

सरस्वतीकोश

दोन्ही भागांची] भाग पहिला [किंमत ८ रुपये

लेखक

विद्याधर वामन भिडे

कॉ/८१

मराठी भाषेचा

सरस्वतीकोश

(मराठी भाषेची उत्पत्ति ह्या विषयावर एक निबंध
आणि अनेक परिशिष्टें यांसह)

हा कोश

विद्याधर वामन भिडे

(अनेक काव्यें, कादंबऱ्या, निबंध, इ० चे कर्ते)

ह्यांनीं रचिला

तो

शंकर नरहर जोशी

मॅनेजर, चित्रशाळा प्रेस, पुणें, ह्यांनीं छापून प्रसिद्ध केला

भाग पहिला

आवृत्ति पहिली

इ० स० १९३०

दोन्ही] किंमत ८ रुपये [भागांची

मुद्रक व प्रकाशक
शंकर नरहर जोशी, 'चित्रशाळा' प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर.

प्रकाशकाचे दोन शब्द

मराठी भाषेचा हौसेनें किंवा परीक्षांसाठीं अभ्यास करणाऱ्या लोकांच्या उपयोगाला येणारा कोश आमच्या मतें आज मराठींत विद्यमान नाहीं. मोल्स्वर्थ्चा मराठीइंग्रेजी कोश हा इंग्लंडांतून हिंदुस्तानांत आलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांना आणि मिशनऱ्यांना मराठी भाषेचें कामचलाऊ ज्ञान करून देण्याच्या उद्देशानें शंभर वर्षांच्या मागें रचिलेला होता, तो मराठी भाषेच्या अभिवृद्ध्यर्थ रचिलेला नव्हता. ह्या कारणांमुळें तो महाराष्ट्रीयांच्या उपयोगी पडण्याजोगा नव्हता. शिवाय त्या कोशांत हिंदू लोकांच्या देवांची, धर्मांची, चालीरीतींची, वाङ्मयाची, संस्कृतीची, धार्मिक आणि आचाररूढ संस्कारांची, ब्राह्मणांची, आणि पंडितांची जागोजाग टवाळकी केलेली असल्यामुळें आणि पुष्कळ अर्थ अशुद्ध आणि अपुरे असल्यामुळें तो कोश महाराष्ट्रीयांच्या आदरास कधींच पात्र झाला नाहीं, आणि शिवाय मराठे लोक इंग्रजी राज्याच्या स्थापनेनंतर इंग्रजी भाषेचा झपाट्यानें आणि अहमहमिकेनें अभ्यास करूं लागल्यामुळें इंग्रज अधिकाऱ्यांना आणि मिशनऱ्यांना मराठी भाषा शिकण्याचें प्रयोजन उरलें नाहीं. तसेंच त्या पिढीच्या मऱ्हाठ्यांना इंग्रज लोकांच्या संघट्टनाच्या योगानें मराठी भाषा तुच्छ वाटूं लागल्यामुळें तो कोश लवकरच रद्द पडला आणि त्याच्या पुढच्या आवृत्त्या छापवून तो सद्यःस्थितीपर्यंत आणून ठेवण्याची सरकारास आवश्यकता वाटली नाहीं. इ० स० १८५७ नंतरच्या मराठी भाषेचें स्वरूप अर्थात् त्यांत दिसत नाहीं.

दुसरा कोश ' महाराष्ट्र भाषेचा कोश. ' हा कोश सरकारच्या आज्ञेवरून बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, सखारामशास्त्री जोशी, दाजीशास्त्री शुक्ल, आणि परशुरामपंत गोडबोले, ह्या पांच पंडितांनीं रचिलेला असून त्यांत मराठी शब्दांचे मराठींत अर्थ दिलेले आहेत. हा कोश ह्या नामांकित पंडितांच्या लौकिकास शोभणारा होता. त्यांतील अर्थ शुद्ध आहेत आणि त्याची भाषा शास्त्रीलोकांच्या कांटेकोर सरणीची आहे; परंतु त्यांत शब्द, वाक्प्रचार, म्हणी, इ० चा संग्रह फार थोडा आहे. हा कोश १८२९ सालचा म्हणजे शंभर वर्षांमागचा असल्याकारणानें मराठी भाषेच्या आजच्या अभ्यासकाला तो पुरे पडण्यासारखा नाहीं. मोल्स्वर्थ्चा कोश सरकारला पुनर्मुद्रित करण्याची जशी जरूरी भासली नाहीं, तशी ह्याही कोशाच्या संबंधानें भासली नाहीं, तेणेंकरून हाही कोश आज उपलब्ध नाहीं.

ह्या दोन कोशानंतर इतर कोश मराठी भाषेमध्यें सात आठ झाले. ह्या कोशांचें ध्येय अत्यंत आकुंचित असल्याकारणानें सर्वसामान्य मराठीच्या विद्यार्थ्यास किंवा अभ्यासकास त्यांचा विशेष उपयोग होण्याजोगा नव्हता. शिवाय ते सर्व कोश आज

अनुपलब्ध आहेत. ह्या सात आठ कोशांत 'मराठी शब्दरत्नाकर' ह्या एका कोशाचा प्रामुख्यानें निर्देश केला पाहिजे. तो कोश नुकतेच कै० वा० झालेले वासुदेव गोविंद आपटे ह्यांनीं मोठ्या मेहनतीनें रचिलेला असून तो आज उपलब्धही आहे. ह्या कोशांत मराठी शब्दांचा बराच मोठा संग्रह असून अर्थही काळजीपूर्वक दिलेले आहेत. हा कोश त्याच्या कर्त्यानें डोळ्यापुढें टेविलेल्या धोरणाप्रमाणें चांगला असून उपयुक्त आहे. परंतु ह्या कोशाचा विस्तार अत्यंत आकुंचित आहे. ह्या कोशांत सर्व कांहीं बाबतींचा अंतर्भाव झाला आहे पण तो अत्यंत अल्प प्रमाणांत आहे आणि भाषेच्या विशेष अभ्यासाला पुरे पडण्यासारखा नाहीं.

मराठी भाषेची कोशाच्या बाबतींत असलेली ही उणीव कांहीं अंशीं भरून काढावी ह्या उद्देशानें आम्ही ही कामगिरी विद्याधर वामन भिडे यांचेकडे सोंपविली. हे गृहस्थ काव्यें, कोश, कादंबऱ्या, गोष्टी, निबंध, इ० त्यांच्या कृतींनीं आज चाळीस वर्षें महाराष्ट्रीयांच्या परिचयाचे असून शिवाय मराठी भाषेच्या अभ्यासास उपयोगी पडणारीं वाक्प्रचार, म्हणी, अर्थालंकार, व्युत्पत्ति, इ० विषयांवरील त्यांचीं पुस्तकें आज कित्येक वर्षें हजारो विद्यार्थी शिकत आहेत. अशा ह्या पंडितांना हा कोश जो आम्हीं रचावयास सांगितला तो आज आम्ही महाराष्ट्रीयांस सादर करीत आहों. सर्व मराठी शब्दांचें सर्वांग परिपूर्ण स्पष्टीकरण करावें अशी आमची ह्या कोशकारांस विनंती नव्हती. तथापि मराठी भाषेंतील महत्त्वाचे बहुतेक शब्द, वाक्प्रचार, म्हणी, आणि विविध माहिती ह्यांत समाविष्ट करावी आणि ग्रंथ तर फारसा मोठा होऊं देऊं नये, अशी आमची त्यांस मोघम सूचना होती. ह्या आमच्या सूचनांना अनुसरून हा कोश सदरहू गृहस्थांनीं तयार केला आहे. तो त्यांच्या हातून कसा उतरला आहे हें ठरविणें महाराष्ट्रीयांचें काम आहे.

ह्या कोशाला मुद्दाम लाँगप्रायमर टाईप वापरला आहे तेणेंकरून पुष्कळ मजकूर थोडक्या जागेंत आम्हाला ठासून भरतां आला आहे. ह्या कोशाची पृष्ठसंख्या २०६० च्यावर आहे. ह्या मानानें त्याची आठ रुपये किंमत ही कोणाला विशेष जड वाटणार नाहीं. वापरणाऱ्यांच्या सोयीसाठीं बाइंडिंगमध्यें ह्या कोशाचे दोन भाग पाडले आहेत.

ह्या कोशाला महाराष्ट्रांतील सर्व ग्रंथसंग्रहालयें, शाळा, कॉलेजें, आणि हौसी कुटुंबें उदार आश्रय देतील अशी आम्हाला उमेद आहे.

पुणें, सदाशिव पेठ, घ. नं. १०२६
१५ सप्टेंबर १९३०

म्यानेजर,
चित्रशाळा स्टीम प्रेस, पुणें.

प्रस्तावना

१ **नमुना**—चित्रशाळेचे हौसी आणि उत्साही मालक रा. रा. वासुदेव गणेश ऊर्फ वासुकाका जोशी यांनीं आमचेवर हा कोश करावयाची कामगिरी सोंपविली तेव्हां कोश कोणच्या नमुन्यावर करावा हें ठरविणें जरूर झालें.. पुष्कळ विचार करून आम्हांला जो नमुना पसंत पडला तो आजपर्यंत मराठी भाषेच्या कोणाही कोशकारांनीं अनुसरलेला नाहीं. हा नमुना आम्ही शोधून काढला असें श्रेय आम्ही घेऊं इच्छीत नाहीं, पण तो नमुना मराठी भाषेस लागूं करण्याची जोखीम आम्हालाच घ्यावी लागत आहे. आमच्या मतानें उत्तम म्हणून जो नमुना आम्ही प्रथम स्वीकारला, तो या कोशाच्या कामांत जसजशी आमची प्रगति होत गेली तसतसा तो आम्ही आपल्या सोयीप्रमाणें प्रसंगविशेषीं बदलून घेतला आहे. ह्या कारणामुळें आणि इतर अनेक अडचणींमुळें ह्या कोशाच्या रचनेचें काम एकाच नमुन्याबरहुकुम उतरलें नाहीं. समग्र कोशाची रचना अगोदर समाप्त करून नंतर छापण्याचें काम सुरूं केलें असतें तर रचनेमध्यें आरंभापासून अखेरपर्यंत एका सरणीचा अवलम्ब आम्हांला करतां आला असतां आणि क्वचित् स्थळीं झालेली विषमता नाहींशी करतां आली असती; परंतु हा कोश रचणें आणि छापणें हीं दोन्ही कामें एकदमच चाललेलीं होतीं. हस्तलिखितांचीं पानें लिहिल्याबरोबर छापखान्यांत पाठविलीं जात असत, आणि तीं कम्पॉझिटरकडून तावडतोब टाइपांत घातलीं जात असत, आणि फॉर्म पूर्ण होतांच तो यंत्रावर छापून टाकला जात असे. रचाईच्या कामांत प्रगतीनें आम्हाला प्राप्त झालेल्या अनुभवानुरूप सरणींत सुधारणा करणें ती छापून गेलेल्या कामांत आम्हांला करतां आली नाहीं. अर्थात् ती पुढच्याच रचाईंत करतां आली. सर्व ग्रंथांतील सरणी स्थूलमानानें जरी एक आहे तरी ती किरकोळ बाबतींत कांहीं कांहीं ठिकाणीं वर निर्दिष्ट केलेल्या कारणांमुळें भिन्न आहे, हें आम्ही कबूल करतों. परंतु सरणीच्या या विषमतेमुळें विद्यार्थ्यांची कोठेंही दिशाभूल होणार नाहीं किंवा त्याला कोठेंही घोटाळ्यांत पडावें लागणार नाहीं हें आम्ही खात्रीनें सांगतों.

२ **शब्दांची निवड**—ह्या कोशामध्यें कोणचे शब्द समाविष्ट करावे आणि कोणचे गाळावे हें आमचें आम्हीच ठरविलें आहे. अगदीं अशिक्षित अशा लोकांच्या भाषणांत जे शब्द येतात,—जे शब्द अभिजात वाङ्मयांत येत नाहींत,—ते वगळावे असें आमचें मत प्रथम होतें परंतु नंतर आम्हाला हें मत थोडेंसें बदलावें असें वाटलें. जे शब्द पुढें कालें-करून अभिजात वाङ्मयामध्यें येणें आम्हाला शक्य किंवा संभवनीय वाटलें, ते या कोशांत समाविष्ट करून घ्यावयास हरकत नाहीं असें आम्हांला वाटल्यावरून आम्ही बरेच प्रसंगीं तसें केलें आहे.

३ **प्रतीकांतील सामासिक शब्द, वाक्प्रचार, इ०**—प्रतीकांतील प्रधान शब्दापुढें दुसरे शब्द येऊन जे संयुक्त शब्द झाले आहेत ते देतांना आम्ही पहिल्या

पहिल्यानें त्या प्रधान शब्दाबद्दल संस्कृत, इंग्रजी, इ० कोशांच्या सरणीप्रमाणें रेघ ओढून पुढचा शब्द देण्याचा क्रम ठेविला होता. अंक, अंग, अग्नि, अग्र, इ० शब्दांनीं घटित जे सामासिक शब्द ते ह्या सरणीनें आम्ही दाखविले आहेत. परंतु कोशाची रचना अशा सरणीनें चालली असतां पुढें आम्हांला असें वाटूं लागलें कीं प्रतीकांतील प्रधान शब्द आणि पुढचा शब्द यांचा संधि करणें संस्कृत संधींचे नियम ठाऊक नसलेल्या विद्यार्थ्याला साधणार नाहीं. तसेंच मराठी संधिनियमांप्रमाणें कधीं पूर्वरूप संधि होतो आणि कधीं पररूप संधि होतो आणि कधीं कधीं तर तिसऱ्याच एका प्रकारें संधि होतो. विद्यार्थ्यांना शुद्ध रूप बनवितां येणार नाहीं असें आम्हांस वाटल्यावरून प्रतीकांतील प्रधान शब्द रेघेनें न दर्शवितां तो समस्त शब्दाच्या रूपांतच देण्याचा क्रम आम्ही पुढें सुरू केला. याच्या योगानें कांहीं जागा फुकट गेली तरी विद्यार्थ्यांची अधिक सोय होईल.

४ गांवढळ शब्द—अगदीं ग्राम्य आणि अशिक्षितांच्याच भाषणांत येणारे शब्द न द्यावे असा जरी आमचा संकल्प होता तरी तसे कांहीं शब्द आम्ही मुद्दाम दिले आहेत. याचें कारण असें कीं अशा कांहीं शब्दांपासून अन्य शब्दांच्या संयोगानें झालेले शब्द सुशिक्षित लोकही वापरतात. ते शब्द देतां यावे म्हणून पहिल्या प्रकारचे शब्द स्वतंत्रपणें जरी योजण्यांत येत नाहींत तरी दिले आहेत; उ० 'लई,' 'लय,' हा शब्द जरी सुशिक्षित लोक वापरीत नाहींत, तरी 'लयलूट' हा शब्द वापरतात. म्हणून आम्ही ' लई,' 'लय' हा शब्द आमच्या कोशांत घेतला आहे.

५ शब्दांचे अर्थ—एका शब्दाचे अनेक अर्थ आम्ही वेगळ्या वेगळ्या अंकांनीं निर्दिष्ट केले आहेत. व्युत्पत्तीशीं सन्निकृष्ट अर्थ अगोदर देऊन नंतर विप्रकृष्ट अर्थ आणि लाक्षणिक अर्थ आम्ही दिले आहेत. तसेंच शब्दांचे प्रचारांत विशेष येणारे अर्थ अगोदर देऊन नंतर क्वचित् येणारे अर्थ क्रमानें दिले आहेत. कांहीं संस्कृत शब्द मराठींत योजले जात नाहींत परंतु त्या शब्दांच्या अंतर्भावानें झालेले संस्कृत सामासिक शब्द मराठींत रूढ आहेत. अशा सामासिक शब्दांचा अंतर्भाव या कोशांत करतां यावा म्हणून आम्ही ते संस्कृत शब्द ह्या कोशांत अर्थासह यथास्थानीं देऊन पुढें तद्घटित सामासिक शब्दांचे अर्थ दिले आहेत. ही सरणी महाराष्ट्रीयांस मान्य होईल अशी आम्हाला उमेद आहे. उदाहरणार्थ 'प्राक्' हा शब्द मराठींत योजीत नाहींत तरी प्राक्तन, प्राङ्मुख, प्रागभाव, हे शब्द मराठींत योजण्यांत येतात; म्हणून ' प्राक् ' हा शब्द आम्ही ह्या कोशांत प्रधान शब्द म्हणून यथास्थानीं देऊन त्या प्रतीकांत फुलापुढें प्राक्तन, प्राङ्मुख, प्रागभाव हे सामासिक शब्द देऊन ते स्पष्टवले आहेत. ' सकृत् ' म्हणजे एकदा हा मराठींत न येणारा शब्द प्रधान शब्द म्हणून देऊन त्यांत फुलापुढें ' सकृद्ग्राही ' आणि ' सकृद्दर्शनीं ' हे शब्द स्पष्टविले आहेत. ' सत् ' म्हणजे असणारा, होणारा, किंवा चांगला, हा शब्द मराठींत नाहीं, पण तो शब्द प्रधान शब्द म्हणून देऊन फुलापुढें सदंजन, सदाचरण, सत्कार, सच्चिदानंद, सद्गति, सत्पथ, इत्यादि सामासिक शब्द स्पष्टविले आहेत.

६ कंसांचा उपयोगः—शब्द, वाक्प्रचार, इत्यादींचे अर्थ स्पष्टावतांना आम्ही शेकडों स्थळीं कंसांचा भरपूर उपयोग केला आहे. विशेषणांचे अर्थ देतांना विशेष्यें कोणचीं येऊं शकतात तीं कंसांत दिलीं आहेत. उदाहरणार्थ शांत, कुरकुरीत, खरमरीत, खुपरा, फुटका, वळींव, पिळपिळीत, इ० विशेषणांचे अर्थ पाहिल्यास आमच्या म्हणण्याचा वाचकांना बोध होईल. क्रियाविशेषणांचे अर्थ देतांना तीं कोणच्या क्रियापदांचीं किंवा विशेषणांचीं किंवा दुसऱ्या क्रियाविशेषणांचीं विशेषणें असूं शकतात तें कंसांत दिलें आहे. क्रियापदांचे अर्थ देतांना कर्तृपदें किंवा कर्मपदें कोणचीं असूं शकतात आणि कोणत्या रूपांत असूं शकतात हें पुष्कळ प्रसंगीं कंसांत त्या त्या ठिकाणीं आम्ही निर्दिष्ट केलें आहे. उदाहरणार्थ रापणें, भिकटणें, वेढणें, वेधणें, फाटणें, हीं क्रियापदें पहा.

७ व्युत्पत्तिः—मराठी भाषेंतील शब्दांच्या व्युत्पत्ति निश्चितपणें ठरवावयाला जितकी साधनसामुग्री आवश्यक आहे तितकी आज आमच्या मतें उपलब्ध नाहीं आणि जी आहे ती संघटित स्वरूपाची नाहीं. आम्हाला जितकी माहिती मिळवितां आली तितकी विचारांत घेऊन आम्ही या कोशांतलि शब्दांच्या व्युत्पत्ति दिल्या आहेत. त्या व्युत्पत्तींच्या बाबतींत कांहीं पंडितांचा आमच्याशीं मतभेद होण्याचा संभव आहे. एका पंडितानें आबरू (मानार्हता) या शब्दाची व्युत्पत्ति संस्कृत आ (उपसर्ग) + ब्रू (बोलणें) अशी दिलेली आमच्या पाहाण्यांत आलेली आहे. ही व्युपत्ति आम्हाला मान्य नाहीं. आम्ही या कोशांत दिलेल्या व्युत्पत्ति कित्येकांना मान्य न होणें शक्य आहे. ज्या शब्दांच्या व्युत्पत्ति आम्हांला ठरवितां आल्या नाहींत त्यांच्या व्युत्पत्ति आम्ही दिल्या नाहींत.

८ व्युत्पत्तीच्या बाबतींत आणखीही एका गोष्टीचा निर्देश केला पाहिजे. भाषेंतील शब्दांच्या व्युत्पत्ति देण्याचे दोन प्रकार कोशकार अवलंबितात. एक प्रकार फक्त अगदीं मूळचा उगम देणें हा आहे. दुसरा प्रकार असा कीं शब्द प्रत्यक्ष ज्या भाषेंतून घेतलेला असेल ती भाषा प्रथम सांगून नंतर त्या भाषेंत तो कोणच्या भाषेंतून घेतलेला आहे हें सांगणें. आम्ही या कोशांत बहुधा पहिला प्रकार अवलंबिला आहे. जे मराठी शब्द संस्कृत, अरबी, फार्शी, हिंदुस्थानी, इत्यादि भाषांतून आले आहेत त्या शब्दांचा आम्ही अगदीं मूळचा उगम दाखविला आहे. ते शब्द प्रथम अन्य भाषांत जाऊन त्या अन्य भाषांतून ते शब्द मराठींत आलेले असले तरी त्या मध्यंतरींच्या भाषांचा आम्ही निर्देश केला नाहीं.

९ परभाषेंतून मराठींत आलेले जे शब्द,–ज्यांना मराठी भाषेनें आपल्यांत पूर्णपणें सामील करून घेतलें आहे,–ते मराठी भाषेचे शब्द होऊन ते मराठी भाषेच्या सर्व नियमांस पात्र होतात; आणि त्यांना मराठी प्रत्यय लागूं शकतात आणि ऱ्हस्वदीर्घादि संस्कार मराठीच्या सरणीप्रमाणें त्यांचेवर होऊं शकतात आणि समासादिकांत ते मराठी शब्दांच्या शेजारीं हक्कानें बसूं शकतात. हें तत्व आम्ही व्युत्पत्ति देतांना बहुधा दृष्टीपुढें ठेविलें आहे. उदाहरणार्थ आम्ही 'नरमणें' हा शब्द घेतों. फार्शी भाषेंतील 'नर्म्' पासून 'नरम' हें मराठी विशेषण बनलें आहे. 'नरमणें' हें

मराठी क्रियापद. ' नरम ' या मराठी विशेषणापासून साक्षात् आणि ' नर्म् ' या फारशी विशेषणापासून परंपरेनें आलेलें आहे. ' नरमणें ' या क्रियापदाची व्युत्पत्ति ' नरम ' या मराठी शब्दावरून आम्हीं दिली आहे ती या तत्त्वावर. वास्तविक रीत्या ' नरमणें ' हें क्रियापद ' नरम ' या मराठी शब्दापासून झालें आहे आणि ' नरम ' हा मराठी शब्द ' नर्म् ' या फार्शी शब्दापासून आला आहे असें म्हणणें हा पक्ष आणि ' नरमणें ' हें क्रियापद एकदम फार्शी ' नर्म् ' शब्दापासून व्युत्पादणें हा पक्ष, हे दोन्ही एकरूपच आहेत, परस्परविरोधीं नाहींत. दुसरें उदाहरण ' दम ' हें आम्हीं घेतों. ' दम् ' या फार्शी शब्दाचा अर्थ ' श्वास ' असा आहे. मराठींत हा शब्द पुल्लिंगी नाम म्हणून आपण स्वीकारलेला आहे. या पुल्लिंगी नामापासून ' दमणें ' हें क्रियापद झालें आहे. ' दमणें ' या क्रियापदाची व्युत्पत्ति फार्शी ' दम् ' यापासून न देतां मराठी ' दम ' पासून देणें यांत कांहीं वावगें नाहीं असें आम्हाला वाटतें. या विषयांवर पंडितांची मतें पडतील तीं दुसऱ्या आवृत्तींत विचारांत घेतलीं जातील.

१० परभाषांतून मराठींत आलेले शब्द मूळच्या रूपांतच असले तर चौकोनी कंसांत फक्त त्या भाषांचा निर्देश आम्हीं केला आहे. मराठींत येतांना ह्या शब्दांचीं रूपें बदललेलीं असलीं तर परभाषांतील रूपें आम्ही बहुतेक ठिकाणीं चौकोनी कंसात निर्दिष्ट केलीं आहेत.

११ कित्येक अरबी शब्द प्रथम फारशींत गेल्यावर नंतर फारशींतून आपण घेतले आहेत. कित्येक अरबी शब्दांना फारशी प्रत्यय लागल्यावर आपण ते उचलले आहेत. अशा शब्दांची व्युत्पत्ति आम्ही अरबी अशी मूळ दाखविली आहे. क्वचित्प्रसंगीं ती फारशी म्हणून दाखविली आहे. हे दोन्ही प्रकार मराठी भाषेच्या दृष्टीनें वावगे नाहींत असें आम्हाला वाटतें. ' खबर ' (बातमी) हा अरबी शब्द असून त्याचें त्या भाषेंत ' अखबार ' असें अनेकवचन होतें. ह्या अरबी अनेकवचनाला फारशी भाषेंतील ' नविश्तन् ' (लिहिणें) ह्याचें ' नवीस् ' हें रूप जोडलें जाऊन ' अखबार नवीस् ' हा फारशी शब्द बनला तो आपण मराठींत घेतला. त्याची धोपटमार्गी व्युत्पत्ति अरबी किंवा फारशी देणें हें मराठीच्या दृष्टीनें क्षम्य आहे असें आम्हास वाटतें.

१२ व्युत्पत्तीच्या बाबतींत आम्ही छातीठोकपणें बोलावयाला असमर्थ आहों. आम्ही दिलेल्या व्युत्पत्तींकडे महाराष्ट्रीयांनीं एका व्यक्तीचें मत ह्या दृष्टीनें पहावें अशी आमची विनंती आहे.

१३ अवतरणें—या कोशांत दिलेले जे शब्दांचे अर्थ त्यांच्या समर्थनार्थ अभिजात किंवा प्रमाणभूत ग्रंथांतील वाक्यें दिल्यानें कोशाची मनोरंजकता वाढून तो रिकामपणीं पानें चाळावयाच्याही उपयोगाचा झाला असतां परंतु अशीं वाक्यें दिल्यानें ग्रंथविस्तार मर्यादेबाहेर होईल म्हणून तसें आम्ही केलें नाहीं; तथापि शब्दांचे अर्थ स्पष्टावण्यासाठीं किंवा वाक्यांत ते शब्द कसे बसवावयाचे हें दाखविण्यासाठीं लहान लहान उदाहरणें भरपूर घातलीं आहेत. हीं बहुतेक उदाहरणें आम्ही बनविलेलीं आहेत. कांहीं उदाहरणें पूर्वीच्या कोशांतून जशींच्या तशींच किंवा कांहीं किरकोळ फेरफार करून घेतलीं आहेत.

१४ ह्या कोशांत नाहीं काय ? मराठी भाषेमध्यें अनुकरणवाचक शब्द घडविण्याचें अमर्याद सामर्थ्य आहे. ह्या सामर्थ्याच्या जोरावर आपण हावा तो आवाज, हावा तो वेग, किंवा क्रियेचा हावा तो प्रकार दाखविण्याला अनुरूप अशीं नामें, क्रियापदें, विशेषणें, किंवा क्रियाविशेषणें जेव्हांच्या तेव्हां घडवूं शकतो. कडकडाट, कडाकडा, किटकिट, कुटकुट, करकरणें, किरकिरणें, कुरकुरणें, इत्यादि शब्द आपण अनुरूप अशीं दोन किंवा तीन व्यंजनें, अनुरूप प्रत्यय, आणि अ, आ, इ, उ, हे स्वर घेऊन बनवितों. असे शब्द असंख्य आहेत पण ते आम्ही क्वचित् दिले आहेत.

१५ अप्रचलित शब्दः—ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, इत्यादींनीं आपल्या काव्यांत योजलेले पण आज प्रचारांतून गळालेले शब्द किंवा अर्थ ह्या कोशांत द्यावे असा आमचा प्रथम संकल्प होता आणि या संकल्पाप्रमाणें पहिल्या सुमारें ७५ पानांपर्यंत ते शब्द किंवा अर्थ आम्ही या कोशांत संगृहीत केले. हे शब्द आम्ही महीरपी कंसांत गराडून दाखविले आहेत. परंतु पुढें प्रकाशकांनीं तसे शब्द किंवा अर्थ यांचा एक स्वतंत्र कोश करण्याचा आपला विचार आहे आणि ते आम्ही या कोशांत देऊं नयेत असें आम्हांस सांगितल्यावरून ते आम्ही देण्याचें बंद केलें; पण ते सर्वथैव बंद केलें असें नव्हे. असे आज भाषेंतून गळालेले पुष्कळ शब्द किंवा अर्थ आम्ही या कोशांत दिले आहेत, पण ते महीरपी कंसांनीं न गराडतां दिले आहेत.

१६ तसेंच आपले मागल्या पिढ्यांचे बखरकार, कारकूनी कामाकडचे लोक, इ० च्या वापरण्यांतील शब्द जे आज अप्रचलित आहेत तेही आम्ही ह्या आमच्या कोशांतून बहुतेक गाळले आहेत. तसेंच कोष्टी, सुतार, पाथरवट, गवंडी, खलाशी, शेतकरी, इ० च्या धंद्यामध्यें, तसेंच तालमीचे आणि मर्दुमीचे व्यवसाय, इ० मध्यें आज प्रचलित असलेले हजारों शब्द आम्हांला स्थलाभावीं देतां आले नाहींत. इतकेंच काय तर ज्योतिष, वैद्यक, सांख्य, न्याय, वैशेषिक, मीमांसा, वेदान्त, गणित, इ० तील हजारों शब्द स्थलाभावीं आम्हांला देतां आले नाहींत. तसेंच हजारों म्हणी, हजारों वाक्प्रचार, हजारों संप्रदाय, इ०नांही या कोशांत आम्हाला स्थल देतां आलें नाही. हें सर्व दिलें असतें तर हा कोश कितीतरी पटींनीं अधिक विस्तीर्ण झाला असतां आणि ग्राहकांच्या ऐपतीबाहेर गेला असतां. अत्यन्त महत्त्वाचें असें जें कांहीं आम्हास वाटलें, त्याचा अंतर्भाव ह्या कोशांत आम्हाला जितका करतां आला तितका केला आहे. ह्या कोशाच्या शेवटीं घालावयाला संकलित माहितीची सुमारें पाउणशें परिशिष्टें आम्ही तयार करून ठेविलीं होती तींही ग्रंथ विस्तारभयास्तव आम्ही मागाहून बहुतेक रद्द केलीं.

१७ आम्हीं अवलोकिलेलीं पुस्तकें—मागच्या तीन पिढ्यांतील सर्व कोशांमध्यें पांच शास्त्र्यांचा 'महाराष्ट्र भाषेचा कोश' हा महत्त्वाचा होय. हा कोश सरकारच्या आज्ञेवरून रचण्यांत आला. तो इ० स० १८२९ ह्या सालीं मुद्रित झाला. हा कोश बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, सखारामशास्त्री जोशी, दाजीशास्त्री शुक्ल, आणि परशुरामपंत

ताल्या गोडबोले, ह्या पांच शास्त्र्यांनीं रचिलेला आहे. ह्यांत दिलेले अर्थ आणि पारिभाषिक शब्दांचीं लक्षणें हीं काळजीपूर्वक दिलीं आहेत. अव्याप्ति आणि अतिव्याप्ति हे दोष ह्या कोशांत शास्त्र्यांनीं होऊं दिले नाहींत. आपले जुने आणि हल्लींचे शास्त्री आपल्या भाषणांत आणि लेखनांत कांहीं न्यूनें राहूं न देण्याविषयीं जपत असत आणि जपत असतात. त्यामुळें त्यांची भाषा बोजड होते. त्याचप्रमाणें ह्याही पांच शास्त्र्यांच्या कोशांची भाषा बोजड झाली आहे. तथापि ह्या बोजडपणामुळें हा कोश चाळणाराला अर्थबोध व्हावयाला कांहीं अडचण पडत नाहीं. ह्या कोशाचा आम्हाला चांगलाच उपयोग झाला. दुसरा कोश के० वासुदेव गोविंद आपटे यांचा इ० स० १९२२ सालीं छापलेला ‘ मराठी शब्दरत्नाकर ’ होय. आपटे ह्यांच्या कोशांत सर्व गोष्टींचा संग्रह करण्यांत आलेला आहे. पण तो अत्यल्प प्रमाणांत करण्यांत आला आहे. मराठी भाषेंतील आज अप्रचलित शब्द, आज प्रचलित शब्द, म्हणी, संप्रदाय, इत्यादि गोष्टी ह्या कोशांत दिलेल्या असून शिवाय इंग्रेजींतून मराठीनें जे शब्द घेतले आहेत तेही दिले आहेत. हा कोश रचणाऱ्या गृहस्थानें जितक्या विस्ताराचा कोश करावयाचें ठरविलें होतें तितक्या विस्तारांत त्याला जें घालतां आलें तें त्यानें ठासून घातलें आहे. आमचा कोश आपटे ह्यांच्या कोशाहून पुष्कळच पटींनीं मोठा करावयाचा आमचा संकल्प असल्याकारणानें आम्हांला अर्थातच ह्या कोशाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तथापि आम्ही त्यांतील प्रत्येक शब्द नजरेखालीं घातला आहे. आपटे ह्यांनीं आपली संकल्पित विस्ताराची जी मर्यादा आखून घेतली होती ती मर्यादा विचारांत घेतली असतां त्यांची कृति श्रेयस्कर आहे. तिसरा कोश हा मराठींतून इंग्रेजींत केलेला आहे. इंग्रज लोक महाराष्ट्रांत आले तेव्हां त्यांना आपल्या महाराष्ट्रीय लोकांशीं हरएक प्रकारें विचारविनिमय करण्याचे प्रसंग सदैव येऊं लागले. त्या काळीं इंग्रेजी भाषेचें ज्ञान हल्लीं इतकें महाराष्ट्रांत पसरलेलें नव्हतें म्हणून इंग्रेजी लोकांना विचारविनिमयार्थ मराठी भाषेचें ज्ञान संपादन करणें आवश्यक होतें. म्हणून त्यांनीं एका इंग्रजाला मराठींतून इंग्रेजींत कोश करण्याची आज्ञा केली. ह्या इंग्रजानें मराठ्यांच्या उपयोगासाठीं हा कोश केलेला नव्हता. हा कोश मराठे लोकांत अनेक कारणांमुळें अप्रिय झाला आहे. हा कोश आम्हांलाही पसंत नव्हता तरी आमचे बहुतेक शब्द स्पष्टावतांना ह्या कोशांत दिलेले अर्थ आम्ही वाचले. शिवाय ह्या कोशांतील कांहीं उदाहरणें आम्ही आमच्या कोशांत मूळच्या रूपांत किंवा कांहीं किरकोळ फेरफार करून घेतलीं आहेत ह्याबद्दल आमची कृतज्ञता व्यक्त करणें उचित आहे.

१८ वर सांगितलेल्या तीन कोशांशिवाय आम्हाला जनार्दन विनायक ओक ह्यांच्या गीर्वाणलघुकोशाचा संस्कृत शब्द आणि धातु ह्यांचे अर्थ पाहाण्याच्या कामीं चांगलाच उपयोग झाला. वामन शिवराम आपटे ह्यांचा संस्कृत–इंग्रजी कोशही आम्ही मधून मधून पाहात होतों. नारायण तम्माजी कातगडे उर्फ श्री. पुंडलीक ह्यांचा हिंदी–मराठी कोशही आम्ही

जवळ ठेविला होता. पण कामाच्या घाईमुळें त्याचा आम्हाला कांहीं उपयोग करतां आला नाहीं. प्रो० माधव त्रिंबक पटवर्धन ह्यांचा फारशी मराठी कोश आम्ही फारशी आणि अरबी शब्दांचे अर्थ आणि व्युत्पत्ति ह्यासाठीं पाहात होतों.

१९ ह्या वर निर्दिष्ट केलेल्या पुस्तकांशिवाय अन्य पुस्तकांचा आम्ही कांहीं फारसा उपयोग केला नाहीं. मराठी म्हणींचे संग्रह जे आम्ही केले होते, किंवा इतरांनीं केलेले होते तेही अर्ध्याच्यावर आमचा कोश गेला तेव्हां आम्ही पृष्ठमर्यादा उल्लंघिली जाऊं नये म्हणून पाहाण्याचें सोडून दिलें. राजव्यवहार कोश, गोडबोले यांचा हंसकोश, माधव चंद्रोबांचा संस्कृत शब्दरत्नाकर अथवा संस्कृत–प्राकृत कोश, मुळे यांचा संख्याबोधक दुर्बोध शब्दांचा कोश, गोडबोले यांचा नवीन मराठी कोश, मराठी भाषेचा सुवह कोश, हंस यांचा रत्नकोश, ह्या कोशांचीं नांवें मात्र आमच्या वाचण्यांत आलेलीं आहेत. परंतु हे कोश आम्हांला पहावयाला मिळाले नाहींत.

२० ज्योतिषविषयक व्याख्या आमचे श्वशुर मोरो बल्लाळ धारप ह्यांच्या ‘ सूर्यमाला ’ ग्रंथांतून आम्ही घेतल्या आहेत. तारकापुंज आणि तारे ह्यांचीं नांवें आमचे मेहुणे दामोदर गणेश केळकर यांच्या ‘ आकाशाचे देखावे ’ ह्या पुस्तकांतून घेतलीं आहेत. ह्याशिवाय गोडबोले ह्यांचा ‘ प्राचीन भारतवर्षीय कोश, ’ शिवराम महादेव परांजपे ह्यांचीं तर्कशास्त्रावरील पुस्तकें, पांडुरंग वामन काणे ह्यांचें साहित्यदर्पण, इ० अनेक पुस्तकांची आम्ही प्रसंगविशेषीं मदत घेतली आहे. शिवाय ‘ अर्थालंकारांचें निरूपण, ’ ‘मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ’ ह्या आमच्या पुस्तकांतूनही आम्ही पुष्कळ उतारे घेतले आहेत.

२१ क्षमायाचन—ह्या कोशांत कोणचे शब्द किंवा अर्थ द्यावयाचे आणि कोणचे शब्द किंवा अर्थ न द्यावयाचे हें आमचें आम्ही ठरविलें आहे. जें आम्ही ह्या कोशांत दिलें आहे ते कां दिले किंवा जे गाळलें आहे तें कां गाळलें हें सांगावयाला आम्ही समर्थ आहों. परंतु जें द्यावयाला पाहिजे असून जें आमच्या नजरचुकीनें राहून गेलें असेल त्याबद्दल आम्ही महाराष्ट्रीयांची क्षमा मागतों. कोशाच्या रचनेचे सर्व काम, मुद्रितें तपासण्याचें सर्व काम, आणि इतर जातींचीं सर्व कामें आमचीं आम्हीच केलीं आहेत. ह्या कामीं आम्हांला कोणीही मदतनीस नव्हता. जबाबदारीचा यत्किंचित् अंश वहावयाला आणि कोणत्याही बाबतींत साहाय्य करावयाला दुसरें कोणी माणूस नसतां, आणि हरएक प्रकारें अत्यन्त प्रतिकूल परिस्थिति असतां डोकें शक्य तितकें शांत ठेवून अनेक गोष्टींकडे शक्य तितकें सारखें अवधान ठेवून बेचाळीस महिने अखंड क्रमानें या वयांत हा कोश आम्ही रचिला आहे तो सर्वथैव निर्दोष असणें शक्य नाहीं हें आम्ही जाणून आहों. म्हणून आमच्या ह्या कृतीकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें महाराष्ट्रीयांनीं पहावें अशी आमची त्यांना विनंति आहे. ह्या कोशांतील गुणांचें श्रेय जसें सर्वथैव आमच्या एकट्याकडे आहे, तसें दोषांचेही सर्वथैव धनी आम्ही एकटेच आहों.

विद्याधर वामन भिडे

मराठी भाषेची उत्पत्ति

भाषेचें जीवन

१ मनुष्य, पशु, पक्षी, मासे, हे सृष्टींतील जिवंत पदार्थ स्थलांतर करूं शकणारे आहेत. झाडें हे जिवंत पदार्थ स्थलांतर करूं शकत नाहींत. ह्या दोन्ही कोटींतील पदार्थ जिवंतपणा ह्या धर्मानें सारखे आहेत पण स्थलांतर करण्याच्या बाबतींत वेगळे आहेत. ह्या दोन्ही कोटींतील पदार्थांना उत्पत्ति, स्थिति, आणि मरण, ह्या तीन अवस्था असतात आणि अमुक मनुष्य किंवा वृक्ष केव्हां जन्मास आला, त्याची किती दिवस वाढ झाली, तो कधींपासून जीर्ण होऊं लागला, त्याच्या शक्तीचा ऱ्हास परमावधीस केव्हां गेला, आणि नंतर तो केव्हां मेला, हें आपणास स्पष्टपणें कालनिर्देशपूर्वक सांगतां येतें.

२ भाषा हाही मनुष्यवृक्षादि पदार्थांप्रमाणें जिवंत पदार्थ आहे. परंतु भाषेला जन्म नाहीं आणि मरणही नाहीं. भाषा केव्हां जन्मास आली किंवा मेली ह्या प्रश्नाचें उत्तर ' मनुष्य ह्या सृष्टींत जन्मास आला तेव्हांच भाषा जन्मास आली, आणि मनुष्य ह्या सृष्टींतून नाहींसा होईल तेव्हांच भाषा नाहीशी होईल, ' असें द्यावें लागेल. सारांश, भाषा ही अनादि आहे आणि भाषा ही अमर आहे.

३ वरील सिद्धांत खरे आहेत तरी अमुक भाषा अमुक काळीं जिवंत होती, आणि तमुक भाषा तमुक काळीं मेली, असे आपण शब्दप्रयोग करतों, त्यांचा अर्थ काय? त्यांचा अर्थ असा कीं, ते शब्दप्रयोग खरे आहेत, पण ते सापेक्षत्वें खरे आहेत.

४ मनुष्यवृक्षादींच्या शरीरांतील जुने परमाणु क्रमाक्रमानें बाहेर टाकले जातात आणि नवे परमाणु आंत समाविष्ट करून घेतले जातात, आणि असे फेरबदल सदैव चाललेले असतात, आणि ह्यारूपें जीवनक्रिया चाललेली असते. त्याचप्रमाणें भाषेमध्यें सदैव फेरफार चाललेले असतात. कांहीं शब्द आणि प्रचार ती भाषा बोलणाऱ्यांच्या लक्ष्यांत न येतां गळत असतात आणि कांहीं शब्द आणि प्रचार अशाच अज्ञातरूपें भाषेंत समाविष्ट होत असतात किंवा गरज पडल्याबरोबर मुद्दाम निर्माण केले जाऊन समाविष्ट करून घेतले जातात. अशा सरणीनें कोणत्याही समाजांतील लोकांच्या सोयीला अनुसरून आणि पुष्कळ प्रसंगीं केवळ यदृच्छेनें किंवा उगीचच्या उगीच भाषेचें स्वरूप सदैव बदलत असतें. अशा प्रकारें भाषेचें स्वरूप बदलणें हाच भाषेचा जिवंतपणा.

५ अशा प्रकारें भाषेचें स्वरूप सदैव बदलत असतें तरी कालचीच भाषा आजही आपण बोलत आहों असें प्रत्येक मनुष्याला वाटतें; इतकेंच नव्हे तर आपले वाडवडील जी भाषा बोलत आले तीच आपण कांहीं किरकोळ अपवाद खेरीज करून बोलत आहों असें प्रत्येक मनुष्य म्हणतो. कोणाही मनुष्याच्या आयुर्मर्यादेंत भाषेमध्यें फारसे बदल होऊं शकत

नाहींत, त्यामुळें भाषेच्या तादात्म्याला कांहीं बाध येऊं शकत नाहीं. आपण तीच भाषा बोलत आहों असें प्रत्येकाला वाटतें, आणि खरोखरी तो तीच भाषा बोलत असतो.

६ भाषेमध्यें जे फेरबदल होत असतात ते इतके अल्प आणि सूक्ष्म असतात कीं ते होत आहेत याची जाणीव कोणालाही होऊं शकत नाहीं आणि जरी झाली तरी भाषेचा बदललेला भाग न बदललेल्या भागाच्या मानानें समुद्राच्या वाळवंटांत एका कणाच्या महत्त्वाचा असतो आणि तो हिशोबांत न घेतला तरी चालण्याजोगें असतें. मुलगा बापाला प्रथम ओळखूं लागतो तेव्हां बाप काळ्या केंसांचा, जाडी गात्रांचा, बत्तीस दातांचा, आणि ताठ उभा असा असतो. प्रत्यहीं ह्या बापाला पाहाणाऱ्या मुलाला सत्तराव्या वर्षांचा बाप पांढऱ्या केसांचा, रोड गात्रांचा, दंतहीन आणि कमरेंत वांकलेला, असा दिसतो, तथापि तो आपला बापच असें मुलगा जाणतच असतो. तसेंच आपण आपल्या बागेंत लाविलेलें चिंचेचें झाड प्रथम वीतभर उंच असतें, तेंच आपल्या म्हातारपणीं दशदिशा व्यापणारें आणि गगनभेदी होतें. तथापि तें आपणच लाविलेलें झाड असें आपण म्हणूं शकतों आणि वस्तुतः तें तेंच झाड असतें. त्याप्रमाणें भाषा एका पिढींत कितीही बदलली, तरी ती तीच भाषा असें ती बोलणारा प्रत्येक मनुष्य बिनदिक्कत म्हणतो. भाषा तीच असते. परंतु भाषेतील वर सांगितलेल्या प्रकारचे फेरबदल एका पिढींत जरी तिला ' वेगळी भाषा ' म्हणण्याइतके पुष्कळ नसले, तरी अनेक पिढ्यांच्या कालावधींत ते पुष्कळ होतात. ह्या कालावधीच्या आरंभींचे जें भाषेचें स्वरूप तें इतकें पालटून गेलेलें असतें कीं त्या काळची भाषा आणि ह्या काळची भाषा मध्यंतरीचें परिवर्तन लक्षांत न घेतल्यास अगदीं भिन्न अशा वाटतात, आणि पहिलीपासून दुसरी उत्पन्न झाली असें म्हणण्यांत येतें. वस्तुतः वामदेव, वसिष्ठ, विश्वामित्र, इ० जी भाषा बोलत होते तीच आज सदाशिवराव, जीवानंद, करसनदास, आणि जवाहिरलाल बोलत आहेत.

७ ह्या वर नमूद केलेल्या सिद्धान्ताच्या अनुरोधानें आपण संस्कृत भाषेपासून मराठीची उत्पत्ति ह्या विषयाचा विचार करूं.

८ संस्कृत भाषा मूळारंभीं कोठें होती किंवा कशी उत्पन्न झाली हा प्रश्न बाजूला सारून संस्कृत भाषा हाच विचाराचा प्रस्थानबिंदु आपण धरूं.

आर्यांचा इतिहास

९ आर्यलोक हिंदूकुश पर्वत ओलांडून प्रथम आफगाणिस्तानांत आले आणि ते आफगाणिस्तानांतून इ० स० पूर्वी ४००० वर्षें हिंदुस्तानांत आले. ते सिंधूनदीच्या पूर्वेकडील प्रदेशांत प्रथम पसरले. हा प्रदेश झेलम, चिनाब, रावी, बियास, आणि सतलज, ह्या सिंधूनदीच्या आग्नेयीकडच्या पांच नद्या आणि कुभा अथवा काबूल आणि क्रमू अथवा कुर्रम ह्या पश्चिमेकडच्या दोन नद्या, ह्या सात नद्या, आणि सिंधु ही आठवी नदी, ह्यामुळें अत्यंत सुपीक असा हा प्रदेश होता आणि आहे.

१० वर सांगितलेल्या सिंधुनदीच्या पूर्वेकडच्या पांच नद्या हिमालयांत उगम पावून पुढें सिंधूनदीला मिळालेल्या आहेत, आणि अशा प्रकारें विशाल झालेली सिंधुनदी पुढें अरबी

समुद्राला मिळते. ह्या सात नद्यांच्या प्रदेशाला आर्य लोक 'सप्त सिंधवः' असें म्हणत आणि पूर्वेकडच्या पांच नद्यांवरून 'पंजाब' (पांच उदकें) हें नांव हल्लींच्या पंजाब प्रांताला प्राप्त झालें आहे. महाभारतांत 'पंचनद' शब्द याच अर्थाचा आलेला आहे (महाभारत उपसंहार पृ. ११८).

११ आर्य लोकांना हा सबंध पंजाबचा प्रदेश व्यापून टाकून अयोध्याप्रांतापर्यंत जाण्याला सुमारें एक हजार वर्षे लागलीं असावीं. हा प्रदेश आर्यांनीं व्यापून टाकला तरी त्यांचा पूर्वेकडे पसरत जाण्याचा एकसारखा क्रम चालू राहून पुढें एक हजार वर्षांत ते थेट ब्रह्मपुत्रानदीपर्यंत गेले. तेथें दक्षिणेकडे समुद्रकिनाऱ्यावर कलिंग हा देश होता. हिंदूकुश ह्या पर्वतापासून तों थेट ब्रह्मपुत्रानदीपर्यंतचा प्रदेश म्हणजे सुमारें १८०० मैल लांबीचा पश्चिम-पूर्व पसरलेला आणि हिमालयापासून तों विन्ध्यपर्वतापर्यंत ७०० मैल रुंदीचा उत्तर दक्षिण पसरलेला प्रदेश हा त्यांनीं इ० स० पू० २००० वर्षे व्यापून टाकला. ह्या प्रदेशाला ते 'आर्यावर्त' म्हणत असत.

१२ ह्या आर्यावर्तांत आर्य लोक आणखी हातपाय न पसरतां सुमारें हजारबाराशें वर्षे राहिले. त्या काळीं विन्ध्यपर्वतावर गगनचुंबित वृक्षांचीं घनघोर अरण्यें असून तेथें राहाणारे रानटी लोक अत्यन्त क्रूर होते, आणि त्यांपैकीं कांहीं जाती तर मनुष्यभक्षक (राक्षस) असत. शिवाय त्या विन्ध्यपर्वताच्या निबिड अरण्यांत शिरणें अतिशय त्रासदायक असे. ह्या कारणामुळें विन्ध्य ओलांडून दक्षिणेकडे येण्याला आर्य लोक बरेच दिवस तयार झाले नाहींत. परंतु दिवसेंदिवस आर्यांची लोकसंख्या वाढत चालली होती, आणि नवीन प्रदेशांत संचार करण्याची जरुरी त्यांना भासूं लागली. तेव्हां आर्यावर्तांतून कांहीं साहसी, धाडसी, आणि पराक्रमी आर्यलोक विन्ध्यपर्वताच्या दुर्लंघ्य रांगा ओलांडून इ० स० पू० ८०० वर्षांच्या सुमारास दक्षिणेंत आले आणि तेथें वसति करून राहिले. पुढें आणखी ३०० वर्षांत ते थेट कन्याकुमारीपर्यंत पसरत गेले (डॉ. भांडारकरांचा दक्षिणचा इतिहास पहा).

१३ आर्य लोक हिंदुस्थानांत इ० स० पू० ४००० वर्षे आले आणि ब्रह्मपुत्रा नदीपर्यंत जाऊन पोंचण्यास त्यांना पुढें २००० वर्षे लागलीं. विन्ध्य ओलांडून ते इ० स० पू० ८०० वर्षे दक्षिणेंत आले आणि इ० स० पू० ५०० वर्षे कन्याकुमारीपर्यंत पसरत गेले. ह्या सुमारें ३५०० वर्षांच्या दीर्घ कालावधींत त्यांच्या भाषेचें स्वरूप कसकसें बदलत गेलें हें आपण पाहूं.

आर्यांची भाषा

१४ आर्यलोकांना हिंदूकुशपर्वतापासून अयोध्याप्रांतापर्यंत येण्याला सुमारें १००० वर्षांचा काळ लागला. ह्या काळांत त्यांनीं वेदांच्या संहितांची रचना केली म्हणून त्याला 'संहिताकाळ' असें पंडितांनीं नांव दिलें आहे. पुढच्या १००० वर्षांत म्हणजे इ० स० पूर्वी ३००० ते २००० वर्षे ते ब्रह्मपुत्रानदीपर्यंत गेले आणि ह्या अवधींत त्यांनीं ब्राह्मणें रचिलीं म्हणून ह्या काळाला 'ब्राह्मणकाळ' असें पंडितांनीं नांव दिलें आहे. ब्राह्मणकाळांतील संस्कृत हें संहिताकाळांतील संस्कृताहून थोडेसें बदललेलें आहे.

१५ ह्यानंतर पुढच्या हजार वर्षांत म्हणजे इ० स० पूर्वी २००० ते १००० वर्षें त्यांनीं सूत्रग्रंथ रचिले म्हणून ह्या काळाला ' सूत्रकाळ ' असें पंडितांनीं नांव दिलें आहे.

१६ ब्राह्मणकाळीं संस्कृताचें जें रूप होतें त्याहून सूत्रकाळांतील संस्कृत किंचित् वेगळें झालें. ह्यानंतर सुमारें दोनतीनशें वर्षांनीं पाणिनि झाला. पाणिनीच्या वेळेस संस्कृत भाषा जिवंत होती आणि त्यानें जें संस्कृत व्याकरण सूत्रबद्ध केलें आहे, तें जिवंत भाषेचें व्याकरण होतें.

१७ पाणिनीच्या नंतर संस्कृत भाषा प्रचारांतून गेली. तिच्या जागीं प्राकृत भाषा रूढ झाल्या, आणि इ० स० पूर्वी ५०० वर्षांच्या सुमारास अयोध्येच्या प्रांतांत बौद्धधर्माचा उदय होऊन त्याचा प्रसार सर्व हिंदुस्थानभर दोनशें वर्षांत झाला. ह्या दोनशें वर्षांच्या अवधीला पंडित लोक ' बौद्धकाल ' म्हणतात. ह्या अवधींत बौद्ध धर्माचें वाङ्मय खूप मोठ्या प्रमाणांत निर्माण झालें. ह्या दोनशें वर्षांच्या अल्प अवधींत बौद्धधर्म हां हां म्हणतां सर्व हिंदुस्थानभर पसरला. बौद्ध धर्म स्वीकारणाऱ्या मौर्यवंशीय अशोक राजानें इ० स० पू० २७२ वर्षें साम्राज्य उभारलें तें इ० स० पू० १८४ वर्षें पर्यंत टिकलें. ह्या राज्यांत बौद्ध धर्माचा हिंदुस्थानांतच नव्हे तर हिंदी महासागरांतील बहुतेक बेटांत प्रसार झाला. हें राज्य अस्तंगत झालें तेव्हां पुन्हा वैदिक धर्म जोरांत आला; परंतु बौद्ध धर्महीं मधून मधून डोकें वर काढीतच होता. इ० स० ९०० वर्षें पर्यंत बौद्धधर्म आणि वैदिक धर्म ह्यांच्यांत झटापटी चालल्या होत्या. कधीं कधीं ह्या धर्माची सरशी व्हावी, कधीं त्या धर्माची. शेवटीं शंकराचार्यांनीं मंडनमिश्राच्या मताचें आणि बौद्ध मताचें खंडन करून वैदिक धर्माला विरुद्ध अशा सर्व मतांचा पाडाव केला. बौद्धधर्म हिंदुस्तानांतून पार नाहींसा झाला. जैन धर्म बौद्ध धर्माच्या अगोदर उत्पन्न होऊन त्या धर्माबरोबरच पसरत चालला होता. परंतु जैनपंडित बौद्धपंडितांइतकें वैदिक धर्मीयांशीं वादाला उभे राहात नसत. ते आपला धर्म पाळून राहात असत. ह्या कारणामुळें वैदिक धर्मीयांनीं त्यांचें उच्चाटन करण्याचा कधींच प्रयत्न केला नाहीं. हे जैन लोक अद्यापिही हिंदुस्तानांत सुखानें आणि समाधानानें नांदत आहेत.

१८. पाणिनीच्या वेळीं संस्कृत भाषा सर्वसामान्य लोकांच्या बोलण्यांतील भाषा होती, आणि त्याचें व्याकरण हें इ० स० पू० ४००० ते इ० स० पू० ८०० वर्षांच्या दीर्घ कालावधींतील भाषेच्या स्वरूपाचें विवेचन करणारें होतें. इतक्या दीर्घ कालावधींत कोणतीही भाषा स्थिररूपें राहाणें शक्य नाहीं. तिच्यांत फेरबदल होत जाणारच. या कारणामुळें पाणिनीला वेदांतील भाषा आणि सामान्य जनाच्या उपयोगांत प्रचलित असलेली भाषा, असे दोन प्रकार करावे लागले आहेत. पहिल्या प्रकारच्या भाषेंतच येणारीं जीं रूपें त्यांना तो छांदस रूपें म्हणतो. प्रचलित भाषेला तो केवळ ' भाषा ' असें म्हणतो. त्याच्या काळच्या प्रचलित भाषेचा तो कोणत्याही नांवानें उल्लेख न करतां तिला तो केवळ ' भाषा ' असें म्हणतो.

१९. आर्य लोक हिंदुस्तानांत आले तेव्हां ते जी भाषा बोलत होते तिला संस्कृत हें

नांव नव्हतें किंवा कांहीं नांव असलें तरी तें आज आपणांस ठाऊक नाहीं. ह्या नवागत आर्यलोकांचें मूळच्या रहिवाशांशीं दळणवळण होऊं लागलें.त्यांच्याशीं त्यांच्या देवघेवी,लढाया, स्वामी, आणि नोकर असे संबंध, शत्रुत्वाचे आणि मित्रत्वाचे व्यवहार, वारंवार घडूं लागले. ह्या कारणांमुळें मूळच्या रहिवाशांच्या भाषांतील शब्द आर्यांच्या भाषेंत शिरत असत, तसेंच आर्यांना नवीन आढळणाऱ्या वस्तूंचे वाचक शब्द त्यांना मूळच्या रहिवाशांच्या भाषांतून घ्यावे लागत,किंवा नवीन निर्माण करावे लागत.अशा रीतीनें आर्यांची भाषा एकसारखी समृद्ध आणि अभिजात होत चालली होती, आणि तिच्या मूळच्या रूपांतही नाना प्रकारचे फेरबदल होत चाललेले होते. भाषेमध्यें नवीन शब्दांची भरती होणें, शब्दोच्चाराच्या सौकर्यासाठीं अक्षरें आणि जोडाक्षरें ह्यांत बदल होणें, विभक्तिप्रत्यय आणि क्रियापदप्रत्यय आणि दुसरें शेकडों प्रकारचे प्रत्यय आणि विकार ह्यांच्यांत फेरबदल होणें, विचार व्यक्त करण्याच्या नवीन नवीन सरणी रूढ होणें, इत्यादि प्रकारचे फेरबदल सदैव चाललेलेच असत.आणि अशा रीतीनें मूळापासून दूर गेलेली आणि मूळच्या रहिवाशांच्या भाषांतील शब्दांच्या स्वीकारानें समृद्ध आणि संपन्न झालेली भाषा आर्यांनीं स्वीकारल्याकारणानें ह्या भाषेला संस्कृतत्व प्राप्त झालें आणि आज जिला आपण संस्कृत म्हणतों ती आर्यांची मूळची भाषा आणि त्या काळच्या येथील मूळच्या रहिवाशांच्या भाषा, ह्यांच्या संकराचें एक रूपच होय. मूळच्या रहिवाशांच्या भाषेच्या अपेक्षेनें आर्यलोकांची भाषा अधिक संपन्न, अधिक समर्थ, आणि अधिक नियमबद्ध असल्याकारणानें ह्या आर्यांच्या भाषेला 'संस्कृत ' हें विशेषण चिकटलें. आणि ' संस्कृत ' हा शब्द मूळचा विशेषण असून तो भाषा दाखवावयासाठीं विशेषनामाच्या दर्जाला चढला आणि त्या भाषेचें नांव ' संस्कृत ' हें झालें.

संस्कृतचे अपभ्रंश

२० आर्यलोक हिंदुस्तानांत आले त्या वेळच्या त्यांच्या भाषेंत त्यांनीं वेदांच्या संहिता रचिल्या. जगांतील अत्यन्त प्राचीनतम वाङ्मय ह्याच संहिता होत. भाषेच्या अखंड प्रवाहाच्या सरणीनें संहितांतलि संस्कृत बदलून तिला ब्राह्मणांतील संस्कृताचें रूप प्राप्त झालें. ब्राह्मणांतील संस्कृत बदलून तें उपनिषदांतील संस्कृत झालें. पुढें भाषेला सूत्रकाळांतील संस्कृताचें रूप प्राप्त झालें. ह्याच काळीं पाणिनीनें आपल्या सूत्रांनीं भाषेला जखडून टाकलें. परंतु भाषा ही स्वच्छंदानें चालणारी आणि वैयाकरणांचे कायदे तिची लहर लागली तरच पाळणारी देवी असल्याकारणानें पाणिनीचे कायदे उल्लंघिण्याचा तिचा क्रम अव्याहत चालूं राहिला. अशा रीतीनें ती बदलत बदलत फारच बदलली आणि अशा क्रमानें पाणिनीच्या काळची संस्कृत भाषा इ० स० पू० सुमारें ५०० वर्षें मृत झाली आणि तिच्या जागीं प्रांतपरत्वें वेगळ्या वेगळ्या प्राकृत भाषा लोकांच्या बोलण्यांत रूढ झाल्या. मृत संस्कृताला स्थिरभाषेचें रूप प्राप्त झालें आणि ह्या रूपांत रघुवंश, शाकुंतल, कादंबरी, इ० हजारो ग्रंथ शेकडों पंडितांनीं रचिले आणि नवीन प्रचलित झालेल्या प्राकृतांतही शेकडों ग्रंथ झपाट्यानें निर्माण होऊं लागले.

२१ भिन्न भिन्न प्रांतांत स्थायिक झालेल्या पंडितांचे परस्परांशीं वादविवाद इत्यादींच्या प्रसंगीं जरी मृत संस्कृतच योजली जात असे तरी ती सामान्य व्यवहारांतून गळून तिच्या जागीं अपभ्रष्ट भाषा रूढ झाल्या. ह्या सर्व अपभ्रष्ट भाषांना संस्कृताच्या अपेक्षेनें 'प्राकृत भाषा' असें सामान्य नांव प्राप्त झालें. ह्या प्राकृत भाषांपैकीं चार प्राकृत भाषा महत्त्वाच्या आहेत. पिशाच लोकांची वसति पंजाबांत असल्याकारणानें पंजाबांतील अपभ्रष्ट रूपाच्या संस्कृताला पैशाची हें नांव, मगधदेशांतील संस्कृताला मागधी हें नांव, शूरसेन ह्या देशांतील संस्कृताच्या अपभ्रष्ट रूपाला शौरसेनी हें नांव, आणि महाराष्ट्रांतील अपभ्रष्ट संस्कृताला महाराष्ट्री असें नांव प्राप्त झालें. पाली ही भाषा अयोध्येच्या प्रांतांत बोलली जात असे आणि ती मागधीचीच पोटभाषा होती. बौद्धधर्माचे बहुतेक सर्व पूज्य ग्रंथ पाली भाषेंत आहेत. जैनांचे धर्मग्रंथ अर्ध मागधींत, पालींत, आणि महाराष्ट्रींत आहेत. आजच्या गुजराथी आणि हिंदी भाषा ह्या शौरसेनीचीं रूपांतरें आहेत. पंजाबी भाषा पैशाचीचें, बंगाली ही मागधीचें, आणि मराठी ही महाराष्ट्रीचें रूपांतर आहे. सारांश, द्राविडी देश वगळून सर्व हिंदुस्तानांत आज ज्या भाषा बोलल्या जात आहेत त्या सर्व संस्कृतापासून उत्पन्न झालेल्या आहेत. त्यांचें संस्कृताशीं कोणतें नातें आहे हें आतां आपण पाहूं.

प्राकृत भाषा

२२ आर्यलोक हिंदुस्तानांत इ० स० पू० ४००० वर्षें आले तेव्हां त्यांना शेतकीचें
उत्तम ज्ञान असून ते कलाकौशल्यांत निपुण होते. रानटी स्थितींतून उत्क्रान्त झाल्यानंतर
त्यांच्यावर सुधारणेचे अनेक संस्कार झालेले होते. त्यांचीं मनें उन्नत असून मनांत येईल
तो विचार व्यक्त करण्याचें त्यांच्या भाषेंत सामर्थ्य होतें. ह्या भाषेंत त्यांनीं वेदाच्या
संहिता, ब्राह्मणें, उपनिषदें, आणि सूत्रग्रंथ निर्माण केलें. ह्या सर्व वाङ्मयाचा रचनाकाळ
इ० स० पू० ४००० ते ८०० वर्षांचा आहे. पाणिनि हा इ० स० पू० ८००
वर्षें असून त्याच्या वेळीं संस्कृत भाषा सर्व लोकांच्या बोलण्यांतील भाषा होती.
आपल्या व्याकरणानें पाणिनीनें जरी भाषेला जखडून टाकलें तरी भाषेची स्वैरवृत्ति
त्याला जखडतां आली नाहीं. भाषा बदलत चाललीच होती आणि पाणिनीच्या सूत्रांचें
उल्लंघन करण्याचा भाषेचा सपाटा चाललाच होता. असें होतां होतां पाणिनीच्या काळची
संस्कृत इतकी बदलून गेली होती कीं तिला मृतत्वाची अवस्था प्राप्त झाली आणि तिच्या
जागीं प्रान्तपरत्वें अनेक प्राकृत भाषा इ० स० पू० ७०० ते ६०० वर्षें प्रचारांत आल्या.
ह्या भाषांपैकीं पैशाची, मागधी, शौरसेनी, आणि महाराष्ट्री, ह्या चार महत्त्वाच्या आहेत.
त्या अनुक्रमें पंजाब, बंगाल, मध्यदेश, आणि महाराष्ट्र, ह्या प्रांतांत जन्मास आल्या. आम्हांला
पहिल्या तीन प्राकृत भाषांसंबंधानें येथें कांहीं बोलावयाचें नाहीं. परंतु ह्या तीन भाषांना निरोप
देण्यापूर्वीं आम्ही येथें हें सांगून टाकतों कीं, पैशाचीचें कालेंकरून रूपांतर होऊन
लहेंडा किंवा पंजाबी ही भाषा झाली, मागधीचें रूपांतर होऊन बंगाली झाली, शौर-
सेनीचें रूपांतर होऊन हिंदी झाली, आणि महाराष्ट्रीचें रूपांतर होऊन मराठी झाली.

२३ वर आम्ही म्हटलें आहे कीं, महाराष्ट्री ही महाराष्ट्राची सामान्य जनांच्या बोलण्याची भाषा इ० स० पू० ७०० ते ६०० वर्षे अस्तित्वांत आली. त्याच भाषेंत विदग्ध वाङ्मय निर्माण होऊं लागलें आणि महाराष्ट्री संपन्न होत चालली. परतु शंकराचार्यानें वेदविरुद्ध धर्मांचा पाडाव करून पुन्हां वैदिक धर्माला चालना दिली. तेव्हां मूळ वैदिकधर्माला संस्कृतांतील आधारभूत ग्रंथांचें अध्ययन करण्याकडे लोकांचें लक्ष्य लागलें. तेणेंकरून महाराष्ट्री आणि इतर सर्व प्राकृत भाषा ह्यांचें महत्त्व आणि त्यांतील वाङ्मयाचें महत्त्व कमी झालें. संस्कृत भाषा आणि संस्कृत वाङ्मय ह्यांचा जोरानें अभ्यास सुरू झाला. मीमांसकांचे आणि विशेषतः शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाचे विचार लोकांस इतके पटले कीं, ते विचार लोकभाषेंत सांगण्याची स्फूर्ति ठिकठिकाणच्या लोकांत उत्पन्न झाली आणि ह्या कारणामुळें महाराष्ट्री आणि इतर प्राकृत भाषा यांना पुन्हां जोराची चालना मिळाली आणि ह्या कामीं संस्कृताचा आश्रय करणें जरूर पडलें. महाराष्ट्रीवर ह्याच स्फूर्तीमुळें संस्कृताचा पगडा बसला आणि महाराष्ट्रीची भाषाशैली जरी तीच कायम राहिली तरी संस्कृतांतून हजारों शब्द लोकांनीं जसेचे तसेच उचलून आपल्या भाषेंत समाविष्ट करून घेतले आणि आपली शब्दसंपत्ति शेकडों पटींनीं वाढविली. महाराष्ट्रीनें संस्कृतांतून पूर्वीं घेतलेले तद्भव शब्द भाषेंत कायम राहून तत्सम शब्दांचा अलोट भरणा भाषेंत झाला आणि जिवंत भाषेच्या सरणीनें ह्या तद्भव आणि तत्सम शब्दांवर भेदनक्रिया सुरू होऊन प्रत्येक शब्दाला विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आणि विचार व्यक्त करण्याची साधनें ह्या दृष्टीनें महाराष्ट्रीमध्यें शब्दांचा भरणा खूप मोठ्या प्रमाणांत झाला. आम्ही अशा तद्भव आणि तत्सम शब्दांच्या कांहीं जोड्या खालीं देतों. ह्या जोड्यांतील दोन्ही शब्द जरी एकाच संस्कृत शब्दापासून मराठीनें घेतले आहेत तरी त्यांचे अर्थ भाषेच्या भेदनक्रियेमुळें भिन्न होऊन दुप्पट शब्द मराठीला मिळाले. पत्र, पातें, पात; चक्र, चाक; यंत्र, जातें; जंतु, जंत; पर्ण, पान; वाणी, बाणी, बाणा; हात, हस्त; कंठ, कांठ; जंघा, जांघ; मस्तक, माथा; पुस्तक, पोथी; कृत्ति, कात (सापाची), कातडें; अंतर, अंत्रा; दंत, दांत, दांता; स्थान, ठाण, ठाणें; युक्ति, युगत; यात्रा, जत्रा; संधि, सांधा; पृष्ठ, पाठ, पुठ्ठा; कर्षण, कसणी; इ०.

२४. संस्कृताच्या अभ्यासाचा दुसरा एक परिणाम भाषेवर झाला तो महत्त्वाचा असून त्याचा निर्देश येथें करणें आवश्यक आहे. संस्कृत भाषा मृत झाली तेव्हां संस्कृतांतील वर्तमान, भूत, भविष्य, इ० काळांचीं क्रियापदांचीं रूपें अपभ्रष्ट रूपांनीं प्राकृतांत योजण्यांत येऊं लागलीं; परंतु संस्कृताच्या अभ्यासाचें महत्त्व वैदिक धर्माच्या पुनःस्थापनेमुळें वाढल्यामुळें पंडितांच्या संस्कृताचा अवलंब सुशिक्षित लोकांनीं सुरू केला आणि काळांचीं रूपें ह्या पंडितांच्या संस्कृतांतून महाराष्ट्रींत प्रचारांत आणिलीं. येथें 'पंडितांचें संस्कृत' हा शब्द आम्ही कोणत्या अर्थानें योजीत आहों हें वाचकांना सांगितलें पाहिजे.

२५. संस्कृत भाषा जिवंत म्हणजे लोकांच्या बोलण्यांतील भाषा होती तेव्हां अत्यन्त

अनियमित रूपें सुद्धां अडाणी लोक, स्त्रिया, आणि मुलें शुद्ध रीतीनें योजूं शकत होती. परंतु संस्कृत भाषा मृत होऊन अपभ्रष्ट रूपें प्राकृत भाषांत समाविष्ट झालीं आणि लोकांच्या विचार-विनिमयाला कांहीं हरकत होत नव्हती. परंतु पंडित लोकांचें असल्या अपभ्रष्ट भाषांनीं समा-धान होण्याजोगें नव्हतें. त्यांच्या मनांत संस्कृताविषयीं आवड आणि प्राकृताविषयीं तिर-स्कार असल्याकारणानें ते ग्रंथरचना आणि एकमेकांशीं वादविवाद संस्कृतांतच करीत. मृत भाषेच्या व्याकरणशास्त्राच्या अर्धवट ज्ञानाच्या जोरावर शुद्ध संस्कृत बोलावयाचें आणि लिहावयाचें हा त्यांचा बाणा असल्याकारणानें त्यांनीं अगच्छत्, जगाम, अजीगमत्, इत्यादि रूपें पाणिनीच्या सूत्रांच्या सांखळीनें न घडवितां गत, गंतव्य, गम्य, इत्यादि आटोपसर रूपें प्रचारांत आणलीं आणि हींच रूपें क्रमानें महाराष्ट्रींत समाविष्ट होऊन त्यांवरून महारा-ष्ट्रींतील क्रियापदांचे काळ अस्तित्वांत आले आणि संस्कृत काळांचीं अपभ्रष्ट रूपें भाषेंतून गळालीं. हल्लींच्या मराठी भाषेंतील वर्तमान इत्यादि काळांचीं रूपें ' पंडितांच्या संस्कृता-' पासून उत्पन्न झालेलीं आहेत.

२६ संस्कृत भाषेपासून महाराष्ट्री झाली.संस्कृत ही महाराष्ट्रीची माता आणि महारा-ष्ट्री ही संस्कृतची कन्या. महाराष्ट्रीपासून मराठी झाली हेंही विधान तितकेंच सत्यमूलक आहे. परंतु संस्कृत मृत झाली तरी तिचा एक ओहोळ मृत न होतां पंडितांच्या समाजांत जिवंत राहिला आणि ह्याच जिवंत ओहोळाचा एक लहानसा पाट महाराष्ट्रीला मिळाला.ह्या-वरून मराठी ही जरा एका दृष्टीनें संस्कृताची नात असली तरी दुसऱ्या दृष्टीनें ती संस्कृताची कन्या आहे असें म्हणावयाला कांहीं हरकत नाहीं. मराठीच्या उत्पत्तिसंबंधानें आम्ही हें जें म्हणत आहों तेंच भाषाशास्त्रज्ञ रा. रा. चिंतामण विनायक वैद्य ह्यांनीं एका लेखांत मार्मिक रीतीनें म्हटलें आहे,-' यासंबंधानें आलंकारिक भाषेनें असें म्हणतां येईल कीं, महाराष्ट्री ही जननी किंवा क्षेत्र असून बीजप्रद पिता संस्कृत, अशा समागमानें मराठी भाषा नवीन उत्पन्न झाली आहे. ' (मराठी भाषेची उत्पत्ति, पान ८).

२७. वरील विवेचनावरून हें सिद्ध होतें कीं मराठीचें संस्कृतशीं नातें नातपणाच्या पलीकडे जाऊं शकत नाहीं.

महाराष्ट्री भाषा

२८ प्राकृत भाषांपैकीं शौरसेनी, मागधी, पैशाची, आणि महाराष्ट्री, ह्या चार मुख्य भाषा होत. ह्या चार भाषांपैकीं महाराष्ट्री ही हल्लींच्या आपल्या मराठी भाषेची साक्षात् जननी होय असें म्हणावयाला हरकत नाहीं.

२९ ही महाराष्ट्री भाषा तिच्या तीन बहिणी ज्या पैशाची,मागधी, आणि शौरसेनी, त्यांच्या मानानें पुष्कळच अधिक संपन्न होती आणि महाराष्ट्रीची ही संपन्नता उत्तर हिंदु-स्तानांत मान्य झालेली होती. ह्या महाराष्ट्री भाषेमध्यें महाराष्ट्रीय पंडितांनीं ज्योतिष, गणित, अध्यात्म, वेद, काव्यें, नाटकें, इ० वाङ्मयाच्या नानाविध शाखांनीं ती समृद्ध केली होती; तसेंच पाणिनीच्या व्याकरणानें जसें संस्कृताला तसें वररुचीच्या व्याकरणानें

महाराष्ट्रीला स्थायिक रूप प्राप्त करून दिलें होतें. महाराष्ट्रीय पंडितांकडून आपल्या कृतीला प्रशंसापत्र मिळावें म्हणून उत्तरेकडचे पंडित आपलीं काव्यें, नाटकें, इ० महाराष्ट्रीयांना दाखविण्यासाठीं आणीत असत. गुणाढ्य कवीनें पैशाचींत बृहत्कथासागर ग्रंथ लिहिलेला होता तो पैठणच्या त्या काळच्या राजाला अर्पण करण्यास त्यानें आणला ह्या गोष्टीवरून महाराष्ट्री भाषा, तिच्यांतील वाङ्मय, आणि महाराष्ट्रांतील पंडित, यांच्यासंबंधानें उत्तर हिंदुस्तानांतील लोकांच्या मनांत किती आदर होता हें दिसून येण्याजोगें आहे. शिवाय सिंवरी जैनांचें धर्मविषयक प्रचंड वाङ्मयही ह्याच महाराष्ट्री भाषेंत होतें. ह्याच जैन पंथाच्या हेमचंद्र ह्या महापंडितानें प्राकृत भाषांचें व्याकरण रचिलें तें महाराष्ट्रींतच होतें. शिवाय त्यानें सर्व प्राकृत भाषांचा एक कोशही रचिला आहे. ह्याच महाराष्ट्री भाषेमध्यें महानुभाव पंथाचेंही वाङ्मय रचिलें जात असे. हें वाङ्मय खूप विस्तीर्ण होतें त्यापैकीं हल्लीं फार लहान अंश अस्तित्वांत आहे. महानुभावी पंथ फार थोड्या लोकांनीं अवलंबिलेला असल्याकारणानें त्याच्या ग्रंथांचें फार थोड्या लोकांकडून परिशीलन होत होतें. तथापि ह्या त्यांच्या ग्रंथांचाही महाराष्ट्री भाषा कमावण्याच्या कामीं पुष्कळ उपयोग झाला. जैनांनीं, महानुभावपंथीयांनीं आणि हिंदू पंडितांनीं हरएक प्रकारच्या ग्रंथांनीं महाराष्ट्री भाषा उत्तम प्रकारें कमाविली. संस्कृत भाषेची आयुमर्यादा इ० स० पू० ४००० वर्षांपासून तों इ० स० पू० ६०० किंवा ७०० वर्षांची मानण्यांत येते. महाराष्ट्रीची आयुमर्यादा इ० स० पू० ७०० वर्षांपासून तों इ० स० ८०० वर्षें इतकी मानण्यांत येते.

३० आजची जी आपली मराठी तिचा जन्म इ० स० ८०० च्या सुमारास झाला असें म्हणावयाला कांहीं हरकत नाहीं.

मराठी भाषा

३१ महाराष्ट्री ह्या भाषेची आयुर्मर्यादा सुमारें दीड हजार वर्षें इतकी होती. ह्या महाराष्ट्रीचें रूपांतर हल्लींच्या आपल्या मराठींत इ० स० ८०० ह्या सालापासून होऊं लागलें. मराठी ह्या शब्दाचीं अन्य रूपें मरेहट, मरहाट, मरेहटी, मरहाटी, मरेठी, मऱ्हेटी, मऱ्हाटी, इ० आहेत. हे सर्व शब्द ही भाषा बोलणारानींही लाविले जात असत हेंही येथें सांगणें जरूर आहे.

३२ ही आपली मराठी भाषा कमीअधिक महत्त्वाच्या ग्रंथांनीं कमाविली जातां जातां तिच्यांत ज्ञानेश्वरी हा ग्रंथ उत्पन्न झाला. ह्या ग्रंथाचें महत्त्व आणि त्याच्या संबंधाची पूज्य बुद्धि आज तागायत टिकून राहिली आहे.

३३ महाराष्ट्रींतून मराठीचा जन्म होऊन तिला प्राप्त झालेलें परिणत रूप ज्ञानेश्वरींत दिसतें. ज्ञानेश्वराचा समकालीन एकनाथ होता. ह्यानंतर दोन तीन शतकें मराठींत कोणी म्हणण्यासारखा ग्रंथकार झाला नाहीं. नंतर म्हणजे सतराव्या आणि अठराव्या शतकांत एकनाथ, तुकाराम, रामदास, वामन, मुक्तेश्वर, मोरोपंत, इ० अनेक कवि निर्माण झाले. त्यांनीं रचिलेल्या ग्रंथांनीं मराठी भाषा संपन्न आणि अभिजात झाली.

३४ परंतु ह्या काव्यवाङ्मयानेंच भाषा संपन्न झाली असें नव्हे. स्वराज्याच्या अमदानींत शेकडों पोवाड्यांच्या रूपानें शाहिरांनीं तिला संपन्न केलें. हे पोवाडे ऐतिहासिक विषयांवर

असून त्यांची भाषा साधी आणि जोरदार आहे. ह्यांशिवाय शेकडों कवि आणि शाहिर होऊन गेले त्यांनीं आपल्या बोधपर, भक्तिपर, धर्मपर, आणि अध्यात्मपर, कृतींनीं मराठी भाषा संपन्न केली. ज्ञानेश्वरापासून तों पेशवाईच्या अंतापर्यंत जे कवि, शाहीर, इत्यादि होऊन गेले त्या सर्वांच्या कवित्वाचा परामर्श घेणें येथें शक्य नाहीं. तथापि येथें इतकें सांगणें जरूर आहे कीं त्या सर्वांनीं महाराष्ट्रीय समाजाची धर्मश्रद्धा, आणि पावित्र्य, आणि स्वत्त्वाची जाणीव शाबूत ठेवण्याचा प्रयत्न केला. हरिदास आणि पुराणिक ह्यांनींही हेंच पवित्र कर्तव्य इतर प्रकारांनीं केलें. शिवाय तात्या पंतोजींनीं मारुतीच्या देवळांत, गांवच्या चावड्यांवर, आणि पाटलांच्या पडव्यांत समाजांतील सर्व व्यवहारांत मुलांना समर्थ करावयाची कामगिरीही अश्रान्तपणें चालविलेलीच होती. त्या सर्व कारणामुळें पेशवाईच्या अंतापर्यंत आपणा मराठ्यांची भाषा, मराठ्यांची संस्कृति, मराठ्यांची धर्मश्रद्धा, मराठ्यांची मर्दुमकी, मराठ्यांची ग्रामसंघटना, मराठ्यांची समाजव्यवस्था, ह्यांच्यावर बाहेरचे कोणतेही आघात कांहींही परिणाम करूं शकले नाहींत आणि मराठी भाषा पेशवाईच्या अंतापर्यंत निसर्गाच्या नियमांना अनुसरून अलोट वाङ्मयानें समृद्ध होत गेली. ह्या काळांत मराठी भाषा इतकी संपन्न आणि समर्थ होती कीं हावा तो शास्त्रीय, आध्यात्मिक, वेदांती, किंवा व्यावहारिक विषय व्यक्त करण्याचें सामर्थ्य तिच्या ठायीं आलेलें होतें.

३५ मराठी भाषेचें गद्य वाङ्मय पद्य वाङ्मयाच्या मानानें कमी आहे असें म्हणण्यांत येतें तें म्हणणें कांहीं अंशीं खरें आहे. परंतु गद्य वाङ्मय फारच कमी आहे असें मात्र नव्हे. स्वराज्याच्या अमदानींत आणि स्वदेशाच्या प्रेमाच्या उज्ज्वल स्थितींत कर्तबगार आणि लढवय्या अशा पुरुषांच्या मोहिमींच्या आणि चरित्रांच्या शेकडों अखबारनवीसांनीं हजारों बखरी लिहिल्या आणि मराठी गद्य वाङ्मयांत अमोल भर घातली. ह्यापैकीं फारच थोड्या आज उपलब्ध आहेत हें खरें आहे तथापि त्यांनीं मराठी भाषा कमावण्याची कामगिरी केली हें निर्विवाद आहे. ह्या बखरींपैकीं ज्या आज विद्यमान आहेत त्यांचे संग्रह अनेक इतिहासप्रेमींनीं करून ठेविले आहेत. या नंतर पुढें आंग्लाई सुरूं झाली. इ० स० १८१८ पासून तों इ० स० १९३० पर्यंतचा जो मराठी भाषेचा इतिहास त्याचे संबंधानें आम्ही कांहीं लिहूं इच्छीत नाहीं. आम्ही इतकेंच म्हणतों कीं, हल्लींच्या काळीं जें वाङ्मय निर्माण होत आहे त्यांत गणपतींच्या मेळ्यांची पदें हीं आमच्या मतें खूप वरच्या दर्जाचीं आणि मूल्यवान आहेत. लोकमान्यांनीं इ० स० १८९६ सालीं गणपतीच्या उत्सवाला सार्वजनिक उत्सवाचें रूप दिलें तेव्हांपासून दरवर्षी ह्या उत्सवांत म्हणण्यासाठीं शेकडों पदें रचिलीं जात आहेत, आणि ह्या पदांत त्या त्या वर्षीं घडलेल्या गोष्टींचें वर्णन केलेलें असून त्यांची भाषा शुद्ध, नीटनेटकी, साधी, जोरदार, आणि हृदयांत घुसणारी अशी असते. हें पदांचें वाङ्मय सर्व सार्वजनिक ग्रंथालयांत जतन करून ठेवण्याच्या लायकीचें आहे. हिंदुस्तानचा इतिहास रचावयाला मराठी बखरी ह्या जशा आज मूल्यवान् साधनें म्हणून आपल्या आदरास पात्र झाल्या आहेत, तशींच मेळ्यांचीं पद्यें स्वतंत्र हिंदुस्तानच्या खऱ्या इतिहासाला आधारभूत वाङ्मय म्हणून आपल्या वंशजांना आदरणीय होतील ह्यांत संशय नाहीं.

विद्याधर वामन भिडे यांचीं कांहीं पुस्तकें

१ राघवीयपरीवाह, पूर्वार्ध, सर्ग १ ते १०. ह्या पूर्वार्धांत रामजन्मापासून तों पंचवटींत सीतेला चोरून न्यावयाला रावण आला येथपर्यंतचा कथाभाग ग्रथित केला आहे. संस्कृतांतील महाकाव्यांच्या पद्धतीवर हें काव्य रचिलेलें आहे. किंमत बारा आणे.

२ मंदारमंजरी इ०—हा अठ्ठावीस काव्यांचा संग्रह असून यावर विद्वानांचें प्रशंसापर अभिप्राय आहेत. किंमत बारा आणे.

३ गजेंद्रमोक्ष इ०—हा बावीस काव्यांचा संग्रह आहे. किं० बारा आणे.

४ रथरूपक इ०—हा एकवीस स्फुट काव्यांचा संग्रह आहे. किं० बारा आणे.

५ जीवजागृति—ह्या संग्रहांत सुमारें २५० विषयांवर आमचे विचार असून त्यांत सुमारें १६० भिन्न भिन्न गणवृत्तांत रचना केलेली आहे. प्रत्येक वृत्ताचे खालीं त्यांतील गण दिले आहेत आणि चरणांत यति कोठें पडते हेंही निर्दिष्ट केलें आहे, ह्यामुळें हें एकप्रकारचें वृत्तदर्पण म्हणून उपयोगीं पडण्याजोगें आहे. किं० बारा आणे.

६ राघवीयपरीवाह, उत्तरार्द्ध—सर्ग ११ ते २२. ह्या उत्तरार्धांत सीतेच्या शोधार्थ राम निघाला येथपासून तों रामाला राज्याभिषेक झाला येथपर्यंतचा कथाभाग आला आहे. किं० बारा आणे.

७ अर्थालंकारांचें निरूपण—अर्थालंकार ह्या विषयावर ह्याच्याइतकें मोठें पुस्तक आजपर्यंत मराठींत झालेलें नाहीं ह्या पुस्तकाच्या उपोद्घातांत लक्षणा, रस, काव्य, रीति, गुण, अनुप्रास, अलंकार, वगैरे पारिभाषिक शब्दांचीं सरळ आणि सोप्या शब्दांत लक्षणें दिलेलीं असून त्यांच्या स्पष्टीकरणार्थ पुष्कळ उदाहरणें दिलीं आहेत. नंतर मुख्य ग्रंथांत ६१ अर्थालंकारांचें निरूपण केलें आहे. परिशिष्टांत आणखी आठ दहा अर्थालंकार, कोटी, इंग्रजी अलंकार, वगैरेंची त्रोटक माहिती दिली आहे. नंतर सुमारें १५० पद्यें विद्यार्थ्यानें स्वतः अलंकार ठरविण्यासाठीं दिलीं आहेत. किंमत एक रुपया.

८ मराठी शब्दांचें उद्घाटन—मराठी शब्दांच्या अभ्यासापासून कशी मूल्यवान् माहिती मिळवितां येते हें ह्यांत सांगितलें आहे. किं० आठ आणे.

९ म्हणींविषयीं चार शब्दः—ह्या निबंधांच्या आठ प्रकरणांत म्हणींची व्याख्या म्हणींचीं रूपें, म्हणींचे आवश्यक व अनावश्यक गुण, म्हणींतील अलंकार, म्हणींपासून मिळणारी मूल्यवान् माहिती, म्हणींची उन्नति आणि अवनति, म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें यांच्यांतील फरक, इ० विषयांची मनोरंजक रीतीनें फोड केली आहे. पृष्ठसंख्या ७८. किं० चार आणे.

१० मुरारि अथवा शिवाजीची एक प्राथमिक मोहिमः—हिंदुसंघटन व मुसलमानांचें अत्याचार या चालू प्रश्नांचें प्रतिबिंब तीनशें वर्षांपूर्वींच्या या शिवकालीन कादंबरींत मोठ्या चटकदार रीतीनें पडलेलें व रंगविलेलें वाचकांना दिसणार आहे. किं० २ रु.

११ कैंजळगडाचा कबजा—ही कादंबरी दोनशें पृष्ठांचीं असून रहस्यपूर्ण आहे. किंमत १ रुपाया.

महाराष्ट्रीय

सरस्वतीकोश

अ

अ १ मराठी वर्णमालेंतील पहिला वर्ण. २ मराठी स्वरमालेंतील पहिला स्वर. ३ 'ओम्' ह्या शुभार्थी शब्दांतील जी तीन अक्षरें अ, उ, आणि म्, त्यांपैकीं पहिलें. (अ = विष्णु, उ = शंकर, म् = ब्रह्मा). ओम् ह्याला 'प्रणव' म्हणतात. ४ शब्दाच्या आरंभीं **अ** जोडला असतां तो पुढील सहा अर्थ दाखवितो. (१) सादृश्य; उ० अब्राह्मण हा० दिसण्यांत ब्राह्मणासारखा पण खरोखरीं जो ब्राह्मण नाहीं तो. (२) अभाव; उ० अक्रोध म्ह० क्रोधाचा अभाव. (३) भेद, फरक, भिन्नता; उ० अपट म्ह० पट नव्हे ती वस्तु. (४) कमीपणा, लहानपणा; उ० अनुदरा म्ह० पातळ आहे पोट जीचें अशी (स्त्री). (५) वाईटपणा; उ० अनाचार म्ह० वाईट आचार. (६) विरोध; असित म्ह० पांढरें नव्हें तें, पांढऱ्याच्या उलट, म्ह० काळें. असुर म्ह० देव नव्हे तो म्ह० दैत्य. **टीप**– स्वरानें सुरू होणाऱ्या शब्दामागें ह्या **अ** चें **अन्** असें रूप होतें; उ० आचार, अनाचार, इ०.

अऋण, अऋणी [**सं०** अ + ऋण (कर्ज)] **वि०** १ ज्याला कर्ज नाहीं तो. २ ऋणमुक्त.

अंक [**सं०**] **पु०** १ मांडी. २ चिन्ह, खूण, निशाणी. ३ डाग, कलंक. ४ जवळचा प्रदेश. ५ (**ग०**) एक, दोन, इ० संख्यांचीं चिन्हें. आंकडा. ६ (**सा०**) नाटकाचा भाग. ७ एक प्रकारचें नाटक. ॐ– **गणित** न० अंकांचे गुणधर्म, सामर्थ्य, इत्यादिकांचें विवेचन करून अंकांच्या योगानें हिशेब कसे करावयाचे ह्या संबंधाचे नियम सांगून ते नियम असे कां हें शिकविणारें शास्त्र. –**चालन न०** (**ज्यो०**) ज्योतिषांतील गणना करण्याचे कामीं योजावयाचीं कोष्टकें, किंवा त्या कोष्टकांची योजना. –**जाल न०** १ गणिताचीं कामें सुलभ करण्यासाठीं केलेलीं कोष्टकें. २ पंचांग रचण्याचे कामीं अंकांना प्रतिवर्षी जे संस्कार करावे लागतात त्यांच्या संबंधाचीं कोष्टकें इ०. –**मुख न०** (**सा०**) एकंदर संविधानकाचा सूचक भाग. –**पट्टी** स्त्री० कापड वगैरेंच्या गठ्ठयांवर वजन, किंमत, लांबी, वगैरेंची माहिती देणारा कागद, फळी, वगैरेंचा तुकडा बांधलेला असतो तो. –**पाश पु०** (**ग०**) स्थानविनिमय. –**लिपि स्त्री०** १ १, २, ३, इ० पासून १०० पर्यंतचे अंक, पाडे, अकरकी, एकोत्री, पावकी, निमकी, इ० पासून आउटकी वगैरे पर्यंतचे धडे लहान मुलांना ज्या पुस्तकांतून शिकवितात ते. २ अंकाक्षरांनी संख्या लिहिण्याची पद्धति.

अकच्छ [**सं०** अ + अभावार्थक + कच्छ] **वि०** लुगड्याचा किं० धोतराचा कासोटा न घालतां नेसलेलें. **ना०** अशा तऱ्हेचें लुगडें किं० धोतर नेसणारी स्त्री किं० पुरुष.

अकंटक, वि० १ कांटे नसलेलें. २ शत्रुरहित.

अकटाचिकट वि० १ चोखंदळा. २ हेकट. हट्टी. ३ चिकित्सा करून ठरविलेली (मसलत इ०).

अकटाविकट, अकटोविकट वि० १ अत्यंत मोठा, अवाढव्य, प्रचंड. २ फार मोठा आणि बेढब.

अंकडा, आंकडा पु० १ अंक. २ हिशेब करून ठरविलेली संख्या, परिणाम, मोजदाद, इ०. ३ वळवून अर्धवर्तुळाकृति केलेली सळई, कांब, वगैरेंचें टोक. ४ विंचू वगैरेंची नांगी. ॐ **आंकडे शास्त्र न०** एकाद्या देशांतील किंवा समाजांतील लोकांचे उद्योगधंदे, व्यापार, शिक्षण, आरोग्य, वगैरे संबं-

याच्या गणनेवरून मिळालेल्या माहितीच्या आधारानें सिद्धान्त ठरविण्याचें शास्त्र. ॐ **आंकडा वळणें** भीतीनें, थंडीनें वगैरे गात्रांचें चलनवलन अशक्य किं० दुष्कर होणें. **अंकड्यास येणें** (शेत, पीक, धान्य, नाट, वगैरे) परिपक्व होऊन कणसें लोंबत राहणें.

अंकडी स्त्री० जिच्या एका टोकाला लोखंडाची वगैरे सळई अर्धवर्तुळाकृति वळवून बसविलेली असते अशी काठी, - जी झाडाचीं फुलें, फळें वगैरे तोडण्याचे कामीं योजतात.

अकढा [न कढलेला] **वि०** १ न कढलेलें किं० न कढविलेलें. २ पूर्णपणें न कढलेलें किं० न कढविलेलें (तूप, दूध, काढ्याचीं द्रव्यें, किं० कोणताही धातु इ०).

अकण [**सं०** अ = अभावार्थक + कण] **वि०** १ कण नसलेले (तांदूळ, वगैरे). २ फुटके तांदूळ, धान्याचे दाणे, वगैरे ज्यांत नाहीत असे. ३ ज्यांत दाणे नाहीत असें म्हणजे वांझोटें (कणीस).

अंकण कढवें, - **आमध्यें** पहा.

अंकणी [**सं०** अंक् = खूण करणें] **स्त्री०** १ आंखणी, आंखावयाची पट्टी, फुटपट्टी. २ पेटी वगैरेंचा खण, कप्पा, इत्यादि.

अंकणें [**सं०** अंक् = खूण करणें] **स०क्रि०** १ ०वर खूण करणें. २ ०वर रेघा वगैरे आंखणें. ३ रेघांनीं (आकृतिविशेष) काढणें. ४ ० चा आराखडा करणें किं० काढणें.

अंकणें [**सं०** अंक् = रेघा पाडणें] **न०** धावें, माळवद, इत्यादिकांवर पडलेलें पाणी वाहून जाण्यासाठीं केलेले उतरते मार्ग.

अकथित [**सं०** अ = अभावार्थक + कथित] **वि०** न सांगितलेला.

अकथ्य [**सं०** अ + कथ् = सांगणें] वर्णन करण्यास किंवा सांगण्यास अयोग्य किं० कठिण.

अंकन [**सं०**] **न०** (कागद, गठ्ठे, वगैरेंवर) खुणा, आंकडे, इत्यादि घालणें, मांडणें किं० करणें.

अंकनीय [**सं०**] **वि०** ज्यावर खुणा, आंकडे, वगैरे घालावयाचे आहेत असा.

अकपट [**सं०** अ + कपट = लबाडी] **वि०** १ ज्याचे ठायीं कपट नाहीं असा; निष्कपट. २ ज्यांत लबाडी, खोटेपणा नाहीं असा (माल, वागणूक, व्यवहार इ०).

अकबरशाही (-ई) [अकबराची सरणि, राज्य, इ०]. **वि०** १ अकबर बादशहानें रूढ, प्रचलित, केलेला इ०. २ अकबर बादशहासंबंधींचा. **स्त्री०** अकबराची राज्यरीति इ०.

अकबरी [**अ०** अकबर] **वि०** १ अकबर बादशाहासंबंधींचा, त्यानें रूढ केलेला, ठरविलेला इ०. **स्त्री०** १ अकबरानें पाडलेली मोहोर. २ तांदुळाच्या पिठाचें एक प्रकारचें खाद्य.

अकरकीं [**सं०** एकादश] **क्रि० वि०** (सोंगट्यांच्या खेळांत) अकराच्या घरांत.

अकरकी स्त्री०, **अकरकें न०** [**सं०** एकादश] अकरापासून वीसपर्यन्तच्या संख्यांना अकरापासून वीसपर्यन्तच्या संख्यांनी क्रमशः गुणून जे गुणाकार होतात त्यांचें कोष्टक.

अकरण [**सं०**] **न०** न करणें, न पाळणें, न आचरणें. ॐ - **रूप न०** (**व्या**) ० नकारार्थक साहाय्यकारी क्रियापद करणरूपी क्रियापदास जोडून जें रूप होतें तें. **अकरणे प्रत्यवाय पु०** न करण्यांत चूकी: जें केलेंच पाहिजे तें.

अकरणीय [**सं०** अ + कृ = करणें] **वि०** करावयास अयोग्य किं० अनुचित.

अकरताळा (**-ळ्या**) **पु०**, (**-ळी**) **स्त्री० वि०** आडदांड, आडमुठा, हट्टी, हेकट.

अकरनकर [करणें यापासून] **वि०** जें करावयास हवें तें न करणारा व जें करावयास नको तें करणारा.

अकरमाशा [बारा मासे या० एक तोळा नव्हे तो: फक्त अकरा मासे वजनाचा; अपूर्ण] **वि०** १ अकरा मासे वजनाचा (रुपाया). २ शास्त्रोक्त विवाहापासून न जन्मलेला. ३ शुद्ध जातकुळीचा नव्हे तो; रंडापुत्र. ४ अकरा महिने गर्भाशयांत राहून जन्मलेलें (मूल). ॐ **अकरमाशी खरबूज न०** एका जातीचें खरबूज.

अकरसणें, - **आकरसणें** पहा.

अकरा (**सं०** एकादश) **वि०** १ एक, दोन, तीन, इत्यादि जे अंक, त्यांतील दहाच्या पुढचा व बाराच्या मागला जो अंक तो (११).

अकरावा वि. १ पहिला, दुसरा, तिसरा, इत्यादि जीं क्रमवाचकें त्यांतील दहाच्या पुढचें क्रमवाचक. **पु०** १ मृत मनुष्याच्या अकराव्या दिवशीं

करावयाचा जो धार्मिक किंवा लौकिक विधि तो. ◎ **अकरावा बृहस्पति** **पु०** दाट मैत्री (जन्मनक्षत्रापासून अकराव्या राशींत बृहस्पति म० गुरु आला असतां तो कल्याणकारक असतो अशा समजुतीवरून). **अकरावा रुद्र** **पु०** १ शंकराचा अकरावा अवतार. २ अति रागीट, तापट माणूस. (अकराही रुद्र अति भयंकर असतात, पण त्यांतल्या त्यांत अकरावा सर्वांहून भयंकर आहे अशा समजुतीवरून). ३ हनुमान् किंवा मारुति.

अकराळ विकराळ [**सं०** कराल (–ळ) = भयंकर; ज्याहून कांहीं भयंकर नाहीं तें अकराल (–ळ). विशेषेंकरून भयंकर तें विकराल (–ळ)] **वि०** १ उग्र, भयंकर, विलक्षण, भीति वाटविणारा. (मराठींत **अक्राळ विक्राळ** असेंही ह्या शब्दाचें रूप आहे).

अकरीं **क्रि० वि०** (मांगल्याच्या खेळांत) अकराव्या घरांत.

अंकरी **स्त्री०** एक प्रकारची वनस्पति.

अकरुण [**सं०** नाहीं करुणा ज्याला] **वि०** करुणारहित; निर्दय, क्रूर, कठोर.

अकरें **न०** चातुर्मास्यांत चार चार बोटें लांबीच्या अकरा वाती निरांजनांत पेटवून ओवाळण्याचा मुलींचा एक नेम (किंवा व्रत).

अक्रोड(–ट) **न०** अक्रोड या नांवानें झाड. **पु०** १ अक्रोडाच्या झाडाचें फळ.

अकर्तव्य [**सं०** अ = नव्हे + कर्तव्य: कृ = करणें] **वि०** १ करावयाला योग्य नव्हे तें. २ जें करावयाचें योजलेलें नाहीं तें.

अकर्ता [**सं०** अ + कर्ता: कृ = करणें] **पु०** कर्तृत्वहीन माणूस; बेवकूब.

अकर्तृक [**सं०** अ नकारार्थक + कर्तृ = करणारा + क] **वि०** १ ज्याला कर्ता नाहीं तें; स्वयंसिद्ध. २ (**व्या०**) ज्या क्रियापदाचा कर्ता निराळा नसून क्रियापदांतच निगूढ रूपानें असतो तें (क्रियापद). क्रियापदाचा कर्ता वाक्यांत योजिलेला नसून तो कोण आहे, म्हणजे कर्त्याच्या जागीं कोणता शब्द योजितां येईल, हेंहीं समजत नाहीं असें क्रियापद. अशा क्रियापदांना भावकर्तृक, अज्ञातकर्तृक, अशींही नांवें देण्यांत येतात. (अशा क्रियापदांचा जो भाव तोच क्रियापदांचा कर्ता असतो, आणि त्याला स्वतंत्र अवस्थिति वाक्यांत नसते). उ० सांजावणें, फावणें, कळमळणें, उजाडणें इ०.

अकर्तृत्व [**सं०** अ नकारार्थक + कर्तृत्व] **न०** कांहीं काम करावयाची नालायकी, पराक्रमशून्यत्व.

अकर्म [**सं०** अ अयोग्य ह्या अर्थी + कर्म] **न०** १ दुष्कर्म, अयोग्य कृत्य. २ नीतिबाह्य वर्तन.

अकर्मक [**सं०** अ अभावार्थक + कर्म + क प्रत्यय] **वि०** १ (**व्या०**) ज्याचा व्यापार कर्त्यापासून उत्पन्न होऊन कर्त्यावरच फलित होतो असा (धातु, क्रियापद इ०). उ० चालणें, पडणें, इ०.

अकर्मी [अ वाईट + कर्म] **वि०** १ दुष्ट; पाप किंवा भलतेंच कृत्य करणारा.

अकलंक [**सं०** अ अभावार्थक + कलंक = डाग] **वि०** डाग किं० दोष नसलेला; निष्कलंक; शुद्ध.

अकल्पनीय [**सं०** अ नकारार्थक + क्लृप कल्पणें] **वि०** ज्याची कल्पना करतां येत नाहीं किंवा करणें शक्य नाहीं असा; कल्पनेच्या आटोक्याबाहेरचा; कल्पनातीत.

अकल्पित [**सं०** अ अभावार्थक + कल्पित (क्लृप् = कल्पिणें)] **वि०** १ न कल्पिलेलें; विचारांत किंवा तर्कांत नसलेलें. २ ज्याची पूर्वी सूचना मिळालेली नाहीं (असा). **क्रि० वि०** १ अकस्मात्, ध्यानीं मनीं नसतां, पूर्वी सूचना नसतां.

अकल्मष [**सं०** अ नकारार्थक + कल्मष ह्म० पाप, मल] **वि०** १ पापरहित, निष्पाप. २ पूर्वग्रहानें अदूषित.

अकल्याण [**सं०** अ अभावार्थक + कल्याण (शुभ)] **न०** १ अशुभ. २ हानि, नुकसान.

अकस [**अ०**] **पु०** द्वेष, दुष्टावा, दुसऱ्याविषयीं वैरबुद्धि, चुरस. ◎ **अकसखोर** [**अ०** अकस + खोर प्रत्यय] **वि०** मनांत अकस कि० अढी धरणारा; खुनशी.

अकस्मात् [**सं०** अ अभावार्थक + कस्मात् (कशापासून)] **क्रि० वि०** १ पूर्वी सूचना नसतां किंवा न देतां; ध्यानीं मनीं नसतां; एकाएकीं. २ कारण किंवा आधार नसतां केलेलें (विधान, दोषारोपण इ०). **अकस्मात्र** हें **अकस्मात्** चें अपभ्रष्ट रूप.

अकळ [अ नाहीं, कळ, 'कळणें'पासून] **वि०** १ कळण्याजोगें नाहीं तें, दुर्ज्ञेय, दुर्बोध. [तुका० १].

अकळतनकळत [म० कळणें पासून स्वैर रचना] **क्रि०वि०** १ चुकूनमाकून; न जाणतां; अज्ञानानें. २ यदृच्छेनें, कर्मधर्मसंयोगानें.

अकळवणी [सं० अकाळ = भलतीच वेळ + म० पाणी] **न०** अकाली किं० भलत्याच वेळीं पड-लेला पाऊस.

अकळी स्त्री० हिसका देऊन जोरानें टाकलेला श्वास (बुडल्यानें, मरणाराने, घाबरलेल्यानें. इ०).

अका,—अक्का पहा.

अंकाईटंकाई स्त्री० खानदेशांतील एका खिंडीच्या दोन बाजूंस असलेले अंकाई व टंकाई या नांवांचे दोन डोंगरी किल्ले. (त्यांच्या मधील खिंडीस दक्षिणचा दरवाजा म्हणतात).

अकांचन [सं० अ अभावार्थक + कांचन (सोनें)] **वि.** १ ज्याच्या जवळ कांचन (सोनें) नाहीं असा. २ द्रव्यहीन; कंगाल; अगदीं गरीब.

अकांड तांडव [सं० अकांड = भलत्याच वेळीं केलेलें + तांडव = शंकराचें नृत्य] **न०** १ वेळ अवेळ मनांत न आणतां जें वेड्यासारखें किं० मूर्खासारखें केलेलें कृत्य तें. २ रागाच्या भरांत दुसऱ्यावर झाडलेला ताशेरा. क्रियापद **करणें**).

अकामी [अ नकारार्थक + काम सं० कर्म] **वि०** निरुपयोगी.

अकाम्य [सं० अ + काम्य (कम् = इच्छिणें] **वि०** फळाची, लाभाची, इच्छा न धरतां केलेलें, आचरलेलें; निष्काम हेतूनें केलेलें इ०.

अकारण [सं० अ अभावार्थक + कारण] **वि०** १ ज्याला कारण नाहीं असा. २ स्वयंसिद्ध (ईश्वर). **क्रि० वि०** कारण, निमित्त, किं० कुरापत नसतां; विनाकारण; उगीचच्या उगीच.

अकारणिक [सं० अ अभावार्थक + कारण] **वि०** १ निरुपयोगी, निष्फळ. **अकारणी** असेंही रूप आहे.

अकार्य [सं० अ अयोग्यार्थक + कार्य (कृ = करणें)] **वि०** १ जें करावयास अयोग्य किं० अनुचित (तें). २ जें कार्य शक्य नाहीं (तें). **न०** दुष्कर्म, पाप

अकाल [सं० अ = अयोग्य + काल = वेळ] **पु०** अयोग्य, भलतीच, किं० गैरसोयीची वेळ.

अकालज [सं० अ = अयोग्य + काल = वेळ, + ज (जन् = उत्पन्न होणें)] **वि०** भलत्याच किं० अशुभ वेळीं उत्पन्न आलेला किं० जन्मलेला.

अकालीन [सं० अ = अयोग्य + काल + प्रत्यय] **वि०** **अकालज** पहा.

अकाल्पनिक [सं० अ अभावार्थक + काल्प-निक (क्लृप्)] **वि०** कल्पनेनें नसलेला; कल्प-नेनें न काढलेला; सत्य, खरा.

अकाळवणी न०.—मागें **अकळवणी** पहा.

अकाळ्या [सं० अ + काळ + या (मराठी प्रत्यय)] **वि०** भलत्याच वेळीं पडलेला (पाऊस).

अकिंचन [सं० अ अभावार्थक + किंचन (काहीं तरी)] **वि०** दरिद्री, निष्कांचन, कंगाल.

अकिंचित [सं० अ अभावार्थक + किंचित (कांहीं तरी)] **क्रि० वि०** १ अगदीं किंचित किंवा अल्पसुद्धां नाहीं अशा रीतीनें. — **—कर वि०** कांहींही काम वगैरे न करणारा. **—प्रद वि०** कांहींही न देणारा.

अंकित [सं० अंक् = खूण करणें] **वि०** ज्याचेवर कांहीं चिन्ह, ठसा, निशाणी उठवि-लेली आहे असा. २ मर्यादेच्या रेषेनें नियंत्रित. ३ स्वाधीन, वश [तुका०] **पु०** १ नोकर, चाकर, सेवक, ताबेदार. २ ज्याला दुसऱ्याच्या तंत्रानें वागावें लागतें तो. ३ मांडलिक राजा.

अंकिला वि० ३ स्वाधीन आलेला. [तुका०]

अंकी [सं० अंक = आंकडा + मराठी प्रत्यय] **वि०** १ अंकांनीं लिहिलेला, दाखविलेला, सांगित-लेला (याच्या उलट **अक्षरी**). उ० **१३** हे अंकी; **तेरा** हे अक्षरी.

अकीक [अ०] **पु०** एक प्रकारचा हिरा.

अकीर्तनीय [सं० अ अभावार्थक + कीर्त-नीय (कृत् = स्तविणें, सांगणें)] **वि०** स्तुति, प्रशंसा, इत्यादीला अयोग्य. वर्णितां, स्तवितां येण्याजोगा नव्हे (तो).

अकीर्ति [सं० अ अयोग्य ह्या अर्थी + कीर्ति = यश)] **स्त्री०** दुष्कीर्ति, बदनामी, दुर्लौकिक, नाचक्की.

अकुटें दुकुटें न० मुलांचा एक खेळ.

अकुंठित [सं० अ + अभावार्थक + कुंठित थांबविलेला (कुंठ् = आडविणें)] **वि०** अप्रति-बद्ध, अवारित, अरुद्ध, न थांबविलेला.

अकुतोभय [सं० अ अभावार्थक + कुतः

(कोठूनही) + भय (भीति) य० स०] **वि०** ज्याला कोठूनही भय नाहीं असा. अत्यन्त सुरक्षित. (याचें **अकतोभय** हें अपभ्रष्ट रूप).

अंकुर [**सं०**] **पु०** १ बीज, कंद, वृक्षाचें कांट, इत्यादींस जो बारीक अवयव फुटतो आणि ज्यापासून वृक्षादिरूप विस्तार होतो, तो; कोंब, मोड. २ मूल पुढें अमूक गुणांचें होईल असा तर्क करावयाला साधनीभूत ज्या त्याच्या चेष्टा, भाषण, वगैरे, त्या सर्वांचा समुच्चय. ३ मूळ कारण.

अंकुरणें [**सं०** अंकुर = मोड] **अ० क्रि०** (वृक्षादिकांना) अंकुर फुटूं लागणें.

अंकुरित [**सं०** मोड फुटलेला] **वि०** १ ज्याला मोड फुटूं लागले आहेत. २ प्रादुर्भूत झालेलें (तारुण्य वगैरे दशा).

अकुलज, अकुलीन [**सं०**] **वि०** हलक्या किंवा हीन कुलांत जन्मलेला.

अंकुश [**सं०**] **पु०** १ हत्तीला इशारत करावयाचें लोखंडाचें अणकुचीदार एक हत्यार. हें हत्यार हत्तीच्या गंडस्थळावर टोचून महात त्याला त्वरित चालण्यास, वळण्यास, वगैरे इशारत करतो. २ अंकुशाच्या आकाराचें शस्त्र जिच्या अग्राला बसविलें आहे अशी आयुधासमान वापरावयाची काठी. ३ नियमादिकांची नियंत्रणा.

अकुशल [**सं०** नव्हे कुशल तो] **वि०** कुशल किंवा चतुर नसलेला.

अंकुशी **वि०** अंकुशाचा ठसा उठविलेलें प्राचीन काळचें नाणें (रुपाया इ०).

अकृत [**सं०** अ नकारार्थक + कृत (केलेला) कृ = करणें] **वि०** न केलेलें. **न०** अयोग्य कृत्य, पाप. ⁂ **–काल वि०** ज्या कर्जाला मुदत ठरविलेली नाहीं असें.

अकृतज्ञ [**सं०** नव्हे कृतज्ञ तो. अ + कृत + ज्ञ] उपकार न स्मरणारा; कृतघ्न.

अकृत्य [**सं०** अ = अयोग्य + कृत्य = कर्म] **न०** अयोग्य कर्म; जें करणें योग्य नव्हे असें काम.

अकृत्रिम [**सं०**] **वि०** १ कृतीनें केलेलें नव्हे तें (डोंगर, वृक्ष, इ०); नैसर्गिक. २ स्वयंसिद्ध (ईश्वर). ३ निष्कपट, साधा, सरळ. ४ खरें; दिखाऊ किंवा वरपांगी नव्हे असें.

अक्लृप्त [**सं०** अ निषेधार्थक + क्लृप्त = केलेलें] **वि०** न केलेलें, न रचलेलें, न उभारलेलें.

अंकोळ स्त्री०, पु० १ एक प्रकारचें लहान झुडूप. २ त्या झुडपाचें फळ. (अंकोळापासून तेल निघतें. अंकोळ विञ्यांत खातात).

अकड [**हिं०**] **स्त्री०** ऐट, इष्की, मिजास. ⁂ **–बाज वि०** ऐटदार, झोकदार. **–बाजी स्त्री०** ऐटदारपणा, मिजासखोरी.

अकडणें अ० क्रि० ऐटीनें किं० दिमाखानें चालणें, वागणें, इ०.

अकल [**अ०** अक्ल् = बुद्धि, शहाणपणा] **स्त्री०** तारतम्य जाणण्याची शक्ति; बुद्धि. **अकलदाढ** [**अ०** अक्ल् = बुद्धि + दाढ (**सं०** दंष्ट्रा)] **स्त्री०** मनुष्यास वयाच्या सुमारें २४ व्या किंवा २५ व्या वर्षी येणारी दाढ. ⁂ **अकलबाज वि०** हुषार, धूर्त, चाणाक्ष. **अकलवान** असाही शब्द वापरतात. ⁂ **अकलहुशारीनें क्रि० वि०** १ जाणतेपणानें, पूर्णपणें समजून उमजून, पूर्ण विचारानें; फसगतीनें नव्हे; दुसऱ्याच्या आग्रहानें, भिडेनें वगैरे नव्हे, (दस्तऐवज वगैरेंत हा शब्द विशेष वापरतात). २सावधगिरीनें. ⁂ **अकलेचा कांदा, ०चा खंदक पु०** १ मूर्ख, बिनअकली माणूस. **अकल विकत घेणें** १ नुकसानी झाल्यावर शहाणपणा शिकणें. **अकलसे खुदा पछानना** –बुद्धीचा नेटानें, इमानानें, उपयोग केल्यास देवाचें स्वरूपही ओळखणें शक्य आहे.

अकलकरा, –कारा, –काढा, –काला, –खार [**अ०**] **पु०** एक औषधी वनस्पति.

अकलखाद क्रि० वि० पूर्णपणें, साफ, अगदीं. (नाश, नासाडी, तोटा, वगैरे दाखविणाऱ्या क्रियापदांच्या साहचर्यानें याचा उपयोग होतो. उ० यंदा आमचा जोंधळा अकलखाद बुडाला).

अका, अकाबाई [**कानडी** अक्का = वडील बहीण] **स्त्री०** १ वडील बहीण. २ दारिद्र्य (दारिद्र्याची देवता ही लक्ष्मीची वडील बहीण अशा विनोदी कल्पनेवरून). ⁂ **अकाबाई** अवदसा. कुबुद्धि. **अकाबाईचा फेरा पु०** दारिद्र्याचें येणें; दारिद्र्य. [मागें पहा.

अकतोभय,–अकुतोभय शब्दाचें अपभ्रष्ट रूप.

अक्रम [**सं०** अ अभावार्थक + क्रम = सरणि] **वि०** क्रमरहित, अस्ताव्यस्त, बेशिस्त.

अक्रय्य, अक्रेय [**सं०** क्री = विकत घेणें] **वि०** १ विकत घेण्याजोगा नव्हे तो. २ विकत न जाणारें. ३ विकतां येत नाहीं तें.

अक्रस वि० १ ज्यांत तूप, दूध, वगैरे स्निग्ध पदार्थ कमी व तेल, तिखट, वगैरे गरम पदार्थ अधिक, असें भोजन, खाद्य, इ०.

अक्रसतक्रस वि० तिखट, तेलकट, वगैरे प्रकारचें रुक्ष (अन्न).

अक्राळविक्राळ, – अकराळविकराळ याचें अपभ्रष्ट रूप. मागें पहा.

अक्रिय [**सं०** अ अभावार्थक + क्रिया (कर्म)] **वि०** क्रियारहित, क्रियाशून्य (ईश्वर).

अक्रीत [**सं०** अ विरोधार्थक + क्रीत = विकत घेतलेला (क्री = विकत घेणें)] **वि०** १ विकत न घेतलेलें. २ योग्य मोबदला कि० किंमत न देतां घेतलेलें. ३ फुकटचें. ४ लबाडीनें मिळविलेलें.

अक्रुसणें, अक्रसणें [**सं०** आकृष्ट होणें = अखूड होणें] **अ० क्रि०** १ लांबी, रुंदी, वगैरेंनीं अखूड होणें (धोतर, लुगडें, किंवा कांहीं कापड धुतल्यावर वगैरे).

अक्रोड:– अकरोड(–ट) पहा.

अक्रोध [**सं०** अ अभावार्थक + क्रोध = राग] **पु०** १ क्रोधाचा अभाव. २ संन्याशाच्या धर्मांचें एक कर्तव्य. **वि०** १ क्रोधरहित, शांत वृत्तीचा.

आक्लिष्टपणें [**सं०** अ + क्लिष्ट + पण (मराठी प्रत्यय)] **क्रि० वि०** १ अगदीं सहजासहजीं; अनायासानें; त्रास न होतां; तारांबळ न उडतां.

अक्लेश [**सं०**] **वि०** १ क्लेशरहित. २ त्रास न देणारें; निरुपद्रवी. **क्रि० वि०** १ श्रमावांचून. २ सहजासहजीं.

अक्साबोक्शीं, अंकसाबोकशीं क्रि० वि० मोठमोठ्यानें किंवा हेल काढून (रडणें). (**ओकसाबोकशीं** असेंही रूप आहे).

अखई वि० } १ अक्षय, अखंड, सदोदित टिकणारें. २ **क्रि० वि०** अनंत काळपर्यंत. † **तुका** ०{

अखजा, अखितीज, [**सं०** अक्षय तृतीया] **स्त्री०** वैशाख शुद्ध तृतीया. **अक्षत् तृतीया** असेंही रूप व्यवहारांत रूढ आहे.

अखंड [**सं०** अ + खंड = तुकडा] **वि०** १ न फाडलेलें, न तोडलेलें; अभग्न, अख्खें, समग्र. २ जोड न लावतां केलेलें कि० शिवलेलें; एकसंधी. ३ ज्याला खंड, अडथळा, विसावा, थांबणूक इ० नाहीं (तो). ꣸ **–दंडायमान वि०** १ काठीसारखा लांबच लांब. **–चोळी स्त्री०** १ नवऱ्या मुलीनें तेलफळाचे वेळीं ल्यावयाची दोन हातांसाठीं दोन तुकडे व पाठ आणि पोट यासाठीं एक तुकडा अशा तुकड्यांची शिवलेली चोळी. **–श्रेढी स्त्री०** १ (**ग०**) एक प्रकारची श्रेणी किं० श्रेढी. **–द्वादशी स्त्री०** मार्गशीर्ष शुद्ध द्वादशी. **–सौभाग्य न०** शेवटपर्यन्त टिकणारें वैभव, सवाशीणपणा. इ०. **– सौभाग्यवती स्त्री०** १ जिचें सौभाग्य आमरण टिकलें अशी; जी नवऱ्यापूर्वी मेली अशी. २ हा शब्द कुचेष्टेनें वारयोषितांस लावतात.

अखडणें अ० क्रि० १ लांबीनें किंवा रुंदीनें आंखूड होणें; आटणें. २ थांबणें (पाऊस).

अखंडित [**सं०** अ + खंडित] **वि०** १ ज्यांत खंड, अडथळा, आलेला नाहीं असा; सतत चालत राहिलेलें. २ ज्याचे भाग पाडिलेले नाहींत असा; सबंध, आख्खा. ३ जें खोटें, चुकीचें, निराधार म्हणून दाखवून देण्यांत आलेलें नाहीं असे (तत्व, विधान इ०). ४ विशाल, तीव्र, तीक्ष्ण (बुद्धि, पराक्रम, संपत्ति). ꣸ **– लक्ष्म्यलंकृत वि०** पत्राच्या मायन्यांत थोर लोकांस द्यावयाची पदवी.

अंखणी स्त्री०,– अंकणी पहा.

अंखणें स० क्रि०,– अंकणें पहा.

अखतेसालीं } **क्रि० वि०** १ पुढल्या वर्षी. २ पुढच्या जन्मीं. † **तुका०** {

अखत्यार [**अ०** इख्तियार] **पु०** १ सोंपविलेला अधिकार. २ दिलेला अधिकार किंवा हक्क. ꣸ **– पत्र न०** ज्या लेखानें किं० पत्रानें कांहीं अधिकार, हक्क, वहिवाट, इ० दिलेलें असतें तें.

अखत्यारी [**अ०**] **पु०** ज्याला कांहीं विशिष्ट हक्क, अधिकार, इ० दिलेला असतो तो. **स्त्री०** दिलेला हक्क, अधिकार इ०.

अखबार [**अ०** 'खबर'चें **अ०** **व०**] **स्त्री०** १ बातमी, वर्तमान. ꣸ **– नवीस, –नीस पु०** १ बातम्या, किं० हकीकती लिहिणारा, किं० लिहून पत्रद्वारां दुसऱ्याला कळविणारा. २ वर्तमानपत्र इ० चा बातमीदार.

अखम } **वि०** पंगु, दुबळा, असमर्थ. † **तुका०** }

अखय } **क्रि० वि०** नित्य. † **तुका०** }

अखर [**फा०** आखर] **पु०** १ गांवाच्या शेजारची रिकामी जागा. २ चरावयासाठीं गेलेलीं गुरें दुपारी विश्रान्तीसाठीं जेथें बसतात किं० सकाळीं आणि संध्याकाळीं एकत्र जमविलीं जातात अशी गांवाबाहेरची मोकळी जागा. ॐ **चुकलें गुरूं अखरास पहावें** (किंवा) **शोधावें** हरवलेलें गुरूं बहुत करून अखरावर आढळतें.

अखरनखर, अखीरनखीर क्रि० वि० कांहीं केलें तरी; शेवटीं किंवा परिणामीं.

अखरी स्त्री० गाडीचीं दोन चाकें ज्या आसाभोंवतीं फिरतात त्याचे वर बसविलेलें तुळईसारखें लाकूड. ह्या लाकडावर गाडीची चौकट खिळविलेली असते.

अखवानजी [**हिं०**] पुढें **अखुनजी** पहा.

अखा [**सं०** अखिल] **वि०** १ सर्व, अभग्न, पूर्ण. २ वट्ट, एकंदर.

अखाडा [**हिं०**] **पु०** १ कांहीं विशिष्ट कार्यार्थ एके ठिकाणीं जमणारी मंडळी किंवा त्यांची एकत्र जमावयाची जागा. २ चव्हाटा, अड्डा. ३ पाल्ख्यांचा दांडा. ४ पंथ (गोसावी वगैरेंचा).

अखाद्य [**सं०**] **वि०** खावयास अयोग्य.

अखिल [**सं०**] **वि०** १ सर्व, सकळ. २मथितार्थ, गोळाबेरीज. ॐ **अखिलार्थ पु०** तात्पर्य, सारांश.

अखुटणें अ० क्रि० खिळा. चलणी. इ० च्या योगानें वस्त्र फाटणें.

अखुड वि० लांडा, फारसा लांब नव्हे तो; ॐ **अखुडशृंगी, अखुडशिंगी वि०** अखुड शिंगांचीं (गाय वगैरे).

अखुडणें अ० क्रि० वस्त्रादिकांचें अखूड होणें, आटणें. **स० क्रि०** वस्त्र इ० अखूड करणें.

अखुनजी, अखवानजी [**हिं०**] शिक्षकासंबंधानें योजावयाची मानाची पदवी.

अखें [**हिं०** आखा] **न०** जनावराच्या पाठीवर घातलेली पडशी, पखाल, कंठाळ, वगैरेंची एक बाजू.

अखेतीज [**सं०** अक्षय तृतीया] **स्त्री०** वैशाख शुक्ल तृतीयेचा दिवस (फार शुभ दिवस म्हणून गाणलेला) अक्षय तृतीया; अक्षत तृतीया.

अखेर [**फा०** आखिर] **क्रि० वि०** सरतें शेवटीं, अखेरीस. ॐ **अखेर नौबत स्त्री०** चौघडा बंद करतेवेळीं वाजविण्यांत येणारे टोले. **अखेर साल न०** १ वर्षाचा शेवट. २ शेवटचें वर्ष.

अखेरी [**फा०** आखिर] **स्त्री०** परिसमाप्ति, शेवट.

अखेरी [**फा०** आखिरी] **स्त्री०** १ समाप्ति. २ बेगमी वगैरेंचें संपून जाणें. ॐ **– मारणें** शेवटीं विजयी होणें. **अखेरीचे दिवस** (शेतकींत) शेतकामें सुरू करावयाच्या पूर्वीचे दिवस.

अखों } **पु०** डोळे. † **तुका०** }

अंखोअंख क्रि० ऐन किंमतीस; मूळच्या किंमतीस.

अखोटा पु० १ काठीभोंवता किंवा खुंटीभोंवता दोरी सरकूं नये अशी राहण्याकरतां जो करकोचा किं० जी खोबण पाडतात ती. २ विहिरींत घागर सोडतांना दोरीचा घागरीच्या गळ्यासाठीं गळफास करतात तो.

अखोड वि० अव्यंग; ज्यांत दोष काढावयास जागा नाहीं असें.

अग अ० लहान बायकांस किंवा मुलांस हाक मारतांना योजावयाचें अव्यय. उ० अग मैने !

अग पु० १ पर्वत. २ वृक्ष.

अंग [**सं०**] **न०** १ शरीर, देह. २ शरीराचा कोणताही अवयव किं० भाग; गात्र. ३ बाजू, दिशा, तर्फ. ४ कोणत्याही शास्त्राचा, विषयाचा, विधीचा, किं० कृत्याचा विभाग. ५ कर्तृत्व, संबंध. उ० त्या मसलतींत मात्याचें अंग असलें पाहिजे. ६ गुप्त मदत, अनुकूलता. ७ कर्तृत्वाचें अधिष्ठान, ठिकाण. उ० त्याच्या अंगीं चित्रकलेचें कौशल्य आहे. उ० हा दोष माझ्या अंगीं नाहीं ह्म० माझ्या ठायीं. ८ शरीराचे कांहीं भाग (आंतडीं इ०) कांहीं रोगांमुळें शरीराच्या एखाद्या द्वारानें बाहेर पडतात ते. ९ कौशल्य. १० आपल्या हितासाठीं खटपट करणारा माणूस; आपल्यासाठीं वशीला चालवील असा माणूस. उ० दरबारांत अंग असल्यावांचून कार्यें सफल होत नाहींत. ॐ **अंगच्छाया स्त्री०** अंगाची सावली; आश्रय. **–ज वि०** अंगापासून उत्पन्न झालेला. **पु०** स्वतःचें अपत्य. **–त्राण न०** चिलखत. **– धार स्त्री०** गाय, म्हैस इ० च्या पुढें आंबोण

न ठेवतां आणि वासराकडून पान्हा न फोडावतां काढलेलें दूध. **-देण्या** **वि०** १ शेतांत जातीनें राबणारा; शेतांत देहकष्ट करण्याचें कर्तव्य ज्याचेकडे आहे तो. **-धट** **वि०** उद्धट, दांडगेश्वर, दांडगेपणानें काम करणारा. **-धुणें** **न०** बायकांचें स्नान किं० अंघोळ. **-न्यास** **पु०** १ देवतार्चनांतील एक विधि. २ मंत्रोच्चारपूर्वक शरीराच्या सोळा भागांना स्पर्श करण्याचा विधि. **-परिवर्तन** **न०** झोपेंत एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळणें. **-पात** **पु०** १ शरीर रोडावणें, वाळणें. २ पर्वताच्या कड्यावरून उडी घेणें. ३ अर्धांगवायूचा झटका. **-प्रत्यंग** **न०** शरीराचे सर्व भाग, शरीर. **-प्रस्थान** **न०** शुभ समयीं परगांवीं जाणें शक्य नसल्यामुळें त्या शुभ समयीं गावांतील दुसऱ्या एका घरीं जाऊन कांहीं काळ राहणें आणि नंतर आपल्या सोयीच्या समयीं तेथून ज्या परगांवीं जावयाचें असेल तिकडे जावयासाठीं प्रत्यक्ष प्रवास सुरू करणें. **-बांधा** **स्त्री०** शरीराची ठेवण, घडण. **-भंग** **पु०** १ थकवा. २ नाटकी हावभाव. **-भर** **क्रि० वि०** सर्व शरीर झाकण्यास पुरेसें. **-भूत** **वि०** अंग किं० भाग ह्या नात्याचें; पोटांत येणारें; समाविष्ट असलेलें. **-मर्दन** **न०** १ चंपी, अंग चोळणें किं० रगडणें. **-मर्दाई**, **-मर्दी** **स्त्री०** केवळ अंगच्या जोराचा उपयोग. **-मस्ती** **स्त्री०** १ अंगांतील रग, मद. २ दांडगाई. **-मार्दव** **न०** १ शरीराची कोमलता, नाजुकपणा. **-मेहनत** **स्त्री०** १ शारीरिक मेहनत. २ शरीर खपवून केलेला प्रयत्न. ३ व्यायाम. **-मोडा** **पु०** १ निरंगळीमुळें जांभया देणें. आळोखेपिळोखे देणें इ०. २ ज्वराचे पूर्वी येणारी निरंगळी. **-यष्टी** [**सं०**] **स्त्री०** शरीराचा बांधा, उंची, मजबुती, वगैरे. **-रस** **पु०** पाणी वगैरे न घालतां काढलेला रस (पानांचा, नारळाचा इ०). **-राख्या** **पु०** काम चुकारतट्टूपणें करणारा, अंग चोरून काम करणारा. **-राग** **पु०** १ अंगास लावावयाचीं उटणीं वगैरे सुवासिक द्रव्यें. २ हीं द्रव्यें अंगास लावण्याची क्रिया. **-रेटाई** **स्त्री०** धक्काबुक्की, मस्ती. **-लग** **पु०** आश्रय, आधार, टेका. **-लग** **वि०** नात्यानें किं० दुसऱ्या कांहीं संबंधानें जुळलेला. **अंगलग** } **वि०** जवळचा. † **तुका०**. **स्त्री०** समागम, संबंध. † **ज्ञा०** }. **-लट** **स्त्री०** १ शरीराची घडण, घाट. **-लट येणें** हानिकारक होणें, नुकसानकारक होणें. **अंगलीन** **वि०** शरीरांत गुप्त असलेलें. † **ज्ञा०** {. **-वळण** **न०** शरीराची ठेवण किं० बांधा. **अंगवळणी पडणें** परिपाठाचा, सरावाचा, किं० सवयीचा होणें. **-वळा** **पु०** आळोके पिळोके (देणें). **-वस्त्र** **न०** शरीर झांकावयापुरतें वस्त्र; अरूर न अत्यावश्यक असणारे कपडेलत्ते. २ लंगोटी. ३ पाट, रुमाल. **-वाटा** **पु०** १ शेतांत प्रत्यक्ष अंगमेहनत करणाऱ्याचा शेताच्या उत्पन्नांतील हिस्सा. **-वाटकरी** **पु०** अंगमेहनत करणारा भागीदार. **-विकल** **वि०** जाया आलेला. **-विक्षेप** **पु०** हातवारे, हावभाव, हस्तादिकांच्या हालचाली. **-वृद्धि** **स्त्री०** १ शरीराची वाढ किंवा स्थूलता. २ अंडवृद्धि. **-शः** **क्रि० वि०** १ भागशः. २ सर्व बाजूंनी. ३ अंगाअंगानें; प्रत्येक अंगानें; वेगळा वेगळा अंगें घेऊन. **-संकोच** **पु०** अंग चोरण्याची म्हणजे थोडक्या जागेंत समाविष्ट करण्याची क्रिया. **-संग** **पु०** १ शरीराचा स्पर्श. २ आलिंगन, भेट. **-संवाहन** **न०** चंपी; शरीरमर्दन; अंग चोळण्याची, रगडण्याची क्रिया. **-संस्कार** **पु०** स्नान करणें, गंध लावणें, वगैरेंचा विधि. **-सरकती** **पु०** **अंगवाटकरी** पहा. **-सामर्थ्य** **न०** स्वशरीरसामर्थ्य, स्वतःच्या अंगातील शक्ति. **-सुटका** **स्त्री०** एखाद्या व्यवहारांतून लाभ न होतां आणि हानीही न होतां सुटका. **-सूट** **वि०** चपल. **-स्वभाव** **पु०** मूळ स्वभाव, जन्मजात आवडीनिवडी. **-हीन** **वि०** सव्यंग, शरीराचा एखादा अवयव कमी असलेला; अपूर्ण. **अंगहीन, अंगहीना** } **स्त्री०** वेश्या. † **ज्ञा०** {. **-काढणें**, **-काढून घेणें** एखाद्या कामांतून बाहेर पडणें. **-चोरणें** कुचरपणानें काम करणें. **-झाडणें** अव्हेरणें. **-टाकणें** १ रोडावणें. २ विश्रांतीसाठीं गादीवर इ० आडवें होणें. **अंगावरून वारा जाणें**, अर्धांग वायूचा झटका होणें. **अंगाबाहेर टाकणें** न पथकरणें. **-धरणें** १ **अ० क्रि०** थंडीनें अंग दुखणें. **स० क्रि०** लठ्ठ, गुबगुबीत होणें. **-मरणें** त्वचा बधिर होणें. **-मोडून काम करणें** कुचराई न करतां काम करणें. **-मोडून येणें** ताप यावयाच्या आधीं गात्रें कसकसणें. **-अंगाखालीं पडणें** परिपाठाचा

होणें. **अंगाचा अेकडा होणें** पटके वगैरेमुळे गात्र ताठ होणें किं० वाखडणें. **–चा आळापिळा करणें** १ गात्रें पिळवटणें. २ सर्व शक्ति खर्चणें. –**चा खुर्दा होणें** अतिश्रमानें थकून जाणें. **–ची लाही होणें** १ अंगाचा भडका होणें (ज्वरादि कारणांनीं). २ क्रोधानें क्षुब्ध होणें. **– चें कातडें काढून जोडा शिवणें** एकाद्या माणसासाठीं पराकाष्टेची झीज सोसणें. **-- चा तिळपापड होणें** रागानें बेफाम होणें. **–चें पाणी होणें** एकाद्या कामीं फार श्रम किं० कष्ट होणें. **अंगाबाहेर टाकणें** न पथकरणें; एकाद्या कामाशीं असलेला संबंध तोडणें. **अंगानें, अंगीं, अंगें** स्वतः, अंगावर, दुसऱ्याच्या मदतीची, संमतीची वाट न पाहातां. **–वर पडणें** अप्रिय, नापसंत वस्तु पथकरावी लागणें. **–वर शेकणें** हानिकारक होणें. **अंगावरचें मूल न०** ज्या बालकाचें अजून स्तनपान सुटलें नाहीं तें. **अंगावरचें मूल तोडणें** मुलाचें स्तनपान बंद करणें; त्याला वरचें दूध इ० देणें. **अंगाला कुयलें लागणें** मत्सरानें किं० रागानें व्याकुळ होणें. **अंगीं तुटणें** कृश होणें, रोडावणें. **अंगीं भरणें** लठ्ठ होणें. **अंगाला मिरच्या लागणें** चरफडाट होणें. **अंगीं उणा वि०** १ ज्याची आई किंवा बाप मयत आहे असा. २ एकाद्या इंद्रियानें किं० गात्रानें उणा. ३ सदोष; कांहीं बाजू असलेला. **अंगीं उणा तर जाणे खाणाखुणा** ज्याच्या अंगीं नैतिक किं० शारीरिक दोष किंवा व्यंग असेल, त्याचा जर कोणीं उघड अथवा प्रच्छन्न उल्लेख केला, तर तें तावडतोब जाणणारा, किं० ओळखणारा.

अगई [अगे + आई] **अ०** अगाई ! अगआई ! (भीति किं० आश्चर्य यांचें दर्शक अव्यय).

अंगचा वि० "अंग" ह्या शब्दाच्या षष्ठीचें हें एक रूप आहे. ह्यानें घटित वाक्प्रचार पुढें दिले आहेत. ※ **०ची बुद्धि** जन्मजात बुद्धि; ग्रंथाध्ययनापासूनची नसलेली बुद्धि. **०चा झरा** पृथ्वीच्या पोटांतून आलेला झरा) ह्याच्या उलट पावसाळी झरा). **० चा धनी** दुसऱ्यावर अवलंबून नसलेला; स्वतंत्र. **०चा लिहिणारा** आपलें लिहिणें आपण स्वतां लिहिणारा (उलट, कारकुनाकडून, मित्राकडून इ०). **–चा खूर, –चा पाय** इ० त्याच द्रव्यांतून कोरून, खोदून काढलेला खूर, पाय इ०. **– चा कल्पक** ज्याला शिकविल्याशिवाय म्ह० जन्मजात बुद्धीच्या जोरावर कांहीं कल्पना सुचते असा. याच सरणीनें **अंगचा कारागीर, –गाणारा, –शाहाणा. –चितारी, –वक्ता.** इ० चे अर्थ जाणावे.

अंगठा [**सं०** अंगुष्ठ] **पु०** १ हाताचें किंवा पायाचें लठ्ठ बोट. ※ **अंगठेदाम पु०, अंगठ्याचा मान पु०** वधूच्या दाहिणीस वरपक्षाकडून द्यावयाची मानाची देणगी. ही द्यावयाच्या विधीला ' अंगठेदावणी ' म्हणतात.

अंगठी स्त्री० हाताच्या बोटांवर घालावयाचा एक वर्तुळ दागिना. अंगुलीयक.

अंगठोळा [**म०** अंगठा] **पु०** मुलांच्या हातांत घालावयाचा एक दागिना.

अगडधू वि० अतिलठ्ठ. फोपशा माणूस (पुरुष किं० स्त्री).

अगडधूत पु० १ गोसावी, किंवा नागड्यानें हिंडणारा भिकारी. २ अगडबंब किंवा ऐसपैस वाढलेला लठ्ठ माणूस.

अगडबंब वि० अति लठ्ठ.

अगडा पु० गाडीचें जूं आणि दांडी यांना बांधावयाची दोरी.

अंगडी स्त्री०, अंगडें न० लहान मुलांची पायघोळ बंडी, सदरा इ०.

अंगण न० १ घरापुढची मोकळी जागा. २ कोणतेंही विस्तृत पटांगण, जसें रणांगण, मल्लांगण इ०.

अगणनीय, अगणेय, अगण्य [**सं०** अ + गण् = मोजणें] **वि०** अगणित, अपरंपार. मोजतां न येण्याइतकें.

अगणित [**सं०**] **वि०** अलोट, अपार. ज्याची गणती करतां येत नाहीं असें.

अगतिक [सं० अ + गति + क(प्रत्यय)] **वि०** १ ज्याची गति कुंठित झाली आहे (तो). २ पुढें इलाज किं० उपाय ज्याला सुचत नाहीं (तो). ※ **अगतिकगति स्त्री०** नाइलाजास्तव किं० निरुपायास्तव पथकरलेली स्थिति, दशा, व्यवस्था; कशीबशी पथकरलेली व्यवस्था, सोय इ०.

अगत्य न० १ जरूरी. २ आस्था, कळकळ. ३ निष्ठा.

अगत्य, अगत्यपूर्वक, अगत्यसेव, अग -

त्यानें क्रि० वि० जरूर, कळकळीनें, कोणत्याही सबबी न सांगता, निष्ठापूर्वक. ※ **अगत्यवाद पु०** आस्थेची, कळकळीची भावना कि० बुद्धि. **अगत्यवादी वि०** एखाद्या माणसासंबंधी किं० वस्तूसंबंधी आस्था किं० कळकळ बाळगणारा.

अंगत्वानें, अंगत्वें क्रि० वि० ०च्या तर्फेनें, वतीनें. ०चा प्रतिनिधि, गुमास्ता ह्या नात्यानें.

अंगदनीति [सं०] स्त्री० १ वालिपुत्र अंगद ह्यानें रावणाला केलेला उपदेश. २ सन्मार्गानें वागण्यासंबंधाचे नियम.

अंगदशिष्टाई स्त्री० १ रामाची सीता परत दे म्हणजे युद्ध टळेल असें रावणाला सामोपचारानें सुचविण्यासाठीं रामानें पाठविलेला वालिपुत्र जो अंगद त्यानें रावणापुढें केलेली रदबदली. २ (वरील अर्थाचा विपर्यास होऊन) लुडबुडेपणा.

अगदीं क्रि० वि० १ पूर्णपणें. सगळा. सर्वस्वी.

अंगना [सं०] स्त्री० बायको, स्त्री.

अगम्य [सं०] वि० १ ज्याचेकडे किं० जवळ जातां येत नाहीं किं० जाणें अयोग्य आहे असा. २ अत्यंत गहन, दुर्बोध: गूढ. ३ ज्याचें आकलन करतां येत नाहीं असा.

अगम्या [सं०] स्त्री० जिच्याबरोबर सगोत्रत्वामुळें, समानकुलत्वामुळें, फार जवळच्या नात्यामुळें, भिन्नजातित्वामुळें किं० वयानें वडील ह्या कारणांमुळें लग्नसंबंध करतां येत नाहीं अशी स्त्री. ※**—गमन न०** वरील कारणामुळें किं० अन्य कारणांमुळें, जिच्याशीं शरीरसंबंध योग्य नव्हे तिच्याशीं तो संबंध करणें.

अगर [सं० अगरु] अगरु पहा.

अगर } न० १ ठिकाण. २ शेत. ३ साठा. † **तुका०** {

अगर [फा०] उ० अ० किंवा, अथवा.

अंगरखा, अंगराखा पु० [म० अंग राखतो तो] १ अंगांत घालावयाचा एक विशिष्ट प्रकारचा कपडा, हा घोळदार आणि गुडघ्यापर्यंत असतो.

अगरताळ, अगरताळा, अगरताळ्या वि० दांडगेश्वर, धटिंगण.

अगरबत्ती स्त्री० उदबत्तीचा एक प्रकार (चंदनाचें पीठ, कापूर, वगैरे सुगंधी द्रव्यांची कांहीं विशेष प्रकारें केलेली काडी).

अगरवादी [सं० अग्रवादी] पु० तक्रार करणारा, फिर्यादी, वादी. [† **ज्ञा०** {

अगरासेर } स्त्री० शेताची कड किं० मर्यादा.

अगरु, अगरू पु०, न० एक प्रकारचें चंदन.

अगर्ह्य [सं०] वि० अगर्हणीय, अनिंद्य, दोषरहित, निंदेला पात्र नाहीं (तें).

अगल, अगली स्त्री० नांगराचे, गाडीचे, वगैरे बैल हाकणाराची बैठक, जागा इ०.

अगला [हिं०] वि० पुढील, पुढचा (मागला याच्या उलट). पहिला, म्होरक्या. ※ ' **अगला पडला म्हणजे मागला हुषार.** ' पुढल्यास ठेच मागला शाहाणा.

अगल्याबगल्या वि० १ कोणीतरी, यःकश्चित किमतीचा. २ ०चा आश्रित, ०चा बगलबच्चा.

अंगवणें } सं० क्रि० सुकणें, गमावून घेणें. † **तुका०** { | † **तुका०** {

अंगवण } स्त्री० सामर्थ्य. शक्ति. † **ज्ञा०**.

अगवळ, आगवळ [सं० अग्र + वळणें] पु० वेणी, अंबाडा इ० बांधल्यावर केशांचीं टोकें बांधावयाचा दोरा.

अंगसाळ्या वि० दागिने वगैरे घडविणारा सोनार (उलट, **टंकसाळ्या** म० टांकसाळींत काम करणारा).

अंगस्ताळ,—ळा, —ळ्या वि० दांडगेश्वर, उच्छृंखल.

अगस्ति [सं०] वि० ना० १ एका महान तपस्व्याचें नांव. २ अगस्ति नांवाचा तारा. ३ एक प्रकारचें झाड, अगस्ता (याच्या फुलांची भाजी करतात).

अगळ [सं० अर्गला] पु० दार बंद करण्यासाठीं त्याला अडसर लावतात तो.

अगळ स्त्री० वैदुलांच्या खेळांतील खळगा.

अगळगोटी स्त्री०, अगळडाव पु० वैदुलांच्या खेळांतील एक प्रकार (उलट, कोंडडाव).

अगळा, आगळा [हिं०] वि० १ वरचढ, श्रेष्ठ. २ ०पेक्षा अधिक, जास्त.

अंगळी [सं० अंगुलि] स्त्री० १ बोट (हाताचें किं० पायाचें). [२ अधिकारबाह्य वर्तन.

अगळीक, आगळीक स्त्री० १ चूक, अपराध.

अगा [फा० आगाह् = ठाऊक असलेला] पु०, स्त्री० ०ची जाणीव, ०विषयीं अटकळ. ◈ **अगा बांधणें** अटकळ किं० अजमास करणें.

अगा केव० प्रयो० अ० अरे ! अहो !

अंगाई अ० लहान मुलांना निजवितांना आया जें गाणें म्हणतात त्याचें हा शब्द पालुपद आहे. स्त्री० (मुलांच्या संबंधानें) निजणें, नीज, झोप.

अगाई [अगे आई] अ० १ अगबाई ! (हा भीतीचा किंवा आश्चर्याचा उद्गार आहे).

अगाऊ, आगाऊ [हिं० आगव्] क्रि० वि० पूर्वी, अगोदर. वि० पूर्वी दिलेला, किं०यावयाचा; पूर्वी केलेला, किं० करावयाचा इ०

अगाकडा, अंगाकडा पु० एक प्रकारचा रोट, गाकर, पानगी.

अगाजणें अ० क्रि० गाजणें, ०चा गाजावाजा होणें.

अगाजा [फा० आगाजाह्] पु० गाजावाजा, प्रसिद्धि, बोलबाला. ◈ **अगाज्याचा** वि० सर्वत्र माहित असलेला, गाजलेला.

अगांतुक [सं० आगंतुक = बाहेरचा] वि० न बोलावतां आलेला.

अगांतुकी [स० अगांतुकाचें वर्तन इ०] स्त्री० बोलावलेलें नसतां दुसऱ्याच्या घरीं जाणें.

अगाध [सं० अ अभावार्थक + गाध = खोल] वि० १ अति खोल, ज्याचा पार लागत नाहीं असें; अतिशय विस्तृत, विपुल (समुद्र, ज्ञान इ०). २ अशक्य, असंभाव्य, दुर्मिळ.

अगापिछा, आगापिछा [हिं० आगा = पुढची बाजू + पिछा = मागची बाजू] पु० १ मागील पुढील हकीगत, इतिहास. २ पुढची आणि मागची बाजू. ना० मागल्या पिढीचीं आणि पुढल्या पिढीचीं माणसें म्ह० आई बाप, मुलें बाळें इ०. ◈ **अगापिछा पाहाणें** एखाद्या गोष्टीचा सर्व बाजूंनीं विचार करणें. सावधगिरी बाळगून एकादें काम करणें.

अगाबानी स्त्री० एक प्रकारचें कापसाचें बुटीदार कापड. [निखारा.

अंगार [सं०] पु० रसरसीत किंवा पेटलेला

अंगार ⟩ पु० १ निखारा. † ज्ञा० २ राख. † तुका० ⟩

अगार [सं०] न० १ घर, निवासस्थान. २ कांहीं पदार्थ साठवून ठेवण्याची जागा. उ० शस्त्रागार = शस्त्रास्त्रें ठेवण्याची जागा.

अंगारक [सं०] पु० १ मंगळनांवाचा ग्रह (ह्याचा रंग तांबूस असतो).

अंगारकी, अंगारी [सं० अंगारक] स्त्री० कृष्ण पक्षांत मंगळवारीं पडलेली चतुर्थी. (हिला अंगारी चतुर्थी किं० चौथ असेंही म्हणतात).

अगारडा [सं० अग्र] पु० टोक, शेंडा (झाडाचा, जिभेचा वगैरे).

अंगारा [सं] पु० १ देवाच्या मूर्तीसमोर जाळलेल्या पदार्थाची रक्षा (जी भाविक लोक कपाळाला लावतात). २ अशा रक्षेनें कपाळादिकांवर काढलेली आकृति किं० खूण. ३ निखारा, विस्तव. ४ जोंधळ्याच्या ताटांवर पडणारा एक रोग. ५ भूतपिशाचादिकांची बाधा टाळण्यासाठीं मंत्र घालून साधु जी राख कपाळाला वगैरे लावावयाला देतात ती. ◈ **अंगाराधुपारा** पु० खालीं स्वतंत्र शब्द पहा. **अंगाऱ्याला गेला आणि पांगारा वेऊन आला** मोठें काम करायला गेला, आणि यःत्किंचित काम करून आला ! **अंगारा करणें** भूतबाधा होऊं नये किंवा दृष्टबिष्ट लागूं नये म्हणून कपाळास वगैरे अंगारा लावणें. **डाव्या पायाचा अंगारा** लहान मुलांना दृष्ट वगैरे लागूं नये किं० लागली असल्यास तिचें निरसन व्हावें म्हणून आया त्यांच्या डाव्या पायाची माती त्यांच्या कपाळास लावतात, ती. **अंगारा धुपारा करणें**, – वर **अंगारा करणें** पहा.

अंगाराधुपारा पु० १ **अंगारा** (५) पहा. २ अल्प, अपुरा पुरवठा.

अंगावर्त [सं० अंग (शरीर) + आवर्त (भोंवरा)] न० केशांचा भोंवरा (विशेषतः घोड्याच्या अंगावरचा किं० खांद्यावरचा).

अंगाविणें [सं० अंग] स० क्रि० १ अंगाखांद्यावर घेणें, आलिंगिणें. २ आपलेंसें म्हणून घेणें, स्वीकारणें, किं० बागाविणें.

अगाशी, आगाशी [सं० आकाश] स्त्री० १ जिच्या वर छप्पर नाहीं अशी, म्हणजे उघडी गच्ची (प्रत्यक्ष आकाशाखालीं असलेली).

अंगिसुनी ⟩ वि० निश्चल. † तुका० ⟩

अंगी [सं० अंग] **स्त्री०** लहान मुलांचें अंगातलें पैरण, बंडी इ०.

अंगीकरण न०, अंगीकार पु० [सं० अंग + करण] १–चा स्वीकार करणें. २–ला आश्रय देणें. ०ची बाजू उचलून धरणें; पत्करणें. ३ मान्य करणें. ४ हातीं घेणें. ५ स्वीकार.

अंगीकारणें [सं०] **स० क्रि०** १ स्वीकारणें, पत्करणें,–चा पुरस्कार करणें. हाती घेणें. मान्य करणें. –ला संमति देणें.

अंगीकृत [**सं०**]**वि०** १ पत्करलेलें, स्वीकारलेलें, मान्य केलेलें, हातीं घेतलेलें.

अगीन [सं० अग्नि] **पु०, स्त्री०** अग्नि, विस्तव.

अगीनबंद वि० रेशमाचा एक प्रकार.

अंगुठा [सं०'अंगुष्ठ'बद्दल कवितेंत]**पु०** आंगठा.

अगुणा } **वि०** अवगुणी, निर्गुण. † **तुका०** {

अंगुलें } **न०** अंगठी. † **तुका०** {

अगुणी [**सं०** अ + गुण] **वि०** १ गुणरहित. २ दुर्गुणी. ३ नादान.

अंगुल [**सं०**] १ आठ यव पोटास पोट देऊन जी लांबी होते ती. २ वर सांगितलेल्या लांबी इतकें परिमाण. ३ हाताच्या बोटाच्या रुंदीचें परिमाण.

अंगुलि [**सं०**] **स्त्री०** हाताचें किं० पायाचें बोट. ※ **–त्राण** [**सं०** अंगुलि + त्राण] **न०** १ धनुष्याच्या दोरीचा बाण सोडल्याबरोबर बोटांवर दोरीचा प्रत्याघात होतो त्यापासून बचाव करण्यासाठीं बोटांवर घालावयाची चामड्याची पिशवी किं० हातमोजा. **–निर्दिष्ट वि०** बोटानें दर्शविलेलें. **– निर्देश पु०** १ बोटानें दर्शविण्याची क्रिया. **–भंग** [**सं०** अंगुलि + भंग (मोडणें)] **पु०** १ बोटें मोडणें वगैरे; बोटांचे सांधे साफ, सैल, करणें. २ शाप देते समयीं किं० आनंद सूचित करतें समयीं स्त्रिया दोन कानशिलांवर दोन हातांचीं बोटें मोडतात ती क्रिया. **– नर्तन न०** १ आपण कांहीं विचारांत मग्न असतां आपल्या बोटांच्या ज्या सहजासहजीं हालचाली चाललेल्या असतात त्या. **–संदेश पु०** १ करपल्लवी; बोटांच्या खुणांनीं विचारविनिमय करावयाची भाषा.

अंगुलीयक [**सं०**] **न०** १ अंगुलीवर किंवा बोटावर वापरावयाचा दागिना; अंगठी.

अंगुष्ट [**सं०**] **पु०** १ आंगठा. ※ **अंगुष्टपर्व** अंगठ्याचें पेर. **अंगुष्टाची आग मस्तकांत जाणें** अतिशय रागावणें. **अंगुष्टावरून दशशिर करणें** १ थोडक्या इशाऱ्यावरून सर्वच वस्तुस्थिति जाणणें; थोडक्यावरून पुष्कळ आकलणें. २ राईचा पर्वत करणें; अतिशयोक्ति करणें; पिसाचा कावळा करणें.

अंगुष्टाण, अंगुस्तन, अंगुस्थान, अंगुस्तान [**सं०** **अंगुलिस्थान, अंगुलित्राण**] **न०** सुईचा नेढ लागूं नये म्हणून शिवण्याचे वेळीं शिवणारा माणूस आपल्या बोटाला पत्र्याची लहानशी टोपी घालतो ती.

अंगुस्ती स्त्री०, अंगुस्त न० १ एकादी भेसुर किंवा किळसवाणी वस्तु पाहिली असतां, किंवा एखादा कर्णकटु, कर्कश, आवाज ऐकला असतां, आपल्या अंगांत जी थरारी उठते, किंवा आपल्याला जे शहारे येतात ते; शिरशिरी. उ० औषधाचें बोटलें पाहातांच त्या मुलानें अंगुस्ती दिली.

अंगुळी, – अंगुलि पहा. ※ **अंगुळी सुजली म्हणून डोंगराएवढीं होणार नाहीं** प्रत्येक गोष्टीला नैसर्गिक किंवा ज्याचा त्याचा निर्बन्ध असतात, ते कोणासच केव्हांही उल्लंघितां येत नाहींत.

अंगुळू [गोंड भाषेंतील शब्द] **स्त्री०** दहा.

अगून [**सं०**'अंग' ची पंचमी] **क्रि० वि०** –च्या बाजूनें, तर्फेनें, कडून.

अंगूर [**फा०**] **पु०** द्राक्ष, द्राक्षें.

अंगूर [**सं०** अंकुर] **पु०** **अनेक व०** बरी होत आलेल्या जखमेचा खरखरीत पृष्ठभाग.

अंगूळ [सं० अंगुल] **न०** '**अंगुल**' पहा. ※ **–वेढें न०** बोटावर दागिना म्हणून घालावयाचें वळें.

अगे अ० हे ! अग ! आपल्याहून वयानें किं० दर्जानें लहान अशा स्त्रीला उद्देशून बोलतांना किंवा हाक मारतांना योजावयाचें अव्यय. उ० अगे चंद्रे!

अंगेजणें स० क्रि० "**अंगीकारणें**" पहा. (हें क्रियापद कवितेंत आढळतें).

अगेरी, अग्यारी, आगियारी स्त्री० पारश्यांची अग्निशाळा, (जेथील अग्नि कधींही विझूं दिला जात नाहीं.)

अंगेष्टी } **स्त्री०** १ अंगयष्टि, शरीररूप काठी. अंगाचा बांधा. २ देहप्राय नमस्कार. † **ज्ञा०** {

अगा अ० स्त्रियांना संबोधन बोलतांना किं० स्त्रियांना हाक मारताना योजावयाचें अव्यय; **गो** असाही शब्द रूढ आहे. **अगो** आणि **गो** ह्यांचा प्रचार कोंकणांत आहे.

अगोचर [सं० अ अभावार्थक + गोचर = इंद्रि-यांना कळतें तें] **वि०** १ जें इंद्रियांना कळत नाहीं तें. २ दांडगा, आर्प, धटिंगण. उ० तूं किती अगोचर आहेस रे (किं० गे) ? **अगोचरपणा** पु० आर्पपणा, दांडगाई.

अगोचरी **स्त्री०** योग्याचें एक विशिष्ट आसन.

अगोट, –ठ **स्त्री०** १ पावसाळ्याची सुरवात किं० सुरवातीनंतरचा कांहीं काळ. २ स्वंध पाव-साळ्याचा काळ.

अगोदर **क्रि० वि०** पूर्वी, आधीं.

अगोदरचा **वि०** आधींचा, पूर्वीचा.

अंगोपचार } **पु०** देवाच्या मूर्तीचे उपचार. † **ज्ञा०** {

अगोस्ती **स्त्री०** **अंगुस्ती** पहा.

अग्नि [**सं०**] **पु०** १ विस्तव. २ अग्नीचा देवता. ३ पूर्व आणि दक्षिण ह्या दोन दिशांच्या मधलीचा अधिपति. ४ आपल्या पोटांतील पचनक्रिया करणारी उष्णता. ५ पृथ्वी, अप्, तेज, वायु, आणि आकाश, हीं जी पंचमहाभूतें त्यांतील तिसरें. ॐ **एकाद्यावर अग्नीचा पाऊस पडणें** त्याच्या वर एकाच काळीं अनेक संकटें गुदरणें. **अग्निकाष्टें भाक्षिणें** सती जाणें. नवऱ्याच्या चितेंत बायकोनें स्वतास दहन करून घेणें. **–कण** **पु०** १ विस्तवाची ठिणगी. **–काष्ठ** **न०** १ पेटलेलें, जळणारें लाकूड. २ रसरशीत निखारा. **–क्रीडा** **स्त्री०** शोभेची नळे, चंद्रज्योती, फुलबाज्या, इ०. दारू उडविणें. **–खांब** **पु०** १ रसरशीत, तापविलेला धातूचा खांब. यमाचे किंकर पाप्यांना शासन करण्यासाठीं असल्या खांबांस बांधतात. **–कुंड** **न०** होमाचें वेळीं अग्नि प्रज्व-लित करावयाचा खळगा किं० भांडें. **–कुमार** **पु०** एक प्रकारचें औषध किंवा रसायन. **–चक्र** **न०** योगशास्त्रांतील एक पारिभाषिक शब्द. **–ज्वाला** **स्त्री०** विस्तवाचा जाळ; जाळाचा झोत. **–तीर्थ** **न०** तळहाताचा खळगा ज्यांतून पाणी घ्यालें जातें. किं० ज्यावर दक्षिणा दिल्यावर पाणी सोडलें जातें. **–नाश** **पु०** १ होमाचें वेळीं प्रदीप्त केलेला अग्नि विझणें हें दुश्चिन्ह असून त्यास प्रायश्चित्त सांगितलें आहे. **–परीक्षा** **स्त्री०** अग्निदिव्य. **–पुट** **न०** (वैद्यकांत) मात्रा करते वेळीं मात्रांच्या घटकद्रव्यांस अग्नीची आंच देण्याची क्रिया. **–प्रद** **वि०** जठराग्नि प्रदीप्त करणारें (औषध). **–प्रवेश** **पु०** नवऱ्याच्या चितेंत त्याच्या स्त्रीनें त्याच्याच शवाबरोबर स्वतास जाळून घेणें. **–मणि** **पु०** सूर्यकांत मणि. **–मांद्य** **न०** पोटांतील पाचकशक्तीची अशक्तता किं० दुर्बलता. **–मुख** **न०** पचनक्रिया वाढविणारी एक औषधि. **अग्निस्थान** } **न०** योगशास्त्रोक्त त्रिकुटिमध्यस्थ द्विदल–दोन पानांचें चक्र. † **ज्ञा०** { **–शाला** **स्त्री०** होमशाळा. **–होत्र** **न०** गृहस्थाश्रमी ब्राह्मणांनीं शास्त्रोक्त अग्नीत सांजसकाळ होम करण्याचा विधि. **–होत्री** **पु०** अग्निहोत्र करणारा ब्राह्मण. २ एकसारखी तंबाखू ओढणारा (विनोदां-तील उपयोग). **अग्न्युत्पात** **पु०** १ अग्नीनें किं० वीज पडून जो अनर्थ होतो तो. २ उल्कापात.

अग्या **ना०** (मुलांच्या खेळांत) म्होरक्या, पुढारी.

अग्यारी **स्त्री०** **अगेरी** पहा.

अग्र [**सं०**] **न०** टोक, शेवट, शेंडा, कळस, उर्ध्वभाग. २ (समासांत) मुख्य, प्रधान, महत्त्वाचा. ॐ **अग्रासन** [**सं०** अग्र + आसन] **न०** मुख्य बसा-वयाची जागा. जसें सभास्थानीं अध्यक्षाची खुर्ची, दरबारांत राजाचें सिंहासन, देवळांत शास्त्रीबोवांचें व्यासपीठ. **अग्रका, अग्रजा** **स्त्री०** १ ग्रहाच्या उदयास्ताचे क्षितिजबिंदु आणि पूर्व पश्चिम क्षितिजबिंदु यांच्या मधला कंस. **–गण्य** **वि०** मुख्य, प्रधान, श्रेष्ठ, अग्रस्थानच्या मानाला योग्य. **–गामी** **पु०**, **अग्रगामिनी** **स्त्री०** १ पूर्वगामी, म्होरक्या, अग्रेसर, पुढारी. आघाडीस किंवा आरंभीं असणारा, –री. **–ज** **वि०** १ वडील. साऱ्यांत आधीं जन्मलेला. **पु०** वडील भाऊ. **–जा** **स्त्री०** १ अगोदर जन्मलेली. २ वडील बहीण. **–णी** **पु०** पुढारी, म्होरक्या, मार्गदर्शक. **–धान्य** **न०** शर-दृतूंत पिकणारें धान्य; खरीपाच्या हंगामाचें धान्य. **–पूजा** **स्त्री०** सन्मान. पहिली पूजा. श्रेष्ठ मान. **–भाग** **पु०** १ ऊर्ध्वभाग, पुढील भाग. २ टोक, माथा, शेवट. कळस. **–भोजन** **न०** १ आधीं

जेवणें (इतरांच्या पूर्वी जेवण्याचा मान, हक्क, असल्यामुळें). –भोजी वि० १ अग्रभोजनाचा, किंवा इतरांच्या अगोदर जेवण्याचा मान, कि० हक्क असणारा. २ अग्रभोजन करणारा. –वर्ती वि० पूर्वीचा, आधींचा; पुढें असलेला. –वादी पु०, वादिनी स्त्री० १ फिर्यादी, तक्रार करणारा. २ आपलें मत जोरानें प्रतिपादणारा. –सर वि० खालीं अग्रेसर पहा. –हार पु० ब्राम्हणांना उदरनिर्वाहार्थ दान केलेल्या जमिनी किंवा गांवें. अग्रांशु [सं० अग्र + अंशु (किरण)] पु० प्रकाशाच्या किरणाचा शेवट, किंवा त्याचें टोंक. अग्रेवन न० अरण्याच्या कडा किं० अरण्याचा कांठ. अग्रेसर पु० पुढें सरणारा, पुढाकार घेणारा, नेता, पुढारी, म्होरक्या. अग्रोदक [अग्र + उदक] न० अगदीं पहाटेस विहिरींतून वगैरे काढलेलें पाणी, म्हणजे स्वच्छ निर्मळ, पाणी.

अग्रा [सं०] स्त्री० खस्थ ज्योति उगवतात किंवा मावळतात तेव्हां त्यांचें पूर्वबिंदूपासून जें अंतर असतें तें.

अग्राह्य [सं० अ (निषेधार्थक + ग्राह्य = घेण्याजोगा] वि० १ अग्रहणीय; स्वीकारण्यास अयोग्य किंवा अशक्य.

अग्रिम [सं०]वि० १ पुढला, पुढील. २ मुख्य, प्रधान, आदिम. ३ अग्रज, वडील. ※ –धान्य न० शरदृतूंत पिकणारें धान्य. खरीपाचें धान्य.

अग्र्य [सं०] वि० मुख्य, पुढें असलेला, पुढें असावयाला योग्य. [३ वदकर्म.

अघ [सं०] न० १ पाप. २ गुन्हा, अपराध.

अघटमान [सं०] वि० १ कधींही घडून न येण्याजोगा; अशक्य कोटींतील. २ असंभाव्य.

अघटित [सं०] वि० १ घडण्यास अशक्य. २ भीतिप्रद, अवलक्षणी. न० १ चमत्कारिक, आश्चर्यजनक, नवलाची, कि० अश्रुतपूर्व गोष्ट, किं० प्रसंग इ० २ लोकोत्तर साहसाचें कृत्य. ※ अघटितघटना [सं०] स्त्री० विलक्षण, अश्रुतपूर्व, अशी घडलेली गोष्ट, प्रसंग वगैरे. अघटितविंदान न० १ आश्चर्यकारक, अद्भुत, कृति. २ विलक्षण गोष्ट.

अघड वि० १ न घडविलेला. २ मूळ रूपांतच असलेला (दगड इ०).

अघननघन, अघाननघान, अघानीनघानी [फा० नाघान = एकाएकी, अकस्मात; विना कारण; कुरापत नसतां.

अघरडा [सं० अग्र ?] पु० १ टोंक, माथा, शेवट.

अघवा, अघा वि० सर्व, समग्र, दरोबस्त.

अघळणें, अघाळणें स० क्रि० पाण्यात कपडा स्वच्छ करण्याकरितां खळबळणें.

अघळपघळ वि० ऐसपैस, विपुल, प्रशस्त. २ मन मोकळें करून, संकोच न बाळगतां, केलेलें (भाषण). क्रि० वि० मोकळ्या मनानें; संकोच सोडून, न बाळगतां.

अघळाअघळ स्त्री० पाण्यात कपडे वगैरे खळबळण्याची क्रिया.

अघाडा पु० एक प्रकारचें लहानसें झुडूप.

अघाडा पु० वेणी, अंबाडा, वगैरे घालतांना स्त्रियांनीं केशांचा मुठींत धरलेला टोंक.

अघाडी [हिं०] स्त्री० १ पुढली बाजू. २ सैन्याच्या तोंडच्या, म्ह० सैन्यांत पुढल्या तुकड्या. (पिछाडीच्या उलट). ३ घोडा ठाण्यावर बांधतांना त्याच्या गळ्यांत आणि बाजूस अडकवावयाच्या दोऱ्या. ※ –घेणें पुढाकार घेणें. –मारणें पुढच्या भागावर हल्ला करणें. –साधणें सर्वांच्या अगोदर एखादी गोष्ट करणें.

अघाडी क्रि० वि० पुढें, अग्रभागीं.

अघाडीपिछाडी [हिं०] स्त्री० १ पुढील बाजू आणि मागील बाजू. २ सैन्याच्या पुढल्या मागल्या तुकड्या. ३ घोडा तबेल्यांत बांधतांना त्याच्या गळ्याला बांधावयाच्या आणि मागल्या पायांना बांधावयाच्या दोऱ्या.

अघोर [सं०] वि० १ क्रूर, भयंकर. २ किळस, शिसारी, किं० खंती वाटविणारा. ३ चिंता, विवंचना, किंवा काळजी, नसलेला; निश्चिन्त. ४ विलक्षण, अचाट. उ० अघोर कर्म, दंड, निद्रा, पातक, दुःख, यातना, कष्ट, इ०. ※ अघोर पंथ, –मार्ग, –योग पु० अघोरी लोकांचा पंथ, मार्ग, योग. खालीं अघोरी पहा. } पु० नरकविशेष. तुका० }

अघोरजप }पु०पिशाच्च मंत्राचा जप. † तुका० }

अघोरी [सं० अघोर = अत्यंत भयंकर, हिंडिस्स] वि० विलक्षण, राक्षसी, किळसवाणीं कर्म करणारा. पु० हा शब्द एका विशिष्ट

मागांच्या किंवा पंथाच्या भिकाऱ्यास लावतात. हे नग्न स्थितींत किंवा नुसत्या लंगोटीनिशीं बाजारांत हिंडतात, व रक्त काढून, मूत पिऊन, डोळ्यांचीं बुबुळें बाहेर काढून, अंगांत, जिभेंत वगैरे सुया भोसकून दुकानदारांस खंती, दया, वगैरे वाटावयास लावतात, व त्यांच्याकडून पैसे उकळतात, व अशा तऱ्हेनें गांवोगावीं हिंडतात. अशा रीतीनें शरीराला छळणें संवयीनें त्यांना साध्य झालेलें असतें. त्यासच अघोरयोग, –मार्ग, –पंथ अशी संज्ञा आहे, आणि अघोरयोगी, –पंथी, –मार्गी हे अघोरी शब्दाचेच प्रतिशब्द होत.

अंघोळ स्त्री० स्नान; अंगधुणें.

अचकट, अचकटविचकट वि० १ अश्लील, घाणेरडें, असभ्य, फाजीलपणाचें.

अचकबोचक, अचकबचक क्रि० वि० अव्यवस्थितपणें, भरमसाटपणें.

अचकाविचका पु० १ दांडगाईमुळें झालेली नासाडी, दुर्दशा. २ गोंधळ, बिघाड.

अचकी स्त्री० उचकी. मनुष्य मरतांना किंवा बुडतांना त्याचे प्राणवायु निघून जातात त्यावेळचें त्याचे जे हिसके ते प्रत्येक.

अचंचल [**सं०**] **वि०** १ चंचल नव्हे तें; स्थिर, निश्चळ. २ एकनिश्चयी, स्थिरवृत्तीचा.

अचतुर [**सं०** अ + चतुर] **वि०** १ चतुर किंवा शाहाणा नव्हे असा. २ जड हाताचा, बिनकसबी. ३ मंदबुद्धि, जड, धोरण न समजणारा.

अचपळ [**सं०** अ + नाहीं चपळ ज्याहून] **वि०** १ भराऱ्या मारणारें, आवरण्यास कठिण (मन वगैरे);उच्छृंखळ. २ खोडकर, चंचळ, व्रात्य (मूल इ०). ३ तल्लख, तत्पर.

अचंबा [**हिं०**] **पु०** १ आश्चर्य, विस्मय, चमत्कार. २ आश्चर्य वाटविणारी वस्तु, पदार्थ इ०.

अचंबीत क्रि० वि० अचानक; झट्दिशीं; लक्ष्यांत न येईल अशा सफाईनें.

अचर [**सं०** अ + चर] **वि०** न हालणारें; स्थिर, स्थावर (झाडें, पर्वत, घरें, इ०).

अचरट वि० १ मूर्ख, बावळट, अर्धवट. २ अक्कल कमी असल्याकारणानें मूर्खासारखें वर्तन करणारा.

अचरटपचरट वि० बेचव. रूक्ष (खाद्य वगैरे). २ पाल्हाळिक. असंबद्ध, मूर्खपणाचें (भाषण इ०).

अचरपचर. अचरबचर न० रूक्ष. बेचव (अन्न वगैरे).

अचल [**सं०** अ + चल] **वि०** न हालणारें; स्थिर. **पु०** पर्वत. उ० हिमाचल, विंध्याचल, इ०.

अंचल [**सं०**] **पु०** १ एखाद्या वस्त्राची कड कि० किनार, पदर. २ वस्त्राचे सोगें. ३ योग्यानें वापरावयाचें एक वस्त्र.

अचला [**सं०**] **स्त्री०** पृथ्वी. **वि० स्त्री०** न हालणारी. ꣸ **अचलागौर स्त्री०** मकरसंक्रांतीचे दिवशीं स्त्रिया ज्या एका स्त्रीला एकाच ठिकाणीं बसवून ठेवून तिला कांहीं हालचाल करूं न देतां बसल्याच जागीं खाऊं पिऊं घालतात ती.

अचलित [**सं०**] **वि०** १ स्थिर. न हालणारें; हालवितां न येतें तें. २ न हालविलेलें.

अंचवण [**सं०** आचमन] **न०** जेवणानंतर हात धुणें.

अंचवणें [**सं०** आचमन] **अ० क्रि०** १ जेवण झाल्यावर हात धुणें. (**आंचवणें** हें ज्यास्त शुद्ध रूप). २ ० ला मुकणें, सर्वस्वा गमावणें ꣸ **जेवावयास पंचामृत अंचवावयास खारें पाणी** =आनंदात प्रारंभ आणि दुःखांत समाप्ति.

अचळ, अंचूळ, अंचोळ, अचोळ न० गायी, म्हशी, इ० चें थान.

अचळ क्रि० वि० अलगत; धक्का न लागेल. हिसका न बसेल, अशा रीतीनें; सौम्यपणानें.

अचळ [**सं०** अचल = न हालणारें] **वि०** न हालणारें; स्थिर. ꣸ **–पद न०** न ढळणारें किं० न बदलणारें स्थान (ध्रुवाच्या ताऱ्याचें इ०).

अचळवी वि० १ न हालविलेलें, न स्पर्शिलेलें, न ढवळलेलें, (दहीं, वस्त्रें इ०.) ꣸ **– वाण न०** मकरसंक्रांतीच्या आधल्या दिवशीं दहीं विरजून तें न हालवितां दुसऱ्या दिवशीं भांड्यासकट, –जिचें एकही मूल मेलेलें नाहीं अशा, –सुवासिनीस दान देतात तें वाण. (हें वाण देणाऱ्या स्त्रीस आयुरारोग्य प्राप्त होऊन तिचीं मुलें अल्पायु मरत नाहींत).

अचळवी क्रि० वि० हलकेंच, नाजूक हातानें. सौम्यपणानें (स्पर्शिलेला पदार्थ न हालेल, न डिचमळेल अशा रीतीनें).

अचळ [**पु०** आंचा (लुगडें, धोतर, इत्यादींचा. † **तुका०**]

अंचळी, आंचळी [**सं०** अंचल = पदर] **स्त्री०** १ वस्त्राच्या कडेस सुटे सुटे धागे किनारीसाठीं ठेवलेले असतात ते प्रत्येक.

अचळोजी, अचळोबा पु० लठ्ठ, कापशा, आळशी माणूस (विनोदानें, कुचेष्टेनें).

अचांगणें अ० क्रि० अपकर्षाच्या स्थितीस पोंचणें; अशक्त, कमजोर, निरुत्साह होणें.

अचांचल्य [**सं०** अ + 'चंचल' चें भाववाचक नाम] **न०** स्थिरता (वागणुकीची, विचाराची, वगैरे).

अचाट वि० विलक्षण, असामान्य, लोकोत्तर. (कल्पना, बुद्धि, बळ, इ०). ॐ **अचाट खाणें मसणांत जाणें** अचाटपणानें खाण्याचा परिणाम मरण. **अचाट बुद्धि खेळवावी बळेंच संपत्ति मेळवावी** लोकोत्तर बुद्धि चालविली तर पैसा हटकून मिळतो.

अचानक [**हिं०**] **क्रि० वि०** १ एकाएकी, पूर्वसूचना किं० कल्पना नसतां. २ नेमका, सरळ, कांहीं हरकत किंवा अडथळा न येतां, बिनचूक. ३ हलकेंच, गाजावाजा न करतां, गुपचूप. ४ सहजपणें, प्रयास न पडतां. ५ यदृच्छेनें.

अचापल्य [**सं०**] **न०** स्थैर्य, अचांचल्य.

अच् (संस्कृत व्याकरणांत) स्वर (अ, आ, इ, इ०. ॐ **–संधि पु०** स्वरसंधि (व्याकरणांत).

अचाल [**म०** अ + चाल=गति] **स्त्री०** काम बंद पडणें किं० अडणें, खंड, व्यत्यय, थांबणूक.

अचावचा, अचावच्चा क्रि० वि० अद्वातद्वा, भरमसाटपणें, तोंडाला येईल तसें (बोलणें).

अचिकित्सनीय [**सं०**] **वि०** १ ज्याची चिकित्सा, वाटाघाट, करतां येत नाहीं किं० करणें योग्य नाहीं असा (विषय). २ ज्यावर औषधोपचार काय करावा हें समजत नाहीं, किंवा करतांच येत नाहीं असा; बरा न होणारा इ० (रोग).

अचिंतित [**सं०** अ + चिंतित] **वि०** पूर्वी न चिंतिलेलें, पूर्वी मनांत नसलेलें किं० न आणलेलें; पूर्वी कल्पनेंत नसलेलें; एकाएकीं उद्भवलेलें.

अचिन्त्य [**सं०** अ + चिंत्य] **वि०** १ ज्याचा विचार करतां येत नाहीं असें; ज्या विषयीं तर्कानें ज्ञानप्राप्ति होत नाहीं असा (ईश्वर). २ गूढ, दुर्ज्ञेय. ॐ

अचिन्त्याव्यक्त [**सं०** अचिन्त्य + अव्यक्त] **वि०** ज्याच्या विषयीं तर्क करतां येत नाहीं व जो इंद्रियांना गोचर होत नाहीं असा (ईश्वर). **पु०** ईश्वर.

अचिर, अचिरात, अचिरेंकरून [**सं०** अ + चिर (फार वेळ)] **क्रि० वि०** लवकर, थोड्याच वेळांत. ॐ **अचिरकाळ पु०** अल्प किं० थोडका कालावधि. **अचिरस्थायी वि०** लवकर नाश पावणारा, अशाश्वत, क्षणिक.

अचुंबित [**सं०** अ + चुंबित] **वि०** १ न चुंबिलेली, न भोगलेली. २ नवीन, पूर्वी कोणी न काढलेली (युक्ति, कल्पना, शिकमत इ०).] १ संपूर्ण. २ अस्पष्ट. ३ बिनचूक, † **ज्ञा०**

अचूक [**म०** अ नकारार्थक + चूक] **क्रि० वि०** न चुकतां, बिनचूक. **क्रि० वि०** १ अचानक, एकदम, एकाएकीं, २ लक्ष्याला गांठून, लक्ष्य न चुकतां. ॐ **–संधान न०** १ बिनचूक लक्ष्यवेध. २ वाग्बाणांचा मारा. **–संधानी पु०** १ बरोबर लक्ष्यवेध करणारा. २ वाग्बाणांचा, इष्टपरिणामी मारा होणारा. नेमकी, बिनचूक वितानें, किं० तर्क करणारा.

अचेतन [**सं०** अ + चेतना] **वि०** १ मृत. २ जड (धोंडा, लाकूड इ०). ३ चलनवलन नसलेला (मूर्च्छित माणूस इ०).

अचैतन्य [**सं०** अ + चैतन्य] **न०** १ मूर्छा. २ निरुत्साहीपणा, जिवन्तपणाचा किं० तरतरीचा अभाव. ३ मंदपणाची स्थिति.

अचोज [**म०**] आश्चर्य, नवल.

अचोष्य [**सं०** अ + चोष्य] **वि०** जें चोखतां किं० चुंफितां येत नाहीं (असें).

अच्छंदस्क [**सं०** अ + छंदस् + क (प्रत्यय)] छंदस् शास्त्राच्या नियमांना सोडून असलेला; छंदोनियमांचें उल्लंघन करणारा.

अच्छिद्र [**सं०** अ० छिद्र + भोक] **वि०** १ छिद्र किं० भोक नसलेलें. २ उणीव किं० व्यंग नसलेलें.

अच्छिन्न [**सं०** अ + छिन्न (मोडलेलें)] **वि०** संपूर्ण, अखंड; भोक न पाडलेलें (रत्न); न तुटलेलें, न तोडलेलें, अभग्न.

अच्छेर [**म०** अर्धा + शेर] **पु०** अर्धा शेर, दोन पावशेर (वजनी किंवा मापी).

अच्युत [**सं०**] **वि०** न गळलेलें, भ्रष्ट न

झालेलें; न पडलेलें; अढळ, स्थिर. पु० श्रीविष्णूचें नांव. ꕥ **अच्युतफल** न० आंबा (चूतफळ ह्याचें अशुद्ध किं० अपभ्रष्ट रूप).

अज [सं० अ नाहीं + ज (जन्=जन्मणें)] वि० १ ज्याचा जन्म झाला नाहीं (असा), स्वयंभु. (ईश्वर). २ बोकड. ३ ब्रह्मदेव. ४ रघुवंशीय एका राजाचें (दशरथाच्या बापाचें) नांव.

अज [फा०] न० अनेक सदरें वेगळीं वेगळीं छावीं, आणि बेरजांचा ताळा पाहतां यावा, म्हणून सदरवार बेरजेची पंक्ति. ꕥ **अजीं न करणें** मुळींच नसणें. **अजीं वजा करणें** वगैरे बेरजेंतून वाद करणें. **अजीबात** क्रि० वि० पूर्णपणें, अगदीं.

अजडांश [सं० अ + जड + अंश] पु० पंच-महाभूतात्मक शरीर नसलेला (ब्रह्म, आत्मा, इ०).

अजंगम वि० स्थावर; झाडें, पर्वत, इ०.

अजगर [सं०] पु० एक प्रकारचा लांबलचक आणि लठ्ठ साप. तो तीस चाळीस फूट लांब असून माणसें, जनावरें, यांस न चावतां गिळून टाकतो. भक्ष्य गिळिल्यानंतर तो झाडाभोंवतीं विळखे घालतो, अंगातल्या अंगांत भक्ष्याचा चुराडा करतो, आणि नंतर तसाच भक्ष्यपचनार्थ पडून राहतो. २ (लक्षणेनें) आळशी किं० सुस्त माणूस. ३ देहधारणाला जरूर तीं कामें न करतां आणि देहाचें होईल तें होओ अशा निर्धारानें जो ईश्वरचिंतन करीत अजगरासारखा राहातो तो (तपश्चर्येचा एक प्रकार). ꕥ **अजगरासारखा पसरणें, निजणें, लोळत पडणें** सुस्तपणें पडणें, निजणें, लोळणें.

अजगूल वि० १ अशक्त; भक्कम किं० मजबूत नव्हे तो; अधू, (पदार्थ, बांधकाम, इ०). २ स्वव्यापार करावयाला असमर्थ (इंद्रिय, अवयव, इ०). ३ अपेक्षित काम करावयाला निरुपयोगी.

अजतरफ [फा० अज् (कडून) + तर्फ् (बाजू)] ०च्या बाजूनें किं० तर्फेनें; ०च्या कडून.

अंजन [सं०] न० १ डोळ्यांत घालावयाचें काजळ, सुरमा, इ०. २ भूमिगत द्रव्य, पाणी, इ० दिसावें म्हणून डोळ्यांत घालावयाचें चूर्ण, किंवा द्रव पदार्थ. ३ (लक्षणेनें) झणझणीत उपदेश. ꕥ **अंजनहारी** पु० अट्टल म्ह० कुशल चोर (जो डोळ्यांतील काजळ चोरूं शकतो).

अंजन, अंजनी स्त्री० एक प्रकारचें झाड.

अजन्म [सं० अ अभावार्थक + जन्म= उत्पत्ति] १ जन्मरहित. २ ज्याचा अद्यापि जन्म झाला नाहीं. ३ अनादि कालापासून अस्तित्वांत असलेला.

अजप [सं० अस्पष्ट रीतीनें जप करतो तो] पु० १ यथाशास्त्र जप न करणारा ब्राह्मण. २ शास्त्र-निषिद्ध ग्रंथ वाचतो तो. ३ श्वास घेणें व सोडणें ह्या क्रियांनीं होणारा ' हंस ' मंत्र.

अजपा [सं०] स्त्री० " हंस " नांवाचा मंत्र-विशेष. ꕥ **अजपाजप** पु० ' हंस ' नांवाचा मंत्र.

अजब [अ०] वि० चमत्कारिक, आश्चर्यकारक, विलक्षण, अद्भुत, असामान्य. ꕥ **—खाना** पु० विचित्र-वस्तुसंग्रहालय; पदार्थसंग्रहालय.

अजबाई [अ० अजब + मराठी प्रत्यय] स्त्री० अजबपणा, नवलाई, अद्भुतता.

अजबाब [अ० असबाब] स्त्री० १ चीजवस्त. २ सामानसुमान. ३ युद्धसामग्री.

अजम [अ० अजीम=बडा माणूस] वि० पत्रांत मुसलमान गृहस्थाच्या नांवामागें योजावयाची पदवी; उ० अजम अबदुल करीम.

अजमत [अ० अजीमत=मोठेपणा] स्त्री० मोठेपणा; सामर्थ्य. ꕥ **—खान** पु० अवरंगजेब बादशहानें जेजूरीच्या खंडोबाला दिलेलें नांव (खंडोबाच्या प्रभावामुळें जेजुरीहून अवरंगजेब बादशाहाला एके प्रसंगीं पळ काढावा लागला होता). ꕥ **जेथें अजमत तेथें करामत** जो खरोखरी मोठा तोच कांहीं कर्तबगारी करूं शकतो.

अजमाव [हिं०] पु० अदमास, अंदाज, सुमार.

अजमावणें [हिं०] स० क्रि० १ ०चा अंदाज करणें, ०चा ठोकताळा पाहाणें. २ ०ची परीक्षा करणें. ३ पारखून किं० करून पाहाणें.

अजमास [फा० आजमाईष्=अंदाज] पु० अदमास, अंदाज, ठोकताळा.

अजमासणें [फा०] स० क्रि० ०चा अंदाज करणें, ०चा ठोकताळा बांधणें.

अजमासी [फा०] वि० १ साधारणपणें किं० अदमासें ठरविलेला; अनमान धबक्यानें किं० अनुमानानें निश्चित केलेला.

अजमोदा पु० स्त्री० ओंव्याची एक जात, (हिंगाष्टकाचें एक घटक द्रव्य).

अजय्य [**सं०**] **वि०** अजिंक्य, न जिंकतां येण्याजोगा.

अजर [**सं०** अ + जरा = म्हातारपण] **वि०** १ ज्याला म्हातारपण, वार्धक्य, नाहीं असा; सदा तरुण. २ अक्षय; नाशवंत नव्हे तो. **न०** परब्रह्म. ※ **अजरामर** [**सं०** अजर + अमर] **वि०** १ जरा-मृत्युरहित; चिरकालिक; यावच्चन्द्रदिवाकरौ टिक-णारा; अक्षय.

अंजलि [**सं०**] (मराठींत) **पु०, स्त्री०** १ ओंजळ. २ अर्घ्य द्यावयाच्या वेळीं दोन्हीं हातांचे पंजे एकत्र जुळवून झालेला खळगा, किंवा त्यांतील अर्घ्य. ※ **अंजलि जोडणें** नमस्कार करण्याकरतां, वंदन करण्याकरतां, दोन्हीं हातांचे पंजे जुळविणें; नमस्कार करणें.

अजवला पु० काळी तुळस.

अजवान [**हिं०**] **पु०** वनस्पतिविशेष.

अजस्त्र, अजस्र वि० विलक्षण मोठें, अवा-ढव्य, जगडव्याळ.

अजहत्स्वार्थलक्षणा, अजहल्लक्षणा [**सं०** अ = नाहीं + जहत् (सोडणारा) + स्व (आपला) + अर्थ + लक्षणा], [**सं०** अ (नाहीं)] जहत् (सोड-णारा) + लक्षणा] **स्त्री०** शब्दाच्या वाच्यार्थाहून अधिक किंवा कमी किंवा वेगळा अर्थ जेव्हां वाक्यांत घ्यावा लागतो, तेव्हां त्या शब्दावर लक्षणा केली आहे असें म्हणतात. शब्दाचा मूळचा ह्म० वाच्यार्थ घेतलेला असून आणखी कांहीं अधिक अर्थ घेतलेला असल्यास तेथें अजहत्स्वार्थ लक्षणा किं० अजहल्लक्षणा होते. 'कावळ्यांपासून दह्याचें रक्षण कर' ह्या ठिकाणीं कावळे ह्याचा अर्थ कावळे असा घ्यावयाचा असून इतरही दह्याला उपद्रव करणारे प्राणी असा अधिक अर्थ घ्यावा लागतो. ही अजहत्स्वार्थलक्षणा किं० अजहल्-लक्षणा होय.

अजक्षर [**सं०** अच् (अ, इ, इत्यादि स्वर) + अक्षर] स्वर.

अजा[**सं०**]**स्त्री०**१ शेळी, बोकडाची मादी. २ (वेदान्तांत) माया. ※ **अजागलस्तन** [**सं०** **अजा** (शेळी) + गल (गळा) + स्तन (थान)] **पु०** १ शेळीच्या गळ्याखालीं लोंबणारे स्तनासारखे दोन निरुपयोगी अवयव. २ कुचकामाचा मनुष्य. **टीप**:–' अजागलस्तन ' ह्याचें ' अजागळ ' हें तोकडें किं० अपभ्रष्ट रूप. अजागळ = मूर्ख, कर्तृत्व-शून्य, बावळट. ※ **–पालक पु०** मेंढ्या राखणारा; धनगर. **–पुत्र पु०** मेंढरूं (विनोदानें). **–युद्ध न०** पोकळ दटावणीची आरडाओरड. **अजापुत्रं बलिं दद्यात्** गरीब निराश्रित वगैरे माणसांस सर्व छळतात. श्रीमंत किं० समर्थ माणसाच्या कोण वाटेस जातो?

अजागळी स्त्री० दांडगाई; स्वच्छंदीपणाचें चाळे; स्वैराचार.

अजागुरु [**सं०**] **पु०** आपल्या गुरूचा जो गुरु (आध्यात्मिक विषयांत) तो.

अजाण [**म०** अ + जाणणें] **वि०** १ ज्याला स्वत:चें हिताहित कळूं लागलें नाहीं असा. पोरवयाचा व पोरबुद्धीचा. जगांत वागावयाला असमर्थ असलेला. २ कृतघ्न. ३ बुद्धिहीन.

अजाणता [**म०** अ + जाणणें] **वि०** न जाण-णारा, अपक्व बुद्धीचा, अननुभविक, गैरमाहीतगार.

अजात[**सं०**अ(नाहीं) + जात (उत्पन्न झालेला)] **वि०** न जन्मलेला, उत्पन्न न झालेला. ※ **अजात-व्यवहार पु०** पंधरा वर्षांच्या आंतील मुलगा. कायद्यानें वयांत न आलेला मुलगा. **अजातशत्रु पु०** १ शान्त; कोणास त्रास न देणारा मनुष्य. २ धर्मराजाचें नांव (त्याला कोणी शत्रु नव्हता). **अजातपक्ष वि०** ज्याला पंख फुटले नाहींत असा. **अजातसिद्ध वि०** १ निसर्गत: अस्तित्वांत अस-लेलें; स्वयंभु; जन्मसिद्ध.

अजादुजा [**म०** हा आणि दुसरा] **वि०** माझा तुझा. आपलें लोकांचें; आपपर. ※ **अजा-दुजा भाव, –बुद्धि, –विचार** इ० हें आपलें आणि तें लोकांचें असा भाव इ०.

अंजान [**हिं०**] **वि०** अजाण, अडाणी.

अजानवृक्ष पु० आळंदी क्षेत्रीं सद्गुरु ज्ञाने-श्वरमहाराज यांनीं आपली काठी रोंवली, त्यापा-सून उत्पन्न झालेला वृक्ष.

अंजारणें, अंजारणेंगोंजारणें स० क्रि० १ बरें वाटण्याकरतां अंगावरून हलकेंच हात फिरविणें, थोप-टणें, इ०. २ लडीवाळपणें वागणें, एखाद्याचें मन बिलकूल न दुखवितां, त्याच्या कलाप्रमाणें घेऊन, त्याला आपलासा करणें (स्वकार्यसिध्यर्थ). **अंजा-**

रून गोंजारून क्रि० वि० १ एखाद्याच्या कलाप्रमाणें घेऊन, त्याच्याशीं लाघवीपणानें वागून, त्याची स्तुति करून.

अजाहत [अ०] वि० १ कोणा मोठ्या अधिकाऱ्याच्या प्रतिनिधीची पदवी (ही पदवी पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांड्या, आणि सामान्यतः सर्व वतनी गुमास्त्यांना देण्यांत येत असे). २ अखंडित किं० एकसारखी चालत आलेली (वृत्ति इ०).

अजिंक (-क्य) [म० अ + जिकणें] वि० जिकण्यास कठिण. ❀ **अजिंक्यपत्र** न० या इसमानें अमुक विद्येंत, कलेंत, वादांत, कुस्तींत, जय मिळविला आहे अशा अर्थाची सनद इ०.

अजित [सं० अ=नाहीं + जित=जिंकिलेला] वि० न जिंकिलेला. ❀ **–पत्र** न० **अजिंक्यपत्र** हा शब्द वरती पहा. **अजितेंद्रिय** वि० ज्याचीं इंद्रियें किंवा वासना स्वाधीन नाहींत असा.

अजिदिलयखलास [फा० अज्=कडून किं० पासून + दिल = अंतःकरण + अखलास] क्रि० वि० प्रेमानें बद्ध अशा माणसाकडून (दरबारी भाषेंतील पत्रांत लहानानें मोठ्या संबंधानें योजावयाचा वाक्प्रचार).

अजिन [सं० अजिन=हरिण वगैरेंचें कातडें] न० कातडें (हरिणाचें वगैरें); योग्यांचें किंवा शिष्याचें आसन.

अंजिनी पु० वृक्षविशेष.

अंजिरी वि० अंजिराच्या रंगाचें म्हणजे तांबूस हिरव्या रंगाचें (लुगडें वगैरे).

अजिसबब [फा० अज् ई सबब] पासून, कडून (वरिष्ठाकडून येणाऱ्या पत्रांतील वाक्प्रचार).

अजी [सं० आर्या] स्त्री० १ बापाची किंवा आईची आई.२ वृद्ध स्त्रीस द्यावयाची मानाची पदवि

अजीं, अजीबात,–द क्रि० वि० अगदीं, सपशेल, पूर्णपणें, निखालस. **अजींमाफी** [फा० अजीं=अगदीं + माफी (दिलेली सूट)] स्त्री० ज्या जमीनीचा सारा पूर्ण माफ आहे अशी जमीन.

अंजीर पु० १ एक प्रकारचें फळ. २ अंजिराचें झाड. स्त्री० जनावरांना दवा वगैरे देतानां आपल्या हातास त्यांच्या दांतांची वगैरे दुखापत होऊं नये म्हणून त्यांच्या तोंडांत लाकडाचा खुंटा वगैरे घालतात तो (तोंड न मिटावें म्हणून).

अजीर्ण [सं० अ=नाहीं + जीर्ण (पचलेलें)] न० अपचन. वि० न फाटलेलें, न मोडलेलें, न झिजलेलें. ❀ **–विकार** पु० अपचनाचा रोग किंवा आजार. **अजीर्णांश** पु० १ साधारण, थोड्या प्रमाणांत असणारें, अपचन. २ न पचलेलें अन्न. न पचलेल्या अन्नाचा भाग. **अजीर्णी** स्त्री० अपचनावर द्यावयाचा एक विशिष्ट काढा.

अजुनि क्रि० वि० (कवितेंत) अजून; अद्यापि.

अजुरदा [फा० आजुर्दाह्] वि० १ निष्काळजी, बेपर्वा, एखाद्या गोष्टीविषयीं उत्साह, काळजी, उल्हास, नसलेला. २ दुःखी, कष्टी.

अजुरदार [फा० अजूरहदार] पु० मोलानें कामाला लावलेला मजूर किं० बिगारी. ❀ **अजुरदारी** स्त्री० मोलानें कामाला लावलेल्या मजुराचें नियुक्त कार्य किंवा कार्यक्षेत्र.

अजुरा [अ० अजूरह्] पु० १ मोलानें कामाला लावलेल्या मजुराची मजुरी. २ उक्ती कामें करणा. त्यास द्यावयाचे पैसे.

अंजुळ } स्त्री० ओंजळ. [तुका०]

अजूग वि० १ कडेल, फाजील, उद्धट. २ दांडगेश्वर, अनियंत्रित.

अजून क्रि० वि० अद्यापि, इतउत्तर. ❀ **–तरी** क्रि० वि० इतउत्तर, आतांतरी.

अजेगुरू पु० आपल्या गुरूचा गुरु. वर **अजागुरू** पहा.

अजेचीर, अजेवाण [सं० आर्य + म० चीर=लुगडें] न० नवऱ्यामुलाकडच्या वडील माणसानें नवरीच्या आजीस द्यावयाचें मानाचें लुगडें इ०.

अजेय [सं० अ + जेय=जिंकण्याजोगा] वि० आजिंक्य, जिंकण्यास कठिण.

अजोगी वि० १ न रेंगाळणारा; न गमणारा. २ न हालविलेला, न ढवळलेला.

अजोळ [म० अजाचें घर] मातामहाचें म्ह० आईच्या बापाचें घर.

अज्जम, अज्जी, अज्जीबाद वर **अजम, अजीं, अजीबात,–द** हे शब्द पहा.

अजावळ न० लहान मुलांच्या गळ्यांत त्यांना दृष्टविष्ट लागूं नये म्हणून ताइतासारखा घालावयाचा एक दागिना.

अझून क्रि० वि० आतांपर्यंत, अजून देखील. अद्यापि.

अट स्त्री० १ अडचण. २ हरकत. ३ गाडीच्या चाकाखालीं तें घरंगळूं नये म्हणून जो धोंडा वगैरे टेकण लावतात किं० ठेवतात तो. ४ ईर, हेकटपणा, हट्ट. ५ शर्त. ६ सारंगी, वीणा, वगैरे वाद्यांचे तंतु ज्या घोडीवरून म्हणजे पट्टीवरून नेलेले असतात ती. ७ मोट वगैरे थांबल्यावर पूर्वीच्या मोटेंतील पाणी जें अझून वहात असतें तें. ८ जड पदार्थ जागेवरून हालविण्यासाठीं किं० सरकावण्यासाठीं त्याच्याखालीं जो दांडा किं० काठी घालतात ती; तरफ. ९ कोष्टयाच्या मागां-तील एक विशेष उपयोगाचे हत्यार. १० बैदुलांच्या खेळांत बेदूल ज्या बोटानें मारावयाचा त्याला निश्चल आधार मिळावा म्हणून त्या हाताचा अंगठा जमी-नीवर टेकतात तो. ❀ **अटकर** वि० हट्टी, अटी-तटी वाळगणारा, हेकेखोर. **अटखोर, अटदार, अट-बाज** वि० अटकर. **अटीस पेटणें** हट्टास पेटणें, इरेस चढणें, येणें. **अटीचा खेळ** पु० कांहीं तरी शर्त लावून खेळावयाचा खेळ. **अटीची चाकरी** स्त्री० कांहीं विशिष्ट शर्तींवर केलेली किं० करावयाची नोकरी. **अटीचा करार** पु०, **अटीची बोली** स्त्री० उभय पक्षांना ज्याला मान्यता दिली आहे असा ठराव किं० व्यवहार.

अटक [हिं०] स्त्री० १ प्रतिबंध, अडथळा, अटकाव. २ बंदी, कैद. ३ कोष्टयाच्या मागाची फणी ज्या लाकडावर आपटते तें. ४ पंजाबांतील एक नदी; उ० रघुनाथरावानें पेशव्यांचा वैभवशाली झेंडा अटकेस रोंवला. ❀ **अटक पडणें** अडचण पडणें, माला न चालणें, हात टेकावे लागणें. **अटकबंद** वि० कैदेंत घातलेला, अटकावांत ठेवलेला.

अटक { वि० बाधक. [तुका० }

अटकडी स्त्री० माळवदावरची माती धुपून जाऊं नये म्हणून जो मातीचा किं० लाकडाचा बंधारा किं० कठडा करतात तो.

अटकण न० **अडकण** शब्द पहा.

अटकणें अ० क्रि० —ला अटकाव होणें, —ची गति कुंठित होणें, अडकून पडणें. स० क्रि० —ला अट-काव, प्रतिबंध करणें; कुंठित करणें.

अटकर वि० आटोपशीर, सोयीचें, (शरीर, कपडा, घर, वगैरे); अवाढव्य नसलेलें. क्रि० वि० टापटीपीनें, नीटनेटकेपणानें, व्यवस्थित रीतीनें.

अटकळ [हिं०] स्त्री० १ अदमास, अंदाज. २ गणित वगैरे शास्त्रांतील धोपट मार्गी नियम; आडाखा. ३ कोणतीही क्रिया करण्यासंबंधाची ठरलेली पद्धति. ४ पडताळा. ठोकताळा. ❀—**पंच-विशी** स्त्री० अनुमानधपक्यानें जें ठरविलेलें तें. विशेष विश्वसनीय नव्हे असा अंदाज, कल्पना, इ०.

अटकविणें, अटकाविणें स० क्रि० —ला मज्जाव करणें, —ला हरकत घेणें किं० बंदी करणें.

अटकळणें पुढें अडखळणें पहा.

अटंका पु० आटोका, आवांका.

अटकाव (—वा) [हिं०] पु० १ प्रतिबंध, अडथळा. २ अडवणूक, थांबवणूक.

अटकावणी स्त्री० वर अटकाव पहा.

अटंकाळ पु० अन्न, पाणी, धान्य, इ० ची कमताई.

अटकी स्त्री० १ एक प्रकारची वनस्पति. २ आठकी पहा.

अटकें न० १ जनावराच्या पाठीवर जी कंठाळ पखाल, पडशी, किंवा गोणी, लादलेली असते, तिच्या दोन अर्धुकांपैकीं एक. २ प्रतिबंध, अडथळा, हरकत. ❀ **अटक्याचें घोडें** न० क्षुल्लक, भिकार, कुच किंमतीचें, थोटें.

अटकोल वि० दूध काढूं न देणारी, दूध द्याव-यास खळखळ करणारी, पान्हा चोरणारी (गाय, म्हैस इ०).

अटघोळाणा पु० उपद्रव, छळणूक, गांजणूक. (०चा अ० करणें किं० होणें).

अटणावळ, आटणावळ स्त्री० (सोनें, चांदी, वगैरे) अटविण्याबद्दल किंवा वितळविण्याबद्दल द्यावी लागणारी मजुरी.

अटणी, आटणी स्त्री० १ सोनाराची मूस, —जींत तो सोनें, चांदी, अटवितो. २ हातमागां-तील एक विशिष्ट भाग.

अटणी स्त्री० १ सोनें, रुपें, वगैरे धातु वितळ-विण्याची क्रिया किं० त्या कामीं योजावयाची मूस. २ सूर्यादिकांच्या उष्णतेनें वाफेच्या रूपानें द्रवपदार्थ नाहीसा होणें.

अटणूक, आटणूक स्त्री० १ विहिरींची, तळ्यांची,

ओढ्यांचा, वगैरे अटण्याची, किं० कोरडें होण्याची क्रिया. २ व्यापार, धंदा, इत्यादींची मंदाई. ३ उतरती कळा, अपकर्ष, ऱ्हास. [भटकणें.

अटणें [सं० अट्=भटकणें] **अ० क्रि०** हिंडणें,

अटणें, आटणें **अ० क्रि०** उष्णतेनें घट्ट होणें. (याच पद्धतीनें दुधापासून बासुंदी करतात). २ लांबीरुंदीनें कमी होणें, आखूड होणें (धुतल्यावर कापड चोपड वगैरे). ३ कमी होणें; (झऱ्यांचें, विहिरींचें, वगैरे पाणी) वाळणें, कोरडें पडणें. ४ संपणें, कमी होणें, खलास होणें, (धान्याचा सांठा वगैरे). ५ वितळविणें, (सोनें वगैरे). (सोनें इ० वितळविणें ह्या अर्थानें 'अटणें' हें क्रियापद योजलें जातें पण तो अशुद्ध उपयोग होय). ६ छळणें. गांजणें, सतावणें. ॐ **अटता काळ, अटता पाया** अपकर्षाचा काळ. उतरती कळा.

अटणें **स० क्रि०** १ पिळणें, —ला पीळ देणें, वळणें (सुंभ वगैरे). २ छळणें, सतावणें, ३ वितळविणें.

अटन [सं० अट्=भटकणें] **न०** फिरणें, (तीर्थाटन, देशाटन, इ०).

अटप **पु०** १ आवरण्याची किं० संकुचित करण्याची क्रिया. २ नियंत्रणा, आवर, कह्य. ३ सफाईनें किं० तल्लखपणानें काम करण्याची रीति. ॐ **अटपशीर, अटपशील, अटपशुद्ध, अटपसर** १सोयिस्कर.अघळपघळ पुरेसें.२ आवांक्यांत असलेलें.

अटपणें **स० क्रि०** १ आवरणें. २ अखडणें. ३ गोळा करणें,एकत्र जमविणें. ४कमी करणें.५ संपविणें. ६ ताब्यांत,आटोक्यांत, वहिवाटींत, किं० देखरेखी खालीं घेणें. ७ पथकरणें, अंगावर घेणें. ८ पदरांत पाडून घेणें, आपलासा करणें, (मुक्कामाचा गांव, मजल, प्रवास, इ०). **अ० क्रि०** मरणें; नाश पावणें; संपणें; संपुष्टांत येणें.

अटपळें, अठफळें, **न०** वस्त्राची, कांबळ्याची, वगैरेची रुंदी.

अटपाअटप **स्त्री०** निरवानिरव; आवराआवर.

अटरफटर **न०** १ क्षुल्लक,भिकार,किं०निरुपयोगी वस्तूंचा पसारा. २ बडबड; मूर्खपणाचें भाषण.

अटवळा, अटोळा, आटोळा **पु०** कणसांतील धान्याची पाखरांनीं नासाडी करूं नये म्हणून दोन तीन पुरुष उंचावर बांबू वगैरे बांधून शेतकरी लोक बसावयास जी जागा करतात, व तेथून ओरडून, गोफणीनें दगड मारून, पांखरास उडवून लावतात, ती जागा. शेताची राखण करण्यासाठीं उभारलेला उंच माळा.

अटवी [सं०] **स्त्री०** १ अरण्य, रान. २ झाडें, वेली, वगैरेंची गुंतागुंत.

अटव्य [सं० अटवी] **वि०** विस्तीर्ण, ओसाड; आणि भयंकर (रान, झाडी, इ०).

अटस **वि०** १ लहान व भक्कम. २ सुटसुटीत. घट्ट. ३ चपखल. **क्रि० वि०** घट्ट बसेल, न हालेल, अशा रीतीनें; चपखल.

अटळ **वि०** जें टळणें किंवा टाळणें अशक्य आहे (असें); ज्याच्यांतून सुटका होणें दुरापास्त आहे (असें); अनिवार्य.

अटा **पु०** पीळ, वळसा, वेढा.

अटाअट **स्त्री०** (विहिरी, ओढे, इ० चें) अटणें, शुष्क होणें.

अटाआट पु०, अटाघाट पु०, स्त्री०, अटाटी स्त्री०, अटापिटा पु०, अटापिटी स्त्री०, अटापीट स्त्री० १ पराकाष्ठेचे प्रयत्न, अट्टाहास, (क्रियापद **करणें**). २ त्रास, संताप, उद्वेग, (क्रियापद **होणें, पडणें** इ०). ३ गांजणूक, छळ, (सावकारांकडून देणेंकऱ्यांचा वगैरे). ४ यातायात, दगदग.

अटाई **स्त्री०** १ अटणावळ; सोनें, चांदी, वगैरे अटविण्याबद्दल द्यावयाची मजुरी. २ कोरडें पडणें, (झऱ्यांचें, विहिरींचें, वगैरे).

अटारा **पु०** अतिशय कामामुळें निर्बल किं० निर्वीर्य होणें; अत्यन्त थकवा किं० शीण.

अटारोटा [हिं० आटा (पीठ) + रोटा (भाकरी)] **पु०** १ गरीब माणसाला पोट भरण्यासाठीं करावीं लागणारीं हलकीं कामें (दळण, कांडण, लोकांच्या भाकऱ्या भाजून देणें, इ०). २ सरकारकडून वसूली करावयाला आलेल्या माणसाला गांवकऱ्यांनीं द्यावयाची शिधासामग्री. ३ अतिशय कामाची दगदग, किं० अतोनात काम केल्यामुळें आलेला थकवा किं० शीण.

अटाली (—ळी) [सं० अट्टालिका] **स्त्री०** घराच्या माथ्यावरील उघडी चुनेगच्ची.

अटाळा **पु०** शेताच्या राखणीसाठीं बसणाऱ्या

माणसासाठीं उभारलेली उंच जागा.

अटी स्त्री० १ मोहोरमाच्या दिवसांत हातावर रंगारंगांच्या धाग्यांची बांधतात ती दोरी. २ (वैदु-लांच्या खेळांत) वैदूल उडविण्यासाठीं बोटाला आधार मिळून जोर यावा यासाठीं जमिनीवर अंगठा टेकतात तो. ❀ **अटीचा खेळ. अटीचें काम,–करार,–बोली,–बाज** इ० मागें **अट** मध्यें पहा.

अटी } **स्त्री०** १ हट्ट. २ अटकाव. † **तुका०** {

अटींव, आटींव वि० १ नापवून अटावेल्लें, घट्ट केलेलें, (दूध वगैरे). २ व्यायामादिकांच्या योगानें मजबूद (शरीर). ३ वितळविलेला (धातु इ०). ४ वाळून किं० सुरकुतून गेलेला.

अटोका, आटोका पु० आवांका, शक्तिक्षेत्र.

अटोकाट, आटोकाट वि० १ अतोनात, पराकाष्ठा. २ सर्व शक्ति किं० बुद्धिसामर्थ्य योजून केलेला.

अटोपी वि० काम करण्यांत, किं० कामाचा उरक पाडण्यांत, तल्लख.

अटोळा पु० १ **अटवळा** पहा. २ कणसें पसरून, त्यांवरून बैल चालवून, धान्य व भुसकट विभक्त करण्याची जागा.

अट्टल वि० १ वस्ताद, पक्का, इरसाल (चोर); लुच्चा, भामट्या, इ०. २ तरबेज, निष्णात, पट्टीचा; (पोहणारा इ०).

अट्टाहास, अट्टाहास्य [सं० अट्टहास] पु० पराकाष्ठा; पराकाष्ठेचा प्रयत्न.

अट्टीखोर, अट्टीबाज वि० मागें **अटबाज** पहा.

अठरणें अ० क्रि० १ आकुसणें, अखुडणें. २ रागावून किं० रुसून बसणें.

अठरा वि० १० आणि ८ यांच्या बेरजेची संख्या. एक, दोन, तीन, इ० क्रमांकांतील सतराच्या पुढचा आणि एकोणीसाच्या मागचा क्रमांक; १८. ❀ **अठरा आखाडे** पु० अ० व० गोसाव्यांचे अठरा पंथ. भिन्न लोक भिन्न गणति करीत असल्यामुळें पुढील यादींत हे पंथ २१ भरले आहेत. १ अघोरी, २ अरण्य, ३ अवधूत, ४ आनंद, ५ आश्रम, ६ इंद्र, ७ उदासी, ८ कानफाट्या, ९ कालबेला, १० गोदड, ११ गोरखपंथी, १२ डवरा, १३ नंगागिरी, १४ निरंजनी. १५ निर्वांनी, १६ पुरी, १७ भराडी, १८ भारती, १९ राऊळ, २० वन, २१ सरभंगी. **अठरा पुराणें** न० अ० व० १ ब्रह्म, २ पद्म, ३ विष्णु, ४ शिव, ५ लिंग, ६ गरुड, ७ नारद, ८ भागवत, ९ अग्नि, १० स्कंद, ११ भविष्य, १२ ब्रह्मवैवर्त, १३ मार्कंडेय, १४ वामन, १५ वाराह, १६ मत्स्य, १७ कूर्म, १८ ब्रह्माण्ड. **अठरा उपधान्यें** न० अ० व० सजगुरा, वरी, नाचणी इ०. भिन्न लोक ह्या अठरा उपधान्यांची भिन्न प्रकारें गणती करतात. त्यामुळे त्यांची नांवें सुमारें तीसांहून अधिक भरतात. **अठरा उपपुराणें** न० अ० व० उपपुराणें अठरा आहेत तीं. १ ल्घुकालिका, २ बृहत्कालिका, ३ पराशर, ४ सिंह, ५ नारद, ६ सनत्कुमार, ७ सौर, ८ दुर्वास, ९ कपिल, १० मानव, ११ विष्णु-धर्मोत्तर, १२ शैवधर्म, १३ महेश्वर, १४ नंदी, १५ कुमार, १६ औशनस, १७ देवी, १८ वरुण. **अठरा कारखाने** पु० अ० व० शिकार, तोफ, जामदार, जवाहीर, इ०. ह्यांची गणती भिन्न लोक भिन्न प्रकारें करतात. **अठरा खूम** [अ० कौम = जात, टोळी] १ अठरा जातींचे लोक. २ एकंदर सर्व मानवजातीचे लोक. **अठरा टोपकर** पु० अ० व० सर्व देशचे युरोपी लोक. इटली, ग्रीस, स्पेन, पोर्तुगल, फ्रान्स, वगैरे युरोपी देशांतील लोक भेद न करतां सगळे. **अठरा धान्यें** न० अ० व० गहूं, साळ, तूर, जव, जोंधळा, वाटाणा, लांक, चणा, जवस, मसूर, मूग, राळा, तीळ, हरीक, कुळीथ, सावा, उडीद आणि चवळी. **अठरा पगड जात** स्त्री० अठरा प्रकारच्या पगड्या वापरणारे लोक ह्म० सर्व हिंदू. **अठरा पद्म वानरें** न० अ० व० १ लंकेवर राम निघाला असतां ज्या अठरा पद्म वानरांनीं (असंख्य वानरांनीं) त्याचें साहाय्य केलें ते. पद्म = एक लक्ष कोटी इतकी संख्या. २ मुलांचा मोठा समुदाय (विनोदांत). **अठरा पर्वें** न० अ० व० महाभारताचीं अठरा पर्वें. आदि, सभा, वन, विराट, उद्योग, द्रोण, कर्ण, शल्य, गदा, सौप्तिक, ऐषिक, स्त्री, शांति, अनुशासन, अश्वमेध, आश्रमवासी, मौसल, महाप्रस्थानिक, आणि स्वर्गारोहण.

अठव पु०, **अठवागिरी** स्त्री० आठवण. स्मरण.

अठवडा, आठवडा पु० १ लागोपाठ सात दिवसांचा अवधि. २ लागोपाठ आठ दिवसांचा अवधि.

❀ **अठवडे वाईक, अठवडे पाईक** पु० १ आठ दिवसांनीं बदलावयाचा नोकर. २ आठच दिवस कामावर लावावयाचा नोकर. ३ फार दिवस नोकरीवर टिकून न राहणारा नोकर.

अठवण, आठवण स्त्री० १ स्मरण, स्मृति. २ एकाद्या माणसाची आठवण करून देणारी वस्तु; यादगिरी. ❀ **अठवणीचा धड** वि० ज्याला चांगली आठवण राहते असा. **अठवणूक, आठवणूक** स्त्री० स्मरण, आठवण. २ एकाद्या माणसाचें, प्रसंगाचें, किं० गोष्टीचें, स्मरण करून देणारी वस्तु; यादगिरी.

अठवणें, आठवणें अ० क्रि० स्मरणांत येणें.

अठविणें, आठविणें स० क्रि० १ स्मरणांत आणणें; चिंतणें. २ ०चें मनांत स्मरण करणें. ३ ०ची मनांत प्रार्थना किं० ध्यान करणें.

अठवा, आठवा पु०, **अठवें, आठवें** न० मापी अर्धा शेर.

अठळी, आठळी स्त्री० १ फणसाच्या गऱ्यांतील बी. २ पुरुषांच्या वृषणांतील दोन गोट्यांपैकीं एक.

अठांगळें, अठांगुळें, अठांगूळ न० १ गर्भधारण झाल्यापासून आठव्या महिन्यांत गर्भिणीसंबंधानें करावयाचा एक संस्कार. २ गर्भधारणेपासून आठव्या महिन्यांत जन्मलेलें मूल. ३ गर्भाधानाचा विधि न होतां पतिपत्नींचा संयोग होऊन गर्भ राहिल्यास आठव्या महिन्यांत प्रायश्चित्तरूप जो विधि करावा लागतो तो.

अठायीं [म० (अ भलतीच) + ठाय (जागा)] क्रि० वि० १ भलत्याच जागीं. २ शरीराच्या अडचणीच्या किं० एखाद्या गुह्य स्थानीं. ३ दूरच्या जागीं.

अठीं, अठें, अठ्ठें क्रि० वि० कोणत्याही अंकाला आठ (८) नें गुणावयाचें असतां त्या अंकाच्या सामान्य रूपापुढें योजावयाचा शब्द; उ० नवा अठ्ठें बहात्तर.

अठी स्त्री० १ कपाळावर क्रोधादिकारणांमुळें पडलेली सुरकुती. २ मनांत धुमसत असलेली वैरबुद्धि; मनांत डवचत असलेली नापसंती. ३ लाकूड, झाड, इ० चा गांठळ भाग. ४ मोहरमच्या दिवसांत हातांत बांधतात तो नाडा. ५ फणस वगैरे फळांतील बी. ६ बेंदुलांच्या खेळांत बेंदुल उडावेणाऱ्या बोटाला आधार म्हणून जो आंगठा टेकतात तो. ❀ **कमरेस अठी घालणें** एकाद्याच्या कमरेला विळखा घालून त्याला पकडणें. **अठी घालणें** आलिंगणें.

अठोक (-प-) परब्रह्म न० न घडविलेला काळा फत्तर; मूर्ख बेअकली माणूस; ज्याला कितीही पढविलें तरी जो शहाणा होत नाहीं असा माणूस.

अठोनी वेठोनी } क्रि० वि० अक्कडबाज रीतीनें. † तुका० {

अठापहार [सं० अष्टन् + प्रहर] क्रि० वि० दिवसाचे आठ प्रहरभर ह्म० सारा दिवसभर.

अठाफळी [म० आठ + फळ + ई (प्रत्यय)] स्त्री० आठ फळांचें वाण व्रत म्हणून देतात तें.

अठोळी, आठोळी स्त्री० फणस वगैरे फळांतील बी.

अठ्ठा, आठ्ठा, अठ्ठ्या, आठ्ठ्या पु० १ फाशांच्या खेळांत आठाचें दान. २ पत्यांच्या खेळांत आठाचा पत्ता.

अ (आ-) ठ्ठावन (-न्न) वि० सत्तावन्नाच्या पुढचा आणि एकुणसाठाच्या मागचा अंक; ५८.

अ (आ-) ठ्ठावीस वि० सत्तावीसाच्या पुढचा आणि एकोणतिसाच्या मागचा क्रमांक; २८.

अ (आ -) ठ्ठीं क्रि० वि० १ (फाशांच्या डावांत) आठव्या घरांत. २ वर **अठीं, अठ्ठें** पहा.

अ (आ-) ठ्ठेचाळ, (-ळीस) वि० सत्तेचाळीसाच्या पुढचा आणि एकुणपन्नासांच्या मागचा क्रमांक; ४८.

अ (आ-) ठ्ठ्या पु० (पत्त्यांच्या खेळांत) चौकट, इस्पिक, किलवर आणि बदाम, ह्या चार संचांपैकीं प्रत्येकांतील आठवें पान.

अ (आ-) ठ्ठ्या (-ठ्ठे-) हत्तर वि० सत्त्यांहत्तराच्या पुढचा आणि एकुणऐंशींच्या मागचा क्रमांक; ७८.

अंड न० वृषण. ❀ **अंडज** वि० अंड्यापासून ज्याची उत्पत्ति होते असा प्राणी (साप, पक्षी, इ०). **अंडकटाह** पु० १ ब्रह्मदेवानें निर्मिलेली सृष्टि. २ ह्या सृष्टीभोंवतीं जे भूम्यादि अष्ट प्रकृतींचें कवच आहे तें. **अंडगडी** पु० १ सोंगट्यांच्या खेळांत मुख्य खेळाडूच्या हाताखालचा खेळाडू (हा कधीं कधीं खरोखरींचा खेळाडू असतो किं० कधीं कधीं काल्पिलेला असतो आणि त्याचें दान मुख्य खेळाडूच

टाकतो).२ घुल्याच्या यंत्रानें चालणारा मदनतीस. ३ वगल्वचा, थंडीचाख्या, खुशामत्या.

अड स्त्री० १ अडचण, थांबणूक. २ हट्टीपणा, तेढ. ३ अट, शर्त. ४ ठरावांतील शर्ती पूर्ण न केल्याबद्दल द्यावा लागणारा दंड इ०. ※ **–कर, –खोर वि०** हट्टी, आडमुठ्या. **अडभरीं भरणें** हट्टास पेटणें; हेका न सोडणें.

अडकट } **न०** आडमार्ग, रान. † **तुका०** {

अडकण न०, अडकणी स्त्री० वस्तूच्या गतीस प्रतिबंध करावयासाठीं केलेली योजना; वस्तु स्थिर करावयासाठीं ठेवलेला धोंडा, फळी, काठी, इ०.

अडकणी स्त्री० तांदूळ, डाळ, वगैरे धान्यांतील फुटके पण मोठे कण (जे प्रसंग विशेषीं तांदूळ, डाळ, वगैरेंत मिसळून देतां येण्याजोगे असतात).

अडकणें अ० क्रि० १ कांहीं तरी कारणामुळे कुचंबणा होणें, थांबावें लागणें; कुंठितगति होणें. २ पेंचांत पडणें, गोंविलें जाणें, किं० सांपडणें. ३ कशांत तरी रुतणें. ४ गुंतणें.

अडकथा, आडकथा स्त्री० मुख्य कथेंत ओघानें आलेली दुसरी लहानशी कथा; उपकथा.

अडकर वि० १ हट्टी. २ अडून बसणारा, तुजरा (घोडा इ०). ३ घट्ट किं० तंग बसणारी वस्तु (कपडा, खिट्टी, कोयंडा, इ०).

अडकवण न० प्रतिरोध करणारें कांहींही; एकादी वस्तु ठेविल्या जागींच रहावी, ती हालूं नये, सरकूं नये, म्हणून केलेली योजना, गांठ, पकड, टेकण इ०.

अडकविणें स० क्रि० थांबविणें, प्रतिबद्ध करणें, धरून ठेवणें; –ची गति कुंठित करणें.

अडका पु० १ एक पूर्वकालीन तांब्याचें नाणें,– ज्याची किंमत अर्ध्या रुक्या इतकी होती. २ जमीनीच्या क्षेत्रमापनांत अर्धा रुका विस्ताराची. ३ पैसा, द्रव्य (सामान्यतः). ※ **अडक्याची देवता तिला साडेतीन टक्यांचा शेंदूर** क्षुल्लक वस्तु उपयोगी करून घेण्यासाठीं, किं० शोभिवंत करण्यासाठीं, किं० सजविण्यासाठीं, त्या वस्तूच्या किंमतीहून पुष्कळच अधिक खर्च करणें हा मूर्खपणा. **अडक्याची केली वाण लोणच्याची झाली घाण** लोणचें टिकाऊ होण्यासाठीं त्यांत जीं मीठ वगैरे द्रव्यें घालावयाचीं त्यांत काटकसर केल्यास लोणच्यांत आळ्या, पाखरें, इ० उत्पन्न होऊन तें लोणचें टाकून द्यावें लागतें. **हातीं नाहीं अडका बाजारांत चालला धडका** हातांत पैसा नसून मोठमोठे बेत करणें हा मूर्खपणा.

अडकाम, आडकाम न० जें मुख्य किं० प्रधान काम नव्हे तें; गौण काम, अंगभूत, मुख्य कामाला उपयोगी पडणारें काम. ※ **आडकामी, आडकाम्या पु०** केवळ अडकाम करण्याच्याच उपयोगाचा माणूस.

अडकाव पु०, अडकावणी स्त्री० अटकाव, अटकावणी हे शब्द पहा.

अडकाष्टा पु० धोतराच्या सबंध रुंदीच्या निऱ्या करून न खोचतां फक्त रुंदीचें एक टोक खोचून घातलेला कासोटा.

अडकित्ता, अडकित्था पु० १ सुपारी वगैरे कापण्याचें एक साधन. २ (लाक्षणिक अर्थ) पंचाइत, पेंच. ※ **–त धरणें** पेंचांत धरणें; सुटून किं० निसटून जाण्याला वाट न राहील अशा स्थितींत एकाद्याला अडकावणें. **अडकित्यांत सांपडणें** (किं० **पडणें**) पेंचांत अडकणें.

अडखप्या पु० किरकोळ सटरफटर कामें करून उपजीविका करणारा पोऱ्या.

अडखर्च, आडखर्च पु० किरकोळ खर्च, मोठ्या खर्चाच्या अनुषंगाचा खर्च.

अडखळण स्त्री० १ जेथें ठेच लागण्याचा किं० प्रतिबंध होण्याचा संभव आहे, अशी जागा किं० असा प्रसंग, किं० अशी परिस्थिति. २ वस्तु यथास्थानीं स्थिर रहावी म्हणून केलेली योजना.

अडखळणी स्त्री० अडखळलेपणाची स्थिति; अडकून पडलें राहाण्याची स्थिति.

अडखळणें अ० क्रि० १ ठेचा लागतलागत, अडथळे किं० हरकती येत येत, जाणें, चालणें, बोलणें, वाचणें, इ०. २ बोलतांना जीभ आडवी येणें; तोतरेपणानें बोलणें. ३ कचरणें. ४ अडचणींत किं० पेंचांत पडणें.

अडखाणें न०, अडखाद स्त्री० १ भात, भाकरी, इ० जे भोजनांतील मुख्य पदार्थ त्यांच्याशिवाय जे चटणी, कोशिंबिर, इ० चवीसाठीं खावयाचे पदार्थ ते. २ मुख्य दोन भोजनांच्या प्रसंगाहून इतर वेळीं जें खाणें तें; उ० सकाळची न्याहारी, तिसऱ्या प्रहरचें खाणें, इ०.

अडखोल न० १ ओबड धोबड रीतीनें खणलेली आणि बांधून न काढलेली विहीर. २ कचऱ्यानें, गाळानें, वगैरे भरून निरुपयोगी पडलेली विहीर. ओहोरलेली विहीर.

अडगई स्त्री० महाळुंगांचीं, लिंबांचीं, इ० फळांचीं सालें, व आलें, दहीं, हिंग, इ० चें केलेलें लोणचें.

अडगडी पु० मुख्य गड्याचा मदतनीस. २ गवंडी, सुतार, इ० कारागिरांच्या हाताखालीं किरकोळ कामें करणारा गडी. [बोल.

अडगल्ली, आडगल्ली स्त्री० लहानशी गल्ली,

अडगव, अडगवणी स्त्री० व्यवस्थितपणानें पदार्थ लावणें, रचणें, मांडणें, किं० ठेवणें.

अडग (-गा-)वणें अ० क्रि० १ सुस्तपणानें किं० आळसानें पडून राहणें. २ पडून राहणें किं० निजणें.

अडगविणें स० क्रि० पदार्थ व्यवस्थितपणानें लावणें, मांडणें, ठेवणें, वगैरे.

अडगळ स्त्री० १ निरुपयोगी वस्तूंचा समुदाय किं० पसारा. २ भलत्याच ठिकाणीं ठेविल्यामुळें अडचण करणाऱ्या वस्तु. ३ दाराला, खिडकीला, इ० ला लाविलेला अडसर.

अडगांव, आडगांव पु० लहान गांव (जेथें फारसा व्यापार वगैरे चालत नाहीं).

अडगिऱ्हाइकी, आडगिऱ्हाइकी वि० जिन्नस करणाऱ्या कारागिरापासून तो ज्या कोणी विकत घेतला त्याच्या पासून विकत घेतलेला.

अंडगोल [सं०] न० वृषण. [३ झोपडें.

अडघर न० १ बाजूस असलेलें घर. २ सोपा.

अडघोडा पु० तट्टू; लहान घोडा; तट्टू म्हणण्याइतका लहानही नव्हे व घोडा म्हणण्याइतका मोठाही नव्हे असा घोडा. [तंग.

अडच, अडच्च, अडस्स वि० बराच घट्ट किं०

अडचण स्त्री० १ जागेचा संकुचितपणा. २ दाटी किं० गर्दी यामुळें होणारा त्रास, उपद्रव, किं० गैरसोय. ३ संकट. ४ अडगळ. ५ टंचाई, जरूर अशा वस्तूंचा अभाव किं० कमीपणा. ६ वायकांना विटाळामुळें वगैरे प्राप्त होणारी गैरसोयीची स्थिति. ॐ **अडचणीचें दुःख** शरीराच्या गुह्य स्थानीं झालेला रोग, आजार. **अडचणी सांगणें** काम चुकविण्यासाठीं किं० टाळण्यासाठीं कांहीं तरी सबबी सांगणें. **अडचणीचें दुःख आणि जांवई वैद्य** खात्रीनें संकटाचें निवारण करूं शकेल असा मनुष्य जवळ असतां त्याची मदत घ्यावयाला लाज, संकोच, भीति, वगैरे वाटते अशी स्थिति.

अडचणणें अ० क्रि० १ अडस्स, अतिशय घट्ट, किं० तंग होणें (सदरा, बंडी, इ०). २ द्रव्यादिकांच्या कमताईमुळें विवंचनेंत असणें. ३ स्थलादिकांच्या संकुचितपणामुळें त्रास सोसणें.

अडची स्त्री० नाठाळ गाईम्हशींचें दूध काढण्याचे वेळीं त्यांनीं कांहीं त्रास देऊं नये म्हणून त्यांना घातलेला लाकडी खोडा.

अडचें क्रि० वि० दोन आणि अर्धे इतक्या वेळा, अडीच वेळां (अडीचकीचे पाढे म्हणतानां हा शब्द योजितात; जसें चार अडचें दहा).

अडजात, आडजात स्त्री० १ हिंदूंच्या ज्या मुख्य चार जाति त्यां व्यतिरिक्त जी जात ती. २ जी जात ठरवितां येत नाहीं ती; मिश्र जात.

अडजिना, आडजिना पु० रहदारीचा नसलेला जिना; अडचणीचा, प्रसंगविशेषीं किं० जरूरीच्या वेळीं वापरावयाचा जिना.

अडजुना, अडजून वि० १ जुना झालेला. २ वापरलेला.

अडण वि० हट्टी, हेकट, अडमुठ्या.

अडण न० १ गायी, म्हशी, वगैरेंची ओटी किं० कास. स्त्री० सुपाच्या कांठाला जी चिव्याची जाड पट्टी लाविलेली असते ती (सुपाला बळकटी येण्यासाठीं).

अडणा पु०, **अडणें** न० दरवाज्याचा अडसर वगैरे.

अडणी स्त्री० देवापुढें ठेवावयाचा शंख स्थिर राहण्याकरितां केलेली बैठक. २ तिपाई. ३ सुपाला बळकटी आणण्यासाठी त्याच्या कडेला लाविलेली वांबूची पट्टी. ४ कडी, अडसर. ॐ **अडणीवरचा शंख** पु० बेअकली, मूर्ख मनुष्य (जो समर्थाच्या वशील्यानें उच्च पदावर चढलेला असतो).

अडणूक स्त्री० १ अटकाव, प्रतिबंध. २ विरोध.

अडणें [हिं०] अ० क्रि० १ प्रतिबंध होणें, थांबणूक होणें. कुंठितगति होणें. २ रुसून बसणें, हट्टाला पेटणें. ३ कांहीं नवीनच अटी उपस्थित करून एकादें कार्य करण्याचें नाकारणें. ४ खोळंबून राहणें. ५ घोड्याचें बुजून किंवा मस्तीनें मध्येंच थांबणें. ६ पोटांतून मूल अर्धवट बाहेर येऊन वाळंति

गीची कुचंबना होणें. ७ अडचणांत किं० नडांत सापडणें किं० असणें. ꙮ **अडला नारायण गाढ-वाचे पाय धरी** पेचांत किं० संकटांत पडलेला मोठा मनुष्य मूर्ख, बेवकूब, किं० हलकट, माण-सांचीं आर्जवें करितो.

अडत स्त्री० १ दुसऱ्याच्या दुकानांत आपली हुंडी स्वीकारली जावी, आपला माल तेथें विकावयास ठेवतां यावा, तेथला माल आपणास सोयीनें मिळावा, म्हणून जी व्यवस्था केलेली असते ती. २ अशा व्यवस्थेबद्दल त्या दुकानदारास द्यावयाचा पैसा इ०.

अडतट्टू पु० आपल्या कामांत हरकती आणणारा, पदोपदीं अडून बसणारा, काम बंद पाडणारा (घोडा, माणूस, इ०).

अडताल पु० संगीतांतील कालावधिविशेष.

अडती स्त्री० १ प्रतिबंध, हरकत, अडथळा. २ वीणा इत्यादि वाद्यांचा सूर उंच किं० सखल कर-ण्यासाठीं दांडीवर जी घोडी लाविलेली असते ती.

अडतीस वि० सदतीसाच्या पुढचा आणि एकोणचाळीसाच्या मागचा क्रमांक: ३८.

अडत्या पु० ज्याचे दुकानीं कोणी अडत ठेविली असते तो त्या दुकानदाराचा अडत्या. दुस-ऱ्याचे दुकानीं अडत ठेवणारा.

अडथळणी, अडथळणूक स्त्री० प्रतिबंध, विरोध, हरकत, अडथळा.

अडथळा पु० १ प्रतिबंध, विरोध, हरकत. २ हरकत आल्यामुळें होणारी थांबणूक. [२ हट्टी.

अडदांड, अडदांडगा वि० १ दांडगा, उद्धट.

अडदाणा पु० हरभरा खेरीज करून इतर धान्य जें घोड्याला खावयाला देतात तें. (हरभरा हें घोड्याचें उत्तम पौष्टिक धान्य समजलें जातें, आणि त्याला नुसता "दाणा" हा शब्द लावितात).

अडदाळ स्त्री० डाळींतील अडकणी किं० जाडी तुकडे.

अडधोतर न० लहान धोतर किं० मोठा पंचा.

अडना पु० दाराचा अडसर.

अडनाड, अडनीट (–ड) वि० बरोबर मापाचा, संख्येचा, वजनाचा, विस्ताराचा, किं० किंमतीचा, नसलेला; म्हणजे पाहिजे आहे किं० असावयाला हावा आहे त्यापेक्षां थोडासा अधिक किंवा कमी. **क्रि० वि०** भलत्याच किं० सोईस्कर नाहीं अशा जागीं, वेळीं, किं० प्रकारानें.

अडनांव, आडनांव न० उपनांव; व्यक्तीच्या नांवाहून अन्य जें त्याच्या कुटुंबाचें नांव तें. ꙮ **अड-नांवाचा वि०** केवळ नामधारी, म्हणजे त्या नांवाला अपात्र; नांवानें सूचित जो अधिकार, दर्जा, इ० त्याला अपात्र. उ० तुम्ही अडनांवाचे शास्त्री, पुरा-णिक, जागीरदार, आहां.

अडनीड वि० वर **अडनाड** पहा.

अडपंचा पु० अतिलांडा पंचा.

अडपझडप क्रि० वि० १ हक्क, अधिकार किं० परवानगी नसतां; अयोग्य किं० भलत्याच प्रकारें. २ चोरून मारून, कोणाच्या लक्ष्यांत न येईल अशा रीतीनें.

अडपडदणी, आडपडदणी स्त्री० न्हातांना किं० अंघोळ करतांना बायका जें लहानसें जुनेर किं० वस्त्र कंबरें भोवतीं गुंडाळतात तें.

अडपणें स० क्रि० १ अडविणें; पेचणें. † ज्ञा० १.

अडपतादडपता पु० आवरणारा; आड-मुठ्याला रागें भरून किं० धमकावून, किं० चार बोधाच्या गोष्टी सांगून योग्य मार्गावर आणणारा माणूस. उ० बाप मेल्यापासून तो गोंद्या भारी उनाड झाला आहे, त्याला कोणी अ० राहिला नाहीं.

अडपेठ स्त्री० लहान पेठ, जेथें मालाची फारशी खरेदी विक्री होत नाहीं. [बाजू.

अडफळें न० कांबळें, शेला, इ० ची रुंदीकडची

अडबंक (–बंग, –बंगा, –बंगी, –बांका) वि० अडमुठा, हेकट, हट्टी; योग्य मार्ग दाखविलेला असतां त्या मार्गानें न जाणारा (घोडा, माणूस, मुलगा, इ०).

अडबंद १ पु० कटदोरा, करगोटा. † **तुका०** १

अडबंदर न० १ महत्त्वाचें नव्हे असें बंदर. २ सोयीचें किं० सुरक्षित नव्हे असें बंदर.

अडबाप्या पु० पंधरा सोळा वर्षांच्या वयाचा माणूस,—ज्याला मुलगाही म्हणतां येत नाहीं किंवा पुरुषही म्हणतां येत नाहीं.

अडबायको स्त्री० बारा तेरा वर्षांच्या वयाची स्त्री,—जिला मुलगी म्हणतां येत नाहीं किंवा बाईही म्हणतां येत नाहीं.

अडमड स्त्री० मूल अतिशय तल्लख आणि चंचल असल्याकारणानें तें ज्या हालचाली करतें,—त्यापासून शेजारच्या माणसांना उपद्रव होतो,

आणि वस्तु अस्ताव्यस्त होतात,-त्या.

अडमडणें अ० क्रि० उपद्रवकारक हालचाली करणें (चंचळ आणि नटखट मूल करतें तशा).

अडमड्या वि० उपद्रवकारक हालचाली करणारा.

अडमाप न० जें कोणत्याच ठराविक मापाच्या बरोबर नाहीं असें माप. ❀ **-नें माजणें** १ ठराविक प्रमाणाच्या मापाहून अन्य मापानें मोजणें. २ भरमसाटपणानें गणती, मोजणी, किं० मापणी करणें.

अडमिळकत, आडमिळकत स्त्री० ठराविक किंवा न्याय्य उत्पन्नाशिवाय अन्य प्रकारची मिळकत.

अडमुलगा पु० जो मुलगा म्हणण्याइतक्या लहान वयाचा नाहीं, आणि पुरुष म्हणण्याइतक्या मोठ्या वयाचा नाहीं, तो.

अडमुशी वि० श्वासाचा निरोध झाल्यामुळें व्याकुळ झालेला.

अडमुसणें अ० क्रि० १ श्वासाचा निरोध झाल्यामुळें व्याकुळ होणें. २ ज्वरादिकारणानें अंगाची गठडी होऊन पडणें.

अडमुसा वि० श्वासनिरोधामुळें व्याकुळ [झालेला.

अडमुठा (-ठ्या) वि० १ आडदांड, अडाणी. २ सोयीनें न वागणारा. [† तुका०]

अडमोडी } स्त्री० आपल्या मतांचें प्रतिपादन.

अडलंड वि० १ पदोपदीं नडणारा, विघ्नें उपस्थित करून लोकांना उपद्रविणारा. २ हेकट, हट्टी.

अडला पु० फळें वगैरे सोलण्यासाठीं लाकडाच्या फळींत किं० ठोकळ्यांत बसविलेलें धारेचें पोलादी पान. ❀ **अडला भिडला** वि० पंचाइतींत पडलेला, अडचणींत सांपडलेला.

अडव न० १ हरभऱ्याच्या उपटलेल्या झाडांचा मूठ. } वि० २ असार. **ना०** अरण्य † ज्ञा० }. ३ परीक्षा, कसोटी. ४ अडचण, विघ्न, हरकत.

अडव, अडवी वि०} १ वाईट, असार. † ज्ञा०}

अडवंकी स्त्री० } खोंळ. † ज्ञा० }.

अडवंगी } स्त्री० कुमार्ग. † तुका० {

अडवट न० १ लाकडाचा लांबलचक आणि न घडविलेला सोट. २ ओबडधोबड रीतीनें तासून घेतलेली आडवी तुळई. ३ वस्त्र विणतांना जे उभे धागे (ताणे), यांतून जाणारे आडवे धागे (ताणे), जे धोट्यानें शिरकावले जातात, ते. ४ गोणीच्या दोन बाजूंच्या पिशव्या जोडणारा मधला कापडाचा तुकडा. ५ उतरणीवर गाडीची गति फार वेगाची होऊं नये आणि आटोक्यांत राहावी म्हणून दोन्ही चाकांना चिकटून बांधलेलें आडवें लाकूड. पु० नथेच्या चौकड्या शेजारीं आडवें बसविलेलें लांबोडें मोती.

अडवण न० १ प्रतिबंध किं० अडथळा करावयासाठीं मुद्दाम केलेली योजना. २ वस्त्र विणतांना आडवे धागे (ताणे) जे धोट्यानें शिरकावले जातात ते (**आडवण**, **आडवीण**, अशींही रूपें आहेत).

अडवण, अडवणूक स्त्री० हरकत, अडथळा.

अडवण्या स्त्री० अ० व० ज्येष्ठा नक्षत्र किं० त्या नक्षत्रांत पडलेला पाऊस.

अडवा, आडवा वि० १ कोणत्याही पदार्थाच्या लांबीला समान्तर नसलेला म्हणजे काटकोनांत वगैरे असलेला. २ रुंदीच्या बाजूचा, उभा नसलेला, उभ्या बाजूकडचा. ३ प्रतिकूळ, उलटा, हानिकारक, (दैव, परिस्थिति इ०). ४ उलट परिणाम करणारा; विरुद्ध. ❀**आडवें उभें** न० कुटिल नीति; इष्ट हेतु साधण्यासाठीं वक्र मार्गाचा अवलंब. **अडवें तिडवें** वि०१ व्यवस्थित प्रकारें नव्हे असें.२ उद्धट. **अडवें पाणी** न० नदीचें, विहिरीचें, तळ्याचें, पाणी (उलट **पावसाचें**). **-अंगाचा** वि० लठ्ठ, फोपशा. **अडव्या जिभेचा** वि० १ रानवट किं० गांवढळ भाषण करणारा. २ भरमसाटपणें बोलणारा; संबंधरहित बोलणारा. **अडवें जाणें** १ दुसऱ्याच्या जाण्याच्या मार्गाला काटकोन करून जाणें. उ० त्याला मांजर अडवें गेलें म्हणून तो परत फिरला. २ हरकत करणें, अडथळा आणणें. उ० माझ्या योजनेला तो अडवा जाणार नाहीं. **अडवें येणें** १ हरकत किं० प्रतिबंध करणें. २ सामोरें येणें. ३ प्रसूतिद्वारां मूल वाकडें होणें. **अडवें लावणें** कुत्सित दृष्टीनें पाहाणें. **अडवें घेणें** दोषैक दृष्टीनें पाहाणें. **आडवें नेसणें** किं० **लावून घेणें** लुगडें पुरतेपणीं किं० नीटनेटकें न नेसणें (फक्त कांहीं वेळेपुरतें म्हणून). **अडव्यांत शिरणें** १ वाकडें बोलणें. २ वाम मार्गाचा अवलंब करणें. **आडवें आलें असतां कापून काढावें** आपल्या कामांत कोणी हरकत करूं लागला तर त्याची भीडमरवत

न वाल्गतां त्याला वाटेंतून दूर केलें पाहिजे.

अडवाळ, अडिवाल वि० हट्टी, हेकट.

अडावेणें स० क्रि० १ प्रतिबद्ध, निरुद्ध, किं० कुंठित करणें. २ ०चा मार्ग किं० गति थांबविणें. ३ हरकत आणून किं० शंका काढून ०चा खोळंबा करणें किं० –ला विघ्न आणणें.

अडवी स्त्री० १ अटक. २ अरण्य. ३ हातोहातीं पुढें पोंचता करणें.

अडवें न० कणसांसकट धान्याच्या ताटांची रचलेली रास; उडवें.

अडशेरी [म० अडीच+शेर +ई] १ दोन आणि अर्धा शेर इतकें परिमाण. २ चाकर, कुणबीण, इ० स पोटासाठीं जें धान्य देतात तें.

अडस, अडस्स वि० गच्च, घट्ट; ज्यांत खिळा, खुंटी, खिटी, इ० शिरकावण्याला अडचण पडते, आणि तीं शिरकावल्यावर तेथें घट्ट बसतात असें (भोक, दार, कडी, कोयंडा, इ०); तंग.

अडसटणें स० क्रि० ठोकळ अजमास करणें.

अडसट्टा पु० १ अजमास, धोपट गणती, किं० मोजणी. २ आटोका, आवांका, पोंच.

अडसण स्त्री० न० १ पाखडण्यासाठीं सुपांत एका वेळीं घेतललेलें धान्य, किंवा अशा रीतीनें पाखडलेलें एका खेपेचें धान्य. २ गाय, म्हैस, इ० चें दूध काढतांना त्यांनीं धडपडूं नये किं० पाय झाडूं नयेत म्हणून त्यांच्या दोन बाजूंस जे आडवे दांडे बांधलेले असतात ते.

अडसणें स० क्रि० १ धान्य सुपांत घालून पाखडणें. २ सुपानें वारा घालून धान्यांतील कोंडा उडवून लावणें. ३ ०च्या फांद्या वगैरे तोडणें. ४ ओबडधोबड रीतीनें कापणें किं० तोडणें.

अडसर पु० दरवाजा लावून बंद केला असतां तो वाऱ्यानें उघडूं नये, किं० बाहेरच्या कोणाला उघडतां येऊं नये, म्हणून जें अडवें लाकूड त्याच्या मागें टेकण म्हणून घालतात तें.

अडसष्ट, अडुसष्ट वि० साठांत आठ मिळवून जें परिमाण होतें तें; ६८.

अडसांगड (–डी) स्त्री० १ मोठ्या तराफ्याला दोरीनें बांधलेला आणि खेचला जाणारा लहान तराफा. २ लहानसर तराफा. ३ मासे वगैरे धरण्यासाठीं पाण्यांतून तरंगत जाणारा माणूस ज्या दोन भोपळ्यांना बांधलेल्या दोरीवर स्वारी करून पायांनीं पाणी कापीत जातो त्या भोपळ्यांची जोडी.

अडस्वयंपाक पु० १ भोजनांतील व्यंजनें सिद्ध करण्याची क्रिया. २ मुख्य स्वयंपाकाच्या अंगभूत जो स्वयंपाक तो.

अडहते (–त्या–)र न० बंदुक, पट्टा, तरवार, इ० जीं मोठी हत्यारें त्यांहून इतर जीं कट्यार, पेषकवज, इ० लहान हत्यारें तीं प्रत्येक. ॰**अडहते (–त्या–)री** वि० अडहत्यारानें लढणारा.

अडळ पु० नांगराचा जो दांडा (रुमणी) त्याला बसविलेली खुंटी,–जी हातांत धरून शेतकरी शेत नागरतांना नांगरामागून चालत जातो.

अडळ पु० एक सुमुहूर्तविशेष. { साहाय्य. † ज्ञा० }.

अडांख पु० जमाखर्चाच्या चोपडींत किं० पत्रकांत रकमांच्या डोक्यावर जी रेघ ओढतात,–जिला ' अज ' म्हणतात ती. ॰–**ताळा** पु० बेरजेचा ताळा पाहाण्याची एक विशिष्ट रीति.

अडांखा पु० १ बेरजेचा ताळा पाहण्याची एक रीति. २ खर्चिलेल्या किंवा उसनवार दिलेल्या रकमा, मिति, महिना, माणूस, इ० चा तपशील देणारा खरडा. ३ ठोकताळा.

अडांखा, आडांखा { पु० युक्ति, धोरण, ताळा. † तुका० }

अडाण न० १ शेतकीचीं कामें न करणारे किं० शेतकी कामाशिवाय इतर कामें करणारे, एकाधा गांवचे लोक. २ गायी, म्हशी, इ० ची कास किं० ओटी. ॰**अडाण कबाड** न० शेतांत काम करणाऱ्यांच्या व्यतिरिक्त जीं गावांतील माणसें सुतार, लोहार, गवंडी, शिकलगार, वगैरे तीं. –**पट्टी** स्त्री० बलुतेदार आणि शेतकरी खेरीजकरून जे गांवचे धंदेवाले लोक आणि व्यापारी त्यांच्यावर बसविलेला कर.

अडाणा पु० १ संगीतांत जे अनेक राग सांगितलेले आहेत, त्यांपैकीं एक. २ नाठाळ गायीचें दूध काढतेवेळीं तिनें पाय उचलूं नये, धडपडूं नये, म्हणून जी काठ्यांची अडवणूक करतात ती. ३ उसाचा चरक चालू असतां तो फिरविणारे बैल ज्या लांबलचक लाकडाला जुंपितात तें. ४ दार बंद करावयाचा अडसर.

अडाणी वि० १ अकुशल, अचतुर, रानवटपणानें

काम करणारा; मूर्ख. २ एखाद्या विद्येची किं० शास्त्राची कांहीं माहिती नसल्याकारणानें त्या विद्येसंबंधानें किं० शास्त्रासंबंधानें अजाण. ॐ **अडाणी कबाडी पु० अ० व०** १ अडाणी लोक. २ अशिक्षित लोक. **अडाणी गांठ स्त्री०** एक प्रकारची गांठ.

अडात (–थ) पु० १ दार इ० ला मजबुती येण्यासाठीं जी रीप त्याच्या तक्त्यांवर किंवा फळ्यांवर बसविलेली असते ती. २ घडवंची वगैरेंना बळकटी यावी म्हणून ज्या पट्ट्या बसविलेल्या असतात त्यांतील प्रत्येक.

अडातुडां क्रि० वि० मधून मधून; नियम, नियमितपणा, किं० क्रम, सोडून.

अडावा पु० १ देण्याघेण्याच्या व्यवहारासंबंधीच्या खतावणीवरून देण्याघेण्याच्या रकमा काय निघतात त्यांची यादी; देण्याघेण्याच्या हिशेबाचा कागद. २ खर्चाच्या ठोकळ रकमांचा एकवटलेला आंकडा.

अडीच वि० दोन आणि अर्धें मिळून जें परिमाण तें; २॥.

अडीचकी स्त्री० एक, दोन, तीन, इ० शंभरापर्यंतच्या अंकांच्या अडीच पटींचें जें कोष्टक मुलांकडून पाठ करवितात तें.

अडिंबा पु० खिडकी, दार, वगैरेंना बंद करण्यासाठीं लावावयाची काठी.

अडिवाळ वि० हट्टी (मूल).

आडेशी स्त्री० मागें **अडशेरी** पहा.

अडी स्त्री० पुढें **अढी** पहा.

अंडील वि० १ ज्याचें वृषण वडविलें नाहीं असा (बैल, टोणगा, इ०). २ प्रजोत्पादनासाठीं वृषण न वडवितां तसाच राखलेला (बैल, टोणगा, इ०). ३ ज्याला कामविकार फार असा.

अडीसरी, अडेसरी स्त्री० १ अडीच शेरांचें परिमाण. २ नोकर वगैरेंना पोटासाठीं द्यावयाचें दरमाहाचें धान्य.

अडूमाडू वि० १ धाडसी; मारावयाला आणि मरावयाला तयार. २ अत्यन्त चतुर, हुशार, कर्तबगार.

अडुसष्ट वि० साठांत आठ मिळविले असतां होणारी संख्या; ६८.

अडुळसा [सं० अटरुष] **पु०** एक औषधाच्या उपयोगाची वनस्पति.

अड्डू वि० अडेलतट्टू, नाठाळ, हट्टी.

अड्डू पु० १ दोन तुळया किंवा दोन चिरे यांना सांधणारी किंवा जोडणारी लोखंडी पट्टी. २ पक्ष्याच्या पिंजऱ्यांत त्याला बसावयासाठीं जी आडवी दांडी बसवलेली असते ती. ३ लोकांनीं एका विशिष्ट मर्यादेच्या आंत येऊं नये म्हणून लोखंडी गज किं० लाकडाचे दांडे वगैरे लावतात ते. ४ छत्री किं० छत्रीसारखें एक पाथरवटाचें हत्यार. ५ घोडा वगैरे सरकावण्यासाठीं किं० उचलण्यासाठीं त्याच्या खालीं घातलेली काठी; तरफ.

अडून, आडून क्रि० वि० १ कशाच्या तरी आड किंवा मागें राहून. २ न दिसेल अशा रीतीनें; छपून. ३ ०च्या मागून, ०च्या आश्रयानें.

अंडें न० लंबगोल्या गोला सारखा जो पदार्थ पक्षिणी, सर्पिणी, इ० आपल्या गर्भाशयांतून टाकतात आणि ज्यापासून त्यांचीं पिलें जन्मतात तो. २ खोखो, आट्यापाट्या, वगैरे खेळांत एखाद्या गड्याचें नियमबाह्य वर्तन, –ज्या योगें तो गडी स्वतः मरतो, व वाईट खेळाबद्दल त्याच्या बाजूचे गुण कमी होतात. ॐ **अंडें गाळणें** १ पक्षिणी, सर्पिणी, इ० नीं गर्भाशयांतून अंडें बाहेर सोडणें. २ भीतीनें एकाद्या कामांतून किं० व्यवहारांतून अंग काढून घेणें, किंवा तो अंगाबाहेर टाकणें. **अंड्यास येणें** १ अंडीं घालण्याच्या वेळेस येऊन ठेपणें (सर्पिणी, पक्षिणी, इ०). २ अगदीं दमून जाणें, जेरीस येणें, मेटाकुटीस येणें.

अडेल वि० आडमुठा, हेकट; विनाकारण अडून बसणारा. ॐ **–गुण पु०** अडलेली किं० जाचणुकीची स्थिति, वेळ, इ०. **–तट्टू पु०** आडमुठा, नाठाळ, हेकट.

अडोंगीं क्रि० वि० एका बाजूस, आडवाटेस, मुख्य म्हणजे रहदारीची वाट सोडून.

अडोपर स्त्री० १ थांबणूक, प्रतिबंध, विरोध, त्रास. (क्रियापद **करणें, लावणें, दाखविणें**). २ आग्रह करणें, गळीं पडणें इ०. ३ आग्रह धरणें, दाखविणें, हेका धरणें (क्रियापद **धरणें, दाखविणें, लावणें**). ४ कशाच्यातरी उलट सबबी सांगणें, अडचणी उकरून काढणें; (आपणांस एखादें काम करण्याविषयीं अधिक आग्रह व्हावा म्हणून वरपांगी) मागें घेणें, नकार दर्शविणें इ० (क्रिया० **धरणें**). ५ जरूरी, गरज. ॐ **महाराची अडोपर वेशीपाशीं** आपणाला जें मागावयाचें तें महार वेस अडवून मागूं शकतो.

अडोशींपडोशीं [हिं०] **वि०** जव-ळचा, शेजारीं पाजारीं असलेला, ल्यातचा, नजीकचा.

अडोशींपडोशीं [हिं०] **क्रि० वि०** आजूबा-बाजूस; जवळपासच्या जागेंत किंवा भागांत; शेजा-रच्या प्रांतांत, मुलखांत, ठिकाणीं, इ०.

अडोसा, आडोसा [**म०** आड + बसणें] **पु०** १ निवाऱ्याची जागा. २ छपून राहावयास योग्य स्थळ. ❀ **अडोशानें, आडोशानें** कशाच्या तरी म्ह० भिंतीच्या, झाडाच्या, पडद्याच्या, झुडपाच्या, वगैरे आड राहून. **आडोसा घेणें** कोण काय बोलत आहे वगैरे गुप्त रीतीनें आडून ऐकणें.

अडोळसा पु० मागें **अडुळसा** पहा.

अडोळा पु० घराच्या छपराच्या दोन पा-ख्यांना जोडणारी जी मधोमध तुळई असते ती; अढें.

अड्डा पु० १ एका विशिष्ट व्यवसायाच्या लोकांचा समूह किं० समुदाय. २ अपरिनिर्दिष्ट मंड-ळींची एकत्र जमावयाची, बसण्याउठण्याची, वगैरे जागा. नाकें, खुंट, चव्हाटा. ३ गाडीवाले वगैरे आपल्या गाड्या सोडतात ती जागा; तळ. ४ आखाडा, तालीम. ५ वीणकऱ्याची आपल्या फणीच्या चोया बनविण्याची लाकडाच्या ठोक-ळ्यांत बसविलेली एक विशिष्ट प्रकारचा सुरी. ६ एकाद्या कलेंत किं० कामांत आपण प्रवीण आहों अशी घमेंड (मारणें, किं० बाळगणें); टेंभा (मिरविणें). ❀ **गाण्याचा, गंजीफांचा इ० अड्डा** गाणें, गंजीफा, वगैरे जेथें नेहमीं चालतात ती जागा किंवा त्यांत भाग घेणारी मंडळी. **अड्डेबाज, अड्डेबाईक पु०** घमेंड मारणारा, टेंभा मिरविणारा.

अड्डेकरी पु० एखाद्या अड्ड्याचा किं० तळाचा वगैरे मालक किं० धनी.

अंड्या वि० सुजलेल्या, फुगलेल्या, किं० वाढ-लेल्या अंडाचा.

अड्याल क्रि० वि० (अशिक्षितांच्या भाषेंत) आलीकडे, इकडच्या बाजूस. (**पड्याल** याच्या उलट).

अढंच वि० १ मोठा. † **ज्ञा०** १.

अढळ [**म०** अ+ढळ (ढळणें पासून)] **वि०** न चळणारें; शाश्वत, टिकाऊ, अचंचल. ❀ **—पद न०** अचळ पद, ध्रुव पद.

अढळ, आढळ [**म०**] **पु०** १ ज्ञानाची कक्षा; आढळून येणें, दिसणें. २ इंद्रियगोचरता. उ० शरभ हा प्राणी कोणाचें अढळांत असल्याचें मी ऐकिलें नाहीं.

अढळणें, आढळणें अ० क्रि० दिसणें, साप-डणें, दृष्टिपथांत येणें; ज्ञानगोचर होणें.

अढा पु० १ मुरड. २ वेढा (दोरीचा खांबा-भोंवता वगैरे); वळसा. ३ दोरी वगैरेची अढी.

अडाचौताल पु० संगीतशास्त्रांत एक प्रका-रचा ताल किं० ठेका.

अढाव, अढावा, आढावा, पु० १ एकंदर हिशेब वगैरे करून केलेला अजमास; अंदाज, हिशे-बाचा आडा; तेरीज. २ ठोकताळ्यानें तयार केलेला आंकडा. ३ साधारणपणें काढलेल्या खर्चा-च्या वगैरे किमान मर्यादा.

अढावेढा पु० ए० व० १ दोरीचा मुरड; दोरीच्या पदरांना फार पीळ घातल्यामुळें जो वेढा पडतो तो, किं० जी पिळी पडते ती. २ दोरीची किं० सुताची गुंतागुंत. ३ बयादी किं० सबबी (कांहीं काम टाळण्यासाठीं सांगितलेल्या). ह्या अर्थानें **अढेवढे** असा अनेकवचनी प्रयोग अधिक रूढ आहे). ❀ **अढेवढे घेणें** कांकूं करणें, हरकती, काढणें, सबबी सांगणें.

अढाळ वि० १ अतिशय मोठें, विस्तृत; अजस्र; प्रचंड, (जसें घर, शेत, अरण्य, गलबत, शरीर, इ०). २ कांहीं पदार्थ ठेवावयाला जेवढें मोठें बारदान, पाव, इत्यादि हावें असेल त्याचेपेक्षा पुष्कळ मोठें; फारच मोठें.

अढी स्त्री० १ तेढ. २ पिकविण्याकारितां गव-तावर पसरून ठेवलेल्या आंबे इत्यादि फळांचें थर, (क्रियापद **घालणें**). ३ मनांत गुप्तपणें जागृत ठेविलेला वैरभाव; रुसवा. ४ प्रतिकूल ग्रह. (३ आणि ४ ह्या दोन अर्थीं अनुरूप क्रियापद **धरणें, बाळगणें**). ❀ **अढीच्या दिढी क्रि० वि०** उधळे-पणानें; सढळ हातानें; महागाईच्या दरानें, एकाच्या जागीं दीड खर्चून.

अढें, आढें न० घराच्या छपराचीं दोन पाखीं एकमेकांना जेथें मिळतात तेथें त्यांच्या खालीं त्यांना आधार म्हणून जें लांब लाकूड घातलेलें असतें तें. २ दोन माणसांनीं दोन टोकांस धरून चालवावयाची

करवत. ३ पदार्थाला वाटोळी गति देण्यासाठीं त्याच्या आंसाला काटकोनांत जो दांडा बसविलेला असतो तो. ४ गाय, म्हैस, इ० ची कास. ॐ **एका आढ्याखालचा** एकाच घरांतील, कुटुंबांतील. **आढ्याला पाय लावून निजणें** स्वस्थपणें, बिन-घोर, पसरणें, निजणें.

अढेकड न० चाकाचे आरे किं० रवे ह्यांच्या टोकांस जी अडवी पट्टी बसविलेली असते ती.

अढेपाट पु० छपराच्या एका कडेच्या खालीं आधार म्हणून जें अडवें लाकूड घातलेलें असतें तें.

अढेपारढ पु० अ० द० गांवच्या पाटलाला तेथील शेतकऱ्यांच्या जमिनींच्या उत्पन्नांतून हक्कानें मिळावयाचा भाग. (पाटलाला इनाम दिलेल्या जमीनीला "पासोडी" म्हणतात. गांवांत होणाऱ्या लग्नांत पाटलाला जें दिलें जातें त्याला ' शेला वाटी ' म्हणतात. पाटलाला जी रोख रक्कम दिली जाते ती 'नेमणूक').

अढेवेढे पु० अ० व० १ गायनांत, पुराणांत, इ० त जे विशोभित दिसणारे स्वरांचे कंप, आलाप, इ० ते. २ खोट्या सबबी सांगणें, हरकती आणणें. ३ शुष्क वाद करून एकादें काम टाळण्याचा प्रयत्न करणें. (क्रियापद " घेणें ")

अढ्या पु०ज्या दोन खुंट्यांभोवतीं सूत काढतांना किंवा साफ करतांना गुंडाळतात, त्यांतील प्रत्येक.

अढ्याकरवत पु० १ चौकटींत बसविलेला आणि लाकूड उभें चिरावयासाठीं दोन माणसांनीं चालवा-वयाचा करवत.२ दोन्ही टोकांस लांकडी मूठी बसवि-लेल्या असून दोन माणसांनीं चालवावयाचा करवत.

अणकुची स्त्री० बारीक, सुईसारखें, टोक. ॐ **–दार वि०** टोकदार.

अणखर पु० गाई, हशी, इ० च्या कासेंतून पिळून काढलेल्या शेवटच्या धारा.

अणखर [का०] १ **वि०** घट्ट आणि ठाशींव विणीचें आणि पक्क्या रंगाचें (कापड); टिकाऊ, भक्कम. २ स्पष्ट, कडक, फटकळ (भाषण).३ तीक्ष्ण, झोंबरें. ४ चमत्कारिक, क्वचित् घडणारें, नवलाईचें.

अणखुरणें अ० क्रि० गाय, म्हैस, इ० ची कास दूध फार झाल्यामुळें रटाटून फुगणें. २ गाय, म्हैस, इ० चें दुधानें कासेंत रटाटून फुगणें.

अणगट न०} मूळ. † ज्ञा० {

अणवाणी, आणवाणी क्रि० वि० उघड्या नागड्या पायानीं; पायांत वाहाणा वगैरे कांहीं न घालतां. [३ कोष्टे.

अणा पु०१ म्हण,आहाणा.२ सांप्रदायिक वाक्य.

अणि, अणी [म० आणि] उ० अ० (कवितेंत) आणि, शिवाय.

अणिमा [सं० अणिमन्=अणु (लहान) असण्याचा धर्म] पु०अणिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, महिमा, ईशित्व,वशित्व, कामावसायिता, ह्या ज्या आठ सिद्धि त्यांतील पहिली. २ अत्यन्त लहान किं० बारीक असण्याचा धर्म किं० स्थिति.

अणिमोल वि० बिनमोल, अमूल्य.

अणियाळें वि० }अणकुचीदार. † ज्ञा० {.

अणी [सं० अणि (टोक किं० खीळ)]१ टोक, अणकुची. २ भोंवऱ्याचें लोखंडी अणकुचीदार टोक,–ज्याच्या वर भोंवरा फिरत राहतो. ३ लगामाचें हातांत धरावयाचें टोक. ४ एक आणा किंमतीचें प्राचीन काळचें एक नाणें.५ ऐन वेळ, आणीबाणीची वारी. ॐ**–दार वि०** अणकुचीदार. **एक अणी चुकली कीं बारा वर्षांचा वायदा** योग्य समय चुकूं दिला तर पुढें बारा वर्षांत काम होत नाहीं.

अणीक [म० आणि] क्रि० वि० (कवितेंत) १ आणखी, शिवाय. २ पुन्हा. **उ० अ०** आणि. **वि०** वेगळा, भिन्न, दुसरा. [असामान्य.

अणीकसा वि० विचित्र,चमत्कारिक, विलक्षण,

अणु [सं०] पु० बारीक कण. सूर्यकिरणांत जे धुळीचे कण दृग्गोचर होतात त्यांच्या षष्ठां-शानें लहान असणारा कण. **वि०** अतिशय लहान, बारीक,अल्प. ॐ**–मात्र** अतिशय लहान रूपाचें. अत्यंत थोड्या परिमाणाचें.

अणुआर वि० } चाराचूर. † ज्ञा० {.

अणुरेणु पु० बारीक सारीक कण (साधारणतः हा शब्द अनेकवचनीं योजतात). ॐ **अणुरेणुजाल न०** १ सूर्यकिरणांत तरंगतांना दिसतात ते कण. २ अत्यंत बारीक कणांचा समुदाय.

अणेगा स्त्री० शपथ, आणेगा.

अण्णा [कानडी] १ बहुमानाची पदवि; उ० दामूअण्णा. २ वडील भाऊ. ३ कोणाही पुरुषाचें विशेष नाम.

अतः [सं०] **क्रि० वि०** म्हणून, एतदर्थ. (नुसता अतः शब्द मराठींत वापरीत नाहींत). ※ **अतएव** क्रि० वि० म्हणूनच, यासाठींच. यामुळेंच. **अतःपर** क्रि० वि० इतउत्तर, यापुढें. **अतःकारणात्** क्रि० वि० यामुळें, यास्तव, म्हणून.

अंत [सं०] पु० १ शेवट, समाप्ति, पर्यवसान. २ मरण. ३ (वैद्यकांत) औषधाचा परिणाम,—रोग्याचें बरें होणें किंवा मरणें. ४ (गणितांत) श्रेढीचें शेवटचें पद. ५ ताकदीचा, सामर्थ्याचा,सहनशीलतेचा, पराकाष्ठेचा, पल्ला किंवा पोंच; उ० ह्या घोड्याचा अंत पाहून त्याला दामटा. ६ काम करण्याची किंवा वापर सोसावयाची ताकद (अकरणरूपी प्रयोगांत). ७ (समासांत अंत्यपदीं) सीमा, अखेर, ०च्या पर्यंत, जसें-गदाधर्यंत (न्यायशास्त्र), गजांत (लक्ष्मी), नखशिखांत (स्नान वगैरे). ※**अंतकाल** पु० १ मरणकाळ. २ वैभवाचा वगैरे शेवट. **अंतकालापेक्षां मध्यान्हकाल कठिण** मरणाच्या समयापेक्षां मध्यान्हाची वेळ म्हणजे भुकेचा समय अधिक कठिण. **अंतपार** पु० सीमा, पराकाष्ठा. **एकाद्याचा अंत पाहणें** त्याला पूर्णपणें कसास लावणें.

अंतः [सं०] **क्रि० वि०** हा संस्कृत शब्द सामासिक शब्दांचें पूर्वपद असतां त्याचे आंत, मध्यें, दरम्यान, असे अर्थ होतात. अंतः याच्यापुढें स्वर किंवा मृदु व्यंजन आलें असतां त्याच्या विसर्गाचा र् होतो; आणि पुढें कठोर व्यंजन आलें असतां तो विसर्ग कायम राहतो. या नियमास अनुसरून सिध्द झालेले मराठींतलि रूढ सामासिक शब्द आम्ही येथें देतो. परंतु अंतः याच्यापासून वरील नियमाचें उल्लंघन करून अशुद्ध रूपांत जे सामासिक शब्द मराठींत वापरले जातात ते आम्ही स्वतंत्र रीत्या कोशांत यथास्थानीं दिले आहेत. ※ **अंतःकरण** न० १ मन. २ मन, बुद्धि, अहंकार, आणि चित्त, अशा ज्या चार जीववृत्त्या आहेत, त्यांतील प्रत्येक. **अंतःकरणचतुष्टय** न० मन, बुद्धि, अहंकार आणि चित्त, या चारांचा समुच्चय. **अंतःकरणपंचक** न० अंतःकरण, मन, चित्त, बुद्धि आणि अहंकार या पांचांचा समुच्चय. **अंतःकरणशुद्धि** स्त्री० चित्ताची शुद्धि. **अंतरंग** वि० १ जवळचा, आंतील. २ आत्मीय, प्रिय, जिव्हाळ्याचा, जिवलग. ३ अवश्य कर्तव्य असा. न० १ अंतःकरण, मन. २ आंतलें स्वरूप, आंतील रचना, घटना, मांडणी. **अंतर्गडु** वि० १ कुजकानाचा. २ अडचण करणारा, लुडबुड्या. पु० मनांतल्या मनांत गुप्त ठेवलेला विचार, भाव किं० मसलत. **अंतर्गत** वि० १ आंतील; पोटांत समाविष्ट असलेलें. २ आंतील स्वरूपावरून, रचनेवरून, मांडणीवरून सिद्ध किं० उत्पन्न होणारा. (पुरावा, बोध, इ०). ३ मध्येंच उत्पन्न झालेलें किं० आलेलें. **अंतर्गर्भ** पु० १ आंतील भाग, गाभा. २ गुप्त बेत किं० विचार. वि० गरोदर; पोटांत गर्भ असलेली. **अंतर्गृह** न० १ घराची आंतील बाजू, माजघर, स्वयंपाकघर, इ०. २ बायकांची बसण्याउठण्याची जागा, अवरोध. **अंतर्गळ** पु० वृषणामध्यें पाणी सांचल्यामुळें होणारा व्याधि. **अंतर्जठर** न० पोट. **अंतर्दशा** स्त्री० (ज्योतिषांत) १ गौणग्रहांचे मनुष्याच्या आयुष्यावर होणारे परिणाम. २ खरी, अंतःस्थ स्थिति; उ० गोविंदराव श्रीमंत दिसतो पण त्याची अंतर्दशा तुम्हांस काय माहिती ? **अंतर्दाह** पु० १ मनाचा जळफळाट. २ शरीराचा आंत होत असलेला भडका. **अंतर्दृष्टि** स्त्री० १ दिव्य दृष्टि. २ योगसाधनानें वगैरे होणारी ज्ञानप्राप्ति. **अंतर्द्वार** आंतील दार, गुप्तदार, जनानखान्याचें दार. **अंतर्धान** न० नाहींसें होणें. गुप्त होणें. **अंतर्ध्यान** न० आत्म्याचें चिंतन, निगूढ चिंतन. **अंतर्निष्ठा** स्त्री० १ परमध्यान, चिंतन. २ पराभक्ति. **अंतःपट** पु० १ लग्न लावण्याच्या वेळीं वधुवरांच्या मध्यें जो पडदा धरतात तो. २ मुंजीच्या वेळीं मुंजामुलाच्या व त्याच्या पित्याच्या मध्यें जो पडदा धरतात तो. **अंतःपाती** वि० ०मध्यें समाविष्ट असलेले किंवा झालेले, ०मध्यें मोडणारा; उ० जाबालि ऋषीचा आश्रम दंडकारण्यांतःपाती होता. **अंतःपुर** न० जनानखाना, अवरोध. **अंतःप्रकृति** वि० आंतल्या गांठीचा, आपले विचार आपल्या मनांतच ठेवणारा; आपल्या विश्वासांत कोणासच न घेणारा. **अंतर्बाह्य** क्रि० वि० आंतून बाहेरून, सर्व बाजूंनीं. **अंतर्भाव** पु० १ समाविष्टता, अंतर्गतता. २ मनांतील विचार. **अंतर्भूत** वि० समाविष्ट असलेले; सामील असलेले. **अंतर्भेद** पु० १ अंतःस्थ किं० आंतील

भानगडी. २ अंतःस्थ किं० गुप्त बातम्यांचें प्रकटीकरण. **अंतर्भेदी (–द्या)** वि० घरभेद्या, गुप्त बातम्या काढून आणणारा, किं० सांगणारा. **अंतर्मुख** वि० १ खोल विचारानें केलेली (टीका). २ बाह्य जगांतून मन काढून आत्म्याकडे वळविणारा (योगी). **अंतर्याम** न० मन. **अंतर्यामींची खूण अंतर्यामास ठाऊक** आपण कसे आहों, आपण काय पाप केलें आहे, हें आपल्याला ठाऊक असतें. **अंतर्लापिका** स्त्री० ज्या कोड्याचें उत्तर त्याच्यांतच निगूढ म्ह० लपलेलें असतें तें; उ० काय राखोनि सुदृढ कामसिद्धि व्हे नर; उ० कोळ्यांस कृमिकीटांस कोण आश्रय देतसे. **अंतर्वत्नी** स्त्री० गर्भिणी स्त्री. **अंतर्वर्ती** वि० आंत असलेला, समाविष्ट, (याच्या उलट **बहिर्वर्ती**). **अंतर्वास** पु० १ अंतःकरणांत राहणें. † तुक.१०१. **अंतर्वेदी** स्त्री० गंगा आणि यमुना या दोन नद्यांच्या मधील प्रदेश. **अंतर्वैरी** वि० १ गुप्त शत्रु. २ मरणासन्न इसमाच्या इच्छेवरून त्यास भेटावयास निघालेला परंतु त्याच्या मरणोत्तर येऊन पोचलेला (पुत्र, भाऊ, इ०). **अंतःशौच** न० मनाची शुद्धि. **अंतःस्थ** वि० १ आंतील. २ गुप्त. न० आपलें काम ज्या सरकारी अधिकाऱ्याच्या हातांतले आहे त्यानें तें आस्थेनें, लवकर आणि आपणाला अनुकूल अशा रीतीनें करावें म्हणून त्याला दिलेला लाच. **अंतःस्थपट्टी** स्त्री० आपल्या गांवाचें काम ज्या सरकारी अधिकाऱ्याकडे आहे त्यानें तें गांवाला अनुकूल अशा रीतीनें करावें म्हणून त्याला गांवचा इनामदार आणि सामान्य रयत यांनीं वर्गणी करून लाच म्हणून दिलेली रक्कम. **अंतःस्थपत्र** न० हुंडीच्या सोबतचें तपशीलाचें पत्र. **अंतःस्थिति** स्त्री० १ आंत असणें. २ खरीखुरी पण बाहेर न दिसणारी परिस्थिति, अवस्था, इत्यादि. **अंतर्हित** वि० १ नाहींसें झालेलें. २ झांकलेलें. **अंतर्ज्ञान** न० दिव्य दृष्टीनें प्राप्त झालेलें ज्ञान. **अंतर्ज्ञानी** वि० दिव्य दृष्टीनें जवळचें, दूरचें, इत्यादि जाणणारा.

अंतक पु० १ यम. २ मृत्यु. ३ हाडवैरी. ४ सरकारी मांग, फाशीं देणारा सरकारी नोकर. वि० १ समाप्त करणारा. २ मरणावह.

अतखानी वि० मत्सरी, परोत्कर्षासहिष्णु.

अंतडी स्त्री०, **अंतडें** न०, **आंतडी** स्त्री०, **आंतडें** न० [सं० अन्त्र] पोटांतील ज्या अनेक नाड्या त्यांपैकीं प्रत्येक. ※ **अंतडें कातडें** न० शरीराच्या अंतड्याप्रमाणें आणि कातड्याप्रमाणें प्रिय वस्तु. **आंतडी तुटणें** अंतड्याला पीळ पडणें, एखाद्याबद्दल पराकाष्ठेचें दुःख वाटणें, आंच वाटणें. **अंतडी निपसणें** एखाद्याचीं गुह्यें बाहेर काढणें. **अंतड्या कातड्याची माया** स्त्री० मातेची अपत्याबद्दलची माया.

अतत अ० आश्चर्यवाचक उद्गार. अबब !

अतत्ता स्त्री० १ तोतरें किंवा बोबडें बोलणें. (क्रियापद लावणें, मांडणें). २ कांकूं करणें, आढेवेढे घेणें.

अतथ्य [सं० अ + तथ्य (सत्य)] वि० खोटें, खरें नाहीं असें, दिशाभूल करणारें (भाषण इत्यादि).

अंतर [सं०] न० १ दोन वस्तूंच्या किं० बिंदूंच्या मधली जागा. २ दोन वेळांमधील अवकाश. ३ फरक, तफावत, विरोध. ४ चळणूक, थांबणूक, अडथळा, विघ्न. ५ चुकी. ६ अंतर्याम, हृदय, अंतःकरण, काळीज, मर्म. ७ अंतराळ, स्वर्ग (कवितेंत). ८ (कर्मधारय समासांत) अन्य, दुसरा, भिन्न.–जसें, ‘ भाषांतर ’ म्ह० दुसरी भाषा, एका भाषेंतून दुसऱ्या भाषेंत नेणें किं० लिहिणें; ‘देशांतर’ म्ह० अन्य देशाप्रत जाणें इ०. ९ आंतली बाजू, मधील अवकाश. १० ज्या सामासिक शब्दांत हा पूर्वपद असतो तेथें तो कधीं कधीं विशेषण म्हणून असून, त्याचा अर्थ ‘ आंतील, ’ ‘ मधील,’ इ० सारखा म्हणजे ‘बाह्य’ याच्या उलट होतो. जसें **अंतरवही, अंतरसाल, अंतरात्मा** इ० (पुढें सामासिक शब्द पहा). ※ **अंतर पडणें** चालू न राहणें, बंद पडणें, ०मध्यें विघ्न येणें. **अंतर देणें** ०चा परित्याग करणें, ०ला सोडणें, टाकणें, विसरणें. **अंतरीं भिनणें** काळजांत प्रवेशणें, मर्मीं लागणें, झोंबणें,(बाण, दुरुक्ति इ०). **अंतरची** किं० **अंतरींची खूण** स्त्री० खात्री वाटविणारी, पटविणारी, गुप्त खूण, संकेत, इ०. **अंतरदृष्टि** [सं० अंतर+दृष्टि] स्त्री० मागें **अंतर्दृष्टि** पहा. **अंतरमाळा** स्त्री० अ० व० पोटांतील आंतडीं. **–शोषणें, – वाळणें,– सुकणें** भयंकर धक्का बसणें, भीति वाटणें इ०. **अंतरमाळा गळ्यांत घालणें** १ ठार मारणें, नाश करणें. २ अतोनात त्रास देणें. **अंतरमळीण** वि० दुष्ट मनाचा, दुष्ट वासनांचा.

अंतरवही[**सं०** अंतर+**म०** वही] **स्त्री०** दोन भिन्न मालकांच्या जमीनी एकमेकांस चिकटलेल्या असतां त्यांच्यामध्यें जें कुंपण घातलेलें असतें तें. **अंतरविटाळ** [**सं०** अंतर+**म०** विटाळ] **पु०** ज्याचा प्रत्यक्ष स्पर्श आल्यानें विटाळ होतो त्यानें स्पर्शिलेल्या वस्तूला स्पर्श केल्यानें होणारा विटाळ. उ० मेल्याला स्पर्श आल्यास होतो तो प्रत्यक्ष विटाळ आणि त्यानें स्पर्शिलेल्या चिरगुटास स्पर्श केल्यानें अंतरविटाळ होतो. **अंतरवेल पु०**, **स्त्री०** एक तंतूसारखी बारीक वेल. हिलाच ' आकाशवेल, ' ' अमरवेल ' 'सोनवेल ' अशा दुसरीं नांवें आहेत. **अंतरसाल स्त्री०** वृक्षादिकांच्या बाहेरच्या सालीच्या आंतील साल. **अंतरसाक्षी** [**सं०** अंतर+साक्षी] **वि०** अंतःकरणांतील विचारांचें ज्ञान ज्याला आहे किं० होतें तो (आपण स्वतः किं० ईश्वर). **अंतरसुख** [**सं०** अंतर+सुख] **न०** मानसिक सुख, प्रसन्नता, शांति. **अंतरसुती वि०** १ ज्यांत अर्धे धागे कापसाचे आहेत असें (कापड). २ गुप्त रीतीनें दुसऱ्याच्या कामाला विशिष्ट वळण लावणारा. ३ ज्यांत कांहीं गुप्त अर्थ किं० गूढ धोरण आहे असा. **अंतरस्थ वि०** १ स्वाभाविक, नैसर्गिक. २ पोटांतील; आंत समाविष्ट असलेला. **अंतरज्ञ वि०** १ मर्मज्ञ. २ अंतर्ज्ञानी; जगांत घडत असलेल्या गोष्टी दिव्य दृष्टीनें जाणणारा. ३ दुसऱ्याच्या अंतःकरणांतील विचार जाणणारा. **अंतरागमन न०** १ मध्यें येणें किं० पडणें. गुरुशिष्य, पतिपत्नी, वादीप्रतिवादी इ० च्या मध्यें रदबदली वगैरे करण्यासाठीं तिऱ्हाइताचें येणें. २ तशा येण्यानें होणारा अडथळा किं० प्रत्यवाय किं० खोळंबा. **अंतरात्मा पु०** १ जीवात्मा, प्रत्यगात्मा. २ मन, चित्त. **अंतरें क्रि० वि०** १ दूर, अंतरावर. । **तुका०** १.

अंतरणें [**सं०** अंतर] **स० क्रि०** १ ०ला मुकणें. २ मागें टाकणें, वरचढपणा मिळविणें. ३ वगळणें, गणना न करणें. **अ० क्रि०** १ चुकणें, नष्ट होणें; उ० माझें कालचें पुराण वरी पाहुणे आल्यामुळें अंतरलें.

अंतरपकड स्त्री० तालमींतील एक व्यायामाचें साधन. (एक प्रकारचा लोंबता मल्लखांब).

अंतरपट (**-पाट**) [**सं०** अंतःपट] **पु०** **अंतःपट** शब्दाचें अपभ्रष्ट रूप. मागें **अंतःपट** पहा.

अंतरवन स्त्री० नागवेलीची, -विड्याच्या पानांच्या वेलींची, -मागल्या हंगामाचीं पानें काढून घेतल्यावर आणि नव्या हंगामाचीं पानें (त्यांना नवतीचीं पानें म्हणतात) जोरांत येऊं लागावयाच्या अगोदर जी किरकोळ पानें येतात तीं.

अंतरा पु० मधली जागा किंवा काळ. ✱ **अंतरास्पर्श पु०** परंपरेनें आलेला स्पर्श किं० तशा स्पर्शानें आलेला विटाळ.

अंतरा, **अंत्रा** [**सं०**] **पु०** पदाच्या पहिल्या भागाला अस्ताई म्हणतात आणि दुसऱ्या भागांत एक अंतरा किं० अधिक अंतरे असतात.

अंतराय [**सं०**] **पु०** अडथळा, विघ्न, प्रत्यवाय, अडचण, प्रतिबंध. ✱ **-शत न०** शेंकडों अडचणी किं० अडथळे.

अंतरायामवात [**सं०**] **पु०** धनुर्वाताचा एक प्रकार. यांत रोगी पुढच्या बाजूनें धनुष्यासारखा वांकतो. (याच्या उलट **बहिरायामवात**. यांत रोगी मागच्या बाजूनें कमानदार होतो).

अंतराल (**-ळ**) [**सं०**] **न०** १ स्वर्ग व पृथ्वी यांच्यामधील अवकाश. २ मधला प्रदेश; मधली रिकामी किं० पोकळ जागा. ✱ **अंतराळदीप पु०** आकाशदिवा.

अंतरित [**सं०**] **वि०** १ झांकलेलें. २ मागें टाकलेलें किं० पडलेलें; सोडून दिलेलें. ३ निराळें किंवा विभक्त केलेलें किं० आलेलें. ४ ०ला मुकलेला.

अंतरिक्ष, **अंतरीक्ष** [**सं०**] **न०** १ आकाश. २ पृथ्वीचा पृष्ठभाग आणि निळें दिसणारें आभाळ ह्यांचा दरम्यानचा प्रदेश.

अंतरीय, **अंतरीयवस्त्र** [**सं०**] **न०** अंतर्वस्त्र. आंतमध्यें अंगाबरोबर गुंडाळावयाचें किं० नेसावयाचें वस्त्र, -ज्याच्यावरून दुसरें वस्त्र ल्यावयाचें असतें.

अंतर्कळा [**सं०** अंतःकळा यापासून अशुद्ध समास] **स्त्री०** (कवितेंत) हुषारी, चतुराई, कौशल्य.

अतर्कित [**सं०** अ० (नकारार्थ)+तर्कित (तर्किलेलें)] **वि०** १ तर्कांत नसलेलें, ०ची कल्पना नसलेलें, अकल्पित. २ आकस्मिक.

अतर्क्य [**सं०** अ (नकारार्थक)+तर्क्(अंदाज करणें)] **वि०** ज्याच्याबद्दल तर्क करतां येत

नाहीं असा. कल्पनातीत. विचारानें ज्याचें आकलन होत नाहीं असें.

अंतर्चक्षु [**सं०** अंतः+चक्षु यापासून अशुद्ध समास] **पु०** दिव्य दृष्टि. **वि०** दिव्यदृष्टि असलेला (योगी).

अंतर्त्याग [**सं०** अंतः+त्याग यांचा अशुद्ध समास] **पु०** (कवितेंत) खरीखुरी विरक्तता,– ज्यांत देहावरची सुद्धां ममता नष्ट होते.

अंतर्पाट [**सं०** अंतः+पट यापासून अशुद्ध समास] **पु०** मागें **अंतःपट** पहा.

अतर्प्य, अतर्पणीय सं०] अ (नकारार्थक) +तृप् (संतुष्ट होणें किं० करणें)] ज्याची तृप्ति, किं० समाधान करतां येत नाहीं किं० करणें योग्य नाहीं असा.

अतल [**सं०**] **न०** सप्तपातालांतील पहिलें म्हणजे अगदीं पृथ्वीखालचें पाताल. ꕥ**–स्पर्श वि०** अतिशय खोल, ज्याचा ठाव लागत नाहीं असें.

अतलस [**अ०**] **स्त्री०** मखमल.

अतसबाजी [**फा०** आतिष् (अग्नि)+बाजी (क्रीडा)] **स्त्री०** शोभेची अथवा चैनीची दारू (नळे, चंद्रज्योती, फुलबाज्या, इ०) उडविण्याची करमणूक.

अतसी [**सं०** अतसिका=जवस] **स्त्री०** जवस धान्य किं० जवसाचें झाड.

अताई वि० १ गुरूच्या साहाय्यावांचून विद्या (संगीत, वैद्यक, इ०) जो शिकला आहे तो. २ उपरिनिर्दिष्ट तऱ्हेनें शिकलेली (कोणतीही कला, विद्या इ०).

अतात्त्विक [**सं०** अ (नकारार्थक)+तात्त्विक (तत्त्वाला धरून असलेले)] **वि०** १ खऱ्यास सोडून असलेलें;तत्त्वास बाध आणणारें. २ उथळ, दांभिक. ३ पोकळ, निराधार.

अतार (–री) [**अ०** अत्तार=सुगंधी सामान करणारा किं० विकणारा.] **पु०** अत्तरें करणारा किं० विकणारा; गंधी.

अतांशीं, आतांशीं, आतांशा क्रि० वि० हल्लीं, अलीकडे.

अति [**सं०**] **क्रि० वि०** अतिशय, फार, पुष्कळ, अतोनात, मनस्वी, पराकाष्ठेचा. (या उपसर्गापासून सिद्ध झालेले सामासिक शब्द स्वतंत्र रीत्या यथास्थानीं कोशांत दिले आहेत.) ꕥ**अति तेथें माती** कोणतही गोष्ट मर्यादेपलीकडे केली किं० झाली म्हणजे ती हानिकारक होते. **अति सर्वत्र वर्जयेत्** [**सं०**] कोणतीही गोष्ट युक्त मर्यादेपलीकडे करूं नये.

अंतिक [**सं०**] **वि०** १ जवळचा, लगतचा. २ पर्यंतचा. ३ ०च्या बाजूचा. **पु०** नोकर, सेवक, परिचारक.

अतिकरणें अ० क्रि० { अतिक्रांत होणें; पलीकडे जाणें. † **ज्ञा०** {

अतिकाळ [**सं०**] **पु०** योग्य वेळाच्या नंतरचा काळ म्ह० उशीर.

अतिकाळ्या [**सं०** अतिकाळ+या (मराठी प्रत्यय)] **पु०** आपलीं कर्मे (तोंड धुणें, स्नान-संध्या, इ०) वेळेवर न करणारा, म्हणजे उशिरां करणारा; चेंगट, अतिधिम्या.

अतिकृत वि० { पराभविलेला, तिरस्कारित. ꕥ**अतिकृतकंदर्पसर्पदर्प वि०**ज्यानें कामरूपी सर्पाच्या गर्वाचा परिहार केला आहे असा. † **ज्ञा०** {

अतिक्रम पु०, अतिक्रमण न० [**सं०** अति=पलीकडे+क्रम्=जाणें] १ ठरावेिक किंवा इष्ट मर्यादेच्या, नियमाच्या, किं० चालीच्या वगैरे पलीकडे जाणें म्ह० त्यांचें उल्लंघन. २ भंग, बाजूस टाकणें. ३ विरोध. ४ अपमान. ५ (वेळ) निघून जाणें. ६ जिंकून घेणें, ताब्यांत घेणें. ७ अव्हेर, अनादर. ८ जोराचा हल्ला. ९ अपराध.

अतिक्रमणें [**सं०** अति+क्रम्] १ ०च्या पलीकडे जाणें. २ उल्लंघन करणें, (आज्ञा वगैरे) मोडणें. ३ जिंकून घेणें. ४ व्यापणें.

अतिक्रांत [**सं०** अतिक्रम्] **वि०** १ उल्लंघिलेलें, मोडलेलें (वचन वगैरे). २ टळलेली, उलटून गेलेली, (वेळ वगैरे). ३ संपविलेला, तुडविलेला, आक्रमण केलेला, (मार्ग वगैरे). ४ व्यापिलेला. ५ जिंकिलेला. ꕥ**अतिक्रांताशौच न०** नात्याचा, संबंधाचा, माणूस मृत झाल्यानें येणाऱ्या अशौचाचा म्ह० सुतकाचा अवधि उलटून गेल्यानंतर जर तें मरण कळलें, तर तेव्हां धरावें लागणारें तें अशौच किं० सुतक तें.

अतिचार [**सं०**] **वि०** १ (**ज्यो०**) कक्षेच्या विशिष्ट भागीं ज्याची गति वाढली आहे

असा (ग्रह). २ अति चंचल किं० अस्थिर. पु० १ (ज्यो०) कक्षेच्या विशिष्ट भागीं वाढलेली, ज्यास्त झपाट्याची झालेली, गति (ग्रहांची वगैरे). २ ग्रहांचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें (ठरीव वेळेच्या अगोदर).

अतिछत्र पु०,–त्रा,–त्रका स्त्री० [सं०] १ सुगंधी रोहिस तृण. २ आळंबें. ३ बडिशेप.

अतित्याय पु० { त्रागा. † तुका० {.

अतित्यायी वि०{ साहसकर्म अथवा त्रागा करणारा. † तुका० {.

अतिथि [सं० अतति गच्छति न तिष्ठति] पु० पाहुणा, मार्गस्थ वगैरे मनुष्य, जो आपणांकडे अनाहूत येतो, व ज्यास पाहुण्याप्रमाणें वागविणें आपले कर्तव्य आहे तो. ꙮ **–पूजन** न०, **–पूजा** स्त्री० अतिथींचा करावयाचा सत्कार, आदर. **–यज्ञ** पु० पंचमहायज्ञांपैकीं दुसरा म्ह० मनुष्ययज्ञ. पांच महायज्ञांची नांवें:—भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ, पितृयज्ञ, देवयज्ञ, आणि ब्रह्मयज्ञ. **–वेळा** स्त्री० पाहुण्यांची जेवावयास यावयाची वगैरे म्ह० मध्यान्हाची किं० भोजनाची वेळ; दुपार. **–सत्कार** पु० पाहुण्यांची वास्तपूस्त.

अतिदेणें न० आवांक्याबाहेर असलेलें, न फेडतां येण्याजोगें कर्ज किं० ऋण. ꙮ**फार ऊ त्याला खाज नाहीं आतिदेणें त्याला लाज नाहीं** ज्याच्या केशांत फार उवा त्याला कंड सुटत नाहीं, आणि ज्याला फार कर्ज त्याला त्याची लाज वाटत नाहीं.

अतिदेश [सं०] पु० १ स्वाधीन करणें. २ सादृश्यामुळें नियम किं० विधान अधिक व्यापक करणें; पूर्वींच्या एखाद्या प्रसंगासंबंधानें केलेलें कांहीं विधान हलींच्या पण तत्सदृश प्रसंगाला लागू करून घेणें. [झोप घेणारा.

अतिनिद्र [सं०] वि० सुस्त; झोपाळू, फाजील

अतिपरिचय [सं० अति+परिचय (ओळख)] पु० फाजील सलगी, संघट्टन, किं० ओळख. ꙮ **अतिपरिचयादवज्ञा** [सं०] फाजील सलगी झाली की अपमान होतो.

अतिपात [सं०] पु० कायदा, नियम इ० चें उल्लंघन किं० अतिक्रमण.

अतिप्रसंग [सं०] पु० १ अतिरेक, फाजील सलगी, योग्य मर्यादेच्या पलीकडे जाणें, किं० जाऊन केलेलें वर्तन. २ अनवस्थादोष.

अतिबद्ध वि० { कृपण. † ज्ञा० {.

अतिबळी वि० पराकाष्ठेचा बलवान, बलिष्ठ, ताकदवान.

अंतिम [सं०] वि० १ शेवटचा, कडेचा. २ मागोमागचा. ꙮ **अंतिमांक** पु० नऊ (९) हा अंक. **अंतिमांगुलि** स्त्री० करंगळी.

अतिमात्र [सं०] क्रि० वि० अतिशय, फार, मर्यादेच्या पलीकडचा.

अतिमान [सं०] वि० योग्य परिमाणाहून अधिक; प्रमाणाबाहेरचा; अतोनात.

अतिमानुष [सं०] वि० दैवी, इ० मानवी शक्तीच्या पलीकडील.

अतिमुक्त वि० १ निरिच्छ. २ वांझ. पु० १ कस्तुर मोगरा. २ तिवस, टेंभुरणी.

अतिमोदा स्त्री० नवमल्लिका नांवाची वेल. वि० अतिशय सुवासिक.

अतिरथ, अतिरथी [सं०] पु० १ रथांत बसून जो असंख्यात योद्ध्यांशीं एकटा लढतो तो योद्धा. २ अतिशय बलिष्ठ योद्धा. (योद्ध्यांचे तीन प्रकार आहेत, रथी, महारथी, अतिरथी). ꙮ **अतिरथी महारथी** पु० अ० व० मोठमोठे, अजिंक्य योद्धे.

अतिरस पु० { अतितीव्र, अत्युष्ण.† ज्ञा० {.

अतिरागा [म० अति+राग (क्रोध)]वि० अतोनात रागीट. ꙮ**अतिरागा भीकमागा** फाजील रागिटपणामुळें भीक मागावयाचा प्रसंग येतो.

अतिरिक्त [सं०] वि० मर्यादेच्या पलीकडील, फार, अतोनात.

अतिरेक [सं०] पु० १ इष्ट किं० विशिष्ट परिमाणाचा आतिक्रम किं० उल्लंघन. २ उत्कर्ष, भर, आधिकपणा. ३ भेद, फरक. ४ वरचढपणा. ५ पराकाष्ठा, कडेलोट. ६ विपुलता.

अतिरोग [सं०] पु० क्षयरोग.

अतिवयस्क [सं० अति+वयस् (वय)+क (प्रत्यय)] वि० १ फार वृद्ध किं० म्हातारा. २ विद्यापार्जन, लग्न, इत्यादि कर्मांविषयीं जें योग्य वय तें ज्याचें अतिक्रान्त झालें आहे असा.

अतिवाद [सं०] पु० १ निंदा, अपशब्द. २ कठोर भाषण. ३ अतिशयोक्ति. ४ असभ्यपणाचा किं० तर्कटीपणाचा वाद. ꙮ **अतिवादी** [सं०

अतिवादिन्] वि० १ वटवट्या. २ आपल्याच पक्षाचें समर्थन करणारा. ३ तर्कटीपणानें किं० सभ्य रीति उल्लंघन करून वाद करतो तो.

अतिवाह [सं०] पु० १ पलीकडे नेणें. २ वेळ घालविणें, किं० लोटणें. ३ भागवून नेणें. ४ सूक्ष्म शरीराचा परशरीरांत प्रवेश.

अतिवाहन [सं०] न० १ घालविणें (वेळ). २ फार ओझें वहाणें. ३ अति कष्ट. ४ उचलबांगडी करणें, दूर सारणें.

अतिविष न०, **अतिविषा** स्त्री०, **अतिविख** न० एक औषधी वनस्पति. (याची साल रंगविण्याच्या कामीं येते. ती पांढरी, तांबडी, किं० काळी असते).

अतिवृष्टि [सं०] स्त्री० पाहिजे त्यापेक्षां ज्यास्त पडलेला पाऊस,—ज्याच्यामुळें शेतें कुजून नासाडी होते.

अतिव्यय [सं०] पु० फाजील खर्च, उधळपट्टी. (याच्या उलट **मितव्यय**).

अतिव्ययी [सं०] वि० फाजील खर्च करणारा, उधळ्या, उडव्या.

अतिव्याप्ति [सं०] स्त्री० नियमाखालीं न येणाऱ्या गोष्टींना नियम लागणें, किं० लागू करणें. २ (**न्याय**) फाजील गोष्टींचा समावेश (लक्षणाच्या तीन दोषांपैकीं एक). लक्षणाचे अव्याप्ति, अतिव्याप्ति, आणि असंभव, असे तीन दोष आहेत. त्यांपैकीं अतिव्याप्तीच्या दोषानें लक्षणांत फाजील गोष्टींचा समावेश होतो. उदाहरणार्थ गायीचें जर एकाद्यानें सशृंगत्व असें लक्षण केलें, तर त्यायोगें ह्या गायीच्या लक्षणांत गोव्यातिरिक्त अशा म्हशींचा, रेड्यांचा, बोकडांचा, हरिणांचा, वगैरे अन्य सशृंग प्राण्यांचा फाजील समावेश होईल. ही अतिव्याप्ति होय. ३ मर्यादेचें उल्लंघन.

अतिशय [सं०] पु० १ आधिक्य, वैपुल्य. २ अतिरेक, मर्यादेचें उल्लंघन. ३ गुण, संख्या, किं० परिमाण ह्यांचे बाबतींत मर्यादेचें उल्लंघन. ४ { अत्याचार. † तुका ० }. वि० फार, पुष्कळ. ❀ **अतिशयोक्ति** स्त्री० (**साहित्य**) एक प्रकारचा अर्थालंकार. कांहीं आलंकारिकांनीं हिचे तीन, कांहींनीं चार, आणि कांहींनीं पांच प्रकार मानिले आहेत. मम्मटानें पुढील पांच प्रकार सांगितले आहेत. (क) उपमेय मुळींच न सांगतां उपमान पदार्थांनेच त्याचा निर्देश; (ख) उपमेय ही वस्तू इतर वस्तूंहून कांहीं वेगळीच वस्तु आहे अशा अर्थाचें विधान; (ग) जर...तर ह्या शब्दांनीं किं० ह्या अर्थाच्या शब्दांनीं सुरू झालेल्या दोन वाक्यांनीं केलेलें विधान; (घ) कारण आणि कार्य हीं एकाच काळीं घडलीं अशा अर्थाचें विधान; (ङ) कारणाच्या आधीं कार्य घडलें अशा अर्थाचें विधान. विशेष खुलाशासाठीं आमचें “ अर्थालंकारांचे निरूपण ” पहा.

अतिशयित [सं०] वि० १ अतिनिंद्रित. २ मागें टाकलेला. ३ अतिशय.

अतिशाहाणा पु० फाजील शहाणा, दीडशहाणा, म्हणजे मूर्ख. ❀**अतिशाहाणा त्याचा बैल रिकामा** जो मनुष्य फार फार शहाणपणा करावयास जातो तो अंतीं फसतो.

अतिशूद्र [सं०] पु० शूद्राच्यापेक्षां खालच्या जातीचा माणूस, (अस्पृश्यांत मोडणारा); उ० महार, मांग, धेड, चांभार, वगैरे जातीचा मनुष्य.

अतिसर्ग [सं०] पु० १ देणगी, दान. २ परवानगी. ३ निरोप. ४ वियोग. ५ अनुग्रह.

अतिसार [सं०] पु० १ हगवण. २ आमांश.

अतिसारी वि० अतिसारानें पीडित.

अतिसो पु० { अतिशय, भर. † ज्ञा० }.

अंतीं [सं० ‘अंत’ची सप्तमी] क्रि० ०अ १ शेवटीं, सारांशानें. उ० अनुभवांतीं म्ह० एकंदर अनुभवावरून. २ ०च्या मुळें; साठीं; उ० सरकारीकापाअंतीं तो आला आहे.

अतीत { पु० अतिथि, अगांतुक पाहुणा. **वि०** पलीकडे गेलेला; पलीकडला. **क्रि०** वि०पलीकडे † तुका० }.

अतीत [सं० अति+इत (इ=जाणें)]वि० १ गेलेला. २ दूर गेलेला. ३ पूर्वीं होऊन गेलेला, पूर्वीं झालेला. ४ मागें टाकलेला. ५ मृत. न० मागला काळ. ❀ **वयोतीत** वि० पुष्कळ वय ज्याणें मागें टाकलें आहे असा ह्म० वृद्ध. **मोहातीत** वि० ज्याला मोह पडत नाहीं तो.

अतीत [सं० आतिथीचें अपभ्रष्ट रूप] पु० अतिथि, मार्गस्थ, अनाहूत इसम, (ज्यास आपण पाहुण्याप्रमाणें वागविलें पाहिजे). ❀ **अतीला-**

भ्यागत पु० अतिथि, वैरागी, गोसावी, इ० (ज्यांचा आपण गृहस्थाश्रमाच्या नियमाप्रमाणें सत्कार करणें जरूर आहे).

अतींद्रिय [सं० अति+इंद्रिय (इंद्रियांच्या पलीकडचा)] वि० आपल्या पंचेंद्रियांना न आकलन करितां येण्यासारखा, अदृश्य इ०. ꣸ **अतींद्रियज्ञान** पु० जें पंचेंद्रियांनीं मिळवितां येत नाहीं असें ज्ञान. **अतींद्रियज्ञानी** वि० अतींद्रियज्ञान ज्याला प्राप्त झालें आहे तो. [ज्ञय, फार.

अतीव [सं अति+इव] क्रि० वि० अति-

अतुरबली (–ळी), अतुलबली(–ळी)[सं०] वि० १ अतिशय बळकट, भक्कम. २ असह्य वर्तणुकीचा, त्रास देणारा, उद्धट, अरेराव. ३ अवाढव्य, प्रचंड.

अंतुरी स्त्री० १ पत्नी. २ कोणतीही स्त्री.

अतुबेळ वि० } बलाढ्य. † ज्ञा० {.

अतुल [सं० नाहीं तुला ज्याला न० बहुव्रीहि] वि० ज्याची तुलना करतां येत नाहीं असें; ज्याच्या जोडीचें किंवा तोडीचें दुसरें कांहीं नाहीं असें.

अतुलनीय, अतुल्य [सं०] वि० बिनतोड; ज्याच्याशीं दुसऱ्या कशाचीही तुलना किंवा बरोबरी करितां येत नाहीं, किंवा होत नाहीं, असें.

अतुवट } न० गुह्य, गुज, रहस्य. † तुका०{.

अंतुवट } न० अंतरंग. वि० बळकट. † ज्ञा{.

अंतौरी } स्त्री० स्त्री, बायको. † ज्ञा० {

अतुष्ट [सं० अ+तुष्ट] वि० १ संतोष न पावलेला. २ अतृप्त. ३ असमाधानी.

अतट [स० अ अभावार्थक+तूट (तुटणें)] वि० १ ज्याच्यांत खंड पडत नाहीं कि० पडला नाहीं असें; सतत चाललेलें. २ जें फार दिवस ठेविल्यानें कमी होत नाहीं किं० नासत नाहीं असें. ३ ज्याचा तुटवडा पडण्याचा संभव नाहीं असें.

अतृप्त [सं० अ+तृप्त (तृप्)] वि० अतुष्ट, ज्याच्या इच्छा भागल्या नाहीत असा. ज्याची तृप्ति झाली नाहीं किं० होणें शक्य नाहीं असा.

अतृप्ति [सं० अ+तृप्ति] स्त्री० असमाधान, असमाधानीपणा, असंतुष्टता.

अंतेवासी [सं० अंते (शेजारीं)+वासिन् (राहतो तो)] पु० १ काम, धंदा, वगैरे शिकणारा पोऱ्या. २ गुरुगृहीं विद्याध्ययनासाठीं राहिलेला शिष्य. ३ चांडाल (जो गांवाच्या बाहेर पण शेजारीं राहतो). [पहा.

अंतेष्टि [सं० अंत्य+इष्टि] स्त्री० पुढे अंत्येष्टि

अतोनात [सं० अत: (याहून अधिक) +नास्ति (नाहीं)] क्रि० वि० किं० वि० परमावधीचा; अतिशय; पराकाष्ठेचा.

अत्तर [अ० इत्र=फुलांचा अर्क] पुष्पादिकांचा अर्क किंवा तेल, (जें अतिशय सुवासिक असतें). ꣸ **अत्तरदाणी** स्त्री० आमंत्रितांना पानसुपारी देणें झाल्यानंतर त्यांना अत्तर ज्या सुंदर आणि नक्षीदार पात्रांतून काढीनें लाविलें जातें तें पात्र. **अत्तराचे दिवे जाळणें** पैशाची उधळपट्टी करणें.

अत्तां, आत्तां [सं० अत:] क्रि० वि० याच क्षणीं, तावडतोब.

अत्तार, अत्तारी [अ०] पु० अत्तरें, सुवासिक तेलें, वगैरे करणारा, किं० करून विकणारा; गंधी.

अत्तुरी स्त्री० स्त्री किंवा बायको (कवितेंत).

अंत्य [सं०] न० एकावर पंधरा शून्यें देऊन जी संख्या ती.(जलधीच्या पुढील व मध्याच्या मागील). पु० १ चंडाळ. २ आर्यावर्ताच्या बाहेरचा प्रदेश.

अंत्य वि०१शेवटचा,अखेरचा.२नश्वर. ꣸ **अंत्यकर्म** न०, **अंत्याक्रिया** स्त्री० मरणोत्तर करावयाचे धार्मिक विधि. **अंत्यगोदान** न० अनुष्ठानांतील ब्राह्मणांस जें गाईचें दान करितात तें. **अंत्यज, अंत्यजन्मा, अंत्यजाति** वि० हीन वर्णाचा इसम (शूद्र, चांडाळ, इ०). नीच योनींत जन्मलेला मनुष्य. **अंत्यदशा** स्त्री० मरण. **अंत्यधन** न० गणित श्रेढीचें किं० भूमितिश्रेढीचें शेवटचें पद. **अंत्यनाडी** स्त्री० नऊ नऊ नक्षत्रांचा एक एक अवधि म्हणजे नाडी.हे अवधि तीन आहेत; १ आदिनाडी; २ मध्यनाडी आणि ३ अंत्यनाडी. **अंत्यपद** न० **अंत्यधन** पाहा. **अंत्यांक** पु० त्रैराशिकांतील तिसऱ्या स्थानीं मांडावयाचा राशि. **अंत्यावस्थ** वि० अगदीं आसन्नमरण स्थितींत असलेला; जो थोडक्याच वेळांत मरेल असा संभव दिसत आहे तो. **अंत्याक्षरी** स्त्री० विद्यार्थ्यांच्या करमणुकीचा एक प्रकार. एकानें म्हटलेल्या श्लोकाच्या अंत्याक्षरानें आरंभणारा श्लोक दुसऱ्यानें म्हणावयाचा; ह्या दुसऱ्या श्लोकाच्या अंत्याक्षरानें सुरू होणारा श्लोक पहिल्यानें म्हणाव-

शाचा; ज्याला एका विशिष्ट अक्षरानें आरंभणारा श्लोक म्हणतां येणार नाहीं त्याच्यावर डाव लागतो. ह्यालाच भेंडी करणें असेंही म्हणतात. **अंत्येष्टि** [**सं०** अंत्य + इष्टि] **स्त्री०** मरणोत्तर करावयाचीं धार्मिक कृत्यें, किं० विधि; प्रेतत्वनिरसनार्थ प्रेतावर करावयाचा संस्कारविशेष (यालाच अंत्याहुति, अंत्यकर्म, किं० अंत्यक्रिया म्हणतात).

अत्यंत [**सं०**] **क्रि० वि०** अतिशय, फार, अतोनात. ꙮ**अत्यंत स्वजन पु०** १ अतिशय जवळचा संबंधी किं० नातलग. २ अतिशय प्रिय आप्त, मित्र, इ०. **अत्यंताभाव पु० (न्याय)** संसर्गाभाव आणि अन्योन्याभाव असे अभावाचे दोन प्रकार आहेत. संसर्गाभावाचे तीन प्रकार आहेत. प्रागभाव, प्रध्वंसाभाव, आणि अत्यंताभाव. अत्यंताभाव म्ह० जी वस्तु गतकालीं, वर्तमानकाळीं, आणि भविष्यत्कालीं असणें शक्य नाहीं, तिचें नसणें. उ० सशयाचें शिंग, वंध्येचा पुत्र, इ०.

अत्यंती स्त्री० १ प्रत्यक्ष आणि वारकाईनें पाहाणें. † **तुका०** १.

अत्यय [**सं०**] **पु०** १ निघून जाणें(वेळ). २ समाप्ति, नाश. ३ मृत्यु. ४ संकट. ५ इजा; विपत्ति. ६ गुन्हा, अपराध. ७ हल्ला. [काष्ठेनें.

अत्यर्थ [**सं०**] **क्रि० वि०** अतिशय; परा-

अत्यवस्थ [**सं०**] **वि०** मरणासन्न, ज्याची अत्यंत चिंताजनक स्थिति झाली आहे असा. **अत्यावस्थ** हें अपभ्रष्ट अशुद्ध रूप.

अत्याग्रह [**सं०** अति+आग्रह] **पु०** पराकाष्ठेचा आग्रह; अभिनिवेश.

अत्याग्रही वि० १ फार आग्रह धरणारा. २ आपला हेका किं० हट्ट न सोडणारा.

अत्याचार [**सं०**] **पु०** १ शिष्टसंमत वागणुकीचें उल्लंघन; अनीतीचें किं० पापी आचरण, आततायीपणाची वागणूक. २ फाजील सोंवळेपणा.

अत्याचारी वि० १ आततायी, कुकर्मी. २ फाजील सोंवळा.

अत्यासक्त [**सं०** अति+आसक्त (लंपट)] **वि०** अतिशय आसक्ति म्हणजे इच्छा, वासना, भक्ति, अनुरक्तता, गोडी, किं० अभिरुचि असणारा.

अत्यासक्ति [**सं०** अति+आसक्ति (गोडी, वासना) **स्त्री०** अतोनात, मनस्वी, पराकाष्ठेची, गोडी, अभिरुचि, इच्छा, वासना, भक्ति, इ०.

अत्याहित [**सं०**] **न०** १ मोठें संकट. २ अपघात. ३ भयंकर साहस. ४ महाभीति.

अत्युक्ति [**सं०** अति+उक्ति] **स्त्री०** मागें **अतिशयोक्ति** पहा.

अत्युद्गारवात पु० [**सं०** अति + उद्गार (ढेकर) + वात] ज्या वातामुळें अतिशय ढेकरा येतात तो.

अत्र [**सं०**] १ येथें, ह्या स्थळीं. २ आतां, ह्या प्रसंगीं. ꙮ**अत्रत्य वि०** येथील. [अंतर्गळ.

अंत्र [**सं०**] **न०** आंतडें, ꙮ**अंत्रवृद्धि स्त्री०**

अत्र, अत्रप, अत्रब [**सं०** अत्र (येथें)+कः (कोणचा) संदेहः ' संशय '] **न०** संशयात्मकता, संदिग्धता, अस्पष्टता, अनिश्चितता, दुटप्पीपणा (भाषणाचा, वर्तनाचा इ०); किंतू. (क्रियापद 'ठेवणें,' ' राखणें '). **क्रि० वि०** अस्पष्ट तऱ्हेनें, संदिग्धपणें, अनिश्चितपणें, दुटप्पीपणानें, किंतू ठेवून.

अत्रप (–ब) वि० १ बुद्धिपुरःसर ज्यास्त किं० फालतू घेऊन ठेविलेला. २ सध्यांच ज्याची जरूरी नाहीं असा.

अंत्राळ न० १ आकाश. † **तुका०** १.

अंत्रिक [**अंतर**चें अपभ्रष्ट रूप] **वि०** सोडून दिलेलें, वगळलेलें.

अत्रिसुत [**सं०** अत्रि (ऋषिविशेष) +सुत (मुलगा)] **पु०** चंद्र.

अथ [**सं०**] **अ०** प्राचीन संस्कृत ग्रंथांत विवेचनाचा, सर्गाचा इ० प्रारंभ दर्शविणारें, किं० करणारें, शुभसूचक अव्यय, –जसें 'अथातोब्रह्मजिज्ञासा'. ' अथ ' याच्या उलट ' इति. ' ꙮ**अथपासून इतिपर्यंत** सुरवातीपासून शेवटपर्यंत, प्रारंभापासून कडेपर्यंत. समग्र, संपूर्ण. **अथश्री स्त्री०** प्रारंभ, सुरवात.

अंथरणें [**सं०** आस्तरण (पसरणें, झांकणें)] **स० क्रि०** पसरणें, जमीनीवर (सतरंजी, गादी, वगैरे) घालणें.

अंथरी स्त्री० चटई, गालिचा, गादी, सतरंजी, इ०,–जें जमीनीवर अंथरून किंवा पसरून त्यावर आपण बसतों किंवा निजतों तें. २ (विशेषतः) गवताचें, किं० चिव्याच्या वगैरे पातींचें, विणून तयार केलेलें आस्तरण (चटई, तट्ट्या, इ०).

अंथरूण न० चटई, गादी इ०,–ज्यावर

आपण बसतों, उठतों, किंवा निजतों. ❀ **अंथरूण-पांघरूण** न० पु० व० १ गादी, उशी, पलंगपोस, पांघरूण, इ० निजतांना जरूर अशा वस्तु. २ (बायकांत संकेतानें) रतिसुख. **अंथरूण पाहून पाय पसरावे** आपला आदा पाहून खर्च करावा. **भुईचें अंथरूण आणि आकाशाचें पांघरूण** गादी, पलंगपोस, उशी, इ० नसल्याकारणानें जमीनीवरच निजणें आणि पासोडी, घावळी, इ० नसल्याकारणानें उघडें निजणें; अतिदरिद्रस्थिति. **अंथरूणाचा घाणा करणें** लोळून वगैरे अंथरूण अस्ताव्यस्त करणें.

अथर्गण न० स्वार्थ साधण्यासाठीं रडणें, ओरडणें, धडपडणें, उर्मटपणें बोलणें, इ०.

अथर्व [सं०] पु० १ अग्नि आणि सोम पूजिणारा. २ अथर्ववेदाचा कर्ता. पु०, न० अथर्ववेद.

अथर्वण [सं०] पु० चार वेदांतील चवथा वेद. अथर्ववेद. ❀ **-वेद** पु० अथर्ववेद. **-वेदी** पु० अथर्ववेदाचें पठण करणारा ब्राह्मण किं० ह्या वेदांत उक्त जे संस्कार ते ज्याचे कुळांत चालत आले आहेत तो.

अथर्वण न० दुसऱ्याचा नाश व्हावा आणि आपला स्वार्थ साधावा म्हणून कपटानें, लावालावीनें, चाहाडीनें, खोटें बोलून, केलेला प्रयत्न.

अथवा [सं० अथ+वा] उ० अ० १ किंवा. (हें पक्षांतरबोधक उ० अ० आहे).

अथांक, अथांग [म० अ (नाहीं)+थांग (तळ)] ज्याचा थांग किं० अंत लागत नाहीं असें, अतिशय खोल; अतलस्पर्श.

अथापि अ० असें असतांही; तरी देखील; तथापि; उ० तो शिव्यागाळीवर आला, अथापि मी त्याला कांहीं उत्तर दिलें नाहीं.

अथाव } वि० खोल, अगाध. ना० ज्याचा थांग लागत नाहीं असें पाणी. † ज्ञा० {

अद [सं० अर्ध] वि० अर्ध याचें समासांत वापरण्यांत येणारें अपभ्रष्ट रूप,—जसें अदगज म्ह० अर्धा गज लांबीचें; अदखंडी म्ह० अर्धा खंडी, अदपाव म्ह० अर्धा पावशेर इ०.

अदकाव, अदकावाचा [सं० अधिक] वि० गरजेपेक्षां ज्यास्त, अधिक, फालतू; कार्य विशेषाला पुरून उरण्याइतका.

अदट न० } अदृष्ट. † तुका० {

अदटपण } न० असमर्थपण. † ज्ञा० {

अदंडय, अदंडनीय [सं० अ+दंडय, दंडनीय [दंड्=पारिपत्य करणें.] वि० ज्यास शिक्षा किं० शासन करतां येत नाहीं असा; ज्यास शिक्षा करणें अनुचित आहे असा.

अंदण, आंदण [सं० अनु+दान] न० १ बक्षिस, दान, इनाम. २ नवरीच्या बापानें मुलीला किंवा जांवयाला दिलेली देणगी, (दागिना, वस्तु, जमीन, इ०). ३ लग्नाच्या विधींत केलेली करणी.

अंदणी वि० अंदण म्हणून बक्षिस दिलेली, दान केलेली, जमीन इ०.

अदत्त [सं० अ (नाहीं)+दत्त (दिलेला)] वि० चिक्कू, कृपण; जो कधींही कांहीं देत नाहीं असा; देण्याकडे ज्याची प्रवृत्ति नाहीं असा. ❀ **अदत्तशिखामणि, अदत्तशिरोमणि** ना० अत्यंत चिक्कू, कवडीचुंबक, लोभी, माणूस. **टीप**—' अदत्त ' ह्याचा खरा अर्थ " न दिलेला "; परंतु व्यवहारांत याचा अर्थ " न देणारा, किं० ज्याचे हातून देणें घडलें नाहीं, घडत नाहीं, किं० घडणें शक्य नाहीं," असा घेण्यांत येतो.

अदब [अ० अदब] स्त्री० १ मान ;पूज्य माणसाशीं सभ्य वर्तन; नम्रतापूर्वक आचरण; विनयशीलपणा; लहानपणा. (क्रियापद ' राखणें,' 'ठेवणें, ' ' संभाळणें '). २ पु० त्रास, दगदग, यातायात (क्रियापद ' पडणें, ' ' सोसणें,' 'होणें'). ३ जरूरी, निकड. (क्रियापद 'पडणें'). ❀ **अदबीनें** क्रि० वि० सभ्यतापूर्वक, विनयपूर्वक. **अदबशील, अदबशीर** वि० विनयशील, सभ्य आचरणाचा, लहीन. क्रि० वि० काळजीपूर्वक, लक्ष्यपूर्वक, आस्थापूर्वक, त्रास न होईल अशा रीतीनें, धक्का न पोचेल अशा तऱ्हेनें, व्यवस्थितपणें (क्रियापद 'ठेवणें,' 'राहणें, इ०).

अदबणें अ० क्रि० शीण होणें, यातायात सोसणें, आजारानें, संकटानें, विवंचनेनें, श्रमानें, किं० कष्टानें त्रस्त किं० जर्जर किं० बेजार होणें.

अदभागी [सं० अर्ध+भाग्य+ई (मराठी प्रत्यय)] वि० हतभागी. दुर्दैवी. सुस्थितींत नसलेला किं० सुस्थिति भोगण्यास असमर्थ.

अंदाभित्व [सं० अ+दंभ+इन्+त्व] **न०** १ दांभिकपणाचा अभाव. २ बढाईखोरपणा, थाटमाट, छानछुकी, इ० पासून पराङ्मुखता, किं० इ० चा कंटाळा किं० अव्हेर.

अदभ्र } वि० फार, बहुत. † ज्ञा० }

अदमण पु० अर्धामण वजनाचा. **अदमणा** पु० **अदमणी** स्त्री० अर्धामण तोलाचें वजन. **अदमणका** वि० अर्धामण वजनाचें किंवा मापाचें (भांडें, वजन, धोंडा).

अदमास [फा०] पु० अंदाज, अजमास, ठोकळमान. ※ **अदमासें** क्रि०वि० सुमारें, अनमानधवक्यानें, सरासरी.

अदमासणें स० क्रि० अंदाजानें, अनमानधवक्यानें, किं० ठोकताळ्यानें ठरविणें.

अदमुरें, अदमोरें [सं० अर्ध+म० मुरणें] वि० अर्धवट विरजलेलें, चांगलें किं० पूर्णपणें न गोठलेलें (दहीं.)

अदम्य [सं० अ+दम्य (चेपून, चिरडून, टाकतां येईल किं० टाकला पाहिजे असा)] वि० १ ज्याचें दमन करतां येत नाहीं असा; जो मर्यादेंत ठेवितां येत नाहीं असा, ज्याच्यावर मात करतां येत नाहीं असा. २ अतिशय प्रबल.

अदय [सं० (नाहीं) दया (अनुकंपा) ज्याला] वि० निष्ठुर, दयाहीन, क्रूर.

अंदरघुशी [फा० अंदर (आंत)+हिं० घुसना (प्रवेशणें, शिरणें)] स्त्री० गुप्तपणें घरांत शिरणें (चोरी करावयाला वगैरे).

अदर्शन [सं० अ+दर्शन] न० १ न दिसणें. २ न पाहाणें. ३ नाहींसें होणें; लोप.

अदला, आदला [सं० आदि किं० आद्य] वि० आधींचा, अलीकडील, चालूच्या पूर्वीचा (दिवस, वर्ष इ०). **टीप— आधला** हेंही रूप रूढ आहे.

अदलाबदल [हिं० स्त्री०] १ आपसांत एक वस्तु देऊन तिच्याऐवजीं दुसरी घेणें; मोबदल्यादाखल देणें आणि घेणें. २ येथलें तेथें तेथलें येथें, ह्याचें त्याला त्याचें ह्याला, इ० प्रकारचा जो फेरफार तो.

अदसूशब्द [सं०] पु० १ विप्रकृष्ट किंवा परोक्ष वस्तूंसंबंधीं योजण्यांत येणारें सर्वनाम, **तो, ती, तें** इ०. २ क्वचित् संनिकृष्ट किंवा अपरोक्ष वस्तूंसंबंधींही वापरण्यांत येणारा सर्वनामें म्ह० **हा, ही, हें** इ० या शब्दानें सूचित केलीं जातात.

अदहनीय, अदह्य [सं० अ (नाहीं)+ दहनीय, दह्य (दह्=जाळणें)] वि० १ न जळणारें, न जळण्याजोगें. २ जें जाळतां नये तें.

अदळ, आदळ स्त्री०, पु० १ रहदारी, वापर, धबडगा, पैरव, उ० ह्या हौदावर फार मोठा (किं० मोठी) अदळ आहे. २ त्रास, उपद्रव. ※ **अदळअपट, आदळआपट, अदळाअदळ, अदळउपट अदळउफळ** स्त्री० १ बेफामपणानें हातपाय झाडणें (आजाऱ्यानें इ०). २ वस्तु इतस्ततः फेकून देणें (रागानें, वेडानें इ०).

अदळ वि० 'पोटाचा' आणि 'कासोट्याचा, आणि 'कानाचा' ह्या तीन शब्दांच्या समवेत हा 'अदळ' शब्द येतो. अदळ पोटाचा किं० अदळ कासोट्याचा म्ह० ज्याला हगवणीचा उपद्रव आहे असा. अदळ कानाचा किं० कानाचा अदळ म्ह० ऐकिलेली गोष्ट बोलून दाखविल्याविना ज्याला चैन पडत नाहीं असा.

अदळपण } न० १ असारपण. २ अयोग्यपण. ४ कृशपण. † ज्ञा० }.

अदळणें, आदळणें [सं० आदलन] स० क्रि० १ जोरानें जमीनीवर टाकणें किं० फेकणें; आपटणें. २ (बायकी प्रयोग) अधाशीपणानें पोटांत खाद्यवस्तु कोंबणें; उ० आदळ मेल्या हा पेढा ! कधीं पेढा खाल्ला होतास कीं नव्हतास ? अ० क्रि० थडकणें, सपाट्यासरशीं जाणें, किं० पोचणें.

अदा, आदा [अ०] पु० १ स्त्रिया पुरुषांचें मन वळविण्याकरतां जे हावभाव, नखरे, वगैरे करतात ते. २ लाभ, नफा, वाढ. ३ मिळकत, उत्पन्न, येणें, प्राप्ति. ४ मालमत्ता. ※ **अदा** क्रि० वि० येणें आलें किं० पोचलें. **तीन टक्के अदा त्रेपन्न टक्के खर्च** मिळकतीपेक्षां अधिक, किं० फाजील, खर्च. भरमसाट खर्च. **अदा पाहून खर्च करावा** मिळकतीच्या मानानें खर्च करावा, ज्यास्ती करूं नये. **अदा करणें** कर्जफेड करणें; देणें देऊन टाकणें.

अदाई स्त्री० प्राप्ति, मिळकत. वि० १ हातीं आलेला किं० पोचलेला. २ देऊन टाकलेला किं० दिलेला.

अंदाज, अंदाजा [फा० अंदाजाह्] पु०

१ तर्क, अनुमान. २ अजमास, ठोकळमान, सरासरीनें ठरविलेला आंकडा. ३ ठराविक, नेमस्त केलेलें, परिमाण.

अदाता [सं० अ+दाता (दा=देणें)] **वि०** अनुदार, कंजूष.

अदातृत्व [सं०] अनुदारपणा, कंजूषपणा.

अंदाधुंदी [हिं०] **स्त्री०** १ घरांत, राज्यांत, किं० संस्थेंत, असणारा अव्यवस्थितपणा. २ बेल्गामीपणा, बेशिस्तपणा. पुढें **अंधाधुंधी** पहा.

अदानव } **वि०** १ दैन्यरहित. २ दैत्यरहित. † **ज्ञा०** {

अदांभित्व [सं०] सचेपणा, अकपटीपणा (मागें 'अदंभित्व' पहा).

अदालत [अ०] **स्त्री०** १ न्यायमंदिर, न्यायसभा; न्याय निवाडा करण्याची किंवा देण्याची सरकारी जागा. २ न्यायनिवाड्याविषयींचीं कामें.

अदावत [अ०] **स्त्री०** १ वैर, दुटावा, तेढ. २ दुष्टाव्यानें केलेलें खोटें दोषारोपण (क्रियापद 'घालणें,' 'येणें,' 'करणें,' 'पडणें'). ❀ **अदावती (-त्या)** **वि०** मनांत दुटावा, तेढ, ठेवून शिव्या देणारा, निंदा, नालस्ती, करणारा.

अदावळ [फा०] **स्त्री०** १ दांडगाई, खोड्या (लहान मुलांच्या). २ दुसऱ्यास उपद्रवकारक अशीं कृत्यें. ३ त्रास देणें, सतावणें. ४ खोटें दोषारोपण. (क्रियापद 'घालणें' 'टाकणें,' 'येणें').

अदुःखनवमी [सं० अदुःख+नवमी] **स्त्री०** भाद्रपदाच्या शुक्ल पक्षांतील नवमी (ह्या दिवशीं बायका देवीची पूजा करतात,–पुढें येणाऱ्या बारा महिन्यांत कांहीं अनिष्ट कोसळूं नये म्हणून).

अंदू [सं० अंदु किं० अंदू=सांखळी, विडी]**पु०** १ पीलखान्यांत हत्तीचे पायास बांधावयाची सांखळी किं० दोरी. २ दोन भिंतींना किं० थोंड्यांना जोडून खिळविणारी लोखंडाची कांब, किं० पट्टी. ❀**अंदू घालणें** प्रतिबंध, अटकाव, विरोध करणें; खोडा घालणें; विघ्न उपस्थित करणें.

अदूषणीय, अदूष्य [सं० अ+दुष् (बिघडविणें)] **वि०** अदोषार्ह; ज्याला नांवें ठेवण्यास किं० दोष देण्यास जागा नाहीं असें; पायाशुद्ध.

अदृश्य [सं० अ+दृश् (पाहाणें)] **वि०** १ दृष्टीच्या टप्प्यांत न आलेला. २ दृष्टीच्या टप्प्याच्या पलीकडे गेलेला; नाहींसा किं० विलुप्त झालेला; अंतर्हित.

अदृष्ट [सं० अ+दृष्ट (पाहिलेलें)] **वि०** १ अकल्पित. २ भविष्यकाळचें. ३ न पाहिलेलें, न अनुभविलेलें.

अदृष्ट [सं० अ+दृष्ट=पाहिलेलें] **न०** १ दैव, नियति, किस्मत, पूर्वजन्मकर्मविपाक. २ (विधिघटित कपाळावर लिहिलेलें असतें अशा समजावरून) कपाळ, भालप्रदेश, ललाट. ३ पुढें होणाऱ्या सुखदुःखांना कारणीभूत असलेली सत्प्रवृत्ति किंवा असत् प्रवृत्ति. ❀ **अदृष्टास येणें** अनुचित गोष्ट दैववशात् करण्याचा प्रसंग येणें. **अदृष्टखर्च पु०** मरणोत्तर किं० परलोकीं सुफल मिळावें म्हणून केलेला खर्च (अन्नदान वगैरे). **अदृष्टफल न०** आपल्या कृतींचें परलोकीं मिळणारें किं० अनुभवावें लागणारें फळ. **अदृष्टभय न०** आपल्या इहलोकींच्या कर्माबद्दल आपल्याला काय बरें वाईट फल लाभेल याविषयींची चिंता किं० भीति. **अदृष्टवशात् क्रि० वि०** दैववशात्, सहजासहजीं, यदृच्छेनें, आपण होऊन. **अदृष्टवाद, अदृष्टार्थवाद पु०**, **अदृष्टमत, अदृष्टार्थमत न०** मरणोत्तर प्रत्येक प्राण्याला त्याच्या बऱ्यावाईट कर्माप्रमाणें बरें वाईट फल प्राप्त होतें अशा विषयींचें मत किं० प्रतिपादन. **अदृष्टमतवादी वि०** अदृष्टमत प्रतिपादन करणारा. **अदृष्टवान्, अदृष्टवंत वि०** सुदैवी, भाग्यशील, नशीबवान.

अदेख [म० अ+देखणें] **वि०** दुसऱ्याचें बरें ज्याला पाहवत नाहीं असा. मत्सरी. ❀**अदेखाई स्त्री०** मत्सरीपणा; परोत्कर्षासहिष्णुता.

अदेखणा वि० कुरूप, बेडौल.

अदेय [सं० अ+देय=देण्याजोगा] **वि०** जें देतां येत नाहीं असें, जें देऊं नये असें. ❀**–दान न०** जी वस्तु दुसऱ्यास देणें अनुचित वा गर्हणीय ती त्याला देणें, किं० नजर करणें; भलत्याच वस्तूचें समर्पण.

अंदेशा [फा० अंदेशह्=संशय] **पु०** वहीम, संशय, शंका; आगामि संकटाची भीति.

अदल [अ० अद्ल्=न्याय, निवाडा] **स्त्री०** शिक्षा, ठेंच, नुकसानीमुळें मिळणारी इशारत, ठोकर (क्रियापद घडणें). **वि०** १ हुषार, वाकबगार,

पटाईत. २ अट्टल, पक्का. ३ खरें, योग्य तोलाचें, अस्सल (माप, वजन वगैरे).

अद्भागी [सं० ' हतभागी ' पासून अपभ्रष्ट रूप] वि० दुर्दैवी; कमनशीबी.

अद्भुत [सं०] न० १ आश्चर्य, चमत्कार. २ चमत्कारिक किं० विलक्षण गोष्ट; अपूर्वाईची किं० नवलाईची गोष्ट. ३ असाधारण दैवी गोष्ट (धरणीकंप, धूमकेतुदर्शन, उत्पात, इ०). ॐ **अद्भुत मांडणें** नवीन आणि चमत्कारिक चाल रूढ करून पाहाणें.

अद्भुत [सं०] वि० चमत्कारिक, विलक्षण, अपूर्व, आश्चर्यकारक. **–कौतुक** न० आश्चर्यकारक गोष्ट, अपूर्वाई. **– रस** पु० साहित्यशास्त्रकारांनीं शृंगार, वीर, करुणा, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र आणि शांत, हे जे नऊ रस दिले आहेत त्यांतील एक. **–शांति** स्त्री० भूकंप, धूमकेतुदर्शन, वगैरेसारख्या अनिष्ट गोष्टींपासून आपणांवर कांहीं अरिष्ट गुदरूं नये म्हणून जे धार्मिक विधि करतात ते.

अद्य [सं०] क्रि० वि० १ आज. २ आतां. ३ हल्लीं. ॐ **–तन** वि० आजच्या दिवसाचा. न० आज मध्यरात्रीपासून उद्यां मध्यरात्रीपर्यंतचा काल. **अद्यावधि** क्रि० वि० १ आजपासून. २ आजपर्यंत. **–प्रभृति** क्रि० वि० आजपासून, आजपासून पुढें. **–यावत्** क्रि० वि० आजपर्यंत, आतांपर्यंत (याचें **अद्यावत्** असेंही अपभ्रष्ट रूप आहे).

अद्यापपर्यंत, अद्यापवर, अद्यापपावेतों [सं०] क्रि० वि० अजूनपर्यंत, अद्यापि.

अद्यापि [सं० अद्य+अपि] क्रि० वि० अझून, आत्तांपर्यंत. (**अद्याप** हें अपभ्रष्ट रूप).

अद्राव्य [सं० अ+द्राव्य=पातळ होण्याजोगा] वि० १ जें वितळवितां येत नाहीं, किं० ज्याचा रस होत नाहीं, असें. २ न विरघळणारें.

अद्रि [सं०] पु० पर्वत. ॐ **अद्रिपति** पु० १ हिमालय. २ शंकर. **अद्रिसुता, अद्रिजा** स्त्री० पार्वती.

अद्वंद [सं० अ (अभावार्थक)+ द्वंद्व (जोडी, विरोध)] न० १ विरोधाचा अभाव. २ ज्यांत किं० ज्याच्या संबंधानें तंटा किं० मतभेद नाहीं असें. ३ ब्रह्म आणि जग, जीवात्मा आणि परमात्मा, ह्यांचें ऐक्य आहे असें मत. ४ अशा मताचा माणूस. ॐ **–युक्ति** स्त्री० अद्वंद्व मत किं० त्या मताचा पुरस्कार.

अद्वातद्वा [सं० यद्वातद्वा = एतद्वा तद्वा= हें किंवा तें] क्रि० वि० अचावचा, वाटेल तसें, ताळतंत्र सोडून, मूर्खाप्रमाणें (बोलणें).

अद्वितीय [सं० नाहीं द्वितीयं ज्याला] वि० १ असामान्य, लोकोत्तर, ज्याच्या तोडीचा दुसरा कोणी नाहीं असा; बिनजोड. २ एकटा, एकाकी. ३ सर्वश्रेष्ठ. न० ब्रह्म.

अद्वैत [सं० अ (नाहीं) + द्वैत (भेद) ज्यांत] वि० १ एकटें, द्वैतरहित. २ अद्वितीय; लोकोत्तर; असामान्य. न० १ ऐक्यभाव, तादात्म्य. २ ब्रह्म आणि जग, जीवात्मा आणि परमात्मा, ह्यांचें ऐक्य. ३ दोन माणसांच्या मताचें, हिताहितसंबंधाचें, ऐक्य; पूर्ण सलोखा, दृढ मैत्री. ॐ **– मत** न०, **– वाद** पु० ब्रह्म आणि जग, जीवात्मा आणि परमात्मा, हीं एक आहेत असें मत किं० असा वाद. **–आनंद** पु० ब्रह्म आणि जग वगैरेंच्या एकत्वाच्या प्रतीतीपासून होणारा आनंद. ॐ **अद्वैती, अद्वैतवादी, अद्वैतमतवादी** वि० अद्वैत मताचा किं० वादाचा पुरस्कार करणारा किं० अभिमान बाळगणारा. **अद्वैतकुसरी** स्त्री० अद्वैतमताचें गूढ किं० दुर्बोधत्व. **अद्वैतवन** न० सर्व प्राणी वैरभाव विसरून एकोप्यानें रहात होते असें पुराणांत वर्णिलेलें वन किं० अरण्य. **–सुख** न० वर **अद्वैतानंद** पहा.

अधः [सं०] क्रि० वि० (संस्कृतांत) १ खालीं, तळाशीं. २ (समासांत) खालचा, तळचा, नीच स्थितींतला इ०. ॐ **अधोगमन** न०, **अधोगति** स्त्री० १ खालीं जाणें, उतरणें. २ ऱ्हास, अवनति (आर्थिक, नैतिक, इ०). ३ नरकवास. **अधोजिव्हिका** स्त्री० पडजीभ. **अधोदिशा** स्त्री० १ पाताल. २ दक्षिणदिशा. **अधोदृष्टि** वि० खालीं दृष्टि फिरविलेला. खालीं तोंड घालून बसलेला. **अधःपतन** न०, **अधःपात** पु० उच्च स्थितींतून नीच स्थितींत पडणें; अवनति, ऱ्हास, उतरती कळा. **अधःपंथ** पु० नरकाप्रत जाणारा मार्ग. **अधोभाग** पु० खालील भाग, तळचा प्रांत. **अधोभुवन** न०, (**– लोक**) पु०

पाताळ. **अधोमुख (– वदन)** वि० १ खालीं तोंड घातलेला (दुःखानें, लज्जेनें, चिंतेनें, वगैरे). २ जिरलेला, पराभूत झालेला, नक्षा उतरलेला (लक्षणेनें). **अधोमुखीगोम** स्त्री० (अश्व लक्षणांत) घोणीसारखी दिसणारी आणि खालीं अग्रें असणारी केशांची पंक्ति (अशी पंक्ति हें घोड्याचें सुलक्षण मानलें जातें). **अधोयंत्र** न० वाफेनें अर्क काढण्याचें यंत्र. **अधोर्ध्व** क्रि० वि० खालीं आणि वर. **अधोवायु** पु० अपानद्वारानें सरणारा वायु. **अधस्तन** वि० १ खालचा. २ आधींचा, पूर्वीचा. **अधःस्तात्** क्रि० वि० किं० श० अ० खालीं, खालच्या बाजूला. **अधःस्थळीं, अधस्तलीं** क्रि०वि० खाली. **अधःस्थळीं पहावयाला लावणें** लज्जेनें खालीं मान घालण्याचा प्रसंग आणणें. **अधःस्वस्तिक** न० (स्वस्वस्तिक याच्या उलट) आपल्या डोक्यावर दिसणाऱ्या आकाशाचा जो मध्यबिंदु म्ह० स्वस्वस्तिक त्याच्या अगदीं बरोबर खालचा जो बिंदू तो. **अधोक्षज** पु० श्रीविष्णूचें नांव.

अंध [सं०] वि० १ ज्याला डोळ्यांनीं कांहीं दिसत नाहीं असा, आंधळा. २ मूढ, सारासार विचार न करणारा. ज्याची सारासार विचार करण्याची शक्ति नष्ट झाली आहे असा (‘ कामांध, ’ ‘ मदांध, ’ इ०). ❀ **अंधकार** [सं०] पु० १ काळोख, अंधेर; उजेडाचा अभाव. २ मंदपणा. (**अंधःकार** हें अपभ्रष्ट रूप). **अंधकूप** [सं०] पु० १ गाळानें वगैरे भरून गेलेली विहीर. २ तृण इ० नीं जिचें तोंड झाकलेलें किं० झांकून गेलेलें आहे अशी विहीर. **अंधतम** [सं०] वि० नितान्त आंधळा. न० आध्यात्मिक ज्ञानाचा अभाव. **अंधतमस, अंधतामस, अंधातमस** न० नितान्त अंधता; पूर्ण अंधळेपणा. **अंधपरंपरा** [सं० अंधांची मालिका] स्त्री० १ आंधळ्यांची माळका. २ पूर्वीच्या माणसानें किं० माणसांनीं अमुक केलें म्हणून आपण तसें करावयाचें या प्रवृत्तीनें वागणारे लोक. **अंधविलोकन** [सं०] न० असंभाव्य किंवा अशक्य गोष्ट. शशशृंगवत् असद्वस्तु. **अंधदर्पणन्याय** पु० ज्या वस्तूचा एकाद्याला उपयोग नाहीं त्याला ती दिली असतां याचा उपयोग करतात. **अंधपरंपरान्याय** पु० जेव्हां माणसें विचार न करतां मेंढराप्रमाणें एकामागून एक अशीं जातात, आणि प्रसंगविशेषीं नुकसान सोसतात (कांहीं गोट करतांना), तेव्हां या न्यायाचा उपयोग करतात.

अंधक, अंधुक [फा० अंदक=थोडेसें] क्रि० वि० अस्पष्ट रीतीनें, मंदपणें, थोडक्या प्रमाणांत. ❀ **अंधकअंधक** क्रि० वि० अस्पष्ट, अस्वच्छ रीतीनें; मंदपणें.

अधकाव (–वाचा) [सं० अधिक + आवा (मराठी प्रत्यय)] वि० फाजील, जरूरीपेक्षां ज्यास्त; पुरून उरण्याइतका.

अधचामधचा, अधलामधला [म० आधाचा मधचा (–ला) यापासून बेताल घटणा] वि० १ मधलाच, जो धड इकडचाही नव्हे किंवा तिकडचाही नव्हे, असा. २ एखाद्या कार्यांत संबंध नसतां पडणारा. ३ कोणत्याच बाबतींत पूर्णता न पावलेला.

अधडा, आधाडा } पु० मध्यभाग. † ज्ञा० ३.

अधण, आधण न० १ पाण्याचें कढत होणें, पाण्याला उकळी येणें (क्रियापद ‘येणें’ किं० ‘आणणें’). २ कढत व्हावयासाठीं चुलीवर ठेवलेलें किं० ठेवून कढत झालेलें पाणी. ३ आटण्याकरतां काहिलींत ओतलेला उकळणारा उसाचा रस. ४ (लक्षणेनें) जबाबदारी, जोखीम, भिस्त (धंद्याची वगैरे). ५ एखाद्यावर ठेविलेली भिस्त किं० विश्वास (४ आणि ५ या अर्थांनीं क्रियापद ‘ ठेवणें ’). ❀ **अधणांतले रडतात सुपांतले हसतात** संसारांत विचित्र परिवर्तनें होत असतात. आज जे लोक आपण सुखी आहों म्हणून आनंद मानीत आहेत ते उद्यां दुःखांत पडणें शक्य आहे. **जिवावरचें अधण उतरणें** कांहीं मोठें संकट गुदरणें पण त्यांतून निभावणें.

अधन [सं० अ (नाहीं) धन (द्रव्य)ज्याला] वि० द्रव्यहीन, कंगाल. ❀ **– व्यवहार** पु० पैशाच्या बाबतींतील जो तंटा नव्हे तो; फौजदारी बाबत.

अधम [सं०] वि० १ हलक्या दर्जाचा. २ गौण. ३ दुष्ट, हलकट, दुरात्मा. ४(ज्योतिष) सूर्यचंद्रांचा दारिद्र्य सुचविणारा योग. ❀ **–अंग** न० पाय. **–अर्ध** न० बेंबीखालचा शरीराचा भाग. **अधमर्ण** पु० ऋणको. **अधमाकिडा** पु० १ घोड्यांना होणारा

एक विकार. यावर बोकडाचें यकृत् औषध सांगितलें आहे. २ एक रोगविशेष. यावर माणसाचें यकृत् औषध मानीत अशी दंतकथा आहे. ३ (कांहींच्या मतें) काळपुळी. ४ सदोदित आजारी असणारें माणूस.

अधर [म० ज्याला धर नाहीं असा] **वि०** धीर नसलेला, उतावळा. ॐ **अधर, अधरअधर क्रि० वि०** १ हलकेंच, अलगत. २ अधांतरीं, खालीं आधार नसतां. ३ पक्केपणें नव्हे असें; अव्यवस्थितपणें.

अधर [सं०] **वि०** १ खालील, खालच्या बाजूचा. २ नीच, वाईट. ३ खालच्या दर्जाचें. **पु०** १ खालचा ओठ. २ दोन्ही ओठ (अनेकवचनीं). ॐ **अधर चावणें** ओठ चावणें (त्वेषानें वगैरे). **अधरदिशा स्त्री०** अधोबिंदु. **अधःस्वस्तिक** पहा. **अधरपान न०** ओठांचें पान करणें म्ह० चुंबन घेणें. **अधरपुट पु०** ओष्ठद्वय. **अधरामृत न०** ओंठातील अमृतोपम रस. **अधरामृत चाखणें** चुंबन घेणें. **अधरोष्ठ पु०** खालचा ओठ.

अधर्म [सं० अ+धर्म] **पु०** १ शास्त्रनिषिद्ध आचरण; धर्मबाह्य वर्तन. २ पाप, दुराचार.

अधरलंड, अधलंड, अधलंडमधलंड वि० धड इकडे नाहीं आणि तिकडे नाहीं असा; जो इकडचाही नव्हे आणि तिकडचाही नव्हे असा; ह्याही पक्षाचा नव्हे आणि त्याही पक्षाचा नव्हे असा.

अधला [सं० आदि किं० आद्यपासून] **वि०** आधींचा, अगोदरचा. ॐ **—मधला वि०** जो ह्याही टोकाचा नव्हे आणि त्याही टोकाचा नव्हे असा.

अधवड स्त्री० १ बैलाचें किं० रेड्याचें कातडें. २ (लक्षणेनें) आकारानें मोठा, आळशी आणि बकाबका खाणारा (रेडा किं० गाय). ३ गांवच्या महाराच्या देखरेखीच्या हद्दींत मेलेल्या जनावराचें कातडें (जें हक्कानें महारास मिळतें).

अधवणी [म० अधण+पाणी] **स्त्री०** १ आधणाचें पाणी. २ कढत न्हावयाला किं० उकळावयाला ठेवलेलें पाणी.

अधवडचा वि० अलीकडील, ताजा.

अधवा वि० (तीन मुलांपैकीं) साऱ्यांत वडील (मुलगा). (अधवा, मधवा, आणि धाकटा, ह्या तीन मुलांच्या पाहिऱ्या).

अधव्याचा [सं० अध्वन्=रस्ता] **वि०** १ रस्त्यावरचा (आयत्या वेळेपुरता धरून आणलेला माणूस इ०). २ कायमचा नव्हे असा. ३ उपटलाणू. ४ नवीन, नवथरचा. ४ प्रसंगविशेषापुरता एखाद्या अधिकारावर बसविलेला माणूस (ज्याला त्या अधिकाराच्या जागेच्या कर्तव्यांची कांहीं माहिती नसते). ॐ **अधव्याचा जोडला आणि पिढीचा मोडला बरोबर होत नाहींत** दैवयोगानें किं० वशील्यानें श्रीमंत झालेला माणूस गरीबीस आलेल्या परंतु पिढीजाद श्रीमंत अशा माणसाची बरोबरी करूं शकत नाही.

अधस्वी स्त्री० १ दासी. २ ठेविलेली बाई, रांड.

अधस्वी [म०] **वि०** अधाशी, खादाड.

अंधळा, आंधळा [सं० अंध] **वि०** १ अंध, ज्याला डोळ्यानीं दिसत नाहीं असा (प्राणी). २ ज्या डोळ्यानें दिसत नाहीं असा (डोळा). ३ ज्याला अंतश्चक्षु किं० ज्ञानचक्षु नाहीं असा; मूर्ख. अडाणी; बेअकली. ॐ **—कारभार पु०** अंदाधुंदीचा, बेशिस्त किं० हानिकारक, कारभार किं० व्यवहार. **अंधळी कोशिंबीर स्त्री०** लहान मुलामुलींचा एक खेळ. (या खेळांत एक गडी स्वतःचे डोळे बांधून घेऊन इतरांस धरावयास जातो. तो ज्यास धरील किंवा शिवेल त्याला आपले डोळे बांधून इतरांस शिवावयाला जावें लागतें). **अंधळी गाय स्त्री०** निरुपद्रवी, गरीब माणूस (पुरुष किंवा स्त्री). **अंधळी भिंत स्त्री०** ज्या भिंतींत दारें, खिडक्या, किं० झरोके, वगैरे कांहीं नाहींत अशी भिंत. **अंधळी वेळ स्त्री०** (फलज्योतिषांत) ज्या वेळीं हरवलेली वस्तु सांपडत नाहीं अशी वेळ; आपल्याजवळच वस्तु असून ती आपणास दिसत नाहीं अशी वेळ. **अंधळें गारूड न०** १ लबाडी, लुच्चेगिरी. २ कट, चक्रान्त. **अंधळें नक्षत्र न०** १ ज्या नक्षत्रांत हारवलेल्या किंवा दृष्टिआड झालेल्या वस्तु सांपडत नाहींत, तें नक्षत्र. २ एकादी वस्तु सहज दिसण्या जोगी असून ती ज्याला दिसत नाहीं "त्याला अंधळें नक्षत्र लागलें आहे" असें म्हणतात. **अंधळें वरण न०** १ डोळ निवडून काढून टाकिलेल्या डाळीचें वरण. (याच्या उलट

डोळस वरण) २ केवळ सोलींव डाळींचें नव्हे तें वरण. **अंधळ्याचा मार्ग पु०** जो आंधळ्यालाही सांपडेल अशी वाट: सोपा, सरळ, धोपट मार्ग. **अंधळ्याची काठी स्त्री०** अंधळे, पंगु, निराश्रित, वगैरेंचा वाली, कि० आश्रयदाता. **अंधळ्यांची माळका किंवा माळ स्त्री०** १ आंधळ्यांची सांखळी. २ अंधश्रद्धेनें एकामागून एक असे जाणारे, वागणारे, मूढ लोक. अप्रागतिक धोरणाचे लोक. **अंधळ्याची मिठी स्त्री०** मगरमिठी, घट्ट मिठी. **अंधळ्याच्या मनीं आयतवार बहिरा म्हणतो माझी बायको गर्भार** दोन माणसांचे विचार एकमेकांना न समजल्यामुळें जो घोटाळा होतो तो वर्णावयाचा असतां हा संप्रदाय योजतात. **अंधळ्याच्या गायी देव राखतो** आधिव्याधिपीडितजनांचा त्राता परमेश्वर असतो. **अंधळें दळतें आणि कुत्रें पीठ खातें.** अव्यवस्थित कारभाराचें वर्णन करतांना हा संप्रदाय योजला जातो. **अंधळ्यापुढें नाच बहिऱ्यापुढें गायन** जे लोक ज्या देणग्यांना, किंवा ज्या दर्जाच्या जागांना अपात्र आहेत, किंवा ज्यांना त्यांची महती वाटत नाहीं, अशांना त्या देणें किंवा मिळणें ही सर्वस्वी व्यर्थ व अनुचित गोष्ट. **अंधळ्या बहिऱ्यांची गांठ** जेव्हां एकमेकांचे विचार एकमेकांना न कळल्यामुळें घोटाळा होतो कि० होण्याचा संभव असतो असा प्रसंग. **अंधळ्यास आमंत्रण दोघे येतात** स्वतः अंधळा आणि त्याला हात धरून आणणारा असे दोघे जण जेवूं घालावे लागतात. **अंधळा मागतो एकच डोळा** ज्याच्याजवळ कांहींच नाहीं त्याची थोड्यानेंही तृप्ति होते. **अंधळ्या गायींत लंगडी गाय प्रधान** अडाणी माणसांच्या समुदायांत थोडासा जाणता मनुष्यही पंडित म्हणून गणला जातो.

अंधळ्या स्त्री० अ० व० चित्रा नक्षत्र किंवा त्यांत पडलेला पाऊस.

अंधाई [**म०** अंधळेपणा] **स्त्री०** १ अंधकार. २ आंधळेपणा. ३ अंदाधुंदी.

अधांटी स्त्री० केवळ दुसऱ्याला त्रास देण्यासाठीं वाह्यातपणानें काढलेल्या शंका, कुशंका, हरकती इ० (घेणें, काढणें, फोडणें). ❀ **–बंधाटी स्त्री०** दोरी, किं० झाडाची लवचिक फांदी, जिनें गठ्ठे आवळले जातात. (**बंधाटी स्त्री०** या एकेरी शब्दाचाही तोच अर्थ आहे).

अधांतरीं, अधांत्रीं [**सं०** अध + अंतर (मधली जागा)] **क्रि० वि०** हवेंत, खालीं कशाचा आधार नसतां; लोंबकळत, मध्येंच; अंतराळा.

अंधाधुंद (**–ध**) [**हिं०** अंधाधुंधह] **वि०** अव्यवस्थित, बेशिस्त, (संसार, राज्यकारभार). इ०). ❀ **अंधाधुंद (–ध), अंधाधुंदी (–धी) स्त्री०** अव्यवस्था, सावळा गोंधळ, आंधळा कारभार (संसाराचा, राज्यासंबंधींचा, इ०). **अंदाधुंदी** हें याचें ज्यास्त प्रचारांत असलेलें अपभ्रष्ट रूप.

अंधार, अंधेर [**सं०** अंधकार] **पु०** १ काळोख. २ ज्ञानदीप्तीचा अभाव. ❀ **अंधारीं उजेडीं सांगणें, शिकविणें** इ० सर्व काळीं आणि सर्व ठिकाणीं, स्पष्टपणें आणि उघडपणें, खाजगी आणि जाहीररीत्या. –हस्तद्वेनें सांगणें. **अंधेरनगरी स्त्री०** १ जेथें नेहमी अंधेर म्ह० अन्याय, जुलुम, वगैरे चालतात अशी नगरी. २ अव्यवस्थितपणाचा कारभार, बेबंदशाही, घोटाळा, इ०. **अंधार (अंधेर–) कोठडी (–कोंडी) स्त्री०** १ अंधारमय असलेली लहानशी कैदेची खोली कि० तळघर. २ एकाद्यास एकटाच वरील सारख्या खोलींत कोंडून ठेवण्याची शिक्षा, जेणेंकरून त्यास कोणत्याही अन्य माणसाशीं भाषण करतां येऊं नये. (क्रियापद ' देणें ', ' मिळणें ').

अंधारणें अ० क्रि० अंधकारमय होणें. काळोखानें व्याप्त होणें. ❀ **अंधारून येणें** काळोख पडत जाणें.

अंधारी, अंधेरी [**सं०**] **वि०** काळोखाची. **स्त्री०** १ काळोख. २ अंधुक पटल (उन्हांमुळें वगैरे डोळ्यांपुढें येणारें). ३ धुंदी (अरेरावीपणामुळें वगैरे). ४ घोड्याच्या, चक्कीच्या बैलाच्या, वगैरे डोळ्यांवर त्यांना वाटोळें फिरण्यानें घेरी वगैरे येऊं नये म्हणून घालतात ती ढापणी. **–रात्र स्त्री०** १ काळोखी रात्र. कृष्ण पक्षांतील रात्र. ❀ **– कुंधारीं,–कोंधारीं क्रि० वि०** १ काळोखाच्या, धुळीच्या, जागेंत किंवा सांदीकुंदींत. २ गुप्तपणें, चोरट्या रीतीनें, छपून, नकळत.

अधाशी, आधाशी वि० १ खादाड, जिव्हालोलुप, हावरा, अतृप्त. ❀ **अधास स्त्री०** खा खा; हांवरेपणाची वासना.

अधीं } क्रि० वि० खालीं. † ज्ञा० {.

अधिक [सं०] **वि०** १ संख्येनें, परिमाणानें, मापानें, किं० वजनानें ०पेक्षां ज्यास्त. २ श्रेष्ठ, वरचढ. ३ नेहमीपेक्षां ज्यास्त; ज्यास्त भरतीचा. ४ वाह्यात, फाजील. ॐ – **आगळा वि०** अंदाजापेक्षां किं० अनुमानापेक्षां कांहीं ज्यास्त. उ० तुमच्या मुलीच्या लग्नांत तुम्हांला अधिक आगळे दोनशें रुपये लागले यांत नवल नाहीं. –**उणा वि०** १ कमी जास्त; थोडी फार; फार जरी नव्हे तरी कमी नाहीं अशी, इ०. उ० प्रवासांत अधिक उणा खर्च होईल अशा तयारीनेंच आपण निघालें पाहिजे. उ० कोशकारास प्रत्येक विषयाची अधिकउणी माहिती असावी लागते. २ भलाबुरा, बरा वाईट. उ० त्या घरांत कांहीं अधिक उणा प्रकार चालतो अशी मला शंका आहे. उ० रागांत आपल्या वरिष्ठाला कांहीं अधिकउणें बोलूं नको हो ! –**मास** (–**महिना**) **पु०** संक्रान्तिरहित जो चैत्रादि चांद्रमास पडतो तो; (ह्यालाच " धोंडा महिना " किं० " पुरुषोत्तममास " म्ह०). **अधिकाई स्त्री०** १ वाढ. २ समृद्धि. ३ भरपूर सांठा. **अधिकांग न०** निसर्गनियमाहून ज्यास्ती असलेला अवयव; उ० चंद्रहासाचें एकविसावें बोट हें अधिकांग जेव्हां गळून पडलें तेव्हां त्याची नष्टचर्या संपली. **अधिकाधिक वि०** ज्यास्तीज्यास्तीच, वाढत्या प्रमाणांत. **अधिकस्याधिकं फलम्** ज्यास्त प्रयत्न केले कीं ज्यास्ती यश मिळतें. **अधिकोत्तर वि०** विशेष, कमी ज्यास्त.

अधिकरण [सं०] **न०** १ नेमणूक. २ संबंध. ३ ०चें स्थान. ४ ०चा आधार. ५ (**व्या०**) कर्ता, कर्म, इ० शब्दसंबंध. ६ (**व्या०**) सप्तमीचा अर्थ (स्थान इ०). ७ ग्रंथाचा विषयानुरोधानें पाडलेला विभाग. ८ न्यायमंदिर. ९ हक्क, अधिकार. ॐ**अधिकरण सिद्धान्त पु०** पुष्कळ सिद्धांतांना मूलभूत सिद्धांत. **समानाधिकरण न०** (**व्या०**) दोन शब्दांचें एकाच विभक्तींत असणें. उ० **दीर्घबाहु** म्ह० दीर्घ आहे बाहु ज्याचा; येथें दीर्घ आणि बाहु हे दोन्ही शब्द प्रथमेंत आहेत. **चक्रपाणी** म्ह० चक्र आहे पाणींत (हातांत) ज्याच्या तो (विष्णु); येथें चक्र प्रथमेंत आहे, आणि पाणी सप्तमींत आहे. येथें चक्र आणि पाणि ह्यांच्यांत व्यधिकरण आहे.

अधिकार [सं०] **न०** १ हक्क, वारसा, मालकी. २ नेमलेलें काम, हुद्दा, दर्जा. ३ सत्ता. ४ पात्रता. ५ हुकमत. ६ विवेचनाचें किं० निरूपणाचें क्षेत्र किं० विषय. ७ देखरेख. ८ ग्रंथाचा पोटविभाग; प्रकरण. ९ (**व्या०**) अनेक सूत्रांना लागणारा नियम.

अधिकारी वि० १ सत्ता, हुद्दा, हक्क, वगैरे असलेला; हुद्देदार. २ प्रामाण्यशील, ज्याचा शब्द प्रमाण मानतां येईल असा, प्रमाण म्हणून मानण्यास योग्य असलेला. ३ मालक, धनी.

अधिकारणें [**सं०** 'अधिकार' पासून मराठी क्रियापद] **स० क्रि०** ०ला उद्देशिणें, ०च्या संबंधानें आडपडद्यानें किं० गुप्त रीत्या बोलणें. उ० लेकीस शिव्या देतांना ती सुनेस अधिकारून बोलत होती.

अधिकृत [**सं०**] **वि०** १ ज्याच्याकडे कांहीं अधिकार, हक्क, सत्ता, वगैरे सोंपविलेलीं आहेत असा. २ विशेष कामगिरी करावयासाठीं नेमलेला. ३ अधिकारारूढ.

अधिगत [**सं०**] **वि०** १ मिळविलेलें, संपादिलेलें. २ शिकलेलें ३ ज्ञात असलेलें, किं० झालेलें.

अधिगम [**सं०**] **पु०** १ प्राप्ति; २ संपादन (ज्ञानाचें वगैरे).

अधिगम्य [**सं०**] **वि०** मिळविण्याजोगा, संपादिण्याजोगा, शिकण्याजोगा, ज्ञान करून घेण्याजोगा, ज्ञेय.

अधिदेव पु०, अधिदैवत [**सं०**] **न०** १ कुलदैवत; अधिष्ठात्री देवता. २ रक्षण करणारा देव. ३ ईश्वर. ४ त्या त्या इंद्रियांचा अधिष्ठाता देव. ५ सकल विश्वरूप जो विराट पुरुष तो.

अधिप, अधिपति [**स०**] **पु०** १ राजा. २ धनी.

अधिभूत [**सं०**] **न०** १ सर्व वस्तु. २ अस्तित्वांत असलेली कोणतीही वस्तु. ३ मनुष्याच्या इंद्रियांचा विषय होऊं शकतें जें कांहीं तें. ४ उत्पन्न झालेल्या सर्व भूतांची क्षर म्ह० नामरूपात्मक किंवा नाशवंत अशी जी स्थिति तें अधिभूत.

अधिमास [**सं०**] **पु०** अधिकमास.

अधियज्ञ [**सं०**] **पु०** ईश्वर. २ सर्व यज्ञांचा अधिपति जो ईश्वर तो.

अधिवास [**सं०**] **पु०** १ वसतिस्थान,

निवासस्थान. २ मुख्य ठिकाण. ३ वास्तव्य. ४ जन्मभूमि. ५ शेजारी. ६ एखाद्याच्या दारासमोर जें हट्टानें धरणें घेऊन बसतात तें. ७ यज्ञकर्मादिकां-पूर्वी देवतेच्या मूर्तीत जी प्राणप्रतिष्ठा करतात ती. ८ सुगंधी द्रव्यांचें (उटण्यांचें वगैरे) अर्चन.

अधिवासन [सं०] न० वर **अधिवास** शब्द पहा.

अधिष्ठिणें [सं० अधि + स्था (राहाणें)] स० क्रि० व्यापणें; ०आंत; किं० ०मध्यें राहाणें; ०मध्यें वसति करून राहाणें.

अधिष्ठान [सं० अधि + स्थान] न० १ वास्तव्य, निवासभूमि. उ० प्राणांचें देहांत अधिष्ठान असतें. २ अधिष्ठातृत्व, प्रमुत्व (विषयाचें, ठिकाणाच इ०). ३ अधिष्ठातृत्वाचा किं० प्रभुत्वाचा विषय, ठिकाण इ०. ४ एखाद्याच्या दारापुढें पैसे वसूलीसाठीं धरणें घेऊन बसणें; अधिवासन. ५ वडेजावी, भपका, देखावा (संपत्तीचा, ज्ञानाचा, धार्मिकतेचा, इ०).

अधिष्ठित [सं० अधि + स्थित] वि० १ ताब्यांत घेतलेलें; आक्रांत केलेलें. २ व्यापिलेलें. ३ ०चें नेतृत्व अगर प्रमुत्व असलेलें. ४ स्थापिलेलें; रूढ केलेलें किं० झालेलें; सुरू केलेलें.

अधिक्षेप [सं० अधि + क्षिप् (फेकणें)] पु० १ ०वर आरोप करणें. २ निंदिणें.

अंधी [हिं०] स्त्री० १ वादळ. २ तुफान. (अंधी होणें, उठणें, येणें; उलट अंधी बसणें, जाणें).

अधीं, आधीं [सं० आदि] क्रि० वि० पूर्वी, अगोदर. ꕥ **अधींच बाई नाचरी तिचे पायांत बांधली घागरी** वेडे वेडे चार करावयाला उत्सुक अशा माणसाला उत्तेजक असें कांहीं झाल्यानें तो अधिकच तसले चार करूं लागतो.

अधींचा वि० पूर्वीचा, अगोदरचा. **अधींचे बिदीं, आधींचे बिदां, आधींबिदीं** क्रि० वि० सर्वांच्या अगोदर; अगदीं तावडतोब. (मुलांच्या वापरण्यांत).

अधीत [सं० अधि + इत (इ=जाणें) शिकलेलें] वि० १ शिकलेलें, पढलेलें, वाचलेलें (शास्त्र वगैरे). २ संपादिलेलें (ज्ञान वगैरे). ३ शिकलेला, पढलेला इ०.

अधीन [सं०] वि० स्वाधीन. ०वर अवलंबून असणारा किं० असलेला. ०च्या कबजांत, आटो-क्यांत, नियंत्रणांत असलेला (बहुशः समासांत, जसें परस्वाधीन, दैवाधीन, क्रोधाधीन, इ०).

अधींनामधीं, अधींमधीं, अधेंमधें क्रि० वि० १ मध्येंच, भलत्याच वेळीं. २ अस्ताव्यस्त, इकडे तिकडे. ꕥ **अधींमधीं** किंवा **अध्यामध्यांत** किंवा **अध्यांतमध्यांत** किंवा **अधेंमधें पडणें** (दुसऱ्या)-च्या भानगडींत, व्यवहारांत किं० कारभारांत लुडबुडणें.

अधीर [सं०] वि० १ उतावळा, हळवा. २ चंचल, अस्थिर. ३ नाचरा, एक ठाम निश्चय नसलेला. ४ धडाडीचा नव्हे असा; भितरा.

अधील [म० आधीं] आधींचा.

अधीलपण न० } १ पूर्व स्वरूप; २ मत्यपणा; श्रेष्ठत्व. † तुका० {

अधीश, अधीश्वर [सं०] पु० धनी, शास्ता, अधिपति, सम्राट्.

अधुपा (– वा) [म० अ + धुणें] वि० न धुतलेला. उ० हा अधुपा तांदूळ कां तूं वैरायला टाकणार ? उ० पुन्हां अधुवा पंचा तूं नेसूं नको.

अधुरा [हिं] वि० १ अपूर्ण, अधुरें. २ तयार नसलेलें. ३ अननुभवी, न रुळलेला, न कसलेला.

अधुरी वि० १ उतावळा. अधीर. २ अर्धवट, त्रोटक. ३ अस्पष्ट. ४ अपरिपक्क. ५ हांवरट, खादाड. (या अर्थानें **अधोरी** असेंही रूप योजितात).

अधू [हिं०] वि० १ अशक्त, जायबंदी (हात, पाय) वगैरे. २ कच्चा, अपरिपक्क (विषय) ३ हळवा (मनाचा).

अंधुक मागें **अंधक** पहा.

अधेंमधें मागें **अधींमधीं** पहा.

अंधेर मागें **अंधार** पहा.

अंधेरी मागें **अंधारी** पहा.

अधेला [सं० अर्ध=अर्धा] पु० १ अर्धा पैसा २ सर्पाची एक जात. तो मोठा असतो पण विषारी नसतो. (ह्या अर्थी **अधेलें** हें रूप अधिक रूढ आहे).

अधेली [सं० अर्ध=अर्धा) स्त्री० अर्धा रूपाया. अर्धा रुपयाच्या किंमतीचें चांदीचें नाणें.

अधोक क्रि० वि० बिनधोक; भीति न बाळगतां; निर्धास्तपणें. वि० खात्रीचें; सुरक्षितपणाचें; ज्यांत नुकसानीची भीति नाहीं असें.

अधोड न० १ न कमावलेलें किं० अर्धवट कमावलेलें बैलाचें, रेड्याचें, वगैरे कातडें. २ लठ्ठ, माजलेला, काम करण्यांत चुकार किं० कुचकामाचा बैल, रेडा, इ०. ३ अविवाहित, पैस पैस वाढलेली मोठ्या वयाची मुलगी. ४ वेशीपाशीं एखादें जनावर मरून पडलें तर त्याचें कातडें जें महारास त्याच्या हक्काचें म्हणून द्यावें लागतें तें. ॐ **अधोडी** वि० १ न कमावलेल्या कातड्याचा केलेला किं० बनविलेला. २ अतिखादाड.

अधोडी स्त्री० एका खेळाचें नांव.

अधोपरी [सं० अर्ध + उपरि] क्रि० वि० जन्मापासून नव्हे; नंतर; नवथर.

अधोपी वि० मागें **अधुपा** पहा.

अघोरी वि० १ खादाड. २ चिडखोर. ३ चंचल, अधीर. ४ जो कांहीं गुप्त ठेवूं शकत नाहीं असा; ढिल्या जिभेचा.

अधोली [सं० अर्ध] स्त्री० दोन शेरांचें अथवा अर्ध्या पायलीचें माप.

अध्ययन [सं० अधि + अयन (इ=जाणें)] न० १ शिकणें, पाठ करणें; पढणें (विशेषत: वेद). २ जें पाठ केलेलें किं० पढलेलें असेल तें. ३ अध्यापन, अध्ययन, यजन, याजन, दान आणि प्रतिग्रह, हीं जीं ब्राह्मणांची षट्कर्में त्यांतील दुसरें. ॐ–**शील** वि० अभ्यासी; वाचनाची, शिकण्याची, वगैरे गोडी असलेला.

अध्यवसाय [सं० अधि + अव + सो (छेदणें)] पु० १ प्रयत्न, परिश्रम, उद्योग. २ निश्चय, निर्णय. ३ अंगीकार. ४ आकलन. ५ ज्ञान. ६ तत्परता, दक्षता, नेट.

अध्यवसित [सं०] वि० १ आकलन केलेलें. २ निश्चयानें ठरविलेलें. ३ अंगीकारलें. ४ प्रयत्न केलेलें.

अध्यशन [सं० अधि+अशन (खाणें)] न० १ अति खाणें. २ पूर्वीं खाल्लेलें पचनीं पडण्यापूर्वीं आणखी खाणें.

अध्यस्त [सं० अधि + अस् (फेकणें)] वि० १ वर ठेविलेलें. २ चुकीनें किं० अज्ञानानें गृहीत धरलेलें किं० विश्वसिलेलें. उ० त्यानें शिंपीवर रुपें अध्यस्त केलें.

अध्यक्ष [सं० अधि + अक्षि (डोळा)] पु० १ मुख्य; नेता; शास्ता; पुढारी. २ अधिकारी. जसें, सभाध्यक्ष=सभेचा नेता, शास्ता. सेनाध्यक्ष=सेनेचा शास्ता. ग्रामाध्यक्ष, न्यायाध्यक्ष, इ०. ३ साक्षी. ४ ईश्वर.

अध्यात्म [सं० अधि + आत्मन् (आत्मा)] न० १ सर्वांत श्रेष्ठ आणि कधींही विकार न पावणारें असें जे परम अक्षर तें ब्रह्म, आणि जीवाच्या रूपानें प्रकट होणारा जो त्याचाच भाव तें. (भगवद्गीता अध्याय ८ श्लोक ३ पहा.) २ ब्रह्मज्ञान. ३ मन. ४ देह. ५ ब्रह्म. ॐ – **विद्या** स्त्री०, – **ज्ञान** न० ब्रम्हविद्या; ब्रम्हज्ञान. उपनिषदांनीं शिकविलेली विद्या. वेदान्त. –**योग** पु० बाह्य सृष्टींतून मन काढून तें आत्मध्यानीं लीन करणें. –**रामायण** न० रामकथेंत प्रसंगोपात्त जीवात्मा आणि परमात्मा यांच्या स्वरूपांविषयीं वगैरे ज्यांत चर्चा केली आहे असें रामायण.

अध्यात्मिक [सं०] वि० अध्यात्माविषयींचें; ब्रह्मज्ञानासंबंधीं.

अध्यापक [सं० अधि + इ (जाणें)] पु० शिक्षक; आचार्य, गुरु (विषेशत: धार्मिक ग्रंथांचा).

अध्यापन [सं०] न० १ ब्राम्हणाच्या षट्कर्मांपैकीं एक. (**अध्ययन** पहा). २ ज्ञानदान, शिकविणें, (विषेशत: धार्मिक ग्रंथांचें);

अध्याय [सं०] पु० १ ग्रंथाचा एक परिच्छेद किंवा प्रकरण. उ० भगवद्गीतेचे अठरा अध्याय आहेत. २ पठण, शिक्षण, वाचन. ३ पठणाला, शिक्षणाला, वगैरे युक्त काल.(**अनध्याय** शब्द पुढें पहा).

अध्यास [सं०] पु० १ चुकीनें किंवा अज्ञानानें एखाद्या गोष्टीच्या ठायीं भलत्याच गोष्टीचा आरोप करणें, जसें दोरीला सर्प समजणें हा अध्यास होय. (वेदान्तांत) मिथ्यारोप; मिथ्याग्रह. २ परम ध्यान. ३ अभ्यास. ४ निदिध्यास.

अध्याहार [सं० अधि+आ+हृ] पु० १ विषयानुसंधानानें मूळांत नसतां जो एखादा शब्द वगैरे वाक्यपूरणार्थ वा विचारपूरणार्थ घेतलेला असतो किंवा घ्यावा लागतो तो. २ हा असा घेतलेला

शब्द वाक्यांत यथास्थानीं घालणें.

अध्याहृत [**सं०**] **वि०** मूळांत नसलेला पण विषयाच्या किं०वाक्याच्या पूर्ततेसाठीं जो शब्द वगैरे वाक्यांत घालून अर्थ करावा लागतो तो (शब्द).

अध्रुव [**सं०** अ+ध्रुव (शाश्वत)] **वि०** अनिश्चित; चंचल; अशाश्वत; क्षणभंगुर.

अध्वर [**सं०**] **पु०** १ यज्ञ. २ आठ वसूंपैकीं दुसरा. ॐ**—कांड न०** शतपथ ब्राह्मणांतील यज्ञकांड. **—मीमांसा स्त्री०** पूर्व मीमांसा.

अध्वर्यु [**सं०**] **पु०** १ यज्ञांतील एक ऋत्विज (याचीं कामें जमीन मोजणें,वेदि बांधणें,पाणी आणि अग्निकाष्ठें आणणें, अग्नि पेटविणें,आहुति देणें,इ०). होतृ, उद्गातृ, अध्वर्यु आणि ब्रह्मन्, हे यज्ञांतील चार ऋत्विज् होत. २ यजुर्वेद.३ यजुर्वेद पठण करणारा ब्राह्मण. ४ म्होरक्या, अध्यक्ष, नेता, चालक,पुढारी.

अध्वा [**सं०**] **पु०**रस्ता, मार्ग. ॐ **अध्या-वरचा वि०** काल श्रीमंत होऊन आज प्रतिष्ठा किंवा दिमाख मिरविणारा.

अनकळित वि० } उपद्रवरहित; अक्लेश. † **ज्ञाने०** }.

अनंकपृष्ठ [**सं०** अ, अन् + अंक+पृष्ठ] आपले पूर्वज सुट्या पत्रांवर ग्रंथ लिहीत. ह्या पत्रांच्या गणतीचा अंक तें पत्राच्या दुसऱ्या बाजूस घालीत. ज्या बाजूवर पत्राचा अंक नसे तिला अनंकपृष्ठ असें नांव असे, आणि ज्या बाजूवर पत्राचा अंक असे, तिला सांकपृष्ठ असें म्हणत असत.

अनंकुश [**सं०** अ अभावार्थक+अंकुश] **वि०** १ स्वैरवर्तनी; अनावर. २ नियम न पाळणारा; ज्याच्यावर ताबा चालत नाहीं किंवा चालवितां येत नाहीं असा; बेशिस्त; स्वच्छंदी. ३ काव्यरस-हानि होऊं नये म्हणून व्याकरणाचे वगैरे नियम कधीं कधीं न पाळले तरी चालतील हा जो कवींचा विशेष हक्क त्याचा अधिकारी (कवि); निरंकुश.

अनंग [**सं०** अ, अन्+अंग (देह)] **पु०** १ मन्मथ,कामदेव. २ } निराकार ब्रह्म. † **ज्ञाने०** }. ॐ **— क्रीडा स्त्री०** रतिविलास. **— लेख पु०** प्रणयपत्रिका.

अनग्नि [**सं०** अ अभावार्थक+अग्नि] **वि०** १ अग्निहोत्र न ठेवणारा; निराग्नि. २ ज्याच्या जठरांतील अग्नि मंद आहे असा. ॐ**अनग्निदग्ध वि०** ज्याला विधियुक्त अग्नि देऊन चितेवर जाळला नाहीं असा.

अनघ [**सं०** अ+अघ (पाप)] **वि०** १ दोषरहित, निष्पाप. २ निर्मल; शुद्ध. ३ सुंदर. ४ दुःखरहित.

अनघड वि० } अवघड. **अनणु वि०** अणूहून भिन्न. † **ज्ञाने०** }.

अनंत [**सं०** नाहीं अंत ज्याला] **वि०** १ चिरकालिक; शाश्वत; अमर्याद; असंख्यात. २ } देश, काल, आणि वस्तु, ह्या परिच्छेदांनीं विर-हित. † **ज्ञाने०** }. **पु०**१ श्रीविष्णूचें नांव. २ शेषनाग. ३ वासुकी सर्प. ४ कृष्ण. ५ बलराम. ६ श्रवण नक्षत्र. ७ अनंतचतुर्दशीच्या दिवशीं चवदा गाठींचा जो रेशमी दोरा पूजा करून उजव्या दंडाला बांधतात तो. ८ कानांत घालावयाचा एक दागिना. ९ एक प्रकारचें फूल. १० देवांच्या आकाशसंचरणाचा मार्ग. ॐ **अनंतात्मा पु०** परमात्मा. **— गांठ्या पु०** समुद्रांतील एक प्रकारचा मासा. **—चतुर्दशी स्त्री०** भाद्रपद शुक्लपक्षांतील चौदावा दिवस. **—तगर स्त्री०** अनंताचें फूल. **—तृतीया स्त्री०** भाद्रपद, मार्गशीर्ष आणि वैशाख, या मासां-तील शुक्लपक्षांतील ज्या तृतीया त्यांपैकीं प्रत्येक. **—देव पु०** श्रीशेष. **— पार वि०** अमर्याद, अफाट. उ० शब्दशास्त्र हें खरोखर अनंतपार आहे. **— भट्टी स्त्री०** १ पूर्वीं अनंतभट्ट म्हणून कोणी विद्वान ब्राह्मण होऊन गेला; त्याणें लिहिलेल्या एका ग्रंथाचें नांव. २ ज्ञानाची वगैरे पोकळ आणि दिखाऊ घमेंड, भपका. इ० (अन्वर्थक क्रियापद ' दाखविणें, ' 'मिरविणें '). **—मूळ पु०** एक औषधी वनस्पति (शारिका). **— राशि पु०**(गणितांत) अनंत संख्या. **—वात पु०** धनुर्वातासारखा डोक्याचा एक विकार. **—व्रत स्त्री०** चवदा दोरे एकत्र वळून केलेली वात. **—व्रत न०** वर **—चतुर्दशी** पहा. त्या दिवसाचें व्रत. **—श्रेणी स्त्री०** जिला शेवट नाहीं अशी अंकांची पंक्ति.

अनंतर [**सं०** अ, अन्+अंतर] **क्रि० वि०** खंड न पडूं देतां; पाठीमागून; तावडतोब. **वि०** १ ज्याच्या आंत कांहीं नाहीं असें. २ नंतरचें. ३ जवळचा, लगटून असलेला. ४ पाठोपाठचा.

अनंती स्त्री० स्त्रियांच्या डाव्या हातांत बांधण्याची रेशमी दोरी.

अनंदक [सं०] वि० १ सुख न लागूं देणारा किंवा न नांदूं देणारा. २ नांदण्यास किं० राहण्यास अयोग्य (घर, भुतांखेतांमुळें).

अनद्यतन [सं०] अद्यतन दिवस म्हणजे चालू दिवस नव्हे तो. (अतीत रात्रीचा पश्चार्ध आणि आगामि रात्रीचा पूर्वार्ध यांनीं सहित जो दिवस तो अद्यतन; त्याहून भिन्न कालाचा जो तो अनद्यतन दिवस). ꣸ **–भूत** पु० संस्कृतांतील एक प्रकारचा भूतकाळ.

अनधिकारी [सं० अ, अन्+अधिकारी] वि० हक्क, अधिकार, दर्जा, पात्रता, इ० नसलेला मनुष्य.

अनध्याय [सं०] पु० १ शिक्षण, पठण, वाचन, वगैरेंत व्यत्यय, थांबणूक,इ०. २ ज्या कालीं किं० दिवशीं शिक्षण इ० बंद ठेवलें जातें, किंवा ठेवणें उचित आहे,तो काल किं० दिवस; सणवार.

अननं [अन्न या शब्दापासून स्वैर घटना] न० खाणें, जेवणें. (हा शब्द फक्त पुढील म्हणींतच आढळतो) **आधीं अननं मग तननं** आधीं पोट-भर खाणें आणि मग गाणें वगैरे.

अननस [हिं०] पु० १ एक प्रकारचें फळ. २ त्या फळाचें झाड.

अनन्य [सं० अ, अन्+अन्य (दुसरा)] वि० १ निराळा नव्हे तो; तोच. २ एकनिष्ठ, परम, निस्सीम. ꣸ **–गति, –गतिक** वि० अन्य गति ह्म० मार्ग, आधार, युक्ति, साहाय्य, आश्रय, वगैरे नसलेला.**–चित्त, – मानस** वि० चित्ताच्या, मनाच्या, वगैरे सर्व शक्ति ज्यानें एकाच ध्येयाकडे लाविल्या आहेत असा. उ० शकुन्तला अनन्यमानसा होत्साती दुष्यन्ताचें चिन्तन करीत होती. **– भाव** पु०निस्सीम किं० परम भक्ति किं० निष्ठा,कळकळ,आस्था.**–विषय** वि०१ एकाचेंच.२ एकच ध्येय ज्याचें आहे असा; एकनिष्ठ.**–वृत्ति** वि० १ एकाच विषयांत लीन असलेला. २ पूर्ण अवधान असलेला.(**–चित्त** हा शब्द पहा).**–वेद्य** वि०इतरांस न कळण्याजोगा. **– शरण** वि० ज्याला दुसऱ्या कोणाचा किं० कशाचा आधार,आश्रय, किं० टेका नाहीं असा.**–शासन** वि० सार्वभौम; दुसऱ्या कोणाचाही अंकित नसलेला.**–साधारण,–सामान्य** वि० दुसऱ्या कोणासही सामान्य किंवा साधारण नसलेला; दुसऱ्या कोणाच्याही संबंधानें सत्य नसलेला. उ० प्रभुरामचंद्राचें शौर्य, धैर्य, एकपत्नीत्व, इ० गुण अनन्यसाधारण होते.

अनन्वय [सं० अ, अन्+अन्वय] पु० १ संबंधरहितता; असंबद्धता. २ एक अर्थालंकार. जेव्हां एकाद्या वस्तूचें वर्णन करावयाचें असतें, आणि त्या वस्तूचे ठायीं जो गुण आहे तो दुसऱ्या कोणत्याही वस्तूचें ठायीं नाहीं,असा अभिप्राय व्यक्त करावयाचा असतो, तेव्हां त्या वस्तूसारखी तीच, असें एकवाक्यात्मक विधान केलेलें असतें तेव्हां हा अलंकार होतो. उ० रामरावणांचें युद्ध रामरावणांच्या युद्धासारखेंच.

अनन्वित [सं०] वि० १ असंबद्ध; संबंधरहित. २ भलतेंच, बेताल,रास्त नव्हे असें,अयोग्य, (कृत्य, वर्तन इ०).

अनपायिनी वि० { १ नाश न पावणारी. २ अपाय न करणारी. † **ज्ञाने**० }.

अनपेक्षित [सं० अ, अन्+अपेक्षित] वि० ज्याची अपेक्षा, अनुमान, संकल्प, इच्छा, गरज, इ० नाहीं असा. **क्रि० वि०** अपेक्षा, अनुमान, संकल्प, इत्यादि नसतां; अकल्पित रीत्या;अकस्मात.

अनभग्न [अशुद्ध समास; सं० अ + भग्न (मोडलेलें)] वि० अनभ्यस्त; न मुरलेला; अपक्व; कच्चा.

अनभिज्ञ [सं० अ, अन्+अभिज्ञ=जाणता] वि० अज्ञानी; बिनमाहीतगार; अपरिचित.

अनभ्यस्त [सं० अ+अभ्यस्त=पढलेला] वि० न शिकलेला; नवशिका; अपरिचित;अभ्यास किं० सराव वगैरे नसलेला.

अनभ्यास [सं० अ+अभ्यास] पु० पाठांतर, शिक्षा, वगैरेंचा अभाव, उणीव, किं० कमतरता, इ०. ꣸ **अनभ्यासी** वि० पठण,शिक्षा, अभ्यास, वगैरे नसलेला किं० न करणारा.

अनम [सं० अ+नम्=नमन करणें] वि० जो ब्राह्मणवर दुसऱ्यांस नमन करीत नाहीं, व दुसऱ्यांनीं नमन केलें असतां त्यांस आशीर्वाद देतो असा; उलट नमस्कार न करितां आशीर्वाद देणारा ब्राह्मण.

अनमान [**सं०** अनुमान ह्याचें अपभ्रष्ट आणि चुकीच्या अर्थानें योजण्यांत येणारें पण रूढ झालेलें रूप] **न०** दुर्लक्ष्य, निष्काळजीपणा, उपेक्षा, बेपर्वाई, औदासिन्य, (क्रियापद ' करणें '). ⁂ **–धपका, (–धबका) पु०** अंदाज, अजमास, अटकळ. याचें 'अनमानधबक्यानें' हें रूप विशेष रूढ आहे.

अनमानणें स० क्रि० उपेक्षिणें; बेपर्वाईनें, किंतु ठेवून, किं० कचरत (कांहीं काम) करणें.

अनमानीक वि० १ उदासीन, बेफिकीर; आस्थाविरहित, बेपर्वाईक. २ शंकास्पद, अस्पष्ट.

अनमानीत वि० दुटप्पी, अस्पष्ट, अस्वच्छ. (कारभार, भाषण इ०).

अनय [**सं०** अ अभावार्थक+नय] **पु०** १ अन्याय, अनीति, दुर्वर्तन. २ कपट. ३ पाप. **वि०** अन्यायी, अनीतिमान, दुर्वर्तनी, पापी.

अनर [**हिं०** अनार] **स्त्री०, न०** १ रामफळाचें झाड. २ रामफळ.

अनरसा [**हिं०** अंदरसा] **पु०** १ तांदुळाचें पीठ, गूळ, वगैरेंचें तळून तयार केलेलें एक उंची खाद्य. २ एक प्रकारचें कापड.

अनर्गळ [**सं०** अ+अर्गला (अडकाठी)] **वि०** अडकाठी, दडपण, दाब, नियंत्रणा, वगैरे नसलेला किंवा वगैरेंनीं विरहित; स्वैर, बेताल; स्वच्छंद; स्वेच्छाचारी; प्रतिबंधरहित.

अनर्गळी [**म०** ज्याला अर्गला नाहीं तो; **अनर्गळ** पहा.] **स्त्री०** (कवितेंत) स्वैर, स्वच्छन्दीपणाच्या, किं० बेताल, खोड्या, आचरण, वर्तन, इ०.

अनर्घ,अनर्घ्य [**सं०** अ अभावार्थक+अर्घ अर्घ्य (मूल्य)] **वि०** विनमोल, अमोलिक, अमूल्य, श्रेष्ठ.

अनर्थ [**सं०** अ+अर्थ] **पु०** १ आपत्ति; मोठें संकट. २ कहर; आकांत; गोंधळ. (क्रि० ' मांडणें ').३ हाहाकार. ४ जो खरा किं० योग्य अर्थ नव्हे तो अर्थ;भलताच किं० विपरीत अर्थ. ⁂ **अर्थाचा अनर्थ करणें** १ एकाद्या गोष्टीचा विपर्यास करणें. २ वक्त्याचा उद्दिष्ट अर्थ मनांत न घेतां त्याच्या भाषणाचा भलताच अर्थ करणें.

अनर्थक [**सं०**] **वि०** १ निरर्थक. २ अर्थशून्य.

अनल [**सं०**] **पु०** १ अग्नि. २ अग्नीची देवता. ३ जठराग्नि. ४ आप, ध्रुव, सोम, धर किं० धव, अनिल, **अनल**, प्रत्यूष, प्रभास, ह्या ८ वसूंपैकीं सहावा. ⁂ **कामानल पु०** मदनरूपी अग्नि. **शोकानल पु०** शोकरूपी अग्नि.

अनलस [**सं०** अ अभावार्थक + अलस (आळशी)] **वि०** १ आळशी नसलेला; उद्योगी; कामसू, मेहनती; आस्थाळू.२ (एखाद्या कामीं) दक्ष.

अनल्प [**सं०** अ, अन्+अल्प (थोडें)] **वि०** पुष्कळ, फार.

अनवकाश [**सं०** अ+अवकाश (जागा)] **वि०** १ प्रसंग, संधी, जागा, सोय, सवड, प्रवेश, शिरकाव, फुरसत,पोकळी, वगैरे नसलेला. २ ०ची जरूरी किं० गरज नसलेलें.३ जें बरोबर लागू पडत नाहीं असें(विधान वगैरे). ४ पूर्ण व्याप्त; पूर्णपणें भरलेलें.

अनवच्छिन्न वि० १ अखंड; अकुंठित. २ ज्ञाने०१.

अनवट पु० चांदीच्या धागऱ्या लावलेली पायाच्या अंगठ्यांत घालावयाची आंगठी.

अनवटी [**सं०** हनु+**म०** वाटी] **स्त्री०** हनुवटी.

अनवणी [**म०** अ (नाहीं)+वहाण (पादत्राण विशेष ज्याला)] पायांत जोडा,वाहाणा, वगैरे कोणत्याही जातीचें पादत्राण नसलेला; नागव्या पायांचा.

अनवद्य [**सं०** अ, अन्+अवद्य=निंद्य] **वि०** अदूषणीय; निर्दोष; ज्यांत उणें काढावयाला यत्किंचित् जागा नाहीं असें. **उ०** शकुन्तलेची अंगयष्टि अनवद्य होती.

अनवधान [**सं०** अ, अन्+अवधान (लक्ष्य)] **न०** १ लक्ष्य नसणें.२ दुर्लक्ष्य; बेफिकिरी. ⁂**अनवधानी वि०** लक्ष्य नसलेला; बेफिकीर; आपल्या कामाकडे दुर्लक्ष्य करणारा.

अनवरत [**सं०** अ, अन्+अवरत (थांबलेलें)] **वि०** ज्याला थांबणूक नाहीं असें; साततिक; नित्य चालू असलेलें; सततचें. **क्रि० वि०** नित्य; सतत; थांबणूक, खंड, वगैरे न पडतां.

अनवल स्त्री० रामफळाचें झाड.

अनवलें न० रामफळ.

अनवलोभन [**सं०**] **न०** गर्भधारणेपासून

निसऱ्या महिन्यांत शुद्धीकरणार्थ करावयाचा एक विधि.

अनवसर [**सं०** अ, अन्+अवसर (संधि, जागा, फुरसत)] **वि०** १ अवकाश, फुरसत, किं० विश्रान्ति इ० नसलेला; उद्योगरत. २ भलत्याच वेळीं उपस्थित झालेला; अयोग्यकालीन. **पु०** १ विश्रान्तिरहितता. २ अयोग्यकालीनता. ३ { दुष्काळ; संकट. † **ज्ञाने०** {.

अनवसित [**स०** अ, अन् + अव + सित कापलेला)] **वि०** १ न संपलेलें. २ न ठरविलेलें.

अनवसितता स्त्री० न संपलेपणाची स्थिति.

अनवस्था [**सं०** अ, अन् +अवस्था (स्थिति)] **स्त्री०** १ अस्वस्थपणा; अशांतता; अस्थिरपणा; जाचगुकीची स्थिति. २ अडचणीची स्थिति. अनर्थ; घोटाळा.' ३ ज्याच्यांतून सुटका होणें नाहीं असा प्रसंग. ४ जोपासनेंत हयगय, आबाळ. (मुलांची वगैरे). ५ अनिश्चिततेची स्थिति. ६ अनिर्णय.

अनवा [**अ०** अनवाअ = आश्चर्यकारक] **वि०** अप्रतिम; पूर्वी न पाहिलेलें, न ऐकिलेलें, न चाखिलेलें, न अनुभविलेलें; अपूर्व. उ० आजची कथा, बासुंदी, व्याख्यान, गाणें, इ० अनवा झालें. ॐ **अनवा अपरूप वि०** नवीन व चमत्कारिक; अपूर्व व आश्चर्यकारक; नवलाईचें व विस्मयकारक.

अनवा [**सं०** अन्वय] **पु०** कच्चा खर्डा; घाईनें व मुख्य मुद्यांचेंच लिहिलेलें किं० केलेलें टिपण.

अनवाणा, अनवाणीं, अनवाहाणीं [**म०** अ+ वाहणा] **वि०** पायांत वाहाणा वगैरे पादत्राण नसलेला. **क्रि० वि०** पायांत वाहाणा वगैरे कांहीं पादत्राण न घालतां. नागव्या पायांनीं. ॐ **अनवाणी काशीकर पु०** १ पायांत कांहींही पादत्राण न घालतां आपण काशीस पायीं जाऊन आलों आहों अशी बढाई किं०दिमाख मिरविणारा. २(यावरून) अट्टल सोदा, भामटा, लफंगा.

अनशन [**सं०** अ+अशन (खाणें)] **न०** उपवास (क्रियापद 'करणें,' 'होणें'). ॐ **अनशें पोटीं, अनशवें पोटीं, अनशिळें पोटीं, अनशापोटीं, अनशोय पोटीं, अनसोळें पोटीं क्रि० वि०** कांहीं खाल्लेलें नसतां;पोट रिकामें असतां (सकाळच्या प्रहरीं वगैरे). उ० अनशें-पोटीं पाणी प्यालास तर नळ फुगतील.

अनशूद, अनशुद्ध [**सं०** अन्नशुद्धि] भोजनाचे सर्व पदार्थ ताटांत वाढून झाल्यावर शेवटीं तूप वाढतात. हें तूप वाढल्याशिवाय अन्न खावयाला योग्य होत नाहीं. ह्या तुपाला " अन्नशुद्धि " म्हणतात. अपभ्रष्ट रूपें अनशूद, अनशूध.

अनश्रुत [**सं०**अ+श्रुत; हेंगाडी घटना] **वि०** १ न ऐकलेलें; अश्रुतपूर्व; अपूर्व. २ ज्यानें ऐकलें नाहीं असा.

अनश्वर [**सं०** अ+नश्वर (नाशवन्त)] **वि०** नाशवंत नाहीं असें; चिरकालिक; शाश्वत.

अनसूट [**सं०** अनुच्छिष्ट यापासून अपभ्रष्ट रूप] **वि०** १ चव न घेतलेलें; न वापरलेलें; न चाखलेलें; (खाद्य वगैरे). २ ज्याला आपल्या वांटणीचा हिस्सा अजून मिळाला नाहीं असा. ३ ज्यानें रतिसुखोपभोग अनुभविला नाहीं असा (पुरुष किं० स्त्री).

अनसूट न० १ पुरुष मेल्यानंतर जो पहिला भाद्रपद महिना येईल त्याच्या कृष्णपक्षांत त्या पुरुषाला पिंड देण्याचा धार्मिक विधि. २ वर्षश्राद्धाच्या आधला दिवस. [**वि०** मत्सररहित.

अनसूय,अनसूयक [**सं०** अ+असूया(मत्सर)]

अनसूया [**सं०**] **स्त्री०** १ मत्सररहितता. २ मत्सररहित जी ती. ३ अत्रिपत्नी.

अनहित [**सं०** अ+हित (कल्याण) रूढ अशुद्ध समास.] **न०** तोटा, नुकसान .२ अकल्याण.

अनक्षर [**सं०** अ, अन्+अक्षर] **वि०** अशिक्षित; अडाणी; निरक्षर; असंस्कृत.

अनागत [**सं०** अ, अन् +आगत (आलेलें)] **वि०** न आलेला; भविष्यकालीन, आगामि. **न०** भविष्य काळ. ॐ **–चिंता स्त्री०** आगामि गोष्टींबद्दल काळजी किं० चिंता करणें; पुढच्या करितां तरतूद करणें. **–विधाता वि०** १ भविष्यकालीन गोष्टीबद्दल आगाऊ तरतुद करणारा. २ दूरदर्शी, धोरणी.

अनागम [**सं०** अ, अन्+आगम (येणें)] **वि०** अनादिकालापासून अस्तित्वांत असलेला; अव्याहत चालत आलेला; दस्तऐवज नसलेला (हक्क, जमिनीचा ताबा, वगैरे).

अनागम्य [**सं०** अ, अन्+आगम्य (येण्याजोगा, मिळण्याजोगा)]**वि०** दुरापास्त; मिळविण्यास कठिण; दुष्प्राप्य.

अनमान [**सं०** अनुमान ह्याचें अपभ्रष्ट आणि चुकीच्या अर्थानें योजण्यांत येणारें पण रूढ झालेलें रूप] **न०** दुर्लक्ष्य, निष्काळजीपणा, उपेक्षा, बेपर्वाई, औदासिन्य, (क्रियापद ' करणें '). ॐ **–धपका, (–धबका)** **पु०** अंदाज, अजमास, अटकळ. याचें 'अनमानधबक्यानें' हें रूप विशेष रूढ आहे.

अनमानणें स० क्रि० उपेक्षिणें; बेपर्वाईनें, किंतू ठेवून, किं० कचरत (कांहीं काम) करणें.

अनमानीक वि० १ उदासीन, बेफिकीर; आस्थाविरहित, बेपर्वाईक. २ शंकास्पद, अस्पष्ट.

अनमानीत वि० दुटप्पी, अस्पष्ट, अस्वच्छ. (कारभार, भाषण इ०).

अनय [**सं०** अ अभावार्थक+नय] **पु०** १ अन्याय, अनीति, दुर्वर्तन. २ कपट. ३ पाप. **वि०** अन्यायी, अनीतिमान, दुर्वर्तनी, पापी.

अनर [**हिं०** अनार] **स्त्री०, न०** १ रामफळाचें झाड. २ रामफळ.

अनरसा [**हिं०** अंदरसा] **पु०** १ तांदुळाचें पीठ, गूळ, वगैरेंचें तळून तयार केलेलें एक उंची खाद्य. २ एक प्रकारचें कापड.

अनर्गळ [**सं०** अ+अर्गला (अडकाठी)] **वि०** अडकाठी, दडपण, दाब, नियंत्रणा, वगैरे नसलेला किंवा वगैरेंनीं विरहित; स्वैर, बेताल; स्वच्छंद; स्वेच्छाचारी; प्रतिबंधरहित.

अनर्गळी [**म०** ज्याला अर्गला नाहीं तो; **अनर्गळ** पहा.] **स्त्री०** (कवितेंत) स्वैर, स्वच्छन्दीपणाच्या, किं० बेताल, खोड्या, आचरण, वर्तन, इ०.

अनर्घ,अनर्घ्य [**सं०** अ अभावार्थक+अर्घ अर्घ्य (मूल्य)] **वि०** बिनमोल, अमोलिक, अमूल्य, श्रेष्ठ.

अनर्थ [**सं०** अ+अर्थ] **पु०** १ आपत्ति; मोठें संकट. २ कहर; आकांत; गोंधळ. (क्रि० ' मांडणें ').३ हाहाकार.४ जो खरा किं० योग्य अर्थ नव्हे तो अर्थ;भलताच किं० विपरीत अर्थ. ॐ **अर्थाचा अनर्थ करणें** १ एकाद्या गोष्टीचा विपर्यास करणें. २ वक्त्याचा उद्दिष्ट अर्थ मनांत न घेतां त्याच्या भाषणाचा भलताच अर्थ करणें.

अनर्थक [**सं०**] **वि०** १ निरर्थक. २ अर्थशून्य.

अनल [**सं०**] **पु०** १ अग्नि. २ अग्नीची देवता. ३ जठराग्नि. ४ आप, ध्रुव, सोम, धर किं० धव, अनिल, **अनल,** प्रत्यूष, प्रभास, ह्या ८ वसूंपैकीं सहावा. ॐ **कामानल पु०** मदनरूपी अग्नि. **शोकानल पु०** शोकरूपी अग्नि.

अनलस [**सं०** अ अभावार्थक + अलस (आळशी)] **वि०** १ आळशी नसलेला; उद्योगी; कामसू, मेहनती; आस्थाळू.२ (एखाद्या कामीं) दक्ष.

अनल्प [**सं०** अ, अन् +अल्प (थोडें)] **वि०** पुष्कळ, फार.

अनवकाश [**सं०** अ+अवकाश (जागा)] **वि०** १ प्रसंग, संधी, जागा, सोय, सवड, प्रवेश, शिरकाव, फुरसत,पोकळी, वगैरे नसलेला. २ ०ची जरूरी किं० गरज नसलेलें.३ जें बरोबर लागू पडत नाहीं असें(विधान वगैरे). ४ पूर्ण व्याप्त; पूर्णपणें भरलेलें.

अनवच्छिन्न वि० १ अखंड; अकुंठित. † ज्ञाने०१.

अनवट पु० चांदीच्या घागऱ्या लावलेली पायाच्या अंगठ्यांत घालावयाची आंगठी.

अनवटी [**सं०** हनु+**म०** वाटी] **स्त्री०** हनुवटी.

अनवणी [**म०** अ (नाहीं)+वहाण (पादत्राण विशेष ज्याला)] पायांत जोडा,वाहाणा, वगैरे कोणत्याही जातीचें पादत्राण नसलेला; नागव्या पायांचा.

अनवद्य [**सं०** अ, अन्+अवद्य=निंद्य] **वि०** अदूषणीय; निर्दोष; ज्यांत उणें काढावयाला यत्किंचित् जागा नाहीं असें. **उ०** शकुन्तलेची अंगयष्टि अनवद्य होती.

अनवधान [**सं०** अ, अन्+अवधान (लक्ष्य)] **न०** १ लक्ष्य नसणें.२ दुर्लक्ष्य; बेफिकिरी. ॐ**अनवधानी वि०** लक्ष्य नसलेला; बेफिकीर; आपल्या कामाकडे दुर्लक्ष्य करणारा.

अनवरत [**सं०** अ, अन्+अवरत (थांबलेले)] **वि०** ज्याला थांबणूक नाहीं असें; सातितक; नित्य चालू असलेलें; सततचें. **क्रि० वि०** नित्य; सतत; थांबणूक, खंड, वगैरे न पडतां.

अनवल स्त्री० रामफळाचें झाड.

अनवलें न० रामफळ.

अनवलोभन [**सं०**] **न०** गर्भधारणेपासून

तिसऱ्या महिन्यांत शुद्धीकरणार्थ करावयाचा एक विधि.

अनवसर [**सं०** अ, अन्+अवसर (संधि, जागा, फुरसत)] **वि०** १ अवकाश, फुरसत, किं० विश्रान्ति इ० नसलेला; उद्योगरत. २ भलत्याच वेळीं उपस्थित झालेला; अयोग्यकालीन. **पु०** १ विश्रान्तिरहितता. २ अयोग्यकालीनता. ३ १ दुष्काळ; संकट. † **ज्ञाने०** १.

अनवसित [**स०** अ, अन् + अव + सित कापलेला)] **वि०** १ न संपलेलें. २ न ठरविलेलें.

अनवसितता स्त्री० न संपलेपणाची स्थिति.

अनवस्था [**सं०** अ, अन्+अवस्था (स्थिति)] **स्त्री०** १ अस्वस्थपणा; अशांतता; अस्थिरपणा; जाचगुकीची स्थिति. २ अडचणीची स्थिति. अनर्थ; घोटाळा.' ३ ज्याच्यांतून सुटका होणें नाहीं असा प्रसंग. ४ जोपासनेंत हयगय, आबाळ. (मुलांची वगैरे). ५ अनिश्चिततेची स्थिति. ६ अनिर्णय.

अनवा [**अ०** अनवाअ = आश्चर्यकारक] **वि०** अप्रतिम; पूर्वी न पाहिलेलें, न ऐकिलेलें, न चाखिलेलें, न अनुभविलेलें; अपूर्व. उ० आजची कथा, बासुंदी, व्याख्यान, गाणें, इ० अनवा झालें. ꙮ **अनवा अपरूप वि०** नवीन व चमत्कारिक; अपूर्व व आश्चर्यकारक; नवलाईचें व विस्मयकारक.

अनवा [**सं०** अन्वय] **पु०** कच्चा खर्डा; घाईनें व मुख्य मुद्यांचेंच लिहिलेलें किं० केलेलें टिपण.

अनवाणा, अनवाणीं, अनवाहाणीं [**म०** अ+ वाहणा] **वि०** पायांत वाहाणा वगैरे पादत्राण नसलेला. **क्रि० वि०** पायांत वाहाणा वगैरे कांहीं पादत्राण न घालतां. नागव्या पायांनीं. ꙮ **अनवाणी काशीकर पु०** १ पायांत कांहींही पादत्राण न घालतां आपण काशीस पायीं जाऊन आलों आहों अशी बढाई किं० दिमाख मिरविणारा. २(यावरून) अट्टल सोदा, भामटा, लफंगा.

अनशन [**सं०** अ+अशन (खाणें)] **न०** उपवास (क्रियापद ' करणें, ' ' होणें '). ꙮ **अनशें पोटीं, अनशवें पोटीं, अनशिळें पोटीं, अनशापोटीं, अनशोय पोटीं, अनसोळें पोटीं क्रि० वि०** कांहीं खाल्लेलें नसतां; पोट रिकामें असतां (सकाळच्या प्रहरीं वैगेरे). उ० अनशें-पोटीं पाणी प्यालास तर नळ फुगतील.

अनशूद, अनशुद्ध [**सं०** अन्नशुद्धि] भोजनाचे सर्व पदार्थ ताटांत वाढून झाल्यावर शेवटीं तूप वाढतात. हें तूप वाढल्याशिवाय अन्न खावयाला योग्य होत नाहीं. ह्या तुपाला " अन्नशुद्धि " म्हणतात. अपभ्रष्ट रूपें अनशूद, अनशूध.

अनश्रुत [**सं०**अ+श्रुत; हेंगाडी घटना] **वि०** १ न ऐकलेलें; अश्रुतपूर्व; अपूर्व. २ ज्यानें ऐकलें नाहीं असा.

अनश्वर [**सं०** अ+नश्वर (नाशवन्त)] **वि०** नाशवंत नाहीं असें; चिरकालिक; शाश्वत.

अनसूट [**सं०** अनुच्छिष्ट यापासून अपभ्रष्ट रूप] **वि०** १ चव न घेतलेलें; न वापरलेलें; न चाखलेलें; (खाद्य वगैरे). २ ज्याला आपल्या वांटणीचा हिस्सा अजून मिळाला नाहीं असा. ३ ज्यानें रतिसुखोपभोग अनुभविला नाहीं असा (पुरुष किं० स्त्री).

अनसूट न० १ पुरुष मेल्यानंतर जो पहिला भाद्रपद महिना येईल त्याच्या कृष्णपक्षांत त्या पुरुषाला पिंड देण्याचा धार्मिक विधि. २ वर्षश्राद्धाच्या आधला दिवस.

अनसूय, अनसूयक [**सं०** अ+असूया(मत्सर)] [**वि०** मत्सररहित.

अनसूया [**सं०**] **स्त्री०** १ मत्सररहितता. २ मत्सररहित जी ती. ३ अत्रिपत्नी.

अनहित [**सं०** अ+हित (कल्याण) रूढ अशुद्ध समास.] **न०** तोटा, नुकसान .२ अकल्याण.

अनक्षर [**सं०** अ, अन्+अक्षर] **वि०** अशिक्षित; अडाणी; निरक्षर; असंस्कृत.

अनागत [**सं०** अ, अन्+आगत (आलेलें)] **वि०** न आलेला; भविष्यकालीन, आगामि. **न०** भविष्य काळ. ꙮ **–चिंता स्त्री०** आगामि गोष्टींबद्दल काळजी किं० चिंता करणें; पुढच्या करितां तरतूद करणें. **–विधाता वि०** १ भविष्यकालीन गोष्टीबद्दल आगाऊ तरतुद करणारा. २ दूरदर्शी, धोरणी.

अनागम [**सं०** अ, अन्+आगम (येणें)] **वि०** अनादिकालापासून अस्तित्वांत असलेला; अव्याहत चालत आलेला; दस्तऐवज नसलेला (हक्क, जमिनीचा ताबा, वगैरे).

अनागम्य [**सं०** अ, अन्+आगम्य (येण्याजोगा, मिळण्याजोगा)]**वि०** दुरापास्त; मिळविण्यास कठिण; दुष्प्राप्य.

अनागोंदी [**का०** आनेगुंदी=हत्तींच्या फिर-ण्याची जागा] **वि०** भपकेदार, अव्यवस्थित, ताळ-तंत्र नसलेला (कारभार, जमाखर्च, व्यवस्था, इ० ना हें विशेषण लावतात.) टीप—आमचे "मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०" हें पुस्तक पहा.

अनाघात **क्रि० वि०** सामान्य किं० नेहमीच्या मर्यादेहून किं० परिमाणाहून फारच अधिक. उ० १९१० सालीं अनाघात पाऊस पडला.

अनाचार [**सं०**] **पु०** नियमबाह्य वर्तन; स्वैर वागणूक. दुराचरण. ꙳ **अनाचारी वि०** नियमबाह्य, स्वैर वर्तन करणारा (खाण्यांत, पिण्यांत, वगैरे); स्वैर वागणुकीचा; दुराचरणी.

अनाठायीं [**म०** अ+ठाय (जागा)] **क्रि० वि०** भलत्याच ठिकाणीं; अपात्रीं; निरर्थक किंवा व्यर्थ होईल अशा तऱ्हेनें; अयोग्य रीत्या.

अनाड वि० { अज्ञानी, मूर्ख. † **तुका०** }.

अनाडी [**सं०** 'अज्ञानी' चें विकृत रूप] **वि०** अडाणी; मूर्ख; अकुशळ.

अनातप [**सं०**अ, अन्+आतप (उन्ह)] **वि०** छायायुक्त; थंड; शीतळ. [खोटें.

अनात्मक [**सं०** अ+आत्मा]**वि०** अशाश्वत,

अनात्मवर्ग पु०{ मायाकार्य;जग;जड समुदाय. † **ज्ञाने०**}.

अनात्मा [**सं०** अ, अन्+आत्मा] **पु०** आत्मा नव्हे तो म्हणजे देह. ꙳ **अनात्मज्ञ वि०** मूर्ख. अनात्मवान्. **वि०** इंद्रियनिग्रहशून्य. **अना-त्मसंपन्न वि०** १ बुद्धिहीन. २ इंद्रियें न जिंकिलेला.

अनाथ [**सं०** अ (नाहीं)+नाथ (स्वामी, सहाय) ज्याला] **वि०** निराश्रित; पोरका, दुबळा, गरीब, असहाय, दीन. ꙳ **—बंधु वि०** असहाय लोकांचा वाली; आश्रयदाता.—**प्रेत न०** बिनवारशी प्रेत. —**सभा स्त्री०** भिकारखाना.

अनादर [**सं०** अ, अन्+आदर (संमान)] **पु०** १ अवज्ञा, धिक्कार, तिरस्कार, अवहेलना. २ अव्हेर, अप्रतिग्रह. ꙳ **—बुद्धि स्त्री०**-औदासीन्य; बेफिकीरी. २ तिरस्काराची भावना.

अनादरण [**सं०**] **न०** अवहेलना,तिरस्कार, किं० धिक्कार करणें.

अनादरणें [**सं०**] **स० क्रि०** अव्हेरिणें, अवहेलणें; अवमानिणें, तुच्छ लेखणें.

अनादि [**सं०** नाहीं आदि=(आरंभ) ज्याला] **वि०** १ ज्याला उगम किंवा आरंभ नाहीं असा; सात-तिक. ज्याला आरंभ, उत्पत्ति, इ० नाहीं असा (ईश्वर, माया, इ०). २ ज्याच्या आरंभकालाचा थांग लागत नाहीं असा(ग्रंथ इ०).꙳—**सिद्ध वि०** पूर्वापर चालू असलेलें, स्थापित झालेलें,रूढ, किं० प्रचलित इ०. —**सोयरा पु०** सर्वांचा सर्वकालीन बंधु म्ह० ईश्वर. **अनाद्यनंत वि०** ज्याला आदि म्ह० आरंभ नाहीं व अंत म्ह० शेवट नाहीं असा; पूर्वा-पर चालत आलेला; चिरकालिक.

अनादिवनजर न० पुष्कळ दिवसांपासून माजून राहिलेलें रान.

अनादृत [**सं०** अ, अन्+आदृत (आदरि-लेला)] **वि०** अवमानलेला; अव्हेरिलेला; झिडका-रिलेला; धिक्कारलेला.

अनानस [**हिं०** अननास] **पु०** १ अननसा-च्या फळाचें झाड. २ अननसाचें फळ.

अनाम [**सं०** नाहीं नाम (नांव) ज्याला] **वि०** नामरहित (ईश्वर).

अनामत [**अ०** अमानत] **स्त्री०** १ ठेव; गहाण म्हणून दुसऱ्याजवळ ठेवलेली वस्तु (दागिना जमीन, वगैरे). २ चोपडींत केवळ नोंदून ठेवलेली पण जमेच्या किंवा खर्चाच्या सदरांत मांडलेली नाहीं अशी रकम; हिशेबांत न दाखविलेली रकम. **क्रि० वि०** १ जशाच्या तशाच स्थितींत. उपयोगांत किं० उपभोगांत न आणतां. २ न स्पर्शितां, न डवचितां, न हालवितां. ३ विभाग किं० वाटप न करतां. ꙳ **अनामतवही स्त्री०** कायम विल्हेस न लावतां केवळ स्मरणार्थ टांचून ठेवलेल्या रकमा मांडावयाची चोपडी.

अनामय [**सं०** अ (नाहीं)+आमय (रोग)] **वि०** १ नीरोगी; सुदृढ; सशक्त, निकोप. २ दुःख-रहित. ३ रोगानुत्पादक. **न०** १ नीरोगीपणा; सुदृढता, सशक्तता. २ खुशाली; क्षेम; कुशल.

अनामिक [**सं०** अ + नामन् + इक (प्रत्यय)] **वि०** १ ज्याचें नांव घेणें युक्त नाहीं असा. २ महार, मांग, चांभार, वगैरे जातींतील माणूस. ३ ज्यानें आपलें नांव गुप्त ठेवलें आहे असा. ४ ज्यांत लिहिणाराच्या वगैरे नांवाचा उल्लेख नाहीं असें (पुस्तक इ०).

अनामिका [**सं०** अ+नामन्+इक] **स्त्री०** मधलें बोट व करांगुलि यांच्यामधील बोट, – ज्यांत आपण आंगठी घालतों.

अनायक[**सं०** अ+नायक(नेता,पुढारी)]**वि०** १ नेता, शास्ता, कर्ता, वगैरे ज्याला नाहीं असा. (राज्यकारभार, संसार, इ०);अंदाधुंदीचा;बेबंदशाहीचा. ❀ **अनायकी स्त्री०** बेबंदशाही; अव्यवस्था.

अनायत्त [**सं०** अ, अन्+आयत्त (स्वाधीन)] **वि०** परस्वाधीन नाहीं असें; स्वतंत्र; दुसऱ्याची नियंत्रणा, हुकमत, वगैरे नसलेला; स्वावलंबी.

अनायास [**सं०** अ,अन्+आयास]**पु०**आयास, कष्ट, यातायात, दगदग,वगैरेंचा अभाव; सुलभता; सौकर्य. ❀ **अनायासें, अनायासानें** त्रास, दगदग, वगैरे न होतां किंवा पडतां; सहजासहजीं,सौकर्यानें.

अनार [**हिं०** अनार] **न०, पु०** १ डाळिंबाचें झाड. २ डाळिंबाचें फळ. ❀ **अनारदाणी वि०** १ डाळिंबाच्या दाण्यांसारखे छाप वगैरे ज्याच्यावर नक्षीसाठीं उठविले आहेत असें (कापड). २ डाळिंबी रंगाचें.

अनारसा मागें **अनरसा** पहा.

अनारिसा [**सं०** अन्यादृश=दुसऱ्या सारखा] १ भिन्न प्रकारचा किं० जातीचा. २ विलक्षण, विचित्र. ३ भलता. ४ वेगळा. [**ज्ञाने०** }.

अनार्त वि० } सुखी; निरिच्छ, वैराग्यशील.

अनार्य [**सं०** अ,अन्+आर्य] **वि०** असभ्य; गांवढळ; हीन; नीच.**पु०** जो आर्य नव्हे तो,–शूद्र, म्लेंच्छ,इ०. २ असभ्य; गांवढळ चालीरीतींचा.

अनावड [**म०** अ+आवड] **स्त्री०** अभिरुचि, गोडी, आवड, प्रेम, इत्यादींचा अभाव.

अनावर [**म०** अ+आवर] **वि०** बेफाम; आवरतां येण्यास अशक्य किं० कठिण; बेलगामी.

अनावस्था मागें **अनवस्था** पहा. त्याचें हें अपभ्रष्ट रूप. [णाच्या कृति.

अनावळी स्त्री० अवांळी; खोड्या, टारगटप-

अनावृत [**सं०** अ, अन्+आवृत (झाकलेलें)] **वि०** १ न झाकलेलें; उघडें.२ सर्व लोकांत जाहीर होईल अशा रीतीचें.

अनावृत्त [**सं०** अ, अन्+आवृत्त (परत आलेला)] **वि०** १ परत न आलेला. २ मर्यादा, नियंत्रणा, वगैरेंनीं अबद्ध. उ० पूर्वकालीं स्त्रियांस विवाहाची मर्यादा नसून त्या या बाबतीत स्वतंत्र व अनावृत्त होत्या. (गीतारहस्य).

अनावृत्ति [**सं०** अ, अन्+आवृत्ति (परत येणें)] १ परत न येणें. २ मोक्ष.

अनावृष्टि [**सं०** अ, अन्+आवृष्टि (वर्षाव)] **स्त्री०** अवर्षण; पावसाचा अभाव.

अनाश्रय, अनाश्रित [**सं०** अ,अन्+आश्रय; अ, अन्+आश्रित] **वि०** ज्याला आश्रय, आधार, वगैरे नाहीं असा; निराश्रित; अनाथ.

अनास्थ [**सं०** अ, अन्+आस्था (काळजी)] **वि०** आस्थारहित; निष्काळजी; हलगर्जी किं० दुर्लक्ष्य करणारा.

अनास्था [**सं०** अ, अन्+आस्था (काळजी, कळकळ)] **स्त्री०** १ निष्काळजीपणा; बेपर्वाई; हलगर्जीपणा; दुर्लक्ष्य. २ हेळसांड.

अनाहत पु० { योगसाधनानें दश नादांचा ध्वनि ऐकूं येतो तो; **अनुहत** असाही शब्द आहे. † **ज्ञाने०**. **अनाहतचक्र न०** हृदयकमळ. }.

अनाहार [**सं०** अ, अन्+आहार (खाणें)] **पु०** उपवास,अनशन. ❀ **अनाहारी वि०** उपवासी; ज्यानें कांहीं खाल्लें नाहीं असा.

अनाहूत [**सं०** अ, अन्+आहूत (बोलाविलेला)] **वि०** १ न बोलाविलेला; न पाचारिलेला; आगंतुक. २ अनपेक्षित.

अनिगा [**म०** अ (अभावार्थक)+**फा०**निगाह (काळजी)] **स्त्री०** अनास्था, आबाळ, हेळसांड.

अनिगूत, अनिगुती स्त्री० निष्काळजीपणा, दुर्लक्ष्य, हलगर्जीपणा.

अनिच्छा [**सं०** अ,अन्+इच्छा] **स्त्री०**इच्छेचा किं० वासनेचा अभाव; निरिच्छता; नाखुषी; असंमति. ❀ **–प्रारब्ध न०** आपली किं० दुसऱ्या कोणाची इच्छा नसतां आपणाला जी दैवगति अनुभवावी लागते ती. दुसऱ्याच्या इच्छेनें जी दैवगति अनुभवावी लागते ती " परेच्छा प्रारब्ध ". आपल्याच इच्छेनें जी दैवगति अनुभवावी लागते ती " स्वेच्छा प्रारब्ध ".

अनित्य [**सं०** अ + नित्य (चिरस्थायी)] **वि०** १ चंचल;नश्वर. २ प्रसंगविशेषींच करावयाचें (कर्म किं० विधि).

अनिंदित [**सं०** अ + निंदित (दूषिलेला)] **वि०** अदूषित.

अनिंद्य [**सं०**] निंदिण्यास, दोष देण्यास, किं० नांवें ठेवण्यास, अयोग्य; निंदेला अपात्र.

अनिर्णय [**सं०** अ + निर्णय(निकाल,निश्चय)] **पु०** अनिश्चितता; संदेहात्मक स्थिति. **वि०** ज्याचा निकाल अद्यापि लागला नाहीं असा.

अनिर्णीत [**सं०** अ + निर्णीत (निश्चित)] **वि०** ज्याचा अद्यापि निकाल लागला नाहीं असा.

अनिमेष [**सं०** अ अभावार्थक + निमेष (डोळे मिटणें)] **वि० १** डोळे न मिटणारा, न मिचकावणारा (परमेश्वर, मत्स्य, इ०). २ ज्याची उघडझाप थांबली आहे असा (नेत्र). ३ जागरूक. **क्रि० वि०** डोळ्यांत तेल घालून; जागरूकतेनें; नितान्त दक्षतेनें.

अनियत [**सं०** अ (नाहीं) + नियत (ठरलेलें)] **वि०** न ठरलेलें; न ठरविलेलें; अनिश्चित.

अनियम [**सं०** अ (नाहीं) + नियम (ठराव)] **पु०** १ नियम, क्रम, शिस्त, वगैरेंचा अभाव. २ अनियंत्रितता. ३ बेशिस्तपणा; अनिश्चितता. **वि०**, **अनियमित वि०** १ बेशिस्त; क्रम वगैरेंस सोडून असलेला. २ वक्तशीर नसलेला.

अनियम्य [**सं०** अ (नाहीं) + नियम्य (आटोक्यांत ठेवण्याजोगा)] **वि०** ज्याच्यावर नियंत्रणा, ताबा, वगैरे चालत नाहीं असा; अदम्य; जो आटोक्यांत ठेवतां येत नाहीं असा.

अनिर्वचनीय, अनिर्वाच्य [**सं०** अ + निः + वचनीय, वाच्य (सांगण्याजोगें)] **वि०** १ ज्याचें वर्णन करतां येत नाहीं असें, अवर्णनीय, (ब्रम्ह). २ ज्याचा निर्देश करूं नये असें (वाईट भाषण, गोष्ट,इ०). ३ जें सांगण्यासारखें नाहीं तें. ४ जें पूर्णपणे सांगतां येणें शक्य नाहीं असें.

अनिर्वाह [**सं०** अ + निर्वाह (कार्याची सिद्धि किं० समाप्ति.) **पु०** १ अपूर्ति; अपूर्णता. २ अनिश्चितता. ३ टंचाई, उणीव (आर्थिक). ४ ज्याला तोड नाहीं किं० उपाय नाहीं असा (पेंच, स्थिति, इ०).

अनिर्वाह्य [**सं०** अ + निर्वाह्य (सिद्धीस नेण्याजोगें)] **वि०** चालविण्यास, पूर्ण करण्यास, किं० पुढें ढकलण्यास, कठिण असें (काम वगैरे).

अनिल [**सं०**] **पु०** १ वायु. मुख्य वायु सात कल्पिले आहेत. आवह, निवह, उद्वह, संवह, विवह, प्रवह, परिवाह. २ वायूची देवता. ३ अष्ट वसूंपैकीं एक. ४ वात (त्रिदोषांपैकीं एक). ❀ **अनिलात्मज पु०** १ भीम. २ हनुमान.

आनिवार [**सं०** अनिवार्य पासून] **वि०** १ ज्याचें निवारण करतां येणें शक्य नाहीं असें. २ अफाट; अतिशयित.

अनिवार्य [**सं०** अ + निवार्य (निवारण्याजोगा)] **वि०** १ ज्याचें निवारण करतां येत नाहीं असें. २ जें आटोक्यांत किं० नियंत्रणेंत ठेवतां येत नाहीं असें.

अनिश्चित [**सं०** अ (नाहीं) + निश्चित (ठरलेलें)] **वि०** मुक्रर न केलेलें; अनिर्णीत; न ठरविलेलें; डळमळीत; संदिग्ध.

अनिष्ट [**सं०** अ, अन् + इष्ट (इच्छिलेलें)] **वि०** १ अप्रिय, न रुचणारें. २ प्रतिकूल; अहितावह; अपशकुनी; दुःखकारक. **न०** १ अपशकुन; वाईट गोष्ट; इच्छेच्या, हिताच्या, वगैरे उलट असलेली गोष्ट. २ दुर्दैव. ३ अपघात. ❀ **अनिष्टापत्ति स्त्री०** १ इच्छेविरुद्ध असलेली गोष्ट घडून येणें. २ जें व्हावयास नको तें होणें. ३ जें सिद्ध करावयाचें नाहीं तेंच सिद्ध होणें (न्यायशास्त्रांत). **अनिष्टप्रसंग पु०** १ वाईट किं० अहितावह प्रसंग. २ भलल्याच म्हणजे चुकीच्या नियमाशीं, वाक्याशीं, वगैरे संबंध जोडणें. **अनिष्टापात पु०** दुर्दैवी, अपशकुनी, किं० अहितकारक गोष्ट घडून येणें.

अनिष्पन्न [**सं०** अ (नाहीं) + निष्पन्न (उत्पन्न झालेलें)] **वि०** १ न संपलेलें, अर्धवट स्थितींत असलेलें. २ अपक्व. ३ अनिर्णीत; सिद्ध न झालेलें.

अनीक [**सं०**] **पु०, न०** सैन्य. २ युद्ध. ३ समूह, कोणत्याही पदार्थाची खूब मोठी संख्या. ❀ **अनीकस्थ पु०** योद्धा.

अनीकिनी [**सं०**] **स्त्री०** सेना.

अनीति [**सं०** अ (वाईट) + नीति] **स्त्री०** १ दुर्वर्तन, दुराचार. २ अन्याय. ३ व्यभिचार. ४ पाप. ५ असभ्यपणा.

अनीन [**अ०** अनान] **स्त्री०** लगामाच्या धावण्या, दोऱ्या, किं० वाद्या.

अनीश्वरवाद [**सं०** अन्+ईश्वर+वाद] ईश्वर नाहीं असें मत किंवा प्रतिपादन.

अनु [**सं०**] **अ०** १ नामांना, क्रियापदांना, वगैरेंना हा उपसर्ग लाविल्यानें जे अनेक शब्द सिद्ध होतात त्यांत याचे अर्थ ' मागें, ' ' ०च्या प्रमाणें,' ' ०च्या पेक्षां हलकें, गौण, ' ' ०च्या सह, ' ' प्रति, ' 'प्रत्येक' वगैरे होतात.हे सर्व शब्द स्वतंत्र रीत्या कोशांत दिले आहेत. { २ दुसरें. ३ मुळींच; किंचित् देखील. † **तुका०** }.

अनुकंपा [**सं०** अनु+कंप्+आ (प्रत्यय)] **स्त्री०**दया, द्रव, कींव.

अनुकरण [**सं०**] **न०** १ ०च्या प्रमाणें करणें;०ची प्रतिकृति करणें;०चा कित्ता गिरविणें; नक्कल; २ अनुरूपता. ※ **–धातु पु०** एखाद्या क्रियेचा जो आवाज होतो तदनुरूप ज्याचा उच्चार आहे असें क्रियापद, जसें, ' धडपडणें, ' चिरचिरणें, ' ' कुरकुरणें, ' इ०. **–वाचक, –शब्द पु०** एखाद्या क्रियेच्या आवाजाची उच्चारांत प्रतिकृति आणून घडविलेला शब्द, जसें,'सळसळ,' 'सपासप,' 'ताडताड,'इ०.

अनुकर्ष [**सं०** अनु (मागून)+कर्ष (कृष्= ओढणें)] **पु०** १ ओढीत आणणें, आकर्षण. २ मंत्रानें बोलावणें. ३ युक्त कालावधि उलटून गेल्या-नंतर एखाद्या (धार्मिक वगैरे) कार्याची सिद्धि, किंवा पूर्तता. (याच्या उलट **अपकर्ष**). ३ (**व्या०**) पूर्वीच्या नियमांतील शब्द घेणें.

अनुकल्प [**सं०** अनु (मागून)+कल्प (कृप्=करणें)] **पु०** १ प्रथम सांगितलेली गोष्ट शक्य नसेल तर दुसरी अमुक करा अशी जी यज्ञ-यागादि कर्मांत सवलत देतात ती. उ० यव नस-ल्यास तांदूळ वापरा; येथें यव हा प्रथमकल्प, व तांदूळ हा अनुकल्प. २ गौणपक्ष, अनिर्वाहपक्ष.

अनुकार [**सं०** अनु+कार (कृ=करणें)] **पु०** अनुकरण, नक्कल. { आकार. † **ज्ञाने०** }.

अनुकारी वि० १ अनुकरण करणारा. ०च्या प्रमाणें कृति करणारा. २ ०च्या सदृश किंवा ०शीं अनुरूप असलेलें.

अनुकार्य [**सं०**] ज्याचें अनुकरण किंवा नक्कल करतां येईल किंवा करणें योग्य आहे असा.

अनुकूल [**सं०** अनु+कूल (तट); तटाला अनुसरून] **वि०** १ फायदेशीर,हितकर, हितावह. २ ०च्या बाजूचा; ०च्या कलाचा; अनुरूप; (**प्रतिकूल** याच्या उलट). ३ ० चें पाठबळ असलेला. ४ सहजसाध्य. **पु०** एकनिष्ठ पति. **न०** शक्यता किं० परिस्थितीची अनुरूपता, इ०. **उ०** आपल्याला अनुकूल झालें तर आपण काशीयात्रा करून येऊं.

अनुकृति [**सं०** अनु+कृति] **स्त्री०** १ अनुकरण, प्रतिकृति. २ वेडावणें.

अनुक्रम [**सं०**] **पु०** १ परंपरा, क्रम. २ पद्धति. ३ पुस्तकादिकांची अनुक्रमणिका. ४ दोन किं० अधिक श्रेणींतील पदार्थांची (म्ह० क्रमिकांची) कांहीं विशिष्ट सरणीनें सांगड घालणें. उ० राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न, यांच्या अनुक्रमें सीता, उर्मिळा, मांडवी, आणि श्रुतकीर्ति, ह्या बायका होत्या.

अनुक्रमणिका [**सं०**] **स्त्री०** एकाद्या पुस्तकां-तील वगैरे विषयांची ते ज्या क्रमानें पुस्तकांत निरूपिलेले असतील त्या क्रमाप्रमाणें मांडणी, रचना, किं० नोंद.

अनुक्रमणें स० क्रि० १ ०च्या मागें जाणें, अनुसरणें. २ एकाद्या कार्यास प्रारंभ करणें. ३ एकापुढें एक याप्रमाणें क्रमवारीनें लिहिणें, मांडणें, गणणें, वगैरे.

अनुक्रांत [**सं०**] **वि०** यथाक्रम ज्याची मांडणी, रचना, इ० केली आहे असें.

अनुक्रोश [**सं०**] **पु०** दया, करुणा, कींव. उ० कामदेवा, मजवर तुझा अनुक्रोश कां रे नाहीं ?

अनुगत [**सं०** अनु (मागून) + गत गेलेला)] **वि०** १ ०च्या मागें गेलेलें, लागलेलें, किं० अमलेलें;अनुसरलेलें.२ ०शीं अनुरूप असलेलें.३ युक्त, सहित. ४ व्याप्त, पूर्ण. ※ **–धर्म पु०** पदा-र्थाच्या ठायीं असतोच असतो असा गुण किं० धर्म.

अनुगति [**सं०**] **स्त्री०** १ मागें जाणें, अनु-सरणें. २ अनुकरण. ३ रुकार; संमति. ※ **अका-मानुगति स्त्री०** मनाविरुद्ध दिलेला रुकार किं० संमति.

अनुगम [**सं०** अनु (मागून)+गम् (जाणें)] **पु०** १ मागें जाणें, मागोमाग जाणें, अनुसरणें. २ समजणें, ध्यानांत घेणें, लक्ष्यांत आणणें; एकाद्या विषयाची साकल्येंकरून ज्ञानावाप्ति. ३ अनुमरण.

अनुगमन [**सं०** अनु (मागून)+गमन (जाणें)] **न०** १ मागें जाणें; अनुचरण. २ अनुमरण, सती जाणें.

अनुगवीन [**सं०** अनु (मागून)+गो (गायी, म्हशी, इ०)] **पु०** गुराखी (गायी वगैरे राखणारा).

अनुगामी [**सं०** अनु (मागून)+गम् (जाणें)] **पु० वि०, अनुगामिनी स्त्री० वि०** १ मागें जाणारा–री; ०च्या मताप्रमाणें वागणारा–री. २ परिचारक, सेवक. ३ भक्त. ४ सोबती. ५ साहाय्य करणारा.

अनुगुण [**सं०** अनु+गुण(सारख्या गुणांचा)] **वि०** १ समानशील; समगुणी; अनुरूप; अनुकूल; सारखे धर्म असणारें; एकाद्या गोष्टीच्या वगैरे स्वभावाशीं, धर्माशीं, जुळणारें किंवा त्यांचा परिपोष करणारें. उ० अनुगुण बायको मिळाली तर संसारशकट सुरक्षीत चालतो. २ प्रिय.

अनुगृहीत [**सं०** अनु+ग्रह् (घेणें)] **वि०** १ कृपा दर्शविलेला; ज्याच्यावर उपकार केले आहेत असा. २ स्वीकारलेला.

अनुग्रह [**सं०** अनु+ग्रह् (घेणें)] **पु०** १ दया, कृपा, उपकार; प्रसन्न होणें. २ विद्यादान. ३ अनुरूपता, आनुकूल्य, मदत, जोड. ४ उपकारशीलतेचा संबंध. ५ वेदांतील ऋचा शिकविणें.

अनुग्रही [**सं०**] **वि०** १ ज्याच्यावर अनुग्रह करण्यांत आला आहे असा. २ वेदाच्या ऋचा इ० शिकविणाऱ्याचा शिष्य.

अनुग्राहक [**सं०**] **वि०** १ दया किं० उपकार करणारा. २ वेदांतील ऋचा इ० शिकविणारा.

अनुग्राह्य [**सं०**] **वि०** अनुग्रह करून घेण्यास लायक किं० योग्य.

अनघडी वि० { एक सारखी. † **ज्ञाने०. अनुघडू पु०** गुप्तपणा. † **ज्ञा०** }.

अनुचर, अनुचारी [**सं०** अनु (मागून)+चर् (जाणें)] **पु०** १ मागें जाणारा, ०ची सेवा करणारा, ०च्या पक्षाचा, सहाय. २ सेवक, नोकर, परिचारक. ३ सोबती.

अनुचरण, अनुचार [**सं०**] **न०** १ मागें जाणें, अनुसरण. २ सेवा, शुश्रूषा.

अनुचित [**सं०** अ (नाहीं)+उचित(योग्य)] **वि०** १ अयोग्य, अयुक्त, चुकीचें, न शोभणारें, निंद्य. २ फाजील, जास्त. ३ ज्याची संवय नाहीं असें; नवीन; अपरिचित.

अनुच्चारणीय [**सं०**] **वि०** ज्याचा उच्चार करूं नये असें.

अनुच्छिष्ट [**सं०** अ अभावार्थक+उच्छिष्ट (भक्षिलेलें)] १ **वि०** न सेविलेला, न भक्षिलेला, न स्पर्शिलेला. २ उपयोगांत न आणिलेला; न वापरलेला. ३ अभ्रष्ट, अस्पृष्ट. ४ ताजें.

अनुज पु०, अनुजा स्त्री० [**सं०** अनु (मागून) +जन् (उत्पन्न होणें, जन्मणें)] धाकटा भाऊ, धाकटी बहीण; पाठीवरला भाऊ, पाठीवरली बहीण. **वि०** मागून झालेला (–ली); मागून जन्मलेला (–ली); नंतरचा (–ची).

अनुजीवी [**सं०** अनु+जीव् (राहाणें, जगणें)] **वि०** १ ०च्यावर ज्याची उपजीविका अवलंबून आहे किंवा चालते असा इसम; ०चा आश्रित, परिचारक, नोकर, भृत्य.

अनुतप्त [**सं०** अनु (मागून)+तप्त (तापलेला)] पश्चात्तापानें दग्ध झालेला; पश्चात्ताप पावलेला.

अनुताप [**सं०** अनु (मागून) +ताप(दाह)] **पु०** पश्चात्ताप; केलेल्या कृत्याबद्दल वाईट वाटणें.

अनुतापणें अ० क्रि० पश्चातापानें पोळणें; सानुताप होणें.

अनुत्तर [**सं०** अ, अन्+उत्तर] **वि०** १ निरुत्तर, ज्यास कांहीं उत्तर देतां येत नाहीं किं० द्यावयास जागा नाहीं असा. २ मुख्य; श्रेष्ठ, उत्तम, अद्वितीय; सर्वोत्कृष्ट. **न०** १ उत्तराचा अभाव; मुळींच उत्तर न देणें; अयुक्तिक किं० प्रश्नास सोडून असलेलें उत्तर. २ पथकरलेलें काम न करणें; कबूल केलेल्या कामाची परिपूर्तता न करणें. उ० तुम्ही सांगितलेलीं सर्व कामें मी करीन; ह्यास अनुत्तर करणार नाहीं.

अनुत्पत्ति [**सं०** अ, अन्+उत्पत्ति] **स्त्री०** उत्पन्न न होणें; उत्पत्तिराहितता.

अनुत्पन्न [**सं०** अ, अन्+उत्पन्न] **वि०** १ उत्पन्न न झालेलें. २ न जन्मलेलें.

अनुत्साह [**सं०** अ, अन्+उत्साह] **पु०** औत्सुक्य, शक्ति, जोर, दम, वगैरेंचा अभाव; निरुत्साहीपणा; मंदता. **वि०** उत्साहरहित.

अनुदर [**सं०** अ (नाहीं)+उदर (पोट) ज्याला] **वि०** सडपातळ.

अनुदात्त [**सं०** अ,अन् +उदात्त] **पु०** उदात्त, अनुदात्त, आणि स्वरित, असे जे वेदाचे तीन स्वर आहेत त्यांपैकीं एक; हा खालीं म्हणण्याचा स्वर असतो.

अनुदार [**सं०** अ अन्+उदार] **वि०** स्वार्थी; कृपण; कोत्या मनाचा.

अनुदित [**सं०** अ, अन् +उत्=इत (गेलेला)] **वि०**१ न उच्चारलेला, अपारिस्फुट.२ न उगवलेला. ३ नसलेला.

अनुदिन,अनुदिनीं [**सं०** अनु+दिन (दिवस)] **क्रि० वि०** प्रत्यहीं, प्रत्येक दिवशीं.

अनूद्देश [**सं०**] **पु०** पूर्वी येऊन गेलेल्या नियमाचा किंवा सूचनेचा चालू गोष्टीस आधार म्हणून उल्लेख करणें. २ क्रमानें घेणें. ३ सूचना. ४ हुकूम; आज्ञा.

अनुदृष्टि [**सं०**] **वि०** अनुकूल आहे चर्या ज्याची असा. **स्त्री०** अनुकूल चर्या; सक्रप मुद्रा किं० अवलोकन.

अनुद्रुत [**सं०**] **वि०** प्रतिध्वनि झालेला (शब्द). **न०** गाण्यांत मात्रेचा चतुर्थांश.

अनुद्वाह [**सं०** अ, अन्+उद्वाह (लग्न, विवाह)] **पु०** ब्रह्मचर्य; कौमार्य; विवाहपूर्व स्थिति.

अनुधार [**सं०** अनु+ धारा] संथपणें; न [खळतां.

अनुधावन [**सं०** अनु+धावन] **न०** १ ०च्या मागें धावणें; पाठलाग. २ शोध; संशोधन; बारकाईनें किं० दक्षतेनें एखाद्या विषयाची तपासणी किं० चौकशी करणें. ३ निदिध्यास. ४ शुद्धि किं० स्वच्छता करणें.

अनुध्यास [**सं०** अनु+ध्यास (चिंतन)] **पु०** परम चिंतन; मनाच्या सर्व शक्ति एकवटून केलेलें मनन.

अनुध्वनि [**सं०** अनु+ध्वनि (आवाज)] **पु०** १ प्रतिध्वनि. २ सतार वगैरेसारखें तंतुवाद्य थांबविलें असतां त्याच्या तारांतून किंचित् काल निघणारा स्वरकंप.

अनुनय [**सं०** अनु+नय (नी=नेणें)]**पु०** १ विज्ञप्ति; प्रार्थना. २ आदरयुक्त वर्तन; विनयशील आणि नम्र आचरण; लहीनपणा. ३ शिक्षा. शिस्त; नियमितपणा (वागणूकीचा).

अनुनयी [**सं०**] **वि०** १ सभ्य; विनयशील. २ विनंती करणारा.

अनुनासिक [**सं०** नासिकेला अनुसरणारा] **वि०** ज्या वर्णाचा उच्चार नाकांतून होतो (तो). ङ,ञ,ण, न, म, हीं अनुनासिक व्यंजनें आहेत.

अनुनीत [**सं०**अनु+नीत] **वि०** १ विज्ञापिलेला; प्रार्थिलेला. २ शांत केलेला, तुष्ट केलेला, वळविलेला. ३ शिक्षित, शिस्त लावलेला.

अनुनीति [**सं०**] सामोपचाराची वर्तनपद्धति; नम्रतेचें बोलणें, वागणें, इ०; अनुनय.

अनुनायिका [**सं०** अनु+नायिका] **स्त्री०** उपनायिका; मुख्य नायिकेस अनुषंगभूत असलेलें नाटकांतील वगैरे दुय्यम किंवा गौण स्त्रीपात्र. (सखी, दासी, धात्री, परिव्राजिका, वगैरे अनुनायिका होत)-

अनुपकारी [**सं०** अ, अन्+उपकारी] **वि०** १ उपकार न करणारा. १ प्रत्युपकार न करणारा. ३ हित न करणारा किं० न पाहाणारा.४ कुचकामाचा; निरुपयोगी (पदार्थ).

अनुपठण [**सं०**] **न०** १ गुरूनें शिकविल्याप्रमाणें किं० म्हटल्याप्रमाणे वाचणें किं० म्हणणें. २ मागून म्हणणें.

अनुपपत्ति [**सं०**] **स्त्री०** १ उपजीविकेच्या साधनांचा अभाव; दारिद्र्य, निकृष्टावस्था. २ अनिर्णयात्मक वाद किं० समर्थन; आपला पक्ष स्थापित करतां येत नाहीं अशी स्थिति. युक्त्यभाव (न्यायांत). उ० पीन देवदत्त दिवसां जेवत नाहीं, येथें तो रात्रीं जेवतो हें गृहीत घेतल्याविना त्याचें पीनत्व अनुपपन्न होईल, म्हणजे त्याच्या पीनत्वाची अनुपपत्ति होते.

अनुपपन्न [**सं०** अ, अन्+उपपन्न (सिद्ध, योग्य) **वि०**] १ जें स्थापित केलेलें नाहीं असें; जें सिद्ध झालें नाहीं असें; ज्याचें समर्थन होत नाहीं असें; जें लागू करतां येत नाहीं असें; असंबद्ध; विषयांतरात्मक. २ उपजीविकेच्या साधनांची उणीव असलेला; दरिद्री.

अनुपम [**सं०** अ, अन् (नाहीं) उपमा ज्याला] **वि०** ज्यास कशाची उपमा देतां येत

नाहीं असें; अद्वितीय; सर्वोत्कृष्ट; ज्याची स्पर्धा किं० बरोबरी करतां येत नाहीं असें.

अनुपमेय [सं० अ, अन्+उपमेय (ज्याची बरोबरी करतां येते तें] वर " अनुपम " पहा.

अनुपम्य वि० } ज्याला उपमा किं० जोड नाहीं असा. † तुका० }.

अनुपयुक्त, अनुपयोगी [सं०] वि० १ निरुपयोगी; कामाला किं० उपयोगाला न येणारें. २ न जमणारें; अननुरूप.

अनुपरोध वि० } १ निर्विकार. २ अप्रतिबंध. ३ यथार्थ. † ज्ञाने० }.

अनुपान [सं० अनु (मागून)+पान(पेय)] न०१ औषधाबरोबर किंवा मागून घ्यावयाचें पेय. २ मुख्य औषधाला उपकारक ज्या गोष्टी, (खाद्यें, पेयें, इ०) त्यांचा समुच्चय. उ० तुम्हाला नुसतें हें औषध घेऊन फारसा फायदा होणार नाहीं. मी सांगितलें तें अनुपान पाळा. ३ चाटण्याचीं औषधें ज्या द्रव पदार्थांतून घ्यावयाचीं असतात तो (मध वगैरे).

अनुपात [सं०] पु० १ (गणितांत) त्रैराशिक.

अनुपाती [सं० अनुपातिन्] वि० अनुचर.

अनुपास्थित [सं०] वि० १ हजर नसलेला. २ जवळ नसलेला. ३ चालू किं० प्रचलित नसलेला. बुडालेला; नष्ट झालेला, वापरण्यांतून गेलेला. ४ ताजा नसलेला; मलीन झालेला (विषय, ज्ञान इ०).

अनुपलब्धि [सं०] स्त्री० (न्यायशास्त्रांत) प्रत्यक्ष ज्ञान नसणें.

अनुप्रवेश [सं०] पु० १ ०च्या आंत प्रवेश; एका वस्तूचें दुसरीचे ठायीं गमन. २ ०च्या इच्छेनुसार वर्तन. उ० परकी राजानें पराभव केला असतां विदेशगमन वा तदनुप्रवेश ही नीति आहे.

अनुप्रास [सं०] पु० वाक्यांत व्यंजनांची आवृत्ति. उ० " सांग सागरा सख्या असा कां विचलित झालासी ? " (शांताबाई भिडे). येथें सकाराचा अनुप्रास साधला आहे. अनुप्रासाचे चार प्रकार आहेत. छेकानुप्रास, वृत्यनुप्रास, श्रुत्यनुप्रास, आणि लाटानुप्रास.

अनुबंध [सं०] पु०, १ संबंध, अनुबद्धता (शारीरिक वा मानसिक); आसक्ति. २ सातत्यिक प्रवाह, अखंडितता; परंपरा. ३ फल, परिणाम (बरा किं० वाईट). ४ हेतु. उ० अपराध्याचा अनुबंध पाहून त्याला दंड करावा. ५ मुख्यानुयायी, किं० अप्रधान गोष्ट; गौणांग. ६ आनुषंगिक, ०च्या बरोबर उद्भवणारा, (व्याधि किं० पीडा.) उ० विषमज्वर मूर्च्छानुबंध होत. ७ वंशज; आप्त, संबंधी. ८ गुन्हा, अपराध. ९ प्रत्यवाय, अडथळा; सांसारिक बंधनें, पाश; अडचणी. १० एखाद्या गोष्टीचा अभिनिवेश किं० आग्रह. ११ प्रारंभ. १२ पूर्णांक व अपूर्णांक असलेली संख्या. उ० ७$\frac{3}{4}$ या संख्येंत ७ या पूर्णांकाचा व ३ या अपूर्णांकाचा अनुबंध झाला आहे. १३ (व्या०) मूळ रूप. १४ (व्या०) प्रत्यय इ० तील लोपणारें अक्षर. ❀ **अनुबंधचतुष्टय** न० ग्रंथाचे जे चार भाग ते. १ विषय म्ह० प्रतिपादनाला घेतलेली वस्तु २ प्रयोजन म्ह० त्या प्रतिपादनाचा उपयोग, उद्देश, आणि फळ; ३ भाषा आणि प्रतिपादनाची सरणी; ४ अधिकारी म्ह० त्या ग्रंथाच्या अध्ययनाला योग्य माणूस कोण.

अनुबंधी [सं०] वि०१० शीं संबद्ध, आसक्त; सहित, युक्त. २ ०शीं मिश्रित. ३ ०नें अनुसृत, ०च्यावर अवलंबून असणारें; उ० पूर्वकर्मानुबंधी फल या जन्मीं आपणांस प्राप्त होतें. ४ नित्य, अखंड.

अनुबल [सं० अनु (मागें)असलेलें बल] न० १ पिछाडीचें सैन्य. २ कुमकीचें सैन्य.

अनुभव [सं०अनु(मागून)+भू (होणें, असणें)] पु० १ प्रत्यक्षज्ञान; प्रत्यक्ष माहितीनें मिळालेलें ज्ञान (उपजत किंवा ग्रंथपठणादिकांनीं न मिळविलेलें). २ स्वाद; उपभोग. ❀**-सिद्ध** वि० प्रत्यक्ष माहितीवरून किं० पुराव्यावरून ठरलेलें किं० निष्पन्न झालेलें.**-गम्य** वि० प्रत्यक्ष ज्ञानानेंच समजणारें. उ० ब्रम्हज्ञान केवळ अनुभवगम्य होय. **अनुभवी, अनुभविक** वि० १ अनुभव घेतलेला. २ जगाच्या व्यवहारांत वगैरे मुरलेला; जगांतील टक्केटोणपे खाऊन शाहाणा झालेला.

अनुभाव [सं०] पु० १ तेज, अधिकार, भव्यपणा, कांति, शौर्य, वैभव, थोरपणा. २ मनोगत भावाचें इंद्रियादिद्वारा जें प्रकटीकरण होतें तें. उ० कोप हा भाव, भ्रूभंग हा त्याचा अनुभाव. ३ काव्यादिकांतील रसोत्कर्षामुळें आपल्या ठायीं ज्या अनुकूल वेदना उत्पन्न होतात त्यांचें आविष्करण (हास्यादिद्वारा).

अनुभूत [**सं०**] **वि०** १ अनुभविलेलें; उपभोगिलेलें. २ माहीत असलेलें; परिचित.

अनुभूति [**सं०**] **स्त्री०** १ अनुभव. २ (न्यायांत) प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, आणि शाब्द, या चार प्रमाणांपासून मिळविलेलें ज्ञान.

अनुमत [**सं०**] **न०** १ अनुमति; रुकार; संमति. २ मतैक्यता. **वि०** १ पसंत केलेलें; संमति दर्शविलेलें. २ आवडलेलें.३ अनुकूल असलेलें.

अनुमति [**सं०** अनु+मन् (मनांत आणणें)] **स्त्री०** १ रुकार, संमति, परवानगी, पसंती, मतानुकूल्य. २ कलाहीनचंद्रवती, शुक्लचतुर्दशीयुक्त पौर्णिमातिथि. राजसूय यज्ञांत ह्या तिथीची पूजा करतात.

अनुमरण [**सं०** अनु (मागून) मरण (मरणें)] **न०** स्त्रीचें नवऱ्याच्या चितेवर स्वतास जाळून घेणें.

अनुमान [**सं०**] **न०** १ तर्क; ठाऊक असलेल्या किं०दिलेल्या गोष्टींवरून निष्पन्न होणारें नवीन ज्ञान. २ न्यायशास्त्रांतील चार प्रमाणांपैकीं दुसरें. (अनुमान म्हणजे लिंगपरामर्श. हें दोन प्रकारचें असतें; —स्वार्थानुमान व परार्थानुमान). ३ अंदाज, अजमास; अटकळ;ताडणें. ४ कचर. (अनुमान ह्या शब्दाचें **अनमान** हें अपभ्रष्ट रूप आहे). ५ (साहित्य शास्त्रांत)साधनावरून प्राप्त झालेलें साध्याचें ज्ञान. साधनावरून साध्यासंबंधानें जेथें तर्क केलेला असतो तेथें '' अनुमान '' हा अलंकार होतो. ह्या पर्वतावर वन्हि असला पाहिजे,कशावरून,तर त्यावर धूम आहे. येथें धूम हें साधन आणि वन्हि हें साध्य आहे.उ०बा अंगुलीया ,तुझें पुण्य सानें माझेपरी हें दिसे ह्या फलानें / कांतांगुलिस्थान तें मेळपून तूं भ्रष्ट झालेंस आतां तिथून ॥ **शाकुं०**. ६ } संकोच; अनादर. † **तुका०** }. ॐ – **धपका**, **–धबक्का** **पु०** निव्वळ तर्क; केवळ अजमास. – **सिद्ध** **वि०** अनुमानावरून म्ह० तर्कानें स्थापित झालेलें किं० जाणलेलें.**अनुमानी वि०** तर्क करण्यांत किं० अटकळ बाधण्यांत कुशल. **अनुमानोक्ति स्त्री०** १ अनुमानावरून केलेलें विधान. २ केवळ तर्कावरून केलेलें विधान.३लिंगपरामर्शावरून जें नवीन ज्ञानाचा बोध करून देतें तें वाक्य.

अनुमानणें [**सं०**] **स० क्रि०** १ तर्क करणें, अंदाज करणें. २ लिंगपरामर्शावरून नवीन ज्ञानाचें आकलन करणें.

अनुमापक [**सं०**] **वि०** तर्क करावयाला आधारभूत (गोष्ट).

अनुमिति [**सं०**] **स्त्री०** (न्यायांत) अनुमानानें होणारें ज्ञान. उ० या पर्वतावर धूम आहे म्हणून तेथें अग्नि असलाच पाहिजे. येथें धूम या वस्तूवरून अग्नीचें जें ज्ञान निष्पन्न होतें तें, म्हणजे अग्नीचे ज्ञान, ही अनुमिति.

अनुमोदक [**सं०** अनु + मुद्] **वि०** अनुमोदन, संमति, किं० रुकार देणारा; पसंती देणारा.

अनुमोदणें स० क्रि० —ला रुकार देणें, संमति दर्शविणें, दुजोरा भरणें. २ —ला परवानगी देणें.

अनुमोदन [**सं०**] **न०** १ रुकार, दुजोरा, संमति. २ परवानगी. ३ आनंद, सहानुभूति, इ० दर्शविणें.

अनुयान [**सं०** अनु+या (जाणें)] **न०** मागून जाणें, अनुसरण.

अनुयायी [**सं०** मागून जातो तो] **वि०** १ अनुचारी; शिष्य, ०च्या मताप्रमाणें वागणारा किं० आचरण करणारा; सेवक, परिचारक. २ ०च्या पक्षाचा; ०च्या मताचा पुरस्कार करणारा. ३ ०च्या पासून उद्भवणारें; ०च्या पासून परिणामरूप निष्पत्ति.

अनुयोग[**सं**०अनु+युज्] **पु०** १ प्रश्न,चौकशी, परीक्षा. २ बोलणें, निंदिणें. ३ प्रयत्न, उद्योग. उ० अनयोगावांचून तिळांपासून तेल उत्पन्न होत नाहीं. ४ ध्यान. ५ टीका, भाष्य.

अनुयोगी [**सं०**] **वि०** १ जोडणारें. २ ०शीं संबद्ध. ३ प्रश्न विचारणारा.

अनुरक्त [**सं०** अनु+रंज् (रंगविणें)]**वि०** १ प्रेमांकित; प्रेमबद्ध; उ० वसंतसेना आर्यचारुदत्तावर अनुरक्त होती.२ ०च्या बद्दल आसक्ति असलेला. (**विरक्त** याच्या उलट).

अनुरक्ति [**सं०**] **स्त्री०** प्रेम, भक्ति,अनुराग, आसक्ति, प्रीति.

अनुरंजक [**सं०**] **वि०** आनंदविणारा; करमणूक करणारा; तोषविणारा.

अनुरंजन [**सं०**] **न०** १ हर्षविणें, ०ची करमणूक करणें, तोषविणें. २ करमणूक, मनोविनोदन.

अनुरणन [**सं०** अनु (मागून) +रणन

(आवाज करणें)]**न०** १ प्रतिध्वनि. २ वाद्य वाजविणें थांबविल्यानंतर त्यांतून कांहीं क्षण निघणारा ध्वनि. ३ वाच्यार्थाहून भिन्न अर्थ जो व्यंग्यार्थ तो दर्शविण्याची शब्दादिकांची शक्ति. हिला 'व्यंजना' म्हणतात.

अनुरति [**सं०** अनु (मागून) + रम् (रमणें)] **स्त्री०** प्रेम, प्रीति, आसक्ति.

अनुराग [**सं०** अनु + रंज् (तांबडें करणें)] **पु०** प्रेम, प्रीति, निष्ठा. (**विराग** याच्या उलट). ॐ **अनुरागी वि०** प्रेम, निष्ठा, मोह, इ० असलेला; प्रेमबद्ध; प्रणयी.

अनुराधा [**सं०** अनु + (मागून) + राधा(एक नक्षत्र म्ह० विशाखा)] **स्त्री०** सत्तावीस जीं नक्षत्रें त्यांपैकीं सतरावें. तें चार ताऱ्यांचें मिळून झालेलें आहे.

अनुरूप [**सं०** रूपाला अनुसरून किं० योग्य] **वि०** १ तुल्य, सदृश. २ तेवढा. ३ अनुकूल. ४ योग्य, साजेसें, शोभणारें.

अनुरोध [**सं०** अनु + रुध् (आडविणें)]**पु०** १ धोरण, कल. २ प्रेरक शक्ति. ३ लावून दिलेली दिशा, सरणि, इ०. ४ विचारांत घेणें. ५ मर्जी संभाळणें. ६ अनुसरणें.

अनुलक्षून [अनुलक्षिणें=पाहाणें, दृष्टीपुढें ठेवणें इ०] **क्रि० वि०** १ उद्देशून, मनांत घेऊन. २ ०च्या संबंधानें. ३ ०च्या अनुरोधानें.

अनुलेप पु०,अनुलेपन न०[**सं०**अनु + लिप् (चोपडणें).] १ उटी, गंध, इ० लावणें. २ तेल, उटणें. ३ लेप लावणें. ४ ज्याचा लेप लावावयाचा तो पदार्थ.

अनुलोम [**सं०**अनु (प्रमाणें) + लोमन् (केश)] **वि०** १ क्रमाला धरून असलेलें. २ अनुकूल. **क्रि० वि०** क्रमाला धरून, शिस्तीनें, योग्य सरणीप्रमाणें. ॐ – **विलोम वि०** कांहीं बाबतींत क्रमाला धरून आणि कांहीं बाबतींत क्रमाला सोडून. —**विवाह पु०** वरच्या जातीचा पुरुष आणि खालच्या जातीची स्त्री यांचा विवाह.

अनुवर्तणें[**सं०**अनु + वृत् + (असणें)]**स०क्रि०** १ ०च्या कलानुसार, मतानुसार, वागणें किं० घेणें; ०ला अनुसरणें; ०शीं अनुरूप असणें; ०ला रुकार भरणें. २ (**व्या०**) पूर्वगामी सूत्र नियम, विधान, इत्यादींतील शब्द प्रस्तुतांत लागू करून घेणें.

अनुवर्तन [**सं०**]**न०** १ मागून जाणें; अनुसरण. २ आज्ञाधारण; सेवा करणें. ३ तोषविणें. ४ संमति. ५ परिणाम. ६ पूर्वगामी सूत्रांतील वगैरे शब्दादिकांचें प्रस्तुत प्रसंगीं लागू करून घेणें.

अनुवर्ती [**सं०**] **वि०** १ अनुसरणारा; मागें असणारा. २ ०च्या मतानुसार वर्तणारा. ३ ०शीं अनुरूप असणारा किं० असलेला. ४ आज्ञांकित; विश्वासू; उ० माया अनुवर्तिनी असावी.

अनुवाद पु०, अनुवादन न० [**सं०** अनु (मागून) + वद् (बोलणें)] १ पुनरुच्चारण. २ स्पष्टीकरणार्थ वगैरे तोच मजकूर निराळ्या शब्दांत पण अर्थहानि होऊं न देतां सांगणें किं० लिहिणें. ३ पूर्वी जें कांहीं कोणी बोलला तेंच आपणही बोलणें किं० प्रतिपादणें, दुजोरा देणें. ४ नक्कल. ५ वायफळ भाषण.

अनुवादणें स० क्रि० १ ०चा अनुवाद करणें. २ कोरडी पोपटपंची करणें.

अनुवृत्ति [**सं०** अनु + वृत् (असणें)] **स्त्री०** १ संमति देणें, पसंति दर्शविणें. २ अनुसरण; आज्ञाधारण; अनुरूप वर्तन. ३ सेवा. ४ अनुकरण. ५ पुनरावृत्ति; परंपरा चालविणें. ६ संतुष्ट ठेवणें. ७ पूर्वगामी नियमादिकांतील शब्द पुन्हा घेणें.

अनुवेल [**सं०**] **क्रि० वि०** पुनःपुन्हां; वारंवार; एक सारखें; सतत.

अनुवास पु०,अनुवासन न०[**सं०**अनु + वास् (सुगंधित करणें)] १ अत्तरें वगैरे लावणें; सुवासित करणें. २ उटणें. ३ पिचकारी. ४ तैलयुक्त बस्ति.

अनुविद्ध [**सं०** अनु + व्यध् (मारणें, भोक पाडणें)] **वि०** १ भोक पाडलेलें. २ वेष्टिलेलें. ३ आच्छादित. ४ व्याप्त; संबद्ध. ५ कोंदण करून बसविलेलें; जडविलेलें; खचित.

अनुव्यवसाय [**सं०** अनु + वि + अव + सो (छेदिणें)] (न्यायांत) प्रत्यक्ष ज्ञानाची जाणीव.

अनुव्याख्यान [**सं०** अनु + वि + आ + ख्या (सांगणें)] **न०** मंत्रादिकांचें विवरण; मंत्रादिकांचें अर्थप्रकाशनपर व्याख्यान.

अनुशासन [**सं०** अनु + शास् (सल्ला देणें, राज्य करणें)] **न०** १ सल्ला, उपदेश, शिकवण, आज्ञा, शिक्षा. २ नियम, कायदा. ३ एखाद्या विषयाचें विवरण किं० विवेचन; ऊहापोह. ४ नियमादिकांचें विवरण, स्पष्टीकरण.

अनुशास्ता [**सं०** अनु+शास् (सल्ला देणें, राज्य करणें)] **पु०** १ नेता, उपदेष्टा, नियंता. २ शासन किं० शिक्षा करणारा; अंमल गाजविणारा.

अनुशीलन [**सं०** अनु+शील् (सत्कारणें, चिंतिणें)] **न०** १ आसक्तिपर अभ्यास; काळजीपूर्वक अध्ययन. २ भक्तिपूर्वक शुश्रूषा.

अनुषंग [**सं०** अनु+संज् (चिकटणें, जोडणें)] **पु०** १ साहचर्य, संबद्धता. २ मिश्रित होणें, मिसळून जाणें; यति, संबंध, संग. उ० मत्कुणाच्या अनुषंगानें हिरा भंगतो अशी तुकारामबुवांची समजूत होती.

अनुष्टुभ् [**सं०** अनु+स्तुभ् (वाखाणणें)] **पु०** १ एक प्रकारचें वृत्त; ज्याच्या प्रत्येक चरणांत आठ आठ अक्षरें असून प्रत्येक चरणांत पांचवें अक्षर लघु, सहावें गुरु असतें आणि दुसऱ्या व चवथ्या पादांत सातवें लघु अक्षर असतें असें एक वृत्त.

अनुष्ठणें [**सं०** अनु+स्था (राहणें)] **स० क्रि०** करणें, आचरणें, प्रारंभिणें, पार पाडणें.

अनुष्ठाता [**सं०** अनु+स्था (राहणें, उभें राहणें, असणें.] **पु०** १ अनुष्ठान करणारा २ देवतांच्या प्रसादार्थ धार्मिक विधि वगैरे करणारा.

अनुष्ठान [**सं०** अनु+स्था (राहणें)] **न०** १ देवताप्रीत्यर्थ अभिषेक, दानधर्म, इ० कृत्यें किंवा विधि करणें. २ अशा तऱ्हेनें जे विधि करितात ते. ३ कोणतेंही महत्वाचें आणि जिकिरीचें काम. ४ करणें; पाळणें; आचरिणें. ५ आज्ञाधारण; ०च्या अनुरूप वर्तन. ६ प्रारंभ, सुरवात. ꠸ **यथा अनुष्ठान तथा सिद्धि** ज्या प्रमाणांत आपण देवताप्रसादार्थ धर्मकृत्यें केलीं असतील त्या प्रमाणांतच आपणांस इष्टप्राप्ति व्हावयाची.

अनुष्ठित [**सं०** अनु+स्थित (स्था=राहणें)] **वि०** केलेलें, आचरिलेलें, पार पाडलेलें, अनुसरलेलें.

अनुसंग [**सं०**] **पु० अनुषंग** ह्याचें हें अपभ्रष्ट रूप. वर पहा.

अनुसंधान [**सं०** अनु+सं+धा (ठेवणें)] **न०** १ रोख; अनुरोध. उ० रामाच्या अनुसंधानानें वागण्यांत तुझें हित आहे. २ लक्ष्य, अवधान; साभिमुखता. उ० माझ्या बोलण्याकडे आपलें अनुसंधान आहे ना ? ३ युक्त संबंध, धागेदोरे, वळणें, (असणें, स्थापित करणें). उ० नेपोलिअननें इंग्रजांविरुद्ध टिपु सुलतानाशींही अनुसंधान बांधलें होतें. ४ हेतु, मतलब. उ० असें करण्यांत त्याचें काय अनुसंधान आहे समजत नाहीं. ५ आख्यान (देवादिकांच्या चमत्कारांच्या वगैरे कथा). उ० आज गोसाव्यानें हरिश्चन्द्राचें अनुसंधान लावलें होतें. ६ युक्ति; धोरण; हिकमत; मसलत; बेत. उ० परीक्षेपूर्वीं सर्व अभ्यास संपतील असें अनुसंधान ठेव. ७ चौकशी, तपासणी. ८ व्यवस्थित रीतीनें जुळणें, रचण (एखाद्या विवेचनांतील विधानादिकांचे वगैरे). ९ सुव्यवस्था राखणें. उ० या दुर्गानुसंधानाच्या कामीं कोण लोक नियुक्त करावे? १० (न्यायांत) पंचावयवी वाक्यांतील जो उपनय तो. हे पंचावयव येणें प्रमाणें:— प्रतिज्ञा, हेतु, उदाहरण, उपनय, आणि निगमन.

अनुसंधानी [**सं०**] **वि०** १ चतुर. २ हिंकमती, धोरणी, युक्तिबाज, धूर्त; योग्य वळणें किं० संबंध असलेला किंवा जोडणारा. ३ आख्यान लावणारा (गोसावी, हरिदास).

अनुसरण [**स०** अनु+ सृ (सरणें)] **न०** १ अनुकरण करणें. २ आनुरूप्य. ३ अंगीकार, स्वीकार.

अनुसरणें [**सं०** अनु (मागून)+सृ (सरणें, जाणें] **स० क्रि०** १ ०च्या मागें जाणें; ०चें अनुकरण करणें; ०शीं अनुरूप असणें; ०ला धरून असणें. २ पथकरणें, स्वीकारणें, अंगीकारणें.

अनुसार [**सं०** अनु+सृ (सरणें, जाणें)] **पु०** १ सदृश किं० अनुरूप वर्तन, क्रम, सरणी, इ०. २ मागून जाणें. ३ पाठलाग. ४ अनुसरणें. ५ नियम. ६ स्वभाव. ७ परिणाम. टीप—हा शब्द मराठींत सामासिक शब्दाचें उत्तर पद असतो तेव्हां तो " अनुसारें " ह्याचा अपभ्रंश असून त्याचा अर्थ **क्रि० वि०** प्रमाणें होतो. उ० उपदेशानुसार (म्ह० उपदेशाला अनुसरून); अनुभवानुसार (अनुभवाप्रमाणें) इ०. अन्नानुसार बुद्धि ह्म० ज्याचें आपण अन्न खातों त्याचेंच आपण अनुकरण करितों, त्याचाच कित्ता गिरवितों, किंवा त्याच्याच मताप्रमाणें वागतों.

अनुसारी [**सं०**] **वि०** १ ०च्या मागें जाणारा, ०चें अनुकरण करणारा, ०च्या मता-

प्रमाणें वागणारा. २ ०शीं जुळणारें किं० अनुरूप असणारें; ०ला धरून असणारें.

अनुसृत[सं० अनु+सृत (गेलेला)]**वि०**अनुगत; अनुकृत, ०शीं अनुरूप असलेलें; अनुसरलेलें; पथकरलेलें; स्वीकारलेलें.

अनुस्तरणी [सं० अनु+स्तृ (आच्छादणें)] **स्त्री०** उत्तर क्रियेंत मृताला वैतरिणी नदी तरावयासाठीं दिलेली गाय.

अनुस्यूत[सं०अनु+सिव्(जोडणें,शिवणें)]**वि०** १ अखंड.२ अखंडपणें विणलेलें;शिवलेलें.३ जोडलेलें, संबद्ध, गुंफिलेलें. ४ पूर्णपणें मिश्रित. ५ व्यापणारें.

अनुस्यूति [सं० अनु+सिव् (शिवणें, बांधणें)] **स्त्री०** अखंडित गति.

अनुस्वार [**सं०** अनु+स्वर(=स्वार) स्वरांना अनुसरणारा] **पु०** एखाद्या वर्णाचा नाकांत उच्चार करावयाचा असतां त्या वर्णावर जें आपण टिंब देतों तें. उ० " गंध " या शब्दांत " गं"हें अक्षर अनुस्वारित आहे.

अनुहत [**सं०** अनु+हन् (मारणें)] **वि०** सतत किं० अखंडितपणें चालणारा; अव्याहत. **क्रि० वि०** न खळतां, न थांबतां.

अनुक्षणीं [**सं०** अनु+क्षण] **क्रि० वि०** प्रत्येक क्षणीं, प्रतिक्षणीं.

अनूढ पु०,अनूढा स्त्री०[**सं०** अ, अन्+वह् (नेणें)] अविवाहित.

अनुज्ञा [**सं०** अनु+ज्ञा (जाणणें)] **स्त्री०** १ आज्ञा; हुकूम. २ परवानगी, मोकळीक.

अनुज्ञात [**सं०**] **वि०** १ आज्ञापिलेला. २ परवानगी किं० मोकळीक दिली आहे ज्याला.

अनूद्देश [**सं०** अ, अन्+उत्+दिश् (दाखविणें)] **पु०** पूर्वी कांहीं एका क्रमानें सांगितलेल्या वस्तूंचें त्याच क्र मानें वर्णन करणें. (हें यथासंख्य अलंकारांत केलेलें असतें. पुढें **यथासंख्य** पहा).

अनून [**सं०** अ, अन्+ऊन (कमी)] **वि०** १ कमी नसलेला, हलका नसलेला, हीन नसलेला. २ पूर्ण, समग्र; विस्तृत; मोठा. ३ सर्व हक्क किं० अधिकार असलेला.

अनूरु [**सं०** अ, अन्+ऊरु (मांडी)] **पु०** सूर्याचा सारथि अरुण. (याला मांड्या नव्हत्या; हा गरुडाचा थोरला भाऊ).

अनृण, अनृणी [**सं०**अ,अन्+ऋण(कर्ज)] **वि०** १ कर्ज नसलेला, अऋणी. २ ऋणमुक्त. प्रत्येक मनुष्यास तीन ऋणें असतात,—ऋषींचें,देवांचें आणि पितरांचें. विद्यार्जनानें, यज्ञानीं, व पुत्रोत्पादनानें हीं ऋणें फेडावयाचीं असतात.

अनृत[**सं०** अ, अन्+ऋत (सत्य)] **वि०** खोटें, असत्य. **न०** खोटें भाषण, असत्य बोलणें.

अनेक [**सं०** अ, अन्+एक] **वि०** एकाहून अधिक; पुष्कळ, नाना. ० **अनेकधा क्रि० वि०** पुष्कळ प्रकारें, बहुत तऱ्हेनें. **अनेकदा, अनेकवार क्रि० वि०** पुष्कळ वेळां. **अनेकचर वि०** एकएकटे न राहतां कळप करून राहाणारे प्राणी. **अनेकवचन न०** एकाहून अधिक संख्या दाखविणारें जें शब्दाचें रूप तें. बहुवचन. उ० ' टोपी ' या शब्दाचें अनेकवचन ' टोप्या. ' **अनेकवादी वि०** पाखंडी मताचा. **अनेकशः क्रि० वि०** पुष्कळ वेळां, पुष्कळ प्रकारें. **अनेकवर्णसमीकरण न०** ज्या समीकरणांत दोन किंवा दोहोंहून अधिक अज्ञात संख्या असतात तें.

अनैकांतिक [**सं०**] **वि०** १ अस्थिर; चंचल. २ मूळ मुद्यास सोडून असलेलें; गौण. ३ (न्यायांत) असिद्ध, विरुद्ध, अनैकांतिक, प्रकरणसम, आणि कालात्ययापदिष्ट, या पांच हेत्वाभासांपैकीं एक. साध्याविषयीं संशय उत्पन्न करण्याला जो कारणीभूत होतो तो, किंवा जो व्यभिचारयुक्त असतो, तो अनैकांतिक होय.

अनैक्य [**सं०** 'अनेक' पासून] **न०** १ विविधता, वैचित्र्य, नानात्व. २ बेकी, दुही. ३ घोटाळा, अव्यवस्था, अंदाधुंदी. ४ दंगाधोपा.

अनोठा [**हिं०** अनूठा] **वि०** १ चमत्कारिक, नवीन, आश्चर्यकारक. २ विशेष प्रचारांत नसलेले संगीतांतील राग. उ० मलीकखानानें आज दोन आनोठे राग गायिले.

अनोपत [**सं०** अनुपपत्ति] गांवांतील किं० घरांतील पुष्कळ माणसें एके काळीं दुखणाईत पडणें ही स्थिति. उ० आमच्या कुटुंबावर (किं० गांवावर) हल्लीं मोठी अनोपत कोसळली आहे.

अनोळखी [**म०** अ+ओळख] **वि०** १ नवखा; ओळखीचा किं० माहितीचा नसलेला. २

अपरिचित; अपूर्वज्ञात. ३ कोणाची ओळखदेख किं० माहिती नसलेला (परस्थ इसम वगैरे).

अनौचित्य [सं० अ, अन् + औचित्य ('उचित' याचें भाववाचक नाम)] न० अयुक्तता, असार्थता, अयोग्यता. उ० अनौचित्यासारखें रसभंगाचें अन्य कारण नाहीं.

अनौती वि० } दुसरी. † ज्ञा० }.

अन्न [सं० अद्=खाणें] न० १ शरीरपोषणार्थ प्राणिमात्र जें जें कांहीं खातात तें; खाद्य पदार्थ. २ चरितार्थाचीं साधनें. ३ धान्य. ४ पृथ्वी. ☙ **अन्नकूट** पु० बलिप्रतिपदेच्या दिवशीं गोवर्धनास दिलेला अन्नराशि. **अन्नकोश (–ष)** पु० शरीर. **अन्नगुरु** पु० १ खादाड (मनुष्य). २ अतिवृद्ध माणूस. ३ अर्भक. **अन्नच्छत्र** न० १ अतिथिजनांना, मार्गस्थांना, वगैरे जेथें जेवावयास घालतात तें ठिकाण. २ अन्नदान. याचें शुद्ध रूप **अन्नसत्र**. ☙ **अन्नसत्रीं जेवणें आणि मिरपूड मागणें** जेथें आपल्या पदरचे पैसे खर्च न होतां आपली साधारण सोय होत आहे तेथें श्रीमंतीचे चोचले अपेक्षिणें (हा मूर्खपणा होय). **अन्नदाता** पु० अन्न देणारा; चरितार्थाचीं साधनें मिळवून देणारा; अन्नास लावणारा. **अन्नदेवता** स्त्री० अन्नाची अधिष्ठात्री देवता. **अन्नद्वेष** पु० अन्नाचा वीट येणें, अन्न नकोसें वाटणें. **अन्नपाणी** न० जीवनाच्या आवश्यक गोष्टी. **अन्नपूर्णा** स्त्री० १ दुर्गा, पार्वती. २ (विनोदानें) स्वयंपाकीणबाई. ३ भिक्षा मागावयाची झोळी. ४ पाणी प्यावयाचें एका विशिष्ट आकाराचें भांडें. हें काशीस दिसतें; त्याला **अन्नपूर्णी** असेंही म्हणतात. **अन्नमय** वि० १ अन्नानें भरलेलें किं० परिपूर्ण. २ अन्नजन्य चेतनेनें परिप्लुत. **अन्नमय प्राण आणि प्राणमय पराक्रम** अन्न मिळाल्यास प्राण तगतात, आणि प्राण तगल्यास पराक्रम करतां येतात. **अन्नमयकोश** पु० आत्म्याभोंवतीं ज्यांचें आवरण आहे अशा पंचकोशांपैकीं पहिला म्ह० स्थूलदेहात्मक कोश; स्थूल शरीर. पंचकोशांचीं नांवें येणेंप्रमाणें:— अन्नमयकोष (स्थूलशरीर), प्राणमयकोष, मनोमयकोष, विज्ञानमयकोष, आणि आनंदमयकोष. **अन्नरस** पु० अन्न हा पदार्थ. उ० रोग्याचे पोटांत अन्नरस गेल्याशिवाय त्याला हुषारी वाटणार नाहीं.

अन्नवस्त्र न० १ पुरेसें खाणेंपिणें व कपडालत्ता; जीवनार्थ अत्यावश्यक असणारें अन्न व वस्त्र. २ पोटगी. **अन्नविकार** पु०, **अन्नविकृति** स्त्री० १ अपचनामुळें पोटांत झालेली नादुरुस्ती. २ अन्नाचा वीट किंवा शिसारी. ३ अन्नाचें रूपांतर. ४ शुक्रस्खलन, शुक्रच्युति. ५ शुक्र. **अन्नव्यवहार** पु० कोणासमवेत अन्न ग्रहण करावें वा न करावें यासंबंधींची रूढि, नियम, इ०. **अन्नशांति** स्त्री० क्षुधितांना वगैरे अन्नदान करणें. **अन्नशुद्धि** स्त्री० जेवतांना आपण पहिल्या भातावर जें तूप घेतों तें. याचीं **अनशूध, अनशुद्ध**, हीं अपभ्रष्ट रूपें होत. **अन्नसंतर्पण** न० अन्नदान. **अन्नसत्र** न० मागें **अन्नच्छत्र** पहा. **अन्नसंपर्क, अन्नसंस्कार** पु० नेहमींप्रमाणें जेवण; (प्रवासांतील वगैरे जें खाणें होतें तसलें नव्हे). उ० गलबतांत बसल्यापासून आठव्या दिवशीं बंदरास लागलों तेव्हां अन्नसंपर्क (किं० अन्नसंस्कार) झाला. **अन्नान्नगति, अन्नान्नदशा** स्त्री० अत्यंत निकृष्टावस्था. **अन्नाशय** पु० पोट. **अन्नोदकऋणानुबंध** पु० अन्न, उदक, इ० दिल्याघेतल्यामुळें झालेला संबंध. **अन्न अन्न करणें** किं० **करीत फिरणें** अन्न द्या, अन्न वाढा, अशी याचना करीत दारोदार हिंडणें; अन्नाच्या अभावीं हैराण होणें. **अन्न परब्रह्म** अन्न हेंच परमदैवत; अन्नाशिवाय दुसरें कांहीं महत्त्वाचें नाहीं. **अन्न तुटणें** आजारामुळें भूक नाहींशी होऊन आहार कमी कमी होत जाणें. **अन्नावर अन्न आणि वस्त्रावर वस्त्र** खावयाला मुबलक अन्न आणि ल्यावयाला मुबलक चिरगुटें. **अन्नाआड येणें** एकाद्याच्या चरितार्थाच्या साधनांची हानि करणें, तीं त्याच्यापासून हिरावून घेणें, त्याला तीं मिळूं न देणें. **अन्नाचा मारलेला खालीं पाही, तरवारीचा मारलेला वर पाही** आपण एकाद्याचा प्रतिपाळ केला तर तो आपल्याशीं नम्रपणें वागतो, पण जर त्याच्याशीं आपण जबरदस्तीनें वागून त्याच्यावर अमल गाजवूं, तर तो आपल्याशीं उद्धटपणानेंच वागणार. **अन्नाची लाज धरणें** कोणी परोपकारबुद्धीनें आपणाला खाऊं पिऊं घालून आपला प्रतिपाळ केला असला तर त्या खाल्लेल्या अन्नाबद्दल आपण कृतज्ञ असणें आणि त्याचे उतराई होण्याकरतां झटणें. **अन्नाचें खोबरें होणें** दुष्काळ पडणें (कोंकणांतील वाक्प्रचार). **अन्नाचें**

पाणी करणें कोणी जेवावयाला बसला असतां त्याला कांहीं वाईट बातमी सांगून त्याच्या भोज-नाची सुखकरता नाहींशी करणें. **अन्नाच्या पाठीं लागणें** उपजीविकेची किं० चरितार्थाची सोय पाहणें. **०च्या अन्नांत माती कालविणें** ०चा चरितार्थाचा साधनें नाहींशीं करणें. **अन्नास जागणें** ज्या माणसाचें अन्न खालें त्याच्याशीं इमानानें वागणें. **अन्नास महाग. अन्नास मोताद** जीवनाला आव-श्यक अशाही गोष्टी ज्याच्यापाशीं नाहींत असा; अत्यंत निकृष्टावस्थेस जाऊन पोंचलेला. **एकाद्याला अन्नास लावणें** त्याला चरितार्थाचीं साधनें मिळवून देणें; नोकरी, कामधंदा, वगैरे लावून देणें.

अन्य [सं०] **वि०** १ निराळा; भिन्न; इतर; ०च्याहून व्यतिरिक्त. ॐ**अन्यच्च क्रि०वि०**शिवाय; आणखी शिवाय. आणखी दुसरें असें कीं. **अन्यतम वि०** अनेकांपैकीं कोणतेंही एक; कोणतेंही. **अन्यतर वि०** १ दोहोंपैकीं कोणतेंतरी एक; हें किंवा तें. २ इतर, भिन्न. **अन्यत्र क्रि० वि०** १ दुसरीकडे. २ दुसऱ्या प्रसंगीं. ३ ०च्या शिवाय, खेरीज. **अन्यपूर्वा** [**सं०** अन्य (दुसरा) पति पूर्वी ठरला होता जीचा] **स्त्री०** ज्या स्त्रीचें पूर्वी एका-द्याशीं लग्न ठरलेलें असतां दुसऱ्याशींच लग्न होतें अशी स्त्री. **अन्यभृत पु०** कावळा. (त्याची मादी कोकिळांचीं अंडीं आपलीं म्हणून भ्रांतीनें उबवितें अशा समजुतीवरून. कोकिळेस परभृत म्ह० दुसऱ्यानें वाढविलेली, असें नांव पडलें आहे). **अन्यमनस्क, अन्यमानस वि०** १ दुसऱ्याच विषयाविषयीं जो चिंतन करीत आहे असा; ज्याचें चित्त ठिकाणा-वर नाहीं असा; असावधान. उ० दुर्वास ऋषि आश्र-मांत आले तेव्हां शकुन्तला अन्यमानसा होती. २ चंचल. ३ भूतबाधा झालेला. **अन्यवादी वि०** १ खोटी साक्ष देणारा. २ प्रतिवादी. **अन्यव्रत वि०** १ वेदोक्त देवतार्चन व विधि न पाळणारा. २ नास्तिक; पाखंडी. ३ विधर्मी; **अन्यसाधारण वि०** इतर गोष्टीनाही लागू पडणारें; अन्य वस्तूंतही सारखेंच आढळणारें.

अन्यथा [सं०] **क्रि०वि०** १ अन्य प्रकारें; अन्य मार्गानें. २ एरव्हीं; तसें न केल्यास; तसें न झाल्यास; नाहीं तर. ३ खोटेपणानें; अन्याय्यपणें; असत्यपणें; वस्तुस्थितीचा विपर्यास करून. उ० जो न्यायाधीश अन्यथा न्याय देतो तो नरकांत पडतो. ४ दुसऱ्या हेतूमुळें; अन्य कारणांमुळें. उ० दुर्वासाच्या शापा-मुळेंच ह्या अंगठीला तें विसंबल्यांस. अन्यथा नव्हे. ॐ**अन्यथा करणें** जें कोणी कांहीं केलें असेल त्याच्या उलट करणें; मोडणें; उलथून पाडणें; बदलणें. उ० कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं समर्थ एक ईश्वर च; उ० माझी इच्छा अन्यथा करूं नको. **अन्यथा होणें** खोटें, असत्य, किं० उलट, होणें किं० ठरणें. उ० माझें वचन अन्यथा होणें शक्य नाहीं. **अन्यथाभाव पु०** १ बदल, फरक, बिघडणें, ऱ्हास, अपकर्ष. २ वृत्तान्त, मतांत, मतांत, उ० फरक. **अन्यथावृत्ति वि०** वृत्तांत फरक किं० चलबिचल झालेला, मनोविकारांनी पीडित. **अन्यथासिद्ध वि०** १ चुकीनें किं० अयुक्तिक कारणांनीं स्थापित केलेलें. २ (न्यायांत) एखाद्या कार्यनिष्पत्तीच्या बाबतींत केवळ उपाधिवत् असणारें, किंवा अनावश्यक अस-णारें, कारण. उ० घट या कार्योत्पादनीं रासभानें माती आणली म्हणून रासभ हा घटकार्याचें कारण नव्हे; कारण माती आणण्याचें काम दुसऱ्या कोणा-कडूनही करवितां आलें असतें. म्हणून घटाच्या संबंधानें रासभ हा अन्यथासिद्ध (कारण) होय. **अन्यथास्तोत्र न०** उपरोधिक भाषण.

अन्यदा [सं० अन्य+दा (प्रत्यय)] **क्रि० वि०** १ दुसऱ्या वेळीं; दुसऱ्या प्रसंगीं. २ एकदा; कोणे एके वेळीं.

अन्यदीय [**सं०** अन्य+प्रत्यय] **वि०** १ दुसऱ्याचें; दुसऱ्याच्या मालकीचें; परकीय. २ दुसऱ्यावर अवलंबून असणारें.

अन्याय [**सं०** अ नकारात्मक+न्याय] **पु०** १ न्यायास, कायद्यास, किं० धर्मास, सोडून अस-लेलें वर्तन. २ खोटा निकाल; पक्षपाताचा फैसला. ३ गुन्हा, पाप; अनीतीचें वर्तन; गैरशिस्त वागणूक.

अन्यायी [**सं०** अन्याय+ई (मराठी प्रत्यय)] **वि०**) १ नीतीस, धर्मास किं० कायद्यास, सोडून आच-रण करणारा; अनीतिमान. २ न्यायाला विरोधी.

अन्यून [**सं०** अ+ न्यून (कमी)] **वि०** १ व्यंग किं० कमीपणा नसलेलें. २ पूर्ण, सर्वंथ.

अन्योक्ति [**सं०** अन्य+उक्ति] **स्त्री०** व्याज-पूर्ण भाषण. हा शब्द मराठींत खालील अर्थी कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं रूढ केला. ' ज्यावि-

घर्या किंवा ज्यास बोलावयाचें त्यापेक्षां निराळ्या विषयां किंवा निराळ्यास बोलणें.' ज्याला संस्कृत आलंकारिकांनीं **अप्रस्तुतप्रशंसा** हें नांव दिलें आहे त्याला **अन्योक्ति** हें नांव शास्त्रीबोवांनीं दिलें. विषेश माहितीसाठीं आमचें "अर्थालंकारांचें निरूपण" पहा.

अन्योन्य [सं०] **सर्व०** एकमेक, परस्पर, उभय. **पु०** दोन वस्तूंपैकीं एक दुसरीस आणि दुसरीं पहिलीस उपकारक झाल्याचें वर्णन असतें तेथें 'अन्योन्य' हा अर्थालंकार होतो. दोन वस्तूंची परस्परांवर एकच प्रकारची क्रिया घडून एकच प्रकारचें कार्य घडत असल्याचें ह्या अलंकारांत वर्णन असतें. आमचें "अर्थालंकारांचें निरूपण" पहा. ॐ **अन्योन्याभाव पु०** (न्यायांत) पूर्ण भेद. **अन्योन्याश्रय पु०** परस्परावलंबित्व. **अन्योन्योक्ति स्त्री०** संभाषण. **अन्योन्यपक्षनयन न०** (**ग०**) संख्या एका पक्षांतून दुसऱ्यांत नेणें. { **अन्योन्यविण वि०** गैरशिस्त. **तुका०** † }.

अन्वय [**सं०** अनु (मागून)+अय (ई=जाणें)] **पु०** १ मागून जाणें. २ अनुचर. ३ योग, संबंध, जुळणी. ४ (**व्या०**) शब्दांचा परस्परांशीं योग्य संबंध; (कर्ता, कर्म, यांशीं क्रियापदाचा, विशेष्याशीं विशेषणाचा, इ०). ५तात्पर्य. ६कुटुंब, वंश, कुल; उ० श्रीराम सूर्यान्वयांतील एक राजा होता. ७ कार्यकारणसंबंध. ८ पद्यांतील शब्दांची गद्य रूपांत मांडणी. ९ (**न्याय**) नित्य साहचर्य. १० { प्राप्ति; स्थिति; अणूपासून ब्रह्मापर्यंत आत्मस्थिति. † **ज्ञाने०** }. ॐ**अन्वयागत वि०** परंपरागत. **अन्वयज्ञ पु०** वंशावळ जाणणारा. **अन्वयव्याप्ति स्त्री०**जेथें हेतु असतो तेथें साध्य असतें ह्या विधानाला 'अन्वयव्याप्ति' म्हणतात; उ० 'जेथें धूम असतो तेथें वन्हि असतो;' ह्या उदाहरणांत अन्वयव्याप्ति आहे. 'जेथें वन्हि नसतो तेथें धूम नसतो' ह्या उदाहरणांत 'व्यतिरेकव्याप्ति' आहे. वन्हि आणि धूम ह्या जोडीसंबंधानें अन्वयव्याप्ति आहे आणि व्यतिरेक व्याप्तिही आहे. येथें धूम हा **अन्वयव्यतिरेकी** हेतु आहे.

अन्वर्थ, अन्वर्थक [**सं०** अनु (प्रमाणें)+अर्थ+क (प्रत्यय)] **वि०** १ अर्थास धरून असलेला; अर्थानुसार; यथार्थ; सार्थ; नांवावरून गुणादिबोध करणारें. २ नांवाच्या लायक कि० योग्य.

अन्ववाय पु० कुळ; वंश.

अन्वष्टका स्त्री० मार्गशीर्ष, पौष, माघ, आणि फाल्गुन, ह्यांची वद्य नवमी.

अन्वाख्यान [**सं०**अनु+आ+ख्या (सांगणें)] **न०** स्पष्टीकरणार्थ पुन्हा सांगणें.

अन्वाधेय,अन्वाधेयक [**सं०** अनु+आ+धा (ठेवणें)] **न०** स्त्रीधन; विवाहोत्तर सासरचें किंवा माहेरचें जें द्रव्य स्त्रियांना मिळतें तें.

अन्वारंभ [**सं०** अनु+आ+रभ् (उत्सुक होणें)] **पु०** यजमानाला स्पर्श करणें (तो जो विधि करीत असेल त्याचा फलांश मिळावा म्हणून).

अन्वारोहण [**सं०** अनु+आ+रोहण (रुह्=चढणें, उगवणें)] **न०** अनुमरण; सती जाणें.

अन्वाहार्य [**सं०** अनु+आ+हार्य(हृ=हरणें)] **पु०, न०** १ मासिक पितृश्राद्ध. २ ऋत्विजांना देण्याचें अन्न.

अन्वित [**सं०** अनु+इत (गेलेला; इ=जाणें)] **वि०**१ ०नें अनुगत;०शीं जोडलेलें;०च्या सहित. २ ०नें संपन्न, कि० परिपूर्ण (जसें, मदान्वित, क्रोधान्वित, इ०). ३ व्याकरणदृष्ट्या जोडलेलें.

अन्वेषण [**सं०** अनु+इष् (जाणें, ढकलणें)] **न०** १ चौकशी; तपासणी; माग; तलास; शोध; संशोधन. २ पाळथ ठेवणें. ३ पाठलाग.

अन्वेषणें [**सं०**अन्वेषण पासून]**स०क्रि०** ०ची चौकशी कि० तपासणी करणें; ०चा माग लावणें; शोधणें.

अन्वेष्टा [**सं०**] **पु०** शोधणारा; तपासणारा.

अन्वेषी वर **अन्वेष्टा** पहा.

अप् [**सं०**] **स्त्री०** पाणी. संस्कृतमध्यें हा शब्द नेहमीं अनेकवचनीं योजितात, मराठींत 'आप्' हें रूप रूढ झालें आहे.

अप [**सं०**] **अ०**नामांच्या किंवा क्रियापदांच्या पूर्वी हें अव्यय लागतें, व त्याचे अर्थ खालीलप्रमाणें होतात. १ वियोग, (जसें, अपकृष्ट).२ विकृति, कमीपणा, हीनता, (जसें, अपकीर्ति). ३ विपरीतता, (जसें, अपपाठ). ४ निदर्शन. ५ वर्जन, (जसें, अपकल्मष म्ह० कल्मषरहित).

अपकरा, अपखरा [**फा०** आबूखुराह्=पाणी

प्यावयाचें पात्र] तोंटी असलेलें पाणी प्यावयाचें भांडें (झारीसारखें).

अपकर्ष पु०, अपकर्षण न० [**सं०** अप+कृष् (ओढणें)] १ ऱ्हास; अवनति. २ त्याला किं० वा त्याला ढकलणें. ३ पुढें करावयाचें धर्मकृत्य आधीं करणें. ४ पुढें आलेल्या किं० येणारा शब्द अर्थासाठीं आधीं घेणें. ५ मागें टाकणें.

अपकर्षणें [**सं०**] अगोदर किं० आधी घेणें किं० करणें.

अपका [**सं०** अप् (पाणी) यापासून] पाणी, दूध, किं० दुसरा कोणताही पातळ पदार्थ शिजत असलेल्या त्यायाद पदार्थावर शिपडणें (देणें, मारणें, टाकणें इ०).

अपकार पु०, अपकृति स्त्री० [**सं०** अप+कृ (करणें)] १ दुखापत. २ दोष, गुन्हा, अपराध. ३ दुसऱ्याचें वाईट किं० अनिष्ट चिंतणें. ४ दुष्टपणा, जुलूम. ५ वैर. ‍ –**शब्द पु०** शिवी.

अपकारक, अपकारी [**सं०**] **वि०** १ इजा, दुखापत, किं० हानि करणारा. २ अनिष्ट परिणाम करणारा.

अपकीर्ति [**सं०** अप+कृत् (सांगणें)] **स्त्री०** १ बदनामी; बदलौकिक.

अपकृष्ट [**सं०** अप+कृष् (खेंचणें)] **वि०** ओढून नेलेला. २ दूर नेलेला. ३ वश, स्वाधीन. ४ हलक्या दर्जाचा; नीच. ५ दूरस्थ.

अपंक्त [**सं०** अ (नाहीं)+पंक्ति (ओळ) ज्याला] १ पंक्तींत ज्याला स्थान नाहीं असा. २ जातींतून बाहेर टाकलेला; बहिष्कृत; वाळींत टाकलेला. ३ ज्याच्या शेजारीं जेवावयाला बसणें शास्त्रनिषिद्ध किं० रुढिनिषिद्ध आहे असा.

अपक्रम [**सं०** अप+क्रम् (चालणें)] **वि०** १ क्रमाला सोडून असलेला. २ अनियमित. **पु०** निघून जाणें; पळून जाणें; (वेळ) निघून जाणें.

अपक्रमण न० वर **अपक्रम** पहा.

अपक्राम पु० वर **अपक्रम** पहा.

अपक्रांत [**सं०** अप+क्रांत (निघून गेलेला)] निघून गेलेला; पळून गेलेला.

अपक्क [**सं०** अ (नाहीं)+पक्क (पिकलेला)] **वि०** १ परिपक्क न झालेला; न पिकलेला. २ अननुभविक. ३ हिरवा कच्चा.

अपंग [**सं०** अप+अंग (गात्र, अवयव) अशुद्ध पण रूढ समास] **वि०** १ शरीरानें उणा: ज्याचें एक गात्र किं० कांहीं गात्रें कमी आहेत असा; (थोटा, लंगडा, एका किं० दोन्ही डोळ्यांनीं आंधळा, इ०). २ स्वताचीं कामें स्वतः करावयाला असमर्थ.

अपंगणें [**म०** आप (आपला) + अंग (आपल्या अंगाप्रमाणें प्रिय मानणें)] १ एकाद्या माणसाला जवळ करणें किं० आत्मीय समजणें. २ ०चें पालन, पोषण, किं० सांभाळ करणें.

अपगत [**सं०** अप (दूर) +गत (गेलेलें; गम् = जाणें)] **वि०** १ गेलेलें. २ विभक्त किं० वियुक्त झालेला.

अपघात [**सं०** अप+घात (हन् = मारणें)] **पु०** १ अचानक झालेली इजा, नुकसान, हानि, वगैरे. २ अशा तऱ्हेनें झालेल्या इजा, नुकसान, हानि, वगैरें पासून ओढवलेलें किंवा ओढवणारें मरण; अपमृत्यु.

अपचय [**सं०** अप+चय (चि = गोळा किं० जमा करणें)] **पु०** १ नुकसान. २ ऱ्हास; अवनति; कमी होणें. ३ पराजय. ४ (फुलें इ०) गोळा करणें किं० जमाविणें.

अपचार [**सं०** अप+चार (चर् = जाणें)] **पु०** १ प्रयाण. २ अभाव. ३ मरण. ४ अपराध, गुन्हा. ५ व्यंग. ६ इजा. ७ अपयश. ८ अडथळा. ९ कुपथ्य.

अपचित [अप+चित (चि = गोळा करणें)] **वि०** १ कृश. २ पूजित, श्रेष्ठ.

अपचिति [अप+चिति (चि = गोळा करणें)] **स्त्री०** १ ऱ्हास, तोटा, अपकर्ष. २ खर्च, व्यय. ३ प्रायश्चित. ४ सूड. ५ ऋणाची फेड. ६ पूजा; आदर दाखविणें. ७ पराजय.

अपछाय [**सं०** अप+छाया] **वि०** १ छायारहित. २ अंधक.

अपच्छाया [**सं०** अप (वाईट)+छाया] **स्त्री०** १ अपशकुनी छाया. २ भूत, पिशाच.

अपजय [**सं०** अप (प्रतिकूल)+जय] पराजय, पराभव.

अपजात [**सं०** अप+जात (उत्पन्न झालेला)] **वि०** आईबापांहून कमी गुणांचा पुत्र.

अपजाळ स्त्री० खोटा आरोप; निराधार तोहमत.

अपटणें, आपटणें स० क्रि० १ आदळणें; कशावर तरी जोरानें ढकलून देणें. २ वादांत पराभूत करणें. अ० क्रि० १ जोरानें पडणें. २ कशाच्या तरी योगानें एकदम गति कुंठित होणें. ॐ **अपटणें धोपटणें** जोराजोरानें तडाखे मारणें.

अपटा पु० वृक्षविशेष (दसऱ्याचे दिवशीं याचीं पानें सोनें म्हणून एकमेकांना देतात). संस्कृत,– अश्मन्तक.

अपटी स्त्री० १ व्यापारांत किं० कोणत्याही व्यवहारांत ठोकर बसणें. २ आपटणें.

अपंडित [सं० अ+पंडित] पु० जो पंडित नव्हे तो; मूर्ख.

अपतिव्रता [सं० अ+पति+व्रत] स्त्री० १ जी पतिव्रता नाहीं अशी स्त्री; अनाज्ञाधारक पत्नी. २ व्यभिचार करणारी पत्नी.

अपत्नीक [सं० अ+पत्नी+क (प्रत्यय)] वि० १ज्याचें लग्न झालें नाहीं असा पुरुष. २ ज्याची पत्नी मृत झाली आहे असा पुरुष; विधुर.

अपत्य [सं०] न० १ मूल. २ वडील माणसाला पत्र लिहितेवेळीं मायन्यांत स्वताला लावून घ्यावयाचा नम्रपणाचा द्योतक शब्द. ॐ —**वाचक** वि० बापाच्या नांवावरून उत्पन्न झालेलें किं० साधलेलें मुलाचें किं० मुलीचें नांव. उ० दशरथ, दाशरथि (राम); जनक, जानकी (सीता); पंडु, पांडव.

अपत्रप [सं० अप (नाहीं)+त्रपा (लाज) ज्याला] वि० निर्लज्ज; बेशरम.

अपथ [सं० अ (चुकीचा)+पथ (मार्ग)] १ भलताच छ० चुकीचा मार्ग; कुपथ. २ चालीरीतींना किंवा शिष्टाचाराला विरुद्ध वर्तनक्रम. ॐ— **गमन** न० चुकीच्या किं० शिष्ट मार्गाला विरुद्ध असलेल्या मार्गानें जाणें. इतर समास, **अपथगामी अपथचारी, अपथवर्ती,** इ०.

अपथ्य [सं० अ (चुकीचें किं० भलतेंच) + पथ्य (हितकरवस्तुसेवन)] न० १प्रकृतीला न मानवणारीं खाद्यें आणि पेयें. २ वरील प्रकारच्या वस्तूंचें सेवन किं० उपभोग.

अपदागीर, अपदागिरी, आबदागीर [फा० आफ्ताब् (सूर्य)+गीर् (गिरफतन्=धरणें, आडविणें)] स्त्री० उंची कापडाची छत्री,–जी राजाच्या डोक्यावर किं० मंगल प्रसंगीं शोभेसाठीं मिरवणुकीबरोबर नेली जाते. (तिला रेशमाचे गोंडे, झालरी, मोत्यांचे सर, इ० लावलेले असतात).

अपदार्थ [सं०अ+पदार्थ] पु० १ अभाव २ वाक्यांतील शब्दांचा अर्थ नव्हे तो.

अपदेवता [सं० अप+देवता] स्त्री० भूत, पिशाच इ०.

अपदेश [सं० अप+देश (दिश्=दाखविणें)] पु० १ सांगणें, ०चा उल्लेख करणें. २ कपट, लबाडी. ३ सबब, मिष, बाहाणा. ४ सोंग, वेष. ५ नांव. ६ (**न्यायांत**) कारण सांगणें. ७ नेम धरण्याचें निशाण.

अपधाक [स० आपलाच स्वताचा धाक] पु० कारण नसतां म्हणजे उगीचच्या उगीच वाटत असलेली भीति; आपणाला उपद्रव करावा अशी दुसऱ्याची मुळींच इच्छा नसतां त्याच्या विषयीं जी खोटी भीति वाटते ती.

अपनय [सं०अप (दूर)+नय (नी=नेणें)] पु० १ दूर नेणें. २ ०चें निवारण करणें. ३ खंडन. ४ मूर्खपणा. ५ अपकार. ६ अनीति, दुर्वर्तन. ७ अन्याय.

अपनयन [सं० अप (दूर)+नयन (नी= नेणें)] न० १ ०चा अपहार करणें. २ दूर नेणें. ३ कर्ज फेडणें. ४ वजा करणें. ५ अन्याय.

अपपाठ [सं० अप (खोटा)+पाठ (ग्रंथवाक्य; पठ्=म्हणणें)] पु० चुकीचा किं० अशुद्ध पाठ किं० म्हणण्याची सरणी किं० तऱ्हा.

अपप्रयोग [सं० अप (चुकीचा)+प्रयोग (योजना)] पु० १ चुकीची योजना. २ व्याकरणाच्या नियमांना सोडून असलेली शब्दांची मांडणी किं० सरणी. ३ भलत्याच सरणीनें एकादें काम करणें.

अपभाषण [सं० अप (भलतेंच)+भाषण] न० १ दुर्भाषण. २ सभ्याचाराला सोडून असलेलें बोलणें. ३ शिवीगाळ.

अपभ्रंश [सं० अप+भ्रंश (भ्रश्=पडणें)] पु० १ खालीं पडणें. २ मूळच्या शुद्ध रूपापासून विकृत होणें, किं० असा विकृत झालेला शब्द; उ० आपदा, अब्दा; अपयश, अपेश; अक्षयतृतीया, अखेतीज. { नाश, भ्रष्टता, भ्रम, पतन. † ज्ञा० }.

अपम [सं०] पु० क्रान्तिवृत्त. ❃**-मंडल, -वृत्त** न० क्रान्तिवृत्त.

अपमन्यु [सं० अप (दूर)+मन्यु (राग, कोप)] वि० कोपरहित.

अपमान [सं० अप+मन (मनांत आणणें, समजणें)] पु० मानखंडना, तिरस्कार.

अपमानणें [सं०] ०चा अवज्ञा करणें; धिक्कारणें; ०शीं असभ्यपणाचें वर्तन करणें.

अपमानित [सं०] ज्याचा अपमान झाला आहे असा; अपमान पावलेला.

अपमृत्यु [सं० अप+मृत्यु] पु० १ आकस्मिक मृत्यु; अपघात. २ फार मोठें संकट. ❃**अपमृत्यु टळणें** क्रि० **चुकणें** मरण ज्याचेंनें येणार असा बळकट संभव असतां त्यांतून बचावणें किं० निभावणें. उ० तो मुलगा माडीवरून पडला पण त्याला कांहीं इजा झाली नाहीं; त्याचा अपमृत्यु टळला म्हणावयाचा.

अपयश [सं०] न० १ अपकीर्ति, दुष्कीर्ति. २ जें उद्दिष्ट मनांत धरून प्रयत्न केला तें न साधणें किं० तो प्रयत्न सिद्धीस न जाणें; तो प्रयत्न निष्फळ होणें. ❃**अपयशाचा धनी** ज्यानें चुकी केलेली नाहीं पण ज्याच्या माथ्यावर विनाकारण चुकी लादली गेली आहे असा माणूस; दुसऱ्याचा अपराध ज्याच्या माथीं उगीचच्या उगीच बसविला जातो तो. **एकाद्याच्या माथ्यावर अपयशाचें खापर फुटणें** त्याला दुसऱ्या कोणी केलेल्या अपराधाबद्दल दंड होणें किं० निंदा सोसावी लागणें.

अपर [सं०] वि० १ दुसरा, अन्य, वेगळा, निराळा. २ पाठीमागचा, नंतरचा, शेवटचा. ३ पश्चिम दिशेचा. ४ निकृष्ट. ५ दूरचा, दुसऱ्या टोकाचा. ❃**अपराग्नि** पु० १ प्रेतदहनाचा अग्नि. २ दाक्षिण आणि गार्हपत्य हे अग्नि. **अपराण्ह** पु० १ दिवसाच्या २१ ते २५ किंवा १९ ते २४ घटका. २ दिवसाच्या दोन भागांपैकीं दुसरा किं० पांच भागांपैकीं चवथा. ३ दुपार. **अपरांत** पु० कोंकणप्रांत. **अपरापर** वि० नानाप्रकारचें. **क्रि० वि०** उत्तरोत्तर. **अपराम्बुनिधि** पु० पश्चिमसमुद्र. **अपरक्रिया** स्त्री० और्ध्वदैहिक. **अपरपक्ष** पु० १ कृष्णपक्ष. २ पितृपक्ष. ३ दुसरी बाजू. **अपरपर्याय** पु० त्याच अर्थाचा दुसरा शब्द; उ० **उदक** ह्याचा अपरपर्याय **जल**. **अपररात्र** पु० (मराठीत स्त्री०) रात्रीचा शेवटचा भाग. **अपरलोक** पु० स्वर्ग. **अपरवडी** } अन्याय. † ज्ञा० {. **अपरसूर्य** [दुसरा सूर्य] पु० अत्यंत विद्वान आणि बुद्धिमान ब्राम्हण. **अपरस्वस्तिक** न० क्षितिजाचा पश्चिम बिंदु. **अपरंपार** [सं० सं अपभ्रष्ट रूप] वि० ज्याचा दुसरा कांठ दिसत नाहीं असा; अमर्याद; असंख्य; अगणित; अतोनात.

अपरव वि० ज्याच्यासंबंधानें वाद, तंटा, संदेह, इ०नाहीं असा (हक्क इ०).

अपरव [सं० अप (अयोग्य)+रव (ध्वनि)] पु० १ लज्जा, भांडण. २ अपकीर्ति.

अपराजिता स्त्री० १ ईशान्य दिशा. २ दुर्गादेवी (विजयादशमीस हिची पूजा केली जाते). ३ एक वनस्पति

अपराध [सं० अप+राध् (चुकणें)] पु० १ दोष, गुन्हा. २ चूक, तखशीर. ३ पाप. ❃**अपराधी** पु० ज्यानें चुकी, अपराध, किं० गुन्हा केला आहे तो.

अपरापरी स्त्री० } दुर्दशा; वाताहात. † तुका० {.

अपरिग्रही वि० } संगरहित; संग्रह न करणारा. † ज्ञा० {.

अपरिचित[सं०अ+परिचित (माहितीचा)] वि० १ अनोळखी. २ माहित नसलेला, परकी, तिऱ्हाईत.

अपरितोख पु० } असंतोष. † ज्ञा० {.

अपरिमित [सं० अ+परि+मित(मापलेला)] वि०अगणित, असंख्य, अमोज; अतोनात; जें मोजतां किं० मापतां येणें अशक्य आहे असें.

अपरिहार वि० } टाळण्यास कठिण. † ज्ञा० {.

अपरिहार्य[सं०अ+परि+हार्य(=दूर करण्याजोगा; हृ=हरणें)] वि० १ न टाळतां किं० न चुकवितां येईल असें. २ ज्याची दुरुस्ती करतां येत नाहीं असें.

अपरूप [सं० अपूर्व याचें हेंगाडें रूप] वि० चमत्कारिक, विलक्षण, असाधारण. ❃**अपूर्वाई, अप्रूपाई** स्त्री० क्वचित् प्रसंगीं दिसणारा किं० येणारा असल्याकारणानें एकाद्या पदार्थाविषयींची किं० माणसाविषयींची कळकळ, आस्था, गोडी, किं० प्रीति.

अपरोक्ष [**सं०** अ (नाहीं)+पर+आक्षि (डोळा) परोक्ष=दृष्टीपलीकडे; अपरोक्ष=समक्ष] **क्रि० वि०** १ समक्ष; खबरु; हजर असतां. २ हजर नसतां; पाठीमागें. टीप—ह्या शब्दाचा पहिला अर्थ व्युत्पत्तीला धरून आणि बरोबर आहे; दुसरा अर्थ चूक पण रूढ आहे.

अपलक्षण, अवलक्षण [अप, अव (वाईट) +लक्षण (चिन्ह, गुण)] **न०** अपशकुन, दुष्परिणाम, हानि, इ०चें सूचक चिन्ह. **अपलक्षणी, अवलक्षणी वि०** वाईट गुणांचा; अशुभ आणणारा.

अपलाप [**सं०** अप (भलतेंच) +लप् (बोलणें)] **पु०** १ सत्य झाकणें किं० छपविणें. २ सत्याला विकृत स्वरूप देणें.

अपवर्ग [**सं०** अप+वृज् (सोडणें, वगळणें)] **पु०** १ समाप्ति. २ अपवाद, विशेष नियम. ३ मोक्ष; जन्ममरणांपासून मुक्तता. ४ देणगी. ५ त्याग.

अपवर्त [**सं०** अप+वृत् (असणें)] **पु०** १ काढून टाकणें. २ साधारण भाजक. ३ साधारण भाजकानें संख्यांना भागून त्यांना लघु रूप देणें.

अपवर्तन [**सं०**] १ **न०** काढून घेणें. २ दुसरीकडे नेणें. ३ संक्षिप्त करणें. ४ (**गणित**) संक्षेप देणें.

अपवाड १ अशक्तता. † **ज्ञा०** १.

अपवाद [**सं०** अप(उलट)+वद् (बोलणें)] **पु०** १ खोटा आरोप, आळ, टपका. २ निंदा. ३ नियमाशीं विसंवादी जें कांहीं तें. ४ खंडन. **अपवादक, अपवादी वि०** निंदक. २ विरुद्ध जाणारा.

अपवारक [**सं०** अप+वृ (झाकणें)] **पु०** १ आच्छादन. २ पडदा. ३ आडोसा.

अपवारण [**सं०** अप+वृ (झाकणें)] **न०** लपविणें, झाकणें, आच्छादणें.

अपवारित [**सं०** अप+वृ (झाकणें)] **वि०** १ झाकलेला, अदृश्य.

अपवित्र [**सं०** अ (नाहीं)+पवित्र (शुद्ध)] **वि०** अशुद्ध; मलिन; सदोष.

अपविद्या [**सं०** अप (खोटी)+विद्या] **स्त्री०** माया, अज्ञान.

अपविध, अपविध पुत्र पु० आईबापांनीं टाकून दिलेला आणि परक्यानें आपला म्हणून स्वीकारलेला पुत्र.

अपव्यय [**सं०** अप (भलताच)+व्यय (खर्च)] **पु०** १ भलत्याच कामीं केलेला खर्च. २ अयोग्य कामांत घालविलेला काळ, पैसा, शक्ति, इ०.

अपशकुन [**सं०** अप (वाईट)+शकुन (सूचक चिन्ह)] **पु०** अशुभसूचक चिन्ह.

अपशब्द [**सं०** अप (अयोग्य)+शब्द] **पु०** १ व्याकरणदृष्ट्या योजणें योग्य नाहीं असा शब्द. २ चुकीचा प्रयोग. ३ ग्राम्य शब्द. ४ शिवीगाळ. ५ निंदा करणारा शब्द. ६ दुसऱ्याचा धिक्कार करणारा शब्द किं० भाषण.

अपसव्य [**सं०** सव्य (सुलट) नव्हे तो] **वि०** १ उजवा. २ उलटा, विपरीत. **न०** जानवें उजव्या खांद्यावर घेणें.

अपसा तुपशी [**म०** आप+तूं; विचित्र घटना] **स्त्री०** १ आपपर भाव; हें माझें तें तुझें अशी बुद्धि. २ भांडण, बोलाचाली.

अपसारण [**सं०** अप+सारण (सारणें, ढकलून देणें)] **न०** १ दूर करणें. २ घालवून देणें.

अपसिद्धांत [**सं०** अप (चुकीचा)+सिद्धान्त (विधान)] **पु०** चुकीचा किं० खोटा सिद्धांत, मत, तत्त्व, इ०.

अपसुऱ्या [**सं०** अप (चुकीचा)+**म०** सूर (ध्वनि, आवाज)] **वि०** चुकीचे स्वर काढणारें (वाद्य), किं० बेसूर गाणारा (माणूस).

अपसोशी [**फा०** अफ्सोस्=दुःख] **वि०** १ दुःख करीत असलेला.

अपसोस [**फा०** अफ्सोस्=दुःख] **पु०** १ विलाप. २ दुःख करणें. ३ दुःखाची गोष्ट.

अपस्नान [**सं०** अप+स्नान] **न०** १ घरांत कोणी माणूस मृत झाल्याच्या विटाळासाठीं केलेलें स्नान. २ सुतक संपल्यावरचें स्नान. ३ प्रेतास घातलेलें स्नान. ४ स्नान केलेलें पाणी. ५ एकदां स्नान केलेल्याच पाण्यानें पुन्हां स्नान.

अपस्मार [**सं०** अप+स्मृ (स्मरणें)] **पु०** १ तोंडांतून फेंस येऊन ज्या रोगानें मनुष्य बेशुद्ध पडतो तो; फेपरें. २ विस्मरण.

अपस्वर [**सं०** अप (खोटा) +स्वर] **पु०** १बेसूर. २ संगीतशास्त्राला विसंवादी स्वर; चुकीचा स्वर. **वि०** शुद्ध स्वर नसलेलें (गाणें, वाद्य, इ०).

अपस्वार्थ [**म०** आपला स्वार्थ] **पु०** स्वता-

च्याच फायद्याची कि० सोयीची गोष्ट, कि० अशा गोष्टीविषयींचा प्रयत्न.

अपहरण [सं० अप+हरण; हृ=हरणें)]**न०** १ घेऊन जाणें. २ दूर सारणें. ३ चोरणें.

अपहर्ता [सं० अप=हर्तृ (नेणारा, घेणारा)] **पु०** १ चोरणारा. २ घेऊन जाणारा. ३ दूर सारणारा.

अपहार [सं० अप+हार (हृ=नेणें)] **पु०** १ घेऊन जाणें; दूर सारणें. २ चोरून नेणें. ३ चोरी. ४ नाश. ५ दुसऱ्याचा ऐवज गिळंकृत करणें.

अपन्हव [सं० अप=न्हु (लपविणें)] **पु०** १ लपविणें. २ नाकारणें. ३ शांत करणें. ४ हानि.

अपन्हुति [सं० अप+न्हु (लपविणें)] **स्त्री०** १ लपविणें. २ (**साहित्य**) मूळच्या धर्माबद्दल दुसऱ्या धर्माचा आरोप करणें. ३ उपमेय ह्या वस्तूच्या स्वरूपाचा अपलाप करून तिच्या जागीं दुसरी म्हणजे उपमान ही वस्तु स्थापित केली असतां '' अपन्हुति '' हा अलंकार होतो. उ० न हें नभोमंडल, वारिराशि, न तारका, फेनचि हा तयाशीं । न चंद्र हा, वर्तुळ शेष झाला, न अंक तो, विष्णु गमे निजेला ॥ विशेष माहितीसाठीं आमचें ''अर्थालंकारांचें निरूपण'' हें पुस्तक पहा.

अपक्षेप[**सं०** अप(खालीं+क्षिप् (टाकणें)]**पु०** १ फेकून देणें. २ खालीं टाकणें.

अपा, अप्पा पु० १ बहुमानार्थक पदवि. उ० सदाशिव अप्पा, विनू अप्पा इ०. २ पुरुषाचें विशेष नांव. ॐ सोनार शिंपी कुळकर्णी अप्पा तिघांची संगति नको रे बाप्पा (हीं तीन प्रकारच्या धंद्यांचीं माणसें लबाड असतात).

अपांक्त [**सं०** पंक्तींतून बाहेर टाकलेला]**वि०** जातींतून बाहेर टाकलेला, (ज्याच्याशीं अन्नव्यवहार त्या जातीचे लोक करीत नाहींत); बहिष्कृत; वाळींत टाकलेला. ॐ **अपांक्तपत्र न**०एका विशिष्ट जातीच्या एकत्र जमविलेल्या लोकांच्या पुढें त्या जातीच्या एकाद्या व्यक्तीला वाळींत टाकल्याचा जो कागद वाचून दाखविला जातो तो.

अपांग [**सं०** अप+अंग] **वि०** ज्याचें एकादें गात्र किं० इंद्रिय कमी आहे असा; जसें अंधळा, पांगळा, बहिरा, इ०.

अपांग [सं०] **पु०** डोळ्याच्या बाहेरील कोपरा. } कटाक्ष, कृपादृष्टि † **ज्ञा०** {.

अपांगणें अ० क्रि० जाचणुकीच्या स्थितींत असणें; पेचांत सांपडणें.

अपाड वि० } असाधारण, विलक्षण. † **ज्ञा०**{.

अपाडापाड } साम्यासाम्य. † **ज्ञा०** {.

अपात्र [सं० अ (अयोग्य)+पात्र] **वि०** नालायक; एखादी वस्तु घावयास अयोग्य. (**सत्पात्र** याच्या उलट). ॐ **अपात्रीं दान** कुचकामाच्या किं० अधम माणसाला दिलेलें दान.

अपादान [**सं०** अप+आ+दान] **न०** १ दूर नेणें; वियोग घडवून आणणें. २ (**व्या०**) पंचमी विभक्तीचा अर्थ.

अपान [**सं०** अप+अन् (श्वास सोडणें)] **पु०** १ प्राण, अपान, व्यान, उदान, समान, हे जे शरीरान्तर्गत पंचप्राण त्यांपैकीं दुसरा; अधोवायु. २ श्वास सोडणें; उच्छ्वास, (याच्या उलट **प्राण**). **न०** गुदद्वार.

अपान [**सं०** अ+पान (पिणें)] **न०** न [पिणें.

अपांपरि } दुर्दशा. † **ज्ञा०** {.

अपामार्ग [**सं०**] **पु०** आघाडा (औषधासाठीं, दांत घांसण्यासाठीं, याज्ञिक कर्मांत, वगैरे याचा उपयोग करितात.याच्या राखेचा (अपामार्गक्षार) कपडे धुण्याच्या कामींही बराच उपयोग होतो.

अपाय [**सं०**अप+इ(जाणें)]**पु०**१ नुकसानी, इजा, हानि, अहितकर गोष्ट. २ संकट, अरिष्ट. ३ विनाश.

अपार [**सं०** अ (नाहीं)+पार (पैलतीर) ज्याला)] **वि०** १ ज्याला अंत किं० शेवट नाहीं असें; अमर्याद; अफाट. २ अतोनात; अतिशय मोठें. ३ आटोक्याबाहेरचें.

अपारणें अ० क्रि० (कवितेंत) १ निघून जाणें. २ कमी होणें; उतरणें; शमणें.

अपालिपा पु० लपंडावाचा खेळ.

अपा (–प्पा–) शाई जोडा पु० पूर्वी कोणी सुप्रसिद्ध अप्पा म्हणून ब्राम्हण इसम होता, त्याच्या पद्धतीचा जोडा.

अपावृत वि०{उघड, प्रकट, स्पष्ट. † **ज्ञा०** {.

अपावो पु० { नाश, हानि. † **ज्ञा०** {.

अपुनरावृत्ति स्त्री०, अपुनर्भव पु० [**सं०**

अ+पुनः+आवृत्ति; अ+पुनः+भव] १ मोक्ष; आत्म्याची जन्ममरणांच्या फेऱ्यांतून सुटका.

अपुरता, अपुरा [म० अ+पुरणें] **वि०** १ न संपलेला, पूर्ण न झालेला. २ न पुरण्याइतका; आखूड, तोकडा, लांडा. ३ अर्धवट, कमी.

अपुष्ट [सं० अ (नाहीं)+पुष्ट (पोसलेला; पुष्=पोसणें)] **वि०** १ न पोसलेला; हाडकारोडका, अशक्त. २ (**साहित्य**) अर्थांत भर न घालणारा (शब्द इ०). ꙳ **अपुष्टत्व** किं० **अपुष्टार्थत्व न०** मुख्यार्थांत भर न घालणारा शब्द, किं० जो शब्द गाळला असतां बिलकूल अर्थहानि होत नाहीं असा शब्द योजणें हा दोष. उ० विस्तीर्ण आकाशिं विधू बघून जाओ प्रिये कोप तुझा गळून । येथें विस्तीर्ण ह्या शब्दांत अपुष्टार्थत्व हा दोष आहे.

अपूट [सं० 'अस्पृष्ट' याचें अपभ्रष्ट रूप] **वि०** १ न स्पर्शिलेला, न वापरलेला, न विस्कटलेला, –जशाचा तसा ठेवलेला (खाण्याचा पदार्थ, कापड, इ०). उ० हें लुगडें तुझ्याकरितां मी दोन महिने अपूट ठेवलें होतें, त्याची आजच्या मुहूर्तानें घडी मोड. २ सुरतानभिज्ञ (स्त्री किं० पुरुष).

अपूप [सं०] **पु०** एक उंची खाद्य, (घारगा, अनरसा, इ० सारखें).

अपूर [म० न पुरण्याइतका] **स्त्री०** तोटा. उणेपणा; कमताई. ꙳ **अपूरनपूर स्त्री०** किंचित् कमताई किंवा उणेपणा.

अपूर्ण [सं० अ+पूर्ण (भरलेलें)] **वि०** १ न भरलेलें. २ कमी असलेलें. ३ पूर्ण न वाढलेलें, केलेलें, पिकलेलें, इ०. ꙳ **अपूर्णमाफी जमीन स्त्री०** ज्या जमीनीच्या साऱ्यांत थोडीशी सूट असते अशी जमीन. **अपूर्णांक** (गणितांत) पूर्ण अंकाहून लहान असलेली संख्या; जसें, $\frac{3}{4}$, $\frac{4}{5}$, $\frac{5}{6}$, इ०.

अपूर्व [सं० अ+पूर्व] **वि०** जें पूर्वी घडलें किंवा अनुभविलें नाहीं असें; प्रथमचें. २ नवीन; अद्भुत; लोकोत्तर; अजब; असामान्य. **पु०** परब्रह्म. ꙳ **अपूर्वदर्शन न०** १ प्रथमचें किं० पहिलेंच दर्शन (नजरेस पडणें). २ एखादी अजब किं० लोकविलक्षण गोष्ट पहाणें. **अपूर्वाई** [अपूर्व चें भाववाचक नाम] **स्त्री०** १ विलक्षणपणा, नवलाई. २ क्वचित् प्रसंगीं करण्यांत येणारी पण आस्थेनें करण्यांत येणारी जी गोष्ट तिच्यावरून व्यक्त होणारें प्रेम. उ० तुझी मैत्रीण येवढ्या अपूर्वाईनें तुला बोलावयाला आली आहे, आणि तूं जात नाहींस, याचा अर्थ काय ? ('अप्रूपाई' याच अर्थानें रूढ आहे).

अपूस, हापूस [पोर्तु० आल्फान्झो] **पु०** कलमी कापावयाचा आंबा (ज्याची प्रथम लागवड आल्फान्झोनें गोव्यास केली).

अपेट वि० १ नवीन, नवशिका, न रुळलेला (बैल). २ पूर्णपणें कह्यांत किं० आटोक्यांत न आलेला, अवशीकृत. ३ न मुरलेला, अननुभवी (जगाच्या व्यवहारांत इ०).

अपेय वि० } पिण्यास अयोग्य. [ज्ञा०].

अपेश [सं०'अपयश' याचें अपभ्रष्ट रूप]**न०** १ अपकीर्ति. २ पराभव. ३ फजिति; बदलौकिक. ꙳ **अपेशाचें खापर एखाद्याच्या डोक्यावर फोडणें** आपण आरंभिलेल्या एखाद्या कार्यांत आपली फसगत झाली किं० कार्य सफल झालें नाहीं तर त्याचा दोष दुसऱ्याच्या डोक्यावर विनाकारण लादणें. ꙳**अपेशाचें मोटकुळें, अपेशाचें टोपलें** (घालणें, देणें) असेही ह्याच अर्थाचे वाक्प्रचार आहेत).

अपेशी [**सं०** अपयश याचें अपभ्रष्ट रूप)] **वि०** १ ज्याला बदलौकिक, फजिती, पराभव, किं० अपकीर्ति प्राप्त झाली आहे असा. २ ज्याला एखाद्या कार्यांत यश किं० सिद्धि मिळत नाहीं असा.

अपेष्टा [म० अप+इष्ट+आ (प्रत्यय)] इच्छेविरुद्ध गोष्ट] **स्त्री०** दुःस्थिति, जाचणुकीची अवस्था. ꙳ **हालअपेष्टा स्त्री० अ० व०** खडतर स्थिति किं० भोग; कष्टमय स्थिति; क्लेश.

अपेक्षणीय, अपेक्ष्य [**सं०** अप+ईक्ष्(पाहणें)] **वि०** १ आशा करण्यास किं० इच्छा धरण्यास योग्य किं० लायक. २ अटकळींत असलेलें.

अपेक्षया [सं० 'अपेक्षा' शब्दाच्या तृतीयेचें एकवचन] ०शीं तुलना केली असतां; ०च्या मानानें; ०च्या पेक्षा.

अपेक्षा [सं० अप+ईक्ष् (पहाणें)] **स्त्री०** १आशा; इच्छा. २ जरूरी; गरज; अगत्य. ३ अटकळ; अजमाम.

अपेक्षित [सं० अप+ईक्षित (पाहिलेलें; ईक्ष्

=पाहणें)] वि० १ डांचकळलेलें; ज्याच्याबद्दल आशा वाळगली असे. २ जरूर असलेलें; अगत्य किं० गरज असलेलें. ३ अटकळांत असलेलें; आजमास केलेलें.

अपैतें वि० १ प्राप्त; वश. † **ज्ञा०** १.

अपैसें क्रि० वि० १ आपल्याआपण. † **ज्ञा०** १.

अपैशुन, अपैशुन्य [**सं०** पिशुन (चहाट-खोर) याचें भाववाचक नाम] **न०** १ चहाट-खोरपणाचा अभाव. २ दुष्टपणाचा अभाव. ३ सचो-पणा; ऋजुता; सरळपणाचा वर्तनक्रम.

अ (आ–) पोष्णी, अ (आ–) पूष्णी [**सं०** अपोशन] **स्त्री०** भोजनाच्या मुखवतीस आणि समाप्तीस जें आचमन करतात तें.

अपौरुप, अपौरुषेय [**सं०**अ+पुरुष] **वि०** १ मानवी शक्तीपलीकडील; अमानुष; दैवी. २ मानवी प्राण्याकडे ज्याचें कर्तृत्व येत नाहीं असें; ईश्वर-निर्मित. उ० वेद अपौरुषेय आहेत. [खेळ.

अप्पाधप्पा, अप्पाधोप्पा पु० मुलांचा एक

अप्रकांड [**सं०** अ+प्रकांड (झाडाचें खोड)] **वि०** ज्यास बुंधा किंवा कांडें नाहीं असें; छोटें (झाड). ॐ**अप्रकांड कथा स्त्री०** मुद्यास सोडून असलेलें भाषण किं० कथन इ०; असंबद्ध वचन इ०.

अप्रकृत [**सं०** अ+प्रकृत (चालू); प्र+कृ=करणें] **वि०** १ मुख्य नसलेलें, अप्रधान, आनुषंगिक. २ प्रतिपाद्य विषयास सोडून असलेलें; असंबद्ध; अप्रस्तुत; पाल्हाळिक. **न० (साहित्यांत)** उपमान; **प्रकृत** ह्म० उपमेय नव्हे तें.

अप्रगल्भ [**सं०** अ (नाहीं)+प्रगल्भ (प्रौढ, पक्व.] **वि०** १ भिडस्त, लाजाळू. २ धीट नव्हे असा. ३ अपरिपक्व, ज्याची पूर्ण वाढ झाली नाहीं असा; ज्याचा अजून पूर्ण विकास झाला नाहीं असा.

अप्रज [**सं०** अ+प्रजा] **वि०** १ संततिहीन. २ वसति नसलेला; निर्मनुष्य.३ न जन्मलेला.

अप्रणीत [**सं०** अ+प्र+ नीत (नेलेला; नी =नेणें) **वि०**१ न केलेला; न उपदेशिलेला; कर्तव्य म्हणून न सांगितलेला.

अप्रतर्क्य [**सं०** अ+प्र+तर्क्य (तर्कितां येईल असा; तर्क्=तर्क करणें)] बुद्धीनें किंवा तर्कानें जाणण्यास अशक्य; दुर्ज्ञेय; अवर्णनीय.

अप्रतिबंध [**सं०** अ (नाहीं) +प्रतिबंध (अडथळा) ज्याला] **वि०** १ अप्रतिहत; ज्याला अटकाव, आडकाठी, किं० मज्जाव, नाहीं असा. २ ज्याच्याबद्दल बांधा, घोटाळा, वाद, वगैरे नाहीं असें (बापाचें धन वगैरे). ॐ–**दाय पु०** ज्याच्याबद्दल कांहीं बांधा, हरकत, इ० नाहीं असा वाडवडिलो-पार्जित धनदौलत, मालमत्ता, इ० (याच्या उलट **सप्रतिबंधदाय**).

अप्रतिभट [**सं०** अ+प्रतिभट (सामना कर-णारा योद्धा, पहिलवान, इ०)] **पु०** १ ज्याच्या तोडीचा दुसरा कोणी योद्धा नाहीं असा. २ ज्याचा पराभव करणारा कोणी नाहीं असा (योद्धा, प्रति-पक्षी, इ०).

अप्रतिम [**सं०** अ (नाहीं)+प्रतिमा (उपमा) ज्याला] **वि०** अत्युत्तम; अत्युत्कृष्ट; अनुपम.

अप्रतिमल्ल वि० १ ज्याला कोणी प्रतिस्पर्धी नाहीं असा. **ज्ञा०** १.

अप्रतिरव [**सं०** अ+प्रति+रव (शब्द)] **वि०** १ ज्याच्याबद्दल बांधा, तंटा, वाद, वगैरे कांहीं नाहीं अशी; निर्वेधपणें भोगतां येईल अशी (माल-मत्ता,जिनगी,इ०). २ आडकाठी नसलेला भोगवटा.

अप्रतिष्ठा [**सं०**अ+प्रतिष्ठा (मान)] **स्त्री०** १ मानहानि; मानखंडना; अपकीर्ति; बेअब्रू. २ अस्थिरता.

अप्रतीत [**सं०** अ+प्रतीत (संतुष्ट, ज्ञात, प्राप्त)] **वि०** १ ज्याची प्रतीति किं० अनुभव नाहीं असें. २ ज्याचें ज्ञान नाहीं असें; दुर्बोध. ३ असं-तुष्ट. ४ (**साहित्य**) अस्पष्टार्थ (शब्द).

अप्रतीति [**सं०** अ+प्रतीति (प्रति+इ =जाणें)]**स्त्री०** १ दुर्बोधता; दुर्ज्ञेयता; प्रत्यक्ष ज्ञान किंवा अनुभव यांचा अभाव.२ ज्ञानगोचर न होणें.

अप्रधान [**सं०** अ+प्रधान (मुख्य)] **वि०** गौण; दुय्यम प्रतीचें; मुख्य नव्हे असें.

अप्रबुद्ध [**सं०** अ+प्र+बुद्ध (बुध्=जाणणें)] **वि०** १ ज्याची बुद्धि प्रगल्भ झाली नाहीं असा; अपक्व बुद्धीचा. २ अज्ञानी, मंद.३ अनभिज्ञ; अप-रिचित; अननुभविक.

अप्रभु [**सं०** अ (नाहीं)+प्रभु (बलवान्)] **वि०** १ बलहीन; सामर्थ्यहीन. २ ज्याचा दुसऱ्या-वर दाब, ताबा, किं० नियंत्रणा, नाहीं असा.

अप्रमत्त [**सं०** अ+प्र+मत्त (मद्=झिंगणें, गाफील होणें)] **वि०** १ कर्तव्यांत न चुकणारा.

२ सावध, हुषार, दक्ष, जागरूक.

अप्रमाण[सं अ(नाहीं)+प्रमाण (आधार किं० माप)ज्याला]**वि०**१ ज्याला कांहीं मर्यादा नाहीं असें. २ ज्याला कांहीं पुरावा किं० आधार नाहीं असें. ३ आदर्श म्हणून न अनुसरलेलें; अविश्वसनीय. ४ मान्यता न पावलेलें; अस्थापित.

अप्रमेय [सं० अ+प्र+मेय (मा=मापणें)] **वि०** १ अमर्याद, अपार. २ आकलन करण्यास अशक्य; अज्ञेय. ३ जें सिद्ध करून दाखवितां येत नाहीं असें (ब्रह्म). } निश्चय करण्यास अशक्य. † **ज्ञा०** }.

अप्रयोजक [सं० अ+प्र+युज् (जोडणें) +क (प्रत्यय); संस्कृतांतून चुकीच्या अर्थानें रूढ झालेला शब्द] **वि०** १ ज्याची जरूरी किं० गरज नाहीं असें; निरुपयोगी; न लागू पडणारा. २ मूर्खपणाचा.

अप्रवीण [सं० अ (नाहीं)+प्रवीण (कुशल)] **वि०** १ अकुशल. २ अनभ्यस्त; एकाद्या कामांत न मुरलेला किं० न वहिवाटलेला.

अप्रवृत्ति स्त्री० } अन्यथा प्रवृत्त होणें. कुमार्ग. † **ज्ञा०** }.

अप्रशस्त [सं० अ (नाहीं)+शस्त(स्तविलेलें; शंस्=स्तविणें)] **वि०** १ न स्तविलेला; अश्लाघ्य; निंद्य. २ हलक्या दर्जाचा. (मराठींत रूढ अर्थ) १ आकुंचित, ऐसपैस नसलेली, अरुंद (जागा). २ असंस्कृत, ग्राम्य.

अप्रसन्न [सं० अ+प्रसन्न (स्वच्छ, संतुष्ट; प्र+सद्=बसणें,खचणें)] **वि०**१ अस्वच्छ (पाणी, इ०). २ संतुष्ट नसलेला. ३ आनंदित नसलेला. ४ नाखूष असलेला; नाराज. ५ योग्य नसलेला.

अप्रसाद [सं० अ+प्रसाद (कृपा)] **पु०** १ अवकृपा. २ नाखुषी, असंतोष.

अप्रसिद्ध [सं० अ+प्रसिद्ध (विख्यात)] **वि०** १ माहीत नसलेला. २ गौण; हलक्या प्रतीचा. ३ प्रसिद्धि किं०कीर्ति न संपादिलेला. ४अरूढ, चालू नसलेला, वापरण्यांतून गेलेला (शब्द).

अप्रस्तुत [सं० अ (नाहीं)+प्रस्तुत(चालू असलेलें;प्र+स्तु=स्तविणें, सांगणें)] **वि०**१काळ, वेळ, किं० विषय, यांच्या संबंधानें अयुक्त. २ असंबद्ध. ३ मूर्खपणाचें. ꙮ **अप्रस्तुतप्रशंसा** (साहित्य) **स्त्री०** प्रकृत वस्तूविषयीं बोलावयाचें असतां अप्रकृत अशा वस्तूविषयीं कवि बोलतो, आणि प्रकृत वस्तूचा अप्रत्यक्षपणें बोध करून देतो, तेव्हां " अप्रस्तुतप्रशंसा " हा अलंकार होतो. अप्रस्तुत अशा वस्तूविषयीं प्रशंसा म्ह० कथन किं० विधान केलेलें असतें म्हणून ह्या अलंकाराला " अप्रस्तुतप्रशंसा " हें नांव देण्यांत आलेलें आहे. हिचे पांच प्रकार आहेत. विशेष खुलाशासाठीं आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण ' हें पुस्तक पहा.

अप्रा, अपरा [म० ' अपुरा ' याचें अपभ्रष्ट रूप] **वि०** १ लांडें, आखूड. २ आखूड नाकाचा.

अप्रांत वि० } अपार. † **ज्ञा०**}.

अप्राप्त [सं० अ+प्राप्त (प्र+आप्)]**वि०** १ न मिळालेला. २ अकृतार्थ. ३ } ज्याला ब्रह्मानंद प्राप्त झाला नाहीं तो. †**ज्ञा०** } ꙮ **–यौवन वि०** जो तारुण्यदशेला अद्यापि आलेला नाहीं तो. **–व्यवहार वि०** कायद्याच्या दृष्टीनें जो लहान वयाचा तो.

अप्राप्य [सं० अ (नाहीं) + प्राप्य (मिळण्याजोगें; प्र+आप्=मिळविणें)] **वि०** मिळविण्यास कठिण; दुरवाप.

अप्रामाणिक [सं० अ (नाहीं) + प्रामाणिक (विश्वासु)]**वि०**१ बेविश्वासू, लुच्चा, खोटा. २ विश्वासाला अपात्र किं० नालायक; शंकनीय. ३ ज्याला कांहीं प्रमाण, पुरावा, आधार, इ० नाहीं असें; प्रमाणविरहित.

अप्रासंगिक [सं० अ+प्रासंगिक (प्रसंगाला योग्य)]**वि०** १ प्रस्तुत प्रसंगाला किं०विषयाला वगैरे सोडून असलेलें. २ प्रस्तुत कालाला अनुचित किं० अयुक्त.

अप्रिय [सं० अ+प्रिय (आवडता)] **वि०** नावडतें; न रुचणारें; न पटणारें; झोंबरें.

अप्रीति [सं० अ+प्रीति (आवड)] **स्त्री०** १ प्रेमाचा अभाव. २ वैरभाव. ३ नावड.

अप्रौढ पु०, अप्रौढा स्त्री० [सं० अ+प्रौढ (पक्व)] **वि०** १ वयांत न आलेला–ली मुलगा–मुलगी. २ धीट नव्हे असा–शी; नम्र. ३ अप्रगल्भ.

अप्सरा [सं० अद्भ्यः सरन्ति उद्गच्छन्ति= पाण्यांतून वर येणाऱ्या] **स्त्री०** १गंधर्वपत्नी. २ स्वर्वेश्या. (या इंद्राच्या दासी होत. कोणा साधूची

तपश्चर्या उग्र होऊन इन्द्राला आपलें पद जाईल अशी भीति वाटली म्हणजे तो कोणत्या तरी अप्सरेला त्या साधूची तपश्चर्या भंगण्याकरतां पाठवितो. त्या सुंदर असतात म्हणून कोणाही सुंदर स्त्रीला विनोदानें ' अप्सरा ' म्हणतात).

अफतादार [फा० अफ़्तादह्=पडलेल्या, पडीक राहिलेल्या] **वि०** पडीक; उपयोगांत किं० वापरण्यांत नसलेलें (घर, जमीन).

अफरातफर [म०] **स्त्री०** १ घोटाळा; घालमेल. २ लबाडी; अप्रामाणिकपणानें केलेला घोटाळा, अव्यवस्था, दुरुपयोग, खोटा व्यवहार, इ०.

अफल [सं० अ+फल] **वि०** १ निष्फल; ज्याच्या पासून कांहीं कार्यनिष्पत्ति होत नाहीं असें. २ जें फळ नव्हे तें; ज्याला फळ म्हणतां येत नाहीं तें.

अफलाक (**–ग**) [अ० अफ़्लाक्=आकाश] **क्रि० वि०** (उंच किं० लांब उडी मारीत असलेल्या घोड्यासंबंधानें किं० मनुष्यासंबंधानें) कोणत्याही प्रकारच्या आधाराचा स्पर्श नाहीं अशा प्रकारें किं० अशा स्थितींत.

अफवा [अ० अफ़्वाह्]**स्त्री०** बातमी; वदंता.

अफलाद [अ०] **स्त्री०** १ कन्येच्या बाजूनें दौहित्रादि संतति; पुत्राच्या बाजूनें जी पौत्रादि संतति ती अवलाद. २ दत्तक पुत्राची संतति. ३ रखेली किं० पाटाची बायको हिच्या पासून झालेली संतति.

अफळणें [अ (नाहीं)+फळणें (पक्व होणें)] **अ० क्रि०**१ कच्चें शिजलेलें असणें (खाद्य वगैरे). २ पुरें पिकलेलें नसणें (आढींतील आंबे वगैरे).

अफाळणें स० क्रि० (कवितेंत) जोरानें आपटणें किं० आदळणें.

अफाट वि० अत्यंत विस्तीर्ण किं० मोठें; अमर्याद; अपार. ꕥ **अफाटगुरु न०** १ इतस्ततः मन मानेल तेथें चरणारें गुरूं. २ अशिक्षित किं० गांवढळ मनुष्य.

अफारी वि० जें थोडा वेळच भूक शमवितें असें; जें फार वेळ भुकेचें निरसन करूं शकत नाहीं असें (चुरमुऱ्यासारखें वगैरे किंवा स्वल्प प्रमाणांत असलेलें खाद्य).

अफिण्या, अफिमी, अफिम्या वि० अफूबाज; अफूचें व्यसन असलेला.

अफीण, अफीम [**सं०** अहिफेन (सर्पाचा फेस)] **स्त्री०** खसखशीच्या बोंडांतील चीक; अफू. अमलासाठीं हिचें सेवन करतात किंवा ही ओढतात. ही औषधी आहे.

अफू [सं० अहिफेन] **स्त्री०** ' अफीण' पहा. ꕥ**अफूसारखा जीव ओढणें** किंवा **लागणें** एखाद्या माणसावांचून चैन न पडणें; त्याच्याकडे मनस्वी ओढा असणें, त्याचा ध्यास लागणें.

अफेक पु० बलवती इच्छा; ध्यास; ओढा; चटका, (**क्रि०** ' धरणें, ' ' बाळगणें ').

अबई स्त्री० एक फुलझाड.

अबक स्त्री० विटूदांडूच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

अंबकटी, अंबकाठी [**म०** आंबा+काष्ठ] **स्त्री०** आंब्यांचे लहान लहान तुकडे कापून व वाळवून जें एक खाद्यविशेष (चवीला साटासारखें लागणारें) करतात (कोंकणांत) तें.

अबक दुबक स्त्री० मुलांचा एक खेळ.

अबकरा, अबखरा, अपकारा, आपकारी[**फा०** आबख़ुराह्] **पु०** पाणी प्यावयाचें लहान भांडें.

अब (–प–) का, आब (–प–) का पु० पाण्याचें सिंचन करणें (एखाद्या पदार्थावर).

अबजब [**हिं०** अब (आतां) + जब (जेव्हां)] **पु०** वादावर किं० हमरी तुमरीवर येणें; एकेरीवर येऊन केलेलें भांडण.

अब (–प–)जाळ न० खोटा आरोप; तोहमत.

अंबट [**सं०** आम्ल] **वि०** १ आंबा, चिंच, लिंबू, इ० च्या चवीचा. २ निराश किं० नाखूष; असंतुष्ट. ꕥ **वईवरून अंबट होणें** क्षुल्लक कारणावरून एखाद्यावर रुसणें किं० रागावणें. **अंबट मागणें** दुसऱ्याचें भांडण आपल्या अंगावर ओढून घेणें. **अंबट ओला वि०** अर्धवट वाळलेला; अर्धवट ओला (चिरगुट, कपडा, धान्य, इ०). ꕥ**अंबट चिंबट वि०** अंबट, तेलकट, वगैरे कारणांमुळें अपथ्यकारक. **अंबटढाण वि०** १ अत्यंत अंबट. २ **स्त्री०** अंबटाची अति तीव्र घाण किं० वास. **अंबटवणी** [अंबट+पाणी] **न०** १ अंबट पाणी. २ ज्याला अंबूस वास येत आहे असें पाणी. ३

चवीसाठीं तयार केलेलें अंबट पाणी. **अंबटवाणा** वि० १ अतिअंबट. २ नाखूप किं० निराश झालेला; रुसलेला. **अंबटसर** वि० किंचित् अंबट. **अंबटशोक** पु० मूर्खपणाची चैन.

अंबट स्त्री० एक वनस्पति.

अंबटी, आंबटी, अमटी, आमटी स्त्री० १ एक पातळ खाद्यविशेष. २ वनस्पतिविशेष.

अवडधोवड, ओवडधोवड वि० अकुशल-पणानें केलेला कोणताही पदार्थ (पेटी, मेज, कंदील, पंचपाळें, झारी, इ०); बोजड; बेढब.

अंबणें [म० अंबट होणें] अ० क्रि० १ अंबट होणें (खाद्य पदार्थ इ०). २ अंबट पदार्थाच्या संयोगानें किं० चर्वणानें दांतांतून कळा येणें; उ० ह्या दह्यानें माझे दांत अगदीं अंबून गेले. ३ फार श्रमाच्या योगानें किं० जोराचा तडाखा बसल्या कारणानें गात्रविशेष दुखूं लागणें आणि आपला व्यापार सफाइनें करावयाला कांहीं काळ असमर्थ होणें. ※ **अंबत पडणें** कोणतेंही काम काहींतरी व्यत्यय येऊन अर्धवट स्थितींत पडून राहाणें; काम पूर्ण व्हावयाच्या मार्गांत कांहींतरी अडचण येऊन तें बंद पडणें.

अवदा [सं० ' आपदा ' याचें अपभ्रष्ट रूप] स्त्री० १ आपत्ति; दुर्दैव. २ जाचणूक, दुःख, ताप.

अबदागीर [फा० आफ्ताब् (सूर्य) + गीर (गिरफ्तन् = धरणें, धरून ठेवणें; अडविणें)] स्त्री० मंगल प्रसंगाच्या मिरवणुकींतून नवऱ्या मुलाच्या किं० राजेरजवाड्यांच्या डोक्यावर जें एक सजविलेलें किनखापाचें वगैरे छत्रविशेष धरतात तें. ※**अबदागिऱ्या** पु० अबदागीर धरणारा पोऱ्या किं० सेवक.

अबदार [फा० आब् (पाणी) + दाश्तन् (ठेवणें)] पु० प्यावयाच्या पाण्याच्या खात्यावर देखरेख करणारा अधिकारी. पूर्वीं श्रीमंतांच्या घरांतून प्यावयाचें पाणी शुद्ध करण्यासाठीं, थंड करण्यासाठीं, वाळा वगैरे घालून सुवासिक करण्यासाठीं, एक नोकर ठेविलेला असे, तो. ※ **अबदारी** स्त्री० अबदाराचें नियुक्त कार्य. ※ **अबदारखाना** पु० वरील नियुक्त कार्य करावयाची खोली किं० जागा.

अबद्ध [सं० अ + बद्ध (बांधलेला; बंध् = बांधणें)] वि० १ न बांधलेला; मोकळा. २ अनियंत्रित; स्वतंत्र. ३ असंबद्ध; विसंगत. ४ निरर्थक, मूर्खपणाचें, अशुद्ध, वेडें वाकडें. २ संबंधरहित. ३ अज्ञानी, अडाणी. †तुका० १. ※ **–मुख** वि० अश्लील वाणीचा; अमंगळ तोंडाचा; शिव्यागाळी करणारा.

अबनाल न० तलवारीच्या म्यानास वरच्या बाजूस जें नक्षीदार, सुवर्णाच्या किं० चांदीच्या पत्र्याचें टोपण बसविलेलें असतें तें. (याच्या उलट **तहनाल**).

अबब अ० आश्चर्यवाचक उद्गार, अरे बापरे !

अंबर पु०, **अंबरी** स्त्री० लोहाराची पकड, चिमटा. (अंबूर असेंही रूप आहे).

अंबर [सं०] न० १ वस्त्र (रेशमी), जसें पीतांबर. २ शिवून केलेला कपडा (त्यावयासाठीं). ३ आकाश, अंतराळ. ४ सुगंधी द्रव्यविशेष. कस्तूरी सारखा एक सुगंधी पदार्थ. उदबत्त्या करण्याचे कामीं हा उपयोगीं येतो. ※**अंबरी** वि० अंबर लावून सुगंधित केलेली (तंबाकू वगैरे).

अंबर [फा० अन्बार] पु० धान्य सांठविण्यासाठीं भिंतींत केलेली खोली, कोठी, इ०. ※ **अंबरखाना** पु० धान्यागार. **अंबर लुटणें** सांठवून ठेवलेलें धान्य उधळपट्टीनें खर्चणें.

अंबर स्त्री० अमरवेल नावाची वनस्पति.

अबरचबर क्रि० वि० अव्यवस्थितपणें किं० अडाण्याप्रमाणें (तेल वगैरे) लावणें किं० चोपडणें.

अबरचबर न० १ बेचव, निःसत्व किं० नीरस खाद्य. २ वायफळ किं० निरर्थक भाषण. क्रि० वि० अरबटचरबट, वायफळ, मूर्खासारखें (बोलणें).

अंबरस, आंबरस [सं० आम्र + रस] पु० आंब्याचा रस.

अंबरसा पु० एक प्रकारचा दागिना.

अंबराई, आंबराई [सं० आम्र + राजि (पंक्ति)] स्त्री० जेथें अनेक आंब्यांचीं झाडें लाविलेलीं असतात ती जागा; आंब्याच्या झाडांचा बाग.

अबलक (–ख) [अ० अब्लक्] वि० अनेक रंगांचें; अनेक रंगांच्या नक्षीचें.

अबला [सं० अ (नाहीं) + बल (सामर्थ्य) जिला] वि० स्त्री.

अंबवण, अंबोण, आंबोण [म० अंबवणें पासून] न० गाईम्हशींना दूध काढतेवेळीं किंवा काढल्यानंतर फोल, चूण, सरकी, पेंड, वगैरेंची

मिसळ करून,जें त्यावयास देतात तें.प्रत्यक्ष त्याच्या- देण्यापूर्वी तें बराच वेळ भिजवून ठेविलेलें असतें.

अंबवण न० चाकाच्या तुंब्याला आग लागून झीज न व्हावी म्हणून तुंब्याच्या गर्भांत जें लोखंडाचें नळकांडें बसविलेलें असतें तें.

अंबवणी [अंबा+पाणी] **स्त्री०** हिरवे आंबे भाजून पाण्यांत कोळून जें पेय तयार करतात तें.

अंबवा पु० १ एक प्रकारचा रंग. २ त्या रंगानें रंगविलेलें वस्त्र.

अंबविणें [अंबणें पासून प्रयोजकरूपी क्रियापद] १ **स० क्रि०** अंबट करणें.२ जोरानें आदळणें, थोपटणें, कि० मारणें.३ तडाखे मारून मारून अंग ठणकविणें. ४ एकाद्याला पुष्कळ वेळ विनाकारण तिष्ठत ठेवणें.

अंबष्ट पु० ब्राह्मण पुरुष, आणि वैश्य स्त्री ह्यांच्या संबंधापासून आलेली संतति कि० जात कि० त्या जातीचा कोणीही माणूस.

अंबळ, अंबळसा, अमळ, अमळसा अ० १ जरा, थोडा वेळ, किंचित् काल. २ किंचित्; अत्यल्प प्रमाणांत.

अबा, आबा पु० १ पुरुषांच्या संबंधानें योजावयाचा बहुमानाचा शब्द.२ पुरुष व्यक्तीचें ठेविलेलें नांव.

अंबा [**सं०**] **स्त्री०** १ माता. २ जगन्माता भवानी देवी. (शिवाजीस हीच प्रसन्न होती).

अंबा, आंबा [**सं०** आम्र] **पु०** १ एक वृक्षविशेष. २ त्याचें फळ. ꙮ **अंबा शिंपणें** वरात निघण्यापूर्वी गौरीहराच्या मागील भिंतीवर आंबा आणि शंकरपार्वती यांच्या चित्रांवर वधूवरें केशर, हळद, कुंकु, वगैरेंचें पाणी शिंपून, पाट्यावरील गौरीची मूर्ति घेऊन, वरगृहीं यावयास निघतात, हा जो विधि तो करणें. **अंबेवन न०** आंबराई; आंब्याचा बाग. **अंबेहळद स्त्री०** एक प्रकारची हळद. **अंब्याचा टहाळा पु०** शुभ प्रसंगीं आणि अशुभ प्रसंगीं सारखाच उपयोगीं पडणारा मनुष्य; सर्व प्रसंगीं आणि सर्व कामांत सारखाच योजतां येईल असा माणूस.

अबाट [**सं०** अभ्रष्ट (न बाटलेला) याचा अपभ्रंश]**वि०** १ अनिंद्य;अभ्रष्ट. २ जातीनें वाळींत न टाकलेला.

अबाट वि० ज्यात बाट (कोय) अगदीच लहान आहे किंवा मुळीच नाहीं असें फळ (अंबा इ०).

अंबाडा, आंबाडा पु० स्त्रिया वेणी न घालतां केशांचा बुचडा बांधतात तो.

अंबाडा [**सं०** अम्रात] **पु०** १ एक वृक्षविशेष. २ त्याचें फळ. ३ अंबाडी (ज्याची भाजी करतात).

अंबाडी स्त्री० १ एक वनस्पति. २ तिचें बीज, ज्यापासून तेल काढतात. ३ त्या झाडाची दोऱ्या करण्याचे उपयोगी असणारी त्वचा. ३ तिचा पाने. ४ त्या त्वचेपासून काढलेले तंतु. ꙮ **केशांची अंबाडी** होणें केश पिकणें, म० पांढरे होणें.

अंबाडीचें पान न० विड्यांच्या पानांच्या वेलीची एक जात.

अबाध, अबाधित [**सं०** अ (नाहीं) बाधा (उपद्रव, हरकत) ज्याला; अ (नाहीं)+ बाधित (उपद्रुत, खंडित)] **वि०** ज्याला बाध, अटकाव, प्रतिबंध, विरोध, नाहीं असें (तत्त्व वगैरे). ꙮ**त्रिकालाबाधित** तिन्हीं काळीं सारखेंच पटणारें,कि०सत्य म्हणून मान्यता पावणारें.उ० परमेश्वराचें अस्तित्व त्रिकालाबाधित आहे.

अबाब [**अ०** अब्वाब्] **पु०** १ शेताच्या उत्पन्नांतील सरकारच्या वाट्याला येणारा भाग. २ अंदाजाच्या उत्पन्नाचा अजमास. [उद्गार.

अबाबा पु० आश्चर्याचा कि० विस्मयाचा

अंबाबाई [**सं०** अंबा (आई)+**म०** बाई] **स्त्री०** भवानी देवी. ꙮ **अंबाबाईचा पोत पु०** भला मोठा काकडा किंवा प्रकाशाचा झोत.

अंबार [**फा०** अन्बार्] **पु०** धान्य सांठविण्याची भिंतीच्या पोटांत काढलेली खोली,कोठी, वगैरे.

अंबारी [**अ०** अमारी] **स्त्री०** हत्तीच्या पाठीवर बसण्याकरितां केलेली चार खांबांवर उभारलेली आणि घुमट असलेली बैठक; हौदा. ꙮ **अंबारींत बसणें** मानमान्यता कि० श्रेष्ठता पावणें. **उलट्या अंबारांत बसणें**,किंवा **उलट्या अंबारीचें राज्य करणें** भिक्षा मागत दारोदारीं हिंडणें. आमचें " मराठी भाषेचे वाक्प्रचार, ह्मणी, इ० " हें पुस्तक पहा.

अबांव न० कांगावा. (क्रियापद ' करणें, ' ' मांडणें ').

अबाशाई रंग पु० गहिरा तांबडा आणि किंचित् काळसर रंग.

अबाळ [**म०** अ + बाळगणें] **स्त्री०** जोपासनेंत वगैरे हयगय; अनिगा; हेळसांड. २ शिस्तीचा किं० नीटनेटकेपणाचा अभाव; गबाळेपणा.

अबाळणें स० क्रि० निष्काळजीपणानें किं० निर्ममत्वानें वागविणें; ०कडे दुर्लक्ष्य करणें; ०ची हेळसांड करणें. [†तुका० }.

अबाळी स्त्री० } १ फजीती. २ दुर्दशा.

अंबिका स्त्री० } माता, देवी. † **ज्ञा०** }.

अंबी, अंबेकरी पु० होडीवाला; होडीवर पोट भरणारा.

अंबीण स्त्री० एका जातीचा अंबा; हा अंबा लांबोड्या आकाराचा असतो.

अबीर [**हिं०**] **पु०** सुगंधी द्रव्यविशेष.

अंबील स्त्री० १ नाचण्यांचें पीठ अंबवून किं० ताकांत घालून शिजवून जें पातळ पेयविशेष करतात तें.२ (लक्षणेनें) गढूळ पाणी.

अंबु [**सं०**] **न०** पाणी.🏵 **अंबुज न०** कमळ. **अंबुद, अंबुधर पु०** मेघ. **अंबुधि पु०** समुद्र.

अबूची चिबूची स्त्री० एक आंबट वेल; त्याच्या पानांची भाजी करतात.

अबुद्ध [**सं०** अ (नाहीं)+बुद्ध (जाणलेला)] **वि०** १ न समजलेलें, न कळलेलें. २ ज्याला समजत नाहीं किं०कळत नाहीं असा;अडाणी. **पु०** जीवात्मा.

अबुद्धि [**सं०**] **स्त्री०** अविद्या, माया. **वि०** मूर्ख, अडाणी.

अंबुरकी चिंच स्त्री० पूर्ण वाढलेली आणि पक्क [झालेली चिंच.

अंबुला पु० } पति. † **ज्ञा०** }.

अंबुली स्त्री० } स्त्री. † **ज्ञा०** }.

अंबुसणें अ० क्रि० १ अंबट होणें;अंबटाची चव पावणें. २ अंबट होऊन खाण्याला निरुपयोगी होणें.

अंबूकृत न० १ थुंकी उडवीत बोलणें. २ गुरगुरण्याचा आवाज.

अंबूर पु०सुताराचें एक हत्यार (खिळे उप- [टण्याचें).

अंबूस वि० किंचित् अंबट. (करणें).

अबेदबे [**हिं०**] उद्गार वाचक अव्यय. अरेतुरे

अंबेमोहोर पु० एक प्रकारचा उंची तांदूळ.

अबोची चिंबोची स्त्री०भाजीच्या उपयोगाची एक वनस्पति.

अबोट [**म०**अ + बोट] **वि०** बोट न लावतां, न हाताळतां, किं० न चाखतां, जशाच्या तसाच ठेविलेला (पदार्थ, खाद्य, इ०).

अंबोण न० १ मागें ' अंबवण' पहा. २ लग्नाच्या समारंभांत विहिणी एकमेकींस जो शिध्याचा नजराणा पाठवितात तो.

अबोधनीय, अबोध्य [**सं०** अ+बुध् (जाणणें, शिकणें)] **वि०** १ जाणावयाला अशक्य किं० कठिण. २ शिकण्याच्या कामीं जो जड असा.

अबोल,अबोलका,अबोलणा,अबोल्या[**म०** अ (नाहीं)+बोलणें] **पु०** कमी बोलणारा.

अबोला [**म०** अ (नाहीं)+बोलणें] **पु०** रुसव्यामुळें एकमेकांशीं न बोलण्याचा परिपाठ (क्रि० ' धरणें, करणें ', इ०).

अंबोशी स्त्री० १ हिरव्या अंब्याच्या फोडी उन्हांत वाळविलेल्या असतात त्या (त्या आंबटींत वगैरे चवीसाठीं घालतात किं० त्यांची चटणी करतात). २ एक वनस्पति (हिच्या पानांची चटणी करतात).

अंबोळी स्त्री० पीठ अंबवून तें पातळ करून लोखंडी किं० मातीच्या तव्यावर भाजून जें खाद्यविशेष करतात तें.

अब्ज [**सं०** अप् (पाणी) +जन् (उत्पन्न होणें)] **पु०** १ चंद्र. २ शंख. ३ धन्वंतरी (देवांचा वैद्य). **न०** १दहाव्या स्थानची संख्या; १ ह्या अंकावर नऊ शून्यें देऊन होणारी संख्या.२कमळ.🏵 **अब्जभव, अब्जयोनि पु०** ब्रह्मदेव. **अब्जबांधव पु०** सूर्य. **अब्जभोग पु०** कमळीचें मूळ.

अब्जिनी स्त्री० कमळाची वेली.

अब्धि [**सं०** पाण्याचा साठा] **पु०** समुद्र.

अब्बस स्त्री० मानहानि; मानखंडना, अपमान, उपहास, फजीती. उ० पुण्यामध्यें त्या हरदासाची लोकांनीं अगदीं अब्बस केली (किं० उडविली).

अंब्या पु० १ वल्हें मारणारा,नावाडी.२ होडीवाला.

अब्रह्मण्य [**सं०**] **वि०** ब्राह्मणाला अनुचित, अहितकर किं० अपायकारक. **न०** भयंकर कृत्य.

अब्रह्मण्यम् आश्चर्याचा उद्गार. उ० काय ? तुह्मी आपल्या मुलीचा पुनर्विवाह करणार ? अब्रह्मण्यम् !

अब्राह्मण [**सं०** अ + ब्राह्मण] **पु०** जो ब्राह्मण नव्हे तो. शूद्र. यांचे सहा प्रकार सांगितले आहेत.

अब्राह्मण्य [**सं०** अ + ब्राह्मण्य] **न०** १ ब्राह्मणाचीं जीं नियुक्त कर्मे त्यांचा भंग कि० त्यांचें अतिक्रमण. २ ' अब्रह्मण्य ' पहा.

अब्रू, आब्रू, आबरू [**फा०** आब्+रू (तोंडावरचें पाणी)] **स्त्री०** मान; कीर्ति; प्रतिष्ठितता; लौकिक. ॐ**एकाद्याची अब्रू गाढ्यावरून जाणें**, किंवा **चालणें** तो निर्लज्ज असणें; त्याला अब्रूची चाड बिलकूल नसणें. **अब्रूचा, अब्रूदार वि०** अब्रू संभाळून असणारा; प्रतिष्ठित; संभावित; सन्मान्य; थोर.

अंभ[**सं०** अंभस्=पाणी] **न०** पाणी. ॐ **अंभोधि, अंभोनिधि पु०** महासागर. **अंभोरुह, अंभोज न०** कमळ. **अंभोधर पु०** मेघ.

अभक्त [**सं०** अ + भक्त] **वि०** पूजादि न करणारा; परमेश्वराचे ठायीं निष्ठा किं० भक्ति नसलेला.

अभक्ति [**सं०**अ+भक्ति (आदरबुद्धि)]**स्त्री०** १ भक्तीचा अभाव. २ आवडीचा अभाव; नावड.

अभंग पु० एक प्रकारचें वृत्त. तुकारामाची कविता अभंगात्मक आहे. अभंग दोन प्रकारचे असतात; मोठा चार चरणांचा, आणि लहान दोन चरणांचा असतो.

अभंग [**सं०** अ (नाहीं)+भंग (मोडणें) ज्याला] **वि०** १ न भंगलेलें; अखंड. २ कांहीं फूट, तूट, इ० न झालेला; पूर्वी सारखाच.

अभंड वि० १ दुसऱ्यावर तोहमत घेण्यांत पटाईत. २ अतिशय; फार; अतोनात; मर्यादेच्या पलीकडचा.

अभंड न० तेल, तूप, इ० पातळ पदार्थ तराजूनें वजन करून घ्यावयाचा असतां त्या पदार्थाचें वारदान एका पारड्यांत घालून दोन्ही पारडीं समतोल करण्यासाठीं दुसऱ्या पारड्यांत जे दगड वगैरे घालतात ते. १ पुष्कळ, विपुल. † **तुका०** १. ॐ**अभंड करणें** वर सांगितलेल्या रीतीनें तराजूचीं दोन्ही पारडीं समतोल करणें.

अभद्र [**सं०**अ+भद्र (शुभ)] **वि०**१ अमंगल; अपवित्र; अश्लील. २ अपशकुनी; अभद्रसूचक (दृष्टि, भाषण इ०) **न०**. १ पाप; दुष्टपणा. २ दुःख; आपत्ति; संकट; दुर्दैव.

अभय [**सं०** अ+भय (भीति)] **वि०** भीतिरहित; सुरक्षित. **न०** १ भीतिरहितता; सुरक्षितता. २ भीतीपासून किंवा संकटापासून निवारण कि० निवारणाचें वचन. ॐ**तुला अभय असो** तुला कशापासूनही भीति प्राप्त न होवो ! **एकाद्याला अभय देणें** त्याला त्याच्या सुरक्षिततेबद्दल खात्री कि० आश्वासन देणें. **अभयडिंडिम पु०** १ सुरक्षिततेबद्दल, दवंडी पिटवून जाहीर रीत्या दिलेली खात्री, कि० आश्वासन. २ युद्धांतील नौबद. **अभयदान न०** सुरक्षिततेबद्दल, माफीबद्दल, वगैरे खात्री देणें. **अभयपत्र न०** सुरक्षिततेबद्दल आश्वासन देणारा लेखी कागद; संरक्षणाच्या हमीचा लेख. उ० पेशव्यांचें अभयपत्र जवळ असल्यावर निजामाची काय मला भीति त्याच्या राज्यांतून जातांना ! **अभयमुद्रा स्त्री०** विश्वास वाटविणारी चर्या (राजाची वगैरे). **अभयवचन न०** सुरक्षिततेबद्दल, माफीबद्दल, वगैरे दिलेला शब्द. **अभयहस्त पु०** प्रसाद करावयासाठीं राजाचा कि० देवाचा पुढें केलेला हात.

अभर [**म०** आ (पूर्ण)+भर(भरणें)] **वि०** पूर्णपणें तृप्त; ज्यास्तीची इच्छा नसलेला. उ० मला हजार रुपये मिळाले म्हणजे मी अभर होईन. **स्त्री०** परमावधीची तृप्ति; ज्यास्तीची इच्छा नाहीं अशी मनाची स्थिति.

अभरवण न०, स्त्री० पचवितां न येण्याइतकें खाणें; अतिखाणें. (क्रियापद 'घेणें' इ०). उ० बासुंदी श्री इतकी अभरवण घेऊं नको; अजीर्ण विजीर्ण होईल !

अभरवशीं [अभरवसा याची सप्तमी] **क्रि० वि०** दुसऱ्याच्या भरवश्यावर राहून आपण एखाद्या कार्यास प्रवृत्त झालों असतां त्यानें विश्वासघात केल्यामुळें आपण तोंडघशीं पडून आपणांवर ओढणाऱ्या दुरवस्थेंत, किं०संकटावस्थेंत (क्रियापद 'पडणें' ' घालणें ').

अभरवसा [**म०** अ+भरवसा (विश्वास)] १ एखाद्यानें आपणांस खात्री दिली असतां, आणि आपल्या ठायीं विश्वास उत्पन्न केला असतां त्याचा त्याच्याकडून भंग; प्रथम एकाद्याला एकादें कार्य करण्याला प्रोत्साहन देऊन नंतर त्या कार्याविषयीं

अनास्था दाखवून अलग राहाणें, त्याला साहाय्य न करणें इ०; निराशा; आशामोड.

अभराड [म० अ (नाहीं)+भरणें] **न०** गाई, म्हशी, इ० दुभतीं जनावरें सवर असल्यामुळें किं० अन्य कारणांमुळें दूध देत नाहींत तो काळ.

अभर्तृका [सं० अ (नाहीं)+भर्तृ (पति) +क (प्रत्यय) जिला] **स्त्री०** गतधवा, विधवा, गतभर्तृका.

अभक्षणीय, अभक्ष्य [सं० अ (नाहीं)+ भक्षणीय,भक्ष्य(खावयास योग्य)]खावयास अयोग्य, निषिद्ध, किं० वर्ज्य.

अभाग्य, अभागी, अभाग्यवान् [सं० अ (नाहीं)+भाग्य, भाग (सुदैव) ज्याला] **वि०** दुर्दैवी; भाग्यहीन; फुटक्या नशीबाचा; कपाळ-करंटा.

अभांड वि० मागें **अभंड वि०** पहा.

अभांड न० मागें **अभंड न०** पहा. ॐ**अभांड-कुभांड न०** तोहमत; निराधार दोषारोपण; आळ.

अभाव [**सं०** अ(नाहीं) + भाव (अस्तित्व)] **पु०** १ नसणें; मुळींच नसणें. नाहींपणा. २ उणीव. ३नाश.४प्रलय, मृत्यु.५ नाहींसें होणें. ६(न्यायांत) अस्तित्वाच्या विरोधी स्थिति; भावाहून जो भिन्न तो. ज्याचें आकलन त्याच्या प्रतियोग्याच्या ज्ञाना-धीन असतें तो,–जसें पटाभाव याचें ज्ञान त्याचा प्रतियोगी जो पट त्याचें ज्ञान झाल्याशिवाय होणें अशक्य. अभाव दोन प्रकारचा आहे, –संसर्गाभाव आणि अन्योन्याभाव. संसर्गाभावाचे तीन प्रकार आहेत, –प्रागभाव, प्रध्वंसाभाव, आणि अत्यंता-भाव. ॐ**अभावीं क्रि० वि०** ०ची जरूरी असतां, ०ची उणीव असतां; नसतां. **अभावे ब्रह्मचर्य** [**सं०**] **न०** वासना तृप्त करण्याच्या साधनांच्या अभावीं घडणारें ब्रह्मचर्य; स्तुतीला पात्र नाहीं असें ब्रह्मचर्य.

अभावणी [**म०** आ+भावणें (गणती किं० अजमास करणें)]**स्त्री०** एकाद्या शेताच्या, बागेच्या, इ० च्या उत्पन्नाचा ठोकळ रीतीचा अदमास.

अभावनीय [**सं०** अ (नाहीं)+भावनीय (ज्याची कल्पना करतां येते असें)] **वि०** अकल्प्य; दुश्चिंत्य; ज्याची कल्पना करतां येत नाहीं किं० करणें योग्य नाहीं असें.

अभाविक [अ+भाविक (श्रद्धायुक्त, निष्ठावान्)]**वि०** १ (ईश्वराचे ठायीं) निष्ठा, श्रद्धा, किं० भक्ति, नसलेला. २ कल्पनेंत नसलेलें; ज्याच्या शक्यतेबद्दल विचार देखील मनांत आला नव्हता असें. **न०** अति थोडें प्रमाण (पदार्था-दिकांचें); अति स्वल्प अंश. उ० नानासाहेबांकडे जेवावयाला गेलों, पण तेथें तुपाचें अभाविकच !

अभाळ,आभाळ न० १ आकाश.२ मेघपटल. ॐ**अभाळ येणें** आकाशांत मेघ गोळा होणें. २ त्यायोगें भूतलावर अंधारी पसरणें. **अभाळ कोसळणें** पराकाष्ठेचा अनर्थ गुदरणें. **एकाद्यावर अभाळ येणें** १ त्याच्यावर संकट,अनर्थ,इ० गुदरणें. **आभाळ डोक्याला लागूं लागणें,अभाळ ठेंगणें दिसणें,होणें** किं० **अभाळ दोन बोटें उरणें** गर्वानें अतोनात ताठणें किं० उन्मत्त होणें. कोणाची गुमान न वाटणें. **अभाळावर अभाळ येणें** अनर्थामागून अनर्थ गुदरणें; एकसारखीं संकटें अनुभवास येणें. **अभाळाशीं भांडणें** फार उंच असणें (डोंगर, झाडें, हवेल्या, इ०). **अभाळास भोक पडणें** मुसळधार पाऊस पडणें. **अभाळ फाटलें तर त्यास ठिगळ कोण देईल** ? दैविक आपत्तीला कोणाचा इलाज चालूं शकतो ? त्या आपत्ति निमूटपणें सोसल्या पाहिजेत.**अभाळावर चढणें** १ भरमसाटपणें मागणें किं० याचना करणें. २ अरेरावीपणा करूं लागणें. **अभाळाची सावली** क्षणभंगुर सोय; जिची शाश्वती नाहीं अशी अनुकूल परिस्थिति. **अभा-ळाचा गाळ पु०** आभाळांत गोळा झालेले दाट आणि काळेकुट्ट ढग.

अभि [सं०] **अ०** मराठींत हा शब्द स्वतंत्रपणें योजला जात नाहीं. त्याचे पुढील अर्थ होतात.०कडे,०च्या दिशेस,०च्यावर, ०च्या पली-कडे, सभोंवतीं, अत्यन्त इ०.

अभिघार [सं०] **पु०**१. तूप. २ हविर्द्रव्यांवर तूप घालणें.

अभिचार[सं० अभि+चर]**पु०**१ जारणमारण. २ प्रहार. ३ हिंसा, नाश.

अभिचारी, अभिचारक [सं०] **पु०** जारण-मारणादि कर्म करणारा.

अभिजन[सं०] **पु०** १ कुळ. २ उत्तम कुळ. ३ उत्पत्ति. ४ पूर्वज किं० वंशज. ५ जन्मभूमि. ६

कुळांतील मुख्य. ७ कीर्ति. ८ नातलग, परिवार.

अभिजात [सं०] वि० १ कुलीन. २ सभ्य; प्रतिष्ठित. ३ वरच्या दर्जाचा. ४ योग्य, न्याय्य. ५ प्रिय, मधुर; रमणीय. ६ उच्च;सुसंस्कृत;विदग्ध.

अभिजाति [सं०] स्त्री० कुलीनता.

अभिजित [सं] पु० १ गवामयन यज्ञांतील एक भाग.२ एक नक्षत्र. न० सूर्योदयापासून आठवा मुहूर्त. (मध्यान्हापूर्वी आणि नंतर एक घटका). मराठींत विशेषणाप्रमाणें अथवा क्रियाविशेषणाप्रमाणें हा शब्द कधीं कधीं आकस्मिक, अनपेक्षित, अकस्मात, ह्या अर्थी योजतात. उ० आह्मां सहा माणसांना महिनाभर पुरण्याइतके आह्मी तांदूळ घेऊन ठेविले होते; परंतु आमच्या घरीं अभिजित चार पाहुणे आले, ते सहा दिवस राहिले, म्हणून मध्येंच आणखी तांदूळ विकत घेणें जरूर झालें. ०— **मुहूर्त** पु० दिनमानाचे पंधरा विभाग केले असतां त्यांतील आठवा. [वांजूनीं.

अभितः [सं०] क्रि० वि० सभोंवतीं; सर्व

अभिधान [सं ०] न० १ नांव. २ सांगणें. ३ २ नांव देणें. ४ संभाषण. ५ (व्या०) कर्त्यासंबंधानें विधान. ६ शब्द. ०—**वाद** पु० अन्वयार्थ वाद.

अभिधायक [सं०] वि० १ (अर्थ) दर्शविणारें. २ सांगणारें. पु० बोलणारा.

अभिधेय [सं०] वि० १ सांगण्याजोगें. २ नांव देण्यासारखें. न० १ (शब्दाचा) अर्थ. २ वस्तु. ३ (बोलण्याचा) विषय. ४ अक्षरशः अर्थ.

अभिनंदन [सं० अभि + नंद्=हर्षणें] न० १ स्तुति. २ इच्छा. ३ आनंद मानणें, कोणाचें कांहीं चांगलें झालें असतां त्याबद्दल आपण आनंदित होणें आणि आपला आनंद व्यक्त करणें.

अभिनय [सं० अभि + नी (नेणें)] पु० १ (दुःख, आनंद, इ० भावनांचे दर्शक) हावभाव. २ नाटक करणें.

अभिनव [सं०] अभि (विशेषकरून) + नव (नवीन)] वि० १ अगदीं नवीन. २ तरुण, कोंवळा. ३ ताजा, टवटवीत. ४ नवशिका. पु० खुशामत; तोंडासारखें बोलणें.

अभिनिविष्ट [सं० अभि+नि+विश् (प्रवेशणें)] वि० १ युक्त, सहित. २ तत्पर, गढून गेलेला. ३ प्रवृत्त. ४ कायमचें, स्थिर. ५ दक्ष. ६ दृढनिश्चयी; हेकेखोर. ७ निष्णात, प्रवीण.

अभिनिवेश [सं० अभि + नि+विश् (प्रवेशणें)] पु० १ एकाद्या कामाला वाहून घेणें, किं० त्यांत गढून जाणें. २ भक्ति, प्रेम. ३ उत्कट इच्छा. ४ दृढ निश्चय, हेकेखोरपणा, हेका. ५ अभिमान. ६ कल्पना, ग्रह. ७ प्रयत्न. (**वेदान्त**) प्रपंचासक्ति. ०**अभिनिवेशी** वि० चिकाटीनें प्रयत्न करणारा.

अभिनीत [सं० अभि (जवळ) +नीत नेलेला (नी=नेणें)] वि० १ जवळ नेलेला, आणलेला. २ करून दाखविलेलें (नाटक). ३ उत्तम प्रकारें बनविलेला. ४ सुशोभित. ५ उचित, योग्य (वाक्य, शब्द, इ०).६ क्षमाशील, शांत; कृपाळू.

अभिनीति [सं०] स्त्री० १ हावभाव. २ मैत्री, स्नेह.

अभिन्न [सं० अ (नाहीं) + भिन्न (फोडलेला; भिद्=फोडणें] वि० १ न फोडलेला, न फुटलेला. २ परिणाम न झालेला. ३ न बदललेला; तोच, पूर्वीचाच. ४ अखंड, सगळा. ५ दाट.

अभिप्राय [सं० अभि + प्र + इ (जाणें)]पु० १ हेतु, इच्छा. २ शब्दाचा अर्थ,आशय. ३उल्लेख, संबंध. ४ सरकारी रीत्या मारलेला शेरा. ५ पुस्तकादिकावर दिलेलें मत.(**अभिप्राव** हें मराठी अपभ्रष्ट रूप).

अभिप्रेत [सं०] वि० १ मनांत आणलेलें, असलेलें, किं० योजिलेलें. २ इच्छिलेलें. ३ स्वीकारलेलें. ४ आवडतें. न० १ इच्छा. २ अर्थ. ३ उद्देश. ४ धोरण.

अभिभव पु०, **अभिभवन** न० [सं० अभि +भू (होणें,असणें)] १ पराजय, जेरीस आणणें. २ वश होणें, ०च्या कबज्यांत जाणें. ३ तिरस्कार, अपमान, उपमर्द. ४ पीडा. ५ उत्कर्ष.

अभिभवणें [सं०] स० क्रि० १ पराभूत करणें. २ तुच्छ लेखणें, तिरस्कारणें.

अभिभूत [सं०] वि० १ पराभविलेला. २ तिरस्कारिलेला.

अभिमत [सं०] अभि + मत (मन्=मनांत आणणें)] वि० १ इष्ट, आवडणारें.२ पसंत केलेलें

स्वीकारलेलें. ३ सत्कारिलेलें. न० १ इच्छा. २ स्वीकार. पु० प्रियकर, कांत.

अभिमंत्रण [**सं०** अभि + मंत्र् (खलबत करणें) **न०** १ मंत्रांनीं पवित्र करणें. २ मंतरणें, भारणें. ३ बोलावणें.

अभिमंत्रणें [सं० अभि + मंत्र् (मसलत करणें)] **स० क्रि०** मंत्र म्हणून पवित्र करणें किं० बोलावणें.

अभिमंत्रित [सं०] **वि०** मंत्रांनीं पवित्र केलेला, बोलाविलेला, किं० प्रार्थिलेला.

अभिमर्द [**सं०** अभि + मृद् (चिरडणें)] **पु०** १ जोरानें घासणें. २ चिरडणें, कुसकरणें. ३ उध्वस्त करणें. ४ लढाई. ५ दाटी, गर्दी, खेचाखेच. ६ उपमर्द.

अभिमान [सं० अभि + मान (मन्=मनांत आणणें, विचार करणें)] **पु०** १ ज्ञान, बुद्धि. २ गर्व, ताठा. ३ मीपणा, अहंकार. ४ समज, विचार, कल्पना. ५ प्रेम. ६ हक्क सांगणें. ꕥ **अभिमानानें** (किं० ०खालीं) **मरणें** अतोनात गर्वानें किं० ताठ्यानें वागणें. आपली प्रतिज्ञा विफल न व्हावी, किं० यश कलंकित न व्हावें म्हणून नेटाचा प्रयत्न करणें. ꕥ**अभिमानधन** स्वताच्या कीर्तिला, लौकिकाला, किं० प्रतिज्ञेला कलंक न लागण्याविषयीं दक्ष; बाणेदार. **अभिमानी वि०** गर्विष्ठ, ताठेदार, बाणेदार.

अभिमानणें [**सं०** अभि+मन् (मनांत आणणें)] **स० क्रि०** १०ला हक्क सांगणें; ०चा अभिमान किं० गर्व बाळगणें. २ स्वीकारणें, आपलासा मानणें किं० समजणें; ०च्या योगक्षेमाचा पथकर घेणें किं० वाहणें.

अभिमुख [**सं०** अभि (कडे)+मुख(तोंड) आहे ज्याचें] **वि०** १ समोर तोंड केलेला; ०कडे तोंड केलेला, ०ला संमुख. २०च्या सन्निध असलेला. ३ सज्ज, सिद्ध (कांहीं कार्य करावयाला). ४ अनुकूल. ५ वर तोंड केलेला.

अभियान [**सं०** अभि (कडे)]+यान (जाणें) **न०** १ जवळ जाणें. २ कूच करणें, प्रयाण. ३ हल्ला.

अभियुक्त [**सं०** अभि+युक्त (युज्=जोडणें)] **वि०** १ तत्पर, गढलेला. २ उद्योगी, दक्ष; उत्साही, नेटदार. ३ निष्णात, विद्वान. ४ वरच्या दर्जाचा, उत्कृष्ट, प्रमाणभूत मानलेला. ५ हल्ला केलेला. ६ आरोप ठेविलेला. ७ श्रद्धा ठेवणारा. ८ एकाग्र. **पु०** प्रतिवादी, आरोपी. ꕥ**अभियुक्त उक्ति स्त्री०** वृद्ध वचन; प्रमाणभूत वाक्य.

अभियोग [**सं०**अभि+युज् (जोडणें)] **पु०** १ निकट संबंध. २ (एकाद्या कामाला) वाहून घेणें. ३ दीर्घ उद्योग, नेट, चिकाटी. ४ तत्परतेनें शिकणें. ५ आवेश. ६ आरोप; फिर्याद. ७ लढाई.

अभिराम [**सं०** अभि+रम् (सुखावणें)] **वि०** १ सुखकर, प्रिय, आवडण्याजोगें. २ सुंदर. **पु०** प्रियकर, पति.

अभिरुचि [**सं०** अभि+रुचि (गोडी; रुच् =आवडणें)] **स्त्री०** १ इच्छा. २ आवड. ३ आनंद. ४ महत्वाकांक्षा. ५ तेज.

अभिरूप [**सं०** अभि+रूप] **वि०** १ योग्य, साजेसें. २ सुंदर, रमणीय. ३ आवडता, प्रिय. ४ पंडित, विद्वान, शहाणा. ꕥ **अभिरूपपतिक वि०** योग्य नवरा मिळवून देणारें (एक व्रत).

अभिलाष [**सं०** अभि+लष् (इच्छिणें)] **पु०** १ इच्छा, मर्जी. २ प्रेम. ३ मिळविण्याची किं०अपहार करण्याची इच्छा. ꕥ**—बुद्धि स्त्री०** दुसऱ्याची वस्तु दडपून ठेवण्याची किं० लाटण्याची इच्छा.

अभिलाषणें [**सं०** अभि+लष् (इच्छिणें)] **स०क्रि०** दुसऱ्याच्या वस्तूची उत्कटतेनें इच्छा करणें.

अभिलाषी [**सं०** 'अभिलाष' पहा] **वि०** १ उत्कट इच्छा करणारा. २ दुसऱ्याच्या वस्तूची इच्छा करणारा.

अभिवचन [**सं०** अभि+वचन (वच्= बोलणें)] **न०** मी अमुक काम करीन अशा अर्थाचें दुसऱ्याची खात्री पटवून देणारें कथन किं० विधान; दुसऱ्यापाशीं भोगलेली प्रतिज्ञा.

अभिवादक, अभिवादी [**सं०** अभि + वद् (बोलणें)] **वि०** १ नमस्कार करणारा. २ सभ्य. ३ वर्णन करणारा.

अभिवादन [**सं०** अभि+वद् (बोलणें)] **न०** १ नमस्कार. २ मी अमुक असें नामोच्चारपूर्वक वंदन (वडील आणि पूज्य माणसांस).

अभिविधि [**सं०** अभि+विधि] **पु०** १ व्यापणें. २ विशिष्ट कालाच्या किं० अंतराच्या सुरवातीचें आणि शेवटचें टोक गणतींत घेणें. उ० यंदा

उन्हाळ्याची सुट्टी मेच्या १ तारखेपासून जूनच्या १५ तारखेपर्यंत आहे. येथें अभिविधि विवक्षित असल्यास सुट्टीचे दिवस ४६ पडतील; नसल्यास ४४ पडतील.

अभिवृद्धि [सं० अभि + वृध् (वाढणें)] **स्त्री०** १ वाढ. २ वैभव, भरभराट.

अभिव्यक्त [सं०अभि + व्यक्त (प्रकटिलेला; व्यंज् = प्रकटिणें)] **वि०** १ उघड केलेला किं० झालेला; प्रकटलेला किं० प्रकटिलेला. २ स्पष्ट किं० खुलासेवार.

अभिव्यक्ति [सं० 'अभिव्यक्त' पहा] **स्त्री०** १ उघड करणें किं० होणें. २ खुलासा. ३ प्रदर्शन.

अभिव्यंजक [सं० वरचे दोन शब्द पहा] **वि०** प्रकट किं० स्पष्ट करणारा; खुलासा करणारा; उघड सांगणारा.

अभिव्यापक [सं० अभि+व्यापक (भरणारा; वि+आप्=मिळविणें)] **वि०** पूर्णपणें व्यापणारा किं० भरून काढणारा.

अभिव्यापणें [सं०] **स०क्रि०** पूर्णपणें व्यापणें किं० भरून काढणें.

अभिव्याप्ति [सं० अभि (सर्वतः)+व्याप्ति (पसरणें; वि+आप्=मिळविणें)] **स्त्री०** सर्वव्यापकता; सर्व प्रदेशाचा किं० अवधीचा समावेश.

अभिशप्त[सं० अभि+शप(शापणें, निंदिणें)] **वि०** १ ज्याला शाप दिला आहे असा. २ ज्याच्यावर कांहीं तोहमत आली आहे असा.

अभिशंसन [सं० अभि (प्रतिकूल)+शंसन (सांगणें)] **न०** १ निंदा. २ अपमान. ३ आरोप.

अभिशंसि [सं० वरचा शब्द पहा] **वि०** १ दुसऱ्याची निंदा करणारा किं० निंदेचा प्रसार करणारा. २ दुसऱ्यावर तोहमत घेणारा.

अभिशस्त [सं० 'अभिशंसन' पहा] **वि०** १ ज्याच्यावर तोहमत घेण्यांत आली आहे असा. २ ज्याची निंदा करण्यांत आली आहे असा.३ ज्याचा अपमान करण्यांत आला आहे असा.

अभिशाप पु०, अभिशपन न० [सं० 'अभिशप्त ' पहा] १ शाप. २ आरोप. ३ निंदा. ४ आळ. (मराठींत अभिश्राप हें अशुद्ध रूपही रूढ आहे).

अभिश्रवण [सं० अभि+श्रु (ऐकणें)] **न०** १ श्राद्धांत ब्राह्मण जेवतांना मंत्र म्हणणें. २ अभिश्रवणाचे मंत्र.

अभिषं (-सं-) ग [सं० अभि+संज् (चिकटणें)] **पु०** १ संगति, संबंध. २ आसक्ति. ३पराभव.४ अकल्पित संकट.५ भूतबाधा.६ शपथ. ७ आलिंगन, संभोग. ८ शाप. ९ आळ. १० तिरस्कार. ११ आवेश.

अभिषव पु०,अभिषवण न०[सं०अभि+सु (अर्क, रस, इ० काढणें)] १ सोमवल्ली कुटून रस काढणें. २ मद्य इ० तयार करणें. ३ धर्मकृत्यार्थ स्नान किं० इतर प्रसंगांचें स्नान. ४ सोमपान.

अभिषिक्त[सं०अभि+सिच्(वर पाणी ओतणें)] **वि०** १ ज्यावर विधिपूर्वक अभिषेक करण्यांत आला आहे असा. २ ज्याचेवर पाणी शिंपडलें आहे असा.

अभिषेक[सं०'अभिषिक्त'पहा]**पु०** १ शिंपडणें. २ मंत्रपूर्वक शिंपडणें. ३ राज्याभिषेक. ४ राज्याभिषेकाचें पाणी. ५ स्नान. ६ पूजाविधींतील देवस्नान. ॐ **–पात्र न०** देवांवर स्नानार्थ अभिषेक करावयासाठीं सतत धार पडण्याजोगें सच्छिद्र पात्र केलेलें असतें तें.

अभिषेचन [सं० 'अभिषिक्त' पहा] **न०** १ राज्याभिषेक. २ अभिषेकाची सामग्री.

अभिषेच (–क–)णें [सं० 'अभिषिक्त' पहा] **स० क्रि०** ०वर मंत्रपूर्वक जलानें सिंचन करणें.

अभिष्टव [सं० अभि+स्तु (स्तविणें)] **पु०** स्तुति, स्तोत्र.

अभिसंधि [सं० अभि+सं+धा (ठेवणें)]**पु०** १वचन.२हेतु;उद्देश,ईप्सितार्थ.३ मथितार्थ, आशय. ४ मत, समज. ५ करार, कराराच्या किं० तहाच्या अटी. ६ फसवणूक. ७ तह करणें; मित्रभाव किं० सलोख्याचा संबंध स्थापित करणें (एका राजानें दुसऱ्या राजाबरोबर).

अभिसारिका [सं० अभि+सृ (सरणें)] **स्त्री०** प्रियकराच्या इच्छेनें (कांतार्थिनी) जी स्त्री त्यास संकेतस्थळीं भेटावयास जाते ती. अशा आपुकमापुकांना भेटावयास क्षेत्र, वाटी, भग्नदेवालय, दूतीगृह, वन, श्मशान, किंवा नद्यादींची तटी, या योग्य जागा सांगितल्या आहेत.

अभिहत [सं० अभि+हन् (मारणें)] **वि०** १ मारलेला; इजा केलेला. २ अतिक्रांत, जर्जर; उ० शोकाभिहत. ३ आडविलेला, व्यत्यय केलेला. ४ (गणितांत) गुणिलेला.

अभिहित [सं० अभि+धा (ठेवणें; अभिधा =बोलणें)] **वि०** १ बोललेलें. २ संबोधिलेला. ३ स्मरण दिलेला. ४ ठरविलेला. ५ वर ठेविलेला. ❀ **अभिहितान्वयवाद पु०** शब्दांना स्वतंत्र अर्थ असतो आणि शब्दांचे स्वतंत्रपणें अर्थ केल्यावर वाक्याचा अर्थ होतो असें मत (नैयायिकांचें).

अभिज्ञ [सं० अभि+ज्ञा (जाणणें)] **वि०** १ जाणणारा. २ माहितगार. ३ अनुभविक. ४ निष्णात, प्रवीण. **पु०** परमात्मा.

अभिज्ञा [सं० ' अभिज्ञ ' पहा] **स्त्री०** १ ओळख. २ स्मरण.

अभिज्ञात [सं० ' अभिज्ञ ' पहा] **वि०** १ माहितगार. २ पूर्णपणें जाणलेलें किं० अनुभविलेलें.

अभिज्ञान न०,अभिज्ञा स्त्री० [सं०'अभिज्ञ' पहा] १ खूण, चिन्ह. २ चंद्रबिंबांतील काळा भाग. ❀– **पत्र न०** १ दाखला. २ शिफारसपत्र.

अभीप्सित [सं० अभि+ ईप्सित (आप्= मिळविणें)] **वि०** इच्छिलेलें.

अभीष्ट [सं० अभि+इष्ट (इष्=इच्छिणें)] **वि०** १ इच्छिलेलें. २ प्रिय, लाडका. ३ ऐच्छिक. **न०** कल्याण, शुभ. ❀–**चिंतन न०**(अमक्याचें) कल्याण होओ अशी इच्छा.

अभुक्त [सं० अ (नाहीं)+भुक्त(भोगिलेलें; भुज्=खाणें, अनुभविणें)] **वि०**१ न खाल्लेलें. २ न अनुभविलेलें. २ न उपभोगिलेलें. ४ न जेवलेला. ❀ – **मूल न०** ज्येष्ठा नक्षत्राच्या अन्त्य चार घटका आणि मूळाच्या आद्य चार घटका मिळून जो आठ घटकांचा अवधि तो.

अभूत [सं० अ (नाहीं)+भूत (झालेला; भू=होणें)] **वि०** १ न झालेला. २ नसलेला. ३ खोटें. ❀–**आहरण न०** गर्भित किं० लाक्षणिक भाषण. – **पूर्व वि०** अपूर्व, लोकोत्तर. – **उपमा स्त्री०** वस्तुतः नाहीं जो पदार्थ तो संभावनेनें कल्पून त्याची इतर पदार्थास जी उपमा देतात ती.

अभूमि [सं० अ+भूमि] **स्त्री०** १ अयोग्य जागा. २ आटोक्याबाहेरचा प्रांत.

अभेद [सं० अ+भेद (भिद्=फोडणें)] **पु०** १ साम्य, एकरूपता. २ निकट संबंध. **वि०** १ न विभागलेलें. २ सदृश, एकरूप. ❀–**वाद पु०** जीवात्मा आणि परमात्मा यांचा वस्तुतः अभेद आहे असें मत.

अभेद्य [सं० ' अभेद ' पहा] **वि०** भेदण्यास किं० फोडण्यास अशक्य. **न०** हिरा.

अभोगत [सं० 'अभुक्त' याचें अपभ्रष्ट रूप] **वि०** निकालांत न निघालेलें किं० न काढलेलें; मुग्ध स्थितींत असलेलें; संदिग्ध स्थितींत असलेलें.

अभोग्य [सं० अ (नाहीं) + भोग्य (भोगण्यास योग्य; भुज्=भोगणें)] **वि०** भोगण्यास किं० उपयोगास अयोग्य.

अभोज्य [सं० अ (नाहीं)+भोज्य (भुज् =खाणें, भोगणें)] **वि०** १ खाण्यास अयोग्य किं० अपवित्र. २ ज्याचें अन्न खाणें अयोग्य आहे असा.

अभ्यंग पु०, अभ्यंजन न० [सं० अभि+ अंज् (माखणें)] १ तेल, उटी, इ० लावणें. २ माखणें, चोपडणें. ३ डोळ्यांत अंजन घालणें. ४ उटी, तेल, इ०. ५ अंजन. ❀ – **स्नान न०** तेलें इ० लावून स्नान करणें.

अभ्यंतर [सं० अभि+अंतर] **न०** १ आंतला भाग. २ माजघर. ३ अवधि. ४ अंतःकरण, मन.

अभ्यर्थन न०,अभ्यर्थना स्त्री०[सं० अभि+ अर्थ् (याचणें)] १ विनंति. २ याचना.

अभ्यस्त [सं० अभि+अस् (फेकणें)] **वि०** १ सवयीचा; परिचित. २ पढलेला. (**व्या०**) **वि०** द्वित्व केलेलें. **पु०** द्वित्व केलेला धातु.

अभ्यागत [सं० अभि+आगम् (येणें)] **पु०** पाहुणा. **वि०** जवळ आलेला.

अभ्यास [सं० अभि+आ+अस् (फेकणें)] **पु०** १ पुनरुच्चारण;आवृत्ति. २ सराव; पुनः पुनः करणें. ३ सवय. ४ शास्त्रीय शिक्षण. ५ अध्ययन. ६ (**व्या०**) द्वित्व होणें. ७ द्वित्व झालेल्या शब्दाचें पहिलें अक्षर. ८ (**गणित**) गुणाकार. (**संगीत**) ध्रुवपद.

अभ्यासणें [सं० " अभ्यास " पहा **स० क्रि०** १ शिकणें, पढणें. २ पुनःपुनः करणें.

अभ्यासी [सं० अभ्यास+ई (मराठी प्रत्यय)] **वि०** अभ्यास करण्यांत तत्पर.

अभ्युत्थान [सं० अभि+उत्+स्था (उठणें, उभें राहणें)] **न०** १ सन्मानार्थ उठणें. २ मोहिमीवर निघणें.३ युद्धाची तयारी.४ उत्कर्ष,वाढ, भरभराट. ५ सूर्योदय.

अभ्युदय [सं० अभि+ उत्+ इ (जाणें)] **पु०** १ उगवणें. २ भरभराट, उत्कर्ष. ३ उत्सव. ४ आरंभ.

अभ्युदित [सं० " अभ्युदय " पहा] **वि०** १ उगवलेला. २ वर आलेला. ३ सूर्योदयकाळीं निजलेला.

अभ्युपगम [सं० अभि+उप+गम् (जाणें)] **पु** १ जवळ येणें. २ कबूली, स्वीकार, पथकर. ३ वचन, करार. ४ मत, विचार. ५ अनुमान. ६ सादृश्य.

अभ्युपेत्यवाद [सं० स्वीकार करून वाद] **पु०** एक विशिष्ठ विधान खरें म्हणून स्वीकारून तें कसास कितपत टिकतें हें पाहणें.

अभ्र [सं०] **न०** १ ढग. २ आकाश. ३ अभ्रक. ꕥ **–च्छाया स्त्री०** क्षणभंगुर सुख, सोय, किं० आराम.

अभ्रक [सं] **न०** एक खनिज पदार्थ.

अभ्रा पु० उशी, गिर्दी, तक्या, लोड, इ० चें पिशवीच्या आकाराचें आच्छादन.

अमका, अमुक [सं०] **वि०** कोणी,एकादा. ꕥ **अमका तमका वि०** कोणी तरी.

अमंगल [सं० अ (नाहीं) +मंगल (पवित्र)] १ अशुभ; अपशकुनी. २ अस्वच्छ, घाणेरडा.

अमटी, अंबटी स्त्री० १ वनस्पतिविशेष. २ तोंडी लावण्याचा एक मसालेदार पातळ पदार्थ.

अमंत्रक [सं० अ+मंत्र+क (प्रत्यय)] **वि०** १ मंत्ररहित. २ वेदाला अनधिकारी. ३ वेद न शिकलेला.

अमदानी [फा०] **स्त्री०** १ शेताचीं किं० बागांचीं पिकें वगैरे जिन्नस विपुलपणें बाजारांत विकावयास येतात तो काळ; सुगीचे दिवस. २ अशा जिनसांवर बसविलेल्या जकातीचें उत्पन्न. ३ वैभवाचा, भरभराटीचा, किं० उत्कर्षाचा काळ.

अमनचैन, अमीनचमीन [अ० अमन्+फा० चैन्] **वि०** विपुल, पुष्कळ; मनमुराद. **स्त्री०** वैपुल्य. **क्रि० वि०** सुरक्षितपणें; निर्धास्त रीतीनें.

अमनधक्का, अमनधक्का पु० ह्याचें तृतीयेचें एकवचन विशेष रूढ आहे. **क्रि० वि०** ठोकळ मानानें; तर्कानें; अजमासानें; अनमानानें.

अमर [सं० अ+मृ(मरणें)] **वि०** ज्याला नाश किंवा मरण नाहीं असा. **पु०** १ देव. २ तेहेतीस ही संख्या. ꕥ**–अंगना स्त्री०** अप्सरा. **–अधिप पु०** इंद्र. **– आचार्य पु०** बृहस्पति. **–आपगा स्त्री०** गंगा नदी. **– आलय, –लोक पु०** स्वर्ग. **– तरु पु०** कल्पवृक्ष. **–कंद,–कांदा पु०** एक औषधी कंदविशेष. **–पट्टा पु०, –पत्र न०** तुला मरण येणार नाहीं अशा अर्थाचें आज्ञापत्र; (अकरणीरूपी प्रयोगांत); उ० असा कोण माणूस अमरपट्टा घेऊन आला आहे ? कोणी नाहीं ! सगळीं माणसें मरावयाचींच ! **– वेल स्त्री०** एक प्रकारचा वेल.

अमरता [सं० अमर+ता (प्रत्यय)] **स्त्री०** अमरपणाची स्थिति.

अमरसा पु० एक प्रकारचा दागिना.

अमराई सं०[आम्र +राजी (पंक्ति)] **स्त्री०** आंब्याच्या झाडांचा बाग; आंबराई.

अमरावती [सं०] **स्त्री०** इंद्राची नगरी.

अमर्याद [सं० अ (नाहीं)+ मर्यादा (सीमा) ज्याला]**वि०** १ ज्याला मर्यादा,सीमा, किं० प्रतिबंध नाहीं असा. २ शिष्टाचाराचें उल्लंघन करणारा (माणूस). ३ योग्य परिमाणाच्या पलीकडे असलेला किं० गेलेला.

अमर्यादा [सं० अ अभावदर्शक+मर्यादा] **स्त्री०** योग्य सरणीचें किं० शिष्टाचाराचें उलंघन किं० अतिक्रमण.

अमर्ष [सं० अ (अभावार्थक)+मृष्(सहन करणें)] **पु०** १ असहिष्णुता. २ मत्सर. ३ क्रोध. ४ आवेश. **वि०** न सहन करणारा; न सोसणारा; असहिष्णु.

अमर्षण [सं० 'अमर्ष 'पहा] **वि०** १ असहिष्णु. २ क्रोधयुक्त; रागीट.

अमल [सं० अ (नाहीं) + मल (दोष) ज्यांत] **वि०** १ चकचकणारें. २ शुद्ध;दोषरहित. ꕥ**– रत्न न०,– मणि पु०** स्फटिक.

अमल [अ० अम्ल्] **पु०** १ राज्य, शासन.

२ अधिकाराची जागा. ३ नियंत्रणा. ४ पगडा, जोर; उ० ह्या औषधाचा अमल दोन तीन दिवसांत तुमच्या रोगावर बसेल. ५ सुमार, अटकळ; उ० आतां नवाचा अमल असावा म्ह० सुमारें नवाच्या थोडा आलीकडचा किं० थोडा पलीकडचा वेळ असेल. ꣸अमलाच्या जोरानें कांहीं विशिष्ट अधिकारानें प्राप्त झालेल्या सामर्थ्यावर. **अमलांत आणणें** १ (एकादा हुकूम, आज्ञा, विचार, बेत इ०) प्रचारांत किं० कृतींत आणणें किं० तदनुरूप वर्तन करणें; कृतींत उतरविणें. २ नियंत्रणेंत किं० आपल्या शासनांत आणणें. **अमलदार** पु० अधिकारी. **अमलदारी** स्त्री० अधिकाऱ्याची जागा किं० त्याचें कर्तव्य किं० त्याचें शासन. **अमलमस्त** वि० कांहीं अधिकाराच्या जागेवर असल्याकारणानें उन्मत्त, बेफाम, किं० बेगुमान झालेला. **अमलबजावणी** स्त्री० हुकूम इ० कृतींत आणणें. **अमल गहाण** न० धनकोच्या ताब्यांत तारण म्हणून माल देऊन घेतलेलें कर्ज. **अमलाफैला** पु० अधिकार, ताबा, शासन. **अमलनूफअलन्** [अ०]क्रि०वि० पूर्णपणें, सर्वथैव, अगदीं, बिनतकरार, कांहीं बांधा न राहातां, (विक्री, खतें, वगैरे करणें).

अमल [हिं० अम्ल्] पु० १ कैफ, उन्माद. २ कैफ आणण्याचा गुण. ꣸–**करणें** दारू, अफू, चरस, भांग, गांजा, इ० कैफ आणणाऱ्या पदार्थांचें सेवन करणें. **अमली** वि० मादक पदार्थांचें व्यसन असलेला. **अमली बाब** स्त्री० ताडी, माडी, शिंदी, अफू, इ० मादक पदार्थांचें खातें.

अमसूल, अमसोल [सं०अम्ल(अंबट) +म० साल (त्वचा)] न० कोकमाच्या म्ह० रातांब्याच्या फळाची वाळवून तयार केलेली साल (ही साल सार, आंबटी, वगैरे मध्यें आंबटपणासाठीं घालतात; श्राद्ध पक्ष वगैरेंच्या प्रसंगीं त्यांची चटणी वाटतात).

अमळ, अमळसा क्रि० वि० थोडा, किंचित्, अल्प प्रमाणांत.

अमा [म०] पु० आईचा स्तन.

अमा [सं०] स्त्री० १ अमावास्या. २ चंद्राची पंधरावी किंवा सोळावी कला. ३ शुक्ल पक्षांतील दिवस.

अमातृक [सं० अ (नाहीं) मातृ (आई) ज्याला] वि० मातृहीन; आई नसलेलें पोरकें मूल.

अमात्य [सं० अमा (शेजारीं) + त्य (प्रत्यय= असणारा)] पु० १ शेजारी. २ प्रधान. ३ शिवाजीनें निर्मिलेल्या अष्ट प्रधानांपैकीं एक विशिष्ट प्रधान. [मागें पहा.

अमानत या शब्दाचें अपभ्रष्ट रूप ' अनामत '

अमानित्व [सं० अ + मान + इन् (प्रत्यय) + त्व (प्रत्यय)] न० गर्व, अभिमान, दर्प, ताठा, इ० चा अभाव; नम्रपणा; लहीनपणा.

अमानी वि० १ कायमचा अधिकारी गैरहजर असतां त्याचें काम अल्प अवधींत पाहाणारा किं० करणारा (अधिकारी). २ अशा अधिकाऱ्यानें केलेला, चालविलेला, किं० ठरविलेला (निकाल, हुकूम, नियम, इ०).

अमानुष [सं० अ + मानुष] वि० १ अलौकिक. २ राक्षसी. ३ अत्यन्त क्रूरपणाचा; मनुष्य प्राण्याला न शोभेल असा. ४ मानवी वसति नसलेलें; निर्जन.

अमान्य [सं० अ (नाहीं) + मान्य (संमत)] वि० स्वीकारण्यास किं० पथकरण्यास अयोग्य; त्याज्य.

अमाय [सं० अ (नाहीं) माया (कपट) ज्यांत] वि० १ निष्कपटी; प्रामाणिक. २ मर्यादारहित.

अमायिक, अमायी [सं० ' अमाय ' पहा] वि० निष्कपटी, प्रामाणिक.

अमार्ग [सं० अ (अयोग्य) मार्ग (वाट)] पु० अयोग्य किं० भलताच मार्ग किं० सरणी.

अमार्दव [सं० " अमृदु " चें भाववाचक नाम; अ + मृदु (कोमल)] न० मृदुपणाचा अभाव.

अमाव (–वा–) स्या, अमाव (–वा–) सी [सं० अमा (शेजारीं) + वस् (राहणें, असणें)] स्त्री० चंद्र आणि सूर्य यांच्यांतील अंतर ज्या दिवशीं किं० ज्या तिथीस शून्य होतें तो दिवस किं० ती तीथि; अवस. याचीं **अमोशी, अमोशा**, अशींही अपभ्रष्ट रूपें आहेत.

अमित [सं० अ (नाहीं) + मित (मोजलेलें; मा = मोजणें, मापणें)] वि० १ अमर्याद, अनंत. २ अव्हेरिलेला. ३ अज्ञात. ४ असंस्कृत.

अमित्र [सं० अ (नाहीं)+मित्र (स्नेही)] **पु०** मित्र नव्हे तो; शत्रु.

अमीन [अ०] **पु०** १ मध्यस्थ. २ वादी व प्रतिवादी यांच्या तंट्याचा निकाल लावणारा अधिकारी. ३ कारकुनांवर देखरेख करणारा अधिकारी.

अमीनी [अ० "अमीन" पहा] **स्त्री०** अमीनाचें कर्तव्य, हुद्दा, किं० अधिकार.

अमीर [अ०] **पु०** सरकारांतून ज्याला कांहीं सरंजाम किं० किताब मिळाला आहे तो. (मुसलमानी रियासतींतील पदवी). ❁**अमीर उमराव** [अ० अमीर (एकवचन) + उमरा (अनेकवचन)यांचा संयोग; " व " हें अक्षर निरर्थक] **पु० अ० व०** वडे लोक; थोर लोक.

अमुक [सं०] **वि०** कोणी; कोणी एक. ❁**—तमुक वि०** कोणी तरी; कोणी एक, कोणीतरी एक, कोणी, एकादा.

अमुक्त [सं० अ (नाहीं)+मुक्त (सोडलेला; मुच्=सोडणें)] **वि०** १ न सोडलेला. २ न सुटलेला. ३ मोक्षाच्या दशेस न पोचलेला. ❁**अमुक्ताभरण न०** भाद्रपद शुद्ध सप्तमीला देवीच्या पूजेचा विधि.

अमुत्र [सं० अदस्=तो] **क्रि० वि०** १ तेथें. २ परलोकीं. ३ त्या पक्षीं. ४ तिकडे.

अमू [मुलांच्या भाषेंत] **पु०** आईचा स्तन.

अमू वि० १ ज्यांना वाचा नाहीं असे (पशुपक्ष्यादि प्राणी).२ ज्याला अजून बोलतां येत नाहीं (असें मूल).

अमूप [म० अ (नाहीं)+माप (परिमिति) ज्याला] **वि०** पुष्कळ, विपुल, अतोनात.

अमूर्त [सं० अ+मूर्त=आकारयुक्त] **वि०** आकाररहित. (आकाश, काळ, ब्रम्ह, इ० ना लावावयाचें विशेषण).

अमूल्य [सं० अ (नाहीं)+मूल्य (किंमत) ज्याला] **वि०** बिनमोल; अतिशय मूल्यवान; बहुमोल.

अमृत [सं० अ (नाहीं)+मृत (मेलेला)] **वि०** १ न मेलेला. २ अविनाशी. ३ अमर करणारें. **पु०** १ देव. **न०** १ अमरत्व. २ मोक्ष. ३ देवांचा समूह. ४ स्वर्ग. ५ देवांचें खाद्य किं० पेय. ६ पाणी. ७ दूध, साखर, मसाला,इ० पदार्थांचें केलेलें एक खाद्य. ८ { दूध [तुका०}. ❁**—अंशु पु०** चंद्र. **—अशन पु०** देव. **—कळा स्त्री०** चंद्राची कळा. **—फळ न०** १ द्राक्ष.२पडवळ. **—सिद्धियोग पु०** एक शुभ समय. **—ध्वनि पु०** एक वृत्त. याच्या चरणांत बावीस अक्षरें असून त, भ, य, ज, स, र, न हे गण आणि एक गुरु अक्षर असत.**—कुंडली स्त्री०** एक वाद्यविशेष. **अमृताचें जेवण आणि गोमुत्राचें आंचवण** आनंदांत प्रारंभ आणि दुःखांत समाप्ति.

अमृत्यु [सं० अ + मृत्यु (मरण)] **पु०** अमरत्व. **वि०** अमर.

अमेंज, अमेद [फा० आमेज] **स्त्री०** मिश्रण. **वि०** मिश्र, मिसळलेलें.

अमेध्य [सं० अ (नाहीं) + मेध्य (पवित्र)] **वि०** १ यज्ञास अयोग्य (मनुष्य, वस्तु, स्थल, इ०). २ अपवित्र, घाणेरडा. **न०** विष्ठा.

अमेय [सं० अ (नाहीं) + मेय (मापण्याजोगें; मा=मापणें, मोजणें)] **वि०** अगणित; फार मोठा.

अमोघ [सं० अ (नाहीं) + मोघ (निष्फळ)] **वि०** हटकून काम करणारें,लागू पडणारें,किंवा फळ देणारें (वीर्य, वर, औषध, मंत्र,इ०).

अमोज [म० अ + मोजणें] **वि०** न मोजतां येईल इतकें; अतिशय; पुष्कळ; अगणित.

अमोल,अमोलिक, अमोल्य, अमूल्य [सं० अ (नाहीं) मूल्य (किंमत) ज्याला] **वि०** भारी किंमतीचें किं० योग्यतेचें. [दार पहा.

अम्मल, अम्मलदार इ० मागें **अमल,अमल-**

अम्याग वि० स्वभावानें अति गरीब पण कर्तृत्वशून्य (असा माणूस).

अम्ल [सं० अम्ल=अंबट] **वि०** अंबट;चिंच, लिंबू, इ०च्या चवीचा. ❁**अम्लोद्गार पु०** अंबट ढेकर.**—पित्त न०** एक रोग.

अम्लान [सं० अ (नाहीं)+म्लान (कोमेजलेला, सुखलेला)] **वि०** १ न सुखलेला; टवटवीत. २ स्वच्छ, चकचकीत.

अम्लिका, अम्लीका [सं०] **स्त्री०** १ अम्लपित्त. २ चुका. ३ अंबाडी. ४ चिंच.

अयता, आयता [सं० अयत्नतः ,किं० अयत्न]

वि० १श्रमावांचून किं० कष्टावांचून मिळालेलें किं० झालेलें. २ अनपेक्षित किं० अकल्पित. ३ निकडीचा, घाईचा, बिन फुरसतीचा, किं० ऐन, (वेळ). उ० ल्ग्नाची तयारी अगोदरपासून करून ठेवा, म्हणजे आयत्या वेळीं धांदल उडणार नाहीं. क्रि०वि० सहजा-सहजीं;श्रम, कष्ट, वगैरे न करतां. पु० खाद्यविशेष. ❀अयत्या पिठावर रेघा ओढणें, किंवा घुटका मारणें श्रमावांचून मिळालेल्या पैशावर चैन करणें. अयती वेळ स्त्री० १ ऐन वेळ. २ कामाची, किं० जरूरीची वेळ. अयत्यावर कोयता श्रमावांचून मिळालेल्या पदार्थाची किं० पैशाची नासाडी करावयाला कोणी कचरत नाहीं. आयत्यावर रायतें करणें हल्लीं आपणाजवळ जें कांहीं आहे तें खर्चून चैन करणें. अयत्या बिळांत नागोबा बळी दुसऱ्याच्या श्रमाचें फळ किंवा यश जो आपण घेऊं पहातो तो (आमचें ''मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० '' पहा).

अयत्न [सं० अ (नाहीं) +यत्न (खटपट)] पु० श्रमाभाव; अनायास.❀अयत्नतः क्रि० वि० श्रमावांचून; खटपट न करतां. अयत्नसिद्ध वि० यत्न, श्रम, खटपट, इ० न करतां मिळालेलें किं० झालेलें.

अयथा [सं० अ (नाहीं) +यथा (जसें)] क्रि० वि० १ अयोग्य रीतीनें, चुकीनें. ❀अयथार्थ वि० १ अर्थशून्य. २ अनुचित; असंबद्ध. ३ खोटें. अयथातथ वि० १ अयोग्य. २ निष्फळ. ३ चुकीचें. अयथातथ्य न० १ अयोग्यपणा. २ निरर्थकपणा. अयथावत् वि० १ चुकीचें, अयोग्य, गैरशिस्त. २ संशयित.

अयदी वि० आळशी; रिकामें बसण्याचा ज्याला कंटाळा येत नाहीं असा.

अयन [सं० अय्=जाणें] न० १ जाणें; गति. २ रस्ता. ३ स्थान. ४ काळ, समय. ५ सैन्याच्या गमनाचा मार्ग. ६ (ज्यो०) भ्रमणकाळ. ७ सूर्यचंद्रांचें दक्षिणेकडे किं० उत्तरेकडे जाणें. ८ या गतीला लागणारा काळ(सहा महिने).❀ उत्तरायण न० १ सूर्याचें उत्तरेकडे जाणें. २ मकरसंक्रांतीपासून कर्कसंक्रांतीपर्यंतचा काळ. दक्षिणायन न० १ सूर्याचें दक्षिणेकडे जाणें. २ कर्क संक्रांतीपासून मकरसंक्रांतीपर्यंतचा काळ. अयनकाल पु० दोन संपातांतील अवधि. अयनचलन न० संपातबिंदूचें चलन म्ह० सरकणें. अयनवृत्त न० क्रांतिवृत्त.

अयनक [फा० अय्नक्=लहान डोळे] न० चष्मा, उपनेत्र, चाळिशी, आरशी.

अयना [फा० आयीनाह्=आरसा] पु० १ आरसा. २ चष्मा, उपनेत्र.

अयब [अ० ऐब=उणेपणा] पु० १ दोष, उणेपणा, व्यंग. २ खोडी;व्यसन; वाईट सवय.❀–दार वि० कांहीं उणेपणा किं० दोष असलेलें.

अयराण [फा० वैरानाह्] न० अरण्य; दाट झाडीचा प्रदेश. ['अविधवानवमी' पहा.

अयव, अयवनवमी पुढें ' अविधवा, '

अयंविशेषः [सं० अयं=हा, विशेष=गुणाधिक्य] हें उद्गारव्यंजक वाक्य आहे;याचा अर्थ, हें तर त्याहून चांगलें ! उत्तम !'

अयल, अयाल, आयाळ स्त्री० घोड्याच्या, खेचराच्या मानेवरचे लांब केश.

अयश [सं० अ (वाईट)+यश (कीर्ति)] न० दुष्कीर्ति, बदनामी.

अयस् [सं०] लोखंड.❀अयस्कांत [सं० अयस् लोखंड+कांत (प्रिय)] पु० लोहचुंबक. अयस्कणप न० फेकल्यावर फुटून आंतून लोखंडी तुकडे पडतात असें शस्त्र. अयस्कांड पु० लोखंडी बाण. अयस्कार पु० लोहार.अयोगोलक [सं० अयस् (लोखंड)+गोलक] पु० लोखंडाची गोटी किं० गोळा. अयोमुख पु० बाण. अयःशंकु पु० लोखंडी भाला. अयःशूळ न० १ लोखंडी भाला. २ आसुरी उपाय. अयोहृदय वि० कठोर, निष्ठुर.

अया, अय्या [सं० आर्य] पु० लिंगायत लोकांत बहुमानार्थक पदवी; उ० शिदरामय्या.

अयाचित [सं० अ (नाहीं) +याचित (मागितलेलें; याच=मागणें)] वि० १ न मागतां मिळालेलें. २ न मागतां जें मिळेल त्यावर निर्वाह करण्याची ज्याची वृत्ति आहे असा. ❀–वृत्ति स्त्री० याचना न करतां जें कांहीं मिळेल त्यावर संतोषानें राहाण्याचा स्वभाव किं० परिपाठ किं० सरणी.

अयाचिती स्त्री० न मागतां मिळेल त्यावर गुजराण करण्याची ज्याची वृत्ति आहे अशा माणसाला दिलेलें धान्य इ०.

अयाल, आयाळ [फा० याल] स्त्री० घोडा, खेचर, इ० चे मानेवरील लांब केश.

अयाल (-ळ) [फा० अय्याल्] कागदपत्रीं शूद्र विधवेचें पूर्ण नांव लिहितांना तिच्या नवऱ्याच्या नांवामागें योजावयाचा शब्द. उ० साश्त्री पवार अयाल गणोबा पवार.

अयावया स्त्री० कींविलवाणा किं० दया उत्पन्न करील असा शब्द किं० सूर; य.चा उपयोग "करणें" या क्रियापदासमवेतच होतो; उ० त्यानें कितीही अयावया केली तरी मी त्याची मागणी कबूल करणार नाहीं.('गयावया' याचाही हाच अर्थ आहे).

अयुक्त [सं० अ (नाहीं)+युक्त(युज्=जोडणें)] **वि०** न जोडलेलें; संबंध नसलेलें. २ रास्त नव्हे असें; अयोग्य; अनुचित; न जुळणारें.

अयुत [**सं०**] **न०** दहा हजार.

अयो, अयोनवमी 'अविधवा,' 'अविधवा-नवमी' हे शब्द पहा.

अयोग्य [सं० अ (नाहीं)+योग्य (उचित)] **वि०** १ न शोभणारें; अनुचित; रास्त नव्हें असें; गैर. २ नालायक, अपात्र.

अयोनि [सं० अ (नाहीं)+योनि (गर्भ किं० गर्भद्वार) ज्याला] **वि०** गर्भांतून उत्पन्न न झालेला, (ईश्वर). **अयोनिज पु०** विष्णु. **अयोनिसंभव पु०** शुक्रशोणितसंयोगानें उत्पन्न झालेले नव्हेत असे जे ईश्वराचे मानस पुत्र ते प्रत्येक. **अयोनिसंभवा स्त्री०** सीता, जानकी;(शेताच्या नांगरणींत सापडलेली म्हणून तिला हें नांव आहे).

अरई, अरय, आरई, आरय स्त्री० गुदद्वारीं किं० मांडीवर होणारें गळूं.

अरकशीवरकशी [अ० वर्अक्स्] **स्त्री०** भांडण, बोलाचाली.

अरकस [**फा०** अरह्कष्] **पु०** १ करवत. २ लाकडें अरकसणारा म्ह० करवतानें कापणारा माणूस. [करवतीनें कापणें.

अरकसणें [**फा०** 'अरकस' पहा] **स० क्रि०**

अरकशी, अरकशा [फा० 'अरकस' पहा] **पु०** करवतानें लाकडें कापणारा.

अरखडा पुढें 'अराखडा' पहा.

अरखणा, अराखणा स्त्री० १ आवरणें; अड-विणें. २ अडविणारा पदार्थ किं० योजना.

अरखुंडा पु० १ दोरीच्या घर्षणानें पडलेली खाच. २ दोरी सरकाविण्यासाठीं एकाद्या पदार्थावर पाडलेली खाच.

अरगजा [**हिं०**] सुगंधी चूर्णविशेष.

अरगड, अरगडी स्त्री० जोंधळ्याची एक जात.

अरगळणें अ० क्रि० गोंधळणें; काय करावें हें सुचत नाहीं अशा स्थितींत असणें.

अरगीपारगी, अरगोपारगी स्त्री० एकानें विटा, कौलें, इ० एका टोपलींत भरून दुसऱ्याच्या हातीं धावी, दुसऱ्यानें ती रिकामी करून परत पहिल्यास धावी, पहिल्यानें ती पुन्हां भरून दुसऱ्याला धावी असा क्रम. ह्या रीतीनें घागरीनें पाणी भरणें, दगड वगैरे एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणीं नेणें, इ० कामें केलीं जातात. ह्याचें **अरगी-पारगीनें, अरगीपारगीं** हें क्रियाविशेषणाच्या अर्थाचें रूप विशेष रूढ आहे.

अरजल वि० ज्याचा एक पाय पांढरा आहे असा (घोडा).

अरड स्त्री० करडई, एरंडाच्या बिया, इ० भाजून त्यांचें तेल काढण्यासाठीं केलेला कुट्टा (घाण्यांत न घालतां तेल काढण्याची रीति). ॐ**अरडीं दरडीं घालणें, ०ची अरड काढणें (किं० घेणें)** फार छळणें, सतावणें.

अरड,अरडा स्त्री० मोठमोठ्यानें ओरडणें किं० हाका मारणें, किं० असें करून केलेला किं०झालेला कलकलाट. ॐ **अरडा ओरड, अरडा ओरडा, अरडा अरड, आरडा ओरड स्त्री०** एकानें किं० अनेकांनीं ओरडणें, किंवा अशा ओरडण्यापासून झालेला कलकलाट. [आरडणें.

अरडणें अ० क्रि० मोठमोठ्यानें ओरडणें किं०

अरडेल न० 'अरड' शब्दाच्या स्पष्टीकरणांत दिलेल्या रीतीनें काढलेलें तेल.

अरड्या पु० ओरडून आणि आरडून कलक-लाट करतो तो.

अरणि, अरणी [**सं०**] यज्ञांत होमाकरितां जो अग्नि पाहिजे तो लाकडावर लाकूड घासून उत्पन्न करतात. हीं लाकडें शमी वृक्षाची असतात. अश्वत्थ वृक्षाचीही काष्ठें अशा तऱ्हेनें उपयोजितात. ह्या लाकडांना अरणि किं० अरणी म्हणतात. ॐ**अर-**

णिपात्र न० ज्या विशिष्ट काष्ठावर अन्य काष्ठ घर्षून अग्नि प्रज्वलित केला जातो तें.

अरणी स्त्री० जमिनीची किं० शेताची मर्यादा दाखविणारा लहानसा ओटा.

अरण्य [सं०] न० १ रान; जंगल; जेथें मनुष्यवसति नाहीं असें स्थल. २ गोसाव्यांचा एक पंथ किंवा अखाडा. ꕥ **अरण्यपंडित** पु० मूर्ख माणूस,—ज्याचें पांडित्य मनुष्यवस्तींत किं० मानवी व्यवहाराच्या उपयोगाचें नसतें. **अरण्यरुदन, अरण्यरोदन** न० व्यर्थ श्रम; ज्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं किं० होण्याजोगा नाहीं असें बोलणें, किं० असा उपदेश, किं० असें व्याख्यान. **अरण्ययान, अरण्यायन** न० संन्यास घेणें. **अरण्यराज** पु० १ सिंह. २ वाघ. **अरण्यसेवन** न० अरण्यवास पत्करणें.

अरतणें परतणें स० क्रि० वारंवार उलथणें पालथणें (पोळी वगैरे सर्व भागीं सारखी भाजली जावी म्हणून ती अशा तऱ्हेनें अरतावी परतावी लागते).

अरतवण परतवण न० नवीन लग्न झालेल्या मुलीला सासरीं पोंचविण्याचा आणि सासराहून परत बापाच्या घरीं आणण्याचा विधि किं० समारंभ.

अरता क्रि० वि० १ इकडच्या किं० ह्या बाजूस (उलट ' परता '). २ जवळचा, अधिक प्रिय किं० आत्मीय. ꕥ **अरतापरता** क्रि० वि० १ जवळच्या व लांबच्या बाजूंस; दोन्ही बाजूंस; चोहोंकडें; इकडे तिकडे; भोंवतालीं. २ त्या सुमारास, पुढें मागें, केव्हां तरी. वि० इकडचा तिकडचा; अवांतर; वरकड; दुसरें तिसरें कांहीं. उ० मी फक्त तुमचा स्वयंपाक करून देईन; अरतें परतें कांहीं करणार नाहीं.

अरत्नि [सं०] पु०, स्त्री० १ कोपर. २ मूठ, (हाताची). ३ हात. ४ कोपरापासून करांगुलीच्या अग्रापर्यंतच्या लांबीचें माप (चोवीस अंगुलें).

अरत्र [सं० अत्र पासून मराठी घटना] क्रि० वि० १ इकडे. २ येथें. न० इहलोक (परत्र=परलोक). ꕥ **अरत्र ना परत्र** क्रि० वि० इकडेही नाहीं आणि तिकडेही नाहीं अशा रीतीनें किं० अशा स्थितींत; मधल्या मधेंच.

अरंदळणें अ० क्रि० आरडाओरड करणें; जोराजोरानें हातपाय आपटणें; चरफडणें.

अरब [अ०] पु० अरबस्तानचा रहिवाशी.

अरबचरब, अरबटचरबट न० १ निःसत्व, बेचव, किं० शुष्क, खाद्य पदार्थ. २ निरर्थक किं० शुष्क गप्पा; प्रलाप. क्रि० वि० मूर्खांमारखें, अचकट विचकट (भाषण करणें).

अरबट वि० १ शुष्क, नीरस, (खाद्यपदार्थ). २ असंस्कृत, गांवढळ, आशिक्षित (माणूस, भाषण, संवयी, रीतिभाती, इ०). ꕥ **अरबटदांड** वि० अतिशय उद्धट किं० गांवढळ चालीरीतींचा (माणूस.)

अरबस्तानी, अरबस्थानी [फा० अरबस्तानी] वि० अरबस्तानचा किं० अरबस्तानामधील (घोडा, फळ, मनुष्य इ०); आरबी.

अरंबळणें अ० क्रि० १ झोपेंत बरळणें. २ निरर्थक किं० शुष्क बडबड करणें. ३ ०ला झोपेची निरंगळी येणें. ४ किंचाळणें.

अरबा [अ०] वि० चार. ꕥ **अरबैन** वि० चाळीस. (अरबी सालांसंबंधी दोन्ही शब्द विशेष योजितात).

अरबा [अ० अरब] पु० १ अरबांचें लढणें. २ आरबांचा आवेश. ३ धुमश्चक्री. ४ शिव्यांचा वर्षाव किं० लाखोली; रागाचा आवेग किं० झपाटा. ५ तडाखा, धडाखा (लिहिण्याचा, जेवण्याचा, इ०). ६ खेड्याची किंवा किल्ल्याची वेस. ꕥ **अरबा पिणें,** किं० **सोसणें** एखाद्याचा शिव्यांचा वर्षाव सहन करणें. **एकाद्यावर अरबा उडणें** त्याच्यावर शिव्यांचा वर्षाव होणें.

अरबाणा पु० आटोका, नियंत्रणा. ह्या शब्दाचे फक्त पुढील प्रयोग रूढ आहेत. **अरबाण्यांत असणें, चालणें, राहणें,** किं० **वागणें** एखाद्याच्या शिस्तींत, कह्यांत, किंवा आज्ञेंत राहाणें, वागणें, किं० असणें. **अरबाण्यांत नसणें** कोणाच्याही कह्यांत, आज्ञेंत, किं० नियंत्रणेंत, नसणें. **अरबाण्यांतून जाणें** एखाद्याची शिस्त किं० आज्ञा झुगारून देणें.

अरबी [फा०] वि० अरबस्थानचा, अरबस्तानांतील, अरबस्तानाविषयींचा. ꕥ **अरबी तगादा** पु० अति निकडीचा आणि उपद्रवकारक

तगादा. याच अर्थानें ' अरबी पहारा ' हा वाक्प्रचार रूढ आहे.

अरबूज (–द) **वि०** १ गांवढळ, रिठोळ, ग्राम्य. २ अशिक्षित, मंद. ३ दांडगा. ꙳ **अरबूज** (–द)**जात स्त्री०** ग्राम्य किं० दांडग्या चाली-रीतींचा. [अरेरे !

अरर अ० दुःखाचा किं०खेदाचा वाचक उद्गार.

अरवार (–ळ) **वि०** १ मऊ मऊ, उंची, स्वादिष्ट, डिसूळ (पक्वान्न,–चिरोटे, अनरसे, इ०); लोचट ह्याच्या उलट.२ मऊ,रसाळ,स्वादिष्ट (आंबा, केळें, इ०). ३ मधुर, रुचकर, ललित (काव्यांत); उ० तुमचीं पदें अरवार ॥ ४ खोड्याळ; पोरकट चाळे करणारें (लहान मूल वगैरे).

अरवाळी स्त्री० लहान मुलांच्या खोड्या, धांगडधिंगा, खेळगें, इ०.

अरविंद [**सं०**] **न०** कमळ. ꙳**अरविंद-नाभि पु०** विष्णु.

अरशी, आरशी [**हिं०** आरसी] १ लहान आरसा. २ चष्मा, उपनेत्र.

अरसपरस क्रि० वि० आजूबाजूस, आसपास, शेजारीं, भोंवतालीं.

अरसा, आरसा [**सं०** ' आदर्श ' चें विकृत रूप] **पु०** एका अंगास पारा लावून प्रतिबिंब पाहण्याकरितां तयार केलेलें भिंग. ꙳ **अरश्यापुढें कोळसा** एखाद्या अत्यंत सुंदर, उंची, किं०झगझगीत वस्तूपुढें दुसरी एखादी गोष्ट तितक्याच प्रमाणांत कुरूप,टाकाऊ,काळीबेरी आहे असें विधान करतांना उपयोजितात. **आरशासारखा वि०** स्वच्छ, सरळ, बालबोध, निष्कलंक, अदूषणीय (हिशोब, जमाखर्च, लेखन, घर, वगैरे वगैरे). **आरशाखें तोंड** सुंदर, गोड, आणि तजेलेदार मुख. **आरसेमहाल पु०** चोहोंबाजूस, वर, आणि खालीं, आरसे बसवून बांधलेला महाल किं० क्रीडा-स्थान. **बोडकी जर आरशांत पाहे तर सहदेव म्हणे तेथें काांहीं तरी आहे** ज्या थाटमाटाची जरूरी नाहीं असा थाटमाट कोणी मनुष्य करूं लागला तर त्यांत त्याचा कांहीं तरी गुप्त हेतु असणारच.

अरसिक [**सं०** रस नाहीं ज्यांत तें] **वि०** १ बेचव, पांचट, (हा अर्थ फारसा प्रचारांत नाहीं). २ काव्यादिकांतील माधुरीचा ज्याच्यावर परिणाम होत नाहीं, किंवा त्याच्याबद्दल ज्याला प्रेम वाटत नाहीं, असा.

अरळ वि० १ गबाळेपणानें, निष्काळजीपणानें, ओबडधोबड रीतीनें, हेंगाड्याप्रमाणें, किं० अव्यव-स्थित प्रकारें, केलेलें, बांधलेलें, बसविलेलें, रचलेलें, किं० चालविलें. २ तुडतुडीत; लोचट नव्हे असा (खाद्य पदार्थ, पोळी, घारगा, जिलबी, इ०). **क्रि० वि०** निष्काळजीपणानें, ओबडधोबड रीतीनें, हेंगाड्याप्रमाणें,गबाळ्याप्रमाणें. **अरळतरळ** ह्याचेही अर्थ **अरळ** प्रमाणेंच आहेत.

अरळी स्त्री० असावें त्या दिशेच्या उलट दिशेस असलेले घोड्याच्या अंगावरील केश(हें अशुभ लक्षण समजलेलें आहे).

अराकश [**फा०** अराह्कश्] **पु०** करवतीनें कापणारा; अरकशा.

अराखडा पु० १ रूपरेषा; कच्चा खरडा; चित्राच्या किं० एकाद्या प्रदेशाच्या किं० वस्तूच्या मुख्य मुख्य रेषा काढून तयार केलेला नकाशा.२ घर्ष-णानें झालेला व्रण, ओरखडा, किं० खरचट.३ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाला कांहीं काळ लागला असतां ह्या दुसऱ्या पदार्थावर पहिल्याचा जो ठसा उमटतो तो. उ० भिजलेल्या पायांनीं कोणी मनुष्य चालतो तेव्हां त्याच्या पावलांचा अराखडा उठतो.

अराखडा स्त्री० १ संयमिणें, आवरणें. २ संय-मन; दाब; नियंत्रणा.

अराजक [**सं०** अ+राजन्+क (प्रत्यय)] **वि०** १ राजाशिवाय असलेला (देश इ०). २ राजद्रोही (चळवळ, इसम इ०). **न०** एकाद्या देशाला राजा नाहीं अशी स्थिति.

अराणूक स्त्री० (कवितेंत) १ शांति; समाधा-नाची किं० सौख्याची स्थिति.२ }तृप्ति. †**तुका०**}.

अरावा[**फा०** अरावाह] **पु०** ऐहिक वैभवाच्या किं० थाटामाटाच्या बाबती; जसें नोकरचाकर, जमीन जुमला, घोडे, पालख्या, इ०.

अराले वि० } वृत्ति स्थिर झालेले. †**तुका०**}.

अराव, अरास, आरास [**फा०** आरायिष्] **स्त्री०** घर, बंगला, इ० शोभिवंत करणें (दिवे वगैरे लावून; चित्रें, हंड्या, झुंबरें वगैरे टांगून; रांगोळ्या वगैरे काढून).

अरि [सं०] पु० १ शत्रु, वैरी, दुष्मन. २ काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर, ह्या ज्या मनांतील सहा भावना, त्यांपैकीं प्रत्येक. ꣸**अरिंदम** वि० शत्रूला जिंकणारा. **अरिमर्दन** वि० शत्रूंचें निर्दलन करणारा.

अरिष्ट [सं०] न० १ संकट, आपत्ति, अनिष्ट प्रसंग, दुर्दैव. २ चोर, लुटारू, शत्रु, इत्यादींचा हल्ला, टोळधाड, सांथ, धरणीकंप, धुमकेतुदर्शन, वगैरे सारखें जे अनिष्टकारक किंवा अपशकुनी प्रसंग ते. ꣸**अरिष्ट मांडणें** कहर किंवा उपद्रव मांडणें; एखादी गोष्ट हानिकारक होण्याइतकी अतोनात करणें किं० होणें; उ० आज पावसानें अरिष्ट मांडलें आहे. **अरिष्टसंतोषी** वि० विघ्नसंतोषी; दुसऱ्याच्या कामांत विघ्नें उपस्थित करणारा, किंवा तीं आलीं असतां हर्ष मानणारा.

अरी स्त्री० १ चांभाराची सुई. २ भोवऱ्याला, पराणीला, वगैरे बसविलेली लोखंडाची अणी.

अरुचि [सं० अ (नाहीं) + रुचि (गोडी, चव, आवड)] स्त्री० १ तोंडाची चव नाहींशी होणें. २ अन्नाचा तिटकारा. ३ नापसंती.

अरुण [सं०] पु० १ सूर्याचा सारथि. २ प्रभातकाळ. ३ सूर्य उगवण्यापूर्वीचा जो संध्यासमय तो. वि० तांबडा, तांबूस. ꣸ **अरुणोदय** पु० पहाट; सूर्योदयापूर्वींचा तीन घटकांचा काळ. **अरुणाग्रज** पु० गरुड. **अरुणात्मज** पु० जटायु. **अरुणसारथि** पु० सूर्य.

अरुता, अरू[सं० अर्ह=पूज्य, योग्य, साजेसा] स्त्री० १ योग्यता. २ हक्कांतील किं० अधिकारांतील काम; कार्यक्षेत्र. ३ योग्य स्थान. ४ अत्यंत जरूरी.

अरुंद वि० हावें आहे त्याहून तोकडें (रुंदीच्या बाजूनें); विवक्षित रुंदीपेक्षां कमी रुंद; चिंचोळा.

अरुंधती [सं०] स्त्री० १ वशिष्ठपत्नी. २ सप्तर्षींच्या ताऱ्यांतील वसिष्ठाच्या ताऱ्याजवळील चांदणी.

अरुवार (–ळ) वि० मागें **अरवार** पहा. त्याच शब्दाचें कवितेंत आढळणारें हें रूप आहे.

अरुश (–ष), अरूश (–ष) [सं० 'आर्ष' (ऋषींना योग्य) याचा अपभ्रंश] वि० मंद, ढ, मूर्ख, अडाणी, रेम्याडोक्या.

अरूप [सं० अ (नाहीं) रूप(आकार)ज्याला] ज्यास रूप नाहीं असें (ब्रह्मवस्तु, शब्द, वायु, इ०).

अरे [सं०] अ० पुरुषाला निकट साहचर्य असतां, किंवा तिरस्कार दर्शवावयाचा असतां, किं० हाक मारतांना, किं० संबोधितांना, योजावयाचा उद्गार. उ० अरे रामा, इकडे ये; उ० अरे जा रे, तुझी काय मला पर्वा ! 'अरे' ऐवजीं नुसतें ' रे' असेंही रूप आढळतें. ꣸**अरे तर कां रे, अहो तर कां हो** सभ्यपणानें बोलणाराशीं सभ्यपणानें, आणि असभ्यपणानें बोलणाराशीं असभ्यपणानें बोलण्याची सरणी. **अरे जा रे करणें** एकवचनी प्रयोग करून एकाद्याला संबोधणें. **अरेतुरे करणें** एकेरीवर येऊन एकाद्याशीं बोलणें.

अरेकश [फा० अरहकश्] पु० करवतीनें लाकडें वगैरे कापून उपजीविका करणारा; अरकशी, अरकशा.

अरेराव पु० आढ्यताखोर किं० बढाईखोर मनुष्य; उद्धट; चढून गेलेला किं० मिजासखोर इसम. चढाईच्या गोष्टी सांगणारा. ꣸**अरेरावकी, अरेरावी,** स्त्री० आढ्यताखोरपणा, बढाईखोरपणा, उद्धटपणा, मिजासखोरी.

अरेरे अ० १ दुःखाचा वाचक उद्गार. हाय ! हाय ! उ० अरेरे ! त्याचा असा अंत झाला ना ! २ एकदम कांहीं गोष्टीचें स्मरण झालें असतां हा उद्गार काढला जातो. उ० अरेरे ! हे विटांचे पैसे आपण बेरजेंत घ्यावयाला अगदींच विसरून गेलों ! (ह्या अर्थानें ' अर्रर' हें रूप अधिक रूढ आहे.)

अरोसा पु० १ दोरीचें किं० सुताचें टोक अगदीं बारीक केलेलें असतें तें (ती दोरी किं० तें सूत कशांत तरी शिरकावावयाचें असतां). २ अशी बारीक टोकाची दोरी किं० सूत.

अरोळी, आरोळी स्त्री० १ मोठ्यानें ओरडणें. २ बोंबलणें. ३ मोठ्या आवाजानें मारलेली हाक; मोठी हाक.

अर्क [सं०]पु० १ सूर्य. २ सूर्यकांत. ३ स्फटिक. ४ अश्वमेधाच्या उपयोगाचा अग्नि. ५ रुईचें झाड. ६ (ज्यो०) उत्तरा फल्गुनी. ७ (**गणित**) बारा ही संख्या. ꣸**अर्कांश** पु०, **अर्ककला** स्त्री० सूर्यबिंबाचा बारावा भाग. **अर्काश्मा, अर्कोपल,**

पु० सूर्यकांत मणि. **अर्केन्दुसंगम पु०** अमावस्या. **अर्कबंधु पु०** १ गौतम बुद्ध. २ सूर्यकमल. **अर्कविवाह पु०** एकाद्या माणसाचें तिसऱ्यांदा लग्न व्हावयाचें असतां त्याचें प्रथम अर्काच्या झाडाशीं लग्न लावितात, तो विधि. तिसऱ्या बायकोशीं विवाह करणें अशुभ समजतात. ती मरावयाचीच अशी समजूत म्हणून अर्कविवाहाची योजना. अशा तऱ्हेनें तृतीय विवाह हा चतुर्थ विवाह होतो.

अर्क [फा०] **पु०** सत्त्वांश; औषध्यादिकांचा तत्त्वांश जो द्रवादिरूपें यंत्रानें काढतात तो. ❀**अर्कद्वेष** [द्वेषाचा अर्क] **पु०** हाडवैर; तीव्र द्वेष.

अर्की [सं० अर्क] **स्त्री०** रुईचें झाड.

अर्कुलें, अर्कूल न०१ रफाराचें चिन्ह; जसें, अर्क या शब्दांत क या अक्षरावर रफार आहे. रफार म्हणजे अर्धा किंवा लंगडा र. २ ऱ्हस्व इ दीर्घ करतांना त्यावर लिहावयाचें चिन्ह,—जसें, इ, ई.

अर्गला, (–ळा), अर्गळ [सं०] **स्त्री०** १ अडसर. २ सांखळी. ३ कडी. ४ (लक्षणेनें) बेडी; कडी; दाव; नियंत्रणा; आडकाठी. (क्रियापद ' घालणें ').

अर्घ पु० १ किंमत, मूल्य. २ गंध, फुलें, अक्षता, इ० पाण्यांत घालून देवास किं० ब्राह्मणास पूजाप्रसंगीं अर्पितात तीं.

अर्घ्य [**सं०**] **न०** ओंजळींत किं० पात्रांत पाणी घेऊन त्यांत गंध, अक्षता, फुलें, इ० घालून देवादिकांस पूजासमयीं जें अर्पितात तें. **वि०** १ पूज्य. २ मूल्यवान्.

अर्घ्या [**सं०**] **स्त्री०** अर्घ्यपात्र; अर्घ्य देण्याच्या उपयोगाचें पात्र; पूजाविधींतील एक विशिष्ट आकाराचें पात्र.

अर्चणें, आर्चिणें [**सं०** अर्च्=स्तविणें, पूजिणें] **स० क्रि०** १ पूजिणें, स्तविणें.

अर्चन न०, अर्चना स्त्री० [**सं०** अर्च्= पूजिणें, स्तविणें] १ पूजा. २ स्तुति. ❀ **अर्चनपात्र न०** पूजापात्र; पूजासाहित्य ठेवावयाचें तबक, ताम्हन, इ०.

अर्चनीय, अर्च्य [**सं०** " अर्चन " पहा.] **वि०** १ पूज्य; अर्चना करण्यास पात्र; मान्य. २ स्तुत्य; बहुमानाला योग्य.

अर्चा [**सं०** " अर्चन " पहा] **स्त्री०** १ पूजा. २ ज्याची पूजा करावयाची ती देवतेची मूर्ति. ३ देवाच्या मूर्तीचें ठायीं देवत्व यावें म्हणून प्रथम जो संस्कार करतात तो. ४ स्तुति.

आर्चि [**सं०** अर्चि=ज्वाला] **स्त्री०** ज्वाला.

आर्चिस् [**सं०**] **न०** १ ज्वाळा. २ प्रकाश. **पु०** १ किरण. २ अग्नि. ❀**आर्चिष्मान् पु०** १ सूर्य. २ अग्नि. **अर्चिरादिमार्ग पु०** ब्रह्मलोकाप्रत नेणारा मार्ग. (उत्तरायण मार्ग असाही ह्याच अर्थी शब्द आहे. याच्या उलट धूमादिमार्ग.)

अर्ज [अ०] **पु०**१ विनंतिपत्र; विज्ञप्तिपत्र. २ (जमीन मापणींत) रुंदी. ❀ **अर्जविनंति स्त्री०** अर्ज करणें आणि विनंति करणें. **अर्जदार** [अ० अर्ज (विनंति) +**फा०** दाश्तन् (ठेवणें, मांडणें.)] **पु०**अर्ज, विज्ञप्ति, किं०विनंति, करणारा. **अर्जदास्त** [अ० अर्ज=विनंति+**फा०** दाश्तन्] **स्त्री०**लेखी अर्ज; विज्ञप्ति.

अर्जभूज स्त्री०(जमीनमोजणींत) रुंदी.

अर्जक [**सं०** अर्ज्=मिळविणें] **वि०** मिळविणारा; संपादिणारा.

अर्जणें, अर्जिणें [**सं०**] **स० क्रि०** मिळविणें; संपादिणें; पैदा करणें.

अर्जन न०, अर्जना स्त्री० [**सं०** अर्ज्= मिळविणें] मिळविणें; संपादिणें; जसें, द्रव्यार्जन म्ह० द्रव्य संपादिणें.

आर्जित [**सं०** वर ' अर्जन ' पहा] **वि०** मिळविलेलें; संपादिलेलें.

अर्जी [**हिं०**] **स्त्री०** लेखी अगर तोंडीं केलेला अर्ज, विनंति, इ० (क्रिया० ' करणें ' ' ठोठावणें ' ' ठोकणें ') ❀**अर्जी सजविणें** अर्ज किं० विज्ञप्तिपत्र तयार करणें.

अर्जुन [**सं०**] **पु०** १ पांच पांडवांतील तिसऱ्याचें नांव(ज्याला श्रीकृष्णानें कुरुक्षेत्रीं **भगवद्गीता** उपदेशिली). २ एक प्रकारचें झाड. याला **अर्जुनसाताडा** किंवा **अर्जुनसादडा** अशीही नांवें आहेत. ३ आपल्या आईचा एकच मुलगा. ४ कार्तवीर्याचें नांव. ❀ **अर्जुनध्वज पु०** हनुमान्. **अर्जुनवाद्य न०** (विनोदी योजना) बोंबा मारणें.

अर्णव [**सं०**] १ महासागर. २ समुद्र. ❀ **अर्णवोद्भव पु०** चंद्र. **न०** अमृत. **अर्णवोद्भवा**

स्त्री० लक्ष्मी. **अर्णवयान न०** होडी, गलबत.

अर्तणें [सं० 'आर्त' यापासून] अ० क्रि० अतिशय उत्सुक असणें; चिन्ताग्रस्त किं० अधीर होणें; उ० परीक्षेच्या निकालाची तार केव्हां येईल म्हणून तो अर्तून गेला आहे.

अर्थ [सं०] पु० १ शब्दादिकांपासून कळणारा भाव किं० होणारा बोध; प्रतीति. (अर्थ तीन प्रकारचे असतात; वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, आणि व्यंग्यार्थ. विशेष खुलाशासाठीं आमचें " अर्थालंकारांचें निरूपण " पहा). २ हेतु, ध्येय, इच्छा, साध्यविषय, ईप्सित वस्तु. उ० पुरुषाचे धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष हे चार अर्थ होत. ३ संपत्ति, धन, वित्त, द्रव्य. ४ कारण, हेतु, इंगित, मतलब. उ० तो असें कां करतो याचा मला अर्थ समजत नाहीं. ५ फायदा, हित. ६ फल, परिणाम, निष्पत्ति. ७ पदार्थ; वस्तु; इंद्रियज्ञानविषय; रूपरसगंधस्पर्शशब्दादिद्वारां ज्याचें आपणांस आकलन होतें तें. ८ गरज, प्रयोजन, उपयोग. ९ याचना; विनंति; अर्ज; फिर्याद. जोम; कामीं येईल किं० उपयोग होईल अशी स्थिति; लभ्यांश सारांश. उ० या अंगरख्यांत आतां कांहीं अर्थ उरला नाहीं. १०(समासांत अंत्यपदीं) ०च्या स्तव, ०च्यामुळें; ०च्या बद्दल. उ० धनार्थ म्ह० धनासाठीं, कीर्त्यर्थ म्ह० कीर्तीसाठीं ११ प्रत्यक्ष स्थिति, तत्त्वतः स्थिति. १२(ज्यो०) कुंडलींतील द्वितीय स्थान(धनस्थान). १३ सार, तथ्य, साभिप्रायता, हंशील, उ० माझ्या बोलण्याला अर्थ आहे; उ० या बोलण्यांत काय अर्थ आहे ? ॼ**ज्या अर्थीं...त्या अर्थीं** ज्यापेक्षां किं० ज्या पक्षीं...त्या पेक्षां किं० त्या पक्षीं; उ० ज्या अर्थीं ती इतका आग्रह करीत आहे त्या अर्थीं तुम्हांला गेलें पाहिजे. **अर्थाचे तुकडे भागवताच्या चिंध्या** ग्रंथांतील शब्दांच्या अर्थाचा कीस काढणें आणि ग्रंथांत जें विवक्षित असतें त्याचा विपर्यास करणें. **अर्थाला मरणें** स्वहित साधावयासाठीं मूर्खपणाच्या सीमेपर्यंत खटपट करणें. **अर्थगम्य न०** अर्थाचें ज्ञान. (चुकीनें साधित पण रूढ अर्थ). उ० वैदिक ब्राह्मणांना वेद पाठ येतो, पण अर्थगम्य नततें. **अर्थगौरव न०** अर्थाचा भारदस्तपणा किं० खोलपणा. **अर्थतः** क्रि० वि० १ अर्थावरून. २ ओघानेंच. **अर्थपति पु०** कुबेर. **अर्थदोष पु०** मुख्यार्थाची हानि ज्याचे योगानें होते असा दोष. दोष दोन प्रकारचे असतात.- नित्य दोष व अनित्यदोष. यांचे प्रत्येकीं शब्ददोष, अर्थदोष, व रसदोष, असे तीन विभाग होतात. त्यांपैकीं शब्दांचा अथवा वाक्यांचा अर्थ समजल्यानंतर जे ध्यानांत येतात व ज्यांच्या योगानें रसाचा परंपरेनें अपकर्ष होतो ते अर्थदोष. अर्थदोषांचे अपुष्टत्व, कष्टत्व, व्याहतत्व, पुनरुक्तत्व, इ० सुमारें पंचवीस प्रकार आहेत. **अर्थबुद्धि वि०** स्वार्थी; आपमतलबी. **अर्थवाद पु०** १ उद्देशाचें कथन किं० विवरण. २ स्पष्टीकरण. ३ अमुक लाभ होण्यासाठीं आणि अमुक आपत्ति टाळण्यासाठीं अमुक करावें असें सांगणारें वचन. ४ स्तुति, प्रशंसा. **अर्थबंध पु०** १ वाक्यांतील शब्दांची मांडणी. २ इंद्रियार्थाशीं आत्म्याचा संबंध. **अर्थविकल्प पु०** १ सत्यापासून च्युति; वस्तुस्थितीचा विपर्यास. २ धरसोडीचें भाषण. **अर्थविज्ञान न०** अर्थाचें ग्रहण किं० आकलन; बुद्धीच्या सात गुणांपैकीं एक. **अर्थशास्त्र न०** १ संपत्तिशास्त्र. २ राजनीति. ३ व्यवहारांत कसें वागावें ह्याचें निरूपण करणारें शास्त्र. **अर्थसंबंध पु०** अर्थाचा शब्दांशीं किं० वाक्याशीं जो संबंध तो. **अर्थसिद्ध वि०** वाक्यांत स्पष्टपणें सांगितलेलें नसून संदर्भावरून ध्यानांत येणारें. **अर्थांतरन्यास पु०** (साहित्य). जेव्हां एका सामान्य गोष्टीच्या विधानाच्या समर्थनार्थ एकाद्या विशेष गोष्टीचें विधान केलेलें असतें, किं० एकाद्या विशेष गोष्टीच्या विधानाच्या समर्थनार्थ एकाद्या सामान्य गोष्टीचें विधान केलेलें असतें, तेव्हां अर्थान्तरन्यास हा अलंकार होतो. विशेष खुलाशासाठीं आमचें " अर्थालंकारांचें निरूपण " पहा. **अर्थांतरोपन्यास पु०** वर " अर्थान्तरन्यास " पहा. **अर्थाधिकारी पु०** खजिनदार; राज्याचें उत्पन्न व राज्याचा खर्च तपासणारा अधिकारी. **अर्थान्वय पु०** एकाद्या विशिष्ट वाक्याचा अर्थ करतांना मागल्या आणि पुढल्या वाक्यांचा अर्थ लक्ष्यांत घेणें; संदर्भ. **अर्थापत्ति स्त्री० (न्यायांत)** मीमांसकांनीं ज्ञानप्राप्तीचे जे पांच उगम सांगितले आहेत, त्यांतील एक; अनुमान किं० तर्क. उ० 'धष्टपुष्ट आणि नीरोगी देवदत्त दिवसा कांहीं खात नाहीं,' ह्या वाक्यांतून देवदत्त रात्रीं खातो, हें अनुमान निघतें, तें अर्थापत्तीच्या द्वारें. २ (**साहित्य**) एक गोष्ट सिद्ध झाली,

किं० ठरली, किं० कबूल केली गेली, म्हणजे दुसरी तत्सदृश असलेली गोष्ट ओघानेंच सिद्ध होते, किं० ठरते, किं० कबूल करणें प्राप्त होतें, अशा अर्थाचें विधान असलें म्हणजे " अर्थापत्ति" हा अलंकार होतो. **अर्थालंकार पु०** वाक्याचा अर्थ ज्याचे योगानें सुशोभित होतो तो अर्थालंकार; अर्थालंकाराच्या योगानें वाक्याच्या अर्थात विशेषशी भर न पडतां तोच अर्थ खुलून दिसतो. आमचें " अर्थालंकारांचें निरूपण " हें पुस्तक पहा.

अर्थणें, अर्थिणें [सं०] **स० क्रि०** १ याचिणें; विज्ञप्ति करणें. २ इच्छिणें.

अर्थना [सं०] **स्त्री०** १ याचना; मागणी. २ विज्ञप्ति; अर्ज.

अर्थाअर्थी क्रि० वि० वास्तविक रीत्या. खरोखर पाहिलें असतां.

अर्थात् [सं० 'अर्थ' याची पंचमी] **क्रि० वि०** ओघानेंच; साहजिकच.

अर्थिला [सं० अर्थ्=याचना करणें,इच्छिणें] **वि०**१ ज्याला गरज किं० जरूरी आहे असा माणूस; गरजू. २ जेथें एकाद्या वस्तूची गरज असून ती वस्तु नाहीं असें (ठिकाण).

अर्थी [सं०] **वि०** (समासांत) १ ज्याला ०ची जरूरी किं० अगत्य आहे असा. जसें, विद्यार्थी, मोक्षार्थी, इ०. २ विज्ञप्ति करणारा; अर्जदार. ॐ **अर्थी दान महापुण्य** ज्याला जरूरी आहे अशाला मदत करणें पुण्यप्रद होय. तातडलेल्या म्हणजे गरजू माणसाला जें द्यावें त्यानेंच मोठें पुण्य लागतें.'अर्थी' हा 'आर्ती' ह्याचेबद्दल अपपाठ आहे. आर्त म्ह० विपन्न किं० संकटांत पडलेला.

अर्दित न०, अर्दितवायु पु० [**सं०**अर्द्= दुखापत करणें] मुखाच्या आणि मानेच्या एका बाजूवरून वारें जाणें (अर्धांगवायूचा एक प्रकार)

अर्ध[सं०]**वि०** अर्धा; निमा. **न०** निमा भाग. ॐ**अर्धकच्चा वि०** १ पूर्णपणें न पिकलेला,न शिजलेला, इ०. २ पूर्णपणें न मुरलेला; अपक्व; अर्धवट स्थितींत असलेला; पूर्णपणें तयार नसलेला. **अर्धघबाड न०** घबाडाहून कमी प्रतीचा पण शुभ मुहूर्तविशेष. **अर्धचंद्र पु०** १ अष्टमीचा चंद्र (हा अर्धवर्तुलाकृति असतो). २ अर्धवर्तुलाकृति जें कांहीं तें. **एकाद्याला अर्धचंद्र देणें** एखाद्याची हाकलपट्टी करणें.(एखाद्यास गचांडी देतांना आपल्या पंजानें आपण त्याचा गळा धरतो, व त्यावेळीं आपल्या हाताचा अंगठा व पुढलें बोट हीं ताणलीं जाऊन हातास अर्ध्या चंद्राचा आकार येतो). **अर्धचंद्र मिळणें** हाकलून दिलें जाणें. **अर्धज (–च–) रतीय न०**संदिग्ध भाषण; धड हा पंथ नाहीं किं० तो पंथ नाहीं, अशी वर्तनाची किं० भाषणाची सरणी. उ० येतों तरी म्हण, किंवा येत नाहीं असें तरी म्हण, उगीच अर्धजरतीय सांगूं नको. **अर्धनारीनटेश्वर पु०** श्रीमहादेवाचें नांव. (अर्धें शरीर त्याचें स्वतःचें व अर्धें पार्वतीचें अशी त्याची मूर्ति कल्पिली आहे. नारी=श्रीपार्वती; नटेश्वर=नटांचा मुख्य म्ह० शंकर). **अर्धपड (–डा) वि०** अर्धवट केलेलें, किं० बोललेलें. **अर्धपोटीं क्रि० वि०** पोट अर्धवट भरलें असतां; पोट पूर्ण भरलें नाहीं अशा स्थितींत (राहणें, असणें, जगणें इ०). **अर्धबाट, अर्धबाटगा वि०** १ अर्धवट केलेलें,आचरलेलें,किं० बोललेलें. २ अर्धवट शिजलेलें किं० भाजलेलें. ३ अर्धवट शिकलेला; पूर्ण अनुभविक नसलेला. ४ अर्धवट जातिभ्रष्ट म्ह० जातीचे सर्व आचार न पाळणारा. ५ बाप एका जातीचा आणि आई दुसऱ्या जातीची अशांच्या संबंधापासून उत्पन्न झालेला (मनुष्य इ०). **अर्धबुकट वि०** अर्धवट. **अर्धबोबडा वि०**१ पूर्णपणें न ठेचलेला, चिरडलेला, कुटलेला, किं० फोडलेला. २ पूर्णपणें मऊ न झालेला (डाळ, तांदूळ, इ० शिजत लावलेला पदार्थ). ३ ओबडधोबड रीतीनें केलेलें (काम इ०). **अर्धमेला वि०** मरण्यापर्यंत ज्याची स्थिति आली आहे असा. उ० तिनें त्याला गुदगुल्या करून अर्धमेला केला. **अर्धमेला करणें** बेदम मारणें; सपाटून चोप देणें. **अर्धरात्र पु०** (संस्कृतांत), **स्त्री०** (मराठींत) मध्यरात्र. **अर्धवट क्रि० वि०** १ पूर्णपणें नव्हे अशा प्रकारें; अर्धवटपणें. २ वरवर; ओझरतें; स्पष्टपणें नव्हें अशा रीतीनें. **वि०** अर्धा शहाणा म्ह० वेडा. **अर्धशिशी** [सं० 'अर्धशीर्ष' यापासून]**स्त्री०**डोकें दुखीचा एक विकार. यांत डोक्याची एक बाजू (डावी किं० उजवी) दुखते, व यावर पेढ्याचें अनुपान उत्तम. **अर्धांग न०** १ शरीराचा अर्धा भाग; शरीराची एक बाजू. २ (लक्षणेनें)बायको;

रचेली. ३ परममित्र, **पु०** —**वायु पु०** ज्या रोगांत अर्धें अंग लुलें पडतें किं० अर्ध्या अंगाची चेतना नष्ट होते तो. **अर्धांगी स्त्री०** पत्नी; बायको; सहचरी. **अर्धांगीकार** [सं० अर्ध+अंगीकार (स्वीकार)] **पु०** अर्धवट स्वीकार; अमुक वस्तुस्थिति असली, किं० अमुक गोष्ट घडली, तर मला ही गोष्ट कबूल आहे, अशा अर्थाचें जें विधान तें; कांहीं विशिष्ट शर्तीवर केलेला स्वीकार. **अर्धासन न०** १ निम्मी बैठक. २ आपल्या गादीवर किं० तक्क्याशीं आपल्या शेजारीं दुसऱ्याला बसावयाला दिलेली जागा (संमानाचा एक प्रकार). ३ प्रेममूलक किं० संमानमूलक मैत्री किं० घरोबा. **अर्धासनी वि०** अर्धासनाचा मान ज्याला आहे असा. **अर्धोदय पु०** १ पूर्णपणें उदित नसणें; निम्में उगवणें. २ सूर्य किं० चंद्र यांचें अर्धें बिंब क्षितिजाच्या वर आलें आहे अशी स्थिति. ३ माघ किं० पौषमास, अमावास्या, श्रवण नक्षत्र, रविवार आणि व्यतिपात, यांचा जो योग घडतो तो. **अर्धोदयीं पडणें** एखादें काम पूर्ण न होतां अर्धवट केलेल्या स्थितींत पडून राहाणें. **अर्धोत्रा** [सं० अर्ध + उत्तर] **पु०** दरमहा दरशेकडा अर्धा रुपाया व्याज. **अर्धोअर्ध** [सं० अर्ध] **वि०** निम्मेनिम; अर्धा अर्धा. **क्रि० वि०** निम्मेनिम्म किं० अर्धें अर्धें एकेकाकडे येईल अशा रीतीनें.

अर्धा [सं० अर्ध] निम्मा. ※**अर्धाअधिक वि०** निम्याहून ज्यास्त. **अर्धामुर्धा वि०** जवळ जवळ अर्धा; अर्ध्याहून थोडा कमी अधिक; पूर्ण किं० सर्व नव्हे असा. **अर्धाला वि०** अर्धाअर्धा; निम्मानिम्मा; प्रत्येकाला अर्धा. **अर्धीकोर स्त्री०** भाकरीचा किं० पोळीचा आठवा भाग; नितकोर. चतकोर=चवथा भाग. **अर्धी पट्टी स्त्री०** पाठीवर ओझीं वाहणाऱ्या बैलांवर बसविलेली पट्टी. **अर्धी मांडणी शिरिस्ता पु०** जमीनदार आपली जमीन दुसऱ्यास कसावयास देतो, व उत्पन्नांतील निम्मा हिस्सा घेतो; दोघेही सरकारपट्टी निम्मेंनिम भरतात, ही जी पद्धत ती. यासच **अर्ध मांडणी** असेंही म्हणतात. **अर्धी म्हैस स्त्री०** तीन चार वेळां व्यालेली म्हैस. (एक म्हैस साधारणत: सात आठ वेळां विते). **अर्धें वचन न०** कोणापुढें आश्वेचें किं० उपदेशाचें वचन अर्धवट उच्चारलें आहे तोंच त्याप्रमाणें वर्तन करावयाला तो सिद्ध असणें किं० त्याची तयारी असणें. उ० रामकृष्णपंतापाशीं माझें अर्धें वचन आहे, म्ह० मी सांगेन तें करावयाला तो सदा सिद्ध असतो. **एकाद्याच्या अर्ध्या वचनांत असणें** त्याची आज्ञा पाळावयाला किं० तो सांगेल तें तत्परतेनें करावयाला सिद्ध असणें. [भाग, तुकडा, इ०.

अर्धुक [सं अर्ध] **न०** निम्मा किंवा अर्धा

अर्धेल [सं० अर्ध] **स्त्री०** १ अर्धा हिस्सा किं० वाटा (शेताच्या वगैरे उत्पन्नांतील).

अर्धेली स्त्री० १ शेताचें किं० कोणत्याही व्यापाराचें निम्में उत्पन्न (किं० नफा) मालकाला किं० भांडवल पुरविणाऱ्याला मिळावयाचें आणि निम्में प्रत्यक्ष अंगमेहनत करणाऱ्याला मिळावयाचें अशी शर्त किं० व्यवस्था. २ अशी शर्त किं० व्यवस्था ज्यानें कबूल केली आहे तो, (मालक, सावकार, किं० प्रत्यक्ष काम करणारा); त्याला 'अर्धेल्या' असेंही म्हणतात.

अर्पण [**सं०** अर्प्=देणें; ऋ=ठेवणें याचें प्रयोजक रूप] **न०** १ देणें. २ दान करणें; नजर करणें. **अर्पणपत्रिका स्त्री०** ग्रंथकर्ता आपलें पुस्तक ज्या कोणावर प्रेम व्यक्त करण्यासाठीं किं० ज्या कोणाला बहुमान देण्यासाठीं प्रसिद्ध करतो त्याच्या नांवाचा, गुणांचा इ०, निर्देश करणारें पत्र किं० पान.

अर्पिणें [**सं०** वर 'अर्पण' पहा] **स० क्रि०** १ दान करणें. २ नजर करणें; देणें.

अर्बुज न० लोकांत कसें वागावें, उठावें, किंवा वस्त्र, अलंकार, हीं कशीं वापरावीं, वगैरे ज्यास समजत नाहीं असा गांवढळ, मूर्ख, मनुष्य. उ० खेडेगांवच्या बायका म्हणजे निव्वळ अर्बुजें. ※**अर्बुज जात स्त्री०** ज्यांची भाषा, वेष, रीतिरिवाज हीं आपल्या संप्रदायाच्या विरुद्ध असून आपणांस तीं कशीशींच वाटतात ते लोक. (अरब, सिद्दी, इ०).

अर्बुद [**सं०**] **न०** दहा कोटी इतकी संख्या. एक ह्या अंकावर आठ शून्यें देऊन जी संख्या होते ती.

अर्भक [**सं०**] **न०** लहान मूल; बालक. **पु०** (लक्षणेनें) अजाण, बावळट, किं० अपक्व, मनुष्य.

अर्भकी (-का) [**सं०**] **स्त्री०** लहान मुलगी.

अर्यमा [**सं०** अर्यमन्] **पु०** सूर्य.

अर्व [**सं०**] **न०** एका अब्जाइतकी संख्या; शंभर कोटी.

अर्वाक [**सं०**'अर्वाच्'च्या प्रथमेचें एकवचन] **अ०** पूर्वी; ठरलेल्या किं० विवक्षित कालाचे पूर्वी.

अर्वाचिक वि० (कवितेंत) अननुभवी, न मुरलेला, अपक्व, अकुशल, पुरा तयार नसलेला.

अर्वाचीन [**सं०**]**वि०** अलीकडील; या काळांतील; आधुनिक. (याच्या उलट **प्राचीन**).

अर्वाच्य [**सं०** ' अवाच्य ' यापासून अशुद्ध घटना] **वि०** १ अचकट विचकट, घाणेरडें, अश्लील, ग्राम्य (बोलणें). २ तसलें बोलणारा (मनुष्य). ३ वात्रट, खोडकर.

अर्वाळी स्त्री० अर्वाच्यपणाची कृति; खोडकरपणाचें किं०वात्रटपणाचें कृत्य.

अर्श [**सं०**] **न०, पु०** गुदद्वाराचा एक रोग, मुळव्याध. **अर्शी वि०** वरील विकार झालेला.

अर्ह [**सं०** अर्ह्=लायक असणें] (समासांत अंत्यपदीं) योग्य, उचित, लायक; जसें, पूजनार्ह म्ह०पूजन करावयास योग्य; विचारार्ह म्ह०विचार करण्यास लायक, उचित, इ०.

अलक [**सं०**] **पु० न०**१ केश.२ केशांची बट.

अलका [**सं०**] **स्त्री०**१ जिचें वय आठाच्या व दहाच्या दरम्यान आहे अशी मुलगी. २ कुबेराच्या राजधानीचें नांव.

अलकत्तरा [**अ०** (अलक् तराह्) **पु०** राळ आणि तेल ह्यांच्या मिश्रणापासून तयार केलेला एक पदार्थ.

अलंकरण [**सं०** अलं+करण] १ दागिने घालणें. २ सुशोभित करणें; भूषित करणें; सजविणें.३ जें भूषित करतें किं० सजवितें तें; दागिना.

अलकाब [**अ०**] **पु०** पत्राच्या सुरवातीचा मायना.

अलंकार [**सं०** अलं+कृ=शोभविणें] **पु०** १ दागिना; भूषणवस्तु. २ जें कांहीं सुशोभित करतें किं० गुणगौरव करतें तें. उ० क्षमा ही समर्थांस अलंकार होय. ३ (**साहित्य**) वाक्याला शोभा आणणारे जे धर्म ते. जसें,उपमा, रूपक,इ०. हे अलंकार मुख्यत: दोन प्रकारचे, -शब्दालंकार, व अर्थालंकार. शब्द, शब्दांतील वर्ण, किं० शब्दांची मांडणी, यांवरच जे प्रतिष्ठित असतात म्ह० ह्यांत कांहीं बदल केल्यानें जे नष्ट होतात, ते शब्दालंकार; आणि वाक्याचा अर्थ सुशोभित करतात ते अर्थालंकार. अनुप्रास, यमक, श्लेष, आणि चित्र, हे शब्दालंकारांचे मुख्य भेद होत. उपमा, रूपक, अतिशयोक्ति, विभावना, इ० सुमारें ५९ अर्थालंकार मम्मटानें स्वीकारले आहेत.

अलंकारणें [**सं०** " अलंकार " यापासून] **स० क्रि०** विभूषित करणें; सजविणें.

अलंकारी [**सं०**] **वि०** आलंकारिक, अलंकारांनीं युक्त, अभिजात, किं० उच्च (भाषा, शैली, इ०). **पु०** अलंकारशास्त्र शिकविणारा किं० निरूपिणारा; आलंकारिक.

अलकूत वि० नाजुक; कोमल.

अलंकृत [**सं०**] **वि०** १ दागिने वगैरे घातलेला. २ सजविला, भूषविलेला. ॐ **सालंकृत कन्यादान न०** वराकडून कांहीं न घेतां मुलाला दागदागिने घालून वराला अर्पण करणें.

अलक्त, अलक्तक [**सं०**] **पु०** पायाच्या तळव्यांना लावावयाचा एक प्रकारचा तांबडा रंग; अळिता. (पूर्वीच्या बायका हा वापरीत).

अलख, अलख, अलखनिरंजन[**सं०**'अलक्ष्य' =न कळण्याजोगा] **पु०**ब्रह्म;ब्रह्माचें नांव. (गोसावी भिक्षा मागतांना ' अलख' हा शब्द उच्चारतात).

अलखटपालखट, अलखंडपालखंड, अलखतपालखत, अलखण पालखण स्त्री० आसनमांडी. [चालीचा इगला.

अलखालक[तुर्की] **स्त्री०** एक प्रकारचा तुर्की

अलग [**म०** न लागलेला] **वि०** १ निराळा; वेगळा; विभक्त. २ अस्पृष्ट. ३ आधाररहित. **क्रि० वि०** न अडखळतां; न थांबतां; हरकत न येतां; साफ रीतीनें.

अलग, अलगत [**म०** अ (नाहीं)+लागणें] **क्रि० वि०** एकाद्या पदार्थाचें स्थलांतर केल्यानें किं० त्याला स्पर्श झाल्यानें त्यांत कांहीं बिघाड होणार नाहीं अशा रीतीनें म्ह० हळूच किं० धक्का न लागेल अशा रीतीनें; नाजूक हातानें.

अलंग क्रि० वि० १ विशेषसा आधार किं० टेका नसता. २ लोंबकळत.

अलंग स्त्री० वर्ले विणगें, दोन्या वळणें, इत्यादि काम करण्यासाठीं लांबलचक दुपाखी एक मजली जें घर बांधलेलें असतें तें.

अलगड स्त्री० १ घोटाळ्याची किं० पेचाची बाब; अडचणीची परिस्थिति. २ घोटाळा, अडचण, पेच, जाचणूक. (क्रियापद ' पडणें, ' ' येणें ').

अलगणें अ० क्रि० १ लटकणें, लोंबणें (फळें वगैरे वृक्षांवर). २ लोंबकळत राहाणें.

अलगपीत क्रि० वि० १ एकाएकीं. २ हळूंच; आरते; अलगत. ३ विशेष आधाराशिवाय. ४ मोकळेपणानें, विशेष अडथळ्यांशिवाय. ५ लोंबकळत.

अलगरजी (– जू) [अ०] वि० १ अव्यवस्थित, थंद्रा, हेंगाडा, निष्काळपणाचा, गयाळ. " हलगरजी " हें रूप विशेष रूढ आहे. २ आपलें कार्य साधण्यासाठीं दुसऱ्याविषयीं प्रेम किं० भक्ति दाखविणारा.

अलगूज, अलगुजें [अ० अल्गूजह्] न० १ चिव्याचें एक प्रकारचें वाद्य. २ घोड्याच्या खोगिराच्या दोन छापांस जोडणारे जे बंध त्यांपैकीं प्रत्येक.

अलंघ्य अलंघनीय [सं० अ (नाहीं) + लंघ्=ओलांडणें] वि० उल्लंघिण्यास किं० अति-क्रमण करण्यास कठिण किं० अशक्य.

अलड, अल्लड वि० अजाण; अननुभवी; अज्ञ.

अलताभलता वि० कोणी तरी; ज्याला कांहीं किंमत नाहीं किं० महत्त्व नाहीं असा कोणी तरी; ज्याच्यावर जबाबदारी टाकणें योग्य नाहीं असा; ज्याचा शब्द फारसा विश्वसनीय म्हणतां येत नाहीं असा. कोणी तरी.

अलंप्रतीति स्त्री०, **अलंप्रत्यय** पु० [सं० अलं (पूर्ण)+प्रतीति, प्रत्यय (जाणीव)] पुरेंसें किं० भरपूर असल्याची जाणीव किं० भावना.

अलफ [अ०] वि० एक हजार (अरबी सन सांगतांना योजतात).

अलबत्, अलबत्ता [फा० अल्बत्ताह्] क्रि० वि० १ अर्थात्; जरूर; खात्रीनें. २ कमींत कमी; निदान.

अलंबीं [सं०+अ (नाहीं)+आलंब (टेका)] क्रि० वि० भक्कम आधार किं० आश्रय किं० टेका नसतां; अस्थिर किं० अशक्त आधारावर.

अलंबुद्धि [सं० अलं (पुरेशी)+बुद्धि] स्त्री० १ आपणाला पुरेंसें आहे अशी समजूत किं० भावना; तृप्तपणाची भावना; आपणाला हवें तितकें मिळालें आहे अशी समाधानाची भावना.

अलबेला [हिं०] वि० १ नटिनेटकेपणानें, काळजीनें, कसोशीनें, टापटीपीनें, किं० रेखीव-पणानें जें केलेलें नाहीं तें (बांधकाम, लेखन, विणकाम, रचाई इ०). २ मुग्ध; गुळमुळीत; संशय राहूं शकेल असें; अस्पष्ट. उ० त्याला खस-खशीत ताकीद करून ये, उगीच अलबेलें सांगून येऊं नको. ३ बाहेरून दिसण्यांत साधा (पण आंत कपटी असा माणूस).

अलभ्य [सं० अ (नाहीं) + लभ्य (मिळण्या-जोगा; लभ्=मिळविणें) वि० न मिळण्याजोगें; दुष्प्राप्य. ꠸–**लाभ** पु० फारच मोठा लाभ; जें दुर्मिळ वाटत होतें त्याची प्राप्ति. उ० तुमच्या भेटीचा आज आम्हांस अलभ्य लाभच झाला !

अलम पु० लहान मुलांनीं घालावयाचें छोटेंखानी पागोटें.

अलम [अ० अलम्=सर्व] वि० सर्व, दरोबस्त; यांच्यापुढें दुनिया (जग, पृथ्वी) हा शब्द बहुधा येतो. १ लोक. २ स्त्री० जग, पृथ्वी. जनता. ३ मानवी जाति.

अलमदांड [अ० अलम्=सर्व + म० दांड (दांडगा)] वि० अतोनात उद्धट; धटिंगण.

अलर्क [सं०] पु० १ कुत्र्यांना होणारा एक रोग. २ पिसाळलेला कुत्रा. ३ आठ पायांचें एक रान डुकरासारखें जनावर. ४ पांढरी रूई.

अलवरतालवर न०, पु०, अ० व०, **अल-वारतालवार** पु० अ० व० एकाद्याची बडीजाव करणें; ०ची मिजास राखणें.

अलवान [अ० अल्वान्=अनेक रंगांचें] न० १ एक प्रकारची शाल. २ पक्क्या तांबड्या रंगाचें एक प्रकारचें सुती कापड.

अलस [सं०] वि० १ मंद, सावकाश, सौम्य, (चालण्याची गति वगैरे). २ मदड; आळशी. ३ दमलेला; थकलेला; श्रान्त. हा शब्द मराठींत समासांत आढळतो; जसें, **मदालसा** म्ह० मदानें श्रान्त असलेली. ꠸**अलसेक्षणा** स्त्री० वि० जिचे डोळे श्रान्त दिसत आहेत अशी (स्त्री०)

अलसिका [सं०] **स्त्री०** पटकीच्या रोगाच्या ज्या तीन अवस्था;–विषूचिका, अलसिका, आणि विलंबिका,–त्यांतील दुसरी. (अलसिका ह्या अवस्थेंत पेटके येतात).

अलक्ष्मी [सं० अ (नाहीं)+लक्ष्मी (संपत्तीची देवता)] **स्त्री०** दारिद्र्य; विपन्नावस्था. (अलक्ष्मी आणि लक्ष्मी या दोन सख्या बहिणी; लक्ष्मीनें विष्णूशीं विवाह केला, व अलक्ष्मी पतिकरतां दारोदार भटकत असते अशी कल्पना केली आहे).

अलक्ष्य [सं० अ (नाहीं) + लक्ष्य (लक्ष्= पाहाणें)] **वि०** अज्ञेय; अकल्प्य; दृष्टयगोचर (ब्रह्म वगैरे). ॐ**अलक्ष्य** (किंवा **अलक्ष**) **लेखणें, धरणें, मोजणें, मानणें, पाहणें, जाणणें** तुच्छ समजणें; तिरस्करणीय म्हणून उपेक्षिणें. **न०** दुर्लक्ष्य; निष्काळजीपणा; अनवधानता.

अलक्ष्या [सं० अ (नाहीं)+लक्ष् (पाहाणें)] **स्त्री०** योग्याचें एक प्रकारचें आसन.

अलाईबलाई, अलायबलाय [हिं० अलिया बलिया] **स्त्री०** ईडा पीडा; दुःख, संकट.

अलात [सं०] **पु०** १ अर्धवट जळलेलें लाकूड; जळतें लाकूड. २ वल्ह्याचें पातें. ॐ**अलातचक्र न०** अग्निवलय; जळतें लाकूड गरगर फिरविल्यानें होणारें अग्निचक्र.

अलाद, अलादी [अ० अली अहदह्=पृथक्] **क्रि० वि०** १ इकडे तिकडे न लागतां (तीर किं० धोंडा लक्ष्यावर आदळणें). २ न ठेचळतां किं० न अडखळतां साफ. ३ धरलेल्या वस्तूला इजा किं० उपद्रव न होईल अशा रीतीनें; अलगत; सौम्यपणानें. [भाषिक शब्द.

अलाद स्त्री० पत्त्यांच्या खेळांतील एक पारि-

अलाप, अलाफ [सं० आलाप (आ+लप्)] **पु०** १ गायनाला प्रत्यक्ष सुरवात करावयाच्या अगोदर गवयी लोक रागाचा जो आकार किं० स्वरूप दाखवितात तो. २ एकादें पद किं० पदाचा भाग गुणगुणणें.

अलाबु, अलाबू [सं०] **स्त्री०** १ दुध्या भोपळा. २ पेशी, पिशवी. ३ रक्त काढण्याची तुंबडी. **न०** १ भोपळ्याचें केलेलें पात्र. २ दुधा भोपळा.

अलायी कारखाना [अ० अलाही+फा० कारखाना] **पु०**१ विस्तीर्ण, प्रचण्ड, किं० अवाढव्य कारखाना म्ह० काम करण्याची जागा. २ मोठ्या प्रमाणावरचें वैभव, थाटमाट, इ०.

अलावा [फा० आलावा] **पु०** मोहरमांत मुसलमान लोक ज्या खड्यांत अग्नि प्रज्वलित करून त्याच्याभोंवतीं नाचतात तो.

अलाहिदा [अ० अली अह्दह्] **वि०** वेगळा, निराळा. **क्रि० वि०** वेगळ्या रीतीनें; स्वतंत्रपणें; पृथक्. ॐ**अलाहिदा जमा स्त्री०** जमीनीचा सारा खेरीज करून इतर प्रकारांच्या अंदाजाबाहेरच्या जमा.

अलि [सं०] भ्रमर; भुंगा. ॐ**अलिकुल न०** भुंग्यांचा समूह. **अलिविराव पु०, अलिरुत न०** भुंग्यांचें गुणगुणणें किं० घुमणें; भुंग्यांचा भूं, भूं, असा आवाज. ॐ–**जिह्वा स्त्री०** पडजीभ.

अलिकडचा, अलिकडला वि० १ या काळांतील; आधुनिक. २ या बाजूचा; इकडील. **अलीकडचा, अलीकडला, अलीकडील** अशींही अन्य रूपें आहेत. [तांबडा रंग.

अलिता [सं० अलक्त] **पु०** अळिता; लाखेचा

अलिप्त [सं० अ (नाहीं)+लिप्त (चोपडलेला; लिप्=माखणें, व्यापणें] **वि०** १ अमलिन; न मळलेला. २ संपर्करहित; संबंधविरहित; विभक्त, निराळा. ॐ**करणी करून अलिप्त** वाईटसाईट गोष्टी करूनसवरून वर सोंवळेपणाचा टेंभा मिरवितो तो.

अलीक [सं०] **वि०** खोटें; असत्य. **न०** खोटें, मिथ्या, किं० असत्य भाषण किं० वचन; लबाडी. [बाजूस.

अलीकडे क्रि० वि० १ हल्लीं. २ इकडे; या

अलुक् समास [सं० ज्यांत विभक्तीचा लोप होत नाहीं असा समास] **पु०** ज्या समासांत विभक्तीच्या प्रत्ययांचा लोप होत नाहीं तो. उ० अपांपति (म्ह० वरुण); येथें अपां हें षष्ठीच्या अनेक वचनाचें रूप तसेंच कायम आहे. त्याचा विग्रह अपां पतिः अपांपतिः असा होतो. त्याचप्रमाणें सरसिज (म्ह० कमळ), आत्मनेपद, परस्मैपद, युधिष्ठिर, इ०, समास जाणावे.

अलुता (–त्या) पु० बलुत्याच्या खालच्या दर्जाचे जे गांवकामगार त्यांपैकीं प्रत्येक. हे अलुते बारा असत. १ तेली; २ तांबोळी; ३ साळी; ४

माळी; ५ जंगम; ६ कळवांत; ७ डबऱ्या; ८ठाकर; ९ थडशी; १० तराळ; ११ सोनार; आणि १२ चौगुला.

अलुदा [**फा०** आलूदह्=विटाळलेलें] **वि०** १ मिश्र, मिश्रित. २ निकट संबद्ध. ३ विटाळलेला; वाइटाशीं जुळलेला.

अलुलित, अलूल वि० बुजरा (ठाणेबंध [घोडा इ०).

अलें, आलें [**सं०** आर्द्रक] **न०** जमीनींतच ज्याचा बुंधा पसरत जातो अशी एक तिखट वनस्पति;तिचा बुंधा वाळवून सुंठ करतात.**॰अलेपाक पु०** अलें, साखर, आणि कांहीं औषधी द्रव्यें घालून शिजवून जो पाक करतात तो.

अलेमान [अ० अलामान] **स्त्री०** एक प्रकारची [तरवार.

अलेल वि० अट्टल; पक्का; इरसाल (सोदा, चोरटा, लुच्चा, इ०).

अलोचन जागरण [**सं०** अ+लोचन (डोळा) +जागरण (झोपेचा अभाव)] **न०** सबंध रात्रींत डोळ्याला डोळा न लागणें; एक निमिष सुद्धां डोळे न मिटतां केलेलें किं० झालेलें जागरण.

अलोट [**म०** अ (नाहीं)+लोट (लोटून काढतां येईल असें)] **वि०** १ अतिशय; पुष्कळ; अचाट; अफाट (संपत्ति, बुद्धिमत्ता, विद्वत्ता, इ०). २ ज्याचें निवारण करणें शक्य नाहीं असें; जें परतावितां येत नाहीं असें. ३ जें बदलत नाहीं किं० बदलतां येत नाहीं असें.

अलोटणें स० क्रि० करतां येईल असें असणें; उ० हें काम मला अलोटणार नाहीं.

अलोभ [**सं०** अ+लोभ (तृष्णा)] **वि०** ज्याला लोभ, हांव, किं० तृष्णा नाहीं असा. **पु०** १ निर्लोभीपणा. २ प्रेमाचा अभाव.

अलोल [**सं०** अ (नाहीं)+लोल (चंचल)] **वि०** १ स्तब्ध; शांत, स्थिर; अचंचल.२निरिच्छ; लंपट नव्हे तो.

अलोलकी स्त्री० १ प्रेम, भक्ति. २ देव्हारे माजविणें, स्तोम करणें; स्तुतिस्तोत्रें गाणें. ३ प्रेमानें, लाडानें किं० थाटानें वागविणें. (क्रियापद 'करणें').

अलोलीक वि० १ अलौकिक; आश्चर्य वाटविणारें; असामान्य. २ सौम्य, प्रेमळ, गोड, लाडीक (स्वभाव, भाषण, मनुष्य, इ०). **स्त्री०**आवड. **॰–तालोलीक न०**लाडानें किं० थाटानें वागविणें; लाड करणें. उ० तिनें तरी नवऱ्याचें अलोलिक तालोलिक कोठवर करावें ? तो कामांतून गेला !

अलोलुप [**सं०**अ (नाहीं)+लोलुप(लंपट)] **वि०** निरिच्छ; अलोभी; अलंपट; विषयवासनारहित.

अलौकिक [**सं०**] **वि०** असामान्य; अद्भुत; नवलपूर्ण; चमत्कृतिजन्य; असाधारण; नित्याच्या आढळांत नसणारा. **पु०** बद्लौकिक; दुष्कीर्ति.

अल्प [**सं०**] **वि०** स्वल्प; थोडें; कमी प्रमाणाचें. **॰अल्प करणी बोभाट बहुत** प्रत्यक्ष करायचें थोडें, पण त्याचा गाजावाजा मात्र पुष्कळ करावयाचा. **अल्पकर्ण, अल्पकर्णी वि०** १ कोणीही काहींही गोष्ट (विशेषतः वाईट किं० बदनामीची गोष्ट) सांगितली असतां तिजवर विश्वास ठेवणारा; फारशा पुराव्याची वगैरे अपेक्षा न करतां ती एकदम खरी मानणारा. २ ज्याच्या पोटांत कांहीं गुप्त राहात नाहीं असा; ढिल्या जिभेचा. **अल्पदृष्टि वि०** १ कोत्या मनाचा; अप्रगल्भ विचारांचा; अदूरदृष्टि. २ बारीक सारीक बाबतींतही काळजीपूर्वक लक्ष्य घालणारा: जेथें तेथें हिशेबी दृष्टि ठेवणारा; चिकू. **अल्पप्राण वि०** दमेकरी. **पु०** ज्या वर्णांत हकार नाहीं असे वर्ण; उ० स्वर, य, र, ल, व, क, च, ट, त, प, ग, ज, ड, द, ब, ङ, ञ, ण, न, म (यांच्या उलट 'महाप्राण'). **अल्पभाषी वि०**मितभाषी; थोडें बोलणारा. **अल्पमोली वि०** स्वल्प मोलाची पण खूप दुध देणारी (गाय वगैरे). **अल्पसंतुष्ट, अल्पसंतोषी वि०** ज्याचें थोडक्यांत समाधान होतें असा. **वि०अल्पस्वल्प** थोडीशी; (हा शब्द वापरण्यांत बोलणाराचा विनय असतो.) उ० मला काय जी अल्पस्वल्प करणी करायची ती मी करीन, आपण माझी मुलगी पदरांत पाडून घ्या. उ० त्या महात्म्याची अल्पस्वल्प सेवा माझ्या हातून घडली यांत मी कृतकृत्य झालों. **अल्पायास पु०** थोडे श्रम; स्वल्प जिकीर. **अल्पायासानें** अनायासानें.**अल्पायास आणि महत्फल** फार सायास न पडतां मोठ्या फलाची प्राप्ति. **अल्पायुष, अल्पायुषी वि०** ज्याची जीवितमर्यादा थोडी आहे असा. **अल्पारंभ पु०** सुरवात, सुरवातीचा उपक्रम. **अल्पाहार पु०** थोडें खाणें (सकाळच्या न्याहा-

रोमाग्वें वगैरे). **वि०** ज्याचा आहार कमी आहे असा. **अल्पशः क्रि० वि०** थोड्या बहुत प्रमाणांत; कांहीं अंशानें; थोडें थोडें ह्या क्रमानें.

अल्लड वि० अजाण; अप्रौढ; पोरसवदा; अननुभवी; अपक्व बुद्धीचा; अपेट.

अल्ला [**अ०** इसलामी धर्मांतील देवाचें नांव] **पु०** मुसलमानांचा परमेश्वर. ॐ **अल्लाची गाय स्त्री०** गरीब, निरुपद्रवी, आणि शांत माणूस; हीनदीन माणूस (जो दयेला पात्र आहे).

अल्लाद, अल्हाद क्रि० वि० धक्का न लागेल अशा रीतीनें; हलकेंच; हळूच; सावकाश.

अल्लारखी, अल्लाऋषि [**अ०** अल्ला (परमेश्वर) +**सं०** ऋषि (मुनि)] **वि०** १ अव्यवस्थित किं० निष्काळजीपणानें केलेलें (काम). २ स्वताच्या सुखास्वस्थानाची किं० सोईगैरसोईची पर्वा न करणारा.

अल्ह्या पु० संगीतांतील एका रागिणीचें नांव.

अव [**सं०**] **अ०** एक उपसर्ग. ह्याचे पुढील अर्थ असतात. (१) अपमान (उ० अवज्ञा); (२) आधार, आश्रय (उ० अवलंब); (३) कमीपणा, तुच्छता (उ० अवहेलन); (४) स्वच्छता (उ० अवदात); (५) प्रसार (उ० अवकीर्ण); (६) निश्चय, (७) खालीं, इ० इ०.

अवई स्त्री० वातमी, वार्ता, अफवा, किंवदंती.

अवकटा क्रि० वि० (कवितेंत) अवचित; एकाएकीं.

अवकणें अ० क्रि० ज्यास्त पिकून नासणें.

अवंकणें अ० क्रि० कचरणें; मागें पुढें करणें. पुढें ' अवांकणें ' पहा.

अवकल [**सं०** अव+कला] **स्त्री०** अधोगति; अवनति; ऱ्हास; अपकर्ष; उतरती कळा.

अवकलणें [**सं०** वर ' अवकल ' पहा] **अ० क्रि०** ०ची अधोगति, अपकर्ष, किं० ऱ्हास, होणें; ०ला उतरती कळा लागणें.

अवकहडाचक्र न० जन्मनक्षत्रावरून मनुष्याचें नांव काय ठेवावें हें ठरविण्यासाठीं फलज्योतिषी जें एक चक्र काढतात तें.

अवकळ वि० १ उच्छृंखळ; स्वैर. २ अप्रतिबद्ध; ३ अनियमित. (खालीं **अवखळ** पहा). ॐ**अवकळवणी अवकाळी** [**सं०** अवकाळ+**म०** पाणी] **न०** भलत्याच वेळचा पाऊस. **अवकाळी** (–ळ्या) **पु०** अशाही रूपें आहेत.

अवकळा [**सं०** अव+कला] **स्त्री०** ऱ्हास; अवनति; अधोगति; अपकर्ष; उतरती कळा.

अवकात (–द्) [**अ०** अव्कात] **स्त्री०** १ शक्ति; अवसान. २ ऐपत.

अवकाश [**सं०**] **पु०** १ फुरसतीचा किं० निवांतपणाचा वेळ. २ जागा; प्रदेश. ३ अवधि; मुदत. ४ मधला रिकामा वेळ. ५ वाव, प्रसंग, सवड (' देणें, ' ' मिळणें '). ६ विशिष्ट समयाच्या अगोदरचा अवधि; उ० सभेच्या सुरवातीला अजून पंधरा मिनिटांचा अवकाश आहे.

अवकीर्ण [**सं०** अव+कीर्ण (पसरलेला) कॄ=पसरणें)] **वि०** १ व्याप्त; आच्छादित. उ० आकाश मेघावकीर्ण होतें. २ इतस्ततः पसरलेलें.

अवकृपा [**सं०** अव (विरुद्ध) + कृपा (मेहेरबानी)] गैरमर्जी; खप्पा मर्जी; रोष; प्रतिकूल मत; नापसंती.

अवखळ वि० व्रात्य; उच्छृंखळ; वस्ताळ; खोडयाळ(वर **अवकळ** पहा). लहान मुलांस हा शब्द फार लावतात.

अवखा [**अ०** वाकअह्=घडलेली गोष्ट] **स्त्री०** शारीरिक बिघाड; आजार.

अवखात (–द्) स्त्री० शक्ति, कुव्वत, सामर्थ्य (अकरणरूपी प्रयोगांत).

अवगणणें [**सं०** अव+गण् (मोजणें, मानणें)] **स० क्रि०** तिरस्कारानें किंवा तुच्छतेनें वागविणें; धिक्कारणें; ०ची अवहेलना करणें; विमानणें.

अवगणन न०, अवगणना स्त्री० [**सं०** अव+गण् (गणणें, मानणें)] धिक्कार; अवहेलना; तिरस्करण; विमानना.

अवगणित [**सं०** ' अवगणन ' पहा] **वि०** धिक्कारलेला; तुच्छ केलेला; विमानित.

अवगणी स्त्री० (कवितेंत) साम्य; वेष; सोंग; रूप; बाह्याकार.

अवंगणी [**म०** अवंगणें=थांबणें, वाट पाहणें] **स्त्री०** थांबणें; वाट पहाणें; मार्गप्रतीक्षा.

अवगणें [**सं०** ' अवगम् ' पासून] **अ० क्रि०** १ ओळखला जाणें. २ भासणें, दिसणें.

मुळणें. ४ असणें. ५ अव्यवस्थितपणानें वागणें. **स०** **क्रि०** समजणें. [पहात राहाणें.

अवंगणें अ० क्रि० १ थांबणें. २ ०ची वाट

अवगत [**सं०** अव+गम्=जाणणें] **वि०** जाणलेला; माहीत असलेला; शिकलेला.

अवगति [**सं०** अव (खालीं)+गम्=जाणें] **स्त्री०** १खालीं पडणें. २ अधःपात. ३ ऱ्हास, अपकर्ष.

अवगम [**सं०** अवगम्=जाणणें, शिकणें] **पु०** १ ज्ञान. २ अध्ययन.

अवगाहन [**सं०** अव (खालीं)+गाहन (बुडणें)] **न०** १ पाण्यांत बुडी मारणें. २ एकाद्या शास्त्रांत किं० विषयांत पूर्णपणें निष्णात होणें.

अवगी स्त्री० घोड्याची ऐटदार चाल. ॐ**अवगीवर धरणें** घोड्याला थाटदार चालीवर चालविणें.

अवगुंठन [**सं०** अव+गुंठ् (गुंडाळणें)] १ गुंडाळणें. २ नेसणें. ३ झाकून टाकणें. ४ लपविणें.

अवगुंठित [**सं०** 'अवगुंठन' पहा] **वि०** १ कशानें तरी आच्छादलेला. २ लपविलेला.

अवगुण [**सं०** अव (वाईट) + गुण] **पु०** १ वाईट गुण. २ खोड, व्यसन. ३ अहित किं० भलताच परिणाम (औषधादिकांचा).

अवगुणी [**सं०** अव (वाईट)+गुण (धर्म) + **म०** ई (प्रत्यय)] **वि०** १ वाईट स्वभावाचा किं० गुणांचा. २ अपशकुनी. ३ कुलक्षणी. ४ खोडकर, व्रात्य,

अवग्र [**सं०** अव्यग्र] **वि०** १ स्वस्थ, शांत. २ निस्पृह, उदासीन. ३ दक्ष, तत्पर. ४ (मराठींत) सर्व, समग्र.

अवग्रह, अवग्राह [**सं०** अव (बाजूला)+ गृह् (घेणें)] **पु०** १ अवर्षण. २ अडथळा, बंधन. ३ दुराग्रह. ४ भावना, कल्पना. ५ शिक्षा. ६ (व्याकरणांत) संधि न होणें किं० त्याबद्दलची खूण. ७ संधि होऊन पुढच्या शब्दाच्या आरंभींचें 'अ' हें अक्षर लोपणें; ह्या 'अ' ची ऽ अशी खूण असते. [हटकून; खचित.

अवग्रून क्रि० वि० निश्चयपूर्वक; न चुकतां;

अवघड [**सं०** अव+घट् (बनविणें)] **वि०** १ कठिण; करावयाला, समजावयाला, किं० निस्तरावयाला कठिण. २ कष्टकारक, त्रासदायक. ३ चढावयाला किं० चालावयाला आकुंचित किं० गैरसोयीचा; पदोपदीं ठेचा देणारा (मार्ग इ०). **न०** दुःख (वियोगानें, किं० मरणानें, किं० निराशेनें') ॐ**अवघड वाटणें** अंतःकरण व्याकुळ होणें. ॐ**अवघडनाथ, अवघड्या पु०** १ आळशी, सुस्त, पोटाळ, आणि ठेंगणा माणूस. २ नसत्या अडचणी, शंका, किं० हरकती काढून गति कुंठित करणारा. **अवघड पंथ पु०** गोसाव्यांच्या दहा पंथांपैकीं एकपंथ. ह्या पंथाचे गोसावी अति गलिच्छ रीतीनें राहातात आणि खाण्यापिण्यांत ते कशाचाच विधिनिषेध बाळगीत नाहींत; ते रात्रीं भिक्षा मागतात. **अवघडपंथी पु०** वरील पंथांतील गोसावी.

अवघडणें अ० क्रि० १ अडचणीच्या किं० कष्टकारक स्थितींत असणें. २ (हात, पाय, डोकें, इ०) भारावणें, ताठून जाणें, दुखूं लागणें. ३ घोटाळ्यांत किं० पंचाइतींत पडणें. ४ अडकून पडणें.

अवघा वि० १ सर्व, दरोबस्त. २ प्रत्येक.

अवघ्राण [**सं०** अव + घ्रा (हुंगणें)] **न०** वास; वास घेणें, हुंगणें.

अवघ्रात [**सं०** 'अवघ्राण' पहा] **वि०** हुंगलेला, वास घेतलेला.

अवचट [**सं०** अवचित्त=मनांत नसलेलें] अकल्पित किं० अनपेक्षित संकट, अडचण, किं० पेच. **क्रि० वि०** अकल्पित किं० अनपेक्षित रीत्या; एकाएकीं; अकस्मात्. **अवचटें क्रि० वि०** अकल्पित रीत्या; अकस्मात्; मनीं मानसीं नसतां.

अवचित [**सं०** अवचित्त= ध्यानींमनीं नसलेलें किं० नसतां] **क्रि० वि०** एकाएकीं; अकस्मात्; एकदम. ॐ**अवचित फळ न०** १ मकरसंक्रांतीचे दिवशीं स्त्रियांचा एक वसा; पुत्रप्राप्त्यर्थ स्त्रिया ब्राह्मणाचे घरांत नारळ मुकाट्यानें ठेवून येतात तो विधि. २ असा ब्राह्मणाच्या घरांत ठेवावयाचा किं० ठेविलेला नारळ. **अवचितराव पु०** जन्म देणाऱ्या आईबापांपासून कांहीं कारणांनीं वियुक्त झालेला किं० त्यांनीं टाकून दिलेला, आणि दुसऱ्या आईबापांनीं आपला म्हणून स्वीकारलेला मुलगा, जो ह्या नव्या आईबापांच्या संपत्तीचा वारस होतो किं० वैभवास चढतो तो.

अवचितें. अवचित न० अतित्वरेनें पिकतें असें एक प्रकारचें भात.

अवचित्या वि० खोडकर कि० ग्राम्य (मूल).

अवचिंद, अवचिन्न [**सं०** ' अवचिन्ह ' चा मराठी अपभ्रंश] **वि०** १ दुःशकुनसूचक. २ ग्राम्य, खोडकर, (मूल). **न०** दुःशकुन.

अवचिन्ह [**सं०**] **न०** दुश्चिन्ह, दुःशकुन.

अवच्छिन्न [**सं०**अव + छिद् (कापणें, तोडणें)] **वि०** १ मर्यादित. २ निराळा, भिन्न. ३ (न्यायांत) विशेष गुणानें प्रसिद्ध.

अवच्छेद [**सं०** अव + छिद् (तोडणें, कापणें)] **पु०**१ कापणें, तोडणें. २ भाग. ३ मर्यादा, नियंत्रणा. ४ वेगळें कि० पृथक् करणें. ५ भेद. ६ निकाल, कि० निकालाला लावणें. ७ विशिष्ट गुण. ८ व्यापणें. **०एकसमयावच्छेदेंकरून क्रि० वि०** एकदम; एकाच कि० त्याच वेळीं कि० समयीं. **एतत्कालावच्छेदेंकरून क्रि० वि०** ह्याच वेळीं; ह्याच समयीं. **शक्त्यवच्छेदेंकरून क्रि० वि०** यथाशक्ति; सर्व शक्ति खर्चून.

अवच्छेदक [**सं०** ' अवच्छेद ' पहा] **वि०** १ तोडणारा, कापणारा. २ पृथक् कि० वेगळा करणारा. ३ मर्यादा कि० नियंत्रणा घालणारा. ४ भिन्न करणारा. ५ व्यापणारा. **(व्या०)** विशेषण, उपाधि. **अवच्छेदाकावच्छेद पु०** अपवाद, नियंत्रणा, भेद, किं० विशेष गुणधर्म इ० नाहींसें, करणें. **अवच्छेदाकावच्छेदेंकरून क्रि० वि०** जात्यादि रूप अवच्छेदकानें जितका व्यक्त्यादिरूप अर्थ आक्रमिला आहे त्यांतील अंश न वगळतां तो सर्व घेऊन.

अवजड वि० अवाढव्य; बोजड; पेलावयाला किं० वापरावयाला कठिण; अतिजड आणि वेढब.

अवजतन न० १ जोपासनेंत हयगय; जितकी काळजी घेणें जरूर आहे तितकी न घेणें; हेळसांड, हयगय. २ अडचण.

अवजार [**अ०**]**न०** गलबत, पवनचक्की, इ० चालवावयासाठीं वारा अडविण्यासाठीं जें वस्त्र पसरून लावितात तें.

अवझरता, अवझडता वि० पूर्णपणें स्पर्श न करणारा. **क्रि० वि०** १ पूर्णपणें स्पर्श न करतां. २ हल कैंच. ('ओझरता' हें रूप विशेष प्रचारांत आहे).

अवट पु० १ तुळ्या, कळ्या, वगैरे इमारती लाकडांचा रास. २ जळाऊ लांकडांचा रास.

अवट पु०, अवटाण न० ओहोटी.

अवटकी स्त्री० अवटी ह्या अधिकाऱ्याचें कर्तव्य कि० जमीनजुमला. गोळा करणें.

अवटणें अ० क्रि० १ ओहोटणें. २ शेताचें पीक

अवट (-टा-,-ठ-)रणें अ०क्रि० १ आकुंचित होणें; आकसणें; अखूड होणें. २ ताठणें (गळा, नेगटी, मान, इ०). ३ रुसून कि० फुगून बसणें; धुम्म होऊन बसणें.

अवट (-टा-)ळणें अ० क्रि० मान ताठ होणें; मानेची हलण्याची क्रिया वेदना उत्पन्न करणारी होणें; मान कि० कोणताही अवयव लचकून ताठणें.

अवटळा पु० मानेंत कि० दुसऱ्या कोणत्याही अवयवांत लचक भरणें.

अवटा पु० रुसवा; घुस्सा. (**क्रि०** धरणें).

अवटाळणें स० क्रि० १ पकडणें; धरून ठेवणें, कवटाळणें. २ समाविष्ट कि० सामील करून घेणें. ३ लबाडीनें दुसऱ्याचा पैसा हिरावून आपल्या पदरांत पाडून घेणें. ४ लांवणावर टाकणें.

अवटी स्त्री० १ सोनाराचा सुवर्णादिकांच्या पत्र्याला विवक्षित आकार यावयाचा कि० त्यांवर विवक्षित नक्षी उठविण्याचा पंचरसी धातूचा ठसा. २ ज्या जागीं लाकूड किंवा धातूचा तुकडा तोडावयाचा कि० कापावयाचा आहे त्या जागीं केलेली कि० काढलेली खुणेची रेघ.

अवटी स्त्री० ओहोटा (समुद्राच्या पाण्याची).

अवटी पु० १ गावांतील बाजारांत आलेल्या धान्याची मोजदाद करणारा अधिकारी. २ दुकानदारांचीं वजनें, मापें, आणि तराजू, हीं खरीं आहेत किं० लबाडीचीं आहेत हें तपासणारा सरकारी अधिकारी. ३ संस्थानिकांच्या किं० श्रीमंतांच्या कुटुंबांत बाजारांतून विकत आणलेल्या जिनसा त्या त्या परिमाणांच्या ह्या० त्या त्या वजनांच्या आणि मापांच्या आहेत किंवा नाहींत हें पहाणारा अधिकारी. ४ मोठ्या दुकानांतून माल मापून घेण्यासाठीं वगैरे ठेवलेला नोकर.

अवठाणूं न० गळवासारखी शारीरिक विकृति. यालाच **उठाणूं** असा प्रतिशब्द आहे.

अंवठा पु० राग, घुस्सा; चिडणें; चिडखोर-पणाची लाट किं० उसळी, रागाचा फणकारा, (क्रिया० ' धरणें, '' ' मोडणें ', 'येणें').

अवड, आवड स्त्री० रुचि, पसंती. ॐ**अवडीचा पाहुणा आणि दिवाळीचा सण** १ आवडणाऱ्या अनेक गोष्टी एकदम जुळून येणें. २ आपणाला प्रिय असा इसम आपल्या घरीं पाहुणा म्हणून आला असतां तो दिवाळीच्या सणाप्रमाणें आनंददायक असतो. **आवडगोड** १ एकादा माणूस किं० पदार्थ इतर लोकांच्या मतानें वाईट असला तरी तो आपणाला आवडत असतो म्हणून तो आपणाला गोड वाटतो. २ एकादा पदार्थ कुचकिमतीचा असला तरी तो आपणाला गोड वाटतो, जर तो पदार्थ देणारा मनुष्य प्रेमानें आणि बहुमानपुरस्सर आपणाला तो देत असला तर.

अवडक चवडक स्त्री०, न० १ हा मुलांचा एक खेळ आहे. २ पदार्थ अव्यवस्थित रीतीनें इतस्ततः टाकणें, किं० अव्यवस्थितपणें इतस्ततः टाकलेले पदार्थ.

अवडचिवड स्त्री०, आवडाचिवडा पु० पदार्थांची अव्यवस्थितपणें केलेली मांडणी किं० रचना; पदार्थांची खिचडी किं० मिसळ किं० गल्लद.

अवडणणें, अ० क्रि० १ नापसंत किं० अप्रिय असणें. २ शिसारी किं० किळस उत्पन्न करणें.

अवडणें, आवडणें स० क्रि० प्रिय असणें किं० वाटणें; पसंत असणें; मनाजोगा असणें. ॐ**अवडून घेणें** दुसऱ्याच्या प्रेमाला किं० लोभाला आपण पात्र होऊं अशा रीतीनें वागणें.

अवडता, आवडता वि० आपणाला आवडणारा किं० रुचणारा; मनाजोगा; आपणास जसा पाहिजे तसा. ॐ**आवडती बायको स्त्री०** आपल्या दोन बायकांपैकीं जी आपल्या प्रीतीला पात्र असेल ती म्ह० दुसरी किं० मागून केलेली बायको; पहिली बायको अधिक वयाची म्हणून नावडती असते. **अवडनावड, अवडनिवड स्त्री०** हें आपणास आवडतें आहे आणि तें नाहीं असा भेद करण्याची मनाची प्रवृत्ति. उ० मला कोणताही धोतरजोडा द्या; मला आवडनिवड कांहीं नाहीं.

अवडंबर [**सं०** आडंबर] **पु०** मोठा पसारा, भपका, थाटमाट, (माजविणें).

अवढणणें अ० क्रि० अप्रिय किं० नापसंत असणें; ०ची शिसारी किं० वीट येणें.

अवढणें न० शिसारी, किळस, नापसंती.

अंवढा पु० तोंडांत थुंकी जी वेळोवेळीं जमते आणि जी आपण घशाखालीं ढकलतों ती; (क्रियापद गिळणें, उतरणें, परतणें, इ०); उ० मला अंवढा गिळत नाहीं मग दूध कसें पितां येईल ?

अवढा, अवढाय, अवढ्या पु० शिसारी, वांती, किळस (क्रियापद येणें, पडणें, इ०). उ० मला मेथकुटाचा अगदीं अवढा आला आहे, डोंगर वाट.

अवढाण वि० दावें तोडून इतस्ततः भटकत फिरण्याची ज्याला खोड आहे असा (बैल, गाय, इ०).

अंवढ्या नागनाथ पु० नर्मदा नदीच्या कांठावर जीं बारा ज्योतिर्लिंगें आहेत त्यांपैकीं जें अंवढें गांवाजवळ आहे तें.

अवणा पावणा [**म०** पाव उणा] **पु०** किंमतीसंबंधानें धासाघीस किं० जिकीर करणें आणि किंमत उतरविणें.

अवंतण, अवंतणें न०, अवंता पु० [**सं०** ''आमंत्रण'' ह्याचा अपभ्रंश] आमंत्रण; बोलावणें. ॐ**अवंतण टाकून भीक मागणें** संमानपूर्वक आलेल्या बोलावण्याचा अव्हेर करून आगंतुकी करीत फिरणें (हा मूर्खपणा आहे); असाच संप्रदाय ''**आयनीला मरावें आणि खरवडीला झुलावें** '' हा त्याच अर्थाचा आहे.

अवंतणें ['आमंत्रणें'चा अपभ्रंश] **स० क्रि०** भोजनाचें आमंत्रण देणें किं० करणें.

अवतरण [**सं०** अव (खालीं)+तृ पोहणें, उतरणें)]**न०**१उतरणें,शिरणें.२देवादिकांचें पृथ्वीवर येणें. ३तीर्थस्नान.४ उल्लंघणें.५भाषांतर.६ ग्रंथांतून घेतलेला उतारा. ७ एकाद्या काव्याला,प्रकरणाला, किं० विषयाला दिलेली लहानशी प्रस्तावना (जींत पुढील मजकुराचें त्रोटक स्वरूप सांगितलेलें असतें). ८ पूर्वापर श्लोक, वाक्य, इत्यादिकांची संगति दाखवावयासाठीं टीकाकार जो मध्यें पदरचा मजकूर घालतात तो.ॐ**अवतरण चिन्ह न०** दुसऱ्याच्या ग्रंथांतून किं० भाषणांतून घेतलेला

उतारा दाखविणाऱ्या खुणा. " (सुरवातीची), "(समाप्तीची).

अवतरणिका, अवतरणी [सं० 'अवतरण' पहा] **स्त्री०** १ ग्रंथारंभींची देवतेची स्तुति. २ प्रस्तावना. ३ स्पष्टीकरणार्थ केलेलें विधान किं० केलेली टीका.

अवतरणें [सं० ' अवतरण ' पहा] **अ० क्रि०** १ देव, सिद्ध, इत्यादिकांनीं कांहीं कार्यार्थ मनुष्यादिरूपें जन्मास येणें. २ उतरणें. ३ अचरट-पणाची वडबड किं० वागणूक करणें.

अवतंस, अवतंसक [सं० अव + तंस् (भूष-विणें)] **पु०** १ हार. २ दागिना. ३ कर्णभूषण. ४ तुरा.

अवताण [म० अव (भलताच) + ताण (योग्य समय)] **न०** भलताच वेळ, योग्य वेळेच्या अगोदरची वेळ.

अवता भवता, अवतींभवतीं, अवतेंभवतें क्रि० वि० सभोंवता, आजूबाजूस.

अवतार [सं० ' अवतरण ' पहा] **पु०** १ उतरणें. २ प्रवेश. ३ आश्रय. ४ सुरवात. ५ प्रादुर्भाव. ६ देवादिकांचें पृथ्वीवर येणें. ७ विष्णूनें घेतलेले मत्स्यकूर्मादि अवतार. ८ नदी इ० चा घाट. ९ तीर्थ. १० भाषांतर. ११ प्रस्तावना. ॐ **दशावतार पु०** विष्णूनें घेतलेले दहा अवतार; १मत्स्य; २ कूर्म;३ वराह;४नरसिंह; ५ वामन;६परशुराम;७ राम; ८ कृष्ण; ९ बुद्ध; १० कल्की; ह्या दहा अवतारांपैकीं शेवटचा इतउत्तर व्यावयाचा असा आहे. **दशावतारी गंजिफा स्त्री०अ० व०** ज्यांचेवर वर सांगितलेल्या दहा अवतारांचीं चित्रें असतात आणि ज्या खेळावयाला घेतात त्या. **कर्णाचा अवतार पु०** अति उदार माणूस. **सांभाचा अवतार पु०** अतिशय गरीब,साधा,आणि भोळा माणूस. **रुद्राचा अवतार पु०** अति तापट माणूस. **अवतार घेणें** किं० **धरणें** उपद्रवकारक वर्तन करणें. **अवतार होणें** किं० **संपणें** दरिद्रावस्थेस येऊन पोचणें. **अवतारकृत्य न०** विशिष्ट अवतार ज्या उद्देशानें घेतला तो सफल होणें. **हिडिंबेचा अवतार पु०** जिचे केश विस्कटले आहेत,परकर मळलेला आहे, आणि अंग धुळीनें माखलेलें आहे, अशी मुलगी.

अवतारणें [' अवतरण ' पहा] **अ० क्रि०** वेडे वेडे चार करणें; अव्यवस्थितपणानें वर्तन करणें; पिसाळल्यासारखें वर्तन करूं लागणें.

अवतारी [सं० ' अवतरण ' पहा] **वि०** १ मानवादिरूप ज्यानें धारण केलें आहे असा (देव). २ अतिशय वाचट, खोडकर, चाळसा (पुरुष, मूल इ०). ३ बुद्धिमत्ता, पराक्रम, शौर्य, दया, विद्वत्ता, इ० गुण ज्याचे ठायीं लोकोत्तर आहेत असा माणूस; ('अवतारी पुरुष' असाही वाक्प्रचार रूढ आहे).

अवंती, अवंतिका स्त्री० उज्जनी नगर. अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, आणि द्वारका ह्या सात नगरांत मरण आल्यास मोक्षप्राप्ति होते अशी हिंदू आर्यांची श्रद्धा आहे.

अवतीर्ण [सं० ' अवतरण ' पहा] **वि०** १ मानवादिरूप धारण करून पृथ्वीवर आलेला. २ उतरलेला. ३ प्रादुर्भूत झालेला.

अवथण (–न–) णें [सं० अव (दूर) + स्तन (थान)] **अ० क्रि०** अंगावरच्या मुलाचें आई पुन्हां गरोदर झाल्यामुळें स्तनपान सुटणें.

अवथान [सं० ' अवथणें ' पहा] **न०** आई पुन्हा गरोदर झाल्यामुळें किं० गरोदर दशेंत दूध नासल्यामुळें अंगावरच्या मुलाचें तुटणें म्ह० स्तनपान बंद होणें. ॐ**अवथानकरूं, अवथन-(–ण–) करूं न०** असें तुटलेलें मूल.

अवदशा, अवदसा [सं० अव (वाईट)+ दशा (स्थिति)] **स्त्री०** १ दुर्दैव. २ निकृष्ट किं० कष्टमय स्थिति. ३ (लक्षणेनें) द्वाड, भांडखोर, कजाग किं० खोड्याळ मुलगी किं० स्त्री. ॐ **अवदसा आठवणें** कुबुद्धि होणें; निकृष्ट स्थिति, अवनति, किं० दुःख, प्राप्त होईल अशासारखें वर्तन करण्याची दुष्प्रवृत्ति किं० दुर्बुद्धि होणें. **अवदसेची फेरी स्त्री०** दारिद्र्याचें आगमन. **अवदसेचें बाळ न०** दुर्दैवी मनुष्य.

अवदां [म० ' यंदा ' याचें अशिक्षित लोकांतील रूढ रूप] **क्रि० वि०** या सालीं; चालू सालीं; साल मजकूर.

अवदात [सं० अव (पूर्णपणें)+दै (स्वच्छ किं० शुद्ध करणें)] १ निर्मळ, शुद्ध, स्वच्छ. २

उज्ज्वळ, तेजस्वी. ३ सुंदर. ४ शुभ, पुण्यदायक. ५ पांढरा.

अवदान [सं० ' अवदात ' पहा] न० १ शौर्य. २ शौर्याचें कृत्य, मर्दुमकीचें कृत्य. ३ प्रशस्त धंदा. ४ आहुति. ५ एका आहुतीपुरतें होमद्रव्य.

अवदिवस, अवदीस [सं० अव (वाईट) +दिवस] पु० १ वाईट किं० अशुभ दिवस. २ आडवार (सणवार याच्या उलट). ॐ **सणीं घुगऱ्या अवदिशीं पुऱ्या** सणाच्या दिवशीं साधें अन्न, आणि साध्या किं० अशुभ दिवशीं पक्वान्न (हा प्रकार मूर्खपणाचा होय).

अवधंडा पु० अत्याहित; मोठें संकट (पूर, वादळ, टोळधाड, धरणीकंप, इ० सारखें पुष्कळ लोकांना, किंवा फार मोठ्या प्रमाणावर, उपद्रव-कारक असणारें).

अवधणा, अवधाण, अवधान [सं० अवधान=लक्ष] पु० बाहूला किं० तंगडीला कोठेंही दुखापत झाली असतां खाकेंत किं० जांघेंत जो गळवासारखा दुखणारा उंचवटा रक्त साकळून उठतो तो; वाघणा. ॐ **खाजवून अवधणा आणणें.** १ भांडण उपस्थित करणें किं० उकरून काढणें. २ आपणांवर एखादें दुःख किं० संकट ओढवून घेणें.

अवधा [सं०] स्त्री० त्रिकोणाच्या शिरोबिंदूपासून पायावर काढलेल्या लंबानें पायाचे पडणारे जे दोन खंड त्यांपैकीं प्रत्येक.

अवधान वि० १ खट्याळ, खोडयाळ, मस्तवाल आणि सतावणारें (मूल). २ अशा मुलाला बोललेला रागाचा शब्द.

अवधान [सं० अव+धा (ठेवणें)] न० १ लक्ष्य; एकाग्रता. २ काळजी, दक्षता, आस्था, तत्परता. उ० कालिदासाची ही कृति अवधानपूर्वक ऐका.

अवधानी [सं० ' अवधान '] वि० १ लक्ष्य देणारा. २ अनेक गोष्टींकडे एकदम लक्ष्य पुरविण्याची ज्याला शक्ति आहे असा. ॐ **अष्टावधानी (-न्या)** पु० अनेक गोष्टींकडे एकदम लक्ष्य पुरवून स्मृतीचे चमत्कार करून दाखविणारा मनुष्य.

अवधारण न०, **अवधारणा** स्त्री० [सं० अव+धृ (धारण करणें)] १ निश्चिति; निर्णय; निर्णय करणें; ठरविणें. २ शब्दावर जोर देणें. ३ (शब्दाच्या) अर्थाचें नियमन किं० नियंत्रण. ४ मर्यादा.

अवधारणें [वर ' अवधारण' पहा.] स० क्रि० १ ०चा निश्चय किं० निर्णय करणें; नक्की ठरविणें. २ लक्ष्यांत दृढपणें धरून ठेवणें. ३ मानणें; समजूत असणें.

अवधि [सं० अव+धा (ठेवणें)] (संस्कृतांत) पु०; (मराठींत) स्त्री० १ मर्यादा; सीमा; वेळा; हद्द. २ अंत, समाप्ति. ३ अवकाश; मधला वेळ; मध्यंतरींचा वेळ किंवा जागा. ४ मुदत. ५ करार, ठराव. ६ तुलना किं० मोजदाद करतांना घेतलेलें प्रमाण, माप, किं० आधार. ॐ**अवधिसाकांक्ष, अवधिसापेक्ष** वि० तुलनेनें जें ठरवावयाचें (तें;) ज्याचें स्वरूप ठरवावयाला प्रमाण किं० माप याची आकांक्षा असते असें.

अवधीरण न०, **(-णा)** स्त्री० [सं० अव+धीर् (तुच्छ मानणें)] अपमान, धिक्कार, तिरस्कार.

अवधीरित [सं० वर " अवधीरण " पहा] वि० अवमानलेला; धिक्कारलेला; तुच्छ केलेला.

अवधु (-धू-)त [सं० अव (खालीं)+धू (हालविणें)] वि० १ हालविलेलें. २ अस्ताव्यस्त. ३ तिरस्कृत. ४ दूर सारलेलें किं० लोटून दिलेलें. ५ विरक्त. पु० १ ज्यानें ऐहिक बंधनें, पाश, इ० हीं टाकून दिलीं आहेत असा माणूस. २ श्रीदत्तात्रेयाचा अवतार. ॐ**-गीता** स्त्री० भागवत पुराणांत सांगितलेली गीता. **-मूर्ति** स्त्री० श्रीदत्तात्रेय.

अवंध्य [सं० अ (नाहीं)+वंध्य (विफल)] वि० फुकट, निरुपयोगी, किं० व्यर्थ, नव्हे असा; कामीं आलेला; उपयोग झालेला; फायद्याचा; उपयुक्त कामांत घालविलेला किं० योजलेला.

अवन [सं० अव्=रक्षिणें] न० रक्षण, संरक्षण.

अवनत [सं० अव (खालीं)+नत (वाकविलेला; नम्=वाकणें)] वि० १ नमलेला; वांकलेला; ज्यानें आपलें तोंड खालीं केलें आहे असा; अधोमुख. उ० लज्जावनत म्ह० लज्जेनें ज्यानें आपलें तोंड खालीं घातलें आहे असा.

अवनति [सं० 'अवनत' पहा] स्त्री० १ अधो-

गति, अपकर्ष, ऱ्हास (**उन्नति** याच्या उलट). २ खालीं वांकणें.

अवनि, अवनी [सं०] **स्त्री०** पृथ्वी. ॰**-तल न०** भूप्रदेश; पृथ्वीचा तळ.

अवनिगा (-घा) स्त्री० मागें **अनिगा** पहा.

अवपथ्य न० मागें **अपथ्य** पहा.

अवपीड पु० बायकांचा डोक्यावर धारण करावयाचा एक अलंकार किं० दागिना.

अवपीड [सं० अव+पीड् (दाबणें)] १ दाबणें, आवळणें, चेपणें. २ शिंका आणण्याचें एक औषध.

अवबाधा [सं० अव+बाध् (पीडणें)] १ दुःख; पीडा. २ प्रतिकार.

अवभंग [सं० अव+भंग] **पु०** पराभव.

अवभास [सं० अव+भास (तेज)] **पु०** १ प्रकाश. २ ज्ञान, साक्षात्कार. ३ मिथ्याज्ञान. ४ आटोका.

अवभिताड [**म०** अवा (भट्टी)+भिताड (भिंत)] **न०** कुंभाराच्या भट्टीच्या तोंडापुढची भिंत.

अवभृथ [सं०] **पु०** १ मुख्य यज्ञाचा शेवट किं० परिसमाप्ति. २ मुख्य यज्ञ आटोपल्यावर शुद्ध्यर्थ स्नान करणें. ॰**-स्नान न०** यज्ञसमाप्तीनंतर दीक्षित स्त्रीसहवर्तमान विशिष्ट विधिपूर्वक केलेलें स्नान.

अवभ्रट वि० चपट्या नाकाचा.

अवमत, अवमानित [सं० अव (खालीं) +मन् (विचार करणें)] **वि०** धिक्कृत; तिरस्कारलेला; अनादर केलेला.

अवमर्द पु०, अवमर्दन न० [सं० अव (खालीं)+मृद् (चिरडणें)] १ चिरडणें; तुडविणें. २ उध्वस्त करणें; नाश करणें. ३ निकराचें युद्ध. ४ जेरीस आणणें. ५ ठार मारणें.

अवमान [सं० अव (खालीं)+मन् (मनांत आणणें) **पु०** १ अपमान; अनादर; तिरस्कृति; धिक्कार; अवहेलना; विमानना. २ किल्मिष.

अवमानणें [सं० 'अवमान' पहा] **स० क्रि०** तुच्छ करणें; धिक्कारणें; तिरस्कारानें वागविणें.

अवमास वि० १ अनियंत्रित; मर्यादेंत किं० आटोक्यांत किं० कह्यांत न राहाणारा (जनावर, माणूस इ०). २ उद्धट, दांडगा, आर्ष.

अवयव [सं०] **पु०** १ शरीराचा हस्तपादादिकांसारखा भाग; इंद्रिय. २ भाग, खंड, तुकडा. ३ घटक. ४ साधन. ५ शरीर. **पु० अ० व०** स्तन. उ० मुलीला अवयव आले तरी तिच्या लग्नाला ठिकाण नाहीं ! ॰**अवयवशः क्रि० वि०** भागशः; खंडशः; निरनिराळे घटक किं० पदें घेऊन.

अवयवी वि० ज्याला अवयव आहेत असा.

अवर [सं०] **वि०** १ धाकटा. २ पाठीमागचा, नंतरचा. ३ खालच्या दर्जाचा. ४ कनिष्ठ, नीच. ५ शेवटचा, मागाहूनचा. ६ पश्चिमेकडचा. ७ लगतचा. **क्रि० वि०** या बाजूस; इकडच्या किं० जवळच्या बाजूस. ॰**अवरज पु०** कनिष्ठ भ्राता. **अवरजा स्त्री०** कनिष्ठ भगिनी.

अवरज न० सर्गामि नामधूम (गुरें असल्या शेतांना करतात तशी).

अवरजा [**फा०** आवरचह] **पु०** खतावणीमध्यें एक एक कलमाचें खात्याचें नंबर घातलेलें असतें तें.

अवरजून, आवरजून, आवर्जून क्रि० वि० विनंति करून, आर्जव करून, परोपरीनें, कळकळीनें.

अवरडा वि० विवाह करण्याचें वय होऊन गेलें असतांही अविवाहित.

अवरस, औरस [सं० उरस्=वक्षःस्थल] **वि०** स्वताच्या लग्नाच्या बायकोपासून स्वताची संतति; स्वस्त्रीपासून स्वताच्या वीर्यानें आलेला पुत्र.

अवरस चवरस, औरस चौरस क्रि० वि० १ सर्व बाजूंनीं, सभोंवतीं. २ लांबीकडून आणि रुंदीकडून. **वि०** लांबी रुंदीनें सारखा.

अवरा पु० कडवा म्हणून धान्य आहे तें किं० त्याची शेंग.

अवरात्र [सं० अपररात्र] **स्त्री०** रात्रीचा शेवटचा प्रहर.

अवरुद्ध [सं० अव+रुध् (अडविणें)] **वि०** १ थांबविलेला, अडविलेला; नियंत्रित; प्रतिहत. २ बंदिस्त (जनानखान्यांत वगैरे). ३ व्याप्त. **न०** ठेविलेलें पात्र, (रखेली).

अवरूप [सं० अव (वाईट)+रूप] **वि०** विरूप; कुरूप.

अवरोध [**सं०** अव + रुध् (अडवणें, थांबविणें) **पु०** १ अडथळा; थांबणूक. २ प्रतिकार; दाब; कुचंबणा; नियंत्रितावस्था, जसें मलावरोध, मूत्रावरोध, प्राणावरोध. इ०. ३ जनानखाना, अंत:पुरांतील स्त्रिया. ४ कुलीन स्त्री. ५ आंकण. ६ पहारेकरी. ७ अवरोह. ८ मृताशौच.

अवरोधणें [**सं०** 'अवरोध' पहा.] **स० क्रि०** अडविणें; थांबविणें; प्रतिकार करणें.

अवरोह पु०; अवरोहण न० [**सं०** अव (खालीं)+रुह् (उगवणें, चढणें)] १ उतरणें; खालीं येणें. २ (संगीतांत) सा, रे, ग, म, इ० सूर उतरत्या क्रमानें ह्मणणें किं० गाणें (**आरोह** याच्या उलट). ३ वृक्षास वरपर्यंत वेढणारा वेल.

अवर्ग [**सं०**] **वि०** ज्यांना कोणताच वर्ग नाहीं, किंवा जे कोणत्याच वर्गात घालतां येत नाहींत असे. **पु०** स्वर (अ, आ, इ, वगैरे).

अवर्षण [**सं०**अ (नाहीं)+वृष् (वर्षणें)] **न०** पावसाचा अभाव. (क्रिया० 'पडणें').

अवल, अव्वल [**अ०**] **क्रि० वि०** सुरवातीस; प्रारंभीं. **वि०**१ पहिला. २ श्रेष्ठ. **पु०** सुरवातीचा काळ; उ० यंदा पावसानें अवल तर साधली खरी! ‡**अवलसाल** [**अ०** अवल (पहिलें) + **फा०** साल (वर्ष)] **पु०** वर्षाची सुरुवात; वर्षाचा प्राथमिक भाग. **अवल अर्जी स्त्री०** (कायद्यांत) फिर्याद, तक्रार. **अवलआखर क्रि०वि०**सुरवातीपासून शेवटपर्यंत; आरंभापासून अंतापर्यंत.

अवलणें [**म०** अवलें=वल्हें यापासून] **स० क्रि०** वल्हविणें; पाण्यांत होडी, गलबत, इ० हाकारणें.

अवलंब [**सं०**अव(खालीं)+लंब् (लोंबकळणें)] **पु०** १ आश्रय; आसरा; आधार. २ लोंबकळणें. ३ मदत, साहाय्य. ४ टेका, काठी. ५ ओळंबा.

अवलंबणें [**सं०**" अवलंब " पहा.] **स०क्रि०** १ ०चा आश्रय किं० आधार घेणें. २ अनुसरणें; ०च्या सरणीनें चालणें किं० वागणें.

अवलंबित [**सं०** 'अवलंब' पहा.] **वि०** १ अवलंब केला आहे ज्याचा किं० ज्याणें (तो). २ खालीं आलेला. ३ लोंबत असलेला. ४ परतंत्र.

अवलक्षण [**सं०** अव (वाईट) +लक्षण (चिन्ह)] **न०** १ कुलक्षण; अपशकुनी चिन्ह (सहावें बोट, झोंपेंत दांत खाणें, वगैरेसारखीं). २ अपशकुन, दुःस्वप्न.

अवलक्षणी [**सं०**' अवलक्षण' पहा] **वि०**१ कुलक्षणी; अपशकुनी चिन्हांनीं किं० गुणांनीं युक्त; अपयशी. २ दुर्गुणी, खोड्याळ.

अवला पु०१ वल्हें. २ वल्हें मारणारा. ३ नवरा. (१ ह्या अर्थी ' अवलें' असाही शब्द आहे).

अवलाद [**अ०** अवलाद=पुत्र, मुलगे] **स्त्री०** १ संतति (विशेषत: पुत्राच्या बाजूनें; कन्येच्या बाजूनें जी संतति ती अफलाद). २ वंश. ३ व्रात्य, उपद्रवी, किं० खोडकर माणूस.

अवलिप्त [**सं०**अव+लिप् (माखणें)] **वि०** १ माखलेला; चर्चिलेला. २ गर्विष्ठ; उद्दाम. ३ कलंकित; दोषयुक्त.

अवलिया [**अ०** ' वली 'चें अनेकवचन 'अवलिया'] **पु०**१ साधुपुरुष; ईश्वरचिंतनांत, तपश्चर्येंत, निमग्न असलेला किं०असणारा; विरक्त पुरुष. २ (लक्षणेनें) विचित्र, तऱ्हेवाईक, किं० छांदिष्ट माणूस.

अवलि (- ली)ला (–ळा) [**सं०** अव (वाईट) + लीला (खेळ, क्रीडा) यापासून अ-शुद्ध घटना] **क्रि० वि०** सहज; लीलेनें; अनायासें. हें रूप कवितेंत विशेष आढळतें.

अवली [**अ०** अवल=प्रथम] **स्त्री०** १ अगोदर करणें, साधणें, किं० मिळविणें. २ वरचढपणा.

अवलुंठन [**सं०** अव + लुठ् (मारणें, चोरणें, लोळणें)] **न०**१ जमिनीवर लोळणें. २चोरणें, लुटणें.

अवलें न० वल्हें. ‡**अवलेकरी, अवल्या पु०** वल्हें मारणारा.

अवलेप [**सं०** अव (पूर्णपणें)+लिप् (चोपडणें)] **पु०**१ माखणें; चर्चिणें. २ गर्व, उद्दामपणा. ३ अपमान, बळजबरी, हल्ला. ४ भूषण. ५ संग.

अवलेपन [**सं०** ' अवलेप ' पहा] **न०** १ चर्चिणें, माखणें. २ तेल वगैरेसारखा अवलेपन करावयाचा पदार्थ. ३ संग. ४ गर्व, ताठा. ५ चंदन.

अवलेह [**सं०** अव+लिह् (चाटणें)] २ चाटण (मोरावळा इ०). ३ अर्क (सोमवल्लीचा वगैरे).

अवलोकणें [**सं०** अव + लोक् (पाहणें)]

स॰ क्रि॰ १ पाहणें. २ ०च्याकडे दृष्टि देणें. ३ काळजीपूर्वक पाहणें.

अवलोकन [**सं॰** 'अवलोकणें' पहा] **न॰** १ पाहाणें; काळजीपूर्वक पाहणें. २ ०कडे दृष्टि देणें किं॰ लावणें. ३ तपास किं॰ चौकशी करणें. ४ दृष्टि. ५ डोळा.

अवलोकित [**सं॰** 'अवलोकणें' पहा] **वि॰** १ पाहिलेला. २ मनन केलेला. ३ तपासलेला. **पु॰** १ बुद्धधर्मीय. २ एका बुद्धाचें नांव. **न॰**दृष्टि; कटाक्ष. ꣸**अवलोकितेश्वर पु॰** गौतमबुद्ध.

अवलोडन [**सं॰** अव (पूर्णपणें)+लुड् (घुसळणें, पूर्णपणें तपासणें)] **न॰** पाण्यांत डुंबणें.

अवलोभन [**सं॰** अव+लुभ् (इच्छिणें)] **न॰** कामवासना.

अवलोम [**सं॰** अव (अनुसरून) लोमन् (केश)] **वि॰** १ अनुकूल असलेला. २ सोयीचा, योग्य, लायक.

अवश [**सं॰** अ (नाहीं)+वश (अधीन)] **वि॰** १ स्वतंत्र; दुसऱ्याच्या अधीन नसलेला; २ दुसऱ्याचें न ऐकणारा; उच्छृंखल; स्वच्छंदी; स्वैर; अनियंत्रित.

अवशिष्ट [**सं॰** अव+शिष् (शेष ठेवणें)] **वि॰** उरलेलें; बाकीचें; बाकी राहिलेलें. **न॰** उरलेला भाग.

अवशेष [**सं॰** 'अवशिष्ट' पहा] **पु॰** उरलेला बाकी बाकी राहिलेला भाग.

अवश्य, अवश्यक, आवश्यक [**सं॰**अ (नाहीं) +वश्य (आटोक्यांत ठेवण्याजोगा)] **वि॰** १ अनावर. २ न टळणारें. ३ जरूरीचें. **क्रि॰ वि॰** १ खचित, निःसंशय. २ जरूर, अर्थातच, कांहीं झालें तरी. ꣸**अवश्यभावि वि॰** अपरिहार्य. **अवश्यमेव** वर **क्रि॰ वि॰** चे अर्थ पहा.

अवष्टब्ध [**सं॰** अव+स्तंभ् (थांबविणें)] **वि॰** १ बांधलेला, गुंडाळलेला. २ अडकावलेला. ३ जवळचा, जवळ आलेला. ४ आश्रय दिलेला. ५नेट धरणारा, स्थिर. ६ गर्विष्ठ. ७ अर्धांगवायु झालेला.

अवष्टंभ [**सं॰** 'अवष्टब्ध' पहा] **पु॰** १गर्व. ताठा. २ अवलंबन. ३ आश्रय, टेका, आधार. ४ नेटानें किं॰ दम धरून राहाणें. ५ अर्धांगवायु.

अवस [**सं॰** 'अमावास्या' चा अपभ्रंश]**स्त्री॰** अमावास्या. ह्याची सप्तमी अवसा **क्रि॰ वि॰** अवसीस ꣸**झ॰** तोंन्हीं सांजा; ऐन संध्याकाळ.

अवसन्न [**सं॰** अव + सद् (बसणें)] **वि॰** १ संपलेलें. २ अयोग्य. ३ नष्ट, मृत.

अवसर [**सं॰** अव+सृ (सरणें)] **पु॰** १ सीय, वेळ. २ योग्य काळ. ३ जागा, प्रवेश, शिरकाव. ४ फुरसत. ५ देव, भूत, इ॰चें वारें शिरतें तें; उ॰ टमाबाईच्या दर अवसेच्या अवसर येतो. ꣸**अवसरोक्ति स्त्री॰** समयस्फूर्तीचें भाषण.

अवसरणी [**स॰ अवसर वाणी**=अवसर आलेल्या माणसाचे शब्द] **स्त्री॰** १ अकस्मात कानी पडलेले शब्द (जे कोणी माणूस मनांत योजून असलेल्या बेताला लागू करून घेतो आणि त्यांपासून आपला बेत सफल होईल किं॰ नाही याचा अजमास करतो तो). २ अफवा, बातमी, वदंता. ꣸**अवसरी (–ऱ्या) पु॰** ज्याच्या अंगांत भूत इ॰ चा संचार आला आहे तो.

अवसात अ॰ अकस्मात, एकाएकी.

अवसाद [**सं॰** अव + सद् (बसणें, खचणें)] **पु॰** १ खालीं बसणें; बुडणें. २ कमी होणें, ऱ्हास, अपकर्ष. ३ नाश. ४ अखेर, समाप्ति. ५ थकवा, खचणें, गळून जाणें. ६ खेद, दुःख.

अवसान [**सं॰** अव (पूर्णपणें) + सो (कापणें).] **न॰** १ थांबणें. २ शेवट, अखेर. ३ नाश, नुकसान, हानि. ४ मरण. ५ सीमा. ६ शब्दाचें शेवटचें अक्षर. ७ श्लोकांतील विरामाची जागा; यति; उ॰ शार्दूलविक्रीडित वृत्तांत बाराव्या अक्षरावर अवसान असतें. ८ वसतिस्थान. ९ हिंमत, उत्साह, कार्य करण्याची ताकद. १० (गायनांत) सम. ११ ऐन वेळ. ꣸**अवसानांत येणें** आटोक्यांत येणें (एकादें काम). **अवसान मारणें** (एकाद्या कामीं) जोर धरणें किं॰ शक्ति खर्चणें. **अवसानांत** (किं॰ **अवसानानें**) **करणें** आपली शक्ति हातीं घेतलेल्या कामीं बेतानें आणि फुकट न दवडितां खर्चणें. **अवसानघातकी पु॰** ऐन वेळीं हिंमत खचविणारा किं॰ विघ्न उपस्थित करणारा.

अवसाय [**सं॰** अव+सो (कापणें)] **पु॰** १ अखेर, समाप्ति, नाश. २ अभिप्राय. ३ निश्चय. ४ बाकी.

अवसार 'अवसर'चें कवितेंत येणारें किं० अशिक्षितांच्या भाषणांत येणारें रूप.

अवसित [**सं०** अव+सो (तोडणें)] **वि०** १ संपविलेलें; पुरें केलेलें; पूर्ण झालेलें. २ समजलेलें; नक्की जाणलेलें, अवगत. ३ चांगलें शिजविलेलें; पक्क झालेलें. ४ निश्चित; ठाम केलेलें; ठरविलेलें. ५ बांधलेलें. ६ सांठविलेलें (धान्य वगैरे). ७ गत; गेलेलें.

अवसुती [**म०** अव (वाकडेंतिकडें)+सूत (धागा)] **वि०** वाकडेंतिकडें, हेंगाडें, अव्यवस्थित, अजागळपणाचें.

अवसुत्या **वि०** हेंगाड्यासारखें किं० अव्यवस्थितपणें काम करणारा (माणूस).

अवसेक [**सं०** अव (इतस्ततः) +सिच् (शिंपडणें)] **पु०** १ शिंपडणें. २ तुषार. ३ (वैद्यक) फासणी टाकून रक्त काढणें. [अवचित.

अवस्तां **क्रि० वि०** एकाएकीं; अकल्पित रीत्या;

अवस्तु [**सं०** अ (नाहीं)+वस्तु (पदार्थ)] १ वस्तूचा अभाव; असद्भाव. २ कुचकामाची वस्तु किं० गोष्ट. ३ असत्य.

अवस्था[**सं०** अव+स्था (राहाणें,उभें राहाणें, असणें)] **स्त्री०** १ स्थिति; दशा. २ परिस्थिति. ३ स्वरूप. ४ स्थिरता. ५ हजर राहाणें. ॐ**–चतुष्टय** **न०** आयुष्यांतील चार दशा;–बाल्य, कौमार, यौवन, आणि वार्धक्य.**–त्रय न०** जागृति, स्वप्न, आणि सुषुप्ति, (गाढ झोंप).**–द्वय न०** १ सुख आणि दुःख. २ जागेपणा आणि निद्रा ह्या दोन अवस्था. ३ वृद्धि आणि क्षय ह्या दोन.**–षट्‌क न०** वस्तूची उत्पत्ति, अस्तित्व, वृद्धि, बदल, क्षय,आणि नाश. **अवस्थातीत** **वि०** जन्ममरणापासून मुक्त होऊन ब्रह्मांत मिळालेला.

अवस्थान [**सं०** "अवस्था" पहा]. **न०** १ राहाणें. २ अवस्था, स्थिति. ३ वासस्थान. ४ आधार. ५ स्थैर्य.

अवस्थापन [**सं०** 'अवस्था' पहा] **न०** १ घट्ट बसविणें. २ निवासस्थान.

अवस्थित [**सं०** 'अवस्था' पहा] **वि०**१ राहिलेला; बसलेला. २ निश्चयी. ३ ठरलेला. ४सज्ज, उद्युक्त. ५ स्थिर, निश्चेष्ट. ६ घडलेलें. ७व्यवस्थित.

अवस्थिति [**सं०** 'अवस्था' पहा] **स्त्री०** १ राहाणें. २ स्थळ.

अवहार [**सं०** अव+हृ (हरणें, चोरणें)] **पु०** १ चोर. २ आमंत्रित ब्राह्मणाचें द्रव्य घेणें. ३ थोडक्या वेळेपुरता तह. ४ युद्ध थांबविणें. ५ सैन्य परत नेणें. ६ परत देणें.

अवहित [**सं०** अव + धा (ठेवणें)] **वि०** १ ठेविलेला. २ जोडलेला. ३ लक्ष्य देणारा; तत्पर. ४ प्रख्यात.

अवहित्थ न०, अवहित्था, स्त्री० [**सं०**] १ लपविणें, झाकणें. २ मनोविकार लपविणें.

अवहेल पु०, अवहेला स्त्री०,अवहेलन न०, अवहेलना स्त्री० तिरस्कार, अनादर.

अवळ [**म०**] **वि०** घट्ट, अडस्स, संकुचित, आकुंचित.

अ (आ–)वळक (–का–) टी[**म०** आंवळा+काष्ठ] **स्त्री०** उन्हांत खडखडीत वाळविलेले आंवळे.

अवळणें, आवळणें [**सं०** आ+वल् (फिरणें, आच्छादणें] **अ० क्रि०** १ अखूड होणें; आक्रसणें; आकुंचित होणें. २ घट्ट बसणें. गच्च बसणें.

अवळणें, आवळणें [**सं०** वर 'अवळणें' पहा] **स० क्रि०** १ गच्च बांधणें; ताणणें. २ दाबून धरणें; मिठी मारणें. ३ चंपी करणें; चेपणें (गात्रादि). ४ हस्तगत करणें; बळकाविणें. उ० शत्रूंनीं किल्ला आवळला.

अवळबंधा [**म०** अवळणें+बांधणें] **स्त्री०** नियंत्रणा, दाब.

अवळसर [**म०** 'अवळणें' पहा] **वि०** थोडेसें तंग; किंचित् घट्ट; जरासें अखूड.

अवळसरा पु० गंधकाचा एक भेद.

अवळा, आंवळा [**सं०** आमलक] **पु०** १ एक प्रकारचें आंबट फळ. २ ॐ **अवळा पिकायचा नाहीं समुद्र सुकायचा नाहीं** अशक्य कोटींतील गोष्टीं मूर्तस्वरूपांत येत नाहींत. **अवळा देऊन बेल (किंवा कोहळा) काढणें** स्वल्प दानादिकानें एखाद्याला संतुष्ट करून त्याजपासून मोठा फायदा करून घेणें. **आंवळ्याएवढें पूज्य** कांहीं नाहीं ! (या वाक्प्रचारांत पूज्य शब्द गाळला तरी चालतो). उ० त्याला संस्कृत थोडेसें येतें, पण इतिहासाच्या नांवानें आवळ्यायेवढें पूज्य ! **आवळे उघडणें** १ कठोर शब्दांनीं रागें भरणें. २ खूप मारणें; बेदम मारणें. **आंवळ्यांची मोट स्त्री०** स्वभाव आणि

वर्तनक्रम यांच्या भिन्नतेमुळें ज्यांची मैत्री होण्या-जोगी नसते अशी माणसें कांहीं एका ध्येयासाठीं जुळलीं असतां त्यांना अवळ्यांची मोट असें म्हणतात. ही जुळणी अर्थात त्या ध्येयापुरती आणि अल्प अवधीचीच असूं शकणार. **आंवळ्यांची समई स्त्री०** ज्या समईच्या खांबावर आंवळ्यांसारखे किं० जोडळ्यांसारखे भाग पडलेले असतात ती. समईचा दुसरा प्रकार " सुरुची समई. " हिचा खांब सुरुच्या झाडाप्रमाणें वर निमुळता होत गेलेला असतो. [माणूस.

आवळ्यावेंव पु० आडदांड आणि गांवढळ

अवळाअवळी स्त्री० बांधाबांधी (प्रवासाला निघते समयीं सामानसुमानाची).

अवळी, आंवळी [**सं०** आमलकी] **स्त्री०** आंवळ्याचें झाड. **अवळीभोजन न०** कार्तिक मासांत कोणत्या तरी दिवशीं आंवळीच्या झाडाखालीं बसून ईश्वरप्रीत्यर्थ ब्राह्मणांसमवेत भोजन करतात तें.

अवळ्यागंधक पु० मागें **अवळसरा** पहा.

अवक्षर, अवाक्षर [**सं०** अव (चुकीचें) +अक्षर] **न०** १ चकार शब्द; एक शब्द देखील. (ह्याचा नेहमीं नकारात्मक प्रयोग होतो). उ० तुला मी पैसे देईन म्हणून एकदा सांगितलें ना ? आतां तत्संबंधीं अवाक्षरही बोलूं नको. उ० तो मला इतक्या शिव्या देत होता, पण त्या वेळीं मी अवाक्षर बोललों नाहीं. २ चुकीचें अक्षर (बोल-ण्यांत, लिहिण्यांत, किं० वाचण्यांत).३ अपशब्द; शिवी.

अवक्षिप्त [**सं०**अव (खालीं)+क्षिप् (फेकणें, टाकणें)] **वि०**१ खालीं फेकलेलें. २ उपरोधिकपणें झोंबेल असें बोललेलें; जो उपरोधिकपणें बोलला गेला आहे असा. ३ निंदित; धिक्कृत; तिरस्कृत.

अवक्षेप पु०, अवक्षेपण न० [**सं०**' अवक्षिप्त' पहा] १ खालीं फेकणें. २ निंदा; तिरस्कार, उप-रोधिकपणें बोलणें. ३ खेद.

अवज्ञा [**सं०** अव (खालीं)+ज्ञा (जाणणें)] **स्त्री०** १ आज्ञाभंग.२अपमान .३तिरस्कार; उपमर्द.

अवा [**हिं०** आवा] **पु०** १ मातीचीं भांडीं भाजण्यासाठीं रचून ठेविलेलीं असतात तीं समुच्च-यानें. २ तीं भाजून काढल्यानंतर त्यांचा समुच्चय. **अवा उतरणें** १ एका वेळीं कच्चा मडका भट्टींत घालून भाजून काढणें. २ आपल्या सत्कृत्यांचें आगत होऊन आयुष्यक्रमणाला लागणें; उ० माझा अवा उतरलेला आहे, मी आतां ह्यानंतरचा परिहार म्हणत बसणार. ३ आरंभलेलें कार्य शेवटास जाणें; कृतकृत्य होणें.

अवा [**सं०** अंबा] शूद्रादिजातीय प्रौढ स्त्रियांस सन्मानार्थ लावावयाचा शब्द.

अवा(-व-)ई स्त्री० अफवा; बातमी; किंव-दंती. **तवाई पुरवते अवाई पुरवत नाहीं.** प्रत्यक्ष संकट किं० आपत्ति अंगावर कोसळली तर ती सह्य होते पण नुसती अशुभ बातमी सह्य होत नाहीं. (कारण बातमी फुगवून सांगितलेली असते म्हणून ती खोटी असते).

अवाक् [**सं०** अवाच्] **अ०** अधस्तात्; खालीं. **वि०** १ खालीं वाकलेलें. २ खालचा. ३ दक्षिणेकडचा. **अवाङ्मुख वि०** खालीं आहे मुख ज्याचें असा; अवनतवदन.

अवांकणें, आवंकणें अ०क्रि० १ एखादें कार्य करावें की न करावें हें ठरवीत बसणें किं०ठरविण्यांत वेळ घालविणें; कचरणें; मागें घेणें; आजमावणें. २ एखादें कार्य करण्याविषयी संकल्प किं० बेत करणें. उ० इंदूचें लग्न यंदा करावयास आम्हीं अवांकलें होतें, पण जमलें नाहीं. ३ एखाद्या विषयाबद्दल आपल्या बुद्धीला पटेल असा तर्क बांधणें, निश्चय करणें. उ० रामराव लाख रुपयांचा धनी असेल असें मला अवांकत नाहीं.

अवांका, आवांका पु० १ आटोका; शक्ति-क्षेत्र; झेपण्याची किं० सोसण्याची मर्यादा किं० सीमा. २ ताकद. ३ कचाटी; तडाखा; तावडींत सांपडणें. ४ कल्पना; अटकळ; मनाची समजूत, निर्धार. उ० त्याच्यापाशीं चार हजारांची माया असेल असा अवांका होत नाहीं.

अवांगीं [**सं०** अव (भलतेंच)+अंग (गात्र)] **क्रि० वि०**(शरीराच्या) नाजूक भागीं (क्रिया० ' लागणें, ' ' मारणें ').

अवाची [**सं०** ' अवाच् 'चें स्त्रीलिंग] **स्त्री०** दक्षिण दिशा. **अवाचीन वि०** दक्षिणेकडील; दाक्षिणात्य.

अवाच्य [**सं० अ०** (नाहीं)+वच् (बोलणें)]

वि० १ बोलण्यास अयोग्य; अश्लील. २ वर्णन करण्यास वगैरे कठिण किं० अशक्य. ३ निंदेला अपात्र.

अवाजदारी [**फा०** आवाज् (सूर) + दाश्तन् (ठेवणें, बाळगणें)] आवाजी; आवाजाचा मोठेपणा, गोडपणा, इत्यादिरूप गुण.

अवाजी स्त्री० वर **अवा स्त्री०** पहा.

अवाड [**सं०** आवार] **न०** घराभोंवतालचें कुंपण; घरासभोंवारचें अंगण; आवार.

अवाडाव स्त्री० १ सैन्यांतील शिपायांचे अत्याचार किं० त्यांनीं केलेली नासधूस, जाळपोळ, इ०. २ पोरांच्या खोड्या, धिंगामस्ती; पोरांनीं केलेली नासधूस.

अवाढव्य वि० प्रचंड; फार मोठें; अफाट; विस्तृत (शरीर, घर, खर्च, सैन्य, इ०).

अवात [' अववात ' यापासून अशुद्ध घटना] **न०** १ सोसाट्याचा वारा, वादळ, तुफान. २ अवचित आलेलें मोठें संकट किं० अरिष्ट. [**सं० अ** (नाहीं) + वात (वारा) जेथें] शांत किं० निवांत असें स्थळ.

अवांतर [**सं०** अव + अंतर] **वि०** १ इतर; सटरफटर; आनुषंगिक; वरचें; किरकोळ; इकडचें-तिकडचें. उ० लग्नांत हुंड्याची बाब सोडली तरी अवांतर खर्च काय कमी होतो? उ० त्याचा पगार जरी थोडा आहे तरी त्याची अवांतर प्राप्ति पुष्कळ आहे. २ मधलें. ३ समाविष्ट. ४ दुय्यम. ५ बाह्य, आगंतुक. ॐ**अवांतरदिशा स्त्री०** उपदिशा. **अवांतर प्राप्ति** किंवा **मिळकत स्त्री०** मुख्य पगार किं० ठराविक वेतन यांचे व्यतिरिक्त जी प्राप्ति किं० मिळकत ती. **अवांतर खर्च पु०** मुख्य बाबतीवरच्या खर्चाहून वेगळा खर्च; किरकोळ बाबतींतील खर्च. **अवांतर भोजन न०** घरांतील माणसांच्याहून अन्य माणसांस दिलेलें भोजन.

अवाप्त [**सं०** अव + आप् (मिळविणें)] **वि०** १ मिळविलेलें; संपादिलेलें. २ ज्यानें मिळविलें आहे असा.

अवाप्ति [**सं०** ' अवाप्त ' पहा] **स्त्री०** प्राप्ति; मिळविणें; संपादिणें; (मनोरथाची) सफलता.

अवार क्रि० वि० इकडे, इकडच्या बाजूस. (' तवार 'च्या उलट; अशिक्षितांचा शब्द).

अवारित [**सं०** अ (नाहीं) + वारित (टाळलेला; वृ = झाकणें)] **वि०** १ न निवारलेला; न आडविलेला; अप्रतिहत. २ न टाळलेला.

अवार्य [**सं०** अ (नाहीं) + वार्य (टाळण्याजोगा; वृ = आच्छादणें)] **वि०** निवारण करण्यास किं० टाळण्यास अयोग्य किं० अशक्य किं० कठिण; अपरिहार्य.

अवासवा, अवाचे सवा, अवाच्या सवा क्रि० वि० फाजील प्रमाणांत; युक्त मर्यादेच्या पलीकडे; भरमसाटपणें.

अविकणें [**म०** अति पिकणें] **अ० क्रि०** पिकून ज्यास्त होणें व नासणें; पिकलेपणाच्या अवस्थेच्या पलीकडे जाऊन निरुपयोगी होणें (फळ, धान्य, इ०).

अविकारी, अविकार्य [**सं०** अ (नाहीं) + वि + कृ] **वि०** १ ज्यांत विकृति, फरक, वगैरे होत नाहीं असें; जें बदलत नाहीं असें. २ (व्याकरणांत) जें विभक्त्यादि प्रत्यय लावून चालवितां येत नाहीं असें; उ० क्रियाविशेषणें, उभयान्वयी अव्ययें, इ०.

अविकृत वि० { रूपांतररहित, विकार न पावणारा. † **ज्ञा०** }.

अविक्रिया, अविक्री [**सं०** ' अवक्रिया ' यांचीं अशुद्ध रूढ रूपें] **स्त्री०** १ शरीरांत झालेली थोडीशी नादुरुस्ती. २ खाद्य पदार्थावर अरुचि; खाद्य पदार्थाची शिसारी किं० किळस (ज्वरादिकांमुळें आलेली). ' अवकिरी ' हेंही रूप प्रचारांत आहे.

अविचार [**सं०** अ निषेधात्मक + विचार] **पु०** कर्तव्य किं० अकर्तव्य याच्या विचाराचा अभाव; मूर्खपणा; फाजील धडाडी.

अविच्छिन्न [**सं०** अ (नाहीं) + वि + छिद् (तोडणें)] **वि०** १ सामान्य. २ पूर्ण; भाग न पाडलेलें; सबंध. ३ कांहीं हरकत न येतां, खंड न पडतां किं० सतत चालू असलेला. ४ खर्चवेच वगैरे जाऊन निवळ; ऐन, पुरापूर.

अविद्ध [**सं०** अ (नाहीं) + व्यध् (मारणें, भोक पाडणें) **वि०** न मारलेलें, न भोक पाडलेलें, न तोडलेलें. ॐ**अविद्धयोनि वि०** जिला पतिसंभोग अद्यापि झालेला नाहीं अशी (स्त्री).

अविद्य [**सं०** अ (नाहीं) + विद्या (ज्ञान)

ज्याला] वि० अडाणी; अशिक्षित; गांवढळ.

अविद्यमान [सं० अ (नाहीं) + विद्यमान (हल्लीं किं० चालू असलेला; विद्=असणें)] **वि०** नसलेला; न आढळणारा; अस्तित्वांत नसलेला; अनुपस्थित.

अविद्या सं० अ (नाहीं) + विद्या (ज्ञान)] **स्त्री०** १ अज्ञान. २ ईश्वरासंबंधीं अज्ञान. ३ (वेदान्त) माया. ४ (वेदान्त) कर्म. ॰**अविद्योपाधि पु०** वस्तुस्थिति झांकून टाकणारें किं० दृष्टीआड करणारें अज्ञान.

अविंध [सं० अ (नाहीं) + विंध (ज्याला भोंक पाडलें आहे असा)] १ ज्याला भोंक किं० वेज पाडलेलें नाहीं असें (मोतीं, पोंवळें, हिरा, इ०). २ मुसलमान (जन्मल्यापासून बाराव्या दिवशीं हिंदू मुलाचे कान सोनाराकडून टोंचवितात; असा संस्कार मुसलमानांला नसतो म्हणून मुसलमानाला 'अविंध' म्हणतात).

अविधवा [सं० नव्हे जी विधवा ती] **स्त्री०** १ जिचा पति जिवंत आहे अशी स्त्री. २ पतीच्या पूर्वी मेलेली स्त्री. ॰- **नवमी स्त्री०** भाद्रपद कृष्ण नवमी. सुवासिनीदशेंत मेलेल्या स्त्रियांना ह्या दिवशी पिंड देतात. " अविधवा " ह्याचें " अहेव " असें अपभ्रष्ट रूपही रूढ आहे; ' अहेव नवमी ' हें 'अविधवा नवमी'चें अपभ्रष्ट आणि रूढ रूप.

अविधि [सं० अ (नाहीं) + विधि (कृत्य, नियम, संस्कार)] **पु०** १ नियमविरुद्ध वर्तन. २ ब्रह्म (ज्याचा निर्देश करणें कठिण आहे). **वि०** १ योग्य विधि किं० संस्कार ह्या विरहित. २ अव्यवस्थित.

अविनय [सं० अ (नाहीं) + विनय (नम्रपणा, सभ्याचार)] **पु०** गैरशिस्त वर्तन; उद्धट वर्तन. २ गर्व, ताठा.

अविनाभाव [सं० अ+विना+भाव= पृथक्‌पणाची किं० वियुक्तपणाची स्थिति] **पु०** १ संबंध, साहचर्य. २ स्वभावसिद्धता.

अविनाशी [सं० अ (नाहीं) + विनाशी (नाश पावणारें)] **वि०** नाश न पावणारें; चिरस्थायी.

अविभाज्य [सं० अ (नाहीं) + विभाज्य (भाग पाडतां येण्याजोगा; वि+भज्=फोडणें)] **वि०** १ ज्याचे भाग पाडतां येत नाहींत किं० पाडणें योग्य नाहीं असें. २ दुसऱ्या संख्येनें निःशेष भागतां येत नाहीं अशी (संख्या).

अविरजी वि० {विरजण न घातलेलें. † ज्ञा० {.

अविरत [सं० अ (नाहीं) + विरत (थांबलेला; वि+रम्)] **वि०** १ निरंतर, अखंड. २ गाढ निजलेला. **क्रि० वि०** न थांबतां.

अविरेचन [सं० अ (नाहीं) + विरेचन (जुलाब, रेचक; रिच्=रिकामें करणें)] **न०** मलावरोध.

अविवक्षित [सं० अ (नाहीं) + विवक्षित (बोलूं इच्छिलेलें; वच्=बोलणें)] **वि०** १ जें बोलावयाची किं० सांगावयाची इच्छा नाहीं किं० उद्देश नाहीं असें. २ संकल्पांत नाहीं असें.

अविवाहित [सं० अ (नाहीं) + विवाहित (लग्न झालेला, वि+वह्=नेणें)] **वि०** लग्न न झालेला.

अविवेक [सं० अ (नाहीं) + विवेक (भेद, सारासार विचार; वि+विच् (पृथक् करणें)] **पु०** १ विचारशून्यता. २ समुच्चय, समूह.

अविवेकी [सं० ' अविवेक ' पहा] **वि०** ज्याला सारासार विचार नाहीं असा; असमंजस; अविचारी; मूर्ख.

अविश्रांत [सं० अ (नाहीं) + विश्रान्त (थांबलेला; वि+श्रम्=श्रम करणें, थकणें)] **वि०** एकसारखें; सतत चालू असलेलें. **क्रि० वि०** १ न वळतां, न थांबतां. २ विश्रांति न घेतां.

अविश्वसनीय [सं० अ (नाहीं) + विश्वसनीय (विश्वासाला पात्र; वि+श्वस्=श्वास घेणें)] **वि०** ज्यावर भरंवसा बसत नाहीं किं० ठेवतां येत नाहीं असें.

अविश्वास [सं० अ (नाहीं) + विश्वास भरंवसा (वि+श्वस्=श्वास घेणें)] **पु०** भरवशाचा किं० विश्वासाचा अभाव; साशंक वृत्ति.

अविश्वासी (–सू, किं० **सूक**) [**सं०** ' अविश्वास ' पासून] १ ज्यावर विश्वास टाकणें योग्य नाहीं असा. २ भरवशाला पात्र नाहीं असा. २ कोणावर विश्वास टाकण्याकडे ज्याची प्रवृत्ति नाहीं असा; संशयखोर.

अविषय [सं० अ + विषय] **वि०** १ इंद्रि-

यांना अगोचर. २ विषयवासनेनें विरहित. **पु०** १ अभाव. २ आटोक्याबाहेरचा पदार्थ. ३ निरिच्छ.

अविहित [**सं०** अ (नाहीं)+विहित (योग्य किं० सांगितलेला; वि+धा (ठेवणें)] **वि०** १ न सांगितलेला; न उपदेशिलेला. २ अयोग्य.

अविट, अवीट [**म०** अ (नाहीं)+ विटणें] **वि०** १ न विटणारा, फिका न पडणारा (रंग इ०). २ ज्याचें सेवन किं० उपभोग किं० अनुसरण कंटाळा, त्रास, चिळस, ओकारी, इ० उत्पन्न करीत नाहीं असें. ३ ज्याला एकाद्या कृत्याचा, खाद्याचा, किं० आचरणाचा परमावधि झाला असतांही खंती वाटत नाहीं असा. ॐ**अवीट आवडी स्त्री०** कधींही कमी न होणारें प्रेम किं० भक्ति. [† **ज्ञा०**]।.

अविसाळ (-ळें) न० }पक्ष्याचें घरटें, कोठा.

अवीस [**सं०** आमिष=मांस] **न०** मांस.

अवेच [**म०** अ (नाहीं)+वेचणें (खर्चणें)] **वि०** कोणत्याही कामीं खर्च करण्याला नाखूष; चिक्कू, कृपण.

अवेव पु० } अवयव. † **ज्ञा०** }.

अवेल पु० चुलीच्या एका बाजूस लहानसहान भांडें ठेवण्यासाठीं जें लहानसें भोक ठेविलेलें असतें तें.

अवेश्वर [**सं०** ' अवसर 'चें अपभ्रष्ट रूप] **पु०** समय, संधी. ॐ**अवेश्वरीं क्रि० वि०** योग्य वेळीं, समयीं, किं० प्रसंगीं.

अवेळ [**म०** अ (अयोग्य)+वेळ (समय)] **स्त्री०** १ उशीर. २ भलतीच वेळ.

अवेळसुवेळ [**म०** अवेळ=अयोग्य वेळ; सुवेळ=योग्य वेळ] **स्त्री०** योग्य किं० अयोग्य, शुभ किं० अशुभ वेळ (कोणतेंही कर्म करतांना).

अवेक्षण [**सं०** अव+ईक्ष् (पाहाणें)] **न०** १ पाहाणें. २ देखरेख, संरक्षण. ३ काळजी. ४ आदर, कृपा.

अव्यक्त [**सं०** अ (नाहीं)+व्यक्त (स्पष्ट; वि+अंज्=माखणें, प्रकाशणें)] **वि०** १ अस्पष्ट, अज्ञात. २ अदृश्य. ३ (गणित) अज्ञात, विशिष्ट संख्या न दाखविणारा (राशि). ४ इंद्रियांना अगोचर. ५ स्पष्ट अवयवांनीं रहित. **पु०** १ विष्णु. २ शंकर. ३ मदन. ४ मूर्ख माणूस. **न०** १ परब्रह्म. २ सांख्यांचें प्रधान. ३ जगाची सूक्ष्म अवस्था. ४मूल स्वभाव. ५ अज्ञान, माया. ॐ**-गणित न०** बीजगणित. **-राशि पु०** अज्ञात परिमाण. **-क्रिया स्त्री०** अज्ञात संख्यांची बेरीज, वजाबाकी, इ०. **-लिंग पु०** संन्यासी. **न०** (सांख्य) महत्तत्त्व. **-साम्य न०** समीकरण.

अव्यंग [**सं०** अ (नाहीं) + व्यंग (गात्रांत उणेपणा)] **वि०** १ कोणत्याही गात्रानें किं० गुणानें कमी नाहीं असा; दोषरहित. २सांगोपांग, परिपूर्ण.

अव्यग्र [**सं०** अ (नाहीं)+व्यग्र (व्याकुल, व्यापृत)] **वि०** १ स्वस्थ, शांत. २ निःस्पृह, उदासीन. ३ दक्ष, तत्पर.

अव्यभि(-भी-)चार [**सं०** अ (नाहीं)+ वि+अभि+चर्] **पु०** १ नित्य साहचर्य. २ चिकाटी.

अव्यभि(-भी-)चारी [**सं०** ' अव्यभिचार ' पहा] **वि०** १ अनुकूल. २ अपवादरहित; सर्वत्र लागू पडणारें.

अव्यय [**सं०** अ (नाहीं) + व्यय (खर्च, विकार) ज्याला] **वि०** १ अविनाशी, शाश्वत. २ सुरक्षित, खुशाल. ३ मितव्ययी. **न०** १ ब्रह्म. २ (**व्या०**) ज्याला विभक्त्यादि विकार होत नाहींत असा शब्द; उ० खालीं, आणि, इ०. ॐ **अव्ययीभाव पु०** जो समास अव्ययांच्या कोटींत पडतो तो; उ० प्रतिक्षण, यथाशक्ति, इ०.

अव्यवधान [**सं०** अ (नाहीं)+व्यवधान (आच्छादन, पडदा; वि+अव+धा=ठेवणें)]**वि०** १ जवळचें. २ उघडें. ३ गैरसावध.

अव्यवस्था [**सं०** अ (नाहीं)+व्यवस्था (मांडणें; वि+अव+स्था=राहाणें)] **स्त्री०**घोटाळा, गोंधळ; वाकडी तिकडी रचना; शिस्तीचा अभाव.

अव्यवस्थ, अव्यवस्थित [**सं०** ' अवव्यस्था' पहा] **वि०** १ चंचल, अस्थिर. २ अनिश्चित. ३ घोटाळा, गोंधळ, इ० ज्यांत किं० ज्याचा झाला आहे असा. ४ योग्य शिस्तीप्रमाणें न वागणारा.

अव्यवहार्य [**सं०** अ (नाहीं)+व्यवहार्य (वि+अव+हृ)] **वि०** १ उपयोगांत, कामांत, व्यवहारांत, दृश्य रूपांत, किं०शक्य कोटींत आणतां न येईल असें. २ बहिष्कृत.

अव्यवहित [**सं०** अ (नाहीं)+व्यवहित

(आच्छादलेलें, रोधलेलें; वि+अव+धा=ठेवणें)] वि०१ न झाकलेलें;न रोधलेलें;न थांबविलेलें;ज्याला अडथळा करण्यांत आलेला नाहीं असा. २ अखंड. ३ शेजारचा, लागचा. ४ लागोपाठचा.५ चिकटून असलेला. [दुदैवाची गोष्ट.

अव्या पु० १ अडथळा, हरकत, थांबणूक. २

अव्याकृत [सं० अ (नाहीं) +व्याकृत (स्पष्ट केलेलें; वि+आ+कृ)] वि० १ अव्यक्त रूपांत असलेलें. २ अतर्क्य.न० १ ब्रह्म. २(सांख्य) प्रधान. ३ मायोपाधिक ईश्वर.

अव्याज [सं० अ (नाहीं) + व्याज(लबाडी)] वि० निष्कपट. पु० १ प्रामाणिकपणा. २ अकृत्रिमपणा, साधेपणा.

अव्यापक, अव्याप्त [सं० अ (नाहीं) + व्यापक, व्याप्त (वि+आप्=मिळविणें)] वि० व्यक्तिविशिष्ट.

अव्यापार [सं० अ (नाहीं) +व्यापार (कार्य)] १ आपलें काम नव्हे तें. २ न येणारा धंदा. ३ भलतेंच किं० अयोग्य काम.

अव्यापी [सं० अ (नाहीं) + व्यापिन् (व्यापणारा; वि+ आप्)] वि० न व्यापणारा.

अव्याप्ति [सं० अ (नाहीं)+वि+आप् (मिळविणें)] स्त्री० (न्यायांत) पूर्णपणें व्यापक नसणें; लक्ष्यार्थाचा कांहीं भाग लक्षणांत न येतां शिल्लक राहातो तेथें त्या लक्षणांत अव्याप्ति हा दोष होतो.'जो आपलें अन्न शिजवून खातो तो मनुष्य'असें मनुष्य याचें लक्षण केलें तर कांहीं रानटी जाति न शिजवितां सर्व खाद्यें खातात, त्या रानटी लोकांचा समावेश ह्या लक्षणांत होणार नाहीं. म्हणून येथें अव्याप्ति हा दोष झाला आहे. लक्षणाचे दुसरे दोन दोष अतिव्याप्ति आणि असंभव हे होत.

अव्याहत [सं० अ (नाहीं)+व्याहत (नष्ट, हत; वि+आ+हन्=मारणें)] वि० १ न भंगलेलें.२ सतत चाललेलें.३ हरकत ज्यांत किं० ज्याला आली नाहीं असा.क्रि०वि०खंड न पडतां.

अव्रण [सं० अ (नाहीं)+व्रण (जखम, दोष)] वि० १ ज्यांला कांहीं व्रण, जखम, क्षत, इ० नाहीं असा (मनुष्य, जनावर इ०). २ ज्यांत कांहीं दोष, उणेपणा, इ० नाहीं असा (पदार्थ).

अव्हांटणें अ० क्रि० } आडमार्गानें जाणें. † ज्ञा०}.

अव्हाटा, अव्हांटा पु० } आडमार्ग. † ज्ञा०}.

अव्हास्त्रवा वि० } पाहिजे तशी. † ज्ञा }.

अव्हेर [सं० ' अवहेलन ' चा अपभ्रंश]पु० अनादर, नापसंती, अस्वीकार.

अव्हेरणें [सं० ' अव्हेर ' पहा] स० क्रि० अनादरणें; नापसंत करणें; अस्वीकार करणें; दूर सारणें.

अंश [सं०] पु० १ भाग, खंड, तुकडा, अवयव.२ मिळकतीचा वाटा.३ अपूर्णांकांतील अंश; रेषेच्या वरचा अंक; ३/४ यांत ३ हा अंश, आणि ४ हा छेद आहे. ४ (भूगोलांत) अक्षांश आणि रेखांश; भूगोलावरील दक्षिणोत्तर अंतर दाखविणारे ते अक्षांश,आणि पूर्वपश्चिम अंतर दाखविणारे ते रेखांश. ५ वर्तुळाच्या ३६० भागांपैकीं प्रत्येक. ꙮअंशावतार पु० ईश्वराचा अपूर्ण अवतार. अंशभाज्, अंशहर, अंशहारी पु० वारस. अंशतः क्रि० वि० १ कांहीं अंशीं. २ थोडें थोडें, भागा भागानें.

अशक्त [सं० अ (नाहीं)+शक्त (समर्थ; शक्=शकणें)] वि० १ दुर्बल, दुबळा, असमर्थ. २ विशिष्ट कामाला नालायक.

अशक्य [सं० अ(नाहीं)+शक्य (होण्याजोगा, करण्याजोगा; शक्=शकणें)] वि० न होण्याजोगें, न घडण्याजोगें. ꙮअशक्य कोटींतील वि० ज्या गोष्टी कधींही घडणें शक्य नाहीं अशांच्या वर्गांतील; उ० तूं गणितांत पहिला नंबर मिळविणें ही अशक्य कोटींतील एक गोष्ट आहे.

अशन [सं० अश्=खाणें, व्यापणें] न० १ खाणें. २ अन्न. ३ क्षुधा. ४ व्यापणें.

अशनि [सं] पु०, स्त्री० १ वज्र. २ वीज. ३ शस्त्रविशेष. [वितांना).

अशर [अ०] दहा (मुसलमानी साल दाख-

अशब्द [सं० अ+शब्द] पु० निंदा. न० १ ब्रह्म. २ सांख्यांचें प्रधान.

अशम [सं० अ (नाहीं)+शम (शांति)] पु० १ मनोवृत्तींचा निग्रह न करणें. २ शमाचा अभाव. वि० ज्याच्या चित्तांत शांति नाहीं असा.

अशरीन [अ०] वीस (मुसलमानी साल सांगताना).

अशरीर, अशरीरी [सं० अ (नाहीं)+

शरीर (देह) ज्याला] वि० दैवी (वाणी इ०). पु० १ मदन. २ ब्रम्ह.

अशांत [सं० अ (नाहीं)+शांत (स्वस्थ)] वि० १ अस्वस्थ, ज्याच्या चित्तांत शांति नाहीं असा. २क्षुब्ध,क्षोभलेला (वारा, समुद्र,मनोविकार).

अशाश्वत [सं० अ (नाहीं)+शाश्वत (चिरस्थायी)] वि० १ क्षणभंगुर, फार वेळ न टिकणारा. २ ज्याचा भरंवसा धरतां येत नाहीं असा.

अशास्त्र [सं० अ+शास्त्र] वि० शास्त्राला धरून नाहीं तें; शास्त्राला विरुद्ध असलेलें.

अशिजा[म० अ+शिजणें] वि० पूर्णपणें न शिजलेला (भात इ०).

अशिव [सं० अ (नाहीं) + शिव (कल्याण किं० कल्याणकारक)] वि० १ अशुभ. २ उग्र, भयंकर. न० १ दुर्दैव.२ दुःख; पीडा. ३अकल्याण.

अशिष्ट [सं० अ (नाहीं)+शिष्ट (.सभ्य)] वि० असभ्य; शिष्टाचाराला सोडून असलेला; शिष्ट लोकांना संमत नाहीं असें.

अशिक्षित [सं० अ (नाहीं)+शिक्षित (शिकलेला; शिक्ष्=शिकणें)] वि० १ न शिकलेला, अडाणी, गांवढळ.

अशीर [म० अ (नाहीं)+शिरणें] वि० ज्यांत शिरणें कठिण आहे असा;आकुंचित;चिवळ.

अशुचि सं० अ (नाहीं)+शुचि (शुद्ध, पवित्र)] वि० १ अपवित्र. २ अस्वच्छ, मळलेला, घाणेरडा.

अशुढाळ, अशुढ्ढाळ, असढ्ढाळ [म० अश्रु (बाष्प)+ढाळणें (गाळणें)] वि० १ सुस्त, अति धिमा. २ ओंगळ किं० असभ्य भाषण करणारा. ३ फारच मोठा आणि बेढब.

अशुद्ध [सं० अ (नाहीं)+शुद्ध (पवित्र, बिनचूक, तपासलेला)] वि० १ चुकीचें; खऱ्याला धरून नाहीं तें; खोटें. २ योग्य विधीला, शास्त्राला, किं० सरणीला धरून नाहीं तें. ॐ**अशुद्ध्या** १ पु० सदा चुका करणारा.

अशुद्ध [सं० वर ' अशुद्ध ' वि० पहा] न० रक्त, रुधिर, शोणित.

अशुभ [सं० अ (नाहीं)+शुभ (मंगल, पवित्र)]वि०मंगल नव्हे तें;कल्याणप्रद नव्हे तें;अपशकुनी. न० १ अमंगल; अभद्र. २ पाप. ३ संकट.

ॐ**अशुभचिन्ह, अशुभलक्षण** न० अकल्याण किं० अनिष्ट सुचाविणारें चिन्ह, खूण, देखावा, इ०. **अशुभकार्य** न० अप्रिय किं० अमंगल अशी गोष्ट किं० कृति; मर्तिकाचा विधि.

अशून्य [सं० अ (नाहीं)+शून्य (रिकामा)] वि० १ पूर्ण, भरलेला. २ रिकामा नव्हे तो. ३ शेवटास नेलेला; सफल केलेला किं० झालेला.

अशेला [म० ' असला ' ह्याचें कवितेंतील रूप] वि० असला; ह्या प्रकारचा; ह्या जातीचा.

अशेष [सं० अ (नाहीं)+शेष (बाकी)] वि० १ सर्व, एकूण एक, दरोबस्त. २ बाकी न राहिलेला. क्रि० वि० पूर्णपणें. { **अशेख** वि० संपूर्ण. † ज्ञा० }.

अशोक [सं० अ (नाहीं)+शोक (दुःख, विलाप)] वि० शोकरहित. पु० १ हर्ष, आनंद. २ वृक्षविशेष (हा स्त्रियांच्या लाथेनें फुलतो असा कवींचा समय आहे). ॐ**अशोकाष्टमी** स्त्री० चैत्र शुद्ध अष्टमी. **अशोकपौर्णिमा** स्त्री० फाल्गुन पौर्णिमा. **अशोकवनिका** स्त्री० राजाचा क्रीडेचा बाग.

अशोभन [सं० अ (नाहीं)+शोभन (सुंदर, पवित्र)] वि० १ अमंगल, अपवित्र. २ असुंदर, कुरूप. न० अपकार, अपराध.

अशौच [सं० अ (नाहीं)+शौच (शुद्धपणा)] न० १ अपवित्रपणा, अमंगलपणा. २ सुतक किं० सोवेर (मृताशौच किं० जाताशौच). { वि० अपवित्रपणा. † ज्ञा० }.

अश्मंतक [सं०] अपटा (दसऱ्याचे दिवशीं ह्याचीं पानें सोनें म्हणून हिंदू एकमेकांना देतात).

अश्मरी [सं०] स्त्री० मूत्रकृच्छ्र, मुतखडा.

अश्मा [सं० अश्मन्=धोंडा] पु० १ दगड. २ मर्तिकाच्या विधींत ज्या धोंड्यावर पाणी ओततात तो. ॐ**अश्महृदय** वि० दगडासारखें (म्ह० कठोर) आहे अंतःकरण ज्याचें असा; पाषाणहृदयी; निर्दय; क्रूर.

अश्रद्धा [सं० अ (नाहीं)+श्रद्धा (विश्वास, भक्ति)] स्त्री० १ श्रद्धेचा अभाव. २ नावड.

अश्रद्धेय [सं०] वि० विश्वास किं० भरंवसा ठेवण्यास अपात्र.

अश्रफी [फा०] स्त्री० सोन्याची मोहोर.

अश्राव्य [**सं०** अ (नाहीं)+श्राव्य (ऐकण्याजोगा; श्रु=ऐकणें)] **वि०** १ ऐकण्यास अयोग्य. २ ऐकूं न येईल असें.

अश्रि [**सं०**] **स्त्री०** १ कोपरा, कोन. २ पैलू. ३ शस्त्राची धार.

अश्रीक [**सं०** अ (नाहीं)+श्री (शोभा, संपत्ति)+क (प्रत्यय)] **वि०** १ अभागी, दुर्दैवी. २ निस्तेज.

अश्रु [**सं०**] **न०** डोळ्यांतील पाणी; अश्रू; टीप. **अश्रुनाली स्त्री०** व्रण, भगंदर. **अश्रुधारा स्त्री०** अश्रूंची धार.

अश्रुत [**सं०** अ (नाहीं)+श्रुत (ऐकलेलें; श्रु=ऐकणें)] **वि०** १ न ऐकिलेलें. २ ज्याणें ऐकिलें नाहीं असा. ३ अशिक्षित. ४ ज्याणें वेदाध्ययन केलें नाहीं असा. ५ वेदांना असंमत किं० अमान्य. **अश्रुतपूर्व वि०** पूर्वी न ऐकिलेलें किं० ऐकण्यांत न आलेलें. [**न०** अकल्याण.

अश्रेय [**सं०** अ (नाहीं)+श्रेयस् (कल्याण)]

अश्लाघ्य, अश्लाघनीय [**सं०** अ (नाहीं)+श्लाघ् (स्तविणें)] **वि०** स्तुतीला पात्र नव्हे तें;निंद्य.

अश्लील [**सं०** अ (नाहीं)+श्लील [सुंदर, सभ्य] **वि०** १ असभ्य, फाजीलपणाचें. २ नीच. **न०** १ शिवी. २ (**साहित्य**) असभ्य भाषा.

अश्लेषा [**सं०**] **स्त्री०** नववें नक्षत्र.

अश्व [**सं०**] **पु०** १ घोडा. २ सात ही संख्या. **अश्वायुर्वेद पु०** गुरांचें वैद्यक, शालिहोत्र. **अश्वारोह पु०** घोडेस्वार. **अश्वोरस वि०** रुंद छातीचा. **–कुटी स्त्री०** पागा. **अश्वग्रीव पु०** हयग्रीव अवतार. **–चिकित्सक पु०** १ नालबंद. २ शालिहोत्री. **–चिकित्सा स्त्री०** १ नालबंदीचा धंदा. २ शालिहोत्र. **अश्वतर पु०** खेचर. **–पाल,–रक्षक पु०** मोतद्दार. **–मुख पु०** किन्नर. **–मेध पु०** सार्वभौमराजानें करण्याचा यज्ञ, (असे शंभर यज्ञ केल्यास इंद्रपद मिळतें).**–शाला स्त्री०** पागा.**–शिक्षक पु०** चाबूकस्वार. **–हृदय न०** १ शालिहोत्र; घोड्यांसंबंधाचें शास्त्र. २ घोड्यावर बसण्याची विद्या किं० कला.

अश्वक [**सं०**] **पु०** १ घोडा. २ क्षुद्र घोडा. ३ भाडोत्री घोडा. ४ चुकलेला घोडा. ५ काकाकुवा पक्षी.

अश्वत्थ [**सं०**] १ पिंपळ. २ (ज्यो०) अश्विनी. **–नारायण पु०** देवत्वानें संभावना केलेला अश्वत्थ वृक्ष. **अश्वत्थोद्यापन न०** अश्वत्थाला पार बांधून मंत्रपूर्वक जो संस्कार करतात तो. {**अश्वत्थ पु०** उद्यापर्यंत न राहाणारा संसार. [**ज्ञा०**].

अश्विनी [**सं०**] १ पहिलें नक्षत्र. २ जटामांसी. ३ सूर्यपत्नी. **–कुमार पु० अ० व०** देवांचे वैद्य.

अष्ट [**सं०**] **वि०** आठ. **–अंग न०** १ हात, पाय, गुडघे, छाती आणि कपाळ. २ योगांतील यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, आणि समाधि, ह्या आठांचा समुदाय. ३ बुद्धीचे गुण,–शुश्रूषा, श्रवण, ग्रहण, धारण, चिंतन, ऊहापोह, अर्थविज्ञान आणि तत्त्वज्ञान.४(**वैद्यकांत**) शल्य, शालाक्य,कायचिकित्सा, भूतविद्या,कौमारभृत्य,अगदतंत्र, रसायन तंत्र,आणि वाजीकरण तंत्र. ५ (**स्मृति**) कायदा, न्यायाधीश, पंच, लेखक, ज्योतिष, सोनें, अग्नि, आणि पाणी. ६ (पूजाद्रव्यें) पाणी, दूध, तूप, दहीं, दर्भ, तांदूळ, जव, सर्षप. **–अध्यायी स्त्री०** पाणिनीचें व्याकरण. **–आदिशब्दक पु० अ० व०** पहिले आठ वैयाकरण; इंद्र, चंद्र, काशकृत्स्न, आपिशलि, शाकटायन, पाणिनी, अमर, आणि जैनेंद्र. **–कपाळ्या वि०** कोणत्याही कामाला उपयोगी नाहीं असा माणूस. **–कर्ण पु०** ब्रह्मदेव. **–कर्म, –गतिक पु०** राजा (ह्याचीं आठ कर्तव्यें, कर घेणें, वेतन देणें, कार्यें करविणें, वाईटाचा निषेध, संदिग्धाचा निकाल, न्यायाचें काम, शिक्षा, आणि प्रायश्चित्त शुद्धि. **–कोण वि०** आठ कोपऱ्यांचा पदार्थ; आठ कोनांची आकृति. **–गंध न०** आठ सुगंधी द्रव्यें एकत्र करून देवादिकांस लावितात तें. **–गुण,–गुणित वि०** आठपट. **–गुण न०** ब्राह्मणांचे आठ गुण, – दया, क्षांति, अनसूया, शौच, अनायास, मंगल, अकार्पण्य आणि अस्पृहा. **–घाण स्त्री०** अति दुर्गंधी. **–दल न०** १ आठ पाकळ्यांचें कमल. २ अष्टकोण. **–दिशा स्त्री० अ० व०** पूर्व, आग्नेयी, दक्षिण, नैर्ऋत्य, पश्चिम, वायव्य, उत्तर, आणि ईशान्य. **–दिक्पाल पु० अ० व०** इंद्र, अग्नि, यम, नैर्ऋत, वरुण, वायु, कुबेर, आणि ईश. **–धातु पु०** सोनें, रुपें, तांबें,

कथील, पितळ, शिसें, लोखंड, आणि पारा. **–नायका स्त्री० अ० व०** भैष्मी, जांबवती, भामा, सत्या, भद्रा, लक्ष्मणा, कालिंदी, आणि मित्रविंदा, अशा कृष्णाच्या आठ आवडत्या नायिका. **–पदरी वि०** आठ आहेत पदर ज्याला असा शेला, माळ, दोरी, हार, इ०. **–पुत्रा स्त्री०** आठ आहेत पुत्र जीला ती. सुवासिनीला आशीर्वाद देतांना योजतात,–जसें " अष्टपुत्रा सौभाग्यवती भव. " **–पुत्री स्त्री०** विवाहसमयीं वधूस नेसवितात तें वस्त्र. **–पत्री वि०** १ एका कागदाचीं आठ पानें होतील अशा आकाराचें (पुस्तक इ०). २ लग्नांत वर आणि वधू जें रेशमी कापड नेसतात तें. **–पदी स्त्री०** आठ चरणांचें एक प्रकारचें गाणें, (जयदेव कवीच्या गीतगोविंदांतील गाणीं ह्या प्रकारचीं आहेत). **–पाद पु०** कोळी (ह्या किड्याला आठ पाय आणि आठ डोळे असतात). **–पैलू वि०** १ आठ आहेत पैलू किं० बाजू ज्यास. २ अनेक गुणांनीं युक्त असून हाव्या त्या कामांत किं० व्यवहारांत उपयोगी पडेल असा (माणूस). **–प्रधान पु०** राज्याच्या कामांतील आठ प्रधान. शिवाजीचे आठ प्रधान, १ मुख्य प्रधान, २ अमात्य, ३ सचिव, ४ मंत्री, ५ डबीर, ७ न्यायाधिश, ७ न्यायशास्त्री. ८ सेनापति. **–फळी स्त्री०** एकजातीय आंबे, पेरू, इ० आठ आठ फळांचें एक एक वायन अशीं आठ वायनें आठ ब्राह्मणांस देतात तीं प्रत्येक; अशाच विधीनें पुष्पादिकांचींही वायनें दिलीं असतां त्यांना म्हणतात. **–मंगळ वि०** तोंड, शेपटी, आयाळ, छाती, आणि चार खूर, असे शरीराचे एकंदर आठ भाग ज्याचे पांढरे आहेत असा (घोडा); अशा लक्षणांनीं युक्त जो घोडा तो चांगला समजतात. **–महारोग पु० अ० व०** वातव्याधि, अश्मरी, कृच्छ्र, मेह, उदर, भगंदर, अर्श आणि संग्रहणी. **–मांगल्य न०** गर्भधारणापासून आठव्या महिन्यांत करावयाचा एक विधि. **–मूर्ति पु०** शंकर. **–योगिनी स्त्री०** दुर्गेच्या परिचारिका,–मंगला, पिंगला, धन्या, भ्रामरी, भद्रिका, उल्का, सिद्धा आणि संकटा. **–वर्ग पु०** मुंजींत आठ मुंजांना भोजन देणें. **–वर्ग्या पु०** अशा आठ मुंजांपैकीं प्रत्येक. **–वर्षा स्त्री०** आठ वर्षें वयाची कुमारी (लग्नाला योग्य झालेली). **–वसु पु० अ० व०** आप्, ध्रुव, सोम, धर किं० धव, अनिल, अनल, प्रत्यूष आणि प्रभास हे आठ वसु. **–वायन न०** हळकुंड, सुपारी, दक्षिणा, खण, सूप, कंकण, धान्य, आणि काचमणि, ह्या आठ वस्तूंची आठ दानें, जीं लग्नाच्या विधींत वधू आठ ब्राह्मणांस देते. **–विध समाधि पु० अ० व०** यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, आणि समाधि, असे योगाचे जे आठ प्रकार ते. **–सिद्धि स्त्री० अ० व०** अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व, ह्या आठ सिद्धि. **अष्टसिद्धि आणि नऊ निधि त्याचे घरीं राबत आहेत** तो अत्यन्त वैभवसंपन्न आहे. **अष्टांगपात** किं० **अष्टांगप्रणाम पु०** आठ अंगें जमीनीला टेकून केलेला नमस्कार; दंडवत. **अष्टांगयोग पु०** वर ' अष्टविध समाधि ' पहा. **अष्टांगीं क्रि० वि०** आठ अंगांत; अकरणरूपी प्रयोगांत. उ० मी त्याला परोपरीनें बोध केला पण तो त्याच्या अष्टांगींही वसत नाहीं म्ह० तो तो बोध मुळीं सुद्धां अनुसरत नाहीं. **अष्टाधिकार पु० अ० व०** गांवकीचीं आठ कामें. **अष्टावक्र वि०** आठ ठिकाणीं वाकडा (माणूस किं० पदार्थ). **अष्टाक्षरी मंत्र जपणें** 'काय करूं, कसें करूं' हीं आठ अक्षरें उच्चारीत बसणें म्ह० विवंचनेंत असणें. **अष्टौप्रहर** सर्व दिवसभर; सूर्योदयापासून सूर्योदयापर्यंत म्हणजे सारा दिवस (दिवसाचे प्रहर आठ असतात). **अष्टविवाहविधि पु०** १ ब्राह्म = सालंकार कन्यादान; २ गांधर्व= उभयतांच्या अनुमोदनानें; ३ राक्षस = जबरीनें कन्या पळवून नेऊन; ४ दैव=कर्मांग कन्यादान करून; ५ आर्ष=गाय, बैल, घेऊन कन्या देणें; ६ प्राजापत्य = प्रजोत्पादनार्थ कन्यार्पण; ७ शुल्क= कन्या विकत घेऊन पत्नी करणें; आणि ८ पैशाच= कन्या चोरून आणून पत्नी करणें.

असका वि० सर्व; एकूण एक; दरोबस्त.

असकृत् सं० अ (नाहीं)+सकृत (एक वेळां)] अनेक वेळां.

असंख्य [**सं०** अ (नाहीं) संख्या (गणाति) ज्याला] **वि०** अगणित.

असंख्येय [**सं०** अ (नाहीं) + संख्येय

(मोजतां येईल असें)] वि० ज्याची गणति होत नाहीं असें.

असंख्यात [सं० अ (नाहीं)+संख्यात (गणलेलें)] अगणित.

असंग [सं० अ (नाहीं) +संग) आसक्ति; सं+गम्=जाणें) पु० अनासक्ति. २ (**सांख्य**) पुरुष. वि० १ ज्याला मित्र किं० सोबती नाहींत असा. २ एकलकोंडा. ३ सहवासाला अयोग्य माणूस. ◎**असंगाशीं संग आणि प्राणांशीं गांठ** अयोग्य माणसाची संगति केल्यास प्राण धोक्यांत पडतात.

असंगति [सं० अ (नाहीं)+संगति (जुळणी, सं+गम्)] स्त्री० १ परस्परविरोध. २ असंभव. ३ वैराग्य. ४ (**साहित्य**) कारण आणि त्याचें कार्य हीं दोन्हीं एकाच समयीं भिन्न भिन्न ठिकाणीं आहेत असें कवि उदाहरणानें दाखवून देतो तेथें असंगति हा अलंकार होतो. उ० दशाननकरीं भूमिसुतेलागीं समुद्र अभागी बंध भोगी विशेष. खुलाशासाठीं आमचें ''अर्थालंकारांचें निरूपण'' पहा.

असंगम [सं० अ+सं+गम्] पु० वैराग्य.

असगंध [सं० अश्वगंधा] पु० वनस्पतिविशेष.

असंजाळ पु० खोटा आरोप किं० तोहमत; आळ.

असट वि० १ फारच पातळ; पाणचट. २ आसक्त.

असडणें स० क्रि० १ हात किं० पाय यांना हासडा देणें. २ जोराचा तडाखा देणें. ३ हिसका देऊन ओढणें. ४ जोरानें आपटणें किं० आदळणें. ५ कुवळणें.

असडा पु० १ हासडा, झटका, तडाखा, रट्टा; हिसकणें. २ आचका (मरणारानें हातापायांस दिलेला). ३ व्यापारांत नुकसान किं० चट्टा बसणें.

असडा, असडी, असडीक [म० न सडलेला, न कांडलेला] वि० १ मुसळ वगैरेनीं न सडलेला, न कांडलेला (तांदूळ, डाळ, इ०). २ अशिक्षित, गांवढळ; ज्याला सभ्य चालीरीती माहीत नाहींत असा.

असंडी, असडी स्त्री० क्षतादिकांवर माशा बसल्यामुळें त्यांत होणारी कृमींची उत्पत्ति; किं० सडण्याची किं० कुजण्याची क्रिया. [जंगली वृक्ष.

असण, असणा पु०, **असणी** स्त्री० एक

असणें [सं० अस्=असणें] अ० क्रि० अस्तित्वाला धरून राहाणें.

असत् [सं० अ (नाहीं) + सत् (विद्यमान)] वि० १ नसणारें, अविद्यमान. २ खोटा. ३ वाईट. ४ अयोग्य, निरुपयोगी. ◎**—पथ** पु० कुमार्ग, दुराचार. **असन्मति** स्त्री० १ मिथ्या मानणें. २ खोटा ग्रह.

असत्कळ [सं० '' असत्काळ ''चा अपभ्रंश] स्त्री० हाल अपेष्टेचे किं० दुःखाचे दिवस; अंदाधुंदीचा काळ; बेबंधशाहीचा काळ.

असता [म० ' असणें ' याचे पासून] वि० १ असणारा; अस्तित्वांत असणारा; विद्यमान. २ ज्याचे पाशीं कांहीं द्रव्य, जमीन जुमला, इ० आहे तो; ज्याचे अंगीं कांहीं गुण, कौशल्य, इ० आहे असा; कर्तृत्ववान; धमकदार. ◎**असत्याचा बाप, नसत्याची आई** पैसे मिळविणाऱ्या मुलाचे लाड बाप करतो; निरुपयोगी किं० पैसे न मिळविणाऱ्या मुलाचे लाड आई करते. **असत्याचे विकार, नसत्याचे घोरंकार** श्रीमंतांच्या आजाराचीं कौतुकें केलीं जातात, गरीबांच्या आजारांची टवाळकी केली जाते, किं० ते आजारच नव्हेत असें म्हटलें जातें.

असतेंपण न० अस्तित्व; असण्याचा धर्म.

असतिये [म०] क्रि० वि० यथाशक्ति.

असती [सं० असत्=वाईट, त्याचें स्त्रीलिंग] स्त्री० १ व्यभिचारिणी स्त्री. २ नवऱ्याला सतावून सोडणारी स्त्री; नवऱ्याला सुख न लागूं देणारी स्त्री.

असंतुष्ट [सं० अ (नाहीं)+संतुष्ट (तृप्त; तुप्=आनंदणें)] वि० संतुष्ट नव्हे तो; ज्याचें समाधान झालें नाहीं असा; अतृप्त.

असतेनी [म०] क्रि० वि० असून सुद्धां.

असंतोष [सं०अ (नाहीं)+संतोष (समाधान, तृप्ति; सं+तुष्)] पु० संतोषाचा अभाव; अतृप्ति; असंतुष्टपणा.

असंतोषी [सं० असंतोष+ई (मराठी प्रत्यय)] वि० ज्याला संतोष झाला नाहीं किं० होण्याजोगा नाहीं असा; असमाधानी; मत्सरी; हेवेखोर.

असत्य [सं०अ (नाहीं) +सत्य (खरें)] वि० खोटें. २ काल्पनिक. ३ अनिश्चित. न० खोटें; वस्तुस्थितीला धरून नव्हे असें विधान इ०. ◎**—प्रतिज्ञ** वि० वचन मोडणारा. **—भाषी, —वक्ता** पु० खोटें बोलणारा.

असंपन्न [सं०अ (नाहीं)+संपन्न (श्रीमंत; सं+पद्)] **वि०** श्रीमंत नव्हे तो; गरीब.

असंबद्ध [सं० अ (नाहीं)+संबद्ध (नीट जुळलेलें; सं+बंध्=बांधणें)] **वि०** १ अर्थशून्य. २ भलतेंच; विसंगत. ३ अलग असलेला; दूर राहिलेला; उ० संसारांत साधु असंबद्ध असतात.

असंबंध [सं०अ (नाहीं)+संबंध (संयोग)] **पु०** संबंधाचा अभाव; अलगपणा.

असबाब [अ०] **स्त्री०** १ सामानसुमान; चीजवस्त. २ युद्धसामग्री.

असंभव [सं०अ (नाहीं)+संभव (शक्यता)] **पु०** १ अशक्यता. २ अव्याप्ति, अतिव्याप्ति, आणि असंभव, हे लक्षणाचे तीन दोष; ' जी बोलतें ती गाय' हें गायीचें लक्षण असंभव ह्या दोषानें त्याज्य आहे. **वि०** अशक्य, दुर्घट.

असंभवी, असंभवित, असंभाविक, असंभव्य [सं० ' असंभव ' पासून मराठी घटना] **वि०** ज्याचा संभव नाहीं असें.

असंभाव्य [सं०अ+संभाव्य (शक्य)] **वि०** १ न घडण्याजोगें; अशक्य कोटींतील. २ अतर्क्य. ३ असंभवनीय.

असभ्य [सं० अ (नाहीं)+सभ्य (शिष्ट)] **वि०** १ सभेंत बसावयाला नालायक. २ अशिष्ट; चालीरीतींनीं हलकट; ज्याला शिष्टाचार माहीत नाहींत किं० जो ते पाळीत नाहीं असा.

असमज [म०अ (नाहीं)+समज (जाणीव, बुद्धि)] **पु०** गैरसमज. **वि०** अडाणी.

असमंजस [सं० अ (नाहीं)+समंजस (समजूतदार)] **वि०** १ मूर्ख; मूढ; समजूतदार नाहीं असा; अडाणी. २ अविवेकी, अविचारी.

असमजुती (–त्या) [म० अ+समजूत] **वि०** ज्याची समजूत पडत नाहीं किं० पाडतां येत नाहीं असा; हेकट.

असंमत [सं० अ (नाहीं)+संमत (मान्य)] **वि०** १ मान्य नाहीं असें. २ आपल्या मताच्या उलट असलेलें. ३ शास्त्रांनीं निषिद्ध मानलेलें.

असमवाय [सं० अ+सम्+अव+इ] **वि०** आवश्यक किं० नित्य नव्हे असें जें कारण तें; कार्याशीं निकट संबद्ध नव्हे असें कारण.

असमाधान [सं० अ० (नाहीं)+सं+आ+धा (ठेवणें)] **न०** १ अतृप्ति; नाखुषी. २ शरीरांत थोडासा बिघाड झाल्यानें वाटणारी अस्वस्थता; उ० बासुंदी एक वाटी अधिक खाल्ली म्हणून मला थोडेंसें असमाधान वाटत आहे.

असमान [सं० अ (नाहीं)+समान (सारखें)] **वि०** १ सारखें नव्हे तें; वेगळें; विसदृश. २ भिन्न. [**वि०** न मावणारें.

असमाई [**म०** न समावणारें किं० मावणारें]

असमाप्त [सं० अ (नाहीं) +समाप्त (संपलेलें; सम्+आप् (मिळविणें)] **वि०** संपविण्यांत आलेलें नाहीं तें; न संपलेलें; अपूर्ण; अर्धवट केलेलें किं० झालेलें.

असमास [सं०] **वि०** १ अमर्याद; अनिर्बंध. २ विस्तृत. ३ अगणित, असंख्य.

असल, अस्सल [अ० अस्ल्] **वि०**१ मूळचा; प्रतिकृतिरूप किं० अनुकरणरूप नव्हे तो; उ० ह्या पत्राची तुम्ही नकल करून घ्या आणि असल पत्र मला परत द्या. २ यथायोग्य विधीच्या लग्नापासून जन्मलेला माणूस; जारिणी, कुल्टा, इत्यादिकांपासून जो जन्मलेला नव्हे तो. ३ अत्युत्कृष्ट, अत्युत्तम; स्वजातीय पदार्थांत जो उत्तम दर्जाचा असा. ४ सुगम. ॥**असल अर्जी स्त्री०** मूळ फिर्याद किं० तक्रार. **असलबाब स्त्री०** १ मूळचा किं० पहिला कर किं० पट्टी. २ किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेविलेलीं माणसें, जनावरें, इ० च्या उपयोगासाठीं कमी किंमतीस सामानसुमान विकत देण्याची सक्ती.

असलग, असलंग स्त्री० संगति. **वि०** सुगम.

असला [म० ' असा ' पासून] **पु०** ह्या जातीचा; ह्या प्रकारचा.

असलाई [अ० ' असल् '+आई (मराठी-प्रत्यय)]**स्त्री०** १ असलपणा, खरेपणा. २ उत्तमपणा.

असवर्ण [सं० अ (नाहीं)+सवर्ण (एकजातीय)] **वि०** १ भिन्न रंगाचें. २ भिन्न जातीचें. ३ भिन्न रूपाचें.

असविणें स० क्रि० १ नवें मातीचें भांडें उष्णतेनें किं० अन्य रीतीनें टणक करणें. २ कुमारिकेला भ्रष्ट करणें. ३ जारकर्मादिरूप व्यभिचार करणें.

असंसृष्ट [सं० अ (नाहीं)+संसृष्ट (उत्पन्न केलेला, मिसळलेला; सं+सृज्)] **वि०** १ अमिश्र. २ वेगळा, पृथक्. ३ उत्पन्न न केलेला.

असंस्कृत [**सं०** अ (नाहीं)+संस्कृत (शुद्ध, पवित्र, शिष्ट)] **वि०** १ ज्यावर कांहीं संस्कार (मुंज, लग्न, इ०) अद्यापि करण्यांत आलेला नाहीं असा. २ (**व्या०**) व्याकरणाच्या नियमाविरुद्ध असलेला; अपशब्द. ३ गांवढळ चालीरीतींचा.

असहकारिता [**सं०** अ (नाहीं)+सहकारिता (साहाय्य करण्याची प्रवृत्ति)] **स्त्री०** दुसऱ्यांशीं मिळून काम न करण्याची बुद्धि किं० निश्चय.

असहन [**सं०** अ (नाहीं)+सह् (सोसणें)] **वि०** १ सहन करावयाला असमर्थ. २ तापट, रागीट. **न०** मत्सर. **पु०** शत्रु.

असहाय [**सं०** अ (नाहीं) सहाय (मदतगार) ज्याला] **वि०**१ ज्याला मदत नाहीं असा; एकटा. २ अनाथ, हीनदीन, विपन्न.

असह्य [**सं०** अ (नाहीं) +सह्य (सोसण्याजोगा)] **वि०** सहन करतां न येईल असें;दुःसह.

असळका [**सं०** ‘ आश्लेष’ चा अपभ्रंश] **पु०** आलिंगन.

असा [**म०**] **वि०** ह्या प्रकारचा, ह्या जातीचा. **क्रि० वि०** ह्या प्रकारें, ह्या रीतीनें;ह्या अर्थानें लिंगवचनादि विकृति ‘असा’ ह्याला होतात. ‘ असा ’ ह्याचें पहिलें अक्षर मागल्या शब्दांत कधीं कधीं लुप्त होतें. उ० तें काम सफल होईलसें वाटत नाहीं. ॐ**असा तसा वि०** सामान्य, हलक्या दर्जाचा; कोणी तरी; यःकश्चित्.

असांगडें, असांवडें वि० निरुपम.

असाजे, ऐसाजे [**म०**] **क्रि० वि०** पुढें दिल्याप्रमाणें; पुढें नमूद केल्याप्रमाणें (पत्रें, खतें, वगैरेंत येणारा शब्द).

असाडी, अंसाडी स्त्री० १ क्षतादिकांवर बसलेला माशांचा थवा किं० त्यांनीं घातलेलीं अंडीं. (**क्रि०** घालणें, पडणें). २ दृष्ट लागणें (कित्येक माणसांची दृष्टि हानिकारक किं० अनर्थावह असते अशी समजूत आहे).

असाणा पु० एक जंगली वृक्षविशेष.

असाधारण [**सं०** अ (नाहीं) +साधारण (सामान्य)] **वि०** १ असामान्य; लोकोत्तर; अप्रतिम. २ दोन किं० अधिक पदार्थांना समान नाहीं असा; उ० ३३ आणि ५१ ह्या दोहोंच्या पोटांत ३ हा साधारण गुणक आहे. ११ किं० १७ हा असाधारण गुणक आहे.

असाध्य, असाधनीय [**सं०** अ(नाहीं) + साध्य, साधनीय (साधण्याजोगा; साध्=मिळविणें, पूर्ण करणें)] **वि०** १ न प्राप्त होण्याजोगा; न करतां येईल असा; न मिळण्याजोगा; अप्राप्य. २ असाध्य म्ह० बरा न होईल असा (रोग).

असान [**अ०** अह्सान] **न०** मेहरबानीचा प्रकार; खुषीनें दिलेली वस्तु; देणगी, इ०.

असान [**फा०** आसान] **वि०** सोपें, सुकर, सुसाध्य.

असांप्रत [**सं०** अ(नाहीं)+सांप्रत (योग्य)] **वि०**१ अयोग्य, अनुचित. २ प्रस्तुत विषयाला न लागू पडेल असें; अप्रासंगिक; विषयाला सोडून असलेला; अप्रस्तुत.

असामी [**अ०** **असामी**] **पु०** १ माणूस; व्यक्ति. २ भाडेकरी; कूळ. ३ कुणबी. ४ प्रतिवादी. ५ यादींतील किं० पटावरील नांव. **स्त्री०** १ सरकारी नोकरी. २ नेमणूक; नेमन किं० ठरवून दिलेला तनखा, पगार, सरंजाम,इ०. ॐ**असामीवार क्रि० वि०** प्रत्येक माणसाला; व्यक्तिशः; माणसागणिक. **असामीवार पत्रक न०** नांवांची यादी.

असार [**सं०** अ (नाहीं) +सार (तत्त्वांश) ज्यांत] **वि०** ज्यामध्यें कांहीं तत्त्वांश नाहीं असा; शुष्क, नीरस, पांचट, पचपचीत.

असार पु०१ चरक्यावरून किं० रहाटावरून काढून घेतलेली रेशमाची किं० सुताची लड. २ भिंतीची जाडी. ३ दाराची किं० खिडकीची रुंदी. ४ दाराची किं० खिडकीची दुहेरी चौकट.

असार [**अ०** असर=परिणाम] **पु०** १ परिणाम. २ (व्याख्यानाचा, उपदेशाचा, इ०चा) श्रोत्याच्या मनावर उमटलेला ठसा. ३ संसर्गानें प्राप्त झालेला गुण, बदल, इ०; उ० अंगामध्यें तापाचा असार आहे; दुधामध्यें पाण्याचा असार आहे.

असारा पु० मागाला लावावयाचीं ताणलेलीं सूतें (पांजणी करण्यासाठीं).

असारा पु०, असारी स्त्री० चरक्यावर काढलेलें सूत गुंडाळून त्याची लड बनवावयाचें एक कोष्टयांचें साधन.

असावध [**म०** अ (नाहीं)+सावध (साव-धान)] **वि०** गैरसावध.

असावरी **स्त्री०** (संगीतांत) एक रागिणी.

असावरी, असावली **वि०** ज्याच्या कांठांत वेलबुट्टी विणलेली आहे असा (शेला इ०).

असासाउसासा **पु०** जोराचा श्वासोच्छ्वास, जोरानें सुसकारे सोडणें; धापा टाकणें.

असाळी **स्त्री०** १ राक्षसी, कृत्या. २ भांडखोर आणि कजाग स्त्री.

असाक्षिक [**सं०** अ (नाहीं)+साक्षिन् (साक्षीदार) + क (प्रत्यय)] **वि०** ज्याला साक्षीदार नाहीं असा (व्यवहार इ०.)

असि [**सं०**] **पु०** तरवार. ॐ **-धारा** **स्त्री०** तरवारीची धार. **-धाराव्रत** **न०** अत्यंत कठिण असा वर्तनक्रम. **-लता** **स्त्री०** लतेसारखी (वेली-सारखी) तरवार (सडपातळ आणि लवचीक). **-पत्रवन** **न०** जेथील झाडांचीं पानें तरवारीच्या रूपाचीं असतात असें कल्पित अरण्य (पाप्यांना जेथें रहावयाला यम भाग पाडतो).

असिका **स्त्री०** वास्तव्याचें ठिकाण.

असिकें **वि०** सर्व, दरोबस्त.

असील, अशील **पु०, न०** वकीलाचें कूळ.

असु [**सं०**] **पु०** प्राण. ॐ **-सम** **पु०** १ पति. २ जार.

असुख [**सं०** अ (नाहीं) +सुख] **न०** १ सुख नव्हे तें; दुःख; अस्वस्थपणा; अशांति. २ अव्यवस्थित, अनियमित, किं० वेदनायुक्त विटाळ (स्त्रियांचा).

असुजणें [**म०** अ (नाहीं) +सुजणें] **अ० क्रि०** सूज ओसरणें.

अंसुढाळ [**सं०** अश्रु +ढाळणें (गाळणें)] **वि०** १ पिचक्या किं० चिपड्या डोळ्यांचा (घोडा). २ रड्या; सदा पिरपीर करणारा किं० रडणारा. **पु०, स्त्री०** पिचका डोळा (घोड्याचा एक रोग).

असुद [**सं०** अशुद्ध] **न०** रक्त, रुधिर.

असुदा, असुदाय [**फा०** आसूद्ह्] **वि०** १ ताजा, तरतरीत, नव्या दमाचा (तबेल्यांत कांहीं दिवस बांधून ठेवलेला घोडा). २ तल्लख, कामाची उमेद असलेला. ३ सडा, एकटा आणि मोकळा, ज्याच्या मागें बायकापोरांची विवंचना नाहीं असा. ४ कामाच्या कटकटी ज्याच्या मागें नाहींत असा (माणूस). ५ रिकामें (कांहीं बारदान, घर, इ०). ६ एकाद्या कामीं पूर्वींचा कांहीं अनुभव नसलेला. ॐ**असुदा दम** **पु०** विश्रांतीनंतर हुशार होऊन कोण-तेंही काम करावयाला सिद्धता किं० तयारी.

अंसुपात वर ' अंसुढाळ ' पहा.

असुर [**सं०** अ (नाहीं) +सुर (देव)] **पु०** १ दैत्य (देवांचे शत्रु). २ पिशाच. ३ राहु. ॐ**असुराधिप** **पु०** बलि. **असुराचार्य** **पु०** शुक्र.

असुरवाड **पु०** त्रास, कष्ट.

असुरी [**सं०** असुराची स्त्री] **स्त्री०** १ असु-राची पत्नी. २ असुरस्त्री.

असुज्ञ [**सं०** अ (नाहीं) + सुज्ञ (जाणता)] **वि०** अजाण; अपंडित; गैरवाकबगार.

असूं [**सं०** अश्रु] बाष्प, डोळ्यांतील पाणी, किं० टिपें; अश्रु.

असूड [**म०** असडणें] **पु०** गाडीवाल्याचा किं० नांगरणाराचा चाबूक; कडकलक्ष्मीचा चाबूक. ॐ**असूडगांठ** **स्त्री०** सुरगांठ, सरगांठ.

असूत (-द) [**सं०** असूत=सूज्ञाला किं० योग्य सरणीला धरून नव्हे असा] **न०** ठसका.

असुत (-द) जाणें भलत्याच मार्गानें जाणें.

असूया [**सं०**] **स्त्री०** १ मत्सर, हेवा. २ निंदा. ३ राग.

असूरखाना [**अ०** अशर (दहा)+**फा०** खानह् (जागा)] **पु०** ताबूत तयार करण्यासाठीं बांधलेलें छप्पर (मोहोरमच्या पहिल्या दहा दिव-सांत हें काम होतें).

असोला (-ल्या) **वि०** न सोललेला (नारळ).

असोशी **स्त्री०** अतृप्ति; अधिकाची हाव. **वि०** अतृप्त; अधिकाची हाव धरणारा.

असोशिक **वि०** १ सहन करावयाला असमर्थ. २ चिडखोर; सोसून न घेणारा.

असोळी [**स्त्री०** पक्ष्याचें घरटें].

अस्कंद [**सं०** अश्वगंधा] **पु०** वनस्पतिविशेष.

अस्करणें **अ० क्रि०** धिक्कारून बोलणें.

अस्करा **पु०** प्रख्याति, कीर्ति.

अस्कारणें, अस्करणें **अ० क्रि०** प्रख्यातीस चढणें; चांगला (किं० वाईट) लौकिक मिळविणें.

अस्खलित [**सं०** अ (नाहीं)+स्खलित (अड

लेला; स्खल्=अडणें)] **वि०** १ न अडखळलेला; अक्षय; ज्यांत खंड पडला नाहीं किं० व्यत्यय आला नाहीं असा. २ सुरक्षित. ३ बिनचूक; अव्यभिचारी. **क्रि० वि०** न थांबतां; न अडतां; सतत; व्यत्यय न येतां.

अस्त [**सं०**] **वि०** शेवटास गेलेला. **पु०** १ मावळणें. २ सूर्य क्षितिजाच्या खालीं जाणें. ३ कोणत्याही खस्थ पदार्थाचें मावळणें किं० अदृश्य होणें. ४ (**ज्यो०**) ग्रहाची सूर्याशीं युति. **न०** १ शेवट. २ मरण. ३ नाश, क्षय. ४ अपकर्ष. ॐ**अस्तंगत वि०** १ मावळलेला. २ अपकर्ष पावलेला. **अस्तमय पु०**, **अस्तमान न०** खस्थ पदार्थांचें मावळणें किं० क्षितिजाच्या खालीं जाणें. **अस्ताचल पु०** पश्चिम पर्वत,–ज्याच्या पलीकडे सूर्य, चंद्र, इ० जाऊन मावळतात.

अस्तनी [**फा०** आस्तईन] **स्त्री०** अंगरखा, बंडी, चोळी, इत्यादींचा बाहुला किं० दंडाला आच्छादणारा जो भाग तो; बाही. ॐ**अस्तनींतील निखारा** किं० **विंचू** किं० **साप पु०** किं० **आग स्त्री०** आपल्याच घरांत राहणारा दुष्ट आणि उपद्रव कारक माणूस (ज्याला हाकलून देणें शक्य नाहीं आणि ज्याचा जाच मुकाट्यानें सोसावा लागतो).

अस्तर [**सं०** आ + स्तरण (स्तॄ=पसरणें)] **न०** बंडी, कोट, डगला, वगैरेंना आंतल्या बाजूस दुसऱ्या प्रकारचें वस्त्र जें घालतात किं० शिवतात तें.

अस्तई, अस्ताई स्त्री० पदाचा पहिला भाग दुसऱ्या भागाला अंश किं० अंतरा म्हणतात. "ध्रुवपदाचा पेंडाबंद."

अस्ताव्यस्त [**सं०** अस्त+व्यस्त=इतस्ततः टाकलेलें] **वि०** अव्यवस्थितपणें, बेशिस्तपणें, किं० निष्काळजीपणानें इकडे तिकडे टाकलेलें किं० पडलेलें सामानसुमान, पदार्थ, इ०.

अस्ति [**सं०** आहे] **अ० क्रि०** आहे. **अस्ति नास्ति** आहे किं० नाहीं ह्याबद्दल वाद; वाटाघाट; भवति न भवति. **अस्तिपक्ष पु०** "होय," "आहे," "मान्य," असें म्हणणारा पक्ष, अनुकूल पक्ष. **नास्तिपक्ष पु०** "नाहीं" किं० "अमान्य" म्हणणारा पक्ष; प्रतिकूल पक्ष.

अस्त्युत्तर [**सं०** आहे उत्तर ज्याचेपाशीं] **वि०** कोणी कांहींही बोललें तरी त्याला मोडून काढावयाला ज्याचेजवळ उत्तर सदा तयार आहे असा; यावरून अस्त्युत्तर=१ कुत्सित; २ योग्य किं० खरी गोष्ट नाकबूल करणारा.

अस्तित्व [**सं०** अस्ति (आहे) + त्व (प्रत्यय)] **न०** असण्याचा गुण किं० धर्म; आहेपणा.

अस्तु [**सं०** अस्तु=असो] **क्रि० वि०** बरें आहे; ठीक आहे; असो.

अस्तुरी [**सं०** 'स्त्री' चा अपभ्रंश] **स्त्री०** स्त्री.

अस्तेकरी [**सं०** अस्ति (आहे)+करी (मराठी प्रत्यय)] **पु०** ज्याचेपाशीं कांहीं द्रव्य आहे असा; अगदीं कंगाल नाहीं तो.

अस्तेय [**सं०** अ (नाहीं)+स्तेय (चोरी)] **न०** चोरी न करणें; चोरी करण्यापासून पराङ्मुखता.

अस्त्र [**सं०** अस्=फेकणें] **न०** १ शत्रूच्या नाशासाठी फेकावयाचें हत्यार; बाण, इ०. २ शस्त्र. ३ समंत्र शस्त्र. ४ अस्त्रविद्या. ॐ**–चिकित्सक पु०** शस्त्रवैद्य. **–पाती पु०** गोलंदाज. **–मार्ज पु०** शिकलगार. **अस्त्रशस्त्र न०** सर्व प्रकारचीं शस्त्रें.

अस्थान [**सं०** अ (अयोग्य)+स्थान] **न०** १ अयोग्य वस्तु, जागा, विषय, किं० प्रसंग; उ० तुम्हीं मजवर केलेला दोषारोप अस्थानीं आहे. **वि०** फार खोल.

अस्थायी [**सं०**] **वि०** क्षणभंगुर; चिरकाळ न [टिकणारें.

अस्थावर [**सं०** अ (नाहीं)+स्थावर (जागा धरून राहणारें)] **वि०** दुसरीकडे नेतां येईल असें (पेटी, खुर्ची, इ०; स्थावर=न हालवितां येईल असें; शेत, बाग, विहीर, इ०).

अस्थि [**सं०**] **न०** १ हाड. २ बी, आठळी. ॐ**–पंजर पु०** १ हाडांचा सांगाडा; किडकिडीत माणूस. **–संचय पु०** प्रेत दहनानंतर राख व हाडें जमा करणें. टीप–मृताला जाळल्यानंतर राखेंतून हाडें गोळा करतात आणि पवित्र जळांत टाकतात त्यांना 'अस्थि' हा शब्द आपण स्त्रीलिंगी लावतों. **–गत वि०** हाडांत भिनलेला (ताप इ०). **–गतप्राण वि०** अगदीं मरणोन्मुख. **–समर्पण न०** मृताचीं हाडें पवित्र जलांत टाकणें.

अस्थिर [**सं०** अ (नाहीं)+स्थिर (दृढ)] **वि०** चंचळ; क्षणिक; न टिकणारें.

अस्थैर्य [**सं०** अ (नाहीं) + स्थैर्य (स्थिरता)] **न०** चंचलपणा.

अस्नात [**सं०** अ (नाहीं)+स्नात (अंघोळ

केलेला)] वि० ज्यानें स्नान केलें नाहीं असा; पारोसा.

अस्पर्श [सं० अ (नाहीं)+स्पर्श (शिवणें)] वि० १ स्पर्श करण्यास अपात्र किं० अयोग्य; अशुद्ध. २ रजस्वला किं० विटाळशी (स्त्री).

अस्पृश्य [सं० अ (नाहीं)+स्पृश्य (स्पर्शिण्यास योग्य)] वि० स्पर्श करावयाला अयोग्य किं० नालायक; अपवित्र.

अस्पृष्ट [सं० अ (नाहीं)+स्पृष्ट (ज्याला स्पर्श झाला आहे)] वि० ज्याला स्पर्श करण्यांत आला नाहीं असा.

अस्फुट [सं० अ (नाहीं)+स्फुट (स्पष्ट)] वि० अस्पष्ट; न दिसण्याजोगा, न ऐकूं येईसा.

अस्फूर्ति [सं० अ (नाहीं)+स्फूर्ति (स्फुरण)] स्त्री० १ प्रादुर्भाव न होणें. २ न स्फुरणें. ३ आयत्या किं० जरूरीच्या वेळीं न सुचणें किं० न आठवणें. ४ न उमलणें; न विकासणें.

अस्मत् [सं० आम्ही] **सर्वनाम.** समासांतच याचा उपयोग होतो; उ० अस्मद्गृह=आमचें घर.

अस्मतपना [फा० अस्मत् पनाह्] पत्रांत कुलीन स्त्रीसंबंधानें योजावयाची पदवी.

अस्मदीय [सं० अस्मत्=आम्ही] वि० आमचें; आमच्या मालकीचें किं० संबंधाचें.

अस्मादिक [सं० अस्मत्+आदि=आम्ही आणि इतर; अशुद्ध घटना] वि० आम्हीं स्वतः; आम्हासारखे; आम्ही (बढाई मारतांना किं० विनोदी भाषणांत याचा उपयोग केला जातो).

अस्मान [फा० आस्मान्=आकाश] न० आकाश. ॐ**एकाद्याला अस्मान ठेंगणें होणें** तो गर्वानें फुशारून जाणें. **अस्मानगिरी** स्त्री० छत, चांदणी (मांडवावरचें आच्छादन). **अस्मान चपेटा** पु० १ दैवी आपत्ति. २ आकाशांत भरारी मारणारा घोडा, (भिकार घोड्याची कुचेष्टा करतानांही याचा उपयोग केला जातो). **अस्मानतारा** पु० १ तारा. २ तुटणारा तारा. ३ उत्तम घोडा, स्वार, लेखक, गवई इ०. **अस्मान तारे तुटणें** भाषण किं० गायन यांची स्तुति करतांना योजतात, उ० तो गवई गात होता, ते जसे कांहीं अस्मान तारे तुटत होते! गायन किं० भाषण यांची कुचेष्टा करतांनाही या वाक्प्रचाराचा उपयोग केला जातो.

अस्मानी [फा० आस्मान्=आकाश] वि० १ आकाशाच्या रंगाचा; अगदीं फिका निळा. २ दैवी; दुर्दैवानें ओढवलेलें (संकट). ॐ**अस्मानी सुलतानी** स्त्री० दुर्दैवामुळें किं० राजाच्या दुष्टपणामुळें ओढवलेलीं संकटें.

अस्मार्त [सं०] वि० १ फार जुनें. २ शास्त्रनिषिद्ध. ३ हिंदूंच्या चालीरीतींच्या विरुद्ध. ॐ**अस्मार्त काल** पु० १ फार जुना काळ. २ (हक्क ठरवितांना) शंभर वर्षांच्या मागचा काळ. **अस्मार्तकालिक** वि० शंभर वर्षांहून अधिक काळ भोगवट्यांत असलेली (जमीन, शेत, इ०).

अस्वत्व [सं० अ (नाहीं)+स्व (आपला)+त्व (प्रत्यय)] न० १ आपलेपणाचा अभाव. २ जिंदगीवर हक्क नसणें.

अस्वरस पु० १ नापसंती; नावड. २प्रेमाभाव.

अस्वल पु०, स्त्री०, न० १ एक केसाळ वन्य पशु. २ खूब मोठा सुरवंट.

अस्वस्थ [सं० अ (नाहीं)+स्वस्थ (शांत)] वि० चिंताग्रस्त; शांतिरहित; विवंचनेंत असलेला.

अस्वाधीन [सं० अ (नाहीं) + स्व (आपला) +अधीन (ताब्यांतील)] वि० आपल्या ताब्यांत नाहीं तें; परतंत्र; परावलंबी.

अस्वामिक [सं० अ (नाहीं) +स्वामी (मालक) +क (प्रत्यय)] वि० ज्याला धनी, मालक, नियंता, किं० प्रभु नाहीं असा (प्रदेश, शेत इ०).

अस्वास्य [सं०] वि० बिनवारशी, परक्याचें. न० कायदेशीर हक्क नसणें.

अस्वारस्य [सं० अ (नाहीं) +स्वारस्य (गोडी)] न० गोडीचा अभाव; नावड; अरुचि.

अस्वास्थ्य [सं० ' अस्वस्थ ' चें भाववाचक नाम] न०१ स्वस्थपणाचा अभाव; चैन न पडणें. २ काळजी. ३ आजार. ४ दुःख. [२ खरा.

अस्सल [अ० अस्ल] वि०१ मूळचा, पहिला.

अहं [सं० अहम्=मी] **सर्वनाम** १ मी. २ मीपणा. ॐ**अहंकर्ता** पु० मीपणा, अहंकार. **अहंता** स्त्री०, **अहंकार** पु० १ मीपणा. २ गर्व, ताठा, अभिमान. ३ अविद्येचा प्रकार. ४ **(वेदान्त)** अहंतत्त्व (ज्यापासून पंचमहाभूतें होतात). **अहंकार्य** न० व्यक्तिचें कार्य. **अहंपूर्व** वि० स्पर्धायुक्त.

अहंपूर्विका, अहंप्रथमिका स्त्री० १ चढाओढ. २ स्पर्धा. **अहंममता स्त्री०** मीपणाची जाणीव. **अहंप्रत्यय, अहंभाव पु०, अहंमति स्त्री०** १ गर्व. २ (वेदान्त) अज्ञान. **अहंयु, अहंवादी वि०** गर्विष्ठ. **अहमहमिका स्त्री०** स्पर्धा, चढाओढ. **अहंचत्वंच, हंचत्वंच स्त्री०** अरेतुरे करून बोलणें; एकेरीवर येऊन बोलणें; वादाविवाद; बाचाबाची.

अहंग पु० संगीतांतील एक राग.

अहटणें, अहाटणें स० क्रि० १ पळीनें किं० ओघाळ्यानें शिजलेली डाळ, भाजी, इ० ठेचणें किं० घाटणें. २ फार फार सतावणें.

अहडणी स्त्री० नवीन घडविलेल्या भांड्याचे टोंक किं० पोंचे बुझविण्याचें किं० गुळगुळीत करण्याचें एक हत्यार.

अहदतहद [हिं० हद=ती हद] **क्रि० वि०** येथपासून तेथपर्यंत; या टोकापासून त्या टोकापर्यंत; उ० हा गांव अहदतहद तीन कोश लांब आहे. हा शब्द फोडूनही योजला जातो. उ० अहद काशी तहद रामेश्वर अहल्याबाई होळकरणीचीं धर्मकृत्यें पसरलेलीं आहेत. ॐ**अहद दर्या तहद सूर्य क्रि० वि०** सर्वत्र.

अहर्गण [**सं०** अहन् (दिवस)+गण (समूह)] **पु०** १ दिवसांचा समुदाय. २ महिना. ३ " इष्ट-कालीचें ग्रहादिकांचें गणित वर्तविण्यासाठीं विवक्षित अवधीपासून गतदिवसांचा गणितांत जो समुदाय तो."

अहर्निश, अहर्निशी [**सं०** अहन् (दिवस) +निश् (रात्र)] **क्रि० वि०** रात्रंदिवस; अहोरात्र.

अहलक [**सं०** अलक्ष्य='ब्रह्म' ह्याचा अपभ्रंश] **अव्यय** भिक्षा मागतांना गोसावी हा शब्द उच्चारतात.

अहळवहळ वि० अघळपघळ.

अहळणें स० क्रि० विस्तवाच्या शेकानें किं० सूर्याच्या उष्णतेनें भाजणें.

अहळी स्त्री० १ विस्तवाची धग किं० उष्णता; झळई, शेक. २ कढत वाऱ्याची झुळूक. ॐ**एखाद्याच्या अहळींत असणें** त्याच्या भीतींत, काचांत, किं० जाचांत असणें.

अहळींव न० एक पौष्टिक वनस्पति किं० तिचें [बीज.

अहा, अहाहा उद्गारवाचक अव्यय आनंद, खेद, इ०चा वाचक उद्गार; उ० अहाहा ! काय तुझी अक्कल ! तिच्यावरून दिवे ओंवाळावे !

अहाई स्त्री० अग्नीची धग, अढई, किं० शेक.

अहाकट पु० (शोक).

अहाच (**क्रि०वि०** बरोबर, सहजरीतीनें. **वि०** सामान्य, सर्वसाधारण. † **ग्रा०** (.

अहाटणें स० क्रि० १ शिजलेली डाळ इ० पळीनें ठेचणें किं० घाटणें. २ एखाद्याला फार फार सतावणें.

अहाटींव वि० पळीनें घाटलेली किं० ठेचलेली शिजलेली किं० पुरेशी शिजत असलेली डाळ इ०.

अहाणा पु० १ म्हण. २ लग्नादिप्रसंगीं मुली जे उखाणे घालतात ते. ३ कोडें. ४ **वि०** (आत्मघातकी. † **ग्रा०** (

अहार पु० १ एक प्रकारचा सर्प. २ चुलींतील फसाटा. ३ परीट इस्त्री करतात ती कृति.

अहारणें अ० क्रि० १ अति भोजनामुळें अंगांत सुस्ती येणें. २ अशा सुस्तीमुळें आरामासाठीं आडवें होणें. ३ बांधलेली भिंत, इमारत, इ० जमीनींत खचणें.

अहारणें [**सं०** अ+हार (माळ)] **अ० क्रि०** पाय रहाटाची लोट्यांची माळ तुटणें.

अहारोळी स्त्री० कुपाट्यांत किं० निखाऱ्यावर भाजलेला रोट.

अहाहा उद्गारवाची अव्यय; ओहो !

अहाळणी स्त्री० १ उष्ण वाऱ्याच्या झुळकांनीं होरपळणें. २ धापा टाकणें. ३ उत्कट इच्छेनें उसासा टाकणें. ४ उष्णता, आंच. ५ तीव्र उत्कंठा. ॐ**–टाकणें** किं० **देणें** राग, दुःख, वेदना, इ०च्या क्षोभांची लहर अनावर होऊन टाकलेला सुस्कार किं० काढलेला उद्गार. अहाळण्या कहाळण्या टाकणें किं० देणें याचाही तोच अर्थ आहे.

अहाळणें अ०क्रि० १ उष्ण वाऱ्याच्या झुळकांनीं किं० विस्तवाच्या झळयांनीं होरपळणें किं० अति कासावीस होणें; पोळणें. २तीव्र दुःखानें जर्जर होणें.

अहाळीव न० आळीव नांवाची वनस्पति; तिच्या बीजांचे लाडू करतात.

अहि [**सं०**]१ साप. ॐ **-कोश पु०**सापाची कात. **–छत्रक न०** कुत्र्याचें मूत, अळंबें. **–तुंडिक पु०** गारोडी; साप खेळविणारा. **–नकुलिका स्त्री०** साप आणि मुंगुस ह्यांच्यांतील वैराप्रमाणें वैर; जन्मद्वेष. **–फेन पु०, न०** १ सर्पाची गरळ. २ अफू.

अहित [**सं०** अ(नाहीं)+हित (कल्याण)] **न०**अकल्याण, नुकसान. **पु०**शत्रु. **वि०**१ अकल्याण

करणारा; हानिकारक. २ अयोग्य. ३ प्रतिकूल.

अहिम [सं० अ (नाहीं) + हिम (थंड)] **वि०** उष्ण. ॐ**अहिमांशु पु०** सूर्य.

अहिरण, आहिरणी स्त्री० ऐरण (सोनार, लोहार, तांबट, इ०ची).

अहिरा, अहेरा पु० १ डोळ्यांचा एक रोग. २ तांबूस आणि टणक असा अंगठांत बसवितात तो खडा. त्याला 'अहिऱ्याचा खडा' असेंही म्हणतात.

अहिंसक [सं० अ (नाहीं) + हिंसक (हिंसा करणारा)] **वि०** हिंसा किं० हत्या न करणारा.

अहिंसा [सं० अ (नाहीं) + हिंसा (हत्या)] **स्त्री०** १ खाद्यासाठीं प्राण्यांस न मारणें; कोणत्याही प्राण्यास कोणत्याही प्रकारची दुखापत किं० इजा न करणें किं० न करण्याची प्रवृत्ति.

अहिरी स्त्री० लग्न, मुंज, वगैरे मंगल कार्यांत बोहोल्याच्या चारी कोपऱ्यांस उतरंडी रचावयासाठीं जीं रंगीत मडकीं घेतात तीं (समुच्चयानें).

अही स्त्री० १ अग्नीच्या झळया; शेक; धग. २ उष्ण वाऱ्याची झुळूक. ३ प्रकाशाची डोळ्यांना असह्य अशी दीप. ४ उन्हानें तापलेल्या जमीनीवर पाण्याच्या लाटांप्रमाणें दिसणाऱ्या हवेच्या लाटा. ह्या अर्थानें स्त्रीलिंगी अनेकवचनी ' अह्या ' असा प्रयोग होतो. क्रि० ' मारणें ' अकर्मक

अहीर [सं० आभीर = गवळी] **पु०** १ गुराखी. २ गवळी जातीचा इसम.

अहेतु [सं० अ (नाहीं) + हेतु (कारण)] **क्रि०** निमित्तरहित; सहज, उगीच.

अहेतुक [सं० ' अहेतु ' पहा] **वि०** १ ज्यांत हेतु नाहीं असा. २ तर्कशून्य. ३ तर्काला अगोचर. ४ निःस्वार्थ; लाभाची इच्छा न बाळगतां केलेलें.

अहेनवमी स्त्री० खालीं ' अहेव नवमी ' पहा.

अहेर, आहेर पु० मंगल कार्याचे प्रसंगीं आप्त किं० इष्टमित्र यांचेकडून येणारीं लुगडीं, धोतरें, पागोटीं, वगैरेंची देणगी.

अहेव [सं० ' अविधवा ' याचा अपभ्रंश] **स्त्री०** जिचा पति हयात आहे अशी स्त्री; अविधवा. ॐ**अहेव नवमी स्त्री०** भाद्रपद कृष्ण नवमी,—ज्या दिवशीं सुवासिनीपणें मेलेल्या स्त्रीचें श्राद्ध करतात ती. **अहेवेचें मेलें खेळाया गेलें** अविधवेचें मूल मेलें तर तें खेळावयाला गेलें असें समजावयाला हरकत नाहीं; कारण तिला दुसरें मूल होण्याची आशा असते. **अहेवदोरा, अहेवतंतु पु०** १ मंगळसूत्र. २ जें काढून घेतलें जाण्याची शक्यता नाहीं असें वतन, नोकरी, असामी, जहागीर, इ०. **अहेवमरण न०** अविधवादशेंत म्हणजे पतीच्या अगोदर आलेलें मरण. **अहेवसवाष्ण स्त्री०** अविधवा स्त्री; जिचा पति जिवंत आहे अशी स्त्री. **अहेव सुयेव क्रि० वि०** अविधवा स्थितींत, (आसन्नमरण स्त्रीसंबंधानें); उ० चंद्रिकाबाई अहेवसुयेव मरते आहे; तिच्याबद्दल रडूं नका.

अहो उद्गारवाचक अव्यय, संमान्य पुरुष किं० स्त्री यांच्याशीं बोलतांना योजावयाचें अव्यय. उ० अहो नारायणराव, मला ती पोथी वाचावयाला दोन दिवस द्या. ' अहो ' हा शब्द दुसऱ्या शब्दापुढें आला असतां ' अ ' गळून ' हो ' येवढेंच रूप राहातें ! उ० कायहो ! कांहो ! कधींहो ? ॐ**अहो जाहो पु०** अनेकवचनी प्रयोग करून बोलणें. उ० वडील माणसांना अहो जाहो म्हणावें.

अहो [सं० ' अहन् ' ह्म० दिवस याचें मराठी रूप] हें फक्त पुढील शब्दांत येतें. ॐ**अहोदिवस क्रि० वि०** सर्व दिवसभर; दिवसाचे आठही प्रहर. **अहोरात्र स्त्री०** दिवस आणि रात्र मिळून जो काळ तो; आठ प्रहर; उ० काल त्यानें अहोरात्र वेदपठनांत घालविली. **क्रि० वि०** सर्व दिवसभर (दिवस आणि रात्र मिळून जो अवधि, त्या सर्व अवधींत); उ० तो माणूस अहोरात्र आपल्या वरिष्ठाच्या तैनातींत असतो. **अहोरात्र अहोदिवस** (बायकी प्रयोग). वर ' अहोरात्र ' पहा.

अहोपी वि० लोभी.

अळका वि० अधीर; ज्याला चैन पडत नाहीं असा; उ० भुकेचा अळका म्ह० ज्याला भूक धरत नाहीं असा. झोपेचा अळका म्ह० झोप ज्याला टाळतां येत नाहीं असा.

अळकुडी, अळकुडें खालीं ' अळु ' पहा.

अळंग, अलंग स्त्री० ज्यांची लांबी खूपच मोठी आहे असें घर, सोपा, इ०.

अळगावणें अ० क्रि० विण्याच्या स्थितींत असणें (गाय, म्हैस, इ०).

अळंगें न० गोणीच्या दोन्हीं अर्धुकांपैकीं प्रत्येकाला बाहेरच्या बाजूस ज्या बिरड्या असतात

त्या प्रत्येक; ह्या अळंग्यांतून तळकर्‍या घालून गोणी घट्ट बांधतात.

अळंगें विळंगें न० शरीराला आळापिळा देणें (आळस झाडतांना किं०अस्वस्थपणाच्या स्थितींत). 'आळोके पिळोके देणें ' असाही ह्याच अर्थाचा वाक्प्रचार रूढ आहे.

अळण न० १ भाजीला शिजतांना लावतात तें पीठ. २ खाद्य पातळ पदार्थ घट्ट करण्यासाठीं लावतात जें पीठ तें.

अळणट वि० ज्या खाद्याला किं० पेयाला मीठ किंचित् कमी झालें आहे असें.

अळणी वि० १ ज्या खाद्याला किं० पेयाला मीठ कमी झालें आहे असें. ***नावडतीचें मीठ अळणी** आपणाला जें माणूस आवडत नाहीं त्याणें कोणतीही गोष्ट कितीही चांगली केली तरी ती आपणाला वाईटच दिसते; त्याचें प्रत्यक्ष मीठही अळणी लागतें. २ ज्याचे ठायीं जरूर तो गुण जरूर त्या प्रमाणांत नाहीं असा, म्हणजे नीरस, पचपचींत, वीर्यरहित, सौंदर्यरहित इ०.

अळणें अ० क्रि० १ घट्ट होणें; द्रवांश कमी किं० नाहींसा होणें. २ वाळणें. ३ वयांत येणें. **स० क्रि०** एकाद्या पदार्थातील द्रवांश उष्णतेच्या योगानें कमी करणें किं० काढून टाकणें.

अळता, अळिता [सं० अलक्तक] पु० लाखेच्या चूर्णांत पाणी, टाकणखार, इ० घालून तांबडा रंग करतात तो.

अळंदें न० पोळा ह्या उत्सवांत उपयोगांत आणतात तें कांहीं विशिष्ट आकाराचें पात्र.

अळपण, अळपणें न० कांहीं वस्तु आवळून बांधावयासाठीं किं० गुंडाळण्यासाठीं घ्यावयाची दोरी इ०.

अळपणें स० क्रि० आवळून बांधणें किं० वेष्टिणें किं० गुंडाळणें; उ० तो भाताचा मुडा नीट अळपून बांध.

अळपा पु० १ वस्तु बांधतांना दोरीचा घातलेला वळसा किं० वेढा. (**क्रि०** घालणें, देणें, इ०.) २ बांधावयासाठीं किं० गुंडाळावयासाठीं घेतलेली दोरी, गोणपाट, चटई, इ०. ३ घट्ट बांधणें, आवळणें, गुंडाळणें इ०.

अळबळीत गळबळीत वि० १ गरीब, साधा, निरुपद्रवी, किं० गचाळ (माणूस). २ मोकळ्या मनाचा.

अळम ट(–टा–)ळम न० १ चुकारतट्टूपणा; टाळाटाळी; चुकवाचुकव. २ अमुक कार्य अमुक मनुष्य करील ह्या संबंधानें संदिग्ध किं० अनिश्चितपणा; उ० त्याचें येण्याचें अळम टळम दिसतें.

अळमळीत, अळमळीत गुळमुळीत वि० १ संदिग्ध (भाषण); ठासून नव्हे तें (भाषण). २ निष्काळजीपणानें किं० मनापासून न केलेलें (काम)

अळवट स्त्री० नांगरलेली जमीन सारखी करावयाचें एक साधन किं० हत्यार.

अळवण न० १ खाद्य किं० पेय पदार्थ वेताचा घट्ट करण्यासाठीं जें पीठ इ० लावतात तें. २ कोरडें करणें.

अळवंत स्त्री० बाळंतपणांत मेलेल्या स्त्रीचें भूत; ह्या भुताला ' हडळ ' किं० ' जखीण ' म्हणतात.

अळविणें स० क्रि० १ गोड शब्दांनीं किं०प्रार्थनेनें एकाद्याचें मन आपणाविषयीं अनुकूल करून घेणें; प्रसन्न करणें; विनविणें. २ रडत असलेल्या लहान मलाला अंजारून गोंजारून किं० प्रेमानें बोलून उगें करणें. ३ अनरूप हावभावांनीं आणि स्वरकंपांनीं एकादें गीत, राग, रागिणी, इ० गाणें. ४ पक्ष्याचें मधुर गायन किं० किलबिल शब्द.

अळवीण स्त्री० एक वृक्षविशेष; ह्याच्या फळाला 'अळू' म्हणतात.

अळशी, अळस ' अ ' मध्यें पहा.

अळशी स्त्री० जवस.

अळसुंदा पु० एक प्रकारचा वेल.

अळापिळा पु० अंगाचा मुरडा; अंग पिळवटणें.

अळिता पु० ' अळता ' शब्द पहा.

अळिउळ } **सं०** अलिकुल=भ्रमरांचा समुदाय }.

अळी स्त्री० १ कृमि. २ झाडांच्या पानांवर राहणारा एक किडा.

अळीकर वि० छांदिष्ट.

अळींव वि० १ वाळवून किं० अन्यरीतीनें घट्ट केलेला. २ शरीराची पूर्ण वाढ झालेला (मुलगा, मुलगी).

अळीमिळी स्त्री० मुलें एकमेकांना गप्प करतांना हा शब्द योजतात; उ० मी तुला अळीमिळी घालतों. अळीमिळी गुपचिळी घालणें म्ह० चूप

वसावयाला लावणें. [भुकेलेला.

अळुकी स्त्री० १ आवड. २ भूक. **वि०**

अळुकलें वि० भुकेलेलें.

अळूमाळू क्रि० वि० हलकेंच; थोडकेंच; सौम्य हातानें; किंचित् प्रमाणांत.

अळूं न० पु० एक कंदविशेष; याच्या पानांची, किं० देठीची भाजी करतात. ॐ **अळवावरचें पाणी न०** अशाश्वत किं० क्षणभंगुर वस्तु; उ० वैभव हें अळवावरचें पाणी होय. **अळवाची खाज आळवालाच ठाऊक** आपला उणेपणा, दुष्कृत्यें, चिंता, इ० आपणासच ठाऊक असतात. **आळवावर आंचवणें** कृतघ्नावर उपकार करणें.

अळें [सं० आलवाल] न० १ झाडाच्या मुळाशीं पाणी ठरण्यासाठीं केलेली वाटोळी खळगी. २ चिखल तयार करावयासाठीं मातीच्या ढिगांत जो मधोमध खळगा करतात आणि ज्यांत पाणी ओतलें जातें तो. ३ भोपळा, पडवळ, कारलें, काकडी, इ० चीं बीजें ज्या स्थळीं रुजत घालतात तें स्थळ. ४ वांगीं, मिरच्या, इत्यादिकांचें एक एक रोप एका एका खळींत लावतात ती खळी. ५ शेतांतील चिखल सारखा करावयाचें एक लाकडी आऊत. ६ रेघी अपूर्णांकाच्या पद्धतीनें कांहीं मिश्र रकम किं० मिश्र परिमाण लिहावयाचें असतां ज्या परिमाणाच्या जागीं कांहीं रेघ येत नाहीं त्याच्या जागीं घालतात जी खूण ती; ती खूण ८ अशी असते; उ० रु. ३८=॥। ह्याचा अर्थ तीन रुपये, शून्य पावल्या, दोन आणे आणि तीन पैसे.

अळेदांडी स्त्री०, अळे पिळणें न० गाडीचें जूं आणि दांडी यांना एकत्र बांधावयाची दोरी घट्ट करण्यासाठीं जें लांकूड त्या दोरीच्या पदरांत घालून पिळवटतात तें.

अळेपिळे, अळोकेपिळोके पु० अ० व० शरीराचीं गात्रें आळस झाडण्यासाठीं किं० सईल आणि साफ करण्यासाठीं पिळवटतात किं० ताणतात किं० हसडतात त्या क्रियेला अळेपिळे किं० अळोकेपिळोके देणें असें म्हणतात.

अळेंबळें क्रि० वि० इच्छा असो किं० नसो; स्वेच्छेनें किं० दुसऱ्याच्या सक्तीनें; उ० मला भूक मुळींच नव्हती तथापि मी अळेंबळें चार घास खाल्ले.

अक्ष [सं०] पु० १ रुद्राक्ष. २ गाडीचा कणा. ३ पृथ्वीचा आंस. ४ खेळावयाचा फासा. ५ डोळा. ६ फाशावरील डोळा. ७ बिब्बा. ८ भूगोलावर दोन स्थळांतील दक्षिणोत्तर अंतर; अक्षांश. ॐ **अक्षावली स्त्री०** जपमाळ. **अक्षावपन न०** सोंगट्यांचा पट. **अक्षावाप पु०** जुगार खेळणारा. **अक्षक्रीडा स्त्री०, अक्षकूट पु०** बबूल. **अक्षपाद पु०** गौतम (न्यायशास्त्रप्रवर्तक). **अक्षमाला स्त्री०** रुद्राक्षांची माळ. **अक्षहृदय न०** द्यूतकलेचें रहस्य.

अक्षत [सं० अ (नाहीं) +क्षत (पीडिलेला)] **वि०** १ खुशाल, सुरक्षित. २ न मोडलेला, अभग्न, सबंध. ३ दुःखरहित. ॐ **अक्षतयोनि स्त्री०** पुरुषाचा जिला कधींच संभोग मिळाला नाहीं अशी स्त्री. **अक्षतमरिष्ट [सं०** अक्षतमरिष्टं चास्तु=अरिष्टाचा नाश होओ याचा अपभ्रंश] **क्रि० वि०** कांहीं विघ्न, हरकत, किं० अडथळा न येतां; उ० ही माझी वृत्ति पांचशें वर्षें अक्षतमरिष्ट चालत आलेली आहे.

अक्षत [सं० वर ' अक्षत ' पहा] **स्त्री०** १ देवतापूजादि कर्मार्थ किं० अभिमंत्रित करावयासाठीं घेतात जे तांदूळ ते. २ लग्न, मुंज, वगैरे समारंभांत ज्यास आमंत्रण करतात त्याचे हातीं जे तांदूळ देतात ते. ३ असलें आमंत्रण. ४ कपाळीं लाविलेल्या गंधामध्यें दुसऱ्या रंगाच्या गंधाची लावितात जी टिकली ती किं० तदर्थ केलेलें जें रक्तचंदनादिकांचें गंध तें. ५ (विनोदांत) एऱ्हवींचे तांदूळ; उ० आज घरांत एक अक्षत नाहीं; भात कशाचा करावयाचा ? ६ मंगळ प्रसंगीं कपाळाला जे तांदूळ चिकटवितात ते. ७ लग्नाच्या किं० मुंजीच्या प्रसंगीं वधूवरांवर किं० बटूवर जे तांदूळ टाकतात ते. (१, २, ४, ६ आणि ७ ह्या अर्थीं " अक्षता " असा स्त्रीलिंगी अ० व० शब्दही योजला जातो). ॐ **अक्षतारोपण न०** वधूवरांनीं लग्नाचा संस्कार चालला असतां एकमेकांच्या डोक्यावर अक्षता टाकणें. **अक्षत काढणें** किं० **फिरविणें** लग्न, मुंज, इ० प्रसंगासाठीं इष्टमित्रांना आणि सोयऱ्या-धायऱ्यांना आमंत्रण करण्यासाठीं निघणें किं० हा निघण्याचा विधि. **अक्षत देणें** वरील प्रसंगाचें आमंत्रण एकाघाला करून त्याला कुंकुमानें तांबडे केलेले तांदूळ देणें. **एकाद्याच्या डोक्यावर अक्षता पडणें** त्याचें किं० तिचें लग्न होणें; उ० गोदीला आम्ही दोन वर्षें

स्थळ पाहतां पाहतां बेजार झालों, तिच्या डोक्यावर एकदाच्या अक्षता पडल्या ! **चुलीला अक्षत देणें** घरांतील सर्व मंडळींना भोजनाचें आमंत्रण करणें. **वर अक्षता, मध्यें गोपिचंदन, खालीं रक्षा** चांगला न शिजलेला जो भात त्याचें हें वर्णन आहे. वरचा थर अगदीं कच्चा किं० न शिजलेल्या तांदुळांचा, मधला पिठूळ तांदुळांचा थर, आणि तळाचा जळून करपलेल्या तांदुळांचा थर. **वेशीला अक्षत देणें** सर्व गांवकऱ्यांना भोजनास आमंत्रिणें.

अक्षभा **स्त्री०** संपातबिंदूवर सूर्य असतां मध्यान्हाच्या समयीं बारा बोटें लांबीच्या उभ्या पुरलेल्या काठीची छाया; 'पलभा' ह्याचाही तोच अर्थ आहे.

अक्षम [**सं०** अ (नाहीं) + क्षम (समर्थ)] **वि०** १ असमर्थ. २ मत्सरी. ३ क्षमाशील नाहीं असा. ४ अधीर वृत्तीचा.

अक्षमा [**सं०** अ (नाहीं) + क्षमा (सहनशीलता)] **स्त्री०** १ अधीरपणा. २ क्षमा न करण्याची प्रवृत्ति किं० वृत्ति. ३ मत्सर, हेवा.

अक्षय [**सं०** अ (नाहीं) + क्षय (नाश)] **वि०** १ अविनाशी. २ घर नाहीं ज्याला असा (संन्यासी, दरिद्री, इ०). ३ नेहमींचें, सततचें; उ० आमचें ह्या गांवांत अक्षय राहाणें असतें तर येथें आम्ही घर बांधलें असतें. **पु०** १ परमात्मा. २ क्षयाचा अभाव. ‡**–तृतीया** **स्त्री०** वैशाख शुद्ध तृतीया. **अक्षय भाता** **पु०** ज्या भात्यांतील बाण कधीं संपत नाहींत असा. **अक्षयवाण** **न०** नारळ, तांदूळ, सुपारी, इ० चें वाण बायका ब्राम्हणाला देतात तें. **अक्षयसुख** **न०** अविनाशी सुख.

अक्षयीं, अक्षई [**सं०** वर 'अक्षय' पहा] **क्रि० वि०** सतत, पुनः पुनः, वारंवार; उ० आई, हा पहा ग विनू, मला अक्षयीं चिमटे घेत असतो ! त्याला रागें भर.

अक्षय्य [**सं०** अ (नाहीं) + क्षय्य (क्षयास पात्र)] **वि०** १ क्षय न पावणारें. २ अनंत, असंख्य. ‡**अक्षय्यवट** **पु०** हजारों वर्षें टिकून राहिलेला वटवृक्ष; कित्येक क्षेत्रांचे ठिकाणीं असले वटवृक्ष आहेत.

अक्षर [**सं०** अ (नाहीं) + क्षर् (क्षय पावणें)] **वि०** १ अविनाशी, शाश्वत टिकणारें. **पु०** १ शिव. २ विष्णु. ३ जीवात्मा. ४ परमात्मा. **न०** १ अ, आ, इ, इत्यादि वर्ण. २ भाषण, बोलणें. ३ विद्वत्ता. ४ लेख, (पत्र, दस्तऐवज). ५ वेद. (४ आणि ५ अर्थी 'अक्षरें' असा अनेकवचनांही उपयोग होतो). ६ परब्रह्म. ७ मोक्ष. ८ आकाश. **–ओळख** **स्त्री०** अक्षरें ओळखतां येतील इतकें ज्ञान (मुलाचें). ‡**–चंचु, –चण** **पु०** लेखक. **अक्षरजीवी, अक्षरोपजीवी** **पु०** १ विद्वत्तेवर उपजीविका ज्याची चालते तो. २ कारकून, लेखक. **–जननी, –तूलिका** **स्त्री०** लेखणी. **–न्यास** **पु०** लिहिणें, लेख. **–वर्जित** **वि०** अशिक्षित. **–शः** **क्रि० वि०** प्रत्येक अक्षराचा अर्थ घेऊन. **–शत्रु, –शून्य** **पु०** निरक्षर किं० अगदीं अशिक्षित माणूस.

अक्षरी [**सं०** अक्षर + **म०** ई (प्रत्यय)] **वि०** १ अक्षरांनीं लिहिलेला; उ० साडे दहा रुपये तीन आणे हे अक्षरी; रु. १०॥ हे अंकी. २ अक्षरांसंबंधाचा. ३ वार, नक्षत्रें, इ० चे ज्ञापक अंक न घालतां त्यांचीं आद्याक्षरें घालून केलेलें (पंचांग).

अक्षवण [**सं०** 'आयुष्मान्'चा अपभ्रंश] **न०** १ ताम्हनांत लावलेलें निरांजन ठेवून त्या ताम्हनानें ओवाळणें (देव, अतिथि, इ० ना). २ हें ओवाळण्यासाठीं घेतलेलें ताम्हन.

अक्षांति [**सं०** अ (नाहीं) + क्षांति (सहनशीलता)] **स्त्री०** १ असहनशीलता. २ मत्सर. ३ द्वेष.

अक्षारलवण [**सं०** अ (नाहीं) + क्षार + लवण (मीठ)] **न०** सुतकांत किं० कांहीं धार्मिक विधि कांहीं दिवस चालला असतां जें अन्न खाणें विहित आहे तें, जसें गायीचें दूध, तूप, भात, इ०.

अक्षि [**सं०**] **न०** डोळा. ‡**–गोचर** **वि०** डोळ्यांना दिसण्याजोगें किं० दिसतें तें. **–कूटक** **न०** १ बुबूळ. २ डोळ्यांतील बाहुली. **–गत** **वि०** १ दृष्टिगोचर. (माणूस किं० पदार्थ). **–स्पंदन** **न०** डोळा लवणें.

अक्षीं [**म०** "अक्षय"चा अपभ्रंश)] **क्रि० वि** १ सदोदित, एकसारखें. २ अगदीं, पूर्णपणें, निखालस. ह्या दोन्ही अर्थीं हा शब्द अशिक्षितांच्या वापरण्यांत येतो.

अक्षुण्ण [**सं०** अ (नाहीं) + क्षुण्ण (तुडविलेला, डिवचलेला; क्षुद्=चिरडणें)] **वि०** १ न चिरडलेला, न डिवचलेला. २ न मळलेला, नवा

(रस्ता). ३ न अनुसरलेला किं० न अवलंबिलेला; न शिकलेला (मार्ग, प्रकार, युक्ति, शास्त्र, कला, पद्धति, इ०).

अक्षोभ [**सं०** अ (नाहीं)+क्षोभ (हालणें) ज्याला] **वि०** फार खोल (पाणी). ঞ্ক**–नरक पु०** एका नरकाचें नांव.

अक्षोभ्य [**सं०** अ (नाहीं)+क्षोभ्य (चेतवितां येईल असा)] **वि०** न चेतवितां येईल असा; अक्षुब्ध; अत्यंत शांत (स्वभाव, वृत्ति, पाणी, इ०).

अक्षेत्र [**सं०** अ(नाहीं किं० वाईट) + क्षेत्र(शेत)] **न०** १ वाईट जमीन. २ वाईट शिष्य किं० विद्यार्थी.

अक्षोट, अक्षोड [**सं०**] **पु०** अक्रोड.

अक्षौहिणी [**सं०** अक्ष (रथ) +ऊहिनी (धारण करणारी)] **स्त्री०** पूर्ण सेना म्ह०२१८७० रथ, तितकेच हत्ती, ६५६१० घोडे, आणि १०९३५० पायदळ.

अज्ञ [**सं०** अ (नाहीं)+ज्ञ (जाणणारा; ज्ञा=जाणणें)] **वि०** १ न जाणणारा; अडाणी; अशिक्षित. २ गैरमाहितगार. ३ निर्जीव, अचेतन. **पु०** जीवात्मा.

अज्ञात [**सं०** अ (नाहीं)+ज्ञात (माहीत असलेला; ज्ञा=जाणणें)] **वि०** १ अप्रसिद्ध. २ माहीत नसलेला. ३ ज्याची आपणाला माहिती नाहीं असा. ঞ্ক**–पातक, –पाप न०** अज्ञानानें केलेलें किं० घडलेलें पातक. **–पूर्व वि०** १ पूर्वी ठाऊक नसलेलें; पूर्वी न अनुभविलेलें, न पाहिलेलें, न ऐकिलेलें, इ०. **–यौवना स्त्री०** कामोत्पत्तिद्वारा आपल्या अंगीं तारुण्य आलें असा अनुभव जिला नाहीं अशा अवस्थेंतील नायिका. **–वास पु०** आपण अमुक स्थळीं राहातों असें लोकांस न कळूं देतां जो वास तो; उ० पांडव एक वर्ष अज्ञातवासांत होते.

अज्ञान [**सं०** अ (नाहीं)+ज्ञान (ज्ञा=जाणणें)] **न०** १ ज्ञान नसण्याची स्थिति; ज्ञानाचा अभाव; माहिती नसणें. २ (वेदान्त) अविद्या, माया. **वि०** १ अडाणी; अशिक्षित; मूर्ख. २ वयांत न आलेला (मुलगा किं० मुलगी). ঞ্ক**–चर्या स्त्री०** अज्ञातवास. **–तः क्रि० वि०** अज्ञानानें किं० अज्ञानामुळें. **–तिमिरच्छेदक वि०** अज्ञानरूपी काळोखाचा नाश करणारा किं० करणारें (ईश्वर, किं० सत्याचें ज्ञान). **–धन न०** वयांत न आलेल्या किं० वेड्या माणसाची सपत्ति. **–पटल न०** अज्ञानरूपी पडदा, मायारूपी पडदा (जो ब्रह्मज्ञानाच्या आड येतो). **–प्राणी पु०** गाय, म्हैस, घोडा, इ० पशु; मुकें जनावर. **–भरें, –भुरळ न०** आपण ब्रह्मच आहों ह्या संबंधाचें अज्ञान.

अज्ञानी [**सं०** अज्ञान+**म०** ई (प्रत्यय)] **वि०** अडाणी; अशिक्षित; गैरमाहितगार.

अज्ञेय [**सं०** अ (नाहीं)+ज्ञेय (जाणण्याजोगें)] **वि०** जें जाणतां येत नाहीं असें; जें ज्ञानाचा विषय होऊं शकत नाहीं असें; अगम्य.

आ.

[टीप–जे शब्द आ ह्या अक्षराखालीं सांपडणार नाहींत ते अ ह्या अक्षराखालीं पहावे]

आ मराठी वर्णमालेंतील दुसरा स्वर.

आ ह्या उपसर्गाचे पुढील अर्थ होतात. (१) कमीपणा; ओष्ण=किंचित् उष्ण; (२) विस्तार; आस्तरण=सर्व भागावरचें आच्छादन; (३) पासून; आजन्म=जन्मापासून; (४) पर्यंत; आमरण=मरेतोंपर्यंत. (५) उलटपणा; गमन=जाणें, आगमन=येणें.

आ पु० पसरलेलें किं० उघडलेलें तोंड; उ० आ कर म्हणजे तुझी पडजीभ पाहातां येईल. ঞ্ক**आ करणें** किं० **आ वासणें** तोंड उघडणें (आश्चर्यानें, भीतीनें, इ०). **आ करून बसणें** उत्सुकतेनें मार्गप्रतीक्षा करून असणें.

आइकणें स० क्रि० ऐकणें. (कवितेंतील रूप).

आइकी वि० ऐकिलेलें; कानावर आलेलें (फारसें विश्वसनीय नव्हे असें). (कवितेंतील रूप).

आइणी स्त्री० (कवितेंत) १ उत्कट इच्छा २ सामर्थ्य.

आइती स्त्री० १ सामग्री. २ ऐट, डौल. ३ तयारी. ४ विस्तार.

आइतें वि० १ सहज; तयार. २ स्वतःसिद्ध. **न०** स्वयंपाकाचें साहित्य.

आइसा, आइसी स्त्री० लक्ष्मी.

आई स्त्री० १ माता. २ बहुमानपूर्वक स्त्री-संबंधानें योजावयाचा शब्द. 'आई' शब्दांतील 'आ' कधीं कधीं मागल्या शब्दांत लुप्त होतो; उ० विठाई, कृष्णाई, इ०. ✽**आईचें दूध किंवा गाईचें दूध** मुलांना हीं दोन्हीं सारखींच पुष्टि-कारक आणि अपायरहित असतात. **आईजीच्या जिवावर बाईजी उदार** दुसऱ्याची वस्तु कोणाला तरी देऊन श्रेय मिळवूं पाहणारा. **आई जेवूं घालीना आणि बाप भीक मागूं देईना** दोहों-कडून पंचाईत; दोन्हीं उपाय निष्फळ; कोणत्याही रीतीनें इष्ट हेतु सफल होण्याची आशा नाहीं. ✽**आईपोरका** वि० ज्याला आई नाहीं असा. **आईबाई** स्त्री० आईप्रमाणें प्रेमळ. **आयाबाया** स्त्री० अ० व० १ पोक्त किं० वृद्ध स्त्रिया. २ सामान्यतः सर्व स्त्रिया. **आईमाई करणें** आर्जवें करणें, विनविणें. **आईमाई उद्धरणें** आई-वरून शिव्या देणें. **आईमाई** स्त्री० कोणीही पोक्त स्त्री. **आईबाप** पु० अ० व०, **आईबापें** न० अ० व० आई आणि बाप. **एकाद्याला आईबापावरून पावणें** किं० **एकाद्याचे आई-बाप उद्धरणें** त्याला त्याच्या आईबापांवरून शिव्या देणें.

आईक वि० ऐकीव (जुन्या कवितेंत).

आईन [**फा०** आईन्] **स्त्री०** १ सभ्य वर्तन; सभ्य चालरीत; इभ्रत. २ दिमाखदारी. ✽**आई-नीला सरे तो खडबडीला झुले** कोरडे दिमाख करतो तो क्षुद्र लाभासाठीं नीच वृत्ति दाखवितो.

आउंज स्त्री० भाताचीं रोपें दुसऱ्या ठिकाणीं लावणें.

आउट स्त्री० साडे तीन पट; उ० पांचाची आउट माडेसतरा. **आउटकी** स्त्री० एकपासून शंभरांपर्यंत जे क्रमांक त्यांच्या साडेतीन पटींचें कोष्टक,—जें उजळणीचा भाग म्हणून मुलांना शिकवितात. ✽**आउट घटकांचें राज्य** न० क्षणभंगुर वैभव.

आउक्ष, आऊख [सं० आयुष्य] न० आयुष्य. ✽**आउक्षवान्, आउक्षवंत** वि० दीर्घायुषी.

आउत [सं० आयुध] न० १ हत्यार; कोण-त्याही कामाचें साधन. २ शेतकीच्या उपयोगाचीं हत्यारें, साधनें; इ०; नांगर, कुळव, पाभार, इ०. ३ सोनार, लोहार, साळी, कुंभार, इत्यादि कारा-गिरांचीं त्यांच्या धंद्याला लागणारीं हत्यारें किं० साधनें. ४ सूप, टोपली, रोवळी, इत्यादि महारांनीं केलेले चिव्याचे पदार्थ ते प्रत्येक. ५ माटाची पोय कापण्याचा कोयता. ✽**आउतकाठी** स्त्री० शेत-कीच्या कामाचीं हत्यारें समुच्चयानें. **आउतपट्टी** स्त्री० शेतांत चालविलेल्या नांगरावर बसविलेली पट्टी. **आउतबंदी** स्त्री० शेतांत चालणाऱ्या नांगरांवर पट्टी बसवावयाची पद्धति. **आउतभरणा** पु० १ शेतकरी लोक समुच्चयानें. २ शेतकीचीं हत्यारें समुच्चयानें.

आउत्या [सं० आयुध + म० या (प्रत्यय)] पु० १ शेतांत काम करणारा. २ शेतांत काम करावयाच्या वयाचा मुलगा.

आऊ स्त्री० १ स्त्री किं० वृद्ध स्त्री. २ स्त्रियांच्या नांवाला बहुमानानें जोडावयाचा शब्द; उ०कृष्णाऊ.

आकटी, आगटी [सं० अग्नि] स्त्री० १ शेकावयासाठीं केलेल्या लाकडें, गोवऱ्या, गवत, वाळलेलीं पानें, इ० चा पेटविलेला ढीग. २ शेका-वयासाठीं योजावयाची शेगडी.

आकंठ [सं० आ (पर्यंत) + कंठ (गळा)] क्रि० वि० कंठापर्यंत. ✽**आकंठमर्याद** वि० कंठाच्या मर्यादेपर्यंत; कंठापर्यंत.

आकंठणें स० क्रि० पाठलाग करून गांठणें.

आकडी स्त्री० वाजंत्र्यांची संबळ वाजवावयाची विशिष्ट आकाराची काठी किं० छडी.

आकण न० जोंधळा, बाजरी, इ० चीं एकदा झोडपून काढलेलीं किं० मळलेलीं कणसें. { धान्यां-तील खडा किं० माती }.

आकण कडवें, आंकण कडवें न० १ गाण्यां-तील पालुपद. २ तीच विनंती पुन्हा पुन्हा करणें. ३ एकाद्याच्या भाषणांत वारंवार येणारा शब्द.

आकर [सं०] पु० १ साठा. २ खाण. ३ एकादी वस्तु वैपुल्यानें जेथें असते किं० आढळते तें ठिकाण; रत्नाकर म्ह० समुद्र (त्यांत विपुल रत्नें असतात म्हणून). ✽**आकरग्रंथ** पु० खूब मोठा ग्रंथ. **आकरज्ञान** न० खाणींची माहिती.

आकरसणें [सं० आ + कृष् (ओढणें)] अ० क्रि० अखूड होणें; आकुंचित होणें.

आंकरी [सं० अंकुर] स्त्री० झाडाचीं कोंवळी फांदी.

आकर्ण [सं० आ (पर्यंत) + कर्ण (कान)]

क्रि० वि० कानापर्यंत. उ० त्यानें आकर्ण दोरी ओढून बाण सोडला. ॐआकर्णनेत्र वि० ज्याचे डोळे कानापर्यंत आहेत तो म्ह० विशाल नेत्रांचा. आकर्णवरी क्रि० वि० कानापर्यंत. [ऐकणें.

आकर्णणें [सं० आकर्णन=ऐकणें] स० क्रि०

आकर्णन [सं० आकर्णन=ऐकणें] न० ऐकणें.

आकर्णित [सं०'आकर्णन' पहा] वि० ऐकलेलें.

आकर्षक [सं०आ+कृष (ओढणें)] वि०१ ओढणारा. २ मोहक, चित्तवेधक.

आकर्षण [सं० 'आकर्षक' पहा] न० १ ओढणें, खेंचणें. २ आकुंचित होणें.

आकर्षित [सं० आ+कृष्=ओढणें] वि० ओढलेला; खेचलेला.

आकलणें [सं० आ+कल् (गोळा करणें)] स० क्रि० १ बांधणें, आवळणें. २ समजणें, जाणणें, ग्रहण करणें.

आकलन [सं० 'आकलणें' पहा] न० १ बंधन; बांधणें. २ एकाद्या विषयाचें ज्ञान किं० ग्रहण.

आकलित [सं० 'आकलणें' पहा] वि० १ बांधलेला, जखडलेला. २ जाणलेला. ३ आटोक्यांत आलेला.

आकल्प [सं० आ (पर्यंत) +कल्प (ब्रह्मदेवाचा दिवस)] क्रि० वि० १ ब्रह्मदेवाचा दिवस संपेपर्यंत. त्रेचाळीस कोटी वीस लक्ष वर्षें म्ह० ब्रह्मदेवाचा एक दिवस. २ जगाच्या अंतापर्यंत.

आकस्मिक [सं० 'अकस्मात्' यापासून विशेषण] वि० अवचित घडून आलेलें; पूर्वीची सूचना नसलेलें.

आकळणें [सं० 'आकलन' पहा] स०क्रि० १ बांधणें, आवळणें, जखडणें. २ जाणणें; समजून घेणें; ज्ञानाचा विषय करणें. ३ आटोक्यात ठेवणें, नियंत्रित करणें.

आका,आकाबाई ''अक्का'',''अक्काबाई'' पहा.

आकांत पु० १ गोंधळ, कल्लोळ. २ तीव्र किं० असह्य उपद्रव.

आकार [सं०] पु० १ आकृति, रूपरेषा, अराखडा. २ देखावा, स्वरूप. ३ चेहरा. ४ चेहेऱ्यावरील विकार; अंतर्गत विचारांमुळें चेहेऱ्यावर आलेली मुद्रा. ५ अभिप्राय. ६ **(सांख्य)** ऐक्य; ऐक्यज्ञान. ७ एकाद्या माणसासंबंधानें किं० पदार्थासंबंधानें मनावर झालेला ग्रह. ८ एकाद्या कामाची, खर्चाची, इ० संबंधाची अटकळ, अदमास, किं० सुमार. ९ संभव. १० पद्धति, शैली. ॐ**आकार दाखविणें** देखावा दाखविणें, ढोंग करणें, बहाणा करणें. **आकारास येणें** १ समाप्त होण्याच्या पंथास लागणें. २ पुढच्या स्वरूपाची अटकळ बांधतां येईल अशा स्थितींत येणें. **आकारबंद** पु० जमाखर्चाच्या अजमासाचे आंकडे ज्यांत दाखल केले आहेत असा कागद किं० असें पत्रक. **आकारमान** न० १ आकार; रूपरेषा. २ पदार्थाच्या मोठेंपणाचें परिमाण. **आकारशुद्ध** वि० प्रमाणबद्ध आकार. **आकारशुद्धि** स्त्री० प्रमाणांत अवयव किं० भाग असणें. **आकारगोपन** न० मनांतील विचार बाहेर पडूं न देणें. **आकारजमा** स्त्री० अंदाजीवसूल (याच्या उलट ''वसूली जमा'').

आकारण [सं०] न० आमंत्रण, बोलावणें.

आकारणी [आकार करणें] स्त्री० १ अंदाज. २ गणती, हिशेब.

आकारणें [सं० आकार] स०क्रि० १ बोलावणें. २ हिशेब करणें. ३ हिशेबांत दाखल करणें. ४ अजमास किं० अटकळ करणें.

आकारणें [सं० 'आकार' पासून] अ० क्रि० रंगारूपास येणें; उ० हें घर, हा मांडव, हें चित्र, आतां आकारत चाललें आहे; उ० ह्या मुलाचें अक्षर आतां बरेंच आकारत चाललें आहे.

आकालिक [सं० '' अकाल '' पासून विशेषण] वि०१ अप्रासंगिक; अकालीं किं० भलत्याच वेळीं आलेला, झालेला, केलेला, इ०. २ क्षणिक. ३ निमित्त कालापासून दुसऱ्या दिवशीं त्या वेळेपर्यंत असणारा.

आकाश [सं०] मराठींत न०, संस्कृतांत न०, पु० १ आभाळ. २ पंचमहाभूतांपैकीं एक. २ पोकळ जागा. ३ उघडा प्रदेश, मैदान. ॐ**एकाद्याला आकाशपाताळ एक होणें** तो गर्वानें फुगून जाणें. **आकाशपाताळ एक होणें** अति जोराचा पाऊस पडत असणें. **आकाशपाताळ एक करणें** १ क्षोभ किं० कल्लोळ करणें; मोठमोठ्यानें ओरडून एकाद्याला रागें भरणें. २ भुकेनें व्याकूळ होऊन अतोनात रडणें (मुलांसंबंधानें). **आकाशाला घेरा घालणें** प्रचंड पराक्रम किं० आवाडव्य काम करणें; अशक्य म्हणून समजलेलें काम अंगावर घेऊन तें पार

पाहणें. **आकाशाला** किं० **आभाळाला गवसणी घालणें** अशक्य गोष्ट किं० आपल्या शक्तीच्या बाहेरची गोष्ट करावयाला सजणें. **आकाशाची चौघडी करणें** फार मोठें आणि जिकीरीचें काम करणें. **एकाद्याला आकाश** किं० **आसमान ठेंगणें होणें** तो गर्वानें फुगून जाणें. **आकाश फाटलें त्याला ठिगळ कोण मारूं शकेल** ? ईश्वरी क्षोभाचें निवारण कोणाल्याही करवत नाहीं. **आकाशकक्षा** स्त्री० क्षितिज. **आकाशगंगा, आकाशनदी** स्त्री० १ स्वर्गांतील गंगा. २ आकाशांतील ताऱ्यांचा पट्टा,—ज्यांत असंख्य तारे जवळ जवळ असून नदीच्या प्रवाहासारखा देखावा दिसतो तो. **आकाशाची धाड** किं० **कुऱ्हाड** स्त्री० दैवी आपत्ति. **आकाशदिवा, आकाशदीप** पु० १ आश्विनी पौर्णिमेपासून कार्तिकी पौर्णिमेपर्यंत उंच काठीला किं० झाडाला जो दिवा अडकावतात तो. २ अंधेरांत चालणाऱ्या जमीनीवरच्या प्रवाशांना किं० समुद्रांतील गलबतांना वाट दाखविण्यासाठीं उंचावर लोंबत सोडलेला दिवा. **आकाशनगर, गंधर्वनगर** न० आकाशांतील (कल्पित) नगर, गंधर्वांचें नगर. **आकाशपाणी** न० ताडी, माडी, इ० मादक द्रव्यें,—जीं ताड, माड, वगैरे उंच झाडापासून, काढतात. **आकाशभाषण** न० किं० **आकाशवाणी** स्त्री० नाटकांत रंगभूमीवर न दिसणाऱ्या पात्रांच्या तोंडीं घातलेले शब्द. **आकाशमंडप** पु० आकाशरूपी मांडव. **आकाशमुनि** पु० उंट (विनोदांत). **आकाशयान** न० विमान.

आकांक्षणीय, आकांक्ष्य वि० [सं० आ+कांक्ष् (इच्छिणें)] वि० इष्ट; अपेक्ष्य.

आकांक्षा [सं० आ+कांक्ष् (इच्छिणें)] स्त्री० १ इच्छा. २ अपेक्षा. ३ तपास, शोध. ४ मागणी. ५ (व्या०) अर्थाकरतां बाहेरच्या शब्दाची जरूरी. ६ जरूरी, उणीव (इष्ट कार्यांत). ७ शंका. ॐ**आकांक्षापूरण** न० १ (व्या०) वाक्यांत ज्याची जरूरी आहे असा शब्द योग्य स्थळीं घालणें. २ जरूरीच्या वस्तु मिळाविणें किंवा मिळवून देणें.

आकांक्षित [सं० 'आकांक्षा' पहा] वि० १ इच्छिलेलें. २ जरूर असलेलें.

आकीर्ण [सं०] आ (इतस्ततः)+कीर्ण (पसरलेलें; कॄ=पसरणें) वि० १ गजबजलेलें. २ माणसांनीं किं० पदार्थांनीं गच्च भरलेलें. उ० आकाश मेघांनीं आकीर्ण होतें.

आकुंचन [सं० आ+कुंच् (वाकणें, मरडणें)] न० १ संकोचणें; अवटणें; थोडक्या जागेला व्यापणारा होणें किं० करणें. २ वाकणें. ३ मुरगळणें, पिळणें. ४ जमा करणें. ५ संक्षिप्त करणें. ६ सैन्याच्या हालचालींचा एक प्रकार.

आकुंचित [सं० 'आकुंचन' पहा] वि० १ अवटलेला. २ वाकलेला, पिळलेला. ३ संक्षिप्त केलेला. ४ निवळ. ५ गोळा केलेला.

आकुल [सं०] वि० १ पूर्ण, व्याप्त. २ विकल. ३ गोंधळलेला. ४ क्षुब्ध. ५ गुंतलेले (केश, दोरा, इ०).

आकुलित [सं०] वि० 'आकुल' पहा.

आकूत [सं० आ+कू (ओरडणें)] न० १ हेतु, अभिप्राय. २ मनोविकार. ३ इच्छा.

आकृति [सं० आ+कृ (करणें)] स्त्री० १ आकार, रूप. २ चेहेरा.

आकृष्ट [सं० आ+कृष् (ओढणें, खेचणें)] वि० १ ओढलेला, खेचलेला. २ एकाद्या विषयाकडे ज्याचें मन वेधलें आहे असा.

आंकोल न० सोललेली चिंच.

आक्रंदणें [सं० आ+क्रंद् (रडणें, ओरडणें)] अ० क्रि० १ रडणें. २ ओरडणें, आरडणें. ३ आरडा ओरडा करणें.

आक्रंदन [सं० 'आक्रंदणें' पहा] न० १ मोठ्यानें ओरडणें. २ विलाप करणें.

आक्रम [सं० आ+क्रम् (चालणें)] पु० १ जवळ जाणें किं० येणें. २ हल्ला. ३ धरणें, पकडणें, कबज्यांत घेणें. ४ मिळविणें. ५ चढाई करणें, वरचढ होणें. ६ वर जाणें, चढणें. ७ व्यापणें. ॐ**आक्रमशक्ति** स्त्री० आवांका, सामर्थ्य.

आक्रमण न० 'आक्रम' पहा.

आक्रमणें [सं० 'आक्रम' पहा] स० क्रि० १ ओलांडणें. २ हल्ला करून घेणें.

आक्रसणें [सं० आ+कृष् (खेचणें)] अ० क्रि० अखूड होणें; आटणें (कापड इ०).

आक्रांत [सं० आ+क्रांत (ओलांडलेला; क्रम्=चालणें)] वि० १ ओलांडलेला. २ तुडविलेला. ३ कबज्यांत घेतलेला. ४ जिंकिलेला ५

व्याप्त. ६ व्याकुल किं० विव्हल झालेला; उ० मोहाक्रांत, लोभाक्रांत, चिंताक्रांत, इ०. ꠰꠰पादाक्रांत वि० जिंकून घेतलेला. [रडणें; विलाप.

आक्रांत [सं० आ+क्रंद् (रडणें)] पु०

आक्रांतणें [सं० आ+क्रम् (चालणें)] अ० क्रि० व्याकुल होणें; उ० तें मूल भुकेनें आक्रांतलें आहे.

आक्रोश [सं० आ+क्रुश् (ओरडणें)] पु० १ मोठमोठ्यानें रडणें, ओरडणें, हाका मारणें. २ ओरडून कल्कलाट करणें.

आक्रसाबोकशीं क्रि० वि० मोठमोठे आणि लांबलचक सूर काढून रडणें किं० विलाप करणें.

आंख [सं० अंक] पु० अंक, अंकडा.

आंख [सं० आक्षि=डोळा] पु० डोळा आणि कान यांचे मधील प्रदेश किंवा अंतर; कानशील.

आंख [सं० अक्ष=गाडीचा कणा] पु० गाडीचीं दोन चाकें ज्या लोखंडी पहारे भोंवतीं फिरतात ती; चाकाचा कणा.

आंखटणें, आंखुटणें अ० क्रि० खिळ्याला, लाकडाच्या धसाला, किं० दुसऱ्या कोणत्याही अणीदार पदार्थाला चिरगूट अडकून फाटणें.

आखडणें [म० अखूड होणें] अ० क्रि० १ अखूड होणें, अक्रसणें. २ कमी होणें. ३ बंद पडणें. स० क्रि० १ अखूड करणें. २ आवरणें. ३ समाप्तीच्या पंथास आणणें. ꠰꠰**आखडतां हात** हातीं घेतलेलें काम बंद करणें, किं० कमी जोरानें, किं० कमी नेटानें चालविणें. **आखडत्या हातानें** कमी औदार्यानें; कमी जोरानें किं० उत्साहानें; कमी प्रमाणांत. **आखडतां हात घेणें** कमी करणें किं० कमी प्रमाणांत करणें. **हात आखडता घेणें** अर्थ वरच्याच सारखा.

आखंडल [सं०] पु० इंद्र.

आंखणी, आंखणें ' अ ' मध्यें पहा.

आखंदुळणें [सं० आंदोलन] स० क्रि० चुलीवर भांड्यांत शिजत लावलेल्या पदार्थाच्या सर्व भागांत सारखी उष्णता मिळावी म्हणून तें भांडें चुलीवरून उचलून दोन्ही हातांत घेऊन त्या भांड्याला हासडे देणें.

आखर पु० ' अखर ' पहा.

आंखरी [सं० अक्ष] स्त्री० ' अखरी ' पहा.

आंखा पु० नारळ वगैरे भरावयासाठीं सुंभाच्या दोरीचें जें जाळें करतात तें.

आखाड [सं० आषाढ] पु० चैत्र, वैशाख, इ० जे हिंदूंचे बारा महिने त्यांतील चवथा; ज्येष्ठाच्या पुढचा आणि श्रावणाच्या मागचा महिना.꠰꠰—**—झड** स्त्री० आषाढ महिन्यांत पडणाऱ्या पावसाच्या पुष्कळ वेळ टिकणाऱ्या ज्या सरी त्यांतील प्रत्येक. **—पागोळी** स्त्री० घराच्या छपराच्या कौलांवरून पावसाचें पाणी जें खालीं पडतें त्याच्या धारांना पागोळ्या म्हणतात. आषाढ महिन्यांतील ज्या पागोळ्या त्या आषा (—खा—)ढ पागोळ्या. ह्या पागोळ्या लग्नाच्या प्रथमवर्षी वधूनें पाहूं नयेत, पाहिल्या तर तें सासूला अनिष्ट होतें अशी समजूत आहे. **आखाडपाटी** स्त्री० लग्नाच्या पहिल्या वर्षी जांवई आणि त्याचा बाप ह्यांना पाटांत घालून पाठविलेला नजराणा, —खाऊ, खेळणी, धोतरजोडे, पागोटीं. इ०. **आखाडभूति, आषाडभूति** पु० १ प्राचीन काळचा ह्या नांवाचा एक लफंगा माणूस. २ लफंगेगिरी. ३ खोटा सोंवळेपणा. **आखाडसासरा** पु० नसता अधिकार किं० आधव्याचा अधिकार गाजवूं पाहाणारा पुरुष; अशा स्वाभावाच्या स्त्रीस **आखाडसासू** म्हणतात. आमचे " मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० " हें पुस्तक पहा.

आखाडा पु० १ कुस्तीची जागा. २ कांहीं विशिष्ट कार्यासाठीं एके ठिकाणीं जमणारी मंडळी, किं० त्याचें एकत्र जमावयाचें ठिकाण. ३ चव्हाटा, अड्डा. ꠰꠰**आखाड्यांत उतरणें** वादाला सिद्ध होणें.

आखाडी [सं० आषाढ] वि० आषाढाच्या महिन्यांतील; आषाढाच्या महिन्यासंबंधाचा. स्त्री० १ आषाढ महिन्यांतील पौर्णिमा. २ आषाढांतील जोराच्या पावसाच्या सरींपैकीं प्रत्येक.

आखाडी स्त्री० १ कमीपणा. २ तुटवडा. उ० यंदा आमच्या विहिरींत वैशाखांतच आखाडी पडली.

आखात [सं० खन्=खोदणें] न० उपसागर.

आखान [सं० खन्=खोदणें] पु० खणण्याचें हत्यार; कुदळ.

आंखी स्त्री० झाडावरचे आंबे वगैरे तोडावयासाठीं टोकाला जाळें असलेली लांब काठी.

आखु [सं०] पु० उंदीर. ꠰꠰**—कर्णी, —पर्णी** स्त्री० एक वनस्पति,—जिचें पान उंदराच्या काना-

सारखें असतें. –पत्र,–रथ पु० गणपति, –ज्याचें वाहन उंदीर असतो. –भुज पु० मांजर.

आखुडणें [म० अखूड होणें] अ० क्रि० अखूड होणें. २ (पाऊस) थांबणें.

अखुडवण [म० अखूड] न० पाय रहाटाची माळ लांब झाली असतां तिचा कांहीं भाग दुमडून बांधून ठेवण्याची लहानशी दोरी.

आखुडवत [म० अखूड+ सं० पत्र] न० केळ, चवई, इ०ना कोंभ्याचें अगोदर जें लहानसें पान येतें तें. [हून कमी लांब.

आखूड वि० तोकडा; विवक्षित किं०इष्ट लांबी-

आखें [हिं० आखा] न०१ कंठाळ, पखाल, पडशी, गोणी, इ०चें एक अर्धुक. २ तेल, तूप, इ० भरावयाचा किं० साठवावयाचा कातड्याचा बुधला.

आखेट [सं०] पु० १ शिकार. २ भीति.

आखेटक [सं०] पु० पारधी. न० शिकार.

आखेटिक[सं०]पु०१ पारधी. २ शिकारी कुत्रा.

आखेर, आखेरी अ मध्यें पहा.

आखोट [सं०] पु० अक्रोड.

आख्या [सं० आ+ख्या (सांगणें)] स्त्री० १ प्रसिद्धि (चांगली किं० वाईट); चांगला (किं० वाईट) लौकिक. २ बाजारगप्पा; विशेष विश्वसनीय नव्हे अशी बातमी. ३ नांव; टोपणनांव.

आख्यात [सं० आ+ख्यात (सांगितलेलें, वर्णिलेलें)] वि० १ चारचौघांच्या तोंडीं असलेलें. २ सांगितलेलें. न० १ क्रियापद. २ मंतरलेल्या दुंदुभीच्या ध्वनीवरून मुहूर्त सांगणें.

आख्याति [सं०आ+ख्या (सांगणें)] स्त्री० १ सांगणें. २ कीर्ति. ३ नांव.

आख्यान [सं०आ+ख्या (सांगणें) न०] १ सांगणें. २ जुन्या किं० प्राचीन वृत्तान्ताचें निवेदन. ३ गोष्ट, दंतकथा. ४ भारतादि इतिहास. ५ चरित्र.

आख्यायिका [सं०आ+ख्या (सांगणें) स्त्री० १ गोष्ट, कथा. २ गोष्टी सांगणारा गद्यग्रंथ. ३ गद्यग्रंथांत सांगितलेली गोष्ट.

आग [सं०आगस्=अपराध] न० अपराध.

आंग [सं० अंग] न० अंग पहा. ॐ**आंगलट** स्त्री० अंगाचा बांधा किं० गालांची ठेवण.

आग [सं०अग्नि=विस्तव] स्त्री० १ विस्तव. २ विस्तवाचा भडका. ३ दाह. ४ तळखपणा, तापटपणा, तडफदारपणा. ॐ**एकाद्यावर आग पाखडणें** १ त्याच्यावर शिव्यांचा वर्षाव करणें. २ त्याला कठोरपणानें रागें भरणें. ३ त्याची निंदा करणें. **आग लावणें** कलागत उपस्थित करणें. **आग रिघणें** पतीच्या प्रेतावरोबर त्याच्या स्त्रीनें स्वताला जाळून घेणें. **एकाद्या पदार्थाला आग लागणें** तो फार महाग किं० दुर्मिळ होणें. **एकाद्या वस्तूची आग वरसणें** ती वस्तु अति प्रमाणांत होणें; त्या वस्तूचें वैपुल्य अतिरेकास पोंचणें; उ० पावसाची आग वरसली ! **आगींत उडी टाकणें** किं० **घेणें** मूर्खपणाचें धाडसी कृत्य करणें. **आगींत तेल ओतणें** एकाद्याचा क्रोध वाढेल असें कृत्य करणें किं० शब्द बोलणें. **आगीवांचून धूर निघत नाहीं** मूळांत कांहीं पाप किं० अपराध असल्याशिवाय बोभाटा होत नाहीं. **कोणी आग व्हावें, कोणी पाणी व्हावें** समाजांत कोणी कजाग माणसें असलीं पाहिजेत आणि कोणी भांडणें विझविणारीं माणसें असलीं पाहिजेत (म्हणजे गंमत होते). **आगीवांचून कढ नाहीं आणि मायेवांचून रड नाहीं** उष्णतेशिवाय पाण्याला कढ येत नाहीं आणि खऱ्या प्रेमावांचून मनुष्याला रडें येत नाहीं. **आगजाळ्या** वि० तळख, तापट, कजाग, किं० खोडकर माणूस किं० कृत्य. **आगधाड** स्त्री० १ अगीचा अनर्थ. २ जुलमी राजा. ३ उपद्रवकारक मूल. ४ छळणारा माणूस. **आगपाणी** न० १ नैट्रिक आसीड. २ मद्य, दारू. **आगबोट** स्त्री० वाफेच्या शक्तीनें चालणारें गलवत. **आगलाव्या** पु० भांडणें चेतविणारा.

आगटी, आगटें स्त्री० न० १ शेकावयासाठीं पेटविलेलीं लाकडें, कोळसे, गवत, इ०. २ शेकावयाची शेगडी. ३ सोनाराची शेगडी. ॐ**सोनाराचें पाहाणें आगटींत** सोनार सोन्याचे कण शोधावयासाठीं आगटींत सूक्ष्म नजर टाकीत असतो; लाभासाठीं मनुष्य लोकांना क्षुलक वाटणाऱ्या गोष्टींकडे लक्ष्य पुरवीत असतो. **आगटी पेटविणें** कलागत चेतविणें.

आंगठा, आंगठीं, आंगठेदाम इ० 'अ' मध्यें पहा.

आगत [सं० आगत=आलेला; आ+गम् (जाणें)] वि० आलेला; येऊन पोंचलेला. ॐ**आगतस्वागत** न० आलेल्या पाहुण्याचे स्वागत करणें; आपल्याकडे आलेल्या माणसाचा सत्कार करणें.

आगंतुक [**सं०** आगंतुक=पाहुणा] **वि०** १ आलेला. २ वाट चुकलेला. ३ बाहेरचा. ४ आकस्मिक, यदृच्छागत. **पु०** १ पाहुणा. २ अगांतुक. ३ ग्रंथांत घुसडून दिलेला पाठ. ॐ**आगंतुक लाभ पु०** १ अनपेक्षित किं० अटकळींत नसलेला फायदा. २ ठराविक मिळकतीच्या व्यतिरिक्त मिळकत. **आगंतुक व्रण पु०** केवळ त्वचेवर झालेला फोड.

आगप क्रि० वि० १ आगाऊ, ठरलेल्या समयाच्या अगोदरचा. २ हळवें धान्य इ०.

आगम [**सं०** आ+गम् (जाणें)] **पु०** १ येणें. २ प्राप्ति, लाभ, मिळणें. ३ उत्पत्ति. ४ प्रवाह. ५ दस्तऐवज. ६ उत्पन्न, मिळकत. ७ विद्या. ८ तात्त्विक ज्ञान. ९ शास्त्र. १० वेद. ११ मार्ग, येण्याचा रस्ता. १२ नदीचें मुख. १३ फळ, परिणाम. १४ प्रारंभ. १५ (व्या०) शब्दांत नवीन येणारा वर्ण. ॐ**आगमनिर्गम पु०** १ येणें आणि जाणें. २ प्रारंभ आणि समाप्ति. ३ सर्व किं० समग्र काम किं० व्यवहार. **आगमरहित** ज्याला दस्तऐवज किं० हक्क स्थापित करणारा लेख नाहीं असा. **आगमसंपादक पु०** एकाद्या जमीनीचा किं० घराचा हक्क प्रथम ज्याणें संपादिला तो. **आगमसापेक्ष वि०** हक्क स्थापित करणारा दस्तऐवज जिच्या संबंधानें नाहीं अशी (जमीन, वाडी, इ०). **आगमानिरपेक्ष वि०** जी जमीन शंभर वर्षे कबज्यांत असल्याकारणानें जिच्यावर हक्क शाबीत करण्यासाठीं कोणत्याही प्रकारच्या दस्तऐवजाची, खरेदी पत्रकाची, दानपत्राची जरूरी नाहीं अशी (जमीन इ०).

आगमन [**सं०** आ+गम् (जाणें)] **न०** येणें. 'आगम' पहा.

आगमाग पु० पत्ता; एकाद्या माणसाचा किं० पदार्थाचा तपास किं० शोध.

आगर [**सं०** आकर=साठा, समूह] **न०** १ नारळ, पोफळ, केळ, इ० पदार्थ उत्पन्न होण्याचें किं० मीठ पिकविण्याचें जें क्षेत्र तें. २ स्थान; जो पदार्थ ज्या ठिकाणीं वैपुल्यानें आढळतो किं० उत्पन्न होतो, त्या पदार्थाचें तें ठिकाण हें आगर. ३ एकाद्या कलेंत किं० विद्येंत निष्णात जो मनुष्य तो तिचें आगर; उ० रामभाऊ हे गाण्याचें आगर आहेत. उ० विश्वंभरशास्त्री वेदान्ताचें आगर आहेत. ४ घराभोंवतालची ल्हानशी लागवड,– मिरच्या, कोथिंबीर, भाजी, इ० ची. ॐ**–गांव न०** नारळी, पोफळी, इ० च्या बागा ज्या गांवात विपुल आहेत असा गांव. **–वाडी स्त्री०** फळ झाडें, भाजीपाला, इ० चा घराभोंवतालचा बाग.

आगर [**सं०** अग्र=टोक] **न०** टोक, शेवट; उ० मिष्टान्नाची गोडी जिव्हेच्या आगरीं (कवितेंत).

आंगर न० १ दुबेळक्याचें लाकूड जें वाटेच्या तोंडाला लाविलेलें असतें, आणि ज्यांतून माणसांना जातां येतें पण गुरांना जातां येत नाहीं. २ दुबेळक्याचीं लाकडें किं० फांद्या कुंपण करावयासाठीं रांगेनें पुरलेल्या असतात त्या प्रत्येक.

आंगरखा [**म०** अंग+राखणें] **पु०** लांबलचक डगला जो हिंदू लोक बाहेर जातांना अंगांत घालतात तो.

आगरी वि० १ आगरा संबंधाचा. २ आगरांत लावलेला, पिकविलेला, किं० उत्पन्न केलेला. ३ आगरांत काम करून पोट भरणारा. **पु०** एक जात.

आगरू न० शरीरांत कांहीं बिघाड झाल्याकारणानें गुदद्वारें जो मांसगोलक बाहेर येतो तो.

आगल, आगली [**सं०** अग्र=टोक] **स्त्री०** नांगर हाकणाऱ्याची बसण्याची जागा. आठ बैलांनीं ओढावयाच्या नांगराच्या पुढच्या दोन जोड्यांच्या आणि मागच्या दोन जोड्यांच्या मध्यें ही बसण्याची जागा असते.

आगला, आगली, आगल्या पु० नांगराला जुंपलेल्या बैलांच्या जोड्यांपैकीं अगदीं पुढची जोडी, किं० ही जोडी हाकणारा जो मनुष्य तो.

आंगवण स्त्री० १ इच्छा. २ शक्ति. ३ छंद. ४ नित्यक्रम. ५ नवस, प्रतिज्ञा (जुन्या कवितेंत).

आगवळ [**सं०** अग्र+वल् (वळणें)] **पु०** वेणी, अंबाडा, इ० घातल्यावर केशांचीं टोकें बांधावयाचा दोरा.

आंगवसा पु० साल, पाला.

आंगवळा पु० संबंध, सहवास.

आगवाडा पु० घराची पुढील बाजू.

आगवीस [**म०** आग+विझणें] **स्त्री०** १ जंगलाला आग लागली असतां प्रत्यक्ष पेटलेल्या प्रदेशाच्या सभोंवतालचीं झाडें झुडपें तोडून आग पसरूं न देतां जागच्याजागीं विझविणें (क्रि०

काढणें). २ पुढें येणारें संकट निवारणें.

आगशी [**म०** आग + शिखा] **स्त्री०** आगीची ज्वाला; आगीचा किं० जाळाचा झोत.

आगस **वि०** अपेक्षित काळाच्या अगोदरचा. **क्रि० वि०** अपेक्षित काळाच्या पूर्वी.

आगसणें **अ० क्रि०** १ अपेक्षित काळाच्या अगोदर येणें, होणें, घडणें, इ०. २ लवकर येणें, होणें, घडणें, इ०. ३ अगोदर पक्व होणें.

आंगसूट **वि०** चपळ; सुटसुटीत अंगाचा.

आगळ [**सं०** अर्गला=अडसर, बांधावयाची दोरी] **स्त्री० पु०** दाराचा अडसर. **पु०** वैदुलांच्या किं० विटीदांडूच्या खेळांत जमीनीवर केलेली खळगी.

आगळा **वि०** अधिक.

आगा **पु०** १ पुढचा किं० दर्शनी भाग. २ आंगरख्याची पेशकळी व लुंटकळी यांच्या मधला भाग. **वि०** थोर.

आगा [**फा०**] **पु०** पंडित, धर्मशास्त्रज्ञ.

आंगागवडी, आंगागाणिक **क्रि० वि०** पृथक्‌पणें; प्रत्येकानें आपआपल्या परीनें किं० रीतीनें.

आगांतुकी [**सं०** आगंतुक=बाहेरचा] **स्त्री०** न बोलावतां येणें.

आगामी [**सं०** आगामिन्=पुढें येणारा] **वि०** पुढें येणारा; भविष्य काळचा.

आगारा **पु०** अंकुर.

आगारी **स्त्री०** १ अंकुर; डिरी. २ लागवड.

आंगावो **पु०** मोठेपणा.

आगाही **पु०** १ खबर. २ दक्षता. ३ माहिती.

आगाळा **पु०** जुडी, कोळें.

आंगिक [**सं०** अंग=शरीर] **वि०** १ शरीरानें किं० गात्रांनीं दाखविलेला किं० व्यक्त केलेला; हावभावांच्या रूपाचा. २ शारीरिक; देहासंबंधाचा.

आगिवळा [**सं०** अग्नि, **म०** आग] **पु०** १ भांडें स्वच्छ करण्यासाठीं किं० त्याचा कलंक काढण्यासाठीं त्याला आंच देणें. २ तुळया वगैरे टणक करण्यासाठीं त्यांना धुरावर धरणें.

आगिवळी **स्त्री०** [आग+वळ] **स्त्री०** अग्नीची ज्वाळा.

आंगी [मराठी] **स्त्री०** १ लहान मुलांचा पायघोळ डगला. २ लांबलचक आणि पोकळ डगला.

आगीदुगी **स्त्री०** दुसऱ्यांच्या चुका, अपराध, मूर्खपणाचे चाळे, इ०ची वाच्यता. उ० मी कोणाची आगीदुगी काढीत नाहीं किं० करीत नाहीं किं० उकरीत नाहीं. ॐ**आगीदुगींत नसणें** दुसऱ्यांच्या कृत्यांवर टीका न करणें; कोणाच्या व्यवहारांत नाक न खुपसणें; कोणाच्या उठाठेवी न करणें.

आगीमण्यार **स्त्री०** एक प्रकारचा विषारी साप. (मण्यारीची एक जात.)

आगीमाशी **स्त्री०** एक प्रकारची दंश करणारी माशी.

आंगूळ [**सं०** अंगुल=बोट, बोटाची रुंदी] **न०** बोटाच्या रुंदीचें माप किं० परिमाण; आठ यव रुंदीच्या दिशेनें एकमेकांस लावून होणारी लांबी.

आगेंमागें [**हिं०** आगे=पुढें; **म०** मागें] **क्रि०** विशिष्ट स्थळाच्या किं० समयाच्या थोडेंसें आलीकडे किं० पलीकडे.

आगेरूं **न०** कांहीं रोगामुळें गुदद्वाराबाहेर पडणारा मांसपिंड.

आंगोगर्डी **क्रि० वि०** पृथक्‌पणें; व्यक्तिशः; प्रत्येकाला वेगळें वेगळें; उ० माझ्या मुलाच्या लग्नांत मीं माझ्या कुळांना आंगोगडी एक एक मुंडासें दिलें.

आंगोघडी **क्रि० वि०** क्षणोक्षणीं; वारंवार; पुनः पुनः.

आगोठ (–ट) **स्त्री०** १ पावसाळ्याच्या सुरवातीचा काळ. २ सबंध पावसाळ्याचा काळ.

आगोतली [**सं०** अग्र] **स्त्री०** केळ, चवई, इ०चा अग्राकडचा तुकडा भोजनार्थ घेतात तो.

आंगोपती [**सं०** अंग प्रति=प्रत्येकानें पृथक्] **क्रि० वि०** पृथक्‌पणें; ज्याणें त्याणें आपआपल्या विचारानें आणि स्वतंत्रपणें; (इतरांची संमति न घेतां); उ० ते चौघे भाऊ आंगोपती संसार करूं लागले म्हणून तें घर बुडालें.

आगोस **स्त्री०** उष्ण काळाचा प्रारंभ; कोरडा ऋतु.

आंगोस्ती **स्त्री०** शहारे, शिरशिरी. 'अंगुस्ती' पहा.

आगोळ **पु०** १ केशांचीं टोकें बांधावयाचा दोरा. **न०** रातांब्यांचा गर जो आमसुलें तयार करण्यासाठीं पिळून काढतात तो.

आंगोळी [**सं०** अंगुलि] **स्त्री०** हाताचें किं० पायाचें बोट.

आग्नेय [**सं०** अग्नि] **वि०** अग्नीसंबंधाचा.

आग्नेय, **आग्नेयी** [**सं०** आग्नि] **स्त्री०** दक्षिण आणि पूर्व यांच्या मधली दिशा.

आग्या [**सं०** अग्नि, **म०** आग] **पु०** एक वनस्पतिविशेष, जिचा स्पर्श अंगाला झाला असतां अंगाची आग होते. **वि०** १ दंशानें किं० स्पर्शानें अंगाची आग करणारा; साप, माशी, वनस्पति, इ०. २ जहाल, तापट, तल्लख (मनुष्य). ❀**आग्याघणस**, **आग्याघोणस** **पु०** ज्यानें दंश केला असतां अंगाची आग होते असा घोणस. **–देवी** **स्त्री०** **अ० व०** अंगाची अतोनात आग करणाऱ्या देवी. **–वेताळ** **पु०** १ आग लावणारा पिशाचांचा राजा. २ अति तापट माणूस.

आग्रह [**सं०** आ+ग्रह् (धरणें, पकडणें, घेणें)] **पु०** १ हट्ट, चिकाटी, हेका. २ अतिप्रार्थना. ३ निश्चय. ४ आवेश.

आग्रहायण **पु०** मार्गशीर्ष. **आग्रहायणी** **स्त्री०** मार्गशीर्ष पौर्णिमा.

आग्रही [**सं०** " आग्रह " पहा] **वि०** हट्टी; हेकेखोर, नेट धरणारा, चिकाटी धरणारा.

आघवा **वि०** १ अवघा, सगळा, सर्व. २ प्रत्येक.

आघळ [**सं०** अर्गला] **पु०**, **स्त्री०** दाराचा किं० खिडकीचा अडसर.

आघाडा **पु०** वनस्पतिविशेष.

आघाडी [**सं०** अग्र] **स्त्री०** १ पुढचा भाग. २ प्रथमपणाचें श्रेय; पहिलेपणाचा मान. ३ घोड्याचे पुढचे पाय बांधावयाची किं० गळ्याला बांधावयाची दोरी. ❀**–साधणें** इतरांच्या अगोदर कार्य करणें; इतरांच्या पूर्वी साध्य गांठणें. **–मारणें** शत्रूच्या आघाडीवर हल्ला करणें. **–पिछाडी** **स्त्री०** १ पुढचा भाग आणि मागचा भाग. २ घोड्याच्या गळ्याला बांधावयाची दोरी आणि मागच्या पायांना बांधावयाची दोरी.

आघात [**सं०** आ+हन् (मारणें)] **पु०** १ धक्का, तडाखा, प्रहार. २ जखम. ३ वध. ४ वधस्थान. ५ संकट. ६ मूत्ररोग.

आघार [**सं०**] **पु०** १ शिंपडणें. २ होमाग्नीवर तूप घालणें.

आघारी [**सं०** आघार+**म०** ई (प्रत्यय)] **स्त्री०** १ शूद्रलोक श्राद्धदिवशीं पितरांसाठीं जो तुपाचा होम करतात तो. २ कावळ्यांना खावयासाठीं जो भाताचा घास उवड्यावर किं० अग्नींत टाकतात तो (शूद्रांचा हा विधि आहे).

आघाळणें, **आघळणें** **स०** **क्रि०** १ चिरगुट धुऊन पाण्यांत खळबळणें. २ चिरगुट धुण्यासाठीं पाण्यांत खळबळणें.

[दुधी ' पहा.

आघिवळा, **आघीदुधी** ' आगिवळा, " आगी-

आंघोळ **स्त्री०** स्नान (करणें).

आर्घ्यें **न०** मधमाशांचें पोवळें.

आघ्राण [**सं०** आ+घ्रा (हुंगणें)] **न०** हुंगणें.

आघ्रात [**सं०** आ+घ्रात (हुंगलेलें; घ्रा=हुंगणें)] **वि०** हुंगलेलें; ज्याचा वास घेतला आहे असें (फूल इ०).

आंच **स्त्री०** १ विस्तवाचा शेक. २ विस्तवाच्या झळया. ३ शिजणाऱ्या पदार्थाला दिलेली किं० लाविलेली उष्णता. ४ भाजावयासाठीं खाद्याला दिलेली कोरडी उष्णता. ५ धातूंना दिलेली उष्णता. ६ औषधी द्रव्यें इ० तयार करतांना लाविलेली उष्णता (कोरडी किं० ओली). ७ काळजी, चिंता. ८ आपल्या हातून कांहीं कामांत कांहीं प्रमाद घडूं नये म्हणून चित्तांत असलेली काळजी; धंवशा. ९ एकाद्या व्यवहारांत बसलेला चट्टा किं० ठोकर. ❀**एकाद्याच्या आचींत असणें** त्याच्या बद्दल मनांत भीति किं० दहशत वाटत असणें.

आंचकणें **स०** **क्रि०** १–ला जोराचा हासडा किं० हिसका देणें. २ एकाद्याला बेमालूम रीतीनें लुबाडणें.

आंचका **पु०** जोराचा हासडा किं० हिसका.

आचंगणें, **आचांगणें** **अ०** **क्रि०** १ अपकर्षाच्या स्थितीस येणें. २ अशक्त, कमजोर, किं० निरुत्साह होणें.

आंचणी **स्त्री०** १ पदार्थाला दिलेली किं० लाविलेली उष्णता किं० आंच. २ काळजी, विवंचना. ३ ज्या कुटुंबांत कांहीं मंगल कार्य व्हावयाचें आहे त्या कुटुंबांतील स्त्रियांस देतात जी नारळ, हळदकुंकूं, वगैरेंची भेट किं० देणगी ती.

आचंद्रार्क [**सं०** चंद्र आणि सूर्य असत तोंपर्यंत] **क्रि०** **वि०** चंद्र सूर्य जगांत आहेत तोंपर्यंत; अनंत काळापर्यंत.

आचंबणें **अ०** **क्रि०** आचंबा पावणें, आश्चर्यचकित होणें.

आचमन [**सं०** आ+चम् (पाणी तोंडांत टाकणें)] **न०** तळहातावरून संध्येच्या पळांतील पाणी पिणें.

आचमनीय [**सं०** आचमन+ईय (प्रत्यय)] **न०** आचमनार्थ घ्यावयाचें किं० घेतलेलें पाणी.

आचरण [**सं०** आ+चर्=चालणें] **न०** १ वर्तन, वागणूक. २ व्रत, नियम, इ० यथाविधि पाळणें.

आचरणीय [**सं०** आ+चर् (चालणें)+ईय (प्रत्यय)] **वि०** १ आचरण्यास योग्य. २ कांहीं व्रत, नियम, इ० करावयाला विहित किं० उक्त, किं० संकल्पिलेला.

आचरणें [[**सं०** आ+चर् (चालणें)] **स० क्रि०** १ कांहीं व्रत, नियम इ० करणें किं० पाळणें. २ एकाद्या विशिष्ट कार्यासाठीं एकादा विशिष्ट मार्ग अवलंबिणें किं०स्वीकारणें. **अ० क्रि०** वागणें, वर्तन करणें.

आचरित [**सं०** आ+चर् (चालणें)] **वि०** १ पाळलेलें किं० केलेलें (व्रत इ०). २ अवलंबिलेली (वर्तनसरणी). ३ पाळलेली (चाल रीति, पंथ, संस्कार, इ०). उ० हा अविद्वान् जनांनीं आचरित मार्ग होय. **न०** वर्तन, वागणूक.

आंचवण [**सं०** आ+चम् (थोडें पाणी घेणें किं० पिणें)] **न०** १ आंचवण्यासाठीं घेतलेलें पाणी. २ आंचवण्याची क्रिया. ❀**पंच पक्वान्नांचें जेवण आणि गोमूत्राचें आंचवण** चैनीचें किं० विलासाचें सुख नाहींसें करणारी समाप्ति.

आंचवणें [**सं०** आ+चम् (थोडें पाणी पिणें)] **अ० क्रि०** १ भोजनानंतर किं० कांहीं पदार्थ खाल्ल्यानंतर हात, तोंड, इ० पाण्यानें धुऊन टाकणें. २ गमावून घेणें; **उ०** मी काल आजारी पडलों म्हणून तुमच्या जलशाला आंचवलों.

आंचळ [**सं०** अंचल=वस्त्रादिकांचा पदर] **पु०** १ गाय, म्हैस, इ० चा स्तन. २ वस्त्राचा शेवट किं० पदर.

आंचळी [**सं०** अंचल=वस्त्रादिकांचा शेवट] **स्त्री०** वस्त्राच्या शेवटास न विणतां जीं ताण्याचीं म्हणजे लांबीचीं सुतं मोकळीं सोडलेलीं असतात तीं.

आचार [**सं०** आ+चर्=चालणें] **पु०** १ वर्तन. २ सद्वर्तन, शिष्टाचार. ३ चाल रीत. ४ वर्तनाचा नियम. ५ श्रुतिस्मृतींना अनुसरून जो वर्तनक्रम तो. ❀**–पूत, –संपन्न, –शुद्ध, –वान्** **वि०** श्रुतिस्मृतींना किं० शिष्ट पद्धतीला अनुसरून ज्याचें वर्तन आहे असा. **–प्रसिद्ध** **वि०** रूढ सरणीला अनुसरून असलेला. **–भ्रष्ट, –वर्जित, –हीन** **वि०** शिष्टाचाराचें उल्लंघन करणारा; श्रुतिस्मृतींनीं उक्त आचरण न करणारा. **आचारभ्रष्टी सदाकष्टी** आचार न पाळणारा जो मनुष्य तो नेहमी कष्ट भोगतो. **–विचार** **पु०** सदाचार आणि सद्विचार. **–अनुगत** **वि०** धार्मिक आणि रूढ मार्गाला अनुसरून असलेला.

आचारी **पु०** १ दुसऱ्याच्या घरीं स्वयंपाक्याची नोकरी करणारा माणूस. २ मेजवानीचा स्वयंपाक करण्यासाठीं त्या दिवसापुरता ठरविलेला माणूस. आचाऱ्याच्या मदतनीसांना खटपट्ये म्हणतात.

आचार्य [**सं०**] **पु०** १ गुरु. २ उपनयन करून वेद शिकविणारा. ३ एकाद्या विशिष्ट मताचा प्रवर्तक. ४ पंडित (पदवी); उ० शंकराचार्य, मध्वाचार्य, इ०. ५ उपाध्याय. ६ द्रोणाचार्य (कौरवांचा गुरु). ७ शास्त्रकार. ❀**–मिश्र** **वि०** अतिपूज्य.

आंचूळ [**सं०** अंचल] **पु०** गायी, म्हशी, इ० चे स्तन. [माणूस.

आचुंद्रा, आचोंद्रा **वि०** दुखऱ्या डोळ्यांचा

आच्छन्न [**सं०** आ+छन्न (झाकलेला; छद्=झांकणें)] **वि०** १ आच्छादलेला, झाकलेला. २ लपवून ठेवलेला.

आच्छादक [**सं०** आ+छद्=झाकणें] **वि०** १ झाकणारा. २ लपविणारा.

आच्छादन [**सं०** आ+छद्=झाकणें] **न०** १ झांकण; कांहीं पदार्थ झाकावयासाठीं योजलेलें वस्त्र, फळी, म्यान, इ०. २ झाकण्याची किं० लपविण्याची क्रिया. ३ पडदा.

आच्छादित [**सं०** आ+छादित (झाकलेला; छद्=झाकणें)] **वि०** १ आच्छादलेला. २ लपविलेला.

आज [**सं०** अद्य] **क्रि० वि०** १ वर्तमान दिवशीं; चालू दिवशीं. २ हल्लींच्या काळीं. ❀**–उद्यां करणें** लांबणीवर टाकणें. **आजचा दिवस** **पु०** चालू दिवस. **–काळ** **क्रि० वि०** वर्तमान

काळीं; हल्लींच्या काळीं, सांप्रत. **आजतंव** क्रि० वि० चालू दिवसापर्यंत. **आजदिन** क्रि० वि० आजपर्यंत. **आज दिवशीं** क्रि० वि० गेल्या वर्षी ह्याच दिवशीं. **आजलग** क्रि० वि० आजपर्यंत. **आजला** क्रि० वि० १ आजच्या दिवसासाठीं. २ आजच्या दिवसापर्यंत. ३ एव्हांना. **आजवर, आजवेरीं** क्रि० वि० आजपर्यंत. **आजवर्दी, आजवर्षे** क्रि० वि० पुढच्या वर्षाच्या ह्या दिवशीं

आंजणी, आंजरली स्त्री० डोळ्याच्या पोटावर येणारी पुटकुळी.

आजन्म [सं० आ (पासून) + जन्म] क्रि० वि० जन्मापासून. ॐ**आजन्मतः** क्रि० वि० १ जन्मापासून. २ मरे तोंपर्यंत. **आजन्मांत** क्रि० वि० सर्व आयुष्यांत.

आजा [सं० आर्य] पु० आईचा बाप किं० बापाचा बाप; मातामह किं० पितामह. ॐ**आजेगुरू आजागुरू** पु० आपल्या गुरूचा गुरु. **आजेसासरा** पु० पतीचा आजा किं० पत्नीचा आजा. **आजेसासू** स्त्री० पत्नीची आजी किं० पतीची आजी. **आजोबा** पु० १ आईचा किं० बापाचा बाप. २ कोणीही वृद्ध आणि संमान्य पुरुष. **आजादेवी** स्त्री० अशिक्षित लोकांची एक देवी.

आजानु [सं० आ (पर्यंत) + जानु (गुडघा)] क्रि० वि० गुडघ्यापर्यंत. ॐ**—बाहु** वि० गुडघ्यापर्यंत लांब आहेत बाहु ज्याचे असा.

आजार [फा०] पु० रोग; शरीरांत झालेला कांहीं बिघाड; दुखणें. [दुखणाईत.

आजारी [फा० आजार + ई (प्रत्यय)] वि०

आजी [सं० आर्या] स्त्री० १ आईची किं० बापाची आई; मातामही किं० पितामही. ॐ**—बाई** स्त्री० १ आईची किं० बापाची आई. २ कोणीही पोक्त किं० संमान्य स्त्री. **आजेचीर** स्त्री०, **आजेवाण** न० लग्नाच्या समारंभांत वरपक्षाकडून वधूच्या आजीस जें लुगडें वगैरे दिलें जातें तें. **आजोळ** न० आईच्या बापाचें घर. [पुटकुळी.

आंजिणी स्त्री० डोळयाच्या पोटावर झालेली

आजि [सं०] पु०, स्त्री० लढाई.

आजीव [सं०] पु० १ जगणें. २ पोटाचा धंदा.

आजीवक [सं०] पु० भिक्षेकरी.

आजुरदा [फा० आजुर् दाह्] वि० १ निष्काळजी; बेपर्वा. २ दुःखी, कष्टी.

आजूबाजू, आजूबाजूस क्रि० वि० इकडे तिकडे; सभोंवतीं.

आज्य [सं०] न० तूप, घृत. [४ हरकत.

आट स्त्री० १ हट्ट. २ संताप, त्रास. ३ नाश.

आट स्त्री० पु० हातमागावर विणतांना आडवीं सुतें ठासून बसविण्यासाठीं केलेलें साधन. स्त्री० घारगे मृदु व्हावे म्हणून कण्या उकडून त्यांत पीठ घालून तयार करतात जें पीठ तें.

आटंका, आटांका पु० १ आटोका; कार्यक्षेत्र; कोणतेंही कार्य करण्याला लागणाऱ्या सामर्थ्याचा पोच. २ गणती; आजमास; अंदाज.

आटंकाळ [म० आटणें + काळ] पु० धान्य, पाणी, इ० चा दुष्काळ, कमताई, इ०.

आटकें [म० आठ] न० १ पायलीचा आठवा भाग म्ह० अर्धशेर. २ बैदुलांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

आटघाट पु० १ श्रम, त्रास, छळ. २ विनाश.

आटछाट स्त्री० १ हट्ट. २ छांदिष्टपणा. ३ चोखंदळेपणा.

आटपणें, आटोपणें ' अटपणें ' पहा.

आटपाट स्त्री० १ मुलांचा एक खेळ. २ एकाद्याला एकाद्या कामीं गळ घालणें. ३ आग्रह; नेट.

आटरणें अ० क्रि० अखूड होणें, अक्रुसणें, संकुचित होणें.

आटवल पु०, न०, **आटवली** स्त्री०, **आटवलें** न० एक प्रकारचें पातळ खाद्य.

आटवी स्त्री० १ एक वनस्पति. २ अरण्य.

आटा पु० १ छत्री, इरलें, इ० चा सांगाडा. २ पीप, तबला, इ० च्या भोंवतीं बळकटीसाठीं बसविलेली धाव किं० कडें. ३ लहान मुलांचें खेळायाचें कडें,—जें मुलें काठीनें धावडवीत रस्त्यानें धावतांना दिसतात. ४ एकादा पदार्थ आवळून बांधायासाठीं दोरी वगैरेंचा जो वळसा घालतात तो.

आटापाणी न० [हिं आटा (पीठ) + पाणी] न० १ चरितार्थाचें साधन. २ उपजीविका.

आटाळें न० गुरांना पाणी पाजण्याचें विशिष्ट आकाराचें पात्र.

आठ [सं० अष्ट] वि० एक, दोन, तीन, इत्यादि क्रमांकांतील साताच्या पुढची आणि

नवाच्या मागचीं संख्या. &आठफळी स्त्री० "अष्ट-फळी" पहा. **आठघात** पु० गर्भधारणापासून आठव्या महिन्यांत जन्मलेल्या मुलाचा घात होतो. (म्ह० तें मूल मरतें); ह्याच्या पुढचा भाग **सातारें ह्यातारें** म्ह० सातव्या महिन्यांत जन्मलेलें मूल ह्यातारें (होईपर्यंत देखील जगूं शकतें). **आठ नहाण, दशनहाण, सोळनहाण, मासनहाण** न० लग्नानंतर वधूवरांचें एकत्र स्नान, -आठव्या दहाव्या, सोळाव्या दिवशीं आणि महिन्यानें. ह्याच स्नानांना अनुक्रमें आठबंधन, दसबंधन, सोळबंधन आणि मासबंधन अशीं नांवें आहेत. **आठबैली** वि० आठ बैलांनीं ओढावयाचा नांगर, मोट, गाडी, इ०. **आठवर** वि० आठ वर्षांची (आणि लग्नाला योग्य झालेली मुलगी). **आठवेठ** स्त्री० आठ दिवसांतून एक दिवस एका माणसास वेठीला धरावयाचा खोताचा हक्क. **आंठोळा** वि० गर्भधारणापासून आठव्या महिन्यांत जन्मलेलें(मूल).

आठका [सं० अष्ट] वि० १ आठांनीं बनलेला. २ उचलावयाला आठ माणसांची जरूरी ज्याला आहे असा. ३ जो नांगर, मोट, इ० ओढावयाला आठ बैल जरूर आहेत असा. ४ आठ मण्यांची(खेडी).

आठकी [सं० अष्ट] स्त्री० १ आठांचा संच किं० समूह. २ आठ माणसांची टोळी. ३ मुलांच्या खड्यांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

आठरणें अ० क्रि० १ आकुंचित होणें; अक-सणें. २ रागानें धम्म फुगून बसणें.

आंठुरणें, आंठोरणें अ० क्रि० १ आकसणें. २ घट्ट किं० टढस होणें. ३ रागानें धम्म फुगून बसणें.

आड पु० पायऱ्या नसलेली वाटोळी विहीर. &**इकडे आड तिकडे विहीर** उभय पक्षीं पंचाईत. **आडांत नाहीं तर पोहोऱ्यांत कोठून येणार ?** गुरूला विद्या नाहीं तर शिष्याला ती कशी प्राप्त होणार ? **आडांत खारट तर पोहोऱ्यांत गोड कोठून येईल ?** मूळांतच जर दोष तर कार्य निर्दोष कसें होणार ?

आड क्रि० वि०, **श० यो० अ०** १ पलीकडे, पाठीमागें, उलट दिशेनें. उ० ढगाच्या आड सूर्य गेला; गंजीआड चोर लपला होता. २ मध्यें एक टाकून; उ० दिवस आड दिवस म्ह० एक दिवस मध्यें रिकामा सोडून. &**आड येणें** प्रतिबंधक किं० बाधक होणें. **आड करणें** लपविणें; बाजूला टाकणें. **दृष्टीआड सृष्टि** १ जेथें आपली नजर पोंचत नाहीं असा जगाचा फार मोठा प्रदेश आहे. २ आपणाला दिसत नाहीत किं० कळत नाहीत अशा पुष्कळ गोष्टी असतात. ३ जें आपणाला दिसत नाहीं तें कितीही मोठें किं० चांगलें असलें तरी आपणाला काय उपयोग ? **शेताआड चोरी** शेताच्या पांचरुणाखालीं ह्मणजे स्वतःचें शेत आहे अशा सबबीवर केलेली चोरी (लपविणें सोपें असतें). **कानाआड करणें** ऐकलें नाहीं अशी सबब सांगणें. जें कोणी उपदेशिलें तें मनांत न बाळगणें. **वस्त्राआड जन नागवें** १ मनुष्य दिसण्यांत सभ्य दिसला, किं० गोडगोड बोलत असला, तरी त्याच्या पोटांत कपट हें असावयाचेंच ! आपण त्याला फसतां कामा नये. २ प्रत्येक मनुष्याच्या अंगीं कांहीं तरी पाप हें असावयाचेंच ! **आडऊड** क्रि० वि० आडोशानें. **आडकाठी** स्त्री० १ हरकत. २ नियंत्रण. **आडकुशी, आडकुशीस** क्रि०वि० आडवळणास; रहदारीच्या मार्गाला सोडून.

आड स्त्री० १ हट्ट, दुराग्रह. २ गैरसोयीची शर्त.

आडई स्त्री० आडवें अंग करून आणि हातपाय लांब करून निजणें; विश्रांतीसाठीं आडवें होणें.

आडकूड (-ट-) न० आडोशासाठीं घातलेला कूड, भिंत, कुंपण, इ०.

आडकोठा क्रि० वि० कोपऱ्यांत; बिन वहिवाटीच्या किं० बिन रहदारीच्या जागीं (कवितेंत).

आडखिळी [म० आड + खीळ] स्त्री० दाराला लाविलेली आडवी काठी किं० फळी.

आडगळ स्त्री० १ आडवी काठी. २ लहान गांव. २ निरुपयोगी सामान.

आडगात न० १ शरीराची रुंदी किं० घेर. २ बाजेचें पायगताकडचें आडवें लाकूड. ३ हेकट.

आडगुण [म० आड + गुण] पु० कोणा मनुष्याला दुखणें, किं० कोणा गुराला गोचीड, वगैरेचा उपद्रव देणारा भूतपिशाचसंबंध.

आडजात स्त्री० ब्राह्मण, क्षत्रिय, वगैरे चार जातींहून इतर जी तेली, तांबोळी, इ० जात ती. वि० द्वाड माणूस.

आडदांड वि० हेकट आणि द्वाड.

आडदिवस [म० आड + दिवस] पु० १ ज्या

दिवशीं कांहीं विशिष्ट संस्कार, विधि, धर्मकृत्य व्हावयाचें नाहीं तो दिवस. २ गैरसोईचा किं० भलताच दिवस.

आडपडदा पु० १ मध्यें ठेवलेला किं०लाविलेला पडदा. २ छपवणूक; अप्रिय किं० लाजिरवाण्या गोष्टीचा दुरून उल्लेख करणें, किं० तिच्याबद्दल संदिग्ध शब्दांनीं बोलणें; मर्यादा.

आडपाड पु० आडरस्ता. **अ०** पुढें मागें.

आडपाटी स्त्री० खटपट, श्रम.

आडफाटा पु० मूर्खपणाची हरकत.

आडंबर न० खटाटोप.

आडंबा पु० अडसर.

आडमार्ग पु० रहदारीची नव्हे अशी वाट.

आडमुठा(–ठ्या) वि० १ आडदांड, आडाणी, मूर्ख. २ बीजें जमीनींत रुजावयाला घालण्याचा एक प्रकार. [अडचण.

आडमेळें न० अकल्पित उपस्थित झालेली

आडमोरा वि० १ प्रत्यक्ष पुढें नव्हे असा; बाजूस असलेला. २ वाटेंत असलेला आणि हरकत करणारा.

आडमोहरीं क्रि० वि० १ लपून; लपलेल्या स्थितींत. २ कशाच्या तरी आडोशानें.

आडरान न० रस्त्यापासून दूरचा प्रदेश. २ भलताच विषय; विषयांतर.

आडवळण न० १ रहदारीचें नव्हें असें स्थळ किं० प्रदेश. २ एकान्त स्थळ.

आडवाट स्त्री० १ मुख्य किं० रहदारीची नव्हे अशी वाट. २ भलताच मार्ग.

आडवेळ स्त्री० १ अनुचित, अयोग्य, किं० भलतीच वेळ. २ कामाची नव्हे अशी वेळ. फुरसतीची वेळ.

आडसंधि स्त्री० पु०१ शरीराचा नाजूक भाग किं० मर्मस्थान. २ गैरसोयीची वेळ.

आडसर पु०१ दार किं० खिडकी बंद करण्यासाठीं लाविलेली आडवी काठी. २ पूर्ण तयार झाला नाहीं असा नारळ; फार कोंवळा नव्हे आणि फार निबर नव्हे असा नारळ. ३ डोंगराच्या माथ्यावरची धार, किं० लांबलचक उंचवटा. ४ कोष्टयाच्या मागाचा एक विशिष्ट भाग. ५ लठ्ठ, उंच आणि बोजड माणूस. **क्रि० वि०** धट्टपणें, बराच आवळून.

आडसांठा पु०बाजूस ठेविलेली किं०केलेली रास.

आडसाल न०१ एक साल टाकून पुढचें साल. २ एक साल टाकून पुन्हा केलेलें पीक.

आडळ न०१ अडचण. २ एक वृक्ष. ३ स्पर्श.

आडा पु० १ कुंपण. २ पक्षिविशेष.

आडात न०१ दाराच्या फळ्यांना जों आडवीं लांकडें बळकटीसाठीं लावतात तीं प्रत्येक. २ पाटाला खालीं गंजवाल बसवितात ते.

आडांत्रीं क्रि० वि० नाजूक भागीं किं० जागीं.

आडाव न०ओबडधोबड रीतीनें बांधलेली विहीर.

आडिंबा पु० दाराचा किं० खिडकीचा अडसर.

आढाव स्त्री० न० ओबडधोबड रीतीनें खणलेली आणि चांगली न बांधलेली विहीर.

आढी स्त्री० नाठळ गायीम्हशींना मस्ती करतां येऊं नये म्हणून दूध काढण्याच्या वेळीं जें आडवें लाकूड त्यांच्या शेजारीं बांधलेलें असतें तें.

आढ्य [**सं०**] **वि०** संपन्न; उ० धनाढ्य, बलाढ्य, इ०.

आढ्यता [**सं०** आढ्य (संपन्न) +ता (प्रत्यय)] **स्त्री०** गर्व, ताठा, मिजासखोरी. [(करवत).

आढ्या वि० दोन माणसांनीं चालवावयाचा

आण स्त्री० मिठाचें एक परिमाण, हें भिन्न ठिकाणीं भिन्न आहे; (आडीच किं० तीन खंडी).

आण उभयान्वयी अ०आणि (कवितेंत).

आण स्त्री०शपथ. ॐ**आणभाक स्त्री०** शपथेनें दृढ केलेलें वचन. **आणाभाका स्त्री० अ० व०** वरच्याचसारखा अर्थ. **आणशपथ स्त्री०** शपथ.

आणखी, आणाखिन उ० अ० त्या शिवाय; त्या व्यतिरिक्त.

आणणें [**सं०**आ (उलट)+नी(नेणें)]**स०क्रि०** १ घेऊन येणें. २ अंतर्भूत करणें, सामील करणें; उ० करणीचे पैसे हुंड्यांतच आणा. ॐ**थोडक्यांत आणणें** सारांशरूपानें सांगणें. **मनाला आणणें** मनावर घेणें; महत्त्वाचें समजणें. **मनांत आणणें** करावयाचा संकल्प करणें; पथकरणें. **लागवडीस आणणें** शेतीच्या उपयोगाला जमीन येईल असें करणें. **मनावर आणणें** ०कडे लक्ष्य देणें; ०ची हुरहूर लावून घेणें.

टीप–" आणणें " हें क्रियापद ईत प्रत्ययान्त कोणत्याही क्रियापदाशीं जोडलें असतां त्या क्रिया-

पदानें दर्शविलेली क्रिया बहुतेक पूर्ण झाली आहे असा अर्थ होतो; उ० ही भिंत मी बांधीत आणली आहे म्ह० बहुतेक बांधली आहे.

आणने [**म०** आणणें आणि नेणें] **स्त्री०** वारंवार इकडून तिकडे नेणें आणि तिकडून इकडे आणणें

आणा पु० १ रुपयाचा सोळावा भाग. २ जमीनीच्या क्षेत्रफळाचें एक परिमाण; गुंठ्याचा सोळावा भाग; सुमारें साडेसात चौरस यार्डांचें परिमाण.

आणि उ० अ० शिवाय, अधिक.

आणेगा [**म०** आण=शपथ] **स्त्री०** १ एका-घाला शपथ घालून कांहीं कार्य करावयाला किं० न करावयाला भाग पाडणें. २ एकाद्यावर घातलेलें शपथेचें बंधन किं० नियंत्रण (क्रि० आणेगा घालणें इ०).

आत स्त्री० बापाची बहीण.

आंत [**सं०** अंतः] **क्रि० वि०, श० यो० अ०** १ आंतल्या बाजूस; उ० पड्यांत किं० पड-द्याच्या आंत. २ विशिष्ट किं० ठराविक समयाच्या अगोदर; उ० तीन दिवसांत किं० दिवसांच्या आंत माझे पैसे परत दे. ३ त्या जातीच्या इतर गोष्टी, बाबती, इ०च्या बरोबर किं० इ०च्या साहचर्यानें; उ० कामांत काम, खर्चांत खर्च, इ०. ❀**आंत-मध्यें क्रि० वि०** आंतल्या बाजूस; गर्भांत. **आंत बाहेर करणें** किं० **पाहाणें** सर्व बाजूंनीं विचार करणें. **आंत घेणें** आवरणें, आटोपतें घेणें, कमी करणें. ❀**आंतउतां (–तीं) क्रि० वि०** आंत; आंतल्या बाजूस. **आंतकोनाडा पु०** मोठ्या कोनाड्यांतील लहान कोनाडा.

आतखानी वि० मत्सरी, हेवेखोर, परो-त्कर्षासहिष्णु.

आतगी [**म०** आत=बापाची बहीण] **स्त्री०** बापाची बहीण (अशिक्षितांत). [आंतील.

आंतचा [**म०** 'आंत'पासून] **वि०** आंतला,

आंतडी स्त्री०, आंतडें न०, आंत न० [**सं०** अन्त्र] पोटांत जो पोकळ आणि दोरी सारखा अवयव असतो तो; अंत्रमाळ. ❀**आंत-ड्याला पीळ पडणें** किं० **बसणें** खऱ्या कळ-कळीमुळें तीव्र दुःख होणें.

आततायी [**सं०**] **वि०** १ हत्यार उपसून मारावयाला सिद्ध झालेला. २ घोर अपराध ज्याणें केला आहे असा (खुनी, आगलाव्या, इ०). ३ साहसी, मूर्खपणाचें धाडस करणारा.

आतप [**सं०**] **पु०** ऊन्ह. ❀**आतपाभाव पु०** छाया. **आतपत्र, आतपत्राण, आतपवारण न०** छत्री, अबदागीर. **आतपलंघन न०** उन्हाची बाधा.

आंतबट्टा [**म०** आंत+बट्टा] **पु०** १ एका जातीचें चलनी नाणें देऊन दुसऱ्या जातीचें चलनी नाणें घ्यावयाचें असतां घेणाऱ्याला बाजारभाव असेल त्या मानानें शेकडा कधीं कांहीं अधिक आणि कधीं कांहीं कमी रकम मिळते; अधिक मिळाल्यास तो बाहेरबट्टा, आणि कमी मिळाल्यास तो आंतबट्टा. २ नफा अपेक्षित असतां नुकसान झालें तर त्याला आंतबट्टा म्हणतात; (सामान्यतः) नुकसान, खोट. ❀**आंतबट्ट्याचा व्यापार** किं० **व्यवहार पु०** नुकसान सोसून चालविलेला व्यापार किं० केलेला व्यवहार.

आंतर [**सं०**] **वि०** आंतील, अंतर्गत.

आंतला [**म०** आंत] **वि०** आंतील; आंतल्या बाजूचा. ❀**आंतली खूणगांठ स्त्री०** मनांतील गुप्त हेतु किं० मतलब. **आंतल्या आंत क्रि० वि०** १ आंतल्या बाजूस. २ गुप्त रीतीनें; मनां-तल्या मनांत; कोणाला सुगावा न लागूं देतां. **आंतल्या गांठीचा वि०** आपला मतलब कोणाला यत्किंचित् कळूं न देणारा; खोल विचाराचा.

आंतवार [**म०** आंत+आवार] **न०** घराची आंतील बाजू; आडोशाची जागा; भिंतीच्या अली-कडची जागा. (याच्या उलट बाहेरवार).

आतसबाजी [**फा०** आतिष् (अग्नि) + बाजी (क्रीडा)] **स्त्री०** दारूकाम; फटाकडे, नळे, चंद्रज्योती, फूलबाजा, इ० उडविणें, किं० उडवून करमणूक करून घेणें.

आतळणें स०क्रि० स्पर्श करणें; संपर्क होऊं देणें.

आतां क्रि० वि० ह्या वेळीं; ह्या प्रसंगीं, सद्यः स्थितींत; सांप्रत. ❀**आतांघटके क्रि० वि०** ह्या वेळीं; ह्या क्षणीं. **आताशीं, आताशां, आतांशें** [**म०** आतां] **क्रि०वि०** हल्लीं, अलीकडे, सांप्रत.

आतार, आतारी [**फा०**अत्तार=गंधी] **पु०**

सुगंधी सामान म्ह० उदबत्त्या, अगरबत्त्या, बुक्का, इ० सुगंधी द्रव्यें करणारा किं० करून विकणारा.

आतियेय [**सं०** अतिथि=पाहुणा] **वि०** १ पाहुणचार करण्यांत तत्पर किं० दक्ष. २ अतिथीला योग्य. [पाहुणचार.

आतिथेयी [**सं०** अतिथि=पाहुणा] **स्त्री०**

आतिथ्य [**सं०**'अतिथि'चें **भा० वा० ना०**] **न०** पाहुणचार.

आतिसो [**सं०** 'अतिशय'चा अपभ्रंश] **वि०** अतिशय.

आंतील [**म०** आंत] **वि०** १ आंतल्या बाजूचा; अंतर्गत; पोटांतील; गर्भातील. २ लोकांना न कळणारा किं० न कळण्याजोगा; गुप्त. ॐ**आंतिल आंख पु०**व्यापाऱ्याचा मालावर घातलेला खुणेचा अंक,-जो फक्त त्या व्यापाऱ्यालाच कळतो; गिऱ्हाइकाला दाखवावयाचा अंक वेगळा असतो.

आतुडणें अ० क्रि० १ स्पर्शणें. २ सांपडणें. **स० क्रि०** संपादन करणें, मिळविणें.

आतुर [**सं०**] **वि०** १ पीडिलेला. २ विव्हल. ३ आजारी. ४ उत्सुक. ॐ **आतुरशाला स्त्री०** आजाऱ्यांची शुश्रूषा जेथें केली जाते ती जागा किं० तें घर; रुग्णालय. **आतुरसंन्यास पु०** मरणोन्मुख स्थितींत घेतलेला संन्यास; या दुखण्यांतून आपण आतां जगत नाहीं अशी खातरी झाल्यावर घेतलेला संन्यास.

आंतुरी स्त्री० (कवितेंत) स्त्री.

आतुर्बळी वि० अति बलाढ्य.

आंतुल न० हृदय, जीव. [हृद्गत, मर्म.

आंतुवट वि० १ अंतरंगांतील. २ बळकट. **न०**

आंतुवटें क्रि० वि० आंत, आंतल्या बाजूस.

आतू [**म०** आत=बापाची बहीण] **स्त्री०** बापाची बहीण.

आतृप्ति [**सं०** आ (पर्यंत)+तृप्ति (समाधान)] **क्रि०वि०** तृप्ति होईतोंपर्यंत.

आतें } **वि०** व्याप्त. **ज्ञा०** }.

आते [**म०**] **स्त्री०** बापाची बहीण; आत्या. ॐ**-भाऊ पु०** आतेचा मुलगा. **-बहीण स्त्री०** आतेची कन्या.**-सासरा पु०** सासऱ्याचा आतेभाऊ. **-सासू स्त्री०** नवऱ्याची किं० बायकोची आत. **-दीर पु०** नवऱ्याचा जो आतेभाऊ तो बायकोचा आतेदीर. **-चोर न०**, **-गौरव पु०, न०**, **-वाण न०**, **-मान पु०** १ वरपक्षाकडून वधूच्या आतेला लुगडें वगैरेची मानाची देणगी दिली जाते ती. २ अशा प्रकारचा मान. [आंत.

आतौता, आतौतें वि० आंतील. **क्रि० वि०**

आत्त [**सं०**] **वि०**१ घेतलेलें. २ काढून घेतलेलें. ३ अंगावर घेतलेलें, स्वीकारलेलें. ॐ**-गंध वि०** पराजित.

आत्मन् [**सं०**] **पु०**१आत्मा. २ आपण. हा शब्द समासांत प्रथम पदीं येतो,तेव्हां 'न्' लोपतो. ॐ**आत्मकार्य न०** आपलें काम. **क्रि० वि०** खाजगी कामासाठीं. **आत्माराम वि०** स्वसंतुष्ट. **पु०** १ जीवात्मा. २ स्वताचा देह; उ० मी थोडीशी दशमी खाली; आतां माझा आत्माराम गार झाला. **आत्मगत वि०** स्वताशींच केलेलें (भाषण).**-ग्राहिन् वि०** आपमतलबी.**- घात पु०**१ स्वताचा नाश. २ नास्तिक मत. **-संभव पु०**१ पुत्र. २ मदन.**-जा स्त्री०**१ कन्या. २ बुद्धि.**-ज्ञ,-विद् पु०** ब्रह्मज्ञानी. **-ज्ञान न०** ब्रह्मज्ञान. **-तत्त्व न०** १ परब्रह्मस्वरूप. २ ब्रह्म. **-भू,-योनि पु०** १ पुत्र. २ मदन. ३ ब्रह्मदेव. **-संपन्न वि०** १ जितेन्द्रिय. २ सज्जन. ३ बुद्धिमान्. **-संयम पु०**,**-संयमन न०** स्वतावर नियंत्रणा;मन आवरणें.**-सात् करणें** स्वताच्या ताब्यांत किं० कबज्यांत घेणें. **-स्तुति स्त्री०** स्वताची प्रशंसा. **-हत्या स्त्री०** स्वताचा खून स्वता करून घेणें; प्राणत्याग करणें.

आत्मा [**सं०** आत्मन्] **पु०** १ जीव, प्राणी. २ आपण.३ जीवात्मा. ४ परमात्मा. ५ मन. ६ बुद्धि.

आत्मीय [**सं०**] **वि०** १ आपला स्वताचा. २ आपल्या आवडीचा किं० प्रेमाचा.

आत्यंतिक [**सं०**' अत्यंत ' पासून] **वि०** १ शाश्वत. २ विपुल. ३ सर्वश्रेष्ठ. ॐ**-दुःखनिवृत्ति स्त्री०** मोक्ष. **-प्रलय पु०** ब्रह्माशिवाय सर्व जगाचा नाश; प्रलय.

आत्या स्त्री० १ बापाची बहीण. २ पुरुषाला बहुमानानें योजावयाचा शब्द.

आत्राटणें स० क्रि० थापटणें. **न०** नाद, घोष.

आंत्रिक वि० वगळलेलें. [पकडणें.

आथडणें स० क्रि० जोरानें किं० झटक्यासरशीं

आंथर [**सं०** आ+स्तृ (पसरणें)] **पु०** वेळूच्या पट्ट्यांची चटई; तट्ट्या. [पसरणें.

आंथरणें [**सं०** ' आंथर ' पहा] **स० क्रि०**

आंथरीय [**सं०** आ+स्तृ (पसरणें)] **न०** आंथरावयाचें जें कांहीं तें; सतरंजी, जाजम, इ०.

आथि [**सं०**अस्ति=आहे] **अ० क्रि०** आहे, असतां.

आथिला [**म०** आथि (आहे) यापासून] **वि०** १ संपन्न, युक्त, पूर्ण भरलेला. २ भाग्यवान, थोर.

आथिलेपण [**म०** ' आथिला ' पासून] **न०** १ संपन्नता. २ भाग्य, थोरपणा, वैभव.

आंदण [**सं०** अनु+दान] **न०** लग्नांत कन्येला किं० जांवयाला अवश्य जें द्यावयाचें त्याहून अधिक आपल्या ऐपतीप्रमाणें जें देतात तें.

आंदणा पु० दास, गुलाम.

आंदणी स्त्री० आंदणांत मिळालेली दासी.

आदत [**अ०**] १ रीति, पद्धति. २ कोणा माणसाची कांहीं लकब किं० खोडी (चांगली किं० वाईट).

आदर [**सं०** आ+दृ (मान देणें)] **पु०** १ सन्मान, बहुमान. २ काळजी, लक्ष्य. ३ उत्सुकता. ४ प्रेम. [आदराला पात्र.

आदरणीय [**सं०** ' आदर ' पहा] **वि०**

आदरणें [**सं०** ' आदर ' पहा] **स० क्रि०** १ संमानपूर्वक वागविणें. २ स्वीकारणें. ३ पत्करणें. ४ (एकादा पक्ष) उचलणें.

आदरून [**सं०** ' आदर ' पहा] **क्रि० वि०** १ मुद्दाम. २ अंतःकरणपूर्वक.

आदर्श [**सं०**आ+दृश् (पाहाणें)] **पु०** १ आरसा. २ टीका. ३ नमुना.

आदला [**सं०** आदि, **म०** आधीं] **वि०** मागचा, अगोदरचा. ॐ**आदल्या घरचा वि०** पहिल्या नवऱ्यापासून झालेला (मुलगा किं० मुलगी).

आदा पु०१ प्राप्ति, मिळकत. २ भाव, हावभाव, अभिनय.

आदान [**सं०** आ+दा (देणें)] **न०** १ घेणें. २ स्वीकारणें. ३ मिळविणें; संपादणें.

आदान न० एकाद्यास मरण सुचविणारा जो अरिष्टयोग तो.

आदाय [**सं०** आ+दा] **पु०** नफा, प्राप्ति, लाभ, मिळकत.

आदि [**सं०**] **वि०**१ पहिले. २ मुख्य, प्रधान. ३ पूर्वींचें, अगोदरचें. **पु०** १ प्रारंभ; (समासांत वगैरे). २ पहिला भाग. ३ पहिले फळ. ४ मूळ कारण. ॐ**आदिअंत**, **आद्यंत पु०** पहिला आणि शेवटचा; प्रारंभ आणि समाप्ति. **आदिकरून क्रि० वि०**इत्यादि;वगैरे. **–कवि पु०**१ ब्रह्मदेव. २ वाल्मीकि. **–काव्य न०** वाल्मीकाचें रामायण. **–कारण न०** निदान, अगदीं पहिलें कारण. **आदितः क्रि० वि०** पहिल्यापासून, आरंभापासून. **–पुरुष पु०**१ विष्णु. २ कृष्ण. **–माया स्त्री०** ईश्वराची शक्ति. –जिच्या योगानें हा सर्व प्रपंच होतो. **–भूत न०** सूक्ष्म पंच महाभूतें. **–रस पु०** शृंगाररस. **–शक्ति स्त्री०** १ माया. २ दुर्गा. **–शरीर न०** लिंग देह. **आदीचे विदीं**, **आदींविदीं**, **आदिविधीं क्रि० वि०** अगदीं आधीं, सर्वांच्या आधीं.

आदित्य [**सं०**] **पु०** १ देव (अदितिपुत्र). २ सूर्य. ॐ**–वार**. **–वासर पु०** रविवार.

आदिम [**सं०**] **वि०** पहिला, मूळचा.

आदिष्ट [**सं०** आ+दिश् (दाखविणें)] **वि०** १ हुकूम, आज्ञा. २ उपदेश. ३ उष्टें अन्न.

आंदुळणी स्त्री० डोळयाच्या पोटावरील फुटकुळी; रांजणवाडी.

आंदुळणें, **आंदोळणें** [**सं०** आंदोलन] **अ० क्रि०** ओपाळ्यावर झोके किं० झोपा घेणें. **स० क्रि०** –ला झोके देणें.

आदृत [**सं०**आ+दृ (मान देणें)] **वि०** १ संभावना केलेला. २ पूजिलेला.

आदेश [**सं०** आ+दिश् (दाखविणें)] **पु०** १ हुकूम, आज्ञा. २ उपदेश, शिकवण. ३ सिद्धान्त. ४ **(व्या०)** बदली येणारा वर्ण.५ शास्त्राज्ञा, विधि.

आंदोल [**सं०** आंदोलन=झोके घेणें किं०देणें] **पु०** झोपाळा.

आंदोलणें [**सं०** ' आंदोल ' पहा] **अ०क्रि०** झोके घेणें; इकडून तिकडे हेलकावे घेणें.

आंदोलन [**सं०** ' आंदोल ' पहा] **न०** हेलकावे घेणें; झोके घेणें.

आदौ [**सं०** ' आदि 'ची सप्तमी] **क्रि०वि०** प्रथमारंभीं; सुरवातीस; पहिल्यानें.

आद्य [**सं०**] **वि०** १ पहिला; मूळचा. २ श्रेष्ठ. ३ आधींचा. ꠸**–कवि पु०** १ ब्रम्हदेव. २ वाल्मीकि. **–मासिक न०** पहिल्या महिन्यांतील श्राद्ध.

आर्धा [**सं०** अर्ध] **वि०** अर्धा, निम्मा.

आधाण (–न) न० १ कठिण प्रसंग. २ आजार.

आधान [**सं०** आ+धा (ठेवणें)] **न०** १ ठेवणें. २ घेणें, स्वीकारणें. ३ धारण करणें. ४ स्थापन करणें. ५ अग्निहोत्र ठेवणें.

आधायक [**सं०** आ+धा (ठेवणें)] **वि०** ठेवणारा, स्थापणारा.

आधार [**सं०** आ+धृ (धरणें)] **पु०** १ टेकू. २ मदत; मदतीचें आश्वासन; मदत करणारा माणूस. ३ आश्रय. ४ साठा. ५ बारदान, कांहीं वस्तु ठेवण्याचें किं० साठविण्याचें पात्र किं० स्थल. ६ बांध, धरण. ७ पुरावा; समर्थक कारण किं० युक्ति. ꠸**–शक्ति स्त्री०** माया. **–लावणें** मदत करणें. **आधारास पंथ पु०** एकादा सिद्धान्त ठरवावयाला किं० एकादें मत बनवावयाला जरूर जीं कारणें तीं; उ० ह्या चोराला चांगला मार दिल्याशिवाय तो आधारास पंथ लागूं देणार नाहीं.

आधारक [**सं०** ' आधार ' पहा] **पु०** पाया.

आधि [**सं०**] **पु०** १ मनोव्यथा. २ विपत्ति. ३ ठेव. ४ गहाण. ५ उपद्रवी माणूस. ६ आपल्या मागें लागलेलें लचांड; शुक्लकाष्ठ.

आधिकरणिक [**सं०**] **पु०** न्यायाधीश.

आधिक्य [**सं०** ' अधिक 'चें **भा० वा० ना०**] **न०** १ अधिकपणा. २ श्रेष्ठपणा.

आधिदैविक [**सं०**] **वि०** देवतांना उद्देशून केलेलें. २ देवकृत.

आधिपत्य [**सं०** ' अधिपति 'चें **भा० वा० ना०**] **न०** १ अधिपतित्व. २ मालकी हक्क. ३ वरचढपणा. ४ वडेजाव; उ० कोणी मनुष्य सासुरवाडीस गेला म्हणजे त्याचे अधिपत्य होतेंच होतें.

आधिंबिधीं क्रि० वि० अगोदर, अगदीं सर्वांच्या अगोदर.

आधिभौतिक [**सं०**] **वि०** प्राण्यापासून होणारें; अधिभूतसंबंधीं असलेलें.

आधुनिक [**सं०** " अधुना " पासून] **वि०** आलीकडचें; अर्वाचिन काळचें; हल्लीं असलेलें.

आधेय [**सं०** आ+धा (ठेवणें)] **वि०** विशिष्ट स्थानीं ठेवावयाचें जें (तें); विशिष्ट आधारावर जें ठेविलें आहे तें त्या आधाराचें आधेय.

आंध्य [**सं०** ' अंध 'चें **भा० वा० ना०**] **न०** १ अंधळेपणा. २ बुद्धीचा मंदपणा.

आध्यात्मिक [**सं०** अध्यात्म=मन, देह] **वि०** १ मानसिक. २ परमात्म्यासंबंधाचें. ३ धार्मिक, पवित्र. ४ स्वताच्या मनापासून किं० शरीरापासून झालेलें.

आन [**सं०** अन्य] **वि०** भिन्न; वेगळ्या जातीचा. ꠸ **आनआनें क्रि० वि०** भिन्न भिन्न प्रकारें.

आनखशिख [**सं०** आ+नख+शिखा= पायाच्या नखापासून तों शेंडीच्या टोकापर्यंत] **क्रि० वि०** पायाच्या नखापासून तों शेंडीच्या टोकापर्यंत; पायापासून डोक्यापर्यंत; सर्व शरीरभर.

आनक [**सं०**] **पु०** १ नगारा. २ मृदंग. ꠸**–दुंदुभि पु०** १ वसुदेव (कृष्णाचा बाप). २ नगारा.

आनत [**सं०** आ+नम् (वाकणें)] **वि०** १ वाकलेला. २ वंदन करणारा. ३ नम्र.

आनंतर्य [**सं०** ' अनंतर 'चें **भा० वा० ना०**] **न०** १ सांनिध्य. २ नंतरचें कार्य. ३ अविलंब. ४ अखंडपणा.

आनन्त्य [**सं०** 'अनंत'चें **भा० वा० ना०**] **न०** १ अनंतत्व. २ अमर्यादपणा. ३ शाश्वतपणा. ४ मोक्ष. ५ स्वर्ग.

आनंद [**सं०** आ+नंद् (सुखावणें)] **पु०** १ हर्ष, सुख. २ आठ्ठेचाळिसावें संवत्सर. ३ गोसाव्यांचा आणि संन्याशांचा एक विशिष्ट पंथ. ꠸**आनंदी आनंद पु०** पराकाष्ठेचा आनंद. **आनंदकंद पु०** १ आनंदाचें कारण किं० उगम. २ परमेश्वर. **–घन वि०** १ पूर्ण आनंद अनुभवणारा. २ परमेश्वर. **–भैरव पु०** एक वैद्यकी कृतीनें केलेलें औषध. **–भैरवी स्त्री०** (**संगीत**) एक राग. **–मय वि०** आनंदानें ओतप्रोत भरलेला. **पु०** परमात्मा. **–मयकोश पु०** देह ज्या पांच आवरणांनीं बनलेला आहे त्यांपैकीं अगदीं आंतील जें आवरण तें. तीं पांच आवरणें हीं; १ अन्नमयकोश (स्थूल शरीर); २ प्राणमयकोश; ३ मनोमयकोश; ४ विज्ञानमय कोश; ५ आनंदमय

कोश. **–वृत्ति स्त्री०** आनंदी स्वभाव. **आनंदाश्रु पु०** आनंदानें डोळ्यांत येणारे अश्रु.

आनंदित [सं० आ+नंद् (आनंदणें)] **वि०** आनंद पावलेला. [उल्हासी.

आनंदी [सं० आनंद+म० ई] **वि०** रंगेल, **आनंदेशीं क्रि० वि०** आनंदानें.

आनन [सं०] **न०** १ तोंड. २ चेहरा.

आनयन [सं० आ+नी (नेणें)] **न०** १ आणणें. २ उपनयन.

आनर्थक्य [सं० 'अनर्थक' पासून **भा० वा० ना०**] निरुपयोगीपणा. [भिन्न.

आनसा [**म०** आन=वेगळा] **वि०** वेगळा,

आनाकानी [सं० अनाकर्णन] **स्त्री०** दुर्लक्ष्य; ऐकिलें नाहीं असें ढोंग; **क्रि०** करणें. उ० त्याला जें काम सांगावें त्याचेकडे तो आनाकानी करतो.

आनाह [सं० आ+नह् (बांधणें)] **पु०** १ बांधणें. २ मलमूत्रावरोधानें पोट फुगणें. ३मूत्रावरोध.

आनीत [सं०आ+नी (नेणें)] **वि०** आणलेलें.

आनुकूल्य [सं० 'अनुकूल 'चें **भा० वा० ना०**] **न०** १ अनुकूलता. २ कृपा.

आनुगुण्य [सं० 'अनुगुण 'चें **भा० वा० ना०**] **न०** १ अनुकूलता. २ अनुरूपता.

आनुचित्य [सं० 'अनुचित' (अयोग्य)चें **भा० वा० ना०**]**न०** अयोग्यपणा; योग्य नसणें.

आनुपम्य [सं० 'अनुपम' (उपमारहित)चें **भा० वा० ना०**]**न०** श्रेष्ठपणा, उत्कृष्टपणा.

आनुपूर्वी स्त्री०, आनुपूर्व्य न० आनुपूर्व न० क्रम.

आनुभविक [सं० 'अनुभव 'पासून विशेषण] **वि०** १ ज्याणें अनुभव घेतला आहे असा. २ ज्याला अनुभव आला आहे असा. ३ वहिवाटलेला (मनुष्य).

आनुमत्य [सं० 'अनुमत 'चें **भा० वा० ना०**] **न०** मताची एकरूपता; संमति; पसंती.

आनुमानिक [सं० अनुमान] **वि०** अनुमानावरून ठरलेलें. **न०** सांख्यांचें प्रधान.

आनुरूप्य [सं० 'अनुरूप 'चें **भा० वा० ना०**] **न०**अनुरूप असणें; अनुरूप असण्याचा धर्म.

आनुलोम्य [सं० 'अनुलोम 'चें **भा० वा० ना०**] **न०** १ योग्य क्रम. २ अनुकूलता.

आनुषंगिक [सं० 'अनुषंग 'पासून] **वि०** १ तत्संबंधी. तन्निमित्त. २ बरोबर येणारा. ३ आवश्यक. ४ गौण. ५ आसक्त. ६ सारखा, सदृश. ७ योग्य प्रमाणाचा; बेताचा.

आनृण्य [सं० 'अनृण 'चें **भा० वा० ना०**] **न०** १ ऋणमुक्त होणें. २ ऋण नाहीं अशी स्थिति. ३ कर्जांतून सुटका.

आन्वयिक [सं० अन्वय=वंश] **वि०** १ कुलीन, चांगल्या कुळांतील. २ व्यवस्थित.

आन्वीक्षिकी [सं० अन्वीक्षा=प्रयोजन] **स्त्री०** १ तर्कशास्त्र. २ अध्यात्मविद्या.

आप सर्वनाम १ आपला. २ आत्मीय. ३आपण. ॐ**आपघर कीं बापघर** मुलीला रहावयाला योग्य ठिकाण आपलें घर (नवऱ्याचें घर) किं० बापाचें घर (याशिवाय इतर घरांत तिनें राहूं नये). **आप सुखी तर जग सुखी** आपण सुखी असलों तर सर्व जग सुखी आहे असें आपणाला वाटतें. **आपापला, आपआपला** ज्याचें जें आहे त्याचें तें. **आपखुषीनें क्रि० वि०** स्वताच्या खुषीनें, स्वयंप्रेरणेनें; दुसऱ्याच्या सल्लीनें नव्हे अशा रीतीनें. **आपगंड वि०** हितचिंतकांचें किं० मातापितरांचें न ऐकतां स्वैर वागणारा (माणूस). **आपगरजी वि०** फक्त आपलीच गरज मनांत आणणारा; आपलपोट्या. **आपदृष्टि वि०** आपलपोट्या. **आपदेश पु०** आपला देश.

आप [सं० अप्=पाणी.] **न०** पाणी.

आपई स्त्री० दूरच्या ठिकाणीं असलेल्या आपल्या मित्रास किं० नातलगास पाठविलेली भेट,–वस्त्र, भूषण, खेळणें, खाऊ, इ०.

आपकी [सं० अप्=पाणी] **पु०** चुलीवर शिजत असलेल्या खाद्यादि पदार्थांवर पाणी, दूध, इ० पातळ पदार्थ शिंपडणें (**क्रि०** देणें, मारणें, टाकणें, इ०).

आपखरा [**फा०** आप् खूरह्] **पु०** पाणी प्यावयाचें लहान भांडें.

आपंगणें [**म०** आप+अंग] **स० क्रि०** १ आपल्या स्वताच्या अंगाप्रमाणें प्रिय मानणें; एकाद्याचा प्रेमानें संभाळ करणें. २ स्वीकारणें.

आपडणें स० क्रि० स्पर्शिणें; एकाद्या पदार्थाला स्पर्श करणें, शिवणें, किं० हात लावणें.

आपढंग पु० मूर्खपणाचे चाळे; वेडे चार.

आपढंगी वि० मूर्खपणाचे चाळे करणारा, वेडे वेडे ढंग करणारा.

आपण [**सं०** आत्मा] **सर्वनाम** १ मी किं० आम्ही स्वत:; उ० आपण नाहीं रे बोवा गोविंदरावाच्या कारभारांत पडणार ! उ० मी त्याला जेवूं घातलें मग आपण जेवावयाला बसलों. २ तुम्ही (बहुमानार्थक); उ० आज आपण आमचे घरीं जेवावयास यावें. ३ कोणीही मनुष्य; उ० आपण आपल्या जिनसेला जपावें. ३ तूं किं० तुम्ही; उ० तूं (किं०तुम्ही) मला खटपटीला लावून आपण स्वस्थ बसलास (किं०बसलां). ꙮ**आपण होऊन** १ स्वताच्या प्रेरणेनें. २ स्वताच्या बुद्धीचा उपयोग करून. ३ दुसऱ्यानें सांगावयाच्या अगोदर. ४ दुसऱ्यावर अवलंबून न रहातां. **आपल्या आपण** अंगच्या जोरावर; दुसऱ्याच्या मदतीशिवाय; दुसऱ्याच्या प्रेरणेशिवाय. **आपणावरून जग ओळखावें** जी आपली वृत्ति किं० प्रवृत्ति तीच लोकांचीही असें समजावें किं० गृहीत घेऊन चालावें. **आपणावर आणणें** किं० **वर्तविणें** एकादें काम केल्याबद्दलचें श्रेय आपणा स्वताकडे घेणें. **आपणास ...म्हणविणें** आपण...आहों अशी बढाई मारणें.

आपत् (–द्)[**सं०**] **स्त्री०**१ आपत्ति; संकट. २ अपकर्षाचा किं० ऱ्हासाचा काळ. ꙮ**आपत्काळ पु०** दुर्दैवाचा, संकटाचा, किं० अपकर्षाचा काळ. **आपद्धर्म पु०** निरुपायास्तव करावयाची गौण गोष्ट. **आपत्पुरवणी स्त्री०** बोलतांना जें आपण चुकीचें विधान केलें त्याची कशीबशी संपादणी करणें.

आपत्ति [**सं०**] **स्त्री०** १ संकट, अडचण, दुर्दैव, हीन दशा, विपत्ति. २ मिळणें, प्राप्ति. ३ एकाद्या विशिष्ट दशेला जाऊन पोंचणें. ४ अपराध. ५ तकरार. ꙮ **इष्टापत्ति स्त्री०** प्रतिपक्ष्याचें आपल्यास अनुकूल असें भाषण.

आपदा [**सं०**] **स्त्री०** १ दुर्दैव. २ विपत्ति. ३ संकट. ४ अडचणीची स्थिति.

आपदावणें [**सं०** आपदा=विपत्ति] **अ० क्रि०** दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडणें; संकटांत पडणें; अडचणींत अडकणें.

आपन्न [**सं०** आ+पद् (जाणें)] **वि०** १ घडलेलें. २ संकटांत पडलेला. ३ जवळ आलेलें. ꙮ**आपन्नसत्वा स्त्री०** गर्भिणी.

आपपर [**म०** आप (आपण)+पर (इतर)] **वि०** आपण आणि तिऱ्हाईत; मी आणि तो. ꙮ**आपपरभाव**(–**बुद्धि**,-**भेद**,–**वृत्ति**,–**विचार**,–**दृष्टि**, **इ०**) आपण वेगळे आणि इतर लोक वेगळे अशी भावना; समदृष्टीचा अभाव; भेदभाव.

आपमतलबी [**म०**आप+**अ०** मतलब] **वि०** दुसऱ्याची पर्वा न करतां आपलें इष्ट साधण्याला उत्सुक; स्वार्थसाधू.

आपमुखत्यार [**म०** आप (आपण)+ **अ०** मुख्तार् (मालक)] **वि०** स्वतंत्र; अनियंत्रित. ज्याच्यावर कोणाचा ताबा नाहीं असा.

आपमो (–मौ–) त [**म०** आप (आपण)+ मौत (मरण)] **स्त्री०** निसर्गाच्या नियमाप्रमाणें आलेलें मरण (अपघातानें, फाशीं गेल्यामुळें, इ० कारणांमुळें न आलेलें).

आपरस [**म०** आप (आपला स्वताचा)+ **सं०** रस] **पु०** अंगचा रस (फळाचा, पानांचा, सालींचा, इ० चा).

आपरूपी [**म०** आप (आपलें)+रूप (दर्शन)] **वि०** आईच्या किं० बापाच्या रूपाहून ज्याचें रूप भिन्न आहे असें (मूल); आईच्या किंवा बापाच्या रूपाशीं विसदृश ज्याचें रूप आहे असें (मूल).

आपलकी, **आपलीक स्त्री०**, **आपलेपणा पु०** अमुक पदार्थ किं० माणूस आपलें आहे असा गर्व, अभिमान, समाधान, इ०. ꙮ**आपलेपणांत येणें** वयांत येणें, प्रोढ होणें (मुलगा किं० मुलगी).

आपला [**म०** ' आपण ' ह्याची षष्ठी] **वि०** १ स्वताचा. २ पादपूरक शब्द; उ० मी आपला येथेंच बसणार ! ह्या अर्थी आपला हा शब्द तीन्ही लिंगीं आणि दोन्ही वचनीं योग्य फेरफार करून योजतां येतो. उ० मी आपला, आम्ही आपले, ती आपली इ०.ꙮ**आपल्या आपण क्रि०वि०** १ दुसऱ्याच्या मदतीवांचून किं० प्रेरणेशिवाय; उ०गळवाला पोटीस लाव म्हणजे तें आपल्या आपण फुटेल. २ दुसऱ्या कोणाच्या मध्यस्थीवांचून, रदबदलीवांचून किं०आर्जवावांचून;उ०त्या पोराला भूक लागली म्हणजे तो आपल्या आपणच येईल; त्याचीं आर्जवें कशाला करतोस ? **आपसूक**, **आपसुख क्रि०वि०** आपल्या स्वताच्या सुखासमाधानानें किं० इच्छेनें; लोकांनीं प्रेरणा केल्याशिवाय; उ० रामूला जेवावयाला ये

म्हणून आग्रह कशाला करतोस? गान चरचरलें म्हणजे तो आपसूकच येईल! **आपला म्हणणें** किं० **समजणें** एकाद्या माणसाला आत्मीय समजून त्याची काळजी वाहाणें. **आपली वाढवून घेणें** आपल-पोटेपणानें आपली सोय अगोदर करून घेणें. **आपलातुपला वि०** १ माझा तुझा. २ माझा तुझा असा भेदभाव.

आपवणी [**म०** आप+पाणी] **न०** पाटानें वाहात येणारें पाणी; (याच्या उलट विहिरांतून काढलेलें पाणी).

आपशां, आपशांच, आपशेंच, आपस्यां [**म०** आप=आपण] **क्रि० वि०** आपोआप; अनायासानें; दुसऱ्याच्या प्रेरणेशिवाय.

आपसां, आपसांत, आपसां, आपस (–शीं) [**म०** आपण] **क्रि० वि०** एकमेकांत; एकमेकांशीं; आपआपल्यांत.

आपसोशी [**म०** आप+सोस] **वि०** लोभी, हव्यासी, आपल्पोट्या. **क्रि० वि०** १ मन मानेल त्याप्रमाणें; स्वेच्छेनें. २ संकोच न बाळगतां; न कचरतां.

आपस्तंब पु० १ यजुर्वेदाची एक शाखा. २ त्या शाखेचा ब्राह्मण.

आपस्वार्थ [**म०** आप (आपला)+स्वार्थ (स्वताचा लाभ)] **पु०** आपलें हित, कल्याण, सोय, इ०.

आपस्वार्थी [**म०** 'आपस्वार्थ' पहा] **वि०** आपलेंच हित, कल्याण, सोय, इ० पाहाणारा.

आपहस्त [**म०** आप (आपला)+ **सं०** हस्त (हात)] **पु०** आपला (स्वताचा) हात. ※**आपहस्तें (–स्तीं), आपहस्तक (–कीं) क्रि० वि०** आपल्या स्वताच्या हातानें म्ह० दुसऱ्यावर न विसंबतां; उ० सगळीं कामें आपहस्तकीं केलीं तरच चांगलीं होतात.

आपा [**म०**] **पु०** १ पुरुषाच्या नांवाला लावावयाची बहुमानार्थक पदवी; उ० गोविंद आपा, नारायण आप्पा, इ०. २ पुरुषव्यक्तीचें विशेष नाम. (घाटावर 'आप्पा' असा शब्द प्रचलित आहे). ※**सोनार शिंपी कुलकर्णी आपा तिघांची संगत नको रे बापा** सोनार, शिंपी आणि कुळकर्णी, ह्यांचा सहवास न घडावा; ह्या तिघांची संगत केल्यास हानि होण्याचा संभव असतो, म्ह० हे लोक अट्टल सोदे असतात.

आपा पु० एक खाद्यविशेष. ('अप्पा' किं० अप्पा, हेंही रूप प्रचलित आहे).

आपात [**सं०** आ+पात (पत्=पडणें)] **पु०** १ हल्ला. २ खालीं पाडणें. ३ चालू काळ. ४ प्रथम दर्शन. ५ घडणें किं० घडून येणें. ६ प्रादुर्भाव. ७ मार्ग. ※**–रमणीय वि०** १ प्रारंभीं किं० सुरवातीला मनोहर वाटणारें. २ दिसण्यांत बरें किं० सबळ.

आपादतलमस्तक [**सं०** आ (पासून)+पादतल (पायाचा तळवा)+मस्तक (डोकें)] **क्रि० वि०** पायापासून तो डोक्यापर्यंत.

आपाप, आपाआप, आपांआप [**म०** आप=आपण] **क्रि० वि०** आपल्या आपण; श्रम न करतां; कांहीं खटपट न करतां; स्वताच्या प्रेरणेनें.

आपदमस्तक [**सं०** आ (पासून)+मस्तक (डोकें)] **क्रि० वि०** पायांपासून डोक्यापर्यंत.

आपाप [**म०** आप+आप (आपणच)] **क्रि० वि०** आपल्या आपण; प्रयत्नावांचून. ※**आपापाचा माल गपापा** श्रमावांचून किं० फुकट मिळालेला पदार्थ खर्चावयाला कोणी कचरत नाहीं.

आपालिपा पु० लपंडावाचा खेळ.

आपुला आपला (कवितेंतील रूप).

आपी पु० नातेवाईक (**तुका०**).

आप पु० हितकर्ता. **वि०** १ स्वकीय. २ प्राप्त.

आपुयिणें स० क्रि० गांजणें.

आपुलीक स्त्री० ममता. (**ज्ञा०**).

आपुलेपण न० अहंभाव.

आपें क्रि० वि० आपोआप.

आपोआप क्रि० वि० प्रयत्नावांचून; आपले आपण. **म्हणी** (१) ज्याच्या पदरीं पाप त्याला पोरें आपोआप. (२) ज्याच्या पदरीं पाप त्याला मुंबई आपोआप.

आपैतिया वि० प्राप्त.

आपैतें वि० आयतें. **क्रि० वि०** आपोआप.

आपैशीं क्रि० वि० स्वभावतः [यासानें.

आपैसें क्रि० वि० आपोआप, सहज, अना-

आपोशन न०, आपोष्णी स्त्री० भोजनाच्या सुरवातीस आणि समाप्तीस ब्राम्हण तळहातावर थोडेंसें पाणी घेऊन तोंडांत टाकतात तें.

आप्त [**सं०** आप्=मिळविणें] **वि०** १ मिळालेलें, प्राप्त झालेलें. २ भरंवशाला पात्र. ३ हुशार. ४ योग्य, हितकर. ५ खरें, सप्रमाण. ६ यथार्थ वक्ता. ७ स्नेही, नातलग. ८ नात्यानें जुळलेली. ॐ**–वाक्य न०, –वचन न०, –उक्ति स्त्री०** १ प्रचारोक्ति. २ वेद, स्मृति, इ०चें प्रमाणभूत वचन. ३ विश्वासु माणसाचें भाषण. **–काम पु०** परमात्मा. **आप्तमित्र, आप्तविषय पु० अ० व०** सगेसोयरे, इष्टमित्र.

आप्ती [**अ०** आफत्=संकट] **स्त्री०** १ शेतें न पिकल्यामुळें संकट, अडचण, किं० दुःख. २ महर्घता, महागाई.

आप्पाधोप्पा पु० मुलांचा एक खेळ.

आप्य [**सं०** आप्=मिळविणें] **वि०** मिळण्याजोगा; प्राप्त होण्याजोगा.

आप्य [**सं०** आप्=पाणी] **वि०** जलमय. **न०** जलविकार (फेस, लाट, इ०). **पु०** देवभेद.

अप्याय पु०, अप्यायन न० [**सं०** आ+प्यै (वाढणें, फुगणें)] **न०** वाढविणें; पुष्ट करणें; फुगविणें. २ लठ्ठपणा. ३ सुखविणें. ४ तृप्ति. ५ खाद्य. ६ खाद्यपेयांची चंगाळी करणें. ७ दुसऱ्याचे पैसे लाटणें.

आप्लव [**सं०** आ+प्लु (पोहणें, स्नान करणें)] **पु०** १ स्नान. २ (पाण्यांत) बुडविणें.

आप्लाव [**सं०** ' आप्लव ' पहा] **पु०** १ स्नान. २ महापूर. ३ थबकत जाणें.

आप्लुत [**सं०** ' आप्लव ' पहा] **वि०** १ शिंपडलेला, भिजविलेला. २ पूर्णपणें भरलेला; व्याप्त. ३ ग्रस्त, आक्रान्त. **पु०** सोडमुंज झालेला.

आफडणें, आफुडणें स० क्रि० स्पर्शिणें आणि अपवित्र करणें; विटाळणें. ॐ**आफडूंनयेशी** विटाळशी स्त्री.

आफत [**फा०** आफत्=दुःख] **स्त्री०** संकट, दुःख, दुर्दैव. ॐ**आफत आसमानी स्त्री०** दुर्दैवानें ओढवलेलें संकट. याच्या उलट ' आफत सुलतानी ' दुष्ट राजा किं० राज्य ह्यांचेमुळें आलेलें दुःख.

आफळणें अ० क्रि० अर्धवट शिजणें.

आफळणें स० क्रि० आपटणें; हासडणें; ठोकणें.

आफू [**फा०**] अफू.

आब पु० १ पत. २ लौकिक, आबरू. ३ विश्वासाला पात्रता. ४ सभ्यपणा. ५ मान. ॐ**आपण पांघरूणाचा आब राखला तर पांघरूण आपला आब राखील** आपण आपले कपडे स्वच्छ आणि आपल्या दर्जाला शोभतील असे ठेविले तर आपले कपडे आपला दर्जा राखतील.

आंब [**म०** आंबणें] **स्त्री०** १ अम्लसार. २ हरभऱ्याच्या झाडावर जो आंबट स्वेद असतो तो. ३ लांबोड्या आकाराचा एक प्रकारचा आंबा. ४ पदार्थ आंबट करण्याचा किं० आंबविण्याचा धर्म. ॐ**आंब ओरपणें** एखाद्या पदार्थातील सत्त्वांश काढून घेणें; स्वताच्या फायद्याकडे एखाद्या पदार्थाचा उपयुक्त भाग किं० गुण लावणें किं० योजणें.

आबखाऊ, आबघेणा (–ण्या) वि० १ इज्जतखोर; आबरू घेणारा. २ फजीतखोर.

आबकार [**फा०**] **पु०** दारू गाळणारा.

आबकारी [**फा०**] **स्त्री०** १ दारूवर बसविलेला कर. २ दारू गाळणाराचा धंदा. ३ मादक पदार्थांचें सरकारी खातें.

आंबटणें अ० क्रि० आंबट होणें.

आबटाब [**म०** आब] **पु०** लौकिक; इभ्रत.

आंबटाण स्त्री० आंबट घाण किं० रुचि.

आंबण, आमण स्त्री० एक जंगली वृक्ष.

आंबटणें स० क्रि० १ जनावराला शिकवून कामाला तयार करणें. २ गुरांढोरांना एके ठिकाणीं गोळा करणें (त्यांना इष्ट स्थळीं हाकून न्यावयाच्या पूर्वी). २ मनुष्याची स्वच्छंदी वृत्ति नियंत्रित करण्यासाठीं त्याला कांहीं काम नेमून देऊन त्यांत गुंतवून ठेवणें.

आबडधाबड वि० ओबडधोबड, वेघाट.

आंबतें न० आंबोळी, आंबील, इ० करावयासाठीं आंबट व्हावें म्हणून जें पीठ भिजत घालतात तें.

आबदा [**सं०** आपदा] **स्त्री०** आपत्ति, दुर्दैव; कठिण प्रसंग किं० स्थिति; कष्टमय दशा.

आबदाब [आब (लौकिक)+दाब (वजन)] **पु०** इभ्रतदारीचें वजन किं० जोर; कांहीं सामर्थ्य, कौशल्य, अधिकार, विद्वत्ता, इत्यादि गुणांमुळें लोकांवर पडणारा दाब किं० छाप. (क्रि० राखणें, संभाळणें, गमावणें, इ०). ॐ**आबादाबांत क्रि० वि०** १ केवळ इभ्रतीच्याच जोरावर; सत्याचा पाया नसतां केवळ लोकिकाच्या आधारावर. २ संदिग्ध स्थितींत; वस्तुस्थितीची कल्पना कोणाला न येऊं देतां.

आवनूस [फा०] **पु०** टेंबुरणीच्या आंतला काळा नार.

आंवार, आंवूर पु० सुताराचें एक हत्यार, (खिळे उपटावयाचें).

आवरू [**फा०** आव् (पाणी)+रु (तोंड)] **स्त्री०** नीतिमत्ता, सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, इत्यादि गुणांवरून आलेला लौकिक, प्रसिद्धि, किं० कीर्ति.

आंवली [सं० आम्ल (चिंच)] **स्त्री०** चिंचेचें झाड किं० फळ; चिंच.

आंवलें न० भोपळा.

आंवत्रण न० १ आंबोण. २ आंबत घातलेला पदार्थ लवकर आंबावा म्हणून त्यांत घालतात जो लिंबाचा रस, इ० तो. [गाणें तें.

आंववण न० होडी वल्हवितांना गातात जें

आंवष्टाण, आंवसाण [**म०** आंबट+घाण] आंबटपणाचा वास.

आंवसुका (–खा) वि० अर्धवट ओला; अर्धवट कोरडा किं० सुका; आंबटओला.

आंवसूल, आंवसोल [**म०** आंबट+साल] **न०** रातांब्यांच्या साली पिळून वाळवितात त्या. (खाद्य पदार्थांत ह्या साली आंबटपणासाठीं चिंचेप्रमाणें घालतात).

आवळ, आवाळ स्त्री० १ हेळसांड; दुर्दशा. २ एकाद्या कामांत केलेला निष्काळजीपणा; दुर्लक्ष्य; जरूर किं० योग्य प्रमाणांत काळजी न घेणें.

आवा पु० पुरुष व्यक्तीचें विशेष नाम.

आंवा [**सं०** आम्र] **पु०** आम्रफळ किं० त्याचें झाड. ❀**आंव्याचा तळका पु०** अर्धा आंबा; आंब्याचें अर्धुक. [मागें " अंबा " पहा].

आवाद [**फा०**] **वि०** माणसांनीं गजबजलेलें; वैभवशाली आणि धनसंपन्न (शहर, देश, प्रांत इ०).

आवादान [**फा०**] **वि०** १ वैभवसंपन्न. २ ज्याला चोरांचा, रोगांचा, किं० दुर्भिक्षाचा उपद्रव झाला नाहीं असा (पदार्थ, गांव, देश इ०). ३ सुरक्षित.

आवादानी, आवादी [**फा०**] **स्त्री०** १ भरभराटीची, संपन्नतेची, आणि वैभवशाली स्थिति (देशाची, शहराची, राष्ट्राची, इ०). २ विपुलपणा.

आवाधा [**सं०**] **स्त्री०** १ त्रिकोणाच्या पायाचा खंड. २ त्रिकोणाच्या शिरोबिंदूपासून पायावर काढलेल्या लंबानें पायाचे पडलेले जे खंड ते प्रत्येक. ३ वेदना. ४ उपद्रव.

आवालवृद्ध [**सं०** आ (पासून) +बाल (लहान मूल) + वृद्ध (म्हातारा)] **पु० अ० व०** लहानापासून थोरापर्यंत सर्व लोक; सगळी जनता.

आंवी, आंवेकरी पु० होडी वल्हविणारा, होडीवर पोट भरणारा.

आवुखा, आवका, आपका पु० ' अवका ' पहा. [२ पसरणें.

आवुखणें, आंवुखणें स० क्रि० १ शिंपडणें.

आंवुखा पु० १ शिंतोडा. २ आच्छादन.

आंवुथणें अ० क्रि० पेटणें.

आंवुला पु० पति.

आंवुली स्त्री० पत्नी.

आंवेकरी पु० नावाडी.

आवेजावे [**हिं०** आ (ये)+वे (रे)+ जा (जा)+रे (रे)] **स्त्री०** ये रे जा रे. (उद्धटपणाची किं० तिरस्काराची भाषणसरणी).

आंवेवार पु० आंब्यांच्या ऋतूंतील म्हणजे सुमारें फाल्गुनांतील फळाचा बहर.

आंवेळ स्त्री० केळीच्या झाडाची एक जात.

आंवेळें न० आंबेळ जातीच्या केळीचें केळें.

आभ्र न० १ आभाळ, आकाश. २ ढग किं० ढगांची कोळोखी.

आभंड वि० भांडखोर. ❀**आभंडनार स्त्री०** भांडखोर, भांडखोर कजाग स्त्री.

आभरण [**सं०** आ+भृ (भरणें)] **न०** १ भूषण, दागिना. २ पोषण. ❀**–विनियोग पु०** दागिने यथायोग्य स्थानीं अंगावर घालणें.

आभा [**सं०** आ+भा (चकाकणें)] **स्त्री०** १ प्रकाश, तेज. २ कांति, शोभा. ३ सादृश्य.

आभाणक पु० म्हण.

आभाषण [**सं०** आ +भाष् (बोलणें)] **न०** संभाषण.

आभार [**सं०** आ+भार] (ओझें; भृ= भरणें) **पु०** १ कोणी आपणावर केलेल्या उपकाराबद्दल कृतज्ञता. २ अशा कृतज्ञतेचें प्रकटीकरण. ३ ओझें. ४ ऋणभार. ५ जबाबदारी.

आभारी [**सं०** आभार=ओझें] **वि०** ज्याच्या

टोक्यावर दुसऱ्यानें केलेल्या उपकाराचें ओझें आहे असा; कृतज्ञ.

आभाव [**सं०** आ+भाव (कल्पना; भू= होणें)] **पु०** कोणाच्या सामर्थ्यासंबंधानें, बुद्धिमत्तेसंबंधानें, श्रीमंतीसंबंधानें, पराक्रमासंबंधानें, किं० कर्तृत्वासंबंधानें लोकांच्या मनांत जी कल्पना असते ती; उ० मी कांहीं श्रीमंत नाहीं पण तसा लोकांचा आभाव आहे.

आभास [**सं०** आ+भास् (चमकणें, शोभणें)] **पु०** १ प्रकाश. २ प्रतिबिंब. ३ सादृश्य. ४ भ्रम, भास, कल्पना. ५ **(न्याय)** भ्रामक हेतु.

आभासक [**सं०** ' आभास ' पहा] **पु०** प्रतिबिंब.

आभाळ न० १ आकाश. २ ढग किं० ढगाळपणा. [मागें ' अभाळ ' पहा.]

आभिचार [**सं०**] **वि०** जादूचें.

आभिचारिक [**सं०**] **वि०** १ जादूचें. २ हिंसेसंबंधाचें. **न०** जादू; तंत्र शास्त्र.

आभिजात्य [**सं०** अभिजात=कुलीन] **न०** कुलीनपणा.

आभिधानिक [**सं०** अभिधान=शब्द, नांव] **पु०** शब्दकोशकार.

आभिमुख्य [**सं०** अभिमुख=संमुख, समोर] **न०** १ दिशा. २ समोर होणें किं० असणें.

आभीर [**सं०**] **पु०** गवळी; गवळी जातीचा माणूस. ॐ**–पल्ली स्त्री०** गौळवाडा.

आभोग पु० ध्रुवपदाचा शेवटचा भाग.

आभ्यंतर [**सं०** ' अभ्यंतर ' पासून] **वि०** **वि०** आंतील, आंतला, अंतर्गत. ॐ**–प्रयत्न पु०** गातांना प्रत्यक्ष शब्दोच्चार किं० स्वरोच्चारण (किं० बाह्य प्रयत्न) करावयाच्या अगोदर गवई कंठ आणि फुप्फुसें हवेनें फुगवून आणि ताणून साफ करतो ती क्रिया. आभ्यंतर प्रयत्नाचे चार भाग आणि बाह्य प्रयत्नाचे अकरा भाग असतात.

आम [**सं०**] **वि०** १ कच्चें. २ न भाजलेलें. ३ न पचलेलें. ४ कोंवळें. **पु०** आमांश. ॐ**आमांश पु०** आमांश, (कोठ्याचा एक रोग). **आमाशय पु०** कोठा. **आमगंधी वि०** जळणाऱ्या मांसासारखा वास येणारें. **आमरक्त न०** रक्ती आंव. **आमवात पु०** रोगविशेष. **आमश्राद्ध न०** ब्राम्हणाला नुसता शिधा देऊन केलेलें श्राद्ध. **आमातिसार पु०** एक रोगविशेष. **आमान्न न०** ब्राम्हणाला दिलेला शिधा.

आमगूळ वि० किंचित् आंबट.

आमचा वि० ' आम्ही ' ह्या सर्वनामाच्या षष्ठीचें **पु० ए० व०**. [ण्याचें).

आमटी स्त्री० एक पातळ खाद्य (तोंडीं लाव-

आमण, आंबण स्त्री० एक जंगली वृक्षविशेष.

आमंत्रण [**सं०** आ+मंत्र् (सल्ला घेणें)] **न०** १ बोलावणें. २ संभाषण. ३ स्वागत. ४ निरोप घेणें.

आमंत्रणें [**सं०** ' आमंत्रण ' पहा] **स० क्रि०** बोलावणें.

आमंत्रण्या [**सं०** आमंत्रण+ **म०** या (प्रत्यय)] **पु०** आमंत्रणें करून जो पोट भरतो तो.

आमंत्रित [**सं०** ' आमंत्रण ' पहा] **वि०** ज्याला आमंत्रण करण्यांत आलें आहे असा; ज्याला बोलावणें केलें आहे असा.

आमने सामने [**हिं०**] **क्रि० वि०** १ एकमेकांसमोर; समोरासमोर. [२ नाश, वध.

आमय [**सं०**] **पु०** १ रोग. २ इजा, पीडा.

आमरण [**सं०** आ (पर्यंत)+मरण (मृत्यु)] **क्रि० वि०** मरतेपर्यंत; मरण येईतोंपर्यंत. ॐ**आमरणान्त** मरण येईतोंपर्यंत.

आमरस [**सं०** आम्र+रस] **पु०** आंब्यांचा रस; आंबरस.

आमलक [**सं०**] **पु०** आंवळा. [आंवळी.

आमलकी [**सं०**] **स्त्री०** आंवळ्याचें झाड;

आमा पु० आईचा स्तन.

आमिष [**सं०**] **न०** १ मांस. २ भक्ष्य. ३ इच्छा. ४ मोहक पदार्थ. ५ लाच. ६ नजराणा.

आमुतें स० ना० आम्हाला (कवितेंत).

आमुष्मिक [**सं०** अमुष्य=त्याचा] **वि०** त्याचा म्ह० परलोकासंबंधाचा.

आमूलचूड [**सं०** आ (पासून) +मूल (प्रारंभ)+चूडा (शिखा, शेंडी)] **क्रि० वि०** सुरवातीपासून समाप्तीपर्यंत; खालपासून वरपर्यंत; ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत.

आमेज [**फा०** आमीज्] **पु०** १ मिश्रण, मिसळणें. २ **(संगीत)** मिश्र स्वर किं० सूर.

उ० मुंबईची मराठी भाषा शुद्ध नाहीं; तींत गुजराथी भाषेचा कांहीं थोडा आमेळ आहे.

आमोद [सं० आ+मुद् (आनंदणें)] **पु०** १ आनंद. २ सुगंध.

आमोदित [सं० ‘ आमोद ’ पहा] **वि०** १ आनंदलेला; आनंद पावलेला; आनंदित. २ सुगंधित.

आम्नाय [सं० आ+म्ना (चिंतन करणें)] **पु०** १ वेद. २ अभ्यास. ३ परंपरागत आचार. ४ उपदेश.

आम्र [सं०] **पु०** १ आंबा. २ **(ज्योतिष)** पूर्वा भाद्रपदा. ※**आम्रवन (–ण) न०** आंबराई. **–पल्लव पु०** १ आंब्याच्या पानांचा झुबका किं० टाहाळा. २ **(लक्षणेनें)** शुभ आणि अशुभ प्रसंगीं सारखाच उपयोगी पडणारा माणूस.

आम्रेडित [सं०] **न०** १ एकाच शब्दाचें दोन दोन तीन तीन वेळां उच्चारण. २ **(व्या०)** द्विरुक्त झालेल्या शब्दांपैकीं दुसरा. ३ तोतरेपणानें बोलणें.

आम्ल [सं०] **न०** आंबटपणा. **वि०** आंबट. ※**–पित्त न०** पित्तातिशयामुळें होणारा एक रोग, –ज्यांत घशाशीं वारंवार आंबट येतें, वांति होते, आणि छातींत जळजळ होतें. **–वेतस, –पत्रक न०** चुका (भाजी).

आम्ही [सं० ‘ अस्मत् ’ पासून] **स० ना०** प्रथम पुरुषवाचक सर्वनाम अनेकवचनी.

आय [सं०] **पु०** येणें. २ मिळणें. ३ मिळकत, उत्पन्न. ४ कर. ५ नफा. ६ “ गृहादि बांधायाकरितां योजिलेली जी चतुरस्रभूमि तिच्या लांबीनें रुंदी गुणून आठांनीं तष्ट केलें असतां अवशिष्ट जें राहातें तें. ”

आय स्त्री० आई.

आयंडा पु० १ कापून आणलेल्या भाताच्या रोपांचा भारा. २ ह्या भाऱ्याला बांधलेली दोरी.

आयणी स्त्री० १ इच्छा. २ मन. ३ प्रसार. ४ मत. ५ समुदाय. ६ सामर्थ्य. ७ चांगली चाल. ८ म्हण.

आयत [सं० आ+यम् (आवरणें, ताणणें)] **वि०** १ लांब. २ मोठें, विस्तीर्ण. ३ दूरचें. ४ दीर्घ (काळ). ५ उंच (स्वर). ६ ओढलेलें, ताणलेलें.

आयतन [सं०] **न०** १ स्थान. २ आधार. ३ धाममार्ग. ४ शरीर. ५ देऊळ. ६ यज्ञस्थान, वेदी. ※**भोगायतन न०** भोग भोगण्याचें स्थान म्ह० शरीर.

आयतें सुयतें न० एकाद्या कामा लागणारा हत्यारें किं० साधनें.

आयतोजी, आयतगव्हू, आयतमार(–ऱ्या), आयतोबा पु० दुसऱ्याच्या श्रमाचा वाटा न घेतां त्या श्रमाचे फळ सिद्ध होतांच तें जो निर्लज्जपणानें मागतो किं० मागून घेतो तो. ※**आयतमार आणि खायाला तैयार** एकादें त्याच करण्याचे कामीं श्रम न करतां तें सिद्ध आलें म्हणजे निर्लज्जपणानें हात पुढें करणारा.

आयतोळा पु० पाटाच्या बायकोबरोबर आलेला, (तिच्या पहिल्या नवऱ्यापासून आलेला) मुलगा.

आयतोळा पु० कंठांत घालावयाचा शूद्रांचा दागिना.

आयत्त [सं० आ+यम् (आवरणें)] **वि०** १ स्वाधीन. २ दुसऱ्यावर अवलंबून असलेला; पराधीन. ३ झटणारा. ४ आरंभिलेलें.

आयदण न० धान्य वगैरे सांठवावयाच्या उपयोगाचें चिव्याचें बारदान.

आयद्दी वि० आळशी.

आयना [**फा०** आईनाह्] **पु०** आरसा.

आयनेरणें, आयनरणें [**म०** आई+न्यारा (वेगळा किं० दूर सारलेला)] **अ० क्रि०** १ आईचें दूध पुन्हा गरोदरपणामुळें नासणें. २ असें दूध नासल्यामुळें मुलाचें तुटणें.

आयनेरें [**म०** ‘ आयनेरणें ’ पहा] **न०** मूल लहान असून अंगावर पीत असतां आई पुन्हां गरोदर झाली तर तिचें दूध प्याल्यानें त्या मुलाला जी विकृति होते ती.

आयराणी स्त्री० भूत पिशाच जातींतील स्त्री. तिला ‘मायराणी ’ असेंही म्हणतात. ※**आयराणी मायराणी स्त्री०** दागिने घालून नटलेली स्त्री, (विनोदानें).

आयव्यय [**म०** आय (येणें, प्राप्ति)+व्यय (खर्च)] **पु०** जमा आणि खर्च.

आयःशूल [**सं०** अयस् (लोखंड), शूल (गज, खिळा)] **पु०** १ लोखंडाचा सूळ. २ मोठें

संकट; दुर्दैवाचा घाला. ३ भयंकर पेंचाची स्थिति.

आयःशूलिक [**सं०** अयस् (लोखंड) + शूल (गज, खिळा)] **वि०** १ कार्यतत्पर. २ धाडसी. पु० सौम्य उपाय न योजितां कठोर उपाय योजून जो इष्ट हेतु साध्य करूं पाहातो तो.

आयस [**सं०** अयस्=लोखंड] **वि०** लोखंडी; लोखंडाचा.

आयात [**सं०** आ+या (जाणें)] **वि०** आलेला; येऊन पोंचलेला; बाहेरून आलेला. ॐ**आयात माल पु०** परगांवाहून किं० परदेशाहून विकावयासाठीं आलेला माल. ॐ**आयातनिर्गत स्त्री०** बाहेरून आलेला माल आणि बाहेर पाठविलेला माल किं० अशा मालांवर बसविलेले कर.

आयाबाया [**म०** ' आईबाइ 'चें अ० **व०**] **स्त्री० अ० व०** १ स्त्रिया. २ बिनकर्तबगार माणसें; निरुपयोगी, रड्ड, कुचकामांचीं माणसें; उ० तुझ्या सारखे वीर जेथें थकले तेथें ह्या आयाबाया काय करणार ? ॐ**वृक्षांमध्यें एक साया, वरकड साऱ्या आयाबाया** वृक्षांत वृक्ष एक सागवान्, बाकीचे वृक्ष टाकाऊ.

आयाम [**सं०** आ+यम् (ताणणें)] **पु०** १ लांबी. २ विस्तार. ३ नियमन, नियंत्रण.

आयास [**सं०** आ+यस् (यत्न करणें, कष्ट देणें.)]**पु०** १ श्रम, कष्ट. २ थकवा. ३ दुःख, शोक. ॐ**आयास प्रयास पु० अ० व०** नानाप्रकारचे कष्ट; परिश्रम आणि मेहेनत.

आयासी [**सं०** आयास+**म०** ई (प्रत्यय)] **वि०** कष्टाळू, मेहेनती.

आयु [**सं०** आयुस्=आयुष्य] **न०**१ आयुष्य. २ जीवित. ॐ**आयुर्दाय पु०** आयुष्याचें प्रमाण. **आयुर्वेद पु०** १ वैद्यशास्त्रावर एक मूल प्रमाणभूत ग्रंथ आहे तो. २ वैद्यक. **आयुरारोग्य न०** दीर्घ आयुष्य आणि रोगरहितता. **आयुष्मान् वि०** १ दीर्घायुषी. २ जिवंत. ३ शाश्वत. **आयुष्मान् भव** तुला दीर्घ आयुष्य प्राप्त होओ ! (आशीर्वादाचें हें वाक्य आहे).

आयुष्य [**सं०**] **न०** जीवितमर्यादा. ॐ**—मर्यादा स्त्री०** आयुष्याचा परम अवधि. **आयुष्याची दोरी स्त्री०** आयुष्य रूपी दोरी. **—क्षेप पु०** आयुष्य फुकट घालविणें.

आयोधन [**सं०**] **न०** १ युद्ध. २ रणभूमि. ३ वध.

आर स्त्री० १ खिळ्याचें अणकुचीदार टोंक. २ अणकुचीदार खिळा. ३ एकाद्याला घाई करणें किं० तगादा लावणें (**क्रि०** लावणें). ४ चाकाच्या तुंब्यापासून धावेपर्यंत जे दांडे असतात ते प्रत्येक. ५ गुदस्थानचें किं० मांडीवरचें गळूं. ६ शरीरांवर असलेला केशांचा झुबका किं० भोंवरा. ७ विटीदांडूच्या खेळांतील सहा ही संख्या (वकट, लॅंड, मुंड, नाल, आर, वैद आणि झकू. विटीपासून गलीपर्यंतचें अंतर दांडूनें मोजतांना हे अंक मुलें योजतात). ८ अजगर; यावरून आळशी माणूस. ९ कोणत्याही वस्तूचें अणकुचीदार टोंक (दोरीचें, लाकडाचें, खिळ्याचें इ०). १० अंकुर; उ० नागवल्लीची आर एकदा रुजली म्हणजे वेल वाढतो. ११ वेलींचा ताणा. १२ टोचण्याची पराणी (लोखंडाची अणकुचीदार सळई.) १३ (संसाराची, प्रपंचाची, नोकरीची, इ० ची). टोचणी किं० जाचणी (**क्रि०** लागणें, असणें, लावणें इ०).

आरई स्त्री०गुदस्थानीं किं० मांडीवर झालेलें गळूं.

आरक्त [**सं०** आ+रंज् (रंगविणें)] **वि०** तांबडा; तांबड्या रंगाचा.

आरज स्त्री० आढ्यता. **वि०** श्रेष्ठ.

आरजा स्त्री० ऋतु प्राप्त झालेली (स्त्री).

आरण [**सं०**] **न०** युद्धस्थान.

आरणी स्त्री० शस्त्र.

आरणे अ० क्रि० (कोंबड्याचें) ओरडणें.

आरणें अ० क्रि० आळसानें किं० सुस्तीमुळें पडून राहाणें किं० लोळणें.

आरणें अ० क्रि० अति उत्सुकतेनें इच्छिणें.

आरण्य [**सं०** ' अरण्य ' पासून] **वि०** रानांतील.

आरण्यक [**सं०** ' अरण्य 'पासून] **पु०** अरण्यवासी. **न०** वेदाचा एक भाग; वेदान्त.

आरत [**सं०** आरति] **स्त्री०** आरती.

आरति [**सं०** आ+ रम्(आनंद पावणें)] **स्त्री०** १ थांबणें. २ ओवाळणें; आरती. ॐ**—कुरवंडी स्त्री०** देवास किं० संमान्य माणसास ओवाळणें किं० ह्या ओवळण्याच्या विधीस लागणारें साहित्य (निरांजन, ताम्हन, तांदूळ, इ०).

आरतें **क्रि० अ०** १ अलीकडे. २ अगोदर.

आरंधें **न०** १ अनपत्यत्वाचें दुःख. २ दुःखाचा कोल्हाहल.

आरपणें **अ० क्रि०** नष्ट होणें.

आरपार **क्रि० अ०** १ मधून, आंतून. २ पलीकडे. ३ या टोकापासून तों त्या टोकापर्यंत.

आरंवळणें **अ० क्रि०** १ वरळणें; ओरडणें. २ झोपेंत मुस्तावणें.

आरब्ध [**सं०** आ+रभ (उत्सुक होणें)] **वि०** आरंभिल्लें; सुरू केलेलें.

आरंभ [**सं०** 'आरब्ध' पहा] **पु०** सुरवात, प्रारंभ. ०**–शूर** **वि०** आरंभीं मोठा उत्साह दाखवून नंतर हातपाय गाळणारा.

आरंभण [**सं०** 'आरंभ' पहा] **पु०** १ संगीतमर्मज्ञ श्रोता. २ आरंभ करणारा.

आरंभरा [**सं०** 'आरंभ' पहा] **न०** १ सुरवात, प्रारंभ. २ धरणें. ३ धरण्याची मूठ.

आरंभणें [**सं०** आरंभ] **स० क्रि०** सुरू करणें; करावयाला उद्युक्त होणें.

आरभ्य, आरंभणीय [**सं०** आ+रभ् (उत्सुक होणें)] **वि०** ज्याला सुरवात करावयाची आहे असें.

आरमार [**पोर्चुगीज**] **न०** लढाऊ गलबतांचा [काफिला.

आरय **स्त्री०** गुदस्थानीं किं० मांडीवर झालेलें गळूं.

आरवंठा **पु०** ज्यांतील भाताची कापणी झाली आहे असें भातशेत.

आरवणी **स्त्री०** कोंबड्याचें आरवणें.

आरवणें **अ० क्रि०** (कोंबड्याचें) ओरडणें.

आरळी **स्त्री०** घोड्याच्या अंगावर उलट्या दिशेनें असलेले केश (हें अशुभ लक्षण समजतात).

आराधक [**सं०** आ+राध् (सिद्धीस जाणें, सज्ज होणें] **पु०** १ पूजा करणारा. २ पुजारी. ३ तोषविणारा; प्रसन्न करणारा.

आराधणूक [**सं०** 'आराधणें 'पासून] **स्त्री०** १ देवाला प्रसन्न करणें; देवाची भक्ति करणें. २ एखाद्या माणसाची मर्जी प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न.

आराधणें [**सं०** आ+राध् (सिद्धीस जाणें, सज्ज होणें). **स० क्रि०** १ देवादिकांस प्रसन्न किं० संतुष्ट करणें; पूजिणें. २ एखाद्या माणसाची मर्जी संपादण्याचा प्रयत्न करणें.

आराधन [**सं०** 'आराधणें' पहा] **न०** १ तोषविणें; संतुष्ट करणें. २ पूजा, उपासना, भक्ति. ३ सन्मान. ४ संपादन; मिळविणें.

आराधना [**सं०** 'आराधन' पहा] **स्त्री०** १ 'आराधन' पहा. २ संन्यासी, समाधिस्थ, यांचे पुत्रादिक त्यांच्या स्मरणार्थ श्राद्धस्थानीं जें कर्म करतात तें.

आराधी **पु०** पूजा करणारा.

आराध्य, आराधनीय [**सं०** आ+राध् (सज्ज होणें, सिद्धीस जाणें)] **वि०** १ ज्याची आराधना करावयाची तें (दैवत, इ०). २ ज्याची मर्जी राखावयाची तो मनुष्य. ०**–दैवत** **न०**, **–देवता** **स्त्री०** १ कुटुंबांत उपास्य म्हणून गणलेलें दैवत किं० देवता. २ खुशामत्या ज्या माणसाची खुशामत करतो तें माणस त्याचें आराध्य दैवत (किं० देवता).

आरापारा **क्रि० वि०** मधून मधून; सर्व भागीं सारखे वेचून नव्हेत अशा रीतीनें; विरळ विरळ; उ० यंदा आमच्या ह्या आंब्याच्या झाडावर आंबे आरापारा धरले आहेत, दाट नाहींत.

आरावा **पु०** ऐहिक वैभवाच्या ज्या चीजा त्या समुच्चयानें (जसें शेतभात, नोकरचाकर, घोडे, पालख्या, इ०).

आराम [**फा०**] **पु०** १ समाधान. २ मनोव्यथेचा किं० शारीरिक व्याधीचा उपशम. ३ विश्रांति. सुखस्थिति. ०**–खाना** **पु०** श्रीमंतांच्या घरांतील विश्रांतीचा किं० निजावयाचा महाल. **–शीर** **वि०** सुखदायक; आल्हाददायक.

आराम [**सं०** आ+रम् (रमणें, आनंदणें)] **पु०** १ आनंद. २ बाग. ३ खेळ. ४ विश्रांति. ५ राजाच्या क्रीडेचा बाग.

आराव [**सं०** आ+रु (शब्द करणें)] **पु०** १ ओरडणें. २ पक्ष्यादिकांचा शब्द.

आराष, आराश, आरास [**फा०** आराथिष्] **स्त्री०** घर, बंगला, महाल, दिवाणखाना, इ० शोभिवंत करणें (दिवे वगैरे लावून, हंड्या, झुंबरें टांगून, आरसे, चित्रें वगैरे मांडून).

आरुता **क्रि० वि०** आलीकडे.

आरूढ [**सं०** आ+रूढ (चढलेला; रुह् उगवणें, चढणें)] **वि०** १ चढलेला. २ उगवलेला.

आरूढि [सं० ' आरूढ ' पहा] स्त्री० १ वर चढणें. २ सूर्य वगैरेंचा उदय होणें.

आरूढणें [सं० ' आरूढ ' पहा] अ० क्रि० १ चढणें, वर जाणें; वर चढून बसणें. २ लोकांमध्यें एकादी वदंता प्रसृत होणें; एकादी गोष्ट फारशी विश्वासनीय नसून लोकांमध्यें फैलावणें.

आरेखणें स० क्रि० नियंत्रणेंत किं० आटोक्यांत ठेवणें.

आरोगण न० भोजन; सेवन.

आरोगणें स० क्रि० जेवणें, खाणें.

आरोग्य [सं० ' अरोग 'चें भा० वा० ना० अ (नाहीं) + रोग (दुखणें)] न० रोगरहितता; नीरोगीपणाची स्थिति.

आरोंठा पु० कापणी केलेलें भाताचें शेत.

आरोप [सं० आ + रुह् (चढणें, उगवणें)] पु० १ ठेवणें. २ चढविणें. ३ बोजा लादणें. ४ दोष देणें, टपका ठेवणें. ५ ऐक्य मानणें. ६ नसता गुण कल्पिणें. ७ झाड लावणें, बीज लावणें.

आरोपणें [सं० ' आरोप ' पहा)] स० क्रि० १ आरोपित करणें; एका पदार्थावर दुसरा ठेवणें, लादणें, बसविणें, इ०. २ पदार्थांचें ठायीं नसलेला गुण त्याचेवर कल्पिणें. ३ हवालीं करणें; (एकादें काम) एकाद्याच्या माथीं मारणें.

आरोपार [म० आरपार] क्रि० वि० १ मधून, इकडून तिकडे; ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत. २ अगदीं अंतर्यामापर्यंत.

आरोपित [सं० ' आरोप ' पहा] वि० १ लादलेला. २ चढविलेला. ३ कल्पिलेला.

आरोसापारोसा वि० स्नान न केलेल्या किं० न धुतलेल्या, किं० न विसळलेल्या स्थितींत असलेलें (माणूस, चिरगूट, भांडें इ०).

आरोसा पु० अणकुची; टोक; सुळका.

आरोह [सं० आ + रुह् (वाढणें, उगवणें)] पु० १ चढणें २ चढ, चढाव. ३ क्रमाला अनुसरून चढत जाणें.

आरोळी स्त्री० १ मोठी हाक. २ किंचाळी. ३ एक प्रकारची जाड पोळी.

आर्जव [सं० ऋजु (सरळ) यांचें भा० वा० ना०] सं० न०, म० स्त्री०, न० १ सरळपणा. २ खुशामत. ३ विनवणी. ꣸**आर्जवशक्ति** स्त्री० १ खुशामत करण्याची शक्ति, ताकद. २ लाळघोटेपणा करण्याची पात्रता. ३ लहीनपणा, नम्रपणा.

आर्जविणें [म० ' आर्जव ' पासून] स० क्रि० विनविणें; एकाद्याची खुशामत करून त्याला संतुष्ट करणें किं० वश करून घेणें.

आर्जवी [म० आर्जव + ई (प्रत्यय)] वि० १ खुशामत करण्यांत पटाईत. २ खुशामत करून आपलें काम साधणारा. ३ लहीन, नम्र.

आर्जव् ' आर्जवी ' पहा.

आर्त [सं० ऋ = जाणें, मिळविणें] वि० १ पीडिलेला; ग्रस्त; दुःखी; कष्टी. २ रोगी, रुग्ण. ३ विपन्न. ४ अनाथ.

आर्त न०, स्त्री० १ उत्कट इच्छा. २ उणीवेची पीडादायक जाणीव ꣸**–भूत** वि० उत्कट इच्छेनें पीडिलेला. **–साधु**, **–अभिमानी** वि० पीडलेल्या, दुःखी, किं० विपन्न माणसांविषयीं कनवाळू; दयार्द्र; मायाळू.

आर्तव [सं० ऋतुसंबंधीं] वि० १ योग्य काळचें. २ ऋतूंत उत्पन्न होणारें. न० १ स्त्रियांचा मासिक स्राव किं० विटाळ. २ रजस्वलेचें चवथ्या दिवसाचें स्नान.

आर्ति [सं०] स्त्री० १ दुःख. २ उपद्रव, पीडा, त्रास. ३ आजार, रोग. ४ नाश, क्षय.

आर्थ [सं० अर्थ] वि० १ अर्थाला धरून असलेलें; अर्थासंबंधीं; अर्थनिष्ठ. (याच्या उलट शाब्द). २ अभिप्रेत.

आर्थिक [सं०] वि० १ अर्थसंबंधीं. २ श्रीमंत. ३ शाहाणा.

आर्द्र [सं०] वि० १ भिजलेला, ओला. २ रसभरित, ताजा. ३ दयार्द्र, मायाळू. ४ मऊ. ꣸**–शाक** न० आलें.

आर्द्रक [सं०] न० आलें.

आर्द्रा [सं०] स्त्री० सहावें नक्षत्र.

आर्धिक [सं० अर्ध] पु० अर्धेलीनें शेत करणारा.

आर्य [सं०] वि० १ कुलीन; श्रेष्ठ जातीचा. २ सभ्य, सदाचारसंपन्न. पु० १ श्रेष्ठ माणूस. २ स्वामी. ३ गुरु. ꣸**–आवर्त** पु० हिमालय आणि विंध्य ह्यांच्यामध्यें जो हिंदुस्तानाचा प्रदेश

आहे तो; पुण्यभूमि. **–पुत्र पु०** (**नाटकांत**) १ नवरा. २ राजा. **–मिश्र पु०** पूज्य आणि संमान्य मनुष्य. **–लिंग, –रूप पु०** भोद. **–वृत्त न०** सदाचार, सद्वर्तन.

आर्या [**सं०** 'आर्य'चें स्त्रीलिंग] **स्त्री०** १ पूज्य स्त्री. २ सासू. ३ पार्वती.

आर्या [**सं०**] **स्त्री०** एक प्रकारचें वृत्त किं० ह्या वृत्तांत रचलेलें पद्य. आर्यावृत्ताचे अनेक प्रकार आहेत त्यांत मुख्य पांच आहेत. आर्या, गीति, उपगीति, उद्गीति, आणि आर्यागीति. व्यवहारांत जिला 'आर्या' म्हणतात तिचें वृत्तशास्त्रांत 'गीति' असें नांव आहे. वृत्तशास्त्रांतील जी आर्या तिच्या प्रथम पादीं आणि तृतीय पादीं बारा मात्रा असतात; दुसऱ्या पादीं अठरा आणि चवथ्या पादीं पंधरा असतात.

आर्ष [**सं०** 'ऋषि' संबंधी] **वि०** १ ऋषी-संबंधीं. २ वैदिक (लौकिक नव्हे तें,–ग्रंथ, ज्ञान, धर्म, आचार, प्रयोग, इ०). ३ पवित्र (वेद-तुल्य). **पु०** विवाहाच्या आठ प्रकारांपैकीं एक (ह्या प्रकारांत गाय, बैल, घेऊन कन्यार्पण केलेलें असतें; मागें अष्टविवाह पहा). **न०** वेद. मराठींत आर्ष=विचित्र, तऱ्हेवाईक, रूढ मार्ग न अनुसर-णारा; धाडसी. ❀**–विवाह पु०** गाय, बैल घेऊन कन्यार्पण करून जो विवाह तो.

आल स्त्री० ज्याच्या मुळांपासून कापडें, रेशीम, वगैरे रंगविण्यासाठीं तांबडा रंग काढतात, ती वनस्पति.

आलक्तक [**सं०** अलक्त=अळिता] **पु०** अळिता.

आलंकारिक [**सं०** 'अलंकार'पासून] **वि०** १ अलंकार ज्यांत आहेत अशी (भाषा, शैली). २ उपमा, रूपक, इ० चें निरूपण करणारा (ग्रंथ किं० पंडित).

आलकट, आलगट वि० हलकट, अळड, द्वड.

आलग न० अग्र.

आलबेला [**हिं०**] मागें 'अलबेला' पहा.

आलबेलीं क्रि० वि० सहजासहजीं.

आलंब [**सं०** आ+लंब् (लोंबणें)] **पु०** १ लोंबणें. २ आश्रय, आधार. ३ ओळंबा.

आलंबन [**सं०** 'आलंब' पहा] **न०** १ लोंबणें. २ आधार, आश्रय. ३ स्थान. ४ (**साहित्य**) मनोवृत्तीला उत्तेजक कारण. ५ एकाग्रता.

आलय [**सं०**] **पु०** १ घर. २ स्थान. ३ निवा-साची जागा. ४ कांहीं पदार्थ ठेवण्याचें किं० साठ-विण्याचें वास्दान.

आलवाल [**सं०**] **न०** आळें (झाडाच्या मुळाभोंवतीं पाण्यासाठीं केलेला खळगा).

आलस्य [**सं०** 'अलस'चें भा० वा० ना०] **न०** आळस.

आला [**म०** 'येणें' याचें भू० का० चें **पु०** रूप] **अ० क्रि०** १ येणें ह्या क्रियापदाचें **भू० का० पु० ए० व० वि०** आलेला. ❀**आला गेला पु०, आलें गेलें न०** १ पाहुणापाहुणा. २ प्रसंगानें आलेला किं० थोडक्या काळापुरता आलेला माणूस. ३ कांहीं कामासाठीं घराच्या बाहेर पडणारें माणूस किं० बाहेरचें येणारें माणूस; उ० पुढचें दार आल्यागेल्यासाठीं उघडें असूं दे. **आल्यागेल्याचें घर न०** ज्या घरांत वारंवार पाहुणे येतात तें; जेथें पाहुण्यांचा सत्कार होतो तें घर; ज्या घरांत पाहुण्यांचा विशेष धवडगा आहे तें घर. ❀**आला दिवस पु०** १ प्रत्येक दिवस. **क्रि० वि०** प्रत्येक दिवशीं; उ० आला दिवस तूं खेळत अस-तोस; तुझी परीक्षा कशी पास होणार ?

आलात [**सं० न०**] कोलीत.

आलान [**सं० न०** १ हत्ती बांधण्याचा खांब. २ बेडी. ३ दोरी.

आलाप [**सं०** आ+लप् (बोलणें)] **पु०** १ भाषण. २ सांगणें. ३ गाण्याचे सूर. ४ तान. ५ गप्पा सप्पा. (' अलाप ' पहा.)

आलापणें [**सं०** 'आलाप' पासून] **स० क्रि०** एकादें पद किं० पदाचा भाग गुणगुणणें.

आलापाला [**म०** 'पाला' याशीं 'आला' ही सांगड] **पु०** जाडें भरडें गरीबाऊ जेवण.

आलावा [**फा०** आलावा] **पु०** मोहोरमांत मुसलमान लोक ज्या खड्ड्यांत अग्नि प्रज्वलित करून त्याच्या भोंवतीं नाचतात तो.

आलि(–ली–) कडे क्रि० वि० हल्लींच्या काळीं; सांप्रत; अर्वाचीनकाळीं. आलीकडचा, आलिकडील म्ह० हल्लींच्या काळचा.

आलिंग पु० नांगर हाकणाऱ्या माणसाच्या कोरल्याच्या (म्ह० चावकाच्या) लाकडी मुठीला कातड्याची वादी (तुताती) बांधावयासाठीं केलेला कोयंडा.

आलिंगणें [सं० आ+लिंग् (जाणें)] स० क्रि० कवटाळणें;—ला मिठी मारणें.

आलिंगन [सं० ' आलिंगणें ' पहा] न० कवटाळणें, मिठी.

आलिंगित [सं० आ+लिंग् (जाणें)] वि० कवाटाळलेला; मिठी मारलेला.

आलिजाहां [फा० आली जाह्] वि० प्रचंड, अवाढव्य, फार मोठ्या प्रमाणावर असलेला, (कारखाना, संस्था, सरंजाम, इ०).

आलिशां, आलिशान [फा०] वि० फार वरच्या दर्जाचा, अतिश्रेष्ठ (पत्राच्या किं० अर्जाच्या मायन्यांत योजावयाची पदवी).

आली स्त्री० जिच्या मुळापासून तांबडा रंग काढतां येतो अशी एक वनस्पति.

आली [सं०] स्त्री० सखी, मैत्रीण.

आली गेली [म० येणें+जाणें यांपासून] स्त्री० १ नफा नुकसान; जमा खर्च; आय व्यय. २ सोयीची किं० गैरसोयीची गोष्ट (व्यापारांत किं० व्यवहारांत घडून आलेली); उ० तुम्ही आपल्या चोपड्या नीट तपासून घ्या; आली गेली मजवर लोटाल तर तें मला पथकरणार नाहीं.

आलू, आलबु (–बो–)खार [फा० आलूबुखारा] पु० बुखारा नांवाच्या शहराहून आलेलें एक प्रकारचें फळ.

आलेख [सं० आ+लिख् (रेघा काढणें)] पु० १ लिहिणें. २ पत्र. ३ जें लिहिलें तें.

आलेखन [सं० ' आलेख ' पहा] न० १ ओरखडणें. २ चित्र काढणें. ३ लिहिणें. पु० आचार्य.

अलेख्य [स० ' आलखे ' पहा] न० १ चित्र. २ लेख. ३ जें लिहावयाचें तें. ॐ–**शेष** वि० मृत, मेलेला.

आलोक [सं० आ+लोक् (पाहाणें)] पु० १ पाहाणें. २ दिसणें, देखावा. ३ दृष्टीचा टप्पा. ४ प्रकाश. ५ दिवा. ६ जयजयकार. ॐ–**मार्ग** पु० खिडकी, गवाक्ष.

आलोकन, आलोकित [सं० ' आलोक ' पहा.] न० १ पाहाणें. २ विचार.

आलोडणें [सं० आ+लुड् (घुसळणें, घोटणें)] न० १ ढवळणें, घुसळणें. २ मिसळणें. ३ खळबळ करणें. ४ (**लाक्षणिक**) चिंतन करणें, विचार करणें.

आलोडन [सं० ' आलोडणें ' पहा] न० १ ढवळणें. २ मिश्रण. ३ खळबळ. ४ चिंतन, विचार.

आलोडित [सं० ' आलोडणें ' पहा] वि० १ ढवळलेलें, घुसळलेलें. २ मिश्रित. ३ विचारांत घेतलेले, तपासलेलें, चिंतिलेलें.

आलोड्य [सं० ' आलोडणें ' पहा] वि० १ ढवळावयाचें. २ मिश्र करावयाचें. ३ विचारांत घ्यावयाचें, ज्याची परीक्षा किं० तपासणी करावयाची असे. न० प्रावीण्य, पारंगतता; उ० ज्योतिषांत त्याचें चांगलें आलोड्य आहे; (ह्या अर्थी ' आलोळ्य ' ' ओलाढ्य, ' अशींही रूपें आहेत.)

आव पु० १ मोठा देखावा; डौल; अवसानाचा पविला (क्रि० घालणें; आणणें). २ सुबक किं० नीटनेटका आकार किं० दर्शन. ३ धाडसाचा, हिंमतीचा, किं० धमकदारीचा आविर्भाव. ४ आटोका, पोंच; आवांका. ५ उद्भव, उगम. ६ धैर्य, उत्साह. ७ अवडंबर.

आंव [सं० आम=कच्चा] स्त्री० १ आम, आमांश (रोगविशेष). २ गुदद्वारा शेंबडासारखा बाहेर पडणारा मल. ॐ **रक्ती आंव** स्त्री० ज्या आजारांत गुदद्वारा शेंबडासारखा मल.

आवई स्त्री० बातमी, गप्प, भुमका, कंडी.

आवक वि० आलेला, येऊन पोंचलेला, (पत्रें, सरकारी कागद, इ०). बाहेर जाणाऱ्या कागदांना ' जावक ' हा शब्द लाविला जातो.

आंवकणें अ० क्रि० कचरणें; माघार खाणें; साशंक होणें.

आवगणें अ० क्रि० १ अव्यवस्थित रीतीनें, बेशिस्तपणें, किं० ताळतंत्र सोडून वागणें; स्वच्छंदीपणानें वागणें. २ आटोपणें. ३ अंगीं आणणें.

आवंजणें स० क्रि० नाचणी, वरी, इ० चे रोपे उपटून दुसऱ्या ठिकाणीं तयार केलेल्या जमीनींत रोवणें.

आवजाव [हिं० आव (ये)+जाव (जा)]

स्त्री० येणें जाणें; एकाद्या माणसाला विनाकारण दिलेलें हेलपाटें; उ० तुम्हाला काय जबाब द्यावयाचा असेल तो आतांच्या आतां द्या; मला उगाच आव-जाव लावूं नका.

आवट पु० १ इमारतीच्या उपयोगाकरितां रचून ठेविलेल्या लाकडांचा ढीग. २ सरपणाच्या लाकडांचा ढीग.

आंवटणी स्त्री० नाचणी, वरी, इ० रोपें एका ठिकाणाहून उपटून दुसऱ्या ठिकाणीं लावण्याचें काम.

आंवटणें स० क्रि० नाचणी, वरी, इ० चे रोपें एका जागेंतून उपटून दुसऱ्या जागेंत रोवणें.

आवटणें अ० क्रि० उरणें.

आवड स्त्री० प्रीति. मागें ' अवड ' पहा.

आवडणें प्रीतीस पात्र होणें. मागें ' अवडणें ' पहा.

आवडक वि० १ साकार. २ दृश्य.

आवडताही क्रि० वि० भलत्यासही.

आंवडवणी न० लिंबाचीं पानें वगैरे घालून स्नानासाठीं तयार केलेलें पाणी.

आवडसावड स्त्री० १ माणसें, बैल, नांगर, इ० एकमेकांच्या उपयोगासाठीं देण्याघेण्याची पद्धति (शेतकरी लोकांची). २ एकमेकांनीं एक मेकांस एकाच जातीच्या कामांत केलेली मदत.

आवडाव पु० पकड; पकडल्याची स्थिति. आटोका. **स्त्री०** दरवडेखोरांनीं किं० सैन्यांतील शिपायांनीं केलेली नासधूस, जाळपोळ, इ०. **स्त्री०** मुलांच्या खोड्या.

आवडी स्त्री० आवड, पसंती.

आवडें वि० भलतें; भलतेंसलतें.

आवण न० १ भातशेत. २ भाताचीं रोपें. ३ भाताचीं रोपें एका ठिकाणाहून उपटून नंतर जेथें पुन्हा रोवतात तें शेत. ४ भाजीपाला किं० लहानसें शेत ज्या जमीनींत करतात ती जमीन.

आंवणी स्त्री० १ भाताचीं रोपें एका ठिकाणचीं उपटून दुसऱ्या ठिकाणीं लावणें. २ अशीं रोपें जेथें लावतात तें शेत.

आंवणू वि० १ भाताचीं रोपें एके ठिकाणचीं उपटून पुन्हा लावावयासाठीं तयार करून ठेवलेलें (शेत). २ अशीं लावलेलीं (रोपें). ३ दुसरी-कडे लावावयासाठीं उपटलेला (रोपें).

आवणें स० क्रि० भाताचीं, नागलीचीं, मिरच्यांचीं, वांग्याचीं, इ० चीं रोपें एका ठिकाणां-तून उपटून दुसऱ्या ठिकाणीं रोवणें.

आवणें, आंवणें [**सं०** ' आचमन ' पासून] **अ० क्रि०** भोजनानंतर तोंड आणि हात धुणें; आंचवणें.

आवंतणें [**सं०** ' आमंत्रण ' पासून] **स० क्रि०** भोजनार्थ बोलावणें; आमंत्रण करणें.

आवंतणें [**सं०** आमंत्रण] **न०** भोजनार्थ केलेलें आमंत्रण.

आवंतर वि० बाकीचें; इतर; किरकोळ.

आवथी स्त्री० ' आहुति ' पहा.

आवर, आवर आटोप [**म०** आवरणें, आटोपणें] **पु०** १ संकोच; थोडक्या जागेंत ठेवणें. २ व्यवस्थित रीतीनें पदार्थ, सामानसुमान, इ० लावणें, ठेवणें, इ०. ३ समाप्तीला सुरवात करणें. ४ आटोका, नियंत्रण. ५ काम उरकण्याची सफाई, चटपटीतपणा, इ०.

आवरक वि० १ वेष्टिणारा, मर्यादित कर-णारा, आच्छादणारा, झाकणारा, गुंडाळणारा. २ नियंत्रित करणारा; आटोक्यांत ठेवणारा. ॐ**आव-रक शक्ति स्त्री०** नियंत्रित करण्याची किं० आटो-क्यांत किं० कबजांत ठेवण्याची ताकद.

आवरजा [**फा०** आवर्जह्] **पु०** विशिष्ट सदर (हिशेबाचें), किं० त्या सदराचा उतारा.

आवर्जून क्रि० वि० मुद्दाम; निक्षून; आस्था-पूर्वक; कळकळीनें.

आवरण [**सं०** आ+वृ (झाकणें, वेष्टिणें)] **न०** १ झाकणें, गुंडाळणें, वेष्टिणें. २ झांकण, वेष्टन, आच्छादन. ३ प्रतिबंध, नियंत्रण, अडथळा. ४ अज्ञान. ५ तट, भिंत, कुंपण, इ०. ६ चिल-खत. ७ ढाल. ८ भाद्रपद शुक्ल तृतीयेच्या दिवशीं कांहीं खाण्यावर मन जाऊं नये म्हणून आधल्या दिवशीं रात्रीं बायका जें आकंठ भोजन करतात तें. ह्या भोजनाला 'आवरणें' असेंही म्हणतात. ॐ**—शक्ति स्त्री०** वस्तूचें खरें स्वरूप झाकून टाकणारें बुद्धीचें अज्ञान किं० मांद्य. **—देवता स्त्री० अ० व०** १ एकाद्या विशिष्ट कर्माची जी मुख्य देवता तिचे भोवतीं राहाणाऱ्या ज्या अवांतर देवता असतात

त्या; उ० अनंताच्या भोवतालीं ज्या अष्ट दिशांच्या देवता असतात त्या. २ राजाच्या किं० कोणा मोठ्या अधिकाऱ्याच्या सान्निध्याला असणारे त्याचे जे सहागार, इ० ते. २ श्रीमंताचे बगलबचे, लाळघोटे, थुंकीझेले, गोंडाघोळे. **आवरणशक्ति, आवरशक्ति स्त्री०** १ माणसांना आपल्या नियंत्रणेंत ठेवण्याची हातोटी. २ व्यवहार सुरळीतपणें चालविण्याची सफाई. **आवरणशक्ति स्त्री०** सर्व पदार्थांचें खरें स्वरूप झांकून टाकण्याची शक्ति म्ह० माया.

आवरणें [सं० 'आवरण' पहा] **स० क्रि०** १ एकत्र करणें. २ आटोपणें. ३ व्यवहार किं० पसारा गुंडाळणें. ४ संपविणें. ५ आटोपता घेणें. ६ निवारणें. ७ संभाळणें. ८ ताब्यांत ठेवणें; कह्यांत ठेवणें. ९ व्यवस्थितपणें ठेवणें.

आवरणें न० भाद्रपद शुक्ल द्वितीयेस रात्रौ बायका जेवतात तें जेवण; वर 'आवरण' पहा.

आवरदा पु०, आवरदे पु० अ० व० [फा० आवर्दह्=आणलेला] आयात माल; आवक. ॐ**आवरदाजमा स्त्री०** आयात मालावरील जकातीचें उत्पन्न. **आवरदेरवाना पु० अ० व०** १ आयातीचे आणि निर्गतीचे पदार्थ. २ आयात व निर्गत मालावरील जकाती वगैरे.

आवरसावर, आवराआवर ['आवरणें' या पासून] **स्त्री०** बांधाबांध, झाकपाक, वगैरे.

आवर्त [**सं०** आ+वृत् (असणें)] **पु०** १ फिरणें; वळणें. २ पाणी, केश, इ०चा भोंवरा. ३ चिंतन; निदिध्यास. ४ संशय. ५ गर्दीची किं० दाटीची जागा. ६ (वैद्यक) सुवर्णमाक्षिक. ७ वितळणें. ८ संसार. ९ रत्नविशेष.

आवर्तन [**सं०** आ+वृत् (असणें)] **न०** १ परत फिरणें; गरगर फिरणें; परिभ्रमण. २ घुसळणें. ३ धान्य चाळणें. ४ अनेक धातु एकत्र कढविणें. ५ पुनः पुनः करणें. ६ घोकणें, अभ्यास. ७ मध्यान्हानंतर छायेचें उलटणें. ८ वस्त्रगाळ करणें.

आवर्तनी [**सं०** आ+वृत् (असणें)] **स्त्री०** १ पळी. २ वितळविण्याची मूस.

आवर्षांत क्रि०वि० सबंध वर्षात; सर्व वर्षभर.

आवलणें [**आवलें** यापासून] **स० क्रि०** वल्हविणें.

आवलि (–ली) [**सं०**] **स्त्री०** पंक्ति; राजि; माला; ओळ; रांग; परंपरा. [मारणारा.

आवलें न० वल्हें. ॐ **आवलकरी पु०** वल्हें

आवशुद्ध वि० प्रमाणशुद्ध बांध्याचा.

आवश्य [**सं०**] **न०** आवश्यकता.

आवश्यक [**सं०**] **वि०** अगत्याचा; जरुरीचा; कामाचा; निकडीचा. **न०** आवश्यक अशी गोष्ट; जरूरीची बाब. [पहा.

आवस स्त्री० अमावास्या. मागें 'अवस'

आंवस [**सं०** आमिष=मांस] **न०** बैलाचें, गायीचें, वगैरे मांस; (वाघ आपल्या सावजाला मारून दुसऱ्या दिवसाकरितां जें त्याचें अवशिष्ट मांस राखून ठेवितो तें). ॐ **आंवसावरचा वाघ पु०** आंवस खात असतां व्यत्यय येऊन तें खाणारा वाघ चवताळतो व व्यत्यय करणारावर धावून जातो. यावरून रागीट किं० तापट इसम.

आवसा [**सं०** आवास=राहाणें, वसतीची जागा]**पु०**तात्पुरत्या उपयोगाकरितां दुकानदार जत्रेंत वगैरे काठ्यांचें किं० बाबूंचें जें दुकान उभरतात तें.

आवह [**सं०** आ+वह् (आणणें)] **वि०** आणणारा; या अर्थी समासांत अंत्य पदीं हा शब्द येतो; जसें, हितावह म्ह० हित आणणारा, गुणावह म्ह० गुण आणणारा किं० गुणकारक किं० गुणकारी, इ०.

आवळा जावळा पु० ए० व०, आवळे जावळे पु० अ० व० जुळे भाऊ. **आवळ्या जावळ्या स्त्री० अ० व०** जुळ्या बहिणी. **आवळीं जावळीं न० अ० व०** जुळीं भावंडें.

आवा पु० १ मातीचीं कच्चीं भांडीं भट्टींत घालून भाजावयासाठीं रचून ठेविलेलीं असतात, तीं समुच्चयानें. २ अशीं कच्चीं भांडीं भट्टींत घालून भाजून काढलीं असतां त्यांचा समुच्चय. ॐ**आवा उतरणें** एकाद्या स्त्रीला झालेलीं सर्व मुलें प्रौढ दशेस आलीं असतां त्या स्त्रीचा 'आवा उतरला' असें म्हणतात.

आवा पु० १ आवणांतून उपटलेलीं आणि आवणूंत रोवावयाचीं भाताचीं रोपें. २ आवणूंत रोंवलेलीं भाताचीं रोपें.

आवाज [**फा०**] **पु०** १ ध्वनि (बोलण्याचा वगैरे). २ कटकट; गलबला. ३ स्वर;

कंठ (गायकाचा वगैरे). ⊛ **आवाजीदार** वि० चांगल्या आवाजाचा (गवई, वाद्य, इ०).

आवाजा [फा०] पु० १ आवाज. २ प्रसिद्धि; बोलबाला.

आवाप [सं० आ+वप् (पेरणें)] पु० पेरणें (विशेषतः समासांत, जसें बीजावाप म्ह० बी पेरणें).

आवापन [सं० आ+वे (विणणें)] न० १ कोष्ट्याचा माग. २ सूत काढण्याचें यंत्र.

आवार [सं० आ+वृ (आच्छादणें)] पु०, न० १ पटांगण; मोकळी जागा (घरा भोंवतालची वगैरे). २ कुंपण.

आवारा पु० १ अवाढव्य तयारी किं० खटाटोप. २ सामर्थ्याचा किं० साधनसामग्रीचा भव्य देखावा. ३ वर आलेलें गळूं दाठरणें किं० पुन्हा उठणें.

आवारू वि० दोन (नंद भाषेंत).

आवास [सं० आ+वस् (राहाणें)] पु० वसतिस्थान; सदन; धाम. [कुलधर्म.

आवाह [सं० आ+वह् (नेणें)] पु०

आवाहन [सं० 'आवाह' पहा] न० बोलावणें; पाचारण; आमंत्रण; आव्हान (प्राणप्रतिष्ठा करते समयीं देवतादास). ⊛**आवाहनविसर्जन** न० देवतेची प्राणप्रतिष्ठा करणें व नंतर तिला निरोप देणें. [क्रि० बोलावणें.

आवहणें [सं० आ+वह् (नेणें)] स०

आवाहित [सं० 'आवाहणें' पहा] वि० १ बोलाविलेला. २ मूर्तीचे ठायीं प्रतिष्ठित केलेली देवता.

आवाळूं, अवाळूं न० शरीराच्या एका भागीं कांहीं विकृतीमुळें मांस वाढून जो पिंड किं० गोळा उठतो तो.

आविंज(-झ) स्त्री० भाताचे रोपें आवणांतून उपटून आवणूमध्यें रोवणें.

आविंज (-झ-) णें स० क्रि० भाताचीं रोपें आवणांतून उपटून आवणूंत रोवण्याची क्रिया करणें.

आविर्भवणें [सं० आविस् (प्रकट)+भू= होणें)] अ० क्रि० १ प्रकट होणें; दृग्गोचर होणें; दिसूं लागणें; दिसणें. २ परिस्फूर्ति होणें.

आविर्भवन [सं० 'आविर्भवणें' पहा] न० परिस्फुटता; दृग्गोचरता; प्रकट होणें.

आविर्भाव [सं० 'आविर्भवणें' पहा] पु० १ दर्शन; परिस्फुटता. २ हावभाव; हातवारे. ३ सोंग; देखावा; उ० तिनें रागाचा असा आविर्भाव आणला कीं तिच्या नवऱ्याला तिचें म्हणणें कबूल करावें लागलें !

आविष्करण [सं० आविस् (प्रकट)+करण (करणें)] न० स्पष्ट करणें; प्रकट करणें; दाखविणें.

आविष्कृत [सं० आविस् (प्रकट)+कृ (करणें)] १ प्रकट केलेलें; दाखविलेलें. २ प्रख्यात.

आविष्ट [सं० आ+विश् (प्रवेशणें)] वि० १ पिशाचादिकांनीं पछाडलेला. २ ग्रस्त. ३ आवेशयुक्त. ४ आक्रान्त (उ० लोभाविष्ट, कामाविष्ट, क्रोधाविष्ट, इ०).

आवुत्त [सं०] पु० बहिणीचा नवरा.

आवृत्त [सं० आ+वृत् (असणें)] वि० १ पुन्हां आलेला; वळलेला. २ परत फिरलेला.

आवृत्ति [सं० 'आवृत्त' पहा] स्त्री० १ परत येणें, वळणें, किं० फिरणें. २ पलायन. ३ पुनर्जन्म. ४ गरगर फिरणें. ५ तीच गोष्ट पुन्हा करणें. ६ त्याच टायपांवरून एका वेळीं छापलेलें ग्रंथाचें मुद्रण, किं० त्या वेळीं छापलेल्या प्रती समुच्चयानें.

आवेग [सं०] पु० १ घाई. २ धांदल. ३ आवेश. ४ मनाचा क्षोभ.

आवेदक [सं० आ+विद् (जाणणें)] पु० १ फिर्यादी. २ बातमीदार.

आवेदन [सं० 'आवेदक' पहा] न० १ कळविणें; सांगणें. २ फिर्याद. ३ विवाह.

आवेल न० नारळाचा चोथा तापवून पिळून काढलेलें तेल.

आवेश [सं० आ+विश् (प्रवेशणें)] पु० १ प्रवेश. २ पछाडणूक. ३ उत्कट मनोविकार. ४ भूतपिशाचबाधा. ५ मूर्च्छा (अपस्मार). ६ वसतिस्थान.

आवेशणें [सं० 'आवेश' पहा] अ० क्रि० १ क्षुब्ध होणें; संतप्त होणें. २ उत्साहयुक्त होणें.

आवेशी [सं०आवेश+म० ई (प्रत्यय)] वि० १ आवेशानें आक्रान्त; क्षोभ पावलेला. २ धमकदार; उत्साही.

आशक [अ० आषक्] वि० प्रेमानें किं० लोभानें आकर्षिलेला.

आशंकणें [**सं०** आ+शंक् (शंका घेणें, भिणें)] **अ० क्रि०** शंकित होणें, कचरणें; भीतीनें माघार खाणें.

आशंका [**सं०** ' आशंकणें ' पहा] **स्त्री०** १ संकोच; भीति; कचर. २ आक्षेप. ◊**–निवृत्ति स्त्री०** आक्षेपाचें किं० शंकेचें निरसन.

आशंकित [**सं०** ' आशंकणें ' पहा] **वि०** १ भ्यालेला; कचर खालेला. २ संकोच पावलेल्या मनाचा.

आशय [**सं०** आ+शी (निजणें)] **पु०** १ स्थान. २ शयनस्थान. ३ सांठा. ४ उदर; पोट; कोठा. ५ आंतला भाग. ६ कोठार. ७ मन. ८ मनोवृत्ति. ९ अभिप्राय. १० उद्देश; स्वेच्छा. ११ संस्कार; वासना.

आशा [**सं०**] **स्त्री०** १ इच्छा. २ एकादी वस्तु मिळण्याचा संभव. ३ पूर्व, पश्चिम, इ० ज्या दिशा, त्यांपैकीं प्रत्येक. ४ लोभ; हांव. ५ एकादी वस्तु फलित व्हावी किं० सिद्ध व्हावी अशी मनीषा. ६ आसक्ति. ७ अपेक्षा. ◊**आशादुराशा स्त्री०** बरी बाईट आसक्ति, अपेक्षा, लोभ, माया, इ०. **आशाभूत, आशाळभूत न०** भक्ष्यादिपदार्थांसाठीं जिभा काढणारा; हावरट; लोभी. **आशाळ वि०** हावरट; लोभी.

आशावणें, आशवणें अ० क्रि० उत्कटतेनें इच्छिणें किं० अपेक्षिणें; एकाद्या वस्तूवर आसक्ति ठेवणें किं० तिचा अभिलाष करणें.

आशाविणें स० क्रि० एकाद्याच्या मनांत आशा उत्पन्न करणें; एकाद्याला आशा किं० इच्छा करावयास लावणें; लोभविणें.

आशी [**सं०**] **वि०** (समासांत अंत्यपदीं) इच्छा करणारा; अपेक्षिणारा; जसें, फलाशी म्ह० फलाची इच्छा करणारा; धनाशी म्ह० धनेच्छु; पुत्राशी म्ह० पुत्राची इच्छा करणारा.

आशीं न० पोहे पाखडतांना जें पीठ किं० भुसकट उडतें तें.

आशींपाशीं [पाशीं (पार्श्वीं) ह्याला 'आशी' ची सांगड] **क्रि० वि०** जवळपास; आसपास; आजूबाजूस.

आशीर्वाद पु०, आशीर्वचन न० [**सं०** आशिस्=इच्छा+वाद (वद्=बोलणें), वचन (वच्=बोलणें)] १ इच्छा; वर. २ अभीष्टचिंतन. (दोन्हीं शब्दांशीं सहकारी क्रियापद **देणें**). ३ वडील माणसानें लहानास लिहिलेलें पत्र. ◊**आशीर्वादार्थ, आशीर्वादार्थक वि०** ईश्वराचें गुणवर्णन किं० स्वरूपवर्णन ज्यांत केलेलें असतें आणि ज्याच्या शेवटीं तो ईश्वर तुमचें रक्षण करो अशी इच्छा प्रकट केलेली असतें असा (श्लोक, वाक्य, इ०).

आशुतोष [**सं०** आशु=शीघ्र+तोष (तुष्=संतोषणें)] **वि०** अल्पसंतुष्ट; थोडक्यांत किंवा लवकर समाधान पावणारा.

आशौच [**सं०**] **न०** १ सुतक (आप्तेष्ट मेल्यामुळें आलेलें). २ विटाळ (मेलेल्या माणसास खांदा दिल्यामुळें, ग्रहण लागल्यामुळें, वगैरेमुळें प्राप्त होणारा). ३ कुटुंबांत मूल जन्मल्यानें येणारा विटाळ (याला जननाशौच म्हणतात). ४ (लक्षणेनें) घाणेरडेपणा; गलिच्छपणा; गबाळेपणा. ◊**आशौची वि०** ज्याला आशौच (सोयेर, सुतक, वगैरे) प्राप्त झालें आहे असा.

आश्चर्य [**सं०**] **न०** १ चमत्कार; नवल; विस्मय. २ अघटित गोष्ट; चमत्कृतिजनक किं० विस्मयकारक गोष्ट; उ० काय ? गणेशपंत पास झाले ? आश्चर्यच म्हणावयाचें !

आश्रम [**सं०** आ+श्रम् (श्रमणें)] **पु०** १ तपस्व्याचें निवासस्थान. २ गोसाव्यांचा एक पंथ. ३ ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ, आणि संन्यास, हे जे चार धर्म, त्यांपैकीं प्रत्येक. ४ पाठशाळा. ◊**–धर्म पु०** तपस्व्यांचें व्रत. **–वासी पु०** तपस्वी. **–चतुष्टय न०** ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ, आणि संन्यास, हे जे चार आश्रम ते (समुच्चयानें). **आश्रमांतर न०** १ एका आश्रमांतून दुसऱ्या आश्रमांत जाणें, जसें ब्रह्मचर्याश्रमांतून गृहस्थाश्रमांत जाणें. २ संन्यास घेणें; चतुर्थाश्रम स्वीकारणें. (हाच अर्थ विशेष रूढ आहे).

आश्रय [**सं०** आ+श्रि (आश्रय करणें)] **पु०** १ स्थान. २ आसरा, आधार. ३ वास्तव्याचें स्थान. ४ मदत; पाठिंबा. ५ सान्निध्य. ६ अवलंब. ७ आश्रय देणारा.

आश्रयण [**सं०** ' आश्रय ' पहा] **न०** १ आश्रय; संरक्षणासाठीं एकाद्याकडे जाणें. २ जोडणें.

३ पसंत करणें. ४ एकाद्या विशिष्ट मताचा अवलंब करणें.

आश्रयणें स० **क्रि०** १ ०चा आश्रय घेणें; ०चा अवलंब करणें. २ एकादें विशिष्ट मत वगैरे अनुसरणें. ३ एखादी विशिष्ट योजना वगैरे स्वीकारणें.

आश्रयी [**सं०** ' आश्रय ' पहा] **वि०** कशाच्या तरी आधारें राहणारा, असणारा, इ०; उ० पटत्व हा गुण पट या वस्तूवर वास्तव्य करतो, म्हणजे पटाचा तो आश्रयी होय.

आश्रित [**सं०** ' आश्रय ' पहा] **वि०** १ ज्याला आश्रय, आधार, पाठिंबा, वगैरे देण्यांत आला आहे असा; बाळगलेला; सांभाळलेला. २ ज्याचा आश्रय करण्यांत आला आहे असा. ३ आश्रय करणारा. ४ आचरणारा. ५ अधीन. ६ उदर-निर्वाहार्थ दुसऱ्यावर अवलंबून असलेला.

आश्लिष्ट [**सं०** आ + श्लिष् (आलिंगणें)] **वि०** १ आलिंगिलेला; कवटाळिलेला. २ स्पर्शिलेलें; चिकटलेलें. ३ वेष्टिलेलें.

आश्लेष [**सं०** आ + श्लिष् = आलिंगणें] **पु०** १ आलिंगन; कवटाळणें; मिठी मारणें. २ संबंध.

आश्लेषा [**सं०**] **स्त्री०** सत्तावीस नक्षत्रांतील नववें नक्षत्र.

आश्वलायन [**सं०**] **न०** १ ऋग्वेदाची एक शाखा. २ त्या शाखेचा ब्राह्मण. ३ एक ऋषि.

आश्वासणें [**सं०** आ + श्वस् (श्वास टाकणें)] **स० क्रि०** ०ला आश्वासन देणें; ०ला धीर देणें; ०ची खात्री करणें; ०ला प्रोत्साहन देणें.

आश्वासन [**सं०** आ + श्वस् (श्वासोच्छ्वास करणें)] **न०** १ प्रोत्साहन; धीर देणें. २ वचन देणें; ग्वाही देणें; खात्री करणें.

आश्विन [**सं०**] **पु०** बारा मासांतील सातवा जो महिना तो. ॐ**आश्विनगौरी स्त्री०** नाचणीचा एक प्रकार. **आश्विना, आश्विनी स्त्री० वि०** आश्विनमासांतील; आश्विन मासासंबंधाची. **आश्विनेय पु० ए० व०** नकुल किं० सहदेव. **पु०** अश्विनी कुमार.

आषाढ [**सं०**] **पु०** हिंदूंच्या चवथ्या मासाचें नांव. ॐ**आषाढ पागोळी, आषाढ पाटी, आषाढभूती** मागें **आखाड** शब्द पहा. **आषाढी वि०** आषाढ मासांतील, जसें आषाढी एकादशी. **स्त्री०** आषाढांत येणारी एकादशी.

आष्ट, आस पु० वृक्षविशेष.

आस, आंस [**सं०** अक्ष] **पु०** १ कणा (ज्याच्या भोंवतीं चाक फिरतें तो). २ उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत जी कल्पित रेषा, जिच्या भोंवतीं पृथ्वी फिरते ती पृथ्वीचा आस.

आस [**सं०** आशा] **स्त्री०** आशा; निदिध्यास; उ० आस हा तुझी लागली असे. ॐ**श्वास तों आस** प्राण असे तोपर्यंत आशा सुटत नाहीं. **आसका बा, निरासकी मा** अभ्युदयीं बापाचा आसरा मिळतो, पण विपन्नावस्थेंत आईच कामाला येते.

आसक्त [**सं०** आ + सञ्ज् (चिकटणें)] **वि०** १ अनुरत. २ तत्पर. ३ तन्निष्ठ. ४ ठेविलेलें. ५ विश्वासणारा.

आसक्ति [**सं०** ' आसक्त ' पहा] **स्त्री०** १ मन जडणें; अनुरति; प्रेम. २ गोडी; तत्परता; हव्यास.

आंसट वि० पातळ; पाणकट; अतिशय पाणी घातलेलें.

आंसड पु० गाय, म्हैस, वगैरेंचें थान.

आसडी स्त्री० गाय, म्हैस, बैल, इ० नीं मारलेली लाथ.

आसणी स्त्री० घुसळण्याच्या रवीची दोरी.

आसंद [**सं०** अश्वगंधा] **पु०** एक वनस्पतिविशेष.

आसन [**सं०** आस् = बसणें] **न०** १ बसणें. २ बसण्याची वस्तु, (चटई, इ०). ३ बसण्याचा प्रकार; बैठक; योग्यांचीं पद्मासन, इ० जीं ८४ आसनें त्यांपैकीं प्रत्येक. ४ राहाणें. ५ तळ देऊन राहाणें. ६ न लढतां बंदोबस्ताच्या स्थानीं राहाणें. ७ पुस्तकाच्या पानाचे दोन किं० तीन किं० चार उभे भाग पाडलेले असतात ते प्रत्येक; रकाना. ८ वाहन, जसें विष्णूचें आसन गरुड. ॐ**–ओळखणें** घोडा वगैरे वाहनानें स्वार कोण आहे हें ओळखणें. **–गुंडाळणें** आवराआवर करून पळून जाणें, तोंड काळें करणें. **–जड होणें** गर्वानें फुगणें. **–जमणें** बैठक दृढ आणि सोयीची होणें. **–रुंदावणें, –वाढणें** लठ्ठ होणें (मनुष्य बसला असतां जमीनीचा पुष्कळ भाग आच्छादणें). **–मांडी स्त्री०** दोन्ही तंगड्या गुडघ्यापाशीं दुणा-

वून हें पाऊल त्या गुडघ्याशीं आणि तें पाऊल ह्या गुडघ्याशीं येईल अशा रीतीनें वसण्याची जी तऱ्हा ती. –कुहा, –कुवा पु० घोड्याच्या बाहात्तर खोड्यांपैकीं एक.

आसन्न [**सं०** आ+सद् (बसणें)] **वि०** १ जवळचा (संख्येनें किं० स्थलानें); उ० आसन्नविंश (एकोणीस किं० एकवीस); आसन्नप्रसव, म्ह० बाळंत व्हावयाला टेकलेली; आसन्नमरण ज्याचें मरण जवळ येऊन ठेपलें आहे असा; आसन्नजल म्ह० पाण्याच्या सान्निध्याचा.

आसपास [**सं०** 'पार्श्व' याला 'आस' ची जोड] **क्रि० वि०** जवळपास; आजूबाजूस. ॐ**आसपासचा वि०** जवळचा; शेजारचा.

आसभास [**सं०** 'भास'ला 'आस'ची जोड] **पु०** १ चिन्ह; द्योतक वस्तु किं० कारण. २ तर्क; संभव; उ० हा पोरगा चोर निघेल असा मला बिलकूल आसभास नव्हता.

आसमंतात् [**सं०**] **क्रि० वि०** इतस्ततः; चोहोंबाजूस; जवळपास; सर्वत्र.

आसर पु० पावसाळ्यांत मधून मधून जी उघाडी पडते ती.

आसरा [**सं०** आश्रय; आ+श्रि=आश्रय करणें] **पु०** १ आश्रय; आधार; २ पाठिंबा; मदत.

आसव [**सं०**] **पु०, न०** १ मद्य. २ द्राक्षें, कोरफड, इ० औषधीपदार्थांचा जो अग्निसंयोगानें औषधासाठीं द्रव काढतात तो.

आसवल, आसवील पु०,स्त्री०,न० अस्वल याचीं इतर रूपें.

आसवेल स्त्री० वनस्पतिविशेष.

आसा, आसाणा पु० एक प्रकारचें रानझाड.

आसाडी स्त्री० मागें '**असडी**' पहा.

आसादन [**सं०** आ+सद् (बसणें, खचणें)] **न०** १ मांडणें; ठेवणें; रचणें; तयारी करणें (पूजा करावयास पूजापात्रांची, जेवतांना ताटवाट्यांची, यज्ञार्थ काष्ठें, पत्री, इत्यादींची) २ संपादणें, मिळविणें. ३ हल्ला. ४ गाठणें.

आसार पु० मागें 'असार' हे तीन शब्द दिले आहेत त्यांतील मधला पहा.

आसारी स्त्री० रेशीम गुंडाळण्याचें साधन. मागें 'असारा', 'असारी' पहा.

आसावरी स्त्री० एक रागिणी.

आसावणें, आसवणें [**सं०** 'आशा'] **स० किंवा अ० क्रि०** (कवितेंत) आशा करणें, आशा लावणें.

आसीमांत [**सं०** आ(पर्यंत)+सीमा+अंत] **क्रि० वि०** थेट मर्यादेपर्यंत; अगदीं पैलतीरापर्यंत; कडेपर्यंत.

आसुडणें स० क्रि० १ सुपांत धान्य वगैरे घालून पाखडणें. २ झटकणें; हासडणें.

आसूडपाखूड स्त्री० १ सुपांत धान्य घालून पाखडण्याचे भिन्न भिन्न प्रकार. २ बारकाईची उलटतपासणी.

आंसुढाळ वि० १ पिचक्या डोळ्यांचा, अस्वच्छ दृष्टीचा (घोडा). २ ज्याच्या डोळ्यांना पाणी येतें असा. **स्त्री०** पिचका डोळा.

आसुति [**सं०**] **स्त्री०** दारु गाळणें.

आसुर, आसुरी [**सं०** असुर=देव नव्हे तो दैत्य, दानव, इ०] **वि०** १ असुराविषयींचें; दैत्यासंबंधींचें. २ भयंकर; क्रूर; दुष्टपणाचें; हिडिस; भेसूर; नीच; तामसी. ॐ**आसुरविवाह पु०** विवाहाचा एक प्रकार. यांत वरानें वधूला तिच्या बापास वगैरे द्रव्यदान करावयाचें असतें. **आसुरी उपाय** किंवा **उपचार पु०** भयंकर स्वरूपाचा किंवा भलताच उपाय किं० उपचार. **आसुरी भोजन न०** अचकटविचकट किंवा अचाट खाणें. **आसुरी निद्रा स्त्री०** घोर निद्रा; कुंभकर्णी झोप. **आसुरी संपत्** किंवा **संपत्ति स्त्री०** विषयोपभोगाप्रीत्यर्थ तृष्णेवर तृष्णा किंवा आशेवर आशा ढाळून ऐहिक सुखाच्या मागें एकसारखें धावत सुटणाऱ्या पुरुषाच्या संपत्तीस गीतेच्या सोळाव्या अध्यायांत 'आसुरी संपत्' असें नांव दिलें आहे (गीतारहस्य). 'आसुरी संपत्' याच्या उलट **दैवी संपत्**.

आसू [**सं०** अश्रु] **न०** अश्रु, बाष्प.

आंसें न० पटाशी (सुताराचें एक हत्यार).

आसेवित [**सं०** आ+सेव्=सेवा करणें, आश्रयणें] **वि०** १ उत्साहानें केलेलें. २ पुनः पुन्हा केलेलें. ३ आश्रयिलेला.

आसोल मागें **अस्वल** पहा.

आस्तर मागें **अस्तर** पहा.

आस्तरण [**सं०** आ+स्तृ (झाकणें, पसरणें)]

न० १ पसरणें; २ जें पसरलेलें असतें तें, जसें चटई, सतरंजी, गालिचा, पलंगपोस, इ०.

आस्तरणें [सं०] न० 'आस्तरण' पहा. स० क्रि० १ पसरणें. २ आच्छादणें.

आस्तिक [सं०] वि० १ ईश्वरवादी. २ परलोक मानणारा, (याच्या उलट **नास्तिक**).

आस्तिक्य [सं०] न० देव आहे अशी श्रद्धा किं० भावना; ईश्वरवादित्व; यालाच **आस्तिक्य-बुद्धि** असें म्हणतात.

आस्तीर्ण [सं० आ + स्तृ (पसरणें)] वि० १ आस्तरलेलें; पसरलेलें. २ आच्छादलेलें. [स्त्री.

आस्तरी स्त्री० (गांवढळ लोकांत) १ बायको. २

आस्था [सं० आ+स्था (उभें राहाणें)] स्त्री० १ काळजी; कळकळ. २ विचार. ३ आदर. ४ संमति. ५ उत्साह. ६ आंच. ७ श्रद्धा, विश्वास. ॐ**आस्थाळू** वि० आस्थावान्; कळकळ बाळ-गणारा. **आस्थाळूपणा** पु० आस्था. **आस्थिक**, **आस्थेकरी**, **आस्थेवाईक** वर 'आस्थाळू' पहा.

आस्पद [सं०] पु० जागा, आश्रयस्थान. हा शब्द समासांत अंत्यपदी विशेष उपयोजितात. जसें, **हास्यास्पद** म्ह० हास्य आहे निवासस्थान ज्याचें असें; म्हणजे हसावयास लावणारें, कुचेष्टेस लायक, वगैरे. त्याचप्रमाणें **गुणास्पद** म्ह० गुण-युक्त; **शोकास्पद** म्ह० शोकास उचित; **मानास्पद** म्ह० मानाला लायक; इ०.

आस्फालणें [सं० आ+स्फल्=कंप पावणें] स० क्रि० जोरानें आदळणें, आपटणें, फेकणें; थापटणें.

आस्फालन [सं० आ + स्फल्=कंप पावणें] ताडन; थापटणें; थोपटणें.

आस्फोट [सं० आ+स्फुट् (उमलणें, फोडणें)] पु० १ सणसणीत ठोसा, तडाका, चपराक. २ दंड थोपटणें. ६ कंप.

आस्वल, **आस्वील** पु०, स्त्री०, न० १ अस्वल. २ (लक्षणेनें) एक प्रकारचा लठ्ठ सुरवंट.

आस्वाद [सं० आ+स्वाद् (चव घेणें)] पु० १ चव, रुचि, गोडी. २ गंध; परिमल. ३ ३ खाणें; चव घेणें. ॐ—**वत्** वि० स्वादिष्ट; चवदार.

आस्वादणें [सं० 'आस्वाद' पहा] स० क्रि० सेवणें; चाखणें; उपभोगिणें; खाणें.

आहटणें, **आहाटणें** स० क्रि०, **आहाटीव** वि०, **आहाणा** पु० मागें अ मध्यें पहा.

आहत [सं० आ + हन् (मारणें)] वि० ताडित.

आहत्य, **आहत्यमेव** क्रि० वि० त्वरानें; नक्की; अवश्य; न चुकतां.

आहरण [सं० आ+हृ (हरणें)] न० १ आणणें. २ धरणें, घेणें. ३ बाहेर काढणें. ४ यज्ञ करणें. ५ वधूस दिलेली देणगी; आंदण.

आहरा, **आहारा** पु० भांडें डळमळूं नये म्हणून खालीं घातलेली गवताची चुंबळ किं० निवणें.

आहळ, **आहळी** स्त्री० १ विस्तवाची आंच. २ वाऱ्याची उग्र झुळुक किं० झळई. ३ निरोप. अनेकवचनीच याचा उपयोग होतो. **आहळी** (–ळ्या) अनेकवचनी रूप. ॐ ०च्या **आहळींत असणें** ०च्या धाकांत असणें; ०ची भीति वाटत असणें. उ० गणू फक्त मामाच्या आहळींत आहे, मामीला मुळींच विचारीत नाहीं.

आहळणें अ० क्रि० विस्तवाच्या किं० उन्हाच्या झळयांत होरपळत असणें.

आहळींव, **आहाळींव** न० मागें अ मध्यें पहा.

आहार [सं० आ+हृ (हरणें)] पु० १ अन्न; खाद्य. २ खाणें (जेवणें वगैरे). ३ खाण्याची आणि पचविण्याची शक्ति. उ० तो दिसावयाला लठ्ठ आहे, पण त्याचा आहार विशेष नाहीं. ४ एकाद्या माण-साच्या शरीरपोषणार्थ अन्नाचें जें परिणाम तो त्याचा आहार. ५ निखारे; जळतें लाकडें. ६ एक प्रकारचा सर्प. ७ कपड्यांना वगैरे इस्तरी करणें; (अन्वर्थक क्रियापद **देणें**). ॐ**आहार तुटणें** खाण्याची शक्ति किं० खावयाच्या अन्नाचें परिमाण कमी होणें. **आहारीं असणें** कोणतेंही काम आटोक्यांत किं० आवांक्यांत असणें. **आहारीं पडणें** किंवा **जाणें** एकाद्याच्या ताब्यांत जाणें किं० तावडींत सांप-डणें. **आहारीं** किं० **आहाराखालीं आणणें** स्वतःच्या देखरेखीखालीं आणणें.

आहारणें अ० क्रि० सपवत सुस्त पडणें.

आहारपानगा पु० निखाऱ्यावर भाजून तयार केलेली भाकर किं० रोट.

आहारी [सं० आहार] वि० खाणारा, सेविणारा, भक्षिणारा. या अर्थी सामासांत अंत्य-

पदी हा शब्द वापरतात. जसें, **फलाहारी** म्ह० फळें खाऊन राहणारा. **शाकाहारी** म्ह० पाले-भाज्या, धान्य, वगैरे खाऊन राहणारा.

आहारोळी [आहार+पोळी] **स्त्री०** मागें **आहारपानगा** पहा.

आहार्य [**सं०** आ+हृ (हरणें)] **वि०** १ कल्पिलेलें; गृहीत धेतलेलें. २ खाद्य, अशनीय. ३ कृत्रिम; आगंतुक; गौण; तात्कालिक. ४ ठरविलेलें; गणिलेलें. उ०'हा चंद्र मुख आहे' येथें चंद्राहून भिन्न अशा मुखाचें ठायीं चंद्राभेदज्ञान गृहीत घेतलें त्यास आहार्य म्हणतात. ॐ**—निश्चय पु०** एखाद्या वस्तू-संबंधाची अवास्तव कल्पना. **—ज्ञान न०** खोटा ग्रह. **—आरोप पु०** जें नाहीं तें आहे असें गृहीत घेणें; वस्तूवर तदन्यत्वाची कल्पना करणें.

आहित [**सं०** आ+हित (ठेवलेलें; धा= ठेवणें)] **वि०** १ ठेविलेलें. २ केलेलें. ॐ**आहिताग्नि पु०** अग्निहोत्री. **आहितलक्षण वि०** गुणांनीं प्रख्यात.

आही स्त्री० अग्नीचा शेक; विस्तवाची धग.

आहितुंडिक [**सं०**] **पु०** गारोडी.

आहुति [**सं०** आ+हु (होम करणें)] **स्त्री०** १ देवतोद्देशेंकरून अग्नि, भूमि, उदक, इत्यादींचें ठायीं एकेकवार टाकितात जें चरु, घृत, तिल, इ० द्रव्य तें. २ हवन. ३ हवनद्रव्य. ॐ०**ची आहुति घेऊन उभें असणें** किं० **राहाणें** ०चा नाश करावयाला टपून असणें. ०**ची आहुति देणें** ०चा नाश करणें; ०ला तोफेच्या तोंडीं देणें.

आहूत [**सं०** आ+ह्वे (बोलावणें)] **वि०** १ बोलावलेला. २ नांव दिलेला.

आहूति [**सं०** आ+ह्वे (बोलावणें)] **स्त्री०** बोलावणें; हाक मारणें.

आहृत [**सं०** आ+हृत (आणलेला; हृ= चोरणें)] **वि०** आणलेला, उचलून आणलेला.

आहे स्त्री० १ अग्नीची ज्वाला किं० धग. २ उन्ह वाऱ्याचा झोत.

आहे अस्तित्व दर्शविणारें ' असणें ' ह्या क्रिया-पदाच्या वर्तमानकाळाच्या एकवचनाचें रूप. ॐ**आहे आहे नाहीं नाहीं** थोडक्या प्रमाणांत असणें; नसल्यासारखेंच असणें. **आहेपण न०** अस्तित्व; असण्याचा गुण किं० धर्म.

आहोपुरुषिका [**सं०**] **स्त्री०** १ अतोनात गर्व. २ बढाईखोरपणा.

आन्हिक [**सं०** अहन्=दिवस] **वि०** १ रोजचा. २ दिवसाचें. **न०** १ रोजचें धार्मिक कर्तव्य. २ नित्यविधि (स्नान, भोजन, इ०). ३ भोजन.

आल्हाद [**सं०** आ+ह्लाद् (आनंदित होणें)] **पु०** आनंद. [आनंददायक.

आल्हादक [**सं०** ' आल्हाद ' पहा] **वि०**

आल्हादणें [**सं०** ' आल्हाद ' पासून] **अ० क्रि०** आनंदित होणें.

आल्हादन [**सं०** ' आल्हाद ' पहा] **न०** १ आनंद पावणें. २ आनंदित करणें.

आव्हान [**सं०** आ+ह्वे (बोलावणें)] **न०** १ बोलावणें. २ न्यायसभेचें बोलावणें. ३ नांव देणें. ४ कुस्तीला किं० वादाला बोलावणें.

आव्हानणें [**सं०** ' आव्हान ' पासून] **स० क्रि०** १ बोलावणें. २ आमंत्रण करणें. ३ कुस्तीला किं० वादाला बोलावणें. ४ —ला नांव देणें.

आळ पु० १ खोटें दोषारोपण (घेणें, घालणें, येणें, इ०). २ केवळ संस्कार; संस्काराचा किं० नांवाचा विटाळ; उ० काल त्या पोरीचें लग्न झालें; आज तिचा नवरा मेला; वैवाहिक स्थितीचा हा आळ तिच्यावर आला ! उ० रामभाऊवर पुरुषाचा केवळ आळ आहे; पुरुषाची कर्तबगारी त्याच्या ठायीं नाहीं.

आळ स्त्री० १ विनवणी; प्रार्थना. २ हट्ट करून इष्ट वस्तु एखाद्या जवळ मागणें; उ० मैनेसाठीं तिनें बापाला भारी आळ घातली. उ० बापानें तिची आळ पुरविली.

आळ स्त्री० सरपटत जाणारा कृमि; आळी.

आळवण न० भाजी वगैरे खाद्य बेतापेक्षां अधिक पातळ झाल्यास तें घट्ट करण्यासाठीं त्यांत जें पीठ वगैरे घालतात तें.

आळवा पु० १ गोंडस आणि गुटगुटीत मूल, जें खेळविणाराला आनंद वाटतो. २ लाड करण्याच्या इतक्या वयाचें मूल; अंगाखांद्यावर खेळवितां येईल इतक्या वयाचें मूल.

आळशी स्त्री० १ जवसाचें झाड. २ उपटलेल्या गहूं, जोंधळा, वगैरे धान्यांचीं ताटें (पेंडी बांधावयाच्या अगोदर).

आळशी [सं० अलस] **वि०** १ धिमा; नेटानें काम न करणारा. २ कर्तव्य न करणारा. ❀**आळशा दुणें काम, लोभ्या दुणा खर्च** काम चुकवूं पाहाणाऱ्याला परिणामीं दुप्पट काम करावें लागतें आणि योग्य प्रमाणांत खर्च न करणाराला परिणामीं दुप्पट खर्च करावा लागतो. **आळशावर गंगा येणें** १ आपल्या कल्याणासाठीं मुळींच खटपट न करणाऱ्या माणसाचें सुदैवानें कल्याण होणें. २ कोणी थोर माणूस एकाद्या ल्हान दर्जाच्या माणसाच्या भेटीस येणें. **आळशांचा राजा, आळशांचा मायबाप** अत्यंत आळशी माणूस.

आळस [सं० आलस्य] **पु०** उद्योग करण्याचा कंटाळा. २ उद्योगाविषयीं पराङ्मुखता. ३ फार काम केल्यामुळें अंगांत आलेली सुस्ती. ४ एकाद्या विशिष्ट कामांत योग्य ती काळजी न घेणें; टंगळमंगळ; दुर्लक्ष्य; हयगय; ❀**आळस भिकारी, कुटुंबाचा घात करी** आळस परिणामीं भिक मागण्याची स्थिति आणतो, आणि आळसामुळें कुटुंबाला हाल अपेष्टा भोगाव्या लागतात. **आळसभोंडारा पु०** वृद्धपणामळें ज्याला तरतरीतपणानें कांहीं काम करवत नाहीं आणि ज्याच्या सर्व हालचाली मंदपणें चालतात असा माणूस.

आळसट वि० आळशी; अतिधिमा; मंद.

आळसाई स्त्री० आळस; आळशीपणा.

आळसावणें, आळसणें अ० क्रि० आळसामुळें काम करण्याला पराङ्मुख होणें.

आळा पु० १ गठ्ठा, गाठोडें, वगैरे बांधावयाची दोरी. २ नियंत्रणा; बंधारा; प्रतिबंध. ३ नियम, कायदा, इत्यादींचा दाब. ४ गाडीची आखरी आणि साटा ह्यांना एकत्र बांधण्याची दोरी; ही दोरी ओलदांडी पिळवटून वेताची घट्ट किं० मजबूत करतां येते. ❀**आळाबांधा, आळेबंद पु०** एकाद्या व्यवहाराला व्यवस्थारूप जें बंधन असतें तें; एकाद्या व्यवहाराला असतें जें नियमन किं० नियंत्रण तें.

आळिता पु० मागें ' अळता ' पहा.

आळी स्त्री० भलत्याच वस्तूसाठीं केलेला हट्ट, किं० घातलेली गळ (मुलांनीं). ❀**आळीकर वि०** भलत्याच वस्तूसाठीं हट्ट करणारें (मूल).

आळी स्त्री० गांवांतील अरुंद आणि कोंदट रस्ता किं० गल्ली. ❀**आळीकर पु०** त्याच आळींतील रहिवासी.

आळीपाळीनें [म० ' पाळी ' शी ' आळी ' ची जोड] **क्रि० वि०** एकमेकांना कामांतून सोडवून किं० विश्रांति देऊन कांहीं वेळ एकानें आणि कांहीं वेळ दुसऱ्यानें अशा प्रकारें.

आळूं न० ज्याचीं पानें, देठ, कांदे, इ० च्या भाज्या किं० वडीं करतां येतात अशी वनस्पति. (मागें ' अळूं ' पहा).

आळें न० झाडाच्या बुडाशीं पाणी ठरण्यासाठीं केलेला खळगा. ' अळें ' पहा.

आक्षिप्त [सं० आ+क्षिप (फेकणें)] **वि०** १ ज्याला हरकत घेण्यांत आली आहे असा. २ नापसंत किं० अमान्य.

आक्षेप [सं० आ+क्षिप (फेकणें)] **पु०** १ ओढणें, फेकणें, टाकणें, नेणें. २ निंदा. ३ कठोर वाक्य. ४ चित्ताचा क्षोभ. ५ चित्त वेधणें. ६ अनुमान. ७ ठेव. ८ हरकत, अडथळा, शंका. ९ बाण, इ०चा टप्पा. १०. **(साहित्य)** वक्त्याला खरोखरी जें कांहीं बोलावयाचें असतें तें व्यर्थ किं० अनावश्यक आहे, किं० कठिण आहे, अशा खोट्या सबबीवर जर त्यानें बोललेल्या किं० बोलावयाच्या मजकुराचा निषेध केला, तर ' आक्षेप ' हा अलंकार होतो; उदाहरणें आणि विशेष तपशील आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा.

आक्षेपक [सं०] **पु०** हरकत किं० शंका काढणारा; अडथळा आणणारा.

आक्षेपणें [सं० ' आक्षेप ' पहा] **स० क्रि०** १ ओढणें, खेचणें, फेकणें. २ अमान्य करणें. ३ ०ला हरकत घेणें.

आक्षेपून [' आक्षेपणें ' पासून] **क्रि० वि०** मुद्दाम; जाणून बुजून; बुद्धिपुरःसर; आग्रहपूर्वक.

आज्ञा [सं० आ+ज्ञा (जाणणें)] **स्त्री०** १ हुकूम. २ परवानगी. ३ व्यवस्था, बंदोबस्त. ❀**—कर पु०** १ सेवक, हुकूम पाळणारा. २ सांगितल्याबरोबर करणारा; हुकूम पाळण्यांत तत्पर. **—पत्र न०** लेखी हुकूम. **आज्ञा वंदणें** आज्ञा मान्य करणें. **आज्ञाधारक वि०** आज्ञा पाळणारा. **आज्ञातिक्रम पु०, आज्ञातिक्रमण न०** आज्ञा न पाळणें, आज्ञेचा भंग.

आज्ञाप(-पि-)णें [**सं०** आज्ञा] **स० क्रि०** -ला हुकूम करणें.

आज्ञापन [**सं०**] **न०** हुकूम करणें.

आज्ञापनीय [**सं०**] **वि०** आज्ञा केली जाण्यास पात्र.

आज्ञाप्य [**सं०**] **वि०** आज्ञेचा विषय.

इ.

इ मराठी वर्णमालेंतील तिसरा वर्ण; मराठी स्वरमालेंतील तिसरा स्वर.

इकडचा(-ला),इकडील, वि० ह्या दिशेचा; ह्या संबंधाचा. ॐ**इकडचा तिकडचा वि०** अनेक ठिकाणचा; चार ठिकाणचा; नानाविध स्थानांकडचा. **इकडचा डोंगर तिकडे करणें** १ फार खटपट करणें; नानाप्रकारचे यत्न करणें. २ फार प्रचंड काम करणें.

इकडून क्रि० वि० ह्या दिशेहून; ह्या बाजूहून. ॐ**इकडून तिकडून क्रि० वि०** १ अनेक दिशांकडून; अनेक स्थानांपासून. २ एकंदरींत, एकूण, एवंच. ३ कसें तरी करून; कांहीं तरी लटपटी खटपटी करून. ४ दोन्ही बाजूं कडून.

इकडे क्रि० वि० ह्या बाजूस, ह्या दिशेस. ॐ**इकडे तिकडे क्रि० वि०** ह्या दिशेस आणि त्या दिशेस; चार दिशांस; अनेक ठिकाणीं.

इकरार [अ०] **पु०** १ कबूली, ठराव. २ जबानी. ॐ**-नामा पु०** आपल्या सहीनें दिलेलें कबूलीचें पत्रक; लेखी कबूली.

इखलास [अ० अख़्लास्] **स्त्री०** मैत्री, प्रेम, आवड, स्नेहभाव. ॐ**-नामा पु०** मैत्रीचें किं० प्रेमाचें पत्र; मित्र आणि प्रेमळ नातलग एकमेकांच्या पत्रांना ' इखलासनामा ' म्हणतात.

इखलासी [अ०] **वि०** प्रेमळ; प्रीतियुक्त; घरोब्याचा.

इंगणें अ० क्रि० आजारानें, श्रमानें, किं० चिंतेनें आक्रान्त होणें.

इंग्रज, इंग्रेज [' इंग्लिश 'चा मराठींत अपभ्रंश] **पु०** इंग्लंडचा रहिवाशी

इंग्रजी, इंग्रेजी [' इंग्रज ' पहा] **वि०** १ इंग्रजांसंबंधाचा. २ इंग्रजांच्या तरणीचा किं० नमुन्याचा. **स्त्री०** इंग्रजांची भाषा. ॐ**इंग्रजी दारू स्त्री०** तलख माणूस.

इंगळ (-ळा), इंगोळ [**सं०** अंगार= निखारा] **पु०** जिता निखारा. ॐ**इंगळासारखा लाल होणें** रागानें लाल होणें.

इंगळा पु० मुंगळ्याची एक जाति.

इंगळी, इंगळ स्त्री० विंचवाची एक जाति; ह्या जातीचा विंचू मोठा आणि काळा असून त्याचा दंश फार भयकर आणि बहुतेक प्राणनाशक असतो.

इंगा पु० कातडें घोटून नरम करण्याचें चांभारांचें एक हत्यार. ॐ**एकाद्यावर इंगा फिरणें** त्याच्यावर संकटपरंपरा कोसळून तो जर्जर होणें, किं० तो नरम पडणें, किं० तो निर्वीर्य होणें.

इंगित [**सं०** इंग्=जाणें, हलणें] **न०** १ कंप. २ मनोविकाराची बाह्य खूण (घाम, रोमांच, कंप, इ०). ३ अभिप्राय. ४ गुप्त धोरण. ॐ**इंगितज्ञ वि०** दुसऱ्याच्या मनांतील गूढ विचार, बेत, किं० धोरण त्याच्या मुद्रेवरून किं० हालचालींवरून ओळखणारा.

इचका पु० १ एक प्रकारची गोफण. २ एक प्रकारचें गवत आणि त्याचें बीं. ३ एक वनस्पतिविशेष.

इचकोपा (-बा) पु० नासाडी, विध्वंस.

इचा ० 'ही' ह्या सर्वनामाच्या षष्ठीचें एकवचन.

इच्छा [**सं०** इष्=इच्छिणें] **स्त्री०** १ वांच्छा, वासना, आकांक्षा. २ त्रैराशिकांत प्रमाणसजातीय जो राशि तो; उ० पांच रुपयांस दोन मण तर चार रुपयांस किती ? एथें पांच हें प्रमाण आणि चार ही इच्छा. ॐ**इच्छाफल न०** त्रैराशिकाचें उत्तर. **इच्छे जोगता वि०** जसा इच्छिला तसा; इच्छेला अनुरूप असा. **इच्छांक पु०** त्रैराशिकांतील तिसरा राशि; दुसऱ्या दोन राशींना ' प्रमाणांक ' आणि ' मध्यांक ' म्हणतात. **इच्छाकार्य न०** इच्छिलेलें कार्य; मनांत आणिलेलें काम. **इच्छादान न०** याचकाला जी पाहिजे असेल त्या वस्तूचें त्याला दान देणें. **इच्छादानी वि०** ज्यानें जें मागितलें त्याला तें देणारा. **इच्छापूर्ति स्त्री०** जें इच्छिलें तें मिळणें. **इच्छाभोजन न०** ब्राह्मणानें इच्छिलेलें

पक्वान्न सिद्ध करून त्याला जेवूं घालून तृप्त करणें. **इच्छामरण न०** इच्छिल्या वेळीं आलेलें जें मरण तें. **इच्छामरणी वि०** मरावयाची इच्छा होईल तेव्हां मरण ज्याला स्वतावर आणून घेतां येतें असा; भीष्म हा इच्छामरणी होता. **इच्छाविलासी वि०** मनाला आवडेल तो विलास मनसुराद भोगणारा. **इच्छाविहारी वि०** मनाला आवडेल तो विहार करणारा.

इच्छिणें [सं० इष्=इच्छिणें] स० क्रि० एकाद्या विशिष्ट वस्तूबद्दल वांच्छा करणें. ❀**इच्छी परा तें येई घरा** दुसऱ्यास जें अनिष्ट यावें म्हणून आपण इच्छितों तेंच अनिष्ट दुर्दैवानें आपल्या भोगास येतें.

इच्छित [सं० इष्, इच्छ् यापासून] **वि०** इच्छिलेलें, वांछिलेलें.

इच्छु [सं०] **वि०** (समासांत) इच्छिणारा; उ० धनेच्छु, विद्येच्छु, मोक्षेच्छु, इ०.

इजत, इज्जत [अ० अज्त] **स्त्री०** १ मोठेपणा; प्रतिष्ठा; आबरू. २ पत्राच्या सुरवातीचा मायना (ज्यांत पत्र ज्याला लिहिलेलें असतें त्याची स्तुति केलेली असते आणि त्याला मोठेपणा दिलेला असतो). ❀**इजतीचा वि०** आबरुदार; प्रतिष्ठित. **इजतखाऊ इजतघेणा, इजतखोर वि०** मोठेपणा, प्रतिष्ठा, दर्जा, इ० ला कमीपणा आणणारा (कपडा, सामानसुमान, नोकर चाकर, वर्तन, इ०). **इजतआसरा** ज्याला पत्र लिहावयाचें त्याला मोठेपणा देणारा हा शब्द आहे; सन्मान्य.

इजमायली वि० कामचलाऊ; थोडक्या वेळेपुरतीच केलेली सोय; केवळ अल्पकाल गरज भागवावी किं० निर्वाह करावा म्हणून केलेली व्यवस्था किं० सोय (रहावयाला कच्चा मांडव, झोपडी, इ०; निवाऱ्यासाठीं जुजबी भिंत, कूड, इ०).

इजवटा, विजवटा वि० खोडकर आणि उपद्रवी पोर.

इजलणें अ० क्रि० अंबून नासणें (फळें, [दूध, इ०).

इजा [अ० ईजा] **स्त्री०** १ उपद्रव, त्रास. २ अपाय. ३ हानि, नासाडी. ४ दुखापत.

इंजाई वि० झोकबाज, छान, अक्कडबाज, भपकेदार.

इंजाईत वि० १ ढिसूळ, अशक्त, वापर सहन करावयाला असमर्थ (घर, कापड, इ०). २ अकुशल्यपणानें केलेला कोणताही पदार्थ (पेटी, घडवंची, इ०).

इजाफत [अ० इजाफतह्=भरतीचा, ज्यास्ती] **स्त्री०** १ भरती. २ भरतीचा, अधिक. ❀**इजाफत गांव पु०** इनामदाराच्या वतनाला किंवा इनामाला नवीन जोडलेला गांव. **इजाफत खातें न०** एका राजाकडून दुसऱ्या राजाकडे गेलेले किं० दुसऱ्या राजाकडून आलेले नजराणे नमूद करून ठेवणें ज्या खात्याकडे असतें तें खातें. **इजाफत जमा स्त्री०** १ महाल, प्रांत, इ० जे नेमलेले वेगळे वेगळे तनखे असतात, त्यांपैकीं एकेक तनख्यांत दुसऱ्या तनख्यापैकीं कांहीं कारणास्तव वहिवाट चालली असतां तत्संबंधी होते जमा ती. २ कर्जें काढून आणि नजराणे विकून सरकारांत ज्या रकमा जमा होतात त्या.

इजाबिजातिजा [म० एकदा, दोनदां, तीनदां] **क्रि० वि०** एक वेळां, दोन वेळां, आणि तीन वेळां; एका मागून एक असे तीन वेळां.

इजायली [अ०] **वि०** १ सागवानावांचून इतर जातीचें (इमारती लाकूड). २ असल्या लाकडाचें बांधकाम (घर, गलबत, इ०).

इजार [फा०] **स्त्री०** कंबरेपासून पायाच्या घोट्यापर्यंत शरीर झांकावयाजोगें शिवून तयार केलेलें परिधानविशेष.

इजारा [फा०] **पु०** सरकारी उत्पन्नाच्या ज्या बाबी त्यांपैकीं एकीचा वसूल करून ठराविक रकम सरकारास देऊन बाकीची रकम स्वतासाठीं ठेवून घेण्याबद्दलचा जो ठराव तो; मक्ता. ❀**इजारदार पु०** इजारा म्हणजे मक्ता ज्यानें सरकारांत ठरवून घेतला तो; मक्तेदार.

इजोरात स्त्री० अपघात; आकस्मिक हानि, नुकसान, इजा, किं० दुखापत.

इंज्यानिबा [फा० ई जनाब] **क्रि० वि०** महाराजाकारणें; आपणास; खाविंदांस.

इटकर, इटकूर [सं० इष्टिका, म० वीट] **स्त्री०** विटकर; रोडा; टोला.

इटा पु० भाल्यासारखें एक शस्त्र.

इटाळें, विटाळें [सं० इष्टिका+आलय] **न०**

मातीच्या विटा पाडण्याचा लाकडी सांचा.

इटी, विटी स्त्री० विटीदांडूच्या खेळांत जो चार पांच बोटें लांबीचा तुकडा असतो आणि जो दांडूनें उडवावयाचा असतो तो. ॐ**इटीदांडू, विटीदांडू** पु० विटी आणि दांडू ह्या दोन साधनांनीं खेळावयाचा मुलांचा एक खेळ.

इटीमिटी स्त्री० मुलाची भूतांपिशाचबाधा निरस्त करावयासाठीं त्याच्यावरून ओंवाळून टाकतात जी माती ती.

इटेकरी, इटेबरदार पु० मिरवणुकींत इटा नांवाचें शस्त्र धारण करतो जो मनुष्य तो.

इटबंदी, ईटबंदी स्त्री० विटांची रचाई किं० विटांचें बांधकाम.

इठाळ [म० ईट, वीट] स्त्री० कढीला विशेष रुचि आणि स्वाद आणण्याकरितां, फोडणी करण्यासाठीं एक दगडाची किंवा खापराची जाड खोलगट वाटी घेतात ती. ह्या वाटीला ' ठिकरी ' असें ही म्हणतात. ह्या रीतीनें तयार केलेल्या कढीला " ठिकरीची कढी " असें म्हणतात.

इडनिंबू न० ईड म्हणून जें एक प्रकारचें लिंबू तें.

इडा स्त्री० शरीरांतील एक नाडी; पिंगला आणि सुषुम्ना ह्या दुसऱ्या दोन नाड्या.

इडापिडा [' पीडा ' ला सांगड] स्त्री० सर्व प्रकारच्या पीडा किं० उपद्रव; उ० इडापीडा जाओ आणि बळीचें राज्य होओ !

इतउत्तर [सं० इत: (यापासून) +उत्तर (नंतर, पुढें)] क्रि० वि० यानंतर पुढें; इत:पर.

इतउपर [सं० इत: (यापासून) + उपर (नंतर)] क्रि० वि० यापुढें.

इतका [सं० इयत्] वि० ह्या प्रमाणाचा; ह्या परिमाणाचा; ह्या मापाचा.

इतकासा [म० इतका+असा] वि० १ इतक्या प्रमाणाचा. २ इतक्या थोड्या परिमाणाचा.

इतपत वि० इतक्या प्रमाणाचा. क्रि० वि० इतक्या प्रमाणांत.

इत:पर [सं० इत: (याहून)+पर (पुढें)] क्रि० वि० यानंतर; यापुढें.

इतबार [अ०] पु० इमान; प्रामाणिकपणा.

इतबारी [अ०] वि० प्रामाणिक; भरंवशाला पात्र.

इतमाम [अ० अइतमाम्] पु० १ परिवार; लवाजमा. २ आपल्या दर्जाला शोभेल अशी राहाणी; पालख्या, घोडे, दास, दासी इ० सरंजाम.

इतमामी वि० आपल्या दर्जाप्रमाणें ज्यानें सरंजाम ठेवला आहे असा.

इतर [सं०] वि० अन्य; दुसरा; वेगळा. ॐ**इतरविशेष** पु० बाकीच्या गोष्टी; अवांतर किरकोळ गोष्टी किं० बाबी.

इतरत्र [सं०] क्रि० वि० इतर ठिकाणीं; अन्यत्र; दुसरीकडे.

इतराज [अ०] वि० १ असंतुष्ट. २ रागावलेला.

इतराजी [अ०] स्त्री० गैरमर्जी; नापसंती; अवकृपा.

इतरेतर [सं० इतर+इतर] वि० परस्पर; अन्योन्य; एकमेक. ॐ**इतरेतरयोगद्वंद्व** पु० द्वंद्व समासाचा एक भेद.

इतलाख [अ०] स्त्री० सरकारी खजिन्यांतून, किं० धान्याच्या कोठारांतून, किं०कोणत्याही सरकारी वस्तूच्या राशींतून एकाद्या माणसाला तोडून दिलेली रक्कम किं० भाग किं० हिसा. ह्याला ' इतलाख नेमणूक ' असेंही म्हणतात.

इतलाख (–खी) [अ० इतलाक] वि० १ पृथक् केलेला; वेगळा; तोडून दिलेला. २ स्वतंत्र. सरदारांनीं तयार केलेलीं सैन्यें, ज्यांचा खर्च सरकारी तिजोरींतून मिळतो अशा सैन्यांना 'इतलाखी सैन्यें' म्हणतात. ह्याच्या उलट ' सरंजामी सैन्यें; ' त्यांचा खर्च त्या त्या गांवांवर बसविलेला असतो. एका खात्यांत कामाला लावलेले आणि दुसऱ्या खात्यांतून पगार दिला जाणारे जे नोकरचाकर त्यांना 'इतलाखी नोकर' म्हणतात. आयत्या वेळेला उपयोगी पडावें म्हणून जे जादा नोकरचाकर, शिपायी, वगैरे नेमलेले असतात त्यांनाही 'इतलाखी' म्हणतात.

इतला [अ०] पु० १ एकाद्या कामांत किं० व्यवहारांत असलेला संबंध. २ सरकाराला दिलेली बातमी. ॐ**इतलेपत्रक** न० सरकारी हेरांनीं पुरविलेल्या बातमीचें पत्रक.

इतवा, इतकावा वि० ह्या क्रमाचा; ह्या क्रमांत येणारा.

इतस्ततः [**सं०** इतः (इकडे किं० येथून) + ततः (तिकडे किं० तेथून)] **क्रि० वि०** इकडे तिकडे; ह्या ठिकाणीं आणि त्या ठिकाणीं (पडलेलें पसर-लेलें इ०); अस्ताव्यस्त किं० अव्यवस्थित रीतीनें.

इति [**सं०**] **अव्यय** ह्याचे संस्कृतांत अनेक अर्थ आहेत. मराठींत हा शब्द पुढील समासांत येतो. **इत्यर्थ पु०** तात्पर्य. **इत्यादि वि०** वगैरे. **इतिकर्तव्य न०** एकंदर कर्तव्य; हें कर्तव्य. **इतिकर्तव्यता स्त्री०** जें कांहीं करावयाचें तें; कर्तव्य; कामगिरी. **इतिकर्तव्यतामूढ वि०** प्रस्तुत प्रसंगीं काय करावें हें मन गोंध-ळल्यामुळें ज्याला ठरवितां येत नाहीं असा; बावचळलेला; प्रसंगीं गोंधळून गेलेला. **इतिकृत्य न०** १ साधन. २ कर्तव्य. **इतिवृत्त न०** वृत्तान्त; हकीकत. **इतिहास** [**सं०** इति (असें) + ह (खरोखर)+आस (आलें किं० घडलें)] **पु०** १ वृत्तान्त. २ प्राचीन काळीं घडलेल्या हकीगतींचें संगतवार कथन किं० निवेदन. **इतिश्री स्त्री०** समाप्ति, शेवट, नाश.

इतुका वि० इतका (काव्यांत).

इत्थम् [**सं०**] **क्रि० वि०** अशा रीतीनें. मरा-ठींत हा शब्द पुढील समासांत येतो. **इत्थंभूत वि०** अगदीं जसा घडला तसा; समग्र; तपशिलवार.

इदंकारास्पद [**सं०** इदंकार (ही वस्तु) + आस्पद (स्थल)] **न०** अहंकारास्पदाहून इतर जो ज्ञेय विषय तो.

इदमित्थ [**सं०** इदं (हें)+इत्थं (अशा प्रकारें, ह्यापासून] **न०** कोणेक गोष्टीचा हा उप-क्रम, हा उपसंहार, हें प्रमेय, हा हेतु, ही इतिकर्त-व्यता, इ० सर्व जो ज्ञेयांश तो; जाणावयाचें, सांगा-वयाचें, करावयाचें जें सर्व कांहीं तें.

इदंशब्द [**सं०** इदं=हें+शब्द] **पु०** सन्नि-कृष्ट वस्तूसंबंधानें योजण्यांत येणारें सर्वनाम, हा, ही, हें इ०; हा ह्या अर्थाचा शब्द.

इंदु [**सं०**] **पु०** चंद्र. ꣸ **इंदुवार, इंदु-वासर पु०** सोमवार. **इंदुमुखी, इंदुवदना स्त्री०** चंद्रासारखें सुंदर आहे मुख जिचें अशी स्त्री.

इंद्र [**सं०**] **पु०** १ देवांचा राजा किं० अधि-पति. २ पूर्वदिशेचा अधिपति. ३ मुख्य, श्रेष्ठ; उ० मृगेंद्र म्ह० पशूंत श्रेष्ठ म्हणजे सिंह. ४ गोसावी आणि संन्यासी ह्यांचा एक पंथ. ꣸ **इंद्रकट न०** आढ्यापासून पाण्याचे त्याला आलेले जे वांसे ते टेकून राहाण्यासाठीं नळ्यांचे टोंकावर एक आडवें लाकूड बसविलेलें असतें तें; नोटकटी. **–कापशी स्त्री०** काप-शीची एक जाति. **–गोळ न०** पायाच्या घोट्याचा जो प्रदेश तो. **–गोप पु०** पर्जन्यकाळीं उत्पन्न होणारा एक प्रकारचा किडा. **–चाप पु०, न० –धनुष्य न०** मेघमंडलावर किं० आकाशांत तरंगत असलेले जे पाण्याचे तुषार त्यांवर सूर्यकिरणांच्या योगानें जी सप्तरंगाची प्रचंड कमान दिसते ती. **–जव पु०** कुड्याचें बी. **–जाल न०** नाहीं तें दिसावें, आहे तें दिसू नये, इत्यादि चमत्कार ज्या मंत्रविद्येनें करून दाखवितां येतात ती विद्या, किं० त्या विद्येच्या सामर्थ्यानें करून दाखविलेले चमत्कार; जादू; गारूड; गौडबंगाल. **–ध्वज पु०** वर्षप्रतिपदेच्या दिवशीं दारापुढें उभारतात जी गुढी ती. **–मढें, –मडें न०** अगदीं हाडका रोडका मनुष्य. **–वारुणी स्त्री०** कडू कवंडळ. **इंद्रावरज पु०** वामन, विष्णु. **इंद्रा-युध न०** इंद्रधनुष्य; वर ' इंद्रचाप ' पहा. **–कील पु०** १ मंदरपर्वत. २ खडक. **इंद्रसारथि पु०** मातलि. **इंद्रसूनु, इंद्रपुत्र पु०** १ अर्जुन. २ वाली. ३ जयंत. **इंद्राटी स्त्री०** ' इंद्रकट ' पहा.

इंद्राणी [**सं०**] **स्त्री०** इंद्राची पत्नी; शची.

इंद्रायण न० एक कडू फळ.

इंद्रिय [**सं०**] **न०** १ श्रोत्र, चक्षु, रसना, घ्राण, त्वक् हीं पांच ज्ञानसाधनें तीं प्रत्येक; ज्ञानेंद्रिय. २ वाच्, हस्त, पाद, गुद आणि उपस्थ हीं जीं पांच कर्मांचीं साधनें तीं प्रत्येक; कर्मेंद्रिय. ३ मन; हें ज्ञानेंद्रिय असून कर्मेंद्रियही आहे. ꣸ **इंद्रियायतन न०** शरीर. **इंद्रियाराम वि०** विषयासक्त. **इंद्रियग्राम पु०** सर्व इंद्रियें समु-च्चयानें. **इंद्रियविषय पु०** शब्द, रूप, रस, गंध आणि स्पर्श प्रत्येकीं. **–गम्य वि०** इंद्रियांनीं ज्याचें ज्ञान होऊं शकतें तें. **–अगम्य वि०** इंद्रि-यांना ज्याचें ज्ञान होऊं शकत नाहीं असें. **इंद्रिय जुलाब पु०** मूतढाळ. **–विप्रतिपत्ति स्त्री०** भ्रमिष्टपणा. **–अर्थ पु०** ज्ञानाचा विषय. **–दमन न०** इंद्रियांचें नियंत्रण.

इंधन [**सं०** इंध्=पेटणें किं० पेटविणें] **न०** १ पेटविणें. २ सर्पण. ३ वासना.

इधर तिधर [हिं० इधर (इकडे)+तिधर (तिकडे)] **स्त्री० न०** १ उडवा उडवीचें भाषण किं० उत्तर किं० बोलण्याचा प्रकार. २ भरमसाट-पणाचें भाषण.

इनसाफ [अ०] **पु०** सत्याला धरून किं० अनुसरून केलेला निकाल.

इनसाफी [अ०] **वि०** न्यायी; सत्याला स्मरून निकाल देणारा किं० निकाल करणारा.

इनाम [अ०] **न०** कोणत्याही प्रकारच्या अटी न घालतां दिलेली जी देणगी ती. **क्रि० वि०** बिन हरकत; यथेच्छ; सनमुराद; उ० आजपर्यंत हा माड यानें इनाम खाला; आम्ही ह्या म्हशीचें दूध काढीत नाहीं; वासरूं इनाम पिते. ॐ**इनाम इकराम न०** सर्व प्रकारच्या देणग्या, इनामें, इ०. **इनाम इजाफत न०** नोकरानें अधिक कामगिरी केली असतां त्याच्या पूर्वीच्या इनामांत जी भर राजाकडून घातली जाते ती. **इनाम पट्टी स्त्री०** सरकाराला कांहीं जादा खर्च आल्यामुळें एकादे वर्षी इनामदारापासून कांहीं वसूल घेतात तो. **इनामदार पु०** ज्याला कांहीं इनाम देण्यांत आलें आहे तो; ज्याला कांहीं इनाम मिळालें आहे (वडिलोपार्जित किं० अन्यद्वारा) असा. **इनामपत्र न०** कोणी एकानें कोणा एकास कांहीं इनाम दिलें अशा अर्थाचें पत्र. **इनाम पासोडी स्त्री०** गांव-कामगारांना दिलेल्या देणग्या समुच्चयानें.

इनायत [अ०] **स्त्री०** १ मेहेरबानी. २ मेहेरबानीची देणगी. ॐ**–नामा पु०** मेहेरबानीचें पत्र; वरिष्ठाकडून आलेलें पत्र.

इपट, विपट न० बेबनाव; वितुष्ट; वाकडें.

इ(वि–)तर, इ(वि–) पसळ, इ(वि–) पसळा वि० खोडकर, व्रात्य, द्वाड (मूल).

इपारा वि० १ बेडब. २ मूर्ख, अजागळ. ३ पायाळू (मूल).

इब(–भ–)रत [अ० इबरत] **स्त्री०** १ आब, पत, वजन, धाक. २ मोठेपणा (अधि-काराचा, हुद्याचा, इ०).

इब(–भ–) रती, इब(–भ–) रतदार वि० अंगच्या गुणांवरून किं० अधिकाराच्या जोरावर वजन पाडणारा किं० धाक उत्पन्न करणारा.

इमला, इंबला [अ०] **पु०** राहावया-साठीं किं० अन्य उपयोगासाठीं बांधलेलें घर (ह्याच्या उलट ' बखळ ').

इबलिस [अ०] **पु०** १ सैतान. २ खोडकर किं० व्रात्य पोर. ३ दिसण्यांत साधा पण आंतल्या गांठीचा. [शासन.

इमलाफैला [अ०] **पु०** अधिकार, ताबा,

इमान [अ० ईमान] **न** १ सचोटी, प्रामा-णिकपणा. २ सदसद्विवेकबुद्धि. ॐ**इमान इतबार** सचोटी, खरेपणा. **इमानें इतबारें क्रि० वि०** १ प्रामाणिकपणानें. २ मनापासून. **इमानास जागणें** इमान कायम ठेवणें; सचोटीला बट्टा न लागेल अशा प्रकारें वागणें. **इमानी वि०** विश्वासू; प्रामाणिक; विश्वासघात न करील असा.

इमाम [अ०] **पु०** मुख्य गुरु; उपदेशक. ॐ**इमाम जयंती स्त्री०** मुसलमानांचा मोहरमचा सण. **इमाम दांडगा वि०** धटिंगण, मस्ताळ, दांडगेश्वर. **इमाम बाळी स्त्री०** १ हत्तीच्या कानांत (शोभेसाठीं) घालावयाची बाळी. २ भिल्ल, रामोशी, वगैरे कानांत शोभेसाठीं घालतात ती बाळी.

इमारत [अ०] **स्त्री०** दगड, चुना, विटा, माती, लाकूड, इत्यादींनीं बांधून काढलेलें जें घर, बंगला, विहीर, इत्यादि बांधकाम तें.

इयत् [सं०] **वि०** इतका. ॐ**इयत्ता स्त्री०** १ इतकेपणा. २ मर्यादा, सीमा. ३ पल्ला, टप्पा. ४ अभ्यासाच्या प्रमाणावर ठरविलेला वर्ग(शाळांत).

इरगी मिरगी स्त्री० मुलांचा एक खेळ.

इरजीक स्त्री० शेताच्या किं० इतर जातीच्या कामासाठीं आपणांस माणसांची, जनावरांची, किं० साधन सामग्रीची गरज लागल्यास आपण दुस-ऱ्याचीं माणसें, जनावरें, किं० साधन सामग्री आणावी, आणि त्याला गरज लागेल तेव्हां त्याला आपली द्यावी असा जो परस्परांच्या सायीचा प्रकार तो.

इरज्या वि० इरजीकच्या प्रकारानें उसना दिलेला किं० घेतलेला गडी, बैल, इ०. वर ' इर-जीक ' पहा.

इरड, इरवड, इरवाड स्त्री० १ गाई, म्हशी, इ० नीं सकाळीं माणसांची विष्ठा, उष्टें, वगैरे खाण्यासाठीं भटकणें (**क्रि०** करणें). २ गायी,

म्हशी, इ०चें वरच्या प्रकारचें भक्षण. ३ कांहीं खावयाला मिळेल ह्या आशेनें शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या घरीं जाणें. ४ जंगलांतून आणलेल्या गवताचा किं० सर्पणाचा भाग किं० त्यासाठीं जंगलांत केलेली फेरी. ५ पुढें 'इरळ' शब्द पहा.

इरंमद [सं०] पु० १ विजेचें तेज. २ वडवानल.

इरलें न० पर्जन्यनिवारणार्थ डोकीवर घ्यावयाकरितां कामट्यांचा सांगाडा करून पळस वगैरेच्या पानांचें त्यावर आच्छादन शिवून खोळीसारखा जो पदार्थ करतात तो; विरलें.

इरसाल [अ०] वि० १ नजराणा म्हणून पाठविण्याच्या लायकीचा. २ उत्कृष्ट गुणांचा, अत्यंत मधुर, रसाळ, स्वादिष्ट, (आंबा, फणस, इ० फळें, किं० त्यांचीं झाडें). ३ अत्यंत कुशल, चतुर, (भामट्या, चोर, लबाड, खिसेकापू, इ०). ❀—**नामा** पु० सरकारी खजिन्यांत भरणा करावयाला पाठविलेल्या रकमांच्या तपशिलांचें पत्रक. —**भरणा** पु० वेगवेगळ्या महालांतून सरकारी खजिन्यांत पाठविलेला पैसा.

इरळ न० एकाद्या शेतांत दुसऱ्या महत्त्वाच्या किं० मुख्य धान्यांत मधून मधून पेरलेलें तूर वगैरे कमी महत्त्वाचें किं० गौण धान्य.

इराक(—ख—)त स्त्री० १ लब्बी. २ लब्बी करणें.

इराणी [फा०] इराण देशाचा कोणताही पदार्थ किं० इसम किं० पोशाख, किं० चाल रीती, इ०.

इरादा [अ०] पु० उद्देश, बेत, संकल्प.

इरे स्त्री० पुढें 'ईर' पहा.

इरेफ, इराब वि० कापडाचा तिरकस काप, किं० तिरकस कापलेला तुकडा (शिवण कामांत).

इरोळी स्त्री० जनावरांच्या पायाला होणारा एक रोग.

इलगार पु० जोराचा हल्ला.

इलजाम [अ०] पु० टपका, दोष.

इलम [अ०] पु० १ शास्त्र. २ विद्या. ३ उपाय, इलाज, युक्ति. ४ प्रयत्न. ५ जादूगारीचीं कामें; गौडबंगाल. ❀ —**बाज** वि० जादूगारी जाणणारा; जादूगार.

[गारीसंबंधाचा.

इलमी वि० १ जादूगारींत प्रवीण. २ जादू-

इलाखा [अ० अल्लाकह्] पु० १ हक्क. २ संबंध. ३ सत्ता. ४ सत्तेखालचा मुलूख. ५ युक्ति. ६ पाल्यांचें गोंट (प्रत्येक).

[कापड.

इलाचा [हिं० इलाइचह्] एक प्रकारचें रेशमी

इलाची, इलायची [हिं० इलाचा] स्त्री० वेलदोडा. ❀—**दाणा** पु० वेलदोडे घालून केलेलें एक प्रकारचें खाद्य किं० मेवा.

इलाज [अ०] पु० युक्ति, उपाय.

इला [सं०] स्त्री० १ पृथ्वी. २ गाय. ❀—**धर** पु० पर्वत. —**वृत्त** न० नवखंडांतील एक खंड.

इलिसा, इवला, इवलासा, वि० अगदीं थोडा; किंचित. क्रि० वि० अगदीं थोडक्या प्रमाणांत.

[(मूळ).

इल्लत, इल्लथ [अ०] वि० खोडकर, द्वाड

इल्ला [कानडींत 'नाहीं'] पु० अगदीं कांहीं नाहीं अशी स्थिति; पूर्ण अभाव. ❀**इल्लाबिल्ला करणें** किं० **दाखविणें** कांहीं न देणें; रिकामे हात दाखविणें.

इवळखोर वि० सदा तक्रार किं० चरफड करणारा.

इवळणी स्त्री० तक्रार, चरफड, असंतुष्टपणा.

इवळणें अ० क्रि० चरफडणें, कुरकुरणें.

इश्, इश्श उ० वा० अ० छेः ! छिः !

इशर [अ०] दहा (मुसलमानी साल सांगतांना).

इशरीन [अ०] वीस (मुसलमानी साल [सांगतांना).

इशारत स्त्री०, **इशारा** पु० [अ०] १ खूण, सूचना. २ रचना.

इशी स्त्री० (मलांच्या भाषेंत) मलोत्सर्ग.

इशीम [अ० इस्म्] स्त्री० मोठेपणाची किं० मोठ्या दर्जाची जाणीव; आपल्या दर्जाचा अभिमान, (क्रि० बाळगणें, धरणें' इ०).

इष्क [अ० अश्क्] पु० १ स्त्रीपुरुषांचें परस्परांवरील प्रेम किं० प्रीति. २ आवड; आसक्ति, मनाचा कल (जुगार, दारूबाजी, स्त्रिया, इ०च्या संबंधीं). ❀—**पेंच** पु० एक शोभिवंत लताविशेष. **इष्कबाज** पु० स्त्रियांचा शोकीन; स्त्रियांवर आसक्त. **इष्की** वि० स्त्रियांवर लंपट; रांडांचा नादी. **इष्कबाजी** स्त्री० रांडबाजी; रांडांच्या नादीं लागणें.

इष्कल, इष्कील [अ० अपकाल्] **स्त्री०** अडचण, घोटाळा, ठेच, व्यत्यय, खोळंबा.

इष्ट [**सं०** इष्=इच्छिणें] **पु०** प्रेमाचें माणूस. **वि०** १ इच्छिलेलें. २ प्रिय. (**ग०**) कल्पिलेला. ४ योग्य, अनुकूल, हितावह, असावा तसा. ॐ**इष्टापत्ति स्त्री०** प्रतिपक्ष्याचें आपणास अनुकूल भाषण. **इष्टकर्म न०** कल्पित अंक धरून गणित सोडविणें. **इष्टमित्र पु० अ० व०** प्रेमाचीं माणसें. **इष्टदैवत स्त्री०, इटदेवता न०** कुलस्वामिनी, कुलदैवत.

इष्ट [**सं०** यज्=यज्ञ करणें, होम करणें)] **वि०** यज्ञानें पूजिलेला. ॐ**इष्टापूर्त न०** धार्मिक आणि परोपकाराचीं कृत्यें (यज्ञ करणें, विहिरी बांधणें, धर्मशाळा बांधणें, अन्नसत्रें स्थापणें, इ०).

इष्टका, इष्टिका [**सं०**] **स्त्री०** वीट.ॐ**—न्यास पु०** घराचा पाया घालणें.

इष्टि [**सं०** यज्=यज्ञ करणें] **स्त्री०** यज्ञ.

इसकाड न० नांगराचा दांडा.

इसन्ने [अ० अस्नान्] **वि०** दोन (मुसलमानी साल सांगतांना).

इसप, इसब [**सं०** विसर्पिका] **पु०** १ गजकर्णासारखा एक त्वचेचा विकार आहे तो. २काळसर तांबडा आणि गोचिडा सारखा एक किडा (जनावरांना उपद्रव देणारा).

इसप (–ब–) गोल [**फा०** इस्पगोल्] **पु०** एक औषधी बीजविशेष.

इसम, इशीम [अ०] १ (जमाखर्चांत) एक बाबत. २ जमाखर्चाचा एक रकाना. ३ एका जातींतील सर्व माणसें (समुच्चयानें); उ० माळी इसम, कुंभार इसम इ०. ४ आपल्या दर्जाचा अभिमान. ॐ**इसममजकूर पु०** वर सांगितलेला माणूस. **इसमसुबादला पु०** १ यादींतील बदललेलें नांव. २ एकाच्या बदलीं घातलेलें दुसरें नांव. ३ एका माणसाच्या बदल दुसरा हजर केलेला इसम. **इसमवार क्रि० वि०** १ नांवांवरहुकूम. २ नांवनिशीवार. ३ नांवांच्या क्रमानें. ४ प्रत्येक इसमाला. **इसमवारी स्त्री०** नांवांची यादी.

इसर न० नांगराचा दांडा.

इसरकी स्त्री० नांगराच्या मागच्या टोकाची [खीळ.

इसवी [अ० ईसावी] **वि०** ख्रिस्ती. **स्त्री०** ख्रिस्ती शक.

इसळ (–ळी) स्त्री०, इसाळा पु० १ ईर्ष्या, स्पर्धा. २ ईर्षेचा उद्रेक किं० उसळी.

इसाड न० नांगराचा दांडा; नांगराच्या जोकडास बांधावयाचें जें लांब लांकूड असतें तें.

इसाड न०, इसाडा पु० झाडाचा कांहीं बुंधा शाबूत राखून वरचा तोडून टाकून खालच्या बुंधावर त्याच जातीच्या झाडाचीं कलमें लावून नवें झाड करतात तें.

इसाप (–ब), इसूप (–ब) पु० वर इसप (–ब) पहा.

इसाफत, इसापत वि० वर ' इजाफत ' पहा.

इसार, इसारा पु० कोणा माणसाशीं कांहीं व्यवहार ठरवून तो व्यवहार फिरूं नये म्हणून त्याला दिलेला जो पैसा तो.

इसारकी स्त्री० नांगराच्या दांड्याच्या मागच्या टोकाची खोळ.

इसारा, इशारा [अ०] **पु०** मागें 'इशारा,' ' इशारत ' पहा.

इसाळ, इसाळा [**सं०** ईषा] **पु०** ईर्षा; ईर्षेचा उद्रेक. ॐ**इसाळाइसाळीं क्रि० वि०** ईर्षेनें; ईर्षेचें एकदम संचरण अंगांत होऊन.

इस्तकबील [अ०] **अव्यय** मागच्या अमुक गोष्टीच्या कालापासून पुढें; एखाद्या मुदतीचा आरंभ दर्शविणारें हें अव्यय आहे; शेवट दर्शविणारें अन्वय ' तागायत; ' उ० इस्तकबील चैत्र तागायत काल्गुन म्हणजे चैत्रापासून तों फाल्गुनापर्यंत.

इस्तमाली [अ० इस्त अमाल्] **स्त्री०** परिपाठ, वहिवाट.

इस्तमेल स्त्री० इकडचा तिकडे आणि तिकडचा इकडे असा बदल (करणें.)

इस्ताद [अ०] **स्त्री०** सामानसुमान, चीजवस्त; स्थावर वर्ज करून जी मालमत्ता ती.

इस्तावा पु० शेत प्रथम कौलानें घेऊन नंतर प्रतिवर्षीं चढता सारा द्यावा लागतो तो, किं० शेत करण्याविषयीं ठरवून घेतलेला तसा नियम.

इस्त्री स्त्री० अंबट ओल्या वस्त्राच्या घड्या करून त्या साफ व्हाव्या म्हणून आंत निखारे घालून वर

फिरवावयाचें डब्याच्या आकाराचें धातूमय जें परटाचें आऊत असतें तें. २ ह्या आऊतानें त्या कपड्यांवर केलेली कृति क्रि० संस्कार (क्रि० करणें).

इस्पळ [स० अचपळ] **वि०** अतिचंचळ आणि उपद्रवकारक (मूल).

इस्वन पु० एक प्रकारचा पिवळा मासा.

इह [**सं०** इह=येथें] **क्रि० वि०** येथें; ह्या लोकीं; ह्या प्रसंगीं; ह्या जन्मीं; (ह्याच्या उलट 'परत्र'). ※**इह जन्मीं, इह जन्मांत** ह्या जन्मांत. **इह ना पर क्रि० वि०** इकडे नाहीं तिकडे नाहीं; ह्या जन्मांतही नाहीं आणि पुढच्या जन्मांतही नाहीं. **इहलोक पु०** हा लोक (उलट 'परलोक').

इहिदे [**अ०**] **वि०** एक (मुसलमानी साल सांगतांना).

इळत स्त्री० शेतकी कामाचें एक आउत.

इळा, विळा पु० तृणादि कापण्याच्या उपयोगाचें एक कमानदार शस्त्र. ※**इळया भोपाळ्या इतकें (वाकडें) न०** शत्रुत्वाचा संबंध; शत्रुत्व. **इळया इतकें उजू न०** वाकडें; शत्रुत्व; बेबनाव. **इळा मोडून खिळा करणें** अधिक मूल्यवान किं० अधिक उपयुक्त वस्तु मोडून कमी मूल्यवान् आणि कमी उपयुक्त वस्तु करणें; वस्तूंची नासाडी करणें. **इळा मोडून खिळा करणें आणि खिळा मोडून इळा करणें** भलभलत्या खटपटी करणें. **इळयाइतका वांकडा** सुधा नव्हे असा (माणूस); मुद्दाम वाकड्या मार्गांत शिरणारा (माणूस); आडमुठा. **इळया वाळकांशीं गांठ पडणें** ज्या दोन माणसांचें एकमेकांशीं पटत नाहीं अशांचा संबंध घडून येणें. **इळा खिळा पु०** संसारांत लागणारे सर्व पदार्थ समुच्चयानें; उ० गोविंदरावांनीं इळाखिळा विकून टाकून आलेला पैसा दानधर्मांत खर्चून संन्यास घेतला. **अंगाचा इळा खिळा करणें** एकाद्या कामीं अनेक प्रकारचे कष्ट सोसणें.

इळी, विळी स्त्री० भाज्या, फळ, इ० चिरण्याचें तीक्ष्ण धारेचें एक आउत.

इळीमिळी गु (चि–) पचिळी स्त्री० मुलें एकमेकांना गप्प बसण्याची इशारत करतात ती (क्रि० घालणें).

इक्षु [**सं०**] **पु०** ऊस. ※**–दंड पु०** ऊस. **–कांड पु०** ऊस. **–मेह पु०** मधुमेह. **–यंत्र न०** उसाचा रस काढण्याचें यंत्र. **–रस पु०** उसाचा रस. **–रसासव पु०** उसाच्या रसापासून केलेली दारू.

ई.

ई १ मराठी वर्णमालेंतील नववा वर्ण. २ मराठी स्वरमालेंतील नववा स्वर.

ई अव्यय उपहासाचें द्योतक अव्यय; उ० ई ! आतां कशी लेंडी घाबरली !

ई स्त्री० बहुमानार्थक 'आई' शब्दाचें संक्षिप्त रूप; उ० गोदाई, इंदाई, यमनाई, म्हाळसाई, इ०.

ईट [**सं०** इष्टिका] **स्त्री०** १ भिंत इ० बांधावयासाठीं मृत्तिकेचा चिखल करून तो चौकोनी आकाराच्या साच्यांत घालून दाबून तयार करतात जो पदार्थ तो; वीट. २ सुवर्णादि धातु चौकोनी ठशांत घालून त्यांची बनविलेली चीप. ※**ईटबंदी स्त्री०** विटांनी केलेली रचाई (भिंत इ०).

ईड न० लिंबासारखें एक फळ आहे तें. **स्त्री०** ह्या जातीच्या लिंबाचें झाड.

ईडपीड स्त्री० 'इडापीडा' पहा.

ईति [**सं०**] **स्त्री०** उपद्रव (अतिवृष्टि, उंदीर, टोळ, किडे, परचक्र, आणि स्वसैन्यपीडा, [सण. ह्या सातांचा).

ईद [**अ०**] **स्त्री०** मुसलमानांचा कोणताही

ईदृश, ईदृश, ईदृक्ष [**सं०**] **वि०** असला; ह्या प्रकारचा.

ईनमीन सवातीन [**म०** ही+न (आणि) +मी (मी) + न (आणि) + सवा (ह्या नांवाची मुलगी) + तीन, अशीं एकंदर तीन माणसें] **वि०** अगदीं थोडीं माणसें. ह्या वाक्प्रचारांत 'सवा' ह्या शब्दाबद्दल 'साडे' हा शब्दही योजण्यांत येतो.

ईर [**सं०** वीर्य] **स्त्री०** १ उत्साह, तरतरी, धमकदारी. २ गुण, उत्कर्ष. ३ संरक्षणार्थ दुसऱ्याचा घेतलेला आश्रय. ह्या तीन्ही अर्थीं 'ईर' हा शब्द 'इरेस' ह्या एकाच विभक्तिरूपांत योजला जातो. ※**इरेस घालणें** आपला बचाव करून घेण्यासाठीं दुसऱ्या कोणाच्या तरी पाठीमागें लपणें. बुद्धिबळांच्या डावांत आपल्या राजाला प्रतिपक्ष्यानें शह दिला

म्हणजे आपलें कांहीतरी मोहोरें राजाच्या बचावा-साठीं आपण पुढें सारतों त्याला ' तें मोहोरा इरेस घालणें ' म्हणतात; उ० एके प्रसंगीं नानाफडणावि-सांना निजामाला इरेस घातलें होतें. **इरेस चढणें** १ चुरस लागून आपलें वर्चस्व स्थापित करण्यासाठीं पुढें सरसावणें. २ आपला पराक्रम, कर्तबगारी, हिंमत, इ० दाखविण्यासाठीं कंबर बांधून सिद्ध होणें. **इरेस** किं० **इरईस पडणें** ह्याचाही वरील प्रमाणें अर्थ आहे; ' इरई ' हा ' वीरश्री ' चा अपभ्रंश.

ईरपीर [म० वीर+फा० पीर] **पु०** धाडसी किं० आर्ष माणूस.

ईरमोड पुढें " हिरमोड " पहा.

ईर्षा, ईर्ष्या [सं०] **स्त्री०** १ दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून आपण त्याचेपेक्षां अधिक उत्कर्ष दाख-वावा अशी भावना; उत्साह; चुरस. २ हाता घेत-लेलें काम पुरतें केलें पाहिजे अशी मनाची बळकट इच्छा. (**क्रि०** येणें, धरणें, बाळगणें, इ०). ॐ**ईर्षा देणें** एकाद्याला ईर्षेस चढविणें; त्याला उत्साहयुक्त करणें; त्याला उत्तेजन देणें.

ईर्षालु, ईर्ष्यालु [सं०] **वि०** ईर्षा बाळग-णारा; उत्साही.

ईश [सं०] **पु०** १ ताब्यांत ठेवणारा. २ शास्ता. ३ अधिपति. ४ पति, नवरा; उ० रमेश म्ह० विष्णु; उमेश म्ह० शंकर; शचीश म्ह० इंद्र; इ०. ५ शंकर.

ईशान्य, ईशानी [सं०] **स्त्री०** ऐशानी दिशा; उत्तर आणि पूर्व ह्या दोन दिशांच्या मधली दिशा. (ह्या दिशेचा अधिपति ईश आहे).

ईशिता [सं०] **स्त्री०** १ प्रभुत्व. २ अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशिता, आणि वशिता, ह्या ज्या आठ सिद्धि त्यांतील सातवी.

ईश्वर [सं०] **वि०** १ समर्थ. २ सत्ता चालविणारा. ३ श्रीमंत. ४ श्रेष्ठ. **पु०** १ स्वामी. २ राजा. ३ समर्थ किं० मोठा अधिकारी. ४ पति. ५ परमेश्वर. ६ शंकर. मराठींत हा शब्द अवाढव्यपणा दाखविण्यासाठीं हाव्या त्या शब्दा-पुढें जोडतात; उ० पाटेश्वर म्ह० मोठा पाट; टेबलेश्वर म्ह० मोठें टेबल, इ०. ॐ**—कर्तत्व न०** देवाची कृति. **—कृपा स्त्री०** देवाची कृपा. **—प्रसाद पु०** देवाचा प्रसाद. **—सत्ता स्त्री०** देवाचें सामर्थ्य, किं० त्या सामर्थ्याचा परिणाम. **ईश्वराचा** किं० **हरीचा लाल पु०** १ देवाच्या मर्जींतील किं० प्रेमांतील माणूस. २ मूर्ख आणि अचरट माणूस.

ईश्वरी [सं० ' ईश्वर 'पासून] **वि०** देवानें दिलेला, केलेला, योजलेला, संकल्पिलेला; देवाचा; देवा-संबंधाचा. ॐ**—तंत्र न०** सृष्टिव्यवहार चालविण्या-विषयीं देवानें करून ठेविलेली योजना. **—पुरुष पु०** परमार्थनिष्ठ असून प्रपंचांत भोळा जो पुरुष तो. **—क्षोभ पु०** मनुष्याला ज्याचें निवारण करतां येत नाहीं असा मोठा अनर्थ. **—फळ न०** जन्मलेलें मूल मुलगा असल्यास त्याला ' ईश्वरी फळ ' म्हणतात. **—वाचा स्त्री०** साधु पुरुषाचे शब्द. **—सोहळा पु०** थाटाची मेजवानी; मोठ्या उत्सवाचा प्रसंग. **—देणगी स्त्री०** जन्माचे वेळीच देवानें दिलेली जी शक्ति ती; उ० बुद्धि ही ईश्वरी देणगी आहे; उ० शिवाजीला ईश्वरी देणगी होती म्हणूनच त्याला स्वराज्याची स्थापना करणें शक्य झालें.

ईषणा [सं०] **स्त्री०** १ इच्छा. २ प्रेम. ॐ**लोकेषणा स्त्री०** लोकांवरचें प्रेम. याचप्रमाणें पुत्रेषणा, दारेषणा, इ०चे अर्थ जाणावे.

ईषत् [सं०] **क्रि० वि०** अत्यल्प; अगदीं थोडें. ॐ **ईषदुष्ण** अगदीं थोडें ऊन किं० कढत. **ईषद्दर्शन न०** ओझरता देखावा. **ईषद्दोष पु०** अगदीं थोडा दोष; क्षम्य दोष. **ईषन्मात्र वि०** अत्यल्प. **ईषत्कर वि०** अगदीं थोडें करणारा.

ईस मागें ' इसाड ' पहा.

ईहा [सं०] **स्त्री०** १ इच्छा. २ प्रयत्न.

ईहित [सं०] **वि०** इच्छिलेलें; इष्ट.

ईक्षण [सं० ईक्ष्=पाहणें] **न०** १ पाहणें. २ डोळा. ३ दृष्टि. [सामुद्रिक.

ईक्षणिक [सं० ईक्ष्=पाहणें] **पु०** ज्योतिषी,

ईक्षा [सं० ईक्ष्=पाहणें] **स्त्री०** १ दृष्टि. २ विवेक. ३ आत्मविद्या. ४ भेददृष्टि.

ईक्षिका [सं० ईक्ष=पाहाणें] **स्त्री०** १ डोळा. २ पाहणें.

ईक्षित [सं० ईक्ष्=पाहणें] **वि०** पाहिलेला.

उ.

उ मराठी वर्णमालेंतील पांचवा वर्ण आणि मराठी स्वरमालेंतील पांचवा स्वर.

उं: उद्गार वाचक अव्यय; तें नापसंती किं० तिरस्कार दार्शवितें; उ० उं: ! यांत काय आहे !

उकट, उकड स्त्री० मोदकासाठीं उकडलेलें तांदूळ इ०चें पीठ.

उकटणें स० क्रि० १ घट्ट बसलेल्या खिळा, खिटी, अडसर, कडी, इ० सैल करून उपटून काढणें. २ जातें, पाटा, वरवंटा, इत्यादींना टांकी देणें. ३ देवींच्या व्रणांनीं शरीराची त्वचा अंकित करणें ४ पोळी, भाकरी, इ० तव्यावर उलटून घालणें किं० परतणें.

उकटाई स्त्री० जांत्याला, पाट्याला, किं० वरवंट्याला टांकी देणें, किं० ह्या टांकी देण्याबद्दलची मजूरी.

उकटी स्त्री० १ टांकी देण्याचें हत्यार. २ जांत्याला टांकी दिल्यामुळें उखळलेले जे जात्याच्या दगडाचे कण ते काढून टाकण्यासाठीं त्या जांत्यावर दळलेलें जें धान्य, कोंडा, इ० चें पीठ,–जें रस्त्यांत *अशा आकृतीनें पसरतात तें. ३ असें पीठ ओलांडल्यामुळें उद्भवणारें गळूं.

उकटींव वि० टांकी दिलेलें (जातें, इ०).

उकड स्त्री० मोदक, पोळी, इ० करावयाकारितां उकडलेलें जें तांदूळ वगैरेंचें पीठ तें. **वि०** उकडलेला. ***उकड आंबा पु०** पाडाचा आंबा उकडून तोंडीं लावावयासाठीं मीठ वगैरे घालून ठेवितात तो. **उकडगरे पु० अ० व०** गरे उकडून जें खाद्यविशेष करतात तें. **उकडपोळी स्त्री०** तांदूळ इ० च्या उकडीची केलेली पोळी. **उकडहंडी स्त्री०** पावटे, मुगमूग इ० च्या शेंगा एका मडक्यांत घालून तें मडकें भुईवर पालथें ठेवून त्यावर गोवऱ्या वगैरे पेटवून आंतील पदार्थ शिजवून तयार करतात जें खाद्य तें.

उकडणें [**सं०** उत्+क्वथ् (शिजविणें)] **स० क्रि०** १ पाण्यांत घालून अग्निसंयोगानें पदार्थ मृदु करणें. २ ऊष्मा अनुभूयमान होणें; उ० या देवळांत फार दाटी झाली म्हणजे अतोनात उकडतें. (मांजावणें, उजाडणें, इ० प्रमाणें हें क्रियापद भावकर्तृक आहे).

उकर पु० १ उकरून काढलेली माती. २ उंदीर, चिचुंदरी, वगैरेंनीं बिळांतून उकरून बाहेर टाकलेली माती (त्याला ' उकीर ' असेंही म्हणतात).

उकरडा, उकिरडा पु० केरकचऱ्याचा ढीग. ***उकिरडा फुंकणें** दारिद्र्यामुळें दारोदार हिंडून खाद्यादि मिळविणें. **उकिरड्यासारखा वाढणें** खूप लठ्ठ आणि उंच होणें. **उकिरड्याचेही देखील दैना फिटतें** उकिरड्याची जागा देखील स्वच्छ आणि साफ करतां येतें (मग तूं वैभवाचे दिवस कशावरून नाहीं पाहणार ? तूंही वैभवाला चढशील). **उकिरड्याची धन करणें** निरुपयोगी वस्तूंचा संग्रह करणें (ज्या वस्तु पुढें मागें उकिरड्यावर टाकण्यांत येणार).

उकरणें स० क्रि० १ उंदीर, घुशी, इ० नीं जमीन, भिंत, इ० दातांनीं किं० नखांनीं खणून भोक पाडणें. २ नारळ वगैरेंचा खोबऱ्याचा भाग खवणी इ० साधनांनीं खरवडून काढणें. ३ एकाद्या पदार्थावर ओरखडे किं० चरे पाडणें, किं० रेघा ओढणें. ***उकरून काढणें** दुसऱ्याचीं रहस्यें कुशलपणानें त्याच्या मुखांतून वदविणें. **भांडणें उकरून काढणें** १ भांडणाचा विषय शमलेला असतां त्याला मुद्दाम चालना देऊन भांडण उपस्थित करणें. २ कांहीं कारण नसतां किं० दुसऱ्याकडून कांहीं कुरापत न होतां भांडणाला प्रवृत्त होणें.

उकरीड पु० केरकचऱ्याचा ढीग; उकिरडा.

उकरींव वि० कोरून तयार केलेलें (लाकडाचें किं० दगडाचें भांडें, चित्र, इ०).

उकल, उकला पु० १ उकलण्याची क्रिया. २ जें कांहीं उकललें तें. ३ गुंतलेला दोरा साफ करून त्याचा केलेला विंडा.

उकलणें स० क्रि० १ गुंतलेल्या पदार्थाची गुंतागुंत नाहींशी करून तो साफ करणें. २ घट्ट बसलेला किं० अडकून राहिलेला पदार्थ सोडवून मोकळा करणें. ३ समजावयाला कठिण अशा वस्तूचा उलगडा करणें; उ० कोडें सोडविणें, इ०.

उकलणें अ० क्रि० १ एकाद्या गुंतलेल्या पदार्थाची गुंतागुंत नाहींशी होणें. २ दुर्ज्ञेय अशा विषयाचा बोध होणें; तो समजणें; त्याचा उलगडा

पडणें किं० होणें. ॐदांतखिळी उकलणें स० क्रि० हट्टानें किं० हिरवटपणामुळें कोणी मनुष्य कांहींच बोलत नसला किं० धड उत्तरें देत नसला तर त्याला धमकी भरून किं० लाभ दाखवून बोलावयाला लावणें. अ० क्रि० अशा प्रकारें तो बोलावयास लागणें.

उकवण, उकवणि न० जखमेंतील किं० सड- लेल्या भागांतील किडवळ नाहींशीं करणारा एक मंत्र, किं० तो मंत्र म्हणण्याचा विधि.

उकशी स्त्री० एक लहान रानझाड.

उकसणें, उसकटणें स० क्रि० १ पदार्थ इत- स्ततः टाकून अव्यवस्था करणें. २ व्यवस्थित पदार्थ अव्यवस्थित करणें; पहिली रचना किं० मांडणी मोडणें.

उकळ पु० पातळ पदार्थ फार तापल्यामुळें त्यांत वाफेचे बुडबुडे उत्पन्न होणें; कढ.

उकळणें अ० क्रि० पाणी, दूध, इ० पातळ पदार्थ फार तापल्यामुळें त्यांत वाफेचे बुडबुडे उत्पन्न होणें. **स० क्रि०** १ पाणी, दूध, इ० पातळ पदार्थ बुडबुडे उत्पन्न होईपर्यंत तापविणें. २ उकळी फुटेतों- पर्यंत पाणी तापवून त्यांत धातूचा पदार्थ, चिरगुट, वगैरे घालणें (स्वच्छ करण्यासाठीं किं० त्यांतील कीड, मुंगी, उवा, वगैरे नाहींशीं करण्यासाठीं). ३ वनस्पतीचा अर्क किं० सत्त्वांश काढण्यासाठीं त्या आधणाच्या पाण्यांत घालणें. ४ दुसऱ्याच्या माल- कीचा पदार्थ उपटणें किं० लाटणें. ॐ**घुसळतीपेक्षां उकळतीच्या घरीं ज्यास्त** काबाडकष्ट करून आपला चरितार्थ चालविणाऱ्या माणसापेक्षां दुस- ऱ्याच्या वस्तु लाटणाऱ्या माणसाच्या घरीं अधिक समृद्धि असते.

उकळा पु० १ दुसऱ्याच्याकडचें येणें असलेल्या पैशाची उगराणी. २ दुसऱ्याकडून लाटलेला जिन्नस.

उकळी स्त्री० १ पाणी, दूध, तेल, इत्यादि पातळ पदार्थ फार तापून त्यांतून बुडबुडे निघूं लागण्याची त्या पदार्थाची अवस्था. २ नदीचा जोराच्या पाण्याचा लोंढा खडकावरून वाहात असतां त्या खडकाच्या आकाराचा त्या पाण्याचा जो उंच- वटा होतो तो. ३ एकादी गोष्ट करण्याविषयीं मनाची जी उत्कट इच्छा ती (उकळी येणें, फुटणें, इ०). ४ मनांत दुःख, प्रेम, आनंद, इत्यादि मनोविकार उत्कट झाल्यामुळें बाह्य रूपावर त्यांचा जो परिणाम होतो तो किं० त्या मनोविकारांचा उद्रेक.

उकळीत स्त्री० १ येणें असलेल्या पैशाची उग- राणी. २ दुसऱ्याकडून भीक मागून किं० लाटून मिळविलेला पदार्थ. ३ बाजारांत विकावयाला आ- लेल्या भाजीपाला, धान्य, इ० पदार्थांचा जो अंश शेखदार हक्क म्हणून घेतो तो. ४ रयतेकडून पाट- लानें गोळा केलेला सरकारचा सारा. ५ धारेक- ऱ्यानें दर हप्त्याला जें द्यावयाचें त्याच्या हिशेबाचा कागद जो त्याच्याकडे पाठविला जातो तो.

उंका, ओंका पु० उघडा, नागडा, मोकळा, रिकामा, सुटा.

उकाडा पु० १ हवेच्या उष्णतेमुळें वाटतो जो अस्वस्थपणा तो; ऊष्मा. २ कांहीं दागिना किं० सोन्याचांदीचा पदार्थ उजळ करण्यासाठीं चिंच, मीठ, इ० पाण्यांत घालून जें पाणी कढवून तयार करतात तें. ३ अशा पाण्यानें पदार्थ उजळण्याचा विधि. (क्रि० देणें, करणें, इ०). [रतीब.

उकाडा पु० दूध, भाजीपाला, फुलें, इ० चा

उकाल पु० १ आजारांतून उठणें, बरें होणें, बाहेर पडणें, इ०. २ मोकळें होणें; गुंतागुंतींतून मोकळें होणें किं० करणें.

उकाळा पु० १ उकळीत. २ काढा. ३ विषादि द्रव्य पोटांत गेलें असतां तें ओकून पडावें म्हणून तांब्याच्या भांड्यांत आंबट पदार्थ, मीठ, तांब्याचा बुर्दा इ० उकळून जें पाणी प्यावयाला देतात तें. ४ पैशाची उगराणी. ५ बाजारांत विकावयाला आलेल्या भाजीपाल्यांतून कांहीं अंश काढून घेण्याचा जो गांवकामगाराचा हक्क तो, किं० त्या हक्कावर काढून घेतलेला जो भाग तो.

उकिडवा पु० जमीनीला ढुंगण न लागतां आणि गुडघे मिटून दोन पावलांवर बसलेला.

उकिरडा पु० मागें 'उकरडा' पहा. ॐ**उकि- रडाभाजी स्त्री०** माठ ह्या भाजीची एक जात.

उकीर पु० १ उंदीर, घूस, चिचुंदरी, इ० नीं जमीन उकरून काढलेल्या मातीचा ढीग. २ जमी- नीवर शेण वगैरे पडून तें वाळलें असतां तें शेण काढतांना जमीनीचे जे पोपडे वगैरे शेणाबरोबर उपटून निघतात ते. ३ डोळ्यांतील जो घट्ट पुवा- सारखा मळ तो.

उक्त [**सं०** वच्=बोलणें] **वि०** १ बोललेलें. २ सूचित. **न०** १ भाषण. २ वाक्य. ॰**उक्तनिर्वाह पु०** एकादें वचन, विधान, किं० प्रतिज्ञा खरी करून दाखविणें किं० निभावणें.

उक्ता वि० १ पोटांतील बारीक हिशेबांत न शिरतां, चांगल्या वाईटाची निवड न करतां, परिमाण न पाहातां, वजन माप न करतां केलेली (खरेदी किं० विक्री). उ० ही आंब्यांची पाटी मी उक्ती दोन रुपायाला घेतली; उ० मी ही भिंत उक्ती पांच रुपायांना बांधविली. २ मक्त्यानें ठरविलेला व्यवहार.

उक्ति [**सं०** वच्=बोलणें] **स्त्री०** १ भाषण. २ वाक्य. ३ वचन.

उक्ती स्त्री० नेहमींच्या परिपाठापेक्षां कमी मान्याच्या बोलीनें कसावयाला घेतलेली (जमीन). ॰**उक्ती जमीन स्त्री०** पिकाला अमुक भाग द्यावा असा ठराव न करतां कांहीं रकमेला ठरवून कसावयाला घेतलेली जमीन.

उक्सावुक्शीं क्रि० वि० मोठमोठे हेल काढून (रडणें). ' ओक्साबोक्शीं ' हें रूप विशेष प्रचारांत आहे.

उखई स्त्री० उपहासाला पात्र होणें; फजिती. (**क्रि०** एकाद्याची उखई होणें, मांडणें, करणें, इ०).

उखडणें स० क्रि० १ उपटून काढणें (झाड, ठेंच देणारा धोंडा, इ०). २ एकाद्याला स्थानभ्रष्ट करणें. ३ **अ० क्रि०** रागावणें, संतापणें.

उखण (–ळ–) णें अ० क्रि० जमीन, गच्ची, इ० फुटणें. **स० क्रि०** खणून किं० उपटून काढणें.

उखता, उखती वर ' उक्ता ' ' उक्ती ' पहा.

उखर [**सं०** उषर, ऊषर=खारी जमीन] **वि०** १ जेथें शेत चांगलें होत नाहीं अशी माळवट, डोंगराळ, (जमीन). २ खरबडीत, उंचसखल. ॰**उखरवाखर वि०** खरबडीत (जमीन, पदार्थांचा पृष्ठभाग, इ०). ' अबारवाबीर ' हें रूप अधिक प्रचलित आहे. **उखरवली स्त्री०** जमीनीचा पोपडा.

उखल स्त्री० शेताची पहिली नांगरणी.

उखळ [**सं०** उलूखल] **न०** दगडांत मध्यें खळगी करून तांदूळ वगैरे सडण्यासाठीं केलेलें जें साधन तें. ॰**एकाद्याचें उखळ पांढरें होणें** तो वैभवास चढणें. **एकाद्याच्या बेंबीचें उखळ होणें** तसतसें त्याचें आणि पर्यं एकसारखी मिळत असल्या कारणानें पोट सुटणें (आणि बेंबी उखळाइतकी खोल होणें). **उखळांत घातला असतां तो दहा घाव चुकवील** तो कोणाच्या तावडींत न सांपडणारा आणि अत्यंत द्वाड माणूस आहे. **उखळांत डोकें असणें** संकटाच्या स्थितींत असणें; अनर्थ घडण्याच्या स्थितींत असणें; नाशाची स्थिति जवळ येऊन ठेपलेली असणें. **उखळामुसळांशीं गांठ स्त्री०** ज्यांत नेहमी येतनांत होणार किं० भांडणें होणार अशा सहवास; ज्या योग्य सामन्याचें पटणें शक्य नाहीं अशांना संबंध. **उखळांत डोकें घातल्यावर मुसळाला कोण भितो** ? जाणून बुजून जें साहस केलें असेल किं० जी पेचाची स्थिति पत्करलेली असेल तिचे परिणाम भोगावयाला कोणी कचरत नाहीं किं० भीत नाहीं.

उखळण स्त्री० फार वापर पडून खरबडीत आलेली जमीन किं० कसल्याही पृष्ठभाग.

उखळणी स्त्री० १ शेत करावयासाठीं जमीन प्रथम उकरण्याची किं० नांगरण्याची क्रिया. २ एकाद्या पदार्थाचे वेगवेगळे भाग साफ करण्यासाठीं ते पृथक् करण्याची क्रिया.

उखळणें स० क्रि० १ टणक झालेली जमीन इ० नांगर, कुदळ, पहार, इत्यादि साधनांनीं फोडणें. २ एका पदार्थात घट्ट बसलेला दुसरा पदार्थ सोडवून काढणें. ३ सांध्यानें जोडलेले दोन पदार्थ जोराच्या आघातानें किं० युक्तीनें वेगळे वेगळे करणें. **अ० क्रि०** १ पृष्ठभाग खरबडीत होणें (जमीनीचा, इ०). २ संयोगाचा भंग होणें.

उखळबेर, उखळाबेर स्त्री० शेताची जमीन एकदा उभी आणि एकदा आडवी नांगरणें.

उखळबेरीज, उखळापाखळ स्त्री० एकाद्याचीं वर्मेंकर्में किं० निंद्य कृत्यें उघडकीस आणणें किं० आणून त्याची निर्भर्त्सना, निंदा, किं० टवाळकी करणें (**क्रि०** काढणें, इ०).

उखळाउखळ स्त्री० सांधे जोडून बनविलेला पदार्थ मोडून त्याचे अवयव वेगळे वेगळे करणें.

उखळी [**म०** उखळ] **स्त्री०** पोहे, तांदूळ, इ० कांडावयासाठीं लाकडाचें किं० पाषाणाचें डमरूच्या आकाराचें करतात जें उखळ तें.

उखळ्या वि० पृष्ठभागाचे मधलेमधले टवके

उडून खरवडीत झालेला (पैसा, रुपाया, इ०).

उखाड पछाड [हिं०] **स्त्री०** पराकाष्ठेचे श्रम किं० खटपट किं० मेहेनत.

उखाणा पु० १ कूट, प्रश्न; उ० परडीभर फुलें तुझ्यानें मोजवेनात आणि माझ्यानें मोजवेनात, (उत्तर, आकाशांतील तारे); उ० पाण्यापेक्षां पातळ, लिंबापेक्षां कडू, माझा उखाणा जिंकील त्याला देईन सोन्याचा गडू (उत्तर, धूर). २ आहाणा, म्हण. ३ लग्नाच्या मेजवानीच्या प्रसंगीं वरपक्षाकडच्या मुली आणि वधूपक्षाकडच्या मुली एकमेकींशीं ज्या यमकयुक्त वाक्यांत बोलतात किं० एकमेकींना टोमणे मारतात तीं वाक्यें; उ० समोर होता कोनाडा त्यांत होतें पिठलें आतां कां विहीण-बाईचें तोंड मिटलें, इ०. ॐउखाणा घालणें एकाद्याला सोडवावयाला कोडें देणें. **उखाणा सांगणें** उखाण्याचें उत्तर देणें.

उखाणा पोटरा पु० कणसें यावयाइतकीं धान्याचीं ताटें वाढणें; उ० आमचें शेत तुमच्या शेतापेक्षां लवकर उखाण्यापोटऱ्यांत आलें.

उखार वि० उंचवट्यावरची दमदार नव्हे अशी भातशेताची (जमीन). **पु०** कोऱ्या रेशमाच्या अंगीं असते ती खळ.

उखाळ पु० वांति व्हावयासाठीं जें कांहीं खावयाला किं० प्यावयाला देतात तें. २ वांति, ओकारी (**क्रि०** होणें).

उखाळी, उखाळी पाखाळी स्त्री० ए० व०, उखाळ्या, उखाळ्या पाखाळ्या स्त्री० अ० व० दुसऱ्याचीं वर्मेंकर्में, उणेपणा, निंद्य कृत्यें; (**क्रि०** काढणें). उ० कोणाच्या उखाळ्या पाखाळ्या काढूं नयेत (नित्य अनेकवचनीं प्रयोग).

उखिरवाखिर, उखीरवाखीर वि० खरवडीत (पृष्ठभाग, जमीन, इ०).

उख्ता वि० मागें 'उक्ता' पहा.

उगण, उगवण स्त्री० देवी, कांजिण्या, इ० चा उद्रेक, किं० त्यांचें फुलणें.

उगणा पु० १ जमा करणें; गोळा करणें. २ आपल्या अंगावर ओढून घेणें (देवानें भक्ताची पापें). ३ भक्ताला पापमुक्त करणें.

उगम [सं० उत् (वर)+गम् (जाणें)] **पु०** १ उत्पत्ति. २ उत्पत्तिस्थान. ३ उत्पत्तीचें कारण.

उगराणी स्त्री० १ येणें असलेले पैसे गोळा करणें. २ गोळा केलेले पैसे; वसूल.

उगराबागरा [सं० उग्र] **वि०** १ भयंकर. २ क्रोधाविष्ट.

उगराविणें स० क्रि० (मारावयासाठीं) हात किं० काठी अवसानांत धरणें; उगारणें.

उगला वि० १ स्तब्ध, निश्चल. २ स्वस्थ. **क्रि० वि०** कांहीं न करतां; निष्क्रिय.

उगवण, उगवणी, उगवणूक स्त्री० १ येणें असलेल्या पैशांची उगराणी किं० वसूल करणें. २ केलेला वसूल. ३ गुंतागुंत सोडविणें.

उगवणें [सं० उद्+गम् (जाणें)] **अ० क्रि०** १ सूर्य, चंद्र, इ० खस्थ गोल क्षितिजाच्या वर येऊन दिसूं लागणें. २ बीजाला अंकुर उत्पन्न होणें. ३ त्वचेचा कांहीं विकार दृष्टोत्पत्तीस येणें. ४ इतके दिवस गुप्त असलेला किं० दृष्टीस न पडलेला गुण प्रकट होणें. ५ दृष्टिगोचर होणें; दृष्टीच्या टप्प्यांत येणें. ६ थकलेली बाकी वसूल होणें. ७ जमा आणि खर्च यांची तोंडमिळवणी होणें. ॐ **उगवता मावळता पु०** सूर्य (जो रोज उगवतो आणि मावळतो तो); उ० तुझें कृत्य उगवत्या मावळत्यास ठाऊक आहे. **उगवतां मावळतां क्रि० वि०** सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत म्ह० सारा दिवस; उ० हा मुलगा उगवतां मावळतां रडत असतो.

उगवत [म० 'उगवणें' पासून] **स्त्री०** ज्या दिशेस स्वस्थ गोल उगवतात ती दिशा; पूर्व. **क्रि० वि०** पूर्व दिशेकडे.

उगवा पु०, उगवील स्त्री० १ येणें असलेले पैसे वसूल करणें. २ वसूल केलेले पैसे.

उगविणें स० क्रि० १ गुंतलेले केश, दोरा, इ० सोडविणें; केशांची किं० दोऱ्याची गुंतागुंत सोडविणें. २ वाचावयाला कठिण असें लेखन वाचणें. ३ दुर्बोध अर्थ उकलून काढणें. ४ (टेकडी इ०) चढून जाणें. ॐ**उगवीत पागवीत क्रि० वि०** येणें असलेले पैसे क्रमानें, किं० हळूहळू, किं० प्रयत्नानें वसूल करतां करतां.

उगळ स्त्री० १ तोंडांतून बाहेर पडणारी किं० बाहेर टाकलेली लाळ किं० थुंकी. २ पायाखालीं तुडविलें जाऊन टाकाऊ झालेलें जनावरांचें खाद्य (गवत, कडबा, इ०).

उगळणें स० क्रि० १ पदार्थांचे बारीक बारीक कण काढण्यासाठीं तो पदार्थ दगड, सहाण, वगैरे-वर घासणें. २ विद्यार्थ्याला विशिष्ट विद्या यावी म्हणून त्या विद्येचें त्याला शिक्षण देणें. ३ तोंडांतून थुंकून टाकणें (थुंकी, लाळ, इ०). ४ अर्ध-वट चर्वण करून गिळलेलें खाद्य पुन्हां वर काढून त्याचें पूर्ण चर्वण करणें (गायी, म्हशी, इ० चें). ५ गवत, कडबा, इ० पायांखालीं तुडविणें (गायी म्हशी इ० करतात तसें). ६ नंतर वठविलेल्या पशूच्या वृषणाच्या शिरा पुरतेपणीं न मळल्या गेल्याकारणानें तें वृषण पूर्वीप्रमाणें होणें. ७ ओकणें, वमन करणें. ८ दयार्द्र होणें. ९ वश होणें. १० सोडून देणें. ११ माधार घेणें.

उगा, उगी क्रि० वि० १ न बोलतां, न हालतां, न रडतां. २ स्वस्थपणें. ३ कारण नसतां, विनाकारण. उगीच, उगाच, अशीही ह्या शब्दाचीं रूपें योजण्यांत येतात. ❀**उगाचच्या उगाच क्रि० वि०** कुरापत नसतां; कारणाशिवाय.

उगाण पु० १ स्पष्टीकरण. २ अनुभव.

उगाणणें, उगाविणें, स० क्रि० १ भक्ताचीं पापें देवानें नाहींशीं करणें; भक्ताला देवानें मोक्ष देणें. २ अर्पिणें. ३ उपदेश देणें. **अ० क्रि०** प्रकट होणें.

उगाणवा पु० लूट.

उगाणा, उगावा पु० १ भक्तांचीं पापें नाहींशीं करणें; भक्ताला पापमुक्त करणें. २ भक्ताच्या पापांचा विध्वंस.

उगाणें न० अगाध अनुभव.

उगामुका क्रि० वि० अगदीं स्तब्ध; अगदीं न बोलतां आणि न हालतां; कांहीं चळवळ कि० हाल-चाल न करतां.

उगारणें स० क्रि० १ हात, काठी, तरवार, इ० आघात करावयासाठीं अवसानांत धरणें. २ फेकून देणें. ३ पैशाची उगराणी करणें.

उगावागा पु० १ निकालांत काढणें. २ तंटा, घोटाळा, वाद, इ० शमविणें. ३ येणें असलेल्या पैशाचा वसूल.

उगाळ पु० १ तोंडांतून टाकलेली थुंकी, लाळ, इ०. २ घोटाळा, अव्यवस्था, गोंधळ (चिरगुटांचा, कागदपत्रांचा, इ०).

उगाळणें स० क्रि० १ घर्षणानें एकाद्या पदार्थांचे कण उपयोगासाठीं काढणें; उ० गंध उगाळणें, चंदन उगाळणें, इ०. २ कावाडकष्टानें शरीर झिज-विणें. ३ तीच गोष्ट पुन: पुन: सांगणें (श्रोत्याच्या मनांत ठसविण्यासाठीं किं० बिंबविण्यासाठीं).

उगाळा पु० उगाळून निघालेल्या पदार्थाचा अंश किं० उगाळून निघालेले कण.

उगाळी स्त्री० मोठा दगड फोडून केलेले बारीक बारीक तुकडे (रस्ता करण्यासाठीं किं० गच्ची कर-ण्यासाठीं किं० भिंतीच्या पायांत ठासण्यासाठीं).

उगीच, उगेंच क्रि० वि० १ व्यर्थ, निरर्थक, कारणावांचून. २ स्वस्थपणें, हालचाल न करतां, मुकाट्यानें.

उगीदुगी स्त्री० १ दुसऱ्याच्या कारभारांत लुडबूड. २ वटवट करणें. ३ वायफळ भाषण.

उगीर [सं० उग्र] वि० तीव्र (वास, घाण, इ०). २ तल्लख; तापट; आडदांड.

उग्र [सं०] वि० १ क्रूर. २ भयंकर. ३ जोरदार; शक्तिमान. ४ उष्ण. ५ रागीट; तापट. ६ असह्य (वास). **पु०** १ शंकर. २ क्षत्रिय व शूद्र यांच्या संयोगापासून आलेला पुत्र; राऊत. ३ आंडील बैल. ❀ **उग्रटाण, उगष्टाण स्त्री०** उग्र वास; असह्य वास.

उग्रट वि० नाकांत शिंका उत्पन्न करणारा किं० असह्य वास.

उग्रम पु० १ सुरवात, प्रारंभ. २ उत्पत्ति. ३ अंत:सामर्थ्य, जोर, तीव्रता, (रोगाचा, पावसाचा, वाऱ्याचा, इ०); उ० ह्या गळवाचा उग्रम अजून मोडला नाहीं; उ० पावसाचा उग्रम मोडल्याशिवाय थंडी पडत नाहीं.

उग्रस वि० तीव्र किं० असह्य (वास).

उग्रासणी स्त्री० १ पैशाची वसूली. २ वसूल केलेला पैसा.

उग्राबाग्रा वि० भयंकर, क्रूर, तापट.

उघड वि० १ स्पष्ट दिसणारा किं० समजणारा किं० असणारा. २ चोरटेपणाचा नव्हे तो; जग जाहीर असलेला.

उघड स्त्री० १ पावसाचें खळणें. २ एकाद्या गोष्टीची प्रसिद्धि किं० जगजाहीरपणा.

उघडणें [सं० उद्घाटन] स० क्रि० १ आच्छादन किं० दार बाजूस सारणें. २ आच्छा-

दन काढून (पदार्थ) दृग्गोचर होईल असा करणे. ३ कांहीं गुप्त गोष्ट प्रकट करणें. ॐउघडझाक स्त्री० वारंवार उघडणें आणि झाकणें, उ० त्या आकणाची अशी एकसारखी उघडझाक करूं नको; तें खिळखिळें होईल. उघडदोरा पु० जे दोरे दोहींकडे धरून ओढले असतां बटवा इ० उघडतो ते दोरे प्रत्येक. उघडवाघड क्रि० वि० राजरोसपणें. उघडवासरा पु० उघडी जागा; बिन आडोशाची जागा. उघडवासऱ्यांत क्रि० वि० उघड्यावर; बिन आडोशांत.

उघडणें [सं० उद्घाटन] अ० क्रि० १ आच्छादनानें वियुक्त होणें. २ (पाऊस) थांबणें किं० पडावयाचा बंद होणें. ३ (आकाश) मेघविमुक्त होऊन स्वच्छ होणें. ४ (दैव, नशीब) अनुकूल होणें; उ० रामाचें नशीब उघडूं लागलें आहे असें दिसतें.

उघडा [म० उघडणें] वि० १ झाकलेला किं० गुप्त नव्हे तो; उ० उघडा व्यवहार २ बंद केलेला नव्हे असा; उ० गोविंदशास्त्रयांच्या घराचा दरवाजा अतिथि अभ्यागतांना सदा उघडा असतो. ३ ज्याला संरक्षण किं० बंदिस्तपणा नाहीं असा. ४ नागडा, वस्त्रप्रावरण ज्याला नाहीं असा. ५ आश्रयहीन; साहाय्यविरहित. ६ सर्व लोकांना ठाऊक असलेला; जगजाहीर. ७ सुबोध; उ० ह्या श्लोकाचा अर्थ तर अगदीं उघडा आहे; तुला त्यांत काय अडलें मला समजत नाहीं. ॐउघड्यापाशीं नागडें गेलें सारी रात्र थंडीनें मेलें आपणासारखाच जो हीन दीन तो आपणास कांहीं मदत करूं शकत नाहीं. उघडें पडणें आश्रय सुटल्याकारणानें हीनदीन होणें, रक्षण करणारें किं० संभाळणारें माणूस नाहींसें झाल्याकारणानें विपन्न होणें; उ० आई मेल्यापासून तें मूल उघडें पडलें. उघडा नागडा, उघडा धोत, उघडा बंब वि० अगदीं नागडा, अगदीं वस्त्र अंगावर नाहीं असा. उघडा बोडका वि० १ अगदीं वस्त्रहीन. २ कोणताही आश्रय ज्याला नाहीं असा; मित्र, नातलग, मायेचें माणूस ज्याला कोणी नाहीं असा. उघडा बोडका बाळ संतोष ज्याला बायका पोरें, घरदार, काळजीकांटा नाहीं असा. उघडा माथा पु० १ मोकळीक, परवानगी; उ० आम्ही पिढीजादे भिक्षुक; आम्हाला प्रतिग्रह घ्यावयाला उघडा माथा आहे. २ धीटपणा (चांगल्या किं० वाईट अर्थीं). ३ दोषरहितता किं० दोषनिरसन. उघडी मराठी स्त्री० आड पडदा न ठेवतां भाषण; न कचरतां बोलणें; स्पष्ट भाषण.

उघडी स्त्री० शेत वगैरेचे जे बांध त्यांना आंतील पाणी बाहेर जावयासाठीं राखलेलें द्वार.

उघडीक स्त्री० १ गुप्त राखलेल्या गोष्टीचें प्रकट होणें. २ गुप्त राखलेली गोष्ट प्रकट करणें. ३ पाऊस थांबून आकाश स्वच्छ होणें. ४ आश्रयरहितता; हीनदीनपणाचीस्थिति.

उघळ स्त्री० १ दळलेल्या धान्याचे जात्याला चिकटलेले किं० अडकलेले कण. २ टांकी दिलेल्या जात्यावर दळलेलें मूठभर धान्य (पिठाबरोबर दगडाचे कण निघून जावे म्हणून).

उघळणें स० क्रि० १ अगोदर दळलेल्या पिठाचे कण जे जात्याला चिकटून राहिलेले असतात ते नवें धान्य दळावयाच्या वेळीं झाडून टाकणें. २ नवीन टांकी दिलेल्या जात्यावर मूठभर धान्य दळून दगडांचे कण काढून टाकणें.

उघाड, उघाडी स्त्री० पाऊस खळून आकाश स्वच्छ होणें.

उंच [सं० उच्च] वि० १ वरपर्यंत गेलेला. २ वर असलेला. ३ वरच्या पाहिरीचा. ४ ठेंगणा नव्हे तो. ५ (संगीतांत) वरच्या सुराचा. क्रि० वि० १ वर. २ वरच्या सुरांत. ॐउंचकपाळ्या वि० वैभवशाली होण्याला लायक; थोर नशीबाचा. उंचखाल क्रि० वि० १ वर आणि खालीं. २ अव्यवस्थित रीतीनें. उंचनीच वि० खालीं आणि वर; सपाट नव्हे ती जमीन किं० पृष्ठभाग. उंचपट वि० किंचित् उंच; थोडासा वर असलेला; (याच्या उलट 'खालपट'). उंचपट न० उंचवट्याचा प्रदेश. उंचवट वि० किंचित् उंच; (उलट बसकट). उंचवटा, उंचवळा पु० आसमंताद् भागापेक्षां अधिक उंच असा प्रदेश (भूमीचा, इ०). उंचसखल वि० मधूनमधून उंच आणि मधून मधून सखल अशी (जमीन, इ०); समरेख नव्हे असा. उंचा वि० अधिक किंमतीचा; मूल्यवान्; वरच्या दर्जाचा किं० गुणाचा. उंचाड वि० फाजील उंच; योग्य प्रमाणाहून अधिक उंच; बेढब दिसण्याइतका उंच. न० उंच जमीन; आसमंताद् भागाहून

उंच असा पृष्ठभाग. **उंची क्रि० वि०** उंचावर. **उंचून क्रि० वि०** उंचावरून. **उंचेला वि०** १ किंचित् उंच. २ बराच उंच. ३ उंच आकाराचा. **उंचोटा पु०** वर ' उंचवटा ' पहा.

उचकटणें स० क्रि० १ जोरानें काढणें; पिळवटून किं० उपटून काढणें; जोरानें ओढणें; जोरानें वियुक्त करणें. २ समाप्त झालेला किं० विझलेला व्यवहार किं० भेवनाव पुनरुज्जीवित करणें किं० उकरून काढणें.

उचकणें स० क्रि० १ विसकापूपणानें किं० लबाडीनें दुसऱ्याची वस्तु चोरणें. २ माल उधारीनें घेणें (किंमत न देण्याच्या बुद्धीनें); पैसे उसनें काढणें (परत न फेडण्याच्या इराद्यानें).

उचकळ्या वुचकळ्या स्त्री० अ० व० १ बुडत असलेल्या माणसाची धडपड, किं० तो खात असलेल्या गटांगळ्या. २ संसार चालविण्यांत पंचाईत (क्रि० खाणें). ३ दैवगतीच्या फेऱ्यांत धडपड.

उचका पु० १ फसवून किं० लबाडीनें पैसे किं० कांहीं वस्तु मिळविणें. २ लबाडीनें मिळविलेले पैसे किं० माल. ३ एकाद्या गोष्टीचा ध्यास (अस्वस्थता उत्पन्न करणारा). ४ अमुक प्रसंग आपणावर गुदरेल की काय अशी भीति (क्रि० लागणें; पडणें, इ०). ५ एकाद्या वस्तूचें एकाग्र चित्तानें ध्यान (क्रि० धरणें, इ०). ॐ**उचकाउचक स्त्री०** फसवून किं० लबाडीनें पैसे किं० माल मिळविण्याची क्रिया वारंवार करण्याचा परिपाठ, (**क्रि०** करणें).

उचकी स्त्री० उदरस्थ वायूस कांहीं विकृति होऊन अकस्मात् सशब्द जो कंठाचे ठायीं गचका लागतो किं० हिसका बसतो तो.

उचक्या वि० १ दुसऱ्याची नजर चुकवून त्याच्या खिशांतून त्याचे पैसे चोरणारा. २ परत न देण्याच्या इराद्यानें पैसे उसने घेणारा. ॐ**बाजार भरला, उचक्यांनीं कंबरा बांधल्या** चोरण्याची किं० ठकविण्याची संधी दिसतांच चोरटे, उचले, भामटे, लफंगे, हे लोक आपला धंदा चालावयाला सिद्ध होतात.

उचंगणें [म० उंच+अंग] अ० क्रि० जोरानें वाढणें, फोफावणें (मूल, झाडाचें रोप, आजारांतून बरा होत चाललेला माणूस इ०).

उचट [सं० उच्चाटन] पु०, न० १ कोणतेंही काम सुरू करण्याची घाई. २ अधीरपणा, अस्वस्थपणा, चंचळपणा. (**क्रि०** भरणें, खाणें, इ०). ३ त्याजगी स्वरूपाचा लिलाव.

उचाटणें [सं० उच्चाटन] अ० क्रि० अधीर होणें; एकाद्या स्थितीला किं० कामाला कंटाळणें.

उचटणें [सं० उच्चाटन] स० क्रि० दुसऱ्या पदार्थाला चिकटून बसलेला पदार्थ सोडविणें (पातेल्याच्या कडेला थापलेल्या थालीपिठाच्या वड्या, घट्ट बसलेली कढी, खिळा, इ०).

उचटणें न० उलथनें (भाकरी, पोळी, धिरडें, इ० तव्यावर उलटण्याचें स्वयंपाकघरांतील एक आउत किं० साधन); कलथा.

उचंडळणें [सं० उत्+आंदोलन] अ० क्रि० भांड्यांतील पाणी इ० भांड्याला धक्का लागल्यानें बाहेर सांडणें. **स० क्रि०** निष्काळजीपणानें भांड्याला धक्का दिल्याकारणानें आंतील पाणी इ० बाहेर पडण्याला कारण होणें.

उचंबळ स्त्री० १ कांठोकांठ भरून आंतील पाणी वगैरे सांडण्याची स्थिति (भांड्याची, नदीची, इ०). २ मनोविकार अत्यंत तीव्र झाल्याकारणानें त्यांना दृश्य स्वरूप प्राप्त होण्याची स्थिति, (दुःखानें रोदन, आनंदानें मुखाची प्रफुल्लता, रागानें मुखाची लाली, इ०). ३ मनोविकारांचा क्षोभ. ॐ**उचंबळ खाणें** नेटानें एकादें काम करावयाला पुढें सरसावणें; अवसानानें एकाद्या कामाला हात घालणें.

उचंबळणें, उचमळणें, उचमणें अ० क्रि० १ पात्रांतील पाणी, मनांतील विकार, तीव्र होऊन बाहेर पडण्याच्या स्थितीला येणें. २ ओकारी होईल असें वाटणें.

उचमपचम न० १ दुसऱ्याच्या कारभारांत लुडबूड करणें. २ दुसऱ्याला नांवें ठेवणें; दुसऱ्याला व्यर्थ निंदिणें. ३ टंगळमंगळ; टाळाटाळी. **क्रि० वि०** लुडबुडेपणानें; अधिकप्रसंगीपणानें.

उचल [म० उचलणें] स्त्री० १ कांहीं काम करण्याला सज्ज होणें किं० सज्ज करणें. २ दुसऱ्यावर हल्ला करावयाची किं० तुटून पडण्याची प्रवृत्ति. ३ एकाद्याला कांहीं कामाला उत्तेजन किं० भर देणें किं० त्याला प्रवृत्त करणें; उ० रामभाऊ त्या नोकरीसाठीं अर्ज करावयाला नाखूष होता; पण मी

त्याची उचल केली; त्यानें अर्ज केला आणि त्याला ती नोकरी मिळाली ४ बरा होत आलेला आजार पुन्हां उत्थित होणें; उ० ह्या हवेनें ताप उचल करील असा मला रंग दिसतो; उ० हें गळूं उचल करणार असें मला वाटतें. ५ थकलेल्या किं० निराश झालेल्या माणसाला पुन्हां पूर्वीचें काम किं० धंदा करावयाला उठावणें. ६ कोणाच्या वाटणीस आलेल्या जमीनीचा कांहीं भाग आपणास पाहिजे असल्यास त्या भागाबद्दल त्याला दुसरीकडे दिलेली जमीन, किं० अन्य रूपाचा मोबदला. ७ दुसऱ्याजवळ ठेवलेल्या पैशांतून वेळोवेळीं घेतलेल्या ज्या रकमा त्या प्रत्येक. ८ लोकांकडे आपले येणें जे पैसे त्यासाठीं त्याला तगादा लावणें.

उचलचावडा (–रा) वि० छांदिष्ट, चंचल; अस्थिर बुद्धीचा.

उचलटप्पू वि० एके ठिकाणीं स्थिरपणें न राहाणारा; भटक्या.

उचलणी स्त्री० उचलण्याची क्रिया.

उचलणें [सं० उच्चलन] स० क्रि० १ वर करणें; उभारणें; उभें करणें. २ एकादें काम पत्करणें, स्वीकारणें, किं० करूं लागणें. ३ एकाद्याला एकादें काम करावयाला उत्तेजन देणें किं० प्रवृत्त करणें. ४ दुसऱ्याची दृष्टि चुकवून त्याच्या मालकीचा पदार्थ चोरून घेणें. ৡ**एकादा विशिष्ट पक्ष उचलणें** त्या पक्षाचीं मतें किं० त्या पक्षाची जबाबदारी स्वीकारणें; त्या पक्षाचा अभिमान बाळगणें. **एकाद्याच्या हातांत गणपति, गंगाजळी, तुळशी, बेल, भंडार, धान्य, इ० देणें** म्ह० ह्या वस्तु त्याच्या हातांत देऊन त्याला त्यांची शपथ घ्यावयाला लावणें. **एकाद्याला उचलून धरणें**. १ त्याला सतावणें. २ त्याला तगादा लावणें.

उचलणें [सं० उच्चलन] अ० क्रि० १ उठणें. २ उठून येणें. ३ वर येणें. ४ उत्पन्न होणें, (गांध, गांठ, शिबें, फुटकुळी, गळूं, इ०). ५ उंचीनें वाढणें. ६ उगवणें (रोप, अंकुर, इ०). ৡ**उचमळून येणें** वांतीची भावना होणें; कळमळणें; मळमळणें. **उचलून जाणें** वादाला किं० युद्धाला उठणें किं० सुरवात करणें. **उचलून जाणें** परक्या ठिकाणीं मुलाचें किं० मुलीचें लग्न करावयासाठीं सामानसुमानासह आणि इष्टमित्रांसह जाणें. **उचलून बोलणें, उचलून गोष्टी सांगणें** मर्यादा सोडून बोलणें; गुरुजनांचा अपमान होईल अशा रीतीनें बोलणें.

उचलला [म० उचलणें] वि० उचललेला. २ नेमून दिलेला (ठरवून टाकलेला पगार, वेतन, शेर, काम, इ०). ৡ**उचलल्या हातानें** क्रि० वि० स्वयंप्रेरणेनें किं० स्वसंतोषानें (जें दिलें तें). **उचलला संसार** पु० गरीबाऊ प्रकारचा किं० अल्प प्राप्तीवर किं० भांडवलावर चालविलेला संसार, व्यापार, इ०.

उचला [म० उचलणें] पु० ग्रामदुर्गादिकांचे देवालयीं देवाच्या मूर्तीजवळ एक धोंडा ठेविलेला असतो; देवाला कांहीं गोष्टीविषयीं भाविक प्रश्न विचारतो आणि प्रश्नाचें उत्तर "होय" असलें तर धोंडा उचलतांना हलका वाटावा आणि "नाहीं" असें उत्तर असलें तर जड वाटावा असें म्हणून तो भाविक तो धोंडा उचलतो. तो धोंडा हलका किं० जड लागेल त्यावरून त्या भाविकाला प्रश्नाचें उत्तर समजतें. ह्या धोंड्याला 'उचला' असें म्हणतात.

उचलाऊ [म० उचलणें] वि० १ उचलावयाचें. २ उचलण्याजोगें. [खालीं ठेवणें.

उचलाठेवर स्त्री० वारंवार वर उचलणें आणि

उचल्या [म० उचलणें] वि० दुसऱ्याची दृष्टि चुकवून त्याची वस्तु चोरण्यांत पटाईत.

उचाटी [सं० उच्चाटन] पु०, न० एकाद्या वस्तूचा, स्थितीचा, किं० कामाचा आलेला कंटाळा किं० त्रास किं० खंती (क्रि० खाणें, भरणें, इ०).

उचाट [सं० उच्चाटन] पु०, न० खाजगी स्वरूपाचा लिलाव.

उचाटणें [सं० उच्चाटन] अ० क्रि० एकाद्या वस्तूला, स्थितीला, किं० कामाला कंटाळणें किं० विटणें.

उचापत, उचापतविचापत स्त्री० पुढें पैसे देऊं अशा शर्तीनें उधारीनें दुकानदारापासून माल आणण्याची रीति. ৡ**उचापतीचें पोतें सवाहात रितें** उधारीनें माल आणण्याचा क्रम परिणामीं नुकसान करणारा होतो. **उचापतीचा रोजगार, धंदा**, किं० **व्यवहार** उधारीवर चालविलेला रोज-

गार, धंदा कि० व्यवहार (याच्या उलट ' गोंक-ढीचा). **उचापतखाऊ पु०** उधारीनें जिनसा आणून जो उदरनिर्वाह चालवितो तो.

उचित [**सं०**] **वि०** १ योग्य. २ नेहमीचें, परिपाठाचें, सवयीचें. ३ स्वाभाविक. ४ सराव-लेला, वहिवाटलेला. ५ स्तुत्य. *__उचितास येणें__ योग्य वाटणें; आपली विद्या, कुल, संपत्ति, इ० ला अमुक करणें योग्य आहे असें वाटणें; उ० तुम्ही सुचवितां तो मार्ग माझ्या उचितास येत नाहीं. **उचितज्ञ वि०** देश, काल, इ० ना अनुरूप कि० योग्य काय आहे आणि काय नाहीं हें ज्याला चांगलें समजतें असा.

उचंट स्त्री० कोंदणांत बसविलेला खडा निघा-ल्यानंतर उचकटून काढलेलें जें सोनें, रुपें, इ० तें.

उच्च [**सं०**] **वि०** १ उंच. २ अतिशय. ३ **(ज्यो०)** उच्चस्थानीं असलेला. **पु०** नारळ. **न०** १ श्रेष्ठ स्थान. २ **(ज्यो०)** ग्रहांचा विशिष्ट राशींशी संयोग; सूर्यादि सात ग्रहांस ज्योतिषशास्त्रांत मेषादि राशींतील स्थानें सांगितलीं आहेत तीं प्रत्येक. त्या राशीमध्यें ग्रहविशेषाचा जोर वाढतो ती रास. ***उच्चस्वर पु०** १ उंच स्वर. २ मोठा आवाज. **उच्चनीचभाव पु०** हा वरच्या पायरीचा कि० दर्जाचा, तो खालच्या पायरीचा कि० दर्जाचा, असा फरक.

उच्चलन [**सं०** उत् (वर) + चलन (जाणें)] **न०** वर जाणें. २ स्थानभ्रष्ट होणें.

उच्चाटणें (–ण–) [**सं०** उत् (वर) +चट् (चिकटणें)] **न०** १ उलथून पाडणें. २ दूर सरणें किं० दूर करणें. ३ घालवून देणें. ४ नाश.

उच्चार पु०, उच्चरण न० [**सं०** उत् (वर) +चर् (जाणें)] १ उच्चारणें. २ उच्चारण्याची क्रिया कि० व्यापार. २ विष्ठा.

उच्चारणीय [**सं०** ' उच्चार ' पहा] **वि०** उच्चार करावयाला किं० बोलून दाखवावयाला योग्य.

उच्चारणें [**सं०** उत् (वर) + चर् (जाणें)] **स० क्रि०** बोलून दाखविणें; मुखावाटे काढणें.

उच्चारित [**म०** ' उच्चारणें ' पासून] **वि०** बोलून दाखविलेला; मुखावाटे काढलेला; व्यक्त केलेला.

उच्चार्य [**सं०** ' उच्चार ' पहा] **वि०** उच्चारा-वयाला योग्य किं० आवश्यक असा.

उच्चार्यमाण [**सं०** ' उच्चार ' पहा] **वि०** उच्चारला जात आहे असा.

उच्छाद [**सं०** उत् (वर)+सद् (बसणें)] **पु०** १ उपद्रव (**क्रि०** देणें, आणणें, मांडणें, इ०). २ उपद्रव फार आल्यामुळें त्रासलेपणाची स्थिति.

उच्छाप [**सं०** उत्+शप् (शपथ घालणें कि० घेणें)]. **पु०** शापनिवृत्त्यर्थ वर; अमुक झाल्यास तुझा हा शाप संपेल असें आश्वासन कि० वचन.

उच्छाल पु० चढ, वाढ, उसळी. * **उच्छाल जाणें** १ क्रोधाविष्ट होणें; संतापणें. २ एकदम उडी मारणें (घोड्यानें, इ०).

उच्छास्त्र [**सं०** उत् (बाजूस) +शास्त्र] **वि०** शास्त्राला विरुद्ध असलेले.

उच्छिन्न [**सं०** उत् (वर) + छिन्न (फुटलेलें; फोडलेलें, छिद् = फुटणें, फोडणें) **वि०** नाश केलेलें; विध्वंसिलेलें; उपटून काढलेलें.

उच्छिष्ट [**सं०** उत् + शिष् (शेष ठेवणें)] **वि०** १ टाकून दिलेलें. २ खाऊन कि० भोगून टाकून दिलेलें. ३ खाद्य पदार्थाचा न खातां टाकून दिलेला अंश. ४ दुसऱ्यानें उपभोगिलेली (स्त्री). ५ जेवल्यानंतर हात, तोंड, धुतलेला. ***उच्छिष्ट कल्पना स्त्री०** १ दुसऱ्या कोणी काढलेली कल्पना. २ पूर्वी निघालेली कल्पना. **उच्छिष्ट चांडाळी स्त्री०** एका जेवणाच्या वेळेपासून दुसऱ्या जेवणाच्या वेळेपर्यंत दातांत भाकरीचा तुकडा इ० धरून बस-ण्याचें व्रत (देवीला संतुष्ट करण्यासाठीं).

उच्छिष्टणें स० क्रि० १ उष्टें करणें. २ अर्धवट किं० कांहीं काळ भोगून टाकून देणें.

उच्छृंखल (–ळ) [**सं०** उत् (दूर)+शृंखला (सांखळी)] **वि०** शास्त्र, रूढि, कायदा, शिष्टा-चार, इ० च्या विरुद्ध वर्तन करणारा.

उच्छेद [**सं०** उत् + छिद् (तोडणें)] **पु०** समूळ नाश; पूर्ण विध्वंस.

उच्छेदक [**सं०** ' उच्छेद ' पहा] **वि०** उच्छेद [करणारा.

उच्छेदणें [**सं०** उच्छेद] **स०** समूळ नष्ट करणें; पूर्णपणें विध्वंस करणें.

उच्छेदित [**सं०**] **वि०** समूळ नष्ट केलेलें, पूर्णपणें विध्वस्त केलेलें.

उच्छ्वसन [**सं०** उत् (वर) + श्वस् (श्वास घेणें)] **न०** श्वासोच्छ्वास करण्याचा व्यापार.

उच्छ्वसित [सं० 'उच्छ्वसन' पहा] **वि०** १ वाफ बाहेर टाकणारा. २ श्वास बाहेर टाकलेला. ३ प्रफुल्लित. ४ हालणारें. **न०** १ प्राण. २ बाहेर टाकणें. ३ स्फुरण, कंप. ४ सैल पडणें. ५ उमलणें. ६ सुसकारा.

उच्छ्वास [सं० उत् + श्वस् (श्वास घेणें किं० सोडणें)] **पु०** १ श्वास टाकणें. २ श्वास. ३ सुसकारा. ४ सांत्वन. ५ उल्हास. ६ पाण्याला लावून दिलेला मार्ग. ७ वाऱ्यासाठीं मार्ग किं० खिडकी.

उंच्छवृत्ति [सं० उंच्छ्=टिपून घेणें; वृत्=असणें] **स्त्री०** क्षेत्रादिकांत पडलेले जे धान्याचे कण ते वेचून त्यावर निर्वाह करावा अशी तपस्वी जनांस शास्त्रांत सांगितली आहे वृत्ति ती.

उजखुरा (–खोरा) **वि०** उजव्या हातानें काम करणारा. (याच्या उलट "डावखुरा (–खोरा)".

उजगरा, उजगिरा [सं० उत् + जागर (जागें होणें)] **पु०** १ जागेपणाची स्थिति. २ सावधगिरी. ३ दुःख, श्रम, कंटाळा.

उजदार [म० उज्+दार] **न०** घराचा पुढचा दरवाजा.

उजर [सं० उत्+ज्वल् (चमकणें)] **पु०** १ उत्कर्ष. २ शोभा. ३ चकाकी.

उजरणें [सं० उत्+ज्वल् (चमकणें)] **स० क्रि०** १ स्पष्ट उठाविणें किं० उमटाविणें. २ चकचकीत करणें.

उजरणें [सं० ऋजु=सरळ] **स० क्रि०** १ सरळ करणें. २ यथास्थित करणें, दुरुस्त करणें. **अ० क्रि०** १ पूर्व स्थितीला येणें; पूर्वीचा जोर, शक्ति, तजेला, इ० मिळविणें. २ सुधारणें.

उजरी, उजिरी [सं० उत्+ज्वल् (चमकणें)] **स्त्री०** १ चकाकी, चमक, तेज, प्रभा. २ उत्कर्ष, उदय. **वि०** स्वच्छ; निर्मळ; चमकदार.

उजवट [सं० उत् + ज्वल्] **वि०** स्वच्छ; गोरा.

उजवण, उजवणी, उजवणूक [सं० ऋजु= सरळ] **स्त्री०** १ कामांतून गेलेला माणूस, जनावर, पदार्थ, इ० वर कांहीं संस्कारविशेष करून पुन्हां कामाला येईल असें करणें. २ साफल्य. ३ उद्यापन, समाप्ति. ४ विवाह.

उजवणें [सं० ऋजु=सरळ] **अ० क्रि०** १ समाप्त होणें; यथासांग होणें; शेवटास जाणें. २ संकटांतून, आजारांतून, किं० कांहीं अडचणींतून निभावून निघणें किं० पार पडणें.

उजवा [सं० ऋजु=सरळ] **वि०** १ सव्य (याच्या उलट डावा). २ सरळ. ३ वरच्या पाहिरीचा. ‡**एकाद्याला उजवा घालणें** त्याच्याकडे आपला उजवा हात करून त्याला प्रदक्षिणा घालणें; आपली उजवी बाजू त्याच्या उजव्या बाजूकडे होईल अशा रीतीनें जाणें, बसणें, इ०. **उजवी देणें** संमति किं० अनुकूलता दर्शविणें. याच्या उलट **डावी देणें** वा० असंमति किं० प्रतिकूलता दर्शविणें. **उजवी डावी देणें** स्पष्ट निकाल सांगणें (तो अनुकूल असो किंवा प्रतिकूल असो). **उजवी गुढी देणें** संमति देणें. **उजवी बाजू स्त्री०** एकाद्या बड्या गृहस्थाच्या उजव्या बाजूस बसणारे लोक; त्याच्या भरंवशाचे लोक; त्याचे बगलबच्चे.

उजविणें [सं० ऋजु=सरळ] **स० क्रि०** १ समाप्त करणें; यथासांग करून शेवटास नेणें. २ एकाद्याचा एकादा संस्कार करणें; (मुंज, लग्न, गर्भाधान, इ०). ‡**दोहीं अंगीं उजविणें** दोन्ही बाजूंचा खर्च एकाच बाजूनें अंगावर घेणें; उ० आम्ही मुलाचें लग्न केलें तें दोहीं अंगीं उजवून केलें. (म्हणजे मुलीच्या बाजूचा खर्चही आम्हींच केला).

उजळ [सं० उज्ज्वल=चकाकित, तेजस्वी] **वि०** १ चकचकीत, स्वच्छ, कलंकरहित. २ गोरा, फारसा काळसर नव्हे असा. ३ पक्व दशेस येत आहे असा दिसणारा (आंबा, केळें, इ०). ‡**उजळ ठक पु०** १ संभाविताप्रमाणें दिसणारा भामटा. २ दिसावयाला सरळ आणि प्रामाणिक पण खरोखरीं लुच्चा किं० लबाड, **उजळ माथा पु०, उजळता माथा पु०, उजळ तोंड न०** दोषारोपापासून मुक्तता; आबरू स्वच्छ होणें; कलंक नाहींसा होणें.

उजळणी, उजळणूक [म० उजळणें] **स्त्री०** पूर्वी शिकलेल्या धड्यांची आवृत्ति (ते धडे लिहिणें किं० म्हणणें, ते विसरले जाऊं नयेत म्हणून).

उजळणी [म० उजळणें] **स्त्री०** अंक, पावकी, निमकी, पाउणकी, इ० जो गणिताचा भाग मुलांकडून पाठ करविला जातो तो.

उजळणें [सं० उत् + ज्वल् (चकाकणें, जळणें)] **स० क्रि०** १ घासून स्वच्छ किं० चक-

चकीत करणें. २ एकाद्या पदार्थावर प्रकाश पाडून तो स्वच्छ आणि स्पष्ट दिसेसा करणें कि० चकाकेल असा करणें. **अ० क्रि०** १ स्वच्छ कि० चकचकीत होणें. २ प्रकाशयुक्त होणें. ३ गोरें होणें. ४ सुधारणें (वाईट मार्गाला लागलेलें माणूस). ५ परिपक्व होण्याच्या मार्गाला लागणें कि० अवस्थेस येणें (आंबा, फणस, इ० फळें).

उजळा [सं० उत्+ज्वल्] **पु०** १ सोन्याचा कि० रुप्याचा दागिना कि० भांडें चकचकीत करण्यासाठीं सोरा, तुरटी, इ० द्रव्यांचा खल कि० लेप तयार करतात तो. २ ह्या द्रव्यांच्या लेपानें पदार्थाला आणलेला तजेला कि० चकाकी.

उजळाई [**म०** 'उजळणें' पासून] **स्त्री०** पदार्थ चकचकीत करण्याची क्रिया कि० त्या क्रियेबद्दल दिलेली मजुरी. ❀ **उजळाईचा दगड पु०** पदार्थ चकचकीत करावयासाठीं ज्या दगडानें घासतात तो दगड.

उजागर [**सं०** उत्+जागृ (जागणें, जागें होणें)] **क्रि० वि०** १ उघडपणें. २ निःशंकपणें; निर्भयपणें.

उजागर, उजागरा [**सं०** उत्+जागृ (जागणें, जागें होणें)] **पु०** १ जागेपणाची स्थिति. २ सावधगिरी. ३ धैर्य. ४ निःशंक वृत्ति.

उजागरी, उजागिरी [**सं०** 'उजागर' पहा] **स्त्री०** १ उघडेपणा. २ प्रसिद्धि, जाहीरपणा. ❀**उजागरीस आणणें** उघडकीस आणणें; चव्हाट्यावर आणणें; जगजाहीर करणें. **उजागरीनें क्रि० वि०** निःशंकपणें; न भितां, न कचरतां.

उजागीर [**सं०** 'उजागर' पहा] **वि०** १ उघडा. २ निर्लज्ज. ३ उच्छृंखल.

उजाड वि० ओसाड; वसतिहीन.

उजाडणें, उजेडणें [**म०** उजेड=प्रकाश] **अ० क्रि०** १ प्रभात होणें; सूर्योदय होणें. उ० उजाडल्यावर मी बागेंतून फुलें वेचून आणीन. २ प्रकाशयुक्त होणें; प्रभातकाळाची स्थिति पावणें; उ० दिवस उजाडला कीं नाहीं तों त्याला घराच्या बाहेर पडावें लागतें. ३ एकाद्या माणसाचा वैभवकाळ प्राप्त होणें. ❀**उजाडता काळ पु०** वैभवाचा किं० उत्कर्षाचा काळ.

उजाडी स्त्री० ओसाडपणा; उध्वस्तपणाची [स्थिति.

उजू [**सं०** ऋजु] **वि०** १ सरळ; नीट, योग्य. २ न्यायी; न्याय्य; यथान्याय; निःपक्षपाती. ❀**उजू पण विळयाइतका वाकडा** दिसण्यांत सरळ पण असण्यांत कपटी, लबाड, कि० हट्टी.

उजू [**सं०** ऋजु] **क्रि० वि०** १ थेट; पुढें; समोर; योग्य दिशेस कि० दिशेनें. २ पुन्हां.

उजूबुजू स्त्री० मान, मोठेपणा.

उजूर [**अ०**] **पु०** १ शंका; भीति. (**क्रि०** धरणें). उ० महिना भरतांच माझा उजूर न धरतां तुम्ही गहाण विकून ऐवज घ्या. २ कार्यक्षेत्र, कामाचा प्रदेश कि० प्रांत. ३ वसकदारीनें कि० अधिकाराच्या जोरानें बोलण्याचें सामर्थ्य; उ० बायकोला नवऱ्यापुढें उजूर नाहीं.

उजेड पु० १ प्रकाश. २ प्रकाश देणारा कि० पाडणारा पदार्थ; प्रकाशाचें साधन. ❀**उजेड पाडणें** पराक्रम करून दाखविणें (व्याजोक्तीत); उ० आम्ही प्रयत्न करून हात टेकले; आतां तुम्ही काय उजेड पाडतां तें पाहूं !

उजेडणी स्त्री० प्रकाशासाठीं केलेली गवताची कि० माडाच्या पानांची चूड.

उजेडणें मागें 'उजाडणें' पहा.

उजेरणें स० क्रि० १ स्पष्ट कि० उठावदार करणें. २ अधिक जोरदार कि० तजेलदार करणें. ३ पाणी यावयाच्या पाटांतील केरकचरा काढून टाकून तो पाट साफ करणें.

उज्ज्वल [**सं०** उत्+ज्वल् (जळणें, चकाकणें]) **वि०** तेजस्वी. २ प्रदीप्त. ३ स्वच्छ; शुद्ध. ४ सुंदर. ५ विकसित.

उज्ज्वलन [**सं०** 'उज्ज्वल' पहा] **न०** १ पेटणें. २ पेटविणें. ३ चकचकीत करणें. ४ घासून साफ कि० स्वच्छ करणें.

उज्ज्वलित [**सं०** 'उज्ज्वल' पहा] **वि०** १ पेटविलेला. २ चकचकित केलेला.

उज्झड वि० दांडगेश्वर; मनाला येईल तें धीटपणानें बोलणारा.

उज्झित [**सं०** उज्झ्=सोडणें] **वि०** टाकलेला, परित्यक्त.

उंट [**सं०** उष्ट्र] **पु०** ओझीं वाहणारा आणि पाठीवर माणसांची स्वारी वाहणारा असा एक प्राणी. ❀**उंटावरचा शाहाणा पु०** मूर्खपणाची

सल्लामसलत देणारा मनुष्य. **उंटकटारी स्त्री०** एक वनस्पति. **उंटमान्या वि०** उंच आणि वाकडी मान आहे ज्याची असा.

उटकर, उटकल वि० डळमळणारा (धोंडा).

उटकळ, उटकर, उटकळा स्त्री० पुढें 'उठकळ' पहा. [फुगणें (क्रि० येणें).

उटकळी स्त्री० गालाची आंतील बाजू सुजून

उटक्कर वि० उद्धट, दांडगा, उर्मट.

उटंगळ पु०, न० १ उंचवटा. २ शरीरावर आलेलें किं० उठलेलें गूळ. ३ पदार्थ सरकावावयाला किं० लोटीत न्यावयाला सोयीकर व्हावा म्हणून त्याच्या खालीं घातलेला धोंडा, लाकडाचा तुकडा, इ०. **वि०** उंचसखल; उच्चनीच.

उटणें स० क्रि० धातुमय मूर्ति, भांडें, इ० राख, माती, रांगोळी, इ० नें घासून साफ आणि स्वच्छ करणें.

उटणें न० स्नानाच्या आधीं किं० नंतर अरगजा, खसखस, इ० सुगंधी किं० स्निग्ध द्रव्यें अंगाला चोळून लावतात तीं.

उटंबर वि० उंचसखल (जमीन, इ०).

उटंबरा पु० उंचवटा.

उटा पु० चाक पुढें जाऊं नये म्हणून चाकाला टेकून जो धोंडा ठेवतात तो.

उटारेटा पु०, उटारेटी स्त्री० १ दुसऱ्याच्या कामांत किं० कारभारांत केलेली ढवळाढवळ किं० उठाठेव; लुडबुडेपणा. २ भलताच उद्योग. ३ मुलांचा चंचलपणा. ४ पुरेसें खाद्य खाल्ल्यावर किं० तोंडाला रुचि नसतां खाद्य ताटांत इकडे तिकडे सारणें. ५ कुटाळक्या. **क्रि० वि०** टेलटिकोऱ्या करण्यांत; नसत्या उठाठेवींत; उ० दिवस गेला उटारेटीं मग दिव्यांत कापूस वेटी, किं० मग बोटानें काडवाती लोटी.

उटाळणी स्त्री० १ स्पष्ट शब्दोच्चार. २ लिहिलेलें अक्षर स्पष्ट उमगलें जाणें. ३ श्लोक, वाक्य, इ०चा अर्थ स्पष्ट लागणें. ४ एकाद्यास चेतविणें किं० पुढें ढकलणें.

उटाळणें स० क्रि० धोंडा, ओंडा, तुळई, इ० ना खालीं तरफ घालून हालविणें किं० सरकावणें किं० पुढें ढकलणें. **अ० क्रि०** १ शब्द स्पष्ट उच्चारला जाणें. २ वाक्याचा अर्थ स्पष्ट होणें.

उटाळा पु०, उटाळी स्त्री० १ लाकूड, धोंडा, इ० उचलावयासाठीं किं० सरकावण्यासाठीं खालीं घातलेला दांडा किं० तरफ (क्रि० देणें). २ तरफ घालणें (क्रि० करणें). ३ स्पष्ट शब्दोच्चार. ४ श्लोक इ० च्या अर्थाचा खुलासा. ५ चेतवणूक; एकाद्याला पुढें लोटणें किं० कांहीं काम करावयाला त्याची केलेली उठावणी. ६ पदार्थ पुढें सारण्यासाठीं त्याला दिलेला धक्का.

उटीळ न० गाडीचें चाक फिरूं नये आणि गाडीची गति कुंठित व्हावी म्हणून चाकाला टेकण लावलेला धोंडा.

उटिंबरा पु० १ मातीचा ढीग; लहानसें टेकाड. २ शरीरावर उठलेलें टेंगूळ किं० फुगवटा.

उटी स्त्री० १ शरीराला लावावयाचा किं० लाविलेला चंदनादिकांचा पातळसर लेप; (क्रि० लावणें). २ चाक फिरूं नये आणि गाडीची गति कुंठित व्हावी म्हणून टेकण लाविलेला धोंडा. ३ उभा खांब जमीनींत पुरून त्याच्या भोंवतीं रचतात जी गवताची रास ती.

उंटीण स्त्री० उंटाची मादी; उंट ह्या प्राण्याची स्त्री.

उटीव वि० खरडून काढलेलें.

उटें, उट्टें न० उलट पारिपत्य; उपद्रवाची फेड किं० मोबदला; वडें.

उठकळ, उठकर, उठकळा, उठकट स्त्री० १ निघून जाण्याचा काळ किं० प्रसंग किं० पाळी किं० आवश्यकता; उ० हा नवा सुभेदार आला तेव्हां जुन्या सुभेदाराला उठकळ आली; (क्रि० येणें, लागणें, लावणें, इ०). २ उठण्याची किं० निघून जाण्याची प्रवृत्ति किं० प्रचोदना; एकाद्याला उठावयाला किं० निघून जाण्याला लाविलेला तगादा.

उठणें [सं० उत्थान] अ० क्रि० १ उभें राहाणें. २ वर जाणें किं० सरकणें. ३ वाढून उंच होणें, (वृक्ष, प्राणी, इ०). ४ (सभा वगैरे) बरखास्त होणें. ५ (सैन्य, इ०) एक स्थान सोडून दुसरीकडे जावयाला सिद्ध होणें. ६ (ठसा, रेषा, इ०) स्पष्टपणें दिसूं लागणें. ७ अस्तित्वांत येणें, दृग्गोचर होणें, प्रादुर्भूत होणें; (साथ, पटकी, इ०). ८ तजेलेदार दिसणें किं० दिसूं लागणें (मूल, प्राणी, झाड, इ०). ९ प्रतिपक्षी ह्या नात्यानें किं० हल्ला करावयाच्या संकल्पानें सिद्ध होणें; उ० तो माझ्या विरुद्ध कां उठला आहे तें मला समजत नाहीं. १०

मारलेल्या नडाच्या, ठोसा, छडी, इ० चा वग दिसणें; उ० हा पहा चाबूक बैलाच्या अंगावर उठला आहे. ११ जागें होणें; गादीवरून उठून रोजचे व्यवहार करूं लागणें. ॐ उठून जाणें बैठक मोडून रागानें निघून जाणें. २ कांहीं कारणानें स्थानत्याग करणें. ३ वरपक्ष किं० वधूपक्ष ह्यांनीं वधूपक्ष किं० वरपक्ष ह्यांचे गांवीं विवाहासाठीं इष्टमित्रांसह आणि सामानासुमानासह जाणें. **रोज उठून, नित्य उठून क्रि० वि०** नित्य, हरहमेष, सदासर्वदा. **उठतां बसतां, उठल्या बसल्या क्रि० वि०** प्रतिक्षणीं, सदासर्वदा. **उठत बसत क्रि० वि०** थांबत थांबत; धीरे धीरे. **उठतां बसतां उपास** नवरात्र बसावयाच्या दिवशीं आणि उठावयाच्या दिवशीं केलेला उपास. **डोकें उठणें, कपाळ उठणें** डोकें, कपाळ, दुखूं लागणें (फार त्रास झाल्यामुळें, किं० अन्य कारणामुळें). **उठपाय क्रि० वि०** सदासर्वदा.

उठपळ [**म०** उठणें आणि पळणें] **स्त्री०** १ वारंवार येणें आणि जाणें; अस्थिरपणामुळें किं० असंतुष्टपणामुळें एकसारख्या येरझारा करणें. २ एकाद्याला एकसारखें कांहींतरी कामासाठीं पाठविणें. ३ निघून जाण्याची उत्कंठा. **क्रि० वि०** एकसारखा; सदासर्वदा; उ० हा पोरगा उठपळ खेळावयाला जातो.

उठबशी, उठाबशी [**म०** उठणें आणि बसणें] **स्त्री०** १ वारंवार उठणें आणि बसणें ह्यांचा त्रास. २ एकसारखें कामानिमित्त इकडे तिकडे जाणें. ३ व्यायामाचा एक प्रकार म्हणून उठणें आणि बसणें; बैठक; उ० मी रोज आडीचशें उठाबशा काढतो. ४ गुरुजींनीं विद्यार्थ्याला उठावें आणि बसावें अशी केलेली शिक्षा; उ० तूं आज अभ्यास केला नाहींस म्हणून तुला मी दहा उठाबशांची शिक्षा करतों. (ह्या चारी अर्थीं ' उठाबशा ' असा अनेक वचनींच बहुधा प्रयोग होतो).

उठवण, उठवणूक [**म०** उठाविणें] **स्त्री०** अति दमल्यामुळें किं० आजारामुळें उठावयाची शक्ति नाहींशी झाल्याची स्थिति (बैलाची, घोड्याची, इ०); उ० हा बैल उठवणीस आला आहे. २ अत्यंत विपन्नावस्था. ॐ**उठवण मोडणें** १ बैल, घोडा, इ० ना पूर्व स्थितीवर आणणें आणि कामाला समर्थ करणें. २ एकाद्या माणसाला विपन्न स्थितीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करणें. **उठवणकर वि०** दमल्यामुळें किं० आजारामुळें उठावयाला असमर्थ झालेलें जनावर (बैल, घोडा, इ०). किं० माणूस.

उठवळ वि० आळशी; अनियमित; कामचुकार.

उठाविणें स० क्रि० १ उठावयाला लावणें. २ एकाद्याला उठावयाला हात देणें किं० मदत करणें. ३ जागें करणें. ४ चेतविणें, प्रवृत्त करणें. ५ दुखावयाला लावणें; अतोनात आग्रह किं० हट्ट करून एकाद्याला सतावून सोडणें; उ० ह्या पोरांनीं धिंगामस्तीनें माझें डोकें उठविलें आहे; भावलीसाठीं चिंगीनें माझें डोकें उठविलें आहे. ६ ठसा उमटविणें. ॐ**निजलेल्याला कोणीही उठवील, जागल्याला कोण उठवील** ? जो खरोखरी निजलेला आहे त्याला जागें करणें शक्य आहे; जो झोपेचें सोंग करून पडला आहे त्याला जागें करणें अशक्य आहे; जो मुद्दाम वाकड्यांत शिरत आहे त्याला सरळ मार्गावर आणणें शक्य नाहीं.

उठाउठी क्रि० वि० तत्काळ, सत्वर, लागलीच.

उठागीर पु० १ उचल्या. २ भटक्या.

उठाठव, उठाठेव [**म०** उठाविणें, ठेवणें] **स्त्री०** १ रिकामी खटपट, पंचाईत. २ दुसऱ्याच्या कामांत किं० कारभारांत ढवळाढवळ; ॐ**बोडकीला कुंकवाची उठाठेव कशाला ?** ज्या माणसाला ज्या वस्तूची गरज नाहीं त्यानें त्या वस्तूची चौकशी करीत बसणें हा मूर्खपणा होय.

उठाणूं [**म०** उठणें] **न०** (शरीरावर उठतें तें) गळूं.

उठापायीं, उठोपायीं [**म०** उठणें+पाय] **क्रि० वि०** एकसारखें; सदोदित; सदा सर्वदा.

उठाबशी मागें ' उठबशी ' पहा.

उठारेटा पु०, उठारेट (–टी) स्त्री० मागें ' उटारेटा ' पहा.

उठावणी [**म०** उठाविणें] **स्त्री०** १ एकादें काम करण्याविषयीं एकाद्याला उत्तेजन देणें किं० प्रोत्साहन देणें; त्या कामांत त्याला प्रवृत्त करणें. २ एकाद्या कामाला प्रवृत्त होणें.

उठावणें [**म०** उठणें] **अ० क्रि०** १ एकाद्या कामाला उत्साहानें प्रवृत्त होणें. २ हल्ला करावयाला किं० धाड घालावयाला उठणें किं० प्रवृत्त होणें.

उठावा, उठाव [म० उठणें] पु० १ पळून जावयासाठीं उठणें किं० निघणें. २ हल्ला करावयाला सिद्ध होणें. ३ एकाद्या आजारांतून किं० संकटांतून निभावणूक. ४ उत्तेजन किं० प्रोत्साहन (दुसऱ्याला दिलेलें).

उठूठ, हुटहुट [म० उठ ! उठ !] स्त्री० एकाद्याला एकादें काम करावयासाठीं लावलेला तगादा. (क्रि० लावणें, चालविणें, मांडणें, इ०).

उंड पु० वातादि विकृतींनें पोटांत जो गोळा उठतो तो.

उंड, उंडी स्त्री० एक वृक्ष; त्याच्या फळांतून [तेल काढतात.

उंडकी स्त्री० उचकी.

उंडगळ, उंडगा, उडगा [म० उडणें] वि० स्थिरपणानें काम करण्याकडे ज्याची प्रवृत्ति नाहीं असा; कामचुकार.

उंडगा पु० १ न घडविलेला ओबडधोबड धोंडा. २ उद्धट, आळशी किं० कामचुकार मुलगा. ꣹**उंडगा दगड** पु० १ न घडविलेला धोंडा. २ कामचुकार मुलगा.

उडणटप्पू पुढें ' उडाणटप्पू ' पहा.

उडणें [सं० उत् (वर)+डी (उडणें)] अ० क्रि० १ पक्ष्यादिकांनीं आकाशांत संचार करणें; उ० त्या झाडावरून पक्षी उडाले. २ उडी मारणें. ३ उसळीनें वर जाणें किं० दिशा बदलून दुसरीकडे जाणें; उ० सागरगोटे उडाले; उ० चेंडू जितक्या वेगानें आपटावा तितक्या वेगानें उडतो. ४ आवेशानें एकाद्यावर तुटून पडणें. ५ निघून जाणें, अदृश्य होणें, संपणें; उ० दिवस बुडाला मजूर उडाला. ६ फिका होणें; उ० ह्या जाजमाचा काळा रंग पक्का आहे; तांबडा रंग पक्का आहे; पण पिवळा सहा महिन्यांत उडेल. ७ खर्चला जाणें; उ० पगार आल्याला पांच दिवस झाले, इतक्यांतच निम्याहून अधिक उडाला. ८ गाय, म्हैस, इ० दुभतें जनावर भाकड होणें. उडणें ह्या क्रियापदाचे विशिष्ट नामादिकांच्या साहचर्यानें अनेक अर्थ होतात त्यांपैकीं कांहीं पुढें दिले आहेत. **रंग उडणें** तो फिका होणें. **बंदूक** किं० **तोफ उडणें** तींतील गोळी किं० गोळा वेगानें लक्ष्य पदार्थाकडे जाणें. **पतंग** किं० **वावडी उडणें** हवेंत तरंगत तरंगत वर चढणें. **एकाद्या माणसावरून** किं० **पदार्थावरून मन उडणें** तो आवडेनासा होणें. **गंमत उडणें, मजा उडणें** मोठी गंमत होणें, मोठी मजा होणें. **दोष** किं० **टपका उडणें** तो निरस्त होणें. **फजीती उडणें** फजीती होणें. **पक्वान्न उडणें** संपून जाणें; उ० पहिल्या पंक्तीलाच सारे लाडू उडाले. **थुंकी उडणें** बोलतांना थुंकीचे कण तोंडावाटे इतस्ततः पडणें. **उडून चरणें** १ जनावराला यथेच्छ खावयाला कुरण मिळणें. २ सरकारांतून भरपूर तनखा मिळत असणें.

उडत उडत क्रि० वि० १ संक्षेपानें; उ० सगळी हकीगत मी सांगत नाहीं; त्याला वेळ फार लागेल म्हणून उडत उडत सांगतों. २ एकानें दुसऱ्याला सांगावी, दुसऱ्यानें तिसऱ्याला, तिसऱ्यानें चवथ्याला, अशा रीतीनें; उ० माझ्या कानावर अशी उडत उडत बातमी आली आहे कीं तो मनुष्य कीमयाच्या नादीं लागलेला आहे. ३ अस्पष्टपणें, संदिग्धपणें.

उडता [म० उडणें] वि० १ उडत असलेला. २ उडत उडत आलेला. ꣹**उडत घुमा** पु० दुसऱ्या भोवऱ्याला ठोकर मारून उडून दुसरीकडे फिरत राहणारा (भोंवरा). **उडत पगडें** पु० अ० व० सोंगट्यांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. **उडत** किं० **उडती बातमी,** स्त्री० एकानें दुसऱ्याला सांगितलेली, दुसऱ्यानें तिसऱ्याला, तिसऱ्यानें चवथ्याला, अशा रीतीनें आलेली बातमी. **उडता पीर** हा उदयाला चढेल अशी ज्याच्या बद्दल आशा वाटते असा. **उडत्या पाखराचीं पिसें मोजणारा** वि० चाणाक्ष, धूर्त, हुशार.

उडदळ, उडदाणा, उडदानी, उडदा मुहूर्त, उडदावळ, उडदीं, उडद्या मुरूम पुढें ' उडीद ' शब्दांत पहा.

उडदा बेगम पु० मोगली संप्रदायाचीं बुद्धिबळें खेळण्याचा जो प्रकार आहे त्यांतील घोड्यासारखें एक मोहोरें. हें मोहोरें औट घरें (म्ह० साडेतीन घरें) चालतें आणि ह्या खेळाच्या पटावर शंभर चौक असतात.

उडपाल [म० आड पाल] न० १ प्रवासांत मुक्कामाचे जागीं कांहीं काळ राहावयासाठीं किं० जत्रेंत दुकान मांडावयासाठीं आणि वसतीसाठीं जें मोठे पाल उभारतात त्याच्या एका अंगास स्वयंपाका-

टिकासाठीं जें ल्हानसें पाल ठोकतात तें. २ पर्जन्य-निवारणार्थ कांबळ्याची खोळ करून त्यावर दुसरें वस्त्र लावितात तें.

उंडल स्त्री० उंडाचें झाड. न० उंडाचें फळ.

उडलटप्पू पुढें " उडाणटप्पू. " " उडान-टप्पू " पहा.

उंडलीण स्त्री० ' उंड ' आणि ' उंडीण ' पहा.

उंडलेल [स० उंडल + तेल] न० उंडल झाडाच्या फळांतून काढलेलें तेल.

उडवणी [स० उडविणें] स्त्री० १ पदार्थ इकडे तिकडे फेंकून देणें किं० अस्ताव्यस्त टाकणें. २ कोणी कांहीं सांगितलेली गोष्ट आदरबुद्धीनें न ऐकतां थट्टेवर घालविणें. ३ कोणी सांगितलें काम करण्यांत टंगळमंगळ करणें.

उडवा पु० १ हरभरा, पावटा, इत्यादींची झोडपावयाच्या अगोदर करून ठेविलेली रास. २ भाताच्या ताटांची अशीच करून ठेविलेली रास. ३ रानशेणांची रास.

उडवागी स्त्री० कोणी सांगितलेल्या कामाची किं० काम सांगणाराची अवहेलना किं० टवाळकी (करणें).

उडाविणें [स० ' उडणें ' चें प्रयोजक रूप] स० क्रि० १ पदार्थ अस्ताव्यस्तपणें टाकणें. २ नीट रचून ठेविलेली किं० रास करून ठेविलेली वस्तु विसकटणें. ३ अव्यवस्थितपणें पैसा, खाद्य पदार्थ, इ० खर्चून किं० संपवून टाकणें. ४ अवहेलनेनें किं० तिरस्कारबुद्धीनें एकाद्याचा उपदेश मनावर न घेणें. टीप– ' उडविणें ' हें क्रियापद ' उडणें ' याचें प्रयोजकरूप असल्याकारणानें ' उडणें ' याचे सर्व अर्थ प्रयोजकरूपी करून ' उडविणें ' याचे अर्थ जाणावे.

उडवा उडव [स० उडविणें] स्त्री० १ इत-स्ततः फेंकून देणें; अस्ताव्यस्त टाकणें; अव्यवस्था करणें. २ पैसे, धान्य, इ० निष्काळजीपणानें खर्चून टाकणें. ३ कोणी सांगितलेल्या कामाची टाळाटाळ करणें; त्या कामाकडे दुर्लक्ष्य करणें.

उडवी स्त्री०, **उडवें** न० १ भात, वरी, इत्यादि तृणधान्यांच्या ताटांच्या पेंड्यांची रास. २ गवताच्या पेंड्यांची रास. ३ रानशेणांची रास.

उडव्या वि० १ पैसा वगैरे निष्काळजीपणानें खर्च करणारा. २ टाळाटाळी करणारा.

उंडा पु० भाकरी, पोळी, इ० साठीं पीठ इ० चा जो गोळा तयार करतात तो. २ गूळ आणि नारळ यांच्या पिठाचा शिजवून मळून गोड पदार्थ करतात तो.

उडाउडी क्रि० वि० धाड धाडीनें, कशीतरी धटपट करून.

उडाऊ वि० उधळ्या; अव्यवस्थितपणें पैसा खर्चून टाकणारा; पदार्थांची उधळपट्टी करणारा.

उडाऊळप्पी (-प्पू) वि० टाळाटाळी करणारा.

उडाण पु० शेताचा दूर असलेला भाग.

उडाणवीर पु० अवघड कामांत निःशंकपणें उडी घालणारा.

उडाणटप्पू वि० १ हातीं धरलेलें काम पार न पडतां दुसरें कामें हातीं धरणारा; एक काम स्थिरपणें न चालविणारा. २ एके ठिकाणीं स्थिर-पणें न राहाणारा; भटक्या.

उडाफू वि० १ अस्थिर किं० चंचल बुद्धीचा माणूस. २ थोडका वेळ टिकणारा किं० चालणारा धंदा, उद्योग, व्यवसाय, इ०.

उंडारणें अ० क्रि० १ खाण्यापिण्याच्या चंगाळी-मुळें किं० पैसा आडक्याच्या वैपुल्यामुळें उन्मत्त होणें किं० माजणें. २ यथेच्छ खावयाला मिळत असल्याकारणानें माजास येणें किं० मस्ताळ होणें (बैल, रेडा, इ० जनावर). ३ अनुकूल जागा, पाणी, इ० च्या योगानें फोफावणें (झाडें, इ०).

उंडारणें, हुंडारणें स० क्रि० तुच्छ करणें; अवहेलनापूर्वक दूर सारणें.

उडाळ वि० १ चंचल, अस्थिर. २ कोणत्याही कामाकडे, धंद्याकडे, किं० माणसाकडे स्थिरपणानें लक्ष्य न पुरविणारा. उ० द्रव्य मिळविण्याची गोडी लागतांच याचें मन विद्येवरून उडाळ झालें.

उंडिणी स्त्री० उंडीचें झाड.

उडी [स० उडणें] स्त्री० १ पायानें भूम्यादि आधार खालीं दाबून त्या नेटानें जो वेग उत्पन्न होतो व ज्यांकरून तेथून तटकन् उडून दुसरे ठायीं पडावें असा जो गतीचा प्रकार तो; झेप; उड्डाण. २ महत्त्वाकांक्षेचा पल्ला; उ० त्या घोड्याची हजार रुपये किंमत यावी अशी त्याची उडी आहे. ३ वाचावयाचा, लिहावयाचा, सांगावयाचा, किं० बोलावयाचा कांहीं भाग (बुद्धिपुरःसर किं०

नजर चुकीनें) वगळून पुढें जाणें; उ० माझें व्याख्यान फार लांबत चाललें होतें म्हणून मी चवथ्या मुद्यावरून उडी मारली. ॐएकाद्या पदार्थावर किं० माणसावर उड्या पडणें तो मिळविण्याची इच्छा अनेक लोकांस एकदम होऊन त्यांचे प्रयत्न सुरू होणें; उ० त्या आडीचशें रुपयांच्या जागेवर लोकांच्या उड्या पडतील; उ० तुमच्या ह्या गवया-वर लोकांच्या उड्या पडतील. **उड्या मारणें** १ हुरळून जाणें; उ० तुमच्या आश्रयावर आम्ही इतके दिवस उड्या मारीत होतों; तुम्ही आतां आम्हांला सोडणार, मग आमचे हाल फार होतील. २ उनाडक्या करणें; चैनींत असणें, स्वैर आचार करीत राहाणें; उ० आईबाप काशीयात्रेस गेले तेव्हां-पासून हा पोरगा भारी उड्या मारूं लागला आहे.

उडी स्त्री० दुसऱ्याला नांगरकामासाठीं आपला बैल किं० टोणगा दिला असतां त्याबद्दल आपणाला धान्य, पैसा, इ० रूपानें जो मोबदला येतो तो.

उंडी न० उंडिणीचें फळ.

उंडी स्त्री० १ भाताचा घास; घासभर भात. २ नैवेद्य, बळी. ३ खीर इ० करण्यासाठीं तांदूळ, इ० च्या पिठाच्या गोळ्या करतात त्या प्रत्येक. ॐ**उंडी** किं० **उंड्या उकळणें** भिकारी किं० अगांतुक ह्या नात्यानें ऐन जेवणाच्या वेळीं एका-द्याचें दारीं जाऊन भाताचा गोळा किं० जेवण मिळविणें. **उंडी बकाल** पु० भोजनभाऊ मनुष्य.

उडीद पु० एक द्विदळ धान्य; तूर, कडवा, इ० प्रमाणें उडदाचे दाणे शेंगांत असतात. ॐ**उंड-दळ** स्त्री० उडदाचें शेत किं० उडीद लावण्याला योग्य असें शेत. **उडदाण** न० झोडपलेल्या उडदाचें भुसकट, टरफलें, इ०. **उड़दानी** वि० उडदाच्या रंगाचें (लुगडें, खण, इ०). **उडदां मुहूर्त** पु० लग्न किं०मुंज ह्यांच्या अगत्वेंकरून त्याचे पूर्वी सुवा-सिनी मिळून उडीद दळण्याचा जो विधि करतात तो. **उडदावळ** [म० उडीद+ओळ] स्त्री० प्रति-वर्षीं जेथें उडीद पेरतात तें शेत. **उडदी** वि० उड-दाच्या रंगाचें. ॐ**उडदी लुगडें** न० काळ्या जमी-नीवर पांढरे चौक असलेलें लुगडें. **उडद्या मुरूम** पु० एक प्रकारचा धोंडा; तो उडदाच्या रंगाचा आणि ठिसूळ असून त्याचे फार बारीक कण करतां येतात.

उडु स्त्री०, न० १ तारा, नक्षत्र. २ पाणी. ॐ**उडुप** पु० चंद्र. **उडुपति** पु० चंद्र. **उडुपथ** पु० आकाशमंडल. **उडुगण** पु० ताऱ्यांचा समुदाय.

उंडेल न० उंडिणीच्या फळांचें तेल.

उडेलटप्पू वि० उडाणटप्पू.

उड्डाण [सं० उत् (वर)+डी (उडणें)] न० १ वर उडणें. २ आकाशांत उडणें.

उड्या [म० उडणें] वि०१ उड्या मारणारा. २ तल्लख; कामकरण्यांत तत्पर. ॐ**उडऱ्या पुरवेल पण पडऱ्या पुरवत नाहीं** उड्या मारून उपद्रव देणारें मूल पथकरेल, पण वारंवार पडून उपद्रव देणारें मूल पथकरणार नाहीं.

उढा पु० जाडी चिंध्याची एक जात.

उणवाई [सं० ऊन, म० उणा] स्त्री० कम-तरता, उणेपणा, (क्रि० येणें).

उणा [सं० ऊन (कमी)] वि० १ पाहिजे त्याहून कमी; विवक्षित संख्या, परिमाण, किं० प्रमाण, ज्याचें नाहीं असा. २ खालच्या प्रतीचा किं० दर्जाचा. ३ अपमानकारक; उ० उणें उत्तर, उणी गोष्ट. ॐ**उणा अग्रा** वि० उणा आणि अपुरा; विवक्षित मापाहून कमी. **उणाख** [उणा+अंक] वि० कमी दर्जाचें किं० योग्यतेचें (कापड). **उणादुणा** वि० अपमानकारक, तुच्छ-ताव्यंजक (भाषण, शब्द, उत्तर, इ०).

उणापुरा वि० सरासरीचा, बहुतेक.

उणावणें [म० उणा करणें किं० होणें] अ० क्रि० कमी होणें; महत्त्वानें खालीं जाणें; मंद पडणें. स० क्रि० १ कमी करणें. २ ०चें महत्त्व कमी करणें; मंद पाडणें. [पणा, कमताई.

उणावळ, उणीव [म० उणा] स्त्री० कमी-

उणें [सं० ऊन=कमी] न० कमीपणा, तोक-डेपणा; योग्य किं० इष्ट प्रमाणापेक्षां कमी असणें. २ दोष, निंदेचा विषय, व्यंग. ३ अपुरेपणा, कम-तरता. ॐ**एकाद्याला उणें आणणें** त्याला लाज वाटेल किं० त्याला खालीं मान घालावयाला लावील असें कांहीं करणें. **उणें घेणें** आपल्या अंगीं अस-लेल्या कमीपणाबद्दल खंती करणें किं० खजील होणें. **एकाद्याचें उणें पाहणें** त्याचा कमीपणा किं० व्यंग शोधणें. **एकाद्याचें उणें काढणें** त्याचा दोष,

कमीपणा किं० व्यंग उघडकीस आणणें किं० बोलून दाखविणें.

उतटणें [सं० उत्+तट (किनारा)] **अ० क्रि०** फाटणें; फार ताण पडल्यामुळें फटणें, सोडणें, किं० तुटणें.

उतणणें [सं० उत्+तृण] **स० क्रि०** घराच्या किं० ओपटीच्या छपराचें गवत काढून टाकणें. **अ० क्रि०** गवानें फुगणें किं० नाठणें.

उतणें अ० क्रि० १ दूध, कढी, तेल, तूप, इ० पदार्थ अग्निसंयोगानें कढून पात्राबाहेर पडण्याइतके वर येणें किं० बाहेर पडणें. २ शरीरांतील ज्वर ओघादिप्रदेशीं स्फोटादिरूपेंकरून बाहेर पडणें. ३ विंचवा किं० आंब्याचा किं० शेराचा चीक शरीराला लागून चिडणें. ४ फेसानें युक्त होणें. ५ गर्वानें फुगणें. ६ (आडें अुडपें) फोफावणें. ७ वगैरे त्वचेला लागून तेथें दर्द होणें. ८ पुळी, गळू, इ० उठणें. ❀ **उतूं लागणें** किं० **उतूं जाणें** आटून राहाणें, खोळंबणें; उ० त्याच्यावांचून माझें काय उतूं जात आहे ? (म्ह० माझें काय आटणार आहे किं० नुकसान होणार आहे ?). **उतूं येणें** चुलीवर कढत असलेला पदार्थ पात्राच्या बाहेर पडणें.

उतप वि० सूर्याच्या उन्हांत असलेलें.

उतफाळणें, उतफळणें [सं० उत्+स्फालन] **स० क्रि०** १ फाडणें. २ ओरबाडून उघडें करणें.

उतरट वि० उतरता; सखल.

उतरड, उतरंड स्त्री० १ एका भांड्यावर दुसरें भांडें, दुसऱ्यावर तिसरें, तिसऱ्यावर चवथें, अशा रीतीनें केलेली भांड्यांची रचना. २ घोड्याच्या बहात्तर खोड्यांपैकीं म० अवलक्षणांपैकीं एक; एकावर एक असे तीन उलटे भोवरे घोड्याच्या कपाळावरील. ❀**उतरंडी उतरणें** दुसऱ्याच्या कामांत लुडबुडणें.

उतरड स्त्री० १ उतरता प्रदेश, उतरण. २ उसाच्या चरकाचा नरठोकळा ज्या तुळईंत फिरतो ती.

उतरण [म० उतरणें] **स्त्री०** १ पर्वताची कड, नदीचा कांठ, इ०ची क्रमानें उतरती जमीन. २ सखल होत जाणें. ३ नशीब, आयुष्य, इ० चा अपकर्ष किं० ऱ्हास. ४ पायानें नदींतून चालत जाण्याच्या सोईची वाट. ५ झाडावरून तोडून काढलेल्या आंब्यांची रास.

उतरणें [सं० उत्+तृ (तरणें)] **स० क्रि०** १ वरील पदार्थ खालीं ठेवणें किं० आणणें; उ० हेल्कऱ्यानें डोक्यावरचें ओझें जमीनीवर उतरलें. २ जिना, घाट, पर्वत, इ० वरून खालीं येणें; उ० हा जिना उतरतांना माझे पाय लटपटतात. ३ नदी, ओढा, इ० तून चालत पैलतीरास जाणें किं० नेणें; उ० डोक्यावर इतकें ओझें घेऊन मी नदी कशी उतरूं शकेन ? ४ एका कागदावर लिहिलेल्या लेखाची दुसऱ्या कागदावर नक्कल करणें. ५ कमी करणें; उ० ह्या मालाला हल्लीं फारशी मागणी नाहीं म्हणून व्यापाऱ्यांनीं त्याची किंमत उतरली. ६ ०ची फजीती किं० अपमान करणें; उ० तो भारी उन्मत्त झाला आहे, त्याला उतरलें पाहिजे. ७ एखाद्याचा ताठा, गर्व, जोम, तोरा, इ० कमी करणें. ८ ०चा जोर कमी करणें किं० अगदीं नाहींसा करणें, उ० मंत्रानें किं० औषधानें सर्पाचें वीष उतरलें पाहिजे. ९ मुक्कामाच्या ठिकाणीं माणसें किं० सामानसुमान ठेवणें; उ० तुम्हीं ह्या देवळांत आपलें खटलें उतरा आणि आमच्या बरोबर मेंट राजवाड्यांत चला. १० छाटून टाकणें; उ० नेपाळांत चोरी करणाऱ्याच्या उजव्या हाताचा पंजा उतरतात असें मी ऐकिलें आहे. ११ सोपा, छप्पर, गोठा, इ० बांधणें; उ० मी यंदा पिछाडीस एक पांचखणी सोपा उतरणार आहे. १२ काढून दूर करणें; उ० पोशाख, दागिने, इ० अंगावरून उतरणें. ❀**एकाद्या माणसाची नक्कल उतरणें** त्या माणसाच्या पोशाख, बोलण्याचालण्याची ढब, इ०चें अनुकरण करणें. ❀**एकाद्या वस्तूची नक्कल करणें** तिच्या बरहुकूम दुसरी वस्तु बनविणें. **एकाद्यावरून लिंबलोण उतरणें** लिंबलोणानें त्याला ओंवाळून तें टाकून देणें.

उतरणें [सं० उत्+तृ (उतरणें)] **अ० क्रि०** १ खालीं येणें; खालीं जाणें. २ सिद्ध होणें; तयार होणें; उ० हा अर्क चांगला उतरला. ३ भविष्यकथनाबरहुकूम गोष्टी घडून येणें; उ० त्यानें केलें तें भविष्य मुळींच उतरलें नाहीं. ४ एखाद्या ठिकाणीं मुक्काम करणें; उ० आम्ही आळंदीस जातांना लोहगांवास एक दिवस उतरलों. ५ नष्ट होणें, कमी होणें; उ० आलीकडे त्याचा गर्व बराच उतरला आहे. ६ फिका पडणें (आजारामुळें); काळवंडणें (लज्जेनें); उ० मी त्याची दारुबाजी काढतांच

त्याचा चेहेरा उतरला. ७ अत्यंत जीर्ण होणें; फाटूं लागण्याच्या स्थितीस येणें किं० येऊं लागणें; उ० हें लुगडें आतां अगदीं उतरलें. ८ ०चा तजेला, टवटवी, सौंदर्य, धमकदारी, उत्साह, इ० अपकर्षाच्या स्थितींत येणें. ९ परिपक्व होउन खाण्याला लायक होणें; उ० ह्या आढींतील आंबे सगळे उतरले आहेत; आज आंबरस करूं. १० फाजील पिकून नासणें, खाण्याच्या उपयोगांतून जाणें (फळें, इ०). ११ उत्पन्न होणें, सिद्ध होणें; उ० एक काहिलभर रसाचा गूळ चार मण उतरला. १२ फिक्का पडणें; उ० ह्या जाजमाचा पिवळा रंग अझून उतरला नाहीं. १३ आजारांतून निभावणें; उ० हा मुलगा देवींतून साफ उतरला. १४ योग्य प्रमाणाचा, गुणाचा, किं० परिमाणाचा ठरणें; उ० तो बी. ए. च्या परीक्षेंत उतरला; उ० त्याची एम्. ए. ची परीक्षा यंदाच उतरली. १५ मनाजोगा, मर्जीला येईल असा; उ० तुझ्या मर्जीला हें लुगडें उतरतें आहे काय? ꣸ **मनांतून उतरणें, मर्जींतून उतरणें** आवडेनासा होणें. **मर्जीला उतरणें** पाहिजे तसा आहे असें वाटणें किं० ठरणें; आवडणें.

उतरता [म० उतरणें] **वि०** १ क्रमेंकरून खालीं येत चाललेला (भूप्रदेश). २ खालावत चाललेली (स्थिति, संपत्ति, इ०). ३ अपकर्षाचा. ४ कमी कमी होत चाललेलें (अवसान, सामर्थ्य, इ०). ५ संपत आलेला. ꣸**उतरता दिवस पु०** मध्यान्हानंतरचा काळ (संध्याकाळापर्यंत). **उतरता पाया पु०** अपकर्षाची स्थिति. **उतरती कमान स्त्री०** ऱ्हासाची स्थिति किं० परिस्थिति; अपकर्षाचा काळ. **उतरती पाहिरी** आपत्काळ; अपकर्ष. **उतरत्या पाहिरीस लागणें** क्रमानें ऱ्हासाच्या स्थितीला येणें. **उतरती भांजणी स्त्री०** मोठ्या परिमाणाला हलक्या परिमाणाचें रूप देणें; जसें रुपयांना आण्यांचें किं० पैशांचें रूप देणें; टनाला पौंडाचें रूप देणें; तोळ्यांना माशांचें किं० गुंजांचें रूप देणें. **उतरती वेळ स्त्री०** १ मध्यान्हानंतरचा दिवस. २ अपकर्षाचा काळ.

उतरपराई, उत्तरपराई स्त्री० आयुष्याला कमजोरपणा येऊं लागण्याचा काळ; म्हातारपणाची सुरवात. [किं० महत्त्वाचें ठिकाण.

उतरपेठ, उतारपेठ स्त्री० व्यापाराचें मोठें

उतरल, उतरला पु० दाराच्या माथ्यावरील कमान किं० कोनाडा (सामानसुमान ठेवण्याच्या उपयोगाचा).

उतरवट वि० किंचित् उतरता. २ उतरत्या दशेस येत चाललेला.

उतरवटा पु० उतरती जमीन; उतरण.

उतरवण न० उतरता भूप्रदेश.

उतरवणी [म० उतरणें+पाणी] **स्त्री०** अर्धवट शिजत आलेल्या तांदुळांचें पाणी काढून घेतात तें (उष्णतानिरसनार्थ पेय).

उतरवाट स्त्री० उतरती वाट किं० रस्ता.

उतराई [म० उतरणें] **वि०** ज्यानें उपकार फेडिले आहेत असा; उपकारांच्या ओझ्यांतून मोकळा झालेला.

उतराई [म० उतरणें] **स्त्री०** १ डोंगरावरून किं० नदीच्या एका तीरापासून दुसऱ्या तीरापर्यंत माणसें, सामान, इ० वाहून नेण्याबद्दलची मजूरी. २ कागदांच्या किं० पत्रांच्या नकला करणें वगैरे कामांबद्दल दिलेली मजूरी; लिखाई. ३ झाडावरून आंबे वगैरे फळें काढण्याबद्दलची मजूरी. ४ आयुष्याचा उतरता काळ; म्हातारपणाचा प्रारंभ.

उतराण [सं० उत्तर] **स्त्री०** उत्तरेचा वारा.

उतरावारा पु० उत्तरेचा वारा.

उतरींव वि० खालीं आपटूं न देतां अचळ उतरून काढलेला (आंबा, इ०).

उतव पु० १ परशावर कांबळें इ० सुकत घालावयासाठीं लहान मंडपीसारख्या तीन किं० चार कामट्या बांधून चौकट केलेली असते ती. २ पोफळें, मीठ, इ० पदार्थ वाळवावयासाठीं जी कामट्यांची चौकट टांगलेली असते ती. [कढणें.

उतवणें अ० क्रि० पाणी वगैरेंना आधण येणें;

उताविणें स० क्रि० तापता वगैरे वस्त्र तापलेल्या खापरावर पसरून शस्त्रानें विवक्षित रेषांनीं अंकित करणें.

उतळणें अ० क्रि० पाडास आलेलें आम्रादि फळ उजळणें; आंबे इ० फळें आढांत घातलेली पिकण्याच्या दशेला येणें.

उतळपातळ स्त्री० रिकामी वटवट; गांवांतील गोष्टी कुटणें. **वि०** विरळ, मधून मधून असलेलीं (झाडें, घरें, पिकें, इ०).

उताटणें न०, उताटकी स्त्री० १ आंबा, केळें, फणस, इ०चीं फळें पक्क होऊन साल किं० कवच फाटण्याची स्थिति. २ न दाबून ठेवतां येईल इतकी उतावळी किं० अधीरपणा.

उताटणें अ० क्रि० १ केळें, फणस, इ० फळांची आंतील वाढ पूर्ण आल्यामुळें त्यांची बाहेरची त्वचा किं० साल फाटण्याच्या दशेस येणें किं० फाटणें. २ अतोनात अधीर होणें.

उताणखाट [म० उताणी खाट] न० अति-गर्विष्ठ किं० मदांध माणूस (लक्षणेनें).

उताणणें स० क्रि० वर्णन करणें.

उताणा [सं० उत्तान] वि० १ मुख, पोट, इ० जे शरीराचे भाग ते ऊर्ध्व दिशेस आहेत ज्याचे असा; (पालथ्या त्याच्या उलट). २ वर तोंड करून ठेविलेलें (भांडें). ३ वरची बाजू वर होईल किं० राहील अशा रीतीनें ठेविलेला (कोणताही पदार्थ). ॐ**एकाद्याला उताणा पाडणें** किं० **घालणें** त्याला चित करणें; त्याला पराभूत करणें (मल्लाची पाठ जमीनीला लागली म्हणजे तो चित झाला असें मानतात). **उताणा चालणें** ऐटीनें चालणें किं० वागणें. **उताणा पडणें** १ आधार-हीन होणें; आश्रयहीन होणें; हताश होणें. २ आजारी पडून अंथरुणाला खिळणें. ३ निरुपयोगी होणें (भांडें इ०). ४एकाद्याचा उद्योग, धंदा, नोकरी, इ० सुटून त्याला रिकामा राहण्याची पाळी येणें. **उताणापाताणा वि०** १ पालथा उलथा केलेला. २ पूर्णपणें मातीत लोळविलेला म्हणजे जिंकिलेला (मल्ल).

उताप वि० उघडा, उन्हांत असलेला, निवारण नसलेला.

उतार [म० उतरणें; सं० उत्तरण] पु० १ नदीचें किं० ओढ्याचें पाणी ओसरल्याकारणानें पायानें पैलतीरास जातां येण्याची स्थिति. २ नदी-तून किं० ओढ्यांतून पैलतीरास जाण्याची वाट. ३ नदींतून होडीनें पैलतीरास माणसें किं० सामान वाहून नेण्याबद्दल होडीवाल्याला दिलेली मजूरी. ४ औषधाचा अनिष्ट परिणाम झाला असतां तो परि-णाम नाहींसा करण्यासाठीं जें दुसरें औषध देतात तें. ५ विषाचा प्रतिकार ज्या औषधानें होतो तें. ६ एकाद्या माणसावर प्रसन्न होऊन त्याला कोणी माणूस जें अंगावरील धोतर, कडें, कंठी, इ० काढून देतो तें पारितोषिक. ७ आजाराचें कमी होणें; आजार कमजोर होऊं लागणें. ८ ऱ्हासाची, अपकर्षाची किं० कमजोरीची स्थिति. ९ नदीचें किं० ओढ्याचें पाणी ओसरणें. १० उतरण किं० उतरता प्रदेश (डोंग-राचा). ११ चौघड्याचे शेवटचे म्हणजे समाप्तीचे आघात. **वि०** १ कमजोर आलेलें किं० होऊं लागलेलें (आयुष्य किं०वय). २ दुय्यम दर्जाचा. ३ ऱ्हासाच्या स्थितीस येऊं लागलेला किं० आलेला. ॐ**उतारकरी (-रू) पु०** १ गलबतानें जाणारा प्रवासी. २ प्रवास काहीं वेळ थांबवून ज्यानें मुक्काम केला आहे असा वाटसरू. ३ प्रवासी; मुशाफर. **उतारघाट पु०** नदीचा घाट किं० पायऱ्या. **उतारचढ किं० चढउतार पु०** १ उंच सखलपणा (जमीनीचा). २ बाजारभावांत चलबिचल; महागपणा आणि स्वस्त-पणा; किंमती चढणें आणि उतरणें. ३ ताप वगैरे आजारांचा जोर होणें किं० ते शमण्याचा दशेस येणें. **उतारचावडी स्त्री०** १ प्रवाशांसाठीं गांवक-ऱ्यांनीं आपल्या खर्चानें बांधलेलें घर. २ पाहुण्यांचा किं० आगंतुकांचा ज्या घरांत धबडगा फार असतो असें घर. **उतारचिठ्ठी स्त्री०** १ नदी, खाडी, इ० वरून होडीनें जाण्याबद्दलचा परवाना. २ काग-दावरची श्री फाडून टाकून रद्द केलेला कागद. ३ दंशाचें विष उतरण्यासाठीं मंत्र लिहिलेला काग-दाचा तुकडा जो त्या दंशाच्या जागीं बांधतात तो. ४ लिहिलेल्या पत्रादिकांची नक्कल. ५ एकाद्याला कामावरून दूर करणें किं० त्याला फावसत देणें. **उतार जमीन स्त्री०** १ सखल जमीन. २ क्रमानें सखल होत गेलेली जमीन. **उतार तसरीफ स्त्री०**एकाद्या माण-साला आपल्या अंगावरून कांहीं दागिना किं० वस्त्र उतरून बहुमानपूर्वक जें पारितोषिक देतात तें. **उतार तळ पु०** गांवाबाहेर मालाच्या गाड्या मुक्कामाला उतरण्याचा अड्डा किं० तळ. **उतारतेज वि०** निस्तेज. **उतार तोंड न०** १ घांटावरील उतरणीचा प्रारंभ. २ घाटाचें तोंड किं० घांटाच्या सुरवातीची खिंड. **उतार दिवस पु० अ०व०** १ अंगांतील शक्ति कमी होत जाण्याचे दिवस; वृद्धापकाळ. २प्राप-चिक अपकर्ष. **उतारबितार पु०** १ प्रवासाचा वट्ट खर्च. २ सामानसुमानाच्या वाहतुकीचा वट्ट खर्च. **उतारपान न०** खेळांत खालीं टाकलेलें किं० टाकावयाचें पान. **उतारपेठ स्त्री०** १ उदमा

लोक ठिकठिकाणचा हरजिनसी माल जेथें विकावयाला आणतात आणि जेथें खरेदीदार लोक माल खरेदी करावयाला जमा होतात अशी पेठ; मोठ्या व्यापाराचा गांव किं० गांवाचा भाग. २ मुशाफर लोक गांवाच्या ज्या भागांत मुक्कामाला राहातात तो. **उतार पोशाख पु०** पारितोषिक म्हणून अंगावरून काढून दिलेली शालजोडी, उपरणें, धोतर, इ०. **उतारबंद वि०** १ उतरता, उतरणीचा. २ उतारवयाचा; वार्धक्यामुळें ज्याची शक्ति कमी होत चालली आहे असा. **पु०** दुसऱ्या कागदावरील मजकुराची किं० जमाखर्च वगैरेची नकल केली आहे असा बंद किं० कागद. **उतारबंदर न०** ज्या बंदरांत गलबतांतील मुशाफर उतरतात किं० ज्या बंदरांतून मुशाफर गलबतांत चढतात असें बंदर. **उतारबाजी स्त्री०** १ दहिल्या, नहिल्या, अशा क्रमानें पत्त्यांची पानें. २ नुकसानीची उलाढाल, व्यापार, व्यवहार इ०. ३ चौघड्याचे समाप्तीचे टोले. **उतारबाजू स्त्री०** पत्त्यांचा उतरून टाकलेला हात. **उतारमणि, उतारमोहोरा पु०** सर्पादिकांचा जेथें दंश झाला असेल त्या जागीं जो मणि टेकल्यानें दंशाचें विष उतरतें असा मणि. **उतार मान पु०** १ अपमान करणें. २ ज्याचा अपमान केला गेला आहे असा. **उतार वय न०** वृद्धापकाळ. **उतार वेळ स्त्री०** मध्यान्हानंतरची वेळ.

उतारा [**म०** उतरणें] **पु०** १ फलप्राप्ति, फलनिष्पत्ति; कच्चया पदार्थांवर कांहीं संस्कार करून त्यांचें जें परिमाण हातीं येतें तें; उ० पंधरा शेर लोणी कढविलें त्याचा बारा शेर उतारा आला. २ भिन्न भिन्न ठिकाणचीं वजनें आणि मापें ताडून पाहणें. ३ पिशाचाचा उपद्रव झाला असतां त्याच्या निरसनासाठीं अन्न, नारळ, कोंबडें, इ० ओवाळून टाकतात तें, किं० हा ओवाळण्याचा विधि. ४ औषधांनीं किं० मंत्रतंत्रादिकांनीं ज्वर किं० दुसरा कोणताही आजार घालविणें, किं० तीं औषधें आणि ते मंत्रतंत्र इ०. ५ कोड्याचें उत्तर. ६ एकाद्या लेखाची नक्कल. ७ होडीनें नदीच्या पैलतीरास जाण्याबद्दल दिलेला पैसा. ८ पाणउतारा. ९ पारितोषिक म्हणून दिलेलें वस्त्र. १० झाडावरून आंबे इ० काढून देण्याबद्दलची मजूरी. ११ हुंड्यांच्या नकला ज्यांत करून ठेवलेल्या असतात ती चोपडी.

उतारी [**म०** उतरणें] **स्त्री०** १ गंजीफांच्या डावांत बंद हातीं न राखून जो डाव खेळतात तो. २ उतरती कळा. ३ गलबतावरचा प्रवासी. ४ मुक्कामाला उतरलेला वाटसरू; कोणीही प्रवासी; वाटसरू; मुशाफर. ५ सर्प, वृश्चिक, इ० च्या दंशावर मंत्र घालणारा.

उतारू [**म०** उतरणें] **पु०** १ मुक्कामाला उतरलेला मुशाफर. २ गलबतानें जाणारा प्रवासी. ꣹ **उतारूपातारू पु० अ० व०** वाटसरू, मुशाफर, प्रवासी, इ०चा समुदाय.

उताऱ्या [**म०** उतार] **पु०** १ होडीवाला; पैलतीरास होडीवरून वाहून नेणारा. २ झाडावरचे आंबे, इ० काढून देणारा.

उतावळ, उतावळी स्त्री० १ जें कांहीं करावयाचें, ऐकावयाचें किं० लिहावयाचें आहे, तें करावयाची, ऐकावयाची किं० लिहावयाची, अति उत्कंठा; अधीरपणा.

उतावळी स्त्री० ही जोंधळ्याची लवकर पिकणारी एक जात आहे.

उतावळा, उतावीळ, उतावेळ वि० जें कांहीं करावें असें मनानें ठरविलें असेल तें करावयाला अति उत्कंठित; जें कांहीं घडून यावें अशी इच्छा मनांत असतें तें सत्वर घडावें अशी उत्कंठा ज्याला लागली आहे असा; अधीर. ꣹ **उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग** लग्नाला उतावळा झालेला नवरामुलगा उत्कंठेच्या आतिरेकामुळें डोक्याला बाशिंग न बांधतां गुडघ्याला बाशिंग बांधतो (हा उतावळेपणाचा उपहास करतांना संप्रदाय योजला जातो).

उतींव वि० उतास जात असलेलें किं० गेलेलें.

उतुतणें, उतणें अ० क्रि० १ बिब्याचें तेल, उंबर वगैरेचा चीक त्वचेला लागला असतां त्या त्वचेवर पुटकळ्या किं० फोड उठणें. २ अधीर होणें.

उतू [**हिं०**] **पु०** अंगरखा इ० शिवावयाच्या कापडास जसे जसे दोरे घालावयाचे तशी तशी घडी घालून दाबून मोडी पडत असा करतात जो संस्कार तो. २ कपड्यावर कांहीं प्रकारच्या रेषा उमटविण्याची रीति.

उतें न० जमीन न भाजतां तींत काढलेले भाताचें पीक.

उतोटी स्त्री० भाताचीं अंकुरलेलीं रोपें ज्या उतरत्या जमीनीवर लावितात ती.

उत्कट [सं०] वि० १ मोठें. २ जोरदार. ३ तीक्ष्ण. ४ अतिशय. ५ दृष्टांत भरणारें. ६ मग्न, गर्विष्ठ. ७ श्रेष्ठ. ८ बलाढ्य.

उत्कंठ [सं० उत् (वर)+कंठ (मान) ज्याचा] वि० १ वर मान केलेला. २ उत्सुक. ३ कंठ मोकळा केलेला.

उत्कंठा [सं० 'उत्कंठ' पहा] स्त्री० १ उतावळी. २ हुरहुर. ३ उत्कट इच्छा. ४ विरहवेदना.

उत्कंठित [सं० 'उत्कंठ' पासून] वि० १ उत्कंठा आली आहे ज्याला तो. २ अधीर किं० उतावळा झालेला.

उत्कंप [सं० उत् (वर)+कंप् (कांपणें, हलणें)] वि० कांपणारें, हलणारें. पु० १ कांपणें, हलणें. २ क्षोभ.

उत्कंपन [सं० 'उत्कंप' पहा] न० १ कांपणें, हालणें. २ क्षोभ.

उत्कर [सं० उत् (वर)+कृ (फेकणें)] पु० १ समूह, ढीग. २ झुबका. ३ केरकचरा.

उत्कर्ष [सं० उत् (वर)+कृष् (ओढणें)] पु० १ ओढणें, खेचणें. २ श्रेष्ठता. ३ समृद्धि, वैपुल्य. ४ आधिक्य, वरचढपणा. ५ उत्कृष्टपणा. ६ भरभराट, वैभव, चलती.

उत्कलिका [सं०] स्त्री० १ उत्कंठा. २ दुःखपूर्वक स्मरण. ३ कामचेष्टा. ४ एकदम किं० अकस्मात् उत्पन्न झालेली इच्छा. ५ कळी.

उत्कळ [सं० उत्कलिका] स्त्री० उत्कंठा, उतावीळ, (क्रि० येणें).

उत्किरण [सं० उत् (वर)+कृ (फेकणें)] न० १ इतस्ततः फेकणें. २ उकरणें.

उत्कीलन [सं० उत् (वर)+कील (खिळा)] न० १ गुंता सोडविणें. २ खिळे काढून मोकळे करणें.

उत्कृष्ट [सं० उत् (वर) + कृष् (ओढणें)] वि० १ वर ओढलेलें. २ उत्तम, श्रेष्ठ, वरच्या दर्जाचा. ३ पुष्कळ. ४ ओरखडलेला.

उत्क्रम [सं० उत् (वर)+क्रम् (चालणें)] पु० १ वर जाणें. २ वाढ. ३ दुर्वर्तन. ४ उल्लंघन. ५ क्रमाचा भंग. ६ बेशिस्तपणा.

उत्क्रमण [सं० 'उत्क्रम' पहा] न० १ वर जाणें. २ बाहेर निघून जाणें. ३ वरचढ होणें.

उत्क्रांत [सं० उत् (वर)+क्रांत (गेलेला; क्रम = जाणें)] वि० १ निघून गेलेला. २ मृत. ३ वर चढलेला.

उत्क्रांति [सं० उत् (वर)+क्रांति (गमन; क्रम = जाणें)] स्त्री० १ ऊर्ध्वगति. २ मृत्यु. ३ एका विशिष्ट प्रकारची शिस्त, मांडणी, किं० रचना निसर्गाच्या नियमांनीं हळूहळू बदलून नवीन हळूहळू येणें ह्याला उत्क्रांति म्हणतात; आमचें "मराठी भाषेचें वाक्प्रचार, म्हणी, इ०" पहा. **❀उत्क्रांति धेनु** स्त्री० पापांच्या निरसनार्थ मरणकाळीं दान केलेली गाय.

उत्खात [सं० उत् (वर) + खात (खणलेला; खन = खणणें)] वि० १ खणून काढलेला. २ पदच्युत. न० खाच, खळगा. **❀उत्खात केलि** स्त्री० शिंगानें माती उकरणें.

उत्तप [सं० उत्(वर) + तप् (तापणें, तापविणें)] वि० सूर्याच्या उन्हाखालीं असलेला; उघड्यावर असलेला.

उत्तप्त [सं० वर 'उत्तप' पहा] वि० १ तापलेला. २ तापविलेला. ३ रागावलेला, जळफळणारा. ४ चिंतातुर.

उत्तंभ [सं० उत् (वर) + स्तंभ् (थांबणें)] पु० १ उचलून धरणें. २ उभारणें. ३ आधार. ४ आसरा, टेक.

उत्तंभन [सं० 'उत्तंभ' पहा] न० 'उत्तंभ' पहा.

उत्तंभित [सं० 'उत्तंभ' पहा] वि० १ वर बांधलेला, वर टांगलेला. २ उभें केलेलें. ३ उचललेलें. ४ ठेविलेलें, धारण केलेलें. ५ पुढें आलेलें (स्त्रियांचे स्तन). ६ उभारलेले (कान).

उत्तम [सं० उत् (वर) + तम् (इच्छिणें)] वि० १ श्रेष्ठ. २ मुख्य. ३ उत्कृष्ट. ४ पहिला, पहिल्या स्थानचा. ५ शुभ. ६ शेवटलें. **❀उत्तमांग, उत्तमगात्र** न० १ डोकें. २ पाठ. **उत्तमर्ण, उत्तमर्णिक** पु० धनको, सावकार. **उत्तम पुरुष** पु० १ (व्या०) मी, आम्ही, ह्या अर्थी धातूला लागणारा प्रत्यय. २ परमात्मा. **उत्तमश्लोक** वि० प्रख्यात. पु० विष्णु. **उत्तमसंग्रह** पु० परस्त्रीशीं

कामचेष्टा. **उत्तम साहस न०** १ मोठी शिक्षा, तापलेल्या लोखंडानें डागणें, हद्दपार करणें, मालजप्त करणें, गात्रच्छेद, शिरच्छेद, इ०. २ हजार पैसे दंड. **उत्तम गति स्त्री०** १ मोक्ष. २ सुखाचें मरण; क्लेश न होतां व खितपत न पडतां आलेलें मरण. ३ शुभ-समयीं कि० पवित्र स्थळीं आलेलें मरण. ४ विषेत उत्तम प्रवेश. **उत्तम द्रव्य न०** १ वरच्या जातीच्या माणसाचें चोरलेलें द्रव्य. २ सुगंधी पदार्थ. **उत्तमोत्तम वि०** अति उत्तम.

उत्तर [**सं०** उत् (वर) + तॄ (तरून जाणें)] **वि०** १ उत्तरेकडचा. २ वरचा. ३ नंतरचा. मागाहूनचा. ४ पुढला, भविष्यकाळचा. ५ डावा. ६ श्रेष्ठ. ७ पलीकडचा. ८ अधिक; उ० अष्टोत्तर **म्ह०** आठांनीं अधिक. ९ युक्त, सहित, पूर्ण. १० शेवटचा. ॐ— **अधिकार पु०** वारसा. **–अपरा स्त्री०** वायव्य दिशा. **–अयन** (**–ण**) **न०** सूर्याचें उत्तरेकडे जाणें; मकरसंक्रांतीपासून कर्कसंक्रांतीपर्यंतचा काळ. **–आभास पु०** खोटा जबाब. **–आषाढा स्त्री०** एकविसावें नक्षत्र. **–आसंग पु०** उत्तरीय. **–उत्तर क्रि० वि०** अधिक अधिक. **कथा स्त्री०** गोष्टीचा शेवट. **–कर्म**, **–कार्य न०**, **–क्रिया स्त्री०** और्ध्वदेहिक विधि. **–काल पु०** १ पुढचा काळ. २ आयुष्याचा शेवटचा भाग. **–कुरु पु०** पृथ्वीच्या नवद्वीपांपैकीं एक. **–गति स्त्री०** मोक्ष. **–ग्रंथ पु०** परिशिष्ट. **–छद** (उत्तरच्छद) **पु०** आच्छादन; पलंगपोस. **–ज्या** (**ग०**) धनु आणि ज्या यांचा मध्यरेषा, शर. **–पक्ष पु०** १ कृष्णपक्ष. २ उत्तर; शंकेचें समाधान. ३ सिद्धान्त. ४ (**न्याय**) उपनय. **–पट पु०** १ उत्तरीय. २ पलंगपोस. **–पश्चिमा स्त्री०** वायव्य दिशा. **–पक्ष पु०** प्रतिवाद्याचा जो पक्ष तो. **–वाद पु०** प्रतिवादीचें उत्तर. **–पूर्वा स्त्री०** ईशान्य दिशा. **– पूजा स्त्री०** पूजेचा शेवटचा भाग. **– प्रच्छद पु०** पांघरूण. **–फ–** (**–फा–**) **ल्गुनी स्त्री०** बारावें नक्षत्र. **–भाद्रपदा स्त्री०** सव्वीसावें नक्षत्र. **–मीमांसा स्त्री०** ब्रम्ह-मीमांसा, वेदान्त. **–राग पु०** उत्तर रात्रीं गावयाचा राग (मालकंस, वसंत, इ०). **–रात्र स्त्री०** मध्यरात्रीनंतरचा रात्रीचा भाग. **–वय न०** म्हातारपण. **–बस्ति**, **– वस्ति स्त्री०** योनींत घावयाची पिचकारी. **–वादी पु०** प्रतिवादी.

उत्तर [**सं०** वर 'उत्तर' पहा] **न०** १ जबाब. २ अखेरचा भाग, शेष. ३ नंतरचें कृत्य. ४ परिणाम. ५ आच्छादन. ६ श्रेष्ठत्व. ७ आधिक्य. ८ (**गणित**) प्रश्नाचें उत्तर. ९ (**साहित्य**) १ केवळ उत्तर ऐकून जेथें प्रश्न तर्कितां येतो तेथें उत्तर हा अलंकार होतो; तसेंच जेथें एक एक प्रश्न विचारलेला असतो, आणि त्याचें एक एक उत्तर त्याच क्रमानें दिलेलें असतें आणि हीं उत्तरें सामान्यतः लोकांच्या सहजरीत्या लक्ष्यांत येण्याजोगीं नसतात तेथें जो अलंकार होतो त्यालाही 'उत्तर' अलंकारच म्हणतात. विशेष खुलासा आणि उदाहरणें आमच्या 'अर्थालंकारांच्या निरूपणांत' पहा. १० (**गणित**) बाकी. ११ स्वसमर्थन. ॐ**उणें उत्तर न०** अपमानकारक जबाब. ॐ**उत्तरास प्रत्युत्तर करणें** बरोबरीच्या नात्यानें बोलणें; आपला दर्जा मनांत न आणतां बोलणें; उपमर्दकारक भाषण करणें. **उणें उत्तर करणें, उण्या उत्तरानें बोलणें** उद्धटपणानें किं० दुसऱ्याचा उपमर्द होईल अशा रीतीनें बोलणें.

उत्तरपराई, उत्तरपऱ्हाई स्त्री० आयुष्याचा उत्तरभाग; वार्द्धक्य.

उत्तरा स्त्री० १ उत्तर दिशा. २ बारावें नक्षत्र.

उत्तराण स्त्री० उत्तरेचा वारा.

उत्तरामात्रा, उत्तरामात्रीं क्रि० वि० क्षणोक्षणीं, सदासर्वदा.

उत्तरी [**सं०** उत्तरीय] **स्त्री०** १ पांघरूण, उपरणें. २ मृताची उत्तरक्रिया करतेसमयीं गळ्यांत जानव्यासारखें एक फडकें घालतात तें. ३ स्नानसंध्यादि कर्माचे वेळीं रामनामांकित शालासारखें वस्त्र कोणी ब्राह्मण गळ्यांत घालतात तें.

उत्तरीय [**सं०**] **न०** १ नेसलेल्या वस्त्राहून इतर जें अंगावर अंगवस्त्र, शेला, इ० घेतात तें. २ मृताची उत्तरक्रिया करतेसमयीं गळ्यांत जानव्यासारखें एक फडकें घालतात तें.

उत्तान [**सं०** उत् (वर) + तन् (ताणणें)] **वि०** १ पसरलेला. २ उताणा. ३ उभा. ४ उघडा, स्पष्ट. ५ उंच. ६ उथळ. ७ सुबोध, समजावयाला सोपा. ॐ**–शय पु०** मूल.

उत्ताप [**सं०** उत् + तप् (तापणें)] **पु०** १ अतिउष्णता. २ दुःख. ३ आवेश, क्षोभ. ४

चिता, हरहर. न० उन्हांतील कि० उघडी जागा.

उत्तीर्ण [सं० उत् (वर)+तृ (तरणें)] **वि०** १ पैलतीरास गेलेला किं० पोहोचलेला. २ नदी, घाट, इ० ओलांडून गेलेला. ३ ओलांडलेली (नदी, घाट, इ०). ४ संकटांतून मुक्त झालेला. ५ ज्यानें प्रतिज्ञा निस्तरली आहे असा. ६ निस्तरलेली (प्रतिज्ञा, वचन, व्रत इ०).

उत्तेजक [सं० उत् (वर) + तिज् (सासणें, पाजळणें, धार देणें)] **वि०** १ उत्तेजन देणारा, प्रोत्साहन देणारा. २ उजळा देणारा (पदार्थ).

उत्तेजन [सं० ' उत्तेजक ' पहा] **न०** १ प्रोत्साहन. २ निकड लावणें. ३ उजळा देणें. ४ धार लावणें.

उत्तेजित [सं० ' उत्तेजक ' पहा] **वि०** १ ज्याला उत्तेजन देण्यांत आलें आहे असा. २ धार ज्याला दिली आहे असा (खड्ग, इ०). ३ चक-चकीत केलेला; ज्याला उजळा दिला आहे असा.

उत्थ [सं० उत् (वर) + स्था (उभें राहाणें)] **वि०** हा शब्द समासांत उत्तरपद होतो तेव्हां त्याचा अर्थ "–पासून उत्पन्न झालेला, निघालेला, जन्मलेला," असा होतो; अज्ञानोत्थ म्ह० अज्ञानापासून उत्पन्न झालेला; या प्रमाणें श्रमोत्थ, अजीर्णोत्थ, ज्वरोत्थ, इ०.

उत्थान [सं० उत् (वर) + स्थान (स्था= उभें राहाणें)] **न०** १ उभें राहाणें. २ उदय. ३ उत्पत्ति. ४ प्रयत्न, उद्योग. ५ उत्साह, पौरुष. ६ आनंद. ७ युद्ध. ८ सैन्याची उठावणी. ९ पराक्रम. ॰**उत्थानैकादशी स्त्री०** कार्तिक शुद्ध एकादशी. **उत्थानशील वि०** निरलस, उद्योगतत्पर.

उत्थापक [सं० उत् (वर)+स्था (उभें राहाणें)] **वि०** १ उठविणारा. २ उभें करणारा. ३ चेतविणारा. ४ प्रोत्साहन देणारा.

उत्थापन [सं० ' उत्थान ' पहा] **न०** १ उठविणें. २ चढविणें. ३ उत्तेजन. ४ घडवून आणणें. ५ सन्मान्य गृहस्थाच्या सन्मानार्थ उठणें किं० उभें राहाणें. (**गणित**) अक्षराबद्दल त्याची किंमत घालणें.

उत्थापित [सं० उत्+स्थापित] **वि०** १ उठविलेला. २ ताठ केलेला. ३ उभारलेला. ४ स्थानभ्रष्ट केलेला.

उत्थाप्य [सं० उत्+स्था] **वि०** उठविण्यास योग्य. ॰**उत्थाप्याकांक्षा स्त्री०** एखाद्या ग्रंथांतील वाक्यांवर किं० विधानांवर काढलेली शंका; ग्रंथादिकांवर वस्तुतः दोष नसतां उगीच मनःकल्पनेनें दोषाची संभावना करून कदाचित असें आलें तर काय करावें इत्यादिरूप कोणी घेतो ती आकांक्षा ती.

उत्थित [सं० उत् (वर)+स्थित (असलेला, उभा राहिलेला)] **वि०** १ उठलेला, उभा राहिलेला. २ वर गेलेला. ३ उत्पन्न झालेला. ४ उद्योगी. ५ उत्कर्ष पावलेला, भरभराटीस चढलेला. ६ उडालेला. ७ उंच; उंच असलेला.

उत्थिति [सं० उत् (वर)+स्थिति (असणें)] **स्त्री०** १ उठणें. २ उभें राहाणें. ३ उत्कर्ष, वैभव. ४ उत्पत्ति. ५ वर जाणें.

उत्पत्ति [सं० उत् (वर)+पद् (जाणें)] **स्त्री०** १ जन्म. २ प्रादुर्भाव. ३ मूलकारण.

उत्पन्न [सं० उत्+पद् (जाणें)] **वि०** १ जन्मलेलें; उगवलेलें. २ प्रादुर्भूत झालेलें. ३ मिळालेलें. ४ फलरूपानें प्राप्त झालेलें. **न०** १ मिळकत. २ जें मिळालें तें. ३ कृष्यादि व्यवहारापासून उत्पन्न होतें जें द्रव्य, धान्य, इ० रूप फल तें. ॰**उत्पन्नास येणें** फायदेशीर होणें (शेत, बाग, मळा, व्यापार, इ०). **उत्पन्नभक्षी वि०** रोजच्यारोज पैसे मिळवून दिनचर्या चालविणारा; आज मिळवावें आणि आजचा दिवस पार पाडावा अशा स्थितींतील माणूस. **उत्पन्नविनाशी, उत्पन्नविनष्ट वि०** उत्पन्न होतांच विनाश पावणारी (वस्तु); क्षणभंगुर.

उत्पाटणें [सं० उत् (वर)+पद् (जाणें, चिरणें)] **स० क्रि०** १ फाडून किं० ओरबाडून काढणें. २ उपटणें, वर उचलणें. ३ उपटून काढणें. ४ स्थानभ्रष्ट करणें.

उत्पाटन [सं० उत् (वर)+पाट् (जाणें, फोडणें)] **न०** १ उपटणें. २ वर उचलणें. ३ विध्वंस.

उत्पाटित [सं० ' उत्पाटन ' पहा] **वि०** १ उपटून काढलेला. २ वर उचललेला. ३ विध्वस्त केलेला.

उत्पात [सं० उत् (वर)+पत् (पडणें)] **पु०** १ उडी. २ वेगानें धावून जाणें किं० येणें.

३ उत्कर्ष. ४ शुभाशुभसूचक भूतविकार (भूकंप, धूमकेतु, इ०). ५ संकट. ६ हबका, हिसका, धक्का (गाडी इ० चा). ७ दरोडेखोर वगैरेंचा हल्ला किं० त्यांनीं केलेली नासाडी, जाळपोळ, इ०. ८ मुलांच्या किं० वेड्या माणसांच्या उपद्रवकारक खोड्या इ०. ✿–**पवन** पु० तुफानी वारा. –**प्रलय** पु० कांहीं मोठें संकट.

उत्पाती [सं० ' उत्पात ' पासून] **वि०** १ खोडकर, उपद्रवकारक (मूल, इ०). २ धाडसाचीं कृत्यें करणारा.

उत्पादक [**सं०** उत् (वर)+पद् (चालणें, जाणें)] **वि०** उत्पन्न करणारा. **पु०** पिता.

उत्पादणें [**सं०** ' उत्पादक ' पहा] **स० क्रि०** १ उत्पन्न करणें. २ –ला जन्म देणें.

उत्पादन [सं० ' उत्पादक ' पहा] **न०** १ उत्पन्न करणें. २ उत्पत्ति. ३ –ला जन्म देणें.

उत्पादिका [**सं०**] **स्त्री०** वाळवी.

उत्पादित [**सं०** ' उत्पादक ' पहा) **वि०** १ उत्पन्न केलेला. २ जन्मास घातलेला.

उत्पीड [**सं०** उत् (वर)+पीड् (पीडणें)] **पु०** १ फेस. २ पाण्याचा लोट किं० लोंढा; पूर. ३ उपळी, बाहेर वाहाणें. [दडपणें.

उत्पीडन [**सं०** ' उत्पीड ' पहा] **न०** दाबणें,

उत्प्रेक्षक [**सं०** ' उत्प्रेक्षा ' पहा] **पु०** १ पाहाणारा. २ बारकाईनें पाहाणारा. ३ साक्षी.

उत्प्रेक्षण [**सं०** ' उत्प्रेक्षा ' पहा] **न०** अंदाज, तुलना.

उत्प्रेक्षणें [**सं०** ' उत्प्रेक्षा ' पहा] **स० क्रि०** १ तुलना करणें. २ वर नजर करणें. ३ संभाविणें.

उत्प्रेक्षा [**सं०** उत् (वर)+प्र (पुढें)+ईक्ष् (पाहाणें)] **स्त्री०** १ अंदाज, अटकळ. २ औदासीन्य. ३ व्याजस्तुति. ४ कल्पित गोष्ट. ५ **(साहित्य)** अलंकारविशेष; उपमेय हें उपमानच आहे कीं काय, अशा अर्थाचें जें विधान, त्याला उत्प्रेक्षा म्हणतात. उदाहरणें वगैरेंसाठीं आमचें " अर्थालंकारांचें निरूपण " हें पुस्तक पहा.

उत्प्रेक्षित [**सं०** " उत्प्रेक्षा " पहा] **वि०** १ तुलना केलेलें. २ उत्प्रेक्षिलेलें.

उत्प्लव [**सं०** उत् (वर)+प्लु (तरंगणें, उडी मारणें)] **पु०** उडी.

उत्प्लवन [**सं०** ' उत्प्लव ' पहा] **न०** १ उडी मारणें. २ मलई, फेस.

उत्फुल्ल [**सं०** उत् (वर)+फुल् (विकसणें, पसरणें)] **वि०** १ विकसलेलें, उमललेलें. २ उघडलेलें, विस्तार पावलेलें. ३ उताणा.

उत्फुल्लित वर ' उत्फुल्ल ' पहा.

उत्याचें भात [**म०** ऊत+भात] **न०** फातळावर केलेलें भातशेत.

उत्संकळ, उत्संखळ [**सं०** उच्छृंखल] **वि०** १ अनियंत्रित; मर्यादा किं० शिस्त न पाळणारा. २ खोडकर, व्रात्य.

उत्संग [**सं०**] **पु०** १ मांडी. २ आलिंगन, संसर्ग. ३ मध्यभाग. ४ वरचा भाग, पृष्ठभाग. ५ ढुंगण. ६ शिखर. ७ छप्पर.

उत्सन्न [**सं०** उत् (वर)+सद् (बसणें, खचणें)] **वि०**१ नष्ट किं० विध्वस्त. २ दुष्ट, नीच.

उत्सर्ग [**सं०** उत् (वर)+सृज् (सोडणें, उत्पन्न करणें)] **पु०** १ टाकणें. २ बाहेर टाकणें. ३ दान; देणें; जें दिलें तें. ४ खर्च. ५ मोकळा सोडणें. ६ आहुति. ७ मलमूत्रविसर्जन. ८ संपविणें. ९ सामान्य नियम. १० देवाच्या उपयोगासाठीं घर, विहीर, झाडें, इ० देणें. ११ नवस फेडणें. १२ गुदद्वार. १३ राशि, ढीग. ✿**उत्सर्गतः क्रि० वि०** सामान्यतः; नियमाप्रमाणें पाहिलें असतां.

उत्सर्जन [**सं०** ' उत्सर्ग ' पहा] **न०** १ टाकणें, सोडणें, देऊन टाकणें. २ यज्ञोपवीत धारण करणारे जे ब्राह्मण, क्षत्रिय, इ० त्यांचें एक प्रतिवार्षिक कर्म. ३ वेदाध्ययन थांबविणें किं० त्या संबंधाचा विधि.

उत्सर्जित [**सं०** ' उत्सर्ग ' पहा] **वि०** टाकलेला, सोडून दिलेला.

उत्सव [**सं०**] **पु०** १ सण. २ आनंद, उल्हास. ३ उत्कट इच्छा. ४ कार्यारंभ. ५ उंची.

उत्साद पु०, उत्सादन न० [**सं०** उत् (वर)+सद् (बसणें)] १ नाश. २ उटी लावणें. ३ क्षत बरें करणें. ४ वर जाणें. ५ उन्नति. ६ खोल नांगरणें.

उत्सार [**सं०** उत् (वर)+सृ (सरणें)] **पु०** भाज्य अंकाचे पंक्तींत कितीएक अंकांचें

भाजन होऊन पुढें उरलेले जे भाज्यांतील अंक ते समुच्चयानें.

उत्साह [सं० उत् (वर) + सह् (सोसणें)] **पु०** १ प्रयत्न. २ दीर्घोद्योग. ३ उल्हास, उत्सुकता. ४ निश्चय. ५ शक्ति. ६ धैर्य, हिय्या, हिंमत. ७ सुख. ८ नेटाचा प्रयत्न किं० खटपट. ९ राजाच्या तीन शक्तींपैकी एक; दुसऱ्या दोन शक्ति मंत्र आणि प्रभाव ह्या होत. १० वीररसाला प्रचोदक जी भावना ती. ११ सार्वजनिक उत्सवाचा प्रसंग. ॐ**–बुद्धि स्त्री०** उत्सुकता; कामाला लागण्याची प्रवृत्ति. **–भंग पु०** उत्सुकतेचा नाश. **–मूर्ति स्त्री०** देवाच्या स्थापित मूर्तीहून इतर उत्साहादिकांत पालखींत बसवून मिरविण्यासाठीं जी दुसरी चर मूर्ति असते ती. २ राज्यादि व्यवहाराचा मुख्य जो राजा इ० त्याच्या हाताखालचा त्या त्या व्यवहाराविषयीं जो मुख्य कारभारी असतो तो. **उत्साही, उत्साहवान् वि०** १ आनंदित. २ उत्सुक.

उत्साहित [सं० ‘ उत्साह ’ पहा] **वि०** १ आनंदित, आनंद पावलेला. २ ज्याला उत्साह आला आहे असा. ३ ज्याच्या अंगांत उत्साह उत्पन्न करण्यांत आला आहे असा.

उत्सिक्त [सं० उत् (वर)+सिच् (शिंपडणें)] **वि०** १ शिंपडलेला. २ गर्वानें फुगलेला. ३ खवळलेला, क्षुब्ध. ४ वृद्धिंगत. ५ उत्कर्ष पावलेला. ६ चंचल. ७ उद्धट, गुरुजनांची मर्यादा न ठेवणारा.

उत्सुक [सं०] **वि०** उत्कंठित.

उत्सृष्ट [सं० उत् (वर) +सृज् (सोडणें, उत्पन्न करणें)] **वि०** १ सोडलेला; परित्यक्त. २ उत्सर्जन केलें ज्याचें (तो). ॐ**–पशु पु०** मोकळा सोडलेला पशु; पोळ; वसु.

उत्सेक [सं० ‘ उत्सिक्त ’ पहा] **पु०** १ शिंपडणें. २ गर्व. ३ प्रवाह, उसळी. ४ उतूं जाणें. ५ फार वाढ; आधिक्य. ६ उत्साह.

उत्क्षिप्त [सं० उत् (वर)+क्षिप् (फेकणें)] **वि०** १ उचलून धरलेला. २ व्याकुळ. ३ नाशित. ४ नाकारलेला. ५ फेकून दिलेला.

उत्क्षेप [सं० ‘ उत्क्षिप्त ’ पहा] **पु०** १ वर फेकणें. २ उडविलेला पदार्थ. ३ ओकणें. ४ नाकारणें.

उत्क्षेपक [सं० ‘उत्क्षिप्त’ पहा] **पु०** चोर; भामटा.

उत्क्षेपण [सं० ‘ उत्क्षिप्त ’ पहा] **न०** ‘ उत्क्षेप ’ पहा.

उत्क्षेपणें [सं० ‘ उत्क्षिप्त ’ पहा] **स० क्रि०** वर किं० इतस्ततः फेकून देणें.

उथळ [सं० उत् (वर)+तल (पृष्ठभाग; सपाटी)] **वि०** १ खोल नव्हे असा (पदार्थ, भांडें, नदी, तळें, इ०). २ उथळ्या विचारांचा (मनुष्य); मोकळ्या मनानें बोलणारा; साधाभोळा. ॐ**उथळ पाण्याला खळखळ भारी** ज्याच्या अंगी विद्वत्ता किं० बुद्धिमत्ता किं० दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा गुण नसतो तो फार बढाया मारतो; खरोखरी जो गुणी माणूस आहे तो बढाया मारीत नाहीं. **उथळवट वि०** किंचित् उथळ.

उथळणें अ० क्रि० १ उत्पन्न होणें. २ उसळणें.

उथळा पु० वृक्षावर पर्जन्य पडला असतां त्याच्या पानांवरून पाण्याचे थेंब खालीं पडतात ते प्रत्येक किं० ते समुच्चयानें.

उथला पु०, उथळी स्त्री०, उथळें न० गृहादिकांचे खांब बसवितात त्यांच्या तळीं जे दगडाचे किं० लाकडाचे घडविलेले शिरे किं० ठोकळे ठेवितात ते प्रत्येक.

उथळें, उथाळें न० १ खांबाच्या खालीं दगडावर जें खोल भोंक करतात आणि ज्यांत खांबाला केलेलें कुसूं बसवितात तें. २ खांबाचा माथा आणि पिढें यांच्या मध्यें जें लाकूड घालतात तें.

उथाण (–न) न० हवेचा उघडपणा किं० कोरडेपणा.

उदई, उधई स्त्री० कपड्यांचा आणि लाकडांचा नाश करणारा एक किडा; वाळवी.

उदईक[सं० उदयां=सूर्योदया] **क्रि०वि०** उद्यां.

उदक् [सं० उदच्] **क्रि०वि०** उत्तरेकडे. ॐ**उदङ्मुख वि०** उत्तरेकडे तोंड करून असलेला. **उदगग्र वि०** उत्तरेकडे आहे टोक ज्याचें असा. **उदगयन न०** मकरसंक्रांतीपासून कर्कसंक्रांतीपर्यंतचा काळ; सूर्याचें उत्तर दिशेकडे जाणें; उत्तरायण.

उदक [सं०] **न०** १ पाणी. २ पंचमहाभूतांपैकीं एक. (तीं भूतें, पृथ्वी, अप्, तेज, वायु आणि आकाश). ॐ**एकाद्या पदार्थावर उदक सोडणें** किं० **पाणी सोडणें** तो देऊन टाकणें, त्याचा त्याग करणें; त्यांवर आपलें स्वामित्व नाहीं असें

म्हणणें. **उदका पाण्यानें करून टाकणें** किं० **उरकून घेणें** लग्न, मुंज, इ० मंगल कार्यें, किं० और्ध्वदैहिक विधि इ० इतर कृत्यें, द्रव्याच्या अभावामुळें अत्यंत अल्प खर्च करून करणें. **उदकक्रिया** स्त्री० और्ध्वदेहिक विधि (ज्यांत अनेक वेळां हातावरून किं० अंगठ्यावरून पाणी सोडावयाचें असतें). **उदकघात** पु० नळांतून नेलेल्या पाण्याला जोर यावा म्हणून मधून मधून तें आडविलेलें असतें, ह्या अडविण्याच्या क्रियेला ' उदकघात ' म्हणतात. ह्या संबंधाचें जें शास्त्र तें चौसष्ट कलांपैकीं एक कला आहे. **उदकद, उदकदायी** पु० १ वारस. २ आठ ते चवदा पिढ्यांपर्यंतचे नातलग. **उदकदान** और्ध्वदेहिक विधि. **उदकप्रवेश** पु० जलसमाधि. **उदकमेह** पु० एक प्रकारचा प्रमेह. यांत पाण्यासारखी स्वच्छ व पुष्कळ लघवी होत असते. **उदकवाद्य** न० कमी अधिक प्रमाणांत पाण्यानें भरलेल्या पात्रांचें एक वाद्य. **उदकशांति** स्त्री० मंत्रानें तयार केलेल्या पाण्याचें सिंचन करण्याचा विधि; (रोगी माणूस, इ० वर केला जातो तो).

उदकाडी स्त्री० उदाचा लेप काडीला करून ती काडी वाळवून सुवासासाठीं पेटवितात ती.

उदकुंभ [सं० उद (पाणी)+कुंभ (घागर)] पु० उदकानें भरलेला मृत्तिकादिनिर्मित कुंभ जो दैवादि कर्मांचे एक अंग म्हणून ब्राह्मणाला दान देतात तो. ॐ**उदकुंभदान, उदकुंभश्राद्ध** न० कुटुंबांतील कोणी मनुष्य मेलें असतां त्याच्या उद्देशानें वर्षभर प्रतिदिवशीं कुंभदानपूर्वक जें श्राद्ध करतात तें.

उदगा [म० उतणें=चिडणें] वि० उद्धट, उर्मट.

उदगामादगा [म० उतणें+मातणें] वि० दांडगा, उद्धट, आडदांड.

उदंड [सं० उद्दण्ड] वि० पुष्कळ, मनमुराद, हावें तितकें.

उदधि [सं०] पु० समुद्र. ॐ—**मेखला** स्त्री० पृथ्वी.

उदबत्ती [उदाची बत्ती] स्त्री० सुगंधासाठीं किं० देवापुढें पूजासमयीं पेटवून ठेवितात जी ऊद वगैरे सुगंधी द्रव्यांची काडी ती.

उदफाळणें [सं० उत्+स्फालन (स्फल्=कंप पावणें, फरफरणें)] स० क्रि० फाडून किं० ओरबाडून काढणें; तुकडे तुकडे करणें.

उदफूल न० ऊद म्हणून जें एक सुगंधी द्रव्य आहे त्याचेपासून कांहीं क्रियेनें केलेला पदार्थ.

उदमस्त [सं० उन्मत्त] वि० गर्विष्ट आणि उद्धट.

उदमी [फा० उद्दीम] पु० व्यापारी; दुकानदार.

उदमेख [सं० उद्यम] पु० कांहीं काम करण्याविषयीं आस्था किं० हुरूप. ॐ**उदमेखी** आस्थाळू. **उदमेखून** क्रि० वि० मुद्दाम; आस्थापूर्वक; आवर्जून.

उदय [सं० उत् (वर)+इ (जाणें)] पु० १ वर येणें. २ बाहेर येणें. ३ उद्भव, प्रादुर्भाव, उत्पत्ति. ४ आरंभ. ५ सूर्यादि खगोलांचें क्षितिजाच्या वर येणें; उगवणें. ६ उदयाचल. ७ समृद्धि, वाढ, उत्कर्ष, भरभराट. ८ परिणाम. ९ सिद्धि, फलप्राप्ति. १० नफा. ११ मिळकत. १२ व्याज. १३ प्रभाव. १४ द्वार, मार्ग. १५ वाढदिवस. १६ (ज्यो०) भूगोलान्तर्धानानें अदृश्यपणें स्थित जे सूर्यादि ग्रह, नक्षत्रें, राशिचक्रविभाग, इ० त्यांचें जें त्यापासून ऊर्ध्वभागीं बाहेर आगमन तें. १७ (ज्यो०) सूर्यसन्निधानानें अदृश्य झालेले जे बृहस्पतिशुक्रादि त्यांस सूर्यापासून दूर झाल्यामुळें दृश्यावस्था प्राप्त होते ती. ॐ-**गिरि, उदयाचल** पु० सूर्यादि खगोल क्षितिजाच्यावर ज्या कल्पित पर्वतावरून येतात तो.

उदयीक [सं० उदय] क्रि० वि० उद्यां.

उदयन [सं०] पु० १ अगस्ति. २ वत्सराजा. न० १ उदय. २ शेवट. ३ फल, परिणाम.

उदर [सं०] न० १ पोट. २ मध्यभाग. ३ उदररोग. ४ गर्भाशय. ॐ**उदरामय** पु० अतिसार. **उदरावर्त** पु० बेंबी. **उदरावेष्ट** पु० जंत. **उदरग्रंथि, उदरगुल्म** पु० १ पाणथरी. २ पोटांत होणारी गांठ. **उदरपिशाच, उदरंभरि** वि० खादाड. **उदरपेशी** स्त्री० आंतडीं. **उदरनिर्वाह** पु० चरितार्थ. **उदरपूर्ति** स्त्री० पोटभर खाणें; खाऊन तृप्ति. **उदरपोषण** न० चरितार्थ. **उदरभरण** न० पोट भरणें. **उदरवृत्ति** स्त्री० चरितार्थ किं० चरितार्थाचें साधन. **उदरसूत्र** न० व्यास (वर्तुळाचा).

उंदरी स्त्री० वनस्पतिविशेष.

उंदरी [म० उंदीर, सं० उंदुर] **स्त्री०** १ टोकीचे केश उंदरानें कुरतुडल्यासारखे ज्या त्वचेच्या रोगामुळें होतात तो रोग. २ ज्या रोगामुळें केश गळून पडतात असा एक रोग. ३ प्राण्यांच्या अंगावरील लोकर ज्या रोगामुळें गळून पडते तो. ह्या रोगांना चाई, कातर, कातरी, अशीही नांवें आहेत.

उदर्क [सं०] **पु०** १ शेवट, परिणाम. २ भविष्यकाळ. ३ वाढ, उत्कर्ष.

उदर्ध [सं०] **पु०** आच्या ताप.

उंदऱ्या स्त्री० अ० व० विशाखा नक्षत्र कि० त्या नक्षत्रांत पडलेला पाऊस (ह्या पावसांत उंदीर, घुशी, विषारी प्राणी, विषारी वनस्पति, इ० चो जोरानें उत्पत्ति होते). (**क्रि०** उंदऱ्या लागणें, पडणें, कोसळणें इ०). ॐ **उंदऱ्या मांजऱ्या स्त्री० अ०व०** विशाखा आणि अनुराधा हीं दोन नक्षत्रें कि० ह्या दोन नक्षत्रांत पडलेले पाऊस. (उंदऱ्यांत उंदीर, विषारी प्राणी आणि वनस्पति ह्यांची जोरांत उत्पत्ति होते, आणि मांजऱ्यांत त्यांचा नाश होतो).

उदव [**सं०** उदय] **पु०** अंबाबाईचे भक्त देवापुढें **कि०** भिक्षेस निघाले म्हणजे हा मंगल शब्द उच्चारतात. 'उदव' ह्याचा अपभ्रंश उदे, उदो, उधे, असाही वापरण्यांत येतो; एकाद्याची उदे उदे कि० उधे उधे कि० उधो उधो करणें म्हणजे त्याचा फाजील गौरव करणें; त्याचें स्तोम माजविणें; त्याची टिमकी वाजविणें.

उदवणें [**सं०** उदय, **म०** उदव] **अ० क्रि०** आपण मोठा पराक्रम केला असें मानून फुगणें (निंदेंत प्रयोग होतो).

उदाविणें [म० ऊद] **स० क्रि०** उदाची धुरी देऊन सुगंधित करणें (उंची सणगें, इ०).

उदात्त [**सं०** उत् (वर)+आ+दा (देणें)] **वि०**१ उच्च, श्रेष्ठ. २ उदार. ३ प्रख्यात. ४ प्रिय. ५ चांगलें, मोठें. **पु०** १ स्वरविशेष. २ दान. ३ ढाल. ४ नौबत. **न०** **(साहित्य)** एकाद्या वस्तूचें वैभव किं० ऐश्वर्य मनोहर रीतीनें वर्णिलेलें असतां जो अलंकार होतो त्याला "उदात्त" म्हणतात; तसेंच एकाद्या वस्तूच्या वर्णनांत एकाद्या मोठ्या पुरुषाचें वर्णन गौण रीतीनें होत असल्यास तेथेंही "उदात्त" हा अलंकार होतो. उदाहरणें आणि विशेष तपशील आमचें "अर्थालंकारांचें निरूपण" ह्या पुस्तकांत पहा.

उदान [**सं०** उत् (वर) + अन् (श्वास घेणें)] **पु०** १ श्वासोच्छ्वास. २ कंठस्थ प्राण (पंच प्राणांपैकी एक). ३ ढेंकर. ४ मरणसमयाच्या वेदनांनी जोरानें श्वास टाकणें. ५ फार जेवण झाल्यामुळें अस्वस्थपणा येतो तो (**क्रि०** लागणें).

उदानु [**नंदभाषा**] **वि०** तीन.

उदार [सं०] **वि०** १ दानशूर; सैल हाताचा. २ श्रेष्ठ. ३ मोठा. ४ प्रामाणिक. ५ उत्कृष्ट. ६ वक्तृत्वपूर्ण. ७ मधुर. ८ विपुल. ९ भव्य. १० स्थूल. ११ सुंदर. ॐ **उदार तोच श्रीमंत, कृपण तोच दरिद्री** जो सढळ हातानें खर्च करतो किं० विपन्नांचा परामर्श घेतो तोच खरोखरी श्रीमंत होय; जो पैसा खर्चावयाला कचरतो त्याचे जवळ पैसा असून नसल्या सारखाच. **उदारलक्षण वि०** १ ठसठशीत चेहऱ्याचा किं० अंगलटीचा. २ चांगल्या नशीबाचा. **उदारांग वि०** ठसठशीत चेहऱ्याचा आणि धाटसूद.

उदावर्त [सं०] **पु०** आंतड्याचा रोग (यांत आंतड्यांतील वाताची अनुलोमगति बंद झाल्यामुळें त्याची ऊर्ध्वगति होऊन पोट फुगतें). ॐ **उदावर्त निबंध पु०** मलमूत्रावरोध.

उदास [सं० उत् (बाजूला)+आस् (बसणें)] **वि०** १ उदासीन. २ ओसाड. ३ खिन्न. **पु०** १ विरक्त. २ औदासीन्य. ॐ **उदासस्थिति स्त्री०** औदासीन्य.

उदासी [सं०] **पु०** १ निर्विकार आणि संसारापासून अलिप्त माणूस. २ गोसाव्यांचा एक पंथ, किं० त्या पंथाचा गोसावी.

उदासीन [सं० उत् (बाजूला)+आसीन (बसलेला; आस्=बसणें)] **वि०** १ तटस्थ, तिऱ्हाईत. २ ज्याच्या चित्ताला आनंद किं० उल्हास वाटत नाहीं असा; खिन्न.

उदाहरण [**सं०** उत् (वर) +आ+हरण (हृ=चोरणें, नेणें)] **न०** १ सांगणें, बोलणें. २ गोष्ट, वर्णन. ३ दाखला, नमुना, दृष्टान्त. ४ आरंभ, प्रस्तावना. ५ दाखविणें. ६ किस्ता. ७ **(गणित)** विद्यार्थ्याला सोडवावयाला देतात ते प्रश्न प्रत्येक.

उदाहृत [**सं०** ' उदाहरण ' पहा] **वि०** उदाहरणादाखल दिलेला, सांगितलेला, किं० पुढें आणलेला.

उदित [**सं०** उत् (वर) +इत (गेलेला; इ=जाणें)] **वि०** १ उगवलेला. २ दृग्गोचर झालेला. ३ वृद्धिंगत झालेला. ४ उंच. ५ प्रख्यात. ६ आरंभिलेला. ७ प्रफुल्लित. ८ जागा झालेला. ९ सज्ज. ॐ**उदितकार्य न०** मध्येंच उपस्थित झालेलें कांहीं जरूरीचें काम. **उदितकाळ पु०** वैभवाचा किं० उत्कर्षाचा काल.

उदित [**सं०** वद्=बोलणें] **वि०** बोललेलें, सांगितलेलें.

उदी स्त्री० एक औषधी आणि सुगंधी चीक जो धूपार्थ जाळतात; जो पिराजवळ जाळून त्याचा अंगारा प्रसाद म्हणून घेतात तो. **वि०** उदाच्या रंगाचा.

उदीची [**सं०** उदच्] **स्त्री०** उत्तर दिशा.

उदीचीन, उदीच्य [**सं०**उदच्]**वि०**उत्तरेकडचा.

उदीम [**सं०** उद्यम] **पु०** १ व्यापार, देवघेव. २ आपलें शेत, बाग, मळा, इ० तील पीक. ॐ**उदीम करतां सोळाबारा शेत करतां डोईवर भारा** व्यापारांत कधीं नुकसानही होतें आणि शेत करतां कधीं आपल्या स्वताच्या डोक्यावर भारा वाहाण्याचा प्रसंग येतो. **उदीम करणें** व्यापारांत फसगत होणें; नुकसान होणें. **उदीमपट्टी स्त्री०** धान्याच्या व्यापाऱ्यांवर बसविलेली पट्टी.

उंदीर [**सं०** उंदुरु] **पु०** एक बिळांत राहाणारा काळा प्राणी. ॐ**उंदीर गेला मस्कतास, पण श्रीमंत झाला नाहीं** हलकट किं० क्षुल्लक माणूस मोठीं शहरें पाहून मोठा होत नाहीं; तो जन्मभर आहे त्याच स्थितींत राहणार. **उंदरास मांजर साक्ष** शत्रूची मदत घेणें धोक्याचें असतें. (आमचें " मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०, " हें पुस्तक पहा). **उंदीरकानी स्त्री०** एक वनस्पतिविशेष. **उंदीरखाद स्त्री०** उंदरांनीं केलेली नासाडी.

उदुंबर [**सं०**] **पु०** उंबराचें झाड किं० त्याचें फळ; उंबर. ॐ**उदुंबरमशक वि०** उंबराच्या फळांतील कृमीप्रमाणें असंख्य.

उदेणें [**सं०** ' उदय ' पासून] **अ० क्रि०** १ उदय पावणें, उत्पन्न होणें. २ (नशीब, दैव) अनुकूल होणें. ३ सूर्यादि खगोल उगवणें म्ह० क्षितिजाच्या वर येणें.

उदेल [**म०** ऊद+तेल] **न०** उदाचें तेल.

उदेला [ऊद] **वि०** १ जळत्या उदावर धुपविलेला किं० धुपवून सुगंधित केलेला. २ उगवलेला.

उदो वर ' उदव ' पहा.

उद्गत [**सं०** उत् (वर) +गत (गेलेला; गम्=जाणें)] **वि०** १ वर गेलेला. २ ओकलेला.

उद्गम [**सं०** उत् (वर) +गम् (जाणें)] **पु०** १ वर येणें. २ उभें राहाणें. ३ प्रादुर्भाव, उत्पत्ति. ४ ओकणें, वांति. ५ अंकुर. ६ उत्पत्तिस्थान, उगम.

उद्गाता [**सं०** उद्गातृ] **पु०** सामवेद म्हणणारा ऋत्विज; त्याचे मदतनीस तीन असतात आणि त्या चवघांस ' उद्गातृगण ' म्हणतात.

उद्गार [**सं०** उत् (बाहेर)+गॄ (गिळणें)] **पु०** १ बाहेर पडणें. २ स्राव, प्रवाह. ३ प्रादुर्भाव. ४ फुगणें, वाढणें. ५ मोठी लाट. ६ बोलणें. ७ ओकणें. ८ बाहेर टाकलेला पदार्थ. ९ ढेकर. १० लाळ.

उद्गारणें [**सं०** ' उद्गार ' पासून] **स० क्रि०** बोलणें, उच्चारणें. [ओक.

उद्गिरण [**सं०** ' उद्गार ' पहा] **न०** ओकणें,

उद्गीर्ण [**सं०** ' उद्गार ' पहा] **वि०** १ बाहेर टाकलेलें. २ ओकलेलें.

उद्गीतक [**सं०** उत् (वर) +गै (गाणें)] **वि०** मोठ्यानें गाणारा.

उद्गीति [**सं०** ' उद्गीतक ' पहा] **स्त्री०** मोठ्यानें गाणें. २ सामवेद म्हणणें. ३ आर्यावृत्ताचा एक प्रकार.

उद्घाटन [**सं०** उत् (वर)+घट् (घडविणें)] **न०** १ उघडणें. २ प्रसिद्ध करणें. ३ उंच करणें. ४ चर्चा करणें, चर्चा.

उद्घोष [**सं०** उत् (वर)+घुष् (ओरडणें)] **पु०** १ घोकणें. २ वारंवार सांगणें. ३ दवंडी. ४ बातमी, वदंता.

उद्दाम [**सं०** उत् (नष्ट)+दामन् (दोरी)] **वि०** १ अनियंत्रित. २ जोरदार. ३ अतिशय. ४ भयंकर. ५ मस्त, उन्मत्त, बेफाम. ६ गर्विष्ठ. **क्रि० वि०** १ जोरानें. २ उन्मत्तपणें.

उद्दिष्ट [**सं०** उत् (स्पष्टपणें) + दिश् (सांगणें, दाखविणें)] **वि०** १ योजिलेलें, संकल्पिलेलें. २ सांगितलेलें. **पु०** मनांत योजिलेला बेत; केलेला संकल्प; इच्छिलेली गोष्ट.

उद्दीपक [**सं०** उत् (वर) + दीप (प्रकाशणें)] **वि०** चेतविणें, पेटविणें, उत्तेजित करणारा.

उद्दीपन [**सं०** वर ' उद्दीपक ' पहा] **न०** १ पेटविणें. २ चेतविणें. ३ उत्तेजिणें. ४ दहन करणें, जाळणें. ५ उत्तेजन देणारें.

उद्देश [**सं०** ' उद्दिष्ट ' पहा] **पु०** १ दाखविणें. २ उल्लेख. ३ दृष्टान्त, दाखला. ४ नमुना देणें. ५ अट, करार. ६ हेतु. ७ संकल्प. ८ प्रदेश, स्थान.

उद्देशणें [**सं०** ' उद्दिष्ट ' पहा] **स० क्रि०** १ संकल्पिणें, योजणें, धारणें. २ बोलून दाखविणें. ३ अनुलक्षिणें.

उद्देश्य [**सं०** ' उद्दिष्ट ' पहा] **न०** १ हेतु. २ (**व्या०**) ज्याचेबद्दल किं० ज्याचेसंबंधानें कांहीं विधान केलें तें.

उद्धट [**सं०** उद्धत] **वि०** उर्मट, दांडगा, वडिलांची मर्यादा न राखणारा.

उद्धटाई [**म०** उद्धट, **सं०** उद्धत, आई (प्रत्यय)] **स्त्री०** उद्धटपणा.

उद्धत [**सं०** उत् (वर) + हन् (मारणें)] **वि०** १ वर उडविलेलें किं० फेकलेलें. २ अतिशय जोरदार. ३ बलाढ्य. ४ तीव्र, कठोर. ५ गर्विष्ट, मस्त. ६ उद्धट; उर्मट; दांडगा. ७ क्षुब्ध, उत्तेजित.

उद्धरण [**सं०** उत् + हृ (नेणें, उचलणें)] **न०** १ वर उचलणें. २ उपटून काढणें. ३ नाश. ४ हिस्सा घेणें. ५ वमन, बाहेर टाकणें. ६ सुटका करणें, शापाची निवृत्ति करणें, शापांतून सोडविणें. ७ मोक्ष. ८ कर्जाची फेड. ९ आश्वासन. १० उल्लेख. ११ राख झाडून अग्नि प्रज्वलित करणें.

उद्धरणें [**सं०** उत् + हृ (नेणें, उचलणें)] **स० क्रि०** १ वर उचलणें. २ शापांतून सोडविणें. वर ' उद्धरण ' चे इतर सर्व अर्थ येथें घ्यावे. ❀**एकाद्याचे पितर उद्धरणें** त्याला आईबापावरून शिव्या देणें.

उद्धर्ता, उद्धारक [**सं०** ' उद्धरण ' पहा] **पु०** वर उचलणारा; शापांतून सोडविणारा; संकटांतून मुक्त करणारा.

उद्धार [**सं०** ' उद्धरण ' पहा] **पु०** ' उद्धरणा 'चे सर्व अर्थ येथें घ्यावे. शिवाय १ वगळण्याचा भाग. २ वडील भावाचा ज्यास्त वांटा. ३ लुटीपैकी राजाचा भाग. ४ उपकार. ५ कर्ज. ६ माल्मत्ता परत मिळविणें. ७ ऊंच करणें. ८ ग्रंथावतरण. ९ तात्पर्य. ❀**उद्धारगति** (–**त**) **स्त्री०** जन्ममरणापासून सुटका; मोक्ष.

उद्धूलन [**सं०**] **न०** १ धुळणें. २ (भस्म) अंगाला चोळणें. ३ (पैसा) उडविणें.

उद्धृत [**सं०** उत् (वर) + धृ (धरणें)] **वि०** १ उचललेलें; वर काढलेलें. २ पसरलेलें. ३ बाहेर टाकलेलें. ४ वगळलेलें. ५ दुसऱ्याच्या ग्रंथांतून किं० भाषणांतून घेतलेलें. ६ समाविष्ट झालेलें.

उद्बंध [**सं०** उत् (वर) + बंध् (बांधणें)] **वि०** सोडलेलें. **पु०** टांगून घेणें.

उद्बंधन [**सं०** ' उद्बंध ' पहा] **न०** टांगून घेणें.

उद्बुद्ध [**सं०** उत् (वर) + बुध् (जाणणें)] **वि०** १ पढविलेला किं० पढलेला. २ शिकलेला, जाणता. ३ विकसित. ४ आठवण ज्याला केली आहे असा.

उद्बोध पु०, उद्बोधन न० [**सं०** ' उद्बुद्ध ' पहा] १ पढविणें, शिकविणें. २ स्मरण. ३ स्मरण करून देणें, आठवून देणें. ४ ताकीद देणें. ५ चेतविणें. ६ जागृत करणें. ७ जागृत होणें.

उद्बोधक [**सं** ' उद्बुद्ध ' पहा] **वि०** १ सुचविणारें, आठवण करून देणारें. २ व्यक्त करणारें. ३ सूचक चिन्ह किं० लक्षण. ४ चेतविणारा. ५ जागृत करणारा.

उद्भट [**सं०**] **वि०** १ उन्मत्त. २ वृद्धिंगत झालेला. ३ भव्य. ४ धीट, पराक्रमी.

उद्भव [**सं०** उत् (वर) + भू (होणें, असणें)] **पु०** १ उत्पत्ति, जन्म. २ प्रकट होणें. **वि०** –पासून उत्पन्न झालेला किं० जन्मलेला.

उद्भवणें [**सं०** उद्भव] **अ० क्रि०** १ उत्पन्न होणें. २ प्रकट होणें; दिसूं लागणें.

उद्भाव [**सं०**] **पु०** १ उत्पत्ति. २ औदार्य.

उद्भावन [**सं०**] **न०** १ विचार. २ उत्पत्ति. ३ सांगणें. ४ अनास्था.

उद्भाविणें [**सं०** उद्भाव] **स० क्रि०** १ उत्पन्न करणें. २ प्रकट करणें. ३ प्रत्ययास आणून देणें.

उद्भिज्ज [**सं०**] **वि०** जमीनींत उगवणारें; वनस्पति.

उद्भिन्न [**सं०** उत् (वर) + भिद् (फोडणें)] **वि०** १ उत्पन्न केलेलें. २ मोड आलेलें. ३ उगवलेलें; मोड आलेलें. ४ विकसित. ५ प्रादुर्भूत.

उद्भूत [**सं०** उत् (वर)+भू (होणें, असणें)] **वि०** १ उत्पन्न झालेलें. २ दृग्गोचर. ३ श्रेष्ठ, उच्च.

उद्भेद पु०, उद्भेदन न०[**सं०** उत् (वर)+ भिद् (फोडणें)] **अ० क्रि०** १ अंकुरणें, मोड येणें. २ प्रकट होणें, दिसूं लागणें. ३ उत्पन्न होणें. ४ फोडणें. ५ फुलणें. ६ झरा. ७ फितुरी.

उद्भ्रम पु०, उद्भ्रमण न० [**सं०** उत् (वर)+ भ्रम् (फिरणें)] १ फिरविणें, परजणें. २ उद्वेग.

उद्भ्रांत [**सं०** ' उद्भ्रम ' पहा] **वि०** १ गोंधळलेला. २ भयभीत. ३ फिरविलेला. ४ अस्वस्थ.

उद्यत [**सं०** उत् (वर)+यम् (आवरणें)] **वि०** १ उचललेलें, उभारलेलें. २ ओढलेलें. ३ आरंभिलेलें. ४ जवळ आलेलें. ५ सज्ज. ६ तत्पर. ७ उद्योगी. ८ व्यग्र. ९ शिक्षित. १० तीव्र, कठोर. ॐ**उद्यतदंड वि०** ज्यानें काठी उगारली आहे असा, काठी उगारून उभा असलेला. **उद्यत बाहु वि०** हात उगारून असलेला.

उद्यम [**सं०** ' उद्यत ' पहा] **पु०** १ उचलणें. २ यत्न, उद्योग. ३ तयारी. ॐ**उद्यमी वि०** झटून काम करणारा; कामांत तत्पर.

उद्यां [**सं०** उदय] **क्रि० वि०** उदयीक.

उद्यान [**सं०**] **न०** १ बाग. २ फळबाग.

उद्यापन [**सं०**] **न०** १ व्रताच्या समाप्तिसमयीं जो कर्मविशेष करावयाचा असतो तो. २ अश्वत्थ, सरोवर, इ० कांचा जो मंत्रानें संस्कार करतात तो.

उद्यापित [**सं०**] **वि०** उद्यापनविधि ज्याचा करण्यांत आला आहे असा (व्रतविशेष, अश्वत्थ, इ०).

उद्युक्त [**सं०** उत् (वर)+युज् (जोडणें)] **वि०** १ उद्योगी. २ व्यापृत. ३ सज्ज, पुढें सरसावलेला.

उद्योग [**सं०** उत् (वर)+युज् (जोडणें)] **पु०** १ प्रयत्न. २ काम, कर्तव्य. ३ धंदा, रोजगार, चाकरी, इ०.

उद्योगी [**सं०** ' उद्योग ' पासून] **वि०** आपल्या कर्तव्यांत कि० कामांत तत्पर; आळशी न बसणारा.

उद्रिक्त [**सं०** उत् (वर)+ रिच् (रिकामें करणें)] **वि०** १ स्पष्ट. २ गर्विष्ट. ३ विपुल.

उद्रेक [**सं०** ' उद्रिक्त ' पहा] **पु०** १ अतिरेक. २ ऐश्वर्य. ३ उन्नति. ४ आरंभ. ५ स्फोट. ६ आकस्मिक प्रेरणा. ७ प्रादुर्भाव.

उद्वर्त [**सं०** उत् (वर)+ वृत् (असणें)] **पु०** १ आधिक्य, अतिरेक. २ बाकी. ३ उटी लावणें. ४ प्रलय. ४ वर जाणें.

उद्वर्तन [**सं०** ' उद्वर्त ' पहा] **न०** १ वर जाणें, उडणें. २ चूर्ण करणें. ३ उटणें. ४ उटणें इ० लावून मळ काढणें. ५ औषधी लेप. ६ उत्कर्ष.

उद्वस, उद्वस्त [**सं०** उत् (नष्ट) +वसति (रहाणारे लोक)] **वि०** निर्मनुष्य, माणसांनीं टाकून दिलेला (प्रदेश); ओसाड, उजाड, शून्य.

उद्वस्त [**सं०** उत् (वर)+व्यस्त (फेकून दिलेला; वि+अस्=टाकणें)] **वि०** घोटाळ्याचा; अव्यवस्थित (कारभार, इ०).

उद्वासन [**सं०** उत् (वर)+वस् (राहाणें)] **न०** १ ठार मारणें. २ विसर्जन (देवतांचें). ३ अधिकारावरून दूर करणें.

उद्वाह [**सं** उत् (दूर)+वह् (नेणें)] **पु०** १ नेणें, उचलणें. २ विवाह.

उद्वाहित [**सं०** ' उद्वाह ' पहा] **वि०** लग्न झालेला.

उद्विग्न [**सं०** उत् (वर)+विज् (भीतीनें कांपणें)] **वि०** १ खिन्न, विषण्ण. २ भयभीत.

उद्वृत्त [**सं०** उत् (वर)+वृत् (असणें)] **वि०**१ वर आलेलें. २ फेकलेलें. ३ भरून वाहणारें, अमर्याद. ४ ओकलेलें. ५ क्षुब्ध. ६ दुर्वर्तनी. ७ उन्मत्त.

उद्वेग [सं० उत् (वर) + विज् (भानानें कांपणें)] **पु०** १ कांपणें. २ उद्विग्नता. ३ भीति. ४ काळजी. ५ उर्ध्वहस्त तपस्वी.

उधई, उधय स्त्री० वाळवी (एक प्रकारचा किडा लाकूड वगैरेंची नासाडी करणारा).

उधड, उधडा वि० उघडा, ठोक.

उधडणें स० क्रि० १ फाडणें. २ उसवणें. ३ धुडकावणें. ४ कामावरून काढून टाकणें, हाकलून देणें. ॐ**उधडमाप न०** अंदाजानें ठरविलेलें परिमाण.

उधरणें अ० क्रि० १ ओकणें. २ (भावकर्तृक) मळमळणें; उ० मला उधरतें.

उधरागति [सं० ऊर्ध्वगति] **स्त्री०** १ स्वर्गास जाणें. २ मोक्ष. ॐ**उधरागति जाणें** स्वर्गास जाणें; मुक्त होणें.

उधवणी स्त्री० धुरांडें.

उधवणें अ० क्रि० उसळणें; वर येणें. २ भड-कणें. **स० क्रि०** १ उचलणें; वर करणें. २ बाजूस ठेवून देणें.

उधळ स्त्री० बेताल्पणाचा खर्च; नासाडी; (पैशाची, सामग्रीची, इ०). ॐ**उधळपट्टी स्त्री०** पैसा, सामग्री, इ० ची नासाडी; फाजील खर्च. **उधळया वि०** अव्यवस्थितपणें खर्च करणारा; **उधळभवानी स्त्री०** पदार्थांची उधळपट्टी कर-णारी स्त्री.

उधळण न०, उधळणी स्त्री० १ धूळ, माती, इ० फेकणें. २ गुलाल, बुक्का, इ० पदार्थ (जे उधळले जातात ते).

उधळणें स० क्रि० १ धूळ, गुलाल, भस्म, माती, इ० जे चूर्णप्राय हलके पदार्थ ते वर फेकणें. २ द्रव्यादिपदार्थ निष्काळजीपणाणें किं० अव्यव-स्थित रीतीनें खर्चणें. **अ० क्रि०** घोडा, बैल, रेडा, इत्यादि जनावरांनीं किं० एकत्र आलेल्या लोकांनीं भीति वगैरे कारणांनीं वेगानें इतस्ततः धावत सुटणें.

उधळया वि० सामानसुमान, पैसा, इ०अव्यव-स्थितपणें किं० निष्काळजीपणानें खर्च करणारा.

उधाण, उधान न० १ अमावास्या आणि पौर्णिमा या दिवशींची भरती. २ तारुण्यावस्थेचा किं० कामावस्थेचा भर. ३ वैभवाचा किं० भर-भराटीचा काळ.

उधाणणें, उधनणें अ० क्रि० १ तारुण्याच्या ऐन भरांत असणें. २ कामविकाराचा उद्रेक आला आहे अशा स्थितींत असणें.

उधानु [संद भाषेत] **वि०** तान.

उधार [सं० उद्धार] **वि०** १ पतीवर विकत आणलेला; किंमत पुढें देऊं अशा करारानें विकत आणलेला (जिन्नस). २ विनव्याजी उसनी आण-लेली (रकम). **पु०** किंमत पुढें देऊं अशा करा-रावर विकत घेतलेला जिन्नस. ॐ**उधाराचें पोतें सवा हात रितें** उधारीनें माल विकणें किं० विकत आणणें हें परिणामीं नुकसान करणारें असतें.

उधारा वि० तोंड वर करून असलेला, पड-लेला, किं० निजलेला.

उधारी स्त्री० किंमत पुढें देऊं अशा शर्तीनें माल विकत घेणारांकडे राहिलेली रकम.

उधावी स्त्री० उडी (मारणें).

उधी स्त्री० निर्णय.

उनाड वि० मोकळा सुटलेला, उनाड, भटक्या ॐ**उनाडक्या स्त्री० अ० व०, उनाडचाळे पु० अ० व०** उनाडपणाच्या खोड्या किं० कृत्यें. **उनाड वाहुला पु०** उनाड पोर.

उनाडणें अ० क्रि० अनुपयुक्त कामें करणें किं० भटकत राहाणें. [तापलेला.

उनून [म० ऊन ऊन] **वि०** कढत, गरम,

उन्नत [सं० उत् (वर) + नम् (वांकणें)] **वि०** १ उचललेलें. २ उंच. ३ पूर्ण; मोठें. ४ उत्कृष्ट, भव्य. ॐ **उन्नतानत वि०** उंच सखल. **उन्नतनाभि वि०** लठ्ठ. **उन्नतशिरा वि०** गर्विष्ठ]

उन्नति [सं० 'उन्नत' पहा] **स्त्री०** १ उंची. २ उत्कर्ष, समृद्धि. ३ श्रेष्ठत्व. ४ वर करणें. ५ उद्धटपणा.

उन्नय, उन्नाय [सं० उत् (वर)+नी (नेणें) . **पु०** १ वर नेणें. २ उंची. ३ सादृश्य. ४ अनुमान.

उन्नयन [सं० उत् (वर)+ नी (नेणें)] **न०** १ वर नेणें. २ उंची. ३ सादृश्य. ४ पोहरा. ५ सरळ करणें. ६ अनुमान.

उन्नस [सं०] **वि०** उंच नाकाचा.

उन्नायक [सं०] **वि०** अनुमानसाधक.

उन्नेता [**सं०** उत् (वर)+नी (नेणें)] **पु०** यज्ञांतील ऋत्विज विशेष.

उन्मज्जक [**सं०** उत् (वर)+मज्ज् (पाण्यांत बुडणें)] **पु०** गळ्या इतक्या पाण्यांत तप करणारा.

उन्मज्जन [**सं०** ' उन्मज्जक ' पहा] **न०** १ पाण्यांतून डोकें वर काढणें. २ पाण्यांतून बाहेर येणें. ३ बुडत असलेल्या माणसाचें गटांगळ्या खाणें.

उन्मत्त [**सं०** उत् (फार)+मद् (हर्षणें, झिंगणें)] **वि०** १ झिंगलेला. २ गर्विष्ठ. ३ मस्त. ※**उन्मत्त वायु पु०** एक वातरोग (ज्याचे योगानें मनुष्य उन्मत्त होऊन नाना प्रकारच्या चेष्टा करतो. **उन्मत्त रसायन न०** एक रसायन विशेष.

उन्मना, उन्मनस्क [**सं०** उत् (वर)+ मनस् (मन)] **वि०** १ क्षुब्ध, अस्वस्थ. २ खिन्न. ३ उत्सुक. ४ मानी.

उन्मनी [**सं०**] **स्त्री०** ईश्वरस्वरूपीं मिळून जाणें; जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तुरीया, आणि उन्मनी ह्या मनाच्या पांच अवस्था.

उन्मळणें [**सं०** उन्मूलन] **स०** **क्रि०** झाड इ० उपटून काढणें. **भावकर्तृक क्रि०** मळमळणें, कळमळणें; उ० मला मघापासून उन्मळत आहे.

उन्माद [**सं०** 'उन्मत्त' पहा] **पु०** १ वेडेपणा. २ उत्कट मनोविकार. ३ डोकें फिरणें. ४ उमलणें. ५ पिशाचभेद. ※**उन्माद वायु पु०** एक वातरोग,– ज्यांत मनुष्य उन्मत्त होऊन नाना प्रकारच्या चेष्टा करतो.

उन्मान [**सं०** उत् (वर)+मा (मोजणें)] **न०** १ तोलणें. २ मोजणें. ३ वजनी माप. ४ किंमत.

उन्मार्ग [**सं०** उत् (चुकीचा)+मार्ग (रस्ता)] **पु०** चुकीचा रस्ता.

उन्मिळणें [**सं०** उन्मीलन] **अ० क्रि०** विकास पावणें; उमलणें.

उन्मीलन [**सं०** उत् (उलट)+मील् (मिटणें)] **न०** १ उघडणें. २ डोळे उघडणें. ३ विकसणें, उमलणें. ४ व्यक्त करणें. ५ ठाव देणें.

उन्मीलित [**सं०** ' उन्मीलन ' पहा] **वि०** १ उघडलेला. २ उघडा केलेला. ३ दृश्य झालेला. ४ विकसलेला.

उन्मुख [**सं०** उत् (वर)+मुख (तोंड)] **वि०** १ वर केलें आहे तोंड ज्याचें किं० ज्याणें. २ सामोरा. ३ सज्ज. ४ उत्सुक.

उन्मूलन [**सं०** उत् (वर) +मूल् (मूळ धरणें)] **न०** मुळासकट उपटून काढणें किं० टाकणें.

उन्मेखून क्रि० वि० मुद्दाम, जाणून बुझून.

उन्मेष [**सं०** उत् (वर) + मिष् (शिंपडणें)] **पु०** १ उघडणें. २ उमलणें. ३ विकास. ४ तेज, चमक. ५ प्रादुर्भाव. ६ जागृत होणें. ७ विस्तार.

उन्मेषण [**सं०** ' उन्मेष ' पहा] **न०** ' उन्मेष ' पहा.

उन्हवणी [**म०** ऊन्ह (कढत) + पाणी] **स्त्री०** उन्हांत तापविलेलें पाणी.

उन्हाटणें [**म०** ऊन्ह] **अ० क्रि०** उन्हांत तापलेलें असून न पिकणें (फळ आंबा, इ०).

उन्हाळणें [**म०** ऊन्ह] **अ० क्रि०** १ सूर्याच्या उन्हामुळें किं० हवेंतील गरमीनें नासणें. २ वरील कारणामुळें तुळ्या, फळें, इ० भेगाळणें. ३ लघवीच्या वेळीं तिडीक उत्पन्न होण्याच्या विकारानें पीडित होणें.

उन्हाळा [**सं०** उष्ण+काल] **पु०** उष्णकाळ; ज्या ऋतूंत फारसा पाऊस पडत नाहीं तो; पावसाळा आणि हिंवाळा ह्यांहून भिन्न जो चार महिन्यांच्या अवधीचा काळ तो. २ ऊष्मा, उकाडा. ३ मूत्रद्वारीं आग होऊन वारंवार मूत्रविसर्जन करावें अशी भावना होते ज्या विकारानें तो. ह्या अर्थानें " उन्हाळे " असा अ० वचनीं बहुधा प्रयोग होतो; उ० दिल्लीहून मी आल्यापासून मला उन्हाळे लागले. ४ निराश्रितपणाची स्थिति; उ० त्या कुटुंबांतील पोराबाळांचा उन्हाळा झाला आहे. ५ शेतें, बागा, मळे, इ० ची नासाडी. ※**उन्हाळ पावसाळ क्रि० वि०** उन्हाळ्यांत आणि पावसाळ्यांत म्ह० सर्व ऋतूंत; उ० ह्या विहिरीला उन्हाळ पावसाळ सारखेंच पाणी असतें.

उन्हाळी [**म०** उन्हाळा] **स्त्री०** १ हवेची उष्णता. २ उष्णतेचा विकार. ३ लघवीच्या वेळीं जळजळ होण्याचा आजार, (**क्रि०** लागणें). ४ एक वनस्पति विशेष. ५ उष्ण काळ. ※**उन्हाळी पावसाळी स्त्री०** मुलांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

उन्हाळें [सं० उष्ण+आलय (स्थान)] न० ऊन पाण्याचा झरा.

उप [सं०] ह्या उपसर्गाचे पुढील अर्थ होतात. १ सांनिध्य; उ० उपविंश म्ह० सुमारें वीस. २ शेवट, नाश, प्रतिबंध; उ० उपरत म्ह० थांबलेला. ३ दान; उ० उपदान म्ह० लाच. ४ आरंभ; उ० उपक्रम म्ह० सुरवात. ५ आदर, पूजा, इ०; उ० उपस्थान म्ह० पूजा. ६ गौणत्व; उ० उपपुराण म्ह० कमी महत्त्वाचें पुराण. ह्या शिवाय इतर अर्थ, सादृश्य, शोभा, स्वीकार, व्यापणें, इ०.

उपकंठ [सं० उप (जवळ)+कंठ (गळा, कांठ)] न० १ जवळचा भाग. २ गांवाजवळचा प्रदेश. ३ घोड्याची एक प्रकारची चाल. **क्रि० वि०** अगदीं गळ्यापर्यंत; उ० आज मी अगदीं उपकंठ बासुंदी खाल्ली. **शब्दयोगी अ०** ०च्या शेजारीं किं० सान्निध्याला.

उपकथा [सं० उप (गौण)+कथा (गोष्ट)] **स्त्री०** पोटकथा; लहानशी गोष्ट.

उपकनिष्ठिका [सं० उप (जवळ)+कनिष्ठिका (करंगळी)] **स्त्री०** अनामिका; अंगठ्याकडून चवथें बोट.

उपकन्या [सं० उप (जवळ)+कन्या (मुलगी)] **स्त्री०** मुलीची सोबतीण किं० मैत्रीण.

उपकरण [सं० उप+कृ (करणें)] न० १ मदत. २ उपयोग. ३ साधन, हत्यार. ४ परिवार. ५ सामग्री.

उपकरणें न० अ० व० राजचिन्हें, (छत्र, चामर, अबदागीर, इ०).

उपकरणें [सं० उपकरण] न० देवपूजेमध्यें लागणारीं भांडीं (घंटा, कचोळें, इ०).

उपकर्ता [सं० उप+कृ (करणें)] पु०१ उपकार करणारा. २ मदत करणारा. ३ पोशिंदा.

उपकार [सं० उप+कृ (करणें)] पु० १ मदत, साहाय्य. २ तयारी. ३ भोगवटा. ४ गडी उभारणें. ५ शोभविणें. **उपकारी स्त्री०** राजवाडा. ❀**एकाद्याला उपकारांनीं बांधणें** त्याच्यावर उपकार करून ठेवणें. **एकाद्याचे उपकार मानणें** त्यानें आपणावर केलेले उपकार बोलून दाखविणें किं० स्मरणें; त्याचे आभार मानणें.

उपकारक [सं० 'उपकार' पहा] वि० १ उपयुक्त, हितावह, गुण वाढविणारा; उपयोगी पडणारा. २ अनुकूल परिणाम घडवून आणणारा.

उपकारी [सं० 'उपकार' पहा] वि० उपकार करणारा; उपकार करण्याकडे ज्याच्या मनाची प्रवृत्ति आहे असा. 'उपकारक' पहा.

उपकार्य [सं०उप+कृ (करणें)] वि० १ उपयोगी. २ उपकार करून घ्यावयाला योग्य; उपकाराला पात्र.

उपकृत [सं० उप+कृ (करणें)] वि० ज्याच्यावर उपकार करण्यांत आले आहेत असा.

उपक्रम [सं० उप (प्रारंभ)+क्रम् (चालणें)] पु० १ आगमन. २ आरंभ, सुरवात. ३ योजनापूर्वक किं० संकल्पपूर्वक प्रारंभ.

उपक्रमणिका [सं० उप+क्रम् (चालणें, जाणें)] **स्त्री०** प्रस्तावना.

उपक्रमणें [सं० 'उपक्रम' पासून] स० क्रि० आरंभणें, सुरू करणें.

उपक्रीडा [सं० उप+क्रीड् (खेळणें)] **स्त्री०** खेळण्याची जागा.

उपक्रोश [सं० उप+क्रुश् (ओरडणें)]पु०निंदा.

उपगम [सं० उप (जवळ) + गम् (जाणें)] पु० १ जवळ जाणें. २ स्त्रीपुरुषसंयोग. ३ सहवास. ४ परिचय. ५ मिळणें, लाभ, प्राप्ति, नफा.

उपगाता [सं० उपगातृ] पु० उद्गात्याबरोबर म्हणणारा ऋत्विज.

उपगुरु [सं० उप (जवळचा, गौण) +गुरु (शिक्षक)] पु० गुरूचा मदतनीस.

उपगूढ [सं० उप+गुह् (लपविणें)] वि० १ आच्छादित, गुप्त. २ धरलेलें. ३ ग्रासिलेलें. ४ व्याप्त. ५ आलिंगिलेला.

उपग्रह [सं० उप (जवळचा, गौण)+ग्रह] पु० १ (ज्यो०) १ ग्रहांचें दैवत. २ गौण ग्रह (राहु, केतु, शेंडें नक्षत्र, इ०). ३ मोठ्या ग्रहाभोंवतीं फिरणारा लहान ग्रह.

उपघात [सं० उप+हन् (मारणें, ठोकणें)] पु०१ तडाका. २ अपकार, पीडा. ३ हल्ला. ४नाश. ५ पाप. ६ रोग. ७ प्रतिकूल गोष्ट.

उपचय [सं० उप+चि (गोळा करणें, जमविणें)] पु० १ मिळविणें, गोळा करणें, जमविणें. २ वृद्धि, वाढ. ३ ढीग. ४ उन्नति. ५ पूजित.

उपचार [**सं०** उप+चर् (चालणें)] **पु०** १ सेवा. २ सत्कार. ३ शिष्टाचार, योग्य वर्तन. ४ संबोधण्याचा प्रकार. ५ सत्कारसाधन. ६ बाह्य देखावा. ७ उपाय, इलाज, प्रतिकार. ८ प्रयोग. ९ अवश्य सामुग्री. १० धर्मविधि. ११ गौण अर्थ; लक्ष्यार्थ. १२ ऐक्य कल्पिणें. १३ लाच, नजराणा, भेट. १४ विनंति. १५ सबब. ꠰**षोडश उपचार पु० अ० व०** पूजेमध्यें मूर्तींच्या संबंधानें करावयाचे सोळा संस्कार ते हे. १ आवाहन. २ आसन. ३ पाद्य. ४ अर्घ्य. ५ आचमन. ६ स्नान. ७ वस्त्र. ८ यज्ञोपवीत. ९ गंध. १० पुष्प. ११ धूप. १२ दीप. १३ नैवेद्य. १४ दाक्षिणा. १५ प्रदक्षिणा. १६ मंत्रपुष्प. **सप्तोपचार पु० अ० व०** वैद्यकांतील सात इलाज; १ पाचन, २ रेचन, ३ छेदन, ४ शमन, ५ मोहन. ६ स्तंभन, आणि ७ वर्धन.

उपचारिक [**सं०** उपचार] **वि०** उपचाराचें; लौकिक. ꠰**उपचारिक नांव न०** घरगुती किं० नेहेमींच्या परिपाठांत योजावयाचें नांव (उलट कागदोपत्रीं योजावयाचें नांव).

उपचित [**सं०** उप+चि (जमाविणें)] **वि०** १ वृद्धिंगत. २ परिपक्व. ३ पुष्ट, लठ्ठ, चांगला पोसलेला. ४ पूर्ण, व्याप्त. ५ चोपडलेलें.

उपज [**म०** उपजणें] **स्त्री०** १ उत्पन्न, प्राप्ति. २ उत्पत्ति. ꠰**उपजनिपज स्त्री०** उत्पत्ति आणि वृद्धि.

उपजणें अ० क्रि० उत्पन्न होणें; जन्मणें, उद्भवणें.

उपजत [**म०** उपजणें] **वि०** जन्मतः प्राप्त झालेली, आलेली, इ०; स्वाभाविक; उ० उपजत बुद्धि इ०. **क्रि० वि०** जन्मापासून, जन्मतः. ꠰**उपजत अंधळा वि०** जन्मापासून अंधळा. **उपजत खोड स्त्री०** जन्मापासूनची खोड, व्यंग, कमीपणा, इ०. **उपजत स्वभाव पु०** जन्मापासूनचा स्वभाव.

उपजाप [**सं०** उप+जप् (हळूं म्हणणें)] **पु०** १ विभक्त करणें. २ गुप्तपणें सांगणें. ३ फितुरी. ४ राजद्रोह. ५ चहाडी.

उपजापक [**सं०** 'उपजाप' पहा] **वि०** १ दोन माणसांत फूट पाडणारा. २ चाहाड्या करणारा. ३ फितूरी किं० राजद्रोह करणारा.

उपजीवक, उपजीवी [**सं०** उप (जवळ) +जीव् (जिवंत राहाणें)] **वि०** १ निर्वाह करणारा. २ सेवक, आश्रित.

उपजीवन न०, उपजीविका स्त्री० [**सं०** 'उपजीवक' पहा] १ निर्वाह. २ निर्वाहाचें साधन.

उपजीव्य [**सं०** 'उपजीवक' पहा] **वि०** १ निर्वाहाच्या उपयोगाचें. **पु०** आश्रयदाता. **न०** निर्वाहाचें किं० चरितार्थाचें साधन.

उपट [**म०** 'उपटणें'] **स्त्री०** १ वैपुल्य, पुरून उरण्या इतकें परिमाण. २ खाद्य आणि पेयें यांची समृद्धि. ३ तृप्ति (**क्रि०** घेणें). ४ दोन हातांनीं काठी इ० नीं मारलेला रट्टा किं० तडाखा (**क्रि०** घालणें). ꠰**उपट खाणें** १ पुन्हां जोर करणें. २ पुन्हां उत्पन्न होणें. **उपट घेणें, उपट जेवणें** आकंठ जेवणें. **उपट खुंटा पु०** जागेवरून उपटावयाच्या जात्याची खुंटी किं० खिळा. **उपट जातें न०** हावें तेथें गरज पडेल त्याप्रमाणें घालतां येईल असें जातें (पक्कें जमीनींत न बसाविलेलें). **उपटसुंभा (–बा) वि०** १ अस्थिर, चंचळ. २ हक्क नसतां अधिकाराच्या जागीं इतरांना मागें सारून बसणारा. **उपटसुरी, उपटसर स्त्री०** एक वनस्पतिविशेष. **उपटसूळ पु०** लुडबुड्या, लुच्चा आणि भांडखोर माणूस. **उपटसूळ खांद्यावर घेणें** खालीं 'उपटणें' मध्यें पहा.

उपटणें [**सं०** उत्पाटन] **स० क्रि०** १ जोरानें बाहेर काढणें. २ झाड, खांब, गवत, धान्याचें ताट, इ० जमिनीतून जोरानें बाहेर काढणें. ३ दुसऱ्याचें पैसे किं० एकादी जिन्नस फसवेगिरीनें किं० त्याच्या इच्छेविरुद्ध किं० त्याची नजर चुकवून मिळाविणें किं० लाटणें. ꠰**उपटून जेवणें किं० खाणें** आकंठ जेवणें किं० खाणें. **उपटून सूळ खांद्यावर घेणें** नसतें लचांड आपल्यामागें लावून घेणें.

उपटणें [**सं०** उत्पाटन] **अ० क्रि०** १ बाहेर पडणें. २ निसटणें, निखळणें. ३ उघड होणें, उघडकीस येणें, जाहीर होणें. ४ उद्भवणें, उत्पन्न होणें, पुन्हां उत्पन्न होणें (रोग, वाईट सवय, इ०). ५ रागानें हल्ला करणें; उ० तुझी दौत लवंडली दुसऱ्यानें आणि माझ्यावर तूं उगीच उपटतोस !

उपटा, उपाटा, पु० उपटा उपटी स्त्री० युक्तीनें, जबरीनें किं० फसवेगिरीनें दुसऱ्याची वस्तु लाटणें किं० मिळविणें. ꠰**एकाद्याला उपटा देणें** फसवेगिरीनें त्याची एकादी वस्तु लाटणें किं० मिळविणें.

उपटींव [**म०** उपटणें] **वि०** उपटून काढलेलें (' कापून काढलेलें ' याच्या उलट; केश, झाडें, गवतें, धान्याचीं ताटें, इ०चें विशेषण).

उपट्या [**म०** उपटणें] **पु०** दुसऱ्याच्या वस्तु काटणारा; खिसेकापू, भामटा.

उपडणें स० क्रि० उपटून काढणें. **अ० क्रि०** बाहेर पडणें; निखळणें; निसटणें.

उपडा वि० तोंड खालीं केलेला किं० आलेला; पालथा ठेवलेला. ॐ**उपडा तांब्या पु०** खालीं तोंड करून ठेवलेला तांब्या (स्त्रियां विटाळपणीं तांब्या असा ठेवितात). **उपडी मांडी स्त्री०** पालथी घातलेली मांडी (लिहिण्याच्या सोयीसाठीं).

उपणणी स्त्री० सुपानें धान्यादिकांस वारा घालून त्यांतील भुसकट उडवून देणें.

उपणणें स० क्रि० १ उंचावरून धान्य खालीं सोडून सूप वगैरेनें वारा घालून किं० वाहत्या वाऱ्यांत धरून त्यांतील भुसकट उडवून देणें; (पाखडणें, उफळणें, झडपणें, फटकणें, घोळसणें, इ० क्रियांहून ही क्रिया वेगळी आहे). २ भुसकटाप्रमाणें एकाद्याला वागविणें; तुच्छ लेखणें.

उपणवटी, उपणवाटी, उपणपटी स्त्री० तुराट्या, निरगडीचे फोक, इत्यादिकांची केलेली उथळसर पाटी (जिच्यांतून उपणावयाचा पदार्थ खालीं ओततात).

उपणा पु० हात, पाय, वगैरे अवयवांस वायूची विकृति झाली असतां तिच्या निवारणार्थ निरगुडी, शेवगा, इ० चा पाला किं० नारळाचा कीस बांधतात तो; त्या पाल्याला किं० किसाला 'पेंड' असेंही म्हणतात.

उपणी स्त्री० पेरणी.

उपणें, उंपणें स० क्रि० धान्य इ० पेरणें.

उपणें न० वाऱ्यानें स्वच्छ केलेलें धान्य इ०; (' उपणणें ' पहा).

उपताप [**सं०** उप (फार)+तप् (तापणें, तापविणें)] **पु०** १ उष्णता. २ क्लेश. ३ रोग. ४ संकट. ५ त्वरा.

उपतिष्ठणें [**सं०** उप (जवळ)+स्था (राहाणें, असणें)] **अ० क्रि०** १ मनांत बिंबणें. २ आयत्या वेळीं आठवणें. ३ विद्यमान असणें; पुढें उभें राहाणें. ४ भोक्तृत्वें म्हणून पुढें येणें. [बिंबलेलें.

उपतिष्ठित ['उपतिष्ठणें' पासून] **वि०** मनांत

उपदंश [**सं०** उप + दंश् (चावणें)] **पु०** १ तोंडा लावणें. २ चावणें. ३ गरमीचा रोग; फिरंग रोग. ॐ**उपदंशी वि०** गरमी भरलेला.

उपदिशा [**सं०** उप (गौण) + दिशा] **स्त्री०** १ मुख्य दिशांव्यतिरिक्त ज्या दिशा त्या प्रत्येक. २ गौण दिशा; पूर्व, पश्चिम, दक्षिण, आणि उत्तर, ह्यांशिवाय ज्या दिशा त्या प्रत्येक. ३ अर्थ २ मधील चार आणि यांच्या मधल्या चार (आग्नेय, नैरृत्य, वायव्य, आणि ईशान्य) ह्या एकंदर आठ दिशांव्यतिरिक्त ज्या दिशा त्या प्रत्येक. ४ ह्या आठांत वरची आणि खालची अशा दोन मिळून एकंदर दहा दिशांहून वेगळी जी दिशा ती.

उपदिष्ट [**सं०** उप + दिश् (दाखविणें)] **वि०** १ दाखविलेलें. २ शिकविलेलें. ३ ज्याला कांहीं शिकविलें आहे असा.

उपदेव पु०, उपदेवता स्त्री० गौण देवता (गंधर्व, किन्नर, विद्याधर, अप्सरा, इ० ज्या मुख्य देवांहून अन्य जाति स्वर्गी राहतात त्या).

उपदेश [**सं०** उप + दिश् (दाखविणें)] **पु०** १ शिकविणें; पढविणें. २ निर्देश. ३ सल्ला. ४ मंत्र शिकविणें. ५ सबब. ६ (**व्या०**) आद्योच्चारण.

उपदेशक [**सं०** ' उपदेश ' पहा] **पु०** १ जो शिकवितो किं० पढवितो तो. २ मंत्र शिकवितो तो. ३ सल्लामसलत सांगणारा.

उपदेशिणें [**सं०** 'उपदेश' पासून] **स० क्रि०** १ शिकविणें. २ मंत्र इ० शिकविणें. ३ योग्य वर्तनक्रम शिकविणें किं० दाखवून देणें किं० ठसविणें.

उपद्रव [**सं०** उप + द्रु (जाणें, वितळणें)] **पु०** १ संकट. २ पीडा; छळ; त्रास; कटकट. ३ नाश, विध्वंस. ४ सार्वजनिक संकट. ५ दंगा, बंड. ६ रोगांत नवीन रोग. ७ सप्तावयव सामाचा सहावा भाग. ८ भूतपिशाचादिकांची बाधा.

उपद्रवी, उपद्रवीक [**सं०** ' उपद्रव ' पासून] **वि०** १ त्रास देणारा, खोड्या करणारा, विघ्नें आणणारा, छळिक. २ भूतपिशाचादींनीं आणलेला (रोग, आजार, पीडा, इ०). ३ प्रकृतीस अपायकारक (खाद्य, पेय, इ०).

उपद्रष्टा [**सं०** उप (जवळ) + दृश् (पाहाणें)] **पु०** १ साक्षी. २ देखरेख करणारा. ३ झोपेंत स्वप्न पाहणारा. ४ यज्ञादि कर्मांत देखरेख करणारा.

उपद्रुत [सं० 'उपद्रव' पहा] वि० १ ज्याला उपद्रव झाला आहे असा. २ (ज्यो०) ग्रहण लागलेला.

उपद्वीप [सं० उप (गौण)+द्वीप (खंड)] पु०, न० सप्तद्वीपांव्यतिरिक्त जीं द्वीपें तीं प्रत्येक.

उपद्व्याप [सं० उप + उद् + व्याप] पु० १ मोठा खटाटोप. २ त्रास, उपद्रव, सतावणूक. ३ रिकाम्या खटपटी. ४ थाटमाट करणें किं० दाखविणें.

उपद्व्यापी [म० 'उपद्व्याप' पहा] वि० १ त्रासदायक, छळिक (पोर). २ भलभलत्या खटपटी करणारा.

उपधातु [सं० उप (गौण)+धातु] पु० १ पितळ इ० खनिज धातु. २ दूध इ० शरीरस्थ धातु.

उपधान [सं० उप (वर)+धा (ठेवणें)] न० १ वर किं० जवळ ठेवणें; अर्पिणें; उ० साधुसमागम अंत:करणांत विनयाचें उपधान करतो. २ उशी. ३ विशेष, अतिशय. ४ तंतुवाद्याची खुंटी. ५ धर्मकृत्य.

उपधान्य [सं० उप (गौण)+धान्य] न० तांदूळ वगैरे जीं मुख्य धान्यें त्यांहून कमी दर्जाचीं जीं धान्यें तीं प्रत्येक. हीं धान्यें आणि उपधान्यें मागें 'अठरा' शब्दांत पहा.

उपधायक [सं० उप (आंत, वर)+धा (ठेवणें)] वि० देणारा, अर्पिणारा, ठेवणारा, सांगणारा, ठसविणारा, इ०; उ० गुणोपधायक, फलोपधायक, इ०.

उपध्मानीय [सं०] वि० टाळ्यापासून उच्चारलेला (वर्ण).

उपध्वनि [सं० उप (गौण)+ध्वनि (आवाज)] पु० प्रतिध्वनि.

उपनगर [सं० उप (गौण) + नगर (शहर)] न० मोठ्या शहराला लागून असलेली वसति किं० शेजारचीं खेडीं प्रत्येक.

उपनय [सं० उप + नी (नेणें)] पु० १ प्राप्ति. २ वापरणें. ३ (न्या०) सामान्य नियम विशिष्ट उदाहरणास लावणें.

उपनयन [सं० उप (जवळ)+नी (नेणें)] न० ब्राह्मण, क्षत्रिय, आणि वैश्य यांचे पुत्रांस वेदाधिकारार्थ अष्टमादि वर्षीं करावयाचा एक संस्कार आहे तो; मुंज.

उपनाम, उपनांव [सं० उप+नाम, नांव] न० आडनांव.

उपनिधि [सं० उप+नि+धा (ठेवणें)] पु० १ ठेव. २ मोहोर केलेली ठेव. ३ कपट.

उपनिषद, उपनिषदा [सं० उप (जवळ) + नि (वर)+सद् (बसणें)] स्त्री० १ वेदान्तविषयक ग्रंथ. २ वेदरहस्य. ३ रहस्य, तत्त्व. ४ ब्रह्मज्ञान.

उपनीत [सं० उप (जवळ)+नी (नेणें; नीत=नेलेला)] वि० १ उत्पन्न झालेलें. २ मुंज झालेला. [चाळिशी.

उपनेत्र [सं० उप + नेत्र (डोळा)] न० चष्मा;

उपन्यस्त [सं० उप + नि+अस् (फेकणें)] वि० १ दिलेलें. २ केलेलें. ३ पुढें आणलेलें, दाखविलेलें. ४ शेजारीं ठेविलेलें.

उपन्यास [सं० 'उपन्यस्त' पहा] पु० १ शेजारीं ठेवणें. २ दुसऱ्याजवळ ठेविलेली ठेव. ३ ओलीस देणें. ४ सूचना, उल्लेख. ५ भाषणारंभ. ६ प्रस्तावना. ७ मांडणी; शैली. ८ नियम. ९ आराधना.

उपपति [सं० उप (गौण)+पति] पु० जार.

उपपत्ति [सं० उप (जवळ)+पद् (चालणें)] स्त्री० १ उत्पत्ति; घडणें. २ मिळणें; प्राप्त होणें. ३ सिद्धीस नेणें. ४ मदत. ५ कारण; प्रमाण. ६ युक्तिवाद. ७ सिद्ध करणें. ८ सिद्धान्त. ९ संबंध. १० शेवट.

उपपत्नी [सं० उप (गौण)+पत्नी (बायको)] स्त्री० बाळगलेली रांड; रखेली; राख; अंगवस्त्र.

उपपद [सं० उप (जवळ)+पद् (पाऊल, शब्द)] न० १ जवळचा शब्द. २ पदवी. ॐ**उपपद तत्पुरुष समास** पु० ज्या कर्तृवाचक धातुसाधिताचा वाक्यांत स्वतंत्रपणें उपयोग होत नाहीं असा शब्द द्वितीय स्थानीं येऊन समास झाला म्हणजे त्यास उपपद तत्पुरुष समास म्हणतात; उ० ग्रहस्थ, शेषशायी, ग्रंथकार, इ०.

उपपन्न [सं० उप (जवळ) + पद् (चालणें] वि० १ जवळ आलेलें. २ प्राप्त झालेलें. ३ युक्त, सहित, संपन्न. ४ योग्य. ५ शक्य, संभवनीय. ६ सिद्ध केलेला. ७ सत्य. ८ खाऊन पिऊन सुखी.

उपपातक [सं० उप (गौण) + पातक (पाप)] न० गौण पातक. गोवध, कन्याविक्रय, इ० गौण पापें धर्मशास्त्रांत सांगितलीं आहेत तीं प्रत्येक.

ब्राह्मणवध, दारू पिणें, सुवर्ण चोरणें, गुरूच्या बायकोशीं व्यभिचार; किं० हीं पातकें करणाराशीं सहवास अशीं पांच महा पातकें; ह्यांच्यांनिरिक्त जीं पातकें तीं उपपातकें.

उपपात्र (सं० उप (गौण, लहान) +पात्र (भांडें)] **न०** लहान भांडें (पाणी पिण्याचें).

उपपादक [सं० उप (गौण)+पद् (चालणें)] **वि०** १ घडविणारें. २ सयुक्तिक.

उपपादणें [सं० उप+पद्] **स० क्रि०** विवरण करून सांगणें; स्पष्ट करून सांगणें.

उपपादन [सं० उप+पद् (चालणें)] **न०** १ देणें. २ सिद्धीस नेणें. ३ मिळविणें. ४ सिद्ध करण. ५ विवरण; स्पष्ट करून सांगणें; खुलासा.

उपपाद्य [सं० उप+पद् (चालणें)] **वि०** सांगावयाचें; स्पष्ट करावयाचें; सिद्ध करावयाचें.

उपपुराण [सं० उप (गौण)+पुराण] **न०** गौणपुराण. आदि, नृसिंह, वायु, शैवधर्म, दुर्वास, नारद, नंदिकेश्वर, औशनस्, कापिल, वरुण, सांब, कालिका, माहेश्वर, पद्म, दैव, पराशर, मारीच, व सौर, हीं अठरा उपपुराणें आहेत. यांतील कांहींबद्दल लघुकालिका, बृहत्कालिका, सनत्कुमार, मानव, विष्णुधर्मोत्तर व कुमार अशीं नांवें कोणी देतात.

उपप्राण [सं० उप (गौण)+प्राण] **पु०** पंच प्राणाहून इतर जे प्राण ते प्रत्येक (नाग, कूर्म, कृकल, धनंजय, आणि देवदत्त).

उपप्लव [सं० उप+प्लु (वाहणें, तरंगणें)] **पु०** १ संकट. २ पीडा, त्रास, उपद्रव. ३ अडथळा, विघ्न. ४ भीति. ५ नाश. ६ प्रलय. ७ दंगामस्ती. ८ क्षोभ (इंद्रियादिकांचा). ९ नास्तिक मत. १० (**ज्यो** ०) ग्रहण. ११ उत्पात.

उपभुक्त [सं० उप+भुज् (भोगणें, जेवणें)] **वि०** १ भोगलेलें. २ खाल्लेलें. ३ वापरलेलें. ४ अनुभविलेलें.

उपभोक्ता [सं० 'उपभुक्त' पहा] **पु०** १ उपभोग घेणारा. २ भोगवटा घेणारा. ३ अनुभविणारा.

उपभोग [सं० 'उपभुक्त' पहा] **पु०** १ भोगणें. २ खाणें.३ वापरणें.४ रतिसंभोग. ५ सुख.

उपभोगणें [सं० 'उपभोग 'पासून] **स० क्रि०** १ भोगणें. २ खाणें. ३ वापरणें. ४ अनुभविणें. ५ रतिसंभोग घेणें. ६ आस्वादणें.

उपभोग्य [सं० 'उपभुक्त' पहा] **वि०** १ खाद्य. २ भोगावयाचें. ३ अनुभवावयाचें.

उपमर्द [सं० उप+मृद् (चिरडणें)] **पु०** १ घर्षण. २ नाश. ३ अपमान. ४ चुरगळणें. ५ चोळवटणें, कुस्करणें. ६ दाटगेपणाचें कृत्य.

उपमा [सं० उप (जवळ)+मा (मापणें)] **स्त्री०** १ सादृश्य. २ दृष्टान्त. ३ तुलना. ४ (**साहित्य**) जेव्हां दोन भिन्न भिन्न वस्तूंमध्यें कांहीं आल्हादजनक सादृश्य वर्णिलेलें असतें किं० कांहीं सादृश्य आल्हादजनक रीतीनें वर्णिलेलें असतें तेव्हां 'उपमा' हा अलंकार होतो. पुढें "उपमान" हा शब्द पहा. विशेष तपशील आणि उदाहरणें आमचें "अर्थालंकारांचें निरूपण" ह्या पुस्तकांत पहा.

उपमाता [सं० उप (गौण) +माता (आई)] **स्त्री०** १ मुलाला जन्म देणारी माता मुलाला स्तनपान देऊं शकत नसल्यास दुसरी बाई त्या मुलाला स्तनपान देण्यासाठीं ठेवलेली असते ती. २ दायी.

उपमान [सं० उप (जवळ)+मा (मोजणें)] **न०** १ (**साहित्य**) उपमेय, उपमान, सामान्य धर्म आणि साम्यवाचक शब्द, हीं उपमेचीं चार अंगें असतात. ज्या वस्तूचें वर्णन करावयाचें असतें तिला 'उपमेय' म्हणतात; ह्या उपमेयाचें साम्य ज्या वस्तूशीं वर्णिलेलें असतें तिला 'उपमान' म्हणतात; ज्या गुणावरून उपमेय आणि उपमान ह्या दोन वस्तूंमध्यें साम्य असतें त्या गुणाला 'सामान्य धर्म' म्हणतात, आणि हें साम्य दाखविणारा जो शब्द त्याला "साम्यवाचक शब्द" म्हणतात. 'राम मेघाप्रमाणें काळा आहे' ह्या वाक्यांत उपमा हा अलंकार आहे. राम हें उपमेय आहे, मेघ हें उपमान आहे, काळा हा सामान्य धर्म आहे, आणि प्रमाणें हा साम्यवाचक शब्द आहे. २ तुलना. ३ दृष्टान्त. ४ सादृश्यमूलक अनुमान.
❀**उपमानगम्य वि०** सादृश्यावरून कळण्याजोगें.
उपमानसिद्ध वि० सादृश्यावरून सिद्ध झालेलें किं० ठरलेलें.

उपमित [सं० 'उपमान' पहा] **वि०** ज्याला उपमा देण्यांत आली आहे असा (पदार्थ).

उपमिति [सं० 'उपमान' पहा] **स्त्री०** १

उपमा. २ सादृश्यावरून प्राप्त झालेलें ज्ञान. ३ उपमान म्हणून जें प्रमाण त्याचेवरून मिळालेलें ज्ञान. ४ सादृश्य, सारखेपणा.

उपमेय [सं० ' उपमान ' पहा] **न०** ज्याचें साम्य किंवा सादृश्य वर्णावयाचें आहे तो पदार्थ; मागें ' उपमान ' पहा.

उपयुक्त [**सं०** उप (जवळ)+युज् (जोडणें)] **वि०** १ उपयोगाला येईल असें; उपयोगी. २ कामाला लाविलेला.

उपयोग [**सं०** ' उपयुक्त ' पहा] **पु०** १ वापरणें. २ कामाला लावणें किं० योजणें. ३ कामाला येणें. ४ औषध देणें. ५ लायकी, योग्यता. ६ अनुरूपता. ७ कांहीं विशिष्ट कामाला जरूरी.

उपर [**सं०** उपरि] **क्रि० वि०** १ नंतर, पुढें, मागून. २ शिवाय. **श० यो०** अ० शिवाय, खेरीज,–हून.

उपर [**सं०** उपरि] **पु०** वरचष्मा, छाप, वजन; उ० हा जेथें जातो तेथें आपला उपर लोकांवर बसवितो; उ० ज्या त्या कामांत तुझा उपर माझ्यावर कां ? मी तुझा उपर चालूं देणार नाहीं. ॐ**आपला उपर ठेवणें** किं०**राखणें** एकाद्यावर आपलें वजन अबाधित राखणें. **उपरकाठी स्त्री०** अनवाणी चालत असतां एकाद्या लहान काठीवर पाय पडला असतां तिचें अग्र तडकर उडून पायाचे तळास आघात करतें तेणेंकरून विषारासारखें मोठें दुखणें होतें, तें झालें असतां " उपरकाठी लागली " असें म्हणतात, आणि त्या काठीला ' उपरकाठी ' म्हणतात. **उपरखणी स्त्री०** घराचा दुसरा मजला. **उपरछक्का पु०** फाशांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. **उपरछडी स्त्री०** पोहोणारा मनुष्य उंचावरून अवसान घेऊन हवेंत कोल्हांटी घेऊन पाण्यांत पडतो त्या उडीला ' उपरछडी ' म्हणतात. **उपरट(–ठ–) पका, उपरटप्पा पु०** आपण कोणाचें बरें केलें असून तें त्याला न आवडून त्यानें आपली स्तुति न करतां निंदा केली तर त्या निंदेला ' उपरटपका ' इ० म्हणतात. **उपरदवडा पु०** ' उपरटपका' पहा. **उपरटप्पी, उपरटप्याचा वि०** रसहीन आणि अर्थहीन असें भाषण. **उपरदुवा, उपरपगडा उपरपव, उपरपंजा पु०** फाशांच्या खेळांतील पारिभाषिक शब्द. **उपरप्यादी स्त्री०** एका प्याद्यानें राजाची गति कुंठित करून दुसऱ्या प्याद्यानें शह देणें. **उपरबाहेरचा वारा पु०** ईशान्यदिशेचा वारा.

उपरंडणें स० क्रि० अ० क्रि० लवंडणें, सांडणें, उलथणें.

उपरणा पु०, उपरणें न० खांद्यावर घ्याव- [याचें वस्त्र.

उपरति [**सं०** उप (उलट) + रम् (रमणें)] **स्त्री०** १ शेवट. २ मरण. ३ थांबणें, विश्रांति. ४ औदासीन्य. ५ वैराग्य. ६ किळस, वीट. ७ पराङ्मुखता. ८ पश्चात्ताप.

उपरतें } **वि०** वरलें, उलट, विपरीत. †**ज्ञा०**}.

उपरम [**सं०** उप+(उलट) +रम् (रमणें)] **पु०** १ शेवट. २ मरण. ३ थांबणें. ४ विश्रांति.

उपरमणें [**सं०** ' उपरम ' पासून] **अ०क्रि०** १ बंद होणें. २ प्रफुल्लित होणें. ३ संतुष्ट होणें. ४ आराम पावणें.

उपराग [**सं०** उप+रंज् (रंगविणें)] **पु०** १ रंग, लाली. २ पीडा, इजा, उपद्रव. ३ (**ज्यो०**) ग्रहण. ४ राहु. ५ संगीतांतील प्रकारविशेष.

उपराठणें स० क्रि० उलटें करणें. **अ० क्रि०** उलटें होणें.

उपराठा वि० उलटा झालेला किं० केलेला.

उपरांडणें स० क्रि० उलटें करणें. **अ० क्रि०** उलटें होणें.

उपरांत, उपरांतिक क्रि० वि० नंतर; पाठीमागून.

उपराज [**सं०** उप (गौण) + राजन् (राजा)] **पु०** मांडलिक राजा.

उपराळ वि० अधिक, फाजील.

उपराळणें अ० क्रि० पात्रांतील पाणी किं० इतर पदार्थ बाहेर वाहूं किं० सांडूं लागणें.

उपराळा पु० १ बैलाच्या पाठीवर गोणी इ० जें ओझें लादलेलें असतें, त्या ओझ्याचें दोन्ही बाजूंचें वजन सारखें व्हावें म्हणून कमी वजनाच्या बाजूस जें कांहीं भरतीसाठीं थोडेंसें ओझें घालतात तें. २ नेहमीच्या खर्चासाठीं जें कांहीं सामानसुमान घेऊन ठेवावयाचें त्याहून अधिक जें अनपेक्षित कारणासाठीं घेऊन ठेवतात तें. ३ बारदानांत जितक्या वजनाचा माल असावयाचा त्याहून अधिक जो भरेल तो. ४ कुरापत; भांडणाला चेतविणारी गोष्ट. ५ वादांत किं० कुस्तींत मिळालेली सरशी. ६ मदत, साहाय्य. ७ गिऱ्हाइकाला माल तोलून

किं० मापून दिल्यावर दुकानदार त्याम्न जो थोडासा माल गिऱ्हाइकाला देतो तो. ८ वाइटाचा फैट वाईटानें करून टाकणें; उट्टें काढणें. ९ खोटा आरोप. १० उडपण.

उपरि [**सं०**] **क्रि० वि०** १ वर, वरती. २ मागून. ३ शिवाय. समासांत ह्या शब्दाचा अर्थ विशेषणाप्रमाणें होतो. ॐ**—भूमि स्त्री०** १ वरचा मजला (घराचा). २ डोंगराचा सपाट माथा. **एतदुपरि क्रि० वि०** ह्यानंतर, ह्याशिवाय. **तदुपरि क्रि० वि०** त्यानंतर, त्याशिवाय. **—भाग पु०** वरचा किं० पुढचा भाग.

उपरी [**सं०** ' उपरि ' पासून] **पु०** १ प्रसंग-विशेषीं एखाद्या ठिकाणीं राहाणारा; कायमचा रहि-वासी नव्हे तो. २ जेथें आपलें घरदार किं० शेतवाडी नाहीं अशा ठिकाणीं राहणारा. ३ त्या ठिकाणचा वतनदार नाहीं असा तेथें राहणारा. ४ दुसऱ्याचें शेत, मळा, इ० करून राहणारा (उलट 'थल्करी').

उपरी [**सं०** उपरि] **स्त्री०** घराची माडी.

उपरी [**सं०** उपरि] **क्रि० अ०** १ वर; वरती. २ शिवाय, आणखी.

उपरोध [**सं०** उप+रुध् (अडविणें)] **पु०** १ अडथळा, विघ्न. २ नाकेबंदी. ३ पीडा, उपद्रव. ४ संयमन, (शरीराचें किं० मनाचें). ५ बांधणें, धरणें. ६ शंका, कचर; उ० तुमचें पडेल तें काम मला सांगा; हा मोठ्या दर्जाचा, ह्याला हें काम कसें सांगावें असा उपरोध मनांत बाळगूं नका. ७ व्याजोक्ति; गुप्त निंदा.

उपरोधी, उपरोधिक, उपरोधाचा [**सं०** उपरोध] **वि०** टोमणे मारणारें (भाषण); कुचकें (भाषण); निंदागर्भ (भाषण); छन्नी; व्याजोक्तीचें.

उपल [**सं०**] **पु०** १ धोंडा. २ रत्न, मणि. ३ (तोफेचा किं० बंदुकीचा) गोळा किं० गोळी. ॐ**उपलप्रक्षेप पु०** १ दगडांचा वर्षाव किं० भडीमार. २ प्रतिपक्ष्याच्या मताचें खंडन केल्यावर प्रतिपक्ष्याला पूर्ण चित करण्यासाठीं आणखी लहान सहान मुद्दे काढून त्याच्यावर केलेला भडीमार.

उपलब्ध [**सं०** उप (जवळ)+लभ् (मिळ-विणें)] **वि०** १ प्राप्त झालेलें, मिळालेलें. २ पूर्वी आपल्या जवळ नसून नवथर आपल्या हातीं आलेलें किं० आपणाला सांपडलेलें.

उपलब्धि [**सं०** ' उपलब्ध ' पहा] **स्त्री०** १ प्राप्ति, मिळणें. २ ज्ञान. ३ अनुभव. ४ ज्ञानाचा किं० ज्ञानाचा हातीं आलेला किं० ठाऊक असलेला सांठा. ५ इंद्रियगोचरता; उ० चक्षुरिंद्रिया-वांचून रंगाची उपलब्धि शक्य नाहीं; उ० श्रवणें-द्रियावांचून ध्वनीची उपलब्धि होत नाहीं.

उपलभ्य, उपलभ्यमान [**सं०** ' उपलब्ध ' पहा] **वि०** १ हल्लीं ठाऊक असलेलें. २ प्रचारांत असलेलें; चालू असलेलें. ३ व्यापार किं० दुसऱ्या कोण-त्याही धंद्यापासून मिळणारा (नफा, काही सोय, इ०).

उपलभणें [**सं०** ' उपलभ ' पासून] **अ० क्रि०** प्राप्त होणें.

उपलवण [**सं०** उप (जवळ)+लवण (मीठ)] **न०** मीठ घालून केलेलें तोंडीलावणें.

उपलवण, न०, उपलवणी स्त्री० १ वर्णन, विस्तार, व्याख्यान. २ शोभा.

उपलवणें स० क्रि० १ उघडें करणें. २ सवि-स्तर सांगणें. **अ० क्रि०** १ विकसित होणें. २ उघडें किं० स्पष्ट होणें.

उपलक्षण [**सं०** उप - लक्ष् (पाहाणें)] **न०** १ पाहाणें. २ लक्षण, वर्णन. ३ नामनिर्देश. ४ अप्रत्यक्ष कथन. ५ दृष्टान्त. ६ एकाच्या निर्देशा-वरून त्या जातीच्या इतरांचा बोध.

उपलक्षित [**सं०** ' उपलक्षण ' पहा] **वि०** अप्रत्यक्ष रीतीनें सांगितलेला.

उपलाणा(—णी),उपलाणू [**सं०** उप (नष्ट)+पल्याण (खोगीर)] **वि०** १ ज्याचे पाठीवर खोगीर, जीन, इ० नाहीं असें (स्वारी केलेलें जनावर); उ० उपलाण्या घोड्यावर बसून तो मैलभर भरधाव जातो. २ एकाद्या ठिकाणीं कायमचा राहणारा नव्हे असा. ॐ**उपलाणी बसणें** वाहनावर जीन किं० खोगीर न घालतां त्यावर स्वारी करणें.

उपलेप [**सं०** उप (वर)+लिप् (चोपडणें)] **पु०** माखणें, सारवणें.

उपवन [**सं०** उप (लहान)+वन (अरण्य)] **न०** बाग, बगीचा.

उपवर [**सं०** उप (जवळ)+वर (नवरा-मुलगा)] **वि०** लग्नाला योग्य वयाची मुलगी; लग्नाचें वय किंचित उलटून गेलें आहे ज्याचें असा (मुलगा) किं० विशेषत: अशी (मुलगी).

उपवस्त्र [सं० उप (गौण) + वस्त्र] **न०** १ उपरणें; नेसलेल्या वस्त्राशिवाय दुसरें जें वस्त्र अंगावर धारण करतात तें. २ (अप्रत्यक्ष निर्देशानें) राख, रखेली.

उपवास [सं०उप + वस् (राहाणें)]**पु०**उपोषण.

उपविद्या [सं० उप (गौण)+विद्या (शास्त्र किं० ज्ञान)] **स्त्री०** व्यावहारिक ज्ञान.

उपविष्ट [सं० उप (वर, जवळ) + विश् (प्रवेशणें)] **वि०** बसलेला.

उपवीत [सं०] **न०** डाव्या खांद्यावरून आणि उजव्या हाताखालून घालतात जानवें तें.

उपवेद [सं० उप (गौण)+वेद] **पु०** वेदतुल्य ज्ञानशाखा किं० शास्त्र (आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद, आणि स्थापत्यवेद).

उपवेश [सं० उप (जवळ)+ विश् (प्रवेशणें)] **पु०** १ जवळ बसणें. २ बसणें. ३ आसन. ४ मलविसर्जन.

उपशब्द [सं० उप (जवळ) + शब्द] **पु०** एका विशिष्ट शब्दाचा अर्थ अधिक विस्तृत करण्यासाठीं किं० अधिक जोरदार करण्यासाठीं त्याच्यापुढें जो दुसरा शब्द (त्याच अर्थाचा किं० तत्सदृश अर्थाचा किं० अर्थशून्य) घालतात तो; उ० शाकभाजी, गवतकाडी, लाकूडफाटा, भाकरीबिकरी, इ०.

उपशम [सं० उप+शम् (शांत होणें)] **पु०** १ शांत होणें. २ शांति, शांतता. ३ इंद्रियजय. ४ समाप्ति, शेवट.

उपशमन [सं० ‘ उपशम ’ पहा] **न०** ‘ उपशम ’ पहा.

उपशाखा [सं० उप (गौण)+शाखा] **स्त्री०** १ बुंध्यापासून वृक्षाला आलेल्या मोठ्या फांद्यांना ज्या लहान लहान फांद्या येतात त्या. २ एका समूहाचे जे मुख्य वर्ग त्यांचे पोटवर्ग.

उपशांत [सं० उप+शम् (शमणें)] **वि०** शमलेला, थंडावलेला, कमजोर झालेला, विझलेला, नाहींसा झालेला.

उपशास्त्र [सं० उप (गौण) + शास्त्र] **न०** षड्दर्शनांहून जीं इतर शास्त्रें तीं(वैद्यक, गायन,इ०).

उपशिक्षक [सं० उप (गौण) + शिक्षक (शिकविणारा)] **पु०** खालच्या इयत्तेंतील विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या कामीं मुख्य शिक्षकाला मदत करणारा वरच्या इयत्तेंतील विद्यार्थी किं०शिष्य.

उपश्रुति [सं० उप + श्रु (ऐकणें)] **स्त्री०** १ संमति, स्वीकार. २ अकस्मात् कानीं पडलेले शब्द जे शकुन म्हणून मानले जातात ते; कोणा माणसाच्या मनांत कांहीं विचार घोळत असतां त्याच्या कानीं दुसऱ्या कोणी माणसानें उच्चारलेले शब्द अकस्मात् आले तर हे शब्द तो आपल्या संकल्पाला अनुकूल किं० प्रतिकूल समजून संकल्प सफल होईल किं० विफल होईल तें ठरवितो; हे अकस्मात् कानीं पडलेले जे शब्द त्यांना उपश्रुति म्हणतात; उ० यंदा तांदुळाचा व्यापार करावा किं० न करावा ह्या विषयीं मी विचार करीत होतों इतक्यांत ‘ मरशील रे मरशील ’ असे शब्द माझे कानीं पडले; ही उपश्रुति म्हणून मी तांदुळाच्या व्यापारांत पैसे न घालावे असा निश्चय केला. ३ परोक्ष किं० भवितव्य गोष्टींविषयीं प्रश्न पहावयाचा असतां रात्रीं चांभार, महार, इ० चे घराजवळ हळूंच जाऊन त्या घरांतून ऐकूं आलेल्या शब्दांवरून प्रश्नाचें उत्तर ठरवितात; ह्या ऐकूं आलेल्या शब्दांना उपश्रुति म्हणतात. ४ लोकवार्ता, किंवदंती.

उपाश्लिष्ट [सं० उप (जवळ)+श्लिष् (आलिंगिणे)] **वि०** १ शेजारचा; जवळचा, चिकटून असलेला. २ आलिंगिलेला, कवटाळलेला.

उपश्लेष [सं० ‘ उपश्लिष्ट ’पहा] **पु०** १ आलिंगन. २ पाया, आधार. ३ सांनिध्य.

उपष्टंभ [सं० उप + स्तंभ् (थांबणें)] **पु०** १ आधार, पाया. २ थांबणूक.

उपसण, उपसणी, उपसणें, उपसा, इ० पुढें ‘ उसपण, ’ ‘ उसपणी, ’ ‘ उसपणें, ’ ‘ उसपा ’ इ० हे शब्द पहा.

उपसरण [सं० उप (जवळ) + सृ (सरकणें)] **न०** जवळ जाणें; ०कडे जाणें.

उपसर्ग [सं० उप (जवळ)+सृज् (उत्पन्न करणें)] **पु०** १ आजार. २ एका रोगांत झालेला दुसरा रोग. ३ संकट, दुःख, उपद्रव, पीडा. ४ विघ्न. ५ दुश्चिन्ह, उत्पात. ६ भूतबाधा. ७ **(ज्यो०)** ग्रहण. ८ मरणचिन्ह. ९ **(व्या०)** प्र, परा, उप, सम्, इ० अव्ययरूप शब्द जे धातु वगैरेंना लागतात ते.

उपसर्जन [सं० उप (जवळ) + सृज् (उत्पन्न करणें, सोडणें)] न० १ आगमन. २ सोडणें, त्याग. ३ प्रतिनिधि, बदली. ४ (ज्यो०) ग्रहण. ५ विशेषण, उपपद, इ०. ६ उपद्रव. ७ सैन्याची हालचाल.

उपसर्पण [सं० उप (जवळ) + सृप् (सरणें)] न० जवळ येणें, जवळ जाणें.

उपसंहार [सं० उप + सम् + हृ (हरणें)] पु० १ आंत घेणें, आवरणें, गुंडाळणें. २ परत घेणें. ३ वगळणें. ४ गोळा करणें. ५ संचय. ६ सारांश. ७ संक्षेप. ८ तयारी. ९ समाप्ति, पूर्णता. १० नाश. ११ हल्ला. १२ खंडण.

उपसळा वि० खोडकर.

उपसळो पु० १ कुत्रा, मांजरें, उंदीर, घुशी, इ० चा उपद्रव. २ खोडकर पोरांचा त्रास, उपद्रव, किं० कटकट (क्रि० आणणें, देणें).

उपसाण, उबसाण [म० उबट + घाण] स्त्री० उबट, कुबट, किं० कोंदटपणाची घाण.

उपसामग्री स्त्री०, **उपसाहित्य** न० एखाद्या विशिष्ट कामाला लागणारीं गौण साधनें, द्रव्यें, हत्यारें, भांडीं, इ०.

उपसारा पु० १ अनियंत्रित रीतीनें हिंडणें किं० भटकणें. २ जागेचा मोकळेपणा. ३ घरांतील किं० घराला लागून असलेली रिकामी जागा (ज्यांत प्रसंगविशेषीं मोठा स्वयंपाक करतात, लग्न वगैरे कार्यांत आमंत्रितांसाठीं बैठक घालतात, किं० पंक्ति मांडतात). ४ घरांतील किरकोळ किं० कमी महत्त्वाचें सामान.

उपस्कर [सं० उप + कृ = उपस्कृ = सजविणें, जवळ ठेवणें] पु० १ द्रव्य, सामग्री. २ घरांत जरूर असे पदार्थ (केरसुणी, सूप, उखळ, मुसळ, इ०). ३ मसाला, वेसवार, व्यंजनें. ४ दागिना. ५ निंदा. ६ सजविणें.

उपस्तरण [सं० उप + स्तृ (पसरणें)] न० १ बिछाना, आंथरूण. २ आच्छादन.

उपस्थ [सं० उप (जवळ) + स्था (उभें राहाणें, असणें)] वि० जवळचा, शेजारचा. पु० १ मांडी. २ (वृक्षाचें) मूळ. ३ रथावर सारथी बसण्याची जागा. पु०, न० १ जननेंद्रिय. २ गुदद्वार. ३ ढुंगण. ॐ**उपस्थनिग्रह** पु० कामविकारावर नियंत्रण घालणें.

उपस्थान [सं० उप (जवळ) + स्था (उभें राहाणें)] न० १ हजर असणें. २ जवळ असणें. ३ सांनिध्य. ४ आगमन. ५ पूजा, स्तुति. ६ सत्कार. ७ पवित्र स्थळ. ८ स्मरणें. ९ प्राप्ति. १० आखाडा.

उपस्थापक [सं० ‘ उपस्थान ’ पहा] वि० १ शिकविणारा. २ स्मरण करून देणारें.

उपस्थापन [सं० उप + स्थापन (स्था = उभें राहाणें)] न० १ तयार ठेवणें. २ हजर करणें. ३ स्मरण देणें. ४ सेवा, शुश्रूषा.

उपस्थित [सं० ‘ उपस्थान ’ पहा] वि० १ जवळ आलेलें. २ मिळालेलें. ३ ज्ञात, कळून आलेलें. ४ घडून आलेलें. ५ विद्यमान असलेलें. ६ हजर असलेला.

उपस्थिति [सं० ‘ उपस्थान ’ पहा] स्त्री० १ हजर असणें. २ सांनिध्य. ३ आगमन. ४ पूजा, स्तुति. ५ स्मरण. ६ प्राप्ति. ७ ध्यानांत असणें; (शिकलेला विषय) आयत्या वेळीं आठवत असणें.

उपस्पर्श [सं० उप + स्पृश (स्पर्शणें)] पु० १ आचमन. २ जळ. ३ स्नान. ४ दान.

उपस्मृति [सं० उप (गौण) + स्मृति] स्त्री० गौण स्मृतिग्रंथ (बौधायनादि).

उपहत [सं० उप + हन् (ताडन करणें)] वि० १ ताडित. २ पीडित, उपद्रुत, त्रस्त. ३ वीज वगैरे ज्यावर पडली आहे असा. ४ निंदिलेला. ५ भ्रष्ट; दूषित.

उपहति [सं० ‘ उपहत ’ पहा] स्त्री० १ तडाका. २ नाश, वध. ३ मालिन्य.

उपहरण न०, **उपहार** पु० [सं० उप (जवळ) + हृ (हरणें)] १ आहुति. २ देणगी. ३ बळी. ४ नजराणा. ५ सन्मान. ६ पूजन, पुष्पार्पण, इ०. ७ पूजासामग्री. ८ खंडणी. **उपाहार** म्ह० फराळ ह्याचेबद्दल चुकीनें ‘उपहार’ हा शब्द अशिक्षितांत योजला जातो.

उपहसित [सं० उप + हस् (हसणें)] वि० ज्याचा उपहास करण्यांत आला आहे असा.

उपहार्य [सं० उप (जवळ) + हृ (हरणें)] वि०१ भक्ष्य. न० देव, पितर, ह्यांस देण्याचें अन्न.

उपहास [सं० ‘ उपहसित ’ पहा] पु० थट्टा, फजीती, टवाळकी. ॐ**उपहासास्पद** वि० १ ज्याचा उपहास केला जातो असा. २ उपहासाला पात्र.

उपहास्यता [सं० ' उपहासित ' पहा] **स्त्री०**
थट्टेला विषय होणें.

उपहित [**सं०** उप (जवळ)+हित (ठेवि-
लेलें; धा=ठेवणें)] **वि०** १ ठेवलेलें. २ केलेलें.
३ मिश्रित. ४ युक्त, सहित. ५ फितुर केलेला.

उपळ [**सं०** उत्प्लवन] **स्त्री०** १ फार पाऊस
पडल्यामुळें जागोजाग झरे उत्पन्न व्हावे अशी भूमीची
अवस्था. २ फार पावसामुळें उत्पन्न होतात जे झरे
ते प्रत्येक. ३ फुरसें, घोणस, इ० डसलें असतां
सर्वांगांतून रक्त पाझरतें अशी जी शरीरास अवस्था
प्राप्त होते ती. ४ पावसाळ्यांत डोंगरावरून नवीन
उत्पन्न झालेल्या झऱ्याचा प्रवाह. ५ स्त्रियांचा मासिक
रजःस्राव कांहीं विकृतीमुळें फार वाहातो तो.
॰**उपळवट** **वि०** १ पाण्यानें थबथबलेली (जमीन).
२ जींतून सदा झरे वाहात असतात अशी (जमीन).
उपळवटा **पु०**, **उपळवट** **स्त्री०** १ पाण्यानें थब-
थबलेली जमीन. २ धनधान्याची समृद्धि किं० वैपुल्य;
(**क्रि०** होणें, येणें, इ०). **उपळवणी** **स्त्री०** १
पाण्यानें थबथबलेल्या जमीनींतून वाहाणारा झरा
किं० पाण्याचा प्रवाह. २ (लाक्षणिक प्रयोग)
अशाश्वत किं० क्षणभंगुर वस्तु (संपत्ति, वैभव,
आयुष्य, इ०) ॰**उपळ खाणें** दमा, खोकला, ताप,
इ० चा उद्भव किं० एकदा थांबल्यावर त्यांचा पुन्हां
उद्भव.

उपळणें [**सं०** उत् + प्लु (वाहणें)] **अ०**
क्रि० १ पृथ्वीच्या पृष्ठभागीं पाण्याचा अधिक साठा
झाल्यामुळें झरे, ओहोळ, इ० उत्पन्न होऊन वाहूं
लागणें. २ उष्ण विकृतीमुळें दांतांतून किं० शरी-
राच्या अन्य स्थानांतून रक्त वाहाणें. ३ जमीनींत
पाणी फार झाल्यामुळें झाडांचीं मुळें सईल होऊन
झाडें उलथून पडणें.

उपळी [**सं०** ' उत्प्लवन ' पासून] **स्त्री०** पाव-
साळ्यांत जमीनींतून उत्पन्न होणारा किं० डोंगरा-
वरून वाहणारा झरा किं० पाण्याचा प्रवाह.

उपज्ञा [**सं०** उप+ज्ञा (जाणणें)] **स्त्री०**
१ प्रथम ज्ञान. २ अपूर्व कृति.

उपाई, उपायीं [**सं०** उत् (वर) + **म०**पाय]
क्रि० वि० १ घोडा, खेचर, इत्यादिकांनीं पुढील
दोन पाय उभारून मागच्या दोन पायांवर उभें
(राहाणें); उ० घोडा उपायीं नाचूं लागला तेव्हां
मी त्याच्या गळयाला घट्ट मिठी मारली. २ क्रोधानें
बेफाम होऊन; उ० तो उपाई काठी उभारून माझ्या
अंगावर धावून आला तेव्हां मी तकटधुम ठोकली !

उपाकरण, उपाकर्म [**सं०** उप+आ+कृ
(करणें)] **न०** १ पशुयज्ञ. २ आरंभ. ३ वेदा-
ध्ययनारंभ. ४ यज्ञोपवीत (जानवें) धारण कर-
णारे जे ब्राह्मणक्षत्रियादि लोक त्यांचें यज्ञोपवीत
धारण करण्याचें प्रतिवार्षिक जें कर्म तें.

उपाख्यान [**सं०** उप (गौण)+आ+ख्या
(सागणें)] **न०** पोटकथा, मोठ्या गोष्टींत प्रसंगानें
आलेली लहान गोष्ट; उपकथा.

उपांग [**सं०** उप (गौण)+अंग (भाग,
अवयव)] **न०** १ पोटभाग. २ पुरवणी. ॰**उपांग-
ललिता** **स्त्री०** आश्विन शुक्र पंचमीस पूजितात
ती देवी.

उपांत [**सं०** उप (जवळ)+अंत (शेवट)]
वि० शेवटच्याच्या मागला. **पु०** १ सीमा, कड, कांठ.
२ डोळ्याचा कोपरा. ३ सांनिध्य. ४ बाजू.

उपात्त [**सं०** उप+आत्त (घेतलेला; आ+
दा=घेणें)] **वि०** १ गृहीत, संपादित. २ पकड-
लेला. ॰**उपात्तवर्ण** **वि०** सर्वत्र गायिलेला;
गाण्यांत स्तविलेला.

उपांत्य [**सं०** उप (जवळ)+अंत्य (कडेचा)]
वि० शेवटच्याच्या आलीकडचा.

उपादान [**सं०** उप+आ+दा (देणें)] **न०**
१ घेणें, स्वीकार. २ मिळविणें, संपादन. ३ परि-
चय. ४ समावेश. ५ पदार्थांपासून इंद्रियें परत घेणें.
६ कारण. ७ पदार्थांचें घटक द्रव्य; उ० घटाचें
उपादान माती. ॰**उपादान कारण** **न०** पदार्थांचें
घटक द्रव्य.

उपादेय [**सं०** ' उपादान ' पहा] **वि०** १
ग्राह्य. २ उत्कृष्ट.

उपाद्धिक, उपाधपण, उपाधीक, उपाध्यपण
[**सं०** उपाध्याय=गुरु] **न०** उपाध्यायाचें काम.
॰**उपाधपेठीचें सगंग** किं० **पागोटें** **न०** उपा-
ध्यायाला द्यावयाच्या योग्यतेचें (भिकारी, टाकाऊ,
किं० खरखरीत पोताचें) सगंग किं० पागोटें.

उपाधि [**सं०** उप (जवळ)+आ+धा
(ठेवणें)] **पु०** १ लबाडी. २ विशेष गुण. ३
नियामक गोष्ट; शर्त; अट. अग्नीपासून धूर उत्पन्न

होतो, जर अज्ञान आर्टिन्धन असेल तर; येथें आर्टिन्धन हा उपाधि. ४ खूण. ५ कारण. ६ धर्मचिंतन. ७ पदवी. ८ (**न्याय**) साध्यांत असून साधनांत नियमानें नसणारें कारण. मराठींत **उपाध** असेंही **स्त्री०** अपभ्रष्ट रूप असून त्याचे अर्थ पुढील आहेत. १ उपद्रव. २ लचांड, शुक्लकाष्ट. ३ पंचाईत, विवंचना.

उपाध्या [सं० उपाध्याय=गुरु] **पु०** 'उपाध्याय' पहा.

उपाध्याय [**सं०** उप+आ+ध्यै (शिकणें)] **पु०** १ गुरु. २ वेतन घेऊन वेदादि शिकविणारा.

उपाय [**सं०** उप+इ (जाणें)] **पु०** १ इलाज, प्रतिकार. २ युक्ति. ३ पद्धति. ४ राजनीतींतील साम, दान, दंड आणि भेद हे शत्रूला आपल्या ताब्यांत आणण्याचे चार मार्ग. ह्या चारांच्या समुच्चयाला "उपायचतुष्टय" म्हणतात. *__उपायी__ **वि०** उपाय किं० युक्ति शोधून काढण्यांत चतुर **किं०** हुशार.

उपायन [**सं०** उप+अयन (जाणें)] **न०** देणगी, नजराणा, भेट.

उपायीं मागें 'उपाई' पहा.

उपार [**सं०** उपाहार] **पु०** तांदूळ, डाळ, गूळ, इ० चें देवांना किं० भूतपिशाचांना अर्पण.

उपार्जणें [सं० उपार्जन; उप+अर्ज् (मिळविणें)] १ लाघवीपणानें एखाद्याची मर्जी संपादणें. २ मिळविणें, संपादणें.

उपार्जन न०, उपार्जना स्त्री० [सं० उप+अर्ज् (मिळविणें)] संपादन, प्राप्ति, मिळविणें.

उपार्जित [**सं०** 'उपार्जन' पहा] **वि०** मिळविलेलें, संपादिलेलें.

उपाव 'उपाय' ह्याचें अपभ्रष्ट रूप. 'उपाय' यथास्थानीं पहा.

उपावणें अ० क्रि० १ पायाच्या चवड्यावर उभें राहाणें (माणसानें). २ मागल्या दोन पायावर उभें राहाणें (घोडा, खेचर, इ०नीं).

उपाशी [सं० उप+वस् (राहाणें)] **वि०** १ ज्यानें उपोषण केलें आहे असा. २ ज्यानें कांहीं खाल्लें नाहीं असा.

उपांशु [**सं०**] **वि०** १ गुप्त, मनांतील. **पु०** १ मनांत केलेला जप. २ मौन. **क्रि० वि०** १ हलक्या स्वरानें. २ गुप्तपणानें. ३ एकान्तांत.

उपास [**सं०** उप+वस् (राहाणें)] **पु०** उपवास; धार्मिक विधि म्हणून कांहीं न खाणें. *__उपास आनास पु० अ० व०__ धर्मश्रद्धेनें केलेले उपवास आणि देहकष्ट. **उपासकर (-करी) वि०** ज्यानें उपोषण केलें आहे असा. **उपासतान पाहाणें** मुलाच्या किं० जनावराच्या खाण्यापिण्याची काळजी घेणें. **उपासतान काढणें** खाण्यापिण्याचे किं० काळजीकाढ्याचे कष्ट सोसणें. **उपासतापास पु०** धार्मिक बुद्धीनें उपोषणें आणि देहकष्ट करणें. **उपासमार स्त्री०** खावयाला न मिळाल्या कारणानें आलेली किं० सोसलेली अडचण किं० आलेले हाल. **तो पिकलेल्या झाडाखालीं उपाशी मरेल** तो इतका आळशी आहे कीं तो त्या झाडाचें फळ तोडून भूक शांत करणार नाहीं.

उपासना [**सं०** उप (जवळ)+आस् (बसणें)] **स्त्री०** १ सेवा. २ पूजन. ३ धनुर्वेदाभ्यास. ४ चिंतन. ५ गृह्याग्नि.

उपास्य [सं० 'उपासना' पहा] **वि०** उपासनेला विषयभूत; उ० माझ्या मातामहाचा उपास्य देव शंकर होता; माझ्या माऊस भावाचा उपास्य देव गणपति आहे.

उपाहार [**सं०** उप+आ+हृ (हरणें)] १ फराळ. २ श्रेष्ठ माणसास देण्याचें अन्न. टीप— फराळ ह्या अर्थी 'उपहार' असें रूप चुकीचें आहे.

उपाळी स्त्री० थट्टा; टवाळकी.

उपिकणें अ० क्रि० फार पिकल्यामुळें नासणें.

उपिठणें अ० क्रि० पापडी, खापरपोळी इ० जे वाफेनें शिजावयाचे पिठाचे पदार्थ त्यांचें, किं० भाकरी इ० चें वाफ गेल्यामुळें किं० अग्निसंयोग यथास्थित न झाल्यामुळ कांहीं भागीं पक्व होऊन आणि इतर भागीं पक्व न होऊन शुष्क आणि नीरस होऊन भेगाळणें.

उपिठणें अ० क्रि० अग्निसंयोग व्हावा तसा न झाल्यामुळें भाकरी वगैरे भेगाळणें.

उपीठ वि० अग्निसंयोग व्हावा तसा न झाल्याकारणानें भेगाळलेली (भाकरी, इ०).

उपेग [**सं०** उपयोग] **पु०** उपयोग, प्रयोजन.

उपेड वि० उंचवट्याची आणि उघडी जमीन.

उपेक्षण न०, उपेक्षा स्त्री० [सं० उप+ईक्ष

(पाहाणें)] १ हयगय. २ अनादर, तिरस्कार. ३ त्याग, सोडणें. ४ दुर्लक्ष्य.

उपेक्षणीय, उपेक्ष्य [सं० उप+ईक्ष् (पाहाणें)] **वि०** विचारांतून गाळण्याजोगा; हिशेबांतून सोडून देण्याच्या लायकीचा.

उपेक्षित [सं० 'उपेक्षा' पहा] **वि०** अनादृत; तिरस्कृत; विचारांत किं० हिशेबांत न घेतलेला.

उपोढ [सं० उप+वह् (नेणें, वाहणें)] **वि०** १ जवळचा. २ वाढलेला; वृद्धिंगत. ३ विवाहित. ४ रचलेलें (सैन्य).

उपोद्घात [सं० उप+उत्+हन् (मारणें)] **पु०** १ आरंभ. २ ग्रंथप्रस्तावना. ३ उल्लेख. ४ प्रसंग. ५ तत्त्वशोधन.

उपोद्बलक [सं०] **वि०** समर्थन करणारा; पाठिंबा देणारा; दृढ करणारा; दुजोरा देणारा.

उपोषण [सं०] **न०** उपास, उपवास.

उपोषित [सं०] **वि०** ज्याणें उपास केला आहे असा; ज्याणें कांहीं खाल्लेलें नाहीं असा; उपाशी.

उफट वि० रोगामुळें किं० चिंतेमुळें निस्तेज आणि फिक्का झालेला.

उफटणें अ० क्रि० रोगामुळें किं० काळजीमुळें निस्तेज होणें.

उफणणें स० क्रि० उंचावरून धान्य खालीं सोडून सुपाच्या वाऱ्यानें त्यांतील भुसकट उडवून लावणें.

उफणणें, उफाणणें अ० क्रि० १ मूल, रोप, वासरूं, इ० लवकर आणि जोरानें वाढून लठ्ठ आणि गुटगुटीत होणें. २ चिडणें, चिधळणें. ३ तोंडावर किं० शरीराच्या इतर भागांवर रोगाचा उद्रेक होणें. ४ बिब्बा, शेराचा किं० उंबराचा चीक, वस्त्र्याचा ओरखडा इ० शरीराला लागून त्वचेवर पुरळ किं० फोड येणें. ५ फळें, दूध, इ० उबाऱ्यानें नासून किं० आंबट होऊन निरुपयोगी होणें. ६ गर्वानें फुगणें.

उफर, उफरा पु० १ वृक्ष, लता, इत्यादिकांस प्रतिवर्षी फळें, पुष्पें, यांचे येतात जे बार ते प्रत्येक.

उफरणें स० क्रि० वाऱ्याच्या झोतांत उंचावरून सूप, इ० तून धान्य खालीं सोडून त्यांतील भुसकट उडवून लावून तें धान्य स्वच्छ करणें.

उफराटणें, उफरांडणें अ०क्रि० १ उलटें होणें. उलटणें. २ अंगांतील मस्तीमुळें किं० गर्वामुळें किं० कैफामुळें डोळे चढणें; उ० दारू प्याल्यामुळें त्याचे डोळे उफराटले आहेत; उ० मुलाची एल् एल् बीची परीक्षा उतरली तेव्हां पासून जानकीबाई जशी उफराटून गेली आहे !

उफराट सुफराट, उरफाटा सुरफाटा वि० उलटासुलटा; आंतला भाग बाहेर आणि बाहेरचा भाग आंत ज्याचा झाला आहे असा; खालचा भाग वर आणि वरचा भाग खालीं ज्याचा झाला आहे असा.

उफराटा वि०उलटा. ॐ**उफराटी दुनिया स्त्री०** खऱ्याची किंमत न ओळखणारें, चांगल्याला वाईट आणि वाईटाला चांगलें म्हणणारें, न्यायाला अन्याय आणि अन्यायाला न्याय म्हणणारें जग म्ह० जगांतील लोक; उ० मी माझ्या माऊस भावाच्या शेतांची प्रामाणिकपणानें व्यवस्था लावून दिली, थकलेल्या बाकया मोठ्या कष्टानें वसूल करून दिल्या आणि तुम्हीं म्हणतां कीं मीं पैसे खाल्ले ! म्हणा बोवा ! उफराटी दुनिया आहे ! **उफराट्या बाहुल्यांचा वि०** ज्याला पदार्थ फार जवळ असल्याशिवाय दिसत नाहीं असा माणूस; उ० तुमच्या पुतण्याच्या उफराट्या बाहुल्या आहेत; त्याला लवकर चष्मा विकत घेऊन द्या, नाहींतर त्याचे डोळे खराब होतील. **उरफाट्या काळजाचा न०** अत्यंत धाडसी किं० कठोर (माणूस). **उरफाटें भांडण न०** ज्यानें आपणास प्रेमानें, दयेनें, न्यायानें आणि खरेपणानें वागविलें त्याच्याशीं कृतघ्नपणानें केलेलें भांडण किं० वैर. **उफराटें शहाणपण न०** मूर्खपणा.

उफलणें अ० क्रि० १ उमलणें, विकसित होणें. विकासणें (फुलें इ०). २ मन प्रफुल्लित होणें. ३ (दैव) अनुकूल होणें.

उफळ, उफळणें मागें 'उपळ', 'उपळणें' पहा.

उफळणें अ०क्रि० नांगराच्या फाळानें उकरली जाणें (जमीन).

उफाडा, उफाटा पु० जोराची वाढ; वाढीचा जोर. ॐ **उफाड्याचा वि०** मोठ्या हाडापेरांचा; आहे त्यापेक्षां अधिक वयाचा दिसणारा; ज्याची वाढ फार जोरानें झाली आहे किं० होत आहे असा

(मुळ्या, मुळी, वासरूं, इ०). **उफाड्याची जमीन स्त्री०** सकस जमीन आणि लवकर पीक देणारी जमीन. **उफाड्याचें झाड न०** लवकर आणि जोरानें वाढणारें झाड (मुलाचें किं० वासराचें). उफाड्याचा याच्या उलट **खुजट.**

उफाणणें ' उफणणें ' पहा.

उफान पु०, न० १ पाणी वगैरेंना आलेला पूर (**क्रि०** येणें). २ उतास जाण्याची स्थिति. ३ **उफानगिरी स्त्री०** उधळपट्टी; बेतालपणें केलेला खर्च किं० खर्च करणें.

उफारटा ' उफराटा ' पहा.

उफारशेल्या पु० मित्राशीं, हितकर्त्यांशीं, किं० आश्रयदात्याशीं भांडणारा किं० वैर करणारा.

उफाळ वि० १ गरजेपेक्षां किं० जरूरीपेक्षां अधिक. २ अडचणीच्या प्रसंगीं उपयोगाला यावी म्हणून बाजूला काढून ठेविलेली रक्कम किं० सामग्री.

उफाळ, उफाळा पु० १ कढणें, कढून बुडबुडे येणें. २ सपाट्यानें किं० जोरानें बाहेर उसळणें (झऱ्याचें पाणी, क्षुब्ध मनोविकार, इ०). ३ पुरून उरणारा भाग किं० परिमाण.

उफाळणें अ० क्रि० १ कढणारें पाणी बुडबुड्यांच्या रूपानें उसळणें. २ ज्वाळा किं० जोराचा झरा उसळून उंच जाणें किं० बाहेर पडणें. ३ जोराचा आणि क्षुब्ध झालेला मनोविकार शब्दांच्या किं० हालचालींच्या रूपानें प्रकटणें किं० बाहेर पडणें. ४ धान्य वगैरे मोजतांना तें अंदाजापेक्षां किं० पूर्वीं मोजलेल्या परिमाणापेक्षां अधिक भरणें. ५ नांगराच्या फाळानें उकरलें जाणें.

उफाळणें स० क्रि० धान्यादिकांना वारा घालून त्यांतील केरकचरा उडवून लावणें.

उफिट वि० फिक्का, निस्तेज.

उफिटणें अ० क्रि० फिक्का किं० निस्तेज होणें.

उफणणें, उफिणणें अ० क्रि० १ दूध, फळ, इ० उबावल्यामुळें नासून निरुपयोगी होणें. २ जोरानें वाढणें. ३ बिब्बा, शेराचा किं० उंबराचा चीक उतणें आणि त्वचेवर पुरळ उठणें. ४ गर्वानें उन्मत्त होणें.

उफेणें अ० क्रि० तरंगून वर येणें (पाण्यांत टाकलेलें लाकूड इ०).

उबक पु० १ वांति. २ मनोविकारांचा उद्रेक.

उबग पु० कंटाळा, विटस; त्रास, खंती (**क्रि०** धरणें).

उबगट वि० उबट; धान्य किं० फळें कोंडलेल्या हवेंत असल्यामुळें कुरसणें किं० निःसत्त्व, नीरस, पचपचीत, किं० आंबूस होणें.

उबगणें अ० क्रि० १ दाटीनं किं० संकुचित जागेंत सापडल्यामुळें उबावणें किं० गुदमरणें. २ कंटाळणें. ३ घाबरणें; अस्वस्थ होणें. **स० क्रि०** १ अवमानणें; उपेक्षिणें, तुच्छतेनें वागविणें. २ समजणें, ओळखणें.

उबजणें स० क्रि० उबजे तांदूळ करावयासाठीं भातावर जी क्रिया करावी लागते ती करणें. खालीं ' उबजा ' पहा.

उबजणें अ० क्रि० टवटवीत आणि सतेज होणें; जोरानें वाढूं लागणें, (प्राणी, झाड, इ०).

उबजरा पु० टवटवीत आणि सतेज होणें; जोराची वाढ (**क्रि०** येणें, आणणें), उ० हीं केळ्यांचीं रोपें ह्या जमीनींत लवकर उबजऱ्यास येतील. उ० ह्या मुलाला माल्टीन सुरू केल्यापासून तें उबजऱ्यास येऊं लागलें.

उबजळणें अ० क्रि० कंटाळणें, त्रासणें.

उबजळा पु० कंटाळा, त्रास, अस्वस्थपणा; (**क्रि०** येणें, आणणें, लावणें, लागणें).

उबजा पु० भातावर आधण घालून तें भात खापरांत भाजून निवळून कांडलें असतां जे तांदूळ होतात ते (**अ० व०** उबजे).

उबजें न० उबजे तांदूळ करावयासाठीं पाण्यांत घातलेलें भात.

उबट [**म०** ऊब] **वि०** १ कोंदट किं० आकुंचित जागेंत असल्यामुळें कुरसलेलें किं० नासलेलें किं० आंबुसलेलें, (फळ, धान्य, इ०). २ अशा फळ इ० ना येत असलेली (घाण). ३ साधारण कढत. थोडेसें कढत (पाणी, तापकऱ्याचें अंग, इ०). ४ फार उबावल्यामुळें नासलेलें किं० आंबुसलेलें (फळ किं० धान्य).

उबटणें [**म०** उबट] **अ० क्रि०** १ कोंदट हवेंत असल्याकारणें आंबुसणें, नासणें किं० सडणें. २ आंबे वगैरे फळें न पिकतां सडणें.

उबटाण [**म०** उबट+घाण] **स्त्री०** उबटपणाची किं० कोंदटपणाची घाण.

उबणें [**म०** ऊब] **अ० क्रि०** कोंडलेल्या, संकुचित, किंo गर्दीच्या जागीं असल्यामुळें गुदमरणें किं० अस्वस्थ होणें. २ तापणें; ऊष्म्यानें व्याकुळ होणें. ३ दाटीमुळें घामेजणें. ३ कोंदट हवेंत असल्यामुळें नासणें, (आंबा इ०). ४ कोठारांतील किं० तळघरांतील धान्य नासणें किं० कुरसणें. ५ गळूं इ० पिकण्याच्या किं० फुटण्याच्या स्थितीस येणें. ६ (**भावकर्तृक**) कोंदटपणाची आणि गुदमरल्याची भावना उत्पन्न करण्याची हवेची स्थिति असणें; उ० आज फार उबत आहे; उ० कालच्या इतकें आज उबत नाहीं.

उंबत्रा पु० दाराच्या चौकटीचें वरचें लाकूड आणि खालचें लाकूड अशीं जीं दोन लाकडें असतात त्यांपैकीं खालचें लाकूड.

उबदरणें अ० क्रि० १ पुटकुळी, गळूं, इ० पिकून फुटावयाच्या दशेस येणें. २ जीव उबावणें; ऊष्म्यानें घामेजणें. ३ ऊष्म्यानें किं० कोंदट हवेनें गुदमरणें.

उंबर [**सं०** उदुंवर] **पु०** १ उंबराचें झाड. २ उंबराचें फळ; उंबर. ३ एक प्रकारचा वडा,– ज्याला मध्यें भोक पाडलेलें नसतें. ॐ **भरल्यापोटा उंबर कडू** पोट भरलेलें असतां चांगलीं आणि थोडकीही खाद्य वस्तु नकोशी वाटते. ॐ**उंबरें फोडून केंबरें काढणें** १ उंबराच्या फळांतील क्षुद्र जंतूंना केंबरें म्हणतात; मोठ्या कामाची नासाडी करून जेव्हां कोणी माणूस लहान काम करतो तेव्हां त्यानें '' उंबरें फोडून केंबरें काढलीं '' असें म्हणतात. २ भलत्याच कामीं कष्ट करून अत्यल्प लाभ मिळविणें किं० मुळींच टाकाऊ वस्तु मिळविणें. **उंबराचें फूल न०** दुर्मिळ किं० वारंवार दृष्टीस न पडणारी वस्तु किं० माणूस; उ० अहो गोजराबाई, तुम्हीं आलीकडे अगदीं उंबराचे फूल झालां आहां (म्ह० आम्हाला अगदीं भेटेनाशा झाला आहां किं० अगदीं क्वचित् प्रसंगीं भेटतां).

उंबर वि० दमट (जमीन, शेत, इ०).

उंबरठा [**म०** उंबरा] **पु०** उंबरा; दाराच्या चौकटीचें खालचें आडवें लाकूड.

उबरणें अ० क्रि० १ खरजेचे फोड, गळूं, देवीचे फोड, इ० पुवाळणें म्हणजे त्यांतून **पू** वगैरे वाहण्याच्या दशेस येणें. २ भात वगैरे धान्याचा गठ्ठा बांधला जात असतां तो आकारास येणें. ह्या गठ्ठयाला ' मुडा ' म्हणतात.

उबरणें स० क्रि० भाताचा मुडा बांधला जात असतां आकारास येणें.

उबस वि० जें खाल्लें असतां क्षतांतून किं० फोडांतून पू किं० लस वाहूं लागते असें खाद्य,– पावटा, वाटाणा, भोपळा, पोपई, इ०.

उंबरा पु० १ दाराच्या चौकटीचे वरचें आडवें लाकूड आणि खालचें आडवें लाकूड; विशेषतः खालचें आडवें लाकूड; वरच्या आडव्या लाकडाला ' माथा ' असें बहुतकरून म्हणतात. २ (लाक्षणिक अर्थ) गावांतील घरांची संख्या; उ० ह्या गांवांत दीड लाख उंबरा आहे (म्ह० वसतीचीं घरें आहेत). ॐ**एकाद्याच्या घराचा उंबरा न ओलाडणें** त्याच्या घरांत न जाणें, किं० जाणें वर्ज करणें (वैर उत्पन्न झाल्याकारणानें किं० वैमनस्य उत्पन्न झाल्यामुळें). **एकाद्याच्या उंबऱ्याची साल काढणें** किं० **सोलणें** किं० **न राहूं देणें** त्याच्या घरीं वारंवार जाणें,–त्याला उपद्रव होईल इतके वेळां; उ० माझी मुलगी तुम्ही आपल्या मुलाला करून घ्या म्हणून सांगावयाला गोविंदराव इतके वेळां आला कीं त्यानें उंबऱ्याला साल राहूं दिली नाहीं. **एकाद्याच्या उंबऱ्याला माती न राहूं देणें** अर्थ वरच्याच सारखा. **उंबरघाट पु०** घराचा उंबरा हाच कोणी डोंगराचा घाट, जो ओलांडणें कठिण असतें. ॐ**उंबरघाट ओलांडणें कठिण असतें** डोंगराचा घाट ओलांडणें सोपें पण घरांतून बाहेर पडून नोकरीसाठीं किं० व्यापारासाठीं परगांवीं जाणें फार कठिण असतें; अशा प्रसंगीं घरांतून बाहेर पडणें जिवावर येतें. **उंबरपट्टी स्त्री०, उंबरसारा पु०** घरपट्टी.

उबलक (–ख) वि० १ अगणित, विपुल. **क्रि० वि०** मोघमपणें; संदिग्धपणें; अस्पष्ट रीतीनें.

उंबला पु० पिंगट किं० तांबड्या रंगाचा एक प्रकारचा मुंगळा (यांचा दंश थोडीशी वेदना उत्पन्न करतो).

उंबलें न० पोहे किं० लाह्या करावयासाठीं पाण्यांत भिजत घातलेलें भात, जोंधळे, इ०.

उबवणें, उबावणें भावकर्तृक क्रि० १ उकडत असणें. २ गुदमरत असणें. ३ घामेजणें. उ० येथें फार उब (–बा–) वतें.

उबवरा वि० ऊब यथास्थित न जिरल्यामुळे चिकट किं० चवचवीत झालेला (भात, खिचडी, इ० खाद्य).

उबवलें न० उबट आणि कोंदट जागा.

उबविणें [**म०** ऊब] **स० क्रि०** १ गवताच्या उष्णतेनें किं० उबाऱ्यांत ठेवून पिकविणें (आंबे वगैरे फळें, विड्याचीं पानें इ०). २ अंडीं (कोंबडीचीं इ०) उबाऱ्यांत ठेवून लवकर फुटण्याच्या दशेस आणणें. ३ गहूं इ० पोटिसें लावून लवकर फुटण्याच्या किं० फोडण्याच्या दशेस आणणें. ४ (लाक्षणिक अर्थ) कोंदट आणि बिनवाऱ्याच्या ठिकाणीं मनुष्याला ठेवून किं० बसवावयाला भाग पाडून अस्वस्थ करणें; उ० आधीं मुंबईची राहाणी, आणि तशांत तुमची नाकपुडी एवढी खोली, मी कालपासून येथें जसा उबविला जात आहें.

उबसाण [**म०** ऊब + घाण] **स्त्री०** उबटपणाची किं० कोंदटपणाची घाण; उबट आणि कोंदट जागेला येणारी घाण.

उबळ स्त्री० उमड; खोकल्याची किं० दम्याची एक लहर किं० जोराची एक उसळी.

उबळक क्रि० वि० १ निकालांत न काढलेल्या स्थितींत. २ पक्का न ठरवितां (कांहीं सौदा किंमत, मसुदा, शर्त, इ०). **वि०** पक्क्या हिशेबांतून वगळावयाच्या (रकमा किं० बाबी).

उबळणें अ० क्रि० १ मर्यादेबाहेर उष्णता पोचल्याकारणानें बिलबिलीत होणें किं० नासणें किं० सडणें (आंबा इ० फळें). २ स्त्रियांचा गर्भ जिरून जाणें.

उंबळी स्त्री० एक जातीचा वेल.

उबार स्त्री० हातीं असलेली किं० खेळती शिल्लक. **वि०** रोजखर्चावर पूर्वदिवशीं निघालेली शिल्लक जी दुसरे दिवशीं जमा धरली जाते ती.

उबारणें [**म०** ऊब] **अ० क्रि०** १ कोंदट जागेंतलि उष्णतेनें नासणें किं० सडणें (फळें, शिजविलेलें खाद्य इ०). २ ऊष्म्यानें अस्वस्थ होणें. ३ खरूज, गळवें, देवी, इ० मधून लस किं० पू निचरणें किं० बाहेर पडूं लागणें. ४ देवी वगैरेंचे फोड रटाटून फुगणें. **स० क्रि०** १ (अंडीं इ०) उबेमध्यें ठेवणें. २ गवताच्या थरांत आंबे इ० फळें घालणें किं० घालून पिकविणें. ३ बागेमध्यें बीं पेरावयासाठीं वाफे तयार करणें. ४ केश अस्ताव्यस्त करणें. ५ वस्तूंच्या मांडणांत अव्यवस्था करणें.

उबारा [**म०** ऊब] **पु०** १ उष्णता. २ कोंदटलेल्या जागेंतील उष्णता किं० उबटपणा. ३ पैशाची ऊब **म्ह०** पैसा; उ० रामभाऊ राहतो कंगालासारखा पण त्याच्यापाशीं उबारा आहे हो! त्याणें नाच्याच्या जिटगीवर चांगलाच डल्ला मारला आहे ! ४ कडतपणाची स्थिति (**क्रि०** देणें). इतर अर्थ ' ऊब ' मध्यें पहा.

उबाल न०, उबाला पु० वेली आणि झाडेंझुडपें ह्यांच्या फांद्यांची गुंतागुंत.

उबावणें [**म०** ऊब] **भा० क०** क्रि० उकडणें; उ० ह्या खोलींत ह्या दिवसांत भारी उबावतें. **अ० क्रि०** १ ऊष्म्यानें फार व्याकुळ होणें; उ० ह्या तुमच्या खोलींत मी अगदीं उबावून गेलों आहें; गच्चीवर चार फेऱ्या करून येतों. २ आढींतील आंबे वगैरेंना फाजील उष्णता पोचणें. ३ उभें राहाणें.

उभड, उभडा पु० १ उद्रेक किं० जोराचा प्रवाह किं० स्फोट (जखमेंतून रक्ताचा, डोंगरांतून झऱ्याचा, गळवांतून पुवाचा, इ०). २ मनोविकाराचा उद्रेक.

उभणें [**म०** उभा राहाणें] **अ० क्रि०** पडत असलेला पाऊस थांबणें किं० खळणें. २ आढींतील आंबे वगैरेंना फाजील उष्णता पोचणें. ३ उभें राहाणें.

उबाळणें [**म०** ऊब] **अ० क्रि०** १ कढणें. २ ऊब अधिक झाल्यामुळें बिघडणें (फळें, खाद्यें, इ०).

उबाळा [**म०** ऊब] **पु०** १ हवेची उष्णता. २ उन्हाळा; कोरडा ऋतु. ३ जोर (आधणाचा, प्रवाहाचा, इ० चा). ४ उद्रेक (मनोविकारांचा); (**क्रि०** येणें). ५ अग्नीच्या ज्वाळांची उसळी किं० भडकणें. ६ तांबटांचें ऐरणीसारखें एक साधन; त्यावर घडवावयाचें भांडें ठेवून त्यावर ठोके मारतात.

उबाळूं [**म०** ऊब+अवाळूं] **न०** उष्णकाळीं ऊष्म्याच्या योगानें शरीरावर गळवासारखी गांठ उठते ती.

उंबील पु० मुंगीसारखा पण मोठा आणि तांबडा किडा; उंबला.

उबेणें [**म०** ऊब] **अ० क्रि०** मागें 'उबणें'पहा.

उभगात, उभट पुढें ' उभा ' मध्यें पहा.

उभय [सं०] वि० दोन्हीं; दोघे. **-कुलें** न० अ० व० आईबापांचें कुल आणि नवऱ्याचें किं० बायकोचें कुल अशीं दोन्ही कुलें; उ० ती पोरगी एका मुसलमानाची रखेली झाली; तिनें उभय कुलांना बट्टा लावला. **-गामी** वि० दोहोंकडे लागणारा, जाणारा, असणारा, जोडलेला, अन्वित, राहाणारा, इ०. **-चर** वि० दोहीं स्थानीं संचार करणारा (प्राणी); म्ह० जमीन, पाणी, आणि हवा, ह्यांपैकीं कोणत्याही दोन ठिकाणीं राहूं शकणारा प्राणी, (बेटकुळी, इ० प्रमाणें). **उभयतः** क्रि० वि० दोहोंकडून; दोन्ही पक्षीं; ह्या रीतीनें आणि त्याही रीतीनें. **उभयतः पाशरज्जु** स्त्री० दोहोंकडून पेच; इकडे आड आणि तिकडे विहीर अशी स्थिति. **उभयता** वि० दोघेही; दोघीही. **उभयतोमुखी** स्त्री० १ वितेसमयीं वत्साचें तोंड मात्र बाहेर पडलें आहे अशा अवस्थेंतील जी गाय ती. २ दोन फाट्यांनीं वाहणारी नदी किं० झरा. **-दर्शी** वि० दोन्ही बाजू किं० पक्ष विचारांत घेणारा. **-द्वारें** न० अ० व० शरीराचीं दोन गुह्य द्वारें,-गुद आणि उपस्थ. **-निष्ठ** वि० दोन्ही पक्षांचें हित पाहणारा. **-लोक** पु० अ० व० भूलोक आणि स्वर्गलोक. **-विध** वि० दोहोंप्रकारचा; चांगला आणि वाईट; सरळ आणि वाकडा; अनुकूल आणि प्रतिकूल. **-साधारण**, **-सामान्य** वि० दोहों पक्षीं सारखाच लागू पडणारा; दोहों पक्षांस सारखाच मान्य; उ० कांहीं व्रतें स्मार्तांची, कांहीं वैष्णवांची आणि कांहीं उभयसाधारण आहेत. **उभयान्वयी अव्यय** न० (व्या०) दोन वाक्यांना जोडणारा शब्द; उ० आणि, व, परंतु, किंवा, इ०. **उभयार्थ** वि० १ दोन अर्थांचा. २ संदिग्ध. ३ ज्याचें दोन अर्थ संभवतात असा. **उभयालंकार** पु० ज्यांत शब्दालंकार आणि अर्थालंकार असे दोन्ही आहेत असा. **उभरंग** वि० १ फिक्का, मजीत झालेला (रंग); ज्याचा रंग फिक्का पडला आहे असा (वस्त्रादि पदार्थ).

उभरणें स० क्रि० १ धान्य वगैरेंतील केरकचरा वाऱ्यानें उडवून लावणें. २ धान्य इ० भरणें किं० ओतणें. ३ उभा होणें किं० उभा करणें.

उभरा वि० १ फिक्कया रंगाचा (वस्त्रादि पदार्थ). २ फिक्का झालेला (रंग).

उभवण [म० उभा] न० अंगावर पर्जन्य न पडावा म्हणून त्याच्या निवारणार्थ छत्री, इरलें, टोपी, इ० जें घेतात तें.

उभवण [म० उभा+वीण] स्त्री० मागावर वस्त्र विणावयासाठीं जीं उभीं सुतें लांबलचक ताठ ताणून ठेविलेलीं असतात तीं; ह्या उभवणींतून जीं आडवीं सुतें धोट्यानें शिरकावतात त्यांना 'आडवण' ह्मणतात.

उभवणी [म० उभा, उभविणें] स्त्री० १ उभें करणें, उभारणें. २ दारिद्र्याच्या, संकटाच्या, अडचणीच्या, आजाराच्या, किं० निराशेच्या स्थितींतून बाहेर पडावयाला एकाद्या मागसाला मदत करणें. ३ घोटाळ्यांत किं० अव्यवस्थेंत असलेला एकादा व्यवहार किं० काम सुरळीत चालूं लागेल असें करणें. ४ उभी केलेली वस्तु किं० व्यवस्थित पायावर पुन्हां घातलेला व्यवहार किं० काम.

उभवणें [म० उभा होणें किं० राहाणें] अ० क्रि० ताठ होणें; उभारलें किं० उठविलें जाणें. २ आजारांतून उठणें. ३ दारिद्र्याच्या किं० पंचाईतीच्या स्थितींतून मुक्त होणें. ४ (पाऊस) थांबणें, खळणें, किं० पडावयाचा बंद होणें.

उभाविणें [म० उभें करणें] स० क्रि० १ उभें करणें; उभारणें; रचणें; बांधणें. २ एकाद्याला थांबविणें; त्याची गति कांहीं काळ थोपविणें; त्याला कुंठित करणें. ३ पर्जन्य टाळणें किं० चुकाविणें; पर्जन्य थांबेपर्यंत थबकून राहाणें; उ० मी पर्जन्य उभविला आणि मग घराच्या बाहेर पडलों. ४ जातें, विरीट, इ० नें दळणें वगैरे झाल्यावर तें भिंतीशीं उभें करून ठेवणें. ५ डोकीचे केस विसकटणें.

उभस्वना [सं० उत् (वर)+भर्त्सना (निंदा)] स्त्री० निंदा, बेआबरू, उपहास्यता, फजीती, बदलौकिक; उ० त्याची रांडबाजी माझ्या कानावर येतांच मी त्याची चांगली उभस्वना केली.

उभळ, उभळण स्त्री० खोकल्याची पोटांतून जी जोराची उसळी येते ती. स्त्री०, पु० परमावधीस पोंचलेली उत्कंठा; अत्यंत अधीरपणा; पराकाष्ठेची उत्सुकता. स्त्री० सुपानें उभळण्याची क्रिया करून पृथक् होतो जो कणांश तो. याला 'उभळणें' पद्य. पु० जमीन, क्षत, गळूं, जखम, इ० कांतून

पाण्याचा, रक्ताचा, रसेचा, किं० पुवाचा जो जोराचा प्रवाह बाहेर पडतो तो; उभट.

उभळणें स० क्रि० १ कांहीं पिठप्राय आणि कांहीं कणप्राय असे जे कणीक, सोजी, कोंडा, कणी, इ० मिश्रित पदार्थ ते सुपांत घालून कांहीं विशिष्ट प्रकारची गति आणि झामटे सुपाला देऊन निरनिराळे करणें. २ नवी टांकी दिलेल्या जात्यांचे दगडाचे कण त्या जात्यांत कांहीं तरी दळून काढून टाकणें. ३ जात्याला टांकी कशी काय लागली आहे हें कांहीं दाणे दळून पाहून ठरविणें. ४ पूर्वी दळलेल्या धान्याचे कण नवें धान्य दळावयाच्या अगोदर काढून किं० झाडून टाकणें. ५ (दारू) कढविणें.

उभळणें, उभळेणें [म० उभळ] अ० क्रि० अति उत्कंठित होणें; अति उत्सुकतेनें व्याकुळ होणें.

उभा [सं० उत् + स्तंभ् (थांबणें, अटणें)] वि० १ पडलेला नव्हे तो; आडवा नव्हे तो. २ उभारलेला; रचलेला. ३ चालू असलेला; थांबलेला किं० बंद केलेला नव्हे तो, (व्यवहार, धंदा, व्यापार, कोणतेंही काम, इ०). ४ कापून न काढलेलें शेतांतील (पीक). ५ तयार किं० सिद्ध; उ० माझा घोडा विकत घ्यावयाला कोणी उभा राहिला म्हणजे मी किंमत सांगेन. ६ न शमलेलें, न विझलेलें, मंद न पडलेलें (वैर, भांडण, वैमनस्य, इ०). ७ सर्व; सबंध; आरंभापासून अंतापर्यंत(वर्ष, महिना, आठवडा, इ० कालाचा अवधि); उ० मी उभ्या वर्षांत घराच्या बाहेर पडलों नाहीं; उ० गोजराबाई उभ्या चातुर्मास्यांत मला भेटल्या नाहींत. ८ न खळलेला (पाऊस, वारा, इ०). ९ ज्याच्या धारा लंबरेषेंत पडत आहेत असा (पाऊस). १० अगदीं समोरचा किं० थेट तोंडावर येणारा (चालणाऱ्या गलबताच्या पुढून येणारा वारा). ११ ज्याची गति कुंठित झाली आहे किं० कुंठित करण्यांत आली आहे असें (वाहन, गाडी, घोडा, होडी, इ०); उ० रामा, थोडा वेळ टांगा उभा कर, मी ह्या माझ्या मित्राला ही छत्री देतों.

※**उभगात [म० उभें+गात्र] न०** बाजेचा लांब लांकडें (उजवी आणि डावीकडचा); माथ्याकडच्या आणि पायगताकडच्या लांकडांना आडगात म्हणतात. **उभट, उभंड, उभंटा वि०** उंच रचनेचें किं० बांधणाचें किं० मांडणीचें किं० घडणीचें; उभ्या आकाराचें (भांडें, पेटी, टोकीला बांधलेला रुमाल, इ०). **उभांग वि०** उंच बांध्याचा; उंच कुडीचा. **उभा पाहारा पु०** खडा पाहारा; काळजीपूर्वक केलेली राखण. **उभा दांडा पु०** चोपदारागीं; खडा. **उभें काम न०** जरूरीचें; तातडीनें केलें पाहिजे असें; चालू केल्यावर न सोडतां घेऊन असें काम. **उभें वैर, दावा, किं० द्वेष** न विझलेलें, न विझविता येण्याजोगें वैर इ०. **उभा दोरा पु०** धावती शिवण (ह्याच्या उलट 'टीप'). **उभा वारा पु०** न खळणारा किं० असंचलित वारा. **उभा रस्ता पु०** सबंध रस्ता; सरळ रस्ता. **उभा लगाम पु०** कमानदार लगाम. **उभी चाकरी स्त्री०** श्रमदायक किं० जिकिरीची चाकरी. **उभी चौथ स्त्री०** कृष्णपक्षांतील चतुर्थीच्या दिवशीं सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत पायांवर उभें राहाण्याचें व्रत पाळणार लोक ह्या तिथीस ' उभी चौथ ' म्हणतात. **उभी दुपार स्त्री०** ऐन मध्यान्ह. **उभी रास स्त्री०** वांटण्या पाडावयाच्या अगोदर रास करून ठेविलेलें, पीक किं० धान्य. **उभी विळी स्त्री०** न मिटणारी विळी (भाजी चिरण्याचें साधन विशेष). **उभें दुखणें न०** अंथरुणाला न खिळविणारें दुखणें; साधारण दुखणें,–जें आलें असतां मनुष्य हिंडूं फिरूं शकतो. **उभी कुडी स्त्री०** उंच आणि सडपातळ बांधा किं० अंगलट. **उभा खड्या किं० सुळका पु०** लंबरेषेंत असलेली डोंगराची बाजू. **समशेर घेऊन उभा** दोष काढून शासन करावयाला तयार; समशेर=तरवार. **उभा करणें.** १ थांबविणें. २ लंबरेषेंत ठेवणें; उ० समई आडवी पडली आहे ती उभी कर. ३ परत मिळविणें; उ० मिरचीच्या व्यापारांत पडलेलें भांडवल उभें केल्याशिवाय मी तांदुळाच्या व्यापारांत एक पैसाही घालणार नाहीं. **एकाद्याला उभा धरणें** त्याला छळीत किं० तगादा करीत असणें; त्याला विसावा न घेऊं देणें; उ० तुझें मूल भारी रडकें; आज सारा दिवस त्यानें मला उभें धरलें आहे; उ० सावकारानें विश्वंभरभटाला कर्जासाठीं आज आठ दिवस उभें धरिलें आहे. **एकाद्याला उभा जाळणें** त्याला जाच करणें किं० छळणें. **घामानें उभा न्हाणें** घामानें सर्वांगीं डबडबून जाणें. **उभा राहाणें** १ मिळणें; परत मिळणें. २ सिद्ध किं० तयार होऊन

राहाणें किं० असणें. ३ जवळ येऊन ठेपणें; उ० माझ्या मुलीचें लग्न उभें राहिलें आहे, तुम्हाला मी पैसे कसे उसने देऊं? ४ प्रतिबंध किं० हरकत करावयाला वाटेंत येणें; उ० आम्हासारख्या गरीबांच्या हौसा कशा भागणार? जेथें तेथें पैशाची उणीव उभी राहाते. ५ घडून येणें; उ० त्यावेळीं एक गोष्ट उभी राहिली, तेणेंकरून माझा बेत जागच्याजागींच राहिला. **एकाद्याला उभा असणें** त्याला मदत करावयाला सिद्ध असणें. **एकाद्याच्या सावलीस उभें न राहाणें** त्याची संगत न धरणें; त्याचा सहवास टाळणें. **उभ्यानें यावें आणि ओणव्यानें जावें** येतेसमयीं आपण ताठ्यांत आलों असलों तरी जातेसमयीं नम्रपणानें जाण्याला कचरूं नये; प्रसंग पडेल त्याप्रमाणें वागावयाला आपली तयारी असली पाहिजे. **उभें नेसणें, उभें लावणें, उभें लावून घेणें** लुगडें वगैरे अंगाभोंवतीं अर्धवट गुंडाळून घेणें. **उभा ईंद्र करणें** एकाद्या कामाला पुन्हां सुरवात करणें. **एकाद्याला उभें वारें सुटणें** त्याला अस्वस्थ वाटणें; त्याला चैन पडेनासें होणें; येथून उठून आपण दुसरीकडे केव्हां जातों असें त्याला होणें. **उभ्यां उभ्यां, उभ्यां उभ्यांनीं क्रि० वि०** तत्काळ; आतांच्या आतां. **उभ्या घाई क्रि० वि०** उत्कंठेनें, आवेशानें, जोराजोरानें. **उभ्यानें क्रि० वि०** उभें राहून. **उभ्यानें मुतावयाचें मग गुरूला काय विचारावें?** स्वैर आचार केल्यानंतर गुरूजींना त्याच्या योग्यायोग्यतेसंबंधानें शास्त्राधार विचारण्याचा काय उपयोग?

उभागत [सं० उभय + गत] **क्रि० वि०** वाटण्या पाडावयाच्या अगोदर (शेताचें पीक, पैसा-आडका, इ०).

उभार [म० उभा आकार] **वि०** उभ्या आकाराचें, घडणीचें, मांडणीचें किं० रचनेचें (ह्याच्या उलट 'बसकट').

उभारणी [म० उभें करणें किं० होणें] **स्त्री०** १ उभें करण्याची किं० होण्याची क्रिया. २ मांडणी, योजना; कच्ची रचना किं० जुळवा जुळव. ३ शिवायाच्या अगोदर कपड्याचे तुकडे जुळवून पाहाणें. ४ आटत ठेविलेला जो उसाचा रस, दूध, इ० त्यांना जे अनेकवार कढ येतात ते प्रत्येक. **गुळाचें आधण इ० उभारणीस येणें** सिद्धसमीपावस्थेस येणें.

उभारणें [म० उभें करणें] **स० क्रि०** १ ताठ करणें; उभें करणें; उभें रचणें किं० मांडणें. २ आरंभणें, सुरू करणें. ३ एकाद्याला टेका किं० आधार देऊन त्याचें काम सुरळीत चालेल असें करणें. ४ एकाद्याला कांहीं करावयाला चेतावणें किं० उत्तेजित करणें; त्याला उठविणें. ५ पहिल्यापेक्षां अधिक उंच करणें. ६ तर्क, कल्पना, किं० योजना चालविणें किं० बसविणें. ७ वस्तूचे अवयव जुळवून पाहाणें, – ते अवयव पक्के जोडून ती वस्तु बनवावयाच्या अगोदर. **अ० क्रि०** १ उभें होणें; उभें राहाणें; ताठ होणें. २ गळूं इ० उठणें. ३ आनंद, प्रेम, आश्चर्य, इ० भावनांनीं ताठ होणें (अंगावरचे केश).

उभारत क्रि० वि० १ मोघमपणें, संदिग्धपणें. २ संदिग्ध किं० अनिर्णीत स्थितींत. ३ वाटण्या न पाडतां (शेत, इ० च्या).

उभारतपणा पु० निःपक्षपातीपणा; समतोलपणा.

उभारा [म० उभा] **पु०** १ परिमलाचा किं० सुगंधाचा उद्भव आणि प्रसार. २ चालू असण्याची स्थिति. ३ चालू क्रियेचा जोर किं० सकसपणा.

उभारा (–ळा) पु० १ नालबंदाची ऐरण. २ उमाळा, उद्रेक. ३ उठावणी, उभारणी, उत्पत्ति. ४ चालू राहाणें, स्थिरता. ७ मांडणी, आकृति.

उभारू पु० १ ताठपणा, ताठा, उन्मत्तपणा. २ उभें किं० ताठ असण्याची स्थिति. ३ दारिद्र्याच्या किं० आजाराच्या स्थितींतून निभावणी किं० निस्तरणी.

उमखा स्त्री० १ इच्छेचा उद्भव; मनोविकाराचा उमाळा. २ प्रवृत्ति (कांहीं कामाकडे).

उमग [म० खालीं 'उमगणें पहा] **पु०** १ दृष्टोत्पत्तीस येणें, आढळून येणें, प्रत्ययास येणें (क्रि० पडणें, पाडणें). २ शोध.

उमगणें [सं० उत् (बाहेर) + मज्ज् (बुडणें)] **स० क्रि०** हुडकून किं० शोधून काढणें. **अ० क्रि०** १ दृष्टोत्पत्तीस येणें; उकलणें; कळून येणें. २ उघडकीस येणें; प्रकट होणें.

उमग्या [म० उमगणें] **पु०** माग लावणारा; तपास करणारा; पत्ता काढणारा.

उमचळणें अ० क्रि० उत्सूत किं० लवंडून

पडणें (झाड, रोपा, इ०). ॐउमचळून पडणें. उलथून किं० लवंडून पडणें.

उमज [म० खालीं 'उमजणें' पहा] **पु०** १ समजूत. २ उलगडा, शंकानिवृत्ति. ३ निर्णय. ४ आकलनशक्ति. ५ शहाणपण.

उमजणें [**सं०** उत् (बाहेर)+मज्ज् (बुडणें)] **स० क्रि०** जाणणें, ओळखणें; बुद्धीनें आकळणें. **अ० क्रि०** समजणें; दिसून किं० आढळून येणें; बुद्धिगोचर होणें.

उमजीक [**म०** उमजणें] **वि०** १ तल्लख बुद्धीचा; ज्याचा लवकर उमज पडतो असा. २ समजूतदार.

उमट पु० १ ठसा, रेघ, आकृति, इ० स्पष्टपणें उठणें किं० दिसूं लागणें. २ मनोविकारांचा मुद्रेवर दिसणारा ठसा. ३ परिस्फुटता.

उमटणें अ०क्रि० १ दृग्गोचर होणें; दृष्टोत्पत्तीस येणें; दिसूं लागणें. २ मनोविकारांचा ठसा मुद्रेवर प्रादुर्भूत होणें. ३ (आवाज, सूर, शब्द, इ०) स्पष्टपणें ऐकूं येणें. ४ (मनांत) ठसणें. ५ प्रतिबिंबित होणें. ६ पूर्वीं अस्पष्ट असलेलें चित्र, रेघा, ठसा, इ० कांहीं संस्कारविशेषामुळें स्पष्टपणें उठणें किं० वठणें.

उमदळणें भा० क० क्रि० वांति होईल असें वाटणें; पराकाष्ठेची खंती उत्पन्न होऊन किं०किळस वाटून पोटांत उचलून येणें; मळमळणें, कळमळणें; उ० मला उमदळतें; उ० माझ्या पोटांत उमदळत आहे. **स० क्रि०** ढवळून गढूळ करणें (पाणी इ०).

उमदा [**अ०** अम्दाह्] **वि०** उत्कृष्ट, उत्तम, सर्वोत्कृष्ट (माणूस, घोडा, आंबा, तांदूळ, इ०).

उमप, उमाप वि० पुष्कळ, मनमुराद, अघळपघळ, ऐसपैस, विपुळ.

उमर [**अ०** अम्र] **स्त्री०** वय, वयोमान.

उमराव [**अ०** 'अमीर'चें **अ० व०** 'उमरा'] **पु०** वडा माणूस (मुसलमानांसंबंधानें).

उमलणें [**सं०** उत् (वर)+मील् (मिटणें)] **अ० क्रि०** १ उघडणें, उवडून विस्तीर्ण होणें. २ विकासित होणें, फुलणें, (फूल, फुलाची कळी, इ०). ३ भेगा पडून फुटणें (पाणी पडल्या कारणानें चुन्याच्या कळ्या, जमीन, भिजविलेल्या धान्याचे दाणे, इ०). ४ मन किं० वृत्ति आनंदित होणें; मनांतील आनंदामुळें (चेहरा) टवटवीत दिसणें. **स० क्रि०** १ खिळ्याचा माथा बळाविणें किं० हातोडीनें ठोकून फुलविणें. २ सुवर्णादिकांचा दागिना डाग न लावतां सांधावयासाठीं त्या स्थळीं केवळ क्षार लावून अग्निसंयोगानें द्रवबून बसविणें, जडविणें किं० चिकटविणें. ३ भिजत घातलेले पावटे, हरभरे, इ० सोलणें.

उमलें [**स०** उमळणें] **न०** लाह्या, पोहे, इ० करावयाच्यासाठीं पूर्वी भिजत घालून ठेवितात जें भात, जोंधळा, इ० तें.

उमळ [**म०** उमळणें] **स्त्री०** १ मळमळ, वांतीची भावना (**क्रि०** सुटणें). २ फार पाऊस पडल्यामुळें जमीनींतून झरे उद्भवतात तें प्रत्येक; किं० असे झरे उद्भवण्याची जमीनीची होते जी अवस्था ती. ३ फुरसें, घोणस, इ० डसलें असतां सडलेल्या अंगांतून रक्त पाझरतें अशी शरीराची अवस्था, किं० हें रक्ताचे पाझर ते प्रत्येक. ४ उष्णतेनें किं० दमट हवेनें फळें नासण्याची स्थिति. ॐ**शेतांना उमळ पडणें** अतिशय पाऊस झाल्यामुळें शेतें कुजूं लागणें.

उमळट [**म०** उमळणें] **न०** पावसाळ्यांत उत्पन्न झालेला झरा किं० ओहोळ.

उमळणें स० क्रि० कपडे, भांडीं, इ० पाण्यांत खळवळून धुणें. **अ० क्रि०** १ पाणी फार झाल्यामुळें जमीनींत झरे उत्पन्न होणें. २ फुरसें, घोणस, इ०-च्या विषारामुळें शरीराचे कांहीं भाग कुजून त्यांतून रक्त, पू, इ० वाहूं लागणें. ३ पाणी फार झाल्यामुळें झाडाचीं मुळें सडील होणें. ४ फार उष्णतेमुळें किं० उबाऱ्यामुळें फळें सडूं लागणें. ५ फार शिळें झाल्यामुळें पाणी बेचव होणें. ६ कळी, फूल, इ० विकसणें. ७ चुना पाण्यानें विरणें. ८ वांतीची भावना होणें. ९ स्त्रीच्या पोटांतील जो कोंवळा गर्भ त्याला उष्ण विकृति झाल्यामुळें तो बाहेर पडणें.

उमळा वि० मळमळीत; पचपचीत, बेचव, नीरस, (फळें, खाद्यें, इ०).

उमळावण न० मळमळ किं० कळमळ (सुटणें, येणें, इ०).

उमा वि० साधा भोळा; अशिक्षित; छक्केपंजे ज्याचे अंगीं नाहींत असा.

उमाट पु० खालीं 'उमाठा' पहा.

उमाठ वि॰ उंचावरचा; उंचवट.

उमाटा [**सं॰** उत् (वर)+ **सं॰** मस्तक, (**म॰** माथा)] **पु॰** उंच जागा; डोंगराचा माथा. २ प्रसिद्धि, बोभाटा. ३ स्पष्टपणें एकादी गोष्ट किं॰ तिचें स्वरूप कळून येणें; उलगडा. ❀**उमाट्यास येणें** उघडकीस येणें, जगजाहीर होणें.

उमाड स्त्री॰ समुद्राचा क्षोभ.

उमाडा पु॰ १ वांतीची भावना लहरी लहरींनें होणें; उमदळून किं॰ भडभडून येणें. २ पाण्याचा जोरदार प्रवाह; चिळकांडी. ३ दुःख, प्रेम, आनंद, इ॰ मनोविकारांचा उद्रेक.

उमानणें, उमाळणें, उमापणें स॰क्रि॰ १ वजनें आणि मापें ताडून पाहाणें. २ तुलना करणें; ताडून पाहाणें. ३ तोलून किं॰ मापून वजन किं॰ परिमाण ठरवून नक्की करणें.

उमाणा पु॰ माप.

उमाप [**सं॰** उत्+माप] **वि॰** अधळपधळ; मनसुराद; यथेच्छ; पाहिजे तितकें. ❀**उमाप लगीन सावधान न॰** उधळपट्टी.

उमासा, उमास पु॰ १ मळमळ, वांतीची भावना, उचंबळा (**क्रि॰** येणें). २ क्रोध, आनंद, प्रेम, कामवासना, इ॰ मनोविकारांचा उद्रेक किं॰ उसळी किं॰ लहर. ३ गळूं इ॰ रटाटून फुगणें. ४ वादळाचा जोर; वादळाचें पूर्वचिन्ह. ५ आजाराचें पूर्वचिन्ह. ६ खोकल्याची लहर (**क्रि॰** येणें). ❀**उमासा टाकणें** विसावा घेणें.

उमाळा पु॰, उमाळी स्त्री॰ १ मळमळ; वांतीची भावना; वांतीची लहर. ६ मनोविकारांची लहर किं॰ उद्रेक. ३ कढ, कढाचा जोर, उकळी. ४ उलगडा (कामाचा, व्यवहाराचा, हिशेबाचा; **क्रि॰** पडणें). २ अग्निज्वाळांचा झोत. ६ धान्याचा रोग. ❀**उमाळीं, उमाळीस, उमाळ्यास,** किं॰ **उमाळ्यां येणें** किं॰ **पडणें** प्रकट होणें, उघडकीस येणें, जाहीर होणें.

उमेद [**फा॰** उमीद्] **स्त्री॰** १ आशा. २ अवसान. ३ आत्मविश्वास. ४ प्रौढ वय; परिपक्व वय. ❀**उमेदीस येणें** परिपक्व होणें; प्रौढ दशेस येणें. २ ॰च्या बद्दल आशा वाटूं लागणें, (फळ, मुलगा, मुलगी, बेत, योजना, इ॰संबंधानें). **उमेदवार वि॰** १ हिंमतदार; प्रौढ दशेस आलेला. **पु॰** १ परीक्षेस आलेला मुलगा. २ एकाद्या नोकरीसाठीं पुढें आलेला. **उमेदवारी स्त्री॰** १ आशा किं॰ अपेक्षा. २ आत्मविश्वास. ३ प्रौढ दशेस येणें. ४ प्रौढ दशा. ५ आपली पाळी किं॰ संधी येईतोंपर्यंत खोळंबून किं॰ वाट पाहात बसणें (**क्रि॰** करणें).

उमेराघामेरा वि॰ घामानें डबडबलेला; घामानें निथळणारा. [अमर्याद.

उमोप, उमाप वि॰ पुष्कळ, विपुल, अगणित,

उम्हास, उम्हासा पु॰ उमाळा.

उयला पु॰ पावट्याचा सोलाणा.

उरक [**म॰** उरकणें] काम घोटाळ्यांत न पडूं देतां शेवटास नेण्याचें सामर्थ्य; काम लवकर आणि शिताफीनें करण्याची ताकद. 'उरका' हाही शब्द ह्याच अर्थानें योजला जातो. ❀**कामाचा उरक पडणें** कामांतील घोटाळा नाहींसा होऊन काम शेवटास जाण्याच्या पंथास लागणें.

उरकणें स॰ क्रि॰ काम आटोपून समाप्त करणें; काम करून टाकणें. **अ॰ क्रि॰** १ समाप्त होणें. शेवटास जाणें; संपणें. २ मरणें. ३ पैसा, सामग्री, इ॰ खलास होणें. ४ आटोक्यांत असणें; आवरता येईल असा असणें; उ॰ हा बैल मला उरकत नाहीं. ❀**उरकता मार्ग,–रस्ता पु॰, –वाट स्त्री॰** प्रवासाला किं॰चालावयाला सोपा मार्ग, रस्ता.किं॰वाट.

उरकमणें अ॰क्रि॰ चिकटलेले कण गळून पडणें, (ताटाला चिकटलेलीं भाताचीं शितें, कपड्यांना लागलेला केरकचरा, मळ, इ॰).

उरग [**सं॰** उरानें जातो तो] **पु॰** साप, सर्प. ❀**उरगाशन पु॰** १ मोर. २ गरुड. **उरगेंद्र पु॰** १ शेष. २ वासुकि.

उरजा स्त्री॰ पदार्थ टिकावा किं॰ पुष्कळ दिवस कामाला यावा किं॰ सुंदर दिसावा म्हणून त्याची घेतलेली काळजी; नीटनेटकेपणा. ❀ **॰ची उरजा राखणें** म्ह॰ काळजीनें वापरणें किं॰ ठेवणें.

उरणें [**सं॰** उर्वरित=शिल्लक राहिलेलें] **अ॰ क्रि॰** पैसा किं॰ सामग्री खर्चावयाची तितकी खर्चल्यानंतर कांहीं शिल्लक राहाणें; शिल्लक पडणें; बाकी राहाणें; उ॰ पंक्तींत दीडशें लाडू मी वाढले; आतां पन्नास उरले आहेत.

उरता [**म॰** उरणें] **वि॰**अंशतः उरलेलें. ❀**उरता करणें** पूर्णपणें न दिलेलें; अंशतः बाकी ठेवि-

लेलें; उ० सव्वाशें रुपये कर्जापैकीं मी शंभर फेडले आणि पंचवीस उरते केले.

उरता [**म०** उरणें] **स्त्री०** कमताई; अपूर्णता. ॐ**उरता न ठेवणें** (किं० **राखणें, धरणें, बाळगणें,राहाणें** इ०) एकाद्याला मारतांना, निंदितांना, शिव्या देतांना, किं० झोडपून काढतांना कचर न खाणें किं० संकोच न बाळगणें किं० भीड न धरणें; उ० नान्या, तूं माझ्या वाटेस जाऊं नको; गेलास तर मी तुला असा झोडपून काढीन कीं याद रखेसी; मी तुझी उरता ठेवणार नाहीं. **एकाद्याची उरता न धरणें** किं० **न ठेवणें** १ त्याची वाट न पाहाणें; तो नाहीं म्हणून आडून न बसणें. २ त्याचा मोठेपणा न राखणें.

उरदाणा [**म०** उरलेला दाणा] **पु०** तोबऱ्यांतील धान्य घोड्यानें खाऊन उरलेले दाणे.

उरफाटणें अ० क्रि० १ उलटें होणें. २ प्रतिकूल होणें (काळ, दैवत, इ०).

उरफाटा वि० १ उलटा. २ प्रतिकूल. ॐ**उरफाटा सुरफाटा वि०** अंशतः उलटा आणि अंशतः सुल्टा.

उरवणें, उरंबणें, उरपणें [**म०** ऊर=छाती] **अ० क्रि०** घोडा, बैल, इ० नीं अतिश्रमानें किं० कष्टानें उरीं फुटणें.

उरमट [**सं०** उन्मत्त] **वि०** उद्धट, फाजील धीट; सभ्यांशीं असभ्यपणें वागणारा किं०बोलणारा.

उरमटणें अ० क्रि० असभ्य किं० उद्धट होणें.

उरवई [**म०** उरणें] **स्त्री०** शिलक; ज्यास्ती होऊन राहिलें तें.

उरवळी, उरोळी, रोवळी स्त्री० तांदूळ, डाळ, इत्यादि पदार्थ पाण्यानें धुवावयाचें जें धातूचें किं० बांबूच्या तारांचें सच्छिद्र पात्र असतें तें.

उरविणें स० क्रि० सर्व पदार्थ खर्च न करणें; कांहीं शिलक राहूं देणें; कांहीं शिलक राहील अशा रीतीनें खर्चणें.

उरशी स्त्री० ऋतुमती होऊन जिचे स्तन मोठे झाले आहेत अशी मुलगी.

उरःसर [**सं०** उरानें सरपटणारा=सर्प, इ०] **वि०** उरानें सरकत जाणारा (प्राणी, जसें सर्प, आळी, गांडूळ, इ०).

उरस्फोड [**सं०** उरस्=छाती, स्फुट्=फुटणें; स्फोट=फुटणें] **स्त्री०** एकादा विषय किं० कोणतेंही काम विद्यार्थ्याला किं० दुसऱ्या कोणाला समजावून सांगण्यासाठीं केलेले श्रम (ऊर फुटेपर्यंत); एकाद्याची समजूत पाडावयासाठीं केलेल्या स्पष्टीकरणाचे कष्ट.

उरा पु० नदीच्या पात्राच्या तळाचा उथळ भाग (जो नदीचें पाणी ओसरलें असतां मध्यें बेटासारखा होतो).

उराझुरा वि० अलग राहणारा; मोकळ्या मतानें मंडळींत न मिसळणारा.

उराड [**म०** ऊर] **न०** १ पुढें आलेली छाती. २ छाती (तुच्छतेनें). ॐ**उराड काढून चालणें** छाकटेगिरीनें किं० ऐटींत चालणें.

उरी [**म०** उरणें] **स्त्री०** शिलक, बाकी, अवशेष (**क्रि०** उरणें, येणें, इ०).

उरूबरू [**फा०** रू+ब+रू=तोंडास तोंड] **क्रि० वि०** समक्ष, समोरासमोर, देखत. **स्त्री०** पुढें असणें, समक्षता.

उरूस [**अ०** अर्स्] **पु०** १ मुसलमान साधूच्या संबंधाचा उत्सव; पीराचा प्रतिवर्षी मृत दिवशीं जो उत्सव करतात तो किं० त्या दिवशीं जी जत्रा भरते ती. २ मुसलमानांच्या लग्नांतील मेजवानी.

उरोज [**सं०** उरस्=छाती; जन्=उत्पन्न होणें] **पु०** स्त्रियांचे स्तन.

उरोटा पुरोटा पु० उणें असेल त्याची भर करणारा पदार्थ.

उरोमुरो अ० मुलाला स्तनपान दिल्यावर आया जो उद्गार काढतात तो. ॐ**उरोमुरो बाळापोटीं दूध जिरो** हें दूध मुलाच्या पोटांत पचो ! **न०** वस्तु लाटणें किं० चोरून दाबून ठेवणें; उ० त्या पैशाचें ह्यानें उरोमुरो केलें.

उरोळी स्त्री० १ शेताची हद्द दाखविण्यासाठीं घातलेला बांध किं० ढिगारा. २ रोवळी (बांबूंची किं० धातूची; तांदूळ, इ० धुण्याच्या उपयोगाची).

उर्वरित [**सं०**] **वि०** १ उरलेलें. २ अतिशय.

उर्वी [**सं०**] **स्त्री०** १ पृथ्वी. २ माती. ॐ**–मंडल न०** भूमंडल.

उलकटणें, उलगडणें स० क्रि० १ इतस्ततः फेकणें. २ अव्यवस्थित करणें. ३ ओरबाडून

काढणें. ४ पदार्थांचे अवयव किं० भाग वेगळे वेगळे करणें किं० काढणें. ५ सोडविणें, मोकळें करणें, उलगडणें.

उलखणें [सं० उत् (नष्ट)+म० लाख] अ० क्रि० १ पोटीं लाख घालून केलेला दागिना आंतील लाख दिसण्या इतका झिजणें. २ सांधकाम, खिळा, टाग, इ० निखळणें किं० नाहींसा होणें (कडी, फासा, खीळ, जोड, सांधा, इ० चा).

उलग स्त्री० मोठ्या परिमाणांतून किं० राशीं-तून शिलक राहिलेला भाग; अवशेष. ※ **उलग वारणें** किं० **उलग वारून टाकणें** शिल्लक राहिलेला भाग देऊन किं० काढून टाकणें.

उलगडणें [म० उ+ऊगटणें] स० क्रि० १ गुंडाळून किं० घडी करून ठेविलेलें जें वस्त्र त्याची घडी मोडून पसरणें किं० वापरावयाच्या स्थितींत किं० नीट पाहातां येईल अशा रूपांत आणणें. २ गुंतलेला दोरा किं० घातलेली वेणी उलगडून साफ करणें. ३ यंत्र वगैरेचे अवयव पृथक् करणें. ४ गुंडाळून ठेवलेला पदार्थ मोकळा किं० उघडा करणें. ५ समाप्त करणें; संपविणें; निकालास लावणें. ६ दुर्ज्ञेय विषय स्पष्ट करणें; ०चा खुलासा करणें. अ० क्रि० १ मोकळा होणें. २ उघडा होणें, साफ होणें, स्पष्ट होणें. ३ रचलेला किं० व्यवस्थित रीतीनें ठेवलेला पदार्थ ढासळणें. ४ पंचाईत, शंका, घोटाळा, अडचण, पेच, गुंतागुंत, इ० नाहींशी होणें. ५ निकालास किं० शेवटास लागणें. ६ आजार हटणें. ७ विशिष्ट ऋतु (उन्हाळा, पाव-साळा, इ०) संपणें.

उलगडा [म० उलगडणें] पु० १ पेच, पंचाईत, अडचण, घोटाळा, किं० शंका, यांचें निरसन. २ दुर्बोधता किं० दुर्ज्ञेयता किं० काठिण्य यांचें निराकरण. ३ अव्यवस्थित वस्तूंची केलेली व्यवस्थित मांडणी.

उलगणें अ० क्रि० संपणें, समाप्त होणें, उर-कणें, निकालास किं० शेवटास लागणें (लग्न, मुंज, इ० कार्य; तारुण्य, इ० दशा; वसंतादि ऋतु). स० क्रि० १ समाप्त करणें. २ शेत, बाग, मळा, इ० तील पिकें, फळें, धान्यें, इ० काढून घेणें. ३ बारदानांतून पदार्थ बाहेर काढणें. ४ कांहीं काम, कार्य किं० व्यवहार, आटोपणें, आवरणें, किं० शेवटास नेणें. ※**उलगा उलग, उलगामालगी** स्त्री० १ एकाद्या कामाचा किं० व्यवहाराचा पसारा आवरणें. २ एकादें कार्य समाप्त झाल्यानंतर त्यासंबंधाचा जो सामानसुमान इ०चा पसारा त्याची आटपाआटप करणें. **उलगाघाल** स्त्री० १ व्यर्थ खटपट; रिकामा खटाटोप. २ लहान मुलांच्या खोड्या किं० त्यांनीं केलेली अव्यवस्था. ३ भलभलतीं कामें करणें. ४ उठाठेव.

उलघाल स्त्री०१ आजारी माणसाची अस्वस्थ-पणानें धडपड किं० तडफड. २ ऊष्मा, तहान, भूक, इ० मुळें आलेला अस्वस्थपणा (क्रि० होणें). ३ भलभलत्या खटपटी.

उलट [म० उलटणें] पु०, स्त्री०१ पूर्वस्थिती-वर येणें. २ पूर्वींचा जोर, सामर्थ्य, इ०चा पुनः उद्भव, प्रादुर्भाव, किं० पुन्हा येणें. ३ वळलेली दोरी, इ०चें उलगडणें. ४ वचनभंग, एकदा किं० पूर्वीं कबूल केलेली गोष्ट अमान्य करणें किं० नाक-बूल करणें किं० तद्विरुद्ध वागणें (क्रि० खाणें). ५ परत फेड करणें (वैराची, उपकाराची, वस्तूची, पैशाची इ०). स्त्री० ओकारी, वांति. क्रि०वि०उलट पक्षीं; दुसऱ्या पक्षीं; ह्याच्या ऐवजीं किं० बदलीं; उ० तुझे जवळ मी पैसे उसने मागावयाला आलों होतों, पण उलट तूंच मजपाशीं पैसे उसने माग-तोस, तेव्हां आतां मोठी पंचाईत आली. ※**उलट तपासणी** स्त्री० फेरतपासणी; तपासणीचें परीक्षण. **उलट खाणें** उलटणें; शमलेल्या आजाराचा पुन्हा उद्भव होणें. **उलटकर** वि० बहुतेक निराधार म्हणून किंचित् धक्का लागतांच ढासळणारा (धोंडा, रचना, बांधकाम, इ०). **उलट ढाल देणें** १ स्वपक्षीयांवर शत्रुत्व करून उठणें. २ दिलेलें वचन किं० भोगलेली प्रतिज्ञा मोडणें किं० उल्लंघणें. **उलट वारा** पु०. तोंडावरचा वारा. **उलट हुकूम** पु० १ पुन्हा दिलेला तोच हुकूम. २ पहिल्या हुक-माच्या उलट किं० विरुद्ध हुकुम. **उलटी दुनिया** स्त्री० खरें न पाहणारें किं० चांगल्याची निंदा करणारें जग. **उलटी पूजा** स्त्री० निंदा, निर्भ-र्त्सना. **उलटी बाहुली** स्त्री० पहावयाचा पदार्थ अगदीं डोळ्याजवळ घ्यावा लागतो अशी डोळ्याची रचना. **उलट्या बाहुल्यांचा** वि० ज्याला पहा-वयाचा पदार्थ अगदीं डोळयांजवळ धरावा लागतो

असा (माणूस). **एकाद्याची उलटी सुलटी करणें** किं० **उलटी सुलटी हजामत करणें** त्याची फजीती उडविणें. **उलटें शहाणपण न०** मूर्खपणा.

उलटणी स्त्री० १ एकदा मोजलेलें धान्य पुन्हां मोजणें (कांहीं शंका आल्यामुळें). २ लेखाची पुन्हा तपासणी.

उलटणें स०क्रि० १ भिन्न प्रकारें मांडणें, रचणें, जडविणें, इ०. २ लवंडणें, उपडें करणें. ३ पुन्हा करणें. ४ संपवून टाकणें (काम, कारभार, व्यवहार, सौदा, इ०). ५ उकलणें, उलगडणें, सोडविणें (कोडें, प्रश्न, स्वप्न, इ०). **अ० क्रि०** १ उपडें होणें; पालथें होणें. २ परत वळणें किं० फिरणें. दिशा बदलणें. ३ ताप, खोकला, इ० नीं पुन्हां जोर करणें. ४ गत होणें; होऊन जाणें; ओलांडलें जाणें; उ० त्याची तिशी उलटली नाहीं. ॐ**उलटून गोष्टी सांगणें, उलटून बोलणें** वडील माणसांशीं उर्मटपणें बोलणें; मर्यादा सोडून बोलणें.

उलटणें न० धान्याचा साधारण आजमास पाहण्यासाठीं तें मापावयाला घेतलेली टोपली, हारा, इ०.

उलटी [**म०** उलटणें] **स्त्री०** १ खाऊन पोटांत घातलेलें अन्न मुखावाटें बाहेर पडणें; ओकारी, वांति. २ उलट दिशेची गति (खाणें, देणें, मारणें, घेणें, इ०). ३ वचनभंग; कबूल केलेली गोष्ट नाकबूल जाणें; नव्या पक्षास मिळणें (**क्रि०** करणें).

उलटून क्रि० वि० उलट रीतीनें; पहिल्या किं० मान्य केलेल्या सरणीच्या विरुद्ध प्रकारें.

उलंडणें स० क्रि०, अ० क्रि० लवंडणें; उलथणें, सांडणें.

उलंडी [**म०** उलंडणें] **स्त्री०** होडी उपडी होऊं नये म्हणून तिला एका अंगास वावखंडांच्या टोकांस एक लाकूड बांधतात तें.

उलणें अ० क्रि० भूमि, शरीर, फळ, इ० आंतील जोरामुळें फुटणें, फाटणें, तडकणें, किं० भेगाळणें.

उलथ [**म०** उलथणें] **स्त्री०** डोंगराची किं० गांवाची अगदीं पलीकडची हद्द.

उलथणें न०, उलथा पु० १ भाकरी, पोळी, थालीपीट, इ० खाद्यांची तव्याला लागलेली बाजू वर करून वरची बाजू तव्याला लागेल अशा रीतीनें ठेवावयाचें हत्यार; कुटावयाचा, कांडावयाचा, किं० ठेचावयाचा कोणताही पदार्थ खालावर करावयाचें साधन.

उलथणें [**सं०** उत् + तल] **स० क्रि०** १ परतणें; खालची बाजू वर आणि वरची बाजू खालीं करणें. २ उलटणें; आंतली बाजू बाहेर आणि बाहेरची बाजू आंत होईल असें करणें. ३ कोणतेंही घोटाळ्याचें, जिकीरीचें, किं० कष्टाचें काम करून टाकणें. ४ हापटणें, जमीनदोस्त करून टाकणें; उ० गोविंदराव इतका भक्कम गडी पण दोन दिवसांच्या तापानें हांहां म्हणतां उलथला ! ५ लवंडून पाडणें. **अ० क्रि०** १ खालची बाजू वर आणि वरची बाजू खालीं होईल अशा रीतीनें वळणें किं०फिरणें. २ आंतली बाजू बाहेर आणि बाहेरची बाजू आंत होईल अशा रीतीनें वळणें किं० फिरणें. ३ आपटणें. ४ उलथून पडणें. ५ तडकाफडकी मरणें.

उलथा [**म०** उलथणें] **वि०** उताणा; पाठीवर निजलेला; तोंड वर आहे ज्याचें असा; (' पालथा ' याच्या उलट). **पु०** १ उत्तर (**क्रि०** देणें). २ उलट पक्ष; विरुद्ध बाजू. ३ पडीत जमीन. ॐ**उलथा पसा पु०** भीक मागण्याचा क्रम; उ० विठोबाचा जेव्हां पहावें तेव्हां उलथा पसा असतो.

उलथी [**म०** उलथणें] **स्त्री०** वळविणें, उलटणें, फिरविणें. (**क्रि०** देणें, खाणें, घेणें, इ०).

उलफा पु० ब्राह्मणादिकांस भोजनार्थ डाळ, तांदूळ, इ० जें पाकसाहित्य देतात तें; शिधा.

उलवण न० विणकामाच्या फणीला चिकटून राहिलेले तंतु.

उलागीर [**फा०**] १ प्रवासी. २ न बोलावतां आलेला माणूस.

उलाघाल, उलाढाल स्त्री० १ आजाऱ्याची धडपड किं०तडफड.२ खटपट;खटाटोप.३ कारस्थान.

उलाट स्त्री० १ वांति. २ उडी, उसळी. ३ आनंदाचें भरतें. **वि०** उलटलेली.

उलाळ, उलाळणें खालीं ' उल्हाळ ', ' उल्हाळणें ' पहा.

उलिंग न० वेठकाम, बिगार.

उलिसा वि० अगदीं थोडा.

उलूक [**सं०**] **पु०** घुबड.

उलूखल [**सं०**] **न०** उखळ, उखळी.

उलॅंढालें न० वर ' उलाढाल ' पहा.

उल्का [सं०] स्त्री० १ आकाशांतून पड-णारा तारा. २ मशाल ३ ज्वाळा. ४ कोलित. ॐ**उल्कामुख पु०** ब्रह्मराक्षस. **उल्कापात पु०** १ तुटलेला तारा; ताऱ्याचें तुटणें. २ स्वारी करून आलेल्या शत्रूनें केलेली नासाडी, जाळपोळ, इ०. ३ कोणत्याही प्रकारची नासाडी किं० मोठा विध्वंस.

उल्बण [सं०] वि० १ दाट. २ विपुल. ३ विस्तृत. ४ स्पष्ट. ५ भपकेदार. ६ भयंकर, उग्र, ७ :सह. **न०** १ वात, पित्त, आणि कफ ह्यांचा क्षोभ, किं० ह्या क्षोभापासून जी विकृति होते ती. २ मोठें संकट; नासाडी; विध्वंस. ३ कोणत्याही प्रकारचा संकटाचा प्रसंग.

उल्मुक [सं०] न० कोलीत, जळतें लाकूड.

उल्लंघ पु०, उल्लंघन न० [सं० उत् (वर)+ लंघ् (ओलांडणें)] १ ओलांडणें, पार जाणें, पली-कडे जाणें. २ अनादर, अपमान.

उल्लंघणें [सं० ' उल्लंघ ' पहा] स० क्रि० १ ओलांडणें, ०च्या पार जाणें, ०च्या दुसऱ्या बाजूस, कांठास, किं० तीरास जाणें. २ अनादरणें, अवमानणें.

उल्लंघित [सं० ' उल्लंघ ' पहा] वि० १ ओलांडलेलें. २ अनादृत, अवमानित.

उल्लसित [सं० उत् (वर)+लस् (प्रका-शणें)] वि० १ पसरलेला. २ उसळलेला. ३ प्रकाशलेला. ४ विकसलेला. ५ आनंदित.

उल्लास [सं० ' उल्लसित ' पहा] पु० १ आनंद, हर्ष. २ चित्ताची प्रफुल्लित वृत्ति. ३ रोमांच. ॐ**आधींच उल्लास त्यांत फाल्गुनमास** कोणी माणूस स्वभावानें वात्रट आणि खोडकर असून त्याला वात्रटपणा आणि खोडकरपणा करण्याची संधी मिळाली असतां परिणाम भयंकर होणारच!

उल्लासणें [सं० ' उल्लसित ' पहा] अ० क्रि० १ आनंदणें, हर्षणें. २ चित्ताची वृत्ति प्रफु-ल्लित होणें. ३ रंगेल होणें.

उल्लाळणें, उल्हाळणें अ० क्रि० १ पाण्या-तल्या पाण्यांत टप्पादिशीं उडी मारणें, किं० अशी उडी मारून बाहेर पडणें. २ आनंदानें इतस्ततः बागडणें किं० उड्या मारणें. ३ गर्वानें फुगणें.

उल्लाळणें, उल्हाळणें अ० क्रि० १ मागें लवंडणें किं० उलटणें (सामानानें भरलेली गाडी). २ मागें लवंडून पडणें (मनुष्य).

उल्लाळा, उल्हाळा पु० १ उडी (माशाची). २ आनंदाची उकळी; हर्षाचा उद्रेक. ३ गर्वानें फुगणें.

उल्लू [हिं० उल्लू=घुबड] वि० १ अमली पदार्थ ज्याच्या अंगावर आला आहे असा; अम्मल चढलेला. २ काम, क्रोध, इ० मनोविकारांचा क्षोभ परमा-वधीला गेला आहे ज्याचा असा. ३ मूर्ख, अडाणी. ४ अत्यंत उत्कंठित.

उल्लेख [सं० उत् (वर)+लिख् (रेघा काढणें, खरडणें)] पु० १ निर्देश; लिहिण्यांत ईषन्मात्र कथन. २ उच्चार; बोलण्यांत ईषन्मात्र कथन. ३ खणून किं० खरडून काढणें. ४ सहाणेवर घासणें. ५ ओरखडणें, –ला चरे पाडणें.

उल्हाट न० प्राचीनकाळीं शत्रूवर जोरानें दगड फेकण्याचें एक यंत्र होतें तें; गरनाळ; हल्लींच्या काळीं तोफेचा उपयोग जसा होतो तसा प्राचीन काळीं उल्हाटाचा होत असे.

उल्हास, उल्हासणें वर ' उल्लास ', ' उल्ला-सणें ' पहा.

उल्हाळें न० कोष्ट्याच्या मागाच्या ओवीची खुंटी किं० खीळ.

उंबला पु० पावटे, हरभरे, इ०चे जे सोले किं० सोलाणें त्यांतील एक एक दाणा.

उवला [म० ऊ] वि० उवांनीं भरलेलें (चिरगुट).

उवळ, उंवळ [म० उवळणें] वि० जितका पीळ जरूर तितका जींत नाहीं अशी (दोरी); सैल पिळाची दोरी, सुंभ, सूत, इ०.

उवळणें, उंवळणें अ० क्रि० १ सूत, सुंभ, दोरी, इ० पीळ नाहींसा होऊन सईल पडणें, किं० उलगडणें. २ आंबा, फणस, इ० फळ पाडास न येतां कांहीं विकृतीनें पिकल्यासारखें होणें. ३ फुरसें, घोणस, इ०च्या दंशामुळें अंगांतील रक्त रन्ध्रांतून बाहेर पडणें. ४ अर्धवट खची केलेला बैल कामविकार-युक्त किं० वीर्ययुक्त होणें. ५ एकाद्या माणसासंबंधानें अंतःकरण प्रेमयुक्त किं० प्रसन्न होणें.

उंवळा [म० उंवळणें] वि० १ ज्यांत मिष्टता नाहीं आणि जें खाल्लें असतां मळमळीत लागतें असें फळ (आंबा, फणस, इ०). २ नीरस (भाषण);

निस्तेज (मुद्रा); कर्तृत्वशून्य (माणूस). ३ असावा तितका पीळ नसलेला (दोरा, दोरी, सूत, इ०).

उवेर, उवेरी [म० उरणें] **स्त्री०** १ वाढावा. २ बाकी, शिल्लक. ३ कामाला पुरून राहिलेला अवशेष.

उवेरा, उवेला [म० ऊ] **वि०** उवांनीं भरलेलें (डोकें, चिरगुट, इ०).

उशागत, उशेगत [म० उसें+गात] **न०** १ गादीची डोक्याकडची बाजू. २ शेताची उंच होत गेलेली बाजू किं० कड.

उःशाप, उश्शाप, उशाप [**सं०** उत् (नष्ट) +शाप] **पु०** शापापासून सुटका करण्याचें वचन; शापनिवृत्यर्थ वर.

उशी [**सं०** उत् (वर)+शीर्षक] **स्त्री०** निजलें असतां डोक्याखालीं घेतात जो आधार तो.

उशीर पु० १ दिरंगाई, विलंब. २ अवकाश; ठरावीक समयाच्या अगोदरचा अवधि.

उशीर [सं०] पु०वाळा (एक सुगंधी गवत).

उशीरां [म० उशीर] **क्रि० वि०** १ कांहीं वेळानंतर. २ योग्य किं० ठरलेल्या वेळानंतर.

उंशील न० ऊस लावलेलें शेत.

उशेगत ' उशागत ' पहा.

उश्राप ' उःशाप ' पहा.

उश्रामा [**सं०** उत्+स्मृ (स्मरणें)] **पु०** केलेल्या उपकारांची आठवण करून देणें (**क्रि०** करणें).

उश्वास [**सं०** उत् (वर)+श्वस् (श्वास टाकणें)] **पु०** उच्छ्वास, श्वास सोडणें.

उषःकाळ [**सं०**उषस् (पहाट)+काल] **पु०** पहाटेच्या पांच घटका रात्रीपासून तीन घटका रात्र राहीतोंपर्यंत जो काळ तो.

उषःपान [**सं०** उषस् (पहाट) +पान (पिणें)] **न०** उषःकालीं नित्य नियमानें उष्णतादिनिवृत्यर्थ उदकपान करावें असें वैद्यशास्त्रांत सांगितलें आहे तें.

उष्टरखाना [**सं०** उष्ट्र=उंट; **फा०** शुतर= उंट; खाना=घर, जागा] **पु०**उंटखाना; उंट बांधावयाचा तबेला.

उष्टवड, उष्टवळ स्त्री० खालीं 'उष्टावळ'पहा.

उष्टवणी [म० उष्टें+पाणी] **न०**ज्या पाण्यांत तांदूळ धुतले आहेत, किं० ज्या पाण्यानें खरकटीं भांडीं किं० उष्टे हात धुतले आहेत असें पाणी; टाकून द्यावयाचें पाणी.

उष्टावण, उष्टवण [म०उष्टें करणें] **न०** मुलाला अन्न खाऊं घालावयाच्या प्रारंभाचा एक संस्कार किं० विधि.

उष्टा [**सं०** उत् (वर)+शिष्ट (शिलक राहिलेलें)] **वि०**१खाण्यासाठीं ज्याला तोंड लाविलें आहे असा. २ अर्धवट खाऊन टाकून दिलेलें. ३ कांहीं खाणें झाल्यानंतर न धुतलेलें तोंड, हात, इ०. ४ उष्टें धुण्याच्या उपयोगाचें (पाणी). ५ दुसऱ्यानें पूर्वी भोगिलेली, सेविलेली, किं० अनुभविलेली वस्तु. ६ दुसऱ्यानें काढिलेली, सुचविलेली (योजना, युक्ति, विचार, कल्पना, इ०). ७ भोजनांत वापरलेलें ताट, वाट्या, चमचे, इ० पदार्थ (धुवावयाच्या अगोदरच्या स्थितींतील). ॐ**उष्टा विटाळ पु०**न धासलेल्या खरकट्या भांड्याचा स्पर्श किं०न आंचवलेल्या माणसाचा स्पर्श. **उष्टी स्त्री स्त्री०** पतीनें किं० कोणाही पुरुषानें उपभोगिलेली स्त्री; विद्ध्योनि अशी स्त्री. **उष्टी पत्रावळ स्त्री०** देहविक्रय करून पोट भरणारी स्त्री; रांड; वारांगना. **उष्टी हळद स्त्री०** वधूच्या घरीं देवदेवक बसावयाच्या आधीं वधूस न्हावयास घालून तिच्या अंगास लावून उरलेली हळद वराच्या अंगाला लावावयासाठीं वाजतगाजत नेतात ती हळद, किं० ती हळद नेण्याचा विधि. **उष्टेखळी स्त्री०** उष्टें अन्न किं०पत्रावळी टाकून द्यावयासाठीं केलेला खड्डा. **उष्टा बोल पु०** पूर्वी दुसऱ्या कोणीतरी काढलेला किं० सुचविलेला परंतु आतां आपला म्हणून दिमाखानें सांगितला जाणारा विचार. **उष्टा नवरा पु०** बिजवर नवरा. **तो उष्ट्या हातानें कावळा हाकीत नाहीं** तो अति कंजूष आहे (न धुतलेल्या हातानें कावळा हाकलल्यास एखादें शीत उडून कावळ्याच्या जवळ पडेल आणि तें त्याला खावयाला मिळेल; तें शीत देखील ज्याची देण्याची इच्छा नाहीं असा).

उष्टाविणें [**म०** उष्टें करणें] **स० क्रि०** एखाद्या खाद्याला किं० पेयाला तोंड लावून उष्टें करणें किं० अर्धवट खाऊन टाकून देणें.

उष्टरखाना पु० मागें ' उष्टरखाना ' पहा.

उष्टें [**सं०** उच्छिष्ट] **न०** १ अर्धवट खाल्लेलें किं० अर्धवट खाऊन टाकून दिलेलें अन्न. २ जेवण

होऊन जमिनीवर पडलेले खाद्यांश (शेणानें सारवावयाच्या अगोदर).

उष्ट्र [**सं०**] **पु०** उंट.

उष्ण [**सं०**] **वि०** १ गरम, ऊन. २ ज्याच्या भक्षणानें कोठ्यांत आग होते असा (मिरीं, मिरची, सुंठ, इ० पदार्थ). **पु०** सूर्य, अग्नि, इत्यादींचा ताप किं० कडतपणा. ॐ**उष्णकाल पु०** उन्हाळा. **उष्णमान न०** उष्णतेचें परिमाण.

उष्णता [**सं०**] **स्त्री०** गरमपणा.

उष्मा [**सं०** उष्मन्=उष्णपणा] **पु०** उष्णता. कडतपणा. **उष्मवर्ण पु०** श, ष, स आणि ह हे वर्ण.

उसकटणें स० क्रि० १ अस्ताव्यस्त टाकणें; रचनेंत बिघाड करणें. २ उखडणें, भाग वेगळे वेगळे करणें (यंत्र वगैरेचे). ३ अव्यवस्थित करणें.

उसण, उसणव, उसणावळ स्त्री० कंबर, पाठ, इ० मध्यें एकाएकीं निघणारी तिडीक.

उसंत(-थ) [**सं०** उत्+संधि] **स्त्री०** विश्रांति; काम कांहीं वेळ बंद करून घेतलेला विसावा; फुरसत. **उसंत खाणें** किं० **घेणें** विसावा घेणें. [किं० घेणें.

उसनवट, उसनवारी स्त्री० उसने देणें

उसना वि० १ कांहीं काळपर्यंत दुसऱ्यास वापरावयास दिलेली (आपली वस्तु) किं० स्वताला वापरावयासाठीं दुसऱ्याची मागून आणलेली (वस्तु). २ मनःपूर्वक नव्हे तें (वर्तन किं० भाषण); तिऱ्हाइतासारखें. ॐ**उसनें वाण न०** दुसऱ्यानें आपणाला कांहीं वस्त्र, भांडें, इ० प्रेमपूर्वक दिलें असतां आपणही त्याला कांहीं देणें; दुसऱ्यानें आपणाला अडचणीच्या वेळीं कांहीं मदत केली असली तर आपण त्याला त्याच्या अडचणीच्या प्रसंगीं मदत करणें; प्रत्युपकार. **उसनें पासनें न०** परत देण्याच्या करारानें मागून आणलेली वस्तु.

उसनें न० परत देण्याच्या करारानें आणलेला पदार्थ (द्रव्य, भांडें, इ०). ॐ**उसनें फेडणें** सूड घेणें.

उसपण न०, उसपणी स्त्री०, उसपा पु० बारदानांतून बाहेर काढलेला पदार्थ (पाणी, धान्य, चिरगुटें, इ०).

उसपणें स० क्रि० १ पाणी, धान्य, चिरगुटें, इ० बारदानांतून बाहेर काढणें. २ होडींत तक्त्यांच्या छिद्रांतून किं० फटींतून आलेलें पाणी बाहेर काढून टाकणें. २ म्यानांतून तरवार बाहेर काढणें. ॐ**काम किं० धंदा उसपणें**, काम किं० धंदा कंटाळा आला असतांही करणें. २ कंटाळवाणें काम नाइलाज म्हणून करणें किं० करीत राहाणें.

उसंबणें अ० क्रि० रडण्याचा आवेग न आवरतां येऊन हुंदके देऊन देऊन रडणें.

उसरत, उसरपत स्त्री० खंड, खळ (करीत असलेल्या कामांत)

उसराण [**म०** ऊस+रान] **न०** उसाच्या लागवडीचें शेत.

उसरी, उसर स्त्री० भाजीच्या उपयोगासाठीं वाळवून ठेविलेल्या मेथी वगैरेंचे पाले किं० भेंडी, आळवाचे देठ, गाजरें, वांगीं, इ०च्या फोडी. ॐ**एकाद्या जनावराची किं० माणसाची उसर करणें** त्यांच्या खाण्यापिण्याची काळजी न करणें; त्याला जिवाविशेष काम करावयाला लावणें (ज्याचा परिणाम तो रोडावण्यांत होतो).

उसल, उंसल [**सं०** इक्षु, **म०** ऊस, आलय=जागा] **न०** उसाची लागवड किं० उसाच्या लागवडीचा मळा.

उसवण, उसण स्त्री० पाठींत किं० कमरेंत एकाएकीं उठणारी किं० उठलेली तिडीक.

उसवणी [**म०** उ+शिवणें] **स्त्री०** शिवणीचा दोरा काढून टाकणें किं० निघणें.

उसवणें [**म०** उ+शिवणें] **स० क्रि०** शिवणीचा दोरा काढून टाकणें. **अ० क्रि०** शिवणीचा दोरा तुटणें किं० निघणें. २ सूज कमी होणें. ॐ**उसवलें तें शिवतां येईल, पण नासवलें त्यास कोण काय करील ?** शिवण उसवली तर ती पुन्हा घालतां येईल, पण निगरगट्ट माणसाला कोणत्याही उपायानें ताळ्यावर आणतां येणार नाहीं.

उसवास, उसवासा [**सं०** उत् (वर)+श्वास] **पु०** पाण्याच्या नळाला हवेसाठीं ठेविलेलें तोंड; नळानें आणलेल्या पाण्याला मोकळेपणें वहावयाला मधून मधून ठेवतात जे अवकाश ते प्रत्येक.

उसळ [**म०** उसळणें] **स्त्री०** पावटे, मूग, हरभरे, इ०वर अग्निसंस्कार करून आणि त्यांत चवीसाठीं अन्य पदार्थ घालून जें खाद्य करतात तें.

उसळणी [**म०** उसळणें] **स्त्री०** उसळण्याची क्रिया.

उसळणें [**सं०** उच्छ्वलन] **अ० क्रि०** १ जोरानें वर येणें. २ रागानें आक्रान्त होणें; रागानें बेफाम होऊन जोरानें हालचाली करणें. ३ आवेशानें उसळी मारुन शत्रूवर हल्ला करावयाला सरसावणें. ४ धूळ इ० जोरानें उठणें. ५ धूळ, पाणी, रक्त, इ० चा जोरानें, प्रवाह सुरू होणें. ६ उडी मारणें. ७ जोरानें वाढूं लागणें, (मूळ, रोप, गळूं, आजार, इ०).

उसळपा पु० १ जाळावयासाठीं योजावयाचें लाकूड; सर्पणाचें लाकडें प्रत्येक.

उसळवट वि० पाण्याचें झरे जींत विपुल आहेत अशी (जमीन).

उसळा पु० उसळ केलेले (पावटे, कडवे, हरभरे, मूग, इ०).

उसळी, उसाळी [**म०** उसळणें] **स्त्री०** १ जोरानें वर येणें; उडी; (**क्रि०** मारणें, खाणें). २ आवेशानें पुढें सरसावणें. ३ जोरानें उठणें. ४ रागाचा, कामविकाराचा, किं० प्रेमाचा उद्रेक किं० जोराचा प्रादुर्भाव.

उसाण, उसान न० १ उधान. २ नद्यादिकांस जो अतिशय मोठा पूर येतो तो.

उसार पु० गलबत, घर, पात्र, किं० कोणतेंही बारदान यांमध्यें कांहीं पदार्थ ठेवून किं० घालून रिकामी राहिलेली जागा.

उसास पु० ' उच्छ्वास ' पहा.

उसासणें अ० क्रि० १ जोरानें श्वासोच्छ्वास करणें; धापा टाकणें. २ वयांत आलेली मुलगी स्तनप्रदेशीं भरणें.

उसासा [**सं०** उच्छ्वास] **पु०** सुसकारा, जोरानें श्वास सोडणें (क्रि० देणें, टाकणें, सोडणें). २ पाण्याच्या नळाला मध्यें मध्यें जीं हवा खेळावयासाठीं तोंडें ठेविलेलीं असतात तीं प्रत्येक. ॐ**उसासा असासा पु०** जोरानें टाकलेले सुसकारे प्रत्येक.

उसुलवार वि० जोरानें वाढणारा; फोकावणारा; उफाड्याच्या वाढीचा (प्राणी, मूळ, झाड, इ०).

उसू वि० सैल, घट्ट न बसलेला, लटपटणारा, (सांधा, कुसूं, खिळा, खुंटी, इ०).

उसें [**सं.** उच्छीर्षक] **न०** १ बिछान्याचा किं० गादीचा माथा किं० निजणाऱ्याच्या डोक्याकडची बाजू. २ उशी (डोक्याखालीं घ्यावयाची). ३ डोकें ज्यावर टेकलेलें आहे तो पदार्थ.

उसेंगात, उशागत [**म०** उसें + गात] **न०** १ गादीची डोक्याकडची बाजू. २ शेताची किं० पटांगणाची वरची बाजू.

उस्कारा, उस्कारा पु० जोराचा श्वासोच्छ्वास; धापा टाकणें.

उस्तरणें [**म०** उ, **सं०** उत् + स्तरण] **सं० क्रि०** १ घरावर कौलें, गवत, इ० जें आच्छादन असतें तें काढणें, किं० घर असल्या आच्छादनानें विरहित करणें. २ तात्पुरती केलेली रचना, मांडणी किं० उभारणी मोडून टाकणें किं० काढून घेणें. ३ मोकळें करणें. ४ उकलणें. ५ आंत भरलेला किं० साठविलेला पदार्थ बाहेर काढणें. ॐ**उस्तरा उस्तर स्त्री०** उस्तरण्याची क्रिया.

उस्तवारी [**फा०**] **स्त्री०** १ नीटनेटक्या स्थितींत ठेवणें किं० राखणें. २ गृह, शेत, पशु, इ० स योग्य समयीं योग्य उपचार करून किं० त्यांची योग्य काळजी घेऊन त्यांना चांगल्या स्थितींत ठेवणें.

उस्ताद, वस्ताद [**फा०** उस्ताद] **पु०** १ कोणत्याही विद्येंत, कलेंत, किं० शास्त्रांत प्रवीण किं० पटाईत माणूस. २ गुरु, शिक्षक (विशेषत: गायन, वादन, कुस्त्या, इ० कलांचा) ३ जिंकणारा, हटविणारा, अधिक पराक्रमी; उ० त्याच्या गमजा माझ्यापुढें किती टिकणार ? मी त्याला पक्का वस्ताद आहें. ॐ **उस्तादगिरी स्त्री०** वस्तादाचा धंदा, कौशल्य, किं० पटाईतपणा. **उस्तादी वि०** वस्तादापासून मिळविलेलें किं० शिकलेलें.

उस्तें न० प्रभातकाळाचा प्रारंभ; झुंजुक मुंजुक.

उस्मरणें अ० क्रि० १ हुंदका काढणें. २ मनोविकारानें आक्रांत होणें. ३ धापा टाकणें. ४ मनांत दबचत असलेला विचार मुखावाटें बाहेर पडणें किं० बोलून दाखविला जाणें.

उस्तारा पु० १ दम घेणें; श्रमाच्या कामानंतर विसावा घेणें. २ सुस्कारा टाकणें.

उस्ताप [**सं०** उच्छाप] **पु०** शापनिवृत्तीचा आशीर्वाद.

उंहुं उ० वा० अ० नको, नव्हे, ह्या अर्थाचें उद्गारवाचक अव्यय; उ० बाबा, मी खेळावयाला जाऊं ? उत्तर, उंहूं (म्हणजे जाऊं नको).

उहू [सं० व्यूह] **पु०** १ योजना, बेत, निश्चय, (क्रि० रचणें, काढणें); उ० रात्रीं त्याच्या घराला शंभर शिपायांनीं गराडून त्याला पकडावें असा उहू रचण्यांत आला आहे. २ सामान्य वचनाच्या धोरणाला बाध न येईल अशा रीतीनें विशेष प्रसंगीं तें वचन बदलून वर्तन करणें; उ० 'जो चोरी करील तो शिक्षा भोगतो' ह्या वचनांतून 'जी चोरी करील ती शिक्षा भोगिते' असा उहू निघतो. वरील वाक्य जरी पुलिंगीं एकवचनीं असलें तरी हाव्या त्या लिंगाचा आणि हाव्या त्या वचनाचा त्यांतून उहू काढतां येतो. ३ उपोद्घात किं० प्राथमिक निर्देश; उ० शिमग्याच्या सणांत मारुतीच्या देवळांत तमाशा करवावा असें माझ्याही मनांत आहे. पण मी आपण होऊन त्या संबंधानें गांवकऱ्यांच्या मंडळींत उहू काढणार नाहीं. तुम्ही उहू काढा म्हणजे मी तुम्हाला पाठिंबा देईन.

उळकंबणें, उळकुंबणें स० क्रि० १ लटकत ठेवणें, सोडणें, किं० टांगणें. २ फार वेळ एकाच प्रकारें लोंबत असल्या कारणानें पाय, मान, इ० भारावणें किं० ताठणें.

उळकंबा, उळकुंबा पु० लोंबकळत किं० लोंबत असण्याची स्थिति (क्रि० मारणें, येणें).

उळगाऊ, उळगी [म० उळींग] **वि०** आहेरांत देण्याजोगें; उळींग म्हणून द्यावयाच्या लायकीचें (खालीं ' उळींग ' पहा).

उळंबळणें अ० क्रि० कांठोकांठ भरून बाहेर वाहणें (नदी, पात्र, इ०).

उळा, हुळा पु० दाणे खाण्यासाठीं हरभरा, वाटाणा, इत्यादींच्या भाजलेल्या शेंगा किं० घाटे.

उळींग न० १ लोकांना अहेर करणें (जो करणें आपलें कर्तव्य आहे). २ लोकांकडून आपणाला आलेला अहेर (जो फेडणें आपलें कर्तव्य आहे). ह्या दोन्ही अर्थीं **क्रि०** वारणें, सारणें, फेडणें.

ऊ.

ऊ मराठी वर्णमालेतील सहावा वर्ण आणि स्वरमालेंतील सहावा स्वर .

ऊ, ऊं [सं० यूका] **स्त्री०** डोक्याच्या केशांत उत्पन्न होणारा एक कृमि.

ऊ उद्गार वा० अ० काय ? पुन्हा सांगा पाहूं !

ऊंः उद्गार वा० अ० छत् ! छिः !

ऊकल { **पु०** १ उलगडा. २ अनुभव. ३ विचार }.

ऊट स्त्री० १ गाडीची गति कुंठित करण्यासाठीं चाकाला जें टेकण लावतात तें (**क्रि०** देणें). २ गाडीच्या वाटेंत आलेला मोठा धोंडा (**क्रि०** लागणें). ॐ**एकाद्याचा ऊट उतरणें** (उतरणें सकर्मक) १ त्याचा नक्षा उतरणें; त्याच्या गर्वाचा परिहार करणें. २ त्याला हीनदीन स्थितीस आणणें. ३ (उतरणें अकर्मक) हीन दशेस येणें; विपन्नावस्थेस लागणें.

ऊठपाय [म० ऊठणें+पाय] **क्रि०वि०** उठल्याबसल्या; वारंवार; सदासर्वदा.

ऊठी { **स्त्री०** बाकी }.

ऊड स्त्री० ज्यास्ती उजेड घरांत यावा म्हणून खिडकी किं० दार यांच्या आंतल्या बाजू उत्तरोत्तर पसरट करतात त्या प्रत्येक.

ऊणखूण { **स्त्री०** १ वाटाघाट. २ कमीअधिकपणा }.

ऊत [म० उतणें] **पु०** १ दूध, तूप, कढी, इ० पातळ पदार्थ अग्नीवर ठेविला असतां तो कढूं लागून त्याचा पृष्ठभाग वर उचलूं लागतो आणि तो पदार्थ पात्राच्या बाहेर सांडूं लागतो; त्या पदार्थाच्या ह्या स्थितीला ' ऊत ' म्हणतात. २ तारुण्यानें अंगांत येतो जो उन्माद तो. ३ संपत्ति वगैरेंचा उत्कर्ष किं० अतिरेक. ४ रोदनाचा अनिवार उद्रेक. ४ वैपुल्य, पुष्कळपणा; उ० ढेकणांना, पिसवांना, चिलटांना, डांसांना, यंदा जसा ऊत आला आहे; उ० यंदा मक्याच्या कणसांना ऊत आला आहे; पैशाला तीन तीन मोठींमोठीं कणसें मिळतात. उ० यंदा व्याख्यानांना ऊत आला आहे.

*उतमात [म० उतणें+मातणें] पु० मस्तीचीं, दांडगाईचीं किं० आर्षपणाचीं कृत्यें (क्रि० करणें, मांडणें, इ०). २ उन्माद, आडदांडपणा, गर्विष्ठपणा.

ऊद [अ०] **पु०** एक सुगंधी चीक, जो धूपार्थ जाळतात; ह्याचे चार प्रकार आहेत. भीमसेनी, जनार्दनी, लोहबंदी, आणि कवड्या. ***ऊ(उ–)दकाडी, ऊ(उ–)दबत्ती स्त्री०** १ उदाचा लेप जीवर केलेला असतो आणि जी धूपार्थ जाळतात ती. २ खारीवलेली बोंबील (दुर्गंधीवरून लाक्षणिक प्रयोग).

ऊदफूल न० उदावर कांहीं संस्कार करून जो काळसर पदार्थ तयार करतात तो.

ऊद न० कांडेचोर म्हणून एक जनावर आहे तें.

ऊन, ऊन्ह [**सं०** उष्ण] **वि०** तापलेला, कढत. **न०** सूर्याची उष्णता; सूर्याचा उष्णतायुक्त प्रकाश. ***ऊन खाणें** सूर्याच्या उन्हांत शैत्य–निवारणार्थ बसणें. **ऊन ऊन वि०** अगदीं ऊन; प्रत्यक्ष चुलीवरून काढलेला. **ऊन ऊन आग स्त्री०** अर्थ वरच्या सारखाच. **ऊनतान न पाहाणें, म्हणणें,** किं० **करणें** ऊन वगैरेंची सबब न सांगतां कामाला लागणें. **ऊन पाऊस पु०** सूर्याचें ऊन असतां पडत असलेला पाऊस; नागवा पाऊस. **ऊन पारखा वि०** प्रेमानें वागविलेला, ज्याला घराबाहेरचे नोकरीधंद्याचे कष्ट ठाऊक नाहींत, ज्यानें कधीं कष्टाचीं कामें केलेलीं नाहींत असा. **त्याला कधीं ऊन वारा लागलेला नाहीं** अर्थ वरचाच.

ऊन [**सं०** ऊन]+**वि०** १ कमी, उणा. २ अपुरें. ३ खालच्या दर्जाचा किं० प्रतीचा.

ऊब स्त्री० १ उष्णता (कपडे वगैरेंच्या आच्छादनामुळें, अग्नि, सूर्य, इ० च्या किरणांमुळें किं० अदबशीर जागेमुळें उत्पन्न झालेली). २ प्राण्याच्या अंगाची उष्णता. ३ उष्ण वाफ (चुलीवर ठेवलेल्या पाण्याची, शिजत असलेल्या भाताची, किं० इतर जातीची). ४ संपत्तीच्या जोरावर वाटत असलेलें समाधान; संपत्ति जवळ असल्याकारणानें वाटणारा जोर किं० सामर्थ्य. ***ऊब जिंकणें** भीति नाहींशी होणें; एकाद्या नवख्या किं० मोठ्या माणसासंबंधानें प्रथम जी भीति, दरारा, भीड, संकोच इ०हीं वाटतात तीं लोपणें. **एकाद्याची ऊब जिरविणें** त्याचा नक्षा उतरणें; त्याचा गर्व हरण करणें. **भाताची** किं० **इतर खाद्याची ऊब जिरणें** शिजल्यावर कांहीं वेळ तो मुरून खाण्यालायक होणें.

ऊर [**सं०**उरस्=छाती] **न०** छाती, वक्षःस्थल. ***ऊर काढून चालणें** ऐटीनें किं० बेपर्वाईनें चालणें किं० वागणें. **ऊर लपणें** भीतीनें किं० आश्चर्यानें स्तब्ध किं० ग्रस्त होणें. **एकाद्याचें ऊर दबणें बसणें, फाटणें** किं० **उलटणें** १ तो आश्चर्यचकित होणें. २ भीतिग्रस्त. होणें; घाबरणें; गांगरणें. **ऊर दाटणें** १ छातींत बांध बसणें. २ दुःख, प्रेम, इ० भावनांनीं अंतःकरण आक्रान्त होणें. **ऊर पिकणें** १ कफानें छाती किं० घसा डबडबणें. २ बोलण्याच्या श्रमानें ग्रस्त होणें. **ऊर फोडणें** किं **ऊर फोडून घेणें** फार श्रम करणें; उ० तूं हेकट मनुष्य आहेस; तुझ्यापुढें ऊर फोडणें व्यर्थ आहे. **एकाद्याचें ऊर फोडणें** त्याचाकडून फार काम करून घेऊन त्याला त्रास देणें किं० सतावणें. **ऊर बडविणें** दुःखानें किं० आश्चर्यानें छातीवर हातांनीं ताडन करणें. **उराला** (किं० **छातीला**) **हात लावून, उरावर** (किं० **छातीवर**) **हात ठेवून** भरंवशानें, निश्चयानें, खात्रीपूर्वक, न कचरतां; न डगमगतां. **उरापोटावर उचलणें** मोठ्या कष्टानें किं० श्रमानें उचलणें. **एकाद्याच्या उरावर असणें** १ अगदीं करावयास पाहिजे असें काम त्याच्या शिरावर असणें. २ त्याच्यावर अमल करणारा किं० अधिकार चालविणारा मनुष्य असणें. ३ भारभूत झालेला असणें; उ० दहा रुपायांत माझा संसार कसा भागेल ? माझ्या उरावर भाच्याचें कुटुंब आहेना ? (ह्य० भाच्याच्या कुटुंबाला पोसण्याची जबाबदारी माझ्या शिरावर आहेना ?). **उरावर घेणें** एकादें कठिण काम करण्याचा पथकर घेणें, किं० तें करावयास निघणें. **एकाद्याच्या उरावर धोंडा ठेवणें** किं०**धोंड ठेवणें** किं० **देणें** त्याला एकादें अवघड काम करावयास सांगणें. **एकाद्याच्या उरावर बसणें** १ करावयाला पाहिजेच असें कांहीं काम त्याच्याकडे किं० त्याच्या वाटेला येणें. २ त्याला कैचींत धरणें; त्याच्यावर जबरदस्ती करणें; उ० त्या मजूराच्या उरावर बसून मीं हें काम त्याच्याकडून एका दिवसांत करून घेतलें. **एकादें माणूस उराशीं धरणें** १ त्याला नम्रपणें विनविणें किं०

प्रार्थिणें. ३ त्याला प्रेमानें कवटाळणें. **एकादी वस्तु उराशीं धरणें** ती संभाळून ठेवणें; तिची जोपासना करणें; ती शाबूत ठेवणें; तिचा भंग न होऊं देणें. **उरीं डोंगर घेणें** १ महत्त्वाचें किं० कठिण काम पथकरणें. २ फार परिश्रम करणें. **उरीं पोटीं करणें** फार श्रमानें किं० कष्टानें करणें. **उरीं पोटीं धरणें** नम्रपणें विनविणें किं० प्रार्थिणें; आर्जविणें. **उरीं फुटणें** किं० **भरणें** जिवाविशेष श्रम केल्यामुळें छाती दुखूं लागणें; अतिशय थकून जाणें. **उरीं केश माथां टक्कल** वस्तूची जेथें जरूरी तेथें तिचा अभाव आणि जरूरी नाहीं तेथें तिचें वैपुल्य. **ऊरफोड स्त्री०** उरस्फोट, अतिश्रम. **वि०** ऊर फोडणारें म्ह० कठिण. **ऊरभेट स्त्री०** छातीला छाती भिडवून घेतलेली भेट.

ऊर [**सं०** उर्वरित=उरलेलें] **स्त्री०** जें पुरून उरलें तें; गरज भागून जें उरलें तें. ＊**ऊरतूर स्त्री०** प्रेमाभाव; प्रेमाचा लोप; **क्रि०** करणें, होणें. **ऊरदुखी स्त्री०** १ छाती दुखणें. २ मत्सर. **ऊरनपूर स्त्री०** जरूर जें परिमाण त्यांत कमताई. **ऊरपूर स्त्री०** वैपुल्य; जरूर जें परिमाण तितकें असून त्याहून अधिक. **ऊरसूर स्त्री०** पुरून जें उरलें तें. **वि०** उरलेलें; खर्चून शिल्लक राहिलेलें.

ऊरु [**सं०**] **पु०** मांडी.

ऊर्ज [**सं०**] **पु०** १ शक्ति. २ उत्साह. ३ कार्तिकमास. ४ प्रजोत्पादनशक्ति.

ऊर्जा [**सं०** ऊर्ज] **स्त्री०** पदार्थ काळजीपूर्वक वापरणें किं०ठेवणें; पदार्थाची योग्य ती काळजी घेणें.

ऊर्जित [**सं०** ऊर्ज्=जगणें, बलवान् होणें] **वि०** १ मोठा. २ सामर्थ्यवान्. ३ तीव्र. ४ वृद्धिंगत. ५ श्रेष्ठ. **न०** १ शक्ति. २ उत्साह. ＊**ऊर्जितकाळ पु०**, **ऊर्जित दशा स्त्री०** वैभवाचा किं० उत्कर्षाचा काळ किं० स्थिति

ऊर्ण [**सं०**] **न०** १ लोकर. २ लोकरीचें वस्त्र. ＊**ऊर्णनाभ, ऊर्णनाभि पु०**कोळी (ह्या नांवाचा किडा).

ऊर्णा [**सं०**] **स्त्री०** १ लोकर. २ भिवयांमधील केशांचा भोंवरा. ३ लोकरीचें वस्त्र (घोंगडी, शालजोडी, इ०).

ऊर्ध्व [**सं०**] **वि०** १ उभा. २ वरचा. ३श्रेष्ठ. ४ नंतरचा.**क्रि०वि०** १ मोठ्यानें. २नंतर.३वरच्या बाजूस किं० दिशेस. **पु०** १ धाप, जोराचा श्वास. २ मरण समयींचा श्वास किं० घरघर. ३ स्वस्तिक. ＊**ऊर्ध्वगति स्त्री०** वर जाणें; वरची गति. **वि०** वर चढणारा किं० जाणारा. **ऊर्ध्वबाहु पु०** वर हात करून राहिलेला तपस्वी. **ऊर्ध्वदृष्टि वि०** १ ज्यानें वर डोळे केले आहेत असा. २ ज्याचे डोळे वर आहेत असा. ३ गर्विष्ठ, उन्मत्त. ४ महत्त्वाकांक्षी. **ऊर्ध्वदेहिक** (शुद्ध रूप और्ध्वदेहिक किं० ऊर्ध्वदैहिक). **न०** मर्तिकाचा विधि. **ऊर्ध्वनाडी स्त्री०** शरीरांतील श्वासाच्या नाड्यांपैकीं एक. **ऊर्ध्वपान न०** ताडी, माडी, इ० पेयें किं० तीं पिणें. **ऊर्ध्वमुखी गोम स्त्री०** अग्रें वर आहेत अशी घोड्याच्या अंगावर असलेली केशांची ओळ. **ऊर्ध्वरेखा स्त्री०** पायाच्या किं० हाताच्या तळव्यावर असलेली एक विशिष्ट रेषा (जी रेषा राज्यप्राप्ति किं० तीर्थयात्रा सुचविते). **ऊर्ध्वरेतस्क, ऊर्ध्वरेता पु०**, आजन्म ब्रह्मचारी. २ भगवत्प्रसादानें किं० योगसाधनानें ज्याचें रेतःस्खलन कदापि होत नाहीं असा पुरुष. **ऊर्ध्वलोक पु०** १ स्वर्गलोक. २ सप्त स्वर्गांपैकीं प्रत्येक. **ऊर्ध्ववायु पु०** मरणापूर्वी लागते जी धाप ती. **ऊर्ध्वस्वस्तिक न०** थेट डोक्यावर असलेला आकाशांतील कल्पित बिंदु. **ऊर्ध्वाधर वि०** अगदीं लंबरेषेंत असलेला. **ऊर्ध्वासन न०** उभें राहाण्याचें योग्याचें आसन.

ऊर्फ [**अ०**] **क्रि० वि०** दुसऱ्या नांवानें; व्यवहारांतील नांवानें; उ० गोविंद पुरुषोत्तम ऊर्फ नानासाहेब (ज्याचें कागदोपत्रीं गोविंद पुरुषोत्तम असें नांव लागतें, पण ज्याला लोक नानासाहेब ह्या नांवानें ओळखतात असा).

ऊर्मि [**सं०**] **पु० स्त्री०** १ लाट. २ प्रवाह. ३ प्रकाशाचा किरण किं० झोत. ४ क्षुधा, तृषा, जरा,मृत्यु, शोक, आणि मोह हे जीवाचे सहा धर्म. ५कोणत्याही मनोविकाराची उसळी. ＊**ऊर्मिमाली पु०** समुद्र.

ऊष्मा [**सं०** ऊष्मन्] **पु०** १ उकाडा; अग्नीचा किं० सूर्याचा ताप. २ उन्हाळा (ऋतु). ३ संपत्ति आपणाजवळ पुष्कळ आहे ह्या विचारानें अंगांत आलेला जोर किं० गुर्मी. ४ (**व्या०**) श्, ष्, स्, आणि ह् हीं चार अक्षरें; ᳲक्, ᳳप्, अं, आणि अः ह्या चारांनाही ऊष्मा म्हणतात.

ऊस, ऊंस [**सं०** इक्षु] **पु०** एक गवताच्या वर्गांतील झाड,—ज्याच्या ताटाच्या रसाचा गूळ, काकवी, इ० गोड पदार्थ होतात. ॐ**ऊस गोड लागला तरी मुळें खाऊं नये** गरीब किं० भोळ्या किं० उदार माणसाला अति याचनेनें सतावूं नये; कोणाही माणसाच्या सद्बुद्धीचा फाजील फायदा करून घेण्याला प्रवृत्त होऊं नये. **उसांत जाऊन वाढें आणणें** समृद्धीच्या ठिकाणीं जाऊन टाकाऊ वस्तु आणणें; (वाढें हा उसाच्या ताटाचा पचपचीत भाग असतो).

ऊसदार [**म०** उजू (सरळ किं० पुढचें) + दार] **न०** घराचें पुढचें दार; (मागच्या दाराला परसदार म्हणतात).

ऊह [**सं०**] **पु०, न०** १ अनुमान. २ तर्क. ३ सिद्धान्त. ४ ज्ञान. ५ अध्याहार. ६ धर्मविधींत फेरफार. ॐ**ऊहापोह पु०** चर्चा; वाटाघाट, शंका-समाधान.

ऊंहू उद्गार वा० अ० छे: ! छत् ! नको ! असें नव्हे !

ऊळ स्त्री० १ कांद्याच्या झाडांचें वन किं० बेट. २ कांद्याचें झाड.

ऋ.

ऋ मराठी स्वरमालेंतील सातवा स्वर आणि मराठी वर्णमालेंतील सातवा वर्ण.

ऋक्थ [**सं०**] **न०** १ धन. २ वडिलोपार्जित मिळकत.

ऋच्, ऋचा [**सं०**] **स्त्री०** वेदाची ऋचा म्ह० मंत्र. ॐ**ऋग्वेद पु०** चार वेदांपैकीं पहिला. **ऋग्वेदी** ज्याच्या कुलपरंपरेंत ऋग्वेदानें मौंजीबंधन इ० संस्कार होतात असे जे द्विज ते प्रत्येक.

ऋजु [**सं०**] **वि०** १ सरळ. २ प्रामाणिक. ३ साधाभोळा; ज्याला छक्केपंजे ठाऊक नाहींत किं० जो छक्केपंजे करीत नाहीं असा.

ऋण [**सं०**] **न०** १ कर्ज; परत द्यावयाच्या बोलीनें एका माणसापासून दुसऱ्या माणसानें घेतलेले पैसे (व्याजानें किं० व्याजाशिवाय). २ (**गणित**) वजा करावयाची रक्कम किं० परिमाण. ३ लोकांसंबंधानें आपलें आवश्यक कर्तव्य. ॐ**ऋण करणें** वजा करणें. **ऋणचिन्ह न०** जी रक्कम वजा करावयाची तिचा मागें आणि जोडून वजा करावयाची तिच्यापुढें जें चिन्ह (–) घालतात तें. **ऋण काढून सण करणें** कर्जाऊ पैसे आणून चैन करणें; उपस्थित झालेला जो खर्चाचा प्रसंग तो लोकांचे पैसे उसने आणून साजरा करणें आणि अशा रीतीनें आपली हौस भागविणें किं० आपला लौकिक बुडूं न देणें. **ऋणकरी** १ धनको,—ज्याचेपासून कर्ज घेतलेलें असतें तो. २ ज्यानें दुसऱ्याचें कर्ज काढलेलें असतें तो; ऋणको. ३ निरुपयोगी माणूस, —ज्याचा आपणाला कांहीं उपयोग होत नाहीं पण ज्याला अन्नवस्त्र दिल्याशिवाय गत्यंतर नसतें असा माणूस. ४ आपणावर वारंवार उपकार करणारा माणूस. ५ आया मुलावर रागावल्या म्हणजे त्याला ऋणकरी हा शब्द शिवी म्हणून योजतात. **ऋणग्रस्त वि०** कर्जाखालीं बेजार झालेला; ज्याला लोकांचें देणें फार झालें आहे असा. **ऋणत्रय न०** तीन ऋणें ऋषींचें (अध्ययनानें फेडावयाचें), देवांचें (यज्ञांनीं फेडावयाचें) आणि पितरांचें (पुत्र उत्पन्न करून फेडावयाचें). ह्या तीन ऋणांत हल्लींच्या काळीं देशाचें ऋण चवथें गणलें जातें. **ऋणधन न०** उसनें घेतलेले पैसे. **ऋणबद्ध वि०** दुसऱ्याच्या कर्जात (किं० उपकारांत) असलेला. **ऋणमुक्त वि०** ऋणांतून मुक्त झालेला; ज्यानें कर्ज वारून टाकलें आहे असा. **ऋणमुक्ति स्त्री०, ऋणमोक्ष पु०, ऋणमोचन, ऋणशोधन न०** ऋणांतून सुटका, ऋण वारणें. **ऋणलेख्य न०** कर्जरोखा. **ऋणाईत** ' ऋणकरी ' ह्याचा तिसरा अर्थ पहा. **ऋणाईतस्वरूपी, ऋणायस्वरूपी पु०** निरुपयोगी माणूस ज्याचा आपणाला भार वाटतो. **ऋणानुबंध पु०** १ पूर्वजन्मींचा संबंध. २ स्नेह. ३ संबंध; कांहींतरी कारणामुळें उत्पन्न झालेला आणि टिकून राहिलेला संबंध. **ऋणी वि०** उपकाराखालीं दडपलेला.

ऋतु [**सं०**] १ दोन दोन महिन्यांचे जे अवधिविशेष ते प्रत्येक; एका वर्षांत सहा ऋतु असतात ते हे; चैत्र आणि वैशाख=वसंत; ज्येष्ठ आणि आषाढ=ग्रीष्म, श्रावण आणि भाद्रपद=वर्षा,

आश्विन आणि कार्तिक=शरद्; मार्गशीर्ष आणि पौष=हेमन्त; माघ आणि फाल्गुन=शिशिर. २नियमित काळ, हंगाम (पुष्पें आणि फळें येण्याचा). ३ स्त्रियांचा मासिक स्राव. ४ संभोगकाळ (ऋतुप्राप्तीपासून सोळा दिवस). ५ सहा ही संख्या. ॐऋतुदर्शन न० स्त्रियांचा प्राथमिक मासिक स्राव. ऋतुमती, ऋतुवती, ऋतुवंता स्त्री० मासिक रजःस्रावाच्या तीन दिवसांतील स्त्री. ऋतुशांति स्त्री० स्त्रीला प्रथम ऋतु प्राप्त होतो तेव्हां तिचे ठायीं पतीनें गर्भाचें आधान करण्यासंबंधाचा धार्मिक विधि. ऋतुस्नाता स्त्री० मासिक रजःस्रावाच्या सुरवातीनंतर चवथ्या दिवशीं अंग धुऊन शुद्ध झालेली स्त्री.

ऋत्विज् [**सं०**] **पु०** यज्ञकर्म करण्याकरितां नेमिलेला ब्राह्मण (होता, इ०).

ऋद्ध [**सं०** ऋध्=समृद्ध होणें किं० करणें] **वि०** १ समृद्ध, वैभवशाली. २ वृद्धिंगत.

ऋद्धि [**सं०** ऋध्=समृद्ध होणें किं० करणें] **स्त्री०** १ वृद्धि. २ भरभराट, वैभव. ३ श्रेष्ठत्व. ४ संपादन. ५ पूर्णत्व. ६सामर्थ्य.७ पार्वती ८ लक्ष्मी. ॐ**उद्योगाचे घरीं ऋद्धिसिद्धि पाणी भरी** उद्योगशील माणूस सदा वैभवशाली असतो आणि त्याला सर्व प्रकारचें सामर्थ्य प्राप्त होतें.

ऋषवत् [**फा०** रिषवत] **स्त्री०** लाच.

ऋषि [**सं०**] **पु०** १ पुराणप्रसिद्ध तपस्वी (श्रुतर्षि, कांडर्षि, परमर्षि, महर्षि, राजर्षि, ब्रह्मर्षि, आणि देवर्षि, असे सात प्रकार). २ काया, वाचा आणि मन ह्यांत जो पवित्र तो.३ सात ही संख्या. ॐ**ऋषिऋण न०** ऋषींचें ऋण,—जें वेदाध्ययन, तर्पण, इ० नें फेडावयाचें असतें. **ऋषिधान्य न०** सावे, वरी, देवभात, इ० हलक्या दर्जाचीं धान्यें. **ऋषिपंचमी स्त्री०** भाद्रपद शुक्लपंचमी, —ज्या दिवशीं सप्तऋषींच्या पूजेचें व्रत केलें जातें. **ऋषियज्ञ पु०** पंचमहायज्ञांपैकीं एक (वेदाध्ययन).

ऋष्कत् [**फा०** रिषवत] **स्त्री०** लाच. मागें ' ऋषवत् ' पहा.

ऋक्ष [**सं०**] **पु०**१ अस्वल. २ वानर. **पु०, न०** तारा, नक्षत्र. ॐ**ऋक्षेश पु०**चंद्र. **ऋक्षराज पु०** जांबवान्.

ए.

ए मराठी वर्णमालेंतील आठवा वर्ग आणि मराठी स्वरमालेंतील आठवा स्वर.

ए अ० एकवचनानें एकाद्या माणसाला संबोधावयाचें असतां हें अव्यय योजलें जातें; उ० ए ! इकडे ये. ह्या अव्ययापुढें त्या व्यक्तीचें नांवही योजलें जातें; उ० ए गोविंदा, ती खिडकी झाक; उ० ए गोंदे, येथला केर काढ.

एक [**सं०**] **वि०** १ एक. २ एकटा. ३ श्रेष्ठ, अप्रतिम, अद्वितीय, —ज्याच्याशीं तुलना करावयाला कोणी व्यक्ति किं० वस्तु नाहीं; उ० ब्रह्म जें आहे तें एक आहे. ४ मुख्य. ५ तोच, तेंच. ६ असामान्य. ७ कोणीही एक, कोणताही एक. ८ अभिन्न. ९ न बदलावयाचें; उ० तुम्ही मोठ्या अधिकारावर आहां; तुमचें वचन एक असलें पाहिजे. **क्रि० वि०** १ सुमारें; उ० शंभर एक रुपये मी नेहेमीं आपल्याजवळ ठेवतों; (शंभर एक म्ह० सुमारें शंभर). २ खंड न पडतां; न थांबतां; उ० सकाळपासून एक पाऊस पडत आहे. ॐ**एकएक, एकेक वि०** १ एकामागून एक; एका वेळीं एकच; व्यक्तिशः. २ प्रत्येकाला एक. **एकएकटा (—ला) वि०** ज्याला जोडीदार नाहीं असा; ज्याला कोणी मदतीला नाहीं असा. **एकउंटी स्त्री०** हुचमळी. **एककल्ली वि०** १ एकच सरणी अनुसरणारा. २ प्रसंगाला अनुरूप वर्तन न करणारा. ३ एकच धरून बसणारा; हट्टी, हेकट. **एकंकार पु०** गोंधळ, घोटाळा, गलद. **एककालिक, एककालीन वि०** एक आहे काळ ज्याचा असें; एकाच वेळीं अस्तित्वांत असलेले किं० झालेले. **एकगट क्रि० वि०** सर्व एकदम. **एकच एक वि०** एकच. **एकचर वि०** एकएकटे राहणारे; जमावानें जे रहात नाहींत असे (प्राणी); उ० सिंह एकचर आहे; हत्ती अनेकचर आहे. **एकचाल वि०** त्याच चालीरीती, विधि, संस्कार, इ० ज्यांचे आहेत असे (लोक). **एकचित्त वि०** १एकाच मताचे आणि विचाराचे(लोक). २एकाग्र झालें आहे चित्त ज्याचें असा. **एकच्छत्री वि०** एकाच राजाच्या अमलाखालचा. **एकच्छत्री राज्य न०** १ ज्या राज्याला किं० राज्यांत कोणी

प्रतिस्पर्धी नाहीं असें राज्य. २ समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य. **एकजात** क्रि० वि० सर्वथैव; पूर्णपणें; सर्वचें सर्व; एकही अपवाद नसून; उ० ह्या गांवांत सगळे लोक एकजात शेतकरी आहेत. **एकजातीय** वि० एकाच जातीचे. **एकजिन्नस** वि० एकाच जातीचा माल ज्यांत आहे किं० ज्यांत भेसळ नाहीं असा (माल, दाणा, इ०). **एकजूट** स्त्री० पूर्ण मिलाफ; पूर्ण एकोपा. क्रि० वि० मिलाफानें; फूट न पडतां; एकाच विचारानें किं० ध्येयानें प्रेरित होऊन. **एकटक, एकटंक** क्रि० वि० खळ न पडतां; खळ न पडूं देतां. **एकटा दुकटा** वि० सोबतीला ज्याला कोणी नाहीं असा; ज्याच्या बरोबर कोणी नाहीं असा. **एकटांकी** वि० एका लेखकानें एका लेखणीनें एकसारखें लिहिलेलें (जें पत्र, इ० तें); ज्या लेखांतील सर्व अक्षरें सारख्याच वळणाचीं किं० आकाराचीं आहेत असा (लेख, इ०). **एकठोक** क्रि० वि० सबंध एकदम. **एकतंत्री** वि० एकाच माणसाच्या विचारानें चाललेलें (काम, कारभार, इ०); ज्यांत दुसऱ्या कोणाची लुडबूड नाहीं असें (काम, इ०). **एकतर्फी** वि० एकाच बाजुला किं० पक्षाला विशेष अनुकूल; पक्षपाती. **एकतान** वि० एकाग्र; दुसरीकडे बिलकूल न गेलेलें (लक्ष्य). **एकतारी** स्त्री० एकच तार ज्याला आहे असें (तंतुवाद्य). **एकथोक, एकथोप** वि० एकदम सर्व किं० सगळा; थोडथोडा नव्हे असा. **एकदम** क्रि० वि० १ खंड न पडतां किं० न पडूं देतां. २ उशीर न करतां. ३ तडाख्यासरशीं. **एकदाणें** न०, **एकदाणी** स्त्री० स्त्रियांच्या गळयांत घालावयाचा एक दागिना (ज्यांत मध्यें एक सोन्याचा मणि असून दोन बाजूंस पोतेचे मणि असतात). **एकदेशी** वि० १ एकाच देशाचे. २ एकाच भागाला लागूं पडणारा; अंशतः लागू असलेला. ३ प्रतिपक्ष्याच्या सर्व म्हणण्याला जें उत्तर नव्हे असें. ४ पक्षपाती. **एकदेशीय** वि० ‘ एकदेशी ’ पहा. **एकधान्य** न० एकच धान्य खाऊन राहण्याचें व्रत. **एकनाडी** स्त्री० आद्य, मध्य, आणि अंत्य अशा तीन नाड्या वधूवरांच्या पत्रिकांच्या संमेलनाचे वेळीं विचारांत घ्याव्या लागतात. दोघांची एकच नाडी असल्यास लग्न जमत नाहीं; वधूवरांची एकच नाडी असणें ह्याला ‘एकनाड असणें किं० येणें’ असें म्हणतात.

एकनिष्ठ वि० १ अनन्य भावानें एकाच ध्येयाच्या मागें लागलेला. २ पक्का, इरसाल (भामट्या, सोदा, लबाड, इ०). **एकपत्नीव्रत** न० साऱ्या जन्मांत एकच पत्नी करणारा. **एकपाखी** वि० ज्याला आढ्यापासून एकाच बाजूला छप्पर आहे असें (घर, सोपा, इ०). **एकपाठी** वि० श्लोक, वाक्य, इ० एकदा ऐकून किं० वाचून जो पाठ म्हणून दाखवूं शकतो असा. **एकपुती** स्त्री० एक आहे पुत्र जीला अशी स्त्री; उ० एकपुती रडे सातपुती रडे (म्ह० दोघीही असंतुष्टच). **एकफसली** वि० वर्षांत एकच पीक देणारी (जमीन). **एकभुक्त** वि० दिवसांत एक वेळ जेवणारा. **एकबेरजी** स्त्री० जमा किं० खर्च झालेल्या रकमेची हिशेबांत पहिली नोंद. **एकमंगळ** न० सोंवळा आणि ओंवळा, ब्राह्मण आणि शूद्र, वगैरे भेद न पाळतां जमलेले लोक. **एकमार्गी** वि० एकच ध्येय डोळ्यापुढें ठेवून अन्य गोष्टीकडे चित्त न जाऊं देणारा; सरळ मार्गानें काम करणारा. **एकमुखी** वि० एकाच्याच हातांत असलेली (सत्ता, अधिकार, इ०). **एकमुठाण** न० १ एकमत; ऐकमत्य. २ कट. **एकमुठी** क्रि० वि० सर्व एकदम; उ० माझे हे शंभर रुपये तूं मला एकमुठी परत दे. **एकमेक** वि० परस्पर. **एकमेळीं** क्रि० वि० सर्वजण मिळून; समुदायानें. **एकलकोंडा** वि० एकांतप्रिय. **एकला** वि० एकटा. **एकरस** पु० परब्रह्म. **एकवचन** न० १ (**व्याकरण**) वस्तूचें एकत्व. २ एकच बोलणें. **एकवचनी** वि० १ बोलेल त्याप्रमाणें करून दाखविणारा; सत्यप्रतिज्ञ. २ (**व्या०**) वस्तूचें एकत्व दाखविणारा. **एकवाक्यता** स्त्री० ऐकमत्य; अविरोध. **एकविधा भक्ति** स्त्री० एकाच देवाची किं० दैवताची भक्ति किं० उपासना. **एकसमयावच्छेदें-करून** क्रि० वि० एकदम, एकाच वेळीं. **एकसर** वि० एकसारखा. पु० एकपदरी माळ. **एकसंधी** वि० ज्याला जोड नाहीं असा; एकाच तुकड्यांतून किं० फळींतून किं० पत्र्यांतून केलेला; उ० एकसंधी पाट, बाहुली, इ०. **एकसरां (–रीं, –रें)** क्रि० वि० १ एकट्यानें. २ एकदम; एकाएकीं. **एकसांज** वि० १ एक वेळ दूध देणारी (गाय, म्हैस, इ०). २ एक वेळ जेवणारा (माणूस, इ०). **एकसारखा** वि० किं० क्रि० वि० खंड न पडतां; खंड न पडूं देतां; न थांबतां. **एकाएकीं** क्रि० वि० अकस्मात्. **एकाकी**

वि० एकटा, एकच. **एकांगवीर पु०** मदतीशिवाय किं० सैन्याशिवाय लढणारा वीर. **एकांड्या पु०** १ कोणत्याही पथकांत न राहातां स्वतंत्रपणें लढणारा शिपायी. २ ज्याला कोणी साथीदार किं० मदतनीस जरूर लागत नाहींत असा. **एकान्त पु०** १ निवांत जागा. २ निवांत जागीं केलेली मसलत. **एका तागडीचीं पारडीं न०अ०व०** सारखेच लुच्चे, लबाड, भामटे, इ०. **एकांतीं लोकांतीं क्रि०वि०** खाजगी रीतीनें आणि चारचौघांत. **एकांत्रा क्रि० वि०** एक टाकून एक अशा रीतीनें. **एकांत्राड क्रि० वि०** मध्यें एक टाकून एक अशा रीतीनें; उ० १, ३, ५, ७, ९ इ०; उ० २, ४, ६, ८, १०, इ०. **एकुणएक** [सं० एक+आणि+एक] **वि०** १ प्रत्येक, सर्व, दरोबस्त. २ तेंच; दोन्ही एकच. **एकाच नावेंत क्रि० वि०** त्याच परिस्थितींत; त्याच सुखदु:खांना पात्र अशा प्रकारें. **एक नाहीं दोन नाहीं** अगदीं स्तब्ध (माणूस).

एकादशी स्त्री० प्रतिपदेपासून अकरावी तिथि.

एकारणें अ० क्रि० १ एका बाजूला सरणें किं० घसरणें. २ कंठाळ, पडशी, गोणी, होडी, इ० एका बाजूस अधिक ओझें झाल्याकारणानें कलणें किं० कलंडणें. **स० क्रि०** गोळा करणें; राशीच्या रूपानें ठेवणें.

एकारती स्त्री० आरती करतांना घेतात तें भांडें.

एकार्णव [**सं०** एक + अर्णव (समुद्र)] **पु०** सर्व विश्व बुडून प्रलयाचे काळीं एकच समुद्र होतो तो.

एकावली (-ळी) [**सं०**एक + आवली(पंक्ति)] **स्त्री०** १ गळ्यांत घालावयाचा एक दागिना. २ **(साहित्य)** जेव्हां कांहीं पदांची एक श्रेणी असते, आणि ह्या श्रेणींतील प्रत्येक मागल्या पदाचें कांहीं एका विशिष्ठ सरणीनें वर्णन श्रेणींतील पुढच्या पदानें केलेलें असतें, आणि अशा रीतीनें हें वर्णन श्रेणींतील शेवटच्या पदापर्यंत पोचविलेलें असतें, तेव्हां ' एकावलि ' हा अलंकार होतो. ह्या अलंकारांचे पोटभेद, उदाहरणें, इ० आमचें " अर्थालंकारांचें निरूपण " ह्या पुस्तकांत पहा.

एकांशीं [**सं०** एक+अंश] **क्रि० वि०** १ एकाच भागासंबंधानें. २ एका अर्थानें. [मांडणीनें.

एकासरें क्रि० वि० एकाच प्रकारानें; एकाच

एकाह [**सं०** एक+अहन् (दिवस)] **पु०** एक दिवस; चोवीस तासांचा अवधि; सबंध दिवस आणि सबंध रात्र मिळून जो काळ तो.

एकाक्ष [**सं०** एक+अक्षि (डोळा)] **न०** एक आहे डोळा ज्याला असा (मनुष्य किं० प्राणी). **पु०** १ कावळा. २ शुक्राचार्य.

एकी स्त्री० १ जूट; ऐक्य. २ मैत्री. ३ लव्वी (शाळेंतील मुलांच्या भाषेंत). **ॐएकीबेकी स्त्री०** मुलांचा एक खेळ.

एकीकडे क्रि० वि० १ एका बाजूस. २ एका पक्षीं. ३ एकांतात.

एकीकरण [**सं०** एक+करण (करणें)] **न०** १ अनेक वस्तु एके ठिकाणीं आणणें, जुळविणें, किं० गोळा करणें. २ अनेक पक्ष किं० मतं ह्यांच्यांतील भेदभावाचें निरसन.

एकुण, एकोण [**सं०** एक+ऊन (कमी)] **वि०** एकानें उणा किं० कमी. हा शब्द फक्त संख्यावाचक विशेषणांत पूर्वपदीं येतो; उ० एकोणीस, एकुणतीस, एकुण चाळीस, एकुण पन्नास, इ०. **ॐएकुणऐंशीचा अंक पु०** स्पर्धा, विरोध, भांडण; (हा आंकडा ७९ असा काढतात त्यावरून).

एकुणात, एकुनात, एकुणहात स्त्री० जमा, खर्च, इ० रूप ज्या अनेक रकमा त्यांची एकत्र बेरीज इ० करून त्यांत न्यूनाधिक काय करावयाचें असेल तें करून सिद्धान्त संख्येचा जो लेख करतात तो. २ तो लेख करावयासाठीं जी ७ -- अशी रेघ करतात ती. ३ **(लाक्षणिक)** 'भाषण करतां करतां प्रमाणसिद्ध होतो जो कांहीं एक अर्थ त्याचा सिद्धान्तरूप करतात जो वाक्यप्रयोग तो'.

एकून, एकूण क्रि०वि० सारांश हा कीं; सर्व भाषणाचा किं० वाटाघाटीचा मथितार्थ हा कीं; एकंदरींत.

एकेरा, एकेरी वि० १ एकच पदरी; दुहेरी, तिहेरी, किं० अनेक पदरी नव्हे असा (कंठा, माळ, इ०). २ अशक्त (गायकाचा कंठ किं० गळा). ३ एकवचनी (बोलण्याचा प्रकार); उ० मोठ्या माणसाशीं एकेरी शब्द बोलूं नये. **क्रि० वि०** एकएक अशा मांडणीनें (गुंफिलेलीं फुलें, पुतळ्या, मणि, इ०). **ॐएकेरीवर येणें** एकवचनीं प्रयोग करून वडील माणसाशीं बोलणें किं० वडील माण-

सासंबंधानें बोलणें. **एकेरी कारकून पु०** हलक्या दर्जाचा कारकून (ज्याला दुसऱ्या कोणत्याही कामांत योजतां येत नाहीं). **एकेरी होन पु०** होनाची एक जात. **एकेरी सरकत स्त्री०** सरकतीचा एक प्रकार.

एकोत्रा [सं० एक + उत्तर] **पु०** शंभर रुपायांस प्रतिमासीं एक रुपाया व्याज द्यावें असा व्याजाचा ठराव.

एकोत्री स्त्री० एकापासून शंभरापर्यंत जे अंक त्यांच्या वर्गांचें कोष्टक; एकीएकी एक, बेबे चार, तीन त्रीक नऊ, इ०पासून शंभरशंभर दहा हजार, हें कोष्टक.

एकोद्दिष्ट न० मृताचे अकरावे दिवशीं करावयाचें श्राद्ध.

एकोपा पु० जूट, एकी.

एकोशास, एकोशीं, एकोस क्रि० वि० रहदारीपासून दूर; आडवळणास; एकांतीं; एकाबाजूस.

एकोसा पु० गाय, म्हैस, इ० च्या थानाला होत असतो एक रोग तो.

एकोळ पु० एक प्रकारचें झाड.

एक्का, एक्क्या पु० १ पत्त्यांच्या खेळांत एक ठिपका असलेलें पान. २ एक प्रकारचा छकडा.

एक्का, एक्क्या, एक्के वि० (संख्यावाचकें बनवितांना) एकानें अधिक; एक्क्याऐंशी म्ह० ऐंशी अधिक एक; एक्क्याण्णव, एक्कावन, एक्केचाळीस, इ०.

एखरा पु० कोळिस्त्याचें बी; त्याला ' तालीमखाना ' असेंही म्हणतात.

एखलास [अ० अख्लास्] **पु०** १ प्रेम, प्रीति. २ संमान, आदर.

एखादा, एकादा वि० कोणीतरी; एक; यदृच्छेनें असलेला; निदान एक; उ० मुलाच्या अंगावर दागिने घालीत जाऊं नका; एकादा भामटा त्याला पळवून नेईल; उ० तुजजवळ एकादा रुपाया असला तर दे मला; उ० एकादा स्वच्छ सदरा सापडेल म्हणून सर्व पेटी मी धुंडाळली, पण व्यर्थ; उ० एकाद दुसरा मनुष्य या वाटेनें जातो. ह्या शब्दाचें एकाद, एखाद, असेंही रूप होतें. हा शब्द क्रियाविशेषणाच्या अर्थानेंही योजला जातो; उ०पाण्यांत एकटा डुंबावयाला जाऊं नको, मरशील एकादा (म्ह० कदाचित).

एड स्त्री० घोडा, खेचर, वगैरेंना जलद चालण्यासाठीं स्वारानें टाचेनें केलेली इशारत (क्रि० देणें).

एडका [सं० एडक] **पु०** मेंढा.

एढवळ, एढोळ [म० एवढा वेळ] **क्रि० वि०** एवढा वेळ, इतका वेळ (अशिक्षितांत).

एढोळां [म० एवढा वेळ] **क्रि० वि०** ह्या वेळीं, एव्हांना, इतक्या वेळांत (अशिक्षितांत)

एणें, येणें सामासिक शब्दांत ह्यांचा अर्थ ' ह्या ' असा असतो. एणें करून म्ह० ह्यामुळें; एणेंप्रमाणें म्ह० ह्याप्रमाणें.

एतत् [सं०] **सर्वनाम** हा. समासांत पूर्वपदीं याचा उपयोग होतो. एतदतिरिक्त म्ह० ह्या शिवाय, ह्याहून अधिक. एतदंतर्गत म्ह० ह्यांत समाविष्ट झालेलें किं० समाविष्ट असलेलें; एतदर्थ म्ह० ह्यासाठीं; एतत्कृत म्ह० ह्यानें केलेलें; एतदनुरूप म्ह० ह्याला योग्य, लायक, किं० अनुरूप; एतदाराभ्य म्ह० ह्यापासून सुरवात करून; इ० इ०.

एतादृश [सं०] **वि०** ह्यासारखें.

एतावत् [सं०] **वि०** इतकें, एवढें.

एतावता [सं० ' एतावत् 'च्या तृतीयेचें एकवचन; **पु०, न०**] **क्रि० वि०** १ एवढ्यानें; एवढ्यावरून; ह्या इतक्या कारणांवरून; उ० त्यानें आदरातिथ्य केलें, तो गोड बोलला, एतावता त्याच्या मनांतील द्वेष गेला असें समजूं नका. २ एकंदरींत; सारांश; साऱ्याचा मतलब हा कीं; थोडक्यांत.

एथें क्रि० वि० १ या स्थळीं; ह्या प्रसंगीं. २ घरीं; उ० रामाच्या एथें म्ह० रामाच्या घरीं. ॐ**एथचा, एथील वि०** ह्या ठिकाणचा. **एथपर्यंत क्रि० वि०** १ ह्या ठिकाणापर्यंत. २ ह्या समयापर्यंत. **एथून, एथवर, एथपावेतों,** इ० शब्दांचे अर्थ वरील सरणीनें जाणावे. ' एथें ' ह्याचे जे सामासिक शब्द त्यांत ' ए ' च्या बदल ' ये ' ही योजला जातो.

एधवां क्रि० वि० ह्या वेळीं, ह्या समयीं.

एधष्ट [सं० यथेष्ट] **वि०** हावा तितका, विपुल.

एर [सं० इतर] **वि०** १ दुसरें, अन्य, इतर. २ इतर क्षुल्लक किं० हलक्या योग्यतेचें.

एरझार, एरझारा, वेरझारा स्त्री० जाण्या-येण्याचा व्यर्थ त्रास, निष्फळ हेलपाटे.

एरंड [सं०] पु० एक लहान झाड; याच्या बोंडांतील बीजांचें तेल (म्ह० एरंडेल) रेचक आहे. ※**ओसाड गांवीं एरंड बळी** ज्या गांवांत दुसरे कोणतेच वृक्ष नाहींत त्यांत एरंड हाच मोठा वृक्ष गणला जातो. **थोर वाढला एरंड तरी काय होईल इक्षुदंड** एरंडाचें झाड वाढून कितीही उंच झालें तरी त्याला उसाचा मान मिळेल काय ? (नाहीं मिळणार). **एरंडासारखा वाढणें** केवळ उंच होणें (अंगीं कांहीं योग्यता किं० उपयोगीं पड-ण्याचा गुण आणण्याचा प्रयत्न न करतां). **एरंडाचें गुऱ्हाळ न०** पानचट, नीरस, कंटाळवाणें, लांबच लांब भाषण. **एरंडेल न०** एरंडाच्या बीजांचें तेल. **एरंड्या साप पु०** एरंडाच्या बीवर जसे ठिपके असतात तसे ज्याच्या अंगावर असतात असा एका जातीचा साप.

एरंडी स्त्री० एरंडाच्या बोंडांतील बी.

एरंडें न० हलक्या दर्जाचें रेशीम (ह्याचे मुकटे इ० विणले जातात).

एरमीठ [म० एरवींचें मीठ] **न०** नेहेमींच्या भोजनांत जें समुद्राच्या पाण्यापासून काढलेलें मीठ खातात ते (शेंदेलोण, पादेलोण, सोरमीठ, इ० हून भिन्न).

एरवां, एरव्हां क्रि० वि० परवांच्या पुढच्या किं० पलीकडच्या दिवशीं; मागल्या चवथ्या दिवशीं किं० पुढें येणाऱ्या चवथ्या दिवशीं.

एरवीं, एरव्हीं, एरीं, एऱ्हवीं, एऱ्हीं क्रि० वि० १ नेहेमीं; सामान्य प्रसंगीं; उ० मी लोकांच्या घरीं जेवावयाला गेलों म्ह० पीतांबर नेसतों, एरवीं मुकटा नेसतों. २ इतर वेळीं. ३ तसें नसतें तर; उ० हें पत्र टपालांत टाकून ये असें मी म्हणतांच तो तें पत्र घेऊन रवाना झाला; त्याचें त्या दिशेस कांहीं तरी काम असलें पाहिजे, एरव्हीं तो माझें काम करा-वयाला इतक्या तत्परतेनें गेला नसता. ४ सहज, कांहीं विशेष हेतु नसतां. ५ नाहीं तर; उलट पक्षीं; उ० तूं माझे उसने घेतलेले पैसे आतांच्या आतां दे, एरव्हीं मी तुझ्या घरांतून हालणार नाहीं.

एरशेर वि० क्षुल्लक; भिकार; हलक्या दर्जाचा, किंमतीचा, किं० योग्यतेचा.

एरु [सं० इतर] **सर्वनाम** हा; दुसरा; तो.

एलकावणें स० क्रि० १ उभारणें. २ शेंदून काढणें.

एलकी स्त्री० वेदना, तिडीक, शिणिक, चमक (क्रि० भरणें).

एलगार पु० १ जोराचा हल्ला. २ नेटाचा प्रयत्न.

एलची, एलाची स्त्री० वेलदोडा.

एलरी, एलारी स्त्री० कोष्टयाच्या मागाचीं दोन कांहीं विशिष्ट उपयोगाचीं लाकडें.

एलदोडा [सं० एला+म० दोडा (बोंड)] **पु०** शीतल आणि सुगंधी असें फळ (त्यांतील दाणे विड्यांत आणि पक्वान्नांत घालतात आणि त्यांचा औषधांतही उपयोग केला जातो).

एला [सं०] **स्त्री०** वेलदोडा. वर 'एलदोडा' पहा.

एवं [सं०] **क्रि० वि०** अशा रीतीनें; अशा प्रकारें; एकूण. ※**एवंप्राय वि०** अशा प्रकारचें. **एवमेव क्रि० वि०** अगदीं असेंच; अगदीं ह्याच प्रकारें. **एवंच क्रि० वि०** एकंदरींत; सारांश हा कीं; एकूण. [मोठा.

एवढा [सं० एतावत्] **वि०** इतका, इतका

एवंथितिया } [सं० एवं + स्थित्या] **क्रि० वि०** अशा रीतीनें. † ज्ञा० ४.

एवीं [सं० एवम्] **क्रि० वि०** ह्या रीतीनें; ह्या पक्षीं. ※**एवीं तेवीं क्रि० वि०** ह्या रीतीनें काय आणि त्या रीतीनें काय, फळ एकच; कांहीं केलें तरी; कांहीं म्हटलें तरी; कोणताही पक्ष स्वीकारला तरी; उ० एवीं तेवीं माझी नोकरी सुटणार, मग वरिष्ठाला पोटभर शिव्या तरी देऊन घेतों. **एवीं तेवीं भरगो देवी** कसेंही झालें तरी " हे देवि, माझा उणेपणा भरून काढ " असें म्हणावें लागणारच ? देवीची करुणा भाकावी लागणार; परिस्थिति प्रतिकूल आहे खरी, कांहूं करून कसें चालेल ? कोणचा तरी एक मार्ग स्वीकारला पाहिजे.

एवींच [सं० एवम्+च] **क्रि०वि०** मुकाट्यानें; स्वस्थपणें; कांहीं हालचाल किं० गडबड न करतां (पाहाणें, इ०).

एव्हढा वर ' एवढा ' पहा.

एव्हां क्रि० वि० आतां; ह्या वेळीं; ह्या समयीं. ※**एव्हां एव्हां क्रि० वि०** ह्याच वेळेच्या सुमा-

रास; कदाचित् थोडेंसें अगोदर किं० थोडेंसें मागून.

एव्हांना क्रि० वि० इतका अवधि गेला आहे त्या अर्थी; उ० एव्हांना रामागडी कोथरूडच्या पलीकडे गेला असेल, नाहीं कां ? उ० तूं तो श्लोक पाठ करावयाला घेतलास त्याला आर्धा तास होऊन गेला; एव्हांना तो तुला पाठ झाला असेल.

एव्हांशीं क्रि० वि० इतक्यांतच; ह्याच वेळीं.

एषादिक [**सं०** एषः (हा)+आदि(आरंभ)+क (प्रत्यय)] **वि०** हे; हे लोक; ह्यांच्या सारखे लोक (उपहासांत ह्याचा प्रयोग होतो); उ० आमच्यानें हें काम झालें नाहीं; आतां एषादिक काय दिवे लावतात पाहूं !

एष्य वि० १ यावयाचा; भविष्यकालीन; पुढें व्हावयाचा. २ खस्थ गोलांचा आक्रमावयाचा राहिलेला प्रदेश (याच्या उलट ' गत ').

एस स्त्री० वेस (गांवाची, खेड्याची,किं०वाड-ग्याची). ॐ**एसकर पु०** १ वेशीच्या रक्षणार्थ नियुक्त जो महार तो. २ कोणीही महार.

एहसान [**अ०** अह्सान्] **न०** १ दुसऱ्यांवर केलेली मेहेरबानी; मेहेरबानीची गोष्ट; उपकार. २ माफ केलेला सारा किं० पट्टी किं० वसूल.

एळकोट[**कानडी** एळ=आठ;**सं०**कोटि=कोटी] **पु०** १ सर्वांनीं हातभार लावून एकदिलानें केलेला प्रयत्न. २ गोंधळ, अव्यवस्था; विचका; उ० तूं तेथें दहा घरचीं दहा माणसें गोळा झालीं आणि त्यांनीं साऱ्या कामाचा एळकोट करून टाकला. **टीप**—खंडोबाचे भक्त खंडोबाची तळी उचलतांना ' एळकोट ' हा शब्द उच्चारतात; त्या वेळीं भारी बडबड चालते आणि भारी गडबड होते; ह्यावरून वरचा दुसरा अर्थ निघाला. पुष्कळ लोक एकाच कामांत गुंतलेले असतात यावरून पहिला अर्थ झाला. आमचे "मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०" हें पुस्तक पहा.

एळा [**सं०** एला] **स्त्री० अ० व०** वेलदोड्याची एक जात; तिचें बोंड जाडी असून त्यांतील दाणेही एव्हवींच्या वेलदोड्याच्या दाण्यांहून मोठे असतात.

एळिया, एळ्या [**हिं०**] **पु०** बोळाची एक जात (ही औषधोपयोगी आहे).

ऐ.

ऐ मराठी वर्णमालेंतील आठवा वर्ण आणि स्वरमालेंतील आठवा स्वर.

ऐकणें [**सं०** आकर्णन] **स० क्रि०** १ ०चें श्रवण करणें. २ ० कडे कान देणें किं० लक्ष्य देणें. ३ ०चीं आज्ञा पाळणें; ०च्या मनाप्रमाणें किं० ताकीदीप्रमाणें चालणें किं०वागणें. ॐ**ऐकून ठाऊक वि०** लोकांच्या सांगण्यावरून किं० बोलण्यावरून ठाऊक असलेला (ज्याचा आपणाला प्रत्यक्ष अनुभव नाहीं किं० ज्याशीं आपला परिचय नाहीं). **ऐकावें जनाचें आणि करावें मनाचें** लोकांची सल्लामसलत घ्यावी पण आपल्या मनाला योग्य वाटेल तेंच करावें.

ऐकभट्टी [**म०** ऐकणें+भट्टी] **स्त्री०** केवळ लोकांच्या तोंडून ऐकण्याची रीति; लोकांचें भाषण ऐकणें हा उगम; उ० मी सांगतों ती बातमी ऐकभट्टींतली आहे (म्हणजे केवळ ऐकींव आहे; तिच्या खरेपणाबद्दल मी खातरी देऊं शकत नाहीं).२ ऐकून ज्ञानप्राप्ति करणें किं० शिक्षण संपादणें ही रीति; उ० मी ऐकभट्टीचा गवई आहें; मी कोणा वस्तादाजवळ शिकलेला नाहीं.

ऐकमत्य [**सं०** ' एकमत ' चें **भा० वा० ना०**] **न०** सर्वांचें एकच मत असणें; मताची एकता; उ० लहानपणीं लग्नें करूं नयेत ह्या संबंधानें हल्लीं सर्व महाराष्ट्रीयांचें ऐकमत्य आहे.

ऐकवणी [**म०** 'ऐकणें' ह्याचें प्रयोजक रूप ' ऐकविणें ', ह्यापासून] **स्त्री०** १ मुद्दाम ऐकावयाला लावण्याची क्रिया. २ शिकविणें; स्पष्ट करून सांगणें. ३ केलेला बोध, उपदेश, किं०ताकीद.

ऐकाहिक [**सं०** एक+अहन् (दिवस)] **वि०** १ एका किं० त्याच दिवसाचा. २ क्षणभंगुर. ३ एकाच दिवसांत समाप्त होणारी क्रिया, कर्म, विधि, संस्कार, इ०.

ऐकींव [**म०** ऐकणें] **वि०** १ ऐकून कळलेला; केवळ ऐकून ठाऊक झालेला. २ ज्या माहितीला किं०बातमीला कांहीं आधार देतां येत नाहीं आणि जी केवळ कर्णोपकर्णीं आलेली आहे अशी.

ऐक्य [**सं०** ' एक 'चें **भा० वा० ना०**]**न०** १ एकी; मिलाफ; जूट. २ एक मत. ३ एकरूपता. अभिन्नत्व; एकत्व. ४ ब्रम्ह आणि जीवात्मा यांचें एकत्व किं० अभिन्नत्व. ꣸ **ऐक्यास येणें** मिळतें असणें; एक अशी प्रतीति होणें.

ऐगूबैगु पु० अ० व० कोणी तरी गोमाजी कापशे; ऐवते गैवते; कोणी तरी म्हणसें (ज्यांचें कांहीं महत्त्व नाहीं).

ऐंचण, ऐंचण, ऐतण. स्त्री० १ सटरफटर; अडगळ. २ कोंझट आणि अडगळीनें भरलेली जागा. ३ निरुपयोगी झाडपाल्यानें व्यापलेलें पटांगण.

ऐच्छिक [**सं०** ' इच्छा ' पासून विशेषण] **वि०** १ इच्छिलेला, इष्ट. २ स्वताच्या इच्छेनें केलेलें, स्वीकारलेलें, सेविलेलें, इ० (लोकांच्या इच्छेवरून किं० सक्तीवरून नव्हे). ३ स्वच्छंदी-पणाचा, अनियंत्रित; उ० ऐच्छिक व्यवहार करूं नये, शास्त्रानुरूप वर्तावें. ४ छांदिष्टपणाचा; लहरी. ५ जाणून बुजून केलेलें किं० आचरलेलें किं० सेवि-लेलें; उ०ऐच्छिक पापाचें प्रायश्चित्त मोठें.꣸**ऐच्छिक विषय पु०** आपल्या इच्छेनें किं० आवडीनें परीक्षेंत किं० परीक्षेसाठीं स्वीकारलेला विषय.

ऐट स्त्री० डौल, थाटमाट, दिमाख. ꣸**ऐटबाज वि०** १ डौली,थाटमाट करणारा. २ सुंदर; फक्कड; झोकबाज दिसणारा; भपकेबाज. **ऐटबाजी स्त्री०** भपका, झोक, थाटमाट, दिमाख.

ऐतरेय [**सं०**] **पु०** ऋषिविशेष; ऐतरेय ब्राम्हण आणि आरण्यक यांचा प्रणेता ऋषि. ꣸**ऐतरेय उपनिषद् स्त्री०** एका उपनिषदाचें नांव. **ऐतरेयी क०** ऐतरेय ब्राम्हण पढणारा.

ऐता मागें ' अयता ' पहा.

ऐतिहासिक [**सं०** ' इतिहास ' यापासून]**वि०** १इतिहासाविषयींचा; इतिहाससंबंधाचा. २इतिहा-सावरून ठरलेला किं० समजलेला; इतिहासाच्या आधारावर प्रतिष्ठित असलेला. ३ परंपरेच्या माहि-तीवरून ज्ञात असलेला. **पु०** इतिहासवेत्ता; परं-परागत ज्ञानांत प्रवीण असा माणूस.

ऐतिह्य [**सं०** इति+ह=खरोखर असें] **न०** परंपरागत ज्ञान किं० माहिती; दंतकथा; उ० ह्या वडावर ब्रम्हराक्षस आहे असें ऐतिह्य ऐकतों.

ऐदंपर्य [**सं०** इदं+पर]**न०** तात्पर्य, धोरण.

ऐदी मागें ' अयदी ' पहा.

ऐंद्र [**सं०** इंद्र]**वि०** १ इंद्राचें; इंद्रासंबंधाचें. २ इंद्रलोकस्थ. **पु०** इंद्रसुत. ꣸**ऐंद्रजालिक वि०** इंद्र-जाल विद्येंत प्रवीण;जादूगिरीचे. मागें 'इंद्रजाल' पहा.

ऐंद्री [**सं०** इंद्र] **स्त्री०** १ इंद्रानें अधिष्ठित दिशा; पूर्वदिशा. २ इंद्रपत्नी. ३ (**ज्योतिष**) ज्येष्ठा.

ऐंद्रिय, ऐंद्रियक [**सं०** इंद्रिय] **वि०** १इंद्रि-याचें. २ इंद्रियग्राह्य. ३ विषयासक्त.

ऐन स्त्री० मागें ' आईन ' पहा.

ऐन [**अ०** अईन] **वि०** १ उत्कर्षाच्या स्थितीस आलेला किं० चढलेला; परमावधीस पोचलेला; उ० ऐन उन्हाळा, हिंवाळा, इ०. २ बरोबर; तंतोतंत; भर; कमी ज्यास्ती नसलेला; मागेंपुढें नसलेला; उ० ऐन मध्यान्ह, ऐन दुपार. ३ अवांतर बाबी ज्यांत नाहींत असा. ꣸**ऐन कर्ज न०** व्याज वगैरे मनांत न आणतां नुसती कर्जाची रकम. **ऐन उन्हाळा पु०** उन्हाळ्याचा मध्य किं० भर. **ऐन वेळ स्त्री०** अगदीं जरूरीची वेळ; आयती वेळ. **ऐन लुच्चा सोदा, लबाड, इ०** पक्का किं० इरसाल लुच्चा, लबाड इ०. **ऐन भर पु०** उत्कर्ष, परमावधि, वैभवाची स्थिति;उ० हल्लीं आंब्याचा ऐन भर आहे. उ० त्याच्या तारुण्याचा आजकाल ऐन भर आहे. **ऐन घाई स्त्री०** हातघाई; पराकाष्ठेची घाई. **ऐन मारामारी स्त्री०** १ मारामारीचा जोर; मारामारीचा जोराचा समय. २ आवेशाच्या मारा-मारीचें स्थल. **ऐन कर्ज न०** केवल कर्ज किं० कर्जाऊ रकम (व्याज वगैरे हिशेबांत न घेतां). **ऐन काळी स्त्री०** शेतसारा. **ऐन कारभारी पु०** संस्थेचा मुख्य किं० चालक. **ऐन किंमत स्त्री०** वस्तूची किं० मालाची मूळ किंमत (याच्या उलट विक्रीची किंमत); शंभर रुपायांना कोणीं सौदा-गरानें घोडा विकत घेऊन गिऱ्हाइकाला तो सव्वाशें रुपायांना नफा घेऊन विकला, ह्या व्यवहारांत शंभर रुपये ही ऐन किंमत, सव्वाशे रुपये ही विक्रीची किंमत, आणि पंचवीस रुपये हा त्या सौदागराचा नफा. **ऐन गल्ला पु०** १ केवळ पाहाणीवरून ठरविलेलें शेताचें आजमासी उत्पन्न. २ सरकारी कारकुनानें उत्पन्नाच्या आजमासावर ठरवून टाकलेला सारा. **ऐन जमा स्त्री०** नेहेमींची ठरावीक जमा (याच्या उलट दंड, नजराणे, इ०

उगमांपासून झालेली जी जमा ती खेरीज जमा किं० कमावीस जमा). **ऐन जमाबंदी स्त्री०** 'ऐन जमा' पहा. **ऐन जिन्नस पु०** धान्याच्या किं० अन्य पदार्थांच्या रूपानें सरकारास द्यावयाचा म्हणून ठरलेला सारा (याच्या उलट पैशाच्या रूपानें सरकारास द्यावयाचा सारा). **ऐन दस्त पु०** शेत, आगर, मळा, इत्यादिसंबंधी मुख्य जो सरकारी सारा तो (उलट,बाबती गांवखर्च इ०). **ऐन फाजील** शेत, मळा, इ०च्या मुख्य उत्पन्ना-खेरीज अवांतर जें किरकोळ उत्पन्न तें. **ऐन मुद्दल न०** मूळ कर्जाची रकम (व्याज हिशेबांत न घेतां). **ऐन वसूली स्त्री०** निव्वळ वसूलाची रकम. **ऐन वाफ स्त्री०** बीजें पेरण्याचा योग्य समय.

ऐन [**फा०** आईन] **स्त्री०** १ सभ्य चाल-रीत; मर्यादशीलपणाचें वर्तन किं० वागणूक. २ दिमाखदारी. मागें " आईन " पहा.

ऐन पु० एक जंगली वृक्ष (याच्या लाकडाच्या तुळया, खांब, तक्ते, इ० केले जातात).

ऐनक [**फा०** अय्नक्=लहान डोळे] **पु०** चष्मा; चाळिशी; उपनेत्र.

ऐनपैन, ऐणपैण स्त्री० हेकटपणाचें विधान; हुजत (**क्रि०** करणें, घालणें).

ऐनसादडा पु० एक जंगली वृक्ष.

ऐना [**फा०** आईनाह्] **पु०** १ आरसा. २ चष्मा, उपनेत्र (या अर्थी ' ऐने ' असा **अ० व०** ही प्रयोग आहे).

ऐनेरणें, ऐनरणें, ऐनेरें मागें ' आयनेरणें ' ' आयनरणें, ' ' आयनेरें ' पहा.

ऐपत [**अ०** अफत] **स्त्री०** १ सांपत्तिक सामर्थ्य; संपत्तीचा आवांका. २ बुद्धीचें सामर्थ्य. ३ दर्जा, योग्यता. ꣸**ऐपतदार, ऐपती वि०** ज्याच्या अंगीं संपत्तीचें सामर्थ्य आहे असा; चार पैसे बाळगून असलेला.

ऐब [**अ०** अयब्] **पु०** दोष; कमीपणा; व्यंग; उ० ह्या मोत्यांत थोडासा ऐब आहे; उ० तो मुलगा थोडासा काणा आहे येवढाच काय तो त्याच्यांत ऐब आहे; एरव्हीं तो सुंदर आहे. ꣸**ऐबदार वि०** सदोष.

ऐबते गैबते, ऐबू गैबू, ऐबो गैबो पु० अ० व० कोणी तरी सटर फटर माणसें; बिन महत्त्वाचीं माणसें.

ऐयाल (–ळ) स्त्री० घोड्याच्या मानेवरचे केश. मागें ' अयाल ' पहा.

ऐरण, ऐरीण स्त्री० सोनार, लोहार, तांबट, इ० कारागीर घडवावयाचा धातूचा पदार्थ हातो-डीनें ज्या विशिष्ट आकाराच्या धातूच्या ठोकळ्या-वर ठोकतात तो ठोकळा.

ऐरण, ऐरीण स्त्री० एक जंगली झाड.

ऐरा पु० मागें ' अहिरा ' पहा.

ऐराण [**फा०** वय्रानाह्] **न०** १ ओसाड मैदान. २ एकलकोंडेपणाची भावना.

ऐरावत, ऐरावण [**सं०**] **पु०** १ इंद्राचा हत्ती; (पूर्व दिशेचा रक्षक हत्ती). २ उत्कृष्ट हत्ती. ꣸**कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तटाणी?** त्या दोन जनावरांची तुलना करणें मूर्खपणा होय; त्या दोहोंचे दर्जे अत्यंत भिन्न होत.

ऐरिणी, ऐरीण स्त्री० लग्नांत साडे करतात त्या समयीं वेळूच्या पातीच्या मोठ्या पसरट शिप-तरांत पिठाच्या पणत्यांत दिवे लावून ठेवितात आणि तें शिपतर मानकऱ्यांच्या डोक्यावर ठेवून कांहीं विधि करतात; ह्या शिपतराला 'ऐरिणी' म्हण-तात. ꣸**ऐरिणीपूजन न०** ह्या शिपतराचें पूजन.

ऐरीगैरी वि० १ अजागळ, बावळट. २ भिकार, टाकाऊ, किं० कुचकामताचा पदार्थ.

ऐल क्रि० वि० इकडच्या बाजूस. ꣸**ऐलतीर, ऐलकांठ पु०** इकडची बाजू. **ऐलथडी स्त्री०** इकडची बाजू किं० कांठ; (उलट, ' पैलथडी '). **ऐलपैल क्रि० वि०** १ इकडच्या कांठाला आणि तिकडच्या कांठाला; दोन्ही बाजूंस; उ० नदीच्या ऐलपैल वसति आहे. २ अवांतर; उ० आमच्या संसाराला खर्च लागतो त्यापेक्षां आम्हाला ऐलपैल खर्च अधिक लागतो. ३ **वि०** नानाप्रकारचा; विविध. **ऐलपैल वस्तु स्त्री० अ० व०** १ सटर-फटर वस्तु; टाकाऊ आणि भिकार वस्तूंची अड-गळ. २ नानाप्रकारच्या वस्तु.

ऐलपैल [**फा०** ' बद्फअल् 'चें अपभ्रष्ट रूप] **स्त्री०** १ बंड. २ वेडे वेडे चार; आचरटपणाच्या कृति.

ऐला क्रि० वि० इकडच्या बाजूस (उलट,पैला).

ऐवज [अ० अवज्] **पु०** १ मालमत्ता, चीजवस्त, पैसा अडका; द्रव्य. २सत्त्वसपणा; सत्त्व; कस; कसदारपणा. ३ योग्यता, किंमत. ४ जमाबंदीची रकम. ॐ**ऐवजदार, ऐवजशीर वि०**ज्यांत सत्त्वांश, पौष्टिक अंश, उपयुक्त अंश, ताकद, सामर्थ्य, कस, इ० असावा तितका आहे किं० बराच आहे असा; उ०ऐवजदार खाणें खाल्लें म्हणजे लवकर भूक लागत नाहीं; उ० ऐवजदार कारकून मला मिळाला तर मी तीस रुपये सुद्धां त्याला पगार द्यावयाला तयार आहें. **ऐवज मोबदला पु०** १ दोन माणसांनीं एकमेकांत कांहीं काळ पुरता केलेला मोबदला; उ० तुझा घोडा तूं मला एक महिनाभर प्रवासासाठीं द्यावा; तोंपर्यंत तूं माझ्या म्हशीचें दूध खावें; हा ऐवज मोबदला तुला कबूल आहे काय ? २ एक वस्तु घेऊन तिच्याबद्दल दुसरी वस्तु देणें (प्रत्यक्ष पैशाच्या रूपानें किंमत न देतां); उ० माझा पलंग तूं घे आणि तुझी संदूक मला दे म्हणजे ऐवज मोबदला योग्य होईल. ३ गहाणावर कर्ज काढणें (**क्रि०** करणें, देणें, इ०). **ऐवजीं क्रि० वि०** बदलीं, मोबदला म्हणून; उ० तूं भाऊबिजेच्या दिवशीं आपल्या वहिणीला ओवाळणींत जो जरीकांठी खण घालणार आहेस, त्याच्या ऐवजीं हा चांदीचा कुंकवाचा करंडा तिला दे.

ऐवट [अ० हयूवत्] **वि०** बोजड; अवाढव्य; मोठा पण बेढब.

ऐश आराम [अ० ऐष्+फा० आराम] **पु०** चैनबाजी; सुखविलास; सुखोपभोग; चैन; ख्यालीखुशाली. **ऐश आरामी स्त्री०**अर्थ वरचाच.

ऐशानी [सं०] **स्त्री०** उत्तर आणि पूर्व यांच्या मधली दिशा.

ऐशी उ० वा० अ० आनंदाचा, समाधानाचा, किं० आश्चर्याचा उद्गार; खूप ! खाशी ! उत्तम ! शाबास ! बेश !

ऐंशी [सं० अशीति] **वि०** आठाची दसपट करून जी संख्या होते ती; सोळाची पांचपट. ॐ**ऐंशी तेथें पंचाऐंशी** मोठ्या खर्चांत पांचांची काय गोष्ट ? जेथें इतका अवाढव्य खर्च होतो आहे तेथें ह्या क्षुल्लक बाबीसंबंधानें कचर करण्याचें कांहीं कारण नाहीं.

ऐश्वर [सं० ईश्वर] **वि०** १ सामर्थ्यवान्. २ ईश्वरासंबंधाचा. ॐ**ऐश्वरकारणिक पु०** नैयायिक.

ऐश्वर्य [सं० ईश्वर] **न०** १ प्राधान्य. २ प्रभुत्व, स्वामित्व, मालकी, ताबा. ३ वैभव, समृद्धि. ४ अमानुष शक्ति. ५ अणिमा, महिमा, इ० अष्टसिद्धि. ॐ**ऐश्वर्यपीठ न०** वैभवाचें स्थान. **ऐश्वर्यवान् वि०** मोठा; वैभवशाली; समृद्ध; संपन्न. **ऐश्वर्याचा प्राणी पु०** भाग्यशाली माणूस; ज्याला जगांतील दुःखें, कष्ट, निराशा, संकटें, इ०चा मुळींच अनुभव आलेला नाहीं असा माणूस.

ऐष आराम, ऐष आरामी मागें 'ऐश आराम' 'ऐश आरामी' पहा.

ऐष्टिक [सं० इष्टि=यज्ञ] **वि०** यज्ञसंबंधीचा.

ऐसपैस वि० १ अघळ पघळ; प्रशस्त; बसावयाला, निजावयाला किं० वावरावयाला जेथें अडचण नाहीं असें (स्थळ); संकुचित नव्हे अशी (जागा, घर, इ०). **क्रि० वि०** सभोंवार; आसमंतात भागीं.

ऐसा वि० असा.

ऐहलौकिक [सं० इह=येथें;+लोक] **वि०** ह्या लोकासंबंधी; इहलोकचें; मर्त्यलोकासंबंधाचें.

ऐहिक [सं० इह=येथें] **वि०** इहलोकचें; इहलोकसंबंधाचें. **न०** प्रपंच.

ओ.

ओ मराठी वर्णमालेंतील दहावा वर्ण आणि स्वरमालेंतील दहावा स्वर.

ओ स्त्री० कोणी हाक मारिली असतां तिला 'ओ' हें प्रत्युत्तर 'हाक ऐकिली' ह्या अर्थानें योजलें जातें; उ० 'रामा !' उत्तर 'ओ !' ॐ**ओ देणें** १ कोणी हाक मारली असतां ती आपण ऐकिली अशा अर्थाचें प्रत्युत्तर म्हणून 'ओ' असें म्हणणें. २ मदतीस जाणें. ३ उपयोगीं पडणें. **दैवानें, कर्मानें**, किं०**प्रारब्धानें ओ देणें** दैव, कर्म, किं० प्रारब्ध अनुकूल असणें. **चोरांनीं, भूतांनीं**, किं० **वाघांनीं ओ देणें** त्यांचा एकाद्या विशिष्ट ठिकाणीं सुळसुळाट असणें म्ह० ते तेथें विपुल असणें.

ओ पु० ओ हें अक्षर. ॐ**ओच ओळखणें** मुलांना लिहावयाला शिकवितांना त्यांना 'ओ-नामासिधं' हा धडा प्रथम देतात. ह्यांतील पहिलें अक्षर ओ हें आहे. हें एकच अक्षर ज्याला येतें आणि ज्याची पुढच्या अक्षरांपर्यंत प्रगति होत नाहीं तो ठोंब्या असला पाहिजे. ह्यावरून 'ओ च ओळखणें' म्ह० ठोंब्या असणें. **ओच्या नांवानें शून्य** पु० अगदीं अशिक्षित; ज्याला ओ हें अक्षरही काढतां किं० ओळखतां येत नाहीं तो.

ओं स्त्री० ओकारी; उ० आज मी ओ येई तोंपर्यंत बासुंदी खाल्ली (ह्म० ओकारी येई-तोंपर्यंत म्ह० आकंठ).

ओइंचणें स० क्रि० सुपांत पीठ वगैरे घालून सुपाला कांहीं विशिष्ट प्रकारचे हासडे देऊन त्याचे बारीक कण भरड कणांपासून वेगळे करणें. वेंचणें, वैंचणें, अशींही ह्या शब्दाचीं रूपें आहेत.

ओइरण स्त्री० १ दळावयासाठीं जात्यांत एकवार घालावयाचें धान्यादिकांचें परिमाण. २ गोठ्यांत दोहों गातड्यांचे मध्यें वैरण घालावया-साठीं जी जागा राखिलेली असते ती.

ओइरणें स० क्रि० १ जात्यांत दळावयासाठीं धान्य मुठीमुठांनीं किं० पाव्यांतून घालणें. २ आपणाला नकोशी झालेली किं० अप्रिय वाटत असलेली वस्तु कोणाच्या तरी गळ्यांत बांधणें किं० टोकीवर बसविणें. ३ भात करावयासाठीं आधणांत तांदूळ ओतणें. **न०** दळतांना जात्यांत एक एकवार घालावयाचें धान्य.

ओंऊळ स्त्री० बकुळ वृक्ष. **न०** त्याचें पुष्प. ॐ**ओंऊळदोडा** पु० बकुल वृक्षाचें फळ.

ओक स्त्री० १ ओकारी, वांति. २ जें ओकून पडलेलें तें (अन्न, औषध, इ०). ॐ**कार्तिक स्वामीची ओक** स्त्री० एक प्रकारची पांढरवट माती.

ओकटा वि० वाईट; टाकाऊ; किळस किं० कंटाळा उत्पन्न करणारा (मनुष्य, पदार्थ, इ०). **पु०** प्रिय माणसाच्या वियोगानें मूल घेतें जी खंती ती.

ओकटें न० १ पेच; अडचण; संकट. २ धुवड. ३ स्मशानाकडे प्रेत वाहून न्यावयाची तिरडी. ४ कोणताही त्रासदायक किं० उपद्रवकारक पदार्थ.

ओकणें स० क्रि० १ (पोटांत गेलेलें अन्न, औषध, इ०) मुखावाटें बाहेर टाकणें. २ (शाप) उच्चारणें. ३ (गुह्य ठेवावयाची गोष्ट) प्रकट करणें. ४ (मनांत दवचत असलेली गोष्ट) बोलून दाखविणें. ५ (दुसऱ्याचें लुबाडलेलें धन त्याला) परत देणें (नाइलाजानें किं० नाखुषीनें).

ओकती [म० ओकणें] स्त्री० १ विहीर वगैरेंतून पाणी काढण्याचें एक यंत्र; एक लांब काठी असून तिच्या एका टोकाला भांडें लोंबत असतें आणि दुसऱ्या टोकाला जड धोंडा बांधलेला असतो. ही काठी एका बिंदूवर फिरणारी असते. २ ह्या काठीला जें भांडें लोंबत सोडलेलें असतें तें.

ओकरा वि० ज्याला वारंवार ओकारी येते असा.

ओका वि० जो पदार्थ किं० जो माणूस नेहेमीं ज्या जागीं असावयाचा तो त्या जागेहून नाहींसा झाल्यामुळें विशोभित झालेली (जागा); उ० उन्हाळ्याच्या सुट्टींत माझे तीन नातू येथें आले होते; ते भारी खेळकर होते; सुट्टी संपली तेव्हां ते परत आपल्या बापाबरोबर सोलापुरास गेले; हें घर आतां ओकें झालें; उ० तिनें हातांतील पाटल्या आणि तोडे काढून ठेवल्यामुळें तिचे हात ओके दिसूं लागले आहेत.

ओकाबोक [म० ओकणें] स्त्री० १ वारं-वार ओकणें; एकसारखी वांति होत असणें. २ सोंगट्याच्या खेळांतील एक प्रकार.

ओकारणें अ० क्रि० १ खंत, किळस, किं० वांतीची जी भावना तिनें आक्रांत होणें. २ अगदीं दमून किं० थकून जाणें.

ओकारा पु०, **ओकारी** स्त्री० १ ओकण्याच्या क्रियेच्या आरंभीं कंवरेळा जो हिसका बसतो तो (क्रि० येणें). २ मुद्दाम घशांत बोटें घालून वांति उत्पन्न करणें (क्रि० काढणें). ३ किळस, खंती, (क्रि० येणें).

ओकसां बोकशीं क्रि० वि० मोठमोठ्यानें हेल काढून (रडणें).

ओखट वि० खंती किं० किळस उत्पन्न कर-णारें. ॐ **ओखटवाणा** वि० कसासाच दिसणारा; ज्याला पाहून किळस किं० खंती उत्पन्न होते असा. **ओखटवण** न०, स्त्री०, **ओखटवणी** न० १ जनावरांना धुवावयाचें पाणी; जनावरांना धुत-

लेलें पाणी. २ खरकटीं भांडीं किं० हात धुतलेलें पाणी. ३ कोणत्याही कारणांनीं गढूळ किं० घाण झालेलें पाणी.

ओखटा पु० मायेचें माणूस दूर गेल्यामुळें मुलानें घेतलेली खंती.

ओखटा वि० १ किळस किं० खंती उत्पन्न करणारा. २ अप्रिय. ॐ **ओखटी वेळ स्त्री०** अशुभ वेळ; कामाला अयोग्य अशी वेळ.

ओखद [सं० औषध **] न०** औषध, दवा.

ओखदी [सं० औषधी **] वि०** औषधाच्या उपयोगाचा.

ओखरणें स० क्रि० शेत नांगरल्यावर जमीन सारखी करणें.

ओंगण न०गाडीचें किं० दुसरें कोणतेंही चाक आंसाभोंवतीं न खरखरतां फिरावें म्हणून आंसावर घालतात जें तेल तें. ॐ**घरचा गाडा झाला तरी ओंगणावांचून चालत नाहीं** आपलें घरचें किं० प्रेमाचें माणूस असलें तरी त्याला कामाबद्दल कांहींतरी बक्षीशी द्यावी लागते.

ओगर [सं० उत् (बाहेर) + गिरण (बाहेर काढणें, ओकणें) **] पु०**१ पळीनें किं० ओगराळ्यानें पात्रांतून एका वेळीं बाहेर काढलेला भात, भाजी, इ०. २ वाढपी.

ओगरणें [सं० ' ओगर ' पहा **] स० क्रि०** १ शिजलेला खाद्य पदार्थ पळीनें किं० ओगराळ्यानें पात्रांतून थोडथोडा बाहेर काढणें. २ खाद्य पदार्थ वाढणें.

ओगरू { **पु०** वाढपी {.

ओंगळ [सं० अमंगल **] वि०** किळसवाणें; हिडिस्स; घाणेरडें. ॐ **ओंगळवाणा** किळस उत्पन्न करणारा. **ओंगळसोंगळ** घाणेरडा; किळस उत्पन्न करणारा.

ओगळ खालीं ' ओघळ ' पहा.

ओघ [सं०] पु० १ प्रवाह. २ पाण्याचा वेग. ३ समूह, रास. ४ मागपासून किं० पूर्वीं पासून चालत आलेली सरणी किं० परिपाठी. ५ उत्क्रांतीच्या तत्त्वावर होत असलेला बदल. ॐ **ओघास येणें** किं० **लागणें** कामाला सुरवात होऊन तें सुरळीतपणें चालण्याच्या पंथास लागणें; उ० माझी सावकारी इतके दिवस चांगलीशी चालत नव्हती, पण आतां ती ओघास लागली असें वाटतें. **ओघास येणें** क्रमानें येणें; प्रसंगानें उपस्थित होणें. **ओघांत पडणें** व्यक्तींच्या समुदायांत पडल्याकारणानें त्या व्यक्ति जसें करतील तसें करावें लागणें.

ओघळ पु०१ बारीक प्रवाह. २ डोळ्यांतून गळणाऱ्या अश्रूंचा गालांवरून वाहाणारा प्रवाह; गळवांतून किं० जखमेंतून वाहणारा पुवाचा किं० रक्ताचा प्रवाह. ३ दोहों बाजूंस डगरी असून मधली जी सखल आणि अरुंद जागा ती. ४पाण्याच्या प्रवाहानें जमीनींत पडलेला चर.

ओघळणें अ० क्रि० १ बारीक प्रवाहाच्या रूपानें बाहेर पडणें (डोळ्यांतून अश्रु, जखमेंतून रक्त, गळवांतून पू , इ०). २ सुतांत किं०रेशमांत ओविलेले मणि, मोतीं, फुलें, इ० गळून पडणें. ३ एकादी गोष्ट स्मृतींतून गळणें किं० तिची विस्मृति होणें; आयत्या वेळीं न आठवणें. ४ टोंचलेलें नाक, कान, इ० चें छिद्र नथ, बुगड्या, इ० अलंकारांच्या भारानें किं० घर्षणानें मोठें किं० सैल होणें. ५ बारदानाला असलेल्या भोकांतून किं० फटींतून आंतील पदार्थ (तेल, तूप, तांदूळ, पाणी, इ०) बारीक धारेच्या रूपानें बाहेर पडणें. **स०क्रि०**सुतांत, दोरींत, किं० तारेंत ओविलेले मणि, मोतीं, फुलें, इ० सूत, दोरी किं० तार, इ० तून सरकावून किं० ओढून बाहेर काढणें. ५ पोत्यांतून किं० दुसऱ्या कोणत्याही बारदानांतून तांदूळ, तेल, इ० पदार्थ लहानशा भोकांतून किं० तोंडांतून लहानशा प्रवाहाच्या रूपानें बाहेर काढणें.

ओघळी स्त्री० १ लहानसा ओढा. २ लहानसर प्रवाह. ३ पाण्याच्या प्रवाहामुळें जमीनींत पडलेला चर.

ओचका पु० १ ज्या गोष्टीचा आपल्या मनाला ध्यास लागला आहे, किं० जी गोष्ट आपण उत्कंठेनें इच्छीत असतों, किं० जी गोष्ट आपणाला अप्रिय असते, तिची आठवण करून देणारा पदार्थ दृष्टीस पडला असतां किं० शब्द कानीं पडला असतां मनाला जो धसका बसतो तो; हा धसका सुखकर असेल किं० दुःखकर असेल. २ ह्या धसक्याचा मनावर झालेला परिणाम.

ओंचणें स० क्रि० सुपामध्यें पीठ वगैरे घालून सुपाला कांहीं विशिष्ट प्रकारचे हासडे देऊन त्या

पांठ इ०चे जाड कण आणि बारीक कण वेगळे वेगळे करणें; ह्याला 'वेंचणें' असेंही म्हणतात.

ओंचा पु० १ नेसलेल्या लुगड्याचा किं० धोतराचा सोंगा (जो फार लांब झाल्यास कंबरेशीं खोवितात तो). २ लुगडें, धोतर, इ०च्या प्रत्यक्ष निऱ्या न करतां मधून मधून त्याच्या कांठाचीं टोकें धरून तें धोतर किं० लुगडें आवरलें असतां कांठाचे जे भाग मोकळे सुटतात ते प्रत्येक; ह्या क्रियेस लुगड्याचें किं० धोतराचे 'ओंचे करणें' असें म्हणतात.

ओच्छेद स्त्री० सावली.

ओज [सं० ओजस्=बळ] **न०** १ जोर, बळ. २ वेग. ३ कांति, तेज, प्रभा. ४प्रकाश. ५जीवनशक्ति. ६ जननशक्ति, पौरुष. ७ (**साहित्य**) समासप्रचुर भाषापद्धति. ❀**ओजस्वी वि०** १ तेजस्वी. २ बळवान्. ['ज'च्या तालव्य उच्चार].

ओज [सं० ऊर्ज्=शक्ति, उत्साह] **स्त्री०** १ पदार्थ नीट नेटक्या स्थितींत राहावा किं० सुंदर दिसावा म्हणून त्याची जी काळजी घेतली जाते ती किं० निगा राखली जाते ती (**क्रि०** राखणें); लक्ष्यपूर्वक सांभाळ. २ काम करण्यांत व्यवस्थितपणा आणि टापटीप. ३ चातुर्य, सफाई, कौशल्य. ४ पदार्थाची काळजी; पदार्थ चांगल्या रीतीनें वापरणें किं० वागविणें. ❀**घराची ओज अंगण सांगतें** घराचें अंगण नीटनेटक्या स्थितींत आणि स्वच्छ असल्यास घराच्या आंतील सामानसुमान नीटनेटक्या स्थितींत ठेवलेलें असणारच असें मानावयाला कांहीं हरकत नाहीं. **कपड्याची ओज आपण राखली तर कपडे आपली ओज राखतील** आपले कपडे स्वच्छ आणि नीट नेटके असले तर लोक आपणाला मान देतात किं० व्यवस्थित माणूस म्हणतात. ['ज'च्या दंत तालव्य उच्चार].

ओजविणें [सं० ओजस्=बळ] **स० क्रि०** १ (कोणतेंही काम) टापटिपीनें आणि काळजीपूर्वक करणें किं० शेवटास नेणें. २ (कामाची) योग्य व्यवस्था लावणें. ३ (कोणाही माणसाला) कार्यक्षम करणें.

ओझर पु० १ पाझर, गळती. २ नाला, लहानसा ओढा. ३ पर्वतादि उच्च प्रदेशावरून अलग खालीं पडतो नद्यादिकांचा जो प्रवाह तो.

ओझरणें अ० क्रि० १ थेंबाथेंबानें गळणें; पाझरणें. २ प्रवाहाच्या रूपानें वाहणें. ३ (सूज) ओसरणें, दबणें, किं० बसणें. **स० क्रि०** खरडणें, ओरखडणें.

ओझरता, ओझडता [म० ओझरणें] **वि०** १ अर्धवट, वरवर. २ सर्व भागीं स्पर्श न करणारा. **क्रि० वि०** १ अर्धवटपणें. २ थोड्या भागाला स्पर्श करून; उ० तो बाण त्या फांदीला ओझरता लागला; उ० तो कोपरा ओलांडीत असतां मी त्याला ओझरता पाहिला किं० तो मला ओझरता दिसला; उ० हा मोरचुदाचा खडा फार झोंबरा आहे; तो डोळ्यांत अगदीं ओझरता फिरीव.

ओंजळ [सं० अंजलि] **स्त्री०** दोन्ही हातांचे तळवे एकमेकांस जोडून मध्यें केलेला जो खळगा तो (कांहीं पदार्थ घ्यावयासाठीं, बारदानांतून कांहीं पदार्थ बाहेर काढण्यासाठीं, इ०); उ० ओंजळ कर म्हणजे हीं करवंदें घालतों. ❀ **०च्या ओंजळीनें पाणी पिणें**. ०च्या अर्ध्या वचनांत असणें; ०च्या तंत्रानें चालणें; ०च्यावर अवलंबून असणें; ०ची आज्ञा आढेवेढे न घेतां पाळणें.

ओगराळें [सं० उद्गिरण; म०ओगर+आलय)] **न०** शिजलेला पदार्थ पात्रांतून थोडथोडा बाहेर काढण्याचें एक स्वयंपाकांतील साधन. पंक्तींत वाढावयासाठीं ह्याच साधनानें भाताच्या मुदा ठोकतात.

ओझील, ओझीक [म० ओझें] **वि०** १ ओझें वाहाण्याच्या कामाला योग्य किं० सोयीचा; जड ओझें वहावयाला समर्थ (बैल, घोडा, इ०). २ संसाराचें ओझें वहावयाला समर्थ असा (माणूस); ह्या दुसऱ्या अर्थानें 'ओझीक' अधिक प्रचलित आहे.

ओझें न० १ भार, वजन; उ० इतकें ओझें त्या बैलाच्या पाठीवर लादूं नका; अजून तो ओझें वहावयाला चांगलासा वहिवाटलेला नाहीं. २ आटोपसर रीतीनें बांधलेला गठ्ठा, गाठोडें, बोजा, बस्ता, इ०. ३ कर्तव्य म्हणून करावयाचें जें काम तें,—जें टाळतां येत नाहीं; उ० माझ्या डोक्यावर कुटुंबाचें ओझें आहे तें हलकें नाहीं. ४ जबाबदारी; उ० तुमच्या मुलीला स्थळ तुमचें तुम्हीच पहा; तें ओझें तुम्ही मजवर लादूं नका. ❀**ओझे-**

करी पु० ओझीं वाहणारा हेलकरी, गडी, मजूर, इ०. **ओझेरी, ओंझेल वि०** १ ओझीं वाहणारा, हमाल, हेलकरी. २ जड जड ओझीं वहावयाला समर्थ (जनावर, माणूस, इ०). ३ मोठमोठ्या कामाची जबाबदारी वहावयाला लायक किं०समर्थ.

ओंट स्त्री० एक वृक्ष. **न०** त्या वृक्षाचें फळ (ज्याचा सार इ० कामीं उपयोग होतो). ॐ**ओटवणी न०** ओंटाच्या फळाचें सार.

ओंटभरण न०, ओंटभरणी स्त्री० खालीं ' ओटी ' मध्यें ' ओटीभरण ' पहा.

ओंटळा [**म०** ओंटी] **पु०** नेसलेल्या लुगड्याची किं० धोतराची ओटी जी पदार्थ आंत भरल्यामुळें मोठी दिसते ती.

ओंटा पु०नेसलेल्या किं० पांघरलेल्या लुगड्याचा किं० धोतराचा पदर न बांधतां किं० न खोचतां कांहीं पदार्थ ठेवावयासाठीं खोलगट करतात तो; उ० हे आंबे ओंट्यांत घे आणि माजघरांत नेऊन ओत. ॐ**ओंट्यांत घालणें** १ आपलें मूल दुसऱ्याला दत्तक देणें. २ आपल्या मुलाचा संभाळ करण्याची जबाबदारी दुसऱ्यावर घालणें. **ओंट्यांत घेणें** १ दुसऱ्याचें मूल दत्तक घेणें. २ दुसऱ्याच्या मुलाचा संभाळ करण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेणें.

ओटा पु० १ बसावयासाठीं किं० अन्य-कारणांसाठीं केलेला जो दगड, विटा, इ०चा चवुतरा तो. २ गच्चीच्या चारी बाजूंस जी ठेंगणी भिंत घालतात ती; धक्क्याची भिंत.

ओटा पु० एक कीटविशेष,– जो झाडांची नासाडी करतो.

ओटारणें, ओठरणें, वटारणें स० क्रि० (माझ्या-डोळे) ताणणें किं० ताणून पाहाणें; उ० माझ्या-वर असे डोळे ओटारलेस म्हणून मी तुला थोडाच भिणार आहें !

ओटारणें अ० क्रि० १ ओटा ह्या नांवाच्या किड्यानें उपद्रुत होणें. २ खुरटणें (झाडें, मुलें,इ०).

ओटी स्त्री० हिंदू चाळींच्या घरांत माजघराला लागून पुढच्या बाजूस त्याच सपाटीवर जी बसा-उठावयासाठीं जागा असते ती; हिच्या पुढच्या बाजूस ठेंगणी भिंत असते किं० मुळींच भिंत नसते.

ओटी, ओंटी स्त्री० १ नेसलेल्या किं० पांघर-लेल्या लुगड्याचा किं० धोतराचा पदर न बांधतां किं० न खोचतां कांहीं पदार्थ भरावयासाठीं खोल-गट करतात तो. २ ओटीभरण म्हणून जो विधि आहे त्याच्यासाठीं तांदूळ, सुपारी, हळकुंड, नारळ, इ० जें साहित्य घेतात तें. ३ गाय, म्हैस, इ० पशुस्त्रियांची कास. ४ गुह्य आणि नाभि यांच्या मधला शरीराचा प्रदेश; ओटीपोट. ॐ**ओटी करणें** प्रसवसमय जवळ आला असतां गाय, म्हैस, इ०ची ओटी लठ्ठ होते; ह्या स्थितीला गाय, म्हैस, इ० नी ' ओटी केली ' असें म्हणतात. **सुवासिनीची ओटी भरणें** तिच्या पतीला आजा-रांतून बरें करणें किं० उठविणें. **मातेची ओटी भरणें** तिच्या मुलाचा आजार बरा करणें. **सुवा-सिनीची ओटी भरणें** मंगलार्थ किं० सत्कारार्थ सुवासिनीला तांदूळ, नारळ, सुपारी, हळकुंड, लुगडें, इ० पदार्थ अर्पण करणें,– जे ती आपल्या लुगड्याच्या ओटींत घेते. **ओटींत घालणें** एकाद्या माणसाचा संभाळ करण्याची जबाबदारी कोणेका-कडे देणें. **ओटींत घेणें (देणें)** मूल दत्तक घेणें (किं० देणें). **भरल्या ओटीनें क्रि० वि०** प्रसूत होऊन मुलासकट; उ० गोदे तूं बाळंतपणासाठीं जात आहेस; भरल्या ओटीनें परत येहो ! **ओटी-भरण न०** गरोदर स्त्रीची ओटी भरण्याचा संस्कार, (सुप्रसूति व्हावी म्हणून) करतात तो. २ गर्भ-धारण व्हावें म्हणून करतात जो असाच संस्कार तो.

ओठ [**सं०** ओष्ठ] **पु०** तोंडाच्या द्वाराचे जे दोन भाग खालचा आणि वरचा ते प्रत्येक. ॐ**ओठ फुटणें** थंडीमुळें ओठाला चिरा किं० भेगा पडणें. **ओठाचा जार वाळणें** अर्भकदशा समाप्त होऊन मोठें होणें; उ० अझून तुझ्या ओठावरचा जार देखील वाळला नाहीं (म्ह० तूं अझून लहा-नच आहेस). ह्याच अर्थानें " ओठाचें वाळणें किं० जिरणें " ह्या वाक्प्रचारांचा उपयोग केला जातो. जार म्हणजे मूल जन्मतांच त्याच्या ओठांवर, गालांवर वगैरे जो चिकटा किं० बुळबुळीत पदार्थ असतो तो. **तुझ्या किं० (त्याचा) ओठ पिळला तर दुध निघेल** तूं (किं० तो) अझून लहान आहेस (किं० आहे); पाजिलेल्या दुधाचीं पुटें अझून तुझ्या (किं० त्याच्या) ओठावर दिसत

आहेत. **ओठा बाहेर काढणें** बोलून दाखविणें; प्रकट करणें. **पोटांत एक आणि ओठांत एक** मनांत एक विचार आणि बोलण्यांत दुसराच. **एकाद्याच्या ओठापर्यंत येणें** बोलून दाखविण्याच्या तो अगदीं बेतांत असणें. **ओठापर्यंत आलें पण पोटांत गेलें नाहीं** ऐन उपभोगाची वेळ आली पण दुर्दैवामुळें उपभोग घडला नाहीं. ॐ**ओठतुट्या वि०** ज्याच्या ओठाला मोठी चीर आहे असा. **ओठाळ वि०** ज्याचा एक ओठ किं० दोन्ही ओठ लठ्ठ किं० बोजड आहेत असा. **ओठाळी स्त्री०** घोड्याच्या खालच्या जबड्याला लगामाच्या अभावीं जी दोरी बांधतात ती.

ओटंगण [**सं०** अवष्टंभन] **न० १** टेकावयाला आधार भिंत, लोड, तक्या, इ०. २ कोणत्याही प्रकारचा आधार किं० टेका. ३ आश्रयदाता; आपला परामर्श घेणारा माणूस. ४ आपल्या अडचणीच्या वेळीं आपण ज्याच्यावर भार घालूं शकूं असा माणूस.

ओटंगणें [**सं०** अवष्टंभ पासून] **अ० क्रि० १** तक्या, लोड, इ०चा आधार पाठीशीं घेऊन त्याला टेकणें किं० टेकून बसणें. २ आश्रयासाठीं कोणा माणसावर अवलंबून असणें. ३ आटोक्यांत किं० आवांक्यांत असणें; उ० ह्या पोथीचीं पानें अनुक्रमानें लावण्याचें काम अडाण्याला ओठंगेल असें मला वाटत नाहीं; उ० हा घोडा मी ओठंगूं शकणार नाहीं; उ० तो पोरगा मला ओठंगत नाहीं.

ओठणें अ० क्रि० स्पष्टपणें उठणें किं० वठणें (ठसा, मुद्रा, इ०). पुढें ' वठणें ' पहा.

ओठरणें वर ' ओटारणें ' पहा.

ओठविणें, ओठाविणें, स० क्रि०१ तिरस्कारानें ओठ खालीं वळविणें किं० लांब करणें. २ निर्भर्त्सिणें; ०ला टोमणे मारणें; हिणावणें; उ० त्या एकाच प्रसंगीं मी तुम्हाला जेवावयाला बोलवावयाला विसरलों म्हणून इतकें ओठावतां कशाला ?

ओठिंगण, ओठिंगणें मागें ' ओठंगण '' ओठंगणें ' पहा.

ओड स्त्री० सुरमाडाला अनेक तंतुविशिष्ट येतो जो फलससमुदाय तो.

ओड, ओडक, ओडकर, ओडगस्त, ओडण, ओडणें, इ० खालीं ओढ, ओढक, ओढवार, ओढगस्त, ओढण, ओढणें, इ० पहा.

ओड स्त्री० एक वृक्षविशेष.

ओंड वि० खोल.

ओंडकी स्त्री०, ओंडकूर, ओंडकें न०, ओंडी स्त्री० ठोकळा; लठ्ठ लाकूड (सर्पणार्थ); चुलींत किं० भट्टींत जाळावयासाठीं जे लठ्ठ आणि लांब सोट योजतात ते प्रत्येक; (हे सर्व शब्द ' ओंडा ' ह्याचीं ल्घुतादर्शक रूपें आहेत).

ओंडण वि० सखल किं० खोलगट भातशेत (ज्यांत पाणी साठूं शकतें; याच्या उलट 'उखर'). **न०, स्त्री०** खोलगट शेतजमीन (पसरट द्रोणासारखी).

ओंडण न० ढाल.

ओंडंबर [**सं०** आडंबर=गर्व, भपका] **पु०** १ मोठा पसारा. २ भपका, थाटमाट. **पु०**गारोडी.

ओडंबरी [**सं०** ' ओडंबर ' पहा] **स्त्री०** इंद्रजाळ; माया; जादूगिरी. ॐ**ओडंबरीचें लेणें न०** १ तकलादी वस्तु. २ भिकार दागिना.

ओंडवण न० सखल जमीन; पसरट द्रोणासारखा भूप्रदेश.

ओंडा वि० खोल (पाणी, इ०).

ओंडा पु० १ ठोकळा; लांब आणि लठ्ठ लाकूड (सर्पणाच्या उपयोगाचें). २ झाडाच्या खोडाचे तुकडे प्रत्येक.

ओडाण, ओढाण वि० भटकणारें, भटक्या मारणारें (गुरुं, मूल, माणूस, इ०).

ओंढ वि० खोल, खोलगट (विहीर, खड्डा, भातशेत, इ०).

ओढ [**स०** ओढणें] **स्त्री०** १ आकर्षण; कल; गतीची दिशा किं० धोरण; उ० पाण्याची ओढ स्वभावतः सखल प्रदेशाकडे असते. २ प्रेरणेचा जोर; जोराची प्रेरणा; कोणत्याही मनोविकारामुळें एकाद्या विषयाकडे किं० वस्तूकडे मनाचा झालेला कल किं०प्रवृत्ति किं०उत्सुकता; उ० हें मूल आईकडे जावयाला मघापासून भारी ओढ घेत आहे. ३ताण; (**क्रि०** बसणें, पडणें, घालणें); उ० ही दोरी थोडीशी सैल कर; बैलांच्या मानेला फार ओढ बसत आहे. ४ खेचावयाची दोरी; खेचावयाचें किं० सरकावयासाठीं योजावयाचें कांहींही साधन. ५ जें कांहीं ओढलें जातें किं० खेचलें जाते तें. ६ कांहीं पदार्थ

ओढावयाला लागतो जो जोर तो; उ० हा ओंडका चार बैलांच्या ओढीचा आहे (म्ह० हा ओंडका सरकावयाला चार बैलांचा जोर जरूर आहे). ७ कांहीं पदार्थ जमिनीवरून ओढीत किं० सरकावीत नेला असतां जमीनीवर जो त्याचा चर, ओरखडा, किं० रेघ उमटते ती. ८ पैशाची टंचाई; उ० ह्या महिन्याला माझा घरपट्टीचा हप्ता मी दिला म्हणून सध्यां माझी खर्चाची बरीच ओढ झाली आहे. ९ जिवाविशेष कष्ट झाल्यामुळें गात्रांना आलेला ताठपणा. १० कांहीं पदार्थ खेचावयाला जो जोर लागतो तो; खेचण्याची शक्ति किं० ताकद; उ० ह्या बैलाची ओढ दहा मणांची आहे. ११ सुरमाडाला अनेक तंतुविशिष्ट येतो जो फलसमुदाय तो किं० हे तंतु प्रत्येक. १२ जगांतील मोह, व्यसन, संगति, चैनीचे आणि विलासाचे पदार्थ, यांचेकडे मनाचा कल किं० प्रवणता. १३ काळजी; जबाबदारीचा भार; दुसऱ्याच्या सुखस्थितिसंबंधानें वाटत असलेली हुरहूर; उ० कांगे बाई रोड तर साऱ्या गांवाची ओढ. ꣸**एका ओढीनें** एका दमांत; तडाख्यासरशीं. **ओढी ओढ असणें** अडचणी मागून अडचण येणें. **ओढींत ओढ करून क्रि० वि०** पूर्वींची ओढ असतां तिच्यांत आणखी भर घालून म्ह० भारी ताण सोसून; उ० ह्या महिन्यांत मीं आपल्या पत्नीला दोन लुगडीं घेतलीं त्यामुळें माझी भारी ओढ झाली होती; तशांत एका जिवलग मित्रानें दहा रुपये उसनें मागितले; नाहीं म्हणतां येईना; म्हणून ओढींत ओढ करून त्याला दहा रुपये दिले; आतां मजजवळ कांहीं नाहीं. **ओढीनें एकादें काम करणें** तें लवकर संपविण्याच्या इच्छेनें त्याच्यावर सर्व शक्ति खर्चणें.

ओढक [**म०** ओढणें] **वि०** दुसऱ्यानें कांहीं समजुतीची गोष्ट सागितली तर ती न ऐकतां आपलेंच म्हणणें धरून बसणारा; हेकेखोर; हट्टी.

ओढकर [**म०** ओढणें] **पु०** बैल, टोणगा, इत्यादींचे कडून लाकडें ओढून आणून तीं विकून त्यावर उपजीविका करणारा.

ओढकाठी स्त्री० उसाच्या चरकाच्या नवऱ्याला गति देणारा दांडा.

ओढग (–घ–) स्त [**म०** ओढीनें ग्रस्त (पीडित)] **वि०** ज्याला नेहेमीं पैशाची टंचाई असते असा; सदा पैशाच्या अडचणींत असलेला.

ओढग (–घ–) स्ती [' ओढगस्त ' पहा] **स्त्री०** नेहेमींच असणारी पैशाची टंचाई किं० अडचण.

ओंढण, ओंढाण, ओंढाणी वि० सखल जमीन,–जींत पाणी सांठूं शकतें; (उलट उखर).

ओढण [**म०** ओढणें] **स्त्री०, न० १** मागील बाकी (पुढच्या हिशेबांत ओढून आणलेली). २ मागपासून चालत आलेली रूढि, चाल, परिपाठ, वहिवाट, समजूत, इ०; उ० वडिलांचें ओढण असेल त्याप्रमाणें चालावें. ३ मागें हटण्याचा किं० पुढें न जाण्याचा इट्ट किं० हेका (**क्रि०** घेणें). ४ नेसलेल्या लुगड्याचा जो पदर किं० पदराचा भाग ओढल्यानें लुगडें घट्ट होतें तो. ५ दोरी; कांहीं पदार्थ ओढावयासाठीं, घट्ट करावयासाठीं, किं० ताणावयासाठीं लाविलेली दोरी; तणाव्याची दोरी. ६ कांहीं पदार्थ ओढावयाला लागणारे श्रम किं० कष्ट; उ० वाळूमध्यें गाडीच्या बैलांना फार ओढण लागते. ७ ढाल. ꣸**ओढणगांठ स्त्री०** ओढणाच्या शेवटास जी गांठ दिलेली असते ती. **ओढणबाकी स्त्री०** मागपासून सध्याच्या हिशेबापर्यंत ओढीत आणलेली बाकी. **ओढणशिलक स्त्री०** मागच्या हिशेबांतून निघालेली आणि सध्याच्या हिशेबांत दाखविलेली शिलक.

ओढणी स्त्री० १ डोक्यावरून आणि खांद्यावरून पांघरावयासाठीं किं० शोभेसाठीं घेतलेलें वस्त्र (शाल, इ०). २ ओढण्याची क्रिया. ३ सइलसर डगला.

ओढणें स० क्रि० दूर असलेला पदार्थ आपणाकडे खेचणें किं० आणणें; एका स्थानापासून दुसऱ्या स्थानाकडे पदार्थ सरकावणें; उ० तुम्ही आपली खुर्ची ह्या खिडकीकडे ओढा म्हणजे तुमच्या पुस्तकावर चांगला उजेड पडेल; उ० हा बैल नांगर ओढावयाच्या उपयोगाचा नाहीं. २ चाकू, पेणसल, खिळा, इ०नीं रेघ काढणें. ३ मन, कान, नेत्र, इ० एकाद्या विषयाकडे किं० वस्तूकडे आकर्षिले किं० खेचले जाणें; उ० त्या गवयाच्या तानांकडे माझें लक्ष्य ओढलें गेलें. ३ दुसऱ्याची तोडजोड न ऐकतां किं० आपली किं० दुसऱ्याची सोय न

पाहातां दुराग्रहानें आपला हेका धरून बसणें; उ० हा सौदा बहुतेक जुळत आला आहे; आतां पांच रुपायांसाठीं उगीच ओढू नका. ४ (जमीन) लागवडीस आणणें. ॐओढून आणणें १ ताठ्यानें वागणें. २ कचरणें. मागें मागें घेणें. **ओढून घेणें** आपणाला कांहीं अडचणीला किं० संकटाला पात्र करून घेणें. **ओढून वळकट करणें** जें वाईट आहे तें हेकेखोरपणानें किं० मूर्खपणानें अधिक वाईट करणें. **ओढून विकणें** १ मगागाईच्या दरानें विकणें. २ स्वताला मोठ्या योग्यतेचें समजून तोऱ्यानें वागणें. **कर्ज ओढणें** कर्जावर कर्ज काढणें. **जीभ ओढणें** कांहीं आजारामुळें जीभ कोरडी आणि ताठ होणें. **बाकी ओढणें** जमाखर्चाच्या वहीत पूर्वीची शिल्लक पुढें दाखविणें. **एकाद्या शास्त्रावरून किं० कलेवरून एकाद्याला ओढणें किं० ओढून काढणें** त्या शास्त्राचें किं० त्या कलेचें त्याला थाईथाईनें ज्ञान करून देणें; त्या शास्त्राचा किंवा कलेचा त्याला ईषन्मात्र परिचय करून देणें. **श्वास ओढणें** कष्टानें श्वास घेणें. **एकाद्याला गुवावरून ओढणें** त्याची फजीती करणें; त्याला रागें भरणें; उ० राम्याला त्याची आई रोज गुवावरून ओढते पण त्याचें वर्तन कांहीं सुधारत नाहीं. **एकाद्याची री ओढणें** गवयाचा मदतनीस त्याच्या शेवटच्या शब्दाचा जो सूर लांबवितो त्याला 'री' असें म्हणतात. तो सूर लांबविणें ह्याला 'री ओढणें' असें म्हणतात. ह्यावरून एकाद्याची री ओढणें म्हणजे तो बोलेल तसें बोलणें, त्याच्या बोलण्याला दुजोरा किं० पाठिंबा देण्यासाठीं; ह्या वाक्प्रचाराचा निंदेनें उपयोग केला जातो. **ओढून चंद्रबळ आणणें** एकादी गोष्ट करावयाची मनांत उत्कट इच्छा असून बाह्यात्कारें नाखुषी दर्शविणें. टीप—मौंजीबंधनाच्या विधीला मुलाच्या लग्नकुंडलींत चंद्राचें बळ असावें लागतें. तें नसल्यास तें आहे असें कसें तरी ठरवून मौंजीबंधन आपल्या हौसेसाठीं उरकून घेतात; हें मौंजीबंधन ओढून चंद्रबळ आणून केलेलें असतें; यावरून वरील अर्थ झाला. आमचें "मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०" हें पुस्तक पहा.

ओढून ताणून क्रि० वि० मोठा प्रयत्न करून; अट्टाहास करून; पराकाष्ठेनें.

ओढणें अ० क्रि० १ मागें राहाणें; कचरणें. २ भात करावयासाठीं भांड्यांत घातलेले तांदूळ नीट न शिजतां टणक होणें किं० दाठरणें. ३ शरीराच्या गात्रविशेषाला आचका बसणें; उ० माझा डावा हात मधापासून ओढला आहे. ४ समाविष्ट झालेला असणें; उ० हा प्रांत विजापुर जिल्ह्यांत ओढतो (म्ह० मोडतो). ५ आकर्षिला जाणें; खेचला जाणें; उ० माझें मन त्या अनाथ बालकाकडे फार ओढतें; उ० बुडत्याचे पाय खोलांत ओढतात. ॐओढता घेणें, ओढतें घेण कचरणें; कचर खाणें; माघार घेणें; मागें हटणे. **ओढता धरणें किं० ओढून बसणें** हरकती काढीत बसणें; मागें मागें करणें; उत्साहपूर्वक एकाद्या कामांत न शिरणें. **ओढून धरणें** आपला हेका न सोडणें. **ओढून बोलणें** हेल काढून किं० रेकत रेकत बोलणें. **ओढून येणें** एकाद्या आजाराचा जोर होणें; तो विकोपाच्या पंथास लागणें. **जीव ओढणें** भुकेनें, तान्हेनें, किं० कष्टानें, जीव व्याकुळ होणें. **एकाद्या माणसाकडे किं० पदार्थाकडे जीव ओढणें** त्याच्या संबंधानें कळकळ, आस्था, प्रेम, हुरहुर, आवड, इच्छा, इ० वाटणें किं० वाटत असणें. **देवी, गोवर, कांजिण्या, इ० ओढणें** वाळूं लागणें. **एकाद्याचें मरण किं० काळ ओढणें** तें जवळ येणें, तो मरणाच्या द्वारीं असणें.

ओढदोरा [म० ओढणें+दोरा] **पु०** पिशवी किं० बटवा उघण्याचे आणि मिटविण्याचे जे दोरे ते प्रत्येक.

ओढप [म० ओढणें] **स्त्री०** ओढण्याचा ताण; ओढण्याचे श्रम किं० कष्ट (**क्रि०** पडणें); उ० पोतीं उचलतांना माझ्या उजव्या दंडावर विशेष ओढप पडते.

ओढपट्टी [म० ओढणें+पट्टी] **स्त्री०** कोष्टयाच्या मागाची एक विशेष उपयोगाची खुंटी.

ओढवण न० डोंगरावरून पावसाळ्यांत वाहाणाऱ्या ओढ्याचा पावसाळा संपल्यानंतरचा कोरडा चर.

ओढवणें [म० ओढणें] **अ० क्रि०** १ भोगास येणें (कांहीं अनिष्ट गोष्ट, दुःख, संकट, इ०). २ कांहीं चांगली गोष्ट प्राप्त होणें; उ० दैव ओढवलें म्हणजे ऐश्वर्य आपणास शोधीत येतें. ३

ओढला जाणें; आकर्षिला जाणें; उ० ओढवतो हात भाजीच्या पाना.

ओढा, ओंढा पु० लाकडाचा ठोकळा; लठ्ठ आणि लांब लाकूड. [भातशेत.

ओंढा वि० १ खोलगट जमीन. २ खोलगट

ओढा [म० ओढणें] पु० १ आकर्षिणें; खेचण्याची क्रिया. २ ताण, तणावा, ताणण्याची क्रिया (क्रि० बसणें, पडणें, घालणें); उ० हा चीक ह्या जागेवर लाव म्हणजे ओढा बसेल. ३ पाण्याच्या प्रवाहाचा जोर; उ० ह्या वाटेनें ही नदी ओलांडतांना पाण्याचा ओढा पावलांना फार जाणवतो. ४ कल, प्रवणता; उ० पाण्याचा ओढा सखल प्रदेशाकडे असतो; उ० रामभाऊंचा ओढा गोपिकाबाईंच्या मुलीकडे विशेष आहे. ५ आवड; उ० मुलांचा ओढा खेळण्याकडे असतो. ६ घराचा खांब यथास्थानीं नीट पक्का बसविलेला असला तरी त्याला आणखी पक्केपणा यावयासाठीं दुसऱ्या पक्क्या बसविलेल्या तुळई वगैरेशीं तो जोडतात ज्या लाकडानें तें लाकूड. ७ दोरीनें बांधलेली वस्तु पक्की बांधली जावी म्हणून जो लाकडाचा तुकडा दोरीच्या दोन पदरांत घालून दोरीला पीळ घालून आडकाविलेला असतो तो. ८ उगमापासून दोन तीन कोश वाहून पुढें नदीस मिळतो जो पाण्याचा प्रवाह तो. ९ भातशेताची लावणी केल्यानंतर नवी पात फुटूं लागली म्हणजे जुनी पात जी सुकलेली आणि मेलेली असते ती ओढून काढण्याची क्रिया. १० घरचीं किं० संसाराचीं नेहेमींचीं कामें किं० कर्तव्यें; उ० अहो सगुणाबाई, तुमच्या घरीं बसावयाला मी येऊं कशी ? सारा दिवस घरांतला ओढा मलाच एकटीला हल्लीं ओढावा लागतो. ११ गळूं, करट, इ० वर उंबराचा वगैरे चीक घालतात तो किं० त्या चिकाचा थर. १२ नारळ, पोफळें, इ०फळें झाडांवरून उतरणें. ॐ **एकाद्याचा ओढा ओढणें** त्याच्याकडे मन खेचलें जाणें; त्याची काळजी वाटणें. **ओढ्यांत ओढा वारणें** एका जरूरीच्या कामाबरोबर दुसरें जरूरीचें काम करून टाकणें. **ओढाओढ, ओढाओढी स्त्री०** १ जोराचा ताण. २ पैशासाठीं आलेला तगादा. ३ संसारांत भासणारी पैशाची टंचाई; उ० ह्या महिन्यांत मी दोघी भावजयांना मिळून चार लुगडीं विकत घेतलीं, त्यामुळें माझी खर्चाची भारी ओढाओढ झाली आहे. **ओढाखोडा पु०** नद्या, नाले, ओहोळ, पाझर, इ० समुच्चयानें किं० त्यांचे मार्ग (सजल किं० निर्जल) समुच्चयानें. **ओढाताण [म० ओढणें+ताणणें] स्त्री०** १ वस्त्रादि पदार्थ अनेकांनीं अनेक बाजूंकडे ओढला असतां त्याचेवर जो ताण पडतो तो. २ अनेक कामें एकदम करण्याचा प्रसंग आला असतां मनाला जी अस्वस्थता वाटते ती; तारांबळ. ३ दुकानदार आणि गिऱ्हाईक ह्यांच्यामध्यें पदार्थाच्या किमतीसंबंधानें जी घासाघीस किं० वाटाघाट होते ती. **ओढामाणकी स्त्री० ए० व०, ओढामाणक्या स्त्री० अ० व०** मनांत इच्छा असतां बाह्यात्कारें नाखुषी दर्शविणें; (क्रि० धरणें, लावणें, करणें, इ०); उ० हूं ! गोदे,घेऊन टाक नवऱ्याचें नांव ! उगीच ओढामाणक्या कशाला लावतेस ?

ओढावण स्त्री०, ओढावणें न० वंशपरंपरागत चालरीत किं० आचार.

ओढाळ [म० ओढणें] वि० १ नियंत्रणेंत रहावयाला नाखूष (मन, गुरूं, इ०); उ० मन हें ओढाळ गुरूं परधनपरकामिनीकडे धावे; **मोरोपंत.** २ चंचळ, अस्थिर (खेळकर मूल). ३ एका विषयावर जें एकाग्र होऊं शकत नाहीं असें (मन).

ओढीक [म० ओढणें] वि० १ ओझें ओढावयाला समर्थ किं० लायक (बैल, इ० जनावर). २ ज्याची पैशाची टंचाई झाली आहे असा. २ हेका धरून बसणारा (दुकानदार किं० गिऱ्हाईक). ४ पैसा खर्चण्याच्या कामीं चिकट; कंजूष; चिक्कू.

ओढील, ओढीळ स्त्री० नेसलेल्या वस्त्राच्या कांठाचीं दोन टोकें,-जीं कंबरेपाशीं ओढून वस्त्र घट्ट करतां येतें.

ओढें [म० ओढणें) न० उट्टें; उट्ट; सूड; अपकाराबद्दल प्रत्यपकार.

ओढ्या [म० ओढणें] पु० विधवेशीं लग्न केल्याकारणानें तिच्या पहिल्या नवऱ्यापासून तिला झालेलें मूल जें तिच्याबरोबर दुसऱ्या नवऱ्याच्या घरीं येतें तें.

ओढ्या जगन्नाथ पु० समुद्रांतून ओढून आणलेली जगन्नाथाची मूर्ति,—जी जगन्नाथ पुरी येथें पूजिली जाते.

ओणव [खालीं ' ओणवा ' पहा] **स्त्री०** १ कमरेपाशीं शरीर वाकवून शरीराचा पुढें झालेला किं० आलेला झोक.२ तोंड पुढें किं० खालीं करून उभें राहाणें.

ओणवणें, ओणावणें [खालीं 'ओणवा' पहा] **अ० क्रि०** १ कमरेपाशीं शरीर वाकवून तोंड पुढें किं० खालीं करून उभें राहाणें. २ म्हातारपणामुळें शरीर वर वर्णिल्याप्रमाणें वाकणें किं० वक्र होणें.

ओणवा [सं० अवनत=वाकलेला] **वि०** कंबरेपाशीं शरीर वाकवून तोंड पुढें किं० खालीं करून उभा राहिलेला.

ओत पु० अग्नीवर ठेविलेल्या पाणी, दूध, इत्यादि पातळ पदार्थांना कढ येऊन बुडबुडे उत्पन्न होण्याची स्थिति; ऊत. २ नदीला मोठा पूर आला असतां ज्यादा पाण्याचा प्रवाह जो कांहीं काळ नदीच्या शेजारून वाहातो तो (क्रि० फुटणें). ३ प्रवाह.

ओतणें स० क्रि० १ एका पात्रांतील पाणी, धान्य, इ० पदार्थ तें पात्र वाकडें करून दुसऱ्या पात्रांत पाडविणें किं० घालणें. २ उंबर इ० चा चीक शरीराच्या त्वचेवर उतणें, म्हणजे त्या चिकामुळें त्वचेवर पुरळ उत्पन्न होणें. ३ धातूचा रस साच्यांत घालून कांहीं प्रतिमा, भांडें, इ० वस्तु निर्मिणें. **अ०क्रि०** उंबर इ०च्या चिकानें शरीराच्या त्वचेवर पुरळ इ० रूप विकृति करणें. ***ओतकाम न०** धातूचा रस साच्यांत ओतून देवादिकांच्या मूर्ति किं० अन्य पदार्थ निर्माण करण्याचें काम, धंदा, किं० व्यवसाय.

ओतप्रोत [सं०वे=विणणें किं०शिवणें;ओत=विणलेलें किं०शिवलेलें;प्रोत=पूर्णपणें विणलेलें] **वि०** १ विणलेलें (सर्व बाजूंनीं). २ आंत सर्व ठिकाणीं शिरलेला; भिनलेला.३ पुष्कळ;विपुल. ४ सर्व बाजूंनीं किं० सर्व ठिकाणीं पसरलेला.

ओतल, वतल पु०, न० १ पाणी तापविण्याचें भांडें,—चुलीच्या किं० भट्टीच्या माथ्यावर पुरलेलें किं०लिंपून बसविलेलें.२ कोणतेंही भांडें पाणी तापविण्यासाठीं योजावयाचें.

ओताऊ,ओतींव वि० ओतून केलेलें (भांडें, मूर्ति, इ०). वर ' ओतणें ' पहा .

ओताणा पु०सोनाराचें एक हत्यार किं०साधन.

ओतारी [म० ओतणें] **पु०** ओतकाम करणारा कारागीर.

ओतींव [म० ओतणें] **वि०** ओतून केलेलें (वर ' ओतणें ' पहा). **ओतींव थालीपीठ न०** पातेलें, कढई इ०मध्यें तेल किं० तूप घालून जोंधळा, हरभरा, उडीद, इ०चें पीठ पाण्यांत कालवून पातळ करून त्यांत तिखट मीठ घालून ओतून आणि शिजवून भक्षणार्थ करतात जें खाद्य तें.

ओतु [सं०] **पु०** मांजर.

ओतू पु० मागें उतू पहा.

ओल्सा [हिं०] **वि०** १ हलका, हलक्या दर्जाचा, हलकट. २ हलक्या किमतीचा. ३ ठेंगणा.

ओथंबणें स०क्रि०१ झाड,फांदी,इ० फळें किं० फळें तोडण्यासाठीं वाकविणें. **अ० क्रि०** फळें, फुलें, इ०च्या भारानें झाड किं० फांदी वाकणें; कोणत्याही प्रकारच्या भारामुळें खालीं येणें किं ०वाकून खालीं येणें; भोजन फार झाल्यामुळें किं० पाणी फार प्याल्यामुळें पोट भारावून खालीं येणें; कांहीं आजारामुळें एकादा अवयव नेहेमींच्या स्थानापासून खालीं येणें किं० उतरणें. २ आधारासाठीं अवलंबिणें; ०चा आश्रय घेणें किं० पाहाणें.

ओथंबा पु० १ चढणाऱ्या वेलीला आश्रयार्थ जें लाकूड पुरतात तें. २ झाडाची फांदी फार वाकली असतां तिला टेकण देतात तें लाकूड. ३ कोणत्याही प्रकारचा आधार, आश्रय, टेकण, किं० पाठिंबा. ४ झाडाची फांदी इ० ना लोंबकळणें किं० लोंबकळून झोके घेणें (**क्रि०** घेणें). ५ आश्रय देणारा माणूस.

ओथळा, ओथिळा, ओथिवळा पु० पावसाची सर आल्यावर झाडांच्या पानांवरून गळणारे थेंब समुच्चयानें, किं० सरीमुळें गळून पडणारीं पानें समुच्चयानें; उ० शेत ओथिवळ्यांनीं मेलें; उ० मी पाऊस निवारला परंतु ओथिळ्यांनीं भिजलों.

ओंदण न० कोठार, दुकान, इ० च्या फळ्या बसवावयासाठीं चौकटीच्या लाकडांना ज्या खांचण्या पाडतात त्या प्रत्येक.

ओदन [सं०] **पु०, न०** शिजलेला भात.

ओंध, ओंद स्त्री० पर्जन्यकाळीं पर्जन्य फारसा पडत नसून मेघांनीं आकाश व्याप्त झालेलें असतें तेव्हांची अंधारी (**क्रि०** घालणें); उ० मेघांनीं किं० पावसानें मघापासून ओंध घातली आहे.

ओंधट [**म०** ओंध] **वि०** १फारसा प्रकाश जेथें नाहीं अशी खोली, घर, इ०. २ प्रकाशाच्या कमतरतेमुळें अस्पष्ट दिसणारा (पदार्थ). ३ मेघांनीं आच्छादित असें (आकाश).

ओनवा, वणवा पु० जळत असलेलें किं० आग लागलेलें रान.

ओप पु०, स्त्री०१ धातुमय जो पदार्थ, अलंकार, इ० त्याचेवर कवडी, ओपणी, इ०नीं घोटून आणतात जी चकाकी ती (**क्रि०** देणें). २ मुलामा.३ प्रात:काळचें कोंवळें ऊन (**क्रि०**घेणें, घेत बसणें). ४ वाफ. ५ शोभा; उ० गोऱ्या माणसाला काळा पोशाख ओप देतो. ॐ**ओपसळई स्त्री०** अलंकार, पाल, इ० ना तजेला आणावयासाठीं सोनार ज्या सळईनें घासतात ती.

ओपटणें अ०क्रि० कृश होणें,वाळणें; रोडावणें.

ओपणी स्त्री० झिलई देण्याचें एक हत्यार; ओपसळई.

ओपणी स्त्री० १ पेरणें. २ विकत देणें.

ओपणें [**सं०** अर्प्=देणें] **स०क्रि०** १हवालीं करणें; एकाद्याचें माथीं मारणें; एकाद्याकडे सोपविणें. २ विकणें. ३ वस्त्र पांढरें स्वच्छ व्हावें म्हणून तें पाण्यांत भिजवून उन्हांत पसरणें आणि त्याचेवर मधून मधून पाणी शिंपडून तें कांहीं काळ ओलें राखणें. **अ० क्रि०** वर सांगितलेल्या कृतीनें वस्त्र पांढरें शुभ्र होणें.

ओपतें न० ओपण्याची क्रिया करावयासाठीं भिजवून उन्हांत घातलेलें वस्त्र.

ओपवणी स्त्री०१ वस्त्रावर केलेली ओपण्याची क्रिया (तें पांढरें शुभ्र करण्यासाठीं). २ भांडें, दागिना, इ० ना झिलई देण्याची क्रिया. ३ मुलामा देण्याची क्रिया.

ओपाविणें स० क्रि० १ घर्षणादि क्रियेनें चकचकीत करणें. २ ०ला मुलामा देणें. ३ ओलें वस्त्र उन्हांत घालून त्यावर वारंवार पाणी शिंपडून सावकाश वाळविणें(तें पांढरें शुभ्र करण्यासाठीं).

ओपसरा पु० १ पदार्थाला चकाकी, झिलई, किं० तजेला आणण्यासाठीं त्याचेवर केलेला संस्कार (**क्रि०** देणें). २ रत्नाचें तेज वाढावें म्हणून त्याचे खालीं घातलेला चकचकीत वर्ख.

ओपळी स्त्री०प्रात:काळचें कोंवळें ऊन्ह (**क्रि०** घेणें, घेत बसणें). ॐ**ओपळीस बसणें** प्रात:-काळचें कोंवळें ऊन्ह खावयाला बसणें.

ओपावणें अ०क्रि० शरीराचा तोल संभाळून पायांच्या चवड्यांवर उभें राहाणें (उंचावरचा पदार्थ घेण्यासाठीं किं० कांहीं वस्तु पाहाण्यासाठीं).

ओपींव वि० ओप देऊन पांढरें स्वच्छ केलेलें वस्त्र (वर ' ओपविणें ' पहा).

ओफट वि० रोगामुळें किं० काळजीमुळें निस्तेज झालेलें(मुख किं० शरीर किं० माणूस).

ओफटणें अ० क्रि० रोगामुळें किं० काळजीमुळें निस्तेज होणें (मुख, शरीर, किं० माणूस).

ओफणें न० १ भूतबाधेचा झटका. २ रागाची लहर (किं० येणें, चढणें, जाणें, उतरणें).

ओंब पु० एक इमारतीच्या उपयोगाचें झाड.

ओबक पु० १ ओकारी. २ ओकारी काढणें. ३ ओकारीच्या वेळचा आवाज. [राहणें.

ओंबकळणें अ० क्रि० लोंबकळणें; लोंबकळत

ओंबकळा, ओंबकाळा पु० लोंबकळा; लोंबकळत राहण्याची क्रिया किं० स्थिति.

ओंबट न० राळा, वरी, सावा,इ० चें कणीस.

ओंबट वि० कोंबट, सोमळ.

ओबड धोबड वि० बेढब; वेडें वाकडें; अकुशलपणानें केलेलें.

ओंबण न०घराच्या माथ्याच्या वांशांवर गवत, कौलें, इ० साफ बसावीं म्हणून आडव्या बसविलेल्या कारव्या, कामट्या, इ०; ह्याला ' ओंमण ' असेंही म्हणतात.

ओंबणें स० क्रि० घराच्या माथ्याला ओंबण घालणें. ' ओंबण ' वर पहा. [सूत, इ०).

ओंबरट वि० खरखरीत, जाडें भरडें (वस्त्र,

ओबळणें स० क्रि० विशेष मेहेनत न घेतां वस्त्र धुणें; नुसतें खळबळणें (वस्त्र); साधारण धुऊन वाळत टाकणें (वस्त्र).

ओंबी स्त्री० गव्हाचें कणीस; लोंबी. **ओंब्या स्त्री० अ० व०** गवत इ० मध्यें होरपळून काढलेल्या गव्हाच्या कणसांतील दाणे (खावयासाठीं). ॐ **ओंबी टाकणें** कणसें उत्पन्न करणें (गव्हाच्या ताटांनीं).

ओंबील पु० तांबूस मुंगळा (झाडांवर वसाति [करणारा).

ओम् अव्यय मंत्रोच्चारणाच्या आरंभीं उच्चारावयाचा पवित्र शब्द; 'ओम्' ह्या शब्दाला 'प्रणव' म्हणतात; 'ओम्' चे अवयव तीन आहेत; अ (विष्णु)+उ (शंकर)+म् (ब्रह्मा).

ओमण, ओमणें 'ओवण,' 'ओंवणें' पहा.

ओमळणें 'ओंवळणें' पहा.

ओय उ० वा० अ० वेदनेचा उद्गार.

ओयरण, ओयरणें पुढें 'वैरणें' पहा.

ओयरा पु०१ रोजच्या स्वयंपाकासाठीं कोठींतून किं० त्या त्या वारदानांतून काढून आणलेले तांदूळ, डाळ, गूळ, इ० पदार्थ. २ स्वयंपाकघर; (कित्येक प्रांतांत माजघरालाही 'ओयरा' म्हणतात). ॐ **जोंवर ओयरा तोंवर सोयरा** जोंपर्यंत आपली सुस्थिति आहे तोंपर्यंत लोक आपणाशीं प्रेमानें वागतात; आपण संपन्न स्थितींत आहों तोंपर्यंत लोक आपल्याशीं मित्रत्वानें वागतात. **निराळा ओयरा कोणकोणाचा सोयरा** ? अर्थ वरच्याच सारखा.

ओर स्त्री० १ देवळाच्या बाजूंस बैरागी, यात्रेकरू, किं० पांथस्थ, इ०स कांहीं काळ वसाति करावयासाठीं बांधलेल्या ज्या खोल्या त्यांपैकीं प्रत्येक. ('ओरी,' 'ओवरी' हीं रूपें अधिक प्रचलित आहेत). २ नदीच्या किं० खाडीच्या पाण्याचा एकदम आलेला लोंढा.

ओरकल पु०, स्त्री०, न० सोन्याचा कस पाहण्याचा दगड (हा बहुधा चौकटींत बसविलेला असतो).

ओरखडणें, ओरखाडणें स०क्रि० १ ०वर रेघा काढणें. २ ०ला विचुकरे घेणें. ३ वरवर नांगरणें. ४ (कोणतीही क्रिया किं० काम) वरवर, किं० अर्धवट, किं० कुचरपणानें करणें; उ० हा पोरगा अगदीं निरक्षर नहे; त्यानें कौमुदी (किं० रघुवंश इ०) ओरखडली आहे; उ० मला मनाजोगा नांगर मिळाला नाहीं; माझे बैलही आजारी होते; मी आपलें शेत नुसतें ओरखडून काढलें झालें !

ओरखडा, ओरखाडा पु० १ चरा. २ शरीरादिकांवरून कांटा, नख, इ० जोरानें सरकत गेलें असतां त्वचा दुखावून जी रेघ उमटते ती; विचकुरा; ओरखडल्याची शरीराच्या त्वचेवर झालेली खूण.

ओरट, ओरड पु० मिरच्या इ० अग्नींत पडल्या असतां किं० कुटल्या जात असतां जो दुर्गंध किं० खकाणा नाकांत जाऊन शिंका उत्पन्न करतो किं० घशांत जाऊन ठसका उत्पन्न करतो तो; शिंकेकार्यी कुटली जात असतां किं० तेलांत कांहीं पदार्थ तळला जात असतां जो खकाणा किं० दुर्गंध नाकातोंडांत जाऊन अस्वस्थता उत्पन्न करतो तो. (आम्ही हा शब्द स्त्रीलिंगी ऐकिला आहे). ॐ**ओरढाण स्त्री०** ओरटाचा खकाणा किं० दुर्गंध.

ओरंट पु० वांग; पेटका (हातापायांत येतो तो).

ओरड स्त्री०, ओरडा पु० १ मोठमोठ्यानें ओरडणें किं० हाका मारणें किं० असें केल्यानें झालेला कलकलाट. २ तकरार, बोभाटा.

ओरडणें अ० क्रि० १ मोठमोठ्यानें बोलणें किं० हाका मारणें किं० किंचाळणें. २ तकरार करणें; असंतुष्टपणा बोलून दाखविणें. ३ वेदनेनें किं० दुःखानें किंचाळणें.

ओरंडी स्त्री०१ लांब आणि अरुंद असा जमिनीचा पट्टा. २ कठड्याला घातलेली किं० मर्यादा दाखविण्यासाठीं घातलेली ओबडधोबड भिंत; वरंड.

ओरण, ओरणें पुढें 'वैरण,' 'वैरणें' पहा.

ओरप [म० ओरपणें] पु०, स्त्री० १ उवा, लिखा, इ० केशांतून खरडून काढण्यासाठीं जोरानें केश फणीनें विंचरण्याची क्रिया; **क्रि०** करणें, घालणें. २ ओरबाडणें; शरीराची त्वचा किं० कोणत्याही पदार्थाचा पृष्ठभाग नखांनीं किं० अन्य कांहीं वस्तूंनीं जोरानें खरडणें. ३ लूट. ४ अधाशासारखें खाणें. ५ पातळ खाद्य भुरकणें. ६ द्रव्यादिकांचा अपहार; **क्रि०** घेणें, करणें. ७ पदार्थाचा पृष्ठभाग खरडून निघालेले किं० काढलेले कण.

ओरपणें स० क्रि० १ पातळ खाद्य भुरके मारीत मारीत खाणें. २ अधाशाप्रमाणें बकाबक खाणें. ३ बोटांनीं किं० फणीनें गुंतलेले केश

विचरून ते सोडविणें. ४ जीभ नखांनीं किं० अन्य साधनांनीं खरडणें (ती स्वच्छ करण्यासाठीं). ५ दुसऱ्याच्या द्रव्यादिकांचा अपहार करणें. ६ जमिनींत उगवलेलीं निरुपयोगी झुडपें, गवत, इ० उपटून काढणें. [लेला ओरखडा.

ओरखडा, ओरबाडा पु० नखादिकांनीं काढ-

ओरंबा पु० १ कठड्याची भिंत. २ मर्यादेची दरड. ३ अरुंद आणि लांबलचक जमीनीचा उंचवटा.

ओरवा पु० १ कांहीं काळ गलबताचा नांगर पाण्यांत सोडून गलबत ठाणेबंद करणें. २ गलबताची ठाणेबंदी. ३ गलबताच्या मुक्कामाला सोयीचें ठिकाण.

ओरष्टाण स्त्री० वर ' ओरढाण ' पहा.

ओरा, ओंरा पु० मागें ' ओयरा ' पहा.

ओरा [**हिं०**] **पु०** लाडवासारखा साखरेचा गोळा केलेला असतो तो (मुलांच्या आवडीचें खाद्यविशेष).

ओरा पु० मोठें शेत एकदम सबंध नांगरतां येत नाहीं म्हणून त्याचे लहान लहान भाग पाडून एक भाग नांगरणें झाल्यावर दुसरा, दुसरा नांगरणें झाल्यावर तिसरा भाग नांगरतात, आणिं अशा रीतीनें संबंध शेत नांगरतात; ह्या भागांना 'ओरे' म्हणतात.

ओरी स्त्री० देवळाच्या बाजूंस बैरागी, यात्रेकरू, किं० पांथस्थ, इ०स कांहीं काळ वसति करावयासाठीं बांधलेल्या ज्या खोल्या त्या प्रत्येक; (मागें ' ओर ' पहा).

ओल [**सं०** ओल=ओला] **पु०, स्त्री०** १ जमीन किं० भिंत ह्यांना लोणा येऊन जी कायमची आर्द्रता त्यांना येते ती. २ अपेक्षा किं० आशा करावयाला प्रमाण किं० कारण; उद्दिष्ट कार्य सफल होईल ह्या संबंधाचा संभव; उ० रामभाऊ वारंवार गोविंदपंताच्या भेटीस जातो तो उगीच नाहीं जात; तेथें कांहीं ओल त्याला दिसत असली पाहिजे. ॐ**ओल धरणें** पाऊस पडून जमीन भिजलेली असतां तीं नांगरणें(जमीन सूर्याच्या उन्हानें पुन्हां वाळावयाच्या अगोदर). **ओल ना फोल** लभ्यांश कांहीं देखील नाहीं; सर्व खटपट किं० आशा विफल किं० फुकट. **ओल आहे कीं फोल आहे ?** खटपटीला कांहीं फळ येण्याचा संभव आहे कीं खटपट फुकट जाणार आहे ? **ओलीला ओल मिळणें** पूर्वी पावसानें ओली झालेली जमीन वाळावयाच्या अगोदर पुन्हां पाऊस पडणें.

ओल [**सं०** ओल किं० ओल्ल=१ ओला. २ हडप, ओल] **स्त्री०** शत्रूनें तहाच्या अटी पाळाव्या म्हणून त्याच्याकडून खातरजमेसाठीं त्याचा मनुष्य मागून घेऊन अटी पुरविल्या जाईपर्यंत त्याला अडकावून ठेवणें. ॐ**ओलीस देणें** किं० **ठेवणें** वर सांगितलेल्या व्यवहाराला अनुसरून आपला मनुष्य शत्रूला देणें किं० त्याच्याकडे ठेवणें.

ओल स्त्री० ठाणांतून फाडून काढलेला पांच सहा हात लांबीचा कापडाचा तुकडा,—जो शेल्याप्रमाणें पांघरतात, किं० गादीवर चादर म्हणून वापरतात तो.

ओलंगर पु० पाझरणें, टपकणें.

ओलट [**सं०** ओल=ओला] **वि०** अर्धवट ओलें; खडखडीत न वाळलेलें (वस्त्र, लाकूड, इ०). **स्त्री०** सर्पणासाठीं तोडलेले झाडाचे तुकडे,—अर्धवट ओल्या स्थितींत असलेले.

ओलट, ओलटा [**सं०** ओल; **म०** ओला] **पु०** ओल्या लाकडाचा बारीक तुकडा (झाडावरून फळ पाडावयासाठीं फेकला जातो तो). ॐ**पडला तर आंबा नाहीं तर ओलट** काठी मारून आंबा पडला तर लाभ होईल; पण आंबा न पडतां त्यावर मारलेली नुसती काठी जरी खालीं पडली तरी तो लाभच (म्ह० झाला तर फायदा होईल; फायदा नाहीं झाला तरी निदान नुकसान तरी कांहीं होणार नाहीं). ॐ**आंबा नाहीं ओलटही नाहीं** अपेक्षिलेला लाभ होणें बाजूलाच राहिलें, हानि मात्र झाली.

ओलंडणें, ओलांडणें [**सं०** उत्+लंघ्] **स० क्रि०** उल्लंघणें, अतिक्रमणें, उल्लंघून पलीकडे जाणें; उ० आम्ही होडीनें नदी ओलांडली.

ओलंडा, ओलांडा [**सं०** उत्+लंघ्] **पु०** १ कोणा माणसाला गळवें झालीं असतां सात बिब्बे एका फडक्यांत बांधून त्याला सात गांठी देऊन ती पुर्चुंडी रस्त्यांत टाकतात ती.(ही पुर्चुंडी ओलांडणाऱ्या माणसाकडे त्यांचीं

गळवें जातात अशी समजूत आहे).२ ही पुचुंडी जो ओलांडितो त्याला होतात तीं गळवें समुच्चयानें. ३ रस्त्यांत जेथें मोठी चीर असते जींत पाऊल टाकतां येत नाहीं आणि जी ओलांडून पुढें जावें लागतें ती चीर. ꣸ **ओलंडा** किं० **ओलांडा बाधणें** १ ज्याला गळवें नाहींत अशा मनुष्यानें वर वर्णिलेली पुचुंडी ओलांडली असतां त्याला गळवें होतात त्याला "ओलांडा बाधणें" असें म्हणतात. २ उपदंश म्ह० फिरंगी रोग ज्याला झाला आहे अशा मनुष्यानें जेथें लघवी केली असेल तेथें दुसरा कोणी लघवीस बसला असतां किं० ती लघवी ओलांडून कोणी माणूस गेला असतां त्यालाही तो फिरंगी रोग होतो, त्यालाही 'ओलंडा बाधणें' असें म्हणतात.

ओलपटणें स० **क्रि०** वृक्षादिकांवरील फलादिक पाडविण्यासाठीं फेकलेला ओलटा किं०ओलपटा.

ओलपटा पु०, **ओलपटणें** न० वर 'ओलटा' पहा.

ओलवट स्त्री०ओलें लाकूड.

ओलवण न०, **ओलवणी** स्त्री० [म० ओला] १ भात, भाकरी, इ० घट्ट किं० कोरडीं खाद्यें सोयीनें खातां यावीं म्हणून ताक, दूध, इ० पातळ पदार्थ जे त्या खाद्याच्या बरोबर खावयाला घेतात ते. २ गिलाव्यासाठीं केलेला चिखल फार घट्ट झालेला असल्यास त्यांत घालतात तें पाणी. ३ भाकरी, पोळी, इ० करतांना पीठ भिजविण्यासाठीं त्यांत घालतात जें पाणी तें; ओतवणी.

ओलवण [म० ओला] स्त्री० ज्या जमीनींत गुरांना खावयाला हिरवें गवत मिळतें ती जमीन किं० तिच्यावरचें गवत.

ओलवत [म० ओला] स्त्री० दमट किं० ओलसर जमीनींत हिरव्या गवताचे मधून मधून टापू असतात ते प्रत्येक.

ओलवा, ओलावा [म० ओला] पु० जमीनीला किं० भिंतीला लोण्यामुळें आलेली ओलेपणाची स्थिति.

ओलवाहु [म० ओल] वि० १ जींत पाणी फार मुरलेलें आहे अशी (जमीन) म्ह० आंतून दमट अशी (जमीन). २ अशा जमीनींत केलेलीं पिकें; 'ओलवाहु' ह्याच्या उलट 'कोरडवाहु.'

ओलविणें [म० ओला] स० क्रि० पाणी मारून किं० पाण्यांत घालून ओलें करणें (गहूं, तांदूळ, इ०).

ओलसर [म० ओला] वि० किंचित् ओला. स्त्री० दमटपणा, ओलेपणा.

ओला [सं० ओल किं० ओल्ल = ओला] वि० १ पाण्यानें भिजलेला किं० भिजविलेला. २ ज्यांतील पाण्याचा अंश नाहींसा झाला नाहीं असा (पानें, फळें,इ०). ३ ज्यापासून कांहीं लाभ होण्याजोगा आहे असा(व्यवहार,व्यापार,उलाढाल, इ०); फायदेशीर. ४ अंतर्यामींचा; वरवरचा नव्हे असा;अंतःकरणपूर्वक(आदर,सन्मान,भाषण,इ०). ५ सकस; सत्त्वांशानें युक्त. ६ संपत्तिवान्; (उलट भुकेबंगाल).꣸ **हात ओला तर मैत्र भला** आपण वारंवार खाद्यें, वस्त्रें, किं० पैसे देत असतों तोंपर्यंत मित्राची मैत्री टिकते; आपणापासून कांहीं लभ्यांश होत नाहीं असें दिसतांच आपले मित्र आपणास सोडतात; समानार्थक म्हण,– जोंवर ओयरा तोंवर सोयरा. **ओलें कोरडें पाहाणें** चोखंदळेपणानें जेवणें किं० खाद्यें खाणें. **ओलें जाळणें** अतोनात छळणें; सतावणें. **ओला इसप** पु० ज्या इसपांतून सदा लस वाहते असा इसप (एक त्वचेचा रोग). **ओलाकचकचीत** वि० अगदीं ओला. **ओलाचिंब, ओलातिंब** वि० अगदीं ओला किं० पाण्यानें भिजलेला. **ओलादंड** पु०सतत वाहणारा पाण्याचा पाट किं० प्रवाह. **ओला दुकळ, ओला दुष्काळ** पु० अतिवृष्टीमुळें झालेल्या शेतांच्या नासाडीमुळें उत्पन्न झालेली महागाई. **ओलादेठ** पु० पूर्ण परिपक्व न झालेलीं धान्याचीं ताटें,गवत, इ०. **ओला नायटा** पु० चिघळत असलेला नायटा (एक त्वचेचा रोग). **ओली आग** स्त्री० अतिपर्जन्यामुळें उत्पन्न झालेलें दुर्भिक्ष्य किं० महागाई. **कोरडी आग पुरवेल पण ओली आग पुरवणार नाहीं** अवृष्टीच्या संकटांपेक्षां अतिवृष्टीचीं संकटें अधिक दुःसह असतात.ही म्हण उलटीहि रूढ आहे ह्मं०'ओला'आणि 'कोरडा' ह्या शब्दांच्या स्थानांची अदलाबदल करून. **ओलीकूस** स्त्री० नूतन प्रसूत झालेली जी मनुष्यादि स्त्री तिचा तो रजःस्राव आहे तोंपर्यंतच

जो गर्भाशय तो; (पुनः गर्भधारणाचा संभव वक्तव्य असतां). **ओली भांग स्त्री०** तापट त्रासिक, उपद्रवी, किं० छळिक माणूस. **ओली भिक्षा स्त्री०** शिजविलेल्या अन्नाची भिक्षा किं० याचना; माधुकरी; (कोरडी भिक्षा म्ह० धान्य, पीठ, इ० ची याचना). **ओली ममता स्त्री०** अंतर्यामापासूनची माया;वरवरची नव्हे अशी माया; नुसती शाब्दिक नव्हे ती माया. **ओलें अंग न०** नूतन प्रसूत स्त्रीचें अंग. **ओलें कुष्ट न०** लसेनें डवडवलेलो रक्तपिती. **ओलेंपालें न०** जनावरांचें ओलें खाद्य म्ह० हिरवें गवत, पानें, इ०.

ओलाचा [म० ओला] **वि०** पावसाचें किं० विहिरीचें किं०पाटाचें पाणी नसून केवळ जमीनीच्या अंगच्या ओलाव्यावर केलेलें(ऊस इ० चें पीक).

ओलांडणें [सं० उत्+लंघ् (अतिक्रमणें)] **स० क्रि०** ०च्या पलीकडे जाणें; मागें टाकणें; अतिक्रमणें; ०च्या वरून जाणें; उ०नदी ओलांडणें.

ओलांडा पु० मागें ' ओलंडा ' पहा.

ओलाणी[सं०अवलंबन]**स्त्री**०१ कपडे वाळत घालवयाची दोरी.२ कपडे,वस्त्रें,इ०लोंबते टाकावयाची दोरी.३ लामणदिवा टांगावयाची दोरी किं०सांखळी.

ओलाणें [सं० अवलंबन] **न०** २ लामणदिवा टांगावयासाठीं लोंबती सोडलेली दोरी किं०सांखळी. २ स्नान करतें वेळीं कंबरेला वेढून घेतलेला पंचा, जुनेर, पडदणी, इ०. [विणें' पहा.

ओलावण,ओलाविणें मागें 'ओलवण' 'ओल-

ओलावा [म० ओला] **पु०** १ ओलेपणा, दमटपणा; उ० ह्या भिंतीला टेकून बसूं नका; तिला नुकताच गिलावा केलेला आहे; भिंतीचा ओलावा अझून चांगलासा वाळला नाहीं. २ कोणाची दीन स्थिति पाहून किं० ऐकून हृदयाला जो कळवळा येतो तो; अंतःकरणाला आलेला द्रव. ३ एकाद्या धंद्याचा फायदेशीरपणा किं० किफायतीचा अंश; उ० बटाट्याच्या व्यापारांत सध्या कांहीं ओलावा नाहीं. ४ पैशाचा जोर. ५ लाभ. ६ सत्त्वांश. ७ बुद्धि, विद्वत्ता, पराक्रम, इ० च्या योगानें अंगीं आलेलें सामर्थ्य.ꕥ**ओलाव्याचा वि०**१ज्याचे ठायीं ओलावा आहे असा. २ किफायतशीर किं०फायदेशीर(धंदा,उद्योग,खटपट,व्यवसाय, व्यापार,इ०).३ सत्त्वस, सकस.४ दयाळू, प्रेमळ (अंतःकरण, मन, इ०).५ खरी किं०अंतर्यामापासून असलेली (माया, प्रेम, इ०).

ओलाह्वा [म० ओला+आह्वा (आश्रय)] **पु०** भूम्यादिसंबंधी ओलाचा आश्रय; ओली भींत किं० जमीन, पाणी, इ० चें सांनिध्य किं० शेजार. उ० ही निवडलेली भाजी ओलाह्यास ठेव म्हणजे ती उद्यापर्यंत टिकेल.

ओलेटा, ओलेता [म० ओला] **वि०** १ स्नान केल्यानंतर ओलें वस्त्र ज्याणें अद्यापि बदललें नाहीं आणि अंग पुसलें नाहीं असा. २ स्नान करावयासाठीं जो ओला पंचा इ० नेसला आहे असा. ३ पाण्यानें ओला झालेला (कपडा धोतर, लुगडें, चोळी, सदरा, इ०). [किं० कपडा.

ओलेटें, ओलेतें [म० ओला] **न०** ओलें वस्त्र

ओल्हांटणें, ओल्हांटा वर ' ओलपटणें, ' ' ओलपटा ' पहा.

ओल्हांडणें, ओल्हांडा ' वर 'ओलांडणें, ' 'ओलांडा' पहा.

ओवंडा पु०१ मालक जेथें राहतो त्या गांवाच्या हद्दीबाहेर असलेलें शेत किं० त्या शेताची लागवड करणें; आपल्या वसतीच्या गांवाहून अन्यत्र सर्वांशीं किं० अंशतः केलेला किं० चालविलेला धंदा, व्यापार, इ०. ꕥ **ओवंडेकरी, ओवांडकरी, ओवंडकरू पु०** ओवंड्याचा मालक; ओवंडा करणारा. [गांठणें.

ओवण स्त्री० १ शिवणें. २ ओंवणें.३ गुंफिणें,

ओंवणें स० क्रि० १ सुईच्या नेढ्यांत दोरा घालणें (कांहीं शिवण्यासाठीं). २ मणि, फुलें, इ०च्या छिद्रांत दोरा भरून माळ इ० करणें किं० गुंफिणें. ३ शिवणें (अशिक्षितांत). ४ श्लोक, वाक्य, इ० त पदें, अक्षरें, किं० कांहीं अर्थ इ० संबद्ध करणें.

ओवर [सं० ' वधूवर ' चा अपभ्रंश :] **न०** नूतन विवाहित नवरा आणि बायको; वधूवरांचें जोडपें (लग्न ज्या गांवीं झालें असेल त्या गांवाहून परत आलेलें किं० लग्नानंतर प्रथम देवदर्शनाला निघालेलें किं० हें देवदर्शन करून परत आलेलें). ' ओंवरें,' असा **न०अ०व**०शब्दही वरील अर्थानेंच योजला जातो, (ओवर, ओवरें, हे शब्द अशिक्षितांच्या भाषेंत येतात).ꕥ **ओवरजत्रा, ओवर-**

यात्रा स्त्री० नूतन विवाहित वधूवरांनीं कुलदैवताचें दर्शन घ्यावयाला जाणें किं० तन्निमित्त निघालेली मिरवणूक. **ओंवरजेवण न०** वधूच्या बापानें वधूवरांस दिलेली मेजवानी.

ओंवरा पु० स्वयंपाकघर.

ओवरी स्त्री० देवालयाच्या आवारांत किं० तीर्थाचे सन्निध यात्रेकरू, बैरागी, प्रवासी, इ०साठीं बांधलेल्या लहान लहान खोल्या.

ओंवसणें [**म०** वसा] **स० क्रि०** (कांहीं विशिष्ट व्रत किं० नेम) पाळणें किं० आचरणें; उ० लग्नानंतर मुलीला पांच वर्षे मंगळागौर ओंवसावी लागते.

ओंवसा, वसा पु० देवतेच्या प्रसादार्थ किं० केवळ पुण्यार्जनार्थ किं० कांहीं विशिष्ट कामनेच्या साफल्यार्थ बायका जें व्रत करतात तें किं० जो नियम पाळतात तो (**क्रि०** घेणें, होणें).

ओंवक स्त्री० एक विशिष्ट फुलझाड. **ओंवळदोडा पु०** त्याचें फळ.

ओंवळा [**सं०** अमंगल] **वि०** केवळ सोंवळा नव्हे आणि विटाळाचा नव्हे असा जो मध्यस्थित मनुष्य (किं० वस्त्र) तो (किं० तें).

ओंवळी, ओंऊळ स्त्री० एक झाड; त्या झाडाचें फूल.

ओंवळ्या भोंवळ्या स्त्री० अ० व० मुलांचा [एक खेळ.

ओंवा पु० १ एक औषधी बीज; तें अति तिखट असतें. २ हीं बीजें ज्या झाडापासून मिळतात तें झाड. ❀**ज्याचें पोट दुखेल तो ओंवा मागेल** ज्याला एकाद्या पदार्थाची जरूरी लागेल तो त्या पदार्थाचा शोध करील.

ओवांडा, ओवांडेकरी, ओवांडकरी मागें ' ओवंडा, ' ' ओवंडकरी ' पहा.

ओंवाळणी [**म०** ' ओवाळणें ' पहा] **स्त्री०** १ आपणास कोणी दिवाळी इ० प्रसंगीं ओवाळलें असतां त्यास सन्मानार्थ जें द्रव्यादि देतात तें. २ कथादिकांचे समाप्तीस हरिदास इ० वरून पैसा किं० कांहीं नाणें ओंवाळून टाकतात तें.

ओवाळणें [**सं०** अव + ज्वलन] **स० क्रि०** लामणदिवा किं० जळतें निरांजन ज्यांत ठेविलें आहे असें तबक किं० ताम्हण हातांत धरून तें देवापुढें किं० सन्मान्य गृहस्थापुढें किं० नवऱ्यामुलापुढें वर्तुळाकार फिरविणें, —त्याचा आशीर्वाद मागण्यासाठीं किं० प्रसाद मागण्यासाठीं किं० त्याचें कल्याण होओ अशी इच्छा दर्शविण्यासाठीं. लामणदिवा इ० ओवाळणें, (**स० क्रि०**). लामणदिवा इ०नें ओवाळणें (**अ० क्रि०**). एकाद्याला ओंवाळणें (**स० क्रि०**).

ओंवी [**म०** ओंवणें] **स्त्री०** १ मराठी भाषेंतील एक छंद; (ह्या छंदांत मुक्तेश्वर वगैरेंची कविता आहे). २ मुलांना निजवितांना आया, दळतांना स्त्रिया, किं० झोपाळ्यावर झोपा घेतांना मुली, जीं यमकयुक्त गाणीं म्हणतात तीं प्रत्येक.

ओशंग [**सं०** उत्संग=मांडी] **पु०** मांडी. हा शब्द पुढील वाक्प्रचारांत मात्र येतो. एकाद्याच्या ओशंगाला देणें किं० घालणें, असणें किं० पडणें किं० राहाणें म्ह० त्याच्या आश्रयाखालीं किं० रक्षणाखालीं ठेवणें किं० असणें.

ओशट, ओशेट [**सं०** ' उच्छिष्ट ' पासून] **वि०** १ तेलकट; चरबीनें माखलेलें; ज्याला तेलाचा किं० तुपाचा किं० स्निग्ध पदार्थाचा वास येत आहे असा; उ० ह्या चिरगुटाला ओशट घाण येत आहे; उ० हें ओशट फडकें पाणी गाळावयाला घेऊं नको. २ ज्यांत तेल किं० तूप आहे असें (खाद्य); उ० तुला खोकला झाला आहे; ओशट असें कांहीं खाऊं नको. **न०** ज्यांत तेल किं० तूप विशेष आहे असें खाद्य.

ओशत (–द) स्त्री० (अनिष्ट परिणामांसंबंधानें बोलतांना) छाया, — वृक्षाची, दिव्याची, बाजेची, मनुष्याची, इ०; उ० तूं त्या आडुळशाच्या ओशतास बसून दशमी खालीस म्हणून तुझ्या अंगावर हे नायटे उठले.

ओशाळ [**सं०** अव (नाहीं) + शाला (चांगली चाल)] **वि०** १ निर्लज. २ स्वच्छंदी, स्वैरवर्तनी; उ० ओढाळ गुरूं आणि ओशाळ बायको वागवावयाला कठिण.

ओशाळण [**म०** ओशाळा] **अ० क्रि०** १ लज्जित होणें; खजील होणें; शरमिंदा होणें (आपण केलेली चुकी उघडकीस आली असतां); उ० मी शिंप्याला शर्ट शिवावयाला कापड दिलें; त्यानें विस्मृतीनें सदरे शिवून आणिले; हें तूं काय केलेंस म्हणून मी विचारिलें तेव्हां तो भारी ओशाळला. २ जो गुणानें आपणाहून अधिक आहे त्याचे पुढें दबकणें किं० संकोच पावणें.

ओशाळा [**सं०** अव (नाहीं) + शाला (सद्वर्तन]) **वि०** १ शरमिंदा; लज्जित. २ दबकलेला; संकोचलेला. ३कोणेकाच्या उपकारांत किं० मिंधेगिरींत असलेला; ०चा मिंधा झालेला; उ० तूं कितीसा माझ्या उपयोगीं पडला आहेस ? मी कांहीं तुझा ओशाळा नाहीं. ॐ **ओशाळगत, ओशाळी, ओशाळीक स्त्री०** १ लाजलेपणाची स्थिति किं० भावना; लाज; संकोच. २ दुसऱ्याच्या उपकाराच्या ओझ्याचें दडपण; उ० मला तुझी ओशाळगत कशाला पाहिजे ? तुझ्या रुमालाबद्दल हें घे पागोटें; किंवा मी रुमालाची तुला पडलेली किंमत देतों; नको म्हणूं नको. [वरचा उंचवटा.

ओशिंड (–ढ), वशिंढ न० बैलांच्या माने-

ओशेटा पु० १ दूरच्या किं० जलद जाणाऱ्या पदार्थाचा अंधक, अस्पष्ट, ओझरता, किं० अर्धवट देखावा. २ वृक्षाची छाया; सावट (भाजीपाल्याच्या वाढीला अपायकारक).

ओषधि, ओषधी [**सं०**] **स्त्री०** फळ पिकल्यावर मरणारी वनस्पति. ॐ**ओषधीश, ओषधि (–धी–) नाथ पु०** चंद्र.

ओष्ठ [**सं०**] **पु०** ओठ. ॐ**ओष्ठ आस्वादणें** ओठाचें चुंबन घेणें. **अधरोष्ठ पु०** तोंडाच्या दोन ओठांपैकीं खालचा. **अधरोष्ठपान न०** खालच्या ओठाचें चुंबन.

ओष्ठ्य [**सं०**] **वि०** ओष्ठस्थानचा वर्ण; ओठांतून किं० ओठांनीं उच्चारला जाणारा (वर्ण); उ० उ, ऊ, प, फ, ब, भ, म हे ओष्ठ्य वर्ण होत; उ० ओ, औ हे कंठोष्ठ्य वर्ण; व हा दंतौष्ठ्य वर्ण.

ओष्णावणें, ओष्णेणें, ओसणणें, ओसणवणें, ओसणावणें, ओसंडणें [**सं०** उत् + स्वप्न] **अ० क्रि०** १ झोपेंत बोलणें. २ बरळणें.

ओस वि० १ निर्जन; निर्मनुष्य. २ लोकांनीं सोडून दिलेला (गांव, प्रदेश, इ०). ३ जिच्यांत शेतें, बागा, इ० केल्या जात नाहींत अशी (जमीन); पडीत (जमीन). ४ उजाड.

ओस [**म०** ओसणें] **स्त्री०** भात झोडल्यावर त्या तृणाच्या पेंढ्या बांधतेसमयीं कवळी अग्रभागीं धरून झाडली म्हणजे त्यांतून आखूड किं० कुजका तृणांश जो खालीं पडतो तो.

ओस स्त्री० १ दोन नाकपुड्यांच्या मधल्या पड्याच्या आरंभांचा भाग. २ नारळाचीं सोडणें, केळीच्या बुंध्याचीं सोपटें, माडाच्या मृत होऊन लोंबणाऱ्या झावळ्या इ० ओरबाडून किं० फाडून तोडून काढलेले भाग.

ओस न०, ओसंग पु० झाडाची छाया; सावट (लहान लहान झुडपांना अपायकारक). [वृक्षविशेष.

ओसग, ओसगी [**सं०** अशोक] **स्त्री०** एक

ओसंग, ओसंगा [**सं०** उत्संग=मांडी] **पु०** १ मांडी. २ आश्रय; सांनिध्य. ॐ**०च्या ओसंगीं घालणें** किं० **देणें** ०च्या संरक्षणाखालीं ठेवणें; ०च्या देखरेखीखालीं ठेवणें; ०च्या हवालीं करणें. **ओसंगीं निघणें** आश्रयार्थ किं० प्रसादार्थ लीन होणें.

ओसंगळ स्त्री० [**सं०** उत्संग=मांडी] **स्त्री०** १ आश्रय; आधार. २ संरक्षण; कृपाछत्र.

ओसट ' ओशट ' पहा.

ओसट न० झाडाची सावली,–जी लहान झुडपांना अपायकारक असते; सावट.

ओसंड, ओसंडें न० बैलाचें वशिंड,–मानेजवळचा मांसमय उंचवटा.

ओसंडणें, ओसांडणें, वोसडणें अ० क्रि० १ गळणें; गळून पडणें; पडणें; तुटून पडणें; सांडणें. २ कांठोकांठ भरून बाहेर सांडणें (पात्रांतून पाणी, अंतःकरणांतून प्रेम इ० भावना). ३ पात्रादि आधारानें पाणी इ० आधेय बाहेर टाकणें. ४ सोडणें, परित्यागणें, सोडून देणें.

ओसण, वेसण(–न) स्त्री० बैलाच्या नाकांत ओविलेली दोरी,–जी ओढली असतां बैल आटोक्यांत ठेवतां येतो.

ओसणणें, ओसणवणें, ओसणावणें, ओसंडणें [**सं०** उत्+स्वप्न] **अ० क्रि०** १ झोपेंत बोलणें. २ वडबडणें. ३ बरळणें.

ओंसणें स० क्रि० १ नारळ, पोफळ, वगैरे फळांची साल सोलणें. २ झाडाचा बुंधा, फांदी, इ०ची साल काढणें.

ओसत, ओसद मागें ' ओशत ' पहा.

ओसंबणें, उसंबणं अ० क्रि० १ हुंदके देऊन रडणें. २ रोदनाचा जोर कमी होऊं लागला असतां हृदय, कंठ, इ०स हिसके बसणें.

ओसर [**सं०** अव (बाजूला)+सृ (सरणें)] **पु०** आपण बाजूला होऊन दुसऱ्याच्या गतीला दिलेली वाट; पदार्थाच्या मार्गांतील अडथळा दूर होणें किं० करणें; वाव; अवकाश. २ गळवाची सूज, नदीचें पाणी, इ०चें कमी होणें.

ओसरणें [**सं०** अव (बाजूस) + सृ(सरणें)] **अ० क्रि०** १ नदीचें पाणी, गळवाची सूज, आजार, मनोविकार, वैभवाचा काळ, पाऊस, इ०चें शांत होणें, शमणें, कमी होणें, किं० हटणें.

ओसरी स्त्री० हिंदू चालीच्या घरांत माजघराला लागून त्याच सपाटीवर जी जागा असते (पुरुषांच्या बसण्याउठण्याची) ती; तिला 'ओटी' असेंही म्हणतात.

ओसवा पु० झाडाची छाया (लहान झुडपांना अपायकारक); सावट.

ओसा पु० शेतांत किं० मळ्यांत लावलेल्या किं० पेरलेल्या धान्यांत किं० भाजीपाला वगैरेंच्या रोपड्यांत मधून मधून रिकामी सोडलेली किं० रिकामी झालेली जागा किं० प्रदेश.

ओसाड वि० मानवी वसति जेथें नाहीं असा (गांव, प्रदेश, इ०); उजाड; निर्जन.

ओसाडा पु० पावसाचे तुषार (जे घरांत वाऱ्याच्या जोरानें येतात ते); पावसाचे थेंबटे; पाण्याचे शिंतोडे. 'ओसाडे' असें अनेकवचनी रूप बहुधा योजलें जातें; (**क्रि० येणें**).

ओसाडी [**म०** ओसाड] **स्त्री०** १ उजाडपणा; निर्जनता; शुकशुकाट. २ निर्जन जागा; जेथें मनुष्यें, पशु, इ० ची वसति नाहीं असा प्रदेश.

ओसार [**सं०** अव + सृ (सरणें)] **पु०** १ दुसऱ्याला जावयाला दिलेली वाट (**क्रि०** देणें). २ पाणी ओसरणें किं० उतरणें; पाणी कमी होणें. ३ गळूं, कांहीं दुखणें, इ०चें दबणें किं० हटणें.

ओसारा ['ओसार' पहा] **पु०** तहकुबी; खंड.

ओसीक [**म०** ओस] **वि०** लागवड न होतां रिकामी पडलेली (जमीन).

ओस्तें न० वृक्षाची छाया किं० ह्या छायेची [काळोखी.

ओहट पु०, ओहटी स्त्री०, ओहटें न० [**सं०** अप + अटन (भ्रमणें)] **म०** ओहटणें; समुद्राचें पाणी पूर्ण चढल्यावर तें पुन्हां उतरत जाणें; (उलट 'भरती').

ओहटणें ['ओहट' पहा] **अ० क्रि०** १ समुद्राची भरती पूर्ण झाल्यावर तें क्रमाक्रमानें उतरत जाणें किं० कमी कमी होत जाणें. २ (वैभव) कमी कमी होत जाणें; अपकर्षाची स्थिति येऊं लागणें.

ओहण [**म०** वहाणें] **न०** १ पावसाळ्यांत किं० बारा महिने डोंगरावरून वाहात येणाऱ्या पाण्याचा पाट शेताच्या उपयोगासाठीं किं० संसारकामासाठीं वळवून आणलेला. २ अशा पाण्यासाठीं खणलेला चर.

ओहदा [**फा०** उह्दह्] **पु०** सरकारी काम; सरकारी अधिकाराची जागा ('हुद्दा' हें अधिक प्रचलित रूप).

ओहमा पु० संशय, शंका.

ओहमाय स्त्री० बायकोची आई.

ओहर [**सं०** वधूवर] **न०** नवरानवरीचें जोडपें, (लग्नाच्या गांवाहून परत आलेलें किं० लग्नानंतर प्रथम देवदर्शनास गेलेलें). ꠸**ओहरजत्रा, ओहोरयात्रा स्त्री०** वधूवरांचें जोडपें लग्नानंतर प्रथम देवदर्शनास जातें तो विधि किं० त्या प्रसंगाची मिरवणूक. **ओहरभरणी स्त्री०, ओहरभरणें न०** हेही शब्द याच अर्थाचे आहेत.

ओहर पु० १ खाडीचा लहानसा फाटा. २ समुद्राचे कांठीं पाण्याच्या वेगानें रेती खणली जाऊन जे लांबट चर पडतात आणि ज्यांतून पाणी वाहत जाऊन समुद्रास मिळतें ते प्रत्येक.

ओहरणें अ० क्रि० खड्डा भरून येणें (केरकचरा पडून किं० कांठाची माती ढासळून). **स० क्रि०** १ खड्डा मातीनें किं० दगडांनीं भरून काढणें. २ अंगावर दागिने घालणें, उटी लावणें, इ०.

ओहरा पु० मोठें शेत नांगरण्याच्या सोयीसाठीं त्याचे जे लहान लहान भाग पाडतात ते प्रत्येक.

ओहळ, ओहोळ पु०, ओहळी, ओहोळी स्त्री० १ लहान ओढा; नाला. २ पाणी वाहून पडलेला चर (पाणी वाहणारा किं० कोरडा पडलेला). ३ पाझर. ꠸**ओहोळ उडून राऊत होणें** १ संकट नाहींसें झाल्यावर वढाया मारणें. २ आपल्या संकटांत ज्या कोणी आपणाला हात दिला असेल त्याच्यावर उलटणें किं० त्याच्याशीं कृतघ्न होणें. **ओहळखोवळ पु०** १ लहान मोठे ओढे, नाले, इ०. २ उथळ किं० खोल खड्डे, खाचा, खळगे, इ०

ओहळीं खोवळीं शिरणें १ आडमार्गात शिरणें. २ वेडींवाकडीं किं० टाळाटाळीचीं किं० गुळमुळीत उत्तरें देणें.

ओहळणें अ० क्रि० १ बारीक प्रवाहाच्या रूपानें वाहणें; ओघळणें; पाझरणें. २ नाक, कान, इ० ना दागिन्यांसाठीं पाडलेलीं भोकें त्या दागिन्यांच्या भारानें मोठीं किं० सैल होणें; ओघळणें. ३ मोती, मणि, इ० चीं भोकें घर्षणानें मोठीं होणें.

ओहळी स्त्री० १ लहानसा नाला किं० ओढा. २ पाझर.

ओहार, ओहारजत्रा वर 'ओहर' 'ओहरजत्रा' [पहा.

ओहोट, ओहोटणें मागें 'ओहट' 'ओहटणें' पहा.

ओहोबाप पु० नवऱ्या मुलाचा बाप.

ओहोमाय स्त्री० नवऱ्यामुलाची आई.

ओहो, ओहोहो उ०वा० अ० आनंदाचा किं० आश्चर्याचा उदार.

ओळ [सं० आवलि] स्त्री० १ रांग, पंक्ति. २ क्रमानुसार मांडणी. २ अक्षरें इ० एका पंक्तींत लिहिलीं किं० काढलीं जावीं म्हणून अगोदर जी रेघ आखून घेतात ती, किं० ह्या रेघेवर काढलेलीं अक्षरें इ०ची पंक्ति. ३ वर्तनक्रम. ४ मागपासून चालत आलेली परिपाटी. ५ सभ्यपणाची रीति. ॐ**ओळीस येणें** बोलण्याच्या प्रसंगानें उपस्थित होणें. [प्रवाह किं० पाट.

ओळ स्त्री० ओहोळ; पाण्याचा लहानसा

ओळक पु० १ डेऱ्यांतून किं० अन्य कांहीं बारदानांतून ताक, पाणी, इ० बाहेर काढण्यासाठीं नारळाच्या बेल्याला दांडा बसवून करतात जें साधन तें. २ असा दांडा न बसवितां त्याच उपयोगासाठीं केलेलें बेलें. ३ अशाच उपयोगाचें आणि अशाच आकाराचें धातूचें भांडें. बेलें म्ह० जून नारळांतील खोबरें खरवडून करतात जें पात्र तें.

ओळकी स्त्री० लहान आकाराचें ओळक ('ओळक' वर पहा).

ओळकं(-कुं-)बणें अ० क्रि० १ लोंबकळत राहाणें. २ झाडाच्या फांदीला किं०अन्य आधाराला लोंबत राहून झोके घेणें. ३ एकाच स्थितींत हात, पाय, मान, इ० फार वेळ राहिल्या कारणानें भारावणें किं० ताठणें. ४ जडपणामुळें वाकणें किं० खालीं कलणें. स० क्रि० १ लोंबकळत ठेवणें किं० लोंबकळत सोडणें. २—ला हेलकावे देणें. ॐ**ओळकंबली पाटी** स्त्री० पदार्थ सुस्थळीं किं० बिन उपद्रवाच्या ठिकाणीं ठेवावयासाठीं हलगा वगैरेंना लोंबत सोडलेली पाटी (शिंक्याचें काम करणारी पाटी).

ओळकंबा, ओळकुंबा पु० लोंबकळत राहून घेतलेले झोके प्रत्येक (क्रि० मारणें, घेणें).

ओळख [म० ओळखणें] स्त्री० १ पूर्वी इंद्रियांना गोचर झालेल्या पदार्थाचें ज्ञान कांहीं काळानंतर तो पदार्थ पुन्हा इंद्रियांना गोचर झाला असतां पुनरुज्जीवित होणें; पूर्वीच्या संस्कारांचें पुनरुज्जीवन. २ प्रत्यभिज्ञान. ३ खुणेची वस्तु. ४ पदार्थाचें किं० माणसाचें स्मरण करून देणारी वस्तु; यादगिरी. ५ एकमेकांना ठाऊक नसलेल्या दोन माणसांत कांहीं व्यवहार व्हावयाचा असतां त्या दोघांच्या परिचयाचा तिऱ्हाईत माणूस ह्याची साखी किं० पत त्याला सांगतो आणि त्याची साखी किं० पत ह्याला सांगतो ती; तिऱ्हाइकानें एकाद्या माणसाची सांगितलेली पत किं०साखी. ॐ**ओळख देणें** १ तिऱ्हाइतानें एकाद्या माणसाची साखी किं० पत सांगणें ह्याला 'ओळख देणें' म्हणतात. २ कोणी मनुष्य एकाद्या गोष्टीकडे मुद्दाम दुर्लक्ष्य करीत असेल किं० स्मृतिभ्रंशामुळें त्याचें दुर्लक्ष्य होत असेल तर ती गोष्ट त्याच्या स्मरणांत आणून देणें, म्ह० त्या गोष्टीची त्याला आठवण करून देणें.

ओळखण [म० ओळखणें] स्त्री० १ ओळखण्याची खूण; ओळख पटवून देणारी खूण (क्रि० करणें). २यादगिरी; एकाद्या माणसाची किं० पदार्थाची आठवण करून देणारी वस्तु (क्रि० देणें).

ओळखणें [सं० उप+लक्षण] स०क्रि०१ठाऊक असलेल्या खुणांवरून किं० वर्णनावरून ही वस्तु अमुक हें जाणणें. २ पूर्वी जिचें प्रत्यक्ष ज्ञान झालेलें असतें ती पुन्हां दृष्टीस पडतांच ती अमुक असें जाणणें. ॐ**आपणावरून जग ओळखावें** आपण कसे आहों हें मनांत आणून लोक कसे आहेत हें ठरवावें; आपले जे मनोविकार तेच लोकांचे असें आपण समजावें. **ओळखदेख, ओळखपाळख** स्त्री० १ ओळख. २ आठवण. ३ परिचय.

ओळखंबणें, ओळखंबा वर 'ओळकंबणें,' 'ओळकंबा' पहा.

ओळग पु० १ मूठ बसाविलेलें वेलें (नारळाचें). २ मूठ न बसविलेल्या वेल्यालाही ओळग ह्मणतात. मागें ' ओळक ' पहा.

ओळगणें,ओळंघणें [सं० आलिंगन] **स०क्रि०** १ वाईवाईनें किं० उत्सुकतेनें धरणें किं० पकडणें. २ आलिंगणें, कवटाळणें.

ओळंगर पु० १ डोंगरावरून किं०अन्य उगमापासून वाहणारा ओढा किं० नाला. २ पाझर, झिरप.

ओळण [सं० अवलंबन] **स्त्री०** १ लामणदिवा आडकावून ठेवण्याची दोरी. २ चिरगुटें ठेवण्यासाठीं बांधलेली दोरी. मागें ' ओलाणी ' पहा.

ओळणें अ० क्रि० प्रसन्न मुद्रेनें एकाद्यावर दृष्टि वळविणें.

ओळदांडी स्त्री० गाडीची आखरी आणि साटा यांना एकत्र बांधणारी दोरी (आळा) घट्ट करावयाचा लाकडाचा तुकडा.

ओळंबणें [सं० अव+लंब् (लोंबणें)] **स० क्रि०** ओळंबा लावून खांब, भिंत, इ० लंब रेषेंत आहे किं० नाहीं हें पाहाणें; उ० हा खांब ओळंबून पाहिलास काय ? मला तो थोडासा वाकडा वाटतो आहे.

ओळंबणें [सं० अव+लंब] **अ०क्रि०** १ लोंबत राहाणें. २ झोके घेणें. ३ भारामुळें झाडाची फांदी इ० खालीं वाकणें किं० कलणें. ४ हात, पाय, इ० फार वेळ लोंबत राहिल्यामुळें रक्त खालीं उतरून भारावणें.

ओळंबळणें अ० क्रि० १ पात्रांत पाणी इ० अधिक झाल्यामुळें तें पाणी इ० बाहेर वाहूं लागणें. २ पात्रानें अधिक झालेलें पाणी इ० बाहेर टाकणें किं० वाहविणें.

ओळंबा [सं० अव+लंब्] **पु०** भिंत, खांब, इ० रचाई किं० उभारणी उजू म्हणजे लंबरेषेंत आहे किं० नाहीं हें पाहाण्याचें गवंडी इ०चें साधन; हें साधन म्हणजें शिसें, लोखंड,इ०चा गोळा दोरीच्या टोकाला बांधून तो लोंबत सोडावयाच्या सोयीचा केलेला असतो.

ओळंबी [सं० अव+लंब्] **स्त्री०** गाय,म्हैस, इ० अशक्त झाली असतां भानें खालीं रक्त उतरून जमतो जो गोळा तो.

ओळा पु० १ शिस्त; परिपाटी; वर्तनक्रम. २ चांगली चालरीत.

ओळांगर पु० १ लहानसा ओढा किं० नाला.

ओळाणें न० लामणदिवा टांगावयाची दोरी किं० सांखळी.

ओळी स्त्री० १ लहानसा ओढा.२ ओहोळाचा पडलेला चर.

औ.

औ मराठी वर्णमालेंतील अकरावा वर्ण आणि मराठी स्वरमालेंतील अकरावा स्वर.

[टीप—जे शब्द औ ह्या अक्षराखालीं सापडणार नाहींत तें ' अव ' च्या पुढें पहावे.

औकात (—द) [अ० अवकाद्] **स्त्री०** १ शक्ति; अवसान. २ द्रव्यबळ.

औकाळ [सं० अव+काळ] **क्रि० वि०** आलीकडे; हल्लींच्या काळीं. ⊛**औकाळवणी न०** भलत्याच काळीं पडलेला पाऊस. **औकाळीं क्रि० वि०** भलत्याच किं० गैरसोयीच्या वेळीं; अयोग्य प्रसंगीं. **औकाळी, औकाळ्या वि०** अप्रासंगिक; भलत्याच वेळचा; उ० औकाळ्या पाऊस.

औख,औखवण पुढें ' औक्ष, '' 'औक्षवण'पहा.

औचित्य [सं० ' उचित ' चें **भा० वा० ना०**] **न०** उचितपणा; योग्यपणा.

औजड, औजाड वि० अति जड आणि वागवावयाला गैरसोयीचा; अवाढव्य.

औज्ज्वल्य [सं० ' उज्ज्वल ' चें **भा० वा० ना०**] **न०** तेजस्विता; उज्ज्वलपणा.

औट वि० साडेतीन. ⊛**औटघटकांचें राज्य न०** क्षणभंगुर वैभव; ह्याला 'शिराळशेटीचें राज्य' असेंही म्हणतात. विशेष खुलासा आमच्या ''मराठी भाषेचे वाक्प्रचार, ह्मणी, इ०'' ह्या पुस्तकांत पहा.

औट पु० १ इमारती लाकडांची रास. २ सर्पणाच्या लाकडांची रास.

औट, औटभर म०नांगरकामाच्या मोजदादीचें एक माप किं० प्रमाण. ' खुटणभर ' असाही शब्द ह्याच अर्थाचा आहे.

औटकी [म० औट=साडेतीन] स्त्री० एका पासून शंभरापर्यंत जे क्रमांक त्यांच्या साडेतीन पटींचें कोष्टक,-जें मुलांना उजळणींत शिकवितात.

औटकें न० वर ' औटकी ' पहा.

औटेंडें न० {साडेतीन हात शरीर. †तुका०}.

औटपीठ न० योगशास्त्रांत सांगितलेलें अग्नि-चक्रावरील स्थान.

औटमात्रा स्त्री० ओंकार.

औटावी मात्रा स्त्री० } १ अर्ध मात्रा. २ माया. † ज्ञा०

औटी स्त्री० तासावयाच्या किं० कापावयाच्या लाकडावर पाडलेली खूण किं० चीर (क्रि० घेणें; पाडणें; करणें).

औठणें अ० क्रि० (पाणी) ओसरणें; ओहोटणें.

औठी स्त्री० (पाणी) ओहोटण्याची क्रिया; (पाणी) ओहोटल्याची स्थिति.

औड, औडभर वर, 'औट', 'औटभर' पहा.

औड वि०,**औडकें** न ०वर **औट** वि०,**औटकें** न० पहा.

औत, औतकाठी इ० ' आऊत,' ' आऊत-काठी ' इ० पहा.

औतण इ० ' अवंतण ' इ० पहा.

औत्पातिक [सं० उत्पात=शुभाशुभसूचक भूतविकार] वि० भूकंप, धूमकेतुदर्शन, इ० जे भूतविकार त्यांच्या संबंधाचा.

औत्सर्गिक [सं० 'उत्सर्ग'=सामान्य नियम; उत्=वर; सृज्=टाकणें] वि० १ नेहेमींचा. २ स्वाभाविक. ३ सामान्य.

औत्सुक्य [सं० उत्सुक (उत्कंठित) चें भा० वा० ना०] न० १ उत्कट उच्छा. २ चिंता, हुरहूर.

औदंबर न० खटाटोप. पु० जादूगार.

औदरिक [सं० उदर=पोट] वि० १ पोटा-संबंधाचा. २ खादाड; उ० संस्कृत नाटकांत विदूषक औदरिक दाखविलेला असतो.

औंदा क्रि० वि० यंदा; ह्या वर्षी; चालू साली.

औदर्य [सं० उदर=पोट] वि० उदरांतील; उदरासंबंधाचा. पु० पुत्र.

औदार्य [सं० ' उदार 'चें भा० वा० ना०] न० १ दातृत्व, उदारपणा. २ श्रेष्ठत्व. ३ तेज-स्विता. ४ अर्थगांभीर्य.

औदासीन्य [सं० ' उदासीन 'चें भा० वा० ना०; उत् (बाजूला)+आसीन (बसलेला)] न० १ उदासीनपणा. २ एकान्त. ३ विरक्ति.

औदास्य [सं०] न० ' औदासीन्य ' पहा.

औदुंबर [सं० उदुंबर] वि० उदुंबर (उंबर) वृक्षासंबंधाचा. पु० १ वानप्रस्थविशेष (सकाळीं उठतांच जिकडे दृष्टि जाईल त्या दिशेकडील फळें इ० वर राहाणारा). २ पुष्कळ उंबरांचा प्रदेश. न० उंबर.

औद्धत्य [सं० ' उद्धत ' पासून भा० वा० ना०] न० १ उद्धटपणा. २ साहस.

औद्धारिक [सं० ' उद्धार ' पासून वि०] वि० उद्धारासंबंधाचा. २ दायभागासंबंधाचा. न० हिस्सा.

औपचारिक [सं० ' उपचार ' पासून वि०] वि० १ गौण; लाक्षणिक. २ चालीरीतीचा. ३ केवळ शिष्टाचाराचा. न०(**साहित्य**) लक्षणा.

औपम्य [सं० उप (जवळ)+मा (मापणें)] न० १ सारखेपणा; सादृश्य. २ एकत्वाची भावना; उ० सत्पुरुष भूतमात्राकडे आत्मौपम्यानें पाहातात.

औपरोधिक [सं० ' उपरोध ' पासून वि०] वि० १ विरुद्ध जाणारा. २ परोपकाराचें. ३ टोमणे मारणारें (भाषण).

औपसर्गिक [सं० ' उपसर्ग ' पासून वि०] वि० १ शकुनासंबंधाचा. २ अशुभसूचक. ३ रोगपरिणामरूप. पु० कफवातादिकांचा प्रकोप.

औपाधिक [सं० ' उपाधि ' पासून वि०] वि० अटीचा; शर्तीचा. न० परिणाम. } वि० मायिक; अज्ञानांतलें. †ज्ञा० }.

औपासक [सं० उपासक ' पासून] वि० उपासना करणारा.

औपासन [सं० ' उपासना ' पासून] पु० १ स्मार्ताग्नि. २ पितरांना देण्याचा पिंड.

और पु०, न० १ गोड्या पाण्याचा प्रवाह. २ पाण्याचा पूर किं० लोंढा. ३ खाडीच्या तोंडा-तून वर चढणारें समुद्राचें पाणी.

और [हिं०] वि० १ निराळें, भिन्न. २ आणखी. ३ विचित्र; मजेदार; हास्यास्पद; आश्चर्य-कारक; उ० आपल्या स्वतःच्या देशांत, स्वदेशी-यांच्या साहाय्यानें, स्वदेशीयांच्या सुखासाठीं,

सुव्यवस्थित स्वराज्य स्थापण्याचा प्रयत्न करणाऱ्या छत्रपति शिवाजी महाराजांना जे कोणी चोर, लुटारू आणि दरोडेखोर म्हणतात त्यांची सत्यप्रीति, विवेकबुद्धि; न्यायप्रियता और आहे.

औरत [अ० अवूरत्] स्त्री० १ पत्नी. २ स्त्री.

औरस [सं० उरस्=छाती, कर] वि० १ शारीरिक (बल). २ सवर्ण स्वस्त्रीपासून झालेला (पुत्र). 'दत्तक'च्या उलट. ३ स्वाभाविक. ४ पराक्रमी.

औरस चौरस वि० १ विस्तृत, लांबरुंद. २ सर्व बाजूंनीं पुष्ट किं० लठ्ठ झालेला; उ० रामभाऊ चांगला औरस चौरस पुरुष आहे. ३ लांबी रुंदीनें सारखा. क्रि० वि० १ सभोंवार. २ लांबीच्या बाजूनें आणि रुंदीच्या बाजूनें. ३ सर्व बाजूंनीं. ४ हम चौरस.

और्ध्वदेहिक, और्ध्वदैहिक [सं०] वि० १ प्रेतासंबंधाचा. २ परब्रह्मासंबंधाचा न० १ प्रेतसंस्कार; मृत मनुष्यासंबंधानें करावयाचे जे धार्मिक विधि ते समुच्चयानें; उ० दशरथाचें और्ध्वदेहिक भरतानें केलें. २ यज्ञादि (परलोकसाधक) कर्म.

और्व [सं० ऊरु=मांडी] वि० मांडीचें. पु० वडवानल.

औषध [सं०] न० १ वनस्पति. २ दवा; रोगनिवारणार्थ केलेला इलाज. ३ उपाय; ज्याचे योगानें विवक्षानुरूप कार्यसिद्धि होते असा जो द्रव्यक्रियादिरूप कांहीं अर्थ तो; इष्ट कार्य घडवून आणणारी कांहीं वस्तु किं० कृति. ꙮ**औषध करणें** औषधाचा उपयोग करणें. **औषधाला नसणें** अगदीं देखील नसणें; मुळींच नसणें. **औषधपाणी** न० १ औषधोपचार. २ एखाद्या आजारी माणसाला औषधें वेळच्या वेळीं देणें, त्याची शुश्रूषा करणें, त्याची काळजी वाहणें, इ०; उ० तुमचीं बायकामुलें तर मुंबईस गेलीं; तुमचें औषधपाणी कोण करतो ? **औषध म्हणून** क्रि० वि० १ औषध ह्या सबबीवर. २ नाइलाजानें. ३ औषध ह्या नात्यानें; उ० औषध म्हणून दारू प्यावयाला कांहीं हरकत नाहीं; उ० औषध म्हणून एरंडेल पी.

औषधि, औषधी [सं०] स्त्री० १ वनस्पति. २ चकाकणारी वनस्पति.

औषधी [सं० औषध+ई (मराठी प्रत्यय)] वि० १ औषधाच्या उपयोगाचा. २ गुणकारी.

औस [सं० अमावस्या] स्त्री० १ अमावस्या; अवस. २ संध्याकाळ (ह्या अर्थानें प्रथमा विभक्तींत प्रचार नाहीं). ꙮ**औशीस** क्रि० वि० संध्याकाळीं. **औशीपासून** क्रि० वि० संध्याकाळपासून; उ० राम्या, ऊठ आतां; काल औशीपासून निजलास तो आतां दीड प्रहर दिवस आला तरी अजून निजलाच आहेस ! ऊठ आणि तोंड बोंड धू! **औशीचा** वि० संध्याकाळचा.

औक्ष [सं० आयुष्य] न० आयुष्य; जीवितमर्यादा. ꙮ **औक्षवंत, औक्षवान्** वि० दीर्घायुषी.

औक्षण, औक्षवण न० १ विवाहादि शुभकार्याचे प्रसंगीं ओवाळावयास आणतात जो दिवा तो. २ त्या दिव्यानें ओवाळणें. ꙮ**औक्षण** किं० **औक्षवण करणें** त्या दिव्यानें ओवाळणें; तो दिवा ओवाळणें. पेटलेले दिवे इ० एका ताम्हणांत ठेवून तें ताम्हण हातांत धरून वाटोळें फिरविणें ह्याला ओवाळणें असें म्हणतात.

क.

क मराठी वर्णमालेंतील बारावा वर्ण आणि व्यंजनमालेंतील पहिलें व्यंजन.

क हा तद्धित प्रत्यय असून तो नामांना आणि विशेषणांना लावतात, व तेथें तो प्रायः लघुता, हीनता, सादृश्य, प्रेम, वगैरेंचा व्यंजक होतो; जसें बालक म्ह० लहान बाळ, अश्वक म्ह० वाईट घोडा, पुत्रक म्ह० आवडता मुल, इ०. कधीं कधीं हा प्रत्यय निरर्थकही असतो म्ह० ह्या प्रत्ययाच्या योगानें त्या शब्दाच्या अर्थांत कांहींच फरक होत नाहीं.

कइवाड न० १ युक्ति. २ अंगीकार. ३ कैवार.

कईं क्रि० वि० (कवितेंत) १ कधीं ? २ कोठें ? ॐ**कईपक्षी** पु० कैवारी.

कऊबऊ वि० कुरूप, हिडिस्स, वेडेंवाकडें.

कंक [सं०] पु० एक पक्षिविशेष; याचीं पिसें बाणाच्या बुडल्याला लावितात. ॐ**कंकपत्र, कंकपत्री** पु० बाण.

कंकट [सं०] पु० चिलखत.

कंकण [सं०] न० १ बांगडी; कांकण. २ मुंज्या मुलाच्या हातांत किंवा नवरानवरींच्या हातांत बांधतात तो दोरा; या दोऱ्यांत हळकुंडें बांधलेलीं असतात. ३ यज्ञादिकांत मंत्रून दोरा हातांत बांधतात तो. ॐ**–बंध** पु० कोड्याच्या रूपाची श्लोकाची एक प्रकारची रचना. **एकाद्या गोष्टीबद्दल हातांत कंकण बांधणें** १ ती गोष्ट पूर्ण करण्याची प्रतिज्ञा करणें. २ त्या गोष्टीचा अभिमान बाळगणें.

कंकर पु० १नदीतीरीं सांपडणारे बारीक आणि गोल जे खडे ते प्रत्येक. हे कधीं कधीं अत्यंत गुळगुळीत, गोल, लंबवर्तुलाकृति, वगैरे असतात. यावरूनच खालील म्हण रूढ झाली. **नर्मदेंत जितके कंकर तितके शंकर** नर्मदा नदींत जे जे दगड असतात त्या सर्वांना शंकराचा मान मिळतो.

कंकर (–री) स्त्री० देववाभळ.

कंकरी, कांकरी स्त्री० रेशमाची लड.

कंकातणें अ० क्रि० १ भुकेनें ग्रस्त होणें. २ दमणें, श्रान्त होणें. स०क्रि० ०ला त्रास देणें; सतावणें; छळणें.

कंकाळा वि० (कवितेंत) क्रूर, रानटी.

कंकोल, कंकोळ [सं०] पु० कबाबचिनी; एक प्रकारचें काळें, खरबडीत, गुंजेएवढें व तिखट फळ, (निघंट्वांतील षोडश द्रव्यांपैकीं एक).

कंकातणें अ० क्रि० भुकेनें आक्रांत किं०पीडित होणें; उपासमारीनें व्याकुळ होणें. **कंको म्हणून बसणें** पोटांत भुकेनें कावकाव होत असलेल्या स्थितींत असणें.

कंगणी स्त्री० १ एक प्रकारचें कंकण (स्त्रियांचें हस्तभूषण). २ पागोट्याच्या विनीवरचा उंच व टोकदार भाग; पागोट्याच्या विनीवर एकावर एक पट्या चढवून घेर मोठा केलेला असतो तो. ३ कंगोरा; भिंती वगैरे ज्यास्त सुशोभित दिसाव्या म्हणून त्यांचा कडेचा भाग इतर भागांहून किंचित् पुढें आणून बांधलेला असतो; ही जी भिंतीची वगैरे किनार ती. खांब, तुळया, कपाटाच्या झडपा वगैरेंनांही अशा प्रकारच्या कंगण्या असतात. ॐ**कंगणीदार** वि०कंगणी असलेलें (पागोटें वगैरे).

कंगवा पु०फणी; ही अर्धवर्तुलाकृति असून एकाच बाजूस हिला दांते असतात (विशेषतः केस, मिशा, इ० विंचरण्याच्या उपयोगाची).

कंगाल [सं० कंकाल=अस्थिपंजर] वि० १ अगदीं रोड,–ज्याला कांहीं खावयाला नसल्याकारणानें जो केवळ हाडांच्या सांगाड्याप्रमाणें झाला आहे; दरिद्री, वित्तविहीन. २ निराश्रित, निराधार. ३ भिकारी. ॐ**कंगाली स्त्री**० दारिद्र्य, हीनता.

कंगुमंगु, कंगमंग स्त्री० १ रेंगाळणें; कचरणें, मागेंमागें घेणें. २ संदिग्ध भाषण. ३ चोखंदळेपणा. **वि**० १ रेंगाळणारा. २ संदिग्ध. ३ चोखंदळ्या. ४ मोडकातोडका. ५ आडखळत बोलणारा. ६ कचरत कचरत कांहीं काम करणारा. **क्रि० वि**० १ अडखळत, कचरत, चांचरत. २ चोखंदळेपणानें.

कंगोरा [फा० कंगूरह्] पु० १ कंगणी; भिंतीची वगैरे शोभेकरतां पुढें ठेवलेली कड. २ २ खांब, चहुथरे, कोनाडे, इ० च्या कडांवरच्या कोरलेल्या रेघा, कोपरे, विन्या, इ० प्रत्येक. ३खांब इ० वर शोभेसाठीं पाडलेल्या चिरा. ४ वाटोळी चीर (खांब इ० वरील).

कंगोरी स्त्री० १ एक प्रकारचें फुलझाड; कृष्णकमळ. २ त्या झाडाचें फूल.

कच स्त्री० १ माघार; पंचाइतीची स्थिति; कचर क्रि० खाणें). २ हतवीर्यता, हैबत. ३ खांच (तुळयांना वगैरे कडेला शोभेकरतां पाडतात तशी; क्रि० पाडणें). ४ भांडण, तंटा, गोंगाट्या-ची मारामारी. ['च' चा उच्चार दंततालव्य]

कच [सं०] पु० १ केश. २ केशांचा झुबका; केशकलाप (विशेषतः बायकांचा). ❀ **कचपाश घालणें** केशानें गळा कापणें; विश्वास-घात करणें. ['च' चा उच्चार तालव्य.

कचेल सं०न०पोथीच्या पानांचा वेद;तबलक.

कचक स्त्री० १ आवेशाची झटापट, मारा-मारी, (क्रि० झडणें, उडणें). २ शरीराच्या एकाद्या भागांत एकदम उठलेली चमक (क्रि० भरणें). ३ कडी (तलवार वगैरे पट्टयांत अडकाविण्याच्या उपयोगाची). चाप, फासा; सरी, कंबरपट्टा इ० चीं दोन तोंडें एकमेकांत बसविण्याकरतां केलेला असतो तसा).

कचक स्त्री० प्रचंड, अवाढव्य, जंगी (इमारत; ओझें, जेवण, इ० इ०).

कचकच स्त्री० १ रेतीचे कण (साखरेंत, दळलेल्या पिठांत, वगैरेंत असतात, आणि जें चावले न जातां दांतावर घासतात ते). २ पिंगळ्याचा शब्द.

कचकच, कचकचां, कचांकचां क्रि० वि० १ दांतांवर दांत घासून (खाणें, बोलणें, इ०). २ मोठमोठ्यानें ओरडून किं० कलकलाट करून भांडणें, बोलणें, रागें भरणें, इ०).

कचकचाट पु० झणझणाट, छणछणाट (तर-वारींचा, काड्यांचा, भांडणाऱ्या लोकांच्या बोल-ण्याचा, वगैरे).

कचकचीत वि० १ कच्चा; अर्धपक्व (भात वगैरे). २ धदधदीत आवाजाचें मडकें वगैरे. ३ धडधडीत, चकचकीत, प्रत्यक्षपणें, रोखठोक; उ० उ० ही आंगठी माझी आहे असें म्हणावयाला तुला लाज वाटली पाहिजे. तिच्याबद्दल मी तुला कच-कचीत दोनशें रुपये मोजले आहेत.

कचकट स्त्री० भिकार, टाकाऊ, मोडका तोडका, नादान(तरवार, लेखणी, तुळई, संदूक, इ०).

कचकडा पु० कासवाच्या पाठीचें हाड.

कचकणें अ० क्रि० १ कच खाणें; हतवीर्य होणें; माघार घेणें. २ कडकिनी मोडणें; तिरपणें. ३ कचरणें, भिणें. ४ थरथरणें, कांपणें. ५ वांकणें, सरकणें, (भारानें तुळई वगैरे). ६ मोडण्यास सुरवात होणें. **स० क्रि०** एकदम हिसका देऊन ओढणें.

कचकन्, कचकर, कचदिशीं क्रि० वि० खट्-दिशीं, ताडदिशीं, एकदम; उ० कासार तिच्या हातात बांगडी चढवीत असतां ती कचदिशीं पिचली.

कचकरणें अ० क्रि० १ कचरणें; घाबरणें; माघार घेणें. २ वांकणें, (भारानें तुळई वगैरे). ३ सर-कणें; निसटणें. ४ कांपणें, नीट न चालणें (लिहि-तांना हात, लेखणी, वगैरे).

कचकल न०, पु० १ फुटलेलें मडकें इ०चा तळ. २ काचेचें भांडें, तावदान, इ० चा चुरा. ३ अनेक पदार्थांच्या तुकड्यांचा ढीग.

कचका पु० १ काठी, तरवार, इ० चा रट्टा. २ धबडगा, ताण, सपाटा, रगाडा, बोजा, धडाका (कामाचा, हालचालींचा, इ०). उ० आमच्या कचेरींतल्या कामाचा कचका तुला कसला झेपतो? उ० गोदीला हें रेशमी पातळ काय उपयोग! तिच्या धिंगाण्याच्या कचक्याखालीं तें कां टिकावयाचें आहे? ३ धक्का (भीतीनें बसलेला).

कचकाविणें अ० क्रि० १ ताणून बांधणें. २ सटकाविणें. ३ एकाद्याला रागें भरणें; त्याच्यावर ताशेरा झाडणें. ४ तडाका मारणें (कामावर वगैरे); झपाट्यानें (कांहीं काम)करणें. ५ जोरानें आणि एकदम खेचणें. ६ ठोकून (खिळा, खुंटी, इ०) बसविणें.

कचकावून, कचकून क्रि० वि० १ खूप ताणून, आंवळून. २ सणसणीतपणें (मारणें, बोलणें). ३ चापून, पोटभर (जेवणें इ०). ४ बेसुमार; हावा तसा (खर्च करणें इ०).

कचकोल [हिं०] पु० फुटलेल्या मडक्याचें अर्धुक (विशेषतः खालचें); ज्याचा गळा फुटला आहे असा कुजा, गाडगें, इ०. २ फुटकें काचपात्र, बांगड्या, वगैरेंच्या तुकड्यांचा ढीग.

कचक्या वि० कोणतेंही काम करण्यांत तल्लख आणि चलाख (माणूस); नेटानें आणि झपाट्यानें काम करणारा (माणूस); धमकदार.

कचडें न० १ ज्याचा गळा फुटला आहे असें मडकें. २ फुटक्या पात्राचा तळ.

कचणें,कचरणें अ० क्रि० १ घाबरणें, भीतीनें माघार घेणें. २ वाकणें. ३ कांपणें (लिहितांना हात, बोलतांना जीभ, वगैरे).

कंचन [**सं०** कांचन] १ कांचनाचें झाड. २ कांचनाचें फूल.

कंचनी [**हिं०**] **स्त्री०**नाचण्याचा धंदा करणारी मुलगी.

कचंबणें, कचमणें, कचमळणें स० क्रि० १ डिवचणें; ढवळणें. २ गढूळ करणें. **अ० क्रि०** १ चिखलाचे पदार्थ करून खेळणें. २ खाद्य पदार्थ चोखंदळेपणानें ताटांत इकडे तिकडे सारणें.

कचंबणें, कचमणें अ० क्रि० कोठ्याच्या विकृतीनें पीडित होणें.

कचमा पु० १ गढूळपणा.२कामाचा किं०कारभाराचा अव्यवस्थितपणा; पदार्थांचा अस्ताव्यस्तपणा. ३ घोटाळा, घालमेल. ४ गर्दी, तोबा (मंडळींचा, गुरांचा, वगैरे). ५ अडगळ, सटरफटर सामान, केरकचरा.

कचर स्त्री० तळ्यांत वगैरे उगवणारा एक कंद (हा उपासाला खातात).

कचर स्त्री० १ भीति; साशंकपणा; माघार घेणें; (अन्वर्थक क्रिया० खाणें); उ०; सैनिकहो, कचर खाऊं नका, म्हणजे विजयश्री तुमचीच आहे!

कचरट वि० १ नाजूक, ढिसूळ, (लाकूड, भांडें, वगैरे).२ (लक्षणेनें) अशक्त, अधू, कसहीन, निःसत्त्व, जीर्ण, निर्वीर्य, (मनुष्य, प्राणी, पदार्थ, कपडा, इ०).

कचरट न० केरकचरा; सटरफटर; निरुपयोगी वस्तूंचा समुदाय; अडगळ.

कचरणें अ० क्रि० हातीं घेतलेलें काम आपणाला रेटेल किंवा नाहीं, तें करणें योग्य आहे किंवा नाहीं, अशा विचारानें शंकित किं० कुंठित किं० स्तब्ध होणें. मागें **कचणें** पहा. **भावकर्तृक क्रि०** घशाशीं येणें, (खाल्लेलें अन्न तेथेंच अडकून बसणें, धड खालीं न उतरणें आणि धड बाहेर न पडणें); उ० माझ्या घशाशीं कचरतें आहे.

कचरा पु० १ केर; केरकचरा; अडगळीच्या व निरुपयोगी वस्तु (चिटोरे, चिंध्या, वगैरे); कुचकामाचे पदार्थ.

कचरा पु०,कचरी स्त्री०[**सं०**कर्चूर] १कांचरी. २ आंबे हळद.३ एरंडाच्या बोंडासारखा दिसणारा उपासाला खातात तो कंदविशेष.

कचरा, खचरा पु० सुताराचें एक रंध्यासारखें हत्यार, (खांब, तुळया, वगैरेंच्या कडांवर शोभेसाठीं उठाव किंवा खोदींव रेघा,कंगोरे,पन्हळ, इ० पाडण्याच्या उपयोगाचें).

कचरा वि० एक प्रकारचा तांदूळ; तांदुळाची एक विशिष्ट जात.

कचरी, काचरी स्त्री० १ फळें, पालेभाज्यांचे जाडी देठ, वगैरेंचे काप काढून उन्हांत वाळवून सांडग्यासारखे तळून जें एक तोंडीलावणें करतात तें.

कचलपट वि० कच खाणारा; माघार घेणारा; निधडा नव्हे असा; भितरा.

कंचा सर्वनाम ' कोणचा ? ' याचें हें अपभ्रष्ट रूप; हें कवितेंत किं० संभाषणांतच वापरतात.

कचाकच स्त्री० १ पिंगळ्याचा शब्द. २ दांतावर दांत घासल्यानें होणारा आवाज.

कचाकच, कचांकचां क्रि० वि० १ सपासप, खपाखप, तडातड; उ० तानाजीची तलवार कचाकच उदयभानूचे सैनिक कापूं लागली. २ दांतावर दांत घासून कर्कश आवाज होईल अशा रीतीनें (बोलणें, भांडणें, इ०).

कचाकची स्त्री० तरवारी, काठ्या, इ०नीं केलेली मारामारी, लढाई किं० भांडण.

कचाचणें अ० क्रि० किंचाळणें (बोलतांना, भांडतांना,वगैरे). हा शब्द पशुपक्ष्यांच्याही किंचाळण्याला लावतात; उ० या झाडावरील माकडें काय कचाचताहेत हो !

कचाट न० १ वित्तार्जनार्थ केलेल्या कांहीं तरी लटपटी, खटपटी, धाडसी कृत्यें, उद्योग, भानगडी, इ०;उ० हजार कचाटें करावीं तेव्हां पोट भरतें. २ घोटाळा; धोका; पेंच; अडचणीची स्थिति; उ० त्या कामांत तूं पडूं नको,मागून नसतीं कचाटें उपस्थित व्हावयाचीं. ३ दुसऱ्याला बुडविण्यासाठीं केलेली गुप्त खटपट.

कचाटी स्त्री० १ पंचाइतीची किं० अडचणीची

स्थिति. २ घोटाळा. ꣸**एखाद्याच्या कचाटींत सांपडणें** त्याच्या तावडींत सापडणें किं० ताब्यांत जाणें;त्याच्या तडाख्यांत येणें;त्याच्या हातीं लागणें.

कंचार, कंचारी, कांचार पु०काचेच्या बांगड्या जो तयार करतो तो.

कचावणें अ० क्रि० १ पिचणें, फुटणें, तुटणें. २ कच खाणें; माघार घेणें; दबकणें. ३ वांकणें, सरकणें (भारानें तुळई वगैरे).

कची वि० बद्द आवाज देणारा, चीर पडलेला, बदबदीत आवाजाचा (खोटा रुपया वगैरे).

कचीढेली, कचीढेलीचा वि० झिजलेला, तुटलेला, बद वाजणारा, फार वापरामुळें ज्याच्या वरचीं अक्षरें, रेषा, आकृति, इ० पुसटल्या आहेत असा (रुपाया वगैरे नाणें).

कची (–ची) वहिवाट स्त्री० जमा आणि खर्च यांच्या ज्या पक्क्या पावत्या त्यांच्या कच्च्या नोंदींचा कागद; हा कुळकर्णी लिहितो व त्यावर पाटलाची सही घेतो.

कंचुक [सं०] पु० १ चोळी, अंगरखा. २ बंडी. ३ वस्त्र; पांघरूण. ४ कवच. ५ सर्पाची कात. ६ फळाची साल; फळाचें टरफल; धान्याच्या दाण्यांचा वरचा पापुद्रा. ७ किड्याचें घर. ८ चिलखत. ९ कोणतेंही वेष्टन, जसें नभाचा कंचुक.

कंचुकी [सं०] स्त्री० १ कांचोळी. २ फुलाच्या पाकळ्यांचें आवरण किं० वेष्टण,–जें बहुधा हिरव्या पानांचें असतें. **पु०** १ सर्प. २ अंतःपुराचा द्वारपाळ. ३ पहारेकरी. ४ बदफैली; विट. ५ अगरु चंदन.

कचेरी[हिं०] स्त्री० १ कामकाजाची बैठक जेथें असते तें ठिकाण. २ चावडी. ३ सरकारी कामें करावयाची जागा. ४ कचेरींत काम करणारी मंडळी किं० त्यांनीं केलेलें काम.

कचोरा पु०, कचोरी स्त्री०, कचोला पु० [सं० कर्चूरक] १ कचरकंद. २ हळद.

कचोरी स्त्री०एक प्रकारचें खाद्य,–हें गव्हाच्या व उडदाच्या पिठांचें असून तें तळून तयार करतात.

कचोळें, कचोळ न० १ एक प्रकारचें तीन, चार, पुडांचें पात्र (पूजासाहित्य, तांदूळ, गंध, वगैरे ठेवण्याकरतां केलेलें). २ मंडळी चक्राकार बसली असतां होणारें वर्तुळ; उ० कचोळें करा रे, मुलानों, आपण तोबा, तोबा खेळूं. ३ फुलांच्या पाकळ्यांचें किं० धान्याच्या दाण्यांचें वगैरे वेष्टन.

कच्चा [हिं०] वि० १ अपक्व; अर्धवट उकडलेलें, भाजलेलें किं० शिजलेलें, हिरवें राहिलेलें, पक्कें न झालेलें, इ०. २ टांचणवजा केलेला, ह्या० ज्यांत खोडाखोडी, दुरुस्त्या वगैरे करण्यास सवड आहे असा (हिशेबाचा कागद, लेख, इ०). ३ कायमचा किं०पक्का नव्हे असा. ४ पुरा न मुरलेला. ५ अनभिज्ञ, नवखा. ६ अर्धवट झालेला; पूर्णपणें तयार नसलेला. ७ जो नीट समजला नाहीं किंवा समजत नाहीं असा (विषय). ८ जगाचा ज्याला अनुभव नाहीं असा (मनुष्य). ९ कढवून फार घट्ट न केलेला (साखरेचा पाक). ꣸**–अम्मल पु०** पगारी नेमणूक (मामलेदारसारख्या अधिकाऱ्याची वगैरे); यालाच **कच्ची मामलत, कच्चा मामला** हे प्रतिशब्द आहेत. याच्या उलट **मक्त्याचा अंमल. –आकार पु०** साधारण आढावा किं० अंदाज. **–कागद पु०** खळ लावून पक्का तयार न केलेला कागद. **–डांक पु०** कथलानें वगैरे केलेली सांधेजोड. सोनें, रुपें, तांबें, पितळ, वगैरेंचा डांक पक्का असतो. **–ताप, –ज्वर पु०** बारीक ताप; फारसें अंग तापलें नाहीं अशा स्थितींतील ताप. **–पक्का वि०** ठोकळ मानाचे आंकडे आणि तंतोतंत खरे आंकडे असे दोन्ही प्रकारचे आंकडे ज्यांत नमूद केले आहेत असा (हिशेब, जमाखर्च, वही, खतावणी, इ०). **–पाडा (–ढा) पु०** एखाद्या गोष्टीची ढोटक हकीकत; ठोकळ वर्तमान (ज्यांत तपशील नसतो); उ० गणेशपंतानें त्या खुनाचा कच्चा पाढा त्या गुप्त पोलीसाजवळ वाचला. **–बटवडा पु०** सरकारी कामदारांना एकैकशः पगार वाटणें. **–भरणा पु०** रयतेनें रोख पैसे किंवा धान्य ह्या रूपानें दिलेला सारा. **–मामला पु०** वर **–अम्मल** पहा. **· मोकद्दमा पु०** ठराविक वेतन घेऊन केलेलें काम (जें करणाराचा त्या कामाच्या नफ्यातोट्याशीं कांहीं संबंध नसतो). **–रंग पु०** धुतल्यानें किं० उन्हांत असल्यानें जाणारा ह्य० फिक्का पडणारा रंग. **–वसूल पु०** रयतेकडून आलेला वसूल,–ज्याची वर्गवारी

व्हावयाची आहे. **कच्ची स्त्री० वि०**वर कच्चा पहा. ॐ**–असामी स्त्री०** दिवाळें काढल्यामुळें किं० पैसा नसल्याकारणानें नालायक झालेला शेतकरी, मक्तेदार, कूळ, इ०; उ० रामभाऊचें कूळ म्हणजे कच्ची असामी, त्यांच्याशीं कसलाच व्यवहार करूं नका. **–कमाविशी, – कमावीस स्त्री०** ठराविक वेतन घेऊन केलेली सारावसुली; ह्या वसूलींत नफातोटा मालकाकडे असतो. याच्या उलट **मक्त्याची कमाविशी.–कुंदी स्त्री०** भट्टींत कपडे उकळून न काढतां नुसत्या थंड पाण्यांत धुणें; कपडे नुसते धुणें, त्यांस मागाहून इस्त्री वगैरे न करणें. **–जप्ती स्त्री०** निकाल किं० न्यायनिवाडा होण्यापूर्वीची जप्ती. **–बुट्टी स्त्री०** सोनें किं० रुपें ह्यांच्या पाण्यानें किं० शाईनें लुगड्यांवर वगैरे काढतात जी बुट्टी किं० नक्षी ती. **–मामलत** मागें **–अंमल** पहा. **–मुदत स्त्री०** हुंडी हातांत पडल्यापासून असुक असुक दिवसांत ती वटविली पाहिजे अशा प्रकारची चालू जी मुदत ती. हुंडीची मुदत पूर्ण होण्याच्या अगोदरची मुदत. याच्या उलट **बंदी मुदत.** यांत हुंडी कांहीं एका विशिष्ट तारखेनंतर असुक असुक दिवसांत वटावावयाची असते. **–लढाई स्त्री०** ज्या लढाईचा निकाल धड या बाजूलाही अनुकूल नसतो व धड त्याही बाजूला अनुकूल नसतो अशी; जी लढाई अनिश्चित स्वरूपाची असते ती. **–शाई स्त्री०**लाख न घालतां तयार केलेली शाई. **–सुपारी स्त्री०** न शिजविलेली सुपारी; रोठा. **–हुंडी स्त्री०** अद्याप न वटावलेली किं० न स्वीकारलेली हुंडी. **कच्चें न० वि०**वर 'कच्चा' पहा. **–अक्षर** न घटलेलें किं० वळण नसलेलें अक्षर. **–इरसाल न०** शेतकऱ्यांकडून जसा सारा वसूल झाला असेल तसा सरकारी तिजोरींत भरणें (मामलेदारांनीं वगैरे). **–गिरी स्त्री०** कच्चेपणा; न निर्ढावलेपणाची स्थिति; अपक्वता. **–चीट न०** छापांतलें पातळ, सदऱ्याचें कापड, वगैरे. धुतल्यानंतर यांचा रंग जातो. **–दूध न०** १ निरसें दूध; कोरें दूध. २ गाय किं० म्हैस वगैरे व्याल्यानंतर पहिल्या दहा बारा दिवसांतील दूध. याला कोंवळें दूध म्हणतात व याचा खरवस करतात.

कच्ची स्त्री० १ सोंगट्यांतील एक पारिभाषिक शब्द, जिवन्त झालेली सोंगटी. २ (लक्षणेनें) फजिती; मानखंडनेची स्थिति; उ० मोरू व चिन्तू यांची कुस्ती झाली त्यांत मोरूची कच्ची झाली व तो चिडला.

कच्चीं बच्चीं न० अ० व० लहान मुलेंबाळें; चिलींपिलीं; उ० आप्पासाहेबांस चार कच्चींबच्चीं आहेत. यासच **कच्चे बच्चे पु० अ० व०** असाही प्रतिशब्द आहे.

कच्चे पु० अ० व० (गणितांत) ज्यांच्यामध्यें भारी परिमाणाच्या किंमती वरून हलक्या परिमाणाची किंमत काढावयाची आहे, असल्या हिशेबांतील दरांतले रुपये व त्यांतील हलक्या परिमाणांची संख्या ह्यांच्या गुणाकारास 'कच्चे' म्हणतात. जसें दर खंडीस बावीस रुपये तर आडीच मणांची किंमत काढावयाची असतां बावीस आणि आडीच ह्यांचा गुणाकार पंचावन होतो, त्याला 'कच्चे' असें म्हणतात.

कच्छ [**सं०**] **पु०** १ कासोटा; काचा; धोतराच्या किं० लुगड्याच्या निऱ्यांचीं खालचीं टोकें मागें खोवणें; (क्रिया० घालणें). २ कांठ; उ० यमुनाकच्छ. ३ कासवाची पाठ. ४ दलदल. ५ नावेची नाळ. ७ पर्वताभोंवतालची सपाट जमीन. ८ कांसव; उ० भगवंताचा दुसरा अवतार कच्छरूपानें झाला होता. ९ एक देश; उ० कच्छचें रण.

कच्छप [**सं०**] **पु०** कांसव. पुढें दिलेल्या वाक्प्रचारांत याचा 'कच्छ' या शब्दाप्रमाणें अर्थ आहे. ॐ **एकाद्याच्या कच्छपीं लागणें** त्याचा काचा(निऱ्यांचे सोगे जे मागें खोवलेले असतात ते) धरून असणें, म्ह० त्याच्या पाठीस लागणें; आपलें कार्य साधण्यासाठीं त्याच्या कासोट्याप्रमाणें त्याच्या मागोमाग जाणें किं० असणें; त्याच्या नादीं लागणें.

कच्छी वि० कच्छदेशाचा; कच्छदेशांतील.

कजाख(–ग) [**तुर्की०** कजाक] **वि०**भांडखोर, भांडकुदळ, व्रात्य, हट्टी.

कंजारी पु० १ एक हलकी जात. २ त्या जातीचा इसम. (याचे स्त्री० रूप **कंजारीण**)

कंजारीण स्त्री० १ कंजारी जातीची स्त्री. २ जिचे केश न विंचरल्यामुळें पिंजारल्यासारखे झाले आहेत अशी स्त्री (लक्षणेनें).

कंजूश (–ष) [**हिं०** कन् ज्यूस=कानांतील मळ खाणारा] **वि०** चिक्कू, कृपण, कवडीचुंबक.

कजेल न०, कजेली स्त्री० पुढें **कदली स्त्री०** याचा पहिला अर्थ पहा.

कजेलणें [म० कजेल] **अ० क्रि०** पुढें **कदलणें अ० क्रि०** पहा.

कज्जल [**सं०**] **न०** १ काजळ. २ दिव्याची वगैरे काजळी. (काजळ तेल वगैरेंत खलून औषध म्हणून किं० शोभेसाठीं डोळ्यांत घालतात).

कज्जली [**सं०**] **स्त्री०** पारा व गंधक एकत्र खलून रसायनार्थ जें द्रव्य करतात तें.

कज्जा [**अ०** कज्यह्] **पु०** १ भांडण, तंटा. २ खटला. ॐ**कज्जा खांदून काढणें** भांडण उकरून काढणें. **कज्जेखोर पु०** तंटे करणारा; भांडणें करण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा इसम. **कज्जेदलाल पु०** भांडणे उकरून काढणारा; तंटेखोर; कलागती लावणारा; वकील वर्गास हा शब्द तुच्छतेनें लावतात. **कज्जा खोकला पु०, कज्जा भांडण न०, कज्जा कफावत स्त्री०, कज्जे कफावती स्त्री० अ० व०** हरएक प्रकारचीं भांडणें, तंटे, वाद, मतभेद, इ० (**क्रि०** करणें, काढणें, आणणें, इ०).

कट[**सं०**] **पु०** १ व्यूह; कारस्थान. २ एखाद्या कार्याविषयीं जी मसलत ती; एकादें काम करण्याविषयीं अनेकांनीं केलेलें जें ऐकमत्य तें; उ० रामाला आज नाटकाला न्यावयाचें नाहीं असा त्याच्या घरांतल्या मंडळींनीं कट केला आहे. ३ ०अमुक अमुक घरांतली सोंगटी मारतां येत नाहीं असा निर्बंध कांहीं घरांसंबंधीं सोंगट्यांच्या डावांत केलेला असतो; अशीं जीं घरें त्यांपैकीं प्रत्येक. अशा घरांत जी सोंगटी जाते ती ' कटावर बसली ' असें म्हणतात. हीं सर्व घरें एकमेकांस कापून जाणाऱ्या दोन तिरप्या रेघांनीं चिन्हित असतात. ४ बंदुकीचा दस्ता व नळी यांना संलग्न करणारी कडी किंवा शिंबी किंवा बंद. ५ वस्त्रां दिकावर जें मळाचें पूट चढतें तें किं० मळाचा थर बसतो तो. ६ पदार्थांची कड शाबूत राहावी म्हणून कडेला शिवलेला कातड्याचा संजाप. ७ सैन्याची कांहीं विशेष प्रकारची रचना. ८ कातड्याची टोपी (दोऱ्यांचीं, तंबूच्या काठ्यांचीं, वगैरे टोकें शाबूत राखण्यासाठीं लावतात ती). ९ पुरण शिजवून सार, आमटी, वगैरे करण्याकरतां त्याचें जें पाणी काढतात तें. १० एका विशिष्ट लांबीच्या दोरीनें जितका कडबा बांधला जाईल तितकें परिमाण. ॐ**कटास हात लावणें** एखाद्या कार्यांत अंतर पडूं देणार नाहीं म्हणून देवाच्या पायरीस वगैरे हात लावून शपथ घेणें.

कट [**सं०** कष्ट=श्रम] **पु०** एकादें कार्य करतांना सोसलेला त्रास, केलेले श्रम, भोगिलेलीं संकटें; बहुधा **अ० व०** प्रयोग होतो; उ० त्या कामीं मी अनेक कट खाल्ले, भोगिले, इ०.

कट [**सं०**] **पु०** हत्तीचें गंडस्थळ. २ कंबर. ३ प्रेत. ४ प्रेताची तिरडी. ५ गवत ६ बांबूचा पदार्थ(तट्टया, चटई, इ०). ॐ**कटोदक न०** १ मृतास देण्याचें उदक. २ हत्तीचा मद. **कटाग्नि** [सं० कट (गवत) + अग्नि] **पु०** अपराध्याच्या अंगाभोंवतीं गवत किं० कडबा बांधून तें पेटविणें, ही शिक्षा.

कटकोल पु० १ पिकदाणी. २ खुशामत्या (लाक्षणिक अर्थ).

कटई पु० एक चांभारांची जाति (पडद्याच्या किनारी वगैरेंस चामड्याचे पट्टे लावून उपजीविका करणारी). वर **कट** शब्दाचा ८ वा अर्थ पहा.

कटक [**सं०**] **न०** १ सैन्य. २ मनगट इ० चें भूषण असें कडें. ३ पर्वताचा मध्यभाग किं० बाजू. ४ डोंगराची सपाटी. ५ सैन्याची छावणी. ॐ**कटकास गुळवणी** पुष्कळ जेवणारे आणि त्यांना वाढावयाला नुसतें गुळाचें पाणी; पुष्कळ पाहिजे तेथें अत्यल्प देणें.

कंटक [**सं०**] **पु०** १ कांटा. २ माशाचें हाड. ३ (लक्षणेनें) त्रासदायक, उपद्रवी, किं० क्रूर इसम. ४ शत्रु. ५ सुई, इ० चें सूक्ष्म अग्र. ६ उपद्रव. ॐ**कंटकेनव कंटकम्** [**सं०**] एका दुष्टा करवीं दुसऱ्या दुष्टास शासन होईलसें करणें. **कंटकाशन पु०** उंट. **कंटकफल न०** फणस.

कटकट स्त्री० १ गोंगाट, गडबड, गलबला; उ० कटकट करूं नका, शांतपणें अभ्यास करीत बसा. २ त्रास, पीडा; उ० आमच्या घरासमोरच्या गिरणीचा आम्हांस फार कटकट होते; उ० त्या मोऱ्याला नोकरी मिळून तो जेव्हां परगांवीं गेला तेव्हां त्याच्या आईबापांच्या मागची त्याची कटकट गेली. ३ किरकीर, चिरचीर; उ० त्या पोराला दूध पाजानां लवकर ! केव्हांचा तो कटकट करतो आहे. ५ }. प्रारब्ध. } ॐ**कटकट्या वि०** ०व्यर्थ

कटकट करण्याचा किं० चरफडण्याचा ज्याचा स्वभाव असा (इसम).

कटकटणें अ० क्रि० हळहळणें; चरफडणें.

कटकटा अ० (कवितेंत) दुःखाचा सूचक उद्गार; हाय हाय !

कटकन्, कटदिशीं क्रि० वि० १ कट् असा आवाज करून. २ ताडदिशीं, एकदम.

कंटकारी स्त्री० १ सावरी. २ रिंगणी. ३ वेहेकरी.

कटंजन न० १ कठडा (जिन्याचा, पलंगाचा, छकड्याच्या, इ०). २ बसावयासाठीं केलेला ओटा (टेकावयासाठीं पाठ असलेला). ३ वेलीसाठीं कामट्यांची जाळी. ४ क्रमानें गज किं० काठ्या उभारून केलेली रांग (मर्यादेसाठीं).

कटणें अ० क्रि० १ शरीर, वस्त्र, इ० मळानें-आच्छादित होणें, मळाचीं पुटें बसून वस्त्रादि पदार्थ खराब होणें. २ एखाद्या कार्यांत निष्णांत असणें किं० निढावलेलें असणें. ३ एखाद्या कार्यांत जिवापाड मेहनत करणें; अटोकाट झटणें. ४ लढाईंत पतन पावणें किं० मारला जाणें. ५ शरीराचा अवयव लढाईंत तलवारीनें वगैरे तुटणें. ६ कमी करण्यांत येणें (पगार, खर्च, शेत, इ०). ❀**कटून करणें** एकादें काम झटून किं० कसून करणें. **कटून मरणें** लढाईंत कापलें जाणें; लढाईंत शत्रूंच्या हत्यारांनीं तुकडे तुकडे होऊन मरण पावणें. **कटून लढणें** हजारो लोकांचा फडशा पाडीत लढणें.

कटतर न० कोष्टयाच्या धंद्यांतील एक पारिभाषिक शब्द पुढें **खाटसरी** पहा.

कटता [म० कटणें] वि० कापलेलें; तुटका; अर्धवट. ❀**कटतें व्याज** न० तुटक मुदतीचें व्याज.

कटदोरा [सं० कटि=कंबर+म० दोरा] पु० १ करगोटा; कमरेस बांधतात तो रेशमाचा वगैरे गोफ, किंवा चांदीची वगैरे सांखळी. २ पर्वतादिकांना सभोंवार वेढणारा जमीनीचा किं० जंगलाचा पट्टा.

कटबंद पु० गाडीच्या चाकाच्या तुंब्याच्या वाटोळ्या भोकांत बसविलेली विडी (तो तुंबा झिजूं नये म्हणून; तुंब्याच्या दोन्ही टोकांस बसविलेल्या विड्यांना ' तोंडबंद ' म्हणतात).

कटमस्त (-स्ता) [हिं०] वि० बळकट व पुष्ट; आडदांड व धष्टपुष्ट; चढेल आणि मस्त; दांडगेश्वर.

कटमिती स्त्री०, **कटमुद्दत** स्त्री० उसनवार रकमेवरील व्याज मोजण्याची रीति. व्याजाच्या हिशेबाचा एक प्रकार (यांत कर्जाची रकम व्याजासह जसजशी फेडली जाते तसतसें मुद्दल कमी कमी होत जातें).

कटला पु० कांहीं पदार्थ वजनीं पल्ल्याच्या परिमाणाचा तोलून घेऊन आणखी ज्यादा जें परिमाण दिलें जातें तें.

कटवणी स्त्री० दगडफोड्याची पहार किं० कांब.

कटवणी न० १ पुरण शिजवून आमटी वगैरे करितां त्यांतील जें पाणी काढतात तें. २ मळकट कपडे धुतलेलें पाणी.

कटा उद्गार वा० अ० हाय हाय ! (क्रि० म्हणणें).

कटाकटा उ० वा० अ० हाय हाय !

कटाकटी स्त्री० काटाकाट; छाटाछाट. ❀ **कटाकटीनें** क्रि० वि० भारी ओढाताण करून; जेमतेम.

कटार, कट्यार [हिं० कठार] स्त्री० १ एक प्रकारचें छोट्या तरवारीसारखें शस्त्र. जंबिया किंवा खंजीर याप्रमाणेंच ही कमरपट्ट्यांत खोवावयाची असते. २ कोणतेंही मोठें संकट किंवा आपत्ति. ❀ **जिवावर कट्यार लागणें** मनाला कोणत्या तरी घोर चिंतेनें पीडणें. **एकाद्याला कट्यार लावणें** त्याला झोंबेल किं० लागेल, असें बोलणें; त्याला दोष देणें किं० टोमणें मारणें; उ० तुझा नवरा जुगार खेळतो असें सांगून तूं मालिनीच्या हृदयास कट्यार लावलीस. **एकाद्याच्या जिवावर कट्यार टांगलेली असणें** त्याच्या मनाला कसल्या तरी घोराची टोंचणी असणें (कर्जाची, मुलींच्या लग्नाची, इ०)

कटारी, कटारीदार वि० १ कट्यारीच्या आकाराचे छाप, वेलबुट्टी, शिवण, वगैरे असलेलें (कापड इ०). २ ज्याची वीण कट्यारीसारखी आहे असा गोफ वगैरे.

कटारा पु० कठडा (टेकून बसण्याकरतां किंवा स्थलमर्यादा दाखविण्याकरतां रचलेला).

कटाव [हिं०] पु० १ आंत एकाएकीं इतराचा प्रवेश न व्हावा व तो सुशोभित दिसावा असा जो सैन्य, लवाजमा, इ० चा रचनाप्रकार तो. २ यमकें, प्रौढ पदें, इत्यादींनीं सुशोभित करण्याचा,

तसेंच दोष देण्याविषयीं एकाएकी दुसऱ्याची बुद्धि चालूं नये, असा जो भाषण, काव्य इ० रचनेचा प्रकार तो. ३ भपका; भपकेदार किं० उठावदार देखावा; चटकदारपणा; मोहकपणा (कपड्यांचा, चालण्याबोलण्याचा,इ०),४ कट,कारस्थान, व्यूह. ꙮ**कटावाची कविता स्त्री०** कटिबंधाची कविता. पुढें **कटिबंध** पहा.

कटावणी स्त्री० १ व्याजकटावणी; तुटक मुदतीच्या व्याजाची आकारणी.२कटिबंधाची कविता; कटाव.

कटास पु० कष्ट, दगदग, हाल, (अन्नवस्त्रादिकांच्या अभावीं, किंवा आजाऱ्याच्या शुश्रूषेनिमित्त, इ०) **क्रि०** काढणें. सोसणें. ꙮ **एकाद्याचा कटास काढणें** त्याच्यासाठीं कष्ट करावे किं० सोसावे लागणें.

कटावणी (–णी) स्त्री० १ गठ्ठे इ० आवळून बांधावयाची दोरी. २ खुबी किं० चातुर्य (भाषणादिकांचें).

कटासणें स० क्रि० घट्ट आणि आवळून बांधणें; जखडणें. ꙮ**कटासून बांधणें** किं० **आवळणें** घट्ट आवळून बांधणें (गठ्ठां, बोजा, इ०).

कटासन [**सं०**कट=गवत; आसन=बैठक] **न०** दर्भाचें, मोळाचें, किंवा अन्य गवताचें केलेलें आसन. ꙮ**कटासन घालून बसणें** शुचिर्भूततेचा आव आणणें; दंभ माजविणें.

कटाह [**सं०**] **पु०** १ कढई. (उलट्या कढईची कल्पना करून हा शब्द आकाशासही लावितात, जसें आकाशकटाह).२ कासवाची पाठ.

कंटाळखोर [**म०** कंटाळा+**फा०** प्रत्यय ' खोर '] १ आळशी;टंगळमंगळ करणारा; सुस्त. २ चोखंदळा.

कंटाळणें अ० क्रि० १ ०चा कंटाळा येणें; मन किंवा शरीर निरुत्साह असल्यामुळें कांहीं काम करूं नयेसें वाटणें;उ० आज शाळेंत जावयाचा मला कंटाळा आला आहे. २ त्रासणें, विटणें, ०ची खंत वाटणें, ०च्या बद्दल अरुचि उत्पन्न होणें; उ० खाष्ट बायकोच्या सहवासास कंटाळून त्यानें जीव दिला.३ दमणें, शिणणें; उ०.त्याला उपदेश करून मी कंटाळलों ! तो कसचा ताळ्यावर येतो !

कंटाळवाणा पु० वि०, कंटाळवाणी स्त्री० वि० त्रास आणणारें; अरुचि उत्पन्न करणारें; विटविणारें.

कंटाळा पु० १ त्रास. २ शीण.२ निरुत्साहता. ४ वीट; अरुचि (क्रिया० येणें).

कटाक्ष [**सं०**] **पु०** १ तिर्यगवलोकन, डोळ्याच्या कोपऱ्यांतून पहाणें,विलोकिणें. २ दृष्टि, नजर. ३ साभिप्राय बघणें. ४ सरळ वाच्यार्थावांचून इतर जो व्यंग्यादिरूप अर्थ तिकडे जो भाषणाचा रोख तो. ४ कोणेकाची कोणेकावर जी क्रोधदृष्टि असते ती.६विशेष भर,जोर, रोख(अस्तिपक्षीं वा नास्तिपक्षीं); उ० राष्ट्रास पोषक अशा सर्व बाबींत खादीप्रसाराच्या बाबीवर गांधींचा विशेष कटाक्ष; उ० ताबुतांत हिंदूंनीं भाग घेऊं नये यावर टिळकांचा कटाक्ष होता म्हणून त्यांनीं सार्वजनिक गणपतीची चळवळ सुरूं केली. ७ निरंतर कांहीं शारीर श्रम करीत असतां दमूं नये असा जो कोणेकाचे शरीरीं पराक्रम असतो तो;उ० उपोषण करावयास शरीरास कटाक्ष पाहिजे. ꙮ **कटाक्षावेक्षण न०** १ साभिप्राय किं० ससंकेत अवलोकन. २ विलासपूर्ण दृष्टीनें निरीक्षण.

कटि,कटी [सं०] स्त्री०१ कंबर.२ कड (जेथें मुलाला कडेवर घेतात).३' कट ' चा अर्थ ३ पहा. ꙮ**कटितट न०**१कमरेचा प्रदेश.२ ढुंगण. **कटिबंद वि०**कामविकार ज्याणें किं०जिणें नियंत्रणेंत ठेविला आहे असा (पुरुष) किं० अशी (स्त्री). **कटित्र न०** करगोटा. २ कंबरपट्टा. २ कंबरेचें वस्त्र किं० चिलखत. **कटिबंध पु०** १ कमरबंद; कंबरपट्टा. २ पृथ्वीवरील हवेसंबंधानें कल्पिलेले पट्टे किं०प्रदेश; उ० उष्णकटिबंध, समशीतोष्ण कटिबंध, आणि शीतकटिबंध. **कटिबंधन न०** १ करगोटा. २ कंबरपट्टा. **कटिसूत्र न०** १ करगोटा. २ कंबरपट्टा. **कटिस्नान न०** कंबरेपासून खालच्या शरीराचें स्नान. **कटिशूल पु०** अनिवार मैथुनेच्छा. **कटिशूळाची व्यथा स्त्री०** छाहेरख्यालीपणाची आवड, प्रवृत्ति, किंवा अनिवार इच्छा.

कटु [**सं०**] **वि०** १ कडू. २ उग्र, दारुण. ३ दुःखद. ४ तिखट. ५ झोंबणारें, अप्रिय (भाषण, इ०). ६ तळख, तापट, (मनुष्य

इ०).ॐ–कीट पु० चिलट; डांस.–त्रय,–त्रिक न० सुंठ, मिरीं, आणि पिंपळी यांचा समुच्चय. –रव पु० बेडूक.

कटुकी स्त्री० एक औषधी.

कटुवाण न० पडित आणि नापिक जमीनीची देणगी. [रेंचा वटेंवा.

कटुळतें, कटोळतें न० सराफ, सोनार, वगै-

कटोरा पु०, **कटोरी** स्त्री० १ वाडगा, द्रोण, किं० वाटोळें आणि खोलगट पात्र. २ लहान सुंदर (स्त्री, मुलगी, मूल, गाय, इ०).

कट्टा पु० १ बसावयासाठीं दगड, विटा, इ० चा रचलेला ओटा. २ व्यापारी, अडत्ये, दलाल, इ०ची जमावयाची जागा; उ० सराफकट्टा. ३ रस्त्याच्या बाजूला ओझीं उतरण्यासाठीं किं० विश्रांति घेण्यासाठीं केलेला ओटा.

कट्टा वि० १ मजबूत, भक्कम. २ शक्तिमान्, बळकट. ३ तल्लख; हुशार. ४ जोरदार; आवेशाचा. ५ धाडसी; धीट; माघार न खाणारा. ६ अंतःकरणापासूनचा; पक्का. ७ पूर्णपणें; सर्वथैव. 'कट्टा' हा शब्द क्रि० वि० च्या अर्थानें योजला जातो; उ० कट्टा गांधीभक्त, कट्टा ब्रह्मद्वेष्टा, कट्टा सुधारक, कट्टा पुनर्विवाहाच्या पक्षाचा, इ०.

कट्टा पु० १ कापाकापी; छाटाछाट; कत्तल. २ कट, खलबत. ३ जूट.

कट्यार स्त्री० खंजीर, बिचवा, इ०च्या जातीचें एक हत्यार.

कंठ [सं०] पु० १ घसा. २ मान. ३ आवाज. ४ भांड्याचा कांठ. ५ सांनिध्य. ६ पोपट, खबूतर इ०तील नरांस तारुण्यावस्था आली असतां कंठस्थानाच्या केशांना जो काळा किं० दुसरा एकादा रंग येतो, त्या केशांचें वलय किं० कडें किं० पट्टा. ॐ**कंठाभरण** न० कंठी. –गत वि० अगदीं कंठापर्यंत आलेले (प्राण); मरणोन्मुख. –मणि पु० १ मानेचा मणका. २ प्रिय वस्तु. **कंठकोकिळा** स्त्री० मधुर आवाजाची स्त्री. –वर्ती वि० गमनोन्मुख (प्राण). –शोष पु० घसा कोरडा होईपर्यंत बोलणें; व्यर्थ बडबड. –स्थ वि० १ घोकून पाठ केलेलें. २ कंठांतून ज्यांचा उच्चार होतो असे (वर्ण); उ० अ, आ, क, ख, ग, घ, ङ, ह, हे कंठस्थवर्ण होत; ओ, औ, हे कंठगत असून ओष्ठ्य आहेत. **कंठ दाटणें** किं० **सद्गदित होणें** प्रेमातिशयामुळें घसा भरून येणें. **कंठ फुटणें** १ पिचका आवाज होणें. २ मुलगा वयांत आला असतां त्याचा आवाज प्रौढ आणि खणखणीत होणें. **कंठीं प्राण येणें, कंठीं प्राण उरणें** आसन्नमरणाच्या अवस्थेंत असणें. **कंठीं प्राण धरणें** विशिष्ट आशा सफळ होईपर्यंत प्राण जाऊं न देणें; प्राण देहांत अडकावून ठेवणें; उ० बाळा, मरणाच्या आधीं तुझी भेट व्हावी आणि तुझ्या अनाथ बहिणीला अंतर देऊं नको इतकें तुला सांगावयासाठीं मीं कंठीं प्राण धरून ठेविले होते; तें तुला मी सांगितल; आतां मी प्राण सोडतों. **कंठीं प्राण येणें** १ भयानें घाबरणें. २ तीव्र दुःखानें ग्रस्त होणें. **कंठ मोकळा करून रडणें** मोठमोठ्यानें किं० ओकसाबोकशीं रडणें. **कंठरवानें** क्रि० वि० मोठमोठ्यानें ओरडून (बोलणें, सांगणें, उपदेश करणें, ताकीद देणें, इ०). –ला **कंठस्नान घालणें** ०चा गळा कापणें. **कंठावरोध** पु० घसा बंद होणें किं० बंद पडणें (पक्षवातादि कारणामुळें). **कंठचामीकर न्याय** पु० गळ्यांत चंद्रहार, सरी, इ० दागिना असून आणि त्याचें भान नसून तो घरभर धुंडणें; खाकेंत कळसा आणि गांवांत वळसा.

कंठक वि० १ सोशीक; कष्टाळू; तहान, भूक, वारा, ऊन्ह इ०चा उपद्रव न मोजणारा. २ धाडसी, धीट.

कठडा [सं० काष्ठ, म० काठी] पु० विहीर, जिना, गच्ची, इ०ना सर्व बाजूंनीं घातलेली ठेंगणी भिंत, रिपांची ओळ, इ० (कोणी मनुष्य तोल चुकून पडूं नये यासाठीं घातलेली).

कठण न० डाळ पुष्कळ पाण्यांत शिजवून काढलेलें पाणी (सार, आंबटी, इ० खाद्यपेयें करण्यासाठीं).

कंठणें, कंठिणें स० क्रि० १ दुःखानें आणि कष्टानें घालविणें (दिवस, काळ, इ०). २ दुःख, कष्ट, इ० भोगून अतिक्रांत होणें किं० त्यांतून बाहेर पडणें. ३ कष्टानें चालून अतिक्रान्त करणें (रस्ता, प्रवास, इ०).

कंठा [सं० कंठ] पु० स्त्रियांचा गळ्यांत घालावयाचा एक दागिना.

कठाण, कठाणमठाण न० शेंगा, डाळी, इ० समुच्चयानें.

कठाड, कठारा पु० वर ' कठडा ' पहा.

कंठाळ स्त्री० सामान वहावयासाठीं घोडें, बैल, इ०च्या पाठीवर घालावयाचें जें दोन कप्प्यांच्या रूपाचें बारदान केलेलें असतें तें. ॐतुम्ही आम्ही एक आणि कंठाळीला मेख बोलण्यांत मैत्रीचा आविर्भाव आणि कृतींत आणि वर्तनांत द्विधाभाव किं० परकीपणा; खोटी मैत्री.

कंठाळ्या [म० कंठाळ] वि० कंठाळ वहावयाच्या उपयोगाचा (पशु, घोडा, बैल, इ०).

कठिन, कठिण [सं०] वि० १ बट्ट, टणक; ज्याचा छेद किंवा भेद करावयाला फार प्रयत्न लागतो असा (पदार्थ, दगड, लाकूड, लाडू, लकडी, इ०). २ करावयाला, समजावयाला, किं० चढावयाला अवघड किं० कष्टप्रद. ३ सोसावयाला किं० भोगावयाला किं० निस्तरावयाला दुःखकर (रोग, आजार, अवस्था, इ०). ४ ज्याला द्रव येत नाहीं असें (मन, हृदय, अंतःकरण). ५ उपद्रवकारक. ६ वागवावयाला पीडादायक. ७ दुःसह, पंचाइतीचा, पेचाचा. ॐ**कठिणोत्तर न०** कर्कश किं० क्रूरपणाचें भाषण. **कठिण मर्जी स्त्री०** १ इतराजी; खप्प्या मर्जी; नापसंती. २ कडक किं० तापट स्वभाव. **कठिण वर्ण** कर्कश आवाजाचे वर्ण; उ० ट, ठ, ड, ढ, ण, जोडाक्षरें, इ०.

कंठी [सं० कंठ + म० ई (प्रत्यय)] स्त्री० १ पुरुषांच्या गळ्यांतील सोन्याचें किं० मोत्यांचें भूषणविशेष. २ अंगरख्यास कंठप्रदेशीं शिवून जी अनेक प्रकारची नक्षी (कंठींच्या आकृतीची) केलेली असते ती; अंगरख्याचे मुख्य प्रकार गुंडीदार, कंठीदार, नीम कंठीदार, प्यालेदार, हे होत.

कठोर [सं०] वि० कठिण; टणक. २ तीक्ष्ण. ३ निर्दय. ४ पूर्ण वाढलेला किं० पक्क झालेला (गर्भ). ५ पक्क, प्रौढ. ॐ**कठोरभाषी** झोंबरें किं० निर्दयपणाचें भाषण करणारा.

कंठ्य [सं०] वि० कंठापासून ज्याची उत्पत्ति आहे असा वर्ण; उ० अ, आ, क, ख, ग, घ, ङ, हे कंठ्य वर्ण होत; विसर्ग हाही कंठ्य उच्चार आहे.

कड [सं० कट=कंबर, मध्यभाग] स्त्री० १ कुक्षीखालचे भाग ते प्रत्येक; उ० मुलाला कडेवर घे. २ बाजू; उ० लुगड्याच्या ह्या कडेचा रंग विटला आहे. ३ शेवट; उ० मी मोठा प्रयत्न करून नदीची दुसरी कड गांठली. ४ मर्यादा; उ० मी आपल्या शेताच्या कडेला मिरच्या आणि वांगीं लाविलीं आहेत. ५ (एकाद्या पदार्थाच्या अपेक्षेनें) दिशा; उ० ह्या गडाची पूर्वकड. ' कड ' ह्या शब्दाचीं क्रियाविशेषणार्थक रूपें पुष्कळ प्रचारांत आहेत; उ० इकडे, तिकडे, जिकडे, इकडून, इ०. ॐ**एकाद्याची कड धरणें** किं० **ओढणें** त्याचा पक्ष स्वीकारणें. **कड काढणें** हातीं घेतलेलें काम एका दमांत पूर्ण करून टाकणें. **कडच्या रविवारीं क्रि० वि०** कधींच नाहीं. **कडेस लावणें** १ पूर्ण करणें; संपविणें. २ निस्तरणें. **कडचा पोहोणारा पु०** खोल पाण्यांत न जातां नदीच्या कांठा कांठानेंच पोहोणारा म्ह० फाजील सावधगिरी बाळगणारा व्यापारी, स्वार, मित्र, सहाय, इ०.

कड, कढ [म० कढणें, सं० क्वथ्] पु० दुध, पाणी, इ० पातळ पदार्थ फार तापल्यानें येतात जे बुडबुडे ते समुच्चयानें; उ० दुधाला कढ येईपर्यंत तें मी तापविलें.

कंड [सं० कंडू] स्त्री० १ खाज. २ [illegible]की खरूज. ३ एकाद्या गोष्टीची मर्यादेपलीकडे गेलेली इच्छा.

कडक वि० १ टणक. २ टणक पण [illegible]सूळ. ३ पूर्णपणें वाळलेला म्हणजे ज्यांतील आर्द्रांश पूर्ण किं० अगदीं वाळला आहे अस[illegible] (पदार्थ, भाकरी, खळ लाविलेलें कापड, इ०). ३ निकोप, सुदृढ, धट्टा खट्टा (माणूस, जनावर, इ०). ४ तापट, रागीट, तल्लख (प्रकृति, स्वभाव, माणूस, इ०). ५ जालीम (औषध, इ०). ६ झोंबणारा (थंड वारा, इ०). ७ कर्कश. कठोर (ध्वनि, आवाज, बोलणें, इ०). ॐ**कडक झोप स्त्री०** गाढ आणि शांत झोप. **कडक बिजली स्त्री०** अति तल्लख घोडा किं० घोडी. **कडक वीज स्त्री०** तल्लख आणि तापट माणूस किं० जनावर. **कडक सावित्री स्त्री०** तल्लख आणि चुणचुणीत स्त्री.

कडकड, कडकडां क्रि॰ वि॰ कडकड आवाज होईल अशा रीतीनें. ‡ **कडकड दांत खाणें** रागानें किं॰ त्रासानें दातांवर दांत घासणें. **कडकड** (किं॰ **कडकडां) भेटणें** जोरानें आणि आवेशानें आलिंगिणें.

कडकडणें अ॰ क्रि॰ वृक्ष मोडते समयीं किं॰ वीज पडते समयीं कडकड असें वाजणें; कडकड असा आवाज करणें. २ रागानें तणतणणें. ३ चलीवर ठोविलेलें दूध, तेल, पाणी, इ॰ अतिशय तापणें.

कडकडाट पु॰ गर्जना. [करणें.

कडकडाटणें अ॰ क्रि॰ कडकड असा आवाज

कडकडा वाल पु॰ भाजलेला जो वाल तो.

कडकडीत वि॰ १ कडकड असा आवाज उत्पन्न करणारा (हरभरे खातानां होतो तसा). २ अत्यंत उष्ण (पाणी, दूध, इ॰). ३ पूर्णत्वास पोचला आहे कांहीं प्रकार किं॰ गुण ज्याचा असा (विद्वान्, विद्या, ब्रह्मचर्य, उपास, इ॰). ४ कोणाची भीडभाड न धरतां स्पष्टपणें आपला विचार बोलून दाखविणारा (मनुष्य), किं॰ अशा प्रकारचें (भाषण). ५ ज्याच्यांत कोणत्याही प्रकारचा उणेपणा नाहीं असें; पूर्णत्वास पोचलेलें.

कडकडून क्रि॰ वि॰ १ दृढपणें घट्ट मिठी मारून (आलिंगणें, भेटणें). २ आवेशानें; जोरानें किं॰ चवताळून.

कडकणा पु॰, कडकणी स्त्री॰, कडकणें न॰ १ वाटोळा कापलेला कागद ज्यावर नक्षीदार कातरकाम केलेलें असतें आणि जो नवरात्रांत देवाच्या मूर्तीवर टांगतात तो. २ पुरीसारखें पिठाचें खाद्य, वरच्या सारख्याच उपयोगाचें.

कडकणी [**म॰** कडक] **स्त्री॰** क्षयासारखें एक दुखणें (**क्रि॰** बसणें).

कडकणें [**म॰** कडक होणें] **अ॰ क्रि॰** १ अतिशय भाजल्यामुळें किं॰ पाण्याचा अंश अगदीं नाहींसा झाल्याकारणानें कडक होणें (भाकरी, इ॰). २ आर्द्रांश अगदीं नाहींसा झाल्याकारणानें भेगाळणें. ३ धान्य इ॰ पूर्ण वाळून काढावयाच्या किं॰ गोळा करावयाच्या स्थितीस येणें. ४ पक्क व्हावयाच्या अगोदर वाळून जाणें. ५ वस्त्र, काष्ठ, इ॰ अतिशय सुकल्यामुळें कडक होणें. ६ रूक्ष भाकरी किं॰ शुष्क दाणे खातांना किं॰ चावतांना कर्कश आवाज उत्पन्न करणें. ७ सर्पणाचीं लाकडें, झुडपांच्या फांद्या, इ॰ जळत असतां तडतडणें. ८ ताशेरा झाडणें; रागारागानें ओरडून मोठमोठ्यानें बोलणें; उ॰ माझ्यावर रामभाऊ उगीचच कडकला. ९ वीज गर्जणें. ‡ **कडकून बोलणें** मोठ्यानें ओरडून बोलणें.

कडका पु॰ १ थंडी, उन्ह, इ॰ची तीव्रता; उ॰ आज सकाळीं थंडीचा कडका पडला होता. २ वेदनेचा जोर किं॰ तीव्रता. ३ मेघगर्जनेचा एकाएकीं झालेला उद्रेक. ४ नगारा इ॰ अनेक वाद्यांचा एकदम झालेला आवाज. ५ कोणत्याही अवस्थेचा किं॰ स्थितीचा भर किं॰ पराकाष्ठा; उ॰ दुर्भिक्षाचा कडका आश्विनापासूनच जाणवूं लागला.

कडकां क्रि॰ वि॰ झटपट; तल्लखपणें; तरतरीतपणें; झपाट्यानें; आवेशानें.

कडकावणें अ॰ क्रि॰ भीडभाड न धरतां बोलणें; ताशेरा झाडणें; एकाद्याची खरडपट्टी काढणें.

कडकाविणें स॰ क्रि॰ १ चाबूक, काठी, इ॰नीं रट्टा मारणें. २ भीडभाड न धरतां बोलणें.

कडकावून, कडकून क्रि॰ वि॰ जोरानें; आवेशानें; सर्व बळ खर्चून.

कडाकिंद पु॰ शिंगाड्या एवढा आणि शिंगाड्याच्याच चवीचा एक कंदविशेष (त्याचे काप शिजवून खातात).

कडकी [**म॰** कडक] **स्त्री॰** उपदंशादि रोगामुळें किं॰ सोमल इ॰ उग्र औषधांच्या सेवनामुळें शरीरांतील सर्व धातु संतप्त व्हावयाजोगी जी उष्णता होते ती (**क्रि॰** बसणें).

कडंग वि॰ १ अवर्षणामुळें किं॰ अतिपक्क झाल्यामुळें कडक किं॰ टणक झालेला (तांदूळ). २ अति भाजणें इ॰ कारणामुळें खातांना कडकड वाजावयाजोगें कठिण झालेलें (धान्य, भाकरी, इ॰).

कडंग स्त्री॰ तापाची कणकण; अल्प प्रमाणांत आलेला ताप.

कडंगणें अ॰ क्रि॰ १ भाकरी इ॰ अतिशय भाजली गेल्यामुळें कडंग होणें; (वर ' कडंग ' पहा). २ धान्य अतिशयित तापल्याळें तें कांडतेवेळीं चूर्ण होण्याच्या स्थितीला येणें.

कडंगी, कडांगी स्त्री॰ तापाची कणकण; ताप भरूं लागण्याचीं पूर्वचिन्हें (**क्रि॰** येणें, जाणें, निवणें, इ॰).

कडगुलें न० १ रंगीत कांचेची बांगडी. २ कांहीं जातीच्या सापांच्या अंगावरील काळे कड्या-सारखे जे पट्टे ते प्रत्येक.

कडची स्त्री० लहान कढई; तेल, इ० ताप-विण्याचें पात्र.

कडण, कडणें न० माडाची झावळी,—जिच्या दोन्ही बाजूंच्या पाती चटईप्रमाणें एकांत एक विणलेल्या आहेत.

कडण [**म०** कड] **स्त्री०** १ पर्वत, डोंग-राचा सुळका, कडा, इ०ची कड किं० बाजू. २ शरीराची एक बाजू. ३ धोतर, लुगडें, परकर, इ०कंबरे भोंवतां घट्ट आवळल्यानें होते जी खरूज ती.

कडतर न० १ फाटलेली, तुटलेली, झिजलेली बुरडी टोपली, चाळण, सूप, इ० पदार्थ. २ जुनीं आणि फाटकीं तुटकीं चिरगुटें.

कडतरी स्त्री० लहानसें शेत.

कडता पु० पदार्थ तोलून विकतानां दर मणा-वर जें त्या पदार्थाचें अधिक परिमाण दिलें जातें तें; हें परिमाण भिन्न पदार्थावर भिन्न असतें तसें तें भिन्न ठिकाणीं भिन्न असतें.

कडदण, कडधण, कडधान्य न० १ मूग, मठ, उडीद, वाल, तूर, मसूर, हरभरा, करडई, पावटा, वाटाणा, इ०च्या शेंगांतून निघणारे दाणे म्हणजे मूग, मठ, उडीद, वाल, इ० द्विदलें. २ शेंग.

कडदोरा [**सं०** कटि (कंबर) + **म०** दोरा] **पु०** करगोटा; कटिसूत्र.

कंडन [**सं०**] **न०** १ (धान्यादि) कांड-ण्याची क्रिया; तांदूळ, इ०चा कोंडा काढून टाकण्यासाठीं उखळांत वगैरे घालून मुसळ इ०चे आघात त्यांचेवर करण्याची क्रिया किं० व्यापार. २ विध्वंस करणें. ३ ठार मारणें.

कंडनी [**सं०**] **स्त्री०** १ उखळ. २ मुसळ.

कडप न० हरभऱ्याचीं, तुरीचीं, वगैरे रोपटीं मुळासकट उपटून वाळण्यासाठीं त्यांची करून ठेवलेली रास. ॐ**एकाद्याचें कडप वळणें, बसणें, किं० होणें** तो आजारानें किं० अन्य कारणानें कृश होणें किं० रोडावणें.

कडप्या [**म०** कडप=कडधान्यांच्या रोप-ट्यांची रास] **स्त्री० अ० व०** चित्रा नक्षत्र किं० त्या नक्षत्रांत पडलेला पाऊस (ह्या दिवसांत बाज-रीचीं कडपें वाळावयाला टाकलेलीं असतात).

कडबड स्त्री० कडबा वगैरेंचा खाद्यांश गुरांनी खाल्लयावर खालीं जो त्यांचा निरुपयोगी अंश पडतो आणि जो केवळ सर्पणाच्या उपयोगाचा असतो तो; कडब्याचें गदळ किं० रद्दी भाग.

कडबडीत वि० कडबड असा आवाज ज्याचा होतो असें (वस्त्र, कागद, इ०).

कडबा पु० जोंधळ्याचीं वाळलेलीं ताटें (गुरांना खावयाच्या उपयोगाचीं). ॐ**कडबा नायकीण स्त्री०** १ अगदीं गरीब लोकांच्या उप-योगाची वेश्या; हलक्या दराची वेश्या. २ कुंटीण.

कडबी स्त्री० जनावरांच्या उपयोगासाठीं उन्हाळ्याच्या दिवसांत कापून काढलेलीं जोंध-ळ्याचीं ताटें.

कडबू पु० १ कणकेच्या कवचांत पुरण घालून चौकोनी गाठोड्याच्या आकाराचें तळून काढलेलें एक खाद्य. २ लठ्ठ आणि फोपशा माणूस.

कडबोळें, कोडबोळें, कोडबुळें न० बाजरी, जोंधळे, गहूं, हरभऱ्याची डाळ, तांदूळ, इ०चें पीठ मिश्र करून तें पाण्यांत भिजवून त्याला वेटोळ्याचा आकार देऊन तळून जें खाद्यविशेष करतात तें.

कडमड (–डी) स्त्री०, कडमोडा पु०, कडमोड पु०. स्त्री० १ ताप भरावयाच्या पूर्वीं किं० ताप भरल्यावर किं० ताप ओसरल्यावर जी निरंगळी किं० अस्वस्थता वाटते ती (**क्रि०** येणें, भरणें). २ गळवाची भगभग किं० आग. ३ अति कष्ट किं० श्रम केल्यावर डोळ्यांची किं० हातापायांची होते जी आग ती.

कडमडणें अ० क्रि० १ ताप भरण्याचीं पूर्व-चिन्हें होणें; येणाऱ्या तापाच्या पूर्वीं वाटते ती अस्वस्थता. २ ठणकणें (गळू, इ०). ३ भग-भगणें (डोळे, इ०).

कडवई, कडवी स्त्री० १ एक वेल. २ कडू औषधें फार खाण्यांत आल्याकारणानें कडूपणाची व्याप्ति सर्व शरीरांत होते ती.

कडवट वि० किंचित् कडू.

कडवर क्रि० वि० कडेपर्यंत; शेवटपर्यंत.

कडवसा पु० कवडसा. { १ भिवई. २ पड-छाया. ३ अंधार. †**ज्ञा०** }.

कडवळ न० जनावरांच्या खाण्यासाठीं जोंधळ्याचें किं० मक्याचें किं० बाजरीचें शेत करून ताटें कापून ठेवितात तीं समुच्चयानें.

कडवा [**म०** कडू] **पु०** एका जातीचा वाल.

कडवा वि० १ खाजरा (अळू, सुरण, इ०). २कठोर अंतःकरणाचा; निर्दय. ३ रानवट वर्तनाचा. ४ तापट, तामसी. ५ धीट. ६ ज्याच्यावर वाईट खाद्यें, पेयें, किं० पाणी, थंडी, ऊन्ह, किं० वारा, इ० चा कांहीं अनिष्ट परिणाम होत नाहीं किं० फारसा होत नाहीं असा; कंटक; काटक.

कडवी स्त्री० १ कडव्या वालाचें झाड. २ अफू.

कडवीड }न० सोन्याचा चाराचुरा. †तुका०{.

कडवें न० पदाचा किं० गाण्याचा पालूपदानें समाप्त होणारा भाग.

कडवेळ न० वर ' कडवळ ' पहा.

कडस क्रि० वि० जखडून किं० घट्ट (बांधणें).

कडसणी स्त्री० १ ज्या दोरीवर पडदा सरकाविला जातो ती. २ बटवा उघडावयाच्या आणि मिटवावयाच्या दोऱ्या प्रत्येक. ३ गठ्ठे आवळावयाची दोरी. ४ गाडीवर लादलेलें ओझें ढासळूं नये म्हणून बांधतात ती दोरी. ५ (कवितेंत) बारकाईनें केलेली तपासणी; तपास; शोध. ६ विवेचन, वाटाघाट. ७ बरगड्यांच्या ज्या दोन पंक्ति त्या प्रत्येक. ८ लुगडें किं० धोतर नेसलें असतां त्याच्या उजव्या आणि डाव्या बाजू प्रत्येक; उ० कडसणीला लावलेला पैसा, खोचलेला रुमाल, ठेविलेली सुपारी, तपकिरीची डबी, इ०. ९ घुसळणें, ढवळणें (**ज्ञा०, तुका०**). ‌‌**कडसणी घालणें, कडसणींत धरणें** घोटाळ्यांत घालणें. **कडसणीस लागणें** कृश आणि क्षीण होणें; झिजत जाणें.

कडसणें स० क्रि० १ बांधणें, जखडणें; उ० कडसून बांधणें. २ सावध करणें. ३ कसाला लावणें. ४ घुसळणें. ५ विचार करणें. ६ चौकसणें, परीक्षिणें, तपासणें. ७ आकळणें.

कडसणें अ० क्रि० क्षीण होणें; कृश होणें; झिजणें.

कडसर वि० किंचित् कडू; कडवट.

कडसर स्त्री० डोंगराची उतरण.

कडसरण [**म०** कड+सरणें] **अ० क्रि०** बाजूस सरणें; मागें जाणें; हटणें.

कडसरा पु० भाताच्या किं० धान्याच्या मुळ्याला मधोमध आवळून बांधलेली दोरी.

कडसरी स्त्री० १ पाटी, दुरडी, वगैरेंचा कड. २ कडोसरी, कडोत्री (जेथें बायका किं० पुरुष पैसे, किल्ल्या, सुपारी, वगैरे ठेवतात). ३ डोंगराचा कडा किं० ह्या कड्याच्या पायथ्या जवळचा प्रदेश. ‌**कडसरीस येणें** एकादें बिकट काम करीत असतां थकून जाणें किं० मेटाकुटीला येणें.

कडसूर न० धान्याचीं किं० विशेषतः भाताचीं जीं ताटें त्यांचे बुडखे.

कडळ न० मागें **कडवळ** पहा.

कडळ स्त्री० धान्याचीं ताटें (गुरांच्या खाण्याच्या उपयोगाचीं). **कडळ काढणें** जें काम धिमेपणानें आणि भागांभागांनीं करावयाचें तें घाईघाईनें कसेंबसें करून टाकणें.

कंडा पु० १ घोड्याच्या गळयांत घालण्यासाठीं सखलादीनें मढविलेली दोरी किंवा चांदीचें जें भूषण करतात तें. २ खोट्या महतीनें फुगणें; आपल्या महतीचें जगास प्रदर्शन करावयाला उत्सुक होणें किं० असणें. ३खोटी महत्त्वाकांक्षा. ४मुलांच्या खेळांतील विजयसूचक शब्द (**क्रि०** लावणें किं० लागणें).

कडा [**म०** कड] **पु०** डोंगर वगैरेंची कड; सुळा, सुळका (**क्रि०** तुटणें); उ० काय भयंकर हा कडा तुटलेला आहे हो ! **कडाकोट करणें** [**म०** कडा (डोंगराचा सुळका)+कोट (किल्ला)] **पु०** १ कडा आणि कोट यांनीं बंदिस्त अशा जागीं ठेवणें. २ दारें, कुलपें, अडसर, वगैरे लावून बंदोबस्त करणें; संरक्षणाची तजवीज करणें; बंदिस्त करणें; उ० गुरांच्या भयास्तव शेतकरी शेताभोंवतीं निवडुंगाचा वगैरे कडाकोट करतात; उ० वाघाच्या भयानें धनगर शेळयामेंढ्यांचा कडाकोट करितात; उ० पानिपतावर विश्वासरावांभोंवतीं फौजेचा कडाकोट केलेला होता. **कडाडोंगर पु०** डोंगर चढणें, उतरणें, तेथें गुरें चरावयासाठीं नेणें, परत आणणें, इ० इ० कामें; उ० बाबा म्हातारा झाला त्याला आतां कडाडोंगर होत नाहीं.

कडाकड, कडाकडां क्रि० वि० कडाकड, तडातड असा आवाज करीत किं० करून; उ० तो सत्तर वर्षांचा म्हातारा आहे, पण हरभरे आणि

कावली दांतांनीं कडाकड चावून खातो !

कडाका, कडाखा पु० १ एखाद्या गोष्टीचा सातातिक आणि सातिशय जो प्रवृत्तपणा तो;एकाद्या गोष्टीवर केलेला जोराचा प्रयत्न, दिलेला भर, किं० लाविलेला नेट; कचका; तडाका; उ० रामाची परीक्षा जवळ आल्यामुळें त्यानें अभ्यासावर कडाका लावला आहे; उ० यंदा थंडीनें कडाखा उडविला आहे; उ० आमच्या शेजारच्या राममंदिरांत हल्लीं भजनाचा कडाका चाललेला असतो. २ महागाई, महर्घता; उ० अतिवृष्टीमुळें गतवर्षीं धान्याचा कडाखा होता (म्ह० धान्याचा अतिशय तोटा होता); उ० लढाईमुळें १९१४ सालीं धारणेचा कडाखा श्रीमंतांसही जाणवला (म्ह० धारण विलक्षण चढली होती व श्रीमंतांसही ती असह्य झाली). ३ फटकारा (चाबकाचा वगैरे);उ० त्याशिपायानें दोन कडाखे उडवतांच तो चोर वठणीवर आला.

कडाकूट स्त्री० १ कांहीं एक गोष्ट करण्याविषयीं अनेक प्रकारचा मोठा जो प्रयत्न करावा तो. २ समृद्धि; वैपुल्य; उ० काय हो आज आंब्यांची कडाकूट आहे ? ३ जोर; सातिशय प्रवृत्तपणा; उ० यंदा पावसानें कडाकूट केली आहे. **क्रि० वि०** १ अतिशय; वैपुल्यानें; एकही न वगळतां; उ० आज कडाकूट पंडित मिळाले होते; उ० काल कडाकूट धूळ उडत होती; उ० दर्या कडाकूट खवळल्यामुळें आमची होडी अगदीं बुडण्याच्या बेतांत होती. (हें क्रियाविशेषण सातिशयता, अतिरेक, जोर, इ० दर्शविण्याकरितां उपयोजितात).

कडाखा वर ‘ कडाका ’ पहा.

कडांगी [**म**०कढ+अंग] **स्त्री०** तापाची कणकणी; तापाचीं पूर्व चिन्हें;कढत अंग झाल्याची भावना.

कडाचूर पु० १ पूर्णपणें अगदीं मोडून तोडून केलेली नासाडी; विध्वंस. २ खाऊन फस्त करणें; खाऊन संपवून टाकणें; चैनीची उधळपट्टी; उ० त्याणें बाप मेल्यापासून एका वर्षाच्या आंत वीस हजार रुपयांचा कडाचूर करून टाकला !

कडाचूर वि० एकाद्या कामांत निमग्न झालेला किं० गढून गेलेला; उ० रामा कादंबरी वाचण्यांत अगदीं कडाचूर झाला आहे.

कडाडणें अ० क्रि १ कडकडणें; कडाड, कडकड, असा ध्वनि करीत करीत परिस्फुटित होणें; कडाड असा शब्द उमटवीत एखादी क्रिया होणें; उ० मघाशीं केवढ्या मोठ्यानें वीज कडाडली हो ! २ कडकड आवाज करीत मोडणें; उ० तें झाड कडाडून पडलें.

कडाडां, कडाडून क्रि० वि० कडाड असा शब्द करून.

कंडापट्टा पु० घोड्याच्या तोंडावरचीं आणि मानेवरचीं भूषणें; (मागें ‘ कंडा ’ पहा).

कडाबीन [**फ्रेंच** काराबीन] **स्त्री०**१रुंद तोंडाची आणि अखूड अशी एक प्रकारची बंदूक. २ शत्रूवर दगड फेकावयाचें यंत्रविशेष.

कंडारणा वि० फार जाड व दिसण्यांत भपकेदार, भक्कम, लठ्ठ, विशाळ,पण नीटस, सुंदर इ०. (दोऱ्या, तुळया, खांब, माणसें, जनावरें इ०); उ० पूर्वींच्या वाड्यांचे ते कंडारणे खांब वगैरे पाहिले म्हणजे आमच्या पूर्वजांची उपयुक्तता व सौंदर्य यांचा जेथें तेथें मिलाफ करण्याची हातोटी कौतुकास्पद होती असें वाटतें.

कंडारणें अ० क्रि० लठ्ठ होणें; रटाटून वाढणें; फोफावणें;उ०रामाच्या शेतांतील ऊस खतामुळें खूप कंडारला आहे. (लक्षणेनें हा शब्द माणसांस, जनावरांस, इ० सही लावतात).

कंडारणें स० क्रि० (याचें **करांडणें** हें ज्यास्त प्रचलित रूप आहे). उंदीर इ०कांनीं वस्त्र, कागद, इ० तोडणें किं० कुरतडणें.

कंडारणें न० १ न्हाव्याची नखोली किं० नराणी. २ कागदांवर जाळ्या खोदावयाचें, नक्षी वगैरे उठविण्याचें किं० कातरण्याचें एक हत्यार. (रांगोळ्यांचे गालिचे करतांना असले कागद उपयोजितात. कागदावर रांगोळी पसरून कागद काढून घेतला म्हणजे खालीं कागदांवर कातरलेली नक्षी उमटते). ६ सरी, बिंदली, इ० जे फाशानें आडकावावयाचे दागिने त्यांच्या फाशांच्या दोन बाजूंचे जाडी आणि नक्षीदार भाग ते जोडीनें किं० ते प्रत्येक. ४ सोटा, दांडकें. ५ दाव्याच्या मध्याचा जाड भाग. ६ नांगरहात्र्याच्या आसुडाची मूठ. ७ सोन्या चांदीला ठोकून आकार द्यावयाचें सोनाराचें एक लोखंडाचें साधन.

कडाशीण [कैकाडीण; कैकाडी जातीची स्त्री यापासून] **स्त्री०** कैदाशीण; भांडखोर स्त्री; भांडकुदळ स्त्री; जहांबाज स्त्री.

कडासणी (–नी) स्त्री० १ ओझीं, गठ्ठे, वगैरे बांधण्याची किं० आंवळण्याची दोरी; गाडीवर लादलेलें ओझें बांधावयाची दोरी. २ कौशल्य, चातुर्य, खुबीदारपणा (भाषणादिकांतील). ह्या शब्दाचे इतर अर्थ ‘ कडसणी ’ शब्दांत पहा.

कडासणें,कडसणें स० क्रि० आवळून बांधणें; उ० हा गठ्ठा चांगला कडासून बांध.

कडासन [**सं०** कट (तृणविशेष) +आसन (बैठक)] **न०** तपस्वी इ०कांचें तृणांचें केलेलें किं० व्याघ्रचर्मरूप आसन.

कंडाळी [**म०** कंडी=बातमी, अफवा] **स्त्री०** उठविलेली किं० प्रसृत केलेला कंडी, गप्प, अफवा, बाजारबातमी, (क्रिया० उठणें, उठविणें,पिकणें).

कडीं [**सं०** कटक] **स्त्री०** १ सांखळी (लोखंड्याच्या कड्या एकमेकींत गुंतवून दारें, खिडक्या, वगैरे लावण्याकरतां जी करतात ती) २ पाटणी इ० कांस घालण्याचे उपयोगी जें चौरस लांकूड केलेलें असतें तें.३सुताची वळ,चिवट,पेंडकें, बिंडा. ४ तऱ्हा, पद्धत, धाटणी. ❀ **कडी करणें** ताण करणें; वरचढपणा मिळविणें; चढाओढ करून श्रेष्ठत्व मिळविणें किं० स्थापित करणें; सरशी करणें; वरताण करणें; उ० अंबिकाबाई नुसतीं पोलकींच घालते, पण चांद्रिकाबाई उंच टाचांचे बूटही घालूं लागली आहे ! एकूण चंद्रिकाबाईनें अंबिकाबाईवर कडी केली म्हणावयाची ?

कंडी स्त्री० १ बाजारगफ अथवा गटारगप्प; निर्मूल जें कोणेकानें वर्तमान कल्पून उठविलें तें; **क्रि०**उठविणें,पिकविणें,इ०.२ उत्कंठा. ४कामचेष्टा.

कडीकाळ [कलि+काळ] **पु०** प्रतिकूल समय किं० परिस्थिति.

कडीकोट, कडेकोट [**म०** कडी(दार बंद करण्याची सांखळी)+कोट (किल्ला)]**पु०** १ बंदोबस्ताची किं०सुरक्षित जागा, स्थिति किं०व्यवस्था; उ० फिरंग्यानें वसईच्या किल्ल्यांत जिकडे तिकडे कडेकोट केलेला होता त्यामुळें चिमाजीआप्पांच्या हातांत किल्ला लवकर पडण्याचा सुमार दिसेना.२बंदोबस्त;संरक्षणाच्या तजवीजी.**वि०**पक्का, उत्कृष्ट, सर्वांगीण, पराकाष्ठेचा, पूर्ण; उ० राणीनें किल्ल्यावर कडेकोट बंदोबस्त ठेवलेला, त्यामुळें शत्रूचें कांहीं चालेना; उ० राजपुत्राच्या स्वागतार्थ सरकारनें कडेकोट तयारी चालविली आहे. (कडेकोट याचा विशेषणात्मक प्रयोगच हल्लीं विशेष रूढ आहे).

कडीपाट, कडेपाट [**म०** पाटासारख्या आंथरलेल्या फळ्या]**पु०** १ पटई; पटईच्या फळ्या; माडी करण्याकरतां खालच्या मजल्याच्या खांबावर आडव्या तुळ्या घालतात, त्यावर कड्या घालतात, त्यांवर फळ्या घालून जी तक्तपोशी करतात ती. २ लाकडाच्या फळ्यांचें छत.

कडीबंद वि० माडीला पटई किं० पाटणी करतांना तुळ्यांवर बसविलेल्या कड्यांवर तुळयांना समांतर लांब लांब तक्ते घातलेले असतात; हे तक्ते जेथें एकमेकांना लागतात तेथल्या फटी बुजविण्यासाठीं तेथें लांब लांब आणि पातळ पट्ट्या बसविलेल्या असतात; अशा प्रकारें केलेली (पाटणी किं० पटई). कड्यांवर असे तक्ते न घालतां लहान मोठ्या फळ्या किं० फळ्यांचें तुकडे बसविलेले असतात ती पटई किलचबंद.

कडीभोंवरा पु०ज्या भोंवऱ्यांच्या माथ्याला कडी असून ती हातांत उंच धरावयाची असते असा एक प्रकारचा भोंवरा; ह्या भोंवऱ्याच्या माथ्याला कडी असतें ती हातांत धरावयाची असून त्या कडीच्या भोकांत भोंवरा फिरतो.

कडील [**म०** कड=बाजू;कडे=बाजूला] **वि०** –च्या बाजूचें किं० संबंधीं; उ० गेले दोन महिने गांवाकडील वर्तमान कळलें नाहीं.

कंडू [**सं०**] **पु०, स्त्री०** १ खाज, रग,मस्ती, खुमखुमी, अत्युकंठा; उ०तुला फारच कंडू असेल तर चल आखाड्यांत, पण त्या लहान पोराच्या वाटेस कां जातोस ? २ कंड; खरूज वगैरेंनीं त्वचा खाजवावी असें वाटण्याजोगी जी विकृति ती. ३ कांहीं प्रकारचा सुरण, आळू, वगैरे खातांना स्पर्शानें घशाला जी पीडा होते ती. ४ सुकी खरूज.

कडू वि०१ दासीपासून झालेली (जी संतति ती).

स्त्री० १ अफूचा वाचक सांकेतिक शब्द. २ डोळ्यांना होणारी एक विकृति (धूळ गेल्यामुळें, जागरण केल्यामुळें, वगैरे). ३ कडूविटाळ (मृताशौच वगैरे).

कडू [**सं०** कटु] **वि०** १ कारलें, कडुनिंब, इत्यादींच्या रुचीसारखी जी रुचि तिनें विशिष्ट. २ अप्रिय, कठोर, झोंबणारें (भाषण, वर्तन, इ०). ३ कठिण, टणक; उ० बाभळीचा गाभा कडू असतो, आंब्याच्या लाकडाचा मऊ असतो. ४ पित्तादिकामुळ पदार्थमात्र कडू लागावयाजोग्या विकारानें युक्त (जीभ). ꣸ **आधीं कडू मग गोड** प्रथम थोडेसें अप्रिय वर्तन करावयाला हरकत नाहीं; कारण, पुढें व्यवहार सुरळीत चालतो. **कडू होणें** प्रीतींतून उतरणें (अप्रिय भाषण वगैरे केल्यामुळें); उ० नवऱ्याशीं कडू होण्याजोगें तिनें काय केलें हो ? **कडू करंदा (करांदा) पु०** एक वनस्पति. **कडू कारळी स्त्री०** तिळाची एक जात; कारळा तीळ. **कडू कारळें, कडू जिरें न०** कडूकारळीचें बी. **कडू काळ पु०** प्रतिकूल समय; आपत्तीचा समय. उ० हल्लीं गुजराथला कडू काळ आला आहे; एरव्हीं तेथें जलप्रलय कां होता ! **कडू झोप स्त्री०** अपुरी, असमाधानकारक झोंप. **कडू तेल न०** करंज्यांपासून वगैरे काढलेलें तेल. याच्या उलट **गोडें तेल** किं० **चाखटेल. कडू दोडका पु०** पुढें **कडू भोपळा** याचे लाक्षणिक अर्थ पहा. **कडू दोडकी स्त्री०** ही भाद्रपदाच्या महिन्यांत फुलते, व हिचीं पानें औषधी आहेत. हिला **दिवाळी** असेंही म्हणतात. **कडू निंब, कडुलिंब पु०** निंबवृक्षांतील एक भेद **कडू पाणी न०** १ ज्वरादिरोग निवृत्त झाल्यानंतर प्रथम स्नानार्थ निरगुंडी इ०दींचे पाले कढवून जें पाणी करतात तें. २ विटाळ संपल्यानंतर चौथ्या दिवशीं बायका डोक्यावरून पाणी घेतात तें. ३ मृताशौच वगैरेंतून मुक्त झाल्यावर स्नानार्थ घेतात जें पाणी तें. **कडू पाणी काढणें** कडू पाण्याच्या आंघोळीनंतर पुन्हां नेहेमींप्रमाणें स्नान करणें वगैरे दर्शविण्याकरतां बायका हा वाक्प्रचार उपयोजितात. **कडू पाला पु०** करंजी, लिंब, निर्गुडी, जांभळी, इ० दींची पानें (कडू पाणी करण्याच्या कामीं येणारीं). **कडू भोपळा पु०** १ एक प्रकारचा भोपळा. २ दासीपुत्र; रंडापुत्र. ३ आपल्याहून हीन जातीचा इसम, —ज्याच्याशीं पंक्तिव्यवहार वर्ज्य आहे. **कडू वाघांटी स्त्री०** एक वनस्पति. **कडू विटाळ पु०** मृताशौच. **कडू वृंदावन न०** १ एक अति कडू फळ. २ माणूसघाण्या; एकलकोंडा माणूस.

कडून श० अ० १ ०च्या पासून. २ ०च्या बाजूनें. ३ ०च्या करवीं; उ० सराफाकडून या जिनसेचें मी आपणांस मोल कळवीन. ४ ०च्या योगें; उ० पर्जन्येंकडून सर्वांस सुख होतें.

कडं न० १ जें कांहीं वर्तुलाकार असतें तें. २ हातांत किंवा पायांत घालावयाचें भूषण. ३ वेढा, वलय, इ०.

कडे शब्द यो० अ० १ ०च्या बाजूस; ०च्या दिशेस. २ ०च्या निसबत; वर नियुक्त; ०च्या प्रीत्यर्थ (योजिलेलें); उ० ह्या पागेकडे दोन चाकर आहेत. ३ ०ला; उ० हे आंबे ज्याचे असतील त्याजकडे दे; उ० सरदारांनीं तरवार मारावी पण यश धन्याकडे. ४ ०च्या जवळ; ०च्या पाशीं; उ० त्याजकडे माझे पांचशें रुपये आहेत; उ० राणीकडे दहा हजार निवडक शिपायी होता. ꣸ **कडे शेवट क्रि० वि०** किमानपक्षीं बोलावयाचें तर; शेवटचा उपाय म्हणून. **कडे शेवटचा वि०** केवळ शेवटल्या कोटींतला जो तो (उपाय, मसलत, उपचार, बेत, योजना, इ०).

कडेस अ० कडे.

कडेस [कड म्ह० कांठ याची चतुर्थी] कांठावर, कांठाशीं; उ० नदीच्या कडेस जाऊं नका.

कडेकपाटें न० अ० व० पर्वतादिकांचे कडे किंवा तेथील गुहा इ० दुर्गम जे प्रदेश ते; उ० जगास कंटाळून साधु लोक कडेकपाटीं जाऊन बसतात.

कडेपाठ मागें **कडीपाट** पहा.

कडेलोट पु० १ ज्यास ठार मारायचें त्यास पर्वताच्या किं० किल्ल्याच्या कड्यावरून किं० तटावरून लोटून देण्याची शिक्षा. २ देवादिकांच्या प्रीत्यर्थ अशा प्रकारची शिक्षा स्वतःच भोगिली जाते ती. ३ (लक्षणेनें) उत्कृष्ट कोटींतून निकृष्ट कोटींत पतन; अधःपात. ४ शिकस्त; पराकाष्ठा; परमावधि; अतिरेक; उ० मराठ्यांनीं पानपतावर पराक्रमाचा कडेलोट केला.

कडोजी स्त्री० एक वनस्पतिविशेष.

कंडोरा पु० उसाची गंडेरी.

कडोविकड [कड्यांत कड्या अडकून किं० अडकावून होणारी गुंतागुंत] **स्त्री०** भाषणामध्यें अनेक प्रकारचे वांकडे तिकडे पेंचपांच इ० जो प्रकार असतो तो. (याचा प्रथमान्त प्रयोग प्रायः अनेकवचनांत होतो). ❀ **कडोविकडीचा वि०** १ पेंचपाच वगैरे ज्यांत आहेत असें. (कडोविकडीचें गाणें म्ह० सुरांची ज्यांत सहसा ध्यानांत न येण्याजोगी कसरत असते असें; कडोविकडीचें नाचणें म्ह० साधारण रीत्या करावयास कठिण अशा वांकड्या तिकड्या अंगविक्षेपांनीं युक्त असलेलें इ०). २ कडाक्याचा, उग्र (वादविवाद, खटका, लढाई, इ०). ३ निर्वाणीचा (हुकूम, आज्ञा, इ०).

कडोसरी, कडोस्त्री [**सं०** कटि (कंबर)+ वस्त्र] **स्त्री०** कटिसंबद्ध वस्त्राचा (लुगड्याचा किं० धोतराचा) जो कटिजवळचा भाग तो,–जेथें पैसे, किल्या, सुपारी, वगैरे ठेवतात; उ० रुपया कडोस्त्रीस ठेव; उ० सुपारी कडोस्त्रीस लाव. ❀**कडोसरी** किंवा **कडोसरीस येणें** दमणें; शिणणें.

कडोळी स्त्री०, कडोळें न० धातूची कडी, वलय, दुवा. ❀ **कडोळ्या लगाम पु०** एक प्रकारचा घोड्याचा लगाम. यालाच कड्यांचा लगाम म्हणतात. लगामांचे अनेक प्रकार आहेत. पुढें **लगाम** पहा.

कड्याखार पु० टांकणखार. याचे दोन प्रकार आहेत; (१) तेल्या टांकणखार किं० चौकीचा टांकणखार आणि (२) कड्या (किं० खड्या) टांकणखार.

कड्या पु० १ जिनगराचें डाक लावावयाचें हत्यार; खड्या. २ एक फुलझाड.

कड्याळ न० १ गुरांच्या वैरणीसाठीं पेरलेलें धान्य किं० त्याचेपासून काढलेली वैरण; जोंधळा, मका, किंवा बाजरी, उन्हाळ्यांत वगैरे लावून गुरांना खावयाकरतां जें पीक तयार करतात तें. मागें **कडवळ** पहा. २ (लक्षणेनें) उंच आणि रासवट स्त्री. ❀**कड्याळ दांतीं धरणें** १ आश्रयार्थ एकाद्याकडे जाणें. २ नम्रपणें एकाद्याची काकळूत करणें. ३ आपली हीन दीन स्थिति सांगणें.

कड्याळ न० तोंडमत; एकाद्यावर घातलेलें संकट; उ० तूं माझ्यावर हें कड्याळ आणून माझी नोकरी घालवूं पाहात आहेस.

कड्याळें न० १ धंद्यातील विलक्षण किफायत किंवा नफा. (क्रिया० लागणें). २ आकस्मिक झालेला लाभ किं० इष्ट गोष्ट.

कढ [**म०** कढणें] **पु०** १ पाणी, दूध, तेल, इ० पातळ पदार्थ अग्नीवर ठेवला असतां त्याला बुडबुडे येऊं लागतात ती अवस्था; उकळी; आधण. २ अशा स्थितींतील बुडबुडे. २ कांहीं ओझें फार वेळ डोक्यावर वाहिल्या कारणानें डोकें तापून जो अस्वस्थपणा वाटतो तो. ३ आवेग, इसळी, उसळी (लढण्याची, भांडण्याची, रडण्याची, मारामारी करण्याची, ताशेरा झाडण्याची वगैरे). ४ गहिंवर. ❀**कढ ओढून घेणें** रागावलेला मनुष्य दुसऱ्या कोणाला रागें भरत असतां त्या दुसऱ्याच्या तर्फे बोलून आपण त्या रागाला पात्र होणें. **कढ जिरविणें** ताशेरा झाडीत असलेल्या माणसाचा ताशेरा बंद पाडणें. **जाळा वांचून** (किं० **आंगी वांचून**) **कढ नाहीं आणि माये वांचून रड नाहीं** विस्तव नसतां पदार्थाला कढ येत नाहीं, आणि खरें प्रेम नसतां डोळ्यांतून टिपें गळत नाहींत.

कढई [**सं०** कटाह] **स्त्री०** तळण्याच्या उपयोगाचें पात्रविशेष.

कढण, कढवण [**म०** कढणें, कढविणें] **न०** १ द्विदल धान्य पाण्यांत कढवून त्याचा सारभूत अंश जो सार, आमटी, इ०साठीं काढतात तो. २ कढण्यासाठीं ठेविलेला पदार्थ. ३ औषधासाठीं करावयाचा काढा.

कढणी [**सं०** क्वथ्=शिजविणें; **म०** कढणें] **स्त्री०** १ कढण्याची किं० शिजण्याची क्रिया; कढविण्याची किं० शिजविण्याची क्रिया.

कढणें [**सं०** क्वथ्=शिजविणें] **अ० क्रि०** १ पाणी, दूध, तेल इ० पदार्थांना अग्निसंयोगानें बुडबुडे येण्याची अवस्था प्राप्त होणें. २ सोनें, रुपें, तांबें, इ० धातु अग्निसंयोगानें पातळ होणें. ३ एकाद्या माणसावर अतोनात क्रुद्ध होणें; उ० तूं माझ्यावर उगीचच्या उगीच कढत आहेस !

कढत [**म०** कढणें] **वि०** अतिशय तापलेलें (पाणी, दूध, वारा, हवा, इ०). ❀**कढतवणी न०** कढत पाणी.

कढता पु० मागें ' कडता ' पहा.

कढविणें [म० 'कढणें' चें प्रयोजक रूप] **स० क्रि०** १ पदार्थाला अग्निसंयोगाच्या योगानें बुडबुडे येण्याच्या अवस्थेस आणणें (पाणी, दूध, तेल, इ०). २ सोनें, रुपें, तांबें इ० धातु अग्निसंयोगानें पातळ करणें.

कढी [म० कढणें] **स्त्री०** ताकाला पीठ लावून कढवून करतात तें पातळ खाद्यविशेष. ꙮ**एकाद्याची कढी पातळ होणें** १ तो दुखण्यानें जर्जर होणें. २ तो भीतीनें गांगरून जाणें. **शिळ्या कढीला ऊत आणणें** जुन्या पुराण्या गोष्टीला नवें स्वरूप देऊन, किं० स्मरणांतून गेलेला प्रसंग उकरून काढून त्याबद्दल बाटाबाट करणें किं० त्याबद्दल प्रतिष्ठा मिरविणें. आमचें " मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० " हें पुस्तक पहा. **कढी गवत न०** कढीच्या उपयोगाचें एक प्रकारचें गवत. **कढी निंब** किं० **कढी लिंब पु०** एक झाड,–याचीं पानें कढीमध्यें स्वादासाठीं घालतात किं० त्याच्या पानांची चटणी करतात.

कढया पु० एक झाड; त्याचें बीज.

कण [सं०] **पु०** १ दाणा (धान्यादिकांचा). २ सूक्ष्म अंश; अत्यंत लहान भाग किं० परिमाण; अल्पसंख्या. ३ थेंब. ꙮ **दाम दुप्पट आणि कण तिप्पट** दुप्पट दराचा माल असून पुन्हा त्यांत धान्याच्या बरोबरीनें फुटके कण; म्हणजे टाकाऊ धान्य, इ०.

कणदार वि० १ असंख्य कण एकत्र जुळून झालेलें. २ लठ्ठ कणसें ज्याला आलीं आहेत अशीं धान्याचीं ताटें. ३ ज्यांत लठ्ठ आणि टप्पोरे दाणे आहेत असें (कणीस). ४ सत्त्वस; सकस (कडबा, गवत, दाणा, जमीन, गूळ, तूप, इ०). **कण लक्षांश पु०** अत्यंत लहान कण. **कण लोणी न०** अत्यंत कसदार दुधाचें लोणी (ज्यांत जाडी जाडी तण किं० गोळ्या झालेल्या असतात; याच्या उलट तणलोणी.

कणाद पु० वैशेषिक मताचा प्रवर्तक.

कण स्त्री० वेदनेची तिडीक; पाठ, मान, कंबर, इ०त भरलेली उसण (**क्रि०** भरणें). ꙮ

कण ऊब [म० कण+ऊब] **स्त्री०** धान्यें पिकतात ज्या काळीं त्या काळीं होते जी गरमी ती.

कणक स्त्री० उसण भरली असतां किं० संधिवातांत जाणवते जी तिडीक ती; कळ.

कणकणणें अ० क्रि० ताप आला असतां किं० येणार असतां अंग मोडून येणें; तापाच्या निरंगळीनें पीडित होणें.

कणकण, कणकणी स्त्री० १ ताप आला असतां किं० येणार असतां जी निरंगळी येते ती. २ अल्प प्रमाणांत आलेला ज्वर; अल्प ज्वरांश.

कणकणें [सं० कलंक] **अ० क्रि०** बिन कल्हईच्या तांब्याच्या किं० पितळेच्या भांड्यांत कांहीं खाद्य पदार्थ ठेविला असतां त्याच्यांत विषार, कॅंडॅवेंटपणा किं० वांति उत्पन्न करणारा धर्म उत्पन्न होणें; कळकणें.

कणका पु० १ स्वभावाचा किं० वर्तनाचा तापटपणा, कठोरपणा, रागीटपणा, किं० उग्रपणा. २ कडकपणा, तीव्रपणा (हवेचा, थंडीचा, वाऱ्याचा, इ०). **क्रि०** पडणें, सुटणें, चालणें. पुढें ' कनका ' पहा.

कणक्या वि० तगादा करणें, एकाद्याकडून काम करवून घेणें, नोकरांना काम देणें, इ० गोष्टींत क्रूर किं० कठोर असा.

कणखर वि० १ वापर सहन करावयाला समर्थ (वस्त्र, इ०). २ सारभूत अंशानें युक्त म्हणून टिकाऊ किं० बळकट (शरीर, लाकूड, इ०). ३ थंडी, वारा, ऊन्ह इ० सहन करावयाला समर्थ.

कणकावणें, खणकावणें स० क्रि० ०ची खरडपट्टी काढणें; ०वर ताशेरा झाडणें.

कणंग, कणिंग स्त्री० थांबूच्या पाती, वाभळींचे फोक, इ०चें केलेलें उंच आणि मोठें वरदान.

कणंग न० कणगर (एक खाद्य कंदविशेष).

कणगर स्त्री० एक वेल. **न०** त्या वेलाचा कंद.

कणगा पु० १ मोठी कणिंग(खालीं ' कणिंग ' पहा.) २ तट्टयाच्या दोन्ही कडा एकत्र शिवून नळकांडें करून तें जमीनीवर उभें करून ठेवलेलें असतें; त्यांत भात, जोंधळे, बाजरी, इ० बेगमीचे पदार्थ साठविलेले जातात. ह्या बारदानाला जमीन हाच तळ होतो. ह्या बारदानाला 'कणगा' म्हणतात.

कणगी स्त्री०,कणगुला पु० १ लहान कणिंग. २ कणगाराचें फळ.

कणगुली स्त्री०, कणगूल न०, कणगोली स्त्री० वांबूंच्या तट्ट्याचें केलेलें धान्य इ० साठविण्याच्या उपयोगाचें बारदान.वर 'कणगा' पहा.

कणणें, कण्हणें अ० क्रि० उत्तणीनें युक्त होणें; अशा उत्तणीनें किं० अन्य कांहीं आजाराच्या आवेगानें विव्हळणें. [२ परमावधि.

कणव स्त्री०, कणवा पु० १ दया; करुणा.

कणवट, कनवट स्त्री० मागें 'कडोसरी 'पहा.

कणवण [म० कण्हणें] स्त्री० (लेकरांचें किं० आजाऱ्याचें) कण्हणें किं० चरफडणें.

कणणें अ० क्रि० (लहान मुलाचें किं० आजाऱ्याचें) कण्हणें, चिरचिरणें, किं० चरफडणें.

कणवळणें, कणवळा, कणवाळा, कणवाळू 'कन्हवळणें' इ० शब्द पुढें पहा.

कणशा [सं० कणिश, म० कणीस] वि० गांवढळ, रानवट, रिठोळ, असभ्य. (मालकाला भाजलेलीं कणसें चोळून खावयाला दाणे देण्याच्याच उपयोगाचा.)

कणशी [म० 'कणीस 'चें लघुत्वदर्शक रूप] **स्त्री०** भाताचें कणीस.

कणस न० पुढें 'कणीस' पहा.

कणा पु० १ पाठीचा दांडा; मानेपासून माकडहाडापर्यंतचें हाड. २ डोंगराच्या रांगेचा माथा;—जो अर्थात् लांब रेषेप्रमाणें असतो तो. ३ डोंगरावर चढण्याची किं० डोंगरावरून उतरण्याची पाऊलवाट. ४ रांगोळी, हळद, कुंकू, गंध, इ०नीं भिंतीवर किं० जमिनीवर ज्या आकृति काढतात त्या समुच्चयानें किं० प्रत्येक; रांगोळीची नक्षी. ५ धान्यादिकांची लांबोडी रास. ६ गाडीचीं दोन चाकें ज्याचे भोंवतीं फिरतात ती पहार; पायरहाटाची मधली तुळई; हातरहाटाचा आस. ७ सारविलेल्या जागेवर पिठाच्या, रांगोळीच्या, किं० भाताच्या तुसाच्या पांढऱ्या राखेनें काढतात ज्या आकृति त्या; किं० ह्या कामीं योजलेली रांगोळी, राख, इ०. ८ मोटेच्या वरच्या चाकांतील लाकूड. ९ स्त्रिया वस्त्र नेसतांना त्या वस्त्राचा कमरेभोंवतीं देतात तो वेढा. १० पिंपळी ह्या नांवाची औषधी.

कणाळी स्त्री० पोत्यांतून किं० अन्य बारदानांतून गळत असलेल्या धान्याची धार; पाटांतून वाहणाऱ्या पाण्याचा प्रवाह (क्रि० लागणें).

कणिका [सं०] स्त्री० १ कण. २ थेंब. ३ सूक्ष्म बीज. ४ अत्यंत लहान वस्तु. ५ कणी (तुपाची, साखरेचा, इ०ची).

कणिंग स्त्री० वेळूच्या पाती, तुराट्या, इ० विणून धान्यादि ठेवावयासाठीं करतात जें बारदान तें.

कणिश [सं०] न० धान्यादींच्या ताटांच्या माथ्याला येतो जो भुट्टा किं० तुरा तो (यांतून धान्याचे दाणे काढले जातात).

कणी [सं० कण] स्त्री० १ धान्यादिकांचा बारीक तुकडा किं० खंड. २ शिजलेल्या भातांत किं० अन्य धान्यांत गर्भांत कधीं कधीं राहातो अपक्व अंश तो. ३ चांगल्या कढवून साठविलेल्या तुपांत ज्या जाडी जाडी गोळ्या होतात त्या प्रत्येक किं० समुच्चयानें; उ० तुपांत चांगली कणी पडली आहे, तें उगीच डिवचूं नको; तुला पाहिजे तितकें तूप हळूंच चमच्यानें काढून घे. ४ डोळ्यांतील बाहुली. ५ पातळ भाजीला लावितात जें पीठ तें. **॰दांतांच्या कण्या करणें** अनेक वेळां एकाद्याला उपदेश करणें, ताकीद देणें किं० काम सांगणें, (तो तें मनावर घेत नसतां). **कण्या कण्या करणें** अत्यंत लहीनपणा किं० नम्रपणा स्वीकारणें. **कण्या खाऊन मिशांस तूप लावणें** पोटभर न खातां शिल्लक पडलेले पैसे शुष्क थाटमाटांत खर्चणें. **कणीकूट न०, कणीकोंडा पु०** तांदूळ कांडल्यावर त्याच्या ज्या कण्या पडतात किं० कोंडा निघतो तो; उ० हे तांदूळ सडल्यावर त्यांतून आच्छेराच्यावर कणीकूट जाणार नाहीं. **कणीदार वि०** ज्यांत कण्या पडल्या आहेत असें (तूप, खोबरेल, मध, इ०).

कणीक [सं० कणिक=कणीक] स्त्री० गव्हांचें पीठ. **॰एकाद्याची कणीक तिंबणें** किं० **कणकेसारखा तिंबणें** त्याला खूप चोपणें किं० कुबलणें; त्याला खूप झोडपणें. **कणकेंत मीठ न०** दुसऱ्याच्या पैशाचा पचण्या इतक्या म्हणजे अत्यल्प प्रमाणांत अपहार; दुसऱ्याच्या पैशाचा विनियोग करणें आपल्या हातांत असतां

त्यांतून हळूंच किं० बेमालूम रीतीनें मारलेले पैसे.

कणीस [सं० कणिश=कणीस] न० १ जोंधळा, मका, इ०ना जो धान्याचा गुच्छ येतो तो; भुट्टा, तुरा. २ केवड्याचें जें विशिष्ट पुष्प किं० त्याचे अंत जो अवयवविशेष असतो तो. ३ असोल्या नारळाचा देठ. ४ तांदुळाचें उकडलेलें पीठ जें शेवगा, सुऱ्या, किं० सोऱ्या ह्या नांवाच्या साधनांत चेपून कुरडया वगैरे तळून खावयाचा खाद्यें करतात तें पीठ. ५ रथादिकांच्या चक्रादिकांत जो आंस इ०चा शिरलेला असतो तो किं० तितका अवयव. ⊛**कणीस पागोरा** पु० कणसें विणसें.

कणू [सं० कण] न० कण; सूक्ष्म अंश.

कणेकड न० राहाटगाडग्याचें मध्यवर्ती जें लांब लांकूड (आंस) तें. ⊛**कणेकडाचे खापेकड करणें** एखादी गोष्ट सुधारण्याचा प्रयत्न करीत असतां ती उलट वाईट करून ठेवणें (कणेकड लठ्ठ तुळईसारखें असतें;राहाटाच्या माळेचे लोटे ज्या लहान लहान पट्ट्यांवर बांधलेल्या असतात त्यांना खापेकडें म्हणतात).

कणेची बाहुली स्त्री० राहाटगाडग्याच्या आंसाचीं दोन टोकें ज्या लाकडांवर टेकलेली असतात व फिरतात, तीं प्रत्येक.

कणेर (–री), कण्हेर (–री) [सं० कणेर किं० कणेरु] स्त्री० १ एक सुवासिक फुलझाड. २ त्याचें फूल. ⊛ **कणेरी केळ** स्त्री० केळीच्या झाडांतील एक प्रकार. ⊛**कणेरें केळें** न० कणेरी केळ जी तिचें फल. **कणेरी (–रें) लुगडें** न० लुगड्याची एक तऱ्हा. हें लुगडें काळ्या किंवा तांबड्या जमीनीचें असून त्यावर पांढऱ्या चौकटी असतात. [पातळ भात.

कणेरी पु०, **कण्हेरी** स्त्री० कण्यांचा केलेला

कणेरा [सं० कण; म० कण, कणी] वि० ज्यांत कण्या म्ह० फुटके तांदूळ फार आहेत असे (सडलेले तांदूळ).

कणेरान न० (खाटकांच्या भाषेंत) पाठीचें मांस (खावयासाठीं काढलेलें).

कण्हेर (–री), कण्हेरा (–री), इ० वर **कणेर (–री), कणेरा (–री),** इ० पहा.

कतक [सं०] पु० निवळीच्या बीचें झाड.

कतबा [अ० कताबह्] पु० १ मी सांगितली जी हकीकत ती खरी आहे, यांत कांहीं खोटेपणा पडल्यास मी तुमचा अपराधी आहें इ० वादी.व प्रतिवादी हे प्रतिज्ञायुक्त जो लेख पंचाइतदार इ० कांस करून देतात तो. २ कर्जखत; रोखा.

कतरबेन [हिं० कतरना = कापणे; बेत = योजना] पु० १ अनेक प्रकारांनी जशी जशी कसर निघेल तशी युक्तीनें काढून थोडक्या खर्चात कार्य करण्याचा प्रकार तो; काटकसरीनें, बेताबाताने, खर्च करण्याची तऱ्हा. २ चोरून मारून किं० फसवेगिरीनें पैसे वगैरे लाटणें, मारणें किं० खाणें. ३ टापटीपीची रचना किं० मांडणी किं० व्यवस्था. ⊛ **कतरबेती** वि० १ काटकसरी. २ चोरून मारून पैसे वगैरे मारणारा किं० खाणारा; उ० राजपुत्राच्या स्वागतार्थ गांवकऱ्यांनीं मामलेदाराजवळ शंभर रुपये दिले; पण तो कसला कतरबेती, त्यानें पन्नासांत सर्व खर्च उरकून बाकीचे पन्नास मारले !

कतरभेद पु० अ० व० १ हिकमती; डावपेंच, युक्त्या; लबाड्या. २ युक्तयाप्रयुक्त्या, कावे (जसल्या प्रकारचे एखादा सेनापति शत्रूला भुलविण्यास उपयोजितो).

कतवर, कतवार [हिं० कतवार] न०अ० व० १ सैन्याच्या पाठीमागून जाणारें बाजारबुणगें. २ रिकामटेकड्या गांवकुटाळक्या करण्याचा ज्यांचा धंदा, अशा लोकांचा जमाव. ३ कचरा, अडगळ, निरुपयोगी सामान, इ० (शेवटचे दोन अर्थ पहिल्या अर्थावरून रूढ झाले आहेत). ⊛ **एकपट लष्कर आणि सातपट कतवार** प्रत्यक्ष फौजेतील सैनिक एकपट, पण खोगीरभरतीचीं माणसें मात्र सातपट ! उपयुक्त भाग थोडा आणि रद्दी भरतीचा भाग पुष्कळ.

कतार स्त्री०, **कतारा** पु० [अ० कतार] १ एकामागून एक अशा क्रमानें चाललेल्या अनेक पशूंची (विशेषतः उंटांची) जी पंक्ति ती. २ टेकड्यांची रांग.

कतेरा [हिं० कतीरा] पु० कांहीं कांटेरी झुडपांचा चीक किं० डीक.

कत्तल [अ० कत्ल्] स्त्री० १ कापाकापी (युद्धादि प्रसंगी); क्रिया० करणें, उडवणें. २

सरसहा केलेला नाश किं० विध्वंस. ३ मोहरमचें दहावे रात्रीस फकीर लोक मिळून करतात जो विधि तो. याच रात्रीला **कत्तलची रात्र** म्हणतात. या दिवशीं करवल्यास हसन हुसेन मारले गेले.

कत्ती [कानडी] **स्त्री०** तरवार.

कंत्रण, कंत्राण न० दुर्लभ वस्तूची प्राप्ति किंवा दुर्गम स्थानीं प्रवेश इ० साधण्याविषयीं कांणेकानें चातुर्यानें बांधलेलें संधान. (कांहीं गोष्ट साधण्याविषयीं लढविलेली) धूर्तपणाची हिकमत, ममलत, डाव, बेत, युक्ति, धोरण, इ०. ※**कंत्राणी (–ण्या) वि०** हिकमत्या, युक्त्या लढविणारा.

कंत्राट [**इं०** कॉन्ट्रॅक्ट्] **न०** १ एखादें काम करण्याबद्दल जो मक्ता घेतात तो. २ भानगड; कुलंगडें; लचांड; उ० तूं नोकरीकरतां अर्ज केलेला कोणास सांगू नको; लोक विघ्नसंतोषी असतात, नसतीं कंत्राटें उपस्थित व्हावयाचीं ! ※**कंत्राटदार पु०** मक्त्यानें लोकांची कामं करून देणारा.

कंथ [**सं०** कांत] **पु०** (लावण्यांत आणि शृंगारिक कवितेंत) नवरा, पति.

कथक [**सं०** कथ्=सांगणें] **वि०** १ दंत-कथांत प्रवीण. २ दंतकथा किं० गतकाळच्या गोष्टी सांगणारा. ३ सार्वजनिक रीत्या पुराण सांगणारा.

कथम् [**सं०**] **क्रि० वि०** कसें ? कोणच्या प्रकारानें किं० रीतीनें ? ※**कथंचित् क्रि० वि०** १ मोठ्या कष्टानें; कसें तरी; येन केन प्रकारेण. २ कदाचित्.

कथड्या [**सं०** कथा=गोष्ट] **पु०** हरिदास, गतकाळच्या गोष्टी सांगणारा, वगैरेस तुच्छतेनें ' कथड्या ' हा शब्द लावतात.

कथणें [**सं०** कथ्=सांगणें] **स० क्रि०** १ सांगणें, निवेदिणें. २ तपशीलवार हकीगत सांगणें. ※**अगोदरच कथून ठेवणें** आधींच भाकीत करून ठेवणें.

कथन [**सं०** कथन=सांगणें] **न०** १ सांगणें. २ सांगितलेली हकीगत; निवेदिलेला वृत्तान्त. ३ जें कांहीं सांगितलें तें.

कथला पु० गाय, म्हैस, इ०कांचे अंगावर खरजेसारखा रोग होतो तो. यासच **कथली स्त्री०** असेंही म्हणतात. ※**कथली खरूज, कथली व्याधि, कथली पीडा स्त्री०, कथलें दुःख, कथलं प.सं.न०, कथल्या रोग पु०** १ फिरंगी रोग किं० उपदंश ह्या व्याधीचा एक प्रकार किं० भेद. २ अतिद्वाड मनुष्य; तापदायक किं० उपद्रवी इसम. ३ कोणतीही तापकारक आपत्ति. **कथल्या देवी स्त्री०** अ० व० ज्या देवांत फोड मोठमोठे फुगून चिघळतात अशा देवी (एक त्वचेचा रोग).

कथली स्त्री० कथलाचे पात्र. **वि०** कथलाचें केलेलें; कथलाचें जे कांहीं (तें).

कथल न० मोठा कथली; कथलाचें केलेलें मोठें भांडें.

कथा [**सं०** कथ्=सांगणें] **स्त्री०** १ गोष्ट; वृत्तान्त; हकीकत. २ वीणा, मृदंग, सतार, इ० तंतुवाद्यें आणि वायुवाद्यें इ० सरंजामासह हरिदास जें ईश्वराचें कीर्तन करतात तें. ३ (लक्षणेनें) किंमत; थोरवी; महत्त्व; उ० अहो लग्न करावयाला निघालें कीं हजार पांचशें रुपये लागावयाचेच; त्यांची काय कथा ? पण हें स्थळ गमावूं नका. ४ उल्लेख. ५ कल्पित गोष्ट. ६ संभाषण. ७ गद्य-रचनाविशेष. ८ वादविवाद. ※**कथोद्घात पु०** गोष्टीचा आरंभ. **कथामुख न०** प्रस्तावना. **कथा-प्रसंग पु०** गोष्टीचा ओघ; प्रसंगानें उपस्थित होणें. **कथा होणें** गोष्टीतच फक्त उरणें; स्मृतिरूपें-करून किं० नाममात्रेंकरून अवशिष्ट असणें, म्ह० मरणें; नष्ट होणें. **कथाभाग पु०** पुराण इ० ग्रंथांत वेदान्त, भक्ति इ० विषयावांचून शुद्ध राजादि चरित्ररूप कथांश असतो तो. **कथावशेष वि०** स्मृतिमात्रेंकरून अवशिष्ट राहिलेला, म्ह० मेलेला; मृत. **कथासंदर्भ पु०** पूर्वीं येऊन गेलेल्या विवेचनाशीं पुढें येणाऱ्या विवेचनाचा संबंध, किं० असा संबंध जुळवून दाखविणें. **कथेकरी पु०** कथा किं० कीर्तन करणारा. **कथेलायक वि०** १ हरिदासच्या कथेला किं० कथेच्या प्रसंगा योग्य किं० सोयीचा किं० उपयोगाचा. २ नेहेमा कथा ऐकावयाला जाणारा; कथांचा शोकीन.

कंथा [**सं०**] **स्त्री०** गोधडी; अनेक वस्त्रांचे तुकडे एकत्र शिवून जाडें वस्त्र करतात तें. ※**कंथाधारी पु०** योगी.

कथानक [**सं०**] **न०** १ छोटी गोष्ट. २ गोष्ट, कथात्मक वृत्तान्त, गोष्टीच्या रूपानें जी

हकीकत कथावयाची तो. ३ नाटक, कादंबरी, इ० चें संविधानक किं० आधारभूत हकीगत.

कथित [सं० कथ्=सांगणें] वि० सांगितलेलें; निवेदिलेलें. ❀ **कथितपद** न० (साहित्य) पुनरुक्ति.

कथील न० एक धातु आहे. तांब्यांना कल्हई याचीच देतात. डाक देण्याचें कामींही हें उपयोजितात. याचा डाक कच्चा असतो. ❀ **कथील कुटणें** १ व्यर्थ बडबड करणें. २ तेंच तेंच पुन्हां पुन्हां प्रतिपादणें; काथ्याकूट करणें. **कथील कुट्या** पु० १ सोनारास तुच्छतेनें हा शब्द लावतात. २ निरर्थक बडबडणारा; काथ्याकुट्या. **कथीलकूट** स्त्री० वाष्कळ बडबड; वायफळ गप्पा. **कथल्या देवी** स्त्री० अ० व० एक रोग, – देवींची पुढची पायरी. यांत फोड मोठे होऊन पसरूं लागतात व चिवळतात. याला **चिवळया देवी** स्त्री० अ० व० असेंही म्हणतात.

कथेकरी [सं० कथा+म० करी (करणारा)] पु० हरिदास देवळांत जो देवादिकांच्या कथा सांगतो तो.

कथ्य [सं०] वि० सांगावयाला योग्य; कथनीय; सांगण्याजोगा.

कथ्यमान [सं०] वि० कथावयास उपक्रमिला जो वृत्तान्तादि तो.

कंद [सं०] पु० कांदा. २ सुरण, अळूं, केळ, इ० झाडांच्या मूळप्रदेशीं जो पिंडाकार अवयव असतो तो. ३ (लक्षणेनें) गड्डा, मूळ, उगम, इ०; जसें आनंदकंद, सुखकंद, इ०. ❀ **कंदमूल, कंदमूळ** न० भक्षणोपयोगी असे जे कंद मुळ्या, इ० त्या. (अनेकवचनीं प्रायः प्रयोग).

कद पु० १ रेशमाचें सोंवळ्यांत नेसावयाचें पुरुषांचें वस्त्र. २ घटक द्रव्याची योग्यता, गुणवत्ता, गुरुत्व किं० घनता.

कद [अ० कद्=उंची] १ किंमत, थोरवी, योग्यता. २ मातबरी, पत्रास, किंमत, पात्रता; उ० तुझा काय कद लागला आहे माझ्याशीं वाद करावयाला? २ गोणीच्या दोन अर्धुकांस जोडणारा पट्टा. ❀ **एकाद्याचा कद जिरविणें** किं० **मोडणें** त्याचा नक्षा उतरविणें; त्याची घमेंड जिरविणें. **कद पाहणें** [illegible]स पाहणें; किंमत करणें; लायखी अजमावणें. **कद धरणें** हिंमत न खचूं देणें. **कद सोडणें** खचणें, गलितोत्साह होणें.

कदन [सं०] न० १ कत्तल, नाश, हत्या (युद्धादिकांतील वगैरे). २ युद्ध.

कदन्न [सं० कु (वाईट)+अन्न] न० १ घृतादिरहित इरीक, राळा, इ० निकृष्ट धान्याचें जें अन्न तें. २ हलक्या प्रतीचें, नीरस, कसहीन, आणि राभस असें अन्न.

कदंब [सं०] पु० १ एक प्रकारचा वृक्ष; कळंब. २ समुदाय. ३ (ज्योतिष) शततारका.

कदबा [अ० कताबह्] पु० मागें 'कतबा' पहा.

कदम [अ० कदम्=पाऊल] पु० पाऊल; उ० अडीचशें कदमावरील पाखरूं त्यानें बाणानें अचुक मारलें.

कदर [अ० कद्र्] स्त्री० १ तब्यत, स्वभाव, प्रकृति (एखादी गोष्ट साहण्याची, न साहण्याची वगैरे); उ० रामा धन्याची कदर संभाळून वागतो. २ छाप; आपला मान ठेवला जाईल अशा प्रकारचा स्वभाव; हुकमत; धाक; जरब; वचक; उ० श्रीमंतांची आपल्या सरदारांवर इतकी कदर असे कीं त्यांच्या आज्ञेबाहेर ते कधींच जात नसत. ३ छाती, प्राज्ञा, हिंमत; उ० अबदालीची काय कदर होती मराठ्यांना जेरास आणावयाची ? दुफळीमुळें त्याचें साधलें. ❀ **एकाद्याची कदर काढणें** किं० **सोसणें** त्याची तब्यत संभाळून, त्रास सोशीत, बोलणीं खात, वगैरे वागणें; उ० तो नरहरपंत इतका खाष्ट आहे कीं त्याची कदर त्याची बायकोच सोसूं जाणें; उ० मूल आजारी पडलें म्हणजे आईशिवाय कोण त्याची कदर काढूं शकणार ? **कदरदान** वि० खालीं स्वतंत्र शब्द पहा.

कदरणें अ० क्रि० दमणें; शिणणें; त्रस्त होणें.

कदरदान [फा० कद्र्=किंमत; दानिस्तन्=जाणणें] वि० गुणांची पारख करणारा; गुणज्ञ.

कंदर, पु०, न० **कंदरी, कंदरा** स्त्री० [सं०] १ गुहा; गिरिगव्हर. २ पर्वतांतील लेणें. ३ कडा.

कंदर्प [सं० कुत्सित दर्प यापासून] पु० कांदा. २ कामदेवाचें नांव; मदन; मन्मथ.

कदर्य, कदर्यु [सं० कद् (वाईट)+अर्य (धनी, स्वामी)] पु० द्रव्य खर्चितांना मृत्युप्राय ज्यास दुःख होतें तो; कृपण; चिक्कू.

कदल [**सं०**] **स्त्री० न०** केळें.

कदलणें अ० क्रि० सोंगट्यांचे डावांत जुगल्यानंतर बारा, वेती, इ० जुगडाव घेणें. (खालीं **कदली** याचा पहिला अर्थ पहा). **स० क्रि०** घालावेणें, कांठेणें, ढकालिणें (काळ).

कदली स्त्री० दुफाशां खेळांत बारा, वेती, दुटी, आठ, इ० जे डाव ते प्रत्येक.

कदली [**सं०**] केळीचें झाड; केळ.

कदा [**सं०**] **क्रि० वि०** केव्हां ? कधीं ? ॐ**कदा काळींचा वि०** जुना; बहुत काळाचा जुनाट जो तो (मित्र, वृत्तान्त, इ०). **कदाकाळीं क्रि० वि०** क्वचित् प्रसंगीं, केव्हां तरी; फारा दिवसांनीं;कधींमधीं; उ० नित्यशः येणाऱ्या माणसापेक्षां कदाकाळीं येणाऱ्या माणसाचा आदर अधिक होतो. **कदाचित् क्रि० अ०** न जाणों;चुकून; नक्की जरी नाहीं तरी अशी शक्यता आहे कीं; उ० कदाचित बाबूसंध्याकाळींही पुण्यास येऊन ठेपेल.**कदापि अ०** केव्हांही, कधींही, (नकारार्थी प्रयोग); उ० मी तीं सर्व भावंडें ओळखतों. वासंती कदापि चिंतामणीशीं भांडणार नाहीं, पण मंदाकिनी व विभाकर याचें मात्र सांगवत नाहीं. [अपभ्रंश.

कदान्न न० मागें **कदन्न** पहा. त्याचा हा

कदाळी [**सं०** कदन] **स्त्री०** परचक्रादिकांचा ग्रामास किं० देशास जो उपद्रव होतो तो,–नासधूस, जाळपोळ, प्राणहानि, वित्तहानि, इ०.

कंदाळू [**सं०** कदन+**म०** आळू] **न०**महाबळेश्वरीं आढळणारें एक उत्कृष्ठ फूल तें. यास तेथील लोक **महादकांदा, भूकमळ,** असेंही म्हणतात.

कंदी [**सं०** कंद] **वि०** कंदाच्या रंगाचें; पिंगट, तांबूस.**पु०** कंदी रंगाचें पागोटें इ०.

कदीम [**अ०** कदीम] **वि०** १ चिरकाल चालत आलेलें (वेतन, चाकरी, चाल रीत, धर्म (इ०). जुनाट; फारा दिवसांचा.

कंदील [**अ०** कन्दील] **पु०** फाणस; ज्यांत दिवा लावतात असें एक प्रकारचें काचेचें पात्र. २ पितळेचा लामणदिवा. ३ टांगावयाचा पितळेचा दिवा (ज्याला पांच किं० सात वातेरी असतात).

कंदुक [**सं०**] **पु०** चेंडू.

कदेल स्त्री० मागें **कदली** याचा पहिला अर्थ पहा. यासच **कदेली स्त्री०,कजेली स्त्री०, कजेल न०** हे प्रतिशब्द आहेत.

कदेलणें अ० क्रि० मागें **कदलणें अ० क्रि०** पहा. **कजेलणें** असाही यास प्रतिशब्द आहे.

कंदोरी स्त्री० १ गलबतें वगैरेंच्या उपयोगी पडणारे असे मोठे दोर वळण्याकरितां जें लांबच लांब घर बांधलेलें असतें तें. २ मुसलमान लोक पिरास नैवेद्य, फकिरास भोजन, एतद्रूप जें अन्नदान करतात तें. ३ स्त्रिया आपल्या गळ्याभोंवतीं जो मंतरलेला दोरा, गंडा, वगैरे बांधतात तो. ४ कंजारी जात किंवा त्या जातीचा इसम.

कंद्या [**अ०** कन्दील] **पु०** फाणस; कंदील.

कद्रु [**सं०** कदर्य] **वि०** कंजूष; , चिक्कू; लोभी; हावरा; कृपण.

कंधरा [**सं०**] **स्त्री०** मान, ग्रीवा.

कधीं [**सं०** कदा] **क्रि० वि०** १ केव्हां ? कोणत्या वेळीं ? २ कदापि. ॐ**कधीं कधीं क्रि० वि०** केव्हां केव्हां;मधून मधून; केव्हां तरी.**कधींच क्रि० वि०** १ केव्हांही. २ मागेंच; पूर्वींच; किती तरी दिवसापूर्वीं. **कधीं काळीं क्रि० वि०** फार पूर्वीं;किती तरी दिवसांमागें;उ०कधींकाळीं तुमच्या बापजाद्यांनीं लढाया मारल्या म्हणूनच कीं नाहीं तुमच्या सरदारक्या ? एरव्हीं आज काय तुमची लायकी ? **कधींचा वि०** १ केव्हांपासूनचा; फारां दिवसांचा; उ० कधींचा माझा सत्यनारायण करावयाचा राहून गेला होता, तो आज झाला. २ कोणत्या वेळचा ? **कधीं तरी क्रि० वि०** १ केव्हां तरी. २ कधींमधीं; अधूनमधून. **कधीं नवत, कधीं नव्हत** [कधीं+न+होणें] **क्रि० वि०** कधीं न होणारी गोष्ट पण ती झाली अशा वेळीं. **कधीं नवतांचा, कधीं नव्हतांचा वि०** प्रिय, परंतु क्वचित् प्रसंगीं मात्र भेटणारा, येणारा, किं० घडणारा; कधीं न होणारी किं० क्वचित होणारी गोष्ट ज्याचे ठायीं सिद्ध झाली असा; उ० कधीं नव्हतांच्या तुम्हीं आमच्याकडे आलेल्या, तेव्हां तुम्हांला जेवल्याशिवाय आम्ही सोडीत नाहीं. **कधीं-कधीं,कधींमधीं क्रि० वि०** अधून मधून; क्वचित्. **कधींशीक** (–**सक**) (कधींसें याचें गांवढळ रूप) **क्रि० वि०** केव्हांसें ? कधीं ? कोणत्या वेळीं ? **कध्धीं** [कधीं याचें जोरदार रूप] **अ०** केव्हां

सुद्धां (न);उ० आतां जर तूं खेळावयाला आली नाहींस तर मी तुझ्याशीं कध्धीं बोलणार नाहीं ! **कधीं तुपाशां कधीं उपाशीं** केव्हां सुबत्तेचे दिवस तर केव्हां विपन्नावस्था अशीच संसारांतील स्थिति असते; नेहेमींच सारखी स्थिति नसते.

कनक [सं०] **न०** १ सोनें. २ धोतरा. ❀ **कनकनारायण पु०** अति श्रीमान् मनुष्य;कुबेर; नवकोट नारायण. **कनकाद्रि पु०** मेरुपर्वत. **कनकफळ न०** धोतऱ्याचें फळ.

कनका पु० १ स्वभावाची असहनशलिता; प्रकृतीचा गरमरगा; कडकपणा; उ० राधाबाईच्या घरीं नको ही पोर पडावयाला, तिच्या कनक्या-खालीं ती कसची टिकते ! २ थंडी,वारा,इ०कांचा कडाका, कचका; उ० थंडीचा कनका सुरू चालला; उ० गेले पंधरा दिवस वाऱ्याचा कनका चालला (पडला) होता, पण आज शांत आहे.

कनकाड्या वि० फाजील उंच; अति उंच वाढलेला पण काटकुळा.

कनकावळा पु० १ एक प्रकारचा पतंग किं० वावडी. २ बाण (ज्यांत दारू ठासून भरली आहे आणि ज्याला बत्ती लाविली म्हणजे उडत उंच आकाशांत जातें असें कागदाचें नळकांडें).

कनव, कनऊव स्त्री० प्रार्थना; आर्जव: दयेबद्दल याचना; दया किं० करुणा भाकणें.

कनवठ स्त्री० १ कडोसरी.२ कटिप्रदेशीं खरजेसारखा रोग होतो तो.

कनवळ, कनवळा, कनवाळा स्त्री० अन्तः-करणाचा दयार्द्र भाव; एखाद्याची दुःखद स्थिति पाहून दयेचा पाझर फुटतो तो; उ० तुला तिचा फारसा कनवाळा येतो आहे गे ?

कनवाळू वि०प्रेमळ किं०दयाळू अन्तःकरणाचा; दुसऱ्याची दुःखद स्थिति पाहून ज्याचें हृदय तळमळतें असा. [रानवट.

कनशा वि० गांवढळ, अडाणी, असंस्कृत,

कनात (-थ) [अ० कनात्] **स्त्री०** डेरे, राहूट्या, इ० कांच्या कापडी भिंती किं० त्यांच्या भोंवतालीं जो पडदा उभा करतात तो.

कनात [अ० किनाअत्=तृप्ति] **स्त्री०** एखाद्याच्या खाष्ट नोकरीच्या खस्ता काढणें किं० सोसणें; एखाद्याचा तुसडेपणा, खाष्टपणा, वगैरे सहन करणें; उ० बळवंतराव आजारी पडल्यापासून फार तुसडे झाले आहेत; पण त्यांची कनात सोसून त्यांची सून त्यांची चांगली शुश्रूषा करते.

कनांदणें [कु (वाईट तऱ्हेनें) + नांदणें (राहणें)] **अ० क्रि०** दारिद्र्य, देणेंकऱ्यांचा तगादा, इ० संकटांमुळें जर्जर होऊन जाणें.

कनाळी स्त्री० पाणी, धान्य, इ० चा बारदानांतून गळणारा प्रवाह.

कनिट [सं० अल्प किंवा युवन्] **वि०** १ धाकटा; सर्वांत धाकटा. २ गौण; अधम. ३ सर्वांत नीच प्रतीचा. ४ कमी, गौण, हलका. ५ अति लहान.❀**कनिष्ठ पक्षीं क्रि० वि०** निदान;किमानपक्षीं; कमींत कमी; गौण परिमाण अंगिकारलें तरी; उ० रामेश्वराला जावयाचें तर कनिष्ठ पक्षीं दोनशे रुपये खर्च लागेल.

कनिष्ठिका [सं०] **स्त्री०**करांगुली, करंगळी.

कनीनिका [सं०]**स्त्री०** नेत्रांच्या बुबुळांचा जो मध्यवर्ती प्रदेश,–जेथें पदार्थ प्रतिबिंबित होऊन नेत्रविषय होतात–तो; डोळ्यांतील बाहुली.

कनोजा, कन्होजा [सं० कान्यकुब्ज (पूर्वी असलेले एक शहर) यावरून] **पु०** १ ब्राम्हणांतील एक जात. २ त्या जातीचा ब्राम्हण.

कन्यका [सं०] **स्त्री०** कन्या,मुलगी,बाला, कुमारी.

कन्या [सं०] **स्त्री०** १ बाला, कुमारिका, मुलगी. २ खस्थ बारा राशींतील सहावी रास. ❀**कन्यागत पु०** १ कन्याराशीचे ठायीं बृहस्पतीची जी स्थिति ती, किंवा तदुपलक्षित जो काल तो. हा काल सिंहस्थानंतर येतो, व तो शुभ समजतात. सिंहस्थांत थांबलेलीं लग्न, मुंजी, त्यांत करितात. **न०** हुंडा. **कन्यादान (-प्रदान) न०** विवाहविधीनें मुलगी वरास देणें. **कन्यादूषण न०** एखाद्या कुमारिकेस भ्रष्ट करणें. **कन्यादोष पु०** अपकीर्ति, रोग, वगैरेसारखा कुमारिकेचा दोष. **कन्याधन न०** हुंडा. **कन्यापुत्र पु०** अविवाहित स्त्रीचा मुलगा. त्यासच **कानीन** म्हणतात. **कन्याप्रसू स्त्री०** ज्या स्त्रीस साऱ्या मुलीच नेहेमीं होतात अशी. **कन्यापुर न०** जनानखाना; अन्तःपुर. **कन्यारास वि०** बायक्या; कर्तृत्वहीन; षंढ. **कन्याशुल्क न०** नवरीच्या

बापास वरानें दिलेला हुंडा. गुजराथेंत असली चाल रूढ आहे. **कन्याहरण न०** कुमारिकेस हरण करून नेणें; कुमारीस पळवून नेणें; तिजवर बलात्कार करणें.

कन्याळ स्त्री० १ केळीची एक जात. २ तिचें फळ. यास **कन्याळें न०** असेंही म्हणतात.

कन्हणें, कण्हणें अ० क्रि० ज्वरादिव्यथेमुळें श्वासोच्छ्वासपूर्वक ग्लानतेनें शब्द करणें.

कन्हव स्त्री० दयेची प्रार्थना किं० याचना; विनवणी.

कन्हवळणें, कनवळणें [**म०** कनवळा] **अ० क्रि०** दयार्द्र होणें, करुणेनें कळवळणें; एखाद्याबद्दल अंतःकरण पाझरणें.

कन्हवळा, कन्हवाळा पु० कळवळा; दयार्द्रभाव; दुसऱ्याची विपत्ति पाहून झालेली अस्वस्थता.

कन्हवाळू, वि० दयाळू; दुसऱ्याबद्दल कळवळा वाटणारा; दुसऱ्याच्या दुःखानें दयार्द्रचित्त होणारा.

कन्हारणें स० क्रि० दुखविणें; पीडिणें; जर्जर करणें.

कन्हारी, कन्हेरी स्त्री० कण्हण्याचा किं० विव्हळण्याचा जो व्यापार तो, (क्रिया० करणें). ॐ**०च्या नावानें कन्हेरी गाणें** ०च्या नांवानें खडे फोडणें; ०ला दूषण देणें; ०च्या विरुद्ध तणतणणें, चरफडणें, इ०.

कन्हाण्हण अ० क्रि० कण्हणें, विव्हळणें.

कन्हें न० कण्हणें, विव्हळणें (**क्रि०** चालणें, होणें, करणें).

कन्हेर स्त्री० मागें **कणेर (–री)** [**सं०** करवीर] **स्त्री०** पहा.

कन्हैया [**सं०** कृष्ण; **हिं०** कन्हीया; श्रीकृष्णाचें नांव] **पु०** गमत्या, खेळकर, आनंदी, प्रेमळ, लाडका, गोड, असा जो भक्तांचा कनवाळू श्रीकृष्ण तो; उ० 'कन्हैया, बजाव बजाव मुरली.'

कप पु० सुरमाडाचे अंगास पांढरा कापसासारखा बुरा असतो तो. याचा विस्तव पेटविण्याचे आणि रक्ताचा प्रवाह थांबविण्याचे कामीं उपयोग होतो; चकमकीच्या गारगोटीनें पाडविलेली ठिणगी पकडावयाच्या कामींही कोंकणांतील लोक या कपाचा उपयोग करतात.

कंप [**सं०**] **पु०** १ तलवारीचें पातें एकवार हालविलें असतां जसें हालत राहतें तसें हालणें, थरथरणें, कांपणें (भीतीनें शरीर, वातादिकानें पानें, इ०); उ० हातांत सुरे घेतलेले चोर दृष्टीस पडतांच त्याच्या शरीरास कंप सुटला; उ० त्याच्या शरीराचा कंप झाला. २ गवई तान घेत असतांना वगैरे त्याच्या ध्वनीच्या, कंठाच्या, इ० च्या ठायीं जो गुण किं० प्रकार उपलभ्यमान होतो तो. ॐ**कंपायमान होणें** १ भीतीनें कांपू लागणें. २ हालणें, लटलटणें, हादरणें, इ०; उ० वाऱ्याच्या झोतामुळें समुद्राचें पाणी कंपायमान होत होतें. **कंपवायु** [**सं०** कंप+वायु] **पु०** शरीर निरंतर कांपत असावें अशी जी वातविकृति होते ती; डोकें, हात, इ० अवयव ज्या वायूच्या विकृतिमुळें सदा कांपत असतात तो वायु.

कपचा पु०, कपची स्त्री० टवका, कळपा, तुकडा (पाथरवट वगैरे दगड घडवितांना दगडाचे जे उडतात ते प्रत्येक).

कपट [**सं०**] **न०** १ लबाडी, ढोंग, कावा, लुच्चेगिरी, खोटेपणा, फसवेगिरी, छपवाछपवी. २ पाप; किंतु; साशंकता; उ० विमल, माझ्याबद्दल तुझ्या मनांत असलें कपट कां आलें ? ३ दुष्टपणा, नीचपणा, इ०. ॐ**कपटनिंदा स्त्री०** व्याजनिंदा; प्रच्छन्न निंदा. **कपटपाश, कपटफांसा पु०** खोटा फांसा; द्यूत खेळणारांनीं मंत्रादि विद्येनें आपल्यास मात्र इच्छित डाव पडावा असा भारलेला फांसा असतो तो. **कपटबाब स्त्री०** १ खोटी किं० निराधार फिर्याद. २ खोटेपणानें किं० दुष्टाव्यानें एखाद्यावर केलेली फिर्याद. **कपटमूर्ति वि०** लुच्चेगिरीचा अवतारच जणों असा माणूस. **कपटरूप न०** सोंग; खोटें रूप; उ० इन्द्र अहल्येकडे कपटरूप धारण करून गेला; उ० मारीचानें सुवर्णमृगाचें कपटरूप घेऊन सीतेस भुलविलें. **कपटविद्या स्त्री०** खोटी विद्या (ज्यायोगें एखाद्याचें आहित साधतां येतें अशी); दुसऱ्यास फसवून आपला कावा साधून घ्यावयाजोगी अक्कल, हुषारी, इ०. **कपटवेश पु० कपटरूप** पहा. **कपटसिंधु पु०** गुणाकाराचा एक प्रकार. २ लुच्चेगिरीची मूसच जणों काय असा जो मनुष्य तो. **कपटस्तुति स्त्री०** व्याजस्तुति; प्रच्छन्न निंदा. **कपटाई स्त्री०** कापट्य. **कपटी वि०**

लुच्चा, साशंक, दुष्ट; अनेक कपटें करणारा; ज्याचे मनांत दुसऱ्याविषयीं कपटबुद्धि वसते असा.

कपटा पु० चिटोरा, रद्दी तुकडा, (कागदाचा, झाडाच्या पानाचा, वगैरे).

कपडलेप पु० कुपी, वरणी, मडकें, इ० मध्यें औषधांचीं द्रव्यें घालून वर कापडाचें वेष्टन गुंडाळून त्याचे वर चिखल लिंपून तें भट्टीत घालून औषध तयार करतात; तें चिखल लिपलेलें कपड्याचें जें वेष्टन त्याला कपडलेप म्हणतात.

कपडा [हिं०] पु० कापडाचें शिवून त्याव-परासाठीं तयार केलेलें जें तें (अंगरखा, बंडी, चोळी, इ०). ॐ **कपडालत्ता पु०** कपडे वगैरे.

कंपण, कंपणकांटा पु० अत्यंत सूक्ष्मपणानें म्हणजे अगदीं तंतोतंत वजन दर्शविणारी तराजू (सोनें,मोतीं,हिरे,इ०वजन करावयाची असते ती).

कंपणें [सं० कंप्=हालणें, थरथरणें] अ० क्रि० कांपणें, थरथरणें, हालणें.

कपदरी स्त्री० खपदडी; खबदाड; डोंगरांत ओबडधोबड रीतीनें खोदून केलेली जागा; ओबडधोबड खड्डा, जमिनीची चीर, इ०.

कःपदार्थ [सं० कः (कोण)+पदार्थ(वस्तु)] पु० कुचकामाचा किं० धिःकारार्ह माणूस किं० वस्तु; ज्याच्याबद्दल कसलीच क्षिति बाळगावयास नको असा माणूस किं० पदार्थ; क्षुल्लक किं० क्षुद्र वस्तु किं० माणूस; उ० रामभाऊ मला कःपदार्थ आहे; मी त्याला केव्हांच उलथून पाडीन !

कंपन [सं०कंप्=कांपणें,हालणें] न० कांपणें, थरथरणें, हालणें (पानांचें, पाण्याचें, शरीराचें, वगैरे). **वि०** हालणारें, कांपणारें. **पु०** १ शस्त्रविशेष. २ शिशिर ऋतु.

कंपमान, कंपायमान वि० कंप किं० कांपरें सुटलें आहे ज्याला असा; हालणारा.

कपर स्त्री० कपरी, टवका, कळपा (पाथरवट वगैरे दगडाचा उडवितो तसा), तुकडा, इ०. (क्रिया० उडणें, जाणें, निघणें).

कपरथूल [हिं०] पु० मलमलीच्या कापडांतील एक प्रकार.

कपरा पु०, कपरी स्त्री० वर **कपर** पहा.

कपर्द, कपर्दक [सं० कपर्द] पु० १ शंकराच्या जटा. २ कवडी.

कपर्दिका [सं०] स्त्री० कवडी.

कपर्दी [सं०] पु० ज्याच्या डोक्यावर कपर्द (जटा) आहे असा देव म्ह० शंकर.

कपळा पु० कळपा, ढल्पा, टवका, कपरा, इ०; (दगड, गिलावा, भिंत,लांकूड, इ० चा).

कपा, कप्पा पु० १ खण, पूड (पेटी, पेटी, कपाट, वगैरेंस असतात तसे). २ वस्त्राचा जो तुकडा तो. ३ ठिगळ; या अर्थी **कप्पी स्त्री०** हा विशेष रूढ आहे.

कपाट [सं०] न० १ दरवाजा. २ दरवाज्याच्या ज्या दोन झडपा त्यांपैकीं प्रत्येक. ३ पेटीसारखें उंच आणि उभें सामान वगैरे ठेवण्याचें व पुढें दारें असलेलें बारदान. ॐ **कपाटोद्घाटन न०** किल्ली. **कपाटघ्न पु०** घरफोड्या. **कपाटवक्षा पु०** रुंद छातीचा माणूस.

कपात [अ० कफ़अत] न० खजूर इ० ठेवण्याकरतां खारकेच्या पातींचें जें पोतें किं० बारदान करतात तें.

कपार [अ० खफ़र] न०, स्त्री० डोंगरांतील सांधीफटींचे जे भाग ते प्रत्येक; खबदडी, गुहा, गिरिगव्हर, कोटर, इ०.

कपाल, कपाळ [सं०] न० १ डोक्याची कवटी. २ डोकें. ३ मडक्याचे जे अनेक तुकडे ते प्रत्येक; खापर. ४ भालप्रदेश, ललाट (जेथें आपण गंध लावतों तो केसांखालचा व भुवयांच्या वरचा पट्टा). ५ सदसत्फल भोगण्यास कारणीभूत जो पूर्वकर्माचा परिपाक असतो तो; नशीब; दैव. ६ आपल्या ललाटीं आपल्या पूर्वकर्मानुसार आपणास काय फलें प्राप्त व्हायचीं आहेत याचा जो लेख ब्रह्मदेव लिहितो तो. ॐ**कपाळ उठणें** किं० **चढणें** कपाळ दुखूं लागणें (शारीरिक पीडेनें किं० मानसिक व्यथेनें); उ० या पोरीनें ' चेंडू द्या ' म्हणून माझें कपाळ उठविलें आहे. **कपाळ काढणें** नशीब काढणें; उंच पदवीप्रत चढणें; सुस्थिति प्राप्त करून घेणें. **एकाद्यावर कपाळ टेकणें** (लक्षणेनें) त्याच्यावर विसंबणें; त्याच्यावर भरंवसा टाकून बसणें. **कपाळ धुवून पाहणें** एखाद्याच्या नशीबीं काय लिहिलेलें आहे हें पाहूं जाणें; (हें अर्थातच शक्य नाहीं. हा वाक्प्रचार नेहमीं नकारार्थीच वापरावयाचा असतो).**कपाळ फुटणें** दुर्दैवाच्य

फेऱ्यांत सांपडणें; उत्कर्षाचा प्रसंग दिसत असतां तद्विरुद्ध फल होण्यास दैवानें कारणीभूत होणें. **कपाळभर कुंकू हातभर बांगड्या** सुवासिनी-पणाची स्थिति. **कपाळाचें कातडें नेणें** एखा-याच्या सुखास आग लावणें; एखाद्याचा उत्कर्ष होत असतां त्यांत आडवें येणें. **कपाल जाणें** सुस्थिति, उत्कर्ष, इ० गमावणें, किं० वालवून बसणें. **कपाळाची रेघ (रेषा) उघडणें (उमटणें)** दुःस्थिति संपून उत्कर्ष पावणें; भाग्यकाल अनु-भाविणें. **कपाळाला केस उगविणें** असंभाव्य गोष्ट होणें. **कपाळावर हात मारणें** निराशा, दुःख, उद्वेग, इ० भावना व्यक्त करणें; "फुटकें माझें नशीव !" "दुर्दैव माझें," वगैरेसारखे विचार व्यक्त करणें. **एकाद्याच्या कपाळाशीं कपाळ घासणें** त्याच्याशीं साहचर्य करणें; त्याच्यामागें त्याच्या कासोट्याप्रमाणें जाणें (त्याच्यापासून आपणाला कांहीं लाभ होईल अशा आशेनें). २ त्याचें अनुकरण करणें. **अपकीर्ति, दारिद्य, इ० कपाळास येणें** अपकीर्ति, दारिद्य, इ० भोगास येणें. **कपाळीं काटीं घेऊन जाणें** निघून जाणें; पोबारा करणें; यःपलायन करणें; काळें करणें. **कपाळीं डाग लागणें** कलंक लागणें; बद-नामी होणें; बेआब्रू होणें; कालिमा लागणें. **कपाळीं भद्रा असणें** विपन्नावस्थेंत निमग्न असणें; दारिद्यांत खितपत पडलेलें असणें. **कपाळकरंटा** वि० दैवहीन; फुटक्या नशीबाचा. **कपाळकष्टी, कपाळकुट, कपाळखटखट** स्त्री० १ मंदबुद्धीस कांहीं समजाविणें किं० दुराग्रही जो त्यास आग्रह सोडावयास लावणें, इत्यर्थ जे उपदेशादिरूप परिश्रम करावे लागतात ते. २ दुसऱ्यास त्रास यावयाजोगें बहुत जें भाषण तें. **कपाळकष्टी** वि० अत्यंत त्रास-दायक काम नाइलाजानें करणारा; कष्टाचें काम करणारा. **कपाळकाठी** स्त्री० कोष्टयाच्या मागाचा एक भागविशेष. **कपाळदुखी** स्त्री० निरंतर कपाळ दुखत असावें अशी जी रोगविकृति ती. **कपाळ-पट्टा** पु० घोड्याच्या लगामाच्या ज्या पट्टया, त्यांच्यापैकीं जी पट्टी घोड्याच्या कपाळावर असते ती; सरोसरीचा एक भागविशेष. **कपाळपट्टी** स्त्री० १ कपाळाचा विस्तार. २ मुलांच्या कुंचड्यास कपाळप्रदेशीं यावयाजोगी जी पट्टी लाविलेली असते ती. ३ दरवाज्याच्या चवकटीचें वरचें जें लांकूड तें; माथा. ४ विहिरींतून पाणी काढावयाच्या पोहऱ्याची किं० घागरींची दोरी ज्या कप्पीवरून फिरते ती कप्पी ज्या आडव्या लाकडाला जडविलेली असते तें लाकूड. ५ मनुष्याचें नशीब (जें कपाळरूपी पट्टीवर लिहिलेलें असतें). **कपाळपांच-शेरी, कपाळपांसरी** स्त्री० कांहीं शुभाशुभ प्राप्त होण्याविषयीं दैवरूप जें प्रमाण असतें, ज्याचें अन्यथात्व देशान्तर केल्यानें वा कालान्तर केल्यानें होत नाहीं तें; नशीब; ललाटलिखित; उ० कोठेंही गेलों तरी कपाळपांसरी बरोबरच. **कपाळ-फुटका** वि० कपाळकरंटा. **कपाळफोड** स्त्री० वर **कपाळकष्टी** स्त्री० पहा. **कपाळफोडी** स्त्री० एक झाड, ज्याला चिरबोटी, फोंपटी, अशीं दुसरीं नांवें आहेत. त्याचें फळ ज्याला 'कपाळफोडा' म्हण-तात त्यांत वारा असतो. हें फळ मुलें कपाळावर एकदम आणि जोरानें मारतात. हें फळ फुटतांना फाडदिशीं मोठा आवाज होतो. ह्या वरून कपा-ळफोडी ह्या नांवाची उत्पत्ति. **कपाळफोड्या** वि० १ मनांतील इष्ट गोष्ट सिद्ध होईनाशी झाली असतां कपाळ फोडून घेण्याचा स्वभाव ज्याचा तो. २ कपाळकूट करणारा जो याचकादि तो. ३ कोणीही तापट, हट्टी, आणि आडदांड माणूस. **कपा-ळमाळा** अ० खेद किं० आश्चर्य यांचा वाचक उद्गार; उ० काय ? त्या सुशिक्षित तरुणीनें एका अविंधाशीं निका लावला ? कपाळमाळा ! स्त्री० मुंडकीं ओवून केलेली माळ, जी शंकर भूषणा-प्रमाणें गळ्यांत घालतो. **कपाळमोक्ष** पु० १ शवाचें दहन होत असतां त्याचें मस्तक फुटण्याचा जो व्यापार तो. २ मृत संन्याशाचें डोकें शंखानें फोडतात तें. ३ डोकें फुटणें; उ० तिची आबरू घ्यावयास आलेल्या नराधमाचा तिनें आपल्या हातांतील सोडग्यानें कपाळमोक्ष केला; उ० खिड-कींतून वांकूं नको, पडलास तर कपाळमोक्षच होईल. **कपाळरेषा** स्त्री० मनुष्याचें नशीब (जें ब्रह्मदेवानें त्याच्या कपाळावर लिहून ठेविलेलें असतें). **कपाळशूळ (– सूळ)** पु० कपाळदुखी; कपाळ किं० डोकें दुखावयाचा रोग.

कपास [सं० कार्पास=कापूस] पु० १ कापूस. २ कोणताही हलका आणि विरावरीत पदार्थ जो

द्रवेंत उडत किं० तरंगत असतो. ३ सुरमाड इ०च्या बुंध्यावरचा कापसासारखा पदार्थ,—ज्यावर चकमकीच्या धोंड्यावरची ठिणगी पाडवितात.

कपि [सं०] १ वानर. २ (लक्षणेनें) विवक्षित मंडळीमध्यें इतरापेक्षां वयानें मोठा, किं० कांहीं कामकाज करून निभावल्यामुळें ज्याला प्रौढी मिरवावयाला जागा आहे असा जो मनुष्य त्यास थट्टेनें 'कपि' ह्मणतात. ३ दुराचारी. ४ (उपरोधिकपणें) शहाणा, गाढव, इ०; उ० अहो कपि, बसा ! समजली तुमची अक्कल ! ५ जो अनेकवेळां एकाद्या परीक्षेस गेला आहे आणि जो अजून पास झालेला नाहीं असा उमेदवार. ॐ **कपिमुख न०**वानरासारखें असलेलें तोंड. वि० वानरासारखें तोंड असलेला घोडा. हें घोड्याचें दुश्चिन्ह समजतात. अशा घोड्यांचा वरचा ओठ लहान असून खालचा लांबच लांब असतो. [३ तित्तिरी.

कपिंजल [सं०] पु० १ चातक. २ कवडा.

कपित्थ [सं०] पु० १ कवठाचा वृक्ष. २ त्याचें फल; कवठ.

कपिल [सं०] वि०१ पिंगट वर्णाचा. पु० १एक मुनिविशेष. २पिंगट केशांचा. ॐ **–धारा स्त्री०**गंगा.

कपिला [सं०]स्त्री०१ एकाच रंगाची जो गाय ती, जसें काळी, पांढरी, तांबडी, इ०. २ पिंगट गाय. ३ कोणतीही गाय. ४ एक प्रकारचा रंग (जो कांहीं फळांपासून करतात व जो कपडे रंगविण्याचें कामीं येतो). ५ कावडि. ६ पुंडरीक नामक दिग्गजाची स्त्री. ॐ **कपिलाषष्ठी** [सं०] स्त्री०भाद्रपद मास, कृष्णपक्ष, महानक्षत्र हस्त, योग व्यतिपात, मंगळवार दिवस, नक्षत्र रोहिणी, इतक्यांना युक्त जी षष्ठी ती;इतक्या सर्व गोष्टी एका वेळीं जुळण्याचा योग साठ वर्षांनीं एकदां येतो. **कापलाषष्ठीचा योग पु०** फारच दुर्मिळ संधि; पुष्कळ कालानें प्राप्त होणारी संधि. [पु० पिंगट रंग.

कपिश [सं०] वि० काळसर तांबूस; पिंगट.

कपी, कप्पी स्त्री० १ ठिकळ, जाड तुकडा (कापडाला, लांकडाला, वगैरे लावलेला असतो तो). २ गलबत इ० कांवर वजनदार पदार्थ चढावयास हलका यावा म्हणून जें एक चाक लावलेलें असतें, तें (या चाकाच्या भोंवतालीं खोबण असते, व तींतून दोरी ओढली असतां दोरी निसटत नाहीं). ३ भोपळा, कलिंगड, इ० फळांचा जो भाग चारी बाजू कापून त्या फळांतून बीं, रंग इ० पाहण्यासाठीं अलगत काढलेला असतो तो.

कपुरी [सं० कर्पूर=कापूर] वि० कापरासारखा पांढरा. ॐ**कपुरी मेणबत्ती स्त्री०**अत्यन्त शुद्ध मेणाची पांढरी स्वच्छ अशी मेणबत्ती.

कंपू पु० १ सैन्याची तुकडी. २ अकरा पलटणीं जें सैन्य तें. ३ (लक्षणेनें) मंडळ (मित्रादिकांचें); टोळी, अड्डा, इ०.

कमेश [फा० कम् (कमी)+ओ (आणि) +बेष् (चांगलें)] पु० कोणेक गोष्टीचा, पदार्थाचा, विवक्षित प्रमाणांहून जो न्यूनाधिक भाव तो. वि० कमी ज्यास्ती; थोडाफार; प्रमाणापेक्षां थोडेसें कमी किं० थोडेसें अधिक.

कपोत [सं०] पु० एक पक्षिविशेष; पारवा; कबूतर. ॐ**कपोती स्त्री०** कपोताची जी मादी ती. **कपोता वळणें** रोडावणें; वाळणें; झिजणें (शरीरादि).

कपोल [सं०] पु० १ गाल. २ गुडघ्यावरची वाटी. ॐ**स्वकपोलकल्पित** [स्व (आपला) +कपोल (गाल) -कल्पित]वि० १ स्वतःच्या डोक्यांतून निर्माण केलेलें म्ह० दुसऱ्याचें चोरलेलें नव्हे असें (संविधानक, लिखाण, इ०); स्वतःच्या किं० स्वतंत्र बुद्धीचें इ० इ०; उ० ह्या कादंबरीचें कथानक स्वकपोलकल्पित आहे. २ खोटें, बनावट.

कप्पा, कप्पी वर कपा, कपी हे शब्द पहा.

कफ पु० १ मागें कफ पहा २ ठोकळा लाकडाचा वगैरे (त्यांत कप्पी असलेला किं० नसलेला).

कफ [सं०] पु० १ शरीरांत जे वातादिक (वात, कफ, पित्त) तीन दोष आहेत त्यांपैकीं एक. २ एक प्रकारची खोकला आला असतां जी पांढरट, जाड वगैरे थुंकी पडते ती. ॐ **कफनाशक, कफहारक, कफहारक, कफारि,** वि० कफ घालविणारें किं० नष्ट करणारें, इ० (औषध वगैरे). **कफज्वर पु०** कफ फार झाल्यानें जो ताप येतो तो. **कफप्रकृति वि०**कफप्रधान ज्याची प्रकृति आहे असा. **स्त्री०** कफप्रधान प्रकृति. **कफश्वास, कफक्षय पु०** (वैद्यकांत) कफजन्य किं० कफप्राधान्यामुळें उत्पन्न झालेली क्षयाची व्यथा. **कफोदर न०** एक प्रकारचा उदररोग.

कफण [अ० कफ्न्] न० प्रेतावर जें आच्छादनवस्त्र घालतात तें.

कफणी (-नी) स्त्री० कोपराखालीं हात व कंठावर मस्तक मोकळें राहून इतर सर्व शरीर आच्छादित होईल असें झग्यासारखें जें प्रावरण रामदासी, बैरागी, इ० वापरतात तें. ॐ**कफनी घालणें** (गळ्यांत इ०) १ भिकाऱ्याचा पेशा किं० धंदा उचलणे. २ गृहस्थाश्रमाचा त्याग करून संन्याशाप्रमाणें राहणें.

कफल्ल, कफल्लक पु० अतिशय भिकारी मनुष्य; ज्याच्याजवळ एक कपर्दिकाही नाहीं असा; भुकेबंगाल.

कफारत, कफालत स्त्री०, पु० खोटा किं० बदनामी करणारा आरोप(क्रिया० घेणें, आणणें). ॐ**कज्जाकफालत (-कफावत)** १ भांडण, तंटा, वाद. २ बिकट परिस्थिति, पेंच, कचाटी, इ०. ३ पीडा, लचांड, कटकट, झेंगट, इ०, (क्रि० येणें, गळ्यांत पडणें, उभें राहणें, उपस्थित होणें, इ०).

कफावत स्त्री० १ दोष, चूक, व्यंग, न्यून, इ०. २ कज्जा, भांडण, तंटा.

कबई [फा० कबा] स्त्री० एक प्रकारचा झगा किं० अंगरखा.

कबकबीत वि० रुचीला पांचट लागणारा (ऊंस, भोपळा, वगैरे).

कंबखत [फा० कम् (कमी)+बख्त् (नशीब, वैभव) वि० दैवहीन. ॐ**कंबखती, कंबख्ती** स्त्री० दुर्दैव;दैव फिरल्यामुळें प्राप्त होणारी आपत्ति. क्रिया० येणें, भरणें.

कबज [अ० कब्ज्] न० १ पावतीचा लेख; आपल्यास प्रसंगीं प्रतिबंधक व्हावयाजोगें दुसऱ्यापाशीं गुंतलेलें आपलें वचन, लेख, इ०. २ कोणा माणसाकडून आपलें येणें उगवेनासें झालें असतां त्याला तगादा करण्यासाठीं किं० त्याची अडचण करण्यासाठीं आपल्या हातीं त्याची जी चीजवस्त लागेल ती घेऊन ती अटकावून ठेवणें. ३ पोटांत होतो जो मलावष्टंभ तो. ४ एकाद्याला बोलण्यांत किं० शब्दांत पकडणें किं० धरणें.

कबजा पु० १ ताबा: उ० पंच या नात्यानें सर्व जिनगी माझ्या कबज्यांत आली नाहीं; उ० तूं वयांत आलास कीं सर्व कागदपत्र तूं आपल्या कबज्यांत घे.२ वहिवाट. ३ भोगवटा.४ अस्तऱ्या नसलेली बंडी.

कंबडी,कमडी स्त्री० १धलपी, शीर, किं० पट्टी (बांबूची वगैरे).२ चोईच्या इतकी बारीक अशी लाकडाची, बांबूची, शिंगाची, हस्तीदंतांची पट्टी (खोदकामांत वेलाची फांदी दाखविण्यांत योजतात ती).

कबंध [सं०] पु०, न० १ मस्तक तुटून गेलें असतांही कांहीं चलनवलनादि क्रियायुक्त जें धड असतें तें; हालचाल करणारें धड. २ मुंडविहीन धड. पु० राहु (ग्रह). ॐ**कबंध नाचणें** माणसांचा प्रचंड संहार किं० कत्तल होणें; उ० पानपतच्या भूमीवर अझूनही कबंध नाचतात !

कबर [अ० कब्र्] स्त्री० मुसलमानाचें प्रेत जेथें पुरलेलें असतें त्या स्थलीं बांधलेलें जें थडगें तें.

कंबर [फा० कमर] कमर. हा व यापासून साधलेले सामासिक शब्द पुढें **कमर** या शब्दांत पहा.

कबरा [सं० कर्बूर] वि०१ काळा पांढरा; भुरकट रंगाचा; करडा. २ रंगीबेरंगी. ॐ**कबराबांडा** वि० रंगीबेरंगी (घोडा, इ०).

कंबल [सं०] पु० १ लोंकरीचें पांघरावयासाठीं वगैरे केलेलें वस्त्र; कांबळें. २ पांघरूण. ३ हरिणविशेष. ४ गाय इ०च्या गळ्याची पोळी.

कबलात, कबलायत स्त्री० पुढें **कबुलात** पहा.

कंबळ स्त्री० एक वृक्षविशेष.

कबल न० छकल; शकल; दगड किं० भोपळा इ० फळ फुटून त्याचीं जीं छकलें होतात तीं प्रत्येक.

कंबल [स०] पु० १ लोंकरीचें वस्त्र.२पांघरूण. ३ गाय इ० च्या मानेखालीं लोंबणारी पोळी.

कंबळी [सं० कंबल] स्त्री० कांबळें.

कबाई, कबाय [फा०कबा] स्त्री० एक प्रकारचा पायघोळ झगा किं० डगला.

कबाड न० बैल, उंट इत्यादिकांवर आणलेलें कडबा किं० अन्य सरण यांचें जें ओझें तें. ॐ**कबाडकष्ट (- काम) पु० अ० व०, काबाडकष्ट (-काम)** न० हलकींसलकीं अंगमेहनतीचीं कामें; शरीरपोषणार्थ राबून जें कांहीं केलें जातें तें (ओझीं वाहणें, दळणकांडण करणें,

स्वयंपाक करणें, भांडीं धासणें, इ० इ०). **कबाडखात** पु० १ उभीं रानें कापून जळणाची लांकडें फोडावयाकरतां घेणारा मक्तेदार. २ जळणाच्या लाकडांच्या असुक गाड्या पुरविण्याचा ज्यानें मक्ता घेतला असा. ॐ**कबाडच्योती** स्त्री० १ उभ्या रानांतील झाडें कापून जळणाकरतां लांकडें फोडण्याचा मक्ता. २ जळणाच्या, किंवा धान्याच्या, कडब्याच्या, वगैरे गाड्या पुरवण्याकरितां घेतलेला मक्ता.

कबाडी, कबाड्या वि० १ कबाडें वाहण्याच्या उपयोगी (तट्टू, चाकर). २ तादृश सुखभोग नसतां केवळ संसारादि व्यवहारांची खटपट मात्र करणारा जो पुरुष तो. ३ ओबडधोबड, कलाशीदार नव्हे असें काम करणारा कारागीर. ॐ**कबाडीगलबत** न० व्यापारी सामानाच्या वाहतुकीचें गलबत.

कबाबचिनी [फा० कबाबचीनी] स्त्री० [एक औषधी.

कबाला, कवाला पु० खरेदीखत.

कबिला [अ० कबीलाह्] पु० १ लग्नाची जी स्त्री ती; घरधनीण. २ घर, कुटुंब.

कबीत [सं० ' कविता ' चा अपभ्रंश] न० १ एक प्रकारच्या चालीचें गाणें. २ कविता; काव्य; कवन.

कबीरपंथ पु० मुसलमानांत कबीर नामें एक रामभक्त साधू होऊन गेला त्यानें प्रवर्तिलेला ईश्वरभजनाचा जो मार्ग तो.

कबीलदार [अ० कबीलाह् दार] पु० विवा- [हित पुरुष.

कंबु [सं०] पु० शंख. ॐ **कंबुग्रीवा** स्त्री० शंखाप्रमाणें तीन रेषा असलेली मान (सुदैवाची खूण).

कबुतर, कबूतर [सं० कपोत] न० एक पक्षिविशेष. ॐ **कबूतरखाना** पु० कबुतरें पाळावयाची जागा. **कबुतरबाज** वि० ज्यास कबुतरें खेळावयाचें व्यसन आहे असा.

कबुलात, कबुलायत [अ० कबूलियत]स्त्री० बचनद्वारा वा लेखद्वारा दिलेली किं० घेतलेली एखाद्या गोष्टीसंबंधाची मान्यता; कराररूप संमति; होकार.

कबूतांदळ पु० एक प्रकारचा उंची तांदूळ.

कबूल [अ० कबूल्] वि० मान्य;संमत; रुकार देण्यास योग्य, पटणारें. ॐ **कबूलकतबा,कबूलकदबा** [अ० कबूल्+कतावाह्]पु० पंचाईत जो फैसला करील तो आम्हांस मान्य आहे अशाबद्दल वादी आणि प्रतिवादीनीं दिलेले लेखी करार ते प्रत्येक.

कबुली स्त्री० मान्यता, संमति, इ०ॐ **कबुलीजबाब** पु० अमूक गोष्ट मी केली अशाबद्दल दिलेली साक्ष किं० जबानी.

कबूस [जर्मन्] गलबतावरील पाकगृह.

कब्रू वि० १ नाठाळ (ऋणकरी). २ कठोर आणि कंजूष मनुष्य.

कम [फा० कम्] कमी; ऊन; उ० कमअस्सल म्ह० असलानें कमी म्ह० कमा असलाचा; कमकुवत म्ह० शक्तीनें कमी;आणाकम रुपाया म्ह० पंधरा आणे;शेरकममण म्ह० मणाला एक शेर कमी. ॐ**कमअक्कल** वि० मंदबुद्धी, जड. स्त्री० जडत्व, अक्कलमंदी. **कमअस्सल** वि० हीन जातकुळीचा. **कमकसर** वि०, क्रि० वि० थोडें कमी किंवा ज्यास्त; जवळ जवळ, बहुतेक त्याचप्रमाणांत, इ०. **कमकायदा** पु० १ कायदा, शिस्त, सभ्य चालरीत, वळण, कुळाचार, इ० यांचें सदोषत्व, ढिलाई अपुरेपणा किं० कमताई; उ० मी कृष्णरावांच्या घरा कमकायदा पाहिला म्हणून जाणें सोडलें. २ कमताई; असावयास हावें किंवा असतें त्याहून कमी किं०ऊन असें. ॐ **कमवेतनःराहावें पण कमकायदा राहूं नये** कमी पगारावर नोकरी बेहेत्तर पण अन्यायी धन्याची नोकरी करूं नये. **कमकुवत** [फा० कम्+कुव्वत(जोर)] वि०कमजोर;ज्याचा वकूब, ताकद,इ० कमी आहे असा. **कमजोर** वि० कमी जोराचा. **कमजवाद** [फा० कम् (कमी)+ जियादाह् (ज्यास्ती)] वि० कमी किंवा ज्यास्त. न० कमीपणा किंवा ज्यास्तपणा; तूट किं० वाढ. **कमजात** वि० कमअस्सल; उ० भास्कररावासारख्या कमजात माणसाच्या हातून एकीच्या जागीं बेकी करण्याचें हीन कामच व्हावयाचें ! जन्मानेंच जो हीन तो कर्मानेंही हीनच राहणार ! **कमजादा** वि० कमज्यास्त. **कमजास्त (–स्ती)** वि० १ कमी अधिक; अधिक उणें. २ भलेंबुरें; शिष्टाचाराच्या दृष्टीनें कमी किंवा ज्यास्ती. **कमज्यास्त** न०, **कमीज्यास्ती** स्त्री० १ अधिकपणा किं० उणेपणा; नवलविशेष; उ० तुम्हीं केसरी

वाचला आहेत; कांहीं कमज्यास्त ? **कमता वि०** हावें त्यापेक्षां किं० असावयाचें त्यापेक्षां कमी; अपुरा. **कमताई स्त्री०** कमीपणा, उणेपणा, अपुरेपणा, टंचाई. **कमती वि०** कमी, उणें, अपुरें. **स्त्री०** कमताई. **कमतीबढती स्त्री०** चढ-उतार, कमीपणा अधिकपणा, न्यूनाधिक्य. **कमतोल वि०** १ विवक्षित वजनाहून कमी. २ एखादें कार्य करावयास विवक्षित वजन, दृढता, वशिला, शक्ति, संपत्ति, इ० जी लागते तितकी ज्याच्यामध्यें नाहीं असा. **कमदर पु०** कमी केलेला किं० उतरलेला भाव किं० दर. **वि०** कमी दराचा, कमी भावाचा. **कमदरी वि०** कमदर. **कमदस्त पु०** उतरला आहे भाव,दर,इ० ज्याचा असा कर वगैरे. **कमदस्ती वि०** ज्याचा कर, सारा, इ० कमी केला आहे असा. **कमनशीब न०** दुर्दैव. **कमनशीबी वि०** दैवहीन. **कमबखत** [फा०कम् (कमी)+बख्त् (नशीब)] **वि०** कमनशीबी. **कमबखती स्त्री०** १ कम-नशीब. २ पारिपत्य; शीक्षा; चोपून काढणें.

कमची [हिं० कम्ची] **स्त्री०** घोड्यास वगैरे मारावयाच्या उपयोगाची बारीक छडी.

कमटा(–ठा) [सं० कमठ=वेळू] **पु०** धनुष्य (बांबूचें किं० शिंगाचें केलेलें).

कमठ [सं०] **पु०** १ कांसव. २ वेळू. ३ चंबू, कमंडलु. ४ साळू पक्षी.

कमंडलु [सं०] **पु०** संन्याशाचें जलपात्र; मृत्तिका, काष्ठ, किंवा धातू, याचें जलप्राशनाचें एक प्रकारचें पात्र,–जें प्राय: संन्यासी, ब्रह्मचारी, इ० वापरतात.

कमतणूक [फा० कम्ती+म० णूक (प्रत्यय)] **स्त्री०** उणेपणा, कमताई, अपुरेपणा, टंचाई.

कमतनूक [फा० कम् (तोकडा)+सं० तनू (शरीर)+क (प्रत्यय)] **वि०** १ बारीक, सडपातळ, किरकोळ, काटकुळा (माणूस, जना-वर). २ बारीक व अधू, पातळ व अशक्त (खांब, तुळई, भिंत, इ०).

कमतर [फा०] **स्त्री०** नियोजित कार्यांत आलस्यादिकांमुळें उद्भवणारी न्यूनता, खंड,किं० चूक; **क्रि०** पडणें, होणें; उ० अभ्यासांत कमतर पडली तर नापास होशील हें ध्यानांत ठेव. **वि०** तोकडा, अपुरा.

कमतरीन [फा०] **वि०** कमी दरजाचा; क्षद्र; क्षुल्लक (पत्र लिहिणारा स्वताच्या संबंधानें हा शब्द योजतो).

कमतावणें अ० क्रि० कमी होणें, शमणें, हळू हळू उतार पडणें; उ० ताईसाहेबांचें दुखणें गेल्या मार्गशीर्षापासून बरेंच कमतावलें आहे.

कमनीय [सं० कम्=इच्छिणें, चाहणें] **वि०** १ इच्छिण्यास योग्य. २ सुंदर, रम्य, मनोहर.

कमर [फा० कम्र्] **स्त्री०** कंबर, कटिप्रदेश, नितंब. ॰**कंबर खचणें, मोडणें**, किं० **बसणें** बेसुमार उत्साहभंग किं० निराशा होणें; गलितधैर्य होणें. **कंबर ताठणें** आजारीपणामुळें वगैरे कमर वाकूं नये असें होणें; कमर ताठरणें. **कमर बांधणें,** किं०**कसणें** एखादें काम करावयास जोमानें प्रवृत्त होणें; चंग बांधणें.**कंबर भरणें**,किं०**धरणें** कंबर दुखूं ॰लागणें.**कमरेचा ढिला वि०**प्रजोत्पादनीं असमर्थ; नपुंसक. **कमरेचा कांटा ढिला होणें** एखादें काम करतांना जेरीस येणें; नाकीं नव येणें.**कमरकचका पु०**कमरेवर गुडघ्यानें दिलेला किं०मारलेला ठोंसा. **कमरखुलाइ स्त्री०** कुळाकडे खंड, गुन्हेगारी इ० कारणा करितां सरकारी अधिकारी गेला असतां त्यानें आपला कमरबंद सोडून खालीं बसावें यास्तव त्यास द्यावें लागतें जें द्रव्य तें. **कमरचोडा-पेंच पु०** कुस्तींतील एक पेंच. **कमरठाव पु०** कंबरे इतकी पाण्याची खोली. **कमरपट्टा पु०** १ सुवर्णाचा किं० चांदीचा बायकांचा कमरेभोंवतीं घालावयाचा पट्टा. २ चामड्याचा वगैरे पट्टा, वादी (कमरेभोंवतीं बांधण्याकरतां). **कमरबंद पु०** १ पट्टा; कमरेभोंवतीं बांधावयाचें पट्ट्यासारखें जें कांहीं बांधलें जातें तें. २ कांहीं अंगरख्यांच्या कमरेवर बांधावयाच्या फिती, बंद, असतात ते. **वि०** तयार (कोणतेंही काम करावयाला); सिद्ध झालेला; सज्ज. **कमरबंदी स्त्री०** कोणतेंही काम करावयासाठीं कंबर बांधणें इ०रूप जी सिद्धता किं० तयारी ती. **कमरबस्ता पु०** १ कमरपट्टा, कमरबंद. २ कमरपट्टा वगैरेंमुळें कमरेचें बंधन होतें तें.**वि०** कंबर कसून कांहीं कार्य करावयाला सज्ज

झालेला. **कमरबंदी** (क्रि० करणें, बांधणें) कंबर कसून कांहीं कार्याला सिद्ध होणें; उ० तानाजीनें सिंहगड जिंकण्याकरतां कंमरबस्ता केला. **कमरमोड** स्त्री० कंबर मोडून जाईल इतकें फार किं० जबर काम. **कमरमोड काम** न० कमर मोडून जाण्याइतकें कष्टदायक काम. **कमरमोडी इरलें** न० मनुष्य वाकलें असतां कमरेपाशीं वळेल असें विरलें. **कमरी** वि० कमरेंत अधू किं० अशक्त. **कमरेचा खवाटा** पु०, **कमरेचें खवाट** न० मांडीचा सांधा; ढुंगण. **कमरेचा जोर** पु० द्रव्यबल, बंधुबल, इ० बळांहून भिन्न असें जें कांहीं कार्याविषयीं केवळ शरीरबळ तें.

कमरक (–ख) [सं० कर्मरंग=कर्मर, नीव] करमरीचें फळ; कर्मर; नीव.

कमरगा [फा०] पु० १ पर्वताच्या मध्याभोंवतीं वाढलेला किं० पुढें आलेला त्याचा जो विभाग तो; पर्वताचा मध्य वेष्टिणाऱ्या टेकड्या वगैरे. २ मांड्याचा मध्यभाग (पुढें आलेला किं० खोल गेलेला). ३ कंबर. ४ (कुस्तींत) कंबरपकड. ॐ **कंबरगा मारणें** शत्रूवर पाठीकडून हल्ला करणें.

कमल [सं०] न० १ कमळ. २ पाणी. ३ पुप्फूस. ४ देवांच्या मूर्ति ठेवावयाचें पात्रविशेष. पु० सारस पक्षी. ॐ**कमलाकर** पु०सरोवर. २विष्णु. **कमलालय, कमलासन, कमलज** पु० ब्रम्हदेव. **कमलनेत्र** वि० कमळासारखे सुंदर आहेत डोळे ज्याचे असा. **कमलाक्ष** पु० कमळाचीं बीजें प्रत्येक.

कमला [सं०] स्त्री० १ लक्ष्मी. २ संपत्तीची देवता. ३ कोणीही सुंदर स्त्री.

कमलिनी [सं०] स्त्री० १ कमळाची वेली; कमळीण. २ कमळांचा समूह. ३ कमळांचें स्थान. ॐ **कमलिनीवरचा बिंदु** पु० सुंदर पण क्षणभंगुर अशी वस्तु.

कमाविणें [हिं० कमाना=मिळविणें] स० क्रि० १ संपादन करणें; मिळविणें. २ कांहीं संस्कारविशेष करून व्यवहारोपयोगी करणें; उ० कातडें कमाविणें. ॐ **कवडीपासून कमवावें आणि लाखापासून खर्चावें** क्षुल्लक लाभासाठीं सुद्धां खटपट करावी. त्यांत कांहीं दोष नाहीं, पण खर्च करण्याची वेळ आली असतां मोठी रक्कम खर्चावयाला सुद्धां कचरूं नये.

कमसल [फा० कम् (कमी) + असल (गुण, योग्यता)] वि० गुणानें कमी; खोटा; बनावट; हीन जातीचा.

कमळ [सं० कमल] न० १ जलांत उत्पन्न होणारें एक पुष्पविशेष. २देवांच्या मूर्ति ठेवण्यासाठीं कमलाच्या आकाराचें पात्रविशेष करतात तें. ३ केळफूल. ॐ **कमळगट्टा** पु० कमळाचीं बीजें ज्यांत असतात तो कमळाचा भाग; कमळाचा गाभा.

कमाई [हिं०] स्त्री० १ मिळकत; प्राप्ति; नफा. २ कातडें कमाविण्याची क्रिया किं० तदर्थ दिलेली मजुरी. ३ शेतांत खत इ० घालून तें धान्यादि पिकें उत्तम देईल असें करणें. ४ चुना इ० पदार्थ योग्य मालमसाला घालून इमारतीच्या कामाला उपयोगी पडेल अशा स्थितीस आणणें. ५ गाडी ओढण्याच्या किं० स्वारी वहाण्याच्या कामाला घोडा शिकवून तयार करणें.

कमाऊ [हिं०] वि० १ पैसे इ० मिळविण्याचें काम करणारा; संसार चालविण्यासाठीं नोकरी, शेती, व्यापार, इ० करणारा माणूस. २ कमविण्याची क्रिया ज्याचेवर केली आहे असा पदार्थ, (माती, कातडें, पीठ, शेत, इ०). ॐ**कमाऊ पूत** पु० कुटुंब चालविण्यासाठीं पैसे मिळविणारा मुलगा.

कमान (–ण) [फा०] स्त्री० १ धनुष्य, कमठा. २ महिरप. ३ स्थितिस्थापक गुणानें युक्त अशी पोलादाची किं० अन्य धातूंची करतात जी तार किं० पट्टी ती (घड्याळाची, गाडीच्या चाकाची, इ०). ॐ **कमान (–ण) गार** वि० धनुष्याच्या कामट्या आणि बाण, इ० शस्त्रास्त्रें बनविणारा कारागीर. **कमान (–ण) दार** वि० कमान आहे ज्याला किं० कमान केली आहे ज्यावर असा पदार्थ, (अंगरखा, भिंत, इ०).

कमाल [अ०] स्त्री० १ पूर्णता; परमावधि; पराकाष्ठा, सर्वांत उंच किं० कडेलोटची मर्यादा. २ गांव, देश, इ० ची पहाणी होऊन प्रतिवर्षी चालावयाजोगा जो सारा ठरावलेला असतो तो. ॐ **कमालखानी हार** पु० पायापर्यंत लोंबणारा अनेक पदरांचा हार.

कमावता [हि० कमाना=मिळविणें] वि० कुटुंबासाठीं नोकरी इ०करून पैसे मिळविणारा. ❀**कमावता पूत** कुटुंब चालविणारा कुटुंबांतील इसम.

कमावणें वर ' कमावणे' पहा.

कमाविशी (-सी), कमावीस [हिं०]स्त्री० १ जमीनसाऱ्याची किं० कराची केलेली वसूली किं० वसूलाची रकम. २ नफा, फायदा, किफायत. ❀ **कमावीन जमा स्त्री०** कमावीसदारानें कमालवेरजेच्या पेक्षां अधिक वसूल जो केला असतो तो (दंड, जप्ती इ० पासून). **कमावीसदार पु०** कमाविशीचें काम करणारा इसम.

कमी [फा० कम्] **वि०** थोडा, लहान; उणा. ❀ **कमीपणा घेणें** आपली बाजू कमी जोरदार आहे किं० लंगडी आहे किं० खोटी आहे असें कबूल करणें;हार खाणें; माघार खाणें.

कमोद पु० १ तांदुळाची एक जात.२ संगीतांतील एक राग

कया [सं० काय=देह] स्त्री० तेजेला; शरीर कांति; चेहऱ्याची टवटवी.❀**कयाहीन** वि० देहाची स्वच्छता न राखल्याकारणानें म्लान किं० हिडिस्स दिसणारा. **कयाखाऊ** वि० लाजिरवाणा; लज्जास्पद. **कयावान** वि० ताजा; टवटवीत; उठावदार (चेहेरा, देह, इ०).

कयास [अ०],पु० निर्णय; ठराव; विचार करून जो अभिप्राय ठरला तो;निष्कर्ष.२तर्क, अनुमान.❀**कयासनामा पु०** निर्णय ज्यांत नमुद करण्यांत आला आहे तो कागद.

कर [सं०] पु० १ हात. २ हाताच्या आकाराचा, हातासारखा दिसणारा, किं० हाताचें काम करणारा, कोणताही पदार्थ.२ किरण(प्रकाशाचा). ३ (हत्तीची) सोंड. ४ कर, पट्टी, सारा. ५ पावसांत पडणारी गार. ६ चोवीस अंगुळांची लांबी. ❀ **कराग्र न०** टीच. **करकंटक पु०, न०** नख. **करग्रह पु०** १ राजादिकानें रयतेपासून कर घेणें किं० परकी राजापासून खंडणी घेणें. २ विवाह. **करग्राह पु०**पति.**करज पु०**नख. **करतल पु०,न०** तळहात.**करतलभिक्षा स्त्री०**दारोदार भिक्षा मागत हिंडून जें खाद्य मिळेल तें तळहातावर घेऊन उभ्यानेंच तेथल्या तेथेंच खाण्याचें व्रत. **करतलामलक पु०** १ सोपी गोष्ट. २ (लक्षणेनें) जागृत असलेली विद्या शास्त्र, कला, इ०.वि० सुलभ किं० ठळक. **क्रि० वि०** अगदीं स्पष्टपणे. **करतलामलकवत् वि०** अत्यंत सोपें किं० सुकर. क्रि० वि० अगदीं ठळक रीतीनें. **करताल पु०, न०, करताली स्त्री०, करतालिका स्त्री०** चिपळ्यांसारखें एक कांशाचें वाद्यविशेष. **करताल धरणें** तळहातावर तळहात आपटून गाण्याची किं० वाद्याची साथ करणें. **करद वि०** १ कर देणारा. २ मांडलिक. ३ मदतगार. **करपत्र न०** करवत (सुताराचे हत्यार). **करपल्लव** [सं० कर (हात) + पल्लव (कोंवळीं पानें)] पु० हात; हाताचा पंजा. **करपल्लव करणें** हातानें खूण करणें (एकाद्याला बोलावण्यासाठीं,होय नको कळविण्यासाठीं, निषेध करण्यासाठीं किं० अन्य कारणासाठीं). **करपल्लवी भाषा, करपल्लवी स्त्री०** हाताच्या खुणांनीं आपले मनोगत विचार कळविण्याची रीति किं० मोडणी.

करपाल पु० १ तरवार.२ कर वसूल करणारा. **करपालिका स्त्री०** १ तरवार; गुप्ती. २ सोडगा. **करपीडन न०** विवाह. **करपूट पु०** १ ओंजळ. २ पेटारा, संदूक. **करपुष्कर** [सं० कर (सोंड, हात) + पुष्कर (सोंडेचें अग्र)] **न०** १ हत्तीच्या सोंडेचें अग्र.२ हाताचा पंजा किं० बोटांचीं अग्रें. **करवाल (-वाल) पु०** १ तरवार. २ नख.**करशीकर पु०** सोंडेतून हत्तीनें सोडलेले तुषार. **करसूत्र न०** लग्नकंकण.

कर [सं० कृ=करणें] **वि०** हा प्रत्यय विशेषणरूप आहे; त्याचे अर्थ पुढील प्रमाणें आहेत. १ करणारा; उ० दुःखकर, विस्मयकर, इ०. २ स्थलविशेषीं राहणारा किं० स्थलविशेषाचा अभिमान बाळगणारा; उ० काशीकर,नाशीककर, इ०. स्त्री० करणें, कृति; कर्तृत्व; उ० कर नाहीं त्याला डर नाहीं.

कर अव्यय रीतीनें, प्रकारें, इ०; झटकर, झपकर, पटकर, खटकर, इ०

कर स्त्री० ग्रहण, अयनसंक्रांति, होळी, गांवांतील मोठ्या मनुष्याच्या मरणाचा दिवस, ह्यांच्या पुढचा जो दिवस तो (कोणतेंही काम करावयाला अशुभ मानतात तो).

करक स्त्री० [सं०] पु० १ कमंडलु; पेला; लहान घागर. २ नरोटी, करवंटी. ३ हात; लहान हात. ४ पावसांत पडणारी गार.

करक पु० १ तांबडें दिंड्याचें झाड. २ शिजविलेले दिंड्याचे तुरे किं० अंकुर. **स्त्री०** मान, कंबर, इ०त उठलेली चमक;लचक. **पु०** एरिणीच्या झालांतील दिवा.

करकचणें, करकचावणें, करकटणें, करकसणें स० क्रि० घट्ट बांधणें; जोरानें ओढणें; ह्या क्रियापदाचें बहुधा ऊन प्रत्ययान्त **क्रि० वि०** च्या रूपानें पुढील सारखे प्रयोग होतात; करकचावून बांधणें, आवळणें, गुंडाळणें, इ०.

करकचा, करकोचा पु० पदार्थाभोंवतीं दोरी वगैरे घट्ट बांधली असतां त्याचा त्या पदार्थाभोवतीं पडतो जो खळगा किं० चर किं० पन्हळ तो; उ० गोदे, तूं परकर फार घट्ट नेसलीस म्हणून तुझ्या कमरेला हा खोल करकोचा पडला आहे !

करकटणें स० क्रि० १ करकचावून बांधणें (वरचा शब्द पहा). २ भात, पिठलें, इ०पदार्थ भांड्याला किं० हाताला किं० तोंडाला लागलेले असतात ते तेथल्या तेथेंच वाळून जाणें.

करकर स्त्री० १ कोणताही कर्कश आवाज. २ भांडणाची आरडा ओरड. ३ रागें भरण्याचा किं० शिव्या देण्याचा आवेश.

करकर, करकरां क्रि० वि० कर्कश आवाज होईल अशा रीतीनें.

करकरणें अ०क्रि०करकर असा आवाज करणें; उ० कावळा करकरला म्हणून पिंपळ मरत नाहीं (हलकट लोकांनीं मोठ्या माणसाची कितीही निंदा केली तरी त्या मोठ्या माणसाचें कांहीं वाकडें होत नाहीं).

करकरावणें स० क्रि० दातांवर दांत घासून करकर असा आवाज करणें.

करकरीत वि० १ कोरा; 'कोरा' ह्या शब्दाचा अर्थ जोरदार करण्यासाठीं हा शब्द त्याचे पुढें योजतात; उ० कोराकरकरीत म्ह० अगदीं कोरा. २ ऐन; उ० करकरीत तीन्ही सांजा.

करकोचा पु० एक पक्षी. ॐ **करकोचे धाड स्त्री०** करकोचा पक्ष्यांच्या थव्यानें केलेली शेताची नासाडी.

करकोचा पु०, करकोची स्त्री० दोरी, धोतर, परकर, लुगडें, इ० घट्ट आवळल्या-कारणानें पदार्थावर किं०कंबरेवर पडतो जो व्रण किं०पन्हळ तो.

करंगळी, करांगुळी [सं०] **स्त्री०** हाताचें किं० पायाचें सर्वांत लहान जे बोट तें, (अंगठ्याच्या दुसऱ्या कडेचें).

करगोटा [सं० कटि(कंबर)+ म० दोरा] पु० कंबरेभोवतीं बांधावयाचा दोरा, सोन्या रुप्याची साखळी, रेशमाचा गोफ इ०.

करंज पु० एक वृक्षविशेष.

करंजी स्त्री० १ करंज नामक वृक्षाचें फळ. २ करंज वृक्षाच्या फळाच्या आकाराचें एक पक्वान्न.

करंजेल [म० करंज + तेल] **न०** करंज नामक वृक्षाच्या फळांतील बीजांचें तेल.

करझतकाळ, करजतकाळ [सं० कृतान्त (यम) + काळ] **पु०** उग्र आणि भयंकर माणूस किं० कोणी प्राणी किं० पदार्थ.

करट [सं०] पु० १ हत्तीचें गंडस्थळ. २ कावळा. ३ नास्तिक. ४ नीच. ५ पतित. ६ मृताच्या अकराव्या दिवशीं करतात तें श्राद्ध. ॐ**करटा, कारटया, कारटा, कारपटखाऊ पु०** मर्तिकाच्या विधीचे संकल्प सांगणारा ब्राह्मण.

करट पु०, न० एक फळ (औषधाच्या उपगाचें).

करट, करंट न० गळूं.

करंटपक्ष क्रि० वि० निदान; किमानपक्षीं.

करटा, करंटा [सं० करट=नीच, पतित] **वि०** १ अभागी; हतभाग्य; दुर्दैवी. २ गरीब, विपन्न. ॐ**करंटा पोपट पु०** वन्य पोपट.

करटा बांगडा पुं० खाऱ्या पाण्यांतील एका जातीचा मासा.

कपाळकरंटा वि० फुटक्या नशीबाचा.ॐ **करंट्या कपाळाचा, करंट्या हाताचा वि०** दुर्दैवी, हतभाग्य.

करटी, करंटी स्त्री० लहान गळूं; पुटकुळी.

करटी ,करवंटी[सं० करोट=डोक्याची करटी] **स्त्री०** १ नारळाचें अर्धुक (आंतील खोबरें काढून घेतलेलें). २ डोक्याची कवटी.

करटुली, करटोली स्त्री० एक वन्य वेल.

करड स्त्री० वरची एक मात्र त्वचा जाऊन दुसरी म्हणजे तिच्या आंतली त्वचा ज्यांची निघाली नाहीं असे जे तांदूळ ते. **न०, स्त्री०** १ एक प्रकारचें गवत; तें तांबडें, खरखरीत आणि चवीला वाईट असतें. २ पुष्कळ दिवस केशांना तेल आणि फणी ह्यांचा स्पर्श न झाल्या-कारणानें झालेली केशांची दुर्दशा; उ० माझ्या-केशांची करड झाली आहे; उद्या मला न्हालें पाहिजे. **वि०** खरखरीत, राभस (केश, इ०). ॐ **करड काढणें** ओबडधोबड रीतीनें किं० अव्यवस्थितपणें किं० निष्काळजीपणें कांहीं काम करणें.

करंड [सं०] **पु०** १ करंडा, डबा. २ मधाचें पोळें. ३ बांबूच्या पातींची केलेली पेटी.

करडई स्त्री० १ एक पालेभाजी. २ तिचें बी. (ह्या बीयांचें तेल निघतें). ॐ **करडकूट न०** करडईचें भूस. **करडगूळ न०** करडईचीं लाकडें.

करड कांगोणी स्त्री० कांगोणीची एक जात.

करडणें, करंडणें स० क्रि० उंदीर इ० नीं वस्त्र इ० दांतांनीं तोडणें.

करडा वि० १ पांढुरका (वस्त्र, घोडा, इ०). २ अर्धवट सडलेले (तांदूळ). ३ स्वभावानें कडक; हाताखालच्या माणसांना क्रूरपणानें वागविणारा (माणूस). ४ पिकावयाच्या अवस्थेस आलेले (केश). ५ भेसळ असल्यामुळें कठिण किं० टणक (लोखंड, रुपें, इ०). ६ तेल न लावल्यामुळें भरभरीत झालेलें (अंग, केश, इ०). ७ क्रूरपणाचा. ॐ **करडा अमल पु०** १ कठोरपणाची शासन-पद्धति. २ फार चढणारा (भांग, इ० चा) उन्माद.

करंडा [सं० करंड=डबा] **पु०** १ डबा (कुंकवाचा वगैरे). २ बांबू, इ० च्या पातींची केलेली एक प्रकारची पेटी. ३ लाकडाचा ठोकळा. ४ पातींच्या छत्रीला कांतीव पोकळ दांडा लाविलेला असतो तो,—ज्यामध्यें पाहिजे तेव्हां दुसरा लांब दांडा भरतां येतो तो. ५ केळीचा खांब किं० तादृश इतर काष्ठ यांचीं केलेलीं खंडकीं तीं प्रत्येक.

करंडी स्त्री० बांबूच्या पाती इ० ची झाकण असलेली किं० नसलेली टोपली, पेटी, सांक्षी, इ०.

करंडी स्त्री० एक झाड; त्याचें फळ मुद्रेच्या आकाराचें असल्यामुळें त्याला ' मुद्रा ' असेंही म्हणतात. गोपीचंदनाच्या दाट पाण्यानें ह्या मुद्रांचे ठसे मराठे लोक कानशिलांवर उठवितात.

करडूं, करडें न० शेळीचें पिलूं.

करंडूल न० बांबूच्या किं० वेताच्या पातींचा लहानसा करंडा किं० डबा.

करडेल न० करडईचें तेल.

करढोक, करडोल पु० एक पक्षी.

करण [सं० कृ=करणें] **न०** १ कोणतेंही कार्य करण्याचें साधन. २ करणें. ३ कृत्य. ४ कारण, हेतु. ५ धंदा. ६ (**ज्योतिष**) दिनभाग-विशेष (अर्धी तिथि). ७ शरीर. ८ इंद्रिय. ९ पुरावा, लेख. १० योगासनविशेष. ११ (**व्या०**) तृतीया विभक्ति किं० त्या विभक्तीचा अर्थ. १२ (**ज्यो०**) ग्रहणें इ० वर्तविण्याच्या उपयोगाच्या कोष्ट-कांचा समुदाय. १३ इष्ट शकापासून ग्रहादि गणित-साधन ज्यामध्यें सांगितलें आहे तो ग्रंथ. ॐ **करणवाच्य न०** तृतीयान्त नाम. (**स्पष्टीकरण न०** स्पष्ट करणें. **शुद्धीकरण न०** पतिताला शुद्ध करून त्याच्या जातींत पुन्हा समाविष्ट करणें. **पृथक्करण न०** वेगळें करणें; उ० पाण्याचें पृथक्करण केल्यास हैड्रो-जेन आणि आक्सिजन निघतात. **एकीकरण न०** एक करणें; उ० पोटजातींचें एकीकरण हितावह आहे.)

करणकुसूं [सं० कर्ण + म० कुसू] **न०** लाकडाला लाकूड जोडावयाचीं जीं अनेक जातींचीं कुसवें आहेत त्यांपैकीं एक प्रकार; ह्यांत कुसूं कानाच्या आकाराचें असतें. **करणचौकट** स्त्री० ज्या चौकटीच्या कोनांपाशीं लाकडाचीं टोकें करणकुसुं या नांवाच्या सांध्यानें जोडलेलीं असतात ती चौकट. अशा चौकटीस 'करणाची चौकट 'असेंही म्हणतात.

करणपुतळी स्त्री० काशाच्या भांड्याला काज-ळाचा लेप करून शकुन पाहाण्याचा विधि किं० प्रकार.

करणा [म० कर्णा=वाद्यविशेष] **पु०** तोंडानें फुंकर घालून वाजवावयाचें एक पितळेचें वाद्यवि-शेष. ॐ **करणेकरी पु०** करणा (किं० कर्णा) वाजविणारा; कर्णा वाजवून उपजीविका करणारा.

करणावळ [म० करणें + आवळ (प्रत्यय)]

स्त्री० कांहीं वस्तु करण्याबद्दल किं० घडविण्याबद्दल दिलेली मजूरी.

करणी [**सं०** कृ=करणें] **स्त्री०** १ गवंड्याचें एक हत्यार. २ लग्नांत वरास आणि त्याच्या बाजूच्या मानकऱ्यांस वस्त्रें, भूषणें, इ० चें जें अर्पण तें. ३ कोणेकास उद्देशून केलेला जारणमारणादि जो प्रयोग तो. ४ कांहीं कर्म करण्याचा व्यापार; आचरण; उ० **करणी कसावाची आणि बोलणी मानभावाची (** ह्म० बाहेरून प्रेम दाखविणें आणि गुप्तपणें नाशाच्या खटपटी करणें); उ०करणी केल्यास नराचा नारायण होईल. ५ अत्यंत आश्चर्यकारक किं० अद्भुत गोष्ट घडणें किं० घडवून आणणें किं० उपस्थित करणें; घटनासामर्थ्य (देवाचें); उ० मी त्या कड्यावरून तोल चुकून पडणारच होतों; पण ईश्वराची करणी म्हणून बचावलों. ६ वर्गमूळ न तुटणारी संख्या. ꕥ **करणीगत वि०** ज्याचें पद येत नाहीं तो राशि. **करणीचा वि०** कृत्रिम; बनावट; खरा नव्हे तो; उ०करणीचा वाघ,घोडा,कोंबडा,इ०ह्म०वाघ,घोडा, कोंबडा, इ० चे सोंग घेतलेला मनुष्य. **करणीसार** [**सं०**करणी+अनुसार] **वि०** कृतीला अनुसरून असलेलेलें; उ० करणीसार फळ.

करणीय [**सं०** कृ=करणें] **वि०** करण्यास योग्य; करतां येईल असा.

करणें [सं० कृ=करणें] **स० क्रि०** १ घडविणें; घडवून आणणें; बनविणें; घटक द्रव्यांवर कांहीं व्यापार करून किं० संस्कार करून त्यांचेपासून कांहीं नवीन वस्तु अस्तित्वांत आणणें; उ० कुंभार चिकणमातीचा रांजण करतो;उ० सोनारानें सोन्याची सरी केली; उ० तांबटानें हांडा केला; इ०. २ पाळणें, आचरणें; उ० नेम करणें, व्रत करणें, उपास करणें, इ०. **अ० क्रि०** असणें; होणें; होण्याच्या स्थितींत असणें; उ० मला भोंवळ करते; उ०मला मळमळ करते; उ० त्याला उन्हाळे करतात; उ० भात, चहा, इ० करत आहे. ꕥ **एकाद्याची उचलबांगडी करणें** त्याला त्याच्या मर्जीविरुद्ध एका ठिकाणाहून उचलून दुसरीकडे नेऊन ठेवणें किं० तेथें रहावयाला भाग पाडणें. **अंगाचें पाणी करणें** फार श्रम सोसणें. **एकाद्याला भोंवळ करणें** त्याला भोंवळ किं० घेरी येणें. **शर्त किं० शर्थ करणें** अत्यंत कसोशीचा प्रयत्न करणें; एकाद्या कामीं फार कष्ट सोसणें; कमाल करणें. **केलें न केलेसें करणें** निष्काळजीपणें किं० कुचरपणें एकादें काम करणें. **पंक्तिप्रपंच किं० पंक्तिभेद करणें** पक्षपात करणें; सर्वांशीं सम भावानें न वागणें; वशील्याच्या माणसास अधिक देणें आणि इतरांस कमी देणें. **नेम किं० व्रत करणें** नेम किं० व्रत आचरणें.

करणें [सं० कृ=करणें] **न०** करण्याची क्रिया; आचरण, ꕥ **करणें थोडें मचमच फार.**

करणेर न० विवाहाच्या प्रसंगीं वराला आणि त्याच्या बाजूच्या मानकऱ्यांना वस्त्रें, अलंकार, इ० देणें किं० नजर करणें.

करंद, करवंदी स्त्री० एक झाड. **न०** त्या झाडाचें फळ; करवंद.

करदनकाळ [**सं०** कदन (युद्ध)+काळ (मृत्यु)] **पु०** कठोर आणि क्रूर स्वभावाचा माणूस.

करदा [**फा०** कर्‌दकार] **पु०** जो कोणी प्रत्यक्ष शेत करतो तो,–मग तो मालक असो किं० मक्त्यानें किं० अर्धेलीनें शेत करणारा असो.

करंदा, कारंदा पु० एक झाड.

करदवलें न० एक लहान झुडूप.

करंदें न० कारंदा ह्या नावांचें एक झुडूप आहे त्याचें फळ.

करदोटा (–डा) पु० कंबरेभोंवतीं बांधावयाचा गोफ किं० सांखळी; करगोटा.

करदोडी स्त्री० कापसाचा दोरा किं०सुतळी,–जी शूद्र कमरेभोंवतीं बांधतात. करदोटा, करदोडा, करदोरा, करधोडा, करगोटा, हेही शब्द ह्याच अर्थाचे आहेत. ꕥ **करदोरा तोडणारी तंबाखू स्त्री०** अति अमली तंबाखू.

करनकर, करनकरी [**म०**करणें+न+करणें] **वि०** जें करावयास पाहिजे तें न करणारा आणि जें करतां कामा नये तें करणारा;हेकट; आडमुठ्या.

करनाटक, करणाटक, कर्णाटक न० एक देश. ꕥ **करनाटक ओस पडणें** बहिरें होणें.'कर्ण' ह्या शब्दाचें साम्य ' करणाटक ' ह्याशीं आहे ह्या-

वरून हा वाक्प्रचार उत्पन्न झाला आहे.

करप [म० करपणें] **स्त्री०** योग्य प्रमाणाहून अधिक भाजलेला पदार्थ. २ उन्हानें करपून किं० वाळून गेलेलें शेत.

करप [**सं०** कूर्प=दगड, खडा] **न०** धारायुक्त जो दगडाचा कळपा तो; कोणत्याही टणक पदार्थाचा अणकुचीदार तुकडा.

करपट [म० करपणें] **वि०** १ अर्धवट जळालेला (भात,भाकरी,इ०).२अर्धवट जळालेल्या खाद्य पदार्थांची जी घाण तद्विशिष्ट. ३अजीर्णामुळें अंबट आणि वशांत रीवरीव आणि जळजळ करणारी (ढेकर). ॐ **करपसडऱ्या** पौष्टिक किं० सत्त्वस पदार्थ खाऊन सुद्धां जो गुटगुटीत किं० लठ्ठ होत नाहीं असा मनुष्य. **करपटाण स्त्री०** करपट पदार्थाची घाण.

करपणें अ० क्रि० १ अन्नादि पदार्थ वाजवीपेक्षां अधिक उष्णता लागल्यामुळें आंतील तत्त्वांश जळून दग्धप्राय होणें. २ थंडी, उष्णता, इ० च्या कडाख्यानें वृक्ष इ० दग्धप्राय होणें. ४भय, शोक, इ० चें कारण आकास्मिक रीत्या उद्भवल्यामुळें म्लान निस्तेज, आणि निरुत्साह होणें.

करपविणें स० क्रि० १ खाद्य पदार्थ वगैरेंना निष्काळजीपणानें किं० मुद्दाम ते जळण्याइतकी उष्णता देणें; उ० चुलीमध्यें जास्तीं लाकडें ढोसून तूं माझा भात करपविलास; उ० शिरें करण्यासाठीं बाजरी चांगली करपीव; उ० राखुंडी करावयाची आहे; तंबाखू चांगली करपविली पाहिजे. २ थंडी, उष्णता, इ० नीं वृक्षादिकांना निःसत्त्व करणें.

करपा [म० करपणें] **वि०** करपलेला (पूर्णपणें किं० अंशतः).

करपी [**म०** करपणें] **स्त्री०** १ पिकें जळण्याइतकी सूर्याची किं० हवेंतील उष्णता (**क्रि०** पडणें).२ ज्वर, क्षुधा, इ० कारणांनीं पोटांत आग पडणें किं० जळजळ होणें. ३ चुलीवर ठेवलेल्या भांड्याच्या बुडाला जडलेला जळीचा थर.

करपुतळी स्त्री० मागें ' करणपुतळी ' पहा.

करपेल न० एक प्रकारचें गवत (गुरांचें खाद्य).

करंबट स्त्री० आंवळकाठी, केळ्फुलें, इ० पदार्थांत हिंग, जिरें, आमसूल, मीठ, इ० घालून पातळसर वाटून जें तोंडीलावणें करतात तें.

करबड न०, स्त्री० गुरांनीं खाऊन वगळलेला आणि पायाखालीं तुडविलेला कडबा.

करबडणें, करवडणें अ० क्रि० १ हात,तोंड, इ० ना खाल्लेल्या खाद्यांचे अवशेष चिकटून ते लवकर न धुतल्यामुळें तेथल्या तेथें वाळून चिकटून राहणें. २ खाद्य पदार्थ ज्यांत केलेला असतो तें भांडें लवकर न घासल्याकारणानें त्याचे अंश त्याला चिकटून तेथेंच वाळणें.

करंबल [**सं०** कर्मरंग=कर्मर, नीव] **स्त्री०** करमर, नीव. **न०** तिचें फळ.

करंबुटी स्त्री० कोंवळा आंबा; कैरी.

करंबें, करमणें न० हिरवे आंबे किं० चिंचा वगैरेंच्या ठेच्यांत गूळ आणि चवीसाठीं दुसरे कांहीं पदार्थ घालून तोंडीलावणें करतात तें.

करभ [**सं०**] **पु०** १ मणगट आणि करंगळी यांच्या मधला भाग किं० अंतर. २ हत्तीचा किं० उंटाचा किं० दुसऱ्या कोणत्याही पशुचा छावा. ३ हत्तीची सोंड.

करभार [**सं०** कर (खंडणी) + भार (ओझें)] **पु०**मांडलिक राजापासून सार्वभौम राजा घेतो तो कर किं० खंडणी.

करम न०,करमकंद,करमकांदा, करमगड्डा, करमाचा कांदा पु० कोबीचा गड्डा,–ज्याच्या पानांची भाजी करतात.

करमट स्त्री० वर ' करंबट ' पहा.

करमणूक, करमत [म० करमणें] **स्त्री०** खेळणें, गप्पा मारणें, इ० च्या योगानें जें मनोरंजन तें; सुखांत वेळ जाण्याचें कांहीं साधन; मौज.

करमणें अ० क्रि० सुखांत, आनंदांत, किं० समाधानांत वेळ जाणें; उ० तुला येथें करमतें काय ? **स० क्रि०** सुखांत आणि आनंदांत घालविणें (वेळ).

करमणें अ० क्रि० १ पाण्यामध्यें फार वेळ हात, पाय, इ० राहिल्यामुळें सुरकुतणें. २ क्षारांत कांहीं फळ राहिल्यामुळें सुरकुतणें.

करमणें न० चिंच, इ० अंबट पदार्थांत गूळ मोहोरी इ० घालून पातळ तोंडीलावणें करतात तें.

करमर[**सं०** कर्मरंग] **स्त्री०** करमर किं० नीव ह्यांचें झाड. **न०** त्या झाडाचें फळ.

करमरा वि० करमरीच्या फळासारखा (काचेचा मणि इ०).

करमळ पु० स्त्री० एक जंगली झाड. **न०** त्याचें फळ.

करमळ स्त्री० बागेंत लावतात असें एक झाड. **न०** त्याचें फळ.

करमाळा [**सं०** कर (हात) माला] **स्त्री०** जपाची संख्या मोजावयासाठीं मण्यांची माळ न घेतां बोटांच्या पेरांवर गणती करतात त्या दृष्टीनें तीं बोटें किं० तीं पेरें समुच्चयानें.

करक न०, स्त्री० तांदूळ, सावा, नाचणा, राळा, वरी, इ० चा कोंडा.

करली स्त्री० १ एका जातीचा मासा. २ एका जातीचें गवत.

करलें न० पाणी उडविण्याचें किं० शिंपडण्याचें एका विशिष्ट आकाराचें पात्र.

करवट पु०, न० एक कडू फळ; करट.

करवटणें अ० क्रि० एका कुशीवर निजणें.

करवटी, करवंटी, करोटी स्त्री० नारळाची करटी; सोललेल्या नारळाचें कवच,—ज्यांतून खोबरें खरवडून काढलेलें आहे.

करवडणें अ० क्रि० भात, भाजी, इ० चे अंश हाताला, तोंडाला किं०पायाला लागून ते जागच्या जागीं वाळणें; उ० हात करवडणें, भांडें करवडणें.

करवत[सं० करपत्र] **पु०; स्त्री०, न०** लाकूड कापावयाचें एक पातळ पोलादी पत्र्याचें हत्यार (त्याच्या कडेला दांते पाडलेले असतात). ꕥ **एकाद्यावर आडवा करवत घालणें**१त्याला खचविणें.२ त्याच्या कामांत विघ्नें उपस्थित करणें.३त्याला सतावणें.**जिवाला करवत लागून राहणें** एखाद्या माणसासंबंधानें किं० कामासंबंधानें काळजी किं० हुरहूर लागलेली असणें. **करवतीखालीं धरणें** जाचणें, गांजणें, छळणें. **करवतीकांठीं वि०** करवताच्या दांत्यांसारखी ज्याच्या कांठावर नक्षी आहे असें (धोतर, उपरणें, लुगडें, इ०).**करवती लगाम पु०** कांटेरी लगाम. [कापणें.

करवतणें स० क्रि० करवतानें लाकूड इ०

करवती स्त्री० लहान करवत.

करवंद, करवंदी [**सं०** करमर्द] **स्त्री०** एक झाड,—ज्याचीं फळें खाण्याच्या उपयोगाचीं असतात. ꕥ **गार गार करवंद** फार ओंबण्याइतकें गार (हवा, पाणी, ओलें धोतर, लुगडें, इ०).

करवंदणें अ० क्रि० अत्यंत गार असणें; ओंबण्या इतकें गार होणें, पडणें, किं० असणें; उ० ताक, पाणी, दही, ओले हात पाय, इ० करवंदले आहेत.

करवल, करवळ, करोळ पु० बंदुकीस्वार. ꕥ **करवली स्त्री०** त्या बंदुकीस्वाराचें काम किं० हुद्दा किं० अधिकार.

करवला [**म०** करा (मडकें) + वाला (ज्याच्या जवळ आहे तो ह्या अर्थाचा प्रत्यय) **पु०** नवरा मुलगा किं० नवरी मुलगी ह्यांचा भाऊ (' करवली ' चे पुल्लिंगी रूप विनोदार्थ घडविलेलें).

करवली [**म०** करा+वाली] **स्त्री०** नवरा मुलगा किं० नवरी मुलगी ह्यांची बहीण किं० तिचे अभावीं दुसरी मुलगी जी हातांत करा घेऊन त्याच्या किं० तिच्या मागें उभी असते ती.

करवस्त्र [**सं०** कर (हात)+वस्त्र (फडकें)] **न०** नाक, तोंड, इ० पुसावयासाठीं जें लहान फडकें कटीमध्येस खोचतात तें.

करवा पु० १ सोललेल्या उसाचा तुकडा; गंडेरी. २ एकाद्या अवयवाचा पडलेला तुकडा (अतिशयोक्तीचा प्रयोग); उ० कामाखालीं माझ्या कमरेचा करवा पडला. ३ दोरी चाकावरून न निसरतां फिरावी म्हणून त्या चाकाच्या परिघावर पाडलेला पन्हळ. ४ मोत्याच्या मध्यावर करगोट्यासारखी जी रेघ असते ती.अशी रेघ असणें हा मोत्यांत ऐब होय.

करवा, कारव पु० एक प्रकारचा नाच.

करवीं, करवें श० यो० अ० किं०क्रि० वि० ०च्या कडून; ०च्या मार्फतीनें; ०च्या हस्तें; उ० तुला तें काम करवत नसल्यास आपल्या नोकराकरवीं तें करीव.

करवीर [**सं०**] **पु०** कण्हेरीचें झाड किं० फूल.

करळ पु० १ एक प्रकारचा दगड,—ज्याला ' कड ' असाही प्रतिशब्द आहे. २ भातावरचें टरफळ; गहू, जोंधळा इ०च्या दाण्यावरचा पापुद्रा, —जो कांडून काढतां येतो. ३ रोवळी, टोपली, सूप, इ० च्या फटी.

करळी स्त्री० मोडशी झाल्यामुळें पायांत येतात जे वेग किं० पेटके ते. [बनविलेला.

करळी वि० करळ ह्या नांवाच्या धोंड्याचा

करा पु० लग्नामध्यें वधू आणि वर यांच्या मागें कोणी सुवासिनी किं० कुमारी हातांत जो कलश घेऊन उभी राहाते तो.

करा स्त्री० १ पाण्यावर येतो तो तवंग. २ जोंधळा इ० च्या कणसावर पर्जन्य पडल्यामुळें त्यांतील दाण्यांना अंकुर येतो तो.

कराकर क्रि० वि० करकर आवाज होईल अशा रीतीनें किं० असा आवाज करून.

करांगुली, करंगळी [**सं०** कर (हात)+ अंगुलि (बोट)] **स्त्री०** हाताचें किं० पायाचें लहान बोट (आंगठ्याच्या दुसऱ्या बाजूचें).

करांचली स्त्री० एक प्रकारची तरवार,–ती सरळ असून तोकडी असते.

कराड पु० १ तापाचा आवेग. १ कोणत्याही मनोविकाराची जोराची लहर (**क्रि०** येणें).

करांडणें स० क्रि० कुरतुडणें (दांतांनीं); ओरबाडणें (नखांनीं).

करांडा पु० वृक्षाच्या बुंध्याचा किं० फांदीचा कुऱ्हाडीनें किं० करवतीनें पाडलेला तुकडा; मोठा ओंडका.

कराडी स्त्री० जोर, अवसान, कुव्वत (**क्रि०** येणें, धरणें). **कराड्या स्त्री० अ० व०** लहरी, आवेग, (**क्रि०** येणें, चढणें, उठणें, इ०).

कराडूं न० करडूं, शेळीचें पिलूं.

कराणा पु० एक प्रकारचें भाजीचें झाड.

करांती स्त्री० एक प्रकारची उघडी गाडी.

करांदा पु० कारंदा,–एक प्रकारचा वेल,– त्याचा कंद आणि फळ.

करांदें न० करांदा नांवाच्या वेलाचें मूळ.

कराबीन [**फ्रेंच** काराबीन] **स्त्री०** एक प्रकारची हलकी आणि आखूड बंदूक.

करामत [**अ०**] **स्त्री०** १ युक्ति; अजब हिकमत. २ आश्चर्याची गोष्ट. ३ पराक्रम; सामर्थ्य; ताकद.

करामती [**अ०** करामत] **वि०** ज्याचे अंगीं करामत आहे असा; चतुर; युक्तिवान्; हिकमती.

करार [**अ०**] **पु०** १ दुसऱ्याशीं केलेला ठराव; दुसऱ्याला दिलेलें वचन; दुसऱ्याशीं कांहीं शर्तीनें स्वतास बांधून घेणें. २ निश्चय. ३ स्वतास किं० दुसऱ्यास लावून घेतलेली किं० लावून दिलेली नियंत्रणा. ॐ **कराराचा, करारी वि०** १ दिलेलें वचन पाळणारा. २ दृढनिश्चयी; नेटदार. **करारमदार पु०** आणाभाका; दिलेलीं किं० घेतलेलीं वचनें; ठराव, शर्ती इ० निर्मिलेलीं बंधनें. **करारी वि०** १ मागें न हटणारा; मनांत आणलें तें पार पाडणारा. २ दिलेलें वचन पाळणारा. ३ टिकाऊ (रंग, पदार्थ इ०). ४ ठरावाप्रमाणें केलेला (पदार्थ, काम, इ०).

करारी, कराडी स्त्री० शक्ति, ताकद, हिंमत, अवसान, (**क्रि०** येणें, धरणें, इ०).

कराल [**सं०**] **वि०** १ भयंकर. २ प्रचंड, अचाट मोठा. ३ अवाढव्य. ४ खरबडीत; उंच सखल. ५ दांत पुढें आलेला.

कराल न० तांदूळ, जोंधळे, बाजरी, इ० चें टरफल किं० कोंडा.

कराष्टमी [**म०** करा+अष्टमी] **स्त्री०** गंगोदक भरलेल्या कऱ्यानें देवीची पूजा कुमारिका करतात ज्या तिथीस ती,–म्हणजे आश्विन कृष्ण अष्टमी. हा प्रकार काशीस चालू आहे.

कराळी स्त्री० पेटके (**क्रि०** येणें, चढणें, उतरणें). याचा बहुधा ‘ कराळ्या ’ असा **स्त्री० अ० व०** उपयोग होतो.

करिणा, करिना [**अ०**करीनाह्] **पु०** वादी आणि प्रतिवादी यांणीं पंचाईतदारापाशीं लेखानें किं० तोंडी जबानीनें लिहून दिलेलें आपआपलें म्हणणें किं० निवेदिलेली आपआपली बाजू.

करितां, करतां श० यो० अ० मुळें, साठीं, ०च्या उद्देशानें,प्रीत्यर्थ; उ०तुझ्या करतां हा पेरू मी ठेवला आहे.

करियात, करियाद [**अ०** कर्‌याह्] **स्त्री०** दोन तीन इतर महालांतील कांहीं कांहीं गांव घेऊन लहानसा केलेला जो ज्यादा महाल तो.

करी [**म०**करणें]हा विशेषणाच्या अर्थाचा प्रत्यय असून याचे अनेक अर्थ आहेत. (१) पैका ज्यापाशीं आहे तो पैकेकरी; (२) शेत करतो तो शेतकरी; कथा करणें हा ज्याचा व्यवसाय तो कथेकरी;ऋण देतो किं० घेतो तो ऋणकरी; देणारा

जो तो देणेंकरी; घेणारा जो तो घेणेंकरी; (३) त्याच गांवचा जो रहिवासी तो गांवकरी; (४) घर ह्म० कुटुंब चालवितो तो घरकरी; (६) भाडें देऊन जो दुसऱ्याच्या घरांत राहतो तो भाडेकरी; (५) ठराविक वारीं जो दुसऱ्याच्या घरीं जेवावयाला जातो तो वारकरी; (६) क्षेत्राला नियमानें वाऱ्या करतो तो वारकरी; भिक्षेवर गुजराण करतो तो भिक्षेकरी; इ०, इ०.

करी [सं०] **पु०** हत्ती. ꙮ **करींद्र पु०** श्रेष्ठ हत्ती; उत्तम हत्ती. **करिशावक पु०** हत्तीचा छावा. **करिबल न०** हत्तीवर बसून लढण्याऱ्यांची तुकडी (सैन्याची).

करीर [सं०] **पु०, न०** १ कोंब. २ बांबूचा कोंब. **पु०** १ करावीं; नेवती. २ पोकळ वेळू.

करीव श० यो० अ० मागें 'करवीं' पहा.

करुण [सं०] **वि०** १ दयार्द्र; दयाळू. २ हृदय-द्रावक. **पु०** करुणरस.

करुणा [सं०] **स्त्री०** परदुःख पाहून अंतःकरणास येतो तो द्रव; दया. ꙮ **करुणाविमुख वि०** कठोर अंतःकरणाचा; निष्ठुर. **एकाद्याची करुणा भाकणें** आपली विपन्न स्थिति त्याला कळवून त्याच्या अंतःकरणांत दया उत्पन्न करणें; दीनपणें त्याची विनवणी करणें. **करुणाकीर्तन न०** १ आपली दीन स्थिति निवेदणें किं० निवेदून विनविणें. **करुणारस पु०** करुण रस. **करुणास्वर पु०** दुसऱ्याच्या मनांत आपल्याविषयीं दया उत्पन्न होईल अशा तऱ्हेचा स्वर किं० बोलण्याची सरणी.

करून अव्यय० च्या योगानें; ०च्या मुळें; ०च्या साधनानें किं० द्वारानें; उ० तेणें करून, येणें करून, जेणें करून, इ०.

करेणु [सं०] **पु०** हत्ती. **स्त्री०** हत्तीण.

करेल वि० आंब्याची एक जात.

करेला पु० तालमींतील एक हत्यार किं० साधन; दोन्ही हातांनीं फिरवावयाचा मुद्गर किं० मुद्गल.

करोट [सं० करोटी=डोक्याची करटी] **न०** करटी (डोक्याची). ꙮ **एकाद्याचें करोट होणें** तो मरणें.

करोटी [सं० करोटी=डोक्याची करटी] **स्त्री०** १ डोक्याची करटी. २ नारळाची करवंटी. ꙮ **करोटी हातांत घेणें** भीक मागणें.

करोड वि० कोटि (संख्याविशेष); शंभर लक्ष.

करोडा पु० १ जकाती वसूल करणारा अधिकारी. ꙮ **करोडगिरी स्त्री०** करोडा नांवाच्या अधिकाऱ्याचा हुद्दा किं० त्याचें कार्यक्षेत्र.

करोल स्त्री० बंदुकीनें लढणारा घोडेस्वार.

करोला स्त्री० १ बंदुकीनें लढणारा जो घोडे-स्वार त्याचें काम, हुद्दा, किं० धंदा. २ बंदुकीचा मारा.

करोळा पु० कुंभाराच्या भट्टींतील अर्धवट [जळालेलें गवत.

कर्क [सं०] **पु०** १ खेकडा. २ (**ज्यो०**) चवथी ह्म० कर्क रास.

कर्कट [सं०] **पु०** १ खेकडा. २ (**ज्यो०**) चवथी म्ह० कर्क रास. ३ कमलकंद. ४ कांटा. ५ (**गणित**) त्रिज्या. ६ वर्तुळ काढण्याचें हत्यार किं० साधन.

कर्कटक [सं०] **पु०** १ खेकडा. २ आंकडा. ३ चोरांचें एक यंत्र किं० हत्यार.

कर्कश [सं०] **वि०** १ राठ, कठिण, टणक. २ निष्ठुर, कडक, क्रूर. ३ साहसी. ४ जोरदार. ५ कानाला कठोर वाटणारा आवाज. ६ उपद्रवी किं० द्वाड.

कर्कशा [सं०] **स्त्री०** १ भांडखोर किं० कजाग स्त्री. २ कठोर उच्चार किं० बोलणें जिचें अशी स्त्री.

कर्काटक न० वर्तुळ रेखावयाचें साधनविशेष.

कर्कोटक [सं०] **पु०** १ कद्रूपुत्र एक नाग. दवाग्नींतून नळराजानें त्याला बचावलें म्हणून प्रत्यु-पकार करण्यासाठीं ह्या नागानें नळाला दंश करून त्याचें रूप पालटलें, अशासाठीं कीं त्याला कोणी वनवासांत ओळखूं नये आणि त्याला कलीची पीडा होऊं नये. २ कऱ्हाडा ब्राह्मण. ३ दुष्ट आणि दीर्घ-द्वेषी माणूस.

कर्कोटकी, कर्कोटी स्त्री० कोहळा (एक फळ).

कर्चूर [सं०] **पु०** काचरी; आंबेहळद. **न०** हरताळ.

कर्चूरक [सं०] **पु०** १ कचरकंद. २ हळद.

कर्ज [अ०] **न०** ऋण; व्याजानें किं० विन व्याजानें दुसऱ्याचे घेतलेले पैसे (तारण ठेवून किं० तारणाशिवाय). ꙮ **मी त्याचे चारशें रुपये कर्ज लागतों** मी त्याचे चारशें रुपये कर्ज देणें आहे.

एकाद्याला डोईवरून पाणी जाई इतकें कर्ज असणें तो कर्जाच्या ओझ्याखालीं चिरडून गेलेला असणें किं० बेजार झालेला असणें. **कर्जअमदान** [फा०] **न०** यावयाचें किं० वसूल झालेलें कर्ज (जमाखर्चाच्या चोपडींतील जमेच्या रकमांच्या तपशीलाचा एक रकाना कर्ज अमदानचा असतो). **कर्जकरी पु०** १ दुसऱ्यापासून कर्ज काढणारा. २ दुसऱ्याला कर्जाऊ पैसे देणारा. ३ कर्ज वसूल करावयास पाठविलेला गडी, शिपायी, इ०. **कर्जखत न०** कर्जरोखा; ज्याचेपासून आपण कर्ज काढलें आहे त्याला आपल्या नांवाचा तितक्या रकमेचा पथकरलेल्या शर्तींचा लिहून दिलेला कागद. **कर्जदादन** जमाखर्चाच्या चोपडींत खर्चाच्या बाजूस आपण फेडलेल्या कर्जाच्या रकमांचा रकाना (वर ' कर्ज अमदान ' पहा).**कर्जदार पु०**कर्ज ज्यानें काढलें तो.२ कर्जाऊ रकम ज्यानें दिली तो. **कर्जपाणी न०** कर्जे, उधार आणलेल्या सामानाबदलचे पैसे, इ०; **उ०** मी आपला घोडा पांचशे रुपायांना विकला; आलेल्या पैशांतून कर्जपाणी वारून आतां साठ रुपये मजजवळ शिल्लक राहिलेले आहेत. **कर्जबाजारी वि०** ज्यास पुष्कळांचें देणें आहे असा;जो कर्जाखालीं बेजार झाला आहे तो. **कर्जंभरी वि०** ज्याला फार कर्जे आहेत असा. **कर्जरोखा पु०** घेतलेल्या कर्जाबद्दल लिहून दिलेला कागद; कर्जाबद्दल दिलेला दस्तऐवज. **कर्जवाम न०** कर्ज;लोकांचें देणें;कर्जेबिजें. **कर्जाऊ वि०**कर्जाच्या रूपाचा;व्याजाच्या बोलीनें घेतलेला. **कर्जी वि०**व्याजानें दिलेले किं० घेतलेले (पैसे).

कर्ण [**सं०**] **पु०** १ कान; श्रवणेंद्रिय; शब्दाचें ग्रहण करणारें इंद्रिय. २ होडीचें किं० गलबताचें सुकाणूं. ३ भांड्याची मूठ. ४ काटकोन त्रिकोणाच्या काटकोनासमोरची बाजू. ५ कोपरा. ६ दीर्घ स्वर (छंदःशास्त्रांत). ७ अंगदेशाचा राजा; भारती युद्धांत हा दुर्योधनाच्या बाजूनें पांडवांविरुद्ध लढत होता;तो अर्जुनाकडून मारला गेला;तो अति उदार होता.꙳ **कर्णाचा अवतार** अति उदार माणूस. **कर्णोपकर्णिका स्त्री०** गप्प; ऐकीव बातमी. **कर्णजप, कर्णेजप पु०** १ वर्दी देणारा हेर. २ निंदक. **कर्णधर, कर्णधार पु०** सुकाणूवाला. **कर्णपथ पु०**ऐकण्याचा टप्पा; उ० ही गोष्ट कधीं माझ्या कर्णपथावर आलेली नव्हती ह्म०मी तीं ऐकिली नव्हती. **कर्णपरंपरा स्त्री०** दंतकथा. **कर्णपिशाच पु०** गुप्तपणें बातम्या सांगणारें भूत.**कर्णपिशाची पु०** भविष्यें सांगणारा. **कर्णपूर पु०** १ कर्णभूषण. २ निळें कमळ.**कर्णमूळ न०** कानशील. **कर्णविष न०** निंदा; चहाडी. **कर्णाचा पाहरा पु०** सूर्योदयापासून तीन तासांचा पाहरा. **कर्णारूढ** कानावर आलेली (बातमी). **कर्णोपकर्णी क्रि० वि०** उडत उडत (बातमी येणें).

कर्णक [**सं०**] **पु०** सन्निपातभेद.

कर्णाट पु० देशविशेष. ꙳ **कर्णाटकलह पु०** खोटें भांडण.

कर्णाटी स्त्री० रागिणीविशेष.

कर्णिक [**सं०**] **पु०** सुकाणूवाला.

कर्णिका [**सं०**] **स्त्री०** १ मधलें बोट. २ फळाचा देठ. ३ कमळाचा मध्यभाग.

कर्णीरथ [**सं०**] **पु०** बुरख्याची गाडी.

कर्णी,करणें [**सं०** कृ =करणें] **स्त्री०** गवंड्याचे एक हत्यार किं० साधन.

कर्तन [**सं०** कृत्=कापणें, तोडणें] **न०** १ कापणें, फाडणें, मोडणें. २ कापूस पिंजणें.

कर्तब [**हिं०, सं०** कर्तव्य] **न०** १ गाण्यातील जे डावपेच,–ज्यांचे योगानें गाणें टुमदार दिसतें, ते समुच्चयानें. २ कर्तृत्व; काम करण्याची टापटीप, नेट,धमक. ꙳ **कर्तबगा (–दा–) री स्त्री०** १ गवयाच्या अंगचें कौशल्य. २ धमकदारी; कर्तृत्वाचा पोच; टापटीपीनें आणि नेटानें काम करण्याचें सामर्थ्य.

कर्तरि [**सं०** 'कर्तृ' च्या सप्तमीचें ए०व०] **अ०** कर्त्याचें ठायीं;कर्त्यावर अवलंबून; कर्त्यानें नियंत्रित होऊन. ꙳**कर्तरि प्रयोग पु०** जेथें कर्त्याच्या लिंगवचनांवरून क्रियापदाचें रूप फिरतें तो प्रयोग; उ० रामा चालतो; उ० सदानंद भिंत बांधतो.

कर्तरी, कर्तनी, कर्तरिका [**सं०** कृत्= कापणें] **स्त्री०** एका खिळीनें जोडलेल्या दोन पात्यांत कागद, वस्त्र, इ० कापण्याचें एक साधन; कातरी.

कर्तव्य [**सं०** कृ=करणें+तव्य (प्रत्यय)] **वि०** १ करावयाचें म्हणून योजलेलें किं० ठरविलेलें. २ करावयास योग्य.**न०** जें करणें योग्य आहे

तें; जें केलें पाहिजे तें; अवश्य कर्तव्य. ❀ **कर्तव्य कर्म न०** जें अवश्य केलें पाहिजे तें काम.

कर्ता [**सं०** कर्तृ=करणारा; कृ=करणें] **पु०** १ करणारा; जो करतो तो. २ ईश्वर. ३ कुटुंबाचीं, संस्थेचीं, किं० कांहीं कारभाराचीं सूत्रें जो चालवितो तो; चालक; नियंता;कारभारी. ४ (**व्या०**) एकाद्या क्रियेचा व्यापार ज्याचेपासून निघतो तो त्या क्रियेचा कर्ता; उ० गजानन भगवद्गीता वाचतो; येथें वाचनक्रिया गजाननापासून निघते ह्मणून वाचतो ह्या क्रियापदाचा ' गजानन ' हा कर्ता होय. ५ कुटुंबाचा चरितार्थ जो चालवितो तो. ६ ब्रह्मदेव. ❀ **कर्तापुरुष पु०** कुटुंब किं० संस्था चालविणारा पुरुष. २ कुटुंबासाठीं द्रव्यार्जन करणारा माणूस. **कर्ताहर्ता पु०** १ ईश्वर,—जो सृष्टि करतो आणि जो सृष्टि संहारतो तो.

कर्तुम् [सं० करावयाला; कृ= करणें] **अ०** करावयाला. ❀ **कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् समर्थ वि०** हवें तें करावयाला, जें नको तें न करावयाला, आणि जें केलेलें आहे तें बदलावयाला समर्थ; हें विशेषण देवाच्या संबंधानें किं० अन्यायी, पक्षपाती,क्रूर,कपटी आणि निर्लज्ज अशा अधिकाऱ्याच्या संबंधानें योजलें जातें.

कर्तृक [**सं०** कृ=करणें] **वि०** ०नें केलेलें. ' कर्तृ ' हा शब्द बहुव्रीहि समासांत उत्तर पदीं असतां त्याचें ' कर्तृक ' असें रूप होतें आणि तो ज्या शब्दाचे पुढें लाविला जातो त्याणें केलेलें असा त्या अर्थ होतो; उ० **ईश्वरकर्तृक** ह्य० ईश्वरानें केलेलें (जग).

कर्तृत्व [**सं०** कर्तृ (कर्ता)+त्व (प्रत्यय)] **न०** १ कांहीं काम करण्याची ताकद किं० कुव्वत. २ काम करण्याची किं० पार पाडण्याची लायकी. ३ जें केलें तें; कृति. ४ कारागिरी. ५ कांहीं काम केल्याचें श्रेय.

कर्दनबस्तन [**फा०** कर्दन्=करणें; बस्तन् बांधणें] **न०** १ (दागिने) करणें आणि मोडणें; बांगड्या मोडून गोठ करणें; सरी मोडून वाकी करणें; सल्ले मोडून जोडवें करणें, इ० प्रकारचे फेरफार किं० उलाढाली. २ एक पदार्थ (उ०धान्य) खर्चाच्या बाजूस दाखवून तें दळून आलेलें पीठ जमेच्या बाजूस दाखविणें; कापड खर्ची दाखवून शिवून आलेलें कपडे जमेंत दाखविणें, इ०. ३ मोठें नाणें बदलून त्याच्या किमतीचीं लहान नाणीं घेणें आणि लहान नाणीं बदलून मोठीं नाणीं घेणें; उ० चार चवल्या आणि दोन पावल्या देऊन रुपाया घेणें; उ० रुपाया देऊन चवसष्ट पैसे घेणें, इ०.

कर्दम [**सं०**] **पु०** १ चिखल. २ गाळ. ३ पातक.

कर्दली [**सं०** कदली] **स्त्री०** १ केळ; केळीचें झाड. २ एक प्रकारचें फुलझाड (केळीच्याच वर्गांतील). ह्याला कदली, कदळ, अशींही नांवें आहेत.

कर्पूर [**सं०**] **पु०** कापूर (एक सुगंधी द्रव्य).❀ **कर्पूरगौर वि०** कापरासारखा पांढरा किं० गोरा.

कर्बुर [**सं०**] **वि०** चित्रविचित्र रंगाचा. **पु०** राक्षस. **न०** सोनें.

कर्म [**सं०** कर्मन्] **न०** १ करणें. २ जें केलें तें; कृत्य. ३ कामगिरी. ४ धंदा, व्यवसाय, उद्योग. ५ धार्मिक कृत्य किं० विधि; स्नान, संध्या, यज्ञ, याग, इ० जीं शास्त्रविहित किं० आचारविहित किं० रूढिविहित कृत्यें तीं समुच्चयानें. हीं कृत्यें नित्य, नैमित्तिक आणि काम्य अशीं तीन प्रकारचीं असतात. ६ मेहनत. ७ पूर्वीच्या जन्मीं आपण जीं कृत्यें केलेलीं असतील तीं समुच्चयानें; नशीब; प्रारब्ध. ८ (**व्या०**) एकाद्या क्रियेचा व्यापार कर्त्यापासून निघून ज्या दुसऱ्या पदार्थावर घडतो तें त्या क्रियापदाचें कर्म; जेव्हां क्रियेचें फल कर्त्याच्या व्यतिरिक्त दुसऱ्या पदार्थावर फलित होतें तेव्हां ह्या दुसऱ्या पदार्थाला त्या क्रियेचें कर्म म्हणतात. ❀ **कर्मात्मा पु०** जीवात्मा. **कर्मेन्द्रिय न०** हात, पाय, गुद, उपस्थ आणि वाणी हीं प्रत्येक. **कर्मकर पु०** १ मजूर. २ सेवक. ३ कर्मठ. **कर्मकचाट पु०** पूर्वकर्मानुसार ओढवलेली आपत्ति.**कर्मकटकट, कर्मखटखट स्त्री०** १उपद्रवकारक काम.२त्रासदायक माणूस. **कर्मकथा स्त्री०** १ पेच, पंचाईत (प्रारब्धाचें फळ ह्या दृष्टीनें). २ आत्मश्लाघा.३ घडलेल्या गोष्टीचें खरें निवेदन. **कर्मकहाणी स्त्री०** ' कर्मकथा ' पहा. **कर्मकाण्ड पु०, न०** १ यज्ञादि संबंधाचा वेदभाग. **२** कर्मसमूह. **कर्माचं (–चां–) डाळ पु०** १ अति निंद्य कर्मे करणारा. २ राहु. **कर्मणिप्रयोग पु०**

जेथें कर्माच्या लिंगवचनावरून क्रियापदाचें रूप फिरतें तो प्रयोग; उ० सुतारानें पेट्या केल्या; येथें पेट्या स्त्री० अ० व० आहे म्हणून ' केल्या ' स्त्री० अ०व०आहे. **कर्मदेव पु०** अग्निहोत्रादि कर्मानें झालेले देव. **कर्मधर्मसंयोग पु०** पूर्व जन्मीं केलेलें कर्म(चांगलें किं० वाईट) आणि ह्या जन्मीं केलेला धर्म (शक्त्यनुसार किं० शक्त्यननुसार) ह्या दोहोंची एके समयीं गांठ पडणें; अशी गांठ पडून जें कांहीं घडतें तें कर्मधर्मसंयोगानें घडलें असें म्हणतात. व्यवहारांत 'कर्मधर्मसंयोगानें' ह्याचा अर्थ अकल्पित रीतीनें, अचानक, ध्यानीं मनीं नसतां, असा होतो. विशेष खुलासा आमचें " मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० " ह्या पुस्तकांत पहा. **कर्मधारय पु०** ज्या दोन शब्दांनीं समास घडलेला असतो ते दोन्ही शब्द सामानाधिकरण्यांत ह्म० एकाच विभक्तींत असतात तेव्हां जो समास होतो तो; उ० तांबडमाती, भवसागर, क्रोधाग्नि, इ०. **कर्मपाक पु०** कृत कर्मांचें फळ किं० परिणाम. **कर्मभूमि स्त्री०** १ नांगरलेली जमीन. २ भरतवर्ष. ३ मृत्युलोक. **कर्मयुग न०** कलियुग. **कर्ममार्ग पुं०** स्वर्गप्राप्तीसाठीं यज्ञयागादि कर्मे यथासांग करणें ही वर्तनपद्धति. **कर्मलंड वि०** धार्मिक विधि न पाळणारा. **कर्मवाद पु०** कर्में केल्यानें मोक्ष मिळतो हें मत. **कर्मशील वि०** सर्व कर्में यथासांग आणि यथाविधि करणारा. **कर्महीन** वर 'कर्मलंड' पहा. **कर्मांगदेवता स्त्री०** कांहीं धार्मिक विधि ज्या देवतेस उद्देशून केला जातो ती देवता. **कर्मरंग पु०** कर्मर; नीव. **कर्मशाला स्त्री०** कारखाना. **कर्मशूर वि०** कर्मठ. **कर्मसचिव पु०** मंत्री. **कर्मसाक्षी पु०** १ सूर्य. २ चित्रगुप्त.

कर्यात [अ० कर्याह्] **स्त्री०** आजूबाजूंच्या महालांतील कांहीं गांवें एकत्र करून बनविलेला नवा महाल.

कर्शण [सं० न०] वैद्यकी इलाजांची एक शाखा. (याच्या उलट बृंहण).

कर्ष सं० कृष्=ओढणें] **पु०** ओढणें. **पु०,न०** सोनें, औषधें, इ० वजन करण्याचें एक परिमाण.

कर्षक [**सं०** कृष्=ओढणें]**पु०** १ ओढणारा. २ नांगर चालविणारा. ३ शेतकरी.

कर्षण [**सं०** कृष्=खेचणें] **न०** १ नांगरणें. २ ओढणें, खेचणें. ३ कृश करणें. ४ पीडिणें. ५ शेतकीचीं आउतें(समुच्चयानें). ६ लागवडीची जमीन.

कर्षणी [**सं०**] **स्त्री०** व्यभिचारिणी.

कर्षिणें [**सं०** कृष्=ओढणें] **स० क्रि०** १ ओढणें. २ नांगरणें. ३ पीडिणें.

कर्षित [**सं०** 'कर्षिणें' पहा] **वि०** १ ओढलेलें. २ नांगरलेलें. ३ पीडित. ४ कृश, क्षीण.

कऱ्हा [**सं०** करक=लहान घागर] **पु०** १ लग्नाच्या सोहाळ्यांत ज्या पात्रांत पाणी व त्यांत आंब्याचा टाहाळा घालून त्यावर नारळ ठेविलेला असतो आणि जें पात्र वधूवरांच्या बहिणींच्या हातांत घेतलेलें असतें तें पात्र (क्रि० घेणें). २ तोटी ज्याला आहे असें मडकें. ३ घागर(सामान्यत:). ꣸ **कऱ्हादिवा पु०** प्रथमार्थाचा कऱ्हा धारण करणाऱ्या मुलीच्या शेजारीं तिची बहीण किं० दुसरी कोणी मुलगी हातांत जो लामणदिवा घेऊन उभी असते तो. **कऱ्हयादिव्याचा मान पु०** कऱ्हा धारण करणाऱ्या स्त्रीस देतात तें लुगडें, खण, इ०.

कऱ्हाट पु० कडू आणि जंगली भोपळा किं० [काकडी.

कऱ्हाडा पु० ब्राह्मणांतील एक जात किं० त्या जातीचा ब्राम्हण.

कऱ्हया पु० एक प्रकारचा दगड.

कल [**सं०** कल्=प्रेरणा करणें] **पु०** १ अस्पष्ट आणि मधुर स्वर; मंजुळ शब्द. २ सूर. ३ मनाची प्रवणता; प्रवृत्ति. ४ रोख, झोक, वळण. ५ आजारांत उतार किं० कमीपणा; **क्रि०** खाणें; उ० तापानें कल खाल्ला. **वि०** अस्पष्ट आणि मधुर. ꣸ **कल पाहून वागणें** वरिष्ठाची मर्जी पाहून आपलें वर्तन ठेवणें.

कलई, कल्हई स्त्री० पितळ, तांबें, इ० धातूंच्या भांड्यांत पदार्थ कळकूं नये म्हणून त्याचेवर चढविलेला कथलाचा थर. ꣸ **कलईकर, कलईगर पु०** भांड्यांना कल्हई लावून देणारा धंदेवाला कारागीर.

कलंक [**सं०**] **पु०** १ डाग. २ खूण. ३ लांच्छन; बट्टा; कमीपणा आणणारी गोष्ट; बेआब्रूची बाबत. ४ दोष. ५ धातूंच्या भांड्यांवर येतो तो गंज किं० येते ती तांब.

कलकल [**सं०** कलकल=गोंगाट] **पु०, स्त्री०**

१ किलबिलाट, गोंगाट (माणसांचा, पक्ष्यांचा, इ०). २ भणभणणें, व्यथित होणें. ३ लकलक, भग-भग; उ० माझ्या डोक्यांत कलकल होत आहे; उ० ह्या विस्तवाची (किं० उन्हाची) कलकल माझ्या डोळ्यांना सोसत नाहीं; उ० ऊन्ह भारी कलकल करतें.

कलकलणें अ० क्रि० कलकलाटामुळें किं० पित्तक्षोभामुळें (मस्तक) भणभणणें, व्यथित होणें, किं० त्रस्त होणें.

कलकलाट पु० गोंगाट, किलबिलाट; किल-बिल. (**कलकल** याहून हा शब्द अधिक जोरदार आहे); उ० चिमण्यांनीं (किं० पोरांनीं) मघापा-सून येथें भारी कलकलाट चालविला आहे.

कलंकित [सं०] १ डाग, कालिमा, लांच्छन, इ० असलेलें; मलिन. २ भ्रष्ट, अपवित्र. ३ बदू झालेलें.

कलंकी [सं० कल्कि किं० कल्किन्=विष्णूचा दहावा अवतार] **पु०** विष्णूचें दशावतारांतील नांव; विष्णूचा दहावा अवतार.

कलखापरी स्त्री० एक औषधी.

कलंगडा पु० संगीतांतील एक राग.

कलगी, कलंगी [तुर्की] स्त्री० पागोट्यावर बांधावयाचें एक रत्नखचित भूषण. २ पिसें इ० चा तुरा,– घोड्याच्या डोक्यावर भूषणार्थ बांधतात तो. ३ पुरुषाची आर्जवें स्त्री करीत आहे अशा मजकुराची लावणी. ४ एक झाड. ॐ**कलगीवाला पु०** कलगी जातीच्या लावण्या करणारा किं० म्हणून दाखविणारा शाहीर.

कलच पु० अंगावर बसलेला मळाचा थर; उ० नाऱ्या, जा आतांच्या आतां आणि अंगावर बस-लेला हा कलच धुवून टाक.

कलछा पु० एक प्रकारचें उलथनें.

कलंडणें [म० कलणें] **अ० क्रि०** पदार्थाला धक्का लागल्यामुळें किं० आधार ढासळल्यामुळें तो पदार्थ एका बाजूवर वळणें; लवंडणें; मनुष्याचा तोल गेल्यामुळें तो एका बाजूवर वळणें. **स० क्रि०** एका बाजूवर वळविणें.

कलंडा [म० कलंडणें] **वि०** एका बाजूस वळलेला किं० कललेला.

कलंडी [म० कलंडणें] **स्त्री०** पदार्थाला एका बाजूवर वळण्यासाठीं दिलेला धक्का किं० लाविलेला नेट (क्रि० देणें).

कलणें [सं० कल्=ढकलणें, प्रेरिणें] **अ० क्रि०** १ वळणें, एका बाजूवर झुकणें. २ अपकर्ष, ऱ्हास, किं० उतरती कळा लागणें. ३ एकाद्या विशिष्ट पदार्थाकडे किं० माणसाकडे मनाची प्रवणता किं० ओढ असणें.

कलता [म० कलणें] **वि०** वळलेला; झुक-लेला; उतरता; ऱ्हासास लागलेला; उ० कलता दिवस, कलतें वय, कलता काळ, इ०.

कलत्र [सं०] न० १ पत्नी. २ स्त्री.

कलथणें स० क्रि० एका बाजूवर वळविणें किं० फिरविणें. **अ० क्रि०** एका बाजूवर वळणें किंवा फिरणें.

कलथा पु० तव्यावरील भाकरी, थालीपीठ, इ० खाद्यें परतण्याचें किं० सोडवून काढण्याचें एक आउत किं० साधन; उलथनें.

कलथा वि० एका बाजूवर वळलेला; उ० तें चुन्याचें पातेलें जरा कलथें कर म्हणजे चिंधीनें पाणी थेंबा थेंबानें गळूं लागेल. [ठोसा.

कलथी स्त्री० १ एका बाजूला वळणें. २ धक्का,

कलंदर, कलिंदर पु० एक जंगली जनावर; त्याला ऊद, कांडेचोर, काळमांजर, कानदेर, अशीं दुसरीं नांवें आहेत.

कलंदर, कलिंदर [हिं० कलंदर] **पु०** १ योगी. २ व्यसनी; छांदिष्ट आणि घाणेरडा; भटक्या मारणारा; पिसाट माणूस. ३ सुंदर आणि तल्लख माणूस.

कलंदरा, कलंद्रा [हिं०] पु० १ गर्भरेशमी वस्त्र. २ तंबूच्या रक्षणार्थ बाहेर लाविलेली जाड कनाथ.

कलना [सं०] स्त्री० १ धरणें, पकडणें. २ करणें, घडविणें, अस्तित्वांत आणणें. ३ नियं-त्रणा. ४ जाणणें, जाणीव, भावना. ५ धारण करणें, लेणें.

कलप (–फ) पु० १ काळे केश पांढरे कर-णारा एक औषधी पदार्थ किं० त्याचा लेप. २ परीट वस्त्रांस जी खळ लावतो ती.

कलपणें अ० क्रि० दु:खानें वळवळणें; वेदनेनें धडपडणें.

कलबी, कलंबी, कळंबी स्त्री० गलबताचें अगदीं पाठीमागचें शीड.

कलबूत (–द), कलभूत (–द) [फा० कालबद्] **पु०** १ पगडी किं० पागोटें ज्यावर बांधलें जातें किं० आकारलें जातें तो ठोकळा किं० लाकडाचा गुडवा. २ जोड्याला विशिष्ट आकार द्यावयाचा चांभाराचा ठोकळा (लाकडी किं० लोखंडी). ३ कमान बांधतांना जो मातीचा किंवा लांकडाचा रचनाविशेष आधार देण्यासाठीं करतात तो. ४ छत्रीचा करंडा (पातीच्या छत्रीचा कातीव पोकळ दांडा,-ज्यामध्यें पाहिजे तेव्हां दुसरा लांब दांडा भरतां येतो). ५ पश्वादिकांचा सांगाडा. ६ कोणताही पदार्थ बनवितांना त्याला विशिष्ट आकार देण्याचें जें साधन करतात तें. ७ लठ्ठ आणि बोजड माणूस, जनावर, दागिना, किं० दुसरा कोणताही पदार्थ.

कलभ [सं०] पु० १ हत्तीचा छावा. २ तीस वर्षांचा हत्ती. ३ पशुबालक.

कलभा पु० बाचाबाची; भांडण; कलकलाट. (**क्रि०** लावणें, मांडणें, करणें, माजविणें, इ०).

कलभांड [सं० कलह+**म०** भांडणें] **वि०** भांडखोर; कज्जेदलाल.

कलभांड न० गोसाव्यांचा एक पंथ किं० त्या पंथाचा गोसावी.

कलम [अ० कलम्] **न०** १ एकाद्या विषयाचे जे भाग ते प्रत्येक; प्रकरण; बाब. २ दुसरा वृक्ष निर्माण करण्यासाठीं त्याच जातीच्या झाडाची जमीनींत लावतात ती फांदी ३ फळाला कांहीं विशेष स्वाद किं० रुचि येण्यासाठीं एका वृक्षावर जी त्याच जातीच्या वृक्षाची फांदी विशेषप्रकारें बांधून एकजीव करतात ती. ४ चितान्याची किं० रंगान्याची कुंचली. ५ लेखणी. ६ शिक्षा म्हणून हात, पाय, कान, नाक, इ० छाटून टाकणें. ७ झाडांच्या नकोत त्या फांद्या कापून टाकणें. **पु०, स्त्री०** मूर्च्छा, घेरी. ॐ **कलमकसाई, पु०** कारकून, लेखक (करडे हुकूम लिहिणारा किं० सोडणारा). २आपल्या लेखांनीं लोकांची नालस्ती, बदनामी किं० अेआबू करतो तो. ३ वरिष्ठाच्या नजरेस न येऊं देतां आपल्या बगलबच्चांना किं० आपणास लाच देणान्या इसमांना सोयीच्या ठिकाणीं नेमणारा, शत्रूंना वाईट ठिकाणीं नेमणारा, वाकडी तिकडी हकीगत रचून किं० बनवून आपल्या वरिष्ठाला सांगून आपल्या शत्रूंची बढती थांबविणारा कारकून. **कलमजारी स्त्री०** पटावर किं० यादींत दाखल करणें. **कलमतराश (–स) पु०** करडा आणि हुशार कारकून. **कलमदान न०, कलमदानी स्त्री०** १ लेखण्या, दवती, वाळू, चाकू, इ० लेखनसाधनें ठेवण्याचें लाकडाचें किं० धातूचें केलेलें बारदान किं० पेटी. २चौकोनी तबकाच्या आकाराचें लाकडी छत. **कलमबंदी स्त्री०** १ कलमवार लिहिणें; वेगवेगळ्या बाबी वेगवेगळीं प्रकरणें पाडून स्पष्टपणें ज्यांत लिहून काढल्या आहेत असा लेख किं० असें लिखाण. २ याद्यांत किं० पटावर नोंदणें. **कलमवार क्रि० वि०** कलमांच्या अनुक्रमानें; वेगळीं वेगळीं कलमें पाडून. **कलमसफाई स्त्री०** सुंदर अक्षर लिहिणें किं० सुंदर अक्षर लिहिण्याचें कौशल्य किं० कला. **कलमी वि०** १ कलमवारीनें लिहिलेलें. २ विश्वसनीय म्हणून घ्यावयाला हरकत नाहीं असें; दस्तऐवजी; लेखानें सप्रमाण ठरलेली (बातमी); (उडत उडत कानावर आलेली ह्याच्या उलट). ३ ज्याचेवर कलम केलें आहे असें (झाड). ४ उत्तम झाडाच्या कलमापासून झालेला (आंबा, इ०). **कलमी दालचिनी स्त्री०** तीव्र वास आणि चव जिला असते अशी एका जातीची दालचिनी.

कलमल स्त्री० १ अतिशय थकवा; गळाठा. २ अस्वस्थता. ३ मळमळ.

कलमलणें अ० क्रि० १ अति थकणें, गळाठणें. २ अस्वस्थ होणें. ३ मळमळणें.

कलवंडणें अ० क्रि० १ मोठमोठ्यानें आणि तावातावानें भांडणें; हुज्जत करणें. २ गमतीनें किं० रागानें एकमेकांच्या अंगावर चढणें (मांजरें, कुतरीं, इ० करतात तसें).

कलश [सं०] पु० १घडा, गडवा, कळशी. २देवळाचा कळस.

कलह [सं०] पु० १ भांडण. २ युद्ध. ३ मारामारी. ॐ**–प्रिय पु०** नारद.

कलहंस [सं०] पु० १ पीत हंस; राजहंस. २ बदक. ३ परब्रह्म.

कला [सं०] स्त्री० १ अंश, भाग. २सोळावा भाग. ३ चंद्राची कला. ४ (**ज्यो०**) राशीचा

एक अठराशेवा भाग. ५ शिल्प, नृत्य, गीत, इ० व्यवसाय किं० करमणुकी. ६ कौशल्य. ७ कपट. ८ युक्ति, हिकमत. ९ गूढ युक्ति किं० खुबी. १० अत्यंत सूक्ष्म भाग. ११ तजेला, चटकदारी, देखावा; उ० तुझ्या तोंडावर थेडाची कळा आली आहे; आंघोळ करून ये. १२ स्वच्छता, नीटनेटकेपणा; टापटीप; उ० घराची कळा अंगण सांगतें (म्ह० बाहेरच्या व्यवस्थेवरून आंतली व्यवस्था आजमावितां येते). ॐकलांतर न० व्याज, नफा. **कलावंत** १ कांहीं कला जाणणारा. २ गवई. ३ पखवाज किं० सारंगी वाजविण्याचा धंदा करणारा. **कलावंतीण, कळवंतीण** स्त्री० नाचण्याचा धंदा करणारी पोरगी. **कलाधर, कलानिधि** पु० चंद्र.

कलागत स्त्री० १ तंटा, भांडण. २ कुरापत.

कलांट न० द्वाड, उपद्रवी आणि त्रासदायक माणूस.

[पहा.

कलांडणें, कलांडा मागें' कलंडणें, "कलांडा'

कलाप [सं०] पु० १ मोराचा पिसारा. २ समुदाय, समूह. ३ कळप (पशु पक्ष्यादिकांचा). ४झुबका (पुष्पादिकांचा). ५ एकाच वृत्तांत रचलेलें काव्य. ६ हत्तीच्या गळ्याचा दोर. ॐ **कलापवृत्त** पु० कुळीथ.

कलाफ [सं० कल्प] पु० शंका; भीति; कचर.

कलाबतू [हिं०] पु० रेशमाच्या धाग्याभोंवतीं चांदीचा तंतु गुंडाळून तयार करतात जो तंतु तो.

कलाय [सं०] पु० वाटाणा.

कलाल [सं० कल्यपाल=कलाल] पु० दारू गाळण्याचा किं० विकण्याचा धंदा करणारा.

कलाली [वर ' कलाल ' पहा] स्त्री० १ कलालाचें दुकान. २ कलालाच्या दुकानावरचा कर.

कलाली स्त्री० कपटी, मतलबी.

कलावत [हिं०] पु० एक प्रकारचें गाणें.

कलावा [हिं०] पु० हत्तीवर चढतांना जींत पाय ठेवला जातो ती रिकीबी किं० पाहिरी. २ एका बाजूस वळणें किं० वळविणें (घोडा, इ०). ३ फिरवून आणणें (घोडा, इ० ना). ४ फेऱ्या किं० फेरफटका करणें; उ० रामा शेताकडे कलावा द्यावयाला गेला आहे.

कलावा पु० १ कुरणांत चरावयाला सोडलेल्या घोड्याच्या दोन पायांना खोटीशीं अडचण करावयासाठीं बांधलेली दोरी. २ अशा दोरीनें घोड्याच्या पायांना केलेलें बंधन; उ० गोविंदा, घोड्याला कलावा घाल म्हणजे तो पळून जाणार नाहीं.

कलि [सं०] पु० १ भांडण, कलह. २ युद्ध. ३ कृत, त्रेता, द्वापार आणि कलि, अशीं जीं चार युगें त्यांतील चवथें. ॐ**एकाद्याच्या अंगांत कलि संचरणें** त्याची भांडण करण्याकडे प्रवृत्ति होणें; तो भांडूं लागणें. **कलिकार** पु० नारद. **कलिद्रुम** पु० १ बेहेडा. २ बिब्बा. **कलिप्रिय** पु० १ नारद. २ माकड. **कलिकाल** पु० कलियुगाचा अवधि. **कलिपुरुष** पु० दुष्ट माणूस. **कलिमाहात्म्य** न० कलियुगाचा प्रभाव. **कलियुगाचा ब्रह्मदेव** पु० कल्पक रचणारा किं० शिल्पकार. **कलीचा पाहारा** पु० अतिशय दुष्टपणाचें किं० बेकायदा कृत्य किं० असलें कृत्य जींत केलें जातें अशी रियासत.

कलिका [सं०] स्त्री० १ कळी (झाडाला येते ती). २ वीण्याची खुंटी.

कलिंगड [सं० कालिंग किं० कालिंग=कलिंगड] न० १ टरबूज. २ टरबुजाचें झाड.

कलिंगडी [सं० कलिंग किं० ' कालिंग'= कलिंगड] स्त्री० कलिंगडाचें झाड. ह्याला कलिंगण असें दुसरें नांव आहे.

कलिंदर पु० एक मांजरासारखा प्राणी,– उद, कांडेचोर, काळमांजर, कानेदर, अशींही नांवें ह्या प्राण्याला आहेत.

कलिंदर [हिं०] पु० १ मुसलमान भिक्षेकऱ्यांचा एक पंथ. २ विषयी, स्त्रीलंपट. ३ सुंदर आणि तरतरीत छाकटा. ४ बदफैली माणूस.

कलिंदरा [हिं०] वि० १ प्रथमार्थीं जो कलिंदर त्याचासारखा म्ह० गलिच्छ किं० ओंगळ. २ विषयासक्त; स्त्रियांच्या पाठीस लागलेला.

कलिंदरा पु० गर्भांत रेशमाचे धागे असलेलें कापसाचें एक प्रकारचें वस्त्र.

कलिदा [हिं० कलीजाह्=काळीज] पु० प्रिय माणूस; आवडीचा माणूस; लाडका इसम. ॐ**जिवाचा कलिदा** पु० अत्यंत प्रिय माणूस.

कलुली, कलोली, कुलुली [सं० कल्लोल= आनंद] स्त्री० १घोड्याच्या अंगांत आलेली मस्ती,–

जी आली असतां तो उडया मारणें इ०चेष्टा करतो. २ उसळी, (गाण्याची, वागडण्याची,इ०ची). ३ संभोगेच्छेची अनिवार लहर. ४ तंबाकू खाण्याची, दारू पिण्याची, किं० गांजा ओढण्याची तलफ.

कलुष [सं०] **वि०**१ मलिन, गढूळ. २ दुष्ट, निंद्य. **न०** १ गाळ. २ पाप.

कलुषित [सं०] **वि०** १ गढूळ झालेलें किं० केलेलें. २ विटाळलेलें, अपवित्र झालेलें. ३ एकाद्या पदार्थासंबंधानें किं० विशेषतः माणसा-संबंधानें सकारण किं० निष्कारण प्रतिकूळ ग्रह झाला आहे ज्याचा असें (मन).

कलेप, कलफ पु० केश पांढरे झाले आहेत ते काळे करण्यासाठीं विलासी आणि रंगेल पुरुष लावितात तो रंग.

कलेवर [सं०] **न०** १ मनुष्याचा किं० इतर प्राण्याचा देह,—विशेषतः तुच्छतेनें२मनुष्यप्राण्याचा देह (आत्म्याशीं भिन्नत्व दाखवितांना).

कलोड पु० वाळलेल्या गोवऱ्यांची रास (सर्व बाजूंनीं ती लिंपून काढलेली असो किं० नसो). २ गोवऱ्यांना पावसाचा उपद्रव होऊं नये म्हणून बंदिस्त केलेली जागा. ३ लाकडें, गोवऱ्या, शेणी, सर्पण, कडबा, इ० चीं रास. ꣸ **एकाद्याचें कलोड बसणें** तो वृद्धावस्थेस किं० जीर्णावस्थेस लागणें, त्याला वृद्धावस्था किं० जीर्णावस्था येणें.

कल्क [सं०] **पु०** १ जलयुक्त वाटून किं० खलून बारीक केलेलें औषध.२ तूप,इ० चा गाळ.३ मातीचा गाळ; मळ. ४ कोणताही वाटलेला पदार्थ. ५ चूर्ण. ६ कर्णमळ. ७ शरीरमळ (घाम, शेंबूड, विष्ठा, इ०). ८ दोष, पाप.

कल्की [सं०]**पु०** विष्णूचा दहावा अवतार,—जो यापुढें व्हावयाचा आहे आणि ज्यांत तो सर्व जगाचा नाश करणार आहे.

कल्प [सं०] **पु०** १ ब्रह्मदेवाचा एक दिवस (४३२ कोटी सौर वर्षे; कल्पांत १४ मनु). २ रचना.३ शास्त्रनियम. ४ पद्धति, विधि. ५ युक्ति, योजना, सूचना,निश्चय. ६ प्रकार, पक्ष. ७ धर्म-विधि सांगणारें वेदांग. ८ उद्देश. ९ कल्प ह्या नांवाचा स्वर्गांतील एक वृक्ष. १० रोगचिकित्सा. ११ प्रलय.꣸ **कल्पान्त पु०**१प्रलय.२ मोठा अनर्थ. ३ परमावधीचें दुःख. ४ तीव्र क्षोभ. ५ भुकेनें, तृषेनें,उन्हानें,विरहानें,दुःखानें,किं०,रोगानें,उत्पन्न झालेली असह्य स्थिति.**कल्पान्तकाळ पु०**१कल्पाचा अंत होण्याचा समय. २ कल्पाचा अवधि. ३ अत्यंत उग्र,भयंकर, आणि क्रूर माणूस.**कल्पांतरीं, कल्पांतीं क्रि० वि०** कधींही (अकरणरूपांत प्रयोग); उ० ही गोष्ट तुला कल्पान्तरींही करतां यावयाची नाहीं. **कल्पतरु पु०** पांच जे स्वर्गां-तील वृक्ष त्यांपैकीं एक; मंदार, परिजातक,संतान, कल्प, हरिचंदन,हे ते पांच वृक्ष. **कल्पलता स्त्री०** एक स्वर्गीय लता (इच्छित वस्तु देणारी).

कल्प [सं०] **वि०** १ शक्य. २ योग्य, न्याय्य. ३ दृढ, सशक्त, समर्थ.

कल्प [सं०] **वि०** नामें आणि विशेषणें यांना लागणारा एक प्रत्यय ; त्याचा अर्थ "बहु-तेक तोच किं० तितकाच," "बहुतेक त्याच्याच सारखा" असा होतो; उ० कुमारकल्प म्ह० बहु-तेक कुमाराच्या तोडीचा; मृतकल्प म्ह० मेल्या-सारखाच, ज्याच्या नाड्या अगदीं आखडल्या आहेत असा; इ०.

कल्पक [सं० क्लृप्=समर्थ होणें किं० करणें] **वि०** १ योजना करण्यांत पटाईत. २ युक्त्या करूं शकणारा. ३ चतुर. **पु०** न्हावी.

कल्पना [सं० 'कल्पक' पहा] **स्त्री०** १ विचार, बेत, योजना. २ युक्ति, खुबी, हिकमत. ३ तर्क. ४ शोध. ५ शंका; आभास. ६ हत्ती सजविणें. ७ मनामध्यें रचना किं० योजना कर-ण्याची शक्ति. ८ समजूत, ग्रह. ९ मांडणी. १० इंद्रियगोचर नसलेली वस्तु मनानें जाणण्याची किं० कल्पिण्याची शक्ति. ꣸ **कल्पनारूप वि०** कल्पित. **कल्पनासृष्टि स्त्री०** कल्पनेनें निर्मिलेली सृष्टि.

कल्पिणें [सं०क्लृप्=रचणें, योजणें] **स० क्रि०** १ मनांत आणणें. २ योजणें. ३ अस्तित्वांत नाहीं तें गृहीत धेणें. ४ युक्तीनें शोधून काढणें. ५ एका पदार्थावर दुसऱ्याचा आरोप करणें.

कल्पित [सं० 'कल्पिणें' पहा] **वि०** १ कल्पनेनें ठरविलेलें. २ अविद्यमान. ३ खरें नस-लेलें पण खरेंसें वाटणारें; इतिहासादिकांच्या आधा-रावर न उभारलेलें.

कल्मष [सं०] **वि०** १ पापी. २ घाणेरडें. **न०** १ डाग. २ घाण. ३ पाप.

कल्या [सं० कुल्या=पाट] स्त्री० 'कुल्या' ह्याचें हें अपभ्रष्ट रूप; खालीं 'कुल्या' पहा.

कल्याण [सं०] वि० १ सुखी; दैवी. २ सुंदर, उत्कृष्ट. ३ शुभ, मंगल. न० १ सत्कर्म, पुण्य. २ सुख, मंगल. ३ वैभव. पु० (संगीतांत) रागविशेष. [सातवें करण.

कल्याणी [सं०] स्त्री० १ (ज्योतिष)

कल्ला [हिं०] पु० १ चेहरा भरदार दिसावा म्हणून गालांवर जो केशांचा झुबका ठेवितात तो. २ आरडाओरडा; कलकलाट.

कल्लोल, कल्लोळ, कल्होळ [सं० कल्लोल] पु० १ मोठी लाट. २ अग्निज्वाळांचा लोट. ३ कलकलाट, आरडा ओरडा; अनेक प्रकारच्या आवाजांचें झालेलें मिश्रण.

कल्हई स्त्री०, **कल्हें** न० १ तांब्याच्या आणि पितळेच्या भांड्यांत पदार्थ कळकूं नये म्हणून जो त्यांचेवर कथलाचा थर चढवितात तो. २ पुरणाच्या पोळींत पुरण अगदीं थोडें घालून पोळी लाटलेली असल्यास त्या पुरणाच्या थराला कल्हई असें विनोदांत म्हणतात. ३ मुलामा (सोन्याचा, चांदीचा, इ०). ॐ **कल्हईकर** पु० कल्हई देण्याचा धंदा करणारा. [पांढरें कमळ.

कल्हार [सं० कल्हार=पांढरें कमळ] न०

कव स्त्री० १ दोन्ही बाहु लांब पसरून त्यांचीं बोटें एकमेकांत गुंतविलीं असतां होणाऱ्या चक्राचा घेर किंवा ह्या घेराचें परिमाण; वेंघ; गवस; पकड; उ० माझ्या कवेंत ह्या झाडाचा बुंधा मावत नाहीं. २ समुद्रांत किं०नदींत मासे पकडावयासाठीं जे खांब पुरलेले असतात त्यांना अडकाविलेलीं जीं जाळीं त्यांनीं बंदिस्त केलेला किं० व्यापिलेला प्रदेश. ३ उघडलेल्या तोंडांचा विस्तार.४ कातरी, अडकित्ता, चिमटा, इ० पूर्ण उघडिलीं असतां त्यांच्या पकडींत धरतां येईल जो अति मोठा पदार्थ (वस्त्र,सुपारी,निखारा इ०)त्या पदार्थांचें परिमाण; उ० ह्या अडकित्याची कव लहान आहे; हा रोठा ह्या अडकित्यानें फोडतां यावयाचा नाहीं. ५ एखाद्या विषयाचें आकलन करण्याची बुद्धीची किं० मनाची ताकद किं० पात्रता; उ० तुमचें तें परब्रम्ह माझ्या कवेंत येत नाहीं; मला दगडाच्या देवाला भजून होतें तें समाधान पुरें आहे.ॐ **संसार, कांहीं कारभार** इ० ना **कव घालणें** त्याला व्यवस्थित रूप देणें, म्ह० बेताल न होऊं देणें; नियमित किं० नियंत्रित करणें; शिस्त लावून देणें.

कवकवीत वि० १ खाद्य पदार्थांत पाण्याचा अंश अधिक झाल्यामुळें बेचव किं० पचपचीत. २ जितकी गोडी पाहिजे आहे किं० अवश्य आहे तितकी ज्यांत नाहीं असा (पदार्थ, फळ, इ०).

कवच [सं०] पु०,न० १ चिलखत, अंगराखा, इ० जें शरीरास आच्छादन करतात तें. २ जन्मजात जें रक्षण करणारें आवरण प्राण्यांच्या शरीरास किं० वृक्षादिकांस असतें तें(झाडांचे काटे, इ०). ३ तोडगा, ताईत. ५ मंत्रांतील 'हुं' हें अक्षर. ॐ **कवच टाकणें** १ सर्पानें कात टाकणें.२ जडलेला शेंदराचा थर सबंधचा सबंध टाकणें (मारुति, म्हसोबा, वगैरे देवांच्या मूर्तीनें). ३ आजारीपणामुळें ज्यानें बहुत दिवसांत स्नान केलें नाहीं त्यानें हजामत करवून अंगाला तेलें, साबण इ० लावून मळाचा थर काढून टाकून स्वच्छ आणि तजेलदार होणें. **कवचकुइरी, कवचकुहिरी** (–ली) स्त्री० एक वनस्पती. **कवचबीज** न० एक औषधी बी.

कवंचाळ न० बसणाऱ्या किं० जमलेल्या माणसांचें वर्तुळ.

कवंची स्त्री० १ मोठ्या पदार्थांतून तोडून किं० फोडून किं० मोडवून काढलेला तुकडा. २ डोक्याच्या कवटीचा पुढला भाग. ३ नारळाची करवंटी.

कवट स्त्री० लांब करून टोकांपाशीं जुळविलेल्या बाहुंचा घेर; कव.

कवट न० अंडें. ॐ**कवट गाळणें** भीतीनें ग्रस्त होणें; घाबरणें.

कंवटल (–ळ), कंवटल्य, कंवटाल (–ळ), कौटल्य [सं० कौटिल्य=लबाडी] न० १ जारणमारणादिकांचा प्रयोग; दुसऱ्याचा नाश करण्यासाठीं केलेली युक्ति.२ गूढ पाश; व्यूह; दुसऱ्याच्या बेआबरूसाठीं प्रसृत केलेली खोटी गोष्ट. ॐ**कंवटाळ्या** पु० दुष्टपणानें दुसऱ्याच्या नाशाच्या खटपटी करणारा.

कवटाळणी [म० कवटाळणें] स्त्री० १ दोन्ही बाहूंत पकडणें किं० धरणें; २ आलिंगणें.

कवटाळणें स० क्रि० १ दोन्ही बाहूंत पकडणें; आलिंगणें. २ वेढणें, गराडणें. ३ आपल्या मंडळींत किं० संस्थेंत समाविष्ट करून घेणें. ४ मित्रत्वानें एकाद्याला जवळ करणें. ५ स्वार्थ बुद्धीनें एकाद्याला जवळ करणें. ६ जिंकून देश कवज्यांत घेणें; आक्रमिणें. ७ बुद्धिनें आकलणें.

कंवटाळीण स्त्री० जारणमारणादि कर्में करणारी स्त्री; चेटकीण.

कवटी स्त्री० मिठी, आलिंगन(मागें 'कव' पहा).

कंवटी स्त्री० अंड्याचें टरफल; नारळाची करवंटी.

कंवठ [सं० कपित्थ] न० १ एक अंबट फळ (त्याच्या कल्कांत गूळ वगैरे घालून एक तोंडीलावणें करतात). २ (लक्षणेनें) अंडें. ॐ**कंवठेल न०** कवठाचे तेल.

कंवठी [सं० कपित्थ] स्त्री० कंवठें हीं ज्याचीं फळें तें झाड.

कवठी स्त्री० डोक्याचा वरचा भाग किं० त्या भागाचें गोल हाड.

कवड [सं० करोटि] स्त्री० नारळाचें अर्धुक.

कवंडल(–ळ) स्त्री० कडू वृंदावनाचा वेल. **न०** १ कडू वृंदावन. २ नारळाचें वेलें. ३ दुष्ट माणूस.

कवडसा, कवडा पु० १ दारें, खिडक्या, गवाक्ष इ० तून येणारा प्रकाश. २ कौलार, दारें, झडपा, इ०च्या फटींतून किं० भोकांतून येणारा प्रकाशाचा किरण. ३ आरशावर किं० प्रकाशाचें परावर्तन करणाऱ्या कोणत्याही पदार्थावर प्रकाशकिरण पडला असतां परावृत्त होतो तो किरण. ४ प्रतिबिंब. ५ पदार्थाची छाया.

कवडा पु० १ एक अशुभसूचक पक्षी. २ मोठी कवडी. ३ डोळ्यांवर येणारें एक प्रकारचें पटल किं० अभ्र. ४ विस्कटलेले किं० विखंडित ढग किंवा त्या स्थितींतील ढग. ॐ **कवडा गहूं, कवड्या गहूं पु०** एक प्रकारचा गहूं. **कवडेफोक पु०** हालतें गवत. **कवड्या ऊद पु०** जावा, सुमात्रा इ० बेटांतलि एका वृक्षविशेषाचा डीक,– जो सुगंधी असतो. **कवड्या घणस, कवड्या घोणस पु०** ज्याच्या अंगावर पांढरे ठिपके असतात असा एक प्रकारचा घणस नांवाचा सर्प. **कवड्या साप पु०** ठिपके असलेला एक प्रकारचा साप. **कवडा मिरविणें** (देवीभक्त किंवा भुत्ये गळ्यांत कवड्यांच्या माळा घालून आपल्या देवीच्या भक्तपणाचा देखावा करतात त्यावरून) एखाद्या गोष्टीचा टेंभा मिरविणें; फुशारकी मारणें; उ० माझ्यापुढें तूं आपल्या तालीमबाजीचा कवडा कशाला मिरवतोस ? मी तुला क्षणार्धांत लोळवीन.

कवडी स्त्री० १ समुद्रांतील एका जलजंतूच्या शरीरावरील हाड. (कवड्यांचे तीन प्रकार आहेत. दहीकवडी, सगुणीकवडी, आणि भवानीकवडी). २ हाताचे नखांवर, एक प्रकारच्या सर्पाच्या अंगावर, वगैरे जें पांढरें चिन्ह असतें तें. ३ विटीदांडूच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. ४ एक अत्यंत हलकें नाणें (पंधरा वीस वर्षांपूर्वी खुद्द पुण्यांत कवड्या नाण्यासारख्या वापरिल्या जात). ५ थेंब दोन थेंब दही, म्हणजे दह्याचा अल्पांश. ६ वस्त्राच्या रेशमी कांठांत रेशमाचे तंतु बाजूला सरून जो कांचित् पांढरा अंश दिसतो तो. ७ डोळ्याचा जो पांढरा भाग तो. ८ एक प्रकारचें छोटें झाड. याला **कवडीचें झाड** असेंही म्हणतात. याला लहान लहान पांढरीं फुलें येतात, त्यांचा तापांत वगैरे उपयोग होतो. ९ गव्हाचें कणिस,–गव्हाचीं ताटें झोडपल्यावर त्यांत चुकून न झोडपलें जातां राहिलेलें. ॐ**कवडीचा खेळ** विटीदांडूचा एक प्रकार. **कवडीटंक, ·कवडीचुंबक, कवडीपूत वि०** अतिलोभी, कद्रु, कंजूष, जो कोणी तो. **हातीं कवडी विद्या दवडी** १ पैसे जवळ असले म्हणजे विद्यार्जनाचे कामीं दुर्लक्ष्य होतें. २ सोंगट्या इ० खेळ कवड्यांच्या दानावर खेळले जातात; सोंगट्या इ० खेळ खेळण्याचा ज्याला नाद किं० व्यसन आहे त्याचें विद्येकडे दुर्लक्ष्य होतें.

कवण सर्वना०(कवितेंत)कोण?कोणचा?काय? ह्याचीं सामान्यरूपें कवणे, कवण्या, अशीं होतात. ॐ**कवण्या गुणें** ? कां ? कोणच्या कारणानें ?

कवणी स्त्री० एक पक्षी.

कवणें [सं० कवन] स० क्रि० १ रचणें (कविता इ०). २ गाणें, गुणगुणणें.

कवंद स्त्री० १ जमीनीचा किं० गिलाव्याचा किं० दगडाचा सुटलेला पोपडा किं० पापुद्रा. २ जखम बरी होत आली असतां त्यावर धरते जी

खपली ती; वऱ्या होत आलेल्या देवांवर धरतें जी खपली ती.

कवदर (-री) स्त्री० एकप्रकारची रानकेळ.

कवन [**सं०**] **न०** १ कवितादि रचणें. २ कविता, गान.

कवल [**सं०**] **पु०** १ घांस; याचें **कवळ** हें अपभ्रष्ट रूप. २ गुळण्या करण्याचा काढा.

कवला पु० एक पालेभाजी.

कवसकुइरी(-ली) स्त्री०एक वनस्पतिविशेष.

कंवसाल न० बेआबू करणारा, अपायकारक, असा व्यूह किं० कट.

कंवसाली (-ल्या) वि० एकाद्याची बेआबू किं० हानि करण्यासाठीं अधम प्रकारचे कट करणारा माणूस; दुसऱ्याची नालस्ती करण्यासाठीं व्यूह रचणारा.

कवळ स्त्री०, न०१ शेताची जमीन भाजण्यासाठीं उपयोगी जो डाहाळ्या, काटक्या, इ०चा भारा किं० समुदाय तो. २ कवेंत मावण्याइतका जो तृणाचा किंवा काष्ठाचा ढीग तो. ३ कवटाळण्याची क्रिया; आलिंगन. ४ नांगराची जी रुमणी तिची खुंटी किं० खिट्टी. ५ पखवाजाचें पूड. ६ पानें तापवून शेकण्याकरितां उपयोग करतात तीं. ॐ**कवळकाठी स्त्री०** वर **कवळ** याचा पहिला अर्थ पहा.

कवळटें न० शेत भाजण्याला कवळ मिळावें म्हणून जी पडीक टाकून देतात अशी डोंगरालगतची जमीन.

कवळणें [**म०** कव] **स० क्रि०** १ कवटाळणें, आलिंगिणें, बाहुपाशांत पकडिणें, ०ला मिठी मारणें.२ अस्ताव्यस्त पसरलेल्या वस्तु गोळा करणें किं० एकत्र जमाविणें; आवरणें. ३ घांस करणें,दातांत पकडणें;उ० सापानें बेडूक कवाळिला.

कवळा पु० १ वेंगेंत मावण्याजोगा जो तृण, काष्ठ, इ० चा समुदाय तो. २ तो धरण्यासाठीं केलेली कव.

कवळासणें स० क्रि० गौरी, गणपती, वगैरे विसर्जन करण्याकतां त्यांच्या मूर्ति नदींत वगैरे बुडविणें.

कवळी स्त्री० १ लहान कव किंवा तिच्यांत मावण्याजोगा तृणकाष्ठादिकांचा ढीग. २ दांतांच्या ज्या पंक्ति त्या प्रत्येक.३शेपन्नास पानें (विड्याचीं) एकत्र करून ठेवतात तीं. ४ साडेपांचशें किंवा पांचशें विड्याच्या पानांचा जो जुडगा करून ठेवतात तो. ५ एक प्रकारचा कानांत घालावयाचा दागिना. ६ नांगराच्या रुमणीची खुंटी.

कवळ्या [**म०** कवळ] **पु०** गुऱ्हाळांत उसाची कांडीं जो गवेंत आणून कांडेकऱ्यास देतो तो.

कवा [**अ०** कह्वाह्] **पु०** कॉफीचा काढा किं० अग्निसंयोगानें तयार केलेलें पेय.

कवाइती (-दी), कवाइतदार, कवाईतदार [**अ०** कवाईद्] **वि०** १ लढाईच्या कामांत तरबेज किं० निष्णात. २ कावेबाज; हिकमत्या.

कवाईत (-द) [**अ०** कवाईद] **स्त्री०** १ पलटणींतील सैनिकांनीं युद्धसमयीं एक जुटीनें व शिस्तीनें वर्तावें म्हणून त्यांच्याकडून तदर्थ जी तालीम करून घेण्यांत येते ती; उ० फ्रेंचांकडून महादजी शिंद्यानें आपल्या फलटणीस कवाईत शिकवल्यामुळें इंग्रजांस त्याच्याशीं लढाईत टिकाव धरणें दुरापास्त झालें. २ कांहीं काम करण्याची युक्ति, शक्कल, धोरण; किं० लटपट, मसलत.

कवाटी स्त्री० कव; वेंग; कवळ; पकड.

कवाटु [**सं०** कवाट] **न०** १ दरवाजा, दार, दाराची फळी.

कवाडी स्त्री०१छोटें दार;फाटक.२दाराच्या अभावीं गवताच्या पेंड्या किंवा बांबूच्या चिपा एकांत एक गुंतवून शेताला किं०वागेला करतात ती अटक. ३ विटीदांडूच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

कवाणी, कवणी स्त्री० एक पक्षिविशेष.

कवाता पु० नारळीचें छोटें झाड; नवीनच लाविलेलें आणि ठेंगणें असें नारळाचें झाड.

कवाल [**अ०** कवाल] **पु०** १ ख्यालाचें गाण्याचा बाणा बाळगणारा जो गवई तो;ख्यालाच्या सुरांचीं गाणीं गाणारा गवई. २ ख्यालाचें गाणें.

कवाला [**अ०** कबालाह्] **पु०** घरें, जमीनी, वगैरेंचें खरेदीखत.

कवाली स्त्री०, कवालीख्याल पु० [**अ०** कवाल्] संगीतांतील एका विशिष्ट चालीचें गाणें,-जसलीं गाणीं कवाल म्हणतो.

कवि [**सं०**] **पु०** १ कवनें रचणारा,छंदोबद्ध

वाङ्मय रचणारा किं०निर्माण करणारा.२ज्यामध्यें रस आहे व जेणेंकरून वाचकाच्या किं० श्रोत्याचा मनोभावना उद्दीपित होतात किं० प्रसन्नता पावतात असें वाङ्मय निर्माण करणारा ग्रंथकार; उ० कालिदास, भवभूति, बाण, दण्डी, इ०. ३ स्वताच्या अंतःकरणांत उद्दीपित झालेल्या भावना भाषेच्या द्वारें दुसऱ्याच्या अंतःकरणांत उद्दीपित करणारा. ४ विद्वान, शहाणा, गुणज्ञ, प्रतिभासंपन्न, सुज्ञ मनुष्य. ५ आदिकवि वाल्मीकि. ६ सर्वज्ञ. ७ विचारी. ८ शुक्राचार्य. ॐ **जें न देखे रवि तें देखे कवि** १सूर्याला जें दिसत नाहीं तें कवीस दिसतें. २रवीला वस्तुजाताचें बाह्यांग दिसेल, पण कवीला अंतरंगही दिसतें.

कविजा **पु०** उलथनें, झारा.

कविता [**सं०**]**स्त्री०**१ काव्य; कवन; छंदोबद्ध रचना. २ कवित्व.

कवित्व [**सं०**] **न०** काव्य रचण्यास लागणारे प्रातिभादि गुण; उ० मोरोपंताचें ठायीं कवित्व दांडगें होतें.

कव्य [**सं०**] **न०** पितरांना द्यावयाचें अन्न. ॐ **कव्यवाहन** **पु०** (पितृकर्मांतील)अग्नि.

कशा, कषा [**सं०**] **स्त्री०** चाबूक.

कशाचा [**म०** ' काय ' ह्याची षष्ठी] **वि०, क्रि० वि०** ह्याचे अनेक अर्थ आहेत त्यांपैकीं कांहीं खालीं देतों. (१) कोणच्या घटक द्रव्यापासून केलेला ? उ० ही घागर कशाची आहे ? (२) कोणच्या हेतूनें किं० कारणानें; कोणच्या लाभासाठीं ? उ० माझ्यावर वरिष्ठाची इतराजी झाली; आतां मला तो वारनिशी कारकून कशाचा (किं० कसचा) विचारतो ?

कशानें [**म०** ' काय 'ची तृतीया] **क्रि० वि०** काय केल्यानें ? कोणचा उपाय किं० युक्ति योजल्यानें ?

कशाला [**म०** 'काय'ची चतुर्थी] **क्रि० वि०** किमर्थ ? काय म्हणून ? कोणच्या उद्देशानें ? कां ?

कशिदा, कशीदा [**फा०** कषीदाह् ; कषीदन् = ओढणें] **पु०** १ वेलबुट्टी (वस्त्रादिकावर रेशमानें वगैरे जी काढतात ती). २ कलाबतूचें काम. ३ वस्त्रावर खडीची काढतात ती वेलबुट्टी.

कशी **स्त्री०** १ झोडपलेलें नाचणी इ०चें ताट. २ कांचणी.

कशेट, कशेड **न०**, **कशेरू** **पु०** बोरूसारखें एक तृणविशेष.

कश्चन, कश्चित् [**सं०** कः+चन, कः+चित्] कोणी एक; कोणी तरी.

कश्मल [**सं०**] **न०** १ मोह; गलितोत्साहता; उ० असल्या विषम प्रसंगीं, तूं पार्था, कश्मलाविष्ट कसा ? २ पाप. ३ मूर्च्छा. ४ भीति. **वि०** १ गलिच्छ, मलिन. २ लांच्छनास्पद, गर्हणीय.

कष, कषपाषाण [**सं०**] **पु०** सोन्याचा कस पहावयाचा सोनाराचा धोंडा; निकष.

कषाय [**सं०**] **पु०** १ काढा (औषधी कढवून करतात तो). २ अर्क. ३ षड्रसांतील एक रस. ४ तांबडा गडद किंवा गेरूच्या रंगासारखा रंग. ५ तुरट चव. ६ भगवा रंग. ७ मोह, गुंगी. **वि०** १ तुरट. २ तांबडा गडद किंवा गेरूच्या रंगासारखा.

कष्ट [**सं०**] **पु०** १ अंगमेहनत; राबणें; शारीरिक श्रम. २ शारीरिक श्रमापासून उत्पन्न झालेलें दुःख; दगदग; यातायात (याचा प्रयोग प्रायः अनेकवचनीं होतो). ॐ**कष्टीं फळ आणि तपीं राज्य** कष्ट केल्यास सुख हें फळ मिळतें आणि तपश्चर्या केल्यास राज्य हें फळ मिळतें. **कष्टकरी** **वि०** काबाडकष्ट किं० शारीरिक श्रम करून उपजीविका करणारा. **कष्टसाध्य** **वि०** महा प्रयासानें जें कांहीं साध्य होतें तें. **कष्टाची धण** **स्त्री०** कष्ट मात्र सोसावे लागणें, त्यापासून इतर लभ्यांश कांहींही नसणें. **कष्टाळू** **वि०** मेहनती; शारीरिक श्रम करावयास तयार असणारा किं० असलेला. **कष्टी** **वि०** १ दुःखी. २ खट्टू; हिरमुसलेला. ३ मेहनती; कष्ट करणारा. ४ कष्ट करून शिणलेला; म्लान. **कष्टी होणें** दुःख पावणें; शोकादिकांमुळें निरुत्साह होणें; हिरमुसणें.

कष्टणें [**सं०** ' कष्ट 'पासून **म०** क्रियापद] **अ० क्रि०** १ राबणें. २ दुःखी किं० खट्टू होणें. ३ गांजून जाणें. ४ भारी दुःख सोसावें लागणें.

कस [**सं०** कषाय] **पु०** १ शक्ति; ताकद; जोम. २ पोषक अंश; तत्त्वांश; सत्त्व (अन्नादिकांतील). ३ ज्या योगें दुधाला तें तापविलें असतां साय येते तो दुधाचा विशिष्ट गुण. ५ टिकाऊपणा, कणखरपणा (कापडाचा वगैरे).

*कसदार वि० १ बळकट, पीळदार, कसलेलें (शरीर). २ पौष्टिक, सत्त्वांशमय. **कसहीन वि०** निःसत्त्व.

कस [**सं०** कष्=ओढणें] **पु०** १ सुवर्णादि धातूंच्या ठायीं रंगरूपादि जो गुण असतो तो. २ सुवर्णादिकांच्या शुद्धतेचें प्रमाण,–जें कसोटीच्या धोंड्यावरून समजतें तें; उ० ह्या सोन्याचा कस पंचाण्णव नंबराहून कमी लागेल; उ० हें सोनें कसाला चांगलें उतरणार नाहीं. **स्त्री०** मुरगळणें, किंवा त्याचा ठणका; (**क्रि०** भरणें).

कंस [**सं०**] **पु०** १ पिण्याचें भांडें. २ 'आढक' ह्या नांवाचें एक माप. ३ कांसें (एक धातु). ४ यादववंशीय उग्रसेनपुत्र, मथुरेचा राजा; देवकीचा चुलतभाऊ. ***कंसोद्भवा स्त्री०** गोपीचंदन.

कंस पु० १ वर्तुलाच्या घेराचा एक लहान खंड, जसें (. २ (पुढें दिलेलीं चिन्हें) ( ), [ ], { }. पहिल्या कंसास ' साधा किं० गोल कंस ' म्हणतात; दुसऱ्यास ' चौकोनी कंस ' म्हणतात; व तिसऱ्यास ' महिरपी कंस ' म्हणतात.

कसई [**सं०** कशेरु] **स्त्री०** ' कशेट ' ह्या नांवाचें एका जातीचें गवत; कशेरु तृण; नागरमोथा.

कसकस स्त्री० १ ताप आल्यामुळें अंग दुखूं लागणें (**क्रि०** येणें, भरणें). २ शहारे (कर्कश ध्वनि ऐकल्यानें किं० भयानक देखावा पाहिल्यानें उद्भवणारे). ३ काळजी, चिंता, घोर (**क्रि०** लागणें).

कसकसणें अ० क्रि० १ तापानें अंगांत शिरशिरी भरणें किं० अंग दुखूं लागणें. **२** ठणकणें; गळूं, खरजेचा फोड, जखम, इ०चें ठसठुसणें किं० त्यांची शिणिक उठणें.

कसकसा [**म०** कसा] **वि०** कोणत्या तऱ्हेनें, मार्गानें, पद्धतीनें,इ०:उ० तूं कसकसा पत्ता काढलास तें मला तपशीलवार सांग; उ० त्याणें कसकसें सांगितलें तसेंच सांग.

कसणी स्त्री० १ सामता चालवावयाचें सुताराचें साधन; एका काठीच्या दोन टोकांस एक सईलसर दोरी बांधलेली असते, तिचे वेढे सामत्याच्या खोडाला घालून तो फिरवावयाचा असतो. २ कंठाळ, बस्ता, किंवा अन्य ओझें बांधावयाची किंवा आंवळावयाची दोरी. ३ पैसे वगैरे ठेवावयाची एक प्रकारची पिशवी (जिचें तोंड नाड्या ओढल्या असतां मिटतें). ४ तपासणी; कसास लावणें. ५ घट्ट आंवळून बांधणें.

कसणें स० क्रि० १ घट्ट बांधणें किं० आंवळणें. २ सुवर्णादिकांचा कसोटीवर घांसून पारख करणें. ३ बारकाईनें तपासणी किं० पारख करणें. ४ कांहीं काम करण्यांत जोर किं० शक्ति योजणें; उ० मी कसून अभ्यास केला, म्हणून पास झालों. **अ० क्रि०** १ अंगमेहनतीमुळें शरीर मजबूद आणि कसदार होणें. २ रुळलेले असणें; तयार असणें; तरबेज असणें; उ० टिळक कायद्यांत कसलेले होते. ३ कसकसणें;अंग ठणकणें;ताप वगैरेंच्या शिरशिरीनें पीडित होणें.

कसपट न० १ तृणादिकांचा अत्यल्प जो तुकडा किं० खंड तो. २ (लक्षणेनें) यःकश्चित् किं०भिकार वस्तु; उ० मराठे निजामास कसपटासमान लेखीत (मोजीत, गणीत, मानीत,धरीत, इ०).* **बायको धमकट दादला कसपट** नवरा फाटक्या अंगाचा आणि बायको दणगट अशांची जोडी; दोन अननुरूप वस्तूंचा संयोग किं०सहवास(हास्यास्पद होतो).

कसब [**अ०** कस्ब्] **न०** १ कला, हुन्नर, धंदा. २ अभ्यासानें अंगीं येणारें कौशल्य, सामर्थ्य, वाकबगारी,हुषारी,इ०.३ उपजीविकेसाठीं वेश्या जें कर्म करिते तें. ४ लबाडीची युक्ति, शकल, कावा, मसलत, डाव, इ०; उ० दोघांमध्यें भांडणें उपस्थित करून आपला लाभ कसा करून घ्यावा हें कसब तुम्हांस पूर्णपणें अवगत आहे. **पु०** चांदीची बारीक काढलेली तार. * **कसबाचिठी पु०** वेश्येला देहविक्रय करण्याला सरकार तिला देतें ती परवानगी. **कसबचोर पु०** अंगीं कसब असून कार्यप्रसंगीं जो तें पुरेतेपणीं दाखवीत नाहीं तो (कारागीर, कामगार, इ०). **कसबचोरी स्त्री०** कारकून, कुळकर्णी, सोनार, वाणी, शिंपी, इ० आपल्या कसबांत चतुराईनें धनी, गिऱ्हाईक, वगैरेंस फसवून जी द्रव्यादिकांची चोरी करतात ती. **कसबाती वि०** (कसब याच्या चौथ्या अर्थावरून) लुच्चा, कावेबाज, आपमतलबी, कारस्थानी, इ०. **कसबी वि०** कलावन्त; हुषार, चतुर, निष्णात, वाकबगार (हुन्नर, धंदा, वगैरेंत). **कसबीण स्त्री०**

(कसब याचा तृतीयार्थ पहा) १ कलावंतीण, वेश्या, नाच तमाशे करणारी स्त्री. २ देहविक्रय करणारी स्त्री.

कसबा [अ० कस्बाह्] **पु०** १ एखाद्या महालांतील किंवा परगण्यांतील मुख्य गांव किंवा शहर (ज्याच्या नांवानें तो सर्व महाल किं० परगणा ओळखला जातो). २ कोणेक शहराची मूलभूत ह्म०प्राचीन वसति जेथें असते तो भाग (म्हणूनच पूर्वीचें पुणें शहर जेथें वसलेलें होतें त्यास आपण हल्लीं 'कसबा पेठ' म्हणतों).

कसर [अ० कस्र्] **स्त्री०** १ लोकरीचे कपडे, पुस्तकें, वगैरेंस जी कीड लागते ती. २ कमतरता, उणेपणा, न्यून; उ० या आवृत्तींत जी कांहीं कसर राहिली असेल ती दुसऱ्या आवृत्तींत आम्ही भरून काढूं; उ०दांडपट्टयांत हा मुलगा अजून पुरता तयार झाला नाहीं, थोडी कसर राहिली आहे. ३ बाकी, शिल्लक, अल्प अवशेषांश; उ० या पागोट्याचा रंग पुरतेंपणीं गेला नाहीं, कांहीं कसर आहे; उ० स्पष्ट काय असेल तें सांगा, कसर ठेऊं नका. ४ तापाची कणकणी; अवशेष; उ० माझा ताप गेला, पण जरा कसर राहिली आहे. ५ लबाडीनें काटाकाट करून मिळविलेला नफा; उ० कितीही घरोब्याचा सोनार झाला म्हणून कसबचोरी करून कसर काढावयाचा तो थोडाच राहतो ! ६ कुचराई; उ० रुपये मोजण्यांत कसर करूं नको, मारवाड्याशीं गांठ आहे ! ७ बूड, तोटा, नुकसान; उ० मराठ्याची कसर केसरींतून निघेल या धोरणानेंच मराठा पत्र चालविण्यांत आलें. ८ बूड, तोटा, नुकसान, वगैरेबद्दल केलेली किं० करून घेतलेली भरपाई; उसनफेड (पारिपत्यरूप); उ० खंडणी देत नाहीं म्हणून निजामानें केलेल्या अपमानाची कसर पेशव्यांनीं खर्ड्यांच्या रणांगणावर काढून घेतली. ९ तफावत, फरक; उ० जमा आणि खर्च सारखा असतांना त्यांची तोंडमिळवणी झाली पाहिजे, त्यांत ही दहा रुपयांची कसर कशी येते ? १० आकाशांतील विरल विरल अभ्रांश. ॐ**कसर काढणें** १ लबाडीनें काटाकाट करून नफा मारणें. २ उसनफेड करणें, नुकसानभरपाई करून घेणें. ३ (हिशोबांतील वगैरे) तफावत काढून टाकणें; फरक नाहींसा करणें. **कसरदिढी स्त्री०** उत्पन्नाच्या रूपानें सारा भरणाऱ्या लोकांकडून साऱ्याच्या मापाहून अधिक धान्य वगैरे जें घेतलें जातें तें. **कसरपट्टी स्त्री०** तूट भरून काढण्याकरितां लादलेली पट्टी किं० कर. २ **कसरी वि०** काटकसरी; मितव्ययी; कंजूष; चिकू.

कसर स्त्री० १ उपहारार्थ खावयाचे उपयोगी असा एक कंद.

कसरणें अ० क्रि० १ बाजूस सरकणें; विवक्षित स्थितीपासून ईषन्मात्र चलित होणें. २ दुष्काळ, पर्जन्य, ज्वर, दुपार, इ० उत्तरोत्तर न्यून किं० कमी होण्याच्या दशेस लागणें; कमी होणें, उतरणें.

कसरत [अ०कस्रत्] **स्त्री०**१ मलखांब, उड्या, वगैरे सारखा शरीर स्वाधीन ठेवण्यास उपयोगी असा व्यायाम; किं०ज्यामध्यें शरीर हावें तसें वांकवावें लागतें असा व्यायाम; उ० छऱ्यांच्या सर्कशीत कसरतीचीं कामें चांगलीं होतात; उ० राजाच्या भेटीस जावयाचें म्हणजे सरदारमानकऱ्यांना सतरा वेळां मुजरे करावे लागतात, ही त्यांना एक कसरतच होते. २ एखाद्या व्यवसायांत बुद्धीस हरएक प्रकारें चालना द्यावी लागते ती, किंवा तज्जन्य त्या त्या व्यवसायांतील करामत किं० कौशल्य; उ० वेदान्त म्हणजे बुद्धीची कसरत ! ३ युक्तिप्रयुक्तीनें एखादें कार्य साधण्याविषयीं करावा लागतो जो व्यापार किं० जें सव्यापसव्य तें; उ० कायद्यांत सांपडूं नये म्हणून बळवंतरावांना लेखणीची कशी कसरत करावी लागे ! ४ जिकीरीचें किं० कष्टप्रद काम. ॐ**कसरती वि०** १ जोर इ० कसरतीमुळें घटलें आहे शरीर ज्याचें असा. २ युक्त्या प्रयुक्त्या करून इष्टकार्य साधणारा जो तो.

कसरता [**म०** ' कसरणें ' यापासून] विवक्षित दिशेशीं किंचित् वक्र होऊन; उ०सूर्याकडे समोर पहावत नाहीं तर कसरतें पाहावें. ॐ**कसरतें घेणें** (युद्ध, कज्जा, इ० कांमध्यें) काढतें घेणें; त्यांतून बाजूस होऊन निसटणें.

कसरा वि० करडा; मळकट पांढरा; पिंगट; कबरा; काळापांढरा.

कसलत, कसालत [अ० कसालाह्] **स्त्री०** कामाचें कष्ट किंवा जिकीर (**क्रि०** काढणें). २ परमावधीचे कष्ट किं० त्रास (**क्रि०** घेणें, करणें). ३ एखाद्याबद्दल फार तोशीस किं० घस सोसणें;

त्याच्यासाठीं फार कष्ट सोसणें; उ० मी माझ्या पुतण्याच्या विद्येसाठीं भारी कसालत काढली (किं० सोसली). ४ पुढें ' खसालत ' पहा. ❀ **कसलती, कसालती** वि० १कष्टाळू; मेहनती. २ त्रासदायक; कष्टकारक.

कसला [म० 'कसा' पासून] वि० कोणत्या प्रकारचा किं०जातीचा ? कशासारखा ? कोणच्या गुणाचा ?

कसवट (–टी) स्त्री० कसोटी; कषपाषाण; सोनें, रुपें इ० चा पारख करण्याचा धोंडा (सोनारांचा).

कसवंटी स्त्री० एक प्रकारचें लोणचें.

कसा पु०वि०,**कशी** स्त्री०१कोणत्या प्रकारचा? २ विनंती जोरदार करावयासाठीं ह्या शब्दाचा लिंगवचनभेदें उपयोग केला जातो; उ० जा कसा, जा कशी, जा कसे, म्ह० जाच जा. क्रि० वि० कोणत्या प्रकारें?❀**कसाकसा** वि०कोणत्या प्रकारें. **कसाचसा** वि० चमत्कारिक. **कसासाच** वि० कसातरीच, चमत्कारिक, विलक्षण. **कसा तो** बिल्कुल, मुळींच, अगदीं; (अकरणरूपी प्रयोगांत लिंगवचनभेदेंकरून); उ० त्याला सौम्यपणा कसा तो ठाऊक नाहीं. **कसा बसा** वि० मोठ्या कष्टानें.

कसा [म० कसणें=बांधणें] पु० १अंगरखा, टोपडें,इत्यादिकांस जो बंद लावलेला असतो तो. २ रुपये वगैरे ठेवण्याची पिशवी. ३ बटवा वगैरेंचे जे मणदोरे ते (हे ओढले असतां बटव्याचें तोंड मिटतें किं० उघडतें).

कसाई [अ० कसायी] पु० कसाब, खाटीक.

कसाकुशा स्त्री० घासाघीस; जिकीर.

कसाट [सं० कशेरू] न०'कशेट'ह्या नांवाचें गवत.

कसाब [अ०] पु० खाटीक. ❀ **कसाबाला गाय धार्जिणी** क्रूरपणें नोकरांना वागविणाऱ्या धन्याला नोकर मिळतात; ममतेनें वागविणाऱ्या धन्याला मिळत नाहींत. **करणी कसाबाची आणि बोलणीं मानभावाची** वर्तन क्रूरपणाचें आणि बोलणें ममतेचें; वरून मृदु आणि आंत कठोर अंत:करणाचा.

कसाबी स्त्री० कसायाचा ह्म०खाटकाचा धंदा.

कसालत स्त्री० मागें **कसलत** पहा. ❀

कसालती वि० कसलती; मोठ्या कसाल्यानें जो एकाएकीं थकत नाहीं तो;अति श्रम करणारा किं० सोसणारा.

कसाला [अ० कसालाह्] पु० १ एखाद्या कामाचा थकून जाण्याइतका कांहीं काल सतत जो परिश्रम पडतो तो; (क्रि०लागणें,होणें,गुदरणें). २ एखाद्या माणसाला किं० जनावराला कठिण आणि जिकीरीचें काम देऊन तें त्याच्याकडून कठोरपणें करून घेणें; छळणें;गांजणें.

कसिदा, कसीदा, कशीदा [फा०कशीदाह्] पु० रेशमाच्या किं० कापसाच्या किं० जरीच्या तंतूनें चिरगुटावर काढलेलीं फुलें, वेलबुट्टी, इ०.

कसोटा, कसोटापेंच पु० कुस्तींत तडाखा (मानेवर वगैरे) देऊन प्रतिपक्ष्याला खालीं आणण्याची एक युक्ति किं० हिकमत.

कसोटी [सं० कष; हिं० कसवटी]स्त्री०ज्या धोंड्यावर सुवर्ण घांसून त्याची पारख करतात तो धोंडा (क्रि०घेणें,पाहणें).❀**कसोटीस लावणें** ०ची परीक्षा करणें; पारखणें; कसास लावणें. **कसोटीस उतरणें** एखादा मनुष्य पारख करीत असतां किं० परीक्षा घेत असतां उत्तम ठरणें किं० पसंत पडणें.

कसोशी स्त्री० १ मेहनतीनें आणि काळजीपूर्वक केलेली तपासणी किं० परीक्षा. २ फार परिश्रम, खस्ता, कष्ट (अन्वर्थक क्रि० खाणें, सोसणें, भोगणें); उ० नवऱ्याची कसोशी गोदीनें फार खाल्ली.❀**कसोशीनें** काळजीपूर्वक, मेहनतीनें.

कस्त [सं० कष्ट] स्त्री० १ कष्ट; त्रास. २ आपल्या अंगची कमताई किं० उणेपणा.

कस्त न०, स्त्री० १ नुकसान, हानि, बूड. (क्रि० खाणें, सोसणें).२ कच खाणें, माघार घेणें. क्रि० घेणें); उ० नेपोलियन कसाही प्रसंग पडला तरी कस्त घेत नसे.

कस्तर पु०, न० १ भांडें वगैरे सांधण्याकरितां किं० फुटलेलें भांडें धड करण्याकरितां जो कथलाचा थर किं०लेप बसवितात तो;डाग लावणें (क्रि०करणें, होणें, लागणें, बसणें, जाणें). २ डाक (करणें).

कस्तरणें [म० कस्तर] स० क्रि० ०ला डाक लावणें; डाक लावून सांधणें.

कस्ता, कस्ती वि० १ योग्य मार्गापासून किंचित चलित; वाकलेलें, खचलेलें, कललेलें,

(भिंतांड,खांब,इ०).२ कसर असलेलें,कमी असलेलें, अपुरें (माप, वजन, इ०); याच्या उलट **रास्ती.** ३ खोटा, रास्त नव्हे असा (धंदा, भाषण, इ०). ४ कसरता. ॐ **कस्तें घेणें** बाजूस सरणें; अंग काढून घेणें (एखाद्या कामांतून, कारभारांतून, किं० धंद्यांतून).

कस्तान, कस्तन [सं० कुत्सित + तृण] **न०** १ एक प्रकारचें हलकें गवत. झोपड्या वगैरेंचीं छपरें, दारें, वगैरे याचींच करतात. २ निरुपयोगी आणि गदळ असे पदार्थ.३ गठ्ठे,भारे, वगैरे आंवळण्याची दोरी.

कस्ती [सं० कष्ट] **वि०** उद्योगी, मेहनती, कामसू, कष्टाळू. [मेहनत.

कस्ती [सं० कष्ट] **स्त्री०** परिश्रम,कष्टप्रद काम,

कस्तूर पु० कस्तर, डाक (**क्रि०** करणें, होणें). ॐ **कस्तूरी करणें** कस्तरणें; डाक लावून सांधणें. **कस्तूरगोल पु०** डाक लावावयाचें लोखंडाचे हत्यार; खड्या.

कस्तूरी,कस्तुरी [सं०] **स्त्री०** १ एका विशिष्ट जातीच्या मृगाच्या नाभीमध्यें उत्पन्न होणारें एक सुगंधि द्रव्य. २ काळा टिकला.ॐ **कस्तूरीमृग पु०** ज्याच्या नाभीपासून कस्तुरी उत्पन्न होते तो मृगविशेष.

कस्तूरी [सं०] **स्त्री०** जवादी मांजर.

कहगया बहगया [हिं०] **वि०** वाऱ्यावर उडून गेलेलें; फुकट गेलेलें किं० निरुपयोगी झालेलें (भाषण, सल्ला,शिक्षण इ०).' काहिगया बाहिगया,' 'कैगया बैगया'अशींही ह्या शब्दाचीं रूपें प्रचलित आहेत.

कहणें [हिं०; सं० कथ्=सांगणें, निवेदिणें] सांगणें. ॐ **कहूं तो मा मरजाइगी, ना कहूं तो बाप कुत्ता खाजाइगा** [हिं०] दोहोंकडून पंचाईत; इकडे आड तिकडे विहिर अशी पेचाची स्थिति.

कहर [अ०कहर्=राग, आवेश] **पु०** १ पराकाष्ठा, अतिशय, अतिरेक; उ० या पोरीनें रडण्याचा कहर केला आहे; उ० प्लेगनें गांवांत कहर मांडला आहे; उ० देवा ! आतां कहर झाला ! सोडीव मला या यातनांतून! ॐ **कहर दर्याव** [अ० कहर =आवेश + **फा०** दर्या=समुद्र]**पु०** प्रचंड किं० भीतिप्रद सागर. **कहरी, कहारी, कहऱ्या वि०** १ हट्टी; तापट; त्रागेखोर. २ जहरी (सर्प, विंचू, इ०). ३ तापदायक (किरण, ज्वर, दुखणें, इ०). ४ पराकाष्ठेचें, कमालीचें, मोठें, अतिशय, बेसुमार, (ओझें, आपत्ति, रडणें, इ०). **उदंड झाला कहर तर टाकूं नये शहर** कोणत्याही प्रकारचा ताप किं०त्रास होत असला तरी आपलें नेहमींच्या राहण्याचें शहर किं० देश सोडूं नये.

कहरवट पु० पुढें ' कारवा ' पहा.

कहाकी स्त्री० पुढें ' काकवी ' पहा.

कहाडणी स्त्री० काढणी याचें हें अशुद्ध रूप.

कहाडणें स० क्रि० पुढें ' काढणें ' पहा.

कहाणी [हिं०; सं० कथ्=सांगणें] **स्त्री०** १ पुरातन राजादिचरिताची जी कथा ती. २ दुःखपूर्ण किं० द्रवकारक कथा किं० गोष्ट; हृदयद्रावक हकीगत. ३ कर्मकथा; कर्मकटकट; ४ मंगळागौर, गोपद्मे, हरितालिका, ललितापंचमी, इ० व्रतें जीं आचरिलीं जातात, त्यांची उत्पत्ति, त्यांचा विधि, त्यांचीं उद्यापनें, त्यांचीं फळें, इ० माहिती व्रताचरणाचा भाग म्हणून ज्या गोष्टीच्या रूपानें सांगण्यांत येते ती गोष्ट; उ० वसुबारसेची कहाणी, पिठोरीची कहाणी, इ०. ३ शेतावर रोग पडतो तो. ४ चातुर्मासांत स्त्रिया गोपद्मादिरूपव्रताचें रेषांकित चित्र काढतात तें किं० गोपद्मादिरूप जें व्रत तें. ५ उपदेश; कानउघाडणी; सल्लामसलत.ॐ **उपडऱ्या घागरीवर पाणी आणि मूर्खाजवळ कहाणी** निष्फळ खटपट; उपड्या घागरीवर पाणी ओतलें असतां जसें फुकट किंवा व्यर्थ तसा मूर्खास केलेला उपदेश फुकट कि० व्यर्थ.

कहात, कहत [अ० कहत्=दुष्काळ] **स्त्री०** १ चोर, लुटारू, इ० दींचा आकस्मिक हल्ला किं० धाड. २ गुरांची वगैरे शेतांवर धाड. ॐ **कहातीस येणें** बेफाम रागावणें.

कहाता क्रि० वि०कसरता; विवक्षित दिशेशीं किंचित् वक्र होईल अशा रीतीनें; तिरकस.

कहाती, कहती वि० १ निर्भय; धाडसी; साहसी. २ बेपर्वा. ३ आवेशी. ४ बेफाम झालेला. ५ अवाढव्य; जगडव्याळ; प्रचंड; अति जड किं० जबर; उ० कहाती ओझें, चढण, उकाडा, वारा, पाऊस, प्रवासाची मजल, इ०.

कहार [**हिं०** कहार] **पु०** भोई लोकांची जाति; डोली, मेणा, पालखी इ० उचलणारा. ◈ **कहारवा कहिरवा पु०** कहारांत प्रचलित असलेला एक सुप्रसिद्ध नाच.

कहावणें अ० क्रि० १ भीतीनें गाळण उडणें; भीतीनें कांहीं सुचेनासें होणें. २ कावणें; रागानें बेफाम होणें.

कही [**हिं०** कही] **स्त्री०** १ लष्कराच्या उपयोगासाठीं तृण, काष्ठ, इ० लुटून आणण्याकरतां आसमंतात् प्रदेशीं त्यांनली जाते जी तुकडी ती. २ त्या तुकडीचें लुटण्याचें कर्म. ◈**कहीवाला पु०** १ लूट करावयास निघालेल्या तुकडींतील जे इसम त्यांपैकीं प्रत्येक. २ (लक्षणेनें) तेजोहीन, वस्त्रहीन, मलिन, असा जो मनुष्य तो.

कह्या [**हिं०** कहा] **पु०** हुकूम, आज्ञा, ताकीद. ◈**एकाद्याच्या कह्यांत असणें, वागणें, चालणें,** किं० **राहाणें** १ त्याच्या आज्ञेप्रमाणें वर्तणें. २ एखाद्याच्या ताब्यांत, हुकमतींत, किं० छापेंत असणें; उ० विसू इतका मोठा झाला आहे तरी तो अझून बापाच्या कह्यांत आहे.

कल्हार [**सं०**] **न०** एक पुष्पविशेष; पांढरें कमळ.

कळ [**सं०** कला] **स्त्री०** १ दरवाजे, संदुकी, वगैरेंची उघडझांप करण्याकरतां जी चाप वगैरे सारखी गुप्त यांत्रिक युक्ति केलेली असते ती. २ अशी उघडझांप ज्यायोगें करतां येते तें चाप वगैरेसारखें साधन (**क्रि०** दाबणें). असल्याप्रकारचीं साधनें सहसा लक्ष्यांत येऊं नयेत अशींच तीं असतात, व त्यांचा प्रायः गुप्त द्वारें वगैरे उघडण्यामिटण्याकरतांच उपयोग करावयाचा असतो. ◈**कळ दाबणें, कळ दाबून ठेवणें** आपणाला जें इष्ट कार्य घडवून आणावयाचें आहे (आपला लाभ किं० शत्रूचा नाश) तें अखेर ज्याच्या हातांत त्याच्याशीं संधान बांधून ठेवणें, अशासाठीं कीं कोणी कांहीं विघ्नें उपस्थित केलीं तरी तीं बाधक होऊं नयेत.

कळ स्त्री० तिडीक, चमक, आकस्मिक उठलेली वेदना (**क्रि०** उठणें).

कळ [**सं०** कलि=भांडण] **स्त्री०** १ मखखी, वर्म; परस्परांचें वितुष्ट पडून भांडण्यास सज्ज व्हावयाजोगी जी कलहोन्मुखता कांहीं कारणामुळें उपस्थित होते ते कारण (**क्रि०** काढणें, लावणें). ◈**बोलतां कळ धुतां मळ** कपडा धुतल्यानें जशी घाण बाहेर पडते तशी बोलण्यानें (म्ह० प्रत्युत्तर दिल्यानें) घाण बाहेर पडते म्ह० भांडणारीं माणसें एकमेकांची वर्मेंकर्में आणि उखाळ्या पाखाळ्या काढूं लागतात. **कळीचा नारद पु०** नारदमुनींचा संचार स्वर्ग, मृत्युलोक, आणि पाताळ, अशा तीन्ही लोकीं असल्याकारणानें त्यांना तीन्ही ठिकाणच्या खबरा कळत; त्या ते संभाषणांत बोलून गेल्यानें दोन माणसांत तंटे लागत आणि कलह जुंपत;यावरून 'कळीचा नारद' म्ह० कळ लावणारा किं० कलागती उत्पन्न करणारा असा अर्थ झाला. **कळगोटा, कळचेतव्या वि०** कळीचा नारद; तंटे भांडणें उपस्थित करणारा. **कळलाव्या वि०** भांडणें उपस्थित करणारा; दोन माणसांत वितुष्ट आणणारा; कलागती लावण्याचा ज्याचा स्वभाव असा.

कळंक पु० १ लांच्छन, बट्टा. २ दोष. ३ तांबें, पितळ, इ० धातूंच्या भांड्यांत अंबट पदार्थ असल्यानें जो विषार उत्पन्न होतो तो. ४ गंज, तांब. ◈**कळकट, कळंकट वि०** १ तांबें वगैरे धातूंवर जो विषारी मल असतो त्या मलानें युक्त. २ अशा प्रकारच्या मलानें युक्त पदार्थाची जी चव तद्विशिष्ट; उ० या पितळेच्या वाटीला कल्हई नसल्यानें त्यांतील ताक कळकट झालें आहे. ३ मलिन, गलिच्छ, तेजोहीन, कलाहीन, आंबट (कपडा, शरीर, चर्या, इ०).

कळक, कळंक पु० १ जाडी वेळू किं० चिवा. २ तांबें वगैरे धातूंवर जो एक प्रकारचा मल उत्पन्न होतो तो ;–जो पोटांत गेला असतां वमन होतें.

कळंकटणें, कळकटणें [**म०** कळकट] **अ० क्रि०** कळकट होणें; कलंकादि मलानें मलिन होणें. (भांडें, त्यांतील पदार्थ, कपडा, इ०).

कळंकणें, कळकणें [**म०** कळंक] **अ० क्रि०** कळकटणें (भांडें, त्यांतील पदार्थ, इ०).

कळकळ स्त्री० १ आस्था; अनुकंपा; कनवाळूपणाचा भाव; दुसऱ्याचें दुःख पाहून हृदयास आलेला कळवळा (**क्रि०** वाटणें, असणें). २ [**सं०** कलकल] मोठमोठ्यानें भाषण करून कल-

ह्यादि प्रसंगीं जें तंडणें तें. ꣹ **कळकळया** **वि०** कळकळण्याचा ज्याचा स्वभाव तो.

कळकळणें अ० क्रि० १ सळसळणें, प्रखर होणें (ऊन).२ उन्हानें तळमळणें किं० कासावीस होणें. ३ क्षुधातिशयामुळें हें खाऊं कां तें खाऊं असें होणें. ३ कळवळणें (दुसऱ्याचें दुःख पाहून). ४ भांडणांत मोठमोठ्यानें तंडणें किं० तणतणणें. ५ उन्हांमुळें अंगाची आग होऊन लोळणें किं० धापा टाकणें. **भाव० क० क्रि०** पोटांत दुखणें; उ० माझ्या पोटांत कळकळतें.

कळकळवणी स्त्री० जवळजवळ पाणीच असें दूध, ताक, इ०; ज्यांत वाजवीपेक्षां अधिक पाण्याचा अंश आहे असें दूध, ताक, इ०.

कळकळीत वि० फार पाणी ज्यांत घालण्यांत आलें आहे असें जें दूध, ताक, सार, इ० तें.

कळकी वि० कळकाची किं० वेळूची बनविलेली (टोपली). ꣹**कळकी कागद पु०** कळकापासून बनविलेला कागद; अतिशुभ्र आणि गुळगुळीत असा दौलताबादी कागद. **कळकी बाण पु०** कळकाच्या नळकांड्यांत दारू भरून करंतात जो बाण तो.**कळक्या ऊस पु०**एक प्रकारचा टणक आणि गोड रस असलेला ऊस.꣹**कळकी नारायण पु०**अति उंच आणि ढंगाळ्या इसम.

कळंकी [**सं०**]कलंकी;विष्णूचा दहावा अवतार.

कळकूट न० कळकाचा लहान तुकडा.

कळगा पु०काचेच्या बांगडीचा तुकडा;कडगुलें.

कळगा वि० भांडखोर.

कळंजणें अ० क्रि० अतिक्षुधेमुळें किं० फार वेळ रडत राहिल्यानें लहान मूल व्याकुळ होणें.

कळण न० मुगांचें किं० अन्य डाळीचें कढवून केलेलें एक प्रकारचें सार.

कळणा पु० डाळ करतेंसमयीं जो बारीक चूर होतो तो. ꣹**कळणाकोंडा पु०** १ अति गरिबाऊ अन्न. २ दुसऱ्याचें दळणकांडण करण्याचा धंदा;उ० नवरा मेल्यापासून कोयनाबाई कळणाकोंडा करून पोट भरते. **कळण्याकोंड्याची भाकरी आणि कण्याकुंजण्याची भाजी** अति गरिबाऊ अन्न.

कळणें [**सं०** कलना=जाणणें, जाणीव] **अ० क्रि०** समजणें; ज्ञात होणें; विशदीभूत होणें; ०चें आकलन होणें;लक्ष्यांत येणें. ꣹**कळे न कळे इतका** अत्यल्प; ध्यानांत देखील न येण्याइतका. **कळेना वळेना भाजीभाकर गिळेना** अत्यंत मूर्ख आणि ठोंब्या माणसाचें हें वर्णन आहे. **कळत न कळत क्रि०वि०** १सूक्ष्म प्रमाणांत.२प्रमादानें;जाणून बुजून नव्हें;समजून उमजून नव्हे.**वि०**१अल्प प्रमाणांतील; २ बारकाईनें पाहिलें असतां समजणारा; एकाएकीं न उमगणारा.३बारीक; उ० मला कळत न कळत ताप येतो. **कळतमूर्ख वि०** जाणून बुजून किं० कपटानें अडाणीपणाचा बहाणा करणारा.

कळप [**सं०** कलाप] **पु०** एकजातीय पक्षी, गुरें,वगैरेंचा समुदाय,जमाव किं० तांडा. ꣹ **कळपशुद्ध वि०**आपल्या कळपास सोडून न जाणारें (गुरुं); यांच्या उलट **ओढाळ. कळपांतलें गुरूं न०** (लक्षणेनें) अशिक्षित, गांवढळ, किं० रानवट चालीचा इसम; असंस्कृत.

कळपा पु० १ जखमेवर धरलेली खपली. २ तुकडा, कपरा, धलपा. ३ लोखंड वगैरे गंजल्यामुळें त्याचे गळून पडतात जे तुकडे ते प्रत्येक.

कळंब [**सं०** कदंब] **पु०** एक वृक्ष.

कळंबें न० पावसाळ्यांत पांढरीं छत्रीसारखीं जीं लहान रोपडीं उगवतात तीं प्रत्येक.

कळंबी स्त्री० गलबताच्या डोलकाठीचे मागें लहानशी काठी उभी करून जें त्यास लहानसें अवजार लावतात तें.

कळभांड वि० १ भांडखोर २ कज्जेदलाल.

कळमळ स्त्री० वमन होण्यापूर्वी पोटांत ढवळल्यासारखी जी विकृति किं० भावना होते ती.

कळमळणें [**म०** कळमळ] **भावकर्तृक क्रि०** १ पोटांत कळमळ होणें, पोटांत ढवळणें;उ० माझ्या पोटांत कळमळत आहे; उ० मला कळमळतें. २ दयार्द्र होणें; एखाद्याबद्दल कींव वाटणें, कळवळणें.

कळलावी स्त्री० १ एक प्रकारचें फुलझाड. २ त्याचें फूल.

कळवंडणें अ० क्रि० १ जोराजोरानें भांडणें किं० तंडणें. २ एकमेकांच्या अंगावर धावणें; एकमेकांच्या अंगावरून उड्या मारणें (कुत्रीं, मांजरें, भांडणांत किंवा चेष्टेनें करतात त्याप्रमाणें).

कळवंडा पु० १ भांडण. २ कुत्र्यामांजरांचें भांडण, बागडणें किंवा खेळणें (ज्यांत तीं उड्या मारतात, ओरडतात, इ०).

कळवंतीण, कळावंतीण [**सं०** कलावती] **स्त्री०** १ नाचणारी स्त्री. (कलावंतीण गातांना उभी राहते किं० नाचते, पण कसबीण बसून गाणें म्हणते). २ एक प्रकारचें फुलपाखरूं.

कळवळणें अ० क्रि० १ एखाद्याबद्दल कींव येऊन दयार्द्र होणें. २ दुःखानें विव्हल किं० व्याकुल होणें. [कींव; करुणा.

कळवळ स्त्री०, कळवळा पु० प्रेमाचा पाझर;

कळवा पु० १ म्हशी, घोडे, वगैरे जनावरांचें, तीं पळून जाऊं नयेत म्हणून मागचा व पुढचा असे पाय ज्या दोरीनें बांधतात ती दोरी. २ अशा प्रकारें जनावरांचे पाय बांधणें (क्रि० घालणें); उ० आमची म्हैस दांडगट असल्यामुळें तिला कळवा घातल्याखेरीज आम्ही तिला चरावयाला कधीं सोडीत नाहीं.

कळवाकळव स्त्री० १ जिकडेतिकडे बातमी जाहीर करणें; सर्वांस सांगणें किं० वर्दी देणें. २ एकमेकांनीं एकमेकांस बातम्या कळविणें.

कळविणें [**म०** ' कळणें ' चें प्रयोजक रूप] **स० क्रि०** १ सांगणें; ज्ञात करून देणें. २ ०च्या नजरेस आणणें; ०ला समजाविणें; ०ची वर्दी देणें, खबर देणें; माहिती देणें किं० सांगणें.

कळवी स्त्री० सरकारी खजीन्यांत भरणा केलेल्या पैशांत जीं खोटीं नाणीं आलेलीं असतात तीं त्या त्या गांवांकडे परत पाठविणें.

कळशी [**सं०** कलश] **स्त्री०** लहान घागर.

कळस [**सं०** कलश] १ देऊळ, अंबारी, देव्हारा, इ० कांचे शिखरप्रदेशीं शोभेकरितां कलशाकार लाकडाचे, धातूचे, वगैरे जे अवयव लावतात ते प्रत्येक; उ० धनाजीनें खुद्द औरंगजेबाच्या तंबूचे सोन्याचे कळस कापून आणिले. २ देवालयादिकांचा घुमट. ३ परमावधि, शेवट, अखेर, अत्युच्च मर्यादा; उ० श्रीमंत नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत मराठेशाहीच्या वैभवाचा कळस झाला. ४ उतरत्या कळेचा प्रारंभ; उ० ते आले कळसास, आतां खालावत जाऊन नामशेष होण्याच्या पंथाला लागले. ५ (लक्षणेनें) मानवी डोकें. ※ **मानेचा कळस ढळणें** मरावयास टेकणें; आसन्नमरण होणें. **कळसपाक पु०** पांढऱ्या वस्त्रावर रंगाचा एक प्रकारचा बूट असतो तो. **कळसपाकी वि०** अशा प्रकारें रंगविलेलें (वस्त्र, पागोटें, वगैरे).

कळसणें स० क्रि० १ पहारा ठेवणें; नजर ठेवणें; बारकाईनें लक्ष्य देणें. २ बारकाईनें आणि काळजीपूर्वक तपासणें किं० परीक्षिणें.

काळवणी [**सं०** कलश + **म०** पाणी] **न०** विवाहसमयीं वधू आणि वर न्हात असतां वराच्या अंगाचें उदक वधूचे अंगावर जें पाडितात तें.

कळसा [**सं०** कलश] १ मोठी कळशी; घागर (धातूची). २ तोटी असलेला मृण्मय कलश. ३ कुंभार ज्या मळलेल्या मातीचीं मडकीं बनवतो ती माती. ※ **खाकेंत कळसा गांवांत वळसा** इष्ट वस्तु आपल्याच जवळ आहे याचें भान नसल्यामुळें ती सर्व ठिकाणीं शोधीत बसणें.

कळसूत्र न० पुढें **कळा** यांत **कळासूत्र** पहा.

कळा [**म०** कळी, **सं०** कलिका] **पु०** १ मोठी कळी (फुलाची). २ शोभेकरतां केलेलें कळीच्या आकाराचें चौफल्याच्या मुठीसारखें वगैरे जें कांहीं तें. ३ [**सं०** कला] कला, युक्ति; उ० तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा वागवी पांगळा पायाविणें. ४ मनुष्याच्या चर्येवर जें तेज किं० कांति असते ती. ५ कळ (यांत्रिक). ※**कळा कळा करणें** कांहीं एका कार्यासाठीं त्रास येण्याजोगें सतत भाषण करणें किं० आग्रह करणें, इ०. **कळाकांती स्त्री०** चर्येवरील तेज, कांति, किं० रुबाब. **कळा(-ला) कुशलता स्त्री०, कळा (-ला) कौशल्य न०** १ कला म्ह० कसब आणि कौशल्य म्ह० वाकबगारी; चतुराई, प्रावीण्य. २ शास्त्रीय ज्ञान आणि त्या ज्ञानाच्या सामर्थ्यावर केलेलीं यंत्रें इ० समुच्चयानें. **कळा (-ला) कुसरी स्त्री० अ० व०** चित्रलेखन, गायन, इ०रूप नानाप्रकारच्या उपयुक्त किं० मनोरंजक किं० चमत्कारिक कला व त्यांतील कौशल्य. **कळाकुसरीचें काम न०** अति कौशल्याचें काम. **कळाखाऊ वि०** १ आबरू घेणारा किं० खराब करणारा; इज्जतखोर. २ कठिण, दुष्कर (काम, कारभार, इ०). ३ एकाद्या माणसाची किं० पदार्थाची योग्य काळजी घेतली तरी जो उठून दिसत नाहीं किं० शोभिवंत दिसत नाहीं असा; (मुलें, त्यांचे कपडे, स्त्रिया, इ०)

कळाफूल न० १ एक प्रकारच्या फुलाची कळी, –जी वाळवून औषधांत उपयोजितात किं० आमटी इ० कांचे मसाल्यांत घालतात. २ कळीच्या रूपांत असलेलें फूल. **कळावंत, कलावंत वि०** कोणत्या तरी कलेचें ज्ञान असलेला; एखाद्या कलेंत प्रवीण असलेला; (गवई इ०,–विशेषतः कलावंतीणीच्या मागें सारंगी किं० पखवाज वाजवणारा). **कळावंतीण स्त्री०** मागें **कळवंतीण** पहा.

कळासूत्र [**सं०** कला=युक्ति किं० कळ+सूत्र=दोरा] **न०** बाहुल्यांचे अंगांत जसे पाहिजे तसे त्यांचे अवयव फिरावे म्हणून युक्तीनें अनेक सूत्रें बांधिलेलीं असतात तीं प्रत्येक. ॐ**कळासूत्राचा खेळ पु०** वर निर्दिष्ट केलेल्या बाहुल्यांचा खेळ. **कळसूत्री, कळासूत्री पु०** १ जो कळासूत्राच्या भावल्यांचा खेळ करतो तो. २ कळसूत्राचा जो खेळ तो. **कळसूत्री बाहुलें न०** (लक्षणेनें) आपल्या बोटांवर हावे तसें नाचवितां येईल असें माणूस, इ०; उ० नेपोलिअन युरोपांतील सर्व राष्ट्रांना कळसूत्री बाहुल्यांप्रमाणें नाचवीत होता; उ० त्राटिका आतां प्रतापरावाच्या हातचें कळसूत्री बाहुलें झाली आहे !

कळांतर, कलांतर [**सं०**]रकमेवरील व्याज. ॐ **कळांतराचें आशे आणि मुद्दल नाशे** व्याजाच्या आशेनें रक्कम उसनी द्यावयाची, पण त्यायोगें व्याजही बुडावयाचें आणि हातचें मुद्दलही गमावावयाचें.

कळावा पु० मागें **कळवा** पहा.

कळाशी (**–सी**) **स्त्री०** बेमालूम केलेली व सुबक अशी सांधेजोड किं० परस्परांशीं संयोग. ॐ**कळाशीदार वि०** खुबीनें आणि कौशल्यानें ज्याचे सांधे केलेले आणि जोडलेले आहेत असा (कोणत्याही कारागिरीचा पदार्थ).

कळी [**सं०** कलिका] **स्त्री०** १ फूल, इ० ची कलिका. २ केशर वगैरे ठेवण्याकरतां कमळाच्या कळीसारखें हस्तीदंताचें वगैरे जें पात्र करतात तें. ३ बुंदीच्या लाडवांचे जे दाणे ते प्रत्येक. ४ चुन्याचे उपयोगी बारीक जे खडे असतात ते प्रत्येकीं. ५ कलिकाकार जो विडा बांधतात तो. ६ अंगरख्याचे घेरास जे त्रिकोणाकार तुकडे असतात ते प्रत्येकीं. ७ मराठे शिपाई एका विशिष्ट तऱ्हेनें पागोटें बांधतात त्यास त्रिनीचे स्थानीं जे आकार पाडतात ते (समुच्चयानें). ८ कांहीं एक परिमाण आहे तत्परिमित जें रेशीम तें. ९ वेगड लाविलेला मातीच्या चिलाचा कोणताही भाग किं० अवयव. १० भांडकुदळ स्त्री. (**सं०** कलि=कलह यापासून); उ० ये गे कळी आणि बैस माझ्या नळीं (म्ह० अगे भांडणें चेतविणाऱ्या स्त्रिये, ये आणि मला भांडावयाला प्रेरणा कर; मुद्दाम भांडणें उपस्थित करण्याच्या स्वभावाची निंदा करतांना हें सांप्रदायिक वाक्य उच्चारतात. ११ छप्पराचें बाजूचें लाकूड. ॐ**कळी उमलणें** प्रफुल्लित होणें; हर्षभरित होणें; रंगांत येणें; उल्लसित होणें; उ० नवऱ्यानें नवी नथ आणली म्हणून नमुताईची कळी आज उमलली आहे ! **कळीचा चुना पु०** चुन्याच्या उपयोगी जे खडे ते पाण्यांत टाकून केलेला चुना. **कळीचें पान, कळीदार पान न०** लांबट साग्र, दळदार, पिकलेलें, विड्याचें जें पान तें. **कळीकाळ** [**सं०** कलि+काल] **पु०** कळीचा काळ; कलियुग. (यामध्यें अनेक पापें घडून जगाचा संहार होतो, अतएव जो परम भयंकर काळ तो).

कळीत न० शेतें उभीं असतांच त्यांत किती धान्य निघेल याचा जो अजमास करतात तो, किंवा अमुक बागेंत किती फळ निघेल याचा जो अगाऊ अंदाज करतात तो.

कळेवर[**सं०**'कलेवर' याचें हें मराठी रूप]**न०** देह, शरीर. मागें ' कलेवर ' पहा.

कळ्हणा पु० कळणा; डाळ करतेसमयीं जो बारीक चूर होतो तो.

कळ्हांटणें स० क्रि० धान्य आणि माती, इ० एकत्र झालीं असतां ओंजळ ओंजळ धान्य जमिनीवर उंचावरून सोडून सुपानें वारा घालून त्यांचें पृथक्करण करणें; धान्यांतून माती, इ० काढून टाकणें.

कळहो [**सं०** कोलाहल]**पु०** कल्कलाट, गलबलाट, गोंगाट (भांडणांचा वगैरे); **क्रि०** करणें, माजविणें.

कक्ष [**सं०**] **पु०** १ खाक, बगल. २ बाजू; कड. ३ गवत; वाळलेलें गवत. ४ अरण्य; शुष्क वन. ५ ग्रहाचा मार्ग. ६ कासोटा. ॐ**कक्षापति, कक्षाधीश पु०** अतिदरिद्री माणूस. **कक्षापति,**

कीं लक्षापति किं० **कक्षाधीश कीं लक्षाधीश** बाहु वर करून खाका दाखवून जो आपलें दारिद्य प्रकटितो तो सुखी, किं० जो लक्षाधीश तो सुखी; मधली स्थिति कमी सुखाची असते. **कक्षाग्नि पु०** वणवा.

कक्षा [**सं०**] **स्त्री०** १ ग्रह, चंद्र, सूर्य, वगैरेंचे जे अवकाशांतील निरानिराळे संचारमार्ग ते प्रत्येकी. २(वादविवादांत)वादी आणि प्रतिवादी यांच्या एकमेकांवर होतात ज्या पूर्वपक्षादि कोटी त्या. ३ गृह, पटांगण, इ०कांची कुंपण, भिंत, कठडे इ०मुळें जी भिन्न भिन्न कोष्टकें किं० खोल्या पडतात त्या प्रत्येक. ४ चौक. ५ गृहमध्य. ६ एकान्त स्थान. ७ कुंपण, भिंत, कठडा. ८ हत्तीचा सांखळदंड. ९ दर्जा, योग्यता.

कां अ० १'काय'याचें त्याच अर्थी वापरण्यांत येणारें अपभ्रष्ट रूप; उ० तूं बिमलेला सासरहून आणशील कां ? २ **उ० अ०** कीं, किंवा; उ० त्याला भुकेनें हें खाऊं कां तें खाऊं असें झालें आहे; उ० त्यानें मला सळो कां पळो करून सोडलें ! ३ काय म्हणून ? कशाकरतां ? काव्यांत चरणपूरणार्थ किं० वाक्य जोरदार करण्यासाठीं वापरितात; उ० देशोदेशींचे जे कां नृप ॥

काइणी स्त्री० जोंधळ्याला होतो जो एक रोग तो. मागें **कहाणी** पहा.

काईम [**अ०** कायीम्] **वि०** कायम; एखाद्या स्थानीं स्थिर असा; नेहमीं टिकणारा; शाश्वतचा, सतत चालणारा, इ०; **उ०** विठूला नोकरीवर काईम केला कां ? ॐ**काईमदाईम** [**अ०**] **वि०** टिकणारा; सातातिक; चिरंतनचा; पुरातन कालापासून चालत आलेला; शाश्वत.

काईल [**अ०** कायील्] **वि०** वादांत जो कुंठित किं० निरुत्तर झाला तो.

काईल स्त्री० १ काहिली; मोठी कढई,–जींत उसाचा रस कढवून गूळ करतात. २ रुंद आणि पसरट तोंडाची आणि बिनकानांची कढई.

काऊ पु० (बालांच्या भाषेंत)कावळा; (तो काव, काव करतो त्यावरून).

काक [**सं०**] **पु०** १ कावळा. २ निंद्य पुरुष. ॐ**काकाक्षिगोलकन्याय पु०** एका वस्तूनें दोन कार्यें साधणें; जसें कावळ्याला एकच बुबूळ असून तें दोन डोळ्यांत काम करतें. **काकोदर पु०** सर्प. **काकोलूकिका स्त्री०**, **काकोलूकीय न०** कावळा आणि घुबड यांचें जन्मजात वैर. **काकच्छद पु०** झुलप (मुलांच्या डोक्यावर ठेवितात तें). **काकतालीय वि०** आकस्मिक. **काकतालीयन्याय** कावळा ताडाच्या फांदीवर बसावयाला व ती मोडावयाला एक गांठ पडली तर त्या दोन गोष्टींत कार्यकारणभाव मुळींच नसतो; कावळा बसतो आणि यदृच्छेनें, कर्मधर्मसंयोगानें, आकस्मिकरीत्या, किं०सहजासहजी, डाहाळी मोडते; हा जो यदृच्छेनें एखादी गोष्ट घडण्याचा प्रकार तो. **काकतालीयन्यायानें क्रि० वि०** यदृच्छेनें, सहजासहजीं, कर्मधर्मसंयोगानें. **काकदंतपरीक्षा स्त्री०** कावळ्याला दांत किती असतात ह्याचा तपास किं० वाटाघाट म्ह० रिकामटवळी आणि निरुपयोगी खटपट. **काकदृष्टि स्त्री०** कावळ्यासारखी तीक्ष्ण आणि चपल नजर. **वि०** १ अशी दृष्टि असलेला. २ दोष हुडकून काढणें हा ज्याचा स्वभाव तो; छिद्रान्वेषी. **काकपद न०** ओळींत एखादें अक्षर राहिलें असतां तें जेथें हावें असेल तेथें अशी ^ जी खूण करतात ती. **काकपक्ष पु०** वर ' **काकच्छद** ' पहा. **काकबलि, काकबळी पु०** जेवावयाला बसावयाच्या पूर्वी कावळ्यासाठीं मंत्रोच्चारपूर्वक टाकलेला भाताचा घास. **काकमैथुन न०** कावळ्यांच्या नरमादीचें संभोगकर्म. **काकमैथुन पहावें सहा महिन्यांत मसणांत जावें** काकमैथुन पाहिलें असतां सहा महिन्यांत मरण ओढवतें (इतकें तें अशुभ आहे). **काकरव पु०** १ कावळ्यांची कावकाव. २ (लक्षणेनें) अधमांनीं एखाद्याविरुद्ध केलेली कावकाव म्ह० नाहक आणि व्यर्थ निंदा, बडबड, वगैरे; उ०तारा सच्छील आहे, तिच्याविरुद्ध तुम्ही किती जरी काकरव केला तरी तिचें कांहीं वांकडें व्हावयाचें नाहीं. **काकवंध्या स्त्री०** एक वेळ मात्र प्रसूत होऊन जी दुसऱ्यानें प्रसूत होत नाहीं ती. **काकसावळा वि०** काळसर व निळ्या रंगाचा. **काकस्नान न०** घाईघाईनें आणि उठवळपणानें केलेलें स्नान (अंग नीट न घासतां). **काकस्पर्श पु०** मृत मनुष्याच्या अकराव्या दिवशीं स्मशानांत टाकतात जो पिंड त्याला कावळ्यानें केलेला स्पर्श; मृतानें अंतकाळीं

सांगितलेल्या आपल्या इच्छा मृताच्या पुत्रादिकांनीं पूर्ण करूं असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर केल्यास कावळा स्पर्श करतो अशी आपली समजूत आहे). **काक-स्वर पु०** कर्कश किं० कर्णकटु असा जो स्वर तो (एखादा गवई उच्च स्वर घेत असतां कचित् होतो तसा).

कांकई स्त्री० एक प्रकारचा मासा.

काकजंघा [सं०] स्त्री० एक वनस्पतिविशेष.

काकट, काकड वि० मजबूत घडणीचें; दृढ; भक्कम.

कांकड न० एक फलविशेष.

कांकड स्त्री० शीतादिकारणामुळें भरते जी हुड-हुडी वगैरे ती,–ज्यायोगें हस्तपादादि आंखडावेसे वाटतात.

कांकड वि० पुरता फुललेला आणि मृदु न झालेला [(भात).

काकडकुडा वि० थंडीची काकड भरल्यामुळें ज्याच्या स्नायूंत ताठरपणा आला आहे असा; शीतातिशयानें जो काकडून गेला आहे असा.

काकडशिंगी [सं० कर्कटशृंगी] स्त्री० एक औषधी वनस्पति.

काकडणें, कांकडणें अ० क्रि० थंडीनें हस्त-पादावयव आकुंचित होणें; शैत्यातिशयानें शरीरांत हुडहुडी भरणें व गात्रें आक्रसणें आणि ताठरून जाणें.

काकडा, कांकडा पु० १ चिंध्यांची वगैरे जी मोठी वात ती. २ चिंधी, कापूस, वगैरेंची वळी. ३ पेरू इ० जें कोंवळें किं० कच्चें फल तें. ४ पुरतें पिकलें नाहीं असें जें भात तें. ५ चाब-काची दोरी (चर्मादिकांची). ६ चिंच वगैरेंच्या शेंगा प्रत्येक. ❀ **काकडआरती [म० काकडा + आरती] स्त्री०** देवाची पहाटेस काकडे ओवाळून आरती किं० पूजा करतात ती.

काकडा वि० कोंवळें व रसाळ.

काकडी, कांकडी [सं० कर्कटी] स्त्री० १ एक फलविशेष; तरकाकडी. २ कोंवळें जें तवसें तें. ❀**कोल्हें काकडीला राजी** ज्या वस्तूवर आपला मुळींच हक्क नाहीं ती अत्यल्प प्रमाणांत जरी कोणी आपणाला दिली तरी आपणाला समा-धान वाटतें.

कांकडी स्त्री० कांकड; हुडहुडी; अंग कांकडून जाणें (क्रि० भरणें).

कांकडें न० शहाळें; कोंवळा नारळ.

कांकण [सं० कंकण] न० १ काचेची बांगडी. २ सोन्याचें वगैरे बायकांचें मनगटांत घालावयाचें वलय. ३ लग्नांत नवरानवरींच्या हातांत बांधतात जो दोरा तो. **कांकण** याला **कांकणी, कंगणी** असेही प्रतिशब्द आहेत. ❀**हातच्या कांकणाला आरसा कशाला** ? ज्या वस्तूचें स्वरूप आपल्यापाशीं असलेल्या साधनांनींच सहज रीतीनें आणि पूर्णपणें समजण्याजोगें आहे त्या वस्तूचें स्वरूप समजून घेण्यासाठीं अन्य साधनांच्या किं० बाहेरच्या साधनांचा अवलंब करणें हा मूर्खपणा होय. **कांकणभर** किं० **दोन कांकणें क्रि० वि०** किंचित्; थोडेसें; उ० प्रमिलेच्या गोठांचें सोनें सिंधूच्या गोठांच्या सोन्यापेक्षां कांकणभर सरस आहे.

कांकणा पु० सोनारांचें एक खुंट्यासारखें लाकडी साधन; हा खुंटा एका टोंकास बारीक असून दुसऱ्या टोंकास तो थोडा थोडा लठ्ठ होत गेलेला असतो, व लहान मोठ्या बांगड्या, गोठ, किं० बिलवर त्याचेवर आकारतात; याला ' खिळा ' असेंही म्हणतात. पाटल्या, वळीं, वगैरे ज्याच्याभोंवतीं ठोकून घडवितात तो गायदुमाच्या आकाराचा खुंटा.

काकणीताफता पु० एक प्रकारचें पातळ, गुळगुळीत आणि चकचकीत रेशमी कापड.

काकता, काकणता पु० मागें **कांकणा** पहा. याला **देशमुख, वरताणा,** अशींही अन्य नांवें आहेत.

कांकर पु० १ मृदंग वगैरेंस ओढणीकरतां जी वादी लावतात ती. २ ओरखडा (नखानें वगैरे उठलेला).

काकर स्त्री० १ पाण्यावर पातळ खापरी इ० पाण्याच्या पृष्ठभागास समांतर अशी मारली असतां तिचीं अनेक उड्डाणें होतात तीं प्रत्येकीं. २ भोंवरा जमिनीवर टाकला असतां तो बिन-जोरानें दोन तीन वेळां आंसाभोंवतीं फिरून निश्चल पडणें.

कांकरणें अ० क्रि० १ कचरणें; अनिश्चित मनः-

स्थितींत असणें.२आढेवेढे घेणें;कां कूं करीत बसणें.

काकरता, कांकरता क्रि० वि० कसरता; विवक्षित मार्गापासून ईषन्मात्र चलित होऊन; तिरकस. ꣸ **काकरतें घेणें** एकाद्या कामांतून अंग काढून घेणें.

काकरी स्त्री० शेत नांगरतांना नांगराची शेताच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतची एक खेप.

कांकरी स्त्री० १ कातलेलें रेशीम. २ कातलेल्या रेशमाची लड, गुंडा, इ०; रेशमाचें कुकडें.

काकलक [सं० काकिल=मानेचा वरचा कणा] **न०** गळ्याचें पुढें आलेलें हाड.

काकवी, कांकवी स्त्री० १ उसाचा रस कढवून गूळ न होऊं देतां मधाप्रमाणें पातळ जो रांधा राहवितात तो; उसाचा कढविलेला घट्टसर रस. २ साखरेच्या रांध्याचा जो द्रव जमतो तो.

काकसावणें [सं० कांक्षा] **अ० क्रि०** शंकित होणें; संशयित होणें; कचरणें.

काकळूत, काकुळत, काकुळती [सं० काकली=सौम्य आणि गोड आवाज] **स्त्री०** १ विनवणी; करुणा भाकणें; शरण जाणें; मदतीबद्दल आर्जव; उ० देवा, आणखी किती तुझ्या काकुळती करूं ? २ दुसऱ्याचें दैन्य पाहून वाटते जी दया. करुणा, सहानुभूति, किं० कींव, ती; उ० भक्ताची तुला नाहीं कां काकुळती येत ? ꣸**काकळूत मामळूत स्त्री०**काकुळती. **काकुळतीस येणें** दीनवाणीनें एकाद्याची प्रार्थना करणें. **काकुळती करणें** प्रार्थना करणारावर दया करणें; त्याच्यावर कृपादृष्टि वळविणें. **काकुळती येणें किंवा जाणें** शरण जाणें; दीनवाणीनें दया भाकणें; उ० आणखी कोणाला मी काकुळती जाऊं ? **काकुळतवाणा (–णी) वि०** दीनवाणा; केविलवाणा.

कांका पु० झावळीचे टोंक; माडाच्या झावळीचा टोकाकडचा भाग किं० शेंडा.

काका [हिं०] पु० चुलत्यास सन्मानानें हांक मारण्याचा किं० त्याचा निर्देश करण्याचा शब्द. ꣸**एकाद्याला काकामामा करणें** दीनवाणीनें त्याला विनविणें किं० त्याची करुणा भाकणें.

काकाकव्वा, काकाकुवा, काकातू पु० पोपट, चंडोल, वगैरेच्या जातीचा एक पक्षी.याच्या डोक्यावर तुरा असतो.

काकिणी [सं०] स्त्री० १ दमडी (वीस कवड्यांचें नाणें). २ कवडी. ३ गुंजभर वजन. ४ पाव मासा.५ तागडीची दांडी. ६ हातभर लांबी.

काकी [हिं०] स्त्री० १ चुलती; बापाच्या भावाची बायको. २ चुलतीस सन्मानानें संबोधावयाचा शब्द.

कांकी, काकी स्त्री० १ एक वन्य पालेभाजी. २ काकवी.

कां कीं [म० कां (किमर्थ, कसें)+ कीं (असें, पुढें दिल्याप्रमाणें)] **अ०** कां म्हणून विचारशील तर सांगतों; अशा कारणाकरितां कीं; कारण. उक्तार्थाविषयीं कारणप्रश्नाची मनांत संभावना करून जेव्हां कारणाचा उपन्यास कर्तव्य असतो तेव्हां 'कां कीं 'ह्या शब्दाचा प्रयोग केला जातो;उ०लहानपणींच मुलांना सद्वर्तनाची शिक्षा लाविली पाहिजे,कां कीं थोरपणीं मनें परिपक्व झाल्यावर ती लागणें दुरापास्त.

कांकीट वि० काटकुळा; किडकिडीत; हाडकुळा; रोड.

काकु [सं०] स्त्री० १ शोक, भीति, इ०नीं शब्दोच्चारांत जो स्वराचा पालट होतो तो. २ स्वरभेदानें विरुद्धार्थ दाखविणारा प्रयोग; उ० दोन आणि तीन सात होतात ? उत्तर, होत नाहींत; उ० शंकराचें वास्तव्य कैलासावर नसतें ? उत्तर, होय,असतें. ह्या दोन्ही उदाहरणांत वक्त्याचा अभिप्रेत अर्थ त्याच्या स्वरावरून श्रोत्याला कळतो. ꣸**काकर्थ [सं०** काकु+अर्थ] **पु०** काकु या स्वरभेदात्मक प्रकारानें वाक्यार्थ जो विपरीत होतो तो.

काकुला पु० लहान मुलांच्या टाळूवर केशांचें झुलूप ठेवतात तें, (क्रि० ठेवणें, राखणें).

काकू स्त्री० काकी; चुलतीस ज्या नांवानें सन्मानपूर्वक हांक मारावयाची तें नांव. ' आई, ' ' बाप ' ' काकू, ' ह्या तीन शब्दांचीं रूपें रत्नागिरीकडे ' आईस, ' ' बापूस, "काकूस, ' अशीं केलीं जातात.

कांकूं, काकू स्त्री० काचकूच करणें, कचरणें; मागें मागें घेणें; तयार नसणें. ꣸ **काकू करणें** कचरणें; मागें मागें घेणें;तयार न होणें; अनमान करणें

कांकोरा पु० १ ओरखडा; पदार्थाच्या पृष्ठभागावर खिळा लांकडाचें धसकट, इ० लागल्यानें जी रेघ उठते ती किं० जो चरा पडतो तो.

काकोली [सं०] **स्त्री०** एक औषधी वनस्पति. हिला **क्षीरशुक्ला, वायसोली**, अशीं अन्य नांवें आहेत.

काख, कांख [सं० कक्षा] **स्त्री०** १ खाक; बाहुमूलाखालचा प्रदेश; बगल. २ वेलाचा ताणा; ॐ **काखा वर करणें** दिवाळें काढणें. **काखा वाजविणें** आनंदून जाणें; मोद पावणें. **काखेस मारणें** १ कांहीं वस्तु घेऊन पळून जाणें; कांहीं वस्तु दाबण्याच्या इच्छेनें ती घेऊन जाणें. २ आपल्या संरक्षणाखालीं किं० आश्रयाखालीं घेणें. **काखेंतला काढून बाजारांत मांडणें** आपली खोटी कृति खरी म्हणून गवगवा करणें; आपली बनावट कृति, गोष्ट, किं० हकीगत खरी म्हणून सांगत सुटणें. **काखेंत धाकटें महारवाडा शोधी** आपलें मूल आपल्याच घरांत असून त्याचा शोध गांवभर करणें. **काखेंत कळसा गांवाला वळसा** भान नसल्यामुळें अगदीं आपल्या जवळची वस्तू गांवभर धुंडीत बसणें. **काखबिल्ली स्त्री०** १ बगलबिल्ली. २ अति लाड ज्याचे केले जातात असें मूल; लांडकें मूल. **काखभोंवरा पु०** घोड्याला पुढच्या तंगडीवर जें केशांचें वलय असतें तें, किं० जो काळा वगैरे डाग असतो तो. घोड्याचें हें अशुभ चिन्ह समजतात. **कांखमांजरी स्त्री०** खाकेस गळवासारखा रोग होतो तो. हें गळूं निर्मुख असतें, व त्यावर लोणी वगैरें पसरून तें मांजरास चाटावयास लावणें हा त्याचा इलाज समजला जातो. **काखसावला वि०** (बाहेर जावयाला तयार झालेला मनुष्य आपलीं चिरगुटें खाकेस घालून उभा असतो त्याच्यासारखा) निरुद्योगी, बेपर्वा, बिनदर्द (घरांतील नोकर, मुलगा, इ०). सावलें=लुगडें, बायकांचें कोणतेंही चिरगूट. वरील वाक्प्रचारांत 'चिरगुटें' सामान्यत:.

कांखा पु० निष्पत्र जें वाल इ० काचें झाड तें. २ निष्पत्र अशी झाडाची काठी; पर्णरहित वृक्ष; खुंट. ३ (लक्षणेनें) किडकिडीत, काटकुळा, किं० रोड मनुष्य.

कांखाटणें [म० काख] **अ० क्रि०** दिवाळें काढणें. (आपणाजवळ कांहीं नाहीं हें दाखविण्यासाठीं बाहु उभारून खाका वर करतात ह्या चालीवरून).

कांखाटणें [म० काख] **स० क्रि०** चोरून न्यावयाकरतां पदार्थ वगैरे खाकोटीस मारणें. (याला **काखाळणें, काखविणें**, असेही प्रतिशब्द आहेत).

काखाटी, काखोटी [म० काख] **स्त्री०** खाक; बगल. ॐ**काखोटीस मारणें** १ पदार्थ खाकेंत धरणें (तो घेऊन पळून किं० निघून जावयाच्या उद्देशानें). २ एखाद्याचा पक्ष स्वीकारून त्यास आश्रय देणें.

काखाळा (–ळ्या) [म० काखाळणें] **वि०** १ एखादी वस्तु खाकोटीस मारून पळून जाण्याचा ज्याचा स्वभाव असा. २ हावरट, अधाशी, उपट्या, लाट्या, इ०. २ ओढाळ (गुरूं); स्वैरवृत्ति; नियंत्रणेंत राहावयाला नाखूष. ॐ**काखाळी स्त्री०** (विशेष अर्थ) अल्प निमित्त असतां मोठा कांगाव करण्याचा जिचा स्वभाव अशी स्त्री.

कांग [सं० कंगु, कंकु, कंगुनि=राळा] **पु०** राळा नांवाचें धान्य.

काग [सं० काक, काग=कावळा] **पु०** कावळा.

कागडा [हिं०, सं० काक] **वि०** १ काकदृष्टि जो मनुष्य तो. २ कावेबाज. ३ बारीकसारीक पहाणारा (आपल्या फायद्याचें).

कांगणी स्त्री० १ एक औषधी. २ तिचें फल. ३ कांग नामक धान्य; यांलाच **कांगुणी, कांगोणी** हे प्रतिशब्द आहेत. ॐ**कांगणेल न०** कांगण्याचें जें तेल तें.

कागद [फा० कागज्=कागद] **पु०** ताग, कापूस, इ० कुटून लिहिण्याच्या वगैरे उपयोगीं जें पत्र करतात तें. (कागदांचे अनेक उपयोग असतात व त्याप्रमाणें त्यांच्या जातीही अनेक आहेत, जसें **टीप कागद पु०** शाई टिपावयाचा कागद). ॐ **कागदावर बसणें** धूळपाटीवर शिकावयाची विद्या संपवून कागदावर लिहून शिकावयाच्या विद्येला सुरवात करणें; बालबोध, मोडी अक्षर, पत्रें लिहिणें, जमाखर्च लिहिणें, इ०रूप शिक्षणाला सुरवात करणें. **कागदावर बसविणें**

किं० घालणें वरील विद्या मुलाला शिकविण्याला प्रारंभ करणें. **कागदकुटारी, कागदकुट्या पु०** रद्दी कागद कुटून नवा कोरा कागद तयार करणारा मनुष्य किं० तो धंदा करणाऱ्या जातीचा एक इसम. **कागदपत्र पु० अ० व०, कागदपत्रें न० अ० व०** एखादी गोष्ट स्थापित करण्याच्या कामीं पुराव्याच्या स्वरूपाचे जे रोखे, सनदा, खतें, इ० तीं सर्व समच्चयानें. **कागदाचा घोडा, कागदी घोडा पु०** कागदावर लिहून दिलेली कबुलात वगैरे. **कागदी घोडे नाचविणें** कागदावर कोरडी वाटाघाट करणें; ज्याच्यापासून कांहीं लाभ होण्याजोगा नाहीं असा खटाटोप करणें; कोरड्या कबुलाती वगैरे देणें. **कागदोपत्रीं क्रि० वि०** १ कागदावर नमूद करून. २ पत्रांत किं० खतांत.

कागदी पु० पत्रें वगैरेंची वाहतुक किं० नेआण करणारा, जासूद, इ०.

कागदी वि० १ कागदाचा; कागदानें केलेला (जाळी, मखर, इ० सारखा जो पदार्थ तो). २ तकलादू; टिकाऊ नव्हे असें (घर इ०).३ पातळ सालीचें (लिंबू, चिवा, इ०). ४ कागदासारखें पांढरें, स्वच्छ (कबूतर). ꣸ **कागदी चिवा पु०** स्त्रीजातीचा चिवा(एक प्रकारचा वांबू).याच्या उलट **भरींव चिवा. कागदी जवान पु०** अशक्त आणि किरकोळ शरीरयष्टीचा जो कोणी तरुण तो.**कागदी लिंबू** किं० **निंबू, न०** आपण भातावर किं० सुधारसांत वगैरे पिळावयास जें लिंबू घेतों तें. **कागदी वेळू पु०** वेळूची एक जात.

कागबळ स्त्री० ' काकवलि ' याचें हें अपभ्रष्ट रूप.मागें ' काकवलि ' पहा.

कागली वि० 'कागल' या नांवाच्या गांवचा पूर्वीचा रुपया, इ०.

कागा [**सं०** काग] कावळा. ꣸**शंभर वर्षें कागा हजार वर्षें नागा** कावळा शंभर वर्षें जगतो आणि नाग हजार वर्षें जगतो.

कांगाव, कांगावें न० थोडीशी इजा असतां फार इजा झाली असें रडून, ओरडून, किं० कुरकुरून भासविण्याचा जो प्रकार तो. (**कांगाई** किं० **कांघाई स्त्री०, कांघाव पु०,कांघावें न०, कांघावा पु०** अशींही याची अन्य रूपें प्रचारांत आहेत). अन्वर्थक क्रिया० करणें. ꣸**कांगावखोर, कांघाईखोर, कांघावखोर वि०** कांगाव करण्याची ज्यास खोडी आहे किंवा कांगाव करण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा (मुलगा, पुरुष, स्त्री, इ०).

कागाळी [**म०** काग(कावळा) + आरोळी] **स्त्री०** १ अपराधासंबंधीचें गाऱ्हाणें किं० तक्रार; उ० माझ्या कानावर पुन्हां तुझ्या कागाळ्या आल्या तर बघ ! २ चहाडी करणें.

कागिनी स्त्री० एक रागिणी (संगीतांतली).

कांगुणी, कांगोणी [**सं०** कंगु, कंकु, कंगुनि =राळा] **स्त्री०** राळा; (मागें **कांग** पहा).

कांगु [**सं०** वर ' कांगुणी ' पहा] **पु०** राळा, कांग, कांगणी.

कांघाई स्त्री०, कांघाव (–वें) न० मागें **कांगाव** पहा. ꣸**कांघाई (–व–) खोर वि०**व्यर्थ किं० अत्यल्प कारणावरून कुरकुर करणारा.

कांच पु० १ गांजणूक; छळणूक. २ त्रास, उपद्रव, तसदी.

कांच [**सं०** काच] **स्त्री०** १ काच ही गारांच्या रांध्यापासून वगैरे करतात. तिच्या हंड्या, बांगड्या,वगैरे बनवितात. २ हिरे,माणकें, वगैरेंना वैराग्याच्या तुच्छतेनें म्हणतात.३(**वैद्यकांत**)काचबिंदु.꣸**कांचशाळा स्त्री०** काचेपासून निरनिराळे पदार्थ करणारी किं० करावयाचें शिक्षण देणारी संस्था. **काचमणि पु०** १ काचेचा मणि.२ बिलोर. **कांचेचं भांडें न०** अतिशय नाजूक, ज्याची निगा राखणें किं० काळजी घेणें जरूर आहे, असें माणूस किं० असा पदार्थ. **कांचबंदी वि०** कांचेनें बांधलेलें (जोतें, भिंत, फरशी, इ०).

कांचकमळ,न० सात वर्तुळांची कांहीं विशिष्ट प्रकारें गुंतागुंत करून होते ती आकृति. ह्या आकृतींत एक मध्यवर्ती वर्तुळ असून त्याच्या आणि शेजारच्या दोन वर्तुळांच्या मध्यबिंदूंतून ज्यांचे परीघ जातात अशीं सहा वर्तुळें असतात.

कांचकळणें अ० क्रि० १ बोलतांना अडखळणें; चांचरणें; तोतरा उच्चार करणें. २ संदिग्ध भाषण करणें. ३ एखादें काम धांदरटपणानें करणें; कांहीं काम करतांना आंवांकणें; कचरत कचरत काम करणें.

काचकिरडा वि० १ पुरता शिजला नव्हे जो भात इ० तो. २ पुरता न शिजल्यामुळें टणक लागणारा (पदार्थ).

काचकुयरी स्त्री० एक औषधी. खाजरी कुयरी आणि गोडी कुयरी अशा हिच्या दोन जाति आहेत.

काचकुली स्त्री० गुदगुली (क्रिया० करणें, होणें).

काचकूच स्त्री० मागे मागें घेणें;कचरणें (क्रि० करणें).

काचणी, कांचणी स्त्री० १ दोरीच्या घर्षणानें एकाद्या वस्तुवर जो ओरखडा किं० पन्हळ पडतो तो. २ म्हशींचीं वगैरे शिंगें कापण्याच्या कामाची दोरी. ३ गांजणूक, जाचणी, छळ. ४ काळजी; टोचणी; हुरहूर; उ० माझी परीक्षा कशी पास होते अशी मला काचणी लागून राहिली आहे. ५ काचणें, गांजणें, छळणें.

काचणें [सं० क्रकच=करवत] अ० क्रि० १ घर्षणक्रियेमुळें तुटणें; उ० या रहाटाची दोरी कांचली आहे. २ झुरणें, झिजणें (तहान, भूक, भीति, आपत्ति, चिंता, दुखणें, वगैरेंमुळें). ३ ३ त्रास (कोणेकाच्या जाचामुळें वगैरे).

काचणें, कांचणें स० क्रि० गांजणें, छळणें, जाचणें.

कांचन [सं०] न० १ सोनें. २ एक झाड; त्याला पांढरीं किं० पिवळीं वासाचीं फुलें येतात. ३ गंजीफांच्या रंगांतील एक रंग.

काचन पु०, **काचनक** न० पोथीची पानें, कागद, इ० बांधावयाची दोरी, सूत, रेशीम, इ०. [जंगली शिसू.

कांचनार [सं०] पु० एक जंगली वृक्ष;

काचफोड [**कासेफोड** याचें अपभ्रष्ट रूप] वि० पाण्यानें डबडबलेला फोड.

काचरी स्त्री० १वांगीं, बटाटे, इ०दींचे पातळ काप करून उन्हांत वाळवून पुढें प्रसंगविशेषीं भाज्या करण्यासाठीं ठेवितात ते. २ (लक्षणेनें) वृद्ध स्त्रीचे सुरकुतलेलें आणि लोंबत असलेलें स्तन. ॐ**काचरी सुपारी** स्त्री० कोंवळ्या पोफळांचे काप करून किं० लांब तंतु करून ते शिजवून उन्हांत वाळवून त्यांचेवर ते शिजविलेल्या पाण्याचा आपका देऊन तयार केलेली सुपारी. हिला 'कचरी सुपारी,' 'लवंग काचरी सुपारी,' अशीं दुसरीं नांवें आहेत.

काचलवण [सं०] न० बांगडखार (आवळे आणि सैंधव यांचें मिश्रण).

कांचवा पु० कांबळें इ०कांचे हात उघडे राहून कमरेपर्यंत पुरेल असें जें प्रावरण शिवतात तें; विनबाह्यांचा आणि बिनघोळाचा कांबळ्याचा अंगरखा, (शेतांत काम करणारे लोक घालतात तो).

काचळ स्त्री० १ दगडाची लांबट चीप. २ लाकूड इ०ची लांब धलपी. ॐ**काचळरान** न० माळरान; माळजमीन. [कच्चा.

काचा [मं० कच्चा] वि० (कवितेंत) अपक्व;

काचार, काचारी [सं०काच] पु० कांचेच्या बांगड्या बनविणारा किंवा विकणारा. **कासार** हें यांचें अशुद्ध पण रूढ रूप.

काचावणें अ० क्रि० १ आजारामुळें झिजणें, सुकणें, किं० अंग टाकणें. २त्रासणें (सांसारिक तापानें वगैरे). ३ (कवितेंत) धीर खचणें; गळाठणें; गळून जाणें; उ० काचावला वीर पुढें धजेना ॥

कांची [सं०] स्त्री० मेखला; कंबरपट्टा (सोन्याचा किंवा चांदीचा).

कांचोटी स्त्री० (कवितेंत) कांचेची गोटी; कांचमणि; उ० काचोटी आणि वासरमणि । कोंवि तुलना पावती ॥

कांचोळणें [म० कांचोळी=कोंवळ्या कैरीची कोय] अ० क्रि० कोंवळ्या आंब्यांत कोय धरणें; कोय उत्पन्न होण्याच्या स्थितीला आंबा येणें.

काचोळा पु० १ जोंधळा वगैरे धान्याचे जे दाणे त्यांवरील कवच, सालपट, किं० पापुद्रा. २ बारीक कोंडा, भुसा.

काचोळा पु० १ काचळ. २ दगडाचा उडालेला किं० उडविलेला कळपा किं० तुकडा. ३ फाडून किं० तोडून काढलेली वस्त्राची किं० लाकडाची चिंधोटी किं० पट्टी.

काचोळी, कांचोळी[सं०कंचुली]स्त्री० १जिचे बंद पाठीमागें असतात किं० जिची गांठ पाठीवर बांधली जाते अशी चोळी (मारवाडणी बहुतेक काचोळ्याच घालतात). २ विवाहांत नवरीला एका तुकड्याची केलेली चोळी घालावयाला देतात ती. ३कोंवळ्या आंब्याची बाठ किं०कोय. ॐ**कांचोळीपंथ** पु० एक बीभत्सवर्ती पंथ. **कांचोळीपंथी**

वि० काचोळीपंथाचा अनुयायी (पुरुष किंवा स्त्री).

कांचोळें न० १ वांगें, धोतरा, इ०कांचीं फळें, किं०गुलाब,जास्वंद,इ०कांचीं फुलें,यांच्या मूलभागीं देंठास आच्छादनभूत जो प्रायः हिरव्या रंगाचा कोश किं० अवयव असतो तो. २ जोंधळा, सजगुरा, इ० वरील कवच किं० टरफल. ३ गंधाक्षता ठेवावयाचें लहानसें धातूचें पात्र; कचोळें.

काच्या [सं० कच्छ] पु० १ वीत सव्वावीत रुंदीचें कंबरेस बांधावयाचें (पंचासारखें) वस्त्र. २ नेसलेल्या वस्त्राचा पुढला ओचा जो मागें खोंचतात तो; अन्वर्थक क्रिया० घालणें, मारणें, खोंचणें, खोवणें. ॐ**काच्या घालणें, पिटणें,** किं० **भिडाविणें** १ नेसलेल्या वस्त्राचा पुढला सोंगा मागें खोवणें. २ कंबर बांधणें किं० कसणें.

काछी [हिं०] पु० एक जाति किंवा त्या जातीचा माणूस.या जातीचा माणूस माळवें(मळ्यांत केलेल्या भाज्या,फळें इ०) विकण्याचा धंदा असतो. पुण्यांतले काछी प्रायः स्वतः मळे करीत नाहींत. ते फळें दुसऱ्याकडून विकत घेऊन विकतात मात्र. **काची** असाही शब्द या शब्दाऐवजीं वापरतात व इकडे तोच विशेष ऐकूं येतो.

काज स्त्री० कांच.

काज [हिं०] पु० काजा; ज्यांत गुंडी घालतात तें भोंक किं० घर (क्रिया० पाडणें, शिवणें).

काज [सं० कार्य] न० काम.'काज' हा शब्द व्यवहारांत स्वतंत्ररीत्या वापरीत नाहींत; मात्र कवितेंत तो तसा आढळतो. ॐ**काजकाम न०, काजकारभार पु०, काजकीर्द स्त्री०** हे शब्द **'काम न०'** याच्या पोटांत पुढें पहा.

कांजगी [अ० काईजाह्] स्त्री० घोड्यास ओंठाळी देऊन त्याच दोरीच्या शेवटानें त्याची दांडी बांधतात असें जें बंधन तें. (घोड्याला खरारा करतेवेळीं काजगी बांधतात).

कांजणी, कांजिणो, स्त्री० १ देवीसारखा एक रोग. २ त्याचा जो फोड तो. प्रयमार्थी प्रायः **कांजण्या, कांजिण्या** असा अनेकवचनी प्रयोग होतो. अन्वर्थक क्रिया० येणें, निघणें, उगवणें. ३ तोंडावर कानांच्या बाजूस येते ती लव.

काजरवेल स्त्री० एक औषधी.

काजरा पु० एक विषवृक्ष.

कांजवणी [म० कांजी+पाणी] न० भाताची पेज आंबवून कालवण करतात तें.

काजवा पु० एक जंतुविशेष. याच्या पार्श्वभागीं उजेड असतो व तो रात्रीं चकाकित दिसतो. ॐ**काजवे चमकणें** भीतीनें किं० पित्तादिकानें दृष्टीपुढें जें स्फुरण होतेंसें वाटतें तें तसें वाटणें. 'काजवे लखलखणें' असाही वाक्प्रचार रूढ आहे. **काजव्याचा उजेड पु०** अपूर्ण,असमाधानकारक, क्षुद्र, चंचल, किं० अशाश्वत,सोय, किं० वैभव. **काजव्याचा उजेड गांडीभोंवतां** क्षुद्र आणि हलकट लोकांच्या हातून क्षुद्र आणि हलकट कामेंच व्हावयाचीं;भारदस्त कामांस ते सर्वथा नालायक.

काजळ [सं० कज्जल] न० १ दिवा, कांकडा, इ०कांवर जी मस जमते ती. (पुढें **काजळी** पहा). २ अंजन. हें बायका शोभेसाठीं किं०औषध म्हणून डोळ्यांत घालतात. ॐ**काजळाचा डोंगर पु०** दिव्याचा धूर कोनाड्याच्या माथ्यापर्यंत जाऊन किं० दुसऱ्या कशाच्या तरी पृष्ठभागापर्यंत जाऊन तेथें जी मस जमते ती फार सांचली असतां तिला 'काजळाचा डोंगर' म्हणतात. **काजळकुंकू** १ वेणी घालणें इ० स्त्रियांचा प्रसाधनाविधि (क्रि०करणें). २एका वन्य औषधीचें जें पुष्प त्यास उपमेनें म्हणतात. **काजळाची कोठडी स्त्री०** सरकारी खजीना किं० त्याच्या संबंधाचें काम किं० मोठ्या प्रमाणावरचा देण्याघेण्याचा व्यवहार. रुपये मोजण्याच्या कामानें हात काळे होतात. खजीन्याच्या खोलींत अंधेर असतो म्हणून तेथें दिवे लावावे लागतात, त्यांचें काजळ सर्व खोलीभर पसरलेलें असतें, ह्यावरून हा शब्द उत्पन्न झाला. **काजळाच्या कोठडींत गेलें तर तोंड काळें मोजलें तर हात काळे** ह्या खोलींत दिव्याची मस अंगावर बसते आणि नाणीं मोजल्यानें हात काळे होतात.

काजळी [सं० कज्जल] स्त्री० १ दिव्याच्या धुराचा झोत; उ० नाना, तो दिवा मोठा होऊन त्याची काजळी चालली आहे, तो जरा बारीक कर पाहूं. २ ज्यास्त वात जळल्यानें तिच्या अग्रावर धरतो जो कोळी तो; हा निसत्व असतो व ज्वलनक्रियेस अडथळा करतो. ३ काजळ धरावयाच्या सोर्यांचें पात्र. ४ जोंधळयाला जडणारा एक रोग.५ दागिन्यांतील वगैरे लाख वित-

ळवून ती काढून टाकल्यावर त्यांत थोडीशी जळकी लाख राहते ती. ६ पित्तक्षोभादिकांमुळें डोळ्यांवर येतें जें पटल तें. ७ काजळ घोटून करतात जी शाई इ० ती. ८ एका झाडाचें नांव. ꣸**काजळी वि०** १ काजळाची केलेली (शाई किं० पागोट्यास वगैरे द्यावयाचा एक प्रकारचा काळा रंग, इ०). २ काजळासारख्या काळ्या रंगानें रंगविलेलें (वस्त्र).

कांजळी स्त्री० गाय किं० म्हैस व्याल्यावर पहिलें काढतात जें दूध तें. ह्याचा खर्वस करतात.

काजा पु० १ घोड्याची मान वर राहावी म्हणून त्याला घालतात जो एक प्रकारचा लगाम तो. २ घोड्यास खरारा करतांना दोरीचें जें बंधन करतात तें. [भोक तें.

काजा पु० गुंडी घालावयाकरतां पाडितात जें

काजाऊ [**म०** काज] **वि०** कामास येईल असा; उपयोगी; उपयोगी पडण्याजोगा.

काजाणू न० १ गृहादिकांस लागणारें जें लाकूडसामान (तुळया, दारें, इ०) तें समुच्चयानें. २ घराची लाकूडकामाची उभारणी; भिंती बांधावयाच्या अगोदरची घराची उभारणी.

काजारी [**सं०** काच] **पु०** कांचेच्या बांगड्या करून विकणाऱ्यांची जाति किंवा तज्जातीय मनुष्य.

कांजिणी स्त्री०, **कांजें न०** मागें **कांजणी** पहा.

काजी [**अ०** काजी] **पु०** १ मुसलमानांचा धर्माधिकारी. २ मुसलमानांतील न्यायाधीश. ३ बिकट आणि गंतागुंतीच्या व्यवहारांत कुराणांतील वचनांवरून कसा निकाल करावा किं० निर्णय ठरवावा हें सांगणारा मुसलमान अधिकारी पुरुष.

कांजी [**सं०**] **स्त्री०** १ भाताची पेज आंबवून कालवण करतात तें. २ पातळसर भात.

काजुरा गौरी स्त्री० एक वनस्पतिविशेष.

काजू पु० १ एक प्रकारचें झाड. २ त्याचें फल किंवा बी. ꣸**काजूगोला पु०** काजूचें फळ; लठ्ठ रसाळ देठ वरील फळासह (हें फळ म्ह० व्यवहारांतील काजूबी).

काज्या पु० काजगी; घोड्याला खरारा करतेवेळीं किं० धुतेवेळीं त्याच्या तोंडाला दोरी बांधून ती शेपटीशीं बांधलेली असते ती.

कांट न० जळूसारखा एक जंतू (याचा पावसाळ्यांत उद्भव होतो).

कांट स्त्री० कुंपण करण्याकरतां बाभळ, बोर, शेर, कण्हेरी, मोगली एरंड, इ०कांच्या ज्या काटक्या, फाटे, इ० उपयोगांत आणितात ते प्रत्येक.

काट पु० १ कंत्रण; दुर्लभ किं० दुःसाध्य गोष्ट शक्य करण्याविषयींचें धोरण, शक्कल, किं० युक्ति. २ टापटीप, व्यवस्था, शिस्त, मांडणी (राज्य, संस्था, घर, इ०कांची). ३ [**काटणें अ०क्रि०**] वस्त्र, अंग, इ०कांवर बसतो जो मळाचा लेप किं० थर तो. ४ लुगड्यावर किं० पातळावर बूट काढावयाचा खडी म्हणून जो रंग करतात तो. ५ [**कांटणें स० क्रि०**] फराटा मारणें; खोडणें; उ० शिक्षकानें चुकलेल्या शब्दावर काट मारला. ६ [**कांटणें स० क्रि०**] वगळणें; टाळा किं०फाटा देणें; उ० रघुनाथानें आज संध्येस काट दिला आहे. ꣸**काटकसर स्त्री०** १ व्यवहारांत शक्य तितकी कसर काढून बचत करून बेताबातानें आणि शिस्तीनें जो खर्च करणें तो, (क्रि० करणें). २ अशा तऱ्हेनें शिल्लकीस पडलेलें जें द्रव्यादि तें. **काटकसरी**, **काटकसऱ्या वि०**बेताबातानें खर्च करणारा; खर्चांत बचत करण्याकडे ज्याचा कल आहे असा. **काटागिरी स्त्री०** १ चतुराई, धोरण, युक्ति (अडचणींतून वगैरे मार्ग काढून हेतु साधण्याची). २ कावेबाजी (व्यूह किं० कारस्थानें रचण्यांत). **काटदार**, **काटबाज वि०** ज्याचे अंगीं काटगिरी आहे असा; कारस्थानें करणारा; युक्तिबाज; धोरणानें अडचणींतून माग शोधून काढणारा.

काट पु०, **काटें न०** १ सुपारी, कांहीं रंग, किंवा द्विदल धान्य उकळून जें पाणी निघतें तें. २ कोकंब फोडून जो रस सालांस पुटें देऊन आमसूलें करण्याकरितां काढतात तो. ꣸**काटवणी न०** १ ज्यांत डाळ किं० रंगाचीं द्रव्यें किं० धान्यें, (नाचणी, बाजरी, इ०), उकळलीं आहेत असें पाणी. २ केवळ गढूळ जें पाणी तें.

काट न० १ शाई तयार करण्याकरतां नाचणी, बाजरी, इ० उकळून करतात जें पाणी तें. २ कुळीथ या नांवाच्या धान्याचें केलेलें सार. ३ [**काटणें स० क्रि०**] शेत भाजण्याकरतां उपयोगी शुष्क काटक्या,

इहाळ्या, इ० चा भारा किं० समुदाय; कवळ. ४ विड्याच्या पानांची चवड. ॐकाटकडी स्त्री० द्विदल धान्य शिजवून केलेलें सार, कळण, इ०. **काटकवळ** न० कवळ. **काटांत जाणें** (काट न्ह० शेत भाजण्याकरतां जमविलेल्या काटक्या; जणों काय चितेकरतांच या काटक्या गोळा केल्या आहेत या कल्पनेनें) मसणांत जाणें.

काटक पु० १ कर्नाटकांतील एक क्रूर, रक्तपात करणारी जाति किं०तज्जातीय मनुष्य.२ रामोशी, वाटमारे, दरवडेखोर जे लोक त्यांपैकीं जो तो. ३ अतिशय क्रूर किं०निर्दय मनुष्य. ॐ**काटकाई** स्त्री० १ काटकांचा जो उपद्रव तो. २ क्रूरपणा, निर्दयपणा, अति घोर कर्में.

काटक वि० १ कंटक (शरीर, मनुष्य). २ ऊन,वारा, पाऊस,थंडी, उपवास, इ०शारीरिक श्रम सहन करण्याची ताकद ज्याच्या शरीरीं आहे असा (मनुष्य).

कांटकी, काटकी स्त्री० शुष्क काष्ठक; लहान काष्ठ; फाटा.

काटकुटी स्त्री० १ काटकी, काट्टक. २ वादविवाद करणें; गप्पा कुटणें.

काटकुळा,काटकोळ वि० हाडकुळा; बारीक; मांसल नव्हे असा; किरकोळ, रोड, किरटोळा (मनुष्य, प्रसंगविशेषीं पदार्थ).

काटकुळी स्त्री० १ काट्टक. २ जखम, ओरखडा. ३ थंडीमुळें अंगावर पडणारी भेग.

काटकोन [सं०काष्ट=लाकूड+कोन(सं०कोण =कोपरा)] पु० १ नव्वद अंशांचा कोन. २ गुण्या. हा नव्वद अंशाचा कोन प्राचीन कारागीर अशा कोनाच्या लाकडी ठोकळ्यानें मोजीत.

काटक्याकुटक्या स्त्री० अ० व० काटक्या, बारीक सारीक लाकडाचें तुकडे, ढलप्या, इ०.

काटगोल पु० ओबडधोबड आणि वाटोळें तुळवट; वांसा.

काटणी [म० काटणें] स्त्री० १ जोंधळे, सजगुरे, इत्यादिकांचीं कणसें कापण्याचें काम; कापणी.२पत्ते, गंजीफा,वगैरेंचें जे ढीग त्यांचें द्विधाकरण. ३ अशा रीतीनें द्विधा करण करण्याची भिडूवर येते जी पाळी ती.४ विड्यांच्या पानांच्या चवडी करणें. ५ तोडणें (रान, जंगल,किं०झाडी). ६ छाटाछाट, कत्तल (युद्धांत). ॐ**काटणीवाटणी** स्त्री० पत्ते, गंजीफा, वगैरे काटणें, व त्या खेळणाऱ्या भिडूंना वाटणें.

काटाकाट, काटाकाटी, काटाकुट स्त्री० १ १ छाटाछाटी, कापाकापी; (तोडणें या अर्थी);उ० या निबंधांत काटाकाट करून तो सुटसुटीत कर. २ काटकसर करणें;कापणें (कमी करणें या अर्थी); उ० मोठ्या काटाकाटीनें मी रामभाऊस दहा रुपये उसने देऊं शकलों. ३ कत्तल.

काटणें [म० काट=मल) अ० क्रि० मलानें लिप्त होणें; उ० वारा अनिवार सुटला व आकाश धुळीनें काटलें.

काटणें [हिं० काटना=कापणें] स० क्रि० १ कापणें, छाटणें. २ पत्ते, गंजिफा, वगैरेंची समग्र चवड जी असते तिचे दोन भाग (कोणत्याही प्रमाणांत) करणें. ३ कमी करणें; उणें करणें; उ० बाईट अक्षराबद्दल बाईंनीं कावेरीचे पांच गुण काटले; उ० धनीसाव,माझ्या पोटाकडे बघून माझ्या पगारांतून ते पैसे सध्यां काटूं नका. ४ ०ला चाट देणें, फाटा देणें; उ० वेळ फार झाल्यामुळें बालगंधर्वाला शेवटचा प्रवेश काटावा लागला. ५ कष्टानें कंठणें, कसातरी घालविणें (वेळ); उ० गांवीं करमणुकीचीं साधनें नसल्यानें सुट्टीची मुदत मी कशीतरी काटली. ६ (तुच्छीवळांत) मारणें.

काटमोगरी स्त्री० मोगऱ्याच्या फुलझाडाची एक जात.

काटला, कटला पु० पदार्थ तोलून विकतांना दर मणावर जें त्या पदार्थाचें अधिक परिमाण दिलें जातें तें; हें परिणाम भिन्न पदार्थांवर भिन्न असतें तसें भिन्न स्थळीं भिन्न असतें. मागें ' कडता ' पहा.

कांटला पु०, **कांटली** स्त्री०, **कांटवेल** स्त्री० करटोलीच्या जातीचा एक वेल,–माल त्यास फळें येत नाहींत. ॐ**कांटलें** न० काटवेलीचें फूल.

कांटवन [म० कांटा+वन] न० कांटेरी झाडांचें रान.

काटवल न० गवत (गुरांच्या खावयाच्या उपयोगाचें किंवा छप्परकामाचें). याच्या उलट **भातण**. [फांद्या, इ०.

काटवळ न० कांटेरी झाडांचा काटक्या, शुष्क

काटविकरा पु० पराकाष्ठेची टंचाई; पदार्थाचा तुटवडा किं० तज्जन्य महागाई किं० महर्घता (**क्रि०** येणें); उ० यंदा आंब्याला काटविकरा आला आहे.

काटशह पु० (बुद्धीबळांत) आपल्या एकाद्या मोहऱ्याचा प्रतिपक्ष्याच्या राजास शह बसत असतां आणि आपलें दुसरें एकादें मोहोरें त्यांच्यामध्यें येत असतां तें हालवून आपण आपल्या पहिल्या मोहोऱ्याचा राजास शह देतो; अशा रीतीनें दिलेला जो शह तो ' काटशह '.

काटळणें स० क्रि० चिंचा फोडून त्यांतील चिंचोके काढणें.

काटळी स्त्री० एक हलकें धान्य.

कांटा, काटा [**सं०** कंटक] **पु०** १ बाभळीच्या, बेलाच्या, गुलाबाच्या वगैरे झाडांस जे अणकुचीदार अवयव असतात ते प्रत्येक. २ भीतीनें वगैरे अंगावर जो रोमांच येतो तो; उ० धनाजी व संताजी यांचीं नांवें काढतांच अवरंगझेबाच्या लोकांच्या अंगावर कांटा येत असे. ३ ताजवा इ० कांच्या दांडीचे मध्यभागीं जो कंटकरूप अवयव असतो,– ज्याच्या चलनानें दोन्ही बाजूंच्या पारड्यांतील वजनाचें तारतम्य कळतें,–तो. ४ ताजवा, तराजूं, किंवा दुसरें कोणतेंही यंत्र किं० साधन, ज्याच्या योगानें पदार्थांचें वजन मोजतां येतें. ५ घड्याळासारखें एक वजन मापण्याचें यंत्र असतें तें (याच्या खालच्या कडीस पदार्थ लोंबकळत सोडून वजन मापतां येतें). ६ या यंत्राचा जो कंटकरूप अवयव, ज्याच्या वाटोळ्या फिरण्यानें वजन समजतें तो. ७ घड्याळाचे तास, मिनिटें, सेकन्द, वगैरे दर्शविणारे जे तीन काड्यांसारखें अवयव ते प्रत्येकीं. ८ ज्वरादिकानें अंगावर बारीक बारीक पुटकुळ्या ज्या येतात त्या समुच्चयानें. ९ यत्किंचित् जें हींव येतें तें. १० विंचवाच्या नांगींतील कंटकरूप अवयव,–ज्याचा फटकारा बसला असतां आपल्या अंगांत त्याचें विष उतरतें. ११ वेळू इ० कांस जो तुरा येतो तो. १२ करवत, लगाम, इत्यादिकांचे जे कंटकरूप अवयव किंवा दांते ते प्रत्येक. १३ साळींच्या अंगावर जीं बोचरीं पिसें असतात,–ज्याच्या लेखण्या करतात,–तीं प्रत्येक. १४ कंबर, मान, पाठ, यांचे आंत आधारभूत जो आस्थिविशेष असतो तो म्ह० अर्थात् त्यांच्या ठायींचा कटाक्ष, कणखरपणा, किं० सहनशीलता; उ० कामाच्या रगाड्याखालीं कारकुनाच्या कमरेचा कांटा ढिला झाला; उ० भटजींनीं संध्या पाठ करून घेतांना माझ्या मानेचा कांटा ढिला केला. १५ गुणाकार, किं० भागाकार यांचा ताळा पाहाण्यासाठीं अंक मांडण्याकरतां जी चौफुली घालतात ती. १६ राघू, मैना, इ०कांच्या गळ्याला एक रोग होतो तो. १७ हलवा करतांना तिळादिकांवर साखरेच्या पाकाचीं पुटें बसून जे कंटकरूप अवयव उद्भवतात ते, (प्रायः) समुच्चयानें; उ० शांतीच्या हालव्याला चांगला कांटा आला आहे. १८ त्रासदायक, हानिकारक, आपलें ज्याच्यामुळें नुकसान होतें असा, नकोसा वाटणारा, शल्यप्राय मनुष्य; उ० नारायणरावाचा कांटा वाटेंतून काढल्याशिवाय राघोबांस पेशवाईचीं वस्त्रें मिळणार नाहींत, तेव्हां त्यास मारण्याचा आम्हांस हुकूम द्या. १९ किल्ली कुलपांत घालून फिरविली असतां त्याचा जो अवयव पुढें मागें सरकतो, ज्याच्या योगानें कुलूप उघडलें मिटलें जातें,–तो. २० टोच्या;–युरोपियन लोक मांस वगैरे खातांना जें चार दांते असलेलें चमच्यासारखें एक हत्यार वापरतात तें. ॐ**पाण्याचा कांटा मोडणें** अग्निसंयोगानें पाण्यांतील शैत्य मात्र जाणें; तें किंचित् गरम होणें. **कांटा काढणें** किं० **उपटणें** १ आपल्या मार्गांत असलेल्या किं० आपणांस पदोंपदीं नडविणाऱ्या शत्रूस दूर करणें किं० त्याचा विध्वंस करणें; उ० इब्राहिम फाकड्याचा कांटा काढल्याशिवाय यश येत नाहीं हें जाणून तो झाडावर चढला असतां आपल्या गोलंदाजा करवीं हरिपंत फडक्यांनीं त्यास नेमका उडविला व मराठे विजयी झाले. २ ०ची हड्डी नरम करणें; –ला अति उपद्रवकारक होणें; उ० या कामानें माझा कांटा काढला आहे. **कांटा करणें** (करणें=समजणें). हानिकारक समजून एखाद्याची संगत वगैरे वर्ज्य करणें. **कांट्याचा नायटा होणें** क्षुल्लक गोष्ट विकोपास जाऊन भयंकर परिणाम होणें. **कांट्यानें कांटा काढणें** [**सं०** कंटकेनैव कंटकम्] एका दुष्टाच्या हातून दुसऱ्या दुष्टास शासन होईल असें करणें. **कांटेकडी लगाम पु०**

घोड्याला घालावयाचा कांटेलगाम. **कांटेकणंग स्त्री०** कणगर (वनस्पति). **न०** तिचें फल. **कांटेकयरी स्त्री०** एक औषधी; (कुयरींतील एक तऱ्हा). **कांटेकुटे पु० अ० व०** कांटे वगैरे; उ० दूरून डोंगर साजरे, जवळ जातां कांटेकुटे (म्ह० दुरून एकादा मनुष्य चांगलासा वाटतो पण त्याचा सहवास घडला असतां त्याच्यांतील दोष नजरेस येतात). **कांटेकोर** [कांटा (ताजवा) + कोर (कड)] **वि०** १ बरोबर; तंतोतंत; योग्य परिमाणाला पूर्णपणें जुळणारा; कमी नाहीं ज्यास्ती असा. २ नियमाला किं० घालून दिलेल्या सरणीला पूर्णपणें अनुसरून असलेला. ३ ज्यांत कांहीं कमी ज्यास्ती किं० मागें पुढें करतां येत नाहीं किं० करणें योग्य नाहीं असा. **क्रि० वि०** तंतोतंत रीतीनें; कांहीं कमी ज्यास्ती न करतां; शिस्तीला किं० घालून दिलेल्या सरणीला पूर्णपणें अनुसरून. **कांटेकोरपणें क्रि० वि०** तंतोतंत रीतीनें; अगदीं शिस्तवार. **कांटेकुवर पु०, कांटेकुंवारी, कांटेकोरफड स्त्री०** कोरफडीची एक जात. **कांटेकवळा पु०** एक वनस्पतिविशेष. **कांटेकेतक (-की) स्त्री०** केवडा; वन्य केतकी; **कांटेचुबक पु,०न०**एक कांटेरी झाड;उंटांच्या आवडीचें खाद्य. **कांटेडोळे पु० अ० व०** डोळे येणें ज्याला ह्मणतात तो नेत्ररोग,–ह्यांत डोळ्यांना असह्य वेदना होतात. शेणडोळे आले असतां डोळ्यांना अति कंड सुटते. **कांटेतोल वि०** बिनचूक किं० अगदीं तंतोतंत मापाचा किं० वजनाचा. **कांटेधोतरा, कांटेधोत्रा पु०** धोतऱ्याची एक जात (हा औषधी आहे). **कांटेभांजी स्त्री०**एक पालेभाजी. **कांटेभोंवरी स्त्री०**एक कांटेरी झाड;त्यास भोंवऱ्यासारखें कांटेरी फळ येतें. **कांटेमोडणावळ स्त्री०** पूर्वीं गांवच्या शेतांची पाहाणी मामलतदार करावयास गेला असतां त्यास जर पायांत कांटे रुतले तर गांवकऱ्यांवर तो जो कर लादीत असे तो. **कांटेरी (-री) वि०** १ कांटे असलेला. २ कांट्यासारखा असलेला. **कांटेरा पु०** एक छोटें कांटेरी झाड. याला पांढरें फूल येतें. त्यांत मध असतो. **कांटेरिंगणी स्त्री०** रिंगणीची एक जाति. **कांटेरें न०** कांटेरी झुडूप किंवा खांदी. **कांटेलगाम, कांट्यालगाम पु०**कांटे कांटे असलेला घोड्याचा लगाम. **कांटेवन न०** कांटेरी झाडांचें रान. **कांटेशेवंती स्त्री०** शेवंतींतील एक भेद.

काटांजन,काटिंजन न० मागें 'कटंजन' पहा.

कांटारा पु० एक कांटेरी झाड. यालाच 'उंटकटार' म्हणतात.

कांटारा[म० कांटा] **पु०** कांटा; झाडांना बोचरा अणकुचीदार अवयव असतो तो.

कांटी, काटी [म० कांटा] **स्त्री०** १ कांटेरी झाड किं० झुडूप. २ कुंपणाच्या उपयोगाची कांटेरी वृक्षाची खांदी. ३ आट्यापाट्याच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. ४ लहान आणि कोंवळी वाभळ. ***काटी लावणें** (गृह, संसार, व्यवहार, रोजगार, इ० कांस) त्यांना आग लावणें, त्यांचा नाश किं० नायनाट करणें; उ० अरे गोसावड्या, आपल्या संसारास काटी लावून आमच्या पाठीस कां लागतोस ? **काटऱ्या आपल्या पोटावर ओढणें** पैसे वाचविण्यासाठीं खाण्यापिण्यांत टंचाई करणें. **घराला कांटी लागणें** घर उजाड पडणें, त्याचा नायनाट होणें; उ० प्लेगानें हरिभाऊच्या घरास कांटी लागली. **एकाद्याशीं कांटऱ्या घासणें** १ त्याला छळणें किं० सतावणें. २ त्याची भोसडपट्टी काढणें. **कांटऱ्यांचें कोल्हें करणें** क्षुल्लक गोष्टीस भयंकर स्वरूप देणें. **एकाद्याला काटऱ्यांवरून ओढणें** १ त्याला अतिशय सतावणें किं० छळणें. २ त्याला मनस्वी रागें भरणें किं० शिव्या देणें; त्याची खरडपट्टी काढणें. **काटऱ्याकुटऱ्या स्त्री० अ० व०** कांटेरी काटक्या, फांटड्या, वगैरे. **दुरून डोंगर साजरा जवळ गेलें काटऱ्या कुटऱ्या** दूरून एकादा पदार्थ रमणीय दिसला तरी त्याच्याजवळ गेलें असतां त्याचा भयंकरपणा दिसतो; केवळ बोलण्याचालण्यांत कोणी मनुष्य चांगला वाटला तर तो सहवासाला चांगलाच ठरेल असें म्हणवत नाहीं.

कांटी, काटी [नंदभाषेंत] **वि०** वीस.

कांटील स्त्री० एक वन्य वेल; करटोलीची एक जात. **न०** करटोलीचें फळ.

काटूक, कांटूक न० काटकी, फांटडी (प्रायः [शुष्क).

कांटें न० पावसाळ्यांत उत्पन्न होणारा जळूसारखा प्राणी. मागें 'कांट' **न०** पहा.

काटोस्त्री स्त्री० विणकऱ्याचें एक साधनविशेष; धनुष्याच्या आकाराची वेत इ० ची

काठी,—जी विणावयाच्या वस्त्राची रुंदी विणतेवेळीं 'पूर्णपणें ताणली जावी म्हणून लावण्यांत येते.

कांठ [**सं०** कंठ] **पु०** १ कड; किनार; सीमाप्रांत; उ० पृष्ठाच्या कांठापर्यंत लिहूं नको; उ० दाराचा कांठ लागून मंदाकिनीस टेंगूळ आलें; नदीकाठीं बसून गप्पा मारूं या; उ० समुद्राच्या कांठापर्यंत चिन्तामणी गेला; इ० इ०.२ भांड्याचा वगैरे गळा; उ० तपेलीचा कांठ लागून वासन्तीचा हात कापला. ३ वस्त्रादिकांचा रुंदीच्या दोन्हीं अंगाकडील चरम भाग किं० तेथील रंगीत, वेलबुट्टी काढलेला, किंवा नक्षीदार पट्टा किंवा किनार; उ० शान्तीच्या शालूचे कांठ खूप रुंद आहेत. **%कांठकोणी मोजणें** बारकाईनें आणि तपशीलवारपणें छाननी करून पाहाणें किं० तपासणें. **कांठावर बसणें** (पखवाजाच्या कांठावर थाप पडली असतां कर्णकटु ध्वनि निघतो व रंगाचा बेरंग होतो त्यावरून) खराब होणें; नाश पावणें; बिघडणें; नासणें; बुडणें; हीनदशेस पावणें (धंदा, काम, वगैरे). ०च्या **कांठावर बसली** ०चा नाश झाला; ०ची हानि झाली (भावकर्तृक प्रयोग).**०च्या कांठावर मारणें** बिघडविणें; नासणें; खराब करणें; बुडविणें; हीनदशेस नेणें. **कांठकिनारा पु०**कड किं० सीमाप्रान्त आणि कोपऱ्याचा भाग. **कांठकोपरा** पु०कड, कोपरे, वगैरे; उ०सारें शेत पिकलें नाहीं,कांठकोपरा पिकला (मधला भाग न पिकतां). **कांठदोरा पु०** शिवलेल्या कपड्यांचा कडेकडचा भाग मजबुतीसाठीं गर्भांत सुतळी घालून शिवून काढलेला असतो तो. **कांठप्रा, कांठपरा पु०** रांजण, मडकें, इ० कांचा सुटलेला जो कांठ किं० गळा तो, किं० वरचें अर्धुक. **कांठफुटका वि०** फुटका आहे कांठ, गळा, इ०ज्याचा असें पात्र; याला **कांठमोडका (–मोडा) वि०** असेंही म्हणतात. **कांठभोंवरी स्त्री०** ' कांटेभोंवरी' चें एक रूप. **कांठमोरा वि०**ज्याचे कांठ गेले आहेत असें (पात्र).**पु०** १ एकाद्या पात्राचा गेलेला, किं० सुटलेला कांठ; कांठप्रा. २ पोळी, भाकरी, थालीपीठ, इ० भाजतांना त्यांचा मोडलेला कांठ. **कांठमोरा गळ्यांत अडकणें** किंवा **येणें** एकाद्या व्यवहारांत किं०धंद्यांत लाभ होणें बाजूलाच राहून हानि होऊन उपहासाला पात्र होणें. **कांठोंकाठ,**

कांठोंकाठ क्रि० वि० भांड्याच्या अगदी कांठापर्यंत किं० तोंडापर्यंत; उ० पातेल्यांत दुध कांठोकांठ भरूं नको;तें नेतांना सांडेल.

कांठकर पु० देवादिकाच्या मूर्तीच्या मिरवणुकींत सजविलेल्या लांब काठ्या हातांत उंच उभ्या धरून चालतात ते लोक (सोलापुरास संक्रांतीच्या सणांत हा देखावा पहावयास सांपडतो).

काठंगा (–ग्या) [**म०** काठी+अंग] **वि०** काठीसारखें म्ह० बारीक, सडपातळ, काटकुळें, अंग आहे ज्याचें असा.

काठण [**सं०** काष्ठ+**म०** दाणा]**न०** उन्हाळ्यामध्यें पिकतें जें द्विदल धान्य तें.

कांठणें स० क्रि० १ कंठणें (वेळ, दिवस, इ०).२ सोसणें (कष्ट).

कांठरें [**म०** कांठ] **न०** वस्त्रादिकांची कड, किनार, किं० कांठ; उ० विसूच्या धोतराचीं कांठरीं फाटून लोंबूं लागलीं.

काठवट [**सं०** काष्ट+**म०** वाटी] **स्त्री०** १ लाकडाच्या जाडी फळींतून कोरून काढलेली परात (हिला मूठ असतें किं० नसते). २ उसाच्या चरकाच्या नवरानवरींखालीं असते जी फळी ती.

काठवाड [**म०** काठेवाड] **न०** घोडे विकण्याचा धंदा करणाऱ्या काठेवाडी व्यापाऱ्यांचा तांडा.

काठळी, कांठळी स्त्री० १ एक हलकें गवताचें धान्य. २ वस्त्रादिकांची किनार किं०कांठ; कांठाळी (हिचा नाडीसारखा कधीं कधीं उपयोग केला जातो).

कांठा [**म०** कांठ] **पु०** १ किनारा, तटप्रान्त (समुद्र, नदी, पर्वत, इ० चा). २विहीर वगैरे खणतांना खालीं लागतो जो खडक तो; उ० ह्या विहिरीला दहा हातांपासून कांठा आहे.

काठांगा (–ग्या) मागें ' काठंगा (–ग्या)' पहा.

काठाड, कांठाड [**म०** कांठ] **न०** थोबाड; गालफड; धमकी वगैरे देतानां हा शब्द वापरतात; उ० जास्ती बोललास तर काठाडांत भडकावीन, समजलास ! [पहा.

काठाण, न० धान्याच्या शेंगा. मागें 'काठण'

कांठाप्रा पु० मागें ' कांठप्रा' पहा.

कांठार न०, काठारा पु० [म० कांठ] कांठ,

तटप्रान्त (नदी, समुद्र, विहीर, इ० कांचा).

कांठारा, काठारा पु० १ कांठप्रा; एखाद्या पात्राचा सुटलेला जो कांठ किं० गळा तो. २ गल-बताचा सांगाडा.

कांठाळी [म० कांठ] **स्त्री०** वस्त्रादिकांची किनार (हिचा नाडीप्रमाणें कधीं कधीं उपयोग केला जातो).

काठिन्य [सं० 'कठिन' पासून **भा० वा० ना०**] **न०** १ कठिणपणा, टणकपणा. २ अव-घडपणा.

कांठिळी स्त्री०१ हलक्या प्रतीचें किं० दर्जाचें वस्त्र. २ वस्त्राचा फाटलेला किं० फाडून काढ-लेला कांठ.

काठी [**सं०** काष्ट] **स्त्री०** १ चिवा वगैरेंचें सगळें कांड किंवा त्याचा चार पांच हात लांबीचा तुकडा. २ चार पांच हात लांब हातीं धरावयाची किंवा इतर कामाची छडी किं० दण्ड. ३ झुडूप किंवा लहान झाड किं० रोपडें यांचा देठ किं० बुंधा. ४ गलबताचे मध्यें गोल जे स्तंभ असतात ते प्रत्येक किं० ज्यांस शीड बांधलेलें असतें तें लाकूड. ५ पांच हात अधिक पांच मुठी इतक्या लांबीचें भूमिमापनाचें जें प्रमाण तें. ६ शरीरास आधार-भूत जो आंतील अस्थिपंजर तो; उ० यमुनेची काठी वळकट म्हणूनच ती एवढ्या कामाच्या रगा-ड्यानें थकून जात नाहीं. ७ शरीराची उंची, बांधा, वगैरे (सं० शरीरयष्टि); उ० अहिल्येची काठी उंच असल्यामुळें ती भव्य दिसते. ८ लाठी किंवा लाठी फिरविण्याचा खेळ; उ० प्रताप काठी सफाईनें खेळतो. ९ आश्रयस्थान; उ० मुक्ता, माझ्या म्हाताऱ्याची आतां तूंच काठी आहेस! ०**एका काठीनें हाकणें** एखाद्या गोष्टीबद्दल सरसा विचार करणें; बाधक स्थलें इ० कांचा विचार मनांत न आणतां सरसहा विधान करणें; एकाच मापानें मापणें; उ० बाण कवीची सर्वच वर्णनें चांगलीं असें एका काठीनें हाकूं नका; त्यांतही सरसनीरस स्थळें आहेतच. **काठी टाकणें** (महार गस्त घालतांना हातांत काठी घेतात त्यावरून) महारानें आपला अधिकार, धंदा, किं० नोकरी सोडणें; महारानें महारकीच्या कामाचा राजी-नामा देणें. **काठी शिखरास लागणें** १ आयु-ष्याच्या अखेरीस येऊन पोचणें; वृद्धावस्थेस येऊन पोचणें. २ आयुष्यांतील आशा, आकांक्षा, इ०ची सफलता होणें; कृतार्थ होणें; ज्याच्या करतां क्लेश वगैरे सोसले त्याचें फल मिळणें. **काठीनें पाणी शिंपणें** स्वतः कांहीं न करतां दुसऱ्यांना सांगून त्यांच्या मदतीनें एखादें काम करावयास जाणें, करूं बघणें, किं० करावयाची आशा बाळगणें; उंटावरून शेळ्या हांकण्याप्रमाणें एकादें काम करणें. **काठीनें पाणी शिवणें** एखादी गोष्ट अंग चोरून किं० हलगर्जीपणानें करणें. **काठीनें पाणी हाटलें तरी दोन ठिकाणीं होत नाहीं** किंवा **काठी मारल्यानें पाणी दुभंगत नाहीं** खऱ्या मैत्रीचा किं० प्रेमाचा भंग किं० बीमोड आगंतुक किं० उपऱ्या कारणांनीं होत नाहीं. **काठीला सोनें बांधून चालावें** उघडपणें सोन्यासारखी मूल्य-वान् वस्तु जरी वापरली तरी चोरीची वगैरे भीति नाहीं, असा सरकारी बंदोबस्त आहे. (विज-यनगरच्या राज्याची जेव्हां भरभराट होती तेव्हां अशी स्थिति होती. आपल्या मोडक्या बाजारांत जुन्यापुराण्या वस्तूंचा ढीग घालून त्या जशा उघड्यावर विकतात तसें त्या वेळीं विजय-नगरांत हिरे, माणकें, मोतीं, वगैरें जिन्नस रस्त्यावर ढीग घालून विकीत !). **काठीवर कांबळा घेणें** किं० **घालणें** ऐन किं० बाईच्या वेळीं कांबळ्यामुळें अडचण होऊं नये म्हणून तें बाजूला काढून ठेवणें (मारामारी इ० करावयाला सिद्ध होतांना). **काठीकांबळा पु०** कृष्ण गुरें हाकीत असे, म्हणून त्याला 'गोपाळ' हें नांव दिलेलें आहे.गुराख्यांचीं पोरें काठी आणि कांबळें ह्यांचीं आपल्या हाताच्या मनगटाच्या आणि कोपराच्या मध्यावर काढतात किं० उठ-वितात तीं चिन्हें. **काठीवाला पु०** (गस्त घालते-वेळीं महार काठी बाळगतो त्यावरून) महार.

कांठें [**सं०** कंठ] **न०** १ गळा. २ मान. ३ डोंगरावरील शेताच्या उपयोगाचा प्रदेश.

काठेडोळे, काठ्येडोळे पु० अ० व० 'डोळे येणें' हा जो नेत्ररोग तो. (शेणें डोळे आले असतां डोळ्यांना कंड सुटते).

काठ्या, काठ्यागहूं पु० गव्हाचा एक प्रकार किं० एक जात.

काठ्याळा [**म०** काठी] **वि०** किरकोळ शरीरयष्टीचा; सडपातळ; रोड; किडाकिडीत.

काठ्याळें [**म०** काठी+**सं०** आलय] **न०** १ मोहोळांत एक भेद आहे; तें फार लहान असतें. २ लहानशा देवकार्याच्या प्रसंगीं ब्राह्मणांस दिलेलें गरीबाऊ भोजन.

कांड [**सं०**] **न०** १ वृक्षाच्या मूलापासून त्यास जेथें खांद्या फुटतात तेथपर्यंतचा भाग; खोड. २ दोन सांध्यांमधलि भाग, जसें हाताच्या बोटाचें पेर, उंसाचें पेरें. ३ दोन तीन पेरीं असलेला उसाचा तुकडा. ४ प्रकरण, छेद, भाग (पुस्तकांतील); उ० रामायणांत सात कांडे आहेत; उ० वेदांत कर्मकांड, यज्ञकांड, उपासनाकांड, अशीं तीन कांडें आहेत. ५ काठी. ६ गुच्छ, समूह. ७ प्रसंग, योग्य समय; अकांड ह्म० भलताच समय; अनपेक्षित वेळ; अयोग्य काळ. **पु०, न०** बाण, तीर. ❀ **काण्डेषु पु०** १ बोरू. २ पांढरा ऊस. **कांडर्षि** पु० वेदभाग शिकविणारे जे जैमिन्यादि ऋषि ते प्रत्येक. **कांडतिक्त पु०** काडेचिराईत. ❀ **कांडत्रय न०** वेदांतील कर्मकांड, यज्ञकांड, आणि उपासनाकांड, यांचा समुच्चय किं० गट.

कांड न० १ गलबताचें अवजार चढवावयाची कपीवरून फिरणारी दोरी. २ गहूं, नाचणा, हरभरा, इ०ची झोपडलेलीं ताटें.

काड स्त्री० १ मूग, उडीद, इ० द्विदल धान्यांचें जें भूस तें. २ गहूं, वरी, नाचणी, इ० कांचें धान्य काढून घेतल्यानंतर जें तृण राहतें तें. ३ भात काढून घेऊन तृणाचा जो भारा बांधतात तो झाडल्यानें आंतून जो बारीक पेंढा पडतो तो. ४ भाताचीं रोंपडीं किं० आंवण उपटून घेऊन त्या जाग्यावर कांहीं काड्या राखतात त्या. ५ अंबाडी, ताग, वगैरेंचीं सोललेलीं कांडें किं० ताटें. ६ **न०** शेंगा (सामान्यत:). ❀**काडसड न०** द्विदल धान्याचीं झोडपलेलीं ताटें.

काडकन्, काडकर, काडदिशीं क्रि० **कि०** ताडकन्; कडाड् असा आवाज होईलअशा रीतीनें.

काडकुसुंबा पु० एक प्रकारची भाजी.

कांडकूट, कांडणकुटण [**म०** कांडणें+कुटणें] **न०** तांदूळ वगैरे धान्यें कांडण्याचें आणि पाखडण्याचें काम.

कांडकें [**सं०**कांड] **न०** १ उंसाचें दोन चार पेरीं असलेलें दांडकें. २ लाकडाचा ओंडका. ३ भिंतीचा किं०इतर बांधकामाचा भाग किं०तुकडा. ४ अवजड शरीराचा, अक्कलमंद, इसम (पुरुष किंवा स्त्री).

काडक्या वि० (काडुक ह्म० काडीचें थोटूक–विस्तव हालवून तो प्रदीप्त करतें यावरून) आगलाव्या; कळलाव्या.

कांडण [**सं०** कंडन] **न०**१ धान्यादि उखळांत घालून मुसळानें कुटण्याचा धंदा, काम, किं० कर्म. २ अशा तऱ्हेनें कुटावयास घेतलें जें धान्य तें. ३ कांडण्याबद्दल कांडपिणीला द्यावें लागतें जें मोल तें किं० मजुरी ती. ४ नाचणी, उडीद, यांचें भूस किंवा कोंडा. ❀**कांडणसाळ स्त्री०** कांडण्याच्या कामाकरतां जेथें उखळ घातलेलें असतें ती जागा. **कांडणावळ स्त्री०** कांडण्याबद्दल कांडपिणीला जी मजुरी द्यावी लागते ती. **कांडणी स्त्री०** कांडण; सडणी.

कांडणें[**सं०**कंडन] **स०क्रि०** धान्यादि उखळांत घालून त्यांतील भुसा, कोंडा, वगैरे काढून टाकण्याकरतां सडणें किं०कुटणें. ❀**कांडात काढणें** खरपूस चोप देणें; हड्डी नरम करणें; उ० थांबशील, तुझें आतां चांगलें कांडात काढतें ! चोरून खातेस कां ?

काडदान [**म०** काडी+**फा०** दान; काड्या ठेवण्याचें पात्र] **न०** भोजनाच्या समारंभानंतर आंचवतांना आगत पाहुण्यांना दांत कोरण्यास देतात ज्या लहान लहान काड्या त्या ठेवण्याचें बारदान, किंवा तदर्थ भिंतींत ठेवलेलें भोंक.

कांडप न० कांडण; कांडणाचें धान्य किंवा तदर्थ पडणारी मजुरी. ❀ **कांडपी पु०** कांडण्याचें काम किं० धंदा करणारा. **कांडपीण** हें 'कांडपी' ह्याचें स्त्रीलिंगी रूप.

काडाभिकारी [**म०** काड्या गोळा करणारा भिकारी] **पु०** चिक्कू किं० कंजूष माणूस.

काडमुंगी स्त्री० एक प्रकारची मुंगी (चावरी व विषारी).

कांडरूं [**सं०** कांड] **न०** बोटांचीं अग्रें किं० सांधे सुजण्याचा रोग.

काडवात [**म०** काडी+वात] **स्त्री०** तुळस इ० कांच्या काडीभोंवतीं कापूस गुंडाळून देवापुढें

लावण्याकरतां किं० उजळण्याकरतां (म्ह० जळत ठेवण्याकरतां) जी वात किं० काकडा करतात तो. ॐसूर्यापुढें **काडवात** पेटविलेल्या काडवातींचा प्रकाश सूर्याच्या प्रकाशाची कशी बरोबरी करील ?

काडवाळा पु० लहान मलांच्या पायांत घाला-वयाचा चांदीचा वाळा.

कांडविणें [**सं०** कंडू (खाज)] **स० क्रि०** १ कंड सटली असतां तिच्या उपशमार्थ खाजविणें. २ (लक्षणेनें) व्यक्त करणें; उठविणें; चेतविणें; प्रक्षुब्ध करणें; चिडविणें.

कांडवेल पु० स्त्री० एक औषधी; हिचे दोन प्रकार आहेत,—चौधारी कांडवेल आणि त्रिधारी कांडवेल. [झाड तें.

काडशीर न०, पानांसहित उपटलेलें जें बालाचें

कांडशेर पु० एक लांब, नाजूक, आणि जवळ जवळ पेरें असलेली वेल.

काडसर न०,पु०, काडसरी स्त्री० कोष्ट्याच्या मागांतील एक साधनविशेष. दोन काठ्या दोरीनें सईलसर टोकांपाशीं बांधून वस्त्राची रुंदी ताणाव-याला या साधनाचा उपयोग कोष्टी करतात.

कांडळणें [**सं०** कंडू] **अ० क्रि०** वर्षणानें झिजणें. ' कांडाळणें ' पहा.

कांडळणें [**सं०** कंडू] **स० क्रि०** खाजविणें.

काडा पु० एक प्रकारचें झाड.

कांडाई स्त्री० कांडणावळ; तांदूळ इ० कांड-ण्याबद्दल दिलेली मजूरी.

कांडादळा, कांडाभरडा, पु० धान्यादि कांडणें, जात्यांत घालून दळणें किंवा भरडणें, इत्यादि कामें समुच्चयानें. [विषारी सर्प.

कांडार स्त्री०, कांडारें न० एक प्रकारचा

कांडारणें [**सं०** कांड=बुंधा] **अ० क्रि०** फोफावणें; जोरानें किं० जोमानें वाढणें,—ऊंस, जोंधळा. (क्वचित् लहान मुलासंबंधींही योजितात).

कांडारणें, कंडारणें, करांडणें, करंडणें, कर-डणें स० क्रि० उंदीर इ०कांनीं दातांनीं तोडणें किं० तोडून खाणें; कुरतडणें; कुरतडून खाणें.

कांडारा [**सं०** कांड] **पु०** १ बांबू, ऊंस, केळीचा खुंट, वगैरेंचा उभा चिरून काढलेला अवयव. २ [**म०** कांडणें] धान्यादि कांडून त्यांतून निघतो जो कोंडा तो.

कांडाविणें, कांडिवणें [**सं०** कंडू] **स० क्रि०** १ खाजविणें. २ घासणें. ३ चेतविणें.

कांडाळणें [**सं०** कांड] **अ० क्रि०** दोन पेरां-मधील अंतर वृद्धिंगत होत जाणें, म्ह० (जोंधळा, बाजरी, ऊंस वगैरे) फोफावणें; जोमानें वाढणें. (**कांडारणें अ० क्रि०** पहा). २ (लक्षणेनें) मूल जोमानें वाढूं लागणें. ३ जोंधळा, बाजरी, ऊंस, इ० दांच्या पेरांचे सांधे काळे पडणें व त्यांत रोग उत्पन्न होणें. ४ मनुष्याच्या शरीराच्या सांध्याच्या ठायीं रक्तपित्ताचा उद्भव होणें.

कांडाळणें [**सं०** कंडू] **अ० क्रि०** खाजणें; कंड सुटणें. (खाजविणें या अर्थी हेंच क्रियापद योजितात, पण तें सकर्मक असतें).

कांडिवणें [**स० क्रि०** खाजविणें.

कांडाळणें [**सं०** कंडू] **स० क्रि०** १ खाजविणें (कंडूशमार्थ). २ तोडून, कुरतडून खाणें. (मागें **कांडारणें स० क्रि०** पहा). ३ खाजणें.

काडी स्त्री० १ तृणाचा बारीक व लहान तुकडा. २ लाकूड, धातु, वगैरेंचा तद्रूप लहान तुकडा, जसें आगकाडी, हिराची काडी, तुळशीच्या काष्ठाची काडी, अत्तरदाणींतील अत्तर लावावयाची चांदीची काडी, केशराची काडी, सुरमा लावावयाची काडी, चष्मेची काडी, इ०इ०इ०. ३ एकही दस्त म्ह० हात न झाल्याकारणानें गंजिफांत जो डाव लागतो तो. ४ वस्त्राच्या कांठांत किंवा गर्भांत जे निराळ्या रंगाचे रेशमाचे किंवा जरीचे धागे किं० तंतु विणलेले असतात ते प्रत्येक; उ० हिराबाईच्या चोळीच्या कांठांतील जरीची काडी खुलून दिसते. ॐ **आडवी उभी काडी ओढतां न येणें** (पूर्वी लाकडाच्या फळीवर धूळ पसरून त्यांत किं०त्यावर काडीनें अक्षरें काढीत त्यावरून) मुळीं लिहितां न येणें, किं० अक्षरें काढतां न येणें. **काडीची आग माडीस लागते** १ क्षुल्लक माणूस देखील मोठ्या माणसाची आबरू खराब करूं शकतो. २ चुकी लहान असली तरी ती मोठा अनर्थ करूं शकते. **काडीनें औषध लावणें** चुकारतट्टूपणानें, भिका-रपणानें, कंजूषपणानें, अंग राखून किं० निष्का-ळजीपणानें,एखादें काम करणें.एकाद्या कामीं जितके कष्ट घ्यावयाला पाहिजेत तितके न घेणें. **काडीमात्र, काडीचा, काडीइतका वि०** (अक-

रणरूपीं प्रयोगांत) यत्किंचित, तिळमात्र, तसूभर देखील, अत्यल्प प्रमाणांतही; उ० देश स्वतंत्र करण्याचें कामीं स्वार्थी लोकांचा काडीमात्र उपयोग नाहीं, उलट ते परचक्राचें कार्य मात्र सुकर करून देतात. **काडी मोडणें, काडी मोडून देणें, काडीमोड करणें** नवराबायकोंनीं एकमेकांस यथासांग सोडचिठ्ठी देणें. यालाच **पदर फाडून देणें, पालव कापून देणें** असें म्हणतात. शूद्रादिकांत ही चाल आहे. **काड्या ओवाळणें** दृष्ट लागूं नये म्हणून मुलाभोंवतीं किं०आश्रयदात्याभोंवतीं काड्या ओंवाळणें. (दृष्ट नेहेमीं चांगलाल्याच लागण्याची भीति असते म्हणून)**हा आपल्यावरून काड्या ओवाळतो** हा आत्मश्लाघा करतो;हा भारी बढाईखोर आहे. **काडीचोर तो पाडीचोर** क्षुल्लक अपराध करणारा मनुष्य मोठा अपराधही करावयास प्रवृत्त होणें किंवा असणें साहजिक आहे. २ लहान चोरी करणारा मोठीही चोरी करणें शक्य आहे म्हणून लहान चोरी क्षम्य नव्हे.**काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर होत नाहीं** थोड्याशा अधिकारानें जें काम होतें तें पुष्कळशा पैशानें देखील होत नाहीं. **काडीखार, काडेखार, काड्याखार** पु० काड्यांच्या रूपांत असलेला क्षारविशेष. **काडीपेंढी** स्त्री० धान्याच्या पेंढया इ०; ' पेंढीकाडी ' असाही शब्द ह्याच अर्थानें योजण्यांत येतो; उ० पेंढीकाडी (किं० काडीपेंढी) मागावयाला बलुते आले. **काडीमहाल** पु० कोल्हाटी, वैदू, वगैरे जातीचे लोक गांवाबाहेर तात्पुरत्या ज्या गवताच्या किं० चटयांच्या झोपड्या उभारतात त्या प्रत्येक (शब्दयोजना उपरोधिक आहे). **काडेचिराईत** न० एक औषधी. हींवतापावर याचा काढा सुप्रसिद्ध आहे. **काडेहुरा, काड्याहुरा** पु० शेराचें झाड. **काड्यानिवडुंग** पु० काडेहुरा, शेर.

कांडी [सं० कांड] स्त्री० १ सुंठ, वेखंड, हळकुंड, इ०कांच्या ज्या मुळ्या त्या प्रत्येक.२ तदाकार काष्ठाचा, धातूचा, किंवा दुसऱ्या कशाचा तरी तुकडा; जसें खडूची कांडी. ३ मांत्रिक, जादुगार, हाडाची वगैरे वापरतात ती कांठी, हाडाचा तुकडा, इ०. ४ उसांचें पेरें किंवा दोन तीन पेरीं असलेला तुकडा; कांडकें.५ दोरा ज्या सळईवर किं०काडीवर गुंडाळतात ती. ६ लसणीचा कांदा(सबंध).❀**कांडी फिरविणें किं० फिरगाळणें** जादूगारानें उजव्या हातांत लांकूड किं० हाडूक धरून तें डाव्या मनगटाभोंवतीं फिरविणें;मंत्रतंत्र करणें.**यक्षिणीची कांडी फिरणें** अद्भुत गोष्ट घडून येणें; कांहीं चमत्कार घडून येणें,—ज्याचें कारण आपणांस कळत नाहीं. **यक्षिणीनें कांडी फिरविणें** अज्ञात रीतीनें कांहीं अद्भुत किं० अनपेक्षित गोष्ट घडून येणें; उ० ती जागा मला मिळावी म्हणून मी सर्व संधानें बांधून ठेविलीं होतीं; परंतु यक्षिणीनें कांडी फिरविली आणि ती जागा दुसऱ्यालाच दिली गेली. **कांडीचें लाकूड** न० चरक्यावर काढलेलें सूत प्रथम ज्या सळईवर गुंडाळलेलें असतें तिच्यावरून तें काढून ज्या लाकडाच्या तुकड्यावर घेतात तो तुकडा.

कांडुळणें अ० क्रि० सूत, दोरी, इ० तुटणें किंवा त्यांचे तुकडे पडणें.

कांडुळणें [सं० कंडू] स० क्रि० खाज वगैरे सुटली असतां अंग खाजविणें.

काडू पु० गांडूळ; (याचा पावसाळ्यांत उद्भव होतो). याला **गांडवळ, दानवें, दानवा,** अशीहीं अन्य नांवें आहेत. २सुताराचें एक हत्यार.

काडूक न० लहान काडी; धलपी.

कांडें [सं० कांड] न० १ बोटें, ऊंस, वेळू, बोरू, इ० च्या पेरांचें सांधे किं० गांठीं. २ ह्या दोन सांध्याच्या किं० गांठींच्या मधला भाग. ३ बोटें इ० कांचीं जीं पेरें तीं प्रत्येक. ४ उंसाचा दोन तीन पेरांचा तुकडा. ५ वृक्षाचा मूलापासून खांद्या फुटतात तेथपर्यंतचा भाग; खोड; बुंधा. ६ विशिष्ट कामांत विशिष्ट लांबी मापून घेण्यासाठीं जो लाकडाचा किं० बांबूचा तुकडा कापून ठेवलेला असतो तो. ७ अशा तऱ्हेनें घेतलेलें जें माप तें(क्रि० करणें). ८ हाड(हाताचें, पायाचें,वगैरे). ८ वेल मोठा व जून होऊन त्याचा लाकडासारखा बुंधा होता तो. ८ एकदा जनावरांनीं तुडवून किंवा माणसांनीं झोडपून झाल्यावर दुसऱ्यांदा तुडवण्याकरतां किंवा झोडपण्याकरतां टाकलेलीं किं० राखलेलीं कणसें. १० नाचणी, वरी, इ० चें कोंवळें लहान रोपडें,—जें दुसरीकडे लावण्यास योग्य झालेलें असतें. ११ बोटांचे सांधे सुजतात ज्यामुळें तो रोगविशेष.❀**अडचा काड्यांवर येणें** १ (गव्हाचें ताट अडीच कांडीं उंच वाढतें व मग

त्याला कणीस धरतें, त्यावरून) कणसें यावयाच्या अवस्थेस येणें; परिपक्व होणें, तयार होणें, २ (लक्षणेनें) लग्न करावयास योग्य होणें; वयांत येणें(मुलगा किं० मुलगी). **कांडेपेरें लावणें** किं० **लावून पाहणें** मातींत उमटलेलीं पावलें ताडून पाहणें,–चोर उमगून काढण्याच्या प्रसंगानें. **कांडेपेरें मिळणें** साम्य किं० अनुरूपता आहे असें स्थापित होणें; उ० लीला आणि वासन्ती यांचीं कांडीपेरीं मिळतात. **कांडेपेरें कमी ज्यास्त होणें** भिन्नता असणें; साम्य किं० सारखेपणा किं०अनुरूपता नसणें.**कांडेपेरें पाहून**(जनावर विकत घेतांना) त्याचे सांधे, शुभाशुभ चिन्हें, वगैरेंची परीक्षा करून. **कांडेपेरें घेणें** पदार्थांचीं मापें घेणें; लांबी, रुंदी, इ० मापणें. **कांडेकरी पु०** १ गुऱ्हाळांतील एक कामकरी; कवळ्यानें आणून दिलेलीं कांडीं चरकांत घालण्याचें काम करणारा. २ (प्रांतिक अर्थ) सुतार.

कांडेचोर पु० न० ऊद मांजर; यास ' कांडेदर, '' ऊद, ' ' काळमांजर ' ' कलिंदर, ' ' कानेदर, ' वनेर, ' अशीं अन्य नांवें आहेत.

कांडेश्वर [सं०कांड+ईश्वर] **पु०** बगळ्याच्या जातीचा लांब मानेचा पक्षी.

कांडेसावर स्त्री० एक वनस्पतिविशेष.

कांडेरी स्त्री०, कांडोरें न० १ ऊस, बांबू, इ० चीं पेरीं. २ दोन पेऱ्यांमधील गांठ किं० सांधा. ३ दोन तीन पेरीं असलेला उसाचा किं० बांबूचा वगैरे तुकडा. ४ ऊस किं० बांबू यांच्या दोन गांठींमधील अंतर.

कांडोळणें [सं० कंडू] **स० क्रि०** कंडूशमनार्थ खाजविणें.

कांडोळी स्त्री०, कांडोळें न० पाणी आडविण्याकरतां शेतांत, बागेंत, किं० मळ्यांत ठिकठिकाणीं जे बांध किं० बंधारे घातलेले असतात ते प्रत्येक.

कांडोळें न० लहान मुलांच्या पायांत घालावयाचा दागिना.

काढ पु० जंगलांतून ओढून आणलेला इमारतीच्या लाकडाचा सोट किं० ओंडका.

काढकसुंबा पु० काडकुसुंबा;भाजी करण्याच्या उपयोगाची एक वनस्पति.

काढघाल [म० काढणें+घालणें] वस्तु बारदानांत ठेवणें पुन्हां काढून घेणें, इ० रूप जो फोल व्यापार तो किंवा जी शुष्क खटपट ती; काढाघाली.

काढणी [म० काढणें] **स्त्री०** १ अनेक पदरांची वळलेली भक्कम दोरी (बहुशः सुताची, पण क्वचित रेशीम, ताग, अंबाडी, वगैरेंची). २ हरभरा, गहूं, इ० शेतांतून उपटून काढण्याचा जो व्यवसाय तो.३ विहीरींतून पाणी काढावयाची दोरी. ४ घोड्याला बांधण्याकरतां घेतात जी दोरी ती .५ कैद्याला बांधतात ज्या दोऱ्या त्या प्रत्येक; (क्रि० घालणें).६ गोणी, कंठाळ, आखें, बस्ता, वगैरेंना बांधण्याकरतां असतात ज्या दोऱ्या त्या प्रत्येक. ७ ओझें, गठ्ठा, वगैरे बांधावयाच्या उपयोगाची दोरी. ८ तंबूची दोरी. * **काढण्या ओढणें** जेरबंद लगावणें; दोरीनें मारणें. **काढण्या घालणें** एखाद्यास कैदी म्हणून दोऱ्यांनीं जखडणें.

काढणें[**सं०** कृष्=नांगरणें, ओढणें] **स०क्रि०** १ एखादी वस्तु एखाद्या स्थलापासून वियुक्त करणें किं०ती दूर करणें; उ०आम्ही चिन्तामणीस नाशकाच्या शाळेंतून काढलें; उ०त्या वरिष्ठानें आपल्या कारकुनास नोकरीवरून काढलें; उ० हिराबाईस ओवाळणी घालण्याकरितां वासुनानानें पेटींतून पांच रुपये काढले; उ० वासन्तीनें पेटीचें कुलूप कसें काढलें ?उ०मन्दाकिनीनें खोलींतील सतरंजी काढून कोठें ठेवली ? उ०लक्ष्मीबाईनें तरवार म्यान्यांतून काढतांच तिच्या शत्रूंची दाणादाण उडाली. २ चित्रें, अक्षरें, किंवा इतर आकृतिविशेष कागदावर, दगडावर, किं० कोणत्याही पृष्ठभागावर रेखाटणें, लिहिणें, रचिणें, इ०; उ० हिंदुस्थानचा नकाशा काढून त्यांत कोठें काय पिकतें हें दाखवा. ३ उत्पन्न करणें, सुरू करणें,आरंभिणें, उपक्रमिणें. स्थापिणें (संस्था, नोटी, डाव, चाल, वर्तमानपत्र, चळवळ, दुकान, कायदा, इ०); उ० हल्लीं शंभराच्या नवीन नोटी काढल्या आहेत. ४ कांहीं पदार्थांपासून तत्तदुपयुक्त क्रिया करून फलोत्पत्ति करणें; उ० हातमागावर बंड्या चांगलीं लुगडीं काढतो; उ० मुकुंदानें म्हशीचें दूध काढावयास आज विलंब कां केला ?उ० दरसाल आम्हां शेतांतून दोन खंडी धान्य काढतों; उ० कपाशीचें तेल काढ-

तात कां ? ५ शोधणें, हुडकणें (मार्ग, युक्ति, तोड, माग, तपास, इलाज, औषध, यंत्र, इ०); उ० ढेंकूण मारण्यावर अजून कोणीच कसें औषध काढलें नाहीं ? ६ मिळविणें, प्राप्त करून घेणें; पैदा करणें; उ० कमलेनें गेल्या परीक्षेंत संस्कृतमध्यें चांगले मार्क काढले; उ० शिवाजीफंडाला रमाबाईच्याकडून तुम्ही किती पैसे काढलेत ? उ० आईच्या खणपटीस बसून घड्याळ्याकरतां मी शंभर रुपये काढले. ७ घेणें, स्वीकारणें; उ० निरनिराळ्या पंथप्रवर्तक शंकरादि आचार्यांनीं आपापल्या पंथास अनुकूल असे अर्थ भगवद्गीतेंतून काढले आहेत. ८ निवडणें; वेंचणें; उ० स्वागतपद्य म्हणण्यास आमच्या शाळेंतून तीन मुली काढल्या, त्यांत शांती एक होती; उ० आमच्या वर्गांत शामू, रामू, व मोरू, यांना मास्तरांनीं दगड म्हणून काढलें आहे, व त्यांच्यावर ते विशेष मेहनत घेतात. ९ गुण, दोष, बिंगें, चुका, इ० निदर्शनास आणणें, प्रकट करणें, दाखविणें, किं० प्रसिद्ध करणें; उ० लोकांचे दोष काढले म्हणजे आपल्यांत ते नसतात असें मेयोबाईस वाटतें काय ? उ० बाईनीं विमलेच्या निबंधांत बऱ्याच चुका काढल्या; उ० त्या आब्रूनुकसानीच्या खटल्यांतील साक्षीदार त्या साहेबाचीं बरींच बिंगें बाहेर काढीत आहेत ! १० उपस्थित करणें; उच्चारणें; उल्लेखिणें; उ० राजकारणाचा विषय काढतांच त्या रावबहादुरांचें डोकें खवळलें ! ११ कंठिणें, घालविणें; काल किंवा संकट आतिक्रांत करणें; उ० मी ती थंडी एका धोतरावर काढली ! उ० अकबराला सांग कीं राणा प्रताप रानांवनांत कंदमुळें खाऊन दिवस काढील पण तुला कधीं शरण जाणार नाहीं ! १२ नाहींसें करणें; उडवून देणें; उ० रावसाव, उधारीची बाकी दिवाळीच्या आंत काढा; उ० वर्गणी वेळेवर न पोंचल्यास तुमचें नांव वर्गणीदारांच्या पटांतून काढण्यांत येईल; उ० आईबापें जिवन्त असून तो मिशा काढतो. १३ कर्जाऊ किं० उसनवार घेणें; उ० त्या हलकट नगीनदासाचे पैसे तूं कां काढलेस ? १४ उठाविणें; हालविणें; उ० हिरोबानें मोठ्या बाजारांतून दुकान काढून तुळशीबागेंत आणलें आहे; उ० त्या मास्तरास मुंबईहून काढून पुण्यास पाठाविलें. १५ बैल, टोणगा, इ० ना गाडी, रहाट, इ० ओढण्यास, फिरविण्यास, किं० चालविण्यास शिक्षित करणें. १६ चालते वेळेस घोडे, इ० कांनीं कांहीं दुःखादिकारणामुळें पाय वांकडा टाकणें. १७ पुढें करणें; पुढें आणणें; देणें; उ० विनायकराव, तुमची परीक्षा पास झाली; म्हटल्याप्रमाणें पेढे काढा ? उ० तुमचा खटला आज नाहीं काढीत सुनावणीला; उ० मुलांनो, इतिहासाची पुस्तकें काढा पाहूं. १८ कांहीं एक अर्थ कर्तव्यवक्तव्यरूपानें हातीं घेणें; उ० टिळक विलायतेंहून आले तेव्हां लोकांनीं त्यांची मिरवणूक काढली; उ० सिंधूच्या लग्नांत म्हणें वरात काढली नाहीं ! १९ बनाविणें; निर्मिणें; उत्पन्न करणें; उ० साडेतीन वारांत कोट विजार करून तुम्ही जाकीट काढाल ना ? उ० आपल्या पडीक जागेंत त्याणें दुकानें काढिलीं आहेत. २० रचिणें; तयार करणें; मास्तरांनीं परीक्षेकरतां कठिण प्रश्न काढले. ॐ**काम काढणें** काम लांबविणें किं० वाढविणें. **एखाद्याचें काम काढणें** त्याची खोडकी जिरविणें; मस्ती उतराविणें; रग जिरविणें; त्याचा नक्षा उतरणें. **केश काढणें** विधवेचें वपन करणें. **गळा काढणें** मोठमोठ्यानें रडणें. **घराबाहेर काढणें** १ घराबाहेर पडावयास भाग पाडणें. २ घरांतून हांकलून देणें. **घोडी काढणें** घोड्याला घोडी दाखविणें. **चाकरी काढणें (दुखणेंकऱ्याची किं०पोराची)** त्याची शुश्रूषादि करणें; त्याचें औषधपाणी करणें. **दुखणें** किं० **भूक काढणें** दुखण्याची किं० भुकेची व्यथा सोसणें; उ० गुरूं काढितें भूक आणि पोर काढितें दुःख. **एकाद्याचा आजार काढणें** आजारांत त्याची शुश्रूषादि करणें. **देवी काढणें** देवीची लस देवी होऊं नयेत म्हणून टोंचवून घेणें. **दैव, प्रारब्ध,** किं० **नशीब काढणें** वैभवास चढणें. **धिंड काढणें** एखाद्याचा उपहास किंवा फजिती करण्यासाठीं त्याला गाढवावर बसवून गांवभर फिरविणें. **नकला काढणें** अस्सल कागदाचे उतारे करून घेणें. **नांव काढणें** १ प्रासिद्धि पावणें; वैभवास चढणें; लौकिक मिळविणें. २ आठविणें; उच्चारणें. **निकालांत काढणें** १ ०चा निकाल लावणें. २ रद्द करणें; उ० चिन्तूचा अर्ज निकालांत काढला. **पळ काढणें, पाय काढणें** पोबारा करणें; पळून जाणें. **वाऱ्यानें पाऊस** किं० **आभाळ**

कादणें धान्यानें पाऊस, दग, इ० आणणें. **पाऊस तोंड बाहेर काढूं देत नाहीं** पावसाचा जोर इतका आहे की बाहेर पडणें मुष्किलीचें झालें आहे. **शेत, बनजर,** किं० **नवें रान कादणें** तें नांगरणें. **कादल्या कामाचा वि०** सांगकाम्या; जें काम सांगावें तेंच करणारा; सांगितल्याशिवाय काम न करणारा किं० न करूं शकणारा. **कादल्या रेघेचा वि०** कामाचा आराखडा किं० कामाची रीत सांगितल्याशिवाय काम करूं शकत नाहीं असा.

कादणें अ० क्रि० पर्जन्य, ऊन, पाणी, किं० ज्वरादि आजार कमी होणें किं० शमणें; उ० पाऊस कादला म्हणजे तुला मी दुकानांत नेईन.

कादणें न० विहीरींतून दोरी लावून पाणी कादण्याकरतां केलेलें पात्र.

कादतें न० १ (जुगारांत) कांहीं विशिष्ट रकम दाखविण्यासाठीं घेतलेली कांहीं वस्तु. २ २ मागें हटणें; युद्ध, कज्जा, वाद, भांडण, इ०-तून माघार खाण्याचा उपक्रम करणें; **उ०** गोविंद-राव बेफाम होऊन शिव्या देऊं लागला तेव्हां मी कादतें घेतलें.

कादवणी [**म०**कादणें + पाणी] **न०** विहीरी-तून वगैरे ओढून कादलेलें पाणी; वाहतें (नदीचें, पाटाचें, इ०) नव्हे असें पाणी.

कादवान न० एक प्रकारची बिनचाकी गाडी.

कादविणें [**म०**'कादणें' यापासून **प्र० क्रि०**] १ घोडीला घोडा दाखविणें. २ (देवी इ०) टोचून घेणें.

कादशहा पु० शहाला प्रतिबंध करणारें मोहोरें दुसरीकडे सरकावून प्रतिपक्ष्याला शह देणें. (मागें **काटशह** पहा).

कादा [**सं०**कषाय] **पु०** १ वनस्पति आठवा हिस्सा पाणी राहीपर्यंत कढवून जें ज्वरादिकांवर औषध करतात तें. २ अर्क. ३ [**म०**कादणें] रोख कर्जाऊ रकमेवर व्याज म्हणून जें धान्य वगैरे कबूल करतात तें. ४ अशा तऱ्हेनें रकम व्याजानें देण्याघेण्याची पद्धति. ५ फळफळावळ, भाजीपाला, वगैरे खरेदी केला असतां त्यावर बोलीच्या किं० मापाच्या बाहेर जें मागून घेतात तें (**क्रि०**घेणें). **ॐएका पैशाची खरेदी दोन पैशाचा कादा** झुलूक मदतीच्या किं० व्यवहाराच्या जोरावर, वशील्यावर, ओळखीवर, पतीवर, किं० भिडेवर मोठ्या लाभाची हाव धरणें. **कादा कादणें** आपणास हकानें मिळावयाचा तितका पदार्थ मिळालेला असतां ज्यास्तीची मांक मागत बसणें. २ दुसऱ्यापासून निघेल तितकें मिळविण्याचा प्रयत्न करणें.

कादाऊ [**म०** कादणें] **वि०** फितवून नेलेली किं० उपटलेली दुसऱ्याची स्त्री किं० नोकर. २ पुढें 'कादांव' पहा.

कादाओढ स्त्री०, कादाओढा पु० अनेकांपासून पैसे उसने घेण्याचा व्यापार. **कादाओढ्याचा धनी, पु०** कर्जबाजारी; अनेकांकडून कर्ज कादणें याचाच केवळ धनी; कर्ज कादण्याशिवाय ज्याला गुजराण करतां येत नाहीं तो.

कादाकादी स्त्री० घाईघाईनें आवरा आवरीस लागणें (योग्य समय टळूं नये म्हणून).

कादांव [**म०** कादणें] **वि०** १ आपल्यास हावें त्या नमुन्याचें विणवून, करवून, किं० घडवून घेतलेलें (वस्त्र वगैरे). २ जसा पाहिजे तसा घोडा घोडीला दाखवून उत्पन्न केलेली (संतती); इष्ट अवलादीचा उत्पन्न केलेला. ३ पक्कें सोदें जे पोर तें किंवा पक्की सोदी जी स्त्री ती (शिवी देतानां वापरतात).

काढू, काढ्या [**म०** कादणें] **वि०** दुसऱ्याची आर्जवें करून किं० दुसऱ्यापुढें गोंडा घोळून पैसे उकळण्याचा किं० कर्जाऊ कादण्याचा ज्याचा स्वभाव असा.

काणकूण स्त्री० १ कुणकूण; गुणगुण; दुसऱ्या माणसासंबंधानें हलक्या स्वरांत किं० चोरून जें बोलणें तें. २ असंतुष्टपणाची चिरचिर किं० पिरपीर.

काणा [**सं०**] **वि०** १ ज्याची दृष्टि गेली आहे असा (डोळा). २ एका डोळ्यानें ज्यास दिसत नाहीं असा (मनुष्य, जनावर, इ०). ३ तिरळा (डोळा किं० मनुष्य). ४ जेथें जी वस्तु पाहिजे ती वेळेस मिळत नाहीं, जेथें मालाची आयात अनिश्चित असते व म्हणून पदार्थांचे भाव कधीं स्वस्त तर कधीं महाग असे असतात असा (देश, शहर, किं० गांव.) ५ कांहीं गुन्हा केल्यामुळें ज्या देशांत आपणास जाण्याची मनाई आहे असा (देश). ६ जेथें धन धान्यांची आणि पाण्याची समृद्धि नाहीं असा (देश, गांव, इ०). उ० डोळा काणा असावा पण मुलूख काणा असूं नये ही म्हण ५ आणि ६ ह्या दोन्ही अर्थांचें उदाहरण आहे. तिचा

अर्थः–एका किं० दोन्ही डोळ्यांचें अंधत्व बेहत्तर आहे, पण(१) एकाद्या देशांत जाण्याची आपणाला मनाई असतां कामा नये, म्ह० उजळ माथ्यानें तेथें जाण्याला मोकळीक असावी (२) तेथें धन-धान्याची आणि पाण्याची टंचाई नसावी. ६ एक पेड बारीक आणि एक पेड जाड झाल्यामुळें विलक्षण प्रकारची झालेली (दोरी) ७. तडकल्यामुळें किं० आडाणी कारागिरानें केल्यामुळें वाकडी झालेली किं० तिरपलेली किं० तिरकटलेली (गाडी, घडवंची, बाज, इ०). ꙮकाणीपेठ स्त्री० जेथें पदार्थांचा पुरवठा बाहेरून होतो म्हणून जेथें कधीं पदार्थांचें परमावधीचें वैपुल्य असतें आणि कधीं पदार्थ मुळींच मिळत नाहीं असा देश किं० गांव.

काणोसा पु० दूरचा शब्द ऐकूं यावा म्हणून एकाग्र चित्तानें तिकडे कान लावणें. 'कानोसा' हें अधिक प्रचलित रूप आहे. 'कानवसा' ह्याही शब्दाचा तोच अर्थ आहे (क्रि० घेणें).

काण्णव [सं० काण्व] पु०ब्राह्मणांतील एक पोटजात, किंवा त्या पोटजातीचा ब्राह्मण.

काण्णूबाण्णु न० १ किरकोळ किं० सटर-फटर· पदार्थांचा समुदाय. २ (पहिल्या अर्थावरून लक्षणेनें) कांहीं तरी; मोघम; निरर्थक (वस्तु, बोलणें, इ०); उ० हा नेहमीं मोडक्या बाजारांतून कांहीं काण्णूबाण्णू आणीत असतो, उ० मोडक्या बाजारांत कांहीं काण्णूबाण्णू भरलेलें असतें, तिकडे कशास जा ? उ० तो वक्ता कांहीं काण्णूबाण्णू बोलला झालें ! ३ (बायकांत) पुरुष स्त्रियांचीं हलक्या आवाजांत जीं आर्जवें किं० मनधरणी करतात तीं; (क्रिया० बोलणें). ४ (संकेतानें) अयोग्य रतिविलास; अधर्म्य कामचेष्टा.

कांत [सं० 'कांति' यापासून अपभ्रष्ट रूप] स्त्री० तेज; टवटवी; चकाकी; कळा.

कांत [सं०] वि० १ मनोहर, रमणीय, सुंदर. २ प्रिय; आवडता. पु०१ प्रियकर. २पति. ३ लोहकांत, लोहचुंबक.

कांत [अनुस्वाराचा उच्चार नाकांत] स्त्री० सर्पादिकांच्या अंगावरील निघते जी त्वचा ती. (सापानें कांत टाकली कीं तो पुन्हां तरुण होतो असें म्हणतात). पु० १ (कोंकणांत) जोतें, धक्का, इ० कांचा कांठ. २ [म० कांतणें] काष्ठ,हस्तिदंत, इ० कांतलें असतां जीं सालपटें, सोलावे, तास, वगैरे निघतात ते; कांतण.

कात [सं० क्वाथ=काढा] पु० खैर इ० वृक्षांच्या साली शिजवून जो अर्क काढतात तो; हा विड्यांत घालतात; याची चव कडू असते. ꙮएवढ्यानें काय कात होणार ? येवढ्यानें विवक्षित कार्याचा यत्किंचित् अंशही होणार नाहीं; उद्दिष्ट कार्याला इतकें थोडें परिमाण पुरणार नाहीं, आणखी पुष्कळच पाहिजे आहे. **कातकरी** पु० शूद्रांतील एक जात किंवा त्या जातीचा इसम. या जातीचे लोक कात तयार करतात. **कातगोळी** स्त्री० कातामध्यें सुवासिक द्रव्ये घालून तयार करतात ती गोळी. **कातचुली** स्त्री० कात बनविण्यावर घेतात तो कर. **कातबोळ** पु० कात व इतर द्रव्यें यांपासून बनविलेलें औषध. बाळंत स्त्रियांस हा देतात. **पोराचें पोर गेलें आणि कातबोळाचें मागणें आलें** ज्या लाभासाठीं खर्च पथकरला तो लाभ होणें बाजूलाच राहिलें आणि उलट तो खर्च मात्र डोक्यावर बसला. **वांझेस कातबोळ कशाला ?** ज्या वस्तूचा आपणाला कधींच उपयोग होण्याची शक्यता किं० संभव नाहीं ती संग्रहाला बाळगून ठेवण्याचे श्रम घेणें मूर्खपणा आहे. **संन्याशास सूळ वांझेस कातबोळ** संन्याशाला जसें शस्त्र निरुपयोगी तसा वांझेस कातबोळ निरुपयोगी. **कातभट्टी** स्त्री० १ कात तयार करण्याची भट्टी. २ त्या भट्टीवर बसविलेला कर.

कातकली स्त्री० १ गुदगुली. २ गुदगुल्या केल्यानें होणारी भावना.

कातडी [सं० कृत्ति=कातडें] स्त्री० मनुष्य, जनावर, इ०कांच्या अंगावरील चर्म, त्वचा, किं० साल. ꙮएकाद्याची कातडी लोळवणें किं०लोंबवणें त्याच्या अंगाची सालडी लोंबेपर्यंत त्याला बडविणें किं० झोडपणें.

कातडें [सं० कृत्ति=कातडें] न० १ अंगावरील साल; चर्म. २ चामडें (ज्याचे जोडे इ० करतात). ꙮ **अंगाचें कातडें काढून जोडा शिवला तरी त्यानें केलेले उपकार फिटणार नाहींत** त्यानें इतके पुष्कळ उपकार केले आहेत कीं त्यांची फेड करणें अशक्य आहे.

कांतण [सं० कर्त्तन] **न०** कातण्यानें करंज्यांना नक्षीदार कड करतांना जे तुकडे निघतात ते समुच्चयानें (खालीं ' कांतणें ' पहा).

कातण, कांतीण [म० कातणें] **स्त्री**०कोळ्याच्या जातीचा एक किडा. ꙳**कांतणीचें** कि०**कांतिणीचें घर न०** कांतीण बांधतें जें घर किंवा जो कोश तो (हें जखमेवर रक्त थांबविण्यासाठीं लावितात).

कातणें, कांतणें [स० कर्त्तन] **सं० क्रि०** १ चाती, रहाट, इ० कांच्या साहाय्यानें कापसापासून सूत काढणें किं० निर्माण करणें. २ विवक्षित आकार यावयासाठीं काष्ठ, हस्तिदंत, इ० दांचा अनुपयुक्त भाग तासून काढणें किं० छेदणें. ३ कातण्यानें करंज्याच्या, पुऱ्यांच्या, वगैरे कडा वेण्याकार ण्यानें करणें. ४ सतावणें; पीडणें; त्रस्त करणें **अ० क्रि०** एकाद्यावर गैरमर्जी करणें; त्याला अनेक प्रकारें उपद्रविणें; रागावणें; उ० तो मजवर उगाचिच इतका कातला. ꙳ **एकादी वस्तु कांतून पिंजून काढणें** ती अत्यंत परिश्रमानें आणि त्रास घेऊन करणें; फार श्रम घेउन तिला नीटनेटकें रूप देणें.

कातणें अ० क्रि० १ कांचणें; घर्षणादिकानें तुटणें (दोरी इ०) २ (लक्षणेनें) शरीर ज्वरादिकांनीं कृश होणें; रोडावणें; झिजणें.

कातणें न० करंज्यांना वगैरे वेण्याकार कडा पाडतांना जें चक्र असलेलें आऊत किंवा साधन घेतात तें; दांड्याला गरगर फिरणारें नक्षीदार परीघाचें चक्र असतें असा जो दांडा त्याला ' कांतणें ' म्हणतात.

कातर [सं०] **वि०** १ भितरा; भेकड. २ घाबरलेला. ३ व्याकुल. ४ उत्सुक.

कातर स्त्री०प्राण्यांच्या अंगावरचे केश ज्यामुळें गळून पडतात असा एक रोग; ह्याला कांतरी, चई, चाई, उंदरी, अशी अन्य नांवें आहेत.

कातर [सं० कर्तरी] **स्त्री०** १ वस्त्रादिं कापण्याचें हत्यार; कात्री. हिला दोन पातीं असून त्यांना मध्यावर जोडणारी खीळ असते. इष्ट पदार्थ या दोन पात्यांत धरून कापावयाचा असतो. २ नद्या, रस्ते, इ० चा तिरकस संयोग झाल्यानें मध्यें जें त्रिकोणाकृति क्षेत्र पडतें तें. ३ कात्रींतील किं० चिमट्यांतील जमीन. ३ वर्तुळाच्या मध्यबिंदूपासून परिघापर्यंत काढलेल्या दोन रेषांमधील त्रिकोणाकृति क्षेत्र. ४ अष्टदिशांमधील जी अंतरालें ती प्रत्येकी. ५ एकमेकांशीं तिरकस संयुक्त केलेल्या तुळयांची दुक्कल, किंवा त्यांतील जागा. ६ (लक्षणेनें) पेंच; अडचणीची स्थिति; हें करावें तरी वाईट तें करावें तरी वाईट अशी स्थिति; जणों काय आपण कात्रीच्या पात्यांत सांपडलों आहों; कोठूनच निसटावयास मार्ग नाहीं अशी स्थिति. ७ तळहातावर एकमेकांस कापणाऱ्या रेषांच्या मध्यें पडलेला त्रिकोणाच्या आकाराचा भागविशेष. ८ तेल्याच्या घाण्याला चिकटून फिरणारा त्रिकोणाकृति लाकडांचा सांगाडा. ꙳ **कातर वेळ स्त्री०** ऐन संध्याकाळ; दिवस आणि रात्र यांच्या कातरींत सांपडलेली वेळ.

कातरकुतर [म० कातरणें] **वि०** नागमोडी; करवतीच्या दांत्यांसारखा; उ० जास्वंदीच्या पानाची कड कातरकुतर असते. **स्त्री०** कात्रीनें वस्त्रादि कापल्यानंतर फुकट गेलेले जे तुकडे ते.

कातरण, कातरणी [म० कातरणें] **स्त्री०** कातरण्याचा व्यापार; उ० या मेंढ्यांची कातरणी केव्हां करणार ?

कातरणें [सं० कर्त्तन] **स० क्रि०** कात्रीनें कापणें, (वस्त्र, केश, कागद, इ०).

कातरता [म० कातरणें] **क्रि० वि०**तिरकस.

कातरबेती वि०काटकसरी. मागें **कतरबेती** पहा.

कातराविडा, कातरीविडा [म० कातरणें+ विडा] **पु०** पानांच्या कडा वेण्याकार कापून केलेला जो विडा तो.

कातरशितर[म०'कातरणें' यांचें द्वित्व करून] **वि०** १ काटकसरी. २ विचारी; जपून वागणारा; कालज्ञ; धोरणी.

कातरा [म० कातरणें] **पु०** १ वस्त्रादिकांचा विवक्षित भाग ठेवून बाकीचा कातरून काढलेला जो अतिरिक्त भाग तो, किंवा जो भाग निरुपयोगी म्हणून कातरावयाचा असतो तो. २ वस्त्रादिकांचा कातरून काढलेला तुकडा. ३ दोन सोप्यांच्या संयोगाचा जो संधि पडतो तो. ४ आढ्यापासून वळचणीपर्यंत उतरलेल्या छपराखालची जमीन. ५ थंडीनें हाताला किंवा पायाला पडतात ज्या भेगा त्या प्रत्येक. ६ शाळू किं० जोंधळा ह्यांच्या ताटांची रचलेली रास (**क्रि०** घालणें).

कातरा क्रि० वि० कसरता; तिरकस.

कातरी (– ऱ्या) वि० नागमोडी; करवताच्या दांत्यांसारखें पान किं० तशीं पानें ज्याला असतात असें झाड; जसें, कातरी निरगुंड, कातरी निवडुंग, इ०.

कातरी, कात्री, [**सं०** कर्त्तरी] **स्त्री०** १ कातर (प्रथमार्थ पहा). २ तेल्याच्या घाण्याला चिकटून फिरणारा जो त्रिकोणाकृति लाकडी रचनाविशेष त्याचा घाण्याजवळचा कोपरा. ॐ**कातऱ्याचोर पु०** खिसेकापू; कातरीनें दुसऱ्याचे खिसे कापून चोऱ्या करतो तो.

कातरी स्त्री० ज्या रोगानें प्राण्याच्या अंगावरचे केश गळून पडतात तो रोग. वर ' कातर ' पहा.

कातर्य [**सं०** ' कातर ' पासून **भा० वा० ना०**]**न०** भित्रेपणा; भेकडपणा; भीति;घाबरगुंडी.

कातवडी पु० कातकरी.

कातवणें अ० क्रि० चरफडणें.

कातावणें, कातावणें स० क्रि० सतावणें.

कातळ पु० न० अकृत्रिम दगडांची जमीन; खडकांचे थर नैसर्गिक रीत्या पसरून होतो जो सपाट प्रांत तो. ॐ**कातळवट वि०** ज्यामध्यें कातळ विशेष असतो अशी (जमीन).

कातळा पु० केळें वगैरेंचा पातळ आणि गोल काप. ॐ **कातळा ऊस पु०** एक प्रकारचा ऊस.

कांता [**सं०**] **स्त्री०** १ धर्मपत्नी. २ सुंदर स्त्री; मनोहारिणी स्त्री. ३ प्रिया; प्रियपात्र.

काताडी स्त्री०, कातांडें न० कातडी; कातडें.

कांतार [**सं०**] **न०** १ अरण्य, रान. २ कष्टप्रद मार्ग; वाईट रस्ता.

कातारी, कांतारी [**म०** कातणें]**पु०** कातकाम करणारा मनुष्य.

कातावणें, कांतावणें अ० क्रि० एखाद्यावर चिडणें; चवताळणें; एखाद्यावर रागारागानें चरफडणें.

कातावणें, कांतावणें स० क्रि० सतावणें, गांजणें, छळणें; पीडादायक होणें.

कांति [**सं०**] **स्त्री०** १ सौंदर्य, शोभा. २ तेज, तजेला, टवटवी, चकाकी. ॐ**कांतिमान पु० वि०** तेजस्वी; सुंदर; चकचकीत; टवटवीत.

कातीं स्त्री० भंडाऱ्याचा कोयता. **कातीखुमारी स्त्री०** ज्या माडाच्या झाडांपासून ताडी काढतात त्याचेवर सरकारनें बसविलेला कर.

कांतीण, कातीण [**म०** कातणें] **स्त्री०** कोळ्याचा जातीचा एक क्षुद्र जंतु;हिचें घर पांढरेंशुभ्र, गुळगुळीत, व चिवट असतें; तें जखमेवर रक्तस्राव थांबविण्यासाठीं लावितात.

कातीव, कांतीव [**म०** कांतणें] **वि०** कांतून केलेली (वस्तु,–खांब, जोड्या, रिंगणी, लाटणीं, सोंगट्या, इ०). ॐ **कातीव कोरीव वि०** १ रेखींव बांध्याचा किं० चेहेऱ्याचा(मनुष्य). २ कळाशीदार आणि सुबक (पदार्थ).

कातोडी पु० कातकरी जात किंवा त्या जातीचा इसम (हे लोक कात तयार करतात).

कात्या स्त्री० अ० व० कृत्तिका नक्षत्र.

कात्यायन न० मारणें, झोडपणें, ०ची कणिक तिंबणें; कुबलणें. ॐ**एकाद्याचें कात्यायन करणें** (किं० **काढणें**) त्याला चोप देणें; त्याचें कांडात काढणें.

काथ, काथकरी, काथगोळी, काथबोळ, काथवडी, काथोडी अनुक्रमें कात, कातकरी, इ० इ० पहा.

काथकडी [**म०** काथा+काडी] **स्त्री०** काथ्याचा एक तंतु. [दशेस येणें.

काथंबणें अ० क्रि० आंबा कोय धरण्याच्या

काथंबा पु० केळीच्या झाडाला फटतात जीं पिलें (म्ह० नव्या केळीच्या झाडांचे अंकुर) तीं प्रत्येक.

काथवट, काथोट स्त्री० १ काठवट; परातीसारखें काष्ठाचें पात्र. २ उसाच्या चरकाच्या नवरानवरींच्या खालचें आडवें लाकूड.

काथा, काथ्या पु० १ नारळाच्या कवचाचे जे तंतु असतात, किंवा सुरमाडाच्या अंगास जे तसेच तंतु असतात, ते समुच्चयानें. २ काथ्याची केलेली दोरी. ॐ**काथ्या कुटणें** निरर्थक गप्पा मारणें; शुष्क वादविवाद करणें. **काथाकूट, काथ्याकूट, काथेकूट स्त्री०** शुष्क किं० निष्प्रयोजक गप्पा मारण्याचा किं०वादविवाद करण्याचा व्यापार; रिकामी चर्चा; निरर्थक वाद.**काथामेथा पु०** झाडपाल्याचीं औषधें,–जीं गरीब लोक वापर

तात आणि जो पूर्वी सगळ्या स्त्रियांना ठाऊक असत.

काथ्या स्त्री० अ० व० कृत्तिका नक्षत्र.

काथ्या पु० मागें **काथा** पहा.

कांदपणें अ० क्रि० १ शमणें; दबणें; कमजोर होणें (गळूं, देवी, ताप, ठणका, इ०). २ शरमणें; लज्जित होणें.

कादंबरी [सं०] स्त्री० (बाणभट्टानें संस्कृतांत एक कल्पित कथा रचिली, व तींतील नायिकेचें ' कादंबरी ' हें नांव त्याणें आपल्या समग्र कथेस ठेवलें; त्यावरून) १ निर्मूल, काल्पनिक, कथा किंवा वृत्तान्त ज्यांत निवेदिलेला असतो असा वर्णनात्मक व संभाषणात्मक गद्यग्रंथ. २ विद्यादेवी सरस्वतीचें नांव. ३ एक पक्षी,—सारिका. २(लक्षणेनें)बनवाबनवीची गोष्ट किं० बनावट हकीगत. ꠲**कादंबरीकार वि० पु०, स्त्री०** कादंबरी रचणारा–री.

कांदरी स्त्री० कांद्यास जे लहान लहान कांदे फुटतात ते प्रत्येक.

कांदळ पु०, न० खाऱ्या पाण्याच्या शेजारी उगवणारें एक झाड; उ० शेत बुडालें आणि कांदळाचें रुख झालें (म्ह० शेत पिकलें नाहीं आणि निरुपयोगी झाडांची अडगळ मात्र झाली).

कांदा [सं० कंद] पु० १ एक पौष्टिक आणि उग्र दर्प असलेला जमीनीच्या आंत वाढणारा कंदविशेष. २ कोणत्याही जातीचा जमीनीच्या आंत वाढणारा कंद. ३ जिव्हेचा मूलप्रदेश. ५ मधाच्या पोळ्यांतील मध जेथें असतो तो भाग. ६ सरकारच्या मालकीच्या जमीनींत लाविलेल्या कांद्यांच्या उत्पन्नावर बसविलेला कर.

कादाचित्क [सं०कदाचित्] वि० १ सहजासहजीं, यदृच्छेनें,किं० आकस्मिक रीत्या घडणारा. २ प्रसंगविशेषीं घडणारा किं० होणारा किं० केला जाणारा.

काद्रव [सं० काद्रवेय] पु० (कवितेंत) एक पातालस्थ नागविशेष.

कान [सं० कर्ण] पु० १ ज्यायोगें शब्दाचें ज्ञान होतें तें (पांच ज्ञानेंन्द्रियांपैकीं एक) इन्द्रिय. २ त्या इन्द्रियाचें डोळ्यांना दिसणारें चर्ममय रूप. ३ (लक्षणेनें) पेले, मोदकपात्र, कानटोप्या, इ० कांच्या कडेस कानांसारखे अवयव राखिलेले असतात ते प्रत्येक. ४ भूषणादि घालण्याकरितां कर्णास जीं छिद्रें पाडतात तीं प्रत्येक. ५ बंदुकीचा काना. ६ लक्ष्य, अवधान (क्रिया० देणें).꠲**एकाद्याचे कान उघडणें, एकाद्याची कानउघडणी करणें** त्याला त्याचा मूर्खपणा दाखवून त्याचें हिताहित कशांत आहे हें समजावून सांगणें किं० उपदेशणें; त्याला रागें भरणें. **कान उघडून सांगणें** स्पष्ट शब्दांनीं बजावणें. **कान उपटणें, पिळणें,पिळवटणें, किं० धरणें** शिक्षा करण्याकरतां एकाद्याचा कान पिरगळणें. **एकाद्याचा कान कापणें, कीं० कान कापून हातावर देणें** त्याच्यावर मात करणें, त्याच्यावर ताण करणें (त्याला फसविणें, पराभविणें,या अर्थी).**कान किटणें** कांहीं एक गोष्ट अनेक वेळां श्रवण केल्यामुळें तिचा कंटाळा येणें.**कानखडी लावून घेणें, कानाला खडा लावून घेणें, कान पिळून घेणें** अमुक अमुक केलें असतां बाजू अंगलट येते, अतएव त्यापासून पुढें आलिप्त राहावयाचें असा निश्चय करणें. **कान झाडणें** दुसऱ्याची प्रार्थना अमान्य करणें.**कान टवकारून ऐकणें किं० पाहणें** अवधानपूर्वक किं० दक्षतेनें ऐकणें किं०पाहणें.**कान टोचणें**१भूषणार्थ कानास छिद्रें पाडणें. २ एखादी गोष्ट करण्याबद्दल एकाद्याला आग्रह करणें किं० उत्तेजन देणें. **सोनारानें कान टोचलेले चालतात** वलिष्ठ माणसानें एखादें कार्य करावयास फर्माविलें म्हणजे तें केलें जातें. **कान देणें** कांहीं गोष्ट श्रवण करण्याकरतां तिकडे लक्ष्य देणें; सावधान बसणें. **कान धरून किं० पिळून (एखादी वस्तु) घेणें** बळजबरीनें एखादी वस्तु घेणें; हक्कानें ती हिसकावून घेणें. **कान निवणें:किं०थंड होणें** जें ऐकावयाची इच्छा होती तें ऐकून हायसें वाटणें; उ० शिवाजी सुखरूप पोंचल्याच्या तोफा ऐकतांच बाजीदेशपांड्याचे कान निवले व त्यानें सुखानें प्राण सोडले. **कान पाडणें** जें कार्य करावयास आपण प्रवृत्त झालों तें अशक्य आहेंसें कळून आल्यामुळें आवेशहीन होणें; निरुत्साह, गलितधैर्य, किं०निराश,होणें.(आमच्या ''मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी,इ०''या पुस्तकांतील टीप पहा). **कानपूर ओस करून बसणें** बहिरेपणाचा बहाणा करणें. **कानपूर किं०कर्णपूर ओस पडणें** बहिरें होणें; श्रवणशक्ति नाहींशीं होणें.

एकाद्याचे कान फुंकणें १ त्याला मंत्रादि उपदेशिणें. २ त्याला बदसल्ला देऊन त्याचें मन कलुषित करणें. **कान भरणें** किं० **भारणें** एखाद्याची विवक्षितानुरूप प्रवृत्ति व्हावी म्हणून त्यास अनेक प्रकारें युक्ति प्रयुक्तिनें उपदेश करणें. **कानमंत्र देणें** एकाद्यास एकादी गोष्ट (प्रायः वाईट किं० विरुद्ध) करावयास गुप्त सल्ला किं० उत्तेजन देणें; उ० नारायणरावास मारून पेशवाईचीं वस्त्रें मिळविण्याचा कानमंत्र आनंदीबाईनें राघोबास दिला असें म्हणतात. **कान पसरून ऐकणें** खोट्या आस्थेनें आणि सावधानतेनें ऐकणें मात्र (तदनुरूप करणें नव्हे). **कान फुटणें** कांहीं विकृतीमुळें श्रवणेंद्रिय कामांतून जाणें; (याचा लक्षणेनेंही उपयोग करतात); उ० तुला तीं खुर्चीं मी इकडे आणावयाला सांगत असून तूं ऐकलें न ऐकलें करतो आहेस, तुझे काय कान फुटले आहेत ? **कान येणें** श्रवणशक्ति कर्णांचे ठायीं उत्पन्न होणें किं० प्रादुर्भूत होणें.बालकास ही तिसऱ्या महिन्यांत प्राप्त होते अशी समजूत आहे. **त्याच्या कानाआड किं० कानामागें किं० कानावरून ऊ जात नाहीं** त्याच्यावर बोलण्याचा,रागें भरण्याचा,उपदेशाचा,किं०शिकवणूकीचा, तिळमात्र परिणाम होत नाहीं. **एकाद्याचें कान लांबणें** किं० **वाढणें** तो उत्तरोत्तर मूर्ख होत जाणें;तो गाढवासारखें आचरण करूं लागणें. ' एकाद्याचे कान लांब होणें ' असाही याच अर्थी वाक्प्रचार रूढ आहे. **एकाद्याच्या कानाचे कानवले होणें** त्याचे कान सुरकुतणें किं० सुरकुतलेले असणें. **एकाद्याच्या कानाचे किडे झाडणें** १ चहाड्या ऐकून ज्याचें मन कलुषित झालें आहे त्याला वस्तुस्थिति कळवून त्याच्या मनांतील गैरसमज दूर करणें;त्याचें मन साफ करणें. २ त्याला ताळ्यावर आणण्याकरितां किं० युक्तायुक्त समजावण्याकरतां उपदेश करणें. ३ त्याला रागें भरणें. **एकाद्याच्या कानाचा चावा घेणें** त्याला भलभलत्या चहाड्या आणि चुगल्या सांगून एखाद्याविषयीं त्याचें मन बिघडाविणें. **एकाद्याच्या कानांत जपणें** [जपणें यांतील 'ज'-चा उच्चार तालव्य] त्याच्याशीं गुलगुल गोष्टी करून गुप्तपणें त्याला कांहीं कार्यार्थ उद्युक्त करणें. **कानांत तुळशी (-पत्र) घालणें** किं० **घालून बसणें** १ साधुत्वाचें ढोंग करणें; प्रापंचिक लबाड्यांच्या गांवचे आम्हीं नाहीं असा बहाणा करणें. २ आपणास ऐकूं येत नाहीं असें ढोंग करणें. **कानांत तेल घालून निजणें** १ निष्काळजी असणें; बेफिकीर असणें. २ बेपर्वा असणें; एकाद्या गोष्टीकडे बिलकूल लक्ष्य न देणें. **एकादी गोष्ट कानाबाहेर** किं० **कानावेगळी करणें** ती मनावर न घेणें; ती मनावर न घेतां तिच्याकडे दुर्लक्ष्य करणें. **एकाद्याच्या कानांत सुंठ फुंकणें** त्याला चिथावणें किं० चेतविणें. **कानामागून आले तिखट झाले** १ (गाय, बैल, इ० ना आधीं कान येतात आणि मग शिंगें येतात त्यावरून) मागून येणाऱ्यानें (स०लहानानें)पुढल्यास(स०थोरास) अक्कल शिकवूं पाहाणें; त्याच्यावर वरचष्मा करून आपलें श्रेष्ठत्व स्थापित करावयास प्रवृत्त होणें.२उपटसुंभ्यानें जुन्या प्रतिष्ठित आणि संभावित माणसापुढें शेखी मिरविणें. **कानामागें टाकणें** सल्ला किं०उपदेश यांच्याकडे दुर्लक्ष्य करणें.**कानाला खडा लावणें** आपल्या हातून अपराधाची पुनरावृत्ति होऊं द्यावयाची नाहीं असा निश्चय करणें. **उजव्या (किं० डाव्या) कानावरून जाणें** त्या कानाला चाटून जाणें(गोळी, बाण,इ०).**कानावरून जाणें** उडत उडत ऐकलेलें असणें; ऐकिवांत असणें. **कानांवर येणें, कानीं येणें, कानास येणें** कांहीं गोष्ट श्रुत होणें. **एकाद्याच्या कानावर घालणें** त्याला कळविणें. **कानाशीं कान लावणें** गुप्त मसलती करणें. **कानाशीं लागणें, कानीं लागणें** एखाद्याच्या कानांत गुप्तपणें कांहीं तरी (प्रायः चहाड्या) सांगणें किं० पुटपुटणें.**कानास कोन न कळूं देणें, कानाच्या कोपऱ्यास न कळूं देणें** एखादी गोष्ट अत्यंत गुप्त ठेवणें; तिची कोठेंही वाच्यता होऊं न देणें; ती लोकांपासून छपविणें.**कानास दट्टे बसणें, कानाचे दडे बसणें, कानठळ्या बसणें** तोफेचा वगैरे आवाज ऐकून कानाचे पडदे बधिर होणें; श्रवणेन्द्रिय आपलें काम करावयाला कांहीं काळ असमर्थ होणें. **कानीं कपाळीं रडणें** किं०**ओरडणें** एखाद्यास नित्य एकसारखा उपदेश किं० बोध वगैरे करीत असणें (अशा उपदेशाचा उपयोग झाला नाहीं म्हणजे उद्वेगानें प्रस्तुत वाक्प्रचार उपयोजितात); उ० बाळ्या, अभ्यास कर म्हणून मी तुझ्या

इतकी कानीं कपाळीं ओरडतें तरी तूं उनाडतोस ! **कानीं(म्ह०कोनीं) कोचीं बसणें** क्रि०**लागणें** कोणाचें संभाषण ऐकण्यासाठीं गुप्तपणें कोन्याकोपऱ्यांत बसणें. **कानीं मनीं नसणें** ऐकिवांत नसणें किंवा मनांत आणलेलें नसणें; ध्यानीं मनीं नसणें; एखाद्या गोष्टीची कधींही मनांत संभावनाही आलेली नसणें. **आमच्या कानीं सात बाळ्या** (लहान मुलांच्या भाषणांत)इतउप्पर आम्हांस कांहीं एक ऐकूं येणार नाहीं ! आम्ही तिकडे लक्ष्य देणार नाहीं ! **ह्या कानाचें त्या कानास न कळूं देणें** अत्यंत गुप्त ठेवणें; गुलदस्तांत ठेवणें. **या कानानें ऐकणें आणि त्या कानानें सोडणें** कांहीं गोष्ट ऐकणें व लगेंच ती विसरून जाणें; म्हणजे तिला यत्किंचित महत्व न देणें; जें कोणीं कांहीं सांगितलें त्याला महत्त्व न देणें; त्याचेकडे दुर्लक्ष्य करणें; तें मनावर न घेणें. **कानाचा अदळ वि०** ज्याच्या कानांत गुप्त म्हणून सांगितलेल्या गोष्टीची त्याच्याकडून वाच्यता किं०परिस्फुटता होते असा;ज्याच्या पोटांत कांहीं गुप्त गोष्ट राहात नाहीं असा; अदळ जिभेचा. **कानाचा तिखट वि०** ज्याचें श्रवणेन्द्रिय अत्यंत तीक्ष्ण आहे असा; ज्यास अति हळूं बोललेलेंही ऐकूं येतें असा. **कानाचा हलका** किं० **हलक्या कानाचा वि०** कोणी कांहीं खरी खोटी गोष्ट सांगितली असतां ज्याचा तिच्यावर विश्वास बसतो असा. **कानावर लेखणी बाळगणारा वि०** अति तल्लख आणि हुषार कारकून. **कानकचडा पु०** वासरांच्या कानांना होतो जो रोगविशेष तो. **कानकळाशी स्त्री०** पशूंचे कान, डोकें, इ० अवयवांची घडण,आकार,किं०ठेवण.**कानकिरळी, कानकीड, कानकुरकुटी, कानकुरटी स्त्री०** पशूंच्या कानांत एक प्रकारची कीड पडते ती.**कानकुरकुटी** पोरांच्या कानांस होते ती कीड. **कानकुण (–न) स्त्री०** १ कुणकूण. २ हलक्या स्वरांत कोणाविषयीं कांहीं बोलणें तें. ३ काचकूच; मागें पुढें करणें; अवंकणें. **कानकेस पु० अ० व०** नवरा मेलेल्या स्त्रीचें वपन करणें व तिचे दागिने वगैरे काढून घेणें (तिला संन्यासिनी करण्याकरतां);(**क्रि०** करणें). **कानकोंडा** [कान+कोंडणें] **वि०** १ लज्जित; शरमिंदा. २ आपणास कांहीं ऐकूं येत नाहीं किं० आलें नाहीं असा बाहाणा करणारा. ३ कोणी कांहीं सांगितलें तर तिकडे दुर्लक्ष्य करणारा.**कानकोंडा पु०** कानांतील मळ. **कानकोंडी स्त्री०, कानगाडा, कानागाडा पु०** १ आपण कांहीं ऐकिलें नाहीं असा बहाणा;(क्रि० करणें). २ ऐकिलेल्या किं० कोणी सांगितलेल्या गोष्टीकडे दुर्लक्ष्य करणें (**क्रि०** करणें). **कानकोपरा पु०** घराला, शेताला किं०पटांगणाला आलेला कोन किं०कोपरा; त्यांचा नियमित आकाराशीं न जुळणारा भाग; त्यांच्या ठोकळमानाच्या आकाराशीं विसंवादी असा भाग. **कानकोरणें न०** कानांतील मळ काढावयाची चांदीची वगैरे काडी,–जिला पुढें पळीसारखी चिमुकली वाटी असते; यास **कानकोरणी स्त्री०** असाही अन्य शब्द आहे. **कानखवडा पु०** वासरांच्या कानांना होणारा एक रोग. **कानगच्ची स्त्री०** १ वस्त्रादिकांनीं कान झांकणें किं० बांधणें (थंडी वाजूं नये म्हणून; **क्रि०** करणें, बांधणें). २ (लक्षणेनें) एकाद्याचे चाहाड्या सांगून कान भरणें (**क्रि०** करणें). **कानगोष्ट स्त्री०** १ हळूंच एखाद्याच्या कानांत सांगितलेली गोष्ट. २ चोरून बोलत बसणें; खलबत; गुप्त बेत. **कानघुशी, कानघुसणी स्त्री०** (बैदुलांत) हाताचा अंगठा आणि पुढचें बोट यांच्या चिमटींत कान धरून त्याच हाताच्या कोपरानें गोटी किं० बैदूल उडविणें. **कानघोण स्त्री०** घोण म्हणून जो क्षुद्र जंतु आहे व जो कानांत शिरण्याची भीति असते तो. **कानचिपी, कानचिंबळी स्त्री०**शिक्षा म्हणून कान पिळवटणें (**क्रि०** करणें, करून घेणें). **कानटाळ न०,कानठळीं, कानठळें न० अ०, कानठळ्या, कानठाळ्या स्त्री० अ० व०** [कान+टाळी(=तळहात)] थंडी, मोठा नाद, इ०कांमुळें कानांस बधिरता येऊन कांहीं ऐकूं न येणें. ‘ कानठळ्या बसणें ’ म्ह० वरील कारणांमुळें ऐकूं न येणें,आणि ‘ कानठळ्या उठणें ’ म्ह० वरील कारणांमुळें ऐकूं येत नाहींसें झालें होतें तें पुनरपि ऐकूं येऊं लागणें. **कानडोळा पु०**१ कानाडोळा करणें; दुर्लक्ष्य करणें. २ तिसऱ्यास न समजेल अशा रीतीनें एखाद्यास अमुक कर किंवा नको करूं अशा अर्थानें केलेला नेत्रसंकेत किं० केलेली खूण (**क्रि०** करणें); ‘ काणाडोळा ’हा शब्द पहिल्या अर्थानें अधिक प्रचलित आहे. **कानपटी स्त्री०**

कानावरून रुमाल इ० कांची बांधतात ती पट्टी. **कानपिसा वि०** कानाचा हलका; ज्यास कांहींही सांगितलें तरी त्याच्यावर विश्वास ठेवण्याइतका जो मूर्ख असतो तो. **कानपिळा (-ळ्या) पु०** (विवाहांत) नवरीचा भाऊ. नवऱ्याचे कान पिळण्याचा, तसेंच लाजाहोम चालला असतां नवरीच्या हातांत लाह्या घालण्याचा, त्याचा मान असतो, व त्याबद्दल त्याला पागोटें द्यावें लागतें. त्या पागोट्यास ' कानपिळ्याचें पागोटें' किं० ' कानपिळणीचें पागोटें ' म्हणतात. **कानफट (-ड) न०** गालफड; उ० ज्यास्त बोललास तर कानफड सुजवीन (किं० कानफडांत मारीन). **कानफाटा, कानफाट्या, कानफाटी, कानफाडी पु०** गोसाव्यांतील एक आखाडा किंवा त्याचा अनुयायी. कानफाटे गोरखनाथाची पूजा करतात. त्यांच्या कानांत भलीं मोठीं कुंडलें असतात. **एकदा कानफाट्या नांव पडलें म्हणजे वाईट** एकदा एखाद्या माणसाचें नांव कांहीं कारणावरून बद् झालें म्हणजे त्याणें पुढें कांहींही चांगली गोष्ट केली तरी लोक त्याणें ती वाईट उद्देशानें केली असली पाहिजे असें समजतात. **कानकुशी स्त्री०**एखाद्याच्या कानांत कुजबुजणें. **कानमंत्र पु०,कानमंत्री स्त्री०** १ कानगोष्ट; गुजगोष्ट. २ गुप्तपणें केलेला उपदेश. ३ वाईट कामीं दिलेली भर. ※ **कानमंत्र सांगणें** १ गुलगुल गोष्टी करणें. २ कांहीं वाईट गोष्ट करण्याविषयीं एखाद्याला चिथविणें. किं० फूस देणें. **कानवेणी स्त्री०** स्त्रियांच्या डोक्यावरील कानाजवळच्या केशांची घातलेली एक प्रकारची वेणी. **कानशिरा स्त्री० अ० व०** तोंडांत लाळ उत्पन्न करणारें एक इंद्रियविशेष (त्यांचा आजार तीक्ष्ण वेदना उत्पन्न करतो). **कानशील, कानसल, कानसूल, कानाड न०** १ कानफड. २ कानाजवळील गालाचा व गळ्याचा भाग; उ० आज माझें कानशील ठणकतें आहे. ३ [कर्णशूल] कानांचा ठणका. **कानशीलवेणी स्त्री०**मुलींची कानाजवळील केशांची घातलेली लहानशी वेणी. **कानाकोपरा, कोनाकोपरा, कानाकोचा पु०**सांधे, फटी, कोपरें इ०; उ० मी कानाकोपरा धुंडाळला, पण माझी गमावलेली आंगठी मला कोठेंही सांपडली नाहीं. **कानाकोपऱ्याचें भाषण न०** गुप्त भाषण. **कानेंकोंचें न०** (लक्षणेनें) गुप्त हेतु किं०अर्थ; इंगित; भाषणादिकांची गूढ खोंच किं० गूढ अर्थ; (**क्रि०** लागणें, जाणणें, समजणें, पाहाणें). **कानेंकोंचें भाषण न०** झोंबरें, दुखविणारें, किं० मर्मभेदक भाषण. **कानींकोंचीं बसणें** दडून किं० चोरट्या रीतीनें दुसऱ्याचीं भाषणें ऐकावयाला बसणें किं० बसून तीं ऐकणें. **कानागाडा** [कान+ गाडणें] **पु०** १ बहिरेपणाचें सोंग करणें. २ ऐकलें न ऐकलेंसें करणें; कांहीं आज्ञा ऐकण्यांत हयगय, टंगळमंगळ किं० टाळाटाळ; (**क्रि०** करणें). **कानाडोळा पु०** १ दुर्लक्ष्य करणें; अंगाबाहेर टाकणें; अवमानणें (काम, याचना, इ०). २ माहिती असून माहिती नाहीं असें दर्शविणें; डोळेझांक करणें (प्रोत्साहन देण्याकरितां). ३ प्रयत्न करावयास पाहिजे अशा वेळीं उदासीन बसणें (**क्रि०** करणें). **कानावर्त्त पु०** कानांवर उगवलेलें केशांचें वलय(हें घोड्याचें अशुभ चिन्ह समजतात).टीपः- कांहीं वाक्प्रचारांत ' कोन '(कोपरा) ह्याचे ऐवजीं ' कान ' वापरतात.

कानईचा पु० पांढऱ्या आणि काळ्या वर्णाचा एक मत्स्यविशेष.

कानकारी स्त्री० मागावर विणलें जात असलेलें वस्त्र ताठ ताणावयाचें धनुष्याच्या आकाराचें कोष्टयांचें एक साधन.

कानगी [**म०** कान] **स्त्री०** १ कांहीं एक गोष्ट अनेकांस गुप्तपणें कळविण्याचा व्यापार (**क्रि०** करणें, देणें). २ व्यंकोबाच्या देवास प्रतिवर्षी देतात जें द्रव्य तें. ३ ऐकणें; कानोसा (**क्रि०** घेणें, घेत बसणें).

कानची स्त्री० लांब कान असलेलें वाघूळ.

कानठ स्त्री० खाऱ्या पाण्यांतील एक लहान मत्स्याविशेष.

कानडा वि० १ प्रतिकूळ; विरुद्ध किं० उलट जाणारा किं० वागणारा किं० चालणारा. २ एका कानाशिलावर निजलेला. ३ कर्णाटकासंबधाचा. **पु०** एक राग (संगीतांत). ※ **कानडें न०** चमत्कारिक, कठोर, दुर्बोध, ओबडधोबड, किं०असंस्कृत असें जें कांहीं तें,-चाल, भाषा, वेश, बोलणें, इ०.

कानडें न० चरक्याचें मोठें चाक ज्या दोन उभ्या लांकडांच्या आधारावर असून स्वतां फिरून

सुताला पीळ भरतें त्या दोन लाकडांपैकीं प्रत्येक.

कानन [सं०] न० अरण्य, वन, रान, जंगल, राई. ०**काननौका** पु० अरण्यवासी. २ वानर.

कानपणें अ० क्रि० १ देवींचे, कांजिण्यांचे, किं० गोवरांचे फोड मावळणें किं० नाहींसे होणें. २ शमणें, दबणें, हटणें. ३ (लक्षणेनें) गोंधळणें; लज्जित होणें; घोटाळ्यांत पडणें.

कानपा [म० कान] पु० १ काथवट इ० कांचा कान,–जो हातांत धरून तें पात्र उचलतात. २ तोफेचा गाडीवर टेकणारा अवयव; तोफेच्या दोन्ही बाजूंस जे दोन वाटोळे गोट्यासारखे भाग असतात,–ज्यांवर ती तोफ गाडींत ठेविली जाते, ते प्रत्येक.

कानकुटी स्त्री० एक औषधी वेल.

कानमुशी स्त्री० मुशी या जातीच्या मत्स्यांतील भेद.

कानवडणें [म० कानवड] अ० क्रि० १ एका कुशीवर पडणें. २ (पदार्थ) एका कुशीवर किं० बाजूवर स्थित असणें किं० राहाणें.

कानवडा [म० कान] वि० एका कुशीवर किं० बाजूवर स्थित असा (मनुष्य, पात्र, इ०).

कानवला पु० एक प्रकारचें करंजीसारखें पक्वान्न. २ एका वृक्षाचें नांव. ३ (थट्टेनें) कानाला चिमटा घेणें; कान पिळणें; (क्रि० देणें, खाणें, घेणें, मिळणें). ०**हातापायाचा कानवला होणें** हातपाय सुरकुतून जाणें, आंखूडणें, किं० वांकडे होणें.

कानवसा, कानोसा पु० दूरचा शब्द एकाग्रतेनें श्रवण करण्याचा जो व्यापार तो (क्रि० घेणें, लागणें, लावणें).

कानवळ पु० कानाच्या मागें होत असतो जो एक रोग तो.

कानवळा वि० कुशीवर असलेला किं० पडलेला किं० निजलेला. पु० जनावराच्या डाव्या कानाखालीं तापलेल्या लोखंडानें देतात जो डाग तो.

कानवळे पु० अ० व० कानाच्या शेजारचे केश.

कानवा पु० १ कानोसा. २ कानांतील मळ.

कानव्हळा पु० कानोसा; (क्रि० घेणें, लावणें).

कानस, कानशी स्त्री० धातूचे कण खरडून काढणारें एक हत्यार. ०**एकाद्याला एकाद्या गोष्टीची कानस घालणें** ती गोष्ट त्याला नीट बजावून सांगणें किं० त्याच्या मनावर ठसविणें.

कानसणी स्त्री० कानशीनें घांसण्याचा व्यापार.

कानसणें स० क्रि० कानशीनें घांसणें; उ० पूर्वी लबाड लोक रुपयांच्या कडा कानसून चांदी चोरीत; उ० गहाण म्हणून ठेवून घेतलेल्या सोन्यारुप्याच्या डागिन्यांच्या किं० भांड्यांच्या कडा कानसून निघतील ते कण चोरून श्रीमंत झालेले सावकार पुष्कळ पाहाण्यांत येतात.

कानळ पु० डोंगराच्या मुख्य रांगेपासून निघालेली बारकीशी रांग.

काना पु० १ तोफ, बंदुक, इ० कांचे रंजक भरावयाचें छिद्र. २ हातांनीं धरावयासाठीं किंवा गाड्यांत अडकविण्यासाठीं तोफेस दोन बाजूंस जे कान किंवा अवयव केलेले असतात ते प्रत्येक. ३ अक्षरापुढील उभी रेघ; जसें अ या अक्षरास काना जोडला म्हणजे आ होतो. ४ अक्षराची उभी रेघ; उ० घ या अक्षराचा काना. ५ पाणी वाहण्याकरतां मध्यें पोखरून पन्हाळासारखा केलेला चिरा किंवा चुन्याचे वगैरे तदाकार केलेलें बांधकाम. वि० एका डोळ्यानें अंधळा (अधिक प्रचलित रूप 'काणा'). ०**कानामात्रा** स्त्री० ए० व० किंवा अ० व० अक्षरांस द्यावयाची काना, मात्रा, वेलांट्या, इ० जीं चिन्हें तीं समुच्चयानें. ' कान्हा ', ' कान्हामात्रा, ' अशींही रूपें प्रचलित आहेत.

काना वि० १ काणा; एकडोळ्या. २ तिरळा.

कानाडी [म० कान] क्रि० वि० आकर्ण (ओढलेली धनुष्याची दोरी); उ० धनुष्याची दोरी कानाडी ओढून त्यानें सावजावर बाण सोडला.

कानी स्त्री० १ जोंधळ्यास एक रोग होत असतो तो. २ शिंकयास ज्या चार दोऱ्या असतात त्या प्रत्येक. ३ दावें, दावण, यांस जे पेड असतात ते प्रत्येक. ४ दाव्याचा फास.

कानीन [सं०] पु०, स्त्री० १ कौमार्यदशेंत विवाह व्हावयाचें पूर्वीं होतें जें अपत्य तें,–मुलगा किं० मुलगी. २ व्यास. ३ कर्ण.

कानू [अ० कानून्] स्त्री० १ कायदा, नियम; उ० या नळावर कोणीं धुणीं धुवूं नयेत, धुतल्यास कानूप्रमाणें शिक्षा होईल. २ बाजारांत

विक्रीकरतां माल ठेवणारांकडून त्यांच्या मालांतील कांहीं माल घ्यावयाचा हक्क किं० अधिकार.**कान द्यावा पण कानू देऊं नये.** १ शारीरिक नुकसान सोसावें परंतु बेकायदा कोणी नुकसान करावयाला लागला तर त्याला प्रतिबंध करावा. २ क्षणिक देहकष्ट सोसावे पण चिरकाल नुकसान करीत राहाणारा कायदा लादून घेऊं नये. **कानूकनात स्त्री०** नियम, कायदा, हक्क, अधिकार (समुच्चयानें किंवा एकैकशः). **कानूकायदा पु०** नियम, कायदे, इ० (सामुदायिकत्वानें किंवा एकैकशः). **कानूजाबता** [अ० कानू (कायदा) +अ० जाबताह् (परिपाठ)] **पु०** सर्व कानू आणि कायदे ज्यांत लिहिलेले असतात असा कागद, असा लेख, अशी जंत्री, किं० अशी चोपडी.

कानेदर पु० कांडेचोर; ऊद.

कानोडणें अ० क्रि० कानवडणें.

कानोडा वि० कानवडा.

कानोला पु० कानवला.

कानोसा पु० १ दूरचा शब्द ऐकण्यासाठीं श्रवणेंद्रिय एकाग्र करणें किं० असें करून जें ऐकिलें तें. २ तांदुळाचा केलेला एक भाकरीसारखा खाद्य पदार्थ.

कान्नूबान्नू न० मागें ' काण्णूबाण्णू ' पहा.

कान्हा पु० १ नारळ जिला धरतात अशी जी फांदी तिचें अग्र; नारळाच्या लोंगराचें टोक. २ मूल; तान्हें मूल.

कान्हा पु० मागें ' काना ' पहा.

कान्ही स्त्री० कानी; जोंधळ्याला जडणारा एक रोग.

कान्हेर, कानेर पु० कानठळ्या बसविणारा निनाद, ध्वनि, किं० आवाज.

कान्होबा [सं०] **पु०** कृष्ण; श्रीकृष्णदेव.

काप पु० स्त्रियांचें कानांत घालावयाचें एक भूषण. **काप गेले भोकें राहिलीं** वैभव नाहींसें झालें पण पूर्वीच्या वैभवाचीं चिन्हें राहिलीं आहेत. **कापसांखळी स्त्री०** बायकांच्या कापनामक कर्णभूषणाची सांखळी, किं० सांखळी असलेले काप.

काप [म० कापणें] **पु०** फळें इ०कांचे कापलेले जे तुकडे ते प्रत्येक; चकती (क्रि० करणें, पाडणें, चिरणें, पडणें); उ० या विळीची धार गेली आहे; तिच्यावर या बटाट्यांचे चांगलेसे काप पडत नाहींत. **कापकडीसुपारी स्त्री०** कोंवळी सुपारी काढून तिचे काप काढून ते शिजवून वाळवून तयार करतात ती. **कापी सुपारी स्त्री०** कोंवळ्या पोफळाचे काप दुधांत शिजवून उन्हांत वाळवून करतात जो सुपारीचा प्रकार तो.

कांप [सं० कंप] **पु०** शरीराची कुडकुडी किं० थरथर; कंपन (थंडी, भीति, इ०नीं जनित).

कापटणें [म० कापणें] **स० क्रि०** कातरणें; भादरणें, (मेंढ्या, रेडे, म्हशी, इ०).

कापटा [म० कापणें] **पु०** तुकडा, छेद (केळीच्या पानाचा, कागदाचा, विड्याच्या पानाचा, लांकडाचा, दगडाचा, इ०); कपटा.

कापटी [म० काप=तुकडा] **स्त्री०** आंबा, कलिंगड, इ० फळांचा काप किं० तुकडा.

कापट्य [सं० ' कपट 'चें भा० वा० ना०] **न०** १ कपटीपणा; लुच्चेगिरी; फसवेगिरी; खोटेपणा; लबाडी. २ दुष्टपणा.

कापड न० वस्त्र. **कापडकरी पु०** कापड विकणारा. **कापडआंख पु०** कापडावर किं० कापडाच्या गठ्यावर घातलेला आंकडा (खुणेचा किं० किंमतीचा किं० दर्जाचा). **कापडचोपड न०** ल्यावयास वगैरे लागणारीं सर्व वस्त्रें समुच्चयानें; उ० इन्दूच्या लग्नांत पांच हजार रुपयांचें कापडचोपड लागलें; उ० आम्हांस दर वर्षास दानशें रुपयाचें कापडचोपड लागतें. **कापडनिशी (–निविशी) स्त्री०** कापडनिसाचें काम किं० हुद्दा. **कापडनीस (–निवीस) पु०** कापडें, चिरगुट, इ०चा हिशोब ठेवणारा, त्यांची व्यवस्था पाहणारा, किं० त्यांची मोजदाद करणारा अधिकारी. **कापडलेप पु०** मडकें, बरणी, इ० मध्यें औषधी द्रव्यें घालून त्यांचेवर चिरगुट गुंडाळून त्याचेवर मातीचा लेप करून तीं विस्तवांत भाजून किं० शिजवून काढतात;हा जो कापडावर मातीचा लेप केलेला असतो तो. **कापडी वि०** कापडाचें केलेलें किं० बनविलेलें; कापड ज्यांत वापरिलें आहे असें; कापडानें बांधलेलें, किं० मढविलेलें (डोला, पुस्तक, पेटारा,इ०).

कापडी पु० भगवीं वस्त्रें परिधान करून भागीरथीची कावड खांद्यावर घेऊन तीर्थयात्रा करीत जो फिरतो तो. हे लोक भगवें निशाण हातीं घेतात व रुद्राक्ष, गंगाजल, जानवीं, वगैरे विकतात.

कापण, कापणी स्त्री० दाढी आणि हजामत न्हाव्याकडून करविणें (विनोदात).

कापणावळ [म० कापणी] शेत, लाकडें, इ० कापण्याबद्दल द्यावें लागतें तें मोल.

कापणी [म० कापणें] स्त्री० १ कापणें किं० कापण्याची क्रिया. २ शेत इ० कापण्याचा जो व्यापार तो (मुख्यत्वेंकरून याच अर्थानें हा शब्द विशेष वापरतात).

कापणें स० क्रि० १ तरवार, चाकू, सुरी, कात्री, इ०कांनीं पदार्थ द्विधा करणें, छेदणें, किं० खंडित करणें. २ फोडणें (गळूं वगैरे). ३ (लक्षणेनें) काटणें, कमी करणें (रोजमुरा, वेतन, अंतर, वर्षासन, इ०). ४ कातरणें (केश). ५ पाणी हातांनीं मागें लोटून पुढें सरकणें (पोहणाऱ्यानें). अ० क्रि० चाकू, वस्तरा, कांच, विळीचें पातें, वगैरेंनीं बोट, गाल, पाय, इ० विद्ध होणें आणि त्या त्या ठिकाणांतून रक्तस्राव होणें.

कांपणें [सं०कंप्=थरथरणें] अ० क्रि० भीतीनें किं०शैत्यानें शरीर थरथरणें किं०कंप पावणें.

कांपता क्रि० वि० कातरता;कस्रता;तिरकस.

कापरवणी [म० कापूर+पाणी] न०कापराचें पाणी. [कांपणारा.

कांपरा [सं० कंप, म० कापणें] वि०

कांपरा पु०,**कांपरी** स्त्री०,**कांपर** न०[सं०कंप] कंप, थरथर; (क्रिया० सुटणें, भरणें).

कापर्टिक [सं०] पु०मागें 'कापडी पु०'पहा.

कापला [अ० काफिलाह्] पु० तांडा (यात्रेकरू, व्यापारी, इ०कांचा).

कापशा [म० कापूस] वि० १ फोपशा; थिलथिलीत, बोथल्या माणूस. २ बेचव, पचपचीत किं० चिवट (मुळा, भोपळा, काकडी, इ०).

कापाशी, कपाशी (–सी) [सं० कार्पास] स्त्री० कापूस ज्याचें बोंडांतून निघतो तें झाड.

कापळा [म० कापणें] उंडीच्या गराचा जो काप तो. याला **कापोळा** असेंही म्हणतात. उंडी हें एक फळ आहे व त्याच्यापासून तेल काढतात.

कापा [म० कापणें] वि० रेषा नसलेला, घट्ट, अतएव कापून फोडी करावयास योग्य असा (कलमी आंबा किं० फणस किं० तज्जातीय अन्य फळ). यांच्या उलट बरका.

कापाल, कापालिक [सं० कपाल=डोक्याची कवटी] वि० १ कवटीसंबंधीं जे कांहीं तें. २ कपाळासंबंधीं. ३ भिक्षेकऱ्याचें. पु० वाममार्गानुसारें शिवाची भक्ति करणारा. या मार्गाचे अनुचारी पाणी प्यावयास वगैरे अर्धी कवटी घेतात.

कापींव [म० कापणें] वि० १ कापणी करण्यास तयार; कापावयास योग्य. २ कापून काढलेला (तुकडा). ३ ज्यांतून कांहीं भाग कापून काढला आहे असा.

कापुरवणी [म० कापूर+पाणी] स्त्री० कापराचें पाणी.

कापुसणें [म० कापूस] अ० क्रि० १ फोपशें होणें;शरीर मेदोवृद्धीनें युक्त होणें. २भोपळा इ० फळें कांहीं विकृतीनें कापसासारखीं होणें किं० रेपाळ, थिलथिलीत होणें किं०चिरगुटासारखीं होणें.

कापूर [सं० कर्पूर] पु० एक सुवासिक द्रव्य. हा पांढरा असतो व तो देवापुढें लावतात. तो औषधीही आहे व दांतातील वगैरे कीड मारतो. ॐ**चोळला कापूर नासतो** एखाद्या गोष्टीची फार वाटाघाट केली म्हणजे प्रायः तिच्यांत विघ्नें उपस्थित होऊन ती बिघडते. **कापूरआरती** स्त्री० १ ताह्मण, तबक, इ० मध्यें पेटलेला कापूर ठेवून त्यानें ओवाळून पूजादि करणें (देवाची, गुरूची, ब्राह्मणाची, वगैरे). २ ज्या पात्रांत असा कापूर ठेवून ओवाळतात तें पात्र. **कापूरकचरा** पु०, **कापूरकचरी** स्त्री० एक सुवासिक कंद. **कापूरकर्दळी** स्त्री० एक वनस्पति. **कापूरचिनी** स्त्री० एक औषधी पदार्थ. **कापूरपोंवळें** न० खोटें पोंवळें करतात तें; लाखेचें बनविलेलें पोवळें. **कापूरभेंड (–भेंडी)** स्त्री० भेंडीच्या वर्गांतील एक वृक्षविशेष. **कापूरमोतीं** न० खोटें मोतीं; पाऱ्याचें वगैरे केलेलें कृत्रिम मोतीं. **कापूरविडा** पु० ज्यांत कापूर घातला आहे असा विडा. विड्यांत घातलेल्या कापराला **थंडाई** हें विशेष

नांव आहे. **कापरवेल स्त्री०** १ नागवेलीचा म्ह० विड्याच्या पानांच्या वेलीची एक जात. २ एक फूलवेल.

कापूस [**म०** कार्पास] **पु०** १ कपाशीच्या झाडांस जीं बोंडें असतात त्यांतील तंतुकोश,-ज्यापासून वस्त्रादि करतात. २ तत्सदृश रुई, शेवरी, कुडा, इ० कांचे फलांत निघणारा तंतुकोश किंवा तंतुसंचय. ३ तवसें, भोपळा, इ०फार दिवस राहिल्यानें नासून त्यांत कापसासारखी जी विकृति होते ती. ४ अवाळूं, चामखीळ, इ०कांचे पोटीं जे फुसफुसीत मांस असतें तें.५ केळीच्या झाडाचें जें काल (म्ह० गाभा) त्यांतील तंतु किं० केसर. ꠰꠰ **कापसाची मोट स्त्री०**फोपशा किं०थिलथिलीत मनुष्य. **कापूस महाग करणें** शरीरानें कृश होणें. **कापूस संवग** किंवा **स्वस्त करणें** शरीरानें लठ्ठ किं० पुष्ट होणें; शरीरानें लठ्ठ आणि थिलथिलीत होणें.

कापोळा पु० उंडीच्या फळाचे जे काप ते प्रत्येक; कापळा.

काप्रवाणी न० कापूरपाणी.

काफर [**अ०** काफिर्=मुसलमानांच्या अल्लाच्या धर्माचा नसलेला; नास्तिक] **वि०** लुच्चा, भामटा, सोदा. [जातीचा इसम.

काफरी [अ० काफिर्=नास्तिक] **पु०** शिद्दी

काफला, कापला [अ० काफिलाह्] **पु०** १ दूरच्या यात्रेस निघतांना चोरादिकांपासून संरक्षण व्हावें म्हणून शिपाई, प्यादे, इ० बरोबर घेऊन हजारों यात्रेकरूंचा निघणारा संघ, समुदाय, किं० तांडा. २ याच रीतीनें गलबतें वगैरेंचा निघणारा तांडा किं० समुदाय. ३ व्यापाऱ्यांचा निघालेल्या किं० निघणारा संघ किं० समुदाय किं० टोळी.

काफी स्त्री० १ संगीतातील एक रागिणी. २ बुंद. ३ तुपावर भाजलेल्या बुंदांचें चहासारखें करतात तें पेय.

कांब स्त्री० १ वेळू, चिवा, इ०चा उभा चिरलेला जो तुकडा तो. २ लोखंड किंवा इतर धातु यांचा लांबट तुकडा; गज; उ० संभाजीच्या बाहूंत कांबी वाकविण्याची ताकद होती. ३ कोपरापासून मनगटापर्यंतचें जें हाड तें;त्याला ' मनगटाची कांब ' असेंही म्हणतात. ४ (कुस्तींत) एकमेकांस पाडण्यासाठीं जी एका हाताची मिठी प्रतिपक्ष्याच्या मानेभोंवतीं घालतात ती. ५ क्षेत्रमापनार्थ पंधरा तसू लांबीचा घेतात जो दंड तो. ꠰꠰ **कांब मोठी असणें** बाहूंत खूप शक्ति किं० सामर्थ्य असणें.

कांबट, कांबटी, कामटी स्त्री० पुढें 'कांबीट' पहा.

कांबरूण न० (अडाण्यांत) पांघरूण.

कांबेर न० डोळ्यांतील मल बाहेर पडून डोळ्याच्या शेजारीं चिकटून वाळलेला असतो तो.

काबली, काबुली[**म०** काबूल(अफगाणिस्तानची राजधानी)] **वि०** काबूलचा; अफगाणिस्थानचा; काबूलाविषयींचा; अफगाणिस्तानासंबंधीचा.

काबली स्त्री० १ वाटाण्याची एक जात. २ ह्या जातीच्या दाण्यांचें भाजून आणि मीठ वगैरे लावून करतात जें एक फुटाण्यासारखें खाद्य तें. हें पुण्यांत शुक्रवारीं विकतात व खातात.

कांबळ स्त्री० गाय, बैल, इ०कांच्या गळ्याखालीं जें मांसल चर्म लोंबत असतें तें.

कांबळा [**सं०** कंबल] **पु०** दोन घोंगड्या एकत्र शिवून करतात जें वस्त्रप्रावरण तें.꠰꠰**कांबळ्या वि०** १ कांबळा घेणारा म्ह० सामान्य मजूर किं० हेलकरी किं० शेतकरी. २ कोणिही अशिक्षित गांवढळ माणूस.

कांबळी [**सं०** कंबल] **स्त्री०** १ गाय, बैल, यांच्या गळ्याखाली लोंबत असलेलें मांसल चर्म, –ज्याला आपण' पोळी ' म्हणतों. २ घोंगडी.

कांबळें [**सं०** कंबल] **न०** १ घोंगडें, घोंगडी. २ कोणतेंही ऊर्णावस्त्र (सामान्यतः). ꠰꠰ **भिजत कांबळें जड होतें** ज्या कामाची जेव्हांच्या तेव्हां व्यवस्था लावण्यांत येत नाहीं तें परिणामीं पीडाकारक होतें. [जात.

कांबळ्या, कांबळ्या घोणस पु० सर्पाची एक

काबा पु० उत्तरेकडील लोकांची एक जाति.

काबा पु० कोंवळा काढलेला व म्हणून बेचव असा जो नारळ तो.

कांबाटणें [**म०** कांब] **स० क्रि०** गायीच्या निरणांत (योनींत) विष लावलेली कांब घालून तिला ठार मारणें. महार लोक गायीचें मांस खावयास मिळावें या आशेनें असें दुष्कर्म करतात असा प्रवाद आहे.

काबाड, काबाडकष्ट, काबाडखोती, काबाडी इ० शब्द मागें ' कबाड ' याच्या पोटांत पहा. ' कबाड ' इ०कांपेक्षां ' काबाड ' इ०शब्द इकडे अधिक प्रचलित व ग्राह्य आहेत.

काबाळ पु० नारळाचीं सोडणें पाण्यांत भिजत घालून मग तीं ठेचून त्यांचा केलेला काथ्या.

काबीज [अ० काबिज़्] जिंकलेला, पादाक्रान्त केलेला, ताब्यांत घेतलेला,(मुलूख, मनुष्य, इ०). **न०** पंचाईतीची स्थिति; पेच; अडचण.

कांबीट स्त्री०, न० १ कांब, कामटी (बांबूची वगैरे). २ कोंपरापासून मनगटापर्यंतचें हाड. ३ मनगटाच्या हाडाची रुंदी. ४ जनावरांच्या पुढच्या पायाचें हाड.

कांबीण, कामीण स्त्री० कावीळ,-जी झाली असतां सर्व पिवळें दिसतें.

काबील [अ० काबिल्] **वि०** १ सर्व कामांत जो प्रवीण तो; अष्टपैलू. २ बळकट, दणकट. ३ लुच्चा; अट्टल भामट्या.

काबुयार [हिं० काबूयार्] **पु०** धूर्त; अनेक युक्तया लढवून आपले कार्य साधण्याविषयीं वाकबगार; ठक; लुच्चा; काफर. ॐ **काबुयारी स्त्री०** लुच्चेगिरी, काफरपणा, धूर्तता.

काबू [अ० काबू] **वि०** अनेक युक्तयांनीं इष्टकार्य साधून घेण्याविषयीं जो कुशल तो; धूर्त; हिकमती; कावेबाज.

कांब्या शेंदूर पु०एक औषधी पदार्थ;कांड्यांच्या किं० तुकड्यांच्या रूपांत असलेला शेंदूर.

कांभरूण, कांबरूण न० ' पांघरूण ' याचें अपभ्रष्ट रूप.

कांभेरा, कांबेरा [म० खांब] **पु०** आढ्यापासून वळचणीपर्यंत आलेले जे वांसे ते मध्यें वाकूं नयेत म्हणून त्यांच्याखालीं आढ्याला समांतर तुळवट घातलेलें असतें तें.

काम [सं० कर्मन्] **न०** जें कांहीं करावयाचें तें. या मूळ अर्थापासून खालील विशेष अर्थ उद्भवले आहेतः-१ कर्म, कार्य, कृत्य; उ० सरकारनें तो पूल बांधण्याचें केवढें प्रचंड काम सुरूं केलें आहे ? २ उद्योग, धंदा; उ० कांहीं काम मिळालें तर पहावें म्हणून मी येथें आलों आहें. ३ चालू व्यवसाय; उ० मला हल्लीं फार कामें आहेत, तुझें पुस्तक वाचावयाला मला वेळ नाहीं. ४ साध्य; ध्येय; ईप्सित गोष्ट;उ० त्याच्याकडून तूं आपलें काम साधून घे, नाहीं तर पस्तावशील. ५ जरूरी, उपयोग; उ० सध्यां मला चाकूचें काम नाहीं. ६ कांहीं काम करावयास लागतो जो उत्साह, नेट, कष्टाळूपणा, मेहनत, इ० प्रकारचा गुणविशेष तो. ॐ**एकाद्याचें काम काढणें** १त्याला जेरीस आणणें; त्याला नरम करणें.२ त्याचा नक्षा उतरविणें; त्याचें नाक ठेचणें. ३ त्याचा जीव घेणें; त्याला कायमचें नाहींसें करणें. **काम चोरणें** कुचराईनें किं० दिरंगाईनें किं० आळसटून काम करणें. **कामांत काम करून घेणें** एखादें मोठें काम चाललें असतां त्याच्या साधनांनीं तसलेंच एखादें लहानसें काम करून घेणें. **कामांतून जाणें** १ निरुपयोगी होणें. २ बहकणें; बिघडणें.३ दुर्वर्तनी होणें.**कामामध्यें काम भज मना राम** एखादें कार्य हातांनीं करीत असतां मनानें किं० तोंडानें रामनामाचा जप करावा.**कामास** किं० **कामीं येणें** किं०**पडणें** १ उपयोगीं पडणें; उ० कठिण समय येतां कोण कामास येतो ? (रघुनाथ पंडित). २ लढाईत मारला जाणें. ३ सहन केलें जाणें; पथकरलें जाणें; चालणें; पसंत पडणें; उ० तूं उद्धटपणानें वागलास तर तें माझ्या कामास येणार नाहीं ! **कामाचा वि०** १ उपयोगी, जरुरीचा. २ धंदा, उद्योग, वगैरे ज्याला आहे असा. **काय कामाचा ?** (काकुर्तीनें) कुचकामाचा; टाकाऊ. **कामकरी पु०** मजूर; मोलानें कामाला लावलेला गडी. **कामकाज न०** कामधंदा वगैरे; उ० अरे, कांहीं कामकाज करीत जा ! एरव्हीं पैसे कसे मिळणार ? **काम कारभार पु०** राज्य, दरबार, वगैरे संबंधींचें कामकाज. **कामगत स्त्री०** १ काम; व्यवसाय. २ करावयाला काढलेलें काम. ३ पथकरलेलें किं० अंगावर घेतलेलें काम. ४ कामाला लाविलेल्या मजूरांची टोळी. **कामगार पु०** सरकारी नोकर; कारकून; कारभारी; कारखान्यांतील किं० गिरणीतील किं० इतर कोणत्याही कामावर लावलेले मजूर,इ०.**कामगिरी स्त्री०**सोपविलेलें किं० नियुक्त काम; कांहीं विशिष्ट काम (**क्रि०** करणें, बजावणें, पथकरणें). **कामचलाऊ वि०** तातपुरती गरज भागविणारें; काम आडूं न देईल असें; पुरतें-

पणीं गरज भागविणारें जरी नव्हे तरी तात्पुरतें चालेल किं० उपयोगी पडेल असें. **कामचुकार, कामचुकावू, कामचुकव्या, कामचोर वि०** काम चुकविण्याचा किं० टाळण्याचा ज्याचा स्वभाव असा;उनाड.**कामजोड** आपण पथकरलेलें काम पार वाडण्यांत तत्पर किं० इमानी; उ० ' कामजोड तो दामजोड ' म्ह० जो पथकरलेलें काम तत्परतेनें करतो त्यालाच भरपूर पैसे मिळतात.**कामझोडया वि०** १ ओवडधोवड रीतीनें आणि घाईघाईनें काम करतो तो. २ ज्याला कामाचा उरक आहे असा. **कामदार पु०** कामगार(सरकारी नोकर, कारकून, कारभारी; कारखान्यांतील, गिरणींतील किं० अन्य प्रकारच्या कामावर लावलेले लोक, इ०). **कामधंदा पु०,कामधाम न०**उद्योगधंदा;रोजगार. **कामलाटया वि०** घाईघाईनें आणि काळजी न घेतां कसेंतरी काम करून टाकणारा (मजूर, कारकून, इ०). **कामसाधू वि०** आपलें कार्य लोकांकडून साधून घेण्याचा ज्याचा स्वभाव तो; स्वार्थी; आपल्या इष्टार्थाविषयीं सदोदित जो तत्पर तो; आपमतलबी. ' कामसाधू ' हा शब्द नेहमीं वाईट अर्थानें योजला जातो.**कामसू वि०** उद्योगी; मेहनती; काम करण्यांत तत्पर; जो कधीं निरुद्योगी बसत नाहीं असा.हा शब्द नेहेमीं चांगल्या अर्थानें योजला जातो. **कामाचा गाडा पु०** (लक्षणेनें)अतिशय काम; कामाचा रगाडा. **कामी वि०** १ एखाद्या कार्यांत उपयोगी पडेल असा. २ कामसू. **कामीक, कामीह वि०** कामसू; उद्योगी आणि प्रपंचासंबंधींच्या अनेक कामांत प्रवीण.

काम [**सं०**] **पु०** १ इच्छा. २ मन्मथ, मदन. ३ मैथुनेच्छा; संभोगलालसा. ४ मनोरथ; वांछा. ५ इच्छिलेला पदार्थ. ६ धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष, हे जे चार पुरुषार्थ त्यांपैकीं एक. ७ काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, हे जे षड्रिपु त्यांपैकीं एक. (हे षड्रिपु मनुष्यानें योग्य नियंत्रणेंत ठेवावयाचे असतात). ८ संस्कृतांत क्रियापदांच्या धातूंची'गंतुम्,' 'कर्तुम् ,' अशीं जीं रूपें तुम् प्रत्ययांनें होतात त्यांच्या पूर्वसाहचर्यानें हा शब्द जेव्हां समासांत योजितात तेव्हां त्याचा त्या त्या क्रियापदांच्या धातूंनीं दर्शविलेली क्रिया करण्याची इच्छा असणारा किं० मनीषा बाळगणारा किं०ती क्रिया करण्याविषयीं उत्सुक असा अर्थ होतो; अशा समासांत प्रत्ययाचा ' म् ' लुप्त होतो; जसें, गंतुकाम म्ह० जाण्याची इच्छा करणारा; भोक्तुकाम म्ह० सेवन करण्याविषयीं उत्सुक; इ०, इ०. ९ वांच्छा, मनीषा. १० प्रेम, प्रीति, अनुराग. ॐ**कामांकुश पु०** १ नख. २ शिश्न. **कामावसायिता स्त्री०** अणिमा, महिमा, इ० ज्या अष्टसिद्धि त्यांपैकीं एक; इच्छेप्रमाणें घडणें. **कामायुध न०** शिश्न. **कामोदक न०** पितरांशिवाय आप्तेष्टांना दिलेलें उदक. **कामक्रीडा स्त्री०** मैथुन. **कामकला स्त्री०** मदनाची स्त्री रति. **कामगा स्त्री०** व्यभिचारिणी स्त्री. **कामचेष्टा स्त्री०** कामातुर झाल्यामुळें एकमेकांशीं स्त्रीपुरुष करतात जे शृंगार किं० विलास ते; कामक्रीडा; (प्रायः हा शब्द अनेकवचनीं योजितात). **कामजित् वि०** ज्यानें कामविकार जिंकिला आहे असा. **पु०** शंकर. **कामण्णा पु०** मदनदेवाची कर्नाटकांत ज्या नांवानें पूजा करतात तें नांव. **कामदूती स्त्री०** कोकिळा. **कामदेव पु०** मदनदेव. **कामधेनु स्त्री०** १ इच्छित वस्तु देणारी किं० पुरविणारी एक पुराणप्रसिद्ध गाय. २ (लक्षणेनें) खूप दूध देणारी गाय. ३ आपल्या आवडीची हावी ती वस्तु आपणाला देणारें मनुष्य (पुरुष किं० स्त्री). **कामभक्ति स्त्री०** सहेतुक भक्ति. याच्या उलट **भावभक्ति. काममरणी वि०** ज्याचें मरण ज्याच्या अधीन आहे असा; इच्छामरणी. (भीष्माचार्य असे काममरणी होते).**कामरूप, कामरूपी वि०** हावें तें रूप किं० हावा तो देह इच्छेनुसार धारण करण्याची शक्ति ज्यामध्यें आहे असा. **कामरेखा, कामलेखा स्त्री०** वेश्या. **कामशर पु०**१ मदनाचा बाण. २ आम्रवृक्ष. **कामशास्त्र न०** स्त्रीपुरुषलक्षणपूर्वक संभोगाची इतिकर्तव्यता सांगणारें शास्त्र. **कामसख पु०** १ वसंतऋतु. २ आम्रवृक्ष. ३ सारस. **कामसूत्र न०** १ प्रेमप्रकरण. २ वात्स्यायनानें लिहिलेल्या ग्रंथाचें नांव. **कामातुर वि०** मदनानें पीडित झालेला; कामानें विव्हल झालेला. **कामान्ध वि०** मदनानें वेडावलेला; कामविकारानें बेहोष झालेला. **कामाक्षी स्त्री०** १ श्री दुर्गादेवी. २ कादळीचें झाड. **कामिनी स्त्री० वि०** १ प्रणयिनी. २ प्रिया, वल्लभा. ३ सुंदरी, मनो-

हारिणी स्त्री. ४ कामासक्ता, कामातुरा. ५ कोणतीही स्त्री. **कामी पु० वि०** १ प्रणयी. २ प्रियकर, कांत. ३ कामातुर.

कामुक वि० १ संभोगातुर. २ (समासांत) इच्छिणारा, वांच्छा बाळगणारा, अभिलाषी; जसें, विद्याकामुक, राज्यकामुक, पुत्रकामुक, मोक्षकामुक, इ०.

कामुकी स्त्री० १ संभोगातुरा स्त्री; विलासिनी. २ व्यभिचारिणी.

कामट, कामटी, कामठी स्त्री० कांवटी, कांबीट.

कामठ [सं० कर्मठ] वि० १ हुशार. २ हातीं घेतलेलें काम तडीस लावणारा. ३ कर्मठ; स्नान, संध्या, इ० ब्राह्मणोचित सर्व कर्में यथासांग करणारा. **पु०** अध्यक्ष.

कामत पु० कांहीं शेणव्यांच्या नांवांपुढें लागतें तें प्रतिष्ठानाम; जसें, रामकामत, कृष्णकामत, इ०.

कामथ स्त्री० कांहीं कामगिरीबद्दल इनाम दिलेली जमीन. सोलापूराकडे हा शब्द विशेष रूढ आहे.

कामना [सं०] स्त्री० १ मनीषा, अभीप्सित, मनोरथ. २ विषयेच्छा. ꠰꠰ **कामनापूर्ति स्त्री०** १ इच्छेची सफलता. २ इच्छा पुरविली गेल्यामुळें वाटते ती तृप्ति किं० तें समाधान.

कामानिक [सं०] न० कांहीं कामना किं० मनीषा धरून करतात जें व्रतादिक तें. **वि०** इष्ट; मनाजोगें (काम).

कामबोध [सं० कामोद] पु० एक रागविशेष.

कामला [सं०] स्त्री० ज्याचें योगानें सर्व पदार्थ पिवळे दिसतात असा एक रोग; कामीण; कावीळ.

कामळ स्त्री० कावीळ.

कामळा, कामळी, कामळें, कामळ्या मागें ' कांबळा, ' कांबळी, ' इ० पहा.

कामाठी पु० १ मजुरी करून उपजीविका करणारी तैलंगदेशीय (कर्नाटकांतील) एक शूद्र जाति. २ घरांतील झाडणें, सारवणें, इ० सारखीं हलकीं कामें करावयास लावलेला मजूर (कोणत्याही जातीचा). **कामाठीण** हें स्त्रीलिंगी रूप,—वरील दोन्ही अर्थीं. ३ (लक्षणेनें) खांब जिच्यांत बसवितात ती उथळी.

कामिना (-णा) स्त्री० १ प्रणयिनी. २ कामातुरा स्त्री. ३ प्रिया. ४ शृंगारनायिका. ५ कोणतीही स्त्री. (हा शब्द कांवतत मात्र आढळतो).

कामीट स्त्री० कांबीट, कामटी.

कामीण स्त्री० कावीळ. (ही पक्व झाली असतां पंडुरोग होतो).

कामुनी स्त्री० एक औषधी फळझाड.

कामोखी स्त्री० लोहार, तांबट, जिनगर, इ० कारागिरांचा एक प्रकारचा चिमटा.

काम्य [सं० कम्=इच्छिणें, चाहणें] वि० १ इष्ट; ईप्सित; आवडणारें. २ सहेतुक: कांहीं फलाशेनें केलेलें. ३ कमनीय, मनोज्ञ. ४ इच्छिण्याजोगें. ꠰꠰ **काम्यकर्म न०** कांहीं फलाशेनें उद्युक्त होऊन केलेलें जें व्रतादिक तें. याच्या उलट **नित्यकर्म** किंवा **नैमित्तिक कर्म. काम्यदान न०** १ प्रिय वस्तूची देणगी; इष्टवस्तुप्रदान. २ कामनाप्रीत्यर्थ केलेलें सहेतुक दान. ३ निर्हेतुक किं० कोणत्याही प्रकारची फलाशा नसतां केलेलें दान. याच्या उलट **नित्यदान. काम्यधर्म पु०** सहेतुक किंवा निर्हेतुक केलेलें धर्मकृत्य. **काम्यप्रीति स्त्री०** फलाची किं० कामनापूर्तीची आशा ठेवून केलेली प्रीति. **काम्यभक्ति स्त्री०** सकाम किं० सहेतूक भक्ति किं० पूजा. **काम्यमरण न०** कांहीं कामनापूर्त्यर्थ किं० इच्छापूरणार्थ स्वीकारलेलें मरण. **काम्यव्रत न०** कांहीं फलप्राप्ति व्हावी किं० कांहीं ईप्सित हेतु सिद्ध व्हावा म्हणून जे नेम, धर्म, इ० करतात ते प्रत्येक.

काय [सं०] पु० देह. ꠰꠰ **कायस्थ पु०** १ परमेश्वर. २ जातिविशेष (क्षत्रिय पुरुष आणि शूद्र स्त्री यांचा पुत्र). ३ लेखक.

काय [सं० किं] सर्वनाम किं० अ० किं० वि० १ प्रश्न करावयाचा असतां योजितात; उ० रामा ! (उलट प्रश्न) काय ? उ० तो गोंद्या माझ्याविषयीं काय म्हणाला ? २ विधानास जोर आणावयाचा असतां योजितात; उ० मग मी तुमचे पैसे बुडवितों कीं काय ? उ० काय ? त्या लहान पोरास तूं मारलेंस ? उ० काय अडाणी आहे हो बाई ! उ० काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । (**तुका०**). ३ ' जें कांहीं ' किंवा ' किती ' या अर्थीं योजितात; उ० तो काय म्हणेल तें ऐकून घे ! उ० तो काय देतो तें खरें ! ꠰꠰ **काय कीं**

अ० कोण जाणें ! मला ठाऊक नाहीं ! होय कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. **काय जाणें** अ० काय कीं ! कोणाला ठाऊक ! **काय तो पु०वि०, काय ती स्त्री०, काय तें न०** केवळ; फक्त; उ० गोदी आणि द्वारकी यांचीं लग्नें तर झालीं, आतां नमीच्याच लग्नाचा काय तो प्रश्न उरला ! **कायसा, कायससा वि० पु०** १ कांहींसा; कांहींतरी; जें निश्चयानें ठाऊक नाहीं किं० ज्याची अंधुक आणि अस्पष्ट कल्पना मात्र आहे तद्विषयीं उल्लेख करतांना योजितात;उ०आज माणकी शांतीकडे आली होती.ती बाबूबद्दल कायसें तिच्याजवळ बोलत होती, पण मला तें नीट ऐकू आलें नाहीं; उ० तो कायससा पसत्तीस वर्षांचा आहे म्हणे, काकू, त्याला कशाला तापी देतां ? २ काय मोलाचा ? कांहीं मोलाचा नाहीं ! उ० मारुतीला अर्जुनाचा शरसेतु कायसा ? पण श्रीकृष्णाच्या सुदर्शनामुळें तो पराभूत झाला. **कायसाच, कायससाच पु० वि०** कसातरीच, कसासाच, चमत्कारिक, विलक्षण. **काय होय ? काय होत ?** (काक्वर्थानें) निरुपयोगी; धिक्कारार्ह. **काय... आणि...काय** दोन वस्तु अगदीं सारख्याच किं० समान आहेत असें म्हणावयाचें असतां हे शब्द योजले जातात; उ० रामा काय आणि गोविंदा काय एकच; उ० हें पत्र तूं आज टपालांत टाकलेंस काय आणि उद्यां टाकलेंस काय एकच, विलायतची मेल त्या पत्राला सांपडेलच. **काय काय** ? नानाप्रकारचे (पदार्थ, विचार, शब्द, इ०); उ० इ० स० १९०५ सालच्या प्रदर्शनांत काय काय पदार्थ आले होते ? उ० तो मला काय काय बोलला ? उ० मीं तुला काय काय खेळणीं आणिलीं आहेत ?

कायत [**सं०** कायस्थ] **पु०** हिंदूंची उत्तरेकडील एक जात. परभू लोकांत कायस्थ म्हणून जी पोटजात आहे ती जात ही नव्हे. विक्रीच्या पुस्तकांच्या प्रती लिहून काढण्याचा या जातीचा पेशा आहे. ॐ **कायती वि०** कायत लोकांचें जें कांहीं तें,–विशेषतः त्यांची लेखनपद्धति, अक्षरांचें वळण, पोशाख,इ०. [पहा.

कायदा [**अ०** कायजाह्] **पु०** मागें 'काजगी'

कायदा [**अ०**] **पु०** अमुक प्रकारें वर्तावें, अमुक प्रकारें वर्तू नये, इ०रूप जो सरकारचा नियम किं० कानू इ० तो. ॐ**कायदा पाळणें** कायद्याला अनुसरून वागणें. **कायदा मोडणें** कायद्याचें उल्लंघन करणें.**कायदेशीर वि०**कायद्याला धरून असलेला; सनदशीर. **क्रि० वि०** कायद्याला धरून किं० अनुसरून; कायद्याप्रमाणें.

कायपत्री स्त्री० एका झाडाची साल; ही औषधाच्या उपयोगाची असते.

कायपुळी स्त्री० पाठीवर होत असते अशी एक पुळी किं० पुटकुळी.

कायफळ [**सं०** कटफल] **न०** एक झुडूप,–याची साल आणि बीजें हीं सुगंधी असतात. बाळंतिणीच्या खोलींत मायफळ, जायफळ, आणि कायफळ, हीं तीन द्रव्यें आवश्यक असतात. त्यावरची हरदासी नक्कल सांसारिक स्थितीची द्योतक म्हणून लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. मूल जन्मतें तें मायेचें फळ. पुढें तें मूळ म्हणजे मनुष्य जावयाचें म्हणजे मरावयाचें; आणि शेवटीं फळ काय म्ह० परिणति काय ? कांहीं नाहीं !

कायमदायम [अ० कायम्दायम्] **वि०** साततिक; शाश्वतचें; चिरकालिक; टिकाऊ.

कायस्थ [**सं०**] **पु०** हिंदूंची एक पोटजात किंवा तज्जातीय इसम. परभू जातीच्या लोकांत **कायस्थ** आणि **पाताण्या** अशा ज्या दोन पोटजाति आहेत त्यांपैकीं एक; यांचा पेशा कारकुनी करण्याचा.

कायणूबायणू, कायनूबायनू न० मागें ' काण्णूबाण्णू ' पहा.

काया [**सं०**काया] **स्त्री०** १ देह. २ कळा, तजेला (चेहऱ्याचा किं० शरीराचा). ॐ**काया दाखविणें** अंग दाखविणें; अंगाचा जो भाग झाकावयास पाहिजे तो उघडा टाकणें. **काया झांकणें** अंगाचा जो भाग उघडा टाकतां कामा नये तो वस्त्रानें आच्छादित करणें. (हे वाक्प्रचार बायकांत प्रायः वापरले जातात). **काया पालटणें, फिरणें,** किं० **बदलणें** अंग कांतिमान होणें (आजारांतून उठल्यावर); शरीरावर तजेला किं० टवटवी दिसूं लागणें. **काया वाचा मनें करून क्रि० वि०** शरीरानें, वाणीनें, आणि मनानें म्ह० सर्व प्रकारें.

कायिक वि० शारीरिक. ॐ**कायिक वाचिक मानसिक** वि० कायावाचामनें करून केलेलें. **कायिकवृद्धि** स्त्री०, **कायिक व्याज** न० [**सं०** कायिका=व्याज; वृद्धि=व्याज] सावकारापासून कर्जाऊ काढलेल्या रकमेबद्दल पैशाच्या रूपानें व्याज न देतां घोडा. गाय, बैल, म्हैस, इ० जनावरें सावकाराला उपयोग करावयाला देणें.

कायी सर्वना० 'काय' याचें कवितेंत आढळणारें अपभ्रष्ट रूप.

कार पु० जोंधळ्यांतील एक प्रकार.

कार पु०, स्त्री० एकप्रकारचा दगड.

कार पु० ठराव; योजना.

कार पु० शेत जोमांत वाढावें म्हणून घालतात [तें खत.

कार [कहार] डोली, पालखी, इ० वाहाणारा (भोई). ॐ**कारक** वि० खत पडल्यामुळें शेत करावयाला उत्कृष्ट झालेली (जमीन).

कार पु० १ वर्णमात्रापुढें लाविला असतां तत्तद्वर्णरूपत्वाचा बोध करणारा प्रत्यय; जसें, अकार म्ह० अ हें अक्षर; ईकार म्ह० ई हा स्वर; हाहाकार म्ह० हा हा असा ध्वनि; त्याचप्रमाणें टणत्कार, फूत्कार, चीत्कार, इ०. २ (समासांत) संस्कृत नामांना ' कर्ता ' या अर्थी लावतात तो प्रत्यय; जसें, शस्त्रकार म्ह० शस्त्रादि करणारा किं० बनविणारा; चर्मकार म्ह. चर्माचे पदार्थ करणारा किं० बनविणारा म्ह० चांभार. ॐ**कारक** वि० (समासांत) करणारा, घडविणारा, उत्पन्न करणारा, देणारा, इ०; उ० शांतिकारक, हानिकारक, इ०.

कारक [**सं०**] **न०** १ (**व्याकरणांत**) वाक्यामध्यें क्रियेवर ज्यांचा अन्वय असतो म्ह० कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, आणि अधिकरण, तीं प्रत्येक. २ विभक्तींचे अर्थ सांगणारा जो व्याकरणाचा भाग तो. ॐ**कारकनिमित्त न०** (तर्कशास्त्रांत) फलोत्पादक कर्म. **कारकदीपक न०** (**साहित्य**) एक विभक्त्यन्त नाम अनेक क्रियापदांशीं कोणत्या तरी कारकसंबंधानें जुळलेलें असतें तेव्हां होतो तो अलंकार; विशेष खुलासा, उदाहरणें, इ० आमचें " अर्थालंकारांचें निरूपण," ह्या पुस्तकांत पहा.

कारकीर्द [**फा०** कार=काम; करदन्=करणें] **स्त्री०** राज्य, संसार, इ० व्यवहारांत एखाद्याचा कांहीं कालपर्यंत चालतो जो अंमल तो; कर्तृत्वानें कारभार पाहण्याची किं० चालविण्याची राजा, मुत्सद्दी, इ० कांची मुदत किं० अवधि; उ० दुसऱ्या कृष्णरायाच्या कारकीर्दीत विजयनगरच्या साम्राज्याचें वैभव शिखरास पोचलें; उ० संभाजीची कारकीर्द मराठेशाहीस घातक झाली.

कारकून [**फा०** कार=काम; करदन्=करणें] **पु०** १ धन्याच्या व्यवहारासंबंधीं कागदपत्रें लिहिणारा नोकर. २ खर्डेघाश्या. ॐ**कारकुनाची मेहुणी स्त्री०** काली (तो ती नेहमीं कोठें तरी ठेवतो व मागून ती कोणास सांपडत नाहीं, यावरून चेष्टेनें). **कारकुनी स्त्री०** १ कारकुनाचा धंदा. २ कामाबद्दल कारकुनास द्यावें लागतें तें वेतन. ३ आपण वेतन देऊन ठेवलेला नाहीं अशा माणसास त्याच्याकडून कांहीं काम करून घेतलें असतां किंवा त्याणें कांहीं काम केलें असतां द्यावें लागतें जें मोल, दलाली, इ० तो. ४ (लक्षणेनें) कांहीं व्यवहारांत बारीक दृष्टीनें कसर काढण्याचा प्रकार. ५ दुसऱ्यासाठीं कांहीं पदार्थ विकत घेतांना लबाडीनें मिळविलेले पैसे. ६ एक वनस्पति. **वि०** कारकुनाचें, कारकुनासंबंधीच, —अक्षराचें वळण, डौल, इ०. **कारकुनी कावा पु०, कारकुनी मत न०** कारकुनी करणाऱ्या जातीच्या किंवा पेशाच्या लोकांच्या अंगचें कसब, कावा, लुच्चेगिरी, हिकमत, काटागिरी, इ०. **कारकुनकी स्त्री०** १ कारकुनाचा पेशा; कारकुनाचा धंदा; कारकुनाची जागा किं० हुद्दा. **सव्वा हात लेखणीचा कारकून** फरडा कारकून (विनोदांत).

कारकोळी (-ळ्या) **वि०** कारकोळ नामक देशाचा, देशांतील, किं० देशासंबंधींचा (मनुष्य वगैरे).

कारखाना [**फा०** कार=काम; खानाह्=जागा] **पु०** १ जेथें व्यापाराकरतां कांहीं माल उत्पन्न किं० तयार केला जातो तें ठिकाण. २ जेथें अशा प्रकारचा माल सांठविला जातो तें ठिकाण (साधारणपणें). ३ जेथें कांहीं विशिष्ट प्रकारचें काम केलें जातें तें राज्यादिकांतील खातें; (मागें ' अठरा कारखाने ') पहा. ४ जेथें कामाचा पसारा किंवा धवडगा अतिशय तें गृहादि. ५ साधारणतः यंत्रादि साहाय्यानें माल करण्याचें ठिकाण. ॐ**कारखानदार पु०** कारखान्याचा मालक; व्यापाराकरतां माल निर्माण करण्याचा ज्याचा धंदा आहे तो. **कार-**

खानवीस पु० सरकारी कारखान्यावर नेमलेला अधिकारी. (याच्या ताब्यांत सरकारी धान्याचीं कोठारें असत, आणि तो आठ दरकदारांपैकीं एक असे).

कारचकर, कारंचकर, कारजगर, कारंजगर, कारजगार, करंचकर, [**सं०** क्रकचकर किं० **कानडी** करजगार] **पु०** शस्त्रकार (बंदुका, तोफा, तरवारी, जंबिये, इ०, किंवा सुऱ्या, कात्र्या, इ०, किं० पितळेचे ओतीव किं० घडीव पदार्थ करणारा).

कारंजें न० हौदांतील पाणी वर उडावें व फवाऱ्यांच्या रूपानें तें खालीं पडून शोभा दिसावी एतदर्थ जी विशिष्ट यंत्ररचना करतात तीं, किंवा त्या यंत्ररचनेनें विशिष्ट जो हौद तो.

कारट [**सं०** करट] **न०** १ कोंकणांत उत्तरक्रियेस निंदेनें म्हणतात. २ उत्तरक्रियेबद्दल ती चालविणाऱ्या ब्राम्हणास द्यावें लागतें तें द्रव्य. ❀ **कारटा, कारटया, कारटखाऊ वि०** उत्तरक्रिया करतो तो ब्राम्हण; उत्तरक्रिया करून मिळालेल्या द्रव्यावर उपजीविका करतो तो ब्राम्हण; कर्मान्तऱ्या. **कारटा वि०** पोरास निर्दैनें किं० चीड आली असतां लावतात. (हा अर्थ अर्थातच लाक्षणिक आहे).

कारंडव पु०, कारंडवी स्त्री० [**सं०**] करढुवा ह्या नांवाचा एक पक्षिविशेष.

कारंडा पु० लाकडाचा ठोकळा किं० ओंडा.

कारण [**सं०**] **न०** १ (तर्कशास्त्रांत) कार्याचें अधिकरणीं नियमानें विद्यमान असून जें कार्योत्पादक असतें तें; ज्याचा कार्यपूर्वभाव नियत आणि अनन्यथासिद्ध असतो तें; उ० पटाचें कारण तंतुवेमादि होत; कारण त्रिविध आहे,—समवायि, असमवायि, व निमित्त.ज्याच्याशीं समवायसंबंधानें कार्य उत्पन्न होतें तें समवायिकारण; जसें, तंतु हें पटाचें,मृत्पिंड हा घटाचें,इ०.ज्याचें ठिकाणीं कार्य उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे आणि जें समवायिकारणप्रत्यासन्न असतें तें असमवायि कारण; जसें तंतुसंयोग हा पटाचें, तंतूवरील रूप हा पटावरील रूपाचें, इ०.जें समवायिकारण नसतें, किंवा असमवायिकारण नसतें, तरी पण कारण असतें, तें निमित्तकारण,जसें माग हा पटाचें. हीं तीन कारणें भावपदार्थांच्या ठायीं मात्र संभवतात, अभावाच्या ठायीं केवळ निमित्तकारण संभवतें. २ उद्देश, हेतु, निमित्त, साधन, मूळ. ३ सापेक्षता, जरुरी, गरज. ४ लग्न, मुंज, इ० जें मंगलकार्य तें. ५ काहीं एक क्रियेचें जें उद्देश्य किं०अंतिम हेतु तो;उ०सदा सर्वदा योग तुझा घडावा।तुझे कारणीं देह माझा पडावा॥. ❀ **कारणपरत्वें क्रि० वि०** कांहीं कारण उपस्थित झालें असतां; कांहीं निमित्तामुळें; उ० वासूनानाविषयीं हिराबाईचें उगीच कलुषित मत झालें आहे, तथापि ती त्याच्याशीं कारणपरत्वें बोलते. **कारणमाला स्त्री० (साहित्य)** जेव्हां पूर्वी सांगितलेली वस्तु पुढें सांगितलेल्या दुसऱ्या वस्तूचें कारण असतें, ही दुसरी वस्तु पुढें सांगितलेल्या तिसऱ्या वस्तूचें कारण असतें, ही तिसरी वस्तु पुढें सांगितलेल्या चवथीचें कारण असतें; अशी मालिका किं० परंपरा केलेली असते तेव्हां ‘ कारणमाला ’ हा अलंकार होतो. ह्या अलंकाराला ‘ हेतुमाला ’ असेंही कोणी म्हणतात. विशेष निरूपण आणि उदाहरणें आमच्या ‘ अर्थालंकारांचें निरूपण ’ ह्या पुस्तकांत पहा. **कारणान्तर न०** विशेषकारण. **कारणकारण न०** सूक्ष्म भूतें किं० परमाणु. **कारणवादी पु०** कारणोत्तर सांगणारा प्रतिवादी. **कारणदेह पु०, कारणशरीर न०** अविद्या. **कारणात् श०यो०अ०** ०च्यामुळें; अमुक कारणामुळें; जसें, द्वेषकारणात् (द्वेषामुळें), मत्कारणात् (माझ्यासाठीं), इ०. **कारणें अ०** संप्रदान कारकापुढें याचा प्रयोग होतो; उ० ब्राह्मणाकारणें गाय दे म्ह० ब्राह्मणाला गाय दे. **कारणोत्तर न०** (कायद्यांत) प्रतिवादीचें उत्तर. **कारणीं लावणें** सत्कार्यीं वेचणें किं० खर्चिणें; सार्थक होईल अशा तऱ्हेनें उपयोगांत आणणें (आयुष्य, द्रव्य, देह, सामर्थ्य, जन्म,इ०).

कारणी, कारणिक वि० १ राज्यादि व्यवहारीं जो मुख्य कारभारी किं०प्रधान तो. २ सावकारी गलबतावर मुख्यत्वेंकरून यजमानाचे जागीं असतो जो चाकर तो. ३ उपयुक्त; जशी वेळ पडेल तसा कामीं येणारा जो कोणी तो.

कारंदा,पु० १ एक वेल.२ त्याचा कंद व फल.

कारभार[हिं०] पु० राज्य, संसार, इ०कांच्या निर्वाहार्थ करावें लागतें जें कामकाज, खटपट, इ०

ती समुच्चयानें, (क्रि० पाहणें, चालविणें, करणें, हांकणें). ❀ करील त्याचा कारभार; मारील त्याची तरवार; राखील त्याचें घर; खपेल त्याचें शेत तरवार मारली तर कीर्ति होते, शेतांत खपल्यास तें उत्तम पीक देतें, घर उत्तम प्रकारें चालविल्यास बरकत येते, कारभार दक्षतेनें केल्यास लोकांचे दिवस सुखांत जातात. **कारभारी** पु० राज्य, संसार, गृह, संस्था, इ० कांचा तन्निर्वाहार्थ जो कोणी मुख्यत्वेंकरून कार्यभार वाहातो तो (प्रधान, गुमास्ता, हस्तक, घरधनी, इ०); कार्यकर्ता. **कारभारीण** स्त्री० घरधनीण; (घरांत स्त्री मुख्य असते व तिच्या तंत्रानें तें सर्व चालतें म्हणून तिला गौरवानें म्हणतात). **कारभारीमंडल** न० राज्यादिकांतील कार्यवाहाचें किं० कार्यकर्त्यांचें (प्रधान, मंत्री, वगैरेचें) मंडल. **कारभारी मुखत्यार** १ मुख्य प्रधान, सचिव. २ कोणत्याही संस्थेचा मुख्य देखरेख करणारा अधिकारी.

कारमान्य न० १ दुसऱ्याचा घात पात होईल अशा सारखा मंत्रतंत्रादि कांहीं प्रकार; जारणमारणाचीं कामें. २ दुसऱ्याच्या विरुद्ध रचलेला व्यूह, किंवा दुसऱ्याशीं केलेलें कापट्य (क्रि० करणें, रचणें, योजणें, मांडणें).

कारला पु० बायकांचें एक हस्तभूषण; बांगडीचा एक प्रकार.

कारली [सं० कारवेल्ल=कारली] स्त्री० एक वेल; याला कडू फळें येतात आणि त्यांची भाजी करतात.

कारलें [सं० कारवेल्ल=कारली] न० १ कारलीच्या वेलाला जें कडु फळ येतें तें. २ बायकांचें गळ्यांत घालावयाचें एक भूषण (हें कारल्याच्या आकारांचें असतें). ३ कारल्याच्या आकाराचें जोडीसारखें एक व्यायामाचें साधन; मोठा मुद्गल. ४ भाल्यासारखीं टोकें अंगभर असलेलें लाकडाचें किंवा लोखंडाचें हत्यार; (हें किल्ल्यांतून शत्रूवर फेकण्याकरितां ठेवीत). ५ मोहोरमाच्या सणांत मुसलमान लोक मिरवितात असा एक कागद चिकटावलेला रचनाविशेष.

कारव स्त्री० १ एक झाड. २ त्याच्या ज्या काठ्या निघतात त्या प्रत्येकीं. (हें झाड उंच व बारीक असून त्याच्या काठ्या कुंपण, कूड, वगैरे करण्याच्या कामीं योजतात).

कारवई, कारवाई स्त्री० कपटकावा; दुसऱ्यास फसविण्याकरतां वगैरे योजिलेलें कारस्थान; धूर्तता; लबाडीची कांहीं योजना.

कारवणें [म० कार=खत] अ० क्रि० १ कुजून आणि नासून खत करावयाच्या लायकीचें होणें; (गू, शेण, झाडपाला, इ०). २ भाजी वगैरे पदार्थ पुरता न शिजतां चुलीवरून उतरल्यामुळें बेचव होणें. ३ फणसांतील गरे काळे पडत जाऊन नासू लागणें. ४ खीर, दूध, वरण, इ० करपल्यामुळें कडवट होणें. ५ जोरानें वाढणें; फोफावणें, (रान, गवत, झाड, इ०).

कारवणें, कारविणें स० क्रि० १ अरकसणें, करवतणें. २खत घालून जमीन कमावणें किं० कसणें.

कारवा [हिं० कहार=पालखी वाहाणारा] पु० पुरुषानें पागोटें व तलवार ठेऊन बाकी सर्व वेष स्त्रीसारखा करावयाचा, किंवा स्त्रीनें पुरुषवेष धारण करावयाचा,– हा जो सोंग घेण्याचा प्रकार तो, किंवा तें सोंग घेणारी व्यक्ति, किंवा त्या व्यक्तीचें नाचणें. (क्रि० देणें, नाचणें, नाचविणें).

कारवाद पु० १ कपटकारस्थान रचणें; व्यूह रचणें. २ अशा प्रकारचें कारस्थान किं० व्यूह रचण्यास लागणारें कपट, कारवाई किं० धूर्तता. ❀ **कारवादी** वि० कारस्थानी; कपटव्यूह रचण्यांत कुशल.

कारवान [फा०] पु० घोडे विकणाऱ्या अरबाचा तांडा समुच्चयानें, किंवा त्यांतील इसम एकैकशः. ❀**कारवानी** वि० १ कारवानांनीं आणलेले घोडे इ०. २धूर्त, लुचा, कावेबाज. ३ सौदे करण्यांत पटाईत किं० कुशळ.

कारवी स्त्री० एक झाड. मागें ' कारव 'पहा.

कारसई, कारसाई स्त्री० १ रयतेला सरकार ऋण देतें तें,–जें हंगामाच्या वेळीं रयतनें धान्याच्या रूपानें फेडावयाचें असतें. २ प्रजेनें सरकारला द्यावयाचें जें तृण, काष्ट, दोरांचे गुंडे, खुंटे, इ० तें. ३ कारवाई, कपटकावा, कारस्थान. (क्रि० करणें, चालविणें).

कारस्थान [सं० कार्य+स्थान] न० १ कांहीं मोठें कार्य साधण्याविषयीं युक्तीनें बांधलेलें गुप्त संधान. २ काटकसर; मितव्यय. ३ टापटीप; व्यवस्था. ❀**कारस्थानी** वि० कारस्थानें करण्यांत

कुशल, चतुर, किं० धोरणी.

कारळा, कारळातीळ पु०, **कारळें** न० तिळाचा एक प्रकार; हा लांबोडा आणि चकचकीत असतो; हा मसाल्यांत वापरतात.

कारा [सं०] स्त्री० १ बंदिखाना, तुरुंग; कैद्याची कोठडी. (हा शब्द या अर्थी गृह, अगार, इ० शब्दांच्या साहचर्यानें वापरतात; जसें, कारागृह, कारागार, इ०). २ (लक्षणेनें) ज्या स्थलीं दुःख किंवा त्रास होत असतांही त्यांतून सुटका करून घेतां येत नाहीं असें जें संसारादि तें.

कारागीर पु० पुढें ' कारिगर ' पहा.

कारावणें, काराविणें स० किंवा अ० क्रि० ' कारविणें, ' ' कारवणें. ' पहा.

कारिका [सं०] स्त्री० १ टीकाश्लोक; विवरणश्लोक. २ उंटीण. ३ क्रिया.

कारिगर, कारिगार, कारागीर, कारेगार, कारागार [फा० कारीगर] पु० १ शिल्पकलांमध्यें जो कुशळ तो,–खोदकाम करणारा, सुतार, चितारी, इ०. २न्हावी, सुतार, गवंडी आणि चितारी यांचा संमानाचा शब्द किं० पदवी. ॐ **कारिगिरी, कारागिरी** स्त्री० कारागिराची कुशळता; कारागिरानें बनविलेल्या वस्तूंत दिसून येते जी त्याची कळाकुसरी ती. (कारागीर, कारागिरी, हीं रूपें अधिक प्रचलित आहेत).

कारिंट, कारींट स्त्री० एक वेल. न० त्या वेलीचें फळ.

कारित वृद्धि स्त्री०, **कारित व्याज** न० [सं०] (कायद्यांत) कुळानें ठरविलेलें व्याज.

कारिंदा [सं० करमर्द] पु० कारंदा म्हणून जें झाड आहे तें, किंवा त्याचें फल; कारंदा.

कारिवणा (–ना) पु० ब्रह्मी किं० ब्राह्मी वनस्पति; ब्रम्हीचें झाड. (याचा पाला मेंदूच्या विकारांवर अति गुणकारी असतो.

कारी [सं०] वि० हा प्रत्यय असून तो नामांना ' करणारा ' या अर्थी लावतात,–जसें, गुणकारी म्ह० गुण करणारा (देणारा), पित्तकारी म्ह० पित्त करणारा, इ०. **कारक** या प्रत्ययासारखाच याचा उपयोग आहे.

कारींक [म० कार] वि० खत पडल्यामुळें पीक काढण्यास उत्कृष्ट झालेली (जमीन).

कारींव [म० कारविणें] वि० खतावलेली म्ह० खत घालून कमावलेली जमीन.

कारू [सं०] पु० १ शिल्पविद्योपजीवी; कारागीर,–सुतार, लोहार, सोनार, इ०. २ महार, चांभार, इ० जे बारा बलुतेदार ते प्रत्येक. ॐ**कारू नारू** पु० अलुतें बलुतें.

कारुणिक [सं०] वि० दयाळू; दयार्द्र; कोमल अन्तःकरणाचा.

कारुण्य [सं० ' करुणा ' पासून भा० वा० ना०] न० दयार्द्रता; करुणाबुद्धि; अन्तःकरणाची कोमलता.

कारेती स्त्री० कारली.

कारेतें न० कारलें.

कारेवारे [म० केर+वारा यांपासून] पु० अ० व० वारा जसा केर उडवितो व तो कोठल्याकोठेंच नाहींसा होतो तद्वत् स्थिति करणें; उधळून नष्ट करणें; नासाडी; उधळपट्टी (पैसा, खाद्यें, इ० ची) (क्रि० करणें).

कारेळ, कारेळा, कारेळातीळ पु०, **कारेळें** न० कारळा तीळ.

कारोट पु० सत्यानाश; सर्वस्वी नासाडी (घराची, शेताची, सैन्याची, गांवाची, इ०).

कार्कश्य [सं० ' कर्कश ' पासून भा० वा० ना०] न० कठोरपणा; कर्कशता; कठोरता.

कार्त्तवीर्य [सं०] पु० सहस्रार्जुन नामक राजा; कांहीं हरवलें तर याच्या नामाचा जप करतात.

कार्त्तिक [सं० कृत्तिका] पु० चैत्र, वैशाख, इ० बारा महिन्यांतील आठवा मास,–ज्या वेळीं चंद्र कृत्तिका नक्षत्रासमीप असतो. वि० कार्त्तिक मासांतील, वार, तिथि, इ०. **कार्तिका** असेंही अन्य विशेषणरूप आहे. ॐ **कार्त्तिकस्नान** न० कार्त्तिकाच्या महिन्यांत कृत्तिका नक्षत्र मावळण्याचें पूर्वी जें स्नान करतात तें. **कार्त्तिकस्वामी** पु० शिवपार्वतीपुत्र, – देवांचा सेनापति. पुरुषांना याचें दर्शन मंगल समजतात, व बायकांना निषिद्ध मानतात. याच्या दर्शनानें पुरुषांना सप्तजन्म ब्राह्मणत्व प्राप्त होतें, व बायकांना सप्तजन्म वैधव्य प्राप्त होतें अशी समजूत आहे. **कार्त्तिकस्वामीचा हिमायती** पु०, **कार्तिकस्वामीच्या भिडेच्या** वि० केवळ ब्राह्मणयोनींत जन्मलेला मात्र, परन्तु विद्या, तप,

इ० ब्राह्मणाचे गुण कांहीं देखील ज्याच्यांत नाहींत तो ब्राह्मण. (हा वाक्प्रचार निंदाप्रचुर आहे). **कार्त्तिकी स्त्री०** कार्त्तिक महिन्यांतील एकादशी. **आषाढी** व **कार्त्तिकी** या हिंदूंच्या दोन महा एकादशा आहेत व त्या सर्वांस पाळाव्या लागतात.

कार्त्स्न्यं [**सं०** कृत्स्न (म्ह० सर्व) चें **भा० वा० ना०**] साकल्य; पूर्णता.

कार्पण्य [**सं०** कृपण (=चिक्कू) याचें **भा० वा० ना०**] **न०** १ कृपणता, कंजूषपणा. २ मनोदौर्बल्य. ३ कमीपणा, कमतरता.

कार्पास [**सं०**] **पु०** १ कापूस. २ कपाशीचें झाड. **वि०** कापसासंबंधी. ॐ **कार्पासास्थि न०** सरकी. **कार्पासनालि (–सि–) का स्त्री०** सुताची चाती. **कार्पासगुण पु०** कापसाचा धागा; सूत.

कार्मुक [**सं०**] **न०** धनुष्य, चाप.

कार्य [**सं०**] **न०** १ जें कांहीं करावयाचें तें; कर्तव्य. २ अंगीकारलेलें कृत्य; कांहीं उद्दिष्ट मनांत ठेवून उपक्रमिलेलें प्राय: मोठें आणि महत्त्वाचें काम; कांहीं ईप्सितसिध्यर्थ चालवलेली किं० केलेली कामगिरी. ३ ईप्सितार्थ; उद्देश्य; साध्य. ४ परिणाम; फल: उ० पदार्थाचें आकारमान वाढविणें हें उष्णतेचें एक कार्य आहे. ५ लग्न, मुंज, इ० जे धार्मिक विधि ते प्रत्येक. ६ (कायद्यांत) वाद; दावा. ७ (व्याकरणांत) विभक्त्यादिकांच्या योगानें शब्दाच्या रूपांत किं० अर्थांत जे बदल होतात ते. **वि०** कर्तव्य; करावयास हावें असें; करावयास योग्य. ॐ **कार्य उरकणें** अंगिकारलेलें कृत्य, लग्न, मुंज, इ० विधि संपाविणें. **कार्यावर दृष्टि देणें** इष्टार्थाची हानि न होईल, आणि त्यांत यश मिळेल हें ध्यानांत ठेवून वागणें. **कार्यास लावणें** सत्कार्यी किं० योग्य ठिकाणीं उपयोजिणें; सार्थक होईल अशा तऱ्हेनें उपयोजिणें. **कार्यकर्ता वि०** १ आपल्या हातून दुसऱ्याचें जें कार्य होईल तें करण्याचा ज्याचा स्वभाव तो. २ कार्यक्षम, उत्साही, परोपकारी बुद्धीचा, मनुष्य,– जसें देशाचा पुढारी, नेता, इ०. **कार्यकारणभाव पु०** साध्य आणि साधन यांचा परस्परांशीं जो संबंध तो; उ० मृत्तिका आणि घट यांच्यांत कार्यकारणभाव आहे. अग्नीपासून धूर निघतो; अग्नि हें धुराचें कारण आणि धूर हें अग्नीचें कार्य; अग्नि आणि धूर ह्यांच्यांत जो संबंध आहे त्याला कार्यकारण भाव म्हणतात. **कार्यप्रयोजन न०** विवाहादि, मेजवान्या, वगैरेंसारखे प्रसंग किं० उत्सव. **कार्यभाग पु०** इष्टार्थ; उद्देश्य; उद्दिष्टार्थ; जें करावयाचें योजिलें त्याची सिद्धि; उ० आपला कार्यभाग उरकला कीं कोणी कोणास विचारीत नाहीं! **कार्यभार पु०** १ कारभार. २ जें कांहीं करावयाचें त्याचा बोजा किं० जबाबदारी किं० जोखीम. **कार्यवादी, कार्यवादु, कार्यसाधु वि०** कामसाधू ; आपमतलबी; कोणीकडून तरी आपलें काम साधावें एतदर्थ गोड बोलणें, आजवें करणें, इ० प्रकारें जो वर्ततो तो. **कार्यसाधक वि०** १ कार्य साधणारा; ज्याच्याकडून कार्य साधून घ्यावयाचें तो–हस्तक, गुमास्ता, इ०. २ कार्यसाधू ; आपलें काम साधून घेण्याकडेच ज्याची दृष्टि असते तो. **कार्यसिद्धि स्त्री०** कार्याची सफलता; इष्टकार्य फलद्रूप होणें. **कार्यक्षम वि०** १ अंगीकृत कार्य करण्यास, किं० पार पाडण्यास, लायक किं० योग्य (मनुष्य). २ उद्दिष्ट कार्यांत उपयोगी पडेल असा (पदार्थ). **कार्याकारण वि०** आवश्यक कार्याच्या निर्वाहापुरता; अंगीकृत कार्य उरकण्यास पुरेसा; जरूरी भागविणारा. **कार्याची वस्त, कार्याची वस्त स्त्री०** हरएक कामीं किं० हरएक प्रसंगीं उपयोगीं पडणारें (माणूस किं० पदार्थ). **कार्यार्थी वि०** १ वादी; फिर्यादी. २ कार्यसाधू ; आपमतलबी. २ अंगीकृत कार्य नेटानें चालविणारा.

कार्शत्व न०, कार्शत्ववात पु० [**सं०**] (वैद्यकांत) शरीरांत झालेला वाताचा क्षोभ किं० त्या क्षोभामुळें उद्भवलेली विकृति.

कार्श्य [**सं०** कृश (=रोडका) याचें **भा० वा० ना०**] **न०** किडाकिडीतपणा; कृशता; हाडकुळेपणा.

काल वि० काळा; काळानिळा. **पु०** काळा रंग; काळानिळा रंग; सावळा रंग. ॐ **कालगंगा स्त्री०** यमुना नदी.

काल न० किं० **अ०** वर्तमान दिवसाच्या पूर्वीचा दिवस, किंवा वर्तमान दिवसाच्या पूर्वी.

काल, काळ [**सं०**] **पु०** १ भूत, भविष्य,

वर्तमान या तिहींनीं जो व्याप्त, व ज्याच्या संभावनेनें या तिहींचें पृथक् ज्ञान आपणांस होतें तो. २ [काल] या काळाचा कांहीं विशिष्ट किंवा विशिष्ट गुणान्वित परिच्छेद, हिस्सा, अवधि, किं० भाग. ३ योग्य समय; अनुकूल वेळ. ४ संकट-समय; दुःखाची वेळ. ५ यम; अन्तक. ६ मृत्यु, किं० तो येतो ती विशिष्ट वेळ. ७ ज्यापासून मरणाचें भय असते तो,—सर्प, वाघ, शत्रु, आततायी, इ०. ८ वेळ; समय; उ० धीमान् लोकांचा काळ काव्यशास्त्रविनोदानें जातो. ९परमेश्वरी इच्छा, जिच्या नियंत्रणानुसार इहलोकचे व्यापार चालतात. १० [काल] वैशेषिकांनीं जों नऊ द्रव्यें कल्पिलीं आहेत त्यांपैकीं एक. ११ शनि. १२ रुद्र. १३ [काल] (संगीतांत) गीताची वेळ मोजण्याचें माप म्हणजे ताल; या तालांतील मुख्य टाळीस सम म्हणतात; इतर टाळीस साधारण टाळी किंवा ताल म्हणतात; व सोडावयाची जी टाळी ती ' काल ' होय. १४ [काळ](लक्षणनें) ज्यापासून तादृश इतर उपयोग नसतां जो भांडण, खर्च, भोजन, इ०कांस,किंवा अन्य तऱ्हेनें नुकसान करण्यास मात्र कारणीभूत होतो तो मनुष्य, जनावर किं० पदार्थ; उ० भाकड म्हैस खावयाला काळ ! उ० इन्दूचा कांहीं उपयोग नाहीं,ती निवळ खर्चास काळ आहे. १५ परिस्थिति; परिस्थितीची युक्तायुक्तता; वर्तमान परिस्थिति. ॐ **कालदेशतारतम्य करणें** काळ, देश, परिस्थिति, इ०कांची अनुकूलता किंवा प्रतिकूलता पाहून तद्बोधानुरूप वागणें किं० आचरणें (कांहीं गोष्ट करण्याकरतां). **काल साधणें** कांहीं करावयास योग्य संधि मिळविणें, किंवा अनुकूल समय गांठणें. **कालेकाले भविष्यति, काळोकाळ भविष्यति** एखादी गोष्ट आज नाहीं उद्यां केव्हां तरी घडून येईल; केव्हां तरी ती सिद्ध होण्यास अनुकूल समय प्राप्त होईल ! **काळाच्या तोंडीं देणें** किं० **घालणें,काळाच्या दाढेंत देणें** जेथें मरण किंवा तत्प्राय अन्य भीषण संकट आहे तेथें एखाद्यास ढकलणें, लोटणें,किं० जावयास भाग पाडणें. **काळाच्या तोंडीं** किंवा **दाढेंत पडणें** किंवा **सांपडणें** मृत्युवश होणें किंवा मृत्युप्राय अन्य संकटाच्या तावडींत सांपडणें. **काळाच्या तोंडांतून** किं० **दाढेंतून ओढणें** मृत्यूपासून किंवा मृत्युप्राय अन्य संकटांतून वांचविणें किं० सोडविणें. **काळावर दृष्ट(किं० दृष्टि) देणें** किं० **ठेवणें** १ अनुकूल संधीची वाट पाहणें. २ आपल्या हिताच्या दृष्टीनें चालू परिस्थिति आजमावून पुढील परिस्थितिसंबंधीं धोरण बांधून आपल्या वर्तनास इष्ट वळण लावणें. **काळ आला होता पण वेळ आली नव्हती** (' काळ ' याचे ५ आणि ६ हे अर्थ पहा) यमदेव प्राण हरण करण्यास आला होता पण प्राण जावयाची वेळ आली नव्हती म्हणून बचाव झाला ! म्ह० नाशच व्हावयाचा, पण थोडक्यानें बचावलें आणि घात व्हावयाचा टळला ! अमुक झालें असतें तर महासंकट ओढवतें, पण ईश्वरी कृपेनें तसें झालें नाहीं व संकट टळलें. **काळ विन्मुख होणें, काळानें घेरणें** किं० **वेढा घालणें** प्रतिकूळ परिस्थितीच्या तडाक्यांत सांपडणें; दैव प्रतिकूल होणें. **काळानें ओढणें** किं० **बोलावणें** (' काळ ' याचे ४ व ५ हे अर्थ पहा) मृत्युवश किं० संकटवश होणें. **काळानें हातीं धरणें** (' काळ ' याचा तिसरा अर्थ पहा) काळाचें आनुकूल्य असणें; भरभराटीचे किं० सद्दीचे दिवस प्राप्त होणें. **काळानें मागें पाहाणें** किं० **काळ फिरणें** काळ प्रतिकूळ होणें; परिस्थिति उलटणें; सद्दीचे दिवस संपणें; विपत्काल ओढवणें. **खायला काळ धरणीला भार** किंवा **खाण्यास काळ भूमीस भार** अमुक मनुष्य निरुपयोगी असून शिवाय उपद्रवकारक आहे असें दर्शवावयाचें असतां या वाक्प्रचाराची योजना होते. आपण स्वतः जो कांहीं करीत नाहीं आणि दुसऱ्यास मात्र ज्याच्यापासून त्रास होतो असा. **मारत्याचा गुलाम पळत्याचा काळ** आपल्याहून जे वरचढ त्यांच्याशीं मात्र लीनतेनें वागणारा, पण आपणाहून जे कमजोर किंवा कनिष्ठ त्यांना विनाकारण छळणारा,पीडणारा,किं० सतावणारा जो कोणी मनुष्य तो, किंवा जें कोणी राष्ट्र तें. **कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ** (गोत [सं० गोत्र=कुटुंब, कुळ]) स्वार्थासाठीं किंवा केवळ दुष्ट बुद्धीनें शत्रूस मदत करून स्वकीयांच्या नाशास कारणीभूत होणारा जो कोणी अधम देशद्रोही तो. **काळाचा काकडा पु०** जणों काय मृत्यूस फसवून जो बहुत दिवस वांचला अशा मनुष्यास लावतात; किंवा

अतिशय मोठ्या दुखण्यांतून किं० संकटांतून जो वांचला त्यास म्हणतात;वृद्धावस्थेंतही जो सुदृढ आहे त्यास म्हणतात. (**काळाची काकडी** हें स्त्रीलिंगी रूप). **काळाचा काळ पु०** यमासही जो काळासारखा वाटावा असा भयंकर आणि भीषण मनुष्य. **काळाचा फेरा पु०** यमाचें फिरावयास निघणें म्ह० महासंकट. **काळांतून ओढलेला वि०** खावयाला न मिळाल्यामुळें किडकिडीत; उपासमारीमुळें मरावयाचाच पण मेला नाहीं असा जो तो. **काल (–काळ) कंटक पु०** १ मोठी आपत्ति; संकट; दुःख.२आपत्तिकारक,कळागती लावणारा, किं०दुष्ट मनुष्य. **कालकल्ला** [काल+अकाल म्ह० वेळअवेळ] **पु०** आगामी कालाची पूर्वसंभावित विषमता, वक्रता, विपरीतता, किं० विरुद्धता; उ० सशाच्या पारधीस वाघाचें सामान असावें,न जाणों कालकल्ला आहे. **क्रि० वि०** आगामी कालाची जी पूर्वसंभावित विषमता, वक्रता, इ० तत्समयीं; उ० धान्य घेऊन ठेवावें, कालकल्ला उपयोगीं पडेल. **कालकूट न०** समुद्रमंथनसमयीं जीं चवदा रत्नें निघालीं त्यांतील हें उग्र विष होय. तें शंकर प्याला, पण त्याचाही गळा त्यायोगें काळानिळा झाला व त्यास ' नीलकंठ ' हें नांव प्राप्त झालें. **कालकृत वि०** (कायद्यांत) अमुक अमुक गोष्ट अमुक अमुक अवधींत मी पूर्ण करीन अशा कालनियंत्रणेनें बद्ध. **कालक्रमण न०, कालक्रमणा स्त्री०** १ काळ घालविणें; दिवस कंठिणें. काळ घालविण्याची किं० दिवस कंठिण्याची रीति. **कालगती स्त्री०**१कालाचें गमन व त्यायोगें घडून येतात तीं स्थित्यंतरें (विशेषत: प्रतिकूल, विरुद्ध, किं० वाईट); उ० कालगति विचित्र आहे ! जेथें अवघ्या शतकापूर्वी स्वकीयांचें राज्य होतें तेथें आज परक्यांचें निशाण फडकावें ना ? २ उशीर, विलंब, दिरंगाई. **कालगुजारा पु०, कालगुजारी, स्त्री०, कालगुजराण, कालगुद्राण न०** विषमकालीं यथाकथंचित् जो निर्वाह तो; विपत्कालीं अनेक संकटें सोसून कसावसा केलेला निर्वाह.

कालचक्र न० काळाचें फिरतें चाक,–ज्याच्यामुळें अनुकूल किं० प्रतिकूल स्थित्यंतरें घडून येतात. २ काळाचा सातातिक ओघ,–ज्यायोगें आजची परिस्थिति उद्यां पालटते. **कालत्रय न०** भूत, वर्तमान, व भविष्य हे तिन्ही काळ समुच्चयानें. **कालत्रयीं क्रि० वि०** मागें, हल्लीं, किंवा पुढें केव्हांही; आजन्मांत; (नकारार्थी प्रयोग): उ० धनिणीशीं फितुरी करणें ही गोष्ट या नाऱ्या दोघ्याच्या हातून कालत्रयी घडणार नाही ! **कालदंड पु०** १ मृत्यु. २ यमानें पातकी माणसाला मारलेला रट्टा किं० तडाखा. **कालदशा स्त्री०** कालाच्या सातत्तिक प्रगमनामुळें येणारा स्थित्यंतरें, (क्रि०फिरणें, बदलणें, पालटणें). **कालधर्म पु०** कालाच्या प्रगमनामुळें नैसर्गिक रीत्या होणारे परिणाम; कालाचा गुण किं० प्रभाव. **कालनिर्वाह पु०** दररोजच्या गरजा भागविण्याचा क्रम किं० उद्योग. **कालपरत्वें क्रि० वि०** कालाच्या अनरोधानें. **कालपाश पु०** यमानें पातक्यावर टाकलेलें जाळें. **कालपाशिक पु०** सरकारच्या हुकमावरून अपराध्यास फाशीं देतो तो मांग. **कालपुरुष पु०** १ यमदूत. २ब्राह्मणांना दान द्यावयाकरतां जो यमाचा लोखंडी पुतळा करतात आणि ज्यांत द्रव्य ठेविलेलें असतें तो. ३ कोणीही यमदूतप्राय भयंकर आणि दुष्ट मनुष्य. **कालबेल स्त्री०** भूतभविष्यादिकथन; ज्योतिष सांगणें (कालबेला गोसावी हें करतो). **कालबेल पु०** गोसाव्यांचा एक आखाडा किं० पंथ, किंवा त्या पंथाचा अनुयायी जो गोसावी तो. **कालबेला (–ल्या) वि०** गोसाव्यांचा कालबेलानामक जो आखाडा त्याचा अनुयायी. **कालमहिमा पु०, कालमाहात्म्य न०** कालाचा प्रभाव, प्रभविष्णुता, थोरवी, इ०. **कालमान न०** १ कालमापन किं० त्याची रीत. किं० २कालाचें किं०काळावधीचें प्रमाण.३काळाचे म्ह०चालू स्थितीचें कांहीं विशिष्ट स्वरूप. ४ परिस्थितीच्या कांट्याचें कांहीं विशिष्ट दिशेस झुकणें; उ० देशाच्या पुढाऱ्यास: कालमान पाहून वागावें लागतें; उ० आजचें कालमान फिरलें आहे म्हणून या शिकलेल्या पोरींचे ढंग चालतात ! **कालयुक्त पु०** साठा संवत्सरांतील बावन्नावा जो संवत्सर तो. **कालरात्रि, कालरात्री स्त्री०** १ काळोखी रात्र. २ यमाची बहीण. ३ दिव्यांची आरास करतात ती दिवाळींतील अमावास्येची रात्र. ४ सृष्टीच्या प्रलयकाळची रात्र,–जिनें दुर्गादेवीची संभावना करतात.

५ मनुष्याच्या जीवितांतील एक विशिष्ट रात्र,– सत्त्याहत्तराव्या वर्षातील सातव्या महिन्यांतील सातव्या दिवशींची रात्र. **कालवंचन** न०,**काल-वंचना** स्त्री०१ कालापहरण; काळाची फसवणूक.२ आलेल्या विषम काळीं कसा तरी केलेला जो निर्वाह तो. ३ मृत्यूला फसविणें; मृत्यूचा समय टाळणें; (योगी लोकांस कांहीं विशिष्ट आसन घालून समाधिस्थ राहून हें करतां येतें). **काल-साधन** न०१ स्नान, संध्या, इ० कर्मे करावयास जो विशिष्ट काल सांगितला आहे त्याच वेळीं तीं करणें. २ विवक्षित मुहूर्तादिकांची योग्य वेळा जाणण्याचें साधन (घटी,तुरीय,इ०).३ कोणतेंही कालगणनेचें किं० कालमापनाचें साधन (घड्याळ वगैरे). **कालसूत्र** न० दैवरेषा; नियतीचा नियुक्त किंवा पूर्वनियोजित मार्ग. **कालहरण** न० १ काळ घालविणें; कालक्षेप. २ कशी तरी विषमवेळा निभावून नेणें किं० पुढें ढकलण्याचा प्रयत्न करणें किं० तदर्थ केलेली हिकमत. **कालहानि** स्त्री० कालापव्यय; वेळ घालविणें; काळाचा दुरुपयोग. **कालक्षेप** पु०१ वेळ घालविणें(कोणत्याही प्रकारें). २ कालहरण;कालापव्यय.३कठिण समय कसा तरी निस्तरून नेणें;येनकेनप्रकारेण दिवस साजरे करणें. **कालज्ञ** वि० युक्त वेळ कोणती, अयुक्त कोणती, हें जाणणारा; चतुर; शहाणा; धोरणी. **कालाग्नि** पु० जगाच्या प्रलयकालचा अग्नि. **कालातिक्रम** पु०, **कालातिक्रमण** न० योग्य वेळ टळून जाणें. उशीर होणें; कालाच्या मर्यादेचें उल्लंघन. **काला-ध्यक्ष** पु० सूर्य. **कालाशुद्धि** स्त्री०, **कालाशौच** न० जन्म किं० मरण ह्यामुळें कुटुंबांत आलेलें सोयर किं० सुतक. **कालाष्टक** न० १ आषाढ महि-न्यांतील प्रतिपदेपासून अष्टमीपर्यंतचे जे आठ दिवस ते. या दिवसांत काळभैरवाचे अनुचर उपवास करतात व त्याची पूजाअर्चा करतात. २ काळ-भैरवाच्या शांत्यर्थ किं० प्रसादार्थ आठ ब्राम्हणांस भोजन घालणें. **कालाष्टमी** स्त्री० १ कार्तिक किंवा मार्गशीर्ष मासांतील कृष्णपक्षांतील अष्टमीच्या ज्या तिथ्या त्या प्रत्येक. २ (विशेषतः) कालाष्टकां-तील अष्टमी. ३ कोणत्याही महिन्यांतील कृष्णप-क्षांतील अष्टमी (साधारणतः). **काळकष्ट** पु०अ० व० दैव आणि कष्ट; उ० काळकष्टाचा हक्कमाल कधीं जात नाहीं; (म्ह० आपलें नियतिनियोजित व स्वकष्टार्जित जें कांहीं तें कधीं चुकावयाचें नाहीं,त्याची प्राप्ति व्हावयाचीच). **काळाकष्टाचा** वि० नशिबांत असलेला व मिळविलेला (पैसा, भोग, काम, इ०). **काळःकाळ** क्रि० वि० फार पूर्वीपासून;पुष्कळ दिवसांपासून.**काळखडा** पु० १ जो अति दुर्जन आहे व जो मरावा अशी सर्वजण इच्छा करतात पण जो मरत नाहीं तो.२ ज्याला कितीही मारलें तरी त्याचा ज्यावर तिळमात्र परि-णाम होत नाहीं असा चिकट आणि लोचट मनुष्य. **काळगत** स्त्री० 'कालगति' याचें अपभ्रष्ट रूप; विलंब; उशीर; दिरंगाई; उ०माझें काम काळगतीवर लोटूं नको (म्ह० तें लवकर करून टाक). **काळज्वर** पु०विषमज्वर, मुदतीचा ताप. **काळ-झोंप** स्त्री० १ मृत्यूची झोंप म्ह०मृत्यु. २(लक्षणेनें) ज्या वेळीं विलक्षण आपत्ति ओढवतात व आपल्या हातून त्यांचें निवारण होत नाहीं ती वेळ;उ०प्रत्यहीं शत्रु तुम्हांस नागवीत असतां तुम्हीं आपल्या काळ-झोंपेंतून उठत नाहीं ना ? ३ मूर्च्छा. **काळतिथि** स्त्री० मृत्युदिन; (क्रि० येणें, भरणें). **काळधाड** स्त्री० सर्वस्वी नाश व्हावयाजोगी जी आपत्ति तिचा अकस्मात् कोणेकावर जो पात होतो तो (अग्नि, चोर, इ०कांचा). **काळधात** स्त्री० कालगुण; कालाचा प्रभाव; उ० यंदा काळधातच अशी आहे म्हणून सर्वत्र अनावृष्टि झाली. **काळनिद्रा, काळनीज** स्त्री० मागें ' काळझोंप ' पहा. **काळ-पुळी** स्त्री०, **काळफोड** पु०, **काळपुई** स्त्री० मनुष्याच्या पाठीच्या कण्यावर जी पुळी किं० फोड येतो, व ज्यायोगें मनुष्य प्रायः मरतो, तो विशिष्ट फोड किंवा पुळी. (ही पुळी इतस्ततः चळते, व ती चळेनाशी झाली म्हणजे माणसाला मृत्यु गांठतो). **काळप्रसंग** पु० काळवेळ; कालमान व देशमान; काळ आणि परिस्थिति यांची युक्तायुक्तता; उ०जो मुत्सद्दी काळप्रसंग पाहून चालतो तो लोकप्रिय होतो. **काळभैरव** पु०शिवाचें एक रूप; शिवाचा एक अवतार. काशीक्षेत्रीं याचें देवालय आहे. त्यास ' काशीचा कोतवाल ' असें म्हणतात.**काळ-रोग** पु० कोणताही भयंकर रोग. **काळवार** पु० माणसाचा घातवार किं० अशुभदिन. **काळवेळ** स्त्री० १ आपत्तिसमय; उ० काळवेळ कधीं सांगून

कां येते ? २ काळप्रसंग; कालमान; सद्य:स्थितीची इष्टानिष्टता; उ० काळवेळ पाहून वागतात तेच शाहाणे. **काळवेळ, काळवेळा (–ला)** **स्त्री०** एक विशिष्ट दुष्टवेला (शिवादिलिखित ग्रंथीं सांगितलेली); शनीचा काळ; (प्रत्येक दिवसांतील शनीचा मानलेला जो काळ त्या वेळीं सर्व कर्में निषिद्ध मानलीं आहेत). **काळान्तरीं** **क्रि० वि०** काल्लयीं; कल्पान्तरीं; जन्मजन्मान्तरीं; (नकारार्थीं प्रयोग); उ० ही गोष्ट माझ्या हातून काळान्तरीं व्हावयाची नाहीं.

कालगुत [सं० कला + गुप्त] **न०** १ बाहेर दुसऱ्यास न समजेल अशा तऱ्हेनें विवक्षित कार्य होण्यासाठीं कर्त्यानें यंत्रादिकांचे ठायीं जी गुप्त कळ वगैरे ठेविलेली असते ती. २ अशी कळ असलेलें यंत्रादिक तें. ३(लक्षणेनें) आपल्या इच्छेप्रमाणें किं० सोयीप्रमाणें व्यवहार चालावा एतदर्थ दुसऱ्यास न कळेल अशा तऱ्हेनें बांधिलेलें गुप्त सूत्र किं० गुप्त संधान.

कालण **न०** कालवण.

कालथा **पु०** उलथनें; कलथा.

कालपी, कालपीसाखर **स्त्री०** एक प्रकारची खडीसाखर.

कालमील, कालमेल **स्त्री०** ज्वरादिव्ययेमुळें अस्वास्थ वाटून तळमळत पडून राहणें; गडबडां लोळणें.

कालमेह [सं०] **पु०** ज्या विकारानें लघवी काळी होते तो विकार. [म्ह० रेचक मीठ.

काललवण [सं०] **न०** एक प्रकारचें सारक

कालव **न०** १ समुद्रांतील एक जंतुविशेष. २ त्यांचें कवच. [२ लहान गाय.

कालवड, कालव्हड **स्त्री०** १ गायीचें व्यपत्य.

कालवण [म० कालविणें] **न०** भात इ० कालविण्यासाठीं जें ताक वगैरे आपण घेतों तें.

कालवणें, कालविणें, कालिवणें **स० क्रि०** कांहीं घन पदार्थांत द्रव पदार्थ घालून ते दोन्हीं एकरस होण्याकरतां, त्या दोघांचें यथायोग्य संमिश्रण व्हावयाकरतां, तो इकडचा तिकडे करून हालविणें; उ० भात कालविणें, डांगर कालविणें, मेतकूट कालविणें, बोडण कालविणें, इ०. ॐ**पोटांत कालवणें** १ पोटांत पित्तादिकांमुळें ढवळणें. २ (लक्षणेनें) मत्सरग्रस्त होणें. **प्राण कालवणें** जीव गलबलणें किं० घाबरा होणें. **विटाळ कालवणें** विटाळ आला असतां इतरत्र स्पर्शानें तो प्रसृत करणें. **कालवाकालव** [म० कालविणें] **स्त्री०** १ वाटेल ते पदार्थ वाटेल तसे एकांवत करणें; योग्य, अयोग्य, अशा अनेक जातांच्या पदार्थांचें मिश्रण, एकत्रीकरण. २ कांहीं एक गोष्टीचा वादांत वगैरे विचका करण्याचा व्यापार; संदर्भास वगैरे सोडून वाटेल तो विधानें करण्याचा प्रकार. ३ (लक्षणेनें) पोटांत ढवळाढवळ होणें; कांहीं मनोविकार प्रबळ होऊन जिवास वाटते जी नितान्त अस्वस्थता ती; खळबळाट उडणें; उ० अकबरानें चितोड शहर काबीज केलें म्हणून राणा प्रतापाच्या पोटांत(किंवा मनांत) कालवाकालव होऊन (किंवा उडून) जात असे. ४ (लक्षणेनें) विटाळ इतस्तत: प्रसृत करणें.

कालवा [सं० कुल्या] **पु०** १ नद्यादिकांचें पाणी इतरत्र न्यावयाकरतां खणून जो मार्ग करतात तो. २[म० कालविणें] संमिश्रण.

काला [म० कालविणें] **पु०** १ भात, भाकरी, इ० कांत, दहीं, वगैरे घालून केलेला गोळा, मिश्रण, किं० लध्या. २ कोहोळे, भोपळे, इ० किसून त्यांत तिखट, मीठ, इ० घालून सांडगे करण्याकरतां जो गोळा किंवा मिश्रण करतात तें. ३ दहीकाला.

कालाकेत्ता **पु०** १ हरएक जातीच्या पदार्थांचा समुदाय किं० भरणा. २ सटरफटर वस्तूंचा ढीग; अनेक प्रकारच्या वस्तूंची अडगळ. ३ हरएक प्रकारचीं धान्यें समुच्चायानें (**क्रि०** पिकणें, बुडणें, नासणें, इ०). ४ माड, पोफळी, ऊस, इ० झाडांमध्यें लाविलेला भाजीपाला.

कालाप [सं०] **पु०** १ डोक्याचे केश. २ सर्पाची फणा. ३ कलाप व्याकरणाचा अध्येता. ४[सं० ‘ कलापक ’ चा अपभ्रंश] चार श्लोकांचें बनलेलें एक वाक्य. [चा अर्थ ४ पहा.

कालापाक[सं० कलापक] **न०** ‘ कालाप ’

कालाभुली, कालाभूल **स्त्री०** पित्त, ज्वर, भूक, इ० कांमुळें वाटणारी अस्वस्थता, किंवा पोटांत होतें ती कालवाकालव (**क्रि०** येणें).

कालायस [सं० काल म्ह० काळें + अयस् म्ह० लोखंड] **न०** १ पोलाद (जें काळें निळें असतें). २ लोखंड.

कालिक [**सं०** काल] **वि०** १ काळासंबंधींचा. २ वेळेवर होणारें. ३ इहलोकचें; अशाश्वत. ४ (समासांत) कांहीं विशिष्ट काळचें; ०कालीन; उ०चिरकालिक ह्म०चिरकाळचें किं० टिकणारें. ❀ **नियतकालिक न०** ठराविक मुदतीनें किं० अवधींत प्रसिद्ध होणारें. **कालिकवृद्धि स्त्री०**,**कालिकव्याज न०** मुदतीनें देण्याचें व्याज.

कालिका, काली [**सं०**] **स्त्री०** एक देवी; दुर्गा. हिला **कालकाई, कालिकाई, काळकाई,** असेंही म्हणतात.

कालिका [**सं०**] **स्त्री०** १ हप्त्यानें द्यावयाची पदार्थाची किंमत. २ मुदतीनें द्यावयाचें व्याज. ३ काळेपणा. ४ काळा रंग; शाइ. ५ पावसाचे ढग. ६.ढगांची काळोखी. ७ सोनें, इ०तील हीण. ८ कानांतील रक्तवाहिनी. ९ काळीज. १० मद्य; मदिरा. [कलिंगड.

कालिंगड,कालिंगण [**सं०** कालिंगी] **न०** **कालिंगडा पु०** संगीतांतील एक रागविशेष; (हा राग रात्रीच्या शेवटच्या प्रहरांत गातात).

कालिंदी [**सं०**] **स्त्री०** यमुना नदी. ❀ **कालिंदीसोदर पु०** यम.

कालिमा [**सं०** कालिमन् **पु०**] **स्त्री०** १ काळेपणा; काळा रंग. २ (लक्षणेनें) कलंक; डाग; लांच्छन; उ० त्या हिंदू स्त्रीनें एका अविंधाशी निका लावून आपल्या कुळास कालिमा फासला (लावला, आणला).

कालिया [**सं०** कालिय] **पु०** यमुनेंत गरुडाच्या भयानें लपून राहिलेला एक प्रचंड सर्प. ❀ **कालियामर्दन पु०** श्रीकृष्ण. **न०** कालियनामक सर्पाचा नाश. (' कालिया ' हें मराठींतील रूप).

काली [**सं०**] **स्त्री०** कालिका देवी.

कालीन [**सं०**] **वि०** विशिष्ट काळचा. याचा समासांत अत्यपदीं उपयोग करतात; जसें तत्कालिन म्ह० त्या काळचा; एतत्कालीन म्ह० या काळचा; समकालीन म्ह० त्याच्याच वेळचा.

कालूं न० समुद्रांतील एक लहान प्राणी; कालव. **कालू स्त्री०** त्या प्राण्याचें कवच.

कालू पु०, स्त्री०, न० सनई म्हणून वाजंत्र्याचें वायुवाद्य.

कालें, काल न०केळ, चवई, व ह्या जातीच्या झाडांच्या बुंधाचा जो सोट त्याचा गाभा. ह्या कालाची भाजी होते आणि त्याच्या पाण्यांत पापडाचें पीठ भिजवितात. ❀**काल्यासारखा,** किं० **कालासारखा गार** किंवा थंड अतिशय थंड, (हात, पाय, इ०).

कालेंबेलें न०गुप्त कृत्यें;चोरटे धंदे किं०खटपटी; लफंगेगिरीचे मार्ग; मसलती; काळीबेरीं कृत्यें.

काल्पनिक [**सं०** 'कल्पना' पासून विशेषण] **वि०** कल्पित; कल्पनेनें रचलेली;खरी म्ह० घडलेली नव्हे अशी; बनावट, खोटी, (गोष्ट, हकीगत, इ०).

काव स्त्री० तांबड्या मातींतील एक भेद. कावेचे दोन प्रकार आहेत,–लोखंडी काव आणि सोनकाव.

कावकाव स्त्री०, न० १ कावळ्याचें जें ओरडणें तें. २ (लक्षणेनें) कर्जदार, याचक, वगैरे ' द्या, द्या ' म्हणून जो गिल्ला करतात तो. ३ त्रास येण्याइतकें एखाद्याचें कांहीं मागणें; कांहीं गोष्टीबद्दल लोचटपणाची व हावरेपणाची केलेली कटकट. ४ निंदकांनीं एकाद्या माणसाबद्दल केलेली आरडाओरड; निंदकांनीं केलेला गहजब.

कावड स्त्री० १ चिवट आणि मजबूत अशा कांबटीच्या दोन टोंकांस शिंकाळीं बांधून दूध,पाणी, वगैरे खांद्यावरून वाहण्याकरतां तयार करतात तें साधन; उ० अहिल्याबाईची गंगाजलाची कावड अजूनही काशीहून रामेश्वरास जाते; उ० महादू बरेच दिवसांत वासुंदीची कावड घेऊन आमच्याकडे आला नाहीं.२ विटीदांडूच्या खेळांतील एक शब्द. ❀**कावड्या वि०** कावड वाहातो तो.

कावडतावड, कावडदावड स्त्री० १ तडजोड (गिऱ्हाईक आणि दुकानदार यांच्यामध्यें किंमतीबद्दल, रणको आणि धनको यांमध्यें घेण्याबद्दल, इ०). २ आदलाबदल; एक वस्तु देऊन तिच्याबद्दल दुसरी घेणें; मोबदल्याचा व्यवहार. ३ व्यवहारांतील चातुर्य, तज्ञता, कसब,धोरण, इ०.

कांवडळ, कंवडळ स्त्री० एक कडू फलविशेष.

कावण न० तात्पुरत्या राहाण्याकरतां किं० गुऱ्हाळाकरतां डाहाळ्या, झावळ्या, पळमाचीं पानें, इ०चे कूड व छप्पर करून जी झोपडी करतात ती.

कांवणें, काऱ्हणें अ०क्रि० १ कांहीं दुःखामुळें

बावरें होणें, बावरून जाणें. २ कातवरणें, संतापणें, कातावणें. ३ रागानें बेफाम होणें.

कावती स्त्री० पोफळीचें रोप; लहान पोफळी.

कावर स्त्री०,न० पाचर; अर्धवट करवतलेलें लाकूड फाकटून राहावें, किंवा जांत्याचा खुंटा वगैरे लांपट झालेला असतां तो घट्ट बसावा म्हणून जो लाकडाचा तुकडा, धलपी, इ० ठोकून शिरकावतात ती.

कावराबावरा वि० संताप, भ्रांति, इ० भावनांच्या उत्कटतेमुळें चर्या पालटण्यासारखी जी मनाची अस्वस्थता होते ती; गोरामोरा झालेला; घाबरलेला; बावरलेला.

कावरूख पु० एका झाडाचें नांव.

कावल न०१ जुनें, झिजलेलें, मोडींत घावयाच्या योग्यतेचें धातूचें भांडें. २ नवें असून अत्यंत पातळ जें भांडें त्यास लक्षणेनें म्हणतात. ॐ**कावली, कावल्या वि०** १ कावलासारखें (भांडें). २ अशक्त, अधू, कसरीनें खाऊन पोकळ केलेलें काष्ठ (तुळई, खांब, इ०). **कावलकाठी, कावळकाठी स्त्री०** अगदीं हलकें आणि अशक्त जे काष्ठ तें.

कावला पु० [' कालवा ' याचें अशुद्ध रूप] पु० १ दूर अंतरावर पाणी नेण्यासाठीं खणलेला चर. २रहीं पाणी दूर जाण्यासाठीं जमीनींत खोदलेला पन्हळ किं० पाट.

कावळा पु० १ काक; रंगानें काळा आणि कावकाव ओरडणारा पक्षिविशेष. २ (लक्षणेनें) अगस्त्याच्या फुलांत दोहोंच्या अंकासारखी जी वळलेली काडी असते ती. ३ (लक्षणेनें) केळफुलाच्या प्रत्येक सालाखालीं हाताच्या पंज्यासारखे मृदु अवयव असतात, त्यांतील मधल्या कठिन काड्या ज्या भाजीला नकोत म्हणून टाकून देतात त्या प्रत्येक. ४ कावळी नांवाची जी औषधी तिचें फल. ५गोंडा. ६ (लक्षणेनें) दुर्जन; हलकट, आणि स्वार्थी इसम. ॐ **कावळा साऱ्यांचा गू खाईल पण कावळ्याचा गू कोण खाईल?** या विशिष्ट माणसाचा हा वाईट गुण कोणत्याही उपायानें नाहींसा करतां येण्याजोगा नाहीं. पराकाष्ठेचा मळकेपणा, नीचपणा, किं० दुष्टपणा पाहून हा उद्गार काढला जातो; **कावळां सोत्यापोवळयांचा चारा काय उपयोगी** ज्याला ज्याची गोडी नाहीं त्याला तें देणें व्यर्थ. **कावळा शिवणें** १ मृताच्या पिंडाला कावळ्यानें स्पर्श करणें. कावळा पिंडाला शिवला म्हणजे मृताची कांहीं इच्छा शिल्लक राहिली नाहीं असें समजतात. २ घरांतील स्त्री विटाळशी झाली असतां बाजूस बसतें, त्या गोष्टीचा उलगडा घरांतील मुलांबाळांस होत नाहीं; तेव्हां त्यांच्या समाधानार्थ 'तिला कावळा शिवला' असें म्हणतात. **घरांत नाहीं शीत कावळ्याला आमंत्रण** अंगीं सामर्थ्य नसतां किंवा हातीं अधिकार नसतां पोकळ वल्गना किं० रिकाम्या बढाया यांचा निंदा करतांना हा वाक्प्रचार योजतात. **पांढरे कावळे जेथें असतात तिकडे जा** तूं फार शाहाणा आहेस ! पांढरे कावळे शोधून काढण्याचें काम तुला योग्य आहे; तूं येथून उठून पसणांत जा; आम्हाला तुझी अडगळ झाली आहे; काळें कर ! **कावळ्याच्या शापानें गुरें मरत नाहींत** हलकट किं० नीच माणसांच्या निंदेनें थोरांचें वैभव कमी होत नाहीं.

कावळेगोत न० एकाद्यास उर्जित काळ प्राप्त झाला असतां त्याच्या भोंवतीं जो कोरकोरून नातीं काढून येणाऱ्यांचा घोळका जमतो तो. (अशा रीतीनें जमलेल्या लोकांस 'कावळे' म्हणतात, त्यांचें जें गोत तें). **कावळ्याचा डोळा पु०** १ एका वनस्पतीचें फूल. २अगदीं पातळ, बेचव, आणि पाणकट असें जें ताक तें.

कावा [हिं०] पु० १ बेफाम सुटलेल्या घोड्याला आवरावयासाठीं त्याच्या लगामाला दिलेले हासडे. २ लबाडी; कारस्थान. ३ ढोंग. ॐ**कावेखोर, कावेदार, कावेबाज वि०** कारस्थानी; कपटी; धूर्त; लुच्चा; मसलती; जो अनेक डावपेंच करतो तो.

कावाड न० कवाड; दार.

काविन्न न० कावा, कारस्थान.

काविरडा, कांविरडा वि० १ दुखण्यानें त्रासलेला. २ तुसडा; त्रासिक; तिरसट. [पहा.

काविरें न० १ वेड. २ धुंदी. पुढें ' काहूर '

काविलथा पु० पोळी, भाकरी, इ० तव्यावर उलथण्याचें स्वयंपाकघरांतील एक आऊत. मागें ' कलथा ' पहा.

कावीण स्त्री० कावीळ नांवाचा रोग (जो झाला असतां सर्व पिवळें दिसतें).

कावील स्त्री० काहील, मोठी कढई, —जींत उंसाचा रस गूळ करण्याकरतां कढवितात.

कावीळ स्त्री० मागें ' कामीण ' पहा.

कावेरी स्त्री० कर्नाटकांतील एक नदी.

काव्य [सं०] न० रचनाचातुर्य व कल्पनालाघव यांच्या साहाय्यानें प्रतिपाद्य विषयांत रस उत्पन्न होतो, व त्यायोगें मनोभावना उद्दीपित होऊन प्रसन्नता पावतात, अशी जी कवींची अपूर्व कृति ती. काव्याची व्याख्या ' जें रसात्मक तें, ' ' जें रमणीयार्थप्रतिपादक तें, 'इ० प्रकारची आलंकारिकांनीं केली आहे. ꣸ काव्यचोर पु० दुसऱ्याच्या वाङ्मयाची किं० कल्पनांची चोरी करणारा लेखक. काव्यमीमांसक वि० १ आलंकारिक. २ काव्यरसज्ञ; मर्मज्ञ; टीकाकार. काव्यलिंग न० एक अर्थालंकार; वाक्याचा अर्थ, किं० पदाचा अर्थ, हा जेव्हां एकाद्या विधानाचें कारण असतो, किंवा परिणामाचें कारण म्हणून व्यावयाचा असतो, तेव्हां काव्यलिंग हा अलंकार होतो. विशेष खुलासा आणि उदाहरणें आमच्या " अर्थालंकारांचें निरूपण " ह्या पुस्तकांत पहा.

काव्हणें अ० क्रि० १ रागानें किं० वेदनेनें बेफाम होणें. २ आजारानें त्रासून जाणें. ३ भयानें गांगरणें.

काश [सं०] पुं० १ एक प्रकारचें तृण; कसाड तृण; लव्हाळा. [विणारा एक आजार.

काशश्वास [सं०] पु० छातीचा धापा टाक-

काशा, कांशा [कांशी याचें अनेवचन; एकवचन क्वचितच वापरतात] स्त्री० अ० व० हरळी, कुंदा, किं० धान्याच्या ताटांच्या मुळ्या. ꣸ एकाद्याच्या काशा भरडणें त्याच्यावर तोंड सोडणें; त्याची खरडपट्टी काढणें.

काशिंदा, काशिंदा पु० एक वनस्पति.

काशी स्त्री० १ (कोंकणांत) ज्या क्षेत्रांत कलिंगडी, जिभडी, इ० लावितात तें क्षेत्र. २ कलिंगडी, जिभडी, इ० कांचा जो समुदाय तो.

काशी [सं०] स्त्री० सकल पुण्यक्षेत्रांत श्रेष्ठ क्षेत्र जें बनारस तें. हें उत्तरहिंदुस्थानांत गंगातटीं असून प्रतिवर्षी लाखों यात्रेकरू तेथें जातात. तसेंच फार प्राचीन कालापासून तों आजतागायत तें वेदादिविद्येचें माहेरघर आहे. ꣸ काशीरामेश्वराचें अंतर न० अत्यंत मोठें अंतर. काशीस भागीरथी नेणें जेथें जी वस्तु विपुल तेथें ती नेणें हा मूर्खपणा. काशीची वाट दाखविणें एकाद्या पोरास त्याचे कान दोन हातांनीं दाबून उचलणें व आंगठ्यांनीं त्याची ताळू जोरानें चोळणें (हें अर्थातच असह्य होतें). काशीस गेला काशीदास मथुरेस गेला मथुरादास परिस्थित्यनरूप स्वताचीं मतें बदलणारा; स्वार्थी आणि अविश्वसनीय मनुष्य. काशीकर पु० १ काशीचा रहिवासी. २ काशीची ज्याणें यात्रा केली तो; ('काशीकरीण' हें स्त्रीलिंगी रूप). ३ पक्का जो धूर्त, सोदा, किं० गुंड, तो. काशीचा कोतवाल पु० काशीचा काळभैरव; (तो अपराध्यांना दंड करतो वगैरे समजुतीवरून). काशीपट न० १ रामायणांतील अनेक प्रसंगांच्या चित्रांनीं युक्त असा काशीहून आणलेला लांब वस्त्राचा पट्टा. २ (लक्षणेनें) १ लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत. २ त्रास उत्पन्न करणारी आणि लोचटपणाची प्रार्थना किं० विनंती किं० मागणी. काशीफळ न० काळ्या भोपळ्यासारखें एक फळ. काशी भोपळा पु० एक भाजीचें फळ. कोणी याला काशीफळ म्हणतात. काशीयात्रा स्त्री० १ काशीक्षेत्राची यात्रा. (काशीयात्रेचें पुण्य मोठें असल्यामुळें आयुष्यांत एकदा तरी काशीयात्रा करण्याची रूढि आहे). २ (सोंगट्यांत) दहा, पंचवीस, हे डाव ओळीनें तीनदां पडले म्हणजे दान फुकट जातें; असें दान पडणाऱ्यास त्यानें काशीयात्रा केली असें म्हणतात. काशीशिक्का पु० काशींत पाडलेला एक विशिष्ट रुपया.

काश्मीर [सं०] न० १ हिंदुस्थानच्या उत्तरेस जो सृष्टिसौंदर्यसमृद्ध देश किंवा प्रांत आहे तो. २ (कांश्मीरांत उत्पन्न होते म्हणून) केशर. या देशाचें वर्णन कालिदासकवीनें केलेलें आहे व म्हणून तो काश्मीरांत गेला असला पाहिजे असे मानतात. ꣸ काश्मिरी वि० काश्मीरी किं० काश्मीरासंबंधींचें जें कांहीं ते (शालजोडी, केशर, इ०). काश्मिरीमूर्ती स्त्री० अत्यन्त शुभ्र स्फटिकाची केलेली किं० घडविलेली मूर्ति. [न० रक्तस्राव.

काषाय [स०] वि० तांबूस रंगाचें (वस्त्रादि).

काष्टा [सं० कच्छ, म० ' कासोटा ' चें घाईतील रूप] पु० १ कासोटा; धोतराच्या किंवा लुगड्याच्या डाव्या बाजूच्या निऱ्या मागें कमरेस खोचतात त्या. २ (लक्षणेनें) एखाद्याच्या जो मागें जातो तो त्याचा. ꣸ काष्ट्याचा बळकट वि०

कामविकार ज्यानें ताब्यांत ठेवला आहे असा; स्त्रियांच्या मोहास जो बळी पडत नाहीं असा. काष्ट्याची बळकट हें स्त्रीलिंगी रूप.

काष्टी [**सं०** कच्छ, म० कासोटा, काष्टा] **स्त्री०** लंगोटी (तुच्छतेनें).

काष्ठ [**सं०**] **न०** १ लांकूड; सर्पणाच्या उपयागाचें लाकूड. २ तुळई, काठी, इ०. ३ (लक्षणेनें) केवळ काष्ठासारखा जो मनुष्य तो.ॐ **काष्ठकुट्ट पु०** माड इ०कांस चोचीनें घर पाडतो तो पक्षी; सुतारपक्षी. **काष्ठघंटा स्त्री०** नाठाळ गुराच्या गळ्यांत बांधतात तें लोढणें (तें घंटेच्या लोलकासारखें असतें त्यावरून). **काष्ठतक्षक पु०** सुतार. **काष्ठदारु पु०** देवदारु. **काष्ठप्रदान न०** चितेची लांकडें रचणें; चिता रचणें. **काष्ठमठी स्त्री०** चिता. **काष्ठमल्ल पु०** तिरडी. **काष्ठ-यंत्र न०** (संकेतानें) अपराध्यांस घालतात तो खोडा.**काष्ठवत् क्रि० वि०** लांकडाप्रमाणें निश्चल-पणें; वाळलेल्या काटकाप्रमाणें. **काष्ठौषध न०** झाडपाल्यांचीं जीं औषधें,म्हणजे औषधांच्या मुळ्या, पानें, फळें, इ० तीं प्रत्येक. **काष्ठौषधी पु०** काष्ठौषधें विकणारा; पसारी.

काष्ठा[**सं०**]**स्त्री०**१ दिशा.२ $\frac{1}{3}$ कला किं० १८ निमेष यांनीं होणारा कालावधि. ३ अंतिम मर्यादा. ४शर्यतीचें मैदान.५वायु,ढग, इ०चा आकाशांतील पथ. ॐ**पराकाष्ठा स्त्री०**अतिरेक; परम मर्यादा.

कास पु० (शिंप्यांच्या परिभाषेंत) १ सरळ रेषेंत कापड कापणें.२ सरळ रेषेंत कापलेलें कापड. (इरात्र किं० इरेफ म्ह० वाकडें कापलेलें कापड).

कास [**सं०**] **पु०** १ खोकला. २ शिंकणें.

कास पु० १ कुरण. २ कांहीं वट्ट सारा ठर-वून बक्षीस दिलेली जमीन.२ शेतांतील गदळ काढून जेथें टाकलें जातें तो जमीनीचा तुकडा. ॐ**कास-जमीन स्त्री०** वर ' कास ' द्वितीयार्थीं पहा. **कासबंदी स्त्री०** निरनिराळे तुकडे पाडून त्यांचा दर्जा न पाहतां सरसकट कांहीं वट्ट सारा ठरवून जमीन देण्याची पद्धति; जमीनींच्या सरा-सरीच्या कसाप्रमाणें सारा ठरविण्याची पद्धति.

कास, कांस स्त्री० १ गाय, म्हैस,इ० चीं जी ओटी ती. २ कटिप्रदेश; कंबर; उ० पंढरपुरचा विठोबा कासेवर हात ठेऊन उभा आहे. ३ काष्टा, कासोटा. ॐ **कास घालणें, कास कसणें** कांहीं गोष्ट करावयास उत्सुकतेनें सिद्ध होणें; कांहीं काम करावयास कंबर कसणें. **एकाद्याच्या कासेला लागणें, एकाद्याची कास धरणें** कांहीं संकटांतून पार पडण्याकरतां त्याचा आश्रय करणें;आपला कांहीं हेतु पार पाडण्याकरतां त्या कामीं जो कोणी समर्थ त्याचा आश्रय करणें; उ० एका परमेश्वराची कास धरावी म्हणजे कांहीं उणें रहात नाहीं; उ०बुद्धीची कास धरा, म्हणजे अडचणींतून मार्ग काढण्यास हरकत पडणार नाहीं. **कास सोडणें** समर्थ माण-साचा किं०वस्तूचा आश्रय किंवा अवलंब सोडून देणें किं० टाकणें. **कास चोरणें** गायी म्हशींनीं पान्हा आवरून धरणें; आचोळा कितीहि ओढली तरी त्यांतून दूध निघूं नये असें वर्तन; ओटी चोरणें; दुधाचा ओघ थांबविणें.

कासकुशा स्त्री० अ० व० थंडीनें कुडकुडणें (क्रि० देणें, घेणें).

कासकुस स्त्री० काचकुच करणें; कांकूं करणें; मागें मागें घेणें; कचरणें.

कासगी स्त्री० १ घोड्यास खरारा करतेवेळीं घालतात जो दोरीचा लगाम तो; काजगी. २घोड्याचें डोकें त्याला खालीं करतां येऊं नये म्हणून जो त्याला एक प्रकारचा लगाम घालतात तो.

कासंडी स्त्री० एक प्रकारचें धातूचें पात्र,— जें प्रायः दूध काढण्यास वापरितात; चरवी.

कांसणें स०क्रि०,अ०क्रि०मागें 'काचणें' पहा.

कासंदा, कासुंदा, कासोंदा, काशिंदा पु० एक वनस्पति.

कासनी [**हिं०**] **स्त्री०** बुंदांत भेसळ करा-वयासाठीं ज्याच्या मुळ्या लबाड व्यापारी वापर-तात अशी एक वनस्पति.

कासफोड, कासेफोड, कांसेफोड [**म०** कासव+फोड] **पु०**पायाच्या किं० हाताच्या तळ-व्यांस जो मोठा पांढरा फोड येतो आणि ज्यांत पाणी सांचतें तो. (गुरांच्या पायांसही हा फोड येतो.)

कापया क्रि० वि० (कवितेंत) कशाला ? काय म्हणून ? कशासाठीं ?

कासर पु० कोकिळ.

कासरा पु० १ बैल, टोणगा, इ०कांच्या शिंगांस किंवा वेसणीस बांधतात ती दहा पांच हात लांबीची दोरी(त्यांस स्वाधीन ठेवतां यावें म्हणून)-

२ चामड्याचा आसूड. ॐकासराभर किंवा दोन कासरे सूर्य येणें क्षितिजाच्यावर सूर्य एक कासरा किंवा दोन कासरे उदित होणें, कि० चढणें, म्ह० सूर्योदयानंतर सुमारें एक कि० दोन तास वेळ होणें. कासरा कि० दोन कासरे सूर्य राहणें मावळतेंसमयीं सूर्य कासराभर किंवा दोन कासरे क्षितिजापासून दूर असणें. सूर्यास्ताला एक दोन तास अवकाश असणें.(शेतकरी लोकांत हे वाक्प्रचार अतिशय रूढ आहेत).

कासरी स्त्री० मागें ' काचरी ' पहा.

कासली स्त्री० एक औषधी वनस्पति. ही सर्पदंशावर अति गुणकारी आहे. हिच्या फळास **सुद्रा** म्हणतात.

कासव, कांसव [सं० कच्छप] न० एक प्राणिविशेष. हा जमीनीवरही राहतो व पाण्यांतही राहतो.याची पाठ अत्यंत टणक असून त्याच्या ढाली करतां येतात. भगवंतांनीं दुसरा अवतार कच्छाचा म्ह० कांसवाचाच घेतला होता. पु० कासफोड, कासेफोड; (मागें 'कासफोड' हा शब्द स्वतंत्र रीत्या दिला आहे तो पहा). ॐ**कासवपृष्ठ** न० कासवाची पाठ; ज्याला ' पोटांतलें ' म्हणतात त्या दुखण्यावर किंवा रोगावर ही औषधासारखी योजितात. याला **कासव्याची पाठ** असेंही म्हणतात. **कांसवी इरलें** न० कासवाच्या पाठीच्या आकाराचें इरलें (पाऊस लागूं नये म्हणून डोक्यावर घेण्याकरतां करतात तें). **कांसव्या रोग** पु० पोटांत होणारा एक रोग.

कासवदा, कासवंदा, कासविंदा पु० मागें काशिंदा ' किंवा ' कासंदा ' पहा.

कांसळणें [सं०कांस] अ० क्रि० दमल्यामुळें श्वास लागून धापा टाकणें; धास लागणें; दम लागणें.

कांसा [म० कांसव] पु०१ कासव. २ समुद्रांत जो उघडा खडक असतो तो; ज्याचा पृष्ठभाग समुद्राच्यावर आलेला असतो असा खडक.

कासाई स्त्री० (लावण्यांत) स्त्रियांच्या नेसावयाच्या लुगड्यासारखें एक वस्त्र.

कासांडी स्त्री० कासंडी; चरवी.

कासार[सं०]पु० तळें.

कासार, कांसार [सं० कांस्यकार] पु० तांबें, पितळ, वगैरेंचीं भांडीं करणाऱ्यांची जात, किंवा तज्जातीय इसम. [म०कांचार] पु०काचेच्या बांगड्या करणाऱ्यांची कि० विकणाऱ्यांची जात किंवा तज्जातीय इसम. ॐ**कासारडा** पु०कांसारास तुच्छतेनें म्हणतात. **कांसारथळ** न० कांस्यकार किंवा कांचार यांच्या धंद्यावर बसविलेला कर. **कांसारभट्टी** स्त्री० बांगड्या करावयाच्या भट्टीवर ठेवलेला कर. **कांसारभात** पु० (लक्षणेनें)केवळ फडफडीत झालेला भात.

कांसावणें [सं० कास=श्वास)]अ०क्रि०धापा टाकणें; दम लागणें; श्वासोच्छ्वास जोरानें वाहूं लागणें (दमल्यामुळें).

कासाविसी (-शी) स्त्री० १ प्राण व्याकुल होणें; जीव घाबरा होणें;गुदमरणें.२ अस्वस्थपणाची धडपड. ३ पराकाष्ठेची घाई किं० अधीरपणा.

कासावीस वि० ज्याचे प्राण व्याकुल झाले आहेत असा; ज्याचा जीव घाबरा झाला आहे असा (कांहीं दुःखातिरेकामुळें); उ० हिराबाईस चांगलेंसें पोहतां येत नसल्यामुळें व नदीचा कांठ बराच लांब असल्यामुळें ती कासावीस झाली (किंवा तिचे प्राण कासावीस झाले).

कासाळ [म० कांसें] स्त्री० नौबत इ०बरोबर वाजवितात जी मोठी झांज ती.

कांसाळवत, कांसाळूं न० आळवांतील एक भेद; हें आळूं साध्या अळवाहून मोठें असतें.

कासिनी स्त्री० ज्या वनस्पतीचीं मुळें भेसळ करण्यासाठीं लबाड व्यापारी बुंदांत घालतात ती. मागें ' कासनी ' पहा.

कासीद [अ० कासिद] पु० जासूद; निरोप पोंचविणारा; पत्रें नेणारा किं० आणणारा.

कासीस [सं०] न० १ मोरचूद. २ हिराकस.

कांसें [सं०कांस्य] न० १ एक प्रकारची धातु. याचे वाजवावयासाठीं ताम करतात. २ तास (वाद्य). ३ झांज.

कासेफोड पु० मागें ' कासफोड ' पहा.

कासोटा [म० काष्टा; सं० कच्छ] पु० १ धोतराच्या किंवा लुगड्याच्या ज्या निऱ्या मागें कमरेशीं खोवितात त्या; (क्रिया० मारणें, घालणें, खोचणें, खोवणें, सोडणें,फेडणें,सुटणें, फिटणें,इ०). २ जो ज्याच्या मागें असतो तो त्याचा.ॐ**कासोटा संभाळणें** मानहानीचा प्रसंग येऊन बेतला असतां

त्यांतून बचाव करून घेणें; उ० श्रीमंत पंतप्रतिनिधि यांचा किला अजिक्य कासोटा । तेलग मारी सोटा बापू गोखल्या संभाळ कासोटा ॥ **कासोटयाचा (–ची) अदळ** वि० ज्यास (किं० जीस) हगवणीचा विकार आहे असा (अशी). **कासोटयाचा (–ची) बळकट, खंबीर**, किं० **खबरदार** वि० अव्यभिचारी; कामवासनेच्या अधीन होऊन जो (किं० जी) व्यभिचार करीत नाहीं असा (अशी); शुद्ध आचरणाचा (–ची). **कासोटयाचा (–ची) हलका (–की)**, किं० **ढिला (–ली)** उच्छृंखल वृत्तीचा (–ची); व्यभिचारी.

कासोदा पु० कासुंदा; एक वनस्पति. कासुंदा, कासविंदा, कासवंदा, कासवदा, कासवंदा, हीं याच वनस्पतीचीं अन्य नांवें आहेत.

कास्त पु० 'कायस्थ' याचें अपभ्रष्ट रूप.

कांस्य [सं०] कांसें ही विशिष्ट धातु. ॐ **कांस्यकार** पु० ताम्रादिकांचीं भांडीं घडविणाऱ्यांची किं० विकणाऱ्यांची जाति किं० तज्जातीय उसम. **कांस्यताल** पु० झांज.

काहलीबंदर, काहिलीबंदर न० 'काहली' म्हणून जें हिंदुस्थानाच्या आग्नेय दिशेस बंदर आहे तेथलि मोती. हें मोती तांबूस असून हलक्या प्रतीचें असतें.

काहाकी, कहाकी स्त्री० काकवी.

काहाणी, स्त्री० मागें 'कहाणी' पहा.

काहारी, काहारी वि० मागें 'कहरी' पहा.

काहाळ [सं० काहल] न०, स्त्री० १ एक वाद्यविशेष (झांजा किंवा शिंग). संस्कृतांत **काहल** म्हणून जो शब्द आहे त्याचा अर्थ रणदुंदुभी असा आहे.

काहिणी, काहाणी, कहाणी स्त्री० जोंधळ्यास होतो जो एक रोग तो.

काहिली, काहली स्त्री० मोठी कढई (उसाचा रस कढविण्याची).

काहिली, काहली स्त्री० [हिं०] १ ज्वरानें किं० उष्ण औषध सेविल्यानें अंगाची होते जी लाही किं० आग ती. २ उन्हाची तिरीप लागून उद्भवते जी ग्लानि किं० ग्लानि ती.

कांहीं सर्वना०, वि०, क्रि० वि० १ जरासें; थोडेसें; थोडेंफार; उ० रघुनाथरावाला ज्योतिषांतलें कांहीं समजतें कां ? उ० त्याला पत्रिका दाखवा आणि कांहीं पडताळे येतात कां पहा. २ विवक्षित अर्थ अमुकत्वेंकरून निश्चित असतांही तो सामान्यतः सांगतांना योजितात; उ० ऐकलें कां, मला कांहीं सांगावयाचें आहे. ३ एखाद्या गोष्टीविषयीं सर्वसामान्य सिद्धान्त करावयाचा असतां 'हावें तें', 'वाटेल तें', 'कोणतीही गोष्ट,' इ० अर्थी योजितात; उ० कांहीं गोष्ट करावयाची तर बायकोचा सल्ला घेतल्याशिवाय करूं नये. ४ (निषेधार्थी) इषदपि; किमपि; किंचिदपि; मुळींसुद्धां; बिलकुल; उ० कांहीं नको जायला त्याच्याकडे, या ज्योतिष्यांना कांहीं समजत नाहीं. ५ विवक्षित समुदायांतील विवक्षित किंवा निवडक भागासंबंधीं विधान करावयाचें असतां योजितात; उ० अग, पण कांहीं ज्योतिषी ज्योतिष चांगलें जाणतात, त्यांची परीक्षा बघावयाला काय हरकत? ६ एखाद्या गोष्टीविषयीं निश्चितार्थ नसतां तद्विषयीं संभावना करून, 'हें किंवा तें,' 'असें किंवा तसें,' 'अमुक एक,' 'कोणतें तरी,' इ० अर्थी योजितात; उ० ज्योतिष्यांच्याकडे जातांच कामा नये असें कांहीं शास्त्र नाहीं ना ? ७ विधानास जोर आणतांना नकारात्मक भावानें आलंकारिक रीत्या योजितात. (दुसऱ्या अर्थाचीं विधानें अधिक जोरदार मात्र असतात, पण प्रस्तुत अर्थाचीं विधानें कमी जोरदार असून ज्यास्त आलंकारिक असतात); उ० मी कांहीं वांकडें कां बोललें ? इतकें टोंचून नको कांहीं बोलावयाला ! ८ केवळ शब्दांनीं अनिर्वचनीय किं० अनिर्वाच्य असा अर्थ निर्दिष्ट करावयाचा असतां योजितात; उ० पाहिलेंत ना, बायकांचा राग कांहीं और असतो ! ॐ**कांहीं करतां कांहीं देणें** मोठ्या परिमाणांतील कांहीं भाग देणें. **कांहीं करतां कांहीं होणें** एक गोष्ट करावयाला जावी आणि व्हावी दुसरीच; एक गोष्ट करावयाची मनांत आणली असतां दुसरीच उपस्थित किं० प्रादुर्भूत होणें. **कांहीं करून** काय वाटेल तें करून; कसेंहि करून; येनकेनप्रकारेण. **कांहीं एक** वि०, **सर्वना**० वर 'कांहीं' याचे १ व ७ हे अर्थ खेरीज करून बाकीचे सर्व पहा. ४या अर्थी प्रस्तुत शब्द अधिक जोराचा निषेध दर्शवितो. **कांहीं कांहीं सर्वना०, वि०, क्रि० वि०** १ उक्त संख्येपैकीं

किं० परिमाणापेक्षां,कांहीं,सर्व नव्हे; विवक्षित समुदायांतील विवक्षित किंवा निवडक. २ (अतिशयवाचक जे अनर्थादि शब्द,-कहर, शर्थ, इ०-त्यांच्या साहचर्यानें) मनस्वी, पराकाष्ठेची, अतोनात; उ० आज पावसानें कांहीं कांहीं शर्थ केली ! **कांहींचें बाहीं, कांहींचे कांहींच, कांहींच्या बाहींच क्रि० वि०** भलतेंच; अत्यंत किं०अतिशय विसंवादी किं० विसंगत; संदर्भास सोडून वाटेल तें; मूर्खासारखें; (**क्रि०** बरळणें, बडबडणें, इ०). **कांहीं न होतेला, कांहीं नव्हतेला** जणों काय कांहीं घडलें नाहीं, आपण कांहीं केलें नाहीं, असा बहाणा करून;उ०सर्व आधींच खाऊन सवरून पुन्हा कांहीं न होतेला खावयास मागतो ! उ० रात्रीं चोरी करून दिवसा कांहीं न होतेल्या गोष्टी सांगतो ! **कांहींबांहीं वि०, क्रि० वि०** थोडेंसें, थोडें, थोडेंथोडें, थोडेंफार; उ० माझें अंग दुखत होतें, पण न्हाण्यानें चंपी करतांच कांहीं बांहीं बरें वाटलें; उ० वैराग्यानें डोळयांत औषध घालतांच पिलाबाईला कांहींबांहीं दिसूं लागलें. **कांहींसा क्रि० वि०** थोड्याबहुत अंशानें किं० थोडासा; उ० रामू कांहींसा गोरा आहे; उ० सिंधु कांहींशीं बरी आहे, पण प्रमिला अगदींच टाकाऊ आहे.**कांहीं केल्या क्रि० वि०**कितीही यत्न केला तरी. **कांहींतरी वि०** १ हें किंवा तें, काय हावें तें; जें इष्टकार्यसिध्यर्थ कामीं येईल तें. १ भलतेंच; मूर्खपणाचें; असंबद्ध. ३ निश्चयानें जें सांगतां येत नाहीं तें.

काहीर वि०शिणलेला, दमलेला, गळून गेलेला.

काहील स्त्री०मोठी कढई; काहिली,-उसाचा रस कढविण्याची.

काहील [अ०कायील] **वि०** काईल; वादादिकांमध्यें उत्तराविषयी जो कुंठित झाला तो.

काहुर पु० (कवितेंत) १ निविड अंधेर, अंधेरी. २ ढगांचा समुदाय.

काहूर न० १ निबिड अंधार; घोर तमःपटल; (वादळामुळें आकाशांत मेघ गोळा होऊन त्यायोगें प्रसृत होतें तें; किं० येणें, उठणें). २ (लक्षणेनें) अनर्थ; महासंकट; (**क्रि०** येणें, गुजरणें, गुदरणें). ३ गहजब, (**क्रि०** उठणें, माजणें, माजविणें, इ०); उ० मालिनीविरुद्ध चाबुकस्वारानें काय काहूर माजविलें होतें हो ! ४ गोंधळ; कहर; उ० माझ्या डोक्यांत विचारांचें काहूर माजलें आहे; उ० या पोरीनें रडून रडून काहूर मांडलें आहे.॰ **काहूरबाहूर वि०** कावरा बावरा.

काहूल स्त्री०गलका; कल्लोळ; गोंगाट; आरडाओरडा; ओरड (मनुष्यें, जनावरें, पक्षी, इ०-कांचा).

काळ पु० मागें ' काल ' पहा.

काळकाई [सं०कालिका+म०आई] **स्त्री०** कालीदेवी; दुर्गादेवी.

काळजी [**म०** काळीज] **स्त्री०**१ कांहीं गोष्ट कशी होईल, काय होईल, किं० कशी झाली असेल, याविषयीं अन्तःकरणास वाटते जी व्यथा ती; चिंता (**क्रि०** वाटणें, असणें, लागणें). २ एखाद्या मनुष्याचें बरें असावें, वाईट असूं नये असा जो हृद्रोग लागतो तो; घोर; आंच; (**क्रि०**लागणें, लागून राहाणें). ३ जपण्याची भावना; ०च्या विषयीं खबरदारी; आस्था, निगा; (क्रिया०घेणें); ४ पोटाचा एक विकार. ॰**काळजीचा धगड पु०** अत्यंत बेफिकीर असा माणूस.

काळण पु० अन्नाचें मद्य करून विकणारी एक जाति किंवा तज्जातीय इसम.

काळदुपाऱ्या वि०दुपारचे बारा उलटून गेल्यावर जेवण करणारा. शब्द निंदाप्रचुर आहे.

काळपेरी वि० नाचणीच्या धान्याचा एक भेद किं० प्रकार.

काळंबन, काळमन स्त्री०, न० दमट, पाणकट, आणि गार हवा (पाऊस असतां किं० पाऊस नसतां). [प्रकार.

काळबुंडी जोंधळा पु० जोंधळ्यांतील एक

काळंबें न० मोहळांत एक भेद आहे तो. ॰**काळंबेंमाशी स्त्री०** मधमाशीची एक जात. इला **कोळंबीं स्त्री०** असाही अन्य शब्द आहे.

काळम्मा [**म०** काली+**कानडी** अम्मा] **स्त्री०** काळीदेवीसारखी रूपानें हिडिस्स आणि भयंकर अशी स्त्री.

काळवट [**म०** काळा] **वि०** १ काळसर. **स्त्री०** काळी जमीन (शेतीच्या उपयोगाची).

काळवटणें, काळवंडणें अ० क्रि० १ उन्हा-

तान्हांत हिंडल्याफिरल्यामुळें शरीर कृष्णवर्ण दिसूं लागणें. २ परिणतावस्थेमुळें शेतें काळीं दिसूं किं० पडूं लागणें. ३ आजारामुळें किं० तीव्र काळजी मुळें चेहेरा म्लान आणि निस्तेज होणें. ४ भय, गुन्हा, अपमान, फजीती, इ० कांमुळें मुखश्री उतरून जाऊन तेजोहीन होणें; तोंडावर कालिमा पसरणें. या अर्थी 'काळवंडणें' हा शब्द विशेष रूढ आहे. ५ (कवितेंत लक्षणेनें) कृष्णवर्ण होणें, निस्तेज होणें; उ० म्हणणी काळवंडे वासरमणी !

काळवटी, काळवण, काळवंडी स्त्री० उन्हातान्हांत हिंडल्याफिरल्यामुळें शरीरावर येते ती कृष्णवर्णता. २ परिणतावस्थेमुळें शेत काळें तांबडें दिसूं लागणें ३ आजारामुळें चेहेऱ्यावर पसरते किंवा येते ती म्लानि किं० निस्तेजता. ४ भय, गुन्हा, अपमान, फजीती, इ० मुळें मुखश्री उतरून तोंडावर येते ती कालिमा.

काळवंथरी स्त्री० सह्याद्रिच्या खडकाची विशिष्ट जात; काळोत्री फत्तर. हिला **कार, काळेंभिंवरी, काळादगड,** अशीं नांवें आहेत. दक्षिणेंतील खडक याच जातीचे आहेत.

काळवीट पु० काळ्या पाठीचें हरिण (नर). 'काळविंट' 'काळवंट' अशीही या शब्दाची अन्य रूपें आहेत.

काळवें न० सायंकाळच्या प्रारंभीं पसरतो जो अर्धवट अंधेर तो.

काळसरणें [म० काळसर] अ० क्रि० १ शरीर उन्हातान्हांत हिंडल्यानें, किं० शेत परिणतावस्थेंत पुष्ट होऊं लागल्यामुळें काळवटणें. २ आजाऱ्याच्या शरीरांत शक्ति येऊं लागून त्याचा पिकुटलेपणा किं० अशक्ततजन्य फिक्केपणा जाऊं लागणें व तें कांहीं काळें दिसूं लागणें.

काळा पु० विंचा म्हणून जें फळ आहे त्यास संकेतानें म्हणतात.

काळा[सं०काल] वि०कज्जलाच्या रंगासारखा; रात्रीच्या रंगासारखा; कृष्णवर्ण. ॰ **काळें करणें, तोड काळें करणें** १ चालतें होणें, निघून जाणें; दृष्टिपथाच्या आड किं० बाहेर होणें किं० जाणें. २ छपून बसणें, पळून जाणें, नाहींसें होणें. (हा वाक्प्रचार लांच्छनव्यंजक आहे). **काळ्याचे पांढरे होणें** काळे असलेले केश पिकणें म्ह० वृद्ध होणें; म्हातारें होणें. **पांढऱ्याचे काळे होणें** म्हाताऱ्यानें तरुणासारखे चार चार करूं लागणें. **काळगला** वि० अंगकांतीनें थोडासा कृष्णवर्ण. **काळजिभ्या** वि० १ ज्याचें अभद्र भाषण खरें होतें असा. २ ज्याच्या तोंडांत नेहेमीं शापाचे किंवा शिव्याचे अभद्र शब्द असतात तो. **काळटिक्या** वि० ज्याच्या अंगावर काळे ठिपके आहेत असा,–घोडा. घोड्याचे जे बाहात्तर दोष आहेत त्यांपैकीं हा एक आहे. **काळतोंड्या** वि० १ अपयशी किं० दुर्भागी जो कोणी तो. २ लांच्छन पावलेला; कालिमा लागलेला. **काळदांत्या** वि० ज्याचा एक दांत काळा आहे असा (अशा प्रकारचा मनुष्य पूर्वजन्मीं मांग असतो अशी समजूत आहे). २ दळभद्री, अपयशी. ३ काळजिभ्या (द्वितीयार्थी). **काळमांजर** न०ऊद; कांडेचोर. हा प्राणी उंसाची भारी नासाडी करतो. **काळमुखी** वि० १ काळें आहे तोंड ज्याचें असा, व काळे आहेत केश ज्याच्या तोंडावर असा,–घोडा (घोड्याचें हें एक अशुभ चिन्ह आहे). २ काळें आहे मुख जिचें अशी,–गुंज, लेखणी, इ०.**काळमुख्या** वि० दळभद्री, अपेशी, फुटक्या नशीबाचा. **काळरात्र** स्त्री० शपथ घ्यावयाच्या वगैरे गंभीर प्रसंगीं रात्रीलाच ती अधिक उग्र वाटावी म्हणून म्हणतात; उ० काळरात्र पडली तरी मी खोटें बोलणार नाहीं. **काळसर** वि० काळगेला; थोडासा काळा. **काळसांवळा, काळासांवळा** वि० फार काळा नव्हे व फार गोरा नव्हे असा;मध्यमवर्णीय.(काळसर माणसास प्रायः प्रेमानें किंवा गौरवानें हा शब्द लावतात). **काळा उन्हाळा** पु० १ ऐन उन्हाळा, भर उन्हाळा, अति तापद उन्हाळा. चैत्र, वैशाख व ज्येष्ठ या मासांत उन्हाळ्याचा भर असतो, त्यावेळीं शेतीही कांहीं नसते, त्यावरून लक्षणेनें २ अति तापद व हालाखीची वेळ; अति अडचणीचा काळ; उ० या काळ्याउन्हाळ्यांत तूं मजजवळ पैसे मागतोस ते मी तुला कसे देऊं ? **काळाकभिन्न, काळाकभीन,** वि० अतिशय काळा (भीषण दिसणारा). **काळाकरजत, काळाकरंद, काळाकिट्ट, काळाकीट, काळाकुट्ट, काळाकूट, काळागढ्ढ** वि० अतिशयित काळा. यांतल्या कांहीं शब्दांतील काळा याचें द्वित्व करूनही

शब्दरचना करतात, –जसें, **काळाकाळाकुट्ट. काळा कुडा पु०** एक औषधी झाड. या झाडाच्या काळा कुडा आणि तांबडा कुडा अशा दोन जाति आहेत. **काळाकुळकुळीत वि०** काळा व सतेज, चकचकीत. हा शब्द प्रायः केशांस लावतात. **काळाखापर, काळाढुस्स, काळाढोण, काळाभिल्ल, काळाभील, काळामसकूट, काळामांग, काळामिसकूट, काळाविख वि०** भिल्लासारखा, मांगासारखा, खापरासारखा, मशीसारखा, इ० काळा. हे सर्व शब्द तिरस्कारव्यंजक आहेत. यांतील कांहीं शब्दांतील काळा याचें द्वित्व करूनही ते वापरतात,– जसें, **काळाकाळाढुस्स, काळाकाळाढोण. काळा-गोरा वि०** काळा किंवा गोरा; ज्याचें विशिष्ट रूप ठाऊक नाहीं असा; ज्याच्यासंबंधानें आपणास कांहींच माहिती नाहीं त्याच्याविषयीं बोलतांना ह्या विशेषणाचा प्रयोग नकारार्थ वाक्यांत केला जातो; उ० तो काळा गोरा कसा तो मला मुळींच ठाऊक नाहीं; त्याच्याविषयीं मी काय मत देऊं ? **काळांचरें, काळांचळें न०** एक जंगली फूल. **काळांजनी वि०** ज्याच्या उरावर एक काळा ठिपका किं० डाग आहे असा, – घोडा. अशा घोड्याच्या मालकाचा घात होतो अशी समजूत आहे. **काळाठिक्कर वि०** कांहीं गुन्हा केल्यामुळें लज्जेनें तोंड उतरून जाऊन त्याच्यावर पसरते जी कालिमा तद्विशिष्ट; निस्तेज; तेजोहीन; (क्रि० पडणें, होणें). याच अर्थी 'पांढराफटफटीत' याही शब्दाची योजना होते ! **काळा तीळ पुं०** काळा तीळ. **काळादगड पु०** सह्याद्रि ज्या विशिष्ट खडकाचा बनलेला आहे तो खडक किं०त्यांतील फत्तर. यास **कार, काळेभिंवरी, काळवंथरी,** अशीं अन्य नांवे आहेत. दक्षिणेंत हाच खडक आढळतो. **काळा-निळा वि०** १काळसरनिळसर; तरवारींचें पातें ज्या वर्णाचें असतें त्या वर्णाचा. २ रागानें अंगाची लाही झाली असतां प्रायः काळभर वर्णाच्या लोकांच्या तोंडावर येतें जी छटा तद्विशिष्ट; उ० वसन्तराव भलतें बोलूं लागला तेव्हां गोदी रागानें काळीनिळी झाली. **काळा फत्तर पु०** १ सह्याद्रि ज्या विशिष्ट खडकाचा बनला आहे तो किं०त्या खडकांतील जो दगड तो. २ (लक्षणेनें) शुद्ध दगड, अडाणी, मूर्ख.

काळाबाळा, काळाबाहळा वि० कांहीं काळे आणि कांहीं पांढरे पट्टे ज्याच्या अंगावर आहेत असा (बैल, कुत्रा, इ०) **काळाबेरा, काळाबेंद्रा, काळाबिद्रा वि०** काळा आणि बेढब; काळा आणि विद्रूप. **काळाबोळ पु०** एक औषधी वनस्पति किंवा तिचें फळ. हें बाळंतिणीस अति उपयोगी आहे. **काळाभोर वि०** अतिशय काळा, गडद काळा; हा शब्द चांगल्या अर्थानें योजितात. **काळा-काळाभोर** असेंही अन्य विशेषण वापरतात. **काळामुरूम पु०** मुरमांतील एक भेद. (मुरूम ही एक खडकाची जाति आहे). **काळासांवळा वि०** मागें ' काळसांवळा 'पहा. फार काळा नव्हे, फार गोराही नव्हे असा. **काळासावा पु०** काळ्या रंगाचा सावा. **काळीकाठी स्त्री०** एक औषधी. **काळीकांब स्त्री०** १ काळ्याकुट्ट व घन मेघांची पंक्ति (क्रि० येणें, जमणें, उठणें, विरणें, फांकणें). २ (लक्षणेनें) काळ्याकुट व उघड्या कुणब्यांची जेवतांना वगैरे बसलेली रांग किं० पंगत. **काळीगुळी स्त्री०** गुळी म्हणून काळा रंग करण्याच्या कामीं उपयोगी असें एक द्रव्य. **काळी जिरीं स्त्री०** कडू कारळी. **काळी तेरी स्त्री०** काळें अळूं. **काळीधार स्त्री०** समुद्राची परम मर्यादा, जिच्यापुढें कांहीं दिसत नाहीं किं० दृष्टि पोंचत नाहीं. **काळी पानवेल स्त्री०** पानवेलीची एक जात. हिचें पान पेपरमिंठासारखें स्वादिष्ट व झणझणीत असतें. **काळीप्रजा स्त्री०** कृषिकर्मोपजीवी जे शूद्र ते. **काळी भिंत स्त्री०** उत्तरेस जेथपर्यंत मनुष्याचें गमन होतें तो सीमाप्रदेश. **काळीमाशी स्त्री०** माशीची एक जात. ही व्रणादिकांवर व मरणोन्मुख जनावरांवर बसते. **काळीरात्र स्त्री०** अतिशय काळीरात्र; (गंभीर प्रसंगीं रात्रीस उद्देशून म्हणतात). **काळी किं०काळीशिळी रात्र स्त्री०** ज्या वेळीं सर्वत्र सामसुम असतें, व ज्यावेळीं कोठूनही मदतीची अपेक्षा नसते अशी अडचणीची किं० संकटाची वेळ; उ० तम्ही सोन्यांत पैसे घाला, कारण सोनें काळ्या रात्रीं उपयोगी पडणारें आहे. **काळीसाळ स्त्री०** तांदुळाची एक जाति. **काळें अळूं न०** अळवांतील एक भेद. **काळें अक्षर न०** लिखाण; जें लिहिलें तें; कागदावर नमूद केलेला विचार. **काळेकेश पु० अ० व०**

तारुण्यावस्था; उमेदीचें वय. याच्या उलट **पांढरे किंवा करडे केश**; उ० काळे केश आहेत तोंवरच मनुष्य कांहीं पराक्रम करूं शकतो. **काळें खापर न०** १ अतिशय काळ्या माणसास तिरस्कारानें म्हणतात. २ ज्याची फार बदनामी झाली आहे असा मनुष्य. ३ फार दिवसांच्या आजारानें काळवंडलेला माणूस. **काळें जिरें न०** काळ्या जिऱ्याचें बी. **काळें जिरं न०**कडू कारळें. **काळें ढवळें न०** काळेंबेरें; कुकल्पना; कुत्सित विचार; पाप **काळें तेरें न०** अळवांतील एक भेद. **काळें तोंड न०** १ आपल्या पणतूचा मुलगा. २ कलंकित चेहरा. **काळेथर वि०** दगडांत एक जाति आहे त्या जातीचा दगड; काळोत्री (दगड). **काळेथर धोंडा कि० दगड पु०** मागें ' काळा दगड ' पहा. **काळें पाणी न०** १ समुद्र. २ हद्दपारीची शिक्षा (सरकारनें दिलेली). ३ नोकरीचें फार लांबच्या पल्ल्यावरचें ठिकाण. **काळें पान न०** काळें पानवेलीचें जें पान तें. **काळें बुबूळ न०** डोळ्यांतील जो काळा भाग तो (त्यांतील बाहुलीसह); यास नुसतें **बुबूळ** देखील म्हणतात. **काळेंबेरें न०** पुढें ' काळेंभेरें ' पहा. **काळेंभिंवरी स्त्री०** काळा, आणि कठिन अशा खडकाचा सह्याद्रि झाला आहे; त्याचा जो फत्तर तो. यास **कार, काळेंथरदगड, काळवंथरी**, अशीं अन्य नांवें आहेत. **काळेंभेरें, काळेंबेरें, काळेंभेळें न०** १ कुकल्पना; कुत्सित विचार; पाप. २ लुच्चेगिरी, लबाडी, बिंग; कोणतेंही बेकायदा किंवा लांच्छनास्पद कृत्य. ३ दुसऱ्या माणसासंबंधानें मनांत आलेली प्रतिकूल कल्पना. **काळें मांजर न०** ऊद, कांटेचोर. **काळेंमीठ न०** १ पादेलोण. २ खाऱ्या मातीपासून काढलेलें मीठ. **काळ्या डोईचें मनुष्य न०** हा मनुष्यच आहे पण इतर जीवांपेक्षां याचे ठायीं अद्भुत ज्ञान आणि शक्ति आहे, इ० प्रकार एकाद्याचें वर्णन करावयाचें असतां योजितात.

काळाई स्त्री० १ कांसार लोक, इ० कालिकेस म्हणतात. २ जमीन (शेतकऱ्यांत); उ० यंदा काळाईनें हातचें सोडलें, म्ह० अवकृपा केली.

काळांचणी स्त्री० चिंता; हुरहुर; विवंचना.

काळांतरानें, कालांतरानें क्रि० वि० काळवशानें; कालेंकरून; पुष्कळ दिवसांनीं.

काळापात पु० १ दुसऱ्याच्या पैशाचा लबाडीनें अपहार करणें. २ दुसऱ्याला बुडवून पळून जाणें; लोकांचे पैसे लाटून काळें करणें.

काळिका, काळिकाई स्त्री० मागें ' कालिका ' पहा. उग्र स्वरूपांत कालिका देवीची म्ह० दुर्गेची मूर्ति.

काळिंगण न० कलिंगड.

काळिमा [सं० कालिमन् पु० काळेपणा] **स्त्री०** मागें ' कालिमा ' पहा.

काळी स्त्री० कालीदेवी.

काळी [म० काळी] **स्त्री०** १ (शेतकऱ्यांत) शेताची जमीन; उ० काळी पिकली म्हणून पांढर वांचली (म्ह० शेतें चांगलीं पिकलीं म्हणून गांव किंवा गांवांत राहणारे लोक वांचले). २ ढीस (ती काळी असते म्हणून). ३ शेतांतून काढलेलीं पिकें समुच्चयानें. ॐ**ज्याचे घरीं काळी त्याची सदा दिवाळी** जो ढीस बाळगतो त्याची दुथादुभत्याची चंगळी असते. त्याला सत्वस अन्न खावयाला सांपडतें. **काळींचा पैका कि० वसूल पु०** शेतावर बसविलेल्या साऱ्याचें सरकारी उत्पन्न.

काळीज [**हिं०** कलीजह्] **न०** १ हृदय (हें शरीरांतील अत्यंत नाजूक स्थान होय). २ (लक्षणेनें)मर्मस्थान. ३दया, माया. ४अन्तःकरण. ॐ**उलट्या, कि० उफराट्या काळजाचा वि०**ज्याला दया, माया, कांहीं नाहीं असा. **काळीज उडणें** हृदयाची श्वसनक्रिया चालू असणें. **काळीज उडणें, उडूं लागणें, उडून जाणें, कांपणें, थरथरणें, धडकणें, धडधडणें** भीतीनें वगैरे छाती उडूं लागणें; उरांत भीतीनें वगैरे धडकी भरून तें वेगानें खालीवर होऊं लागणें. **काळीज काढून टाकलें तरी विश्वास येणार नाहीं** हृदय,—जें सर्व विचारांस प्रसवतें,— जरी फाडून उघडें केलें म्ह० जीव तोडून जरी सांगितलें तरी विश्वास किं० खात्री, पटणार नाहीं. **काळीज काढून देणें** अत्यंत आवडती वस्तु बहाल करणें (म्ह० एखाद्यावद्दल वाटेल तें करावयास तयार असणें). **एखाद्याचें काळीज त्याला खाणें** त्याला कृतकर्माबद्दल पश्चात्ताप वाटणें. **काळीज पाठीमागें**

असणें किं० **टाकणें** कशाचीही कदर किं० दिक्कत नसणें; उलट्या काळजाचा असणें. **काळीज फाटणें** किं० **फुटणें, काळजानें धीर सोडणें** किं० **ठाव सोडणें** भीति, दुःख, आश्चर्य, इ०-कांचा भयंकर धक्का बसून गलितधैर्य होणें किं० अगदीं आक्रांत होणें. **काळीज चरचरणें, काळजांत चर्र होणें** दुःख किं० भीति, ह्या भावनांनीं एकाएकीं धक्का बसणें किं० ह्यांचा आघात होणें; एकदम भीतीनें किं० दुःखानें धडकी बसणें. **काळजाला भोकें** किं० **घरें पडणें** अत्यंत दुःखी होणें; दुःखाच्या आवेगानें मन होरपळून जाणें; तीव्र दुःखानें व्याकूळ होणें. **काळजाचें पाणी होणें** दुःखग्रस्त, नष्टधैर्य, किं० हतोत्साह होणें. **काळजास फेस येणें** एखाद्या कामीं फार परिश्रम केल्यानें आंत थकून जाणें. **एकाद्याच्या काळजावर घाव घालणें** किं० **डाग देणें** त्याला मर्मभेदक भाषण बोलणें; त्याला अत्यंत दुःख होईल असें कृत्य करणें. **काळजाला लागणें, भिनणें** किं०**झोंबणें** अत्यंत दुःखदायक किं०पीडाकारक होणें; अतिशय बोचणें किं० टोंचणें. **एकाद्याचा काळजीं कांटा करणें** किं० **धरणें** त्याला फार फार जपणें;त्याची प्रेमानें निगा राखणें. **एकादा पदार्थ** किं० **माणूस साता काळजाचे पलीकडे ठेवणें** त्याला अत्यंत जपणें; त्याची फार काळजी घेणें. **काळजाचा** किं० **काळिजाचा घड पु०** जिवाचा कलिदा किं०कलीजा; अत्यंत प्रियकर माणूस; अत्यंत आवडीचें मनुष्य.**काळजाचा बोका पु०** (खाटकांत) हृदय. **काळीजकठिण वि०** हृदय ज्याचें कठिण किं० कठोर असा; क्रूर;

काळुंखी स्त्री०१अंधार.२ काळेपणा.३ लांच्छन; कालिमा.ꕥ**काळुंखी रात्र स्त्री०** जींत चन्द्र नसतो अशी रात्र किं० असा रात्रीचा भाग; अंधारी रात्र.

काळुंदरा काळुंद्रा, वि० उंदरासारखा काळा; काळाबेंद्रा; (कृष्णवर्णाचा तुच्छतेनें उल्लेख करावयाचा असतां योजतात); उ० त्या काळुंद्र्या ठकीशीं मी नाहीं लग्न करणार !

काळें [**म**०काळा]**न**० लांच्छन, बट्टा, डाग, कलंक. ꕥ ०च्यामुळें **तोंडास काळें लागणें** ०च्यामुळें नांवास बट्टा लागणें; अपकीर्ती होणें. ०च्या; **तोंडास काळें लावणें** त्याला बट्टा लावणें त्याला खालीं पहावयास लागेल असें करणें.

काळेंकरून [**म**० काळ] **क्रि० वि०** कालान्तरानें; कालावधीनें.

काळेला वि० काळसर; काळवेला; किंचित काळा.

काळेश्वरी स्त्री० दुर्गादेवी; श्रीपार्वती; काली.

काळेली, काठली स्त्री० काळा सावा (एक धान्यविशेष).

काळोकाळ क्रि० वि० १ मागें ' काळःकाळ' पहा. २ वारंवार; पुनः पुन; फिरून फिरून. अकरणरूपी प्रयोग); उ० बाबासाहेब, आत्तां मला शंभर रुपये द्याच, मी काळोकाळ खचीत मागावयाचा नाहीं.

काळोख पु० अंधेर. ꕥ**काळोखं नेऊन दिवसास वाळत घालणें** अशक्य गोष्ट करावयास प्रवृत्त होणें; मूर्खासारखें कांहींतरी करूं लागणें; अशक्य गोष्टीला हात घालणें. **काळोखभेट स्त्री०** अति गडद अंधार. **काळोखापाख पु०** महिन्याचा कृष्णपक्ष.

काळोखी (–की) स्त्री०१ अंधेर; अंधःकार; ढग आल्यामुळें जी अंधारी प्रसृत होते ती.२ पित्त-क्षोभादिकांमुळें डोळ्यांवर येतें तें पटल; अंधेरी. ३ कालिमा, लांच्छन, कलंक, डाग. ꕥ**काळोखी रात्र स्त्री०** कृष्णपक्षांतील रात्र,–ज्या वेळीं चन्द्र क्षितिजाच्या खालीं असतो; अंधारी रात्र.

काळोखें न० काळोख; अंधकार.

काळोटा पु०१काळें खबूतर.२ एक पक्षिविशेष.

काळोतरी, काळोत्री, काळोथरी वि०काळा, टणक,आणि मजबूत असा(फत्तर). सह्याद्रिचा फत्तर जसला आहे तसला.

कांक्षा [**सं०**] **स्त्री०** १ इच्छा; मनीषा; अभीप्सित. २ मनाचा कल, ओढा. ३ अपेक्षा. ४ एकाद्या विधानावर काढलेली शंका किं० हरकत.५ विचित्र किं० विलक्षण कल्पना. ६ विकल्प, किंतु.

कांक्षावणें [सं० कांक्षा] **अ० क्रि०** शंकित होणें; अवंकणें; कचरणें.

कांक्षित [**सं०**] **वि०**१ इच्छित; अभीप्सित. २ अपेक्षित.

कांक्षी [सं०] वि० (समासांत अंत्यपदी) इच्छिणारा; अपेक्षिणारा. (**कांक्षिणी** स्त्री०वि०)

कांक्षेखोर [सं०कांक्षा+फा०खोर (खुर्दन)] वि० १ सदा शंका बाळगणारा; पदार्थमात्राकडे कांत्मिन दृष्टीनें किं० शंकित वृत्तीनें पाहाणारा; किंतू बाळगणारा; विकल्पी; चिकित्सक. २ छांदिष्ट, तर्हेवाईक.

किं [सं०] अ० समासाच्या प्रारंभीं हा शब्द क. म्ह० वाईट या अर्थी योजितात. ॐ**किन्नर** पु० १ कुरूप माणूस. २ अश्वाचें मुख व माणसाचें शरीर असा बनलेला प्राणिविशेष किं०त्यांची जाति.यांचें पुराणान्तरीं वर्णन आढळतें. हे देवांचे गवई होत. **किन्नरी** स्त्री० १ किन्नर स्त्री. २ एक मुखवाद्य. **किंपुरुष** पु०१ नीच, अधम, तुच्छ माणूस. २ किन्नर (द्वितीयार्थी). **किंप्रभु** पु० वाईट धनी. २ प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष्य करणारा राजा. **किंसखा** पु० योग्य सला न देणारा मित्र; योग्य नियंत्रणा न घालणारा मित्र.

किं० [सं०] **सर्वना**० कोण ? काय ? याचा प्रयोग प्रायः बहुव्रीहि संस्कृत समासीं होतो; उ० किंकर्तृक म्ह०कोण आहे कर्ता ज्याचा ? म्ह० कोणी केलेलें?किंप्रयोजनक म्ह०काय आहे प्रयोजन ज्याचें? म्ह०कशासाठीं ? इ०इ०. ॐ **किंकर** पु० कांहीं तरी करणारा म्ह० नोकर, सेवक, भृत्य. **किंकरा** स्त्री० दासी. **किंकरी** स्त्री० नोकराची बायको. **किंकर्तव्यतामूढ** वि० काय करावें याविषयीं साशंकवृत्ति झालेला; स्तंभितमति झालेला. **किंच** अ० शिवाय; आणखी असें कीं. **किंचन** अ० थोड्याबहुत अंशानें किं० प्रमाणानें. **किंचित्** वि० थोडेसें; क्रि० वि० थोड्या प्रमाणांत. **किंचिज्ज्ञ** वि० जीवात्मा. याच्या उलट **सर्वज्ञ** म्ह० परमेश्वर. **किंचित्कर** वि० थोडेंबहुत करणारा ;थोडाबहुत उपयोगी पडणारा (मनुष्य). **किंचिद्दान** न० चातुर्मास्यादिकालीं नियमशः आठ मुठी धान्याचें ब्राह्मणास दान देतात तें. **किंतु** अ० परंतु; तत्रापि. पु० विरुद्धार्थाविषयीं संभावना; विकल्प; संदेह; कांक्षा. या शब्दाचें मराठींत **किंतू** असेंही रूप आहे (क्रि० येणें, बाळगणें, शिवणें). **किंनिमित्त** अ० कशाकरतां ? कशासाठीं ? कोणत्या उद्देशानें ? **किंबहुना** अ० १ फार काय सांगावें पण; एखाद्या विधानाचें किं० सत्याचें गुणाधिक्य किं० श्रेष्ठतरता जोरदार किं० आलंकारिक रीत्या सांगावयाची असतां गुणाधिक पक्षान्तराची संभावना करून किं० उपमा देऊन योजितात; उ० स्वधर्मांत कितीही उणीवा अगर अडचणी सोसाव्या लागल्या तरी त्या पथकरल्या, किंबहुना त्यांत मरण ओढवलें तरी पथकरलें, पण परधर्माचा विटाळ नको; तो आपण भयावहच मानला पाहिजे. २ बहुतकरून (पक्षान्तराची ज्यास्त संभाव्यता दर्शवावयाची असतां योजितात; हा अर्थ अधिक व्यावहारिक मात्र असून पहिल्या अर्थाहून कमी जोरदार व आलंकारिक असतो); उ० माणकीस सासरीं जावयाची घाई होती, किंबहुना ती एव्हांना गेलीही असेल. **किंभाव** वि० (कवितेंत) कोणता अर्थ, सार्थकता, लाभ, किं० फल, आहे ? (' कांहीं नाहीं ' या अर्थी). **किमर्थ** क्रि० वि० काय म्हणून ? कशासाठीं ? **किमपि** क्रि० वि० इषन्मात्र देखील;यत्किंचित् सुद्धां,कांहाही;(नकारार्थी प्रयोग). **किंवदंती** सं० लोकवार्ता; अफवा. **किंवा** अ० अथवा, अगर. (हें पक्षांतराचें द्योतक असून उभयपक्षांचें मध्यें याचा प्रयोग होतो); उ० हिरावाईचें लग्न तरी करा किंवा तिला शिकवा, पण अशी रिकामी ठेवूं नका.

किंक स्त्री० भयादिकानें बारीक, उंच आवाजानें मारलेली आरोळी; किंचाळी. ॐ**आस्वलाआधीं किंक फोडावी** आस्वल किंचाळी फोडून आपल्या अंगावर धावून यावयाच्या अगोदरच आपण किंचाळी फोडली असतां तें भिऊन पळून जातें.

किंकट, किंकट [सं० कीकट] वि० रानटी, गलिच्छ, रोगट, नापीक असा (जो प्रदेश तो).

किंकर पु० १ हत्तीचें किंकाळणें, ची ची असा ध्वनि करणें. २ अनेक हत्तींचें एकदम किंकाळणें.

किंकणी [सं०किंकिणी]स्त्री०१ घुंगुर(बैलांच्या गळ्यांत बांधतात तें.)२घागरी(तोरड्यांना असते ती) **किंकणी** स्त्री०एका झाडाची बी.ॐ**किंकणेल** न० किंकणीचें तेल.

किंकणी स्त्री० किंकाळी.

किंकर स्त्री० देवबाभळ.

किंकरें न० १ सुताराचें एक हत्यार; एक

प्रकारची पटाशी. २ लहान मुलांचें एक नाद करणारें खेळणें; किरकिरें.हें लाकडाचें असून हातीं धरून फिरविलें असतां करकर वाजतें.

किंकळणें, किंकाळणें, किंकाटणें [म०किंक] अ० क्रि० १ हत्तीनें ची, ची, असा शब्द करणें किं० ओरडणें. २ मनुष्यादिकानें आरोळी मारणें किं०ठोकणें (बारीक आणि उंच सुरांत); किंचाळणें.

किंकळी, किंकाळी स्त्री० बारीक आणि उंच स्वरांत मारलेली आरोळी; ही अर्थातच आगगाडीच्या शिट्टीसारखी कर्कश असते; (क्रि० फोडणें, मोकलणें).

किंकिणी [सं०] स्त्री० १ चिमकुली घंटा; घागरी. २ घुंगुर. ३ घागऱ्या असलेला कंबरपट्टा.

किंक्रांत [म० 'संक्रांत' चें पालटलेलें रूप] स्त्री० सूर्य ज्या दिवशीं मकर संक्रांतींत किंवा कर्क संक्रांतींत शिरतो त्याच्या पुढचा दिवस; ह्या दिवसाला 'संक्रांतीची कर' असाही शब्द आहे; हा दिवस अशुभ मानलेला आहे.

किंगरी स्त्री० एक मुखवाद्य. भिकारी वगैरे हें वाजवून भिक्षा मागतात.

किच्चकट वि० १ जें फारसें महत्वाचें नसतें, व त्याच्या फलद्रूपतेच्या मानानें त्यांत उपस्थित होणाऱ्या क्षुल्लक व लहानसहान बाबीं किंवा भानगडीं यांची जिकीर आणि दगदग मात्र ज्यास्त पडते असें त्रासविणारें आणि चेंगट जें काम तें.

किचकिचणें अ० क्रि० १ वानरानें दांत चावून ओरडणें किं०शब्द करणें. २पिंगळ्यानें शब्द करणें.

किचाकिचीत वि० भात इ० पुरता न शिजल्यामुळें किंवा त्यांत दगडाची कचकच असल्यामुळें दांतांवर चावतांना ज्याचा शब्द होतो असा (भात इ० पदार्थ).

किचड [हिं०कीचड्] न०पु०चिखलट जमीन.

किचर, किचरट वि० ज्यामध्यें लहानसहान खटपटी आणि भानगडी अनेक असतात असें त्रासदायक आणि वेळ मोडणारें (काम); किचकट.

किचवटणें, किचवंदणें, किचविंदणें स० क्रि० चिवडणें व बिघडविणें; डिवचणें; डिवचून बिघडविणें.

किंचळणें, किंचाळणें अ० क्रि० किंकाळणें; किंकाळ्या मारणें.

किचाटें न० मागें 'कचाट' पहा.

किचाटी स्त्री० मागें 'कचाटी' पहा.

किचाटी, कचाटया वि० कचाटें करणारा; अनेक खटपटी आणि लटपटी करणारा.

किंचाळणें अ० क्रि० मागें 'किंचळणें' पहा.

किचिबिची स्त्री० पिंगळा चार प्रकारचे शब्द काढतो त्यांतील एक. (कु, की, किलबिल, आणि किचिबिची,हे ते शब्द).

किजबिज स्त्री० किलबिलाट (पक्ष्यांचा).

किजबिजणें अ० क्रि० किलबिल करणें.

किजबिडीत, किचबिडीत, किजबीड, किचबीड वि० १ वांकडें तिकडें, एकांत एक लिहिलेलें (अक्षर), किंवा अशा प्रकारें लिहिलेली (पोथी). २ ओबडधोबड, खडबडीत, वांकडें-तिकडें (नक्षी इ० सारखें काम). **गिचमिडीत, गिचमीड** असे यास अन्य प्रतिशब्द आहेत.

किंजल, किंजल्क [सं०] पु० पुष्पांतील जे केसर ते प्रत्येक; फुलांतील तंतु.

किंजळ पु०, स्त्री० एक वन्य वृक्ष. पु० तांदुळाचा एक प्रकार; साळींतील एक भेद.

किंजुरा पु० एक झाड.

किटण [सं० किट्ट=मळ, विष्ठा] न० १घामानें किं० तेलानें शरीर,वस्त्र,टोपी, इ०वर किं०तैलपात्र इ० कांवर बसतो जो चिकट मळाचा थर तो. २ गुडगुडीची नळी इ० कांत जमतो जो चिकट मळाचा लेप तो. ३ कुजलेलें जें शेण, लीद, इ० तें. ४ क्षारादिकानें गंजून मृत्तिकाप्राय झालेले लोखंडावरील पापुद्रे. ५ विटा, कौलें, इ० अति भाजल्यामुळें त्यांवर जे दगडासारखे टणक थर येतात ते. ६ लाल केलेल्या लोखंडांतून निघते ती ठिणगी.

किटणें [सं० किट्ट, म० किटण] अ० क्रि० १ वस्त्र, शरीर, भांडें, इ० मळानें लिप्त होणें. २ लोहादि धातूंवर गंज चढणें. ३ (लक्षणेनें) प्रायः कान, हात, आणि दांत,या इंद्रियांस तत्तद्विषयरूप कर्मांचा अतिशयित संस्कार झाल्याकारणानें त्यांविषयीं तत्तदिन्द्रियानें कंटाळणें; उ० हिचें गाणें ऐकून माझे कान किटले; उ० भागतां मागतां माझे दांत किटले;उ०या पोरास मारून मारून माझे हात किटले.

किटा पु० खैर इ०कांची जळाऊ फोडीव जीं लांकडें किं० त्यांचे ओंडके ते.

किटाड, किटाण न० किटण.

किटाळ, किठळ न० १ तृण, काटक्या, वगैरेंची रास जळत असतां त्यांतून तृण, काटक्या, इ० ज्या वर उडतात त्या. २ हानि व्हावयाजोगें एखाद्यावर येतें जें नसतें किं० खोटें दोषारोपण तें; (क्रि० येणें, आणणें).

किटेला कोमेला[म० किटणें+कोमेजणें] **वि०** मळकट आणि रुक्ष; ओंगळ आणि म्लान; कुरूप; सुरकुतलेला (वृद्ध मनुष्य, झाड, फळ, इ०).

किट्ट [सं०] **न०** १ मळ. २ विष्ठा.

किडका वि० कीड लागलेला; किडलेला; नासका, सडका, कुजका. हा शब्द लक्षणेनेंही योजितात; उ० तुझ्या किडक्या डोक्यांतले विचार सांगत बसूं नको.

किडकालें, किडकुं न० कीड, जंतु, आळी.

किडकिडीत वि० रोड; हाडकुळा; बारीक; सडपातळ.

किडकोळा वि० १ ज्यास कीड लागावयाचा संभव आहे असें. २ किडलेलें. ३ (लक्षणेनें) खरजुडा; खरूज झालेला.

किडकुल न० १ सर्पांच्या जातीचा कोणताही बाल्यावस्थेंतील प्राणी. २ गांडुळ, सुरवंट, इ०प्राणी.

किडखाद वि० किडीनें खाल्लेला; किडलेला.

किडणें अ० क्रि० कीड लागणें किं० किडीनें खाल्लेलें असणें; कीड लागून नासणें.

किडबिडीत, किडबीड वि० मागें ' किजबिडीत ' पहा.

किडमाकडा वि० चिकू; कंजूष; कृपण.

किडमिडा वि० १ अस्वच्छ किं० अस्पष्ट (भाषण). २ अति बारीक आणि विरूप किं० हिडीस (पदार्थ).

किडमिडें न० कुडमुडें; डमरूं (माकडांचा खेळ दाखविणारे लोक किं० भविष्य सांगणारे लोक वाजवितात तें).

किडमुंगी, कीडमुंगी स्त्री० किडे, मुंग्या, इ० सर्व कृमिकीटक समुच्चयानें; उ० राजकन्येस बापानें इतक्या बंदोबस्तांत ठेवलें होतें कीं तिच्या महालांत किडमुंगीसही रीघ मिळणें दुरापास्त होतें.

किडवळ वि० किडकें; कीड लागलेलें. **स्त्री०** न० कीड (प्राण्यांच्या त्वचेंत उत्पन्न होते ती).

किडवळणें अ० क्रि० १ फलादिक किडकें होणें. २ भात इ० पदार्थ अग्निसंयोग सारखा न झाल्यामुळें नासणें.

किडा[सं०कीट]**पु०**क्षुद्र जंतु.※**एकाद्या माणसांत किडे पडणें** तो अनीतिमान होणें;तो दुर्वर्तनी होणें. **एकाद्या पदार्थांत किडे पडणें** १ तो नासून त्यांत किडे उत्पन्न होणें. २ तो फुकट जाणें. ३ तो निरुपयोगी होणें.

किडाळ न० ' किटाळ ' याचे १ व २ हे अर्थ पहा. ३ कुविचार, कुत्सित भावना, मनाचा प्रतिकूल ग्रह.

किडुकमिडूक [म० 'किडुक' याचे द्वित्व करून] **न०** १ बारीकसारिक दागिने समुच्चयानें; मोडके तोडके दागिने समुच्चयानें. २ हलकीसलकी चीजवस्त.

किडुक न० १ यःकश्चित् किडा किं० कृमि. २ लहान मुलांचे एक कर्णभूषण.

किडें न० जिवाणू.

किडेमारी, किडेमाऱ्या, किडेमारू वि०अत्यंत कृपण; कंजूष; लोभी.

किडेला वि० किडका; किडलेला.

किण [सं०] न० १ वण, घट्टा. २ लाकूड खाणारा किडा.

किणकिणी स्त्री० १ कणकणी (तापाची वगैरे). २ पाण्याच्या तुषाराचे जे कण ते प्रत्येक.

किणा [सं० किण] **पु०** १ वण, क्षत, घट्टा (क्रि० पडणें). २ कीड ज्यांत पडली आहे असें गळूं किं० अशी जखम.

किणा वि० ज्याच्या अंगावरील गळूं वगैरेंत किडे पडले आहेत असा.

किणी स्त्री० एक झाड.

किणें [सं० किण] **न०** घट्टा, वण, क्षत.

कितका [म० किती] **वि०** किती? केवढा?

※**कितकावा वि०** कितवा ?अनुक्रमानें कोणता?

कितक्यांदा क्रि० वि० १ कितक्या वेळां, किती वेळां. २ कितव्यांदा ? कितव्या वेळीं ?

कितपत [सं० कियत् परिमित] **क्रि० वि०** किती अंशानें ? कोणत्या प्रमाणांत ? हा शब्द प्रायः गुणपरिमाणासंबंधी पृच्छा करावयाची असतां योजतात; उ०विभाकर कितपत हुषार आहे ? उ०

चाकूला कितपत धार आहे ? याचे पुढील प्रयोग लक्ष्यांत धरण्याजोगे आहेत; १मुलगी कितपत आहे? (म्ह०किती सुंदर आहे ?); २स्थळ कितपत आहे ? (म्ह०स्थळ किती पतीचें किं० श्रीमंत आहे ?)

कितव [**सं०**]**पु०** १ लुच्चा; खोटें बोलणारा; ठक; भोंदू. २ जुगारी; द्यूत खेळणारा. ३ धत्तूरा. ४ एक प्रकारचें सुगंधी द्रव्य. ५ वेडा किं० माथेफिरू इसम. ६प्रियेशीं विश्वासघात करणारा नायक.

कितवा वि० [किती+वा (प्रत्यय)]**वि०** कोणत्या संख्येचा विषय असलेला ? उ० रामूची नापास व्हावयाची ही कितवी वेळ ?**॰कितव्यांदा क्रि० वि०** कितव्या वेळेला ?

किंतान, किंतन [**अ०** कितान्] **न०** एक प्रकारचें तागाचें वस्त्र.

किताब [**अ०** खताब्] **पु०**राजानें कोणेकास सन्मानार्थ दिलेली बहुमानाची पदवी.

किताब [**अ०** किताब्] **स्त्री०, पु०** पुस्तक.

कितावर [**अ०** किताबाह्] **स्त्री०** १ साध्या भाषेत सांगितलेली हकीगत. २ सांगावयाचा मजकूर तो हाच (पत्राच्या शेवटीं योजावयाची शब्दसंहति). ३ मानाची पदवी.

किती,कितीक [**सं०**कियत्] **वि०** १ कोणत्या संख्येनें परिमित ? २ कोणत्या प्रमाणानें परिमित ? ३ कितीतरी; उ० किती रावे असतलि तुझ्या धामीं! **॰किती एक,कित्येक वि०**विवक्षित समुदायांतून कांहीं,बरेंच,कितीतरी; पुष्कळ. **कितीतरी** संख्येनें किं०मानानें केवढें तरी;बरेंच,पुष्कळ. **कितींदा, कितीदा , कितींकदा क्रि० वि०** १ किती वेळां? २ कितीं तरी वेळां. **कितीशीक क्रि० वि०, वि०** (अडाण्यांत)किती ? केवढें ?

कित्ता [**अ०** कित्अह्] **पु०** १ अक्षराचें वळण लागण्याकरतां जाड, वळणशुद्ध, आणि नमुनेदार अक्षरांचा जो कागद गिरविण्याकरतां घेतात तो. २ (लक्षणेनें) नमुनेदार; अनुसरण्यास योग्य; स्वतांस शिक्षा लावून घेण्यास किं० वळण लावून घेण्यास लायक असा मनुष्य, वर्तन, करणीं, इ०;उ० सर्व दृष्टींनीं कित्ता घ्यावा असेंच शिवाजी महाराजांचें आचरण होतें. **॰कित्ता घालून देणें** अमुक गोष्ट अशा प्रकारें करावी इ० लेखद्वारां किं० वचनद्वारां किं० स्वाचरणद्वारां दाखवून देणें किं० विदित करणें.

कित्ता, कित्तां [**अ०** कित अह=खंड,तुकडा] **अ०** यादी, हिशेब, इ० लेखांत ज्या रकमा वगैरेंच्या विशेष संज्ञा किं० विशेष संबंध लिहिले जात नाहींत त्यांचा निर्देश करावयाची संज्ञा; सदरप्रमाणें. **॰कित्ताइसम न०** मोघम सदरांतील किं०संकीर्ण सदरांतील बाब. **कित्ताखर्च पु०**१ किरकोळ खर्च; जो विशिष्ट सदरांत घातलेला नाहीं किं० घालतां येत नाहीं असा खर्च. २ असा खर्च भागविण्यासाठीं बसविलेला कर. **कित्ताबाब स्त्री०**१ निर्दिष्ट न केलेली बाब. २ ज्यादा बाब. ३ कोणच्या कामीं हा पैसा योजावयाचा हें न कळवितां वसूल केलेली वर्गणी, पट्टी, कर, इ०. **कित्तावाटणी स्त्री०** एकादीं रक्कम खर्चास अपुरी पडली असतां तिची तूट भरून काढण्यासाठीं बसविलेला कर.

किंदरी रेघ स्त्री० जमाखर्चाच्या चोपड्या लिहिण्याच्या पद्धतींतील एक पारिभाषिक शब्द.

किनखाप, किनखाब [**फा०** कम्ख्वाब्] **पु०** एक जरीबुट्टीचें वस्त्र; रेशमाच्या कापडावर जरतारीचें काम केलेलें वस्त्र. **॰किनखापी वि०** किनखापाचा केलेला(अंगरखा,गादी, पडदा,इ०).

किनरा [**सं०** किन्नर] **वि०** १ बारीक पण उंच जो कंठस्वर तो.२ नाकांतील (बोलणें).

किनरी[**सं०**किन्नर]**स्त्री०**१ बारीक व उंच असा काढलेला कंठस्वर; किनरा स्वर. २ एक तंतुवाद्य.

किना पु०, किनें न०, किन्हें न० [**सं०** किण] १ व्रण, घट्टा, क्षत. २ अंत:करणाचा मायाळूपणा; दयार्द्रता; कींव.

किना वि० १ बधिर (त्वचा); घट्टा पडलेला. २ किडवळ ज्यांत उत्पन्न झाली आहे असें (गळूं, जखम, इ०).

किनार, किनारी [**हिं०**] **स्त्री०** वस्त्रांस रेशीम इ० कांचा, किंवा रेशीम इ० कांच्या वेलबुट्टीचा, जो कांठ घातलेला असतो तो.

किनारा [**फा०** किनाराह्] **पु०** १ कांठ, कड. २ समुद्राचा कांठ, सीमाप्रान्त (विशेष अर्थ).

किन्हेरा वि० मागें 'किनरा' पहा.

किन्ह्या पु० वांग्याच्या वर्गांतील एक झाड.

किपळा पु०, किपळी स्त्री० कपला, कपची; खपली; उडालेला किंवा उडविलेला दगड इ०चा तुकडा.

किफाईत, किफायत [फा०] **स्त्री०** व्यापारांत वगैरे होतो तो नफा, फायदा, कि० लाभ. ॐ **किफाइती, किफायती, किफायतशीर, किफाईतवार, किफायतवार वि०** नफा होईल असा; नफ्याचा; फायदेशीर; लाभ होण्यासारखा (व्यापार, पदार्थ); स्वस्त्या किंमतीस मिळालेला.

किंबरूं, किंवरें, किम्मरूं, किम्मरें न० ओंगळ पदार्थावर बसतात तीं अत्यंत सूक्ष्म पांखरें कि० घुंगुरटीं.

किमया [अ० कीमया=जादू] **स्त्री०,पु०** १ ताम्रादि हलक्या धातूंचें रसायनादिकांनी सुवर्णांत रूपान्तर करण्याची विद्या. २ (लक्षणेनें) ज्यापासून बहुत आणि निरंतरची द्रव्यप्राप्ति होते तें (मनुष्य, गुरूं, व्यापार, विद्या, यंत्र, औषध, इ०). ॐ **किमयागर पु०** किमया (प्रथमार्थी) जाणतो तो.

किमसान न० पिवळ्या रंगाचें चामडें. हें जोडे, छत, पडदे, इ० करावयाकरतां वापरतात.

किमान, किमानपक्ष (-क्षीं) क्रि० वि० अगदीं कनिष्ट पक्ष स्वीकारून; कमीत कमी; निदान.

किम्मत [अ० कीमत] **स्त्री०** १ मोल; कांहीं पदार्थ विकत घेतला असतां तन्निमित्त द्यावें लागतें जें द्रव्य तें. २ घेणारास द्रव्य द्यावें लागण्याजोगा जो त्या त्या पदार्थाचें ठायीं योग्यताविशेष असतो तो; पात्रता; महत्त्व; लायखी; उ० हा शाल दीडशें रुपये किंमतीचा कांहीं दिसत नाहीं; तुम्हाला दुकानदारानें फसविलें. द्वितीयार्थी या शब्दाचा लक्षणेनेंही उपयोग होतो; उ० एखादी गोष्ट नाहींशी झाल्यावरच तिची किंमत माणसास कळून येते. ॐ **मी त्याला किम्मत देत नाहीं** मी त्याला तुच्छ लेखतों; मी त्याला मुळींच महत्त्व देत नाहीं. **मला त्याची किंमत नाहा, मी काय त्याची किम्मत करतां** ? मला त्याची मुळींच दिक्कत, परवा, किं० मातब्बरी वाटत नाहीं. **तिची काय किम्मत, तिची काय किंमत आहे ? किं० लागून राहिली आहे?** तिची काय प्राज्ञा आहे ? **किंमतीचा वि०** मोलाचा; लायखीचा. **किम्मतवार क्रि० वि०, वि०** किंमतीसह; किंमती लिहून.

कियत् [सं०] **वि०** (प्रमाणानें किं० संख्येनें) किती ? याचा प्रयोग प्रायः समासीं होतो. ॐ **कियत्काल क्रि० वि०** किती वेळ पावेतों ? **कियच्चिर क्रि० वि०** किती दिवसपावेतों ? किती दीर्घकालपर्यंत ? **कियद्दूर क्रि० वि०** किती लांब ? किती दूर ? **कियत्परिमाण वि०** कितीपरिमाणाचें ?

किर [सं० किल=खरोखर] **क्रि० वि०** निश्चयें करून (कवितेंत मात्र). **कीर** ह्याचाही हाच अर्थ आहे.

किरकणें अ० क्रि० १ चिरकणें; हत्ती इ० कानें किंकाळणें. २ याचक, पोर, इ० कानें त्रास यावयाइतकी कटकट करणें, आरडणें, किं० पिरपीर लावणें.

किरकाडा वि० किरकोळ, काटकुळा, बारीक, हाडका, किडकिडीत.

किरकिटणें [म० 'खरखटणें' याचें रूपान्तर] **अ० क्रि०** अन्नलिप्त होणें (हात, भांडें, इ०); अन्नानें लडबडणें (हात, भांडें, इ०); हाताला किं० भांड्यांला खरकटें लागणें.

किरकिर, किरकीर स्त्री० १ घर्षणामुळें किर, किर, किं० कर्र, कर्र, असा ध्वनि उमटतो तो (कानशीनें लोखंड घांसलें असतां, किं० दाराच्या गंजलेल्या बिजागऱ्या, जुना पाळणा, इ० वाजतात त्याप्रमाणें; क्रि० वाजणें). २ याचक, पोर, इ०कांची हें दे, तें दे, अशाबद्दलची त्रास वाटायाजोगी सारखी कटकट, चिरचीर, पिरपीर (क्रि० करणें, लावणें, मांडणें). **क्रि० वि०** १ किर, किर, असा आवाज करून; कर्कशपणें. २ त्रास येईल अशी सारखी चिरचीर किं० पिरपीर करून (रडणें). ॐ **किरकिरा, किरकिऱ्या वि०** चिरचिरण्याचा किं० किरकिर लावण्याचा ज्याचा स्वभाव तो (याचक, पोर, इ०).

किरकिरणें अ० क्रि० १ कर्र, कर्र, किर, किर, वाजणें (दार, पाळणा, इ०). २ चिरचिरणें; किरकिर मांडणें (पोरानें, याचकानें, इ०).

किरकिरांत स्त्री० 'किरांत' याचें एक चमत्कारिक रूप.

किरकिरीत वि० चिरचीर लावणारें, असंतुष्ट, त्रासिक, चिडखोर, (पोर).

किरकिरें [म० किरकिर] **न०** पोरांचें एक

लांकडाचें खेळणें,—जें हातीं धरून फिरविलें असतां किरकिर वाजतें. हीं शिमग्यांत किं० जत्रेंत फार विकावयास येतात.

किरकिसा पु० लांकूड पोखरल्यामुळें वगैरे त्यांतून निघतो जो बारीक भुसा किं० कीस तो.

किरकी स्त्री० १ फिरकी. २ सोन्याच्या तारेचें वेटोळें (नथ वगैरे गुंफतांना घालितात तें). ३ मळसूत्राचा आकार किं०असा आकार ज्यावर कोरला आहे असा खांब, इ०.

किरकीट स्त्री० दातांवर दांत घासणें.

किरकोळ वि० १ सामान्य प्रमाणापेक्षां किं० विवक्षित प्रमाणापेक्षां कृश, बारीक (शरीर, काष्ठ, इ०). २ अशक्त, अधू, कमजोर, फाटक्या अंगाचा (मनुष्य). ३ (लक्षणेनें) साधारण, विशेष सुंदर नव्हे, असें माणूस. ४ यःकश्चित्; क्षुल्लक; महत्त्वाचा नव्हे असा; साधारण, हलका, बारीकसारिक; (मनुष्य, काम, बाब, इ०). ५ सामान्य, सटरफटर, अवांतर, जादा (जिनसा, गप्पा, प्रश्न, खर्च, इ०). ६ किरटा; बारीक; दूर ऐकावयास जात नाहीं व उंच चढत नाहीं असा कंठादि ध्वनि. ७ लहान किंमतीचें, हलकें (नाणें,—खुर्दा, चिल्लर, इ०कांत देतात तसलें). ८ लहान प्रमाणांत धान्यादि पदार्थ घेण्याचा किंवा विकण्याचा(जो व्यापार तो); घाऊक; एकठोक नव्हे असा. ९ लहान प्रमाणांत घेतलेला किंवा विकलेला किंवा विकावयास ठेवलेला. ॐ **किरकोळ प्राप्ति स्त्री०**१ अवांतर प्राप्ति. २ आडमिळकत. **किरकोळ भाव पु०** पदार्थ लहान प्रमाणांत विकत घ्यावयाचा किंवा द्यावयाचा असतां त्याचा ठेवितात तो दर. हा घाऊक मालाच्या दराहून अर्थातच अधिक असतो. **किरकोळ वसूल पु०** सरकारांत जमा झालेला पैसा, धान्य, इ०. **किरकोळ विक्री स्त्री०** १ माल लहान प्रमाणांत विकून मिळतात ते पैसे. याच्या उलट **घाऊक विक्री** किं० **ठोकविक्री**. २ लहान प्रमाणांत पदार्थादिक विकणें. **किरकोळ कागद पु०** किरकोळ बाबी ज्यांत नमूद केल्या आहेत असा कागद; किरकोळ बाबींचें टिपण. **किरकोळीनें क्रि० वि०** १ लहान प्रमाणांत पदार्थ विकत द्यावयाचा किं० घ्यावयाचा असतां. २ किरकोळीच्या म्ह० किरकोळ विक्रीच्या भावानें किं० दरानें. **किरकोळी स्त्री०** हरएक किं० नानाविध पदार्थांची रास.

किरखाद, कीरखाद स्त्री० कीर म्ह० पोपट यानें खाल्लेलें किं० चोंच मारलेलें फळ (पेरू, इ०).

किरखादणें स० क्रि० कीरानें म्ह० पोपटानें फलादिकांस चोंच मारणें किं० त्यांचा कांहीं भाग भक्षिणें. **स० क्रि०** आंबा, पेरू, इ० फल कीरानें डिवचलेलें किं० अंशतः भक्षिलेलें असणें.

किरटा वि० १ अत्यंत कृपण किं० अदत्तशिरोमणी जो तो. २ विशोभित दिसावयाजोगें बारीक रेघांचें (जें अक्षरादिक तें). ३ असें अक्षरादिक उठतें ज्या लेखणीनें किं० टांकानें तो. ४ कृश, किरकोळ, किडकिडित (काष्ठ). ५ अशक्त,—दूर ऐकूं न जाणारा किं० उंच न चढणारा (आवाज). ६ खुरटलेलें (फलादिक). ७ अधू, फटी असलेले, बारीक (दांत). ८ सत्त्वहीन; निर्वीर्य.

किरडी स्त्री० तिरडी.

किरडूं[म०किडा]न०सुतासारखा लांब किडा.

किरण [सं०] पु० सूर्य, चंद्र, तारे, दिवा, इत्यादींच्या प्रकाशाच्या (कल्पित) रेषा. २ हिरा, आरसा, अशासारखा उजेडाचें परावर्तन करणारा जो चकचकीत पदार्थ, त्यापासून प्रकाशाच्या इतस्ततः प्रसृत झालेल्या ज्या असंख्य ओळी त्या प्रत्येक; अंशु. **न०** सूर्याचें जें ऊन तें. ॐ**किरणजाल न०** किरणांचा समुदाय. **किरणमाली पु०** सूर्य.

किरदार [फा०] न० जमाखर्चाच्या चोपडींत मागल्या पानावरचे आंकडे, महिना, तारीख, इ० पुढच्या पानावर मागल्या पानाचा संबंध दाखविण्यासाठीं उतरून घेतात तो उतारा.

किरपाण[सं०कृपाण=तरवार]न० शीख वगैरे लोक धर्माज्ञा म्हणून जें शस्त्रविशेष नित्य जवळ बाळगतात तें.

किरमांडी वि० कद्रू, कंजुष, कृपण, चिकू.

किरमाणी ओंवा पु० ओंव्यांतील एक भेद.

किरमीज [सं० कृमिज] न० कृमींपासून रंग करण्याचे कामीं उपयोगी असा एक पदार्थ उत्पन्न होतो तो. ॐ**किरमिजी वि०** १ किरमिजाचा (रंग). २ किरमिजाचा जो रंग

ताद्विशिष्ट (वस्त्र वगैरे). **किरमिजी दाणा** पु० किरमिजाच्या रंगाच्या ज्या बारीक गोळ्या केलेल्या असतात त्या प्रत्येक.

किरवण [सं० कीर] स्त्री० नक्षीचें किं० वेलबुट्टीचें कोरकाम.

किरवणें, किरविणें [म० किरवण] स० क्रि० धातु, काष्ठ, माती, इ०कांवर कंगोरा, नक्षी, वेलबुट्टी, इ० कोरणें.

किरवंत पु० ब्राह्मणांत एक जाति आहे ती, किं० तज्जातीय ब्राह्मण तो.

किराविजणें अ० क्रि० भात, भाजी, इ० पदार्थ अग्निसंयोग सारखा न झाल्याकारणानें नासणें.

किरवें न० १ माशाचें खरखरीत चर्म,–जें काष्ठ इत्यादिकांवर तें घांसून गुळगुळीत करण्याच्या उपयोगीं येतें. २ खेंकडा. ३ किरिरें; बटवा, शिंकाळी, इ०च्या दोऱ्या आंवळावयाचा फास.

किरळ न० १ कोंवळ्या जोंधळ्यांत होतो तो एक क्षुद्र कृमि. २ हा जोंधळा गुरांनीं खाल्ला असतां त्यांस जो रोग जडतो तो; (क्रि०लागणें).

किरळ न० पु० १ विशेषतः जोंधळा किं० बाजरी यांची कापणी झाल्यावर शेतांत राहतात जे बुडखे किं० अंकुर ते. कांहीं लोक हा शब्द हरळीस किं० अन्य तृण जें उगवतें त्यास लावितात. २ भरत आलेल्या जखमेवर धरतात ते पापुद्रे; (क्रि० बांधणें, येणें, धरणें, फुटणें).

किरळ स्त्री० नेपती म्हणून जें झाड आहे तें. न० नेपतीचें फळ.

किराईत न०, **किराईत कोडकी** स्त्री० एक औषधी. ॐ**किराईत फुलकी** स्त्री० किराईत म्हणून जी औषधी आहे त्यांतील एक भेद.

किरांची स्त्री० तोफेच्या मागें दारूगोळा वगैरे ठेवण्याची जी पेटी असते ती.

किराड पु० शूद्रांतील एक जाति किं० तज्जातीय इसम.

किराण, किरण [हिं० किलान्=उडी] न० १ उडी, झडप (क्रि० मारणें, टाकणें, साधणें). २ सुळका,–पाण्यांत डोक्याच्या बाजूनें मारतात तो. ३ नेम, लक्ष्य, किं० धोरण (क्रि० साधणें,बांधणें, चुकणें).

किराण [सं० ' किरण 'चा गांवढळांचा अपभ्रंश] न० उगवत्या किं० मावळल्या सूर्याचे किरण (क्रि० पडणें, राहाणें).

किराणा पु० १ लवंग, जायफळ, सुपारी, खोबरें, पत्री, हिंग, जिरें, इ० जे पदार्थ,– ज्यावांचून प्रायः गरीब लोकांचा निर्वाह होतो,–ते. २ (व्यवहारांत विशेष रूढ अर्थ) व्यवहारांत नित्य जरूर लागणाऱ्या किं० उपयोगी पडणाऱ्या धान्यादि वस्तु,–ज्या किरकोळीनें धंदा करणारा वाणी आपल्या दुकानांत ठेवतो; किरकोळ वाणसौदा.

किरात [सं०] पु० १ डोंगरांत राहाणारी व शिकारीवर उपजीविका करणारी एक जाति किं० त्या जातीचा इसम; भिल्ल, कोळी, इ०. २ कोणीही रानटी मनुष्य. ३ किरातवेषी शंकर. ॐ**किरातार्जुनीय** न०भारवि कवीनें किरातवेषी शंकर व अर्जुन यांच्यामधील युद्धाचें वर्णन ज्या काव्यांत केलें आहे तें. **किराती** स्त्री० १किरातवधू. २चवरी धेणारी स्त्री. ३ भिल्लीणीचा वेष घेतलेली पार्वती. ४ स्वर्गंगा.

किराया [फा० किरायाह्] पु० भाडें.

किराळ न०, पु० मागें ' **किरळ** न० ' व ' **किरळ** न०, पु० ' पहा.

किराळणें [म० किराळी] अ० क्रि० काकस्वरानें ओरडणें; कर्कश ओरडणें; किंकाळणें.

किराळी स्त्री० किंकाळी; आरोळी; काकध्वनीसारखा कर्णकटु आवाज.

किरिरें न० शिंक्यावर भांडें घट्ट बसावें म्हणून शिंक्याच्या दोऱ्या आंवळण्याकरतां त्यास घालतात तो सरकावावयाचा फांस.

किरी स्त्री० उत्तरोत्तर क्षीण व्हावें अशी जी कोणकास कांहीं विकृति जडते ती; कोणताही खंगविणारा रोग.

किरीट [सं०] पु० देव, राजे, इ० कांचा जो मुकुट तो. ॐ**किरीटधारी** पु० राजा. **किरीटमाली, किरीटी** पु० अर्जुन.

किरीम, क्रिमि [सं० कृमि] पु० १ सुतासारखे जे जंतु पोटांत कांहीं रोगांमुळें होतात ते. २ फळादिकांतील आळ्या वगैरे जंतु. ॐ**किरीमवाताळें, क्रिमिवाताळें** न० पोटांत जंत फार झाल्यानें जी घेरी येते ती किं०काळाविशी होते ती–

किरोंटा पु० पोपटाची एक वन्य जात. बोलणाऱ्या पोपटाहून हा भिन्न जातीचा असतो.

किर्द,कीर्द [**फा०**] **स्त्री०** १ जमीन शेताच्या उपयोगाची करणें. २ लागवडीस आणलेली जमीन. ३ जमाखर्चाची नोंदणी. ४ रोजकीर्दीचा उतारा लिहिण्याची चोपडी. ※**किर्दसार, कीर्दसार** [**फा०** किर्दजा] **वि०** १ लागवडांत असलेली (जमीन). २ लागवडीच्या उपयोगाला योग्य अशी (जमीन). **किर्दावा, कीर्दावा पु०** शेतांतून काढलेलें पीक, किं० त्या पिकाचें उत्पन्न.

किर्र वि० १ कर्कश (आवाज). २ असा आवाज नेहमीं जेथें असतो असें घनदाट (अरण्य).

किलकिलणें अ० क्रि० चिमण्या, मैना, इ० कांचें चिव चीव करणें.

किलकिला, किलकिलीत वि० थोडेसें किं० किंचित् उघडलेलें किंवा मिटलेलें (दार, डोळे, कळी, इ०). हें **क्रि० वि०** प्रमाणेंही वापरतात. –जनें, किलकिलें पाहाणें, इ०.

किलकिलाट, किलकिल स्त्री० १ पक्ष्यांचा किलबिलाट. २ (लक्षणेनें) पोरांचा वगैरे गोंगाट.

किलकिलाविणें[**म०** किलकिला करणें किं० मिटणें किं० उघडणें] **स० क्रि०** किंचित् किं० थोडेसें उघडलेलें किं० मिटलेलें करणें (दार, डोळा, इ०).

किलच, किलींच स्त्री० १तक्तपोशीस तख्त्यांच्या संधींवर म्ह० तख्ये जेथें एकमेकांना लागलेले असतात तेथें बसवितात जे फळीचे तुकडे ते प्रत्येक; रिपा. २ तख्त्यांचे अभावीं जे फळ्यांचे तुकडे पाटणीस घालतात ते प्रत्येक. ३ हिऱ्याचा लांबोडा तुकडा. ४ कापसांतील केर, गवताच्या काड्या, इ०. ※ **किलचबंदी स्त्री०** किलचांचा उपयोग करून केलेली जमीन, पाटणी, इ०.

किलबिल स्त्री० १ पक्ष्यांची किलकिल. २ पिंगळ्याच्या चार ध्वनींपैकीं एक. पुढें 'की' पहा.

किलबिलणें अ० क्रि० (पक्ष्यांनीं) चिवचिवणें; पक्ष्यांचें किलकिल ओरडणें.

किलबिलाट पु० पक्ष्यांची चिवचीव; किलकिलाट.

किलवणें स० क्रि० जमिनींत वगैरे खांब इ० घट्ट बसला असतां तो बाहेर काढण्याकरतां हालविणें; हालवून हालवून तो खिळखिळा करणें.

किलवाणा [**म०**कींव+वाणा (प्रत्यय)]**वि०** १ केविलवाणा; लोकांस कींव वाटेल असा; दीन (मूल, चर्या, परिस्थिति). २ ज्यामध्यें भव्यपणा दिसत नाहीं असा; भिकार (वस्त्र, अलंकार, गृह, शहर, वेष, इ०). ३ अत्यंत कार्पण्ययुक्त असा (स्वभाव, आचरण इ०); दीनवाणा.

किलाण [**हिं०** किलान्] **न०** १ उडी, झडप; (**क्रि०** मारणें). २ उड्या मारणें, बागडणें, हुदडणें; धांगडधिंगा (मुलांचा); (**क्रि०** मांडणें, माजविणें).

किलावा [**हिं०**किलावा] **पु०** हत्तीच्या गळ्यांत सुताच्या दोरीचें पेंडें महाताचें पाय अडकविण्याकरितां घालतात तें; हत्तीची रिकीब.

किलेमाणी [**म०** कील (खिळा, खुंटी)+ माणी (विडी)] **वि०**जांत्याच्या खालच्या तळींत मध्याला जी खुंटी पक्की बसविलेली असते तिला ' कील ' म्हणतात. वरच्या तळीच्या मध्यांत जी लोखंडाची विडी बसविलेली असते तिला' माणी ' म्हणतात. दळतेवेळीं कीलाभोंवतीं माणी फिरते. किलेमाणी म्ह० कील आणि माणी यांनीं युक्त केलेलें किं० असलेलें (जातें).

किल्बिष [**सं०**] **न०** १ पाप. २ गुन्हा. ३ रोग. ४ विपत्ति. ५ कपट. ६ वैर. ७ ओंगळ किं० घाणेरडा पदार्थ.

किल्ला [**अ०** किलअह्] **पु०** दुर्ग; भोंवतालीं चर खणून त्याच्या आंत तट, बुरूज, इ०नीं प्रायः शत्रूपासून बंदोबस्त व्हावयासाठीं राजादि बांधतात जो मोठा कोट किं० गड तो. किल्ले तीन प्रकारचे असतात. डोंगरी किल्ला, भुईकोट, आणि जंजिरा. विशेष माहितीसाठीं आमचें 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० '' हें पुस्तक पहा. ※**किल्ला नेसविणें** गड किं० कोट यांच्या भोंवतालचें रान इ० पेटविणें. **किल्लेदार पु०** किल्ला ज्याचे स्वाधीन असतो तो अधिकारी; गडकरी.

किल्लाण पु० किलकिलाट, गोंगाट (पक्ष्यांचा, पोरांचा). **न०**मागें ' किलाण ' पहा.

किल्ली [**सं०**कील=खिळा] **स्त्री०** १ कुलूप काढावयाची, घालावयाची, किं० उघडावयाचीं, मिटावयाची जी चावी असते ती. २ घड्याळ,

गायनपेटी, इ०यंत्रविशेषांच्या कमानीचे ढिले झालेले वेढे पुनरपि घट्ट करून तीं तीं यंत्रें चालू करण्याकरतां योजितात जें आउत किं०साधन तें; (क्रि० देणें). ३ (लक्षणेनें) विवक्षित अर्थ सिद्ध होण्याविषयीं क्षम असें जें त्याचें सूत्र किं० तत्व तें; उ० त्याच्याकडून काम कसें करून घ्यावें याची किल्ली मला ठाउक आहे; उ० केप् ऑफ् गुड् होप्च्या शोधानें पूर्वेकडील व्यापाराच्या सत्तेची किल्ली पाश्चात्य राष्ट्रांच्या हातांत गेली; उ० ती काय माझ्याबाहेर जाते ? तिची किल्ली माझ्याजवळ आहे ना ? ॐ**किल्ली फिरावणें** एकाद्यानें दुसऱ्याच्या विरुद्ध आपणांस अनुकूल असें वर्तावें म्हणून गुप्त संधान बांधून व्यवस्था, तरतुद, किं० बंदोबस्त करणें किं० करून ठेवणें; आपणाला अनुकूल किं० दुसऱ्याला प्रतिकूल परिस्थिति उत्पन्न होईल अशी योजना किं० तजवीज करणें किं० करून ठेवणें. **किल्ल्या चालविणें** अनधिकारानें, बेकायदेशीरपणें, किं०चोरटेपणानें घर, तिजोरी, इ०कांचीं कुलुपें उघडणें (कांहीं चोरण्याकरतां किं० लांबविण्याकरतां). **किल्ली (किं० किल्ल्या) चालवून पाहाणें** अमुक कुलपास कोणती किल्ली लागून तें उघडतें हें पाहाणें. [आणि बिघडविणें.

किवंचणें स० क्रि० चिवडणें किं० डिवचणें

किवटा [**सं० बालभाषा** किवण] **वि०** कृपण; चिक्कू; अनुदार. [बहिरा.

किवडा [**कानडी** किवी (कान)] **वि०**

किवण स्त्री० कींव; द्रयार्द्रभाव; अनुकंपा.

किवण (–न), किव्येण [**सं**०कृमि+व्रण; किं०किण] **न०**१ गाय, म्हैस, इ०कांच्या कातडीला सकीटक जें क्षत पडतें तें. २ ज्या मंत्रादिकानें असें क्षत बरें होतें तो; (क्रि०म्हणणें, घालणें). ॐ **किवण्या (–न्या)**वि०सकीटक क्षत पडलें आहे ज्यास असें (गुरूं).

किशोर [**सं**०] **पु**० १ बालयुवा, मुलगा (पंधरा वर्षांचे आंतील, व म्हणून कायद्याच्या दृष्टीनें अप्राप्तव्यवहार). २ सूर्य. ३ शिंगरूं. ॐ**किशोरी स्त्री०** बालयुवती; कन्या; मुलगी.

किष्किंधा [**सं**०] **स्त्री**० एका प्राचीन नगरीचें व राज्याचें नांव. किष्किंधा ही सुग्रीवाग्रज जो वाली त्याची राजधानी होती.

किसगणती, खिसगणती, खिजगणती [**हिं०** किस् गनतीका म्ह० काय किमतीचा ? म्ह० क्षुद्र, क्षुल्लक] **स्त्री०** कांहीं गोष्टीविषयीं ' त्यांची काय गणना करावयाची ? ' ' त्याची जमेत धरण्याविषयीं काय पाहता ? ' ' त्याची काय किम्मत ?' अशी जी निषेधपर किं० तुच्छतापर भावना ती. ॐ **किसगणतींत नसणें** तुच्छ वाटत असणें; ०ची किंमत किं० परवा नसणें.

किसणी [**म०** किसणें] **स्त्री०** सुंठ, बटाटे, मुळे, रताळी, इ० कांचा कीस काढण्याकरतां लोखंडी पत्र्यास कांहीं विशिष्ट तऱ्हेनें भोकें पाडून व त्यास चार पाय लावून जें साधन करतात तें. ॐ**किसणकाम न०** १ कांहीं पदार्थ किसण्याचा व्यापार किं० क्रिया. २ (लक्षणेनें) कळाकुसरीनें करावयाचें म्ह० नाजुक काम.

किसणें [**म०**कीस] **स० क्रि०**१ सुंठ, बटाटे, इ०पदार्थ किसणीवर घांसून त्यांचा कीस काढणें किं० पाडणें. २ खरडणें. ॐ**किसून दळणें** बारीक पीठ होई असें दळणें.

किसबत [**हिं०**] **स्त्री०**भिस्ती लोक डाव्या मांडीवर मसकेखालीं जें चर्म घेतात तें. **'मसक'** म्ह० भिस्ती लोक जी कातड्याची पाणी भरलेली पिशवी खांद्यावरून लोंबणारी घेतात ती.

किसमीस, खिसमीस स्त्री०१ बेदाणा (वऱ्हाडकडे). २ बेदाणे, मनुका, खोबरें, पिस्ते, अंगूर (एक प्रकारचें द्राक्ष), इ० समुच्चयानें (पुण्यामुंबईकडे).

किसर, केंसर न० लाकूड इ०ची धलपी, धस, धसकट, इ०. [२ पालवी.

किसलय [**सं०**] **पु०, न०**१ कोमल अंकुर.

किसान [**हिं०**] **पु०** १ शेतकरी; खेडवळ मनुष्य; गांवढळ मनुष्य. २ (लक्षणेनें) यःकश्चित् किं० बिनकिंमतीचा मनुष्य. ॐ**किसानकाम न०** १ शेतकी काम; कृषिकर्म. २(लक्षणेनें) हलकें काम; सटरफटर काम; कोणतेंही किरकोळ स्वरूपाचें आणि हलकें काम.

किसूळ [**सं०** कुश] **पु०** पोकळा, कोथिंबीर, इ०कांच्या लहान, किं० कोंवळ्या, किं० पिकुटलेल्या ज्या काड्या त्या.

किस्तगारी, किस्तबंदी, खिस्तबंदी [फा०] **स्त्री०** हप्तेबंदीनें रकमेची फेड करणें किं० फेड करण्याचा ठराव किं० पद्धति.

किस्तगारी [फा०] **स्त्री०** शेतकी काम.

किळकिळी स्त्री० ए० व०, **किळाकिळ्या स्त्री०** अ०व० याचकानें कांहीं प्राप्त व्हावें म्हणून चालविलेल्या अनेक प्रकारच्या विनवण्या, विनंत्या, किं० आर्जवें. २ कोणेकास ताडनादिकामुळें दुःख प्राप्त झालें असतां त्यानें अनेक प्रकारें चालविलेली पिरपीर, रडगाणें, किं० विलाप.(दोन्ही अर्थी **क्रि०** देणें,चालविणें; शब्द बहुधा अनेकवचनीं वापरतात).

किळकिळीत वि० केवळ पाणकट जें ताक, दूध, इ० तें.

किळवें न० धान्य मोजण्याचें एक माप. अर्धे निळवें; शेराचा बत्तीसावा जो भाग तितकें परिमाण.

किळशा, किळोशी वि० ज्याला निरंतर कांहीं तरी रोग,आजार, किं० दुखणीं होतात तो. (पोर, म्हतारा, इ०).

किळस [सं० क्लेश] **स्त्री०, पु०** १ अमंगळ पदार्थ दिसल्यानें किं० पाहिल्यानें येते ती खंती.२ अतिसेवनामुळें कांहीं पदार्थांबद्दल येतो तो वीट; शिसारी. ३ **पु०** ज्वरादि दुखण्यानें दुःख पावावें अशी जी कोणेकास काल्दशा येते ती. ४ पु० पोर, इ०कांस आगामी आजाराचें सूचक जीं अंगावर उवा पडणें इ०चिन्हें होतात तीं समुच्चयानें. ⊛ **किळसखोर, किळसुडा वि०** १ खाण्यापिण्यांत चिकित्सेखोर किं० कांक्षेखोर. २ ज्याला ओंगळ पदार्थ स्पर्शावयाला,पहावयाला, किं०खावयाला खंती वाटते असा.**किळसवाणा वि०**घाणेरडा; खंती वाटविणारा; अमंगल.

किळसणें [**म०** किळस] **अ० क्रि०** किळस येणें, किं० वाटणें, किं० पावणें. [हे अर्थ पहा.

किळोस पु० मागें ' किळस ' याचें १ व २

कीं उ० अ० हें विकल्पबोधक, स्वरूपबोधक, संकेतबोधक,व कारणबोधक असें चार प्रकारचें असतें. १ क्रियापदास जोर आणण्याकरतां वापरतात; उ० दे कीं; देतों कीं, इ०. (कधीं कधीं अधिक जोर आणण्याकरतां रे, ग, हो, इ० संबोधनार्थक अव्ययेंही 'कीं' ला जोडतात; जसें, दे कीं ग, देतों कीं हो, इ०). २ ' काय ' याला संदेहार्थी लावतात; मागें ' कायकीं ' पहा.

की न० पिंगळा जे चार प्रकारचे शब्द करतो –कू, कीं, किलबिल, किचीबिची,–त्यांतलि एक.

कीकट [सं०] **वि०** कोळी,भिल्ल, इ०रानटी मनुष्याची वसती ज्यामध्यें आहे असा देश.

कीकट [**सं०**] **नि०** १ दरिद्री. २ कृपण.

कीटक पु० (कवितेंत) एका किं० अनेक हत्तींचा चीत्कार.

कीचक [**सं०**] **पु०** १ पोकळ बांबू. २ वाऱ्याच्या योगानें निनाद करणारा बांबू.३वेणू.

कीट [सं० किट्ट=मल; विष्ठा] **न०** (मागें ' किटण ' याचे सर्व अर्थ पहा). १ मळाचें पूट, मशेरी, इ०. २ ठिणगी. ३ नांगर इ० कानें निघालेले जें मोठें ढेंकूळ तें.

कीट, कीटक [**सं०**] **पु०** १ किडा; क्षुद्र जंतु. २ (लक्षणेनें) तुच्छ माणूस; कःपदार्थ; अवगणनीय मनुष्य. ⊛ **कीटज न०** रेशीम.**कीटक पु०** गंधक.

कीड [**सं०** कीट] **स्त्री०** १ धान्य, वस्त्र,शेत, दांत, इ०कांस नाशक जो किडा त्यांत पडतो तो. (शब्द समुदायवाचक आहे). २ कोणाताही क्षुद्र जंतु; कटिक. ⊛ **एकाद्या वस्तूला कीड लागणें** ती नाश पावण्याच्या स्थितीस पोंचणें,ती क्षणि होऊं लागणें,ती अपकर्षाच्या स्थितीस येऊं लागणें(सारासार विचार, बुद्धि, संपत्ति, वैभव, इ०).

कीदृश [सं०]**वि०**कशासारखें? कोणासारखें ?

कीर [सं०] पु० राघू, पोपट. ⊛**किरासारखें बोलणें** १ बालकानें वगैरे स्पष्ट अक्षरोच्चार करून बोलणें. २ कोणेकानें जितकें शिकविलें तितकें मात्र बोलणें. **कीरखाद स्त्री०** पोपटानें खाल्लेलें, किं०चोच मारलेलें फलादिक (पेरू, आंबा, इ०). **किरखादलेलें वि०** पोपटानें खाल्लेलें किं० चोचावलेलें (फळ, इ०). **कीरमुख न०** पोपटासारखें जें तोंड तें किं० जी चर्या ती.घोड्याचें हें अशुभ चिन्ह होय.

कीर [**सं०** किल] **क्रि० वि०** निश्चयेंकरून; खरोखर. [व्याप्त; आच्छादित.

कीर्ण [**सं०**] **वि०** १ इतस्ततः पसरलेलें. २

कीर्त्त स्त्री० 'कीर्ति' याचें अपभ्रष्ट रूप.

कीर्त्तणें [सं० कृत्=स्तविणें] **स० क्रि०** स्तविणें; ०चीं स्तुतिस्तोत्रें गाणें; ०चे गुण वर्णिणें.

कीर्त्तन [सं०] **न०** १ हरिदास वगैरे वीणादि गानसाहित्य घेऊन देवळांत परमेश्वराचें उभ्यानें गुणवर्णन करतात तें. २ ईश्वरनामाचा जप. ३ कथिणें; सांगणें. ॐ **कीर्त्तनभक्ति स्त्री०** परमेश्वराची भक्ति नवविधा करतां येते, त्यांपैकीं गुणसंकीर्त्तनद्वारां परमेश्वराची करावयाची जी भक्ति किं० आराधना ती. भक्तीचे नऊ प्रकारः– ईश्वराच्या गुणांचें (१) श्रवण, (२) कीर्त्तन, (३) स्मरण; (४) ईश्वराचें पादसेवन, (५) अर्चन, (६) वंदन, (७) दास्य; आणि (९) ईश्वराप्रत आत्मनिवेदन.

कीर्त्तनीय [सं०] **वि०** १ स्तविण्यास किं० गुणसंकीर्तन करण्यास योग्य; अर्चिण्यास किं० पूजिण्यास योग्य. २ गणावयास योग्य; कथनीय.

कीर्त्तवाडा [सं० कीर्ति] **पु०** अपकीर्त्ति; बेआब्रू; बदनामी; कांहीं दुर्गुणावरून जी प्रसिद्धि ती.

कीर्ति [सं०] **स्त्री०** लोकांत कोणेकाचा गुणप्रसार होतो तो; लोकांत कोणेकाची उत्तमत्वेंकरून प्रसिद्धि किं० ख्याति होते ती; नांवलौकिक. ॐ**कीर्तिमान, कीर्तिवान्, कीर्तिवंत वि०** ज्याच्या गुणाची ख्याति झाली आहे असा; ज्यानें आपल्या गुणादिकांनें लोकांत प्रसिद्धि मिळविली आहे असा; सर्वविश्रुत. **कीर्तिमुख** [सं०] **पु०** एका राक्षसाचें नांव. याचें तोंड शंकराच्या देवळाच्या उंबऱ्यावर कोरलेलें असतें.

कीर्तित [सं०] १ स्तविलेला. २ सांगितलेला. ३ प्रख्यात.

कीर्द [फा०] **स्त्री०** १ राज्य, सावकारी, इ० जे व्यवहार तत्संबंधीचे नित्य जे आय आणि व्यय, त्यांच्या टिपणाचा कागद. २ शेत, आगर, इ० भूमीची जी लागवड ती. ॐ**कीर्दसार स्त्री०** १ लागवड करावयाची आहे जीची अशी (जमीन). २ लागवड करावयास योग्य (जमीन). **कीर्दावा पु०** लागवड केलेल्या शेत, आगर, इ० कांचें उत्पन्न.

कीर्मे [सं० कृमि] **पु०** 'कृमि' शब्दाचा अपभ्रंश पण विशेषतः हा शब्द क्षत, फल, उदर, इ० कांचे ठायीं पडतात जे कृमिविशेष त्यांच्याविषयीं बोलतांना योजितात. ॐ**कीर्मेवातोळें न०** पोटांतील जंतांच्या विकारामुळें येणारी बेशुद्धि, भोंवळ, इ०.

कील [सं०] **पु०** १ खिळा, मेख, खांब, पाचर, आडसर, खुंटा, इ०. २ (विशेष अर्थ) जात्याचा खुंटा. ३ गुडगुडीच्या नळींत जो मल सांचतो तो; कीट. ४ (अग्नीची) ज्वाळा. ५ भाला.

कीलक [सं०] **पु०, न०** १ मेढ. २ घिरट किं० जातें यांचा खुंटा. ३ 'कील' प्रथमार्थी.

कीलक पु० साठा संवत्सरांतील बेचाळीसावा जो संवत्सर तो.

कीलखाना [हिं० कीलकांटा] **पु०** १ सटरफटर वस्तूंचा ढीग; अडगळ. २ अशा वस्तु जेथें सांठवितात किं० टाकतात ती जागा; अडगळीची खोली.

कींव, कीव स्त्री० कोणेकाचें दुःख पाहून जी करुणा किं० दया वाटते ती; अनुकंपा. ॐ**एकाद्याची कींव करणें** १ त्याच्यावर दया करणें. २ त्याची गय करणें. **एकाद्याची कींव येणें** त्याच्याबद्दल दया वाटणें; त्याच्याबद्दल मन अनुकंपार्द्र होणें. **एकाद्याची कींव भाकणें** त्याची करुणा भाकणें; त्यानें अनुकंपा दर्शवावी म्हणून त्याची काकुळत करणें. **कींवची कानू** १ आपण दुसऱ्यावर केलेल्या एकाद्या क्षुल्लक उपकाराचा मोबदला फार मोठा अपेक्षिणें. २ विनवणीला आग्रहाचें रूप देणें; ज्या वस्तूवर आपला हक्क नाहीं ती नम्रपणानें न मागतां हक्कानें मागणें. **ज्याची करावी कींव तो घेतो जीव** दुर्जनावर कधीं उपकार करूं नये. तो तावडींत सांपडला असतां त्यास सोडणें हा मूर्खपणा; तो अडचणींतून मुक्त झाल्याबरोबर उलटून आपणांस उपद्रविल्याखेरीज कधीं राहाणार नाहीं. **कींवकाकळूत, कींवकाकुळती स्त्री०** १ अनेक प्रकारें करुणा भाकण्याचा व्यापार; काकुळत (क्रि० भाकणें); उ० भाका बहुता रीती माझी कींवकाकुळती ॥ (तुका०). २ कोणेकाचें दैन्यादि मनांत आणून त्याच्यावर दया करण्याचा किं० त्याची गय करण्याचा व्यापार; कीव; (क्रि० येणें); उ० माझी कींवकाकळूत तुम्हाला येऊं द्या !

कीस [म० किसणें] **पु०** १ कांहीं पदार्थ किसल्यानें त्याचें निघतात जे केसरासारखें अवयव ते, किं० चूर्णासारखें कण ते, समुच्चयानें. २ बटाटे,

रताळीं,इ०कांच्या किसाचें जें उपवासादिकांकरतां खाद्य करतात तें. ❀कीस काढणें (लक्षणेनें) अति बारीक बारीक भेद विचारांत घेणें; अति बारकाईनें चर्चा करणें; फार फार चिकित्सा करणें.

कीळ [सं० कीला=ज्योत, ज्वाळा] न० १ तेज, प्रभा(रत्नांची). २ अग्नीच्या ज्वाळांचा झोत.

कु [सं०] स्त्री० १ पृथ्वी. २ त्रिकोण, इ० आकृतींचा पाया. ❀ **कुगति** स्त्री० पृथ्वीची गति. **कुज्या** स्त्री० पृथ्वीच्या परिघाचा एक भाग. **कुपरिधान** स्त्री० पृथ्वीचा परीघ. **कुपुत्र** पु० मंगळ. **कुप्रदक्षिणा** स्त्री० पृथ्वीचें स्वताच्या आंसाभोंवतीं फिरणें. **कुवृत्त** न० पृथ्वीचा परीघ. **कुव्यास** पृथ्वीचा व्यास.**कुदिन** न०पृथ्वीला स्वतः भोंवतीं फिरावयाला जो अवधि लागतो तो म्ह० दिवस आणि रात्र मिळून होतो तो अवधि.

कु [सं०] अ० याचा वाईट या अर्थी संस्कृत समासांत प्रयोग होतो. ❀ **कुकर्म** न० वाईट, दुष्ट, किं० पापी कर्म किं० कृत्य.**कुकर्मा** वि०दुष्ट, पापी किं० अधम कृत्यें करणारा. **कुकर्मी** असेंही यांचें अशुद्ध रूप प्रचलित आहे. **कुकल्पना** स्त्री० वाईट, दुष्ट, पापी, अधम किं० कुत्सित कल्पना किं० विचार.**कुग्रह** पु० पापग्रह; शनि,राहु,केतु,मंगळ,रवि,हे पांच पापग्रह कल्पिले आहेत. **कुग्राम** पु० लहान खेडें; भिकार गांव; जेथें राजाचा अधिकारी नाहीं, अग्निहोत्री नाहीं, वैद्य नाहीं, किं० नदी नाहीं, असें गांव. **कुग्रामवस्ती** स्त्री०, **कुग्रामवास** पु० कुग्रामीं निवास म्ह० राहाणें. चार दोषांपैकीं हा एक होय. चार दोष येणेंप्रमाणें:--कुग्रामवास, कुभोजन, कुलहीनसेवा आणि क्रोधमुखीभार्या.**कुतर्क** पु० १ कांहीं एक गोष्टीचा सरळ मार्ग सोडून शास्त्रादि प्रमाणांविरुद्ध जो कोणेकाचे मनांत तद्विषयीं तर्क येतो तो.२शंका;वाईट किं०विरुद्ध विचार; **कुदान** न० जें कांहीं घेतल्यानें घेणारास फार पाप लागतें असें जें मृतशय्यादिरूप दान तें. **कुदिन** न० पु०१व्यतीपातादि कुयोगनिमित्तानें गमनादिकर्माविषयीं वाईट दिवस.२ शोककलहादि प्राप्त झाल्यामुळें दुःखानें घालवावा लागतो व म्हणून जो वाईट दिवस तो. **कुधान्य** न० ज्याचा वैश्वदेव, नैवेद्य, करूं नये असें जें हरीक, मसूर, लाक, उडीद, चवळी, बाजरी, कांग, इ० धान्य तें. **कुनीति** स्त्री० १ अन्याय्य, अधर्म्य, किं०पापी वर्तन किं० आचरण. २ अन्याय्य, अधर्म्य, इ०राजनीति किं० राज्यकारभाराची पद्धति. **कुपथ** पु०१ आडमार्ग, वाईट मार्ग. २ चुकीचा मार्ग. ३ (लक्षणेनें) नास्तिकपणा; चार्वाकी तत्व. **कुपथ्य** वि०अपथ्यकर जें तें. न०१ अपथ्य. २ प्रकृतीला अपायकारक जें खाद्यपेय तें. ३ विशिष्ट आजारांत जें कांहीं असेव्य तें. **कुपात्र** न० दान घ्यावयाला अनाचारादि दोषामुळें अयोग्य जो ब्राह्मणादि तो; दान घेण्याला नालायक असा मनुष्य. **कुपुत्र** पु० मातापितरांस त्रास देणारा किं० कुलास कलंक लावणारा पुत्र. **कुभक्ति** स्त्री०१ खोटी किं०कृत्रिम भक्ति. २ अयोग्य माणसाची किं० दुष्ट देवतेची भक्ति. **कुभाव** पु० कांहीं गोष्ट सरळ असतां, किं० कोणी मनुष्य निष्कपटपणें वागत असतां; त्याविषयीं यांत कांहीं कपट असेल अशी कोणेकास जी खोटी किं० निराधार कल्पना येते ती; कुढाभाव. **कुभोजन** न० कदन्नादिभक्षण; वाईट किं० हलकें अन्न खाणें किं० सेविणें. चतुर्दोषांपैकीं हा एक होय. मागें ' कुग्रामवस्ती ' पहा. **कुमति** स्त्री० कुवासना; कुबुद्धि; दुष्ट बुद्धि. **कुमंत्र** पु० १ बद्सल्ला; कांहीं वाईट कर्मांत सिद्धि मिळविण्याचा मंत्र. **कुमार्ग** पु० (लक्षणेनें)असन्मार्ग,दुराचरणपथ; शास्त्रनिषिद्ध आणि लोकनिंदित आचार. **कुमार्गी** वि०दुराचरणी;पापी;असन्मार्गवर्ती. **कुयोग** पु०१ ग्रहादिकांचें अशुभ मीलन किं०संधि.२ अशा मीलनाचा काल,-ज्या वेळीं कांहीं कर्म करणें निषिद्ध आहे. ३ (लक्षणेनें) कोणताही अहितकारी किं० नावडता संबंध. ४ असा संबंध जुळून येतो ती वेळा. **कुरूप** न०१ विद्रूप. २ बेढब. ३ तळहात किं० तळपाय यांत कांटा इ० मोडून आंत राहिल्यामुळें त्या स्थळीं येते जी गांठ, गळूं, इ० तें. **कुवच** न०वाईट,अधम,किं० शिव्यागाळीचें बोलणें.**कुवाद** पु०१ उलट वाद.२ कुत्सितपणाचा वाद.३ रिकामटेकडा वाद, (क्रि० करणें, घेणें, धरणें). **कुवासना** स्त्री० दुष्ट किं० पापी वासना किं० इच्छा. **कुविचार** पु० वाईट विचार; पापी विचार; कुत्सित विचार. **कुविद्या** स्त्री० पिशाचोपासना, जारण, मारण, इ०ज्या विद्या त्या प्रत्येक. **कुविवाह**

पु० अयोग्य, अधम, शास्त्रनिषिद्ध किं० अहित-कारी लग्नसंबंध. **कुवेळ स्त्री०** दुष्ट वेळा; वाईट किं० अयोग्य वेळ. **कुशंका स्त्री०** वाईट शंका, कुत्सित संशय; कुतर्क; प्रतिकूल विचार. **कुशब्द पु०** १ शिव्यागाळीचा किं० बीभत्स शब्द; अपशब्द. २ अभद्र किं० शापशब्द किं० भाषण. **कुश्चळ, कुश्चीळ वि०** १ अनीतिमान्; वाईटसाईट चाळे करणारा; कुमार्गी. २ दुष्ट, गर्हणीय; निंद्य. ३ मलिन, दुर्गंधियुक्त, किळसवाणा. **कुश्चीळठाय पु०** (कवितेंत)कुश्चळ ठिकाण किं० जागा. **कुसंग पु०, कुसंगति स्त्री०** दुष्ट,पापी किं० अधम अशा माण-सांचा संबंध, सहवास, किं० मैत्री. **कुसंतान न०** ज्याच्यामुळें बेआब्रू होतें असें अपत्य; लांच्छन-कारक अपत्य. **कुसंतानापेक्षां निसंतान बरें** काळिमा आणणाऱ्या पोराच्या योगानें पुत्रवंत असण्यापेक्षां निपुत्रिक असणें ज्यास्त चांगलें. **कुस्पृष्ट न०**१ उणें; व्यंग; चीड यावयाजोगें किं० अप्रतिष्ठाकारक जें मर्म तें. २ निर्मूल जें कलहादि-कांस कारण तें; (**क्रि०** काढणें, निघणें, इ०); उ० कोणाचें कुस्पृष्ट काढूं नये.

कुइटार न० तृण,पाती,किं०नारळीच्या झापा, इ० (छप्पर शिवण्याचें जें साधन तें).

कुइटार (–रू) वि०तृण, झांपा, पाती, इ० कानीं शिवलेलें (झोंपडें, इ०).

कुइरा पु० लहान किं० कोंवळा फणस.

कुइरी स्त्री० एक प्रकारचा वेल. २ तिची शेंग.(कुइरीचे दोन प्रकार आहेत,–खाजरी कुइरी व गोडी कुइरी). ३ लहान किंवा कोंवळा आंबा किं० फणस. ४ स्त्रियांचें डोक्यांत घालावयाचें एक भूषण.

कुइरें न०कुइरीची जी शेंग ती.

कुइला पु० १ कुइरी वेल किं० तिची शेंग. २ मुलांचें गळ्यांत घालावयाचें एक सुवर्णभूषण.

कुइली स्त्री० १ कूइरी नामक लता. २ तिची शेंग. ३ कोलिती म्हणून जें झाड आहे तें. ४ एक रानटी पालेभाजी.

कुई स्त्री० १ एका कोल्ह्याची किं० अनेक कोल्ह्यांची जी आरोळी ती. २ (लक्षणेनें) अनेक मनुष्यांची किं० पोरांची, कांहीं कारणास्तव एक-दम जी ओरड किं०आरोळी ती. (**क्रि०**घालणें) ३ ससा, खार, इ०कांचें ओरडणें. ॐ **कुईकुई करणें** आरोळी देणें; आरोळी मारणें. **कोल्हेकुई स्त्री०** एकाद्या मोठ्या माणसासंबंधानें हलकट लोकांनीं केलेली ओरड.

कुईट न० झोंपडें इ० शिवण्याचें जें साधन,– तृण, झांप, नारळीच्या पाती, इ० तें.

कुईट वि० १ खोबरें, धान्य, इ० सरदल्यामुळें किं० कुजल्यामुळें त्यास जी घाण येते त्या घाणीनें युक्त. २त्याची जी रुचि लागते तिनें युक्त. ३अजी-र्णांशाची जी घाण येते तिनें युक्त. ४ (लक्षणेनें) कोणेकाचें दोषरूप मर्म अंत:करणांत ठेवून प्रसंगीं काढावें अशा प्रकारचा कुत्सित स्वभाव ज्याचा तो, किं० तदनुसार जें त्याचें भाषण तें.

कुंक, कुक स्त्री० कोंबड्याचें आरवणें.

कुंकड न० पिंजाऱ्याचें एक साधन.

कुकडी स्त्री०जनावराचा पश्चाद्भाग किं०ढुंगण.

कुंकडें न०१ सुताचें लहान लांबट जें गुंडाळें केलेलें असतें तें.२ गुरांस एक रोग होत असतो तो.

कुकडेकू न०१ कोंबड्याचें आरवणें. २ (लक्षणेनें) पोकळ वल्गना करणें; खोटा टेंभा मिरविणें; रिकाम्या वढाया मारणें.

कुंकणें, कुकणें अ० क्रि०(कोंबडा) आरवणें.

कुकर [सं०कुक्कुर] पु० कुत्रा. ॐ**कुकरचाल स्त्री०** घोड्याची एक विशिष्ट गति.

कुका पु० १ जिचें गर्भादान व्हावयाचें असतें तिजकडून जमलेल्या स्त्रिया चेष्टेखातर तिच्या भर्त्याची पूजा, विड्या तोडणें, इ० प्रकार करवून घेतात ते समुच्चयानें. २ जो वयानें मोठा झाला असूनही पोरकट चाळे करतो तो.

कुकारणें स० किं० अ० क्रि०दूरच्या मनुष्यास ऐकूं जावें म्हणून उंच स्वरानें दीर्घ आरोळी मारणें.

कुकारा पु० दूरस्थित माणसास ऐकूं जावें म्हणून मारलेली उंच स्वरांतील दीर्घ आरोळी; (**क्रि०** घालणें).

कुकुची स्त्री० जोंधळ्यांतील एक भेद. याला **दूधमोगरा** असेंही म्हणतात.

कुकुट (–ड) कुंभा (कोंबा) [सं०कुकुट + म० कोंबडा]पु० एक पक्षी. यालाच 'सोनका-वळा'किं०'भरद्वाज'म्हणतात. पुढें 'कुकुट' पहा.

कुकुद् [सं० 'ककुद्' पासून अशुद्ध रूप] **स्त्री०** बैल, इ० कांस मानेवर असतो तो मांसगोल; वशींड.

कुकुबाळ, कुकुलें बाळ १ तान्हें बाळ. २ थोरास तो जर पोरास साजेसें वर्तन करूं लागला तर हिणविण्याच्या बुद्धीनें म्हणतात.

कुंकुम [सं०] **न०** १ कुंकू. २ केशर. ⊛ **कुंकुमतिलक** पु० बायका कपाळास लावतात ती कुंकवाची टिकली. **कुंकुमपत्र न०, कुंकुमपत्रिका स्त्री०** लग्न, मुंज, इ० शुभ कार्यप्रसंगीं पाठवितात जी कुंकुमाचा शिडकाव करून निमंत्रणपत्रिका ती. **कुंकुमागर पु०** केशरासारखें चंदन; तांबडें चंदन.

कुकुलें वि० तान्हें (मूल), लहान (बाळ).

कुंकू [**सं०** कुंकुम] **न०** १ हळदीचें खन्यांस निंबू, टाकणखार, इ० कांच्या पुटानें रंगवून त्यांची जी लाल पूड करतात ती. (हें कोरडें कुंकू होय. कोंकणांत याला पिंजर म्हणतात). २ कोरडें कुंकू तेलांत खलून नित्य कपाळास लावण्याकरतां सुवासिनी अगर कुमारिका घेतास तें. याला **ओलें कुंकू** असेंही म्हणतात). ३ कपाळावर प्रत्यक्ष लावलेलें असतें तें; कुंकुमतिलक. ४ (लक्षणेनें) सुवासिनीपणाची स्थिति; सौभाग्यवतीत्व. ५ स्त्रीत्वाचें लक्षण. [टीपः—पूर्वकालीं स्त्रिया कुंकवाऐवजीं केशर लावीत असत, व कुंकू याचा मूळ अर्थ तोच होय. या सौभाग्यतिलकास स्त्रिया अत्यंत मान देतात, व भेटावयास आलेल्या सुवासिनीस व कुमारीस कुंकू लावणें हें जसें घरच्या स्त्रीचें कर्तव्य आहे, तसेंच त्या सुवासिनीचा व कुमारीचा कुंकू लावून घेणें हा हक्क आहे. त्याचप्रमाणें रस्त्यांत देखील जर सांडलेले अगर पडलेलें कुंकू कोणा सुवासिनीस अगर कुमारिकेस दिसून आलें, तर ती त्या रस्त्यांत पडलेल्या कुंकवाची चिमूट कपाळास लावल्याशिवाय तें कधीं ओलांडीत नाहीं. तसें करणें म्हणजे सौभाग्यदेवतेचा अपमान करणें समजतात]. ⊛**कुंकू जाणें** वैभव नष्ट होणें; वैभवास उतरती कळा लागणें. याचा प्रयोग नेहेमीं उपरोधिकपणें नकारार्थीं करतात; उ० रामभाऊनें माझी शिफारस केली नाहीं म्हणून माझें थोडेंच कुंकू जाणार आहे ? **एकाद्या स्त्रीचें कुंकू जाणें** किं० **पुसणें** तिला वैधव्यदशा प्राप्त होणें. **कुंकू पुसणें** किं० **पुसून टाकणें** १ मी तुमची बायको नाहीं असें एखाद्या विवाहित स्त्रीनें नवऱ्यास सांगणें. २ स्त्रीत्वाचा त्याग करून पुरुषासारखें वागणें. **कुंकू पुसून शेण लावणें** १ ज्याच्याशीं विवाह झाला त्याच्याशीं स्त्रीपणाचा संबंध तोडून दुसऱ्याबरोबर पाट लावणें. २ नवरा मेल्यावर दुसऱ्याबरोबर पाट लावणें.(पाटाच्या स्त्रीचा दर्जा विवाहबद्ध स्त्रीहून अर्थातच हलका असतो). **कुंकू बळकट असणें** एखाद्या विवाहित स्त्रीच्या सौभाग्याचा योग सबळ असणें म्ह० तिचा पति कठिण संकटांतून किं०आजारांतून निभावणें. **कुंकू संरक्षिणें, कुंकवाचें रक्षण करणें** सुवासिनीत्व किं०सौभाग्य ढळूं न देणें; तें कायम ठेवणें किं० टिकविणें. **बोडकीला कुंकू वांझेला कातबोळ कशास पाहिजे** ? ज्या माणसास ज्या गोष्टीचा कांहीं एक उपयोग नाहीं त्यानें त्यागोष्टीची उठाठेव करूं नये. **कुंकूगोपचंदन न०** नात्याच्या संबंधामुळें ज्या स्त्रीचा आणि पुरुषाचा विवाह होऊं शकत नाहीं अशांचा विवाह झाल्यामुळें दोन कुटुंबांची झालेली जुळणी किं०झालेला संयोग.

कुंकोत्री स्त्री० ' कुंकुमपत्रिका ' याचें गांवढळ अशुद्ध रूप.

कुकोबा पु० पोरकट किं० बायकी वर्तनाचा, स्वभावाचा, किं० वृत्तीचा माणूस. ' कुकुबाळ ' द्वितीयार्थीं पहा.

कुक्कुट [**सं०**] **पु०** १ कोंबडा.२ रानकोंबडा. (**कुक्कुटी** हें स्त्रीलिंगी रूप). ⊛ **कुक्कुटयुद्ध न०** कोंबड्यांची झुंज. **कुक्कुटासन न०** योग्यांचें एक विशिष्ट आसन. **कुक्कुटव्रत न०** भाद्रपद शुद्ध सप्तमीस स्त्रिया संतानार्थ करतात जें व्रत तें. **कुक्कुटकुंभा, कुक्कुडकुंभा (—कोंबडा) पु०** एक पक्षिविशेष,— ज्याला ' सोनकावळा ' किं० 'भरद्वाज' म्हणतात तो.

कुक्कुर [**सं०**] **पु०** कुत्रा.

कुखावर्त्त [**सं०** कुक्षि+आवर्त] **वि०** एका पार्श्वीं केशांचा भोंवरा आहे ज्याच्या असा (घोडा).

कुंगार न० भिकार; कंगाल लोक, भिकारी, इ० समुच्चयानें.

कुंगार वि० कंगाल, भिकारी(खेडें,मनुष्य,इ०).

कुच [म०] पु० स्तन. **कुचाग्र न**०स्तनाग्र. **कुचतट न**० स्तन, किं० स्तनाची उतरण. **कुचफल न**० डाळिंब.

कुचका, कुचकट वि० १ कुजलेला, नासलेला (पदार्थादि). २ (लक्षणेनें) कुत्सित, हीन, छिद्रान्वेषी, कावळ्याप्रमाणें व्रणावर घाव करणारा (मनुष्य, स्वभाव, भाषण, इ०).

कुचकामाचा [हिं० कुछ्छू कामका नहीं= कोणच्याही कामाचा नव्हे असा] **वि**०निरुपयोगी; कोणत्याही कामाला नालायख; बिनकिंमतीचा.

कुचकुच स्त्री०१ कोणेकाजवळ हळूंहळू बोलणें; चोरटेपणाचें भाषण. २ कुणकुण; लोकांत तोंडों-तोंडीं प्रसृत होते ती अफवा.

कुचकुचणें [म० कुचकुच] **अ० क्रि**० कोणास ऐकूं न जाईल अशा तऱ्हेनें म्ह०चोरटेपणानें बोलणें, किं० गप्पा मारणें.

कुचकुली स्त्री० गुदगुली (**क्रि**० करणें, होणें).

कुचंडा वि० कंजूष; कृपण; कद्रू.

कुंचडें न० १ मूल किं० बाळंत स्त्रियांचें डोक्यास घालावयाचें टोपडें. २ (लक्षणेनें) अत्यंत लहान, आकुंचित, आणि गैरसोयीचें घर.

कुंचणी, कुचणी, कुंचली, कुंची स्त्री० डुक्कर इ०कांचे केश एकत्र जुळवून व बांधून अलंकार इ० साफ करावयासाठीं करतात जे साधन तें; कोष्ट्याचें ताण्यावरून फिरविण्याचें वरील प्रकारचें साधन तें; चितान्याचें उंट इ०चे मऊ केश एकत्र जुळवून चित्रांत रंग वगैरे भरण्याकरतां मुठीचें केलेलें असतें जें साधन तें; कांहीं विशेष तृणाची देवघरांतील केर इ० काढण्याकरतां वापरतात ती लहान केरसुणी. **कुंचला, कुंचा पु**० मोठी कुंचली; घरास रंग सफेती करण्याकरतां अंबाडीच्या तंतूंची वगैरे करतात जी दांड्याची केरसुणी ती; घरांतील कोळिष्टकें वगैरे झाडण्याकरतां काठीला केरसुणी बांधून करतात तें साधन. पुढें 'कुंचा' व'कुंची,' स्वतंत्र शब्द दिलें आहेत ते आणखी पहा.

कुंचणें [म० कुंची] **स० क्रि**० कुंचीनें किं० कुंचलीनें पदार्थादि साफ करणें; कुंचलणें.

कुचंदन [सं०] **न**० एक प्रकारचें चंदन.

कुचनिंदा, कुचनिंदी स्त्री० वर्मेकर्मे; उणींपुरीं; उखाळ्यापाखाळ्या; एखाद्या विरुद्ध खोटसाळपणें केलेलीं विधानें; दुष्टपणाचें दोषारोपण; (**क्रि**० करणें).

कुचंबणा, कुचंबणी, स्त्री० रोगादि अनेक कारणांमुळें अडकून पडावें लागण्याची किं० तिष्ठत बसावें लागण्याची स्थिति किं० अवस्था; त्रास होण्याजोगा उशीर किं० विलंब; खोटी; कांहीं प्रगतीस होतो जो त्रासदायक प्रत्यवाय त्यायोगें सोसावी लागणारी थांबणूक किं० अटकाव.

कुचंबणें अ० क्रि० रोगादि कारणांमुळें कांहीं करावयास अटकाव होणें; कांहीं प्रगतीस अडथळा येऊन तिष्ठत बसावें लागणें किं०अडकून पडणें;त्रास व्हावयाजोगी खोटी सोसावी लागणें.

कुचर [सं०] **वि**० १ दुर्वर्तनी; चोर. २ निंदक. ३ मंदगति. ४ (लक्षणेनें) कपटी अन्तःकरणाचा; खुनशी. ५ द्विदल धान्यांत जो दाणा भिजत नाहीं किं० शिजत नाहीं तो. ६ कामचोर; अंग चोरून कांहीं काम करणारा. ७ कसबचोर; अंगीं कौशल्य असून तें चोरून ठेवून कसें तरी कांहीं काम करणारा.८खचरट; त्रास देणारा; दुर्गम (मार्ग, ग्रंथ, लिखाण, इ०).

कुचराई [**सं**० कुचर+**म**० आई (प्रत्यय)] **स्त्री**० १ कामचोरपणा. २ कसबचोरपणा. ३ पक्षपातीपणानें किं० स्वार्थीपणानें केलेला खोटेपणा, चोरटेपणा, कपटीपणा, टंगळमंगळ, किं० काचकूच. ४ स्वार्थी भावनेनें अंग राखून कांहीं गोष्ट करणें.

कुचल, कुचला पु० काजरा म्हणून जो विषवृक्ष आहे तो. **कुचली स्त्री**० कुचल्याची बी.

कुंचलणें [**म**० कुचली] **स० क्रि**० कुंचलीनें पदार्थादि साफ करणें किं० झाडणें.

कुचलणें [**हिं**० कुचलना] **स० क्रि**० १ भरड कुटणें. २ कुचलणें, ठोक देणें.

कुंचला पु०मागें 'कुंचणी' याच्या पोटांत पहा.

कुंचली स्त्री० मागें ' कुंचणी ' पहा.

कुचविंधी, कुचिंदी [**सं**० कुच+**म**०विंधणें] **स्त्री**० कोणेकास चीड येईल अशा तऱ्हेनें त्याची भाषणादि द्वारा काढली जी खोड ती; एखाद्याची अवचालविलेली कुचाळी, कुचेष्टा, टवाळकी, अवहेलना, उपहास; उ०· कोणाच्या कुचिंद्या करणें हा असभ्यपणाचा प्रकार होय.

कुंचळणें [म० कुंचा] अ० क्रि० मोरानें पिच्छसमुदायेंकरून युक्त होणें, म्ह० मोर वयानें वाढून त्याचा पिसारा भरपूर होणें; मोराच्या पिसाऱ्याची पूर्ण वाढ होणें.

कुंचा [सं० कूर्च] पु० १ मोरचेल (मोराच्या पिसांचा राजादिकांच्या शिरीं वारण्याकरतां केलेला असतो तो चवरीसारखा कुंचला). २ मोळ, शिंदीच्या पात्या, अंबाडीचे तंतु, इ० एकत्र जुळून बुडख्यास बांधून केर काढणें, रंग देणें, पदार्थादि साफ करणें, इ० कामासाठीं करतात तें साधन.

कुचा पु० १ एका भोंवऱ्याच्या अरीनें दुसऱ्या भोंवऱ्यास पडतें तें क्षत; (क्रि० मारणें). २ पुढच्या बोटानें तडाखा मारणें. ꠰꠰ **कुचे मारणें** १ एका मागून एक असें भराभर रट्टे मारणें. २ वादांत मुद्यावर मुद्दे काढून एकाद्याला पराभूत करणें.

कुचाळ, कुचाळखोर वि० दुसऱ्याची कुचाळी, नालस्ती, उपहास, अवहेलना इ० करण्याचा ज्याचा स्वभाव तो; कुचष्ठेखोर.

कुंचाळणें [म० कुंचा] स० क्रि० कुंच्यानें पदार्थादि साफ करणें, घांसणें, किं० स्वच्छ करणें.

कुचाळी स्त्री० नालस्ती, टवाळकी, अवहेलना; दुसऱ्यास जेणेंकरून चीड येईल असें कुत्सितपणाचें किं० छिद्रान्वेषी भाषण (क्रि० करणें).

कुचित न० कुचेष्टा. ꠰꠰ **कुचित, कुचितखोर** वि० कुचेष्टेखोर.

कुचिंदी, कुचनिंदा स्त्री० कुचेष्टेखोर किं० कुत्सित भाषण; नालस्ती; टवाळकी; एखाद्यास चीड येईल अशी त्याची काढलेला खोडी; उणींपुरीं. ꠰꠰ **कुचिंदखोर, कुचिंदा, कुचनिंद** वि० कुचेष्टेखोर; दुसऱ्याच्या खोड्या आणि उणींपुरीं काढणारा; टवाळ; नालस्ती करणारा; खोडसाळ.

कुचिंद्या, कुचिद्या स्त्री० अ० व० (मुलांत) खिजावणें; वेडावणें (वेडींवाकडीं तोंडें करून); टवाळकी; टर उडाविणें; कुचेष्टा.

कुंची स्त्री० डुकर इ० कांचे केश सारखे जुळवून ते पक्के बांधून अलंकारादि स्वच्छ करण्याकरतां जी जुडी करतात ती; कोष्टयाचें ताण्यावरून फिरवावयाचें अनेक शलाका एकत्र करून केलेलें असते जें साधन तें; चिताऱ्याची कुंचली; रंग द्यावयाचा, केर काढण्याचा, वगैरे कुंचा.

कुंची स्त्री० डोईपुरतें असतें तें कुंचडें; त्यास पाठीवर पडेलसा वस्त्राचा पट्टा जोडून मुलांना बाहेर नेतांना वगैरे डोक्यावर घालण्याकरतां करतात ती कुंची.

कुचेष्टा [सं०] स्त्री० अवहेलना; टवाळकी; नालस्ती; अर्थाचा अनर्थ करून वगैरे दुसऱ्याची केलेली थट्टा; विपरीत बुद्धीनें केलेला उपहास. ꠰꠰ **कुचेष्टेवांचून प्रतिष्ठा वाढत नाहीं** बिनाकिंमतीच्या माणसानें कर्तबगार माणसांची टवाळकी, निंदा, किं० नालस्ती केल्याशिवाय त्या हलकट माणसाची बडीजाव वाढत नाहीं; मोठ्या लोकांची सभादिकांत टवाळकी केल्यावांचून लहानाचें नांव सर्वविश्रुत होत नाहीं. **कुचेष्टेखोर** वि० टवाळकी करणारा; दुसऱ्यास चीड येईल अशा त्याच्या खोड्या करणारा; दोषैक दृष्टीनें दुसऱ्याचा उपहास करणारा; कुचाळ.

कुचोद्य [सं०] न० १ नालस्ती; टवाळकी; कुचाळी; उपहास; (क्रि० करणें). २ खोड्या; उणींपुरीं, कुत्सितपणानें काढलेले दोष; (क्रि० काढणें). ३ कुचाळखोरपणा; उ० त्याच्या अंगीं कुचेद्य आहे. ꠰꠰ **कुचोद्य** वि० कुचाळी किं० कुचेष्टा करण्याचा स्वभाव ज्याचा असा. **कुचोद्याचें पाखरूं** न० कुचेष्टेखोर; कुचोद्य करण्याचा ज्याचा स्वभाव असा.

कुच्चा पु० मागें ' कुचा ' पहा.

कुच्या [हिं० खुर्च] स्त्री० अ० व० १ कापणें; छाटणें; **एकाद्याच्या कुच्या पाडणें** त्याला छिन्नविछिन्न करणें. २ एकाद्याला मार देणें; त्याची कंबख्ती करणें; त्याची कणीक तिंबणें; एकाद्याच्या कुच्या ढिल्या करणें म्ह० त्याचें कांडात काढणें; त्याला चोप देणें. ३ घोड्याच्या मागल्या पायांच्या गुडघ्याच्या शिरा तोडून त्याला जाया करणें.

कुछ (–च) रोटी कुछ(–च) लंगोटी [हिं०] वि० अगदीं गरीबाऊ अन्न आणि अगदीं जीर्ण आणि अपुरें वस्त्र अशी राहाणी म्ह० अत्यंत सामान्य प्रतीचा जीवनक्रम.

कुज [सं० कु=पृथ्वी; तिच्यापासून जन्म-

लेला] न० १ क्षितिज. २ मंगळ. ३ नरकासुर. ॐकुजपंचमी स्त्री० मंगळवारीं येते जी पंचमी ती. ही अशुभ मानली आहे.

कुंज [सं०] पु० लतामंडप; क्रीडादि करावयास योग्य असें लताच्छादित किं० वृक्षाच्छादित उद्यानांतील किं० अरण्यांतील वगैरे स्थल.

कुंज पु० १ घराच्या छप्पराच्या दोन पाख्यांचा संयोग होऊन जो कोन होतो तो. २ नदी, रस्ता, इ०चें वळण किं० त्या वळणांतील प्रदेश. ३ दार, खिडकी, तसबीर, इ०च्या चौकटीच्या कोपऱ्याशीं मिळणाऱ्या दोन लाकडांचा झालेला कोन.

कुजकट, कुजट वि० किंचित् कुजलेला जो पदार्थ तो, किं० त्याचा जो वास तो. ॐ**कुजकटाण, कुजटाण** [म० कुजट+घाण] स्त्री० कुजलेल्या पदार्थास येते ती घाण.

कुजका वि० १ कुजलेला, नासलेला. २ (लक्षणेनें) कुत्सित, हीन, छिद्रान्वेषी, कपटी (मनुष्य, स्वभाव, भाषण). ॐ**कुजकाकवंडळ** पु० कुत्सित स्वभावाचा; कपटी; कुटाळखोर मनुष्य. **कुजकानासका** वि० कुजलेला व नासलेला; सडलेला आणि टाकून द्यावयास योग्य.

कुंजडा [हिं०] पु० १ भाजीपाला विकणाऱ्यांची एक जाति किं० तज्जातीय इसम. २ (लक्षणेनें) कंजूष किं० कृपण मनुष्य. ३ हीन दर्जाचा मनुष्य.

कुजडा [म० कुजणें] वि० (लक्षणेनें) मनाचा कुचका; कुत्सित; कपटी.

कुजणें अ० क्रि० १ कांहीं पदार्थ उदकसंयोगादि अनेक कारणांमुळें नासून निःसत्त्व होणें; सडणें. २ (सोंगट्यांत) योग्य दान न पडल्यामुळें सोंगटी वाया जाणें, अनुपयुक्त होणें, किं० तें दान कुचकामाचें होणें किं० फुकट जाणें.

कुजन [सं० कु (वाईट)+जन (माणूस)] पु० दुर्जन; दुष्ट मनुष्य.

कुजबुज [म० कुजबुजणें] स्त्री० १ हलक्या स्वरांत कोणाशीं केलेलें संभाषण. २ गांवांत पसरलेली गुप्त बातमी.

कुजबुजणें अ० क्रि० हलक्या स्वरांत कोणाशीं बोलणें किं० संभाषण करणें.

कुंजर [सं०] पु० हत्ती. २ (समासांत उत्तरपदीं) श्रेष्ठ; उ० नरकुंजर म्ह० श्रेष्ठ पुरुष, नृपकुंजर म्ह० उत्कृष्ट राजा, इ०. ॐ**कुंजरभार** पु० सैन्यांतील हत्तींचा भाग.

कुंजरडा वि० चिक्कू; कंजूष.

कुंजरा पु० १ भाजीच्या उपयोगाचें एक प्रकारचें तृण. २ एक विशेष जात, किं० त्या जातीचा इसम. त्या जातीचे लोक भाज्या, फळें, इ० विकण्याचा धंदा करतात. ६ क्षुद्र किं० क्षुल्लक माणूस.

कुंजरी [सं०] स्त्री० हत्ती ह्या प्राण्याची मादी; हत्तीण.

कुजविणें [म० ' कुजणें ' चें प्रयोजक रूप] स० क्रि० कुजत घालणें. ॐ**कुजघाण** स्त्री० कुजल्याची घाण.

कुजा, कुज्या [फा० कूजाह्] पु० १ पाणी गार करण्याचें एक मातीचें भांडें. २ पाण्याची सुरई.

कुंजी, कुंजिका स्त्री० किल्ली.

कुंजीर, कुंजरू, कुंजर पु० एका प्रकारचें भाजीच्या उपयोगाचें गवत.

कुटका पु० तुकडा; खंड; तोडून काढलेला भाग; कापून किं० छाटून काढलेला भाग किं० तुकडा; दोरी, सुतळी; इ०चा तोडा. ॐ**कुटका तोडून देणें** एकाद्याची विनंति किं० मागणी साफ नाकारणें; त्याला वाटाण्याच्या अक्षता लावणें.

कुटकी स्त्री० १ एक औषधी. २ लाकडाचा तुकडा; ढलपी.

कुटण [सं० कुट्ट=कांडणें, सडणें] न० झोडपणें; ठोक देणें. ॐ**एकाद्याचें कुटण निघणें** त्याला मार बसणें. **एकाद्याचें कुटण काढणें** त्याला चोप देणें.

कुंटण [सं० कुट्टनी, कट्टिनी] स्त्री० जारकर्मासाठीं स्त्रीपुरुषांचा संबंध जोडून देणारी स्त्री. ॐ **कुंटणकी** स्त्री० १ कुंटणीचा धंदा किं० त्या धंद्यावर मिळालेला पैसा. २ एकाच्या चहाड्या दुसऱ्यास सांगून कलागती उत्पन्न करण्याचा व्यवसाय. ३ दुष्टबुद्धीनें किं० गमतीखातर एकाचीं रहस्यें दुसऱ्यास सांगणें.

कुटणें [सं० कुट्ट=कांडणें] स० क्रि० १ कांडून किं० सडून जाडें भरडें चूर्ण करणें. २

एकाद्याला झोडपून काढणें. ३ एकाद्या श्लोकाची किं० वाक्याची किं० विषयाची उलट सुलट मुद्दे विचारांत घेऊन चर्चा किं० वाटाघाट करणें.

कुटरा [म० कुटणें] **वि०** ढिसूळ तांदूळ,–जो सडतांना त्याचे तुकडे किं० कण्या होतात.

कुटला [म० कुटणें] **पु०** भाकरीसाठीं तांदूळ दळण्यासाठीं अगोदर ते ठेचून त्यांच्या कण्या करतात त्या.

कुटा [म० कुटणें] **पु०** १ लाह्यांचें पीठ. २ वाळलेल्या माशांचा भुगा. ३ फणसाच्या आठळ्यांत मीठ, तिखट, इ० घालून त्यांचा केलेला ठेचा (तोंडीं लावण्यासाठीं). ꠰ **कुटाई स्त्री०** कुटणें किं० कुटण्याबद्दलची मजूरी.

कुटाकुटी, कुटकूट [म० कुटणें] **स्त्री०** १ गुद्दे, रट्टे, किं० तडाखे मारून केलेली मारामारी. २ एकाद्या विषयाचा खल, किं० चर्चा, किं० वाटाघाट. ३ रंगांत आलेला सोंगट्यांचा डाव (ज्यांत आवेशानें सोंगट्या प्रतिपक्ष्याकडून मारून ठोकल्या जातात).

कुटाळ, कुटाळखोर वि० १ दुसऱ्याचीं वर्मेंकर्में काढणारा किं० लोकांत प्रसृत करणारा. २ वात्रट; खोडकर. ꠰ **कुटाळकी, कुटाळी, कुटाळखोरी, कुटाळगिरी स्त्री०** दुष्टपणानें केलेली एकाद्याची निंदा किं० निर्भर्त्सना.

कुटिल [सं०] **वि०** १ वांकडा. २ नागमोडी. ३ कपटी; दुष्ट. ४ वक्रमार्गी. ५ खोडकर. (मार्ग, स्वभाव, नीति, तर्क, भाषण, इ० ना ' कुटिल ' हें विशेषण लागतें).

कुटी [सं०] **स्त्री०** झोपडी; उ० पर्णकुटी.

कुटी, कुट्टी [म० कुटणें] **स्त्री०** १ कुटणें. २ कुटून केलेलें चूर्ण. ३ माशांचा भुगा. ४ एकाद्या माणसाला झोडपून काढणें. ꠰ **आज सुट्टी उद्यां कुट्टी** आज सुट्टींत आपण खूप खेळलों (अभ्यास न करतां), उद्यां पंतोजी आपली कुट्टी काढणार !

कुटीण [सं० कुट्टिनी] **स्त्री०** कुंटणकीचा धंदा करणारी स्त्री.

कुटीर [सं०] **पु० न०** १ झोपडी. २ लहान घर.

कुटीर पु० ढिसूळ तांदूळ,–जो कांडतांना त्याच्या कण्या फार पडतात.

कुटींव [म० कुटणें] **वि०** कुटलेला किं० कुटून केलेला.

कुटील [सं० कुटिल] **वि०** १ वक्र स्वभावाचा. २ दुष्ट. ३ खोडकर.

कुटुंब [सं०] **न०** १ बायको, मुलें, आपण स्वतां, आपणावर अवलंबून असलेलीं नातलग माणसें, इ० चा एकत्र राहणारा समुदाय; घर. २ पत्नी. ३ (लाक्षणिक) एकाच उगमापासून उत्पन्न झालेले प्राणी किं० वनस्पति किं० भाषा इं० भिन्न स्थळीं, भिन्न हवापाण्यांत, भिन्न परिस्थितींत बहुत काळ राहिल्या किं० वाढल्या कारणानें त्यांच्यांत थोडाफार भेदभाव उत्पन्न होतो, तथापि त्या सर्वांचा उगम एकच आहे असें स्पष्ट असतें, अशा सर्वांचा समुच्चय; उ० वांगें, मिरची, टोमाटो, बटाटा, इ० झाडें एका कुटुंबाचीं होत; उ० हिंदूलोक, ग्रीक लोक, रोमनलोक, हे आर्यकुटुंबांतील होत; उ० संस्कृत, ग्रीक, ल्याटिन, ह्या आर्यकुटुंबाच्या भाषा; इ०. ४ समूह. ५ परिवार. ६ कुटुंबाचा भार किं० जबाबदारी. ꠰ **कुटुंबकवि पु०** ज्याच्या कुटुंबांतील प्रत्येक माणूस कविता करूं शकतो असा. **कुटुंबकबाडी, कुटुंबकाबाडी पु०** कुटुंबाच्या पोषणाचा भार सर्वथैव ज्याच्यावर आहे किं० जो वाहातो तो. **कुटुंबवत्सल वि०** ज्याचे पदरीं बायको, मुलेंबाळें, इ०चा परिवार आहे असा. **कुटुंबशास्त्री पु०** ज्याच्या कुटुंबांतील सर्व माणसें संस्कृतांत संभाषण करूं शकतात किं० बोलूं शकतात किं० शास्त्रें जाणतात तो. **कुटुंबाळा वि०** कुटुंबाचा मोठा परिवार ज्याच्यावर अवलंबून आहे तो. **कुटुंबी पु०** कुटुंब ज्याला आहे तो. **वि०** चार पांच पिढ्याचें अंतर पडलेला असा सगोत्र, सपिंड, इ० जो कोणी तो.

कुट्टन [सं० कुट्ट्=कुटणें] **न०** कुटणें, कांडणें.

कुट्टनी, कुट्टिनी [सं०] **स्त्री०** कुंटीण; रतिकर्मासाठीं स्त्रीपुरुषांची गांठ घालून देऊन आपला चरितार्थ चालविणारी स्त्री.

कुट्टा [म० कुटणें] **पु०** १ लाह्या कुटून केलेलें पीठ. २ मासोळ्यांचा भुगा. ३ फणसाच्या आठळ्यांत मीठ, तिखट, इ० घालून जो ठेचा करतात तो.

कुट्टचेल [म० कुटणें+तेल] **न०** एकाद्याला मारून झोडपून काढण्याचा व्यापार; (**क्रि०** काढणें, निघणें).

कुठचा, कुठला, कुठील [**म०** ' कोठें ' पासून] **वि०** कोणच्या स्थलाचा ? कोणच्या स्थळासंबंधाचा ?

कुंठणें [**सं०** कुंठ्=कुंठित होणें] **अ० क्रि०** कुंठित होणें; स्तब्धगति होणें; ०ची गति बंद होणें किं० बंद पडणें.

कुठपर्यंत ,कुठपावेतों,कुठवर [**म०**कोठें] **क्रि० वि०** कोणच्या स्थलापर्यंत ? कोणच्या प्रसंगापर्यंत ?

कुंठविणें [**म०** ' कुंठणें ' चें प्रयोजक रूप] **स० क्रि०** एकाद्या वस्तूची, माणसाची, किं० कामाची गति बंद करणें किं० बंद पाडणें.

कुठार [**सं०**] **पु०** कुऱ्हाड.

कुठाविणें [**म०**] **स० क्रि०** तुम्ही कोठून आलां ? तुम्ही कोठें जात आहां ? अशा प्रकारचे प्रश्न एकाद्याला विचारणें.

कुंठित [**सं०** ' कुंठ् ' पासून **भू० का० वि०**] **वि०** स्तब्ध झालेला; गति बंद पडलेला; निरुत्तर झालेला; उ० त्याचा प्रश्न ऐकून मी कुंठित झालों; उ० माझी मति कुंठित झाली.

कुठून, कुठोन [**म०** कोठें किं० कुठें] **क्रि० वि०** कोणच्या स्थलापासून किं० समयापासून किं० प्रसंगापासून ?

कुठें [**म०** कोठें] **क्रि० वि०** १ कोणच्या स्थलीं ? २ कोणत्याही स्थळीं; उ० मी येथेंच होतों, कुठें गेलों नव्हतों.

कुड उ० वा० अ० पांखरें उडवून लावतांना उच्चारतात तो शब्द. (मांजराला शुक् हा शब्द, कुत्र्याला हड हा शब्द,हाकून लावतांना योजतात).

कुंड [**सं०**] **न०** वैश्वदेव, होम, इ०विधींतील आहुति ज्या अग्नीवर देतात तो अग्नि ठेवावयाचें जें विशिष्ट आकाराचें पात्र तें. २ पति जिवंत असतां जारापासून झालेला पुत्र. (पति मेलेला असतां जारापासून झालेला जो पुत्र त्याला 'गोलक'म्हणतात).३नदीच्या पात्रांत स्वच्छ पाणी सांठण्यासाठीं जो खळगा दगडांविटांनी बांधून काढलेला असतो तो. ॐ**कुंडगोलक पु०** वर ' कुंड 'चा दुसरा अर्थ पहा. **कुंडवेदिका स्त्री०** यज्ञादिसाठीं जमीनींत केलेला आणि भोंवतीं कूड घातलेला खळगा. [कर पिकतो).

कुडकी स्त्री० पुरुषांचें एक कर्णभूषण.

कुडकुड क्रि० वि० कुडकुड असा आवाज होईल अशा रीतीनें; कुड कुड असा आवाज करून; कुडकुड असा आवाज करावयाला लावील अशा प्रकारें; उ० दांतांखालीं पापड, पोहे, कुरड्या, इ० कुडकुड वाजतात; उ० थंडी कुडकुड वाजते.

कुडकुडणें अ० क्रि० असह्य थंडीनें गात्रें एकसारखीं कंपित होणें, किं० दांतांवर दांत एकसारखे आपटत राहणें.

कुडकुडा पु०, कुडकुडी स्त्री० असह्य थंडीची व्यथा; उ० मला ह्या गार वाऱ्यानें कुडकुडी भरली.

कुडकुडा(–ड्या)वि०सदा चरफडणारा;ज्याची सदा कांहीं तरी पिरपीर चाललेली असते असा.

कुडकुडीत वि० चिरडल्यावर, चावल्यावर, किं० हालविल्यावर कुडकुड असा आवाज करणारा पदार्थ (चांगलें वाळलेलें चिरगूट,चांगला भाजलेला पापड, भाकरी, पोहे, इ०).

कुंडगा पु० भात इ० पेरावयासाठीं बंधारा घालून तयार केलेलें शेत.

कुडवई स्त्री० कामट्या, काड्या, इ०चा केलेला कूड,–ज्यावर चिखलाचा गिलावा केलेला असतो,–त्या कुडाच्या गर्भांत घातलेल्या दुबेळक्याच्या काड्या, कामट्या, इ०.

कुडचा, कुडता पु० तळहातावर पाणी, तीर्थ, दूध, पोहे, इ० घ्यावयासाठीं बोटें जुळवून केलेला खळगा.

कुडण [**म०** कूड, **सं०** कुड्य] **न०** १ कुंपण; झुडपें, कामट्या, काड्या, इ० शेजारीं शेजारीं रोवून त्यांना आडव्या काड्या बांधून जी कच्ची मर्यादा केलेली असते ती; वई. २ वरील सारख्या कुंपणानें किं० वईनें मर्यादित जें पटांगण, अंगण, इ०तें. ३ वर सांगितल्या प्रकारें एकाद्या जागेभोंवतीं वई किं० कुंपण घालण्याचा व्यापार. ॐ**कुडणावळ स्त्री०** वर सांगितल्याप्रकारें जागेभोंवतीं कुडण घालण्याबद्दलची मजुरी किं० कुडण घालण्याचें काम.

कुडणें [**म०**] **स० क्रि०** १ कूड, कुंपण, इ० घालून एकादी जागा बंदिस्त करणें किं० मर्यादित करणें. २ एकाद्या रस्त्यावर आडव्या

काठ्या बांधून रहदारी बंद करणें. ३ अटकेंत घालणें; आडविणें; प्रतिबद्ध करणें.

कुडणें, कुढणें अ० क्रि० १ स्वच्छंदी वर्तनाला प्रतिबंध झाल्याकारणानें किं० आपणाला पाहिजे आहे ती वस्तु कोणी न दिल्यामुळे असंतुष्ट होऊन झुरणें किं० मनांतल्या मनांत दुःख पावणें. २ फार वेळ एकाच विशिष्ट संस्थानांत राहिल्यामुळें किं० ठेविलें गेल्यामुळें दुखूं लागणें, किं० ठणकूं लागणें, किं० आखडणें (गात्र, शरीर).

कुडतन, कुडतान न० छत्तीस (किं०कित्येक ठिकाणीं बेचाळीस) कवळ्यांचा समुच्चय. कवळी म्ह० पांचशे किं० पांचशेपन्नास विड्याच्या पानांचा गठ्ठा.

कुडता पु० वर ' कुडचा ' पहा.

कुडताळ वि० आकुंचित (जागा, पटांगण, घर, इ०).

कुडताळा पु०, **कुडताळें** न० आकुंचित (जागा, पटांगण, घर, मांडव, इ०). ॐ**कुडताळयांत येणें** संपुष्टांत येणें; अत्यंत थोडक्या प्रमाणांत येणें; संपत येणें; क्रमाक्रमानें कमी कमी होत जाणें (व्यापार, सावकारी, व्यवहार, इ०).

कुडती स्त्री० लांबी, रुंदी, आणि उंची किं० खोली, हीं जीं पदार्थाचीं तीन परिमाणें त्यांपैकीं तिसरें. **क्रि० वि०** उंचीच्या किं० खोलीच्या दिशेनें किं० बाजूनें (लावणें, ठेवणें, बसविणें).

कुडता पु०, **कुडती** स्त्री०, **कुडतें** न० सखलाद इ०चा कमरेपर्यंत पोचणारा एक प्रकारचा अंगरखा.

कुडती स्त्री० १ कंबरेपर्यंत उतरणारा अंगरखा. २ सुताराचें एक आऊत. ३ परटाचें एक आऊत.

कुडतुडणें, कुरत(–तु)डणें स०क्रि०दांतांनीं किं० नखांनीं फाडणें किं० तोडणें.

कुडथळ न० कागदावर नमूद केलेल्या किं० तोंडीं सांगितलेल्या क्षेत्रफळापेक्षां कमी विस्ताराची जमीन.ॐ **कुडथळबिघा** पु० वीस पांडांचा बिघा.

कुडपण (–णें) न० सुमारें हात दीड हात लांबीचा आणि मनगटाइतक्या जाडीचा काठीचा तुकडा; सोडगें.

कुडबुडणें स० क्रि० १अस्पष्ट आवाजांत उच्चारणें; पुटपुटणें; तोंडांतल्या तोंडांत बोलणें. २भविष्यकथन करावयाला येतात जे जोशी त्यांनीं आपला खुळखुळा वाजविणें.

कुडबुड, कुडमुडा, कुडमुड्या जोशी पु० खुळखुळा वाजवून आपलें आगमन सूचित करून भाकित सांगावयाला दारावर येतो जो जोशी तो.

कुडबुडें न० भाकित सांगणाऱ्या जोशाचा खुळखुळा.

कुंडल [स०] पु०,न० १ कर्णभूषण. २वेटोळें.

कुंडला [सं०कुंडल] पु०तपकीर घोटावयाच्या उपयोगाचें दगडाचें किं० मातीचें पात्रविशेष.

कुंडलिनी स्त्री० (योगशास्त्रांत) पोटांत नाभीचे खालीं सर्पाच्या वेटोळ्यासारखी जी नाडी असते ती.

कुंडली [सं० कुंडलिन्] पु० १ ज्याच्या कानांत कुंडलें आहेत असा पुरुष. २ सर्प.

कुंडली [सं०] स्त्री० १ सूर्य, चंद्र, इ० खस्थ गोलांची विशिष्ट समयाची स्थिति दाखविण्यासाठीं काढतात जी विशिष्ट आकृति ती. २ चुकीनें कांहीं अक्षर किं० शब्द कागदावर लिहिला गेला असल्यास तो गाळावयाचा आहे म्ह० तो अविवक्षित आहे हें दाखविण्यासाठीं त्या अक्षराभोंवतीं किं०त्या शब्दासभोंवतीं जें वर्तुळ काढतात तें.

कुडव [सं०] पु० धान्याचें एक विशिष्ट माप किं० परिमाण.ॐ **कुडवीभार** पु० ज्या साळीच्या भाऱ्यापासून झोडपल्यावर कुडवभर साळी होतात तो भारा. **मेल्याम्हशीस कुडव दूध** जिवंतपणीं जो नादान होता तो मनुष्य मेल्यावर त्याचे आप्त त्याची अवास्तव स्तुति करतात.

कुडवा पु०भिंतीच्या खालचा भाग किं०पट्टा,–जो वरच्या भागाच्या रंगाहून भिन्न रंगानें रंगविलेला असतो तो (क्रि० देणें, ठेवणें, इ०).

कुंडा [म० कुंडी, सं० कुंड] पु० मोठें आणि पसरट तोंडाचें पात्र,–मातीचें, लाकडाचें, दगडाचें, किं० चुनेगचीचें;(तपकीर घोटणें,उसाचा रस सांठविणें, इ० कामीं उपयोजावयाचें).

कुंडा पु० धान्यादिकांचा कोंडा.

कुडा [सं० कुटज] पु० १ एक औषधी वनस्पति. २ तांदुळाची एक जात. ३ स्त्रियांचें एक कर्णभूषण;कुडें.ॐ**कुडेपाक** पु०कुड्याच्या पाळाच्या साली भाजून औषधार्थ त्याचा रस काढतात तो.

कुडा, कुढा वि० १ वाकडा, कपटी. २ मनांतल्या मनांत झुरण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा. ३ खोटें (नाणें, रुपाया, पैसा, इ०). ४ अपायकारक. ॐ **आपलाच दाम कुडा (कुढा, खोटा) आणि परक्याशीं झगडा मोठा** आपली बाजू चुकीची किं० लंगडी असून दुसऱ्यावर विनाकारण ताशेरा झाडणें. **कुडाभाव पु०** १ मनाचा वाकडेपणा; कपटी वृत्ति. २ दुष्टपणा; दुष्टावा; द्वेष. **कुडावेडा वि०** वेड पांघरलेला; लबाडीनें वेड्याप्रमाणें वर्तणारा.

कुडावा [म० कूड, सं० कुड्य] पु० १ काटक्या, कामट्या, इ०नीं केलेला आणि वरून गिलावा करून सारविलेला कूड. २ रक्षणार्थ केलेली बंदिस्ती.

कुडाळदेसकर पु० ब्राम्हणांतील एक पोटजात.

कुडी [सं० कुटि=शरीर] स्त्री० १ प्राण्याचें शरीर; उ० ह्या कुडींत प्राण आहे तोंपर्यंत मी तुमचा पक्ष सोडणार नाहीं. २ झोंपडी, कोंपी. ३ मानवी शरीर (वैतागानें किं० तुच्छतेनें); उ० ही कुडी केव्हां एकदा ओंकारेश्वरावर जाईल असें मला झालें आहे. ॐ **जशी कुडी तशी पुडी** जसें शरीर अशक्त किं० सशक्त, तसा आहार पुष्कळ किं० थोडा.

कुडी स्त्री० १ लाकडाची ढलपी; काटुक; काडी. २ हळकुंड, आलें, इ०चें जमीनींतील फांद्यांचें अंकुर. ३ आलें इ०चें एक पेरें किं० पेर. ४ एक प्रकारचा नांगर. ५ भातेणाची रास. ६ वीस ही संख्या.

कुंडी [सं० कुंड] स्त्री० पसरट तोंडाचें आणि मोठें पात्र (दगडाचें, मातीचें, चुनेगच्चीचें, किं० लाकडाचें).

कुडपणें न० १ लठ्ठ आणि अखूड काठी; सोडगें. २ मजबूत शरीराचा आणि लठ्ठ माणूस.

कुडुक न०, पु० एक कर्णभूषण. **पु०** एक झाड. **न०** त्या झाडाचें फळ.

कुडूक, कुडकवाणा (–णी) वि० १ असंतुष्ट झालेला आणि रुसून बसलेला; घम्म फुगून बसलेला. २ नाखूष (मन, मर्जी).

कुडें न० १ आलें, वेखंड, इ० चे जमीनींत पसरत जाणारे मोड किं० अंकुर. २ आलें, वेखंड, सुंठ, इ० चें एक पेरें, किं० लहानसा तुकडा. ३ एक कर्णभूषण.

कुडें न० १ द्वेषबुद्धि; शंकित वृत्ति. २ कावा, दुष्टाव्याची हिकमत. ॐ**ज्याचें कुडें त्याच्या पुढें** दुसऱ्याच्या हानीची खटपट करणाराची हिकमत त्याची त्यालाच जाचक होते. **कुडेंपावडें** १ दुष्टावा; दुष्ट बुद्धि. २ दुष्टपणाची हिकमत. ३ चेटूक; जारणमारणाचीं कर्मे. **कुडें शहाणपण न०** दुष्टपणा; दुष्टबुद्धि; वक्रमार्ग. **कुडें कपट न०** ' कुडें ' याचे १ व २ हे अर्थ पहा.

कुंढग [सं० कु (वाईट)+म० ढंग (चाळे)] पु० वेडे वेडे चार; मूर्खपणाचीं कृत्यें (अनेकवचनीं प्रयोग).

कुढणें [हिं० कुढना] अ० क्रि० असंतुष्टपणें मनांतल्या मनांत झुरणें किं० कष्टी होणें.

कुढा वर ' कुडा ' पहा.

कुढाण स्त्री० कुजक्या पदार्थाची घाण.

कुढापा [म० कुढा] पु० १ द्वेषबुद्धि; वैर. २ चरफडाट.

कुणकूण स्त्री० १ हलक्या स्वरांत कोणेकाशीं बोलणें किं० संभाषण करणें. २ असंतुष्टपणें चालविलेली पिरपीर. ३ दुसऱ्याला त्रास येईल इतकी याचना (क्रि० करणें, लावणें). ४ गांवांत लोक भीत भीत जी बातमी एकमेकांत हलक्या स्वरांत सांगतात ती.

कुणकुणणें अ० क्रि० १ हळक्या स्वरांत बोलणें; पुटपुटणें. २ लोचटपणें याचना करीत राहाणें.

कुणगा पु० १ हिस्सेदार भाऊबंदांपासून चोरून बाजूला काढून ठेविलेलें समाईक संपत्तीचें वाटणी व्हावयाच्या पूर्वीचें द्रव्य, दागिना, भांडीं, सणंग, इ०. २ धोतराचा सोगा किं० कासोटा. ३ भातशेताची वाटणी. ॐ**कुणगेकरी** वाटणी व्हावयाच्या अगोदर समाईक संपत्तींतून ज्यानें कांहीं भाग चोरून बाजूला काढून ठेवला आहे तो.

कुणट न० १ पोह्यांत जे बारीक कण असतात ते प्रत्येक. २ पोह्यांत भाताच्या टरफलांचे जे तुकडे राहून गेलेले असतात ते प्रत्येक.

कुणप [सं०] पु०, न० प्रेत; मुडदा.

कुणबट पु० कुणबी (तिरस्काराचा शब्द).

कुणबाऊ [म० कुणबी] वि० १ कुणब्यासंबंधाचा. २ कुणब्यांत आढळणारा. ३ कुणब्याला शोभेसा. ४ रानवट; गांवढळ; खेडवळ. ५ कुण-

ब्यांत प्रचलित किं० रूढ (भाषा, शब्द, पोशाख, विधि, इ०).

कुणबावा, कुणबवा [म० कुणबी] पु० १ शेतकीचें काम. २ सरकारधारा पथकरून घेतलेली शेत किं० बाग, मळा, इ०च्या उपयोगाची जमीन. ३ अशा जमीनींवरचा सारा ॐ**कुणबावेदार** पु० १ सरकारधारा पथकरून ज्यानें शेत वगैरे घेतलें आहे तो. २ कुणबावा वसूल करणारा अधिकारी.

कुणबी पु० शेतकीचा धंदा करणारी एक शूद्र जात. ॐ**कुणब्या इळया इतका उजू** वि० १ अत्यंत वाकडा. २ ज्याची कांहीं केल्यानें समजूत पडत नाहीं असा. **कुणबी मेला भुतानें, बामण मेला वातानें, सोनार मेला पित्तानें** कुणबी भुतांखेतांच्या भयानें बेजार होतो, सुग्रास परान्न आकंठ खाल्ल्यानें अजीर्णानें ब्राह्मण बेजार होतो, आणि सदा शेगडींत डोकें खुपसून बसल्यामुळें सोनार पित्तानें बेजार होतो. **कुणब्यासारखा दाता नाहीं, पण कुटल्यावांचून देत नाहीं** कुणब्यापासून आपणाला पुष्कळ प्राप्ति करून घेतां येते पण त्याला पिळून काढलें तरच ही प्राप्ति होते. **शूद्रका बेटा, गहूंका आटा, जिस बखत कुटा तो मिठा** कुणब्याला कुटावें आणि कणीक तिंबावी त्या मानानें कुणबी पैसा देतो आणि पोळी गोड लागते. **कुणबीक** स्त्री० शेतकीचें काम. **कुणबीण** स्त्री० १ कुणबी जातीची स्त्री. २ कुणब्याची पत्नी. ३ दासी. **कुणबीदोक** वि० १ कुणब्यानें स्पर्शिलेलें (पाणी, अन्न, भांडें, इ०); कुणब्यानें आणलेलें किं० भरलेलें (पाणी, इ०). **कुणबीमाळी** पु० १ शेतकरी, शेतकीला आवश्यक साधनें बनविणारे लोक, फळें, फुलें, भाज्या, इ० विकणारें लोक, समुच्चयानें. २ खालच्या वर्गांतील, किं० जातींतील, लोक साधारणपणें.

कुणी न० कोणत्याही डाळीचा पोकळ आणि हलका दाणा. [३ धलपी.

कुणी स्त्री० १ लाकडाची खुंटी. २ पाचर.

कुणी ' कोणी ' चें संभाषणांतील अपभ्रष्ट रूप.

कुणेट, कुण्येट न० पोह्यांत जो बारीक चुरा असतो त्यांतील प्रत्येक कण.

कुतका पु० १ भांग घोटावयाचा लाकडाचा खुंटा. २ रट्टा, तडाखा, बुक्की, गुध्धा.

कुतंगळ, कुतंगळ्, कुतुंगळ, कुतुंगळ् वि० १ किं० अशक्त; नाजूक (मनुष्य, जनावर, इ०). २ बायल्या (पुरुष); नपुंसक. ॐ**घर कुतुंगळ् कणगीला पडलें डुळूं** घरांतील माणसें दिसतात हाडकीं रोडकीं पण त्यांचें खाणें पुष्कळ आहे, कारण कणिंग रिकामी पडत चालली आहे.

कुतडा, कुथडा [म० कुंथणें] पु० ज्वरादिकारणांमुळें किं० उपासमारीमुळें आलेली अशक्तता; उ० तूं जोरानें कां नाहीं काम करीत ? तुला कुतडा भरला आहे कीं काय ?

कुतनी स्त्री० अर्धें रेशीम आणि अर्धें सूत घालून विणलेलें पट्टेदार कापड.

कुतप [सं०] पु० दिवसाचा आठवा मुहूर्त (म्ह० मध्यान्ह समय).

कुतरा, कुत्रा पु० एक चतुष्पाद ग्राम्य जनावर. (कुतरा प्रामाणिकपणासाठीं प्रसिद्ध आहे). ॐ**कुतर ओढ (–वोढ, –तोड)** स्त्री० १ अनेक कार्यें एकदम करणें प्राप्त झाल्यामुळें होते जी तारांबळ ती. २ अनेकांचीं देणीं झाल्यामुळें आणि अनेकांकडून नेटाचे तगादे आल्यामुळें होते ती धांदल. **कुतरघाई** स्त्री० १ काम करण्यासाठीं एकाद्याला लावलेला नेट किं० घाई (करणें, लावणें, मांडणें). २ अगोदरच उशीर झालेला असल्याकारणानें आणि योग्य समय चुकूं न द्यावा म्हणून कोणी करतो जी लगबग ती. **कुतरझाड** न० एक कांटेरी झुडूप. **कुतरी, कुत्री** स्त्री० कुतऱ्याच्या जातींतील मादी.

कुतरें, कुत्रें न० १ कुतऱ्याचें पोर. २ कुतरा (तिरस्कारानें).

कुतर्क [सं०] पु० सरळ मार्ग सोडून आणि वाकड्या मार्गांत शिरून काढलेली शंका किं० मनांत आणलेली अडचण.

कुंतल [सं०] पु० केश.

कुतूहल [सं०] न० १ जिज्ञासा. २ उत्सुकता. ३ आनंद. ४ आश्चर्य.

कुत्ता [हिं०] पु० कुतरा. ॐ**कुत्तेघशी, कुत्तेघाशी** स्त्री० अंगावर बसलेलें अप्रिय काम; थोड्या लाभासाठीं करावी लागते जी त्रासदायक चाकरी किं० कामगिरी ती. **कुत्तेमल्हार** [म० कुतऱ्यानें गायिलेला मल्हार राग] पु० कर्कश आवाजांत आणि बदसूर गायि-

लेलें गाणें. **कुत्तेवान पु०** कोण्या श्रीमंतानें हौसेसाठीं बाळगिलेल्या कुतऱ्यांची व्यवस्था ज्याच्याकडे असते असा अधिकारी.

कुत्रा पु० वर ' कुतरा ' पहा.

कुत्रापि [**सं०** कुत्र=कोठें;+अपि=ही] **क्रि० वि०** कोठेंही, कोणत्याही स्थळीं.

कुत्री स्त्री० १ वर ' कुतरी ' पहा. २ एक वनस्पति.

कुत्रें न० १ वर ' कुतरें ' पहा. २ कुतरा हा प्राणी (लिंग मनांत न आणतां). ३ दार किं० खिडकी बंद करावयासाठीं जी लाकडाची किं० लोखंड इ० धातूची केलेली असते योजना ती. ४ एक प्रकारचें गवत. ५ एक प्रकारची वनस्पति, किं० तिच्या फुलांचा सकंटक तुरा,– जो वस्त्राला लागतांच त्याला चिकटून बसतो; मुलें गमतीखातर हीं कुत्रीं एकमेकांच्या अंगावर फेकतात. ६ भांडखोर माणूस: लोकांवर एकसारखें तोंड टाकणारा माणूस. ७ कोणीही माणूस (नकारार्थी प्रयोग); उ० माझ्या शोधाला कोणी माणूस आलें होतें काय ? उत्तरः–कुत्रें देखील आलें नव्हतें. ८ कोणीही यःकश्चित् किं० धिक्कारार्ह माणूस. ९ लाळघोट्या किं० गोंडा घोळणारा कोणीही माणूस. ☸ **धर्माचें दारीं कुत्रें आडवें येतें** कोणा श्रीमंत किं० समर्थ माणसाकडे किं० एकाद्या अधिकाऱ्याकडे कांहीं याचना किं० प्रार्थना करावयाला कोणी दीन माणूस किं० कोणी हलक्या दर्जाचा कारकून जात असला तर त्याला दारावरचे पट्टेवाले किं० शिपायी प्रतिबंध करतात (दुष्ट बुद्धीनें किं० मत्सरानें किं० पारितोषिकाच्या इच्छेनें). **कुत्रीं मारीत हिंडणें** किं० **फिरणें** निरुद्योगीपणांत काळ घालविणें. **कुत्रें आपणाला डसलें तर आपण त्याला डसावें कीं काय** ? कोणी हलकटानें आपणाविरुद्ध कंड्या पिकविल्या म्हणून आपण त्याच्या विरुद्ध कंड्या पिकवाव्या कीं काय ? **एकाद्याच्या पायाशीं कुत्रा (किं० कुत्रें) होऊन पडणें** किं० **राहाणें** त्याची नीचपणाची सेवाचाकरी करणें (आपला दर्जा विसरून जाऊन). **कुत्र्याचे पाय मांजरावर आणि मांजराचे पाय कुत्र्यावर घालणें** १ नानाप्रकारच्या लटपटी आणि खटपटी करणें (इष्टकार्य साधण्यासाठीं किं० केवळ गमतीखातर). २ असंभवनीय गोष्टी घरून सुटणें. **कुत्र्याला हाड म्हटलें म्हणजे कुत्रें हाड टाकून पळून जातें** अशीच खरोखरची वस्तुस्थिति आहे. " हाड " ह्या शब्दावर श्लेष आहे. ह्यावरून व्यवहारांत पुढील अर्थ झाला. दुर्वर्तनी माणसाचा कितीही तिरस्कार केला तरी तो आपलें निंद्य वर्तन सोडीत नाहीं; तो कुत्र्यापेक्षाही अधम प्राणी होय. **कुत्र्यासारखें हिंडणें** किं० **फिरणें** आळसांत काळ घालविणें. **ये रे कुत्र्या आणि चाव रे माझा पाय** केवळ हौसेखातर भांडणें उपस्थित करून तीं भांडत बसणारा मूर्ख माणूस किं० आंवटशोकी किं० दुष्ट स्वभावाचा माणूस. **कुत्र्याचा पाय पु०** रान तेरड्याचें फूल. **कुत्र्याची चार स्त्री०** एक वनस्पति. **कुत्र्याची झोप स्त्री०** अति सावध झोप; अति लहान आवाज झाला तरी जो जागा होतो त्याची झोप. **कुत्र्याचें कुत्र्याचें छत्र न०** एक वनस्पति. **कुत्र्याचें जिणें न०** १ ज्याणें त्याणें हिडिस्सफिडिस्स करावें अशी आयुष्यक्रमणपद्धति. २ अत्यंत हीनदीनपणाची स्थिति. **कुत्र्याचें तोंड न०** भांडखोर माणूस. **कुत्र्याचे दांत पु० अ० व०** दुध्ये दांत मुलांना येतात ते. **कुत्र्याचे पाय मांजराचे पाय पु० अ० व०** वाईट वळणांत आणि निष्काळजीपणानें लिहिलेल्या पत्राचीं अक्षरें. **कुत्र्याचें मूत न०** तुसड्या स्वभावाचा किं० तिरसट माणूस. **कुत्र्याचें शेपूट न०** कितीही उपदेश केला तरी जो सुधारत नाहीं असा माणूस. जगामध्यें हजारों वाकड्या वस्तु आहेत परंतु वाकडेपणाच्या उपमानपदीं आपल्या सर्व पूर्वकवींनीं कुत्र्याच्या शेपटासच तो मान दिला ही लक्ष्यांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे ! **गांवचें कुत्रें** किं० **काळें कुत्रें देखील विचारणार नाहीं** ज्याला सर्व गांवानें हिडिसफिडीस करावें असा यःकश्चित् माणूस सुद्धां विचारणार नाहीं; कुण्णी कुण्णी सुद्धां किंमत किं० मान देणार नाहीं.

कुत्सन न०, कुत्सा स्त्री० १ निंदा. २ तिरस्कार. [(विचार).

कुत्सित [**सं०**] **वि०** १ निंद्य. २ कुत्र्यका

कुंथणें, कुथणें[**सं०** कुंथ्=दुःख भोगणें] **अ० क्रि०** १ कण्हणें(दुःखानें किं० वेदनेनें). २ मलविसर्जन होण्यासाठीं बलानें अपानवायु रेटून कंठानें

शब्द करणें. ३ कांहीं एका कार्याच्या सिद्धीसाठीं सर्व शक्ति खर्चून प्रयत्न करीत राहाणें. ४आरंभिलेल्या कार्यांत यश न आल्यामुळें खेद करीत बसणें.

कुंथविणें, कुथविणें [**म०** 'कुंथणें,' 'कुथणें,' यापासून प्रयोजक रूप] **स० क्रि०** एखादा माणूस जेरीस येईल,कंटाळेल किं०चरफडेल इतका वेळ त्यास कांहीं कार्यांत अडकावून ठेवणें किं०तिष्ठत बसाविणें.

कुंद[**सं०**] **पु०** १ एक पांढऱ्या पुष्पांचा वेल. २ गुरांचा एक रोग. ४ घराच्या माथ्याच्या छपराचीं दोन पांखीं जेथें एकमेकांना मिळतात तेथील कोन. ३ रस्त्याचें वळण. ५ रुमाल, शालजोडी, इ०च्या कोपऱ्यांत काढलेलें फूल किं०कांहीं आकृति. ६ कुबेराच्या नवनिधींपैकीं एक.

कुंद [**म०** कोंडणें] **वि०** १ कोंडलेला; कोंदलेला; चोंदलेला; स्तब्ध; बंद (हवा, इ०). २ ज्यांतून साफ उच्चार निघत नाहीं असा (कंठ, वाद्य),किं०अशा कंठांतून निघालेला (ध्वनि).

कुदकणें स०क्रि०कोणेकास लाथाबुक्या मारणें.

कुदंड, कुदंडखोर इ० ' कुभांड, ' ' कुभांडखोर ' पहा.

[उड्या मारणें.

कुदणें अ० क्रि०१ उडी मारणें. २घोडा इ०नीं

कुदविणें स० क्रि० १झोडपणें,बडविणें (माणसाला किं० जनावराला). २ क्रूरपणानें वागविणें.

कुदळ स्त्री०, कुदळें न० [**सं०**कुद्दाल=कुदळ] १ जमीन खणावयाचें एक आउत. २ द्वाड, खोडकर, किं० वात्रट माणूस.

कुदळणें [**म०** कुदळ] **स० क्रि०** कुदळीनें जमीन खणणें.

[वागविणें.

कुदळणें स० क्रि० गांजणें; सतावणें; क्रूरपणानें

कुंदळणें स० क्रि० १ कठोरपणानें वागविणें; गांजणें. २ झोडपून काढणें. ३ छिन्नविछिन्न करणें. ४ तुडविणें (चुना, इ०). पुढें ' खुंदळणें ' पहा.

कुदळा [**म०** कुदळ] **पु०** मोठी कुदळ.

कुदळी स्त्री० लहान कुदळ. ॐ **कुदळ्याचें वि०** कुदळीनें (नांगरानें नव्हे) खणलेल्या जमीनींत पिकविलें (धान्य, फळें, भाज्या, इ०).

कुंदा पु० १ गवताची एक जाति. २ एक फुलझाड. ३ भांग, तपकीर, इ०घोटावयाचा कुंडा.

कुंदा [**फा०** कुंदाह्] **पु०** बंदुकीचा दस्ता.

कुदांड न० ' कुभांड ' पहा.

कुदांड वि० १ दांडगट; आडदांड. २ धटिंगण. ३ मजबूत बांध्याचा. (खालचा शब्द पहा).

कुदाडी स्त्री० १ दांडगाई; वात्रटपणा. **वि०** १ दांडगा. २ धटिंगण. ३ वात्रट. ॐ **कुदाड्या, कुदांडखोर वि०** कुभांडें आणणारा.

कुदाळ [**सं०**कुद्दाल] **पु०**मोठी कुदळ.

कुंदी [**हिं०**] धुतलेल्या चिरगुटांच्या घड्या घट्ट बसावयासाठीं त्या मोगरीनें ठोकून बसाविण्याचा संस्कार किं० कृति. ॐ **एकाद्याची कुंदी काढणें** त्याला झोडपून काढणें; त्याला चोपणें.

कुंदणें अ० क्रि० ' कुंद ' नांवाच्या रोगानें ग्रस्त होणें (जनावर).

[आउत.

कुद्दाल [**सं०**] **पु०** कुदळ,—खणण्याचें एक

कुधण, कुधन, कुधाण, कुधान वि० १ शंकाखोर. २ दुष्ट;मत्सरी. ३ तिरसट, चिरडखोर. ॐ **कुधानकाकडा पु०** शंकाखोर, दुष्ट, किं० तिरसट माणूस.

कुधाड, कुधांडी, इ० पुढें ' कुभांड, ' ' कुभांडी, ' इ० पहा.

कुन्हा [**फा०** कुह्नाह्] **पु०** आकस; द्वेषबुद्धि; खुनशी वृत्ति, (**क्रि०** धरणें, ठेवणें). ॐ **कुन्हेबाज, कुन्हेवाईक वि०** आकसखोर; खुनशी स्वभावाचा.

कुंप, कुंपण, कुपण, न० आडोशाकरतां घातलेली वई; झुडपें, कामट्या, काड्या, इ० चें केलेलें आवरण (घर, बाग, मळा, इ०चें भोंवतीं). ॐ **सरड्याची धाव कुंपणापर्यंत** अल्प सामर्थ्याच्या किं० वकूबाच्या माणसानें आपणाकडून पराकाष्ठा केली तरी त्याच्या हातून अल्प किं० क्षुल्लक कामच होणार.

कुपठ स्त्री० गृह,क्षेत्र,इ०ची कड किं० मर्यादा.

कुपा [**सं०** कुतुप=डबडें, बुधला] **पु०** काचेचें किं० दगडाचें औषधें इ० ठेवण्याचें लहान तोंडाचें बारदान.

[करतात.

कुपा पु०एक प्रकारचा दगड,—ज्याची रांगोळी

कुपी [**सं०** कुतुप=डबडें, बधला] **स्त्री०** औषधें, इ० ठेवण्याचें दगडाचें किं० गारेचें लहान तोंडाचें लहानसें बारदान.

कुपीण (—न) [**सं०** कौपीन=गुह्यांग; लंगोटी] **स्त्री०** गोसावी, बैरागी, इ०ची लंगोटी.

कुपेथर [म० कुपा + थर] **वि०** ' कुपा ' नांवाच्या दगडाच्या थरांतून निघालेला किं० काढलेला (धोंडा). वर ' कुपा ' पहा.

कुप्पा पु० मोठा कुपा. वर ' कुपा ' पहा.

कुफरांड, कुफराण, कुफराणा [अ० कुफ़रान] **पु०** एखाद्यावर केलेला खोटा आरोप: (**क्रि०** येणें, घालणें, करणें) इ०. ॐ **कुफरांडी** (–णी) **वि०** दुसऱ्यावर खोटा आरोप घालणारा.

कुंफळ न० ' कुंभा 'नांवाच्या झाडाचें फळ.

कुबट वि० १ पाणकट किं० कोंडलेल्या हवेंत असल्यामुळें दुर्गंधयुक्त झालेलें (धान्य, चिरगूट, इ०). २ कुजकें भाषण करणारा. ३ शिवराळ.

कुबटणें अ० क्रि० कुबट होणें; कोंडलेल्या किं० सर्द हवेंत असल्यामुळें दुर्गंधयुक्त होणें.

कुबड [सं० कुब्ज=कुबड] **न०** १ कांहीं वातादि विकृतांना पाठीस येतो जो बांक किं०वाकडेपणा तो. २ वृद्धपणीं येतो जो पाठीला वाकडेपणा तो. ३ कित्येक माणसांच्या पाठीस जन्मजात जो विशोभित दिसणारा उंचवटा असतो तो.

कुबडा, कुबड्या वि० ज्याच्या पाठीस कुबड आहे असा.

कुबडी स्त्री० रामदासी पंथाच्या लोकांच्या हातांत ओठंगण्याच्या उपयोगाचा असतो तो दंड. वैरागीही असला दंड बाळगतात. ॐ **कुबडी काढणें** कांहीं दोष किं०कमीपणा किं०न्यून हुडकून काढणें.

कुंबारी, कुंबरी जमीन स्त्री०, कुंबरी रान न० डोंगराच्या पायथ्यास असलेली फारशी कसदार नव्हे अशी जमीन.

कुबलणें स० क्रि० एकाद्याला लाथाबुक्यांनीं मारणें; त्याला झोडपून काढणें.

कुंबल न० एक कांटेरी झाड,–कुंपण करण्याकडे बहुधा याचा उपयोग केला जातो.

कुंबा पु० खाऱ्या पाण्यांतील एक मत्स्यविशेष,– जो खडकाला किं० गलबताच्या तळांना चिकटून राहतो.

कुंबा पु० एक जंगली वृक्ष.

कुंबेकुकूड पु० वर ' कुकुडकुंभा ' पहा.

कुबेर [सं०] **पु०** १ देवांचा खजिनदार (याला तीन पाय, एक डोळा, आणि आठ दांत आहेत). २ कोणीही जो लक्षाधीश किं० कोट्यधीश तो. ॐ**कुबेराद्रि पु०** कैलास. **कुबेरदिशा स्त्री०** उत्तर दिशा. **कुबेराचें धन आणि मार्कंडेयाचें आयुष्य असावें** इंग्रजांच्या कायद्याच्या कोर्टांत जावयाचें असलें तर कुबेराची संपत्ति जरूर आहे आणि मार्कंडेयाच्या इतकें दीर्घ आयुष्य जरूर आहे. मार्कंडेयाला शंकराच्या वरानें दीर्घ आयुष्य प्राप्त झालें होतें. इंग्रजांनीं स्थापिलेल्या कोर्टांत खटला नेणें हें अत्यंत खर्चाचें आणि दिरंगाईचें किंवा कधींच समाप्त न होणारें काम होय.

कुब्ज [सं०] **वि०** वाकडा. **पु०** कुबडा.

कुब्बल वि० सामान्य प्रमाणाहून पुष्कळच अधिक शक्ति, वजन, किं०कांहीं गुण ज्याचे ठायीं आहे असा (माणूस, जनावर, ओझें, इ०); उ० त्याचा आहार कुब्बल दीड शेराचा आहे; उ० हा भारा कुब्बल दोन खंडीचा आहे.

कुंभ [सं०] **पु०** १ घागर; घडा. २ कुंभरास. ३ श्वासनिरोध ४ हत्तीचें गंडस्थळ. ५ जार. ६ वेश्यापुत्र. ॐ**कुंभकामला स्त्री०** कावीळ म्हणून रोग आहे त्याचा एक प्रकार किं० एक अवस्था. **कुंभकार पु०** कुंभार. **कुंभज, कुंभसंभव पु०** १ अगस्त्य. २ द्रोणाचार्य. **कुंभदासी स्त्री०** कुंटीण. **कुंभकर्ण पु०** खालीं ' कुंभकर्ण ' यथास्थानीं पहा.

कुंभक [सं०] **पु०** खांबाचा तळ. २ श्वासनिरोध.

कुंभकर्ण [सं०] **पु०** १ रावणाचा एक भाऊ; हा अति झोपाळू होता. २ कोणीही अति झोपाळू माणूस. ॐ**कुंभकर्णाची झोप, कुंभकर्णी स्त्री०** एक सारखी पुष्कळ काळपर्यंत घेतलेली झोप; कितीही हाका मारल्या किं० हालविलें तरी न जाणारी झोप; अति गाढ झोप.

कुंभा पु० १एक पक्षिविशेष. २एक जंगली झाड; याचीं पानें जाडीं असून विरल्यावर घालावयाच्या उपयोगाचीं असतात आणि त्याच्या फांद्यांच्या सालीं वळून दोऱ्या करतात. ३ दुसरें एक लहानसें झाड; त्याचीं फुलें शंकरास प्रिय आहेत; त्याला ' दुधाणी, ' ' शेतवड ' ' शेतोड ' अशीं अन्य नांवें आहेत.

कुभांड, कुभांड आभांड न० १ दुसऱ्यावर केलेलें खोटें दोषारोपण; आळ. २ कपट कारस्थान. ३ सत्याचा अपलाप. ॐ**कुभांडी, कुभांडखोर,**

कुभांडया, कुभांडया आभांडया वि० १ दुसऱ्यावर खोटें किं० निराधार दोषारोपण करण्याचा ज्याचा स्वभाव असा. २ कारस्थानी; दुसऱ्याची आब्रू खराब करणाऱ्या खोट्या गोष्टी रचणारा किं० त्या समाजांत प्रसृत करणारा. ३ सत्याचा अपलाप करणारा.

कुंभार [सं० कुंभकार] **पु०** मातीचीं भांडीं, कौलें, विटा, इ० पदार्थ करणारा. ॐ**कुंभारास मडकीं धड नाहींत** मडकीं विकून पैसे मिळविण्याची हाव कुंभारास असल्याकारणानें तो न विकतां येण्याजोगींच मडकीं वापरतो. **कुंभारकाम न०** (विशेष अर्थ) विवाहादि कार्यास लागतो जो मडकीं, इ०पात्रसमुदाय तो समुच्चयानें. **कुंभारक्रिया स्त्री०** शूद्र मेला असतां कुंभाराचे हातून त्याची जी उत्तरक्रिया करवितात ती. **कुंभारगवंडी पु०** एक जात; किं० त्या जातीचा इसम. हे लोक जातीनें कुंभार असून ते धंदा मात्र गवंड्याचा करतात. **कुंभारघाणी स्त्री०** १ कुंभाराचा मडकीं तयार करावयासाठीं मळलेल्या मातीचा जो लध्या किं० ढीग तो. **कुंभारवाडा पु०** कुंभारलोक राहतात तो गांवाचा भाग. **कुंभाराच्या देवी** किंवा **माता स्त्री० अ० व०** देवी टोंचवून घेतात त्या. **कुंभारी वि०** १ कुंभारासंबंधीं. २ कुंभारानें केलेलें (मडकें, मूर्ति, चूल, इ०).३ पक्क झाली नसतां पक्क सुपारीचा रंग, आकार, इ०मात्र जीस आला आहे अशी (सुपारी). **कुंभारीण स्त्री०** कुंभाराची स्त्री किं० कुंभार जातीची स्त्री. **कुंभारणीनें कुंभारणीशीं कज्जा केला आणि गाढवाचा कान पिळला** १एकाचा राग दुसऱ्यावर काढणें. २ दोघांच्या भांडणांत तिसऱ्याला विनाकारण त्रास पोचतो.

कुंभार पु०एक प्रकारचा किडा.याला **कुंभारीण** असेंही म्हणतात.ॐ **कुंभारणीच्या घरांत जाईल तो किडा कुंभारीणच होतो** ज्याच्या सहवासांत आपण रहावें त्याचे गुणदोष आपणांस लागतात.

कुंभिनी [सं०] **स्त्री०** पृथ्वी.

कुंभी स्त्री०, कुंभ्या, कुंभा, कुंब्या पु० एक वृक्षविशेष. याच्या सालीच्या मजबूत दोऱ्या करतात, व त्याचीं पानें इरल्यावर घालण्याचा उपयोगीं पडतात.

कुंभीपाक [सं०] **पु०** एका नरकाचें नांव.

कुंभीर [सं०] **पु०** नक्र; सुसर.

कुंभारी [म० कुंभ] **स्त्री०** १ गवत, पेंढा, इ०कांची गंजी करतात ती. २ कुंभारीण नांवाचा किडा.

कुमक [फा० कुमक] **स्त्री०**(युद्धांत)मदत; मदत म्हणून पाठविलेलें सैन्य,द्रव्य, इ०. ॐ**कुमकपत्र न०**मदतीसाठीं दिलेलें शिफारसपत्र.

कुमकणें स० क्रि० कुदलणें; कुवलणें; कुदकणें.

कुमका पु० ठोसा; गुद्दा;बुक्कीनें केलेला प्रहार.

कुमकुमा [अ० कुमकुमाह्] **पु०** गुलालानें भरलेला पातळ काचेचा गोटा. शिमग्यांत वगैरे हे गोटे एकमेकांवर टाकतात.

कुमटपिका, कुमटका वि० अर्धवट पिकलेला (आंबा, फणस, इ० फळ).

कुमलणें स० क्रि० कुवलणें; बुक्क्या मारून जेरीस आणणें.

कुमळें न० शेताचा कमाल धारा.

कुमाईत, कुमायत [अ० कम्यत] **वि०** किंचित् तांबूस किं०पिंगट;काळसर तांबूस(घोडा).

कुमार [सं०] **पु०** १ पांच वर्षांच्या आंतील मुलगा. २ प्रौढ दशेस आला नव्हे असा पुत्र. ३ राजकुमार, राजपुत्र, युवराज. ४ कार्तिकेय. ॐ **कुमारभृत्या स्त्री०** १ सुईणपणा. २ शिशुसंगोपन.

कुमारिका, कुमारी [सं०] **स्त्री०** १ जिचा विवाह झाला नाहीं अशी मुलगी. २ दहा किं० बारा वर्षें वयाची मुलगी; बालयुवती. ३ अविवाहित कन्या. ४ मुलगी. ॐ **कुमारिका (–री) आसव पु०** कोरफडीपासून करतात तें एक औषध.

कुमुद [सं०] **न०** १ श्वेतकमळ. २ रक्तकमळ.(हीं दोन्ही चंद्रविकासी आहेत).ॐ**कुमुदबांधव पु०** चंद्र.

कुमुदिनी [सं०] **स्त्री०** १ कुमुदपुष्पाचें जें झाड तें. ३ कमलपूर्ण तळें.

कुमेटका वि० अर्धवट पिकलेलें; परिणत व्हावयास लागलेलें किं० पिकावयास आलेलें,–काजू, आंबा, इ० फल.

कुमेत [अ०] **वि०** 'कुमाईत,' 'कुमायत' हे शब्द मागें पहा.दांडी, आयाळ, गुडघे, पाय, आणि

कान, हे काळे असून शरीरानें रक्तवर्ण असा जो घोडा तो, किं० यत्किंचित रक्तामिश्र जो सर्वांगा (तो घोडा). [(झोंपडें).

कुयटारू वि० तृण, झांपा, इ० नीं शिवलेलें

कुयरा, कुयरी, कुयरें, कुयला, कुयली मागें अनुक्रमानें ' कुइरा, '' कुइरी, 'इ० शब्द पहा.

कुरकुंची [सं० क्रौंच] **स्त्री०** एक पक्षिविशेष; करकोचा.

कुरकुटणें, कुरकुडणें स० क्रि० दांतांनीं किं० नखांनीं पदार्थ थोडा थोडा तोडणें; कुरतडणें.

कुरकुटी स्त्री० बारीक जो अंगांत ज्वर येतो तो.

कुरकुर स्त्री० तकरार; असंतुष्टपणानें केलेली पिरपिर.

कुरकुरणें अ० क्रि० असंतुष्टपणानें पिरपिर करणें; हलक्या स्वरांत चरफडणें. [रोग तो.

कुरकुरी स्त्री० घोड्याच्या पोटांत होतो एक

कुरकुरीत वि० १ खातांना ज्याचा कुरकुर असा आवाज होतो असें (खाद्य,—पापड, पापडी, सांडगा, कुरडई, इ०).२ कुडकुड आवाज ज्याचा होतो असें(वस्त्र,इस्त्री केलेला परटीचा कपडा, इ०)

कुरकुला पु०, कुरकुली, कुरकूं स्त्री०, कुरकुलें न० एका विशिष्ट आकाराचें वांबूचें, चिव्याचें, किं० झाडांच्या फोकांचें पात्र किं० बारदान.

कुरंग [सं०] **पु०** हरिण ❀**कुरंगनयना स्त्री०** सुंदर डोळ्यांची स्त्री. ' कुरंगनैना ' हा गांवढळ अपभ्रंश.

कुरगोटऱ्या स्त्री० अ० व० ज्या बैदुलाच्या खेळांत जिताच्या पाठीवर जेता बसतो तो प्रकार.

कुरघोडी स्त्री० १ दुसऱ्या मनुष्याला आपल्या पाठीवर बसावयासाठीं ओणवलेल्या माणसाचें संस्थान म्ह० गात्रांची मांडणी. २ मुलांचा एक खेळ. ❀ **एकाद्यावर कुरघोडी करणें** त्याच्यावर आपलें स्वामित्व गाजविणें; दुसऱ्याचा पक्ष हाणून पाडण्यासाठीं त्याच्या युक्तीवर आपली प्रयुक्ति लढविणें.

कुरचणें स० क्रि० नखांनीं तोडणें.

कुरचा पु० १ विचकुरा; ओरखडा. २ नखांनीं किं० पंज्यांत पकडणें.

कुरचूक वि० ढिसूळ (लाकूड, काच, पान, इ०).

कुरटंक पु० एक पुष्पविशेष.

कुरठा, कुरटा वि० १ मनाचा कपटी. २ मनातल्या मनांत असंतुष्टपणानें झुरणारा; कुढा.

कुरडई स्त्री० तांदूळ, गहूं, रताळीं, किं० बऱ्या, या द्रव्यांचें सोऱ्यांतून चेपून काढून, नंतर वाळवून आणि तळून जें खाद्य करतात तें; हें खातांना कुरुम कुरुम वाजतें.

कुरडा वि० १ किंचित मिटलेला (डोळा).२ ज्याचा डोळा किंचित मिटलेला आहे असा(माणूस).

कुरडुकें, कुरडुग न० पुढें ' कोरडिकें ' पहा.

कुरडू पु० १ स्त्रियांचें एक कर्णभूषण.२ हें भूषण कानाच्या ज्या भागांत घालतात तो भाग. ३ एक प्रकारचें लांब पातीचें गवत,—त्याचीं फुलें गुलाबी रंगाचीं असतात.

कुरण न० शेत न करतां गुरांस गवत करण्यासाठीं जी जमीन मोकळी सोडलेली असते ती किं० अशा उद्देशानें ज्यावर गवत वाढूं दिलेलें असतें तो प्रदेश. ❀ **कुरण्या पु०** कुरणाच्या रक्षणार्थ ठेविलेला गडी.

कुरणेकरी वि० बहुत दिवस आजारी पडलेला किं० बहुत दिवस आजारी पडल्यामुळें अशक्त झालेला.

कुरतुडणें स० क्रि० नखांनीं किं० दांतांनीं फाडणें किं० तोडणें किं० चोंचावणें.

कुरंद पु० एक प्रकारचा तांबूस आणि मृदु धोंडा; याचीं जातीं करतात, किं० शस्त्रांना धार देण्याचे कामीं याचा उपयोग करतात.❀**कुरंदी वि०** ' कुरंदी ' ह्या नांवाच्या दगडाचा केलेला, (सहाण इ० पदार्थ).

कुरनिशात, कुरनिस [**फा०** करद् निषात] राजा किं० कोणी बडा अधिकारी यांस जमीनीला हात लावून करतात जो नम्रपणाचा सलाम तो.

कुरपण न० स्वयंपाकाच्या कामाचीं भांडीं किं० पळी, झारा, इ० आऊतें ठेवावयाची पाटी,—जी शिंक्यांत घालून लोंबत सोडिलेली असते.

कुरबुर स्त्री० असंतुष्टपणाची पिरपीर किं० चिरचीर; असंतुष्टपणाचे उद्गार.

कुरबुरणें अ० क्रि० १ असंतुष्टपणानें पिरपीर करणें,—मनांतल्या मनांत किं० तोंडानें पुटपुटून. २ शब्दांनीं असंतोष व्यक्त करणें. ३ चरफडणें. ४ पोटांत गुरगुरणें.

कुरमणें अ० क्रि० १ धुमसणें, धुमसत असणें

(गोंवरी, इ०).२ मनांतल्या मनांत चरफडणें. ३ पोटांत गुरगुर असा आवाज होणें; उ० माझ्या पोटांत कुरमुरत आहे किं० कुरमत आहे.

कुरमुर स्त्री० १ चरफड ; तरफड; धुमसणें; जळफळाट. १ पोटांत गुरगुर असा आवाज होणें (**क्रि०** उठणें, निघणें, थांबणें, इ०).

कुरमुरणें अ० क्रि वर ' कुरमणें ' याचा २ अर्थ पहा; कुरमुरे खाणें, चरफडत बसणें.

कुरमुरा पु०, कुरमुरी स्त्री० उत्रजें, तांदूळ, किं० पोहे कांहीं विशिष्ट संस्कारांनीं भाजून कुरकुर वाजावयाजोगे करतात ते; चुरमुरे. ॐ**कुरमुरे किं० चुरमुरे खाणें किं० खात बसणें** मनोरथ सफळ न झाल्यामुळें हिरमुष्टें किं० खट्टू होऊन बसणें.

कुरली स्त्री० हाताच्या पंज्याला होतो जो एक रोग तो,–यांत बोटें सुजून ताठरतात.

कुरलें न०,कुरली स्त्री०१खाऱ्या पाण्यांत किं० त्याच्या शेजारीं असणारा एक प्राणी. २ हाताच्या पंज्याच्या खालच्या म्ह० बाहेरच्या बाजूस होतें तें गळूं.

कुरवंडणें स० क्रि० वधुवरें इत्यादिकांवरून शुभप्राप्त्यर्थ निंबलोण, अन्न, इ० ओवाळून टाकणें किं० त्यांना दिवा ओवाळणें.

कुरवंडा वि० उथळ जें भातशेत तें,–ज्यांत पाणी फारसें सांचूं शकत नाहीं.याच्या उलट **ओंडण.**

कुरवडी स्त्री० तांदुळाच्या पिठाचें एक खाद्य-विशेष.

कुरवंडी [**म०** कुरवंडणें] **स्त्री०** १ दीप, इ० देवाच्या मूर्तीपुढें किं० कोणा सम्मान्य गृह-स्थापुढें किं०वधुवरांपुढें ओवाळणें,–शुभार्थ, अरि-ष्टशमनार्थ, इ०. २ हें ओवाळणें चाललेलें असतां जें गाणें गातात तें.

कुरवाळणें स० क्रि० प्रेमानें लहान मुलाच्या अंगावरून हात फिरविणें; गोंजारणें.

कुरसी, खुरसी स्त्री० बसावयासाठीं केलेलें कांहीं विशिष्ट आकाराचें आसन; खुर्ची.

कुरळ, कुरळित [**सं०** कुरल] **वि०** नाग-मोडी वळणाचे (केश); वेटाळलेलें.

कुरळी,कुरुळी स्त्री० १ धोतरजोडा, पंचेजोडी, इ० सबंध विणलेलीं जीं वस्त्रें,तीं मध्यें फाडावयाच्या जागीं किंवा इतर वस्त्रांसही पदराचे जागीं आडवीं सुते न भरतां जी जागा वगळतात ती. २ खिजा-वणी; (**क्रि०** करणें; एकाद्याची कुरळी करणें म्ह० त्याला खिजावणें; त्याची खजाळी काढणें; त्याला चीड येईल असें करणें). ३ हत्ती, घोडा, इ०नीं आपलें सर्व सर्व सामर्थ्य खर्चावें म्हणून त्यांना पराण्या, इ० नीं बोचणें.ॐ**कुरळी काढणें** एका-द्याचीं रहस्यें बाहेर काढणें,–त्याची बेअब्रू करण्या-साठीं किं० त्याची फजीती उडविण्यासाठीं.

कुराण,कुरान [**अ०** कुरान्] **न०** महमदी धर्माचा पवित्र ग्रंथ.

कुरापत [**अ०** खुराफात्]**स्त्री०** खजाळी;कज्जा, कलह, किं० भांडण होण्यास बळेंच उत्पन्न केलेलें जें निमित्त तें; जेणेंकरून भांडण होईल अशी दुस-ऱ्याची काढलेली खोडी; (**क्रि०** काढणें).

कुरी स्त्री० १ उपद्रवकारक जीं भुतेंखेतें, रोग, इ० त्यांचा उपद्रव न व्हावा म्हणून अमुक अमुक कालीं अमुक अमुक तुला देण्याचा देईन इ०जो नियम एकादा विशिष्ट देव किं० भूतपिशाच यांच्याशीं केलेला असतो तो; अशा प्रकारची केली जी शर्त देवादिकांजवळ ती. २ कांहीं कार्याची योग्य किं० नियुक्त वेळा; उ० कुरीचे कुरीवर घोड्याला दाणा द्या म्हणजे तो चांगला राहील. ३ एक वृक्षविशेष. ४ एक प्रकारचा नांगर. ५ जमीन मोजण्याचें एक माप,–सुमारें अर्धा बिघा.

कुरुंग पु० डोळ्याच्या कोनाचा तांबडेपणा. हें विशेष प्रकारावरून समृद्धीचें किं० आपत्तीचें सूचक लक्षण मानलें आहे.

कुरुचिमुरुचि क्रि० वि० १ आडमार्गानें किं० किरकोळ कामें करून द्रव्य इ० मिळविणें. २ काट-कसरीनें,कसर काढून,–(द्रव्य, बेगमी, इ०खर्चिणें). २ किंचित्, थोडेसें,– पोट दुखणें, ताप भरणें इ०.

कुरुंद पु० १ एक प्रकारचा पाषाण,–सहाण, इ० ज्याची करतात तो. २ डोळ्यांतील जो पांढरा भाग त्यावरील तांबडा ठिपका.ॐ**कुरुंदी वि०** कुरुंदाची जी साहाण, जातें, निष्णा, इ०पदार्थ तो.

कुरुक्षेत्र [**सं०**] **न०**कौरवपांडवांचें जेथ युद्ध तें स्थल. हेंच हल्लींचें पानिपत होय असें कित्येकांचें मत आहे.

कुरू पु० त्वेषाचा किं० रागाचा आवेग किं० झणकारा; (**क्रि०** येणें).

कुरूम न० १ तळहात किं० पाय यांमध्यें कांटा वगैरे शिरून तेथें जी गांठ धरते ती. २ मनुष्य, घोडे, इ० कांच्या डोळ्यांतील पांढऱ्या भागावर वाढतो जो मांसांश तो; (हा एक रोग आहे).

कुरूळ [सं० कुरूल] **वि०** नागमोडी, वर्तुलाकार (केश).

कुर्पण न० घासलेलीं भांडीं ठेवण्याकरतां स्वयंपाकघरांत जी पाटी टांगलेली असते ती.

कुऱ्याट न० भाजीपाला, फळें, इ० ची घराभोंवतीं किं० घराच्या एका बाजूस केलेली बाग.

कुर्रे अ० गोट्यांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

कुर्रा पु० १ तोरा, ताठा, दिमाख, मिजास, घमेंड, अकड. २ कुन्हा; एखाद्यावर धरलेला दांत; एखाद्याविरुद्ध मनांत बाळगलेलें वैर किं० द्वेष; (**क्रि०** धरणें, ठेवणें). ॐ **कुर्रेदार, कुर्रेबाज वि०** १ घमेंडखोर; अकडबाज. २ डौलदार.

कुऱ्हाड [सं० कुठार] **स्त्री०** १ लांकडें फोडावयाचें एक शस्त्र. २ या शस्त्राचा पोलादी फाळ. ॐ**आकाशाची कुऱ्हाड कोल्ह्याचे दांतांवर** भलत्याच माणसाचें पारिपत्य. **कुऱ्हाडीचा घाव खोट्याचे कपाळीं** ज्यानें कपट केलें असेल त्याला दंड होतो (किं० होओ) ! **कुऱ्हाडीचा दांडा** स्वार्थासाठीं किं० केवळ दुष्ट बुद्धीनें शत्रुपक्ष्यांस मिळून स्वजनांचा घात करणारा जो कोणी दुष्ट, अधम, देशद्रोही तो. **कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ** कुऱ्हाडीचा दांडा आपल्या जातिबांधवांचा (म्ह० वृक्षांचा) नाश करतो त्याप्रमाणें देशद्रोही मनुष्य आपल्या देशाला शत्रूच्या हवाली करतो. **कुऱ्हाडी जमीन स्त्री०** झाडें किं० झाडांचे बुंधे जागोंजाग असल्याकारणानें नांगरतांना अडचण करणारी जमीन; अशा जमीनीवर नांगर चालवावयाचा असला तर अगोदर कुऱ्हाडीनें झाडें आणि बुंधे तोडावे लागतात. **कुऱ्हाडऱ्या लगाम पु०** मस्त, किं० नाठाळ, घोड्यास घालावयाचा एक प्रकारचा कांटेरी लगाम.

कुऱ्हाडा पु० मळसूत्रें उचकटावयाचें किं० आंत घालावयाचें साधन; मळसूत्र फिरवून काढणें किं० बसविणें हीं कामें करावयाचें एक आऊत.

कुऱ्हाडी स्त्री० कुऱ्हाड.

कुल [सं०] **न०** १ कुटुंब; वंश; घराणें. २ अभिजात वंश; उच्च घराणें. ३ समुदाय; कळप (एकजातीय जीवांचा); उ० गोकुल. ४ जात, ज्ञाति. ५ सारख्या सारख्याच गुणधर्मांचे पदार्थ; उ० कुष्मांडकुल म्हणजे भोपळ्याच्या जातीच्या काकडी दोडका, इ० वनस्पति. ॐ **कुल उद्धरणें** एकाद्याच्या कुळाला शिव्या देणें. म्ह० आईमाईवरून शिव्या देणें. **नदीचें मूळ आणि ऋषींचें कूळ** नदीचा उगम लहान आणि ओंगळ ठिकाणीं असतो आणि ऋषींचा मूळ पुरुष हीन जातीचा असतो. नदी पुढें कितीही पवित्र झाली आणि ऋषि पुढें कितीही मोठ्या मानास चढला तरी त्या दोहोंचा आरंभ बाइटांतच असतो. **कुलाला डाग लावणें** कुटुंबाची आब्रू घालविणें; कुटुंबास लज्जेमुळें खाली पहावयास लागेल असें वर्तन करणें. **कुलकज्जल, न० कुलकलंक पु०** कुलास काळिमा फासणारा. **कुलकरंटा, कुळकरंटा वि०** १ कमनशिबी. २ कुळाला काळिमा आणण्याजोगें वाईट आहे वर्तन ज्याचें असा. ३ कंजूष. **कुलगुरु पु०** कुलोपाध्याय. **कुलज वि०** उत्तम कुळांत जन्मलेला. **कुलतिलक वि०** आपल्या कुळास तिलकवत् म्ह० आभरणवत् असा जो कोणी तो. **कुलदीपक वि०** आपल्या घराण्याची किं० कुलाची जो कोणी कीर्ति किं० नांवलौकिक वाढवितो तो; आपल्या गुणामुळें जो आपल्या कुळाच्या कीर्तीचा प्रकाश सर्वत्र पसरवितो तो. **कुलदेवता, कुलदेवी स्त्री०, कुलदैवत न०** ज्या विशिष्ट देवतेची उपासना ज्या विशिष्ट कुटुंबांतील लोक परंपरेनें करतात ती विशिष्ट देवता त्या विशिष्ट कुटुंबाची. **कुलधर्म पु०** त्या त्या कुटुंबाच्या ज्या विशिष्ट धार्मिक चालीरीती त्या; कुलपरंपरेनें चालत आलेले धर्मविधि. **कुलपति पु०** १ कुळांतील श्रेष्ठ किं० मुख्य जो कोणी तो. २ दहा हजार विद्यार्थ्यांना पोसणारा व शिकविणारा ऋषि. **कुलपरंपरा स्त्री०** एकाद्या विशिष्ट कुलाच्या एकामागून एक अशा परंपरा समुच्चयानें. **कुलपरिपाटि (–ठी) स्त्री०** वंशपरंपरागत चालत आलेला नियम, आचार, विधि, किं० रूढि. **कुलपर्वत पु० अ० व०** सात जे मुख्य पर्वत कल्पिले आहेत ते; (सात पर्वत येणेंप्रमाणें:–

महेन्द्र, मलय, सह्य, शुक्तिमान् , ऋक्ष, विंध्य, आणि पारियात्र; यांना **कुलाचल**, **कुलाद्रि**, **कुलशैल**, अशींही अन्य नांवें आहेत). **कुलपुरुष पु०** पूर्वज. **कुलभूषण न०** स्वकुटुंबास शोभा देणारा किं० अलंकारवत् असा जो कोणी तो. **कुलमर्यादा स्त्री०** कुळाची आब्रू किं० मान. **कुलरीति स्त्री०** कुळांत चालत आलेली कांहीं रूढि, नियम, किं० चाल. **कुलवधू**, **कुलस्त्री स्त्री०** अभिजात कुळांत उत्पन्न झालेली व सदाचारादि गुणांनीं संपन्न जी स्त्री ती. **कुलवान् वि०** उत्तम कुळांत जन्मलेला. **कुलशील न० ए० व०** जातकुळी, स्वभाव, वर्तन इ० समुच्चयानें,—जीं विवाहादि प्रसंगीं वधूवरांसंबंधानें विचारांत घेतात; कोणेकाचें बरेंवाईटपणाचें नियामक जें त्याचें कुलशील, इ० तें. **कुलस्वामी पु०**, **कुलस्वामिनी स्त्री०** कुलदेवता; कुलदैवत; वंशपरंपरागत चालत आलेलें उपास्य दैवत. **कुलहीन वि०** हीन आणि नीच जातकुळीचा. **कुलहीनसेवा स्त्री०** हीन जातीच्या लोकांची सेवा. कुग्रामवास, कुभोजन, कुलहीनसेवा, आणि क्रोधमुखीभार्या, या चार दोषांपैकीं हा एक आहे. **कुलक्षय पु०** सर्व कुळाचा जो नाश किं० विध्वंस तो; कुळाचा सर्वस्वीं घात. **कुलांगना स्त्री०** अभिजातकुलोत्पन्न आणि सद्गुणसंपन्न अशी जी स्त्री ती. **कुलांगार** [**सं०** कुल+अंगार (विस्तव)] **पु०** कुळाचा नाश करणारा, कुळास काळिमा लावणारा, अपकीर्तिकारक, जो कोणी तो. **कुलाचार पु०** कुळांत परंपरेनें चाललेली चाल, रीत, नियम, विधि इ०. **कुलाचारी वि०** आपल्या कुळांत चालत आलेल्या रूढि जो पाळतो किं० अनुसरतो तो. **कुलावतंस पु०** कुळास भूषणभूत असलेला.

कुल [**अ०** कुल्=सर्व] हा शब्द ' सर्व ' या अर्थीं समासांत वापरितात जसें, **कुलबाबती स्त्री० अ० व०** म्ह० सर्व ज्या बाबी त्या. ꣳ**कुलअखत्यार पु०** पूर्ण अधिकारी; अखत्यार; कुलकारभारी. **कुलकुल्ला**, **कुलकल्ला पु०** १ पूर्णसत्ताधारी; कुलअखत्यार. २ प्रीतींतला माणूस.

कुलकुल स्त्री०, **कुलकुलाट पु०** कलकलाट (पोरांचा, पक्ष्यांचा, इ०).

कुलकुलणें अ० क्रि० कलकलाट करणें.

कुलकुली स्त्री० १ घोड्यास किं० कोणाही प्राण्यास जी अतिशयित कामुकावस्था प्राप्त होते ती; कोणाही प्राण्याच्या मादीस किं० स्त्रीस जी उत्कट संभोगेच्छा होते ती. २ उत्साह, हर्षोर्मि.

कुलंगडें न० १ भानगड; विघ्न; एखाद्या कार्यांत खो येण्याजोगी अडचण किं० पंचाईत; लचांड. २ पंचाइतीची स्थिति. ३ दुष्ट हेतु साधण्यासाठीं लढविलेल्या युक्त्या समुच्चयानें; कपटप्रयोग. ४ गूढ युक्तींची योजना (क्रि० करणें).

कुलगा, **कुलुंगा वि०** कुत्र्यांत एक भेद आहे. या जातीच्या कुत्र्यांना लांब लांब केश असून तीं बांध्यानें लहान आणि गुटगुटीत असतात.

कुलटा [**सं०**] **स्त्री०** व्यभिचारिणी स्त्री.

कुलपणें अ० क्रि० लंगडणें.

कुलांगडें न० मागें ' कुलंगडें ' पहा.

कुलाबा [**अ०** कुलाबाह्] **पु०** १ बिजागरीसारखा उपयोग होण्याजोगी कडी किं० आंकडा इ० कांची जी रचना डब्याचें झांकण इ० कांना केलेली असते ती; २ जमीनीचा चिंचोळा भाग समुद्रांत गेलेला असतो तो, जसें मुंबईचा कुलाबा. ३ करवतीचें पातें ताठ रहावें म्हणून ज्या कमानीच्या आकाराच्या पट्टीनें तें ताणलेलें असतें ती पट्टी.

कुलाल [**सं०**] कुंभार.

कुलास पु० गोंव्याकडील आंब्याची एक जात.

कुलिंजन न० एक वनस्पतिविशेष.

कुलित्थ [**सं०**] **पु०** कुळीथ; हुलगे.

कुलीन [**सं०**] **वि०** १ अभिजात कुळांत जन्म पावलेला; श्रेष्ठ किं० शुद्ध आहे बीज ज्याचें असा. २ जातिवंत घोडा. **कुळीण** हें याचें अशुद्ध रूप.

कुलुंगा वि० १ छोटा आणि खूर लांब व कुरळे केश असलेला,—कुत्रा. २ लठ्ठ आणि ठेंगणा (माणूस).

कुलुली, **कुलोली** [**सं०** कल्लोल] **स्त्री०** १ आकस्मिक संकटामुळें भय वाटून, किं० दुःख सोसवेंनासें झाल्यामुळें. केलेली आरडाओरड किं० बोंबाबोंब. २ कोल्हेकुई. ३ अतिशय उत्साहामुळें मुलांनीं माजविलेला गोंधळ. ४ कामविकाराची जोरदार चेतना (घोड्याची घोडीबद्दल, किं०

घाडाचा वोज्यावद्दल) (१,२, व ३ या अर्थी क्रि० करणें, ठोकणें).

कुलूप [अ० कुफ्‌लू=कुलूप] **न०** दार, पेटी, इ०कांना तीं किल्लीवांचून उघडतां येऊं नयेत म्हणून जें धातूचें, इ० यंत्रविशेष लावतात तें. ॐ**तोंडाला कुलूप घालणें** गप्प बसणें. **कुलपी वि०** मळसूत्र वगैरे असलेला म्ह० मळसूत्र काढलें असतां उघडणारा, व घातलें असतां मिटणारा,–गोठ, तोडे, वगैरेसारखा जो दागिना तो. **कुलपी गोळा पु०** लोखंडाचे तुकडे इ० ज्याच्या पोटांत भरले आहेत असा दारूचा गोळा. **कुलपी विडा पु०** दहाबारा पानांचा जो विडा तो,–ह्यांत सुपारी, केशर, कस्तुरी, इ० द्रव्यें घालून तो केळीच्या पानांत घालून चोयीनें बंद केलेला असतो.

कुल्या [**सं०**] **स्त्री०** १ कालवा; पाट. २ २ लहान नदी,ओढा. ३चर, खंदक.४ सद्गुणी स्त्री; सदाचरणी स्त्री. ५ आठ द्रोणांइतकें एक धान्याचें माप. ॐ**घृतकुल्या मधुकुल्या स्त्री०अ० व०** पक्वान्नांचें यथेच्छ भोजन; खाण्यापिण्याची चंगाळी. (घृतकुल्या म्ह० तुपाचा पाट; मधुकुल्या म्ह० मधाचा पाट; हे शब्द विनोदप्रचुर आहेत).

कुल्ला पु० कंबरेच्या खालीं मागल्या अंगास जे दोन उन्नत अवयव असतात ते प्रत्येक. ॐ**मातीचा कुल्ला पु०** कृत्रिम स्नेहसंबंध ज्याच्याशीं जोडला आहे असें दूरचें माणूस,–जें प्रसंगविशेषीं तिन्हाइताप्रमाणेंच वागण्याचा संभव असतो. **मातीचे कुल्ले लावल्यानें लागत नाहींत** खऱ्या जिव्हाळ्याच्या माणसासारखा परकी किं० दूरचा इसम,–जो केवळ कृत्रिम स्नेहसंबंधानें मात्र संबद्ध असतो,–तो कसा उपयोगी पडणार ? नाहींच नाहीं ! ‘ कुल्ला ’यास ‘कुला,’‘कुल्लाणा’,‘कुल्हा,’ ‘कुल्हाणा’ असेही प्रातिशब्द आहेत.

कुवत [**अ०** कुव्वत] **स्त्री०** ताकद; हिम्मत; जोम; कार्यनिर्वाहक शक्ति.

कुंवर [**सं०** कुमार] **पु०** बालयुवा. ॐ**राजकुंवर पु०** राजपुत्र.

कुंवरा, कुंवरी स्त्री० कोंवळा फणस.

कुंवला पु० १ एक लता. २ मुलांचें एक गळ्यांत घालावयाचें भूषण.३ अगदीं कोंवळा फणस.

कुंवली स्त्री० कुयली, कुइली.

कुंवळ [**म०** कुंवळणें] **पु०** १ कोळ; चिंच, आंबा, भात इ०कांत पाणी, ताक, इ० घालून त्यांचा अंश आंत येई असे कुसकरलें असतां जें पाणी निघतें तें. २ वर्म, उखाळ्यापाखाळ्या; (**क्रि०** काढणें).

कुंवळणें स० क्रि० पाणी, ताक, इ०कांत चिंच, भात, आंबा इ०कांचा सत्वांश यावा म्हणून त्यांत तीं घालून कुसकरणें. **अ० क्रि०** दारूमध्यें चिंच, गूळ, इ० विरघळणें.

कुवा [**सं०** कूप] **पु०** आड; बांधून न काढलेली छोटी विहीर.

कुवाकर स्त्री० एक पक्षिविशेष.

कुवाडें, कुवेडें न० १ आजार घालविण्यासाठीं किं० भूतपिशाचबाधा निवारण्यासाठीं केलेलें मंत्रतंत्र. २ इष्टकार्य साधण्यासाठीं योजलेली युक्ति किं० हिकमत. ॐ**कुवाडेपोवाडे पु० अ० व०** चहाड्या; दुसऱ्याचीं वर्मे कर्मे (**क्रि०** सांगत सुटणें किं० जाहीर करणें).

कुंवार, कुवार [**सं०** कुमारी] **स्त्री०** १ अविवाहित मुलगी. २लहान किं० लग्न न झालेली मुलगी; कन्यका; बालयुवती. ॐ **कुंवारकांडें, कुंवारफोड न०, कुंवारी स्त्री०** कोरफड. **कुंवार सवाशीण स्त्री०** कांहीं देवताच्या उद्देशानें पूजादि करण्याविषयीं विवक्षित जी कुमारी ती; देवतेच्या कल्पनेनें अलंकारादि घालून पूजावयाची अशी जेवावयास बोलाविलेली कुमारी.

कुवीट वि० कुईट; कुजका.

कुवेडें न० १ दृष्टिदोषादि निरसनार्थ मंत्रावांचून शुद्ध क्रिया, तंत्रें, जीं सांगितलीं आहेत तीं प्रत्येक; रोगपरिहारार्थ योजितात जे गांवठी उपाय ते प्रत्येक. २ (लक्षणेनें) सरळ मार्गानें जें कार्य होत नाहीं तद्विषयीं वांकड्या मार्गानें केली जी कांहीं युक्ति ती. ३ कोडें (**क्रि०** घालणें, उलगडणें).

कुव्यें, कुवें न० १ वासरांस सडी म्हणून रोग होत असतो त्याच्या निवारणार्थ त्याच्या तोंडावर डाग देणें (**क्रि०** काढणें). २ कुटचेल; एखाद्यास मारून, तुडवून, त्याची दुर्दशा करणें किं० त्याचें कांडात् काढणें (**क्रि०** काढणें).

कुश [**सं०**] **पु०, न०** एक प्रकारचा यज्ञयागांत उपयोगी असणारा दर्भ. ॐ**कुशाग्र वि०** कुशदर्भाच्या टोंकाप्रमाणें तीक्ष्ण किं० सूक्ष्म (बुद्धि, मति, इ०). **कुशाग्रबुद्धि वि०** तहत आहे बुद्धि ज्याची असा (माणूस);अत्यंत बुद्धिमान्.

कुशल, कुशळ [**सं०**] **न०** खुशाली; सुखरूप असणें; कोणत्याही प्रकारचा उपद्रव किं० चिंता नसल्यामुळें असते जी सुखावस्था ती; कल्याण. **वि०** १ खुशाल, सुखरूप, निश्चिन्त. २ मार्मिक; चतुर. ३ वाकबगार, निष्णात; कांहीं कार्यांत ज्याचा हात सौकर्यानें चालतो असा. ॐ **कुशलता स्त्री०** १ कांहीं काम करण्याविषयीं हस्तादिकांचे ठायीं असते जी कला ती. २ मार्मिकता. **कुशलक्षेम पु०, न०** खुशाली आणि स्वास्थ; रोगादिराहित्य आणि सुखरूपता; कल्याण. **कुशलार्थ पु०** सुखरूपता, खुशाली. हा शब्द प्रायः पत्रांत नित्य योजितात; उ० स्वकीय कुशलार्थ कळवावा.

कुशाद [**फा०** कुषाहाह्] **वि०** १ प्रशस्त, मोठें, ऐसपैस, (स्थळ). २ (लक्षणेनें) स्वच्छ, सुवाच्य, (अक्षर).

कुशावर्त्त पु० एका कुशीवर असलेला केशांचा भोंवरा (घोड्याच्या अंगावरील). घोड्याचें हें अशुभ चिन्ह होय.

कुष्टाण [**म०** कुजट+घाण] **स्त्री०** कुजलेल्या मांसादि पदार्थास येते जी वाईट घाण ती; कुजटाण.

कुष्टेंपिष्टें न० अ० व० वर्मेंकर्में; उखाळ्यापाखाळ्या; उणेंपुरें; (**क्रि०** काढणें, बोलणें, सांगणें). **कुष्टपिष्ट** हें एकवचनीं रूपही कधीं कधीं योजण्यांत येतें.

कुष्ठ [**सं०**] **न०** १ महारोग. २ कोड. ३ कोष्ठ कोळंजन. ॐ**कुष्ठी वि०** महारोग किं० कोड ज्यास झालें आहे असा. **कुष्ठारि पु०** गंधक.

कुष्मांड [**सं०**] **पु०** १ कोहोळा,–ज्याचे सांडगे वगैरे करतात आणि जो शक्तिवर्धक असतो. २ **न०** एकाद्यावर रचलेलें कुभांड, तोहमत, किटाळ (**क्रि०** करणें, काढणें उठवणें, योजणें, रचणें).ॐ**कुष्मांडनवमी स्त्री०**कार्तिक वद्य नवमी. **कुष्मांड्या वि०** एखाद्यावर कुभांड रचतो तो.

कुसकर, कुसकरा, कुसकुर [**म०** कुसकरणें] **पु०** कुसकरल्यामुळें भाकरी इ०कांचा होतो तो चुरा; चोळामोळा, चेंदामेंदा; विस्कळितपणाची किं० चुरगळलेपणाची स्थिति.

कुसकुरणें, कुसकरणें स० क्रि० हस्तपादादिकांच्या व्यापारानें भाकरी, फुलें, इ० पदार्थ चुरणें किं०मर्दिणें;चोळामोळा किं०चेंदामेंदा करणें; विस्कळित करणें; चुरगळणें.

कुसका वि० कुजका. ॐ **कुसक्या काष्टीचा कुणबी** कुणबी माणसाला तिरस्कारानें लावावयाचा शब्द; कुणबट.

कुसडा वि० १ कुजका, कुजलेला. २ कुजका; दुष्ट; नीच. ॐ**कुसडा घोणस पु०** सर्पांत घोणस म्हणून एक जाति आहे. घोणसाच्या दंशानें शरीर हळूंहळूं कुजत किं० सडत जाऊन शेवटीं तें मनुष्य मरतें.

कुसधुवणा वि० शेवटीं झालेलें जें अपत्य तें. यास **कुसधुणीचा, कुसनिकुरणीचा, कुसनिखवणा** असेही प्रतिशब्द आहेत.पुढें 'कूस'पहा.

कुसपट न० खुसपट; कुरापत; कलहादिकास कारणीभूत होणारें एखाद्याचें काढलेलें वर्म.

कुसमडणें, कुसमाडणें, कुसमरणें स० क्रि० कुसकरणें; एकाद्या वस्तूचा चोळामोळा करणें; विस्कळित करणें, चुरगळणें (फुलें, कपडे, इ०).

कुसमुस स्त्री० १ धुमफुस; जळफळ, ठुसठुस, मनांतल्या मनांत चेवणें; चरफडणें. २ मनःक्षोभ; चित्ताची अस्वस्थता.

कुसमुसणें अ०क्रि० मनांतल्या मनांत धुमसणें; चेवणें किं० रडणें, चरफडणें, जळफळणें.

कुसर, कुसूर, पु० १ सूड; (**क्रि०** काढणें, घेणें). २ एखाद्याविरुद्ध धरला जो दांत तो;(क्रि० धरणें). ॐ **कुसरखोर, कुसूरखोड वि०** सूड घेणारा किं०व्यावयास टपलेला; आकसखोर.

कुसर, कुसरी स्त्री० जंगली जासवंद.

कुसरी स्त्री० १ चातुर्य, प्रावीण्य, वाकबगारी, कौशल्य. २ नीटनेटकेपणा; सफाई; नाजुकपणा, सुबकपणा, कळाशीदारपणा, मोहकपणा.३ प्रवीण, कुशल किं० चतुर स्त्री. ४ चेटकीण. (याअर्थी **कुसरीण** असेंही रूप आहे).

कुसरीण, कुसरूड, कुसिरडा पु० सुरंवट, चुला (याच्या अंगावर लांब लांब केश असतात)

कुसरुडणें [म० कुसरूड] अ० क्रि० सुरवंटाचे केश अंगाला लागल्यामुळें त्वचेची आग होणें.

कुसवळ न० अतिवृष्टीमुळें किं० जमिनींत अति पाणी सांचल्यामुळें शेताची होते ती नासाडी; (क्रि० पडणें).

कुसवा [म० कूस] पु० मातेची कूस किं० गर्भाशय. मातेच्या पोटीं जन्मास येणाऱ्या अपत्याच्या गुणावगुणासंबंधानें चर्चा करावयाची असतां प्रस्तुत शब्द वापरतात; उ० चंद्रिकाबाईचा कुसवा वाईट, कारण त्यांचीं मुलें जगत नाहींत.

कुसळ न० तृण, सुंभ, इ०कांचा, किं० निवडुंगाचें बोंड इ० चा सूक्ष्म, बोचरा अवयव, (क्रि० शिरणें, बोंचणें, मोडणें, लागणें, अडकणें). **&दुसऱ्याच्या डोळयांतलें कुसळ दिसतें, पण आपल्या डोळयांतलें मुसळ दिसत नाहीं** दुसऱ्याचे क्षुद्र, क्षुल्लक, दोषही आपल्या नजरेस येतात व सहन होत नाहींत, पण आपल्या स्वत:चे ढोवळ, मोठे, दोष किं० अपराध आपणांस कळत नाहींत, किं० ते क्षम्य वाटतात.

कुसळण, कुसळीण, कुसळ स्त्री० १दुसऱ्याच्या घरचें लोणी इ० पदार्थ मंत्रविद्येनें चोरणारी किं० नाहींसें करणारी स्त्री; चेटकीण. २ हुषार किं० चतुर, स्त्री. [विशेषण.

कुसळी वि० एक प्रकारचा तांदुळ आहे त्याचें

कुसा पु० मातीचीं डिखळें उलथण्याचें एक आऊत, किं० ह्या आउताचा लोखंडाचा अवयव.

कुसा पु० मातेची कूस किं० गर्भाशय. मागें ' कुसवा ' पहा

कुसुंब, कुसुंबा [सं० कुसुंभ] पु० १ वस्त्रांस रंग द्यावयाकरितां जीं करडईचीं फुलें वाळवून ठेवतात तीं. २ त्यांच्यापासून तयार करतात तो रंग. ३ भांगेंत मिरे इ० घालून वाटून प्यावयाकरतां जें पेय करतात तें(हें पेय अमली असतें). **&कुसुंबकडई, कुसुंबकरडी, कुसुंबेकडी स्त्री०, कुसुंभ पु०** करडईत एक जाति आहे,—जिचीं फुलें वाळवून कुसुंबा करतात,—ती. **कुसुंबी पु०** कुसुंबा रंग. **वि०** कुसुंब्यानें रंगविलेलें किं० कुसुंब्याच्या रंगाचें (वस्त्रादि).

कुसुम [सं०] न० फूल, पुष्प. २ स्त्रीरज, विटाळ. ३ (वैद्यक) डोळ्यांतील फूल. **&कुसुमाधिप पु०** चंपक वृक्ष. **कुसुमबाण पु०** मदन. **कुसुमाकर पु०** वसंत ऋतु. **कुसुमपुर न०** पाटलीपुत्र नामक एक प्राचीन शहर. **कुसुमित वि०** १ पुष्पित, प्रफुल्लित. २ ऋतुमती(स्त्री).

कुसू न० १ दोन लांकडें एकमेकांना जोडण्यासाठीं एका लाकडाच्या अग्राला कांहीं विशिष्ट प्रकारचा आकार देऊन दुसऱ्या लाकडाला अनुरूप खोबणी पाडतात आणि ह्या खोबणीत तें अग्र धसवितात; त्या अग्राला ' कुसू ' म्हणतात आणि त्या खोबणीला ' बिधी ' म्हणतात. २ दाराचा जो अवयव उखळींत फिरतो किं० जो अवयव चौकटीच्या माथ्याच्या भोंकांत फिरतो तो. ३ कुसळ. ४ घर, गांव बाग, इ०कांभोंवतीं असते जी भिंत ती.

कुसूर कुसुरी स्त्री० एक झाड.

कुस्करी स्त्री० एकमेकांनीं एकमेकांचीं अंगें मारामारींत कुसकरण्याचा व्यापार म्ह० मारामारी; उ० मस्करीची होते कुस्करी म्ह० थट्टेनें किं०चेष्टेनें एखादी गोष्ट करावयाला गेल्यास अंतीं त्यास खऱ्याखुऱ्या भांडणाचें स्वरूप येतें, म्ह० प्रथम जरी थट्टेनें बोलणें चाललें असलें तरी त्याचा परिणाम भांडणाच्या रूपाचा होतो.

कुस्त वि० अतिशयित श्रमामुळें थकून किं० गळून गेलेलें (शरीर).

कुस्ती [फा० कुश्ती] स्त्री० मल्ल, पैलवान, इ०कांचें बाहुयुद्ध; झुंज; लढत.

कुस्मांड [सं० कुष्मांड] न० कुभांड, तोहमत; (क्रि० करणें, काढणें, रचणें, योजणें, उठवणें).

कुहडें न० कोडें; कुवेडें.

कुहना [सं० कुहनिका=कपट; ढोंगी साधुत्व] स्त्री० भोंदूपणा; साधूपणाचें ढोंग.

कुहर [सं०] न० १ गव्हर, दरी, गुहा २ (लक्षणेन) ओटी, पोकळी; उ० जननीच्या जठरकुहरीं । प्राणी असे नवमासवर ॥.

कुहा पु० सर्दपणा; गारपणा, गारठा; ओलेपणा, ओलसरपणा (जमिनीचा, हवेचा, इ०).

कुहिजक वि० कुजका.

कुहिजट वि० कुजट.

कुहिजणें अ० क्रि० कुजणें.

कुहिटार न० १ तृण, झांपा, इ० (गृहादि शिवण्याच्या उपयोगी). २ जुनें गवती छप्पर. वि० तृण, झांपा, इ०कांनीं शिवलेलें (गृहादि); उ० कोंकणांत कुहिटार घरें असतात.

कुहिटारू वि० तृण, झांपा, इ०कांनीं शिवलेलें (गृहादि). [कुधाण.

कुहिना, कुहीन वि० संशयी, मत्सरी; घुम्या;

कुहिरी, कुहिरें, कुहिला, कुहिली मागें ' कुइरी, ' ' कुइरें, ' इ० शब्द अनुक्रमें पहा.

कुही स्त्री० कुई; कोल्ह्याची आरोळी.

कुहीट [सं० कु+म० वीट] वि० 'कुईट ' हा शब्द मागें पहा. ॐ**कुहीट खोबरें** न० (लक्षणेनें) दुष्ट, खुनशी, कुत्सया स्वभावाचा, किं०नीच असा जो मनुष्य तो; ' खवट खोबरें ' असाही प्रचार आहे.

कुहेडें न० कुहडें, कुवेडें, कोडें.

कुह्या पु०प्राय: पर्जन्यकाळीं पायांच्या बोटांच्या बेचका, तळवे, हीं कुजण्याची जी विकृति होते ती; ' चिखली ' स्त्री० असाही शब्द प्रचलित आहे. (**कुहे** पु० अ० व०).

कुळई स्त्री० एक पालेभाजी.

कुळक स्त्री० मनुष्यास प्राय: अजीर्णामुळें हग, ओक, इ० सुटायाजोगी विकृति होते तिला ' मोडशी ' म्हणतात; ही अतिरिक्त झाली असतां तिला ' कुळक ' (किं० ' कुळीक ') म्हणतात.

कुळकट (–त) [म० कुळ+कथा] न० कर्मकहाणी; संसारांत आपण काय केलें किं० अनुभविलें याचें चऱ्हाट किं० रडगाणें; वैयक्तिक व खाजगी किं० कुटुंबविषयक अनुभवांचा किं० भोगांचा प्राय: विषादमय पाढा.

कुळकथा स्त्री० आपल्या कुटुंबासंबंधीचें किं० अनुभवाविषयींचें खाजगी वृत्त; कर्मकहाणी.

कुळकणें [म० कुळक] अ० क्रि० कुळक म्हणून जो विकार आहे त्यानें पछाडिलें जाणें.

कुळकरण न० १ कुळकर्ण्याचा धंदा; कुळकर्णी ज्या कार्यावर नियुक्त असतो तें कार्य. २ कुह्रा (चेष्टेनें).

कुळकरणी, कुळकर्णी [म० कूळ+सं० कारणी] पु० १ सरकारनें आपला वसूल इ०चा हिशेब लिहिण्याकरतां गांवांत नेमलेला पाटलाच्या हाताखालचा अधिकारी. २ कुह्रा (थट्टेनें).

कुळकाविणें स० क्रि० कुळीकाची विकृति उत्पन्न करणें.खालीं ' कुळीक ' पहा.

कुळकुळीत वि० ' काळा ' ह्या शब्दाचा अर्थ अधिक जोरदार करण्यासाठीं ' काळा ' ह्याच्यापुढें'कुळकुळीत'हा शब्द योजतात;उ०काळा कुळकुळीत घोडा;उ०काळे कुळकुळीत केश इ०.

कुळंजन पु०कोळंजन. [धातूचें पात्र.

कुळणी स्त्री० कांहीं विशिष्ट आकाराचें एक

कुळचा पु० एका हाताची ओंजळ.

कुळपट न० उणेंपणा; वर्मकर्म, उखाळ्यापाखाळ्या; उणेंपुरें; खुसपट; (क्रि० काढणें, निघणें). ॐ**कुळपट्या** वि० दुसऱ्याचीं वर्मंकर्में किं० उखाळ्या पाखाळ्या काढणारा.

कुळपटा (–**पुटा**) पु०, **कुळपुटी** स्त्री० लाकडाची जी बारीक ढलपी ती.

कुळपाट न० लांकडाच्या जाडी ढलप्या समुच्चयानें किं० एकेकश:. [कुणबीण.

कुळंबी पु० कुणबी. ॐ**कुळंबीण** स्त्री०

कुळव पु० १ तृणादिक शेतांतून काढण्याचा उपयोगाचें एक आऊत. २ नांगरलेली जमीन सपाट करण्याचा उपयोगाचें एक शेतकीचें आऊत. ॐ **कुळवमोड्या** वि० कुळव चालवून शेतांतील तृणादि उपटून काढतो तो.**कुळवाची पाळी** स्त्री० एक वेळ कुळव शेतांत चालविणें;कुळवाची एक फेरी.

कुळणी [म० कुळवणें] स्त्री० १ शेतांत धान्य पेरण्यासाठीं त्यांतील तृणादि उपटून तें साफ करण्याचा व्यापार. २ शेताची जमीन कुळव फिरवून साफ आणि सारखी करणें.

कुळवणें, कुळविणें स० क्रि० धान्यादि पेरण्यासाठीं कुळवानें शेतांतील तृणादि उपटून तें साफ करणें आणि जमीन सारखी करणें.

कुळवाडी पु० कुणबी. ॐ**कुळवाडीण** स्त्री० कुणबीण. **कुळवाडसमजावशी** (–**विशी**), **कुळवाडसमजूत** स्त्री० अडाणी लोकांस समजेल किं० पटेल अशा सोप्या तऱ्हेनें केलेलें विशदीकरण, स्पष्टीकरण, किं० खुलासा.

कुळवारी स्त्री० पुढें ' कूळवार ' हा शब्द ' कूळ ' यांच्या पोटांत पहा.

कुळविणें स० कुळव फिरवून शेताची जमीन साफ करणें. मागें ' कुळवणें ' पहा.

कुळवें न०रान तोडून प्रथम वर्षी तेथें जें नाच-णीचें शेत करतात तें.

कुळारग [**म०** कुळ + वर्ग] **वि०** ज्या गांवांत अनेक वतनदार कुळें आहेत तो गांव (याच्या उलट **खोतीचा गांव**). **पु०** गांवांतील सर्व कुळें समुच्चयानें. **स्त्री०** अशा कुळानें द्यावयाचे पैसे समु-च्चयानें; अशा कुळांशीं असलेला पैशाचा व्यवहार; उ० आम्हीं दहा हजार रुपयांची कुळारग केली. ❀ **कुळारगी गांव न०,पु०**ज्या गांवांतील लोकांच्या सोयीप्रमाणें आणि संमतीनें सर्व शेतें खंडानें दिलेलीं असून शेतसारा त्यांच्या संमतीनें ठरवि-लेला असतो असा गांव.

कुळारग, कुळारगवार, कुळवर्ग क्रि० वि० ग्रामादिकांतील सर्व कुळांचा पृथक् पृथक् नाम-निर्देशादि करून (याद करणें, वसूल घेणें, किं० पट्टी, वांधा, हिशेब, बाकी, शेतें, इ०चा तपशील देणें).

कुळिंजन न० एक औषधी; तिला ' कोष्ठ कोळंजन ' असेंही म्हणतात.

कुळी [**म०** कुळ] **स्त्री०** १ कुल,–विवाहा-र्थ एखाद्याचें कुल शुद्धबीजाचें आहे किं० मिश्र-णाचें आहे इ०विचार विवक्षित असतांना योजितात. २ एक पालेभाजी. ३ गुळणी, चुळका, चूळ. ❀**कुळी-वंत वि०** कुलवान्; उत्तम कुळाचा.

कुळीक स्त्री० ज्यांत जोराच्या वांत्या आणि रेच होतात असा एक प्रकारचा आजार. मागें ' कुळक ' पहा.

कुळीत (–थ) [**सं०** कुलित्थ] **पु०** एक द्विदल धान्य.

कुळीत [**म०** कुळ] **न०** कुळांपासून याव-याचा किं० घ्यावयाचा जो वसूल तो.

कुळुमकांचरी स्त्री० एक औषधी पदार्थ.

कुळूम सुपारी स्त्री० कातरलेली जी सुपारी ती.

कुक्षि [**सं०**] **पु०, स्त्री०** १ खाकेच्या खालचा आणि कंबरेच्या वरचा जो भाग तो (आंतील किं० बाहेरील). २ पोट, उदर (आंतील भाग). ३ गर्भाशय. ४ कोणत्याही वस्तूचा आंतील भाग. ❀ **कुक्षिज पु०** पुत्र. **कुक्षिंभरि वि०** उदरंभरि, खादाड.

कू न० पिंगळा जे चार शब्द करतो त्यांतील एक; (पिंगळ्याचे चार शब्द:–कू, की, किल-किल, किचीकिची).

कूच [**हिं०** कूच] **न०** १ स्थलान्तर करणें; एका ठिकाणचा तळ हालवून दुसरीकडे गमन किं० प्रयाण करणें; (विशेषत: सैन्यानें). २ मरणें (लक्षणेनें). ❀**कूचाचा नगारा वाजविणें** १ एका ठिकाणाहून दुसरीकडे मोर्चा वळविणें (शत्रूच्या विरुद्ध दिशेस); निघून जाणें; दुसरी-कडे चालूं लागणें. २ पळून जाणें.

कूट [**म०** कुटणें] **न०** १ लोणचें इ० कांवर घालण्यासाठीं मोहोऱ्या, मेथ्या, इ० कुटून त्यांचें चूर्ण करतात तें. २ तांदूळ इ० कुटतेसमयीं त्यांतील कांहींचा होतो तो चुरा. ❀**एखाद्याचें कूट काढणें** त्याला खूप चोप देणें.

कूट [**सं०**] **न०** १सरळ व्युत्पत्तीनें उलगडा होऊं नये असा श्लोक, प्रश्न, मुद्दा, हिशेब, इ०; उ० कूट श्लोक, कूटान्योक्ति, इ०. २ लुच्चेगिरी, फसवेगिरी; लुच्चेगिरीचें किं० फसवेगिरीचें कार-स्थान किं० व्यूह. ३ कट, कारस्थान; एका विचा-रानें चालणाऱ्या मनुष्यांचा समुदाय किं० टोळी; किं०कांहीं कार्याविषयीं त्यांनीं केलेला एकोपा किं० संगनमत. ४ पर्वतशिखर. ५ ढिगारा, रास; समूह; उ० अभ्रकूट म्ह० अभ्रांचा समूह; उ० अन्नकूट म्ह० अन्नाचा राशि. ६ विवाह करते-समयीं वधूवरांच्या पत्रिका जमतात कीं नाहीं हें पाहावें लागतें, त्या वेळीं ज्या गोष्टी विचारांत घेतात त्यांतील प्रत्येक. (विचारांत ज्या गोष्टी घेतात त्या:–वर्ण, वश्य, भ, योनि, खेचर, गण, कूट, आणि नाडी). ७ मुख्य किं० मूळ जो कोणी तो; ज्याच्यापासून उगम झाला तो. **वि०** खोटें, लबाडीचें. ❀ **कूटतुला स्त्री०** खोटी तराजू. **कूटपाकल (–पर्व) पु०** हस्तिवातज्वर. **कूटपाश पु०**एखाद्यास पकडण्यास केलेली युक्ति किं०योजलेला डाव. **कूटशासन न०**कांहीं देणगी दिल्याचा खोटा कागद. **कूटसाक्षी वि०** खोटी किं० बनावट साक्ष देणारा. **कूटसाक्ष्य न०** खोटी साक्ष. **कूटस्थ वि०** मूळ पुरुष;आद्यजनक (एखाद्या वंश-वृक्षांतील). **पु०**परमात्मा(ज्याच्यापासून सर्व सृष्टीचा पसारा झाला आहे).

कूड [**खं०** कुड्य] **पु०** १ कांबट्या, कारवीच्या काड्या, पट्या, इ० कांचीं घालून शेणामातीनें लिंपलेली भिंत. २ देह, शरीर. ३ कुंपण (झाडाझुडपांचें).॥**रिकामा न्हावी कुडाला तुंबड्या लावी** निरुद्योगी माणूस निरुपयोगी कामें करीत बसतो. प्राचीन काळीं तुंबड्या लावून शरीरांतील कुचकें रक्त काढण्याचें काम न्हावी करीत असत. यावरून ह्या म्हणीची उत्पत्ति झाली.

कूड वि० कुत्सित, कपटी, खोटा, दुष्ट, जो मनुष्य तो.

कूत पु० १ ऐन जोर, ऐन रंग (भांडण,रोग, पाऊस, वारा, उष्मा, इ०कांचा).२ (लक्षणेनें) जोराची उत्सुकता; खाज; कंड; सुरसुरी; (**क्रि०** येणें, होणें, जिरणें, मुरणें).३ खरजेचा ऐन भर; (**क्रि०** येणें, मोडणें).

कूप [**म०** कुंपण किं० कुपण]**पु०**कुंपण; शेतांत गुरेंढोरें येऊं नयेत म्हणून कांटेरी झाडें झुडपें कडेनें लावून जें प्रतिबंधक करतात तें.॥**कूप जर शेत खाऊं लागला तर मालधनी काय करील** ? रखवालदारानें जर उत्पन्न बळकावलें तर मालकाला काय मिळणार ? प्रधानानें राज्याचीं सर्व तंत्रें आपल्या हातीं घेतलीं तर राजाकडे काय सामर्थ्य किं०सत्ता किं० अधिकार राहणार ?

कूप [**सं०**] **पु०** १ उदकार्थ खणलेला जो आड किंवा कुवा तो; उ० अंधकूप, जलकूप, धान्यकूप, शुष्ककूप. २ खड्डा, चर; उ० शौचकूप.॥**कूपकच्छप, कूपमंडूक पु०** (आडांतील कांसव,आडांतील बेडूक) आकुंचित मनाचा किं० विचारांचा जो मनुष्य तो; अप्रगल्भ विचारांचा किं० अविकसित मनाचा मनुष्य. **कूपयंत्र न०** रहाटगाडगें. **कूपयंत्रघटिकान्याय पु०** विहिरीच्या रहाटगाडग्यांचा न्याय. या जगांत श्रीमंतांचे गरीब होतात, गरिबांचे श्रीमंत होतात, किं० आज जे खालीं आहेत, ते उद्यां वर येतात,इ०रूप जी परिवर्तनें तीं वर्णितांना प्रस्तुत न्यायाचा प्रयोग करतात.

कूर्च [**सं०**] **पु०, न०** १ गुच्छ; जुडगें. २ दर्भमुष्टि. ३ मोराचा पिसारा. ४ मोराच्या पिसाऱ्याची चंवरी. ५ दाढी. ६ दर्भासन.

कूर्चक [**सं०**] **पु०** १ दांत घासण्याचा कुंचा. २ चित्राऱ्याची कुंचली (ह्या अर्थानें ' कूर्चिका ' असाही शब्द आहे).

कूर्म [**सं०**] **पु०** १ कांसव; कच्छ. २ पंच उपप्राणांपैकीं एक; (पंचप्राण येणेंप्रमाणें:–नाग, कूर्म, कृकल, धनंजय, आणि देवदत्त).३डोळ्यांतील तांबुस किं० काळसर ठिपका. ॥ **कूर्मदुग्ध न०** सशाच्या शिंगाप्रमाणें असिद्ध जी वस्तु ती. याच अर्थी **कूर्मलोम न०**असाही शब्द वापरतात. **कूर्मदृष्टि स्त्री०** मेहेरबानी;कृपा. कासव आपल्या अपत्यांना दूध न पाजतां किं० खावयाला कांहीं न देतां केवळ त्या अपत्यांकडे दृष्टि फेकून त्यांचे पोषण करतें अशा समजुतीवरून कूर्मदृष्टि म्ह० प्रेम, मेहेरबानी, एखाद्याविषयीं मनांत असलेली खरी कळकळ,असा अर्थ झाला.**कूर्मासन न०** योग्यांचें एक विशिष्ठ आसन. **कूर्मावतार पु०** भगवान् विष्णूचा दुसरा अवतार.

कूल [**सं०**] **न०** १ तट, कांठ (नदीचा). २ उतार. ३ कट, किनारा. ४ टोक, अग्र. ॥ **कूलंकषा स्त्री०** नदी (किनारा म्ह० कांठ फोडून काढणारी).**कूलवती स्त्री०** नदी.

कूष्मांड [**सं०**]**न०** कुभांड,तोहमत, किटाळ; कोणेकास ठकवावें, भिववावें, बुडवावें, इत्याद्यर्थ त्याच्याविरुद्ध रचिलेली जी कांहीं निर्मूल गोष्ट ती. **पु०** १ कोहळा किं० कोहाळें. २ एक प्रकारचें भूत किं० पिशाच.

कूंस न० १ कुंसू. २ कूड, कुंपण. ३ कुसळ.

कूस न० कुसळ.

कूस [**सं०** कुक्षि] **स्त्री०** १ खाकेखालची आणि कंबरेवरची शरीराची एक बाजू; उ० रात्रभर मी या कुशीचा त्या कुशीवर होत होतों, पण झोंप कशी ती येईना; उ० आई बाळाला कुशींत घेऊन निजते; उ० त्या मुसलमानानें त्या अबलेच्या कुशींत ठोसा मारला, त्यामुळें ती तत्काळ बेशुद्ध झाली. २ पोट; उदर (सर्व किं० एक बाजू) ; उ० गायीच्या दोन्ही (किं० चारी) कुशी भरल्या, आतां तिला अधिक कडबा नको. ३ गर्भाशय; कुसवा; जेथें मातेच्या उदरांत गर्भ असतो तें स्थान. ४ ओटी; पोकळी;अवकाश; उ०माधवाश्रमांत मी आणि रामू इतके जेवलों कीं पाणी प्यावयाला देखील कूस राहिली नव्हती. ५ कसर; बाकी, अवशेष, विवाक्षिताहून अधिक भाग, प्रमाण, किं० जागा; मजून, मापून, कांहीं पदार्थाची इयत्ता

केली असतां त्यांत पडणारी तफावत(आधिक्याच्या दृष्टीनें); उ० मोजणी झाल्यामुळें शेतांत कूस राहिली नाहीं; उ० त्यानें लग्नासाठीं पांचशें रुपये नेले होते, पण गांवांत स्वस्ताई असल्यामुळें शंभर रुपयांची कूस राहिली; उ० कूस राखून दुकानदार किंमत सांगतात; उ०तुमच्या अधोलीला कूस आहे, तुमच्या अधोलीनें मी माप करण्यास तयार नाहीं. ६ गुरें, इ० कांच्या योनिद्वारां तीं प्रसवल्यानंतर कुजका अंश निघतो तो. ⁂ कुशी भरणें रटाटून पोट भरण्याइतकें खाणें किं० जेवणें; आकंठ खाणें किं० जेवणें. कुशीचा वि० (वर ' कूस ' याचा ५ वा अर्थ पहा) ज्यांत कसर काढतां येते, पैसे खातां येतात, असें (काम, धंदा); उ० राजमलशेटच्या घरचा व्यवहार पाहवयाचा धंदा कुशीचा असल्याशिवाय बन्सीलालनें घर बांधलें नाहीं. मांजर करी एकादशी उंदीर मारून भरी कुशी मांजरानें एकादशी करणें म्हणजे उंदीर खाणें म्ह० नेहेमीपेक्षां अधिक खाणें. जेव्हां कोणी माणूस उपासाच्या दिवशीं नेहेमीच्या आहाराहून अधिक पदार्थ खातो तेव्हां ह्या म्हणीनें त्याची थट्टा करतात. अशीच दुसरी म्हण "एकादशी दुप्पट खाशी." कूसगोम स्त्री० पार्श्वावरचे गोमीच्या आकाराचे केश;—कूसगाम असणें हें घोड्याचें एक कुलक्षण गणलें आहे. कूसनिकुरणीचा, कूसनिखवणा, कूसधुणीचा, कूसधवणा, कूसधुणा वि० स्त्रीचें जें शेवटचें अपत्य त्यास निंदाव्यंजकतेने म्हणतात. कूसभोंवरा पु० घोड्याच्या एका कुशीवर असणारा केशांचा भोंवरा किं०वलय.(हें घोड्याचें अशुभ चिन्ह होय).

कूळ न० १ ज्याणें ज्याचें द्रव्यादि द्यावयाचें तो त्याचें; ऋणको; देणेकरी; कर्जदार. २ वतनदार, सरकारांत शेतसारा भरणारा शेतकरी. ३ वकील ज्यांचे कज्जे चालवितो ते प्रत्येक त्याचें. ⁂**कूळघडणी** स्त्री० प्रत्येक शेतांचें आकारमान, मालकाची आउतें, त्याणें सरकारांत द्यावयाचा सारा, त्याची ऐपत इ० तपशीलाचें कुलकर्ण्यानें तयार केलेलें पत्रक. **कूळजमा** स्त्री० १ एकाद्या गांवाच्या शेतसाऱ्याचा वट्ट वसूल. २ शेतकऱ्यांना सावकारानें दिलेल्या कर्जाची वट्ट रकम. **कूळभरणा** पु०एकाद्या गांवचे शेतकरी समुच्चयानें,—यांच्या व्यतिरिक्त जे राहिवासी ते अडाणकबाड. **कूळरुज** (—जु—) **वात** स्त्री० रयतेनें सरकारांत भरलेल्या पैशाची वरच्या अधिकाऱ्यानें केलेली खतावणी (क्रि० करणें, घेणें, पहाणें). **कूळवर्ग** पु० १ एकाद्या गांवांतील सर्व शेतकऱ्यांच्या ताब्यांतील शेतें आणि त्या शेतांवरील सारा यांच्या तपशीलाचें पत्रक. २ एका विशिष्ट शेतकऱ्यासंबंधाचें वरील प्रकारचें पत्रक. **कूळवार** क्रि० वि० प्रत्येक कुळाचा तपशील देऊन. (याच्या उलट ' थळवार '.)

कृक [सं०] पु० गळा, कंठ.

कृकल[सं०]पु० पांच उपप्राणांपैकीं एक प्राण.

कृच्छ्र [सं०] न० १ बारा दिवसांचें प्रायश्चित्त; प्राजापत्य. २ दुःख; कष्ट; संकट; उ० कृच्छ्रसाध्य म्ह० कष्टसाध्य. ३ पाप. पु० मूलकृच्छ्र ज्यास म्हणतात तो रोग. ⁂**कृच्छ्रेंकरून** क्रि० वि० कष्टानें; अडचणीनें; संकटानें; उ० मी त्याला कृच्छ्रेंकरून दहा रुपये उसने दिले.

कृत् [सं०] वि० करणारा, बनविणारा, उत्पन्न करणारा, इ० अर्थी समासाच्या अन्तीं योजितात; उ० पापकृत्=पाप करणारा.

कृत, कृतयुग [सं०] न० सत्ययुग; कृत, त्रेता, द्वापार, आणि कलि, या चार युगांपैकीं पहिलें युग.

कृत [सं० कृ=करणें] वि० केलेलें, बनविलेलें, घडवून आणलेलें, इ० अर्थी बहुव्रीहि समासांत पूर्वपदीं याचा उपयोग करतात; उ० कृतविवाह म्ह० विवाह ज्यानें केला आहे असा; कृतापराध म्ह० अपराध ज्याणें केला आहे असा म्ह० अपराधी; कृताभिषेक म्ह० अभिषेक ज्याला केला गेला आहे असा (राजपुत्र); इ०. ⁂**कृतकर्म** न० (मराठींत रूढ झालेला विशेष अर्थ) ज्याबद्दल पश्चात्ताप व्हावा असें अहितपरिणामी जें कांहीं केलें तें. **कृतकर्मा** वि० १ जें कर्म ज्याच्या हातून एक दोन वेळां निभावलें आहे तो त्याच्याविषयीं. २ कसलेला; निढावलेला. ३ चतुर. पु० १ संन्यासी. २ पंडित. **कृतकाल** वि० ज्याची मुदत ठरविली आहे असें; विशिष्टकालनियंत्रित; कांहीं कालमर्यादेनें किं० मुदतीनें; बांधलेलें (वचन, कर्ज, ठेव, चाकर, दास, इ०) **कृतकृत्य** वि० १ जें पुण्यकर्मादि करावयाचें तें ज्याणें केलें असा; जें

करावयाचें तें केल्यामुळें ज्याचें जन्मसार्थक्य झालें असा; धन्य; सुखी; कांहीं दुर्घट आरंभिलेलें काम ज्याचें तडीस गेलें व त्यायोगें जो समाधान पावला तो; कृतार्थ; तृप्त, संतुष्ट. **न०** दुःसाध्य असें कर्म कोणी सिद्ध केलें असतां त्या कर्मास म्हणतात; उ० त्या अदत्तापासून मी पैसा काढला हें मोठें कृतकृत्य केलें. **कृतघ्न वि०** (केलेल्याचें हनन करणारा) दुसऱ्यानें केलेले उपकार न स्मरतां त्याचें उलट अनिष्ट करणारा; ज्याणें उपकार केले त्यावर अपकार करणारा; उपकाराची फेड अपकारानें करणारा. **कृतनिश्चय पु०** पक्का, दृढ, किं० ठाम निश्चय किं० निर्धार. **कृतसंकल्प पु०** कांहीं कार्य करण्याविषयीं दृढपणें केला किं० ठरविला जो बेत तो; असुक गोष्ट कर्तव्य म्हणून तद्विषयीं मनांत ठरविला किं० योजिला जो हेतु तो. **कृतसाक्षी पु०** (कायद्यांत) साक्षी व्हावयाला ठरविलेला किं० नेमलेला इसम. **कृतज्ञ वि०** केलेले उपकार स्मरणारा किं० आठवणारा.याच्या उलट 'कृतघ्न.' **कृताकृत वि०** वैकल्पिक; केल्यास कांहीं फल आहे न केल्यास प्रत्यवाय नाहीं असें जें कर्म तें; केलें तर चांगलें पण न केलें तरी कांहीं वांकडें होत नाहीं असें जें कर्म तें. २ आहे, नाहीं, अशी स्थिति आहे ज्याची असें; उ० रामभाऊंच्या घरीं आचार.कृताकृत (म्ह० आचार पाळले तर पाळले नाहीं तर नाहीं अशी स्थिति आहे). ३ अर्धवट केलेलें. **पु०** परमात्मा. **न०** ज्याच्याबद्दल फारशी खात्री नाहीं असें; ज्या गोष्टीची सिद्धता होण्याचा आणि न होण्याचा संभव सारखाच आहे अशी गोष्ट; उ० यंदा दुभत्याचें कृताकृत दिसतें, कारण अनेक गुरें थंडीमुळें मेलीं आहेत. **क्रि० वि०** मोठ्या अडचणीनें किं० पंचाइतीनें; उ० दोन शेर तूप पंक्तींत वाढावयाला कृताकृत पुरलें. **कृतांजलि वि०** जोडले किं० जुळविलें आहेत हात ज्यानें असा. **कृतांत पु०** १ यम. २ दैव, नियति. ३ सिद्धांत; स्थापित केलेली गोष्ट. ४ (लक्षणेनें) कर्दनकाळ; मृत्युप्राय भीषण जो मनुष्यादि तो; या अर्थी **कृतांतकाल (-ळ)** असाही शब्द वापरतात. ५ मृत्यु. ६ शनि. **कृतान्न न०** शिजविलेलें अन्न,-विशेषतः भात. **कृतार्थ वि०** कृतकृत्य; जें करावयाचें तें ज्याणें केलें असा; दुर्घट असें अंगिकारलेलें काम ज्याणें तडीस लावलें व तेणेंकरून जो समाधान पावला तो; धन्य; सुखी; याला **कृतकृतार्थ** असाही याच अर्थी अन्य शब्द आहे.

कृति[सं०]स्त्री० १कृत्य;करणें;क्रिया.२ एखादी गोष्ट करण्याची रीति किं० पद्धति. ३अंकाचा जो वर्ग तो. ४ कर्तृत्वानें एखाद्यानें जें तयार केलें, बनविलें, रचिलें, इ० तें त्याची; उ० रघुवंश ही कालिदासाची कृति. ॐ **कृतीचा वि०** कृत्रिम; बनावट; बनविलेला. **कृतोपकार पु०** एकाद्यावर केलेले उपकार; उ० तुमचे माझ्यावर मोठे कृतोपकार आहेत. **कृतोपकारी पु०** ज्याणें उपकार केले आहेत असा मनुष्य.

कृत्तिका [सं०] स्त्री० सत्तावीस नक्षत्रांपैकीं तिसरें जें नक्षत्र तें. ॐ**कृत्तिकापुत्र पु०** कार्तिकेय, षडानन.

कृत्य [सं०] न० कृति; कार्य; कर्म. (हा शब्द जोरदार असून कांहीं कृतींच्या अचाट, दुष्ट, इ०रूप गुणावगुणासंबंधीं चर्चा विवक्षित असतां त्याचा प्रयोग करतात). ॐ**पांडवकृत्य न०** डोंगरांत पोखरलेलीं जीं लेणीं तीं प्रत्येक.

कृत्या [सं०] स्त्री० १ जारणमारणादि कर्मांत सिद्धि प्राप्त व्हावी म्हणून जिला बळी देतात अशी एक उग्र देवता. २ (लक्षणेनें) भांडखोर किं० कजाग जी स्त्री ती.

कृत्रिम[सं०]वि०१कृतीचा;बनावट;अनैसर्गिक; घडविलेला. २ खोटें, नकली, दिखाऊ, लबाडीचे (प्रेम, इ०). **न०** कपट; सोंग, ढोंग. ॐ**कृत्रिम, कृत्रिमपुत्र पु०** दत्तक घेतलेला पुत्र. **कृत्रिमभूमि स्त्री०** गृहादिकांत चापून चोपून जी सपाट जमीन करतात ती. **कृत्रिमयुद्ध न०** खोटें युद्ध (सैनिकांना युद्धाचें शिक्षण देण्याकरतां मुद्दाम आपसांत करतात तें). **कृत्रिमवन न०** उपवन; उद्यान. [बनावट, कृतीचा.

कृत्रिमी वि० १ खोटा, कपटी, ढोंगी. २

कृत्स्न [सं०] वि० सर्व; एकून एक सगळें.

कृदंतकाळ [सं० ' कृतांतकाल **' यापासून** अशुद्ध रूप]· **पु०** करदनकाळ; मृत्युप्राय भीषण जो कोणी तो.

कृपण [सं०] वि० १ चिकू, कंजूष, लोभी. २ हीन दीन दिसण्याजोगें, हीनदीनपणाचें (वचन, रूप, चर्या, इ०).

कृपा [सं०] स्त्री० १ दया, करुणा, प्रसाद. २ कोणेकाचें बरें व्हावें असा जो कोणेकाचा त्याच्याविषयीं पक्षपात, लोभ, इ० असतो तो: प्रीति व त्यायोगें कोणेकास दिलेला पाठिंबा; (कृपा शब्दापासून अनेक सुंदर समास बनविले जातात; उ० कृपादृष्टि, कृपाछत्र, कृपासिंधु, इ०). ॐ कृपाक्लिन्न वि० दयार्द्र; कृपेनें ज्याच्या अंत:करणास पाझर फुटला आहे असा. कृपापात्र न० १ ज्याच्या कृपेचा जो विषय झाला तो त्याचें. २ ज्याच्यावर कृपा करणें उचित आहे, जो कृपेस लायक आहे, असा जो कोणी दरिद्री, भक्त, इ० तो. कृपालु, कृपाळु वि० कृपावंत; दुसऱ्याचें यत्किंचित् दुःख पाहिल्यानें ज्यास दया येते असा, किं० अशा तऱ्हेनें ज्याच्या ठायीं कृपा उद्भवली आहे असा. कृपावंत, कृपावान् वि० १ कृपा करणारा. २ कृपा करण्याची झाली आहे इच्छा ज्यास असा. (वर ' कृपालु ' पहा).

कृमि [सं०] पु० १ किडा. २ (विशेष अर्थ) पोटांत होतो तो जंत. ३ किरमिजी रंग. ॐकृमिनाशक वि० कीड मारणारें; जंतनाशक (औषध). कृमिवाताळें न० पोटांत जंत पडल्यामुळें जी वातविकृति होते ती.

कृमी वि० ज्याच्या पोटांत जंत पडले आहेत [असा.

कृश [सं०] वि० काटकुळा; रोड; बारीक; सडपातळ.

कृशानु[सं०] पु० अग्नि. 'कृशानन'हें मराठी [अशुद्ध रूप.

कृषि स्त्री० [सं०] शेत करण्याचा व्यापार; शेतकी. ॐकृषिकर्म न० शेतकीचें काम. कृषिक वि० शेती करून उपजीविका करणारा; शेतकरी. कृषीवल पु० शेतकरी; कृषिक.

कृष्ण [सं०] पु० श्रीविष्णूचा आठवा अवतार; कंसाचा नाशकर्ता, पांडवांचा मित्र, भगवद्गीतेचा उपदेष्टा.

कृष्ण [सं०] वि० काळा किं० गडद निळा; वर्षाऋतूंतील घनाप्रमाणें काळा. ॐकृष्णकनक पु० काळा धोतरा. कृष्णकावळा पु० ज्याची मान पांढरी असते, म्ह० ज्याच्या मानेभोंवतीं पांढरीं पिसें असतात, असा कावळा. (कृष्णानें त्याच्या मानेभोंवती दही चोळल्यामुळे ती पांढरी झाली असा समज आहे). कृष्णकारस्थान न० गुप्त कट; कपटव्यूह. कृष्णकृत्य न० निंद्य, अधर्म्य, आणि गुप्तपणें केलेलें कर्म. कृष्णगुजरी स्त्री० बायकांच्या वापरण्याचें एक वस्त्र: लुगड्यांतील एक भेद. कृष्णग्रंथि पु० कांहीं विशेष प्रकारें बांधलेली आणि सोडण्यास अत्यंत कठिण अशी जी गांठ ती. (कृष्णानें एका गोपाची शेंडी आणि एका गोपीची वेणी यांची गांठ मारली होती, व ती कोणास न सुटण्याजोगी होती यावरून). कृष्णतालु(-तालुका), कृष्णटाळू वि० ज्याची टाळू काळी आहे असा(घोडा) घोड्याचें हें एक अशुभ चिन्ह होय. कृष्णपक्ष पु० १ ज्यामध्यें चन्द्राच्या कला उत्तरोत्तर कमी होतात तो पंधरवडा; वद्यपक्ष. २ (लक्षणेनें) ऱ्हास; उतरती कळा; अवनतीचा काल. ३ सदोष, चुकीची किं० खोटी बाजू. पुढें ' शुक्लपक्ष ' पहा. कृष्णपक्ष शुक्लपक्ष पु० ऱ्हास आणि भरभराट; उन्नति आणि अवनति; खोटेपणा आणि खरेपणा; वाईटपणा आणि चांगलेपणा. कृष्णमणी पु० काळ्या काचमण्यांची माळ; काळ्या पोतीची माळ,-जी विवाहित बायका गळ्यांत घालतात. (कुमारिका हिरव्या पोतीची माळ गळ्यांत घालतात). कृष्णमृग, कृष्णसार पु० काळवीट. कृष्णवर्ण न० एखाद्याच्या संबंधास कोणी त्रासला असतां त्याच्या संबंधाची कांहीं कारणामुळें निवृत्ति होणें; जो कोणी दुस्मान आहे त्याचें दृष्टिआड होणें किं० मरणें; (' करणें, ' ' होणें, ' यांच्या साहचर्यानें प्रयोग); उ० त्या दुसमानाचें जेव्हां कृष्णवर्ण होईल तेव्हां मी येईन(म्ह० तो मरेल, किं० गांवांतून जाईल, तेव्हां मी येईन). पु० काळा वर्ण. वि० काळ्या वर्णाचा. कृष्णाविलास पु०, कृष्णक्रीडा स्त्री० १ कृष्णानें गोकुळांत केले ते विलास, क्रीडा, लीला, इ०. २ (लक्षणेनें) उत्तान विलास, क्रीडा, इ०. कृष्णागर, कृष्णागरु पु० चंदनांत एक भेद आहे तो. कृष्णाची गाय स्त्री० पावसाळ्यांत जे अनेक पायांचे, तांबडे, क्षुद्र जंतु उद्भवतात ते प्रत्येक. कृष्णाजिन न० हरिणाचें कातडें; काळ्या पाठीच्या हरणाचें कातडें. कृष्णार्पण न० १ परमेश्वराला अर्पण करणें. २ एकाद्या वस्तूवर कोणत्याही प्रकारचा आपणाकडे हक्क न

ठेवून घेतां ती दुसऱ्यास देऊन टाकणें.३एखादी वस्तू अजिबात टाकणें,सोडणें,किं०परित्यागणें. **कृष्णावतार पु०** विष्णूचा आठवा म्ह०रामावतारानंतरचा अवतार.**कृष्णसावळा पु०,स्त्री०**कांद्याला विनोदानें म्हणतात. (कारण तो उभा चिरला असतां त्यांत शंखाची आकृति दिसते व आडवा चिरला असतां चक्राची आकृति दिसते; शंख आणि चक्र हीं विष्णूचीं म्ह०कृष्णाचीं आयुधें आहेत).**कृष्णावला पु०** घोड्याच्या पायाच्या आंतल्या बाजूस असलेला काळा चट्टा किं० घट्टा.

कृष्णा [सं०] स्त्री० १ एक महानदी,–जिच्या कांठचें लोणी, वांगीं, इ० प्रसिद्ध आहेत.२ द्रौपदी.

कृत [मं०] वि० १ कल्पिलेला जो तो;बनविलेला, तयार केलेला, रचिलेला.२ तज्ञ,निष्णात, निढावलेला, कसलेला.

कृप्ति [सं०] स्त्री० १ कांहीं कर्माविषयीं, किं० कार्यसिध्यर्थ, कोणेकानें लढविली जी शक्कल किं० युक्ति ती. २ अशी शक्कल किं० युक्ति लढविण्यास अंगीं लागते जी कल्पकता, अक्कल, कुशलता, इ० ती. ३कांहीं एका कार्याचे ठायीं कल्पकानें किं० युक्तिमंतानें ठेविली जी युक्ति किं०केली जी खुबी ती.

केंकटणें, केंकणें, केंकावणें अ० क्रि० कुत्रें, पोर, इ० कानें कोणी मारलें असतां दुःखानें दीनपणें आणि आर्तस्वरांत ओरडणें.

केकत, केकती [सं० केतक (–की) यापासून अशुद्ध रूप] स्त्री० केतकीचें झाड;केवड्याचें झाड.

केकत [सं० ' केतक ' यापासून अशुद्ध रूप] न० १ केवड्याचा कणसाच्या आकाराचा जो पुष्पगुच्छ तो. २ स्त्रियांचें डोईस घालावयाचें एक सुवर्णभूषण.याला **केकतपान न०**असेंही म्हणतात.

केकताट स्त्री०केतकीच्या झाडांचें कुंपण.

केकताड [म० केकत+ताड] न०, स्त्री० केतकीच्या झाडांचें कुंपण; केकताट.

केकया, केकयी [सं० कैकेयी] स्त्री० जहांबाज, कजाग,किं० खाष्ट, जी स्त्री ती; वाटिका.

केंकरूं न० कोंकरूं; शेळीचें किं० मेंढीचें जें अपत्य तें.

केंकरें न० १ केरसुणी. २ पदार्थाच्या पृष्ठभागावरचा मळ, गंज, इ० खरडून काढण्याचें एक हत्यार.

केकसणें, खेकसणें, खेंकसणें अ० क्रि० चिडून किं० तावातावानें ओरडणें.

केकसा, केकसामावशी [सं०कैकेयी]स्त्री० जहांबाज, कजाग, किं० द्वाड जी स्त्री ती.

केका [सं०] स्त्री० मयूरख; मोराचा जो ध्वनि तो. ❀ **केकावलि स्त्री०** मोरोपंत कवींचें एक पृथ्वीवृत्तांत रचिलेलें भक्तिपर काव्य.

केकावणें अ० क्रि० मागें ' केंकटणें ' पहा.

केकी [सं०] पु० मोर.

कें कें न० केंकटण्याचा म्ह० ' कें, कें ' करून रडण्याचा किं०ओरडण्याचा जो व्यापार तो.

केगद स्त्री० केतकी वृक्ष. **न०** १ केतकीच्या कणसाचें जें पान तें. २ स्त्रियांचें केशांत घालावयाचें एक सुवर्णभूषण.❀**केगदी स्त्री०**केतकीचें झाड.**वि०** केतकीच्या पानांचें केलेलें (इरलें, चटई,इ०).

केगया, केगामती [सं० कैकेयी] स्त्री० खाष्ट, जहांबाज, आणि कजाग जी कोणी स्त्री ती.

केगरें न० मागें ' केंकरें ' पहा.

केचित् [सं०'कश्चित' यांचें बहुवचन] वि० कोणी लोक; कांहीं लोक;कांहींजण. ❀ **केचिन्मत न०** सर्वांस मान्य नव्हे असें जें एकदेशीय मत तें.

केजणें [म० केजें] स० क्रि० नारळ, दाणे, इ० देऊन मासळीचा कुटा, भाजी, इ० घेणें.

केंजळ पु० एक मोठा वृक्षविशेष. यापासून इमारतीचीं लाकडें करतात.

केजें [सं० क्रय] न०मासळीचा कुटा,भाजी, इ० व्यावयासाठीं नारळ, दाणे, इ० जें देतात तें. ❀ **केज्यास कापूर होणें** मोठ्या किंमतीचा किं० मूल्यवान् पदार्थ अगदीं थोड्या किंमतीस विकत जाणें किं० विकला जाणें.

केंड [उच्चार अनुनासिक] न० १ हरिक नामक धान्याचे पोकळ दाणे किं० फोल. १भाजून रक्षारूप केलेला शेणगोळा. **पु०**एक प्रकारचा मासा.

केंड वि० अति चिक्कू;अत्यंत कृपण किं०कंजूष.

केंडणें स० क्रि० १ एकाद्याला तुच्छ करणें. झिडकारणें; धिक्कारणें. २ हरकत करणें; प्रतिबंध करणें;आडविणें. ३ एकादें काम दिरंगाईवर लोटणें.

४ एकाद्या माणसाला लोंबत किं० निष्टत ठेवणें. ५ परित्यागणें.

केढवळ, केढोळ [म० केवढा वेल] **पु०** केवढा वेल; किती तरी वेल (गांवढळांत प्रचार). ॐ **केढोळचा वि०** पुष्कळ वेळापासूनचा.

केणा पु० एक प्रकारचें गवत. ॐ**केणाकुंजरा पु०** अत्यंत गरीबाऊ अन्न. केणा आणि कुंजरा हीं दोन प्रकारचीं गवतें आहेत.

केणें न० पीतांबर, लुगडें, रुमाल, इ० च्या घडीभोंवतालीं बांधलेला दोरा.

केणें [सं० क्रय] कोणताही विकावयाचा माल किं० पदार्थ किं० जिन्नस. ॐ **एका घरीं केणें न०** एकाच ठिकाणा मिळावयाजोगा जो माल किं० पदार्थ तो.

केत पु० लांकडाचा गाभा.

केतक [सं०] **न०** १ केवड्याचें झाड. २ केवड्याच्या कणसाचें एक पान. ३ स्त्रियांचा डोकींत घालावयाचा एक दागिना; याला ‘ केतक-पान ’ असेंही म्हणतात.

केतकट [सं० केतक] **स्त्री०** १ केतकी. २ केतकीचें लाकूड.

केतकी [सं०] **स्त्री०** केवड्याचें झाड.

केतन [सं०] **न०** १ घर. २ स्थान. ३ शरीर. ४ धर्मकृत्य. ५ ध्वज, निशाण. ६ खूण.

केतु [सं०] **पु०** १ निशाण, ध्वज. २ पुढारी; श्रेष्ठ. ४ धूमकेतु. ४ किरण, ठिणगी. ६ केतु ह्या नांवाचा ग्रह. ॐ**केतुरत्न न०** वैदूर्य मणि.

केतुला [म० किती ?] (कवितेंत) किती?

केतेंपान न० १ गंजिफाच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

केदार, केदारा पु० संगीतांतील एक राग.

केंद्र [सं०] **न०** वर्तुळमध्य.

केधवां क्रि० वि० केव्हां (कवितेंत).

केनशी स्त्री० तुरा, तुरशी.

केनसावणें [म० केनशी] **अ० क्रि०** केनशीनें युक्त होणें; तुरसणें.

केना, केणा पु० एक प्रकारचें गवत. ह्याचा खाद्य म्हणून गरीब लोक उपयोग करतात.

केनी स्त्री० १ एक वनस्पति. २ तुरशी.

केंबरें, केम्रें, केंम्रूर न० एक क्षुद्र जंतु,– जो डोळ्यांपुढें उडत असतो आणि उपद्रव करतो.

केंबळ, केमळ न० १ गृहादिकांवर आच्छादनार्थ घातलेलें तृण. २ पुरकटलेला आणि लोंबत असलेला कोळिष्टक. ३ एकमेकांना शिवीगाळ करतांना उच्चारतात ती शिवी. ४ म्हातारी; सुरकुतलेली स्त्री; थेरडी; हडळ.

केंबळ, केमळ न०, केंबळा, केमळा, पु० केंबळी, केमळी स्त्री० घरावर घातलेलें तृणाचें आच्छादन (नवें आच्छादन घालावयाच्या वेळीं काढून टाकावयाचें किं० टाकलेलें).

केंबळा, केमळा पु० एक प्रकारचें खरखरीत तांबूस गवत (जें घरावर आच्छादनार्थ घालतात). ॐ **केंबळ्या घुडा पु०** नांदुळाची एक जात.

केमटा वि० चिकू किं० कंजूष माणूस.

केमशी स्त्री० केनशी, तुरशी.

केमसा पु० पुरुषाला शिवी देण्याचा बायकांचा शब्द; धगड. **केमशी स्त्री०** कोणाही स्त्रीला शिवी म्हणून यावयाचा बायकांचा शब्द; भेंदाडीण, हडळ.

केर पु० १ घराच्या जमीनीवर किं० कोणत्याही पदार्थावर बसतो जो धुराळा तो; कचरा. २ एकाद्या पदार्थांतून चांगला किं० उपयुक्त भाग काढून घेतल्यावर खालीं उरतो तो रद्दी किं० गदळ किं० टाकाऊ भाग. ३ एकाद्या पदार्थांत भलत्याच पदार्थांचे जे कण, तुकडे, इ० असतात ते समुच्चयानें. ॐ **केरवारा करणें** घरांतील सामान सुमान झाडून पुसून यथास्थानीं ठेवणें, जमीनीवरचा केर केरसुणीनें काढणें, इ० कामें करून घराला नीटनेटकेंपणाचें रूप देणें. **केरवारा करून टाकणें** १ उधळून किं० नासून टाकणें. २ तुच्छ मानून झिडकारणें; मनावर न घेणें (उपदेश, सूचना, इ०). **केरासमान वि०** बिनकिंमतीचा; लक्ष्यांत घेण्याच्या लायकीचा नव्हे असा; तुच्छ; धिक्कारार्ह. **केरकचरा पु०** गदळ, घाण. **केरकोंडा पु०** दुसऱ्याच्या घरांतील हलकीं कामें,–केर काढणें, भांडीं घासणें, चिरगुंटें धुणें, इ०; उ० नवरा मेल्यापासून कोयनाबाई केरकोंडा करून रहात असते. **केरकोन पु०** घरांतील रोजचा निघणारा केर टाकावयाची जागा. **केरडोक न०** घराच्या पाटणीला किं० छपराला

लोंबत असलेलीं धुरकटलेलीं कोळिष्टकें, जळमटें, गवताच्या काड्या, इ० समुचयानें (जीं सदा झोडयाला लागत असतात). **केरपाणी, केरपोतेरें** न० घरांतील रोजच्या रोज करावयाचीं स्त्रियांचीं कामें समुच्चयानें, –केर काढणें, झाडसारव करणें, पाणी भरणें, इ०. **केरावाऱ्यांत, केरावाऱ्यानिशीं** क्रि० वि० हलगर्जीपणानें, गफलतीनें (हारवलेलें, गेलेलें).

केरवा पु० ' कारवा ' पहा.

केरसुणी, केरसोणी स्त्री० १ शिंदीच्या पातीं, नारळीच्या झावळ्यांचे हीर, इ० एकत्र बांधून झाडावयासाठीं जी जुडी करतात ती; वाढवण. २ स्त्रीला शिवी देतांना योजावयाचा शब्द; हडळ; केंदाशीण; कृत्या. ॐ **केरसुणीच्या काड्या मोडून फळ नाहीं** निरर्थक आणि निष्फळ काम करण्याचा कांहीं उपयोग नाहीं इतकेंच नव्हे तर आपलें नुकसान होण्याचा संभव आहे.

केरावणें [म० केर] अ० क्रि० धान्यादि पदार्थ केरानें मिश्रित होणें.

केरी [म० केर] स्त्री० १ नांगरानें उखळलेल्या जमीनींतून वर आलेला केरकचरा, किं० पर्जन्यानें धुपून गेलेल्या जमिनींतील उघडा झालेला केरकचरा. २ शेतांतले खुंट. ३ पाण्याच्या प्रवाहाबरोबर वहात आलेला कचरा. ४ नारळाच्या झावळ्यांच्या पातींची एक प्रकारची पाटी.

केल न० १ दुफांदी आंकडी; दुवळक्याचें लाकूड; मोडून पडलेल्या फांदीचा खुंट जो झाडालाच राहिलेला असतो तो.

केलडें न० एक प्रकारचें माकड. ॐ **करायाला गेला गणपति तों झालें केलडें** चांगली गोष्ट करण्याचा खटाटोप करून वाईट गोष्ट मिळविणें किं० भलताच कांहीं तरी परिणाम होणें.

केलांडू न० लहान मूल; लेकरूं.

केलि [सं०] स्त्री० १ खेळ; क्रीडा. २ विलास. ३ थट्टा. ॐ **केलिगृह** न० रंगमहाल. **केलिरंग** पु० क्रीडास्थान. **केलिकलह** पु० पतिपत्नींचा प्रेमाचा रुसवा. याला ' लाल झगडा ' असेंही म्हणतात.

केंव, केव स्त्री० १ दीनपणाची याचना. २ काकळुतीचें भाषण. ३ कींव.

केवट न० किरकोळीनें माल विकणें किं० विकण्याचा धंदा. खालीं ' केवट्या ' पहा.

केवटा पु० एक प्रकारची माती.

केवटा (–टी) वि० चिक्कू; कंजूष.

केवटा, केवट्या, केवटी वि० किरकोळीनें माल विकणारा (व्यापारी किं० दुकानदार).

केवडा [सं० केतक] पु० १ केतकीचें झाड. २ स्त्रियांचें एक शिरोभूषण. ३ अंगरख्याच्या खाकेच्या जागीं लावतात तो कापडाचा तुकडा. ४ वेणी घालावयाच्या अगोदर विंचरलेल्या केशांची केलेली एक प्रकारची मांडणी किं० रचना. ॐ **केवड्याचा खाप** पु० सुंदर आणि मोहक चेहेरा (स्त्रीचा किं० पुरुषाचा).

केवडी स्त्री० ' केवडा ' अर्थ १ पहा.

केवढा [सं० कियत्] पु० किती मोठा ? ॐ **केवढ्यानें** क्रि० वि० किती मोठ्यानें ? किती जोरानें ? **केवढ्यांदा** किती उंच स्वरांत ? किती मोठ्यानें ?

केवण स्त्री० एक वृक्ष, – याच्या सालींच्या दोऱ्या करतात.

केवणें न० १ वस्त्राच्या घडीभोंवतीं गुंडाळलेला दोरा. २ साठा, संचय.

केवल (–ळ) [सं०] वि० १ विशिष्ट, एकट्याचें. २ फक्त; उ० केवळ तांदुळावर भोजन होत नाहीं. ३ शुद्ध, मिश्र नव्हे असें; उ० ही पंचपात्री केवळ चांदीची आहे (म्ह० तींत तांबें इ०ची भेसळ नाहीं). क्रि० वि० अगदीं; पूर्णपणें; सर्वथैव; तंतोतंत; सर्वांशांनीं; उ० हें प्रदर्शन केवळ इंद्रभुवन आहे; उ० तुझ्या विनंतीला मी केवळ नाहीं म्हणत नाहीं; उ० हा मनुष्य केवळ मूर्ख आहे; उ० केवळ तूंच यावेंस असा माझा हेका नाहीं; तुझा भाऊ आला तरी माझें काम भागेल. न० अद्वैत वाद. ॐ **केवलता** स्त्री० मोक्ष; कैवल्य. **केवलप्रयोगी अव्यय** उद्गारवाचक शब्द; उ० ओहो ! छीः ! थुः !

केव(–वु–)लवाणा, केविलवाणा वि० हीन दीन दिसणारा; दया उत्पन्न करणारा; ज्याला पाहून अंतःकरण कळवळतें असा; दीनवाणा.

केवल [नंदभाषेंत] वि० वीस.

केवा पु० १ साठा; संचय. २ खजिना; डबोलें; उ० माझ्या मावशीनें आपला केवा चुली-

खालीं पुरून ठेविला होता. ३ महत्त्व; थोरवी; उ० मी यमालाही भिणार नाही, मग तुझा केवा काय ? (म्ह० तुझी काय पत्रास ?). ४ लाभ; मूल्यवान् पदार्थ.

कैंवि क्रि० वि० (कवितेंत) कसा ? कोणच्या प्रकारें ? कोणच्या रीतीनें ?

केवी पु० परगांवचा मनुष्य जो एखाद्या गांवांत शेत करावयाला येऊन राहातो तो (याच्या उलट ' गांवकरी ' किं० ' वतनदार ').

केवी स्त्री० १ साठा. २ खजिना.

केव्हढा ' केवढा ' पहा.

केव्हां क्रि० वि० १ कोणच्या वेळीं ? कोणच्या समयीं ? २ कोणत्याही वेळीं (अकरणरूपी प्रयोगांत); उ० मी केव्हां गेलों नव्हतों. ॐ**केव्हा तरी, केव्हां केव्हां क्रि० वि०** मधून मधून; कधीं कधीं; उ० तो मुलगा चालतांना केव्हां केव्हां पडत होता; उ० मी त्या मोलकरणीला केव्हां केव्हां (किं० केव्हां तरी) लुगडें देत आलेली आहें. **केव्हां कधीं क्रि० वि०** मधून मधून; कधीं कधीं. **केव्हांच क्रि० वि०** मघाशींच. २ अगदीं थोडक्या वेळांत किं० अवघ्यांत; उ० घोड्यापुढें मी एक पेंडी सोडली होती ती त्यानें केव्हांच खाऊन टाकली. **केव्हांचा वि०** [**क्रि० वि०**च्या अर्थानें] पुष्कळ वेळेच्या पूर्वींच; पुष्कळ वेळपर्यंत; उ० मी येथें केव्हांचा (किं० केव्हांची) तुझी वाट पहात आहें. **केव्हां ना केव्हां, केव्हां नाहीं केव्हां तरी, केव्हां तरी क्रि० वि०** कोणच्या तरी वेळीं; प्रसंगानें; संधि येतांच. **केव्हांशीक क्रि० वि०** १ केव्हां ? कोणच्या वेळीं ? उ० तूं केव्हांशीक आलास ? २ कोणत्याही वेळीं (अकरणरूपी प्रयोगांत) उ० मी तुला येथें केव्हांशीक येऊं देणार नाहीं (म्ह० कधींही). **केव्हांसा वि०** (तीन्हीं लिंगीं आणि दोन्हीं वचनीं) कोणच्या समयाच्या सुमारास ? उ० तो केव्हांसा गेला ?

केश, केस [सं०] पु० मनुष्य, पशु, इ० कांचे अंगावर जे तंतुप्राय अवयव उगवतात,–जे कापिले असतां दुःख होत नाहीं, व पुनरपि वाढतात,–ते प्रत्येक. ॐ**केशकलाप,–हस्त,–पाश,–पक्ष पु०** केशसमूह (वेणी, अंबाडा, शेंडी, इ०). **माझ्या हातास** (किं० **मनगटास**) **काय केश आले आहेत** ? मी काय कर्तृत्वहीन माणूस आहें की काय ? **केशांच्या अंबाड्या होणें** केश पिकूं लागणें; वार्धक्यावस्था येऊं लागणें. (अंबाड्याचे तंतु पांढरे असतात ह्यावरून हा वाक्प्रचार उत्पन्न झाला आहे). **सुटलेले केस पाठीला शरण** हीन, दीन, आणि विपन्न, अशा माणसानें येईल ती स्थिति भोगिली पाहिजे आणि मिळेल तें आश्रयस्थान पत्करलें पाहिजे. **केशा (–सा–) नें गळा कापणें** गोड भाषणानें मनांतील कपट झांकून एखाद्याचा नाश करणें; मैत्रीच्या पांघरुणाखालीं विश्वासघात करणें. **केसास धक्का लागूं न देणें** ईषन्मात्र उपद्रव होऊं न देणें; यत्किंचित वांकडें होऊं न देणें. **पाणी केस तोडील** पाण्याच्या प्रवाहाला इतका जोर आहे की त्यांत केश धरला तर तो तुटेल. **केशविंचरणी स्त्री०** फणी. **केसकरीण स्त्री०** जिचें अद्यापि केशवपन झालें नाहीं अशी गतधवा स्त्री. **केसतुटें, केसतड (–तोड) न०** केस तुटल्यामुळें गळवासारखी त्या-जागीं जी गांठ येते ती. **केसपट न०** केसायेवढें जें परिमाण तें. या अर्थी ' कसपट ' हा शब्द विशेष वापरतात. **केसाळ, केसाळू, केसाळा वि०** १ शरीरावर बहुत केश असलेला (माणूस, जनावर, इ०). २ ज्यावर दाट आणि लांब केश आहेत असें वस्त्र (घोंगडी, तुरणूर, इ०).

केशर [सं०] न० १ काश्मीर देशांत उत्पन्न होतें तें एक सुगंधि द्रव्य; (केशर हें द्रव्य एका विशिष्ट झाडाच्या फुलांतील तंतु असतें). २ रंग तयार करण्याच्या कामाची एक वनस्पति. ३ फुलांतील तंतु. ४ आयाळ. ५ बकुळ. ॐ**केसरी, केशरी पु०** १ सिंह. २ घोडा. ३ उत्तम ह्या अर्थी,–वैयाकरणकेसरी म्ह० उत्कृष्ट वैयाकरण. **केशरा पु०** एक केशरी रंगाचें वस्त्रविशेष, जें ' मारीन किंवा मरेन ' या इर्षेनें युद्धाला निघालेले रजपूत योद्धे परिधान करीत असत; (**क्रि०** करणें, घेणें). याला **केशरी वस्त्र न०, केशरी पोशाख पु०** असेही शब्द आहेत. **केशरी वि०** १ केशराचा किं० केशरासारखा जो रंग तो, किं० तद्विशिष्ट जें वस्त्रादि तें. २ केशरा केलेला, घेतलेला.(योद्धा). **स्त्री०** केशरी गंधाचा शरीरास जो लेप करत.

तो. **केशरी गंध न०** कपालादिकांस लावण्याकरितां केशरांचें (किं० कुकूं, रवे,इ०कांचें) जें गंध करतात तें. **केशरीभात पु०** केशर,बदाम,साखर, वेदाणे, इ० घालून तांदुळाचा जो सणवारीं भात करतात तो. याला **साखरभात** असेंही म्हणतात. **केशऱ्या वि०** १ केशरी वस्त्र ज्यानें परिधान केलें आहे असा(योद्धा). २केशऱ्या, रेषाळ(आंबा).

केशव [**सं०**] **पु०** विष्णूचें एक नांव. ॐ **केशवमाधव पु० अ० व०** गढूळ किं० कुजक्या-पाण्यांत किं० फळादिकांत जे क्षुद्र जंतु असतात ते.

केसटी [**म०** केस] **स्त्री०** १ न विंचरलेल्या व तैलसंस्कार न झालेल्या केशांची बट. २ केश (तुच्छतेनें).

केसर [**सं०**] **पु० न०** १ फुलांत जे बारीक बारीक तंतु असतात ते प्रत्येक; पुंकेसर आणि स्त्रीकेसर अशा यांच्या दोन जाति असतात. २ सिंहाची आयाळ. ३ आंब्याचे बांठ्यावर जी लोकर असते ती. ४ आंबा, शाळी, तुळस, इ०-कांस जो पुष्पाचा तुरा येतो तो; मोहोर; मोगरी. ५ भात, राळा, वरी, इ०कांचें जें कणीस तें.

केसरी पु० १ सिंह. २ घोडा.

केसरी (**–ऱ्या**) **वि०** १ केशरी वस्त्र किं० केशरी पोशाख ज्यानें केला आहे असा(योद्धा). २ रेषाळ; बांठ्यावर तंतु किं० लोकर असलेला (आंबा).

केसरी स्त्री० एक फुलझाड.

केसरी, केसारी, केसाळी [**म०** केस] १ दृष्टिबाधा न व्हावी म्हणून गायी म्हशींच्या गळ्यांत घालण्याकरितां जी केशांची दोरी करतात ती. २ केशांची केलेली दोरी.

केसारीण [**म०** केसारी] **स्त्री०** केशांच्या दोरीचा गळ्यास फांस घालून अकस्मात् पुरुषास मारणारी जी स्त्री ती.

केसुरडी [**म०** केस] **स्त्री०** केशांस तुच्छ-तेनें म्हणतात; केसटी.

केहरवा पु० मागें ' कारवा ' पहा.

केळ [**सं०** कदली] **स्त्री०** केळीचें झाड; (त्याचीं पानें कार्यप्रसंगीं जेवण्याकरतां घेतात). ॐ**केळबोंड, केळकमळ,केळफूल, न०** केळीच्या झाडास किं० चवेणीस फुलासारखें जें कणीस येतें तें,–ज्याची आपण भाजी करतों.

केळ पु० एक वन्यवृक्ष.

केळडें, केलडें न० माकड.

केळंबा (**–भा**) [**म०** केळ] **पु०** १नवीन वाढलेली किं० नवीनच उपटून दुसरीकडे लावलेली केळ; केळीचा रोपा, (**क्रि०** फुटणें). २ चवे-णीचें जें काल तें.

केळवंड [**म०** केळ] **स्त्री०** केळीला येतो जो केळ्यांचा लोंगर किं० घड तो.

केळवण [**सं०** केलि] **स्त्री०, न०** लग्न,मुंज, यांच्या पूर्वी करतात जो एक सोहळा तो ; गडग-नेर. **न०** काळजीपूर्वक ठेवणें जें तें.

केळवणें[**म०**केळवण]**अ०क्रि०**१नवरा,नवरी, मुंजा, इ०नीं केळवण सोहाळ्यानें युक्त होणें; त्यांचा केळवण सोहाळा उरकणें किं० समाप्त होणें. २ (लक्षणेनें) नटणें थटणें; नटणें मुरडणें.

केळवा [**म०** केळ] **पु०** केळीचा रोपा; केळंबा, (**क्रि०** फुटणें).

केळविणें स० क्रि० काळजीपूर्वक किं० आस्थापूर्वक ठेवणें किं० बाळगिणें किं० राखणें.

केळा पु० लहान मातीची घागर.

केळांबा, केळयांबा पु० १ आंब्याची एक जात. २ त्या जातीच्या आंब्याचें फळ; (कोंकंबा-सारखें हें असतें).

केळी स्त्री० १ कळशी (मृत्तिकेची किं० धातूची). २ जोंधळ्यांतील एक भेद. ॐ**घर चंद्रमौळी आणि केळीवर नारळी** घराला छप्पर नसल्यामुळें रात्रीं चंद्राचें मात्र आच्छादन, आणि घरांत भांडीं नसल्यामुळें खापराच्या कळशीवर करवंटीचें मात्र पात्र ! परमावधीच्या दारिद्र्याचें वर्णन विवक्षित असतां प्रस्तुत वाक्प्रचार योजतात.

केळें न० १ केळीच्या झाडाचें लांबोडें आणि स्वादिष्ठ फळ. २(लक्षणेनें)लहान मुली साडी इ०, नेसून तिच्या निऱ्या पोटावरील वस्त्राच्या कांठांत खोचून वळवितात तेणेंकरून तेथें जो केळ्यासारखा आकारविशेष होतो तो. ३ पागोट्याची जी बिनी ती.ॐ **केळीं खात बसणें** हिरमुसलें होऊन स्वस्थ बसणें; कांहीं करतां येऊं नये अशी स्थिति अनु-भवावी लागणें. **माझे हात काय केळीं खाव-**

याला गेले आहेत ? माझे हात स्वस्थ बसले नाहीत. मला प्रतिकार करतां येणार नाहीं काय ? (' येईलच ' याअर्थी धमकीनें).

कैं अ० (काव्यांत) १ कोठें ? २ केव्हां ? ' कई ' असेंही रूप ह्याच अर्थी आहे.

कैक वि० कित्येक; किती तरी; कित्येक.

कैकट, कैकड वि० भयंकर, वाईट (देश, अरण्य, इ०).

कैकाडी पु० डोंबाऱ्यांसारखी एक जात आहे ती, कि० तज्जातीय इसम. हे झाडांच्या फांद्यांच्या टोपल्या करून विकतात. **कैकाड** न० अनेक कैकाड्यांचा समुदाय.

कैकेयी [सं०] स्त्री० १ दशरथाची तिसरी म्ह० कनिष्ठ व सर्वांत आवडती बायको. हिनें दशरथाकडून दोन वर मागून घेऊन रामास वनवासास पाठविलें व भरतास राज्यपद देवविलें. दशरथास रामवियोगाच्या असह्य यातना होऊन त्यांतच तो मृत्यु पावला; पण कैकेयीनें आपला हट्ट सोडला नाहीं. २ (लक्षणेनें) कजाग, हट्टी, दुष्ट, खाष्ट जी स्त्री ती; घातिका.

कैंचा वि० (काव्यांत) १ कोणता ? २ कोठचा?

कैंची [हिं० कईंची] स्त्री० १ कातरी,— वस्त्रादि कापावयाची दोन पात्यांची. २ तुळया, इ० बरावर चढविण्याकरतां दोन वासे दोहींनी गुणाकाराच्या चिन्हासारखे एकत्र बांधतात ते. ३ शोभेच्या दारूच्या बाणांचा चोविसाचा जो समुदाय तो. ४ लाकडें वजन करावयाचा असतां कांटा अडकविण्याकरतां जें तिकाटणें करतात किं० उभारतात तें. ५ (लक्षणेनें) अडचणीची, किं० पंचाईतीची स्थिति; पेंच, पक्कड.

कैंछा पु० मिठाईवाल्याचें एक आऊत किं० साधन; करछा.

कैद [अ०] हिं० १ तुरुंगांत टाकणें; बंदिवान करणें. २ बंदिवास. ३ राजा, शास्त्रकर्ते, इ०कांनीं प्रजेनें अमुक प्रकारें वर्तावें, अमुक प्रकारें वर्तूं नये, इ०रूप जें शासन घालून दिलेलें असतें तें. ४ जरब, कदर. ५ आपली कैद कोणकानें यत्किंचित मोडली असतां त्याबरोबर कोणी जी फारच घासाघीस करतो ती. वि० कैदेंत ठेविलेला; कैद केलेला; बंदिवान केलेला.

कैदकानू स्त्री० सरकारनें केलेले सर्व कायदे सामुदायिकत्वानें. **कैदखाना** पु० तुरुंग; गुन्हेगारास जेथें अटकेंत ठेवण्यांत येतें तें बांदिस्त स्थळ. **कैदखोर** वि० १ आपली कैद कोणेकानें यत्किंचित मोडली असतां त्याबरोबर फारच घासाघीस करण्याचा ज्याचा स्वभाव तो. २ भांडखोर. ३ तुसडा. ४ लोकांना कडक नियम किं० नियंत्रणा लागू करणारा. **कैदवार** क्रि० वि० १ राजानें किं० दुसऱ्या कोणी घालून दिलेल्या नियमांस किं० नियंत्रणेस न उल्लंघितां. २ निमूटपणें; नियंत्रणा सोसून. **कैदी** वि० भांडरा; तुसडा; कैदखोर. पु० बंदिवान; कारागृहांत टाकलेला जो कोणी अपराधी तो.

कैदाशीण [म० कैकाशीण] स्त्री० भांडकुदळ, कजाग, खाष्ट जी कोणी स्त्री ती; हडळ; कृत्या.

कैपत स्त्री० एक विशिष्ट प्रकारचा पितळी दिवा.

कैपत [अ० कैफीत] स्त्री०, न० लांडी-लबाडी, लटपट, मसलत, डावपेंच (क्रि० करणें, रचणें, काढणें, चालवणें, मांडणें). **कैपणखोर, कैपती** वि० लांड्यालबाड्यांनीं भरलेला; अनेक लटपटी करणारा; कावेबाज; मसलती. **काना कैपती अंधळा हिकमती** एकडोळ्या कुटिल, व्यूह रचण्यांत, आणि दोन्ही डोळ्यांनीं अंधळा, हे युक्त्या करण्यांत पटाईत असतात.

कैफ [अ० कैफ] पु० १ अफू, भांग, इ०कांच्या ठायीं उन्माद यावयाजोगा जो गुण असतो तो. २ अफू, भांग, इ०कांच्या सेवनानें येतो किं० चढतो तो उन्माद, अंमल, किंवा धुंदी. ३ अफू, भांग, इ० जे उन्मादकारक पदार्थ ते प्रत्येक. **कैफी** वि० १ अफू, भांग, इ० अंमली पदार्थ सेविण्याचें ज्यास व्यसन आहे असा. २ कैफ. २ कैफ उत्पन्न करण्याचा गुण आहे ज्याच्या ठायीं असा अफू, इ० सारखा जो पदार्थ तो.

कैफियत, कैफत, कैफेत , कैफेयत [अ० कैफीत] स्त्री० १ हकीगत; इत्थंभूत वृत्तान्त किं० निवेदन. २ एक विशिष्ट व्यवहार किं० काम.

कैमर्थ्य [सं० 'किमर्थ'यापासून भा०वा० ना०] न० निरर्थकता; कांहीं विशिष्ट पदार्थानें सिद्ध व्हावयाचें जें काम ते अन्यथा सिद्ध झालें असतां, किं० त्या कामाची इच्छा किं० विवक्षा नाहीं असें

झाल्यामुळें, त्या विशिष्ट पदार्थाची तें काम सिद्ध करण्याविषयींची जी निरुपयोगिता ती;उ०पर्जन्या-वांचून जर धान्य पिकतें तर पर्जन्यास कैमर्थ्य येतें.

कैमुतिकन्याय [**सं**०किं+उत=मग विशेषच] **पु**०१अमुक एका गोष्टीनें अमुक एक दुष्कर गोष्ट जर सिद्ध होते तर तिनेंच त्या दुष्कर गोष्टीहून सुकर गोष्ट सिद्ध होणारच हें निराळें कशास सांगावयास हावें असा अर्थ अभिप्रेत असतां प्रस्तुत न्यायाचा प्रयोग होतो. २मग 'विशेषच' ह्या अर्थाची कोटी;उ० ज्या शस्त्रानें लांकूड तुटतें त्या शस्त्रानें गवत तुटेल हें कैमुतिकन्यायानें सिद्ध आहेच.

कैरा, खैरा वि० १ अश्वादि पशूंचा एकच डोळा जो घारा असतो तो (डोळा), किं० तद्विशिष्ट जो (अश्वादि तो); (कैरा डोळा हें घोड्याच्या अशुभाचिन्हांपैकीं एक होय). २ तिरळा जो डोळा तो, किं० तद्विशिष्ट जो मनुष्य तो.

कैरी स्त्री० कुयरी; हिरवा आणि अपक्व आंबा.

कैलास [**सं**०] **पु**० श्रीमहादेवाचें निवासस्थान ज्या हिमकूटावर आहे त्याचें नांव. याला **कैलासपर्वत** असेंही म्हणतात. ‡**कैलास कंटाळे तों गाणें आणि कान फाटे तों लेणें** मोठमोठ्यानें कर्कश आवाजांत गाणें आणि पुष्कळ दागिने घालणें. **कैलास येणें, मिळणें, उतरणें**,किं०**प्राप्त होणें** फार मोठा लाभ मिळविणें. **कैलासवासी वि**० कोणा सन्मान्य मृत मनुष्याचा उल्लेखादि करावयाचा असतां त्याच्या नांवाशीं जोडतात(पुढें किं०मार्ग)उ०;कैलासवासी महादेव गोविंद रानडे; उ० लोकमान्य टिळक इ० स० १९२० त कैलासवासी झाले.

कैली [**अ**० कैल्] **वि**० मापी; याच्या उलट **वजनी**; उ० कैली शेर म्ह० मापी शेर, कैली खंडी, कैली मण, इ० ‡**कैली माप न**० कांहीं पात्रांतील अवकाशावरून धान्यादिकांचें परिमाण ठरविण्याचीं जीं मापें तीं प्रत्येक; याच्या उलट **वजनी माप**. [हत्यार किं० साधन.

कैवर, कैवार पु०, **न**० वर्तुल काढण्याचें

कैवर्त,कैवर्तक[**सं**०]**पु**०कोळी,मासे धरणारा.

कैवल्य [**सं**०] **न**० १ निःसंगपणा. २ अद्वितीयत्व. ३ पृथक्पणा. ४ वैशिष्ट्य. ५ केवलपणा. ६ जीव आणि शिव यांचें ऐक्य. ७ मोक्ष; ब्रह्म. ‡**कैवल्यपद न**० ब्रह्माशीं एकरूपावस्था. **कैवल्य येणें** किं० **मिळणें** कांहीं मोठा लाभ मिळविणें.

कैवाड न० १ कुभांड; तोहमत; (**क्रि**० **रचणें**, घेणें). २ (कवितेंत) पक्षपातानें एखाद्याची बाजू स्वीकारणें व तिचें समर्थन करणें; कैवार. ‡**कैवाडी वि**० १ कुभांडी. २ (कवितेंत) कैवारी; कैवार घेणारा.

कैवार, कैंवार पु० पक्षपातानें एखाद्याची बाजू स्वीकारून तिचें केलेलें जें समर्थन तें; कळकळ्याचा तरफदारी(**क्रि**०घेणें).‡**कैवारी वि**० एखाद्याचा जो कैवार घेतो तो; एखाद्याचा वाली.

कैवार पु,० **न**० १ वर्तुल काढावयाचें साधन. २ त्या साधनानें काढलेलें वर्तूल. ३ परीघ.

कैसा [**म**० कसा ?] **वि**० (कवितेंत) १ कोणत्या प्रकारचा ? २ कोणत्या प्रकारें ?

कोहटारू वि० कुइटार, कुहिटार; कुइटानें विणलेलें किं०शिवलेलें (झोपडें,इ०).

कोई स्त्री० १ कोंवी. २ कोय. ‡**कोईकमळ न**० एक पांढरें कमळ.

कोईट न० तृण, गृहादि शिवण्याचीं किं० विणण्याचीं, झांपा इ० जीं साधनें तीं प्रत्येक.

कोईन स्त्री०मासे धरण्याकरतां पाण्यांत कांहीं विशिष्ट प्रकारें मांडलेली, सोडलेली, किं०ठेविलेली टोपली.याला **खोईण** असाही प्रतिशब्द आहे.

कोईल, कोईळ स्त्री० विटीदांडूच्या खेळांत विटी कोलण्याकरतां जी लांबोडी खळगी करतात ती; गल. ‡**कोईलडाव पु**० विटी कोलण्याची पाळी.

कोईल, कोईळ [**सं**० कोकिल] **स्त्री**० कोकिळा.

कोंक न० पंक; कुबड.

कोक [**सं**०] **पु**० चक्रवाक पक्षी; ह्या पक्ष्याच्या नरमादींचा रात्रीं वियोग होतो आणि सूर्योदयीं पुन्हा गांठी पडतात असा कविसमय आहे. ‡**कोकदेव पु**० खबूतर. **कोकबंधू पु**० सूर्य. **कोकशास्त्र न**० स्त्रीपुरुषांचीं लक्षणें, त्यांचें एकमेकांवरचें प्रेम, इ० विषयांचें निरूपण करणारें शास्त्र. **कोकमार्ग पु**०, **कोकपंथ पु**० कोकशास्त्राप्रमाणें वर्तणाऱ्या लोकांचा पथ.

कोकटहोळी स्त्री० फाल्गुनी पौर्णिमेच्या पूर्वी मुलें जी होळी करतात ती.

कोकड, कोंकड, खोंकड स्त्री०, न० कोल्ह्या-सारखें रानांतील एक जनावर; खोंकड.

कोकण, कोंकण न० सह्याद्रीच्या पश्चिम-कडचा समुद्रापर्यंत गेलेला जमीनीचा पट्टा. ॐ**कोकण धार स्त्री०** कोकणांत आढळणारी एका विशिष्ट जातीची धार; करकोंची. **कोकणपट्टी स्त्री०** सह्याद्रीच्या पश्चिमेकडची समुद्राला टेकलेली पट्टी, म्ह० अरुंद आणि लांबलचक जमीनीची पट्टी. **कोकणस्थ पु०** ब्राह्मणांची एक जात ती, किं० तज्जातीय ब्राह्मण तो. **कोकणी वि०** कोकणांत आढळणारा किं० रूढ किं० प्रचलित. **कोकण्या, कोकणा कुणबी पु०** कोकणांतील कुणब्याच्या जातीचा इसम.

कोंकणें अ० क्रि० १ कुत्रा इ० प्राण्याचें ओरडणें किं० किंचाळणें. २ कोंबडा इ०चें आरवणें. ३ कावळा, राघू, इ०चें ओरडणें.

कोंकणें न० एका जंगली वेलीचें फळ.

कोकदमा, कोंगदमा पु० थकवा (प्रथम विभक्तींत रूढ नाहीं). ॐ**कोकदम्या येणें, कोंगदम्या येणें** अगदीं थकून निरंगळीस येणें; असह्य श्रमानें मृतप्राय होणें.

कोकंब, कोकम, कोकंबी स्त्री० एक वृक्ष-विशेष; याचीं फळें तांबडीलाल असून त्यांच्या सालीपासून आमसोल करतात. ह्या झाडाला ' रातांबी ' असें अन्य नांव आहे.

कोकंब पु० कोकंबीचें फळ; रातांबा. ॐ**कोकंब (-म-) साल स्त्री०, न०** कोकंबीच्या फळाचें साल; हें आंबट असून सार, इ०मध्यें चवीसाठीं घालतात; ह्याचें पन्हेंही करतात. **कोकंबेल न०** कोकमाचें तेल; रातांबेल. थंडीच्या दिवसांत किं० इतर ऋतूंत फुटीर किंवा भेगळणाऱ्या त्वचेला हें तेल लावतात. तें नेहेमीं घट्ट असतें आणि दिव्यावर धरून पातळ करून लावतात.

कोंकरा पु० मेंढी. **कोंकरी स्त्री०** मेंढी.

कोंकरूं न० १ मेंढीचें पोर; २ (लिंग मनांत न आणतां) मेंढरूं. ॐ**कोंकरचाल स्त्री०** घोड्याची एक विशिष्ट चाल.

कोंकलणें स० क्रि० एकाद्याला झोडपून काढणें; त्याला कुबलणें किं० चुकलणें. **अ० क्रि०** इष्ट कार्य सिद्धीस न गेल्याकारणानें ओरडत आणि चरफडत असणें; इष्ट वस्तु प्राप्त न झाल्यामुळें चर-फडत बसणें.

कोंका पु० १ कानफाट्याचें तंतुवाद्य. २ नुक-तेच बाहेर पडलेलें केळफूल; कोंवळें केळफूल. ३ केंक पक्षी. ४ एक प्रकारचा मासा.

कोंकट पु० १ कोलाहल, इ० पक्ष्यांची चीव-चीव. २ मनुष्यें इ०चा मिश्र आवाज किं० गलबला; गोंगाट.

कोंकाटी स्त्री० घुम्म असा आवाज करीत फिर-णारा एक प्रकारचा भोंवरा. हा भोंवरा बहुधा हस्तिदंताचा आणि सच्छिद्र असतो आणि तो बोटांनीं फिरवावयाचा असतो.

कोकावणें अ० क्रि० १ कों कों असा शब्द करणें. २ कुत्रें इ०नीं भुंकणें.

कोकिल (-ळ) [सं०] पु० वसंत ऋतूंत मंजुळ आवाज करून ओरडणारा एक पक्षी; पिक. ह्या पक्ष्याचीं अंडीं कावळी उबविते ह्या समजावरून त्याला 'परभृत' असेंही म्हणतात. ॐ**कोकिलावास, कोकिलानंद पु०** आम्रवृक्ष. **कोकिला स्त्री०** कोकिळ पक्ष्याची मादी. **कोकिलाव्रत न०** आषाढ अधिक मास आला असतां स्त्रिया एक मासपर्यंत करतात तें एक विशिष्ट व्रत.

कोकी स्त्री० १ पागोटें, विरलें, इ०च्या माथ्याला शृंगासारखा वाकडा जो भाग असतो तो. २ डोळ्याच्या बुबुळाचा जो एक भाग वाढतो आणि त्यामुळें दृष्टि गढूळ होते किं० अंधक होते तो. ॐ **कोकीदार वि०** झोकदार कोकी असलेलें (पागोटें, विरलें, इ०).

कोंकणें, कोकणें अ० क्रि० किंचाळणें; ओर-डणें; कैंकाटणें; गुरगुरणें.

कोंकेरी स्त्री० एक पक्षिविशेष.

कोंग न० १ दारिद्र्य, वेड, दुःख, वेदना, इ०नीं ग्रस्त नसतां ग्रस्त असल्याचें ढोंग (क्रि० घेणें); उ० तूं वेडाचें कोंग घेतलें आहेस, मी फसणारा मनुष्य नाहीं. २ कुबड्या. ३ कुबड. [कोयती

कोंगळी स्त्री० अगदीं लहान आकाराची

कोंगा, कोंगाढ, कोंगाडी पु० १ कर्णाट-

कांतील एक जाति किं० त्या जातीचा इसम. २ कोणीही मूर्ख किं० अडाणी माणूस.

कोंगाळा वि० लांब आणि वाकड्या शेंगा ज्याला येतात असें चिंचेचें झाड.

कोंगाळें न०लांब आणि वाकडी चिंचेची शेंग.

कोंगी, कोंग्या वि० १ दारिद्र्य,दुःख,वेदना, आजार, इ०चें ढोंग करणारा.२कारणाशिवायं चरफडणारा; विनाकारण विवळणारा.

कोंगें न० मधाचें पोळें.

कोच पु० आंबेहळदीचा कांदा.

कोंच स्त्री० १ शस्त्रादिकांच्या टोंकानें शरीरावर पडतें ती खळी, ओरखडा, किंवा जखम. २ टोंक, अग्र. ३ पागोटें,इरलें, इ०चा अणकोचीदार माथा.

कोंच, कोचें, न० जोंध्या कातळावर एक कांटेरी वेल उगवतो तो; त्याच्या बोंडाचा काढा करतात.

कोचक(– का–) ई स्त्री०कोंवळें आंवळें कुटून त्या कुट्टयांत हिंग, जिरें, इ० पदार्थ घालून जें तोंडीलावणें करतात तें.

कोचाकिंदर न०१ अडगळ; सटरफटर सामान; अव्यवस्थितपणें पडलेलें किं० टाकलेले पदार्थ किं० सामानसुमान. २ आडगळीची जागा.

कोंचका स्त्री० १ पागोट्याचें किं० इरल्याचें टोंक. २ पागोटें (तुच्छतेनें). ❀ **कोंचकीदार वि०** ज्याला अकडबाज कोचकी आहे,असें(पागोटें, इरलें, इ०).

कोचकीस वि० आकुंचित किं० अडचणीची. (जागा, खोली, इ०). [२ थोडा, अल्प.

कोचट, कोचा वि०१ आकुंचित,अडचणीचा.

कोंचणें स० क्रि० नखांनीं किं० दांतांनीं तोडणें किं० फोडणें किं० फाडणें किं० कुरतुडणें.

कोंचाळें, कोचाळें न० वर्तुळाकार बसलेल्या माणसांचा किं० ठेविलेल्या पदार्थांचा समूह; कोंडाळें (क्रि० करणें, घालणें, करून बसणें,इ०).

कोचिंदा पु० एक वनस्पति; कोचिंदा दिसण्यांत कांद्यासारखा दिसतो.

कोची स्त्री० टोंक; अग्र; बोंडी.

कोंजट, कोंझट वि० १ आकुंचित, लहान लांबीरुंदीचा किं० कोंडलेल्या हवेचा (प्रदेश, घर, खोली, इ०). २ आजार, इ०कारणांनीं अर्धवट मिटलेला (डोळा).

कोजळणें अ० क्रि० १ काळ्या बुरशीनें व्याप्त होणें (नारळ, पोफळ, खोबरें, सुपारी, किं० कोणतेंही फळ). २ काजळीनें किं० धुराच्या पुटांनीं किं० मशेरीनें व्याप्त किं० आच्छादित होणें (घराचा माथा, छपर,भांड्याचा तळ, इ०). ३ वात जळून तिच्या अग्रावर कोळी धरणें (तो कोळी झाडला म्हणजे दिवा अधिक प्रकाश देतो).

कोजळी स्त्री० १ जळत असलेल्या वातीच्या टोंकाला जो जमतो कोळी तो (तो झाडून टाकला म्हणजे वातीचा प्रकाश स्वच्छ होतो). २ गवत, पातेरा, इ० जळून गेल्यानंतर होते जी राखेची रास ती. ३ धुरकटलेलीं आणि लोंबत असलेलीं कोळिष्टकें.

कोजळी स्त्री० विवंचना, हुरहुर, चिंता.

कोजागर [**सं०** कः जागर्ति=कोण जागत आहे ?] **पु०** आश्विनी पौर्णिमेस रात्रीं जागत बसण्याचें एक व्रतविशेष. ❀**कोजागरी पौर्णिमा स्त्री०** आश्विन महिन्यांतील पूर्णिमा.

कोंझट वि० १ आकुंचित. २ ज्यांतील हवा कोंडलेली आहे, ज्यांत वाऱ्याचा प्रवाह चालत नाहीं, ज्यांत अंधेर आहे,असें (स्थळ).

कोंझा वि० १ आजार इ०नीं खोल गेलेला किं० अर्धवट मिटलेला (डोळा). २ तिरसट; चिरडखोर. ३ रुसून आणि फुगून बसलेला (ह्या अर्थी ' कोंझडा ' असाही शब्द आहे).

कोट [**सं०** कोट] किल्ला; विशेषतः भुईकोट किल्ला. २ तट; रक्षणार्थ उभारलेली मोठी व भक्कम भिंत (किल्ल्याची, नगराची); उ० पुणें शहराभोंवतीं दगडाविटांचा तट काय कामाचा ? तुमच्या छातीचा कोट पाहिजे. ३ आपल्या सैन्यांत शत्रूचा प्रवेश न होतां आपला मारा शत्रूवर चालावा एतदर्थ करतात जो सैन्याचा व्यूह तो.

कोट [**सं०** कोटि] **स्त्री०** शंभर लक्ष ही संख्या. **वि०** शंभर लक्ष जें कांहीं तें. ❀**कोटकल्याण न०** कांहीं एका लाभानें होते ती पराकाष्ठेची तृप्तता; ज्याच्या प्राप्तीनें ज्यास्तीची हांव किं० अपेक्षा राहात नाहीं असा कांहीं एक लाभ.

कोटेगा वि० कोडगा, निर्लज्ज; बेशरम.

कोटगा पु० एक प्रकारचा भोंवरा (मुलांचा). २ खंडोबाचे भक्त भिक्षा ज्या लाकडी पोंवरलेल्या पात्रांत घेतात तें पात्र. ३ लाकूड पोंखरुन केलेलें बारदान.

कोटंबा पु० १ खंडोबाचे अनुचर जे वाघ्ये त्यांचें एक चौकोनी लाकडाचें भिक्षा मागावयाचें पात्र असतें तें. २ लांकडाचें काथवटीसारखें एक पात्र. ❀ **कोटंबापूजा** स्त्री० वाघ्ये आपल्या कोटंब्याची करतात ती पूजा.

कोटंबी स्त्री० लहान जो कोटंबा तो; लाकूड कोरुन केलेलें लहानसें बारदान.

कोटंबें न० कोळंबें; रहाटाच्या गाडग्यांचें पाणी आंत पडण्याकरतां रहाटाच्या मध्यभागीं जें एक लांबोडें पन्हाळ्यासारखें काष्ठपात्र ठेविलेलें असतें तें.

कोटर [सं०] न० झाडाची ढोली,–ज्यांत पांखरें निवास करतात. २ खळगा.

कोटि, कोटी [सं०] स्त्री० १ धनुष्याचें किं० चंद्राच्या कलेचें टोंक. २ उच्च शिखर; अंतिम टोंक. ३ पराकाष्ठा; कळस (लक्षणेनें). ४ त्रिकोणाचा लंब. ५ जात; वर्ग; उ० देवकोटि, मनुष्यकोटि, श्रेष्ठ कोटि, किं० नीच कोटि; उ० नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, शब्दयोगी, उभयान्वयी, क्रियाविशेषण, आणि केवलप्रयोगी, ह्या शब्दांच्या आठ कोटी वैय्याकरणांनीं ठरविल्या आहेत; उ० सोनें, रुपें, हीं खनिज कोटींतील द्रव्यें होत. ६ विवक्षित अर्थ अनपेक्षित अशा कांहीं वस्तूशीं युक्तीनें संबंध जोडून निष्पन्न केला जातो ज्यांत असें विधान, किं० बोलणें; एकाद्या शब्दांतून वेगळा अर्थ काढून, किं० एकाद्या शब्दाच्या अक्षरांत थोडासा फेरफार करुन, किं० एकाद्या वाक्यांतील शब्द मागचे पुढें आणि पुढचे मागें करुन, किं० अन्य रीतीनें अकल्पित साम्य किं० विरोध दृष्टोत्पत्तीस आणून देणाऱ्या विधानास ' कोटी ' असें म्हणतात; चतुरालाप. ७ लोकोत्तर पराक्रमादिगुणेंकरुन उत्कृष्ट जो मनुष्यादि तो. ८ शतलक्ष ही संख्या. **वि०** शतलक्षसंख्यात्मक. ❀ **कोटिध्वज लावणें** किं० **उभारणें** अतिशयित श्रीमन्तीचीं चिन्हें लोकांस दर्शविणें. **कोटिक्रम** पु० युक्तिवाद; युक्तीनें स्वपक्षाचें केलेलें समर्थन किं० परपक्षाचें केलेलें खंडन.

कोटिशः क्रि० वि० कोटींनीं गणना केली पाहिजे इतक्या प्रमाणांत; कोट्यवधि. **कोटयधीश** कोटींनीं गणना करण्याइतकें द्रव्य ज्याच्याजवळ आहे असा; कोटीपति. **कोटयाधीश** असेंही या शब्दाचें अशुद्ध रुप प्रचलित आहे. **कोटयानकोटि** [कोटि+अनु+कोटि] क्रि० वि० कोटींनीं गणना करण्याइतके; कोट्यवधि. **कोटयवधि** वि० कोटींनीं गणना करण्याइतकें. **कोटयावधि** हें या शब्दाचें अशुद्ध प्रचलित रुप.

कोटें न० १ घरटें. २ रेशमाच्या किड्याचा किं० तद्विध अन्य किड्याचा कोश. ३ पक्ष्याचें घरटें.

कोठ [सं० कोट्ट=तटबंदीचें शहर; किल्ला] पु० १ दुर्ग, किल्ला. २ तट. [२ नारू.

कोठ [सं०] पु० १ महारोगांतील एक भेद.

कोठचा [म० कोठें] वि० कोणच्या स्थळाचा? कुठचा ?

कोठडी [हिं०] स्त्री० १ कांहीं ठेवण्याकरतां घरामध्यें केलेली असते जी खोली ती; कोठी; उ० धान्याची कोठडी. २ बंदिवानाची खोली.

कोठनीस [हिं० कोठा=खोली; फा० नीस (प्रत्यय)] पु० धान्याच्या कोठारावरचा अधिकारी.

कोठपर्यंत, कोठपावेतों, कोठवर [म० कोठें] क्रि० वि० कोणच्या स्थळापर्यंत किंवा समयापर्यंत; कोणाच्या पल्ल्यापर्यंत ?

कोठंबा, कोठबा पु० वर ' कोटंबा ' पहा.

कोठंबी, कोडमी स्त्री० खालीं बारीक आणि वर लठ्ठ असें मातीचें बारदान किं० पात्र.

कोठला [म० कोठें] वि० कोणच्या स्थळाचा? कोणच्या प्रसंगाचा ? कोणच्या संबंधाचा ?

कोठवळा, कोठावळा, कोठिवळा [म० कोठा] पु० तांदूळ, डाळ, गूळ, इ० नित्यखर्चाच्या उपयोगाचे पदार्थ खोलींत ठेविलेले असतात त्या खोलीवरचा अधिकारी. ❀ **खर्चणाराचें खर्चतें आणि कोठवळ्याचें पोट दुखतें** यजमान औदार्यानें कांहीं देण्याची इच्छा करतो पण त्यानें दिलेले कोठावळ्यास खपत नाहीं; यजमानाच्या इच्छेला मान न देतां त्याचे कारकून त्याचा इच्छेच्या आड येतात; कारकुनांचा किं० नोकरांचा द्वाडपणा किं० दुष्टपणा किं० मत्सर भयंकर असतो.

कोठा [सं० कोष्ट=घराचा मध्यभाग; कोठार]

पु० १ वखार; माल ठेवावयाची किं० साठवावयाची जागा. २ पोटांत अन्नादिकांची जागा. ३ ३ बंदूक, कारंजाचें पाणी, इ०ची कोठी. ४ पक्ष्याचें घरटें. ५ गुरांच्या वसतीची जागा; गुरें बांधावयाची जागा. ६ हुंडीची रक्कम मांडावयाचा चौकोन.

कोठार न०, कोठारी स्त्री० १ पक्ष्याचें घरटें. २ धान्याची खोली. ३ धान्य सांठविण्याचें बारदान.

कोठारें न० १ पदार्थ साठविण्याची खोली, जागा, किं० बारदान. २ पक्ष्याचें घरटें. ३ भूस किं० कोंडा यांच्या रक्षणार्थ केलेलें कडब्याच्या पेंढ्यांचें कुडाण किं० आवरण.

कोठाविणें [**म०** कोठें ?] **स० क्रि०** तुम्ही कोठून आलां ? तुम्ही कोठें जात आहां ? अशा प्रकारचे प्रश्न एकाद्याला विचारणें.

कोठिंबा, कोठिंबी, कोठिंबें वर ' कोटंबा, ' इ० शब्द पहा.

कोठी [**सं०** कोष्ठ=कोठार; घराचा मध्यभाग] **स्त्री०** १ धान्यादि साठविण्याची खोली किं० जागा, किं० आवार. २ सैन्याला लागणारें सामानसुमान ठेवण्याची जागा. ३ बंदूक, कारंजें, इ०चा कोठा. ४ गलबत, गाडी, खटारा, इ०तील सामान ठेवावयाची किं० लादावयाची जागा किं० अवकाश किं० पोकळी. ५ आम, मूत्र, अन्न, अग्नि, आणि रुधिर, यांचीं शरीरांतील स्थानें. ६ बुरडी, हारा (तांदूळ, इ० ठेवण्याच्या उपयोगाचा). ७ मिठागरांतील जे वाफे ते प्रत्येक. ॐ **कोठीफरा पु०** वखारींतील तांदुळाची नासधूस भरून काढण्यासाठीं बसविलेली पट्टी किं० कर.

कोठील [**म०** कोठें?] **वि०** कोणच्या स्थळाचा, प्रसंगाचा, समयाचा, किं० काळाचा ?

कोठून, कोठोन [**म०** कोठें ?] **क्रि० वि०** कोणत्या स्थळापासून, प्रसंगापासून, किं० समयापासून ?

कोठें [**सं०** कुत्र=कोठें ?] **क्रि० वि०** १ कोणत्या स्थळीं ? २ कोठेंही; कोणीकडे सुद्धां; उ० मी येथेंच आहें; मी कोठें गेलों नव्हतों. ॐ **कोठें कोठें क्रि० वि०** कांहीं कांहीं स्थळीं; मधून मधून; इकडे तिकडे.

कोठ्या पु० वर ' कोठा ' पहा.

कोड [**सं०** कुष्ठ] **न०, पु०** ज्या रोगांत अंगावरील त्वचा पांढरी होते किं० गळून पडते तो रोग.

कोड, कोडी स्त्री० वीस ही संख्या.

कोड न० १ कौतुक. २ आवड. ३ अत्यंत उत्कट हौस किं० इच्छा. ४ लाड (पुरविणें); मर्जी (संभाळणें). ५ खेळाडूपणा; गमतीदारपणा; रंगेलपणा. ६ उत्कटतेनें इच्छिलेली, अपेक्षिलेली, संकल्पिलेली, किं० चिंतिलेली वस्तु, रचना, मांडणी, किं० व्यवस्था.

कोंड पु० १ नदीचा डोहो. २ शेताभोंवतींचें वाटोळें कुंपण किं० वई. ३ गांवाच्या मुख्य वस्तीच्या ठिकाणापासून अन्य ठिकाणीं कांहीं घरांची वसाहत असते (विशेषतः एकाच जातीची) ती. ४ कोणा माणसाला शपथ घ्यावयाला लावावयाचें असतां त्याला एका स्थळीं उभें करून त्याच्याभोंवतीं जें वर्तुळ किं० मंडल काढतात तें. ५ गोट्यांच्या खेळांत गोटीभोंवतीं जें वर्तुळ काढतात तें. ६ एकाच मालकाचीं शेतें किं० एकाच प्रकारच्या धान्यानें नियंत्रित जीं शेतें तीं समुच्चयानें. ७ कोणतीही बंदिस्त जागा. ८लग्न, मुंज, इ० प्रसंगीं ब्राह्मणांना दक्षणा द्यावयाच्या वेळीं त्यांना ज्या बंदिस्त जागेंत कांहीं काळ कोंडून ठेवितात ती जागा किं० तेथें कोंडलेले ब्राह्मण समुच्चयानें.

कोंडका पु० लाकडाचा लांबट आणि लठ्ठ तुकडा किं० खंड; ओंडका.

कोंडकी स्त्री० १ बाग इ० मध्यें विहिरींतून मोटेनें वगैरे काढलेलें पाणी साठविण्याचा बांधून काढलेला खड्डा किं० हौद. २ मिठागरांतील एक एक वाफा. ३ भात पेरावयासाठीं बंदिस्त केलेलें शेत.

कोंडकें न० १ डोंगरांतील आडोशाची किं० निवाऱ्याची जागा. २ पाणी साठेल असें खोलगट शेत किं० प्रदेश. ३ दार, खिडकी, इ० बंद करावयाचें कुलें किं० खिटी ज्या लाकडाच्या खोबणींत किं० दोरीच्या फासांत घालतात, किं० बसवितात, तें लाकूड किं० तो फासा.

कोडगा वि० १ निर्लज्ज; बेशरम. ॐ**कोडगेखाऊ वि०** ज्याला कितीही मारलें किं० उपदेशिलें तरी जो सुधारत नाहीं किं० आपलें दुर्वर्तन सोडीत नाहीं असा. **कोडगेला वि०** निर्लज्ज.

कोंडडाव पु० गोट्यांचा खेळांतील एक प्रकार.

कोंडण [**म०** कोंडणें] **न०** बंदिस्त जागा. (गुरांढोरांच्या निवासासाठीं केलेली).

कोंडणी [**म०** कोंडणें] **स्त्री०** कोंडलेपणाची स्थिति किं० अवस्था; बाहेर पडावयाला कोणी-कडूनही मार्ग नाहीं अशी स्थिति: पंचाइतीची स्थिति.

कोंडणें स० क्रि० १ बाहेर पडावयाला वाट न राहील अशा रीतीनें एकाद्याला आडकावून ठेवणें. २ बंदिस्त करणें. ३ नियंत्रणेंत घालणें किं० ठेवणें. ४ घोंटाळ्यांत, पेचांत, किं० पंचा-इतींत घालणें.

कोंडमारा पु० १ कोंडणें आणि मारणें. २ कोंझट जागेंत असल्यामुळें होतो तो गुदमरा किं० अस्वस्थपणा. ३ पेचाची किं० अडचणीची स्थिति; अडकलें जाण्याची स्थिति.

कोंडबुळें, कोडबोळें, कोंडवळें, कडबोळें न० जोंधळे, बाजरी, हरभऱ्याची डाळ, उडदाची डाळ, तांदूळ, गहूं, इ० अनेक धान्यें, एकत्र दळून त्यांच्या पिठांत तिखट, मीठ, धने, इ० पदार्थ घालून तें पीठ भिजवून त्यांना वलयाकार देऊन तळून जें खाद्य करतात तें. ꙮ**अठरा धान्यांचें कडबोळें न०** १ अनेक जातींच्या, पंथांच्या, किं० मतांच्या, लोकांचा कांहीं विशिष्ट उद्देशानें एकत्र झालेला समुदाय. २ वेश्यापुत्र. [उथळ.

कोंडवरा वि० खोलगट; फारसें खोल नव्हे तें;

कोंडवाड स्त्री० गुरें, इ० कोंडावयासाठीं कुंपण घालून तयार केलेली जागा.

कोंडवाडा पु० भटक्या गुरांना अडकावून ठेवण्याची जागा.

कोंडली स्त्री० धान्याचीं कणसें झोडपलीं जात असतां तीं उडून बाहेर पडलीं तर तीं परत झोड-पणींत आणावयाची आंकडेदार काठी.

कोंडा पु० १ तांदूळ इ० धान्यावरील निःसत्त्व भुसा,–जो कांडल्यानें गळून पडतो. २ एक प्रकारचा बांबू किं० चिवा. ३ ज्वरादि आजार निघून गेल्यावर अंगावरील त्वचेचे जे मृत कण गळून पडतात ते समुच्चयानें. ४ 'कोयंडा' ह्याचें अशुद्ध रूप; 'कोयंडा' पहा. ꙮ **कोंड्याचा मांडा करून खावा** दारिद्र्याची स्थिति शक्य तितकी सुखावह करून घ्यावी; आहे त्या स्थितींत समाधान मानून राहावें. **कोंडाभोंडा पु०** बेचव किं० नीरस खाद्य किं० भोजन.

कोंडाळणें अ० क्रि० कोंडाळें किं० वर्तुळ करून बसणें. **स० क्रि०** गराडणें, घेरणें, वेढणें.

कोंडाळें न० वर्तुळ. २ गराडा, वेढा. ३ वर्तुळाकार बसलेल्या लोकांचा समुदाय. ४ भाज-णीचें एक खाद्यविशेष.

कोंडी [**म०** कोंडणें] **स्त्री०** १ सर्व बाजूंनीं बंदिस्त केलेली जागा. २ उनाड गुरें कोंडून किं० अडकावून ठेवण्याची जागा. ३ दक्षिणा द्यावयाचे अगोदर ब्राह्मणांना एके ठिकाणीं जमविण्याची बंदिस्त जागा. श्रीमंत पेशवे सरकारच्या कोंडीला 'रमणा' असें नांव असे; रमणा पर्वतीच्या शेजारीं होता. ४ आट्यापाट्याच्या खेळांतील एक पारि-भाषिक शब्द. ५ पाणी आडकावून ठेवण्याची जागा किं० बंधारा.

कोडी स्त्री० १ वीसांचा संच किं० समुदाय. २ उंची किं० खोली.

कोडी वि० कोड ज्याला आहे असें माणूस.

कोंडींव [**म०** कोंडणें] **वि०** कोंडलेलें; अडकावून ठेविलेलें; प्रतिबंधांत घातलेलें किं० ठेविलेलें.

कोडें न० १ अडचणीची, पंचाइतीची, किं० पेचाची स्थिति. २ मोठ्या कष्टानें किं० श्रमानें सुटणारा प्रश्न किं० पेच. ३ सहसा लक्ष्यांत न येईल असें ज्याचें उत्तर आहे असा प्रश्न. ४ मातीचें दिवेलावणें. ५ अडाणी लोक वालतात तो मंत्र किं० करतात तें तंत्र.

कोंडेकड न० तांदुळाच्या कोंड्यांत तिखट, मीठ, इ० घालून जें पापडासारखें खाद्यविशेष करतात तें.

कोंड्या, कोंढ्या पु० ताडी, माडी, इ० धरा-वयाचें किं० ठेवावयाचें भोपळ्याचें वगैरे जें बार-दान असतें तें.

कोडया, कोढया, कोढी वि० कोड ह्या रोगानें ग्रस्त जो तो.

कोंढा पु० एक प्रकारचा चिवा किं० बांबू.

कोंढाळें न० मागें ' कोंडाळें ' पहा.

कोंढी स्त्री० १ मिठागरांतील एक वाफा. २ मागें ' कुंडी, ' ' कोंडी ' पहा.

कोण प्रश्नार्थक सर्व० कोणा माणसाविषयीं प्रश्न करावयाचा असतां हें सर्वनाम योजतात; उ० असें कोण म्हणतो ? 'कोण' ह्याचा विशेषणाप्रमाणेंही उपयोग केला जातो; उ० कोण माणूस आलें होतें ? ॐ **कोणाचा कोण** ? ज्याची किंमत नाहीं किं० ज्याचें कांहीं महत्त्व नाहीं असा माणूस;उ०गोविंदपंत हा कोणाचा कोण आणि त्याच्याकारितां मी खटपट करावयाला बसलों आहें थोडाच ! **कोणचा,कोणता वि**०समुदायांतून जो इष्ट किं० विवक्षित तो; उ० ह्या पंचवीस शालजोड्यांतून तुम्हांला कोणची (किं० कोणती) पाहिजे ती काढून घ्या. **कोणी एक वि०** कोणी. **कोणसें वि०** कोणी माणूस,–जो मला (किं० आम्हाला) ठाऊक नाहीं.

कोण [सं०] **पु०** कोन; कोपरा.ॐ**कोणपिका, कोणपीक वि०** घरांत पिकविलेला (आंबा, फणस इ०).

कोणी ['कोण' ची तृतीया] **प्रश्ना० सर्व०** उ० ही पेटी कोणी मोडली ? **सर्वनाम** १ कांहीं लोक; उ० कोणी असें म्हणतात कीं ग्रहणाचे अवधींत मुसळ उभें राहतें. २ हावे ते लोक; उ० कोणी कांहीं म्हटलें तरी माझा मार्ग मी सोडणार नाहीं; उ० कोणी वंदा कोणी निंदा आम्हो स्वहिताचा धंदा. ३ एकही इसम, कोणचेही इसम (नकारार्थी प्रयोग); उ० तुझ्या शोधाला कोणी आलें नव्हतें.

कोणें न० गायी, म्हशी,इ० च्या कानाला एक रोगविशेष होतो तो.

कोत न० १ भाल्याचें पोलादी टोक.२ भाला. ३ शस्त्र. ४ नारळी,इ०कांची जी पोय तिचें टोक.

कोतवाल [**फा०**] **पु०** शहराच्या बंदोबस्ताकरतां सरकारनें नेमलेला अधिकारी. ॐ **उलटा चोर कोतवालाला दंडी** चोरानें कोतवालालाच गुन्हेगार ठरवून त्याला शिक्षा करणें किं० करविणें हा अंधाधुंदीचा कारभार होय. **कोतवालचावडी स्त्री०**कोतवालाची कचेरीची आणि कामकाज करण्याची जागा; कोतवालाची कारभार चालविण्याची जागा.

कोतवाली स्त्री० १ कोतवालाचा अधिकार.२ कोतवालाचें कार्य. ३ कोतवालाच्या अधिकाराची मुदत.

कोतवाल [**हिं०** कोताल्] **पु०** १ स्वारी, इ० कांपुढें शोभार्थ चालवितात जे घोडे ते प्रत्येक. यास **कोतवालघोडा** असेंही म्हणतात. २ (लक्षणेनें)पाहिजेत त्याहून अधिक असे प्रसंगीं उपयोगी पडावे म्हणून जे फाल्तू पदार्थ घेऊन ठेवतात ते प्रत्येक. ३ थाटमाटाच्या प्रसंगीं घालावयासाठीं जे कपडे,दागिने,इ० घेऊन संग्रहीं ठेविलेले असतात तें प्रत्येक. ॐ **कोतवाली वि०** कोतवालघोडा, जिन्नस, इ०कांचे विशेषण. **कोतवाली पोशाख पु०** प्रसंगविशेषीं घालण्याकरतां घेऊन ठेवलेला उंची पोशाख; विशेषप्रसंगीं घालण्याकरतां बारदानांत ठेऊन दिलेला पोशाख.

कोता [**फा०** कोताह्] **वि०** आखूड; आकुंचित; लांडा; तोकडा; अपुरा.ॐ**कोताई स्त्री०** १ कोतेपणा, आकुंचितपणा, अपुरेपणा. २ मनाचें कार्पण्य;मनाची अनुदारता.**कोती बुद्धि स्त्री**०दूरवरचा विचार न करणारी बुद्धि.

कोथंबरी, कोथंबिरी, कोथंबीर, कोथरीब, कोतरीब स्त्री०कोथिंबीर.

कोथळा पु० १ धान्य, इ० ठेवण्याकरतां जें मोठें वळद करतात तें, किं० जें मोठें पोतें करतात तें, किं० कोणतेंही मोठें बारदान. २ (लक्षणेनें) पोटाच्या कोठ्याभोंवतीं असतें जें मांसादिकांचें आवरण तें.३कोठा, आशय; उ०अन्नाचा,मूत्राचा, इ०चा कोथळा.४उशीची किं०गादीची किं०तक्याची पिशवी किं०खोळ.५जखमेंतून बाहेर पडून लोंबणारें मांस, आंतडीं, इ०.६ जनावरांच्या माथां व्याल्यावर त्यांची आंतडीं जीं बाहेर लोंबत राहतात तीं.

कोथळी स्त्री० लहान जो कोथळा तो.

कोथळें न० लहान कोथळा.

कोथिंबीर,कोथिंबरी स्त्री०धन्यांचें जें झाड तें. ॐ**कोथिंबरी बाळी स्त्री**०एक मोत्यांचें कर्णभूषण. **कोथिंबरी भात, कोथिंबरें भात न०** तांदुळाची एक जात. **कोथिंबिऱ्या देवी स्त्री० अ० व०** देवीच्या रोगांतील एक विशिष्ट दशा किं०अवस्था.

कोथें मेथें न० धने,मेथ्या,हिंग,इ०जिनसा ज्या रोजच्या स्वयंपाकांत जरूर असतात त्या समुच्चयानें.

कोथेर, कोथेरें न० एक तृणविशेष.

कोंद स्त्री॰ तीळ भाजून आणि कुटून त्यांत गूळ इ॰ घालून जो खाद्य पदार्थ करतात तो.

कोंदट [म॰ कोंदणें] **वि॰** मोकळी हवा जेथें नाहीं अशी म्ह॰ कोंडलेली (जागा).

कोदंड [सं॰] **न॰** १ धनुष्य. २ (लक्षणेनें) भ्रुकुटि; कमानदार भिवई. ३ अरिष्ट, संकट.

कोदंड वि॰ दांडगा; धटिंगण; दांडगेश्वर.

कोंदण [म॰ कोंदणें] **न॰** १ हिरे, इ॰ ज्यांत बसवितात तें; खोबण; घर. २ हिरे, इ॰ कोंदणांत म्ह॰ त्यांच्या घरांत बसविणें. ☸ **कोंदण-पट्टी स्त्री॰** कोंदणांत हिऱ्याखालीं घालतात जो सोन्याचा वर्ख तो,–हिऱ्याचें तेज उठून दिसावें म्हणून. [भरणें.

कोंदणें स॰ क्रि॰ चेपून, दाबून, किंवा ठासून

कोंदणें अ॰ क्रि॰ पूर्णपणें भरून जाणें; व्याप्त होणें; कोंडलें जाणें; निरुद्ध होणें; चोंदणें.

कोदा पु॰ १ हलकें व घाणेरडें काम; क्षुद्र व ओंगळ काम; (पुढें ' कोदावणें ' पहा). २ हलकें, जिकिरीचें, किं॰ किचकट काम; (**क्रि॰** काढणें, उपसणें, पडणें); उ॰ मी बाळंतिणीचा कोदा उपसते, किंवा मला बाळंतिणीचा कोदा पडतो.

कोंदाट वि॰ कोंदट; कोंडलेला; मोकळी हवा ज्यांत खेळत नाहीं असें (स्थळ).

कोंदाटणें [म॰ कोंदणें] **स॰ क्रि॰, अ॰ क्रि॰** अवकाश न राहील इतकें भरणें, किं॰ भर-लेलें असणें.

कोदावणें, कोदवणें [म॰कोदा] **अ॰ क्रि॰** १ गुदप्रक्षालन करणें. २ कोदा उपसणें किं॰ काढणें.

कोद्रव [सं॰] **पु॰** एक हलकें धान्य; हरीक; याला **कोद्रू** असेंही म्हणतात.

कोन न॰ एक कंदविशेष. ☸ **कोनफळ न॰** कोन हा कंदविशेष. **स्त्री॰** त्याचीं जी वेली ती.

कोन [सं॰ कोण] **पु॰** १ एका रेषेस दुसरी रेषा जेथें मिळतें तें स्थळ, किंवा कोणत्याही वस्तूचा एक पृष्ठभाग दुसऱ्या पृष्ठभागाशीं जेथें मिळतो तें स्थळ. २ कोंपरा. ३ टोक. ४ स्त्रीचा प्रसव होण्याचा जो प्रकार तो; उ॰ तिचा कोन चांगला म्हणून ती लवकर बाळंतीण होते. ५ सूतिकागृहांत बाळंतिणीला जे कपडेलत्ते, जिन्नस, इ॰ लागतात ते समुच्चयानें; बाळंतिणीच्या पहिल्या दहा दिवसांत तिला लागतो तो साहित्याचा सरंजाम. ☸ **स्त्रीनें कोन होणें, स्त्रीनें कोनीं निघणें, स्त्रीला कोन येणें** स्त्री बाळंतीण होणें; स्त्री प्रसूत होणें. **कोनकोपरा, कोनाकोपरा** १घरांतील कोपरे, अडगळीच्या जागा, इ॰ समुच्चयानें; घरांतील सांधीकुचीं इ॰ समुच्चयानें. २ क्षुद्र किं॰ अप्रसिद्ध ठिकाण; उ॰ असल्या कोन्याकोपऱ्यांतल्या पंडितांची कां चरित्रें लिहावयाचीं ? ३ अडगळपणा; कोस; उ॰ भिंतीला कोठें कोनाकोपरा वाढला असला तर तो नाहीसा करा, किं॰ छाटून टाका, किं॰ उडवून द्या. **कोनपालट पु॰** १ दुखणेकऱ्यास उतार पडावा म्हणून जें स्थलांतर करतात तें. २ व्यालेली मांजरी आपलीं पिलें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं चाळवते तें. **कोनपिका, कोनपांक वि॰** झाडावर जें पिकलें नव्हें, खालीं काढल्यावर घरांत जें पिकलें, असें फळ (फणस, रामफळ, अननस, इ॰). याच्या उलट **वरपिका. कोनवासा पु॰** घराचीं दोन पाखीं जेथें मिळतात तेथें जो मोठा वांसा घालतात तो. **कोनशिला स्त्री॰** कांहीं इमारत बांधावयाची असतां सुमुहूर्तावर कोणा संमान्य किं॰ अधिकारी माणसाकडून तिची जी पहिली शिळा बसवितात ती; (ही प्रायः पायाच्या वरची असून कोप-ऱ्यांतली असते, व तिच्यावर ती कोणी बसवली, इ॰ संबंधाचा नामनिर्देश केलेला असतो).

कोनपट न॰ कोंपरा, सांधीकुची.

कोनपडा, कोनपा पु॰ १कोंपरा. २ भिकार, आकुंचित, किं॰ अडचणीचें घर किं॰ जागा.

कोनट पु॰ कुणब्यास तुच्छतेनें हा शब्द लावतात.

कोनडा, कोनाडा [म॰ कोन] **पु॰** भिंतींत पदार्थादि ठेवण्याकरतां जी वाटोळी किं॰ चौकोनी पोकळी ठेवितात ती.

कोना, कोन्या[म॰ कोन] **पु॰**१ कोनशिला. २घराच्या आढ्यावर किं॰ कोनवांस्यांवर घालण्या करतां जीं रुंद कौलें केलेलीं असतात तीं प्रत्येक. ३ कोनवांसा. ४ कुणब्यास तिरस्कारानें म्हणतात.

कोनाडा पु॰, कोनाडें न॰ मागें'कोनडा' पहा.

कोनें न॰ हत्ती, उंट, इ॰कांच्या पायांच्या बेचक्यांस होत असतो तो रोग.

कोन्हें न० खडक इ०कांच्या सांधीकुर्चीत उगवणारें एक फुलझाड.

कोप [**सं०**] **पु०** राग; क्रोध. ꙮ **कोपट, कोपिष्ट, कोपी वि०** रागीट, तापट.

कोप पु० न० फल, काष्ठ, पाषाण, इ०कांस किडल्यामुळें किं० भंगल्यामुळें जो व्रण, च्छेद, इ० दोष असतो तो.

कोप, कोपी स्त्री० तृण, झावळ्या, पानें, इ०कांची झोपडी; खोपट.

कोपट, कोंपट, खोपट [**म०** कोप] **न०** गवत, पानें, झावळ्या,इ०ची बनविलेली झोपडी.

कोपणें [**सं०** कुप्=रागावणें] **अ० क्रि०** कोपाविष्ट होणें; रागावणें.

कोपर, कोंपर [**सं०** कूर्पर] **न०** बाहूच्या जो मध्याला असतो तो सांधा.ꙮ**मऊ सापडलें म्हणून कोपरानें खणूं नये** सौम्य माणसाचा फाजील फायदा करून घेण्याचा प्रयत्न करूं नये; काणी मनुष्य न चरफडतां काम करतो म्हणून त्याला अयोग्य किं० भलतें किं० जिवाविशेष काम सांगूं नये. **कोपरा ढोपरानें कांहीं काम करणें** जिकीरीनें, कष्टानें, चरफडत, किं० टाळतां येत नाहीं म्हणून,एकादें काम आपल्या मर्जीविरुद्ध करणें.**कोपरा ढोपरानें चालणें** (किं० **जाणें**) १ मोठ्या कष्टानें कांहीं काम करणें; फार संकटानें किं० नाखुषीनें कांहीं काम करणें. २ अडचणीच्या परिस्थितीत कांहीं काम करणें. **कोपरापासून हात जोडणें** अत्यंत आग्रहपूर्वक आणि नम्रपणानें कांहीं याचना करावयाला सिद्ध होणें. **कोपरखळी स्त्री०** १ कोपरानें केलेला प्रहार. २ कोपरानें ताडन करून दुसऱ्याच्या अंगावर उठविलेला खळगा (**क्रि०** पाडणें).

कोंपरा, कोपरा [**सं०** कूर्पर=कोपर] **पु०** १ कोपरा, कोन. २ कढई (स्वयंपाकघरांतील एक आऊत).ꙮ**तूं कोणत्या कोपऱ्याचा कोण?** तुझी काय किंमत ? तूं क्षुद्र यःकश्चित् माणूस आहेस.

कोपरी, कोंपरा [**म०** कोपर] **स्त्री०** १तळहातापासून कोपरापर्यंत दोऱ्याचें किं० दोरीचे चाळीस (किं० कांहीं विशिष्ट संख्यात्मक) वेढे घालून जी गुंडाळी करतात ती. २ गोट्यांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.३कोपराची सूज. ४ बोटाच्या नखाला होतो तो एक आजार.

कोंपरी स्त्री० कोपरापर्यंत ज्याच्या बाह्या आहेत असा सदरा, पोलकें,बंडी,इ०.

कोपिष्ट [**सं०** कोप=राग] **वि०** १ रागीट; क्षुल्लक कारणावरून ज्याला फार राग येतो असा.२ रागानें बेफाम झालेला;अति रागावलेला.

कोपी स्त्री० खोपटी;पानें,गवत,इ० ची शेतांत राहावयासाठीं किं०बसावयासाठीं केलेली झोपडी.

कोपीण (**–न०**) [**सं०** कौपीन=लंगोटी]**स्त्री०** पुरुषाची लंगोटी.

कोंब पु० बीज, कंद, इ०ना येतो तो अंकुर.

कोंबट [**सं०** कोष्ण] **वि०** किंचित् कढत किं० तापलेलें (पाणी, अंग, दूध, इ०).

कोंबडा पु० एक पक्षी (जो फारसा उंच उडत नाहीं आणि जमीनीवर राहातो).ꙮ**कोंबडसादीं** [**म०**कोंबडा+साद (शब्द)] **क्रि०वि०**कोंबडा सकाळीं आरवतो त्या समयीं, म्ह० पहाटेस, किं० सूर्योदयीं. **कोंबडेंआरणें न०** कोंबडा आरवतो तो समय. **कोंबड्याबरोबर उठणें** अगदीं सकाळीं उठणें. **कोंबडा नेला डोंगरा म्हणून कां दिवस उगवत नाहीं ?** १ अवश्य होणाऱ्या किं० घडावयाच्या गोष्टींना प्रतिबंध करतां येत नाहीं.२ एकाद्या कार्याचें एक साधन नाहींसें झालें तरी दुसरीं साधनें असतातच.याच अर्थी दुसरी म्हण **कोंबडें झाकलें म्हणून तांबडें फुटावयाचें रहात नाहीं.**

कोंबडी स्त्री० कोंबड्याच्या जातीतील मादी.

कोंबडें न० कोंबडा (लिंग मनांत न घेतां).

कोंबणें स०क्रि० ठासून भरणें (पोत्यांत चिरगुटें, सामानसुमान, इ०); चिणणें.

कोंबरा पु० कोंब. [कोंब.

कोंबरी स्त्री० लहान कोंब; नुकताच फुटलेला

कोंबा पु०१ कोंबडा. २ अंकुर. ꙮ**शेजारणीनें कोंबा लपविला म्हणून उजेडावयाचें राहातें कीं काय?**एकाद्या कार्याचें एक साधन किं०एक सोय नाहींशी झाल्यानें तें कार्य व्हावयाचें थांबत नाहीं; अन्य साधनें किं० सोयी असतातच.

कोबी [**पोर्च्युगीज** कूव्हे] **स्त्री०** कोबीचा कांदा (मुळ्याच्या वर्गांतील एक भाजीच्या उपयोगाचें झाड).

कोंवी [**म०**कोंव] **स्त्री०** कोंवळा कोंब किं० अंकुर.

कोंबीट न०एक प्रकारचा बाण.

कोंवणें [**म०** कोंब येणें] **अ० क्रि०** कोंब उत्पन्न करणें; अंकुर फुटणें.

कोंभ, कोम पु० वर ' कोंब ' पहा.

कोंभा पु०माडाचा म्ह० नारळाच्या झाडाचा रोपा.

कोम [**अ०** कौम=जाति|किं० कुटुंब]**स्त्री०, पुं०** पत्नीच्या किं० विधवेच्या नांवापुढें आणि तिच्या जिवंत किं०मृत पतीच्या नांवामागें हा शब्द कागदोंपत्रीं योजतात; उ० सखवारबाई कोम गणपतराव म्ह० सखवारबाई जी गणपतरावाची बायको आहे किं० होती.' कोम ' हा शब्द ज्या जातींत विधवांचीं पुन्हां लग्नें होत नाहींत त्या जातींच्या स्त्रियांच्या संबंधानें योजतात; इतर जातिसंबंधानें ' जवजे ' याचा उपयोग केला जातो.

कोमजणें अ०क्रि०म्लान होणें; सुखणें; (तोंड, फूल, पान,भाजी, इ०).

कोमट वि० किंचित् उष्ण. [इसम.

कोमटी पु०हिंदूंची एक जाति किं०त्या जातीचा

कोमडा, कोमडी, कोमडें वर 'कोंवडा,' 'कोंबडी,' ' कोंवडें 'पहा.

कोमणें अ० क्रि० म्लान होणें, सुखणें. वर " कोमजणें " पहा.

कोमणें स० क्रि० पिशवींत, पोत्यांत, पेटींत, किं० कोणत्याही बारदानांत, एकादा पदार्थ ठासून ठासून भरणें; कोंवणें;चिणणें.

कोमल [**सं०**] **वि०** १ नाजूक; सुकुमार. २ कोंवळें. ३ सौम्य किं० दयाळु प्रकृतीचा (माणूस).४रमणीय, मनोहर. ५ गोड, मधुर.

कोमलणें, कोमाइणें, कोमावणें, कोमेजणें, कोमेणें अ०क्रि० शुष्क होणें, म्लान होणें.

कोय स्त्री० १ आंब्याची बाठ. २ अंडाच्या पिशवींतील एक गोटी.

कोयंकोयं, कोयकोय स्त्री०१ कुत्र्याचें ओरडणें (वेदनेनें). २ कुत्र्याच्या पिलांचें ओरडणें.

कोयंडा पु० १ आंब्याची बाठ किं० कोय. २ दार, खिडकी, इ० ची कडी आडकावण्याला जो मध्यें पोकळ बांक राखून दोन बाजूंनीं वळवून त्याचीं दोन्हीं टोकें जुळविलेलीं असतात असा खिळा किं० सळई. ३ चावकाची लाकडी मूठ. ४ नथ, भिकबाळी, इत्यादींचा फासा आडकावला जातो ज्यांत, असें सुंकल्याच्या आकाराचें अडकावण.

कोयंडी स्त्री० नाठाळ गाय,म्हैस,इ०ना धिंगामस्ती करतां येऊं नये म्हणून जें कांहीं विशेष प्रकारचें बंधन त्यांना घालतात तें.

कोयडें न० मागें ' कुवेडें ' पहा.

कोयता पु०लाकूड इ० तोडावयाचें शस्त्रविशेष.

कोयती स्त्री० लहान कोयता.

कोयतें, कोयतूल न० १ लहान आकाराचा कोयता. २ कोयता (तुच्छतेनें).

कोयनाटकी स्त्री० एक प्रकारचा बोटांनीं फिरवावयाचा भोंवरा; भिंगरी.

कोयनाटकी वि० चिक्कू, कंजूष. २ अल्पसंतुष्ट.

कोया पु० १ एक पक्षिविशेष. २ त्याची आरोळी किं० त्याचा शब्द.॥**कोया कोया करीत हिंडणें** १ अन्नासाठीं दीन स्वरानें याचना करीत हिंडणें. २ अनाथ आणि विपन्न स्थितींत हिंडणें.

कोयाडें [**म०** कोय] **न०** १ आंबा भाजून त्याच्या गरांत गूळ इ० घालून जें तोंडीलावणें करतात तें. २ पिकून उतरलेल्या आंब्याच्या रसास तिखट, मीठ, इ० लावून तोंडीलावणें करतात तें.

कोयाळ, कोईल [**सं०** कोकिल] **स्त्री०** १ कोकिल पक्षी.

कोयाळ पु०कोकाटी.

कोयाळ वि० १ ज्यांत कोय झाली आहे असा आंबा. २ आंब्याच्या कोयींची मुळें करतात तीं पिपाणी.

कोयाळणें [**म०** कोय] **अ० क्रि०** आंब्यानें कोयीनें युक्त होणें; आंब्यांत कोय तयार होणें.

कोर स्त्री० १ प्रायः द्वितीयेच्या चंद्राची जी आकृति किं० कड ती. २ तदाकार बायका भालप्रदेशीं कुंकू लावतात तें. ३ न्हावी कपाळावरील केश सारखे कापून ते कोरीप्रमाणें दिसावयाजोगे करतो तें. ४ कोणत्याही पदार्थाची प्रायः धारदार व बांकदार असते किं० दिसते जी कड ती. ५ भाकरीचा एक चतुर्थांश तुकडा; चत्कोर. ६ नखाच्या मूलाग्रीं असणारी रेषा, किं० तेथें

नखांच्या कोपऱ्यांत होतो जो रोग तो. ७ रुपयाच्या एक तृतीयांश किंमतीचें नाणें. ८ स्पर्धा; चढाओढ; वरकस. ९ स्वतंत्र विणलेल्या वस्त्रांस मागाहून लावावयाचा जर इ०कांचा कांठ. ꠳**कोर धरणें** चिमटा, इ०कांनीं कपाळावरील केश काढून सारखी कोर दिसावयाजोगें करणें.

कोरकांडें न० कोरफड.

कोरकाम [**म०**कोरणें+काम] **न०** काष्ठ इ०कांवर कळाकुसरीनें खोदून नक्षीचें वगैरे केलेलें जें काम तें.

कोरखडी स्त्री० स्लेट पाटीच्या प्रचारांत यावयाच्या अगोदर धूळपाटीवर मुलें अक्षरें शिकत असत. ह्या धूळपाटीवर जिचा लेप करीत असत अशी एक प्रकारची पांढऱ्या रंगाची शाडूसारखी माती.

कोरगू पु० बारा बलुतेदारांपैकीं एक. पुढें ' कोरवू (–भू) ' पहा.

कोरट स्त्री० कांतलेलें कोरें जें रेशीम तें.

कोरंटा पु०,कोरंटी स्त्री० कोऱ्हांटीचें फूलझाड.

कोरटाण [**म०** कोरा+घाण] नवीन वस्त्र, नवीन मडकें, इ०कांस कोरेपणाचा जो विशिष्ट वास येतो तो.

कोरड [**म०** कोरडा] **स्त्री०** ज्वरानें, भीतीनें, तहानेनें, इ०नीं घशास जो कोरडेपणा किं० शुष्कपणा येतो तो (**क्रि०** येणें, पडणें). ꠳**कोरड वाळणें** किं०**वळणें** भोजनास अतिकाल झाल्यामुळें कोणेकास क्षुधेनें अतिशय व्याकुलता येणें; उ० भुकेनें माझी अगदीं कोरड वळली !

कोरडक न० घरास कोळिष्टकें, जळमटें, इ० जीं लोंबत असतात तीं (समुच्चयानें).

कोरडणें [**म०** कोरडा] **अ० क्रि०** १ कोरडा पडणें (घसा). २ कोणेक पदार्थानें कोरडें होणें.

कोरडवट [**म०** कोरडा] **स्त्री०** १ विहीर, इ० जलसाधनें ज्यांत नाहींत, व जीं केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असतात अशीं शेतें (समुच्चयानें).२जमीन;उ०सतत पंधरा दिवस गलबतांत बसल्यामुळें मला केव्हां एकदा कोरडवटीला माझे पाय लागतील असें होऊन गेलें होतें. (समुद्र याच्या उलट).

कोरडवाव, कोरडवाहू, कोरडवाही [**म०** कोरडा+वावर (शेत)] **वि०** कोरडवट ज्या जमिनी, शेतें, इ०तीं प्रत्येक; विहीर, कालवा, इ० ज्यांत नाहींत, व जलार्थ जीं केवळ पावसावर अवलंबून असतात अशीं (वावरें, शेतें, इ०).

कोरडा वि० १ शुष्क, वाळलेला, आर्द्रांशरहित; उ० कोरडा घसा, जीभ, विहीर, भांडें, आळें, इ०. २ (लक्षणेनें) कोंराकरकरीत; ज्यावर उपदेशाचा किमपि परिणाम झाला नाहीं असा; उ० तुला इतकें शिकविलें तरी तूं अझून कोरडाच? ३ (लक्षणेनें) स्नेहशून्य, मानभावी, दिखाऊ, वरवरचें, खोटें; उ० कोरडा आदर, मान, माया, मैत्री, बोलणें, वैराग्य, इ०. ४ ज्यापासून कांहीं लभ्यांश नाहीं असें; निरर्थक;व्यर्थ;फलविहीन;फुकटचें; उ० कोरडा अधिकार, धंदा, खटपट, श्रम, विचार, उहापोह, इ०. ५ अकारण, निराधार; उ० कोरडा द्वेष; कोरडें वैर; कोरडी किरकीर, इ०; उ० चंद्रराव,तुम्ही शिवाजीशीं कोरडें वैर कां करतां ? तो मोंगलांचा शत्रु आहे,तुमचा नाहीं !꠳**कोरडा आग्रह पु०**दिखाऊ, वरवरचा,किं० मनापासून नव्हे असा,आग्रह;पैठणी आग्रह. **कोरडटाक वि०**कोरडा ठणठणीत,–कूप, विहीर, तळें, नदी, इ०. **कोरडा डौल पु०**शुष्क, खोटा, निरर्थक, पोकळ,किं०रिकामा, दिमाख;उ० रुक्मिणीबाई, आमच्या तुपाला नाकें मुरडण्याचा कोरडा डौल कशाला करतां ? तुमच्या घरीं तुम्ही जशा साजुक तूपच खातां कीं नाहीं ! **कोरडा दुष्काळ पु०** मुळींच पाऊस न पडल्याकारणानें होतें जी महर्घता ती; अतिवृष्टीमुळें पिकांची नासाडी होऊन जी महर्घता होते तिला ' ओला दुष्काळ ' म्हणतात. **कोरडा पगार** किं० **मुशारा पु०** भोजनाव्यतिरिक्त दिलेला पगार; जेवणाशिवाय निव्वळ उचलून दिलेलें जें नोकराचें वेतन तें. **कोरडा पाषाण पु०** कोंराकरकरीत; उपदेशाचा ज्याच्यावर यत्किंचित परिणाम झाला नाहीं असा; उ० लोकां सांगें ब्रह्मज्ञान आपण कोरडा पाषाण **कोरडी आग स्त्री०** ओली आग (म्ह० अतिवृष्टी, प्रलय, इ०) याच्या उलट अर्थानें वणव्यास, आगीस, इ०स म्हणतात.**कोरडी ओकारी स्त्री०** १ १ घशांत बोटें घालून मुद्दाम काढलेली ओकारी (क्रि०देणें,काढणें).२वांति न होतां घशाशीं उचलून

किं०उमदळून येऊन छातीला हिसके बसणें(क्रि० येणें).**कोरडी खाकरी** स्त्री०मुद्दाम काढलेली खाकरी (क्रि०देणें,काढणें). **कोरडी जांभई** किं० **जांभळी** स्त्री० श्रमातिशयामुळें येते ती जांभई; ही निद्रासूचक नसते. **कोरडी दारू** स्त्री० वायबार. **कोरडी भाजी** स्त्री० पातळ नव्हे अशी जी भाजी ती; ज्या भाजींत रस राखलेला नाहीं अशी भाजी. **कोरडी मेजवानी** स्त्री० हलक्या खाद्यांची मेजवानी; फळें, चिवडा, इ०कांची मेजवानी. **कोरडी हवा** स्त्री०उष्ण,रखरखीत,किं०कडक हवा; उ० सोलापूरच्या कोरड्या हवेंत तुमचा थंडीताप बरा होइल. **कोरडें अंग** न० गर्भविहीन पोट. **कोरड्या अगीं तिडका** स्त्री० अ० व० व्यर्थ वल्गना किं० बढाया; पोकळ डौल. **कोरड्या अंगीं तिडका बोडक्या डोईं लिखा** पोटांत गर्भ राहिलेला नसतां तिडका येण्याचा बहाणा करणें हास्यास्पद होतें,तसेंच डोकीला केश नसतां लिखा झाल्याचें ढोंग करणें हास्यास्पद होते; निरर्थक किं० न शोभणाऱ्या बढायांची टवाळकी ह्या वाक्यानें केली जाते. **कोरडें काम** न० अंघोळ न करतां किं० अंघोळीच्या अगोदर वेणी फणी,काजळ कुंकू,इ०रूप जो स्त्रियांचा प्रसाधनविधि तो.**कोरडें पिठलें** न० पातळ नव्हें असें म्ह० घट्ट पिठलें. **कोरडें साल** किं० **वर्ष** न० ज्या वर्षी शेतें पिकलीं नाहींत व कांहींच उत्पन्न किं०प्राप्ति झाली नाहीं असें साल किं०वर्ष. **कोरड्या गाथा** स्त्री० अ० व०खोट्या किं० निराधार अफवा; दुष्टपणानें किं० वात्रटपणानें समाजांत प्रसृत केलेल्या खोट्या कंड्या. **कोरड्या टांकाचा हिशोब** जो हिशोब कारकुनापासून तपासून घेतांना यजमानाला हिशेबाच्या चोपडींत मुळींच खाडाखोडी करावी लागत नाहीं असा हिशोब म्ह० अगदीं बरोबर हिशोब (क्रि० देणें, करणें). **कोरड्यास** (-ला),**कोरडेशास** (-ला) अ०भात,भाकरी, इ० पदार्थ कोरडे किं० नुसते खाववत नाहींत म्हणून त्यांच्याबरोबर खावयाला कढी, वरण, आमटी, भाजी,इ०जे पातळ पदार्थ करतात ते; उ० आज कोरड्यास भाजी केली होती, पण ती अति तिखट असल्यामुळें मला चालली नाहीं;(वरचे लोक 'कोरड्यास' या ऐवजीं 'तोंडीं लावण्यास' असा शब्दप्रयोग करतात). **कोरडें खाणें** अडचण सोसणें; कांहीं वस्तूच्या अभावामुळें गैरसोय सोसणें;उ०रामभाऊ माझ्या मदतीला येणार नाहीं? न येऊं द्या; मी काय त्यांच्यावांचून कोरडें खाईन ? **मला कोरडे तीन रुपये मिळतात** मला जेवण न मिळतां नुसते तीन रुपये मिळतात.

कोरडा पु० चाबूक किं० त्याचा फटकारा. (क्रि० ओढणें, लगावणें).

कोरडिकें, कोरडीक, कोरडुकें, न० १ दार बंद करावयासाठीं दाराच्या एका पानास कुलें बसविलेलें असतें. हें कुतरें दुसऱ्या पानाला जी मादी बसविलेली असते तींत शिरकावून दार बंद करतात: ह्या मादीला कोरडिकें, कोरडीक, किं० कोरडुकें म्हणतात. २ सूत काढावयाच्या चरक्याच्या चाकाच्या आसाला काटकोनांत बसविलेली जी पट्टी असते ती; ह्या पट्टीच्या दुसऱ्या टोकाला जें भोक असतें त्यांत बोट घालून हें चाक फिरवितात.

कोरडीक स्त्री०वस्त्राच्या मागाचा बैला बांधावयाची जी दोरी ती.

कोरण [म० कोरणें] स्त्री० काष्ठादिकांतील विवक्षित भाग छेदून करतात जो आकारविशेष तो;खिडक्यांच्यावगैरे चौकटीच्या खालच्या ,वरच्या, किं०बाजूच्या लांकडांस खिडक्या लावल्या असतां फट पडूं नये,व खिडक्यांची दारें आडावीं म्हणून त्यांना जो खोलगट पन्हाळा किं० कंगोरा करतात तो. ह्याला 'धडी ' असेंही म्हणतात.

कोरणी [म० कोरणें]स्त्री० १ कोरकामाच्या उपयोगाचें हत्यार (कान कोरणें,दांत कोरणें, गणपति, इ० कोरण्याचें शस्त्र,इ०). या अर्थी,'कोरणें' असाही शब्द आहे.२कोरकामाचा जो व्यापार तो. ३ (लक्षणेनें)कांहीं पदार्थांतून कोणेकाचें द्रव्यादि युक्तिप्रयुक्तिनें थोडें थोडें हरण करण्याचा जो व्यापार तो.

कोरणें स० क्रि०१ काष्ठ, पाषाण, धातु, इ० कांवर नक्षीकाम खोदणें,किं०पदार्थादिक विवक्षितरूप होण्यासाठीं तो अविवक्षितभागरहित करणें. २ कान, दांत, किं० अन्य कांहीं पदार्थ यांतील मळांश काढणें. ३ (लक्षणेनें) कांहीं व्यवहारादिकांतील बारीक दृष्टीनें विवक्षितांश जितका निघेल

तितका मोठ्या युक्तीनें काढिणें. ॐ**दांत कोरून पोट भरत नाहीं** मोठ्या कार्यास लहान साधन पुरत नाहीं; मोठ्या कार्याचा बारीकसारीक साधनांनीं निर्वाह होत नाहीं; क्षुल्लक काटकसर करून फारशी मोठी शिल्लक पडत नाहीं किं०पडली तरी म्हणण्या इतकी मोठी रक्कम जमत नाहीं किं० बरकत येत नाहीं.

कोरप न० १ झगरें; भाकरी वगैरे भाजण्यासाठीं किं० शेकण्यासाठी गोंवऱ्या पेटवितात त्या. २ बंदुकीचा काना.

कोरपट्टी[म०कोर+पट्टी]**स्त्री०**दुपट्टा,इ०वस्त्रांस लावण्याकरतां जरीचा पदर आणि कोर मिळून निराळे पट्टे विणलेलें असतें तें.ही कोरपट्टी दुपट्टा,इ० कांस मागाहून शिवावयाची असते.

कोरफड [**सं०** कुमारी] **स्त्री०** एक औषधी वनस्पति; ही खोकला, इ०कांवर गुणकारी आहे.

कोरंब वि० जर्जर आणि निर्वीर्य झालेलें किं० निःसत्व झालेलें(शरीर, काष्ठ,इ०).

कोरबंद [**म०** कोर किं० कोरबंदी म्ह० स्पर्धा यावरून] **वि०** १ मत्सरी. २ चिरडखोर.

कोरबंदी स्त्री०१ शिपायांचें एका ओळींत उभें राहाणें; शिपाई, इ० कांनीं एकसारखा धरला जो फरा तो. २ बरकस; स्पर्धा; मत्सर.

कोरबू (–भू) [**कानडी** शब्द धनगर या अर्थी] **पु०**बारा जे बलुतेदार त्यांपैकीं एक. हा धनगर जातीचा असून प्रवाशांची विचारपूस करणें, ओझीं, इ० योग्य स्थळीं पोचतीं करणें, रयतेकडून सरकारधारा वसूल करणें, इ०त्याचीं कामें असत.ॐ**कोरबूगिरी स्त्री०**कोरबू ज्या ज्या कामांवर नियुक्त असतो तीं समुच्चयानें.

कोरवट [**म०** कोरा] **वि०** नवीनसर; ताजें किं० कोंवळें दिसणारें.

कोरवण न० घर, छप्पर, इ० शिवण्याच्या किं० विणण्याच्या उपयोगाचें गवत.

कोरवाण (–न) [**म०** कोरा+वाण (वर्ण)] **वि०** १ मागावरून नुकतेच काढलेलें व न रंगविलेलें, न खळ लावलेलें (कापड, ठाण, इ०). २ २ अगदीं कोरें, सतेज, चकचकीत (कापड, मोतीं, दागिना, भांडें,इ०).**न०** कोरेपणा, (कापडाचा इ०).२हलक्या किंमतीचें खादी,इ०कापड तें.

कोरवान् [**म०** कोर+वान् (प्रत्यय) **वि०** न्हाव्यानें कपाळावरील केश कोरीसारखें दिसावयाजोगें कापण्यास योग्य असा जो दहा बारा वर्षांचा मुलगा तो.

कोरघाण, कोरसाण [**म०** कोरा+घाण] **स्त्री०** कोरें वस्त्र, मडकें, इ०कांस कोरेपणाचा जो वास येतो तो. [करतात.

कोरळ पु० एक वृक्ष; याच्या पाल्याची भाजी

कोरा वि० १ नवा, नवीन, न वापरलेला; तत्तद्योग्य व्यवहाराचे वहिवाटींत पडून नवेपणाचीं चिन्हें ज्याचीं लोपलीं नाहींत असा. २ (लक्षणेनें) बिनमाहितगार; नवा; नवशिका. ३ उपदेशादिकांचा ज्याच्यावर कांहीं परिणाम झाला नाहीं असा; कोरडा; न बदललेला; होता तसाच राहिलेला. ४ शुद्ध; न बिघडलेला. ॐ**कोराचा कोरा वि०** अगदीं कोरा, कोरडा, उपदेशादिकांचा ज्याचेवर कांहींही संस्कार झाला नाहीं असा. **कोरा करकरीत वि०** १ अगदीं कोरा, नवा (जोडा, वस्त्र, इ०). २ कोराचे कोरा. **कोरान्न न०** न शिजविलेलें धान्य तें म्ह० हिरवे तांदूळ, इ० जें धान्य तें. (भिक्षेकऱ्यास घालावयाचें). **कोरान्नकरी पु०**, न शिजविलेल्या धान्याची भिक्षा मागतो तो.

कोरांटा, कोऱ्हांटा पु०, कोरांटी, कोऱ्हांटी स्त्री० [**सं०** कुरंटक] एक कांटेरी आणि सुवासिक फुलझाड. याच्या पांढरी कोऱ्हांटी, तांबडी कोऱ्हांटी, पिवळी कोऱ्हांटी, अशा भिन्न भिन्न जाति आहेत.

कोराळ जमीन स्त्री० तांबूस व विशेष सकस नसलेली जमीन.

कोरी स्त्री० विशेष सकस नसलेली जमीन,– जी इतर जमिनीबरोबर लावली असतां तिच्यावर कर घेत नाहींत.

कोरीटक न० (रत्नागिरीकडे) कांबळीं विणणाऱ्यांच्या मागाच्या दुसऱ्या टोकाकडचें एक साधनविशेष.

कोरींव[म०कोरणें]**वि०**खोदींव;पदार्थाचा नको तो अंश हत्यारांनीं काढून केलेली मूर्ति, इ०. ॐ **कोरींव लेणीं न०अ०व०**डोंगराच्या गर्भांत खोदून काढलेलीं लेणीं.(ही कला आपणां हिंदूंशिवाय इतर

कोणासही अवगत नव्हती). **कोरींव कातींव** **वि०** सुबक, कळाकुसरीचें, नीटस, नाजूक.

कोल न० १ जप्त केलेलें, टांच आणलेलें, कबजांत घेतलेलें जें उत्पन्न, मालमत्ता, इ० ती,– कर्जाच्या वसुलीबाबत;(क्रि०धरून ठेवणें,सोडणें). २ गल, कोली (विटीदांडू, गोट्या, इ० खेळांत खणतात ती).

कोल वि० शरीरसामर्थ्यानें, बुद्धिमत्तेनें, किं० द्रव्यबलानें जो कमकुवत,असहाय,किं० निर्बल,तो.

कोलकर पु० एक गांवकामगार; ह्याला 'तराळ' असाही दुसरा शब्द आहे.

कोलंगडें, कोलांगडें न० मागें 'कुलंगडें' पहा.

कोलंगी स्त्री० ठिणगी; ज्वाला किं० ज्वालांचा झोत; (**क्रि०** उडणें).

कोलडें न० १ एक धान्यविशेष. २ एक प्रकारचें गवत.

कोलणें स० क्रि० १ गलींतून विटी दांडूनें उडाविणें. २ (लक्षणेनें) दुसऱ्याच्या अंगावर लोटणें; आपल्या अंगावर न घेतां दुसऱ्यावर ढकलणें (काम, जबाबदारी, इ०). ३ वाद्प्रकरणीं कोणेकास कोणेकानें पराजित करणें.

कोलती स्त्री० १ कोलीत; पेटलेलें जें लहानसें लांकूड तें; जळती किं० पेटलेली धलपी. २ दुष्टपणानें एखाद्यावर केलेलें दोषारोपण; खोटें किं० निराधार दोषारोपण; एखाद्यावर कोलती ठेवणें म्ह० त्याच्यावर खोटेपणानें किं० दुष्टाव्यानें कांहीं आळ घालणें.

कोलदंडा, कोलदांडा पु०१ मस्त कुत्र्याच्या गळ्यांत बांधतात तें लाकूड (त्याच्या मस्तीस आळा बसावा म्हणून). २ अपराध्यास पळून जातां येऊं नये इत्यादर्थ त्याचे हातपाय एकांत एक अडकावून व मध्यें एक लांब लांकूड घालून त्याला बंधन करतात तें.

कोलमडणें अ० क्रि० धडपडून पडणें; पाय मुरगळून, ठेंच लागून,जोराचा धक्का बसून, किंवा अन्य प्रकारें,एकाएकीं वाकडें तिकडें पडणें.

कोलमाडणें स० क्रि० उलथून पाडणें; लवंडून देणें (वाऱ्यानें झाड, रट्टा मारून किं० धक्का देऊन मनुष्यादि प्राणी).

कोलमाडा पु० १ एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळणें (**क्रि०** देणें). २ एकाद्याला धक्का देणें. ३ लांबणीवर टाकणें(कांहीं काम); **क्रि०**देणें.

कोलवा पु०घरावर घातलेलें जें गवत तें;(विशेषत: गत सालचें).

कोलवाकोल,कोलाकोल, कोलाकोली [म० कोलणें]**स्त्री०**यानें त्याच्या अंगावर ढकलावें, त्यानें याच्या किं०तिसऱ्याच्या अंगावर ढकलावें,असा जो कोलण्याचा व्यापार तो;उडवाउडवी; टोलवाटोलव.

कोला पु० कोल्हा.

कोलाहल [**सं०**] **पु०**गलबला; गोंगाट.

कोलिस्त्रें न०कित्येक किडे जें गुळगुळीत बारीक तंतूचें घर स्वतास राहावयासाठीं करतात तें.

कोली स्त्री० विटीदांडूच्या किं० गोट्यांच्या खेळांत खणतात ती गल.

कोलीत न० जळक्या लांकडाची धलपी. ※ **पिशाच्याचे हातांत कोलीत स्त्री०** दुष्ट माणसाच्या हातांत किं० सारासारविचारशून्य अशा माणसाच्या हातांत दुसऱ्याच्या नाशांची साधनें येणें; भयंकर अनर्थाचें कारण.

कोलेती स्त्री० खाजकोलेती म्हणून जें झाड आहे तें.

कोल्हरी स्त्री० (कवितेंत) माया, जादू.

कोल्हा पु०, कोल्हें न० एक वन्य पशु; याची धूर्तपणाबद्दल फार ख्याति आहे.(**कोल्ही** हें स्त्रीलिंगी रूप).※**कोल्हा किं० कोल्हें काकडीला राजी** ज्या वस्तूवर आपला हक्क नाहीं ती अल्प प्रमाणांत मिळत असली तरी स्वार्थी मनुष्य खूष होतो. **अडलें कोल्हें मंगल गाय** नेहमीं कर्कश आवाजानें ओरडणारें कोल्हें देखील अडचणींत पडलें असतां सौम्य आणि केविलवाण्या स्वरानें प्रार्थना करतें. संकटांत सांपडलेल्या माणसाचा ताठा किं० दिमाख नाहींसा होतो. **कोल्हें लागलें** खेळांत प्रतिस्पर्धी हरला असतां 'तुझ्यावर आमचा एक डाव लागला' या अर्थीं या वाक्याची योजना करतात. **कोल्हेटेंकण्यास बसणें** अंग आकुंचित करून बसणें; (दवा धरून बसतांना बसतात तसें). **कोल्हेटेंकण्यास येणें** १ वृद्धावस्थेस येणें; म्हातारपण येऊं लागणें. २ सूर्य, चंद्र, इ० मावळावयाच्या पंथास लागणें; अस्तोन्मुख होणें.

कोल्हेकुई स्त्री० (लक्षणेनें) दुर्जनांनीं सज्जनाची केलेली निंदा, किं० त्याच्याविरुद्ध चालविलेली

ओरड. **कोल्हेभुंक (-भोंक) स्त्री०** १ कोल्ह्यांचें जें ओरडणें तें. २ प्रभात; अरुणोदय; नुकतें तांबडें फुटूं लागलें आहे ती वेळ. **कोल्हेहूक स्त्री०** १ कोल्ह्यांचें ओरडणें. २ एखाद्यावर तावातावानें जें तुटून पडणें तें.

कोल्हाट न० खालीं डोकें वर पाय करून एक वेळ हवेंत गरकन् फिरून पुन्हां पायावर उभें राहावें अशी जी उडी ती. हिला **कोल्हांटी उडी, कोल्हांटी स्त्री०** असेही प्रतिशब्द आहेत (**क्रि०** मारणें).

कोल्हांटी [**म०** कोल्हांटी] **पु०** कोल्हांटी मारणें, दोरीवरून चालणें, उंच उभ्या बांबूवर आडवें निजणें, इ०प्रकारचे कसरतीचे खेळ करून उपजीविका करणारे जे लोक ते प्रत्येक. (**कोल्हांटीण** हें स्त्रीलिंगी रूप). ॐ **कोल्हांट्याचें शूरत्व न०** कोरडें दिमाखदाराचें भाषण.

कोल्हापुरी माप न० (कोल्हापुरी माप मोठें असतें त्यावरून कुचेष्टेनें) अजस्र मोठें, फताडे (जोडे किं० वाहाणा).

कोल्हारा पु० कोरळ म्हणून जें झाड आहे तें (त्याच्या पाल्याची भाजी होते).

कोल्हाळ [**सं०** कोलाहाल] **पु०** कल्लोळ; रडण्याचा वगैरे गडबडाट.

कोवणें स० क्रि० १ नवीन मडकें, रांजण, इ०चा कोरेपणाची घाण घालविणें. २अनीतिमार्गांत एकाद्याला निढावणें.

कोंवरी स्त्री० अचिरपक्व जो फणस तो.

कोवसा पु० वाली; त्राता; अभय देणारा; एखाद्याच्या वतीनें पारिपत्य करणारा.

कोंवळसर, कोवळसर [**म०** कोंवळा]**वि०** जरासा कोंवळा असलेला.

कोंवळा, कोवळा [**सं०** कोमल] **वि०** नवोद्भिन्नतेमुळें किं० बाल्यावस्थेमुळें अकठोर, अपरिणत (शब्दशः किं० लक्षणेनें);नाजुक (किसलय, मन, इ०); अप्रखर (किरण, उन्ह); अपक्व (फल,विचार,इ०); अप्रगल्भ, अशक्त; अबल(वय, पोर, बद्धि); ताजें (अंडें,-जून किं० निबर नसलेलें); कच्चें (दूध,-गाय, म्हैस व्याल्यानंतर जें काढतात व जें खरवसाच्या उपयोगीं येतें तें). ॐ **कोंवळा किरळा वि०**नवीनच फुटलेला(अंकुर, मोड, पान, फूल, इ०).

कोंवळीक, कोवळीक [**म०** कोंवळा]**स्त्री०** कोवळेपणा; अपरिणत्त्वामुळें असणारा नाजुकपणा व अशक्तपणा; कोमलता.

कोवा पु० कानफाट्ये गोसावी वाळगतात ती एकतारी; एक तार असलेलें तुणतुणें; कोंका.

कोवा स्त्री (वैदिकांच्या भाषेंत संकेतानें) विधवा, गतधवा.

कोविद [**सं०**] **वि०** (समासांत अंत्यपदीं) विशारद; तज्ज्ञ; हुषार; निढावलेला; उ० भाषाकोविद, अर्थशास्त्रकोविद,इ०.

कोविदार [**सं०**] **पु०** १ शिसवींतील एक भेद. २ कांचन. ३ वाहावा.

कोवी स्त्री० खोबरें काढून टाकून पळासारखी वापरतात ती नारळाची करवंटी.

कोव्हाळा पु० ,कोव्हाळें न०कोहळा,-ज्याची भाजी, सांडगे, इ० करतात; तो शक्तिवर्द्धकही आहे.

कोव्हाळी स्त्री०कोहळे जिला लागतात तो वेल; कोहाळ्याचा वेल.

कोश, कोष [**सं०**] **पु०** १ पात्र, बारदान (सामान्यतः). २ खजिना, भांडार. ३ भाषेंतील शब्द, इ०चा सार्थ जो संग्रह केलेला असतो तो. ४ तलवार इ०कांचें जें मेण किं० म्यान तें. ५ कमलादि पुष्पांचा कळा, किं० मिटलेलें कमलादि पुष्प.६ रेशमाच्या किड्याचें घर. ७ (वेदान्तांत) आत्म्याभोवतीं जीं पांच आवरणें आहेत तीं प्रत्येक; (पांच आवरणें:—अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय). ७ आवरण, घर, आच्छादन (साधारणतः). ॐ **कोशकार पु०** १ भाषेंतील शब्दादिकांचा सार्थ संग्रह करतो तो. २ तलवार इ० कांचीं म्यानें करतो तो कारागीर.३ रेशमाचा किडा (कोशान्तर्गत). **कोशाध्यक्ष पु०** खजिनदार; राजादिकांच्या द्रव्यसंग्रहावर जो अधिकारी नियुक्त असतो तो.

कोश [**सं०** क्रोश] **पु०** कोस; दोन मैलांचें अंतर.

कोशरें, कोशेरें [**सं०** कोश] **न०** रेशमाचें खरखरीत किं० जाडेंभरडें वस्त्र.

कोशा [**म०** कोश] **पु०** १ प्रायः श्वेत किं० पीत वर्णाचें रेशमाचें डोक्यास पटक्यासारखें बांधावयाचें वस्त्र. २रेशमी वस्त्र (सामान्यतः).

कोशा वि० किंचित् काळसर (गाय,बैल,इ०).

कोशिंदा पु० कोचिंदा नावांची एक वनस्पति. हिला कंद येतात व ती औषधोपयोगी आहे.

कोशिंब पु० एक वृक्ष. ॐ **कोशिंबी स्त्री०** कोशिंबाची बी. **कोशिंबेल न०** कोशिंब्यांपासून काढलेलें तेल.

कोशिंबरें न० एक प्रकारचा तांदूळ.

कोशिंबीर,कोशिंबरी स्त्री० काकडी, मुळा, इ०किसून त्यांस तिखटमीठ लावून जें तोंडीलावणें करतात तें.

कोशीस [**फा०** कोषिस्] **स्त्री०** १ प्रयत्न, कष्ट, परिश्रम; (**क्रि०** करणें). २ पराकाष्ठेचा यत्न.

कोशेटा पु०,कोशेटी,स्त्री० कोशेरा पु०[**म०** कोश] १ फणसाच्या आठळांवर जें पातळ पांढरें कवच असतें, किं० अन्य फलांदिकांवर जें पातळसर वेष्टन किं० आच्छादन असतें, तें. २ रेशमाचा किडा किंवा तज्जातीय अन्य किडे यांचें तंतुमय घर.

कोष्ट [**सं०** कुष्ठ] **न०** कोष्टकोळंजन.

कोष्टक न० पुढें **कोष्ठक** पहा.

कोष्टी पु० १ सूत काढून त्याचें वस्त्र विणून उपजीविका करणारी एक जाति किं० तज्जातीय इसम. साळी लोक हाच धंदा करतात पण ते कोष्ट्याच्या जातीहून भिन्न आहेत. २(लक्षणेनें) कोळी,—जो घराच्या कोपऱ्यांत आणि सांदीकोंदींत आपलें तंतुमय घर करतो.

कोष्ठ [**सं०**]**पु०** १ पोटांतील जो कोठा तो. २ आम, मूत्र, अग्नि, रुधिर, आणि अन्न, यांचीं शरीरांतील स्थानें. ३ धान्य सांठविण्याची कोठी; कोठार.४ खोली,गृह.ॐ**कोष्ठबंधक वि०**कोठ्यास निरोधकारक; मलावरोधक. **कोष्ठशुद्धि स्त्री०** कोठ्याची शुद्धि, साफ असणें, किं० निर्मलता (रेचकानें होते ती).

कोष्ठक, कोष्टक [**सं०**] **पु०,न०** १ आडव्या दोन रेषांवर उभ्या दोन रेषा ओढल्या असतां पडतें त घर; आडव्या, उभ्या, तिरकस,इ० रेषा कागदावर आखून किं०कागदाला घड्या पाडून जे रकानें वगैरे पाडतात ते समुच्चयानें; किं०अशा रकान्यांत दिलेली माहिती; उ० पंचांगांतील,अंकगणितांतील, भूगोलांतील, इतिहासांतील, ज्योतिषग्रंथांतील, कोष्टकें.

कोष्ठ (–ष्ट)कोळंजन, कोष्ठ(–ष्ट)कोळिंजन न० एक औषधी.

कोष्ण [**सं०**] किंचित् ऊन किं०गरम;कोंबट (पाणी, अंग,इ०).

कोस [**सं०**कोश]**पु०** दोन मैलांचें अंतर किं० परिमाण; आठ सहस्र हात लांब जें मार्गप्रमाण तें.

कोस [**सं०** कोश (आच्छादन)] **पु०** सर्पाची कांत.

कोस, कोंस [**म०** कूस]**पु०** युक्त आकारांत वक्रतेमुळें येतो तो न्यूनाधिक्यदोष (भिंतीला कललयामुळें पोट येणें, इ० स्वरूपाचा); घर, शेत, पटांगण, इ० च्या आकृतींत काटकोनाला आणि सरळ रेषेला न जुळणारे भाग, (**क्रि०** येणें, होणें, जाणें,निघणें, काढणें, जिरणें,जिरवणें); उ० पुण्यांत घराला कोस ठेवीत नाहींत;मुंबईमध्यें हजारों घरांना कोस दिसतात.

कोसला पु०एकप्रकारचा रेशमाचा किडा,—जो आपणास रहावयाकरतां कोशेरा करतो.२ कोशेरा, कोश. ३चकमकीवरून पाडविलेली ठिणगी ज्याचेवर पाडवितात तो ‘ कप ’.

कोसळणें अ० क्रि० १ विशकलित होऊन किं० मोडून धाडदिशी जमिनीवर पडणें किं० आदळणें (शब्दशः किं० लक्षणेनें); उ० भिंत, घर, झाड, किं० रचलेला व्यूह, राज्य,सिंहासन,इ० कोसळणें. २वेगानें किं०सोसाट्यानें भूमीवर पतन पावणें किं० आदळणें (शब्दशः किं० लक्षणेनें); उ० वीज, पाऊस, वादळ, इ०, किं० फलें, पुष्पें, किं० संकटें, अनर्थ, इ० कोसळणें. ३ (लक्षणेनें) एखाद्यावर वादादिप्रसंगीं तावातावानें आणि कडाक्यानें तुटून पडणें किं० घसरणें.

कोसीस [**फा०**कोषीष्] **स्त्री०** प्रयत्न, परिश्रम, खटपट.

कोहळा, कोहाळा, कोहोळा पु० भोंपळ्याच्या जातीचें एक फल,—ज्याचे आपण सांडगे करतों. **कोहळी, कोहोळी, कोहोळी स्त्री०** व

कोहळें, कोहाळें, कोहोळें न०अशींही या शब्दाची अन्य रूपें आहेत. ꙮ **कोहोळेंपाळ पु**० कोहोळ्यापासून करतात तो पाक. हा शक्तिवर्धक असतो.

कोळ[म०कोळणें] **पु**०१ ज्यांत चिंच, आंबा, आमसुलें, इ० कुसकरलीं आहेत असें घट्ट किं० दाट पाणी, ताक, इ०; चिंच, इ०च्या अर्काचें पाणी, इ०.२ अशा तऱ्हेनें कुसकरलेली चिंच, इ०.३ एक मुठभर तिळाची रोंपडी. ꙮ**कोळ होणें** किं० **वाळून कोळ होणें** १ पूर्णपणें वाळणें किं०शुष्क होणें.(पानें फुलें, इ०). २ अक्रुसणें, सुरकुतणें, रोड होणें. (त्वचा, शरीर, इ०). **चिरगुट, कागद, इ० जळून कोळ होणें** चिरगुट, कागद, इ०पूर्णपणें जळून रक्षारूप होणें.

कोळं पु० १ ऋणाची किं० दुसऱ्या कोणत्याही देण्याची फेड किं० भरपाई होईतोंपर्यंत त्या किमतीचा अडकावून ठेविलेला पदार्थ, जनावर, इ०. २ खाडीचा लहानसा फाटा; खाडीची शाखा.

कोळऊ स्त्री० म्हैस, डुकर, इ० च्या अंगावर पडते ती ऊ.

कोळखंड न०, **कोळखांदा पु**० बैलाच्या खांद्यावर उंचवटा असतो तो.

कोळंगा पु० निखारा.

कोळंगी स्त्री० जळत असलेल्या लाकूड, गवत, पातेरा, इ०तून उडणारे भाग किं० ठिणग्या.

कोळंजणें अ०**क्रि**०१ जळणारें लांकूड, कोळसा, इ० चुलींतून किं० भट्टींतून बाहेर काढून बाजूला ठेवला असता तो जागच्या जागीं जळून रक्षारूप होणें (ह्या अर्थीं ' कोळपणें ' हें रूप अधिक रूढ आहे).२ फार दिवस उन्हातान्हांत प्रवास केल्यामुळें अंगाची त्वचा काळी होणें; उन्हानें काळवंडणें.

कोळंजन [फा० खोलंजन्] **न**०कोष्ठकोळंजन ह्या नांवाची औषधी.

कोळणें स० **क्रि**० १ चिंच, आंबा, आमसूल, इ०तील सत्त्वांश काढण्यासाठीं तीं पाणी, ताक, इ०मध्यें कुसकरणें. २ (लक्षणेने)अर्क काढून घेणें.

कोळपणी स्त्री० कोळप्यानें शेतांतील गवत काढून टाकणें. खालीं ' कोळपें ' पहा.

कोळपणें अ०**क्रि**० १ अग्नीनें किं० सूर्याच्या उन्हानें होरपळणें किं०काळवंडणें (तोंड, अंग, इ०). धुमसणें.

कोळपें न०, **कोळपा पु**०शेतांतील गवत उपटून काढण्याचें एक आऊत.

कोळंब पु०, **न**०, **कोळंबा पु**० एक प्रकारचें तांबूस आणि खरखरीत गवत; हें घरावर आच्छादन घालण्याचें कामीं बहुधा योजितात. ह्याला 'तांबट' असेंही नांव आहे.

कोळंबा पु०तांदुळाची एक जात.

कोळंबी स्त्री० एक प्रकारचा मासा.

कोळंबें(-भें)न०जनावरांना पाणी पाजण्याच्या कामाचें एक पात्र.(मातीचें). २फुलझाडाची कुंडी. ३ राहाटाच्या लोट्याचे पाणी ज्यांत पडतें आणि जे रहाटाच्या मध्यभागीं ठेविलेलें असतें तें लांबोडें पात्र ४विहीर इ०चें ओकतीनें पाणी काढण्यासाठीं सु॰ माडाच्या बुडख्याचें किं०धातूचें पात्र केलेलें असतें ते. ५ भाजीपाल्याच्या वाफ्यांवर हौदांतून पाणी उडविण्याचें लांबोड्या आकाराचें पात्रविशेष.

कोळवण न० उत्तर कोंकण; वसई, कल्याण, ह्या शहराच्या उत्तरेकडचा कोंकण प्रान्त; यांत प्राचीन काळीं कोळी लोकांची प्रायः वसाति असे.

कोळविणें स० **क्रि**० चिंच, इ०पाण्यांत कुसकरून त्यांचा सत्त्वांश काढणें.

कोळवाड स्त्री०, **कोळवाडा पु**० कोळी लोकांच्या वसतीचा प्रदेश, टापू, किं० मोहल्ला.

कोळवें न० १ चिपट्याच्या अर्ध्या इतकें परिमाण. २ घराच्या चांधईला चिकटून उभारलेलें छप्पर. ३ पडवीचें छप्पर घरांत शिरतांना डोक्याला आपटूं नये म्हणून छप्पराचा पुढचा भाग कमानीसारखा किं० अर्धवर्तुळाकार केलेला असतो तो. ४ बैलाचें वशिंड. ꙮ **कोळव्याचा वांसा घडीघडी लागे** वारंवार ज्याची गांठ पडते किं० संबंध घडतो अशा माणसाला आपण कांहीं कारणांवरून दुखविलें किं० नाखुष केलें असतां तो आपणास दरखेपेला हिणावतो आणि लाजवितो.

कोळशी स्त्री०१ काजळी. २दिव्याच्या वातीचा किं० मशालीचा जळून मुरदाड किं० निःसत्त्व झालेला भाग. ३ जोंधळ्यावर पडणारा एक प्रकारचा रोग.

कोळशीण (-सीण) स्त्री० एक वनस्पति; तिचा उपयोग कोळ्याच्या दंशावर करतात.

कोळष्टक, कोळशीट, कोळशेटें, कोळिष्टक [**म०** कोळी+शीट] **न०**कोळ्याचें तंतुमय घर; अशा घरांचा बुजबुजाट. [लांकूड, इ०).

कोळसंडणें अ० क्रि०धुमसत राहाणें (गोवरी,

कोळसन पु०, न० एक प्रकारचा कुत्रा.

कोळसा पु०विझलेला निखारा.**॥कोळशांतलें माणीक न०,कोळशाची अंतरसाल स्त्री०**अतिशय काळा माणूस. **कोळसा कितीही उगाळला तरी काळाच** १ वाईट मनुष्याला कितीही सवलती दिल्या तरी तो वाईट कामच करणार.२वाईट माणसाचा,किं०गोष्टीचा, कितीही सहानुभूतिपर विचार केला तरी तो किं०ती वाईटच आढळून येणार;वाईट माणूस,इ०बाहेरून आणि आंतून वाईटच. [पहा.

कोळाशिंदा, कोलसिंदा पु०खालीं **कोळिष्णा**

कोळा पु० एक प्रकारचा डांस.

कोळांजन, कोळिंजन [**फा०**कोलंजन्] **न०** कोष्ठकोळिजन जिला म्हणतात ती औषधी.

कोळिवडा [**म०**कोळी+वाडा] **पु०** कोळी लोकांच्या वसतीचा प्रदेश.

कोळिष्णा पु० एक वन्य पशु; ह्या शब्दाची इतर रूपें 'कोळिसरा,' 'कोळिस्ता,' ' कोळसुंदी' 'कोळसुना,' इ० आहेत.

कोळिसरा पु० एक किडा.

कोळिसरी स्त्री०एक वनस्पति.

कोळिस्ता, कोळिस्त्रा पु०१कोळिष्णा. २कोल्ह्यांच्यांतील एक भेद.

कोळी पु० हिंदूंची एक जाति; ह्या जातीचे लोक मासे धरून, होड्या चालवून, किं०वन्य पशु मारून, उपजीविका करतात.

कोळी पु० एक किडा; हा आपल्या अंगांतून तंतु काढून त्यांचें स्वतास घर करतो आणि त्यांत माशा वगैरे पकडून खातो.**॥कोळ्याचें सूत.न०** कंटाळवाणी हकीकत. **कोळ्याचें जाळें न०** विरविरित किं० झिरझिरीत चिरगूट.

कोळी पु० पाण्यांतील मासे पकडून खाणारा एक पक्षिविशेष.

कोळी पु० दिव्याची वात किं०मशाल यांचा जळून सुरडाड आणि निःसत्त्व झालेला भाग,–जो झाडून टाकला असतां प्रकाश उज्ज्वल होतो.

कोळीण स्त्री०कोळी जातीची स्त्री.

कोळें न० १ बैलाच्या पाठीवरचें वाशिंड. २ कोळखंड. [किडा; कोळिसरा.

कोळेसरा पु०रेशमाच्या किड्याच्या जातीचा

कौटिल्य [**सं०** ' कुटिल ' पासून **भा० वा० ना०**] **न०** वाकडेपणा; लबाडी; कापट्य.**पु०** चाणक्य नांवाचा एक मुत्सद्दी.

कौटुंबिक[**सं०**]कुटुंबासंबंधीचें;कुटुंबाविषयींचें.

कौतुक [**सं०**] **न०** १ इच्छा. २ उत्सुकता. ३ जिज्ञासा. ४ आनंद. ५ क्रीडा. ६ लग्नकंकण. ७स्वागत. ८गान. ९आश्चर्य. १० आपल्या आवडीच्या किं० प्रेमाच्या वस्तुसंबंधानें जें समाधान वाटतें तें, किं० ह्या समाधानामुळें त्याचें जें गौरव केलें जातें तें. **॥ कौतुकक्रिया स्त्री०** विवाह, लग्न. **कौतुकतोरण न०** विजयतोरण.

कौतुकी वि० रंगेल; खेळाडू; खेळकर.

कौतूहल [**सं०**] **न०** १ इच्छा. २ जिज्ञासा. ३ उत्सुकता. ४ नवल. ५ आश्चर्य वाटविणारी वस्तु; आश्चर्यकारक वस्तु.

कौदरी स्त्री० एक प्रकारची केळ; चवेण.

कौनबौ वि० विचित्र; प्रचंड; अगडबंब; जगडव्याळ.

कौपीन [**सं०**] **न०** गुह्यांग; उपस्थ. २ लंगोटी. ३ फाटकें वस्त्र. ४ पाप,दुष्कर्म.

कौमार [**सं०**] **वि०** १ तरुण. २ नाजूक. ३ कार्तिकेयासंबंधाचें.**न०** १ बालपण (पांच वर्षांपर्यंत); लहान वय (सोळा वर्षांपर्यंत).**॥कौमारभृत्य न०** बालसंगोपन.

कौमुदी [**स०**] **स्त्री०** १ चंद्रप्रकाश, चंद्रप्रभा, चांदणें. २ (लक्षणेनें) चंद्रप्रकाशाप्रमाणें जें शीतल, आल्हादजनक, किं० मनोहर आहे तें (स्त्रीमुख, इ०). ३ ग्रंथाच्या नांवापुढें ०च्यावर प्रकाश पाडणारें, ०चें स्पष्टीकरण करणारें, ०चा अर्थ सुलभ करणारें, इ० अर्थीं लावतात; उ० तर्ककौमुदी, सिद्धांतकौमुदी, इ०. **॥ कौमुदीवृक्ष पु०** दिव्याची बैठक किं० ठाणवई.

कौल न० आच्छादनार्थ घरावर मातीचे पन्हळ करून पक्के भाजून घालतात ते प्रत्येक. कौलें प्रायः तीन प्रकारचीं असतात; मंगळुरी किं० विलायती कौलें, चपटी किं० थालीपिठी कौलें, व नळे. ॥

एकाद्याच्यां घरावर कौल न राहूं देणें त्याचें कुटुंब किं० घर सर्वस्वीं विध्वंसिणें (आर्थिक दृष्ट्या).

कौल [अ०] **पु०** १ सरकार शेतकऱ्यांस 'तुह्मांस इतकी सूट दिली,' 'प्रसंगीं तुह्मांस साहाय्य करूं,' इ० प्रकारचें जें आश्वासन किं० अभयपत्र देतें तें. २ शत्रूस आपल्या मुलखांतून जावयाकरतां दिलेलें अभयपत्र. ३ कांहीं एक कार्य करण्याविषयीं देवीची आज्ञा घेण्याकरतां तिच्या अंगास तांदूळ, सुपाऱ्या, फुलें, इ० लावतात तीं. हे तांदूळ, इ० खालीं पडले म्हणजे देवीची आज्ञा आहे असें मानतात. ❀ **कौल देणें** देवीनें आज्ञा देणें. **कौल लावणें** देवीच्या अंगास फुलें इ०लावून तिची आज्ञा मागणें. **कौलनामा** सरकार शेतकऱ्यांस जें आश्वासनपत्र किं० अभयपत्र देतें तें. (' कौल' याचा प्रथमार्थ पहा). **कौलप्रसाद पु०** ('कौल' याचा तृतीयार्थ पहा) १देवी कौल देऊन अनुग्रह करते तो. २ देवीची आज्ञा मागण्याकरतां गुरव तिच्या अंगास तांदूळ, सुपाऱ्या, फुलें, इ० लावतो ती.

कौला पु० एक पालेभाजी.

कौला [हिं० कोनूला] **पु०** एक प्रकारचें मोठें नारिंग.

कौलाफोक वि० १ कोवळें, जोमदार, आणि फोकासारखें ताठ आणि सरळ (झाड, इ०). २ (लक्षणेनें) तरुण, जोमदार आणि ताठ, असें सुरूप किं० सुरेख (मनुष्य).

कौलार [म० कौल] **न०** कौलें घातलेलें घराचें छप्पर.

कौलारी [म० कौल] **वि०** कौलें घातलेलें [(गृह).

कौलारू(-र) [म० कौल]**वि०**माथ्यावर कौलें घातलेलें (घर); यांच्या उलट माळवदी किं० कैंबलू.

कौलावण [म० 'कौल' याचा १ अर्थ पहा] **स्त्री०** कांहीं कार्याकरतां सरकारकडून कौल घेण्याकरतां जें द्रव्य द्यावें लागते तें.

कौलिक [सं० कौल=शाक्त पंथ] **पु०** शाक्त लोकांतील एक भेद किं० पंथ, किं० तदनुसारी इसम.

कौली [म० 'कौल'याचा प्रथमार्थ पहा]**स्त्री०** सरकारकडून कौल घेऊन नव्यानेंच किं० प्रथमच केलें तें शेत. **वि०** सरकारांतून कौलानें घेतलेलें शेत, इ०.

कौलीन [सं०] **न०** १ दुष्ट वार्ता, अफवा; उ० मालविकेसंबंधीं आपण कांहीं कौलीन ऐकलें कां ? २ लोकापवाद, आळ.

कौलू स्त्री० पोटांत होतो एक रोग-तो.

कौशल, कौशल्य [सं०] **न०** १ कसब, कारागिरी, वाकबगारपणा, कला (हस्तादिकांचे ठायीं असते ती). २ खुशाली, सुखरूपता, क्षेम.

कौशलिका, कौशली [सं०] **स्त्री०**१ आठवण म्हणून, किं० प्रेमाखातर, जी कांहीं वस्तु नजर करतात ती. २खुशालीबद्दल विचारपूस करतात ती.

कौशी, कौशीकानडा, कानडा पु० एक राग (संगीतांतील).

कौशेय [सं० कोश] **वि०** रेशमाचें (वस्त्र, सूत्र, इ०). **न०** रेशीम किं० रेशमाचें वस्त्र.

कौसुंभ [सं०] **वि०** कुसुंब्याच्या रंगाचें (वस्त्र, रंग, इ०).

कौस्तुभ [सं०] **पु०** श्रीविष्णूच्या कंठांतील मणि किं० रत्न. समुद्रमंथनाचे वेळीं जीं चवदा रत्नें निघालीं त्यांतील हें एक.

क्यारी [सं० केदार; हिं० कियारी] **स्त्री०** भोंवतालीं फरसबंदी करून मध्यें फुलझाडें लावण्याकरतां जागा राखतात ती.

क्रकच [सं०] **पु०, न०** करवत. ❀**क्रकचनासिक वि०** करवतनाक्या (एक मासा).

क्रतु [सं०] **पु०** यज्ञ.

क्रदंतकाळ पु० कृतांतकाळ; कर्दनकाळ.

क्रम [सं०] **पु०** १ कांहीं विशिष्ट नियमास, तत्त्वास, पद्धतीस, किं० शिस्तीस अनुसरून असलेला जो मार्ग किं० परिपाठ तो; उ० नित्याचा क्रम, शिक्षणाचा क्रम, सृष्टीचा क्रम, चक्रनेमिक्रम, इ०. २ कांहीं विशिष्ट नियमास अनुसरून असलेली जी रचना, मांडणी, किं० परंपरा ती; उ० अभ्यास केला नाहींस म्हणून नापास झालास हें क्रमानेंच उपपन्न होतें; उ० कवायतीकरतां आपापल्या उंचीप्रमाणें एकाखालीं एक उभे रहा, कोणीही क्रम मोडूं नका. ३ अनुक्रम; उ० क्रमांक; उ० संध्येतील नांवें ज्या क्रमानें आलीं आहेत त्या क्रमानें म्हण; उ० विष्णू, गणेश, आणि शिव, या

क्रमान जर नांवें लिहिलीं असलीस तर त्यांच्या वायकांची लक्ष्मी, सरस्वती, आणि पार्वती, अशीं अनुक्रमें नांवें लिही. ४ जाणें; गति. ५ झडप घालण्याच्या वेळचें संस्थान किं०पवित्रा. ६ संहिता म्हणण्याचा एक प्रकार,–यांत प्रत्येक खेपेस मागील एक शब्द सोडून पुढील एक म्हणावयाचा असतो. ❀**क्रमपाठी पु०** क्रमानुसार वेद म्हणणारा. जटापाठी, घनपाठी, शाखापाठी, हे वेद म्हणणाऱ्यांचे अन्य प्रकार आहेत. **क्रमप्राप्त वि०** १ परंपरेनें मिळालेलें किं०चालत आलेलें;पिढीजाद.२ ओघानें, किं०परंपरेनें जें घडतें तें (विधान, इ०). **क्रमभंग पु०** अनियमितपणा. **क्रमशः, क्रमतः क्रि० वि०** पायरीपायरीनें; हळूंहळूं; ओघानें. **क्रमाक्रमानें क्रि० वि०** क्रमशः.

क्रमण [**सं०** क्रम्=चालणें; जाणें] **न०** चालणें; अनुसरण; आक्रमण; उ० मार्गक्रमण.

क्रमणा [**सं०**] **स्त्री०** चालणें; क्रमण करण्याचा व्यापार किं० रीति; घालविणें; लोटणें; उ० कालक्रमणा.

क्रमणें, क्रामिणें [**सं०** क्रम्] **स० क्रि०** १ आक्रांत करणें (मार्ग). २ घालविणें (काल). ३ उल्लंघिणें. ४ दूर लोटणें किं० सारणें.

क्रय [**सं०** क्री=विकत घेणें; अदलाबदल करणें] **पु०** १ विकत घेणें; विकत घेण्याचा व्यापार. २ अदलाबदल.❀**क्रयविक्रय पु०** विकत घेणें आणि देणें हे दोन्हीं व्यापार; देवाणघेवाण; खेरदीविक्री.

क्रव्य [**सं०**] **न०** १ हिरवें जें मांस तें. २ मांस (सामान्यतः).❀**क्रव्याद्, क्रव्याद पु०** हिरवें मांस खाणारे जे राक्षस, व्याघ्र, सिंह, इ०तः प्रत्येक.

क्रांत [**सं०**] **वि०** आक्रांत; उत्तीर्ण केलेलें.

क्रांत [**सं०** ' क्रांति ' यापासून अशुद्ध रूप] **स्त्री०** चोर, टोळ,शत्रु, इ०कांची धाड किं० हल्ला.

क्रांतणें [**सं०** क्रांत] **स० क्रि०** १ आक्रामिणें, पादाक्रांत करणें (देश, टापू). २ भूक, तहान, आजार, चिंता, किं० झोप, यांनीं पछाडणें किं० बेजार करणें किं० व्याकुळ करणें.

क्रांति[**सं०**]**स्त्री०**१पूर्व कल्पना, विचार,घटना, इ०कांत मानवी किं० नैसर्गिक कारणांनीं एकाएकीं विलक्षण असा घडून येतो तो बदल, किं० फरक; मन्वंतर घडविणारी नवीन विचारांची येते जी लाट ती; उ० रूसोच्या ग्रंथांनीं फ्रेंच लोकांच्या विचारांत विलक्षण क्रांति उडवून दिली. २ विषववृत्तापासून विवक्षित सूर्यादिग्रहाचें दक्षिणोत्तर असतें जें अंतर तें. ३ राजानें प्रजाजनावर किं० चोरांनीं रयतेवर घातलेली धाड. ❀**राज्यक्रांति स्त्री०** राजकीय स्वरूपाची क्रांति; पहिली राज्यव्यवस्था बदलून तिच्या जागीं नवीन स्वरूपाची दुसरी राज्यव्यवस्था स्थापित होते ती. फ्रान्समध्यें अशा प्रकारची राज्यक्रांति इ०स० १७९९ मध्यें झाली. **क्रांतिवृत्त न०** तारांगणांतून सूर्य ज्या वर्तुळ मार्गानें फिरतोसा दिसतो तो.

क्रिमि [**सं०**] **पु०** कृमि; किडा; जंतु.

क्रिया [**सं०**] **स्त्री०** १ कृति; प्रत्यक्ष कांहीं कार्य करणें; उ० क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे. २ मृत माणसाचें जें उत्तरकर्म तें. ३ रासायनिक वगैरे परिणाम; एका वस्तूचें दुसऱ्या वस्तूवर स्थित्यंतर घडविणारें जें कार्य होतें तें; उ० औषधांच्या क्रियेनें आजार बरे होतात. ४ हालचाल; चलनवलन; व्यापार; उ० तिच्या हातांपायांच्या क्रिया एकदम बंद पडल्या; उ०श्वसनक्रिया.❀**क्रिया धरणें, क्रियेला जागणें** एकाद्यानें जीं चांगलीं कृत्यें केलेलीं असतील तीं स्मरत राहाणें. **क्रिया टाकणें, सोडणें, सांडणें**,किं०**विसरणें** एकाद्यानें जीं कांहीं चांगलीं कृत्यें केलेलीं असतील तीं विसरून जाणें. **क्रियाकर्मांतर न०** और्ध्वदैहिक क्रिया; उत्तराक्रिया. **क्रियानष्ट वि०** १ कृतघ्न.२शपथ मोडणारा; वचन न पाळणारा. **क्रियापद न०** वाक्यामध्यें क्रियावाचक जें पद तें,–जेणेंकरून वाक्याची समाप्ति होते. **क्रियाबाल पु०** (कायद्यांत) अप्राप्त व्यवहार जो कोणी तो; लोकांबरोबर देणें, घेणें, इ० व्यवहार करण्यास अप्रौढत्वानें अयोग्य जो कोणी तो. **क्रियाभ्रष्ट वि०** १ कृतघ्न. २ वचनभंग करणारा; वचनानुरूप न वर्तणारा. ३ नित्यकर्मं चालढकलीवर लोटणारा, किं० तीं अनास्थेनें कशींतरी करणारा. **क्रियारूप न०** एका धातूपासून वचन, पुरुष, काल, इ० भेदानें अनेक क्रियापदें होतात तीं प्रत्येक. **क्रियावाचक वि०** (व्याकरणांत) क्रिया दर्शविणारा. **क्रियावान् वि०** शास्त्रविहित कर्मं यथासांग करणारा जो

कोणी तो; शास्त्रविहित कर्में केवळ जाणतो असा नव्हे तर तीं प्रत्यक्ष करणारा जो कोणी तो. **क्रियाविशेषण, क्रियाविशेषण अव्यय न०** ज्या पदाचा विशेषणत्वेंकरून साक्षात् क्रियेवर अन्वय होतो, कर्मादि कारकांवर होत नाहीं तें. **क्रियाश्रय पु०**कर्त्ता; धातूपात्त क्रिया ज्या कारकावर प्राधान्येंकरून राहते तो.

क्रीडणें [**सं०** क्रीड्=खेळणें] **अ० क्रि०**क्रीडा करणें; खेळणें; वागडणें.

क्रीडन न०, क्रीडा स्त्री० [सं०क्रीड्=खेळणें] मनोरंजनाचे जे अनेकविध व्यापार ते प्रत्येक;खेळ; विहार; केलि.꠸**क्रीडाकलह पु०**लटक्या रागाच्या आविर्भावानें गमतीखातर केलेला कलह.**क्रीडागृह, क्रीडामंदिर न०**केलिसदन;विहारमंदिर. **क्रीडामृग पु०** १ हौसेखातर बाळगलेलें हरिण, माकड, इ०. २ (लक्षणेनें) कर्तव्य सोडून विषयांच्या नादीं लागलेला माणूस; रंगेल गडी.

क्रीत [**सं०** क्री=विकत घेणें] **वि०** विकत घेतलेलें. **पु०** क्रीतपुत्र;विकत घेतलेला पुत्र.

क्रुद्ध [**सं०** क्रुध्=रागावणें]**वि०** रागावलेला; चिडलेला; संतापलेला.

क्रूर [**सं०**] **वि०** १निर्दय, निष्करुण,कठोरहृदयी. २ भयंकर; भीति उत्पन्न करणारें,उग्र(कर्म, स्वभाव,श्वापद, इ०).

क्रेतव्य, क्रय [**सं०** क्री=विकत घेणें] **वि०** १ विकत घेण्याजोगें. २ विकत घ्यावयाला योग्य.

क्रेता [**सं०** क्री=विकत घेणें; क्रेतृ=विकत घेणारा] **वि०** विकत घेणारा; खरेदी करणारा.

क्रोड [**सं०**कोटि] **पु०, स्त्री०** एक कोटी ही संख्या.

क्रोड [**सं०**] **पु०**१ डुकर. २ ढोली. ३ उर, छाती. ४ शनि. ५ मांडी. ६मध्यभाग. ७क्रोडपत्र (खालीं 'क्रोडपत्र'पहा.)꠸**क्रोडपत्र न०** १पुरवणी. २ताजा कलम.३ ग्रंथांत ज्यास जें कांहीं न्यून आढळेल तें त्यानें ज्या वेगळ्या पत्रावर लिहून नमूद केलेलें असतें तें पत्र.**क्रोडपर्णी स्त्री०** रिंगणी.**क्रोडीकरण न०** १आलिंगन. २ एकाद्या वस्तूचा दुसऱ्या वस्तूंत अंतर्भाव करून घेणें किं०सामील करून घेणें.

क्रोडों [**सं०** क्रोड] **क्रि० वि०** कोट्यवधि; अगणित परिमाणांत.꠸ **क्रोडोपति पु०** लक्षाधीश; अति श्रीमंत माणूस.

क्रोध[**सं०**] **पु०** राग, कोप. ꠸ **क्रोधमुखी भार्या स्त्री०**रागीट बायको;कजाग स्त्री.कुग्राम वास, कुलहीनसेवा,कुभोजन,आणि क्रोधमुखी भार्या, ह्या चार आपत्ति गणण्यांत आलेल्या आहेत.

क्रोधणें, क्रोधावणें [**म०** क्रोध=राग] **अ० क्रि०** रागावणें; कोपणें. [लेला; क्रुद्ध.

क्रोधायमान [**सं०**क्रुध्=रागावणें] रागाव-

क्रोधिष्ट [**सं०** क्रोध=राग] **वि०** रागीट; लवकर ज्याला राग येतो तो.

क्रोश [**सं०**] **पु०** १ आक्रोश.२ दोन मैलांचें अंतर किं० लांबी.

क्रौंच [**सं०**] **पु०** करकोचा पक्षी.

क्रौर्य [**सं०** ' क्रूर'पासून **भा० वा० ना०**] **न०** क्रूरपणा; कठोरपणा; निर्दयपणा.

क्लांत [**सं०** क्लम्=थकणें] **वि०** दमलेला.

क्लांति [**सं०** क्लम्=थकणें] **स्त्री०** थकवा.

क्लिन्न [**सं०** क्लिद्=भिजणें] **वि०** १ ओलें. २ माखलेलें.

क्लिष्ट [**सं०** क्लिश=पीडा देणें किं० त्रास सोसणें] **वि०** कठिण, दुर्बोध (ग्रंथ, वाक्य, श्लोक, कल्पना, इ०). ꠸ **क्लिष्ट कल्पना स्त्री०** १ सरळ आणि सुगम नव्हे अशी कल्पना.२विचित्र आणि असंबद्ध कल्पना किं० विचार. **क्लिष्ट विषय पु०** कठिण किं० दुर्बोध विषय. **क्लिष्टार्थ पु०** ओढून ताणून आणलेला किं० काढलेला अर्थ.

क्लीब [**सं०**] **वि०** १ नपुंसक. २ अशक्त, दुर्बल.३भित्रा. ४ निष्फल. ५(**व्या०**)नपुंसक लिंग.

क्लेद [**सं०** क्लिद्=भिजविणें] **पु०** १ ओलावा. २ स्राव. ३ घाम.

क्लेदन [**सं०** क्लिद्=भिजविणें] **न०**१ भिजविणें, ओलें करणें. **२** पाझरणें.

क्लेश [**सं०** क्लिश=पीडा देणें; दुःख सोसणें] **पु०** दुःख, त्रास (बहुधा **अ० व०** प्रयोग). ꠸ **क्लेशावह वि०** दुःखकारक; दुःख देणारें. **क्लेशकाळ पु०** आपत्तीचा समय. **क्लेशक्षम वि०** काटक. **क्लेशदान न०** दुखण्यानें फार दिवस जर्जर होऊन पडलेल्या माणसाचें दुःख निवारण व्हावें म्हणून उडीद, तेल, इ० चें जें दान देतात तें.

क्लेशणें [**सं०** क्लिश्=दुःख देणें] **स० क्रि०**

त्रासविणे; पीडिणें; सतावणें. अ० क्रि० त्रासणें, जेरीस येणें. [जर्जर झालेला.

क्लेशी [म० 'क्लेश' पहा] वि० दुःख पावलेला;

क्वचित् [सं० क (कोठें) + चित् (प्रत्यय)] क्रि० वि० १ कांहीं ठिकाणीं. २ कांहीं प्रसंगीं. ३ विरळपणें; फारसा नव्हे अशा रीतीनें; फार थोड्या प्रसंगीं;उ० सहा बोटांचीं माणसें क्वचित् आढळतात.

क्वापि [सं०क (कोठें)+अपि] क्रि० वि० १ कोठें कोठें. २ कधीं कधीं. ३ विरळ प्रसंगीं.

क्वथन [सं० क्वथ्=शिजणें] न० १ शिजणें. २ शिजविणें. ३ काढा करणें.

क्वाकर, कुवाकर पु० एक पक्षिविशेष.

क्वाचित्क [सं० क्वचित्] वि० दुर्मिळ; विरळ; अगदीं थोड्या प्रसंगीं किं० स्थळीं होणारा किं० आढळणारा. [पहा.

क्वाडका पु०, **क्वाडकें** न० मागें ' कोरडिकें '

क्वाथ [सं० क्वथ्=शिजणें, शिजविणें] पु० १ शिजविलें जें कांहीं तें. २ काढा. ३ संकट, पीडा.

ख

ख मराठी वर्णमालेंतील तेरावा वर्ण आणि व्यंजनमालेंतील दुसरें व्यंजन.

ख [सं०] न० १ आकाश. २ स्वर्ग. ३ इंद्रिय. ४ हृदयाकाश. ५ देहच्छिद्रें (तोंड, कान, डोळे, नाकपुड्या, मूलद्वार, आणि मलद्वार, हीं नऊ). ❀ **खग** पु० १ पक्षी. २ सूर्य. **खगम** पु० १ पक्षी. २ सूर्य. **खगाध्यक्ष, खगेश्वर** पु० गरुड. **खगान्तक** पु० ससाणा. **खगोल** पु० आकाशगोल. **खविद्या** स्त्री० ज्योतिष. **खचर, खेचर** पु० १ पक्षी. २ राक्षस. ३ सूर्य, इ० ग्रह. **खनगर** न० गंधर्वनगर. **खपुष्प** न० अशक्य गोष्ट; (वंध्यापुत्राप्रमाणें).

खंक, खंख [हिं० खंखाह्] वि० १ अकिंचन; भिकारी. २ तिरसट. ३ रानवट स्वभावाचा, क्रूर. ४ चिक्कू, कंजूष. ५ तल्लख (घोडा).

खंकर पु० १ धान्यादिकांच्या पिठाचा पिंड निखाऱ्यांवर भाजावयासाठीं घालावयाचा किं० घातलेला. २ कंकर. ३ खडा. ४ कृपण.

खकाण (-न) वि० १ ओंगळ, घाण, मलिन, भिकार. २ दरिद्री; अकिंचन.

खकाणा (-ना) [फा० खाकानाह्] पु० १ धूळ, मळ (सामानावरील; क्रि० बसणें, उडणें, झाडणें, इ०). २ मिरच्या, शिकेकाई, इ० कुटतांना उठतो तो धुराळा किं० कणसमुदाय,—जो नाकांत जाऊन खोकला, ठसका,इ० उत्पन्न करतो. ३ गदळ सामान; केरकचरा.

खंकारणें अ० क्रि० १ खाकरणें. २ खिंकाळणें (घोड्याचें). स० क्रि० घशांतील कफ काढून तोंडावाटें टाकणें.

खंकाळ (-ळा,-ळ्या) वि० १ तिरसट; त्रासिक; चिडखोर. २ तल्लख (घोडा). [ओरडणें.

खंकाळणें, खिंकाळणें अ० क्रि० (घोड्याचें)

खंक्या, खणक्या वि०दांडगट;धटिंगण;रानवट.

खग वर ' ख ' मध्यें पहा.

खंगणें अ० क्रि० आजार, अतिश्रम, काळजी, इ० मुळें रोडावणें.

खंगर,खंगार पु० १ पक्की भाजलेली वीट किं० कौल. २ योग्य मर्यादेच्या पलीकडे भाजलेली आणि दगडासारखी टणक झालेली(वीट,कौल,इ०).

खंगार वि० १ वार्धक्यानें अशक्त झालेलें (माणूस, जनावर, झाड, इ०).२ नापीक (जमीन). ३ कंगाल किं० भिकार (गांव, देश, इ०).

खंगाळणें, खंगळणें स० क्रि० १ धुतांना चिरगूट पाण्यांत खळबळणें. २ कांहीं भांडें पाण्यांत किं० पाण्यानें विसळणें.

खग्राशा [सं० खग्रास] वि० १ लोकांचें पैसे, माल, इ० घेऊन दडपून ठेवणारा. २ लफंग्या; लोकांचे पैसे बुडविणारा. ३ विषयासक्ततेंत सर्वस्व बुडवून घेणारा. ४ बिलकूल किफायतशीर नसलेला (धंदा, उद्योग, खटपट, इ०).

खग्रास [सं० ख+ग्रास] पु० ग्रहणामध्यें सूर्य किं० चंद्र यांचें अदृश्य होणें किं० छायेनें आच्छादलें जाणें. २ दुसऱ्याच्या पैशाचा किं० मालाचा अपहार. ३ पूर्ण लोप; नायनाट; विध्वंस.

खच [सं० खच्=बांधणें, जडविणें; म० खचणें] पु० १ दाटी; गर्दी. २ झाडावरून खालीं पडलेल्या फुलांचा किं० फळाचा किं० पानांचा सडा, थर, ढीग, किं० रास). ३ संकु-

चित जागेंत पुष्कळ सामानसुमान ठेविल्यामुळें होणारी किं० वाटणारी अडगळ.

खचका पु० तडाका; कचका.

खंचणी स्त्री०खाचणी;दोन फळ्या किं० लाकडें एकांत एक कळाशीनें बसवावीं किं० सांधावीं म्हणून त्या दोन लाकडांचे शेजारीं येणारे भाग एकांत एक मिळणारे करण्यासाठीं जाव देणाऱ्या विंध्या, घड्या, इ० पाडतात त्या.

खचणें [**सं०** खच्=बांधणें, जडविणें] **स०** **क्रि०** १ कांहीं दागिना करतांना हिरे, माणकें, मोतीं, इ० सोन्याच्या वगैरे कोंदणांत कळाशीनें बसविणें किं० जडविणें. २ वेणी, इ० मध्यें फुलें, तुरे, इ० खोवणें.३ बारदानांत पदार्थ ठासून भरणें.

खचणें अ० क्रि० १ कचणें, खालीं बसणें, खालीं चेपला जाणें (पाया, घर, भिंत, इ०). २ (लक्षणेनें) गलितोत्साह होणें, हताश होणें; धीर, उत्साह, किं०उमेद गळून जाणें. ३ रोड होणें, खंगणें (शरीर, इ०). ४ खालीं पडणें, अधः-पतन पावणें. ५ उलथून पडणें (मसलत, इ०). ६ डगमगणें, कचरणें, ०चे हातपाय गळणें. ॐ**खचता पाया पु०** (लक्षणेनें) उत्तरोत्तर जें कमी कमी होत जाणें किं० संपुष्टांत येणें तें (कीर्ति, वैभव, संपत्ति, इ०कांचें).

खचरट वि० किचकट; खडतर; नाठाळ (मार्ग, देश, जमीन, काम, ग्रंथ, इ०). ॐ**खचर-टाण स्त्री०** हगंदारीची घाण.

खचरण स्त्री० १ ताडपत्रावर ज्या अणकुची-दार लोखंडी सळईनें ग्रंथ लिहिले जात असत ती सळई. २ उंच सखल किं० खरबडीत रस्ता किं०वाट.

खचरा पु० १ लाकडावर खोबणी किं०पन्हळी पाडण्याचें सुताराचें एक आऊत किं० हत्यार. २ अशी खोबणी किं० पन्हळी. [पहा.

खचळणें अ० क्रि० वर ' खचणें ' **अ० क्रि०**

खचाटणें स० क्रि० १ खपाखप किं० खचा-खच तोडणें. २ जोरानें किं० दांडगेपणानें (कांहीं काम) करणें. ॐ**खचाटून क्रि० वि०** १ दांड-गाईनें. २ सर्व शक्ति वेचून; जोरानें.

खचित [**सं०** खच्=बांधणें; जडविणें] **वि०** १ गुंफिलेलें; कोंदणांत बसविलेलें. २ ज्यांत रत्नें, मोतीं, इ० बसविलेलीं आहेत असें; उ० रत्न-खचित सिंहासन, मुकुट, इ०.

खचित वि० निश्चित; ठाम; पक्कें; असंदिग्ध. ॐ**खचितार्थ पु०** निश्चित ठरलें जें कांहीं तें; ठाम बेत, मत, निश्चय, किं० निर्णय. **खचिती स्त्री०** निश्चितपणा,पक्केपणा,(ठरावाचा, कराराचा,इ०).

खची, खच्ची, खसी वि० १ तोडलेलें (झाड, फांदी, इ०). २ अंड बडविलेला (बैल, घोडा, इ०).

खंज [**सं०**] **वि०** १ लंगडा. २ लंगडणारा.

खंजन, खंजरीट [**सं०**] **पु०** ताजवा पक्षी.

खजाना, खजिना [**फा०** खजानाइ्] **पु०** १ द्रव्य किं० कोणताही माल ठेवण्याची किं० सांठविण्याची जागा. २ बंदूक, इ०चा कान्या-जवळचा भाग (बाराच्या दारूचा). ३ कारं-जाचें पाणी साठविण्यासाठीं उंचावर बांधलेला हौद किं० ठेविलेलें बारदान. ४ गळ्यांतील पडद-ळ्यास तरवार अडकावण्यासाठीं जें अडकण कर-तात तें. ५ नळांतून पाणी चालत असतां तें उंच चढावें म्हणून बुरजासारखा बांधून करतात तो रचनाविशेष. ६ गरनाळे मारण्याचें यंत्रविशेष. ७ मुलें दिवाळींत ज्या लहानशा लोखंडी उखळींत किं० वाटींत दारू भरून लोखंडी सळईनें ती दारू ठोकतात ती.**खजीनदार** [**फा०**खजानाह्दार]**पु०** कोशाध्यक्ष; ज्याच्या ताब्यांत तिजोरी असते तो अधिकारी.

खजाळ [**म०** खाज] **वि०** १ कुरापती काढणारा; कलहप्रिय. २ खाजाळू; विषयी; प्रखर आहे कामविकार ज्याचा असा.

खजाळी स्त्री० १ कुरापत किं० कुरापत काढण्याचा व्यापार. २ खोडी (दुसऱ्याची काढलेली).

खंजिरी [**फा०** खन्ज्री] **स्त्री०** रेशमाचें कापड रंगविण्याची किं० रेशमाच्या कापडावर वेलबुट्यांचे छाप उठविण्याची कला किं० रीति. २ एक प्रकारचा लहान डफ (वाजविण्याचा).

खंजीर [**अ०** खन्जिर्] **पु०** एक शस्त्रविशेष; कट्यारीसारखें एक सरळ पात्याचें हत्यार.

खजील [**अ०** खजिल्] **वि०** लज्जित; शर-मिंदा; जिरलेला; (**क्रि०** होणें).

खजुरी [**सं०** खर्जूर] **स्त्री०** खारकांचें झाड.

खजुराचें झाड. ॐखजुरी (-रा) दोरा पु० अनेक धागे एकत्र वळून शिवण्याकरतां वगैरे जो मजबूद दोरा करतात तो. खजूरी बोऱ्या पु० १ खजूरीच्या झाडाच्या पातींची चटई. २ (लक्षणेनें आणि वात्रटपणानें) फजीतवाडा; फजीती.

खजूर [सं० खर्जूर] पु० खजुरीचें फल,-जें वाळवून खारका करतात. ॐ**खजूरछडी** स्त्री० एक प्रकारचें रेशमी कापड.

खट [सं० क्षत] न० व्रण.

खट पु० संगीतातील एक रागविशेष.

खट स्त्री० १ मळाचा थर; कीट; (क्रि० पडणें, जमणें). २ जमिनीस दांडू लागेल अशा तऱ्हेनें विटी मारणें; (असें करणें नियमबाह्य आहे,व त्यायोगें डाव जातो).ॐ०ची **खट काढणें** त्याला खूप बडविणें किं० झोडपणें (त्याच्या शरीराचा मळ जणों काय काढणें). **खटीं खापरीं लागणें, जाणें,** किं० **मिळणें** १ आजारामुळें वगैरे काळवंडणें,सुकणें,किं०कळाहीन होणें.२बुडणें (धंदा, संस्था, इ०). ३ पार नष्ट होणें, उडविली जाणें (जिनगी, इ०). ४ रसातळास जाणें, नामशेष होणें (शहर, गांव इ०). **खटीं खापरीं लावणें** किं० **मिळविणें** उधळून टाकणें, बुडविणें (संपत्ति, संस्था, सामानसुमान, इ०).

खट [सं० शठ] वि० खाष्ट, दुष्ट, दुर्जन, वांकड्या मनाचा जो कोणी तो. ॐ**खटकर्म** न० त्रासदायक, कंटाळवाणें, किं० जिकीरीचें काम.

खटकन् (-**कर्**,-**दिशीं**) क्रि० वि० १ खट् असा आवाज होईल अशा तऱ्हेनें; ('वाजणें' याचें वि०). २ खाड्कन्, ताबडतोब, एकदम.

खटका पु० १ वितुष्ट येऊन होतें तें भांडण किं० तंटा किं० बोलाचाली (क्रि० उडणें). २ गायनांतील एक पारिभाषिक शब्द. ३ खट् असा आवाज होऊन बंद होणारा चाप, कळ, इ०.

खटखट स्त्री० कटकट.

खटखट, खटखटां क्रि० वि०खट्, खट्, असा आवाज होईल अशा तऱ्हेनें (दार वाजविणें, ठोठावणें).

खटखटीत वि० १ खडखडीत (वाळलेलें). २ (लक्षणेनें) स्पष्ट,कोणाचीही भीड किं०मुरवत न धरतां केलेलें (भाषण).

खटखटें न० १ पक्ष्यादिकांच्या निवारणार्थ खट् खट् वाजणारें जें काष्ठयंत्र किं० काष्ठसाधन करतात तें. २ (लक्षणेनें) संसारोपयोगी म्ह० संसारशकट चालविण्यास उपयोगी असा जो रोजगार, कामकरी, गुरूं, ढोर, इ० तें.

खटंग न० खाटलें, बाज.

खटगुळ वि०१ खट,खाष्ट, त्रास देणारें, नाठाळ (गुरूं). २ (लक्षणेनें) खचरट (काम, इ०).

खंटणें स० क्रि० खणणें.

खटणें अ० क्रि० १ खुंटणें. २ (लक्षणेनें) अडून तटून बसणें.

खटनट स्त्री० कष्ट, जिकीर, त्रास, यातायात, खस्त (क्रि० काढणें, सोसणें, इ०).

खटनट वि० १ वाईटसाईट; ओंगळसोंगळ; नासकाकुचका. २ दुष्ट, लुच्चा, खट, खाष्ट, बदमाष.

खटपट स्त्री० १ कांहीं एक कार्य करण्याकरतां अनेक प्रकारची जी मेहनत करावी लागते ती, किं० अनेक प्रकारचे उद्योग, प्रयत्न, इ० करावे लागतात ते, किं० भानगडी कराव्या लागतात त्या; कांहीं उद्योग किं० त्याचा व्यापार; (क्रि० करणें,चालविणें);उ० गोदे,तूं काय खटपटींत गुंतली आहेस ? २ कज्जा. ३ जिकीरीचें किं० यातायातीचें काम. ॐ **खटपट करी तो पोट भरी** निरुद्योगी बसून पोट भरत नाहीं; जो उद्योग करतो त्यालाच पोटापाण्याला मिळतें. **खटपट्या, खटपटी** वि० उद्योगी; मेहनती; कांहीं कार्यसिद्ध्यर्थ अनेक प्रकारें झटण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा. **खटपट्या** पु० (विशेष अर्थ) स्वयंपाक्याच्या हाताखालील अवांतर कामें करणारा त्याचा मदतनीस जो ब्राम्हणादि तो.

खटरक (-**ग**) स्त्री० लचांड, लफडें, झेंगट, शुष्ककाष्ट; (अप्रिय माणूस किं०काम या दोहोंसही लावतात).

खटराग स्त्री० १ त्रासदायक, नकोसा, शूळ उठविणारा, असा जो कोणी मनुष्य तो, किं० जें कांहीं काम तें; पीडा; लचांड; लफडें; झेंगट;(क्रि० मागें लागणें, घालविणें, जाणें). 'खटराग' ह्याचेपेक्षा ' खटरक," खटरग, ' हीं दोन रूपें अधिक प्रचलित आहेत.

खटला पु० १ कज्जा, दावा, फिर्याद (०च्या

विरुद्ध खटला भरणें). २ खटल्याचें जें काम तें.

खटलें न० १प्रपंचांत मनुष्याचे मागें जे उद्योग धंदा, बायको, पोरें, इ० अनेक व्याप असतात ते प्रत्येक; उ० अहो, आमच्यामागें सतरा खटलीं, तेव्हां तुमच्याकडे यावयाला बनत नाहीं. २ कांहीं भानगडीचें किं० गुंतागुंतीचें काम किं० व्यापार; उ० कुळकरण्याच्या लिहिण्यांत सतरा खटलीं, म्हणून तें लिहणें कठिण. ३ लफडें; उ० तुमचीं खटलीं मागून आम्हीं काय म्हणून निस्तरावीं ? ४ देणें घेणें इ० व्यवहाराचीं मागील राहिली जी लड-थड ती; खरकटें (लक्षणेनें). ❀ **खटलें ओढणें** प्रपंचाचा भार किं० जबाबदारी अंगावर घेणें किं० पथकरणें किं० निस्तरणें. **खटला तुटणें** एकाद्या माणसाशीं किं०संस्थेशीं असलेला संबंध समाप्त किं० खंडित किं०बंद होणें. **खटलेखोर वि०**अनेक लचांडें किं० लफडीं करण्याचा ज्याचा स्वभाव तो. **खटलेवाईक वि०** ज्याच्या पदरीं किं० शिरावर गांव, शेतें, परिवार, वाड्या, इ०ची जबाबदारी आहे तो; प्रपंचाचा पसारा ज्याच्याभोंवतीं आहे तो.

खटवणी [म० खट (वाईट)+पाणी] **स्त्री०** पाणकट; मीठमसाला कमी प्रमाणांत घात-लेलें आमटी, इ० पेय.

खटवें न० लहान मुलाच्या पायाच्या आंग-ठ्यांत घालतात तें वळें किं० जोडवें पडूं नये इत्यादर्थ त्याच्यापुढें घालतात तें वळें.

खटाई [हिं०] **स्त्री०** १ कडवटपणा. २ कोण-तीही कडू लागणारी वस्तु (मेथ्या, इ०सारखी). ३ आंब्याच्या वाळविलेल्या फोडी किं० खापी.

खटाटोप [हिं०] **पु०** मोठी किं० दांडगी किं० प्रचंड खटपट; मोठ्या प्रमाणावर केलेली किं० चालविलेली तयारी किं० मेहनत; कांहीं कार्य करण्याकरतां साधनांचें आणि सामग्रीचें माजविलें जें अवडंबर तें; जंगी प्रयत्न. ❀ **खटा-टोपो भयंकरः** अंगीं सामर्थ्य किं०अवसान नसून किं० असलें तरी अगदीं थोडेंच असून अवडंबर मात्र मोठें माजवावयाचें ! प्रत्यक्ष क्रिया कांहीं नाहीं, वायफळ वडबड मात्र खूब करावयाची !

खटारणें,खटावणें [म० खाट=तिरडी] **अ० क्रि०** मरणें.

खटारणें [म० खराटा] **स० क्रि०** नासधूस करणें,(गांव, शहर, इ० ची).उध्वस्त करणें.

खटारा पु० १ घर, गाडी, पालखी, इ०चा सांगाडा (सामान, गाद्या, गोंडे, इ० सरंजाम मनांत न घेतां).२जुनें झाल्यामुळें किं०योग्य वेळीं दागदुजी किं० दुरस्ती न केल्यामुळें वापरण्याच्या स्थितींतून गेलेले पदार्थ, किं० ते वाळगण्याची किं० वहिवाटण्याची ताकद राहिली नसल्यामुळें भारभूत वाटत असलेले पदार्थ व्यक्तिशः; उ० मी आतां म्हातारा झालों,ह्या घराचा खटारा मी घेऊन काय करूं?उ०अच्युतरावांच्या मोटारीचा निव्वळ खटारा झाला आहे. ३ बिनटपाची बैलगाडी किं० छकडा.

खटालणें, खटाळणें, खटारणें स० क्रि० १ एखाद्यास ' हूं, कर, ' इ० शब्द बोलून कांहीं काम करण्यास प्रेरित करणें. २ कोणेकास कांहीं कार्य करण्याविषयीं वारंवार आठवण करून प्रेरित करणें.

खटास [हिं०] **स्त्री०** अंबटपणा;अम्लता.

खटीत वि०खटेलली,थकलेली,–बाकी,पैसे,इ०.

खटूं न० १ लहान मुलींचे पायाचे बोटांत घालावयाचें रुप्याचें दुहेरी जें वलय असतें तें. २ जोडवें बोटांत घातलें असतां तें ओघळूं नये म्हणून त्याच्यापुढें जें चांदीचें घट्ट वेढें घातलेलें असतें तें.

खटेली पु० (मालवणाकडे) जमीनदार; शेताचा किं० जमीनीचा मालक.

खट्टा [हिं०] **वि०** १ आंबट (फळ). २ (लक्षणेनें) खट्टू; नाखूष. ३ फिक्कट. ४उतरलेला; स्वादरहित किं० पचपचीत झालेला(आंबा, इ०). ❀ **खट्टाबार पु०** फळादिकांचा दुसरा म्ह० कमी दर्जाचा बार. याच्या उलट ' मिठाबार ' म्ह० पहिला गोड बार.

खट्टा पु०१ कमरेचें हाड;श्रमातिशयामुळें कंबर दुखूं लागली असतां मात्र ह्या शब्दाचा प्रयोग कर-तात; उ०ओझीं वाहून वाहून त्याच्या कमरेचा खट्टा मोकळा किं०ढिला झाला.२जोर, रग,मस्ती;उ०मी त्याचा खट्टा मोडला, जिरवला, मोकळा केला, इ०, किं०हिंवाचा, पडशाचा, इ०चा किं०वाऱ्याचा,इ० चा, खट्टा मोडला, उतरला, ढिला झाला, इ०.

खट्टी [हिं०] **वि०** १ अति अंबट (फळ इ०). २ दुःखी; नाखूष; गलितोत्साह; नाराज झालेला.

खट्टू [**हिं०**] **वि०** १ दुःखी; गलितोत्साह; कष्टी. २ निराश झालेला.

खट्याळ वि० १ खट; नाठाळ. २ कुचेष्टेखोर; दुसऱ्याच्या खोड्या काढण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा मनुष्य.

खट्वा पु० खाट, बाजलें. ॐ**खट्वामरण न०** खाटेवर मरण येणें; हिंदू लोक खट्वामरण निषिद्ध मानतात व म्हणून मरणापूर्वीं मरणासन्न जो कोणी त्यास जमिनीवर निजवितात.

खड स्त्री० १पाऊस पडल्यानंतर गुरांचें तोंडांत जावयाजोगें जें गवत होतें तें.२ गाय,म्हैस,इ०कांस खावयास कडबा, दाणा, पेंड, इ० सांठवून ठेविलेलें असतें तें समुच्चयानें.

खंड [**सं०**] **पु०**१ खंडणी. २ तुकडा; भाग. ३ व्यत्यय; उ० अध्ययनांत खंड पडूं देऊं नको. ४ स्वताचें शेत दुसऱ्यास करावयास जी विशिष्ट रक्कम इ० वेण्याचें ठरवून देतात ती. ५एक काव्यरचनाप्रकार;लहान काव्य. ॐ**खंडें खंडें** किं० **खंड विखंड करून टाकणें** ०चे तुकडे तुकडे करणें; ०च्या खांडोळ्या करणें. **खंडकमाविशी (–वीस) स्त्री०** खंड बसविण्याचा व वसूल करण्याचा हक्क (कधीं कधीं हा हक्क गांवच्या इनामदारास असे). **खंडकरी पु०** ज्यास खंडानें (म्ह०कांहीं ठराविक रकम, इ० वेण्याच्या करारानें) शेत करावयास दिलें तो. **खंडकाम पु०** असुक द्रव्य वेऊन असुक व इतकें काम करीन अशा करारानें करावयास घेतलें जें काम तें. **खंडखोती स्त्री०** इजारा; उक्त द्रव्य मालकास देऊन उत्पन्नावरील नफ्यातोट्यावद्दल पूर्ण जबाबदारी स्वतः पत्करून कांहीं व्यवहार करण्याचा जो करार तो. **खंडगुन्हेगारी स्त्री०** खंड, खंडण्या, दंड, इ० इ० सर्व; उ० त्या राज्यांत उगाच खंडगुन्हेगाऱ्या भराव्या लागतात! त्याला **खंडखुरई स्त्री०**, **खंडदंड पु०** असेही प्रतिशब्द आहेत. **खंडबकरी स्त्री०** जकात, पट्टी, म्हणून चरावयास आलेल्या, किं० घाटावरून विकावयास चालविलेल्या, कळपांतील एक बकरी किं० मेंढी घेतात ती. **खंडमक्ता पु०** इजारा; खंडखोती. **खंडशिंदी स्त्री०** ज्या शिंदीच्या झाडांतून ताडी काढतात त्या झाडावर बसविलेला कर किं० पट्टी.

खडक पु० १ उखीरवांखीर डोंगरी प्रदेश; कातळ. २ खूप मोठा फत्तर. ३ पूर्णपणें वाळलेलें; खडखडीत वाळलेलें (चिरगूट, इ०). ४ (लाक्षणिक प्रयोग) पूर्ण अभाव; साफ नकार; उ० मी त्याच्या घरीं रुपये उसने मागावयाला गेलों होतों पण तेथें खडक लागला. ५ (लाक्षणिक). कंजूष किं० कृपण माणूस; अदत्त. ॐ **खडकावर पेरलें आणि व्यर्थ गेलें** भलत्याच माणसाची प्रार्थना केली असतां ती फुकट जाते. **खडकाशीं घडका घेऊन काय उपयोग** ? समर्थांशीं वैर करूं नये. **खडकावर पोट भरावयाला तो समर्थ आहे** तो स्वावलंबी आहे; साधनसामग्रीची अनुकूलता नसतां तो आपल्या सर्व सोयी स्वताच्या हिमतीनें करून घ्यावयाला समर्थ आहे.

खडक स्त्री० प्रचंड आणि वेड्यावाकड्या आकाराचा फत्तर.

खडकणें अ० क्रि०१ वाळून ताठ आणि टणक होणें (धुतलेलें वस्त्र, वाळलेलें लाकूड, इ०). २ स्तब्ध उभें राहाणें;निश्चल होणें;उ०वाघाची गर्जना कानीं पडतांच वाटसरू जागच्या जागीं खडकले.

खडकत वि० खडकाळ; कातळाचा. **स्त्री०** खडकाळ जमीन किं० प्रदेश.

खडकपात्र न० पुढें ' खड्ग ' मध्यें पहा.

खडकळ [**म०** खडक] **स्त्री०** १ धोंडाळ जमीन किं० प्रदेश. २ अडचणीचें स्थळ. ३ ग्रंथादिकांतील क्लिष्ट किं०दुर्बोध भाग.४पेचाची स्थिति.

खडकळ, खडकाळ [**म०**खडक]**वि०** धोंडाळ.

खडका पु० १ येणाऱ्या माणसाच्या किं० जनावराच्या पावलांचा ध्वनि; चाहूल. २ थोडाच वेळ चाललेलें पण आवेशाचें भांडण; उ० नोकर नेमण्याच्या बाबतींत माझा आणि रामभाऊंचा थोडासा खडका उडाला. ॐ**खडका घेणें** किं० **काढणें** आपल्या जवळ येत असलेल्या माणसाच्या किं० प्राण्याच्या पावलांचा ध्वनि एकाग्रतेनें ऐकणें; त्याची चाहूल घेणें किं० ऐकणें.

खडकावणी स्त्री० एकाद्याची खरडपट्टी काढणें; त्याला रागें भरणें.

खडकावणें स० क्रि० एकाद्याला रागें भरणें. ॐ**खडकावून क्रि०वि०**जोरानें;ठासून; आवेशानें.

खडकाळ (–ळी) वि० जींत खडक पुष्कळ

आहेत अशी (जमीन, प्रदेश, शेत, इ०). **स्त्री०** १ खडक जींत फार अशी जमीन. २ नदींतील खडक.

खंडकी स्त्री० हलक्या किंमतीचें प्राय: तांबड्या रंगाचें कापड.

खडकील, खडकूत, खडकूळ [**म०** खडक] **वि०** धोंडाळ (प्रदेश).

खडकूत पु० गुरांच्या खुरांस होतो तो एक रोगविशेष; खुरकूत.

खडक्या वि० दुसऱ्याशीं बोलण्यांत भीड मर्यादा न राखणारा; साफ, न कचरतां, आणि स्पष्टपणें आपले विचार बोलून दाखविणारा.

खडखडणें अ० क्रि० खड्खड् अशा आवाजानें युक्त होणें. ॐ**खडखडून क्रि० वि०** जोरानें; आवेशानें.

खडखडाविणें, खडखडावणें स० क्रि० १ एकाद्याची खरडपट्टी काढणें. २ खडखड वाजविणें.

खडखडाट पु० १ पुष्कळ वेळ होत असलेला खडखड असा आवाज. २ पूर्ण अभाव; उ० आमच्या विहिरींत हल्लीं पाण्याचा खडखडाट झाला आहे.

खडखडीत वि० १ पूर्णपणें वाळलेलें (लाकूड, चिरगूट, इ०). २ स्पष्ट; भीड मर्यादा न ठेवणारें (वर्तन, भाषण, ताकीद, हुकूम). ३ पूर्णपणें आरोग्याचा उपभोग घेत असलेला; अगदीं निकोप प्रकृतीचा. ४ आजारांतून पूर्णपणें बरा झालेला.

खडंग क्रि० वि० पूर्णपणें (वाळलेलें किंo [ताठलेलें).

खडगळ, खडगूळ वि० १ खडकाळ. २ त्रासदायक; कष्टकर. ३ खोडकर, नाठाळ (गाय, म्हैस, पोर, इ०). ४ द्वाड, उद्दाम.

खडंजा पु० भिंतीमध्यें शोभेसाठीं उभ्या विटांचा जो थर रचतात तो.

खडण वि० १ द्वाड. २ नाठाळ (गाय, इ०). ३ त्रासदायक; कवितेंत 'खडीण' असेंही रूप आढळतें. ॐ**खडण गुरा दूध बहु** दूध काढतांना जी गाय किं० म्हैस फार त्रास देते ती (कधीं कधीं) पुष्कळ दूध देणारी असते; द्वाड आणि कडक यजमानाच्या हातून आपलें पुष्कळ कल्याण होऊं शकतें.

खंडण न०, खंडणा स्त्री० [**सं०** खंड्=मोडणें] १ तोडणें; फाडणें; फोडणें. २ प्रतिपक्ष्याच्या विधानाचें निराकरण; एकाद्या मतांतील चुकी दाखवून देणें.

खंडणी स्त्री० १ मांडलिक राजा सम्राटाला ठराविक प्रकारें देतो ती द्रव्याची रकम. २ शेजारच्या स्वतंत्र राजानें आपणाशीं मित्रत्वाच्या संबंधानें वागावें म्हणून त्याला दिलेली द्रव्याची रकम किं० दिलेला धान्यादिकांचा किं० शस्त्रास्त्रांचा सांठा. ३ पराभविलेल्या राजापासून घेतलेली द्रव्याची रकम किं० घेतलेला अन्य प्रकारचा माल. ५ राजानें रयतेवर बसविलेला दंड. ६ जमीनीच्या कसणारानें मालकाला दिलेलें धान्य किं० पैसा.

खंडणूक स्त्री० १ इजारा. २ कामाचा दिलेला किं० घेतलेला मक्ता. ३ मक्त्याचा केलेला ठराव. ४ शर्ती, किंमत, इ०संबंधाचा ठराव.

खंडणें, खडणें [**सं०** खंड्=तोडणें] **अ० क्रि०** वृक्षाचीं पानें गळून पडणें; वृक्षानें पर्णरहित होणें; उ० हें वेलाचें झाड आतां अगदीं खंडलें.

खंडणें [**सं०** खंड्=तोडणें]**स० क्रि०** १तोडणें, मोडणें. २ प्रतिपक्ष्यांचीं विधानें, मतें, इ०चें निराकरण करणें. ३कांहीं शर्तींवर एकाद्या कामाचा मक्ता घेणें किं० देणें. ४ विकत घ्यावयाच्या किं० द्यावयाच्या मालाची किंमत ठरविणें. ॐ**खंडलें तुटलें करणें** संबंध तोडणें; फारखत करणें.

खडतर वि० १ काठिण, त्रासदायक (काम). २ उग्र (तप, व्रत, इ०). ३ आपत्ति किं० संकट आणणारें किं० भोगविणारें (दैव, नशीब, इ०). ४ द्वाड, वात्रट, उपद्रवकारक (माणूस). ५ जलाल, झोंबरें (औषध इ०). ६ तिरसट स्वभावाचा. ७ हेकट. ॐ **खडतर बीज न०** १ द्वाड माणूस. २ दुष्ट किं० बदमाष कुटुंबांतील माणूस. ३ हीन जातकुळीचा. **खडतर वेळ स्त्री०** ज्या वेळीं आरंभिलेल्या कार्यांत अनेक विघ्नें येतात ती वेळ. **खडतर शब्द पु०**अंत:करणाला घरे पाडील असें भाषण. **खडतर साल न०** दुष्काळ, महामारी, टोळधाड, युद्ध, इ० कारणांमुळें दु:खमय वर्ष. **खडतर हत्यार न०** १ जें हत्यार खुपसून बाहेर काढल्यावर मांस बरोबर ओढून आणतें तें. २ बागनीट.

खडतर न०माडाची जुनी किं० जीर्ण झाप किं० झांवळी.

खडतरणें अ० **क्रि**० १ खड्खड् असा आवाज करीत जाणें किं० चालणें,– (उ०खडकाळ जमीनीवरून चालणारी गाडी). २ बाण, दगड, इ० एकाद्या पदार्थावर जाऊन आदळणें किं० आपटणें. ३ खडतर किं०खचरट होणें.

खंडन [**सं**० खंड्=तोडणें, मोडणें] **न**० १ मोडणें, तोडणें, फोडणें. २ ०च्या चिंधड्या उडविणें; ०चे तुकडे तुकडे करणें. ३ प्रतिबद्ध करणें; कुंठित करणें. ४ प्रतिपक्ष्याच्या मताचें किं० विधानाचें किं० कोटीचें निरसन करणें. ॐ**खंडनमंडन न**० १ कांहीं भागाचें खंडन आणि कांहीं भागाचें मंडन. २ एकाद्या विषयाची साधक बाधक प्रमाणें विचारांत घेऊन केलेली चर्चा.

खडप पु० १ खडक. २ खडकाळ किं० धोंडाळ जमीन किं० प्रदेश. ३ पोळ्यांची किं० भाकऱ्यांची किं० चळत. ४ खरकट्या भांड्यांची रास. ५: जमीनींतून डाळींचीं रोपडीं उपटून तीं गोळा करून केलेली रास.

खडपा पु० १ खडक. २ डोंगराचा सूळ.

खडबड स्त्री० खड् खड् असा आवाज. २ कचाकचीचें भांडण. ३ अडगळ;निरुपयोगी सामानाचा ढीग. ४ उंटिंगळ किं० धोंडाळ जमीन किं० प्रदेश.५गडबड, गोंगाट. ॐ **खडबड खुंटा पु**० बारदानांत वस्तूचा पूर्ण अभाव(विहिरींत पाण्याचा, कणगींत धान्याचा, पेटींत पैशाचा, इ०).

खडबडणें अ० **क्रि**० १ खड्बड् किं० खड्खड् असा आवाज करणें.२ गोंधळणें; घोट्याळ्यांत पडणें. ३ घाबरून जाणें.ॐ**खडबडून क्रि०वि**०१ धक्कयानें. २घाबरून. ३एकाएकीं.४ भयग्रस्त अशा स्थितींत.

खडबडाट पु० मोठा आवाज.

खडबडीत वि० उखीरवाखीर; उंचसखल.

खडवण न० १ माळरान; खडकाळ प्रदेश. २ उंच आणि खडकाळ चढण किं० चढाव.

खडव, खडाव स्त्री० लाकडाची पादुका (एका लाकडाच्या फळीला अंगठ्यासाठीं खुंटी बसविलेली असते. ती खुंटी पायाचा अंगठा आणि त्याच्या जवळचें बोट यांत धरून त्या फळीवर पाऊल ठेवून चालतात).

खडवा पु० पर्वत.

खडविणें स० **क्रि**० जूं वहावयाला किं०नांगर ओढावयाला बैल शिकवून तयार करणें.

खडवें न० नागमोडीची डोंगरी वाट.

खडशिंग स्त्री०तांबूस इमारती लाकूड ज्यापासून मिळतें तो वृक्ष. **खडशिंग न**०त्या झाडाचें फळ.

खडस, खडसा वि० धट्टाकट्टा; मजबूत शरीराचा; वार्द्धक्यांतही ज्याची ताकद पूर्वीप्रमाणें टिकून राहिली आहे असा.

खडस स्त्री०एकाद्याचा नक्षा उतरणें किं०बोऱ्या उडविणें, किं० फजीती करणें. ॐ**खडसपट्टी स्त्री**० फजीती; बोऱ्या. [काढणें).

खडसणी स्त्री० खरडपट्टी; बोऱ्या; (**क्रि**०

खडसणें स० **क्रि**० १ तोडणें, छाटणें (झाडाच्या फांद्या, इ०). २ एकाद्याची खरडपट्टी काढणें; त्याला रागें भरणें. ३ एकाद्याला निक्षून ताकीद देणें; बजावणें. ॐ **खडसून हडसून क्रि**० **वि**० १ जोरानें. २ आग्रहपूर्वक. ३ संशय न राहील अशा प्रकारें. ' हडसून खडसून ' हें रूप अधिक प्रचारांत आहे.

खडसा पु० नांगरखुंट.

खडसावणें स० **क्रि**० १ रागें भरणें.२ताकीद देणें; बजावणें. ३ तंबी भरणें.

खंडळमंडळ [**सं**० खंड=तुकडा] **क्रि०वि**० १ थांबून थांबून; थांबत थांबत. २ अंशतः इकडे आणि अंशतः तिकडे; अर्धेमधें. ३ संदिग्ध रीतीनें; मोघमपणें.

खंडळ मंडळ[**सं**० खंड=तुकडा] **स्त्री**०, **न**० १थांबत थांबत होण्याची,घडण्याची,किं०करण्याची रीति किं० खंडाखंडानें करण्याचा प्रकार. २ संदिग्धपणा किं० सरणी, (भाषणादिकांतील). ३ चढउतार; कमजास्तीपणा.

खडा पु० १ दगडाचा बारीक तुकडा. २ लहानसर म्ह० साधारण बोरा एवढा वाटोळा दगड. ३लहानसर मातीचा,साखरेचा,गुळाचा,काताचा, हिंगाचा, इ०चा शकल. ४ हिरा, माणीक, पांच, इ० मूल्यवान् पदार्थ व्यक्तिशः. ५ गुळाची लहानसर ढेप. ६ छत्रीप्रमाणें ज्याचा उपयोग शेतकरी करतात तें पातीचें जें वाटोळें तबक त्याला लाविलेल्या काड्या किं० कामट्या व्यक्तिशः.

७ कोठा साफ नसल्याकारणानें गुदद्वारें मळ मऊ रूपानें बाहेर न पडतां टणक गोळ्यांच्या रूपानें कुंथून नेटानें बाहेर घालवावा लागतो; ह्या विकृतीस 'खडा होणें' असें म्हणतात. ८ चिलमीमध्यें तंबाखू घालावयाच्या अगोदर उभ्या नळीच्या भोकावर ठेवितात तो लहानसा दगड. **एकाद्याचा खडा उडणें** १ आजार इ० नीं तो अगदीं जर्जर होणें. २ कामानें तो अगदीं दमून आणि श्रमून जाणें. **खडा टाकून ठाव घेणें** (पाण्याची खोली आजमावण्यासाठीं पाण्यांत खडा टाकतात ह्यावरून) चातुर्यानें पण दिसण्यांत सहजगत्या एकादा प्रश्न विचारून किं० एकादें विधान करून दुसरा मनुष्य त्यावर काय बोलतो हें पाहून त्याचा विचार तर्किणें; एकाद्याच्या विचाराचा किं० मताचा खुबीनें आजमास पाहणें. **खडा फुटणें** ज्या दगडावर पहारीचें टोक आदळून तेथील कळपा निखळून पाण्याचा झरा खणिल्या जात असलेल्या विहिरींत वाहूं लागतो तो दगड फुटणें; उ० विहीर दहा पुरुष आपण खोल खणली पण अद्यापि खडा फुटला नाहीं (म्ह० झरा लागला नाहीं). **खडे खाणें** त्रासदायक काम एकसारखें करीत राहणें (फलाशा किं० लाभाशा नसतां किं० अत्यंत नाखुषीनें). **एकाद्याला खडे चारणें** (किं० खावविणें) १ त्याचे फार फार हाल करणें. २ त्याला धुळीस मिळविणें; त्याचा सत्यानाश करणें. **एकाद्याच्या नांवानें खडे फोडणें** (किं० **खडे घासणें**) त्याच्या माथ्यावर दोष लादणें; त्यानें आपलें काम बिघडविलें किं० त्यानें आपलें नुकसान केलें म्हणून त्याच्यावर चरफडणें. **एकाद्याचें खड्या खड्यांनीं डोकें फुटणें** एकावर एक अगणित लहान लहान संकटें येऊन किं० त्यांचीं लहान लहान प्रमाणांत नुकसानें होऊन त्याचें दिवाळें निघणें किं० त्याचा सत्यानाश होणें किं० तो ठार बुडणें; संकटें अगदीं क्षुल्लक असलीं तरी तीं एकाद्यावर पुष्कळ गुदरलीं असतां तो चिरडून जातो. **खड्यांनीं एकाद्याचें डोकें फोडणें** कोणी गायीवर धोंडा मारल्यावर ती जर कर्मधर्मसंयोगानें मेली तर त्या माणसाचें पाप निरस्त करण्यासाठीं त्याच्या डोक्यावर त्याचे आप्त, इष्ट मित्र, सोयरे, खडे मारतात (अर्थात् अगदीं लहान खडे ओाण सौम्य हातानें); ह्या विधीला "त्याचें डोकें फोडणें" असें म्हणतात. **खड्यासारखा निवडणें** रद्दी म्हणून काढून टाकणें; मोठ्या समूहांत एकादा वाईट पदार्थ नजरचुकीनें मिसळला असल्यास त्याला झटदिशी निवडून किं० हुडकून काढून बाजूला सारणें किं० टाकून देणें; उ० त्या गांजेकसांत मी खड्यासारखा निवडून पडलों (धान्यांतील खडे निवडून काढून फेकून दिले जातात). **खडा नू खडा माहिती** पूर्ण माहिती. (एकाद्या विशिष्ट क्षेत्रफळांतील सर्व खडे ज्याला माहीत आहेत तो त्या क्षेत्रफळाचा पूर्ण माहितगार असलाच पाहिजे). **खडाळ** खालीं यथास्थानीं पहा.

खंडा पु० एक प्रकारची तरवार; ती सरळ असून तिला दोन्ही बाजूंनीं धार असते.

खडा [हिं०] वि० १ उभा; उभा असलेला. २ साततिक; टिकून राहणारा; सततचा; उ० त्याच्या दारावर चोवीस तास खडा पाहरा असतो. ३ समाप्त न केलेला; बंद न केलेला; चालू; उ० खडा जमाखर्च, हिशेब, तपशील, यादी, इ०. **खडी हुंडी स्त्री०** अद्यापि वटाविली नाहीं किं० नाकारलीही नाहीं ती हुंडी. **खडा जंगी स्त्री०** (न बसतां म्हणजे सतत उभें राहून केलेलें युद्ध) जोराचा किं० कडाक्याचा वाद. **खडाघाट पु०** १ फार कठिण अशी चढण; बहुतेक लंबरूप चढ. २ अद्यापि पूर्ण झाला नाहीं असा पदार्थ,—दगडाची मूर्ति, सोनार करीत असलेला कांहीं दागिना, भांडें, इ०.

खडागुंडा पु० रत्न.

खडाचढ स्त्री० १ पानथरी. २ पोटांत मळ टणक होतो आणि त्याचें गुदावाटें विसर्जन वेदनामय असतें तो रोग.

खडाडणें अ० क्रि० खड् खड् असा आवाज करणें; उ० मघापासून तें दार खडाडत आहे; त्याला कडी लाव.

खडाण वि० १ तल्लख, तत्पर. २ खोडकर; उपद्रवकारक (कोणी जनावर, पोर, इ०).

खडाव स्त्री० लाकडाचा ज्याला अंगठा आहे असें पादत्राण. 'खडावा' स्त्री० अ० व० चें रूप

'खडावा' हेंही ए० व० रूप म्हणून वापरलें जातें.

खडाष्टक [सं० षष्+अष्टन् (सहा आणि आठ)] न० वैर; शत्रुत्व. एका माणसाच्या राशीपासून दुसऱ्याची रास सहावी, व दुसऱ्याच्या राशीपासून पहिल्याची रास आठवी, अशी असली म्हणजे "त्या दोघांत खडाष्टक आहे," असें म्हणतात. हें खडाष्टक 'प्रीति खडाष्टक' आणि 'वैर खडाष्टक' असें दोन प्रकारचें असतें. परंतु व्यवहारांत 'त्या दोघांत खडाष्टक आहे' ह्याचा अर्थ 'त्या दोघांत वैर आहे' असा घेण्यांत येतो. 'खडाष्टक' ह्याचे ऐवजीं 'षडाष्टक' असेंही रूप त्याच अर्थानें उपयोजिलें जातें.

खडाळ [म० खडा] वि० खड्यांनीं व्याप्त; धोंडाळ. ॐ**शेत खडाळ,बायको तोंडाळ** ज्याच्या शेतांत धोंडे फार आणि ज्याची बायको भांडखोर तो मनुष्य दुःखी.

खंडाळणें [सं० खंड; म० खंड] अ० क्रि० मधून निघून किं० उठून जाणें किं० नसणें,—जेणेंकरून मध्यें खिंड पडते. स० क्रि० एकाद्या वस्तूच्या मधला भाग काढून घेणें,—जेणेंकरून त्या वस्तूंत मध्यें खिंड पडते; उ० तुझ्या लंगोटीसाठीं हें फडकें खंडाळूं नको; मी तुला दुसऱ्या कापडाचा तुकडा देईन.

खंडाळी स्त्री० १ उपद्रव, सतावणूक, चिडवणूक, गांजणूक; उ० ते उगीच माझी खंडाळी करतात. २ एकाद्याचे दोष प्रकट करून किं० त्याची कुरापत काढून त्याला उपद्रव देणें; उ० कोणाची खंडाळी काढणें हें तुला शोभत नाहीं. 'खंडाळी' ह्या शब्दाचें अन्य रूप 'खवंडळी' किं० 'खवंडाळी' असें आहे.

खंडाळें न० चोळखण करावयाचें वस्त्र.

खडिंजा पु० भिंतीच्या रचाईत उभ्या विटांचा एक थर घालतात तो (क्रि० देणें, लावणें).

खंडित [सं० खंड्=मोडणें, फोडणें, तोडणें] वि० १ तोडलेल. २ बंद पडलेलें. ३ अर्धवटच राहून गेलेलें. ४ नष्ट झालेलें. ५ निराकृत केलेलें. ६ खोटें किं० निराधार म्हणून दाखवून दिलेलें. ७ खंडानें दिलेलें किं० घेतलेलें. ८ मक्तयानें ठरवून दिलेलें किं० घेतलेलें.

खंडिता [सं०] स्त्री० पतीचें अखंडित प्रेम नसल्यामुळें रागावलेली स्त्री.

खडी स्त्री० १ बारीक खड्यांचा समुदाय. २ एक प्रकारचा पिठूळ दगड,—ज्याचा लेप धूळपाटीवर करतात, किं० ज्याची भुकटी पाण्यांत घालून भिंतींना पांढरा रंग देतात. ३ वस्त्रावर फुलें, वेलबुट्टी, इ० काढण्यासाठीं जो पांढरा किं० अन्य रंगाचा चकचकीत लेप करतात तो, किं० त्या लेपानें वस्त्रावर काढलेल्या आकृति. ४ रस्ता करतांना दगडाचे जे अणकोचीदार तुकडे फोडून वापरतात ते समुच्चयानें. ५ एकाद्या माणसाचा आजार भूत, पिशाच, इ०नीं पछाडल्या कारणानें आला आहे कीं काय हें पाहाण्यासाठीं हाताच्या मुठींत न मोजतां तांदूळ, गहूं, किं० खडे घेऊन प्रश्न विचारतात, आणि नंतर एकीबेकीच्या सरणीनें ते खडे मोजतात आणि त्यावरून प्रश्नाचें उत्तर ठरवितात; ह्या विधीला 'खडी' म्हणतात. ६ घाटाखालीं आसमंतांत भागीं कोश दोन कोश रुंदीचा जो जमीनीचा पट्टा असतो तो. ७ मुंगसासारखा केसाळ पण लहान एक क्षुद्र जंतु आहे तो; ह्या खडीच्या शेपटीच्या केशांच्या कुंचल्या रंग देण्याच्या कामीं योजल्या जातात. ८ लहानसर टेकडी; टेकाड.

खंडी स्त्री० १ कांहीं विशिष्ट वजनाचें किं० परिमाणाचें माप; हें माप भिन्न भिन्न प्रांतीं भिन्न भिन्न असतें तसें तें भिन्न पदार्थासंबंधानें भिन्न असतें; वीस मणांची खंडी पुणें प्रांतांत आहे. २ मोठी संख्या; पुष्कळ परिमाण; उ० अहो गोजराबाई, तुमचीं खंडीभर पोरें मी कुठें संभाळीत बसूं? तुम्ही तीं आपल्याबरोबर घेऊन जा; उ० मला सासरीं खंडीभर काम ओढावें लागतें! मला तुमच्या लुगड्यावर कशीदा काढावयाला वेळ कसा मिळणार ? उ० उगीच खंडीभर बोलतोस कशाला? ३ वीस ही संख्या(शेळ्या,मेंढ्या, इ०च्या मोजदादींत). ४ एकशेवीस बिघ्यांचें क्षेत्रफळ. ॐ**एकाद्यावर खंडी लावणें** त्याला फसविणें. **खंडीस नवटकें** शेराच्या आठव्या भागाला 'नवटकें' म्हणतात. खंडीच्या मानानें नवटकें अत्यंत लहान होय; पाहिजे आहे त्याच्या पेक्षा हें अत्यंत कमी आहे अशा अर्थानें 'खंडीस नवटकें,' हा वाक्प्रचार

योजतात; उ० तुझ्या दहा रुपयांच्या देणगीनें ह्या दुष्काळग्रस्तांना काय खंडीस नवटकें होणार ?

खंडोगणती वि०,क्रि वि० पुष्कळ; उ०येथें उडदू भाषा बोलणारे खंडोगणती लोक तुम्हाला आढळतील.

खडुळणें स० क्रि० पाणी वगैरे पदार्थ ढवळून गढूळ करणें. **अ० क्रि०** डोळे आरक्त होणें.

खडुलें न० गढूळ पाणी.

खडूवा पु० पर्वत.

खडू वि० गढूळ.

खडू पु० शाडू; एक प्रकारची पांढरी माती.

खडू पु०, स्त्री० लाकूड, दगड, इ०कांतून कांहीं पदार्थ बनवावयाचा असतां हत्यारानें न छाटून किं० न तोडून जो भाग राखतात तो,– हा राखलेला भाग अर्थात् उंचवट्याच्या रूपाचा असून तो कांहीं सोयीसाठीं किं० शोभेसाठीं राखलेला असतो; बैलाच्या मानेवर जें लाकडाचें जूं असतें त्याला असे उंचवटे राखलेले असतात.

खडू वि० ज्याला वरच्या ओठावर केश नाहींत किं० हनुवटीवर केश नाहींत असा (पुरुष); बिनमिशांचा (पुरुष); बिन-दाढीचा (पुरुष).

खडू, खडूळ स्त्री० मुंगसासारखा केसाळ पण त्याचेहून पुष्कळच लहान असा एक प्राणी;त्याच्या शेपटीच्या केशांच्या चितारी,लोक कुंचल्या करतात.

खडूळ वि० गढूळ, चिखलट (पाणी).

खडे स्त्री०कागदच्या बंदाला घड्या घालून पाड-लेल्या चार रकान्यांपैकीं उजव्या हाताकडच्या तीन रकान्यांवर काढलेली रेघ (कारकुनांच्या भाषेंत).

खडे कंकर पु० अ० व० हिरे,माणकें, पांच, पुष्कराग, इ० जीं मूल्यवान् रत्नें तीं समुच्चयानें किं० व्यक्तिशः.

खडे घाट पु० १नदीकांठीं चिरगुटें जेथें धुतात किं० वाळवितात ती जागा. २ पदार्थाचा प्रथम बनविलेला कच्चा किं० ठोकळ रूपाचा आकार. ३ धुऊन स्वच्छ केलेल्या चिरगुटाचा तजेलेदार देखावा; उ० गोविंदपंताचा नेहेमीं खडेघाट असतो (म्ह० तो नेहेमीं परीटघडीचे किं० घरीं धुतलेले स्वच्छ कपडे वापरतो). **॥खडया घाटाचा** वच्छ; तजेलेदार.

खडेफोड वि० कठिण; त्रासदायक; कष्टकर (काम, उद्योग, खटपट, इ०).

खडेबंद पु० कच्चा खरडा.

खंडेराव [सं० खड्ग=तरवार; राव=बहुमाना-र्थक प्रत्यय] पु० १ शंकराचा एक अवतार. २ जो स्वता असमर्थ आणि नादान आहे परंतु दुस-ऱ्याच्या चिथावणीनें कांहीं बिकट कार्य करावयाला प्रवृत्त झाला आहे तो. **॥एखाद्याला खंडेराव करणें** त्याला कांहीं काम करावयाला भर देऊन प्रवृत्त करणें (तो नाखूष असतां).

खडोखड,खडोखडीं क्रि०वि०१जेथल्या तेथें. २ जेव्हांच्या तेव्हां. ३ तावडतोब; तडकाफडकीं.

खंडोबा पु० जेजुरी येथील प्रसिद्ध देवता. **॥सोळा (किं० अठरा) गुणांचा खंडोबा पु०** १ खोडकर पोर. २ ज्याला अनेक आजार होतात किं० झाले आहेत तो. **खंडोबाचा कुत्रा पु०** खंडोबाचे भक्त जे वाघ्ये ते प्रत्येक. **खंडोबाची काठी स्त्री०** तांबड्या आणि निळ्या वस्त्रानें लपेट-लेली आणि मोराच्या पिसाऱ्याच्या तुऱ्यानें टोकाला शोभविलेली अशी काठी; ही काठी खंडोबाच्या देवळांत ठेविलेली असते आणि ती मिरवणुकीच्या प्रसंगीं बरोबर घेतली जाते.

खड्ग [सं०] पु० १ तरवार. २ गेंडा. ३ गेंड्याचें शिंग. **॥खड्गपात्र न०** गव्याचें शिंग किं० हाड किं० त्यांचें केलेलें पात्र, इ०. **खड्ग-कोश,खड्गाधार पु०, खड्गपिधान न०** तरवारीचें म्यान. **खड्गधेनु स्त्री०** सुरी. **खड्गपुत्रिका स्त्री०** १ सुरी. २ कट्यार. **खड्गफल न०** तरवारीचें पातें. **खडकपात्र [सं० खड्ग=गेंडा; पात्र=भांडें] न०** तांबें किं० पितळ यांच्या पाटल्या घडवून त्यांवर सोन्याचा पत्रा सफाईनें बसवून सोन्याच्या अशा दिसणाऱ्या पाटल्या गरीब स्त्रिया हातांत घालतात, त्यांना ‘ खडक पात्रें ’ म्हणतात. **खड्ग-पात्री वि०** खड्गाच्या शिंगाचें किं० हाडाचें बन-विलेलें; उ० ही तपकिरीची डबी खड्गपात्री आहे.

खड्डा पु० खाच; ओबड धोबड खोलगट जागा किं० जमीन.

खंडया पु० मासांवर उपजीविका करणारा आणि चटकदार पिसाऱ्याचा एक पक्षिविशेष.

खडया पु० एक मत्स्याविशेष.

खड्या नाग पु० वचनागासारखी एक वनस्पति.

खड्या वाघ पु० लहान आकाराचा एका विशेष जातीचा वाघ. [त्रात्य; खट्या:.

खड्याळ [म० खोड] **वि०** खोडकर;

खण पु० १ घराच्या बांधणींत दोन खांबांमध्यें जें अंतर ठेविलेलें असते तें; दोन खांबांतील जागा किं० अवकाश. २ होडीमध्यें बसावयासाठीं ज्या फळ्या असतात त्यांच्यांपैकीं दोन फळ्यांमधील अंतर. ३ पेटी, संदूक, इ० बारदानांत ठेवावयाच्या वस्तूंपैकीं ज्या लहान किं० बारीक वस्तु असतात त्या ठेवावयासाठीं जे लहान लहान कप्पे केलेले असतात ते प्रत्येक. ४ संक्रांतीचे दिवशीं स्त्रियांत वाटण्यासाठीं जीं पांच सुगडें [सुघट] घेतात तीं समुच्चयानें. ५ इमारतीचा एक मजला (पहिला, दुसरा, तिसरा, इ०). ६ एकोणीस तसू लांबीचा चोळी शिवण्याच्या कामाचा वस्त्राचा तुकडा. ॐ**खणाळें न०** चोळखण करावयासाठीं विणलेलें वस्त्र,–ह्याच्या विणींत दोन खणांच्यामध्यें कापावयासाठीं न विणतां कांहीं जागा रिकामी सोडलेली असते. खणाळ्याला ' खंडाळें ' असाही शब्द आहे.

खणकत [म० कुळ+कथा] **स्त्री०** १ आपल्या कुटुंबांतील कोणा पूर्वजासंबंधानें चालत आलेली दंतकथा. २ स्वताच्या कांहीं कर्तबगारीची गोष्ट.

खणका पु० १ रट्टा, तडाका, धपाटा. २ खण् असा आवाज. ३ आवेशाचें भांडण; खडाजंगी. ४ खणखणाट; गर्जना. ॐ**खणका दणका पु०** कडाक्याचें भांडण; खडाजंगी.

खणकाविणें स० क्रि० १ दरडावणें; रागें भरणें; एकाद्यावर ताशेरा झाडणें. २ एकाद्याला तंभी भरणें किं०त्याला सक्त ताकीद देणें.

खणकी स्त्री० हलक्या दर्जाचें कापड.

खणकुदळ [म० खणणें+कुदळ] **स्त्री०** १ एकाद्याला त्रास येईल इतक्या नेटानें त्याच्यापाशीं काहीं मागणी करणें; कांहीं वस्तु एकसारखी मागत राहाणें; एकाद्या वस्तूसाठीं एकाद्याच्या पाठीस लागणें; उ० कालपासून जिनगरी बाहुलीसाठीं गंगीनें माझी खणकुदळ घेतली आहे. २ एकाद्या कामीं नेटाचा प्रयत्न करणें; त्याच्यासाठीं अविश्रांत खटपटणें; उ० आज सहा महिने त्यानें फलज्योतिषाची खणकुदळ घेतली आहे.

खणक्या वि० १ दांडगेश्वर, धटिंगण. २ नेटदार; तल्लख. ३ उत्साही.

खणखणणें अ० क्रि० खणखण असा आवाज होणें किं० करणें; उ० त्या सराफाच्या दुकानांत सकाळपासून संध्याकाळपर्यंत रुपये खणखणत असतात.

खणखणीत वि० १ रोखठोक; स्पष्ट शब्दात्मक (जबाब, इ०). २ पिचका नव्हे तो, ठणठणीत (आवाज). ३ निकोप (प्रकृति,शरीर,इ०).

खणणें [सं० खन्=खणणें] **स० क्रि०** १ पहार, कुदळ, इ० साधनांनीं जमीन उकरणें किं० अशी उकरून आंतील माती सईल करणें, किं० आंतील माती बाहेर काढून तेथें खड्डा उत्पन्न करणें. २ क्षारादिकांच्या योगानें धातूचा किं० त्वचेचा पृष्ठभाग नाहींसा करणें. ॐ**खणून काढणें** १ जबरदस्तीनें एकाद्यापासून द्रव्यादि काढणें; उ० गोविंदपंतांनीं एक नवें वाचनमंदिर रास्त्याच्या पेठेंत स्थापिलें आहे, त्याच्यासाठीं त्यांनीं मजजवळून दहा रुपये खणून काढले. २ कारण किं० निमित्त नसतां रडें काढणें(हट्टी मुलें असें करतात). ३ गोड गोड बोलून आणि पोटांत शिरून एकाद्या माणसाचीं रहस्यें जाणून घेणें. **खणखणून क्रि० वि०**जोरानें (वांति होणें, इ०).

खणती [म० खणणें] **स्त्री०** १ खणण्याचा व्यापार. २ जुलूम जबरदस्तीनें पैसे लुटणें; उ०होळकरानें पुणें शहराला खणती लावून बाराशे कोट रुपये नेले. ३ क्षत, जखम, इ० खोल खोल चरत जाण्याची क्रिया; उ० तुमच्या लेपानें जखम बरी होणें बाजूलाच राहून उ:ट त्यानें खणती लाविली आहे. ४ एकाद्याला केलेला पराकाष्ठेचा आग्रह किं० घातलेली गळ; उ० पैशासाठीं अशी माझी खणती घेऊं लागलास तर मी तुला कांहींच देणार नाहीं, मी तुला पांच रुपये स्वसंतोषानें देत आहें ते मुकाट्यानें घेऊन जा. ५ एकाद्या विषयाची पिच्छा पुरविणें; उ० त्यानें सकाळपासून इतिहासाची खणती घेतली आहे.

खणतें, खणतोड न० जमीनींत किं० भिंतींत

भोंकें पाडण्याचें एक हत्यार; खुंटाळी.

खणपट [**म०** खणणें] **स्त्री०** हें काम केल्याशिवाय मी सोडणार नाहीं अशा मनोनिग्रहानें त्या कामीं झटणें; उ० त्यानें खणपट घेतली तेव्हां रामभाऊ डोक्यावर पागोटें ठेऊन घराच्या बाहेर पडला. ॐ**एकाद्याच्या खणपटीस बसणें** त्यानें आपलें म्हणणें कबूल करावें किं० आपली मागणी पुरवावी म्हणून त्याला एकसारखी गळ घालीत बसणें; उ० आवडी माझ्या खणपटीसच बसली तेव्हां तिला ही इरकली साडी आणून देणें मला भाग पडलें.

खणपेंट [**म०** खणणें] **न०** १ जमीनींतून डिखळें बाहेर काढण्याचें आउत. २ओल्या किं० ओलविलेल्या जमीनीचे पोपडे खरवडून काढण्याचें एक आउत.

खणपुट न० १ धसकट (लाकडाचें, लोखंडाच्या तासाचें, इ०). २ अणकुचीदार टोंक किं० डोकें (पेटी इ० ला ठोकलेल्या खिळ्याचें (ज्याला लागून चिरगुट फाटतें किं०अंगावर ओरखडा उठतो). ३ मोडलेल्या किं०तोडलेल्या झाडाचा किं० फांदीचा बुडखा. ४ बुडखा, (मोडक्या तरवारीचा, झिजलेल्या केरसुणीचा,इ०). ५ कोणत्याही पदार्थाचा कोणताही अवयव अर्धवट मोडून गेला असतां अवशिष्ट भाग जो पदार्थाला चिकटून किं० लोंबत राहिलेला असतो तो.

खणपुस न० १ धस; धसकट. २ अणकुचीदार टोंक (**क्रि०** लागणें, जाणें, शिरणें, इ०).

खणाजंगी स्त्री० कचाकचीचें भांडण.

खणाणणें अ० क्रि० खण्‌खण् असा आवाज करणें.

खणाळें [**म०**खण+आलय] **न०** चोळ्यांचे खण करावयासाठीं विणलेलें असतें तें कापड; मागें 'खंडाळें' पहा.

खणील स्त्री० भाताचीं रोपें दुसरीकडे लावण्यासाठीं उपटतात तीं समुच्चयानें.

खण्णी, खण्णूक मागें 'खंडणी,' 'खंडणूक' पहा.

खंत स्त्री० १वाईट,अप्रिय,किं०त्रासदायक पदार्थाच्या दर्शनानें किं० चिंतनानें वाटते ती तिरस्काराची किं०वीटाची भावना. २अस्वस्थपणा. ३ एकाद्या पदार्थासंबंधीं वाटते ती शिसारी. ४ प्रिय माणसाच्या वियोगानें मनाला लागते ती हुरहुर किं०वाटते ती अस्वस्थता किं० चिंता; उ० हें मूल आईची भारी खंत घेतें.

खत [**अ०**] **न०** कर्ज, गहाण, इ० व्यवहारासंबंधानें एक मनुष्य दुसऱ्याला लिहून देतो तो कागद.

खत न०१ शेत, मळा, इ०ची जमीन अधिक सुपीक करण्यासाठीं झाडांना पौष्टिक द्रव्य जें मातींत घालतात तें. २ चिमट्यानें उपटावयाचे जे दाढी, मिशा, इ० चे केश ते. ३ क्षत, जखम.

खतखत पु० १ उसळी. २ आवेश, सुरसुरी.

खतखशी [**अ०** खत्+**फा०**कशीदन्] **स्त्री०** भिंतीवर शोभेसाठीं ज्या रेघा काढतात त्या, किं० त्या रेघा काढणें.

खतरा, खत्रा पु० १ कपटाची शंका. २ भयाची शंका.

खतरी, खत्री पु० विणकऱ्यांची एक जात.

खतवड न० गांवातील केरकचरा गांवाबाहेर जेथें टाकतात ती जागा. २ केरकचरा; मैला.

खतवड, खताड वि० केरकचरा, मैला, इ० च्या योगानें सुपीक झालेलें (शेत).

खतवड न०,खतवडी स्त्री० पाथरवटाचें एक आउत.

खता, खत्ता [**अ०**] **स्त्री०**१ भयाची किं० संकटाची आशंका. २ हानि, नुकसान. ३गैरवर्तन; नियमाचें किं० शिष्टाचाराचें उल्लंघन; गैरवर्तन. ॐ**दया उधार, खता रोकडी** आपल्या अपराधाबद्दल दया दाखविली जाईल किं०नाहीं हें अनिश्चित असतें, पण पारिपत्य व्हावयाचें मात्र निश्चित असतें.

खता पु० नेत्रावर लेप घालण्यासाठीं अनेक औषधें एकत्र उगाळून करतात तें मिश्रण.

खतावणी स्त्री० १ रोजखर्डावरच्या अधिक रकमा असतील त्या दूर करून पक्क्या रकमा खात्यांत लिहिणें, किं० त्या ज्याच्यावर लिहिल्या आहेत तो कागद. २ लाकडाच्या कडेला समांतर रेघा उठविण्याचें किं० रेघा काढण्याचें सुताराचें आऊत. ह्या रेघा उठविण्याला किं० काढण्याला 'खत करणें' असें म्हणतात. ॐ**एकाद्याला खतावणीवर घालणें** त्याला जिकीरीचें काम करावयाला देणें.

खतावणें [**म०** खत] **अ० क्रि०** ओंगळ किं० घाणेरडा होणें (बुरसून, आंबून, इ०).

खताविणें स० क्रि० १ कागद खतावणीच्या चिन्हानें युक्त करणें. २ जमीनींत खत वगैरे घालून ती कमावणें. ३ रेघा काढून शोभविणें (भिंत).

खंतावणें अ०क्रि०एकाद्या वस्तूबद्दल किं०माणसाबद्दल खंती घेणें(खंती=अप्रीति; खंती=वियोगजन्य दुःख).

खंती स्त्री०१ अप्रिय, ओंगळ, हिडिस्स, किं० किळसवाणी, अशा पदार्थासंबंधानें वाटते ती भावना (क्रि० घेणें, धरणें).२ एकाद्या माणसाच्या आरोग्याविषयीं किं० सुस्थितीविषयीं वाटतें ती चिंता किं० कळकळ. ३ प्रिय मनुष्याच्या वियोगामुळें वाटतें ती अस्वस्थपणाची भावना.

खतोड वर ' खतवड ' पहा.

खतोड न०,स्त्री०, **खतोडा** पु०१ पाथरवटाचें एक विशेष आऊत ८ ह्या आकाराचें. २ एक प्रकारची पहार किं० सळई.

खत्ता पु० अफू, तुरटी, लिंबाचा रस, इ०चें केलेलें डोळ्यांचें औषध.

खत्ता [अ०] स्त्री० १ भयाची आशंका. भयासंबंधीं काळजी. २ हानि; नुकसान; बूड.

खत्रड, खत्रुड, खडतर वि० १ त्रासदायक; कष्टंकर;कंटाळा आणणारा.२कठिण;विकट. ३द्वाड.

खत्रप न० शेत, मळा, इ०चीं जमीन अधिक सुपीक करण्यासाठीं जो केरकचरा, मैला,इ० घालतात तो.

खत्रा [अ० खतूराह्] पु०१ संकट, धोका. २ भयाची आशंका (क्रि० बाळगणें, वाटणें).

खत्री [सं० क्षत्रिय] पु० रेशमी वस्त्रें विणणाऱ्यांची जात किं० त्या जातीचा इसम.

खंदक [अ०] पु०१ किल्ला, इ०चे भोंवतीं खणला असतो जो चर तो. २ मोठा आणि खोल खड्डा.

खदका पु० १ अग्निसंयोगानें पाणी, दूध, इ०ना आलेली बुडबुड्याची स्थिति; सळसळ वाजणारें आधण. २ प्रेम, राग, हसें, दुःख, इ० भावनांचा एकाएकीं अनावर झालेला उद्रेक; उसळी; लहर. ३ ३ खरूज, रक्तपीति, कोड, इ० चा त्वरेनें चरत जाणारा उद्रेक.

खदखद पु० १ आधण येत असलेल्या पातळ पदार्थाचा ध्वनिविशेष. २ कोणत्याही मनोविकाराचा उद्रेक.

खदखद, खदखदां क्रि० वि० खद् खद् असा [आवाज करून (हसणें).

खदलबदल स्त्री०, **खदलाबदला, खदलाबदला** पु०१ अदलाबदल. २ इकडचा तिकडे आणि तिकडचा इकडे अशा जातीचा बदल.

खंदस्त [फा०] वि० तल्लख; चलाख; संकटसमयीं स्वतःची निभावणी करून घेण्यास समर्थ.

खंदस्त, खंदस्ती स्त्री० शत्रुत्व;वैरभाव.

खंदा [फा० खंदाह्] वि० १ बळकट असून तल्लख आणि चंचल असा (घोडा). २ नेटदार; हेकेखोर, तापट, (मनुष्य). ३ हट्टी, खोडकर (पोर). ॥**खंदा तट्टू** पु० धाडसी किं० आवेशी (माणूस, पोर).

खंदा पु०, स्त्री०द्वेष, आकस (लावणें,करणें).

खंदाटी स्त्री०, **खंदाडें** न० [म० खांदी= झाडाची शाखा] झाडाची फांदी, शाखा(मोठी).

खंदारी वि० गायनांतील एका विशिष्ट प्रकारचा. ॥**खंदारीबाणी** स्त्री० खंदारी तऱ्हेची गायनाची पद्धति.

खदिर [सं०] पु०खैर नांवाचें एक जंगली कांटेरी झाड (याच्यापासून कात काढतात). ॥ **खदिरसार** पु० कात (विड्यांत खातात तो).

खंदील [अ० कंदील] पु० १ प्रकाशासाठीं करतात ती एक विशेष प्रकारची योजना. २ पांच सात वातीऱ्यांचा लामणदिवा. ह्या शब्दाचें 'कंदील' हें रूप अधिक प्रचलित आहे.

खदुळणें, खदूळ, पुढें ' गढुळणें, ' ' गढूळ ' पहा.

खंदें न० एक पक्षिविशेष (हा आकारानें लहान [असतो).

खंदोस पु०१ द्वेष. २ वैरभाव. ३ स्पर्धा.

खद्योत [सं० ख=आकाश; द्युत्=प्रकाशित करणें, शोभणें] पु० १ काजवा. २ सूर्य.

खद्रूड ' खत्रड ' पहा.

खनका पु० ' खणका ' पहा.

खनन [सं० खन्=खणणें] न० खणण्याची क्रिया.॥**खननदहन** न० मर्तिकाचा विधि.

खनपुस मागें ' खणपूस ' पहा.

खनि [सं० खन्=खणणें] स्त्री० खाण (दगडाची, इ०).

खनित्र [सं०] न०कुदळ (खणण्याचें साधन-[विशेष).

खप [म० खपणें] पु० १ विक्री; उ० ह्या गांवांत चहाचा खप कांहीं होत नाहीं. २ देहकष्ट; उ० बारा महिने शेतांत खप करावा तेव्हां पोटा-

पुरतें धान्य मिळतें. २ शेत, मळा, इ० ची जमीन सुपीक व्हावी म्हणून जो केरकचरा, मैला, शेण, इ० त्यांत घालतात तें. [खमशा.

खपक्या वि० तल्लख, चलाख, नेट्या; खमक्या;

खपट न० १ माशाच्या अंगावरील खवला. २ ह्या खवल्याच्या आकाराचा सोनें, रुपें, इ० चा दागिना किं० कोणताही पदार्थ. ३ कणकेचा रोठ (निखाऱ्यावर भाजलेला).

खपटी स्त्री० गूळ इ० कढवून त्याच्या वड्या करतात त्या प्रत्येक. [गाल, इ०),

खपड वि० रोड, बसके, खोल (डोळे, अंग,

खपणें अ० क्रि० १ मेहनत किं० कष्ट करणें; उ० खपेल त्याचें शेत, मारील त्याची तरवार. २ विकला जाणें; उ० हा गांव केवळ गरीब शेतकऱ्यांचा आहे, येथें तुमचीं अत्तरें खपणार नाहींत. ३ पथकरलें जाणें; सहन केलें जाणें; उ० तुझें हें भंगटगिरीचें वर्तन मला खपणार नाहीं किं० येथें खपणार नाहीं. ४समावणें; उ० हें पोतें आतां अगदीं कांठोंकांठ भरलें, आतां त्यांत ती लुगड्याची घडी खपणार नाहीं. ५योग्य विनियोग करून संपणें; उ० हें पातेलेंभर पिठलें आम्हां तिघांत खपणार नाहीं. ६ मरणें; उ० आठ्याण्णव सालच्या प्लेगांत माझ्या घरचीं तेरा माणसें खपलीं, आतां मी एकटा प्राणी राहिलों आहें.

खपता वि० आवेशी, तल्लख, उग्र.

खपती [म० खपणें] स्त्री० १ नेटदार, दीर्घोद्योगी. २ लोचट, हेकट. ३ तल्लख, चलाख, आवेशी. ३ तापट, उग्र, रागीट.

खपरी स्त्री० १ छन्नीनें उडविलेला दगडाचा तुकडा किं० कळपा. २ फुटलेल्या मडक्याचा तुकडा; खापरी.

खपरेल न० १ थालिपिठी कौल (उलट, नळ्याचें कौल, मंगळूरी कौल, इ०). २ अशा थालिपिठी कौलांचें छप्पर किं० अशी थालिपिठी कौलांनीं आच्छादलेली जागा, पडवी, घर, इ०.

खपला पु० १ गळून पडलेला, सोलून किं० तोडून काढलेला तुकडा. २ गव्हाची एक जात; याला ' खपल्याण ' असेंही म्हणतात.

खपली स्त्री० लहान किं० पातळ खपला. ('खपला' वर पहा). ꠰꠰**खपली काढणें, खपली उचकटून काढणें** विझलेलें भांडण मुद्दाम उकरून काढणें.

खपल्याण न० वर ' खपला ' पहा.

खपा, खप्पा [फा० खफाह्] वि० नाखूष; असंतुष्ट; नाराज. ꠰꠰**खपा मर्जी** स्त्री० नाराजी; कृपेचा लोप; गैरमर्जी.

खपाट न०, **खपाटी, खपारी** स्त्री० [सं० कपाट=दार, दरवाजा] १ दार (ह्या अर्थी अप्रचलित). २ पोटांत अन्न बराच वेळ न गेल्याकारणानें पोट दबणें किं० पोट दबल्याची स्थिति; उ० ह्या लेकराला दूध पाज गे आवडे, त्याचें पोट पहा अगदीं खपाटीस गेलें आहे. ꠰꠰**एकाद्याच्या खपाटीस बसणें, एकाद्याचा खपाटा घेणें** त्याच्याजवळ एकसारखी कांहीं नेटाची मागणी करीत राहाणें; एकाद्या वस्तूबद्दल त्याची पिच्छा धरणें. **पोटाला खपाटा बसणें, पोटाचा खपाटा होणें** पोटांत फार वेळ अन्न न गेल्यामुळें पोट खोल जाणें किं० दबणें. **पोटाचीं खपाटें होणें, पोटाच्या खपाट्या बसणें** हे वाक्प्रचारही वरील अर्थानेंच योजले जातात.

खपाट न० निसर्गानें किं० मानवी कृतीनें उत्पन्न झालेला किं० केलेला खड्डा, गुहा, कोनाडा, पोकळी, विवर, इ०. २ खबदड; अडचणीची आणि आकुंचित जागा; उ० ह्या खपाटांत तुम्ही नऊ माणसें कशीं हो गुजराण करतां ?

खपाटून क्रि० वि० जोरानें, आवेशानें.

खपाट्या, खपाऱ्या वि० १ नेटानें आणि हट्ट घेऊन कांहीं वस्तूची मागणी करणारा. २ नेटानें आणि उत्साहानें कांहीं काम करणारा.

खपी [म० खपणें] वि० तल्लख, चलाख, तत्पर (काम करण्यांत).

खपीप [अ० खफीफ्] वि० १ नाखूष किं० नाराज झालेला. २ शरमलेला, ओशाळलेला.

खपुष्प [सं० ख (आकाश) + पुष्प (फूल)] न० अविद्यमान किं० अशक्य वस्तु, (सशाच्या शिंगाप्रमाणें). ꠰꠰**खपुष्पायमाण** वि० अशक्य किं० अविद्यमान (वस्तु).

खपेटोणपे पु० अ० व० जगाच्या व्यवहारांत नुकसान, पराभव, दुःख, निराशा, हिरमोड, विघ्नें, अडचणी, इ० चे आघात किं० तडाखे; उ० जगांत खपेटोणपे खाल्ल्याशिवाय कोणाला शहाणपण येत

नाहीं. ' टक्केटोपणें ' पु० अ० व० हा शब्द ह्या अर्थानें अधिक प्रचलित आहे.

खप्पड वि०आजारानें, हाल अपेष्टांनीं, चिंतेनें, वार्धक्यानें, किं० दारिद्र्यामुळें जीर्ण, शीर्ण, रोड, झालेला (देह, शरीर, गाल, इ०).

खप्पा वि० १ नाराज, नाखूष (मर्जी, इ०). २ विटलेलें (मन, इ०).

खप्पी वि० १ तापट, चिडखोर. २ तल्लख, चलाख. ३ तत्पर, नेट्या, नेटदार. ❀**खप्पीदास पु०**१ नेटदार माणूस; पथकरलेल्या कामाची पिच्छा न सोडणारा; दीर्घोद्योगी. २ एकाद्या माणसाच्या चोकांडीस बसणारा (त्यानें आपली मागणी पुरवावी म्हणून).

खबदड न०, स्त्री०, खबदडी स्त्री०, खबदाड न० १ ओबडधोबड भोंक, खड्डा, खळगा, पोकळी, इ०. २ अडचणीची आणि आकुंचित जागा, घर, इ०.

खबदडी वि०खड्डे, खाचा, उंचवटे, इ० जींत आहेत अशी (जमीन).

खबर [अ० खब्र्] **स्त्री०** १ बातमी, वार्ता. २ माहिती (एकाद्या विशिष्ट प्रसंगाची, माणसाची, इ०). ❀ **एकाद्याची खबर घेणें** १ त्याचें परिपत्य करणें. २ त्याच्यावर सूड घेणें. **खबरदार ! उ०वा०अ०**जपून रहा ! काळजी घे ! याद राखून अस !**खबरदारी स्त्री०** १सामर्थ्य, ताकद, ऐपत. २ निष्णातपणा, पटाईतपणा, वाकबगारपणा, नैपुण्य. ३ सावधगिरी. **खबरबखर स्त्री०** बातम्या; वार्ता; गप्पसप्प; कर्णोपकर्णी आलेल्या अफवा किं० खबरा. **खबऱ्या वि०** इकडच्या खबरा तिकडे तिकडच्या इकडे सांगत फिरणारा रिकामटेकडा माणूस. **खबरदार वि०** १ एकादें काम, कर्तव्य, इ० इ० करावयाला जरूर जीं साधनें ज्ञान, माहिती, बुद्धिमत्ता, द्रव्यबल, शरीरसामर्थ्य, इ० तीं ज्याच्या जवळ किं० ज्याच्या ठायीं भरपूर आहेत असा (पदार्थ, माणूस, जनावर, इ०); उ० हा खांब खबरदार आहे; तो ह्या तुळईचा भार सहज पेलील; उ० हा घोडा ह्या चिलखत घातलेल्या स्वाराला सहज वाहूं शकण्याइतका खबरदार आहे; उ० तो कारकून जमाखर्चाच्या कामा खबरदार आहे. २ वाकबगार, निष्णात; उ० हा गवई कर्णाटकी संगीतांत खबरदार आहे. ३ जागरूक, सावध; उ० तो गोविंदपंत आतिलफंगा आहे; खबरदार असा, नाहीं तर तो तुम्हांला गंडा घालील.

खबरा स्त्री० अ० व० चकाट्या (पिटण), रिकामटेकड्या गप्पा(मारणें); उ० हा गांवांत उगीच खबरा सांगत फिरतो.

खंबऱ्या वि० १ तल्लख, चलाख, हुशार. २ तत्पर. ३ मजबूत बांध्याचा.

खबळ स्त्री० १ खोल दरी. २ डोंगरांतील पोकळी किं० गुहा. ३ मोठा खड्डा. [पहा.

खबाड न० ओबडधोबड पोकळी. मागें'खबदड'

खंबायती वि० खंबायत नांवाच्या शहरचें किं० खंबायतसंबंधाचें.

खंबारी स्त्री० शिवणी नांवाचें झाड.

खबालणें, खबलणें [क० काबल्] **स०क्रि०** १ आधाशीपणानें खाणें; गपागप खाणें. २ उधळेपणानें खर्चून टाकणें. २ (रिकामटेकड्या चकाट्या) पिटीत बसणें; उ० तो गोवर्धनपंताच्या घरीं बाता खबलीत बसला असेल !

खबाला वि० १ अघळपघळ, ऐसपैस, (जागा, खोली, घर, इ०). २अजस्त्र मोठें, फत्ताडें, अगडबंब.

खबाला [अ०] **पु०** १ अधाशीपणानें खाणें किं० खाऊन टाकणें (पोहे, चुरमुरे, पुऱ्या, इ०); उ० त्यानें सोलापुरी चिवड्यावर मघापासून खबाला मारला आहे. २ उधळेपणानें खर्चून किं० संपवून टाकणें (पैसे, सामग्री, इ०). ३ व्यापारांत किं० कोणत्याही व्यवहारांत झालेलें नुकसान किं० बसलेली ठोकर. ४ बांगड्या, काचपात्रें, चिनें, इ० पिचणें, फुटणें, इ०. खालचा शब्द पहा.

खबाला (-ल्या) वि० १ पिटणारा, कुटणारा, झोकणारा (बाता, गप्पा, चकाट्या, इ०); उ० बाताखबाल्या, गोष्टीखबाल्या. २ (कांहीं खाद्य) आधाशीपणानें खाणारा; उ० भातखबाल्या, पोळीखबाल्या, लड्डूखबाल्या, इ० इ०.

खंबिरी स्त्री०खंबीरपणा. खालीं'खंबीर' पहा.

खंबीर वि० १ बळकट, मजबूत, पक्का (घर, खांब, भांडें, टोपलें, इ०). २ स्थिर, नेट्या, दृढनिश्चयी, अढळ (माणूस, विचार, वचन, मत, इ०). ३ जड; अवजड; अवाढव्य. ४घट्ट; संसारांतील दुःखें, निराशा, पराभव, विघ्नें, इ० नीं न खचणारें किं० डगमगणारें (मन, अंतःकरण).

पु०बळकट, दृढ, किं०अचल आधार, पाठिंबा, किं० अनुकूलता; उ० तुमच्या बोलण्याचा खंबीर असल्याशिवाय आम्ही हें काम कसें पथकरावें? ‡ खंबीर खुंट पु० पक्का, घट्ट, स्थिर, कायमचा, टिकाऊ (माणूस, काम, रचना, मांडणी, इ०).

खंबीर, खमीर न० आंबवण, फुगवण, मंड.

खबुतर, खबूतर, खबुदर पु० पारवा (एक पक्षी). ‡ **खबुतरखाना** पु० सरकारनें किंवा खाजगी माणसानें पाळलेलीं खबुतरें ठेवण्याची जागा. **खबुतरबाज** वि० खबुतरें पाळण्याचा आणि उडविण्याचा नाद ज्याला आहे असा. **खबूतरबाजी** स्त्री० खबुतरें पाळण्याचा आणि उडविण्याचा व्यवसाय, षोक, नाद, किं० उद्योग.

खबू वि०जख्ख म्हातारा; अगदीं जरठ. अधिक प्रचलित रूप ' खब्बू '.

खबक वि० प्रचंड, धिप्पाड, अवाढव्य, जगड्व्याळ (माणूस, जनावर, पदार्थ).

खबूस पु० गलबतावरील भटारखाना किं० स्वयंपाकगृह.

खबटोणपे पु० अ० ब०मागें 'खपेटोणपे' पहा.

खबेड वि० १ कडक, ताठट, तिरसट. २ वागवयाला कठिण (माणूस, जनावर). ३ ओबडधोबड; खरबडीत; उंचसखल.

खबबा पु० ओबडधोबड गुहा किं० विवर.

खब्बू वि० अति म्हातारा; अगदीं जख्ख (तुच्छतेनें).

खमकावणें स० क्रि० १(एकाद्यावर)ताशेरा झाडणें; (एकाद्याला) रागें भरणें. २ (एकाद्याला) धमकी भरणें किं०त्याची खरडपट्टी काढणें. ३ जोरानें धरणें किं० पकडणें. ‡ **खमकावून** क्रि० वि० जोरानें, नेटानें (ओढणें, धरणें, मारणें, इ०).

खमक्या, खमशा वि० १ नेटदार, तल्लख. २ तत्पर. ३ आवेशी; उत्साही.

खमखम, खुमखूम स्त्री० रग, आवेश, उसळी (भांडण्याची, मारामारीची, गाण्याची इ०). क्रि० येणें, जिरणें, जिरविणें, इ०.

खमखमीत, खमंग, खमंक वि०स्वादिष्ट, रुचकर; योग्य प्रमाणांत तूप, साखर, किं०मीठ, तिखट, इ० पदार्थ घातले गेल्यामुळें चवदार (कांहीं खाद्य). ‡ **खमंग काकडी** स्त्री० काकडी विळीवर चोचावून निघालेल्या तासांत थोडेंसें मीठ घालून त्यांतून पाणी पिळून काढून त्यांत कुटलेलें डाळें किंवा मुगमुगाचे दाणे कुटून घालून मग फोडणी देऊन करतात जें तोंडीलावणें तें.

खमंगाई स्त्री०खमंगपणा. ' खमंग ' पहा.

खमणें अ०क्रि०१ दुसऱ्या पदार्थांत गडप होणें, लोपून जाणें, किं० शोषून घेतला जाणें. २सहन केला जाणें(अपकार, अपशब्द, इ०).

खमध्य [सं०ख=आकाश; मध्य=मध्यबिंदु] पु०१आकाशांतील आपल्या डोक्यावरचा कल्पित बिंदु. २आकाशांतील आपल्या डोक्यावरचा रेखांश.

खमस [फा०] वि०पांच (अरबी सालांत).

खमसी (-सै-) न वि०पन्नास (अरबी सालांत).

खमाज, खमास पु० रागविशेष (संगीतात).

खमाटणें स० क्रि० जोरानें ओढणें किं० ताणणें किं० बांधणें. ‡ **खमाटून** क्रि० जोरानें, आवेशानें, नेटानें (ओढणें, खाणें, जेवणें, इ०).

खमाट्या वि० १ दांडगा, धटिंगण; आवेशी, उत्साही. २ अगडबंब.

खमीर [अ०] न० आंबवण, फुगवण, मंड.

खम्माल वि० १ भक्कम, मजबूत (इमारत, कारागिरीचा पदार्थ). २ अवाढव्य, जड, अवजड.

खय स्त्री० १ रग, ताठा, मस्ती, गर्व(मोडणें, जिरणें, जिरावणें). २ आडदांडपणा.

खर [सं०] पु० १ गाढव, गध्धा, गधडा. २ खेचर. ‡ **खरवात्सल्य** न० अंधळें प्रेम.

खर स्त्री० १ ल्हवांमध्यें जो पांढरा चुन्यासारखा पदार्थ जातो तो. २ शेतांत दाढीवर जो केरकचरा इ० दडपण टाकतात तें. ३ सायंकाळीं आकाशास येतो तो आरक्तपणा. ४ आकाशांत पसरलेले पातळ ढग समुच्चयानें. ५ विहिरीच्या किं० नदीच्या तळाचा गाळ. ६ पाण्यांतील रेव. ७ कोळशाची भुकटी. ८ सोनाराच्या शेगडीतील सोन्यारुप्याचे कण.

खर [सं०] वि० १ कठिण, घट्ट. २ तीक्ष्ण. ३ कडक, कर्कश. ४ उग्र. ५ तिखट. ६ दाट. ७ दुःखद (शब्द). ८ निष्ठुर. क्रूर, निर्दय. ९ उष्ण. ‡ **खरांशु** पु० सूर्य. **खरशब्द** पु० कर्‌ढोक; क्रौंच.

खरकट, खरकटवाड, खरकटवळ, खरकटावळ स्त्री०, **खरकटवडा, खरकटवाडा** पु० जेथें माणसें जेवलीं आहेत किं० जेथें स्वयंपाक झालेला आहे अशा जमीनीची शेणानें सारविली जावयाच्या अगोदरची स्थिति.

खरकटणें स० क्रि० १ रेघोट्या ओढून विरूप करणें (कागद, जमीन, इ०). २ आडें भरडें वाटणें (पाटा, दगड, इ०वर); उ० गोदे, ही पुदाण्याची चटणी तूं नुसती खरकटली आहेस, ती पुन्हा वाटून आण. ३ खरवडून काढणें (जमीनीचे पोपडे,इ०). ४ अर्धवट किं० निष्काळजीपणानें करणें (कांहीं काम). अ० क्रि० १ खरकटें होणें (हात, भांडें, पाणी, इ०). २ शेण, चिखल, उष्टें, इ०नीं लिप्त होणें.

खरकटा वि० १ भात, भाजी, इ० अन्नानें लिप्त. २ ओंवळ्याचा स्पर्श झालेला (कोणताही खाद्य पदार्थ).

खरकटें न० अन्नादिक पदार्थांनीं लडबडलेलें भांडें किं० अन्नादिकांनीं व्याप्त जमीन किं० तें अन्नादिक; उ० ह्या कोपऱ्यांत खरकटें पडलें आहे त्याला अगोदर शेण लाव; उ० सरू, काल तूं हीं स्वयंपाकाचीं भांडीं घासलींस त्या सर्वांना खरकटें राहिलेलें होतें. २ देणें घेणें इ० व्यवहारांतील निकालास न लागलेला भाग; उ० मागल्या कर्जाचें खरकटें तूं काढून टाकल्याशिवाय मी तुला नवें कर्ज कांहीं देणार नाहीं. ॐ**खरकटेल** वि० ज्याला खरकटें चिकटलेलें आहे असें (भांडें, जमीन, किं० कोणताही पदार्थ).

खरकणें अ० क्रि० सर् किं० खर् असा आवाज करून सरकणें किं० निसटणें. २ जोरानें जाणें, वाहाणें, किं० निसटणें. ३ ओहोटणें (पाणी, समुद्र, इ०). ४ (गळूं, सूज, इ०) दबणें. ५ उतरलेल्या चेहेऱ्याचा होणें (माणूस); उतरणें (चेहेरा); उ० तो गडी पेटीच्या कुलपांत किल्ली घालीत होता इतक्यांत मी 'कोण आहे रे?' असें म्हणतांच तो खरकला (किं० त्याचा चेहेरा खरकला).

खरका पु० १ खरबडीतपणा (थंडीच्या दिवसांत गालांचा किं० कोणत्याही गात्राचा, देवी इ० येऊन गेल्यावर त्वचेचा, इ०). क्रि० येणें, उठणें, इ०. २ एकाएकीं मनाला बसलेला धक्का (कांहीं अप्रिय वार्ता ऐकून, किं० कांहीं भयंकर देखावा पाहून; क्रि० बसणें). ३ व्यापारांत आलेली बूड किं० बसलेला चट्टा. ४ पाऊस, थंडी, टोळ, उंदीर, इ०नीं पिकांवर किं० शेतांवर झालेला नुकसानकारक परिणाम (क्रि० बसणें, होणें). ५ खरूज, गजकर्ण, इ०ना एकदम कंडू किं० खाज सुटणें. ६ खरूज, गजकर्ण, इ० खाजविण्याची जोराची लहर किं० प्रवृत्ति. ७ दगडावरून खटारागाडी वेगानें चालत असतां होणारा ध्वनि. ८ कांहीं काम करण्याचा जोर, सपाटा, आवेश, इ०.ॐएकाद्याला **खरका देणें** १ त्याची खरडपट्टी काढणें; त्याच्यावर ताशेरा झाडणें. २ त्याला तंभी भरणें. **हिशेबांत खरका मारणें** खोटा हिशेब सांगून किं० मांडून दुसऱ्याच्या पैशाचा अप्रामाणिकपणें अपहार करणें.

खरकावणें अ० क्रि० खरखर आवाज करून घसरणें किं० घसरत येणें किं० जाणें. स० क्रि० १ ०ला रागें भरणें; ०वर ताशेरा झाडणें; ०ची तासडपट्टी काढणें. २ खर् खर् असा आवाज होईल अशा रीतीनें एकादा पदार्थ ओढणें किं० सरकावणें किं० ढकलणें. [पदार्थ).

खरकुटणें अ० क्रि० खरकटा होणें (कांहीं

खरखर,खरखरां क्रि०अ०खरखर असा आवाज करून किं० असा आवाज होईल अशा रीतीनें, (चालणें, ओढणें, जाणें, इ०).

खरखर स्त्री० १डोळ्याला कांहीं विकृति झाल्यामुळें जी वेदना होते ती; उ० आज सकाळ पासून माझ्या उजव्या डोळ्याला खरखर लागली आहे. २ पश्चात्ताप. ३ दुःखमय विचाराची टोचणी किं० टोचणी(लागणें). ५ कफामुळें घशांत चालणारी घरघर (लागणें,सुटणें).४ कंड; खाजविण्याची लहर किं० प्रवृत्ति.

खरखरणें अ० क्रि० १ खरखर असा आवाज करणें. २ कफामुळें घसा घरघरणें. ३ तीव्र वेदनेनें (डोळा) जर्जर होणें.

खरखर मुंडा (–ढा) पु० १ मुसलमान भिकाऱ्यांचा एक वर्ग किं०पंथ.२भिक मागावयाला निघालेल्या हिजड्यांचा साजिंदा किं० पाठीराखा. ३ कफल्लक; अकिंचन; अतिदरिद्री माणूस.

खरखरा पु० १ काळजी; विवंचना (लागणें, फिटणें). २ दुःख; जिवाची तडफड. ३ रागानें बेफाम झालेल्या माणसाचा आरडाओरडा किं० आवेशयुक्त भाषण. ४ खरजेला सुटलेली तीव्र कंडू (जी खर्‌खर्‌ खाजवून शमविली जाते).

खरखराट पु० खरखर असा जोराचा आवाज.

खरखरीत वि० स्पर्शेंद्रियाला उखीर वाखीर लागणारा; खडबडीत (मृदु, गुळगुळीत, साफ, ह्याचा उलट).

खरंगटणें स० क्रि० ओबडधोबड रीतीनें (पाट्यावर वरवंट्यानें) वाटणें; केवळ ठेचळणें; उ० ही पुदाण्याची चटणी तूं नुसती खरंगटून आणली आहेस, तींत पुदाण्याचीं पानें सबंधचीं सबंध राहून गेलीं आहेत; जा, आणि ही चटणी पुन्हा वाटून आण.

खरंगणें, खरगणें स० क्रि० १ पूर्णपणें तळून काढणें (भजीं,आळवाच्या पानांच्या वड्या,इ०). २ बहुतेक रक्षा होईल इतकें तळणें. **अ० क्रि०** १ तळावणें (डोळे). २ उन्हानें डोळे, गाल, इ० तांबूस होणें.

खरगोस [**फा०** खर्‌गोष्‌] **पु०** ससा.

खरगोळ पु० एक वृक्षविशेष.

खरच इ० पुढें ' खर्च, ' खर्चणें, ' इ०पहा.

खरचटणें अ०क्रि० खरखरीत किं०अणकोचीदार पदार्थाला लागून शरीराच्या त्वचेवर ओरखडे उठणें किं० वस्त्र इ० लागून फाटणें. [कणसें.

खरचिंब न० भाताचीं शुष्क किं० वांझोटीं

खरज पु० १ संगीतांत नीच स्वर. २ घोगरा आवाज.

खरजाई [**म०** खरूज+आई] **स्त्री०** खरूज झाली असतां ज्या देवीला नवस करतात ती देवी. तिचा अंगारा विकृत भागावर लेपतात.

खरजुडा (-ला) वि० खरूज ज्याला झाली आहे असा.

खरट पु० १ लहानसर खडा. २ असा खडा पायाला लागून होतो तो रोगविशेष.

खरटणें अ० क्रि० १ वृक्ष, मूल, इ० चीं वाढ कुंठणें किं० त्यांनीं निर्वीर्य किं० निस्तेज होणें. २ खरडणें.

खरटा पु० १ खराटा (झाडावयाचा). २ झिजलेल्या खराट्याचा बुडखा.

खरड [**म०** खरडणें] **स्त्री०** १ घाईघाईनें किं० निष्काळजीपणानें लिहिलेला कागद किं० काढलेलें चित्र किं० केलेलें कांहीं काम. २ एकाद्यावर झाडलेला ताशेरा (काढणें). ३ आटणांत ओतलेल्या वितळविलेल्या सोन्याला किं० चांदीला चिकटलेली राख किं० कोळशाचे कण समुच्चयानें,–जे मागून खरडून काढतात.

खरडघासा पु० खालीं ' खरडा ' मध्यें पहा.

खरडणें स०क्रि० १ खरखर आवाज होईल अशा रीतीनें तासणें (वाईट न्हावी डोक्यावरचे केश वस्त्र्यानें काढतो तसें). २ भांडें इ० घासून मलरहित करणें. ३ खुरप्यानें (गवत इ०) मुळापासून कापून काढणें. ४ निष्काळजीपणानें किं० घाईघाईनें किं० इच्छेविरुद्ध लिहणें (पत्र, जमाखर्च, वर्तमानपत्राचा संपादकीय लेख, इ०). ५ कोणतेंही काम) इच्छेविरुद्ध किं०घाईघाईनें किं० निष्काळजीपणानें करणें. ६ मिरे, लवंगा, इ० पदार्थ पाट्यावर वरवंट्यानें ठेचून अर्धवोबडे वाटणें. ७ (एकाद्याला) रागें भरणें किं० त्याचेवर ताशेरा झाडणें (' त्याची खरड काढणें ' असा वाक्प्रचार त्याच अर्थानें अधिक प्रचलित आहे).

खरडणें अ० क्रि० १ सरकत जाणें; उ० माझे गुडघे दुखत आहेत,मला चालतां येत नाहीं, म्हणून मी ढुंगणानें खरडत पाटावर जाऊन बसलों. २ जमीनीवर लोळपटणें; उ० ह्या वेलासाठीं काठ्या उभारून त्यावर तो चढीव; त्याच्या फांद्या ह्या पहा जमीनीवर खरडत आहेत. ३ ०ची वाढ कुंठित होणें; उ० ह्या झाडाला पाणी नसल्याकारणानें तें खरडत आहे.

खरडनिशी स्त्री० निष्काळजीपणानें लिहिणें.

खरडनीस, खरडनिशा वि० निष्काळजीपणानें लिहिणारा (कारकून, विद्यार्थी,इ०).

खरडपट्टी स्त्री० एकाद्यावर झाडलेला ताशेरा; भोसडपट्टी; हजामत (लाक्षणिक प्रयोगांत); (काढणें, निघणें).

खरडबरड वि०धोंडाळ आणि नापीक(जमीन).

खरडा [**म०** खरडणें] **पु०** १ खरडून काढलेले कण समुच्चयानें.२ अर्धवट कुटलेला किं० ठेच-

लेला पदार्थ. ३ वारंवार खोडाखोड केल्यामुळें चिताड झालेला कागद. ४ कच्चें लिखाण किं० हिशेब; आरखडा. ५ कच्चें टाचण किं० यादी; मसुदा. ६ हलक्या जातीचा मोत्याचा दाणा. ७ भाजलेल्या मेथ्यांचा चुरा. ८ एक प्रकारचें खरबूज. ९ शालिधान्याचा लहानसर पण भरदार कणिशसमुदाय. १० देवी, गोवर, इ०ची पोटांत पडते ती आग. ११ गुरांना खातां येईल इतकें वाढलेलें गवत. १२ विवळ्या वाघाची एक जात. १२ जायफळ, मुरुड शेंग, इ० द्रव्यांचें तळून नंतर केलेलें चूर्ण,—हगवणीवर औषध. १३ बारदानांतून खरडून काढण्याइतकें कोणत्याही पदार्थाचें परिमाण किं० अशा स्थितीप्रत पोचलेलें बारदान किं० अशा बारदानांतून खरडून काढलेला पदार्थ किं०त्या बारदानांचीं अशी स्थिति; उ० आमच्या विहिरीला चैत्रापासूनच खरडा लागला; उ० आजची दहावी तारीख पण माझ्या पिशवीला आतांच खरडा लागला, मी तुला पैसे कसे उसने देऊं ? ❀ **खरडेघाशा, खरडघाशा** पु० कारकून (तिरस्कारानें). **खरडनीस** पु० वाईट लिहिणारा कारकून, विद्यार्थी, इ०. **खरडेवजा मोतीं, खरड्याचें मोतीं** न० हलक्या दर्जाचें मोतीं. **खरड्या** वि० ज्याणें लिहिलेला कागद खरडा म्हणण्याच्या लायकीचा आहे असा (कारकून, विद्यार्थी, इ०).

खरडी [म० खरडणें] स्त्री० १ भोसडपट्टी; उलटी सुलटी (लाक्षणिक प्रयोग). २ एक प्रकारचा वाघ. ३ काथ्याचे तंतु. [एक जात.

खरड्या, खरड्या वाघ पु० विवळ्या वाघाची

खरणें [म० खर] अ० क्रि० १ मूत्रद्वारें चुन्यासारखा पांढरा पदार्थ जो जातो त्याला 'खर' म्हणतात; ह्या विकारानें ग्रासलेला असणें. २रेतःस्खलन ह्या विकारानें पीडलेला असणें.

खरतड, खरतडणें मागें ' खडतर, ' ' खडतरणें ' पहा.

खरनखर[फा०आखिर्=शेवट;'नखर'हें केवळ जाब देणारें यमक] क्रि० वि० १ सरतें शेवटीं. २ कांहीं केलें तरी.

खरप स्त्री० चुलीवर ठेविलेल्या भांड्याच्या बुडाला जडलेला मशेरीचा थर.

खरंप स्त्री० आमांशादि विकृतींनीं पोटांत होणारा मुरडा.

खरपट न० १ मोठा प्रचंड फत्तर किं० खडक. २ मुरूम, दगड, धोंडे, इ०ची जमीन. ३ डोंगर, टेकडी, इ० चा माथा. ४ फोड (येणें, उठणें). वि० खडक, मुरुम, इ० जांत फार अशी जमीन.

खरपट न० खडकाळ आणि मुरुमाची जमीन.

खरपड, खरपाड, खरपट न० १ तुटवडा, कमीपणा, अपुरा पुरवठा. २दुर्भिक्षाचा काळ; उ० ढंदा पाण्याचें खरपट पडेल असा रंग दिसतो; उ०गेल्या वर्षीं धान्याचें खरपड पडलें तें श्रीमंतांना देखील जाणवलें.

खरपड, खरपडी, खरपुडी स्त्री० टोळासारखा एक प्राणिविशेष.

खरपडी स्त्री० खालीं ' खरपुडी ' पहा.

खरपणें स० क्रि० नखादिकांनीं ओरबाडणें किं० विचकुरे घेणें.

खरंपणें भा० क० क्रि० आमांशादिकांमुळें पोटांत मुरडणें; उ० आज सकाळपासून नारायणाचा पोटांत खरंपत आहे.

खरपळी स्त्री० खरपुडी, अखिरवळी, पोपडा, (जमीन, भिंतीचा गिलावा, इ०चा).

खरपी स्त्री० भांड्याच्या बुडाला जमलेली मस किं० जळ किं० मशेरी. [विशेष.

खरपुडा पु०टोळाच्या जातीचा एक प्राणि-

खरपुडी, खरपोडी स्त्री० १ जमीन, झाडाचें खोड, किं०वरी होत आलेली जखम, यांचेवर धरते ती थपली, खपली, किं० पापुद्रा. २ एक प्राणिविशेष. ३ एक वनस्पतिविशेष.

खरपूस वि० १ पूर्णपणें आणि यथायोग्य प्रमाणांत भाजलेला, तळलेला, शेकलेला, किं० शिजलेला (कांहीं खाद्य पदार्थ): खमंग. २ स्पष्ट शब्दांनीं दिलेली (ताकीद), भरलेली (तंबी), बोललेलें (उत्तर). क्रि०वि०पूर्णपणें किं० योग्य प्रमाणांत, उ० दूध खरपूस तापल्याशिवाय तें चुलीवरून उतरूं नको.

खरबड वि०१ उखीर वाखीर(जमीन, पाटाचा पृष्ठभाग, इ०). २ चिखल, कांहीं खाद्य पदार्थ, इ० नीं लडबडलेला(हात, भांडें, इ०).

खरबडणें अ० क्रि० अन्न, शेण, चिखल, इ०

लागून जागच्या जागीं वाळून लेप बसला आहे ज्यावर असा होणें(हात, जमीन, भांडें, सतरंजी, वडवंची, इ०); करवडणें.

खरबरीत, खरबडीत, खरवडा, खरबुडीत वि० खरखरीत, उखीरवाखीर; साफ आणि नितळ नव्हे असा (पृष्ठभाग).

खरबुजी [म० खरबूज] वि० खरबुजाच्या आकाराचा (चुनाळ, माणे, तपकिरीची डबी, किं० दुसरा कोणताही पदार्थ).

खरबूज स्त्री० खरबुजाचें झाड. न० त्या झाडाचें फळ. ॐ **खरबुज रोगाचें ठिकाण** किं० **माहेर** घर खरबुजें फार फार खाल्यानें रोग होतात.

खरमंजरी [सं०] स्त्री० आघाडा नांवाचें झुडूप.

खरमरा (–ऱ्या) वि० १ तल्लख, तापट, कठोर. २ तीक्ष्ण. ३ झणझणीत. ४ आवेशयुक्त. ५ निर्भीड. ॐ **राऊत असे खरमरा तर घोडा चाले तरतरां** यजमान खंबीर असला तर नोकरलोक काळजीपूर्वक काम करतात.

खरमरीत वि० १ तिखट, जलाल (मिरें, लवंगी मिरची, इ०). २ पोटांत आग पाडणारें (कांहीं औषध किं० खाद्य). ३ भीडभाड न राखतां बोललेलें (भाषण), दिलेली (ताकीद), भरलेली (तंबी), इ०. ४ आवेशयुक्त. ५ कडक प्रकृतीचा (यजमान, धनी).

खरमस्त [फा०] वि० १ कोपलेला; रागानें बेफाप झालेला (म.णूस). २ मस्तीला आलेला (घोडा, बैल, इ०). ३ गर्विष्ठ, मदांध. ४ भरकट्या.

खरमस्ती [वर ' खरमस्त ' पहा] स्त्री० १ गर्व, ताठा. २ उन्माद. ३ तडफदारपणा. ॐ **एकाद्या माणसाची किं० जनावराची रग, उन्माद, किं० बेफमपणा जिरविणें, मोडणें,** किं० **मुरविणें** त्याला पूर्णपणें नरम करणें.

खरभाटी स्त्री० एक वृक्षविशेष; त्याच्या लाकडाचा पटई करण्याकडे विशेष उपयोग केला जातो.

खरवई स्त्री० भांडीं घडविणाऱ्या कासाराचें एक आऊत.

खरवट वि० ओबडधोबड; उखीरवाखीर.

खरवड [म० खरवडणें] स्त्री० १ दूध, लोणी, इ० पदार्थ चुलीवर ठेवून तापविले किं० कढविले असतां भांड्याच्या तळाचा चिकटून राहतो जो त्या त्या द्रव्यांतील कांहीं अंश तो,–जो जोरानें खरवडून काढावा लागतो. २ बुडाशीं लागलेल्या भाताचा करपट अंश,-जो भांड्याच्या बुडाला चिकटलेला असतो तो. ३ एकाद्याची काढलेली भोसडपट्टी. ४ संपत्तीची उधळपट्टी करून अवशिष्ट राहिलेला भाग. ॐ **कामाला मरावें आणि खरवडीला जपावें** कुचराई न करतां म्हणजे प्रामाणिकपणानें आणि झटून काम करावें, आणि खाद्यांची खरवड देखील टाकून देऊं नये म्ह० गायी म्हशीच्या आंबोणांत त्याचा विनियोग करावा (म्हणजे संसारांत बरकत येते).

खरवडणें स० क्रि० पदार्थाला चिकटलेला किं० पदार्थाच्या अंगचा नको असलेल्या भाग नखांनीं किं० कांहीं साधनांनीं घासून किं० तासून काढून टाकणें; उ० गोरे, दुधाणी खरडावयाला ही शिंप घे.

खरवडणें [म० खरवडणें स० क्रि०] न० पदार्थाचा अंगचा किं० त्याला चिकटलेला आगंतुक भाग तासून किं० काढून टाकावयाचें कांहीही हत्यार किं० साधन. ॐ **खरवड्या न्हावी** [म० खरवडणें=तासून काढणें] पु० अकुशलपणानें हजामत करणारा न्हावी; खुरप्या न्हावी.

खरवत, खरवती स्त्री० उंबर किं० अंजीर ह्या जातीचा एक वृक्षविशेष.

खरवस, खर्वस, खरस पु० १ गाय, म्हैस, इ० चें कोंवळें दूध साखर, वेलदोड्याचे दाणे, केशर, इ० मसाला घालून तापवून करतात तें खाद्य; ह्या खरवसाच्या वड्या कापून खाल्या जातात. २ फार बोलल्यामुळें किं० फार वेळ पोटांत अन्न न गेल्यामुळें किं० श्रमातिशयानें तोंडाला येतो तो फेस. ॐ **तोंडीं खरवस येणें** श्रमातिशयामुळें गळून जाणें म्ह० निर्वीर्य आणि निर्बल होऊन जाणें. [वाट).

खराबखर वि० भयंकर चढउताराची (डोंगरी

खराविगें स० क्रि० विहिरींतील, पाण्याच्या पाटांतील, किं० गटारांतील गाळसाळ काढून टाकणें.

खरशी स्त्री० गोड्या पाण्यांतील मत्स्याची एक जात.

खरस पु० वर ' खरवस ' पहा.

खरळ खोंचर [म० खळी + खोचर] वि० ओबडधोबड, उंच सखल; उखीरवाखीर.

खरळा पु० बोजड आणि जाडी धारेचा विळा.

खरा वि० १ जो पदार्थ ज्या रूपानें पाहिला किं० ऐकिला किं० चिंतिला त्याच रूपाशीं मिळता किं० जुळता असलेला; वस्तूच्या वास्तव रूपाशीं मिळता किं० जुळता; आपल्या स्वताच्या रूपांत असलेला; अकृत्रिम रूपाचा; उ० हा कुत्रा मेणाचा आहे; खरा नव्हे; उ० तो दाखवितो ती सहानुभूति खरी आहे, ती मानभावीपणाची नाहीं. २ ज्यांत भेसळ नाहीं असा; उ० हें दूध खरें आहे, ह्यांत पाणी, भाताची पेज, इ० चीं भेसळ नाहीं. ३ अकृत्रिम. ४ प्रामाणिक; लबाड नव्हे असा. ५ काळजीपूर्वक मापें घेऊन बसविलेला किं० पक्का केलेला; उ० तो सांव इतक्यांतच खरा करूं नको, मी ओळंबा लावून तो लंब रेषेंत आहे किं० नाहीं हें पाहतो; उ० ह्या खणाच्या दोन्ही टोकांचीं अंतरें मीं मोजलीं आहेत; ही तुळई आतां खरी कर. ६ शास्त्रशुद्ध रीतीनें बनविलेला किं० केलला; उ० हीं रससेंदुराची मात्रा खरी आहे; ती बाळशास्त्री लागवणकर यांनीं स्वता केलेली आहे. ७ आणाभाका होऊन पक्का केलेला (दर, सौदा, ठराव, पदार्थांची किंमत, इ०); उ० ह्या मोत्यांची किमत आठशे रुपये आहे, पण ती अद्यापि खरी करावयाची आहे. ८ तपासून पाहून बरोबर म्हणून ठरविलेला; उ० ह्या पांच बेरजा मीं खऱ्या केल्या आहेत, उरलेल्या आठ तुम्ही खऱ्या करा. ❀ **खऱ्याला मरण नाहीं** सत्यमेव जयते! खरें फार वेळ झाकून ठेवतां येत नाहीं; खरें केव्हां ना केव्हां तरी प्रकट होतेंच! **खराखुरा** वि० अगदीं खरा.

खरा पु० १ कुंकूं किं० गंधाचे रवे करण्यासाठीं हळकुंडाचे तुकडे जे लिंबाच्या रसांत बुडवून ठेवतात ते प्रत्येक. २ उष्णतेनें तोंडांत किं० जिभेला येतात जे फोड ते प्रत्येक; (अनेक वचनांत प्रयोग); उ० काल मी लवंगी मिरचीचें भरीत खाल्लें तों आज माझ्या जिभेला खरे आले. ३ कोयती, इ० शस्त्रांस दांत्यांसारखे पाडतात किं० पडतात खंड ते प्रत्येक. ४ बारीक तुकडा किं० भाग; खडा.

खरा क्रि० वि० (लिंगवचनांनीं विकृत होणारें हें अव्यय आहे). अगोदर; आधीं; उ० तूं नाऱ्याबरोबर जा तर खरा, कीं तुझ्या पाठीचीं चकंदळें उडालींच असें समज; उ० हें लग्न ठरूं दे तर खरें, मग मांडव घालावयाला कोणचा बढाई बोलावयाची तें पाहूं; उ० मला विचारल्याशिवाय तूं घराच्या बाहेर पड तर खरा, कीं तुझी तंगडी मोडून लंगडा करून टाकीन! याद राखून अस.

खराई [म० खरें] स्त्री० १ खरेपणा. २ वास्तविक रूप. ३ प्रामाणिकपणा. ४ चोखपणा, निर्भेळपणा. ६ तंतोतंतपणा. ६ सत्याशीं किं० न्यायाशीं संवाद किं० जुळणी.

खराई [म० खर] स्त्री० कांहीं विशिष्ट रोगामुळें लघवींतून जाणारा पांढरा पदार्थ.

खरांटा वि० १ पर्णरहित (झाड, फांदी, इ०). २ नापीक किं० बिनकसाची (जमीन).

खरांट न० १ गदळ सामान. २ पडक्या घराच्या विटा, कौलें, दगड, इ० चा ढीग. ३ कांहीं बांधकाम समाप्त झाल्यावर उरलेली जी सामग्री ती; उ० हें घर बांधून झाल्यावर खरांटांतून मी तीन खणांचा सोपा उतरणार आहें.

खरांटणें अ० क्रि० पर्णरहित होणें; उ० हें बेलाचें झाड दरवर्षी पौष महिन्यांत खरांटतें.

खराटा, खरांटा पु० १ नारळीच्या पातींच्या हिराची केरसुणी. २ तूर इ० च्या काटक्यांची केरसुणी. ३ (लाक्षणिक) पर्णरहित झालेलें झाड; उ० ह्या बेलाच्या झाडाचा अगदीं खराटा झाला; पुढच्या महिन्यांत त्याला नवी पालवी फुटूं लागेल. ❀ **एखाद्या देशावर, गांवावर, किं० कुटुंबावर खराटा फिरविणें** तो देश, इ० पूर्णपणें विध्वंसिणें किं० बेचिराख करणें; साफ नाहींसा करणें; उ० एकोणीसशे अठरा सालच्या इन्फ्लुएंझानें मेहेंदळ्यांच्या कुटुंबावर खराटा फिरविला; त्या कुटुंबांतील एकवीस माणसांपैकीं एकही उरलें नाहीं!

खराणा वि० कडक उन्हाचा (दिवस किं० महिना); उ० सोलापुरचे चैत्र आणि वैशाख हे खराणे महिने मला अगदीं सोसत नाहींत.

खराब [अ०] वि० १ वाईट. २ नासलेला. ३ नादुरुस्त झालेला. ४ गळलेला. ५ पडीत (जमीन). ❀ **पैसे, संपत्ति, इ० खराब करणें** तीं उधळून टाकणें.

खराब [अ० खराब] पु० १ नासाडी; उधळपट्टी. २ पडीत जमीन. ३ पाण्याच्या तळाचा खडक, —जो गलबतांच्या किं० होड्यांच्या तळाला नडतो.

खराबी स्त्री० १ नाश, विध्वंस. २ बिघाड. ३ दुर्दशा. ४ हानि, नुकसान. ५ उधळपट्टी.

खरारणें अ० क्रि० खरखर असा कर्णभेदक ध्वनि करणें.

खरारा [हिं०]पु० घोड्याचें अंग घासून आणि मृत केश खरडून काढण्यानें एक धातुमय आऊत किं०साधन;खराऱ्याला पांच सहा पत्रे करवतीसारखे दांते पाडलेले असतात. ❀ **घोडा इ०ला खरारा करणें** त्याचे अंग खराऱ्यानें घासून आणि खरडून स्वच्छ करणें. **खरारा खाजवी नगारा वाजवी** प्रत्येक साधनाचा योग्य प्रकारें उपयोग केला पाहिजे; भलत्याच साधनानें भलतेंच काम करणें हा मूर्खपणा होय.

खरारां क्रि० वि० खरखर असा आवाज होईल अशा रीतीनें; खरखर असा आवाज करून.

खराव पु० १ खांबाची उंची पाहिजे आहे त्याचे पेक्षां कमी पडत असल्यास त्या खांबाच्या तळाखालीं किं०माथ्यावर जो तुकडा बसवितात तो. २ अशी पुरवणी. ३अशा पुरवणीनें वाढलेली उंची; उ० ह्या खांबाला चार अंगळांचा खराव दिला पाहिजे म्हणजे तो इतर खांबांबरोबर होईल; उ०ह्या खांबाला चार बोटांचा खराव देतांच तुळईलाही तितका खराव आला.

खरावणें [म० खरा] अ०क्रि०१ खरा होणें किं० खरा ठरणें; पक्का होणें. २ वायु, ऊन, थंडी, इ०ची दिशा ठरणें किं० परिमाण ठरणें; वारा, उन्ह, थंडी,इ० ची स्थिति किं० गति किं० परिमाण ठरणें किं०पक्कें होणें किं० टिकून राहील अशी शाश्वती वाटणें; उ० वारा खरावेल तेव्हां गलबत चालेल; उ० पाऊस खरावल्या शिवाय हीं बीजे पेरूं नका. ३ उन्ह, वारा, इ० कारणांनीं डोळे फुगणें किं० दुखणें किं० आरक्त होणें; उ० काल मी पाषाणला जाऊन आलों त्यामुळें माझे डोळे खरावले आहेत.

खराविणें [म० खरा] स० क्रि० १ कांहीं मांड, व्यवहार, सौदा, किंमत, दर,इ०पक्का करणें.२ कांहीं गुंतागुंतीच्या कामांतील एक एक भाग पक्का पक्का करीत जाणें; उ० हे दहा खांब मी आपल्या मतानें बसविले आहेत,ते तुम्ही तपासून ध्या म्हणजे मी ते खरावीन. ३ एकाद्याला कांहीं कामासंबंधीं पुन्हा निक्षून किं०बजावून किं० ताकीद देऊन त्या कामीं प्रवृत्त करणें. ४ कोणी पथकरकेल्या कांहीं कामाची त्याला विस्मृति होऊं नये म्हणून त्या कामाचें त्याला स्मरण करून देणें. ५ विहिर, पाट, गटार, इ०तून मैला, गाळ, इ० काढून टाकून साफ करणें.

खराळ पु० कोयता.

खराळी स्त्री० लहानसर कोयता; कोयती.

खरिदी, खरीदी, खरेदी [**फा०** खरीदन्= विकत घेणें] **स्त्री०** १ विकत घेणें. २ विकत घेतलें जें कांहीं तें. ❀ **खरेदी खत न०**ज्यापासून कांहीं पदार्थ विकत घेतला त्याचेपासून ' हा पदार्थ तुम्हाला विकला'अशा मजकुराचा जो लेख लिहून घेतात तो. **खरीददार पु०** जो कोणी कांहीं पदार्थ विकत घेतो तो. **एकाद्यानें एकाद्याला खरीद करणें** त्याचेपेक्षां कांहीं विशिष्ट गुणानें आपण वरचढ आहों असें सिद्ध करणें; उ० व्याकरणांत गदाधरभट्ट हे त्रिविक्रमभट्टाला सहज खरीद करतील !

खरिपी (-फी)वि० खालीं ' खरीप ' पहा.

खरी स्त्री० खडकावर किं० कातळावर असलेली किं०केलेली शेतकामाच्या उपयोगाची जमीन.

खरीद [**फा०** खरीदन्=विकत घेणें] **वि०** विकत घेतलेलें.**स्त्री०** १ विकत घेणें. २ जे विकत घेतलें तें.

खरीप (–फ) [**अ०** खरीप] **पु०** भातावांचून ज्येष्ट मासीं पेरतात तीं धान्यें. ❀ **खरीपी, खरिफी वि०** १ खरीपाचा, खरीपासंबंधाचा. २ खरीप ज्यांत पिकतो असा (प्रदेश,जमीन, इ०).

खरीष [म० खर] **न०** १ केरकचरा. २ पडक्या धराचे फुटके तुटकें द्रव्य म्ह०पुटकीं कौलें, विटा,इ०.३ विहिरींतून काढलेली माती,गाळ,इ०.

खरूज [**सं०** खर्जु] **स्त्री०** एक त्वचेचा रोगविशेष.हिचे'ओली खरूज'आणि'कोरडी खरूज' असे दोन प्रकार आहेत. ❀ **खाजवून (किं० कांडळून) खरूज काढणें** १अडदांडपणानें वर्तन करून कांहीं संकट आपणावर आणून घेणें किं० कांहीं पेंचांत सांपडणें. २ विझलेलें भांडण उकरून काढणें. ३ नाहीं तें भांडण उपस्थित करणें.

खरूज पु० १ राखडीसारखा डोक्यांत घालावयाचा चांदीचा एक दागिना (कुणब्याच्या

क्रियांत ह्या दागिन्याचा प्रचार आहे). २ एक वाद्यविशेष,–ज्याला खरवस किंवा खर्वस म्हणतात.

खरे पु० अ० व० १ उष्ण पदार्थाच्या किंवा औषधाच्या सेवनानें जिभेवर किंवा गालाच्या आंतल्या बाजूस उठतात ते फोड; एकवचन 'खरा;' मागें 'खरा' पहा. २ भात किंवा चिवट गवत कापावयाच्या कोयत्याला किंवा खुरप्याला पाडतात ते दांते.

खरेदी, इ० मागें 'खरीदी' इ० पहा.

खरोखर, खरोखरी, खरोखरें क्रि० वि० १ अगदीं खरेपणानें. २ निःसंशय. ३ प्रत्यक्ष.

खरोड स्त्री० मागें 'खरवड' पहा.

खरोडा पु० १ ज्वर, उन्हाळा, इ० कारणांमुळें पोटांत पडते ती आग. २ तुटवडा, उणीव (बारदानांतून कांहीं पदार्थ खरवडून काढण्याइतका त्या पदार्थांचा कमीपणा). उ० यंदा चैत्रांतच आमच्या विहिरीला खरोडा लागला. ३ भांड्याच्या तळापासून खरवडून काढलेला अंश; उ० त्या कांकवीचा खरोडा मी खावयाला येणार आहें.

खरोष्ण [सं० खर=अत्यन्त; उष्ण] **वि०** अतिशय कडक किंवा तापलेलें.

खरोस पु० मागें 'खरवस' पहा.

खर्च [फा०] **पु०** व्यय; पदार्थांचा विनियोग केल्यानें त्या पदार्थाचें त्या प्रमाणांत कमी होणें; उ० ह्या मेजवानीला आम्हाला पन्नास रुपये खर्च आला किंवा आमचा पन्नास रुपये खर्च झाला. ॐ **खर्चीक वि०** १ खर्च करण्याच्या प्रसंगीं खर्च करावयाला जो सिद्ध असतो, किंवा कचरत नाहीं, असा. २ उधळ्या. **खर्चपट्टी स्त्री०** सरकारी अमलदार पाहणीसाठीं फिरतीवर निघाले असतां एकाद्या विशिष्ट गांवीं त्यांच्या निसबत जो खर्च होईल तो भागविण्यासाठीं तेथील गांवकऱ्यांवर बसविली जी वर्गणी ती. **खर्चवेच पु०** खर्चविर्च. **खर्ची पडणें** १ लढाईत मारला जाणें; उ० ह्या लढाईंत आमचे पन्नास शिपायी खर्ची पडले. २ नुकसानाला पात्र किंवा विषय होणें; उ० तुझ्या कारभारांत मी पडलों म्हणून पन्नास रुपयांच्या खर्ची पडलों.

खर्ची [म० खर्चणें] **स्त्री०** कांहीं विशिष्ट कामासाठीं बाजूस काढून ठेविलेली किंवा दिलेली रकम (प्रवासानिमित्त, इ०). **वि०** नित्याच्या उपयोगाचा (उलट, विशेषप्रसंगीं उपयोजावयाचा); उ० जांवईबोवांच्या खाशा पंक्तीला खर्ची तूप वाढूं नका, बरें कां! ह्या कासंडींतील साजूक तूप वाढा.

[झाडाचें फळ.

खर्जूर [सं०] **पु०** खजुराचें झाड किंवा त्या

खर्जूरी [सं० खर्जूर] **स्त्री०** खजुराचें झाड.

खर्पर [सं०] **न०** १ फुटक्या मडक्याचा तुकडा; खापर; खापरी. २ मातीचें परळ म्ह० उथळ आणि पसरट पात्र. ३ भिक्षापात्र. ४ अंग शेकावयाला घेतलेला मडक्याचा तळ किंवा विटेचा किंवा कौलाचा तुकडा.

खर्मेंवर्में [सं० कर्मन्+वर्मन्] **न० अ० व०** एकाद्याचीं निंद्य, दूषणीय, किंवा लाजिरवाणीं कृत्यें; उ० माझीं खर्मेंवर्में तूं बाहेर काढलीस तर मी तुझीं खर्मेंवर्में कधीं बाहेर काढल्याशिवाय सोडणार नाहीं.

खर्व [सं०] **वि०** १ लहान; ठेंगणा. २ लंगडा. **पु०** १ वामनावतार. ३ दहा अब्ज ही संख्या.

खल [म० खलणें] **पु०** १ पदार्थांचें चूर्ण करण्याचें पात्र (दगडाचें, धातूचें, गारेचें, इ०). २ औषध किंवा कांहीं पदार्थ ह्या असल्या पात्रांत घालून कुटून बारीक करणें. ४ ह्या कुटण्यानें झालें जें चूर्ण तें. ३ (लाक्षणिक) एकाद्या विषयाची साधक बाधक प्रमाणें विचारांत घेऊन केलेली चर्चा. ॐ **खलबत्ता पु०** खल आणि बत्ता ही जोडी.

खल [सं०] **पु०** १ दुष्ट, नीच, किंवा अधम माणूस. ३ धान्य मळण्याचें खळें. ४ कुटण्याचा खल. **वि०** वाईट; निंद्य; अधम जातीचा; दुष्ट. ॐ **खलयज्ञ** [सं० खल=खळें; यज्ञ] **पु०** शेतांतील पिकें काढून घेतल्यावर शेतकरी लोक जी मेजवानी करतात ती. ह्या मेजवानीच्या प्रसंगीं कोंबडीं, बकरीं, इ० मारून खाल्लीं जातात, यावरून 'यज्ञ' शब्दाची सार्थकता. 'खलयज्ञ' हा शब्द विनोदांत ह्या मेजवानीस लाविला जातो.

खलक [अ० खल्क्=सर्व] **पु०** कारस्थानी दुनिया. ॐ **खलक दुनिया स्त्री०** सर्व दुनिया; सारें जग.

खलखंदा [फा० खेल खानाह्] **पु०** बायकोमुलें, नोकरचाकर, गुरेंढोरें, शेतवाड्या, इ० चा

पसारा (ज्याची एकाद्याच्या माथीं जबाबदारी असते); संसारासंबंधाचा जो मोठा खटला किं० कारभार किं० व्याप तो.

खलखलणें अ० क्रि० तरफडणें; चरफडणें.

खलखलावणें स० क्रि० (एकाद्याला) सतावणें, त्रास देणें.

खलखाना पु० खालीं ' खल्खाना ' पहा.

खलणें स०क्रि०खलांत घालून बत्त्यानें ठोकणें किं० कुटणें; ०चें बारीक चूर्ण करणें.

खलबत [फा० खल्वत्=एकान्त **] न०**दुसऱ्याशीं एकांतांत केलेला विचार; मसलत; गुप्तपणें केलेली एकाद्या विषयाची चर्चा.

खलबत्ता [म०खल+बत्ता **] पु०** खलण्याचें साधन; खल आणि बत्ता. वर ' खल ' पहा.

खलबल स्त्री० १ गोंगाट; आरडाओरडा. २ बंडाची धामधूम. ३ मनाचा अस्वस्थपणा.

खलबलणें अ० क्रि० १ आरडाओरडा किं० गोंगाट करणें. २ (मन) अस्वस्थ होणें.

खलयज्ञ वर ' खल ' मध्यें पहा.

खलती वि० खलबत्त्यांत कुटून तयार केलेलें (औषध, इ०).

खलाटी (–ठी),खालाटी (–ठी) [म०खालीं =खालच्या बाजूस **] स्त्री०** १ सखलांतील भातशेत. २ सखल प्रदेश.३ शेतकी जमीनींचा विस्तार; उ० मुरूडची खलाटी लहान आहे.

खलाशी स्त्री०[अ०खलासी **] पु०** १ गलबताचा तांडेल इ०मुख्य जे अधिकारी त्यांच्या व्यतिरिक्त इतर जे कामगार ते प्रत्येक. २ सैन्याच्या तोफा ओढणारे किं० पेटविणारे जे लोक ते प्रत्येक.

खलास [अ०] वि०१ संपून किं० खर्चून गेलेलें. २ आटोपलेलें; समाप्त झालेलें.

खलिता [अ०खरीताह् **]पु०**१ थैली, पिशवी. २ रेशमी किं० किनखापी किं० साध्या थैलींत घालून कोणा मोठ्या अधिकाऱ्यास किं० दुसऱ्या कोणास पाठविलें जें पत्र तें. ३ अनेक पदार्थ मिसळून केलेलें घट्ट थिलथिलित औषध किं० लेप (जखमेवर किं० गळ्यावर लावावयासाठीं, इ०).

खलिपा [अ०खलीफाह् **] पु०**१ एकाद्या मंडळीचा मुख्य. २ महंमदी धर्मीयांचा श्रेष्ठतम धर्मगुरु. ३ ताशांचा ढोल, इ० वाद्यें वाजविणाऱ्यांत ताशा वाजविणारा जो मुख्य तो.

खली, खळी [सं०खलि, खली=गाळ,पेंड **] स्त्री०** (गुरें खातात ती) पेंड.

खलीत [सं० स्खलित=गळलेलें**]वि०**कांहीं वेळ बंद पडलेलें किं० पाडलेलें; कांहीं काळ थांबलेलें किं०थांबविलेलें. **न०** बोलण्यांत किं०लिहिण्यांत चुकून राहून गेलेलें.

खलेल [हिं० खलील् **]वि०** १ दुराग्रही,हट्टी. २कज्जेदलाल. **स्त्री०**खलेल माणसाचें कांहीं दुष्कर्म.

खलेल, खलेली [हिं० खलील् **] स्त्री०**द्वाडपणा; हट्ट. २ अडदांडपणा.३ हिरवटपणा (स्वभावाचा किं० वर्तनाचा).

खल्क [सं०' कफल्लक ' चा अपभ्रंश **] वि०** १ अकिंचन; दरिद्री. २ किडाकिडीत; रोडका.

खल्लड वि० १ नासून गेलेलें. २ रोडावलेलें. २ बसलेले, खोल गेलेले, (डोळे,गाल, पोट, इ०).

खल्लाड पु० १(पाण्याचा) खळखळाट.२(मनोविकारांचा) क्षोभ. ३ खळखळाट करणारा ओढा.

खल्वाट [सं०] वि० डोक्यावर केश नसलेला (माणूस); टक्कल पडलेला. **न०**डोक्यावरचें टक्कल. ***खल्वाटो निर्धनःक्वचित्** टकल्या माणूस अकिंचन कधीं असत नाहीं; टकल्या माणूस चार पैसे बाळगून असतोच असतो.

खवखव स्त्री० १खाजरें अळूं, सुरण, इ०च्या भक्षणानें घशांत किं० जिभेला वाटतें ती भावना. मिरमीर. ३ भुकेची वेदना; खाण्याची बलवत्तर इच्छा. ४ पश्चात्ताप. ५ कोणत्याही मनोविकाराची इसळी किं०उसळी (मैथुनाची, भांडणाची, मारामारीची,गाण्याची,इ०).६जळणाऱ्या पदार्थाची धग.

खवखवणें अ० क्रि०१ कांहीं जातीचें अळूं, सुरण, इ०च्या भक्षणानें घसा, जीभ, इ०नीं विकृत होणें. २ क्षुधातिशयामुळें होणारी जी विशिष्ट वेदना तिनें युक्त होणें. ३ झालेल्या पराजयाच्या दुःखानें उद्विग्न होणें. ४ उद्बोधक पदार्थ समीप असल्याकारणानें कांहीं कृति करण्याची जी उत्कंठा प्राप्त होते तिनें आक्रान्त होणें.

खवचट, खवंचट वि० १ खाजणारा (अळूं, सुरण, इ०). २ उगीचच्या उगीच कुरापती काढणारा. ३ खवट (नारळ, इ०).४ दुसऱ्याचीं वर्मे कर्मे प्रकट करण्याचा ज्याचा स्वभाव असा माणूस.

खवट, खवंट वि० १ खवचट. २ घाणेरें, नासलेलें (तूप, नारळ, खोबरें, इ०). ३ खंती उत्पन्न करणारें किं०चीड आणणारें (भाषण,वर्तन, इ०). ॐ**खवट खोबरें** न० १ कुचक्या स्वभावाचा माणूस.२ दुसऱ्याचीं वर्मै कर्मै काढून आनंद पावणारा.

खवटाण स्त्री० खवट पदार्थाचा घाण.

खवटेल, खंवटेल वि० खवट; खवटपणाच्या घाणीनें युक्त.

खवडव स्त्री०१ दुसऱ्याला छळणें किं० सतावणें (करणें).२ दुसऱ्याच्या खोड्या करून त्याला दिलेला त्रास किं०उपद्रव. ३ दुसऱ्यानें केलेल्या मांडणीचा किं० रचनेचा केलेला विचाड.४चहाडखोरी.

खवडा पु० १ मनुष्याच्या डोक्याच्या त्वचेवर किं०पशूच्या अंगावर खरजेसारखी होते ती विकृति. २ खवडा नाहींसा व्हावा म्हणून पशूला लास देतात तो;(लास देणें म्ह०तापवून लाल केलेल्या लोखंडानें त्वचा जाळून काढणें). ॐ **एकाद्या पदार्थाचा खवडा करणें** तो नासून, संपवून, किं० उधळून टाकणें. **एकाद्या माणसाचा खवडा उडणें** त्याचा नक्षा उतरणें. **एकाद्याचा खवडा जिरविणें** त्याचा नक्षा उतरविणें.

खवडाळणें स० क्रि० १ एकाद्याचीं वर्मेकर्मै काढून त्याला चेतविणें, चिडविणें, किं० सतावणें. २ एकाद्याच्या खोड्या करून त्याला सतावणें किं० उपद्रविणें.

खवंडाळी स्त्री० उपद्रव, सतावणूक, त्रास. ॐ**एकाद्याची खवंडाळी काढणें** त्याचीं वर्मेकर्मे काढणें किं० काढून त्याला पीडणें किं० सतावणें.

खवणणें स० क्रि० खवणीनें किं० अन्य साधनानें (नारळाच्या शकलांतील खोबरें) खरवडून काढणें.

खवणा पु० नारळ इ०तून खोबरें इ० खरवडून काढण्याचें आऊत किं० साधन. [(माणूस).

खवणा वि० खवचट, तिरसट, किं० हिरवट

खवणी [म० खवणें] स्त्री० १ नारळांतील खोबरें खरवडून काढण्याचें आऊत. २ ही खरवडण्याची क्रिया. ३ एक वृक्षविशेष.

खवणें स० क्रि०१ नारळांतील खोबरें साधनविशेषानें खरवडून काढणें.२ अळू, सुरण, इ०नीं तोंड, घसा, इ०चे ठायीं खिरखीर उत्पन्न करणें.

खवंद, खवंदळ न० १ फोड. २ खाजविण्यानें उत्पन्न झालेलें क्षत. ३ जखम, फोड, इ०ची खपली किं०चट्टा किं० वण.

खवदव स्त्री०१ उपद्रव, त्रास, कष्ट. २ खटपट. ॐ**खवदव्या** वि० १ खटपटी करण्याचा ज्याचा स्वभाव असा. २ बारकीं सारकीं कामें करण्यांत चलाख किं० तत्पर.

खवदळणें स० क्रि० १ ढवळणें. २ हालविणें. ३ ०ला हेलकावे किं० धक्के देणें. ४ (लाक्षणिक) चेतविणें;रागास चढविणें.अ०क्रि० रागावणें; चेतणें.

खवदळणें भा० क० क्रि० पोटांत ढवळणें.

खवना वि० १ झोंबरें, बोचरें (भाषण). २ हिरवट; चिडखोर. [खाद्यांचा शोकीन.

खवय्या [हिं० खावइय्या] पु० चमचमीत

खवल, खवलें न० १ व्रणावरची खपली. २ माशाच्या किं० सापाच्या अंगावरच्या वुट्टीच्या आकृतीच्या रेषा. ३ मातीच्या सापाच्या किं० माशाच्या अंगावर अशा रेषा उमटविण्याचें आऊत किं०साधन.४नारळाच्या शकलांतून खोबरें खरवडून काढण्याचें आऊत. ५शिताफळ, रामफळ, अननस, इ० फळांच्या त्वचेवर जे लहान लहान खरबडीत उंचवटे असतात ते प्रत्येक.६पिंजलेल्या कापसाप्रमाणें दिसणारे पातळसर ढगांचे पुंजके,—जे शिताफळ, इ०च्या त्वचेवरील उंचवट्यांसारखे दिसतात.

खवला पु०१ नारळ इ० खरवडण्याचें आऊत. २ सर्पादिकांच्या अंगावरील आकृतिविशेषांच्या रेषा. ३ मृत्तिकेच्या सर्पाच्या अंगावर खवले उमटविण्याचें आऊत. ४ चट्टा; व्रणावरची खपली. ॐ**खवलें मांजर** न० एक जंगली जनावर.

खवली स्त्री०नारळ इ०तून खोबरें इ०खरवडून काढण्याचें एक लहानसर आऊत.

खवळ स्त्री० १ क्षतावरील खपली. २ जमीन, इ० तील खोल चर.

खवळणें [सं०क्षुभ्=क्षोभणें] अ० क्रि० १ क्षुब्ध होणें. २ रागानें बेफाम होणें. ३ पित्त इ० उसळणें. ४ इंद्रियविशेष उद्दीप्त होणें. ५ मनोविकारविशेष उद्दीप्त होणें.

खवळा पु० १ माड,सुपारी,ताड,इ०ना जेथून झाप, झावळ्या इ० फुटलेल्या असतात तो प्रदेश-

२ गोड्या पाण्यांतील एक लहान मत्स्यविशेष.

खवळी स्त्री० लहान खपली.

खवा.पु०१दूध आटवून करतात तो मऊ पदार्थ,— ज्यांत साखर मिसळून पेढे करतात. २ नारळाच्या दुधाचा आटवून बनविलेला गोळा. ३ अडमुठेपणाची किं० अडदांडपणाची लहर (क्रि०येणें, उठणें).

खवा, खवाटा पु०, खवाट न० खांदा आणि बाहु यांचा संधि किं० सांधा.

खवास [अ०] पु० हुजऱ्या, खिजमदगार. ॐ**खवासखाना, खवासा पु०, खवाशी स्त्री०** हत्तीच्या अंबारांतील हुजऱ्याची जागा.

खवीस [अ०खबीस्]पु०१ मुसलमान मरून होतो तो पिशाच. २ (लक्षणेनें) अतिद्वाड आणि उपद्रवी पोर किं० माणूस. ३ खुनशी माणूस.

खवैय्या,खवैया वि०चमचमीत खाद्यें खाण्याची ज्याला चटक आहे असा.

खशाफशा, खशाभशा, खशाबशा क्रि० वि०अव्यवस्थितपणें, निष्काळजीपणें, किं०वेड्या-वाकड्या अक्षरांनीं (लिहिणें, लिहिलेला कागद किं० पत्र किं० जमाखर्च).

खशी, खसी स्त्री० (झाडाच्या मृत फांद्या) तोडणें किं०(झाड जोरानें वाढावें म्हणून चांगल्या जिवंत फांद्या) कापून टाकणें;उ०ह्या झाडाची खसी केली पाहिजे. **वि०**वरील प्रकारें तोडलेलें (झाड); उ० हें झाड खसी करा.

खष्ट [सं०क्लिष्ट] वि०१ द्वाड; उपद्रवकारक. २ कडक, तापट. ३ छाळिक; उ० गोदे, तुला खष्ट सासू मिळाली तर तुझे हाल कुत्रा खाणार नाहीं. ४ प्रतिकुल (दैव).५ निंद्य, लोकाचारास सोडून असलेलें(वर्तनक्रम, राहाणी, इ०).

खस [सं० खच्; म० खच] पु० १ वाळलेल्या पानांचा झाडाखालीं झालेला थर. २ नकोत्या सामानाची अडगळ. ३ विपुल परिमाण; मनमुराद पुरवठा; उ० यंदा आंब्यांचा खूप खस झाला होता.

खसका पु० जोराचा रट्टा किं० तडाका.

खसखशीत वि०१ स्पष्ट,असंदिग्ध, (हुकूम, ताकीद, इ०).२ जोरदार, आवेशयुक्त,उत्साहाचा. ३ निर्भीडपणाचा. ४ खरखरीत, ओबडधोबड, (स्पर्शाला).५ भीड न बाळगतां बोललेलें.

खसखस [फा० खस] स्त्री० १ अफूच्या बोंडांतील बारीक दाणे; अफूचें बीज. २ खसखस असा आवाज.ॐ**खसखस पिकणें** हंसण्याचा अनिवार लोट किं० लहर येणें. **खसखशीचें झाड न०** अफूचें झाड. **खसखशीचें बोंड न०** अफूच्या झाडाचें फळ.

खसखस,खसखसां क्रि०वि०खसखस आवाज होईल अशा रीतीनें (लिहिणें,कापणें, चालणें,इ०).

खसणें अ० क्रि० खचणें, दबणें (घराचा पाया, भिंत, इ०).मागें ' खचणें ' पहा.

खसकुद्दा वि० १ ओंगळ, अव्यवस्थित (माणूस). २ भिकार (पदार्थ).

खसलत, खसालत [अ० खस्लत] स्त्री० १ स्वभाव. २ वागण्याची (कडक) तऱ्हा इ० ॐ**एकाद्याची खसालत काढणें** १ त्याच्यासाठीं कष्ट सोसणें. २ त्याचा तिरसटपणा निमुटपणें सहन करणें. ३ त्याच्यासाठीं झीज सोसणें.

खसलती, खसालती [अ० खस्लत]वि० तापट, कडक, तिरसट.

खसवसा,खसावसां क्रि० वि०तिरसटपणानें, रागें भरून, त्रासिकपणें ओरडून (बोलणें). ॐ**एकाद्याला खसाखसा करणें** त्याच्याशीं तिरसटपणानें वागणें; त्याला हिडिसफिडीस करणें; त्याच्याशीं चरफडून बोलणें.

खसी [अ० खसी] वि० १ छाटलेला, तोडलेला (झाड, फांदी, इ०). २ खची केलेला किं० अंड बडविलेला ·(घोडा किं० बैल).

खसूस [अ०] वि०निश्चयात्मक, असंदिग्ध, पक्का केलेला, झालेला, किं० ठरलेला; निश्चित स्वरूपाचा.

खस्त [फा० खस्ताह्] न० १ चिखल, माती, केरकचरा, इ०.२नासाडी, नुकसान.३त्रास,उपद्रव. ॐ **खस्त खाणें, खस्ता खाणें** नुकसानाला किं० त्रासाला विषय किं०पात्र होणें.खालीं' खस्ता'पहा.

खस्त [फा० खस्ताह्] वि० १ (लढाईत) ठार मारलेला,कापून काढलेला. २ मरून पडलेला, मृत झालेला. ३ (लाक्षणिक)खजिल झालेला, खट्टू झालेला, ओशाळलेला; उ० तो आपल्या ठिकाणीं खस्त झाला किं० मरून खस्त झाला.

खस्ता [सं० कष्ट] स्त्री० अ० व०काळजी,

विवंचना, कष्ट; शुश्रूषेचा त्रास; उ०मी तुझ्यासाठीं थोड्या थोडक्या नाहीं खस्ता काढल्या (किं० भोगल्या, सोसल्या, खाल्या).

खस्ती वि० १ कुजक्या, नासक्या, सडक्या पदार्थांनीं व्यापलेली (जमीन). २ समुद्राच्या पाण्यानें खारट झालेली (जमीन).

खस्वस्तिक [**सं०** ख=आकाश; स्वस्तिक=बिंदु] **न०** आकाशांतील थेट आपल्या डोक्यावरचा (कल्पित) बिंदु. (याच्या उलट ' अधःस्वस्तिक ').

खहर पु० ज्याचा छेद शून्य (०) आहे [असा अपूर्णांक.

खळ [**सं०** खल] **वि०** १ दुष्ट. २ नीच. ३ **पु०, न०** धान्य मळण्याची जागा;खळें.

खळ स्त्री० १ कागद डकवण्यासाठीं किंवा वस्त्राला कडकपणा यावयासाठीं गहूं, तांदूळ, इ०चें पीठ पुष्कळ पाण्यांत शिजवून जो पातळसा पदार्थ तयार करतात तो. २ घारगे करावयासाठीं गुळाच्या पाण्यांत रवा भिजवितात तो. ※ **परटाची खळ आणि ब्राह्मणाची सळ लागलीच आहे** संसारांत परटाच्या खरकट्या खळीनें माखलेले कपडे अनिवार्य आहेत तसाच ' बामणीणीचा ' उपद्रव किं० जाचही अनिवार्य आहे.

खळ [**म०** खळणें; **सं०** स्खल्=घसरणें] **पु०** कांहीं कामामध्यें पडलेला खंड किं०झालेली थांबणूक; उ० आज सकाळीं जो पाऊस सुरूं झाला त्याला अझूनही खळ पडला नाहीं.

खळ स्त्री० कांहीं गोष्ट करण्याविषयीं किं० न करण्याविषयीं केलेला मनाचा निर्धार; उ०चिंगी जिनगरी बाहुलीसाठीं कालपासून भारी खळ घेऊन बसली आहे; उ० तें पोर जेवीत नाहीं, त्यानें खळ घेतली आहे.

खळक पु० चिंच, अमसोल, इ० चें फारच अंबट पाणी. २ चिंच, आमसोल, इ०च्या कोळांत फारच पाणी पडल्याकारणानें पचपचीत आणि पांचट झालेलें आंबवण.

खळका पु० १ काचेच्या बांगड्या, बरण्या, मातीचीं भांडीं इ०, फुटून त्यांचा झालेला चुरा. २ वाहत्या पाण्याचा खळखळाट.३ कडाक्याचें भांडण.

खळकावळका पु० ए० व०, खळकेवळके पु० अ० व० १ चिरचीर, पिरपीर. २ आढेवेढे.

खळखळ स्त्री० १ वाहत्या पाण्याचा होतो तो आवाज; उ० उथळ पाण्याला खळखळ भारी (म्ह० लक्षणेनें, कमी ज्ञान ज्याला तो बढाया फार मारतो). २ कोणत्याही पदार्थाचा हालविण्यानें होतो तो खळखळ असा आवाज; उ० दगडाचें पेव घालतां खळखळ, काढतां खळखळ (म्ह०निरुपयोगी वस्तूसाठीं त्रास करून घेणें हा मूर्खपणा होय). ३ बांगड्या किं० पावें चलून पावल्यानें होतो तो आवाज.४ नाखुषी किं०नापसंती(दर्शविणें);उ० एरंडेल घ्यावयाला सगुणा फार खळखळ करते. ५ दरासंबंधीं किं० हिशेबासंबंधीं त्रास येण्याइतकी ओढाताण. ६ द्यावयाचे पैसे द्यावयाच्या वेळची हुज्जत. ※ **खळखळ करून क्रि० वि०** १ जिकीर किं० ओढाताण करून. २ अत्यंत नाखुषीनें.

खळखळणें अ० क्रि०१ खळखळ अशा आवाजानें युक्त होणें (झाडाचीं पानें, परीट घडीचीं पेडेरलेलीं चिरगुटें, भांडीं, बांगड्या, नाणीं, इ०). **भा० क० क्रि०** दूध इ० पदार्थ न पचल्यामुळें ते पोटांत ढवळणें.

खळखळाट पु० खळखळ असा आवाज.

खळखळीत वि० १ खळखळ असा आवाज करणारा. २ शुष्क. ३ ज्याचीं शितें एकमेकांना चिकटत नाहींत असा (भात);फडफडीत(भात). ४ मळ काढल्या किं० निवाल्या कारणानें स्वच्छ झालेला (कपडा, पाल, दगड, इ०). ५ पाणचट, बेचव, फारच पातळ (दूध,ताक, इ०). ६ पूर्णपणें वाळलेला; वाळून खळखळ आवाज करणारा (शेंगा, धान्य, इ०).

खळगट, खळगोट वि०१ पाणकट आणि बेचव (आमटी, सार, इ० पातळ पदार्थ).

खळगा पु० १ खड्डा, खिंड, भगदाड. २ धाब्याच्या उपयोगाची माती (माळवदी घरावर घालतात ती). ३ काचेच्या बांगडीचा तुकडा किं०असे तुकडे समुच्चयानें. ४ पाण्याच्या जवळचा अर्धवट वाळलेल्या चिखलाचा थर. [खांच.

खळगी स्त्री० लहान आकाराचा खड्डा किं०

खळणें स० क्रि० १ थांबविणें. २ कागदास खळ, तुरटीचें पाणी, इ० पसरणें किं० सारविणें. ३ वस्त्रादिकांस खळीचा संस्कार करणें (परीट

करतात त्याप्रमाणें). अ० क्रि० १ थांबणें, बंद पडणें. २ अडून किं०तटून बसण. ३(पुरुष, घोडा, इ०चा वीर्यपात होणें (मैथुनक्रियेवांचून).

खळखळणें स०क्रि०१ वस्त्र, भांडें,इ०ना लागलेला किं० चिकटला मळ, माती, केर, इ० नाहींसें करण्यासाठीं पाण्यांत हालविणें किं० वरून पाणी घालून हालविणें. २ अस्वस्थ करणें, क्षुब्ध करणें, उद्दीप्त करणें (मन किं० कोणताही मनोविकार).

खळखळणें अ० क्रि० १ अस्वस्थ होणें; क्षुब्ध होणें; चेतणें. २ पोटांत ढवळणें. ३ दयार्द्र होणे (मन).

खळखळाट पु०१ वाहत्या पाण्याचा आवाज. २ कोणत्याही मनोविकाराचा क्षोभ किं०उद्रेक.

खळखळीत वि० मोकळ्या मनाचा, निःशंक वृत्तीचा (माणूस,वर्तनक्रम,भाषणाचा प्रकार इ०).

खळभट, खळेभट, खळ्याभट [म० खळ घेऊन बसणारा भट] पु० १ धान्याच्या खळ्यावर जाऊन खळ घेऊन धान्य मागून घेऊन निर्वाह करतो तो भट. १ एखाद्या पदार्थासाठीं हट्ट घेऊन बसणारा (माणूस, पोर, इ०).

खळमळ [म०खळ+मळ] पु० १ कोऱ्या कापडाचा खळीचा मळ.२ कोणत्याही कारणामुळें लागलेला मळ.

खळयज्ञ [म० खळ=खळें; सं०यज्ञ] पु० धान्याची कापणी होऊन तें यथास्थानीं नीट व्यवस्थेनें ठेविल्यादर शेतकरी लोक मेजवानी करतात ती; या प्रसंगीं कोंबडीं, बकरीं,इ० मारून खाल्लीं जातात; मागें ' खळ ' पहा.

खळव [म० खळणें=थांबणें] पु० १ कामांत पडलेला,झालेला,किं० केलेला खंड किं० थांबवणूक. २ उगमाचें पाणी बंद केल्यावर कांहीं काळ जो पाटांतून पाण्याचा प्रवाह चालतो तो.

खळवटणी [म० खळवटणें] स्त्री० झोडपावयासाठीं किं० रचून ठेवावयासाठीं धान्याचीं ताटें गोळा करणें किं० जमाविणें.

खळवटणें स० क्रि० १ हुडकणें; शोधणें;अवशेष न राहूं देतां सर्व पदार्थ शोधून काढणें; उ० चोरांनीं घरांतील सर्व पदार्थ खळवटून नेलें; उ० सर्व घर खळवटलें तेव्हां डबी सापडली. २ झाडावरून पडलेलीं किं०पाडलेलीं फळें जमा करणें; शेतांतील धान्य जमाविणें. अ० क्रि० (लाक्षणिक) प्राण घ्याकुळ होणें.

खळवळ व० रास दुसरीकडे नेल्यावर खळ्यावर पडलेलें धान्य; हें धान्य गोळा करून नेणें हा महाराचा हक्क असे.

खळवळणें अ० क्रि० १ थांबणें; स्तब्ध होणें; बंद पडणें. २ पाण्याचा पाट इ० चोंदणें किं०वहावयाचा बंद होणें. ३ ' खळवळणें ' पहा.

खळवाडी स्त्री० सर्व गांवांतील शेतकऱ्यांचीं खळीं जेथें पडतात तो गांवाशेजारचा प्रदेश.

खळविणें [म० ' खळणें ' चें प्र०रूप]स० क्रि० थांबविणें; कुंठित किं० स्तब्ध करणें; अडविणें;बंद पाडणें. [नव्हे असा मसाला.

खळा पु० गरीब लोकांचा फारसा झणझणीत

खळाखळ, खळाखळां क्रि० वि० खळखळ असा आवाज करून किं० करीत. २ संतत धारेनें (पडणारें अश्रु,जखमेंतून वाहणारें रक्त,इ०).

खळाळ पु० १ समुद्राच्या लाटांचा ध्वनि. २ भांडीं एकमेकांवर आदळून होतो तो ध्वनि. ३ ओढा, इ०चा ध्वनि.४ खळखळ ध्वनि करीत वाहणारा ओढा. [करणें.

खळाळणें अ० क्रि० खळखळ असा आवाज

खळाळी स्त्री० १ दगडांवरून वाहणाऱ्या पाण्याचा ध्वनि. २ खळखळ आवाज करीत वाहणारा ओढा. ֍ **उथळ पाण्याला खळाळी**(किं० **खळखळ**) **फार** ज्याच्या अंगीं विद्वत्तेचा किं० दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा गुण नसतो तो फार बढाया मारतो; खरोखरी गुणी माणूस बढाया मारीत नाहीं.

खळी स्त्री० १ लहान आणि सखल जागा; खळगी; लहानसर खळगा किं० खड्डा. ֍ **खळ्या खणणें** गवत किं० तोबरा ह्यासाठीं अधीर झालेला घोडा पायाचे आवात करून जमीन उकरीत असतो; ह्यावरून कांहीं खाद्यासाठीं किं० कोणत्याही पदार्थासाठीं हट्ट घेऊन बसणें किं०तगादा करीत राहणें. **खळ्या खणीत (किं० खादीत) बसणें** (ढोईफोड पंथाचे भिकारी किं० अन्य प्रकारचे भिकारी पैसा, चिरगुट, किं० भिक्षा, मिळेतोपर्यंत बसून राहतात आणि जमीन उकरीत बसतात, यावरून) कोणत्याही वस्तूसाठीं हट्ट घेऊन बसणें.

खळें [**सं०**खल=धान्य मळण्याचें खळें] **न०** १ धान्याचीं कणसें झोडण्याची जागा. २ जेवतांना लहान मुलें ताटांतील खाद्यांची करतात ती कालवाकालव; उ० अरे नान्या, हें काय तूं ताटांत असें कांहीं खळें करून ठेविलें आहेस ! तूं आठ वर्षांचा घोडा झाला आहेस आणि अजून तुला नीट जेवतां येत नाहीं ? ३ सूर्य, इ०खस्थ गोलांभोंवतीं वातावरणाच्या कांहीं विशिष्ट स्थितींत पडतें तें चक्र; हें खळें अशुभ समजतात; उ० तूं मेलास तर सूर्याला थोडेंच खळें पडणार आहे!टीप—खळ्याचा परीघ खूब मोठा असल्यास त्याला ' तळें ' असें म्हणतात. ४ बंदिस्त पटांगण. ꣸ **खळेवाडी स्त्री०** गांवकऱ्यांचीं खळीं जेथें असतात तें पटांगण. **खळेवेसकर पु०** खळ्यांवर देखरेख करणारा महार; गांवाच्या वेशीवर असतो तो ' गांववेसकर. ' **खळयाचा वि०** खळ्यावर तुडवून काढलेला; ह्याच्या उलट 'बडव्याचा' म्हणजे झोडपून काढलेलें (धान्य). **खळयाची मेढ स्त्री०** खळ्याच्या मध्यावर रोविलेला खांब. **खळेंतळवें न०** धान्य झोडावयाचें जें खळें आणि सतृण धान्य सांठवावयाचें जें तळवें, त्यांचेवर पडलेलें धान्य; उ० खळेंतळवें सगळें अर्धेल्यास देऊं नये; अर्धे आपण घ्यावें आणि अर्धे त्याला द्यावें.

खळेभट पु०वर ' खळभट ' पहा.

खळया [**म०**खळ] **वि०** हट्टी.

खाइरा [**म०**खाणें] **वि०**खाणारा(कवितेंत).

खाई स्त्री०१ मृत पतीबरोबर स्वताला जाळून घ्यावयाला सिद्ध झालेली त्याची पत्नी ज्यांत उडी घेते ती जळत्या लाकडांनीं युक्त खळी. २ खड्डा, खंदक, चर. ३ खाऊ (मुलांमध्यें प्रचलित शब्द). ४ खाण्याची अनिवार इच्छा.

खाऊ [**म०**खाणें] **पु०** १ मुलांना देतात तें खाद्य,—पेढे, बरफी, खारका, इ०. २ लांच. ३ चिरीमिरी. ४ लाभाचा धंदा किं०व्यवसाय;या अर्थी 'खाऊची गोष्ट'' असाही वाक्प्रचार प्रचलित आहे.

खाऊ [**म०**खाणें] शब्दाला ' खाणारा ' ह्या अर्थी लावावयाचा प्रत्यय; उ० अफूखाऊ, लाचखाऊ, मारखाऊ, खेटरखाऊ, इ०.

खाक [**फा०**] **स्त्री०** राख; रक्षा. **वि०**रक्षारूप; उ० शेतें जळून खाक झालीं.

खाक [**सं०** कक्षा] **स्त्री०** खांद्याखालचा कुशीच्या लगतचा शरीराचा भाग; छाती आणि पाठ ह्यांच्या मधील खांद्याखालचा खळगा; बगल. ꣸ **खाकसांजरी स्त्री०**खाकेंत झालेलें गळूं. **खाकेस मारणें** आश्रयाखालीं घेणें. **खाक (किं० खाका) वर करणें** आपल्या जवळ कांहीं नाहीं असें सांगणें. **त्यानें खाका वाजविल्या** त्याला अत्यानंद झाला. **खाकेंतून काढून बाजारांत मांडणें** आपली खोटी कृति खरी म्हणून सांगत फिरणें. **एकादी वस्तु खाकेस किं० खाकोटीस मारणें** ती पळवून नेणें; ती आपली आहे असें गृहीत धरून किं० असा बहाणा करून किं० आविर्भाव करून घेऊन जाणें.

खाकटणें स० क्रि० ओढून, ओरबाडून, किं० छाटून काढणें (झाडाचीं पानें, फांद्या, इ०).

खाकटा पु० खालीं'खांखोटा'पहा.

खाकर पु० वांशाचें निमुळतें टोक; वांशाचा शेंडा.

खाकर,खांकर वि० १ म्हातारपणामुळें जीर्ण आणि सुरकुतलेलें अंग. २ किडलेलें,वाळलेलें, वठलेलें (झाड).

खाकर, खांकर न० १ वाळलेलें किं० वठलेलें झाड. २ वांझोटें फळझाड.

खांकर, खांकरा पु० कणकेचा निखाऱ्यावर भाजून काढलेला रोठ (मुंबईचा शब्द).

खाकरणें, खाकेरणें स० क्रि० घशांतून कफ बाहेर काढण्यासाठीं घशावर कांहीं विशिष्ट प्रयत्न करणें; गळ्यांतील कफ सुटून बाहेर पाडण्यासाठीं कांहीं विशेष प्रकारें जोरानें श्वास सोडणें.

खाकरव(—वा—) सा पु० १(एकाद्याची काढलेली) खरडपट्टी.

खाकरवासा पु० १उंच झाड,—ज्याला फारशी पानें किं० फांद्या नाहींत. २ म्हातारपणांत स्पष्टपणें दिसत असलेला पाठीचा कणा; उ० त्या गोंदोबाच्या पाठीचा खाकरवासा निघाला आहे आणि तो कां आतां लग्न करायला निघाला आहे ? धन्य आहे बाई ह्या पुरुषांची !

खाकरा, खाकेरा पु० घशांतून प्रयत्नविशेषानें काढलेला आणि तोंडावाटें फेकून दिलेला कफ.

खाका [**फा०** खाकाह्] **पु०** १ भिंतीवर किं० जमीनीवर उठवावयाच्या नक्षीच्या आकृती ज्या कागदावर भोकें पाडून करतात तो कागद

२ कच्चा खरडा किं० मसुदा किं० आराखडा.

खाका पु० धाणा, विरुद. २ परिपाठ; नेम.

खाकावणें न० गर्जना.

खाकी (-क्या-) गोसावी पु० १ अंगाला राख फासणाऱ्या एक गोसाव्याचा पंथ. २ तापट; त्रासिक, किं० तिरसट माणूस.

खांकोटा खालीं 'खाखोटा' पहा.

खाकोटी, खाकाटणें, खाखोटी, खाकाळा, 'काखोटी,' 'काखाटणें' 'काखोटा' 'काखाळा,' हे शब्द पहा.

खाकोरणें स०क्रि०ओरवाडणें, (नखांनीं,इ०).

खाकोरा पु० ओरखडा, विचकोरा.

खाकोळें न०१ डोकें किं० डोक्याचा वरचा भाग; टाळकें; पुढील प्रयोगांत मात्र हा शब्द योजतात; उ० फार व्रात्रटपणा केलास तर तुझें खाकोळें फोडीन. २डोकें(तुच्छतेनें); उ०मी सांगितलेलें स्पष्टीकरण अझून तुझ्या खाकोळयांत नाहींशिरत काय?

खाखा [म० खाणें] स्त्री० खाण्याची अनिवार इच्छा; भयंकर क्षुधा; अन्नाभावें पोटांत पडलेली आग; क्रि० सुटणें, लागणें, करणें. ꠸**खाखा करणें** तरफडत बसणें; उ० सकाळपासून मुलें खाण्यासाठीं खाखा करताहेत, त्यांना दह्यांत कालवून पोहे दे.

खाखाइणें, खाखाणें अ०क्रि० कर्कश वाजणें.

खाखाई [म०खाणें] स्त्री०वर 'खाखा' पहा.

खाखावणें [म०खाणें]अ०क्रि०भुकेनें व्याकुळ होणें.

खाखोटा,खाकोटा पु०१लहान नारळ(अद्यापि तोडण्याजोगा न झालेला). २ पुरता न पिकलेला पेरू किं०ताडगोळा. ['खाकोळें' पहा.

खाखोळें न० डोक्याचा वरचा भाग. वर

खाच स्त्री० १ खड्डा, खळगा. २ बाणाचा टप्पा किं०पल्ला. ३ व्यापारांतील बूड किं० तोटा; बसलेली ठोकर. ꠸**खाचखब (-ब-)ळ** स्त्री०, **खाचखळगा** पु०, **खाचखोबळा, खाचरखळगा** पु०, **खाचरखुचर** न० १ खाच; खळगा. २ खड्डेविड्डे, खळगेविळगे. ३ खड्डे, खाचा, खळगे, (समुच्चयानें). १ जमीन,भिंत,इ० चा टेंगळें आणि खळगे असलेला पृष्ठभाग. २ जमाखर्च, लेख, इ०तील किरकोळ चुका किं० नोंदी. ३भाषणांतील किं० गायनांतील खुबी, मख्खी, किं०मर्म.

खाचणी स्त्री० १ पन्हळ, पाट. २ हत्यारानें लाकूड,इ०वर पाडलेला पन्हळासारखा चर. ३ कुसवासाठीं केलेली विंधी.

खाचर न० १ खड्डा, खळगा. २ पाण्याच्या प्रवाहानें पडलेला चर. ३ डोंगरावर केलेलें शेत. ४ लहानसा उसाचा मळा किं०भातशेत. ५ जाडेंभरडें लुगडें, धोतर, किं० कोणतेंही वस्त्र.

खाचरी [म० खाच] न०१ भातशेतांत किं० उसाच्या मळ्यांत पाणी ठरण्यासाठीं चारी बाजूंनीं बांध घातलेली जमीन. २ सखल प्रदेश,—ज्यांत पाणी ठरूं शकेल.

खाचविणें [म० खाच] स० किं० खाचा किं० विंध्या पाडून बसविणें.

खाचा पु० खोंवणी (वर्तुळाच्या किं० दुसऱ्या आकाराची); क्रि० घेणें, करणें, पाडणें, इ०.

खाचाड [म० खाच] न० मोठ्या आकाराची खाच; मोठा खड्डा किं० खळगा.

खाज [सं० खर्जु=खरूज]स्त्री० १ कंड, कंडू; खाजविण्याची प्रवृत्ति (येणें, सुटणें). २ अनावर किं० बळवत्तर इच्छा; खुमखुमी. ३गुमास्ता,मुनीम, कारकून, इ० नीं यजमानाचे खाल्लेले पैसे. ꠸**खाजकुइरी, खाजकुयरी(-ली,)खाजकुहिरी, खाजकोयरी, खाजरी कुयरी** स्त्री० कुयरीची एक जात,—जिचीं कुसळें अंगाच्या त्वचेला लागल्यानें अति कंड सुटते.

खाजगत, खाजगी, खाजगीवाला पुढें 'खासगत,' 'खासगी,' खासगीवाला,' हे शब्द पहा.

खाजण न० १ समुद्राच्या किं० खाडीच्या कांठीं केलेलें शेत,—ज्यावर खारें पाणी केव्हां केव्हां येतें. २ बंधारे घालून समुद्राचें पाणी यावयाचें बंद करून केलेलें शेत. ३ समुद्र, इ०च्या कांठीं खाऱ्या पाण्याचा चिखल ज्याच्यावर पडतो तें स्थळ. [खाजणासंबंधाचा.

खाजणी [म०खाजण]वि०खाजणांत केलेलें;

खांजणी स्त्री० बेरीज करण्याची एक विशिष्ट पद्धति किं० तऱ्हा; फाडे (पाडे,पाढे)इ०च्या मिळवण्या करणें किं० त्या करण्याचें कृत्य. ꠸**खांजणी**

खांजणी स्त्री० ए० व० १ गुणणें, भागणें, इ० रूप जें गणितकृत्य तें २ विक्रीच्या पदार्थाची किंमत जी व्यापाऱ्याचें सांगितलेली असते ती त्यानें थोडीशी कमी करणें आणि गिऱ्हाइकानें देऊं केलेली किंमत थोडीशी वाढविणें आणि अशा रीतीनें सौदा ठरविणें; तोडजोड. ३ दिवाळें ज्याचें निघालेलें आहे अशा व्यापाऱ्याच्या धनकोंना कांहीं प्रमाणानें कमी करून त्यांचीं देणीं देणें.

खाजणें[सं० खाज; खर्जु=कंड] स० क्रि० कंड उत्पन्न करणें. अ० क्रि० कंडूनें किं० खाजेनें युक्त होणें किं० असणें; उ०अळवानें हात खाजतो; उ० हें सुरण भारी खाजतें.

खाजदार, खाजदारी पुढें ' खासदार, ' ' खासदारी ' पहा.

खाजरा [म० खाजणें] वि० खाज उत्पन्न करणारें (अळूं, सुरण, कांहीं वनस्पति, इ०).

खाजव [म० खाज] स्त्री० खाजविण्याची प्रवृत्ति. **खाजव खाजव** स्त्री०१ दुसरा माणूस कलहास प्रवृत्त होईल किं० व्हावा म्हणून त्याची काढलेली कुरापत. २ छळणूक; उपद्रव; दुसरा चरफडूं लागेल असें कांहीं कृत्य.

खाजविणें [म० खाज] स० क्रि०कंडूशमन (घर्षणादि व्यापानें) करणें. **खाजवील त्याला खरूज,भोगील त्याला संपदा**१ जो अंग खाजवितो त्याला खरूज नसली तरी होते; जो पैशाचा उपभोग घेतो त्याचे जवळ पैसे नसले तरी येतात. २ जो खाजवीत असतो त्याला खरूज आहे आणि जो विलास करीत असतो त्याचे जवळ पैसे आहेत असें अनुमान करावयाला कांहीं हरकत नाहीं.

खाजाळ, खाजाळू [म०खाज] वि० १ भांडखोर; कुरापती काढणारा. २ खाज उत्पन्न करणारा (अळूं,सुरण,इ०). ३ अनिवार कामविकार ज्याला आहे असा.

खाजाळूं [म० खाज] न० घशांत किं० हाताला खाज उत्पन्न करणारी अळवाची एक जात.

खाजिवरा [म० खाज] वि० झोंबरा, बोचरा, खाजरा.

खाजी [हिं० खाजा]स्त्री० एक खाद्यविशेष. **खाजी करंजी** स्त्री० पक्वान्न म्हणून जी करंजी करतात ती.

खाजूर पु० १ खजूराचें झाड.२खजूर हें फळ.

खाजें [सं० खाद्य=खावयाचा पदार्थ] न० खावयाजोगा पदार्थ. २ खाण्याचा गोड पदार्थ. ३ खाजी नांवाचें गोड खाद्यविशेष. ४ वाण्याच्या दुकानांतील पदार्थ. ५ त्या त्या प्राण्याचें तें तें भक्ष्य किं० आवडतें भक्ष्य; उ० मेंढरूं हें लांडग्याचें खाजें; उ० उंदीर हें मांजराचें खाजें. ६ खारीक, खोबरें, खसखस,खिसमिस, आणि खडीसाखर, हीं पांच खाद्यें समुच्चयानें किं०एकैकश.: **पंच खाजें** न० 'खाजें' चा अर्थ ६ पहा.

खाट [सं० खट्वा=बाज] स्त्री०१बाज. २ पलंगडी. **आईच्या खाटेवर चढणारा** पु०ज्याला पापपुण्याचा तिळमात्र विचार नाहीं असा; हावें तें पापकृत्य निःशंक मनानें करणारा माणूस. **खाटेवर चढणें** आपणाला पूज्य जो कोणी किं० आपणावर उपकार करणारा जो कोणी त्याला संताप येईल असें कृत्य करणें. **खटखटलें** न०,**खाटखडबड** न० संसारांतील सामानसुमान, समुच्चयानें. **खाटखोली धरून बसणें** किं० **असणें** आजारानें किं० रुसून किं० अन्य कारणानें आपल्या खोलींतच बसून राहाणें. **खाटपसारा** पु० अव्यवस्थितपणें पडलेलें घरांतील समान (करणें,मोडणें,होणें,पडणें, इ०). **खाटमार** पु०खाटेला बांधून किं०खाटेंत डोकें अडकावून मार देण्याची शिक्षा. **खाटवाईक** वि० आजारी म्हणून खाटेवर पडून राहिलेला किं०खाटेला खिळलेला. **खाटवाकळ, खाटवाखळ** [सं० खट्वा+वल्कल(म०वाकळ)]स्त्री० १आजारीपणाचें ढोंग करून खाटेवर पडून राहाणें(क्रि०घेणें). २ तुच्छतेनें किं० बेपर्वाईनें एकाद्याला वागविणें किं०एकाद्याशीं वागणें, उ० तूं माझ्याशीं खाटवाकळ केलेली मला खपणार नाहीं. **खाटवावडी** स्त्री०खाटेच्या आकाराची वावडी (उडवावयाचा पतंग). **खाटली** स्त्री० आडवे धागे ठासून बसवावयाचें कोष्ट्याचें एक आऊत; कटतर. पु० २ मिरच्या, शिकेकायी, इ० पदार्थ कुटले जात असतां त्याचे कण घशांत जाऊन ठसका किं० खोकला उत्पन्न करतात ते समुच्चयानें. २ तळतांना उत्पन्न होतो तो वास किं०दुर्गंधी.

खाट, खष्ट, खाष्ट [सं० क्लिष्ट=पीडादायक] वि० द्वाड; कडक; तुसडा; उग्र.

खाटलें [म० खाट] न० १ ल्हान खाट. २ 'सप्तर्षि,' ह्या नांवाचा उत्तर ध्रुवाजवळचा तारकापुंज(अशिक्षितांचा प्रचार). ॐ**खाटलें बाजलें** न० १ उत्तर ध्रुवाजवळील 'सप्तर्षि' नांवाचा तारकापुंज (अशिक्षितांचा शब्द). २ लुगड्यावर ज्या समविषम चौकड्या असतात त्या समुच्चयानें. **खाटलेंवाईक, खाटलें कुंजविणारा** पु० आजारी माणूस (तिरस्कारानें कि० वैतागानें).

खाटा स्त्री० १नांगरून पण वीं न पेरतां तशीच कांहीं काळ टाकलेली जमीन. २ अशा जमीनीवर केलेलें पीक. [ओबडधोबड.

खाटा वि० १ अति आंबट (फळें, इ०). २

खाटू, खाटूळ, खाटोळ वि० अति आंबट किं० अंबलेलें (खाद्य, फळ,इ०).

खाट्या वि० अंबट (फळ).

खाड[फा०]न० दाढी किं० कल्ले(तुच्छतेनें). ॐ **खाडास वेगळें बोडास वेगळें कोण देतों?**दाढीमिशांना वेगळें तेल आणि डोक्याला वेगळें तेल कोण देणार ? एकदा दिलेल्या तेलांतच दोन्ही कामें भागविलीं पाहिजेत; अति हावरटपणाचा तिरस्कार करतांना ही म्हण योजतात.बोड म्ह०डोकें(तिरस्कारानें); बोडकें, टाळकें.

खांड [सं० खंड] न० १ सुपारी, बिब्बा, हळकुंड, गोंवरी, इ०चा तुकडा. २ घर, इ०च्या दोन खांबांवर आडवें लाकूड घालतात तें,—ज्याचेवर तक्तपोशीच्या कड्या बसवितात. ३ शेळ्या, मेंढ्या, इ० चा कळप. ॐ**खांडकापी सुपारी** स्त्री० कोंवळीं पोफळें घेऊन त्यांचे काप करून पाण्यांत शिजवून उन्हांत वाळत असतां त्यांच्याच रापाच्या पाण्याचीं पुटें देऊन केलेली सुपारी. हिला 'कचरी सुपारी,' 'काचरी सुपारी,' 'लवंगकाचरी सुपारी' अशीं अन्य नांवे आहेत.

खांड [सं० खंड] स्त्री० १ शेताचा बांध इ०स पाण्याचा नेट इ० कारणांमुळें मध्यें जी खिंड पडते ती. २ भिंत, बांध, इ०त पडलेली भेग किं० चीर. ३ तोंडांतील दांतांच्या रांगेंतील एक दांत पडल्यानें होते ती खिंड,—जिला मुलें 'बोथरखिंड ' म्हणतात. ४ शस्त्राच्या धारेला पडतात त्या खाचा व्यक्तिशः.

खांड [सं०खंड] न० १लाकडाची मोठी आणि लांब गंडेरी किं०चौरस लांबट लाकूड. २ झाडाच्या बुंध्याचा किं० फांदीचा एक मोठा तुकडा किं० गंडेरी. ३शेताचा एक विभाग.

खांड सं० पु० खडीसाखर. २ तरवार.

खांडक (—ग—)ळी, **खांडगाळी** स्त्री०सुवासिनींस रांड,बोडकी,इ०शब्दात्मक दिलेली शिवी.

खांडकी [म० खांड; सं० खंड] स्त्री० दगडाचा उडालेला किं०उडविलेला तुकडा किं०कलपा.

खांडचोर [म० खणणें+चोर]पु०घर फोडून चोरी करणारा चोर.

खांडचोरी [म० खणणें+चोरी] स्त्री० घर फोडून केलेली चोरी.

खांडडोह (—हो) [म० खंड+डोहो] पु० उन्हाळ्या दिवसांत नद्यादिकांचे प्रवाह बंद पडल्यामुळें जे त्यांना मध्यें मध्यें खंड पडतात ते प्रत्येक.

खांडवळणं [म० खांडणें] स्त्री० खणण्याबद्दल दिलेली मजुरी किं० झालेला खर्च.

खांडणें [सं०खंड्=तोडणें] स० क्रि० १ तोडणें. २ जोरानें (एकाद्या वस्तूचा) तुकडा पाडणें. ३ खणणें. ४ छिन्न भिन्न करणें. ५ नको तो भाग छाटून टाकणें. ६ खांडवी, शंकरपाळे, साखरपाऱ्याचा वड्या, इ०चा लध्या पाटावर थापल्यावर त्यांच्यावर त्यांचे तुकडे पाडावयांसाठीं ज्या रेघा ओढतात, त्या रेघा ओढणें.

खांडपासोळा पु० दुष्ट आणि मत्सरी माणूस.

खांडमिशा स्त्री० अ० व० १ ज्या मिशांच्या केशांच्या रांगेंत मध्यें खिंडी आहेत अशा मिशा.२ ज्या मिशांची उजवी बाजू आणि डावी बाजू या दोहोंच्या मधोमध खंड पडलेला असतो अशा मिशा.

खांडतोळी स्त्री० एक पक्वान्नविशेष.

खांडव (—वा) पु० नदीच्या पात्रांतील कोरडा उंचवटा. वर ' खांडडोहो ' पहा.

खांडवा पु० लग्न, मुंज, इ०च्या समारंभांत पानसुपारी देण्यासाठीं विडे, सुपारी, इ० ज्या झोळींत घालतात ती झोळी.

खांडवी स्त्री०, **खांडवें** न० तांदुळाचा किं० गव्हाचा रवा तुपावर भाजून त्यांत साखर, नारळाचा चहू, इ० मसाला घालून त्यांत पाणी घालून त्या लध्याला आंच देऊन तो पोटावर थापतात, आणि त्याच्या वड्या पाडतात,त्या प्रत्येक.

खांडवी स्त्री० खारविलेल्या माशाचा तुकडा.

खांडवें न० ताडावर किं० माडावर चढतांना पायांना घालतात तो दोरीचा फास. ꣸ **आडव्यास खांडवें बोलणें** सरळपणें बोलणाराशीं तिढ्या रीतीनें बोलणें; सभ्याशी असभ्यपणानें वागणें.

खांडवेल स्त्री० एक वनस्पतिविशेष.

खाडा [म० ' खड्डा ' चें विकृत रूप] पु० १ खड्डा, खळगा. २ सतत चाललेल्या कामांत किं० क्रमांत जी कांहीं काळ होतें थांबणूक ती; चालू सरणींत किं० क्रमांत पडलेला खंड; उ०त्या कामांत दोन रोज खाडा पडला. ३ गैरहजीरीचा दिवस; उ० ह्या महिन्यांत तुझे तीन खाडे झाले; उ० तुला एक वेळ मी माफी करतों, पुन्हां उशीरां आलास तर तुझा सबंध दिवसाचा खाडा धरीन (किं० मांडीन). ४ वस्तूचा पूर्ण अभाव; उ० ह्या तपेलींत तेलाचा खाडा आहे. पु० विन कामाचा दिवस किं०महिना किं० वेळ. ꣸ **खाड्यांत पडणें** नुकसानीस पात्र होणें. **एखाद्याला खाड्यांत घालणें** त्याचें नुकसान होईल किं० तो संकटांत पडेल असें करणें.

खांडा पु० १ सरळ, रुंद पात्याची, दुधारी आणि रुंद अग्राची तरवार. २ शस्त्राच्या धारेचा उडालेला लहान कळपा. ३ ओबडधोबड चर. ꣸ **खांडाईत, खांडेकरी** वि० खांडा जातीच्या तरवारीनें सज्ज असलेला. [भोंक.

खांडार [म० खांड] नं० भगदाड; मोठें

खाडी स्त्री० १ नदींत जेथपर्यंत समुद्राच्या भरतीचें पाणी चढतें तेथपर्यंतचा नदीचा भाग, (मुखापासून).२खिंड. ३ शरीरावरील खवंद.

खांडूं न० वर ' खांडवें ' पहा.

खाडू वि० १ द्वाड, हट्टी, उच्छृंखळ. २ विन मिशांचा (पुरुष). ३ षंढ, नपुंसक.

खांडूक न० १ गळूं, गळू, इ०, किं० त्याचें क्षत. २ वाहत राहिलेलें गळूं.

खाडूस न० १ अडथळा, व्यत्यय, खंड. २ अडकावण. ३ अडचण; उ० घरामध्यें सुनेला सासूचें खाडूस (होतें किं० वाटतें).

खांडें न०नदीच्या प्रवाहांतील कोरडा उंचवटा.

खांडेनवमी स्त्री० नवरात्राचा नववा दिवस; ह्या दिवशीं कुणबी लोक बकरीं, कोंबडीं, इ० मारतात.

खांडोरें [म० खांड] न० १ वंधाऱ्यांत किं० भिंतींत पडलेली खिंड किं० भोंक. २ दांतांच्या रांगेतील एक दांत पडल्याकारणानें होते ती खिंड.

खांडोळी स्त्री० एक खाद्यविशेष. ꣸ **एकाद्या पदार्थाची खांडोळी करणें** त्याचे तुकडे तुकडे करणें; उ० पुन्हां माझ्या वाटेस जा तर खरा कीं तुझी खांडोळी करून सोडतों ! याद राखून अस !

खांडोळें [म० खांड; सं० खंड] न० १ तुकडा. २ तोडून काढलेला किं० छाटून टाकलेला भाग किं० अवयव. ꣸ **एकाद्याचीं खांडोळीं करणें** त्याचे तुकडे तुकडे करणें.

खाण [सं० खानि] स्त्री० १ मोठा खळगा. २ पदार्थविशेषाचें उत्पत्तिस्थान; पदार्थविशेष जेथें विपुल मिळतो तें स्थळ त्या पदार्थाची 'खाण;' उ० दगडाची खाण.३ मुंग्या किं०इतर कृमिकीट यांच्या वसाहतीचें स्थळ.

खाण [म० खाणें] न० खाणें;' खाण ' हा शब्द फक्त ' जेवण ' ह्याला पुस्तीच्या रूपानें जोडतात; जेवणखाण म्ह० जेवणेंबिवणें.

खाणखूण स्त्री० ए० व०, **खाणाखुणा** स्त्री० अ० व० तपशीलवार माहिती; पत्ता लावण्याचीं साधनें,तपास करण्याला आधारभूत वर्णन;'खाणाखुणा ' हा शब्द बहुधा अनेकवचनीं योजला जातो.

खाणगत स्त्री० खाणी उकरणारांकडून सरकाराला मिळतो तो कर. [खणणें.

खाणणें [सं० खन्=खणणें] स० क्रि०

खाणवट स्त्री० चोळीची पाठ,म्ह० चोळीच्या पाठीचा तुकडा.

खाणाजंगी [फा० खानाह्=घर; जंग=युद्ध] स्त्री० गृहकलह. २ आवेशाचें भांडण. ३ कज्ज्याचा वाद. पुढें ' खानाजंगी ' पहा.

खाणावळ [म० खाणें] स्त्री० १ आपल्या जेवण्याच्या खर्चाबद्दलची रकम. २ दुसऱ्याच्या घरीं आपण कांहीं दिवस जेवल्याबद्दल त्याला दिलेले पैसे. ३ लोकांस जेवूं घालून त्याबद्दल पैसे जेथें घेतले जातात असें ठिकाण.

खाणी [म० खाण] स्त्री०१दगड इ०ची लहान खाण; वर 'खाण' पहा. २ उत्पत्तिस्थान;उगम.३ जो विशिष्ट पदार्थ जेथें विपुल मिळतो तें ठिकाण. ꣸ **खाणीचा** वि० १ चांगल्या कुटुंबांतील. २चांगल्या उगमाचा.

खाणें [**सं०** खाद्=खाणें] **स० क्रि०** १ अन्नादि पदार्थ चर्वणादि क्रिया करून गळ्याखालीं उतरविणें. २ (लाक्षणिक) घेणें; ०ला जरूर असणें; ०ला लागणें; ०साठीं खर्च होणें; उ० ह्या मुलीच्या लग्नानें माझे दोन हजार रुपये खाले; उ० ह्या घराच्या रंगरेखोटीनें माझे पन्नास रुपये खाले. ३ (लाक्षणिक) पराभूत करणें; जिंकणें; उ० गोवर्धनशास्त्र्यानें तुमच्या त्रिविक्रमशास्त्र्यास वादामध्यें एका घटकेंत खाऊन टाकलें. ४ औषधादिकांनीं रोगादिकांस हटविणें किं० घालविणें किं० निर्वीर्य करणें किं० त्यांची वाढ कंठित करणें; उ० हें मल्म तीन दिवसांत तुमचें गजकर्ण खाऊन टाकील. ५ रासायनिक द्रव्यादिकांनीं धातु, इ० पदार्थ नाहींसा करणें; उ०पारा शिसें खातो; नैट्रिक आसिड तांबें खातें. ६ खर्च करावयास लावणें; उ० ह्या बेरजांनीं माझा अर्धा तास खाल्ला; उ०ह्या गोपाळपंतानें माझा एक तास खाल्ला. ७ (खेळांत) मारणें; उ० तुमच्या वजीरानें माझा उंट खाल्ला.८ अन्यायाच्या मार्गानें मिळविणें; उ० लांच खाणें, पैसे खाणें.९ अनुभविणें, भोगणें, सोसणें; उ० हवा खाणें, विसावा खाणें, मार खाणें, इ०. ॐ **एकाद्याचा जीव खाणें** त्याला छळणें किं० सतावणें. **एकाद्याच्या जिवाला खाणें** झोंबणें. **शब्द किं० अक्षर खाणें** लिहितांना किं० बोलतांना वगळणें. **दांत ओठ खाणें** किं० **चावणें** चरफडणें; रागानें दांतांवर दांत घासणें किं० रागामुळें आपले ओठ दांतांनीं चावणें.**डुलक्या खाणें** डुलक्या येत असणें. **ठोकर खाणें** नुकसानीस पात्र होणें. **एकाद्याला खावयाला उठणें** त्याच्यावर हल्ला किं०गहजब करावयास किं० त्याच्यावर दोष लादण्यास आवेशानें सरसावणें. **गटांगळ्या खाणें** पाण्यांत धडपडणें. **टक्के टोणपे खाणें** प्रतिकूल किं० दुःखकारक स्थितीचा अनुभव एकाद्याला प्राप्त होणें. **शपथ खाणें** शपथपूर्वक कांहीं विधान करणें; शपथ घेणें. **साप खाई पोट रितें** किं० **रिकामें** किं० **उपाशी** साप दंश करतो पण त्याचें पोट भरत नाहीं; आपला कांहीं लाभ नसतां दुसऱ्याची हानि दुर्जन करतो. **हें कापड मळ खाणारें आहे** हें कापड मळ लागला तरी वाईट दिसणार नाहीं.**मन खाणें** पश्चात्तापानें व्यथित होणें; उ० मी आईला उद्धटपणें बोल्लों त्याबद्दल माझें मन खात आहे. **मनाला खाणें** लागणें; झोंबणें. **खाऊं जाणें तों पचवूं जाणें** जो दुसऱ्याचे पैसे अन्यायानें खाण्यांत पटाईत आहे तो आपली लबाडी उघडकीस न यावी अशी तजवीजही करूं शकतो. **जेवून खाऊन सुखी** सुस्थितींत असलेला.**खायाप्यायाचे दिवस** (**किं० वय**)चैनीचे दिवस (किं० वय); तारुण्य. **खाववेना तर खाववेना आणि लवंडूनही देववेना** आपणाला एकाद्या वस्तूचा उपभोग घेतां येत नसून किं० आपल्याला एकादी वस्तु निरुपयोगी असून ती दुसऱ्याच्या उपयोगाला किं०उपभोगाला देण्याची इच्छा नसते (दुष्ट किं० मत्सरी माणसाचें हें वर्णन); गंजीवरच्या कुत्र्यासारखें वर्तन असणें. **खाण्यांत तुटणें** वार्द्धक्यानें खाण्याच्या किं०पचविण्याच्या बाबतींत कमी होणें.

खाणें [**सं०**खाद्=खाणें] **अ०क्रि०**१ कांहीं खाद्य खाणें;अल्प उपहार करणें;उ०मी मधल्या सुट्टींत घरीं येऊन खातों आणि मग शाळेंत जातों.२दुखत असणें.३उ०सकाळपासून माझें डोकें खात आहे.

खाणें [**म०** खाणें] **न०**१ खाण्याची क्रिया. २ खावयाचा पदार्थ; खाद्य.ॐ**खाणें पिणें न० ए० व०** खाण्याचा आणि त्यावर पाणी पिण्याचा व्यापार; खाणें आणि पिणें. **खाणें जेवणें, जेवणें खाणें न० ए० व०** १ जेवणखाण. २ जेवणाखाणाची सोय किं० तजवीज.

खाणोरा [**म०** खाणें] **वि०** १ आधाशी. २ खाण्याचा षोकीन; चमचमीत खाद्यें ज्याला आवडतात असा(माणूस)३सदा खाण्यावर ज्याचें लक्ष्य असा.

खाणोरी चोर, खाणोरी चोरी मागें ' खाणचोर ', ' खाणचोरी ' पहा.

खाण्णी, खाण्णीभाण्णी मागें ' खांजणी, ' ' खांजणी भाजणी ' पहा.

खात पु०, न०शेत सुपीक व्हावें म्हणून त्यांत घालतात तो केरकचरा, शेण, इ०.

खातर [**अ०** खातिर्] **स्त्री०** १ पर्वा; हळहळ; फिकीर; (नकारार्थी प्रयोग); उ० घोडजुगारींत हजार रुपये त्याचे गमावले त्याची त्याला

तिळमात्र खातर नाहीं. २ खातरी; भरंवसा; विश्वास. ३ आवड, इच्छा, लहर; उ० माझ्या खातरीस येईल तसें मी करीन किं० तसा मी वागेन. **श०यो० अ०** ०साठीं: ०प्रीत्यर्थ; उ०माझ्या आईघेरच्या नातवाखातर मी हावा तितका पैसा खर्चावयाला सिद्ध आहें. ❀ **खातरनिशा स्त्री०** एकाद्या वस्तूसंबंधानें असलेला भरंवसा. **खातरजमा स्त्री०** पर्वा; मनाचा असंदिग्धपणा;भरंवसा. **खातरजामीन, खातरदार, खातरदारी पु०** १ जामीन.२ आश्वासन.

खातर स्त्री० १ खड्डा. २ खिंड. ३ भगदाड.

खातरखा[**फा०**खातिरख्वाह्]**वि०**हितचिंतक. (कागदोंपत्रीं मात्र). [२ खड्डा.

खातरा पु० १ (शेतांत घालतात तें) खत.

खातरी [**म०** खातर; **अ०** खातिर्] **स्त्री०** १ भरंवसा; विश्वास; मनाचा दृढ ग्रह. २ ओळख, जामिनकी.३ भलावणपत्र; उ०तुम्ही कोणाची तरी खातरी घेऊन या म्हणजे ही रक्कम तुम्हाला द्यावयाला आम्ही सिद्ध आहों. ❀**खातरीचा वि०**१पसंतीचा; चांगला म्हणून ठरलेला. २ विश्वासाम पात्र.

खातऱ्या [**फा०**] **वि०** भिंतीला भोक पाडून घरांत शिरतो तो (चोर).

खातवट (–ड) न०उकिरडा.**वि०** खत घालून सुपीक केलेली जमीन.

खातवणा [**म०** खाणें] **वि०** १ खाण्यापिण्याच्या पदार्थांसंबंधानें चोखंदळा; खाद्यें आणि पेयें ह्यांचे ज्याला चवणे आहेत असा. २ खादाड.

खाता [**म०** खाणें] **वि०** खाणारा; खातो तो. ❀**खात्याला न खाता देखूं शकत नाहीं** ज्याला खावयाला मिळत नाहीं तो ज्याला खावयाला मिळतें त्याचा मत्सर करतो. **खातीचे गाल आणि न्हातीचें बाल झाकत नाहींत** जिला यथेच्छ खावयाला मिळतें तिचा चेहेरा टवटवीत आणि तजेलेदार दिसतो;आणि जिला न्हावयाला तेलें,उटणीं,इ०विपुल मिळतात तिचे केश तुळतुळीत दिसतात; खऱ्या गुणी माणसाचा गुण स्वयमेव प्रकटतो. **खाताजेवता,खातापिता वि०** खेर्ये किं० ज्याला खाण्यापिण्याची ददात नाहीं असा (माणूस किं०घर); उ० खातेंपतें (किं० खातेंजेवतें)घर पाहून तेथें तुम्ही आपली मुलगी द्या.

खातां जेवतां (किं०–पितां) **क्रि० वि०** १ खावयाला आणि प्यावयाला विपुल मिळत असून. २ आहार लेशमात्र कमी न होतां; उ० खातां जेवतां कां रे रडतोस ? उ० तो खातां जेवतां मेला (म्ह० कांहीं आजार न होतां त्याला मरण आलें). **खात्यानारीचं दैव न०** स्त्रीची वैभवाची स्थिति; उ० आवडीचें खात्यानारीचें दैव केव्हां फळाला येईल तें येओ ! **खातें तोंड न०** ज्यांना खावयाला घालावयाची जबाबदारी एकाद्याच्या माथ्यावर असते तो;उ०माझ्या घरीं खातीं तोंडें पांच आहेत आणि म‍ला पगार मिळतो चाळीस रुपये;मी बायकोला दागिने कसे करूं शकेन ?

खाताड न० गांवाबाहेर जेथें गांवांतील मैला, केरकचरा इ०, टाकतात अशी जागा.

खाताड वि० वर ' खातवड ' पहा.

खातें न० १रोजखड्यावर एकाच्या नांवें अनेक रकमा अनेक पानांवर असतात त्याचें नांव दुसऱ्या कागदावर लिहून त्याखालींच देण्याघेण्याच्या ज्या सर्व रकमा लिहितात तो कागद; एकाद्या माणसाशीं झालेला जो देवघेवीचा व्यवहार त्याची त्याच्या नांवावर एकत्रित केलेली तारीखवार नोंद. २ज्या ज्या नांवाखालीं ज्या ज्या समुदायाची किं० व्यवहाराची घडामोड होते, त्या त्या नांवाखालीं त्या त्या समुदायाची किं०व्यवहाराची नोंद. ३किनखाब,मश्रू, इ०च्या घडीभोंवतीं बांधतात तो दोरा. ४ टापू, पल्ला, (अमल, राज्य, राज्याची बाबत, इ० संबंधांत); उ० हा गांव मुंबई खात्याखालीं मोडतो. ५ शाखा; कारभाराचें क्षेत्र;सदर; उ० बिगार खातें, मुलकी खातें, लष्करी खातें; शाळा खातें, इ०. ❀ **खातें बाकी स्त्री०** हिशेबाच्या वहीतील पक्का केलेला शेवटचा आंकडा; परस्परांच्या देण्याघेण्याच्या रकमांची वजावाट होऊन जो आंकडा निघतो तो. **खातेंपोतें न०** एकाद्या माणसाशीं केलेला खरेदीचा व्यवहार आणि विक्रीचा व्यवहार यांची एकवटणी.**खातेंपोतेंबरोबर अ०**णें१देण्याची रक्कम आणि घेण्याची रक्कम ह्या दोन्ही समान असणें.२एका बाबतींत नुकसान आणि दुसऱ्या बाबतींत तितकाच नफा अशी स्थिति. ३ एक माणूस मरणें आणि दुसरें जन्मणें (एकाद्या कुटुंबाविषयीं बोलतांना).

खातेरें न० १उकिरडा; केरकचरा. २केरकचरा टाकण्यासाठीं खणलेला खड्डा. [खाज.

खाद [म० ' खाज'चें रूपांतर] **स्त्री०** कंडू,

खांद स्त्री०मोठी फांदी किं० शाखा(झाडाची).

खांद पु० १ खांदा (ओझें उचलण्याच्या संबंधानें); उ० मेण्याला मी खांद देईन; उ० आज माझा खांद ठणकत आहे, उद्यां हें गाठोडें मी रानड्यांच्या घरीं पोंचतें करीन. २ परिपाठ, सराव, राबता (क्रि० पडणें). ३ सवय. ४ दुसऱ्याचा बैल, रेडा, इ० जनावर आपल्या कामासाठीं आपण आणले असतां त्याच्या मालकाला मोबदला म्हणून दिलेलें धान्य. ॐ **एकाद्याशीं खांद बांधणें (किं० करणें)** त्याच्याशीं स्पर्धा करणें किं० सामन्याला उभें ठाकणें. **खांद येणें** ओझें खांद्यावर वाहून खांदा दुखत असणें. **खांद चोरणें** नांगर, गाडी, इ० ओढण्याचें बाबतींत कुचरपणा करणें; उ० हा बैल खांद चोरणारा आहे. **खांद देणें** कांहीं ओझें वाहण्याला किं० ओढण्याला खांद्याचा नेट किं० आधार देणें किं०लावणें. **खांदकुहा पु०** घोड्याच्या खांद्यावरील भोंवरा;हा अशुभ असतो. **खांदकरी पु०**१ खांद्यावर ओझें वाहणारा. २तिरडीला खांदा देणारा.

खाद [**सं०** खाद्=खाणें] **स्त्री०** खाणें; आहार; खावयाच्या अन्नाचें परिमाण; उ० "खाद तशी लात " म्ह०ज्या प्रमाणांत त्याचें खाणें त्या प्रमाणांत त्याचें शरीरबळ असावयाचें; उ०"कारकुनाचें लिहिणें म्हणजे उंदराची खाद " कारकुनानें लिहिलेला कागद उंदरानें कुरतुडलेल्या खाद्याप्रमाणें असतो म्ह० कारकुनाचें लिहिणें (बहुधा) वाईट असतें; उ० " खाद आहे तर लाथ आहे " म्ह० तो भोक्ता आहे आणि नशीबानें त्याला खावयाला मिळतेंही. उ० " खाद हरी व्याध " म्ह० पोटभर जेवल्यानें आजार टळून अंगांत ताकद येते. २ उंदीर वगैरेंनीं कुरतडणें,किं०कुरतुडलेला पदार्थ. २ पक्ष्यांनीं चोंची मारणें किं० चोंची मारलेलें फळ; इ०. ३ सार्वजनिक किं० लोकांच्या व्यवहारांत पैसे खाणें किं० खाल्लेले पैसे.

खादगी [**म०** खाणें] **स्त्री०** १ दुसऱ्याचा व्यवहार आपल्याकडे असतां त्यांत मारलेले पैसे (खाणें). २ माणसाचा किं० जनावराचा नेहेमींचा आहार किं०खाण्याचें परिमाण. ३ दुसऱ्याच्या घरीं आपण जेवीत असतां जेवणाच्या खर्चाबद्दल दिलेले पैसे. ४ पोटासाठीं नोकराला करून दिलेली नेमणूक.

खादरा [**म०** खाणें] **वि०** खाणारा; ह्याचा उपयोग प्रत्ययाप्रमाणें होतो;उ०अफिमखादरा,लाचखादरा, मारखादरा,खेटरखादर, भांगखादरा इ०.

खांदल (–ळ–)णें [**म०** खांदा] **स० क्रि०** डोक्यावर घेतलेलें ओझें डोक्याला कांहीं वेळ आराम वाटावयासाठीं खांद्यावर वाहाणें.

खांदवटा [**म०** खांदा] **पु०** (ओझें वहावयाच्या किं० ओढावयाच्या दृष्टीनें) खांदा किं० खांद्याची ताकद; उ० ह्या बैलाचा खांदवटा अझून चांगलासा भरला नाहीं; उ० ह्या दाणेआळींतल्या ओझेवाल्याच्या खांदवटा पल्लाभर तांदूळ सहज वाहूं शकेल.

खांदवडा [**म०** खांदा] **पु०** १ उसन्या आणलेल्या बैलाच्या किं० रेड्याच्या उपयोगाच्या मोबदला देतात जें धान्य, गवत, कडबा, इ० तें.२ अशा तऱ्हेचा व्यवहार (क्रि० करणें).

खांदपा [**म०**खांदा]**पु०**खांद्यानें किं० खांद्यावर ओझें वहावयाचा सराव किं० परिपाठ किं०ताकद.

खांदा [**सं०** स्कंध] **पु०** १ बाहुमूलापासून ग्रीवामूलापर्यंतचा शरीराचा भाग (मनुष्याचा). २ मानेचा वरचा भाग (बैल, रेडा, इ०चा).३ खांद्यावर वाहतां येईल इतक्या परिमाणाचें ओझें. ४ ओझें वाहण्याचें खांद्याचें सामर्थ्य. ५ खांद्यावर किं० मानेनें ओझें वाहण्याचा किं० ओढण्याचा सराव किं० परिपाठ; उ०हा बैल चांगला बळकट आहे पण त्याला अझून खांदा पडला नाहीं. ६ झाडाच्या फांद्या जेथपासून पुढें किं० वर फुटलेल्या असतात तेथपर्यंतचें झाडाचें खोड किं० बुधा. ७ झाडाची मोठी फांदी. ॐ **खांद्याखालीं पदर घेणें** १ कामाचे वेळीं स्त्रिया पदर घेतात तो घेण्याची तऱ्हा, किं० तसा पदर घेणें. २ स्त्रीनें व्यभिचारिणी किं० व्यभिचारप्रवृत्त असणें; उ० साळूबाईनें कधांपासून खांद्याखालीं पदर घेतला आहे. **खांद्याचा बैल पु०** ओझें ओढावयाच्या उपयोगाचा बैल किं० त्या कामीं

वहिवाटलेला बैल. **एकाद्याच्या खांद्यावर मेखा (किं० गाठोडें, इ०) देणें** त्याला त्याच्या कामावरून काढून टाकणें म्ह० बडतर्फ करणें. **खांद्याला लागणें** मृताची तिरडी वहावयाला खांदा देणें. **डोक्यावरचें खांद्यावर येणें** बिकट जी जबाबदारी ती अंशतः कमी किं० हलकी होणें; जड जें कर्ज तें अंशतः फेडल्यामुळें तें कमी होणें. **खांदेकरी, खांदेवाईक पु०** खांद्यानें ओझें वाहणारा. २ प्रेतवाहक.

खांदाड [**म०** खांदा] **न०** १ मोठी फांदी (झाडाची).२ मोठा थिप्पाड खांदा(माणसाचा).

खादाड [**म०** खाणें] **वि०** १ खाण्याचा शोकीन. २ फार खाणारा.३आधाशी.⚘**खादाडमावसा पु०** १ आधाशी. २ खाण्याचा शोकीन. ३ फार खाणारा. **स्त्री०** खादाडमावशी. **खादाडकुरकुला पु०** खादाड माणूस.

खांदाडा [**म०** खांदा] **पु०** झाडाची खूब मोठी फांदी किं० शाखा.

खांदाडी [**म०** खांदा] **स्त्री०** १ पडशीसारखें खांद्यावर वहावयाचें ओझें (पडशीचा एक भाग पाठीवर आणि दुसरा छातीवर पडतो). २ खांद्यावर किं० खांद्यानें ओझें वाहावयाचें सामर्थ्य किं० परिपाठ.⚘**खांदाडीस घालून नेणें** खांद्यावर वाहून नेणें.**एकाद्याच्या खांदाडीस बसणें** त्याच्या खांद्यावर बसणें (एक पाय छातीवर आणि एक पाठीवर टाकून घोड्यावर बसतात त्याप्रमाणें); उ० रामा, तूं आतां चालून दमलास; माझ्या खांदाडीस बैस. **एकाद्याच्या खांदाडीस मेखा देणें** त्याला कामावरून काढून टाकणें.

खांदान, खांदानी पुढें ' खानदान, ' ' खानदानी ' पहा.

खांदी [**सं०** स्कंध] **स्त्री०** झाडाची फांदी [किं० शाखा.

खादी [खाणें] **स्त्री०** १ चांगलें सुग्रास खाणेंपिणें. २ योग्य वेळीं योग्य प्रमाणांत खाणें. ⚘ **खादीचें (माणूस किं० शरीर किं० जनावर)** योग्य वेळीं योग्य प्रमाणांत खावयाला मिळाल्याकारणानें सुदृढ, गोटीदार, निकोप, किं० मजबूत असें.

खादी स्त्री० जाडें भरडें कापसाचें वस्त्र.

खादू [**म०** खाणें]**वि०**१ चमचमींत खाण्यापिण्याचा शोकीन. २ खादाड. ३ पैसा खाणारा (नोकर, कारकून). ⚘ **खादूनंदन पु०** १ चमचमींत खाद्यपेयांचा शोकीन माणूस. २पैसे खाणारा माणूस.३पैसे खाणारा कारकून.

खांदेला [**म०** खांदा] **वि०** १ ओझीं वाहून किं०ओढून ज्याचा खांदा दुखत आहे असा.(**स्त्री०** खांदेली). २ प्रेतवाहक.

खांदोडा मागें ' खांदवडा ' पहा.

खांदोडा पु० एक प्रकारचें गाणें.

खांदोल [**म०** खांदा] **वि०** बैल किं० माणूस यांच्या खांद्याच्या उंचीचा सारखेपणा.

खांदोली वि०खांद्यांच्या उंचीनें सारखे (बैल, ओझीं वाहाणारीं माणसें, इ०).

खाद्य [**सं०**] **वि०** खाण्यास योग्य. **न०** खावयाचा पदार्थ. [२ तिरडी वाहणारा.

खांद्या [**म०** खांदा] **पु०**१ ओझीं वाहणारा.

खाद्रूमा [**म०** खाणें] **वि०**खादाड,आधाशी.

खान [**फा०**] **पु०** मुसलमानाच्या नांवापुढें लावावयाचा बहुमानार्थक शब्द (विशेषतः पठाणांच्या नांवांपुढें); उ० याकुबखान.

खान [**सं०** खन्=खणणें] **पु०**खणतीं लावून चोरी करणारा.⚘ **खानचोर, खानचोरी** मागें ' खाणचोर, ' ' खाणचोरी ' पहा.

खानगी [**म०** खाणें] **स्त्री०** १ भोजनाचा खर्च. २ भोजनार्थ दिलेले पदार्थ समुच्चयानें. ३ चरितार्थाचा उद्योग, धंदा, किं० व्यवसाय.४ वंश; अवलाद, कुळी. ५ परंपरागत संस्कारविशेष.

खानचोर पु० घरफोड्या चोर.

खानदान [**फा०** खान्दान्] **पु०, स्त्री०** वंश; अवलाद. ⚘ **खानदानीचा वि०** १चांगल्या सुखी किं० श्रीमंत कुटुंबांतील; पिढीजाद श्रीमंत. २ तल्लख किं० हुशार (कारकून, शिपायी, इ०)/

खानदानी [**फा०** खानदान्] **स्त्री०** उच्च कुळ; कुळाची उच्चता;खाऊन पिऊन सुखी अशी स्थिति.

खानवटा पु० १ कुळ; कुळी.२खांद्याचा सांधा.

खानवटा (–ठा) पु० १ जनावरांना उन्हाच्या वेळीं सावलींत बसावयासाठीं केलेला सोपा किं० छप्पर. २ दुभत्या जनावरांसाठीं बांधलेलें छप्पर. ३ आजारी गायी, हशी, इ० बांधावयासाठीं केलेलें छप्पर.

खानसा पु० मागें ' खांदसा ' पहा.

खाना [फा० खानाह्] पु० १ कांहीं वस्तु ठेवावयासाठीं केलेली किं०ठरविलेली विशिष्ट जागा किं० स्थळ. २ पेटी, संदुक, इ०त बारीक पदार्थ ठेवण्यासाठीं केलेला कप्पा. टीप:—खाना हा शब्द समासांत इतर शब्दांच्या पुढें येतो;उ० पील-खाना म्ह० हत्तींचा पागा, उष्टरखाना म्ह० उंट बांधावयाची पागा किं० तबेला; इतर शब्द, कार-खाना, तोफखाना, दारुखाना, इ०.॰**खानाजाद** वि० आपल्या गुलामाचें किं० नोकराचें अपत्य (स्त्री किं०पुरुष).**खानसुमारी** स्त्री०,**खानेसुमार** पु० १ एकाद्या गांवांतील किं० देशांतील किं० विशिष्ट प्रदेशांतील घरांची आणि त्यांत राहाणाऱ्या माणसांची मोजदाद (क्रि० करणें, घेणें). २ अशीच गुरांढोरांची मोजदाद. ३ घरांची मोजदाद; उंबरठा (एकवचनी प्रयोग); उ० ह्या गांवांत दीडशें उंबरठा आहे (म्ह० ह्या गांवांत दीडशें घरें आहेत).

खानोटा पु० मागें ' खानवटा ' पहा.

खानोरी चोर पु० घरफोड्या चोर.

खान्नी, खान्नी भान्नी वर ' खांजणी, ' ' खांजणी भांजणी ' पहा.

खाप स्त्री० १ विड्याच्या पानांची किं० तंबा-खूच्या पानांची चळत किं० रास. २ ओरखडा. ३ खुणेसाठीं पाडलेली किं० कोरलेली रेघ. ४ फळ वगैरेची फाक म्ह० फळ कापून त्याचे जे वेगळे वेगळे तुकडे करतात ते प्रत्येक. ५ पदार्थाचे परमाणु किं०सजातीय पदार्थ एकाला एक चिकटून बनलेला गोळा, गठ्ठा, किं० ढेप; उ० गोठलेलें रक्त, खजूर, दही, दूध,इ०ची खाप. ६ लहान चलपी, तुकडा, किं० खंड. ७ माड इ० झाडांवर चढावयासाठीं बुंध्यावर पाय ठेवण्यासाठीं करतात ते खळगे प्रत्येक; विहिरींत उतरण्याच्या सोयीसाठीं करतात ते कोनाडे किं० भोकें(प्रत्येक).॰**खापकडी** स्त्री० पोफळाच्या चकत्या करून शिजवून केलेली सुपारी.

खापटी, **खपटी** स्त्री० १ माती इ० चिखलट पदार्थ थापून मुलें खेळांत करतात ती थापटी किं० चकती. २ गुळाची पोळी. ३ कान्हवला.

खापणी [म० खापणें] स्त्री० १ सरकारनें एकाद्या गांवावर बसविलेली दंडाची किं० साऱ्याची रक्कम गांवकऱ्यांवर किं० घरवाल्यांवर हिस्सेरसीनें विभागणें. २अशी विभागणी.३ अशा विभागणीची रक्कम. ४ अशा विभागणीचा एक हप्ता. ५ माड इ० झाडांवर चढतांना पाय ठेवावयासाठीं शस्त्रानें पाडतात जे कोनाडे ते प्रत्येक.

खापणें स० क्रि० १ झाडाच्या बुंध्यावर किं० विहिरीच्या भिंतीवर पाय ठेवावयासाठीं कोनाडे पाडणें. २ कापूस, गवत, इ० पदार्थ दाबाखालीं ठेवून किं० घालून आकारानें लहान करणें; दाबून काढणें;चेपून काढणें.३ डोंगराचा तास काढून ती बाजू लंबरूप किं० उतरती करणें.

खापर [सं० खर्पर] न० १ मातीचें उथळ आणि पसरट पात्र; परळ;ह्या पात्रांत धान्य,खापर-पोळी, सांदणें, इ० भाजतात. २ मातीच्या भांड्याचें खालचें अर्धक,—जें अंग वगैरे शेकावया-साठीं योजलें जातें. ३ मातीचें भांडे (कोणत्याही आकाराचें किं० उपयोगाचें). ४ धातूचें भांडें (तुच्छतेनें). ५ मस्तकाची कवटी (तुच्छतेनें). ॰**खापर पोळी** स्त्री० खापरांत भाजलेली पोळी. **खापरखुंटी** स्त्री० १ खापराचा तुकडा. २ अति उष्णता दिली गेल्याकारणानें जळून टणक झालेली भाकरी इ० खाद्य. **खापरतोंड (–ड्या)** न० १ निपणतूचा मुलगा.२अपेशी माणूस.३दुर्दैवी माणूस. **खापरपणजा** पु० प्रपितामहाचा पितामह; पणजाचा आजा. **खापरपणतू** पु०पणतूचा नातू. **खापरपणत्खंड,खापरपणतोंड** पु०पणतूचा नातू. **खापरसूत** न०एक मिश्र धातु.**एकाद्याच्या डोक्या-वर खापर फोडणें**. १ त्याला व्यर्थ दोष देणें. २ त्याच्या माथीं अपेश लादणें. **एकाद्याच्या डोक्या-वर खापर फुटणें** १ तो दोषाला व्यर्थ पात्र होणें, २ तो अपेशी ठरणें. **डोक्यावर खापर येणें** संक-टाला पात्र होणें; कांहीं पेचांत सांपडणें. **खापरांत मुतून तोंड पहा** पुरे झाली तुझी बढाई ! तुझ्या-वैभवाला योग्य असा आरसा तुझ्याच मुताचा खापरांत झालेला पृष्ठभाग ! त्यांत तूं आपल्या मुखकमळाचें प्रतिबिंब पहा !

खापरी [म० खापर; सं० खर्पर] स्त्री० १ फुटलेल्या मातीच्या भांड्याचा तुकडा. २पाणथरी इ०नीं टणक झालेला पोटाचा भाग. वि० मातीचा भाजून केलेला (कोणताही पदार्थ). ॰**खापरी-चोर, खापऱ्या चोर** पु० १ अट्टल चोर. २ मुरट

चोर. **खापऱ्या नारळ पु०** ज्यांतील खोब-ऱ्याचा थर अगदीं पातळ आहे असा नारळ.

खापलणें [म० खापणें] **स० क्रि०** १शस्त्रांनें तोडणें. २ छाटणें. ३ शत्रुसैन्याची कत्तल करणें.

खापेकड न० राहाटाच्या माळेचे लोटे ज्या सुमारें हातभर लांबीच्या रिपांवर बांधलेले असतात त्या रिपा प्रत्येक. मागें ' कणेकड ' पहा.

खांब [सं० स्तंभ] **पु०** १ इमारतीच्या तुळईखालीं उभा जो आधार असतो तो. २केळीच्या झाडाला पानें फुटलेलीं असतात तेथपर्यंतचा बुंधा. ३ एखाद्या कुटुंबाचा, संस्थेचा, इ०चा मुख्य आधा-रभूत जो इसम तो. आमचें " मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० " हें पुस्तक ले० १३७७ पहा. ॐ **खांबाला डीक पाहणें** ज्याच्या पासून कांहीं मिळण्याची आशा नाहीं अशा पासून एखादी वस्तु अपेक्षिणें (कांहीं झाडांना डीक येतो यावरून हा संप्रदाय उत्पन्न झालेला आहे. तासून रंधून उभारल्या खांबाला डीक कसा राहणार ?). **खांबखांबोळी स्त्री०** खांब धरून उभें राहून मुलांचा खेळण्याचा एक प्रकार. **खांबसूत्र न०, खांबसूत्राचा खेळ पु०** [म० खांब+सं० सूत्र] दोन काठ्या उभ्या पुरून त्यांच्या अग्रांना दोरा ताणून बांधून त्यावर बाहुल्या नाचविण्याचा एक खेळ. ह्या दोऱ्यावर जी बाहुली नाचविली जाते तिला ' खांबसूत्र पुतळी ' असें म्हणतात.

खांबट [म० खांब] **न०** लहान खांब. २ अशक्त खांब. ३ कांहीं थोड्या वेळा पुरतां आधारा-साठीं दिलेला खांब.

खाबड खुबड वि० ओबडधोबड; खरबडीत.

खांबडी स्त्री० तांदुळाची एक जात.

खांबणी, खांबली स्त्री०, खांबला, खांबुला, खांबा पु०[म० खांब]१ दोन तीन हात लांबीचें आणि नांवें असलेलें लाकूड,—जें गाताडी ठेवणें वगैरे साठीं उभें पुरलेलें असतें तें. २कोणत्याही कामासाठीं पुरलेला उभा लहानसर खांब.

खांबली [म० खांब] **स्त्री०** उसाच्या चर-काच्या वाईनसळाला जमीनीचा आधार मिळावा म्हणून जीं लाकडें लाविलेलीं असतात तीं प्रत्येक.

खानान [फा० खावियान्] **न०** फुलझा-डांच्या बागेंतील ताटवा.

खावू [म० खाणें] **वि०** १ खाद्यपेयांचा शोकीन. २ खादाड. ३ (प्रत्ययरूप) खाणारा; उ० लाचखावू, पैसेखावू, इ०.

खांबोटी म० खांब] **स्त्री०** लहान खांब.

खांबोळ (–ळें), खांबोळी स्त्री० [म० खांब+ओळ] १ घराच्या भिंती रचल्या जात असतां खांबांसाठीं भिंतींत ज्या रिकाम्या जागा राखलेल्या असतात त्या प्रत्येक. २ घराच्या खांबांच्या माथ्यांवर काटकोनांत (+) जोडलेलीं लांकडें बसवितात तीं प्रत्येक.

खांब्या [म० खांब] **पु०** खळ्यावर कणसें तुडविणाऱ्या बैलांपैकीं जो मध्याच्या खांबाशेजारीं असतो तो.

खामखा, खामाखा, खामाखाम, खामाखाय खामोखाम, खामोखाय[फा०ख्वाह् मख्वाह्] **क्रि० वि०** खास, निश्चयें करून, निश्चयपूर्वक, खचित, कांहीं झालें तरी (येणें, जाणें, इ०). ह्या शब्दाचीं इतर रूपें ' खामखास ' आणि ' खामाखाम ' अशीं आहेत.

खामनखुजा वि० ठेंगणा.

खामपट्टी [फा० खाम्=कच्चा+म० पट्टी] **स्त्री०** कांहीं विशिष्ट उद्देशानें शेतकऱ्यांवर घात-लेली वर्गणी. [(व्यापारांत).

खामी [फा] **स्त्री०** नुकसान, तोटा, बूड

खाय [म० खाणें] **स्त्री०** खाऊ. मागें 'खाई' पहा. ॐ**खायखाय स्त्री०** आधाशीपणा (सुटणें, येणें, मोडणें). **खायनिंदक वि०** आपणाला खाऊ घालणाऱ्या किंवा पोसणाऱ्या माणसाची निंदा करणारा; कृतघ्न.

खार [सं०क्षार] **पु०**मीठ, तुरटी, संचळ, सवागी, इ० जे पदार्थ ते प्रत्येक. २ आंबे, लिंबें, इ०च्या लोणच्यांतील रस म्ह० पातळ भाग. ३ खारट रस. ४ कोणताही खारट पदार्थ. ५ क्षारमय ज्या औषधी त्यांची राख. ॐ**एखाद्याच्या पदराला खार लागणें** १ त्याचें नुकसान होणें. २ त्याच्या-वर विनाकारण टपका येणें.

खार [सं० क्षार] **स्त्री०** १ समुद्रकांठीं केलेलें शेत. २ खाजण बांधून केलेलें शेत.

खार स्त्री० १ मुंगसासारखा केसाळ पण त्याचे हून फारच लहान असा एक प्राणी. २ फळें, धान्यें, इ०वर नाशकारक पडतें तें दहिवर. ३ जमीन, भिंत, इ०वर येतो तो लोणा.

खार पु० सापाची एक जात.

खारकट [सं० क्षार; म० खार] वि० १ खारट; क्षारयुक्त किं०क्षारमय. २ हेवेखोर(माणूस).

खारखंडा [म० खार] पु०खाऱ्या जमीनींत शेत करणारा आगरी (तुच्छतेनें).

खारट [सं० क्षार; म० खार] वि० १ क्षार-रसमय पदार्थ. २ बेतापेक्षां अधिक मीठ ज्यांत पडलें आहे असें (खाद्य किं० पेय). ३ खाऱ्या जमीनींत केलेलें (शेत). ॰**खारट खारट मीठ, खारटघोट** वि० अतिशय खरट (खाद्य किं० पेय); योग्य परिमाणाहून अधिक मीठ ज्यांत पडलें आहे असें (खाद्य किं० पेय). **खारट तुरट** वि० १ चमचमीत; मीठमसाला योग्य प्रमाणांत पडल्या-कारणामुळें रुचकर लागणारें (खाद्य किं० पेय). २ खुबीदार, झणझणीत, तडफदार, किं० आवेशी (भाषण किं० वर्तन).

खारट [सं० क्षार; म० खार] न० समुद्रालग-तच्या खाऱ्या जमीनीला बंधारे घालून केलेलें शेत.

खारटाई [सं० क्षार; म० खारट+आई (प्रत्यय)] स्त्री० खारटपणा; खारट चव.

खारणें [सं० क्षार; म० खार] अ० क्रि० १ लोणचें इ०च्या अंगीं मीठ इ०चा क्षार मुर-ल्यामुळें त्यांनीं क्षाररसानें युक्त होणें. २ जमीन, भिंत,इ०चे ठायीं मुरलेला क्षार ओलाव्याच्या रूपानें दिसणें. स० क्रि० क्षारयुक्त करणें; कांहीं क्षारांत फळें इ० घालून त्यांत क्षार भिनेल असें करणें.

खारवट [म०खार]वि० जींत खार मुरला आहे अशी (जमीन, भिंत, इ०).

खारवणी [म० खारें+पाणी] न०खारट पाणी.

खारवा पु०, **खारवें** न० एक प्रकारचें जाडें-भरडें तांबड्या रंगाचें कापड (गाद्या, लोड, तक्ये, इ०च्या खोळी करण्याकडे याचा विशेषतः उपयोग केला जातो).

खारवी पु०हिंदूंची एक विशिष्ट जात.समुद्रांत होड्या, गलबतें, इ०चे हे लोक मालक किं०त्यांवर नोकर असतात.

खारवें न०खारव्याच्या रंगाचें बायकांचें लुगडें.

खारसंध [म०खार+सांधा]पु० धातुमय पात्र इ०चे सांधे जडविण्यासाठीं जो पदार्थ करतात तो.

खारा [सं० क्षार] वि० १ ज्याचे अंगीं क्षार म्ह० खारटपणा आहे असें (पाणी, जमीन, इ०). २ खाऱ्या जमीनींत उत्पन्न होणारें (भात, इ०). ३ खाऱ्या पाण्यांतील (मत्स्य, इ०). ४ समुद्र, खाडी, किं० त्याचे लगतची जमीन ह्यांच्रेवर वाह-णारा (वारा). ५ ज्यांत क्षार विशेष आहे असें (पाणी).॰**खारी माती** स्त्री० १समुद्रकांठची माती. २जी वस्तु दैव अनुकूळ असल्यास लाभदायक होईल किं० दैव प्रतिकूळ असल्यास हानिकारक होईल अशी वस्तु. एकादें जनावर किं० वस्तु विकणारा मनुष्य विकत घेणारास म्हणतो 'ही मी तुम्हाला खारी माती देत आहें; ती तुम्हाला लाभेल किंवा नाहीं ह्याची जबाबदारी माझ्याकडे नाहीं; तुम्हीं आणि तुमचें नशीब 'सौदा झाला तो पक्का झाला, तो फिरावयाचा नाहीं, असा अर्थ वरील वाक्यानें दर्शविला जातो. 'माळावरचा धोंडा' हा शब्द त्याच अर्थानें योजला जातो. **खारें मीठ** न० खाणींतून काढलेलें मीठ (ह्याच्या उलट समुद्रांतून काढलेलें मीठ).

खाराळ, खाराव न० हलक्या किंमतीचें तांबडें सुती लुगडें; त्याला 'शेंदरी' असेंही म्हणतात.

खारावणें [म० खार] अ० क्रि० १ मीठ इ० क्षारानें युक्त होणें; ज्यांत मीठ इ० क्षार मुरला आहे असा होणें. २ खाऱ्या पाण्यावरून वाहत आलेल्या वाऱ्यानें विकृत होणें (डोळे).

खाराखीर, खाराखिरी, खाराखेर स्त्री० १ थोडक्यासाठीं दुसऱ्याशीं केलेली ओढाताण किं० जिकीर. २ क्षुल्लक बाबतीसाठीं घासाघीस. ३ रागानें किं०निष्काळजीपणानें वस्तु इतस्ततः फेकणें किं० उडविणें किं० विसकटणें.

खारी स्त्री० १ आभाळ येऊन थंडी जींत पडते अशी हवा (सुटणें, पडणें). २ एक प्राणिविशेष; हा मुंगसासारखा केसाळ पण लहान आकाराचा असतो; खार. ३ पिवळसर माती (घराच्या धान्याकडे हिचा विशेष उपयोग केला जातो).

खारी माती स्त्री० वर 'खारा' मध्यें पहा.

खारीक स्त्री० खजूर न पिकूं देतां तो वाळवून करतात जो मेवा तो. **पु०** खाऱ्या जमीनींत शेतकी करणारा इसम. २मिठागरांत काम करणारा.

खाल स्त्री० अंगाचें कातडें; पुढील प्रयोगांत मात्र हा शब्द योजला जातो; तूं पुन्हां असें केलेंस तर तुझ्या अंगाची खाल काढीन, याद राखून अस !

खालचा, खालला [म० खालीं] **वि०** १ खालच्या बाजूचा. २ दर्ज्यानें कमी प्रतीचा; उ० तो माझ्या खालचा कारकून आहे. ३ पूर्वदिशेसंबंधाचा. ॥ **खालचें पोट न०** बेंबीच्या खालच्या पोटाचा भाग.

खालता [म० खालीं] **क्रि० वि०** १खालीं; अधोमार्गीं. २ पूर्वदिशेकडे.

खालतीं, खालतें क्रि०वि०१ खालच्या बाजूस किं० बाजूकडे. २ नुकसानांत ह्या अर्थी; उ० त्या व्यवहारांत मी पन्नास रुपयांस खालतीं आलों (अ० माझें नुकसान झालें).

खालपट [म० खालीं] **वि०** १ सखलांतील (जमीन, शेत, इ०). २ ठेंगणा; खुजा.

खालवणें पुढें ' खालावणें ' पहा.

खालवर [म० खालीं + वर] **क्रि० वि०** १ उलट सुलट; खालचें वर आणि वरचें खालीं होईल अशा रीतीनें. २खालीं आणि वर. ३ सर्व बाजूंनीं, सर्व दृष्टींनीं; दूरवर विचार करून. ॥ **खालवर मन होणें** मनाला कचर वाटणें; मन साशंक होणें.

खालविणें स०क्रि० खालीं करणें किं० टाकणें.

खालस (–सा–) वणें [म० खालीं] **अ० क्रि०** १ खालीं जाणें किं० पडणें. २ अपकर्षाच्या स्थितीस पोचणें; अपकर्षाच्या स्थितीस जाणें.

खालावणें [म० खालीं] **अ०क्रि०** १ खालच्या स्थितीस जाणें किं० पोचणें. २ एकाद्याचा गर्व, ताठा, अभिमान, इ० कमी होणें.

खालसा, खालिसा [अ० खालिसाह्] **पु०** १ सरकारच्या मालकीची जमीन, गांव, इ०. २ खोताच्या अभावीं सरकारच्या वहिवाटींतील जमीन, गांव, इ०.

खालसा, खालिसा [अ० खालिसाह्]**वि०** संस्थानिकांच्या मुलखाबाहेरचा इंग्रज सरकारच्या प्रत्यक्ष अमला खालचा (प्रदेश, सैन्य, इ०).

खालस्ती [फा० खल्प्] **वि०** दुष्ट; हेवेखोर; मत्सरी.

खाला स्त्री० वाहुली; खेळणें.

खालां क्रि० वि० खालतीं; खालच्या बाजूस.

खालाट न०, खालाटी (–ठी) स्त्री० [**म०** खालीं + प्रत्यय] १ सखल प्रदेश. २ सह्याद्रीचा पायथा आणि समुद्रकिनारा ह्यांचा दरम्यानच्या प्रदेशापैकीं समुद्रालगतचा प्रदेश; पायथ्यालगतच्या प्रदेशास ' वलाटी (–ठी) ' म्हणतात. ३ मात्रा, अनुस्वार, वेलांट्या, अक्षराच्या डोक्यावरचा रेफ, ह्या चिन्हांना 'वलाटी,' ' वेलांटी, ' किं० रेफ म्हणतात; आणि ऱ्हस्व उकार, दीर्घ उकार, ऋकार, ट इ० च्या खालचें रकारचिन्ह ह्यांना ' खालाटी ' म्हणतात. ॥ **खालाटकर पु०** खालाटीवर राहाणारा रहिवासी.

खालारां क्रि० वि० खालीं.

खालावणें [म० खालीं] **स०क्रि०** खालच्या स्थितीस ढकलणें; हीनदीन करणें. २ ०चा नक्षा उतरणें; ०ची फजीती करणें **अ० क्रि०** गरीबीच्या स्थितीस येणें; अपकर्ष पावणें.

खाली [अ०] **वि०** रिकामा; मोकळा; ज्याला किं०ज्याचें कांहीं काम नाहीं असा ,(माणूस, बारदान, जनावर, इ०).

खाली स्त्री० साल, चामडें.

खालीं, खालें क्रि० वि०, श० यो० अ० १ खालच्या बाजूस किं० दिशेस; अधोभागीं २ दर्जानें, महत्वानें, किं० गुणानें, कमी पाहिरीवर. ३ ०मुळें, ०साठीं; उ० कामासालीं माझा सारा दिवस गेला. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक पान ३२८ आणि ३३५ पहा. ' खालीं ' हा शब्द क्रि० वि० असला किं० शब्दयोगी अव्यय असला तरी त्याचा अर्थ वस्तुतः तोच असतो; विभक्तिप्रत्ययाचा लोप केल्यानें ' खालीं ' ह्या **श० यो०अ०**चें **क्रि०वि** होतें; उ० घराखालीं, घराच्या खाली ॥ **खालोखाल क्रि० वि०** ०पेक्षा दर्जानें किंचित् कमी.

खालील [**म०** खालीं] **वि०** १ खालच्या बाजूचा किं० दिशेचा २ ०च्या ताब्यांतील किं० अमलांतील.

[लाचखाऊ.

खावट [**म०** खाणें] **वि०** १ खादाड. २

खावटी [छ० खावट] **स्त्री०** १ खाण्यापिण्याचा खर्च. २ खाद्यपेयांची सामग्री किं० बेगमी.

खांवडें न० १ नांगरलेल्या किं० पेरलेल्या शेतांतील न नांगरलेला किं० न पेरलेला भाग. २ लिहिलेल्या कागदांतील रिकामा सोडलेला भाग. ३ पाऊस इ० त पडलेला खंड.

खावंद, खाविंद [फा०] **पु०** धनीसाहेब; यजमानसाहेब.

खावनिंदक, खाऊनिंदक [म०खाणें=निंदक] **वि०** पदार्थ पोटभर खाऊन मग त्या पदार्थाची किं० तो देणाराची निंदा करणारा; कृतघ्न.

खावराडिवहा [म०खाणें] **वि०** १ खादाड. २ तापट, रागीट. ३ तल्लख, चलाख. ४ धाडसी.

खावराबावरा वि० आश्चर्य, राग, किं० अन्य कांहीं विकार, यानें आक्रान्त झालेला.

खावाड [म० खाणें] **वि०** खादाड; खाद्यपेयांचा शोकीन. [जातीनें.

खाशानिशा [अ० खास] **क्रि०वि०** स्वतः,

खाशी [अ० खासाह्] **उ० वा०अ०** उत्तम! ठीक ! वेश ! वाहवा!

खाशी स्त्री० खोकण्याची लहर किं० उसळी.

खाशीपंगत ' खास 'मध्यें 'खास पंगत' पहा.

खाष्ट वि० द्वाड; चरफड्या; त्रासदायक.

खाष्टें न० ओबडधोबड खड्डा.

***खास** [अ०] **क्रि० वि०**१ खचित; निश्चयेंकरून. २ तंतोतंत रीतीनें; कमी ज्यास्ती न होतां किं० भरतां.

खास [अ०] **वि०**१ सरकारी. २ खाजगी; स्वताचा; वैयक्तिक. ३ निर्भेळ; शुद्ध. ***खास खबर स्त्री०**सरकारी रीत्या प्रसिद्ध झालेली बातमी. **खासगत वि०** स्वताचा; खासगीचा. **क्रि० वि०** स्वतः; जातीनें. **खासगी वि०** स्वताच्या मालकीचा; स्वताकडचा; स्वताच्या संबंधाचा.**खाजगीवाला पु०** खासगीच्या द्रव्याचें रक्षण करणारा किं० खाजगीच्या पैशाचा हिशेब ठेवणारा कारकून. **खासदार पु०** १ घोड्याला खरारा करणें इ० कामांत नियुक्त जो नोकर तो. २ बड्या माणसाचा शरीरसंरक्षक. ३ आपल्या आश्रयाखालीं असलेला इसम. **खासदारी स्त्री०** खासदार जो त्याची स्थिति, दर्जा, काम, किं०अधिकार. **खास पंगत स्त्री०** १ यजमानाची किं० बड्या माणसाची पंगत (भोजनाच्या प्रसंगीं). २ बडे लोक समुच्चयानें. ३ कांहीं विशिष्ट कार्यार्थ जमलेली निवडक मंडळी. **खासपथक न०**स्वताच्या खर्चानें उभारलेलें आणि स्वताच्या हाताखालीं लढणारें जे लोक त्यांची टोळी.**खासपागा स्त्री०** कोणा बड्या माणसाची किं० अधिकाऱ्याची खाजगी पागा. **खासबरदार पु०**कोणा बड्या माणसाचीं शस्त्रास्त्रें जो वाहतो तो. **खासबारगीर पु०** कोणा बड्या माणसाच्या पाहऱ्यावरील घोडेस्वार. **खासस्वारी, खासा स्वारी पु०** खुद्द यजमान किं० त्याच्या प्रभावळींतील लोक समुच्चयानें.

खासडा पु०१ जोडा (गुन्हेगारास मारण्याचे प्रसंगीं); उ० दोन खासडे मारतांच तो भामटा कबूल झाला. २ तडाखा, रट्टा (भाल्याचा).

खासणें अ० क्रि० खोकणें.

खासा [अ०खासाह्] **वि०**१ वरच्या प्रतीचा किं० दर्जाचा; उत्तम; उत्कृष्ट. २ बड्या माणसासंबंधाचा; मुख्य, (धनी, यजमान,इ०). ४ शुद्ध; ज्यांत भेसळ नाहीं असा. ***खासा कागद पु०** दौलताबाद येथें केलेला कागद. ***खासास्वारी स्त्री०**यजमान; धनीसाहेब. **खासा लोक पु०पु० ग०** बडे लोक समुच्चयानें.

खासाड न० ओबडधोबड खड्डा.

खासी स्त्री० खोकला किं० खोकल्याची लहर.

खास्त क्रि० वि० १ बरोबर किं० तंतोतंत रीतीनें. २ खचित; निश्चयेंकरून.

खास्त स्त्री०१ आकस. २ द्वेष.३ मत्सर (**क्रि०** धरणें); उ०हा माझी खास्त करतो; उ०तो माझ्या खास्तीस पेटला किं० लागला, म्ह० तो माझ्याशीं स्पर्धा करूं लागला.

खास्त, खास्ती स्त्री०१ चरफड; असंतुष्टपणा; त्रासिकपणा; उ०आई मेल्यापासून ह्या पोरानें खास्त घेतली आहे (म्ह० खंती घेतली आहे). २ दुसऱ्याचे दोष काढण्याची प्रवृत्ति; दुसऱ्याशीं केलेली तिरसटपणाची वर्तणूक, (**क्रि०**करणें,लावणें,इ०).

खाळ पु० १ पाण्याचा नाला (वाहतां किं० कोरडा). २ चर.

खिंकाळणें, खिंखाळणें अ० क्रि० १ घोडा..

गाढव,इ०नीं ओरडणें.२ खिदळणें किं०मोठमोठ्यानें हसणें.

खिक्या, खिख्या स्त्री० अ० व० एकाद्याची टवाळकी करून हसणें (घालणें, करणें); उ० सदाशिव नेहेमीं दुसऱ्याच्या खिख्या करीत असतो.

खिकी क्रि० वि०फिदीफिदी (हसणें).

खिचकुला पु० अनेक प्रकारचीं खाद्यें आणि पेयें सिद्ध करून मुलगे आणि मुली गमतीनें भोजनाचा समारंभ करतात तो.

खिचडा पु०१ करडे तांदूळ इ० भरडून आणि मग शिजवुन गाय, म्हैस, इ०स खावयास घालतात तो पदार्थ.२सजगुऱ्याचा करतात तो भात. ३ताबुतांचे दिवसांत फकीरास घालतात ते धान्य.

खिचडी स्त्री० १ तांदूळ आणि डाळ यांचें मिश्रण (शिजविलेलें किं० न शिजविलेलें). २ सळमिसळीचे पदार्थ; भिन्न जातीच्या पदार्थांची गल्लद; उ०या पेटींत इंग्रजी, संस्कृत, आणि मराठी, पुस्तकांची खिचडी झाली आहे; पुस्तकें भाषावार वेगळीं ठेव; उ० श्रीमंतांनीं मोहोरा पुतळ्यांची खिचडी वाटली. ३ जत्रा इ०प्रसंगीं अनेक जातीच्या आणि दर्जांच्या लोकांची झालेली गर्दी. ४ ज्या गांवांत कांहीं शेतें धारेकरी करतो आणि कांहीं शेतें खोत करतो तो गांव.

खिचिडें न० वर ' खिचडा ' प्रथमार्थी पहा.

खिचणें[हिं०] स० क्रि०१ विवक्षित स्थलापासून दूर सरणें किं०हटणें. २ प्रतिज्ञेपासून किं० वचनापासून च्युत होणें म्ह० त्यांचा भंग करणें.

खिचरट वि० 'खचरट' पहा.

खिचाबिड वि०वेड्या वाकड्या अक्षरांनीं किं० अव्यवस्थितपणें किं०असुवाच्य रीतीनें लिहिलेलें.

खिचाबिडणें स० क्रि० खाजविणें, ओरबाडणें (त्वचा, इ०).

खिची स्त्री० पीठ, डाळ, इ०घालून जी पातळ पालेभाजी करतात ती.

खिजणें अ० क्रि० दुसऱ्यानें आपलीं वर्में कर्में काढल्यामुळें किं० कांहीं खोड्या केल्यामुळें रागावणें; चिडणें.

खिजमत, खिजमतगार, इ० ' खिदमत,' खिदमतगार ' इ०पहा. [भूषण.

खिजमती स्त्री०स्त्रियांचें हातांत ल्यावयाचें एक

खिजवणी [म०खिजविणें] स्त्री० दुसऱ्याला राग येईल असें कांहीं वर्तन किं०भाषण मुद्दाम करणें.

खिजविणें, खिजाविणें स० क्रि० दुसऱ्याला राग येईल किं० तो चरफडेल असें भाषण किं० वर्तन मुद्दाम करणें; चिडविणें.

खिजाणा वि-१ निराश झालेला. २ ओशाळलेला.

खिटी स्त्री०१ दार, इ०ना आडवणूक म्हणून लावतात ती लाकडाची पट्टी. २ दोन पदार्थ, (लाकडांची मोळी,इ०)ज्या दोरीनें बांधलेले असतात ती घट्ट करण्यासाठीं जी खूंटी दोरीच्या दोन वळशांत घालून पिळवटतात ती. ॐएकाद्या कामांत किं०कामाला खिटी घालणें तें बंद पाडणें; कांहीं तरी विघ्न किं० हरकत उपस्थित करून तें पुढें न चालेल असें करणें.

खिंड स्त्री० १ दोन डोंगर किं० टेकड्या यांचे मध्यें जी अरुंद आणि अडचणीची वाट असते ती. २ कांहीं चालत्या कामांत आलेला, झालेला, किं० पडलेला व्यत्यय; कांहीं चालत असलेल्या कामाची कुंठित स्थिति;प्रगतीला प्रतिबंध.३ शास्त्रादि अध्ययनांतील वगळलेला मधला भाग; अनधीत भाग. ४ चालू असलेलें काम ज्या अवधींत बंद पडतें किं० पाडलें जातें तो अवधि. ५ लेखादिकांमध्यें पळावयास किं० सुटून जावयास करून ठेविलेली वाट म्ह०संदिग्ध भाषासरणी. ॐखिंडुकलें न०; **खिंडुकली** स्त्री०१ लहान खिंड (दोन डोंगरांमधील).२ भिंत, कुंपण, वई, इ०मध्यें मनुष्य जावयाला किं० यावयाला ठेविलेली वाट.

खिंडकबाळी स्त्री० स्त्रियांचें एक कर्णभूषण.

खिडकी [हिं०] स्त्री० १ उजेड किं० वारा यांच्यासाठीं भिंतीच्या रचनेंत कोणत्याही आकाराची रिकामी जागा सोडिलेली असते ती, (झडपा, गज, इ० असलेली किं०नसलेली). २ पळवाट. ३ लेखामध्यें सुटून जावयाला मुद्दाम संदिग्ध रचना करून ठेविलेली असते ती, किं०नजर चुकीनें राहिलेली असते ती (जिचा वकील लोक फायदा करून घेतात).

खिंडार, खिंडारें [म० खिंड] न० १ मोठें भगदाड. २ दोन शेतांमधील वाट, गल्ली, इ०. ३ उद्धस्त किं०ओसाड गांव, घर, इ०.

खिंडी स्त्री० लहानशी खिंड.

खि (-कि-) डूकमिडूक न० वापरावयाच्या स्थितींत नसलेले मोडके किं० तुटके दागिने. समुच्चयानें.

खिडें न० एक प्रकारचें पोलाद.

खितपण (-णी), खितपीण, खितपिणी स्त्री०आजारीपणाची फार दिवस चाललेली स्थिति; आजारानें झिजत असणें.

खितपणें अ० क्रि० आजारानें पुष्कळ दिवस जर्जर होऊन अंथरुणावर पडलेलें असणें; खितपिणें, खिदवणें, खिदवणें, अशीं ह्या शब्दाचीं अन्य रूपें आहेत.

खिदडणें, खिदाडणें अ० क्रि० हसणें, धावणें, उड्या मारणें, मस्ती करणें, इ० पोरकट चाळे करणें. स० क्रि० उधळून, उडवून, किं० पळवून लावणें.

खिदमत [फा०] स्त्री० सेवा; चाकरी; तैनात. ॥**खिदमतगा (-दा-)र** पु० ज्या माणसाचा नोकर,—त्याचा जोडा संभाळणें, त्याचें अंग रगडणें, त्याचा पोशाख त्याच्या अंगावर चढविणें, इ० कर्में करणारा. **खिदमतगा (-दा-)री** स्त्री० खिदमतगाराचें काम किं० नोकरी.

खिदळणें अ० क्रि० हसणें, उड्या मारणें, इ० बालिश चेष्टा करणें.

खिदडा, खिदाडा पु० हसणें, उड्या मारणें, इ० इ० बालिश चेष्टा.

खिन्न [सं० खिद्=थकणें, खेद पावणें] वि० १ दुःखी. २ विषाद पावलेला; विषण्ण. ३ दमलेला.

खिपणी, खिपणें वर 'खितपणी' 'खितपणें' पहा. [स्थानचा भोंवरा.

खिमावर्त पु० घोड्याच्या अंगावरचा विशेष-

खिरंगटणें अ० क्रि० खुरटणें; वाढ कुंठित होणें.

खिरटा पु० दांतांत कीड पडते तो रोग.

खिरटा वि० ज्याची वाढ कुंठित झाली आहे असें (माणूस, जनावर, झाड, इ०).

खिरड न० जनावरांच्या अंगावर उत्पन्न होणारा कृमिविशेष.

खिरणा पु० एक वृक्ष.

खिरणी स्त्री० १ एक वृक्षविशेष किं० त्याचें फळ. २ खरबुजाची एक जाति.

खिरणें [सं० क्षर्=नाश पावणें, पाझरणें] अ० क्रि० १ पाझरणें, वाहणें (कांहीं आजारामुळें धातु किं० मूत्र). २ आजारानें क्षीण होत जाणें. न० चाळणी.

खिरसाळ स्त्री० तांदुळाची एक जात.

खिरा पु० १ एक प्रकारची काकडी. २ एक वृक्षविशेष.

खिरापत [फा० खैर आफियत] स्त्री० १ कथा, कीर्तन, इ० च्या समाप्तीचे वेळीं श्रोतेमंडळीस देतात तो प्रसाद,—बत्तासे, साखर, खोबरें, इ०. २ उदारपणानें दिलेल्या देणग्या. ३ उधळपट्टीनें केलेला खर्च.

खिरी स्त्री० पोलादाची एक जात.

खिलाडी, खिलाडू [म० खेळ] वि० १ खेळण्यांत कुशल. २ खेळकर (मूल). ३ मनमिळाऊ स्वभावाचा इसम.

खिलात [अ० खिल् अत्] स्त्री० राजानें सन्मानार्थ कोणा मनुष्यास दिलेलीं वस्त्रें,—शालजोडी, मंदील, इ०.

खिलार, खिल्लार न० १ गायी, म्हशी, इ० समुच्चयानें. २ (लक्षणेनें) लहान मुलांचा किं० मुलींचा जमाव किं० घोळका.

खिला(-ल्ला-) री पु० गुराखी. ॥**खिलारी धनगर** पु० गायी, म्हशी, आणि शेळ्या मेंढ्या बाळगणारा किं० राखणारा धनगर; ह्याच्या उलट 'मिरका धनगर.'

खिशाण (-णा), खिसाणा, खिसाणी [हिं० खिसियानाइ] वि० १ निराश; खट्टू झालेला. २ शरमिंदा, ओशाळलेला. ३ असंतुष्ट, दुःखी, वगैरे.

खिशी स्त्री० सांडगा, कुरडया, पापड्या, वडे, इ० साठीं शिजविलेलें पीठ.

खिसखिसा, खिसाखिस वि० चरफड्या, असंतुष्ट, पिरपिऱ्या.

खिसखिस स्त्री० जिकीर, घिसाघिस, चरफड; थोडक्यासाठीं ओढाताण.

खिसखिस क्रि० वि० खिसखिस आवाज होईल अशा रीतीनें (हसणें).

खिसखिसणें अ० क्रि० १ माकड इ०नीं दांत दाखवून खिसखिस असा आवाज करणें. २ एकाद्याला रागें भरणें. ३ एकाद्यावर तोंड टाकणें.

खिसगणती मागें 'किसगणती' पहा.

खिसणें अ० क्रि० १ बाजूस सरणें; एकाद्याला वाट देणें किं० त्याच्या वाटेंतून दूर होणें. २ (माकडांनीं) खिसखिस असा आवाज करणें. ३ एकाद्यावर तोंड टाकणें; त्याची भोसडपट्टी काढणें. ४ रागावणें, चिडणें.

खिसमत इ० ' खिदमत, ' इ० पहा.

खिसमती स्त्री० बेगडीनें आच्छादलेल्या स्त्रियांच्या बांगडया प्रत्येक.

खिसमीस [फा० किष्मिष] स्त्री० ज्यांत बीजें नाहींत अशी द्राक्षाची जात.

खिसा [फा० कीसाह्] पु० १ कांहीं पदार्थ ठेवण्यासाठीं अंगरखा, बंडी, इ० स पिशवीच्या आकाराचा करतात तो भाग. २ पोटभाग; मोठ्या पदार्थांची एक बाबत; उ० त्या कामामध्यें पुष्कळ खिसे आहेत. ३(लाक्षणिक) भाषणादि व्यवहारांत प्रकट न केलेले सूक्ष्म भेद किं० अर्थश्लेष किं० दुटप्पी प्रयोग (क्रि० राखणें, असणें); उ० त्याचें भाषण दिसण्यांत सरळ दिसतें पण त्यांत दोन चार खिसे आहेत. ४ पुढें 'खिस्सा' पहा. ॐ**खिसाखोकला** पु० तंटाबखेडा. (चाल्र्म, इ०).

खिसाणा पु० हसणें, खिदळणें (करणें,मांडणें,

खिसारा पु० १ व्यवहार, पसारा (गुंतागुंतीचा किं० भानगडींचा). २ लांबट किं० कंटाळवाणी हकीगत. ३ मोठ्या कामाची किं० व्यवहाराची एक शाखा किं० बाबत.

खिस्त [अ० किस्त] स्त्री० १ हप्ता. २ हप्त्या हप्त्यांनीं रकम देणें किं० रकमेची फेड करणें. ३ हफ्ता द्यावयाचा ठरलेला दिवस किं० समय; उ० खिस्त भरल्यानंतर रुपये राहिले तर व्याज द्यावें लागेल. ४ सकाळीं उसनें दिलेले पैसे संध्याकाळीं व्याजासकट परत घेणें हा व्यवहार; आठ चार दिवसांच्या बोलीचा वरील प्रकारचा व्यवहार. ५ एकाद्या व्यवहारांतील किं० कामांतील ज्या जिकीरीच्या भानगडी त्या प्रत्येक किं० समुच्चयानें ६ (कामांतील) गुंतागुंत, उपद्रव, त्रास, किं० बखेडा. ७ कुलंगडें, लबाडीची युक्ति किं० शकल; उ० हा पाटील हजार खिस्तींनीं छळतो. ॐ**खिस्तीखिस्तींनीं रुपये देणें** किरकोळ रकमांनीं रुपये देणें. **खिस्तीचा** वि० त्रासदायक, जिकीरीचा, भानगडीचा.

खिस्त (-स्तीं-) खांदा पु० वर ' खिस्त ' चा ७ वा अर्थ पहा.

खिस्तक [अ० खिसतक्] न०,स्त्री० विजारीचे दोन पाय मिळतात तेथें देतात तो जोड.

खिस्ताई [अ० किसत] स्त्री० वर 'खिस्त' चा ४ था अर्थ पहा.

खिस्ती [अ० किस्त] वि० खिस्त, अर्थ ४ पहा) करतो तो. २ त्रासदायक; जिकीरीचा; भानगडीचा.

खिस्ती पु० गुजराथी ब्राम्हणांची एक जात. त्यांना ' जंबू ' असेंही म्हणतात.

खिस्सा [अ० किसाह्] पु० १ वृत्तांत; हकीकत; गोष्ट. २ काम, व्यवहार,प्रकरण.३भानगडीचें काम.

खिळखिळा, खिळखिळीत वि० ज्याचे सांधे अशक्त, लटपटीत,कमजोर, किं० निखळलेले आहेत असा (पदार्थ, माणूस, जनावर, इ०).

खिळखिळी स्त्री० सांध्यांचा अशक्तपणा किं० कमजोरी.

खिळण [म० खिळा] स्त्री० १ खिळे ठोकून पक्के बसविणें.२एकाद्या स्थळीं फार वेळ बसावें लागणें किं० त्यामुळें सांधे कांहीं वेळ हलवितां न येण्याची स्थिति. ३ सांधे दुखत असल्याकारणानें ते हालविण्याची शक्ति नष्ट होणें. ४ तगादा लावणाऱ्यानें घेतलेलें धरणें. ५ हट्ट, नेट. ॐ**खिळणीस** येणें हट्ट करून बसणें.

खिळणें [म० खिळा] स० क्रि० १ एकादा पदार्थ दुसऱ्या पदार्थाशीं खिळे ठोकून पक्का बसविणें, किं० एकाद्या पदार्थाचे भिन्न भिन्न भाग खिळे ठोकून पक्के बसविणें. २ घट्ट धरून ठेवणें.

खिळपट पु० शेतांत किं० रस्त्यावर अव्यवस्थितपणें पडलेली दगडांची रास.

खिळव(-वि-)णें [म०खिळा]स० क्रि० १ खिळे ठोकून पक्के करणें. २ स्तब्ध करणें, जखडून टाकणें.३कुंठित करणें.

खिळा [सं० कील] पु० १ लोखंड, इ० धातु एका टोकास बारीक आणि दुसऱ्या टोकास जाडी माथ्याचा सळईसारखा पदार्थ असतो तो. २ गाय, म्हैस, इ०चे स्तनावर दूध बाहेर पडण्यास प्रतिबंधक जो मळ बसलेला असतो तो; व्याल्यानंतर

हे खिळे काढावे लागतात. ३ अव्यवस्थितपणें पडलेला दगडांचा ढीग. ४ नुकताच जमीनींतून वर आलेला वृक्षाचा मोड. ५ दोन तीन गांवांच्या हद्दी जेथें मिळालेल्या असतात ती जागा. ६ छापखान्यांतील अक्षरें इ०चे धातूचे तुकडे. ॐखिळापट्टी, खिळेपट्टी स्त्री० जाळलेली सुपारी किं० कोळसा उगाळून त्या रंगाचा केशर, रक्षा, इ०चें गंधावर लाविलेला टिका. खिळेपट्टी किं० खिळापट्टी करणें १ दुसऱ्याचे घरीं जेवून येणें; उ०आज तुमची कोठें खिळेपट्टी झाली ? म्ह० आज तुम्ही कोठें जेवावयास गेलां होतां ? २ घर बांधून झाल्यावर दारें, खिडक्या, इ० ना कड्या, कोयंडे, इ० बसावेणें; उ० आमचें घर बांधून झालें, आतां फक्त खिळापट्टी करण्याचें काम राहिलें आहे, तें दोन चार दिवसांत आटोपेल.

खिळोरें [म० खीळ] न० १ दरवाज्याचा अडसर एका बाजूकडून ओढून दुसऱ्या बाजूच्या ज्या भोकांत खुपसतात तें भोक. २ असा अडसर आणि तें भोक वगैरे रचना.

खीज [हिं० खीजाह्] स्त्री० धुस्सा, राग.

खीट न० १ घांटेसारखा लाकडी पदार्थ गुरांच्या गळ्यांत बांधतात तो. २ लाकडाची खुंटी किं० मेख.

खीर [सं० क्षीर] स्त्री० गव्हले किं० तांदूळ इ०पदार्थ दुधांत घालून दूध आटवून जें गोड पातळ खाद्य करतात तें. ॐजेथें खीर खाल्ली तेथें राख खावी काय ? जेथें आपण वैभवानें वास्तव्य केलें तेथें हीन दीन स्थितींत दिवस घालविणें योग्य नाहीं. खिरींत सराटा १ एकाद्या मंडळींतील नडणारा किं० उपद्रवी माणूस. २ सुंदरांच्या समूहाच्या संगतींत असलेला कुरूप पुरुष. ३ चांगल्या कारागिरीच्या पदार्थांशेजारीं असलेला कांहीं ओबडधोबड पदार्थ. ४ एका मताच्या मंडळींत भिन्न मताचा आणि सदा हरकती करीत असणारा मनुष्य. खिरींत हिंग साधु पुरुषांत किं० सद्गुणी आणि नीतिमान् माणसांच्या जमावांत घुसलेला द्वाड, दुर्गुणी, आणि अनीतिमान् माणूस.

खीळ [सं० कील] स्त्री० १ दरवाजा, खिडकी, इ०बंद करावयासाठीं जी सळई, खुंटी, इ० सोयीनें पाडलेल्या भोकांत सरकावून बसवितात ती; कोणत्याही प्रकारचें अडकण. २ दोन लांकडें एकाशीं एक अशी जोडावयासाठीं किं० एकांत एक बसावयासाठीं जो लोखंडी खिळा किं० वांबू, लाकूड, इ०ची सळई ठोकून बसवितात तो. ३ प्रतिबंध, विघ्न, हरकत, थांबणूक (पडणें, बसणें, घालणें). ४ गायी, म्हशी, इ०च्या आचोळांवर जो मळ बसतो आणि जो दूध काढतांना धुऊन काढावा लागतो तो. ५ कोपर, गुडघा, इ०चा सांधा. ॐचालत्या गाड्याला खीळ घालणें सुरळीतपणें चाललेल्या कामांत विघ्न आणणें किं० अडथळा उत्पन्न करणें. तुझ्या तोंडाला खीळ घाल गप्प बस.

खुजट [म० खुजा] वि० १ ठेंगणा. २ रोगादिकारणांमुळें ज्याची वाढ कुंठली आहे असा. ॐखुजट हाड न० ज्याची वाढ होत नाहीं किं० बंद पडली आहे असें हाड; जें मूल वयाच्या मानानें वाढावें तितकें वाढलें नाहीं त्याचें ' खुजट हाड ' आहे असें म्हणतात. ह्याच्या उलट ' उफाड्याचें हाड. '

खुजरत [अ० कुद्रत] स्त्री० ताकद, सामर्थ्य (नकारार्थी प्रयोग); उ० माझ्याशीं दोन हात करण्याची त्याची काय खुजरत लागली आहे ? पुढें ' खुदरत ' पहा.

खुजा [सं० कुब्ज] वि० ठेंगणा, खुरटलेल्या वाढीचा; वयाच्या मानानें ज्याची वाढ झाली नाहीं असा (माणूस किं० जनावर). ॐखुजावड पु० वेहेकळ किं० नदीवड ज्याला म्हणतात तो वृक्ष.

खुंट पु० १ ज्याच्या शाखा तुटल्या आहेत किं० तोडल्या आहेत असा वृक्षाचा जमीनींत उभा असलेला बुंधा. २ वरील प्रकारचा मोडून पडलेला किं० टाकलेला बुंधा. ३ कुत्र्याची शेपटी तोडल्यावर जो अवशेष राहातो तो. ४ केरसुणी, इ० झिजून उरलेला निरुपयोगी भाग. ५ नदी, समुद्र, इ०त होड्यांना स्थिर आश्रय मिळावा म्हणून पाण्यांत रोविलेला खांब. ६ मासे पकडावयाचीं जाळीं बांधावयासाठीं असे जे खांब कोळी लोक पाण्यांत पुरतात ते प्रत्येक. ७ गाय, म्हैस, इ०चे स्तनद्वारीं दूध बाहेर पडण्यास प्रतिबंधक जो मळ बसलेला असतो तो; ब्याल्यानंतर ते खिळे

काढावे लागतात. ८ हजामत झाल्यानंतर हाताला जे केसांचे बुडखे लागतात ते प्रत्येक. ९ गाय, म्हैस, इ०च्या ज्या स्तनांतून दूध निघत नाहीं तो स्तन. १० शिंके किं० गोफण करावयासाठीं दोरीचे दोन पदर दोहींकडे करून जी आडवी दोरी पडते ती. ११ पृथ्वीचे जे चार कोपरे ते प्रत्येक. १२ केळीला नवा फुटलेला अंकुर; केळीचें पिलूं. १३ चार रस्ते जेथें मिळतात ती जागा; चौक; उ० बुधवार चौक, मोती चौक, इ०. १४ रस्त्याचा शेवट. १५ कुटुंब किं० कुटुंबाचा मूळ पुरुष, किं० त्या कुटुंबांतील कोणी पुरुष. १६ बुगडी (स्त्रियांचें कर्णभूषण) ह्या दागिन्याचा नळकांड्यासारखा अवयव. १७ अंगरख्याचा बगलेंतील चुण्या ज्या जाडसर लोडाशीं शिवलेल्या असतात तो लोड. १८ आश्रयदाता, हाताशीं धरणारा. १९ अंधळी कोशिंबीर, इ० खेळांत डोळे बांधणारा जो गडी किं० खेळाडू तो. **ॐखुंटावरचा कावळा पु०** ज्या ठिकाणीं ज्या मनुष्यास घरदार, वतनवाडी, बायकामुलें, इ० नाहींत तो त्या ठिकाणचा 'खुंटावरचा कावळा.' **खुंटासारखा उभा राहाणें, खुंट होणें** न बोलतां आणि न हालतां एका ठिकाणीं रागानें उभें राहाणें. **खुंटास खुंट उभा होणें किं० राहाणें** कुटुंबांतील एक माणूस मरणादिकारणांनीं कमी होऊन दुसरें माणूस जननादिकारणांमुळें उत्पन्न होणें; संस्थेतील एका माणसानें राजीनामा दिला असेल त्याच वेळीं दुसरा इसम संस्थेस मिळणें; उ० आजा मेला नातू झाला; खुंटास खुंट उभा राहिला. **खुंटास खुंट घेणें** प्रतिकार करणें; जशास तसें करणें; उट्टें काढणें.

खुंट न०, पु० नांगराचा जो जमीन उकरण्याच्या उपयोगाचा अवयव तो. **न०** शरीरानें खबरदार जी गाय, म्हैस, बायको, इ० ती; उ० गाय घेणें ती खुंट खबरदार पाहून घ्यावी.

खुंटकणें अ० क्रि० कुंठित होणें, अडणें.

खुंटकळी स्त्री० अंगरख्याच्या रचनेंतील एक तुकडा. [भाषण, इ०.

खुटखुट (–टी) स्त्री० आवेशयुक्त वर्तन.

खुटखुटीत वि० १ आटोपसर (घर, संसार, शरीर, संस्था, इ०). २ मोडावयाला किं० चावायाला सुलभ; लोचट किं० चिकट याच्या उलट. ३ निकोप; वृद्धावस्थेंत किं० आजारांतून उठल्यानंतर सफाईनें हालचाली करूं शकणारें (शरीर); उ० मी आतां बरा होऊन खुटखुटीत झालों आहें; उ० तो रामचंद्रपंत ऐंशीं वर्षांचा आहे पण त्याचें शरीर अझून खुटखुटीत आहे. **क्रि० वि०** पूर्णपणें (वाळलेलें चिरगूट, कुरड्या, सांडगे, इ०).

खुंटण [म० खुंट] न०झाडाचा, केरसुणीचा, किं०तुटलेल्या शेपटीचा बुडखा किं०अवशिष्ट भाग.

खुटण, खुटणभर न० नांगरकामाचें सामान्य किं० साधारण परिमाण. ' औटभर ' असाही ह्याच अर्थी शब्द आहे.

खुंटणावळ [म० खुंटणें] स्त्री० भाजीपाला, शेंगा, इ० जमीनींतून किं० झाडावरून खुडून किं० तोडून काढणें किं० काढण्याबद्दल दिलेली मजुरी.

खुंटणें, खुटणें [सं० कुंठ्] अ० क्रि० १ अडणें; अडून बसणें; थांबणें; स्तब्ध होणें; क्रियाविहीन होणें; उ० नदीला एकाएकीं पूर आल्यामुळें आम्ही त्या कांठावर दोन दिवस खुंटून बसलों होतों; उ० ह्या श्लोकांवर माझी मति खुंटली. २ विशिष्ट परिमाणांत तुट येणें; उ० दोन मण गुळांत दहा शेर गूळ खुंटला.

खुंटणें, खुटणें, खुडणें स० क्रि० भाजी इ० पदार्थांचीं अग्रें किं० पानें नखें, इ०नीं तोडणें; झाडाची पानें, फुलें, शेंगा, इ० तोडणें.

खुंटपान न० कोंबयाच्या पूर्वी केळीला येतें तें शेवटचें लहान पान.

खुंटवरा [म० खुंटा] पु० खुंटा; खुंटी; उभा पुरलेला लाकडाचा सोट (कांहीं कार्यार्थ).

खुंटबावली स्त्री० १ मुलींची खेळावयाची कापडाची किं० मातीची बाहुली. २ उंचावरच्या पदार्थाला हात पोंचावा म्हणून पायाच्या चवड्यावर उभें राहाणें; चवड्यावरचें संस्थान (क्रि० करणें). ३ जिला अमुक काम कर असें एकसारखें सांगावें लागतें, आणि न सांगितलें असतां जी स्तब्ध उभी राहते, अशी स्त्री. **ॐखुंटबावलीवर उभें राहणें** पायांच्या चवड्यांवर उभें राहणें.

खुंटबाळी स्त्री० स्त्रियांचें एक कर्णभूषण.

खुंटभाजी स्त्री० १ पालेभाजीचीं झाडें विस्तार पावावीं म्हणून त्यांचे शेंडे तोडून काढून जी भोजनार्थ भाजी शिजवितात ती. २ वर सांगितल्या-

प्रमाणें भाजी न करतां शेंडे तोडून फेकून दिले जातात ते समुच्चयानें. ३ असे शेंडे तोडल्यावर फुटतात तीं नवीं पानें समुच्चयानें.

खुंटरोग पु० १ बैल, घोडा, इ०जनावरांना फार दिवस एके ठिकाणीं बांधून ठेविल्यामुळें त्यांना येते ती कृशता. २ बैठ्या नोकरीनें उत्पन्न होतात ते आजार किं० तीं दुखणीं व्यक्तिशः किं० समुच्चयानें. ❀ **खुंटरोगी वि०** बैठ्या नोकरीमुळें ज्याला कांहीं आजार झाला आहे असा.

खुटवा, खुंटवा [म०खुंटणें=अडणें] **पु०**स्थलविशेषीं नाव, होडी, गलबत,इ० बद्दल द्यावा लागतो तो कर.

खुंटविणें [म० ' खुंटणें ' चें प्रयोजक रूप] अडविणें; थांबविणें; ०च्या गतीला प्रतिबंध करणें.

खुंटळणें [म० खुंटी] **स० क्रि०** वाल,इ० दाणे जमीनींत घालतांना जमीनीला खुंटीनें दरा किं० भोक करणें.

खुंटा पु० १ मोठी खुंटी. २ जनावरांना बांधावयासाठीं जमीनींत पुरून रोवितात जो लाकडाचा दांडा किं०तुकडा तो.३जात्याच्या वरच्या तळींतील खळगींत बसवितात जो लाकडाचा गुळगुळीत तुकडा तो,–जो हातांत धरून वरची तळी माणीभोंवतीं चक्राकार फिरविली जाते. ४ दुफाशी सोंगट्यांच्या खेळांत उभे पडतात जे दोन फासे त्यांतील एक. ५ जात्याच्या खुंट्यासारखा टणक,लांब आणि वाटोळा कोणताही पदार्थ.❀ **खुंटा गाडणें** एकाद्या विशिष्ट स्थळीं कायमचें वास्तव्य करून राहाणें; स्थळविशेष न सोडण्याच्या इराद्यानें तेथें राहणें. **त्याचा खुंटा बळकट (किं० खबरदार) आहे** त्याचा वाली किं० आश्रयदाता समर्थ आहे. **खुंट्याच्या जोरानें दावें ओढणें (किं० उड्या मारणें)** कोणा समर्थाच्या आश्रयाच्या किं०पाठिंब्याच्या जोरावर उर्मटपणा किं० द्वाडपणा करणें. **हालवून खुंटा बळकट करणें**१ संदिग्ध गोष्ट स्पष्ट करणें; शंका काढून आणि त्यांचें निरसन करून एकादी गोष्ट स्पष्ट किं० निश्चित किं० संशयरहित करणें. २ स्पष्ट असेल ती गोष्ट अधिक स्पष्ट करणें. **खुंटेउपट, खुंटेउगाड, खुंटेउपड स्त्री०** घोड्याच्या ज्या बहात्तर खोड्या त्यांपैकीं एक; असल्या खोडीच्या घोड्याच्या मालकाला कोणत्याही कामीं यश येत नाहीं अशी समजूत आहे. २ अपशकुनी नोकर; जो ठेविल्यामुळें यजमानाचें चरितार्थाचें साधन नाहींसें होतें असा नोकर. ३ एकाद्या गांवचा थोडकेच दिवसाचा रहिवासी; एकाद्या गांवीं ज्याचें वास्तव्य कांहीं काळच व्हावयाचें आहे असा इसम. **खुंटेगाढ स्त्री०** घोड्याचें एक शुभलक्षणविशेष. **खुंटेबाळी स्त्री०** स्त्रियांचें कर्णभूषणविशेष. **खुंटीवरचा कावळा, खुंट्यावरचा कावळा पु०** १ जो एकाद्या विशिष्ट गांवीं कांहीं कामापुरताच राहिलेला आहे आणि तें काम संपतांच जो तेथून जावयाचा आहे असा इसम.२ कोणी तरी माणूस, ज्याचें कांहीं महत्त्व नाहीं किं० ज्याच्या बद्दल कोणास कांहीं माहिती नाहीं.

खुंटाड[**म०** खुंट]**न०**१ज्याच्या फांद्या नाहींशा झाल्या आहेत अशा झाडाचें खोड किं० बुंधा (तुच्छतेनें).२ अडगळ ज्यानें होतें असें म्हणजे भलत्या जागीं पडलेलें लाकूड.

खुंटाड्या [म० खुंटा] **पु०** वैष्णवधर्माचा किं० पंथाचा इसम (वैष्णव उभें गंध लावतात यावरून).

खुंटापळी स्त्री० लठ्ठ काठी; सोडगें.

खुंटाप्रा [म० खुंटा] **पु०** वृक्षाचा खुंट; ज्याचीं शाखा आणि पानें तोडलीं गेलीं आहेत अशा वृक्षाचा बुंधा.

खुंटाफळी स्त्री० १ मुलांचा एक खेळ. २ घोड्यांवर कांहीं प्रांतांत घेतात तो कर.

खुंटारा[**म०** खुंट]**पु०**१ झाडाचा बुंधा,–ज्याच्या फांद्या,पानें,इ०तोडलेलीं आहेत.२तेलाच्या घाण्याचा किं०पायराहाटाचा बैल शिकवून तयार करावयासाठीं तो ज्या खांबाभोंवतीं फिरावयास लाविलेला असतो तो खांब.३झिजलेल्या केरसुणीचा बुडखा किं० थोटूक. ❀ **एकाद्या मुलाला खुंटाखालीं घालणें** विद्यादि शिकवावयासाठीं त्याला पंतोजी, वस्ताद, इ०च्या हाताखालीं ठेवणें.

खुटाला पु० कापसाचे गुंतलेले धागे सोडविण्याचें साधनविशेष.

खुंटावणें अ० क्रि० थांबविलें जाणें; कुंठतगति होणें. ❀ **माझा पाय खुंटावला** माझी गति बंद पडली.

खुंटाविणें [**म०** खुंटा] **स० क्रि०** १ आखडलेली तंगडी साफ आणि सैल करण्यासाठीं त्या

तंगडीवर कांहीं विशेषप्रकारें ओढ किं० ताण घालणें. २ मंत्रानें भुताला नियंत्रणेंत घालणें.

खुंटाळी [म० खुंटा] स्त्री० १ वांझोटी स्त्री. २ बांधावयाचा मुडा आटोपशीर व्हावा म्हणून तो ज्या सोडग्यानें ठोकतात तो सोडगा. ३ चिरगुटें ठेवावयासाठीं ज्या लाकडाच्या फळीला चार पांच खुंट्या बसविलेल्या असतात आणि जी फळी भिंतींत ठोकलेली असते ती; ह्या अर्थी ' खुंटाळें ' असाही शब्द आहे.

खुंटाळ्या [म० खुंट] वि० १ज्यानें हजामत केली असतां केशांचे खुंट राहतात असा (न्हावी); अकुशल(न्हावी). २वैष्णव सांप्रदायाचा(माणूस).

खुटी स्त्री० बैल इ० च्या गळ्यांत बांधतात ती लाकडाची घंटा.

खुंटी, खुटी स्त्री० १ कपडे, चिरगुटें, इ० पदार्थ उंचावर ठेवण्यासाठीं भिंतींत जे लाकडाचे तुकडे बसविलेले असतात ते प्रत्येक. २ सतार इ०च्या तारा ताणावयासाठीं ज्या बारीक खिट्या केलेल्या असतात त्या प्रत्येक. ३ लहान खुंटा. ॐ **खुंटी पिळणें** किं० **पिळवटणें** किं० **पिरगाळणें** १ दुसऱ्या कोणी आपल्या योजनेच्या किं० आरंभिलेल्या कार्याच्या विरुद्ध कांहीं खटपट केली असतां ती सफळ होऊं नये म्हणून अगोदरच आपण सावधगिरीनें तजवीज करून ठेवणें. २ दुसऱ्याच्या कार्यांत विघ्न उपस्थित होईल अशी कांहीं तरी योजना करून ठेवणें. ३ दोघांत कलह पेटविण्यासाठीं दुष्टपणानें केलेली योजना. **खुंटीस अडकणें** १ बंद होणें किं० बंद पडणें. २ थांबविलें जाणें;कुंठित केलें जाणें. **खुंटीस गवाळें**(किं० **गांठोडें**) **लावणें** १ वादग्रस्त जो पदार्थ,(शेत, मालमत्ता, इ०) तो निकाल लागेपर्यंत सरकारांत अनामत पडणें. २ कामाला सुरवात झालेली असणें; निकाल लागावयाच्या पंथास (एकादी गोष्ट) लागलेली असणें. ३ स्थानान्तर लवकरच करावें लागेल अशा धोरणानें (कोणेकानें)असणें; उ० माझें गाठोडें मी कधींच खुंटीला लावलें आहे. **एकाद्याची खुंटी उपटणें** त्याला वाटेंतून दूर करणें.

खुटुरुटु क्रि०वि०मंद गतीनें;थोड्या प्रमाणांत; विशेष तसदी न पडेल अशा रीतीनें.

खुड उ० वा० अ० चिमण्या, कावळे, इ०ना हाकलून लावतांना उच्चारतात तो शब्द; मांजराला शुक, कुत्र्याला हड, हे शब्द योजतात.

खुडकणें स० क्रि० झाडाचीं पानें, फुलें, इ० नखांचीं अग्रें इ०नीं तोडणें. अ०क्रि० १ कुंठित होणें (गति, वृद्धि,इ०).२हात,पाय,इ० अवयव वायूच्या विकारानें ताठणें म्ह०त्यांची हालचाल बंद पडणें. ३ थांबविलें जाणें, कुंठित केलें जाणें.

खुडकाविणें [म० खुड खुड] स० क्रि० १ खुड खुड असा शब्द उच्चारून (पाखरें) उडवून लावणें किं० हाकून देणें. २ नापसंत म्हणून नाकारणें किं० फेकून देणें.

खुडखुडणें अ० क्रि० १ थंडीनें जर्जर होऊन कुडकुडणें किं० गात्रें कंपित होणें. २ पोटांत ढवळून किं० अन्य कारणानें अस्वस्थता वाटणें;उ० माझ्या पोटांत खुडखुडत आहे.

खुडखुडी स्त्री० थंडीनें अंगाला सुटतो तो कंप.

खुडखुडीत वि० १ हस्तपादादि गात्रांची हालचाल करण्यांत तल्लख; निकोप; नीरोगी; उ० तो सत्तर वर्षांचा म्हातारा आहे पण अझून खुडखुडीत आहे. २ आटोपसर. ३ पूर्णपणें वाळलेला (कपडा, शेंगा, पानें, इ०).

खुडगा पु० गाडीच्या साटीस जे उभे खुंटे बसविलेले असतात ते प्रत्येक.

खुडणी स्त्री० झाडाचीं पानें, फुलें, इ०खुडणें.

खुडणें स० क्रि० १ नखादिकांनीं झाडाचीं पानें, फुलें, इ० तोडणें. २ बोटांनीं पिळवटून तोडणें (पानें, फुलें, इ०).

खुडतुडणें, खुरतडणें स० क्रि० १ नखादिकांनीं तोडून काढणें; उ० दांतांनीं नखें खुडतुडण्याची तुझी खोडी वाईट आहे.

खुडसणी स्त्री० १ नखें, दांत, इ०नीं तोडणें. २ कापणें, छाटणें. ३ एकाद्यावर झाडलेला ताशेरा. ४ खेद; मनाला लागलेली विवंचना. ५ उत्कट इच्छा; उ० मी इतके दिवस खुडसणी धरली होती ती आज फिटली.

खुडसणें स० क्रि० १ नखादिकांनीं तोडणें.२ तोडणें, छाटून टाकणें.३ (एकाद्याला) रागें भरणें.

खुडसाविणें स० क्रि० १ खुड, खुड, असा शब्द उच्चारून (पांखरें) हाकलून लावणें. २ नापसंत म्हणून फेकून देणें.

खुडा वि० १ एकाच संस्थानांत फार वेळ राहिल्याकारणानें जड किं० ताठ झालेलें (गात्र-विशेष);उ०खुर्चीवर चार तास बसून माझी पाठ खुडी झाली आहे;उ० लिहून लिहून माझीं बोटें खुडीं होऊन गेलीं आहेत. २ संधिवातादि विकृतींनीं शरीराचें ताठलेलें (गात्रविशेष).

खुंडी स्त्री० १ लहान मुलांच्या कुंचीसारखें शिवलेलें गोणपाट इ०, (धान्य इ० भरून दुसरीकडे वाहून न्यावयासाठीं).२जोंधळ्याची एक जात.

खुडी स्त्री० १ पावसाळ्याच्या दिवसांत गलबतांवर करतात तें छप्पर. २ लहान वासरांसाठीं कूड आणि छप्पर घालून करतात ती खोली. ३ गुरांढोरांसाठीं अशीच केलेली बंदिस्त जागा. ४ कोंबडीं, खबुतरें, इ०साठीं केलेली कुडलेली जागा. ४ घोड्याच्या मुतासाठीं लाकडें वर घालून केलेला खड्डा. ५ उंट इ०ची अवलाद.

खुडूक न० खोड, खुंट, बुंधा.

खुडें न०कोंबडीं, खबुतरें, इ०ठेवण्याची जागा.

खुणखुणणें अ० क्रि० रागानें गेंगाणा आवाज काढून चरफडत बसणें.

खुणखूण स्त्री० १ कांहीं अनिष्ट गोष्ट घडून आल्यामुळें अंतःकरणास लागते ती चिंता किं० हुरहूर किं० वाटतो तो विषाद. २ एकाद्या माणसाच्या वद वर्तनाबद्दल लोक हलक्या स्वरांत आणि एकमेकांत करतात ती टीका.

खुणा स्त्री० पदार्थावर त्याचा दर्जा, उत्पत्तिस्थान, उपयोग, किंमत, इ०चें सूचक असें जें करतात तें चिन्ह. ॐ**खुणामुद्रा स्त्री०** खुणाविणा; पदार्थांचा तपशील कळावा म्हणून घातलेलीं चिन्हें समुच्चयानें. **खुणाखाणा स्त्री० अ० व०** १ तपशीलवार माहिती. २ खुणाविणा.

खुणाविणें [म० खूण] स० क्रि० १ डोळे, बोटें, मान, इ०नीं खुणा करून आपला अभिप्राय दुसऱ्यास कळविणें. २ दुसऱ्या कोणास न कळूं देतां एका विशिष्ट माणसालाच आपला अभिप्राय खुणांनीं कळविणें. ३ एकाद्या पदार्थावर माहितीसाठीं कांहीं चिन्ह करणें.

खुतखुत, खुतखूत पु० १ उकळी फुटलेलें पाणी, दूध, इ०चा शब्द. २ डोक्यांत उवांचा वुजवुजाट. **स्त्री०** १ चरफड. २ मनाची टोचणी. ३ घर, इ०मध्यें मनुष्यें इ०ची दाटी किं० गर्दी.

खुतखुतणें अ० क्रि० शिजत असलेला भात किं०विरत असलेल्या चुन्याच्या कळ्या, इ०चा जो ध्वनि होतो त्या ध्वनीनें युक्त होणें;उ०ह्या चुन्याच्या कळ्या खुतखुतूं लागल्या; आतां झांकण ठेव.

खुतणी(-नी) [अ० खुतन्] स्त्री० अर्धें कापसाचें सूत आणि अर्धें रेशमाचे धागे ह्यांच्या मिश्रणाचें पट्टेदार कापड.

खुतणें, खुंतणें [सं० कुंठ्] अ० क्रि० १ रुसून, अडून, तटून बसणें. २ कचरणें, मागेंमागें घेणें. ३ ध्यानस्थाप्रमाणें बसून राहाणें.

खुतबा [अ० खुत्बाह्] पु० १ महमद, त्याचे चार प्रचारक, आणि राजा, यांचीं स्तोत्रें मुसलमान लोक शुक्रवारच्या निमाजानंतर म्हणतात तो विधि. २ कोणत्याही प्रकारचा गोंगाट किं० गलबला.

खुद, खुद्द [फा० खुद्] वि० १ खासगी; स्वताच्या मालकीचें. २ वैयक्तिक. ३ स्वामित्व म्हणजे मालकी दाखविणारा जो षष्ठयन्त शब्द त्याच्यामागें ' खुद ' किं० ' खुद्द ' हा शब्द जोर देण्यासाठीं योजतात;उ०हें घर खुद्द माझें आहे,ह्मं० दुसऱ्या कोणाचें नाहीं. **क्रि० वि०** स्वता;जातीनें; उ० हें चित्र खुद्द मी काढलेलें आहे. ॐ**खुदसनद स्त्री०** प्रत्यक्ष राजापासून मिळालेली सनद. **खुद्द असामी पु०** स्वताच किं० जातीनें हजर जो तो. **खुद निसबत वि०** स्वताचा; वैयक्तिक. **क्रि० वि०** स्वता; जातीनें. **खुद खर्च पु०** कोणा वड्या माणसाचा खाजगी ह्मं० स्वताबद्दलचा खर्च. **खुदखासा वि०** केवळ वैयक्तिक. **क्रि० वि०** जातीनें, स्वता.

खुदखुद स्त्री० घोड्याचा तल्लखपणा.२आवेश, उत्साह,वीरश्री,इरई. ३ चिंता, विवंचना.

खुदरत [अ० कुद्रत] स्त्री० ताकद, लायकी, कर्तृत्व (नकारार्थी प्रयोग): उ० माझ्याशीं वेदान्तावर वाद करण्याची त्याची काय कुदरत आहे ?

खुंदल (-ळ-)णें, खुदळ (-ल-)णें स० क्रि० १ कोणेकाला लाथा बुक्क्या मारून जर्जर करणें. २ पदार्थाची दुर्दशा होईल अशा रीतीनें

त्याचा उपभोग घेणें. ३ माणसाचा किं० जनावराचा भलत्याच रीतीनें उपयोग करून घेणें किं० त्याला न झेपेल असें काम त्याला करावयाला लावणें.

खुनस [हिं० खुन्स्] **पु० स्त्री०** आकस, द्वेषबुद्धि, मनांत गुप्तपणे जिवंत ठेविलेलें वैर, (धरणें, करणें, इ०). ⁂**खुनसी, खुनशी वि०** मनांत गुप्त वैरभाव धरून संधी मिळेल तेव्हां सूड घेणारा.

खुनी [फा० खून् (रक्त)+ई (मराठी प्रत्यय)] **वि०** १ खुनासंबंधाचा. २ ज्यानें खून केला आहे असा. पुढें ' खून ' पहा. ⁂**खुनी मुळव्याध स्त्री०** ज्या मूळव्याधीच्या विकृतींत रक्त पडतें ती (मूळव्याधीचा दुसरा प्रकार ' मोडाची मूळव्याध '). **खुनेरी, खुनेऱ्या वि०** खून करणारा किं० खुनासंबंधाचा किं० खून करण्याच्या प्रवृत्तीची. [झोंबणी.

खुपणी [म० खुपणें] **स्त्री०** बोचणी; टोचणी;

खुपणें अ० क्रि० १ केर, इ० डोळ्यांत गेल्यानें तो पीडादायक होणें; लाकडाचें धसकट, कांटा, इ० शरीराच्या त्वचेंत शिरून तेथें कांहीं काळ राहिल्यामुळें त्यानें वेदना उत्पन्न करणें; सलणें. २ मनाला असह्य होणें; उ० तो गोविंदपंत माझ्या डोळ्यांत खुपतो आहे; त्याला तुम्ही दूर करा.

खुपरा [म० खुपणें] **वि०** १ खुपतो तो. २ खुपरी नांवाच्या रोगानें विकृत झालेला (डोळा). ज्याचे केश किं० पृष्ठभाग त्वचेला बोचतो असा पदार्थ (घोंगडी, शालजोडी, इ०). ३ वारा लागून ज्याला ठुसठुस लागली आहे असा (डोळा).

खुपरी [म० खुपणें] **स्त्री०** एक नेत्ररोग,– ज्यांत डोळ्याची पोटें सुजतात (येणें, होणें).

खुपसणें स० क्रि० जोरानें घालणें किं० शिरकावणें. ⁂**खुपसदशमी स्त्री०** तव्यावर पीठ न भाजतां जळतें लाकूड पिठांत खुपसून त्या पिठांत पाणी घालून केलेली दशमी (ही दशमी ओंवळ्यानें खातां येतें).

खुंब [अ० कौम्] **पु०, न०** जात, टोळी; उ० माळी खुंब, साळी खुंब, चांभार खुंब.

खुबड [म० खुबा] **न०** १ गुडघा इ०चा सांधा. २ पोक; पाठीवरचा वेढव दिसेल असा मांसाचा उंचवटा. ⁂ **एकाद्याचें खुबड मोडणें** त्याचा नक्षा उतरणें; त्याची रग किं० मस्ती जिरविणें.

खुबडी स्त्री० कबुतरांसाठीं केलेली जागा.

खुबलणें स० क्रि० लाथाबुक्क्या मारून (एकाद्याला) जर्जर करणें.

खुब, खुबसूरत पुढें ' खूब,' खूबसूरत' पहा.

खुबळणें स० क्रि० मांडीवर घेऊन हालविणें किं० दोन हातांनीं उडवून झेलणें (मुलाला).

खुबा पु० १ गुडघा इ० शरीरावयवाच्या सांध्याच्या हाडाचें वर्तुल किं० उंचवटा. २ जमीन, वृक्षाचें खोड, इ०वरचा उंचवटा किं० टेंगूळ. ३ समुद्र, खाडी, इ० मध्यें राहणारा एक प्राणी,–ज्याच्या पाठीवर शंखाकार हाड असतें. ४ अशा प्राण्याचें असें हाड.

खुबी [फा० खूबी] **स्त्री०** १ सौंदर्य; डोळ्यांना आनंद देणारा पदार्थाचा नीटनेटकेपणा. २ एकाद्या वस्तूंतील किं० माणसांतील कांहीं विशेष धर्म, रचना, रहस्य, किं० मर्म. ३ एकाद्या वृत्तांतांतील लक्ष्यांत ठेवण्याजोगा भाग,–ज्याचे पासून घ्यावयाचा धडा, बोध, तात्पर्य, इ०. ४ लहान खुबा. वर ' खुबा ' तृतीयार्थ पहा. ⁂ **खुबीदार वि०** ज्यांत युक्ति, बोध, किं० सौंदर्य आहे असा.

खुमखुम (–खू–) **स्त्री०** १ आपल्या अंगच्या गुणविशेषाबद्दल वाटत असलेली प्रौढी किं० गर्व. २ मस्ती, रग, ताठा. ३ भांडण, कुस्ती, इ० त शिरण्याची किं० पडण्याची अनिवार इच्छा.

खुमारी, खुमाई [अ० खुमार्] **स्त्री०** पदार्थाचा उत्कृष्टपणा, (रुचि, रूप, गंध, सुबकपणा, कर्णमधुरता, इ० बाबतींतील).

खुमाशी स्त्री० खालीं ' खुमास ' अर्थ २ पहा.

खुमास, खुमाच [अ० कुमाष्] **पु०** १ चंग कांचन गंजिफांतील जो चवथा रंग तो. २ पदार्थाचा गुणविशेष (सौंदर्य, नीटनेटकेपणा, सुबकपणा, तजेल्दारपणा, चकाकी, इ०).

खुर पुढें ' खूर ' पहा.

खुरकटणें, खुरकुटणें अ० क्रि० १ खरकटा होणें (हात, पाय, तोंड, इ०). २ ढुंगणानें खरडत किं० सरकत जाणें; मागें ' खरकटणें ' पहा.

खुरकी [म० खूर; सं०खुर] **स्त्री०** गाय, म्हैस, इ० चीं वासरें हीं जन्मलीं असतां त्यांच्या खुरांचा जो भाग खुडून काढतात तो.

खुरखुरणें अ० क्रि० हात, पाय, जिव्हा, इ०

इंद्रियांनीं किं० गात्रांनीं कर्मविषेश करण्याला अति उत्कंठित होणें; उ० तुला झोडपून काढावयाला माझे हात खुरखुरत आहेत.

खुरखुत, खुरकूत, खुरगुटी [म० खूर]गुरांच्या खुरांस म्ह० पावलांस होतो तो एक रोगविशेष.

खुरखुर, खुरखुरी स्त्री०, खुरखुरा पु० १अत्युत्कंठा. २ इष्टार्थ लांबणीवर पडल्यामुळें होते ती चरफड.३कांहीं मोठें नुकसान किं० हानि झाल्यानें वाटतें तें दुःख.

खुरग (-गु-) टणें अ० क्रि० १ वाढीकडून कुंठित होणें; वाढ बंद पडणें. २ ढुंगणानें फरपटत जाणें.

खुरचा स्त्री० अ० व० खंड, तुकडे; ह्या शब्दाचा पुढील सारख्या वाक्यांत प्रयोग होतो; माझ्याशीं चाहाटळपणा केलास तर खुरचा पाडीन.

खुरचांपा पु० चांफ्यांच्या झाडाची एक जात.

खुरचांपें न० खुर चांप्याचे फूल.

खुरची, खुरसी स्त्री० १बसावयासाठीं केलेला लाकूड, लोखंड,इ०द्रव्याचा एक प्रकारचा आधार. २घराच्या खांबांखालीं घालतात ते लाकडाचे किं० दगडाचे साधे किं०नक्षीचे ठोकळे ते प्रत्येक;उथळी.

खुरजी [अ०] **स्त्री०** १ सराफ वगैरे लोकांची पैसे ठेवण्याची पिशवी. २ एक प्रकारची सतरंजी.

खुरट, खुरंट वि० १ रोगादिकांमुळे ज्याची वाढ कुंठित झाली आहे असें (माणूस, जनावर, इ०).२ वयाच्या मानानें जितकी वाढ व्हावयाची तितकी ज्याची झाली नाहीं असें (माणूस, जनावर, झाड). ॐ**खुरंट पाय पु०** तोकडा पाय. (हा ज्याचा त्याला आणि इतरांनाही अशुभ भोगवितो अशी समजूत आहे); उ० ह्याचा खुरंट पाय जेथें जातो तेथें वाटोळें करतो. **खुरंट पायाचा, खुरंट पायी, खुरंट पावल्या, खुरडे पायाचा वि०** अपशकुनी माणूस; अनिष्ट भोगविणारा.

खुरटणें,खुरंटणें अ० क्रि० ज्याची वाढ रोगादिकारणांमुळें कुंठली आहे असा होणें; वाढीच्या दृष्टीनें कमी असणें किं० असावा तितका नसणें.

खुरडणें अ० क्रि० १ वाढीकडून कुंठित होणें. २ ढुंगणानें खरडत किं० सरकत जाणें.

खुरडिंबी स्त्री० शरीराचें संस्थानविशेष,-जमीनीवर गुडघे आणि पायांचीं बोटें टेकून आणि तोल पुढें टाकून मांडलेलें.

खुरतु (-त-)डणें स० क्रि० नखांनीं किं० दांतांनीं तोडणें किं० तोडून काढणें; कुरतुडणें.

खुरदमा [अ० खूरद्दमा] **पु०** १ ओढाताण; झोंबाझोंबी; अति कष्ट, इ० मुळें आलेला थकवा; निरंगळी; शैथिल्य, इ०. २ निष्काळजीपणानें पदार्थ किं० जनावर वागविल्याकारणानें त्याची झालेली दुर्दशा, मोडतोड, खराबी, इ०.

खुरपणें स० क्रि० खुरप्यानें कापून, तोडून, किं० खरडून काढणें (गवत, इ०).

खुरपी स्त्री० १ तव्यावर भाकरी इ० फिरविण्याचें एक आउत.२ खुरप्यासारखें एक माळ्याचें आउत. ३ दूध, इ० ढवळण्याचें एक आउत.

खुरपें, खुरपा, पु० खुरपण्याचें एक आउत,-त्याला लाकडी मूठ असून त्याचें पोलादी पातें निमगोल वळणाचें असतें.

खुर [अ० कुर्बान्] **न०** १ आश्रयार्थ आलेला हीनदीन प्राणी किं० माणूस. २ भक्त. ३ ओवाळून टाकलेला पदार्थ.

खुरबेटी स्त्री० एक जलजंतु,-जो खडकाला किं० गलबतांच्या तळाला आपलें घर चिकटावून त्यांत असतो.

खुरमांडी [म० खूर+मांडी] **स्त्री०** मांड्यांखालीं पाय वळवून गुडघे आणि पायांचीं बोटें जमीनीला टेकतील अशा रीतीनें बसण्याचा प्रकार.

खुरमुंडी [म० खूर+मुंडी (डोकें)]**स्त्री०** १ बकरा मारण्याचा महाराचा हक्क. २ पाय आणि डोकें एकत्र बांधणें. ३ पायांत डोकें घालून बसणें. ४ अंगाचें गाठोडें करून निजणें. ५ एकाद्या माणसाचा पराभव किं० मोड.

खुरशी (-सी) स्त्री० १ उंच बसावयासाठीं लाकडाचें किं० लोखंडाचें जें आसन तें,-त्याला चार पाय असतात; खुर्ची. २खांबाखालीं घालतात ती उखळी. [हल्द, इ०).

खुरष्णी वि० खुरासानचा (ओवा, तीळ,

खुरा, खुऱ्या पु० १ नालबंद, सोनार, वगैरेंचें एक आउत,-ऐरणीसारखें. २ जोड्याची किं० खडावाची टाच.

खुराक [**फा०**] **पु०** शरीर बळकट होण्यासाठीं नियमानें जें पौष्टिक खाद्य खातात तें. **खुराकाचा वि०** १ खुराक खाल्ल्यामुळें धष्टपुष्ट झालेला. २ नियमशः खुराक खाण्याचा ज्याचा परिपाठ आहे असा. **खुराकी वि०** खाण्याच्या संबंधाचा किं० उपयोगाचा. **खुराकी स्त्री०** खाण्याच्या अन्नाचें परिमाण किं० तदर्थ खर्च.

खुरांटणें अ० क्रि० वाढीकडून कुंठित होणें (मनुष्य, मूल, जनावर, किं० झाड).

खुराट (–डें) न० १ खवुतरें, कोंबड्या, इ० साठीं केलेली जागा. २ अति लहान घर किं० खोली (तुच्छतेनें).

खुरासणी, खुरासानी [**फा०** खुरासानी] **वि०** १ खुरासानचा किं० खुरासानसंबंधाचा. २ ओवा, तीळ, किं० हळद, ह्यांची एक विशिष्ट जात. **स्त्री०** वनस्पतिविशेष.

खुरी स्त्री० १ एक जंगली झाड. २ आंबे, फुलें, वेल इ० चीं पानें, तोडून गोळा करण्यासाठीं ज्या काठीच्या टोकाला जाळें अडकावलेलें असतें ती काठी. ३ वासरें इ०च्या खुरांचा पुढें आलेला भाग. ४ गायी, म्हशी, इत्यादींच्या खुरांचें एक अर्बुद. ५ गुरांची बसण्याची जागा.

खुरीमुंडी [**म०** खूर+मुंडी] **स्त्री०** बकरा, बोकड, किं० मेंढा, नवसलेल्या देवापुढें कापून त्याचें डोकें आणि खूर त्या देवाला अर्पण करण्याचा विधि (आजारांतून उठलेल्या माणसाप्रीत्यर्थ).

खुरूप न० पायांत कांटा मोडून तेथें जें घर तो करतो तें; कुरूप.

खुरें न० जोड्याची किं० खडावाची टाच; खोट.

खुर्द [**फ ०**] **वि०** एकाच नांवाच्या दोन वस्तूंत तुलना करावयाची असतां किं० त्यांच्यांतील भेदभाव दर्शवावयाचा असतां त्या दोन वस्तूंपैकीं जी लहान (ती वस्तु); मोठ्या वस्तूला ' बुदरुक ' हें विशेषण किं० टोपण लावतात; उ० हिंगणें खुर्द, हिंगणें बुदरुक, लेनाड खुर्द, लेनाड बुदरुक, इ०. २ दोन माणसांपैकीं वयानें किं० दर्जानें जो लहान तो खुर्द आणि जो मोठा तो बुदरुक. एकाच नांवांचीं दोन गांवें, शेतें, किं० माणसें यांच्या नांवांपुढें खुर्द आणि बुदरुक हे शब्द योजले जातात.

खुर्द [**फा०** खुर्दन्=खाणें; खुर्दाह्=खाल्लेलें] **वि०** जें खाल्लें तें (या अर्थी अप्रचलित). **खुर्द (–दा–) सानक स्त्री०** १ ज्यांतील अन्न खाल्ल्यामुळें जें उष्टें झालें आहे असें ताट. २ पूर्णपणें बक्षीस दिलेली देणगी (जमीन, इ०). सानक म्ह० जेवावयाचें ताट.

खुर्दा [**फा०** खुर्दाह्=लहान] **पु०** १ लहान नाणीं,–विशेषतः तांब्याचीं. २ तुकडे तुकडे; खंड विखंड. ३ मडकें, भांडें, इ० फूटून त्याचे झालेले तुकडे. ४ मोठ्या माणसांत लुडबुडणारीं जीं लहान लहान मुलें तीं किं० त्यांचा समुदाय किं० घोळका. ५ एकाद्याशीं हातझोंबी, धिंगामस्ती, किं० मारामारी केल्यानें त्याच्या अंगाला जो थकवा किं० शीण येतो तो.

खुलणें [**हिं०** खुलना] **अ० क्रि०** १ उघडणें. २ विकास पावणें. १ आणि २ हे अर्थ विशेषसे प्रचलित नाहींत. ३ (मन, अंतःकरण, चित्तवृत्ति) प्रसन्न होणें किं० आनंदित होणें. ४ रंगांत येणें. ५ स्तुतिस्तोत्रें ऐकून खुष होणें किं० खूष होऊन मेहेरबानीची गोष्ट करावयाला सिद्ध होणें. ६ दैव किं० परिस्थिति अनुकूल होणें. ७ अधिक शोभायुक्त दिसूं लागणें. ८ एकाद्या कार्यांत उत्साहानें भाग घेण्याच्या मनोवृत्तींत येणें. ९ दुसऱ्या रंगाच्या सान्निध्यानें किं० परिस्थितींत कांहीं फरक झाल्याकारणानें अधिक उठावदार, तजेलेदार, सुंदर, किं० मनोहर दिसूं किं० वाटूं लागणें.

खुलवर स्त्री०, न० १ लाच. २ पारितोषिक. **स्त्री०** १ समायिक जिंदगीच्या वाटण्या व्हावयाच्या आधीं एका हिस्सेदारानें चोरून बाजूला काढून ठेवलेला भाग. २ अशा प्रकारची चोरी (**क्रि०** करणें).

खुलविणें, खुलाविणें स० क्रि० १ एकाद्याचीं स्तुतिस्तोत्रें गाऊन किं० अन्य रीतीनें त्याला प्रसन्न करणें; तो खुषींत येईल असें करणें. २ एकाद्या पदार्थाची शोभा कांहीं युक्तीनें किं० संस्कारानें वाढविणें.

खुला [**हिं०**] **वि०** १ उघडा; मोकळा, रिकामा; उ० हें घर खुलें आहे. २ अनियंत्रित. ३ संकोचरहित, भीतिरहित (अंतःकरण, दिल, मन). ४ कुलूप इ०नीं बंद नसलेलें. ५ कालादिकांची मर्यादा नसलेली (मुदत, नोकरी, इ०).

६ अंबारी, खोगीर, किं०पल्याण,नसलेला (हत्ती, घोडा, उंट). ७ स्वार ज्यावर नाहीं असा (हत्ती, घोडा,उंट,इ०).॰खुला कारभार जाहीर रीतीचा, चौघाचारी केलेला, किं० उघडा कारभार; याच्या उलट 'चोरटा कारभार'.खुला व्यापार पु०जकाती, इ०ची नियंत्रणा ज्यावर नाहीं असा व्यापार. खुला पदर पु० स्त्रीचें पवित्र आचरण किं० आचरणाची पवित्रता. खुला हिशेब पु० स्वच्छ, सरळ, आणि बिनलबाडीचा हिशेब. खुली कैद स्त्री० इकडे तिकडे हिंडण्याची मुभा जींत आहे अशी कैद.

खुला पु० मोठ्या आकाराच्या आणि पांढऱ्या कवडीची एक जात. [' खुराडें 'पहा.

खुलाड, खुलांडें न० मागें ' खुराड, '

खुलाविणें वर ' खुलविणें ' पहा.

खुलास [अ०] वि० १ उघडा, मोकळा, मर्यादा नसलेला (प्रदेश, पटांगण, घर,इ०).२मुक्त केलेला; बंधमुक्त. ३ उघड्या दिलाचा; मोकळेपणानें बोलणारा. ४ चोरटा, गुप्त, किं० लपविलेला नव्हे असा (कारभार).

खुलासा [अ० खुलासाह्] पु० १ आशय, विचार. २ उद्देश, बेत. ३ धोरण (भाषणादिकांचें). ४ मोकळेपणा, उघडेपणा (स्थळाचा); याच्या उलट 'कोंडटपणा.' ५स्पष्टीकरण, उलगडा, (उदाहरण, श्लोक, इ०चा). ॰ खुलाशाचा वि० १ उघडा, न लपविलेला, स्पष्टपणानें सांगितलेला किं० बोलून दाखविलेला. २ अनियंत्रित, मोकळा (देखावा, जागा, इ०).

खुश, खुष [फा० खूष्]वि० १ आनंदित. २ संतुष्ट,तृप्त,समाधान पावलेला.३आनंददायक,संतोषकारक.॰खुषख(-खा-)त न०सुंदर अक्षर;वळणदार लिहिणें. खुषखबर स्त्री० आनंदाची बातमी. खुषखरी(-रे-) दी स्त्री० स्वेच्छेनें केलेली खरेदी; दुसऱ्याच्या सक्तीनें किं०भिडेनें केलेली नव्हे अशी खरेदी. खुषबो, खुषबोयी [फा० खूष्+बो (वास)] स्त्री० सुगंध.खुषमर्जी स्त्री० १ पसंती.२ संतोषाची वृत्ति.३मनाची प्रसन्नता. खुशमस्कऱ्या पुं०१वरिष्ठाची किं०समर्थाची मर्जी प्रसन्न करण्यासाठीं किं० आपणावर बसावी म्हणून जो गमती करतो किं० विनोदी भाषण करतो तो. २ वरिष्ठाला किं० समर्थाला खुश करण्यासाठीं हौस हो ठेवून देतो तो. ३ धन्याचें मनोरंजन करण्यासाठीं मुद्दाम पगार देऊन ठेविलेला नोकर. खुशमौज स्त्री०गंमत; गंमतीचा खेळ; आनंददायक भाषण,इ०.खुशमौज्या(-जी-)पु०१रंगेल माणूस. २ विनोदी माणूस. ३ खेळण्याचा शोकीन माणूस. खुशरज वंत(-द ·) वि० कांहीं सांगितलेलें काम मनापासून म्ह० न चरफडतां करावयाला सिद्ध असलेला. खुशरजावंती(-दी)स्त्री० कोणी सांगितलेलें काम करावयाला तत्परता. खुशवख्त पु०, खुशवख्ती स्त्री० आनंदाचा किं० रंगेलपणाचा समय; प्रसन्न चित्तवृत्तीचा काळ; उ० धन्याची खुशवख्ती पाहून बढतीबद्दल विनंती करावी. खुशवख्त वि० खाऊनपिऊन सुखी (अशी कोणेकाची स्थिति) किं० अशा स्थितींतील.

खुशामत(-द) [फा० खूषामद्] स्त्री० १ लाळघोटेपणा, थुंकीझेलेपणा.२आपल्या कार्यासाठीं दुसऱ्याचीं केलेलीं आर्जवें.खुशामती (-दी) वि० लाळघोट्या, थुंकीचाट्या,पिकदाण्या.

खुशाल [फा० खूष् (आनंदी)+हाल (स्थिति)] वि० प्रकृतीचें आरोग्य, चरितार्थासंबंधानें स्वस्थता, इ० बाबतींत सुखी. क्रि० वि० निःशंकपणें;बिनधोकपणें; न कचरतां.॰ खुशालचंद पु०रंगेल गडी;ज्याला कशाचीच चिंता किं० काळजी नाहीं असा.

खुशालणें [वर ' खुशाल ' पहा] अ० क्रि० आनंदांत असणें; निश्चित स्थितींत असणें; सुखस्थितीचा अनुभव किं० उपभोग घेत असणें.

खुशाली [वर ' खुशाल ' पहा] स्त्री० खुशाल असण्याची स्थिति; निश्चितता; शरीराची नीरोगिता.

खुशी, खुषी [फा० खूष्] वि० संतुष्ट; आनंदित; तुष्ट; कबूल. स्त्री० १ इच्छा, मर्जी. २ कबूली. ३ मनाची प्रसन्नता. ॰ खुशींत गाजरें खाणें मूर्खपणाच्या चेष्टांनीं आनंद व्यक्त करणें. खुशीचा सौदा पु० स्वसंतोषानें केलेला सौदा; दुसऱ्या कोणाच्या सक्तीनें, किं०आग्रहानें, किं० भिडेखातर केलेला नव्हे तो सौदा.

खुसखुशीत वि॰ खातांना दांताखालीं सहज मोडेल किं॰ चिरडेल असा.

खुसपट, खुसपुट न॰ भांडण उत्पन्न करण्यासाठीं मुद्दाम काढलेली कुरापत; निरर्थक हरकत; एकाद्याला चिडविण्यासाठीं किं॰ राग आणण्यासाठीं काढलेलें त्याचें खरें किं॰ खोटें रहस्य किं॰ कांहीं गुपित. २ सुरळीतपणें चालल्लेल्या कामांत कांहीं तरी हरकत काढणें किं॰ कांहीं विघ्न उपस्थित करणें. ३ क्षुद्र किं॰ निराधार दोष. क्रि॰ काढणें, रचणें, इ॰. ॰**खुसपट्या वि॰** कांहीं तरी दोष काढून विघ्नें उपस्थित करणारा; कांहीं तरी निमित्तें काढून काम बंद पाडणारा; हरकती आणणारा.

खुसपणें, खुपसणें स॰ क्रि॰ एका वस्तूंत दुसरी वस्तु जोरानें ढकलणें, सरकावणें, रेटणें, किं॰ शिरकावणें. [३ मूर्खासारखा.

खुळकट वि॰ १ वेडा, खुळा. २ अर्धवट वेडा.

खुळखुळ क्रि॰ वि॰ घागऱ्या, लहान घंटा, वाळलेल्या वाटाणा इ॰च्या शेंगा, ह्या हालविल्यानें उत्पन्न होतो जो ध्वनि त्या ध्वनीनें सहित अशा रीतीनें (वाजणें, इ॰).

खुळखुळा पु॰, खुळखुळणें न॰ जें हालविल्यानें खुळखुळ असा ध्वनि होतो असें मुलांचें एक खेळणें.

खुळखुळा वि॰ हालविल्यानें खुळखुळ आवाज ज्याचा होतो असा (पदार्थ,—काठी, सोटा, ओगराळें, इ॰). **पु॰** घोड्याला मंडळावर धरते समयीं त्याला वेळोंवेळीं इशारती देण्यासाठीं वाजवितात जो खुळखुळ ध्वनि करणारा पदार्थविशेष तो. ॰**दांतांचा (किं॰ तोंडाचा)खुळखुळा होणें** दांत ढिले होऊन हालत असणें.

खुळखुळावणें स॰ क्रि॰ कांहीं पदार्थ हालवून खुळखुळ असा आवाज उत्पन्न करणें. २ दांत आणि तोंड धुऊन स्वच्छ करण्यासाठीं तोंडांत पाण्याची चूळ भरून तें पाणी कांहीं चलनविशेषानें हालविणें. ['खुळगा' पहा.

खुळगट न॰ रेडा (तुच्छतेनें). खालीं

खुळगा पु॰ रेडा, टोणगा.

खुळपट, खुळपट्या वर ' खुसपट, ' ' खुसपट्या ' पहा. [अडाणी; वात्रट.

खुळसट, खुळसर, वि॰ वेडा; अर्धवट वेडा;

खुळा वि॰ वेडा, मूर्ख, अडाण्यासारखा वागणारा. **पु॰** रेडा, टोणगा. ॰**खुळा किं॰ वेड ऊस पु॰** १ उसाची एक जात. २ उसासारखं एक औषधी झाड. **खुळा किं॰ वेडा मधुरा पु॰** १ मधुरा नामक जो रोग त्याचा एक प्रकार.२ एक प्रकारचा ज्वर. **खुळा पैसा पु॰** राजापुराकडे चालणारें एक नाणें; असले सुमारें सातशें पैसे म्हणजे एक रुपाया होतो. **खुळा वेडा वि॰** मूर्ख आणि अजागळ. **खुळें वेडें पोटचें आणि चिबपोल शेतचें** आपलें मूल वेडें असलें आणि आपल्या शेतांतील धान्य चिंबलेलें म्ह॰ फोलकट असलें तरी तें टाकून देणें बरोबर होणार नाहीं. ह्याच अर्थाची दुसरी म्हण " चिबचळें शेतचें आणि थोटेंपांगुळ पोटचें "

खुळावणें अ॰ क्रि॰ वेडा होणें.

खुळ्या पु॰ रेडा, टोणगा.

खूट [**म॰** खुंटणें] **स्त्री॰** उणेपणा, तोकडेपणा, कमीपणा (जरूर असलेल्या परिमाणांत); **क्रि॰** पडणें, येणें.

खूट, खूंट पु॰ अंगरख्याच्या बाहीखालीं चुण्या करून त्यावर पट्टीसारखी शिवण घातलेली असते ती.

खूण स्त्री॰ १ चिन्ह; एकाद्या वस्तूचें दर्शक, बोधक, किं॰ सूचक जें कांहीं तें;निशाणी.२ गुप्तपणें आपला अभिप्राय दुसऱ्यास कळावा म्हणून ज्या हात पाय,डोळे इ॰च्या हालचाली त्या प्रत्येक; संकेत.॰**खूण धरणें** लक्ष्यांत ठेवणें.**खूणखाण स्त्री॰ ए॰ व॰, खुणाखाणा स्त्री॰ अ॰ व॰** खुणाविणा. **खूणगांठ स्त्री॰** एकाद्या कामाची किं॰ माणसाची किं॰ पदार्थाची आपणास आठवण व्हावी किं॰ रहावी म्हणून धोतराच्या किं॰ लुगड्याच्या पदरास जी गांठ बांधतात ती; **क्रि॰** बांधणें. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ॰ ' लें॰ १७८० पहा. **खूणमुद्रा स्त्री॰** कोणत्याही प्रकारची केलेली खूण.

खूद पु॰ अरुंद गळ्याचें गाडगें,—ज्यांत भंडारी लोक ताडी भरतात.

खूद वि॰ खासगत. वर ' खुद ' पहा.

खून [**फा॰** खून्=रक्त] **पु॰** १ रक्त. २ हत्या,-प्राण्याची किं॰ मनुष्याची. ३ मनुष्याची

हत्या; मनुष्यवध. ꙮ **खून चढणें** १ केलेल्या खुनामुळें अंगावर उन्माद येणें. २ केलेल्या खुनामुळें वेड लागणें. ३ केलेल्या खुनामुळें आणखी खून करण्याकडे प्रवृत्ति होणें. **खूनखराबा** पु० खून आणि नासाडी; नासधूस; जाळपोळ; वेचिराखी. **खूनमाफ** पु०, **खूनमाफी** स्त्री० केलेल्या खुनाबद्दल माफी.

खूप [म० खुपणें] स्त्री० १ खुपण्याची व्यथा (डोळ्याला येते ती). २ ठणका. ३ वेदना.

खूब, खूप [फा० खूब] क्रि० वि० १ पुष्कळ प्रमाणांत, फार. २ संख्येनें पुष्कळ. वि० सुंदर. ꙮ **उपर तो खूब बनी, अंदरकी बात राम जाने** वरून ती सुंदर दिसते पण नीतीनें ती कशी आहे कोण जाणे ? पवित्रपणाचें ढोंग करणारी पण दुर्वर्तनी किंवा व्यभिचारिणी अशा स्त्रीचें हें वर्णन आहे. **खूब (–प–)तराशीं** क्रि० वि० सुंदर रीतीनें; भपकेदार रीतीनें; ऐटींत; झोकांत.

खूम [अ० कौम्=जाति, टोळी] पु० १ एका देशांतील किं० जातींतील लोक समुच्चयानें. २ एका कुटुंबांतील माणसें समुच्चयानें. ३ टोळी. ꙮ **खूम, खूमदार** पु० १ गांवांतील मुख्य किं० नायक किं० अग्रणी. २ सभ्य माणूस; आबरूदार माणूस; प्रतिष्ठित माणूस. **खूमवार** क्रि० वि० एक एक टोळी किं० संघ किं० कुटुंब घेऊन, धरून, किं० मनांत आणून.

खूर [सं० खुर] पु० १ पंचनख पशूंच्या व्यतिरिक्त जे पशु त्यांचें पाऊल. २ बाज, पलंग, टेबल, खुर्ची, इ० चे जे पाय ते प्रत्येक. ३ चुलीच्या किं० वैलाच्या माथ्याला जे तीन किं० चार उंचवटे असतात, ज्यांवर भांडे टेकतें, ते प्रत्येक. ४ तुळशी वृंदावनाच्या माथ्याला जे चार उंचवटे असतात, ते प्रत्येक. ५ वासरूं जन्मतां त्याच्या खुरांना जो निरुपयोगी पदार्थ असतो, आणि जो काढून टाकावा लागतो तो. ꙮ **जेथें गाय व्याली तेथेंच खूर खांडावें** जेथें विघ्न उपस्थित झालेलें असेल तेथेंच त्याचें निरसन केलें पाहिजे. **एक खूराचा** वि० ज्याचा खूर दोन अर्धुकें मिळून झालेला नसतो असा (पशु); उ० घोडा, गाढव, इ०. याच्या उलट, दोन खूरांचा; उ० गाय, म्हैस, बकरा, इ०. **खूरमुंडी** स्त्री० मागें ' खुरमुंडी ' पहा.

खूश [फा० खूष्] वि० मागें ' खुश ' पहा.

खूळ न० १ वेड. २ मायेफिरूपणा. ३ लुटारू, दरोडेखोर, किं० बंडखोर जे लोक त्यांची टोळी. ४ वरील प्रकारच्या लोकांनीं केलेली नासाडी, जाळपोळ, विध्वंस, इ०. ५ वरील प्रकारच्या लोकांची स्वारी किं० धाड. ६ चालू होणाऱ्या कामांत किं० चालू कामांत आणलेलें विघ्न. ꙮ **खूळ पिकणें** बंड इ०, उपस्थित किं० प्रकट व्हावयाच्या स्थितीस किं० दशेस येणें.

खेंक स्त्री० १ खोकणें. २ खोकण्याची उसळी. क्रि० लागणें.

खेंकटें न० १ रचलेला व्यूह. २ युक्ति, हिकमत. ३ त्रासदायक काम. ४ चरितार्थासाठीं कराव्या लागतात त्या नानाप्रकारच्या उलाढाली. ५ लचांड, विघ्न. ६ अव्यवस्था, गोंधळ. ७ मागें लागलेलें शुक्लकाष्ट. ८ कामांत उपस्थित झालेली गुंतागुंत. ꙮ **खेंकटेखोर** वि० १ लचांडें उपस्थित करणारा. २ नानाप्रकारच्या उलाढाली करणारा.

खेकड, खेकडें न०, **खेकडा** पु० जलसान्निध्यास राहणाऱ्या एका प्राण्याचें नांव. ꙮ **खेकडा मेकडा** वि० कुरूप, ओबडधोबड (माणूस, जनावर, वस्तु).

खेंकणें अ० क्रि० १ दांत ओठ खाऊन ओरडणें; चरफडत बोलणें. २ एकाद्याच्या अंगावर ओरडणें, त्याच्यावर ताशेरा झाडणें. ३ खिंकाळणें (घोडा, गाढव, इ० नीं). ४ खोकणें.

खेकसणें, खेकाटणें अ० क्रि० एकाद्याच्या अंगावर वस्सकिनी ओरडणें किं० असें ओरडून बोलणें. २ एकाद्यावर ताशेरा झाडणें किं० त्याला रागें भरणें.

खेकाटणें अ० क्रि० खें खें असा कंठांतून शब्द काढणें किं० असा शब्द काढून बोलणें.

खेंकाळणें, खेंखाळणें अ० क्रि० १ घोडा, गाढव, इ० नीं ओरडणें. २ मुलांनीं आनंदानें मोठमोठ्यानें बोलणें, हसणें, किं० खिदळणें.

खेंगट न० एक लहान मत्स्यविशेष (परंतु तो मारून आणल्यावरच त्याला हा शब्द योजतात).

ꙮ **खेंबटखाऊ** पु० एक शिवी देण्याचा शब्द; मांसभक्षक (निंदेंत). [खोर ' पहा.

खेंगटें, खेंगटेखोर मागें ' खेंकटें, ' ' खेंकटे-

खेंगाळा पु० तांबड्या रंगाचा एक मत्स्यविशेष.

खेचणी [म० खेचणें] स्त्री० खेचण्याची क्रिया. खालीं ' खेचणें ' पहा.

खेचणें [हिं० खेचना] **स० क्रि०** १ ओढणें, आकर्षिणें. २ हट्टानें एक पक्ष धरून बसणें; हेका धरणें. ॐ **खेचून धरणें** हेका धरून बसणें.

खेंचणें स० क्रि० रेटणें, ढकलणें.

खेचर [सं० ख (आकाश) + चर(जाणारा, चालणारा)] **पु०** १ पक्षी. २ आकाशांतील नक्षत्रें प्रत्येक. ३ गंधर्व.

खेचर पु० घोडा आणि गाढव यांच्यांतील स्त्री आणि पुरुष यांच्या संयोगापासून झालेला पशु; (विशेषत:) घोडी आणि नर गाढव यांच्या संयोगापासून झालेला प्राणी. ॐ **खेचरी मुद्रा स्त्री०** योगसाधनांतील एक संस्थानविशेष, म्ह० गात्रांची एका विशेष प्रकारची मांडणी किं०रचना.

खेचाखेच स्त्री० १ ओढाताण. २ अतोनात दाटी किं० गर्दी.

खेट स्त्री० १ पदार्थांचे भाग घट्ट करण्यासाठीं किं० बसविण्यासाठीं त्याच्या सांध्यांत घातलेला तुकडा; पाचर. २ संकेतस्थान किं० संकेतसमय; **क्रि०** करणें, ठरविणें, पाळणें, संभाळणें, ३ खेटा. पुढें ' खेटा' पहा. ४ अड्डा. ५ गर्दी.

खेटक न० ढाल (लढणाराची).

खेटणी स्त्री० १ खेटण्याची क्रिया. खालीं ' खेटणें ' पहा. २ वस्त्र विणतांना कोष्टी वाण्याचे धागे ठासतो ती क्रिया.३ कापडाची वीण.४रेटणें.

खेटणें स० क्रि० १ आक्रमिणें, उल्लंघिणें; उ० मी पांच कोशांची मजल खेटली,किं० पल्ला खेटला. २ दूर किं० बाजूस सारणें, लोटणें, किं० ढकलणें. **अ० क्रि०** जवळ येणें; भिडणें; चिकटणें; उ० तो गनीम शहराशीं येऊन खेटला.

खेटर, खेंटर न० १ जोडा, वाहाणा, इ० पायतण (निंदेनें). २ तुच्छ किं०टाकाऊ पदार्थ (निंदेनें). ॐ **चांभाराच्या देवाला खेटराची पूजा** द्वाड माणसाचें पारिपत्य कठोरपणानें करणें जरूर असतें; दुष्ट माणसाशीं निर्दयपणें वागलें पाहिजे. आमचें ' म्हणीविषयीं चार शब्द ' पान ७० पहा. **आपल्या खेटरावर माया असते ती दुसऱ्याच्या पोरावर नसते** आपलें टाकाऊ असें जें कांहीं त्याची किंमत अधिक वाटते, दुसऱ्याचें मूल्यवान् जें कांहीं तें तुच्छ वाटतें. **वडिलांची खेटरें घेऊन पळणारा** कृतघ्न मुलगा.**खेटर जळो, खेटर तुटो** मला काय तुझी किं०त्याची पर्वा?**खेटरखाऊ वि०**जोड्यानें मारला जाण्याच्या लायकीचा (मनुष्य). **खेटराखेटरी स्त्री०** १ एकमेकांना खेटरांनीं मारून केलेली मारामारी. २ एकमेकांना शिव्यागाळी देऊन झालेलें भांडण.

खेटा पु० ए० व० १ एकाद्या ठिकाणाप्रत केलेली यात्रा. २एकाद्या स्थळापर्यंत घातलेला फेरा. ३ गर्दी, खेचाखेच. **खेटे पु० अ० व०** १ फेरे, येरझारा.२ एखाद्या माणसाच्या भेटीसाठीं घातलेले फेरे, केलेल्या येरझारा, किं० त्याच्या भेटीस गेल्याचे प्रसंग (सफळ किं० निष्फळ); उ० नोकरीसाठीं मला गोविंदपंताकडे शंभर खेटे घालावे लागले; उ० त्या पोरीच्या लग्नासाठीं मला हजार खेटे घालावे लागले.ॐ**खेटाखेंट स्त्री०** दाटी, गर्दी. **खेटेघाल्या वि०** वरिष्ठाची मर्जी आपणावर सुप्रसन्न रहावी म्हणून त्याच्या भेटीस वारंवार जाणारा.

खेंड स्त्री०वाटोळ्या आणि जड टोकाची तरवार.

खेड स्त्री० १ मिसळ; भेसळ; मिश्रण;उ० या आंबेमोहोराच्या तांदुळांत थोडीशी पटणीची खेड आहे. २ मिसळीसाठीं घातलेला पदार्थ (त्याच जातीचा). ३ म्हातारा माणूस (तुच्छतेनें).ॐ **खेडखर वि०**मिसळीचा ह्म०ज्यांत हलक्या दर्जाच्या पदार्थाची भेसळ आहे असा (तांदुळ, डाळ,इ०).

खेडणें स० क्रि० १ ओलांडणें. २ आक्रमिणें. ३ गांठणें, ०पर्यंत भिडणें किं० मजल करणें.

खेडवळ इ० खालीं ' खेडे ' मध्यें पहा.

खेडा पु०, खेंडें न० १ खरखरीत किं०ओबडधोबड विणीचें वस्त्र किं० तशा वस्त्राचा शिवलेला कपडा. २ प्रेतावर घातलेलें वस्त्र.

खेडा पु० उणाख जो साधा शेला तो.

खेडें न० लहानसा गांव,—ज्यांत प्राय: शेतकी करणारे लोक राहातात. ॐ**खेडेंगांव न०** खेडें. **खेडेंगांवचा वि०** गांवढळ. **खेड्या वि०** गांवढळ. **खेडवळ, खेडवाळ वि०** खेड्यांत राहाणाऱ्या माणसासंबंधाचा; खेड्यांत दिसणारा किं० आढळणारा किं० प्रचलित.

खेती [सं० क्षेत्र] **स्त्री०** शेतकी; शेतकीचा धंदा. ॐ **उत्तम खेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी** (किं० **चाकरी**) आबरूनें आणि प्रति-

ष्ठितपणानें आयुष्य घालविणें असेल तर शेतकी करावी; त्याच्या खालचा व्यवसाय व्यापार; आणि सर्वांत कनिष्ठ प्रकार नोकरीचा. **वि०** शेतकी काम करणारा.

खेद [**सं०**] **पु०** १ इष्ट पदार्थ न मिळाल्या-मुळें किं०गमावल्यामुळें वाटणारें दुःख किं० अनिष्ट प्राप्त झाल्यामुळें वाटणारें दुःख; विषाद. २ थकवा, श्रम. ३ इंद्रियांवर नियंत्रणा नमणें. ४ पश्चात्ताप. ॐ**एकाद्या गोष्टीचा खेद मानणें** ती मनाला लावून घेणें; तिच्याबद्दल हळहळत किं० हुरहुरत असणें किं० बसणें.

खेंदडा, खेंदाडा वि० १ कुरूप (मनुष्य किं० जनावर). २ कुरूप (अवयव किं० गात्र). ३ खट्याळ, द्वाड, खोडकर, उनाड (पोर किं० जनावर). ४ हट्टी, हेकट, हेकेखोर.

खेंदडा पु०१गाढव.२ गध्धा,-माणसाला शिवी.

खेदविणें [**म०** खेद; **सं०** खेद] **स० क्रि०** दुःखी करणें; उपद्रविणें; सताविणें; छळणें.

खेप स्त्री० १ एकाद्या स्थळाप्रत जाऊन येणें (**क्रि०** करणें). २ एक फेरी. ३ नियमित काळीं किं० ऋतूंत बाहेरून येणारा किं० बाहेर जाणारा माल. ४ वेळ, बारी, प्रसंग; उ० पहिली खेप सर्वांची चुकतेच, दुसऱ्या खेपेला तुला ती मल-खांबाची उडी साधेल; उ० ह्या खेपेला तूं जा, पुढच्या खेपेला मी जाईन. ५ एकाद्या रोगाचें किं० साथीचें स्थलविशेषीं आगमन किं० प्रादुर्भाव (येणें).ॐ**खेपेसरशीं क्रि० वि०** त्याच खेपेंत; एकाच खेपेंत; मुद्दाम हेलपाटा न घेतां. **खेप्या वि०** दुसऱ्याच्या कामानिमित्त जो खेपा करतो तो (ओझीं वाहाणें इ०सारखीं).

खेपणें अ० क्रि० अडणें, कुंठित होणें. **स० क्रि०** अडविणें, थांबविणें, कुंठित करणें.

खेपाटा [**म०** खेप] पु० १ निरर्थक किं० निष्फळ फेरी; फुकट हेलपाटा. २ अति आग्रह; दूसऱ्याला त्रास येण्या इतका आग्रह, हट्ट, किं० हेका (**क्रि०** करणें).

खेंबडा,खेंबुडला वि०१कुरूप (माणूस, जना-वर, पदार्थ). २ अव्यवस्थित; अनियमित;वाकडा तिकडा;उ०जीभ लावल्यानें दांत खेंबडे येतात.ॐ **खेंबडा लेंबडा वि०** खेंबडा (वरच्या सर्व अर्थी).

खेबाळणी [**म०** खेबाळणें] **स्त्री०** दांडगे-पणानें वागविणें किं० उपयोगास लावणें (माणूस, जनावर, पदार्थ).

खेबाळणें स० क्रि० अव्यवस्थितपणें, निष्का-ळजीपणें, कठोरपणें, किं० दांडगेपणानें वागविणें, भोगणें, योजणें (माणूस, जनावर, किं० पदार्थ).

खेम, खेंव [**सं०** क्षेम] **स्त्री०** १ आलिंगन; कवटाळणें (देणें,घेणें, किं० मारणें). २सुस्थिति, कुशळ, खुशाली. ॐ **खेमालिंगन न०** प्रेमाचें आलिंगन. **खेमवेंगेस येणें** १ आटोक्यांत येणें. २ हातांत येणें. ३ तावडींत सांपडणें.

खेर स्त्री० १ टाकाऊ पदार्थ. २ टाकाऊ भाग. अव्यवस्था, उलथापालथ. **वि०** टाकाऊ (पदार्थ किं० अंश).ॐ**खेरखाना पु०** अडगळीनें भरलेली जागा किं० खोली; रद्दी पदार्थ टाकले जातात ती अशी खोली. **खेरमाती स्त्री०** १ रद्दी किं० निरुपयोगी पदार्थ समुच्चयानें.२ नासाडी किं०अव्य-वस्था (कामाचा किं०कारभाराची); **क्रि०**करणें. **खेरमेर स्त्री०** रद्दी किं० निरुपयोगी सामानसुमान.

खेर पु० खालीं ' खैर ' पहा.

खेरीज [**अ०** खारिज्] **वि०** १ अधिक; अवांतर; ज्यादा; ज्यास्ती. २ वगळलेला, बाजूस सारलेला. **श० यो० अ०** शिवाय; व्यतिरिक्त. **क्रि० वि०** टाकून; सोडून; वगळून. ॐ**खेरीज मक्ता पु०** खोताच्या मक्त्यांत आल्याशिवाय राहिलेला जो जमीन इ०पदार्थ त्याचा सरकारांतून केलेला ठराव. **खेरीज मुशाहिरा पु०** सरदार इ०स मुशाऱ्याच्या रकमेच्या बाहेर जें बक्षीस देतात तें. **खेरीज मिळकत स्त्री०** पगार मिळून आणखी ज्यास्ती जें मिळतें तें.

खेलखाना[**फा०**खेल खानाह्]**पु०** १ अडगळ; अडगळ करणारे पदार्थ. २ एकाद्या प्रसंगीं पुष्कळ माणसें जमलेलीं असल्याकारणानें कार्यांत होते ती अव्यवस्था. ३ सैन्याबरोबरचे बाजार बुणगे लोक.

खेंव [**सं०** क्षेम] **स्त्री०** १ आलिंगन; कवटाळणी. २ धासटणें, निसटतें लागणें. ॐ**शहा-ण्याची लाथ पुरवेल पण मूर्खाची खेंव पुरवणार नाहीं** शहाण्याशीं शत्रुत्व झालें तरी फारसें नुकसान होत नाहीं, पण मूर्खांशीं स्नेह करणें अपायकारक होतें.**आपल्याची लाथ आणि**

परक्याची खंव आरला हितचिंतक आपणाला रागें भरला तरी चालेल पण तिन्हाइताच्या स्तुतीला भुलूं नये.

खेव पु० अपघात; कांहीं अनिष्ट गोष्ट; दुर्दैवांचा घाला (येणें). क्रि० वि० तत्क्षणींच.

खेवा [फा०] **पु०** वल्हविणें; वल्हें मारणें (मारणें).

खेवा [सं० क्षेम] **पु०** आलिंगन (करणें).

खेस पु०, न० एक प्रकारचें विणलेलें कापड. **स्त्री०** गुरांना होतो तो एक प्रकारचा खोकला.

खेसणें अ० क्रि० (माकड, इ०) ओरडणें. २ एकाद्याच्या अंगावर ओरडणें. ३ खोकणें. ४ (घोड्यानें) नाकपुड्यांतून जोरानें आणि हिसक्यानें श्वास सोडणें.

खेळ [**सं०**] **पु०** १ चित्तविनोदन, क्रीडा. २ चित्तविनोदाचें साधन,–सोंगट्या, बुद्धिबळें, इ०. ३ मुलांचें कांहीं खेळणें (भोंवरा, इ०). ४ नाटक इ०चा प्रयोग; गारोडी, इ०चे हातचलाखीचे प्रकार. ५ बुद्धि इ०चा व्यापार; बुद्धीनें केलेली युक्ति किं० काढलेली शकल. ६ एकाद्या विशिष्ट कार्यार्थ केलेल्या खटपटी किं० लटपटी. ७ खेळण्याची पाळी. ८ खोड्या समुच्चयानें. ॐ **एकाद्या पदार्थाचा खेळ करणें** १ तो उधळून टाकणें किं० खर्चून टाकणें. २ त्याची अव्यवस्था करणें. **खेळकर वि०** १ खेळाडू, रंगेल, स्वताची करमणूक करून घेणारा. २ खेळावयाजोगें ज्याचें वय झालें आहे असें (मूल). ३ खोडकर, व्रात्य (माणूस). **खेळकरी पु०** १ कांहीं खेळ करून दाखविणारा गारोडी, बहुरूपी, डोंबारी, इ०; तमासगीर. २ दशावतारादिकांचे खेळ करून उपजीविका करतो तो. **खेळकुडी स्त्री०** गंमत; खेळ; विनोदी चेष्टा; पोरकट चाळे. **खेळकू, खेळगड, खेळगर** वर 'खेळकर' पहा. **खेळखंडोबा पु०**-नासाडी, विध्वंस (करणें). **खेळगडी पु०** लहानपणापासूनचा मित्र; लहानपणीं ज्याच्याशीं कोणी खेळला तो. **स्त्री०** लहानपणापासूनची मैत्री. **खेळगड्या पु०** सांगितलेलें किं० करावयाचें तें काम न करतां खेळण्यांत वेळ घालवितो तो.

खेळणी [**म०** खेळणें] **स्त्री०** १ कर्तव्य जें कांहीं तें न करतां निरुपयोगी उद्योग करणें, गप्पा मारणें, मटकणें इ०. २ खेळण्यासाठीं नियुक्त जो काळ तो; उ० अमावास्या आणि पौर्णिमा हे दोन दिवस मुलांचे खेळणीचे.

खेळणें [**सं०** खेल=हलणें, हलविणें] **अ० क्रि०** १ चित्तविनोदार्थ क्रीडा करणें. २ रिकामपणांत किं० निरुपयोगी कामांत वेळ घालविणें; कर्तव्य न करतां आळसांत काळ घालविणें. ३ सोंगट्या, बुद्धिबळें, गंजिफा इ० चित्तविनोदनाचा कांहीं विशिष्ट प्रकार करणें किं० चालविणें. ४ भूतसंचार अंगांत झाल्यानें कांहीं तरी वेडे वेडे चार करणें. ५ हालचाल पावणें, वाहणें, वाऱ्यावर उडणें, इ० (अचेतन पदार्थासंबंधानें); उ० ह्या किल्ल्याभोंवतीं पाणी खेळत असतें; उ० वाऱ्यावर झाडांची पानें खेळत असतात. **स० क्रि०** मनोरंजनाचा कांहीं विशिष्ट प्रकार अवलंबिणें; उ० पत्ते खेळणें. इ०. ॐ**खेळणें रांगणें न० ए० व०** मकरसंक्रांतीच्या दिवशींचा स्त्रियांचा एक विशिष्ट वसा. ह्या दिवशीं 'खेळतें घ्या, रांगतें घ्या,' हें वाक्य उच्चारून एक स्त्री दुसऱ्या एका स्त्रीच्या घरांत दोन नारळ टाकते आणि त्यांच्या बदलीं दोन नारळ घेते.

खेळणें [**म०** खेळणें] **न०** मुलाची खेळावयाची कांहींही वस्तु; उ० रिंगणें, खुळखुळा, इ०.

खेळता [मं० खेळणें] **वि०** १ मोकळेपणानें किं० न अडतां सफाईनें फिरणारा, वळणारा, हालणारा, उडणारा (पदार्थ); हालचाली करावयास मोकळीक देणारा, संकुचित न वाटणारा, अघळपघळ (अंगरखा, बंडी, खोली, चोळी, वाकी, इ०). २ खेळावयाची ताकद, शक्ति, किं० उत्साह न मोडणारा (आजार, ताप, गोवर. इ०); उ० रामूला ताप आला आहे पण तो खेळता ताप आहे. ३ खेळण्याच्या वयाला आलेलें (मूल). ४**खळतें वारें न०** भूतपिशाचादिकांचा एकाद्याच्या अंगांत संचार (भूतभविष्यादि सांगण्याचें सामर्थ्य देणारा). **खेळतें रांगतें वि०** खेळण्या रांगण्याच्या वयास पोंचलेलें(मूल). **खेळत्या देवी स्त्री० अ० व०** देवी ह्या रोगाचा एक प्रकार.

खेळवणा [**म०** खेळणें] **पु०** खेळण्यासाठीं, चित्तविनोदनासाठीं, गप्पा मारून मनोरंजन करण्यासाठीं, किं० खुशामत करून सुखविण्यासाठीं;

ठेविलेला, बाळगिलेला, किं० जवळ केलेला (कोणीही माणूस, कुत्रा, पोपट, खुशमस्कऱ्या, बगलबच्चा, इ०).

खेळवणी [म० खेळणें] स्त्री० १ बाळगलेली रांड; रखेली. २ पुरुषाला आपलीं गोपनीय गात्रें दाखवून किं० विलासक्रीडा वर्णून जी स्त्री पुरुषाला मोहांत पाडते ती.

खेळावणें [म० ' खेळणें 'चें प्रयोजक] स० क्रि० १ इकडे तिकडे फिरविणें किं० फिरावयाची किं० वहावयाची सोय करून ठेवणें; उ० आमच्या घरांत सर्व भिंतींत खिडक्या ठेवून आम्ही वारा खेळविला आहे; उ० आमच्या घरांत आम्ही पाणी खेळविलें आहे. २ चालू ठेवणें किं० करणें; काम करण्याच्या स्थितींत ठेवणें (यंत्र, सतार, इ०).

खेळशेपणा [म० खेळणें] पु० रिकामटेकडे उद्योग करीत बसणें किं० करीत बसण्याची प्रवृत्ति.

खेळा [म० खेळणें] पु० शिमग्यामध्यें खेळ घेऊन फिरत असतात ते प्रत्येक. २ कोणाचे घरीं लग्न झालें असतां त्या गांवचे जे शूद्र खेळ घेऊन तेथ जातात ते प्रत्येक.

खेळी [म० खेळणें] स्त्री० १ खेळ, गंमत. २ खेळण्याचा दिवस. ३ खेळण्याची पाळी. ४ शिमग्याचे दिवसांतील खेळ करणारे जे ते प्रत्येक. ❀ **खेळी मेळी** स्त्री० १ दृढ परिचय किं० मैत्री. २ खेळ; गंमत. ३ पोरचेष्टा. **खेळीमेळीचा** वि० दृढ मैत्रीनें बद्ध; जिवलग. **खेळीमेळीचा** क्रि० वि० खेळांत, गमतीनें, थट्टेत.

खेळ्या [म० खेळणें] पु० १ शिमग्यांत किं० लग्नाच्या प्रसंगीं खेळ करणारा किं० करीत हिंडणारा. २ सदा खोड्या करीत असणारा माणूस; व्रात्य. ३ भांडणें चेतविणारा. ४ चहाडखोर.

खै स्त्री० १ अहंपणा, बढाई (मोडणें, जिरविणें). २ नाठाळपणा (जनावरांचा).

खैन पु० फार दिवस रेंगाळत राहिलेला खोकला. ❀ **खैनकरी** पु० फार दिवसांच्या खोकल्यानें जर्जर झालेला माणूस. ' खैनकरीण ' स्त्री०.

खैर पु० एक जंगली कांटेरी वृक्ष. ❀ **खैरभट, खैरंभट** पु० १ कोणीही बळकट माणूस. २ अडाणी भट.

खैर [फा०] स्त्री० १ सुस्थिति; आरामाची किं० सुखाची राहाणी. २ सुदैवाचा फेरा; सुदैवाची गोष्ट. ❀ **खैर असणें** मन आणि शरीर यांची सुखस्थिति असणें. **खैरसल्ला** पु०, स्त्री० १ स्नेहभाव, मैत्रीचा संबंध (पत्रांतील योजना). २ वस्तूचा पूर्ण अभाव; खडखडाट; उ० पाण्याचा, अन्नाचा, दाण्यांचा, पैशाचा, खैरसल्ला.

खैरा पु० जोंधळ्यावर पडणारा एक रोग.

खैरा [म० खेर; सं० खदिर] वि० १ काळसर; तपकिरी. २ तांबड्या पृष्ठभागावर पांढरे ठिपके असलेला किं० पांढऱ्या पृष्ठभागावर तांबडे ठिपके असलेला (कांहीं पदार्थ). ३ भिन्न रंगी, वेगवेगळ्या रंगाचे (डोळे, इ०). ❀ **खैरा खबुतर** न० खैरा रंगाचें खबुतर. **खैरावांडा** वि० काळ्या आणि तांबड्या ठिपक्यांच्या मिश्रणाचा.

खैरात [फा०] स्त्री० १ फकीरास मुसलमान लोक धर्मार्थ जें द्रव्यादि देतात तें. २ मशीदींच्या खर्चासाठीं किं० फकीरांस द्रव्यादि देण्यासाठीं ज्या जमिनी बक्षीस दिलेल्या असतात त्या समुच्चयानें. ❀ **खैराती** वि० टाकाऊ; बिन किमतीचा (धर्मार्थ जें दिलें जातें तें बहुधा टाकाऊ असतें यावरून). **खैरी शैरी** वि० टाकाऊ.

खैरी स्त्री० १ चांगल्या बांधून न काढलेल्या विहिरींतून पाणी काढण्यासाठीं राहाटाला आधार जे खांब रोवलेले असतात ते प्रत्येक (ते बहुधा खैराचे असतात). २ गर्व, ताठा, जंभ; उ० रामभाऊची खैरी मी काल चांगली जिरविली.

खैयत [फा०] स्त्री० सुखस्थिति; कुशल; क्षेम.

खैलाटी(–ठी) स्त्री० वर ' खालाटी ' पहा.

खैशा [म० खैस, खवीस] वि० १ द्वाड, उपद्रवी. २ अपशकुनी; पांढऱ्या पायाचा.

खैस पु० मागें ' खवीस ' पहा.

खो पु० १ विघ्न, हरकत. २ उच्चाटन (स्थानापासून). खोखो हा मुलांचा खेळ आहे. त्यांत एक धावणारा मुलगा असतो. त्याच्या मनांत ज्याला उठवावयाचें असेल, त्याला तो ' खो ' असा शब्द उच्चारून उठवितो आणि आपण त्याच्या जागीं बसतो. मग हा उठविलेला गडी धावावयास लागतो. यावरून 'एकाद्याला खो देणें' म्ह० त्याला त्याच्या अधिकारापासून भ्रष्ट करणें, किं० करण्याची खटपट करणें. ' खो घालणें ' म्हणजे एकाद्या सुरळीत चाललेल्या कामांत विघ्न आणणें.

खो येणें, खो मिळणें, म्हणजे प्रतिबंध होणें किं० उचाटन होणें.

खोईण स्त्री० मासे पकडण्यासाठीं पाण्यांत रोवून किं० धट्ट बांधून ठेविलेली बांबूच्या पाती, बांभळींच्या काटक्या,इ०ची पाटी.

खोक स्त्री० १ कांहीं पदार्थाचा डोकें इ०वर आघात झाल्यामुळें जे क्षत पडतें तें. २ खोकण्याची लहर किं० उसळी (येणें, उठणें, इ०).

खोकड स्त्री० मुलांचा एक खेळ.

खोकड पु०, स्त्री०, न० १ कोल्ह्यासारखें एक जंगली जनावर. २ म्हातारपणामुळें किं० जन्मतः कुरूप,किं० प्रमाणरहित गात्रांचा माणूस स्त्री, गाय, म्हैस, इ०. ३ नापीक किं० कमी कसाची जमीन.

खोकडी स्त्री० मुखाची एक बाजू; गाल. ❀**खोकडी रंगविणें** किं० **गुंगविणें** गालफडांत चपराक मारणें. ' खोकाड ' असाही शब्द ह्या वाक्प्रचारांत योजला जातो.

खोक (–ख–) णें अ० क्रि० कास रोगामुळें कंठांतून खों, खो,असा शब्द करणें किं० काढणें.

खोकर, खोकड वि० १ जीर्ण, फुटका, तुटका. २ नाशवंत.

खोकला, खोखला पु० कास म्हणून जो रोग आहे त्याचेमुळें कंठांतून खो खो असा शब्द काढावा लागण्याची प्रवृत्ति, किं०अशा प्रवृत्तीचा काल.❀ **गळा कापला,खोकला गेला, (किं० मिटला, किं० वारला)** मूळच्या संकटापेक्षा त्या संकटाच्या निवारणाचा उपाय अधिक भयंकर असल्यास तो उपाय करणें मूर्खपणा होय.

खोकस, खोखस न० धान्यांतील पोकळ म्ह० चांगले न पोसलेले दाणे.

खोका, खोखा [हिं०] पु० १ ज्या हुंडीच्या कागदावर धन्याची भरपाई लिहून घेतात तो कागद. २ हुंडी दिल्याचें सूचनापत्र. ३ हाकालपट्टी, बडतर्फी, (येणें, आणणें). ४ रद्दी किं० मोडकी पेटी. ५ लाकडी बारदान (पेटीसारखें). ६ पेटी (तुच्छतेनें).

खोकाड न० १ तोंडाची एक बाजू; गालफड. २ कुरूप आणि ओबडधोबड आणि डागळलेला चेहेरा किं० तोंड. मागें ' खोकडी ' पहा.

खोकाळें न० डोकें, टाळकें, बोडकें. मागें ' खाकोळें ' पहा.

खोका(–खा–) वणें अ० क्रि० खो, खो असा आवाज करून पडणें (पाऊस, किं०कांहीं जड पदार्थ).

खोखो पु० मुलांचा एक खेळ. मागें 'खो'पहा

खो खो क्रि० वि० मोठमोठ्यानें (हसणें, खिदळणें). **स्त्री०** खोकण्याचा सपाटा; उ० मघांपासून त्या म्हाताऱ्यानें काय खो खो चालविली आहे तरी !

खोंगळा पु०, खोंगळी स्त्री० चर,पाट,पन्हळ.

खोंगा पु० दाणे इ० घ्यावयासाठीं हाताचीं बोटें जुळवून आणि आखडून करतात तो खसा.

खोंगी स्त्री० गुडघ्यांत डोकें खुपसून बसणें (घालणें, घालून बसणें).

खोगीर [फा०] न० घोडा वगैरेंवर बसावयासाठी जें कांहीं विशेष प्रकारचें आसन केलेलें असतें तें. ❀**खोगीर भरती स्त्री०** केवळ संख्या किं० आकार फुगावेण्यासाठीं घेतलेले पदार्थ किं० माणसें. खोगीर मऊ आणि जाडी करावयासाठीं त्याच्या आंत चिंध्या, केश, इ० अन्य कामाला निरुपयोगी पदार्थ भरलेले असतात ह्यावरून ' खोगीर भरती 'चा वरील प्रमाणें अर्थ झाला.

खोंच, [नंद भाषेंतील शब्द] वि० हलक्या किंमतीचें.

खोच खोंच स्त्री० १ तडाखा, रट्टा, इ० मुळें होणारी जखम २ अशा जखमेचा वण. ३ भिंत इ०मध्यें खोचून किं० शिरकावून घातलेला पदार्थ (खुंटी, इ०) किं० त्या पदार्थाचें बाहेर राहिलेलें किं० ठेविलेलें टोक. ४ (व्यापारांत) बूड, ठोकर, नुकसान. ५ घुस्सा, राग; उ० माझ्याविषयीं तूं मनांत उगीच खोच धरली आहेस. ६ गायनांतील कंठाचा कंपविशेष. ७ भाषणादिकांतील खुबी किं० मर्म. ❀ **खोचखाच स्त्री०** भाषणादिकांतील खुब्या समुच्चयानें.

खोचकील वि० आकुंचित, तंग.

खोचट [म० खोच] स्त्री० १ धल्पी, कुसळ. २ पदार्थाचा पुढें आलेला भाग किं० टोक (लागणें). ३ (व्यापारांत) ठोकर, हानि, नुकसान.

खोचटणें अ० क्रि० पदार्थाच्या पुढें आलेल्या भागाला वस्त्रादि अडकणें किं० अडकून फाटणें.

खोचण [**म०** खोचणें] **स्त्री०** १ स्त्रियांच्या नेसलेल्या लुगड्याचें ओचें. २ नेसलेल्या लुगड्याचा कमरेशीं खोचलेला भाग.

खोचणें, खोचरणें स० क्रि० १ खुपसणें. २ खुबीदार भाषणानें दुसऱ्याच्या मनांत कांहीं विचार भरविणें. ३ कोणेकाला रागास चढविणें; त्याला घुस्सा येईल असें बोलणें किं० वागणें; त्याचें वर्म काढणें. **अ० क्रि०** रागावणें, चेतणें, चिडणें.

खोचणें स० क्रि० १वारंवार एकाद्या पदार्थावर तडाखे मारणें, किं० मारून क्षतें करणें. २ दांतांचा फटींत काडी वगैरे घालून ते साफ करणें.

खोचा [**म०** खोचणें] **पु०** १ धोतर इ०चा कमरेशीं खोचलेला भाग. २ रट्टा. ३ त्वचेंत शिरलेलें धसकट किं० कुसळ. ४ गाय, म्हैस,इ०चीं वासरें मातेचें दूध पितांना जे कासेला तडाखे देतात ते प्रत्येक. ५ वासरानें भलत्याच वेळीं मातेचें दूध पिऊं नये म्हणून त्याच्या मानेला जें अडकण करतात तें. ६ लहानसें खाचर किं० भातशेत.

खोची स्त्री० १फळी, तक्ता, इ०च्या सपाट पृष्ठभागांत पडलेली खळगी.२लहानसर खाडीचा फाटा.

खोचेरा [**म०** खोचणें]**पु०**विळांतून सापाला बाहेर काढण्याचा चिमटा.

खोजा [**फा०** खोजाह्] **पु०** षंढ, नपुंसक.

खोजा [**फा०** ख्वान्चाह्]**पु०** पसरट पात्र (ताटासारखें).

खोजा [**फा०** ख्वाजाह्] **पु०**प्रतिष्ठित आणि आबरूदार मुसलमान.

खोट स्त्री० १ सोनें,रुपें, इ० धातु आटवून जी लगड,किं०वर्तुळ इ० रूप आकार करतात तो.२घट्ट रूपांत असलेला कफ, शेंबूड, रक्त, दहीं,इ० पदार्थ; गोठलेला किं० घट्ट झालेला कोणताही पदार्थ.

खोट [**म०** खुटणें]**स्त्री०** १ व्यापारांत बूड, नुकसान किं०ठोकर.२लबाडी.॥**खोटचाल वि०**१ संप्रदायाला सोडून ज्याचा आचार आहे असा.२ वाकड्या मार्गाचें अवलंबन करणारा.३वद वर्तनाचा. **खोटपत्र न०** १ आपल. खोटेपणा आहे किं०आपण गैरवर्तन केलें आहे अशा मजकुराचें पत्र एकाद्याकडून लिहून घेतलेलें असतें तें. २ वादांत आपण हरलों अशा अर्थाचें पत्र कोणेकाकडून लिहून घेतलेलें असतें तें. **खोटसाळ** [**म०** खोटा +शाळा] **वि०** १ लबाडीचा, मिश्रणाचा, भेसळीचा (कांहीं पदार्थ). २ खोडकर, व्रात्य. 'खोडसाळ' असेंही रूप प्रचलित आहे.

खोट स्त्री० १ पायाची टाच. २ जोडा,वहाणा, इ० पादत्राणाची टांच. ॥ **खोटवाद पु०**वाहणेच्या टाचेपाशीं पायाच्या टाचेला जें कातडें अडकण म्हणून लाविलेलें असतें तें.

खोटा [**सं०**कूट] **वि०** १ स्वस्वरूपांत नसलेला; खऱ्याशीं विसंवादी. ८ अप्रामाणिक, लबाड. ३ मिश्रणाचा, भेसळीचा. ॥ **खोटाई स्त्री०** खोटेपणा,लबाडी, कपट.**खोटानाटा वि०** १ लबाडीचा, भेसळीचा (व्यापारी पदार्थ).२असत्य विधानांनीं मिश्रित (हकीगत, वर्णन, इतिहास). **खोटा तरी गांठचा, वेडा तरी पोटचा** एकादें खोटें नाणें आपणाजवळ असलें किं०आपल्या हातांत आलें तर तें फेकून देऊं नये,आणि आपल्या पोटीं वेडा मुलगा आलेला असला तरी त्याचा अव्हेर करूं नये; त्या नाण्याचा आणि त्या मुलाचा शक्य तो उपयोग करून घ्यावा.

खोटी [**सं०** कुंठ्=थांबणें] **स्त्री०** थांबणूक, अडणूक, उशीर, विलंब. **वि०** थांबविला गेलेला; कुंठित.

खोटें [**सं०**कूट] **न०** १ असत्य; वस्तुस्थितीला सोडून जे कांहीं तें. २ लबाडी, कपट. ३ अप्रामाणिकपणा. ॥**खोट्याच्या कपाळीं कुऱ्हाडीचा घाव** लबाडीला पारिपत्य होतें किं० केलें जातें.

खोटें [**म०** खोटा] **न०** माणसाच्या अंगांत किं०कांहीं स्थळीं संचरणारें भूत. किं०पिशाच.

खोंड पु० १ गोऱ्हा; गायीचें नर अपत्य. २ जोंधळ्याची एक जात.

खोड स्त्री० १वाईट सवय,—गांजा ओढणें, अफू खाणें, इ०.२ कोणतीहि लकब;कांहीं विशिष्ट गोष्ट वारंवार करण्याची प्रवृत्ति (चांगली,वाईट,छांदिष्टपणाची, निरुपयोगी, इ०); उ० गोविंदा फडणिसाला बोलतांना भिवया उडविण्याची खोड होती. ३ कमीपणा, व्यंग,कुरूपतेची कांहीं बाबत;

उ० ह्या मुलीमध्यें कांहीं खोड नाहीं, तिला तुम्ही पत्करा. ४ दोष; कारागिरीच्या कामांत झालेली चुकी किं० राहिलेला उणेपणा. ५ चोखंदळेपणा (खाण्यापिण्याच्या बाबतींत;) उ० रामूला तुपाची खोड आहे. ६ अपकीर्तीची कांहीं बाबत; डाग; कालिमा. **जित्याची खोड मेल्यावांचून जात नाहीं** कोणतीही खोड एकदा लागली की ती कायमची राहते. **जी खोड बाळा ती जन्म काळा** लहानपणीं जी खोड लागलेली असते ती जन्मभर टिकून राहते. **एक गोरी बहात्तर खोड्या चोरी** मुलगी गोरी असली म्हणजे तिच्या गोरेपणामुळें तिच्या शारीरिक व्यंगां कडे लक्ष्य जात नाहीं. **दरिद्र्याला खोडे असूं नये** जो दरिद्री त्याच्या साध्या सोयी देखील भागावणें किं० भागणें कठिण असतें, तशांत त्याच्या अंगीं जर खाणें, पिणें, निजणें, इ० बाबतींत कांहीं चोखंदळेपणाचे प्रकार असले तर त्याचे हालच व्हावयाचे. **एकाद्याची खोड काढूं नये** १ त्याचीं वर्में कर्में प्रकट करूं नये. २ त्याच्या वाटेस जाऊं नये. **वाघाची खोड काढूं नये** वाघाला (किं० दुष्ट समर्थाला.) चेतवूं नये; त्याच्यापासून चार पावलें दूर असावें. **खोड ठेवणें** दोष देणें. **एकाद्याची खोड मोडणें** १ त्याची वाईट सवय घालविणें. २ रग जिरविणें; कांडांत काढणें. या अर्थी 'खोडकी मोडणें' असेंही म्हणतात. **खोडकर वि०** १ व्रात्य. २ चोखंदळ.

खोडसा, खोडसर वि० द्वाड, व्रात्य.

खोड न० १ मृदंगादि तयार करावयासाठीं लाकडाचा तुकडा तयार करतात तो. २ गंध उगाळावयासाठीं चंदनादिकांचा तुकडा केलेला असतो तो. ३ केशर, वेलदोड्याचे दाणे, इ० खलावयासाठीं पेरू इ०च्या लाकडाचा गुळगळीत तुकडा केलेला असतो तो. ४ वृक्षाचा शाखादिविस्ताररहित जो बुंधा तो. ५ गाभण होण्याची योग्यता जिच्यांत राहिली नाहीं अशी गाय, म्हैस, इ०. ७(लाक्षणिक) वार्धक्यामुळें ज्याच्यांत मांस फारसें राहिलें नाहीं असें शरीर. ६ फलपुष्पादि धारण करण्यास असमर्थ झालेला वृक्ष.

खोडणें स० क्रि० १ लिहिलेल्या मजकुरांतील नको तो भाग त्यांतून रेघ ओढून किं० अन्य रीतीनें रद्द करणें. २ नापसंत म्हणून बाजूस सारणें किं० टाकून देणें. ३ वायु इ० मुळें (हात, पाय, इ०) आवेशानें झाडणें. **अ० क्रि०** बंद पडणें; कांहीं विशिष्ट क्रिया करावयाला असमर्थ होणें; उ० ती गाय इतके दिवस सुरळितपणें दूध देत होती पण आलीकडे चार दिवस खोडली (म्ह० दूध देईनाशी झाली).

खोडबावली मागें ' खुंटबावली ' पहा.

खोडवा, खोडावा पु० एकदा ऊस कापल्यावर त्याच्या खुंटाला फुटणारा कोंब.

खोडसाळ मागें ' खोटसाल ' पहा.

खोंडा पु० १ कांबळा इ० चा घोंगता. २ डोंगरांतील मोठी कोनाड्यासारखी पोकळी. ३ दोन डोंगरांच्या मधला संधिप्रदेश जेथें आंत कोपरा दिसत असतो.

खोडा पु० १ मनुष्य इ०स अडकावून ठेवण्यासाठीं जें काष्ठसाधन करतात तें. २ गुरें चरावयास सोडिली असतां त्यांना पळून जातां येऊं नये म्हणून त्यांच्या पायांना जें बंधन घालतात तें. ३ (लाक्षणिक) स्वैराचार, मोकळेपणाची वागणूक, स्वच्छंदीपणा, निष्काळजीपणा, इ०मध्यें हरकत असणारें जें कांहीं तें; उ० त्याचें लग्न झाल्यामुळें त्याच्या पायांत खोडा पडला. ४ वाय्वाद्युपद्रवानें हातपाय इ०ची चलनवलनादि शक्ति नाहींशी होऊन जी स्थिति होते ती; उ० अर्धांगवायूनें त्याचा अगदी खोडा झाला आहे. **चालला तर गाडा नाहीं तर खोडा** सुरळीतपणें जोपर्यंत एकादें काम चाललेलें असतो तोपर्यंत तें आपणास सुखसोईचें होतें; अन्यथा तें तापदायक होतें. **खोडा चढविणें** १ एका मल्लानें कुस्तीमध्यें आपल्या तंगड्यांनीं दुसऱ्या मल्लाच्या तंगड्या जखडणें. २ चालत्या कामांत कांहीं तरी विघ्न आणून तें बंद पाडणें. **खोडाबेडी स्त्री०, खोडा मोडा पुं०** वाय्वाद्युपद्रवानें गात्रें चलनवलनादि व्यापाराला असमर्थ होणें.

खोडावणें अ० क्रि० हस्तपादाद्यवयव खुंटे होणें.

खोडाळ, खोड्याळ वि० खोडकर.

खोंडी स्त्री० १ धान्य इ० दुसरीकडे वाहून नेण्यासाठीं कांबळ्याला कांहीं विशेष प्रकारें घडी

घालून एक प्रकारचें पोतें करतात तें. २ जोंधळ्याची एक जात.

खोडी स्त्री० 'मागें 'खोड' **स्त्री०** पहा.

खोडें न० जोंधळ्याची एक जात.

खोत पु० १ सरकारच्या तर्फेनें ग्रामादिकांचा वसूल करणें इत्यादि कामांसाठीं नेमिलेला अधिकारी, किं० वतनदार असा जो अधिकारी तो. २ नफा, तोटा, इ० आपल्या अंगावर पथकरून जकात किं० कांहीं जिन्नस इ० आपण घ्यावा आणि मग लोकांस विकावा अशा प्रकारच्या कामाचा इजारदार. ३ 'जवळ' ह्या नांवाच्या जातीचा जो इसम त्याच्या नांवापुढें हा शब्द प्रत्ययाप्रमाणें लावतात; जसें गोविंद खोत, विठोबा खोत इ०.४कोणत्याही प्रकारचा मक्तेदार. ❀ **खोतकरी पु०** जमीनी किं० जमीनीचें उत्पन्न ह्यांचा मक्ता घेतो तो. **खोतकी, खोदगी स्त्री०** खोताचा अधिकार किं० कर्तव्य. **खोतपट्टी स्त्री०** खोताच्या चरितार्थासाठीं म्हणून बसविलेला कर. **खोतखराबा पु०** ज्या गांवचा ज्याला खोतीचा अधिकार दिला असतो त्या गांवाची जी खराब जमीन तिचा कांहीं ठराव करून खोताच्या माथीं घातलेला असतो तो. **खोतवेठ स्त्री०** किंमत न देतां जो पदार्थ खोत हक्कानें घेऊं शकतो तो; मजुरी न देतां जें काम खोत हक्कानें करून घेऊन शकतो तें काम. **खोतसज्जा पु०** खोतानें जी जमीन खंडानें दिलेली असते ती. सरकारनें दिलेली जी जमीन ती खमी. जमीन. **खोती स्त्री०** १ खोताचा अधिकार, कर्तव्य, इ०.२ वाढी दीढीचा व्यवहार.

खोद न० १ शरीरावरील टेंगूळ; कुबड. २ रस्ता, कुंपण, इ०तील वांकण.

खोदणें स० क्रि० पदार्थविशेष हत्यारें इ०नीं उकरणें (डोंगर, जमीन, लाकूड, इ०). ❀**खोदकाम न०** हत्यारानें कांहीं पदार्थ खोदणें किं० खोदण्याची क्रिया. **खोदागिरी स्त्री०** १ खोदण्याची क्रिया किं० कला. २ खोदून बनविलेला पदार्थ. **खोदणावळ स्त्री०** खोदण्याबद्दल दिलेली मजुरी. **खोदणी स्त्री०** १ खोदण्याचें काम किं० त्या कामाबद्दल दिलेली मजुरी. २ लोचटपणानें किं० आग्रहानें पैसे मागणें किं० मागून मिळविणें. **एकाद्याला खोदखोदून विचारणें** युक्ति प्रयुक्तीनें त्याला प्रश्न विचारून त्याच्या मुखांतून विवक्षितांश बाहेर काढणें. **खोदून कज्जा काढणें** नवेंच निमित्त योजून भांडण उपस्थित करणें. **खोदींव वि०** १ खोदलेला. २ खोदून बनविलेला (पदार्थ,-पाट, करंडा, डबी, इ०).

खोप स्त्री० १ पोट, पोकळी. २ देवी, गोवर, इ०चीं साथ. ३ झोपडी; लहानसें किं० गरिबाऊ घर. ४ तडाखा लागून पडतें तें क्षत; जखम;खोंक. ५ पक्ष्याचें घरटें.

खोपट न०, खोपटी (-डी) स्त्री० १ लहानसें घर. २ झोपडी. ३ वैराग्याची किं० तपस्व्याची राहावयाची पर्णकुटी.

खोपड स्त्री० १ वृक्षाची ढोली. २ डोंगरांतील पोकळी. ३ पक्ष्याचें घरटें. ४ भिकार घर.

खोपरी स्त्री० डोकें, कपाळ (तुच्छतेनें); बोडकें, टाळकें.

खोपा पु० १ वेणी घालून स्त्रिया केशांचें करतात तें वेटोळें. २ पक्ष्याचें घरटें. ३ झाडाची ढोली. ४ कोंवळ्या झाडावर करतात तें पानांचें आच्छादन.

खोपी, कोपी स्त्री० १ शेतांत पानांची केलेली झोपडी (राखणदारासाठीं). २ कोणतीही झोपडी.

खोबण, खोबणी स्त्री० १ कोरून केलेली खळगी,-लांबोडी,चौकोनी,किं०वाटोळी;खाचणी. २ विंधी. ३ कोणत्याही वस्तूंत कोणत्याही उद्देशानें पाडलेलें भोंक. ४ अडसर इ०चें घर.

खोबरें न० १ नारळांतील जो मुख्य खाद्यांश तो; नारळाचा गाभा. २ पोफळांतील पांढरा भाग. ❀**खोबरेल न०** खोबऱ्याचें तेल. **अन्नाचें खोबरें होणें** अन्नाचें दुर्भिक्ष्य होणें. **जेवणाचें खोबरें होणें** जेवणाचें स्वारस्य नाहींसें होणें; भूक नाहींशी होणें (जेवणाचें पूर्वीं फराळ केलेला असल्यामुळें). **खोबऱ्याचा वाटा पु०**नारळाचा कीस.**खोबऱ्याची आई स्त्री०**नारळाची करवंटी.

खोबळा पु० १ पट्टा हातांत आडकावावयासाठीं मुंढा हात लांबीचें मुठीसारखें घातलेलें असतें जें कवच तें. २ भिंत, दगड, इ०मध्यें ओबडधोबड खळगी पडलेली असते ती.

खोबली स्त्री० लहानसा खड्डा किं० खळगा.

खोबी स्त्री० १ खड्डा, खाच, खळगी. २

तेल्याच्या घाण्याचा बुडाचा खळगा,–ज्यांत पिळून निघालेलें तेल सांठतें. ॐखोबी पातेरें न० खोबींत सांठलेलें तेल आणि पातेऱ्यानें पुसून काढून पिळून निघालेलें तेल. [पहा.

खोमट, खोमटाण मागें ' खवट, ' 'खवटाण'

खोमण वि० चिंबलेल्या तोंडाचा (माणूस).

खोमण काकडी स्त्री० मागें ' खमंग काकडी ' पहा.

खोमणें स० क्रि० शिरकावणें, खुपसणें, रोवणें.

खोमणें न० १ खवणी (खोबरें खरवडून काढण्याचें आउत). २ खळगी; खड्डा; सखल प्रदेश.

खोमण्या वि० दांडगेश्वर; आवेशी; दणक्या.

खोमलणें स०क्रि० १ भांडें ठोक्यांनीं युक्त करणें; भांड्यावर ठोके मारणें. २ पोचे पाडणें (भांड्याला).

खोमसणें स० क्रि० भोकांत, खळग्यांत, किंवा दऱ्यांत माती ठासणें.

खोमा पु० १ भांडें हापटल्यानें येतो तो पोचा. २ जमीनींतील खळगा किं० दरा (घेणें, पाडणें).

खोमेटी स्त्री० दगड फेकण्याची क्रिया; दगडाची फेक.

खोय [**फा०** खो=स्वभाव] **स्त्री०** स्वभाव, वृत्ति; तब्बेत. ॐ**खोयबोय** [**फा०** खो (स्वभाव) +बो (वास)] **स्त्री०** १ स्वभाव. २ मनाची वृत्ति; तब्बेत; लहर; विशिष्ट समयाची मनाची लहर किं० वृत्ति; उ० वरिष्ठाची खोयबोय पाहून बढतीसाठीं विनंती करावी.

खोर न० डोंगरांतील खिंड किं० खबदाड.

खोर न० १ निखारे (झाऱ्यावर घेतलेले किं० काढलेले). २ फावडें (पातेरा गोळा करण्याचें). ३ स्वयंपाकगृहांतील एक आउत.

खोरडण न० गाय, म्हैस, इ० च्या खालीं पडलेलें किं० त्यांनीं पायाखालीं टाकलेलें गवत, कडबा, इ०.

खोरण स्त्री० डोंगरांतील खिंड; डोंगराचा खोंडा.

खोरणें न० १ पातेरा गोळा करण्याचें फावडें. २ चुलींतील किं० भट्टींतील निखारे चाळविण्याचें एक आउत. ॐ**एकाद्याला खोरणें लावणें** त्याच्यापासून वारंवार मोठमोठ्या रकमा मागून घेणें; त्याच्यापासून पैसे उकळण्याचा सपाटा लावणें.

खोरणें स० क्रि० चुलींतील राख, फुपाटा, इ० झारा, उलथनें, इ० नीं खरवडून काढणें.

खोरपणें स० क्रि० एकाद्याला लुबाडणें किं० बुचाडणें.

खोरसणी स्त्री० एकाद्याला खोदखोदून आणि खुबीनें प्रश्न विचारून त्याच्या मुखांतून कांहीं माहिती काढणें (क्रि० देणें).

खोरा पु० १ कोणत्याही झाडाच्या पानाचा एक टांका देऊन केलेला द्रोण (तूप, इ० घ्यावयासाठीं). २ एक प्रकारचें इरलें. ३ डोंगरांतील अरुंद खिंड.

खोराडें, खुराडें न० कोंबडीं, बदकें, इ०साठीं केलेली त्यांच्या सोयीची जागा.

खोरी स्त्री० पर्जन्यनिवारणासाठीं बांबू इ० च्या कामट्यांवर पानें शिवून डोक्यावर घ्यावयाला करतात तें आच्छादन; इरलें. २ डोंगरांतील अरुंद खोरें. ३ व्यापारांत बसलेली ठोकर. ४ व्यापारांत किं० धंद्यांत एकाद्या माणसाला लागलेली उतरती कळा. ५ माती, खडे, इ० ओढून जवळ आणावयाचें एक आउत. ॐ**खोरीं येणें** (किं० **पडणें**), **खोरीस येणें** (किं० **पडणें**), **खोरी होणें** ऱ्हास पावणें, कमी होणें; उ० द्रव्यानें, अंगानें, आबरूनें, खोरीस येणें इ० म्ह० गरीब होणें, रोड होणें, फजीती पावणें इ०. **प्रयत्नांनीं** किं० **उपायानीं खोरीस येणें** म्ह० प्रयत्न किं० उपाय थकणें.

खोरें न० १ डोंगराचा जो खोंडा तो; अरुंद दरी. २ फावडें. ॐ **खोरें माती आपणाकडे ओढतें** मनुष्य आपलपोटेपणाच्या बुद्धीनें वागत असतो. **खोरें लावणें** पैसे उकळण्याचा सपाटा चालविणें. मागें ' खोरणें लावणें ' पहा.

खोरेती स्त्री० खरवती ह्या नांवाचें झाड.

खोऱ्याळ (–ळी) स्त्री० उणेपणा; दोष; व्यंग; उ० एकाद्याची खोऱ्याळी काढणें बरोबर नाहीं.

खोल वि० १ अधोभागाकडे लांबवर गेलेला किं० पोंचलेला; ओंड; उ० ही विहीर पांच पुरुष खोल आहे. २ बाहेरून लांबवर आंतपर्यंत गेलेला किं० पोंचलेला; उ० ही गुहा शंभर कदम खोल आहे. ३ गुप्त; दुर्बोध; दुर्ज्ञेय; गहन. **खोलक(–ग–)ड, खोलट वि०** १ सखल. २ बराच खोल.

खोलगा पु० खळगा; खड्डा.

खोलटणें, खोलवटणें [**म०** खोल] **अ० क्रि०** १ खोल होणें; पृष्ठभाग खोल जाणें; खचणें;

दबणें; उ० पावसानें जमीन दोन बोटें खोलटली. २ आजार, काळजी, इ०नीं गाल, डोळे, इ० खोल जाणें. ३ प्रसूतिसमय जवळ आला असतां गाय म्हैस, इ०कांनीं शेपचे मूलभागीं दोन बाजूंस खळ्या व डोळे ओढले जावे अशा तऱ्हेच्या प्रसूति-चिन्हांनीं युक्त होणें.

खोलणें [म० खोल] स० क्रि० उकरलेला खड्डा, विहीर,-इ०ज्यास्त खोल करणें. ॥**खोलून खोलून विचारणें** खूत्रीदार प्रश्न विचारून एकाद्याच्या मुखांतून कांही माहिती काढणें; खोद-खोदून विचारणें.

खोलवत न० भोक पाडण्याचें एक आउत.

खोलवा पु० खळगा, सखल प्रदेश.

खोला, खोल्या पु० १ तूप, इ० ध्यावया-साठीं केलेला पानांचा द्रोण. २ ओबडधोबड पत्रावळ,-जिला दूर दूर टांके आहेत. ३ फुल-झाडें लावावयाची कुंडी; कोळंबें.

खोलावा [म० खोल] पु० १ खोलपणा, ओंडपणा. २ पोकळपणा. ३ सखलपणा.

खोली [म० खोल] स्त्री० १ खोलपणा. २ खोलपणाचें परिमाण;उ०ह्या विहिरीची खोली चार पुरुष आहे.३घरांतील लहान आकारमानाची बंदिस्त जागा; कोठडी. ॥ **खोलेरी खाट** [म०खोली+खाट]स्त्री०आजारीपणाचें मिष करून खोलींत खाटे-वर पडून राहणें (कांहीं प्रसंग टाळण्यासाठीं; क्रि० घेणें).

खोवणें, खोसणें स० क्रि० १खोचून बसविणें (केशांत फुलें इ०). २ एकाद्याच्या मनांत एकाद्या माणसाविषयीं किंवा वस्तूविषयीं प्रतिकूल ग्रह उत्पन्न करणें.

खोवा पु० गायीं म्हशींचें दूध, नारळांचें दूध, इ०चा आटवून केलेला गोळा;खवा.

खोसडा पु० रट्टा, तडाखा.

खोसडा, खासडा पु० जोडा, वहाणा.

खोळ स्त्री० १ गादी, तक्या, लोड, उशी,इ० करावयासाठीं कापूस इ० ज्या पिशवींत भरतात ती. २ पावसाचें निवारण करण्यासाठीं घोंगडीची कुंचीसारखी घडी करून डोक्यावर घेतात ती. ३ गर्भाला लपेटणारें जें जरायु तें.

खोळंबणें अ० क्रि० कांहीं कार्य करावयाला जरूर जी सामग्री, द्रव्य, संधी, फुरसत, इ०, तींत कांहीं कमताई असल्या कारणानें तें कार्य कुंठित होणें, थांबणें, किं० अडून राहणें.

खोळंबा [म०खोळंबणें]पु०१जरूर जी साधन-सामग्री तिच्या अभावीं झालेली अडणूक;थांबणूक, २उशीर, विलंब, खोटी.

खोळेंरें इरलें न० कमरेवर न वळणारें विरलें (पर्जन्यनिवारणाचें साधनविशेष). कासवी, कमरमोडी, इ०,हे विरल्यांचें प्रकार.

ख्याख्या क्रि० वि० ख्या ख्या असा ध्वनि निघेल अशा रीतीनें (हसणें, खिदळणें, बोलणें, खोकणें, इ०).

ख्यात [सं० ख्या=सांगणें, स्तविणें, वर्णिणें] वि०१माहीत असलेला.२प्रसिद्ध,प्रख्यात,विख्यात.

ख्याति [सं०'ख्यात'पहा] स्त्री० १ प्रसिद्धि. २ कीर्ति, लौकिक.

ख्याल [फा० खियाल्] पु० एक प्रकारचें गीत किं० गाण्याची चाल. पु० अ० व० नाना-प्रकारचे वात्रटपणाचे किं० सोदेगिरीचे ढंग किं० प्रकार. ॥०च्या **ख्यालीं असणें** (**लागणें**, किं० **पडणें**) ०च्या नादांत, विचारांत, शोधांत, किं० विवंचनेंत असणें. **ख्याल तमाशा** पु० आनंदांत काळ घालविणें; मौजेंत वागणें. **ख्यालिया** वि० ख्यालासंबंधाचा; केवळ ख्याल गाण्याच्या उप-गाचा;ख्यालाचें गाणें गाण्याचें कसब ज्याचें असा. **ख्यालीखुशाली** स्त्री० १ गाणें बजावणें वगैरे. २ सुस्थिति; अनामय; खुशाली; खुशाल असण्याची स्थिति.

ख्यास [अ० कियास्] पु० १ निवाडा, निर्णय. २ साधक बाधक प्रमाणें विचारांत घेऊन ठरविलेला निर्णय. ३ तर्क, अटकळ.मागें 'कयास' पहा.

ग

ग मराठी वर्णमालेंतील चवदावा वर्ण आणि व्यंजनमालेंतील तिसरें व्यंजन.

ग [म० गर्व ह्या शब्दाचें पाहिलें अक्षर] पु०

गव,–गव ह्या शब्दाच्या अर्थाचें द्योतक; उ० त्याला ग ची बाधा (किं० पीडा, इ०)फार झाली आहे. ⊛ **गचें वारें** न०गर्व.

ग [**सं०** गम्(=जाणें) समासान्तीं ग होतो] **वि०** जाणारा; जातो तो; उ० भुजग म्ह० भुजांनीं जातो तो म्ह० साप; खग म्ह० आकाशांतून चालतो तो म्ह० पक्षी.

ग [**सं०** गुरु=दीर्घ (स्वर)] **पु०** गुरु अक्षर (छंदःशास्त्रांतील संक्षेप); उ० विद्युन्माला ह्या छंदांत दोन म येऊन पुढें दोन ग येतात.

गइवती इ० पुढें ' ' गै ' मध्यें पहा.

गई,गय स्त्री०दुसऱ्याच्या अपराधाकडे केलेला काणाडोळा; उ० तूं मला न विचारतां खेळावयाला गेलास; आज मी तुझी गय करतें, पुन्हां मला न विचारतां असा गेलास तर मी तुझी तंगडी मोडून कांडी करून टाकीन !

गई स्त्री० घराच्या आढ्यापासून उतरलेले वांसे भिंतीच्या माथ्यावरील ज्या लाकडावर टेकतात तें लाकूड किं० त्या लाकडाला चिकटलेला भिंतीचा भाग. ⊛**गईगोळा पु०** शेणाचे गोळे जे भिंतीच्या माथ्याला किं० गई म्हणतात त्या लाकडाच्या शेजारीं थापतात ते प्रत्येक. **गईमेढकें न०** घराच्या पाख्याच्या वांशांना टेकावयासाठीं जें लाकूड घालतात तें जर भिंतीवर टेकलेलें नसेल तर तें ज्या मेढीवर म्ह०लहान खांबांवर ठेविलेलें असते त्या मेढी प्रत्येक. **गईसर (–रा) पु०** गईमेढक्यांवर आडवा लांब वांसा घालतात तो.

गाऊळवाडा [**म०** गवळी+वाडा] **पु०** १ गवळी लोकांच्या वसतीचा गांवाचा भाग. २ गायी, म्हशी, इ० बांधावयाची जागा.

गंगथडी [**स०** गंगा+थडी (बाजू)] **स्त्री०** गोदावरी नदीच्या दोन्ही बाजूंचा प्रदेश.

गगन [**सं०**] **न०** आकाश. ⊛**त्याच्यापुढें गगन कांपतें** (किं०**थरारतें**) तो भारी उग्र किं० तामसी मनुष्य आहे. **गगनाशीं गांठ बांधणें** (**किं० लावणें**) मोठे पराक्रम करणें. **त्या अरण्यांतील वृक्ष गगनाशीं भांडत होते** ते खूप उंच होते; ते गगनचुंबित होते. **तो गगनाशीं भांडणारा आहे** तो अत्यन्त गर्विष्ट आहे. **गगनाशीं दिवस भांडणें** दिवस लांबत चाललेला असणें (उन्हाळ्याच्या दिवसाचें वर्णन). **गगनासारखा** (**किं० एवढा**) फारच मोठा किं० लांबलचक किं० अवाढव्य (काम, कारभार, राज्यविस्तार, इ०). **गगनासारखी मैत्री आणि तिळा इतकें नातें बरोबर होत नाहीं** कितीहि लांबचें किं० दूरचें नातें असलें तरी त्याचा उपयोग अधिक होतो आणि कितीही दृढ मैत्री असली तरी तिचा उपयोग कमी होतो. **गगनीं दिवा लावणें** प्रसिद्धि पावणें; नांव मिळविणें; लौकिकास चढणें. **गगनचुंबित, गगनचुंबी वि०** खूप उंच (घरें, वृक्ष). **गगनपुष्प न०** अशक्य किं० अविद्यमान वस्तु; उ० वंध्यापुत्र, मृगजळ, इ० प्रमाणें.

गंगा [**सं०**] **स्त्री०** १ भागीरथी नदी,–जी हिमालयांत उगम पावून बंगालच्या उपसागरास मिळते. २ गोदा किं० गोदावरी नदी. ३ कोणतीही पवित्र नदी. ४ गंगेचें पाणी, किं० कोणतेंही पवित्र पाणी, जें तीर्थ म्हणून घेतात तें. ⊛**वाहती गंगा आणि चालता धर्म** गंगा वहात आहे म्हणून तिला थोरवी प्राप्त होते; धर्म अनुसरला जात आहे म्हणून त्याचें वंद्यत्व. **मी गंगेतलें पाणी गंगेंत सोडीत आहें** मी आपलें उपकार फेडीत आहें ही आपलीच पुण्याई, माझ्याकडे कांहीं श्रेय नाहीं ! **गंगेस (किं० गंगेंत) घोडे न्हाणें** १ कृतकृत्य होणें; कांहीं मोठा पराक्रम करणें. २ उत्कटतेनें इच्छिलेली वस्तु प्राप्त झाल्यामुळें धन्य होणें. **वाहत्या गंगेंत हात धुणें** (**किं० धुऊन घेणें**) सर्व साधनें अनुकूल असतां त्यांचा फायदा करून घेणें; अनुकूल परिस्थिति जमून आल्यामुळें जर आपले काम सहजगत्या होण्याजोगें असेल तर तें तावडतोब किं० अवश्य करून घ्यावें. **वाहिली ती गंगा आणि राहिलें तें तीर्थ** दोन्ही प्रकारें फायदेशीर; पैसा दान केल्यास पुण्य लागतें आणि जो न देतां आपल्याजवळ राखिलेला असेल तो अडचणीच्या किं० जरूरीच्या प्रसंगीं आपल्या उपयोगाला येतो; सारांश, पैसा हा सर्व प्रकारें उपयोगी किं० मूल्यवान् पदार्थ आहे.

गंगागोत न० १ साळी, माळी, इ०पैकीं

एकाद्या विशिष्ट जातीचे लोक समुच्चयानें. २ जातीच्या संबंधाच्या एकाद्या तंट्याचा निकाल करण्यासाठीं असे जमलेले लोक समुच्चयानें. **गंगा-जमनी वि०** ज्याचा एक कांठ एका रंगाचा आणि दुसरा दुसऱ्या रंगाचा असें (धोतर, उपरणें, लुगडें, इ०). **गंगाजळी स्त्री०** १ गंगेचें पाणी किं० तीर्थोदक ठेवण्याचें भांडें. २ शिलकीचे पैसे ठेवण्याचें बारदान,–ज्यांतील पैसा अत्यन्त अडचणीच्या प्रसंगीं काढून खर्चावयाचा असा संकल्प केलेला असतो. **गंगाजळी घेणें** (किं०**उचलणें**) गंगेचें पाणी ज्यांत ठेविलेलें असतें तें भांडें हातांत घेऊन किं० त्याला स्पर्श करून कांहीं विधान प्रतिज्ञेवर करणें. **गंगापाट(–ठ) पु०** घोड्याच्या छातीवरील भोंवरा,–हें घोड्याचें सुचिन्ह समजलें जातें. **गंगापुत्र पु०** गंगेवरचा एक अधिकृत इसम,–जो गंगेला दिलेलें दान घेतो. **गंगाभागीरथी स्त्री०** विधवेच्या नांवापूर्वी लावावयाचें उपपद. **गंगामृत्तिका, गंगामाती स्त्री०** गंगातीरची माती,–जी गोपीचंदनासारखी असते. **गंगावन न०** वनगायीच्या शेपटीचे केश,–जे कांहीं विशेष प्रकारें पटवेकरी बांधतात, आणि जे बायका केशकलाप लठ्ठ होण्यासाठीं वेणीमध्यें घालतात. **गंगावळ पुं०** गयावळ; गयेवर धार्मिक विधींचे संकल्प सांगणारे लोक. **गंगासागरी वि०** ज्याचे कांठ रंगानें छापलेले असतात असें (लुगडें, धोतर, उपरणें, इ०). **गंगाळ** [**सं०** गंगा+आलय] **न०** मोठ्या आणि पसरट तोंडाचें आणि लहान बुडाचें आणि उचलावयाला कड्या असलेलें धातूचें पात्र; यांत अंघोळीचें पाणी घेतात किं० चिरगुटें धुतात. **गंगाळपोतें न०** अति सैल अंगरखा, बंडी, इ०. **गंगोत्री** [**सं०** गंगा+उत्तरणी] **स्त्री०** गंगेचें हिमाल्यांतील उगमस्थान.

गचकणें अ० क्रि० १ एकदम खळग्यांत पाऊल पडल्यामुळें हिसका खाणें; ठेच खाणें. २ घसरणें. ३ एकाद्या कामांत किं० प्रयत्नांत अपयश पावणें; उ० तो संस्कृतांत गचकला (म्ह० नापास झाला).

गचकळणें अ० क्रि० नदी, इ०मध्यें मनुष्य किं० जनावर याच्या नाकातोंडांत पाणी जाऊन त्यानें घाबरून खालीं जाणें वर येणें अशा स्थितींत असणें; उ० वरून एकदम पाण्याचा लोंढा आला त्यांत तो गचकळून मेला. २ व्यापारांत निभाव लागेनासा होऊन हिसके खात राहाणें.

गचकळी [**म०** गचकळणें] **स्त्री०** पाण्यांत किं० व्यापारांत किं० व्यवहारांत निभाव लागत नाहीं अशी स्थिति.

गचका [**म०** गचकणें] **पु०** १ बसलेला हिसका. २ जेथें चालणाऱ्याला हिसका बसतो किं० ठेच लागते असें स्थळ. ३ दुर्दैवाचा तडाखा. ४ व्यवहारांत बसते ती ठोकर. ५ ग्रंथ, भाषण, इ०कांतील दुर्बोध भाग. ६ दुसऱ्याच्या विरुद्ध रचिलेला व्यूह किं० पेच.

गचकी [**म०** गचकणें] **स्त्री०** लहान गचका. वर ' गचका ' पहा.

गचंगळी[**म०**गचकणें]**स्त्री०**गचकळी,हिसका.

गचणें अ० क्रि० चिखल इ० त रुतणें किं० रुतून बसणें.

गचंदा पु० १ कमरेचा सांधा दुखावण्याजोगा जो धक्का बसतो तो. २ कोणत्याही प्रकारचा धक्का किं० हिसका. गचांदा, गचोंदा, गचंदी, गचांदी, गचोंदी, गचांडी, हीं ह्याच शब्दाचीं अन्य रूपें आहेत. [वाढलेलें रान.

गचपण न० केरकचरा; अडगळ; अंगणांत

गचाड न० दाट जंगल किं० झाडी.

गचांडी स्त्री० १ हाताचा अंगठा आणि पुढचें बोट ह्यांच्या मधल्या भागानें दुसऱ्याच्या मानेस जो धक्का देतात तो;अर्धचंद्र.२शत्रूचा गळा; उ० मी चोराची गचांडी धरली. **गचोडी स्त्री०**, **गचोरा पु०** हीं ह्याच शब्दाचीं दुसरीं रूपें आहेत.

गचाबोचा पु० १ पाठ आणि ढुंगण (मनुष्यांचें); स्कंध प्रदेश आणि ढुंगण (जनावरांचें). लठ्ठपणाची थट्टा किं० निंदा करावयाची असते गचाबोचा ह्या शब्दाचा उपयोग केला जातो; उ० हणमंतभट्टजींचा गचाबोचा एक नाहीं होणार तर काय होईल ? रोज घृतकुल्या मधुकुल्या चालल्या आहेत !

गचावणी [**म०** गचावणें] **स्त्री०** १ पाण्यांत धडपड. २ व्यापारांत बुड किं० ठोकर. ३ खचणें (धैर्य, टेका, आधार, इ०). ४ अपेक्षेहून कमी ठरणें.५ हुकणें.

गचावणें [म० गच्च्] अ० क्रि० पाण्यांत किं० चिखलांत किं० व्यापारांत किं० परक्षित गटांगळ्या खाणें बुडणें, खचणें, किं० ठोकर खाणें.

गचाळ वि० १ नेभळट, भोंगळ, गैदी. २ अगदीं खालच्या प्रतीचा; टाकाऊ.

गचोरा पु० १ कणसें धरावयाची स्थिति; उ० जोंधळा गचोऱ्यास आला नाहीं. २ रट्टा, तडाका.

गच्च क्रि० वि० १ घट्ट, आवळून, जोरानें, नेटानें. २ दाटीनें, गर्दीनें, खेटून. ३ काठोकाठ, तोंडापर्यंत. ४ पक्केपणें.

गच्चा पु० १ जोंधळा, बाजरी, गहूं, इ०चें कणीस,—विशेषतः दाण्यांनीं ठासून भरलेलें; उ० बाजरीनें गच्चा धरला; उ०शेताचे गच्चे बाहेर पडले. २ फुगीरे गाल किं० गालाचा फुगीरपणा; उ० गालाचे गच्चे फुगणें, बसणें, ओसरणें, इ०.

गच्ची स्त्री० १ इमारती चुना घराच्या जमीनी-वर किं० धाब्याच्या घराच्या माथ्यावर धुमसून टणक केलेला पृष्ठभाग. २ गर्दी, दाटी, खेचाखेच. ३ गलबताच्या डोलकाठीला काटकोनांत बांधलेलें जें लाकूड त्याला अवजारें इ० कांहीं विशेषप्रकारें बांधणें.४मानेला दिलेली गचांडी. ५ गाल,(चिमटा घेणें,चपराक मारणें इ०प्रसंगीं प्रयोग);उ०एकाद्याची गच्ची दावणें, चिमटणें, रंगविणें, इ०.

गच्छ [सं०]न०गणित श्रेढींतील एकंदर पदांची संख्या.

गच्छ, गच्छंतीचें न०, **गच्छंती** स्त्री० [सं० गम्, गच्छ्=जाणें] जाणें; पळून जाणें; परवानगी न घेतां निघून जाणें.

गज [सं०]पु०हत्ती. ॐ**गजाग्रणी** पु०ऐरावत. **गजकर्ण** न० एक त्वचेचा रोग. **गजकर्णी** स्त्री० एक वनस्पति,—जिचा उपयोग ' गजकर्ण ' ह्या त्वचेच्या रोगावर होतो.वि० मोठमोठ्या किं०थिल-थिलीत कानांचा (माणूस).**गजगामिनी, गजगति** वि० ठमकत ठमकत चालणें जिचें अशी (स्त्री). **गजगौर (—री)** स्त्री० हत्तीवर बसविलेल्या गौरीची(म्ह० पार्वतीची)मूर्ति. **गजगौरीव्रत** न० हत्तीवर बसविलेल्या गौरीच्या मूर्तीची पूजा कर-ण्याचा विधि.(सूर्य हस्त नक्षत्रांत जातो तेव्हां म्हणजे भाद्रपद मासीं हस्ताकीं स्त्रिया ही पूजा करतात आणि ब्राह्मणाला दानें देतात. **गजघंटा, गजघांट** स्त्री० १ हत्तीवर लोंबत सोडलेल्या घांटांपैकीं प्रत्येक. २ गलागला बोलणारी स्त्री.३ज्याच्या तोंडांत गुप्त गोष्ट रहात नाहीं असें माणूस. **गजच्छाया** स्त्री० भाद्र-पदमासांतील अमावास्या,—ह्या दिवशीं चंद्र आणि सूर्य हस्त नक्षत्रांत असतात.**गजनेत्री** वि०१बारीक बारीक डोळ्याचा (माणूस). २ पिचक्या डोळ्यांचा (माणूस).**गजारि** पु० सिंह.**गजाजीव,गजारोह, गजपाल** पु०महात.**गजपूर** न०हस्तिनापुर. **गज-दंत** पु०१हस्तिदंत. २गणपति.३खुंटी (चिरगुटें इ० ठेवण्यासाठीं भिंतीत बसविलेली).**गजनासा** स्त्री० सोंड.**गजपुंगव** पु०उत्कृष्ट हत्ती. **गजशाला** स्त्री० हत्तीखाना. **गजवीथि** स्त्री०रोहिणी, मघा, आणि आर्द्रा हीं तीन नक्षत्रें मिळून होणारा आकाशभाग. **गजस्नान** न० निरुपयोगी प्रयत्न, खटपट, किं० उद्योग. **गजमस्तकारूढ** वि० पैसा, अधिकार, विद्वत्ता,इ०गुणांपैकीं एकाद्या किं०सर्व गुणांनीं उन्मत्त झालेला; अत्यन्त गर्विष्ट;मदांध. **गजस्कंधीं बसणें** वैभवप्राप्तीनें मदान्ध होऊन पूर्वीच्या नातलगांस आणि मित्रांस विसरणें किं० धिक्कारणें. **गजान्त-लक्ष्मी** स्त्री०१हत्ती आहे अंतीं जिच्या अशी संपत्ति; अपरंपार श्रीमंती;हत्ती विकत घेऊन तो बाळगण्या-इतकी श्रीमंती. २ केवळ पंचा नेसावयाला ज्याला मिळतो त्याची श्रीमंती ह्य० दारिद्र्य. येथें 'गजा' शब्दावर श्लेष आहे.खालीं' गजा ' पहा.

टीप,—ह्या प्रतीकांतील ' गज ' शब्दांतील 'ज' चा उच्चार तालव्य.

गज [सं० गज=तीस अंगुळें लांबी] पु० १ चोवीस तसू लांबी किं० ह्या लांबीच्या प्रमाणाची काठी, पट्टी, इ०. २ विहिरींची खोली दाखवि-ण्यासाठीं विहिरीच्या भिंतीवर जी गजा गजाच्या उंचीवर चिन्हें कोरलेलीं किं० काढलेलीं असतात तीं प्रत्येक; उ० कालच्या पावसानें आमच्या विहि-रीचा एक गज बुडाला(म्हणजे एक गज पाणी चढलें). ३विहिर,तळें,इ०चा कांठ(मुंढेरी असलेला किं०नस-लेला).४बंदूक,इ०मध्यें बार चिणावयाची काठी किं० सळई. ५ खिडकी इ०तून मांजरें, चोर, इ०ना प्रवेशतां येऊं नये म्हणून जे धातूचे किं०लाकडाचे दांडे मारलेले असतात ते प्रत्येक. ॐ **रजाचा गज करणें** लहान वस्तू मोठी करून सांगणें किं०वर्णिणें; क्षुद्र वस्तूला नसतें महत्त्व देणें; मूर्खपणाची अति-

शयोक्ति करणें;फुगवून सांगणें.**गजाचा रज करणें** एकाद्या वस्तूचें महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न करणें. **गजभोंगळी स्त्री०** धराच्या छपरावर घातलेलीं कौलें घसरूं नयेत म्हणून माहुटाच्या पानाला ठोकून बसविलेला गज(म्ह० रीप किं०पट्टी). **गजपुट न०** गजाच्या परिमाणाच्या खड्ड्यांत औषधाच्या उपयोगाचें द्रव्य बनविण्याचा एक वैद्यकी संस्कारविशेष.

टीप,–ह्या प्रतीकांतील ' गज ' शब्दांतील ' ज ' चा उच्चार दंततालव्य.

गंज [सं० गंज=खजीना, सांठा] **पु०** १ धान्यादिकाचा राशि. २ एकांत एक बसणारीं भांडीं इ०चा समुदाय, किं० ह्या समुदायांतील एक एक भांडें व्यक्तिशः. ३ सुतारी हत्यारें किं० अन्य धंद्याचीं हत्यारें आटोपसर रीतीनें एके ठिकाणीं ठेवण्याची पेटी किं०कोणत्याही आकाराचें बारदान. ४ एका विशिष्ट प्रसंगीं जरूर ज्या वस्तु त्या व्यवस्थित रीतीनें एके ठिकाणीं ठेवण्याच्या सोयीचें कोणतेंही बारदान; उ० पानें, सुपाऱ्या, आडकित्ता, इ०चा गंज; उ० काजळ, कुंकू, फणी,इ०चा गंज. ५ बाजार. ६ एकादा व्यापारी पदार्थ जेथें खूप मोठ्या प्रमाणांत खरेदीविक्रीसाठीं ठेविलेला असतो ती जागा. ७ पाणी सांठविण्याच्या उपयोगाचें मोठें बारदान.

गजक [फा०] **स्त्री०** एकाद्या विशिष्ट पदार्थाचें वैपुल्य किं० मोठें प्रमाण.

गजगज स्त्री० १ गलबला; अनेक माणसें एकदम बोलत असतां होतो तो ध्वनि. २ चिमण्या इ० पांखरांचा कलकलाट.

गजगज (–ब–) णें अ० क्रि० मोठ्या वस्तीनें व्याप्त असणें (घर, गांव, राज्य, इ०).

गजगा पु० गजरगोटीचें बीज (मुलीं हीं बीजें खेळावयाला घेतात).

गजणें स० क्रि० १ तेल, तूप, किं० कांहीं औषधी द्रव्य चोळून चोळून अंगांत जिरविणें. २ घासणें, चोळणें. ३ ०पेक्षां वरचढ होणें.

गंजणें अ० क्रि० लोखंड, तांबें, इ० धातूंचीं पात्रें तांब किं० कीट यानें युक्त होणें.

गज (–झ–) नी स्त्री० अर्धे सूत आणि अर्धें रेशीम ह्यांच्या मिश्रणाचें पट्टेदार कापड; हें गर्भसुती असून त्याला एका बाजूनें रंगीत पट्टे असतात.

गजब [अ० गझब्] **पु०** १ कांहीं असह्य मोठें संकट (होणें, गुदरणें, येणें, करणें, मांडणें, इ०). २ जोराचा,नेटाचा, किं० क्रूरपणाचा हल्ला (माणसावर, देशावर). ३ शिव्यागाळींचा वर्षाव. ४ दुर्दैवाचा तडाखा. ॐ**एक गजब पु०** १ आवेशाचा आणि क्रूरपणाचा हल्ला (शब्दांनीं किं० हत्यारांनीं). २ जोरदार, क्रूरपणाचें, किं० नेटाचें कोणतेंही कर्म; उ० रडण्याचा, लुटण्याचा, झोडपण्याचा, ओरडण्याचा, त्या मुलांनीं, चोरांनीं, परदेशी दरवडेखोरांनीं, वाघांनीं, इ०नीं एक गजब मांडला, चालविला, इ०.

गजबजणें अ० क्रि० व्यापार, उद्योग धंदे, हालचाल, इ०नीं युक्त असणें (शहर, गांव, देश, इ०). २ भीति, आश्चर्य, किं० निरुत्साहता, ह्या भावनेनें आक्रान्त होणें; घाबरून जाणें; विस्मित होणें; खचणें; गळाठणें.

गजबजीत वि० १ गजबजलेलें (शहर, देश, इ०). २ नाना प्रकारच्या धडामोडी,व्यवहार,इ० जेथें चालतात असें (शहर, देश, इ०).

गजबाव स्त्री० चुना, दगड, इ०नीं बांधून काढलेली विहीर.

गजर पु० १ कीर्तनादि प्रसंगीं सर्व श्रोते ईश्वरनामाचें मोठ्या आवाजानें करतात तें उच्चारण. २ अनेक वाद्यांचा एकवटलेला ध्वनि. ३ प्रहर भरला म्हणजे तासावर बडवितात ते टोले समुच्चयानें; उ० सकाळच्या प्रहराचा गजर झाला.४एकाद्या गोष्टीचा बोभाटा; उ० मला अमुक ठिकाणीं नोकरी मिळावयाची ठरली आहे ह्या गोष्टीचा तुम्ही गजर करूं नका. ५ प्रसिद्धि; सर्वविश्रुतता.

गजरगोटा पु० सागरगोटीची बी.

गजरा पु० १ फुलें एकत्र गुंफून हातांत घालावयासाठीं जी करतात ती माळ. २ स्त्रियांचें एक करभूषण.३ मुलांना खेळावयाच्या ज्या लाखेच्या गोट्या त्या प्रत्येक. ४ गजरगोटा.

गजल, गझल [**फा०**] फारशी गाण्यांतील एक छंद; गजलांत प्रायः शृंगाराचें वर्णन असतें.

गजा पु० अति लहान पंचा,–नेसावयाचा.वर ' गजान्तलक्ष्मी ' पहा.ॐ **गजानंद पु०**केवळ गजा कमरेला वेढून हिंडणें फिरणें ज्याला आवडतें असा माणूस; छांदिष्ट किं० विक्षिप्त माणूस.

गजाल स्त्री० १ गोष्ट, हकीगत. २ गप्पा, (सांगणें, करणें). ३ गलबा, कलकलाट.

गंजिफा स्त्री० अ० व० खालीं ' गंजीफ'पहा.

गजिवेल स्त्री०जिच्या पात्याला करवतीसारखे दांते आहेत अशी तरवार,–शत्रूच्या चिलखताला अडकावून त्याला खेचण्यासाठीं.

गंजी [इं०] स्त्री० तृणादिकांचा ढीग किं० रास,–विशेषत: नीट रचिलेली रास. ॐ**गंजीखाना पु०** ज्यांत गंजी रचलेल्या आहेत असें पटांगण.

गजी स्त्री० तासून चौरस केलेली लाकडाची कडी (पाटणीची).

गंजीकोट वि० विपुल, मुबलक. ॐ **गंजीकोट कारखाना पु०** प्रचंड किं० विस्तीर्ण कारखाना.

गंजीफ [फा० गंजिफाह्] स्त्री० खेळावयाच्या उपयोगाचे कागदाचे तुकडे रंगाचें आणि चित्रांचे चौकोनी किं० वाटोळे ते प्रत्येक. **अ०व० गंजिफा.**

गंजीव वि० दगड, विटा, चुना, इ० द्रव्यें लावून बांधून काढलेली (विहीर); याच्या उलट " आढाव विहीर " म्ह० ओबड धोबड रीतीनें बांधलेली विहीर.

गजेंदर [सं० गजेन्द्र=मोठा हत्ती] वि०खूप मोठें, प्रचण्ड, अवाढव्य, जगडव्याळ (कारखाना, सैन्य,अरण्य, संपत्ति, इ०).

गजेरी स्त्री० पाण्यावर तरंगत असणारा केर-कचरा,–जो लाटेबरोबर येऊन कांठावर साचतो (समुद्र,नदी,इ० चा). [लहान पंचा.

गज्जा पु०,गज्जें न० कंमरेस वेढून घ्यावयाचा

गट पु० १ मनुष्यांचा किं०पदार्थांचा समुदाय. २ कांहीं विशिष्ट कार्यार्थ जुळलेल्या माणसांची जूट. ३ कांहीं विशिष्ट तत्त्वावर केलेल्या वर्गीकरणांतील एक एक भाग. ४ ठाशीव रीतीची रचना, किं० मांडणी(शिपायी,जनावरें,पदार्थ,इ०ची). ५ सोनें, चांदी, इ०ची लगड. ६ एकत्र बांधलेल्या किं०मांड-लेल्या पदार्थांचा संच.

गट पु० कांहीं खाद्य किं० पेय पदार्थ गिळतेसमयीं कंठांतून निघतो तो ध्वनिविशेष. ॐ **गट करणें** १ गिळून टाकणें. २ दुसऱ्याचा पैसा किं० कांहीं पदार्थ आपल्या हातीं आला असतां तो अप्रामाणिकपणानें लाटणें किं० दाबून ठेवणें; दुस-ऱ्याचा पदार्थ लबाडीनें मिळवून जिरविणें. **गटकन**

गटगटां, गटांगटा गट् असा आवाज होईल अशा रीतीनें.

गटकाविणें स० क्रि० वर ' गट करणें ' पहा.

गटंगळी, गटगळी,गटांगळी स्त्री० १पाण्यांत पडलेल्या माणसाची धडपड; गचकळी; डुबकी. २ कोणत्याही कामीं केलेला शिकस्तीचा प्रयत्न.

गटगट, गटगटां क्रि०वि०गटगट असा आवाज करून (खाणें, पिणें).

गटगटणें अ० क्रि० गटगट असा आवाज करणें (शिजत असलेला भात, भाजी, इ०नीं).

गटगटीत वि० १ मोठे आणि तेजस्वी (डोळे). २ लटपटीत, अधू (टेबल, खुर्ची, इ०).

गटगिळ्या, गटगीळ वि०दुसऱ्याच्या पैशाचा किं० कोणत्याही वस्तूचा लबाडीनें अपहार करणारा.

गटगोळा, गट्टं गोळा पु० मोठेमोठे घास घेऊन खाणें.

गटण न०, स्त्री० (संगीतांत) मात्रांचें प्रमाण.

गटर, गटार [इं० गटर्] न० मोरीचें किं० पावसाचें पाणी वाहावयासाठीं केलेला पाट (बांधून काढलेला किं० न काढलेला). ॐ**गटार बातमी स्त्री०** फारशी विश्वसनीय नव्हे अशी बातमी. **गटारयंत्र न०** १ गमतीखातर किं० दुष्टपणानें किं० पैसे मिळविण्यासाठीं जो मनुष्य समाजांत खोट्या बातम्या प्रसृत करतो तो. २ खोट्या बातम्या प्रसृत करण्याचा धंदा.३ हा धंदा करणारा इसम किं०ह्या धंद्याचें लोक जेथें जम-तात तें ठिकाण. आमचें 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक ले० १०५२ पहा.

गटाणा पु० गपागप खाणें, खाऊन टाकणें (करणें). **पु०** लठ्ठ आणि फोपशा किं० थिल-थिलीत माणूस. ह्या अर्थी ' गट्टंगा, ' ' गट्टणा (–ना) ' हेही शब्द प्रचलित आहेत.

गटोळा गांटोळा, गुटुळा वि० वाटोळा; वाटोळा आणि जड.

गट्ट क्रि० वि० गट्ट असा आवाज करून.

गट्ट पु० वर ' गट ' पहा.

गट्टी स्त्री० १ दृढ मैत्री; जीवश्चकंठश्च मैत्री. २ लहानसर गठ्ठा. ३ टोळी (माणसांची).

गठडी [हिं०] स्त्री० १ लहानसें गांठोडें; पुचुंडी.२गुप्तपणें ठेविलेलें एकाद्याच्यां द्रव्य;एकाद्याचे

जवळचा गुप्त ऐवज; उ० आण्णाराव नोकरीची खटपट कशाला करतील ? त्यांना मामाची गठडी मिळावयाची आहे ना ? ※**एकाद्याची गठडी होणें** (किं० **वळणें**) तो भीतीनें, आश्चर्यानें, किं० आजारानें, हातापायांचें चलनवलन करण्यास असमर्थ होणें.

गठडें न० १ लहानसें गांठोडें. २ गुप्तपणें बाळगून ठेविलेलें द्रव्य, दागिने, इ०.

गठण स्त्री०, न० १ (संगीतांत) मात्रांचें प्रमाण.२मृदंग वाजविण्यांतील एक प्रकार. ※**गठण गांठणें, गठणास आणणें** आपल्या हेतूला अनुकूल किं० अनुरूप करून घेणें. **गठणास येणें** आपल्या उद्देशाला अनुरूप होणें किं० असणें.

गठली, गठरी स्त्री० वर ' गठडी ' पहा.

गंठीखोड पु० भामट्या.

गठीछोड, गठ्ठीछोंड, गंठीछोड पु० अत्यंत कृपण माणूस.

गठोळी स्त्री० लहानसें गांठोडें.

गठ्ठ वि० घट्ट आणि मजबूद (शरीर किं०गात्र).

गठ्ठा पु० १ कापूस, चिरगुटें, इ० चें आटोपसरपणें बांधलेलें ओझें; बस्ता. २ घट्ट झालेला पदार्थ (दहीं, रातांबेल, इ०). ३ पैसा, ऐवज. ४ पखवाजाच्या वाद्या घट्ट करावयासाठीं घातलेल्या आठ गंडेऱ्या ह्म० लाकडाचे वाटोळे तुकडे.

गठ्ठी स्त्री० १ लहान गठ्ठा; लहानसर बस्ता किं० ओझें. २ गुप्त द्रव्य. ※ **गठ्ठीचोर पु०** अट्टल चोर; बिलंदर भामटा. **गठ्ठीजोड वि०** द्रव्याच्या पुंचुंडीला गांठीवर गांठी मारणारा म्ह० अत्यंत कृपण किं० चिक्कू.

गंड [सं०] पु० १ कानशील आणि गाल मिळून मुखाची एक बाजू. २ गाल. ३ हत्तीचें गंडस्थळ. ४ पुळी, फोड, गळूं. ५ गांठ. ६ गेंडा. ७ मूत्राशय. ८ योद्धा. ९ बुडबुडा. १० विष्कंभादि सत्तावीस योगांतलि दहावा योग. ११ रोगाचा, पावसाचा, वाऱ्याचा, इ० चा जोर, आवेश, किं० सपाटा. १२ गर्व, उर्मटपणा, रग, किं० ताठा (जिरणें, मोडणें, इ०). १३ कांहीं शब्दांच्या पुढें ' गंड ' हा शब्द तुच्छता दर्शविण्यासाठीं लावतात; उ० न्हावी, न्हावगंड; त्याचप्रमाणें तेलगंड, वाणगंड, जोसगंड, इ०.

गड [हिं०] पु० डोंगरावर बांधलेला किल्ला आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी,इ० ' हें पुस्तक ले० १३४८ पहा. ※ **गड घेववेल पण वायको घेववणार नाहीं** गड जिंकून घेतां येईल पण परस्त्री जिंकून घेणें कठिण. **गडकरी पु०** गडावर नेमलेला अधिकारी. **गडघेणा वि०** कठिण, बिकट, जिकिरीचा. **गडनीस पु०** गडावर पैशाआडक्याचा हिशेब किं० जमाखर्च ठेवणारा अधिकारी. **गडनिविशी, गडनिशी स्त्री०** गडनीसाचा हुद्दा किं० काम.

गड स्त्री० अडचण, पंचाईत, कठिण प्रसंग.

गडका पु०, स्त्री०, गडखी स्त्री० १झाडाची फुलें, पानें, फळें, इ० तोडावयाची टोकाला आकडा असलेली लांब काठी. २ (तुच्छतेनें) उंच स्त्री.

गडखळ न० १ दुःसाध्य वस्तु,किल्ला,इ०. २ दुर्बोध मजकूर,श्लोक, बोलणें, इ०. ३ दुर्गम रस्ता, वाट, इ०. ४ घोटाळा, पेच, अडचण.

गडखी स्त्री० झाडावरील पानें, फुलें, इ० तोडावयाची लांब काठी,–जिच्या टोकाला अंकडा असतो.

गडखोल पु० घोड्याचा गळा.

गडगंच (–ज) वि०अघळपघळ पुरेल इतकें; राशीच्या राशींनीं मोजतां येण्याइतकें; उ० त्याच्याजवळ गडगंच पैसा आहे; उ० आमच्या घरांत गडगंच धान्य आहे. ※ **आभाळ गडगंच भरणें** आभाळांत दाट ढग येऊन भूतलावर अंधेर पडणें. **गडगंच काळोख** निबिड अंधेर. **गडगंच (–ज) शहर (किं० देश)** भरभराटीच्या स्थितींतलि किं० संपन्न लोकांच्या वसतीचें शहर (किं० देश).

गडगडणें अ० क्रि० गडगड असा आवाज करणें, (मेघ, आकाश, किं०अजीर्ण झालें असतां पोट, इ० नीं).

गडगडा वि० ओबड धोबड वाटोळा मोठा धोंडा; उ० हा गडगा गडगड्यांचा रचिलेला आहे.

गडगडाट पु०गडगड असा आवाज (मेघांचा, किं० अजीर्ण झालें असतां पोटांत होणारा.)

गडगनें (–णे–) र पु०, न० एकाद्या कुटुंबांत लग्न, मुंज, इ० सारखें कांहीं मंगल कार्य

गजाल स्त्री० १ गोष्ट, हकीगत. २ गप्पा, (सांगणें, करणें). ३ गलबा, कलकलाट.

गंजिफा स्त्री० अ० व० खालीं ' गंजीफ' पहा.

गजिवेल स्त्री० जिच्या पात्याला करवतीसारखे दांते आहेत अशी तरवार,–शत्रूच्या चिलखताला अडकावून त्याला खेंचण्यासाठीं.

गंजी [इं०] स्त्री० तृणादिकांचा ढीग किं० रास,–विशेषतः नीट रचिलेली रास. ॐ**गंजीखाना पु०** ज्यांत गंजी रचलेल्या आहेत असें पटांगण.

गजी स्त्री० तासून चौरस केलेली लाकडाची कडी (पाटणीची).

गंजीकोट वि० विपुल, मुबलक. ॐ **गंजीकोट कारखाना पु०** प्रचंड किं० विस्तीर्ण कारखाना.

गंजीफ [फा० गंजिफाह्] स्त्री० खेळावयाच्या उपयोगाचे कागदाचे तुकडे रंगाचें आणि चित्रांचे चौकोनी किं० वाटोळे ते प्रत्येक. **अ०व० गंजिफा.**

गंजीव वि० दगड, विटा, चुना, इ० द्रव्यें लावून बांधून काढलेली (विहीर); याच्या उलट " आढाव विहीर " म्ह० ओबड धोबड रीतीनें बांधलेली विहीर.

गजेंदर [सं० गजेन्द्र=मोठा हत्ती] वि० खूप मोठें, प्रचण्ड, अवाढव्य, जगडव्याळ (कारखाना, सैन्य, अरण्य, संपत्ति, इ०).

गजेरी स्त्री० पाण्यावर तरंगत असणारा केर-कचरा,–जो लाटेबरोबर येऊन कांठावर साचतो (समुद्र, नदी, इ० चा). [लहान पंचा.

गज्जा पु०, गज्जें न० कंमरेस वेढून घ्यावयाचा

गट पु० १ मनुष्यांचा किं० पदार्थांचा समुदाय. २ कांहीं विशिष्ट कार्यार्थ जुळलेल्या माणसांची जूट. ३ कांहीं विशिष्ट तत्त्वावर केलेल्या वर्गीकरणांतील एक एक भाग. ४ ठशीव रीतीची रचना, किं० मांडणी (शिपायी, जनावरें, पदार्थ, इ०ची). ५ सोनें, चांदी, इ०ची लगड. ६ एकत्र बांधलेल्या किं० मांड-लेल्या पदार्थांचा संच.

गट पु० कांहीं खाद्य किं० पेय पदार्थ गिळतेसमयीं कंठांतून निघतो तो ध्वनिविशेष. ॐ **गट करणें** १ गिळून टाकणें. २ दुसऱ्याचा पैसा किं० कांहीं पदार्थ आपल्या हातीं आला असतां तो अप्रामाणिकपणानें लाटणें किं० दाबून ठेवणें; दुसऱ्याचा पदार्थ लबाडीनें मिळवून जिरविणें. **गटकन**

गटगटां, गटांगटा गट् असा आवाज होईल अशा रीतीनें.

गटकाविणें स० क्रि० वर ' गट करणें ' पहा.

गटंगळी, गटगळी, गटांगळी स्त्री० १ पाण्यांत पडलेल्या माणसाची धडपड; गचकळी; डुबकी. २ कोणत्याही कामीं केलेला शिकस्तीचा प्रयत्न.

गटगट, गटगटां क्रि० वि० गटगट असा आवाज करून (खाणें, पिणें).

गटगटणें अ० क्रि० गटगट असा आवाज करणें (शिजत असलेला भात, भाजी, इ० नीं).

गटगटीत वि० १ मोठे आणि तेजस्वी (डोळे). २ लटपटीत, अधू (टेबल, खुर्ची, इ०).

गटगिळ्या, गटगीळ वि० दुसऱ्याच्या पैशाचा किं० कोणत्याही वस्तूचा लबाडीनें अपहार करणारा.

गटगोळा, गट्ट गोळा पु० मोठेमोठे घास घेऊन खाणें.

गटण न०, स्त्री० (संगीतांत) मात्रांचें प्रमाण.

गटर, गटार [इं० गटर्] न० मोरीचें किं० पावसाचें पाणी वाहावयासाठीं केलेला पाट (बांधून काढलेला किं० न काढलेला). ॐ**गटार बातमी स्त्री०** फारशी विश्वसनीय नव्हे अशी बातमी. **गटारयंत्र न०** १ गमतीखातर किं० दुष्टपणानें किं० पैसे मिळविण्यासाठीं जो मनुष्य समाजांत खोट्या बातम्या प्रसृत करतो तो. २ खोट्या बातम्या प्रसृत करण्याचा धंदा. ३ हा धंदा करणारा इसम किं० ह्या धंद्याचें लोक जेथें जमतात तें ठिकाण. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक ले० १०५२ पहा.

गटाणा पु० गपागप खाणें, खाऊन टाकणें (करणें). **पु०** लठ्ठ आणि फोपशा किं० थिल-थिलीत माणूस. ह्या अर्थी ' गट्टंगा, ' ' गट्टणा (–ना) ' हेही शब्द प्रचलित आहेत.

गटोळा गोटोळा, गुटुळा वि० वाटोळा; वाटोळा आणि जड.

गट्ट क्रि० वि० गट्ट असा आवाज करून.

गट्ट पु० वर ' गट ' पहा.

गट्टी स्त्री० १ दृढ मैत्री; जीवश्चकंठश्च मैत्री. २ लहानसर गठ्ठा. ३ टोळी (माणसांची).

गठडी [हिं०] स्त्री० १ लहानसें गांठोडें; पुर्चुंडी. २ गुप्तपणें ठेविलेलें एकाद्याच्या द्रव्य; एकाद्याचें

जवळचा गुप्त ऐवज; उ० आण्णाराव नोकरीची खटपट कशाला करतील ? त्यांना मामाची गठडी मिळावयाची आहे ना ? ॐएकाद्याची गठडी होणें (किं० वळणें) तो भीतीनें, आश्चर्यानें, किं० आजारानें, हातापायांचें चलनवलन करण्यास असमर्थ होणें.

गठडें न० १ लहानसें गांठोडें. २ गुप्तपणें बाळगून ठेविलेलें द्रव्य, दागिने, इ०.

गठण स्त्री०, न० १ (संगीतांत) मात्रांचें प्रमाण.२मृदंग वाजविण्यांतील एक प्रकार. ॐ**गठण गांठणें, गठणास आणणें** आपल्या हेतूला अनुकूल किं० अनुरूप करून घेणें. **गठणास येणें** आपल्या उद्देशाला अनुरूप होणें किं० अरूणें.

गठली, गठरी स्त्री० वर ' गठडी ' पहा.

गंठीखोड पु० भामट्या.

गठीछोड, गट्टीछोंड, गंठीछोड पु० अत्यंत कृपण माणूस.

गठोळी स्त्री० लहानसें गांठोडें.

गट्ठ वि० घट्ट आणि मजबूद (शरीर किं०गात्र).

गट्ठा पु० १ कापूस, चिरगुटें, इ० चें आटोपसरपणें बांधलेलें ओझें; बस्ता. २ घट्ट झालेला पदार्थ (दहीं, रातांबेल, इ०). ३ पैसा, ऐवज. ४ पखवाजाच्या वाद्या घट्ट करावयासाठीं घातलेल्या आठ गंडेच्या ह्य० लाकडाचे वाटोळे तुकडे.

गट्ठी स्त्री० १ लहान गट्ठा; लहानसर बस्ता किं० ओझें. २ गुप्त द्रव्य. ॐ **गट्ठीचोर** पु० अट्टल चोर; बिलंदर भामटा. **गट्ठीजोड** वि० द्रव्याच्या पुंजुंडीला गांठीवर गांठी मारणारा म्ह० अत्यंत कृपण किं० चिक्कू.

गंड [स०] पु० १ कानशील आणि गाल मिळून मुखाची एक बाजू. २ गाल. ३ हत्तीचें गंडस्थळ. ४ पुळी, फोड, गळूं. ५ गांठ. ६ शेंडा. ७ मूलाशय. ८ योद्धा. ९ बुडबुडा. १० विष्कंभादि सत्तावीस योगांतील दहावा योग. ११ रोगाचा, पावसाचा, वाऱ्याचा, इ० चा जोर, आवेश, किं० सपाटा. १२ गर्व, उर्मटपणा, रग, किं० ताठा (जिरणें, मोडणें, इ०). १३ कांहीं शब्दांच्या पुढें ' गंड ' हा शब्द तुच्छता दर्शविण्यासाठीं लावतात; उ० न्हावी, न्हावगंड; त्याचप्रमाणें तेलगंड, वाणगंड, जोसगंड, इ०.

गड [हिं०] पु० डोंगरावर बांधलेला किल्ला आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी,इ० ' हे पुस्तक ले० १३४८ पहा. ॐ **गड घेववेल पण वायको घेववणार नाहीं** गड जिंकून घेतां येईल पण परस्त्री जिंकून घेणें कठिण. **गडकरी** पु० गडावर नेमलेला अधिकारी. **गडघेणा** वि० कठिण, बिकट, जिकीरींचा. **गडनीस** पु० गडावर पैशाआडक्याचा हिशेब किं० जमाखर्च ठेवणारा अधिकारी. **गडनिविशी, गडनिशी** स्त्री० गडनीसाचा हुद्दा किं० काम.

गड स्त्री० अडचण, पंचाईत, कठिण प्रसंग.

गडका पु०, स्त्री०, **गडखी** स्त्री० १झाडाचीं फुलें, पानें, फळें, इ० तोडावयाची टोकाला आकडा असलेली लांब काठी. २ (तुच्छतेनें) उंच स्त्री.

गडखळ न० १ दुःसाध्य वस्तु,किल्ला,इ०. २ दुर्बोध मजकूर,श्लोक, बोलणें, इ०. ३ दुर्गम रस्ता, वाट, इ०. ४ घोटाळा, पेच, अडचण.

गडखी स्त्री० झाडावरील पानें, फुलें, इ० तोडावयाची लांब काठी,–जिच्या टोकाला अंकडा असतो.

गडखोल पु० घोड्याचा गळा.

गडगंच (–ज) वि०अघळपघळ पुरेल इतकें; राशीच्या राशींनीं मोजतां येण्याइतकें; उ० त्याच्याजवळ गडगंच पैसा आहे; उ० आमच्या घरांत गडगंच धान्य आहे. ॐ **आभाळ गडगंच भरणें** आभाळांत दाट ढग येऊन भूतलावर अंधेर पडणें. **गडगंच काळोख** निबिड अंधेर. **गडगंच (–ज) शहर (किं० देश)** भरभराटीच्या स्थितींतील किं० संपन्न लोकांच्या वसतीचें शहर (किं० देश).

गडगडणें अ० क्रि० गडगड असा आवाज करणें, (मेघ, आकाश, किं०अजीर्ण झालें असतां पोट, इ० नीं).

गडगडा वि० ओबड धोबड वाटोळा मोठा धोंडा; उ० हा गडगा गडगड्यांचा रचिलेला आहे.

गडगडाट पु०गडगड असा आवाज (मेघांचा, किं० अजीर्ण झालें असतां पोटांत होणारा.)

गडगने (–णे–) र पु०, न० एकाद्या कुटुंबांत लग्न, मुंज, इ० सारखें कांहीं मंगळ कार्य

व्हावयाचें असलें म्हणजे त्याच्या अगोदर त्या कुटुं-बांत जी मेजवानी करतात ती; अशा आनंदाच्या प्रसंगीं सोयरे धायरे किं० मित्रमंडळी त्या कुटुंबाला करतात ती मेजवानी. ह्या मेजवानीला ' केळवण ' असेंही म्हणतात.

गडगा (–घा) पु०, **गडगें** (–घें) न० एकावर एक दगड रचून केलेला ढीग, किं० भिंत; चिखल इ० चा उपयोग न करतां केलेली दगडाची रास किं० भिंत. [खड्डा.

गडगा, गटगा पु० ओबडधोबड आणि मोठा

गडगिळ्या, गडगीळ वि० दुसऱ्याचे पैसे किं० माल लाटणारा.

गडगूप पु० जोंधळ्याची एक जात.

गंडगुळ पुढें ' गळगुंड ' पहा.

गंडगोळ स्त्री० १ एक प्रकारची तोफ; उखळी तोफ; गरनाळ. २ लठ्ठ आणि ठेंगणा माणूस.

गडणी [म० गडी=मित्र] स्त्री० मैत्रिण; आपल्या भरवशाला पात्र अशी स्त्री; ' गडण ' असेंही ह्याच अर्थी रूप आहे.

गडणें पुढें ' गढणें ' पहा.

गडत (–द) वि० १ अतिघन किं० निबीड (अंधेर, झाडी, झोप, प्यालेल्या दारूचा अमल, सुस्ती,इ०). २ पूर्णपणें मग्न (अभ्यासांत किं०कांहीं कामांत). न० दाट किं० निबिड अंधेर, काळोखी (येणें,पडणें). ◈ **गडद होणें** अदृश्य होणें, नष्ट होणें, लुप्त होणें; विध्वस्त होणें, मृत होणें;

गडद न० खोल खड्डा.

गडदणें स० क्रि० जमीनींत (द्रव्यादि पुरून ठेवणें, दृष्टीआड करणें.)

गडदन, गरदन [फा०] न०,स्त्री०गळा,कंठ.

गडदर स्त्री०, **गडदरा** पु०खोल आणि ओबडधोबड खाच किं० खड्डा.

गडदा पु० पोट (तिरस्कारानें).

गडदू (–धू) वि० शरीरानें अगडबंब , लठ्ठ (माणूस किं० जनावर).

गडद् पु० १ पदार्थ चेपण्यासाठीं त्यावर ठेविलेला जड पदार्थ. २ फार मोठें ओझें. ३ (लाक्षणिक) आपले पूर्वज किं०आपल्या पूर्वीचे आपल्या कामावरचे अधिकारी यांनीं रूढ केलेली किं० त्यांनीं चालू ठेविलेली चाल,पैशाची देणगी, इ०,– जी आपण चालू ठेवणें आपलें कर्तव्य आहे.

गडप (–ब) वि० १ अदृश्य; न दिसेसा; उ० आम्हाला पाहातांच तो वाघ झाडीमध्यें गडप झाला.२खर्चून किं०खाऊन टाकलेला;पत्ता न लागेल अशा रीतीनें एकादा पदार्थ नाहींसा केलेला किं० लपविलेला; उ० त्या कारकुनानें रामभाऊंचे पन्नास रुपये गडप केले; उ० आम्हीं तीघांनीं दोन शेर फोडणीचे पोहे तेव्हांच गडप केले.

गडबड स्त्री० १ गोंगाट; अनेक प्रकारच्या ध्वनींचें मिश्रण. २ घोटाळा, अव्यवस्था, गोंधळ. ३ चित्ताची व्यग्रता; कांहीं काम न सुचेल अशी चित्ताची स्थिति. ४ अनेक कामें एकदम करण्याचें अंगावर पडल्याकारणानें होते ती धांदल. ६ चोर, दरोडेखोर, इ०चा उपद्रव एकाद्या गांवीं झाल्यानें लोकांची होते ती अस्वस्थता; घाबरेपणाची स्थिति. ◈ **गडबड्या** पु० चंचल स्वभावाचा; लगबग करणारा;गडबड करणारा; धांदल्या.

गडबड सडबड स्त्री० १ फार मोठी गडबड. २ गडबडविडबड. **गडबड गुंडा** पु० १ घाईघाईनें किं० कांहीं भाग वगळून केलेलें एकादें काम किं० असें काम करण्याचा प्रकार. २ मानभावी पंथाच्या लोकांतील लग्नाचा विधि. ३ जमाखर्च, हिशेब, इ०मध्यें लबाडीची रचना किं० मांडणी; श्रोत्यांच्या मनांत घोटाळा उत्पन्न होईल किंवा कांहीं गोष्टींकडे त्यांचें लक्ष्य जाणार नाहीं अशा रीतीनें एकादी हकीगत सांगण्याचा प्रकार.

गडबडणें अ० क्रि० १ घोटाळ्यांत पडणें. २ काय करावें तें न सुचण्याच्या स्थितींत पडणें किं० असणें; व्यग्रचित्त होणें. ३ अव्यवस्थित होणें; अव्यवस्थेच्या स्थितींत पडणें किं० असणें. ४ एकदम कांहीं संकट किं० अडचण किं० विघ्न उपस्थित झाल्यामुळें हताश आणि निरुत्साह होणें. ५ घाबरून जाणें. ६ गडगड किं० ठणठण असा आवाज करीत करीत एकादा पदार्थ उलटा सुलटा होत होत दूर जाणें; घरंगळत जाणें. ७ कुशीवरून जमीनीवर लोळणें.

गडबडविणें स० क्रि० १ घाईघाईनें उरकून टाकणें; कसेंबसें करणें. २ घोटाळ्यांत घालणें किं० पाडणें.

गडबडां क्रि० वि० १ जमीनीवर एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर (लोळणें). २ आवेशानें, जोरानें. ३ घाईघाईनें.

गडबडाट पु० १ गडबड असा आवाज. २ फार मोठा घोटाळा; गोंधळ; अव्यवस्था. ३ मोठमोठ्यानें बोलण्याचा आवाज. ४ कोणताही पुष्कळ वेळ चाललेला मोठा आवाज किं० असा मिश्र आवाज.

गंडभेर, गंडभैरव, गंडभैरी पु० एक प्राणी.

गंडमाळा स्त्री० मानेला किं० गळ्याला गळवांसारखे मांसाचे उंचवटे ज्या रोगानें उत्पन्न होतात तो रोग.

गंडरी, गंडेरी स्त्री० १ सोललेल्या उसाचें दंडगोलाकार जे तुकडे ते प्रत्येक; सोललेल्या उसाच्या उभ्या चिरफळ्या करून जे तुकडे करतात त्यांना ' करवे ' म्हणतात. २ लुगडें म्हणून ज्याचा उपयोग करावयाचा त्या कापडावर केलेली खूण. अशा खुणेचें जें कापड त्याला ' गंडरीदार ' म्हणतात. ३ लाकूड, धातूची सळई, इ०चा तुकडा.

गडवा पु० जेवावयाच्या वेळीं घ्यावयाचें पाणी ज्या मोठ्या धातूच्या पात्रांतून ओतून लहान भांड्यांत घेतात तें पात्र. तें कांहीं विशिष्ट आकाराचें असून तें बहुधा तांबें ह्या धातूचें असतें; त्याला ' तांब्या ' असें म्हणतात.

गडसंध(-द) [**म०** गड+संधि] **स्त्री०** १ जरूरी, गरज, निकड; उ० मला चार रुपायांची गडसंध आहे. २ घाईची वेळ; गडबडीचा प्रसंग; उ० हल्लीं लग्नाची गडसंध आहे; तुझें काम मला सध्यां पथकरतां येणार नाहीं. ३ अडचणीचें, धोक्याचें, किं० भयाचें ठिकाण; उ० ही एवढी पांच कोशांची गडसंध ओलांडून मग आपण फराळ करावयाला बसूं. ' गडसंड ' असेंही ह्या शब्दाचें रूप प्रचलित आहे. [कानशीलं.

गंडस्थळ [**सं०** गंड+स्थळ] **न०** हत्तीचें

गंडा पु० १ चार वस्तूचा संच किं० समुदाय; चार कवड्या किं० चार पैसे. २ गवई, तबलजी, नर्तक, इ० धंदेवाले लोक आपल्या चेल्यांना शिकवूं लागण्याच्या अगोदर त्यांच्या मनगटाला बांधतात तो दोरा, (बांधणें, घालणें, इ०); ह्या दोऱ्याला ' गंडादोरा, ' 'गंडानाडा' असेंही म्हणतात. ३ घोड्याच्या गळ्यांत शोभेसाठीं बांधतात ती काळ्या सुताची आणि विशेष प्रकारें वळलेली दोरी. हिला ' गंडापट्टा ' असेंही म्हणतात. ४ भूतपिशाचादिकांच्या उपद्रवाच्या निरसनार्थ मंतरलेला दोरा हातांत बांधतात तो. ॐ**एकाद्याला गंडा घालणें** (किं० **चढविणें**) त्याला फसविणें; उ० त्या दुकानदारानें मला चार आण्याला गंडा घातला. **एकाद्याला गंडा बांधणें** १ त्याला शिष्य करून घेणें. २ त्याला आपल्या मंडळींत अंतर्भूत करून घेणें.

गडाडणें अ० क्रि० १ (मेघ, आकाश, इ० कांतून) गर्जना होणें; (मेघ, आकाश, इ०नीं) गर्जणें. २ मरणें; उ० सत्याण्णव सालच्या प्लेगांत कुशाबा गडाडला. ३ बडतर्फ केला जाणें; हाकलून दिला जाणें. ४ (बंड, दंगा, इ०) चिरडून टाकलें जाणें.

गंडांत पु०, गंडांतर न० अपमृत्यु किं० कोणतेंही मोठें संकट,—ज्यावर आपली नियंत्रणा चालत नाहीं; (**क्रि०** येणें, टळणें, इ०).

गंडाला पु० १ ओबडधोबड खड्डा किं० खळगा. २ कठिण, जिकीरीचें, किं० घोटाळ्याचें काम.

गडाविणें [**म०**गडी] **स० क्रि०** (एकाद्याला) आपल्या इच्छेला अनुकूल करून घेणें; त्याचें मन वळविणें (आपल्या कृत्यांत सामील होण्याला). ह्याचा वाईट संबंधानेंच उपयोग केला जातो.

गंडिया पु० १ नपुंसक, षंढ. २ पराक्रमशून्य माणूस; कर्तृत्वहीन मनुष्य. ३ पुरुषाला शिवीं-घावयाचा हा शब्द आहे; उ० अरे जा गंडिया, तुझी काय मला भीति ?

गंडी स्त्री० पाणी पिण्याचें कांहीं विशिष्ट घाटाचें लहान पात्र; गिंडी.

गडी पु० १ दिवसाच्या मजुरीनें किं० महिन्याच्या पगारानें आपलें काम करावयासाठीं ठेविलेला नोकर. ३ बारीकसारीक कामें करावयासाठीं ठेविलेला नोकर. २ बारीकसारीक कामें करावयासाठीं आपल्या हाताखालीं घेतलेला इसम. ४ त्याच धंद्यांतील, संस्थेंतील, वर्गांतील, किं० कामांतील कोणीही दुसरा जो इसम तो आपला गडी. ५ एकाद्या जातींतील त्या जातीच्या गुणांनीं युक्त इसम; उ० ब्राह्मण गडी, माळी गडी, इ०. ६ इसम (सामान्यतः); उ० कारकून गडी, मुशाफर गडी, पुणेकर गडी, शिपाई गडी, इ०. ७ एकाद्या खेळांतील जोडीदार. ८ भाजीपाला इ०

ची जुडी किं० गठ्ठा. ९ मैत्री, संगत; उ० मी तुझी गडी फू करतों.

गडी स्त्री० लहानसर मुईकोट किल्ला. वर ' गड ' पहा.

गडीगंज वि० गडगंज; विपुल.

गडू पु० लहान गडवा. वर ' गडवा ' पहा.

गंडूष [सं०] पु० १ तोंडांत घेतलेलें पाणी (चूळ भरावयासाठीं किं० तोंड स्वच्छ करण्यासाठीं). २ (पाणी, इ०चा) घोट. ३ मद्यविशेष. ४ हत्तीच्या सोंडेचें टोक.

गडेकरी पु० हत्तीच्या पुढें भाला हातांत घेऊन चालतो तो इसम.

गंडेरी स्त्री० सोललेल्या उसाचा तुकडा (दंडगोलाच्या आकाराचा). **वि०** लुगड्याच्या पदराचा एक प्रकार.

गड्डा पु० १ कांदा, मुळा, आलें, इ० चा जमीनींतील भाग. २ कोबी, इ० पालेभाजीच्या पानांचा घट्ट समुदाय; ३ कोणत्याही पदार्थांच्या कणांचा घट्ट झालेला समुदाय किं० गोटा किं० गोळा. ४ दुसऱ्या ठिकाणीं लावावयासाठीं उपटलेल्या झाडाच्या मुळांचा मातीनें लडबडलेला झुबका. ५ नदीचें पाणी विपुल नसतां पात्रांत उत्पन्न झालेला कोरडा भाग (बेटासारखा). ६ पदार्थांचा सारभूत भाग; उ० त्या जिंदगीचा गड्डा विसुभाऊंच्या हातांत आला.

गड्डालिका [सं० गद्य+आवली] स्त्री० १ नाना प्रकारच्या अलंकारांनीं सजविलेला मोठा गद्यलेख. २ लांबच लांब हकीगत; कंटाळवाणी हकीगत; चऱ्हाट (क्रि० लावणें).

गड्डी स्त्री० १ भाजीपाल्याची जुडी. २ दहा दस्ते(कागदाचे). ३ लहान गड किं०डोंगरी किल्ला.

गढ वि० लठ्ठ आणि ठेंगणा माणूस.

गंड्या पु० कर्तृत्वहीन माणूस; नादान मनुष्य. ❀ **गांवचा गंडया तो सासूचा देशपांड्या** ज्याला गावांत कोठेंही मान मिळत नाहीं त्याला सासुरवाडीस मान मिळतोच मिळतो; हाडाचे भित्रे लोक दुबळ्या माणसापुढें शूरत्वाचा टेंभा मिरवितात.

गढणें अ० क्रि० वाचनांत, विचारांत, किं० दुसऱ्या कोणत्याही कामांत निमग्न होऊन जाणें किं० तल्लीन होणें.

गढळ वि० रद्दी, टाकाऊ, बेढब, कुरूप, भिकार (जमीन, माणूस, जनावर, पदार्थ, इ०).

गंढारणें अ० क्रि० घराची किं० विहिरीची भिंत ढासळणें किं० कोसळणें.

गंढाळणें अ० क्रि० १ फसणें, नासणें, बिघडणें, अंगावर येणें (बेत, काम, युक्ति, शेत, व्यापार, इ०). २ भीतीनें किं० संशयानें माघार खाणें; कच खाणें; कचरणें.

गढुळणें अ० क्रि० १ गढूळ होणें. २ (मन) शंकित होणें; कोणेकाबद्दल कांहीं किल्मिषानें व्याप्त होणें. ३(देश, शहर, इ०तील लोकांचीं मनें)अधिकाऱ्यां विरुद्ध संतप्त होणें. **स० क्रि०** १ (पाणी, इ०) गढूळ करणें. २एकाद्या माणसासंबंधानें कोणेकाच्या मनांत वाईट ग्रह उत्पन्न करणें.

गढुल वि० १ चिखलट (पाणी, इ०). २ शंकित(होणें);प्रतिकुल ग्रहानें युक्त(मन). ३अस्वस्थ (चित्त). ४ असंतुष्ट (देश किं० रयत). ५ लबाडीचा (हिशेब). ६ मिश्र बीजाचा (माणूस किं० जात).

गढेकरी पु० डोंगरी किल्ल्यावरचा शिपायी.

गण [सं०] पु० १ कळप, समुदाय; उ० पिशाचगणामध्यें वेताळ श्रेष्ट २ जात, वर्ग. ३ सेवक, भक्त, इ० चा समूह. ४ शंकराचे सेवक, प्रमथादिक. ५ परिवार. ६ (व्याकरण) समानधर्मी शब्दांचा समुह; उ० सकर्मक क्रियापदांना भूतकाळीं कर्मणि प्रयोग होतो, याला पढ गणांतील धातु अपवाद आहेत;जसें रामानें भिंत बांधली, रामा पुरुषसूक्त शिकला. ७ (फलज्योतिषांत) जन्मनक्षत्रानुरोधानें देव, मनुष्य,आणि राक्षस,असे तीन जे वर्ग ते प्रत्येक. ८विचार; अमुक गोष्ट करावयाची किं० न करावयाची यासंबंधानें एकाद्याचा विचार, बेत, किं० अभिप्राय; उ० आमच्या पुतण्याला बळवंतराव आपली मुलगी द्यावयाला कबूल आहेत किं०नाहींत हा गण काढून या. ९पद्यरचनेमध्यें तीन तीन अक्षरांचें किं०चार चार मात्राचें जे गठ केलेले आहेत ते प्रत्येक;उ०मालिनी वृत्तांत नगण, नगण, मगण, यगण, यगण,असे पांच गण येतात. १० मुख्य पिशाचाचें सेवक जे समीपस्थ इतर

पिशाच ते प्रत्येक. ११ देवांच्या उत्सवांत कोणी चोपदार व्हावें, कोणी पालखीला लागावें, कोणी चवरी घ्यावी, म्हणून नियुक्त जे इसम ते प्रत्येक. १२ तमासगीर लोक तमाशाच्या सुरवातीला म्हणतात ती देवाच्या स्तुतिपर कविता. ꠳ **गणमैत्री** **स्त्री०** देवगण, मनुष्यगण, आणि राक्षस गण, असे जे तीन गण ज्योतिषशास्त्रांत सांगितले आहेत त्यांची जी मैत्री किं० जुळणी ती,—जी दोन माणसांचा एक गण आला असतां असतें; उ० या मुलाची आणि त्या मुलीची गणमैत्री येते कीं नाहीं तें पाहावयाचें आहे. **गणवैर न०**गणमैत्रीचा अभाव; वर ' गणमैत्री ' पहा. **गणशः क्रि० वि०** एक एक गण ह्म० वर्ग किं० टोळी किं०समूह घेऊन. **गणसवाशिण स्त्री०**पाटील किं०म्हेतर किं०चौधुला ह्यांची पत्नी,—सार्वजनिक भोजनादि प्रसंगीं पहिलें आमंत्रण जिला करावें लागतें. २ सार्वजनिक प्रसंगीं गण म्हणून आमंत्रिला कोणीही पुरुष आणि सवाशिण म्हणून आमंत्रिलेली कोणीही स्त्री. **गणद्रव्य न०** सार्वजनिक पैसा किं० माल. **गण नमणें** कांहीं एका कार्याला आरंभ करणें. **गणगौर स्त्री०** गौर आणि पार्वती यांच्या मूर्तींची मारवाडी लोकांत चैत्रांत काढतात ती मिरवणूक. **गणगोत** [**सं०** गण+गोत्र] **न०** एकाद्याचे भाऊबंद, सोयरे, धायरे इ० समुच्चयाचें; आप्त; नातेवाईक.

गणक [**सं०**] **पु०** १ ज्योतिषी. २ पंचांग रचिणारा. ३ कारकून.

गणंग पु०,**गणग(-गु-)ट न०** १ जोंधळे,इ० च्या लाह्या करीत असतां जे दाणे उमलून त्यांच्या लाह्या होत नाहींत ते दाणे.२ (लाक्षणिक) उपदेश किं० शिक्षणाचा ज्याच्यावर कांहीं परिणाम होत नाहीं असा माणूस.

गणणें [**सं०** गण्=मोजणें] **स० क्रि०** १ मोजणें, मापणें; उ० तिथि गणा, मास दुणा, त्यांत एक उणा, तें नक्षत्र जाणा. २ महत्वाचें समजणें; ०ला किंमत देणें, मनावर घेणें; पूज्य मानणें; उ० तो आतांपासूनच बापाचें बोलणें गणीनासा झाला आहे.

गणतर स्त्री०तगरीच्या फुलझाडाची एक जात. **न०** ह्या तगरीचें फूल.

गणती [**सं०** गण्=मोजणें] **स्त्री०**१ संख्या. २ मोजदाद; कांहीं पदार्थ मोजून त्याचें निघालें किं० ठरलें तें परिमाण; मोजणी.३ किंमत; महत्व; पूज्यबुद्धि; उ० जो देवाला भीत नाहीं त्याला मनुष्याची काय गणती ? उ० मला रामभाऊची काय गणती ? मी त्याला हां हां म्हणतां उडवून देईन.

गणती [**सं०** गण्=मोजणें] **क्रि० वि०** किंवा **श० यो० अ०** गणिले असतां; गणून; गणतीनें; गणिलें असतां शेकडों मापें, परिमाणें, इ०. भरतील अशा रीतीनें; उ० घाटांत खंडोगणती ब्रह्मींचीं झाडें तुम्हाला दिसतील. असेच इतर शब्द सालोगणती, महिनोगणती, लक्षोगणती.

गणन [**सं०** गण्=मोजणें] **न०** १ गणणें, मोजणें, मापणें, किं० ह्या क्रियेचें फळ, किं० ह्या क्रियेनें ठरलें तें परिमाण, संख्या, मोजदाद, इ०.

गणना [**सं०** गण्=मोजणें] **स्त्री०** १ मोजणी; संख्या; हिशेब; गणती. २ अमुक माणूस किं० पदार्थ अमुक योग्यतेचा किं० लायकीचा किं० किंमतीचा आहे असा ग्रह. ३ महत्व; योग्यता; लायकी.

गणनीय [**सं०** गण्=मोजणें] **वि०** गणावयास योग्य; हिशेबात किं० विचारांत घेण्याच्या लायकीचा किं० महत्वाचा किं० योग्यतेचा.

गणपति [**सं०** गण+पति] **पु०** गणाचा पति किं० मुख्य. २ शंकर आणि पार्वती यांचा पुत्र,—मंगल कार्याच्या आरंभीं ज्याची पूजा करतात. ३ काहिलींतून गूळ ओतून काढल्यावर गणपतीच्या नांवानें त्याचा जो अंश बाजूला काढून ठेवितात तो. हा गुरवाचा हक्क म्हणून त्याला द्यावयाचा असतो. ४(लाक्षणिक) ढेरपोटया.꠳**गणपतीचें केलें** स्त्री गरोदर राहिली. **गणपतिपूजन न०** मंगल कार्यारंभीं करतात तें गणपतीचे पूजन किं० चिंतन.

गणा पु० १ कोष्टी लोक कांडी करावयासाठीं जो कडब्याच्या ताटाचा तुकडा घेतात तो. २ तव्याला तेल लावून करतात ती भाकरी.

गणिका [**सं०**] **स्त्री०** १ वेश्या; वारस्त्री. २ कलावंतीण.

गणिकारिका [**सं०**] **स्त्री०** नरवेल.

गणित [**सं०** गण्=मोजणें] **वि०** गणलेलें; मोजलेलें. **न०** १ अंकांनीं किं० अक्षरांनीं हिशेब करणें किं० त्यासंबंधाचें शास्त्र; उ० अंकगणित, बीजगणित, इ०.२ (मुलांच्या भाषेंत) उदाहरण (गणिताचें). ॐ **गणिती पु०** गणित शास्त्रांत निष्णात इसम. **गणित श्रेढी स्त्री०** ज्या श्रेढींतील पदें कांहीं विशिष्ट अंतरानें कमी होत जातात किं० अधिक होत जातात ती श्रेढी.

गणिमी [**म०** गणीम, **अ०** गनीम्=शत्रु] **स्त्री०** १ शत्रुत्व, वैर (करणें, मांडणें, चालविणें). २ बंड, दंगा, राजाविरुद्ध प्रजाजनानें केलेली असंतोषव्यंजक चळवळ.

गणीक, गणीक श० यो० अ० प्रत्येकाला; उ० माणसागणिक मूठ मूठ बत्तासे वाट.

गणेश [**सं०** गण+ईश] **पु०** १ गणांचा पति; गणांचा स्वामी. २ मंगल कार्यारंभीं पूजितात किं० चिंतितात तो देव; शंकर आणि पार्वती यांचा पुत्र; गजानन. ॐ **गणेशचतुर्थी स्त्री०** भाद्रपद महिन्याच्या शुक्लपक्षांतील चतुर्थी ही तिथि; ह्या दिवशीं मातीच्या गणपतीची पूजा करून मोदक हें पक्वान्न केलें जातें; ह्या दिवशीं रात्रीं चंद्र पाहिला असतां चोरीचा आळ येतो अशी समजूत आहे. **गणेशटोपी स्त्री०** एखाद्या मुलाला बडविण्याचे पूर्वीं मुलें त्याची दृष्टि बंद करण्यासाठीं त्याच्या डोक्यावर जें चिरगुट टाकतात तें (आपणाला कोण मारीत आहे हें त्याला दिसूं नये म्हणून; **क्रि०** घालणें). **एखाद्याला गणेशटोपी घालणें** त्याला फसविणें. ' एखाद्याला टोपी घालणें ' असाही ह्याच अर्थीं प्रयोग आहे. **गणेशपट्टी स्त्री०** गृहाच्या पुढच्या दरवाज्याच्या चौकटीवर गणपतीचें चित्र कोरण्यासाठीं जी आडवी फळी मारलेली असते ती. **गणेशपूजा स्त्री०** १ गणपतीची पूजा. २ कथा इ० प्रसंगीं बत्तासे इ० खिरापत वाटतात ती. **गणेशवेल स्त्री०** एक सुंदर फुलांचा वेल; त्याला ' आकाश वेल ' असें दुसरें नांव आहे.

गण्या पु० १ मासे खाणारा आणि सुंदर पिसाऱ्याचा एक पक्षिविशेष. २ कोष्टी लोक कांडी करावयासाठीं जो जोंधळ्याच्या ताटाचा किं० वेताचा तुकडा घेतात तो; गणा.

गत [**सं०**] **वि०** १ गेलेला. २ मागला; उ० गतवर्ष, गतसाल, इ०. ३ मृत, मेलेला. ४ नष्ट झालेला; उ० गतलज्ज म्ह० निर्लज्ज; गतशंक म्ह० शंका नाहीं ज्याला असा; गतधैर्य म्ह० गळालें आहे धैर्य ज्याचें असा; इ०. ५ (ज्योतिष) भोगिलेला; आक्रान्त, (ज्याच्या उलट ' एष्य '). ॐ**गत होणें** मरणें. **गतकथा स्त्री०** जुनी झालेली गोष्ट किं० बाबत किं० प्रकरण. **गतकाळ पु०** पुरातन काळ; प्राचीन काळ. **गतकुळी, गतकूळ वि०** १ सोडून दिलेली; जिचा मालक जिच्यावरचा हक्क सोडून निघून गेला आहे अशी (जमीन, इ०). २ ज्या जमीनीचा किं० घरदार इ०चा मालक कोणाला ठाऊक नाहीं अशी (जमीन किं० असें घरदार इ०). **गत गोष्ट स्त्री०** १ होऊन गेलेली गोष्ट; जुनी गोष्ट. २जी गोष्ट परत येऊं शकत नाहीं ती गोष्ट; उ०गत गोष्टीची वाटाघाट कशाला ? सध्यां आपल्यापुढें जें कर्तव्य आहे त्याचा विचार करूं. **गतधवा, गतभर्तृका स्त्री०** विधवा. **गतप्राण वि०** मृत; मेलेला. **गतवयस्क वि०** ज्याचें उमेदीचें किं० अवसानाचें वय गेलें आहे असा; म्हातारा. **गतागत न०** जाणें आणि येणें; येरझारा. **गतानुगत न०** परंपरा पाळणें; अंध अनुकरण. **गतानुगतिक वि०** अंध श्रद्धेनें अनुकरण करणारा. **गतागत न०** येरझारा. २ जागेची अदलाबदल. ३ मागला पुढला वृत्तान्त. **गतार्तवा स्त्री०** १ वृद्ध स्त्री; जिचा विटाळ गेला आहे अशी स्त्री. २ वांझ. **गतायु वि०** १ म्हातारा. २ मृत. **गतार्थ वि०** १ जाणलेलें. २ जें शब्दांनीं सांगण्याची जरूरी नाहीं असें; कबूल किं० मान्य असलेलें. ३ करून टाकलेलें. ४ गरीबीस आलेला.

गत [**सं०** गति] **स्त्री०** पुढें ' गति ' पहा.

गतक न० १ लांबलचक आणि कंटाळवाणी कल्पित गोष्ट किं० वृत्तान्त; चऱ्हाट (लावणें, सुरूं होणें, इ०). २ सारभूत विधान. ३ थोडकें दुःख झालें असतां तें फुगवून सांगण्याचा प्रकार; कांगाव; (**क्रि०** घेणें, करणें). ४ दुसऱ्याला घाबरविण्यासाठीं केलेलें भाषण किं० सांगितलेली अतिशयोक्तिमिश्रित हकीगत. ५ दुसऱ्याच्या भाषणाची जी नक्कल ती; उ० त्याणें एक गतक घातलें

तर तुम्हा सर्वांचीं पोटें हसतां हसतां फुटतील. ६ ढोंग, मिष (घेणें, करणें). ७ हसविणारी गोष्ट किं० हकीगत.

गतका, गदका **पु०** १धामाधूमपणाची स्थिति; उ० पर्वतीला जाऊन आलों तों माझ्या अंगांचा गतका झाला. २ उन्हाचा ताप; उकाडा; ऊष्मा. ३ तापत असलेल्या पाणी, इ०ची उकळी किं० बुडबुडे येण्याची स्थिति (येणें). ४ तीव्र मनोविकाराचा उद्रेक. ५ गळवाला लागलेला तीव्र ठणका. ॐ**गतकाळा(–ळ्या)** **वि०** १ कांगावखोर; अगदीं थोडा मार दिला तरी जो वेदनेचें मिष करून बोंबलत सुटतो तो. २ दारिद्र्याचें ढोंग करणारा. ३ वेडाचें ढोंग करतो तो. **गतक्या** **वि०** ' गतकाळा 'चे १ आणि २ हे अर्थ पहा. २ विनोदी;थट्टेखोर.

गति [**सं०**] **स्त्री०** १ चालणें, गमन. २ हालणें. ३ शिरकाव.४ स्थिति, अवस्था. (चांगल्या अर्थी);दुर्दशा. ५ मार्ग, रस्ता.६उपाय, इलाज. ७ रक्षण करणारा; आश्रयदाता. ८ जाण्याचें ठिकाण. ९ दैव; कर्मफळ.१० पुनर्जन्म. ११ स्वर्गप्राप्ति. १२ तत्त्व, सिद्धान्त. १३ परिणाम, फल. १४ ग्रहाचा चोवीस तासांतला प्रवास. १५ पोच, पल्ला, आटोका; उ० बुद्धीची गति. १६ पिशाच्च किं० भूत याची मुक्तता.१७ मृदंग इ० वाजविण्याच्या किं० नृत्याच्या ज्या तालानुसार रीति त्या प्रत्येक; उ० त्याणें ख्यालाची गति वाजविली. ॐ **गतीवर येणें, गतीस येणें** एखाद्या माणसाचें खरें उग्र किं० भीषण स्वरूप प्रगट होणें. **गतीवर वातलेला** (किं० **पडलेला**) **वि०** आसन्नमरण झालेला; मरणोन्मुख झालेला. **गतिसामान्य** **न०** रोख, धोरण. **गत्यंतर** **न०** दुसरा मार्ग; इलाज; तोड. टीप १–' गति ' ह्या शब्दाचें तोकडें रूप ' गत ' होतें आणि ' गति ' चे सर्व अर्थ 'गत'-चे होतात. ' गतीनें ' याचें तोकडें रूप ' गत ' शब्दयोगी अव्ययाप्रमाणें किं० क्रियाविशेषणाप्रमाणें योजलें जातें: उ० रामाच्या गत ह्म० रामाप्रमाणें. टीप २ ' गत्या ' हें गतीचें तृतीयेचें एकवचन; उ० सहजगत्या ह्म० सहज रीतीनें; सहजासहजीं; स्वभाव गत्या म्ह० स्वभावानुसार;प्रारब्धगत्या म्ह० नशीबानें; इ०.

गंथडी [**सं०**गंगा+थडी (कांठ, बाजू)] **स्त्री०** गोदावरी नदीच्या कांठचा प्रदेश.

गथागोवा [**स०**गुंतणें+गोवणें]**पु०**घोटाळा; गुंतागुंत; पेचाची स्थिति. ' गथगोव ' **स्त्री०** ह्याच अर्थानें योजतात.

गद्क **पु०** १ उकळी (येणें). २ उकळत असलेल्या पदार्थाचा ध्वनि.

गदका **पु०** धामाधूमपणाची स्थिति. वर ' गतका ' पहा.

गद्गद **क्रि० वि०** गदगद किं० खदखद असा आवाज करून (हसणें) **स्त्री०** खाजविण्याची इच्छा; (**क्रि०** सुटणें); उ० खरजेला गदगद सुटली तरी खाजवूं नको.

गद्गदणें **अ० क्रि०** १ गदगद असा आवाज करणें;–चुलीवर तापत असलेल्या पाणी, इ० नीं. २ तीव्र उन्हानें किं० उष्ण हवेनें व्याकुळ होणें. ॐ **गद्गदून यण** कांहीं तीव्र मनोविकारानें बेफाम किं० व्याकुळ किं० आक्रांत होणें.

गद्गी **स्त्री०**तालमींतील एक आउत,कातड्यानें मढविलेली काठी जी हातांत धरून कांहीं विशिष्ट प्रकारें आपल्या अंगाभोंवतीं फिरवायाची असते.

गद्म **वि०** पर्जन्य गेल्यानंतर ज्यांत फार दिवस ओल राहातें असें (शेत).

गद्मणें, गद्मदणें **भा० क० क्रि०**उकाड्यानें व्याकुळ होणें; उ० मला आज अतिशय गदमत आहे.

गद्रणें **अ०क्रि०** १ फळ, गळूं इ० पिकावयाच्या स्थितीस येऊं लागणें. २ घामाघूम होणें; घामानें भिजणें.

गद (–ज–) रा, गद (–ज–) रेल **वि०** अर्धवट पिकलेलें किं० पिकावयाच्या स्थितीस आलेलें (विड्याचें पान).

गंद्लकी **स्त्री०**, **गंद्वल** **न०** १ बसावयाला बेतात त्या पाटाच्या फळीला खालच्या बाजूस जीं दोन दांडकीं (एक उजव्या बाजूस आणि एक डाव्या बाजूस) ठोकलेलीं असतात तीं प्रत्येक. २ अशींच दांडकीं जीं दार इ०ना ठोकलेलीं असतात तीं प्रत्येक.

गद्ळ **वि०** १ केरकचऱ्यानें मिश्रित (पाणी,

धान्य, तेल, तूप, इ०). २ बिघडलेलें;अव्यवस्थित झालेलें. ३ प्रक्षुब्ध,व्याकुळ (मन). न० १ केर-कचरा (पदार्थांत मिसळलेला). २ टाकाऊ पदार्थ किं० भाग. ३ अव्यवस्था, घोटाळा.

गदळणें स० क्रि० १ गढूळ करणें. २ अव्यवस्थित करणें. **अ० क्रि०** गढूळ किं० अव्यवस्थित होणें; केरकचरा मिसळून खराब होणें.

गदा [सं०] स्त्री० एक आयुधविशेष. ❀**गदाधर पु०** विष्णु. **गदाधर पु०** आवखऱ्याच्या घाटाचें पाणी पिण्याचें लहान भांडें.

गदारोळ, पु०, गदारोळी स्त्री० १ गर्जना, किंचाळी. २ गलबलाट, गोंगाट. ❀**गदारोळाचें हसणें** मोठमोठ्यानें ओरडून किं० किंचाळ्या फोडून किं० असभ्यपणानें हसणें.

गदेपदे, गद्देपद्दे पु० अ० व० टोल्याटोलवी; खोट्या सबबी सांगून लोकांना पैसे इ० देणें लांबणीवर टाकणें.

गद्देला पु० मोठा गादी.

गद्गद [सं०] वि० अडखळणारा. **पु०, न०** अस्पष्ट वाणी.

गद्दी [हिं० गादा=चिखल] स्त्री० १ नदीच्या कांठीं गाळ जमून होते ती जमीन,–जी फार सुपीक असते. २ उत्तम कसाचें भातशेत.

गद्देमल्हार पुढें ' गद्दा ' शब्दांत पहा.

गद्य [सं०] न० गण, माला, इ० नियम ज्याला लागू नाहींत अशी रचना; पद्यभिन्न रचना; उ० संस्कृतांतील बाणाची कादंबरी: उ० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची निबंधमाला; इ०. ❀**गद्यपद्यात्मक वि०** अंशत: गद्यरूप आणि अंशत: पद्यरूप असा (ग्रंथ० किं० रचना).❀**गद्यरूप, गद्यात्मक वि०** गद्य; गद्याच्या रूपांतील. **गद्यपद्य न०** लबाडी, कावा.

गंध [सं०] पु० १ वास. २ सुवास. ३ सुगंधी पदार्थ. ४ चंदनादिकांचें काष्ठ उगाळून काढतात जो देवांच्या मूर्ति इ०ना लावण्यासाठीं लेप तो (मराठींत ह्या अर्थीं नपुंसक लिंगी); अशा लेपानें कपाळ इ०वर केलेली आकृति.❀**गंध नसणें** अल्प प्रमाणांत देखील नसणें; उ० त्याला ज्योतिषाचा गंधही नाहीं (तो ज्योतिष मुळींच जाणत नाहीं); उ० माझ्या मनांत लबाडीचा गंधही नाहीं. **गंधमार्जार पु०** जवादी मांजर,–ज्याच्यापासून एकप्रकारचें सुगंधी द्रव्य मिळतें. **गंधपाषाण पु०** गंधक. **गंधाजीव पु०** गंधी, अत्तार. **गंधाढ्य न०** चंदन. **गंधद्विप पु०** १ उन्मत्त हत्ती. २ उत्तम हत्ती. **गंधरस पु०** रक्ताबोळ. **गंधवाह पु०** वारा, वायु.

गंधर्व [सं०] पु० १ देवांचा गवई. २ गाणारा. ३ घोडा. ❀**गंधर्वपुर, गंधर्वनगर न०** आकाशांत दिसणारी नगराची आकृति,–अशुभ चिन्ह. **गंधर्वविद्या स्त्री०, गंधर्ववेद पु०** संगीतशास्त्र (सामवेदाचा उपवेद). **गंधर्वविवाह पु०**प्रीतिविवाह. **गंधर्वगायन न०** सुस्वर गायन. **गंधर्वनगरासारखा वि०**क्षणभंगुर.**गंधर्वपूजा स्त्री०** कोणेकाला सन्मानानें आपल्या घरीं आमंत्रन आणून त्याला शिव्या देणें किं० बडवून काढणें. **गंधवार्ता स्त्री०** यत्किंचित् खबर, थोडा देखील सुगावा,–अकरणरूपी प्रयोग; उ० तुम्ही सांगतां त्या प्रसंगाची मला गंधवार्ताही नव्हती. **गंधाबेरोजा,गंधाबिरुजा पु०** सुरूच्या झाडाचा चीक. **गंधाक्षत (-ता) स्त्री०** १ गंध आणि त्यावर लाविलेल्या अक्षता. २ मैत्रीचा संबंध;स्नेहसंबंधाचें किं० घरोब्याचें दळणवळण; उ० ह्याची आणि त्याची गंधाक्षत होत नाहीं. **गंधाक्षतवर्जन न०** वर्ज्य संबंध; संबंधाला प्रतिबंध.

गंधक [सं०]पु० एक उपरस,–जो ज्वालाग्राही असतो.

गधडा पु० १ गाढव; गद्धा. २ अडाणी किं० मूर्ख माणूस.

गंधा त्रि०दुर्गंधीचा.❀**गंधानाला पु०**गांवांतील मोऱ्या ज्यांत सोडलेल्या असतात तो नाला. **गंधें पाणी न०** दुर्गंधियुक्त पाणी.

गंधार [सं० गांधार] पु० सप्तस्वरांतील तिसरा.

गंधी [सं० गंध] स्त्री० दुर्गंधी; उ० त्याच्या गळवाला गंधी सुटली आहे. **पु०** अत्तरें विकणारा.

गधुळणें अ० क्रि० गढूळ होणें. **स० क्रि०** गढूळ करणें.

गध्धा पु० १ गाढव. २ मूर्ख माणूस. ❀ ❀ **गध्यागाढव पु०** गांवाची मर्यादा दाखविणारा धोंडा.

गंध्या [सं० गंध] पु० १ अत्तरें करण्याचा

कि० विकण्याचा धंदा करतो तो. २ ज्याच्या अंगाला घाण येते तो माणूस.

गनिमाई [अ० गनीम्=शत्रु] १ **स्त्री०** शत्रुत्व. २ शत्रूची धाड.

गनिमात [फा० गईमत] **स्त्री०** खेर; चांगली गोष्ट; सुदैवाची गोष्ट; आनंदाची गोष्ट; उ० तूं माडा-वरून पडलास पण तुला मुळींच दुखापत झाली नाहीं ! मोठी गनिमातच झाली म्हणावयाची ?

गनीम [अ० गनीम्=शत्रु] **पु०** शत्रु; सार्व-जनिक किं० देशाचा शत्रु.

गप, गप्प स्त्री० १ अफवा; वार्ता. २ निरा-धार बातमी; उठविलेली बातमी; कंडी. ॐ**गप्पा छाटणें (मारणें, तासणें)** सुखदुःखाच्या किं० रिकामटेकड्या गोष्टी बोलणें; निरुपयोगी संभाषण करणें. **गप्प झोकणें** गमतीखातर कांहीं तरी खोटी गोष्ट सांगणें. **गपछप, गपसप, गपशप स्त्री०** गांवांतील किं० इकडच्या तिकडच्या बातम्या. **गप्पाष्टक न०** रिकामटेकड्या गोष्टी. **गप्पीदास पु०** १ खोट्या वार्ता पसरणारा. २ गमतीखातर बढाया मारणारा.

गप, गप्प वि० १ स्तब्ध; कांहीं न बोलतां बसलेला; मूक. २ अदृश्य; नजरेच्या टप्प्याच्या बाहेर गेलेला; दिसेनासा; उ० ह्या रानांत गाय शिरली ती मी पाहिली, पण आतां ती कोठें गप्प झाली कोण जाणें ! ॐ**गपचूप क्रि० वि०** कांहीं न बोलतां; मुकाट्यानें; स्तब्ध. ह्या शब्दाचीं गुपचीप, गुपचूप, गपचीप, इ० अन्य रूपें ह्याच अर्थानें योजिलीं जातात.

गपकन क्रि० वि० एकदम, अकस्मात, एका-एकीं (पडणें, बसणें, इ०).

गपगप, गपांगप, गपगपां क्रि० वि० आधाशाप्रमाणें किं० घाईघाईनें किं० नीट चर्वण न करतां (खाणें).

गपका पु० १ घाईनें तोंडांत टाकलेला किं० गिळलेला घास (**क्रि०** मारणें, घेणें, उचलणें). २ दिलेला किं० मिळालेला लांच. ३ हलक्या हातानें मारलेला धप्पा, रपाटा, किं० ठोसा.

गपाणा पु० चुरमुरे, लाह्या, इ० चा घेतलेला किं० तोंडांत भरलेला मोठा घास.

गपापणें अ० क्रि० बडबड करणें.

गपाप्या वि० चकाट्या पिटणारा.

गफलत [अ०] **स्त्री०** १ निष्काळजीपणा. २ चुकी; नजरचुक. ३ अव्यवस्था, घोटाळा. ४ निष्का-ळजीपणामुळें पदार्थ भलत्याच ठिकाणीं ठेवला जाणें आणि तो सांपडेनासा होणें. ॐ **गफलती (-त्या) वि०** निष्काळजीपणानें पदार्थ भलत्याच ठिकाणीं टाकणारा.

गफलतणें [वर 'गफलत' पहा] **स० क्रि०** १ भलत्याच ठिकाणीं टाकणें किं० ठेवणें. २ अव्यवस्थित करणें.

गबका पु० रट्टा, धप्पा, तडाखा.

गबगबणें अ० क्रि० १ पडसें किं० खोकला ह्यानें जर्जर होणें. २ डोळ्यांना पाणी येत राहाणें. ३ मांस भरल्यामुळें गाल इ० लठ्ठ होणें; उ० तुझ्या अंगावर मांस गबगबत आहे.

गबगबीत वि० १ लठ्ठ, फोफशा, मांसल. २ पुष्कळ गर आहे ज्यांत किं० ज्याला असें (फळ). ३ पुष्कळ पुरण आहे ज्यांत अशी (पोळी, करंजी, मोदक, इ०).

गबदू, गबदूल, गबदुला वि० १ लठ्ठ, फोफशा. २ मजबूत बांध्याचा. ३ धष्टपुष्ट (अंग) किं० धष्टपुष्ट अंगाचा (माणूस).

गबर, गब्बर [**हिं०**] **पु०, स्त्री०** १ एक प्रकारचें सोन्याचें नाणें. २ श्रीमंत किं० धनाढ्य माणूस.

गबरू [**हिं०** गभरु] **पु०** १ मजबूत आणि गोंडस बांध्याचा मुलगा. २ धनाढ्य माणूस.

गबान वि० १ सुपीक (जमीन). २ धन-संपन्न (देश). ३ फायदेशीर (व्यापार, धंदा, इ०). **न०** नफा, किफायत. ह्या अर्थी 'गबानी' असाही शब्द आहे.

गबाळ, गबाळणें, गबाळी, गबाळ्या पुढें 'गावाळ,' 'गाबाळणें,' 'गाबाळी,' 'गाबाळ्या' पहा.

गबेलें न० चिखल, चुना, विटा, इ० वाहून न्यावयासाठीं जें लाकूड इ० चें पात्र करतात तें.

गब्बू वि० १ लठ्ठ आणि ठेंगणा; गिड्डा. २ गोंडस. ३ बाळसेंदार (मूल). ४ पैसेवाला; श्रीमंत. ५ भरभराटीच्या स्थितींत असलेलें (गांव, शहर, देश).

गभस्ति [**सं०**] **पु०** १ किरण. २ सूर्य. **स्त्री०** अग्नीची भार्या. ॐ **गभस्तिमान् पु०** सूर्य.

धान्य, तेल, तूप, इ०). २ बिघडलेलें;अव्यवस्थित झालेलें. ३ प्रक्षुब्ध,व्याकुळ (मन). न० १ केरकचरा (पदार्थांत मिसळलेला). २ टाकाऊ पदार्थ किं० भाग. ३ अव्यवस्था, घोटाळा.

गदळणें स० क्रि० १ गढूळ करणें. २ अव्यवस्थित करणें. **अ० क्रि०** गढूळ किं० अव्यवस्थित होणें; केचकचरा मिसळून खराब होणें.

गदा [सं०] **स्त्री०** एक आयुधविशेष. ॐ**गदादर पु०** विष्णु. **गदाधर पु०** आबखऱ्याच्या घाटाचें पाणी पिण्याचें लहान भांडें.

गदारोळ, पुं०, गदारोळी स्त्री० १ गर्जना, किंचाळी. २ गलबलाट, गोंगाट. ॐ**गदारोळाचें हसणें** मोठमोठ्यानें ओरडून किं० किंचाळ्या फोडून किं० असभ्यपणानें हसणें.

गदेपदे, गद्देपद्दे पु० अ० व० टोलवाटोलवी; खोट्या सबबी सांगून लोकांना पैसे इ० देणें लांबणीवर टाकणें.

गदेला पु० मोठी गादी.

गद्गद [सं०] **वि०** अडखळणारा. **पु०, न०** अस्पष्ट वाणी.

गद्दी [हिं० गादा=चिखल] **स्त्री०** १ नदीच्या कांठीं गाळ जमून होते ती जमीन,–जी भारी सुपीक असते. २ उत्तम कसाचें भातशेत.

गद्धेमल्हार पुढें ' गद्धा ' शब्दांत पहा.

गद्य [सं०] **न०** गण, मात्रा, इ० नियम ज्याला लागू नाहींत अशी रचना; पद्यभिन्न रचना; उ० संस्कृतांतील बाणाची कादंबरी: उ० विष्णुशास्त्री चिपळुणकर यांची निबंधमाला; इ०. ॐ**गद्यपद्यात्मक वि०** अंशतः गद्यरूप आणि अंशतः पद्यरूप असा (ग्रंथ० किं० रचना).ॐ**गद्यरूप, गद्यात्मक वि०** गद्य; गद्याच्या रूपांतील. **गद्यपद्य न०** लबाडी, कावा.

गंध [सं०] **पु०** १ वास. २ सुवास. ३ सुगंधी पदार्थ. ४ चंदनादिकांचें काष्ठ उगाळून काढतात जो देवांच्या मूर्ति इ०ना लावण्यासाठीं लेप तो (मराठींत ह्या अर्थी नपुंसक लिंगी); अशा लेपानें कपाळ इ०वर केलेली आकृति.ॐ**गंध नसणें** अल्प प्रमाणांत देखील नसणें; उ० त्याला ज्योतिषाचा गंधही नाहीं (तो ज्योतिष मुळींच जाणत नाहीं); उ० माझ्या मनांत लबाडीचा गंधही नाहीं. **गंधमार्जार पु०** जवादी मांजर,–ज्याच्यापासून एकप्रकारचें सुगंधी द्रव्य मिळतें. **गंधपाषाण पु०** गंधक. **गंधाजीव पु०** गंधी, अत्तार. **गंधाढ्य न०** चंदन. **गंधद्विप पु०** १ उन्मत्त हत्ती. २ उत्तम हत्ती. **गंधरस पु०** रक्त्या बोळ. **गंधवाह पु०** वारा, वायु.

गंधर्व [सं०] **पु०** १ देवांचा गवई. २ गाणारा. ३ घोडा. ॐ**गंधर्वपुर, गंधर्वनगर न०** आकाशांत दिसणारी नगराची आकृति,–अशुभ चिन्ह. **गंधर्वविद्या स्त्री०, गंधर्ववेद पु०** संगीतशास्त्र (सामवेदाचा उपवेद). **गंधर्वविवाह पु०**प्रीतिविवाह. **गंधर्वगायन न०** सुस्वर गायन. **गंधर्वनगरासारखा वि०**क्षणभंगुर.**गंधर्वपूजा स्त्री०** कोणेकाला सन्मानानें आपल्या घरीं आमंत्रन आणून त्याला शिव्या देणें किं० वडवून काढणें. **गंधवार्ता स्त्री०** यत्किंचित् खबर, थोडा देखील सुगावा,–अकरणरूपी प्रयोग: उ० तुम्ही सांगतां त्या प्रसंगाची मला गंधवार्ताही नव्हती. **गंधाबेरोजा,गंधाबिरुजा पु०** सुरूच्या झाडाचा चीक. **गंधाक्षत (-ता) स्त्री०** १ गंध आणि त्यावर लाविलेल्या अक्षता. २ मैत्रीचा संबंध;स्नेहसंबंधाचें किं० घरोब्याचें दळणवळण; उ० ह्याची आणि त्याची गंधाक्षत होत नाहीं. **गंधाक्षतवर्जन न०** वर्ज्य संबंध; संबंधाला प्रतिबंध.

गंधक [सं०]**पु०** एक उपरस,–जो ज्वालाग्राही असतो. [मूर्ख माणूस.

गधडा पु० १ गाढव; गद्धा. २ अडाणी किं०

गंधा वि०दुर्गंधीचा.ॐ**गंधानाला पु०**गांवांतील मोऱ्या ज्यांत सोडलेल्या असतात तो नाला. **गंधें पाणी न०** दुर्गंधियुक्त पाणी. [तिसरा.

गंधार [सं० गांधार] **पु०** सप्तस्वरांतील

गंधी [सं० गंध] **स्त्री०** दुर्गंधी; उ० त्याच्या गळवाला गंधी सुटली आहे. **पु०** अत्तरें विकणारा.

गधुळणें अ० क्रि० गढूळ होणें. **स० क्रि०** गढूळ करणें.

गध्धा पु० १ गाढव. २ मूर्ख माणूस. ॐ ॐ **गध्यागाढव पु०** गांवाची मर्यादा दाखविणारा धोंडा.

गंध्या [सं० गंध] **पु०** १ अत्तरें करण्याचा

किं० विकण्याचा धंदा करतो तो. २ ज्याच्या अंगाला घाण येते तो माणूस.

गनिमाई [अ० गनीम=शत्रु] १ **स्त्री०** शत्रुत्व. २ शत्रूची धाड.

गनिमात [फा० गईमत] **स्त्री०** खैर; चांगली गोष्ट; सुदैवाची गोष्ट; आनंदाची गोष्ट; उ० तूं माझ्या-वरून पडलास पण तुला मुळींच दुखापत झाली नाहीं ! मोठी गनिमातच झाली म्हणावयाची ?

गनीम [अ० गनीम्=शत्रु] **पु०** शत्रु; सार्व-जनिक किं० देशाचा शत्रु.

गप, गप्प स्त्री० १ अफवा; वार्ता. २ निरा-धार बातमी; उठविलेली बातमी; कंडी. ॐ**गप्पा छाटणें (मारणें, तासणें)** सुखदुःखाच्या किं० रिकामटेकड्या गोष्टी बोलणें; निरुपयोगी संभाषण करणें. **गप्प झोकणें** गमतीखातर कांहीं तरी खोटी गोष्ट सांगणें. **गपछप, गपसप, गपशप स्त्री०** गांवांतील किं० इकडच्या तिकडच्या बातम्या. **गप्पाष्टक न०** रिकामटेकड्या गोष्टी. **गप्पीदास पु०** १ खोट्या वार्ता पसरणारा. २ गंमतीखातर बढाया मारणारा.

गंप, गप्प वि० १ स्तब्ध; कांहीं न बोलतां बसलेला; मूक. २ अदृश्य; नजरेच्या टप्याच्या बाहेर गेलेला; दिसेनासा; उ० ह्या रानांत गाय शिरली ती मी पाहिली, पण आतां ती कोठें गप्प झाली कोण जाणें ! ॐ**गपचूप क्रि० वि०** कांहीं न बोलतां;मुकाट्यानें;स्तब्ध.ह्या शब्दाचीं गुपचीप, गुपचूप, गपचिप, इ० अन्य रूपें ह्याच अर्थानें योजिलीं जातात.

गपकन क्रि० वि० एकदम, अकस्मात, एका-एकीं (पडणें, बसणें, इ०).

गपगप, गपांगप, गपगपां क्रि० वि० आधाशाप्रमाणें किं० घाईघाईनें किं० नीट चर्वण न करतां (खाणें).

गपका पु० १ घाईनें तोंडांत टाकलेला किं० गिळलेला घास (**क्रि०** मारणें, घेणें, उचलणें). २ दिलेला किं० मिळालेला लांच. ३ हलक्या हातानें मारलेला धप्पा, रपाटा, किं० ठोसा.

गपाणा पु० चुरमुरे, लाह्या, इ० चा घेतलेला किं० तोंडांत भरलेला मोठा घास.

गपापणें अ० क्रि० बडबड करणें.

गपाप्या वि० चकाट्या पिटणारा.

गफलत [अ०] **स्त्री०** १ निष्काळजीपणा. २ चुकी;नजरचुक.३अव्यवस्था,घोटाळा.४ निष्का-ळजीपणामुळें पदार्थ भलत्याच ठिकाणीं ठेवला जाणें आणि तो सांपडेनासा होणें. ॐ **गफलती (-त्या) वि०** निष्काळजीपणानें पदार्थ भलत्याच ठिकाणीं टाकणारा.

गफलतणें [वर ' गफलत ' पहा] **स०** **क्रि०** १ भलत्याच ठिकाणीं टाकणें किं० ठेवणें. २ अव्यवस्थित करणें.

गबका पु० रट्टा, धप्पा, तडाखा.

गबगबणें अ० क्रि० १ पडसें किं० खोकला ह्यानें जर्जर होणें. २ डोळ्यांना पाणी येत राहाणें. ३ मांस भरल्यामुळें गाल इ० लठ्ठ होणें; उ० तुझ्या अंगावर मांस गबगबत आहे.

गबगबीत वि० १ लठ्ठ, फोफशा, मांसल. २ पुष्कळ गर आहे ज्यांत किं० ज्याला असें (फळ). ३ पुष्कळ पुरण आहे जींत अशी (पोळी, करंजी, मोदक, इ०).

गबदू, गबदूल, गबदुल्ला वि० १ लठ्ठ, फोफशा. २ मजबूत बांध्याचा. ३ धष्टपुष्ट (अंग) किं० धष्टपुष्ट अंगाचा (माणूस).

गबर, गब्बर [**हिं०**] **पु०, स्त्री०** १ एक प्रकारचें सोन्याचें नाणें. २ श्रीमंत किं० धनाढ्य माणूस.

गबरू [**हिं०** गभरू] **पु०** १ मजबूत आणि गोंडस बांध्याचा मुलगा. २ धनाढ्य माणूस.

गबान वि० १ सुपीक (जमीन). २ धन-संपन्न (देश). ३ फायदेशीर (व्यापार, धंदा, इ०). **न०** नफा, किफायत. ह्या अर्थी ' गबानी ' असाही शब्द आहे.

गबाळ, गबाळणें, गबाळी, गबाळ्या पुढें 'गाबाळ,' 'गाबाळणें,' 'गाबाळी,' 'गाबाळ्या' पहा.

गबेलें न० चिखल, चुना, विटा, इ० वाहून न्यावयासाठीं जें लाकूड इ०चें पात्र करतात तें.

गब्बू वि० १ लठ्ठ आणि ठेंगणा; गिड्डा. २ गोंडस. ३ बाळसेदार (मूल). ४पैसेवाला; श्रीमंत. ५ भरभराटीच्या स्थितींत असलेलें(गांव,शहर,देश).

गभस्ति [**सं०**] **पु०**१ किरण.२ सूर्य. **स्त्री०** अग्नीची भार्या. ॐ **गभस्तिमान् पु०** सूर्य.

गंभीर [**सं०**] **वि०** १ खोल (विहीर, नदी, इ०). २ अर्थपूर्ण (वाक्य, श्लोक, इ०). ३ खळबळाट न करतां वाहणारें (नद्यादिकांचें पाणी). ४ जो एकदम किं० फारसा क्षुब्ध होत नाहीं असा (माणूस). ५ टवाळकी न करणारा किं० टवाळकीला उत्तेजन न देणारा (माणूस). ६ परमार्थानें बोललेलें (भाषण); थट्टेंत किं० विनोदांत बोललेलें याच्या उलट.

गम [अ०] **पु०, स्त्री०** १ क्षमा, काणाडोळा; (अपराध) पोटांत घालणें (क्रि० खाणें, करणें). २ धीर, उत्कंठेचें नियंत्रण. **क्रि०** खाणें.

गम [**सं०** गम्य] **न०** मनांतील आशय किं० धोरण; भाषणाचा रोख.

गम न० एक प्रकारचें मलम.

गमक [**सं०**गम्=जाणें] **वि०**द्योतक,बोधक, सुचविणारा. **न०** पुरावा; आधार; संमति. २ प्रमाणचतुष्टयाव्यतिरिक्त जें प्रमाण तें; उ० ईश्वरास भजावें ह्या विषयीं वेदशास्त्रपुराणादि अनेक गमकें आहेत.**स्त्री०** गवई लोक छातींतून घेतात ती तान.

गमका पु० ऐट; दिमाख; ऐनदारी.

गमजा [**फा०** गम्जाह्] **स्त्री० अ० व०** १ ऐट, नखरा. २ उद्दामपणाचें वर्तन. ३ शृंगारचेष्टा. ॐ **गमजा करणें** (किं० **चालविणें**) १ आडदांडपणानें वागणें. २ वेडेवेडे चाळे करणें.

गमणूक [**म०** गमणें] **स्त्री०** व्यर्थ वेळ घालविणें; करावयाच्या कामांत उशीर करणें; खेळत खेळत काम करणें.

गमणें अ० क्रि० १ भासणें; वाटणें. २ आळसानें, निरुत्साहीपणानें, किं० अनास्थेनें कांहीं काम करीत राहणें. ३ निरुद्योगीपणांत काळ घालविणें. ५ टेलटिकोऱ्या करण्यांत किं० रिकाम्या खटपटी करण्यांत वेळ दवडणें. **भा०क० क्रि०** कोणा एका स्थलीं किं० कोणा एका परिस्थितींत कोणी मनुष्य असतां त्याचा काळ सुखांत जाणें किं० त्याला चैन पडत असणें;करमणें;उ०मी नेहमीं मुंबईस राहाणारा माणूस, मला ह्या तुमच्या खेड्यांत गमत नाहीं. ॐ**गमत रमत, रमत गमत क्रि०वि०** आळसांत, निरुत्साहतेंत, खेळत खेळत (कांहीं काम करणें).

गमत, गंमत स्त्री० खेळ; क्रीडा, पोरचेष्टा; मौज; करमणूक.

गमत, घमत न० होडी, गलबत, इ०च्या तक्त्यांतून नदीचें किं० समुद्राचें पाणी आंत येतें तें; उ० तुम् तांडेल, हम् तांडेल, तो घमत कोण सांडेल ? म्ह० तूं यजमान म्हणून स्वस्थ बसलास आणि मी यजमान म्हणून स्वस्थ बसलों आणि गमत कोणीही काढून बाहेर फेकून दिलें नाहीं, तर होडी (किं० गलबत) पाण्यांत बुडेल. खालीं ' गमतड ' पहा.

गमतड, गमतडी, गमताड स्त्री० गमत सांचावयाची गलबतांतील जागा. वर 'गमत' पहा.

गमती वि०गमती करणारा;विनोदी, थट्टेखोर.

गमद (-दा-) सडा; गमदासरा वि० कांहीं काम करीत असतां खेळणारा किं० फुकट वेळ घालविणारा.

गमन [**सं०** गम्=जाणें] **न०** जाणें, जाण्याची क्रिया; जाण्याचा व्यापार. ॐ **गमनागमन न० ए० व०** जाणें येणें; हेलपाटे; येरझारा.

गमनाज्ञा स्त्री० जाण्याला परवानगी.

गमनी [**सं०** मातृगामी; **म०** 'मातागमनी' याचें संक्षिप्त रूप] **वि०** १ शहाणा असून जो पक्का लबाड तो. २ वाह्यट; व्रात्य; खोडकर.

गमनीय, गम्य [**सं०**] **पु०** १ सुबोध. २ योग्य. ३ मैथुनसंबंधास योग्य. ४ सुलभ. **पु०**जार.

गमाविणें, गमाविणें स० क्रि० १ हरविणें; उ० ह्या आंगठीला जप, गमावूं नको. २ उधळून किं० खर्चून टाकणें. ३ भलती किं० अयोग्य गोष्ट केल्या कारणानें एकाद्यानें आबरू इ०नें विरहित होणें; उ० रांडांच्या नादीं लागून त्यानें आपली आबरू गमावून घेतली.

गमावणें अ०क्रि० मरणें; उ० इ०स० एकोणीसशे पांच सालीं माझ्या कुटुंबांतील सात माणसें गमावलीं (म्ह० मेलीं). **स० क्रि०** नाहींसें करून टाकणें; हरविणें; घालवून बसणें.

गमूत्र [**सं०** गोमूत्र] **न०** गाईचें मूत.

गमेल न० मागें ' गमेलें ' पहा.

गंमत स्त्री० मागें ' गमत ' पहा.

गम्य [**सं०** गम्=जाणें, जाणणें] **वि०** मागें ' गमनीय, गम्य ' पहा. १ मिळण्याजोगें; साध्य होण्याजोगें. २ समजण्याजोगें. ३ आक्रमितां येण्याजोगें. ४ गोचर; उ० इंद्रियगम्य, बुद्धिगम्य,

अनुभवगम्य, इ०. न० प्रवेश, शिरकाव, एकाद्या विषयाशीं परिचय किं० त्या विषयाची कांहीं माहिती; उ० मला फलज्योतिषांत गम्य नाहीं, किं० फलज्योतिष्याचें गम्य नाहीं.

गय, गयगोळा मागें 'गइ,' 'गइगोळा' पहा.

गयावया स्त्री० काकुळतीनें एकाद्याची केलेली प्रार्थना किं० आर्जव (**क्रि०** करणें).

गयांवयां क्रि० वि० काकुळतीनें.

गया [**सं०**] **स्त्री०** एक पुण्यक्षेत्रविशेष. हें बहार प्रान्तांत आहे. ॐ**गयावळ, गयापुत्र पु०** १ गया क्षेत्रींचे जे उपाध्ये ते प्रत्येक; हे यात्रेकरूंना संकल्प सांगून चरितार्थ चालवितात. २ ब्राह्मणोचित कर्तव्यें न करणारा ब्राह्मण (निंदेनें). ३ मुद्दाम वेड्यामारखा वागतो तो. **गयावर्जन, गयावर्दन, गयावर्धन न०** गया क्षेत्रीं यात्रेकरू जे श्राद्धादि विधि करतात ते समुच्चयानें.

गयाळ [**म०** 'गहाळ'चें अपभ्रष्ट रूप] **वि०** १ परागंदा झालेलें(कुळ);उ० सरकारच्या उपद्रवामुळें त्या गांवचीं दहा कुळें गयाळ झालीं. २ परागंदा झालेल्या माणसाचें (जें शेतवाडी इ० तें).

गयाळ ['अजागळ'चें एक रूप] **वि०** ज्याला स्वताचें ज्ञान नाहीं आणि दुसऱ्यानें सांगितलें तें समजत नाहीं असा; अजागळ; बावळट; गयबती. या अर्थी 'गयाळी' असेंही रूप आहे.

गर पु० फलादिकांच्या आंतील जो मृदु अंश तो; गीर; सारभूत भाग. **न०** १ साता करणांतील पांचवें जें करण तें. २ विष, गरळ. **स्त्री०** १ घोड्याच्या मानेवर होत असतो एक रोग तो. २ खरारा न केल्यामुळें घोड्याच्या अंगावर जो मळ जमतो तो. ३ मनुष्याच्या डोक्यांत होतो तो खवडा.

गरक, गर्क [अ०गरक्=बुडालेला] **वि०** १ जलादिकांत बुडलेला. २ कांहीं तरी मनोरंजक व्यवसायांत तल्लीन झालेला. ३गाढ (झोप, विचार). ४ अजीबात नष्ट झालेला. ॐ**गर्क करणें** दुसऱ्याची वस्तु किं० पैसा गिळंकृत करणें. **गर्क झोप येणें** (किं० **लागणें**) आतिगाढ झोप येणें किं० लागणें.

गरका पु० १ नृत्यादिसमयीं मंडलाकार फिरण्याचा जो व्यापार तो. २ कांहीं एका पदार्थाभोंवतीं मनुष्यादिकांनीं घातलेला वेढा; गराडा. ३ पुरुषांच्या शेंडीभोंवतालीं राखलेला असतो आखूड केशांचा वेढा तो; संजाप. ४ घोटाळा; पेच; अडचणीचा प्रसंग किं० स्थिति. ५ शेतांतील चांगला न पिकलेला टापू.

गरखी स्त्री० झाडांचीं पानें, फळें, इ० तोडावयासाठीं जी लांब काठी योजतात, जिच्या अग्राला आंकडा बसविलेला असतो, ती.

गरगचा, गरगशा पु० बोभाटा, ओरड.

गरगट(–ड) पु०, न०, गरगटें न०, गरगटा पु० १ कांहीं एका पदार्थांत जलांश योग्य प्रमाणांत घालून जें मिश्रण, रांधा, इ० करतात तो; उ० आज आमच्या घरीं आळवाचें गरगट केलें होतें. २ भाकरीबरोबर खावयाला मसाला इ० घालून जें पातळ तोंडीलावणें करतात तें. ३ बनविलेलें औषध इ०कांतील जो जलरूप भाग टाकून द्यावयाचा असतो तो. ४ कोणत्याही खाद्य पदार्थाची निंदा कर्तव्य असतां त्याला 'गरगट' हा शब्द लावतात; उ० हें भाताचें गरगट मला अगदीं चालत नाहीं.

गरगटणें स० क्रि० १ पाणी घालून वेताचें पातळ केलेलें जें शेण त्यानें भिंत, जमीन, इ० सारविणें. २ उखळांत घालून कुटणें किं० पाट्यावर वरवंट्यानें वाटणें; उ० तूं पुरण गरगटून दे म्हणजे झालें, पोळ्या भाजण्याचें काम मी करीन.

गरगटणें न०, गरगटा पु० औषधी द्रव्यें किं० पुरण इ०खाद्यें वाटण्याचें किं० कुटण्याचें साधन जें उखळ इ० तें.

गरगडा पु० १ नूतन प्रसूत स्त्रीला देतात तीं औषधें समुच्चयानें. २ पसारा (लग्न, मुंज, इ० प्रसंगासंबंधाचा).

गरगर, गरगरां क्रि० वि० वाटोळ्या गतीनें; मंडलाकार सरणीनें. २ झपाट्यानें; वेगानें.

गरगरणें अ० क्रि० १ वाटोळें किं० मंडलाकार फिरणें. २ भोंवळ येण्यानें अस्वस्थ किं० व्यस्थित होणें (डोकें). ३ झपाट्यानें वाढणें (झाड, मूल, इ०). [(वाटोळा).

गरगरीत क्रि० वि० पूर्णपणें किं० अगदीं

गरगशा [**फा०** खर्+खशाह्=गोंगाट] **पु०** १ बोभाटा; गुप्त जी गोष्ट ती चव्हाट्यावर येणें. २ आरडा ओरडा. ३ असंतुष्टपणानें चालविलेली

कि० केलेली हाकाटी. तीन्हीं अर्थी **क्रि०** करणें, किं० होणें.

गरगा पु० खड्डा, खळगा.

गरंगील वि० १ अजागळ, मूर्ख, वेंधळा. २ अत्यंत गरीब, निरुपद्रवी (निंदेनें).

गरगोट न०, पु० वर ' गरगट ' पहा.

गरगोटी स्त्री० मान (तिरस्कारानें, रागानें, तुच्छतेनें, इ०); मानगुटी; उ० मांजराची गरगोटी पकडा; उ० तूं असा माझ्या गरगोटीला बसलास तर मी तुला कांहींच देणार नाहीं. **क्रि०** धरणें, आवळणें, पकडणें.

गरज [**अ०** गरज्] **स्त्री०** १ जरूरी; आवश्यकता. २ उणीव, कमताई, कमतरता. **छगरज करणें किं०भागविणें** जरूर जी साधनसामग्री ती नसल्याकारणानें अडचण सोसणें किं० कसातरी निर्वाह करणें; उ० धोतरें ध्यावयाला मजजवळ पैसे नाहींत म्हणून पंचांवर मी गरज करतों (किं० भागवितों) म्ह० पंचे नेसून दिवस ढकलतों. **गरज सरो आणि वैद्य मरो** १ वैद्याचा आपणाला व्हावयाचा तितका उपयोग झाला कीं नाहीं इतक्यापुरतें आपलें पाहणें असावें, पुढें त्या वैद्याचें काय होतें हें पाहण्याचें आपणाला कांहीं कारण नाहीं. २ आपणाला वैद्याची जरूरी आहे तोपर्यंत वैद्याशीं सभ्यपणानें किं० नम्रपणानें वागावें, याला आपण बांधील आहों; गरज सरल्यावर तशा रीतीनें त्याच्याशीं वागण्याचें कारण नाहीं. **आपल्या गरजे गाढव राजे** आपणाला ज्याच्यापासून काम करून घ्यावयाचें आहे तो कितीही हल्कट, नीच, किं० पाजी असला तरी त्याला मोठेपणा द्यावा लागतो. **गरज करणें** १ थोडीशी अडचण सोसून वेळ निभावून नेणें. २ अडचणीच्या प्रसंगीं एकादी वस्तु उपयोगीं पडेल अशा बुद्धीनें ती जपून किं० राखून ठेवणें. **एकाद्याची गरज होणें** त्याला पाहिजे असेल ती वस्तु त्याला मिळणें. **गरजवंताला अक्कल नसते** जो नडलेला किं० अडचणींत सांपडलेला आहे तो मूर्खासारखें वर्तन करतो किं० त्याला मूर्खासारखें वर्तन करावें लागतें. **गरजवंत** [**अ०** गरज्+**म०** प्रत्यय] **वि०** ज्याला गरज आहे तो; जो कांहीं वस्तूसाठीं नडलेला आहे तो.

गरजसाधु वि० दुसऱ्याची सोय किं० गैरसोय मनांत न आणतां आपली मात्र सोय करून घेणारा किं० आपलें मात्र कार्य साधून घेणारा.

गरजी, गरजू वि० १ नडलेला; ज्याला एकाधा एकाद्या वस्तूची गरज आहे असा. २ कामचुकार.

गरजणें अ० क्रि० पुढें ' गर्जणें ' पहा.

गरजणें अ० क्रि० गरजेस येणें; एकाद्याला एकाद्या वस्तूची गरज असणें; उ० मी आतां दहा रुपायांसाठीं गरजलों आहें.

गरडगप क्रि० वि० हरवण्याच्या किं० नष्ट होण्याच्या बेतांत.

गरडा पु० १ करपट ढेकर. २ आसन्नमरण अशा माणसाच्या किं० जनावराच्या घशांतील घरघर किं० हिसकेदार श्वासोच्छ्वास.

गरडई, गरढई स्त्री० अजीर्णाच्या विकृतीमुळें पोटांतील वायु ऊर्ध्वगत होऊन घशांत जो जलांश येतो तो.

गरत, गरती [**सं०** गृह+रत] कुलीन आणि संभावित आणि सदाचरणी स्त्री.

गरता [**सं०** गर्ता=खड्डा] **स्त्री०** १ खड्डा, खळगा. २ (लाक्षणिक) पोट, उदर.

गरद, गर्द वि० दाट (अरण्य, झाडी).

गरद (–ध–) ट, गळदट वि० अडदांड, हट्टी, हेकट.

गरदन [**फा०**] **स्त्री०** मान; मानगुटी; कंठनाल.

गरदा [**हिं०**] **पु०** तंबाखू इ०च्या वाळलेल्या पानांचा चुरा.

गरनाळ [**हिं०**] **स्त्री०** एक प्रकारची तोफ,— जिचा आकार लाकडी उखळीसारखा असतो.

गरबरणें अ० क्रि० पित्तादि विकृतींमुळें वान्ति होईल अशा प्रकारें पोटांत ढवळणें; उ० मला गरबरतें किं० माझ्या पोटांत गरबरतें.

गरभरू वि० ज्यांत गर पुष्कळ आहे असें (फळ).

गरम [**फा०** गर्म्] **वि०** १ कढत, उष्ण (पदार्थ). २ रागानें तापलेला; फार रागावलेला. छ **गरम नरम वि०** १ फार उष्ण नव्हे आणि फार थंड नव्हे असा (कांहीं पदार्थ). २ कधीं शांत आणि कधीं तापट अशा प्रकृतीचा (माणूस, स्वभाव, इ०). ३ जुने आणि नवे असे (पदार्थ समुच्चयानें). **गरम मसाला पु०** दालचिनी, लवंगा, जिरें, मिरें, इ० पदार्थ हिरवेच कुटून केलेला मसाला; भाजी,

सार, इ० मध्यें हा घालतात. **गरमागरम पु०** अगदीं कढत; अगदीं चुलीवरून काढलेला.

गरमर न० माईणमूळ नांवाची एक वनस्पति.

गरमा [फा०] पु० हवेची उष्णता.

गरमी [फा०] स्त्री० १ हवेचा उष्मा. २ उष्ण पदार्थांच्या भक्षणानें होते ती भावना. ३ उपदंश रोग.

गरल, गरळ [सं०] न० १ विष. २ सर्पविष.

गरवस, गरवा वि० उशीरां पिकणारें (धान्य); याच्या उलट ' हळवा. ' ॐ **गरवी अंवगी स्त्री०** नाचणी ह्या धान्याची एक जात.

गरस स्त्री० रक्ताच्या कांहीं विकृतीमुळें शरीरावर उठते ती गांठ.

गरसळी, गरसोळी, गळसरी, गळेसरी स्त्री० १ टूशी, वज्रटीका, इ० प्रकारचीं स्त्रियांचीं कंठभूषणें असतात तीं प्रत्येक. २ कांचेचे आणि सोन्याचे मणि आणि पुतळी ही ओवून जें कंठभूषण स्त्रिया करतात तें.

गरळ [सं० गरल=विष **] न०, स्त्री०** १ सर्पादिकांची विषयुक्त लाळ जी तृणादिकांवर पडलेली असते ती. २ (लाक्षणिक) वस्तुस्थितीचा विपर्यास करून केलेलें निवेदन किं० सांगितलेली हकीगत; उ० माझ्याविषयीं तुझ्या कानांत कोणी गरळ ओतलें आहे कोण जाणे ? (ह्या अर्थी नपुंसकलिंगी). ३ आस्था, कळकळ; उ० त्या पोरानें आलीकडे पढण्याची गरळ सोडून दिली आहे. ४ तोंडाला सुटतें तें पाणी (**क्रि०** येणें).

गरळा पु० १ विड्यामध्ये अनेक औषधें घालून तो विडा चावून त्याचा रस तान्ह्या मुलांच्या तोंडांत घालतात तो. २ लाच (**क्रि०** देणें). ३ भात, वरी, इ०च्या लोंबीचा देठाजवळचा भाग (कापण्याचे प्रसंगीं ह्या शब्दाचा उपयोग केला जातो).

गरळी स्त्री० अजीर्णादिकांमुळें तोंडाला सुटतें [तें पाणी.

गरा वि० उशीरां पिकणारें (धान्य). मागें ' गरवस ' पहा.

गरा पु० फणसाच्या फळांतील जो मुख्य भक्ष्यांश तो,–यांत आठळी असते ती तो खातांना काढून टाकावयाची असते. एका फणसांत असे पुष्कळ गरे असतात. २ गहूं इ०चा रवा.

गरांगर, गरगर, गरांगरां क्रि० वि० वर्तुळाकार गतीनें.

गराज (–द) स्त्री०, गरादा पु० खिडकी, दार, इ० च्या चौकटींमध्यें बसविलेले जे लाकडाचे किं० लोखंडाचे गज ते प्रत्येक.

गरांठी स्त्री० दुवेळकी काठी किं० अग्राला आंकडा असलेली काठी,–झाडांचीं फळें, पानें, इ० तोडण्याच्या उपयोगाची.

गराडा पु० १ वेढा, घेरा. (**क्रि०** घालणें, देणें, पडणें, इ०). २ खिडकी, दार, इ० च्या चौकटींत बसविलेले जे गज ते प्रत्येक.

गराडी स्त्री० १गाडी जमीनीवर चालत असतां तिच्या चाकांनीं ज्या पन्हळी पडतात त्या प्रत्येक. २ इमारतीं चुना कुटण्यासाठीं जो वर्तुळाकार चर केलेला असतो,–ज्यांतून चाक फिरतें,–तो.

गरांडी स्त्री० ओवंट ठेकर येऊन घशांत जें पाणी येतें तें.

गरादा पु० वर ' गराज ' पहा.

गरारणें अ० क्रि० १ वाटोळें फिरणें. २ झपाट्यानें वाढणें (मूल, झाड, इ०). ३ घाबरून जाणें; उ० रामभाऊ भारी धीट ! चोर म्हणतांच गरारला !

गरारां क्रि०वि० चक्राकार गतीनें किं०मार्गानें.

गरिबाई, गरिबी स्त्री० गरीब असण्याची स्थिति. खालीं ' गरीब ' पहा.

गरीब [अ०] वि० १ द्रव्यादि ऐहिक वैभवानें कमी; अकिंचन. २ निरुपद्रवी; स्वभावानें शांत. ॐ **गरीब गुरीब पु० अ० व०** गरीब लोक. **गरीबस(–सा–)र वि०**साधारणपणें गरीब. **गरिबांचा काळ आणि मोठयांचा प्रतिपाळ** गरीबांना छळणारा आणि समर्थांपुढें लाळ घोटणारा नीच माणूस.

गरिमा [सं० गरिमन्=मोठेपणा **] पु०** १ मोठेपणा; वजन; जडपणा. २ पूज्यता. ३ श्रेष्ठत्व, महत्व. ४ योग्यता. ५ अष्टसिद्धींपैकीं एक,–हिच्या प्रभावानें आपणास इच्छेप्रमाणें जड होतां येतें.

गरिष्ठ [सं०] वि० १ अत्यंत जड; फार जड. २ प्रचण्ड; अवाढव्य; जगड्व्याळ. ३ वरच्या दर्जाचा. ४ पचनशक्तीला जड असें (खाद्य).

गरी स्त्री० १ फणसाच्या फळांतील लहान गरा. २ वीतभर दोरीचीं दोन टोकें काठीच्या अग्राला बांधून त्या वेळक्यांत किं० फासांत चिमोरी इ०चा नांगडा सापडवून पीळ घालून त्यांस धरतात ती काठी दोरीसह. ३ लहान मासे धरावयाचा गळ.

गरुड [**सं०**] **पु०** विष्णूचें वाहन जो पक्षिविशेष तो. ॐ**गरुडाग्रज पु०** अरुण. **गरुडमणि पु०, गरुडपाच पु०, स्त्री०, गरुडपाचू पु०, स्त्री०**पाच (रत्न).

गरुडवेल, गरोळ, गरूळ स्त्री०गुळवेल नांवाची वेली,–हिचें सत्त्व तापावर देतांत.

गरुरी [अ०गरूर] **स्त्री०** ताठा, गर्व, मगरुरी.

गरोदर [**सं०** गुरु (जड)+उदर (पोट)] **वि०** गभार (स्त्री).

गर्ग [**सं०**] **पु०** एक मुनिविशेष; त्याला 'गर्गाचार्य' असें म्हणतात. ॐ**गर्गाचार्यांचा मुहूर्त पु०** मागील पांच घटिका रात्र शेष उरली म्हणजे उषःकाळ होतो तो गर्गमुनीच्या मतें शुभ, आणि बृहस्पतीच्या मतें उत्तम शकुन. ह्या उषःकालाला ' गर्गाचार्यांचा मुहूर्त ' म्हणतात.

गर्जन न०, गर्जना स्त्री०, गर्जित न० [**सं०** गर्ज्=गर्जणें] १ मेघांचा किं० विजांचा शब्द. २ वन्य पशूंचा शब्द.

गर्ता [**सं०**] **स्त्री०** खड्डा.

गर्द वि० दाट, निबिड (अंधेर, झाडी, निद्रा). ॐ**सैन्य गर्द होणें** प्रत्येक शिपायी शत्रूंच्या हातून ठार मारला जाणें.

गर्दपोस [**फा०** गरद् पोष्] **पु०** धुळीपासून रक्षण व्हावें म्हणून मूल्यवान पदार्थांवर घालतात तें आच्छादन.

गर्दबाज, गर्दाबाज वि० १ दाट, गहन, निबिड (झाडी, अरण्य, इ०). २ दाट छाया ज्याची असें (झाड).

गर्दभ [**सं०**] **पु०** गाढव (चतुष्पाद प्राणी).

गर्दी [**फा०**] **स्त्री०**१दाटपणा;निबिडपणा.२ माणसें किं० पदार्थ यांची खेचाखेच. ३ विपुलपणा; रेलचेल. ४ पराकाष्ठा.

गर्दोवर्दी क्रि०वि०वर्तुळाकारानें; सभोंवतालीं.

गर्भ [**सं०**] **पु०** १ मातेच्या उदरांत भावी प्राण्याच्या उत्पत्तीचा जो अंकुर तो. २ ह्या प्राण्याची मातेच्या उदरांतील अव्यक्त दशा. ३ पदार्थाच्या आंतील भाग; अंतर्भाग. ४ पदार्थाचा मध्यभाग. ५ देवळाचा गाभारा. ॐ**गर्भागार, गर्भगृह न०** १ गर्भाशय (मातेच्या उदरांतील). २ माजघर. ३ अंतःपुर. ४ बाळंतिणीची खोली. ५ देवळाचा गाभारा. **गर्भांक पु०** (**नाटक**) अंकांतील पोटअंक. **गर्भाधान न०**१गर्भोत्पादन.२पतीचा स्त्रीशीं पहिला समागम किं० त्या समागमासंबंधाचा पहिला धार्मिक विधि;फळशोभन.**गर्भश्रीमंत वि०**जन्मतः श्रीमंत; ज्याच्या जन्मापासून घरांत मुबलक पैसा आहे असा. **गर्भाश्रय, गर्भकोश पु०** मातेच्या उदरांतील गर्भाचें स्थान. **गर्भेश्वर वि०** जन्मापासून जो श्रीमंत तो. **गर्भच्युति स्त्री०** १ बाळंत होणें. २ गर्भस्राव. **गर्भदास पु०** जन्मापासून जो दास तो. **गर्भनाडी स्त्री०** नाळ. **गर्भपात पु०** चार महिन्यानंतरचा गर्भाचा पात म्ह० नासावण्याची स्थिति. **गर्भवास पु०** १ गर्भाशय. २ गर्भाशयांतील मुलाची वसति किं०त्या वसतीचा अवधि. **गर्भी अंधळा, रोगी, शहाणा,** इ० जन्मापासूनच जो अंधळा, रोगी, शाहाणा, इ० असा. **गर्भी रोजमुरा पु०** मूल जन्मावयाचे अगोदरपासूनच त्याची करून ठेविलेली तरतूद.**गर्भगळित वि०** अत्यन्त भीतिग्रस्त किं० भ्यालेला. **गर्भगिळीत, गर्भगीळ** हीं ह्या शब्दाचीं अपभ्रष्ट रूपें होत. आमचे ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० 'ले० २०४ पहा. **गर्भग्रहण न०** पतिसमागमानंतर गर्भधारणाची स्थिति. **गर्भच्युति स्त्री०** गर्भाचें पतन. **गर्भछाट पु०** समूळ उच्छेद. **गर्भशंकु पु०** मातेच्या उदरांतून मृत बालक बाहेर काढण्याचें एक साधन. **गर्भशय्या स्त्री०** गर्भाशय. **गर्भस्राव पु०** गर्भपात; वाखा. **गर्भसुती वि०** ज्या वस्त्राचे उभे धागे कापसाचे आणि आडवे धागे रेशमी आहेत असें वस्त्र.

गर्भा [**सं०** गर्भ] **पु०** गुजराथी स्त्रियांचा एक प्रकारचा नाच किं० ह्या नाचाचे प्रसंगीं म्हणावयाचीं जीं गाणीं तीं प्रत्येक.हीं गाणीं म्हणतांना स्त्रिया एकमेकांचे हात धरून मंडलाकार फिरत असतात. आश्विन महिन्याच्या शुक्ल

पक्षांतील दशमीपासून तों पौर्णिमेपर्यंत हा गार्णी गुजराथी स्त्रिया म्हणतात.

गार्भिणी [**सं०** गर्भ+इन्+ई (प्रत्यय)] **स्त्री०** गरोदर स्त्री; गर्भवती स्त्री.

गर्भित [**सं०** गर्भ] **वि०** अंतर्गत; गूढ.

गर्भी [**सं०** गर्भ] **स्त्री०** १ क्षेत्रादिकांची भोंवतालची बाजू सोडून मधला जो भाग तो. २ बरोबर मध्य.

गर्व [**सं०**] **पु०** अभिमान; ताठा; उन्मत्तपणा. ॐ **गर्वमोचन न०** एकाद्याचा नक्षा उतरणें. **गर्वहत वि०** ज्याचा नक्षा, गर्व, किं० तोरा उतरला आहे असा. **गर्वोक्ति स्त्री०** गर्वाचें भाषण.

गर्विष्ठ [**सं०**] **वि०**ज्याचे अंगीं गर्व फार आहे तो; गर्वानें उन्मत्त. [निंदेस पात्र.

गर्हणीय [**सं०** गर्ह्=निंदिणें] **वि०** निंद्य;

गर्हा [**सं०** गर्ह्=निंदिणें] **स्त्री०** निंदा.

गऱ्हाणें न० पुढें ' गाऱ्हाणें ' पहा.

गर्हित, गर्ह्य [**सं०** गर्ह्=निंदिणें] **वि०** निंद्य; निंदिलेला; निंदेस पात्र.

गल स्त्री० बेंदुलांच्या खेळांत करतात ती खळगी.

गल [**सं०**] **पु०** १ गळा. २ वाद्यविशेष. ३ मासे पकडावयाचा गळ म्ह० आंकडा. ॐ**गलकंबल पु०** गुरांच्या मानेखालची पोळी,–लोंबत असते ती. **गलग्रह वि०** उपद्रवी; मानगुटीस बसणारा. खालीं ' गळग्रह ' स्वतंत्र शब्द पहा.

गलगंड पु०गळ्यावर उठतात त्या गांठी प्रत्येक.

गलकल्ला पु० मिशीचें पीळदार अग्र.

गलका पु० कोलाहल, गोंगाट, कलकलाट.

गलंगती, गलंत्ती, गलंतकी स्त्री० कांबळें, घोंगडी, इ०ला तात्पुरते टाके मारून केलेलें पोतें.

गलगल स्त्री० १ गलका, गोंगाट, कलकलाट. २ भोकर इ०फळांचा चीक. ३ मत्स्याची चरबी.

गलगलणें अ० क्रि० १ पाणी फार सांचल्यामुळें चिखलट होणें (जमीन). २ कलकलाट किं० गोंगाट करणें.

गलगलाट पु० गोंगाट; एकदम पुष्कळ माणसें बोलत असतां होतो तो ध्वनि.

गलगली स्त्री० दलदल; चिखलट जमीन.

गलगलीत वि० १ दलदलीचा. २ अत्यन्त मृदु असें (फळ); अति मऊ किं० बिलबिलीत.

गलगुच्छ पु० मिशांच्या टोकांचा गालावरील झुबका.

गलग्रह [**सं०** गल+ग्रह] **पु०** १ गळा धरणें किं० पकडणें किं० दाबणें. २ एक रोगविशेष ३महिन्याच्या कृष्णपक्षांतील चतुर्थी,सप्तमी, अष्टमी,नवमी आणि त्रयोदशी आणि पुढच्या तीन तिथि ह्यांतील प्रत्येक. ४ज्या दिवशीं अध्ययन वर्ज आहे त्याच्या आधल्या दिवशीं केलेला कोणत्याही अध्ययनाला प्रारंभ. ५ फार दिवस न चालविलेलें किं० लवकरच थांबविलेलें कोणत्याही विषयाचें अध्ययन. ५ घशांत होतो तो एक रोगविशेष.

गलंड न० रक्तदोषामुळें शरीरावर उद्भवते ती गांठ.

गलत [**अ०** गल्त=चुकी, खोटें] **क्रि० वि०** १ भलत्याच मार्गानें. २ हरवावयाच्या पंथांत.

गलत, गलतान, गलतन [**अ०**] **स्त्री०** कालवाकालव (कागद, पुस्तकें, दागिने, किं० इतर पदार्थ, इ० ची) २ अव्यवस्था, घोटाळ्याची स्थिति. ३ गंजिफा, पत्ते, इ०ची खेळाच्या आरंभीं मुद्दाम केलेली कालवाकालव (क्रि० करणें).

गलत [**अ०**] **वि०** १ अव्यवस्थित; घोटाळ्याचें(काम,वस्तु,कारभार,इ०).२ रद्दी, टाकाऊ.

गलतान [**अ०**] **वि०** १ नादान, नालायक, टाकाऊ, रद्दी (माणूस). २ रद्दी, टाकाऊ, मोडका तुटका (पदार्थ). ३ बेसूर (घसा, वाद्य, गायन, इ०).

गलत्कुष्ठ [**सं०**] **न०** ज्यानें शरीराचीं गात्रें झडत जातात असा एक रोग. ॐ **गलत्कुष्टी वि०** वरील रोगानें व्यथित.

गलत्या वि०१ अजागळ, बावळट. २ निष्काळजी,भलत्याच ठिकाणीं पदार्थ ठेवून ते गमावणारा.

गलथा पु० १ जिन्याच्या पाह्यऱ्या, कोनाडा, चौरंग, इ० पदार्थाच्या कांठाला जो गोल किं०कांहीं नक्षीदार आकार केलेला असतो तो. २ बागेंत ज्या लहान लहान पाऊलवाटा केलेल्या असतात त्याच्या ज्या कडा त्या प्रत्येक.ॐ **गलथेदार वि०** ज्याला गलथा केलला आहे असा (पदार्थ).

गलदट, गलधट पुढें 'गळदट,' 'गळधट' पहा.

गलदुम स्त्री० हवेंत पाय उभारून हातांच्या पंज्यावर चालणें किं० अशा प्रकारच्या चालण्या-

साठीं केलेलें शरीराचें संस्थान किं०पवित्रा (क्रि० करणें, टाकणें).

गलन [**सं०** गल्=गळणें] **न०** १ थेंबाच्या रूपानें गळणें (पाणी, दूध, लघवी, घाम, इ०). २ वितळणें. ३ वितळविणें.

गलफटणें, गलफाटणें अ० क्रि० १ भलत्याच ठिकाणीं ठेविल्यामुळें, किं० कोठें ठेविला तें स्मरत नसल्याकारणानें, पदार्थ जरूरीच्या वेळीं न सांपडण्याच्या स्थितींत असणें; घोटाळलेला असणें; उ० कालपासून माझा सदरा ह्या चिरगुटांत गलफटला आहे तो अजून मला सांपडला नाहीं. २ रस्ता चुकलेला असणें किं० कोणत्या रस्त्यानें जावयाचें हें सुचत नाहीं असें होणें (माणसास). **स० क्रि०** भलत्याच ठिकाणीं ठेवून वेळेस न सापडेसा करणें.

गलफटा, गलफाटा पु० कांहीं एका प्रसंगीं किं० व्यवहारांत गति कुंठित व्हावयाजोगी जी अवस्था प्राप्त होते ती; किंकर्तव्यमूढता.

गलबत न० जलमार्गानें प्रवास करण्याचें किं० मालाची ने आण करण्याचें जें खूप मोठ्या आकाराचें साधन तें; जहाज; तारूं.

गलबल स्त्री० १ कलकलाट; आरडाओरडा. गोंगाट; कला; गलका. २ कामाची किं० पदार्थांची अव्यवस्था किं० घोटाळ्याची स्थिति. ३ प्रजाजनाची अस्वस्थपणाची स्थिति.

गलबलणें अ० क्रि० १ घाबरून जाणें. २ सांपडेनासा होणें (कांहीं पदार्थ). ३ काय करावें तें सुचत नाहीं अशा स्थितींत असणें. ४ वांतीची भावना होणें; उ०मला सकाळपासून गलबलत आहे.

गलबला पु० १ गोंगाट, कलकलाट, आरडाओरडा. २ (कामाचा) घोटाळा; अव्यवस्था.

गलबलाट पु० खूप मोठा गोंगाट किं० कलकलाट; मोठा आरडाओरडा.

गलबा पु० १ गोंगाट. २ बोभाटा.

गलमुची(–छी),गलमिशी स्त्री०,गलमूच्छ, गलबूच्छ पु० [**हिं०** गाल+मूच्छाह्] गालांवर वळलेलीं मिशांचीं टोकें.

गलमुच्छा वि० मुखाच्या कोपऱ्याकडे वळली आहेत मिशांचीं अग्रें ज्यांचीं असा माणूस.

गलशुंडि (–ठि–) का, गलशुंठिका [सं०] स्त्री० पडजीभ.

गलशुंडी [**सं०**] **स्त्री०** तालुरोग.

गलश्च कंठश्च, गलस्य कंठस्य न० दाट मैत्री.

गलांकुर, गलगंड [**सं०**] **पु०** एक रोग.

गला(–ळा–,–ल्हा–)टणें अ० क्रि० १ गळफटणें; पदार्थ भलत्याच ठिकाणीं ठेवला गेला असल्याकारणानें तो वेळीं न सांपडण्याच्या स्थितींत असणें. २ आजारानें किं०फार भूक लागलेली असल्याकारणानें शरीर म्लान किं० निःसत्त्व होणें. ३ व्यापार, धंदा, देण्याघेण्याचा उद्योग, सावकारी, इ० व्यवहार नीट न चालणें किं० मंदावणें किं० संपुष्टांत येणें किं० अजीबात बंद पडणें.

गलाटा (–ठा–), गलांटा (–ठा) गल्हा (–ल्हां–) टा (–ठा)पु० १ कडबा, पेंढा, गवत, इ० च्या पेंड्या बांधल्यावांचून अस्ताव्यस्त पडलेला. ढीग. २ आजारामुळें किं० भुकेमुळें मनुष्यास किं० जनावरास प्राप्त झालेली क्षीणता किं० दुर्दशा. ३ व्यापार,धंदा इ०स आलेली मंदी.

गलांड न०, गलांडा पु० गळूं.

गलिचा पु० गालिचा.

गलित [**सं०**] **वि०** १ गळालेला; गळून पडलेला. २ वितळलेला. ३ निःसत्व किं० निर्वीर्य झालेला. ४ रोडावलेला. ॐ **गलितयौवन वि०** उतार वयाचा. **गलितकुष्ट न०** रक्तपिती. **गलितपत्र न०** १वृक्षाचें जीर्ण होऊन गळून पडलेलें किं० पडावयाच्या बेतांत आलेलें पान. २ वृद्ध माणूस. ३ अधिकारापासून किं० वैभवापासून पतन पावलेला माणूस. **गलितपात्र न०** अधिकार, वैभव, सामर्थ्य, इ०पासून च्युत झालेला माणूस.

गलिमाई [**अ०** गनीम्=शत्रु] **स्त्री०** १ देशावर आलेलें परचक्र; शत्रूनें देशावर घातलेली धाड किं० केलेली स्वारी. २ शत्रुत्व; वैरभाव.

गलीच(–ज) [**अ०** गलीज्] **वि०** ओंगळ, घाणेरडा, मळकट (माणूस, पदार्थ, किं० जागा).

गलीम [**अ०** गनीम्=शत्रु]. २ लबाड किं० कावेबाज माणूस.

गलूल, गलोल [**फा०** गलील्] **स्त्री०** खडे मारावयाची जी कमान असते ती. **पु०** अग्नीच्या ज्वालांचा झोत. **स्त्री०, न०** शेळीच्या गळ्याला लोंबत असतो तो स्तनासारखा अवयव.

गलेफ [**फा०** गलाफ्] **पु०** उशी, तक्या, लोड, गिर्दी, इ०ना मलनिवारणार्थ पिशवीसारखें जें आच्छादन काढण्याघालण्याच्या सोयीचें केलेलें असतें तें.

गलेलठ्ठ वि० १ धष्टपुष्ट आणि अंगानें मजबूत. २ रानवट वर्तनाचा. ३ लठ्ठ आणि अडाणी.

गल्ल स्त्री० बेंदुलांच्या किं० विटीदांडूच्या खेळासाठीं केलेली खळगी.

गल्ल [**सं०**] **पु०** गाल. ॐ**गल्लचातुरी स्त्री०** गिरदी.

गल्ला [**फा०** गलाह्] **पु०** १ धान्याचा मोठा राशि; मण, खंडी, इ०रूप धान्याचा समुदाय किं० राशि; या शब्दाचा प्रयोग प्राय: मोठा राशि दाखविण्याकडेच होतो; उ० आम्ही यंदा पन्नास खंडी गल्ला खरेदी करून ठेविला आहे. २ सराफ, दुकानदार, इ०ची दुकानांतील पैसे ठेवावयाची खळगी. ॐ**गल्लेकरी पु०** धान्याचा व्यापारी.

गल्ली स्त्री० ज्याच्या दोन्ही बाजूंस घरें भिंती, किं० कुंपण असून जो अरुंद असतो असा रस्ता. ॐ**गल्लीकुची** [**हिं०** गली+**फा०** कूचाह्] **स्त्री०** आडगल्ली; लहान आणि विशेष रहदारीचा नव्हे असा रस्ता किं० असे रस्ते समुच्चयानें. ॐ**गल्लकुचीचा वि०** अप्रसिद्ध; सर्वांस ठाऊक नसलेला (माणूस, गांव, इ०).

गव स्त्री० १ दोन्हीं हात लांब करून त्यांचीं बोटें एकमेकांशीं मिळवून मध्यें जो अवकाश होतो तो; पकड, कचाटी; उ० ह्या झाडाचा बुंधा माझ्या गवेंत मावत नाहीं. २ कांहीं एक कार्य फलद्रूप व्हावयाला जी योग्य संधी ती; उ० कोणताही उद्योग करणें तो गव पाहून केला पाहिजे, नाहीं तर तो यशस्वी होत नाहीं. ३ व्यापारांत पत.

गंवई पुढें ' गांवई ' पहा.

गवई पु०गाणारा म्ह०गाण्याचा धंदा करतो तो.

गवराव स्त्री०, गवरावा पु० आरडा ओरडा; बोभाटा.

गवंड पु०, न०, गवंडी, गोवंडी स्त्री० जंगलांत चरणाऱ्या गुरांची पाउलवाट.

गवंडा पु० गव्हाचें मुसकट.

गवंडी पु०घराच्या भिंती इ०बांधणारा धंदेवाला.

गवत न० १ तृण, तण. २ भातेण. ॐ**गवत कटाई, स्त्री०** १ सरकारी जमीनीवरचें गवत कापण्याच्या परवानगीसाठीं दिलेला धारा. २ सरकारी तबेल्याच्या खर्चासाठीं बसविलेला कर. ३ गवत कापण्याच्या कामाबद्दल दिलेली मजुरी. **गवतकाडी स्त्री०** गवत, झाडपाला, पातेरा. **पुं०** गवताचें केलेलें बुजगावणें. इ० समुच्चयानें; गवतविवत. **गवतकाप्या पु०** १ अकुशल न्हावी. २कोणीही अडाणी कारागीर. **वि०** बिनधारेचा (विळा,चाकू,खुरपें,इ०).**गवत शी स्त्री०**भातेणांची काडी.**गवताचा उंट पु०**गवताचें शेतांत उभारलेलें बुजगावण. **गवताळ वि०** जींत गवत दाट उगवलेलें आहे अशी (जमीन). **गवती चहा पु०** पातीचा चहा,–जो ताप, पडसें, इ० वर औषध म्हणून घेतात. **गवत्या गोमाजी पु०** कोणी तरी माणूस, ज्याचें कांहीं महत्त्व नाहीं किं० ज्याचें नांवगांव कळण्याची जरुरी नाहीं.

गवंद स्त्री० अंगणांत किं० परसांत माजलेलें रान; ओलाव्याच्या जागीं उगवलेलें गवत किं० झाडें झुडपें समुच्चयानें.

गवनसार, गवसार, [**म०** गव (संधी)+ अनुसारें (प्रमाणें)] **क्रि० वि०** सोयीच्या दरानें; फायदेशीर रीतीनें; उ० जो बाजारांत वारंवार जात येत असतो त्याला सर्व जिन्नस गवसार मिळतात.

गवय, गवा [**सं०** गवय=गवा] **पु०** वनगायीच्या जातींतील नर. **गवयी स्त्री०** वनगाय.

गवय्या पु० गवयाचा धंदा करणारा; गाण्यावर उदरनिर्वाह करतो किं० कुटुंब चालवितो तो.

गवशा [**म०** गवसणें; **सं०** गवेषण] **वि०** १ मालकानें टाकून दिलेला आणि दुसऱ्याला सापडलेला असतो असा (पदार्थ).२ किंमत न द्यावी लागतां मिळालेला (पदार्थ); दैवगतीनें सापडलेला (पदार्थ). ३ आईबापांनीं सोडलेला (मुलगा). **पु०** १ व्यभिचारापासून जन्मलेलें मूल आया पिंपळाच्या पारावर कि० देवळांत टाकतात तें. **स्त्री०** गवशी. २ दारिद्र्यामुळें पोसावयाचें सामर्थ्य नाहीं म्हणून असें टाकून दिलेलें मूल; **स्त्री०** गवशी. ३ कामशांतीसाठीं बाळगिलेला पुरुष (गवशा) किं० बाळगिलेली स्त्री (गवशी). ४ ज्याच्या आई-

नापांचा पत्ता लागत नाहीं असें मूल जें कोणी दयार्द्र बुद्धीनें वाढविलेलें असतें तें (पु० गवशा; स्त्री० गवशी).

गवस [म० गवसणें; सं० गवेषण] पु० पत्ता; तपास; माग (क्रि० लागणें). ※**गवस गाढव** पु० मूर्ख आणि अडाणी माणूस.

गवसणी स्त्री० आच्छादन, वेष्टन (सतार, तंबूरा, ढाल, सारंगी, इ० ना धुळीपासून निवारण करण्यासाठीं घालतात तें). ※**गवसणीची पोळी** स्त्री० तांदुळाच्या उकडीचें पुरण भरून कणकेची केलेली पोळी. हिला ' उकडीची पोळी ' असेंही म्हणतात. **ज्याचा शिंक्याला हात पोचत नाहीं तो आकाशाला काय गवसणी घालणार?** क्षुल्लक कामही ज्याला धड करतां येत नाहीं तो मोठा पराक्रम कसा करणार ?

गवसणें [सं० गवेषण] अ० क्रि० सापडणें, आढळणें, दृष्टीस पडणें, मिळणें. टीप—हा उत्तम शब्द असून सुशिक्षितांनीं सोडून दिलेला आहे; 'गवसणें' चें अपभ्रष्ट रूप 'गावणें'. स० क्रि० गोळा करणें; आवरणें.

गवसार [म० गव+अनुसारें] क्रि० वि० संधी मिळेल त्याप्रमाणें; वर ' गवनसार ' पहा.

गवळट पु० गवळी (तुच्छतेनें).

गवळण, गवळीण [म० गवळी+प्रत्यय] स्त्री० १ गवळ्याचा धंदा करणारी स्त्री किं० गवळ्याची बायको. २ कोळ्यासारखा एक क्षुद्र जंतु.

गवळवाडा, गवळहाट खालीं ' गवळी ' मध्यें पहा.

गवळा खालीं ' गव्हला ' पहा.

गवळी [सं० गो (गाय)+म० वळणें] पु० १ गायी म्हशी बाळगून त्यांचें दूध विकतात त्यांची जात. २ असा धंदा करणारा कोणत्याही जातीचा इसम. ※ **गवळवाडा, गवळहाट** पु० गवळी लोक जेथें प्रांय: राहतात तो गांवाचा भाग.

गवा [सं० गवय] पु० वनगायींच्या जातीचा प्राणी स्त्री किं० पुरुष (लिंग मनांत न घेतां).

गवा पु० ठसा किं० छाप ह्यांना शाई ज्या बोळ्यानें लावतात तो बोळा; हा बहुधा फडक्याचा असतो.

गंवाई स्त्री० पुढें ' गांवई ' पहा.

गवादी स्त्री० गव्याचें शिंग,—ज्याचें अभिषेक पात्र करतात.

गवादी, गवांदी स्त्री० अन्नसत्र; अन्नछत्र.

गंवार [हिं० गन्वार]वि० गांवढळ, अडाणी. ' गव्हार ' हें अधिक रूढ रूप आहे.

गवारी पुढें ' गोवारी ' पहा.

गवाळा पु० पोथ्यापत्रें.

गवाळें न० १ मुकटा, पितांबर, इ० सोवळ्याचीं वस्त्रें ठेवण्याची पिशवी. २ एकाद्या माणसाचें सामानसुमान. ※ **गवाळें आटोपणें** १ आपलें सामानसुमान आटोपून आवरून तें घेऊन एकाद्या ठिकाणापासून निघून जाणें. २ संसारयात्रा समाप्त करून इहलोकांतून निघून जाणें, म्ह० मरणें. ३ कामावरून बडतर्फ केलें जाणें; हाकलून दिलें जाणें. **चंबुगवाळें आटोपणें** निघून जाणें. **गवाळें चवाळें** न० आपलें सामानसुमान; चीजवस्त. **गवाळ्यांत घालणें** पळविणें, चोरून नेणें.

गवाक्ष [सं० गो (गाय किं० बैल)+अक्ष (डोळा)]पु०, न० वारा खेळण्यासाठीं केलेली खिडकी, जाळी, किं० झरोका. ※ **गवाक्षजाल** पु० गवाक्षाला बसविलेली जाळी.

गवी, गावी स्त्री० सोनार, लोहार, इ० चा चिमटा; पक्कड.

गवेषण [सं०] न० शोध; शोधणें.

गव्य [सं०]वि० गायीचें; गायींसंबंधाचें; गायीपासून मिळालेलें. न० गोरस (गायीचें दूध, तूप, दहीं, मूत्र, शेण). ※**पंचगव्य** न० गायीचें दूध, तूप, दहीं, मूत्र, आणि शेण, ह्या पांचांच्या मिश्रणापासून शरीरशुध्यर्थ करतात तें पेय. [मुठा.

गव्हर, गव्हार, गवार वि० अडाणी, अड-

गव्हला पु० १ सुगंधी द्रव्यविशेष. २ गव्हाचा रवा दुधांत भिजवून गव्हाच्या आकाराचे बारीक तुकडे करून वाळवितात ते प्रत्येक; ह्या तुकड्यांची खीर करतात. ३ एक फलविशेष.

गव्हळा, गव्हाळा (—ळ्या) [म० गहूं] वि० १ गव्हाच्या रंगाचा. २ गव्हाच्या रंगाचे आणि आकाराचे ठिपके असलेला (साप, गाय,

चेल, इ०).३ गव्हाच्या उत्पत्तीला योग्य (जमीन). ४ परिपक्क दशेचा सूचक रंग ज्याच्यावर आला आहे असें(फळ).

गव्हळी, गव्हाळी, गव्हाळ [**म०** गहूं] **वि०** १ गव्हाच्या उत्पत्तीला योग्य अशी (जमीन,शेत). २गहूं पेरावयासाठीं तयार केलेली (जमीन).

गव्हाण (–णी) **स्त्री०** गवत, कडबा, इ० खाद्य गुरांना सोयीनें खातां यावें आणि तें विसकटलें जाऊं नये म्हणून त्यांच्यापुढें दोन फळ्या लावून जी सोयीची जागा करतात ती.

गव्हार, गंवार त्रि० रानवट किं० खेडवळ चालीरीतींचा; अडाणी.

गव्हाळ (–ळी) [**म०** गहूं] **वि०** गव्हाच्या पिकाला योग्य (शेत, जमीन).

गव्ह्या [**म०** गहूं] **वि०** गव्हाची पोळी किं० गव्हाचें दुसरें कांहीं खाद्य ज्याला भोजनांत वाढलें पाहिजे असा (पांहुणा);वरच्या दर्ज्याचा (पाहुणा); याच्या उलट पिठ्या म्ह० भाकरी वाढली म्हणजे ज्याचा पाहुणचार होतो असा (पाहुणा).

गस्त [**फा०** गष्त्] **स्त्री०** १ रखवालीस ठेविलेल्या शिपायाची फेरी. २ रखवालदार शिपायांची फेरी किं० अशा टोळीच्या फेऱ्या. ३ मंडपादिकांचा खण;घराच्या जावयाच्या दोन खांबांच्या दरम्यानचा अवकाश. ॐ**गस्तकरी पु०** फिरतीवरचा मनुष्य.

गस्तंगर न०, गस्तंगिरी स्त्री० [**फा०** गष्तन् (फिरणें) + गिरफ्तन् (धरणें)] बाजारांत काय काय पदार्थ आलेले आहेत त्यांचे दर्जे, त्यांच्या किंमती, दर,इ० काय काय आहेत,ह्याची माहिती मिळविण्यासाठीं बाजारांत किं० अन्य ठिकाणीं जें फिरणें तें.

गस्तंगीर [**फा०** ' गस्तंगर ' पहा] **पु०** नाना प्रकारचे व्यापारी पदार्थ बरोबर घेऊन ते विकीत विकीत एका गांवाहून दुसऱ्या गांवाला, दुसऱ्या गांवाहून तिसऱ्या गांवाला, असा प्रवास करीत जातो तो; फिरता व्यापारी.

गहजप (–ब) [**फा०** गजब्] **पु०** मागें ' गजब ' पहा.

गहजर मागें ' गजर ' पहा.

गहजरी स्त्री० १ रट्टा, तडाखा. २ कांहीं मोठें संकट (**क्रि०** होणें, गुदरणें).

गहन [**सं०**] **वि०** १ खोल. २ निबिड, दाट (अरण्य). ३ तीव्र, वृद्धिंगत (वेदना, इ०). ४ दुर्बोध, कठिण (विषय, शास्त्र). ५ गुंतागुंतीचें. **न०** १ खोल स्थान; खळगा. २ अरण्य.३ दुर्गम स्थान. ४ लपावयाची जागा. ५ गुहा.

गहना, गहिना, गहिना गाठा [**हिं०**]**पु०** १ दागिना. २ दागिने समुच्चयानें; दागिने बिगिने; किडूक मिडूक.

गहाण, गाहाण [**हिं०** गहना] **न०** दुसऱ्याला कर्जाऊ दिलेल्या पैशाच्या तारणार्थ किं० विश्वासार्थ ठेवून घेतलेला त्याचा ऐवज,–जो कर्ज, फिटतांच परत द्यावयाचा असतो. ॐ **गहाणवट वि०** गहाण ठेविलेला (पदार्थ). **क्रि० वि०** गहाण म्हणून किं० गहाण ह्या नात्यानें (आलेला किं० ठेविलेला). **गहाणखत, गहाणपत्र न०, गहाणरोखा पु०, गहाणचिठी स्त्री०** आपली कांहीं वस्तु सावकाराकडे गहाण म्हणून ठेवावयास देणारा मनुष्य सावकाराला त्या वस्तूचें वर्णन आणि गहाणाच्या व्यवहाराच्या शर्ती इ० ज्या कागदावर लिहून देतो तो.**गहाणदार पु०** गहाण म्हणून वस्तु ठेवून घेतो तो, म्ह०सावकार. **गहाणलहाण न०** कर्जाची रकम आणि तिच्यावर वाढलेलें व्याज हीं दोन्ही मिळून गहाण वस्तूच्या किंमतीहून अधिक झाली असतां ऋणकोनें त्या गहाण वस्तूवरचा हक्क सोडून देऊन ऋणमुक्त होणें (**क्रि०** करणें). **गहाणवट क्रि०वि०** गहाण ह्या नात्यानें (ऋणकोनें दिलेली किं० सावकारानें ठेवून घेतलेली वस्तु).**गहाणाचा व्यापार** (किं० **रोजगार**) **पु०** वस्तु गहाण ठेवून घेऊन कर्ज देण्याचा धंदा.

गहिगट न० कुसुंब्याच्या काढ्याचा गाळ. ॐ**एकाद्याचें गहिगट काढणें** त्याला चोप देणें. **दोन माणसांचें गहिगट जमणें** त्यांचें सख्य होणें; त्यांचें मेतकूट जमणें; त्यांच्यांत मैत्री उत्पन्न होणें. **रामाचें गोविंदाशीं गहिगट जमलें आहे** त्यांच्यांत मैत्रीचा संबंध उत्पन्न झाला आहे.

गहिरा [**फा०** गेहरा] **वि०** गडद (तांबडा, काळा, गुलाबी, इ०); उ० रामभाऊंच्या पागोट्याचा रंग गडद हिरवा आहे.

गहिवर [**सं०** गव्हर=दीर्घ उसासा] **पु०** कंठ दाटून येऊन प्रेम, दुःख, किं० दुसरा एखादा मनोविकार रोदनाच्या रूपानें आविष्कृत होणें.

गहिवरणें [वर ' गहिवर ' पहा] **अ० क्रि०** आनंद, दुःख, किं० अन्य विकार, अंतःकरणांत तीव्र होऊन तो रोदनाच्या रूपानें प्रकट करण्याच्या स्थितींत असणें किं० येणें.

गहिसर, गहिसरा मागें ' गइसरा ' पहा.

गही स्त्री० १ सोनाराचें एक आउत,–एक प्रकारचा चिमटा किं० पक्कड. २ वर ' गई 'पहा.

गहीन वि० क्षमाशील (माणूस); शांत प्रकृतीचा.

गहुला वर ' गव्हला ' पहा.

गहूं [**सं०** गोधूम] **पु०** एक धान्य; याच्या पिठाचीं असंख्य खाद्यें होतात,–चिरोटे, पोळ्या, इ० इ०. ‌**ःएक गहूं प्रकार बहू** गव्हाचीं अनेक खाद्यें करतां येतात. **गव्हाची कणीक करणें** वाईट आहे तें मूर्खपणानें अधिक वाईट करणें.

गह्या पु० समुद्रांतील खूप मोठी लाट.

गह्वर [**सं०** गव्हर] **पु०, न०** गुहा; डोंगरांतील विवर.

गळ पु० १ मासे पकडावयाचें एक आउत,–एका काठीला एक लांब दोरी बांधलेली असून तिच्या टोकाला एक पोलादी अंकडा असतो. २ अंकडा,–लोखंड इ० धातूंचा. ३ पाण्यांत पडलेली घागर इ० पदार्थ वर काढण्याचें एक आउत. ४ मनुष्याला फाशीं द्यावयासाठीं केलेला कांहीं विशेष प्रकारचा अंकडा. ५ देवद्वारापुढील खवाटास टांगून घ्यावयाच्या उपयोगी मनुष्याच्या शरीरास टोंचावयाजोगा लोखंडाचा अंकडा केलेला असतो तो. ६ दमा ह्या नांवाचा रोग. **ःगळ टाकून पहाणें** दुसऱ्याचा आशय जाणण्यासाठीं कांहीं खुबीदार विधान करणें (वर अर्थ ३ पहा). **गळीं देणें** १ फाशीं देणें (वर अर्थ ४ पहा).२ संकटांत किं० अडचणींत घालणें.

गळ [**म०** गळणें] **स्त्री०** १ डोळ्यांतून पाण्याचे थेंब गळण्याचा नेत्ररोगविशेष; उ० हल्लीं दोन महिने माझ्या डोळ्याला गळ लागली आहे. २ एखाद्या माणसानें कांहीं विशिष्ट गोष्टीला आपली संमति द्यावी म्हणून त्याची केलेली प्रार्थना किं० मनधरणी; उ० तुम्ही आपली मुलगी माझ्या भावाला द्या म्हणून गोविंदपंत मला आज महिनाभर गळ घालीत आहेत. ३ हवेंतील फरक वृक्षास सहन न झाल्यामुळें त्याचीं पानें किं० फळें गळून पडण्याची त्याला जी अवस्था प्राप्त होते ती. ४ वैदुलांच्या किं० विटीदांडूच्या खेळांत जी खळी करतात ती; गल.

गळका [**म०** गळणें] **वि०** १ छिद्र, फट, इ०मुळें ज्यांतील पदार्थ गळून बाहेर पडतो असें (भांडें, इ०). २ कांहीं रोगामुळें ज्यांतून पाणी गळत आहे असा (डोळा).

गळगंड [**सं०** गलगंड] **पु०** ज्या रोगानें गळ्याला गांठी येतात असा एक रोगविशेष.

गळगळ क्रि० वि० गळगळ असा आवाज करून (खाणें, पिणें, इ०); उ० इतकें जेवण गळगळ जेवतोस आणि तुला हें पोतें उचलत नाहीं? **ःगळगळघशीं क्रि० वि०** १ खादाडाप्रमाणें; बकाबकां. २ आपल्या आहारापेक्षां अधिक.

गळगळां क्रि० वि० दीनपणानें आणि रडत रडत याचना करण्याच्या स्थितींत; उ० तो दोन रुपयांसाठीं अगदीं गळगळां आला.

गळगळाट पु० वैपुल्य.

गळगळीत वि० १ आकंठ भरलेलें; कांठोकांठ भरलेलें (भांडें, माप, इ०). २ मळमळीत; फारसा रुचकर नव्हे असा पदार्थ; पचपचीत. ३ संदिग्ध, अस्पष्ट. ४ गुळगुळीत.

गळंगा पु०१गवत, वाळलेलीं पानें, कडब्यांचीं ताटें, इ०चा केरकचरा.२अव्यवस्थित किं० अस्ताव्यस्त पडलेलें सामानसुमान (पडणें, होणें).

गळंगा वि० सईल; घट्ट आवळून न बांधलेलें. **पु०** घोटाळा.

गळगुंड न०, स्त्री०१गाय, इ०च्या गळ्याखालीं लोंबत असतें तें कातडें;पोळी.२ शेळीच्या गळ्याला लोंबत असतात जे पिशव्यांसारखे दोन अवयव तें प्रत्येक. ३ गळ्यावर उठलेलें गळवासारखें टेंगूळ.

गळगोंटी स्त्री० गायीच्या गळ्याखालीं लोंबत असतें तें कातडें; पोळी; सास्ना.

गळग्रह [**म०** गळा+ग्रह (धरणारा)] **पु०** १ गळा पकडणारा. २ उपद्रवी माणूस. ३ विघ्नें उपस्थित करणारा. ४ अत्यंत आग्रह किं०

आग्रहाची विनंती, मागणी, किं० प्रार्थना; उ० तुम्ही मला भोजनास येण्याविषयीं गळग्रह घालतां पण मला फावणार नाहीं. ५ ज्योतिषशास्त्रांत सांगितलेला एक दुष्ट ग्रहविशेष.

गळघांटी स्त्री० गळ्याचें हाड जें पुढें आलेलें असतें तें.

गळचंडी, गळचोंडी, गळचुटी स्त्री० १ मानेचा मागचा भाग किं० त्या भागावरचें कातडें; उ० त्या मांजराची गळचोंडी धरून त्याला उचल. २ गचांडी; मानेला दिलेला धक्का,–हाताचा अंगठा आणि पुढचें बोट यांच्या मधील अवकाशानें; (**क्रि०** देणें).

गळचिपी [म० गळा+चेपणें] **स्त्री०** १ एकाद्याचा गळा पकडणें. २ अडकावून धरणें किं० ठेवणें; दुसऱ्याच्या कामांत कांहीं विघ्न आणून तें बंद पाडणें. ३ एकाद्याला फार त्रास येण्याइतकी आग्रहाची विनंती, प्रार्थना, किं० मागणी करणें (**क्रि०** करणें लावणें). ॐ**एकाद्याच्या गळचिपी बसणें**, किं० **गळचिपीस बसणें** त्यानें आपली मागणी पुरवावी म्हणून त्याला अति आग्रह करणें.

गळचुटी स्त्री० ए० व०, गळचुटया स्त्री० अ० व० १ गळा आंतून सुजण्याचा रोगविशेष(**क्रि०** बसणें, धरणें, फुगणें). हा रोग बरा होण्याला ' गळचुटी (–टया) मोकळी (–ळ्या) होणें ' असें म्हणतात. २ घसा, कंठ (तुच्छतेनें).३गाय इ० च्या गळ्याखालीं लोंबणारें कातडें; सास्ना. ४ शेळीच्या गळ्याखालीं पिशव्यांसारखे लोंबत असतात जे दोन अवयव ते प्रत्येक. ॐ **लिंबाला आल्या लिंबोण्या आणि कावळयाच्या धरल्या गळचुटया** इच्छिलेला सुखोपभोगाचा काळ प्राप्त झाला असतां त्याच वेळीं दुदैवानें त्या सुखाचा उपभोग घेण्याचें सामर्थ्य नाहींसें होणें.

गळणी [म० गळणें] **स्त्री०** नरसाळें,–लहान तोंडाच्या बारदानांत कांहीं पदार्थ ओतण्याची एक प्रकारची वर पसरट तोंडाची नळी.

गळणें [**सं०** गल्=गळणें] **अ० क्रि०** १ आधार नाहींसा झाल्यामुळें किं० कमजोर झाल्यामुळें पदार्थ स्वस्थानापासून सुटून खालीं येणें किं० पडणें. २ बारदानाला असलेल्या भोकांतून किं० फटींतून आंतील पदार्थ बाहेर येणें किं० बाहेर पडणें. ३ पाझरणें. ४ गळूं, जखम, इ० तू न' रक्त, पू, पाणी, इ० निघून बाहेर पडणें. ५ आजारामुळें किं० पोटांत फार वेळ अन्न न गेल्यामुळें रोड होणें, अशक्त होणें,किं० अस्वस्थ होणें. ६ कांहीं कार्यांत कांहीं विघ्न आल्यामुळें किं० अपयश आल्यामुळें निराश किं० निरुत्साह होणें. ७ विशिष्ट संख्येतून किं० समुदायांतून किं० संस्थेतून कमी होणें किं० बाहेर पडणें. ८ अनेक वस्तूंतून कांहीं नापसंत ठरणें आणि त्या टाकून दिल्या जाणें. ९ अपकर्षाच्या स्थितीस येणें. १० धैर्य, उत्साह, हिंम्मत,किं०आशा नष्ट होणें. ११कचरणें;कच खाणें; हटणें. १२ विस्मृतींत पडणें. १३ मरणें.१४ मैथुन. क्रियेवांचून (रेत) बाहेर पडणें. १५ कांहीं पानें नाहींशीं होऊन (ग्रंथ) अपूर्ण स्थितींत येणें.

गळंत [**म०** गळणें] **न०** १ शब्दाचा संक्षेप दाखविण्यासाठीं पहिल्या अक्षरापुढें घालतात तें शून्य; उ० रा० रा० म्हणजे राजमान्य राजश्री. २वाक्याचा किं० श्लोकाचा संक्षेप दाखविण्यासाठीं पहिल्या शब्दाचे पुढे घालतात तें शून्य. ३ अजीबात गाळलेल्या वाक्याबद्दल त्याचे जागीं घालतात तें शून्य किं० तें गाळलेलें वाक्य. **वि०** १ गळालेलें; गळून पडलेलें.२ गाळलेलें; ॐ**गळंत करणें** दुसऱ्याचा पैसा खाणें किं० लाटणें.

गळती [म० गळणें] **स्त्री०** १ अभिषेकपात्र. २अत्तरें करणारे किं० वैद्यलोक ह्यांचें पात्रविशेष,–ज्यांतून एका बारदानांतील पदार्थाचा कांहीं अंश दुसऱ्या बारदानांत पृथक् होऊन पडतो. ३ पाझरण्याची किं० गळण्याची क्रिया. ४ सोसाट्याच्या वाऱ्यामुळें झाडाचीं पानें, फुलें, फळें, इ० टपाटप गळून पडण्याची क्रिया; उ० ह्या झाडाला (किं० ह्या झाडाच्या फुलांना) सकाळपासून गळती लागली आहे. ५ ज्याचें वजन करावयाचें आहे पण जो तराजूच्या पारड्यांत ठेवितां येत नाहीं तो पदार्थ ज्या दोरीनें तराजूच्या दांडीच्या टोकाला लोंबत सोडतात ती दोरी.

गळतें [म०गळणें] **न०** १कौलें अव्यवस्थितपणें शाकारलेलीं असल्यामुळें पावसाचें पाणी घरांत गळणें.२ज्या विशिष्ट ठिकाणांतून पाणी असें गळतें तें ठिकाण. ॐ**गळतें काढणें** कौलें पुन्हा नीट शाकारून पावसाचें पाणी न गळेसें करणें. **गळतीचे दोष**

आणि **चळतीचे दोष** जें निवेदिणें जरूर तें न निवेदिल्यामुळें होणारे जे दोष ते गळतीचे दोष आणि भलतेंच कांहीं निवेदिल्यामुळें होणारे दोष, ते चळतीचे दोष; उ० ह्या आमच्या महाराष्ट्रीय सरस्वतीकोशांत जे गळतीचे दोष आणि चळतीचे दोष झालेले असतील त्याबद्दल महाराष्ट्रीयांनीं आम्हाला क्षमा करावी.

गळद (-ध-) ट वि० ज्याला रागें भरल्याची लाज नाहीं असा; बेशरम; कोडगा.

गळफ (-फा-)टणें अ० क्रि० घोटाळ्यांत पडून सापडेनासा होणें. मागें ' गलफटणें ' पहा.

गळफटणें, गळफाटणें, गळफटाविणें स० क्रि० निष्काळजीपणामुळें भलत्याच ठिकाणीं (पदार्थ) ठेवणें. २ गुंतविणें, गुंतागुंत करणें (दोरा इ०ची).

गळफटा, गळफाटा [म० गळफ (-फा-) टणें] **पु०** गुंतागुंत; घोटाळ्याची स्थिति.

गळफास [म० गळा+फास] **पु०** गळ्याला घातलेला किं०घालून घेतलेला फास (देणें, घालणें, घालून घेणें). [साधनविशेष.

गळवगदी, गळोगदी स्त्री० बगाड नांवाचें

गळवट, गळवंड, गळवणा, गळवणी क्रि० वि० गळ्यापर्यंत किं० कांठापर्यंत.

गळवटी, गळवडशी स्त्री० गायीच्या गळ्याखालीं लोंबत असतें तें कातडें; सास्ना.

गळवणी [**म०** गळणें+पाणी] **न०** पाझरलेलें किं० झिरपलेलें पाणी.

गळश्च कंठश्च, गळस्य कठस्य [संस्कृत रूपाचें मराठी] **न०** दाट मैत्री. [तोंडांतून पडणारें.)

गळसट न० थुंकी, कफ, किं० रक्त,(घट्ट रूपानें

गळसर स्त्री०, पु० १ स्त्रिया दोऱ्यांत ओवून गळ्यांत जे काचेचे माणि बांधतात ते प्रत्येक. २ ते मणि दोऱ्यांत ओवून गळ्यांत घालवयासाठी करतात तो सर.

गळसरणें अ० क्रि० थंडीमुळें किं० ओलीमुळें (पाय, बोटें) भेगाळणें.

गळसरी, गळेसरी, गळसोरी स्त्री० सोन्याचे आणि काचेचे मणि दोऱ्यांत ओवून आणि मध्यें पुतळी घालून गळ्यांत घालावयाला स्त्रिया करतात तो सर.

गळसुटी न० अ० व० घशाच्या आंतील भागाची सूज (बसणें, येणें, फुगणें).

गळसूत्र [म० गळा+सूत्र] **न०** १ घोड्याच्या गळ्याशीं बांधतात ते पट्टे किं० वाद्या (त्याचेवर बसते वेळीं किं०त्याला रथादिकांस जुंपते वेळीं).

गळा [**सं०** गल] **पु०** १ मानेच्या पुढचा भाग. २ घसा. ३ गाण्यांतील आवाजी; उ० त्या गवयाचा गळा मधुर आहे. ४ घागर, तांब्या, इ०-चा गळ्याच्या आकाराचा भाग,-म्हणजे पोट आणि कांठ ह्यांच्या दरम्यानचा भाग. ☙ **गळा धरणें** १ घशामध्यें कांहीं विकृति किं० आजार उत्पन्न होणें. ३ शब्दोच्चाराला किं० खाण्याला हरकत करणें किं० येणें. **केसानें गळा कापणें** विश्वासघात करणें. **गळा गुंतणें(किं०अडकणें)** अडचणींत किं० पेचांत सांपडणें किं०पडणें. **एकाद्याचा गळा गोवणें** त्याला वचनांत धरणें;त्याला पेचांत अडकवणें किं० संकटांत घालणें. **गळा दाटणें** किं० **दाटून येणें** दुःखानें किं० प्रेमानें सद्गदित होणें; शोकानें कंठ भरून येणें. **गळा पडणें, बसणें,** किं० **फुटणें** फार बोलून किं० गाऊन घसा घोगरा होणें. **गळा फुटणें** १ मुलगा प्रौढ दशेंत येऊं लागला म्हणजे त्याच्या आवाजाचा नाजूकपणा नाहींसा होऊन आवाज प्रौढ आणि भारदस्त होणें. २ पोपट इ० पक्ष्यांचा शब्दोच्चार स्पष्ट होणें. **गळा पिंजणें** १ कंठांतून दुहेरी उच्चार निघूं लागणें. २ पित्त इ० ओकून पडल्यामुळें घसा नाजूक होणें किं०सोलून निघणें. **एकाद्याच्या गळां बांधणें, गळीं बांधणें,** किं० **गळ्यांत बांधणें** १ एकादी वस्तु त्याला पथकरावयाला भाग पाडणें. २ त्याच्या माथीं विनाकारण दोष लादणें. **गळा भरून** (किं० **दाटून**) **येणें** १ प्रेमादि मनोविकारांनीं कंठ सद्गदित होणें. २ कफादिकांनीं गळा कोंदणें किं० चोंदणें. **गळा लागणें** गायनांत सूर किं० आवाजी यथाशास्त्र होऊं लागणें. **एकाद्याचा गळा सोडविणें** १ त्याचा गळा कापणें. २ त्याला पेचांतून किं० संकटांतून मुक्त करणें. **एकाद्याच्या गळीं पडणें** (किं० **लागणें**) १ त्याला अतोनात भीड घालणें किं० आग्रह करणें, किं० प्रार्थिणें. २त्याला आलिंगिणें. ३ अमुक गोष्ट तूंच केलीस असें त्याला विनाकारण म्हणणें; त्याला विनाकारण दोष देणें. ४ त्याच्यावर शिव्यांचा वर्षाव करणें. ५ त्याच्या-

वर भारभूत होऊन राहाणें. ६ त्याला जडणें; उ० तें व्यसन माझ्या गळीं पडलें. **गळीं लागणें** १ भारभूत होणें; उ० मुलगी गळीं लागली आहे, तिला हें तेरावें वर्ष. २ आरडाओरडा करणें; उ० असा काय गळीं लागतोस?जरा हळू बोल. **गळ्याखालीं उतरणें** १ (शब्दशः) घशाखालीं उतरणें; उ० घास अडकला होता तो आतां गळ्याखालीं उतरला. २ पदरांत पडणें; स्वाधीन होणें; पचणें. **तुला माझ्या गळ्याची शपथ आहे** माझा गळा न तुटावा असें तुला वाटत असेल तर तूं हें काम कर (आग्रह दाखवावयासाठीं ह्या वाक्प्रचाराचा उपयोग करतात). **एकाद्याच्या गळ्यांत असणें** त्याचेवर अवलंबून असणें; त्यानें केलेंच पाहिजे असें (काम) असणें; उ० सध्या माझ्या गळ्यांत पुष्कळ कामें आहेत; तुझें काम मला पथकरतां येणार नाहीं. **गळ्यांत गोणी येणें** १ एकादें संकट टाळावयासाठीं केलेल्या प्रयत्नानें तें संकट ज्यास्तीच त्रासदायक होणें. आमचें 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक पहा. २ संकट आढवणें. **गळ्यांत पाय येणें** अडचणींत किं० पेचांत सांपडणें; 'त्याच्या तंगड्या त्याच्या गळ्यांत आल्या ' ह्याचाही वरच्याचसारखा अर्थ होतो. **एकाद्याच्या गळ्यांत माळ घालणें** त्याला किं० तिला वरणें; पति म्हणून किं० पत्नी म्हणून स्वीकारणें. २ त्याच्यावर कांहीं काम सोपविणें; उ० लोकांनीं अध्यक्षपदाची माळ माझ्या गळ्यांत घातली (म्ह० मला अध्यक्ष केलें). **गळ्यांत येणें** एकादी अडचण किं० संकट उपस्थित होणें. चांगल्या उद्देशानें एकादें काम करीत असतां त्याचा अगदीं अनिष्ट परिणाम होऊन पंचाईत होणें. **एकाद्याच्या गळ्यांत धोंगडें येणें** १ त्याचेवर कांहीं तरी लचांड येणें.२ त्याची इच्छी नसतां एकादी गोष्ट पथकरण्याचा प्रसंग त्याचेवर येणें. **मुलगी गळीं (किं० गळ्याशीं) लागणें** ती लग्नाला योग्य होऊन गेलेली असणें; मागें ' गळीं लागणें ' पहा. **एकाद्याच्या गळ्यांत हात घालणें** त्याला दादा बाबा करणें; त्याची मर्जी सुप्रसन्न व्हावी म्हणून त्याला प्रेम दाखविणें. **गळ्यांत गळा आणि नळ्यांत नळा** निकट मैत्री; घट्ट दोस्ती; उ० आलीकडे रंगोपंत आणि सदूभाऊ ह्या दोघांचा गळ्यांत गळा असतो. **गळ्यांत पडणें** हिताहिताची, रक्षणाची, पोसण्याची, इ०ची जबाबदारी येणें; उ० माझी वहीण मेल्यापासून तिची मुलें माझ्या गळ्यांत पडलीं आहेत; उ० हेडक्लार्क रजेवर गेल्यामुळें पगार आकारणीचीं बिलें माझ्या गळ्यांत पडलीं आहेत. **गळ्यांत धोंड पडणें** नावडतें किं० कठिण काम करण्याचें ओझें येणें किं० जबाबदारी अंगावर पडणें. **गळ्यापर्यंत येणें** अगदीं असह्य होणें. **गळ्याला फास (किं० दोरी) लागणें** पंचाइतींत, पेचांत, किं० अडचणींत असणें, येणें, किं० सांपडणें. **गळ्यावर गाणें म्हणणें** मधुर, शास्त्रशुद्ध रीतीनें, किं० चालीवर गाणें म्हणणें. **गळ्यावर बोलणें** भरकटल्यासारखें बोलणें; अविचारीपणाचें भाषण करणें. **एकाद्याच्या गळ्यावर सुरी ठेवणें** त्याचा जीव घ्यावयाला उठणें किं० सिद्ध होणें. **गळ्याशीं येणें** नुकसानीची बाब होणें; उ० चिंचेचा व्यापार हरिभाऊंच्या गळ्याशीं आला (म्ह० त्या व्यापारांत ते बुडाले). **गळ्याचा किं० गळ्यांतला ताईत, गळ्यांतला तन्माणि पु०** अत्यंत प्रिय किं० लाडका किं० मूल्यवान् पदार्थ किं० माणूस (**क्रि०** मानणें, मोजणें, इ०). **मोठा गळा करून रडणें** मोठमोठ्यानें रडणें; ओकसाबोकशीं रडणें. **टीप**—' गळा 'चे कांहीं वाक्प्रचार खालीं स्वतंत्रपणें दिले आहेत.

गळागोठा पु० माणसांची गर्दी किं० दाटी.

गळांठणें स० क्रि० १ अव्यवस्थित करणें; वस्तूंचा गोंधळ किं० घोटाळा करणें. २ निष्काळजीपणानें भलत्याच जागीं (पदार्थ) ठेवून जरूरीच्या वेळीं तो सांपडेनासा करणें. ३ (आजार किं० भूक यांनीं) अशक्त करणें. **अ० क्रि०** १ भलत्याच ठिकाणीं पडल्यामुळें जरूरीच्या वेळीं सांपडेनासा होणें. २ घोटाळ्यांत पडणें. ३ भुकेनें किं० आजारानें अशक्त, निर्वीर्य किं० निःसत्व होणें.

गळाठा [**म०** गळाठणें] **पु०** अव्यवस्था. २ घोटाळा. ३ म्लानपणा; थकवा.

गळांड न०, गळांडा पु० गड्ड.

गळांत मागें ' गळंत ' पहा.

गळापट्टू, गळेपट्टू [**म०** गळा+पडणें] **वि०** १लोचट; हट्टी; हेका धरून बसणारा; पिच्छा

पुरविणारा. २ टाळतां न येण्याजोगा; अनिवार्य.

गळीत [**म०** गळणें] **वि०** १ ज्याचेपासून तेल निघतें असा पदार्थ, – बीजें, धान्यें, इ०. २ पडलेलें; पाझरलेलें. ३ ज्याची पानें गळून पडली आहेत असें (झाड, पुस्तक, इ०).

गळींव [**म०** गळणें] **वि०** पुरतेपणीं पिकून खालीं पडलेलें (फळ). ॐ **गळींव सुखड, गळी सुखड स्त्री०** झाडावर पुरतेपणीं पिकून खालीं पडलेला नारळ.

गळेफोड [**म०** गळा+फोड] **स्त्री०** १ फार किं० मोठ्यानें बोलणें. २ ज्या कामीं मोठ्यानें बोलावें लागतें असें काम.

गळेलठ्ठ, गळेलठ्ठ [**म०** गळा+लठ्ठ] **वि०** १ गळ्याच्या प्रदेशीं लठ्ठ (माणस किं० जनावर). २ खूप लठ्ठ आणि अगडबंब (माणूस किं०जनावर).

गळेसर, गळेसरी मागें 'गळसर,' 'गळसरी' पहा.

गळहाटा (–ठा) **पु०** १ अव्यवस्थित रीतीनें पडलेला कडबा, गवत, इ०.२ अव्यवस्था. ३ संकटाची किं० पेचाची स्थिति. ३ निरुत्साहता; अशक्तपणा; म्लानपणा; थकवा. ४ खूप मोठासरंजाम.

गळोगदी, गळवगदी स्त्री० वगाड नांवाचें यंत्र.

गळ्या [**म०** गळणें] **पु०** झाडावर परिपक्व होऊन गळून पडलेला नारळ.

गा उ० वा० अ० अगा ! अरे !

गाई स्त्री० १ गाय.२ मुलांचें निजणें (करणें). ३ मुलांना निजवतांना आया ह्मणतात तें गाणें.

गाईर स्त्री० १ शेणखळी. २ एका विशिष्ट झाडाच्या शेंगेंतील बी. कागद घोटून ह्या बीनें गुळगुळीत करीत असत. ३गळवांतील टणक भाग. ४ प्रौढ मुलीच्या स्तनांतील टणक भाग.५ कोंबडी इ०च्या अंड्यांतील पिवळा भाग.

गाउली [**म०** गाय] **स्त्री०** गाय (प्रेमानें किं० लाडानें).

गाऊ स्त्री० मुलांला निजवितांना आया म्हणतात तें गाणें.

गाऊल [**म०** गावणें] **न०** १ नफा, लाभ. २ अकल्पित रीत्या झालेला लाभ (**क्रि०** सापडणें, लागणें).

गाकर, गाखर, गागरा पु० कणकेचा निखाऱ्यांवर भाजलेला जाड रोठ. [यांची पोळी.

गाकरी स्त्री० तांदुळाचें पीठ आणि कणीक

गाखर पु० १निखारे;फुफाटा.२ कणकेचा रोठ.

गागणें अ० क्रि० १ एकाद्याच्या अंगावर ओरडणें. २ असंतुष्टपणानें ओरडणें, चरफडणें, किं० तणतणणें.

गागरडा पु०आरडा ओरडा;कल्ला; कलकलाट.

गांगरेंण, गांगावणें, गांगारणें, गांगणें भितीनें बावरणें किं० गर्भगळीत होणें.

गांगा वि० तांबड्या रंगाची छटा असलेल्या श्वेत वर्णाचा (घोडा).

गागाचार्य, गागादीक्षित, गागाभट्ट पु० १ शिवाजीला अभिषेक करणें यथाशास्त्र आहे असें ज्यानें सिद्ध करून दिलें तो पंडित. २ पंडितंमन्य; आपण मोठे पंडित आहों अशी शुष्क बढाई मारणारा माणूस.

गागावणें अ० क्रि० १ एकाद्यावर ताशेरा झाडणें; त्याच्यावर तोंड टाकणें किं० शिव्यांचा भडीमार करणें. २ चरफडणें, तरफडणें.

गागाळी, कागाळी स्त्री० एकाद्या माणसाविरुद्ध केलेली तक्रार.

गागी गुगे धनिष्ठा स्त्री० १ अर्थशून्य कांहीं तरी चर्पटपंजरी; मूर्खासारखें बोलणें. २ बावरलेल्या मनाच्या स्थितींत बोललेलें भाषण. जोशाला पत्रिका दाखवून कांहीं प्रश्न विचारला म्हणजे तो आपल्याशीं विचार करून उत्तर ठरवीत असतां तोंडानें जे शब्द उच्चारतो त्यांतील अधलींमधलीं अक्षरें घेऊन हा वाक्प्रचार बनविण्यांत आलेला आहे. **क्रि०** करणें,करूं लागणें, किं० म्हणणें.

गांगो पु० ग्रामदुर्गेसारखी एक देवता; ही देवता गांवकऱ्यांच्या आणि त्यांच्या गुरांढोरांच्या कल्याणाला जपत असते.

गांजणी, गांजणूक [**म०** गांजणें] **स्त्री०** १ छळण्याची क्रिया किं० व्यापार; सतावणूक. २ छळण्यानें झालेलें दुःख.

गांजणें स० क्रि० छळणें; सतावणें;उपद्रविणें. **अ० क्रि०** जर्जर होणें; कांहीं त्रास असह्य झाल्यामुळें क्लेश भोगणें.

गाजणें [**सं०** गर्ज्=ध्वनि करणें] **अ० क्रि०** १ (मेघादिकांनीं) ध्वनि करणें; गर्जणें. २ जगत्-

प्रसिद्ध होणें; समाजांत दुमदुमणें (चांगल्या किं० वाईट अर्थानें).

गाजर न० एक झाड,-ज्याच्या मुळांपैकीं एक मूळ अति लठ्ठ असतें आणि इतर मुळें तंतुरूप असतात.ह्या लठ्ठ मुळाची भाजी,रायतें, इ० खाद्यें करतात. ❀ **गाजरांची तुळा आणि विमानाची वाट** आपल्या भारंभार गाजरें गरीब लोकांस भिक्षा म्हणून द्यावयाचीं आणि ह्या पुण्यकृत्याबद्दल आपणास विमानांत सदेह जातां येईल अशी अपेक्षा करावयाची हा मूर्खपणा होय; अतिस्वल्प कामगिरीबद्दल फार मोठी बक्षिशी आपणास मिळेल अशी अपेक्षा करणाराची ह्या वाक्यानें थट्टा केली जाते. **गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीं तर मोडून खाल्ली** झाल्यास फायदा होईल, फायदा यदाकदाचित् न झाल्यास निदान तोटा तरी खास होणार नाहीं (येथें खाली म्ह० खातां येते). **गाजरपारखी** पु० ज्याला गाजराचीही पारख करण्याची अक्कल नाहीं असा माणूस म्ह० मूर्ख माणूस.**गाजरासारखा** वि० रागानें तांबडा लाल झालेला.**गाजरसुंब** स्त्री० घोड्याचा नाजुक आणि मऊ खूर.**गाजरसुंबा (-ड्या)** वि० नाजूक आणि मऊ खुरांचा (घोडा). **गाजरा** वि० तांबूस आणि मऊ (घोड्याचा खूर).

गांजवा पु० १ शेणी,गोवऱ्या,आंबे,इ० पदार्थ बाजारांत विकावयास नेतांना ज्या जाळ्यांत भरून नेतात तें जाळें. २ एक काष्ठौषधि.

गाजाविणें [म० 'गाजणें' चें प्रयोजक रूप] स०क्रि० प्रसिद्ध किं० जगजाहीर करणें. ❀ **तरवार गाजाविणें** आपल्या तरवारीनें पराक्रम करून प्रख्याति पावणें. **नांव गाजाविणें** प्रख्यात होणें. **लग्न, मुंज, किं० अन्य कार्य गाजविणें** तें थाटानें करणें.**वाजवून गाजवून करणें** उघडपणें करणें. **वाजत गाजत** क्रि० वि० मोठ्या थाटानें.

गांजा [हिं०] पु० १ भांगेचे बूट; भांगेच्या रोपाच्या मंजऱ्या. २ शेणी, आंबे, इ०पदार्थ ज्या जाळ्यांत घालून बाजारांत विकावयाला नेतात तें जाळें. वर 'गांजवा' पहा. ❀**गांजेकस** पु० गांज्याचें व्यसन ज्याला आहे असा माणूस.

गाजा पु० (मुलांच्या भाषेत) मेघ, ढग; उ० गाजा गाजा गाजूं दे तदशी भोपळी लागूं दे.

गाजा [म्ह० गाजणें] पु० प्रसिद्धि. ❀ **गाजावाजा** [म० गाजणें+वाजणें] पु० १ प्रसिद्धि, बोभाटा. २ कंठाचें आणि वाद्याचें संगीत. 'गाजावाज,' 'गाजावाजी' स्त्री० हीं ह्याच शब्दाचीं अन्य रूपें आहेत.

गाजी स्त्री० एक क्षुद्र प्राणिविशेष.

गाजी [अ०] पु० वीर; योद्धा; पराक्रमी पुरुष. ❀**क्षणांत गाजीचा पाजी होतो आणि पाजीचा गाजी होतो** राजाची अशी लहर लागली कीं श्रेष्ठ पुरुष मूर्ख ठरतो, आणि तशी लहर लागली कीं जो महामूर्ख तो अतिश्रेष्ठ म्हणून मान पावूं लागतो. ❀**गाजीमर्द** पु० १ वीर पुरुष. २ (घोड्याला प्रेमानें थोपटतांना) उत्तम घोडा.

गांझा पु० आंबे भरावयाचें जाळें.

गाटा, गाटऱ्या वि० १ हट्टी, हेकट. २ कावेबाज. स्त्री० गाटी.

गांठ [सं० ग्रंथि] स्त्री० १ दोरी, वंद, किं० सूत, यांचीं दोन टोकें कांहीं विशेष रीतीनें एकांत एक गुंतवून तीं वियुक्त न होतील किं० न सुटतील अशा रीतीचें बंधन किं० बांधणें. २ वृक्षाचा बुंधा इ०वर जें टेंगूळ झालेलें किं० वाढलेलें असलें तें. ३ शेजारच्या भागांपेक्षा अधिक टणक किं० घट्ट असा जो लाकडांत थोडासा किं० लहानसा भाग असतो तो.४ बोरूचें,उसाचें,कडब्याचें,किं०अन्य धान्याचें जें ताट असतें त्याच्या दोन पेरांच्या मध्यें असलेला टणक भाग. ५ तिसऱ्या महिन्यापर्यंतचा स्त्रीच्या गर्भाशयांतील मुलाचा अव्यक्त गोळा. ६ मनुष्य किं० अन्य प्राणी यांच्या अंगावर कांहीं रक्तदोषामुळें जी टणक किं० जाडी वाढ होते ती. ७ कांहीं कार्याच्या सिध्यर्थ पदार्थांचा संयोग,मिलाफ, किं० जुळणी; उ०कागद आणि लेखणी यांची गांठ पडेल तेव्हां अक्षर निघेल ८ भेट; उ०मी काल रामभाऊंच्या घरीं गेलों होतों पण त्यांची गांठ पडली नाहीं. ९ नाभिस्थानीं प्राण आणि अपान यांचा जो संधि तो. १० संग्रह, मालकी, स्वामित्व, किं०सांनिध्य (अप्रथमान्त प्रयोगांत); उ० माझ्या गाठीं (किं० गांठीला, गांठीस)काल दहा रुपये होते पण आज एकही उरला नाहीं, सगळ खर्चून गेले. ११एखादी गोष्ट अमुक प्रकारें होईल किं०अमुक प्रकारची आहे असें जें कोणी सांगितलेलें त्याचा आलेला अनुभव,

प्रत्यय, किं० पडताळा; उ०आज संध्याकाळीं गोविंदराव चिंचवडाहून येतील असें जें जोशीबोवांनीं सांगितलें होतें त्याला गांठ पडली. १२ठरवून ठेविलेली मर्यादा, परिमिति, किं०अटकळ, ह्यांची प्रत्यक्ष परिमाणाशीं जुळणी किं० तफावत; उ० पांचशे रुपायांत घर बांधू म्हणतां पण आठशें रुपयांशीं गांठ पडेल. १३ गुंतागुंत; घोटाळा. १४ व्यवहार ज्याच्याशीं करावयाचा तो मनुष्य त्या व्यवहाराच्या अपेक्षेनें; उ० माझ्या प्रश्नांना खरीं खरीं तीं उत्तरें दे; यत्किंचित् खोटें सांगूं नको, माझ्याशीं गांठ आहे हें लक्ष्यांत ठेव. १५ क्रोधादि विकारामुळें कपाळावरच्या शिरा टणक होऊन उठून दिसतात त्या; (अनेक वचनी प्रयोग). १६जुळणी, प्रत्ययास आलेला संवाद, किं० सारखेपणा, किं०एकरूपता; उ० गोदोंवाचें कालचें बोलणें आणि आजचें बोलणें ह्यांना गांठ नाहीं. १७ सोयीचा समय; अनुकूळ वेळ; उ० मी तुमचे पन्नास रुपये द्यावयाचे आहेत ते मला गांठ पडेल तेव्हां देईन. १८ इहलोकचे बंध; भवचक्रांत सांपडलेल्या माणसाला खावे लागतात ते गोते किं० फेरे. १९तोंड न पडलेलें गळूं.❀ **एकाद्या ध्येयाशीं गांठ घालणें** (किं०**ठेवणें**) तें ध्येय सदैव लक्ष्यांत धरून वर्तन करणें किं० करीत राहणें; उ० तो नेहेमीं मतलबाशीं गांठ घालीत (किं० ठेवीत) असतो. **एकाद्याची गांठ घेणें** त्याच्या भेटीस जाणें. **एकाद्याची गांठ न घेणें** तो आपल्या भेटीस आला असतां त्याला भेट न देतां त्याला परत पाठविणें. **गांठीस असणें** संग्रहास असणें; जवळ असणें; हावा तेव्हां उपयोग करतां येईल असा असणें. **गांठीस करणें** संग्रहीं ठेवणें; शिलकीस टाकलेला असणें; बाळगून ठेविलेला असणें. **सात गांठी देऊन ठेवणें** किं० **सात गांठींपलीकडे ठेवणें** फार जपून ठेवणें; फार फार जपणें. **आपण करूं तें काम, गांठीं असेल तो दाम** आपण जातीनें किं०स्वता करूं तेंच काम चांगलें होतें आणि प्रत्यक्ष आपल्या जवळ असेल तोच आपला पैसा आपल्याला ऐन वेळीं उपयोगीं पडतो. **असंगाशीं संग आणि प्राणाशीं गांठ** भलत्याच माणसाशीं आपला संबंध आला असतां किं० आपली मैत्री जडली असतां आपले प्राण धोक्यांत पडतात, म्ह० आपणाला त्रास होतो. **बोला फुलाला गांठ पडणें** आपण बोललेलें असेल (म्ह०भाकीत केलेलें असेल किं०इच्छिलेलें असेल) तेंच घडून येईल अशा अर्थाचें फूल देवानें देणें. टीप—देवाला कांहीं प्रश्न विचारून त्याच्या मूर्तीला फुलें चिकटावून ठेवतात आणि उजवीकडची किं० डावीकडचीं फुलें पडतील त्याप्रमाणें देवानें उत्तर दिलें असें समजण्यांत येतें. **बोलल्या बोलास गांठ पडणें** जें आपण बोललेलें असूं तेंच प्रत्ययास येणें. **कांहीं काम करण्यास गांठ पडणें** तें करण्याला अनुकूल किं० सोयीचा समय प्राप्त होणें. **गांठचा वि०** खालीं यथाक्रम पहा. **गांठदाम पु०, गांठसोडावण न०, स्त्री०** लग्नाच्या सोहाळ्यांत वधूच्या बहिणीनें वधूवरांच्या वस्त्रांना मारलेली गांठ सोडण्याच्या मानाबद्दल दिलेली देणगी(लुगडें, खण, दागिना, इ०).

गांठचा [म० ' गांठ ' ची षष्ठी] **वि०** १ आपल्या संग्रहीं असलेला; आपल्या हातीं असलेला; प्रत्यक्ष आपल्याजवळ असलेला. २ ज्याची मालकी आपणाकडे आहे असा. ३ ज्याची जबाबदारी आपआपणावर आहे असा. ❀ **गांठचा एक शंभरांबरोबर** प्रत्यक्ष आपल्या हातीं जो पैसा आहे त्याचा उपयोग अधिक होतो आणि अधिक खात्रीपूर्वक होतो. लोकांकडून यावयाच्या पैशासंबंधानें तशी खात्री नसते म्हणून त्याचा उपयोग कमी होतो किं० त्याच्या संबंधानें आपणाला निश्चित बसतां येत नाहीं. **खोटा तरी गांठचा आणि वेडा तरी पोटचा** मागें ' खोटा ' शब्दांत पहा. **गांठचा वाहणें** स्वताच्या मालकीचा पैसा खर्चणें,—जो खर्चल्याबद्दल आपणास कोणी बोलूं शकणार नाहीं. **जामीन रहा आणि गांठचें वहा** आपण जामीन राहिल्यास आपलें पैशाचें नुकसान होण्याचा संभव असतो.

गांठण [ग० गांठणें; सं० ग्रथन] **स्त्री०** १ गांठण्याची क्रिया; खालीं ' गांठणें ' पहा. २ गांठ किं० गांठी मारणें. ३ गुंतविणें.

गांठणें [सं० ग्रंथ्=बांधणें, गुंफणें] **स०क्रि०** १ गांठ किं० गांठी देऊन बांधणें, सांधणें, खिळविणें, किं० पक्कें करणें. २ पकडणें. ३ एकाद्याच्या भेटीचा योग कांहीं युक्तीनें किं०

प्रयत्नानें घडवून आणणें; उ० विश्वंभर दिवसभर कोठेंही भटकला तरी रात्रीं जेवणाला घरीं येणारच, म्हणून तूं रात्रीं येथें येऊन त्याला गांठ; उ० चोरांनीं त्याला ऐन रडतोंडिच्या खिंडींत गांठलें. ३ नियंत्रणेंत ठेवणें; कबज्यांत आणणें; वश किं० अनुकूल करून घेणें; उ० हा सदानंद भारी हट्टी, ह्याला कोण गांठू शकेल ? ४ (ध्येय) मिळविणें; (इष्टार्थ) साधणें. ५ ताब्यांत घेणें; नियंत्रणेंत आणणें. ꕥ **पल्ला गांठणें** जेथें जाऊन पोंचावें असें मनानें ठरविलेलें असतें तेथें जाऊन पोचणें.

गांठलें [**म०** गांठणें] **न०** पुतळ्या, मणि, इ० एका सरांत ओवून गळ्यांत घालदयासाठीं जें भूषण केलेलें असतें तें.

गांठळ, गांठाळ, गांठेळ [**म०** गांठ] **वि०** १ ज्याला पुष्कळ किं० जागोजाग गांठी आहेत असें(लाकूड इ०). २ ज्यांतील शिरांची जागोंजाग वेटोळीं झालीं आहेत असें गात्रविशेष(पोटरी,मनगट, इ०). ३ वक्रमार्गी,कपटी (माणूस, विचार, इ०). ꕥ **गांठळगुंठळ, गांठळगुंठळ वि०** ज्यांत जागोंजाग पुष्कळ गांठीं आहेत असें (लाकूड).

गांठा [**म०** गांठ] **पु०** खंडोबाचे भक्त किं० इतर लोक जें गळ्यांत कांहीं विशेष रीतीनें गुंफिलेलें कंठभूषण धारण करतात तें.

गांठी [**म०** गांठ] **स्त्री०** १ शिमग्याचे महिन्यांत मुलांस खाऊ म्हणून द्यावयासाठीं खारका, खोबऱ्याचे तुकडे, लवंगा, वेलदोडे, इ० पदार्थांची माळ करतात ती. २ साखरेचा पाक लाकडी ठशांत ओतून दोऱ्यांत गुंतविलेल्या पदकांच्या माळा हलवई लोक शिमग्याच्या सणासाठीं करतात त्या प्रत्येक. ३ अळवाच्या पानाला कांहीं विशेष प्रकारें गांठीं देऊन करतात जें तोंडीलावणें तें.

गांठीव [**म०**गांठणें]**वि०**गुंफिलेला; गुंफून किं० पटवून केलेला (दागिना, – माळ, ठुशी, इ०).

गांठोडी (–ळी) [**म०** गांठणें] **स्त्री०** लहानसें गाठोडें; पुर्चुंडी.

गांठोडें, गांठोळें [**म०** गांठणें] **न०** १ लहानसें गांठोडें (कपडे, इ० चें). २ गुप्तपणें ठेविलेलें द्रव्य. ३ नागपंचमीच्या सणाला करतात तें पक्वान्न,–दिंडें. ꕥ **गांठोडें आटोपणें** (किं० **आवरणें, गुंडाळणें, बांधणें**) १ सामान सुमान आवरून निघून जाण्यास सिद्ध होणें. २ समाप्त करणें(काम, कारभार, इ०). **एकाद्याच्या अंगाचें गांठोडें होणें** १ तो लठ्ठ होणें. २ आजारादि कारणांमुळें तो हातपाय इ० गात्रांचें चलनवलन करण्यास असमर्थ होणें.

गांठ्या [**म०** गांठणें] पु० १ खंडोबाचे भक्त गळ्यांत घालतात तें चांदीचें जड वलय. २ शूद्र स्त्रियांचें एक कर्णभूषण. ३ अळवाच्या पानाच्या तुकड्यांना गांठी देऊन उकडून करतात तें खाद्यविशेष; उ० आज आमच्या घरीं गांठे केलें होते. ४ एक वनस्पतिविशेष.

गांठ्याळ, गांठाळ, गांठळ [**म०** गांठ] **वि०** ज्याला किं० ज्यांत फार गांठी आहेत असें (लाकूड इ०).

गांड [**सं०** गुद] **स्त्री०** १ प्राण्यानें भक्षिलेल्या अन्नावर जठराग्नि इ० चे संस्कार होऊन कांहीं भागांचें रक्त इ० होऊन कांहीं त्याज्य भाग ज्या द्वारांतून शरीराच्या बाहेर टाकला जातो तें द्वार; गुद; ढुंगण. २ कोणत्याही पदार्थाचा खालचा किं०मागचा भाग.

गाडगुड स्त्री० न० १ मेघांची गर्जना. २ पोटांतलि गुरगुरणें. ३ पुढें काय होईल कोण जाणे अशी भीति.

गाडगें, गाडलें न०, गाडगा, गाडला पु० [**सं०** घट] मृत्तिकेचें भांडें. ꕥ **गाडगें आंबा पु०** एक प्रकारचा आंबा; हा आकारानें गाडग्या इतका मोठा असतो.

गाडणें[**हिं०**]**स०क्रि०**१जमीनींत खळगी करून तींत (कांहीं वस्तु) घालून वर माती घालून नजरेआड करणें; पुरून टाकणें. २ जमीनींत दरा करून त्यांत (खांब इ०) रोवणें किं० पुरणें. ३ (लाक्षणिक) वैराचें किं० विरोधाचें कारण विसरून जाण्याचा प्रयत्न करणें किं०त्याचें उच्चारण न करणें.

गाडदी, गारदी [**पोर्च्युगीझ**] **पु०**१ पायदळांतील शिपायी. २ बड्या माणसाचा शरीरसंरक्षक. ३ पेशव्यांचा शरीरसंरक्षक (हे बहुधा मुसलमान किं० परदेशी जातीचे असत).

गाडला पु०, गाडलें न० [**सं०**घट] मृत्तिकेचें पात्र.

गाडला पु०,**गाडली** स्त्री०,**गाडलें**.न०मुलांची खेळावयाची गाडी (मातीची किं०भेंडाची).

गाडा पु० १ ज्याला दोन चाकें असून बहुधा ओझ्यांची वाहतुक करण्यासाठीं योजितात तें साधनविशेष. २ मुलांना खेळावयासाठीं देतात ती गाडी.३चाकाचा परीघ. ४नथेचा जो तारेच्या रूपाचा भाग नाकाच्या वेजांतून शिरकावून नथ नाकांत अडकावतात तो. ५ राहाटाचा जो परीघ तो. ६ चाळण,डफ, इ०चा,किं०नथ इ० भूषणांचा जो परिघ किं० विस्तार तो. ७ खूप मोठें परिमाण (गाडाभर ह्या वाक्प्रचारांत मात्र).**॰पांगुळगाडा** पु० मुलांना चालतां यावें म्हणून जें साधनविशेष केलेलें असतें तें.**संसाराचा गाडा** पु० संसाररूपी गाडी म्ह० संसाराची जबाबदारी; संसाराचे कष्ट;त्रासदायक किं० कष्टकर संसार. **गाड्यावर नाव आणि नावेवर गाडा** १ जो मनुष्य आज श्रीमंत आहे आणि विपद्ग्रस्तांचा परामर्श घेतो, तो दैवगतीनें विपन्न दशेस येतो, आणि विपन्न दशेस आला म्हणजे त्याचा परामर्श त्यानेंच पूर्वी पोषिलेला गरीब पण आतां श्रीमंत झालेला मनुष्यच घेऊं लागतो. संसारांत अशीं कांहीं चमत्कारिक परिवर्तनें घडतात कीं आज जो गरीब आहे तो उद्या श्रीमंत होतो, आणि आणि आणि आज जो श्रीमंत आहे तो उद्यां गरीब होतो. २ समाजांतील सर्व माणसांनीं एकमेकांच्या उपयोगीं पडलें पाहिजे. **चालत्या गाड्याला खीळ घालणें** मागें ' खीळ ' मध्यें पहा. **गाडा नाडा** पु० ए० व० संसाराचा पसारा,—घरेंदारें, नोकर चाकर, शेतवाड्या, इ०. **गाड्याला जुंपलेला** वि० जो सदा कामांत गुंतलेला असतो तो; ज्याला फुरसतीचा वेळ फार थोडा मिळतो तो; ज्याचें काम एकसारखें चाललेलेंच असतें असा.

गाडी स्त्री० १ दोन चाकें ज्याला आहेत असें वाहन. २ दोन किं० तीन किं० अधिक चाकांचें वाहन. ३ नथ, ढोलकें, चाळण, इ०चा घेर. ४ विहिरींतून पाण्याची घागर इ० काढणें, किं० कांहीं ओझीं खालून वर चढविणें या कामांसाठीं त्यांना दोरी बांधून ज्या चाकावरून ती दोरी ओढतात तें चाक. ॰ **गाडीचें चाक** न० चाकर कसाही वागला तरी त्याला दोष देणारा यजमान.

गाडीवान पु० १ गाडी हाकतो तो. २ गाडीचा मालक.

गाडीव [म०गाडणें] वि० पुरलेला किं०जमीनींत उभा केलेला (खांब, धोंडा, इ०).

गांडीव, गांडिव [सं०] पु०, न० १ अर्जुनाचें धनुष्य. २ कोणतेंही धनुष्य. ॰ **गांडीवी** पु० अर्जुन.

गाडीवान पु० ' गाडी ' मध्यें पहा.

गांडू, गांड्या वि० १ दुर्बळ; विवक्षित कार्याविषयीं जो असमर्थ तो. २ भित्रा; नेटानें कोणतेंही काम करावयाची ज्याला धमक नाहीं असा; मागें मागें सरणारा; कचर खाणारा.॰**मन बादशाही पण दैव गांडू** मोठे मोठे पराक्रम करण्याची ज्याला हौस आहे पण दैव अनुकूल नसल्यामुळें ज्याच्या हातून कांहींच घड होत नाहीं असा; हें दुर्दैवी माणसाचें वर्णन आहे.

गांडूळ, गांडोळ न० दोऱ्यासारखा किं० सुतळीसारखा एक सरपटणारा प्राणी.

गाडें न० जुगारांत लाविलेला पणाचा पैसा.

गाडें न० [' गाडी ' चें लघुत्वदर्शक रूप] न० १ गाडी. २ (लाक्षणिक)व्यवहाराची सरणी;कांहीं विशिष्ट व्यवहार;उ०तें गाडें कांहीं निराळेंच आहे. ॰ **गाडेबगाड** न० बगाड हा एक प्रायश्चित्ताचा प्रकार आहे. एका खांबाच्या माथ्याला काटकोनांत खिळविलेल्या आडव्या लाकडाच्या टोकाला लोंबत सोडलेल्या दोरीच्या टोकाला बांधलेला आंकडा पाठीच्या स्नायूंतून खुपसून घेऊन स्वताला टांगून घेणें ह्या विधीला ' बगाड घेणें ' म्हणतात. ह्या खांब जमीनींत उभारलेला असतो तेव्हां ह्या विधीला ' साधें बगाड ' म्हणतात आणि हा खांब जेव्हां गाडींत उभारलेला असतो आणि ही गाडी देवाच्या मूर्तीभोवतीं एक किं० अधिक प्रदक्षिणा करते तेव्हां ह्या विधीला' गाडे बगाड घेणें 'म्हणतात.

गाडे भिंगोऱ्या,गाड्या भिंगोऱ्या स्त्री०अ० व०, **गाडे भिंगोरे** पु अ० व० आपल्या स्वताच्याच अंगाभोंवतीं वाटोळें फिरण्याचा मुलांचा एक खेळ.

गाड्या [म० गाडणें] वि० जो गाडतो म्हणजे पुरतो तो; मृत मनुष्याला पुरतो किं० मूठमाती देतो तो. ॰**गाड्याची आणि गाड**

त्याची वाट एकच मृत मनुष्याला पुरतो तो मृताच्याच वाटेनें जावयाचा आहे म्ह० सगळे लोक मरावयाचेच.

गांड्या वि० १दुर्बळ. २ भित्रा. ३ पराक्रमशून्य.

गाढ [सं०] वि० १ स्वस्थ लागलेली (झोप). २ गहन, निबिड (अंधकार). ३ परमावधीचें (अज्ञान). ४ दाट (जंगल, अरण्य). ५ घट्ट (बांधलेला). ६ भक्कम, मजबूद. ॐ**गाढमुष्टि वि०** कंजूष, चिक्कू. **गाडमूढ वि०** डाराडूर लागलेली (झोप).

गाढव न० एक आळीसारखा क्षुद्र जंतु,–हा बहुधा घाणीच्या जागीं असतो.

गाढव [सं० गर्दभ] पु०, स्त्री०, न० एक चतुष्पाद प्राणी; ह्याचे कान लांब असतात आणि हा भारी काटक असून मोठीं ओझीं वाहूं शकतो. ॐ**एकाद्याच्या घरावरून गाढवाचा नांगर फिरविणें** ज्याला शिक्षा करावयासाठीं त्याचें घर जमीनदोस्त करून ती जागा गाढव जुंपलेल्या नांगरानें नांगरविणें; हा प्राचीन काळीं फार मोठ्या शिक्षेचा एक प्रकार होता. **गाढवाच्या गोणीस खंडीभर तूट (किं० भोकें)** पदरांत पडलेल्या परिमाणाच्या मानानें फुकट गेलेल्याचें परिमाण फारच अधिक. **गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ** मूर्ख लोक कांहीं गोष्टीचा विचार करण्यासाठीं एकत्र जमले तर त्याचा परिणाम काय होणार ? ते एकमेकांचीं वर्मे कर्मे काढून एकमेकांना खिजावणार आणि सर्व मंडळी फुटून दहा दिशांस दहा लोक निघून जाणार. **गाढवानें शेत खाल्ल्याचें पाप ना पुण्य** गायीनें शेत खाल्लें तर एका पवित्र प्राण्याचें पोट भरेल आणि मालकाला पुण्य लागेल; पण गाढवानें शेत खाल्लें तर नुकसानी होऊन पुण्य कांहींच पदरांत पडणार नाहीं; हलकटावर किं० निरुपयोगी माणसावर केलेले उपकार अनाठायीं जातात. **गाढवापुढें वाचली गीता कालचा गोंधळ बरा होता** ज्याला उपदेशाचें ग्रहण करण्याची पात्रता नाहीं त्याला उपदेश करण्याचे श्रम न घेतां पूर्वीची अव्यवस्था, अडचण, किं० गैरसोय पथकरणें हें अधिक बरें. ' गांवढ्यापुढें ' असाही पाठ आहे; गांवढ्या ह्म० खेडवळ अशिक्षित माणूस. **गाढवाला गुळाची चव काय माहीत ?** चांगल्या वस्तूचे गुण तिच्याशीं परिचित नसणाराला किं० अडाण्याला कळत नाहींत; दर्दी माणसालाच वस्तूचे गुण समजतात. **गाढवाचा खरारा पु०** मूर्ख किं० बिनअकली माणूस. **ज्याचा त्याला आणि गाढव ओझ्याला** ज्याचा माल असेल त्याच्याकडे तो माल पोचविला जाईल; माल वाहून नेणें इतकेंच काय तें गाढवाचें काम. निरोप पोचविणारा मनुष्य वैतागानें हा उद्गार काढतो; लोकांच्या भानगडीचा विचार आपण कशाला करावा ? निरोप पोचविणें आपलें काम आहे तें चोख केलें म्हणजे आपण सुटलों. **गाढवाच्या पाठीवर साखरेची गोणी** मोहोरा पुतळ्या गाढवानें पाठीवर वाहून नेल्या तरी त्याला तितकेंच श्रम आणि गोवऱ्या वाहून नेल्या तरी तितकेच श्रम; दोन्ही ओझीं वाहण्याचे कष्ट सारखेच (हा नोकराचा वैतागाचा उद्गार). [स्त्री.

गाढवी, गाडवीण स्त्री० गाढव ह्या प्राण्याची

गाढा [सं० गाढ] वि० १ दाट (दूध, काकवी, इ० पातळ पदार्थ). २ घट्ट, मजबूत, किं० कसलेलें (गात्र, शरीर, इ०). ३ धीट; न कचरणारा. ४एकाद्या कलेंत किं०शास्त्रांत निष्णात. ५ पक्का, विलंदर, अट्टल.

गाण स्त्री० डोंगरांत जें पाण्याचें स्थान विहिरीसारखें पण फारसें खोल नसतें तें.

गाणें [सं० गै=गाणें] अ० क्रि० कांहीं विशेष नियमांच्या अनुसारानें रचिलेले शब्द कांहीं विशेष प्रकारें स्वर उंच सखल करून ह्मणणें.

गाणें [सं० गै=गाणें] स० क्रि० १(कांहीं विशेष नियमांच्या अनुसारानें रचिलेलें शब्द) कांहीं विशेष प्रकारें स्वर उंच सखल करून म्हणणें म्ह० सुरावर म्हणणें. २ (कांहीं विषय, गोष्ट इ०) कवितेच्या रूपानें वर्णणें किं०निवेदिणें. ३ एकाच विषयांबद्दल बोलत बसणें लोकांना कंटाळा येण्याइतकें.

गाणें [सं०गै=गाणें] न० १ कांहीं विशिष्ट नियमांना अनुसरून रचिलेलें आणि कांहीं विशिष्ट नियमानुसार म्हणावयाचें जें वाक्य तें किं० जीं वाक्यें तीं समुच्चयानें. २ लांबच लांब आणि कंटाळा यावयाजोगी जी गोष्ट ती. ३ एकाद्या पदार्थाची एकसारखी केलेली मागणी. ४ त्याच गोष्टींसंबंधानें

चालविलेली पिरपीर. ५ बाबत, प्रकरण, विषय. ॐ **गाणेंबजावणें न० पु० न०** गाणें आणि वाजविणें; गायनवादन.

गात [**सं०** गात्र=शरीर किं० शरीराचें अंग] **न०** पलंग, बाज, इ० च्या चौकटींचीं जीं चार लाकडें तीं प्रत्येक. ॐ **त्याच्या बोलण्याला (कृतीला, किं० वर्तनाला) आडवें गात ना उभें गात** त्याच्या वर्तनांत इ०त कांहीं मेळ नाहीं म्ह० तें वेड्यासारखें किं० मूर्खासारखें आहे, किं० भरकटल्यासारखें आहे.

गातडा, गाताडी [**म०** गात; **सं०** गाल] **स्त्री०** १ गुरांचें खाद्य गवत, कडबा, इ० च्या पुढें आडवा वांसा जो लाविलेला असतो आणि ज्याला गुरांचीं दांवीं बांधलेलीं असतात तो वांसा. २ देवाच्या मूर्तींना भक्तजनांनीं अगदीं खेटून बसावयास येऊं नये म्हणून जो आडवा ठोकिलेला दांडा असतो तो. ३ आकाशांत मेघांचा लांबलचक पट्टा पसरलेला असतो तो; उ० संध्याकाळपर्यंत ढगांची गातडी जमेल, (धरेल, मोडेल, वितळेल, इ०).

गाताडा वि० १ हट्टी; हेकट. २ मुद्दाम आडमार्गांत शिरणारा.

गात्र [**सं०**] **न०** १ देह. २ शरीराचा कोणताही अवयव; उ० हा कडबा रचून माझीं गात्रें अगदीं खिळखिळीं होऊन गेलीं; उ० त्याचीं गात्रें तालमीच्या कामांनीं कसलेलीं आहेत. ३ शरीराचीं जीं नऊ द्वारें त्यांतून कांहीं विकृतीमुळें बाहेर पडलेलें अंग. ॐ **गात्रभंग पु०**कांहीं विकृतीमुळें शरीरास आलेली अशक्तता किं० कमजोरी.

गांथण [**सं०** ग्रथन] **स्त्री०** ताटी, कूड, घरावरचें ओंबण, इ०च्या आडव्या आणि उभ्या काठ्यांना संयोगाच्या स्थळीं सुतळी, सुंभ, इ०नीं गांठी मारण्याचा व्यापार म्ह० गांठी मारणें.

गांथणें [**सं०** ग्रंथ्=बांधणें, रचणें]**स०क्रि०** (ताटी, कूड, ओंबण, इ०च्या आडव्या आणि उभ्या कांठ्या) सुंभ, सुतळी, इ० नीं बांधणें.

गाथा [**सं०**] **स्त्री०** १ स्तोत्र. २ श्लोक. ३ गाणें. ५ कथा, इतिहास. ५ प्राकृत भाषा किं० कविता. ६ एक वृत्तविशेष. ७ रिकामटेकड्या गप्पा किं० गप्पाष्टकें (कुटणें, करणें, इ०). **पु०** गोंधळ, गुंतागुंत, घोटाळा. ॐ **गाथागोवा पु०**

गाथागोवी स्त्री०१घोटाळा, गुंताडा, अव्यवस्था.२ अस्ताव्यस्त पडलेलें सामानसुमान.

गाथिक [**म०** गाथा] **वि०** १ दंतकथा, काहाण्या, गोष्टी, आख्यायिका, इ० सांगतो तो किं० सांगण्याचा धंदा करतो तो. २ गद्यरचना करतो तो. [गढूळ होणें.

गादणें अ० क्रि० १ (वस्त्र) मळणें. २ (पाणी)

गांदणें स० क्रि० छळणें, गांजणें, सतावणें.

गांदविणें, गादाविणें स०क्रि० १ गढूळ करणें (पाणी, इ०). २अव्यवस्थित करणें; गोंधळविणें;०ची दाणादाण करून सोडणें. ३ छळणें; सतावणें; गांजणें.

गादा [**हिं०**] **पु०** १ एक मोठ्या आकाराचा समुद्रांतील मत्स्य. २ गढूळ झालेलें पाणी. ३ पातळ चिखल; राड. ॐ **गादावादा पु०** अव्यवस्था किं० अव्यवस्थित रीतीनें पडलेलें सामानसुमान.

गादावणें भा० क० क्रि० पोटांत ढवळत किं० कळमळत असणें; उ० आज सकाळपासून माझ्या पोटांत गादावत आहे.

गादी स्त्री० १ निजावयासाठीं किं० बसावयासाठीं कापूस इ० पदार्थ पिशवी, खोळ, इ० मध्यें भरून मऊ केलेलें आसन. २ मोठ्या अधिकाऱ्याचा हुद्दा, दर्जा, किं० इभ्रत, किं० त्याचीं खरोखरीची बसावयाची गादी; उ० राजाच्या गादीला इतरांनीं पाय लावूं नये. ३ तंबाखू, इ० जिन्नस विकण्याचा सरकारानें एखाद्या इसमास दिलेला मक्ता; उ० मुंबईस तंबाखूची गादी आहे ह्मणून ती हावी त्याला विकतां येत नाहीं. ४कागदाचे दहा दस्ते समुच्चयानें. ॐ**गादीला पाय लावणें** १ राजाच्या विरुद्ध बंड करणें. २ वरिष्ठाशीं बेमुरवतीनें वागणें. ३ वरिष्ठाचा अधिकार बळकावूं पाहणें. **गादीवर गोष्टी सांगणें** १ बढाईच्या गोष्टी सांगणें. २ प्रसंग आला नाहीं तों आपली प्रौढी वर्णिणें. **गादीहुजूर क्रि० वि०** वरिष्ठाच्या समोर किं० समक्ष. **गादीचा चाकर पु०** अधिकारावर एकाद्या विशिष्ट समयीं जो कोणी असेल त्याचा नोकर. **गादी तंबाखू स्त्री०** धान्याचे व्यापारी, वाणी, इ० लोकांचीं दुकानें.

गांध स्त्री० १ पित्तादि विकृतीमुळें, किं० मुंगी इ०डसल्यामुळें शरीराची त्वचा त्या ठिकाणीं जाड

होते ती. २ जिच्या दंशानें त्वचा अशी जाडी होते ती माशी.

गांधट, गांधाड, न०मोठी गांध.वर'गांध' पहा.

गांधणी, गांधळ, स्त्री०गांधीलमाशी 'गांधीण,' 'गांधील,' 'गांधण,' हीं ह्या शब्दाचीं अन्य रूपें आहेत.

गांधर्व [**सं**०] **वि**० गंधर्वासंबंधाचें. **पु**० १ प्रीतिविवाह. २ घोडा. **न**० १ गाणें. २ संगीतशास्त्र. ॐ **गांधर्वलग्न न**०, **गांधर्वविवाह पु**० प्रीतिविवाह; स्त्रीपुरुषांच्या परस्पर संमतीनें झालेलें लग्न.मागें 'अष्ट' शब्दांत 'अष्टविवाहविधि' पहा.

गांधार [**सं**०] **पु**० सप्त स्वरांपैकीं तिसरा.

गांधी [**सं**० गंध] **पु**० औषधी द्रव्यें विकतो तो; पसारी.

गान [**सं**०]**न**०१ गाणें.२ गाण्याची चीज.३ गाण्याची कला किं० शास्त्र. ॐ **गानश्रेढी स्त्री**० गणितांत श्रेढींचा एक प्रकार.

गाफल, गाफील, गाफिल, गाफली [**अ**० गाफिल] **वि**० १ निष्काळजी; गैरसावध. २ कर्तव्यांत कसूर करणारा. ॐ **गाफली स्त्री**० जिचा मालक परागंदा झालेला आहे किं० जिचा मालक कोण हें कळत नाहीं अशी जमीन.

गाब(–भ–)डी स्त्री०, **गाबडें न**० १ भोकं बुजविण्यासाठीं मारलेलें ठिगळ (लाकडाचें किं० फडक्याचें). २ भोक बुजविण्यासाठीं ठोकलेली किं० खुपसलेली खुंटी.

गाबती (–दी)पु०कोळी;मासे धरण्याचा धंदा करणारा किं०मासे धरणाराच्या जातीचा इसम. ॐ **गाबत्यास गुरूं आणि गुराख्यास तारूं** भलत्याच माणसानें भलताच धंदा करणें हा मूर्खपणा.

गाब(–बा–)ळणें स०**क्रि**० (वस्तु) भलत्याच ठिकाणीं ठेवणें; (वस्तु) घोटाळणें; अव्यवस्थित करणें; (वस्तु) निष्काळजीपणानें भलत्याच ठिकाणीं टाकून आयत्या वेळीं न सांपडेशी करणें;उ०माझा पंचा तुमच्या चिरगुटांत कोठें गाबळला तो कालपासून मी शोधीत आहें.

गुबागुबी स्त्री० १ मारामारी; एकमेकांनीं एकमेकांना रट्टे चढविणें. २ लाच देणें इ० लबाडीचें प्रकार.

गाबाळ पु० **न**० १ पदार्थांतील रद्दी आणि टाकाऊ भाग; केरकचरा. २ निरुपयोगी किं० कुचकिंमतीचा पदार्थ. ३ चर्पटपंजरी; बाष्कळ भाषण किं० लेख. ४ उसाचा पाचोळा किं० पाचोळ्याचा ढीग. ५ असोला नारळ सोलला असतां त्याचे तंतु निघतात ते समुच्चयानें; काथ्या. वि० टाकाऊ; रद्दी; निरुपयोगी. ॐ **गाबाळ ग्रंथ पु**०१ कसरीनें खाल्लेला ग्रंथ; उंदरांनीं कुरतुडलेला ग्रंथ किं० पोथी. २ दुसऱ्याच्या ग्रंथांतून कांहीं भाग चोरून घेऊन बनविलेला ग्रंथ. ३ अनेक उतारे एकत्र करून बनविलेलें पुस्तक किं० चोपडें.४दुसऱ्याच्या ग्रंथांतील उपयुक्त भाग ज्यांत आपल्या सोयीसाठीं उतरून घेतलेले किं० चिकटावलेले असतात अशी वही; टांचणवही. **गाबाळ मुद्रा स्त्री**० अजागळपणाची चेहेरेपट्टी.

गाबाळी (–क्या) वि० १अजागळ; गैबती.२ अव्यवस्थित. ३ आपले कपडे किं० सामानसुमान भलत्या ठिकाणीं टाकणारा.

गाबी पुढें 'गाभी' पहा.

गाबीद, गाबदी पु०मासे धरून ते विकण्याचा धंदा करतो तो.

गाभ [**सं**० गर्भ] **पु**०१ मनुष्यादि जातींच्या स्त्रियांच्या उदरांतील गर्भ. २ डोंगरांतील पोकळी किं० विवर. ॐ **गाभ सांडणें** (**किं**० **टाकणें**) १ योग्य अवधि व्हावयाच्या अगोदर प्रसवणें. २ (मनुष्यजातीय स्त्रीचें किं० पश्वादिकांच्या स्त्रियांचें) नासावणें. **गाभास जाणें** पशुजातीय स्त्रीनें गर्भधारण करणें; गाभण होणें.

गाभटणें, गाभडणें [**म**० गाभ; **सं**० गर्भ] **अ**० **क्रि**० १ पूर्ण मर्यादा भरावयाच्या अगोदर प्रसवणें किं० विणें. २ नासावणें (गर्भिणीनें).

गाभडा [**म**० गाभ] **वि**० आंबे, चिंचा, इ० परिपक्व दशेस आलेलें (फळ).

गाभडी, गाभणी स्त्री०, **गाभडें न**० १ लाकडाच्या भोंकांत किं० फटींत ठोकून बसलेला तुकडा (तें भोक किं० ती फट बुजविण्यासाठीं किं० सर्व पृष्ठभाग सारखा दिसण्यासाठीं).२ ठिगळ.

गाभण, गाभणा [**म**०गाभ;**सं**० गर्भ]**वि**० गर्भार; (गर्भयुक्त गाय, शेळी, इ० संबंधानें);उ० ही गाय गाभण आहे. घोडीसंबंधानें 'सबर' हा शब्द योजतात. ॐ **रेडा (किं**०**बैल) गाभणा तर**

दहावा महिना यजमानाचें मूर्खपणाचें विधान खरें म्हणून म्हणणारा किं० होस हो ठेवून देणारा जो खुशामत्या किं० थुंकीचाट्या त्याचें वर्णन ह्या वाक्यानें केलें जातें. **ह्याचें पुढें गाभणी गाभटाकील** हा मनुष्य इतका उग्र, तामसी, किं० राक्षसी वृत्तीचा आहे कीं ह्याला पाहतांच गर्भिणीचा गर्भपात होईल. **गाभसांड पु०** गर्भपात. **गाभसांडणें, गाभसंडणें अ० क्रि०** नासावणें.

गाभणें [**म०** गाभ; **सं०** गर्भ] **अ० क्रि०** गर्भधारण करणें (मनुष्येतर जातीच्या स्त्रिया-संबंधानें).

गाभणें [**म०** गाभ] **न०** प्रकाशांत न आलेली वस्तु,–युक्ति, मसलत. २ अपरिपक्व किं० अपूर्ण योजना.

गाभळणें, गाभुळणें, गाभोळणें, गाभुट-(–ड–) णें [**म०**गाभ=गर्भ]**अ० क्रि०** गर्भिणीच्या गर्भाचा पात होणें; गर्भिणीन नासावणें; योग्य कालावधि भरावयाच्या पूर्वी स्त्रीच्या गर्भाचें पतन होणें.

गाभा [**सं०** गर्भ] **पु०** १ माड, इ० वृक्षांच्या शेंड्याकडचा भाग. २ केळ, ताड, इ० झाडांच्या फळांचा लोंगर,–बाल्यावस्थेंत असलेला. ३ वेळीच्या झाडाच्या आंतील भाग. ४ वृक्षादिकांच्या पोटीं जो अति टणक भाग असतो तो. ५ कोणत्याही पदार्थाच्या आंतील भाग; मुख्य भाग; मगज. ६ मधला भाग. ७ माजघर.

गाभारा [**सं०** गर्भागार] **पु०** देवळाचा अगदीं आंतील भाग,–जेथें देवाची मूर्ति असते (ओहोऱ्या, सभामंडप, नगारखाना, इ० च्या अपेक्षेनें).

गाभाळ, गाभाळणें मागें ' गाबाळ, ' ' गाबाळणें ' पहा.

गाभी [**म०** गाभा] **स्त्री०** ठिगळ. मागें ' गाबडी, ' ' गाभडी ' पहा.

गाभीण [**सं०** गर्भिणी] **स्त्री०** गर्भवती (पश्वादि जातीची स्त्री).

गांभीर्य [**सं०**] **न०** १ खोली. २ गंभीरपणा.

गाभुटणें, गाभुडणें अ० क्रि गर्भपात झाला आहे अशा स्थितींत असणें.

गाभुळणें, गाभोळणें [**म०** गाभ] **अ० क्रि०** १ आंबा इ० फळांनां परिपक्व दशेस येऊं लागणें. २ आंबा इ० फळांनीं योग्य मर्यादेच्या बाहेर पक्व होऊन सडूं लागण्याच्या स्थितीस पोंचणें.

गाभूळ, गाभोळा वि० गर सांचून लठ्ठ झालेले आंबा इ० फळ.

गाभोळी स्त्री० जोंधळा इ० धान्याचे दाणे भरून लठ्ठ झालेलें कणीस.

गाय [**सं०** गौ] **स्त्री०** १ बैल ह्या पशु-जातीची स्त्री. २ स्वभावानें गरीब आणि निरुपद्रवी असा माणूस (लक्षणेनें). ३ झुरळाच्या वर्गातील काळ्या रंगाची जात. ४ केवडयाच्या फणींतील पांढरा दांता. **गायीनें गाय फळत नाहीं** १ एक दरिद्री माणूस दुसऱ्या दरिद्री माणसाच्या उपयोगीं पडूं शकत नाहीं. २ बिन वशील्याचा माणूस दुसऱ्या माणसाबद्दल वशीला घालूं शकत नाहीं. **गाय गोवणें** आपली मुलगी नालायक माणसाशीं विवाहसंबंधानें जखडणें; भलत्याच किं० नालायक माणसाशीं तिचें लग्न करून देणें. **गाय चिखलांत अडकणें** संकटांत पडणें. **गाय माय सारखी** १ आईच्या दुधाइतकेंच गायीचें दूध हितकर असतें. २ आई आणि गाय ह्या सारख्याच वंद्य. **गाय होणें** विपत्तींनीं किं० आजारांनीं हीनदीन दशेस येणें. **गायीनें माणीक गिळणें** जें नुकसान भरून काढावयासाठीं अतिशय भयंकर पातक करावें लागतें अशा नुकसानाला पात्र होणें; माणीक गायीच्या पोटांतून बाहेर काढावयाला गाय कापावी लागते. गोहत्येचें पातक डोक्यावर लादून घेण्यापेक्षां माणीक गेलें ही हानि पथकरणें श्रेयस्कर होय. **गायी पाण्यावर येणें** अश्रुपात व्हावयाजोगे पाण्यानें डोळे भरून येणें. **गायीवासरांची ताडातोड करणें** ज्या दोन माणसांत अति दृढ प्रेम आहे अशांना एकमेकांपासून दूर करणें किं० दूर ठेवणें. **गायीसारखा हंबरडा फोडणें** मोठमोठ्यानें आक्रोश किं० विलाप करणें; उ० तिच्या पतीचें प्राणोत्क्रमण झालें असें वैद्यबोवांनीं सांगतांच तिनें गायीसारखा हंबरडा फोडला. **गायचाळा पु०** मुलांचा एक खेळ. **गायतोंडा (–ड्या) वि०** दिसण्यांत गरीब आणि निरुपद्रवी. **गायदुम** [**फा०** दुम्=शेपूट] **वि०** एका टोकाकडे निमुळता होत गेलेला. **गायपारख स्त्री०** गायींची परीक्षा करण्याचें कौशल्य किं० विद्या. **गायपारखी वि०** गायींचे आजार, योग्यता, किंमती, इ० जाणण्यांत वाकबगार; गायींचा वैद्य.

गायमुख न० पाणी वाहण्यासाठीं गायीच्या मुखाचा आकार देऊन घडविलेला धोंडा. **गायरट न०** गाय (तुच्छतेनें). **गायरान न०** १ गायी आणि इतर गुरें यांना चरण्यासाठीं राखलेलें रान. २ शेतकामाला निरुपयोगी अशी जमीन. **गायरूं न०** १ गाय (प्रेमानें).२ गरीब आणि निरुपद्रवी माणूस.**गायीचा गोऱ्हा पु०**१मूर्ख माणूस.२ कृतघ्न माणूस. **गायींचा पुत्र, गायीचा बाप पु०, गायीचें मूल (बाळ, लेकरूं) न०** मूर्ख किं० अज्ञाणी माणूस.

गायक [सं० गै=गाणें] **पु०** १ गवई.२नट.

गायकी [सं० गै=गाणें] **स्त्री०** १ गाण्याची तऱ्हा किं० धाटणी; उ० हिंदुस्थानी गायकी निराळी आणि दक्षिणी गायकी निराळी. २गाण्यांतील कौशल्य. ३ गायनाचा धंदा. [णारा.

गायक्या [म०गाय] **पु०** गुराखी, गायी राख-

गायत्री [**सं०**] **स्त्री०** १ वैदिक वृत्तविशेष. २ गायत्रीमंत्र. ३ प्रातःसंध्येतील देवताविशेष. ४ ब्रम्हदेवाची स्त्री.

गायदड स्त्री० एक वनस्पतिविशेष.

गायन [सं० गै=गाणें] **न०** १ गाणें. २ गाण्याची कला.

गायनी, गायणी [सं० गै=गाणें] **स्त्री०** गाणारी स्त्री; गाणारीण. [नम्रपणानें.

गायांवायां, गयांवयां क्रि०वि० दीनपणानें;

गार स्त्री० १ पांढऱ्या रंगाचा आणि टणक धोंडा. २ पावसाच्या धारांबरोबर जे गोठलेल्या पाण्याचे खडे पडतात ते प्रत्येक. ३ खड्डा, खाच, खळगी. ४ पोट (तुच्छतेनें). ॐ**गारगोटा पु०, गारगोटी स्त्री०** वर 'गार 'चा पहिला अर्थ पहा.

गार वि० थंड (पाणी, अंग, इ०). ' गार ' हा शब्द 'थंड' आणि ' हिरवा ' ह्या शब्दांच्या पुढें तीव्रपणा किं० गडदपणा दाखविण्यासाठीं योजतात; उ० थंडगार म्ह० फार थंड; हिरवागार म्ह० गडद हिरवा (रंग). ॐ **गार गार थंड गारगार करवंद, गार गार टणक वि०** अतिशय थंड. **गार होणें, गार पडणें** १ स्वस्थ होणें; स्वस्थता पावणें. २ पुढें बोलावयाला जागा,कारण, अवसर, किं० वाव नाहीं असें दिसून आल्यामुळें स्वस्थ, निश्चल, किं० स्तब्ध बसणें.

गारट [**म०** गार] **वि०** किंचित् थंड (हवा, पाणी, इ०).

गारट (–ठ–)णें [म० गार=थंड] **अ०क्रि०** १(अंग इ०)गार होणें, गार पडणें, (थंड हवा इ० मुळें). २ हवेच्या किं० पाण्याच्या थंडपणामुळें शरीराच्या गात्रांचा लवचिकपणा नष्ट होणें.

गारटें [**म०** गार] **न०** ओबडधोबड खड्डा किं० खळगा.

गारठा[म०गार] **पु०**हवेचा थंडपणा(विशेषतः हवेंतील पाण्याच्या अंशामुळें उत्पन्न झालेला).

गारत (–द) [**अ०**] **वि०** १ पुरलेलें. २ मेलेलें. ३ नष्ट किं० विध्वस्त झालेलें.

गारदी [**पोर्च्युगीझ्**] **पु०** १ पायदळांतील शिपायी. २ पहारेकरी. मागें 'गाडदी' पहा.**स्त्री०** नासाडी, विध्वंस.

गारपगार(–री,–ऱ्या)पु० १ गारांचा पाऊस पडावयाला लावण्याचें ज्याच्या अंगीं सामर्थ्य आहे असा माणूस (कल्पित). २ लबाड माणूस; फसव्या.

गारंबी, गारबी, गारभी स्त्री० १ एक वेल किं० वेली. २ ह्या वेलीची बी.

गारभांड, गारभांडें न० चापाची बंदूक.

गारवट न०, गारवठा, गारवंडा, गारका, गारिंवठा, गारिंवडा पु० [**म०** गार] गारपणा (हवा, पाणी, इ०चा). [गार.

गारवट [**म०** गार]**वि०**१किंचित् गार.२ फार

गारशेल वि० गरदार आणि बहुतेक पक्व दशेस आलेला (आंबा इ० फळ).

गारसणें [**म०** गार] **अ० क्रि०** १ गारांच्या पावसामुळें खराब होणें. २ थंड होणें (पाणी किं० कांहीं पदार्थ). ३ गर भरून परिपक्व दशेस येत असणें; उ० गारसल्या जांबाची रुचि उत्कृष्ट.

गारा पु० चिखल (भिंतीच्या रचाईसाठीं किं० गिलाव्यासाठीं केलेला). २ सरबरीत पातळ केलेला पदार्थ,–माती, चुना, शेण, इ०. ३ पुष्कळ पाणी, ताक, इ० घालून सरबरीत पातळ केलेलें कांहींही खाद्य.

गाराणें, गाऱ्हाणें न० १ एकाद्या माणसाविरुद्ध किं० अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार (करणें, सांगणें, इ०). २ कांहीं मनोरथ सफळ व्हावा

म्हणून देवावर किं०कोणा समर्थावर घातलेला भार किं० केलेली प्रार्थना (घालणें).

गारुड [सं०] न० १ पाच (रत्नविशेष). २ विषावर उतार. ३ विषशास्त्र. ४ दुसऱ्याविरुद्ध गुप्तपणें रचलेला व्यूह. ५ गुप्तपणें केलेली ममलत. ६ इंद्रजाल विद्या; नजरबंदीचे प्रयोग व्यक्तिशः किं० समुच्चयानें.

गारुंडा, गारोंठा, गारोंडा [म० गार] पु० हवा, पाणी, इ०चा गारपणा.

गारुडी, गारोडी [सं० गारुड] पु० १सर्पांस खेळविणारा. २ नजरबंदीचे प्रयोग करणारा.

गारूड वर ' गारुड ' पहा.

गारो(-ऱ्हो-)ळा वि० मांजराच्या डोळ्यांच्या रंगाचा. पु० अशा रंगाचे डोळे ज्याचे आहेत असा माणूस. [मुलांचा एक खेळ.

गाऱ्या (-ड्या-) भिंगोऱ्या स्त्री० अ० व०

गाल [सं० गल्ल] पु० मुखाच्या बाजूचे जे दोन भाग ते प्रत्येक; उ० त्याणें तुला उजव्या गालावर मारलें तर डावा गाल पुढें कर, पण त्याला उलटून बोलूं नको. ❀ **एकाद्याचा गाल वडणें** त्याच्या थोबाडींत चपराक मारणें; त्याची मुखश्री रंगाविणें. **एकाद्याचा गाल रंगाविणें, एकाद्याच्या गालांत बसाविणें** त्याच्या थोबाडींत मारणें. **एकाद्याचे गाल निपटणें** तो रोड होणें (आजार इ० मुळें). **तो गालांत बसला** तो रोड झाला (आजार, उपवास, इ० मुळें). **गाल फुगाविणें** (किं० **फुगवून बसणें**) १ रुसून बसणें; रागानें घम्म बसणें. २ बढाई मारणें; शेखी मिराविणें. **एकाद्याचे गालावर गाल येणें** (किं० **चढणें**) खाण्यापिण्याची चंगाळी असल्यामुळें आणि कांहीं काळजी कांटा नसल्यामुळें लठ्ठ किं०गुटगुटीत होणें. **गालांत हसणें, गालांतल्या गालांत हसणें** मनाजोगी एकादी गोष्ट घडून आल्यामुळें आनंद होऊन मंदस्मित करणें. **गालकल्ला** पु० मिशांचीं गालांवर वळविलेलीं पीळदार टोकें. **गालकुच्चा, गालगुच्चा** पु० गालाला घेतलेला चिमटा (घेणें, धरणें, उपटणें). **गालगुंड** न० गाल सुजून त्याला गांठी येऊन त्या ठणकतात असा एक रोग-विशेष. **वैद्याचीं पोरें गालगुंडानें मेलीं** ज्याच्या घरीं जें विपुल असतें तें त्याच्या मुलांबाळांना भोगावयास मिळत नाहीं, कारण त्याचें लक्ष्य पैसा मिळविण्याकडे असतें. **गालगुंडा** पु० गालावर मारलेली चपराक. **गाल गोंजारणी** स्त्री० रागावलेल्या माणसाला शांत करण्याचा प्रयत्न. **गालचिंबा** वि० ज्याचे गाल जन्मतः किं० आजारामुळें खोल गेले आहेत किं० बसले आहेत असा (माणूस). **गालडी, गालोडी** स्त्री० मुखाच्या कोपऱ्यांतील ज्या खळग्या त्या प्रत्येक. **गालदोडी** स्त्री० १ गाल फुगविले असतां तोंडांत ज्या पोकळ्या होतात त्या प्रत्येक. २ माकड जोंधळे इ० खाद्यें गपागपा खाऊन गळ्याजवळच्या ज्या दोन पिशव्यांत सांठवितें त्या प्रत्येक,—ह्या गालदोड्यांतील खाद्यें नंतर फुरसतीनें तें चर्वण करून खातें (क्रि० भरणें, फुगविणें). **गालपट** न० गाल (तुच्छतेनें). **गालफट (-ड)** न० गाल (रागांत किं० तुच्छतेनें); उ० तुझ्या गालफडांत एक लगावल्याशिवाय तूं खरें सांगणार नाहींस. २ तोंडांत वारा कोंडून गाल फुगविले असतां तोंडांत होणाऱ्या ज्या गालाच्या दोन पोकळ्या त्या प्रत्येक. ३ गालाचा पृष्ठभाग; गाल. **गालफुगी** स्त्री०, **गालफें** न० कांहीं विकृतीमुळें गालाला होतात जे गळवासारखे फुगवटे ते प्रत्येक. वर ' गालगुंड ' पहा. **गालबोट** न० १ मुलाला दृष्टिबाधा होऊं नये म्हणून त्याच्या गालावर जो काजळ, तीट, इ०चा ठिपका लावतात तो. २ चांगल्या लौकिकाला कांहीं क्षुल्लक बदकर्मामुळें आलेला कमीपणा (क्रि० लागणें). **गालविंधा, गालोरा** पु० गालाला घेतलेला चिमटा (क्रि० घेणें). **गालाचा ढोपर** पु० गालांचीं डोळयांच्या खालचीं जीं दोन हाडें तीं प्रत्येक,—विशेषतः तीं पुढें आलेली असतां.

गालन [सं०] न० १ गाळणें. २ वितळणें.

गालि स्त्री० शिवी; शिवीचा शब्द.

गालिचा[फा०गालीचाह]पु०१लोकरीचें चित्रविचित्र नक्षीचें आसन. २ त्रिपुरी पौर्णिमेला किं० आधीं पांच दिवस देवळांत चित्रविचित्र रांगोळ्याचें जे देखावे जमीनीवर करतात ते प्रत्येक. ❀**गालिच्याचा बूट** पु० दिसण्यांत गोरागोमटा आणि सुंदर पण निरुद्योगी आणि कुचकामाचा पोरगा.

गाली [सं० गालि=शिवी] स्त्री० शिवी;

अपशब्द. ॐ गालि(-ली-)प्रदान न० शिव्या देणें. **गालीगलोची स्त्री०** शिव्या देणें; शिवीगाळ.

गालोरा [म० गाल] **पु०** गालाला घेतलेला चिमटा.

गांव [सं० ग्राम] **पु०, न०** १ खेडें. २ शहर. ३ दोन अडीच कोशांपासून तों चार पांच कोश इतकें अंतर; एक योजन अंतर. ॐ **गांवकामगार पु०** सरकारच्या तर्फेनें गांवाचें कांहीं विशिष्ट काम करण्यासाठीं सरकारनें नेमिलेला अधिकारी. **गांवकर पु०** गांवच्या शूद्रांत देवसकीच्या मानपानाविषयींचा एक अधिकारी. **गांवकरी पु०** १ एकाद्या विशिष्ट गांवीं राहणारा जो तो त्या गांवचा गांवकरी; गांवातील जे रहिवासी ते प्रत्येक. २त्याच गांवीं राहणारा जो तो आपला गांवकरी; उ०हा राघोबा आमचाच गांवकरी आहे. **गांवआकार पु०, गांवआकारणी स्त्री०** गांवांची जमा आणि गांवाच्या संबंधानें झालेला खर्च ह्यांच्या तपशिलाचा कागद. **गांवई स्त्री०** सरकारच्या जुलमाला कंटाळून तो गांव सोडून देऊन दुसऱ्या एकाद्या गांवाला जाऊन तेथें वसाति करणें. **गांवकी स्त्री०** १ गांवाची शासनपद्धति. २ गांवकऱ्यांची गांवाच्या हिताहितासंबंधानें भरलेली सभा. ३ गांवचे रहिवासी आणि त्यांचे पुढारी समुच्चयानें. **गांवकुठार वि०** गांवांत राहून गांवकऱ्यांशीं बाह्यात्कारें स्नेह दाखवून त्यांच्या चहाड्या, त्यांचीं वर्मेंकर्में, इ०अधिकाऱ्यांना कळवितो (स्वार्थासाठीं किं० केवळ दुष्टपणानें) तो इसम. **गांवकुसूं न०** १ सर्व गांवाच्या सभोवतालीं जी भिंत घातलेली असते ती; ह्या भिंतींत रहदारीसाठीं ठेविलेलीं जीं दारें त्यांना 'वेशी' म्हणतात. २ धोतरजोडा, शेला, इ० वस्त्रांस जो रेशीम, कलाबतू, इ० चा कांठ असता तो. **गांवखर्च पु०** पंडित, गोसावी, फकीर, इ०ना गांवांत वर्गणी करून द्रव्य, शिधा, इ० देतात त्यासंबंधाचा खर्च. **गांवखुरी क्रि०वि०** गांवाच्या आसपास. **गांवगन्ना क्रि० वि०** महाल, तालुका, इ० मध्यें जे गांव असतात त्या सर्वांचा नांवनिशीवार उल्लेख करून; उ० गांवगन्ना ताकीद देऊन सर्वांस चतुर्दशीच्या दिवशीं येथें यावयाचा हुकूम सोडा. **गांवगुंड पु०** १ गारुड्यांस जिंकावयासाठीं त्यांची विद्या शिकतो तो. २ अंगीं तादृश विद्या नसतां जो दुसऱ्यास जिंकण्यांत प्रवीण तो. ३ नाना लबाड्या किं० कुटाळण्या करून गांवकऱ्यांना त्रास देतो तो. **गांवगुंडकी स्त्री०** गांवगुंड जीं कृत्यें करतो तीं समुच्चयानें. **गांवचलन न०** गांवांत जीं विशिष्ट नाणीं चालतात तीं समुच्चयानें. **गांवचा डोळा पु०** गांवचा महार. **गांवखर न०** गांवाबाहेरचा किं० लगतचा प्रदेश. **गांवखुरीस क्रि० वि०** गांवाच्या शेजारीं; गांवालगत. **गांवझाडा पु०** गांवांतील लोकांच्या जमीनींच्या तपशिलाचा आणि वर्णनाचा कागद किं० तक्ता. **गांवझांड पु०** १ गांवांतील अत्यंत लफंगा माणूस. २गांवांतील अति उपद्रवी माणूस. **गांवठण, गांवठाण न०** गांवाची जागा. **गांवढळ वि०** खेडवळ चालीरीतींचा; असभ्य. **गांवदरी स्त्री०** गांवाच्या आसपासचा प्रदेश. **गांवदेवी, गांवदेवता स्त्री०** एकाद्या विशिष्ट गांवाची मुख्य देवता. **गांवाबाहेरचा पु०** महार किं० परवारी. **गांवधोंड** [म० गांव + धोंड (मोठा दगड)] **स्त्री०** १ गांवावर सरकारनें लादलेला असह्य कर किं० कांहीं कामासाठीं बसाविलेला वर्गणी. २ गांवावर आलेलें कांहीं मोठें संकट, -पटकी, हगवण, इ०.

गांवशींव [म० गांव+शींव (सीमा)] **न०, स्त्री०** १ गांव (सामान्यत:). २ चार पांच गांवांचा समुदाय. **गांवरुई स्त्री०** १ गांवच्या भुतांखेतांच्या शांतीसाठीं दरवर्षीं गांवांत करतात तो विधि. २ सर्व गांवकरी समुच्चयानें. **गांववेसकर पु०** गांवाच्या बंदोबस्ताचें काम ज्या वर्षीं ज्या महाराकडे असतें तो त्या वर्षाचा गांववेसकर. **गांवसवाशीण, गांवसवाष्ण स्त्री०** पाटील किं० चौघुला यांची पत्नी (गोंधळ, मोहतूर इ० प्रसंगाच्या संबंधानें).

गांवठा [म० गांव] **पु०** गांवचा वतनदार. ॐ **गांवचा गांवठा गांवीं बळी** गांवाच्या वतनदाराची प्रतिष्ठा गांवापुरतीच असते.

गांवठी [म० गांव] **वि०** १ गांवांत झालेलें. २ ओबड धोबड; सुबक नव्हे असें.

गावडा पु० १ हिंदूंतील एक जात; हे लोक कात इ० पदार्थ करतात. २धनगर जातीचा पुढारी किं० अधिकारी.

गावडी स्त्री० १ गाय. २ गाय (प्रेमानें).

गांवढें [**म०** गांव] **न०** १ लहान गांव. २ शेतकऱ्यांचा गांव किं० वसाहत. ॐ **गांवढेकरी पु०** गांवढ्यांत राहाणारा. **गांवढें गांव न०**अगदीं लहान गांव,;—ज्यांतील रहिवासी प्रायः शेतकरीच आहेत. **गांवढ्या गांवांत गाढवी सवाशीण** लहान गांवांत साधारण सुशिक्षित किं० हुशार माणसाची प्रतिष्ठा होते.

गावणें [**म०** गवसणें; **सं०** गवेषण] **अ० क्रि०** १ सापडणें; (हरवलेली वस्तु) सापडणें. २ दिसणें; ०ची गांठ पडणें. ३ तावडींत सापडणें; पकडला जाणें. ४ कांहीं एका गोष्टीचा निदिध्यास करीत असणें;उ० काशीस जावें काशीस जावें असें दोन वर्षें तो गावत होता तो आतां त्यांचा काशीस जाण्याचा योग आला.

गांवदरी स्त्री० गांवाच्या आसपासचा प्रदेश.

गावदी [**हिं०**] **पु०**अडाणी किं० मूर्ख माणूस.

गांवधें [**म०** गांव] **न०** १ खेडेंगांव. २ दुसऱ्या गांवीं कांहीं कामासाठीं जाण्याचें कारण; उ० मला गांवधें उपस्थित झालें.

गावली [**म०** गाय] **स्त्री०** गाय (प्रेमानें).

गावलें न० हरभऱ्याच्या झाडांची जुडी.

गावा [**म०** गाणें] **पु०** एकादी गोष्ट करावयाची म्हणून लागलेला ध्यास; एकाद्या संकल्पाचा निदिध्यास; उ० काशीस जाण्याचा मला पांच वर्षें गावा लागला होता तो आज सफल होण्याचा योग आला.

गांविक [**म०** गांव] **वि०** सर्व गांवकऱ्यांच्या मालकीचें आणि उपयोगाचें,—ज्यावर एकाचीच सत्ता नसते.

गावी स्त्री० सोनार, जिनगर,इ० कारागिरांचें चिमट्यासारखें एक आउत.

गाशा [**अ०** गाशियाह] **पु०** १ घोड्याच्या खोगिरावर घालण्याची पातळ गादी. २ बसावयासाठीं केलेलें पातळ आसन,—वरच्या अंगास सखलाद आणि खालच्या अंगास खारवें घालून शिवलेलें. ॐ**गाशा गुंडाळणें** किं० **आटोपणें** १ आपलें सामानसुमान आवरून तें घेऊन दुसरीकडे जाणें किं० जावयाला सिद्ध होणें. २ एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणीं मुक्काम्यानें राहावयास जाणें. ३ मरणें.

गासलापूर न० पलायन. ॐ**गासलापूर करणें** पळून जाणें; उ० सरकारचें धरणें येतांच त्यानें गासलापूर केलें (म्ह० तो पळून गेला).

गाहाण, गहाण न० पैसे उसने देणारा सावकार पैसे घेणारापासून जी वस्तु तारण ठेवून घेतो ती. मागें ' गहाण ' पहा.

गाहाणखत इ० मागें ' गहाण ' शब्दांत पहा.

गाहाळ, गहाळ वि० १ हरवलेला; सांपडेनासा झालेला. २ अव्यवस्थित (मनुष्य किं० कारभार).

गाहाळणें, गहाळणें स० क्रि० हरवणें, भलत्याच ठिकाणीं ठेवणें.

गाहाळणें, गहाळणें अ०क्रि० मार्ग चुकल्यामुळें भलतीकडे भटकत जाणें.

गाही, गावी स्त्री०कारागीर लोकांचा चिमटा किं० पक्कड.

गाही, गाहीदार पुढें ' ग्वाही, ' ' ग्वाहीदार ' पहा.

गाळ पु० १ पाण्याच्या बारदानाच्या तळाशीं जमलेला मळ. २ कोणत्याही पदार्थाच्या तळाशीं बसलेला रद्दी किं० टाकाऊ भाग. ३ पदार्थांतून चांगला भाग निवडून घेऊन रद्दी म्हणून टाकलेला भाग. ४ चिखल.

गाळ [**सं०** गालि=शिवी] **स्त्री०** शिवी(देणें).

गाळण [**म०** गाळणें] **न०** गाळावयासाठीं वस्त्रावर एका खेपेपुरता घेतलेला चूर्णादि पदार्थ; चाळावयासाठी वस्त्रावर एका खेपेपुरतें घेतलेलें परिमाण. **स्त्री०** १ आजारामुळें शरीराला आलेली दुर्दशा. २ कांहीं संकट ओढवल्यामुळें उत्साह, अवसान, किं० उमेद, ह्यांचा होतो तो लोप; उ० डेक्कन ब्यांक बुडाली ही बातमी ऐकतांच रामभाऊंची गाळण उडाली. ३ कांहीं देखावा पाहातांच भीतीनें होते ती घाबरगुंडी; उ० जाळींतून वाघ बाहेर पडतांच त्या मुशाफराची गाळण उडाली. ४ कांहीं कामांत किं० कारभारांत झालेली अव्यवस्था किं० बिघाड. ५ कोणी केलेल्या उपदेशाचा अनादर; बोधवचनाचा तिरस्कार; उ० मी तुम्हास केलेल्या सूचनांची गाळण करूं नका.

गाळणा [**म०** गाळणें] **स्त्री०** १ घाबरगुंडी; उ० वाघाची गर्जना कानीं पडतांच मुकुंदरावाची गाळणा झाली.

गाळणी [म० गाळणें] **स्त्री०** १ चाळणें किं० सोधणें (वस्त्रांतून पाणी, पीठ, इ०). २ वरील कामाच्या उपयोगाचें वस्त्र, चाळण, इ०. ३ तळें, विहीर, इ०तील गाळ काढणें.

गाळणें [म० ' गळणें ' चें प्रयोजकरूप] **स० क्रि०** १ वस्त्र, चाळण, इ०वर पदार्थविशेष घालून त्याज्य भाग आणि ग्राह्य भाग हे पृथक् करणें; उ० हें तूप गाळून पहा म्हणजे त्यांत किती बेरी आहे तें तुला दिसून येईल. २ घाणा, इ० साधनांच्या योगानें तीळ, भुइमूग, इ०तून तेल काढणें. ३अग्निसंस्कारानें सोनें इ०धातूंतून मलांश काढून टाकून ते शुद्ध करणें. ४ प्रकृत कमास जी गोष्ट किं० बाबत आली ती मुद्दाम वगळणें; उ० त्यानें सर्व माणसांची खुशाली सांगितली पण रामभाऊंची गाळली; उ० फराळाला बसलेल्या सर्व मुलींचीं नांवें त्यानें सांगितलीं पण आपल्या बायकोचें नांव त्यानें गाळलें. ☙ **पक्ष्यांच्या मादीनें अंडें गाळणें** म्ह० अंडें घालणें. **पक्ष्यांनीं पिसें गाळणें** म्ह० त्यांचीं पिसें गळून पडणें. **कोणेकानें हातपाय गाळणें** म्ह० त्यानें निरुत्साह होणें किं० माघार खाणें किं० कचरणें.

गाळणें [म० गाळणें] **न०** पदार्थांतून नको तो भाग काढून टाकण्याचें साधन,— वस्त्र, तुरडी किं०धातूची चाळण, इ०. ' गाळाणें ' हाही शब्द ह्याच अर्थानें रूढ आहे

गाळा [म० गाळणें] **पु०** १ पदार्थाच्या बुडाला सांचलेला मळ किं० केर. २ चाळून किं० सोघून जो रद्दी भाग निघतो तो. ३ नदीला आलेला पूर ओसरून गेल्यावर तिच्या कांठावर जो केरकचरा बसलेला असतो तो. ४ चौकट, इ० च्या गर्भाचें जें परिमाण तें; दोन खांबांतील जें अंतर तें. ५ स्वच्छ पिंजलेला कापूस. ६ चुना इ० पदार्थ गाळून घेतल्यावर खडे इ० जो टाकाऊ भाग राहातो तो. ७ चाळींतील एका एका कुटुंबाच्या सोयीचे जे विभाग ते प्रत्येक. ☙ **गाळागाळ स्त्री०** गाळण्याचा व्यापार; एकाद्या विशिष्ट पदार्थांतून मधले मधले भाग काढून टाकणें.

गाळाणें न० वर ' गाळणें ' **न०** पहा.

गाळींव [म० गाळणें] **वि०** १ गाळलेला पदार्थ किं०भाग).२ कांहीं पदार्थ गाळून त्यांतील ठेवून घेतलेला (ग्राह्य भाग). ३ कांहीं पदार्थांतील रद्दी किं० टाकाऊ भाग टाकून उरलेला(जो अस्सल किं० शुद्ध भाग तो).४गाळून स्वच्छ केलेला; उ० गाळींव मूर्ति, गाळींव सोडा इ०.

गाळेखेरें न० अ० व० खडे उडवून खेळण्याचा मुलांचा एक खेळ.

गाळ्यारा [सं० गालि=शिवी] **वि०** शिव्या देणारा; शिवराळ; शिवरा.

गिचागिंदा पु०अनेक खाद्य पदार्थांची कालवाकालव किं० मिश्रण.

गिचमिट (–ड) वि० १ एकांत एक गुंतलेलें किं० घोटाळलेले (लिखाण किं० कांहीं वस्तु). २ निष्काळजीपणानें लिहिलेला (कागद, इ०).

गिचाड न० १ दाट जंगल. २ दाटपणा; निबिडपणा (झाडांचा किं०वस्तूंचा).

गिजगिजीत, गिचगिचीत वि० जलांश विशेष राहिल्यामुळें मृदु आणि पातळ झालेला (भात, भाजी, इ० पदार्थ).

गिजबिजलें न० काचेचे आणि सोन्याचे मणि एका सरांत ओवून केलेलें गळ्यांत घालावयाचें एक भूषणविशेष.

गिटकडी, गिटकारी स्त्री० गातेसमयीं कंठांत जो कंप घेतात तो.

गिढंगी स्त्री० दारू विकण्याचें दुकान.

गिंडी स्त्री० लहान तोंडाचें चंबूसारखें एक आकारविशेषाचें पात्र; ह्यांत तीर्थोदक इ०ठेवतात.

गिड्डु, गिड्डा वि० ठेंगणा आणि लठ्ठ.

गिणगिण स्त्री०१ नाकांत बोललेलें वाक्य. २ हलक्या आवाजांत आणि तोंडांतल्या तोंडांत गाइलेलें गाणें किं० उच्चारलेले शब्द.

गिणगिणणें अ० क्रि० १ नाकांत बोलणें. २ डास, धुंगुरडीं, माशा, इ०चे कानाशीं हलका ध्वनि करणें.

गिणगिणा वि० १ नाकांत बोललेला (शब्द, इ०). २ अस्पष्ट (ध्वनि, इ०). ३ तोंडांतल्या तोंडांत आणि नाकांत गायिलेलें (गाणें इ०).

गिणागिण्या वि० नाकांत बोलणारा.

गिदवा, गिदावा पु०विटा, कौलें,इ०ची धूळ.

गिघड, गिघाड न०, गिघाडा पु० [सं०

गृध्र] गरुडाच्या वर्गातील एक पक्षी.

गिधण न० एक औषधिविशेष.

गिमवस [**सं०** ग्रीष्म=उन्हाळा] **स्त्री०** उन्हाळ्याच्या दिवसांत पिकवितात जें भात, नाचण्या, इ० तें.

गिमवा [**सं०** ग्रीष्म=उन्हाळा] **पु०** उन्हाळ्याच्या दिवसांत केलेलें नाचण्या इ०चें पीक.

गिमावणें [**सं०** ग्रीष्म=उन्हाळा; **म०** गीम] उन्हाच्या तापानें किं० उन्हाळ्यामुळें किं० उपासमारीनें रोडावणें किं० अशक्त होणें; उन्हाळ्यानें जर्जर होणें.

गिमाळा [**सं०** ग्रीष्म=उन्हाळा] **पु०** उष्णकाळ; उन्हाळा.

गिरका पु० १ कापसांतून सरक्या काढण्याचें साधनविशेष. २ गरका; चक्राकार गति; गरकांडा.

गिरकांडा, गिरकंडा पु०, गिरकांडी स्त्री० १ चक्राकार गति. २ चक्कर; मारलेला फेरा; जाऊन येण्याचा हेलपाटा. ३ सरळमार्ग सुटल्यामुळें जो निरुपयोगी फेरा पडतो तो. ४ भाषणादिकांत दूरान्वयिपणा. ५ पंचाइतीची किं० पेचाची स्थिति; घोटाळा.

गिरकी स्त्री० १ चक्राकार गति (मारणें, देणें, खाणें, घेणें, इ०). २ डोक्यांत वाटते ती भोंवळ. ३ गायनांतील कंपाविशेष (घेणें).

गिरकें न०, गिरकी स्त्री० १ पित्तादि विकृतीमुळें येते ती घेरी. २ मंडलाकार गति.

गिरगटणें स० क्रि० १ सारविणें. २ वेडेंवाकडें किं० निष्काळजीपणानें लिहिणें (पत्र, इ०).

गिरगिरी स्त्री० भोंवळ.

गिरगिरें न०, गिरगिरी स्त्री० १ किरकिरें म्हणून जें मुलांचें खेळणें असतें तें,—ज्यांतून अत्यंत कर्कश आवाज निघतो. २ कागदाचा तुकडा कांहीं विशेष प्रकारें कापून आणि दुमडून त्याला कांहीं विशेष प्रकारचा आकार देऊन तो काठीच्या टोकाला अडकावून वाऱ्यावर धरला म्हणजे आंसाभोंवतीं वाटोळा फिरतो; हें जें मुलांचें खेळणें तें.

गिरटी स्त्री० १ चक्राकार गति; फेरा; चक्कर (घालणें, मारणें). २ हेलपाटा; जाऊन येणें. ३ प्रदक्षिणा.

गिरणी स्त्री० १ यंत्रांनीं चालणारा कारखाना.

गिरणूळ पु०, स्त्री० एक झाड,—याचें मूळ उगाळून त्याचा लेप खरजेवर लावतात.

गिरदा [**फा०**] **पु०, गिरदी स्त्री०** १ हुक्का ठेवण्यासाठीं केलेली लहानशी वाटोळी गादी; हुक्का जीवर ठेवतात ती बैठक. २ वाटोळी गिरदी (डोक्याखालीं घ्यावयाची). ३ वर्तुळ, कडें.

गिरदी स्त्री० लठ्ठ आणि ठेंगणी स्त्री.

गिरफतार [**फा०** गिरफ्तन्=धरणें, पकडणें] **वि०** १ अडकलेला. २ अडकावलेला; पकडलेला; कैद केलेला.

गिरमाळ वि० खडकाळ किं० डोंगराळ(प्रदेश).

गिरमी स्त्री० पोफळीचा लोंगर,—ज्याला पोफळें लागतात.

गिरविणें स० क्रि० १ कित्त्यांतील अक्षरांच्या रेषांतून लेखणी फिरविणें (अक्षराचा आकार शिकण्यासाठीं). [' गिऱ्हा ' पहा.

गिरा पु० १ दीड तसू लांबीचें माप. २ पुढें

गिराण [**म०** ग्रहण] **न०** ग्रहण; उ० दे दान सुटे गिराण. [अंगरख्याचा खांदा.

गिरावण, गिरवाण [**फा०** गरीबान्] **न०**

गिराशी (–सी) पु० गुजराथेंतील एक डोंगरी जात; ह्या जातीचे लोक बहुधा चोऱ्या करून चरितार्थ चालवितात. **स्त्री०** चोऱ्या करण्याचा आणि दरवडे घालण्याचा धंदा किं० व्यवसाय.

गिरास पु० गिराशी लोकांचा धंदा म्ह० लुटालूट करणें. **न०** गिराशी लोकांची लुटालुट करावयाला निघालेली टोळी.

गिरि [**सं०**] **पु०** १ पर्वत. २ गोसाव्यांची एक जाति. ३ संन्याशाची बहुमानाची पदवि; उ० आनंदगिरि. ꣸ **गिरीश पु०** १ शंकर. २ हिमालय. **गिरिकदली स्त्री०** चवई (केळीसारखें एक झाड). **गिरिमल्लिका स्त्री०** कुडा. **गिरिप्रिया स्त्री०** वनगाय. **गिरिशय पु०** शंकर. **गिरिकंदरीं क्रि०वि०** रानावनांत आणि गुहांत (राहिलेला किं० लपलेला चोर किं० तपस्वी).

गिरिबदार [**फा०** गिरफ्ताह् दार] **वि०** संकटग्रस्त. ꣸ **गिरिबदारी स्त्री०** संकटाची स्थिति; आडचण; विपन्नावस्था.

गिरीघोटी स्त्री० १ ओवळ्या भोवळ्या नांवाचा

मुलांचा एक खेळ. २ रिकामा हेलपाटा (घालणें, करणें).

गिरेबाज [**म०** गिरकी+बाज] **पु०** आकाशांत वाटोळें म्ह० मंडलाकार फिरावयाला शिकवून तयार केलेलें खबूतर.

गिरेबान [**फा०** गरीबान्] **पु०** अंगरख्याचा खांद्यावर येणारा तुकडा.

गिरो [**फा०** गिरव्] **न०** गहाण म्हणून ठेविलेली वस्तु.

गिर्द [**अ०**] **क्रि० वि०** सभोंवार, सभोंवतालीं. **स्त्री०** परिघ(वर्तुळाचा).

गिर्दी [**फा०** गिरद्=सभोंवतीं] **स्त्री०** १ देशाचा किं० प्रदेशाचा सीमेवरचा प्रान्त; सरहद्द. २ किल्ल्याच्या सभोंवतालचा प्रदेश. ३ पहारेकऱ्याची फेरी;गस्त. ४ निजतांना डोक्याखालीं घेतात वाटोळी मऊ गादी. मागें 'गिरदा,' 'गिरदी' पहा.

गिऱ्हा [**सं०** ग्रह] **पु०** १ पाण्यांतील एक पिशाच. २ राहु (ग्रह). ३ ग्रहण (सूर्य आणि चंद्र यांना लागतें तें). ४ खाणें पिणें चांगलें मिळत असून रोडकें असलेलें पोर. ꙮ **गिऱ्हेपूजन न०** सूर्य इ० ग्रहांचें लग्न इ०प्रसंगीं पूजन.

गिऱ्हाइकी, गिऱ्हायकी[**म०**गिऱ्हाईक]**स्त्री०**१ जिन्नस खरेदी करावयाला दुकानावर येणाऱ्यांचा समुदाय. २गिऱ्हाइकांशीं दुकानदार करतो तो व्यवहार. ३ एकाद्या दुकानांत नेहेमीं खरेदी करावयाला येणारे लोक समुच्चयानें; उ०माझ्या दुकानासमोर सगन वाण्याचें दुकान झाल्यापासून माझी गिऱ्हाइकी बसली.

गिऱ्हाईक [**सं०** ग्राहक=घेणारा] **पु०** १ खरेदी करणारा. २ (लाक्षणिक) गुणग्राहक; दर्दी; मर्मज्ञ; उ० हल्लीं मूल्यवान ग्रंथांना कोणी गिऱ्हाईक मिळत नाहीं; अनेक ग्रंथांतून काढलेल्या उताऱ्यांच्या चोपड्यांना फार मोठें गिऱ्हाईक आहे. **न०** जिन्नस विकत घ्यावयाला दुकानावर आलेले लोक समुच्चयानें. ꙮ **गिऱ्हाइक मारणें** एकाद्या विशिष्ट दुकानाचें गिऱ्हाईक आपल्या दुकानाकडे ओढणें. **गिऱ्हाईक मरणें** शेजारीं प्रतिस्पर्ध्याचें दुकान झाल्याकारणानें एकाद्या दुकानांतील खरेदी करावयाला येणारांची संख्या कमी होणें.

गिऱ्हावळ[**म०**गिऱ्हा]**स्त्री०**हाडकें रोडकें पोर.

गिलकी, गिलची स्त्री० एक शाकभाजी. ꙮ **गिलकें, गिलचें न०** ह्या झाडाचें फळ.

गिलगिलीत वि० १ पाणकट आणि मऊ (केळें इ० फळ). २ चिखलट (जमीन इ०).

गिलावा [**फा०** गिलावाह्] **पु०** घराच्या भिंती, इ०चा पृष्ठभाग साफ करण्यासाठीं त्यांचेवर जो चिखल, चुना, इ०चा जाडी लेप करतात तो.

गिलित [**सं०** गिल्=गिळणें] **वि०** गिळलेला, मटकावलेला; उ० सर्पागिलित बेडूक; मत्स्यगिलित माणिक, इ०.

गिलेफ, गिलीफ, गलेफ [**फा०** गिलाफ्] **पु०** तक्या, लोड, गिरदी, इ०चें धुळीपासून रक्षण करण्यासाठीं त्यांना घालतात ती पिशवी; अभ्रा.

गिल्ला [**फा०** गिलाह्] **पु०** १ एकाद्या माणसाविरुद्ध केलेली तकरार (करणें, होणें, इ०). २ एकाद्या माणसाविरुद्ध केलेला निंदेचा गहजब किं० वर्षाव. ३ एकाद्याविरुद्ध शिव्यांचा भडीमार. ४ प्रपंचांतील खटरकी, त्रास, संताप, इ०चें कथन किं० निवेदन; उ० हा रामभाऊ नेहमीं संसाराचे गिल्ले लोकांपाशीं सांगत असतो.

गिळंकृत [**म०** गिळणें] **वि०** १ गिळलेलें; घशाखालीं घातलेलें. २ अन्यायानें किं० लबाडीनें लाटलेलें (दुसऱ्याचें द्रव्य, इ०). ꙮ**गिळंकृत कन्यादान न०** वरापासून द्रव्य घेऊन वराला आपली कन्या देणें; याच्या उलट ' सालंकृत कन्यादान' किं० 'सा(-शा-)लंकृत कन्यादान' म्ह०दागिन्यांनीं अलंकृत करून वराला आपली कन्या देणें.

गिळगिळीत वि० १ खावयाला मऊ आणि बेचव असा (खाद्य पदार्थ); पाणचट. २ मऊ आणि बुळबुळीत म्हणून ज्याचें चांगलेंसें चर्वण करतां येत नाहीं असा (बरक्या फणसाचा गरा, इ०). ३ बेचव आणि बुळबुळीत आणि शिसारी उत्पन्न करणारा (एरंडेल इ०). ४ गळगळीत (मागें ' गळगळीत ' पहा).

गिळणें [**सं०** गिल्=गिळणें] **स० क्रि०** १ खाद्य पदार्थ घशाखालीं घालणें (चावून किं० न चावतां). २ शोषून घेणें; उ० पाऱ्यानें सोनें गिळलें. ३ व्यापून टाकणें; उ० मेघांनीं आकाश गिळून टाकलें. ४ आच्छादणें; उ० राहूनें चंद्र गिळला. ५ दुसऱ्याचा पैसा लाटणें म्ह० खाऊन पचविणें. ६ मनावर न घेणें (दुसऱ्यानें केलेला अपकार); सोसणें. ꙮ **माशानें माणीक गिळणें**

आपली वस्तु कोणी चोरली हें आपणांस सिद्ध करतां येण्याजोगें असून ती परत मिळविण्याची खटपट करणें शक्य नसल्यामुळें स्वस्थ बसण्याचा प्रसंग येणें.

गीत [सं० गै=गाणें] वि० १ गाइलेलें. २ वर्णिलेलें. न० १गाणें. २गायन. ३ छंदोबद्ध गाण्यांतील एक भेद. ४ दळतेवेळीं किं० विवाहादि प्रसंगीं स्त्रिया जीं गाणीं म्हणतात तीं प्रत्येक. ꣸ **एकाद्याच्या नांवें गीत गाणें** त्याणें आपणावर केलेल्या उपकारांबद्दल आपली कृतज्ञता त्याच्या परोक्ष दुसऱ्यापुढें व्यक्त करणें किं० बोलून दाखविणें. **कोणेकाजवळ आपलें गीत गाणें** त्याच्यापुढें आपल्या दुःस्थितीचा पाढा वाचणें, किं० आपली रड चालविणें किं० रड गाणें. **होतें तें गीत गायिलें** जें सांगावयाचें होतें तें सांगून झालें किं० सांगून संपलें. **ज त्यावर बसलें म्हणजे गीत आठवतें** अमुक काम आपणास कसें करतां येईल अशी कचर न बाळगतां एकदम कामाला सुरवात करावी, म्हणजे तें काम कसें करावयाचें हें आपणास आपोआप समजूं लागतें. ꣸ **गीतमान** न०गायनाचे नियम समुच्चयानें.

गीता [सं० गै=गाणें] स्त्री० १ ईश्वरावतारप्रोक्तभगद्गुणादिवर्णन ज्यांत आहे असे जे पुराणाचे लहान लहान अंश ते प्रत्येक; उ० भगवद्गीता, शिवगीता, नारदगीता, इ०. २ भगवद्गीता (विशेषतः).

गीति [सं०] स्त्री० १ गाणें. २ आर्याछंदांतील एक भेद; ज्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या चरणांत बारा बारा मात्रा असतात आणि दुसऱ्या आणि चवथ्या चरणांत अठरा अठरा मात्रा असतात असें वृत्त विशेष; उ० मोरोपंताचें भारत.

गीतिका [सं०] स्त्री० १ लहानसें गीत. २ अक्षरगणांनीं नियंत्रित वृत्तविशेष; याचे चारी चरण सारखे असून प्रत्येक चरणांत स, ज, ज, भ, र, स, असे गण असून शेवटीं एक लघु अक्षर आणि एक गुरु अक्षर हीं असतात.

गीद, गीध [सं० गृध्र]पु० गिधाड नांवाचा गरुडाच्या जातीचा एक पक्षी.

गीम, गीष्म [म० ग्रीष्म] पु० उन्हाळा.

गीर, गर पु० आंबा इ० फळांतील मृदु अंश; मगज. मागें ' गर ' पहा.

गीर [फा० गिरफ्तन्=धरणें,पकडणें] 'गीर' प्रत्यय नामादिकांना लागून त्याचे भिन्न भिन्न अर्थ होतात; आबदागीर म्ह० सूर्याला आडविण्याचें साधन, राजाच्या डोक्यावर धरावयाची एक प्रकारची छत्री.

गीर्वाण [सं०] पु० देव. ꣸ **गीर्वाणभाषा** स्त्री० देवांची भाषा म्ह० संस्कृत भाषा.

गीर्वाण न० अंगरख्याच्या मानेचा तुकडा.

गुखडी, गुखाड, गुखाडी [म० गू+खड्डा] स्त्री० जेथें जिकडे तिकडे गू, केरकचरा, इ०पडला आहे ती जमीन किं० तो प्रदेश.

गुंग [फा० गूंग्=मुका] वि० १ ज्वर, कैफ, झोप, दुःख, इ० कारणांमुळें जो म्लान आणि निश्चेष्ट तो. २ कांहीं गहन विचारांत तल्लीन झालेली (मति, इ०). ३ एकाद्या प्रश्नाचा उलगडा करण्यांत निमग्न असा (मनुष्य, विचार, बुद्धि, इ०). ४ कांहीं गोष्टीचा उलगडा होत नाहीं म्हणून हताश आणि गलितोत्साह असा(मनुष्य इ०).

गुंगणी, गुंगी [म० गुंग] स्त्री० झोप, कैफ, इ० कारणांमुळें आलेली निरंगळी, सुस्ती, निश्चेष्टता, इ० ती.

गुंगणें [' गुंग ' वर पहा] अ० क्रि० १ गुंगीनें आक्रान्त होणें. २ झोप येत असल्यामुळें डुलक्या खाणें. ३स्पष्टपणें वर्णोच्चार न करतां आपल्याशींच कविता इ० म्हणत राहणें. ४ भ्रमरादिकांनीं गुं गुं असा शब्द करणें. ५ मुलांचा खेळावयाचा जो भोंवरा त्यानें गुं गुं असा शब्द करणें. ६ एकाद्या विषयांत तल्लीन किं० एकाग्र होणें. ७ पळून जाणें; हातावर तुरी देऊन पलायन करणें.

गुंगविणें [म० ' गुंगणें 'चे प्रयोजकरूप]स० क्रि० १ एकाद्याला गुंगींत घालणें. २ एकाद्याला एकाद्या नादाला लावणें; एकाद्या विषयाकडे त्याला आकर्षिणें. ३ भ्रांत करणें. ४ कांहीं वस्तु घेऊन पळून जाणें.

गुंगारणें अ० क्रि० १ गुं गुं किं० सूं सूं असा ध्वनि करणें (फेकलेला धोंडा इ०नें). २ कांहीं वस्तु घेऊन फरारी होणें. ३ पळून जाणें. ४ अमली पदार्थाच्या सेवनानें मलून किं० निश्चेष्ट होणें.

गुंगारा [म० गुंग] पु० १ एकाद्याला फस-

चून पळून जाणें. २ एकाद्याला चुकवून किं० त्याच्या हातावर तुरी देऊन पळून जाणें (क्रि०देणें, मारणें). ३ जोरानें फेकलेल्या दगडाचा सूं सूं असा ध्वनि.

गुंगाविणें [म० गुंग] **स० क्रि०** १ अमली पदार्थानें एकाद्याला गुंगी आणणें. २ एकाद्या विषयाकडे आकृष्ट केला जाणें. ३ एकाद्या नादाला लाविला जाणें.

गुंगी [म० गुंग] **स्त्री०** १ गुंगपणा; धुंदी; बेशुद्धि. २ झोपेनें आलेली निरंगळी किं० सुस्ती.

गुग्गुल(–ळ), गुग्गूळ पु० एक सुगंधी द्रव्य-विशेष; धूप. ॐ **घे गुग्गुळ दे प्रसाद** एकादी क्षुल्लक वस्तु एकाद्याला देऊन त्याच्यापासून फार मोठ्या वस्तूची अपेक्षा करणें (हा मूर्खपणा होय).

गुग्गुळी स्त्री० एक वल्ली.

गुघाण [म० गू+घाण] **स्त्री०** एकाद्या कामाची किं० व्यवहाराची दुर्दशा, अव्यवस्था, किं० नासाडी.

गुचकी स्त्री० उचकी.

गुचकुला वि० चिमुकला; लहान आणि सुंदर.

गुच्चा पु० १ आट्यापाट्यांच्या खेळांत दुसऱ्या गड्याला फसवून पळून जाण्यासाठीं ज्या हुलकावण्या दाखविल्या जातात त्या प्रत्येक. २ एक भोंवरा दुसऱ्या भोंवऱ्यावर मारला म्हणजे पहिल्याच्या आरीनें दुसऱ्याच्या अंगावर उठतें तें चिन्ह; किं० एका भोंवऱ्यानें दुसऱ्याला मारलेला तडाखा. ३ पुढच्या बोटानें मारलेला तडाखा. ४ गालाला घेतलेला चिमटा.

गुच्छ [सं०] **पु०** १ झुबका, जुडी. २ फुलांचा झाडावर एका देठाला लागलेला समुदाय; घोस. ३ फुलें एकत्र बांधून शोभेसाठीं केलेला समुदाय. ४ मोत्यांचा हार बत्तीस किं० सत्तर सरांचा. ५ मोचेल.

गुच्छी स्त्री० मुठीचा ठोसा.

गुज [सं० गुह्य] **न०** गुप्त गोष्ट; एकाद्याची लपवून ठेवावयाची गोष्ट किं० रहस्य. ॐ**गुजगोष्ट स्त्री०** एकाद्याचें रहस्य किं० अगदीं मनांतील गोष्ट.

गुंज [सं० गुंजा] **स्त्री०**१गुंजवेल.२तिचें बीज; हें तांबडें असून एका टोकाला काळें असतें;हें सोनारलोक वजन करावयाला परिमाण म्हणून घेतात. शाहाण्णव गुंजा म्हणजे एक तोळा परिमाण होतें.३ झाडांतील किं०लाकडाच्या तुळईतील किं० फळीतील अत्यंत टणक भाग. ॐ**हत्ती जातो, नाहीं तर गुंज मारतात** खूप मोठा अपराध क्षमिला जातो पण अत्यंत लहान अपराधाला जबर शिक्षा केली जाते (अन्याय, पक्षपात, इ०चें वर्णन).

गुजगुज न० पांगुळबैलाच्या तमाशांत वाजवितात तें ढोलकें. **क्रि० वि०** हलक्या स्वरांत (बोलणें, खलबत करणें, इ०). **स्त्री०, न०** हलक्या स्वरांत बोलणें किं० केलेलें खलबत.

गुजगुजणें अ० क्रि० हलक्या स्वरांत बोलणें.

गुंजट [म० गुंज] **वि०** गांठळ (लाकूड). **न०** लांकडांतील गांठळ भाग.

गुंजडा पु०, गुंजडी स्त्री०, गुंजडें न० [म० गुंज] १ ज्याच्यावर गुंजा चिकटावलेल्या आहेत असा मेणाचा गोटा (मुलांच्या पाळण्यावर टांगावयासाठीं केलेला असतो तो). २ सुताचें किं० दोऱ्याचें गुंडाळें किं० गुंडा.

गुंजणें [सं० गुंज्=गुणगुणणें] **अ० क्रि०** गुणगुणणें; भ्रमरादिकांनीं गुंजारव करणें.

गुजर पु०गुजराथचा रहिवासी.**स्त्री०गुजरीण.**

गुजर [फा०] **पु०, स्त्री०** निर्वाह; चरितार्थ.

गुजरणी स्त्री० १ रेघोतळी नांवाच्या हत्यारानें दागिन्यावर सोनार काढतो ती बारीक रेषा.

गुजरणें, गुदरणें [फा०] **अ० क्रि०** १ (दिवस, काळ इ०) लोटणें किं० जाणें; उ० ह्या गोष्टीला पांच वर्षें गुजरलीं. २ (संपत्ति, वैभवाची स्थिति, सौंदर्य, हिंमत, इ०) नष्ट होणें किं० गत होणें. ३ मरणें. ४ एकाद्याच्या भोगास येणें; उ० त्या प्रवासांत माझ्यावर अनेक संकटें गुदरलीं. **स० क्रि०** १ (कांहीं वस्तु कोणेकाच्या) स्वाधीन किं० हवालीं करणें; उ० कारकुनानें जमाखर्चाचा कागद मजकडे अझून गुजरला नाहीं. २ (एकाद्या मनुष्याला एकाद्या कामावर किं० अधिकारावर) स्थापित करणें. ३(दिवस) घालविणें.

गुजराण [फा०]**स्त्री०**१चरितार्थ.२चरितार्थाचें साधन. ३स्वल्प प्राप्तीवर कालक्रमणा किं० निर्वाह.

गुजरात (–थ)[सं०गुर्जर] **स्त्री०**हिंदुस्तानांतील एका प्रान्ताचें नांव.ॐ**गुजरात कमाविणें** खूप पैसा

मिळविणें. **गुजराती(–थी)** **पु०**गुजराथ प्रान्तांतील रहिवासी. **वि०** गुजराथ संबंधाचा.

गुजराविणें, गुजरावणें [**म०** ' गुजरणें ' चें प्रयोजक रूप] **स० क्रि०** (दिवस) घालविणें किं० लोटणें किं० काढणें.

गुजरी [**हिं०** गुजरी] **स्त्री०** १ दुपारानंतरचा किं० संध्याकाळचा बाजार. २ संध्याकाळ,– खरेदी विक्रीच्या संबंधानें बोलतांना. ॐ**गुजरीचा बाजार पु०**१ संध्याकाळचा बाजार.२ सायंकाळची बाजारांतील घडामोड.

गुजरी स्त्री० १ एक प्रकारचें लुगडें. २ पायांत घालावयाचा एक दागिना.

गुजरी वि० गुजर लोकांसंबंधाचा.

गुंजवडा, गुंजवला, गुंजाडा पु० ज्याच्यावर गुंजा चिकटावलेल्या आहेत असा मेणाचा गोटा. मागें ' गुंजडा ' पहा.

गुंजाईस, गुंजएस खालीं ' गुंजावीस ' पहा.

गुंजाट [**म०** गुंज] **न०** लाकडांतील टणक भाग. **वि०** ज्यांत फार फार गुंजा आहेत असें (लाकूड, फळी, इ०). वर ' गुंज ' पहा.

गुजारत [**फा०** गुजारा] **स्त्री०** (देणें घेणें इ० व्यवहारीं) मध्यस्थी किं० साक्षी किं०मार्फती. ॐ**गुजारतवार क्रि० वि०** १ साक्षीदारासमोर किं० समक्ष. २ अमक्याच्या ओळखीनें किं० ओळखीवर. **गुजारत हाय** [**फा०** ' गुजारा 'चें **अ० व०**] **स्त्री० अ० व०** व्यवस्थित कायदेशीर साक्षीदार. **गुजारती** [' गुजारत ' पहा] **पु०** कायदेशीर साक्षीदार.

गुंजारव [**सं०** गुंज=गुणगुण; आरव=ध्वनि] **पु०** भ्रमरादिकांचें गुणगुणणें किं० त्या गुणगुणण्याचा आवाज.

गुजारा [**हिं०** गुजारा] **पु०** १ चरितार्थ, निर्वाह. २ अल्प सामग्रीवर काळ घालविणें किं० दिवस ढकलणें.

गुंजावीस [**फा०** गुंजायीष्] **स्त्री०** १ दोष, उणेपणा, ऐब; उ० ह्या तुळईंत आतां कांहीं गुंजावीस राहिली नाहीं. २ चुकी; उ० ह्या जमाखर्चांत कांहीं गुंजावीस नाहीं,तुम्ही बेलाशक सही करा.३ कर्तव्यांत हेळसांड किं०प्रमाद.४ नफा, किफायत.

गुंजाळें न० लुगड्याची एक तऱ्हा.

गुंजी स्त्री० कालवड, पाडी.

गुंजुला पु० १ गुंजा ज्यावर चिकटावल्या आहेत असा मेणाचा गोटा (मुलांच्या करमणुकीसाठीं पाळण्यावर टांगतात तो).२ एकाद्या ठिकाणी बसलेल्या लोकांचें वर्तुळ; माणसांचें कोंडाळें.

गुटकळी, गुटकुळी पु० १ बुचकळी; पाण्यांत बुडत असलेल्या माणसाचें पाण्यांत बुडणें आणि वर येणें; गटंगळी. २ लहान ढेकर.

गुटका [**सं०** गुटिका] **स्त्री०** १ गोळी; लहान गोळा; गोटी. २ पुटकुळी. ३ मोती. ४ रेशमी किड्याचा कोशेटा. ५ मांत्रिकानें दिलेली गोटी,–जी तोंडांत धरली असतां धरणारा मनुष्य अदृश्य होणें इ० अद्भुत गोष्टी करूं शकतो. ६ बुटका, एकदम गिळलेला घास. ७ लहानशी पोथी रेशमी कापडानें सुंदर रीतीनें बांधलेली.

गुटकुळा,गुटगुटीत गुटुंगा, गुटुणा वि०१लठ्ठ आणि ठेंगणा. २ मांसल.

गुटमळणें, घुटमळणें अ० क्रि० बोलतांना कचरणें; साशंक होणें; अस्पष्ट किं० अर्धवट बोलणें.

गुटिका स्त्री०१ लहानशी गोटी. २ रसायनादि द्रव्याची गोळी. ॐ **गुटिकपात पु०** सोडतीच्या सरणीनें ठरविण्याचा प्रकार.

गुटी स्त्री० एका मोठ्या वृक्षविशेषाचें नांव.

गुटोळा, गोटोळा [**म०**गोटा] **वि०** वाटोळ्या आकाराचा; वाटोळा; गोल.

गुठळी, गुठोळी, गुटोळी स्त्री०१ रक्त, दहीं, इ०ची गोटी किं० गोळी. २ कोणत्याही पदार्थाची गोळी किं० गोळा. ३ तोंड न पडलेलें गळूं किं० गळवांतील टणक भाग.४ पोटांतील मळांतील खडा.

ॐ**गुठळेबाज वि०** चुकारतट्टू; कामचुकार.

गुंठा पु० जमीनमापणीचें एक परिमाण; एका एकराचा चाळीसावा भाग.

गुठा, पु०, गुठें न० नांगरलेली जमीन सारखी करण्याचें एक आउत.

गुठावणें स० क्रि० नांगरलेली जमीन गुठा नांवाच्या आउतानें साफ करणें.

गुड, गुढ [**सं०** गुड] **पु०** गूळ.

गुंड वि० १ कावेबाज; लुच्चा. २ अर्कट, वाल्रट.

गुंड पु० आकारविशेषाचें एक पात्र. **गुंडगी** स्त्री० लहान आकाराचा गुंड.

गुंड न० खरडा मांवाचें जें खरवडींत मोती त्याचा फुगवटा.

गुडगुडणें अ० क्रि० १ नारळ इ० पदार्थ हालविला असतां तो गुडगुड अशा आवाजानें युक्त होणें. २ पोट वातविकारानें गुडगुड अशा ध्वनीनें युक्त होणें.

गुडगुडा वि० नारळ, ऊंडी, इ० फळें पूर्ण पक्व होऊन त्यांचा कांहीं अंश कवचापासून सुटून मोकळा झालेला असतो आणि तीं फळें हालविलीं असतां गुडगुड असा आवाज होतो; अशा स्थितींतील (फळ).

गुडगुडी, गुरगुडी स्त्री० तंबाखू ओढण्याचें एक साधनविशेष. ॐ**एकाद्याची गुडगुडी बंद करणें** त्याला जातींतून बाहेर टाकणें; (एका जातीचे लोक एका गुडगुडीनें तमाखुसेवन करूं शकतात).

गुडगुडीत वि० १ गुटगुटीत अंगाचा (मनुष्य, जनावर, इ०). २ मध्यम प्रमाणांत जो लठ्ठ तो.

गुडगुडें न० नारळाचा गोटा (कवचापासून मोकळा केलेला किं० कवचांतच असलेला).

गुंडगुळें, गुंडगाळें न० १ वाटोळ्या आकाराचें एक प्रकारचें भांडें. २ लठ्ठ आणि ठेंगणा माणूस. वि० वाटोळें, गोल.

गुंडगें [म० गुंड] न० लहानसा गुंड, (मातीचा किं० धातूचा).

गुडघा पु० १ मनुष्याच्या तंगडीच्या मध्याचा जो सांधा तो. २ (लाक्षणिक) पाठबळ; टेका; आधार. ॐ**गुडघे टेकणें** (लाक्षणिक) एकादें काम करावयाला किं० पार पाडावयाला असमर्थ असणें किं० आपण असमर्थ आहों असें कबूल करणें. **गुडघ्यावर हात येणें** (किं० **देणें**) वार्द्धक्यामुळें उठावयाच्या वेळीं गुडघ्यावर हात टेकण्याची जरूरी वाटणें.

गुडघी [म० गुडघा] स्त्री० १ गुडघ्याचा एक रोगविशेष; उ० छत्रपति शिवाजीमहाराज गुडघीनें मरण पावले. २ गुडघ्याच्या खालीं दोन तीन बोटें येणारा चोळणा; जसें ' कोपरी ' म्ह० कोपरा इतक्या ज्याच्या बाह्या आहेत अशी बंडी किं० असें पैरण. ॐ**गुडघेमार** पु० गुडघ्यानें एकाद्याच्या ढुंगणावर मारलेले तडाखे (**क्रि०देणें**).

गुडणें, गुढणें अ० क्रि० आसन्नमरण स्थितींत असणें; मरावयास टेकलेला असणें; उ० सदोबा मरावयाला गुडलेला आहे आणि त्याला आतां लग्न कशाला पाहिजे ?

गुडणें, गुंडणें स० क्रि० १ लपेटणें, गुंडाळणें. २ गुंत्यांत सापडणें.

गुडदा पु० तरवारीसारखी मूठ असलेलें आणि लोखंडाच्या सळईच्या रूपाचें एक हत्यार.

गुडदी स्त्री० दौत, शिसा इ० तील द्रव्य बाहेर पडूं नये किं० त्यांत धूळ, मुंग्या, इ० शिरूं नयेत म्हणून त्यांचें तोंड ज्या लाकडी किं० कापडी किं० अन्य द्रव्याच्या साधनानें बंद करतात तें साधन; बूच; झाकण.

गुडदू वि० लठ्ठ आणि ठेंगणा.

गुडधान, गुडधानी, गुडदाणी [सं० गुड (गूळ)+धान्य] स्त्री० गुळाचा पाक आणि चुरमुरे किं० फुटाणें ह्यांचा केलेला लाडू,–मुलांचें एक खाद्य.

गुंडळी, गुंडाळी स्त्री०, **गुंडळें, गुंडाळें** न० कापडें, कागद, दोरी, इ०ची वळकटी किं० गठ्ठा.

गुंडा पु० १ वाटोळा धोंडा. २ सूत, दोरी, सुंभ, इ० गुंडाळून जो वाटोळा गोळा होतो तो. ३ (लाक्षणिक) अट्टल सोदा; फसवेगिरीचीं कृत्यें करण्यांत कुशल. ४ मोठ्या आकाराचा गुंड,–गोल आकाराचें भांडें. ५ ज्याची एक बाजू घडविलेली आहे आणि इतर बाजवा ओबडधोबड आहेत असा दगड (भिंती, इ० रचण्यांत योजतात तो). ६ मातीच्या भांड्यांना विशिष्ट आकार आणि दृढपणा यावयासाठीं कुंभारलोक योजतात तो दगड. ७ घराचें जोतें बांधतांना गवंडी जे तीन थर रचतात त्यांतील मधला थर; ह्या थराला 'पेटी' असाही शब्द आहे. ८ कमावलेल्या मातीचा गोळा,–जो फिरवावयाच्या चाकाच्या मध्यावर कुंभार लोक ठेवितात आणि चाक फिरूं लागल्यावर त्या गोळ्याला हातानें आकारविशेष देतात तो.

गुडाकू (**–खू**) स्त्री० तंबाखू आणि गूळ आणि इतर कांहीं द्रव्यें एकत्र कुटून जो गोळा करतात तो (ओढण्याच्या उपयोगाचा). ॐ०**ची**

गुडघु वळणें क्रि० **होणें** १ दुर्दशा होणें. २ पूर्ण नाश होणें. ३ श्रमातिशयानें किं० झोपेनें अगदीं अगदीं बेजार होऊन जाणें.

गुंडाळणें स० क्रि० सपाट पसरलेला जो वस्त्रादि पदार्थ त्याची एक कड आंत ठेवून तिच्याभोंवतीं बाकीचा विस्तार एका दिशेनें लपेटीत जाणें म्ह० त्या वस्त्रादि पदार्थाची वळकटी करणें; उ० सकाळीं निजून उठल्याबरोबर आपली गादी आपणच गुंडाळून ठेवावी. २ आवरणें, आटोपणें; उ० आपलें भाषण श्रोत्यांना कंटाळवाणें वाटून ते एकसारखे सभागृहांतून उठून जात आहेत असें वक्तेबोवांना दिसतांच त्यांनीं आपलें भाषण गुंडाळलें. ३ बंद करणें; उ० आपल्या मालाला गिऱ्हाईक नाहीं असें दिसतांच गिड्डमल्लानें आपलें दुकान गुंडाळलें. ४ वादामध्यें प्रतिपक्षाला निरुत्तर करणें. ५ परदेश जिंकून पादाक्रान्त करणें.

गुंडाळणें अ० क्रि० १ वळकटीच्या रूपांत जाणें; ०चें वेटोळें होणें. २ संपणें. ३ मरणें.

गुंडाळा पु०, गुंडाळी स्त्री०, गुंडाळें न० १ गुंडाळण्याच्या क्रियेचें कार्य; सूत्र, वस्त्र, इ० गुंडाळून होतो तो आकारविशेष. २ सूत्र इ०पदार्थांची गुंतागुंतीची स्थिति. ३ अनेक पदार्थांची एके ठिकाणीं झालेली गुंतागुंत किं० घोटाळलेपणाची स्थिति. ३ मुंडासें, रुमाल, फेटा, इ० शिरोवेष्टन (तिरस्कारानें).

गुंडिका, गुण्णिका [सं०] स्त्री० कांहीं वाक्य, श्लोक, मंत्र, इ० पाठ करतांना त्याचें एकवेळ म्हणणें; घोकून पाठ करतांना केलेली एक आवृत्ति.

गुडी, गुढी स्त्री० वर्षप्रतिपदेच्या दिवशीं किं० अन्य उत्सवाच्या प्रसंगीं ज्या एका लांब काठीच्या टोकाला रेशमी वस्त्र, चांदीचें भांडें, फुलांची माळ, इ० पदार्थ बांधून घराच्या अंगणांत उभारतात ती काठी. ॐ**गुडी पाडवा पु०** वर्षप्रतिपदेचा दिवस.

गुंडी [म० गुंड] स्त्री० १ लहान गुंडा. २ गवताची बांधलेली पेंडी. ३ अंगरखा, पैरण, इ० चा एकीकडचा भाग दुसरीकडच्या भागाला जुळलेला राहावा म्हणून एका बाजूला शिवलेल्या विरुद्यांत घालावयाला दुसऱ्या बाजूला शिवलेली जी फडक्याची गोळी असते ती. ॐ**जाफरी गुंडी स्त्री०** एक सुंदर पुष्पविशेष. **गुंडीदार अंगरखा पु०** ज्या अंगरख्याचा उजवीकडचा गळ्याजवळचा भाग डावीकडे बद्ध करावयासाठीं त्यास गुंडी असते असा.

गुडुंब न०, गुडुंबा पु०, गुडूम पु०, न० गर्भ (विशेषत: अद्यापि तोंड न पडलेलें).

गुडूची, गुडुची [सं०] स्त्री० गुळवेल नांवाची लता. हिचा उपयोग तापावर करतात.

गुंडें [म० गुंडाळणें] न० दोरा, दोरी, इ० गुंडाळून होतो तो गोटा.

गुड्डू वि० लठ्ठ आणि ठेंगणा.

गुढघा पु० ' गुडघा ' पहा.

गुंढणें, गुंढाळणें वर 'गुंडणें,' 'गुंडाळणें' पहा.

गुढार न० १ दरवडेखोरांची धाड एकाद्या गांवावर आली असतां तेथून पळून गेलेल्या लोकांचा समुदाय. २ तट्टें, चटया, इ०ची अल्पकाळ रहावयासाठीं केलेली लहानशी झोपडी.

गुढी स्त्री० वर ' गुडी ' पहा.

गुढी स्त्री० १ परदेशीं मेलेल्या मनुष्याचें वर्तमान; उ० शामराव मेल्याची कालच कोल्हापुराहून गुढी आली. २ देवाला कांहीं प्रश्न विचारून त्याच्या मूर्तीला ज्या लहान गोट्या किं० सुपाऱ्या लावतात त्या प्रत्येक; ह्या गोट्या उजवीकडच्या किं० डावीकडच्या गळून पडतील त्याप्रमाणें भक्तजन देवाचें उत्तर ठरवितो; उ० मला नोकरी लागावयाची असली तर उजवी गुढी दे; उ० देवानें डावीकडची गुढी दिली. ३ दोरी वळण्याचें काम चाललेलें असतां पदराचा ताण किंचित कमी होऊन अल्पभागाला जी मोड पडते ती; तिला 'पिंपळी' स्त्री० किं० ' मेंढा ' पु० असेंही म्हणतात. ४ वस्त्राला पडलेली दुमड, (क्रि० पडणें). ॐ**एकाद्याला उजवी गुढी देणें** त्याची विनंती मान्य किं० सफल करणें. **एकाद्याला डावी गुढी देणें** त्याची विनंती अमान्य करणें. **एकाद्यानें गुढी उभारणें** त्यानें प्रसिद्धि पावणें (बहुधा दुष्कृत्यांनीं).

गुढी पाडवा पु० वर ' गुडी ' मध्यें पहा.

गुढें न० १ दरवडेखोरांची धाड एकाद्या गांवा-

वर आली असतां गांवकरी तेथून उठून दुसरीकडे पळून जातात ते गांवकरी समुच्चयानें; उ० पिंपळ-गांवाहून पुढें उठलें (किं० पळालें) तें वडगांवाला गेलें. २ नेहमीच्या वसतीचा गांव सोडून दुसरीकडे कायमचें वास्तव्य करावयाला गेलेलें कुटुंब. ३ दुसऱ्या गांवच्या शेतकऱ्यांना शेतकामीं मदत करावयाला गेलेले एका गांवचे शेतकरी समुच्चयानें किं० अशा शेतकऱ्यांची टोळी; ह्या टोळीला ' गूढ ' असेंही म्हणतात. ४ धान्याच्या ताटांची पेंडी झोडपावयाच्या अगोदरची. ५ गूढ, कोडें (क्रि० घालणें, सांगणें, उकलणें). ॐ **गुढ्याचा पाडवा पु०** शेतांतील धान्याची कापणी झाल्यावरचा दुसरा दिवस; ह्या दिवशीं ब्राह्मणांना शेतकरी कांहीं धान्य देतात. दिपवाळीचा पाडवा आणि राखी पाडवा ह्या दोन दिवशीं ब्राह्मणांना अशींच दानें शेतकऱ्यांकडून मिळतात.

गुण [**सं०**] **पु०** १ मनुष्य, पदार्थ, इ० चा मूळधर्म. २ सद्गुण. ३ फायदा, उपयोग. ४ कार्य, परिणाम. ५ दोरी; सूत. ६ धनुष्याची दोरी. ७ वीणा, सतार, इ० ची तार. ८ सत्त्व, रज, आणि तम हीं जीं तीन तीं प्रत्येक. ९ दिव्याची वात. १० ज्ञानेंद्रिय. ११ रूपादि पंचविषय. १२ आधिक्य; श्रेष्ठत्व. १३ विशेषण. १४ (**व्याकरण**) अ, ए, आणि ओ हे वर्ण. १५ माधुर्य; ओज आणि प्रसाद हे काव्याचे धर्म किं० विशेष. १६ संधि, विग्रह, यान, आसन, संश्रय आणि द्वैत हे जे राजनीतीचे सहा प्रकार ते प्रत्येक. १७ रूप, रस, इ० जे चोवीस गुण नैय्यायिकांनीं गणिलेले आहेत ते प्रत्येक. १८ (**समासांत**) पट; उ० द्विगुण म्ह० दुप्पट; त्रिगुण म्ह० तिप्पट; चतुर्गुण म्ह० चौपट; शतगुण म्ह० शंभरपट, इ०. ॐ**गुणातीत पु०** ईश्वर. **गुणानुवाद पु०** एकाद्याच्या गुणांचें वर्णन किं० परिगणन; त्याची स्तुति. **गुणावह, गुणकारक वि०** फायद्याचें. **गुणगंभीर वि०** उत्तम गुणांनीं जो युक्त तो. **गुणग्राहक, गुणग्रहीता, गुणग्राही पु०** गुणाचें चीज किं० कौतुक करणारा; मर्मज्ञ; दर्दी. **गुणविशेषण न०** [**व्या०**] गुण दाखविणारें विशेषण; उ० चांगला, वाईट, लठ्ठ, इ०. **गुणवान्, गुणवंत वि०** गुणी माणूस. **गुणज्ञ वि०** गुण जाणणारा; दर्दी; मुरब्बी. **एकाद्याचे गुण आठविणें** मृत अथवा दुसरीकडे गेलेल्या माणसाच्या गुणांचें वर्णन करणें. **एकाद्यानें गुण उधळणें (पसरणें, पागळणें)** आपल्या अंगचे दुर्गुण एकाद्यानें कांहीं दुष्कृत्य करून प्रकट करणें. **गुण करणें** पुढें आपण मोठीं मोठीं कृत्यें करूं असें लहानपणच्या वर्तनावरून लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आणून देणें (लहान मुलाच्या संबंधानें बोलतांना). **एकाद्याचे गुण काढणें** त्याला झोडपून त्याला सन्मार्गावर आणणें. **एकाद्यानें गुण दाखविणें** किं० **गुणावर येणें** आपल्या अंगचे आजपर्यंत लपलेले दुर्गुण कांहीं दुष्कृत्य करून प्रकट करणें. **एकाद्यानें आपल्या गुणांची माती करणें** त्यानें आपली बुद्धिमत्ता किं० कसब भलत्याच कामीं योजणें. **गुणास येणें** किं० **पडणें** लागूं पडणें; फलद्रूप होणें. **चांगले गुण करणें** शिस्तीनें वागणें; सन्मार्गानें वर्तणें. **गुणांश पु०** औषधविशेषाचा गुण किं० परिणाम; औषधाची गुणावहता; उ० त्या औषधाचा गुणांश अद्यापि कांहींच दिसून येत नाहीं.

गुणक [**सं०**]**पु०** १ गणिती. २ गुणणारा अंक.

गुणकली स्त्री० एक रागिणी.

गुणगुण स्त्री० १ फारशी विश्वसनीय नव्हे अशी बातमी. २ लोक एकमेकांत जी हलक्या आवाजांत बोलतात ती वार्ता. ३ दुसऱ्याला स्पष्ट ऐकूं न जाईल असें भाषण, म्हणणें, गाणें, इ०.

गुणगुणणें अ०क्रि० हलक्या आवाजांत बोलणें, गाणें, इ०. **स० क्रि०** हलक्या आवाजांत (गाणें इ०) म्हणणें.

गुणगुणा पु० नाकांतील अवयवविशेष; दोन नाकपुड्यांच्या मधल्या पड्याचा मांसल भागविशेष. ॐ**गुणगुणा फुटणें** नाकांतून रक्त वाहणें.

गुणगुण्या त्रि० हलक्या आवाजांत आणि नाकांत बोलणारा किं० गाणारा किं० म्हणणारा.

गुणणिका, गुणनिका [**सं०** गुणनिका] **स्त्री०** पुनः पुनः घोकणें; अभ्यास.

गुणणें [**सं०** गुण्=गुणणें, वाढविणें] **स० क्रि०** १ गुण्यांकाची गुणकांकाइतकी पट करणें; उ० पांचाला चारानें गुणणें म्ह० पांचाची चौपट करणें. २ घोकणें.

गुणन [**सं०**] **न०** १ गुणण्याचा व्यापार. २ परिगणन; मोजणें.

गुणा पु० १ गाडीच्या आंसाचीं जीं दोन टोकें चाकांत शिरकावलेलीं असतात तीं प्रत्येक. २ सुतार, गवंडी, इ० चें काटकोन मोजावयाचें एक आउत; गुण्या.

गुणाकार पु० एका संख्येला दुसऱ्या संख्येनें गुणून जी संख्या येते ती, किं० येतें तें फल.

गुणांक भागोत्री स्त्री० १ गुणाकार आणि भागाकार हीं दोन गणितकृत्यें. २ (सामान्यतः) सर्व गणितकृत्यें.

गुणी [**सं०** गुण] **वि०** १ गुणवान्. २ चांगले गुण ज्याचे ठायीं आहेत असा. ꣸**गुणिजन पु०** १ गुणवान् माणूस. २ गायनादि कांहीं गुण ज्याचे ठायीं आहे असा माणूस. ३ रंडापुत्र.

गुणेंगोविंदें, गुण्यागोविंदानें, गुण्यागोविंदें [**सं०** गुण=(चांगला) गुण; गोविंद=समाधान (मराठींतील एक अर्थ)]. **क्रि० वि०** चांगल्या गुणांनीं; भांडणें तंटे न करतां; गोडीगुलाबीनें; प्रेमानें; मित्रत्वानें.

गुणोत्तर न० दोन परिमाणांची तुलना केली असतां एका परिमाणाचा दुसऱ्याच्या किती पटीशीं सारखेपणा आहे हें दाखविणारा एक आंकडा किं० दोन आंकडे; उ० पांच आणि दहा ह्यांच्यांत दुपटीचें गुणोत्तर आहे; उ० बारा आणि अठरा ह्यांच्यांत दोहोंस तीन हें गुणोत्तर आहे.

गुण्णिका [**सं०** गुण्= वाढविणें] **स्त्री०** १ घोकणें किं० घोकून पाठ करणें. २ पाठ करण्यासाठीं विशिष्ट श्लोकादिकाची केलेली आवृत्ति.

गुण्य [**सं०** गुण्] **न०** जिला गुणावयाचें ती संख्या; उ० पांचास तिहींनीं गुणून पंधरा हा गुणाकार येतो; येथें पांच हें गुण्य; तीन हा गुणक. ꣸ **गुण्यांक पु०** जिला गुणावयाचें ती संख्या; वरील उदाहरणांत पांच हा गुण्यांक.

गुण्या पु० १ चाक, इ०चा आस. २ सुतार, गवंडी, इ०कारागिरांचें काटकोन मोजण्याचें साधन.

गुतका पु० मक्ता; उ० तुला स्वताला शेत करतां येत नसलें तर गुतक्यानें देऊन टाक.

गुंतणूक [**सं०** गुंतणें] **स्त्री०** १ गुंतागुंत; घोटाळा. २ अडकल्याची स्थिति. थांबणूक.

गुंतणें, गुतणें अ० क्रि० १ अडकणें. २ एकाद्या विशिष्ट कामांत व्यापृत असणें; एकाद्या कामांत किं० व्यवहारांत निमग्न होणें. ३ मोकळा न होण्याच्या स्थितींत असणें; एकादी वस्तु एकाद्या विशिष्ट कामाकडे अगोदरच योजलेली असल्याकारणानें दुसऱ्या कांहीं कामाला लावतां येण्याच्या स्थितींत नसणें.

गुतवळ, गुंतवळ [**म०** गुंतणें] **पु०** केश गुंतलेले असतां ते फणीनें विंचरले म्हणजे फणीच्या दांत्यांत अडकून जे केश येतात ते प्रत्येक.

गुंतविणें, गुतविणें [**म०**'गुंतणें' चें प्रयोजक रूप]**स० क्रि०** १ घोटाळ्यांत घालणें. २ अडकाविणें; थांबविणें.

गुंता, गुता [**म०** गुंतणें] **पु०** १ अडथळा; प्रतिबंध. २ थांबणूक; खोळंबा. ३ अडचण; पंचाइतीची स्थिति. ४ गुंतागुंत. ५ केश विंचरले असतां त्यांतून जे केश गळून किं० तुटून फणीला अडकून येतात ते समुच्चयानें. ६ कणसें झोडपून काढल्यावर जमीनीवर जो केरकचरा पडतो तो. ७ सुतक; मृताशौच. ꣸**गुंतागुंत, गुतागूत स्त्री०** १ गुंताडा; एका पदार्थाचे अनेक भाग किं० अनेक पदार्थांचे भाग एकमेकांत घोटाळणें किं० गुंतणें. **गुंताड, गुताड स्त्री०, न०, गुं (–गु–) ताडा; पु०** घोटाळलेपणाची स्थिति; गुंतागुंत (वर पहा).

गुतारुता, गुंतारुंता पु० अडथळा, खोळंबा (**क्रि०** पडणें, घालणें).

गुत्ता पु० १ दारू गाळण्याचा किं० विकण्याचा मक्ता. २ दारू विकण्याचें दुकान.

गुंथणें वर ' गुंतणें ' पहा.

गुथ्थागुथ्थ वर ' गुंतागुंत ' पहा.

गुद [**सं०**] **न०** प्राण्यानें भक्षिलेल्या अन्नावर जठराग्नीचे संस्कार होऊन रद्दी भाग शरीरांतून ज्या द्वारानें बाहेर पडतो तें द्वार; अपानद्वार. ꣸ **गुदद्वार न०** वर 'गुद'चा अर्थ पहा. **गुदरोग पु०** गुदास झालेला कोणताही रोग. **गुदांकुर, गुदकील, गुदार्श पु०** मूळव्याध. **गुदग्रह, गुदस्तंभ पु०** मलावरोध. **गुदभ्रंश पु०** गुदद्वारांतून आंतडें बाहेर येणें.

गुदगुद (-दी) स्त्री० कंड, खाज.

गुदगुद, गुदगुली स्त्री० १ शरीरास सौम्य हस्तस्पर्श झाला असतां हसण्याची प्रवृत्ति होते ती. २ आनंदाची वार्ता ऐकून किं० कांहीं सुखदायक विचार मनांत येऊन हसण्याची प्रवृत्ति होते ती. ॐ **एकाद्याला गुदगुल्या करणें** त्याच्या अंगांत (विशेषतः पोटांत) बोटें खुपसून त्याला हसावयाला लावणें.

गुदड पु० रद्दी रेशीम.

गुदडणें, गुदडा पुढें 'गधडणें,' 'गुधडा 'पहा.

गुदमरणें, गुदमुरणें अ० क्रि० १ दम कोंडल्यानें किं०श्वासोच्छ्वासाला पूर्ण अवसर न मिळाल्यानें व्यथित होणें. २ कोंडलेल्या हवेंत फार वेळ राहिल्यामुळें व्यथित होणें. ३ खेळती हवा पुरेशी न मिळाल्या कारणानें जर्जर होणें. ४ कोंडलेल्या हवेंत असल्यामुळें किं० उकाड्यामुळें अस्वस्थ होणें.

गुदम(-मा-)रा [म० गुदमरणें] **पु०** कोंडलेल्या हवेंत फार वेळ असल्यामुळें किं० उन्हाच्या झळयामुळ वाटते ती अस्वस्थता.

गुदरणें [मागें 'गुजरणें' पहा]**स० क्रि०** १ (कोणा इसमाला कोणे एके स्थानीं) स्थापित करणें. २ (कांहीं वस्तु कोणेकाच्या) हवालीं किं०स्वाधीन करणें. ३ (काल) घालविणें किं० लोटणें. **अ०क्रि०** १ एकाद्यावर एकादें संकट किं० प्रसंग येणें किं० ओढवणें. २ (काळ) अतिक्रान्त होणें किंवा उलटून जाणें. ३ संसारादिकांत गुंतणें. ४ नाहींसें होणें; गत होणें. ५ मरणें.

गुदरणें अ० क्रि० १ चिखल इ०नीं लिप्त होणें; उ०शेणानें गुदरलेले पाय ह्या दिवाणखान्यांत आणूं नको.२ दुर्व्यसनामध्यें गढलेला असणें.३ प्रपंचाच्या खटरकींनीं जर्जर झालेला असणें.

गुदस्त, गुदस्ता [फा० गुजश्ताह्=गेलेला] **वि०** गत, गेलेला; उ० माहे गुदस्त; उ० गुदस्त साल. ॐ **साल गुदस्तां क्रि० वि०** गेल्या वर्षी.

गुदारा पु० मागें ' गुजारा ' पहा.

गुद्दा, गुध्धा पु० मुठीनें मारलेला रट्टा किं० ठोसा किं० तडाखा.

गुधडणें स० क्रि० इकडे तिकडे फेकून, खालीं वर उडवून किं० भलत्याच रीतीनें योजून किं० भोगून नासणें किं० बिघडविणें किं० बहुतेक निरुपयोगी करणें. २ माणूस जनावर इ०ना फार काम करावयास लावणें.

गुधडा [म० गुधडणें] **पु०** पदार्थ गुधडणें; पदार्थाचा दुरुपयोग करणें; पदार्थाचा चोळामोळा करणें. [(संगीतांत).

गुनकली, गुणकली स्त्री० एक रागिणी.

गुन्हा [फा० गुनाह्=अपराध] **पु०** अपराध; सरकारच्या किं० समाजाच्या कायद्याचें उल्लंघन. ॐ **गुन्हेगार वि०** गुन्हा करतो तो. **गुन्हेगारी स्त्री०** १ गुन्हा; गुन्हा करणें. २ गुन्हा करणारापासून घेतलेला दंड.

गुप, गुपची(-चू-)प वि० कांहीं न बोलतां बसलेला; स्तब्ध. **क्रि० वि०** १ कांहीं न बोलतां; कांहीं हालचाल न करतां,मुकाट्यानें.२लपूनछपून.

गुपचीप न० मलईचें एक खाद्यविशेष.

गुपटणें अ० क्रि० हातीं घेतलेलें किं० मनांत आणलेलें काम कसें पार पाडावें हें सुचेनासें झाल्यामुळें कच खाणें; कचरणें; आवंकणें.

गुपटमार [म०गुपट; **सं०**गुप्त;**म०**मार(मारणें)] **पु०** अंतःकरणास लागलेली चिंता, हुरहूर किं० काळजी;-जी बाहेरून दिसत नाहीं किं० जी चार चौघांत प्रगट करणें योग्य नाहीं. ' गुपित घाला ' हाही शब्द ह्याच अर्थाचा आहे.

गुपित [सं० गुप्त=लपलेलें, झाकलेलें] **वि०** १ गूढ; लपलेलें; दृष्टोत्पत्तीस न येणारें. २ लपवून ठेविलेली गोष्ट; रहस्य.

गुप्त [सं० गुप्=लपविणें] **वि०** १ लपलेलें; आच्छादलेलें. २ बाह्येंद्रियांना अगोचर. ३ रक्षिलेला. **पु०** वैश्यांच्या नांवांपुढें लावावयाचें पद;उ० चंद्रगुप्त. ॐ **गुप्त घाला पु०** मंत्रतंत्रादि कृत्यांनीं एकाद्यावर आणलेलें संकट. २ गुप्त युक्तीनें एकाद्यावर घातलेलें संकट.३ दुसऱ्याची आबरू,नोकरी, कीर्ति, इ० वर गुप्तपणें घातलेला घाला, किं० आणलेली घोरपड. **गुप्तदान न०** आपलें नांव प्रगट न होऊं देतां दिलेलें दान. कोहळा इ०चे पोटीं मोहोरा, पुतळ्या, इ०घालून ब्राह्मणांस जें दान देतात तें,- हें दान किती आहे तें अर्थात् दुसऱ्या माणसास दिसत नाहीं. **गुप्तदूत पु०** शत्रूच्या

हातचाली पाहून येण्यासाठीं पाठविण्यांत आलेला इसम; हेर. **गुप्तधन न०** १ एकाद्याजवळ असलेलें लपलेलें धन; एकाद्याचीं लोकांना ठाऊक नसलेली संपत्ति. २ एकाद्याच्या अंगीं असलेली गायनवादनादि कला (लोकांच्या दृष्टोत्पत्तीस अद्यापि न आलेली).

गुप्ति [सं० गुप्=लपविणें] **स्त्री०** १ झाकणें; लपविणें. २ रक्षण. ३ भुयार, तळघर. ४ तटबंदी. ५ बंधन, कैद. ६ गलबताचा तळमजला.

गुप्ती [सं० गुप्त=लपलेलें] **स्त्री०** काठीच्या पोटांत भोक पाडून लपविलेली लहानशी तरवार. ही काठी दिसण्यांत हातांत धरावयाची साधी काठी दिसते; तिच्यांतील तरवार उपयोगाचे वेळीं बाहेर काढून चापानें त्या काठींत बसवावयाची असते.

गुप क्रि० **वि०** कांहीं न बोलतां. **उ० वा०** **अ०** चीप बस ! अगदीं कांहीं बोलूं नको ! चीप !

गुंफ स्त्री० १ शेंडी किं० स्त्रियांचे डोक्यावरचे केश विंचरल्यानें फणीला अडकून जे केश किं० गुंतवळ येतात ते समुच्चयानें. २ गुंतवळ व्यक्तिशः.

गुंफ [सं०] **पु०** १ बांधणें; गुंफणें. २ रचना. ३ बाहुभूषण. ४ कल्ला (गालावरचा).

गुफटणें, गुफाटणें, गुंफटणें, गोफाटणें, गोफटणें स० क्रि० १ धरणें, पकडणें, अडकावणें. २घोटाळ्यांत घालणें; गुंतविणें. ३ (कांहीं काम) कसेंबसें रेटून नेणें; असेलत्या सामग्रीनें किं० साधनांनीं गरज भागवून घेणें.

गुंफणी [**म०** गुंफणें] **स्त्री०** गुंफण्याची क्रिया. खालीं ' गुंफणें ' पहा.

गुंफणें [**सं०** गुंफ्=गुंफणें] **स० क्रि०** दोरा, तार, इ० मध्यें फुलें, मणि, इ० ओंवून कांहीं विशेषप्रकारें संबद्ध करणें; उ० नथ, बुगड्या, इ० सोनार गुंफून देतो; उ० फुलें, पानें, दूर्वा, इ० गुंफून फुलारी हार करतो.

गुंफा [**सं०**]**स्त्री०** १ आंत रहातां येईल असें पर्वताच्या पोटांतील विवर; गुहा. २ झाडाच्या फांद्या इ०ची योगी, तपस्वी, इ०ची झोपडी. ३ लतामंडप (आरामासाठीं केलेला). ॐ **सीता-गुंफा स्त्री०**: नाशकास पंचवटींतील सीतेला जेथें लपवून ठेविलें होतें तें डोंगरांतील विवर.

गुंफाटणें [**म०** गुंफणें] **स० क्रि०** घाईघाईनें (कांहीं काम) करून टाकणें; कसेंबसें करणें.

गुंफित [**सं०** गुंफ्=गुंफणें] **वि०** गुंफिलेलें.

गुंफींव [**सं०** गुंफ्; **म०** गुंफणें] **वि०** गुंफून बनविलेला (माळ, हार, इ०).

गुबकणें स० क्रि० (एकाद्याला) रट्टे चढविणें; त्याची कणीक तिंबणें;त्याला कुंबलणें किं० तुकलणें.

गुबगुबीत वि० लठ्ठ किं० ठसठशीत (अंग).

गुबारणें अ० क्रि० उन्हानें किं० उकाड्यानें अस्वस्थ होणें.

गुबारा, गुभारा, गुबार पु० १ पोटांत वातानें धरलेला फुगवटा; (पोट) डब्ब होणें. २ धूळ जमून गर्द रटाटणें. ३ एकाद्या माणसाविषयीं गुप्तपणें मनांत ठेविलेलें वैर; खुनस. ४ मेघांचा आकाशांत जमलेला समुदाय (पाऊस न पडतां). ५ उकाडा, उष्मा. ६ शेक (ठणकत असलेल्या अंगाला दिलेला). ॐ**पोटामध्यें गुबारा धरणें** वातानें पोट फुगणें. **पावसाचा गुबारा धरणें** आकाशांत मेघ जमून पाऊस सुरू होईल अशीं चिन्हें दिसणें. **मेघांचा गुबारा पु०**मेघांनीं आकाश कोंदणें (वृष्टि व्हावयाच्या अगोदर).

गुम [**फा०**] **क्रि० वि०** १ स्तब्धपणें; निश्चलपणें; मुकाट्यानें. २ हरवलेल्या स्थितींत; न सांपडेल अशा स्थितींत.

गुमगुमित वि० वर ' गुबगुबीत ' पहा.

गुमट पु० घुमट.

गुमठा (–डा) **पु०** मृदंग किं० पखवाज यांचा [मध्यभाग.

गुमशुद [फा०गुम=हरवलेला; शुद्=झाला] वि० हरवलेला; न सांपडेसा किं० बेपत्ता झालेला.

गुमा पु० जमीन इ० चा भाडेपट्टा.

गुमान [**फा०**] **पु०** १ परवा, काळजी; उ० तुम्हासारख्या श्रीमंतांना शंभर रुपायांची काय गुमान ? २ तोरा, ताठा, दिमाख. ३ शंकितपणाची वृत्ति; संशय. ॐ**गुमानांत ठेवणें** (किं० **राखणें**) संदिग्ध स्थितींत ठेवणें; मोघम ठेवणें.

गुमानी वि० गर्विष्ट, अभिमानी, कुरेबाज.

गुमास्तगिरी स्त्री० खालीं ' गुमास्ता ' पहा.

गुमास्ता [**फा०** गुमाष्ताह्] **पु०** आपलें काम आपण न करतां तें करण्यासाठीं आपल्या तर्फेनें आपण नेमिलेला किं० अधिकृत केलेला

इसम; मुखत्यार; मुनीम. ॐगुमास्ता(-स्ते-)गिरी स्त्री० गुमस्त्यानें काम, अधिकार, किं०दर्जा.

गुरकणी [म० गुरकणें] **स्त्री०** गुरकण्याचा व्यापार; खालीं ' गुरकणें ' पहा.

गुरकणें अ० क्रि० (व्याघ्रादिकांनीं) कर्कश आवाजांत ओरडणें; गर्जणें.

गुरका (–क्या) **वि०** मोठमोठ्यानें आणि आवेशानें बोलणारा. [(क्रि० येणें).

गुरका पु० रागाचा झटका; फणकारा; आवेश

गुरकावणी [म० गुरकावणें] **स्त्री०** १ आवेशानें मोठमोठ्यानें ओरडून बोलणें; क्रोधाचें प्रकटीकरण; धमकी. २ रागानें डोळे वटारणें.

गुरकावणें अ० क्रि० १ क्रोधानें ओरडणें किं० मोठमोठ्यानें बोलणें. २ धमकी भरणें. ३ डोळे वटारणें (एकाद्याला भीति दाखविण्यासाठीं किं० दम भरण्यासाठीं).

गुरकी, गुरकाई स्त्री० मागें 'गुरकणी' पहा.

गुरखी पु० खालीं ' गुराखी ' पहा.

गुरग(–गु–)टणें स० क्रि० वस्त्रादिकांनीं लपेटणें.

गुरगुडी स्त्री० मागें ' गुडगुडी ' पहा.

गुरगुर(–रां) क्रि० वि० गुर्रगुर्र असा आवाज करून.

गुरगुर(–री) स्त्री० १ गुर्रगुर्र असा आवाज (तोंडानें केलेला किं० पोटांत वातादिकांनीं होणारा). २ चरफड, पिरपीर.

गुरगुरणी स्त्री० वर ' गुरगुर ' पहा.

गुरगुरणें अ०क्रि० १ रागानें किं०असंतुष्टपणानें तोंडांतल्या तोंडांत बोलत राहाणें. २ अपचनादि कारणांमुळें पोटांत गुर्रगुर्र असा आवाज होणें. ३ व्याघ्रादिकांनीं निसर्गतः किं० रागानें घशांतून गुर्रगुर्र असा ध्वनि काढणें. ४ रागानें चरफडणें. ॐपोट गुरगुरणें किं० **पोटांत गुरगुरणें** अपचनादि कारणांमुळें पोटांत गुर्रगुर्र असा आवाज होणें. **एकाद्याच्या अंगावर गुरगुरणें** चरफडत बोलून त्याला रागें भरणें. [गुरगुरत राहाणें.

गुरगुराट [**म०** गुरगुरणें] **पु०** एकसारखें

गुरगुरीत वि० १ उग्रपणें किं० रागानें वटारलेले (डोळे). २ फुगलेली (पोळी, भाकरी, इ०). ३ सुजलेलें (गात्र, गळूं, इ०).

गुरगुशी स्त्री० गात्रें संकुचित करून होतें तें संस्थान; उ० मूल मातेच्या कुशींत गुरगुशी मारून निजलें.

गुरगूज [**फा०** गुरज्] **पु०** जिला लोखंडाच्या लहान लहान सांखळ्या बसविलेल्या आहेत अशी काठी (जी कांहीं जातिचे भिकारी भिक्षा मागतांना वाजवितात).

गुरघुस क्रि० वि० घोरत (पडणें, निजणें).

गुरचरण [**म०** गुरूं + चरणें] **स्त्री०** १ गुरें चरतात जेथें तें कुरण किं० तो प्रदेश. २ गुरें विशिष्ट कुरणांत किं० प्रदेशांत चरण्याबद्दल द्यावे लागतात ते पैसे. ह्या अर्थानें **गुरचराई स्त्री०** असाही शब्द आहे.

गुरचराई [**म०** गुरूं + चरणें + आई (प्रत्यय)] **स्त्री०** दुसऱ्याच्या मालकीच्या कुरणांत आपलीं गुरें चरण्याच्या परवानगीबद्दल कुरणाच्या मालकाला दिलेला पैसा.

गुरजी पु० एका विशिष्ट जातीचा कुत्रा.

गुरदंड [**म०** गुरूं+दंड (काठीसारखी वाट)] **पु०** गुरांची वाट (विशेषतः डोंगरावरील).

गुरदा [**फा०** गुर्ज्] **पु०** लोखंडी सोटा.

गुरदा [**फा०** गुर्दाह्]**पु०** मूत्राशय.

गुरदा [**फा०**गिरद्] **पु०** पातळ पोळी;चपाती.

गुरधळ(–ळी) स्त्री० धिंगामस्ती; दांडगाईचीं कृत्यें (**क्रि०** मांडणें, लावणें, घालणें).

गुरपटणें, गुरफ(–फा–)टणें स० क्रि० १ चिरगुटें गुंडाळणें. २ पानें, फांद्या, इ०मध्यें लपविणें, गुंडाळणें, किं० न दिसेसा करणें. ३ दोरा, इ० गुंतविणें. ४ घोटाळ्यांत घालणें किं० पाडणें. ५ (पदार्थ) भलत्याच ठिकाणीं ठेवणें. **अ०क्रि०** १ अन्य पदार्थांत घोटाळणें किं० आच्छादला जाणें. २ न दिसेसा होणें. ३ गुंतणें.

गुरफ(–फा–)टा, गुरप(–पा–)टा पु० १ गुंतागुंत; गुंतलेपणाची स्थिति. २ अन्य पदार्थांत झाकले जाण्याची स्थिति. ३ घोटाळा; पंचाईत, पेच.

गुरंभळणें अ० क्रि० आंबा, पेरू, इ०फळांना पक्वदशेस येऊं लागणें.

गुरंभा वि० पक्व दशेस येऊं लागल्यामुळें गोड झालेला (आंबा, पेरू, इ०फळ).

गुरमळणें अ० क्रि० १ तोंडांतल्या तोंडांत बोलणें; अस्पष्ट रीतीनें शब्दोच्चार करून बोलणें. २ आवंकत बोलणें; कचरत कचरत बोलणें.

गुरमा पु०, **गुरमाई, गुरमी** स्त्री० १ (दारू प्याल्यानें, तारुण्यानें, विद्वत्तेच्या किं० अधिकाराच्या किं० पैशाच्या जोरानें आलेली) रग, मस्ती, उन्मत्तपणा, ताठा, इ०. २ ताप भरू लागण्याच्या समयीं अंगावर येतो तो तजेला. ३ रागाची लहर; रागाचा आवेश. ४ जागरणामुळें डोळ्यांवर चढते ती लाली.

गुरव पु० १ हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा इसम. २ शंकराची पूजा ब्राह्मणानें करावयाच्या अगोदर जो ब्राह्मणेतर प्रथम त्याची पूजा करतो तो. ॐ**गुरवकी** स्त्री० गुरवाचें कर्तव्य; गुरवाचा हक्क, अधिकार किं० मान. **गुरव पुंज** पु० शेतकऱ्यांकडून गुरवाला मिळतो तो भाग (धान्य, पैसा, इ०).

गुरवडा [म० गुरव] पु० गुरव (तिरस्कारांत).

गुरवडा [म० गुरूं+वाडा] पु० गुरें बांधण्यासाठीं केलेलें छप्पर.

गुरवळी खालीं ' गुरूळी ' पहा.

गुरवीण स्त्री० गुरव जातीची स्त्री.

गुराखी(-ख्या) [म० गुर+राखणें+प्रत्यय] पु० गुरें राखणारा. ॐ**गुराख्यानें गुरें टाकलीं म्हणून मालक टाकील काय ?** भाडोत्री बुद्धीनें काम करणारानें काम सोडलें म्हणून खऱ्या कळकळीनें काम करणारा तें बंद करणार नाहीं.

गुराब स्त्री० १ लढाऊ गलबत. २ व्यापारी मालाची नेआण करणारें गलबत. ३ उतारूंची नेआण करणारें मोठें गलबत.

गुराळ [म० गूळ+आलय] न० १ उसाचा रस काढण्याचें यंत्र जेथें उभारलेलें असतें, जेथ हा रस कढवून ढेपा केल्या जातात, आणि जेथें ह्या रससंबंधाचीं इतर कामें केलीं जातात ती जागा. २ जेथें उसाचा रस काढून गिऱ्हाइकांना किरकोळ प्रमाणांत विकला जातो ती जागा किं० तें दुकान. ॐ**गुराळघर आणि लगीनघर बरोबर** कलकल, गडबड, धावाधाव, अनेक माणसांची गर्दी, इ० बाबतींत गुऱ्हाळघर आणि लगीनघर हीं दोन्ही सारखींच.

गुरु [सं०] पु० १ स्वामी. २ कांहीं धार्मिक संस्कार करतो तो (बाप, आचार्य, इ०). ३ पूर्वज. ४ वडील नातलग. ५ सासरा. ६ अध्यापक. ७ उपाध्याय. ८ मंत्रोपदेशक. ९ बृहस्पति, देवांचा आचार्य. १० (ज्योतिष) सूर्याभोंवतीं फिरणारे जे ग्रह त्यांपैकीं एक; हा ग्रह सूर्याच्या अगदीं जवळचा आहे. ११ स्फोटरूप देवीचें योगानें अंगावर जें उठाणूं उठतें तें. वि० १ जड (वजनानें). २ जड (पचवावयाला). ३ विशाल. ४ तीव्र, अत्यंत. ५ दीर्घ, लांब. ६ शक्तिमान्. ७ महत्त्वाचा. ८ पूज्य, वंद्य. ९ अर्थपूर्ण. १० अभिमानी. ११ द्विमात्रक वर्ण (छंदःशास्त्रांत); उ० ' वक्र ' ह्या शब्दांतील पहिलें अक्षर गुरु असून त्याच्या दोन मात्रा गणल्या जातात; लक्ष्मीकान्तं कमलनयनं इ० मधील पहिलीं चार अक्षरें आणि दहावें अक्षर हीं गुरु आहेत. ॐ **गुर्वर्थ** पु० गुरुदक्षिणा. **गुरुकुल** न० १ गुरूचें गृह. २ गुरुगृहींची शाळा. **गुरुचर्या** स्त्री० गुरूची सेवा. **गुरुतल्पग** वि० आपल्या गुरूच्या पत्नीशीं व्यभिचार करणारा (शिष्य). **गुरुवार, गुरुवासर** पु० आठवड्याचे जे सात दिवस त्यांतील बुधवाराच्या पुढला आणि शुक्रवाराच्या मागला दिवस; ह्याला ' बृहस्पतिवार ' असें दुसरें नांव आहे. **गुरुश्रुति** स्त्री० गायत्री मंत्र. **गुरुकिल्ली** [म० गुरूच्या हातांतील किल्ली] स्त्री० १ गुरूनें केलेला उलगडा; गुरूनें सांगितलेला मार्ग किं० दाखविलेली युक्ति. [म० गुरू (श्रेष्ठ)+किल्ली] स्त्री० १ महत्त्वाचें साधन; उत्कृष्ट उपाय; कांहीं मूल्यवान् ध्येय मिळविण्याचा मार्ग. २ श्लोक, वाक्य, भाषण, इ०तील जें मर्म किं० रहस्य समजल्याशिवाय त्याचा अर्थ पूर्णपणें समजत नाहीं तें मर्म किं० रहस्य. **गुरुगम्य** वि० गुरूनें सांगितल्याशिवाय जें समजण्याजोगें नाहीं असें. **गुरुत्व** न० जडपणा. **गुरुत्वमध्य** पु० पदार्थाचें वजन ज्या बिंदूपाशीं एकवटलें आहे असें समजतां येतें तो; गुरुत्वाकर्षणाचा केंद्र. **गुरुत्वाकर्षण** न० विश्वांतील वस्तूंचें परस्पराकर्षण. **गुरुदक्षिणा** स्त्री० गुरूनें शिकविलेल्या विद्येबद्दल त्याला जें पारितोषिक म्ह० बक्षिस देतात ती. **गुरुपुत्र** पु० १ गुरूचा मुलगा. २ ज्यानें संताचा उपदेश घेतला तो त्या संताचा गुरुपुत्र. **गुरुप्रसाद** पु० १ गुरूची आपणावर असलेली कृपा; गुरूनें आपणावर केलेली मेहेरबानी. २ गुरूनें

आपणाला शिकविलेली विद्या, कौशल्य, इ०. ३ गांजा, भांग; तंबाखू (मित्राजवळ मागतांना); उ० विडा खाऊन त्याचें चर्वण झालें, आतां गुरुप्रसाद येऊं द्या (म्ह० तंबाखू द्या). **गुरुबंधु पु०** एका गुरूचे जे शिष्य ते एकमेकांचे गुरुबंधु. **गुरुमंत्र पु०** गुरूनें शिकविलेली खुबी किं० युक्ति; अमुक रीतीनें वाग अशी कोणेकानें कोणेकाला सांगितलेली मसलत.

गुरुरी [अ० गरूर] **स्त्री०** मगरूरी, ताठा.

गुरुळा [सं० गरल] **स्त्री०** चूळ.

गुरूळी, गुरवळी, गुळवरी स्त्री० गुळाचें पुरण घालून केलेली पोळी.

गुरू [म०गोवर] **पु०** गोवर, देवी, इ०चा फोड.

गुरूं न० गाय, बैल, रेडा, हीं जनावरें. ꣳ**गुरूं-ढोरूं न०** शिंगांचीं जनावरें सामान्यतः.

गुरूळ पु० शेत, बांधण, इ० चे बांधास आंतील पाणी वाहून जावयाजोगें खेकडा इ० नीं पाडलेलें भोक.

गुरोडा [म० गुरूं+वाडा] **पु०** गुरें बांधावयाची जागा. [**म०** गुरव] **पु०** गुरव जातीचा इसम (तुच्छतेनें).

गुरोळी स्त्री० मागें ' गुरवळी' पहा.

गुर्जर पु० गुजराथ प्रान्त किं०तेथील राहिवासी.

गुर्विणी [सं०] **स्त्री०** गरोदर स्त्री; गर्भारशी.

गुऱ्हाळ न० मागें ' गुराळ ' पहा.

गुलअनार [फा०] **पु०** १ डाळिंबाचें फूल. २ एक रंग. ३ त्या रंगाची शालजोडी. ४ एक झाड.

गुलकणें अ० क्रि० खिदळणें; रंगेलपणानें हसणें.

गुलकंद [हिं०] **पु०** गुलाबाच्या पाकळ्यांत खडीसाखर घालून शीतोपचाराच्या उपयोगाचें जें औषधी द्रव्य केलेलें असतें तें.

गुलकातरी स्त्री० दिव्याचा काळी कातरावयाची कातरी. पुढें ' गूल ' पहा.

गुलकावणी [**फा०** गुल्=गलबलाट] **स्त्री०** ढोंग; फसवणूक किं० फसविण्यासाठीं केलेली युक्ति; कोणेकाला फसविण्यासाठीं केलेली हालचाल किं० केलेला आविर्भाव.

गुलकावणें स० क्रि० खोटा आविर्भाव करून एकाद्याला फसविणें.

गुलकी स्त्री० रंगेलपणाचें हास्य; खिदळणें.

गुलकेश [**हिं०**] **पु०** एक पुष्पविशेष.

गुलखैरा (-रू) पु० एक झाड.

गुलगुलाब [**फा०**] **पु०** गुलाबाचें फूल.

गुलगुलीत वि० मऊ (गादी, मुलाचें अंग, इ०).

गुलछबू (-ब्बु) [**फा०** गुलचब्बू] **पु०** एक नाजूक आणि मधुर वासाचें झाड किंवा त्याचें पुष्प.

गुलजाफरी [**फा०**] **स्त्री०** एक फुलझाड.

गुलजार [**फा०**] **वि०** सुंदर आणि नाजूक.

गुलटोप पु० एक फुलझाड आणि त्याचें फूल.

गुलडा पु० कोष्ट्याच्या मागाचा एक अवयवविशेष.

गुलतुरा पु० एक फुलझाड.

गुलदस्त [**फा०** गुल् (फूल)+दस्त् (हात)] **पु०** वाटोळ्या गंजिफांच्या डावांत तिघा खेळणारांपैकीं ज्याला मागल्या डावांत कांहीं पानें देणें झालें असेल तो पुढच्या डावाच्या वाटणीच्या वेळीं तितकीं पानें न बघतां आणि येतील त्या क्रमानें जशींचीं तशींच दस्तांच्या रूपानें जमीनीवर पालथी ठेवीत जातो. ह्या पालथ्या ठेविलेल्या पानांना ' गुलदस्त ' ह्मणतात. गुलदस्तांत कांहीं विशेष उपयोगाचीं पानें आपणाला मिळतील असा त्याचा समज असतो. गुलदस्त म्ह० मूल्यवान् वस्तूंचा गुप्तपणें हातानें केलेला संचय. ꣳ**एखादी वस्तु (किं० विचार, किं० बेत) गुलदस्तांत ठेवणें** ती मूल्यवान् म्हणून ती योग्य समय येईतोंपर्यंत गुप्त ठेवून आयत्या वेळीं बाहेर काढणें.

गुलदान [**फा०**] **न०** बंदुक पेटविण्यासाठीं जळता काकडा जींत ठेविलेला असतो ती लोखंडी पेटी.

गुलदावदी फा०] **स्त्री०** एक फुलझाड.

गुलनार पु० एक फुलझाड आणि त्याचें फूल.

गुलपणें, गुलफणें अ० क्रि० १ भाषणांत किं० कांहीं हालचालींत खळणें किं० अडखळणें. २ रेकत रेकत बोलणें ३ फेंगडेपणानें चालणें.

गुलबदन [**फा०**] **पु०** १ एक रंग. २ तापत्याचा एक भेद. [त्याचें फूल.

गुलबस, गुलबास स्त्री० एक फुलझाड. **न०**

गुलमेख [**हिं०**] **स्त्री०** पसरट डोक्याचा लहान खिळा.

गुलवेल पु०. स्त्री० एक वेल.

गुलहवस,गुलहौस[फा०]स्त्री० नाना प्रकारचे शौक करण्याची प्रवृत्ति किं० इच्छा. ॐ**गुलहौसी** (-शी) वि० पैसे खर्च झाल्याची परवा न करतां नाना प्रकारचे विषयोपभोग घेण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा; विषयासक्त; चैनी; विलासी.

गुलाडी स्त्री०कोष्टयाचें एक साधन किं०आउत.

गुलाब [फा०] पु० सुगंधी पुष्पविशेष. ॐ **गुलाबी** वि० गुलाबाच्या रंगाचा किं० वासाचा. **गुलाबदाणी** स्त्री०, **गुलाबदान** न० संमान्य गृहस्थाच्या अंगावर शिंपडण्यासाठीं गुलाबपाणी ज्या सुंदर नक्षीदार पात्रांत घालतात तें. **गुलाबाचें फूल** न० १ नाजूक आणि सुंदर मूल. २ प्रेमानें ज्याचें जतन केलें पाहिजे किं० काळजीपूर्वक ज्याला जपलें पाहिजे असें मूल, माणूस, किं० पदार्थ. **गुलाबकडी, गुलाबलकडी** स्त्री० मुलांचें एक खाद्य. **गुलाबी जांब** पु० जो आंतून तांबडा किं० तांबूस असतो असा पेरू. **गुलाबी झोप** स्त्री० थंड हवेंत विशेषतः पहाटेस लागते ती झोप. **गुलाबी थंडी** स्त्री० हवेंतील सुखकारक किं० सुखदायक थंडी; ' झोंबरी थंडी ' याच्या उलट.

गुलाम [अ०] पु० १ दासीपुत्र. २ विकत घेतलेला मनुष्य. ३ शिवीचा शब्द. ५ चंगवाचन गंजिफांतील सहावा रंग. ५ लडिवाळपणानें मुलासंबंधानें योजावयाचा शब्द. ॐ**गुलामगिरी** स्त्री० १ गुलामाची स्थिति. २ लबाडी, लुच्चेगिरी. **गुलामजादा** पु० १ गुलामाचा पुत्र. २ शिवीचा शब्द. **गुलामडा** पु० १ गुलाम (तुच्छतेनें). २ मुलासंबंधानें प्रेमानें योजावयाचा शब्द.

गुलाल पु० बाजरी, नाचणी, इ०चें पीठ पतंगी रंगानें तांबडें केलेलें; हें रांगोळीची शोभा वाढविण्यासाठीं जमीनीवर घालतात किं० आनंदाच्या प्रसंगीं हवेंत किं० एकमेकांच्या अंगावर उधळतात. ॐ**गुलालगोटा** पु० लाखेचे पातळ कवचाचे चेंडू ज्यांत गुलाल भरलेला असतो आणि जे आनंदाच्या प्रसंगीं एकमेकांच्या अंगावर फेकतात ते प्रत्येक; हे चेंडू थोडक्या स्पर्शानें फुटतात आणि ते फुटले म्हणजे जिकडे तिकडे गुलाल उधळतो. | लालाच्या रंगाचें लुगडें.

गुलाली वि०गुलालाच्या रंगाचा. स्त्री० गुला-

गुली [फा०]स्त्री०पोवळें(समुद्रांत सांपडतें तें).

गुलंगा वि० ठेंगणा आणि लठ्ठ; लहान आणि गुटगुटीत (माणूस, मूल, प्राणी).मागें 'कुलुंगा'पहा.

गुल्फ [सं०] पु० पायाचा घोटा.

गुल्म [सं०] पु०, न० १ झाडी. २ सैन्याचा एक तुकडी (४५ पायदळ, २७ घोडदळ, ९ रथ, आणि ९ हत्ती). ३ किल्ला, दुर्ग. ४ पाणथरी (पोटांत विशिष्ट ठिकाणीं होते ती गांठ). ५ चौकी किं० चौकीवरचे रक्षक समुच्चयानें. ६नदीचा घाट.

गुल्ल [हिं०] वि० अति दारू पिऊन झिंगलेला.

गुल्हेर वि० गडद तांबडा; तांबडा लाल.

गुवाड स्त्री० हगंदारीची जागा.

गुवेरें न० गुवानें लडबडलेलें चिरगुट.

गुहा [सं०] स्त्री० १ गुहा. २ खड्डा. ॐ**गुहाशय** पु० १ उंदीर. २ गुहेंत राहणारा प्राणी (वाघ, सिंह, लांडगा, इ०).

गुह्य [सं० गुह्=लपविणें, आच्छादणें] वि० १ गुप्त. २ गूढ. ३ एकान्तांतील. न० १ रहस्य; गुप्त गोष्ट. २ गुद. ३ जननेन्द्रिय.

गुळखोबरें पुढें ' गूळ ' मध्यें पहा.

गुळखी स्त्री०, **गुळखें** न० १ दावें इ०चे बिरड्यांत आडकावावयाची जी गोटी किं० गांठ ती. २ दावें,-बिरडें आणि ही गोटी किं० गांठ मिळून. ३ स्त्रियांचें एक शिरोभूषण.

गुळगुळ थापडी स्त्री० स्पष्ट शब्दांनीं एखाद्या विषयाचा किं० प्रश्नाचा निवाडा न करतां तो मोघम स्थितींत ठेवणें; स्पष्ट शब्दांत न सांगितलेला निकाल.

गुळगुळीत वि० साफ, नितळ (पृष्ठभाग); ' खरखरीत ' ह्याच्या उलट.

गुळचट [म० गूळ] वि० १ किंचित गोड (खाद्य पदार्थ).२गोडगोड (बोलणें) ३ थापबाजीचा.

गुळणा पु०, **गुळणी** स्त्री० १ तोंड स्वच्छ करण्यासाठीं तोंडांत जें पाणी घेऊन तें विशेष प्रकारें हालवून नंतर तें थुंकून टाकतात तें. २ तोंडांतून जें विकृतिविशेषानें रक्त पडतें तें (एकाखेपेचें); क्रि० टाकणें, थुंकून टाकणें. ३ आम्ल-

पित्तानें घशांत जी जलरूप ढेकर येते आणि जी थुंकून टाकावी लागते ती (क्रि० येणें). ***गुळणा धरणें** कांहीं गुप्त गोष्ट न बोलून दाखवितां स्वस्थ असणें. **एकाद्या रहस्याचा गुळणा सोडणें** तें रहस्य बोलून दाखविणें किं० प्रकट करणें. **तुपा-दुधाच्या गुळण्या टाकणें** अत्यंत श्रीमंत असणें; नानाप्रकारचे विलास करण्याची ऐपत असणें आणि ते विलास करणें.

गुळधवा, गुळंधा, गुळधिवा, गुळधुवा पु० पांढरा आणि तांबडा ह्यांच्या मिश्रणाचा रंग. वि० वरील रंगाचा. [गळूं.

गुळंब(–भ) न० गुळंबा(–भा) पु० न फुटलेलें

गुळंबा, गुळांबा [म० गूळ+आंबा] **पु०** गुळाचा पाक करून त्यांत कच्चया आंब्यांच्या फोडी आणि वेलदोडे, केशर, इ० रुचीचे पदार्थ घालून करतात तें खाद्य. [गोड; गोडसर.

गुळमट [म० गूळ] **वि०** गुळाच्या चवीचा;

गुळमटणें अ० क्रि० १ आंबा, चिंच, इ० फळांनीं गोड होऊं लागणें. २ आवंकणें; साशंक होणें; कचरणें. [इ० धातूचें भांडें.

गुळमा पु०, गुळमी स्त्री० वाटी, वाडगा,

गुळमुळणें, गुळमळणें अ० क्रि० १ कचरत किं० भीत भीत बोलणें; २ साशंक वृत्तीनें बोलणें. ३ संदिग्ध रीतीनें बोलणें. ४ अस्पष्टपणें बोलणें.

गुळमुळीत वि० संदिग्ध किं०अस्पष्ट (भाषण); बोलणाराचा भाव निश्चितपणें ज्यापासून कळत नाहीं असें (भाषण).

गुळवणी [म० गूळ+पाणी] **न०** १ गुळाचें पाणी. २ ज्यांत पदार्थविशेषाचा स्वाद, रुचि, इ० आलेलें नाहीं आणि जें केवळ गोड असें पातळ खाद्य तें (चहा, भांग, पन्हें, इ०); ह्या अर्थानें 'गुळवणी' हा शब्द त्या खाद्याला निंदेनें लावतात.

गुळवरी, गुळोरी स्त्री० गुळाची पोळी.

गुळवेल स्त्री० एक वेली; हिचें सत्त्व ज्वरावर औषध म्हणून घेतात.

गुळव्या [म० गूळ] **पु०** उसाच्या गुऱ्हाळांत उसाचा रस कढविणें इ० कामांवर देखरेख करणारा इसम.

गुळसर [म० गूळ+सर (प्रत्यय)] **वि०** गुळाच्या चवीचा; किंचित् गोड.

गुळार [म० गूळ+आलय] 'गुऱ्हाळ' पहा.

गुळी स्त्री० १ नीळ (रंगाच्या उपयोगाचें एक झाड).

गुळी [म० गूळ] स्त्री०एक प्रकारची साखर; ही तांबूस मळकट रंगाची असते. ***गुळीतोळ पु०** एकाद्या विशिष्ट प्रांतांत पिकलेल्या गुळीवर घेतात तो कर.

गुळी स्त्री०शौचाचे समयीं गुदद्वारें जें अंग बाहेर पडतें तें (क्रि०उतरणें).

गुळी स्त्री० वाल इ० कांहीं द्विदल धान्यें मळून घेतल्यानंतर त्यांचें जें भूस पडतें तें;हें गुरें खातात. ***गवत आणि गुळी हीं सारखींच समजणें** हलका पदार्थ आणि उंची पदार्थ यांना सारखेंच लेखणें; हिरा आणि गारगोटी हीं मूर्ख मनुष्याला सारखींच वाटतात.

गुळूंब (–भ), गुळूम न०, गुळूंबा पु०[**सं०** गुल्म] १ न फुटलेलें गळूं. २ झाडाला खोडावर गाठीसारखा उंचवटा होतो तो. ३ थांडगूळ.

गुळें मागें 'गुढें' पहा.

गुळोणी [म० गूळ+पाणी] **न०** १ गुळाचें पाणी; गूळ घालून गोड केलेलें पाणी. २ ज्यांत पदार्थविशेषाचा स्वाद उतरलेला नाहीं आणि जें नुसतें गोड असें पेय; उ० आजचा चहा केवळ गुळोणी !

गुळ्या मागें 'गुळव्या' पहा.

गुळ्यें न० मासे धरावयाच्या जाळ्याला ज्या शिशाच्या गोट्या बांधलेल्या असतात त्या प्रत्येक.

गुळ्हार मागें 'गुऱ्हाळ' पहा.

गू [**सं०** गू=घाण; विष्ठा] **पु०** १ प्राण्यानें (विशेषत: मनुष्य प्राण्यानें) भक्षिलेल्या अन्नांतील शरीरपोषणाच्या उपयोगाचा अंश शरीरांत राहून निरुपयोगी अंश जो गुदद्वारें बाहेर टाकला जातो तो; विष्ठा. २ धातूंचा गंज. ३ डोळ्यांच्या कोपऱ्यांतून बाहेर पडतो तो घाण पदार्थ. ***गुवाचा भाऊ पाद आणि पादाचा भाऊ गू** दोन्ही वस्तु सारख्याच दुर्गंधियुक्त; दोन्हीं ओंगळच. **एकाद्या माणसाची किं०पदार्थाची गुकाडी करणें**१त्याच्या दोषाचा वारंवार निर्देश करणें. २ त्याला काळिमा लावणें; त्याची निंदा करणें.३त्याची दुर्दशा करणें; त्याची नासाडी करणें. **गू चिवडणें, गू डिवचणें**

१ अपमानकारक किं० लांच्छनास्पद गोष्टीचा वारंवार उल्लेख करीत बसणें. २ खरोखरींचा गू चिवडणें (वेड्या मनुष्याचें वर्णन). **एकाद्यापुढें गू जाळणें** १ अंगांत संचरलेलें भूत घालविण्यासाठीं त्याच्यापुढें खरोखरींचा गू जाळणें. २ त्याला अतोनात छळणें. **गू जाळून धूर घेणें** कांहीं वाईट गोष्ट करून निर्लज्जपणानें फुशारकी मारीत नसणें. **गुवांत धोंडा टाकून शिंतोडा घेणें** १ कांही वाईट कृत्य करून त्याचे परिणाम भोगीत बसणें. २ वाईट माणसाशीं कलह उपस्थित करून त्याच्या शिव्या खात बसणें (हें मूर्खपणाचें कृत्य होय). **एकाद्याला गुवावरून ओढणें** त्याची अतोनात फजीती करणें; त्यानें केलेल्या दुष्कृत्यांचा त्याच्यापुढें पाढा वाचून त्याचीं निर्भत्सना करणें. **गू माणूस पु०, न०** ओंगळ, गलिच्छ, घाणेरा माणूस.

गूज [**सं०** गुह्य] **न०** एकाद्याचें रहस्य किं० गुप्त गोष्ट. ꙮ **निजगूज न०** आपलें रहस्य; आपल्या मनांतील गुप्त विचार किं० बेत.

गूड, गूढ न० कणसांसकट असलेलीं जीं धान्यांचीं ताटें त्यांची पेंढी; उ० बाजरीचें गूढ, जोंधळ्याचें गूढ, इ०.

गूढ [**सं०** गुह्=लपविणें, झाकणें] **वि०** ज्याचा बोध होणें कठिण आहे असा (श्लोकादिकांचा अर्थ, बोलणाराचा आशय, इ०);दुर्बोध. **न०** १ दुर्बोध, अगम्य किं० दुर्ज्ञेय असा श्लोक, भाषण, इ०. २ गुप्त गोष्ट. ३ ज्याचा उलगडा करतां येत नाहीं असा प्रश्न, विषय, इ०. ४ कोडें. ꙮ **गूढ पडणें** कठिण, दुर्बोध, किं० दुर्ज्ञेय वाटणें. **गूढ उकलणें** इतका वेळ समजत नव्हती ती गोष्ट आतां समजणें. **गूढचर, गूढपुरुष, गूढचार पु०** शत्रूच्या हालचाली गुप्तपणें पाहून येण्यासाठीं पाठविलेला इसम; हेर. **गूढजत्रु** [**सं०** गूढ (लपलेला) आहे जत्रु (खांद्याचा सांधा) ज्याचा असा] **वि०** लठ्ठ; मांसल; गुबगुबीत. **गूढपाद** [**सं०** गूढ आहेत पाय ज्याचे असा] **पु०** साप. **गूढात्मा पु०** परमात्मा. **गूढोत्पन्न, गूढज पु०** अज्ञात व पतिभिन्न पुरुषापासून झालेला पुत्र.

गूत स्त्री० १ गुंतागुंत. २ गांठ. ३ फार पीळ भरला गेला असतां दोरीला पडतो तो तिढा; मेंढा, पिंपळी. ४खळ्यावर तुडविलेलीं धान्याचीं ताटें. ५ गुरें इ०नीं खावयाजोगा अव्यवस्थितपणें खळ्यावर पडलेला जो बारीक सारीक तृणसमुदाय तो.

गूथ [**सं०**] **पु०, न०** १ विष्ठा (विशेषतः मानवी प्राण्याची). २ झोडपलेल्या धान्याच्या ताटांचा केरकचरा.

गूथ स्त्री० केश विंचरले असतां फणीच्या दांत्यांना अडकून येतात ते केश किं० गुंतवळ.

गूद पु० १ आग, जळजळ (पोटांत किं० त्वचेवर उठते ती), **क्रि०** येणें, सुटणें. २ आवेश, जोर (पावसाचा, आजाराचा, विजांचा, इ० चा).

गूल पु०, स्त्री० १ बंदूक इ०चा तोंडा इ०स अग्नि लाविला असतां शेवटीं जो व.ळीसारखा आकार होतो तो. २ खिळा इ० तापवून वर्तुळाकार जो डाग देतात तो. ३ खिळ्याचें डोकें. **स्त्री०** अकस्मात चोर, दरोडेखोर, इ०ची टोळी एकाद्या गांवावर येत आहे अशी आवई आल्यावरून गांवकऱ्यांनीं आरडावें, ओरडावें, घाबरावें, पळू लागावें, अशी अवस्था, किं० तारांबळ, किं० धांदल, ꙮ **गूल करणें** मशाल, दिवा, इ० मालविणें. **गूलखिळा पु०** बाटोळ्या माथ्याचा खिळा किं० मेख.

गूलगलबा पु० गोंगाट; आरडाओरडा; गलबला.

[दिलेला डाग.

गूलडाग पु० तापवून लाल केलेल्या लोखंडानें

गूळ [**सं०** गुड=गूळ] **पु०** उसाचा रस अग्निसंयोगानें आटवून करतात तो पदार्थ. ꙮ **गुळांबा पु०** गुळाच्या पाकांत आंब्याच्या फोडी मुरवून करतात तें खाद्य. **गुळखोबरें न० ए० व०** १कोणेकाला दिलेला लाच. २ शुष्क वचनें. ३ थापेबाजी. **गुळखोबरें करणें** फजीत करणें. **एकाद्याच्या हातीं (किं० एकाद्याला)गुळखोबरें देणें**.त्याला फसविणें; गोड गोड बोलून त्याला कांहीं भलतेंच किं० आपल्या हिताचें कृत्य करावयाला लावणें. **गुळदगड, गुळधोंडा पु०** साधुत्वाचें ढोंग करणारा लुच्चा माणूस. **गुळध (–धा–,–धि–,–धु–) वा गुळदे (–धे–) वा वि०** तांबूस रंगाचा. **गुळपापडी स्त्री०** १ एक पक्वान्न. २ गुळांत तूप घालून कढवून मुलें जें खाद्य करतात तें. ३ परोक्ष अपराध करून समक्ष गांठ पडली असतां गोडगोड

भावणें करून एकाद्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न (क्रि० करणें). **गुळपीठ न०** मैत्रीचा संबंध. **गुळमारी स्त्री०** उसाच्या मळ्यावर बसविलेला कर,–जो गुळाच्या रूपानें द्यावयाचा असे. **वाण्यानें आपलाच गूळ चोरून खाणें** आपलें नुकसान आपणच मूर्खपणानें करून घेणें. **गुळाचा गणपति पु०** १ लठ्ठ, फोफशा, किं० दोंदील माणूस. २ उ० राजाच्या प्रसादानें उच्च पदावर चढलेला मूर्ख माणूस. ३ गरीब स्वभावाचा माणूस. **गुळाच्या गणपतीला गुळाचाच नैवेद्य** १ एकाद्या माणसाच्या मालकीचा जो पदार्थ, त्यांतूनच त्याला कांहीं देणगी देणें; गंगेचें पाणी ओंजळींत घेऊन त्याचेंच अर्घ्य गंगेला देणें ह्या प्रकारचा व्यवहार. २ राजाविरुद्ध तक्रार आणि राजाचा जातभाई मित्र न्यायाधीश असा हास्यास्पद प्रकार. **गुळावरच्या माशा स्त्री० अ० व०** एकाद्या माणसाच्या वैभवकाळीं त्याला धरून असणारे पण त्याच्या आपत्काळीं त्याला परित्यागणारे लोक. **गूळ नाहीं तरी गुळाची वाचा असावी** आपण गरीब असल्याकारणानें आपण कोणाला पक्कान्नांचें भोजन जेवूं घालून त्याचा सत्कार करूं शकलों नाहीं तरी त्याच्याशीं गोड बोलणें हें बिनखर्चाचें काम आपणास करतां येतें तें अवश्य केलें पाहिजे. **गुळानें मरे त्याला विष कशाला** सौम्य उपायांनीं ज्याला ताळ्यावर आणतां येतें त्याला ताळ्यावर आणावयाला कठोर उपाय योजूं नयेत.

गृध्र [**सं०**] **पु०, न०** गिधाड, गीध. **वि०** १ हावरा. २ विषयेच्छु. ॐ**गृध्रपति, गृध्रराज पु०** जटायु (दशरथाचा मित्र).

गृह [**सं०**] **न०** १ घर. २ गृहस्थाश्रम. ३ (**ज्यो०**) रास. **वि०** (समासांत) पार्थिव, पाळलेला. ॐ**गृहकर्म न०, गृहकृत्य न०** घरांत झाडसारव इ०कामें समुच्चयानें. **गृहप्रवेश पु०** १ नवें घर बांधून झाल्यावर त्यांत रहावयास जातांना करतात तो प्रवेश किं० त्या प्रवेशासंबंधाचा विधि. २ लग्न झाल्यावर नवऱ्याच्या घरीं नवरीच प्रथम जाणें म्ह०प्रवेश करणें. **गृहबलि पु०** वैश्वदेव. **गृहमेध, गृहयज्ञ पु०** १ गृहस्थाश्रमी. २ गृहस्थधर्म (अग्निहोत्र इ०). **गृहमेधी पु०** गृहस्थाश्रमी. **गृहस्थ पु०**१ गृहस्थाश्रमी. २ ज्यास बायको आहे तो. ३ जो भिक्षुक नव्हे तो. ४ भला मनुष्य. ५ कोणी माणूस (सामान्य संज्ञा). **गृहस्थाश्रम पु०**ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ, आणि संन्यास हे जे चार आश्रम त्यांतील दुसरा. मागें 'आश्रम' पहा. **गृहस्थाश्रमी वि०**गृहस्थ; **गृहस्थी वि०**गृहस्थाला योग्य; गृहस्थांत आढळणारा(बाणा, थाट, पोशाख, इ०). **गृहकच्छप पु०** स्वयंपाकघरांतील पाटा ('पाटावरवंटा' ह्या जोडींतील). **गृहछिद्र न०**घरांतील रहस्य किं० उणेपणा; घरच्या माणसांपैकीं एकाद्याची कांहीं लाजिरवाणी गोष्ट (रांडबाजी, दारूबाजी, इ०). **गृहभेदी, घरभेद्या पु०** घरांतील रहस्यें किं० लाजिरवाण्या गोष्टी ज्याला ठाऊक आहेत असा मनुष्य. २ घरफोड्या चोर. **गृहविच्छेद पु०** घरांतील सर्व माणसें मरून गेल्या कारणानें गृहाला कोणी मालक नाहीं अशी स्थिति. **गृहसंमार्जन न०** घराची झाडसारव, सडा घालणें, रांगोळी काढणें, इ०कामें समुच्चयानें. **गृहांतर, गृहाभ्यंतर न०** १ माजघर; २ घराचा आंतील भाग.

गृहिणी [**सं०**] **स्त्री०** १ पत्नी. २ घराची स्वामिनी किं० मालकीण.

गृहीत [**सं०**] **वि०** १ घेतलेलें. २ स्वीकारलेलें. ३ कबूल किं० मान्य केलेलें.

गृह्य [**सं०**] **वि०** १ घरचें, घरासंबंधाचें. २ भरंवशाला पात्र; विश्वासु. ३ पाळींव (१ पशु, पक्षी, इ०). ॐ**गृह्याग्नि पु०** दक्षिणाग्नि, गार्हपत्याग्नि, आणि आहवनीयाग्नि हे जे तीन त्यांतील दुसरा.

गे उ० वा० अ० अगे !

गेंगणें, गेंगाणें अ० क्रि० नाकांत बोलणें.

गेंगाणा, गेंगणा वि० नाकांत बोलणारा.

गेंगरणें, गेंगारणें अ० क्रि० १ धावरणें; धावरून जाणें. २ पडशामुळें नाकांत बोलणें.

गेचक, गेचकळ न० १ झाडाच्या खोडाशीं फांदीचा कोन;दुबेळकें. २दोन बोटांमधील कोपरा.

गेंझट, गेंझा वि० फारच लोचटपणानें कांहीं मना केलेली गोष्ट करणारा; लोचटपणानें कांहीं वस्तु मागत बसणारा.

गेटण, गेठण न० बैलाच्या गळ्यांत ठोकडा बांधावयाची दोरी.

गेटम [**हिं०** गतम्] **न०** पांघरावयाचा पातळ बुरणूस.

गेठा जेठा पु० ढुंगणावर बसून **गुडघ्यापाशीं** दोन्ही तंगड्या वळवून इकडचें पाऊल तिकडे आणि तिकडचें इकडे जमीनीवर टेकून उपरणें दोन्ही गुडघ्यांभोंवतीं गुंडाळून मांडलेली किं० केलेली बैठक,—हें एक प्रकारचें आरामाचें संस्थान असतें. ❀ **गेठा मारून बसणें** वर वर्णिलेल्या संस्थानांत बसणें.

गेठा पु० खंडोबाचे भक्त गळ्यांत जें जड आणि जाडें भूषण धारण करतात तें.

गेंडकणें अ० क्रि० आंबा इ० फळांनीं पाडाला येऊं लागणें.

गेडामिळें न० १ गेडमेळी स्त्री० कोष्ट्याच्या मागांत विणलेलें वस्त्र ज्या लाकडाभोंवतीं गुंडाळ-ल्यांत येतें त्याला आधारभूत जे दोन उभे खुंटे असतात ते प्रत्येक. ह्या आडव्या लाकडाला ' अट-सर ' अशी संज्ञा आहे. [शिंग असतें-

गेंडा पु० एक वन्य पशु,—ज्याचे नाकावर.

गेंद पु० १ मखमाल, बटमोगरा, इ० च्या फुलांचा जो गुच्छ तो. २ झेंडूचें फूल. ३ तदाकार जो रेशीम, लोकर, इ० चा गुच्छ करतात तो. ४ स्त्रियांचें पायाच्या बोटांत घालावयाचें चांदीचें भूषण; ❀ **गेंदजोडी स्त्री०** रेशीम इ० अनेक गेंद करून त्यांची माळ घोड्याच्या शेपटीखालून पाठीच्या कण्यावर मधोमध बांधलेली असते ती.

गेय [सं०] त्रि० गाण्यास योग्य. **न०** गाणें

गैर स्त्री०, पु० १ प्रजाजनांत असंतोष पसर-ल्यामुळें त्यांनीं केलेला दंगा. २ परचक्र; लुटा-रूंची धाड; उ० होळकराच्या गेरींत सगनमलाचें सर्वस्व लुटलें गेलें.

गेरवा पु० धान्यावर पडतो तो रोग,—ज्यानें त्यांना तांबूस रंग येतो.

गेरुडा स्त्री० कावेचे खडे आणि सुतळी ठेव-ण्याची सुताराची पेटी,

गेरू [सं० गैरिक] पु०, स्त्री० १ काव. २ धूळपाटीवर घालावयासाठीं विटकर कुटून करीत असत ती तांबडी माती. ३ फटकण्याची दोरी सुतार लोक ज्या तांबड्या रंगांत भिजवितात ती.

गेला [म० जाणें] वि० गत, गेलेला, मागला उ० गेला दिवस, गेलें वर्ष, इ०. ❀ **गेलामेला** लिंगवचनांनीं बदलणारें **क्रि० वि०** कांहीं केलें तरी; प्रतिकूल परिस्थितींत सुद्धां; उ० गेलामेला-पाऊस कोंकणांत पडणारच !

गेह [सं०] न० घर. **गेहे** ' गेह 'च्या सप्तमीचें एकवचन. गेहे=घरांत. ❀**गेहेशूर, गेहे-नर्दी वि०** भित्रा; ज्याच्या पराक्रमाच्या गोष्टी चुलीजवळच ऐकावयाच्या लायकीच्या; बाहेर गांडू आणि घरांत शूरत्वाचा डौल मिरविणारा. **गेहे-पटु वि०** मूर्ख, अज्ञ. **गेहेपंडित पु०** अडाणी आणि अशिक्षित लोकांतच ज्याची विद्वत्ता झळकते असा. **गेहेप्रगल्भ वि०** मूर्ख; दगडोबा. **गेहेमेही वि०** अत्यन्त आळशी.

गेळ न० १ दोन बोटांमधील अंतर; बेचक. २ गायी म्हशींच्या खुराचे जे दोन भाग ते प्रत्येक. ३ गायी म्हशींच्या प्रत्येक खुराचे जे दोन भाग (गेळ) त्यांचेमधील अंतर किं० फट. ❀ **गाईचे गेळीं आणि ह्मशींचे वेळीं**(दूध काढावें). गाय रानांतून संध्याकाळीं घरीं परत येतांच तिचें दूध काढावें आणि म्हशींचें ठरल्यावेळीं काढावें.

गेळ स्त्री० एक वृक्षविशेष. **न०** त्याचें फळ.

गेळा पु० तेल, तूप, इ० ठेवावयाचें लहान तोंडाचें भांडें.

गेळी स्त्री० लहान गेळा. ' गेळा ' वर पहा.

गेळी स्त्री० गायी म्हशींच्या खुराचे जे दोन भाग ते प्रत्येक.

गैदी, गैरती, गैबत्या, गैबी [हिं०] वि० अव्यवस्थित (माणूस); घंदरा; अजागळ

गैप, गैब [अ० गय्ब्] वि० गबाळलेला; गहाळ झालेला; नजरेच्या टप्प्याच्या बाहेर गेलेला.

गैबी [अ० गय्ब्] वि० लपलेला; झाकलेला; गुप्त; गूढ. ❀ **गैबी अर्जी स्त्री०** मुकी अर्जी; आपली सही न करतां केलेली अर्जी. **गैबी आवाज पु०** आकाशवाणी; अज्ञात उगमापासून आलेली बातमी किं० मिळालेली माहिती; जिचा उगम कळविणें धोक्याचें आहे अशी खबर. **गैबी खबर स्त्री०** गुप्तपणें काढलेली माहिती; हेरानें आणलेली बातमी. **गैबी माणूस पु०** दुसऱ्या माणसाचें नांव, पदवी, इ० धारण करणारा माणूस.

गैर [अ० गैर्=दुसरा] हा शब्द इतर शब्दांच्या मागें घातला असतां त्याचे अनेक अर्थ होतात. वि० **गैरखर्च** पु० ज्यादा किं० अवांतर खर्च. **गैरखुशी** स्त्री० नाखूशी. **गैरचलन** न० एखाद्या विशिष्ट ठिकाणीं न चालणारें नाणें. **गैरजबाब** पु० अपमानकारक उत्तर. **गैरदस्त(–स्ती)** वि० ज्यावर सरकारचा कर माफ आहे अशी जमीन. **गैरमर्जी** स्त्री० नापसंती; रुसवा. **गैरमहसूल** पु० अन्यायानें बसविलेला किं० घेतलेला सारा. **गैरमाहीत** वि० ज्याला कांहीं विशिष्ट प्रकार, मार्ग, कला, इ० ठाऊक नाहीं असा. **गैरराह** [अ० गैर्+हिं० राह् (रस्ता)] स्त्री० शिस्तीला किं० योग्य सरणीला सोडून केलेली कृति. **गैरराजी** वि० नाखूष; असंतुष्ट. **गैरवास्त** वि० खोटें; वस्तुस्थितीला अनुसरून नसलेलें. **गैरवळण** न० १ रहदारीचा अभाव. २ एकान्त; आडमार्ग. ३ सुंदर किं० शास्त्रशुद्ध पद्धति ज्या अक्षरांना नाहीं अशीं अक्षरें समुच्चयानें; जें वळणदार नव्हे तें अक्षर किं० लिहिणें. **गैरवाका** पु० खोटें विधान. **गैरवाजवी** वि० जें वाजवी किं० योग्य नव्हे असें. **गैरविल्हेस** क्रि० वि० भलत्याच ठिकाणीं (ठेवण्यांत आलेला). **गैरशिस्त** वि० अयोग्य; भलतेंच; योग्य सरणीला सोडून असलेलें. **गैर समजूत** स्त्री० खोटी किं० चुकीची समजूत. **गैरसावध** वि० १ जागरूक किं० दक्ष नसलेला. २ बेशुद्धीच्या स्थितींत असलेला. **गैरसाळ** वि० १ सरकारी टांकसाळींतून निघालेलें नव्हे असें(नाणें). २ असभ्य; शिस्तीला सोडून ज्याची चालरीति आहे असा. **गैरसोय** स्त्री० अडचण; अनुकूल परिस्थितीचा अभाव. **गैरहजर** वि० जो प्रसंगीं उपस्थित किं० विद्यमान नाहीं असा; असावयास पाहिजे तेथें नसलेला; अन्यत्र असलेला.

गैरात वि० १ अव्यवस्थित; निष्काळजी. २ मूर्ख, अडाणी.

गैरी, गैरा वि० १ मूर्ख, अजागळ, अडाणी. २ भिकार; कुचकामाचा(पदार्थ); टाकाऊ. [वर्तन.

गैरी स्त्री० बेशिस्तपणा; अव्यवस्थितपणाचें

गैहरा, गहिरा[हिं०] वि० दाट, गडद (रंग).

गो उ० वा० अ० अगो !

३७

गो [सं०] स्त्री० गाय. संस्कृतांत ह्या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. ते पुढें त्या त्या सामासिक शब्दाच्या व्युत्पत्तींत यथास्थानीं दर्शविले आहेत.

गोकटी, गोकनळी स्त्री० १गळा; नरडें. २मान; मानगुटी, गरदन. हे दोन शब्द पुढील वाक्प्रचारांत मात्र येतात. **गोकटी (किं० गोकनळी) धरणें, पकडणें, फाडणें,** इ० मान किं० गळा धरणें इ०. **एकाद्याच्या गोकटीस(किं० गोकनळीस)बसणें** १ त्याला कांहीं काम करावयाला भाग पाडणें; त्याच्याकडून जबरदस्तीनें कांहीं काम करविणें. २ त्याला अडवून धरणें. ३ त्याचा खोळंबा करणें.

गोकर्ण [सं० गो=गाय; कर्ण=कान] स्त्री० एक फुलझाड,–त्याचें फूल गायीच्या कानासारखें असतें. पु० १ गायीचा कान. न० गायीच्या कानाच्या आकाराचें आणि लहान मुलांस दूध पाजावयाचें पात्रविशेष; ह्याला ' बोंडलें ' असेंही म्हणतात. २ स्वयंभु शिवलिंग जेथें आहे असें एक पुण्य क्षेत्रविशेष; हें क्षेत्र मलबारच्या किनाऱ्यावर आहे. ❀ **गोकर्णांत येणें** अपकृष्ट होणें; कमी होणें; ऱ्हासाच्या स्थितीस जाणें; थोडें होणें; उ० त्याची संपत्ति गोकर्णांत आली आहे. ह्याच अर्थाचे दुसरे वाक्प्रचार १संपुष्टांत येणें. २ गोकुळांत येणें.

गोकर्णी [सं० गो+कर्ण; ' गोकर्ण ' पहा] स्त्री० गोकर्ण नांवाचें झाड.

गोकुल [सं० गो (गाय) +कुल (कळप)] न० १ गायांचा कळप. २ गोठा. ३ श्रीकृष्ण जेथें बालपणीं होता तें गांव. ४श्रावण वद्य अष्टमी ह्या दिवशीं नंद, यशोदा, श्रीकृष्ण, बलराम, इ० कांच्या चित्रांचा देखावा करतात तो. ❀ **गोकुळांत येणें** १ वर 'गोकर्णांत येणें' पहा. २ आटोक्यांत येणें; पकडींत येणें. **गोकुळ अष्टमी** स्त्री० श्रावण वद्य अष्टमी ही कृष्णाच्या जन्माची तिथि. **नंदाचें गोकुळ** न० गुरें, वासरें, मुलें, माणसें, नोकर चाकर, आश्रित, इ० परिवारानें गजबजलेलें घर; उ० ह्याचें घर म्हणजे केवळ नंदाचें गोकुळ !

गोकोश [सं० गो (गाय) + क्रोश (ओरडणें)] पु० १ गायीचें ओरडणें जेथपर्यंत ऐकूं जातें तेथपर्यंत अंतर. २ जमीनमापणीचें एक परिमाणविशेष. [पहा.

गोक्रण ' गोकर्ण 'ह्याचा अपभ्रंश. वर 'गोकर्ण'

गोखणें स० क्रि० घोकणें (पाठ करतांना).

गोखमा पु० १ गुराखी. २ अशिक्षित आडाणी माणूस.

गोखरू [सं० गोक्षुर] **पु०** १ एका औषधी वृक्षाचें बीज. २ पालखीच्या दांड्याला लोंबत सोडलेल्या गोंड्यांचा गोटीसारखा अवयव. ह्या गोंड्याला 'इलाखा' म्हणतात. ⊛ **गोखरू बांगडी स्त्री०** गोखरूच्या आकारासारख्या चिन्हांनीं युक्त जी स्त्रिया हातांत घालतात ती बांगडी.

गोखरें [सं० गो (गाय)+क्षुर (खुर)] **न०** गुरांढोरांनीं कडबा, गवत, इ० खाऊन खालीं पड-लेला जो अंश तो.

गोखा, गोखी स्त्री० झाडावरील पानें, फुलें, फळें, इ० पाडावयाची अग्राला दुबेळकें असलेली लांब काठी.

गोखाना [सं० गो (गाय) + **फा०** खानाह् (घर)] **पु०** गुरांढोरांचें खातें,—सरकारी किं० कोणा खाजगी मनुष्याचें.

गोंगणें अ० क्रि० १ सूं सूं असा ध्वनि करीत जाणें (बाणानें किं० फेकलेल्या धोंड्यानें). २ रागानें किं० वेदनेनें ओरडणें किं० चरफडणें.

गोंगरणें अ० क्रि० गोंधळणें; भांबावणें. **स० क्रि०** मारहाण करून किं० शिव्यागाळी देऊन एकाद्याला जर्जर करणें.

गोगलगाय स्त्री० १ एक सरपटणारा प्राणी. २ (लाक्षणिक) अत्यंत गरीब स्वभावाचा माणूस.

गोंगाट पु० कलकलाट; गलबला.

गोंगावणें अ० क्रि० घों घों असा ध्वनि करणें (कानाशीं माशा, डास, इ०नीं).

गोग्रास [सं० गो (गाय)+ग्रास (घास)] **पु०** भोजनाला सुरवात करावयाच्या अगोदर गायी-साठीं जो घास बाजूला काढून ठेविलेला असतो तो.

गोंच मागें ' खोच ' पहा.

गोचका पु० १ उचकी. २ दातांनीं किं० नखांनीं तोडून काढलेला पदार्थाचा भाग; उ० बर्फीचा, भाकरीचा, इ० चा गोचका घेणें (तोडणें किं० काढणें).

गोचका वि० खुरटलेल्या वाढीचें (मूल).

गोचकुला, गुचकुला वि० गुटगुटीत (मूल).

गोचडी, गोचिडी, गोचीड स्त्री० १ गाय, म्हैस, इ० च्या अंगावर वसति करून त्यांचें रक्त शोषून घेऊन जगतो असा एक क्षुद्र कीट. २ (लाक्षणिक) अति लगट करणारा माणूस.

गोचर [**सं०** गो (इन्द्रिय)+चर (ज्ञात किं० ज्ञेय)] **वि०** १ इन्द्रियांना कळणारें किं० कळ-ण्याजोगें; उ० दृष्टिगोचर, कर्णगोचर मनोगोचर, इ०. २ जन्मराशीपासून द्वादश राशींच्या ठायीं सूर्यादि ग्रहांचा जो वर्तमान संचार तो.

गोचर्म [**सं०** गो (गाय)+चर्मन् (कातडें)] **न०** जमीनीचें एक विशिष्ट माप किं० परिमाण.

गोचीड मागें ' गोचडी ' पहा.

गोज न० तोंडीं लावण्याकरतां मसालेदार अशी एक प्रकारची कारल्यांची भाजी करतात ती.

गोजका, गोजकुला वि० मागें ' गोचका, ' ' गोचकुला ' पहा.

गोंज(—जा—)रणें स० क्रि० मूल किं० जनावर यांच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरविणें; कुरवाळणें.

गोजरा, गोजिरा, गोजिरवाणा वि० नाजूक आणि सुंदर (मूल, वासरूं, इ०).

गोजरूं न०, गोजी स्त्री० गायीची कालवड.

गोजिरवाणा वि० वर ' गोजरा ' पहा.

गोजिव्हा [**सं०** गो (गाय) + जिव्हा (जीभ)] **स्त्री०** एक वनस्पतिविशेष; पाथरी.

गोजी स्त्री० गायीचें स्त्री अपत्य; कालवड.

गोट, गोठ [**हिं०**] **पु०** १ सुवर्णादि धातूंचें स्त्रियांचें एक हस्तभूषण. २ सैन्याचा तळ; सेना-निवेश; छावणी. ३ वस्त्राचा काठ फाटूं नये म्हणून कडेला घातलेली शिवण. ४ जोड्याच्या नरीच्या कडेला पट्टी मारून घालतात ती अशीच शिवण. ⊛ **गोट (गोठ-) गणती स्त्री०** तबेल्यांत केलेली घोडे इ० ची गणती. **गोठ घोळणी स्त्री०** गोट किं० गोठ हें जें स्त्रियांचें हस्तभूषण तें करावयाचें सोनारांचें एक आउत.

गोटली स्त्री०, गोटी आंबा पु० लहान आका-राचा एका विशिष्ट जातीचा आंबा.

गोटा पु० १ वाटोळा धोंडा. २ भातकणसांतील दाणे प्रत्येक; उ० पावसानें भाताचे गोटे झडले. ३ कोणत्याही धान्याच्या कणसांतील एक एक दाणा. ४ आंतील पाणी आटलेला सुका नारळ. ५

भोजनार्थ आमंत्रित लोकांना पानसुपारी दिल्यानंतर जी टोकाला फुलें बांधलेली काडी देतात ती.

गोटाळ [म० गोटा] **वि०** ज्यांत गोटे फार आहेत असें शेत, मैदान, इ०.

गोटी [म० गोटा] **स्त्री०** १ लहानसर वाटोळा धोंडा. २ मुलांच्या खेळण्याच्या उपयोगाचे जे लाखेचे, दगडाचे, किं० काचेचे लहान लहान गोल ते प्रत्येक; बैदूल. ३ मल्लाच्या किं० तालीमबाज लोकांच्या शक्तीची परीक्षा करावयासाठीं जे वाटोळे धोंडे किं० लोखंडाचे गोल असतात ते प्रत्येक. ४ तालमीनें कसलेलें जें शरीर तें. ५ जरीचा पदर किं०कांठ जाळून त्यांतून जी चांदी काढतात तिचा खडा. ६ एका विशिष्ट जातींचा आंबा किं० कोणतेंही लहान आकाराचें फळ. ७ ग्रामदुर्गादिकांचे देवालयांत देवाच्या मूर्तीजवळ एक धोंडा ठेविलेला असतो. देवाला भाविक कांहीं प्रश्न विचारून भाविक तो धोंडा उचलतो; तो धोंडा हलका किं० जड लागेल त्या प्रमाणें प्रश्नाचें उत्तर भाविक समजतो. मागें ' उचला ' शब्द पहा.

गोटुला, गोटोळा [म० गोटा] **वि०** १ वाटोळा, गोलाकार. २ लठ्ठ आणि ठेंगणा (मनुष्य किं०जनावर).

गोठ, गोठगणती मागें ' गोट, ' 'गोटगणती' पहा.

गोठण, गोठणी [सं० गोस्थान] **स्त्री०** जलाच्या समीप गायी म्हशी जेथें दुपारच्या उन्हाच्या वेळीं वृक्षाच्या छायेंत बसतात ती जागा. ॐ **गोठण घालून बसणें** सभेंत किं० देवळांत कथापुराणादि प्रसंगीं अव्यवस्थित रीतीनें बसणें किं० बैठक मारणें. **गोठणीच्या गायी माभळभट दान देई** दुसऱ्याच्या मालकीची वस्तु कोणेकानें आपली म्हणून तिसऱ्याला दान करणें आणि मोठेपणा आपणाकडे घेणें हा हास्यास्पद प्रकार होय. **गोठणीच्या गायी माभळभट दान घेई** लोकाची वस्तु कांहीं तरी खोटा हक्क दाखवून लाटणें किं० बळकावून बसणें हा व्यवहार लबाडीचा होय.

गोठणें अ० क्रि० घट्ट किं० टणक होणें; थंडीनें पाणी गोठतें; उष्णतेनें दूध, इ० गोठतें; दवतांतील शाई हवेंतील उष्णतेनें गोठते.

गोठळी स्त्री० मागें ' गुठळी ' पहा.

गोठा [सं० गोष्ठ] **पु०** गायी, म्हशी, इ० जनावरें बांधावयाची घरांतील किं० घराशेजारची जागा. ॐ**गोठापाणी न**०गोठ्यासंबंधाचीं कामें,–शेण काढणें, जमीनीवर पडलेलें गवत इ० झाडून काढणें, इ० कामें समुच्चयानें.

गोठाविणें स०क्रि० गोठणीवर गुरें हाकून नेणें.

गोठी [म० ' गोठा ' चें लघुत्वदर्शक रूप] **स्त्री०** वासरें बांधावयाची जागा.

गोठी [म० गोष्ट; सं० गोष्ठी] **स्त्री०** १ गोष्ट. २ बाबत, प्रकरण, काम, कांहीं व्यवहार.

गोठुळा, गोठोळा मागें 'गोटुळा,' 'गोटोळा' पहा.

गोठुळी, गोठोळी [म० गोटी] **स्त्री०** लहानशी गोळी,–साखरेच्या पाकाची, औषधाची, इ०ची.

गोंड पु०, न० जोंधळ्याच्या किं० बाजरीच्या दाण्यावर जो टोपणासारखा अवयव असतो तो. **न०** मिऱ्यांचा घड. २ साचलेल्या पाण्याच्या पृष्ठभागावर शेवाळीसारखी वाढते ती वनस्पति. **स्त्री०, न०** दोन कुंपणांच्या किं० वयांच्या दरम्यानची अरुंद वाट किं० गल्ली. **पु०** सकाळीं गायी म्हशी इ० जेथें गोळा करून आणून जमवितात ती जागा. ॐ**गोंडास(किं० गोवंडास)लागणें** सरळ रीतीनें किं० मार्गानें चालणें (काम, माणूस, व्यवहार, इ०).

गोड वि० १ जिव्हेला ज्या धर्मांचें ग्रहण करतां येतें ते जे पदार्थनिष्ठ सहा धर्म त्यांपैकीं एक; षड्रसांपैकीं मधुर जो रस तो; गूळ, साखर, इ०च्या चवेचा. २ कडू, तिखट, आंबट, झोंबरा नव्हे असा,–सुरण, आळू, इ० खाद्य पदार्थ. ३ मनोहर, सुखावह, आनंददायक, आल्हादकारक, असा (माणूस, नाटक, काव्य, गोष्ट, भाषाशैली, आवाज, देखावा, इ०). ॐ **शेवट गोड होणें** (किं० **करणें**) पूर्वी वाईट असून नंतर परिणामीं सुखदायक होणें (किं० करणें). **गोड करून खावें आणि मऊ करून निजावें** आपल्या गरिबाऊ स्थितींत मिळेल तितक्या सामग्रीपासून शक्य तितक्या सोयी आणि सुखें मिळविण्याचा प्रयत्न करावा. **केलें नाहीं तोंवर जड** कामाला सुरवात केली नाहीं तो पर्यंत ते आपणाला कठिण वाटतें आणि तें आपल्या हातून

रेटेल किंवा नाहीं अशी शंका वाटते. पण कामाला सुरवात करतांच आपणांला तें करण्याचे मार्ग सुचूं लागतात आणि तें काम आपल्या हातून सुरळीतपणें तडीस जातें. **खाल्लें नाहीं तोंवर गोड** पदार्थाचा किं० माणसाचा आपणाला अनुभव किं० सहवास नाहीं तोंपर्यंत तो चांगला वाटतो पण अनुभव आला किं० सहवास घडला म्हणजे त्याच्यांतील दोष आपणाला कळूं लागून तो आवडेनासा होतो. **गोड करून घेणें** दोषांकडे दृष्टि न देतां पदार्थांत जो चांगला अंश असेल त्याचा उपभोग घेऊन आनंद पावणें. **गोड गोड गुळचट वि०** अत्यंत गोड. **दिलें घतलें गोड** लोकांना आपण द्यावें, त्यांच्याकडून घ्यावें आणि सुखानें राहावें; सर्वांशीं मित्रत्वानें वागत असावें; कोणासंबंधानें मनांत अढी धरूं नये; अपकार घाशीत बसूं नये. **गोड सुरण न०** खाजरें नव्हे तें सुरण. **गोडें भात न०** खाजणांतील नव्हे तें भात. **गोडें झाड न०** कांटेरी नव्हे तें. **लाकडाचें गोड अंग न०** नारावांचून जें वरचें अंग तें. **गोडा साप पु०** विषारी किं० फारसा विषारी नव्हे तो साप. **गोडा शिपायी पु०** कणखर नव्हे तो शिपायी. 'गोड' ह्या शब्दाचीं कांहीं कांहीं शब्दसंहतींत 'गोडा,' 'गोडी,' 'गोडें' अशीं रूपे होतात; उ० गोडें वरण, गोडें पाणी, गोडें तेल इ०. **गोड घास पु०** १ भोजन समाप्त होऊन आंचवावयाला उठावयाच्या अगोदर घ्यावयासाठीं पक्वान्नाचा किं० दुसऱ्या कसल्या तरी आवडत्या खाद्याचा घास मुलें राखून ठेवितात तो. २ शेवटून वाढावयाला आणावयाचें पक्वान्न. ३ सुग्रास भोजन; चमचमीत जेवण; उ० मामाच्या घरीं तो आनंदानें राहतो. तेथला गोड घास टाकून तो आईच्या घरीं रहावयाला कसा कबूल होईल ? ४ भांडणाची समाप्ति झाल्याधर आनंदाचा कांहीं प्रकार,–फराळ, नाटक, इ०. **गोडजेवण, गोडाचें जेवण न०** ज्या जेवणांत मुख्य पक्वान्न साखरभात, पुरणपोळी, इ० साखरेचें किं० गुळाचें पक्वान्न असतें तें; उ० गोड जेवणानंतर पाण्याचा शोष लागणारच ! **गोडधड, गोडधोड न०** साखर किं० गूळ घालून केलेलें पक्वान्न; उ० उद्या दसरा आहे, कांहीं तरी गोडधोड केलें पाहिजे.. **गोडबोल्या वि०** गोड बोलणारा; उ० **गोड बोल्या साल सोल्या** म्ह० बोलण्यांत गोड पण नुकसान करणारा.

गोड न० साखर, गूळ, इ० पदार्थांचे धर्म ज्यांत आहेत असे खाद्य पदार्थ,–व्यक्तिशः किं० समुच्चयानें; उ० ह्या औषधाला गोड वर्ज्य; उ० मधुमेह ह्या रोगाला गोड वर्ज्य.

गोडगस्ता पु० गांवांतील खबरा पाटलाला देणारा एक अधिकारी. [अधिकारी.

गोडगस्ती पु० जकातीच्या खात्याकडचा एक

गोडंबी, गोडांबी स्त्री० १ बिब्याच्या पोटांतील जी बी ती. २ काजूची बी.

गोंडवण न० गुजराथच्या पूर्वेकडचा प्रदेश,–जेथें गोंड लोकांची वसति आहे.

गोंडवळ, गोंडवण न० कोंडलेल्या जलाशयांत पाण्याच्या पृष्ठभागावर शेवाळीसारखी जी वनस्पति पसरते ती.

गोडवा [म० गोड] पु० स्तुति, प्रशंसा. ❀ **एकाद्या माणसाचे किं० पदार्थाचे गोडवे गाणें** त्याची स्तुति करणें (बहुधा फाजील स्तुति करणें). ह्या शब्दाचा 'गोडवे' असा **अ० व०** प्रयोग नेहमीं केला जातो.

गोडवी [म० गोड] स्त्री० १ रुचि, चव. २ आवड. [गुटगुटीत (बांधा).

गोंडस वि० गोटीदार (शरीर, अवयव);

गोंडा पु० १ घोस; झुबका. २ मखमल, बटमोगरा, इ० चें फूल. ३ रेशीम इ० चा बनविलेला वरील सारखा घोस किं० झुबका (पालखी, मच्छरदाणी, इ०च्या शोभेसाठीं लावतात तो). ❀**एकाद्याचे पुढें गोंडा घोळणें** त्याची खुशामत करणें (त्याच्यापासून आपला लाभ करून घेण्यासाठीं; त्याच्यापासून कांहीं इष्टार्थ मिळविण्यासाठीं). **गोंडा फुटणें** कढत असलेल्या उसाच्या रसावर फेसाचा थर जमणें. **सूर्यानें गोंडा फोडणें** सूर्य क्षितिजाच्या वर येऊन सर्व दिशांस त्याचे किरण पसरणें. **एकाद्या माणसानें गोंडा फोडणें** त्यानें कांहीं वाईट कृत्य केल्यामुळें तो अपकीर्तीला पात्र होणें; त्याची बदनामी होणें.

गोडांबी स्त्री० बिब्याच्या पोटांतील बी.

गोडावणें [म० गोड] अ० क्रि० १ गोड होणें (आंबा, चिंच, इ० फळांचा आंबटपण

नाहींसा होऊन). २ हरीक इ० चा माजरेपणा नाहींसा होणें. ३ मूळची खारी जमीन खताच्या योगानें गोड होणें. ४ फार गोड पदार्थ खाल्ल्यानें कमी गोड पदार्थ मुळींच गोड नाहींत किं० फिक्के आहेत असें जिभेला वाटूं लागणें; उ०बासुंदी खाल्ल्यावर तोंड गोडावतें आणि खीर फिक्की वाटूं लागते; उ०लाडू खाऊन माझें तोंड गोडावलें आहे; कांहीं वेळानें मी चहा पिईन.

गोडाविणें [म० गोड]**स०क्रि०** समुद्राच्या किं० खाडीच्या कांठची जमीन बांध घालून शेतासाठीं घेतलेली असते तिच्यांत खतें घालून ती शेतकीला लायख करणें.

गोंडाळ [म० गोंडा] **न०** १ एक प्रकारचें गवत; त्याचे झुबके असतात. २ तळें इ० च्या पाण्याच्या पृष्ठभागावर ज्या वनस्पति उगवतात त्या (त्यांच्या योगानें पाणी स्वच्छ राहातें अशी समजूत आहे). ३ जोंधळा, बाजरी, इ०च्या दाण्यांवर जे टोपणासारखे अवयव असतात त्यांचा ढीग.

गोंडाळ वि० १ गोंडाळ नामक वनस्पतीनें आच्छादलेला आहे जलपृष्ठभाग ज्याचा असें (तळें, विहीर, इ० जलाशय); वर 'गोंडाळ' पहा. २ गोटस, गुटगुटीत (मूल). ❀ **गवत गोंडाळ, शेत धोंडाळ, आणि बायको तोंडाळ** हे तीन पदार्थ वाईट, कारण त्यांचेपासून दुःख होतें किं० उपद्रव होतो.

गोंडिळणें, गोडुळणें [म० गोड] **अ०क्रि०** फणस, केळें, इ० फळांनीं पूर्णपणे पिकावयाच्या मार्गावर असणें म्हणजे त्यांनीं अर्धवट पिकलेल्या स्थितींत असणें.

गोडी [म० गोड] **स्त्री०** १ मधुरपणा; गोडपणा. २ जिव्हेचे ठायीं पदार्थाची रुचि जाणण्याचें जें सामर्थ्य असतें तें. ३ कोणत्याही ज्ञानेंन्द्रियाच्या ठायीं त्या त्या इंद्रियाच्या विषयाची सुखकरता जाणावयाची जी शक्ति असते ती. ४ आवड; अभिरुचि; उ० मला गायनाची गोडी नाहीं. उ० मला सोंगट्यांत गोडी वाटत नाहीं. ५ मित्रत्वाचा संबंध; वैराचा अभाव; उ० इतके दिवस रामभाऊशीं माझा अबोला होता पण आतां गोडी झाली. ❀**गोडीगुलाबी स्त्री०** मित्रत्वाचा गोड संबंध. **गोडीस चढणें** गोड होत जाणें; पक्क दशेस येऊं लागणें. **गोडीस पडणें** सुपरिणामकारक होणें; हितकर होणें; फायदेशीर होऊं लागणें. **गोडीस येणें** १ आवडूं लागणें. २ मित्रत्वाच्या संबंधांत पडलेला खंड भरून येणें म्ह० पुन्हा मित्रत्वाचा संबंध स्थापित होणें.

गोंडी [म० गोंडा] **वि०** गोंडेदार किं० झुबकेदार (जास्वंद, तगर, मखमल, इ० फुलझाड).

गोंडी स्त्री० १ बारीक अरुंद वाट. २ जिच्या दोन बाजूंस कुंपणें आहेत अशी अरुंद पाऊलवाट. ३ज्या मार्गानें गुरें डोंगर इ०वर चरावयाला जातात तो मार्ग.

गोडीळ, गोडूस [म० गोड] **वि०** गोडसर; साधारण गोड; किंचित् गोड.

गोडूळ [म० गोड] **वि०**किंचित् गोड(पक्कदशेस येत असलेलें फळ).

गोडें [म० गोड] **न०** भातावर गोड कालवण घेतात तें,— दूध, गुळवणी, नारळाचा रस, इ०; याच्या उलट सार, ताक, आंबट वरण, इ०.

गोंडेर, गोंडेरा [म०गोंडा]**वि०**जें गोंड्यासारखें असतें असें (फूल); गोंड्याच्या रूपाचें (फूल).

गोड्या [म० गोड] **वि०** ज्याला गोड खाद्यें फार फार आवडतात असा (मनुष्य).

गोड्या पु० धान्यापासून मद्य काढून घेतल्यावर त्याचा जो चोथा राहातो तो.

गोण स्त्री० १ बैल, घोडे, इ० कांच्या पाठीवर धान्यादि भरून वाहून न्यावयासाठीं कंठाळीसारखें गोणपाट इ०कांचें शिवलेलें जें पोतें तें. २ (लाक्षणिक) कोणत्याही कार्याचें अंगावर पडलेलें ओझें किं० भार किं० जबाबदारी. ❀ **गोण घालून बसणें** नेटानें किं०निग्रहानें बसून राहाणें (कांहीं काम करतांना); एकाद्या कामाची पिच्छा पुरविणें. **गाढवाच्या गोणीस खंडीची तूट** १ एकाद्या विशिष्ट पदार्थांतून मिळालेल्या उपयुक्त अंशापेक्षा रद्दी आणि टाकाऊ भाग कितीतरी पटीनें जास्ती आहे.२ त्याच्या बोलण्यांत एकपट सत्याचा अंश असला तर दसपट खोट्याचा अंश असणार.

गोणता पु० १ बैल इ०च्या पाठीवर दोन बाजूंस दोन कप्पे असलेले पोतें जें घालतात तें; ह्या दोन कप्प्यांत धान्य इ० घालून वाहून नेलें

जातें. २ शिंदीच्या पातींचें खजूर इ० भरावया-साठीं विणलेलें पोतें.

गोणताट, गोणपट, गोणपाट, न०तागाच्या झाडाच्या सालीचे तंतू विणून जें वस्त्र करतात तें. ह्या वस्त्राचीं गोण, पोतें, इ० बारदानें करतात.

गोणती स्त्री० गोणताटाचें लहान पोतें.

गोणा पु० १ मोठ्या आकाराची गोण. वर 'गोण' पहा. २ गाढवाच्या पाठीवरून कौलें, विटा, माती, इ० वाहून न्यावयाचें जें दोन पुडांचें पोतें असतें तें. ३ बांबूच्या पाती इ०विणून जो मोठा हारा करतात तो.

गोणी स्त्री० १ कंठाळ. २ जबाबदारीचा भार. ३ संकट. ‡**गळयांत** किं० **मानेवर गोणी येणें** किं० **पडणें** एकादें संकट टाळावयासाठीं केलेला प्रयत्न फसून तें संकट पूर्वींपेक्षां अधिकच त्रासदायक होणें. २ कांहीं संकट ओढवणें. मागें 'गळा' शब्दांत हा वाक्प्रचार पहा. **मणगटावर गोणी येणें** कांहीं जबाबदारी अंगावर येऊन पडणें. **एकाद्याच्या पाठीवर गोणी घालणें** त्याच्या माथीं कांहीं काम लादणें.

गोत [सं० गोत्र=कुळ] न० १ एकाद्या विशिष्ट जातीचे किं० कुटुंबाचे लोक समुच्चयानें. २ एकाच गोत्राचे लोक समुच्चयानें.‡**कुऱ्हाडीचा दांडा** पु० स्वार्थासाठीं किं० केवळ दुष्टबुद्धीनें शत्रूला मदत करून आपल्या बंधुबांधवांचें किं० देशबांधवांचें नुकसान करणारा नीच माणूस. **कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ** देशद्रोही माणूस आपल्याच देशाच्या नाशास कारण होतो. आमचे " मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०" ह्या पुस्तकांत लेखांक १०२९ आणि १४२८पहा. **गोत मिळणें** १ कांहीं एका गोष्टीचा किं० व्यवहाराचा पूर्वापर संबंध जुळणें. २ परस्परांचें सख्य जुळणें. ३ कांहीं माणसांनीं एके ठिकाणीं जमून कांहीं बेत करणें. ४ परस्परोपकारक होणें. **ताकाचें आणि तेलकट भाजीचें गोत मिळत नाहीं** हे दोन्ही पदार्थ एकदम उपभोगूं गेल्यास सुखावह होऊं शकत नाहींत; ते दोन्ही पदार्थ स्वतंत्रपणें चांगले आहेत पण एकवटल्यास त्रास-दायक किं० दुःखकारक होतात. **गोत घोडा** पु० १ नात्याच्या स्त्रीशीं व्यभिचार करणारा. २ वयानें मोठा असून ठोंब्या; 'घोडा' असाही शब्द ह्याच अर्थाचा आहे. ३ कुटुंबांतील मूर्ख माणूस. **गोतपत, गोतपात, गोताई** स्त्री० जातिभ्रष्ट इसमाला परत जातींत घेण्याच्या वेळचा शूद्रांचा विधि. **गोतावळ** स्त्री०, **गोतावळा, गोतोळा** पु०, **गोतावळें, गोताळें** न०, **गोतगंगा** स्त्री० १ एका विशिष्ट जातीचीं सर्व माणसें समुच्चयानें. २ एका कुटुंबाशीं नात्यानें जुळलेलीं माणसें समुच्चयानें.

गोता पु०, **गोत** स्त्री० [अ० गूताह्] १ पक्ष्याचें किं० पतंगाचें आकाशांत खालीं येणें किं० घसरणें (खाणें). २ पदार्थ किं० माणूस पडेल अशा रीतीचा त्याला दिलेला किं० बसलेला धक्का (क्रि० मारणें, देणें, मिळणें). ३ व्यापा-रांत किं० व्यवहारांत बसलेली ठोकर किं०झालेली हानि किं० उत्पन्न झालेलें विघ्न. ४ रिकामी यांता-यात; हेलपाटा. ‡**गोता खाणें** नुकसानीस पात्र होणें. **जेनूं काम तेनें थाय बिजा करे ते गोता खाय** ज्याचें काम त्यानेंच करावें; जो कोणी भलतें किं० भलत्याचें काम करूं लागेल त्याला ठोकर बसेल; न्हावी वस्तऱ्यानें डोक्यावरचे केश तासून काढतो ते सुतार रंध्यानें तासून काढूं लागला तर तो मूर्ख ठरेल.

गोतांबील स्त्री० अनेक पदार्थांचें संकरण, मिश्रण, किं० गल्लद; उ० मुक्कामाच्या ठिकाणीं उतरल्यावर खावयासाठीं आम्ही भात, भाजी, लोणचें, इ० पदार्थ डब्यांत भरून बरोबर घेतले होते; मुक्कामाच्या ठिकाणीं उतरून आम्ही डबा उघडून पाहातों तों सर्व पदार्थांची गोतांबील झालेली आम्हांला दिसली !

गोत्र [सं०] न० १ वंशाचा मूळ पुरुष; उ० माझें गोत्र कौंडिन्य. २ एकाद्या विशिष्ट गोत्रांत उत्पन्न झालेलीं माणसें समुच्चयानें; उ० माझें गोत्र आलीकडे फार वाढलें आहे. ३ पर्वत. ‡**गोत्रकुठार** पु०, **गोत्रकुदळ** स्त्री० १ स्व-गोत्रासंबंधीं मनुष्यांना अनेक प्रकारें पीडा देणारा. २ स्वगोत्रीय स्त्रीशीं गमन करणारा. **गोत्रज** पु० जो ज्याच्या गोत्रांत उत्पन्न झाला तो त्याचा गोत्रज (बाप, आजा, पणजा, बंधु, चुलता, पुतण्या इ० विशेष संज्ञा नसतां 'गोत्रज' शब्दाचा

प्रयोग होतो). **गोत्रपुरुष पु०** 'गोत्रज' पहा. **गोत्रबंधु पु०** परस्परांशीं सूतकादि संबंध नसतां एका गोत्राचे जे इसम ते परस्पर. **गोत्रहत्या स्त्री०** १ गोत्रज पुरुषाचा वध. २ सोंगट्या खेळणारे जे गडी त्यांनीं नजरचुकीनें आपल्या संगू गड्याची सोंगटी मारणें (विनोदानें). **गोत्री वि०** गोत्रज.

गोंद [हिं०] पु० डीक (कागद इ० चिकटावयाच्या किं० पुष्टीसाठीं खावयाच्या उपयोगाचा). ꙮ **गोंददाणी स्त्री०** डिकदाणी.

गोद [हिं०] स्त्री० खाडीचें पाणी आंत येऊं शकेल अशा विस्ताराची गलबतें बांधण्याच्या उपयोगाची जी जागा ती.

गोदड वि० खरखरीत किं० खरबडीत (त्वचा).

गोदड, गोदंड पु० गोसाव्यांच्या अठरा आखाड्यांपैकीं एक. ꙮ **गोदडशाई वि०** १ ठिगळें ज्याला फार असा कपडा. २ अव्यवस्थित (काम, संस्था, इ०). ३ गोसाव्याच्या गोदड पंथासंबंधाचा. वर 'गोदड' **वि०** आणि 'गोदड' 'गोदंड, '**पु०** पहा.

गोदडी, गोधडी स्त्री० १ अनेक वस्त्रांचे तुकडे एकाला एक आणि एकावर एक असे शिवून जो जाडी आणि मऊ पदार्थ पांघरण्यासाठीं करतात तो. २ (लक्षणेनें) घामोळें, गोवर; इ० च्या योगानें शरीराचा पृष्ठभाग खरबडीत होतो तो.

गोंदगी स्त्री० एक झाड.

गोंदणें, गोंधणें स० क्रि० कपाळ, गाल, हात, इ० च्या त्वचेवर सुईनें टोंचून नक्षी, रामनाम, तुळशीवृंदावन, इ० वठविणें; ह्या सुईनें पाडलेल्या छिद्रांवर हळद इ० पदार्थांचा लेप करून त्या आकृति टिकाऊ हिरव्या रंगाच्या होतात. ꙮ **गोंदवण न०** गोंदण्याची साधनसामुग्री.

गोदरड स्त्री० गोठ्यांतील केरकचरा.

गोंदविडा पु० एक प्रकारचा आकारविशेषाचा विडा.

गोंदवेल स्त्री० तांदुळाची एक जात.

गोदा पु० लाल तापविलेल्या खिळ्यानें शरीराला देतात तो डाग.

गोदा, गोदावरी स्त्री० एक नदी; ही त्रिंबकेश्वरीं उगम पावून बंगालच्या उपसागरास मिळते.

गोदान [सं० गो=गाय; दान=देणें] न० ब्राह्मणाला गाय देण्याचा विधि. [**सं०** गो=केश; दान=कापणें] षोडष संस्कारांतील एक; सोडमुंजीच्या अगोदरचा विधिविशेष.

गोदी [हिं०] स्त्री० बंदरामध्यें जहाजें, गलबतें, इ० ना सुरक्षितपणें राहण्यासाठीं केलेली जागा.

गोंध स्त्री० १ केश विंचरले असतां फणीला अडकून येतात ते केश; गुंतवळ. २ गुंतागुंतीचा, जिकिरीचा, किं० भानगडीचा व्यवहार, काम, इ०.

गोंधणें वर 'गोंदणें' पहा.

गोधन [सं० गो=गाय+धन=संपत्ति] न० गायी, म्हशी, बैल, रेडे, इ० रूप संपत्ति.

गोंधरणें, गोंधवणें अ० क्रि० १ गुंतणें; गुंतागुंतींत पडणें; घोटाळणें. २ अव्यवस्थित होणें; भग्नक्रम होणें. ३ गोंधळणें. **स० क्रि०** १ गुंतविणें. २ अव्यवस्थित करणें; भग्नक्रम करणें. ३ गोंधळविणें.

गोंधलें [म० गोंधणें] न० गोंधण्याच्या संस्कारानें उत्पन्न केलेली आकृति. वर 'गोंधणें' पहा.

गोंधवण [म० गोंधवणें] स्त्री० गुंतागुंत; गुंतलेपणाची स्थिति.

गोंधळ पु० १ अव्यवस्था; घोटाळा, अस्ताव्यस्तपणा. २ कोलाहल; आरडाओरडा. ३ भ्रांति; भ्रांतिष्टपणा; विचारांची गुंतागुंत होऊन काय बोलावें किं० काय करावें हें सुचत नाहीं अशी स्थिति. ४ जगदंबेच्या प्रीत्यर्थ गायन, नृत्य, कथानुसंधान, इ० रूप जो प्रकार करतात तो (**क्रि०** घालणें). ꙮ **गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ** मागें 'गाढव' शब्दांत पहा.

गोंधळणें अ० क्रि० १ घोटाळ्यांत पडणें; काय करावें तें सुचत नाहीं अशा स्थितींत पडणें. भ्रांतिष्ट होणें. २ अनेक पदार्थांत एक विशिष्ट पदार्थ पडून तो न सापडेसा होणें; भलत्याच ठिकाणीं पडणें किं० टाकला जाणें. **स० क्रि०** घोटाळ्यांत घालणें किं० पाडणें. २ भलत्याच ठिकाणीं टाकणें. ३ अव्यवस्थित करणें.

गोंधळविणें वर 'गोंधळणें' **स० क्रि०** पहा.

गोंधळी पु० जगदंबेच्या मूर्तीपुढें गोंधळ घालून उपजीविका करणारी हिंदूंची एक जाति. वर 'गोंधळ' अर्थ ४ पहा. [मध्यें पहा.

गोंधळी लग्न, गोंधळी मुहूर्त खालीं 'गोधूळ'

गोधा [सं०] **स्त्री०** १ घोरपड. २ सुसर. ३ तिरंदाजाचा चामड्याचा हातमोजा (धनुष्याच्या दोरीनें हाताला इजा होऊं नये म्हणून घालावयाचा). ' गोधांगुली ' हा शब्द याच अर्थी मराठी कवितेंत योजला आहे.

गोधूम [सं०] **पु०** गहूं.

गोधूळ [सं० गो=गायी, म्हशी; धूलि=धूळ] **स्त्री०** सूर्यास्ताचे पूर्वींचीं तीस पळें आणि नंतरचीं तीस पळें मिळून जो साठ पळांचा अवधि तो. ह्या वेळीं चरावयास गेलेल्या गायी म्हशी परत गांवांत येतात त्या वेळीं त्यांच्या पावलांनीं धूळ उडत असते ह्यावरून 'गोधूळ' शब्दाचा वरील अर्थ रूढ झाला. ॐ**गोंधळी लग्न न०** वरील साठ पळांच्या अवधींतील लग्न. **गोंधळी मुहूर्त पु०** वरील साठ पळांच्या अवधींतील मुहूर्त. **गोंधळिक, गोंधळूक वि०** वरील अवधांतील किं०वरील अवधाच्या संबंधाचा. ' गोंधळी इ० तील अनुस्वार आगंतुक होय.

गोप [सं० गो=गाय, पा=रक्षण करणें] **पु०** १ गुराखी. २ सुवर्णाचा एक अलंकारविशेष.

गोप, गोफ पु० रेशमाचे किं० कापसाचे किं० सुवर्णादिक धातूंचे तंतू कांहीं विशेष प्रकारें एकमेकांत गुंतवून दोरीसारखा लांब पदार्थ करतात तो.

गोप पु० एक प्रकारचें गवत.

गोपचार [सं० गोप्रचार=गायरान] **पु०** गायी म्हशींना चरावयासाठीं गांवाच्या शेजारीं जी जागा सरकारनें गांवकऱ्यांना फुकट दिलेली असते ती.

गोपन [सं० गुप्=लपविणें] **न०** लपविणें; गुप्त राखणें; गुप्त ठेवणें. **न०** रहस्य; गुप्त गोष्ट. [सं० गुप्=रक्षिणें] **न०** रक्षण; संरक्षण. ॐ**गोपनस्फोटःपु०**गुप्त गोष्ट बाहेर पडणें किं०फुटणें.

गोपाल, गोपाळ [सं० गोपाल=गुराखी] **पु०** १ श्रीकृष्ण. २ गुराखी. ३ कोल्हाट्यासारखे खेळ करणारे जे लोक त्यांची जात. ॐ**गोपाळकाला पु०** गोकुळ अष्टमीच्या उत्सवाच्या अखेरीस दह्याची उंचावर टांगलेली हंडी फोडणें, फुगड्या घालणें, चेंडू खेळणें इ० ज्या मौजा करतात त्या समुच्चयानें किं० त्यांचा समारंभ. **गोपाळी वि०** संध्याकाळच्या वेळचें (लग्न).

गोपिका, गोपी [सं०] **स्त्री०** गुराख्याची स्त्री.

गोपचंदन गोपीचंदन न० १ एक प्रकारची पिवळसर माती,—जी द्वारकाक्षेत्रीं विशेष आहे; ही गंधासारखी कपाळावर किं० शरीराच्या इतर भागांवर लावितात. २ देशादिकांची जाळून पोळून, आणि लुटून केलेली दुर्दशा.

गोपिपी, गोपीपी स्त्री०एक लहान काळा पक्षी.

गोपुर [सं०] **न०** देवालय इ०च्या परिघाच्या द्वारावर दुमजली किं० तिमजली करतात ती बंदिस्त जागा. २ शहराची वेस. ३ स्त्रिया चैत्रमासीं भिंत इ०वर गंध इ०च्या ज्या आकृति काढतात त्या. ४ एक प्रकारचें गवत.

गोप्य [सं०] **वि०** गुप्त ठेवावयाचा; गुप्त ठेवण्याच्या लायकीचा.

गोप्रसव पु० अशुभ वेळीं जन्मलेलें मूल गायीच्या तोंडापुढे धरण्याचा विधि. असें केल्यानें त्या मुलाचें अनिष्ट टळतें अशी समजूत आहे.

गोफ पु० १ गळ्यांत धारण करावयाचें एक भूषणविशेष. २ रेशीम इ०चे अनेक पदर कांहीं विशेष प्रकारें विणून केलेला लांब दोरीसारखा पदार्थविशेष. मागें 'गोप, गोफ' पहा.

गोफण, गोफीण स्त्री० दगड जोरानें दूर फेकावयाचें सुतळी, दोरी, कातड्याच्या वाद्या, इ०चें बनविलेलें साधन. ॐ**गोफणगुंडा पु०** गोफणीनें फेकलेला किं० फेकावयाला योग्य असा धोंडा. २ तल्लख किं० तरतरीत किं० चलाख माणूस.

गोफणणें [म० गोफण] **स० क्रि०** गोफणींत घालून दूर फेकणें.

गोफा [सं० गुल्फ] **पु०** १ पायाचा घोटा. २ स्त्रियांचा केशांचा बुचडा.

गोफाटणें, गोफटणें स० क्रि० १ घोटाळ्यांत घालणें; पगदर्स्तीचें भाषण करून एकाद्याला फसविणें. २ चुकीच्या मार्गास लावणें. ३ कांहीं काम ओरखडून काढणें; कसेंबसें करणें. ४ अपुरत्या साधन सामग्रीनें (कांहीं काम) कसें तरी शेवटास पोचविणें. **अ० क्रि०** गुदमरणें; कासावीस होणें.

गोफाटा पु० घोटाळा; पेच; संकट. (सप्तम्यंत प्रयोगात मात्र); उ० गोफाट्यांत पडणें, सांपडणें, अडकवणें, घालणें इ०).

गोफीण स्त्री० मागें ' गोफण ' पहा.

गोबटी स्त्री०, **गोवटें** न० पुढें ' गोमेटी ' ' गोमेटें ' पहा.

गोबड न० १ शेण इ० केरकचरा अस्ताव्यस्त पडलेला. २ अव्यवस्थितपणें इतस्ततः पडलेलें किं० पसरलेलें सामानसुमान किं० पदार्थ.

गोबडणें अ० क्रि० खरकटें, शेण, माती, इ० नीं घाण झालेलें किं० लडबडलेलें असणें (भांडें, जमीन, इ०).

गोबरा वि० लठ्ठ आणि बेघाट (शरीर, पात्र, पदार्थ). ꙮ **गोबरा गणेश** पु० बेघाट, बेडौल, किं० कुरूप माणूस.

गोबराळ स्त्री० एक प्रकारची केळ.

गोबाडणें स० क्रि० १ राख, शेण, माती, इ०नीं माखणें. २ अव्यवस्थित करणें; गढूद करणें.

गोबें, घोबें न० अकल्पित किं० अनपेक्षित असा लाभ; घबाड; क्रि०येणें, सापडणें, मिळणें,इ०.

गोब्राह्मण पु० स्वभावानें सौम्य आणि गरीब ब्राह्मण.

गोम स्त्री० १ अनेक पाय ज्याला असतात असा एक क्षुद्र जंतु. २वरील जंतूसारखी कांहीं घोड्याच्या अंगावर जी केशांची पंक्ति असते ती,—ही अशुभ गणिली गेली आहे. ३ पदार्थांतील कांहीं कमीपणा, उणेपणा, दोष, किं०ऐब. ४कांहीं गुप्त दोष,—जो एकदम लक्ष्यांत येण्याजोगा नसतो. ५ कांबळा, घोंगडी, इ०च्या शेवटास रेशीम इ०चे दोर भरून करतात ती पट्टी. ६ गुणयुक्त माणसांत किं० पदार्थांत एकादा जो कमीपणा किं० दोष असतो तो.

गोमटा, गोमट वि० मनोहर; सुंदर; सोयीचें.

गोमटा पु० कोष्ट्याच्या धंद्यांतील एक पारिभाषिक शब्द; मागाच्या ओव्याच्या पांच पदरी दोऱ्या.

गोमटी स्त्री०काचेच्या बांगड्यांची एक तऱ्हा.

गोमा पु० १ खोटी, दिखाऊ, किं० बाह्यात्कारीची नाखुषी, नापसंती, किं० अप्रीति; उ० राम्या, तुझ्या मनांत विड्या तोंडावयाच्या आहेत, हें तोंड, उगीच गोमा कशाला करतोस (किं० लावतोस) ? २ डौल, दिमाक, ऐट.

गोमा पु० पुरुषाचें ठेविलेलें नांव. ꙮ **गोमागणेश पितळी दरवाजा, गोमाजी कापशे, गोमाजी तिमाजी, गोमाजी सोमाजी** कोणी तरी माणूस(ज्याचें नांव सांगण्याची जरूरी नाहीं); एक मनुष्य (मग तो कोणी कां असेना); कोणी तरी मनुष्य (ज्याचें कांहीं महत्त्व नाहीं). हीं सर्व नांवें काल्पनिक आहेत; ह्या नांवांच्या कोणी व्यक्ति होऊन गेल्या नाहींत. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० " हें पुस्तक ले० १०७८ पहा.

गोमाशी [म० गो + माशी] स्त्री० गाय इ०च्या अंगावर वसति करून त्यांचें रक्त शोषून घेऊन जगणारी एक प्रकारची माशी. ꙮ **चालत्या घोड्यावरच्या गोमाशा** मनुष्य वैभवसंपन्न असेतों पर्यंत त्याच्याशीं मैत्री करणारे लोक (तो हीनदशेस येतांच त्याला परित्यागणारे लुच्चे आणि लबाड लोक); कार्यसाधु लोक.

गोमांस [सं० गो (गाय) + मांस] न० १ गायीचें मांस. २ अनुपभोग्य वस्तु; असेच अन्य वाक्प्रचार ' शिवस्व, ' ' माय सावशी.' [चिन्ह.

गोमीच न० घोड्याच्या अंगावरचें एक अशुभ

गोमुख [सं० गो (गाय) + मुख (तोंड)] न० १ गायीचें तोंड. २ लाकूड, दगड, धातु, इ०चें केलेलें गायीचें तोंड. ३ एक वाद्यविशेष. ꙮ **गोमुख व्याघ्र** पु० दिसण्यांत गरीब साधा भोळा पण कपटी आणि विश्वासघातकी मनुष्य; गायतोंड्या.

गोमुखी [सं० गो (गाय) + मुख (तोंड) + प्रत्यय] स्त्री० हातांत माळ घेऊन जप करावयाची सखलादीची पिशवी.

गोमूत्रिका स्त्री० सावयव अंक गुणावयाचे असतां एक प्रकारें अंक मांडून गुणण्याचा एक प्रकार. ꙮ **गोमूत्रिका बंध** पु० श्लोकांतील अक्षरें कांहीं विशेष प्रकारें मांडतां येतील असा एक श्लोकरचनेचा प्रकार.

गोमेटी, गोमेठी स्त्री० एक वल्लीविशेष

गोमेटें (–ठें) न० गोमेटीचें फळ.

गोयला पु० जळाऊ लाकडांचा भारा; हात दीड हात लांबीच्या काटक्यांचा डोक्यावर वाहून नेतां येण्याइतका जड भारा.

गोयाबा पु० १ सुस्त, आळशी मनुष्य; तल्लख, तरतरीत याच्या उलट. २ मूर्ख अजागळ माणूस.

गोरख गांजा पु० एक औषधी वनस्पतिविशेष (नळगुद इ० वर याचा उपयोग केला जातो).

गोरख चाळा पु०, गोरख सांखळी स्त्री० १ अनेक कड्या जिला बसविलेल्या असतात असा लोखंडाचा दांडा,– जो गोसावी हातांत घेतात. २ दुसऱ्या कुटुंबांत आपल्या मुली विवाहानें देऊन आणि त्यांतील मुली आपल्या कुटुंबांत विवाहानें करून घेऊन एकमेकांशीं जुळलेलीं कुटुंबें समुच्चयानें. ३ एकमेकांना जामीन राहिल्यानें किं० देण्याघेण्याच्या व्यवहारानें एकमेकांच्या पकडींत अडकलेले गांवकरी समुच्चयानें. ४ एकांत एक गुंतल्या आहेत शाखा ज्यांच्या अशा वृक्षांचा आणि वेलींचा टापू. [त्याचें फळ.

गोरखचिंच स्त्री० १ एक वृक्षविशेष. २

गोरख पंथ, गोरख मार्ग, गोरख संप्रदाय पु० गोरख मत न० गोरखनाथानें प्रचलित केलेला धर्म.

गोरख मुहूर्त पु० शुभ मुहूर्तविशेष.

गोरखी पु० गुराखी.

गोरगरीब पु० अ० व० गरीब लोक.

गोरज [**सं०** गो (गाय)+रजस् (धूळ)] **वि०** रानांत चरावयाला गेलेल्या गायी परत घराकडे येतात त्या वेळेसंबंधाचा किं० त्या अवधांतील; गोरज मुहूर्त, गोरज लग्न, इ०.

गोरटा [**सं०** गोर] **वि०** किंचित् गोरा (माणूस, इ०). ' गोरटेला ' ह्याच अर्थी दुसरें रूप.

गोरब न० खोळीच्या आकाराचें इरलें(पर्जन्यनिवारणाचें एक साधनविशेष).

गोरबंद पु० घोड्याच्या किं० उंटाच्या खोगिराचें एक बंधनविशेष.

गोरवी कटगी [**कानडी**] **स्त्री०** मशालीसारखें पेटणारें एक लाकूड,– हें माकडी नांवाच्या झाडाचें लाकूड असतें.

गोरस [**सं०** गो (गाय)+रस] **पु०** गायी किं० म्हशी यांचेपासून आपणास मिळतें तें दूध, दहीं, लोणी, इ०.

गोरसण (–न), गोरसाण (–न) न० एरंड्या, ०इ चा ठेचा, इ०,–जो कातडें कमावण्याच्या कामीं उपयोजितात.

गोरसणें स० क्रि० बीजें पेरावयाला योग्य करणें (शेत, जमीन, इ०). [धर्मप्रसारक.

गोरक्ष, गोरख, गोरखनाथ पु० एक हिंदु-

गोरक्ष, गोरक्षक [**सं०** गो (गाय)+रक्ष् (रक्षिणें)] **पु०** १ गुराखी. २ गुरांढोरांची काळजी वहाणारी देवता.

गोरा, गोऱ्हा पु० गायीचें नर अपत्य.

गोरा [**सं०** गौर=पांढरा] **वि०** श्वेत वर्णाचा; पांढरा. ॐ **एक गोरी आणि बत्तीस खोड्या चारी** गोरेपणांत शारीरिक व्यंगें लपतात किं० त्यां व्यंगांकडे फारसें लक्ष्य दिलें जात नाहीं. **गोरागोमटा वि०** गोरा आणि सुंदर. **गोरागोमटा आणि कपाळकरंटा, गोरागोमटा आणि नरदेव करंटा पु०** दिसण्यांत सुंदर पण वाईट गुणांचा किं० भाग्यहीन (पोरगा किं० माणूस). **गोरागोरापान वि०** खूप गोरा; अत्यंत गोरा. **गोरामोरा वि०** भीतीनें किं० रागानें ज्याच्या चेहेऱ्याचा रंग पालटला आहे असा.

गोरांजन, गोरोचन [**सं०**गोरोचना] **न०**एक सुगंधी पदार्थ,–जो गायीचे मस्तकांत असतो असें समजतात.तो रंगानें पांढरा किं०पिवळसर असतो.

गोऱ्हा पु० गायीचें नर अपत्य.

गोल [**सं०**] **वि०** १ वर्तुळाकार; उ० गाडीचें चाक. २ वाटोळा भरीव. **पु०** १ गरगरीत वाटोळा पदार्थ; सर्व बाजूंनीं वाटोळा पदार्थ; गोटा; उ० भूगोल, खगोल. २ वाटोळा वांसा; गोलटा. ३ पदार्थाचा वाटोळेपणा. ४ पागोटें, इ० वस्त्रांस जो जरीचा पदर असतो तो. ५ अग्निज्वालांचा झोत किं० गलूल. ६ क्रांतिवृत्ताचा अर्धा भाग. ७ गोड्या पाण्यांतील मत्स्यविशेष. ८ गोफ ज्या तंतूंचा गुंफिलेला असतो ते तंतु प्रत्येक. ९ अखूड विटी.

गोलक [**सं०**] **पु०** १ हिंदूंची एक जाति,– ब्राह्मण जातीच्या विधवांची संतति. पति जिवंत असतां व्यभिचारापासून स्त्रीला झालेला जो पुत्र तो कुंड. विधवेच्या पुत्राला रंडगोलक आणि सधवेच्या पुत्राला कुंडगोलक असे पर्याय शब्द आहेत. २ कोणताही वाटोळा पदार्थ. ३ इंद्रियवाचक शब्दांना आणि 'इंद्रिय' ह्या शब्दाला जोड देणारा शब्द; ह्या जोडानें त्या शब्दाच्या अर्थांत कांहीं फारसा बदल होत नाहीं; उ० नासागोलक, कर्णगोलक, नेत्रगोलक, इंद्रियगोलक, इ०.

गोलक [**फा०** गोलक्] **न०** रुपाया इ० नाणें

आंत शिरण्यापुरती चीर ज्याला पाडली आहे असें बारदान (दुकानांत असतें तसें).

गोलची स्त्री० तुळई, खांब, इ०च्या कडांना विशिष्ट आकार द्यावयाचें सुताराचें एक हत्यार (क्रि० मारणें).

गोलंदाज [फा० गोल=गोटा; अंदाख्तन्=फेकणें] पु०तोफेंतून गोळे उडविण्याचें काम करणारा इसम. ꕥ**गोलंदाजी** स्त्री०गोलंदाजाचा धंदा.

गोला पुढें ' गोल्या ' पहा.

गोलांगूल [सं० गो (गाय)+लांगूल (शेपूट)] पु० गायीच्या शेपटीप्रमाणें ज्याची शेपूट आहे आणि ज्याचा वर्ण काळा आणि गाल तांबडे असतात अशी वानराची एक जाति.

गोलांट (–ठ), **गोल्हांट**(–ठ) न० उडीचा एक प्रकार (मारणें, घेणें); ह्या उडींत डोकें खालीं आणि पाय वर होऊन मनुष्य पुन्हा पायांवर उभा राहातो.

गोली स्त्री० कोळपें, कुळव, इ० आउतांना लावलेले असतात ते अंकडे प्रत्येक.

गोल्या पु० १ एक प्रकारचें मुसळ; एका लाकडाच्या दांड्यांत एक दगडाचा गोटा बसविलेला असतो आणि लाकडाच्या मापट्यासारख्या नळकंड्यांत सडावयाचे तांदूळ घातलेले असतात ते ह्या वर वर्णिलेल्या मुसळानें सडावयाचे असतात; ह्या सडणाऱ्या लोकांना 'गोल्ये' किं० 'गोल्येवाले' म्हणतात. २ कोळप्याला बसविलेली असते ती लोखंडाची पट्टी. [कांतील.

गोंवई वि० गोमांतकासंबंधाचा किं० गोमांत-

गोवंड पु०, न०, **गोवंडा** स्त्री० रानांतील किं० डोंगरावरील जनावरांची वाट. ꕥ**एकादें काम गोवंडास लागणें** तें सुरळीतपणें चालत राहाण्याच्या स्थितीस लागणें; तें शिरस्तीनें चालूं लागणें. **एकादा माणूस गोवंडास लागणें** त्याच्या सर्व सोयी जमून त्याचें काम सुरळीतपणें चालूं लागणें; उ० रामाला मास्तर ठेविल्यापासून तो गोवंडास लागला (किं० त्याचे अभ्यास गोवंडास लागले). वरील दोन्ही वाक्प्रचारांत 'लागणें' प्रमाणें 'येणें' हें योजलें जातें.

गोवणें स० क्रि० १ मणि, फुलें, किं० दुसरे कांहीं पदार्थ सूत्रादिकांत ओवणें किं० कोणत्याही अन्य रीतीनें गुंतविणें. २ कोणेकाला कोणेका कामांत किं०स्थळीं स्थापित करणें. ३ लेखानें किं० वचनानें किं० अन्य प्रकारें एकाद्याला अडकावणें किं० बांधून टाकणें. ४ गुंतविणें. ५ घोटाळ्यांत किं० पेचांत अडकावणें किं० घालणें. ६ शब्दांत पकडणें.

गोवत्स [सं० गो=गाय; वत्स=वासरूं] पु० गायीचें वासरूं. ꕥ **गोवत्स द्वादशी** स्त्री० आश्विन वद्य द्वादशी; ह्या दिवशीं गाय आणि वासरूं यांची पूजा करण्यांत येते. ह्या दिवसाला ' वसुबारस ' असें व्यवहारांत म्हणतात.

गोवपा [सं० गो=गाय; वपा=चरबी]स्त्री० गाय किं० बैल यांची चरबी.

गोवर पु०,**गोवरें** न० मानवी शरीरावर देवीसारख्या शेकडो पुळ्या किं० पुटकुळ्या येतात तो रोग.

गोवर [हिं० गोबर] पु० १ गोवऱ्यांचा चुरा किं० चूर्ण. २ गुरांनीं गवत इ० खाल्ल्यावर खालीं जमीनीवर पडतो तो केरकचरा. ꕥ**गोवरकोंडा** पु० गुरांनीं गवत, कडबा, इ० खाद्यें खाल्ल्यावर जमीनीवर पडतो जो केरकचरा तो.

गोवरी स्त्री० १ शेण थापून त्याला वाटोळा आकार देऊन उन्हात वाळवून सर्पणाच्या उपयोगीं जो पदार्थ करतात तो; शेणी. २ चरावयाला गेलेल्या गायी म्हशींचें जें शेण पडतें तें जागच्या जागीं वाळून जो टणक पदार्थ होतो तो; ह्याचाही सर्पणाच्या कामीं उपयोग केला जातो. ꕥ **गोवरीची आग** स्त्री० १ गुप्तपणें मनांत जागृत ठेविलेलें वैर. २ असें वैर ज्याच्या मनांत आहे असा माणूस.

गोवरें न० वर ' गोवर ' पहा.

गोवर्धन पु० १ मथुरेजवळचा एक डोंगर; इंद्रानें उत्पन्न केलेल्या जलप्रलयापासून गोपांचें रक्षण करण्यासाठीं कृष्णानें गोपांस त्या डोंगरावर बसवून तो डोंगर करंगळीवर उचलून धरला होता अशी पौराणिक गोष्ट आहे. २ बलिप्रतिपदेच्या दिवशीं वल्लभसंप्रदायी लोक जो शेणाचा किं० तांदुळाचा किं० भाजीपाल्याचा ढीग करतात तो.

गोवळ, **गोवळगोठा** पु० गायींचा गोठा.

गोवळा, **गोवाळा** पु० १ गुराखी. २ मनु-

ष्याच्या शरीरावर ज्या स्फोटरूपी देवी येतात त्या शमविणारा देवता. ३ दूधखुळा. ४ पोरकटपणा करणारा मोठा माणूस.

गोवा [म० गोवणें] **पु०** १ गुंता; गुंतागुंत. २ घोटाळ्याची किं० पंचाइतीची स्थिति. ३ एखाद्या माणसाला एखाद्या कामीं अडकावून किं० डांबून ठेवणें.

गोवारी पु० गुराखी.

गोवारी स्त्री० एक झाड; याच्या शेंगांची [भाजी करतात.

गोविंद [सं०] **पु०** १ श्रीकृष्ण. २ एक पुष्पविशेष. ३ तांबडा किं० हिरवा असा मणिविशेष ॰**गोविंद-मणि पु०** तांबडा कांचेचा मणि,—ज्याला 'गोविंद' असा पर्याय शब्द आहे. **गोविंद द्वादशी स्त्री०** फाल्गुन शुद्ध द्वादशी. **गोविंदपुष्प न०** कावळीच्या झाडाचें पुष्प. **गोविंदविडा, गोंदविडा पु०** एका विशिष्ट आकाराचा केलेला विडा(मुखशुद्ध्यर्थ खावयाचा).

गोविंदी स्त्री० वाघेटी नांवाची एक वेल. हिच्या फळाला ' गोविंद ' म्हणतात.

गोवें न० १ अदमुरें जें दहीं तें. २ श्रमाशिवाय मिळालेला लाभ. ३ अकल्पित किं० अनपेक्षित प्राप्ति. ४ आपण प्रार्थना किं० याचना केलेली नसतां आपणास द्रव्यादि देणारा उदार माणूस. ५ इमारतींचें बांधकाम करणारांना उंचावर उभें राहाण्यासाठीं जी वासे फळ्या इ०ची रचना करतात ती; पहाड; परांची.

गोवेल पु०, स्त्री० गुरांना अपायकारक असें एक झुडूप,—याच्या फांद्या गवत इ०चे भारे बांधण्याच्या कामीं उपयोजिल्या जातात.

गोव्या वि० अजागळ; वेधळा.

गोशत [सं० गो (गाय)+शत (शंभराचा समुदाय)] **न०** शंभर गायींची ब्राह्मणाला दिलेली देणगी; शंभर गायींचें मूल्य द्रव्याच्या रूपानें ब्राह्मणाला दिलें जातें तें. हें बायकांचें एक व्रत असतें.

गोशपेच [फा०] **पु०** थंडीच्या दिवसांत डोकें आणि कान यांना गुंडाळतात तें वस्त्र किं० त्या वस्त्राचें असें वेष्टन; टापशी.

गोशमाली, गोशमाल, गोसमाल [फा० गोष्=कान; मालीदन्=घासणें] **स्त्री०** कान पिरगाळणें (शिक्षा करण्यासाठीं).

गोशा [फा० गोशाह्] **पु०** १ धनुष्याचें टोक. २ कातान्याच्या धनुकलीची किं० कशणीची मूठ. ३ वस्त्राचा सोगा. ४ निवाऱ्याची किं० खाजगी जागा किं० खोली.

गोशाला [सं० गो (गाय)+शाला (घर)] **स्त्री०** गायी म्हशी बांधावयाची जागा; गोठा.

गोशेरा, गोषेरा, गोश(-ष-) वारा [फा० गोषवाराह्] **पु०** सारांश; तात्पर्यार्थ; थोडक्यांत सांगितलेली हकीगत, एखाद्या हकीगतीचें संक्षिप्त रूप.

गोष्ट [सं० गोष्ठ=१ गोठा. २ सभा] **स्त्री०** १ हकीगत, वृत्तांत. २ कथा; मनोरंजक प्रसंगाचें किं० वृत्तान्ताचें कथन किं० निवेदन. ३ कांहीं काम किं० व्यवहार. ४ नाटक किं० कादंबरी यांचें कथानक. ५ केलेली कृति, बोललेला शब्द, मनांत आणलेला विषय, केलेलें आचरण, चिंतिलेला बेत; उ० तूं पुन्हा अशी गोष्ट करूं नको, बोलूं नको, चिंतूं नको, आचरूं नको, इ०. ६ एखाद्या माणसाचा किं० वस्तूचा उल्लेख किं० उच्चारण किं० निवेदन; उ० कालच्या सभेंत त्या जादूगाराची कांहीं गोष्ट निघाली नव्हती. ६ प्रकरण, बाबत. ७ स्थिति किं० परिस्थिति मनांत घेऊन एखाद्यानें केलेलें, बोललेलें, आचरलेलें जें कांहीं तें (त्याची स्थिति किं० परिस्थिति मनांत घेऊन); उ० रामभाऊ बोडक्यानें बुधवारांत जातो म्हणून तूं जाऊं नकोस हो; त्याची गोष्ट वेगळी आणि तुझी वेगळी. ॰**एखाद्याची गोष्ट काढणें** त्याच्या वाटेस जाणें; त्याची कुरापत काढणें. **तूं येथें त्या व्यवहाराची गोष्ट बोलूं नको** त्या व्यवहारासंबंधानें अक्षरसुद्धां बोलूं नको. **लांब लांब गोष्टी सांगणें** किं० **गोष्टी बोलणें** बढाया मारणें. **गोष्टमात स्त्री०** गप्पा टप्पा. **गोष्टी वेल्हाळ वि०** १ गोष्टी ऐकण्याचा किं० सांगण्याचा नादी किं० शोकीन. २ बुलबुल करणारा; उ० तुमची चिंगी भारी गोष्टीवेल्हाळ आहे बोवा ! **गोष्टी श्राद्ध न०** १ श्राद्धविधि यथासांग करणें द्रव्यादि प्रतिकूलतेमुळें अशक्य असतें तेव्हा जो श्राद्धविधीचा प्रकार सांगितला आहे त्याप्रमाणें श्राद्ध करणें. २ अनेकविध ज्या निरर्थक गोष्टी किं० गप्पाटप्पा त्या; उ० आतां तुझें हें गोष्टीश्राद्ध पुरें कर, माझें डोकें उठलें.

गोष्ठ [**सं०**] **पु० न०** १ गायी म्हशींचा गोठा. २ वासस्थान. **पु०** सभा ⊛ **गोष्ठश्व पु०** १ कुभांडी. **गोष्ठेपंडित पु०** १ शेंदाड शिपायी. २ बढाईखोर माणूस. **गोष्ठेपटु, गोष्ठेशूर, गोष्ठेप्रगल्भ वि०** लांब लांब बाता झोकणारा कर्तृत्वशून्य माणूस.

गोष्पद [**सं०**] **न०** १ गायीचें पाऊल. २ गायीच्या पावलाचें चिखल इ० मध्यें वठलेलें चिन्ह. ३ अत्यंत लहान डबकें. ⊛ **गोष्पदोपम वि०** सुसाध्य; सहज मिळण्याजोगें; सुकर; सुलभ.

गोसा पु० १ धनुष्याचें टोक. २ अंगरखा, झगा, इ० चा घोळ किंवा घेर.

गोसाव (–म–) डा [खालीं 'गोसावी' पहा.] **पु०** गोसावी (तुच्छतेनें).

गोसाव (–म–) पण [खालीं 'गोसावी' पहा] **न०** गोसाव्याची स्थिति, दर्जा, किं० राहाणी.

गोसावी, गोसामी [**सं०** गो (इंद्रिय)+ स्वामिन् (नियंत्रणेंत ठेवणारा)] **पु०** १ जो शूद्रादिक संसार सोडून शेंडी काढून टाकून भगवी वस्त्रें धारण करतो तो. २ कथा करणारा जो हरिदास त्याला द्यावयाची पदवी. ३ (लाक्षणिक) ज्याला घरदार, बायकोपोरें इ० नाहींत तो. ४ पलांत शूद्रांस द्यावयाची बहुमानाची पदवी; उ० तुकोजीराव मोरे गोसावी यांसी. ५ मालक, धनी. ६ मातीची चिमणी,–वाजवावयाची. ७ एक लहान राखी रंगाचा पक्षिविशेष. ८ तव्याच्या वरच्या बाजूस राख लावून त्यावर भाजलेली भाकरी.

गोस्तनी [**सं०**] **स्त्री०** द्राक्ष.

गोस्वामी [**सं०** गो० (गाय, इंद्रियें)+ स्वामिन् (नियंत्रणेंत ठेवणारा)] **पु०** १ गवळी. २ गोसावी. ३ बहुमानाची पदवी.

गोहण स्त्री० गुरांना कडबा, गवत, इ० सोयीनें खातां यावें आणि तें फारसें विसकटलें जाऊं नये म्हणून जी वासा आडवा घालून बंदिस्त जागा केलेली असते ती; गव्हाण; गव्हाणी.

गोहरा, गोहोरा, गोऱ्हा पु० गायीचें नर-अपत्य. ⊛**गोहऱ्यानें शेत आणि पोरानें संसार होत नाहीं** –या त्या कामाला समर्थ अशींच माणसें किं० साधनसामग्री असल्याशिवाय तीं तीं कामें चांगलीं होऊं शकत नाहींत. [पहा.

गोही, गोहीदार ' ग्वाही, ' ' ग्वाहीदार '

गोहो पु० १ पति, नवरा. २ वयांत आलेला पुरुष. ३ एखाद्या माणसाला नियंत्रणेंत ठेवावयाला किं० आवरावयाला समर्थ असा माणूस; उ० मी त्याचा गोहो आहे; तो कसें नाहीं हें काम करीत तें पहातों. ४ एखाद्या रोगाचें निवारण करावयाला समर्थ असें औषध; रामबाण औषध; उ० हें औषध पित्ताचा गोहो आहे.

गोहोत न० १ गुरांना खावयाला देतात तें आंबोण,–कोंडा, पेंड, चुरी, इ० चें शिजविलेलें मिश्रण. २ अनेक पदार्थांची गल्लद म्ह० घोटाळलेपणाची स्थिति. [पहा.

गोहोरा पु० गायीचें नर अपत्य. वर 'गोहरा'

गोळक पु० हिंदूंची एक जाति. वर 'गोलक' पहा.

गोळंबी स्त्री० पाण्यांतील एक लहान प्राणी.

गोळंकारी [**म०** गोळा+आकार] **पु०** वार्धक्यानें किं० आजारानें ज्याच्या गात्राचा गोळा झाला आहे तो.

गोळा [**सं०** गोल] **पु०** १ मध्य बिंदूपासून परिघाच्या प्रत्येक बिंदूपर्यंत ज्याचें सारखे अंतर असतें असा भरीव किं० पोकळ पदार्थ; वाटोळा पदार्थ; चेंडू. २ वाटोळा किं० साधारण वाटोळा पदार्थ,–शेणाचा, मातीचा, पिठाचा गोळा. ३ ढिखूळ,–माती इ० चें. ४ कांहीं व्यक्ति किं० पदार्थ समुदायाच्या दृष्टीनें; उ० ती मारामारी पहावयाला शंभर लोक गोळा झाले होते; उ० वर्गणी पन्नास रुपये गोळा झाली; उ० त्या पोरानें सुपाऱ्या उडविल्या त्या गोळा कर. ५ मोतें घ्यावयाची ऐपत नसल्यामुळें तारेंत ओवून नथ इ० दागिन्यांत मोत्याच्या ऐवजीं जो चांदी इ० चा वाटोळा पदार्थ करून घालतात तो. ६ हस्तपादादि गात्रें ज्याला असावीं तितकीं नाहींत किं० त्यांचा उपयोग करण्याचें ज्याला सामर्थ्य नाहीं असा माणूस किं० जनावर; उ० माझा भाऊ लढाईवर गेला होता त्याच्या गुडघ्याखालचे दोन्ही पाय तोफेनें तुटून तो गोळा होऊन परत आला आहे; उ० अर्धांगवायूनें रामभाऊंचा अगदीं गोळा झाला आहे. ७ भोजन, जेवण, (वैतागांत): उ० मी आतां कुटुंबांतील एकटा माणूस राहिलों आहें, मला कोणीही गोळा

खाऊं घालील. ८ स्त्री नासावून पडतो जो अव्यक्त गर्भ तो. ९ कित्येक फळांच्या नांवापुढें किं०बीजांपुढें 'गोळा' हा शब्द घालतात त्या योगें अर्थांत कांहीं बदल किं० फारसा बदल होत नाहीं; उ० बदामगोळा, पिस्तेगोळा, काजूगोळा, ताडगोळा, ढंडगोळा, इ०. ꙮ **गोळा करणें** विसकटलेले एके जातीचे पदार्थ एकत्रित करणें; एका वर्गांतील किं० समूहांतील अस्ताव्यस्त पसरलेल्या व्यक्ति एके जागीं आणणें किं० त्यांना संघटित रूप किं०आकार देणें. **गोळा गिळणें** लाच खाणें; लाच घेणें किं० घेऊन पचविणें. **गर्भिणीनें गोळा टाकणें** तिनें नासावणें. **गोळाभर अन्न** पोट भरण्याइतकें अन्न,— केवळ देहधारणेचें साधन ह्या दृष्टीनें; विलासाचें साधन ह्या दृष्टीनें नव्हे; उ० कालपासून तें पोर उपाशीं होतें, त्याला मीं गोळाभर अन्न खाऊं घातलें तेव्हां त्याला बोलावयाची ताकद आली. **गोळे मारणें** गपागपा घास तोंडांत घालून फारसें चर्वण न करतां गिळणें किं० घशाखालीं ढकलणें. ꙮ**गोळेगांवाला वेढा घालणें**(किं० **पडणें**) जेवावयाला (कोणी माणूस) बसलेला असणें.

गोळागोळी स्त्री०बंदुकांच्या गोळ्या किं० तोफांचे गोळे एकमेकांवर सोडण्याची किं० मारण्याची क्रिया. **गोळाबेरीज स्त्री**० १सर्व बेरजा एकत्र मिळवून होते जी मोठी बेरीज ती;वट्ट बेरीज. २ सारांश; तात्पर्यार्थ. **गोळाबेरीज करणें** एकंदर खर्चाची रक्कम सांगणें,—पोट रकमांचा निर्देश न करतां (खोट्या रकमा किं० फुगविलेल्या रकमा यजमानाच्या लक्ष्यांत न याव्या ह्या उद्देशानें). **गोळा भाजी स्त्री**० पीठ घालून आणि बराच जलांश राखून केलेली भाजी,—जी हाताच्या बोटांनीं पानांत वाढतां येते आणि जी पानांत वाढली असतां पसरत नाहीं म्ह० इकडे तिकडे धावत नाहीं; ह्याच्या उलट पातळ भाजी,—जी पळीनें वाढावी लागते किं० भगरा भाजी किं० कोरडी भाजी जींत जलांश अगदीं थोडा असतो; मेथी इ० कांहीं भाज्या तीन्ही प्रकारच्या करतां येतात.

गोळांगूळ मागें ' गोलांगूल ' पहा.

गोळाविणें स० क्रि०१ एकत्रित करणें; पदार्थांचे इतस्ततः पसरलेले किं० पडलेले भाग एके ठिकाणीं आणणें; जमविणें. २ द्रव्यादि संपत्ति जमविणें म्ह० संपादणें किं० मिळविणें.

गोळिंब, गोळीम, स्त्री० 'गोळंबी' पहा.

गोळी स्त्री० १ लहान गोळा;गोटी; उ०औषधाची गोळी; बंदुकीची गोळी. २एक रोगविशेष,— जो झाला असतां मनुष्य तत्काळ मरतो. ꙮ**एकाद्या माणसाला किं० जनावराला गोळी घालणें** त्याला ठार मारण्यासाठीं त्याच्या अंगावर बंदुकीची गोळी सोडणें. **गोळी घालणें** औषधाची गोळी एकाद्याला खाऊं घालणें किं० खावयाला देणें. **गोळी लागणें** भोजनाचे प्रसंगीं माशी पोटांत गेल्यानें वमन होणें. **गोळी चढविणें** तलफेच्या वेळीं अफू, तंबाखू, इ०भक्षिणें; उ० दुपारीं चार वाजतां गोळी चढविल्याशिवाय मला कांहीं काम सुचत नाहीं.

गोळीबार पु० बंदुकीनें गोळ्या मारणें; बंदुकीनें गोळ्या सोडणें; उ० तेथें जमलेल्या लोकांवर गोळीबार करण्यांत आला. **गोळीचा टप्पा, पु**० **गोळ्याचा टप्पा पु**०बंदुकीची गोळी किं०तोफेचा गोळा जितक्या अंतरावर जाऊन पडेल तितकं अंतर.

गोळ्या पु० १ एक प्रकारचें मातीचें भांडें; गाडला. २ तांदूळ सडणारा माणूस; गोल्या. मागें ' गोल्या ' पहा.

गोल्हाट न० मानवी देहांतील एक स्थान; ह्याला **गोल्हाटचक्र न**० असें दुसरें नांव आहे.

गौ [**सं**० गो] **स्त्री**० गाय. **गौकोश पु**० गायीचा शब्द जेथवर ऐकूं जाईल तेथपर्यंतचें अंतर.

गौड [**सं**०] **वि**० १ गुळाचा बनविलेला. २ गुळासंबंधाचा. पु० ब्राह्मणांची एक जाति.

गौड न०मिठाई. ꙮ **गौडबंगाल** [गौड आणि बंगाल हे देश] **न**० मंत्रसामर्थ्यानें एकादा पदार्थ एकाद्या ठिकाणीं उत्पन्न करणें, किं० तेथें असेल तो पदार्थ नाहींसा करणें, इ० अद्भुत गोष्टी करण्याची विद्या ती; कारण उपस्थित असतां कार्य न घडूं देणें आणि कारण उपस्थित नसतां कार्य घडवून आणणें इ० प्रकार ज्या विद्येच्या सामर्थ्यानें करतां येतात ती विद्या. **गौडसारंग पु**० (संगीतांत) एक रागविशेष.

गौडी [**सं**० गुड=गूळ] **स्त्री**० गुळापासून [केलेली दारू.

गौडी स्त्री० एक रागिणी.

गौडी स्त्री० १ गुळाची दारू. २ काव्याच्या वैदर्भी, पांचाली, लाटी, गौडी, वगैरे ज्या अनेक भाषाशैली आहेत त्यांपैकीं एक.

गौंडी, गवंडी पु० दगड, विटा, चिखल, चुना, इ० साधनसामग्रीनें घराच्या भिंती बांधणें, ओटे घालणें, कमानी उभारणें, फरसबंदी करणें, इ० कामें करणारी जात किं० त्या जातीचा कोणीही इसम किं० तीं कामें करणारा दुसऱ्या जातीचा कोणीही इसम.

गौंड्या पु० वर 'गौंडी' पहा.

गौण [**सं०**] **वि०** १ मुख्य नव्हे असें; अप्रधान. २ कमी महत्त्वाचें. ३ (गणितांत) गुणाकारासंबंधाचा. ४ औपचारिक. **न०** उणेपणा; अभाव; अविद्यमानता; उ० तुमच्या मेजवानीचा आजचा थाट उत्कृष्ट होता पण वाळ्याचें पाणी तुम्ही केलें नव्हतें इतकेंच काय तें त्यांत गौण होतें. ꣸**गौण मानणें** खालच्या दर्जाचा किं० हलक्या प्रतीचा समजणें. **गौणकल्प पु०** १ मुख्य नव्हे असा जो कल्प म्ह० उद्देश किं० ध्येय तें. २ जो पाहिजे तो पदार्थ विद्यमान नसतां त्याचें काम भागविणारा जो दुसरा पदार्थ त्याचेबद्दल घेऊन गरज भागवितात तो. **गौणपक्ष पु०** जें करणें योग्य तें शक्य नसतां त्याच्या खालोखाल जें दुसरें चांगलें तें किं० त्याचा स्वीकार. **गौणमुख्यन्याय** दोन पदार्थांत तारतम्य करण्याची सरणी.

गौणी [**सं०**] **वि०** ज्या लक्षणेंत वाच्यार्थ आणि शब्दार्थ या दोहोंमध्यें सादृश्य संबंध असतो अशी (लक्षणा); विशेष तपशील आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा.

गौतमी [**सं०**] **स्त्री०** १ गोदावरी नदी. २ गोमाता, गाय.

गौप्य [**सं०** गोप्य] **वि०** गूढ; लपलेलें. **न०** रहस्य; गुप्त जें कांहीं तें; हितगुज.

गौर [**सं०**] **वि०** १ पांढरा; श्वेतवर्ण. २ पिवळसर. ३ तांबूस. ४ चकचकीत.

गौर [**सं०** गौरी] **स्त्री०** १ पार्वती. २ ऋतुदर्शन जिला अद्यापि झालें नाहीं अशी मुलगी. ꣸**गौर जागविणें** गौरीच्या पूजनार्चनाचा एक भाग; गौरीपुढें जागत बसून कांहीं खेळ खेळणें, किं० कांहीं पाठ म्हणणें, इ०. **गौर रुसली आणि सौभाग्य घेऊन बसली** गौर माझ्यावर कोपली तर कोपेना ! मला काय तिची परवा आहे ? ती फार झालें तर माझा नवरा मारील ! मला नवऱ्याची काय किंमत आहे ? माझ्या वरिष्ठाची मी कशाला भीति बाळगूं ? फार झालें तर तो मला नोकरीवरून काढून टाकील, मला दुसऱ्या शंभर नोकऱ्या मिळतील (वैतागाचा उद्गार).

गौरव [**सं०**] **न०** १ वजन, जडपणा. २ श्रेष्ठपणा, महत्त्व. ३ आदर, संमान. ४ अर्थगांभीर्य. ५ स्वराचें गुरुत्व; उ० 'राघव' ह्या शब्दांत 'रा' ह्या अक्षराला गौरव आहे. टीप,—२ आणि ३ ह्या अर्थीं मराठींत कधीं कधीं 'गौरव' शब्द पुल्लिंगीं योजतात. मराठींत 'गौरव'चे आणखी पुढील४अर्थ (सर्व नपुंसकलिंगी)आहत. १ मानमान्यता, आदरसत्कार. २ वजन, इष्टकार्य कोणेकाकडून करवून घेण्याचें सामर्थ्य; उ० त्या दलालाजवळ माझें गौरव आहे (म्ह० त्याचेकडून मी हावें तें मिळवूं शकेन किं० करवूं शकेन. ३ थाटमाट. ४ त्रास, कष्ट, दुःख; उ० घोडा असतां पायीं चालण्याचें गौरव कशाला ?

गौरवणें [**सं०** 'गौरव' पासून] **अ०क्रि०** पेहेरलेला कपडा, नेसलेलें धोतर, किं० डोक्यावर धारण केलेलें शिरोभूषण अंगावर जळणें किं०पेटणें; उ० विस्तवाच्या इतका जवळ बसूं नको,—तुझें धोतर गौरवेल. सुवासिनीच्या सौभाग्याचे पदार्थ कुंकूं, बांगड्या, इ०ना संपणें, फुटणें, इ० क्रियापदें न योजतां वाढणें किं० वाढवणें हीं क्रियापदें योजलीं जातात हें लक्ष्यांत घेण्याजोगें आहे.

गौरावणें, गौरवणें [**सं०** 'गौरव' पासून] **स० क्रि०** १ संमानानें वागविणें; कोणेकाला बहुमान देणें. २ (कोणेकाला) प्रशंसिणें किं० स्तविणें. ३ (कोणेकाचें) महत्त्व वाढविणें. ४ चांगला अंश खुलून किं० उठून दिसेल अशा प्रकारें कोणा माणसाचें किं० पदार्थाचें वर्णन करणें.

गौरवी [**सं०** गौरव+मराठी प्रत्यय] **वि०** सभ्य, शिष्ट.

गौरी [**सं०**] **स्त्री०** १ जिला अद्यापि रजोदर्शन झालें नाहीं अशी मुलगी. २ भूमि. ३ वरुणाची स्त्री. ४ पार्वती,—शंकराची पत्नी ५ हळद. ६ दहा वर्षांची अविवाहित मुलगी. ꣸**गौरीहर पु०** विवाहाच्या विधीच्या अंगत्वानें पार्वती आणि शंकर यांची पूजा नवरी मुलगी

करते तेव्हां स्थापिलेल्या गौरी आणि हर यांच्या मूर्ति समुच्चयानें. ज्येष्ठागौरी, ज्येष्ठागौर स्त्री० भाद्रपद मासीं ज्येष्ठा नक्षत्रावर पूजितात ती देवी. गजगौरी स्त्री० हत्तीवर बसविलेल्या गौरीची मूर्ति,–जी भाद्रपद मासीं हस्ताकीं स्त्रिया पूजितात. गौरीचा हळवा पु० नाचणीची एक जात. गौरीचे डोहाळे पु० अ० व० चैत्रांत पडतो तो पाऊस. गौरीतृतीया स्त्री० चैत्राच्या शुक्लपक्षांतील तृतीया. [शेणाची थापटी.

गौरी, गावरी स्त्री० सर्पणार्थ करतात ती

गौल्यता [सं० गोल] स्त्री० १ मृदुपणा. २ मधुरपणा. ३ लिहिलेल्या अक्षराचा सुंदरपणा.

गौसणी, गौळण, गौळी मागें ' गवसणी, ' ' गवळण, ' ' गवळी ' पहा.

ग्रंथ [सं०] पु० १ बांधणें. २ रचना. ३ पुस्तक, पोथी.४ एक अनुष्टुभ् श्लोक इतकी रचना किं० बत्तीस अक्षरांचा समुदाय (ग्रंथ मोजण्याचें मान); उ० महाभारत एक लक्ष ग्रंथ आहे म्हणजे महाभारतांत एक लक्ष अनुष्टुभ् श्लोक आहेत. ५ मांडणी (वस्तूंची). ६ (मराठींतील विशेष अर्थ); विस्तार; अद्वातद्वा बोलणें किं० लिहिणें; कुभांड रचणें; शिवीगाळ करणें. ७ कांहीं घडलेल्या व्यवहाराचा तपशील किं० साद्यंत हकीगत. **ग्रंथकर्ता, ग्रंथकार पु०** ग्रंथ करणारा किं० रचणारा. **ग्रंथान्तर न०** दुसरा ग्रंथ.

ग्रंथणें [सं० ग्रंथ्=बांधणें, गुंफणें] स० क्रि० १ गुंफणें; जोडणें; अनेक पदार्थ एका विशिष्ट सरणीनें मांडणें, बांधणें, किं० रचणें. २ (कविता) रचणे.

ग्रंथन, ग्रथन [सं० ग्रंथ्=बांधणें, गुंफणें] न० रचण्याचा, बांधण्याचा, किं० गुंफण्याचा व्यापार.

ग्रंथि, ग्रंथिका [सं०] स्त्री० १ गांठ,–दोरी, वस्त्र, इ० ची. २ गळूं, लांकूड इ०तील टणक किं० कठिण भाग. ३ धान्याच्या ताटाचा किं० उसाचा दोन पेरांमधील सांधा. ४ गुंतागुंत; घोटाळ्यांत पाडणारा, किं० न उकलणारा, किं०न समजणारा भाग. ५ नियंत्रणा. ६ कूट.

ग्रथित [सं०] वि० बांधलेला; जुळविलेला, रचलेला; गुंफलेला. २ कवितेच्या रूपांत घातलेला किं० मांडलेला.

ग्रसणें, ग्रासणें [सं० ग्रस्=खाणें, पीडिणें, नासणें] स० क्रि० १उपद्रविणें, पीडिणें.२ (लाक्षणिक) लुप्त किं० अदृश्य करणें. ३ (लाक्षणिक) कोणेकाची पिच्छा पुरविणें.

ग्रसित, ग्रस्त[सं०ग्रस्=खाणें, पीडिणें]वि० १ उपद्रावेलेला, पीडिलेला. २ खाऊन टाकिलेला. ३ आक्रमिलेला. ४ कबज्यांत घेतलेला. ५ नियंत्रणेंत घातलेला. ६ (बोलतांना) न उच्चारलेला (शब्द किं० अक्षर). ७ लाच ह्या नात्यानें खाल्लेला (पैसा).८दुसऱ्याच्या कारभारांत लबाडीनें लाटलेला किं० मारलेला (पैसा). ❀ **ग्रस्तास्त न०** सूर्य किं० चंद्र यांना ग्रहण लागून तें सुटावयाच्या अगोदर त्यांचा झालेला अस्त म्हणजे त्यांचें मावळणें. **ग्रस्तोदय पु०** ग्रहण लागलेल्या स्थितीत सूर्य किं० चंद्र यांचा उदय म्ह० उगवणें.

ग्रह [सं०] पु० १ घेणें, धरणें, पकडणें, पछाडणें. २ ग्रहण,–सूर्य, चंद्र, इ०चें.३सूर्यादि जे नऊ ग्रह ते प्रत्येक.४ब्रह्मराक्षसादि पिशाच.५(लाक्षणिक) उपद्रव करणारा माणूस. ६ पकड, कबजा, नियंत्रणा. ७ मत, समज, समजूत. ८ कल्पना. ❀**ग्रहचार पु०**सूर्यादि ग्रहांची स्थिति. **ग्रहाधीश पु०** सूर्य.**ग्रहाधार पु०**ध्रुवाचा तारा. **ग्रहामय पु०** अपस्मार. **ग्रहचिंतक पु०** ज्योतिषी. **ग्रहदशा स्त्री०** ग्रहाची परिणामकारक स्थिति. **ग्रहमख पु०** ग्रहांप्रीत्यर्थ होम.**ग्रहपीडा, ग्रहबाधा स्त्री०**अशुभ ग्रहांच्या योगानें आलेलें दारिद्र्य, आजार, दुःख, इ०. **ग्रहदान न०** ग्रहांचें आनुकूल्य व्हावें म्हणून तत्प्रीत्यर्थ जें ताम्रादि दान करतात तें.**ग्रहबल न०** कांहीं एक कर्म करण्याविषयीं विवक्षित राशीस जें ग्रहांचें आनुकूल्यरूप बल तें.**ग्रहसाधन न०**कोष्टकादिकांवरून अमुक ग्रह अमुक स्थळीं, अमुक ग्रहांची अमुक गति, इ०जाणावयाचें जें साधन तें.**ग्रहसारणी स्त्री०** ग्रहसाधनोपयोगी जें अंकजाल असतें तें.

ग्रहण [स० ग्रह्=धरणें, पकडणें] न० १ अमावास्येस किं० पौर्णिमेस सूर्याचे आड चंद्र आल्यामुळें किंवा चंद्रावर भूमीची छाया पडल्याकारणानें जे त्या बिंबाचें आच्छादन होतें तें. २ बुद्धीनें किं० ज्ञानेंद्रियांनीं एकादा विषय आकलणें किं० जाणणें. ३ हस्तादिकांनीं धरणें किं० पकडणें. ३ घेणें, स्वीकार. ४ जाणणें, ज्ञान. ५

शिकणें. ६ ज्ञानेंद्रिय. ॐ **ग्रहणाशौच न**० ग्रहणामुळें आलेला विटाळ,—जो स्नान केल्यानें निरस्त होतो.

ग्रहणि (–णी) [**सं**० ग्रह्=धरणें, पकडणें] **स्त्री**० १ लहान आंतडें. २ हगवण.

ग्रांथिक [**सं**० ग्रंथ] **वि**० १ ग्रंथासंबंधीं. २ ग्रंथांत आढळणारा. ३ गुंफिलेला. **न**० ग्रंथसंग्रह; एका विशिष्ट भाषेंतील सर्व ग्रंथ समुच्चयानें.

ग्राम [**सं**०] **पु**० १ गांव. २ समूह. ३ षड्जादि स्वर. ४ समाज, जात. ५ गाण्यामध्यें सप्तस्वरांतील जे मुख्य तीन अवधि ते प्रत्येक. ६ अनेक कचाटें उठवून दुसऱ्याचा पराभव करतो असा मनुष्य; उ० तो कसला ग्राम ! त्याजबरोबर भांडून तुझा निभाव लागणार नाहीं. ॐ **ग्रामकंटक, ग्रामकुठार पु**० गांवांतील लोकांच्या चहाड्या सरकारांत सांगून त्यांचें नुकसान करणारा माणूस. **ग्रामजोशी पु**० गांवकरी लोकांचीं ज्योतिषाचीं कृत्यें करतो तो; गांवकऱ्यांना एकादशी, ग्रहणें, चतुर्थी, प्रदोष, इ० कधीं आहेत ही माहिती सांगतो तो. **ग्रामदेवी, ग्रामदेवता स्त्री**० गांवाची मुख्य देवी,–जिला मंगलप्रसंगीं पहिलें आमंत्रण दिलें जातें. **ग्रामनेत्र** गांवचा महार. **ग्रामयाजक पु**० गांवकऱ्यांचीं धर्मकृत्यें करणारा किं० चालविणारा. **ग्रामलेखक पु**० कुलकर्णी. **ग्रामसिंह, ग्रामकेसरी पु**० कुतरा.

ग्रामकी [**सं**० ग्राम+ई (मराठी प्रत्यय)] **स्त्री**० १ ग्रामजोशाचें कर्तव्य किं० दर्जा किं०मान. २ गांवाच्या पुढाऱ्याचा दर्जा.

ग्रामणी [**सं**०] **पु**० १ गांवाचा पाटील. २ गांवांतील खोडसाळ आणि उपद्रवी माणूस; गांवांत भांडणें पेटविणारा; गांवांत कुटाळक्या करणें हा ज्याचा धंदा तो. ३ गांवचा महार.

ग्रामण्य [**सं**० ग्राम=गांव] **न**० धर्मविरुद्ध कोणी आचरण केल्यास त्याला जातींतून बाहेर टाकणें किं० बाहेर टाकलेल्या माणसाला परत जातींत घेणें इ० संबंधाचें काम.

ग्राम्य [**सं**० ग्राम] **वि**० १ गांवासंबंधीं. २ खेडवळ. ३ असभ्य. ४ अश्लील. ५ विषयलंपट. ६ माणसाळलेलें (जनावर, इ०). **न**० अश्लाघ्य गोष्ट. ॐ **ग्राम्यश्व पु**० गाढव. **ग्राम्यकर्म न**०, **ग्राम्यधर्म पु**० मैथुन. **ग्राम्यमृग पु**० कुतरा.

ग्रास [**सं**० ग्रस्=खाणें] **पु**० १ घास. २ अन्न. ३ गिळणें. ४ (**ज्योतिष**) ग्रहण. ५ सूर्य इ० चा ग्रहण लागलेला भाग. ॐ **एकाद्याच्या तोंडचा घास काढणें** (किं० **नेणें**) त्याच्या चरितार्थाचें साधन नष्ट करणें.

ग्रासणें [**सं**० ग्रस्=गिळणें] **स**० **क्रि**० १ खाणें; खाऊन टाकणें. २ पीडिणें; उपद्रविणें. ३ (लाक्षणिक) झाकणें, आच्छादणें. ४ अत्यंत उपद्रवकारक होणें. ५ पूर्णपणें आकृष्ट करणें. ६ पिच्छा पुरवून त्रासविणें.

ग्राह [**सं**० ग्रह्=धरणें, पकडणें] **पु**० १ पकडणें; पकड. २ कैदी. ३ सुसर. ४ स्वीकार. ५ ज्ञान. ६ समज, कल्पना. ७ हेका. ८ कोणताही मोठा जलचर प्राणी.

ग्राहक[**सं**०ग्रह्=धरणें, पकडणें] **वि**०१घेणारा. २ बाजारांत कांहीं पदार्थ विकत घेणारा; गिऱ्हाईक. ३ जाणणारा. ४ चित्ताकर्षक. ५ विष उतरविणारा. ६ काव्य, चित्र, गायन, इ०चें मर्म समजणारा किं० त्यांत रमणारा. ॐ **ग्राहकबुद्धि स्त्री**० शास्त्र, काव्य, संगीत, चित्र, इ० मध्यें रमणारी किं० इ०चे गुणदोष जाणणारी बुद्धि.

ग्राहीक [**म**० ' ग्राहक ' चा अपभ्रंश] **पु**० ग्राहक; गिऱ्हाईक.

ग्राह्य [**सं**० ग्रह्=घेणें] **वि**० घेण्याजोगा; घेण्यास योग्य. ॐ **ग्राह्यांश पु**० १ एकाद्या वस्तूंतून घेण्यालायक भाग. २ तात्पर्य, सारांश.

ग्रीवा [**सं**०] **स्त्री**० मान.

ग्रीष्म [**सं**०] **पु**० १ उन्हाळा. २ उष्णता. ३ ज्येष्ठ आणि आषाढ ह्या दोन महिन्यांच्या अवधीचा काळ; किं० वृषभ आणि मिथुन ह्या दोन राशींत सूर्य आहे तोंपर्यंतचा काळ. ॐ **ग्रीष्मर्तु पु**० ग्रीष्म ऋतु; उन्हाळा.

ग्लानि [**सं**०ग्लै=थकणें, मूर्छित होणें] **स्त्री**० १ थकवा. २ म्लानपणा, शक्ति, उत्साह, किं० तरतरी, ओहोटल्याची स्थिति. ३ दुबळेपणा. ४ अपकर्ष; उतरती कळा.

ग्वाही [**फा**० गवाही] **पु**० साक्षीदार. **स्त्री**० साक्षी. ॐ **ग्वाहीदार पु**० साक्षीदार.

घ.

घ मराठी व्यंजनमालेंतील चवथें व्यंजन.

घंगाळ, घंघाळ [**सं०** गंगालय] **न०** पसरट तोंडाचें, लहान बुडाचें आणि उचलावयाला कड्या असलेलें तांब्याचें किं० पितळेचें भांडें; गंगाळ. अंघोळीचें पाणी घेण्याच्या किं० चिरगुटें धुण्याच्या कामीं ह्या पात्राचा उपयोग पूर्वीं केला जात असे; विलायती बालद्या प्रचारांत आल्यापासून हीं घंगाळें लोक हल्लीं वापरीत नाहींत. ❀ **घंगाळपोतें, घंगाळें टोपलें न०** मागें ' गंगाळ ' मध्यें पहा.

घघा [**म०** ' घेणें ' चें पहिलें अक्षर ' घ ' यावरून] **पु०** घेणें; हा शब्द पुढील वाक्प्रचारांत मात्र येतो. **घघाची विद्या, घघाची बाराखडी स्त्री०** घेण्याची क्रिया; दुसऱ्याचा पदार्थ लाटण्याचें कौशल्य; उ० त्याला एक घघाची विद्या किं०बाराखडी येते आहे किं० ठाऊक आहे. याच्या उलट ददाची विद्या किं० ददाची बाराखडी म्ह० देणें; देण्याकडे कल; औदार्य.

घंघाळी स्त्री० एका जातीची माशी.

घट [**सं०**] **पु०** १ पाणी, इ० ठेवण्याच्या उपयोगाचें माती, धातु, इ०चें बनविलेलें पात्र,—याचें तोंड लहान असून पोट मोठें असतें; घागर; घडा. २ ईश्वरानें उत्पन्न केलेलें जें सर्व जग तें किं० त्या जगांतील सर्व पदार्थ समुच्चयानें; उ० सर्व घटीं ईश्वर आहे. ३ नवरात्रादिकांच्या प्रसंगीं जलपूरित घट जो कांहीं विशिष्ट संस्कारानें स्थापितात तो. **स्त्री०** धान्यादि पदार्थ मोजले असतां ते भरावे तितके न भरतां जें परिमाण कमी येतें (नासणें, आटणें, वाळणें, इ० कारणांनीं) तें;तूट, तुटवडा; तुटार; उ०खंडीभर भात मोजलें त्यास चार पायली घट आली.❀ **घटीं बसणें** १ आराध्यादि विवक्षित देवतेनें स्थापित घटाच्या आश्रयानें राहाणें किं० घटस्थापक यजमान किं० आचार्य यांनीं घटोत्थापनापर्यंत व्रतनियमानें असणें. २ घरांत बसून राहाणें, —आळसानें किं० आजारामुळें. ३ स्त्रीनें मासिक रजःस्रावाच्या कारणानें एकीकडे निरुद्योगीपणाच्या स्थितींत बसून राहाणें. ४ पैशाचा तगादा करावयाला आलेल्या माणसानें देणेकऱ्याच्या दारांत बसून राहाणें (वात्रटपणाचा प्रयोग). ५ कांहीं याचना करावयाला आलेल्या माणसानें याचना सफल केली जाईतोंपर्यंत लोचटपणानें बसून राहाणें.❀**घटोध्नी स्त्री०** मोठ्या कासेची गाय. **घटदासी स्त्री०** कुंटीण. **घटपर्यसन न०, घटस्फोट पु०** पतित जो माणूस तो जिवंत असतां तो मृत झाला असें गृहीत घेऊन त्याचें और्ध्वदेहिक करण्याचा विधि; पतित असून जो प्रायश्चित्त घ्यावयाला नाखूष असेल त्याच्यासंबंधानें हा विधि करण्यांत येतो.**घटस्थापन न०, घटस्थापना स्त्री०** नवरात्र इ० प्रसंगीं यथाविधि घटाची स्थापना करणें. **घटसर्प** खालीं 'घाटसर्प' यथास्थानीं पहा.

घटक [**सं०** घट्=घडणें; संयोग करणें] **वि०** १ झटणारा. २ जुळवून आणणारा. ३अवयवभूत; उ० आक्सिजन आणि हायड्रोजेन हीं पाण्याचीं दोन घटक द्रव्यें आहेत. **पु०** १ मध्यस्थ.२लग्नें जुळविण्याचा धंदा करणारा.३ खटपट्या; व्यवस्थापक. ४ लहान घागर.

घटका, घटिका, घटी [**सं०** घटी, घटिका] **स्त्री०** १ साठ पळांचा अवधि; चोवीस मिनिटांचा काळ.२घटका मोजावयाचें पात्रविशेष;या पात्राच्या बुडाला एक बारीक छिद्र असतें आणि हें पात्र पाण्यांत तरंगत सोडलें असतां ह्या छिद्रांतून पाणी पात्रांत शिरून तें बरोबर एका घटकेनें पाण्यांत बुडतें. ❀ **एकाद्याची घटका भरणें** १ त्याच्या आयुष्याची मर्यादा भरणें किं० भरलेली असणें; तो आसन्नमरण झालेला असणें. २ त्याच्या अधिकाराचा किं० वैभवाचा अवधि समाप्त झालेला असणें किं०समाप्त होण्याच्या पंथाला लागलेला असणें.**एकाद्याची घटका घातलेली असणें** १ तो आसन्नमरण स्थितींत असणें. २ तो अधिकारभ्रष्ट किं० वैभवभ्रष्ट होण्याच्या पंथाला लागलेला असणें. **घटकावेळ स्त्री०** एकाद्या विशिष्ट कामाचा ठरलेला समय. **घटकेचा (किं० वेळेचा) गुण पु०**एकादी गोष्ट अमुक प्रकारें कां झाली किं० कां झाली नाहीं हें जिच्या संबंधानें सांगतां येत नाहीं त्या गोष्टीची अज्ञात प्रेरक शक्ति; उ० काशीकर वैद्यांचें हें संधिवातावरचें औषध रामबाण आहे; माझ्या ओळ-

खीच्या पन्नास रोग्यांना त्या ओषधानें गुण आला आणि ते सगळे खुटखुटीत बरे झाले, तेंच औषध सदानंदाला लागूं पडलें नाहीं; घटकेचा (किं० वेळेचा) गुण म्हटलें पाहिजे ! **घटकेचें वड्याळ** (किं०**घडयाळें**) **न**०१ मानवी जीवित,-जें क्षणभरच चालून बंद पडतें किं०जें क्षणभंगुर असतें. २ कोणतीही क्षणभंगुर वस्तु.

घटघट , घटघटां, घटांघटां, क्रि० वि० घटघट असा आवाज करून म्ह०मोठे मोठे घोट घेऊन(पिणें).

घटण, घटणा पुढें ' घटन ' ' घटना ' पहा.

घटणें [**सं०** घट्=यत्न करणें, शक्य होणें] **अ० क्रि०** १ कमी होणें; कमी पडणें; आकुंचित होणें; उ० दोन मण गूळ आणला त्यांत पांच शेर घटला. २ (तालमीचीं कामें इ० करून शरीर) घट्ट किं० मजबूत होणें. ३ परिपाठ, सराव, अभ्यास, घोकणें, वारंवार करणें, इ०च्या योगानें एकादी गोष्ट स्मृतींत पक्की बसणें, किं०ती करण्याची सफाई येणें, किं० ती करणें सुकर होणें किं० वाटणें; उ० त्या कामांत मी घटलों, माझा हात घटला, इ०. ४ शमणें (क्षुधा, तृषा, इ०).

घटती स्त्री० १ व्यापार इ०त आलेली तूट किं० बसलेली ठोकर(येणें,लागणें). २पदार्थांत आलेली तूट किं०कमीपणा (येणें,लागणें).३उतरती कळा;ऱ्हास; अपकर्ष (येणें, लागणें).

घटन न०, घटना स्त्री० [**सं०** घट्=यत्न करणें, शक्य होणें] १ करणें, घडविणें, बनविणें, निर्मिणें. २ घडून आलेली **गोष्ट**. ३ कांहीं कार्य घडवून आणण्यासाठीं केलेली युक्ति किं० खटपट; उ० तुम्ही घटना कराल तर त्याचें लग्न होईल. ४ घडविलेली किं० केलेली वस्तु; उ० हें सर्व जग ईश्वराची घटना आहे.

घटपट [**सं०** घट=घागर; पट=वस्त्र] **स्त्री०** १ न्यायशास्त्राचा अभ्यास.२न्यायशास्त्राची उरस्फोड. उदाहरणें देतांना नैयायिक घट आणि पट हे शब्द योजतात यावरून'घटपट'हा शब्द निघालेला आहे. ॐ**घटपटादि खटपट स्त्री०**१ नैय्यायिकांची भाषासरणी. २ न्यायशास्त्रांत प्रावीण्य.

घटमूट, घट्टमुट्ट [**म०** घट्ट=बळकट; मुट किं० मुट्ट हा शोभेचा शब्द] **वि०** घट्ट; पक्का; मजबूत.

घटवटना [**सं०** घट्=यत्न करणें] **स्त्री०** १ कांहीं कार्य घडवून आणण्यासाठीं वाटाघाट करून किं० विचार करून ठरविलेली योजना किं० सरणी; उ० मुलीच्या लग्नाची तुम्ही अजून कशी नाहीं घटवटना सुरू केली ? २ वाटाघाट; चर्चा.

घटवाई, घट्टाई [**म०** घट्ट] **स्त्री०** १ वस्त्रादिकाचा घट्टपणा किं०ताठरपणा किं०दडदडीतपणा. २ मजबूत रचना; रचनेचा मजबूतपणा. ३ टणकपणा.

घटवाटप [**म०** घट+वाटणें] **न०** भाऊबंदांत घरदार, सामानसुमान, शेतेंवाड्या, इ०ची वाटणी.

घटविणें [**सं०** घट; **म०** ' घटणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ आकुंचित किं० आखूड करणें; उ० शेटजी,हे दोन्ही गोठ दोन दोन गहूं मला घटवून द्या. २ तालमीच्या कामांनीं शरीर कसदार बनविणें. ३ घोकून पाठ करणें (श्लोक इ०); पुन्हा पुन्हा काढून(अक्षराचें वळण इ०)हाताला लागेसें करणें; (गायनाची तान इ०)पुन्हा पुन्हा म्हणून शिकणें किं० शिकलेली असेल ती पक्की करून घेणें. ४ पैसा इ० उधळून टाकणें.

घटसर्प, घांटसर्प [**सं०** घाट, घाटा=मानेचा कांटा] पु० मानेला होतो तो एक रोग.

घंटा [**म०**] **स्त्री०** १ धाट (वाजवावयाची किं० गुरांच्या गळ्यांत घालावयाची). ही पालथ्या पात्राप्रमाणें असून तिच्यांत एक लोळी किं०लोढणा लोंबत असतो. २ भाकरीच्या आकाराचा धातूचा तुकडा,-ज्यावर लाकडाच्या हातोडीनें तासांचे टोले मारावयाचे असतात. ३(लाक्षणिक)पूर्ण अभाव.ॐ **एकाद्या पदार्थाची घंटा वाजणें** किं० **हालणें** तो पदार्थ संपलेला किं० खलास झालेला असणें. **घंटापथ पु०** राजमार्ग किं० मोठ्या रहदारीचा रस्ता,-ज्या रस्त्यानें जाणाऱ्या श्रीमंत लोकांनीं आरोहिलेल्या हत्तीच्या घंटा किं० गाड्याच्या बैलांच्या घंटा वाजत असतात. (**तुपाच्या**) **नांवानें घंटा** (तुपाचा) पूर्ण अभाव. **घंटापारधी** **पु०**घंटा वाजवून सावजांना भुलवून त्यांना फासांत अडकावून त्यांना पकडणारा पारधी.

घटा, घट्टा पु०कांहीं क्रिया त्या त्याच गात्रानें वारंवार केल्या कारणानें त्या गात्राचा जो भाग स्पर्शानें किं० घर्षणानें टणक होतो तो; दळणें,

कांडणें, होडी वल्हाविणें, इ० कामांनीं तळहाताला पुष्कळ घट्टे पडतात.

घटा पु० भोपळा इ०चें लहान किं० कोवळें फळ.

घटा, घाटा पु० हरभऱ्याच्या झाडाची शेंग,—जींत एक दाणा असतो किं० कधीं कधीं दोन दाणे असतात.

घटा [सं०] **स्त्री०** १ समुदाय; समूह. २ टोळी. ३ थवा. ❀ **गजघटा स्त्री०** हत्तींचा सैन्यांतील भाग. **घनघटा स्त्री०** मेघांचें पटल.

घटाटोप पु० १ देव्हारा, अंबारी, रथ इ० वर घुमटाकार जें उन्हाचें निवारण करणारें आच्छादन असतें तें. २ खटाटोप. मागें ' खटाटोप ' पहा.

घटाव [सं० घट् = संयोग होणें] **पु०** १ संयोग; मिलाफ. २ एकत्र केल्यानें उत्पन्न होणारें परस्परोपकारित्व; उ० अंबाडीच्या भाजीचा आणि तेलाचा घटाव चांगला होतो; उ० थालीपिठाचा आणि लोण्याचा घटाव कांहीं और होतो. ३ थाटमाट; भपका; भव्यपणा. ४ मांडणी; रचना; जुळणी.

घटिका मागें ' घटका ' पहा.

घंटिका [सं०] **स्त्री०** लहान घंटा. मागें 'घंटा' [पहा.

घटित [सं० घट्=घडणें; संयोग होणें] **वि०** १ जें घडून आलें तें. २ रचिलेलें; बनविलेलें; जुळविलेलें; उ० सुशब्दघटित वाक्य बोलावें. **न०** १ वधूवरांच्या जन्मकाळावरून परस्परांचा आनुकूल्यभाव (दोघांच्या पत्रिकांवरून ठरलेला). २ कांहीं कार्य सिद्धीस जाण्याच्या दृष्टीनें जो दैवयोग तो; उ० मी केलेला संकल्प सिद्धीस जाईल असें मला वाटतें परंतु घटित असेल तसें होईल. ❀ **घटितार्थ पु०** १ विचारपूर्वक ठरविलेला बेत किं० केलेली मांडणी. २ दैवयोग; विधिलिखित; उ० शामरावांनीं वसंताला मुलगी द्यावी असें ठरविलें होतें पण तिचा घटितार्थ होता तसें घडून आलें.

घटी [सं०] **स्त्री०** मागें ' घटिका ' पहा. ❀ **घटीगोत्र न०** पत्रिकामेलन आणि कुलशील. **घटीयंत्र न०** १ कालमापनाचें कोणतेंही साधन. २ रहाट, रहाटगाडगें, पायरहाट.

घटींव [म० घटणें] **वि०** १ घटलेलें; कसलेलें (शरीर किं० गात्र). २ हाताला पक्कें लागलेलें (अक्षराचें वळण). ३ स्मृतींत पक्कें ठसलेलें (शास्त्र, कला, विद्या, माहिती, इ०). ४ परिपाठानें किं० अभ्यासानें कोणतेंही काम करण्यांत सरावलेला किं० निष्णात झालेला (मनुष्य). ५ सुबक केलेला किं० घडविलेला (पदार्थ).

घट्ट वि० १ ज्यांत जलांश फार थोडा आहे असा; उ० हें दहीं घट्ट आहे, याच्या वड्या कापतां येतील. २ सैल न पडेल असें (बांधलेलें, रचलेलें, जुळविलेलें). ३ थिलथिलित नव्हे तें; टणक; (गात्र, शरीर). ❀ **घट्ट करणें** घोकून घोकून स्मृतींत पक्कें बसविणें किं० पाठ करणें.

घट्टा [म० घट्ट होणें] **पु०** त्याच गात्रांनीं तेंच काम वारंवार केल्या कारणानें किं० करीत असल्या कारणानें त्या गात्राचा घर्षण पावणारा भाग टणक झालेला असतो तो; उ० दळून, सडून, हाताला घट्टे पडतात; उ० होडी वल्हवून, दोऱ्या वळून, हाताला घट्टे पडतात.

घट्टाई स्त्री० घट्टपणा; पक्केपणा; टणकपणा.

घड [अ० घूज्] **पु०** १ एका देठाला आलेलीं किं० लागलेलीं अनेक फळें समुच्चयानें; उ० केळ्यांचा घड. २ पांच सहा वाट्या कमळाच्या आकारानें एकत्र जुळविलेल्या असून त्या उचलावयाला कमानदार कडी असते; ह्या वाट्यांच्या संचाला 'घड' म्हणतात; अनेक कोशिंबिरी पंक्तींत वाढावयाला नेण्याच्या कामीं ह्या घडाचा उपयोग केला जातो. ३ मित्रत्वाचा किं० सलोख्याचा संबंध; प्रेमभाव; उ० ह्या सासवा सुनांचा घड चांगला आहे. ४ टोळी, ताफा. ५ दोन पदार्थांचा मनोहर मिलाफ, संयोग, किं० जुळणी; उ० दूध आणि साखर यांचा घड चांगला बनतो (किं० जमतो). ६ दोन गोष्ट्यांसहित जें वृषण तें. ❀ **घडघोसाळी स्त्री०** जिच्या एका देठाला अनेक घोसाळीं लागतात ती घोसाळी. **घडघोसाळें न०** वरील जातीच्या घोसाळीचें एक घोसाळें.

घडकाम [म० घडणें+काम] **न०** १ धातुमय पात्र घडवून करण्याचें काम, धंदा, किं० कला. २ घडवून केलेल्या पदार्थविशेषाचा आकार किं० डौल किं० घाट.

घडगशीळ वि० १ जिच्यावर दगड फार आहेत अशी (उतरण). २ धोंडाळ, दगडाळ. **न०** दगडाळ उतरण.

घडघडणें अ० क्रि० १ (मेघ) गर्जणें. २ गाडी किं० खटारा दगडाळ जमीनिवरून चालतांना घडघड अशा आवाजानें युक्त होणें. ३ विफल होणें (एकादें काम). ४ मरणें.

घडघडां, घडांघडां क्रि० वि० न अडखळतां (वाचणें, बोलणें). [**वि०, न०** पहा.

घडघशीळ वि०, न० मागें 'घडगशीळ'

घडण, घडणी [**म०** घडणें] **स्त्री०** १ घडलेल्या किं० घडविलेल्या पदार्थाचा डौल, घाट, किं० आकार. २ घडविलेल्या पदार्थाबद्दल दिलेली मजूरी.

घडणावळ [**म०** घडणें+प्रत्यय] १ पदार्थ घडविण्याचें कौशल्य किं० कला किं० हातोटी. २ घडवून केलेल्या पदार्थाबद्दल दिलेली मजूरी. ३ घडविलेल्या पदार्थाचा घाट.

घडणें [**सं०** घट्=बनविणें] **स० क्रि०** १ करणें, बनविणें, घडाविणें. २ हिशेब, जमाखर्च, इ० कागदावर नमूद करणें किं० लिहून काढणें. **अ० क्रि०** १ होणें; घडून येणें. २ शेवटास जाणें, समाप्त होणें. ❀ **घडल्यास पडता वि०** १ योग्य वेळीं आलेला किं० झालेला. २ उपयोगीं पडणारा. **घडला घाट पु०** आयता मिळालेला घडविलेला पदार्थ.

घडणें स० क्रि० शिवणें, स्पर्शिणें; उ० तो शूद्र मला घडला, मी ओंवळा झालों.

घडती स्त्री० घटती; नुकसान; बूड; ठोकर.

घडमाळ स्त्री० मध्यें खापेकडाची जुळी वगळल्यावांचून लोटे बांधून जी राहाटाची माळ करतात ती.

घडमोड स्त्री० पुढें 'घडामोड' पहा.

घडवंची [**हिं०**] **स्त्री०** एका फळीच्या किं० चवकटीच्या चार कोपऱ्यांना चार पाय बसवून पोतीं, गाद्या, घागरी, इ० ठेवण्यासाठीं जी बैठक करतात ती.

घडवण न० मागें 'घडण' पहा.

घडवशी स्त्री० हरदासाच्या मागें मृदंग ठेवावयासाठीं केलेली असते ती घडवंची,—उभ्यानें मृदंग वाजविण्याच्या सोयीची.

घडविणें [**म०** घडणें; **सं०** घट्=बनाविणें] **स० क्रि०** करणें; घडवून आणणें; सिद्धीस किं० शेवटास नेणें किं० पोचविणें.

घडशी (–सी) पु० वाजंत्री वाजविण्याचें काम करणारी एक हिंदूंची जात.

घडा [**सं०** घट] **पु०** १ घागर. २ ताड, माड, इ०च्या पोगीला लावतात ती घागर,—झाडाचा रस साठविण्यासाठीं. ❀ **कच्च्या घड्यानें पाणी भरणें** (किं० **वाहाणें**) निष्फळ प्रयत्न करणें; ज्याला यश येणें कठिण किं० अशक्य आहे असा प्रयत्न करणें. **घडा फोडणें** कांहीं गुप्त गोष्ट प्रकट करणें; रहस्याचा भेद करणें. **एकाद्याचा घडा भरणें** त्याच्या आयुष्याची किं० अधिकाराची किं० वैभवाची समाप्ति होणें.

घडाई [**म०** घडणें] **स्त्री०** कांहीं पदार्थ घडण्याबद्दल किं० घडविण्याबद्दल दिलेली मजूरी.

घडांघड, घडांघडां क्रि० वि० १ न आडखळतां (वाचणें, बोलणें, पाठ केलेला मजकूर बोलून दाखविणें). २ खड खड किं० धड धड असा आवाज करून.

घडामोड [**म०** घडणें+मोडणें] **स्त्री०** १ कांहीं दागिने किं० पदार्थ करणें, केलेले मोडून नवे करणें, केलेल्यांत कांहीं फेरफार करणें इ० रूप जो व्यापार तो. २ फेरफार; उलथापालथ; नव्याचे जागीं जुनें आणणें, जुन्याचे जागीं नवें आणणें इ० रूप जे फेरफार ते समुच्चयानें; ३ देणें, घेणें, विकणें, विकत घेणें, इ० रूप जो व्यवहार तो.

घडारणें अ० क्रि० फळांनीं किं० फळांच्या घोसांनीं किं० घडांनीं (वृक्षांनीं) युक्त होणें; उ० यंदा ही चिंच खूप घडारली आहे.

घडावण मागें 'घडण' पहा.

घडाळ इ० पुढें 'घड्याळ' इ० पहा.

घडी [**सं०** घटी] **स्त्री०** १ चोवीस मिनिटांचा अवधि. २ बुडाला छिद्र असलेलें तांब्याचें पात्र,—जें पाण्यांत तरंगत सोडलें असतां छिद्रांतून आंत पाणी शिरून तें बरोबर एका घटकेच्या अवधींत भरून पाण्यांत बुडतें. ३ मध्यें विवक्षित ठिकाणीं दुमडून दुहेरी, तिहेरी, चोहोरी, इ० पदर होतील अशा प्रकारचा वस्त्र, कागद, इ०ना दिलेला आकार. ४ संघटितपणाची स्थिति; व्यवस्थितपणें

एकादें काम चालूं लागण्याची स्थिति (क्रि०बसणें, जमणें, विसकटणें, इ०). ५ ताड, माड, इ०च्या पोगींतून स्रवणारा रस धरावयाचें मडकें. ६ कापूस, फडकें,इ०ची पट्टी,—जी गळूं इ०तून गळणारा पू,रक्त इ० शोषून घ्यावयासाठीं त्याचेवर बांधलेली असते. ७ मित्रत्वाचा किं० सलोख्याचा संबंध (जमणें, बसणें, विसकटणें). ॐ **एकाद्या कार्याची घडी बसणें** (किं० **मोडणें**) तें सुरळीतपणें चालूं लागणें. **दोन माणसांची घडी बसणें** त्या दोघांचें ऐकमत्य होऊन हातांत घेतलेलें काम सुरळीतपणें चालूं होणें. **दोन माणसांची घडी मोडणें** किं० **विसकटणें** त्यांच्यांत बेबनाव होणें. **घडी घटकेचा गुण** अमुक गोष्ट अशी कां घडली आणि तशी कां घडली नाहीं हें आपणास सांगतां येत नसलें म्हणजे हें वाक्य उद्गारलें जातें; तें काम त्या विशिष्ट वेळीं हातांत घेतलें म्हणून त्याची तशी परिणति झाली. **घडीघडी,घडोंघडीं क्रि०वि०** हरघडी; क्षणोंक्षणीं; प्रत्येक खेपेस; सदासर्वदा. **घडीची पोळी स्त्री०** एकदा पोळी लाटून वाटोळी करून तिच्या एका बाजूला तेल किंवा तूप चोपडून ती मध्यें दुमडून त्या अर्धुकाला पुन्हा तेल किंवा तूप लावून त्याला पुन्हा मध्यावर दुमड घालून लाटून केलेली पोळी; हिच्या उलट चपाती किं०फुलका.**घडीचें घड्याळ** (किं० **घड्याळें**) मनुष्याचें क्षणभंगुर जीवित किं० आयुष्य. **घडीपदर पु०** घडी घातलेल्या वस्त्राचा वरचा पदर. **घडीबंद वि०** ज्याची घडी अद्यापि मोडलेली नाहीं म्ह० जें वस्त्र अद्यापि वापरावयाला काढलेलें नाहीं तें.

घडीत [म० घडणें] **न०** १ घडून किं०घडवून केलेला पदार्थ.२पदार्थ घडण्याबद्दलची मजूरी.३ घडलेल्या पदार्थाचा घाट किं० डौल किं० आकार. ॐ**घडींत बुडवून घडणावळीचा तगादा** एका हानींत दुसऱ्या हानीची भर. **घडितघाट वि०** आयता घडविलेला मिळाला जो दागिना किं० पदार्थ तो.

घडींव वि० घडून किं० घडवून केलेला(पदार्थ); यांच्या उलट ‘ ओतींव. ’

घडुला, घोडुला [म० घोडा] **पु०** रांगणारें मूल दोन हात आणि दोन गुडघे जमीनीवर टेकून करतें तें संस्थान (**क्रि०** करणें).

घडुलें [**म०** घड] **न०** केळीचा लहान किं० नुकताच बाहेर पडलेला घड किं० लोंगर.

घडेबाजी [**म०** घडा (घागर)+बाजी (खेळ)]**स्त्री०** १ दारूचे तोटे, फटाके, इ०एका घड्यांत घालून एकदम पेटवून करतात जी अग्निक्रीडा ती (**क्रि०** करणें, लावणें, उडविणें). २ वाद्यांचा गजर.

घडोंची स्त्री० वर ‘ घडवंची ’ पहा.

घड्याळ, घड्याळें [**सं०** घटी (घटकापात्र)+आलय] **न०** १ कालमापनाचें साधनविशेष,—घटकापात्र किं० सूर्याची सावली, इ०. २ भाकरीच्या आकाराची धातूची तबकडी,—जिच्यावर लाकडाच्या हातोडीनें तासांचे टोले बडवितात. ॐ**घड्याळ टिपरूं न०** गरीबाऊ भोजन,—भाकरी आणि मिरची. भाकरी तासासारखी वाटोळी आणि मिरची तास बडवावयाच्या काठीसारखी असते यावरून विनोदी रूढि. **घड्याळजी (—ची) पु०** तासावर टोले बडविण्याच्या कामावर नेमिलेला शिपायी.

घण [**सं०** घन=लोखंडी सोटा] **पु०**हातोडा; हातोडी. ॐ **हिऱ्याची परीक्षा घणावांचून होत नाहीं** भयंकर संकटें आल्यावांचून किं० खलजनांनीं छळ केल्यावांचून खरा साधुपुरुष कोण हें ठरत नाहीं. **घणाचे घाव सोशील तो हिरा** दुर्जनांनीं केलेला छळ सोशील तो खरा साधु. **घणकरी पु०** लोहाराच्या ऐरणीवर ठेविलेल्या लोखंडावर घणाचे तडाखे मारणारा. **घणकोरा वि०** १ घणाखालीं नुकताच बडविला जाऊन केला गेलेला जो कोणत्याही धातूचा पदार्थ तो. २ अगदीं कोरा किं० नवा(कोणताही पदार्थ). **घणघाव, घणघावूक वि०** मोठा आणि मजबूत; ठसठशीत आणि बळकट (पदार्थ, माणूस, दागिना).

घण [**सं०** घन=घट्ट,दाट] **वि०** घट्ट, निबिड टणक.ॐ**घणघोर वि०** १ दाट (झाडी,अरण्य). २ हातघाईची (मारामारी, लढाई). ३ निबिड (अंधकार). ४ गाढ (झोप, सुस्ती). ५ जोरदार (पाऊस). ६ आवेशयुक्त (शिव्यांचा वर्षाव). **घणदाट वि०** घट्ट, निकट, निबिड (झाडी, अंधकार, माणसांची

गर्दी, मेघांचें पटल, इ०). **स्त्री०** दाटी, गर्दी. **न०** सलोख्याचा संबंध; दृढ मैत्री; परस्परांचें परम सख्य, उ०आलीकडे राम्या आणि सद्या ह्या दोघांचें घणदाट आहे. **घणसर वि०** १ बरेंच दाट (ताक, दूध, कढी, इ०).२ दडदडीत (वस्त्र). ३ मजबूत, राकट, कणखर (मनुष्य, जनावर, गात्र, पदार्थ).

घणघण स्त्री० घंटादिकांचा किं० कोणत्याही धातूच्या पात्राचा आवाज. ® **घणघण घंटा स्त्री०** वस्तूचा बारदानांत पूर्ण अभाव; उ० ह्या कासंडींत तेलाची घणघण घंटा आहे म्ह० एक थेंबही तेल नाहीं. उ० आज घरामध्यें तुपाची घणघण घंटा वाजली आहे !

घणवट, घणवटणें पुढें 'घनवट,' 'घनवटणें' पहा.

घणस पु० एक प्रकारचा सर्प,–जो भारी विषारी असतो.®**घणसापुढें गारुड चालत नाहीं** तो इतका दुष्ट आणि भयंकर आहे कीं त्याचें पारिपत्य करणें शक्य नाहीं (त्याला टाळणें हाच शहाणपणा). ® **घणस कांडें न०, घणस वेल स्त्री०** एक वेल,–ज्याचा देठ हुबेहूब घणसासारखा दिसतो. **घणसाचें न०** घणस चावून विषारानें जो रोग होतो तो.

घणसा पु० १ फुरशांची एक जात. २ पडवळाची एक जात.

घणा [म० घण] पु० मोठा लठ्ठ आणि जाडा हातोडा (वर 'घण'पहा).®**घणाघाई, घण्याघाई क्रि० वि०** खूप जोरानें, आवेशानें, कडाख्यानें. **वि०** जोराचा, कडाख्याचा(वादविवाद, भांडण). **घणा खालचा** वर ' घणकोरा ' पहा. **घणाटऱ्या स्त्री० अ०व०**रिकामे किं० निष्फळ हेलपाटे(खाणें, घालणें, घेणें).

घणाणघंटा स्त्री० वर ' घणघण घंटा ' पहा.

घणाणां क्रि० वि० मोठा आवाज किं०खणखणाट करून.

घतणें[म०घात]अ०क्रि० अपायकारक, नाशकारक किं० हानिकारक होणें; उ०तुझ्याची संगत तुला पुढेंमागें चांगली घतेल बरें, लक्ष्यांत ठेव.

घतन [म० घात] वि० अपायकारक. **न०** १ संकट, पेच. २ नाश, विध्वंस. ३ प्राणहानि.

घन [सं०]पु० १ मेघ.२ एका विशिष्ट संख्येला त्याच संख्येनें आणखी दोन वेळां गुणून येतो तो गुणाकार; उ० चाराचा घन चौसष्ट.३लांबी, रुंदी; आणि उंची या तीन परिमाणांनीं विशिष्ट पदार्थ. ४ हातोडा (खूप मोठा). ५ धातूचें वाद्य,–टाळ, करताळ, झांज, झेंगट, इ०. वेदपठणाची एक विशिष्ट रीति. ® **घनकोरा वि०** अगदीं कोरा; कोरा करकरीत. **घनवाद्य नं०** धातूचें बनविलेलें कोणतेंही वाद्य. **घनात्यय, घनान्त पु०** शरदृतु. **घनागम पु०** वर्षाकाळ. **घनोपल पु०** गार,–(पावसांत पडते ती). **घनज्वाला स्त्री०** वीज. **घनपदवी, घनवीथी स्त्री०** आकाश. **घनश्याम पु०** १ राम. २ कृष्ण. **घनपद न०** घनमूल. **घनफळ न०** १ एका विशिष्ट संख्येला त्याच संख्येनें दोन वेळां गुणून येतो तो गुणाकार; उ० पांचाचें घनफळ एकशे पंचवीस. २ पदार्थाची लांबी, रुंदी,आणि उंची दाखविणाऱ्या आंकड्यांचा गुणाकार. **घनमूळ न०** ज्या संख्येचा घन दिलेल्या संख्येइतका असतो ती त्या दिलेल्या संख्येचें घनमूळ; उ० पांच हे एकशे पंचवीसाचें घनमूळ. **घनपाठी वि०**घनपाठ म्हणून जी वेदपठनाची एक विशिष्ट सरणी तींत जो निष्णात तो. ह्या सरणीनें ' देशाचें ऋण फेडा ' हे शब्द पुढीलप्रमाणें पढले जातील; ' देशाचें ऋण ऋण देशाचें देशाचें ऋण फेडा फेडा ऋण देशाचें देशाचें ऋण फेडा. ' **घनचक्र, घनचक्कर न०** १ मेघांचें दाट पटल. २ मोठा थाटमाट; भव्यपणाचा देखावा; मोठें अवडंबर; मोठा पसारा. ३ आवेशाचा कलह; जोराचा वादविवाद; उ० पहिल्यानें ते साधेपणानें बोलत होते पण पुढें त्यांचें घनचक्कर उडालें.५कोणतीही आवेशाची, जोराची,किं० उत्साहाची कृति.

घन [सं०] वि० १ खरखरीत. २भरीव. ३ कठिण, टणक (लोखंड इ०). ४ दाट,निबिड (झाडी, अरण्य). ५ गंभीर (ध्वनि). ६ व्याप्त, भरलेला. ७ घट्ट, झालेला; गोठलेला; उ० हें तूप, (हें खोबरेल) उद्यां सकाळपर्यंत घन होईल. ८ पदार्थाच्या ज्या तीन स्थिति,–घट्ट किं०टणक किं०

अप्रवाही, पातळ, आणि वायुरूप,त्यांपैकीं पाहिल्या स्थितींतील; उ० पाणी बर्फाच्या रूपांत घन असतें, आपण पाणी पितों तें पातळ किं० द्रवरूप असतें, आणि पाण्याची वाफ वायुरूप असते. ॐ **घनघोर वि०** १ दाट, निबिड. २ झोंबाझोंबीचा. ३ गाढ. **घनदाट वि०**दाट; निबिड; गहन.

घनवट वि० १ घट्ट विणीचें (वस्त्र). २ सर्वव्यापी. ३ महत्त्वाचा.

घनाक्षरी स्त्री० मराठींतील एक वृत्तविशेष.

घपाघोळ, घप्पाघोळ पु० १ अनेक वाद्यांचा संमिश्र ध्वनि. २ अनेक कामें एकदम करण्याचा प्रसंग आल्यामुळें होतो तो गोंधळ. ३ अनेक कार्यें एकदम करूं लागल्यानें होतो तो घोटाळा.४ घोंटाळा.

घबकें न० अकल्पित झालेला लाभ.

घबाड न० १ एक शुभ मुहूर्तविशेष. २ अल्प प्रयत्नानें झालेला मोठा लाभ. टीप—वाराचा अंक आणि तिथीचा अंक यांच्या बेरजेच्या तिपटींत पंधरा मिळवून सातांनीं भागिलें असतां बाकी तीन उरते तेव्हां तो काळ शुभ म्हणून ज्योतिषशास्त्राचा सिद्धान्त आहे, आणि त्याला " घबाड मुहूर्त " अशी संज्ञा आहे; यावरून घबाड मुहूर्त म्हणजे अत्यन्त शुभ समय किं० अनुकूल काळ असा झाला. ॐ**घबाड माप न०** १ शिरस्त्याहून मोठें जें माप किं० परिमाण तें. २ (लक्षणेनें) ज्याचा आहार मोठा त्या माणसाचें पोट; उ० चार माणसांचें अन्न ह्या तुझ्या घबाड मापास पाहिजे ! **घबाड षष्ठी स्त्री०** घबाड मुहूर्त ज्या षष्ठीला येतो ती.

घबूक वि० पुष्कळ, विपुल. **न०** १ अनपेक्षित लाभ (लागणें, मिळणें, सापडणें). २ वैपुल्य.

घबूकेल न० कोणताही मोठा अनपेक्षित लाभ.

घम [**अ०** गम्=दुःख, खिन्नता] **स्त्री०** सोशीकपणा; क्षमाशीलता; क्षमा (खाणें, करणें, येणें). [फुगून(बसणें).

घम क्रि० वि० मुकाट्यानें; स्तब्धपणें; रुसून

घमघम क्रि० वि० १ सोसाट्यानें. २ जोरानें (सुवास येणें); उ० मी मोगरीजवळून गेलों तों घमघम वास आला (किं० सुटला). २ झपाट्यानें; वेगानें; उ० छडी लागे छमछम आणि विद्या येई घमघम.

घमघमणें अ० क्रि० सुवास जोरानें पसरविणें; उ० हा गुलछबू किती घमघमतो हो !

घमघमाट पु० जोरदार मधुर वास,—तुपाचा, वेलदोड्याचा, केशराचा, इ०चा घमघमाट.

घमघमीत वि०मधुर वास पसरणारा (पदार्थ,—फोडणी, भाजी, इ०).

घमट गुळवणी न० १ फिक्का गोड खाद्यपदार्थ.२ गोड पण निष्क्रिय भाषण;कोरडी थापबाजी.

घमड, घामड, घामट वि० ओंगळ; घाणेरा; घाणेरडा (माणूस, पदार्थ).

घमंड, घमंडी [**हिं०**] **स्त्री०** १ वैपुल्य; पुष्कळपणा. २ कामकाजाची घाई; कामाचा रगाडा; कार्यबाहुल्य. ३ चैनबाजी. ॐ**घमंड गुळवणी न०** ज्या गोड म्हणून केलेल्या खाद्यांत किं० पेयांत साखर किं० गूळ अगदीं थोडा आहे आणि म्हणून जें बेचव आणि पचपचीत लागतें असें खाद्य किं० पेय.

घमंड, घमेंडी स्त्री० १ अंगीं असेल त्या गुणाबद्दल न शोभण्याइतकी बढाई. २ अंगीं नसलेल्या गुणाबद्दल रिकामी बढाई. ॐ**घमंडखोर, घमेंडखोर, घमंडानंदन,घमंडीनाथ पु०** बढाईखोर माणूस.

घमत स्त्री० होडीच्या किं० गलबताच्या बुडाच्या तक्त्यांच्या फटींतून जें पाणी आंत येतें तें. मागें ' गमत ' पहा.

घमतड, घमतडी स्त्री० मागें ' गमतड, ' ' गमतडी ' पहा.

घमशान [**सं०** घोर+श्मशान] **न०** १ भक्ष्य भोज्यादि पदार्थांची समृद्धि किं० वैपुल्य; उ० त्याच्या मामाच्या घरचें घमशान टाकून तो इकडे आईच्या घरचें घड्याळटिपरूं खावयाला कसा येईल ? २ रंगेलपणाचें वागणें (क्रि० घालणें, मांडणें). ३ खाणें, पिणें, गाणें, बजावणें, इ० संबंधाची चैनबाजी. ४ कोणत्याही पदार्थाची समृद्धि. ५ आंथरूण, गादी, चिरगुटें, इ०चा घातलेला गुधडा. **वि०** १ खूप मोठा; अवाढव्य; जगड्व्याल. २ मजबूत, भक्कम (माणूस, घर, पदार्थ). ३ इंद्रियभोगासक्त; अति विषयलंपट.

घमांघम, घमांघमां क्रि० वि० वर ' घमघम ' पहा.

घर [सं० गृह] **न०** १ राहावयासाठीं लाकडें, विटा, दगड, इ० साधनांनीं केलेलें वसतिस्थान,–(माणसें, जनावरें इ०कां साठीं). २ एका कुटुंबांतील माणसें समुच्चयानें; उ० घर फुटलें कीं त्याची शोभा गेलीच असें समजावें. ३ सांसारिक स्थिति; प्रपंच करून राहाणें; उ० त्याची बायको मेल्यापासून त्यानें घर सोडलें. ४ सावकारी पेढी किं० अडत. ५ हिंस्र पशु, पक्षी, जंगली जनावरें, इ०ची डोंगर, झाडी, जमीन, जंगल, इ०तील राहावयाची जागा. ६ कोणताही पदार्थ ठेवण्यासाठीं,पुरण्यासाठीं, खुपसण्यासाठीं, मुद्दाम केलेलें भोक, खळगा, चीर, फट, इ०; उ० आधीं जमीनींत पहारीनें ह्या खांबाला घर करून घे आणि मग खांब (किं० खुंटा) ठोक. ७ खबुतरें इ० साठीं, त्यांच्या सोयीची केलेली जागा. ८ पदार्थ सुरक्षितपणें ठेवण्यासाठीं योग्य आकाराचा कप्पा, खण, पेटी, पिशवी, इ०; उ० चष्म्याचें घर, अंगठीचें घर, इ०; चंचींतील सुपारीचें घर, कातीचें घर, इ०. ९ बुद्धिबळें, सोंगट्या, इ०च्या पटांवरील ज्या लहान लहान मर्यादित जागा त्या प्रत्येक; उ० वजीराचें घर, उंटाचें घर, इ०. १० रेषा आखून जे मर्यादित प्रदेश किं० अवकाश होतात ते प्रत्येक. ११ सूर्य, चंद्र, इ०ची स्थिति दाखविण्यासाठीं जें कोष्टक आखतात त्यांतील एका एका ग्रहाचें विशिष्ट स्थान; उ० हें चंद्राचें घर, तें गुरूचें घर, इ०.१२ कुटुंब, वंश.१३ उत्पत्तिस्थान; उ० शरीरांत पित्ताचें घर कोठेसें असतें? १४ उत्पत्तीचें कारण; उ० आळस हें दारिद्र्याचें घर आहे; उ० वांगें हें खरजेचें घर आहे. १५ वादाचें कारण; कलहाचा उगम. १६ ऐपत; एकादें काम करण्याचें सामर्थ्य; उ० जें कांहीं करणें तें आपलें घर पाहून करावें. १७ सतारीच्या दोन पडद्यांमधील अंतर. १८ शास्त्र, कला, वगैरेंचें मर्म किं० खुबी; उ० तुम्ही गातां खरें पण तुमच्या हातीं गाण्याचें घर लागलेंसें दिसत नाहीं.१९अडचणीच्या किं० पराभवाच्या वेळीं निसटून जाण्यासाठीं करून ठेविलेली पूर्व योजना; उ० तुमच्या बोलण्यांत घर आहे; उ० हा घनश्याम नेहमीं घर ठेवून बोलतो. २० आपण स्वतां; उ० इच्छी परा तें येई घरा (म्ह० स्वताच्या भोगाला; जो दुसऱ्याचें अनिष्ट चिंतितो किं०करूं जातो त्याच्या स्वताच्या भोगाला तें अनिष्ट येतें). २१ मांडलेला संसार किं० प्रपंच; उ० त्याला नोकरी लागतांच त्यानें स्वतंत्र घर थाटलें.२२ वसतीचें स्थान (मालकाच्या इच्छेविरुद्ध मिळविलेलें);बळकावलेलें ठिकाण; उ० कांस्यानें माझ्या टाचेंत घर केलें; उ० ढेकणांनीं ह्या कोपऱ्यांत घरें केलीं. २३ पेटींतील कप्पा; उ० चवल्यांच्या कप्यांत पावली पडूं देऊं नको. २४ घराणें, वंश; उ० त्याचें घर कुलीनांचें आहे; उ० आमच्या घरांत आजपर्यंत कोणाही स्त्रीस वैधव्य आलेलें नाहीं. ꣸ **घर उवडणें** लग्न करून संसार थाटणें. **घर करणें** १ बिऱ्हाड करणें,–(लोकांच्या घरीं जेवणें किं० खानावळींत जेवणें याच्या उलट). २ लोकांना त्रास होईल अशा ठिकाणीं वास्तव्य करणें; उ० कांट्यानें आज सहा महिने माझ्या टाचेंत घर केलें आहे. **एकाद्याचें घर घेणें** (किं० **चालणें**) त्याच्या घराचा नाश करणें; त्याच्या माणसांची वाताहत करून सोडणें. **घर चालविणें** प्रपंचाची किं० संसाराची जबाबदारी वाहणें; उ० घर चालवी तो घराचा वैरी. **घर जोडणें** एकाद्या घराण्याशी मैत्रीचा किं० विवाहाचा संबंध करणें. **घर डोईवर घेणें** घरांत कलकलाट, धिंगामस्ती, किं० दांडगाई करणें; उ० गोंदूआक्का चार घटका पुराणाला गेल्या कीं हीं मुलें घर जसें डोईवर घेतात. **घर तुटणें** एकाद्या कुटुंबाशीं असलेला मैत्रीचा किं० नात्याचा संबंध नाहींसा होणें. **दुसऱ्याचें घर दाखविणें** आपल्या घरीं कोणी त्रासदायक मनुष्य आला असतां त्याला कांहीं युक्तीनें दुसऱ्याच्या घरीं हाकलून देऊन आपला त्रास चुकविणें. **घर धरणें** १ घरांतच बसून राहाणें; घराच्या बाहेर न पडणें. २ एकादा आजार पक्का जडणें; उ० दम्यानें माझ्या शरीरांत घर धरलें आहे. ३ चंचलपणा न करतां एकाच ठिकाणीं स्थिर ठेवून असणें; उ० कमलाबाई ही एक घर धरून राहाणारी बाई आहे. **एकाद्याचें घर धुणें** किं० **घर धुवून नेणें** त्याची चीजवस्त,डागडागिना,हिरावून किं० लुबाडून किं० चोरून नेणें. **घर नेसविणें, घर शिवणें** घरावर गवत घालून तें शाकारणें. **लोकांचीं घरें पूजणें** १ आपलें कर्तव्य न करतां लोकांच्या घरीं त्यांना भेटावयाला जाणें. २ आपलें इष्ट मिळविण्यासाठीं

घरकूल [म० घर] … जेवें किं० खुशामत करा- खेळांत लहान मुलें करता… **गें** १ संसार आटोपणें किं० **घरंगळणें** अ० … ल माणसांत फूट पाडणें. **घर** दगड, इ० पदार्थ … ले कर्ता किं० मिळविता पुरुष नाहींसा … कुटुंबाला विपन्न दशा प्राप्त होणें. **घर पाहाणें** घराकडे वक्र दृष्टि करणें; उ० काळानें एका- द्याचें पाहिलें कीं तें बुडालेंच म्हणून समजावें. **एकाद्याचें घर बुडविणें** त्याच्या कुटुंबाचा विध्वंस करणें, त्याच्या कुटुंबांतील माणसांना देशोधडीस लावणें. **घर फिरलें म्हणजे घराचे वांसे फिरतात** एकाद्या माणसाच्या यजमानाची गैरमर्जी **घपाघोळ, घपाघोळी** … संमिश्र ध्वनि. २ अनेक कामें एकदम करण्या… झाली कीं त्याचे नोकर चाकर सुद्धां त्या माण- साचा तिरस्कार करूं लागतात. **घर बुडणें** १ कुटुंबाची नासाडी किं० दुर्दशा होणें. २ संतति नसल्या कारणानें कुटुंबाचा लोप होणें. **घर भंगणें** घराचें वैभव किं० महत्त्व नाहींसें होणें; उ० बाप- लेकांत तंटे लागल्यामुळें सार्‍यांचें घर भंगलें. **आपलें घर भरणें** दुसर्‍याच्या पैशाचा हळूहळूं आणि गुप्त रीतीनें अपहार करून तो आपल्या घरांत आणणें. **घर भलें कीं आपण भला** जो लोकांच्या उचा- पतींत न पडतां मुकाट्यानें आपलें कर्तव्य करीत असतो असा; जो लोकांकडे उगीचच्या उगीच न जातां आपल्याच घरीं असतो तो. **घर मांडणें** (किं० **थाटणें**) घरामध्यें संसारोपयोगी जिन्नस आणून तें नीटनेटकें किं० सोयीचें करणें. **घर म्हणून ठेवणें** नांदत्या घरामध्यें ह्या जिनसेचा उपयोग केव्हांना केव्हां तरी होईल असें म्हणून ती जिन्नस संग्रहास ठेवणें. **घर वसाविणें** मुलांबाळांनीं घर भरून घराचा भयाणपणा नाहींसा करणें. **घर सांकड आणि बाईल माकड** घर भिकार आणि बायको कुरूप (असें असलें म्हणजे भीति नाहीं). **घराचा पायगुण तसा** क्रि०वि० घरांतील माणसांची चालचलणूक असेल त्याप्रमाणें. **घराचा पायगुण** पु० घरांतील माणसांची वर्तणूक किं० शिस्त (परिणा- माच्या दृष्टीनें). **घराचा वांसा ओढणें** १ एकाद्या मोठ्या कामांतून जरूरीचें साधन नाहींसें करणें. २ घरांतील महत्त्वाच्या माणसास फित- विणें. **घरांत विचारा, घरांत दाखवा** इ० माझ्या पत्नीला विचारा, दाखवा, इ०. ह्याच्या उलट ' बाहेर ' म्ह० पतीला. **घरांत समजणें** घरां- तल्या घरांत समजूत पाडून घेणें; घरांतील भान- गडी किं० तंटे चवाठ्यावर न येऊं देणें. **घरावर काठ्या घालणें** किं० **गोवरी ठेवणें** किं० **निखारा ठेवणें** एकाद्या कुटुंबाची बदनामी करणें किं० त्याची वाताहत करणें. **एकाद्याच्या घरा- वर कुत्रें चढविणें** त्याच्या घरांत कलागती लावून देणें. **घरावर गवत रुजणें** तें ओसाड होणें किं० ओसाड पडणें. **घराला कांटी लागणें** घर ओसाड किं० उध्वस्त होणें. **घराला कांटी लावणें** घर ओसाड किं० उध्वस्त करणें. **एकाद्याच्या घराला हाड बांधणें**, किं० **घरावर टाहळा टाकणें** एकाद्या … त्याला … जातीच्या बाहेर टाकणें; … कामाचा … टाकणें. **मळा, शेत, इ० घरीं करणें** … किं० खंडानें न देतां घरांतील माणसांनीं स्वकष्टानें त्याची लागवड किं० मशागत करणें. **घरीं बसणें** उद्योगधंदा नसल्याकारणानें किं० सोडून दिल्याकारणानें रिकामें असणें. **आपघर कीं बापघर** मागें ' आप ' मध्यें पहा. **खालच्या घरचे वांसे मोजणें** कृतघ्न होणें. **बडा घर पोकळ वांसा** दिसावयाला भपकेदार पण असावयाला नादान. **घर ना दार आणि देवळीं बिर्‍हाड** जो एकटा आहे, ज्याला बायको मुलें इ० परिवार नाहीं, अशा मनुष्याचें हें वर्णन आहे; देवळीं म्ह० कोनाड्यांत, किं० देवळांत. **घरासारखा पाहुणा होतो, पाहुण्यासारखें घर होत नाहीं** परक्या ठिकाणीं मनुष्य गेला असतां त्याला त्या ठिकाणच्या चालीरीती, पोशाख, भाषा, इ०चा स्वीकार करावा लागतो; त्या ठिकाणचे लोक पाहु- ण्याच्या चालीरीती, पोशाख, भाषा, इ०चा स्वीकार करीत नाहींत. आमचें ' म्हणींविषयीं चार शब्द ' पान २२ पहा. **घरीं दारीं सारखाच** सर्व ठिकाणीं सारखाच वाईट; स्वतःच्या घरीं जसा उपद्रवकारक तसाच लोकांच्याही घरीं उप- द्रवकारक. **घरोंघरीं एकच परी, घरोंघरीं मातीच्याच चुली** जिकडे तिकडे एकच प्रकार. **आपलें घर बारा कोशांवरून दिसतें** आपलीं कामेंधामें इ० आपणास कळतात किं० उत्तम प्रकारें ठाऊक अस- तात; आपल्या घरांतील अमुक माणूस अमुक प्रसंगीं कसा वागला असेल हें आपणास तर्कितां येतें. **घरकोंबडा, घरनशा** पु० जो सदा घरांतच किं०

आपल्या गांवांतच राहातो तो; चारचववांकडे जो जात येत नाहीं तो. **घरबसल्या** क्रि०वि०घरांतल्या घरांत; घरांत बसूनच; घर न सोडतां. **घर बांधून पहावें आणि लग्न करून पहावें** घर बांधावयाला किं०लग्न करावयाला खर्च आपल्या आजमासापेक्षां नेहेमीं अधिक होतोच होतो; घर बांधल्याशिवाय आणि लग्न केल्याशिवाय त्या त्या कामाला किती खर्च होतो हें समजत नाहीं. **घराचा खांब, घराचा धारण** पु०, **घराचें पांघरूण** न० प्रपंचाची जबाबदारी वाहातो तो माणूस. **घराची ओज अंगण सांगतें** एकाद्या घरांत कितपत टापटीप आहे हें अंगणाची स्थिति पाहून आपणास समजतें किं० तर्कितां येतें; ओज म्ह० शोभा; टापटीप. **घरीं आलेली** स्त्री०विधवा. **घरकरी** पु०१माझा पति.२ घरचे यजमान. **घरकरीण** स्त्री० १ माझी बायको. २ घरची यजमानीण. **घरकसबी** पु० घरांतील किरकोळ कामें किं०सामानासुमानाची दागदुजी, जो स्वताच करतो तो. **घरकुनडा, घरकुबा, घरकोंबा, घरकोंग्या, घरकोंडा, घरकुंडा, घरघुबडा, घरकोंबडा** पु० चारचौघांत बसणें, उठणें, गप्पा मारणें इ० न करणारा; एकलकोंडा; माणूसघाण्या. **घरगाडा** पु० प्रपंचाची राहाटी; संसाराचीं कामें, कर्तव्यें, जबाबदारी, इ० समुच्चयानें. **घरगुती, घरघराऊ** वि० १ घरांतच केलेला, बांधलेला, रचलेला, इ०. २ ज्याच्याविषयीं परकेपणा वाटत नाहीं असा. **घरगोहो** पु० बायकांत शूर; भितरा. **घरघालू, घरघाल्या** पु० आपल्या किं० लोकांच्या कुटुंबाची हानि करणारा; घर बुडविणारा; उपद्रवी माणूस. **घरघुशी** स्त्री० नवऱ्याला सोडून जाराच्या घरीं राहणारी. **घरचा** वि० १ घरांत केलेला, बनविलेला, किं० उत्पन्न केलेला. २ घरगुती. ३ आत्मीय; परका नव्हे तो; परकासा वाटत नाहीं तो. ४ विकत घेतलेला नव्हे असा. ५ खाजगीचा. **घरजांवई** पु० सासऱ्याच्या घरीं राहातो तो. **घरजुगूत, घरजोगावणी** स्त्री० अल्प सामग्रीवर केलेला निर्वाह; उ० पन्नास रुपायांत घरजुगूत मात्र होत्ये, शिलकीस कांहीं राहात नाहीं. **घरटका** पु० प्रत्येक घरास दर वर्षी जो कर द्यावा लागतो तो. **घरटण** न०, **घरठणा** पु० घर मोडल्यावर घराचा जो चवथरा शिलक राहातो

उ० तो इतिहास ह्या विषयांत

तो. **घरटा (–ठा)** गाकडे किं०कामाकडे जोरानें, घरटें. **घरटी** स्त्री० १ प्र० वळणें; उ०तो आलीकडे रुपये प्रमाणें वर्गणी जमवून अ. ५ उतरती कळा देवळाचा जीर्णोद्धार केला. २ भात द॰॰ दुर्मार्गावर

घरटीप स्त्री० १ घरगणती. २ प्रत्येक ॰॰, यंदा आमांशानें घरटीप घेतली. **घरटोळ, घरडोळ** स्त्री० विशिष्ट गांवांतील प्रत्येक घराची झडती, किं० प्रत्येक घरांत केलेला शोध किं० तपास; उ० ह्या गांवाची घरटोळ घेतली तेव्हां चोर सांपडला. **घरदार** न० घर इ० प्रपंचाचा पसारा; उ० एक पाहुणा म्हणजे घरदार पाहुणें (पाहुण्यासाठीं कांहीं पक्वान्न केलें म्हणजे तें घरातील सर्व माणसांस वाढावें लागतें). **घरबंद** पु० घरांची वसति; उ० ह्या शहरांत एक लाख घरबंद आहे. **घरबारी** पु० कुटुंबवत्सल माणूस; बायकोपोरें इ०चें खटलें ज्याचेवर अवलंबून आहे तो; उ० ना घरबारी ना गोसावी ! **घरबूड** स्त्री० कांहीं कारणानें झालेला सर्वस्वनाश. **घरबैठा** वि० घरांतच बसून करतां येतो तो (धंदा). **घरभरणी** स्त्री० नवीन बांधलेल्या घरांत राहायास जाण्याच्या वेळचा विधि किं० समारंभ. **घरभाट** न० घराच्या सभोंवतीं असलेली आपल्याच मालकीची जागा. **घरभेद** पु० घरांत पडलेली किं०पाडण्यांत आलेली फूट. **घरभेदी, घरभेद्या** वि० घरांतील पक्का माहीतगार,– जो स्वार्थासाठीं किं०केवळ दुष्टपणानें किं० गमतीखातर परक्याला मदत करून घरांत घेतो तो नीच माणूस. **घररिघणी** स्त्री० नवीन बांधलेल्या घरांत रहावयास जाण्याचा विधि किं० समारंभ. **घरसंजोग** पु० घरचा म्ह० स्वताचा सरंजाम,– जो स्वताच्या धंद्याला आवश्यक लागावयाचा तो; उ० त्या हरिदासाचा घरसंजोग आहे (म्ह०त्याच्या स्वताच्या मालकीचा मृदंग, टाळ, सतार, घडवंची इ० सामान आहे). **घरसोकील** वि० एकाद्या घरांत दोन तीन वेळां भाकरीतुकडा खावयाला मिळाल्याकारणानें तें घर धरून राहातो तो (कुत्रा, इ०).

घरका [म० घर] पु० १ लांकूड, वस्त्र इ०तील भोंक. २ कांटा इ०नीं शरीरांत पडलेलें भोक.

घरकुडा पु० पक्ष्याचें घरटें.

घरकूल [**म०** घर] न० किं० खेळांत लहान मुलें करतात संसार ... न० लहानसें घर,–

घरंगळणें अ० ... माणसांत ... दगड, इ० पदार्थ ... किं० ... तें.

... कुटुंबाला ... क्रि० गडगडत जाणें (वाटोळा पाहाणें घराकडे ...).

... याचें पाहिजे **घरघर स्त्री०** १ आसन्नमरण अशा माणसाच्या घशांत चालतो तो आवाज. २ जांत्यावर दळतांना होतो तो आवाज.

घरट [**सं०**घरट्ट] **पु०** जांतें;हें बहुधा लाकडाचें असतें व कधीं कधीं दगडाचें असून त्याचा परीघ एऱ्हवींच्या जांत्याहून मोठा असतो;त्यांत भात भरडून काढतात.

घरटी स्त्री० प्रत्येक घर.

घरडणें स० क्रि० घरटानें धान्य भरडणें.

घरण स्त्री० घरांतील स्त्रियांत मुख्य जी कारभारीण ती.

घरंदाज वि० १ स्वसत्तेच्या घरांत आवरूनें राहाणारा. २ बायको, मुलें, नोकर चाकर, इ० परिवारासह राहाणारा.

घरवी स्त्री० घर बांधावयासाठीं जमविलेलें सामान किं०घर मोडून त्याचें निघालेलें एकत्र रास करून ठेविलेलें सामान.

घरा [**म०** घर] **पु०** भोक, खळगी (गळवानें त्वचेवर पडलेली).

घराणें [**म०** घर] **न०** परंपरेनें चालत आलेला जो वंश तो किं० त्या वंशांतील माणसें समुच्चयानें.

घरू पु० लाकडाला कीड लागून त्यांतून जो भुगा पडतो तो.

घरोटी स्त्री० घरांतील समायिक द्रव्य इ० जिंदगी; उ० घरोटीपैकीं गुरें वाटावयाचीं राहिलीं आहेत.

घरोबा [**म०** घर] **पु०** जीं एका घरचीं माणसें नाहींत त्यांच्यांत एका घरच्या माणसांप्रमाणें उत्पन्न झालेला जो मित्रभाव तो.

घरोसा पु० घराच्या पाटणीला किं० छपराला कोळ्यांचीं घरें लोंबत राहून त्यांच्या तंतूंवर धुराचीं पुटें, धूळ इ० जमून जे दोऱ्यांसारखे लोंबत असतात ते पदार्थ.

घर्म [**सं०**] **वि०** प्रखर,तीक्ष्ण. १ उष्णता. २ उन्हाळा. ३ ऊन्ह. ४ घाम. ❀ **घर्मांशु, घर्मदीधिति पु०** सूर्य. **घर्मांबु न०** घाम. **घर्मचर्चिका स्त्री०** घामोळें.

घर्षण [**सं०** घृष्=घासणें] **न०**१ घासण्याची क्रिया; घासणें. २ लक्ष्यांत ठेवावयाची जी गोष्ट तिच्यावर पुनः पुनः मेहेनत घेणें म्ह० ती घोकणें.३ एकादी क्रिया सफाईनें करतां यावी म्हणून ती पुनः पुनः करणें. ४ एकाद्या गोष्टीचा पुनः पुनः उच्चार करणें किं० ती पुनः पुनः बोलून दाखविणें.

घर्षणें [**सं०** घृष्=घासणें]**स० क्रि०**घासणें, चोळणें, उगाळणें.

घल पु० पदार्थ जितका पातळ किं० सद्रव असावा त्यापेक्षां कमी पातळ किं० कमी सद्रव झालेला पदार्थ.

घवघव, घवघवां क्रि० वि० पुष्कळपणीं.

घवघवणें अ० क्रि० दरवळणें (सुगंध इ०).

घवघवीत वि० १ ठसठसीत (दागिना, पात्र). २ गोंडस (शरीर). ३ संख्येनें पुष्कळ (सभेला जमलेली मंडळी). ४ खाद्यपेयांनीं सुशोभित(ताट). ५ अंगावर खूप दागिने घातलेली (नवरी मुलगी).

घशा पु० चुन्यासारखी पांढरी अशी एक प्रकारची माती.

घष्ट [**सं०** घृष्=घासणें] १ पदार्थ घासण्यासाठीं त्याला दिलेला तडाका. २ पदार्थाच्या शेजारून जातांना त्याला आपल्या अंगाचा स्पर्श होऊन जें घर्षण होतें तें.

घष्टें न० तूप (सांकेतिक अर्थ).

घस [**म०** घासणें] **स्त्री०** १ व्यापारांत किं० व्यवहारांत बसलेली ठोकर किं० आलेली बूड (बसणें, लागणें, येणें). २ दुसऱ्या माणसाच्या सहवासामुळें किं० त्याचा आणि आपला वारंवार संबंध घडत असल्यामुळें सोसावी लागते जी गैरसोय, उपद्रव, किं० त्रास तो; उ० मला माझ्या सासुरवाडच्या माणसांची आलीकडे फार घस पडते. ३ कांहीं एका पदार्थाच्या परिमाणांत आलेली न्यूनता; उ० पांच मण गुळांत आच्छेराची घस आली. ४ सतत चुलीवर ठेवलेल्या भांड्याला जो काळ्या पदार्थाचा थर जमतो तो. ५ कसोटीच्या धोंड्यावर काढलेली सोन्याची रेघ.

घसका पु० १ रट्टा, तडाखा. २ हिसका,

घसक्या वि० दांडगा; ज्याच्या कामांत नाजूकपणा नाहीं असा. [पिरपिरणारा.

घसघशा वि० चरफड्या; तरफड्या; सदा

घसघशीत वि० १ ठसठसीत; किरटा नव्हे तो. २ स्पष्टपणें किं० उठून दिसणारा पदार्थ. **क्रि० वि०** विपुलपणें.

घसघस, घिसघिस वि० जिकीर; कोरडी तकरार; वायफळ ओढाताण (पदार्थ विकत घेतांना किमतीसंबंधानें).

घसटणी, घसट, घसणी [**म०** घासणें] **स्त्री०** कोणा माणसाशीं विशेष परिचय, किं० वरचेवर होत असलेला व्यवहार, किं० येत असलेला संबंध.

घसटणें [म० घासणें; **सं०** घृष्] **अ० क्रि०** जोरानें स्पर्श करणें. **स० क्रि०** कांहीं काम रेटून नेणें; फारशी काळजी न घेतां (कांहीं काम) करणें; उपयोगांत आणावयाच्या स्थितींत पदार्थ नसतां त्याला उपयोगांत आणणें.

घसट्या [म० घासणें] **वि०** दांडगेपणानें किं० निष्काळजीपणानें काम करणारा.

घसडा पु० १ जोराचें घर्षण किं० घासणें. २ जोराचा रट्टा किं० तडाखा.

घसण [**म०** घासणें] **स्त्री०** १ व्यापारांत बसलेली ठोकर. २ दृढ परिचय किं० सहवास.

घसमस स्त्री० पिरपिर; चरफड.

घसरट वि० बुळबुळीत (जमीन). **स्त्री०** दाट परिचय किं० सहवास.

घसरड, घसरण स्त्री० १ जीवरून चालतांना पाय घसरतो अशी जमीन. २ उतरण. ३ बुळबुळीत जमीन.

घसरडा वि० बुळबुळीत (जमीन).

घसरडें न० १बुळबुळीत किं० निसरडी जमीन. २ जमीनीचा निसरडेपणा.

घसरणें अ० क्रि० १ कोणत्याही पृष्ठभागावरून घासत घासत कांहीं पदार्थ खालीं येणें. २ कोणा माणसावर जोराचा शाब्दिक हल्ला करावयाला प्रवृत्त होणें; त्याला रागें भरावयाला किं० निंदावयाला आवेशानें सरसावणें. ३ चुकणें, हुकणें, कांहीं विशिष्ट कामांत कमी पडणें किं० कमी प्रतीचा ठरणें; उ० तो इतिहास ह्या विषयांत घसरला. ४एकाद्या विषयाकडे किं०कामाकडे जोरानें, आवेशानें, किं० उत्सुकतेनें वळणें;उ०तो आलीकडे कादंबरीवाचनावर घसरला आहे. ५ उतरती कळा किं० अपकर्षाची स्थिति अनुभविणें. ६ दुर्मार्गावर जाणें; दुर्वर्तनाकडे वळणें. ७ एकाद्या कामावरून किं० अधिकारावरून काढून टाकला जाणें किं० हाकलून दिला जाणें. ८ आरोग्याच्या बाबतींत कमी होणें; निकोप प्रकृतीच्या बाबतींत कमी होणें; उ० त्याला आमांश झाला तेव्हांपासून तो घसरला आहे.

घसरा [**म०** घसरणें] **पु०** १ रट्टा; तडाखा. २ जोरानें घसरण्याची क्रिया. ३ जोरानें दिलेला धक्का. ४ एकाद्याला बोललेलें दरडावणीचें भाषण (मारणें, देणें). ५ व्यापारांत बसलेली ठोकर किं० आलेली बूड. ६ दुर्दैवाचा घाला.

घसवट स्त्री०, घसवटा, घसाटा पु० [**म०** घसवटणें] १ परिचय; उ० ह्या बाबतींत त्याला भीड घालण्याइतकी त्याची आणि माझी घसवट नाहीं. २ परिपाठ, राबता; उ० तें काम माझ्या घसवटींस पडलें म्हणजे मला तें सुबकपणानें करतां येईल.

घसवटणें अ० क्रि० १ घासणें. २ घासल्याकारणानें झिजून जाणें किं० नाहींसें होणें किं० गळून पडणें. ३ एकाद्या कलेंत, शास्त्रांत, कामांत, किं० व्यवहारांत परिचित होणें किं० निष्णात होणें. ४ कामाला लावला जाणें; उपयोगांत आणला जाणें.

घसा पु० १ गळ्याच्या आंतला भाग. २ कंठध्वनि; उ० महादूचा घसा गोड आहे. ॰**घशाखालीं उतरणें** १ गिळिला जाणें; उ० ताप आल्यापासून मला सर्व पदार्थांची शिसारी आली आहे, कोणताच पदार्थ माझ्या घशाखालीं उतरत नाहीं. २लाचाची रक्कम पचणें; लबाडीनें दुसऱ्याचा लाटलेला पैसा पचणें. **घशांतून काढणें** कोणी खाल्लेला लाच, मारलेला पैसा त्याला ओकावयाला म्हणजे परत द्यावयाला भाग पाडणें. **घशांत पीक धरणें** (किं० **अडकणें**) पर्जन्याच्या अभावामुळें धान्याचीं कणसें वाढीच्या बाजूनें कुंठित होणें म्ह० त्यांची वाढ थांबणें. **घसा कोरडा करण**

फार वेळ बोलत राहाणें किं० कोणाला उपदेश करणें(घसा कोरडा होईपर्यंत). **घसा फुटणें** मुलगा वयांत आल्याकारणानें त्याच्या आवाजाचा पोरकटपणा जाऊन त्याचा आवाज मर्दानी किं० प्रौढ होणें. **घसा बसणें** फार बोलल्यामुळें किं०तळलेला पदार्थ फार खाल्ल्यानें शब्द उमटेनासा होणें किं० शब्दोच्चार अस्पष्ट होणें.

घसारा पु० १ दहापांच औषधें एकत्र उगाळून त्यांचें मिश्रण करतात तें. २ कष्टानें चालतो तो श्वासोच्छ्वास (आसन्नमरण अशा माणसाचा).

घसें न० ... लाकडाचें वाहन,–ज्याचा उपयोग भातशेतांत करतात. २ एक प्रकारची हातगाडी.

घस्त स्त्री० व्यापारांत बसलेली ठोकर किं० आलेली बूड.

घस्मर [**सं०** घस्मर=खादाड; नाशकारक] **वि०** १ बळकट; कणखर; दडदडीत (शरीर,वस्त्र, भांडें,माणूस). २ खादाड.३नाशकारक;विध्वंसक.

घळ पु० झाडावरून आंबे इ० उतरावयाची काठी,–जिच्या टोकाला जाळें बांधलेलें असतें; आंखी. **स्त्री०** दोन डोंगरांच्या मधलि किं० एकाच डोंगरावरील पाण्यानें धुपून खोलगट झालेला पट्टा. **पु०, स्त्री०**बंधाऱ्यांत खेकडे वगैरेंनीं पाडलेलें भोक.

घळघळ, घळघळां, घळांघळां क्रि० वि० १ जोरानें एकामागून एक असे अश्रुबिंदु डोळ्यांतून पडत असतां किं० पडून (रडणें). २ खळखळ असा आवाज करून (वाहाणारें पाणी ...ओढा). ३ सईलसर किं० अघळ... गावर दागिने किं० कपडे बसणें...लागून त्यांतून...). ꙮ **घळघळ घंटा स्त्री०** ब... पदार्थाचा पूर्ण अभाव (**क्रि०** वाजणें). ... समाप्ति

घळघळणें अ० क्रि० १ ज्वरादि आजारामुळें अंगाचे सांधे अत्यंत शिथिल होऊन अशक्तता पावणें; उ० कालच्या उपोषणामुळें मी अगदीं घळघळलों. २ शरीर कृश झाल्यामुळें अंगरखा, बंडी, बांगड्या, करगोटा इ० सईल बसणें. ४ मोत्याचें वेजें सईल किं० मोठें होऊन मोती तारेंत किं० रेशमाचे तंतूंत हालूं किं० सरकूं लागणें. ꙮ **घळघळपोतें न०** अंगावर अति सईल बसणारा कपडा किं० दागिना (तिरस्कारानें). **घळघळ माळा स्त्री० अ० व०** हातांत अति सईल बसणाऱ्या बांगड्या. **घळघळ बाघ्या पु०** ज्यानें अंगावर फाजील सईल कपडे पेहरले आहेत असा माणूस.

घळघळाट [**म०** घळघळणें] **पु०** १ फाजील सईलपणा (कपड्यांचा किं० दागिन्यांचा). २ २ अश्रूंचें वैपुल्य. ३ कोणत्याही पदार्थाचें वैपुल्य.

घळघळीत [**म०** घळघळणें] **वि०** १ बेताचा सईल (दागिना, कपडा, इ०). २ मोकळ्या मनाचा (माणूस). ३ अनियंत्रितपणें केलेलें (संभाषण). **क्रि० वि०** १ औदार्यानें, चिक्कूपणा न करतां; कुचरपणा न करतां; उ० एकबोत्यांच्या घरीं मेजवानींत घळघळीत लाडू वाटले.२ पूर्णपणें; पक्केपणें; कमी नव्हे इतका; उ० ...घळघळीत अडीच हाती धोतरजोडा लागतो.

घळण [**म०** घळणें] **न०, स्त्री०** १ पाणी एकसारखें वाहात असल्या कारणानें पडतो तो चर किं० होते ती उतरण (जमीनीवर किं०डोंगरावर). २ निसरड्याची जमीन किं० प्रदेश.

घळणें अ० क्रि० १ पाण्याच्या नेटानें किं० सततच्या प्रवाहानें नदी इ०ची माती धुपून जाणें. २ दागिना आडकावावयाचें नाक, कान, इ० चें वेजें मोठें होणें. ३ मोती इ० चें वेजें मोठें होऊन तें तारेंत किं० रेशमांत हालूं लागणें. ४ माळेंतील फुलें, मणि इ० ओघळून बाहेर पडणें.

घळबळीत, घळमळीत वि० १ मोकळ्या मनानें बोलण्याचा ज्याचा स्वभाव असा. २ अनियंत्रितपणानें किं० मोकळ्या मनानें सांगितलेले (विचार) किं० केलेलें (संभाषण).

घळण स्त्री० पाणी सतत वाहात असल्यामुळें जमीनीवर किं० डोंगरावर पडतो तो चर.

घळ्या वि० १ निष्काळजी; गयबती; अजागळ; अव्यवस्थित. २ ओंगळ, घाणेरडा, गलिच्छ (माणूस).

घाइवटा पु० क्षत; जखम.

घाई स्त्री० १ त्वरा; जलदी. २ उतावळी. ३ वैपुल्य; पुष्कळपणा; उ० पुढच्या वर्षी कन्यागतांत लग्नांची घाई उसळेल. ४ चर्मवाद्यादिकांचा गजर, किं० त्यांच्या वाजविण्याची गति. ५ एकाद्या कामाचा कोणेकाला लाविलेला नेट किं० केलेला तगादा. ६ नगाऱ्याचा ताल ꙮ **नगाऱ्याची घाई तेथें टिमकी काय जाई** मोठ्या कामांत लक्ष्य

लागलेलें असतां क्षुल्लक कामाकडे कोण लक्ष्य देणार? फार मोठें आणि महत्त्वाचें काम चाललें असतां बारक्या सारक्या कामांकडे कोण पहाणार किं० त्यांची आठवण कोणाला होणार ?

घाऊक वि० १ मोठ्या प्रमाणांत विकत दिलेला किं० विकत घेतलेला (माल); उ० घाऊक माल घेतला तर स्वस्त मिळतो. २ मोठे मोठे; ठोकळ (किरकोळ किं० बारीक सारीक याच्या उलट) उ० मला किरकोळ रकमा सांगूं नको, घाऊक रकमा सांग. [टाऊक; ठावकें.

घाऊल, गाऊल न० नफा; मोठा लग्गा;

घांग स्त्री० आठवण; स्मरण (ठेवणें धरणें,इ०) अकरणरूपी प्रयोगांत किं० निषेध वक्तव्य असतां.

घांग वि० १ चुकारतट्टू; कांहीं काम करावयाचें अंगीं सामर्थ्य असतां तें टाळूं पाहाणारा. २ पिरपिऱ्या; कुरकुऱ्या; ओरड्या; कांधावखोर. ३ थोडकी इजा किं० हानि झाली असतां मोठमोठ्यानें ओरडणारा. ॐ **घांगचाळे पु० अ०व०** १ लोकांचें देणें द्यावयाचें सामर्थ्य असतां पैसे देण्याच्या बाबतींत चालविलेली टोलवाटोलवी किं० लावलेल्या चाळवण्या किं० सांगितलेल्या सबबी किं० बयादी. २ थोडकी इजा झालेली असली तरी ती फार मोठी इजा आहे असा केलेला कांगाव.

घागर स्त्री० नदीवरून किं०विहिरीवरून किं० हौदावरून पाणी वाहून आणावयाचें बारदान,– याचें तोंड लहान असून पोट डेऱ्यासारखें मोठें असतें; घागर तांब्याची, पितळेची किं० मातीची असते. ॐ **घागरी फुंकणें** आश्विन शुद्ध अष्टमीच्या दिवशीं रात्रीं महालक्ष्मीची स्थापना करून तिची पूजा करून तिच्यापुढें स्त्रिया घागरींत तोंडाचा फुंकर घालून नाचतात तो विधि. **घागरगडचा सुभा पु०** पाणी [illegible] काम (विनोदांत). **पालथ्या घ**[illegible] फुट गेलेला उपदेश.

घांगरणें, गांगरणें [illegible] घाबरणें

घागरा[सं०घर्घरा किं० घर्घरी=परकर, लहंगा] **पु०**१गुजराथी किं० मारवाडी स्त्रिया नेसतात तो परकर. २ मुलांचा खेळावयाचा खुळखुळा. ३ एक झाड.

घागरी [**सं०** घर्घरा किं० घर्घरी=घागरगेंडी **स्त्री०** १ लहान घांट. २ घुंगरूं. ३ घागरा ह्या नांवाचें झाड. ४ ह्या झाडाचें फळ. ॐ**घागरमाळ (–ळा) स्त्री०** बैलाच्या गळ्यांत घातलेली घंटांची किं० घुंगरांची माळ. **घागऱ्या घोळ पु०** १ घाबरगुंडी.२घोटाळा;अव्यवस्था. **घागऱ्या देवी स्त्री० अ० व०** अंगावर येतात त्या देवींचा एक प्रकार; ह्या देवी घागऱ्यांच्या आकाराच्या असतात.

घागरें न० कनेकडाचें बूड ज्या लाकडाच्या तुकड्याला खाचणी घेऊन ठेवितात तें लाकूड.

घांगावणें अ० क्रि० घाबरणें; भयभीत होणें.

घाघड पु० कमळाच्या पाकळ्या गळून गेल्यावर जो देठाचा माथा शिल्लक राहातो तो.

घांघरणें अ० क्रि० घाबरणें; भयभीत होणें.

घाट [**सं०** घाट किं० घाटा] **पु०**१ मानेचा कांटा. २ घसा. ॐ **गेलें घाटीं झालें मातीं** घशाखालीं गेलें तें अन्न पुढें मातीच्या रूपाप्रत पावणार म्हणजे (१) शारीरिक म्ह० इंद्रियजन्य सुखें क्षणभंगुर असतात (२) इंद्रियजन्य सुखें परिणामीं बिन किंमतीचीं असतात. **घाटी फुटणें** आवाजाचा पोरकटपणा नाहींसा होऊन मुलगा प्रौढ किं० मर्दानी आवाजाचा होणें. २ आवाज घोगरा होणें (फार बोलल्यामुळें). **घाटीं शेंदूर ओतणें** प्रतिस्पर्धी गवयाचा आवाज बदसूर करण्यासाठीं त्याच्या खाद्यपेयांत शेंदूर घालणें (दुष्टपणाचा प्रकार).

घांट [सं० घंटा] **स्त्री०** १घंटा (वाजवावयाची). २ (लाक्षणिक) मोठ्या किं० कर्कश आवाजाचा माणूस. ३ (लाक्षणिक) ज्याच्या पोटांत गुप्त गोष्ट राहात नाहीं असा माणूस.ॐ **घांटपान न०, घांटपट्टा पु०**गोणपाटाचा किं० कातड्याचा पट्टा,–ज्याला घंटा अडकावलेल्या असतात आणि जो शोभेसाठीं बैलाच्या गळ्यांत घालतात.**मांजराच्या गळ्यांत घांट बांधणें** धोक्याचें किं०जोखमीचें काम करण्याचा पथकर घेणें किं०त्या कामांत पुढारीपण स्वीकारणें–(उंदरांच्या सभेच्या गोष्टीवरून रूढ झालेला वाक्प्रचार). **घांटसर पु०** लहान लहान घंटांची माळ किं० पट्टा,– बैलाच्या गळ्यांत शोभेसाठीं घालावयासाठीं.

घाट [सं० घाट=उतरण्याची जागा; आड्डा] पु० १ दोन देशांच्या मध्यें असलेली डोंगराची रांग. २ सह्याद्रीच्या पलीकडचा म्हणजे पूर्वेकडचा प्रदेश (कोंकणाच्या अपेक्षेनें).३ डोंगर ओलांडून जावयाची वाट. ४ नदीचा कांठ,–जेथें होड्या लागतात, जेथें होड्यांतील माल उतरतात किं० होड्यांत चढवितात. ५ परीट इ० जेथें कपडे धुतात ती नदीच्या कांठची जागा; जेथें ब्राह्मण संध्येला बसतात ती नदीकांठची जागा. ॐ **घाटपाया** पु० पर्वताचा किं० डोंगराचा पायथा; उ० घाटपायापासून घाटमाथा एक कोस-भर उंच आहे (किं० दूर आहे). **घाटबंदी** स्त्री० १ पर्वताचा घाट बांधणें किं० बांधलेल्या घाटाची दागदुजी करणें इ० संबंधाचा खर्च वसूल करण्या-साठीं मुशाफरांपासून घेतात तो कर. २ घाटानें कोणी जाऊं येऊं नये म्हणून जो बंदोबस्त केलेला असतो तो किं० चौकी बसविलेली असते ती. **घाटबुडी** स्त्री० घराचा पायथा.

घाटमाथा पु० पर्वताच्या डोक्यावरचा प्रदेश. **घाटवळ, घाटवळी** वि० घाटावरचा किं० घाटासंबंधाचा (माणूस, जनावर, इ०). **एकाद्याला घाटांत अडविणें** किं० **चापणें** त्याच्या संकटस्थितीचा फायदा घेऊन त्याला लुबाडणें किं० बुडविणें किं०आपलें कार्य साधून घेणें. **घाटनाळ** स्त्री० डोंगरावरची अरुंद पायवाट. **घाटपांड्या** पु० घाटांतून जाणाऱ्या येणाऱ्या मालावर जकाती वसूल करणारा सरकारनें नेमि-लेला अधिकारी.

घाट [म० घडणें किं० घडविणें] पु० १ केलेल्या किं० घडविलेल्या पदार्थाचा आकार, डौल किं० घडण; उ० तुमच्या झारीचा घाट तांब-टाला चांगला साधला नाहीं. २ योजना, मांडणी, रचना, बेत. ॐ **घाटसर, घाटशुद्ध** वि० सुंदर आकाराचा;ज्याचे वेगळे वेगळे अवयव किं० भाग योग्य प्रमाणांत आहेत असा (माणूस, जनावर, कांहीं केलेला पदार्थ).

घाट [म० घाटणें] स्त्री० १ पाण्याला पीठ लावून घाटून खावयासाठीं केलेला पातळ पदार्थ. २ हरभऱ्याच्या झाडावर पडणारा एक रोग,–ज्यामुळें हरभऱ्याच्या शेंगा म्हणजे घाटे चांगले भरत नाहींत (क्रि० पडणें).

घाटण [म० घाटणें] न० १ शिजलेली डाळ पळीनें ठेचन करतात तें पातळ तोंडीलावणें. २ शिजत असलेला पदार्थ पळीनें ढवळण्याची क्रिया.

घाटणा, घाटणेरा [म० घाटणें] पु० १ जोंधळे इ० धान्याच्या लाह्या करतांना जोंधळे इ० मडक्यांत घालून ते ज्या काठीनें हालवितात किं० ढवळतात ती काठी; ह्या काठीच्या टोकाला फडकीं गुंडाळून त्या टोकाला चेंडूचा आकार दिलेला असतो. २ लाकडाच्या किं० दगडाच्या उखळांत डाळ इ० पदार्थ घाटा[illegible] लागणारा वरवंट्या-सारखा लांबोडा दगड असतो [illegible] खळाला ' घाटवाईन ' म्हणतात.

घाटणूक [म० घाटणें] स्त्री० लग्न इ० संबंध जुळवावयाचा असतो त्याची जी वाटाघाट करतात ती.

घाटणें स० क्रि० १ पळी, ओगराळें, इ० नीं शिजलेली डाळ इ० ठेचणें. २ उपद्रविणें, सता-वणें. ३ ०ची वाटाघाट करणें; ०ची चर्चा करणें.

घाटणें न० १ लाह्या करतांना जोंधळे इ० ढवळण्याचें साधन; घाटणा. २ पळी, ओगराळें, इ० नीं शिजलेली किं० शिजत असलेली डाळ इ० ढवळण्याची क्रिया.

घांटरू, घांटरें [म० घांट=घंटा] न० १ लहा-नशी घांट,–बैल इ०च्या गळ्यांत शोभेसाठीं बांध-तात ती. ॐ**ढोरान् ढोर मेलें आणि कुतऱ्याच्या गळ्यांत घाटरूं** (किं० **घांटरें**) **आलें** सगळीं गुरेंढोरें मेलीं आणि रिकामी पडलेली घांट कुत-ऱ्याच्या गळ्यांत बांधली गेली; सर्व कर्ते पुरुष मरण पावले आणि जबाबदारी किं० अधिकार एका क्षुद्र पोराकडे आला. २ घांट (तुच्छतेनें).

घाटलें [म० घाटणें] न० पाण्यांत गूळ, खोबऱ्याचा चहूं, वेलदोड्याच्या दाण्यांचें चूर्ण इ० घालून घावनाबरोबर खावयाला जो पातळ पदार्थ करतात तो.

घाटवाईन [म० घाटणें+वाईन (उखळ)] न० पुरणासाठीं शिजविलेली डाळ किं० दुसरा कांहीं पदार्थ घाटावयाचें जें लाकडाचें किं०दगडाचें उखळ असतें तें.

घाटसर, घाटसरी स्त्री० १ डोंगराच्या माथ्याचा प्रदेश. २ घाटमाथ्याच्या आजूबाजूचा प्रदेश.

घाटसर्प [**सं०** घाट, घाटा=मानेचा कांटा] **पु०** घशाचा एक रोगविशेष.

घाटा पु० हरभऱ्याच्या झाडाची शेंग.

घाटा [**म०** घाटणें] **पु०** १ जोंधळे इ०च्या लाह्या करतांना ते जोंधळे इ० ढवळावयासाठीं जी काठी योजतात ती,—ह्या काठीच्या टोकाला फडकीं गुंडाळून त्याला चेंडूचा आकार दिलेला असतो. २ बाजरी, जोंधळे, उडीद, मूग, इ० शिजवून गुरांना जें पुष्टीसाठीं खाद्य घालतात तें.

घाटाघाट [**म०** घाटणें] **स्त्री०** १ जोरानें घाटणें. २ वाटाघाट, चर्चा.

घाटी [**म०** घाट] **वि०** सह्याद्रीच्या पूर्वेकडचा जो प्रदेश तेथील किं० त्या संबंधाचा.

घाटी [**म०** घाट=डोंगरी वाट] **स्त्री०** डोंगरावरून पलीकडे जाण्याची अरुंद वाट.

घांटी [**सं०** घंटा; **म०** घांट] **स्त्री०** १ लहान घंटा किं० घांट. २ घसा. ३ हनुवटीखालीं गळयाचें जें हाड पुढें आलेलें असतें तें. ४ शिमग्याच्या दिवसांत साखरेच्या पाकाच्या पदकांची करतात ती माळ; गांठी. ❀ **घांटी खाऊन बोलणें** मोठमोठ्यानें बोलणें. **घांटी फुटणें** (किं० **बदलणें**) १ प्रौढ किं० मर्दानी आवाजाचा होणें (वयांत आलेला मुलगा). २ गवयाच्या कंठांतून बदसूर येऊं लागणें. **एकाद्याची घांटी चिप्प होणें** १ घशाखालीं खाद्य ढकलण्याला तो असमर्थ होणें (हा एक रोग आहे).२ शब्दोच्चार करण्याला असमर्थ होणें (घशाच्या कांहीं विकृतीमुळें).

घाटींव [**म०** घाटणें] **वि०** १ पळी, ओगराळें, इ० नीं घाटलेलें किं० ठेचलेलें. २ ज्याची वाटाघाट किं० चर्चा करण्यांत आली आहे असा (विषय).

घाटू पु० लाकडाची मोठी पळी.

घाटोळा वि० घाटवळ.

घाटया [**म०** घाट] **पु०** नदी इ० च्या कांठावर स्नान, संध्या, इ० साठीं आलेल्या ब्राह्मणांना भस्म, गोपीचंदन, इ० पदार्थ देऊन उपजीविका करतो तो.

घाटया, घांटया पु० लहानशी हातोडी (सोनार, तांबट, इ० कारागिरांच्या उपयोगाची).

घाड स्त्री० १ शरीरास पडतें तें मोठें क्षत. २ भातेणाची पेंढी.

घाडकी स्त्री० घाड्याचें काम, कर्तव्य, किं० धंदा. खालीं ' घाडी ' पहा.

घाडी पु० देवळाच्या व्यवस्थेकडचा एक अधिकारी; गुरव.

घाण स्त्री० १ नाकाला न आवडणारा वास; दुर्गंधी. २ डोळ्यांला किं० नाकाला न आवडणारी वस्तु. ३ केरकचरा. ४ जमाखर्च,हिशेब, इ०तील निकालास न लागलेल्या बाबती समुच्चयानें. ❀ **एकाद्याच्या घाणीचा वि०** त्याच्या आश्रयाला असलेला; त्याच्या नात्याचा किं० दुसऱ्या कोणत्याही संबंधाचा. **घाणकढा वि०** योग्य मर्यादेच्या पलीकडे कढविलेलें म्हणून घाण येत असलेलें (तूप,भात,इ०). **घाणवट स्त्री०** घाणीची जागा. **घाणट, घाणवट वि०** १ ज्याला घाण किं० दुर्गंधी येत आहे असा.२ आवडण्याजोगा नाहीं असा. **घाणेरडा, घाणेरा, घाणेल, घाणेला वि०** १ ज्याला घाण येत आहे असा. २ अस्वच्छ, ओंगळ, गलिच्छ. ३ ज्याचा त्रास येतो असा (माणूस, पदार्थ). **घाणेरी मुंगी स्त्री०** एक प्रकारची मुंगी,—जिला घाण येते.

घाणणें, घाणवणें घाणावणें [**म०** घाण] घाणीनें युक्त असणें; दुर्गंधयुक्त असणें.

घाणवट [**म०** घाणा] **स्त्री० न०** तेल्याच्या घाण्याची जागा.

घाणा पु० १ तीळ, भुईमुगाचे दाणे, इ०तून तेल काढण्याचें साधनविशेष. २ उसाचा रस काढण्याचें साधनविशेष; चरक. ३ तेल्याच्या घाण्याची लाट ज्यांत फिरते ती कुंडी. ४ इमारती चुना मळावयासाठीं जो वर्तुळ चर केलेला असतो (ज्यांतून दगडी चाक फिरतें) तो. ५ एका खेपेला घाण्यांत घातलेला तीळ, खोबरें, इ० तेल काढावयाचा पदार्थ. ६ कांडतांना एका खेपेला घातलेले तांदूळ,डाळ इ०. ७ कांडणें,दळणें,भाजणें, तळणें, कुटणें, इ० क्रिया पदार्थावर करावयाच्या असतां एका खेपेला घेतलेलें त्या त्या पदार्थाचें परिमाण. ८ संक्रान्तीचे दिवशीं ब्राह्मणास धान्यासाठीं उखळावर जो धान्यराशि करतात तो. ९ लग्न, मुंज, इ० मंगल प्रसंगीं दुरडींत तांदूळ घालून

मुसळांनीं ते कांडण्याचा समारंभ करतात तो (क्रि० घालणें,भरणें). **एकाद्या माणसाचा घाणा करणें** त्याच्या अंगाशीं किं० अंगावर मस्ती किं० खोड्या करून त्याला सतावणें.**एकाद्या जनावराचा घाणा करणें** त्याला कठोरपणानें वागविणें; त्याच्या-कडून त्याच्या ताकदीच्या बाहेर काम करून घेणें. **एकाद्याला घाण्यांत घालणें** त्याला संकटांत किं० पेचांत लोटणें. **एकाद्याला घाण्यांत घालणें** किं० **घाण्यांतून पिळून काढणें** त्याला जिवाविशेष काम सांगून त्याला निर्वीर्य आणि निःसत्त्व करून टाकणें; त्याचा भुसा पाडणें (लाक्षणिक).

घाणावणें मागें ' घाणणें ' पहा.

घाणी [**म०** घाणा] **स्त्री०** 'घाणा' शब्दाचे ३ आणि ९ हे अर्थ वगळून बाकीचे सारे.

घाणेरी [**म०** घाण] **स्त्री०** एक दुर्गंधियुक्त झुडूप.

घात [**सं०**] **पु०** १ ठोसा, तडाखा. २ वध. ३ नाश; नुकसान; हानि. ४ नासाडी, विचका. ५ समान संख्यांचा गुणाकार; त्याच संख्येस त्याच संख्येनें एक वेळ गुणलें असतां द्विघात होतो; दोन वेळां गुणिलें असतां त्रिघात किं० घन होतो; तीन वेळां गुणिलें चतुर्घात होतो, ई०;उ०२चा द्विघात४ होतो त्याला २ चा वर्ग म्हणतात. २ चा त्रिघात ८ झाला घन म्हणतात.**॥ आत्मघात पु०** १स्वताची हत्त्या. २ स्वताची हानि स्वता करून घेणें.**घातकर्म न०** एकाद्या संख्येला त्याच संख्येनें कांहीं विशिष्ट वेळां गुणणें. **घातघेणा (–ण्या) वि०** ऐन वेळीं विघ्न उपस्थित करणारा किं०माघार खाणारा किं० निराशा करणारा. **घातचतुर्दशी स्त्री०** भाद्रपद वद्य चतुर्दशी; लढाईत किं० अपघातानें जो मेला असेल त्याचें श्राद्ध ह्या तिथीस करतात. **घात-चतुष्टय न०** घातचंद्र, घाततिथि,घातनक्षत्र,आणि घातवार,हे चार घात. **घातचंद्र पु०** अशुभ नक्ष-त्रांचा चंद्र.**घाततिथि स्त्री०** अशुभ तिथि. **घात-नक्षत्र न०** अशुभ नक्षत्र.**घातपात पु०** १ कोणे-काचा वध किं० नाश. २ कोणेकाची नुकसानी,– कोणत्याही प्रकारें केलेली. ३ कोणेकावर ओढवलेलें संकट. **घातप्रकाशक पु०**एकाद्या संख्येचा कितवा घात करावयाचा आहे हें दाखविणारा आंकडा. **घातवार पु०** आठवड्याच्या सात दिवसांपैकीं आपणाला जो अशुभ दिवस तो,–ह्या दिवशीं कांहीं महत्त्वाचें काम आरंभिलें असतां तें अयशस्वी होतें. **घातवेळ स्त्री०** १ अशुभ समय. २ मोठें संकट गुजरण्याचा समय. ३ मरणाचा समय.

घातुक [**सं०** घातक] **वि०** १ मारक. २ अपायकारक; नुकसान करणारा. ३ हिंस्र (पशु).

घाव स्त्री० पर्वतांत किं० कातळांत पडलेलें असतें तें भोक.

घाबरणें अ० क्रि० १ भीतीनें ग्रस्त होणें;भय-भीत होणें. २ गोंधळून जाणें.

घाबरा वि० १ घाबरलेला. २ भ्यालेला. ३ श्वासोच्छ्वास साफ करतां येत नाहीं अशा स्थितींत असलेला. **॥ जीव घाबरणें** कासावीस होणें; श्वासोच्छ्वास साफ करतां येत नाहीं अशा स्थितींत असणें. **॥ घांबऱ्यां घाबऱ्यां क्रि० वि०** घाब-रलेल्या स्थितींत; भयानें व्याकुळ होऊन.

घाम [**सं०** घर्म] **पु०** उष्णता, ज्वर, इ० मुळें अंगाच्या छिद्रांतून बाहेर पडतें तें पाणी; स्वेद;घर्मो-दक. २ पाण्याची वाफ जी पात्रादिकांच्या पृष्ठ-भागावर जमते ती. ३ काष्ठ जळतेसमयीं त्याला कांहीं विशिष्ट ठिकाणीं जमतो तो पातळ पदार्थ. **॥ घामाघूम वि०**वेगानें चालल्यामुळें किं०कांहीं शक्तीचें काम केल्यामुळें किं० कांहीं कारणानें घाबरगुंडी उडाल्यामुळें घामानें डबडबलेलें (अंग).

घामट वि० १ घामाची घाण ज्याच्या अंगाला येत आहे असा (मनुष्य). २ घामाची घाण ज्याला येत आहे असा (कपडा). ३ गलीच्छ; ओंगळ; कळकट; मळकट; दुर्गंधयुक्त. **॥ घामटघाण, घामटाण, घामट्टाण, घामसाण** [**म०** घाम+घाण] **स्त्री०** घामाची घाण (शरी-राला किं० चिरगुटाला येते ती).

घामटा [**म०** घाम] **पु०** कष्टाचें किं०जिकी-रीचें काम करीत असतां अंगांतून निघत असतो तो घाम किं० असें काम केल्यामुळें झालेली शरी-राची दुर्दशा; उ० चौघांचें काम त्याला एकट्याला करावें लागल्यामुळें त्याचा घामटा निघाला; उ० अंगाचा घामटा काढावा तेव्हां कोठें मला सात रुपड्या महिन्याला मिळतात.

घामावणें, घामेजणें, घामेणें [**म०** घाम] **अ० क्रि०** घामानें भिजून जाणें; घामानें न्हाणें.

घामेला [**म०** घाम] **वि०** घामानें निथळत असलेला; ज्याला घाम आला आहे असा.

घामोळी [**म०** घाम] **स्त्री०** उकाड्यामुळें अंगावर उठतात त्या पुळ्या प्रत्येक.

घामोळें [**म०**घाम] **न०** १ घर्मविकारानें अंगावर उठतो तो पुरळ. २ घाम शोषून घ्यावयासाठीं कांहीं विशिष्ट पदार्थांत फडक्याचा, बुरणुसाचा, कातड्याचा, किं० अन्य द्रव्याचा घालतात तो तुकडा; जोड्यांत, पागोट्यांत, घोड्याच्या पाठीवर खोगिराखालीं, अंगांत घालावयाच्या कपड्यांच्या खाकांत असे तुकडे घालतात.

घाय [**हिं०**] **पु०** १ घाव; तडाखा; ठोसा. २ जखम, क्षत, व्रण. ॐ **घायकटर, घायकटार, घायखेटर वि०** ज्याला कितीही मारलें किं० रागें भरलें तरी जो सुधारत नाहीं असा; कोडगा. **घायकुठार, घायखोर वि०** अत्यंत थोडकी इजा झालेली असली तरी आपणाला फार मोठी इजा झाली असें भासवितो तो; कांघावखोर. **घायतेल न०** बिब्बा, राळ, आंबेहळद, गंधक, मोरचुत, रुईचें पान, इ० द्रव्यें तेलांत खळून खरजेला लावण्यासाठीं जें तेल करतात तें; या तेलाला ‘ भडक तेल ’ असें दुसरें नांव आहे.

घायकुत्या (–थ्या)[**म०** घाई(त्वरा)+कुथणें] **वि०** दुसऱ्याला अति निकड लावण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा,–निकड लावण्याला योग्य कारण नसतां.

घायकूत (–थ)[**म०** घाई (त्वरा) + कुथणें] **स्त्री०** १ कारण नसतां, किं० विशेषसें कारण नसतां, दुसऱ्याला कांहीं काम करण्याबद्दल लाविलेली निकड किं० तगादा. २ कांहीं काम करण्याबद्दल दुसऱ्याला चालविलेला आग्रह किं० लाविलेला नेट; (देणें, लावणें, करणें, मांडणें).३ पुढें ताप यावयाचा असतां अगोदर जी अस्वस्थता वाटूं लागते ती (येणें). ४ खाजेची इसळी; खाजविण्याची अनिवार प्रवृत्ति (खरूज झाली असतां उठते ती).ॐ **घायकुतीस येणें** १ कांहीं गोष्ट मनाजोगी झाली नसतां असंतुष्टपणाची लहर येणें; रडण्याच्या किं० चरफडण्याच्या स्थितीच्या अगदीं जवळ गेलेलें असणें. २ विलंब सहन करण्याची अंगीं ताकद नाहीं अशा स्थितींत असणें.

घायतळ स्त्री० १ चक्कर, भोंवळ, घेरी(येणें). २ डोकें इ० भागाला रट्टा बसल्यानें डोळ्यांपुढें येते ती अंधेरी (येणें). ३ आश्चर्य, आचंबा.

घायतावणें [**स०** घाई] **स० क्रि०** कांहीं काम करण्याबद्दल दुसऱ्याला घाई करणें किं० नेट लावणें.

घायपत, घायपात, घायमार, घायमारी स्त्री० एक वनस्पति,–जी दिसण्यांत कोरफडीसारखी असून जिच्या पाती पाण्यांत कुजवून त्यांतील तंतूंच्या दोऱ्या करतात.

घायवटणें [**म०** घाय] **अ० क्रि०** १ जखम लागल्यामुळें जर्जर झालेलें असणें. २अत्यंत अस्वस्थ अशा स्थितीत असणें; कसेंसेंच वाटणें ह्या भावनेमुळें पीडित झालेलें असणें.

घायवटा [**म०** घाय] **पु०** १ जखम. २ शस्त्राचा तडाखा किं० रट्टा.

घायाळ [**म०** घाय] **वि०** १ ज्याला जखम झाली आहे असा; शस्त्रादिकांचे वार ज्याच्या अंगावर झाले आहेत असा. २ आपलें कांहीं बदकर्म उघडकीस आल्यामुळें शरमलेला. ३ ज्याची मानखंडना झाली आहे असा. ४ कांहीं लाजिरवाण्या कृत्यामुळें ज्याला समाजांत तोंड दाखवावयाची लाज वाटते असा. ५ कमजोर झालेला (रोग, शत्रु, प्रतिपक्षी). **न०** एक प्रकारचें श्राद्ध; लढाईत जो मरण पावला किं० जो अपघातानें मरण पावला त्याच्यासाठीं जो श्राद्धविधि भाद्रपद वद्य चतुर्दशीला करतात तो. मागें ‘ घातचतुर्दशी ’ पहा.

घार स्त्री० १ एक पक्षी. २ कागदाचा पतंग (घारीच्या आकाराचा). ॐ **घारीसारखी वाट पाहणें** एकाद्याच्या येण्याच्या मार्गाकडे उत्कंठापूर्वक दृष्टि लावून बसणें.

घारकूट न० उडीद आणि तांदूळ एकत्र दळून केलेलें जाडें भरडें पीठ.

घारगा पु० गव्हाचा रवा तुपावर भाजून त्यांत गूळ घालून मळून त्याच्या थापट्या करून त्या तळून जें खाद्य करतात तें; शिजविलेल्या भोपळ्यांत कणीक, गूळ, इ० घालून ज्या थापटी करून तळून काढतात, त्यांना ‘भोपळ्याचे घारगे’ म्हणतात.

घारमोर न० मुलांचा एक खेळ,—ज्याला ' आळंचो माळंचो ' असेंही म्हणतात

घारवीट न० उडीद आणि तांदूळ एकत्र दळून केलेलें पीठ. वर ' घारकूट ' पहा.

घारा वि०मांजराच्या डोळ्याच्या रंगाचे ज्याचे डोळे आहेत असा; मांजरडोळ्या. ꙮ **घारडोळ्या वि०** घाऱ्या डोळ्यांचा.

घारी स्त्री० घारगा. [२ घार.

घारूड [म० घार] न० १ घारींचा थवा.

घारेला, घारोळा [म० घारा] वि० मांजराच्या डोळ्यांसारखे डोळे ज्याचे असा.

घाऱ्या वि० वर ' घारोळा ' पहा.

घाल [म० घालणें] स्त्री० १हल्ला(घालणें,पडणें, पाडणें). २ एकाद्यावर आलेलें किं० आणलेलें संकट (पैशाच्या संबंधाचें). ३ कोणतेंही मोठें संकट (दैवगतीनें ओढवलेलें किं० चांडाळांनीं दुष्टपणानें एकाद्यावर ढकललेलें).

घालण [म० घालणें] स्त्री० १ मार्गांतील अडचणीची आणि धोक्याची जागा.२ कोणत्याही कार्यांतील गोंधळविणारा भाग. ३ नुकसानीची बाबत. ४ चोर, दरवडेखोर,इ० नीं उपद्रविलेला प्रदेश.५पंचाइतीची स्थिति. ६नुकसान, ठोकर. ७ तोहमत, आळ.

घालणें स० क्रि० १ (पात्रादि बारदानांत कांहीं पदार्थ) भरणें, ठेवणें, शिरकावणें,ओतणें, ढकलणें, किं० खुपसणें. २ वाढणें; उ० मला आमटी घाल.३प्रविष्ट करणें; कांहीं कामांत योजणें; कांहीं विशिष्ट उद्देशानें किं० कांहीं विशिष्ट धोरण दृष्टीपुढें ठेवून कांहीं गोष्ट आपण करणें किं० दुसऱ्याला करावयाला लावणें; उ०मी आपल्या मुलाला पाठशाळेंत घालणार आहें; उ० त्या बाईला भात कांडावयाला घाला; उ० मी आपल्या पुतण्याला व्यापारांत घालणार आहें. ३ स्थापणें, सुरू करणें; उ० शाळा घालणें, दुकान घालणें. ४ शरीराच्या विशिष्ट भागीं किं० भागावर कपडा किं० दागिना ठेवणें किं० परिधान करणें; उ० अंगांत अंगरखा घाल; उ० पायांत जोडा घाल; उ० नाकांत नथ घाल; उ० बोटांत अंगठी घाल. ५ सोडवावयाला देणें (प्रश्न, कोडें, गुंतागुंत, घोटाळा, इ०). ꙮ **तांदूळ, गहूं, इ० दळावयाला घालणें** ते दळावयाचें काम सुरू करणें. **धुणीं धुवावयाला घालणें, घर बांधावयाला घालणें** धुवावयाला, बांधावयाला,सुरवात करणें. **त्यानें मला हजार रुपयांस घातलें** त्यानें माझे हजार रुपये बुडविले; तो माझ्या हजार रुपयांच्या नुकसानीस कारण झाला. **एकाद्यावर चोरीचा आळ घालणें** तूं चोरी केलीस असें त्याला म्हणणें. **भिंत, कूड, इ० घालणें** भिंत, कूड, इ० बांधणें, रचणें, किं० उभारणें. **वाद,गोंधळ, इ० घालणें** वाद, गोंधळ, इ० सुरू करणें किं० माजविणें. **सणाचे दिवशीं पुरण घालणें** पुरण हें खाद्य नैवेद्यास किं० भोजनांत खावयास सिद्ध करणें. **एकाद्याला शपथ घालणें** तूं अमुक गोष्ट कर किं० करूं नको असें म्हणून त्याच्यावर शपथेचा जोर किं० आग्रह पाडणें.**जेवण, समाराधना इ० घालणें** मित्र, ब्राह्मण,जातवाले, इ०ना जेवावयास बोलवून जेवूं घालणें. **उदाहरण, प्रश्न, कोडें,इ० घालणें** तें सोडवावयास देणें किं०सांगणें.**एकाद्या कामाला हात घालणें** तें पथकरणें किं० पथकरून करूं लागणें. **उडी घालणें, झेप घालणें** उडी मारणें,झेप घालणें.**दुकान,शाळा,पिठाची गिरणी इ० घालणें** ती सुरूं करणें, मांडणें,किं० स्थापणें. **एकादी चाल, (किं० संप्रदाय), घालणें** प्रचलित किं० रूढ करणें. **कांहीं गोष्ट एकाद्याच्या कानावर घालणें** ती त्याला कळविणें, सांगणें, किं० निवेदणें. **मुलाला कित्त्यावर घालणें** अक्षरांचा कित्ता गिरवून त्या अक्षरांप्रमाणें कागदावर शाईनें अक्षरें काढावयाला मुलाला शिकविण्याचा प्रारंभ करणें. **कुत्र्याचे पाय मांजरावर आणि मांजराचे पाय कुत्र्यावर घालणें** १ दोन माणसांत कलागत लावून देणें.२ अनीतीच्या खटपटी लटपटी करणें; कांहीं तरी निरुपयोगी आणि भलत्याच गोष्टी किं० कारभार करणें. **धाड घालणें** हल्ला करणें. **घालपांड्या पु०** १ वेडाचें सोंग घेणारा: आपण वेडे आहों असें लोकांना खोटेंच भासविणारा. २ दुसऱ्याच्या कामांत विघ्नें आणणारा; दुष्ट माणूस. **घालवेडा वि०**जो मुद्दाम वेड्यासारखें वर्तन करतो तो (कांहीं स्वार्थ साधण्यासाठीं). **घालवेड न०** खोटें वेड (लबाडीनें घेतलेलें). **घालपिसा वि०** मुद्दाम वेड पांघरणारा.**घालपिसें**

न० खोटें वेड. **घालफेल स्त्री०** ज्वरादि कारणां-मुळें अंगाची काहली होत असल्याकारणानें हात-पाय इतस्ततः टाकणें किं० हासडणें. **घालमेल, घालमेली स्त्री०** १ अव्यवस्था; गोंधळ; इकडचें तिकडे आणि तिकडचें इकडे करून शिस्तीचा किं० क्रमाचा भंग करणें ;उ० त्या पोरानें पोथीची घालमेल केली. २ ज्वरादि कारणामुळें हातां-पायांना दिलेले हासडे. ३ कमीज्यास्ती; योग्य प्रमाणांत किं० क्रमांत केलेला किं० झालेला भंग; उ० पथ्यामध्यें घालमेल न झाल्यास माझ्या औष-धानें तुम्हाला हटकून गुण येईल. ४कांहीं आजारा-मुळें शरीराला किं० मनाला वाटतो तो अस्वस्थ-पणा. ५ गुप्तपणें केलेलें कारस्थान, रचिलेला व्यूह, किं०योजिलेली मसलत.**एकाद्याला घालून पाडून बोलणें** ज्याला बोलावयाचें किं० निंदावयाचें त्याच्या नांवाचा प्रत्यक्ष निर्देश न करतां त्याला तें लागेल किं० झोंबेल अशा प्रकारें बोलणें.

घालविणें [म० 'घालणें' चें बहुतेक अर्थीं प्रयोजक रूप] **स० क्रि०** १ स्थलविशेषीं स्थित किं० संबद्ध मनुष्यास किं० पदार्थास त्या स्थलापासून दूर करणें. २ पाठविणें; पाठवून देणें. ३ हाकलून देणें. ४ पोचता करणें (मनुष्य किं० पदार्थ). ५ (पैसा, संपत्ति, आबरू, मोठेपणा, किं०लौकिक) गमावणें किं० गमावून घेणें किं०गमा-वून बसणें. ६ (वस्त्राला, भांड्याला, आबरूला लागलेला डाग, लांच्छन, इ०) नाहींसें करणें. ७ (प्रायश्चित्तविधीनें पाप) निरसून टाकणें.८(काल) अतिक्रांत करणें. ९ (एका संख्येंतून दुसरी संख्या) बाद करणें किं० वजा करणें. १०(कोणा माणसाला त्याच्या गंतव्य स्थानापर्यंत किं० मार्गाच्या कांहीं अंतरापर्यंत) पोचवावयास जाणें.

घाला [म० घालणें] **पु०** हल्ला; छापा; प्रहार (घालणें, पडणें, येणें).

घालू [म० घालणें] **वि०** १ दुसऱ्याला पेचांत किं० संकटांत घालण्याचा स्वभाव ज्याचा असा. २ लबाड; अप्रामाणिक, लुच्चा. ३ दुसऱ्या-पासून ऋण घेऊन तें बुडविणारा.

घाव पु० १ तडाखा; रट्टा. २ व्यापारांत बसलेली ठोकर (बसणें, लागणें). ⊛ **टांकीचे घाव सोसल्यावांचून देवपण येत नाहीं** अपरं-पार कष्ट सोसावे तेव्हां वैभवाची स्थिति प्राप्त होते.**घावडाव पु०**१सोयीचा समय किं०परिस्थिति; अनुकूल वेळ. २ आटोका. ३ युक्त्या, व्यूह. ४ प्रयत्न.

घावटणें, घावटळणें [म० घाव] **स० क्रि०** १ वर वर सडणें; थोडेसें कांडणें; ०ला घाव लावणें; उ० हे तांदूळ अमळसे घावटून आण. २ कांहीं कांहीं ठिकाणीं आणि फार खोल जखमा न होतील अशा प्रकारें शस्त्रप्रहार करणें; उ०चोरांनीं त्याला बरेच ठिकाणीं घावटलें.

घावटा [म० घाव] **पु०** जखम; शस्त्रा-दिकांचा रट्टा किं० तडाखा.

घावन न० दगडाचें उखळ.

घावन, घावना पु० तांदुळाच्या पिठाचें एक खाद्य; हें सच्छिद्र असून तें 'घाटलें' नांवाच्या पातळ पदार्थांत बुडवून खावयाचें असतें.

घाशीरामी [म० घाशीराम ह्या नांवाचा एक कोतवाल पेशवाईंत होऊन गेला त्यावरून] **स्त्री०** १ दाटीनें थोडक्या जागेंत पुष्कळ माणसें बसल्या कारणानें होणारा कोंडमारा. २ जुलमी आणि मूर्खपणाची कारकीर्द किं० शासनपद्धति.

घास [सं०] **पु०** १ अन्न. २ गवत. ३ एका वेळीं तोंडांत घालून चर्वण करतां येईल इतकें अन्नाचें परिमाण.४पदार्थांचें दळतांना जात्यांत घात-लेलें एका वेळेचें परिमाण. ५ जात्यांत न चिरडले जातां राहातात ते दाणे; उ० हें जातें घास धरतें. ⊛ **एकाद्याचा घास करणें** (किं० **धरणें**) १ त्याला गांजणें. २ त्याचा सत्यानाश करणें. **घास उतरणें** मुलाला खाऊं घालावयाच्या अन्नाचा एक घास त्याच्यावरून ओवाळून घराबाहेर फेकून देणें (मुलाला झालेली दृष्टिबाधा निवारण्यासाठीं).**घास-कटाऊ वि०** १ गवत कापण्याचें काम करावया-लाच लायक असा माणूस; दांडगेश्वर; धटिंगण. २बिन धारेची तरवार,सुरी,किं०चाकू.३ शिपायी (तुच्छतेनें). **घासकाडी स्त्री०** गुरांचें खाद्य,— गवत, कडबा, इ० समुच्चयानें. **घासखाऊ पु०** घरांतील निरुद्योगी माणूस,—जो फक्त खाण्याचें काम करतो. **घासदाणा पु०** सरकारी तबेल्यांच्या खर्चासाठीं किं० उपयोगासाठीं दिलल गवत किं०

दिलेला पैसा. **घासमुटका** पु० पिशाचाचा उपद्रव निवारण्यासाठीं त्याला दिलेला अन्नाचा घास (टाकणें, देणें, उतरणें).

घासटणें [म०घासणें;सं०घृष्]स०क्रि०१घर्षणें; पदार्थाच्या पृष्ठभागावरून (कांहीं वस्तु) सरकावीत नेणें. २ एकाद्याला लुबाडणें; उ० त्यानें मला शंभर रुपयांना घासटलें. अ० क्रि० १ घासला जाणें. २ लुटला जाणें; ठोकर खाणें; उ० त्या व्यवहारांत मी शंभर रुपयांना घासटलों.

घासण [म० घासणें] स्त्री० नुकसान, ठोकर (बसणें, येणें, लागणें).

घासणी [म० घासणें] स्त्री० १ घर्षणाचा म्ह० घासण्याचा व्यापार.२भांडें घासावयासाठीं काथ्या, सुंभ,गवत,इ० जें घेतात तें. ३एकाद्याला एकसारखें रागें भरणें, जाचणी करणें, किं० गांजणें.

घासणें [सं० घृष्=घासणें] स० क्रि० १ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाच्या पृष्ठभागाशीं संलग्न राहील अशा रीतीनें तो त्याच्यावरून जोरानें सरकावीत नेणें; जो पदार्थ आपण घांसतों त्याचे घर्षणानें निघालेले कण टाकून द्यावयाचे असतात; उ० खरकटीं भांडीं घासणें;आमचें "मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० " हें पुस्तक लेखांक १३३६ पहा. २ खरडून काढणें. ३ एकाद्याला रागें भरणें; त्याची भोसडपट्टी काढणें. ४ एकाद्या विषयाची चर्चा करणें. ५ व्यवहारांत लुबाडणें. ६ घोकणें; उ० हा श्लोक तूं दहा वेळ घासशील तरच तो तुला पाठ होईल. ७ मुलांना एकाद्या विषयांत पढविणें किं० पढवून तयार करणें; उ० हीं पोरें घासलीं पाहिजेत म्हणजे त्यांना चार अक्षरें येतील. ८ एकाद्या विषयाची वारंवार उजळणी करून तो जिवंत ठेवणें; उ० तूं कौमुदी मथून मथून घासली नाहींस तर सहा महिन्यांत ती विसरून जाशील आणि ती आयत्या वेळीं तुला आठवणार नाहीं. ॐ **एकाद्यापुढें नाक घासणें** त्याच्यापुढें जमीनीवर खरोखरीं नाक घासून त्याची क्षमा मागणें. **घासून घेणें** मनाजोगी गोष्ट झाली नाहीं म्हणून तरफडत आणि चरफडत बसणें.**घासून द्यावें पण हसून घेऊं नये** थोडीशी नुकसानी झाली तरी ती पत्करावी पण कोणी आपणाला हसेल किं०आपणावर टपका ठेवील असें कांहीं वर्तन करूं नये. **घासाघास, घासाघीस** स्त्री० जिकीर; ओढाताण (करणें, लावणें, मांडणें).

घासणें [सं० घृष्=घासणें] अ० क्रि० १ खरचटणें. २ बोचणें. ३ ओढाताण करणें.

घासीव [म० घासणें] वि०घासलेलें; खरडलेलें.

घाळ [म० घळणें] स्त्री० पाण्याच्या प्रवाहाच्या जोरानें जमीनींत किं० डोंगरावर पडलेला चर.

घाळ [म० 'गहाळ' चें एक रूप] वि० १ गहाळ.२अजागळ; गैबती; अव्यवस्थित(माणूस). ३ घोटाळलेलीं किं० इतस्ततः पडलेलीं कागदपत्रें. ॐ**घाळघोळ** पु० १ घोटाळा; गोंधळ; अव्यवस्था.२ मनाचा गोंधळ किं० घोटाळा.

घाळण [म० घळणें] स्त्री० भिंत, बंधारा, इ०त पडलेलें भगदाड (पडणें, होणें).

घाळणें [म० 'घळणें' चें एक रूप]अ० क्रि० (मोतीं, कान किं० नाक, ह्यांना पाडलेलें भोक किं० वेजें) मोठें होणें.

घाळणें [म० गहाळणें] अ० क्रि० १ विसरणें; चुकणें, घोटाळणें. २ भरकटणें. स० क्रि० भलत्याच ठिकाणीं ठेवणें.

घिगी स्त्री० १ बहालें, तुळया, ओंडके, इ० उंच ठेवण्यासाठीं किं० उंचावर चढविण्यासाठीं जी कैची करतात ती.२ वाकलेल्या किं०झुकलेल्या झाडाला अशा प्रकारचें टेंकण देतात तें. ॐ **एकाद्याला घिग्या लावणें** त्यानें कांहीं एकादी गोष्ट करावयाला प्रवृत्त व्हावें म्हणून त्याचीं आर्जवें करणें किं० त्याला तगादा करणें किं० त्याचे मागें नेट लावणें. [ध्वनि.

घिरघिराट पु० जांत्याचा किं० घिरिटाचा

घिरघिरें न० मुलांचें एक खेळणें.

घिरघिसा पु०किड्यांनीं पोखरलेल्या लांकडांतून पडतो तो भुसा; किरकिसा.

घिरट, घरट, घरंट न० मोठें जांतें.

घिरटणें [म० घिरट] स० क्रि० घिरटांत घालून दळून किं० भरडून काढणें.

घिरटी (–ठी) स्त्री० १ वर्तुळाकार फिरणें (घालणें). २ फेरी. ३ एकाद्या स्थळीं जाऊन येणें.

४ निष्फळ हेलपाटा. ५ कोणेकापासून कांहीं इष्ट साधण्यासाठीं त्याच्याकडे वारंवार जाणें. टीप,–ह्या पांचही अर्थी ' घिरट्या ' असा अनेकवचनी प्रयोग होतो; क्रि० घालणें. ॐ **एकाद्या पदार्थाभोंवतीं घिरट्या घालणें** तो खावयाला किं० पळवावयाला सापडण्याची संधी पहात बसणें; उ० चोर बोचक्याभोवतीं किं० मांजर दुधाभोंवतीं घिरट्या घालीत होतें. [काढलेलें.

घिरटी [म० घिरट] वि० घिरटांत दळून

घिवर, घीवर पु० एक पक्वान्न,–हें गव्हाच्या रव्याचें असतें. ॐ **घिवरपात्र** न० घीवर करावयाचें कांहीं विशिष्ट आकाराचें पात्र. [खोर.

घिसघिशा [म० घिसघिस] वि० जिकीर-

घिसघिस, घिसघिस स्त्री० १ जिकीर, ओढाताण (पदार्थ विकत घेतांना गिऱ्हाईक करतो तशी).२ कसोशी,-- कोणत्याही व्यवहारांत केलेली. ३ वाद.

घिसाडी पु० हिंदूंची एक जात; ह्या जातीचे लोक लोहारकी करतात.

घिस्सापेच पु० कुस्तीचा एक विशिष्ट पेच.

घी [हिं०] न० तूप. ॐ **घी गया पर कुपा तो नहीं गया** तूप गेलें असेल पण तुपाचें भांडें गेलें नाहीं, तें आमचे जवळ आहे; किरकोळ बाबती जरी अंगावर आल्या तरी मुद्याच्या गोष्टी किं० महत्त्वाचे पुराव्याचे कागद आमचे हातांत सुरक्षित आहेत. [खळगी.

घुगघुगी स्त्री० छातीजवळची गळ्याची

घुगट, घुंगूट न० तोंडावरून आच्छादनार्थ घेतलेलें वस्त्र.

घुंगरट, घुंगरूट न०एक उडणारा क्षुद्र जंतु,–मच्छर, डांस, इ०च्या जातीचा.

घुगरावणें अ० क्रि० एकाद्यावर ताशेरा झाडणें; एकाद्यावर तुटून पडणें.

घुगरी स्त्री० ए० व०, **घुगऱ्या** स्त्री० अ० व० हरभरे इ०द्विदळ धान्यें किं० जोंधळे, बाजरी, गहूं, इ० एकदळ धान्यें शिजवून करतात तें खाद्य. ॐ **मी तुझ्या सटीच्या (किं०बारशाच्या) घुगऱ्या खाल्ल्या आहेत** मी तुझ्यापेक्षां वयानें, अनुभवानें, आणि शहाणपणानें पुष्कळच अधिक आहें, माझ्यापुढें तुझ्या गमजा कशा चालतील ? सटी म्ह० मूल जन्मल्यावर सहाव्या दिवशीं पूजितात ती देवी; ह्या देवीला घुगऱ्यांचा नैवेद्य दाखवितात आणि त्या घुगऱ्या आमंत्रितांना फराळांत वाढतात. मुलाच्या जन्माच्या बाराव्या दिवशीं (बारशास) हेंच पक्वान्न केलें जातें.

घुगरू पु० १ मोगरा नांवाच्या फुलाची एक जात. २ डोक्यावरून आणि तोंडावरून घेतलेलें आच्छादन.

घुंगरू पु०,**घुंगरूं**,**घुंगूर**,**घुंगरूट**,**घुंगुरटें**(–डें) न० एक क्षुद्र जंतु,–डास, चिलट, ह्यांच्यासारखा.

घुंगरू पु०, **घुंगरूं**, **घुंगूर** न० नाचतांना पायांत बांधतात जो चाळ त्याची एक घागरी. ॐ **घुंगुरमाळ** स्त्री० घुंगरांची माळ, जी बैल इ० च्या गळ्यांत हौसेनें बांधतात.

घुगा पु० १ घरावर आच्छादनार्थ घातलेल्या तृणाची किं० भातेणाची कुचकी गुंडी. २ प्रफुल्लित पुष्प.

घुगी स्त्री० १ वाऱ्याचा आकस्मिक किं० एकाएकीं येतो तो झोत किं० सोसाटा. २ पर्जन्यनिवारणार्थ डोक्यावरून घेतात ती सखलाद इ०ची पायघोळ टोपी; छत्र्यांचा प्रचार फार झाल्यामुळें ह्या टोप्या आलीकडे बुडाल्या पण नवऱ्यामुलांच्या डोक्यावर कधीं कधीं त्या पाहाण्यांत येतात.

घुघू स्त्री० घुबड, खबूतर, होला, इ० पक्ष्याची किंचाळी; घूत्कार.

घुघू, घुगू वि० अगदीं लहान (मूल). ॐ **घूघू बाळ** न० अगदीं लहान मूल; तान्हें मूल; मोठ्या मुलाला रागानें किं०तुच्छतेनें योजावयाचा शब्द; उ० रांगावयाला तूं कां आतां घुगू बाळ आहेस ? **'कुकूबाळ,' 'कुकुलें बाळ,' 'घुघुलें बाळ,'** असेही ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

घुटका पु० १ घोट (कांहीं पेयाचा).२ कांहीं काम करतांना गात्रविशेषाला अलौकिक सामर्थ्य प्राप्त व्हावें म्हणून तोंडांत धरतात जी गोळी ती; गुटका; गुटिका.

घुटमळणें, घुटमुळणें अ० क्रि० १ मरणाची घरघर घशाशीं लागल्यावर प्राण न जातां घोटाळत राहाणें. २ एकादें काम करावयाचें असतां साशंक होणें; कचरणें. ३ अडखळत बोलणें. ४ काय करावें आणि करूं नये अशा विषयीं शंकित होऊन स्तब्ध राहाणें.

घुटवळणें अ० क्रि० १ प्राण कंठास येणें; उ० सर्पदंश होतांच त्याचा प्राण घुटवळला. २ व्याकुळ होणें; उ० एका तिडकीबरोबर तो घुटवळला. ३ कांहीं पदार्थाच्या किं० माणसाच्या उत्कंठेनें व्याकुळ किं० जर्जर होणें; उ० त्याचा प्राण आईसाठीं घुटवळत आहे.

घुटी स्त्री० १ तान्ह्या मुलाला औषधी द्रव्यें एकत्र उगाळून घालतात तें. २ दोन पेरांच्या मधला उसाचा भाग. ३ गात्रविशेषाला अलौकिक सामर्थ्य देणारी गोळी,—जी तोंडांत धरावयाची असते. ஃ **एकाद्याला घुटी देणें** त्याला मोहांत घालणें; त्याला नाद लावणें. **घुटी बसणें** गुटी परिणामकारक होणें (वर ३ अर्थ पहा).

घुट्टें न० उडदाचें वरण,—फोडणी देऊन तोंडीं लावणें करतात तें.

घुट्ट न० १ प्राणोत्क्रमणाचे वेळीं कंठांतून निघतो तो शब्द. २ घोट गिळतांना होतो तो शब्द.

घुडगें न० घुबड.

घुडणें अ० क्रि० सिद्ध होणें,—प्रवासाला निघावयास, जेवावयास, निजावयास, मरावयास, इ० कार्यास.

घुडा, घुड्या पु० वरंगळ जातीचा तांदूळ; ह्याला ' घुड्या वरंगळ ' असेंही म्हणतात.

घुडाघूड स्त्री० तयारी किं० सिद्धता (बाहेर पडावयाच्या वेळची).

घुडी स्त्री० खबुतरें इ० साठीं तयार केलेलें घर किं० घरटें.

घुड्ड न० १ पोटांत होतो तो गुरगुरण्याचा आवाज. २ मेघगर्जना.

घुण [सं०] पु० लाकूड पोखरणारा किडा. ஃ **घुणाक्षर न०** घुणाच्या पोखरण्यानें यदृच्छेनें बनलेलें अक्षर. **घुणाक्षर न्याय पु०** यदृच्छेनें गोष्ट घडणें,—जसें किड्यानें कोरलेल्या रेषेला अक्षराची आकृति येणें.

घुणघुणा पु० नाकाच्या आंतील अवयवविशेष. ஃ **घुणघुणा फुटणें** नाकांतील घुणघुण्याला धक्का लागल्यानें किं० मस्तकांत उष्णता फार झाल्यानें नाकांतून रक्त पडणें; ह्या विकृतीवर कांदा हुंगतात किं० डोक्यावर बांधतात.

घुणा, घुण्या वि० हिरवट (स्वभाव किं० माणूस); आठुरल्या स्वभावाचा (माणूस).

घुणा पु० १ लाकडाशीं लाकूड दोरीनें घट्ट बांधण्याचा एक प्रकार. २ साखळीचा दुहेरी दुवा; तोड्याचा पेच. ३ उतरणीवरून गाडी चालतांना चाकांना जें आडवें लाकूड चाकांची गति मंद करण्यासाठीं घट्ट बांधतात तें. ஃ **एकाद्या कामांत घुणा घालणें** त्यांत कांहीं विघ्न उपस्थित करून तें बंद पाडणें.

घुबघुबीत वि० लठ्ठ, मांसल, गोंडस (मूल).

घुबड न० १ एक पक्षी,—जो दिवसास आपल्या घरट्यांतून बाहेर पडत नाहीं आणि ज्याचें आणि कावळ्याचें जन्मजात वैर असतें. २ कुरूप म्हातारी बाई. ஃ **घुबडतोंड्या वि०** हा शिवीचा शब्द म्हणून योजला जातो.

घुंबरडा पु० १ खबुतरें इ० पक्ष्यांचा किलकिलाट. २ खेळत असलेल्या मुलांचा कलकलाट.

घुबुकेल [म० घबूक] न० आकस्मिक, अनपेक्षित, किं० अतर्कित लाभ; टाऊक (लागणें, सापडणें).

घुमघुमणें अ० क्रि० (तोफेनें) घुमघुम असा ध्वनि करणें.

घुमट [फा० गुंबज्] पु० देऊळ इ०च्या माथ्यावर जी भरीव आणि सुळकेदार रचना करतात ती. **न०** एक चर्मवाद्य. [शब्द तो.

घुमटा पु० तबल्याच्या बाह्याचा जो घुमघुम

घुमटी [म० घुमट; फा० गुंबज्] स्त्री० लहान घुमट; घुमटाच्या आकाराचा माथा (कोणत्याही वस्तूचा).

घुमड पु० १ खुपरी (डोळ्याची विकृति). २ डोळ्याचीं पोटें उलटलेलीं प्रत्येक(मोठीं मुलें लहान मुलांना भीति दाखविण्यासाठीं पोटें उलटतात); उ० त्या पोरानें मला डोळ्याचे घुमड काढून भीति दाखविली.

घुमण न० घुबड (पक्षिविशेष).

घुमणें [सं० घूर्ण्=गरगर फिरणें, झोकांडे खाणें] अ० क्रि० १ तोफ इ०च्या शब्दानें प्रतिध्वनि करणें. २ देऊळ इ० मध्यें कोंडलेला किं० गुदमरलेला शब्द उत्पन्न होणें. ३ पारव्यानें शब्द करणें. ४ टिकणें, चालू राहाणें; उ० तो वाद फार वेळ घुमला. ५ पिशाचानें एकाद्याच्या अंगांत

संचार करून त्याच्याकडून कांहीं चेष्टा करविणें. ६ माजरे पदार्थ खाल्ल्यानें अंगांत उन्माद उत्पन्न होणें; उ० हे हरीक नवे आहेत तोंपर्यंत घुमतात, पुढें ते निवळले म्हणजे त्यांचा कांहीं उपद्रव होत नाहीं. ७ एकाद्या गोष्टीची बोलवा असणें; उ० ते आपलें घर विकणार आहेत ही गोष्ट आज वर्षभर घुमत आहे. ८ गुप्तपणें बोललें जात असणें; उ० तिनें एका मुसलमानाचा आश्रय केला आहे हें वर्तमान आज दोन महिने गांवांत घुमत आहे.

घुमरणें अ० क्रि० (पिशाच)अंगांत संचरणें.

घुमरा [म० घुमणें] वि० माज किं० उन्माद उत्पन्न करणारा (हरीक, इ०).

घुमरी स्त्री० १ मुलांचा एक खेळ (क्रि० घालणें). २ मोठमोठ्यानें ओरडणें (घालणें). ३ एक वाद्यविशेष. ४ वैपुल्य;पदार्थविशेषाची रेलचेल.

घुमशान मागें ' घमशान ' पहा.

घुमा पु० १ भोंवऱ्याचे खेळामध्यें घुमेबाजीनें खेळत असतां ज्याचेवर डाव लागू होतो त्याच्या भोंवऱ्यावर आपला भोंवरा मारून केलेलें क्षत. २ एकाद्या मनुष्याला किं० जनावराला वठणीस आणण्यासाठीं किं० नरम करण्यासाठीं त्याला कठोरपणानें वागविणें किं० जरबेंत धरणें. ३ श्रमातिशयानें आलेली निरंगळी. ४ चिंता, विवंचना, इ०मुळें उत्पन्न झालेली निरुत्साहतेची स्थिति. ५लांबणीवर टाकणें (कांहीं काम); क्रि० घालणें; उ० त्या कामाचा त्यांनीं आज वर्षभर उगाच घुमा घातला आहे. ६ छळणें, सतावणें, पीडा देणें; उ० हें लहानसें लाकूड असून तें अझून मला फोडतां येत नाहीं, तें कुऱ्हाडच ठरूं देत नाहीं, त्यानें मघापासून माझा घुमा घेतला आहे. ॐ**घुमेबाजी** स्त्री० ज्यानें डाव जिंकला त्यानें दुसऱ्याच्या भोंवऱ्यावर घुमे मारावे असा जो खेळण्याचा प्रकार तो. **एकाद्या माणसानें** किं० **कामानें एकाद्याचें घुमे घालणें** त्याला पीडा देणें किं० सतावणें.

घुमा, घुम्या वि० १ कमी बोलण्याचा ज्याचा स्वभाव असा. २ रुसून स्तब्ध बसलेला. ३ ज्याच्या अंगांत कांहीं तरतरी नाहीं असा; मदड. ॐ**घुमावाघ** पु० १ गर्जना न करतां सावजावर झेप घालणारा वाघ. २ आळशी वाघ. ३ (लक्षणेनें) सुस्त माणूस. ४ (लक्षणेनें) आंतल्या गांठीचा माणूस. ५वाच्यता न करतां आपलें काम साधणारा इसम.

घुमेवेड न० न बोलतां स्तब्ध बसून राहाणें असा वेडाचा प्रकार.

घुमाऊ, घुमाव पु० आमराई, कुरण, शेत, जमीन इ०चा मक्ता.

घुमें न०जरबेंत ठेवणें (माणसाला किं० जनावराला नरम करण्यासाठीं).

घुरगुटणें स० क्रि० वस्त्रांत गुंडाळणें (मूल किं० कांहीं पदार्थ).

घुरघुरणें [म० घुरघुर] अ० क्रि० १ घुरघुर असा आवाज करणें (कुतरा, इ० प्राण्यांनीं). २ पोटांत किं० घशांत घुरघुर असा आवाज होणें.

घुरघूस पु० कांहीं प्रकारचे मुसलमान भिक्षेकरी दुकानदारांनीं पैसे दिले नाहींत म्हणजे आपल्या स्वताच्या डोळ्यांत किं० अंगांत एक अणकोचीदार हत्यार खुपसून रक्त पाडवितात; ह्या हत्याराला ' घुरघुस ' म्हणतात; हें लोखंडाचें असून त्याला लोखंडी कड्या लाविलेल्या असतात.

घुरघूस,घुरघुशी स्त्री० पोटाशीं पाय घेऊन निजण्याचें संस्थान; उ० तें मूल घुरघुशी मारून निजलें आहे.**गुरगुशी** असाही ह्याच अर्थी शब्द आहे.

घुरट [सं० उग्र; म० उग्रट] वि०बोकड, वाघ, इ० च्या अंगाला जी चमत्कारिक घाण येते तिनें युक्त असलेला.

घुरटाण [म० उग्रट+घाण] स्त्री० उग्रट घाण (बोकड, वाघ, इ०च्या अंगाला येते ती).

घुरदळणें अ० क्रि० बागडणें; आनंदानें उड्या मारणें; हुदडणें. स० क्रि० गादी, चिरगुटें इ० पदार्थांवर नाचून त्यांचा चोळाबोळा करणें.

घुरमळणें अ०क्रि० १ पतंग इ०नीं दिव्याभोंवतीं, किं०माशांनीं गोड पदार्थाभोंवतीं घिरट्या, घालणें. २ कांहीं इष्ट मिळविण्यासाठीं एकाद्या माणसाच्या मागें मागें जाणें किं० त्याचा पिच्छा पुरविणें. ३ मरण जवळ आलेलें असतां श्वासाची चलबिचल होणें. ४ संदिग्धपणें बोलणें.

घुरमी, घुर्मी स्त्री० उन्माद; गुरमी.

घुरम्यांव [म० घुर् + म्यांव्] न० मांजराचें गुरगुरणें.

घुरष्टाण [**म०** घुरट; **सं०** उग्र; **म०** घाण] **स्त्री०** बोकड, वाघ, इ० च्या अंगाला येते ती उग्र वाण.

घुरें [**सं०** घूर्णू=गरगर फिरणें] **न०** १ भोंवळ किं० मूर्च्छा येणें, बेशुद्ध होणें इ० लक्षणांनीं प्रकट होणारा एक रोग (येणें, जडणें, लागणें). २ भोंवळ.

घुला पु० १ कवडीची एक जात,–ही कवडी मोठी तपकिरी रंगाची आणि ठिपकेदार असते. २ सुरवंट.

घुलावणी, घुलकावणी [**म०** घुलावणें किं० घुलकावणें] **स्त्री०** कोणेकानें आपण सांगू तसें वागावें म्हणून त्याची केलेली आर्जव किं० खुशामत. ॐ **घुलावणीचा दस्तऐवज पु०** कोणेकाकडून फसवून करून घेतलेला दस्तऐवज.

घुलाविणें स० क्रि० गोड गोड बोलून किं० थापा मारून कोणेकाला फसविणें.

घुलें न० सुरवंट,–एक केसाळ आणि अनेक पायांचा प्राणी.

घुशी [**म०** घुसणें] **स्त्री०** १ जोरानें घुसणें (मूल आईच्या कुशींत, वासरूं गायीच्या कासेंत). २ जोराचा धक्का (देणें, मारणें).

घुसडणें, घुसटणें [**म०** घुसणें] **स० क्रि०** १ एक पदार्थ जोरानें दुसऱ्या पदार्थांत ढकलणें, खुपसणें किं० शिरकावणें. २ उपभोग्य पदार्थांची दुर्दशा होईल अशा रीतीनें त्याला वागविणें किं० त्याचा उपयोग करून घेणें (माणूस, जनावर, किं० पदार्थ). ३ चुरगळणें, कुसकरणें. ४ दुसऱ्याच्या ग्रंथांत आपला मजकूर घालणें (त्याच्या परवानगी शिवाय). **अ० क्रि०** जोरानें घुसणें किं० शिरणें.

घुसडा [**म०** घुसडणें] **पु०** पदार्थाचा क्रूरपणानें किं० निष्काळजीपणानें किं० भलत्याच रीतीनें उपभोग किं० उपयोग केल्यानें त्याची होते ती दुर्दशा (माणूस, जनावर, चिरगुट, इ० ची).

घुसणी [**म०** घुसणें] **स्त्री०** बैदुलांच्या किं० गोट्यांच्या खेळांत हरलेल्या खेळाडूनें एक विशिष्ट बैदूल किं० गोटी कोपरानें, कानानें, किं० बोटाच्या पेरानें गलींत म्ह० खळगींत लोटण्याची त्याला केलेली शिक्षा. कोपरघुसणी, कानघुसणी, पेरघुसणी, असें ह्या शिक्षेच्या प्रकारांना पारिभाषिक शब्द आहेत.

घुसणें अ० क्रि० १ जोरानें शिरणें. २ युक्तिप्रयुक्तिनें शिरणें; उ० तो दाटींत घुसला. ३ जेथें जावयाला आपणाला हक्क, अधिकार, परवानगी इ० नाहीं तेथें कोणच्या तरी रीतीनें जाणें.

घुसदणें ' घुसडणें ' पहा.

घुसमटणें अ० क्रि० १ प्राणवायूचा निरोध झाल्यामुळें व्याकुळ होणें किं० कासावीस होणें; उ० मी ह्या धुरानें घुसमटलों. २ गुदमरणें. ३ अडचणींत पडणें; संकोच पावणें.

घुसविणें [**म०** ' घुसणें ' चें प्रयोजक रूप] **स० क्रि०** शिरकावणें; खुपसणें.

घुसळण [**म०** घुसळणें] **न०** १ घुसळण्याचा व्यापार, घुसळण्याची क्रिया. २ घुसळावयाला भांड्यांत घातलेलें दहीं इ०.

घुसळणें स० क्रि० १ दहीं इ० पदार्थ रवी इ० साधनांनीं ढवळणें (लोणी काढण्यासाठीं किं० ताक करण्यासाठीं). २ एकादा पदार्थ, माणूस, किं० जनावर यांचा कठोर प्रकारें किं० भलत्याच रीतीनें उपयोग करून घेणें. ३ ०ची दुर्दशा करणें किं० उपभोग घेणें. ॐ **एकाद्या माणसाचीं हाडें घुसळणें** त्याला छळणें किं० सतावणें.

घुसा, घुस्सा [**अ०** गुसाह्] **पु०** आपणाला योग्य रीतीनें वागविण्यांत आलेलें नाहीं अशा समजुतीवरून येतो तो राग किं० आलेली रागाची लहर; असंतुष्टपणाचा राग. ॐ **कमकुवत घुसा बहुत** आपल्या अंगांत कांहीं कर्तृत्व किं० पराक्रम नाहीं आणि दुसऱ्याला दोष देत बसणें (हा मूर्खपणा होय). [तडाखा.

घुसा, घुस्सा [**हिं०** घूसा] **पु०** ठोसा, रट्टा;

घुळणें अ० क्रि० गडगडत किं० घरंगळत जाणें (उतरणीवरून वाटोळा धोंडा, इ०).

घुळी पु० देवतेला अर्पण केलेला बैल; ह्याच्याकडून कोणतेंही काम करून घेतलें जात नाहीं आणि त्याला हावें तिकडे हिंडण्याची मुभा असते.

घूट वि० शरीरानें लठ्ठ आणि ठेंगणा.

घूड पु० १ घोस; फलादिकाचा समुदाय; घड. २ काप इ० दागिन्यांस लावतात तें मोती इ० चे जे घोस ते प्रत्येक.

घूम पु० १ डोळ्याच्या वरच्या पापणीच्या आंतल्या बाजूस जो रक्तविकार होतो तो; खुपरी (येणें, फुटणें, होणें). २ एका भोंवऱ्यानें दुसऱ्या भोंवऱ्यावर पाडलेली खोच. ३ धूमपेंढी, पाट्या, इ० खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

घूर्णन [सं० घूर्णू=गरगर फिरणें, झोकांडे खाणें] **न०** १ गरगर फिरणें. २ झोकांडे खाणें.

घूस स्त्री० १ उंदरासारखा पण उंदरापेक्षां मोठा असा एक प्राणी. २ अति काळ्या वर्णाची स्त्री (लाक्षणिक प्रयोग).

घूस स्त्री०धान्य पाखडतांना उडतो तो कोंडा.

घृणा [सं०] **स्त्री०** दया; कृपा.**॰घृणी वि०** दयाळु, कृपाळु.

घृत[सं०]**न०** तूप.**॰घृतकुंभ पु०**एकाद्या स्त्रीवर आसक्त झालेला पुरुष. **घृतकुमारी स्त्री०** कोरफड.**घृतकुल्या स्त्री०**तुपाचा पाट;तुपाची समृद्धि; **घृतकुल्या मधुकुल्या स्त्री०अ०व०** १ तुपाचे पाट आणि मधाचे पाट.२तुपाची आणि साखरेची समृद्धि ज्यांत आहे अशीं पक्वान्नें; उ० भाद्रपद महिन्यांत भिक्षुक लोकांची चैन असते; रोज घृतकुल्या आणि मधुकुल्या ! **घृतधेनु स्त्री०** तुपाची केलेली गायीची आकृति,–जिची पूजा करून जी ब्राह्मणाला दान केली जाते. **घृतपक्व** तुपांत शिजविलेलें किं० तळलेलें खाद्य,–जें उपासाला खातां येतें. **घृतबुद्धि स्त्री०** बथ्थड म्हणजे मंदबुद्धि. ह्याच्या उलट ' तैलबुद्धि. ' पाण्यांत तूप लवकर पसरत नाहीं, तेल पसरतें ह्यावरून हे प्रचार.

घृष्ट [सं०] **वि०** घासलेलें.

घेऊ [**म०**घेणें]**वि०**घेण्यांत पटाईत; दुसऱ्याचा पदार्थ लाटण्यांत कुशल.हा शब्द पुढील वाक्प्रचारांत मात्र येतो.**॰घेऊघेवडी स्त्री०**१खादाड स्त्री.२लोभी स्त्री.**घेऊपांसरी, घेऊपासेऱ्या, घेऊबा पु०** दुसऱ्याचे पदार्थ घेण्याच्या, लाटण्याच्या, किं० घेऊन जिरविण्याच्या कामांत कुशल. **घेऊपांशेरी स्त्री०** १ पांच शेरांचें वजन,–जें पदार्थ विकत घेतांना दुकानदार वापरतात.२दुसऱ्याचे पदार्थ लाटणारा.

घेंगडी, घेंगरी, घेडी, घेडी मुंगी स्त्री० एक प्रकारची मुंगी,–जी तांबडी असून एऱ्हवींच्या मुंगीहून मोठी असते; ती चावरी असते. हिला वडी किं० चावड अशीं दुसरीं नांवें आहेत.

घेगा, घेवा पु० १ कांहीं एक मोठें कार्य करण्यासाठीं सर्व शक्ति खर्चून केलेला प्रयत्न; एल्गार. २ एकादें काम कोणेकाला करावयाला भाग पाडण्यासाठीं त्याला लाविलेला नेट. ३ एकाद्या विरुद्ध केलेली ओरड. ४ एकाद्या कामावर घेतलेले श्रम.५ कामाची घाई किं० नेट किं० बोजा.

घेंघा (–गा–) वणें अ० क्रि० १ एकाद्यावर तोंड सोडणें;त्याला रागें भरणें. २ कामाची निकड फार लागल्यामुळें पिसाळून किं० त्रासून जाणें.

घेघे [**म०** घेणें] **स्त्री०** जोराचा हल्ला; आवेशाचा प्रयत्न.उ० **वा० अ०** आवेशाचा उद्गार. **॰घेघेमार पु०** जोराचा किं० आवेशाचा हल्ला (करणें). **क्रि० वि०**१जोरानें; आवेशानें; उत्साहानें. २ घाईघाईनें; पोक्त विचार न करतां;उ० हातीं पैसा येतांच त्यानें घेघेमार घोडे विकत घेतले, आतां त्यांना पोसण्याचीही ताकद त्याला राहिली नाहीं; उ० उगीच घेघेमार पत्र लिहूं नको, विचार करून लिही.

घेटूळ, घेटोळी स्त्री० पांढरी पुनर्नवा ह्या नांवाची वेली. [तल्फ ती.

घेणी स्त्री० घ्यावयाची जी गंजिफांतील

घेणें [सं० ग्रह्=धरणें, घेणें] **स० क्रि०** १ आपल्या हातांत किं० ताब्यात आणणें किं० येईसा करणें; आपल्या मालकीचा करणें; उ० मी तो पेरू घेतों; उ० त्यानें हें घर घेतलें; उ० शिवाजीनें तोरणा किल्ला घेतला. २ इंद्रियगोचर किं०मनोगोचर करणें; उ० मी ह्या फुलाचा वास घेतों; उ० चाहूल घेणें; उ० कानोसा घेणें. ३ धरणें, पकडणें. ४ समाविष्ट करणें; अंतर्भूत करणें; उ० रामभाऊंना गायनसमाजात घेतलें; उ० सोनार मंडळींनीं त्याला जातींत घेतलें. ५ स्वीकारणें; अंगीकारणें; आपला म्हणणें; पथ्करणें; उ० त्यानें खिस्ती धर्म घेतला; उ० तुमच्या आक्षेपाचें त्या शास्त्र्यानें निरसन केलें तें तुम्ही घेतलें काय ? ६ खर्चावयाला लावणें किं० भाग पाडणें; उ० हें घर सहा महिने घेईल म्ह० हें घर बांधावयाला सहा महिने लागतील; उ० तुम्ही माझा अर्धा तास घेतला; उ० ह्या क्रियापदानें माझे दोन दिवस घेतले. ७ झोडपणें; उ० मी त्याला भलें

घेतलें (म्ह० झोडपून काढलें). ८ आक्रमिणें; उल्लंघिणें; उ० अर्ध्या तासांत ही घांटी आपण सहज घेऊं (म्ह० ओलांडूं). ९ एकाद्या क्रियेचा विषय होणें; उ० ओलें लाकूड लवकर आग घेत नाहीं, वाळलेलें गवत तावडतोब आग घेतें. १० शोषणें; उ० तेलकट वस्त्र पाणी घेत नाहीं. ११ बळी घेणें; उ० हा ओढा दर वर्षी एक दोन गुरें घेतो. १२ भूतपिशाच्च ह्यांनीं ग्रासणें; उ० माझ्या सासऱ्याला भुतानें घेतलें. ॐ**एकाद्याचा गुण घेणें** १त्याचा गुण आपल्या अंगीं आणण्याचा प्रयत्न करणें. २ त्याचा गुण स्तविणें; उ० कुत्र्यापासून इमान हा गुण घेण्याजोगा आहे; उ० गाढवापासून सोशीकपणा हा गुण घ्यावा. **एकाद्याचें सोंग घेणें** त्याचा पोशाख, भाषणपद्धति, वर्तन, इ०ची बतावणी करणें. **वेड घेणें** मुद्दाम वेड्यासारखें वर्तन करणें; उ० सदाशिव वेड घेऊन पेडगांवाला जात आहे. **दहशत** (किं० **धास्ती** किं० **भीति**) **घेणें** दहशत भीति किं० धास्ती ह्यांनीं पछाडलें जाणें. **नाक कान घेणें** ते छाटून टाकणें; उ० चोरांनीं त्या मारवाड्याचें नाक कान घेतलें; उ० ह्या भाताचे शेंडे चार सहा अंगळे घे म्हणजे तें पडणार नाहीं. **शोध घेणें, तपास घेणें** तपास करणें; चौकशी करणें; बातमी काढणें. **माप घेणें** लांबी, रुंदी, उंची, परिमाण, घेर इ० मोजणें; उ० शिंप्यानें तुझ्या सदऱ्याचीं मापें घेतलीं काय ? **वाद घेणें** वाद करीत बसणें. **एकादा पदार्थ इकडे घेणें** तो पदार्थ जवळ आणून ठेवणें किं० हातीं देणें (फक्त आज्ञार्थी प्रयोग); उ० नाना, ती दऊत इकडे घे बरें. **ही रुंदी कमी झाली, ती आणखी वीतभर घे** म्ह० वितीनें वाढीव. **एकाद्यावर आळ घेणें** त्याच्यावर आळ घालणें. **ती गाय वासरूं घेत नाहीं** म्ह० ती आपल्या वासराला पिऊं देत नाहीं. 'ऊन' प्रत्ययान्त क्रियापदांच्या पुढें 'घेणें' हें क्रियापद योजलें असतां ती क्रिया आटपून टाका किं० पदरांत पाडून घ्या किं० उरकून टाका असा अर्थ होतो; उ० अंघोळ करून घ्या; उ० जेवून घ्या, इ०. **वाहत्या गंगेंत हात धुऊन घेणें** मागें 'गंगा' मध्यें पहा. **हसून घेणें** लोकांच्या उपहासास जाणून बुझून स्वतास पात्र करणें. **घेणेकरी,**

घेणेदार पु० १ सावकार; धनको. २ घेण्याचा ज्याला हक्क आहे असा; उ० माझ्या निरुद्योगी पुतण्याला मी पोसतों, तो माझा पूर्वजन्माचा घेणेकरी आहे. **देणें घेणें न०** हरएक प्रकारचा व्यापारी संबंध. **घेता देता पु०** सावीनें आणि नियमितपणें दुसऱ्याशीं व्यवहार करणारा. **देतां घेतां क्रि० वि०** प्रत्यक्ष व्यवहार करतेसमयीं; उ० तो ह्या सणंगाची किंमत दहा रुपये सांगत आहे पण देतां घेतां तो आठ रुपयांपर्यंत उतरेल असें वाटतें. **घेपो देपो स्त्री०** व्याजाचा कांहीं लाभ नसतां पैसे उसने देण्याचा व्यवहार. **घेमार पु०, स्त्री०** मागें 'घेघेमार' पहा.

घेर [**हिं०**] **पु०** १ वर्तुळाचा परीघ. २ वस्त्राचा सईलसर जो खालचा भाग तो. ॐ**घेरदार वि०** १ ज्याला घेर आहे असा. २ ज्याला मोठा घेर आहे असा.

घेरणें [**हिं०**] **स० क्रि०** १ गराडणें; वेष्टिणें. २ आक्रान्त करणें; कबज्यांत घेणें; पछाडणें. ३ व्याकुळ करणें.

घेरविणें स० क्रि० अक्षराच्या किं० कांहीं आकृतीच्या रेषा यांतून कोरडी लेखणी इ० फिरविणें (अक्षरांचें वळण इ० हाताला लागण्यासाठीं किं०दुसऱ्या कांहीं उद्देशानें).

घेरा [**हिं०** घेरा] **पु०** १ वेढा; फेरा. २ किल्ला, घर, बाग, इ०चा आसमंतात भाग.

घेरी [**हिं०**] **स्त्री०** पित्तादि कारणांनीं येते ती भोंवळ किं० चक्कर (**क्रि०** येणें).

घेरू पु० किड्यांनीं पोखरलेल्या लाकडांतून पडणारा भुसा.

घेरोसा पु० कोळ्यांच्या तंतुमय घरांवर धूर, धूळ, इ०चे थर बसून दोऱ्यांसारखे लोंबतात ते तंतु.

घेऱ्या पु० दोऱ्या करण्याच्या कामांत पेडांना पीळ घालणारा मदतनीस.

घेव [**म०** घेणें] **पु०** दुसऱ्यापासून आपणास जें द्रव्यादि घ्यावयाचें आहे तें; उ० गोविंदरावापासून मला पंचवीस रुपयांचा घेव घ्यावयाचा आहे.

घेवडा पु० एक वेल,–ज्याच्या शेंगांची भाजी [करतात.

घेवडी स्त्री० १ घेवड्याचा वेल. २ घेवड्याची शेंग.

घेवडें न० घेवडीची शेंग.

घेवदेव, देवघेव [**म०** देणें+घेणें] **पु०, स्त्री०** देणें, घेणें, इ०रूप व्यवहार.

घेवपत [**म०** घेणें+पत (व्यापारी साखी)] **वि०** भांडवलाशिवाय म्हणजे केवळ पतीवर चालविलेला (धंदा, व्यापार, व्यवहार, इ०).

घेवबा [**म०** घेणें+बा (बहुमानार्थक प्रत्यय)] **पु०** दुसऱ्यापासून पदार्थ मागून घेऊन आपला संसार किं० चरितार्थ चालविणारा किं० आपली लहान किं० मोठी गरज भागविणारा; ' घेऊपांसरी ' हा ह्याच अर्थाचा शब्द आहे.

घेवाण देवाण न० १ आपण दुसऱ्याची गरज भागवावी आणि त्यानें आपली गरज भागवावी असा जो सलोख्याचा किं० मैत्रीचा किं० उपकारशीलतेचा संबंध तो. २ दुसऱ्याला आपण अहेर केला असतां तो आपणाला उलट अहेर करतो ही जी समाजाची रूढि ती.

घेवारी पु० मोठ्या प्रमाणांत माल खरेदी करून तो किरकोळीनें विकतो तो व्यापारी.

घैलाट, घैलाड वि०वेडगळ; बावळा;अजागळ.

घैशा वि० आळशी आणि आर्ष.

घो, गोहो, घोव पु० नवरा.

घोककाम्या वि० अर्थाकडे लक्ष्य न देतां किं० संदर्भ लक्ष्यांत न घेतां किं० उपयोग मनांत न आणतां जो केवळ घोकतो असा (विद्यार्थी).

घोकणी [**म०** घोकणें] **स्त्री०** १ शिकावयाचा विषय स्मृतींत पक्का ठसावा म्हणून तो पुन्हा पुन्हा वाचणें किं० म्हणणें किं० उच्चारणें; त्याची अनेकवार आवृत्ति करणें. २ आतुरतेनें इच्छिलेल्या वस्तूचें पुनःपुनः कथन, निवेदन, किं० उच्चारण; उ० सकाळपासून त्या मुलानें आईची घोकणी घेतली आहे; उ० त्या आचाऱ्याचें बिऱ्हाड आपल्या वाड्यांतून काढून टाकलें पाहिजे अशी आज दोन महिने तिनें माझ्यामागें घोकणी लाविली (चालविली) आहे.

घोकणें [**सं०** घुष्=शब्द करणें, जाहीर करणें] **स० क्रि०** १ स्मृतींत कांहीं विषय पक्का ठसावा म्हणून त्याचें पुनः पुनः उच्चारण करणें किं० म्हणणें; उ० हे श्लोक घोकीत बस. २ इष्ट जी गोष्ट तिचें वारंवार कथन किं० निवेदन करणें.

घोकींव [**म०** घोकणें] **वि०** १ घोकून घोकून पाठ केलेलें. २ घोकून स्मृतींत पक्कें ठसलेलें. ३ अर्थ न समजतां केवळ घोकून पाठ केलेलें. ४ कोणत्या प्रसंगीं काय बोलावें हा शिकून घेतलेला (मजकूर); उ० हा साक्षीदार घोकींव जबाब देत आहे.

घोक्या [**म०** घोकणें] **वि०** १ घोकणारा. २ न समजतां केवळ घोकतो तो.३मूर्ख (विद्यार्थी) जो केवळ घोकलेलेंच सांगूं शकतो.

घोंगट, घोंघट, घोंगाट न० १ घों घों असा शब्द किं० गुणगुणाट करणाऱ्या मक्षिकांचा समुदाय.२लचांड; झेंगट;शुक्लकाष्ट. ३ ढगांनीं आकाश आच्छादलें असण्याची स्थिति.

घोंगडी स्त्री० कांबळ्याचें एक पट्टें. दोन घोंगड्या शिवल्या असतां एक कांबळें होतें.⁂**घोंगडबाऊ पु०** द्वाड मुलांना भिवविण्यासाठीं घोंगडी पांघरतो तो मनुष्य.

घोंगडें न० १ कांबळ्याचें एक पट्टें. २ कांबळें. ३ (लाक्षणिक) दुर्दशा; हाल.⁂ **घोंगड्या वि०** निरंतर घोंगडी पांघरावयाच्या योग्यतेचा कोणीही शूद्रादि माणूस. **गरीबाचें गेलें घोंगडें गरीब पडलें उघडें** जो गरीब त्याची अगदीं अल्प किमतीची वस्तु जरी नष्ट झाली तरी ती हानि त्याला जाणवते; कारण दुसरी वस्तु मिळविण्याची त्याला ऐपत नसते. **घोंगडें गळ्यांत येणें** (किं०**पडणें**) कांहीं लचांड मागें लागणें. **एकाद्याच्या गळ्यांत घोंगडें घालणें** त्याच्या मागें कांहीं त्रासदायक कर्तव्य लावणें; त्याच्या डोक्यावर उपद्रवकारक काम बसविणें.

घोंगणा पु० दोन नाकपुड्यांच्या मध्यें जो पडदा असतो त्याचा माथा (आंतला वरचा भाग).

घोंगणें [**म०** घों घों] **अ० क्रि०** १ कोंडलेल्या जागेंत वारा गर्जणें. २ माशांचें गुणगुणणें.

घोंगता पु०, घोंगती, घोंगशी स्त्री०, घोंगतें न० दोन बाजूंनीं शिवलेली घोंगडी,—जी प्रसंगविशेषीं धान्य, भुसा, इ० पदार्थ आंत घालून वाहून नेण्याच्या उपयोगाला येते. २पर्जन्यनिवारणार्थ डोकीवर घ्यावयाला एका बाजूस चुण्या करून बांधलेलें कांबळें. ⁂ **घोंगत्या कुंबर**

पु० पुष्य नक्षत्र,–कारण ह्या नक्षत्रांत पाऊस फार असल्यामुळें शेतांत काम करणारांना डोक्यांवर घोंगता घ्यावा लागतो.

घोगरा, घोघरा वि० फुटक्या मडक्याच्या ध्वनीसारखा किं० म्हशीच्या रेकण्याच्या ध्वनीसारखा (जो बोलण्याचा आवाज तो) किं० तशा आवाजाचा (मनुष्य). [मत्स्य.

घोंगरा पु० गोड्या पाण्यांतील एका जातीचा

घोंगशी स्त्री० १ चौपदरी शेला किं० घोंगडी यांस उभा दोरा घातला असतां घोंगत्याचा आकार होतो तो. २ वस्त्राला भोंक पडलें असतां तें शिवून बुझविण्यासाठीं सभोंवतालचे भाग जवळ ओढून शिवावे लागतात, अशा शिवणीभोंवतीं येतो तो झोल.

घोंगा पु० वर ' घोंगडबाऊ ' पहा.

घोंगाट, घोंगाणा न० १ पर्जन्याचें अवडंबर; ढगांनीं आकाश कोंदल्याची स्थिति. २ डोकें, तोंड इ० वर घेतलेलें पांघरूण. ३ माशांचा थवा,–गूळ, साखर, इ० वर घोंघावतो तो. ४ भिक्षा मिळविण्यासाठीं गर्दी करून पुढें घुसूं पाहाणाऱ्या भिकाऱ्यांचा समुदाय.

घोंगाड न० मेघांनीं आलेली अंधेरी.

घोंगाडणें अ० क्रि० आकाशांत मेघांचें जमणें किं० गोळा होणें.

घोंगाणा पु० दोन नाकपुड्यांच्या मध्यें जो पडदा असतो त्याचा वरचा भाग. [पहा.

घोंगार, घोंगारणें वर 'घोंगाड,' 'घोंगाडणें'

घोंगावणें, घोंगेणें, घोघावणें अ० क्रि० वारा, समुद्र, इ० चें गर्जणें.

घोंगी [हिं०] स्त्री० पर्जन्यनिवारणार्थ डोकीवर घेतात तें वस्त्रादिकांचें आच्छादन.

घोगरा, घोंघेरा पु० भ्रमरजातीय एक क्षुद्र जंतु.

घोघाट, घोघाण पु० जोराचा वारा, पाऊस समुद्र, इ० चा ध्वनि (क्रि० घालणें).

घोघावणें, घोघेणें अ० क्रि० समुद्र, वारा, इ० चें गर्जणें.

घोट [हिं] पु० १ एका खेपेस गिळतां येईल इतका पातळ पदार्थ,– तोंडांत घेतलेला किं० पात्रांत असलेला. २ पातळ पदार्थांचें अगदीं थोडें परिमाण. ꣿ **हें पोर माझ्या जिवाचा घोट घेत आहे** तें मला सतावीत किं० छळीत आहे.

घोंट न० पिकलेली सुपारी. **स्त्री०** एक कांटेरी झाड. **न०** त्याचें फळ. **स्त्री०** एक वेल,–जिच्या कोंवळ्या अंकुरांची भाजी करतात.

घोटक [सं०] पु० १ घोडा. २ बुद्धिबळांच्या खेळांतील घोडा. [क्रिया.

घोटणी [म० घोटणें] स्त्री० घोटण्याची

घोटणें [हिं०] स० क्रि० १ कागद इ० गुळगुळीत करण्यासाठीं कवडी इ०पदार्थांनीं तो घासणें. २ पदार्थाचें बारीक चूर्ण करण्यासाठीं एकाद्या टणक पदार्थाचे त्याच्यावर घाव घालणें किं० तो चेंपीत चेंपीत इकडे तिकडे सरकावणें. ३ दोन किं० अधिक पदार्थांचें मिश्रण पूर्ण व्हावयासाठीं ते पात्रादिकांत घालून कुटणें किं० ढवळणें किं० खलणें. ४ तोंडांत एकवार पातळ पदार्थ घेऊन तो गिळणें; उ० माझा घसा सुजला आहे, मला पाणी देखील घोटत नाहीं.

घोटवाल पु० वालाची एक जात.

घोटविणें स० क्रि० अक्षराचें वळण हाताला परिचित होण्यासाठीं कित्यांतील अक्षरांतून कोरडी लेखणी फिरविणें. [एक जात.

घोंटवेल स्त्री० १ एक जंगली वेल. २ भाताची

घोटा [म० घोटणें] पु० १ भांगेमध्यें वेलदोड्याचे दाणे इ० घालून घोटून केलेलें पेय. २ लाकडाचा बत्ता. ३ तंगडीची नळी आणि पाऊल ह्यांच्यामधला संधि किं० सांधा. ४ दागिने, रत्नें, इ० घोटून गुळगुळीत आणि चकचकीत करावयाचें सोनाराचें एक साधन. ꣿ **घोटेस्नान न०** फक्त पावलें धुणें.

घोटाळणें, घोटळणें अ० क्रि० १ गुंतागुंतीच्या मार्गांत मागें पुढें, इकडे तिकडे भ्रमणें किं० भटकणें. २ कोंडलेल्या जागेंतील वाऱ्याची हालचाल. ३ वाऱ्याच्या झोतावर गवताच्या काड्या, वाळलेलीं पानें इ० यांचें इतस्ततः उडणें. ४ वाकड्या-तिकड्या मार्गानें नदी वाहाणें. ५ काय करावें हें सुचत नाहीं अशा स्थितींत (मन) असणें. ६ एकादा पदार्थ इतर पदार्थांत पडून जरूरीच्या वेळीं न सापडेसा होणें.

घोटाळणें, घोटिलणें स० क्रि० अक्षराचें वळण हाताला लागावें म्हणून त्यांतून कोरडी लेखणी फिरविणें.

घोटाळा पु०१ अस्ताव्यस्तपणा;उ०ह्या पोरानें पोथीचा घोटाळा करून सोडला. २ गुंतागुंतीचा व्यवहार. ३ ठरावीक क्रम, सरणि, किं० शिस्त, यांचें उल्लंघन. ४ मनाची चलबिचल; काय करावें हें सुचत नाहीं अशी मनाची स्थिति.

घोटींव [म० घोटणें] वि० १ घोटून गुळगुळीत आणि चकचकीत केलेलें.२ अभ्यासानें पूर्णपणें परिचित झालेलें.

घोटें न०जनावरांना औषध पाजावयाचें नळकंडें.

घोटऱ्या पु० गिलावा घोटून त्याचा पृष्ठभाग गुळगुळीत करण्याचें गवंड्याचें एक आउत. वि० जो अभ्यास करतो पण ज्याला ज्ञान प्राप्त न होतां जो मूर्खच राहातो असा विद्यार्थी.

घोडा [सं० घोटक] पु० १ एक चतुष्पाद जनावर; अश्व. २ पाळणा टांगावयासाठीं एका आडव्या लाकडाला चार पाय बसवून करतात ती रचना. ३ मुलें दोन तंगड्यांत जी काठी घालून धावतात ती काठी. ४ वस्त्रें ठेवण्यासाठी खुंट्या बसविलेला खांब जो जमीनींत पुरलेला असतो तो. ५ पालखी, मेणा, इ० ठेवण्यासाठीं जे अग्राला दुबेळकें असलेले खांब जमीनींत पुरलेले असतात ते प्रत्येक. ६ चालण्याचें सामर्थ्य वक्तव्य असतां दोन पायांस ' घोडा ' म्हणतात; उ० मला आळंदीला जावयाला घोडा बिडा कांहीं नको, हे दोन घोडे खंबीर आहेत (म्ह० पाय). ७ मूर्ख माणूस; अल्लड किं० अडदांड माणूस; पोरासारखा वागत असलेला मोठा माणूस; उ० तूं येवढा घोडा झाला आहेस आणि तुला कोणाशीं कसें वागावें हें अझून कसें नाहीं समजत ? ८ रांगणारें मूल दोन गुडघे आणि दोन हात टेकून करतें तें शरीराचें संस्थान. ९ बुद्धिबळांच्या डावांतील एक मोहोरें,-हें आडीच घरें चालतें. १०बंदुकीचा अवयवविशेष,-जो लहानशा हातोडी सारखा असून ठिणगी उत्पन्न करतो. ११ दोन बाजूंना पाद्यऱ्या असलेला लाकडाचा किं० मातीचा ओटा,-घोड्यावर चढून बसण्याच्या सोयीचा. १२ घडवंची.१३ नारळ सोलण्याचा एक रचनाविशेष. १४ समुद्राच्या लाटेचा माथा. १५ पेटी, करंडा, डबी, इ० चें झाकण बंद करण्याची योजना; खटका. १६ दाराच्या चौकटीचा अवयवविशेष. ॐ ' घोडा ' हा शब्द समासांत किं० कांहीं वाक्प्रचारांत अंतर्भूत झाला असतां त्याचीं ' घोड ' ' घोडे ' इ० रूपें होतात.

घोडकट,घोडकें न० घोडा (तुच्छतेनें). **घोडकुदळ** वि० १मुंजीचें वय झालेलें असून ज्याची मुंज झाली नाहीं असा मुलगा. २ लग्नाचें वय होऊन गेलेलें असून जिचें लग्न झालें नाहीं अशी मुलगी.

घोडकें न०, **घोडका** पु० खटारा गाडीच्या चौकटीचीं दोन बाजूंचीं दोन लांब लाकडें प्रत्येक; चौकटीच्या रुंदीच्या दोन आखूड लांकडांस ' करळ्या ' आणि 'तरसें' अशीं नांवें आहेत.

घोडकेळें न० मोठ्या आकाराचें एका जातीचें केळें. **घोडक्या** पु० १ चाबूकस्वार. २ घोड्याची चाकरी करणारा नोकर.

घोडगा पु० पोरचाळे करणारा प्रौढ माणूस. **घोडगी** स्त्री० पोरीसारखें वर्तन करणारी मोठी स्त्री. **घोडगांठ** स्त्री० बुद्धिबळांच्या खेळांत एकमेकांना जोर देणाऱ्या दोन घोड्यांची मांडणी. **घोडचाल** स्त्री० जलद चाल. **घोडचिलट, घोडेचिलट** न०डांस. **घोडजांवई,घोडनवरा** पु०मोठ्या वयाचा नवरामुलगा (नवरा बोवा ?). **घोडनवरी** स्त्री०मोठ्या वयाची नवरी मुलगी(नवरी बाई?). **घोडजाळी** स्त्री०प्रतिपक्ष्याच्या भोंवऱ्याला तडाखा मारून तो कांहीं अंतरावर जाऊन फिरत राहील असा भोंवरा फेकण्याचा प्रकार. **घोडदळ** न०सैन्यांतील घोडेस्वारांचा भाग. **घोडपाळणा, घोडेपाळणा, घोडीपाळणा** पु०, लाकडाच्या रचनाविशेषाला लोंबत सोडलेला पाळणा;याच्या उलट हालग्यांना टांगलेला पाळणा. **घोडपिंपळी** स्त्री० मोठ्या आकाराची पिंपळी;पिंपळीची दुसरी जात लवंगी पिंपळी.

घोडपुत्र पु० १ घोडा (प्रेमानें किं० तिरस्कारानें). २ बुद्धिबळांतील घोडा(वात्रटपणानें).

घोडपेटें न० चार भोपळे कांहीं विशिष्ट प्रकारें दोरीनें जोडून केलेला तराफा; हा एकाच माणसाला वाहून नेऊं शकतो; मासे धरणारे कोळी ह्याचेवर बसून पाण्यांत फिरतात.

घोडब्रम्हचारी पु० लग्नाचें वय होऊन गेलेलें असून ज्याचें लग्न झालेलें नाहीं असा मुलगा.

घोडमली स्त्री०, **घोडमात** स्त्री० बुद्धिबळाच्या खेळांतील पारिभाषिक शब्दविशेष. **घोडमुख** पु० १ किन्नर,-देवजातिविशेष. २ कुरूप आणि

लांबट तोंडाचा माणूस. **घोडमुंजा पु०** उशीरां म्हणजे योग्य वय उलटून गेलें असतां ज्याची मुंज होत आहे असा मुलगा. **घोडवेल स्त्री०** घोड्याची लीद (औषधांत लिदीचा उपयोग करावयाचा असतां हा शब्द योजतात). **घोडशह पु०** घोड्यानें दिलेला शह (बुद्धिबळांच्या खेळांत). **घोडशाळा स्त्री०** घोड्यांची पागा. **घोडशिष्य पु०** मोठ्या वयाचा शिष्य किं० विद्यार्थी. **घोडदौड स्त्री०** घोड्यासारखें धावणें. **घोडवळ स्त्री०** १ बांधलेल्या घोड्यांची पंक्ति. २ घोड्यांची पागा. ३ उपवर कन्या. **घोडशीर स्त्री०** पायाच्या टाचेच्या वरच्या बाजूस असते ती शीर. **घोड्याच्या पाठीवरचा कोश पु०** लांबलचक आणि कंटाळवाणा कोश म्ह० कोशाची मजल. **घोड्याथेवडी चूक स्त्री०** मोठी आणि अक्षम्य चूक. **घोडुला पु०** मुलें रांगतांना जमीनवर दोन हात आणि दोन गुडघे टेकून करतात तें संस्थान. **घोडे खाद स्त्री०** १ घोड्याचा तृणादि भक्षण-व्यापार. २ घोड्याला खातां येईल इतक्या वाढीचें गवत. **घोडे खोत पु०** भाड्यानें घोडा देण्याचा धंदा करणारा. **घोडेगांठ स्त्री०** (बुद्धिबळांच्या खेळांत) एकमेकांच्या जोरांत असलेल्या दोन घोड्यांची जुळणी किं० मांडणी. **घोडेगांठी वि०** एक प्रकारचें रेशमी (वस्त्र). **घोडे नवरी, घोडे पाळणा, घोडेमात** इ० वर 'घोडनवरी,' 'घोडपाळणा,' 'घोडमात' इ० पहा. **घोड्या गोवर पु०** ज्यांत मोठमोठ्या पुटकुळ्या येतात असा गोवर. **घोड्याचा दाणा पु०** बुंदीचा लाडू (भिक्षुकांच्या भाषेंत). **घोड्याचा पूत (किं० लेक) पु०** मूर्ख माणूस. **घोड्याची चाकरी स्त्री०** घोड्याला खरारा करणें इ०रूप जी घोड्याची निगा राखणें ती. **घोड्याची जीभ स्त्री०** एक वनस्पति-विशेष. **मी घोड्याच्या मुंजीला (किं० घोड्याच्या बारशाला) जात आहें** तुम्ही कोठें जातां आहां असें कोणा अधिकप्रसंगीं किं० फाजिल चौकस माणसानें विचारलें असतां त्याचें तोंड बंद करावयासाठीं द्यावयाचें हें उत्तर आहे. **घोड्याचें मूत न०** कुजक्या लाकडावर उगवणारें अळंबें. **घोडा काढणें** घोड्याला फेरफटका करावयाला नेणें. **घोडा हाकणें** १ चालूं लागणें. २ पळून जाणें. **एकाद्याच्या घोड्यापुढें धावणें** त्याची हिडिस्स खुशामत करणें. **घोड्यापुढें धांवणें** जिकीरीचें काम करणें. **घोड्यावर घोडा घालणें** लिलावांत एकानें बोललेल्या किंमतीहून अधिक किंमत बोलणें. **घोड्यावर बसणें** दारू पिऊन धुंद होणें किं० झोकांडे खात खात चालणें. **घोड्यावर बसून येणें** आपलें काम दुसऱ्याला करावयाला घाई करणें. **हा घोडा आणि हें मैदान, किं० घोडामैदान (किं० घोडेमैदान) जवळच आहे** ज्या वस्तूची परीक्षा करावयाची असेल ती वस्तु आणि परीक्षा करावयाची संधी ह्यांचा मिलाफ झाला असतां हें वाक्य उच्चारलें जातें. आमचें "मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०" हें पुस्तक लेखांक १६२३ पहा. **सर घोड्या पाणी खोल** मागें हट; पुढें धोका आहे. **सर घोड्या पाणी पी** पुढें बेलाशक जा आणि आपलें काम करून घे.

घोडी [म० 'घोडा' चें स्त्री०] **स्त्री०** १ घोडा ह्या चतुष्पाद प्राण्याची स्त्री. २ सारंगी, वीणा, इ० तंतुवाद्यांच्या तारा उंच राहाण्यासाठीं काष्ठ, हस्तिदंत, इ० चा रचनाविशेष करतात तो. ३ बसावयाच्या पाटाला खालच्या बाजूस जीं आडवीं दोन लांकडें मारलेलीं असतात तीं प्रत्येक; आडात; गंजवाल. ४ पखवाज उंच ठेवावयासाठीं घडवंचीसारखा लाकडाचा कांहीं रचनाविशेष. ५ गाड्यावर तृणादि ओझें अधिक लादतां यावें म्हणून लाकडाचा रचनाविशेष करतात तो. ६ लग्न जिचें अद्यापि झालें नाहीं अशी मोठ्या वयाची मुलगी. ७ पोरकट चाळे करणारी मोठ्या वयाची मुलगी (लग्न झालेलें असो किं० नसो). ८ तारवावर शौचास बसावयाच्या सोयीची चौकट जी बाहेरच्या बाजूस टांगलेली असते ती. ९ लाकूड सोयीनें तासतां किं० रंधतां यावें म्हणून सुतार लोक तें लाकूड घट्ट बसवावयासाठीं जो ठोकळा तासणी पाडून तयार करतात तो. ꣸ **घोडी मेली ओझ्यानें आणि शिंगरूं मेलें हेलपाट्यानें** घोडी ओझें किं० स्वार पाठी-

वरून वाहून नेत असतां तिचें लहान शिंगरूं तिच्या मागें जात असतें. यावरून वरील वाक्याचा अर्थ हा होतो. प्रत्यक्ष काम करणाराच्या सहवासांत जो असतो त्याला काम न करतां सुद्धां तितकेच किं० बहुतेक तितकेच कष्ट होतात.

घोडें [**सं०** घोटक; **म०** ' घोडा ' पासून] **न०** १ (लिंगविवक्षा नसतां) घोडा ह्या जातीची व्यक्ति. २ खटारा गाडीच्या चौकटीचीं दोन बाजूंचीं जीं दोन लांब लाकडें तीं प्रत्येक. ३ मासे धरणारे कोळी चार भोपळे दोरीनें बांधून जो एक प्रकारचा तराफा करून त्यावर बसून पाण्यांत संचार करतात तो तराफा. ❀ **आपलें घोडें पुढें ढकलणें (हाकणें** किं० **घालणें)** १ दुसऱ्याच्या कामांत खंड पाडून आपलें काम अगोदर करून घेण्याचा प्रयत्न करणें. २ दुसऱ्याच्या संभाषणांत लुच्चेपणानें मध्येंच तोंड घालून आपले विचार त्याच्यावर लादण्याचा प्रयत्न करणें. **घोडें खाई भाडें** नफा मिळवावयासाठीं म्हणून जो व्यवहार करावयाचा संकल्प केला असेल त्यांत नफ्यापेक्षां खर्च अधिक होईल असा संभव असतां किं० नफा आणि खर्च ह्यांची बरोबरी होत असतां हें वाक्य योजतात. **एकाद्याचें घोडें थकणें** १ चालूं केलेलें काम अर्धवट करून तें सोडून देण्याइतकें थकणें; उ० रामभाऊ, तीन लाडू खाल्ले नाहींत तोंच तुमचें घोडें थकलें कीं काय ? घ्या आणखी एक जोडी ! २ कांहीं हातीं घेतलेला व्यवहार हानीमुळें पुढें चालवितां न येणें. **माझें घोडें जाऊं द्या पुढें** आपलपोटेपणानें आपलें काम इतरांच्या कामांच्या अगोदर करूं पाहाणाराची निंदा ह्या वाक्यानें केली जाते. **एकाद्याचें घोडें मारणें** त्याचें नुकसान करणें. **तुझें घोडें कोठें अडलें** ? तुला कोठें अडचण आली ? तुझी गति कोठें कुंठित झाली ? तूं कोठें अडलास ? **गांडीखालचें घोडें न०** संसारनिर्वाहक उद्योग, धंदा, नोकरी, इ०. **एकाचे हातीं घोडें आणि दुसऱ्याचे हातीं लगाम** ज्या कामाची जबाबदारी दोन माणसांवर टाकलेली असते म्हणून एकमेकांवर कोलाकोली करण्याला जागा असते आणि कोणीच तें काम करीत नाहीं त्या कामाचें वर्णन करतांना हें वाक्य योजतात. **बिगारीचें घोडें त्याला तरवडीचा फोक** दुसऱ्याचा पदार्थ कोणी चांगल्या रीतीनें वागवीत किं० वापरीत नाहीं.

घोण स्त्री० १ पुष्कळ पायांचा एक क्षुद्र प्राणी. २ घर इ० च्या पाख्यांचा संधि; घराचीं काटकोनांत मिळणारीं दोन पाखीं जेथें मिळतात तेथें होणारा संधि किं० त्या संधीच्या ठिकाणीं घातलेला वांसा. ३ ढुंगणावर टेकून गुडघ्यांत डोकें घालून बसणें (शारीरिक किं० मानसिक दुःखामुळें मनुष्य अशा संस्थानांत बसतो). ❀ **घोण घालून बसणें** दुःखानें गुडघ्यांत डोकें घालून बसणें. **घोणवांसा पु०** वर ' घोण ' चा दुसरा अर्थ पहा. [सुस्त; मंद.

घोणशा वि० फोफशा आणि आळशी;

घोणस पु० एक प्रकारचा सर्प. मागें ' घणस' पहा. ❀ **घोणसकांडें न०** एक वनस्पतिविशेष; हें घोणसकांडें दिसण्यांत घोणसासारखें असतें. **घोणसें पडवळ न०** पडवळाची एक जात,—हें पडवळ घोणसासारखें दिसतें.

घोणा [**सं०** घोण=नाक] **पु०** दोन नाकपुड्यांच्या मधल्या पडद्याचा वरचा भाग. ❀ **घोणा फुटणें** घोण्याला धक्का लागून किं० उष्णादि कारणामुळें त्यांतून रक्त वाहाणें; कांदा हुंगल्यानें हें रक्त थांबतें.

घोणाटणें स०क्रि० मोठ्यानें ओरडून गुरेंढोरें इ० ना हाकलून गोळा करणें. **अ० क्रि०** १ एके ठिकाणीं घों घों असा आवाज करून जमणें (माशा इ०). २ डुरकाण्या करीत करीत एके ठिकाणीं जमणें (गुरेंढोरें).

घोणाटा [**म०** घोणाटणें] **पु०** १ माशांचें घोंघावणें किं० घों घों असा आवाज करणें. २ पदार्थांचा घोटाळा किं० अस्ताव्यस्तपणा.

घोण्या पु० १ वर ' घोण, ' ' घोणवांसा ' पहा. २ घोणवाशांवर किं० पाटिसावर घालतात ते नळे किं० तीं नळ्यांचीं कौलें प्रत्येक.

घोंप पु० घड, गुच्छ (फळांचा किं० फुलांचा).

घोंबें न० १ अल्प प्रयत्नानें किं० प्रयत्नाशिवाय मिळालेला मोठा लाभ (येणें, हातास लागणें). २ संसार चालविण्याला जरूर तो पैसा किं० धान्य इ० देणारा यजमान, शेत, इ०.

घोमेटी स्त्री०, घोमेटें न० मागें 'गोमेटी,' 'गोमेटें' पहा.

घोयरा पु० सरड्याच्या जातीचा एक प्राणि- [विशेष.

घोर [सं०] वि० १ भयंकर. २ गाढ (निद्रा). **पु० १** वीणा इ० कांस खर्ज स्वराची तार लावितात ती, किं० तींतून निघालेला स्वर. २ भयंकर राक्षस किं० कोणी प्राणी. ३ इष्ट माणूस किं० पदार्थ दूर असल्यामुळें त्याच्याबद्दल लागते ती उत्कंठा किं० होतें तें दुःख; उ० त्या पोरानें आईचा घोर घेतला आहे. ४ कांहीं कार्यासंबंधाचा आरडाओरडा किं० गडबड. ५ मरणाच्या वेळीं घशांत चालते ती घरघर. ६ मोठा आक्रोश; रडारड; उ० आई मेली असें कळतांच पोरांबाळांनीं एकच घोर केला. ꣸ **घोरंकार पु० अ० व०** अनेक प्रकारचे प्रयत्न; एकाद्या कार्यासाठीं केलेली प्रयत्नाची शिकस्त; उ० त्यानें घोरंकार करून घर बांधलें. **असत्याचे विकार नसत्याचे घोरंकार** ज्याच्याजवळ साधन-सामग्री आहे त्याचें कार्य सहज होऊन जातें आणि ज्याच्याजवळ साधनसामग्री नाहीं त्याला तें कार्य पार पाडण्याला फार कष्ट करावे लागतात. **घोरवेळ स्त्री० १** अशुभ समय. २ करकरीत दुपार, किं० संध्याकाळ.

घोरड पु० मंद, भोळसर, सुस्त, किं० अव्य-वस्थित मनुष्य.

घोरणें अ० क्रि० निद्रेच्या स्थितींत नाकांतून चालणाऱ्या श्वासोच्छ्वासानें शब्दविशेष करणें; उ० रामभाऊ घोरत पडले आहेत. ꣸ **गाय घोरे गोठा भरे, बैल घोरे धनी मरे** गोठ्यांत गाय घोरत पडली असतां तें आगामि वैभवाचें सूचक असतें आणि बैल घोरत पडला असतां तें आगामि अपकर्षाचें सूचक असतें.

घोरंदर, घोरांदर वि० वर 'घोर' **वि०** पहा.

घोरपड स्त्री० १ सरड्याच्या आकाराचा पण त्याच्याहून मोठा असा एक प्राणी. ह्याच्या कम-रेला दोरी बांधून तो किल्ल्याच्या तटावर फेकून दोरीनें किल्ल्यावर प्राचीन काळीं शत्रू चढत असत. २ पेचाची किं० संकटाची स्थिति; लचांड; अरिष्ट. ३ त्रासदायक माणूस. ꣸ **एकाद्यावर घोरपड येणें** तो संकटांत किं० अडचणींत पडणें; त्याच्या-वर कांहीं अरिष्ट गुजरणें; त्याच्यावर कांहीं तरी हकनाहक तोहमती येणें. **एकाद्यावर घोरपड आणणें** त्याला संकटांत किं० पेचांत लोटणें.

घोरबंद पु० खोगिराचा पुढचा बंद.

घोरांटी स्त्री० मरणाऱ्याचा घशांतील घरघर.

घोल पु० दोन डोंगरांमधील किं० दोन टेकड्यांच्या मधील खिंड.

घोलांट स्त्री०, न०, घोलांटी स्त्री० कोल्हांटी उडी; खालीं डोकें आणि वर पाय ज्या उडींत होतात ती उडी.(मारणें, घेणें, टाकणें). ꣸ हनुमंतापुढें (किं० **मारुतीपुढें**) **घोलांटी** घेऊं नये आप-णाहून जो शेकडो पटीनें गुणवान् त्याच्या पुढें बढाई मारणें हा मूर्खपणा होय.

घोलावणी स्त्री० फसवणूक.

घोलाविणें स० क्रि० भुलथापांनीं फसविणें.

घोव पु० दादला; नवरा. ꣸ **घोवकरीण स्त्री०** नवऱ्याची बायको; जिला नवरा आहे अशी स्त्री; सधवा. **घोवगंडा [म०** घोव (नवरा) + **कानडी** गंडा (नवरा)] **पु० १** नवरा. २ नवरा आणि त्याचे नातलग (समुच्चयानें); सासरचें वडील माणूस.

घोवकी [म० घोव] **स्त्री०** पुरुषत्व; वीर्य. ꣸ **घोवास नाहीं घोवकी आणि बायको करी शिंदळकी** नवऱ्याच्या अंगीं पुरुषत्व नसल्यास त्याची बायको व्यभिचार करणारच.

घोवदी पु० बाप्या; पुरुषमाणूस.

घोष [सं०] पु० १ मेघ, समुद्र इ० चा ध्वनि. २ अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा ध्वनि; घोकण्याचा आवाज. ३ आपला उद्देश किं० बेत यांचें पुनःपुनः कथन, निवेदन, किं० उच्चारण (मांडणें, लावणें, घेणें, लागणें).

घोषण न०, घोषणा स्त्री० [सं०] १ एकाद्या गोष्टीचा बोभाटा किं० प्रसिद्धि. २ एकादी गोष्ट वारंवार बोलून दाखविणें किं० सांगणें.

घोस [सं० गुच्छ] **पु०** घड; गुच्छ; मोती, फुलें, इ० ची विशेष प्रकारें केलेली गुंफणी. ꣸ **घोसबाळी स्त्री०** ज्या बाळीला मोत्यांचे घोस असतात ती. **घोसदार वि०** ज्याला घोस आहेत असा (दागिना इ०).

घोस [फा० घोषाह्] **पु०** १ शिडाच्या काठीचा बुंध्याकडील प्रदेश. २ ज्या दिशेकडून वारा वहात आहे ती दिशा. ३ जलमार्गाचा प्रवास; उ० मुंबईच्या घोसास दहा रुपये पडतात. ४ वैभवाची स्थिति; उत्कर्षाचा कळस; उ० तो भरघोसानें मेला. ५ विवक्षित स्थळीं गलबताची एक फेरी किं० खेप. वि० ठळक; ठसठशीत; घवघवित.※ **भरघोसानें, भरघोसानिशीं, भरल्या घोसानें क्रि० वि०** आवेशानें; सर्व शक्ति खर्चून आणि उत्साहानें; नेटानें आणि छातीठोकपणें; उ० तानाजीनें भरल्या घोसानिशीं सिंहगड घेतला; उ० मी तरुणपणीं भरल्या घोसानें तीन मिनिटांत पर्वतीचा डोंगर चढत असें. [गुच्छ किं० गजरा.

घोसा [सं० गुच्छ] **पु०** पुष्पांचा घोस किं०

घोसाळी स्त्री० एक वेल.

घोसाळें न० घोसाळी नांवाच्या वेलाचें फळ ; या फळाची भाजी, भजीं, इ० खाद्यपदार्थ केले जातात. ※ **घोसाळ वेल स्त्री०** एक प्रकारचा तांदूळ. [बुळीत असते.

घोळ स्त्री० एक प्रकारची पालेभाजी, ही बुळ-

घोळ स्त्री० खाऱ्या पाण्यांतील एका जातीचा मासा; हा तांबूस वर्णाचा असतो.

घोळ [म० घोळणें] **पु०** १ चर्चा; वादविवाद (घालणें); उ० ह्या शास्त्रार्थाविषयीं चार दिवस त्यांनीं घोळ घातला तेव्हा सिद्धांत ठरला. २ गोंधळ; घोटाळा; अडवणूक; उ० ह्या वाघानें वाटेवर पुष्कळवेळ घोळ घातला पण शेवटीं तुका नाकानें त्याला गोळी घालून ठार केलें. ३ लगबगीची हालचाल. ४ वाघ्याच्या हातांत असतें तें धातूचें वाद्य. ५ जिच्या एका टोकाला कोयंड्यांत अडकावलेलीं घुंगरें असतात अशी काठी,—जी रात्रीच्या वेळीं हिंडतांना हातांत घेतात; हिला ' घोळकाठी ' असेंही म्हणतात. ६ अंगरख्याचा, परकराचा, झग्याचा, लुगड्याचा, किं० धोतराचा घेर. ७ धान्य सूप इ० मध्यें घालून घोळलें असतां मागें जो त्याज्य अंश राहातो तो.

घोळका [म० घोळ] **पु०** मनुष्यांचा किं० पक्ष्यांचा किं० जनावरांचा अव्यवस्थित समुदाय. २ गोंधळ; घोटाळा; गडबड.

घोळंकार, घोळांकार पु० १ अव्यवस्था; गोंधळ; घोटाळा. २ उपद्रव; मनाची भांबावलेपणाची स्थिति. ३ लगबगीची हालचाल.

घोळण [म० घोळणें] **न०** १ घोळण्यासाठीं सुपांत घेतलेलें एका खेपेचें किं० एका वेळेचें धान्य इ०. २ धान्य इ० घोळण्याची क्रिया.

घोळणा [म० घोळणें] **पु०** १ जोंधळे, बाजरी, इ० च्या लाह्या करतांना तीं धान्यें मडक्यांत ढवळावयासाठीं जी टोकाला फडकीं गुंडाळलेली काठी घेतात ती. २ भात चाळावयाची चाळण. ३ दोन नाकपुड्यांच्या मधला जो पडदा त्याचा आंतल्या टोकाकडचा भाग. ४ सोनाराचें एक आउत ठसा उठविण्याच्या कामाचें.

घोळणें [म० घोलणें] **स्त्री०** घोळण्याची क्रिया.

घोळणें [म० घोळणें] **न०** लाह्या करतांना धान्य ढवळावयाची काठी. वर ' घोळणा ' अर्थ १ पहा.

घोळणें स० क्रि० १ धान्यादि पदार्थ सूप इ० मध्यें घालून तें कांहीं विशिष्ट प्रकारें हालविणें,— त्या पदार्थांतील बारीक मोठे, हलके जड, ग्राह्य अग्राह्य अंश वेगळे वेगळे करण्यासाठीं. २ दोन किं० अधिक पदार्थ ह्यांचें चांगलें मिश्रण व्हावयासाठीं ते ताट, परात, सूप इ० मध्यें घालून हालविणें किं० ढवळणें; उ० बुंदीच्या लाडवाच्या कळ्या आतांच्या आतांच पाकांत घालून घोळल्या पाहिजेत; उ० पोळी तूपसाखरेंत घोळून खा. ३ पदार्थ घासून गुळगुळीत करणें; उ० ह्या कुऱ्हाडीचा दांडा हाताला बोचतो, तो तासणीनें चांगला घोळून काढला पाहिजे. ४ दांडगाईनें पदार्थ वागविणें किं० त्याचा उपयोग करणें. ५ पत्ते, गंजीफा इ० एकमेकांत मिसळणें किं० त्यांची गल्लद करणें. ६ चिंतनाचा किं० विचाराचा किं० चर्चेचा विषय करणें; उ० हा श्लोक मी एक प्रहरभर मनांत घोळला तेव्हां त्याचा अर्थ मला लागला. ७ सतावणें; उपद्रविणें; उ० आमांशानें मला सहा महिने घोळलें. ८ उलटे सुलटे आणि खुबीदार प्रश्न एकाद्याला विचारणें,—सत्य बाहेर काढण्यासाठीं ; उ० त्या चोराला आम्ही घोळघोळून घेतलें तेव्हां त्यानें चोरीचा तपशील सांगितला ! ९ एकाद्या कामांत वहिवाटलेला किं० अनुभवलेला असणें; उ० त्या कामांत मी दोन वर्षें घोळलेला आहें, मी नवशिका नव्हे. उ० हा घोडा दोन चार दिवस

घोळला म्हणजे बसावयाच्या सोयीचा होईल. १० हातांनीं चोळवटणें किं० इकडे तिकडे ठेवणें किं० घेणें देणें इ०प्रकारचे व्यवहार किं० व्यापार; उ० हातीं रुपये (किं० दागिने) घोळावयाच्या कामीं प्रामाणिक कारकुनाची नेमणूक करावी लागते. ११ वापरणें; उपयोगांत आणणें; उ० आज हें लुगडें तुम्हांला कडकडीतः वाटतें पण दोन चार वेळ घोळलें म्हणजे तें मऊ होईल. **अ० क्रि०** १ कांहीं गोष्ट वारंवार मनांत येत असणें. २ वहिवाटींत येणें. ३ चोळवटलें जाणें. ꣸ **घोंळून घोळून क्रि० वि०** १ वारंवार उलथें पालथें करून किं० खालीं वर करून. २ अदलाबदल करून. ३ आळीपाळीनें; आलटून पालटून. ४ घोळण्याची क्रिया वारंवार करून.

घोळ बोटवा [**म०** घोळणें + बोट] **वि०** १ एक प्रकारचा गव्हला. २ लुडबुड्या.

घोळमाडणें स० क्रि० अव्यवस्थित रीतीनें किं० दांडगाईनें (पदार्थ, माणूस, जनावर) वापरणें किं० उपभोगणें किं० कामाला योजणें.

घोळसणें, घोळसावणें स० क्रि० १ ढवळणें. २ कालविणें; मिश्रित करणें. ३ कोणेकास मारणें किं० लोळविणें किं० बुकलणें.

घोळांकार [**म०** घोळणें] **पु०** वर ' घोळंकार ' पहा.

घोळाणा, घोलाणा पु० दोन नाकपुड्यांच्या मधल्या पड्याचा अगदीं आंतील वरचा भाग; ह्याला कांहीं इजा झाली असतां किं० उष्णादि विकारानें त्यांतून रक्त वाहूं लागलें असतां त्याला ' घोळाणा फुटणें ' असें म्हणतात.

घोळाणा [**म०** घोळणें] **पु०** अव्यवस्था; गोंधळ; घोटाळा.

घोंस वि० १ गंभीर; खणखणीत (आवाज, किं० स्वर). २ ठसठशीत, जाडी (दागिना किं०कांहीं पदार्थ).

घ्न [**सं०**] **वि०** उपपद तत्पुरुष समासांत ' हन् ' ह्या क्रियापदाचें ' घ्न ' हें रूप होऊन त्याचे पुढें दिल्याप्रमाणें अर्थ होतात. मारणारा; हत्या करणारा; विध्वंसिणारा; नाहींसा करणारा, इ० इ०; उ० रोगघ्न म्ह० रोग हटविणारें; वातघ्न म्ह० वातविकार घालविणारें; पापघ्न म्ह० पापाचें निरसन करणारें; कृतघ्न म्ह० दुसऱ्यानें आपणावर केलेले उपकार मनांत न घेणारा; नियमघ्न म्ह०नियमाचें उल्लंघन करणारा; इ० इ० इ०.

घ्या [**म०** घेणें] **उ० वा० अ०** हें पहा !

घ्राण [**सं०**] **न०** १ वास. २ वास घेण्याचें इंद्रिय; नाक. ३ वास घेण्याची क्रिया; हुंगणें. ꣸ **घ्राणतर्पण वि०** नाकाला सुखदायक; सुगंधित. **घ्राणेन्द्रिय न०** पदार्थाचा वास ग्रहण करणारें इंद्रिय; नाक.

घ्रात [**सं०** घ्रा=हुंगणें] **वि०** हुंगलेलें; वास घेतलेलें.

ङ

ङ संस्कृत व्यंजनमालेंतील हें पांचवें व्यंजन समजलें जातें. ह्या अक्षराला संस्कृतांत स्वतंत्र अवस्थिति नाहीं. तें क, ख, ग, आणि घ ह्या चार अक्षरांच्या मागचा अनुस्वार दाखविण्यासाठीं लिहिलें जातें. संस्कृतांतून मराठींत घेतलेल्या शब्दांतील अनुस्वार दाखवितांना कधीं कधीं ङ हें अक्षर लिहिलें जातें; उ० अङ्क, अङ्ग, इ०.

च

च मराठी व्यंजनमालेंतील सहावें व्यंजन. ह्या अक्षराचा संस्कृतांत नेहेमीं तालव्य उच्चार असतो; मराठींत कधीं कधीं तालव्य(चार,चिक्कू,इ०)आणि कधीं कधीं दंततालव्य (चमचा,चहूंकडे,इ०)असतो. हे दोन्ही प्रकारचे च लिहिण्यांत आणि छापण्यांत भिन्न प्रकारें दाखविले जात नाहींत.

च अव्यय कांहीं अर्थाचा निश्चय, खात्री, अन्यव्यावर्तन इ० चें दर्शक अव्यय आहे; उ० तुम्हीच या म्हणजे तुम्ही या, दुसऱ्या कोणास पाठवूं नका; उ० तुम्ही याच म्हणजे तुम्ही आल्याशिवाय राहूं नका; उ० मी जेवतांच येतों म्ह० दुसरें कांहीं न करतां येतों; उ० पढलेल्या ग्रंथाची पुष्कळ दिवसांत उजळणी केली नसली तर तो नवा नवासाच वाटतो.

चई, चाई स्त्री० ज्याच्या योगानें केस झडतात असा एक रोग (क्रि० लागणें).

चईन, चैन स्त्री०, न० मनाला वाटते ती स्वस्थता; आरामाची स्थिति; उ० मी मुंबईस राहाणारा मनुष्य; मला ह्या तुमच्या खेडेगांवांत चैन पडत नाहीं; उ० येथें तुला चैन पडतें काय ?

चक पु० १ वचक, दरारा; उ० त्या मामलतदारानें ती चोरांची टोळी हुडकून काढून प्रत्येकाला जबर शासन केलें त्याबरोबर त्याचा सर्व रयतेवर चक बसला. २ परिपाठ; पाळावयाची शिस्त किं० नियम; उ० ह्या कुटुंबांतील सर्व माणसांचा असा चक आहे कीं प्रातःस्नान केल्याशिवाय कोणी घराच्या बाहेर पडत नाहीं. ३ कांहीं गोष्ट करण्याविषयीं किं० न करण्याविषयीं सर्व व्यक्तींचें ऐकमत्य; उ० सर्व गांवकऱ्यांचा चक असल्यावर सरकारचाही जोरा चालत नाहीं. ४ यजमानानें नोकरास घालून दिलेली वर्तनपद्धति; उ० तुमच्या नोकराला नित्य नवें सांगूं नका; त्याला एक चक बांधून द्या आणि त्याप्रमाणें त्याला वागावयाला भाग पाडा. ५ एकाद्या इसमाकडे कसावयाला दिलेली जमीन. ६ जमीनीचा लांबपर्यंत पसरलेला विस्तार. [(येणें; ठेवणें).

चक [इं० चेक्] पु० ताकीद; सूचना; वचक

चकचक स्त्री० चकाकी. क्रि० वि० १ लखलखत. २ चकचक असा आवाज करून (कुत्रें पाणी पितांना करतें तसा).

चकचकणें अ० क्रि० झळकणें; लकाकणें.

चकचकाट पु० लखाखी; चकाकी; लखलखाट.

चकचकावणें स० क्रि० १ डोळ्यांपुढें चक्र होईल अशा प्रकारें एकाद्याच्या कानशिलावर चपराक मारणें. २वानरानें चक् चक् असा ध्वनी करणें. [झळाट.

चकचकी स्त्री० लखाखी; प्रकाशाचा झळ-

चकचकीत वि० १ झळकणारा; चकाकणारा. २ स्वच्छ; निर्मल (वस्त्र, आरसा, घासलेलें धातूचें भांडें, इ०).

चकचूर पु०, न० श्रांतपणा; थकवा.

चकट [म० चटक] स्त्री० कांहीं वाईट खोडी (दारू पिण्याची, विडी ओढण्याची, सुपारी खाण्याची). [गठ्ठा किं०समुदाय.

चकडी स्त्री० आठ ठाणांचा किं० सणंगांचा

चकणा वि० तिरवा (डोळा) किं० तिरव्या डोळ्याचा (इसम).

चकणी स्त्री० पैसे, कवड्या, इ० चे खेळांत जी चकण्याची पाळी येते ती.

चकणें अ० क्रि० १ बाह्यसौंदर्य, चकाकी, थाटमाट, इ० पाहून फसणें किं० संभ्रान्त होणें; भूल पडून फसणें. २ एकाद्याच्या गोड गोड थापांनीं फसविला जाणें. ३ भलत्याच मार्गाकडे जाणें. ४ लपंडाव वगैरे खेळांत गडी उजवण्यासाठीं हातावर हात मारणें. ५पैसे, कवड्या इ०च्या खेळांत आरंभीं खळीमध्यें पैसा इ० टाकणें.

चकती [सं० चक्र] स्त्री० १ धातूचा पत्रा, कागद, चामडें, इ० चा लहान (प्रायः वाटोळा) तुकडा. २ केळें, पेरू, वांगें, इ०चा विळीनें किं० सुरीनें कापून काढलेला तुकडा (जो अर्थात् वाटोळा असतो). ३ पदार्थाला चिकटावलेला कागद इ०चा तुकडा,–ज्यावर त्या पदार्थाचें वर्णन इ० रूप माहिती लिहिलेली असते. ४ लहानसें पत्र, चिठ्ठी, इ०. ५ कोणताही पातळ आणि वाटोळा पदार्थ.

चकंदळ, चकांदळ न० १ गजकर्ण, नायटा, इ०मुळें शरीराच्या त्वचेवर जें वाटोळें आणि त्वचेहून वेगळ्या रंगाचें चिन्ह उमटतें तें. २ भिंतीच्या गिलाव्याचा ढपला उडाल्यामुळें किं० जमीनीचा पोपडा निघाल्यामुळें जें वाटोळें चिन्ह किं० जो वाटोळा खळगा होतो तो. ३ प्राण्याच्या शरीरावर रट्टा बसल्यानें भिन्न वर्णाची त्वचा होते ती. ४ जेथें पेरलेलीं बीजें रुजलीं नाहींत तो शेताचा भाग. ५ हिशेब, व्यवहार, इ०मध्यें मारलेले पैसे. ६ अन्नादि सामग्रीचा उडविलेला फन्ना. ७ मालमत्ता, जिंदगी इ०ची उधळपट्टी. ८ माणसांचा थवा.

चकदळ न० केळें, पेरू, वांगें, इ०चा काप (अर्थात् जो चक्राकार असतो).

चकदळी स्त्री० १ लहान आकाराची भाकरी किं० पोळी. २वांगें, भोपळा,इ०चा वाटोळा काप.

चकदा पु० १ वाटोळा डाग किं० ठिपका

(त्वचेवर उमटलेला). २ पदार्थाचा उडालेला कळपा (निवणें, काढणें, तोडणें).

चकनचूर [**हिं०** चकनाचूर] **पु०** १ पदार्थाची नासाडी किंवा सत्यानाश; पदार्थाचा चुरा. २ दमलेपणाची स्थिति किं० भावना.

चकनाचूर [**हिं०** चकनाचूर] **वि०** १ दमलेला; अत्यन्त थकलेला; श्रमादिकांनीं अर्धमेला झालेला. २ फुटून तुटून छिन्नभिन्न झालेला (कांहीं पदार्थ).

चकनामा पु० गांवच्या जमीनींच्या तपशीलवार माहितीचें पत्रक.

चकपक वि० नीटनेटका,: झुळझुळीत, स्वच्छ (वस्त्र, स्थळ, माणूस, इ०). **स्त्री०** कांहीं काम करण्यांत तरतरी किं० तल्लखपणा.

चकबंदी स्त्री० १ जमीनीच्या मर्यादा इ०रूप तपशील किं० वर्णन. २ जमीनीवर घ्यावयाच्या साऱ्याची आकारणी.

चकभूल [**सं०** चकित+भूल] **स्त्री०** १ आचंबा; विस्मय; मनाची संभ्रान्तता किं० गोंधळ. २ मनाला प्राप्त झालेला संमोह. **वि०**आश्चर्यचकित, विस्मित किं० संभ्रान्त झालेलाः(माणूस).

चकमक स्त्री० १ ठिणगी पाडावयासाठीं गारेवर ज्या पोलादी पट्टीचा आघात करतात ती. २ ती पट्टी आणि ती गार यांची जोडी. ३ युद्ध, कलह, मारामारी (उडणें, झडणें, इ०).

चकमकणें अ० क्रि० चकचकणें; झळकणें.

चकरणें स० क्रि० बहाल, चिरा, इ० जड पदार्थ विवक्षित अंगानें बसवावयासाठीं तो युक्तीनें फिरविणें किं० वळविणें किं० सरकावणें.

चकरदंड [**सं०** चक्र+दण्ड] **पु०** तालमींत करावयाचा व्यायामाचा एक प्रकार.

चकरमकर [**हिं०**] **स्त्री०** १ युक्त्या, लबाड्या, डावपेच. २ खोट्या सबबी; टोलवाटोलवी. ३ घाबरगुंडी. ॐ**चकर मकर पाहाणें** घाबरलेल्या नजरेनें पाहाणें; भयाची नजर इतस्ततः फेकणें.

चकला [**हिं०** चकला; **सं०** चक्र] **पु०** १ देशांतील अनेक परगण्यांचा गट. २ शहरांतील महल्ला किं० चवाठा. ३ शहराची पेठ. ४ गर्भसुती असून उणाख असें एक वस्त्रविशेष. ५ शहराच्या विशिष्ट भागांतील खटले चालविण्याची जागा; कोतवालचावडी. ६ सराफकट्टा. ७ भिकारी लोक जेथें जमतात आणि जेथें परोपकारी इसम त्यांना भिक्षा घालतात ती जागा किं० अशा जागीं घातलेली भिक्षा किं० अशा भिक्षेसाठीं भिकाऱ्यांचें गोळा होणें.

चकली [**सं०** चक्र] **स्त्री०** तांबें इ० धातूच्या पत्र्याची चकती किं० वाटोळा तुकडा.

चकली [**सं०** चक्र] **स्त्री०** तांदूळ आणि उडीद ह्यांच्या पिठांत लोणी, मीठ, हिंग, जिरें, तिखट, मीठ, इ० पदार्थ घालून सर्व द्रव्यें चांगलीं कालवून तें पीठ सांच्यांत घालून चेपून त्याचीं जिलबीसारखीं वेटोळीं करून कढईत तळून काढून करतात तें खाद्यविशेष.

चकल्या पु० शहराच्या चकल्यावर म्ह० चवाठ्यावर असतो तो चौकीदार.

चकवा पु०१ महागिरी चालविणारे कोळी इ० कवलें मारतेसमयीं गाणें गातात तें. २ चक्रवाक पक्षी.

चकविणें [**म०** ' चकणें 'चें प्रयोजक] **स०** **क्रि०**१भुलविणें; थापबाजीनें फसविणें.२घोटाळ्यांत घालणें किं०भलतीच गोष्ट करावयाला लावणें.

चकसणें [**म०** चव+कसणें] **अ० क्रि०** एखाद्या पदार्थाची गोडी किं० लज्जत लागल्यामुळें ती मिळविण्यासाठीं पुनः पुनः झटणें.

चकळ [**सं०** शकल=तुकडा] **न०** पदार्थाचा कापून किं० तोडून काढलेला किं० निघालेला तुकडा.

चकळी स्त्री० रक्त, दूध, चीक, इ०ची उडालेली चिळकांडी.

चकाकणें अ० क्रि० झळकणें, चमकणें, [लखलखणें.

चकाकी [**म०** चकाकणें] **स्त्री०** चमक; झकझगाट; तेज; प्रभा; चकचकीतपणा.

चकाचकी स्त्री० १ तरवारी इ० शस्त्रांचा चकचकाट किं० एकावर एक आपटून होणारा खणखणाट. २ वाद, भांडण, बोलाचाली (झडणें, उडणें).

चकाचूर, चक्काचूर वर ' चकनाचूर ' पहा.

चकाटणें, चाकाटणें अ० क्रि० १ दिपणें. २ चकित होणें. ३ गोंधळणें.

चकाट्या स्त्री० अ० व० वायफळ गप्पागोष्टी (पिटणें, मारणें).

चकाणा, चकणा वि० तिरळा (डोळा) किं० तिरळ्या डोळ्याचा (इसम).

चकांदळ, चकांदळा वर ' चकंदळ ' पहा.

चकाभूल [म० चक्र+भूल] **स्त्री०** घाबरगुंडी.

चकार [**म०** च+कार; च हें अक्षर] **पु०** कांहीं अक्षरसुद्धां (अकरणरूपी प्रयोग); उ० मी तेव्हां चकार बोललों नाहीं. ह्याच अर्थानें ' चकार शब्द ' हा शब्द योजला जातो.

चकार पु०, चकारी स्त्री० [**म०** 'चवली' किं० 'चवल' ह्या शब्दाचें पहिलें अक्षर च यावरून] दोन आणे किंमतीचें नाणें; चवली; चव्वल. भिक्षुकांच्या भाषेंत राम म्ह० रुपाया; सीताबाई म्ह० आधेली किं० अर्धा रुपाया; चकारी किं० चकार म्ह० दोन आणे; पकारी, पकार म्ह० पावली.

चकारविल्हा [**म०** च हें अक्षर+**अ०** विलाइयाह् (वर्ग)] **पु०** चकारानें सुरू होणाऱ्या शब्दांच्या वर्गांतील इसम म्ह० चोर, चहाड, चिकू, चिंदळ (म्ह० शिंदळ); विशेषतः चहाडखोर माणूस; उ० रंगाचार्य हा इसम चकारविल्ह्यांपैकीं आहे !

चकार शब्द वर ' चकार ' मध्यें पहा.

चकारा [वर ' चकार ' पहा] **पु०** दोन आण्यांचें नाणें; चवली; चव्वल.

चकारी [वर ' चकारविल्हा ' पहा] **स्त्री०** चहाडी; चहाडी करण्याचा धंदा किं० खोडी.

चकारी [**सं०** चक्र; **म०** चाक] **स्त्री०** १ गाडीच्या चाकाची रस्त्याच्या धुळीवर किं० चिखलांत उमटलेली रेषा. २ गाडीचें वळण (घेणें); उ० अडचणीच्या जागेंत चकारी घेऊं नये, पैस जागा पाहून घे. ३ गाडी रस्त्यांत वळविण्याच्या सोयीचा जो प्रदेश केलेला असतो तो.

चकित [**सं०**] **वि०** १ भ्यालेला; घाबरून स्तब्ध झालेला. २ गोंधळलेला.

चकीर [**सं०** चक्र] **न०** मुलांचें खेळावयाचें चक्र.

चकोत्रा [**हिं०**]**पु०** एक झाड किं० त्याचें फळ.

चकोंदळ पु०, न०, चकोंदळा पु० मागें ' चकंदळ, ' ' चकदळ ' पहा.

चकोर [**सं०**] **पु०** एक पक्षी,– जो चंद्रकिरणांवर उपजीविका करतो असा कविसमय आहे.

चक्क वि० १ लखलखीत; चकचकीत. २ स्वच्छ. ३ आश्चर्यानें चकित झालेला; उ० लाख रुपयांचा तेथें ढीग पाहातांच मी चक्क झालों ! **न०** डोळे दिपावयाजोगें जें तेजाचें आकस्मिक स्फुरण तें; उ० प्रथम चक्क झालें आणि लागलीच वीज पडली. ❀ **चक्कन, चक्कर, चक्कदिशीं क्रि० वि०** चक्क होऊन, चकचकाट होऊन.

चक्कर [**सं०** चक्र] **न०** १ मुलांचें खेळावयाचें चाक. २ वर्तुळ. ३ पटांगणांतील घोडदौडीसाठीं केलेला रस्ता. ४ बागेंतील वर्तुळाकार पायवाट. ५ इमारतीचुना मळावयासाठीं दगडी चाकाच्या फेरीसाठीं खणलेला असतो तो चर. ६ फेरा; फेरी; हेलपाटा. **न०, स्त्री०** भोंवळ, घेरी, (पित्तादिकारणामुळें येते ती). ❀ **चक्कर मारून येणें** १ फेरी करून येणें; एकाद्या ठिकाणापर्यंत कांहीं कामासाठीं जाऊन येणें. २ पाय मोकळे करण्यासाठीं किं० हवा खाण्यासाठीं फिरून येणें. **घोडा चक्करावर धरणें** घोड्याला मंडळाकार फिरावयाला लावणें.

चक्का पु० १ सुरीनें कापावयाजोगें घट्ट दहीं. २ सुग्रास भोजन (दुसऱ्याच्या घरीं मिळालेलें); उ० आज कोणीकडे चक्का झोडला भटजीबोवांनीं ? ❀ **चक्का दहीं न०** सुरीनें कापतां येईल इतकें घट्ट दहीं.

चक्की [**सं०** चक्र] **स्त्री०** १ जातें. २ वाऱ्याच्या किं० पाण्याच्या प्रवाहाच्या जोरानें चालणारें यंत्र; उ० पवनचक्की, पाणचक्की.

चक्र [**सं०**] **न०** १ गाडीचें चाक. २ श्रीविष्णूचें चक्राकार आयुधविशेष; सुदर्शन. ३ बोटांभोंवतीं गरगर फिरवून शत्रूवर फेकावयाचें एक वर्तुळाकार शस्त्र. ४ मुलांचें खेळावयाचें वाटोळें कडें. ५ बोटाच्या टोकावर असतात त्या कांहीं विशिष्ट सरणीच्या रेषा समुच्चयानें. ६ टोळी; सैन्याचें एक पथक. ७ मंडळींचा जमाव. ८ प्रदेश; देशाचा विशिष्ट भाग किं० परगणा; राष्ट्र; प्रांत; जिल्हा. ९ वडा हें खाद्य (भिक्षुकांच्या भाषेंत). १० कुंभाराचें चाक. ११ तेल्याचा घाणा. १२ वर्तुळ. १३ सूर्यमंडळ. १४ पाण्यांतील भोंवरा. १५ सैन्य. १६ सैन्याची कांहीं विशिष्ट रचना. १७ शरी-

रांतील हृदय, नाभि इ० जीं प्राणस्थानें तीं प्रत्येक. १८कोष्टयाच्या मागाच्या कराळकाठीच्या टोकाला असतात तीं चाकें किं० कप्प्यां प्रत्येक.१९ ज्योतिष्याचीं फलें वर्तविण्यासाठीं काढतात ती आकृति. २० संवत्सराद्यात्मक काळ. २१ (लाक्षणिक) संसार. २२ पाठीस लागलेलें लचांड; शुष्ककाष्ट. ॐचक्रान्त पु० १एकाद्या माणसाविरुद्ध किं० संस्थेविरुद्ध केलेला कट किं० रचिलेला व्यूह. २ कोणा माणसाचें नुकसान करण्यासाठीं केलेल्या लबाडया, उठविलेल्या कंडया, किं० सांगितलेल्या चहाडया, समुच्चयानें.ॐचक्रवाक पु०पक्षिविशेष. **चक्रवर्ती पु०** सार्वभौम राजा. **वि०** श्रेष्ठ. **चक्रदंड पु०** तालमींतील एक व्यायामाचा प्रकार. **चक्रभेद पु०** कांहीं लबाडीची युक्ति किं०हिकमत. **चक्रवाढ व्याज न०, चक्रवृद्धि स्त्री०** मुदतीमुदतीचें व्याज त्या वेळच्या मुदलांत मिळवून तें मुदल धरून त्याचेवर व्याज आकारणें ह्या सरणीनें झालेलें व्याज. **चक्रवात पु०**वाटोळ्या गतीनें फिरणारा वारा. **चक्रवाल पु०** १ क्षितिज. २ पृथ्वीला वेष्टिणारें पर्वतांचें वर्तुळ. **चक्रवेला स्त्री०** ज्या वेळीं आरंभिलेलें कार्य रेंगाळत चालतें अशी वेळ. **चक्रव्यूह, चक्रविभू, चक्रविहू पु०** १ सैन्याची कांहीं एका विशिष्ट प्रकारची मांडणी. २ एकाद्या माणसाविरुद्ध रचिलेला कट. **चक्रांकित, चक्रांगीत पु०** १ एक प्रकारचा दगड, – ज्याची पूजा करतात. २ देवीचे वण ज्याच्या अंगावर आहेत असा माणूस. **चक्रावळ स्त्री०** १ चक्रवाढ व्याज. २ घोड्याच्या अंगावरील केशांचा कांहीं विशिष्ट आकाराचा भोंवरा; हें घोड्याचें अशुभ चिन्ह मानलें जातें.

चक्री [सं० चक्र] **स्त्री०** १ अनेक समानशील माणसें एकत्र जमून आळीपाळीनें गायन, पुराणवाचन, इ० रूप जो समारंभ करतात तो. २ पागोट्याच्या बिनीवर चक्राकार पट्टया एकावर एक बसवून करतात ती रचना; पागोट्याच्या केळ्याच्या वरचा आणि कोकीच्या खालचा जो वर्तुळाकार भाग तो. ३ मुलांचें खेळावयाचें वर्तुळाकार कडें. ४ मुलांची खेळावयाची लाकडी तबकडी,–जिच्या परिघावर खाचणी असून तींतील दोरीवर ती तबकडी हाताच्या खुबीदार झटक्यानें वर चढते आणि खालीं उतरते. ५ पागोट्यावर खोचावयाचा तुरा. ६ (लाक्षणिक) मति; अक्कल. ॐ **एकाद्याची चक्री उडविणें** त्याची हुर्यो करणें; त्याची फजीती करणें. **एकाद्याची चक्री गुंगविणें** (किं० **उतरणें**) त्याला घोटाळयांत घालणें; त्याला संभ्रान्त करणें; त्याला पेचांत किं० अडचणींत पाडणें. **त्याची चक्री गुंग झाली** त्याला कांहीं सुचेनासें झालें; तो संभ्रान्त झाला; अडचणींतून कसें मोकळें व्हावें हें त्याला समजेना. **चक्री फिरविणें** मारामारीला किं० भांडणाला सिद्ध होणें. **चक्रीदार वि०** ज्याची चक्री (अर्थ २ पहा) सुंदर आहे असें (पागोटें).

चखोट [म० चोखट] **वि०** १ चांगला; मनोहर. २ शुद्ध; बिन भेसळीचा.

चंग [फा०] **पु०** १ दातांत धरून वाजवावयाचें एक पोलादी वाद्य. २ वावडी उडतांना ती फरफर वाजावी म्हणून तिला कागद कातरून लावतात तो.३ गंजिफांच्या आठ रंगांतील पहिला. **वि०** बुद्धिमान्; तल्लख; हुशार (मूल).ॐ**चंगकांचनी गंजिफा स्त्री० अ० व०** चंग, कांचन, बरात, कुमाश, ताज, गुलाम, रूप, शमशेर ह्या आठ बाजू ज्यांच्या संचांत असतात अशा खेळावयाच्या गंजिफा; दुसऱ्या प्रकारच्या गंजिफांना 'दशावतारी गंजिफा' म्हणतात. **चंगचिलखत, चंगचिलत, चंगचिल्लत, चंगचिल्लद, चंगचिल्ली, चंगचल्ली स्त्री०**गंजिफांच्या खेळांतील पारिभाषिक शब्दविशेष; गंजिफांच्या खेळामध्यें शेवटीं दोघांचे दोन रंग राहिले असतां एक पान उताणें पडावें म्हणून दोन पानें जुळून वर उडविणें.

चगडग स्त्री० १ धाडसाचा सौदा किं० व्यवहार. २ हिशेब, जमाखर्च, इ० मधील अव्यवस्था किं० गोंधळ. **चगडग्या वि०** व्यापारांत धाडसाचे सौदे करणारा.

चगण्या स्त्री० अ० व० नखरे (करणें, लावणें, जडणें इ०).

चगदळ, चगदाळ (–ळें) **न०, चगदळी स्त्री०** मागें 'चकदळ,' 'चकदळी' पहा.

चगदा, चकदा पु०१वाटोळा तुकडा.२ ठिगळ. ३ तोडून काढलेला तुकडा किं० भाग किं० अंश.

चंगळ, चंगाळी, चंगळी, चंगळपट्टी, चंगळवटी स्त्री० १ खाद्यें, पेयें, साधनसामग्री, पर्जन्य, पाणी, इ० चीं समृद्धि किं० वैपुल्य. २ वैभवशाली स्थिति. ३ तृप्ति.

चंगा [हिं०] **वि०** १ शुद्ध; चांगलें. २ निकोप. ३ रुचकर; स्वादिष्ट; उ० आजची अळवाची भाजी बहुत चंगा झाली होती. ※**मनमें चंगा तो कथोटमें गंगा, मन असें चंगा तर काथोटींतच गंगा** मन तृप्त आणि समाधानी आणि शांत असल्यावर सुखाचीं सर्व साधनें आपल्याजवळ असल्याप्रमाणेंच होत.

चंगाराणी स्त्री० १ गंजिफांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. २ (प्रेमानें) लाडकी मुलगी किं० कोणीही स्त्री.

चंगाळ,चंगाळें न० घोड्याच्या किं० बैलाच्या गळ्यांत किं० गाडीभोंवतीं घालतात ती घुंगरांची माळ.

चंगाळ (–ळी) **स्त्री०** वर ' चंगळ ' पहा.

चंगी, चंगीभंगी पु० दारू, गांजा, भांग, अफू, इ० व्यसनांना आसक्त; व्यसनी.

चघळ पु०, न० गुरांनीं अर्धवट चघळून टाकून दिलेलें गवत, कडबा, इ०. **वि०** १ ज्यास ताळतंत्र नाहीं किं० जें पाणचट किं० चटोर किं० नीरस आणि वायफळ असें (भाषण) किं० असें भाषण करणारा (माणूस). २ सईल किं० लापट (खिळा, खिळ्याचें भोंक, कडी, कोयंडा, इ०). ※ **चघळबघळ पु०, स्त्री०, न०** १ अर्धवट चावून गुरांनीं टाकून दिलेलें गवत, इ०. २ पाचकळपणाचें भाषण.

चघळणें स० क्रि० पदार्थ दांतांनीं न चावतां तोंडांत धरून त्याचा अंश लाळेंत मिसळेल तेवढा गिळणें.

चंच [सं० चंचुर=हुशार, निपुण] **वि०** तल्लख; हुशार; धूर्त. **पु०** विकत घ्यावयाचा जो पदार्थ त्याची परीक्षा, पारख, किं० निवड.

चचणें अ० क्रि० मरणें. **चच करणें अ० क्रि०** मरणें.

:[३ धरसोड करणारा.

चंचल [**सं०**] **वि०** १ हलणारा. २ अस्थिर.

चंचला [**सं०**] **स्त्री०** १ वीज. २ लक्ष्मी.

चचावणें स० क्रि० १ एकाद्याचा प्राण घेणें; त्याला ठार मारणें (गुप्तपणें). २ एकाद्याचा सत्यानास करणें (गुप्त रीतीनें).

चंचा स्त्री० १ गवत किं० पेंढा चिरगुटाच्या पिशवींत भरून त्याला माणसाचा आकार देऊन शेतांत उभा करतात तो (पशुपक्ष्यांना भिवविण्यासाठीं); बुजगावणें. २ रोड आणि अशक्त माणूस,–ज्याचे हातपाय बुजगावण्याच्या गात्राप्रमाणें लडबडत असतात.

[हुशार, धूर्त.

चंचिबाग (–ज), चंचुबाग वि० तल्लख,

चंची स्त्री० १ पिशवी; घड्याळ, चष्मा इ०चें घर. २ पानें, सुपारी, कात, चुन्याची डबी, वेलदोडे, लवंगा इ० विड्याच्या सामानासाठीं केलेली असते ती पिशवी,–जिचे कप्पे एकापेक्षां एक अधिक खोल केलेले असतात.

चंचु [**सं०**] **स्त्री०** चोंच. ※**चंचुपुट पु०** मिटलेली चोंच. **चंचुप्रवेश पु०** १ फलादिकांत चंचूचा प्रवेश किं० शिरकाव. २ (लाक्षणिक) थोडासा शिरकाव. **चंचुप्रवेशान्मुसलप्रवेशः पु०** चोंच शिरकावण्यापुरती जागा मिळाली म्हणजे पुढें मुसळ शिरकावण्याइतकी जागा करून घेतां येते; प्रथम थोडासा अवकाश मिळाला म्हणजे तेवढ्याच्या जोरावर ज्यास्ती जागा मिळवितां येते.

[पहा.

चचोर, चचोरी पुढें ' चिचोर, ' ' चिचोरी '

चट स्त्री० १ गोडी, लज्जत, तलफ (तंबाखूची, सुपारीची, दारू पिण्याची इ०) (लागणें).२ चुना, रंग, इ०चा थर (देणें).

चट क्रि० वि० पूर्णपणें; सर्वथैव. **वि०** सर्व; एकूण एक; दरोबस्त; उ० चट आंबे नासले; उ० चट माणसें यात्रेस गेलीं.

चट पु० (तालव्य उच्चार) श्राद्धविधीमध्यें खरे ब्राह्मण जेवूं घालण्याची ऐपत नसली म्हणजे दर्भाच्या काड्या ब्राह्मण कल्पून त्यांना जेवूं घालतात; ह्या ब्राह्मणांच्या पुढें लहान लहान पानें ठेवून त्यांवर स्वयंपाकांतील सर्व पदार्थ थोडथोडे वाढलेले असतात;हे जे दर्भब्राह्मण त्यांना'चट'म्हणतात. ※ **चटश्राद्ध न०** चटावर केलेला श्राद्धविधि.

चटई स्त्री० शिंदी इ०च्या पातींची केलेली आंथरी. ※ **चटईची वाक स्त्री०** चटईच्या

विणीची वाक (स्त्रियांचा कोपराशीं घालावयाचा एक दागिना).

चटक [हिं०] **स्त्री०** १ एकाद्या पदार्थाची गोडी किं० लज्जत; एकाद्या पदार्थाचें व्यसन (लागणें, जडणें). २ बोलण्यांत किं० चालण्यांत किं० दुसऱ्या कोणत्याही हालचालींत जडलेली जी वाईट सवय ती; उ० याला बोलतांना ' काय समजलांत ? ' असें वारंवार म्हणावयाची चटक लागली आहे (**क्रि०** लागणें, जडणें). ॐ**चटक चांद(-दि-)णी स्त्री०** स्वरूपानें सुंदर असून शृंगारचेष्टांनीं प्रेक्षकांना मोहविणारी स्त्री. **चटक चांदणें न०**पांढरें शुभ्र चांदणें; पिठासारखें चांदणें.

चटकणी, चटकाणी स्त्री० हातानें मारलेली चापटी.

चटकन्, चटकर, चटदिशीं क्रि० वि० त्वरेनें; [झपाट्यानें; तावडतोब.

चटक [सं०] **पु०** चिमणी. ॐ**चटकपाक पु०** चिमण्यांचा पाक किं० कांहीं औषधी कृति (वीर्यवृद्ध्यर्थ खातात तो).

चटका पु० १ उन्ह, शेक, तिखट इ०नीं झालेली दुःसह व्यथा (शरीरास किं० जिव्हेस). २ तापलेल्या पदार्थाचा स्पर्श झाल्याबरोबर त्वचेला पहिल्या क्षणीं होते ती असह्य व्यथा(बसणें). ३ तिखट किं० उन्हउन्हीत पदार्थ तोंडांत घातला असतां पहिल्या झटक्याला जी व्यथा होते ती. ४ त्वचा भाजली असतां पडतो तो वण. ५तीव्र दुःख; असह्य वेदना. ६ कुचक्या भाषणाचा प्रहार (मारणें). ७ काळजी; प्रामाणिकपणानें काम करण्याची इच्छा; उ० नोकर माणसांस कामाचा चटका असणें शक्य नाहीं. ८ एकाद्या माणसाच्या वियोगानें होणारें दुःख; एकादें माणूस आपणाला भेटावें म्हणून मनाला लागलेल्या उत्कंठेची व्यथा (लावणें, लागणें, इ०). ९ बैल इ०चे अंगाला डाग द्यावयाचा लोखंडाचा तुकडा किं० असा दिलेला डाग (देणें, लावणें). १० सोनें इ०वर मोरचूत इ०चा लेप करून तें विस्तवांत तापवून काढणें (देणें); ह्या कामीं लागणारी सामग्री किं० साधनें. ११ व्यापारांत बसलेली ठोकर (बसणें). १२ चटक. १३चरका.

चटकाणी वर ' चटकणी ' पहा.

चटकी, चुटकी स्त्री० अंगठा आणि मधलें बोट ह्यांचा संयोग करून झटकन वियोग केला असतां होतो तो आवाज.ॐ**चटक्या स्त्री०अ०व०** गप्पाटप्पा; वायफळ संभाषण (मारणें, पिटणें). **चटक्यांचा मांडव पु० ए० व०, चटक्यांचे मांडव पु० अ० व०** अंगीं कर्तृत्व नसतां पोकळ वल्गना किं० मोठमोठे बेत किं० धमकदारीच्या वल्गना करण्याचा हास्यास्पद प्रकार; ह्याचा प्रयोग बहुधा अनेकवचनीं होतो; उ० तुझ्यासारखे चटक्यांचे मांडव घालणारे पुष्कळ लोक आहेत पण प्रतिज्ञा निस्तरणारे विरळा; उ० चटक्यांचे मांडव होत नसतात. **[illegible]क्या पटक्यांत क्रि० वि०** झटपट; एका क्षणांत.

चटचट, चटचटां क्रि० वि० १चटचट आवाज होईल अशा रीतीनें. २डास,चिलट,इ०नीं अनेकवार (दंश करणें). ३ एकामागून एक (कामें करणें).

चटचटणें अ० क्रि० खतखतणें; चटचट असा आवाज करणें (शिजतांना,भाजतांना,मोडतांना); उ० झुणका चांगला चटचटू लागला म्हणजे उतर.

चटचटीत वि० १ पुरतेपणीं न शिजल्यामुळें किं०न भाजल्याकारणानें कच्चा किं०टणक राहिलेला (भात, सांजा, कांहीं कंद, इ०). २ टणक, न पिकलेलें (गहूं इ०).

चटणी, चटनी स्त्री० १ कोथिंबीर, पुदाण्याची किं० कोथिंबिरीचीं पानें,डाळ, इ० पदार्थांत तिखट, मीठ, इ० पदार्थ घालून वाटून करतात तें तोंडीलावणें. २ फडशा; विध्वंस; सत्यानाश (मारून, खाऊन); उ० आमच्या शंभर शिपायांनीं शत्रूच्या पांचशे माणसांची दोन घटकांत चटणी उडविली !

चटपट स्त्री० १ झालेल्या हानीबद्दल वाटत असलेलें दुःख. २ कर्तव्य यथासांग न केल्यामुळें किं० न झाल्यामुळें वाटतो तो पश्चात्ताप, किं० टोचणी. ३गंजिफांच्या पानांची हातांतल्या हातांत गल्लत. ४ कांहीं काम करण्यांत तल्लखपणा. ५ चटचट असा आवाज;वस्त्र्याला धार आणण्यासाठीं न्हावी तो कातड्यावर घासतांना होतो तो आवाज.

चटपट, चटपटां क्रि० वि०झपाट्यानें;तडकाफडकीं.

चटपट्या वि० तडखपणानें काम करणारा. न रेंगाळतां काम करणारा.

चटांचट, चटांचटां क्रि० वि० एका मागून एक (अनेक कामें करणें).

चटार, चटोर वि० अंगीं योग्यता नसून मोठमोठ्या वल्गना करणारा; वात्रट; आपला दर्जा न ओळखतां लंब्या लंब्या बाता झोकणारा.

चटावणें [**म०** चट=गोडी] **अ० क्रि०** कांहीं खाद्य खाण्याच्या, पेय पिण्याच्या, व्यसन चालवावयाच्या सवयीनें आकृष्ट झालेला; असणें; कांहीं निषिद्ध सुखोपभोगाकडे कललेला असणें.

चटूवटाव पु० चिकू किं० कंजूष माणूस.

चट्ट क्रि० वि० पूर्णपणें, सर्वथैव.

चट्टा पु० १ शरीरावर गळूं, फोड, इ० बरा झाल्यावर राहातो तो डाग किं० वण. २ व्यापार, सावकारी, इ० मध्यें बसलेली ठोकर किं० आलेली बूड. [फडशा किं० फन्ना.

चट्टामट्टा पु० खाद्य पेय पदार्थांचा उडविलेला

चट्टी स्त्री० व्यापार, व्यवहार, इ० मध्यें बसलेली ठोकर (बसणें, येणें, लागणें).

चट्टीपट्टी स्त्री० १ शरीरावर दागिने घालून तें सुशोभित करणें. २ फाजील नीटनेटकेपणा; फाजील छानछोकी. ३ शरीर शृंगारणारी स्त्री.

चट्टेकरी पु० १ पट्टेवाला शिपायी. २ पट्टा घातलेला जासूद. ३ चपराशी.

चंड [**सं०**] **वि०** १ भयंकर. २ तीव्र. ३ रागीट. ४ उष्ण. ५ प्रचंड, अवाढव्य. **पु०** १ यमकिंकर. २ महादेवाचा एक गण. ॐ **चंडांशु, चंडकर, चंडकिरण पु०** सूर्य. **चंडवात पु०** वावटळ. [चपराक; थप्पड.

चडक, चडकण, चडकणी, चडकाणी स्त्री०

चडचड स्त्री० धान्य, पाणी, द्रव्य, इ० ची क्रमतरता (गैरसोय होण्याइतकी).

चडचडणें अ० क्रि० १ चडचड असा आवाज करणें. २ महाग किं० दुर्मिळ होणें. बाजारचे दर चढणें; उ० यंदा बाजरी चडचडेल असा रंग दिसतो.

चडचडीत वि० चटचटीत.

चडफड, चडफडणी स्त्री० १ असंतुष्टपणा त्रासिकपणानें व्यक्त करणें; तरफड; तडफडणी. २ धडफडणें; हातपाय आदळणें किं०आपटणें.

चडफडाट (–ट्) **पु०** चडफडणें; तडफडणें.

चंडळ न० भिंत, जमीन, दगड, इ०चा उखळून निघालेला डपला, तुकडा, किं० खंड.

चंडाल, चंडाळ [**सं०** चंडाल] **पु०** १ शूद्र बाप आणि ब्राह्मण जातीची स्त्री यांची संतति. २ नीच माणूस. ॐ **चंडाळ खत न०** रद्दी झालेलें खत. **चंडाळचौकडी स्त्री०** अनेक दुष्ट माणसांची एका विचारानें चालणारी टोळी.

चंडाळी [**सं०** चंडाल; **म०** चंडाळ] **स्त्री०** १ दुष्ट कृत्य. २ नीचपणा. ३ रागाची लहर(येणें). ४ चंडाळ जातीची स्त्री. ५ कोणीही दुष्ट, भयंकर, किं०कजाग स्त्री.

चंडिका, चंडी [**सं०**] **स्त्री०** १ दुर्गेचा अवतार. २ कोणीही रागीट, तापट, किं० भांडखोर स्त्री.

चंडोल [**हिं०**] **पु०** १ एक पक्षी. २ नीटनेटका, सुंदर, आणि टापटिपीचा माणूस. ॐ **अफूचा चंडोल करणें** अफूचा धूर नळीच्या द्वारें सेवन करणें. [पिछाडी.

चंडोल [**हिं०** चंदावल्] **पु०** सैन्याची

चढ [**म०** चढणें] **पु०** १ पर्वतादिकांचा किं० जमीनीचा क्रमेंकरून उंच उंच होत जाणारा पृष्ठभाग. २ अशा उंचवट्याचें परिमाण. ३ उत्कर्ष, वैभव, भरभराट. ४ महागाईची धारण; पदार्थांच्या किमतींत वाढ. ५ एकाद्यावर केलेली सरशी. ६ दुखण्याचा जोर. ७ वाढविलेला सारा, कर, इ०. ८ मापलेल्या किं० जोखलेल्या परिमाणांत आलेला वाढावा. ॐ **एकाद्याला चढ देणें** त्याला कांहीं काम करावयाला उत्तेजन, प्रोत्साहन किं० भर देणें. **लिलावांत चढ देणें** पूर्वीच्या माणसानें देऊं केलेल्या किंमतीहून अधिक किंमत देऊं करणें. **एकाद्याला चढास देणें, चढीं देणें** त्याला कांहीं करावयाला भर देणें. **चढीस भरणें** (किं० **लागणें**), **चढीं भरणें** १ नेटानें कांहीं काम चालविण्याला प्रवृत्त होणें. २ लिलावांत प्रतिस्पर्ध्याहून अधिक अधिक किंमत बोलण्याला प्रवृत्त होणें. ३ भरीं भरणें;

हट्टास पिटल्यासारखें वर्तन करणें; मागचा पुढचा विचार न करतां कांहीं काम एकसारखें करीत राहाण्यास प्रवृत्त होणें. **चढउतार पु०, चढण-उतरण स्त्री०** उंचसखलपणा, कमीपणा आणि अधिकपणा, क्षय आणि वृद्धि, जोरदारपणा आणि कमजोरपणा, उत्कर्ष आणि अपकर्ष (रोगाचा, रस्त्याचा, सांसारिक स्थितीचा, इ०चा).

चढण, चढणी [**म०** चढणें] **स्त्री०** चढ; वरची सपाटी; उत्तरोत्तर वर वर किं० उंच उंच होत गेलेला पृष्ठभाग (जमीन, डोंगर, इ०चा). ॐ**चढणीस घोडा उतरणीस रेडा** चढणीचा मार्ग आक्रमावयाचा असतां घोडा हें सोयीचें जनावर होय आणि उतरणीचा मार्ग आक्रमावयाचा असतां रेडा हें सोयीचें जनावर होय.

चढणें स० क्रि० १ आरोहिणें; ० च्या वर जाणें; उ० पर्वतीचा डोंगर चढावयाला मला तीन मिनिटें लागतात. **अ० क्रि०** उंच होणें; उंच उंच होत जाणें; उ० बांधकाम सुरू झाल्यापासून मध्यें खंड न पडतां तो बुरूज एकसारखा चढत आहे. २ वाढणें; अधिक होणें; जोरदार होणें; उ० कालच्या उपासानें आज पित्त चढलें ; उ० कालच्या पावसानें आज विहिरींत पाणी दोन हात चढलें; उ० ताप आज चार वाजतां एकशे दोन अंश चढला; उ० भांग जसजशी छानावी तसतशी ती चढते. ३ शिरणें; यथास्थानीं अधिष्ठित होणें; जागच्याजागीं बसणें; उ० हा अंगरखा चांगलासा चढत नाहीं, तो किंचित् सैल कर. ४ गर्विष्ठ होणें; उ० त्याला नोकरी लागल्यापासून तो फार चढला आहे. ५ एकाद्या पदार्थावर दुसरा पदार्थ बसणें किं० दुसरा पदार्थ उत्पन्न होणें; उ० ह्या घागरीवर गंज चढला आहे. ६ गायनांत स्वर वरच्या पाहिरीचा होणें; उ० मी आजारांतून उठल्यापासून माझा स्वर (आवाज, कंठ) चढेनासा झाला आहे. ७ वाद्याचा आवाज वरच्या पाहिरीचा होणें. ८ तजेलेदार किं० चटकदार होणें किं० दिसणें; उ० हिंगुळांत लिंबाचा रस पिळला असतां रंग चांगला चढतो. ९ मृदंग इ० वाद्य वाजविण्याच्या स्थितींत येणें. ॐ**चढेल तो पडेल पोहेल तो बुडेल** मोठ्या कामाला उत्साहानें हात घालणें हेंच श्रेयस्कर आहे,—मग त्यांत यश न आलें तरी तो कमीपणा नव्हे. **चढ्या घोड्यानिशीं, चढे घोड्यानशीं क्रि० वि०** वाटेंत विश्रांतीसाठीं घोड्यावरून न उतरतां; एका दमांत कांहीं एका कार्यार्थ जो आवेशानें निघाला त्यानें मध्यें विराम न घेतां; उ० शत्रु जो आला तो लगलाच चढ्या घोड्यानिशीं किल्ल्यावर गेला.

चढता [**म०** चढणें] **वि०** चढणारा; क्रमें-करून चढत जाणारा, वाढणारा, अधिक होणारा, जोरदार होणारा, उत्कर्ष पावणारा, इ०. ॐ**चढती गोष्ट सांगणें, चढत्या गोष्टी सांगणें** उर्मटपणानें बोलणें; आपला दर्जा न ओळखतां बोलणें. **चढता दिवस पु०, चढती वेळ स्त्री०** प्रातःकाळ, सकाळ; सूर्योदयापासून मध्यान्हापर्यंतचा अवधि; उ० चढत्या वेळेस रक्त काढवूं नये. **चढता पाया पु०** वैभवाचा किं० उत्कर्षाचा काळ. **चढती कमान स्त्री०** वैभवाची किं० उत्कर्षाची स्थिति; वाढ; अधिकपणा; अधिक होण्याचें प्रमाण. **चढती कळा स्त्री०** १ चंद्राच्या कलांची उत्तरोत्तर वृद्धि. २ उत्कर्ष; वैभव. **चढती पराई, चढती पाहिरी स्त्री०** वैभवाची स्थिति; उत्तरोत्तर होत जाणारा उत्कर्ष. **चढती बाजू स्त्री०** १ गंजिफांची पहिल्या निम्मे रंगाची एक्का, दुव्वा, तिव्वा, अशा क्रमानें जी बाजू लावितात ती. २ उत्कर्ष. **चढती भांजणी स्त्री० (गणितांत)** खालच्या परिमाणाच्या संख्येला वरच्या परिमाणांत नेणें; उ० तीनशे पैशांस रुपये, आणे, ह्या परिमाणांत नेण्याची रीति. **चढती भावना स्त्री०** रोगादिकांत चढ. **चढती मुदत स्त्री०** हुंडीची नेहेमीच्या शिरस्त्यापेक्षां अधिक केलेली किं० वाढविलेली मुदत. **चढती श्रेढी स्त्री०(गणितांत)** ज्या श्रेढीचीं पदें कांहीं विशिष्ट सरणीनें वाढत जातात ती श्रेढी; ह्याच्या उलट उतरती श्रेढी. **चढतें व्याज न०** चक्रवाढ व्याज.

चढती [**म०** चढणें] **स्त्री०** उत्कर्ष; वाढ.

चढला[**म०** चढणें]**वि०**वाढलेला (पगार इ०).

चढवट [**म०** चढणें] **वि०** उत्तरोत्तर वाढत जाणारा किं० गेलेला. **पु०** वाढ, चढ, चढाव, उत्कर्ष.

चढाविणें [**म०** ' चढणें 'चें प्रयोजक] **स० क्रि०** १ वर सारणें, ठेवणें, किं० बसाविणें. २

धनुष्याला (दोरी) बांधून बाण सोडावयाला सिद्ध करणें. ३ (चपराक) मारणें. ४ (अमली पदार्थ) खाणें, पिणें किं० तोंडांत धरणें; उ० तो शरीफखां तंबाखूची गोळी चढविल्याशिवाय कधीं गावयाला बसत नाहीं. ५ स्तुतीनें (एकाद्याला) कांहीं काम करावयाला उद्युक्त करणें.

चढा [**म०** चढणें] **वि०** विवक्षित सुरापेक्षां उंच (स्वर) किं० तो सूर ज्याचा असें (वाद्य).

चढाई [म० चढणें]**स्त्री०** १ शत्रूला दबवावयासाठीं त्याचेवर स्वारी करून जाणें. २ दुसऱ्याचा पक्ष खालीं करण्यासाठीं त्याच्याविरुद्ध केलेली हिकमत किं० रचलेला व्यूह. ३ एकाद्यावर मिळविलेला वरचष्मा. ॐ **चढाईच्या गोष्टी स्त्री० अ० व०** १ न शोभणाऱ्या बढाईचीं भाषणें; पोकळ वल्गना. २ मगरूरीचें बोलणें.

चढाईत [**म०** चढणें] **वि०** झाडावर चढणें किं० घोड्यावर बसणें ह्या कामीं पटाईत.

चढाऊ वि० १ ज्यावर चढतां येईल असें झाड किं० टेकडी किं० चढणीची जमीन. २ टाचेला मागल्या बाजूनें झाकील असा (जोडा).

चढाचा [**म०** चढणें] **वि०** १ वाढणारा; चढत जाणारा. २ ज्यांत चढ होत आहे, ज्यांत कांहीं विशिष्ट गुण किं० प्रकार अधिक अधिक होत आहे किं० दिसत आहे असें (औषध, भाषण, वर्तन, इ०).

चढाव [**म०** चढणें] **पु०** चढ; वृद्धि;उत्कर्ष.

चढी [**म०** चढणें] **वि०** उत्कृष्ट; श्रेष्ठ; वरचढ.

चढेल [**म०** चढणें] **वि०** गर्विष्ठ; मगरूर. ह्याच्या उलट 'पडेल' म्ह० लहीन, सभ्य,नम्र.

चढोवढी [**म०** चढणें] **स्त्री०** स्पर्धा. ॐ**चढोवढीचा वि०** स्पर्धेनें किं० चुरशीनें केलेला किं० चालविलेला.

चढोवढीं क्रि० वि० उत्तरोत्तर वाढत.

चणका पु० १ आवेग; एकाएकीं उठलेली वेदना; तीव्र वेदनेची लहर. २ उन्हाचा झटका. ३ कोणत्याही मनोविकाराचा जोरदार उद्भव किं० उद्रेक.

चणच वि० हुशार, तल्लख,बुद्धिमान (मूल).

चणचण स्त्री० महर्घता, कमतरता (बाजारांत कांहीं जिनसेची).

चणचणणें अ० क्रि० १ महाग किं० दुर्मिळ होणें. २ तीव्र वेदना उत्पन्न करणें. ३ अतिशय क्षुधित झालेलें असणें. ४ चणचण असा आवाज करणें (हवेंत मारलेले हिराची काडी इ० नीं).

चणचणीत वि०१मीठ मसाला योग्य प्रमाणांत पडल्या कारणानें स्वादिष्ट आणि रुचकर झालेला. (झुणका,भाजी, इ०). २ तल्लख, हुशार (मूल). ३ तीव्र, कडक (सूर्याचें उन्ह, भूक, रागाची लहर, वेदना, इ०).

चणा [**सं०**चणक] **पु०** हरभरा. ॐ**चण्याच्या (किं० हरभऱ्याच्या) झाडावर एकाद्याला चढविणें** त्याची स्तुति करून त्याला सुखविणें (आपलें कांहीं कार्य त्याच्याकडून करविण्यासाठीं किं० निव्वळ वात्रटपणानें). **एकाद्या पदार्थाचे चणे फुटाणे करणें** तो उधळून किं० अव्यवस्थितपणें खर्चून संपविणें.

चणोरा वि० लहान आकाराचा (पावटा, घेवडा, शेंग, इ०).

चतकोर [**म०** चवथा (भाग)] **पु०** भाकरी, पोळी, लाडू, इ०चा चतुर्थांश किं० चवथा भाग.

चतुर् [**सं०**] **वि०** चार. हा शब्द अनेक संस्कृत समासांत पूर्व पद असतो. ह्या समासांपैकीं जे मराठींत रूढ आहेत ते खालीं देतों. ॐ**चतुरंग न०** चार प्रकारचें सैन्य (हत्ती, घोडेस्वार, रथी आणि पायदळ). **चतुरस्र वि०** १ चार कोन आहेत ज्याला असें; चौकोनी. २ प्रमाणबद्ध. ३ अनेक विद्या आणि कला ह्यांमध्यें प्रवीण असा (मनुष्य). **चतुरानन पु०**ब्रह्मदेव. **चतुराश्रम न०** ब्रह्मचर्य, गार्हस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास ह्या चार आश्रमांचा समुच्चय. **चतुष्कर्ण वि०** फक्त दोन माणसांनीं ऐकिलेलें.**चतुष्कोण पु०** चौकोन. **चतुर्गुण वि०** चौपट. **चतुर्घात पु०** एका विशिष्ट संख्येस त्या संख्येच्या घनानें गुणून येतो तो गुणाकार; उ० दोन ह्या संख्येचा सोळा हा चतुर्घात. **चतुश्चित्य पु०** गृहादिकांचा चौथरा. **चतुर्दन्त पु०** ऐरावत. **चतुर्दल (–ळ) वि०** चार पाकळ्यांचें (फूल).**चतुर्दश वि०** चौदावा. **चतुर्दश विद्याधाम न०** विद्वान् ब्राह्मणाला देतात ती बहुमानाची पदवी. **चतुर्दशी स्त्री०**

चौदावी तिथि. **नरकं चतुर्दशी स्त्री०** आश्विन महिन्याच्या कृष्णपक्षांतील चौदावी तिथि. **चतुर्दश वि०** चौदा. **चतुर्दश रत्नें न० अ० व०** १ लक्ष्मी; २ कौस्तुभ; ३ पारिजातक; ४ सुरा (दारू); ५ धन्वंतरि; ६ चंद्र; ७ कामधेनु; ८ ऐरावत; ९ अप्सरा; १० उच्चैःश्रवा (इंद्राचा घोडा); ११ हालाहल (विष); १२ शार्ङ्गधनु; १३ शंख; आणि १४ अमृत; हीं समुद्रांतून मंथन करून काढिलेलीं चौदा रत्नें. **चतुर्दश भुवनें न० अ० व०** भूः इ० वरचे सात लोक आण खालचे सात लोक मिळून चौदा लोक. **चतुर्दश विद्या स्त्री० अ० व०** चार वेद, सहा वेदांगें, पुराणें, मीमांसा, न्यायशास्त्र, आणि धर्मशास्त्र. **चतुर्दोल पु०, न०** १ पालखी. २ मेणा. **चतुर्धा क्रि० वि०** १ चार प्रकारांनीं. २ चार तुकडे करून. ३ चार दिशांकडे. **चतुष्पाद् वि०** गाय, बैल, इ० चार पायांचा प्राणी. **चतुष्पथ पु०, न०** १ चव्हाटा. २ चौक. **पु०** ब्राह्मण. **चतुष्पाणी पु०** श्रीविष्णु. **चतुर्बाहु न०** चौकोन. **चतुर्भुज पु०** १ श्रीविष्णु. २ चौकोन. **वि०** १ मुसक्या बांधलेला (चोर). २ लग्न झालेला (पुरुष). **चतुर्मास न०**, मराठींत **पु०** आषाढ शु० एकादशी ते कार्तिक शुद्ध एकादशी हा काळ. **चतुर्मुख पु०** ब्रह्मदेव. **चतुर्वर्ग पु०** धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष यांचा समुच्चय. **चतुर्वर्ण पु०** ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, ह्या चार जाति समुच्चयानें. **चतुर्विद्य वि०** चारी वेद पढलेला. **चतुर्विद्या स्त्री०** चार वेद. **चतुर्विध अन्न न०** खावयाचें, चाटावयाचें, चोखावयाचें आणि प्यावयाचें असें चार प्रकारचें अन्न. **चतुर्विध मुक्ति स्त्री०** सलोकता, समीपता, सरूपता, आणि सायुज्यता ह्या मोक्षाच्या चार चढत्या पाहिऱ्या. **चतुःशाल, चतुःशालक न०, चतुःशाली स्त्री०** चौसोपी वाडा. **चतुःशास्त्री पु०** न्याय, व्याकरण, पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा (वेदान्त) ह्या चार शास्त्रांत पारंगत पंडित. **चतुःषष्टि वि०** चौसष्ट. **चतुःषष्टि कला** चौसष्ट कला. नृत्य, गीत, वाद्य, नाट्य. आलेख्य, इ०. **चतुःसीमा स्त्री० अ० व०**घर, शेत, इ०च्या चार बाजूचीं जीं घरें, शेतें, इ० तीं समुच्चयानें. **चतुःसीमापूर्वक क्रि० वि०** चतुःसीमा सांगून. **चतुःसमुद्र पु० अ० व०** पृथ्वीच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण, आणि उत्तर ह्या चार दिशांचे चार समुद्र.

चतुर [**सं०**] **वि०** १ हुशार. २ बुद्धिमान. ३ धूर्त. ‡**चतुर साबाजी पु०** कोणीही चतुर माणूस.

चतुराई [**म०** चतुर + प्रत्यय] **स्त्री०** १ हुशारी. २ बुद्धिमत्ता. ३ धूर्तपणा.

चतुर्थ [**सं०**] **वि०** चवथा. **पु०** १ कात (विड्यांतील चवथें द्रव्य). २ संन्यास (ब्रह्मचर्य, गार्हस्थ, वानप्रस्थ, आणि संन्यास ह्या चार आश्रमांपैकीं चवथा). ३ दंड (साम, दाम, भेद, आणि दंड ह्या चार उपायांपैकी चवथा). ‡**चतुर्थाश्रम पु०** संन्यास.

चतुर्थी [**सं०**] **स्त्री०** १ चौथी तिथि,–विनायकी किं० संकष्टी. २ (व्याकरणांत) चवथी विभक्ति.

चतुष्क [**सं०**] **वि०** चार भाग असलेला. **न०** १ चौकडी; चार वस्तूंचा समुच्चय. २ चौकोनी अंगण; चौक. ३ दिवाणखाना. ४ चार सरांचा हार.

चतुष्टाई, चतुष्टयी [**सं०** चतुर्=चार] **स्त्री०** १ चार माणसांनीं एकत्र बसून केलेली चौकशी किं० वाटाघाट किं० परीक्षा. २ गुप्त ठेवावयाच्या गोष्टीची प्रासिद्धि किं० बोभाटा.

चत्रा [**सं०** चतुर] **वि०** चतुर (माणूस) (अशिक्षितांचा शब्द).

चंदन [**सं०**] **पु०, न०** १ एक सुगंधी वृक्षविशेष, किं० त्याचा गंधासाठीं तोडलेला तुकडा. २ हा तुकडा उगाळून काढलेलें गंध. ३ (लाक्षणिक) शत्रूंनीं किं० चोरांनीं केलेली नासाडी किं० विध्वंस. ‡**चंदन करणें** (किं० **उडविणें**) विध्वंसिणें, ०चा नाश करणें किं० नासाडी करणें. **चंदनचारोळी स्त्री०** चंदनाच्या झाडाचें बीज. **चंदनबटवा पु०** एक शाकभाजी. **चंदनहौसी वि०** गुलहौसी किं० रंगेल (माणूस); विषयासक्त.

चंदनी [**सं०** चंदन] **वि०** चंदनाचा. ‡**चंदनी अत्तर, चंदनतेल, चंदनेल न०** चंदनाच्या लाकडाचें तेल. **चंदनी पोपट, चंदन्या पोपट**

पु० गळ्यावर आणि पंखांवर तांबड्या रेषा असलेल्या पोपटाची जात.

चंदा पु० १ एकाद्या माणसावर बसलेला वर्गणीचा अंश. २ वर्गणीनें पैसे गोळा करणें (करणें).

चंदी स्त्री० १ घोडा, उंट, इ० स नित्यशः जो दाणा देतात तो. २ घरगुती संसाराला नित्यशः लागणारी सामग्री. ७ **आपली चंदी वाढवून खाणें** इमानानें नोकरी करून पगारांत बढती मिळविणें.

चंदेरी [म० 'चंदेर' नांवाचें गांव] **वि०** चंदेर गांवचा किं० चंदेर गांवीं केलेला, बनविलेला, विणलेला, घडविलेला (पदार्थ,–वाटी, तांब्या, पागोटें, शेला, इ०).

चंदोरी [सं० चंद्र] **स्त्री०** पातळ पोळी (तुच्छतेनें).

चंदोल, चंडोल पु० एक पक्षिविशेष.

चंद्र [**सं०**] **पु०** १ नवग्रहांतील एक. २ (मुसलमानांकडून आलेल्या पत्रांत किं० त्यांना पाठवावयाच्या पत्रांत) महिन्याची तारीख; उ० आज चंद्र तेरावा माहे मोहरम; उ० रवाना चंद्र तीन मोहोरम. ३ गाय, म्हैस, इ०च्या कपाळावर जो पांढरा ठिपका असतो तो. ४ स्त्रियांच्या कपाळावर गोंदून जें बालचंद्राकार चिन्ह करतात तें. ५ मोरांच्या पिसांवर जें चित्रविचित्र रंगाचें वर्तुळ असतें तें. ६ कोणतीही आल्हादकारक वस्तु. ७**चंद्रार्ध पु०** १ चंद्राची कोर. २ अर्धचंद्र, गचांडी. **चंद्रमालि, चंद्रचूड, चंद्रशेखर पु०** शंकर. खालीं ' चंद्रमौळी ' पहा. **चंद्रातप पु०** १ चांदणें. २ छत, चांदवा. **चंद्रात्मज पु०** बुधग्रह. **चंद्रानन पु०** कार्तिकेय. **चंद्रापीड पु०** शंकर. **चंद्रोपल, चंद्रमणि, चंद्रकान्त पु०, चंद्रशिला स्त्री०** चंद्रकान्त मणि,–जो चांदण्यांत पाझरतो असा कविसमय आहे. **चंद्रकान्ता स्त्री०** १ रात्र. २ रोहिणी नक्षत्र. ३ चांदणें. **चंद्रक्षय पु०** अमावस्या. **चंद्ररेखा स्त्री०** चंद्राची कला. **चंद्रशाला, चंद्रशालिका स्त्री०** गच्ची. **चंद्रव्रत न०** चांद्रायण व्रत. **चंद्रहास पु०** तरवार. **चंद्रम् दिवटे विरम् थाळी वि०**अत्यन्त गरीब,–ज्याला चंद्र हा दिवा असतो आणि पान हें जेवावयाचें ताट असतें. **चंद्रानें कोंबडा करणें** चंद्राभोंवतीं प्रभावळीचें चक्र असणें. **सुतानें चंद्र ओवाळणें** किं० **सुतानें चंद्राला ओवाळणें** शुद्ध द्वितीयेला वस्त्राचें सूत काढून तें चंद्राला अर्पण करून त्याचेपाशीं वस्त्राची समृद्धि मागणें. **चंद्रकळा स्त्री०** १ चंद्राची एक कळा म्ह० पूर्ण चंद्राचा सोळावा भाग. २ स्त्रियांचें एक प्रकारचें काळें किं० तांबडें लुगडें. ३ चंद्रप्रकाश; चांदणें. **चंद्रकोर स्त्री०** स्त्रियांचा डोकींत ल्यावयाचा एक दागिना; हा चंद्राच्या कोरीसारखा आकारानें असतो. **चंद्रग्रहण न०** चंद्रावर पौर्णिमेच्या दिवशीं पृथ्वीची छाया पडणें. **चंद्रधारी, चंद्रधार स्त्री०** कानाशिलांत लगावलेली चपराक; (क्रि० देणें, दाखविणें); उ० मुष्टिमोदक आणि चंद्रधाऱ्या दिल्या म्हणजे विद्या येते. **चंद्रज्योत स्त्री०** १ चंद्राची कांति. २ गंधकप्रधान दारू पणतींत घालून वर कागद चिकटावून करतात ती,–जी पेटवली असतां प्रकाश चंद्राच्या चांदण्याप्रमाणें पडतो. **चंद्रज्योत्स्ना स्त्री०** चंद्रप्रकाश; चांदणें. **चंद्रपर्व न०** चंद्रग्रहणाची मुदत. **चंद्रबल (–ळ) न०** कोणाएकाचे राशीस जें चंद्राचें आनुकूल्य तें. **ओढून चंद्रबळ आणणें** १ जी गोष्ट करावी अशी इच्छा असते तिचेबद्दल लोकांकडून आग्रह करून घेणें. २ अंगीं तादृश योग्यता नसता तिचा आविर्भाव करणें. (आमचें "मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०" हें पुस्तक लेखांक १७६६ पहा). **चंद्रबिंब न०** चंद्राचें वर्तुळ. **चंद्रमंडळ न०** चंद्रावरील भूमि; चंद्रावरील राहाण्याचा प्रदेश. **चंद्रमौळी पु०** शंकर. **वि०** ज्याच्या छपरांतून चंद्र दिसतो असें (घर, झोपडें). **घर चंद्रमौळी आणि केळीवर नारळी** तो इतका गरीब आहे कीं तो घरांत निजला असतां त्याच्या डोक्यावर चंद्र असतो आणि त्याच्या घरांत मातीच्या डेऱ्यावर झाकण नारळाची करवंटी असते. **चंद्रविकासी वि०** रात्रीस उमलणारें (फूल, कमळ). **चंद्रसूर पु०** डाव्या नाकपुडींतून श्वास सोडणें (योगाभ्यासांतील एक प्रकार); याच्या उलट ' सूर्यसूर '. **चंद्रहार पु०** स्त्रियांचें गळ्यांत घालावयाचें एक भूषणविशेष. **चंद्रार्क, चंद्रार्कवरी, यावचंद्रदिवाकरौ क्रि० वि०** जगांत चंद्र आणि सूर्य आहेत तोंपर्यंत म्ह० अनंतकाळपर्यंत. **चंद्रोदय**

पु० १ चंद्र उगवणें. २ चंद्राचें दर्शन महिन्यांत पहिल्यानें होतें ज्या दिवशीं तो दिवस किं० त्या दिवशींचें त्याचें दर्शन.

चंद्रस , चंद्रुस, चंद्रोस पु० सर्ज नामक झाडाचा निर्यास किं० डीक.

चंद्रिका [सं०] स्त्री० चांदणें.

चंद्री [सं० तंद्री] स्त्री० १ मद्य प्याल्यानें किं० त्रिदोषवायु इ० झाल्यामुळें डोळे ताटकळून ऊर्ध्व दृष्टि होण्याची दशा. २ एकसारखी एकाद्या वस्तूकडे लागलेली दृष्टि. ३ एकादा विषय मनांत घोळत असल्याकारणानें अन्य विषयांकडे दुर्लक्ष्य होते ती स्थिति. ४ एकादा मनुष्य यावयाला उशीर लागल्यामुळें जी त्याच्या येण्यासंबंधानें उत्कंठा लागते ती (लागणें). ५ पोराला निश्चल न बसण्याची स्थिति जी येते ती; उ० हा पोर क्षणभर निश्चल बसत नाहीं; दिवसभर मेल्याला चंद्री लागली आहे. ६ एक प्रकारची वाटी,– जिला ' चंदेरी वाटी ' असेंही म्हणतात. ❀ **एकाद्याची चंद्री भुलणें** किं० **चंद्री गुंग होणें** आश्चर्य, आनंद, भीति, इ० कारणांमुळें त्याचें देहभान गमावणें.

चंद्या वि० जिच्या कपाळावर पांढरा ठिबका आहे अशी (गाय, म्हैस).

चप् उ० वा० अ० गप्प ! गप्प बस ! चीप बस ! **क्रि० वि०** कांहीं न बोलतां.

चंपक [सं०] पु० चाफ्याचें झाड. **न०** त्या झाडाचें फूल. ❀ **चंपकमाला स्त्री०** १ एक कंठभूषण विशेष. २ एक वृत्तविशेष; याचे चारी चरण दहा दहा अक्षरांचे असून प्रत्येक चरणांत भ, म, स, असे गण आणि शेवटीं एक गुरु अक्षर येतें.

चप(–ब–)कल, चप(–ब–)खल क्रि० वि० विवक्षित जागीं किं० भोकांत अगदीं तंतोतंत रीतीनें (बसणें); कमी किं० ज्यास्ती, लांब किं० अखूड, घट्ट किं०सैल न होतां(बसणें); उ०हा चिरा त्या जागेंत चपखल बसला; उ० ही पेटी त्या कोपऱ्यांत चपकल बसेल.

चपका पु० चपराक किं० थापटी (देणें).

चपका पु० १ सोन्याला मोरचूत, गेरू, इ० पदार्थ लावून दिलेला ताव (देणें). २ ताक इ०स फोडणी देणें. [आवाज करून.

चपचप (–पां) क्रि० वि० चपचप असा

चपटा (–डा) वि० १ असावा तितका उंच नसलेला. २ बसक्या घाटाचें (पात्र इ०).

चपटी (–डी) स्त्री० चेपून किं० दाबून किं० ठोकून पातळ किं० चपटा केलेला पदार्थ.

चपडाक, चपराक स्त्री० शरीरावर तळहाताचा केलेला प्रहार; थप्पड; थापडी.

चपड, चप्पड, चपडा वि० ऊन करून जिची थापटी केली आहे अशी (लाख).

चपडास, चपरास [हिं०] पु० बिल्ला,– शिपायी लोकांच्या पट्ट्याला असतो तो.

चपणी वि० १ चपटें किं० बसकें (नाक). २ चपट्या नाकाचा (मनुष्य).

चपणी स्त्री० वल्ह्याची फळी.

चंपत वि० फरारी झालेला किं० पळून गेलेला (कैदी इ०). ❀ **चंपत होणें** फरारी होणें किं० पळून जाणें (कैद्याचें).

चपतळ (–तळा), चपताळा, चपताड, चपताडा वि० चपटा; चेपून किं० ठोकून पातळ केलेला.

चपना वि० १ डावखुरा (माणूस). २ उजव्या हाताची सफाई किं० कौशल्य असलेला (डावा हात); उ० हा चपन्या हातानें काम झरझर करतो.

चपरंग पु०, स्त्री० घासून गुळगुळीत केलेली कवडी (मुलींच्या खेळांतील). [थप्पड.

चपराक स्त्री०तळहाताचा प्रहार किं०चापटी;

चपराकणें [म० चपराक] स० क्रि० तळहाताचा प्रहार करणें. [लेला शिपायी.

चपराशी (–सी) [हिं०] पु० पट्टा घात-

चपरास [हिं०] स्त्री० १ बिल्ला (शिपायांच्या पट्ट्याला अडकावलेला असतो तो). २ मेणबत्ती इ० चा अंकडा अडकावावयासाठीं खांब इ० ना जी चकती किं० पट्टी बसवितात ती.

चपल (–ळ) [सं० चपल] वि० १ हालणारा. २ चंचळ. ३ फार दिवस न टिकणारी (संपत्ति इ०). ४ तल्लख, चलाख.

चपळ, चप्पल, चपली स्त्री० वहाण (पायांत घालावयाची पातळ अशी).

चपला (–ळा) [**सं०** चपला] **स्त्री०** १ वीज. २ लक्ष्मी; संपत्तीची देवता. ३ जीभ. ४ जारिणी. [तरीत (मूल).

चपळा [**सं०** चपल] **वि०** तल्लख, तर-

चपळाई [**सं०** चपल; **म०** चपळ+प्रत्यय] **स्त्री०** चलाखी; तरतरीतपणा; तल्लखपणा.

चपांचप क्रि० वि० १ जोरानें. २ चपचप असा आवाज करून.

चपाट [**म०**चपाटणें] **वि०** विध्वस्त किं०निःशेष केलेला; फन्ना केलेला; उ०त्यानें पंधरा पोळ्या खाऊन चपाट केल्या; उ० पेंढाऱ्यांनीं गांवचे गांव चपाट करून टाकलें. **न०** विध्वंस; नाश; निःशेषता; उ० गोविंदभटानें पंचवीस जिलब्यांचें एका क्षणांत चपाट केलें !

चपाटणें स० क्रि० १ खाऊन संपविणें; गपां-गपां खाऊन टाकणें. २ थोडक्या वेळांत किं० न खळतां (कांहीं काम) संपवून टाकणें.

चपाटा [**म०** चपाटणें] **पु०** वेग; झपाटा; जोर; कामाचा अखंडितपणा; उ० विठोबाच्या हाताच्या चपाट्यानें सदोबाच्या डोकीचें मुंडासें उडालें; उ० गणोबा येथून जो निघाला तो एका चपाट्यानें खडकवासल्यास जाऊन ठेपला.

चपाटी [**म०** चपाटणें] **स्त्री०** चपराक; थप्पड; चापटी.

चपाती स्त्री० कणकेची लाटून आणि घडी न घालतां केलेली पोळी; फुलका. याच्या उलट घडीची पोळी.

चपापणें अ० क्रि० भीतीनें किं० लज्जेनें दचकणें किं० दबकणें किं० क्षणमात्र निःस्तब्ध होणें; उ० तो चोर कुलपांत किल्ली घालीत होता इतक्यांत मी तेथें गेलों तेव्हा तो चपापला.

चंपाषष्ठी स्त्री० मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी. ह्या दिवशीं मणिमल्ल नांवाच्या दैत्याला शंकरानें खंडोबाचा अवतार घेऊन ठार मारलें.

चंपाष्टमी स्त्री० मार्गशीर्ष शुद्ध अष्टमी.

चंपू [**सं०**] **पु०** ज्या काव्याचा कांहीं भाग गद्यांत आणि कांहीं भाग पद्यांत असतो असें काव्य; उ० रामायणचंपू, भारतचंपू, नलचंपू, इ०.

चपेट स्त्री० १ चापटी; थप्पड; चपराक. २ मांजर, वाघ, इ०च्या पंज्याचा तडाखा. ३ (लाक्षणिक) दुर्दैवाचा आकस्मिक तडाखा. ४ चोर, टोळ, उंदिर, रोगांची साथ, इ०चा आकस्मिक उद्रेक. ५ एकाद्यावर सूड उगविण्याची किं० त्याचें पारिपत्य करण्याची संधि, किं० परिस्थितीची अनुकूलता; उ० तो माझ्या चपेटींत येईल त्या दिवशीं मी त्याचें निसंतान करून टाकीन. ६ जुलमी राजानें रयतेवर चालविलेला कहर इ०. ७ मोठा अनर्थ; असह्य हानि; उ० यंदा गुरें मेल्यामुळें मोठी चपेट बसली. ॰ **चपेटींत येणें** तावडींत सापडणें. **चपेट साधणें** व्यापारांत मोठा लाभ मिळविणें.

चपेटा पु०१चापटी, चपराक.२रट्टा, तडाखा. ३ वाऱ्याचा सोसाटा.४जोरदार प्रवाह; उद्रेक.५झपाटा.

चप्प उ० वा०अ० चीप ! चूप ! गप्प बस ! **क्रि० वि०** कांहीं न बोलतां; मुकाट्यानें.

चप्पल, चप्पळ स्त्री० पायांतलि वहाण.

चप्पी स्त्री० १ गात्रविशेष चेपणें किं० मर्दणें किं० रगडणें. २ धोतर, उपरणें, शेला, डोकीचा रुमाल इ०च्या पट्ट्या, निऱ्या, कांठ इ०ची काळजीपूर्वक केलेली रचना. [हुशार (मूल).

चप्पू वि०१ बोलण्याचालण्यांत हुशार.२तल्लख,

चबक, चबकण स्त्री०, चबका पु०कांहीं पदार्थ घ्यावयासाठीं किं०धरावयासाठीं किं०वेष्टावयासाठीं बोटें ताणलेला हात; उ० त्याचा दंड माझ्या चबकेंत मावत नाहीं; उ० त्याला चबकभर बोरें दे.

चबकणें अ० क्रि० वर ' चपापणें ' पहा.

चब(-प-)क(-ख-)ल क्रि० वि० अगदीं बरोबर किं० तंतोतंत रीतीनें म्ह० कमी किं० ज्यास्ती न होतां भोकांत, खळग्यांत, किं० घरांत (बसणें, राहाणें, शिरणें); उ० ही चष्मा ह्या घरांत चप-कल बसते. **वि०** अगदीं बरोबर लागू पडेल असें; उ०त्याच्या प्रश्नाला पांडोबाचें चबकल उत्तर मिळालें.

चबचबणें अ० क्रि० पाण्यानें पूर्णपणें भिज-लेलें असणें (वस्त्र).

चबचबीत वि० १ ज्यांतून पाणी निथळत किं० टपकत आहे असें (वस्त्र). २ तूप, तेल, इ०नीं थबथबलेला (अनरसा, भजें, इ०).

चबडा, जबडा पु० १ तोंड (जनावरांचें). २ माणसाचें तोंड(तुच्छतेनें). [थप्पड.

चबडाक, चपडाक, चपराक स्त्री० चापटी;

चबढब, चबडब, चबढबीत, चबडबीत

वि० डिवचलें किं० ढवळलें गेल्यामुळें गढूळ किं० खराब झालेलें (पाणी).

चवढव, चवडव स्त्री० १ ढवळाढवळ; गोंधळ; अव्यवस्था. २ पदार्थांची गल्लद किं० उलथापालथ.

चवढवी, चवडवी स्त्री० १स्वच्छंदी स्त्री. २ दुर्वर्तनी स्त्री. [लटपटी खटपटी करणारा.

चवढवी (-व्या), चवडवी (-व्या) वि०

चाविणा (-ना) [**सं०** चर्वण] **पु०** १ पोहे, फुटाणे, चुरमुरे, लाह्या इ० चावून खावयाचे पदार्थ. २वरीलसारखे पदार्थ खाणें किंवा खाण्याची क्रिया; उ० मुलांचा सारा दिवस चविणा चालतो.

चबुतरा, चबुत्रा [**हिं०** चबूतराह्] **पु०** १ चौकोनी ओटा. २ कोतवालाची कचेरी. ३ जकातीचें नाकें. ४ रिकामटेकड्या लोकांचा अड्डा.

चंबू (-भू) पु० आवळ गळ्याचें धातूचें पात्र. ꠸ **एकाद्याचा चंबू होणें** तो वादांत निरुत्तर होणें; त्याचा बोऱ्या उडणें. [इ०).

चभळ वि०वापरून वापरून सईल झालेला (कपडा

चमक [**हिं०**] **स्त्री०** १ रत्नादिकांची चकाकी; तकतकी; लखलखी. २ मनांत एक उद्देश असून दुसऱ्या उद्देशाची बतावणी; ढोंग; उ० एकीकडे चमक दाखवून दुसरीकडे रट्टा मारण्यांत तो पटाईत आहे. ३ गात्रविशेषांत एकाएकी उठलेली वेदना; एकदम उठलेली तिडीक (उठणें, मारणें, इ०). ४नाकांत किं० कानांत घालतात तें हिऱ्याचें किं० मोत्याचें किं० सोन्याचें एक भूषण. ꠸ **चमक बिजली स्त्री०** १नखरे करणारी स्त्री. २ठमकत ठमकत चालणारी स्त्री.

चमकणें अ० क्रि० १ चकाकणें; झगझगणें. २गात्राविशेष आकस्मिक वेदनेनें व्यथित होणें; चमक उठणें किं० मारणें. ३ दचकणें. ४ ठमकत ठमकत चालणें.

चमक (-का-) विणें [**म०** 'चमकणें' चें प्रयोजक] **स० क्रि०** छडी, चाबूक, इ० नीं मारणें. २ अंगावरचे दागिने लोकांच्या नेत्रांत भरावे म्हणून अंगविक्षेप करणें.

चमकी [**म०** चमकणें] **स्त्री०** १ मारावयाची वेत इ० ची छडी. २ नथेवर बसविलेली असते ती हिरकणी. ३ लवंगेच्या आकाराचें एक कर्णभूषणविशेष.

चमचम क्रि० वि० १ चटचट; उ० छडी लागे चमचम विद्या येई घमघम. २ झुमझुम; उ० घागऱ्या चमचम वाजतात.

चमचमाट पु० १ खाद्यपेयादि पदार्थांची समृद्धि. २ खाद्यपेयादि पदार्थांचें यथेच्छ सेवन. ३ चकचकाट; उ० दिवाळींत घरोघर दिव्यांचा चमचमाट असतो.

चमचमीत वि० १ योग्य प्रमाणांत मसाला पडल्या कारणानें आणि योग्य प्रकारें बनविल्याकारणानें स्वादिष्ट झालेलें (खाद्य किं० पेय). २ सुस्वाद्य पदार्थांची समृद्धि ज्यांत आहे असें भोजन.

चमचा [**हिं०** चम्चाह्] **पु०** एक प्रकारची उथळ आणि लांबट पळी.

चमडी [**सं०** चर्मन्; **हिं०** चम्डी] **स्त्री०** अंगाचें कातडें. ꠸ **तो चमडी देईल पण दमडी देणार नाहीं** तो देहकष्ट सोसावयाला तयार होईल पण पैशाची हानि सोसावयाला तयार होणार नाहीं (चिक्कू माणसाचें वर्णन). **चमडी फाटे पर झबला नहीं फाटे** अंगाची कातडी झिजून फाटेल पण हें वस्त्र झिजून फाटणार नाहीं (इतकें बळकट आणि दडदडीत तें आहे).

चमत्कार [**सं०**] **पु०** १ आश्चर्य. २ आश्चर्यजनक पदार्थ.

चमत्कारणें [**म०** 'चमत्कार' पासून] **अ० क्रि०** आश्चर्यचकित होणें.

चमत्कारिक [**म०** चमत्कार] **वि०** १ आश्चर्यकारक. २ विलक्षण.

चमन [**फा०**] **पु०** १बागेंत सहल करावयासाठीं ठेविलेली पायवाट. २ थाटमाट; भव्यपणा; भपका. ३ वृत्तीचा उल्हास; रंगेलपणा.

चमनी [**म०** चमन+ई] **वि०** रंगेल खेळ खेळणें, वागडणें, इ० ची ज्याला आवड आहे असा (माणूस, मूल, इ०).

चमर [**सं०**] **पु०** १ मृगविशेष. २ गवा (पांढऱ्या शेपटीचा). **पु०, न०** चंवरी (श्रीमंतांच्या डोक्यावर वारावयाची).

चमरी [**सं०**] **स्त्री०** कणीस; मंजरी.

चमस [**सं०**] **पु०, न०** १ यज्ञिय पात्रविशेष. २ पिठाचें पक्वान्न(घारगा, इ० सारखें).

चमू [**सं०**] **स्त्री०** १सैन्य. २ सैन्यभागविशेष.

चमेल स्त्री० एक फुलझाड. **न०** त्याचें फूल.

चमेली स्त्री० एक फुलझाड.

चय [**सं०**] **पु०** १ समूह, ढीग, रास. २ श्रेढींतील संख्यांमधलें अंतर.

चयन [**सं०** चि=गोळा करणें, जमविणें]**न०** १ ढीग करणें, जमविणें. २ स्थंडिल. ३ नदीचा घाट.

चयन [**हिं०**] **स्त्री०** करमणूक; खेळणें, हिंडणें, फिरणें, इ० रूप गमतींत केलेली कालक्रमणा.

चयन [**हिं०** चय्न्] **स्त्री०** विश्रांति;आराम.

चयनी [**हिं०** चयन्+**म०** ई (प्रत्यय)]**वि०** रंगेल; करमणुकींच्या उद्योगांत काळ घालविणारा.

चर [**सं०**चर्=हलणें]**वि०** १हलणारें;चंचळ. २ जंगम, सजीव. **पु०** १ हेर; टेहळणी करावयास पाठविलेला इसम. २ खंजरीट नांवाचा पक्षी. ३ मंगळ-ग्रह. ४ मंगळवार. **न०** १ (**ज्योतिष**) दोन स्थानां-मधील दक्षिणोत्तर अंतर. ꣸**चराचर न०** सर्व वस्तु; जग. **चरराशि पु०** मेष, कर्क, तुला आणि मकर, हे राशि प्रत्येक. **चर नक्षत्र न०** स्वाती, श्रवण, धनिष्ठा, आणि शततारका, हीं नक्षत्रें प्रत्येक. **चर वार पु०** सोमवार.

चर [**हिं०**] **पु०** किल्ल्याचे भोवतीं खण-लेला खंदक. **पु०, स्त्री०** घासून पडलेला ओर-खडा (पडणें).

चरक [**फा०** चर्ख्] **पु०** १ उसाचा रस काढावयाचें यंत्र. २ धातुमय पात्रास झिलई किं० नक्षी करण्याचें यंत्रविशेष. ३ तोंड (खाद्यें खाण्याची जी चटक तिची निंदा करावयाची असतां);उ० ह्या राम्याचा चरक (किं०तोंडाचा चरक) एकसारखा चाललेला असतो. ४ पुरण इ० वाटावयाचें यंत्र-विशेष. ५ (लक्षणेनें) धबडगा (कामाचा, पाहुण्यांचा, स्वयंपाकाचा). ꣸**एकाद्याला चर-कांत धरणें** त्याला चुकारपणा न करूं देतां काम करावयाला लावणें.

चरक, चरख वि० आश्चर्यानें चकित झालेला; उ० माझी बुद्धि (किं० अक्कल) चरक झाली; उ० मीं चरख झालों !

चरकट [**म०** चऱ्हाट] **न०** लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत किं० गोष्ट. **स्त्री०** चपराक (मारणें, चढविणें, लगावणें).

चरकटणें स० **क्रि०** १ दुपदरी किं० तिपदरी दोरी चांगली वळण्याचा हेतु न धरतां कशीतरी कामचलाऊ वळणें. २ (लक्षणेनें) लिहिणें इ० काम घाईघाईनें करणें; उ० त्यानें एका तासांत दहा बंद चरकटले म्हणून त्यांत इतकीं अशुद्धें राहिलीं.

चरकट्या [**म०** चरकटणें] **वि०** घाईघाईनें काम करणारा; काम चांगलें करण्याकडे विशेषसें लक्ष्य न देतां काम करणारा.

चरकणें अ० क्रि० १ चर्र असा आवाज करून फाटणें (वस्त्र इ०). २ कांहीं अप्रिय वार्ता अकस्मात् ऐकून व्यथित होणें; कांहीं अनिष्ट देखावा पाहून चकित होणें. ३ भयंकर देखावा पाहून घाबरणें; उ० वाघ दिसतांच तुकोबा चर-कला. ४ दबकणें; ओशाळणें; कचरणें.

चरका पु० १ उष्ण पदार्थांच्या स्पर्शानें एक-दम उठते ती तिडिक किं० वेदना. २ फोडणीचा आवाज. ३ अप्रिय किं० भयंकर किं० दुःख-कारक गोष्टीनें मनाला बसलेली दहशत. ४ लाल तापलेल्या लोखंडानें मनुष्याच्या किं० जनावराच्या अंगाला देतात तो डाग (देणें).

चरकी (–खी) [**फा०**] **स्त्री०** १ चाकू, सुरी, कातरी, इ०स धार धावयाचें चाक. २ धातूच्या पात्राचे कण तासून काढून तें चकचकीत करण्याचें सोनार,तांबट,इ० कारागिरांचें एक यंत्र.

चरगण [**म०** चरणें] **न०** गुरांस चरा-वयाजोगें गवत इ०; उ० पाऊस पडला तरी चरगण व्हावयाला एक महिना पाहिजे.

चरचर, चरांचरां क्रि० वि० १ चर चर असा आवाज करून किं० असा आवाज होईल अशा रीतीनें (वस्त्र इ० फाडणें). २ वेगानें, झपाट्यानें (बोलणें, लिहिणें इ०). ꣸**काळीज चरचर कांपणें** कांहीं भयंकर गोष्टीमुळें हृदय व्याकुळ होणें किं० हृदयाला धक्का बसणें.

चरचरणें अ० क्रि० १ चरचर असा आवाज करणें. २ झोंबणें (औषध इ० डोळ्यांत, जखमेवर, इ०). ꣸**एकाद्याचें रान चरचरणें** त्याला फार भूक लागणें.

चरचरीत वि० १ खरखरीत; स्पर्शेंद्रियाला गुळगुळीत लागत नाहीं असें (कापड इ०). २ झोंबण्याजोगें, जोरदार, स्पष्ट, मनांत पक्कें ठसेल असें (भाषण, हुकूम, ताकीद, इ०). **क्रि० वि०** पूर्णपणें, अगदीं; उ० हें कापड चरचरीत पंधरा

हात आहे; उ० ह्या मोत्यांना चरचरीत शंभर रुपये द्यावे लागतील.

चरचीक वि० तल्लख; हुशार.

चरचोंडा वि० १ वटवट करणारा. २ दुसरे लोक बोलत असतां मध्यें तोंड घालणारा; लुब्रा.

चरड(–ढ–)क न० लांबलचक आणि कंटाळवाणी गोष्ट किं० हकीगत (लावणें, मांडणें, करणें).

चरडणें स० क्रि० धान्य इ० जाडेंभरडें दळणें.

चरण [म० चरणें] स्त्री० १ गुरांस चरावया इतकें उंच वाढलेलें गवत इ०; चरगण. २ गुरें चरावयास पाठविलीं असतां त्यांच्यासाठीं सरकारला जो पैसा द्यावा लागतो तो. ३ गवत खाण्याची क्रिया; उ० त्या बांड्या गायीपेक्षां ह्या काळ्या गायीची चरण जलद आहे. ४ गुरांनीं खालेल्या गवताचें परिमाण.

चरण [सं०] पु०, न० १ मनुष्यादि प्राण्यांस चालावयास साधनभूत जो अवयव असतो तो; तंगडी; पाऊल. २ खांब. ३ चवथा भाग. ४ वृक्षाचें मूळ. ५ वेदशाखा. ६ अभंग इ०चें कडवें. ७ हस्त नक्षत्राचा चवथा भाग; ह्या चार भागांना लोखंडी, तांबेरी, रुपेरी, आणि सोनेरी अशीं नांवें आहेत. ॐ**चरणायुध पु०** कोंबडा. **एकाद्याच्या चरणीं लागणें** त्याच्या पायांवर डोकें ठेवून त्याला वंदन करणें किं० त्याची प्रार्थना किं० विनंती करणें. **चरणचाली स्त्री०** पायांनीं चालून प्रवास करणें. **चरण चालीनें क्रि० वि०** पायांनीं चालून. **चरणतीर्थ न०** गुरु, ब्राह्मण, इ०च्या पायांचें तीर्थ. **चरणसंपुष्ट पु०** जोडा (पायांत घालावयाचा).

चरणें [सं० चर्=खाणें, भोगणें] अ० क्रि० १ गुरें इ०नीं तृणादिके जेथें रुजलें आहे तेथें जाऊन तें भक्षिणें. २ नानाप्रकारच्या उद्योगधंद्यांत पैसे मिळवीत असणें. ३ पक्षी इ०नीं धान्याचे कण चोंचीनें उचलून घेऊन ते खाणें. ४ कांहीं क्षत, खरूज, गजकर्ण, इ०नीं त्वचेचा अधिक अधिक भाग आक्रान्त करीत जाणें. ५ (लाक्षणिक) एकसारखें खात असणें; उ० हीं मुलें सकाळपासून चरत आहेत.

चरपट स्त्री० लांबलचक आणि कंटाळवाणी हकीकत. ॐ**चरपटपंजरी, चरपटपंजरिका स्त्री०** लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत; चऱ्हाट.

चरफड [म० चरफडणें] स्त्री० असंतुष्टपणानें केलेली पिरपीर; रागाचें ओरडणें.

चरफडणें अ० क्रि० रागानें किं० असंतुष्टपणानें पिरपिरणें.

चरफडाट पु० शब्दांनीं किं० क्रियेनें व्यक्त केलेला असंतुष्टपणा किं० राग.

चरफी स्त्री० जाडीभरडी दळलेली कणीक (गव्हाचें पीठ).

चरब [अ०] क्रि० वि० तंतोतंत रीतीनें; अगदीं बरोबर; यत्किंचित् कमी किं० ज्यास्ती न होतां; उ० तो गांव येथून चरब तीन कोश आहे; उ० हा धोतरजोडा चरब दहा हात लांब आहे. **वि०** महागाइचा (भाव, दर, मजुरी, इ०).

चरबट स्त्री० १ वायफळ किं० पाचकळपणाचें बोलणें (लावणें, मांडणें, चालविणें). २ हिरवटपणा (स्वभावाचा). **वि०** १ खरखरीत (विडा इ० खाऊन झालेली जीभ). २ नीरस किं० पचपचीत (खाद्य). ३ वटवट करणारा.

चरबटणें अ० क्रि० १ खरखरीत होणें (विडा इ० खाऊन जीभ, गाल इ०).२ पुळ्या पुटकुळ्या इ० मुळें खरखरीत होणें (अंगाची त्वचा). ३ लडबडणें (मातीनें, राखेनें, इ०नीं भांडें इ०).४ खरडणें, ओरखडणें (मांजर इ० च्या नखांनीं त्वचेवर); उ० मांजरांचीं नखें माझ्या अंगावर चरबटलीं आहेत.

चरबरीत वि० १ खरखरीत. २ पूर्णपणें न शिजलेला (भात, भाजी, इ०).

चरबी [फा०] स्त्री० बकरा, मेंढा, इ०च्या मांसांतील तेल काढतात तें.

चरम [सं०] वि० १ शेवटला. २ मागला. ३ पश्चिम दिशेकडचा. ४ कनिष्ट. ॐ **चरमकाल पु०** मृत्युसमय. **चरम कोटि स्त्री०**शेवटचा उपाय, इलाज, किं०युक्ति. **चरमावस्था स्त्री०** म्हातारपण.

चरमर स्त्री० १ खरखरीतपणा. २ झोंबरेपणा (पदार्थाचा, बोलण्याचा).

चरमरीत वि० १ मसालेदार म्हणून रुचकर (खाद्य).२ कठोर(भाषण). ३ तल्लख, हुशार.

चरवट न० मृत्तिकेचें कांहीं आकारविशेषाचें पात्र.

चरवण न०, चरवा पु० १ गुरांना गवत

इ० खावयाचें कुरण. २ कुरणांत गुरें चराविण्याबद्दल कुरणाच्या मालकाला द्यावे लागतात ते पैसे.

चराविणें स० क्रि० चरणाऱ्या गुरांची राखण करणें; गुरें इ० चरावयास नेणें.

चरवी स्त्री० १ वाटोळ्या आकाराचें पात्रविशेष. २ मधाचें पोळें.

चरवें न० गुरांचें किं० पक्ष्यांचें भक्ष्य.

चरस [हिं०] पु० भांगेच्या झाडाच्या बोंडातील चीक (पिणें, ओढणें).

चरसा [हिं०] पु० १ बैल इ० चें कातडें. २ चांभार लोकांवर बसविलेला कर (जो कातड्याच्या रूपानें द्यावयाचा असतो).

चरा पु० ओरखडा; गुळगुळीत पदार्थावर कांहीं कठिण पदार्थ घासल्यानें पडते ती रेघ.

चराई [म० चरणें] स्त्री० १ गुरें लोकांच्या कुरणांत चरावयाला घातलीं असतां कुरणाच्या मालकाला द्यावें लागतें तें द्रव्य. २ चरावयाला घातलेल्या गुरांच्या राखणावळीबद्दल गड्यास द्यावें लागतें तें द्रव्य; राखील.

चराचर[सं०] न० स्थावरजंगमात्मक जें जग तें.

चराचर पु०, स्त्री० प्राचीन कालापासून चालत आलेली रीति, संप्रदाय, चाल, इ०.

चरांचर, चरांचरां, चरांचर, चरारां क्रि० वि० १ चरचर असा आवाज होईल अशा रीतीनें (फाडणें, बोलणें, कापणें, खाणें, लिहिणें, इ०). २ न अडखळतां (लिहिणें, वाचणें, बोलणें, इ०).

चरित [सं०] न० १ जाणें. २ आचरण; वर्तनक्रम. ३ चरित्र. ४ स्वभाव. ॐ**चरितार्थ वि०** १ विजयी. २ कृतार्थ. ३ ज्याच्या सर्व कामना तृप्त झाल्या आहेत असा. ४ सार्थ, सफल. **पु०** १ संसाराची गुजराण. २ उपजीविका.

चरित्र [सं०] न० १ करणें; पाळणें. २ वर्तन. ३ स्वभाव. ४ वृत्तान्त; इतिहास. ५ कर्तव्य. ॐ**स्त्रीचें चरित्र आणि पुरुषाचें भाग्य कोणास समजत नाहीं** स्त्रीची वागणूक कशी आहे हें आणि पुरुष किती ऐश्वर्याला चढेल हें कोणाला कळत नाहीं.

चरिंदा [फा०] पु० १ जनावरांसाठीं गवत, दाणा, इ० समुच्चयानें. २ जनावरें चरावयास घालण्याबद्दल द्यावयाचा पैसा.

चरी स्त्री० १ लहान चर, पन्हळ, किं० ओहोळ. २ तळहातावर सुताचे पेड वळून केलेली दोरी.

चरींव [म० चरणें] न० गुरांचें चरावयाचें कुरण.

चरु [सं०] पु० १ होमार्थ शिजविलेला भात. २ चरूचा थाळा. ॐ**चरुस्थाली स्त्री०** १ स्वयंपाकाचीं विविध अंगें. २ एक दोघांचा स्वयंपाक.

चरोळें न० तूप इ० ठेवावयाचें लाखलोट्यासारखें कांहीं बारदान.

चर्चणें, चर्चिणें [सं० चर्च्=माखणें] स० क्रि० चंदनादि पदार्थ शरीर इ० स लावणें किं० चोपडणें; माखणें; उ० अंगाला भस्म, चंदन इ० चर्चिणें.

चर्चन [सं० चर्च्=माखणें] न० उटणें लावणें; माखणें.

चर्चा [सं० चर्च्=माखणें, निंदिणें, वाटाघाट करणें] स्त्री० १ अभ्यास. २ वाटाघाट. ३ घोटणें. ४ चौकशी. ५ माखणें (चंदनादिकानें शरीरादि). ६ प्रसंगादिकानें कोण एकाची कोण एका स्थलीं निघते ती गोष्ट; उ० आज त्या गवईमंडळींत तुमची चर्चा निघाली होती. ७ देवादिकांच्या चरितांचें वर्णन किं० निरूपण; उ० सर्वकाळ तो गोपाळपंत भगवच्चर्चा करीत असतो. ८ कोणेकाची त्याच्या पाठीमागें जी निंदा ती; उ० तो वामनराव तुमच्या तोंडावर गोड गोड बोलतो पण मागें तो तुमची चर्चा करीत असतो. ९ दोन माणसांनीं श्लोकादि आळीपाळीनें म्हणणें.

चर्पट [सं०] पु० १ हाताचा पंजा (बोटें ताठ करून). २ बुडबुड्यांचा समूह; फेस. ३ लांबलचक आणि कंटाळा यावयाजोगी हकीगत, गोष्ट, इ०. ॐ **चर्पट पंजरी स्त्री०** लांबलचक आणि नीरस गोष्ट, हकीगत, निवेदन, इ०.

चर्पटिका [सं०] स्त्री० १ एक वृत्तविशेष. २ नीरस हकीगत किं० गोष्ट. ३ अलंकारांनीं सुशोभित असें वाक्य.

चर्म [सं० चर्मन्=कातडें] न० १ कातडें, चामडें. २ ढाल. ॐ**चर्मकार, चर्मक पु०** चांभार. **चर्मकील पु०** चामखीळ (त्वचेवर उठतो तो). **चर्मकुंड, चर्मकाचें कुंड न०** चांभार लोक कमावावयाचीं कातडीं ज्या डोणींत भिजत घालतात ती डोणी. **चर्मचक्षु न०** जगतांतील जे पदार्थ

(दगड, झाड, बैल, माणूस) त्यांचें ज्ञान करून देणारें इंद्रिय; डोळा (ज्ञानचक्षु, अंतश्चक्षु, दिव्यचक्षु इ० च्या सापेक्षत्वें). **चर्मधन न०** गायी, म्हशी, इ० रूप संपत्ति. **चर्मवाद्य न०** ढोलकें, नगारा, संबळ, डफ, इ० कातड्याचें वाद्य तें. **चर्मपादुका स्त्री०** जोडा, वहाण, इ०. **चर्मी वि०** कमावलेल्या कातड्याचा बनविलेला. **चर्मी जोडा पु०** उत्तम रीतीनें कमावलेल्या कातड्याचा केलेला जोडा.

चर्या [**सं०**] **स्त्री०** १ हिंडणें; संचार. २ गति. ३ वर्तनाची सरणी, वागणूक. ४ करणें, कृति; उ० तपश्चर्या. ५ विधि, कृत्य; उ०व्रतचर्या. ६ रीति, पद्धति. ७ मार्ग. ८ सेवा, शुश्रूषा. ९ मुखाची मुद्रा; उ० दुखण्यानें त्याची तोंडाची चर्या पार फिरली.

चर्र क्रि० वि० चर्र असा आवाज करून, किं० चर्र असा आवाज होईल अशा रीतीनें. **न०** आकस्मिक भीतीचा किं० दुःखाचा उद्भव किं० उद्रेक; उ० वाघ म्हणतांच त्याच्या पोटांत चर्र झालें; उ० त्याची नोकरी गेली हें ऐकतांच माझ्या पोटांत चर्र झालें.

चर्वण [**सं०**] **न०** १ कांहीं पदार्थ तोंडांत घालून दांतांनीं तो बारीक म्हणजे कणरूप करण्याचा व्यापार; चावणें. २ लाह्या, पोहे, इ० चावून खावयाचे पदार्थ.

चर्वणा [**सं०**] **स्त्री०** एकादा विषय मनांत चांगला बिंबावा म्हणून त्याची पुनः पुनः वाटाघाट करणें.

चर्वित [**सं०**] **वि०** चावलेलें; दांतांनीं चावून कणरूप केलेलें. **न०** चावून चूर्णरूप केलें तें. ॐ **चर्वितचर्वण न०** निरर्थक पुनरुच्चारण किं० वाटाघाट.

चऱ्हा, चरा पु० कांहीं कठिण पदार्थ दुसऱ्या पदार्थावर जोरानें घासल्यानें उठते ती रेघ; ओरखडा.

चऱ्हाट न० १ वळलेली दोरी. २ (लाक्षणिक) लांबलचक आणि नीरस हकीगत, वर्णन, किं० गोष्ट (वळणें). ॐ **देवळांतली गेली घांट तर गुरव म्हणे माझें गेलें चऱ्हाट** मोठ्याच्या मोठ्या नुकसानाबद्दल आपण बेपर्वा असतों आणि त्या नुकसानाबरोबर आपलें अगदीं अल्प नुकसान झालेलें असलें तरी आपण ओरडत असतों.

चल [**सं०** चल्=सरकणें] **वि०** १ हलणारें, कांपणारें. २ चंचल, अस्थिर. ३ नाशवंत; विनाशी; क्षणभंगुर. ॐ**चलबिचल** [**म०** चल+विचल] **स्त्री०** १ स्थिरपणांत बिघाड; पदार्थविशेषाची कांहीं काळ स्थिरता आणि कांहीं काळ चंचलता. २ काय करावें काय करूं नये ह्या संबंधानें मनाची चंचलता किं० दोलायमान स्थिति.

चलणें [**सं०** चल्=चालणें, सरकणें] **अ० क्रि०** १ आमच्या किं० माझ्याबरोबर येणें; एकाद्या माणसाबरोबर जाणें (फक्त आज्ञार्थी किं० विध्यर्थी प्रयोगांत); उ० चल (किं० चला) आमच्या (किं० माझ्या) बरोबर; उ० चल, नीघ, आपल्या आईबरोबर. २ निघून जाणें (फक्त आज्ञार्थी); उ० चल, ऊठ, काळें कर !

चलती [**सं०** चल्=जाणें; **म०** चलणें] **स्त्री०** वैभवाची किं० उत्कर्षाची स्थिति; भरभराट. ॐ**चलती तिकडे भलती** वैभवाच्या काळीं मनुष्यानें कांहींही केलें तरी त्याचे गोडवे गायिले जातात; (भलती=वाखाणणी; भलेपणाचें श्रेय).

चलन [**सं०** चल=चालणें] **न०** १ कांपणें. २ हिंडणें. ३ एकाद्या देशांत चालू असलेलें नाणें; (एकाद्या देशांत) देवघेवींत उपयोगीं पडणारीं धातूंचीं नाणीं किं० कागदाचे तुकडे. ॐ **चलनवलन न०ए०व०** हालचाल; हालणें. **चलनी वि०** चलनांत चालणारें; देवघेवीच्या व्यवहारांत चालू असलेलें; उ० गांव चलनी, सरकार चलनी, पेठ चलनी, बाजार चलनी.

चलाऊ [**म०** चलणें] **वि०** कामाला चालण्याजोगा; उत्तम नव्हे तरी गरज भागविणारा. ॐ**कामचलाऊ वि०** उत्तम नव्हे तरी प्रस्तुतची गरज भागविणारा.

चलाक, चलाख [**फा०** चलाक्] **वि०** तल्लख; हुशार; चंचिबाग.

चलाकी (–खी) [**फा०** चलाकी] **स्त्री०** तल्लखपणा; हुशारी.

चलित [**सं०**] **वि०** हाललेला; स्थानभ्रष्ट.

चव स्त्री० १ ऐकावयाच्या शब्दादिकांची,

किं० पहावयाच्या रूपादिकांची, किं० खावयाच्या प्यावयाच्या खाद्यपेयांची किं० बुद्धिग्राह्य शास्त्रादिकांची गोडी, रुचि, किं० लज्जत. २ (विशेषतः) खाद्यपेयांची रुचि. ३ रसनेंद्रियांची रुचि जाणण्याची ताकद किं० रुचि घेऊन उत्पन्न होणारें सुख; उ० आज आठ दिवस माझ्या जिभेची रुचि नाहींशी झाली आहे. ***गाढवाला गुळाची चव काय आणि बहिऱ्याला गायनाची चव काय** ? १ दर्दी मनुष्यालाच पदार्थाची योग्यता कळते, इतरांस कळत नाहीं. २ दर्दी मनुष्यच पदार्थाचा सदुपयोग करून आनंद अनुभवूं शकतो. **तापल्या पाण्याला चव राहात नाहीं** मैत्रींत एकदा कांहीं बिघाड झाला असतां ती मैत्री पुन्हा जमली तरी ती पहिल्याप्रमाणें सुखकर होत नाहीं. **चव काढणें** खाण्यांत चोखंदळेपणा करणें. **चव घेणें, चव पाहाणें** पदार्थाच्या आस्वादाचा अनुभव घेणें. **चवेस पडणें** आवडीचा वाटणें किं० वाटूं लागणें.

चव पु० १ ओला नारळ खवणीनें खवून म्हणजे खरवडून काढलेला कीस; चहू. २मोत्याच्या वजनाच्या रती आणि मोत्यांची संख्या ह्यांचेवर कांहीं गणितकृत्य करून जें वजनरूप फळ येतें तें.

चवई स्त्री० १ रानकेळ. २ चार पायांची बैठक; चौपायी (देवांच्या मूर्ति, पाण्याचीं भांडीं, इ० ठेवावयाच्या उपयोगाची).

चवक पु० एक वनस्पतिविशेष.

चवकट इ० ' चौ ' मध्यें खालीं पहा.

चवचव स्त्री० कांहीं समारंभांत योग्य व्यवस्था नसल्याकारणानें होतो तो गोंधळ.

चवंटकें पुढें ' चवंडकें ' पहा.

चवड स्त्री० विड्याचीं पानें, भाकऱ्या, पोळ्या, इ० पदार्थांची जुळविलेली रास किं० समूह; चळथ.

चवंडकें न० एकतारी वाद्यविशेष (हें गोंधळीलोक वाजवितात). ***खंडींत नवंटकें आणि कटकांत चवंटकें कोठें पहावें** ? खंडीभर धान्याच्या राशींत गळफटलेलें नवंटकें हें माप (शेराच्या आठव्या भागाचें माप) शोधून काढणें अशक्य आहे आणि सैन्याच्या अवाढव्य पसाऱ्यांत चवंटकें हें वाद्य शोधून काढणें अशक्य आहे. **खंडीस नवंटकें आणि कटकास चवंटकें काय होय** ? खंडीभर धान्य नवंटक्यानें मोजूं पाहाणें हा मूर्खपणा आहे; तसेंच चवंटक्याचा आवाज सैन्यांतील सर्व लोकांस ऐकूं जाईल असा प्रयत्न करणें हा मूर्खपणा आहे. [प्रकार.

चवडचाल स्त्री० घोड्याच्या चालीचा एक

चवडा पु० १ तळपायाच्या बोटांजवळचा प्रदेश. २ पायाचा एक रोगविशेष.

चवढव स्त्री० १ गुंतागुंत; घोटाळा. २ बोभाटा, बदनामी.

चवणा [**म०** चव] **पु०** खाद्यपेयांची चटक. २ वाईट खोडी. ३ छांदिष्टपणाची सवय.

चवणें अ० क्रि० १ शिष्टाचारापासून भ्रष्ट होणें. २ भलत्याच सरणीनें वागणें. ३ वेड्यासारखें वागणें.

चवता(-त-)ळणें अ० क्रि० रागानें बेफाम होणें; क्रोधाविष्ट होणें.

चवताळें न० गवत, पानें, इ० चा कचरा ओढून काढण्याचें एक आउत.

चवदार [**म०** चव + **फा०** दार (प्रत्यय)] **वि०** ज्याला चांगली चव आहे असें; रुचकर.

च(-चा-)वनट [**म०** चव] **वि०** १चोखंदळा. २ वात्रट, फाजील.

चवर पु० एक वनस्पतीविशेष.

चंवर [**सं०** चामर] **न०** चमर नामक मृगाच्या शेपटीच्या केशांचा एक पदार्थविशेष (माशा वारावयाच्या उपयोगाचा). २ हातानें फिरवावयाच्या जात्याच्या खुंट्यावर दगडाचे रट्टे मारून मारून त्या खुंट्याचा जो कुंच्यासारखा माथा होतो तो; तंबूच्या दोऱ्या बांधावयाचे जे खुंटे त्यांचे माथेही हातोडीचे रट्टे खाऊन खाऊन असेच कुंच्यासारखे होतात; हे माथे प्रत्येक चालतांना हातांत धरावयाच्या काठीचें जमीनीला लागणारें टोकही असेंच कुंच्यासारखें होतें, ह्या टोकालाही चंवर म्हणतात. सर्व ठिकाणीं ' चंवर येणें'असा शब्द योजतात; उ० खुंट्याला चंवर आला. इ०. ***चंवर गोंडा पु०** पळस इ० झाडांच्या साली ठेचून त्यांचे तंतु विभक्त करून करतात तो गोंडा; श्रावणमहिन्याचा पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशीं असले गोंडे बैलांच्या शिंगांना बांधून त्यांची मिरवणूक काढतात. **चंवरडोल पु०**देव्हाऱ्याचा, किं०अंबा-

रीचा; किं० गाडीच्या छपराचा माथा. **चंवरडोली** स्त्री०१ देवळांतील देवाच्या मूर्तीवरील छताची चवकट.२स्त्रियांची बसावयाची डोली,–जी मेण्यासारखी खांद्यावरून वाहून नेली जाते.

चंवरा पु० नदीच्या किं० खाडीच्या कांठचा प्रदेश,–ज्याच्या चारी बाजूनें पाणी खेळून ज्याला बेटाचें रूप येतें.

चंवरी [सं० चामर] स्त्री० वनगायीच्या शेपटीच्या केशांचें केलेलें माशा वारावयाचें साधन. ☸ **चंवरीबरदार** पु० चवरी धरणारा हुजऱ्या.

चवला पु०, **चवली** स्त्री० दोन आणे किंमतीचें नाणें. ☸ **चवल्या** पु० रोजची मजूरी एक चवली द्यावयाची अशा ठरावानें कामावर लाविलेला गडी.

चवविणें स० क्रि० १ जागृत करणें; जागें करणें. २ चेतविणें; उद्दीप्त करणें.

चवळी स्त्री०द्विदल धान्यविशेषाचा वेल.☸**चवळवेल** स्त्री०, पु०चवळीचा वेल, चवळा.**चवळा**पु०, **चवळ(–ळा–)ई** स्त्री०माश्या आकाराची चवळी.

चवळी स्त्री० अफवा; बातमी (क्रि० निघणें, उठणें, पिकणें).

चवा पु० मोठें लाकूड, तुळवट, इ० उंच चढवावयासाठीं दोन लाकडें एकत्र बांधून करतात ती कैची.

चवाटकें [म० चौ(चार,)+टाक] न० तेल, तूप इ०च्या मापी शेराचा सोळावा भाग.

चवाटा (–ठा) [म०चौ (चार)+ वाट (रस्ता)] पु० १ चार बाजूंनीं येणारे चार रस्ते जेथें मिळतात तें ठिकाण. २ कोणताही सार्वजनिक अड्डा,–जेथें अनेक घरचे अनेक लोक जमून गप्पागोष्टी करतात ती जागा.

चवारी स्त्री० पोफळाची एक जात.

चवाळ स्त्री० एकसंध चार पंचे एकत्र विणलेले असतात ते समुच्चयानें.

चवाळें न० १ चार पंचे एकापुढें एक असे विणलेले असतात ते समुच्चयानें. २ लहान उणाख घोंगडी. ३ जड धोंडा किं० अन्य पदार्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं चौघांनीं वाहून न्यावयासाठीं जो वांसा घेतात तो आणि त्याला लोंबत असलेल्या दोऱ्या आणि त्याला काटकोनांत बांधलेलीं दोन लाकडें हीं सारीं समुच्चयानें.

चविष्ट [म० चव=रुचि] वि० अत्यंत रुचकर; स्वादिष्ट. [रानकेळ.

चवी, चवेण (–णी), चवीण,चवैण स्त्री०

चव्य [सं०] न० चवक नांवाची वनस्पति.

चव्या [सं०] स्त्री० कपाशी.

चव्या पु०१ गंजिफांच्या किं०पत्त्याच्या डावांतील चार ठिपक्यांचें पान.२तिफाशी सोंगट्यांच्या खेळांत चवथ्या घरीं सोंगटी बसे असा जो फाशावरील डाव तो.

चव्वीस [म०चौ(चार)+वीस] वि०चोवीस ही संख्या.

चव्हाटा [म० चौ (चार) + वाटा] पु० १ चार वाटा जेथें मिळतात ती जागा. २ गांवांतील लोक जेथें गप्पा मारावयाला बसतात किं० जमतात ती जागा.

चव्हाळें न० जबडा.

चष्मा [फा० चश्माह्=डोळा] पु०, स्त्री० १ उपनेत्रा·चाळिशी. २ घराच्या कडेची खोली. ३ दोन खांब किं० दोन तुळया ह्यांच्यामधल्या जागेंतील खोली. ४ नाटक गृहांतील प्रेक्षकांसाठीं केलेली खोली.

चसणें अ० क्रि० १ हुकणें, चुकणें, अयशस्वी होणें. २ मरणें. ३ अधिकाराच्या जागेवरून बडतर्फ केलें जाणें, हाकलून दिलें जाणें. ☸**चसणेपुरास जाणें, चसणापुरास जाणें** मरणें.

चहा, चाहा [हिं०] स्त्री० एकाद्या माणसाबद्दल किं० वस्तूबद्दल वाटते ती आवड; उ० तुमच्या कलेची ह्या गांवांत चहा होणार नाहीं; उ० त्या हरिदासाची सर्व ठिकाणीं चहा झाली.

चहा [**पोर्च्युगीझ्** शा; **चिनी** छा] पु० १ एका विशिष्ट झाडाचीं पानें ऊन पाण्यांत उकळून करतात तें पेय. २ एका वनस्पतिविशेषाच्या पाती अधणांत घालून करतात तो काढा (ताप, पडसें, इ० वर). ☸**चहादाणी** स्त्री० चहा हें पेय करावयाचें किं० वाढावयाचें पात्रविशेष.

चहाटळ वि० वात्रटपणानें बोलणारा; फाजीलपणा करणारा.

चहाड वि० १ एकाद्याच्या गुप्त गोष्टी किं० लाजिरवाण्या कृति दुष्टपणानें प्रकट करणारा. २

भिजविले किं० शिजविले असतां जे मऊ होत नाहींत असे धान्याचे दाणे. ॐचहाडखोर, चहाडबुचका वर ' चहाड 'चा अर्थ १ पहा.

चहाडणें [**म०** चहाड] **अ० क्रि०** चहाड्या करणें. हा शब्द पुढील म्हणींतच येतो. **वाढल्यापेक्षां चहाडलें गोड** मिष्ट पदार्थ खाऊन होतो जो आनंद त्यापेक्षां चहाड्या करून किं० ऐकून अधिक आनंद होतो.

चहाडी स्त्री० दुसऱ्याचीं वर्मेंकर्में प्रकट करण्याचा धंदा किं० प्रकट करणें; दुसऱ्याचीं चारचौघांत प्रकट केलेलीं रहस्यें समुच्चयानें.

चहाणें स० क्रि० एकाद्या माणसाला किं० पदार्थाला प्रेमाचा किं० आवडीचा विषय करणें.

चहूं, चोहों [**म०** 'चार' चें एक रूप] **वि०** चार. हा शब्द सामासिक शब्दांत मात्र येतो. चहूंकडे, चोहोंकडे, चहूं दिशांस, चोहों दिशास, चहूंफेर, चौहोफेर (चौफेर), चहुत्रा, चहोत्रा (दरमहा दर शेंकडा चार हा व्याजाचा दर), चहुत्रा (चवुत्रा).

चळ [**म०** चळणें; **सं०** चल्=सरकणें] **पु०** १ म्हातारपण, वायु, पिशाचसंचार, इ० कारणांमुळें बुद्धीला होतो तो भ्रंश. २ अस्थिरपणा, चंचळपणा (संपत्ति, इ०कांचा). ३ दिलेल्या वचनाचा किं० केलेल्या प्रतिज्ञेचा भंग; ठरलेल्या शिस्तीचें किं० कायद्याचें किं० नियमाचें उल्लंघन. ४ एकाद्या पदार्थाबद्दल किं० माणसाबद्दल अत्यंत तीव्र उत्कंठा किं० इच्छा किं० छंद (ह्या अर्थीं **स्त्री०** सुद्धां).

चळ [**म०** चळणें] **स्त्री०, पु०** रडत असलेल्या पोर इ०कांना रडें न आटोपावयाची स्थिति प्राप्त होते ती.

चळक स्त्री० १ शिपायांची टोळी. २ चोरांची टोळी. ३ पावसाची जोराची सर (येणें, पडणें). ४ प्रवाहाचा जोर; जोराचा प्रवाह. ५ चोर, शिपायी, कुत्रें, गुरेंढोरें इ०चें एकाद्या ठिकाणीं वेगानें येणें. ६ भाकऱ्या, पोळ्या, इ० ची चळथ. ॐ**चळकधार वि०** (पावसाची जोराची) सर.

चळकांडी, चिळकांडी, चिरकांडी स्त्री० १ रक्त, झऱ्याचें पाणी, इ०चा एकदम आणि जोरानें उद्भवलेला प्रवाह. २ पिचकारीनें उडविलेली धार.

चळकांप [**म०** चळणें+कांपणें] **पु०** आकस्मिक भयानें शरीराला सुटतो तो कंप; (भरणें, सुटणें); उ० वाघ (चोर, सर्प, इ०) पाहातांच मुरारबाच्या अंगाला चळकांप सुटला (किं० अंगांत चळकांप भरला).

चळचळ, चळचळां, चळांचळां क्रि० वि० १ अतिभयामुळें चळचळ शब्द होई अशा रीतीनें (मुतणें, कांपणें). २ थंडीमुळें जोरा जोरानें (कांपणें).

चळचळाट पु० १ भक्ष्य आणि भोज्य पदार्थांची समृद्धि किं० वैपुल्य. २ घरांत गायी, म्हशी, वासरें, इ०चें वैपुल्य. ३ पैशाची समृद्धि. ४ एकाद्या अधिकाऱ्यासंबंधानें रयतेला वाटतो तो दरारा.

चळचळीत वि० खाद्यपेयांची समृद्धि ज्यांत आहे असें (भोजन, मेजवानी).

चळचूक [**म०** चळणें+चुकणें] **स्त्री०** सर्व प्रकारचे दोष समुच्चयानें (करावयाचें तें न केल्यामुळें आणि न करावयाचें तें केल्यामुळें झालेले).

चळण वळण [**सं०** चलन+वलन] **न०** १ हालचाल. २ वर्तनाची पद्धति; वागण्याची तऱ्हा; उ० संपत्ति त्याच्या ताब्यांत आल्यापासून त्याचें चळण वळण फिरलें.

चळणें [**सं०** चल्=सरणें] **अ० क्रि०** १ स्वस्थानापासून भ्रष्ट होणें; सरकणें. २ बुद्धि, मति, इ० बहकणें, (म्हातारपणा इ०कां मुळें). ३ चुकणें. ४ विसरला जाणें (पदार्थ, कर्तव्य, इ०). ५ सतत दीर्घ रुदन करणें (मुलानें).

चळथ, चळत स्त्री० पोळ्या, भाकऱ्या, इ० ची चवड (एकावर एक ठेवून झालेली).

चळथणें, चळतणें स० क्रि० एकावर एक अशा (भाकऱ्या, पोळ्या) ठेवून त्यांची रास करणें.

चळबळ पुढें ' चळवळ ' पहा.

चळबळीत वि० तेलानें किं० तुपानें माखलेली (पोळी, भाकरी, इ०).

चळवळ [**म०** चळणें+वळणें] **स्त्री०** १ चंचळपणा; अस्थिरपणा. २ समाजांत उत्पन्न केलेली ओरड किं० जागृति. ४ हालचाल; उद्योग; खटपट.

चळवळणें अ० क्रि० १ अस्वस्थपणानें हातपाय झाडणें (आजारी किं० असंतुष्ट माणूस करतो

तसें). २ कांहीं तरी हालचाली करणें (चंचल मूल करतें तसें).

चळवळ्या वि० १ चंचल किं०अस्थिर स्वभावाचा. २ लोकांत चळवळ उत्पन्न करणारा(भाषणें, लेख, इ० नीं).

चळविणें स० क्रि० १ स्थानभ्रष्ट करणें. २ चुकाविणें. ३ गोंधळविणें.

चळाळणें अ०क्रि० १ जोरानें वाहाणें(मातेच्या स्तनांतून दूध, जखमेंतून रक्त, गळवांतून पू, इ०). २ जोराचा प्रवाह वाहाविणें (स्तन, जखम, गळूं, इ० नीं).

चळी स्त्री० बिघाड, नाश, नासाडी. ॐ**माझी झोप चळी पडली.** माझी झोप गेली (झोप मोडल्यामुळें किं० आकस्मिक जागृति आल्यामुळें).

चळें न० कांहीं धान्य काढून घेतल्यामुळें सईल पडलेला मुढा. मुढा म्ह० गवताच्या आच्छादनांत बांधलेल्या धान्याचा गठ्ठा.

चळेल [**म०** चळ] **वि०** ज्याला चळ भरला आहे असा (वृद्ध माणूस).

चक्षु [**सं०** चक्षुस्=डोळा] **न०** १ रूपाचें ज्ञान करून देणारें इंद्रिय; डोळा; नेत्र. २ दृष्टि. ३ दिव्य ज्ञान. ॐ**चक्षुर्दान न०** देवांच्या मूर्तींच्या डोळ्यांस तूप लावणें. **चक्षुष्पथ पु०** क्षितिज. **चक्षूराग पु०** १ डोळ्यांची लाली. २ प्रेमकटाक्ष. **चक्षुर्विषय वि०** दृष्टीस पडलेला. **पु०** दृष्टीचा टप्पा. **चक्षुःश्रवा पु०** साप (जो डोळ्यांनीं ऐकतो असें समजलें जातें). **चक्षुरिंद्रिय न०** डोळा हें इंद्रिय. **चक्षुष्मान वि०** १ ज्याला डोळे आहेत असा म्हणजे डोळस. २ सुंदर आहेत डोळे ज्याचे असा. **चक्षूरोग पु०** ' डोळे येणें ' हा रोग.

चाई स्त्री० ज्यानें केश गळून पडतात असा एक त्वचेचा रोग (**क्रि०** लागणें); ह्या रोगाला ' कातर,' ' कातरी,' ' उंदरी ' अशीं अन्य नांवें आहेत. ॐ**चाईचाट पु०** केश गळण्याचा रोग; चाई.

चाउटी स्त्री० वाष्कळ गोष्टी.

चाऊल स्त्री० पावलांचा आवाज, वास, इ० वरून एकाद्याच्या सांन्निध्याची सूचना; 'चाहूल' असें ह्या शब्दाचें दुसरें रूप आहे. **क्रि०**लागणें,घेणें.

चाक [**सं०** चक्र] **न०** गाडी, रथ, इ०चें चक्र.

चाक वि० नीट नेटकें; गोंडस.

चाकचक्य [**सं०**] **न०** १ चकाकी; तजेला. २ वीज, हिरा, इ० चे अंगीं डोळे दिपावयाजोगें जें तेज असतें तें.

चाकचोप वि० नीट काळजीपूर्वक वडी करून, किं० मांडणी करून, किं० तो घासून पुसून आणला आहे नीटनेटकेपणा किं० गोंडसपणा ज्याला असा (पदार्थ).

चाकचोप, चाकचोपी [**म०** चाकचोप] **स्त्री०** पदार्थविशेषाच्या अंगीं कांहीं संस्कारानें किं० विशेष प्रकारच्या मांडणीनें आणलेला नीटनेटकेपणा किं० गोंडसपणा.

चाकटणें अ०क्रि० १ चकित होणें. २ गोंधळणें.

चाकपाक, चकपक वि० स्वच्छ, नीटनेटकें, गोंडस.

चाकर [**हिं०**] **पु०** नोकर; सेवक. ॐ**चाकर चाकराला भाईबटीक बटिकीला समजावी** समान दर्जाच्या माणसांचा संबंध सोयीचा किं० सुखाचा असतो. **चाकराला आणि बटकीला उजूर नाहीं** चाकर आणि बटीक यांना कोणत्याही सबबीवर काम टाळतां किं० चुकवितां येत नाहीं. **चाकराला चुकर आणि बटकीला नफर** एका नोकरानें आपण करावयाचें काम दुसऱ्या नोकरावर लोटणें (हा हास्यास्पद किं० निंद्य प्रकार होय). **चाकरचुकर, चाकरनफर पु० अ० व०** नोकरचाकर; सर्व चाकर समुच्चयानें; चाकर माणसें. **चाकरपेशा पु०** १ नोकर चाकर समुच्चयानें. २ नोकराचा दर्जा. ३ कोणीही नोकर. **चाकरमानी (–न्या) पु०** नोकरीचा धंदा करणारा; नोकर.

चाकरी [**हिं०**] **स्त्री०** नोकरी; नोकरीचा धंदा. ॐ**चाकरी करावी आणि भाकरी खावी** कष्ट करावे म्हणजे हक्कानें सुख भोगतां येतें; लोकांवर भारभूत होऊन राहाणें ही लाजिरवाणी गोष्ट होय. **चाकरीचोर पु०** चुकारतट्टू नोकर; कुचरपणानें काम करणारा नोकर.

चाकवत पु० एक शाकभाजी.

चाकळ पु० वाचाळपणा करणारा; वटवट [करणारा.

चाकाटणें अ० क्रि० १ दिपणें. २ चकित होणें.

चाकाट्या, चकाट्या स्त्री० अ० व० गप्पा-

गोष्टी; रिकामटेकड्या गप्पा.

चाकारी [**सं०** चक्र] **स्त्री०** गाडी चालली असतां तिच्या चाकाची जी रेषा मातींत किं० धुळींत किं० चिखलांत उमटते ती.

चाकी [**सं०** चक्र] **स्त्री०** १ धातु, लाकूड इ०चा वाटोळा पातळ तुकडा. २ चपटा भोपळा.

चाकू [**हिं०**] **पु०** लेखण्या करणें इ०कामीं उपयोगाचें शस्त्रविशेष.

चाकोता पु० चाकवत नांवाची पालेभाजी.

चाकोंदळ न० ' चकंदळ, ' ' चकदळ ' पहा.

चाकोरी स्त्री०,चाकोरें न०मागें 'चाकारी'पहा.

—कोळें, चाखोळें [**म०**:चाक+ओळ] **न०** रिकाम्या गप्पागोष्टी करीत बसलेल्या लोकांचा समुदाय.

चाख वि० नीटनेटकें.

चाखणी [**म०** चाखणें] **स्त्री०** चाखण्याची क्रिया.

चाखणें स० क्रि० १ पदार्थाची चव किं० रुचि घेणें किं० पाहाणें. २ पदार्थ अल्प प्रमाणांत भक्षिणें. ❀**तळें राखी तो पाणी चाखी** ज्याच्याजवळ संरक्षणार्थ कांहीं पदार्थ ठेविला आहे तो त्याचा उपयोग करणारच आणि उपभोग घेणारच. **चाखलें नाहीं पण देखलें तर असेल?** एकाद्या वस्तूचा प्रत्यक्ष अनुभव नसेल किं० उपभोग घेतलेला नसेल तरी ती वस्तु काय आहे, तिचा उपयोग काय किं० उपभोग कसा घ्यावयाचा किं० तिची योग्यता काय ह्या गोष्टी माहीत असणें शक्य आहे. **चाखत माखत जेवणें** १ चोखंदळेपणानें जेवणें. २ अन्नावर वासना नसतां अळेंबळें जेवणें. **चाखत माखत बोलणें** आवंकत आणि रेकत बोलणें. **मी तो पदार्थ कांहीं चाखून रांधला नाहीं** मी तो पदार्थ केला आहे हें खरें आहे पण त्याचे सर्व गुणदोष मला ठाऊक असणें शक्य नाहीं. **चुकीविषयीं कोणी चाखून रांधलें नाहीं** मानवी कृतींत चुकी ही असावयाचीच; बिनचूक अशी कृति करणें शक्य नाहीं.

चाखवत पु० वर ' चाकवत ' पहा.

चाखविणें [**म०** 'चाखणें'चें प्रयोजक] **स० क्रि०**१ चाखावयास भाग पाडणें. २ चाखावयाला देणें. ३ (लाक्षणिक) अनुभव घ्यावयाला लावणें; सोसावयाला भाग पाडणें; उ० त्याच्या तोंडांत जेव्हां दोन चाखविल्या तेव्हां तो कबूल झाला (म्ह० त्याच्या मुसकटांत दोन लगावल्या तेव्हां).

चाखळ वि० निरर्थक वटवट करणारा; चवळ.

चाखुंदा पु० अडचणीची, संकटाची, किं० घोटाळ्याची स्थिति.

चाखोळा [**म०** चाखणें] **पु०** मुंजीचे दिवशीं मुलानें मातेच्या ताटांत जेवावयाचें हा समारंभ.

चाखोळा पु०, चाखोळें, चाकोळें न० १ रिकामटेकड्या गप्पागोष्टी करणारे लोक समुच्चयानें.२अशा लोकांचा अड्डा किं०बसावयाची जागा.

चांग वि० चांगला.

चांग, चांगदेव, चांगोबा पु० १ भैरव हा जो शिवाचा अवतार त्याचा वाचक शब्द. २ एक ज्योतिर्लिंगविशेष.

चांगट वि० सुंदर; गोंडस.

चांगभला [**म०** चांग (चंद्र)+भला (भाल=कपाळ)] **पु०** १ शंकराचें नांव. २ भैरवाचे भक्त ह्या ' चांगभला ' नांवानें त्याचा जयजयकार करतात. ३ ज्योतिर्लिंगाचे उपासक ' चांगभला ' ह्या नांवानें त्याचा जयजयकार करतात. ४ दोरी खेचणें, नेट लावणें, जड ओझें उचलणें, इ०कामें करतांना 'चांगभला ! ' हा शब्द उच्चारून सर्व लोक एकदम सर्व शक्ति वेचतात.

चांगभांग पु०स्त्रियांचा प्रसाधनविधि; स्त्रियांची चट्टीपट्टी,–वेणीफणी, काजळकुंकूं इ०समुच्चयानें.

चांगला [**सं०** चंग=सुंदर, चतुर, नीरोगी] **वि०** जसा पाहिजे तसा; जसा असावा तसा; बरा; योग्य. ❀ **चांगुलपणा पु०, चांगुलपण न०** चांगलेपणाचा गुण.

चांच वि० चलाख, तल्लख, हुशार (मूल).

चांच न० चांचे लोकांची टोळी.

चाचड पु० एक क्षुद्र जंतु,–हा रंगानें तांबडा असून आकारानें मुंगीसारखा असतो.

चांचण न०डांस(दंश करणारा एक क्षुद्र प्राणी).

चांचण, चांचणी, चाचणी स्त्री० पक्कान्नांत घालावयासाठीं माखरेवर करतात ती कृति किं० संस्कार. ❀**चांचणीचें बेसन न०, चांचणीचे लाडू पु० अ० व०** हरभऱ्याच्या डाळीचा रवा

तुपांत तळून तो फुगून मोकळा झाल्यावर तो साखरेच्या पाकांत घालून त्याचे वळलेले लाडू.

चांचणी, चांचणूक, चांचण स्त्री० पदार्थाची परीक्षा करावयाची असतां त्याच्या लहान अंशाची परीक्षा करून तीवरून सर्व पदार्थाची परीक्षा करणें; उ० तुमच्या मुलाच्या अभ्यासांची मी चांचणी पाहिली, तो परीक्षेला बसावयाच्या लायकीचा आहे असें माझें मत झालें.

चांचपडणें अ० क्रि० १ अंधेरांत पदार्थ नीट दिसत नसल्यामुळें स्पर्शेंद्रियानें पदार्थ शोधणें किं० हुडकून काढणें. २ अंधेरांत जपून पावलें टाकीत आणि आजूबाजूंचे पदार्थ हस्तस्पर्शानें ओळखून चालत जाणें. ३ भयादि कारणांमुळें किं० बोलावयाचा मजकूर किं० शब्द न आठवल्यामुळें किं० न सुचल्यामुळें अडखळत आणि थांबत थांबत बोलणें.

चाचपणें अ० क्रि० १ हाताच्या बोटांनीं स्पर्श करून किं० चेपून एकादा पदार्थ किती खरखरीत किं० गुळगुळीत, किती टणक किं० मऊ आहे ह्याचें ज्ञान करून घेणें. २ अंधेरांत एकादा पदार्थ स्पर्शानें शोधून काढणें. ३ अनेक पदार्थांत घोटाळलेला पदार्थ शोधून काढणें. ४ (लाच) घेणें.

चांचर पु० उंदीर इ०नीं कुरतडलेल्या पदार्थाचा भुसा किं० कीस.

चांचरणें अ० क्रि० १ झोकांडे खात चालणें. २ बोलतांना वाहवत जाणें; भरमसाट रीतीनें बोल्णें; ताळतंत्र सोडून बोलत सुटणें. ३ अडखळणें; कचरणें.

चाचरी स्त्री० १ योग्याच्या ध्यानाचा एक प्रकार. ॐ**चाचरी मुद्रा** स्त्री० अशा ध्यानाच्या समयीं होते ती योग्याची मुद्रा.

चाचरी, चाचारी, चाचारें क्रि० वि० अडखळत; धडपडत; झोकांडे खात खात. ॐ**चाचरी चाचरी जेवणें** चोखंदळेपणानें जेवणें.

चाचरी स्त्री० अडखळत, वाहवत, झुकत, झोकांडे खात केलेली क्रिया (बोलणें, चालणें, इ० रूप); क्रि० खाणें.

चांचल्य [सं०] न० १ चंचलपणा; अस्थिरपणा; धरसोड. २ क्षणभंगुरपणा.

चांचा पु० समुद्रावर चोऱ्या करणाऱ्यांच्या जातीचा इसम.

चाचावणें अ० क्रि० १ चरफडणें; रागानें पुटपुटणें. स० क्रि० काकडी इ०फळाचा बारीक चुरा किं० कीस करण्यासाठीं तें फळ विळी इ० च्या धारेवर अनेक रीतीनें हापटून फिरविणें; ह्या अर्थीं 'चोचावणें' हें रूप अधिक प्रचलित आहे.

चांचूं न० १ एक शब्द सुद्धां; चकार शब्द; उ० वेदान्त विषयांत मी त्याला चांचूं करूं देणार नाहीं. २ आपण जागे आहों असें सुचविणारें कांहीं चिन्ह,—खाकरणें, हुंकारणें, हूंः करणें, इ०.

चाट वि० उनाड, हलकट, चघळ, चहाटळ.

चाटण [म० चाटणें] न० अनेक औषधी एकत्र उगाळून जें चाटून खावयाचें औषध करतात तें.

चाटणें स० क्रि० १ औषधादि पदार्थ जिव्हेनें ग्रहण करून खाणें. २ औषधादि पदार्थ बोटानें घेऊन जिभेला लावून तो खाणें. २ फेकलेल्या धोंड्यानें किं० बाणानें शरीराच्या त्वचेला खरडून पुढें जाणें; उ० तो धोंडा माकडाच्या खांद्याला चाटून गेला. ॐ**चाटलें आणि बाटलें असें होणें** उपभोग्य पदार्थांचें अत्यल्प प्रमाणांत सेवन घडणें; पुरता किं० यथेच्छ उपभोग न घडतां उपभोग्य पदार्थाला अंतरणें किं० आंचवणें. **चाटून पुसून खाणें** (किं० **जेवणें**) खाद्य पदार्थ लेशमात्र शिल्लक न राहूं देतां सगळाचा सगळाच खाऊन टाकणें किं० संपविणें. **चाटून पुसून नेणें** अगदीं लहान वस्तु देखील न राहूं देतां (चोरादिकांनीं) सर्व वस्तु घेऊन जाणें किं० लुटून नेणें.

चाटवण [म० चाटणें] न० पहिला पाऊस पडल्यावर जें गवत उगवतें त्याची अगदीं थोड्या दिवसांची वाढ,—जी अद्यापि गुरांना खातां येण्याइतकी मोठी झालेली नाहीं, म्हणजे जी केवळ चाटतां येण्याइतकीच झालेली असते.

चाटळ वि० वायफळ किं० असभ्यपणाच्या किं० पोरकटपणाच्या गोष्टी किं० कृति करणारा; चहाटळ.

चाटी, चाट्या पु० कापडाचें दुकान घालून उपजीविका करणारी एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम किं० तो धंदा करणारा दुसऱ्या कोणत्याही जातीचा इसम.

चाटु [**सं०**] **पु०, न०** १ गोड भाषण; लाडीगोडी. २ स्पष्ट बोलणें. ॐ**चाटुकार वि०** १ गोड गोड भाषण करणारा; लाडीगोडी करणारा किं० लावणारा. २ खुषमस्कऱ्या. **चाटुपटु, चाटुबटु पु०** विदूषक. **चाटऱ्या भाटऱ्या** [**सं०** चाटुबटु] **वि०** वाचाळ आणि वात्रट.

चाटू पु० १ लाकडाची पळी. २ होडीचें वल्हें. ३ ढेकणाच्या आकाराचा एक पाण्यांत राहाणारा क्षुद्र प्राणी. [सवकलेला.

चाटू [**म०** चाटणें] **वि०** लाच खाण्याला

चाड स्त्री० १ आवड, गोडी. २ किंमत, परवा; आदरबुद्धि; उ० रामभाऊ स्पष्टवक्ता आहे, तो कोणाची चाड बाळगणारा माणूस नाहीं. ॐ**रोग्याला कुपथ्याची चाड** जें निषिद्ध तें करण्याकडे माणसाची प्रवृत्ति असते. **ज्याची लागे चाड तो उडे ताडमाड** ज्या मनुष्याची एकाद्या कामीं किं० प्रसंगीं जरूर असते त्याला जंभ चढतात म्ह० तो लोकांना फार वेळां पाया पडावयाला लावतो.

चाडदोरी स्त्री० खालीं ' चाडें ' मध्यें पहा.

चाडा वि० १ वडबड्या; वात्रटपणें बोलणारा. २ रहस्यें बोलून जाणारा (आपलीं किं० लोकांचीं).

चांडाळ [**सं०** चांडाल] **पु०** शूद्र पुरुष आणि विप्रस्त्री यांची संतति. ॐ**चांडाळचौकडी स्त्री०** एकाद्या विशिष्ट ठिकाणीं बसणारे उठणारे हलकट लोक समुच्चयानें.

चाडें, चाढें न० १ समईत किं० लामणदिव्यांत वातीसाठीं जेथें तेल घातलेलें असतें तो भाग. २ वातींतून टपकणारें तेल जेथें साठतें तो समईचा भाग. ३ बीं पेरण्याकरितां पाभरीवर जें लाकडाचें पात्र असतें तें. ॐ**चाडदोरी स्त्री०** पाभरीवर बीजांचें पात्र ज्या दोरीनें बांधलेलें असतें ती दोरी. **चाडयावर धरणें** किं० **चाडें मूठ धरणें** १ शेतांत पेरणी सुरूं करणें. २कोणत्याही कामाला सुरवात करणें. **चाडेमूठ लागणें** (किं० **चालणें**) पेरणीचें काम चाललेलें किं० सुरूं केलेलें असणें.

चाडेगांठ स्त्री० बोटांत अंगठीसारखें जें सोन्याचें पवित्रक घालतात त्याच्या गांठीसारखी जी गांठ ती.

चाणाख्य, चाणक्ष, चाणाक्ष [**सं०** चाणक्य= चंद्रगुप्ताचा गुरु आणि मंत्री] **पु०** कोणीही धूर्त आणि हुशार माणूस; चतुर माणूस.

चाणूक स्त्री० १कोणत्याही कामाचें, उद्देशाचें, किं० बेताचें,दिग्दर्शन किं० असें दिग्दर्शन ज्यावरून होतें असें कांहीं चिन्ह (**क्रि०** दाखविणें, पाहाणें, किं० लागणें). २ एकाद्या पदार्थाचा अल्पप्रमाणांत घेतलेला अनुभव किं० आस्वाद. ३ वेदनेचा झटका.

चात पु०, स्त्री०, न० १ सूत काढावयाचा जो चरका त्याचें मोठें चाक,–जें एक वेळ फिरविलें असतां सूत गुंठाळावयाची सळई अनेक वेळां फिरते. २ चरक्याची ही सळई,–जिच्यावर सूत गुंडाळलें जातें. ३ सूत गुंडाळावयाची सळई (चरक्याच्या अंगभूत नसलेली). ४सोनार लोकांची भोकें पाडावयाची पोलादी सळई. ५ लांबोडा आणि मळसूत्रासारखा दिसणारा शंख.

चातक [**सं०**] **पु०** एक पक्षिविशेष. हा पक्षी केवळ मेघजळावरच उपजीविका करून राहातो म्हणून तो वर्षाकाळाची मार्गप्रतीक्षा करीत असतो असा कविसमय किं० कविसंकेत आहे. ह्यावरून पुढील वाक्प्रचार रूढ झाले आहेत. ॐ**चातकासारखी वाट पाहात बसणें** अतिशय उत्कंठेनें एकाद्या माणसाचें येणें किं० एकाद्या गोष्टीचें घडणें इच्छीत बसणें. **चातकन्यायानें क्रि० वि०** अत्यन्त उत्कंठापूर्वक.

चाती स्त्री० १ सूत काढण्याची लहानशी धातूची, दगडाची, किं० अन्य द्रव्याची पातळ आणि वाटोळी तबकडी; ही जड असल्याकारणानें हिला दिलेली गति पुष्कळ वेळ टिकते आणि सुताला इष्ट तितका पीळ भरतां येतो. ह्या सुताचीं जानवीं करतात. २ कोणत्याही उपयोगाची वाटोळी चपटी तबकडी.३सूत काढावयाच्या चरक्याचे चाक. ४ चरक्यावर काढलेलें सूत जीवर गुंडाळलें जातें ती सळई. ५ सुत गुंडाळावयाची सळई,–चरक्याच्या अंगभूत नसलेली.

चातुर [**सं०**चातुर=शाहाणा] **वि०** १ धूर्त, तल्लख, हुशार, बुद्धिमान्. २ सुंदर

चातुराश्रम्य [**सं०**] **न०** ब्रह्मचर्य, गार्हस्थ, वानप्रस्थ, आणि संन्यास, हे चार आश्रम समुच्चयानें.

चातुर्जात, चातुर्जातक न० दालचिनी, तमालपत्र, एलची, आणि नागकेशर, हीं चार औषधी द्रव्यें समुच्चयानें.

चातुर्थक, चातुर्थिक [**सं०**] **पु०** दर चवथ्या दिवशीं येणारा ताप.

चातुर्भद्रक न० नागरमोथा, सुंठ, अतिविष, आणि गुळवेल, हीं चार औषधी द्रव्यें समुच्चयानें.

चातुर्मास्य [**सं०**] **न०** १ चार महिन्यांचा यज्ञविशेष. २ चतुर्मासाचें व्रत. ३ आषाढ शुद्ध दशमीपासून कार्तिक शुद्ध दशमीपर्यंतचा अवधि. ४ उन्हाळा, पावसाळा, आणि हिंवाळा, हे जे चार चार महिन्यांचे अवधि ते प्रत्येक. ५ कोणताही चार महिन्यांचा अवधि.

चातुर्य [**सं०**] **न०** चतुरपणा; हुशारी. २ धूर्तपणा. ३ बुद्धिमत्ता. ❀ **चातुर्यकळा स्त्री०** बुद्धिमत्ता; धूर्तपणा; हुशारी.

चातुर्वर्ण्य [**सं०**] **न०** १ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, ह्या चार जाति समुच्चयानें. २ ह्या चार जातींचे धर्म.

चातुर्विद्य, चातुर्वैद्य [**सं०**] **न०** ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, आणि अथर्वणवेद, समुच्चयानें.

चातुर्वैद्य [**सं०**] **पु०** ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्वण वेद, हे चारी जाणणारा.

चातुर्होत्र [**सं०**] **न०** १ चार ऋत्विजांनीं केलेला यज्ञ. २ यज्ञांतील चार ऋत्विज समुच्चयानें.

चातेंपोतें [**म०** चात+पोतें] **न०** सोनार, सराफ, शिंपी, इ० कारागिरांचीं हत्यारें आणि साधनें समुच्चयानें.

चांद [**सं०**] **पु०** १ चंद्र. २ चंद्राच्या आकाराचा एक दागिना. ❀ **चांदमारी स्त्री०** निशाणबाजी. (ज्यावर गोळी मारावयाची त्या वर्तुळाला शिपायी इ० 'चांद' म्हणतात.) **चांदसलामी स्त्री०** १ कोणा वड्या अधिकाऱ्याला चांदरात्रीं संध्याकाळीं केलेला सलाम. २ कधींमधीं दृष्टीस पडणारा किं० चुकारतट्टू नोकर; उ० हा चाकर एकादे वेळेस चांदसलामी सारखा दृष्टीस पडतो. **चांदरात स्त्री०** अमावास्येनंतरची प्रथम चंद्रदर्शन होते ती रात्र. **चांदरात झडणें** महिन्यांतील नोकरीचे दिवस मोजून कामगाराला पगार देणें.

चांदई स्त्री० दुपाखी घराची आढ्यापर्यंतची उंच भिंत; चांधई.

चांदकी, चानकी स्त्री० लहानशी भाकरी.

चादड वि० म्हातारा आणि अशक्त (माणूस किं० जनावर).

चांदणी [**सं०** चंद्र] **स्त्री०** १ आकाशांतील तारा. २ स्त्रियांचा डोकींत घालावयाचा राखडीसारखा एक दागिना. ३ घोडा दाणा खात असतां त्याच्या पाठीवर झूल इ० कांहीं आच्छादन नसलें तर त्याला होतो जो रोग तो (**क्रि०** पडणें). ४ घोड्याचें एक अशुभ-चिन्हविशेष. ५ छायेसाठीं पटांगणांत बांधतात तें वस्त्र. **एकाद्याची चांदणी तरारणें** तो भीति, क्षुधा, राग, इ० कारणांनीं उग्र, अस्वस्थ, किं० कावराबावरा दिसणें; उ० रामूला दोन प्रहरांपर्यंत खावयाला न घातलें तर त्याची चांदणी तरारते. **चांदण्यांत निजणें आणि माडीची हवा पाहाणें** दारिद्र्याच्या स्थितींत असून श्रीमंतीचे सुखविलास अपेक्षिणें (हा मूर्खपणा होय). **चांदणा पाख पु०** महिन्याचा शुक्ल पक्ष. **चांदणी रात्र स्त्री०** महिन्याच्या शुक्लपक्षांतलि रात्र.

चांदणें [**सं०** चंद्र; **म०** चांद] **न०** १ चंद्रप्रकाश. २ चंद्र नसतां म्हणजे कृष्णपक्षांत रात्रीं जो ताऱ्यांचा प्रकाश पडतो तो. ❀ **पिठासारखें चांदणें पडणें** चंद्राच्या आड ढग नसतां स्वच्छ जें चांदणें पडतें तें.

चादर [**हिं०**] **स्त्री०** रुजामा, गादी, इ० वर मळ लागूं नये म्हणून जें आच्छादन (बहुधा पांढरें) घालतात तें.

चांदर [**म०**चांद; **सं०** चंद्र] **वि०** कपाळावर पांढरा ठिपका असलेली (गाय, बैल, इ०).

चांदला [**म०** चांद; **सं०** चंद्र] **पु०** १ स्त्रिया कपाळावर शोभेसाठीं लावतात ती टिकली (धातूची, काचेची, किं० दुसरी कसली तरी). २ गंधाचा कपाळावर लाविलेला मोठा टिळा.

चांदवड पु० १ एक वृक्षविशेष. २ कुंभा, बाभूळ, इ० झाडांची सोडवून काढलेली साल.

चांदवडी वि० महाराष्ट्रांतील चांदवड नांवाच्या गांवीं घडविलेला (रुपाया इ० नाणें).

चांदवा [**सं०** चंद्र; **म०** चांद] **पु०** १

मांडव, पलंग, पाळणा, इ० वरचें छत. २ स्त्रिया कपाळावर कुंकवाखालीं शोभेसाठीं चिकटवितात ती टिकली. ३ कपाळपट्टीच्या टोपीचा किं० इतर प्रकारच्या टोपीचा वरचा वर्तुळाकार भाग.

चांदवेल स्त्री० एक वेल.

चांदा, चांद्या [**म०** चांदें] **वि०** कपाळावर पांढरा ठिपका असलेला (बैल, गाय, इ०). वर 'चांदर' पहा.

चांदी स्त्री० १ निर्मळ रुपेंधातु. २ रुपें (सामान्यतः). ॐ **एकाद्या वस्तूची चांदी करणें** ती विध्वंसिणें; तिचा नाश करून टाकणें.

चांदुकली [**म०** चांद; **सं०** चंद्र] **स्त्री०** लहानशी पोळी.

चांदें न० बैल, गाय, इ० च्या कपाळावरील पांढरा ठिपका.

चांदोबा [**सं०** चंद्र; **म०** चांद] **पु०** चंद्र (मुलांच्या भाषेंत).

चांद्र [**सं०**] **वि०** १ चंद्राचें; चंद्रासंबंधाचें. २ चांद्रमानाचें. **पु०** १ चंद्रकान्त मणि. २ शुक्ल-पक्ष. **न०** चांद्रायण नांवाचें व्रत. ॐ **चांद्रमान न०** चंद्राच्या स्थितिगतीवरून केलेली गणना. **चांद्रायण न०** पौर्णिमेस पंधरा घास खाणें आणि नंतर कृष्णपक्षांत रोज एक एक घास कमी करून शुक्ल पक्षांत पुन्हा एक एक घास वाढविणें असें व्रत. **चांद्रमास पु०** चंद्र एकदा पूर्ण झाल्या-पासून पुन्हां पूर्ण होईपर्यंत किं० एका रात्रीं मुळींच न दिसल्यापासून पुनः दिसेनासा होईपर्यंत जाणारा काळ; हा सुमारें साडे एकुणतीस दिवसांचा असतो.

चांधई स्त्री० दुपाखी घराची आढ्यापर्यंत उंच जी भिंत ती; चांदई.

चानी स्त्री० खार ह्या नांवाचा प्राणी.

चानूक स्त्री० ' चुणूक ' पहा.

चाप [**सं०**] **पु०, न०** १ धनुष्य. २ (**गणित**) वर्तुळार्ध. ३ (**ज्योतिष**) धन. ॐ **चापकर्ण पु०** वर्तुळाच्या परिघाच्या खंडाचीं अग्रें जोडणारी रेषा.

चांप [**हिं०**] **पु०** १ मळसूत्र फिरविल्यानें हावा तितका दाब घालण्याचें एक साधन. २ छळ करण्याचें यंत्रविशेष,—हें कानाला लावावयाचें असतें. ३ कानाची पाळ. **एकाद्याला चाप लावणें** त्याला छळणें.

चांप स्त्री० उडी (**क्रि०** करणें).

चापचणें ' चाचपणें ' पहा.

चापट वि० चपटा; सपाट; बसका; उंच घड-णीचा नव्हे तो (पदार्थ).

चापट स्त्री० तळहातानें शरीरावर केलेला प्रहार; चपराक; चापटी. ॐ **चापटपोळी स्त्री०** चपराक (विनोदी भाषेंत).

चापटणें स० क्रि० १ चपटें करणें. २ चपराक लगावणें.

चापटी स्त्री० १ तळहातानें गात्रादिकांवर केलेला प्रहार. २ चपटी केलेली कोणतीही वस्तु.

चापणें स० क्रि० १ चपटें करणें. २ चेपणें. ३ (लाच, पैसे, इ०) खाणें किं० मारणें. ४ एकाद्याला रागें भरणें किं० तंभी भरणें.

चांपणें स० क्रि० चांचपणें; स्पर्शेंद्रियानें जाणणें; चेपून पाहाणें.

चापती स्त्री० १ जड पदार्थ स्थानापासून हालवि-ण्यासाठीं किं० सरकावण्यासाठीं किं० उचलावया-साठीं त्याच्याखालीं घातलेला दांडा. २ बैलाचा गळा जुवाशीं बांधण्याची जी दोरी किं० जो कात-ड्याचा पट्टा असतो तो; सापती.

चापल्य [**सं०**] **न०** १ शीघ्रपणा. २ चंचल-पणा. ३ चपलपणा. ४ वळवळ.

चांपसणें अ० क्रि० स्पर्शेंद्रियानें जाणणें.

चापा पु० कानाची पाळ.

चांपा, चांफा [**सं०** चंपक] **पु०** १ चंपक नांवाचा वृक्ष.

चांपा पु० आतिषबाजींतील लहानसा बाण.

चांपें [**म०** चांफा; **सं०** चंपक] **न०** १ चाफ्याचें फूल. २ फणसामध्यें आठळीवांचून जो गऱ्यासारखा खाद्यांश असतो तो. ३ कानाची पाळ. ॐ**चांपेकळी स्त्री०** १ चांफ्याच्या फुलाची कळी. २ चांफ्याच्या फुलाच्या कळीसारखें एक कर्णभूषण. **चांपेकळ्यांची माळ स्त्री०** चांफ्याच्या फुलाच्या कळ्यांसारख्या सोन्याच्या आकृति करून त्या गुंफून करतात ती गळ्यांत घालावयाची माळ.

चापखण पु० १ घराचा सर्वांत मोठा खण. २ प्रायः चौसोपी घराला दोन सोप्यांच्या संधीस

जो मोठा खण आलेला असतो तो. ३ माजवर.

चांवऊ स्त्री० ऊ म्हणून जो क्षुद्र प्राणी आहे त्याची एक जात.

चावडा पु० जनावरांचा जवडा.

चावरणें अ० क्रि० भयादिकानें घावरून भलतें भलतें बोलूं लागणें.

चावा [**सं०** चर्वण; **म०** चावणें] **पु०** १ चावून खाणें. २ जेवण (करणें, पाडणें). ३ खाण्याची क्रिया; उ० ह्या पोराचा दिवसभर चावा चाललेला असतो. ४ खाद्य पदार्थ.

चाबुकणें, चावकणें स० क्रि० चाबकानें मारणें.

चावू [**म०** चावणें] **वि०** १ जो एकसारखा कांहीं तरी खात असतो तो. २ जो एकसारखा खावयाला मागत असतो तो.

चाबूक [**हिं०**] **पु०** घोडा, बैल, इ० ना मारावयासाठीं काठीच्या टोकाला दोरी, कातड्याची वादी, इ० बांधून करतात तें साधनविशेष. ॐ **एकाद्याच्या अंगावर चाबूक ओढणें** त्याला चाबकानें मारणें; त्याला चाबकाचा फटकारा लगावणें. **चाबुकस्वार पु०** पाठीवर स्वारी वहावयाला घोडा शिकवून तयार करतो तो. **चाबुकस्वारी स्त्री०** चाबुकस्वाराचा धंदा.

चांबोटा पु०, चांबोटी स्त्री० १ हात किं० पाय बांधावयाचा पट्टा. २ कातड्याचा पट्टा.

चाभरा [**हिं०**] **वि०** बडबड्या.

चाभाड न० जबडा.

चांभार [**सं०** चर्मकार] **पु०** कातड्याचे पदार्थ बनविणारा. २ जोडे इ० पायतणें करणारा कारागीर. ॐ **चांभाराची नजर पायांकडे** आपआपला धंदा कोणच्या रीतीनें वाढेल, कोणत्या रीतीनें तो लाभदायक होईल, इ० गोष्टी पाहाण्याकडे लोकांचें लक्ष्य असतें. **एकाद्याला चांभाराच्या कुंडाचें पाणी पाजणें** जारण मारण इ० कर्में त्याच्यावर कोणी केलेलीं असल्यास त्याला चांभाराच्या दगडी पात्रांतील पाणी प्यावयाला देणें. असें पाणी प्याल्यानें त्या कर्मांचा अनिष्ट परिणाम टळतो अशा समुजुतीवरून हा वाक्प्रचार उत्पन्न झाला आहे. **चांभारकी स्त्री०** चांभाराचा धंदा. **चांभारडा पु०** चांभार (तुच्छतेनें). **चांभारगोचीड, चांभारी गोचीड, चांभाऱ्या गोचीड पु०, स्त्री०** १ गुरांच्या अंगावर चिकटून राहून त्यांचें रक्त शोषून घेऊन त्यांना उपद्रव करणारा गोचिडीसारखा एक क्षुद्र प्राणी. २ कोणीही लोचट मनुष्य,—जो माणसाची पिच्छी पुरवून सतावतो. **चांभारचतुराई स्त्री०** १ पदार्थ विकत देतांना किं० घेतांना फाजील चिकित्सा किं० जिकीर करण्याचा स्वभाव किं० गुण. २ पदार्थांत किं० माणसांत दोष काढून काढून आपला दर्दीपणा दाखवूं पाहाणारा. **चांभारचौकशी स्त्री०** १ फाजील चौकशी किं० विचारपूस. २ आपला जिच्याशीं संबंध मुळींच नाहीं त्या गोष्टीची चौकशी. **चांभारफट स्त्री०** मानभावीपणाचें भाषण. **चांभारचाळवणी स्त्री०** गिऱ्हाइकानें करावयाला सांगितलेला पदार्थ आज देतों उद्या देतों असें म्हणून त्याला लांबणीवर टाकणें. हा गुण एकट्या चांभारांतच असतो असें नव्हे तर बहुतेक सर्व कारागिरांत आणि धंदेवाल्यांत असतो. **चांभारवाडा पु०** गांवातील चांभारांच्या वसतीचा मोहल्ला. **चांभार (-री-) हिरडा पु०** रंगाच्या उपयोगाचा हिरडा. बाळहिरडा आणि सुरवारी हिरडा ह्या हिरड्याच्या अन्य जाति.

चाम [**सं०** चर्मन्] **न०** कातडें किं० चामडें. ॐ **चामाचे दाम चालविणें** १ जें नाणें चालू नाहीं किं० जें नाणें पथकरावयाला लोक कबूल नाहींत तें त्यांच्या बोडक्यावर बसविणें; ज्या नाण्याची जी वास्तविक किंमत नाहीं ती पाशवी सामर्थ्याच्या जोरावर लोकांना पथकरावयाला लावणें. २ जुलमी राज्यपद्धति पाशवी सामर्थ्याच्या जोरावर चालविणें. **चामखीळ** [**सं०** चर्मकील] **पु०** त्वचेवर बारीक फोडासारखी झालेली वाढ.

चामऊ [**म०** चाम=कातडें; ऊ एक क्षुद्र प्राणी] **स्त्री०** एक क्षुद्र प्राणी (प्राण्यांच्या शरीरांवर वसति करून त्यांचें रक्त शोषिणारा).

चामखीळ पु० वर ' चाम ' मध्यें पहा.

चामट [**सं०** चर्म] १ चिवट; मृदु असून लवकर न तुटणारा किं० फाटणारा (पोळी इ०). २ लोचट; कितीही झिडकारला तरी आपला हेका न सोडणारा.

चामडी [**सं०** चर्मन्] **स्त्री०** अंगाचें कातडें. ॐ **एकाद्याची चामडी लोंबविणें** त्याला खूप चोप देणें.

चामडें [सं० चर्मन्] न० कातडें.

चामफोड पु० ' चाम ' मध्यें ' चामखीळ ' पहा. [ढाळणें).

चामर [सं०] न० चंवरी (वारणें,

चामीकर [सं०] न० सोनें. [वांदी.

चामोटा पु०, **चामोटी** स्त्री० कातड्याची

चाम्हार, चाम्हारकी इ० वर ' चांभार ' ' चांभारकी, ' इ० पहा.

चार, चार चार पु० अ० व० वेडे वेडे चाळे (करणें). ॐ **चारां चारांनीं बोलणें, खाणें,** इ० चोखंदळेपणानें, नाजूकपणाच्या ऐटीनें, किं० दिमाखानें बोलणें,खाणें,इ०.

चार स्त्री० १ हिरवें कोंवळें गवत. २ गुरांनीं खावयाजोगा पाला इ०. ३ फणसाच्या पोटांत गऱ्याच्या भोंवतीं जे बारीक बारीक अवयव असतात ते. ' चार ' हा शब्द ' हिरवा ' ह्याचेपुढें गडदपणा दाखविण्यासाठीं योजतात; उ० हिरवाचार. ॐ **चारगटा** पु० कोंवळ्या फणसाची भाजी. **चारकूट** न० कोठें कोठें रुझलेलें लहान तृण किं०अशा तृणानें आच्छादित जमीन. **चारखंड** न० फणसाचें चारासकट साल.

चार [सं०] पु० हेर; गुप्त रीतीनें बातम्या आणणारा. ॐ **चारचक्षु, चारेक्षण** पु० १ राजा. २ मुत्सद्दी. **चारचण, चारचंचू** वि० ऐटींत चालणारा.

चार [सं० चतुर्] वि० १ एक, दोन, तीन, इ० क्रमांकांतील चवथा अंक. २ अल्प संख्या दाखविण्यासाठीं ' चार ' हा शब्द योजतात; कांहीं थोडेंसें; उ० चार गोष्टी मी त्याला सांगितल्या तेव्हां तो कबूल झाला; उ० तो चार पैसे बाळगून आहे. ॐ **चार गोष्टी लावणें** (किं० **करणें**) हेकटपणा करीत बसणें. **चार घेणें चार देणें** किरकोळ अप्रिय गोष्टी मनावर न घेतां एकमेकांशीं सलोख्यानें वागून एकमेकांच्या उपयोगीं पडणें. **एकाद्याचे दोन हातांचे चार हात होणें** त्याचें लग्न होणें. **एकाद्याशीं एकाद्याचे चार हात होणें** त्याच्याशीं त्याची मारामारी किं० बोलाचाली होणें. **चार अक्षरें** न० अ० व० थोडीशी विद्या. **चार कळशा** पु० ब्राम्हणेतरांची एक जात. ' चौकळशा ' असाही ह्याच अर्थाचा शब्द आहे. **चारका** पु० फाशांच्या खेळांतील एक दान. **चार खाणी** स्त्री० अ० व० सृष्टींतील पदार्थांच्या चार जाति; १ अंडज (पक्षी, मासे, इ०); २ जरायुज (मनुष्य, गाय, इ०); ३ स्वेदज (कृमि, कीट, इ०); उद्भिज्ज (द्राक्ष, फणस, इ०). **चार खुंट जहागीर** स्त्री० १पृथ्वीच्या चार कोपऱ्यांपर्यंत जाऊन ठेपलेली जहागीर; सार्वभौमत्व. २ माधुकऱ्याचें ऐश्वर्य,—जें झोळीच्या फडक्याच्या चार कोपऱ्यांपर्यंत पसरलेलें असतें म्ह० भाताच्या उंडया, भाकऱ्यांचे तुकडे, इ०. **चारचौघे** पु० अ० व० लोक (सामान्यतः); उ० चार चौघांत जें बरें दिसेल तें करावें. **चार जमा, चार जामा** पु० १ ज्यास लाकडाचें खोड नाहीं असा खोगिरांत एक भेद आहे तो;हें चौपदरी वस्त्राच्या रूपाचें असतें.२घोडयाच्या खोगिरावर घालावयाचें झालरींनीं शोभिवंत असें एक प्रतिष्ठित वस्त्र.३घोडयावर खोगीर वगैरे घालून आरोहणाला सज्ज करण्याची क्रिया. **चार दाणे** पु०अ०व०तिफाशी खेळांतील एक दान.**चार बैली** वि० चार बैलांनीं ओढली जाणारी गाडी, मोट, इ०. **चार वाणी** स्त्री० स्वरांचे चार वर्ग; परा, पश्यंती, मध्यमा,आणि वैखरी.**चारही ठाव**,(किं० **चारी ठाव**) **जेवण** न० ताटाच्या चारी बाजूंस (म्ह०सर्व बाजूंस) खाद्यें वाढलेलीं असून त्या ताटांत जें जेवण तें; श्रीमंती जेवण. **चार घटका** स्त्री० अ०व०१थोडासा वेळ.२बराचसा वेळ.**चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे** सासूच्या वैभवाचे दिवस असतां ती सुनेवर अधिकार चालविते; पुढें सून मोठी होऊन करती सवरती झाल्यावर घरांत तिचा अधिकार चालतो आणि सासूचें महत्त्व कमी होतें. मनुष्याचें वैभव सदोदित सारखें टिकत नाहीं. **चारी दिशा मोकळ्या होणें** वाटेल तिकडे जाण्याला मोकळीक प्राप्त होणें.

चारण [सं०] पु० विद्याधर, सिद्ध, किन्नर, चारण, इ० ज्या देवांच्या जाति त्यांतील एक.

चारण [सं० चर्=चालणें] पु० बैलांच्या पाठीवरून धान्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं वाहून नेऊन उपजीविका करणारी जी हिंदूंची जात तींतील कोणीही इसम. स्त्री० चारणीण.

चारण [सं० चर्=चरणें, खाणें] स्त्री० ज्या स्थळीं बहुत चारा आहे असें ठिकाण; उ० भाकड गुरें चारणीस पाठवितात.

चारणें [सं० चर्=खाणें; म० 'चरणें' चें प्रयोजक] स० क्रि० १ खावयाला देणें; खाऊं घालणें; खावयाला नेणें (गाय, म्हैस, इ० ना कुरण इ० मध्यें); उ० लहान मुलाला औषध, पौष्टिक खाद्य, इ० देणें. २ (लाच) देणें; उ० त्या कारकुनाला दहा रुपये चारले तेव्हां त्यानें मला ही जागा दिली.

चारा [हिं०] पु० १ गुरांना खावयाजोगें गवत इ०. २ पक्षी वगैरेंचें भक्ष्य.

चाराचुरा पु० एका किं० अनेक पदार्थांचे तुकडे समुच्चयानें.

चारी स्त्री० मोटेच्या विहिरीची उतरण (जी-वरून बैल मागेंपुढें जातात).

चारु [सं०] वि० १ प्रिय. २ सुंदर.

चारोळी स्त्री०,**चारोळें** न०१ चार नांवाच्या वृक्षाची बी. २ चंदनाच्या झाडाची बी.

चार्वाक पु०एक नास्तिकमतप्रवर्तक;जडवादी.

चाल [म० चालणें] स्त्री०१ चालणें; चालण्याची क्रिया; चालण्याचा व्यापार. २ चाललेल्या अंतराचें परिमाण; उ० आज ह्या घोड्याला पंचवीस मैलांची चाल पडली. ३ चालण्याची रीति, शैली, प्रकार, ढब (माणसाची, जनावराची). ४ रूढि, प्रचार, परिपाठ, आचार, रीति. ५ एकाद्या विशिष्ट नाण्याचा एकाद्या विशिष्ट प्रांतांत प्रचार. ६ निर्वाह; अडचणीची वेळ भागविणें; उ० माझा मुकटा आज धुतला आहे ह्मणून मी धाबळीवर चाल करतों ! ७ प्राबल्य; वरचष्मा; उ० गोविंदपंतांपाशीं रामभाऊंची चाल होती तोंपर्यंत त्याच्या विरुद्ध ब्र काढण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. ८गाणें,पद,श्लोक, इ० म्हणण्याची धाटणी. ९ एकाद्या देशावर केलेली स्वारी; उ० तैमूरलंगानें हिंदुस्थानावर चाल करून फार द्रव्य आपल्या देशांत नेलें. १० पूर्वी बांधलेली भिंत नंतर कांहीं दिवसांनीं लांबवावयाची असतां त्या भिंतीची कड नव्या भिंतीशीं सांधेमोड होण्यासाठीं उखीरवाखीर ठेविलेली असते ती कड ॐ **एकाद्या देशावर चाल करणें** त्या देशावर स्वारी करून जाणें. **चालचर्या** स्त्री० रीतभात; वर्तनपद्धति; बोलण्या चालण्याचा प्रकार. **चालचलन, चालचलणूक, चालचलाण** स्त्री०, **चालचलाव** पु० वर्तणूक; वागण्याची रीति. **चालचलाऊ** वि० १ सध्यांची गरज भागविणारा. २ स्वताची सोय करून घेणारा. **चालचलाक** (-ख) वि० चालण्याला चांगला (मनुष्य, घोडा, इ०). **चालढकल, चालढाल** स्त्री० १ कांहीं जरूर करावयाचें असें काम आळस, द्रव्याभाव, फुरसतीचा अभाव, इ० कारणांमुळें लांबणीवर टाकणें. २ पुरेशी साधनसामुग्री नसतां यथाकथंचित् निर्वाह; कशी तरी नड भागविणें; गरज भागविणें. **चालढाल** पु० रीति; संप्रदाय; परिपाठ. **चालीवजा** [म० चाल+वजा] वि० १ रूढीला अनुसरून असलेला; नेहेमींसारखा. २गरज भागविण्याजोगा (अति उत्कृष्ट नसून).

चालक [सं०] वि० १ चालविणारा; प्रेरक; मुख्य; सूत्रधार; उ० ह्या संस्थेचा चालक कोण आहे ? उ० ह्या यंत्राची वीज ही चालक शक्ति आहे. २ इतरांपेक्षां अधिक जलद चालणारा (मनुष्य, घोडा, इ०). ॐ **चालकबाऊ** पु० पायाचा एक रोग. **चाळकबाबू, चालकबाऊचा मणि** पु० चालकबाऊ हा रोग झाला असतां घोड्याला बांधतात ती गारगोटी किंवा कांचेची अंगठी.

चालका [म० चालणें] वि० १ चालणारा; चालावयाला समर्थ. २चालूं लागलेलें (मूल). ॐ **चालका बोलका** वि० १ चालूं बोलूं लागलेलें (मूल). २ मोकळ्या मनानें बोलणारा(माणूस).

चालणें [सं० चल्=सरकणें] अ० क्रि० १ पायांना कांहीं विशिष्ट प्रकारें गति देऊन पुढें जाणें किं० एका स्थानापासून दुसऱ्या स्थानाकडे जाणें; उ० मी आज सात कोश चालून आलों. २ कांहीं उद्योग, धंदा, काम, इ० केलें जात असणें, किंवा होत असणें, किं० घडत असणें; उ० बारामतीला गोविंदपंत शिरसाट यांची वकीली चालत नाहीं; उ० त्रिकमशेटचें कापडाचें दुकान चांगलें चाललें आहे. ३ काळ, दिवस, घटका, इ० अतिक्रांत होणें किंवा होत असणें; उ० माझे दिवस येथें फुकट चालले आहेत. ४ अखंडित क्रमानें येणें,

जाणें, होणें, किं० घडणें; अखंडित किंवा अबाधित रीतीनें टिकून असणें किं० राहाणें; उ० आमच्या घराण्यांत पंधरा पिढ्या हरिदासवृत्ति चालली आहे. ५ लागूं पडणें; परिणामकारक होणें; उ० हें औषध डोकें दुखण्यावरचें आहे, तें अर्धशिशीवर चालत नाहीं. ६ देववेवीच्या व्यवहारांत पथकरलें जाणें (कांहीं नाणें). ७ इलाज, युक्ति, खटपट, प्रयत्न, इ० फलद्रूप होणें; इष्ट कार्याला उपयोगीं पडणें. ८ खपणें; सोसलें जाणें; मान्यता मिळविणें; उ० तुझ्या ह्या चेष्टा येथें चालणार नाहींत. ९ वर्तणें; वागणें; उ० वडील माणसें सांगतील तसें चालावें. १० आपआपलें काम किं० कर्तव्य करीत असणें; ज्या कार्यासाठीं एकाद्या पदार्थाची योजना केलेली असेल तें कार्य त्या पदार्थानें यथायोग्य रीतीनें करणें; उ० तुमचें घड्याळ चांगलें चालतें काय ? ११ उपयोगीं पडणें; कार्यनिर्वाहक होणें. ॐ **चालला तर गाडा नाहीं तर नाडा** (किं० **खोडा**) एकादा माणूस किं० पदार्थ तें तें काम योग्य प्रकारें करीत असला तर तें सोयीचें असतें नाहींतर त्याची उलटी अडचण होते. **चालून जाणें** हल्ला करणें किं० हल्ला करावयाला जाणें.

चालता [म० चालणें] वि० १ चालत असलेला; चालूं असलेला. २ हल्लीं उपयोगांत असलेला; सध्यांच्या कामाला किं० गरजेला लागूं पडणारा. ३ सध्यां ज्याचा उपयोग आहे असा. ४ रूढ; प्रचारांत असलेला; प्रचलित. ॐ **चालतें काम न०** सध्यांची गरज भागविण्याची ताकद किं०सामर्थ्य (एकाद्या वस्तूचें ठायीं उत्पन्न केलेलें); उ० ह्या गाड्याचें चालतें काम सुतारानें केलें. ॐ **चालता काळ पु०** एकाद्या माणसाचा वैभवाचा काळ; सद्दीचा काळ. **चालतें बोलतें मूल न०** जें मूल चालूं शकतें आणि बोलूं शकतें तें. **चालतां बोलतां क्रि० वि०** १ झपाट्यानें, कंटाळवाणा न होतां (काळ जाणें); उ० हे सात महिने चालतां बोलतां निघून जातील. २ एकाएकीं; अकस्मात्. ३ विशेष श्रम न करतां; अनायासें; सहजासहजीं. **चालतें नांव न०** सामान्य व्यवहारांत जें नांव लोक ओळखतात किं० वापरतात तें; व्यावहारिक नांव; याच्या उलट'कागदोपत्रीं चालणारें नांव.' **चालत्या गाड्याला खीळ घालणें** सुरळीतपणें चालत असलेल्या कामांत विघ्न आणणें; सुरळीतपणें चाललेल्या गतीला प्रतिबंध करणें.

चालन न०, चालना स्त्री० [सं०] १ चालविण्याची, चाळविण्याची, खालीं वर करण्याची, किं० मागें पुढें सरकावण्याची क्रिया. २ प्रचारांत किं० वहिवाटींत आणण्याची क्रिया. ३ ग्रहादिकांचें अस्तोदयांचें अंतर जाणून क्षेपक कल्पितात तें. ४ एखाद्या विशिष्ट ग्रहाची स्थिति एकाद्या विशिष्ट समयीं कोठें असेल इ० काढावयासाठीं जें गणितकृत्य करावें लागतें तें. ५ ज्योतिषगणनेंत कालेंकरून पडलेली चूक दुरुस्त करण्यासाठीं वजाबाकी, मिळवणी, इ० रूप जे संस्कार करावे लागतात ते समुच्चयानें. ६ शिकलेला विषय जिवंत ठेवण्यासाठीं केलेली उजळणी. ७ कांहीं कार्यासाठीं केलेली प्रेरणा.

चालविणें [म० ' चालणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ चालू ठेवणें; चालूं करणें; प्रचलित करणें. २ पथकरावयास किं० मान्य करावयास लावणें किं० भाग पाडणें. ३ प्रचारांत आणणें; रूढ करणें. ४ लागूं करणें. ५ झिजलेलें किं० खोटें नाणें दुसऱ्याला शिताफीनें घ्यावयाला लावणें किं० त्याला तें त्याच्या लक्ष्यांत न येईल अशा रीतीनें देणें. ॐ **चालवून घेणें** पाहिजे आहे ती वस्तू किं० पाहिजे आहे तशी वस्तू नसल्या कारणानें होणारी अडचण न भासेल किं० न जाणवेल असें करणें.

चालीवजा वर ' चाल ' मध्यें पहा.

चालूं [म० चालणें] वि० १ सध्यां रूढ असलेला. २ सध्यां चालत असलेला; प्रचलित.

चालूक [म० चालणें] वि० जलद चालणारा.

चाव पु० अ० व० गोलण्यांत, चालण्यांत, पोषाखांत, खाण्यापिण्यांत, केलेला छांदिष्टपणाचा प्रकार.

चावट वि० १ चिवट, लोचट, (पोळी, इ० खाद्य). २ असभ्यपणा करणारा; असभ्यपणानें बोलणारा. ३ निरर्थक भाषण करणारा. ४ फार वापर पडल्यामुळें सईल झालेला (मळसूत्र,बिजागरी, कडी, इ० पदार्थ).

चावडी [हिं०] स्त्री० कोतवालाची काम

करावयाची जागा. २ गांवांतील सार्वजनिक जागा. ३ रिकामटेकड्या लोकांची गप्पा गोष्टी करावयाची जागा.

चावणें [**सं०** चर्व्=चावणें] **स० क्रि०** १ दांतांनीं कणरूप करणें. २(सर्प, उंदीर, इ०कांनीं) दंश करणें. ३ (लाच) घेणें किं० खाणें. ४ दुसऱ्याचा पैसा आपल्या वहिवाटींत असतां त्यांतील कांहीं भाग लाटणें. **अ० क्रि०** १ दांतांनीं कणरूप करतां येणें किं० कणरूप करणें शक्य असणें. २ उंदीर, विंचू, सर्प, इ० नीं दंश करणें. ३ (पोट, डोकें) दुखणें.॰ **चावून घालणें** कोणेकाला कांहीं गोष्ट बजावून बजावून आणि अनेक वेळां आग्रहपूर्वक सांगणें.**चावून चिकट करणें**१फार लोचटपणामुळें आपलें काम बिघडवून घेणें;आपखुषीनें कोणी जें कांहीं देत असेल तें लोचटपणानें अधिक मागून मागून त्याला त्रास देऊन कमी करून घेणें. २ लोकांना त्रास येण्याइतके वेळां एकाद्या गोष्टीबद्दल बोलणें. **चावून चावून क्रि० वि०** काटकसरीनें (पैसा खर्चणें, संसार करणें, इ०).

चावणें न० घराच्या खांबाची उंची वाढविण्यासाठीं खांबाच्या माथ्यावर आणि तुळईच्या खालीं जो लाकडाचा तुकडा बसवितात तो.

चावादिवस,चावदीन [**म०**चावणें+दिवस] **पु०** १ आश्विन कृष्ण चतुर्दशी म्हणजे नरकचतुर्दशी हा दिवस; ह्या दिवशीं लोक मित्रमंडळीच्या आणि नातलगांच्या घरीं जातात तेव्हां त्यांना पोहे चावावयाला म्हणजे खावयाला देऊन त्यांचा सत्कार केला जातो. २ कोणत्याही महिन्याची वद्य चतुर्दशी.

चावनट [**म०** चावणें] **वि०** १ त्या त्याच गोष्टीबद्दल एकसारखी वटवट करणारा. २ वात्रट, फाजील (माणूस).

चावर पु० १ एकशेवीस बिघे क्षेत्रफळ;चाहूर. २ शेतकामाचें एक आऊत,–उसासाठीं खोल चर करण्याच्या कामाचें.

चावरा [**म०** चावणें] **वि०** चावण्याची खोडी ज्याला आहे असा (घोडा, मूल, इ०).

चावरा पु० नांगर हाकणाराचा चाबूक.

चावरी [**म०** चावणें] **स्त्री०** गुरांनीं चावून किं० अर्धवट चघळून टाकून दिलेलें गवत, कडबा, इ० खाद्य.

चावरी [**म०** चौ=चार] **स्त्री०** चार पायांची लहानशी घडवंची.

चावरी स्त्री० चार बैलांनीं ओढावयाची मोट, नांगर, इ० ना बांधलेला जो दोर किं० सोल त्याचा अगदीं पुढचा भाग,–जो पुढच्या जोडीच्या बैलांच्या जुंवाला बांधलेला असतो. ॰ **चावरी बैल,चावरे बैल पु० अ० व०** चार किं०अधिक बैली नांगर, मोट, इ० ओढणारे जे बैल त्यांच्यापैकीं अगदीं पुढच्या दोन बैलांची जोडी. **चावरी मोट स्त्री०** बैलांच्या दोन किं० अधिक जोड्यांनीं ओढावयाची मोट. **चावऱ्या आसूड पु०** नांगर हाकणाऱ्याचा चाबूक.

चावळणें [**म०** चावणें] **अ० क्रि०** वरळणें; भलभलतें बोलणें; असंबद्ध रीतीनें बोलणें.

चावा [**म०** चावणें] **पु०** १ दंश (घेणें). २ दंशाचें चिन्ह. ३ चावून तोडून काढलेला भाग.

चावाचींव [**म०** चावणें] **स्त्री०** १ असंतुष्टपणाची पिरपीर. २ लोचटपणाची मागणी.

चावी [**पोर्च्युगीझ**] **स्त्री०** कुलूप काढावयाची किल्ली.

चाव्हरा पु० नांगर हाकणाऱ्याचा चाबूक.

चाव्हरी वर ' चावरी ' पहा.

चाष, चाश, चास [**सं०** चाष, चास] **पु०** एक पक्षिविशेष.

चाहटळ मागें ' चहाटळ ' पहा.

चाहड इ० मागें ' चहाड ' इ० पहा.

चाहणें [**हिं०** चाहना] **स०क्रि०** १ प्रिय मानणें; ०वर प्रेम करणें. २ इच्छिणें; उ० मी चाहीन तें करीन.

चाहुरी, वर ' चावरी ' पहा.

चाहूर पु०, न० १ एकशेवीस बिघे क्षेत्रफळ. २ दोहोंपेक्षा अधिक जोड्यांच्या नांगराची किं० मोटेची पुढची बैलांची जोडी.

चाहूल [**म०** चालणें+हूल] **स्त्री०** कोणी माणूस, जनावर इ० जवळ येत आहे किं० जवळून चालत आहे असें सुचविणारा ध्वनि, वास, इ० (लागणें, एकणें, इ०).

चाळ [**म०** चाळा] **वि०**नखरेबाज (स्त्री).

चाळ स्त्री० १ लांबीनें खूप मोठें आणि रुंदीनें फारच लहान असें घर. २ जनावरें बांधण्यासाठीं उभारलेला लांबच लांब सोपा, पडवी, इ०. ३ एकाच नमुन्याच्या अनेक खोल्यांचा पट्टा. ४ लहर (छांदिष्टपणाची).

चाळ पु० १ नाचणारे लोक पायांत जी घुंगुरांची माळ बांधतात ती. २ धोतरजोड्याचीं दोन पानें जेथें कापून वेगळीं करावयाचीं असतात तेथें वाण्याचे तंतु न विणतां जी रिकामी जागा सोडलेली असते ती; करळी. ३ खेळावयाच्या सागरगोट्यांचा संच. ४ खाडीच्या भरतीच्या पाण्यावरोबर आलेले मासे धरावयासाठीं केलेला खळगा.

चाळ [म० चाळणें] पु० १ शोध; तपास. २ हलवाहलव. ३ चाळणींत किं० सुपांत पीठ इ० घालून चाळून काढलेला अंश. ४ हिकमत, युक्ति, इ० ची वाटाघाट.

चाळक वि० खोडकर; व्रात्य. ꙮ **चाळकभवानी** स्त्री० १ खोडकर किं० व्रात्य स्त्री. २ नखरेबाज स्त्री.

चाळक [सं० चालक] वि० चालविणारा; चालू ठेवणारा; प्रेरक; उ० विश्वचालक, जगच्चालक, इ०.

चाळढाळ पु० अडचणीचें निवारण; किं० हें निवारण करण्याचा प्रयत्न; उ०कसेंही करून माझा चाळढाळ पांच रुपयांचा करावा; उ० कसाही चालढाळ करून रुपये देऊन टाका.

चाळण [म० चाळणें] स्त्री० १ धान्य, पीठ, इ० पदार्थांतील खडे,केर,इ० पृथक् करण्याचें एक सच्छिद्र पात्रविशेष. ३ जिला पुष्कळ झरे आहेत अशी विहीर. ३ अत्यंत विरविरीत आणि झिरझिरीत वस्त्र. ४ फार वापरल्यामुळें मधें मधें भोंकें पडलेलें वस्त्र. न० १ चाळण्याची क्रिया. २ चाळावयाचा पदार्थ (धान्यादि). ३ चाळण्याच्या क्रियेनें वेगळा झालेला केरकचरा इ०.

चाळणी [म० चाळणें] स्त्री०१ पीठ,धान्य, इ० चाळावयाचें सच्छिद्र पात्र. २ चाळण्याची क्रिया. ३ छपराचीं कौलें शाकारण्याची क्रिया.

चाळणें [म० ' चळणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ धान्य, माती, इ० पदार्थ पात्रविशेषांत घालून हालवून त्यांतील ग्राह्य आणि त्याज्य अंश पृथक् पृथक् करणें. २ घराचीं कौलें नीट रीतीनें बसविणें; शाकारणें. ३ शोधणें; धुंडाळणें; खालीवर इकडे तिकडे पदार्थ सरकावणें (इष्ट वस्तु सांपडावी म्हणून). ꙮ **चाळून पाळून** क्रि० वि० आळीपाळीनें.

चाळवण, चाळवणी, चाळवणूक [म० चाळविणें] स्त्री०आशा लावून दिरंगाईवर लोटणें.

चाळवणें [म० 'चळणें' चें प्रयोजक] अ०क्रि० १ खांडत होणें (झोप).२ बाजूस सरकणें. ꙮ **चाळणपुळी, चालणपुळी** स्त्री० हाडाच्या सांध्यांवर होणारा व्रण.

चाळविणें [म० ' चळणें ' पासून प्रयोजक] स० क्रि० १ सरकावणें; पदार्थ त्याच्यां स्थानापासून दूर करणें. २ (पदार्थ) इकडचे तिकडे आणि तिकडचे इकडे करणें. ३ ढवळणें. ४ आज उद्यावर ढकलणें.

चाळशी, चाळिशी [म० चाळीस] स्त्री० १ उपनेत्र, चष्मा. २ वयाचें चाळीसावें वर्ष. ३ चाळीस पदार्थांचा संच किं० समुदाय; ह्या अर्थी ' चाळिसा ' असा पुल्लिंगीही शब्द आहे.

चाळा पु० १ कांहीं गोष्ट (विशेषतः वाईट) वारंवार करण्याचा नाद किंवा सवय. २आवड किं० खोडी (लागणें). ३ चाळणीनें पदार्थ चाळल्यावर राहतो तो शेष. ४ पदार्थ जोडण्याचा सांधा; सांधेजोड; पदार्थ एकमेकांत जडविणें. ५ धोतर - जोडा इ० ची करळी. ६ एक पिशाच. ७ कोष्टयाच्या मागांत पावडा आणि पासरा ह्यांना जोडणारी दोरी. ८ कोष्ट्याच्या मागाचा ओवा किं० वही ज्यांना म्हणतात तो भाग. ꙮ **चाळाबोळा, चोळा बोळा** पु० १ पदार्थांची कुसकरणी; पदार्थ निष्काळजीपणानें वापरल्या कारणानें झालेली त्याची दुर्दशा (करणें, होणें). २ अव्यवस्थितपणें टाकलेले पदार्थ.

चाळीस [सं० चत्वारिंशत्] वि० वीसाच्या दुप्पट ही संख्या. ꙮ **चाळीस पत्र** न०चष्मा; उपनेत्र (बहुधा चाळिसाव्या वर्षी ह्या वस्तूची गरज लागते यावरून).

चाक्षुष [सं०] वि० १ डोळ्या संबंधाचा. २ दृग्गोचर. न० प्रत्यक्ष ज्ञान. पु० सहावा मनु.

चिऊ स्त्री० चिमणी (मुलांच्या भाषेंत).

चिकचिकणें अ० क्रि० घाम इ० नीं अंग इ० चिकट होणें.

चिकचिकीत वि० घाम इ० मुळें चिकट झालेलें (अंग, केश, इ०).

चिकट [म० चीक] **वि०** १ चिकटण्याजोगा; चिकटणारा. २ पदार्थ जोडण्याला समर्थ असा (डीक, खळ, इ०). ३ लोचट; हट्टी; हेका न सोडणारा. ४ श्रम, कष्ट, किं० त्रास सोसूं शकणारा; काटक.

चिकटणें अ० क्रि० १ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थास स्पर्श करून किं० लागून असणें किं० राहणें किं० स्थित असणें; उ० माझें शेत केदारीच्या शेताला चिकटलें आहे. २ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाच्या अगदीं जवळ येणें किं० येऊन राहणें; उ० जरा दूर बस; इतका माझ्या अंगाला चिकटूं नको. ३ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाशीं संलग्न होणें. ४ एकादी खोडी, संवय, किं० व्यसन जडणें; उ० त्याला तंबाखूचें व्यसन चिकटलें.

चिकटविणें, चिकटाविणें [म० 'चिकटणें'चें प्रयोजक] **स० क्रि०** १एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाशेजारीं ठेवणें. २ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाशीं संलग्न करणें. ३ एकादी गोष्ट एकाद्याच्या माथीं मारणें किं० लादणें किं० तिची जबाबदारी त्याचेवर ढकलणें; उ० पिंजऱ्यांतून राघू उडून गेला ही गोष्ट तूं मला चिकटावूं नको.

चिकटा [म० चिकटणें] **पु०** १ तेल, घाम, किं० अन्य कांहीं द्रव्य यामुळें शरीर, केश इ० दिकांवर बसतो तो मळाचा थर. २ जांत्यांच्या तळ्यांना चिकटून बसलेला पिठाचा थर. ३थोडासा पाऊस पडून गेल्यानंतर जमीनीवर जो किंचित् चिकट चिखलाचा थर जमतो तो. ४ जखमेंतून वाहाणारा दाट पू किं० रक्त यांचा येतो तो चिकट अंश. ५ गाय, म्हैस, इ०च्या स्तनांतून बाहेर पडतो तो चिकट दुधाचा अंश. ६ चिकटपणा; चिकणाई.

चिकटा पु० पुरुषांच्या नेसावयाच्या उपयोगाचें मुकटयासारखें एक रेशमी वस्त्र.

चिकटी स्त्री० १ डोकीच्या केशांत जो चिकट मल उत्पन्न होतो किं० जमतो तो. २ चिकटपणा; चिकचिकीतपणा. ३ जांत्याच्या तळ्यांवर जमून चिकटून बसतो तो पिठाचा थर.

चिकटें न०, चिकटा पु० सोंवळ्यासाठीं नेसावयाचें एक हलक्या दर्जाच्या रेशमाचें वस्त्र.

चिकण [सं० चिक्कण] **वि०** १ मऊ. २ स्निग्ध, चिवट, चिकट. ३ तुळतुळीत. ४ टणक; कठिण. ५ ज्यांत चिकटपणा विशेष आहे असा (गहूं, उडीद, तांदूळ, इ० पदार्थ). ६ ज्यांत कस विशेष आहे असें (दूध) किं० असें दूध देणारी (गाय, म्हैस, इ०). ७ द्रव्यसंपन्न (मनुष्य). ८ बळकट (मनुष्य). ९ पैसा खर्च करावयाला नाखूष (मनुष्य); चिक्कू. ॐ**चिकणमाती स्त्री०** जिचे अंगीं चिकटपणा विशेष आहे अशी माती. **चिकणचोपडा वि०** १ चिवट, टणक (माती, दगड, लाकूड). २ दडदडीत; वापर सोसावयाला समर्थ (वस्त्र, कपडा). ३ चकचकीत. **चिकणचोपडें न०** १ तेल ज्यांत विशेष असें खाद्य इ०.२तेल,चरबी,इ० मुळें स्निग्ध असा पदार्थ. **चिकणवट वि०** चिकणमाती ज्यांत विशेष असें (क्षेत्र).**चिकण (–णी–) सुपारी स्त्री०** कोंवळीं पोफळें दुधांत शिजवून सावलींत वाळवून त्यांची केलेली सुपारी.

चिकणाई [म० चिकण+आई (प्रत्यय)] **स्त्री०** १ तेलकटपणा. २ चिकटपणा.

चिकवडी [म० चीक+वडी] **स्त्री०** तांदुळाचें पीठ शिजवून त्याच्या बारीक बारीक गोट्या वस्त्रावर हातानें घालून उन्हांत वाळवून तेलांत तळून खावयाचें जें तोंडीलावणें करतात तें.

चिकसा पु० जोंधळ्याच्या पिठांत हळद आणि कांहीं सुगंधी द्रव्यें घालून अंगाला लावावयासाठीं जें उटणें करतात तें.

चिकाटी [म० चिकट] **स्त्री०** १ चिवटपणा. २ नेट; करारीपणा; इष्ट हेतु सफळ होईपर्यंत प्रयत्न चालूं ठेवण्याचा निग्रह. ३ बळाची परीक्षा पाहावयासाठीं एकानें दुसऱ्याचें मनगट धरावयाचें आणि दुसऱ्यानें तें सोडवून घ्यावयाचें हा जो प्रकार तो (धरणें, सोडविणें). ४ वादविवादाच्या प्रसंगीं एकानें दुसऱ्यास घातलेला नडविणारा प्रश्न. ५ पक्षी धरण्यासाठीं चिकट पदार्थ

(?)जिला लाविला आहे अशी काठी किं० तो चिकट पदार्थ. ६ स्वारानें घोड्यावर केलेली बैठक,–घोडा उचळला तरी सईल न पडणारी. ७ स्वस्थपणें किं० रेंगाळत कांहीं काम करण्याचा प्रकार.

चिकार क्रि० वि० पूर्णपणें; खच्चून; रिकामी जागा न राहील अशा रीतीनें; उ० सभेंत चिकार माणसें भरलेलीं होतीं; उ० ह्या खोलींत चिकार सामान भरलेलें आहे.

चिकारा पु० नावड; अप्रीति; खंती.

चिकित्सक [सं०] पु० १ वैद्य. २ मांत्रिक. ३ एखाद्या गोष्टीची फार बारकाईनें परीक्षा किं० वाटाघाट करणारा.

चिकित्सा [सं०] स्त्री० १ रोगाचा प्रतिकार; औषधादिकांचा इलाज करून रोगाचें निवारण. २ रोगाची परीक्षा. ३ बारकाईनें केलेली परीक्षा. ४ साधकबाधक गोष्टी मनांत घेऊन केलेली वाटाघाट. ५ फाजील चौकशी. ॐ **चिकित्साखोर** फाजिल चौकशी करणारा; भलभलते संशय किंवा शंका काढणारा.

चिकी स्त्री० १ हलक्या दर्जाचा गूळ; गुळाचा रांधा होतेवेळेस त्यावरून फेस काढून मळून करतात तो गूळ. २ पातळ गूळ; काकवी. ३ उडीद इ० चें पीठ शिजवून करतात ती खळ. ४ तावदानें चौकटींत बसविल्यावर तीं हालूं नयेत म्हणून जो लांबी इ० पदार्थ तावदानांच्या कडांना लावतात तो.

चिकीर वि० त्रासदायक किं० जिकीरीचें (काम किं० माणूस).

चिकीर्षा [सं०] स्त्री० करण्याची इच्छा.

चिकीर्षु [सं०] पु० करूं इच्छिणारा.

चिकू, चिक्कू वि० कवडीचुंबक; कृपण.

चिके क्रि० वि० थोडासा वेळ;उ० चिके रहा, मी आतां येतों.

चिकोटी वर 'चिकाटी' पहा.

चिकोरी स्त्री० मातीची पणती.

चिकर वि० लहान; चिमुकला.

चिखल [सं० चिकिल] पु० १ मातीचा गारा. २ रेंदा.

चिखलणें [म० चिखल] अ० क्रि० १ चिखलट होणें (पाणी किं० जमीन). २ चिखल्या नांवाच्या रोगानें पछाडलें जाणें. ३आवेशानें पुढें सरसावणें किं० चाल करून जाणें. स० क्रि० हत्ती, घोडा, इ० ना जल्द चालावयाची प्रेरणा करणें.

चिखल्या [म० चिखल] स्त्री० अ० व० पाण्यांत किं० चिखलांत फार वेळ चालल्यानें पायांच्या बोटांच्या बेचकांत होतो तो एक रोग. 'चिखल्या' असा नित्य अनेकवचनी प्रयोग होतो.

चिंगळ, चिंगळी, चिंगूळ स्त्री० १ लहान मासा. २ लहान वयाचा मासा. ३ लहान विंचू, खेकडा, इ०. ४ कोणतेंही कोंवळें लहान फळ (आंबा, फणस, इ०).

चिंगारी, चिंगोटी स्त्री० १ मुलांचा खेळावयाचा लहान भोंवरा. २ लहान मूल.

चिघळ पु० गूळ, साखर, मीठ, इ० पदार्थांस द्रव सुटतो तो; पाझर. स्त्री०एक शाकभाजी.

चिघळणें अ० क्रि० १ मीठ,गूळ, साखर,इ० पदार्थ हवेंतील जलांशानें पाझरणें. २ गळूं, खरूज, इ० पुवानें लडबडणें किं० त्यांतून पू वाहाणें.

चिघळया [म० चिघळणें] वि० हवेंतील जलांशानें लवकर पाझरूं लागणारा (गूळ, साखर, इ०). ॐ**चिघळया देवी** स्त्री० अ० व० ज्यांतून पू वाहतो अशा देवी. देवींचा दुसरा प्रकार 'कथल्या देवी'.

चिचूर वि० लहान, चिमुकला, खुजट.

चिंच स्त्री० एक आंबट फळ किं० त्या फळाचें झाड. ॐ **चिंचपानी** वि० चिंचेच्या पानाच्या रुंदीइतका कांठ आहे ज्याला असें(धोतर,लुगडें,इ०).

चिंचकुली स्त्री० चिमटी; चिमूट.

चिंचपटी, चिंचपेटी स्त्री० स्त्रियांचा गळ्यांत घालावयाचा एक दागिना. 'चिंचपेट्या' असा अनेकवचनीं प्रयोगही होतो.

चिंचळा पु० १ दिव्याच्या वातीचा कोळी. २ सतैल पदार्थ पेटविला असतां त्याचीं फुलें खालीं गळतात तीं प्रत्येक.

चिचुंदरी, चिचोंदरी [सं० छुच्छुंदर (–री)] स्त्री० १ उंदरासारखा एक प्राणी. २ आतिषबाजीचा एक पदार्थ,–कागदाच्या नळींत दारू भरून केलेला.

चिंचुरटी (–डी) स्त्री० वांग्याच्या जातीचें

एक झुडूप. **चिंचरटें (-डें)** **न०** त्याचें फळ.

चिंचोका **पु०** चिंचेच्या झाडाच्या शेंगेंतील बीज.

चिचोंदरा **वि०** १ तल्लख आणि हुशार (मुलगा). २ चुरुचुरु बोलणारा (मुलगा).

चिचोर, छिचोर **वि०** १ अचावचा बोलणारा. २ हलकट आणि फाजील (माणूस).

चिंचोळा **वि०** १ लांबट. २ क्रमानें निमुळता किं० बारीक होत गेलेला. ३ अरुंद असून खूप लांब. [कोळी].

चिंचोळा **पु०** जळत असलेल्या वातीचा

चिटकी **स्त्री०** १ मधलें बोट आणि आंगठा यांचा संयोग करून नंतर एकदम वियोग केला असतां होणारा आवाज; टिचकी; चुटकी. २ कांहीं विशिष्ट आकाराचें मडकें. ३ मुळ्याची शेंग.

चिटकुला **वि०** लहान; चिमुकला.

चिटकें **न०** निपट्याच्या अर्धाइतकें म्ह० शेराच्या सोळाव्या भागाइतकें परिमाण किं० त्या परिमाणाचें माप.

चिटकें **न०** 'चिटकी' अर्थ १ पहा. ॐ **चिटक्यांचे मांडव** **पु० अ० व०** मागें 'चटक्यांचे मांडव' पहा.

चिटणें **स० क्रि०** कासेंतील दूध बहुतेक पिळून काढल्यावर थेंबाथेंबांनीं (बाकीचें दूध) पिळून काढणें.

चिटनविशी, चिटनिशी खालीं 'चिटनवीस,' 'चिटनीस' पहा.

चिटनवीस, चिटणीस, चिटनीस [म० चिटी+फा० नविष्तन्=लिहिणें] **पु०** १ पत्रव्यवहाराचें काम करणारा कारकून. २ शिरस्तेदार. ॐ **चिटनविशी, चिटनिशी** **स्त्री०** चिटनविसाचें काम किं० अधिकार किं० दर्जा.

चिटपांखरूं **न०** कोणहि माणूस; कोणीही जनावर, पक्षी, इ०. ह्या शब्दाचा उपयोग नेहेमीं अकरणरूपींच होतो; उ० मला त्या रस्त्यानें चिटपाखरूं आढळलें नाहीं.

चिटी, चिट्टी, चिठी, चिठ्ठी **स्त्री०** १ लहानसें पत्र. २ हुंडी. ॐ**एकाद्यानें चिट्ठी परतविणें** तो मरतां मरतां वाचणें; भयंकर आजारांतून उठणें किं० बरें होणें; यमाकडील आमंत्रण न स्वीकारणें.

चिठ्ठीचपाटी **स्त्री०** चिठ्ठी विठ्ठी.

चिटोरा, चिठोरा **पु०**, **चिटोरें, चिठोरें** **न०** **चिट (-ठ-) डी, चिटो (-ठो-) डी** **स्त्री०** कागदाचा लहान तुकडा (कोरा किं० त्यावर कांहीं लेख लिहिलेला).

चिठ्ठा **पु०** १ जमाबंदीचें पत्रक. २ खाजिन्यावर केलेली मागणी. ३ तालुक्यांतील इनाम जमीनींचें पत्रक; इनामचिठ्ठा. ४ पगार वाटणीचें पत्रक. ५ लागवडींत असलेल्या जमीनींचें पत्रक; लावणीचिठ्ठा.

चिडखोर [म० चिडणें+खोर (प्रत्यय)] **वि०** आपलें कोणी वर्म काढलें असतां तत्काळ फार रागावणारा.

चिडचिड **स्त्री०** १ थोडक्या जागेंत पुष्कळ माणसें किं० पदार्थ असल्यानें होणारी दाटी किं० अडचण किं० गैरसोय. २ चिखलटपणा; रेंदटपणा. ३ घामेजलेपणाची स्थिति.

चिडचिडणें **अ० क्रि०** १ चिखलट होणें किं० असणें. २ डोळे, शरीर, इ० घाम, पाणी, इ० नीं चिकट होणें. ३ एकाद्याला चरफड लागलेली असणें; रागाच्या झटक्यानें विकृत झालेला असणें.

चिडचिडा **वि०** १ चिकट. २ चिखलट, रेंदट. ३ चिडखोर.

चिडणें, चिढणें **अ० क्रि०** १ रागावणें; खिजणें. २ आपलें कांहीं वर्म कोणी बाहेर काढल्यानें रागावणें. २ बिब्बा, चीक, इ० त्वचेला लागल्यानें त्वचेवर पुरळ, फोड, इ० उठणें.

चिडमिड **स्त्री०** पुष्कळ पदार्थ एके ठिकाणीं जमल्यामुळें किं० ठेविले गेल्यामुळें होणारी अडचण किं० गैरसोय किं० खेचाखेच.

चिडमिडणें **अ० क्रि०** विशिष्ट जागेंत हलणें, वळणें, किं० कोणत्याही प्रकारचें चलन वलन करणें; उ० या खोलींत चिडमिडावयाला बिलकूल जागा नाहीं.

चिडरा **वि०** चिडखोर स्वभावाचा.

चिडवणी [म० चिडविणें] **स्त्री०** एकाद्याचें वर्म काढून त्याला रागास चढविणें; एकाद्याला कुत्सित बोलण्यानें राग आणणें; खिजावणी.

चिडविणें [म० 'चिडणें' चें प्रयोजक] **स० क्रि०** कोणेकाचें कांहीं वर्म काढून किं० कुत्सित बोलून त्याला राग आणणें.

चिडी [हिं०] स्त्री० चिमणी.

चिढखोर, चिढणें, चिढरा, चिढवणी, इ० वर ' चिडखोर, ' ' चिडणें, ' ' चिडरा, ' ' चिडवणी, ' इ० पहा. [ज्याचा असा.

चिणका, चिणक्या वि० चिडण्याचा स्वभाव

चिणका, चिणकारा पु० १ रागाची इसळी किं० लहर. २ एकाद्या वस्तूविषयीं वाटत असलेली अप्रीति किं० किळस किं० शिसारी.

चिणणें स० क्रि० १ धारदानांत पदार्थ ठासून भरणें. २ बीळ बुझविण्यासाठीं दगड, रोडे, इ० त्यांत ठासून भरणें. ३ जेथें थोडकीं माणसें बसण्याची सोय किं० शक्यता आहे तेथें जबरदस्तीनें अधिकमाणसें कोंबणें किं.बसविणें.४एकाद्या माणसाला भिंतींतील पोकळींत जबरदस्तीनें घालून भिंत बांधून घेणें,–हा प्राचीन काळीं शिक्षेचा एक प्रकार होता. ५ ठार मारणें. ६ चेतविणें; रागास चढविणें. ७ परकर इ० ना चीण घालणें.

चिणोरा वि० न्हानुला; चिमुकला.

चित् [सं०] स्त्री० १ विचार. २ बुद्धि. ३ मन. ४ ज्ञान. ५ चैतन्य. ६ ब्रह्म. ॐ **चिदात्मा** पु० १ परमात्मा. २ विचारशक्ति. **चिदाभास** पु० जीवात्मा. **चिन्मय** पु० १ परमात्मा. २ शुद्धचैतन्य. **चित्स्वरूप** न० ईश्वर. **चित्कळा** स्त्री० प्राण्यांच्या अंगची ज्ञानग्रहण करण्याची शक्ति. **चिच्छक्ति** स्त्री० १ परमात्मा. २ शुद्ध चैतन्य. ३ बुद्धि. ४ मन. **चित्साक्षी** पु० ईश्वर.

चिंतक [सं० चिंत्=चिंतिणें] वि० चिंतणारा; उ० इष्टचिंतक, अशुभचिंतक, इ०.

चितंग पु०, स्त्री० गळ्यांत घालावयाचा एक दागिना.

चितड वि० अस्पष्ट अक्षरांनीं लिहिलेला (कागद). खालीं 'चिताड' आणि 'चिथड' पहा.

चिंतणी, चिंतणूक [सं० चिंत्=चिंतिणें] स्त्री० ऐकलेल्या किं०शिकलेल्या विषयाचें मनन.

चिंतणें, चिंतिणें [सं०चिंत्=चिंतिणें, मनन करणें] स० क्रि० १ कोणेकाचें कल्याण (किं० अकल्याण) होओ अशी उत्कट इच्छा करणें; उ० साध्वी स्त्री नेहेमीं पतीचें अभीष्ट चिंतिते; उ० जुलमी राजाचें कोणी अभीष्ट चिंतीत नाहीं. २ २ कांहीं गोष्ट कशी करावी किं० कशी होईल इ० संबंधानें मनांत विचार करणें. ३ योजणें,संकल्पिणें. ४ शिकलेला किं० ऐकिलेला विषय मनांत घोळणें. ५ मनांत ठरविणें. ६ मननाचा विषय करणें.

चिंतन [सं० चिंत्=चिंतिणें] न०चिंतिणें; चिंतिण्याची क्रिया.

चिंतानिका, चिंतनी, चिंतना [सं० चिंत्= चिंतिणें] स्त्री० मनन; विचार: एकाद्या विषयाचा आपल्या मनाशीं केलेला खल.

चिंतनीय [स० चिंत्=चिंतिणें] वि०चिंतिण्यास योग्य; ज्याचा विचार करावयास पाहिजे असा.

चितय स्त्री० सर्पासारखें एक जनावर,–हें लांबलचक, मंद, आणि सुस्त असतें.

चितरणें [सं० चित्र; म० चित्र] स० क्रि० १ चित्रांनीं शोभविणें. २ फराटे मारून लिहिलेल्या अक्षरांनीं सुशोभित करणें (किं० विशोभित करणें); उ० हें तुझें चितरलेलें पत्र तुझे मामा न वाचतां फेकून देतील. ३ ढगांनीं (आकाश) आच्छादणें.

चितळ पु०, न० हरिणाच्या जातीचा एक जंगली पशु; यांचीं शिंगें फार आखूड असतात.

चिता [सं०] स्त्री० प्रेत जाळण्यासाठीं गोवऱ्या, लाकडें, इ०चा ढीग करतात तो.ॐ**चितेपेक्षां चिंता काठिण** चिंतेची आग चितेच्या आगीपेक्षां अधिक प्रखर असते. **चिताभूमि** स्त्री० प्रेतें जाळावयाची जागा;स्मशान; मसणवटी.

चिंता [सं०] स्त्री० १ विचार, खल, चिंतन. २ काळजी, हुरहूर. ॐ**चिंतामणि** पु० १ मागावी ती वस्तु देणारा (कल्पित) मणि. २ गणपति. **एकाद्या वस्तूची(किं०माणसाची)चिंता वाहाणें** त्याची सुस्थिति, उत्कर्ष, किं० वैभव कसें वाढेल ह्याचा विचार करणें आणि त्या विचाराप्रमाणें कृति करणें.**चिंता नाहीं** हरकत नाहीं;ती अडचण समजण्याचें कांहीं कारण नाहीं; आपल्या कार्याला कांहीं विघ्न येणार नाहीं. **चिंताग्रस्त, चिंताकुल, चिंतातुर** वि०चिंतेनें किं०काळजीनें व्याकुळ किं० जर्जर झालेला. **चिंताज्वर** पु० चितारूप ज्वर.

चितांग, चितंग पु०,स्त्री० स्त्रियांचा गळ्यांत घालावयाचा एक दागिना.

चिताड, चितड वि० निष्काळजीपणानें किं० फार खोडाखोड करून लिहिलेलें, किं० तसें लिहिलें आहे ज्यावर असा (कागद).

चितारणें [सं० चित्र; म० चित्र] स० क्रि० १ चित्रांनीं शोभविणें (भिंत इ०). २ झोकदार फराटे मारून पत्र इ०शोभविणें(किं०विरूप करणें).

चितारी [सं० चित्रकार] पु० चित्रें काढून किं० करून चरितार्थ करणारा माणूस.

चिंतावणें [सं० चिंता] अ० क्रि० चिंतेनें व्याकुल होणें; उ० मी मुलीच्या लग्नाच्या बाबतींत भारी चिंतावलों आहें.

चितोडा, चितोड पु० १ घोड्याच्या रंगाचा एक प्रकार; पांढऱ्या रंगावर तांबडे ठिपके असलेला घोडा.

चित्त [सं०] न० १ अंत:करण. २ लक्ष्य, अवधान. ३ मन. ॐ**चित्तनिग्रह** पु० मनावर घातलेली नियंत्रणा. **चित्तपावन** पु०कोंकणस्थ ब्राह्मण. **चित्तवेधक** वि० १ मन रंजविणारा. २ मनाला झोंबणारा. ३ हृदयद्रावक. **चित्त पुरविणें** लक्ष्य देणें; मन लावणें. **एकाद्याच्या चित्तांत एकादी गोष्ट खात असणें** ती त्याच्या मनाला टोंचीत असणें.

चित्तळ [सं० चित्रक=हरिणविशेष] पु० न० ठिपकेदार हरिणाची जाति.

चित्ता [सं० चित्रक=वाघ, चित्ता] पु० वाघाच्या जातीचें एक हिंस्र जनावर. ॐ **चित्तेवान्** पु०कोण्या बड्या माणसाच्या संग्रहाला असलेल्या चित्त्यांची निगा राखणारा अधिकारी.

चिंत्य [सं०] वि० १विचार करण्याला योग्य. २ ज्याचा अर्थ आपल्याला समजत नाहीं असें (वाक्य किं०विधान).३ जें आपणाला चुकीचें वाटतें पण चुकीचें म्हणावयाला आपणाला धैर्य नसतें असें (विधान, शब्द, इ०).

चित्र [सं०] वि० १ चकचकीत. २ चित्रविचित्र रंगाचा. ३ सुंदर, रमणीय. ४ बहुविध; अनेक प्रकारचा.पु० १ चित्रविचित्र रंग. २ एरंड. न० १ रेषांनीं दगड, १कागद, इ० कांवर काढलेली किं० माती इ० द्रव्यानें बनविलेली मनुष्य, जनावर, कांहीं पदार्थ, देश, इ० ची आकृति.२ आश्चर्य. ३ आश्चर्यकारक वस्तु. ४ कोड (अंगावरचे पांढरे डाग). ५ चमत्कारजनक शब्दरचना किं० अर्थरचना. ॐ**चित्रकथी (—थ्या)**पु०कापड, कागद,इ० वर राम, धर्मराज, इ० पौराणिक माणसांचीं चित्रें काढून तीं प्रेक्षकांना दाखवून त्यांचीं चरित्रें सांगून उपजीविका करणारा. **चित्रकार** पु० चित्रें काढणारा किं० करणारा किं० चित्रें काढून किं०करून चरितार्थ करणारा माणूस.**चित्रान्न** न०डाळ,तांदूळ, इ० एकत्र शिजवून करतात तें खाद्य; खिचडी. **चित्रार्पित** वि० चित्रांत काढलेला किं० दाखविलेला किं० चित्राच्या रूपानें बनविलेला. **चित्रकंठ** पुं० १ खबूतर. २ सारस पक्षी. **चित्रकंबल** पु० गालिचा. **चित्रकर** पु० चित्रें करणारा किं० काढणारा; चितारी. **चित्रगुप्त** पु० मनुष्यांच्या पापपुण्यांचा हिशेब ठेवणारा यमाचा कारकून. **चित्रपट, चित्रपट्ट** पु० चित्रें ज्यावर काढलेलीं आहेत असें वस्त्र किं० असा कागद. **चित्रबई** पु० मोर. **चित्रभानु** पु० १ अग्नि. २ सूर्य. **चित्रसेन** पु० एक गंधर्व. **चित्ररेखा** स्त्री० १ चित्रांतील रेषा. २ चित्राचा आराखडा. ३ सुंदर स्त्री. **चित्रविचित्र** वि० १ अनेक रंगांचा. २ विलक्षण; चमत्कारिक. **चित्रींचा लेख, चित्रींचा लेप** पु० सुंदर माणूस किं० जनावर. **चित्रासारखा** वि०अगदीं स्तब्ध;न बोलणारा आणि न हालणारा (माणूस, पशु, इ०); उ० ती बातमी कानीं पडतांच आम्ही सगळेजण चित्रासारखे त्या जासूदाकडे पाहात राहिलों. **चित्रालंकार** पु० साहित्यशास्त्रांतील एक अलंकार;हा दोन प्रकारचा असतो.(१) प्रश्नवाक्यांतच उत्तर असतें तेव्हां होतो तो; (२) दोन किं० अधिक प्रश्नांना एकच उत्तर असतें तेव्हां होतो तो; पहिल्या प्रकाराचें उदाहरण; काय राखोनि सुदृढ कामसिद्धि लहे नर ? (काय= कोणची वस्तु, आणि शरीर). दुसऱ्या प्रकारचें उदाहरण; प्रश्न '' भाकरी कां करपली ? पानें कां कुजलीं ? घोडा कां बुझला ? '' उत्तर '' न फिरविल्यामुळें. ''

चित्रा [सं०] स्त्री० अश्विनी, भरणी, इ० जीं सत्तावीस नक्षत्रें त्यांतील चवदावें. ॐ **चित्रांचें ऊन्ह** न० चित्रा हें नक्षत्र असतां पडतें तें ऊन्ह; ह्या उन्हामध्यें मूल्यवान् सणंगें त्यांना कसर लागूं नये म्हणून कांहीं वेळ तापत घालतात. ह्याच उन्हानें हरिणांच्या पाठी काळ्या होतात. **चित्रास्वाती** स्त्री० अ० व० १ सत्तावीस

नक्षत्रांपैकीं चवदावें आणि पंधरावें हीं दोन नक्षत्रें. २ ह्या दोन नक्षत्रांतील पाऊस. **पडतील चित्रा-स्वाती तर पिकतील माणीकमोतीं, पण कापूस न मिळेल वातीं** चित्रा आणि स्वाती ह्या दोन नक्षत्रांत पाऊस पडले तर धान्याची आणि पाण्याची समृद्धि फार होईल, पण कापसाचें पीक ठार बुडेल. **पडतील चित्रा तर भात न खाय कुत्रा** चित्रांच्या पावसानें धान्याची समृद्धि होते. **चित्राहुति, चित्रावती स्त्री०** अ० व० भोजनारंभीं ताटाच्या बाहेर जे घास देवतांच्या प्रीत्यर्थ ठेवितात ते.

चिथड, चितड, चिथाड, चिताड वि० निष्काळजीपणानें लिहिलेला आणि पुष्कळ खोडा-खोडी असलेला (कागद, पत्र, इ०).

चिथडा पु० १ चिंधी, रगटें. २ माणसाच्या किं० जनावराच्या अंगावरील ठिपका, तीळ, इ०. ३ फळ, शरीर, इ० वर असतात ते ठिपके. ४ ठिगळ (वस्त्रादिकांचें भोक बुझविण्यासाठीं लावलेलें).

चिथडी स्त्री० १ चिंधी; रगटें. २ वस्त्रादिकांस लाविलेलें ठिगळ.

चिथण [सं० चित्=जाणणें] **अ० क्रि०** चिडणें; रागावणें.

चिथ(–था–) विणें [म० चिथणें] **स० क्रि०** १ कोणेकाला कांहीं वाईट गोष्ट करावयाला उद्युक्त करणें किं० प्रोत्साहन देणें. २ कोणेकाला कोणे-काविरुद्ध उठविणें. ३ कोणेकाचें वर्म काढून त्याला रागास चढविणें.

चिंधुकली, चिंधकोली, चिंधी, चिंधडी स्त्री० १ वस्त्राचा किं० कागदाचा लांब पट्टा किं० तुकडा. २ जीर्ण वस्त्र (तुच्छतेनें). ॐ**चिंधाचोळा, चिंधीचोळा पु०** वस्त्रें प्रावरणें समुच्चयानें; कपडेबिपडे. **चिंधीचोळा करणें** विध्वंसिणें. **चिंधादेवी, चिंध्यादेवी स्त्री०** १ रस्त्याच्या कडेला एक देवी असते ती; प्रवास सुखकर व्हावा म्हणून मुशाफर तिच्या नांवानें शेजारच्या झाडा-वर कापडाची चिंधी टाकतात. २ काड्यांभोंवतीं चिंध्या गुंडाळून मग त्या उलगडून ज्या देवीचें मनांत चिंतन करून प्रश्नाचें उत्तर ठरवितात ती देवी.

चिंधूक, चिंधुट न० वर ' चिंधुकली ' पहा.

चिंधोटी स्त्री० वर ' चिंधुकली ' पहा.

चिनई, चिनाई [**म०** चीन या नांवाचा देश] **वि०** चीन देशासंबंधाचा.

चिनका (–क्या) वि० तापट; रागीट.

चिनका, चिनगा, वि० लहान, चिमुकला, न्हानगा, न्हानुला (मुलांच्या भाषेंत).

चिनकाविणें [**म०** चिनका] **स० क्रि०** १ चेतविणें. २ उद्दीप्त करणें. ३ खुणावणें.

चिनकु (–गु–) ला वि० लहान, चिमुकला (मुलांच्या भाषेंत).

चिनी स्त्री० कोनफळीची एक जात.

चिनी वि० चीन देशासंबंधाचा.

चिनें न० चिनी कोनफळावर येतो तो फळा-सारखा गोटा. [हुशार (मूल).

चिन्नादानी (–णी) वि० चुणचुणीत आणि

चिपकी स्त्री० चिमूट, चिमटी, (तपकीर इ० ची).

चिपट न० १ प्रभात काळ. २ चिपड.

चिपटी स्त्री० १ चरकांत घालून पिळून काढ-लेला आणि रसहीन झालेला ऊस. २ आजारानें किं० खावयास न मिळाल्या कारणानें रोडावलेलें शरीर किं० गात्रविशेष; उ० पोटाची, शरी-राची, किं० अंगाची चिपटी वळणें. ३ झाडाची लांब आणि बारीक फांदी (मारणें इ० साठीं तोडलेली).

चिपटें न० शेराचा चवथा भाग.

चिपड न० १ द्विदळ धान्याची कवचासकट असलेली डाळिंबी किं० अशा डाळिंब्या समुच्चयानें. २ पूर्णपणें न पोसलेला धान्याचा दाणा किं० असे दाणे समुच्चयानें. ३ चरकानें रस पिळून काढ-ल्यावर राहतो तो ऊस. **न०, पु०** डोळ्यांतील गू, जो वाळून पापण्यांना चिकटलेला असतो तो.

चिपडणें अ० क्रि० डोळ्यांतील जो गू त्यानें लडबडलेला असणें (डोळा).

चिपडा पु० डोळ्यांतलि गू. **वि०** अशा गुवानें लडबडलेला (डोळा).

चिपडी स्त्री० अगदीं अल्पकालावधि; उ० तुम्ही पुढें चालूं लागा, मी चिपडींत येऊन तुम्हाला गांठतो.

चिपडें न० डोळ्यांतून बाहेर पडतो तो गू.

चिपतळ (–ळा), चिपताळा वि० चपटा आणि सपाट.

चिपनळी स्त्री० पिचकारी (मारणें, उडविणें).

चिपळी स्त्री० १ पिचकारी (मारणें). २ दोन लहान आणि सपाट फळ्या एकावर एक आपटून वाजवावयाचें एक लाकडाचें वाद्य. ३ रसभरित फल इ० दावलें असतां तें फुटून रसाची उडते ती धार किं० चिळकांडी. ३ पिकलेलें गळूं दावलें असतां त्याला तोंड पडून त्यांतून उडतें ती रक्त, पू, इ० ची धार किं० चिळकांडी. ५ लहानसा अरुंद ओहोळ. ६ दोन मांड्यांत आवळून घातलेली पकड; उ० चिपळींत धरणें.

चिपळ्या खालीं ' चिपोळ्या ' पहा.

पिळून काढलेल्या
चिपाट (-ड) न० १
उसाचें ताट. २ गुरांना खाण्याला निरुपयोगी असें जोंधळा इ० चें ताट. ३ अति रोड मनुष्य.

चिपुट चिंगळी स्त्री० कोणीही माणूस. ह्या शब्दाचा उपयोग अकरणरूपी प्रयोगांत मात्र होतो; उ० पेंढाऱ्यांची टोळी येत आहे ही बातमी ऐकतांच सर्व गांवकरी पळून गेले, गांवांत चिपुटचिंगळी राहिली नाहीं.

चिपोटा पु० १ भोंक किं० खळगा बुजविण्यासाठीं लाकडाला किं० दगडाला बसवितात तो तुकडा किं० तें ठिगळ. २ पातळ धलपी (लाकडाची). ❀ **एकाद्याच्या अंगाचा** (किं० **पोटाचा**) **चिपोटा होणें** तो आजारानें किं० खावयाला न मिळाल्यानें रोड होणें किं० किडकिडीत होणें.

चिपोळी [स० चीप] स्त्री० १ चपटा धोंडा किं० लाकडाची धलपी. २ मडक्याची खापरी.

चिपोळ्या, चिपळ्या स्त्री० अ० व० भजन किं० आरती करतेवेळीं धातूचे किं० लाकडाचे दोन पातळ आणि सपाट तुकडे एकमेकावर वडवितात ते.

चिप्प उ० **वा०** अ० गप्प. वि० थेंब थेंब गळण्याइतकें भिजलेलें (वस्त्र,-घामानें, पावसानें).

चिप्पड न० मागें ' चिपड ' पहा.

चिंब वि० ज्यांतून पाण्याचे, रक्ताचे, किं० घामाचे थेंब निथळत आहेत असें (वस्त्र इ०).

चिंब न० १ पूर्णपणें न पोसलेली शेंग किं० कणीस. २ बांबूची चोय किं० बीळ. ❀ **चिंबचळें** न० शेतांत पूर्णपणें न पिकलेलें धान्य; रद्दी धान्य. **चिंबचळें शेतचें आणि थोटेपांगुळ पोटचें** (त्याज्य होत नाहीं) आपल्या स्वताच्या शेतचें रद्दी उत्पन्न ग्राह्य मानलें जातें आणि आपलें स्वताचें मूल व्यंग असलें तरी तें प्रियच मानलें जातें.

चिंबका वि० १ चिंबलेला, दबलेला. २ चिबळ.

चिंबखडा पु० खालीं ' चिमखडा ' पहा.

चिबचिबणें अ० क्रि० १ एकसारखे थेंब गळत राहण्याइतकें भिजलेलें किं० ओले झालेलें असणें (वस्त्र). २ चिखलट, निसरड, बुळबुळीत (जमीन).

चिंबट, चिमट वि० १ टणक, कठिण (लाकूड). २ सुरकुतलेलें. ३ ओलें, पूर्णपणें न वाळलेलें (वस्त्रादि). ४ चिकण. ५ ज्यांतील दाणे पूर्णपणें पोसलेले नाहींत असें (धान्याचें कणीस).

चिंबट न० बांबू, चिवा, इ० ची सुरी इ० नीं काढलेली चोय किं० कांबीट.

चिंबटणें स० क्रि० चेपणें; दावणें.

चिबड, चिबीड न० दलदलीची जमीन.

चिबडीण स्त्री० ज्याला चिबडें येतात ती वेली; शेंदाड. **चिबूड** न० त्या वेलीचें फल.

चिंबणें स० क्रि० १ दावणें, चेपणें. २ पिंजणें; दोन चिरफांकळ्याच्या रूपानें फाडणें. अ० क्रि० दबणें, सुरकुतणें, आकुंचित होणें, चपटें होणें.

चिंबपोल, चिंबफोल [म० चिंब+फोल] सावा, वरी, तूर, हरभरा, इ० चीं पूर्णपणें न पोसलेलीं कणसें किं० शेंगा.

चिंबळणें स० क्रि० चिमटणें, दावणें.

चिंबा [म० चिंब] वि० १ वाळून सुरकुतलेलें; रोडावलेलें. २ दबलेलें; चेपलेलें; चेपटलेलें.

चिबूड न० शेंदाड नांवाचें फळ.

चिभट, चिभड, चिभूट (-ड) स्त्री० चिबूड या नांवाचें फळ ज्या वेलीला येतें ती वेली. न० ह्या वेलीचें फळ; ह्या फळाला ' चिभाड, ' ' शेंदाड, ' ' फूट, ' अशींही नांवें आहेत.

चिमका, चिमकुला, चिमुकला, चिमकोला लहान आणि सुबक; लहानसर आणि गोंडस.

चिमकुरा, चिमकोरा पु० १ (चिमटा अंगाला घेतलेला). २ विचकुरा (नखादिकांनीं त्वचेवर काढलेला).

चिमखडा पु० १ बांबूची पट्टी, वेतांचा किं० लोखंडाचा तुकडा, यांच्या जोरानें उडविलेला किं०

उडवावयाचा बारीक खडा किंवा धोंडा. २ मार्गामध्यें आल्या गेल्या मुशाफरानें एक एक दगड एके ठिकाणीं टाकल्यामुळें होतो तो ढीग. ३ चलाख, तल्लख, आणि तरतरीत मुलगा.

चिमखुरा, चिमखोरा, चिमकोरा, चिमकुरा, चिमकोडा, चिमखोडा पु० १ एक वनस्पति,–ही खाण्यांत येते. २ चिमटा (अंगाला घेतलेला). ३ ओरखडा (नखादिकांनीं त्वचेवर काढलेला).

चिमट स्त्री० १ चिमटा; चिमटी; चिमूट. २ अंगठा आणि पुढचें बोट यांच्या दाबांत धरून घेतलेला कांहीं पदार्थ (तपकीर, औषधी चूर्ण, इ०). ३ लाजाळूसारखी एक वनस्पति,– जिला स्पर्श केला असतां जिची वळकटी होते.

चिमट वि० १ चिवट, टणक (लाकूड, इ०). २ सुरकतलेला; रोड. ३ पूर्णपणें न सुकलेलें (चिरगुट). ४ ओलसर. [चित करणें.

चिमटणें स० क्रि० १ दाबणें, चेपणें. २आकुं-

चिमटा पु० १ पदार्थ घट्ट धरणें, किंवा पिळवटणें, किंवा उपटून काढणें, या उपयोगाचें सोनार, इ० चें एक साधन; हे चिमटे अनेक आकारांचे असतात. २अंगठा आणि पुढचें बोट यांचा परस्परांवर दाब घातल्यानें होते ती पकड. ३ दोन ओढे किंवा नाले वाहात येऊन मिळतात तेथें त्या कोनांत होतो तो जमीनीचा लांबट आणि चिंचोळा तुकडा तो. ४पंचाइतीची, पेचाची किंवा अडचणीची स्थिति; दोन पक्षांत दोन अडचणी किंवा गैरसोयी असतात अशी स्थिति; हें केलें तरी संकट आणि तें केलें तरी संकट अशी स्थिति. ॐ **एकाद्याला चिमटा घेणें** १ त्याला झोंबेल किंवा बोचेल असें कांहीं विधान करणें किंवा कांहीं कृति करणें. २ दुसऱ्यांना समजूं न देतां त्याला कांहीं इशारत करणें. **एकाद्याला चिमट्यांत धरणें** त्याला अडचणीच्या स्थितींत घालणें,–त्यानें आपलें कांहीं काम करावें म्हणून.

चिमटी स्त्री० १अंगठा आणि पुढचें बोट यांच्या जुळणीनें होणारी पकड. २ ह्या पकडींत धरला जाणारा पदार्थ (तपकीर, इ०). ३ एक वनस्पतिविशेष.

चिमणखडा, पु० धनुकलीनें किंवा पुढच्या बोटानें किंवा लवचीक पट्टीनें उडवावयाचा खडा किंवा दगड.

चिमणा पु० चिमणी ह्या पक्षाचा नर.

चिमणी स्त्री० १ एक लहान पक्षिविशेष. ह्या पक्ष्याच्या नराला ' चिमणा ' म्हणतात; ' चिमणी ' हें त्या पक्ष्याचें जातिवाचक नांव; ' चिमणी ' हें नांव मादीलाही लावतात. २ मुलांची मातीची शिटी; कोणत्याही द्रव्याची वाजवावयाची शिटी. ३ दिव्यावरची काचेची नळी. ४ गिरणी इ० तील धूर इ० पदार्थ वर जाण्यासाठीं केलेली असते ती रचना; धुराडें. ५ खिडकी, दार, इ० बंद करावयासाठीं किंवा विशिष्ट प्रकारें राहाण्यासाठीं केलेलें असतें तें अडकण. ६दोन वाटोळ्या खापऱ्यांस चामडें जडवून मुलांसाठीं जें वाद्य केलेलें असतें तें. ७ तोटीचें भांडें किंवा भांड्याची तोटी. ८ केळफुलांतील भाजीच्या उपयोगाच्या ज्या ज्या फण्या त्या फणींतील प्रत्येक दांत्याच्या म्ह० कळीच्या भोंवतीं एक शुभ्र अर्धवट पारदर्शक जें आवरण असतें त्याला ' चिमणी ' म्हणतात; हें भाजीला निरुपयोगी असतें. केळफुलाच्या फणींतील प्रत्येक दांत्यांत म्ह० कळींत जी भाजीला निरुपयोगी अशी एक कठिण काडी असते तिला ' कावळा ' किंवा ' चोर ' म्हणतात. ॐ **चिमणीच्या दांतांनीं एकादा खाद्य पदार्थ फोडणें** तो पदार्थ फडक्यांत धरून दांतांनीं फोडणें; अशा रीतीनें फोडलेला पदार्थ दुसऱ्या माणसास खावयास उष्टा होत नाहीं अशी मुलांची समजूत असते. **चिमणीची सुरकुंड** स्त्री० अनेक चिमण्यांचें वर्तुळ भिंतीवर कुंकू, हळद, इ० रंगांनीं काढलेलें; ह्या चिमण्यांचीं तोंडें बाहेर असतात. **चिमणीचे पोहे** पु० अ० व० एक प्रकारच्या गवताचीं बारीक बीजें. **चिमणचारा** पु० चिमण्यांना आवडतें तें एक प्रकारचें गवत. **चिमणचिटकें** न० पहाट किंवा प्रातःकाळ,–जेव्हां चिमण्यांची चिवचीव सुरू होते. **चिमणडोळ्या** वि० बारीक आणि पिंगट डोळ्यांचा. **चिमणसा** वि० आकारानें लहान आणि गोंडस; चिमुकला आणि गुटगुटीत. **चिमणसाळ** स्त्री० तांदुळाची एक जात; ह्या जातीच्या तांदुळाचा दाणा बारीक असतो.

चिमी, चिमू स्त्री० चिमणी (मुलांच्या भाषेंत).

चिमुकला वि० लहान आणि गोंडस.

चिमुटणें, चिमटणें स० क्रि० चेंपणें, दाबणें. अ० क्रि० दबणें; दाब्यांत सापडणें.

चिमुरडा वि० १ लहान, खुजट, पूर्ण वाढ न झालेला. २ वात्रट (पोर).

चिमुरा, चिमोरा पु० १ चिमटा (वेणें). २ ओरखडा (नखादिकांनीं काढलेला).

चिमूट, चिमोट स्त्री० १ आंगठा आणि पुढचें बोट यांची जुळणी किं० ह्या जुळणीनें घेतलेला पदार्थ किं० अशा घेतलेल्या पदार्थाचें परिमाण. २ (पदार्थाचा) अल्पल्प अंश.

चिमोटा पु० चिमखोरा.

चिमोरा पु०, चिमोरी स्त्री०, चिमोरें न० खेकड्यासारखा एक प्राणी.

चिमोला वि० लहान असून गोंडस.

चिर [सं०] वि० १ जुना; पुष्कळ दिवसांचा. २ फार दिवस टिकून राहिलेला किं० राहाणारा. ॐ चिरकालिक वि० १ पुष्कळ दिवसांपासून चालत आलेली (रूढि, संप्रदाय). २ फार दिवस टिकून राहील असा. चिरंजीव वि० १ फार दिवस टिकणारा किं० जगणारा. २ वडिल माणसानें लहानास लिहितांना किं०लहानासंबंधानें लिहितांना लहानाच्या नांवामागें पत्रांत योजावयाचा शब्द; उ० चिरंजीव रामाला मास्तर ठेवावा; उ० चिरंजीव सदूआण्णास अनेक आशीर्वाद. पु० १ पुत्र; उ० आमचे धाकटे चिरंजीव यंदा एम. डी.च्या परीक्षेंत पास होऊन पहिले आले. २ अश्वत्थामा, बलि, व्यास, मारुति, बिभीषण, कृप, आणि परशुराम, हे सात पुरुष प्रत्येक. चिरंजीवी स्त्री० १ कन्येच्या किं० लहान मुलीच्या नांवामागें लावावयाचा शब्द. २ कन्या. चिरंतन वि० १ जुना. २ प्राचीन. चिरस्थायी वि० चिरकाल टिकणारें किं० टिकून राहाणारें.

चिरक स्त्री० १ नापसंती; वीट; खंती. २ भ्यालेल्या हत्तीची किंचाळी. ३आमांशाच्या उपद्रवामुळें थोडथोडा विसर्जिलेला मळ. ॐ चिरकखोर वि० क्षुल्लक कारणावरून पिरपीर करणारा किं० चरफडणारा.

चिरकंडी, चिरकांडी स्त्री० १ फल किं० पिकलेलें गळूं, इ० दाबलें असतां त्यांतून उडते ती रस, पू, रक्त, इ० ची धार. २ पिचकारीनें उडविलेली धार. ३ पावसाची जोराची सर.

चिरकणें अ० क्रि० टर्र असा आवाज करून फाटणें (वस्त्रादि). चिरकणें स० क्रि० टर्र असा आवाज करून फाडणें (वस्त्रादि).

चिरकणें अ० क्रि० १ थोडा थोडा मल विसर्जिणें (आमांशादि कारणानें). २ हत्तीचें भीतीनें ओरडणें. ३ कांचेच्या किं० मातीच्या भांड्याला चीर पडणें किं० तडा जाणें. ४ वयांत आलेल्या मुलग्याचा आवाज प्रौढ होणें. ५ फार गायल्यामुळें गवयाचा आवाज बदसूर होणें. ६ रागानें बडबडूं लागणें. ७ काहीं काम, धंदा, व्यापार, इ० मध्यें ठोकर बसणें.

चिरका वि० १ ठिसूळ (लाकूड इ०). २ फुटलेलें, पिंजलेलें, तडा गेलेलें (लाकूड, पात्र, दगड, इ०).

चिरकी स्त्री० वर ' चिरक ' पहा. ॐ चिरकीस येणें अगदीं दमून जाणें.

चिरंगट स्त्री० गर्दी, दाटी, खेंचाखेंच.

चिरंगटणें, चिरगटणें स० क्रि० एकाद्या जागीं किं० बारदानांत (माणसें, पदार्थ) ठासून भरणें, बसविणें, किं० कोंबणें.

चिरगुट [सं० चीर] न० वस्त्र. ॐ चिरगूट पांघरूण न० ए० व० वस्त्रप्रावरण; कपडेबिपडे; धोतरें उपरणीं, इ० रोजच्या वापरण्याचीं वस्त्रें समुच्चयानें.

चिरघोडी, कुरघोडी स्त्री० एकानें दुसऱ्याच्या पाठीवर बसावें असा मुलांचा एक खेळ.

चिराचिरणें अ० क्रि० १ हत्तीचें ओरडणें. २ रागानें चरफडणें. ३ चिर्र असा आवाज करून फाटणें. ४ फुटणें, भेगाळणें. ५ कंठ प्रौढ होणें.

चिरंजीव मागें ' चिर ' मध्यें पहा.

चिरट (-टूं), चिलट न० एक पंखांचा क्षुद्र प्राणी.

चिरटा पु० केळीच्या पानाचा तुकडा.

चिरटी स्त्री० १ केळीच्या पानाची किं० वस्त्राची चिंधी. २ जमिनीचा अरुंद पट्टा. ३ कमी रुंदीचें घर.

चिरटोळी स्त्री० मूल स्तनपान करूं लागलें नाहीं तोंपर्यंत त्याला दूध पाजण्यासाठीं जी वस्त्राची

चिंधी दुधांत भिजवून मुलाच्या तोंडांत दुधाचे थेंब पाडवितात ती.

चिरड स्त्री० घुस्सा; राग; उणें उत्तर ऐकणें, मर्मश्रवण, इ० मुळें होतो तो चित्तक्षोभ. ꙮ**चिरड-खोर** वि० दुसऱ्यानें बोललेलें उणें उत्तर, लोकांनीं केलेली थट्टा, इ० न सोसल्यामुळें ज्याला फार राग येतो असा. **चिरडीवर येणें** वादांत हार आल्यामुळें रागावणें आणि कठोर शब्द बोलूं लागणें.

चिरडणें स० क्रि० चेपणें, दाबणें. अ० क्रि० १ दावला जाणें. २ दाबामुळें फुटणें किं० फाटणें.

चिरडी स्त्री० मुलीची नेसावयाची साडी. ꙮ **चिरडी नेसणें** रागावणें; चिडणें.

चिरण [म० चिरणें] स्त्री० १ उभें म्हणजे दांड्यावर चिरलेलें केळीचें पान. २ फट, भेग, खिंड. ३ दोन घरांमधील अरुंद अशी रिकामी जागा.

चिरणी [म० चिरणें] स्त्री० १ खोवण (लाकडाला किं० दगडाला पाडलेली). २ खोवण पाडण्याचें हत्यार. ३ अरुंद पटाशी. ४ भिंतीच्या पुढें आलेली फळी. ५ एकविटी भिंत. ६ केळीच्या पानाचा दांड्यावर विभागून पाडलेला तुकडा किं० अर्धुक. ७ भिंतीचा कांहीं भाग पुढें आलेला असतो तो,—ज्यावर पदार्थ ठेविले जातात किं० माणसें बसूं शकतात.

चिरणें स० क्रि० १ फाडणें. २ उभें फोडणें. अ० क्रि० १ फाटणें; भेगळणें. २ उभें फाटणें. ꙮ **एकाद्याला उभा चिरणें** त्याला कठोरपणानें शासन करणें.

चिरणें [म० चिरणें] न० सुताराची अरुंद पटाशी.

चिरफळ, तिरफळ स्त्री० एक झाड. न० [त्याचें फळ.

चिरफ (–फा–) ळी, चिरफोळी स्त्री० चिरून किं० कापून किं० फाडून काढलेला फळी, चिर-गुट, इ० चा लांबट तुकडा किं० चिंधी.

चिरबोटी स्त्री० एक झाड. **चिरबोटें** न० त्याचें फळ. मागें ' कपाळफोडी ' पहा.

चिरमी स्त्री० १ सुरकती. २ वस्त्राचा चोंभा.

चिरमुटणें अ० क्रि० फळ किं० अंगाची त्वचा सुरकुतणें. स० क्रि० १ दाबांत धरून पिळवटणें. २ चुरमुडणें.

चिरंवटा, चिरोटा, चिऱ्होटा पु० गव्हाच्या रव्याचें एक पक्वान्न,—याला अनेक पदर असतात.

चिरा पु० १ पाथरवटानें घडवून भिंत इ० साठीं तयार केलेला दगड. २ ज्याला जरीच्या उभ्या काड्या असतात असें अरुंद पागोटें. ३ बागें-तील फुलझाडांचा किं० भाजीपाल्याचा वाफा. ४ दारू भरून उडविलेल्या सुरुंगाचे मोठे मोठे कळपे. ५ मोठा फत्तर. ६ चिऱ्यांनीं बांधून काढलेला पाया (घर इ० चा). ꙮ **चिरा उलथणें** कोणी लठ्ठ माणूस एकाएकीं मरण पावला असतां वात्रटपणानं ' त्याचा चिरा उलथला ' असें म्हणतात. **चिरेबंदी** वि० चिऱ्यांनीं केलेली किं० रचलेली, (भिंत, जमीन, पाया, विहीर, घर, इ०). **चिऱ्याचा पाया** पु० १ प्रसूत स्त्रीला मुलगा झालेला असल्यास तो "चिऱ्याचा पाया" म्हटला जातो. २ चिरस्थायी वस्तु (राज्य, हुद्दा, इ०). **चिऱ्यावरची रेघ, दगडावरची रेघ, काळ्या दगडावरची (किं० चिऱ्यावरची) रेघ** स्त्री० कधींही खोटें न होणारें वाक्य किं० विधान.

चिराई स्त्री० तुळ्या, ओंडे, इ० अरकसण्या-बद्दलची मजूरी.

चिराईत, चिरायत [सं० किरात] न० एक वनस्पति,—हिच्या काड्यांचा काढा किं० पाण्यांत उतरविलें वीर्य ह्यांचा तापावर उपयोग करतात. ह्याला ' काडेचिराईत ' असेंही म्हणतात.

चिराख, चिराग [फा० चिराग्] पु० दिवा. ꙮ **चिराख (–ग–) दान** न० १ दिवा किं० मेणबत्ती ठेवावयाचें घर किं० कांहीं साधन. २ रांगेनें ठेविलेले अनेक दिवे समुच्चयानें. **चिराख (–ग–) बत्ती** स्त्री० ए० व दिव्यांत तेल, वाती, इ० घालणें, ते कांहीं विशिष्ट प्रकारें ठेवणें, ते पेटविणें इ० कामें समुच्चयानें. **बेचिराख (–ग)** वि० उद्ध्वस्त केलेला किं० झालेला (गांव, मुलूख, घर). **चिराखी(–गी)** स्त्री० १ मुसलमान पीराच्या थडग्यापुढें लावि-तात तो दिवा आणि समर्पितात ते पदार्थ. २ एत-दर्थ सरकारांतून जी पैशाच्या रूपानें नेमणूक ठर-विलेली असते ती. ३ ह्या नेमणुकीचा विनियोग कर-ण्याचें काम.

चिरांबा [म० चिरणें+आंबा] पु० आंब्याच्या [फाकोंचें लोणचें.

चिरी [म० चीर] **स्त्री०** १ द्रोण करावयासाठीं तयार केलेला केळीच्या पानाचा तुकडा. २ कपाळावर स्त्रिया लावतात ती कुंकवाची रेघ. ३ तडा (मडकें, काचपत्र, इ० ना जातो तो). ४ ओरखडा(नखादिकांनीं काढलेला). ५वैष्णव लोकांची कपाळावरची कोळशाची रेघ. ॐ **चिरीपट्टी स्त्री०** स्त्रियांची वेणीफणी, काजळंकुकु, इ० प्रसाधनविधि.

चिरीक स्त्री० अकस्मात् वाटलेली भीति.

चिरींव स० [चिरणें] **वि०**लाकूड इ०चिरून किंवा तासून बनविलेला पदार्थ.

चिरू स्त्री० वस्त्रावरील ऊ,–ही पांढरी आणि जाडी असते. [पहा.

चिऱ्हवटा, चिऱ्हाेंटा पु० मागें ' चिरंवटा '

चिलकं (–कां–) डी स्त्री० मागें 'चिरकंडी' पहा.

चिलख (–क–) त न० शरीरावर गोळी, तरवारीचा तडाखा, इ० लागूं नये म्हणून लोखंडाच्या वाटोळ्या कड्या किंवा पट्ट्या एकांत एक गुंतवून केलेलें असतें जें अंगरख्यासारखें आच्छादन तें.

चिलखी वि० १ अगदीं कोराकरकरीत (रुपाया इ० नाणें). २ अगदीं गरमागरम (चिवडा इ० खाद्य). ३ अगदीं नवा, ताजा, नुकताच झाडावरून तोडलेला, मागावरून उतरलेला (सणंग, फळ, इ० कोणताही पदार्थ).

चिळघोळ स्त्री०बारीक पानांची घोळ नावाची शाकभाजी.

चिलट [**सं०** चीरक] **न०** १ पंखांचा एक क्षुद्र प्राणी. २ उंबर, अंजीर, इ० च्या पोटांतील क्षुद्र जंतु. [पायवाट.

चिलण स्त्री० १ उभी फट किंवा भेग. २ अरुंद

चिलम, चिलीम [**हिं०**] **स्त्री०** ओढावयाची तंबाखू एका टोकानें पसरट अशा ज्या नळीमध्यें घालतात आणि त्या तंबाखूवर निखारे ठेवितात ती नळी. ॐ **चिलमी वि०** १ तंबाखूचें व्यसन ज्याला आहे असा. २ रिकामटवळ्या गांजेकस इ० मंडळीनें उठविलेली (कंडी, बातमी); लोणकढी (थाप).

चिलवंत पु० चिलवंत, पंचम, तिलवली, आणि कुलंग, ह्या लिंगाइतांच्या चार पंथांपैकीं हिल्या पंथाचा इसम.

चिलवाण (–णा) वि० आकार लहान असल्यामुळें जो डोळ्यांत भरत नाहीं किंवा भव्य दिसत नाहीं असा (मनुष्य, जनावर, घडविलेला पदार्थ,इ०); किरटा.

चिला पु० जरीच्या रेघा असलेलें अरुंद आणि लांबलचक वस्त्र,–जें पागोट्याच्या रूपें योजिलें जातें.

चिलीट मागें ' चिलट ' पहा.

चिलींपिलीं न० अ० व० १ बालबच्चे; मुलेंबाळें. २ मकर संक्रांतीचे दिवशीं स्त्रिया ब्राह्मणाला देतात तें एक प्रकारचें वाण,--एका मोठ्या मडक्यांत अनेक लहान बोळकीं घातलेलीं असतात.

चिलीम, चिलिमी मागें 'चिलम,' 'चिलमी' पहा.

चिलया पु० आग्नेय दिशेचा वारा (दर्यावरील लोकांचा शब्द).

चिल्लर, चिल्हार, चिल्हेर वि० किरकोळ; लहानसहान; बारीकसारीक.

चिल्ला [**हिं०** चिला] **पु०** धनुष्याची दोरी; प्रत्यंचा.

चिवचिव स्त्री० १ चिमण्या, उंदीर, इ० चें ओरडणें. २ कटकट, कलकल, कलकलाट (मुलें, भिकारी, याचक, इ० चा). ३ उपद्रवकारक आरडाओरडा. ४ पिरपीर; असंतुष्टपणाची चरफड किंवा पुटपूट.

चिवचिवणें अ० क्रि० १ (चिमण्या, उंदीर, इ० नीं) ओरडणें. २ चरफडणें (असंतुष्टपणानें). ३ अनेक कार्यें एकदम अंगावर पडल्यामुळें कातवणें. ४ (गळूं इ०) ठुसठुसणें किंवा त्यांत शिणका मारणें. ५ आंबट पदार्थ फार दिवस राहिल्यामुळें त्यांतून आंबण्याच्या क्रियेचा शब्दविशेष होणें. ६ खरवस इ० खाद्य पदार्थाला पाणी सुटणें.

चिवट वि० १ मऊ असून लवकर न तुटणारा, फाटणारा, किंवा मोडणारा (पोळी, साट, इ० पदार्थ). २ लवकर न फुटणारें (लाकूड). ३ कंजूष. ४ लोचट. ५ आपला हेका न सोडणारा.

चिवट न० कापसाच्या जाड आणि मजबूत दोऱ्याचें पेंडाळें,–तानवटा भोंवतीं सुमारें दीडशें फेरे होतील इतक्या लांबीचें हें असतें.

चिवटा पु० गलबताच्या शिडाच्या उपयोगांचें जाड वस्त्र.

चिवडणी [म०चिवडणें] स्त्री० चिवडण्याचा व्यापार. खालीं 'चिवडणें' पहा.

चिवडणें स० क्रि० १ भात, पोळी, चिरगुटें, इ० अव्यवस्थितपणें कालवून, कुसकरून, चुरगळून, किं० चेपून त्यांची दुर्दशा करणें. २ व्यवस्थित रीतीनें ठेविलेला पदार्थ किं० केलेली योजना अव्यवस्थित करणें. ३ एकाद्याचें वर्म काढून त्याला सतावणें किं० राग आणणें किं० चिडविणें.

चिवडा [म० चिवडणें] पु० १ अनेक वेळां एकादा पदार्थ डिवचल्यामुळें त्याची होते ती दुर्दशा किं० अव्यवस्था २ कांहीं कामांत अनेक माणसांच्या लुडबुडण्यानें झालेला बिघाड किं० गोंधळ किं० विचका. ३ फुटाणे, चुरमुरे, पोहे, मटक्या, इ० अनेक पदार्थ मिसळून तळून करतात जें भोजनाहून इतर वेळीं खावयासाठीं खाद्य तें.

चिवर [सं० चीवर=गोधडी] न० फणसाचें चारखंड; फणसाच्या गऱ्याभोंवतालचें तंतुमय वेष्टन.

चिवरें न० कच्चें सुपारीचें फळ; कोंवळें पोफळ. पक्क पोफळाला ' बेडा ' असें म्हणतात.

चिवली स्त्री० १ एक प्रकारचें रेशमी वस्त्र. २ जंगली बांबू. मुद्दाम लाविलेल्या बांबूला ' चिवा ' म्हणतात.

चिवळ वि० १ सडपातळ; रोड. २ जाडीनें योग्य परिमाणापेक्षां कमी. ३ लांबोळ्या घडणीचा किं० आकाराचा.

चिवळणें स० क्रि० १ दाबणें. २ फळ इ० हातानें दाबून आणि चोळून मऊ आणि बिलबिलीत करणें.

चिवा पु० वेळूंतील एक भेद.

चिवार स्त्री०, न०एक प्रकारचें गवत. २चिवा ह्या नांवाच्या बांबूचें वन किं० बेट.

चिवारी स्त्री० १ चिवा. २ चिव्याचें बेट किं० वन.

चिहळणें, चिहाळणें, चिळणें अ० क्रि० १ साखर, गूळ, मीठ, इ० पदार्थांना हवेंतील जलांशानें पाझर सुटणें. २ जखम, गळूं, इ० तून पू, लस, इ० वाहणें. दोन्ही अर्थीं 'चिघळणें' हा शब्द अधिक प्रचलित आहे.

चिहाळ पु० मीठ, साखर, इ० ना सुटलेला पाझर.

चिन्ह [सं० चिन्ह] न० १ कांहीं वस्तूंचें ज्ञापक असें जें कांहीं तें; उ० दक्षिणवारा सुरू झाला हें पावसाचें चिन्ह दिसतें. २ खूण; ठसा; पदार्थ ओळखतां यावा म्हणून त्याच्यावर केलेली कांहीं निशाणी. ३चालीरीती सोडून छांदिष्टपणानें वागणारा मनुष्य. ४अशा मनुष्यानें केलेले छांदिष्टपणाचे प्रकार. ५धुळीनें मळलेलें किं० अव्यवस्थितपणें कपडे घातलेलें मूल. ६ रोग ओळखण्याची खूण,–शरीराचा किं०गात्राचा वर्ण पालटणें इ० रूप.

चिन्हित [सं०] वि० १ डाग दिलेला. २ ज्यावर कांहीं खूण केली आहे असा. ३ प्रख्यात.

चिळकं (–कां–)डी, चिळकी स्त्री० जोरानें उडालेली किं० उडविलेली धार (पिचकारींतून. दाबलेल्या गळवांतून, किं० फळादिकांतून).

चिळण, चिलण [म० चीर] स्त्री० १ फट; भेग. २ कातळांत कोठें कोठें असते ती फट.

चिळवें न० शेराचा बत्तीसावा भाग किं० त्या भागाचें माप.

चिळस, चिळसी (–शी) स्त्री० वीट; शिसारी; खंती. ॐ **चिंळसखोर, चिळशी, चिळसबाज** वि० १ चोखंदळा. २ किळसुडा.

चिळहाट पु० मीठ, साखर, इ० ना हवेंतील जलांशानें सुटतो तो पाझर.

ची स्त्री० पराभवाची कबूली. हा शब्द फक्त पुढील वाक्प्रचारांत येतो. मी त्याच्याकडून ची म्हणाविलें; मी त्याला ची म्हणावयाला लाविलें; तो ची ची करीत गेला; इ०.

चीक [सं० चिक्कण, चिक्किण=मऊ, चिकट, स्निग्ध] पु० १ रुई, शेर, उंबर, इ० झाडांना जखम केली असतां गळतो जो दाट दुधासारखा पदार्थ तो. २ गर्भिणी किं० नवप्रसूत मानवजातीय किं० पशुजातीय स्त्रीच्या स्तनांतून निघतें तें घट्ट दूध. ३ बाभूळ, शेवगा, इ० झाडांच्या खोडांतून निघतो तो डीक. ४ गहूं इ० चें सत्त्व. ५कुरड्या, चिकवड्या, किं० पापड्या करण्यासाठीं शिजविलेलें पीठ.

चीज [फा०] स्त्री० १ वस्तु; पदार्थ. २ उत्कृष्ट वस्तु किं० पदार्थ. ३ गावयाचें किं० गायि-

लेलें पद किं० गीत. न० सार्थकता; सत्फलात्मक शेवट किं० परिणति; उ०मी माझ्या भावाच्या विद्येसाठीं तीन हजार रुपये खर्चले त्याचें त्यानें चीज केलें, तो बी.ए.पास झाला. ꙮचीजव(–ब–)स्त स्त्री० सामानसुमान; वस्त्रपात्रादि सामान.

चीट न० रंगाच्या छापांनीं वेल, फुलें, इ० दींनीं सुशोभित केलेलें वस्त्र.

चींड, चींढ [हिं०] स्त्री० दुसऱ्याच्या कांहीं भाषणानें किं० कृतीनें आलेला घुस्सा किं० राग. ꙮ **चिड(–ढ–)खोर** वि०क्षुल्लक कारणानें ज्याला घुस्सा येतो असा.

चीण [फा०] पु० १ परकर,लहंगा,विजार, इ० ना कमरेच्या भागाजवळ ज्या बारीक बारीक निऱ्या करून शिवणींत घेतलेल्या असतात त्या समुच्चयानें. २ घराला ओल न यावी म्हणून खालीं घातलेला दगडांचा थर. स्त्री० १ भिंत, जमीन, इ०तील भेग किं० फट. २ चोपून सपाट केलेली जमीन.

चीत वि० १ कुस्तींत पराभव होऊन उताणा पडलेला. २ वादांत पराभव पावलेला. ३ व्यापार किं० कांहीं आरंभिलेलें काम यांत अयशस्वी झालेला. ४ उताणी पडलेली कवडी (कवड्यांच्या खेळांत); याच्या उलट पट. ५ खरडलेला किं० रेघोट्या ओढून घाण झालेला कागद, इ०.

चीत्कार [सं०] पु० हत्तीचें ओरडणें.

चीन पु०, न० रताळ्याच्या जातीचा एक कंद. पु० परकर, विजार, इ० नीं कंबरेजवळ बारीक बारीक निऱ्या करून शिवलेल्या असतात त्या समुच्चयानें. स्त्री० १ भेग; फट; २ चीण.

चीप स्त्री० १ पातळ दगड किं० फळी. २ फुलांची माळ, तुरा, इ०. २ पोटांतील एक विकृतिविशेष (मुलांना विशेषतः होते ती).

चीप, चीब वि० पूर्णपणें भिजून निथळत असलेलें (वस्त्र, इ०).

चीप उ० वा० अ० गप्प ! अगदीं स्तब्ध !

चीर [हिं०] स्त्री० १ फट; भेग. २ स्त्रिया कपाळावर लावतात ती कुंकवाची रेघ किं० ती लावावयाची चांदीची पट्टी.

चीर [सं०] न० १ चिंधी; जीर्ण वस्त्र. २ कपडा. ३ वल्कल. ४ रेषा. ꙮ **चीरचोळी** स्त्री० मकरसंक्रांतीच्या दिवशीं सवाशिणी एकमेकींना खण, इ०चें जें वाण देतात तें.

चीर [म० चिरणें] स्त्री० तडा गेल्यामुळें किं० सांधकाम बरोबर न झाल्याकारणानें बारीक रेघेसारखी जी भिंत, पात्र, इ० त फट पडते ती.

चील स्त्री० एक शाकभाजी.

चील [म० चीर] स्त्री० १ फट, भेग. २ अरुंद पाऊलवाट.

चीळ स्त्री०स्तनांतून जोरानें फुटणारी दुधाची धार किं० चिळकांडी (फुटणें).

चुइटी स्त्री० १ पत्रावळीचीं पानें एकास एक जोडावयासाठीं बोरू इ० च्या ज्या बारीक काड्या करतात त्या प्रत्येक. २ रस पिळून काढून ऊस, इ०चा टाकून दिलेला चोथा.३ कोणत्याही उपयोगासाठीं केलेली बारीक, पातळ, आणि बहुधा चपटी अशी काडी.

चुकचुक स्त्री० पालीच्या ओरडण्याचा शब्द.

चुकचुकणें अ० क्रि० (पालीनें) ओरडणे.

चुकटी स्त्री० १अंगठा आणि पुढचें बोट यांची जुळणी किं० ह्या जुळणीनें हातांत धरली जाणारी तपकीर इ०ची चिमूट;चिमटी.२ अंगठा आणि एक बोट यांचा संयोग करून एकदम वियोग केला असतां होणारा आवाज; टिचकी; चिटकी. ३असा आवाज करावयाला लागतो तो काळ; अल्प काळ. ४ एकादा पदार्थ करण्याची कला किंवा खुबी (साधणें).

चुकणें अ० क्रि० १ जसें व्हावें तसें न होणें; यथाशास्त्र किं० यथानियम (काम) न होणें; उ०ह्या रसायणाची कृति चुकली. २ हरवणें; गळफटणें; उ०माझें मूल गर्दींत चुकलें.३कांहीं गोष्ट करावी तशी न करणें किं०भलत्या प्रकारें करणें; उ०तुह्मी त्याला तंभी भरलीं ह्यांत चुकलां. ४ अपराध करणें. ५ भलत्याच मार्गाला किं० सरणीला लागणें.६ टळणें; न होणें; न घडणें. ७उद्दिष्ट वस्तु किं०फळ हातीं न लागणें. ८ स्थानापासून भ्रष्ट होणें किं० गळणें. ९ समाप्त होणें; कांहीं कामाची किं० व्यवहाराची गुंतागुंत न उरणें किं० न राहाणें; संपविला जाणें. ꙮ **चुकतचुकत, चुकतमाकत** क्रि० वि० चुका करीत करीत; अडखळत अडखळत. **चुकूनसुद्धां** चुकीनें देखील; अकरणरूपी प्रयोगांत. **चुकला-**

माकला वि० नजर चुकीनें राहून गेलेला; योग्य वेळीं हजर नसलेला. चुकवाचुकव स्त्री० टाळाटाळ. चुकला फकीर मशीदींत कोणी मनुष्य कोठें सापडत नाहीं असें झाल्यास त्याच्या समानशील मंडळींत त्याला शोधावा; तेथें तो हटकून सापडावयाचाच. गेलें तें येत नाहीं आणि होणार तें चुकत नाहीं केलें जें भलतें कृत्य त्याचे परिणाम टाळतां येत नाहींत आणि नशीबांत असतें तें घडतेंच घडतें. वेळेस चुकला तो मुकला योग्य वेळीं जो हजर असतो त्याचा लाभ होतो. एकादी गोष्ट करून चुकणें ती गोष्ट संपविणें,– पूर्व स्थिति येण्याची आवश्यकता दर्शविणें असतां; उ० मी घर बांधून चुकलों,आतां व्यापारांत घालावयाला मजजवळ पैसे नाहींत; उ० मी आंबेमोहोर घेऊन चुकलों,आतां मला कमोद घेतां येत नाहींत.

चुकता [म० चुकणें] वि० १ निकालास लागलेला किं० लाविलेला; समाप्त केलेला किं० झालेला. २ कांहीं पैसे देऊन उरलेले द्यावयाचे पैसे; द्यावयाची जी रकम ती अंशतः दिल्यानें द्यावयाचा जो अंश राहातो तो.

चुकर [म० चुकणें] वि० घोटाळलेला; गोंधळलेला. २ पंचाइतींत पडलेला.

चुकवती स्त्री० कर्जाची फेड;देणें जें असेल तें देऊन टाकणें.

चुकविणें [म० ' चुकणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ भलत्याच मार्गास लावणें. २ घोटाळ्यांत पडेल असें करणें. ३ टाळणें.

चुका [सं० चुक्र; चुक्री] पु० एक पालेभाजी. ॐ चुकाचाकवत पु० एक पालेभाजी.

चुकाचूक, चुकामूक स्त्री० १अमुक वेळीं अमुक प्रकारें दोन माणसांची भेट व्हावी किं० गांठ पडावी असा संकल्प किं०ठराव पूर्वी केलेला असतां त्याप्रमाणें भेट न होणें किं० गांठ न पडणें. २ दोन माणसांनीं एकत्र असावें असा संकल्प किं० निश्चय असतां त्या दोघांचा यदृच्छेनें झालेला वियोग.

चुकांडी [म० चुकविणें] स्त्री० झुकांडी; एकाद्या माणसाचें आपल्याकडे लक्ष्य नाहीं अशी संधी साधून पळून जाणें; हातावर तुरी देऊन पळून जाणें.

चुकार [म० चुकविणें] वि० १ भटक्या. २ काम टाळणारा. ३ दुसऱ्याचें आपणास सापडलेलें (गुरूं किं० मूल). ॐ चुकारतट्टू, चुकार- पु० १ हातावर तुरी देऊन पळून जाणारा. २ काम टाळणारा; काम चुकवूं पाहाणारा.

चुकी [म० चुकणें] स्त्री० १ दोष; अपराध. २कांहीं गोष्ट व्हावी तशी न होणें; अन्यथा होणें. ॐ चुकीची अर्जी स्त्री०पूर्वींच्या अर्जींत किं०विनंतींत जें कमी पडलें तें भरून काढण्यासाठीं केलेली नवी अर्जी.

चुकूर [म० चुकणें] वि० १ चुकणारा; चुकलेला. २ भलत्याच मार्गास लागलेला. ३ गांधळलेला; घाबरलेला.

चुकौती स्त्री० १ कर्जाची फेड. २ कर्जाचा द्यावयाचा राहिलेला भाग.

चुखणें, चुंखणें स० क्रि० चोखून किं० शोषून घेणें(तोंडानें).

चुंग स्त्री० १ समुदाय; टोळी. २ जमा किं० गोळा झालेले लोक.

चुंगडा पु०, **चुंगडें** न० मोतीं, मणीं, इ० च्या सरांचें जुडगें. २ घोस, जुडी, पेंडी.

चुगली [हिं०] स्त्री० चहाडी; दुसऱ्याचें प्रकट केलेलें वर्म किं० रहस्य. ॐ चुगल,चुगलखोर, चुगलीखोर वि० १ दुसऱ्याच्या चहाड्या करणारा.२दुसऱ्याचें नुकसान करण्यासाठीं त्याचीं रहस्यें प्रकट करण्याचा स्वभाव ज्याचा असा.

चुंगी स्त्री० १ माणसांची किं० जनावरांची टोळी किं० थवा किं० जमाव. २ गवत, कडबा, इ०ची पेंडी किं० जुडी.

चुंच [सं० चंचू] स्त्री० पक्ष्यादिकांची चोंच.

चुचकारणें, चुचकाविणें स० क्रि० १ क्रुद्ध किं०बेफाम झालेलें माणूस किं० जनावर यांस सौम्य शब्द बोलणें किं०प्रेमानें थापटणें(त्यांना शांत करण्यासाठीं);गोंजारणें.२एकाद्याला गोड गोड बोलून वश किंवा अनुकुल करून घेण्याचा प्रयत्न करणें.

चुचर, चुचरट न० आंबा इ० फळांतील रेषा.

चुंचु [सं० चंचू]स्त्री० पक्ष्यादिकांची चोंच.

चुटका पु० १ विनोदपर किं० गमतीचें लहान वाक्य. २ अनपेक्षित विरोध किं०साम्य किं० अर्थ-

विपर्यास ह्यांच्यामुळें चमत्कार वाटविणारें वाक्य किं०विधान,' किं०गोष्ट.३मनाला लागलेली किं०लागून राहिलेली कांहीं गोष्ट; हुरहूर वाटविणारी कांहीं गोष्ट. ४ थोडा वेळ घेतलेली झोप. ५ चिलमीचा किं० विडीचा एक झुरका; पाणी, दूध, इ० चा घेतलेला एक घोट (क्रि० घेणें).६ लाल तापविलेल्या लोखंडानें दिलेला लहानसा डाग (क्रि० देणें).

चुटकी स्त्री० १ अंगठा आणि एक बोट यांचा संयोग करून एकदम वियोग केला असतां होतो तो आवाज. २ हा आवाज करण्याला लागतो तो काळ किं०तितका काळ.३अंगठा आणि पुढचें बोट यांच्या दाबांत आलेल्या पदार्थाचें परिमाण. ꙮ **चुटकी-सरशीं क्रि० वि०** १ अत्यल्प काळांत; हां हां म्हणतां. २ अत्यल्प प्रयत्नानें; सहजासहजीं. **चुटक्यांचे मांडव पु० अ० व०** मागें 'चट-क्यांचे मांडव' पहा.

चुटपुंजी पुढ 'तुटपुंजी' पहा.

चुटपुट स्त्री० न करावी ती गोष्ट आपण केल्यामुळें किं० आपल्याला न आवडणारी गोष्ट घडल्यामुळें होतें तें दुःख; हुरहूर. (क्रि० लागणें).

चुटपुरता वि०अगदीं बेताचा; जेमतेम पुरण्या-इतका.

चुटियाचुरमा, चुट्याचुरमा पु०एक पक्वान्न-विशेष; गव्हाच्या रव्याचे रोट भाजून ते कुसकरून तव्यावर तुपावर होरपळून काढून मग त्यांत साखर घालून वळलेले लाडू; त्यांना 'चुटिया चुर-म्याचे लाडू' असेंही म्हणतात.

चुटीमुटी, चुठीमुठी क्रि० वि० अगदीं बेतानें किं० हात राखून किं० काटकसरीनें (पुरविणें, खर्चणें, इ०). **वि०** बेताबेताचा; तुटपुंजा.

चुटी स्त्री० मागें 'चुइटी' पहा.

चुटी, चुट्टी स्त्री०, चुट्टा पु० रुईच्या किं० दुसऱ्या कसल्या तरी पानाची पसरट तोंडाची नळी करून तींत तंबाकू भरून ओढावयासाठीं करतात ती तात्पुरती विडी किं० चिलीम.

चुडवत, चुडत न० माड, ताड, इ० झाडांची फांदी किं० झावळी.

चुडा [सं० चूडा] पु० ह्या शब्दांत 'च' चा उच्चार दंत तालव्य. स्त्रियांचें करभूषण; बांगडी किं० बांगड्या; उ० तुझे चुडे जन्मवर अक्षय असोत (म्ह० तुला कधीं वैधव्य न येओ). ꙮ **चुडा भरणें, बांगड्या भरणें** १ स्त्रीनें हातांत बांगड्या भरून घेणें. २ भितरेपणानें मागें हटणें. **चुडेदान न०** नवऱ्याचें जीवित; उ० त्या वैद्यानें तिला चुडेदान दिलें (ह्म० तिच्या नवऱ्याला औषधोपचार करून दुखण्यांतून बरें केलें). **मला चुडेदान द्या** माझ्या नवऱ्याला ठार मारूं नका. **हातांत चुडे भरणें, हातांत बांगड्या भरणें** भित्रा, पुचाट, नामर्द असणें; उ० तूं मला मारलेंस तर मी तुला मारीन; मी काय हातांत चुडे भरले आहेत ?

चुडा चोंबडा पु० फाजील आणि लुच्चा.

चुडी स्त्री० सणकाड्या, माडाच्या झाडाच्या झापांचे शिंगे, इ० ची लांब जुडी बांधून प्रकाशार्थ पेटवितात ती. ꙮ **चुडी पुनव स्त्री०** माघ महि-न्याची पौर्णिमा; ह्या दिवशीं गांवाच्या सीमे-जवळ लोक हातांत चुड्या घेऊन चंद्राला ओवा-ळतात. **चुड्या पु०** चुडी धरणारा. २ भांडणें पेटविणारा; आगलाव्या.

चुडेराहाट पु० कनेकडास चोवीस रवे मारून करतात तो राहाट.

चुडेल स्त्री० स्त्रीचें पिशाच्च; हडळ.

चुणका पु० पुढें 'चुणूक' पहा.

चुणका वि० १ तल्लख, हुशार, तरतरीत (मूल इ०). २ उत्कृष्ट, नमुनेदार.

चुणचुण स्त्री० १ थोडीशी आग किं० वेदना (लागणें, होणें); उ० त्या औषधाची थोडीशी चुणचुण अजून आहे. २ पश्चात्ताप, हुरहुर.

चुणचुणणें अ० क्रि० झोंबणें, ठुसठुसणें.

चुणचुणीत वि० चलाख, हुशार, तरतरीत. (माणूस).

चुणणें [म० चूण] स० क्रि० १ वस्त्रादि-कांना चूण भरणें. २ (विड्याचीं पानें इ० ची) चवड करणें.

चुणी [म० चूण] स्त्री० वस्त्रादिकांस घात-लेली निरी किं० घडी; सुरकुती.

चुणी स्त्री० लहानशी माणकी, हिरकणी, इ०.

चुणी [सं० चूर्ण] स्त्री० डाळीचीं सालपटें, धान्याच्या दाण्यांचे तुकडे, कोंडा, इ० चें मिश्रण जें गुरांस खावयाला देतात तें.

चुणूक स्त्री० १ नमूना; पदार्थाचें दिग्दर्शन; वस्तूच्या स्वरूपाचें अंधुक कथन किं० निवेदन (दाखविणें, इ०). २ क्षणमात्र टिकणारी तीव्र वेदना.

चुथडा पु० १ वस्तूची दुर्दशा; खोडाखोडी केल्यामुळें विरूप दिसणारा कागद, लेख, इ०. २ भिन्न मताचे अनेक लोक एकाद्या कार्यांत लुडबुडूं लागले असतां त्या कार्याची होते ती नासाडी किं० घालमेल किं० अव्यवस्था.

चुथणें स० क्रि० अनेक पदार्थांत एकादा पदार्थ गळफटलेला असल्यास तो शोधतांना ते सर्व पदार्थ खालचे वर आणि वरचे खालीं करून ते ते अव्यवस्थित करणें म्ह० त्याची गल्लद होईल असें करणें.

चुथाचूथ स्त्री० १ पदार्थविशेष धुंडाळतांना किं० शोधतांना त्याच्या जवळच्या इतर पदार्थांची होते ती गल्लद किं० अव्यवस्था २ एखाद्या लेखांत अनेक ठिकाणीं केलेली खोडाखोड, दुरुस्त्या, इ० समुच्चयानें.

चुनकळी इ० ' चुना ' मध्यें पहा.

चुनका वि० नमुनेदार, उत्कृष्ट.

चुनडी, चुंदडी स्त्री० १ ठिपके असलेलें लुगडें. २ अशा लुगड्यावरचा एक एक ठिपका.

चुनणें, चुणणें स० क्रि० वस्त्रादिकांना बारीक बारीक निऱ्या घालणें किं० पाडणें; वस्त्रादिकांच्या निऱ्या करणें.

चुना [सं० चूर्ण=चुना] पु० १ शिंपा, कालवें, चुनखडी, इ० भाजून त्यांचें जें चूर्ण किं० खडे करतात ते. २ दुर्दशा, नासाडी. ꣸ **चुनकळी, चुन्याची कळी स्त्री०** १ जो भाजून चुना करतात असा एक प्रकारचा भुसभुशीत खडा किं० दगड. २ असा भाजलेला पण न विरविलेला खडा किं० दगड. **चुनखडा पु०** १ जो भाजून चुना करतात तो दगड. २ भाजलेला पण न विरविलेला चुनखडा. ३ तल्लख पोर किं० माणूस. **चुनखडी स्त्री०** चुन्याचे न भाजलेले खडे. २ असे खडे ज्या जमीनींत विपुल आहेत अशी जमीन. ३ तल्लख आणि चुणचुणीत मूल. **चुनभट्टी स्त्री०** ज्या भट्टींत चुन्याच्या उपयोगाचे दगड, शिंपा, इ० पदार्थ भाजतात ती. **चुनाळ पु०** विड्याच्या पानाला लावतात तो चुना ठेवावयाचें कांहीं विशिष्ट आकाराचें धातूचें वारदान. **चुनेखाण स्त्री०** चुनखडीची खाण. **चुनेगच्ची स्त्री०** इमारती चुना, दगडाचे तुकडे इ० धुमसून केलेली जमीन.

चुपकड न० पायराहाटाच्या माळेचे लोटे ज्या बारक्या लाकडांवर बांधलेले असतात तीं प्रत्येक; खापेकड. मागें ' कणेकड, ' ' खापेकड ' पहा.

चुप्प उ० वा० अ० गप्प बस ! गप्प बसा ! बोलणें बंद ! खामोष !

चुंफणें [सं० चुंब्] स० क्रि० १ मुखानें फलादिकांतील रस ओढून तोंडांत घेणें. २ कांहीं वस्तु तोंडांत घालून ती इकडे तिकडे हालविणें.

चुंफा [म० चुंफणें] पु० १ मुखानें आम्रादि फळांतील रस ओढून घेण्याची क्रिया. २ तोंडानें एकावेळीं ओढून घेतलेला आम्रादि फळांतील रस.

चुंब स्त्री० गर्दी, टोळी (एकाद्या माणसावर किं० जागेवर आलेली किं० पडलेली).

चुबक स्त्री० बारीक भोक.

चुंबक [सं०] पु० लोखंडाला ओढणारा किं० आकर्षिणारा पदार्थविशेष; लोहचुंबक. २ चिक्कू माणूस. ३ मुके घेणारा. ४ विषयलंपट. ꣸ **कवडीचुंबक वि०** चिक्कू, कृपण, पैशाचा लोभी.

चुबकणें स० क्रि० १ धुवावयाचें वस्त्र दोन्ही हातांनीं धरून दगडावर अनेकवार हापटणें. २ भोक पाडणें. **अ० क्रि०** कांटा इ० अंगांत शिरणें.

चुबकणें न० खोदकामाचें एक हत्यार.

चुबकणें स० क्रि० पाण्यांत बुडवून काढणें.

चुबका पु० १ एकत्र रुजलेल्या रोपांचा समुदाय. २ गवताचा झुबका. ३ गुंतवळांचा गोळा. ४ मुंग्या, माशा, इ० चा थवा.

चुबचुबणें अ० क्रि० पाण्याचे थेंब एकसारखे गळत राहाण्याइतकें भिजलेलें असणें (वस्त्र इ०).

चुबचुबीत वि० पाण्याचे थेंब एकसारखे गळत राहण्या इतकें ओलें झालेलें असणें (वस्त्र इ०).

चुंबणें [स० चुंब्=मुका घेणें] स० क्रि० १ ०चा मुका घेणें; ०२ शींसंलग्न होणें; ०ला चिकटून राहाणें. ३ ओढून घेणें, आकर्षिणें.

चुंबन [सं०] न० १ ओढून घेणें. २ मुका घेणें.

चुंबळ स्त्री० १ डोक्यावरून पदार्थ वाहून न्यावयाचा असतां तो डोक्याला बोचूं नये म्हणून वस्त्राचें जें वेटोळें करून डोक्यावर ठेवून त्यावर ओझें ठेवतात तें. २ मूळव्याध ह्या रोगाचा एक प्रकार. ३ चरकांतून पिळून काढलेला ऊस.

चुंबा पु० मुंग्या, माशा, इ०चा थवा किं० जमाव. [ओढलेला.

चुंबित [सं]वि०१चुंबिलेला.२स्पर्शिलेला. ३

चुंबीत क्रि० वि० नाइलाज होऊन; झक मारीत; उ० त्याला दाखला देण्याचें लांबणीवर टाक म्हणजे तो चुंबीत तुझे रुपये परत देईल.

चुचुकडा वि०लहान आणि गोंडस;चिमुकला.

चुचुकणें अ० क्रि० बोंचणें, टोचणें, भोंक पाडणें, वेधणें. **स० क्रि०** ०ला भोंक पाडणें.

चुंभळ स्त्री० मागें ' चुंबळ ' पहा.

चुयटी, चुयी मागें 'चुइटी,' 'चुई' पहा.

चुरका पु० मागें 'चरका' पहा.

चुरंगटणें, चुरगळणें, चुरगाळणें स० क्रि० १ कुसकरून, दाबून, चेपून, पिळवटून (पदार्थ) नासणें किंवा त्याचा चोळावोळा करणें किं०दुर्दशा करणें. २ माणूस किं० जनावर किं० पदार्थ ह्यांचा भलत्याच रीतीनें उपयोग किं० उपभोग घेऊन त्यांची खराबी करणें.

चुरग (–गा–)ळा पु० पदार्थ चुरगळणें किं० चुरगळण्याची क्रिया किं० चुरगळण्यानें झालेली दुर्दशा.

चुरचुर, चुरचुरां क्रि० वि० १ कढईत तळला जात असलेल्या पदार्थातून चुर्रचुर्र असा आवाज होईल अशा रीतीनें. २ न अडखळतां (बोलणें).

चुरचुर स्त्री० तीव्र वेदना;निखारा किं०कांहीं तापलेला पदार्थ अंगाला लागला असतां कांहीं वेळ जी वेदना होते ती; झोंबरें औषध डोळ्यांत घातलें असतां होते ती वेदना; क्षताला क्षारादिकाचा स्पर्श झाल्यानें होते ती वेदना.

चुरचुरणें अ० क्रि० १ चुरचुर असा आवाज करणें. २ झोंबणें.

चुरचुरीत वि० १ पूर्णपणें भाजलेला किं० तळलेला किं० वाळलेला. २ पूर्णपणें किं० समर्पक रीतीनें लागू पडेल असें (उत्तर).

चुरचोंबडा, चुरचोंडा वि० १ वटवट्या; वडवड्या; लुबा; मध्यें तोंड घालणारा.

चुरडणें स० क्रि० कुसकरणें; पदार्थ दाबून, चेपून,किं० भलत्याच रीतीनें वापरून तो नासणें.

चुरणें [सं० चूर्ण्=चिरडणें] स० क्रि० १ चूर्ण करणें; उ० पापड चुरून भातांत घाल. २ चेपणें,दाबणें.३कुसकरणें.४मर्दणें, चेपणें (गात्रादि). ५ अव्यवस्थित करणें. [आकरसणें.

चुरमटणें, चुरमुटणें अ०क्रि०आकुंचित होणें,

चुरमा [हिं] पु० गव्हाचे रोठ भाजून ते कुसकरून तें पीठ तुपावर परतून त्यांत साखर इ० घालून त्याचे केलेले लाडू; चुटिया चुरमा.

चुरमुरणें अ० क्रि० १ चरफडणें, तरफडणें. २ असंतुष्टपणानें तोंडांतल्या तोंडांत पुटपुटणें.

चुरमुरा पु० १ भात ऊन्ह पाण्यांत भिजवून त्याचे तांदूळ करून खापरांत भाजून त्याचे पांढरे तकेत आणि लांबोडे दाणे करतात ते प्रत्येक; मुरमुरा, कुरमुरा,असे पर्याय शब्दही आहेत. २ पोहे ओलवून भाजून करतात ते दाणे. ॐ**चुरमुरे खाणें** (किं० **खात बसणें**) मनोरथ सफळ न झाल्याकारणानें चरफडत बसणें किं० खट्टू होऊन बसणें.

चुरस [हिं०] स्त्री० १ द्वेष, वैमनस्य,अदावत, वैर. २ स्पर्धा; ईर्ष्या.३दुसऱ्यावर चढाई करण्याची इच्छा किं० प्रयत्न.**वि०**अपमान,निराशा, इ० कारणांमुळें दुःखीकष्टी झालेला.

चुरा [सं० चूर्ण्=फोडून तुकडे करणें] पु० १ फोडणें, ठेचणें, इ० क्रियांच्या योगानें पदार्थांचे झालेले तुकडे समुच्चयानें. २ नासाडी, दुर्दशा. ॐ **चुराचारा पु०** पदार्थ फुटून तुटून त्याचे झालेले तुकडे समुच्चयानें.

चुराडा [म० चुरा] पु० १ पदार्थांचे तुकडे झाले अशी स्थिति; नासाडी; दुर्दशा. २ थकवा, गळाठा; श्रमातिशयामुळें आलेला शीण.

चुरी[सं० चूर्ण]स्त्री० १हरभरे, तूर,इ०द्विदल धान्यांचे फुटके कण.२भरडलेल्या डाळीचा चुरा.

चुरूं चुरूं क्रि० वि० फाजिलपणें आणि न थांबतां (बोलणें).

चुलत वि० चुलत्याच्या संबंधाचा; चुलत्याच्या बाजूनें; चुलत्याच्या द्वारें. ॐ **चुलत**

भाऊ पु० चुलत्याचा मुलगा. चुलत बहीण स्त्री० चलत्याची मुलगी. चुलत चुलता पु० बापाचा चुलत भाऊ. चुलत आजी स्त्री० बापाची चलती. चुलत सासरा पु० आपल्या सासऱ्याचा भाऊ. चुलत सासू स्त्री० आपल्या सासूची जाऊ किं० बायकोची चुलती. चुलत दीर पु० आपल्या नवऱ्याचा चुलत भाऊ. चुलत नणंद स्त्री० आपल्या नवऱ्याची चुलत बहीण. चुलत चुलत भाऊ पु० आपल्या बापाच्या चुलत भावाचा मुलगा.

चुलत, चुलेत, चुळत न० होडीचें वल्हें ज्या उभ्या दांड्याला टेकून खेचलें जातें तो दांडा.

चुलता पु० बापाचा भाऊ.

चुलती स्त्री० बापाच्या भावाची बायको.

चुलवा[सं० चुल्लि; म० चूल] पु० मोठी आणि ओबडधोबड चूल.

चुलवान (–ण), चुलांगण, चुलाण [सं० चुल्लि; म० चूल] न० १ उसाचा रस कढविण्याची मोठी चूल. २ ओबडधोबड रचलेली मोठी चूल.

चुला, चुल्ला [सं० चुल्लि, चुल्ली] पु० मोठी चूल (पाणी तापविणें, स्वयंपाक करणें, इ० उपयोगाची).

चुलाणें [सं० चुल्लि, चुल्ली] न० लहानशी चूल किं० शेगडी.

चुवा पु० चंदनाच्या लाकडापासून काढलेलें एक सुगंधी द्रव्य.

चुवा, चुहा [हिं०] पु० हुशार आणि तरतरीत माणूस. ❀ **चुहेदान, चुवेदान** न० उंदीर पकडावयाचा सापळा.

चुळका [सं० चुलुक] पु० १ ओंजळ. २ ओंजळींत मावण्याइतकें पाणी; चूळ. ❀ **चुळक्यांत पाणी घेऊन जीव देणें** कांहीं अशक्य गोष्ट मूर्खपणानें करूं पाहाणें.

चुळचुळ (–ळां) क्रि० वि० चुळचुळ असा आवाज करून.

चुळचुळ स्त्री० घाई, नेट. ❀ **चुळचुळ मुंगळा** पु० १ घाई, नेट. २ एखाद्या कामाबद्दल उत्कंठा (लागणें).

चुळणी [म० चूळ] स्त्री० तोंड स्वच्छ करावयासाठीं तोंडांत घेतलेलें पाणी, किं० थुंकून टाकलेलें असें पाणी.

चुळत न० मागें ' चुलत ' न० पहा.

चुळबुळ स्त्री० १ अस्वस्थपणाचें चलनवलन किं० चळवळ. २ अत्यन्त उत्कंठा किं० घाई.

चुळबुळणें अ० क्रि० १ तेल, तूप, इ० स्निग्ध पदार्थांनें बुळबुळीत होणें. २ अस्वस्थ होणें किं० असणें.

चुळबुळा (–ळ्या) वि० चळवळ करणारा; चंचळ; अस्वस्थ.

चुळबुळाट पु० १ फार उतावळेपणा. २ तेल इ० स्निग्ध पदार्थांनें माखलेलें असण्याची स्थिति.

चुळबुळाविणें स० क्रि० तेल इ० स्निग्ध पदार्थांनें माखणें.

चुळबुळीत वि० १ तेल, तूप, इ०नीं माखलेला. २ ज्यांत तेल, तूप, इ० फार आहे असा (कांहीं खाद्य पदार्थ).

चुळमुळ स्त्री० १ घाई; नेट (करणें, लावणें). २ उत्कंठा (लागणें).

चुळमुळणें अ० क्रि० १ अस्वस्थ होणें. २ उत्कंठित होणें. ३ चरफडणें.

चुळी स्त्री० हातांत पाणी घ्यावयासाठीं केलेला खळगा किं० त्या खळग्यांत घेतलेलें पाणी.

चुळेत न० होडीचें वल्हें खेचतांना वल्ह्याचा दांडा ज्या उभ्या खुंट्याला टेकविलेला असतो तो खुंटा. वर ' चुलत, ' 'चुलेत' पहा.

चूं स्त्री०, न० १ जोरानें फेकलेल्या धोंड्याचा किं० सोडलेल्या बाणाचा शब्द. २ कोणताही सौम्य ध्वनि. ❀ **हूं कां चूं** स्त्री०, न० यत्किंचित् शब्द सुद्धां (अकरणरूपी प्रयोग); उ० हूं कां चूं न म्हणतां (किं० न करतां) माझें काम कर.

चूक स्त्री० १ दोष; करावयाचें तें न करणें आणि न करावयाचें तें करणें. २ जें वास्तविक असावयाला पाहिजे तें नसणें; खऱ्याशीं विसंवाद; सत्याशीं न जमणें. वि० खोटें; खऱ्याशीं किं० सत्याशीं न जुळणारें; असत्य. ❀ **चूक भूल** स्त्री० ए० व० चुकीनें किं० विस्मृतीनें राहून गेलेल्या नोंद, हिशेब, लिखाण, इ० तील कांहीं बाबी. **चूकभूल द्यावी घ्यावी** हिशेबांत कांहीं बाबती चुकीच्या असल्यास

किं० विस्मृतीनें खोट्या नमूद केल्या असल्यास किं० लिहावयाच्या राहून गेल्या असल्यास देण्याघेण्यांत त्या दुरुस्त केल्या जाव्या; दोन्हीं पक्षांनीं एकमेकांस दोष कळवून देणें तें द्यावें आणि घेणें तें घ्यावें; (व्यापारी भाषेंत हा शब्द योजला जातो).

चूड स्त्री० १ सण, गवत, झाडाच्या वाळलेल्या फांद्या, इ० चें जुडगें जें प्रकाशासाठीं पेटवितात तें; चुडी. २कांडार नांवाचा सर्पविशेष. न० लावणीसाठीं भाताच्या रोपांची मुठींत घेतलेली जुडी. ॐ **चूड उचलणें (धरणें किं० लावणें)** एकाद्या विरुद्ध खोटा आळ घेणें. **चूड लावणें** (किं० **फिरविणें**) जाळपोळ करून रयतेची दुर्दशा करणें.

चूडा [सं०] स्त्री० ह्या शब्दांत ' च ' चा उच्चार तालव्य. १ शेंडी. २ केशकलाप. ३ तुरा (कोंबडा, मोर, इ० च्या डोक्यावरचा). ४ मस्तक. ५ शिखर. ॐ **चूडामणि** पु० १ शिरोभूषण. २ श्रेष्ठ. **चूडाकरण, चूडाकर्म** न० चौल हा संस्कार;जावळ राखणें.

चूण स्त्री०,न०जनावरांना खाद्य म्हणून देतात तें डाळीचे फुटके दाणे, कोंडा, इ० चें मिश्रण. स्त्री० १ लहानशी हिरकणी, लालडी, पाच, इ०. २ सुरकुत्या; बारीक बारीक निऱ्या. ॐ **चूणकस** वस्त्राला चीण पाडावयाचें साधन.

चून न० नारळाचा चहू.

चूर [सं० चूर्ण] पु० १ पदार्थाचे झालेले किं० केलेले तुकडे समुच्चयानें. २ थकवा; शीण. वि० निमग्न; कांहीं कार्यांत किं० विचारांत तल्लीन किं० एकाग्र झालेला. ॐ **चूरचार** पु० ए० व० तुकडे विकडे.

चूर्ण [सं०] न० १ चुरा; पूड. २ पीठ. ३ धूळ. ४ कापूर, चंदन, इ० सुगंधी द्रव्यांचा चुरा. पु० १ खडू. २ चुना. ॐ **चूर्णकार** पु०लोणारी. **चूर्णखंड** पु०,न० १ वाळूचा खडा. २ चुनखडी.

चूर्णिका स्त्री० १ गद्यात्मक तात्पर्यरूप टीका.२ शब्दालंकार आणि अर्थालंकार ज्यांत विपुल आहेत असा भाषाशैलीचा एक प्रकार.

चूल [सं० चुल्लि, चुल्ली] स्त्री० स्वयंपाक करणें, पाणी तापविणें, पदार्थाला उष्णता देणें इ० साठीं केलेला रचनाविशेष. चूल मातीची किं० दगडाची असते.चुलीच्या तळाशीं लाकडें,कोळसे, गोवऱ्या इ० पेटविलेल्या असतात आणि चुलीच्या माथ्यावर पात्रांत ज्याला उष्णता द्यावयाची तो पदार्थ असतो. ॐ**चुलीचें लाकूड चुलींतच बरें** त्या त्या माणसाला त्याच्या त्याच्या दर्जाप्रमाणें वागविलें पाहिजे;कोणालाही भलतेंच महत्त्व देणें बरोबर नाहीं. **चुलीचें लाकूड चुलींतच जळेल** लफंग्या माणसानें कितीही चुकवाचुकव केली तरी तो शेवटीं सरकारच्या किं०समाजाच्या तावडींत सांपडणारच आणि त्याला योग्य तें पारिपत्य होणारच. **चुलींत जाणें** निष्फळ होणें;नष्ट किं०विध्वस्त होणें. **चुलींत जाओ** त्याची गोष्ट काढूं नका.तें बाजूस सारा.त्याचें कांहीं कां होईना,आपणाला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. **चुलींतून निघून वैलांत पडणें** एका संकटांतून बचावलें तरी दुसऱ्या संकटांत पडणें; स्थितींत पालट न होणें किं०झाला तरी तितकाच कष्टकर पालट होणें. **चुलीला अक्षत देणें** घरांतील सर्व माणसांना जेवावयास बोलावणें. **एकाद्याच्या चुलींत मांजरें व्यालेलीं असणें** १त्याची अत्यंत विपन्न दशा असणें.२ घरांतील सर्व माणसें कारणपरत्वें दुसऱ्या गांवीं गेलेलीं असल्यामुळें चूल पेटविण्याचें कारणच न पडणें. **चुलीला विरजण पडणें** चूल विझणें. **बायकांचें शहाणपण चुलीपाशीं** (किं० **चुलीपुरतें**) जगांतील किं० व्यवहाराच्या खुब्या बायकांना ठाऊक असणें शक्य नाहीं. **घरोघर मातीच्या चुली** साधारणपणें म्हटलें असतां सर्वांची स्थिति सारखीच असते; घरोघर कांहींतरी कष्टकर प्रकार असावयाचेच; सर्व घरांत कांहींतरी अडचणी, दुःखें, कुरबुरी,असावयाच्याच;पूर्ण सुखी कोणीही नसतें. **चुलीपाशीं हगावें आणि जन्मान्तरास रडावें** अपराध करावा आणि पारिपत्य झालें असतां नशीबास दोष द्यावा (हा मूर्खपणाचा किं० हास्यास्पद प्रकार होय). **चुलखंड** न० चूल (रागानें किं० तुच्छतेनें). **चूलपोतेरें** न०, **चूलभूई** स्त्री० स्वयंपाक करणें, भांडीं आवरणें, झाकपाक करणें, पोतेरें घालणें, इ० भोजनाच्या अंगभूत सर्व कृत्यें किं०कर्तव्यें समुच्चयानें (करणें). **चूलभावनशा** पु० घरबशा; ज्याला घरांतच बसावेंसें वाटतें तो; जो कोठें बाहेर जात नाहीं तो.

चूळ [सं० चुलुक] पु०, स्त्री० तोंडांत घालून खळखुळून टाकावयासाठीं घेतलेलें पाणी किं० हें बाहेर टाकलेलें पाणी.

चेइणें अ० क्रि० जागृत होणें; जागें होणें (कवितेंत).

चेक [इंग्रजी] पु० १ दपटशा; तंभी (येणें).

चेकळणें, चेकाळणें अ० क्रि० १ आवेशपूर्वक कांहीं कामास प्रवृत्त होणें. २ बेफाम होणें (माणूस, जनावर). ३जोरानें सुरू होणें(वारा, जाळ, वगवा, पाऊस, रडण्याचा आक्रोश, खोकला, इ०). ४ क्रोधाविष्ट होणें. ५ विपुल होणें, पिकणें, वाढणें, किं० फोफावणें.

चेंगट,चेंगटया वि० १ संथपणानें किं० आळसटलेपणानें काम करणारा;ज्याला काहीही कामाला इतरांपेक्षां अधिक वेळ लागतो असा; रेंगाळत रेंगाळत काम करणारा. २ ज्याला उशीर लागतो, जें लवकर आटोपत नाहीं असें(काम). ३ भेटावयाला आलेला आणि लवकर न निघून जाणारा (माणूस).

चेंगटाई [म०चेंगट+आई (प्रत्यय)]स्त्री० चेंगटपणा.

चेंगरणें, चेंगडणें स० क्रि० दाबणें, चेपणें. अ० क्रि० दाबलें जाणें, चिरडलें जाणें.

चेंचकट ,चेंचट, चेंचका वि० खरडलें गेलेलें, अर्धवट झिजलेलें,–(रुपाया, मोहोर, इ० नाणें).

चेंचट, चेंचड किं० १ खरडला गेलेला (रुपाया इ० नाणें). २ धोंडाळ किं० ओबडधोबड रस्ता.

चेंचणें,चेंचरणें स०क्रि० १ ठेचणें;खूप दाबणें. २ एकाद्याला चोप किं० मार देणें; कुबलणें.

चेंचा पु० कोथिंबीर, मिरच्या, इ० पदार्थ ठेचून करतात तें तोंडीलावणें; ठेंचा.

चेंचें न० खाद्यासाठीं पक्ष्यांचीं चिवचीव. ꣸ **चेंचें करणें** १ दीनपणानें एकाद्याची प्रार्थना करणें किं० त्याची करुणा भाकणें. २चोप किं०मार बसल्यामुळें किंचाळणें किं०दुःखाचा आक्रोश करणें.३ नाइलाज झाल्यामुळें तरफडत बसणें.

चेट स्त्री०, **चेटक, चेटूक** न० १ कोणेकाचा घातपात करावयाचा असतां ज्या मंत्रविद्येचा किं० तंत्राचा उपयोग केला जातो ती विद्या किं०तें तंत्र; करणी. २ दुसऱ्याच्या नाशासाठीं किं०नुकसानीसाठीं केलेली गूढ युक्ति किं० मसलत. ꣸ **चेटक्या, चेटकी, चेटक्या** वि० १ चेटूक करतो तो. २ दुसऱ्याच्या नाशासाठीं गूढ हिकमती करणारा. **चेटकीण** स्त्री० जादूटोणा करणारी स्त्री.

चेटूक न० वर 'चेटक' पहा.

चेड स्त्री० मुलगी; कन्या.

चेडरूं, चेडूं न० लहान मूल.

चेंडवळ पु०एक पक्षिविशेष.

चेडा पु० १ एक पिशाच,–याच्या मदतीनें कोणाही माणसाला उपद्रव देतां येतो. २ मुलगा.

चेंडू पु० १ वस्त्राच्या चिंध्या घट्ट गुंडाळून वाटोळा करतात जो खेळावयासाठीं गोळा तो; हा जमीनीवर आपटला असतां तो जोरानें वर उडतो.२ कोणत्याही द्रव्याचा वाटोळा गोळा खेळावयासाठीं केलेला असतो तो. ३ कोणत्याही द्रव्याचा कोणत्याही उपयोगासाठीं केलेला वाटोळा गोळा. ४ ठेंगणा आणि लठ्ठ माणूस (उपहासानें). ꣸ **चेंडूफळी** स्त्री० फळीच्या तुकड्यानें चेंडू उडवावयाचा मुलांचा खेळ.

चेंडूल, चेंडोल, चंडोल पु० डोक्यावर तुरा असलेला एक पक्षिविशेष.

चेंढळ मेंढळ स्त्री०पोरांचा समुदाय किं०टोळी.

चेत वि० १ बेशुद्ध किं० मेल्यासारखा निश्चळ. २ पराभूत; चीत.

चेत [सं० चृत्=पेटविणें] स्त्री०, पु० पेट, ज्वाला (येणें, घेणें).

चेतणें [सं० चृत्=पेटविणें] अ० क्रि० १ पेटणें; जळूं लागणें. २ रागास चढणें; क्रुद्ध होणें. ३ उद्दीप्त होणें (कामविकार, राग, मत्सर, इ०). स० क्रि० १ पेटविणें. २क्रोधास चढविणें.३ उद्दीप्त करणें.

चेतन [सं०] वि० सजीव. पु० १ प्राणी. २ मनुष्य. ३ आत्मा. ꣸ **चेतनाचेतन** वि० सजीव आणि निर्जीव सृष्टि; सर्व सृष्ट पदार्थ.

चेतना [सं०] स्त्री० १ बुद्धि. २ मन. ३ ३ प्राण.४ चैतन्य.

चेतव [सं० चृत्=पेटाविणें; म० चेतविणें] पु० १ उद्दीपन; क्षोभ; उत्साह (अंगीं येणें किं० आणणें). २ पाझर (फुटणें, सुटणें).

चेतवण [म० चेतविणें] न० धलप्या, काटक्या, गवत, इ० लवकर पेट घेणारे पदार्थ,–

चेहळणें [म० चेहळ] अ० क्रि० मीठ, साखर, इ० हवेंतील जलांशानें पाझरणें; चिघळणें.

चेहेळ, चेहेळणें वर 'चेहळ' 'चेहळणें' पहा.

चेळ [हिं० चहल्] स्त्री० वैपुल्य, समृद्धि.

चेळणें स० क्रि० ठासणें;ठासून भरणें;कोंबणें.

चेळणें अ० क्रि० मागें ' चेहळणें ' पहा.

चेळा वि० खेळकर; चळवळ्या; चंचल(मूल).

चेळें न० १ म्हातारचळ; भ्रांतिष्टपणा (भरणें, येणें, लागणें). २ हट्ट, दुराग्रह.

चैतन्य [सं०]न० १ प्राण, जीव. २ मन, चित्त. ३ ज्ञान. ४ परमात्मा. ❀ **चैतन्यगाभा** पु०, **चैतन्यज्योति** स्त्री०, न०, **चैतन्यमूर्ति, चैतन्यमूर्त** स्त्री०,**चैतन्यरूप, चैतन्यस्वरूप** न० परमात्मा.

चैत्य [सं०] वि० अंतर्यामासंबंधाचा. पु० १ जीवात्मा. २ हद्दीचें झाड. न० १ अभिप्राय. २ देवालय. ३ यज्ञस्थान. ४ पार बांधलेला पवित्र वृक्ष (पिंपळ, इ०). ५ पिंपळ. ६ वृक्षाचा पार. ७ वासस्थान. ८ जैनांचें देऊळ.

चैत्र [सं०] पु० १ चैत्र हा महिना; चैत्र, वैशाख इ० जे हिंदूंचे वर्षाचे बारा महिने त्यांतील पहिला; इंग्रेजी वर्षाच्या मार्च, एप्रिल, ह्या महिन्याशीं चैत्र हा समकालीन असतो. २ बुद्ध भिक्षु. ❀ **चैत्ररथ (-थ्य)** न० कुबेराचा बाग. **चैत्रगौरी, चैत्रागौर (-री)** स्त्री० चैत्र महिन्यांत पूजितात ती पार्वतीची मूर्ति. **चैत्रपालवी** स्त्री० चैत्र महिन्याच्या सुमाराम वृक्षांस नवीन पानें फुटतात तीं समुच्चयानें. **चैत्र शिंपणें** न० चैत्रांत येतात त्या पावसाच्या सरी समुच्चयानें किं० एक एक सर प्रत्येक. **चैत्रांगण** न० चैत्र महिन्यांत पार्वती देवीच्या प्रीत्यर्थ अंगण झाडून त्यांवर काढतात त्या रांगोळीनें शोभित केलेलें अंगण.

चैत्रागौर स्त्री० वर 'चैत्र' मध्यें पहा.

चैत्री [सं०]स्त्री०चैत्र महिन्यांतील पौर्णिमा. वि० चैत्र महिन्यांतील किं०चैत्र महिन्यासंबंधाचा.

चैन [हिं०] स्त्री० १ मनाची स्वस्थता. २ आनंदाची, आरामाची, सुखाची स्थिति. ३ समृद्धीमुळें होणारा आनंद. ४ सुखें; सुखोपभोग. ❀ **चैनबाज** वि० चैनींत काळ घालविणारा.

चैल [सं० चैल=वस्त्र, कपडा] वि० वस्त्रसंबंधीं. न० वस्त्र; कपडा; चिरगुटें.

चैली [हिं०] स्त्री० धलपी.

चोइटी, चोई स्त्री० ' चुइटी, ' 'चुई' पहा.

चोख [हिं० चोखाह्] वि० १ अस्सल, भेसळ नसलेला. २ अगदीं खरा किं० प्रामाणिकपणाचा. ३ नीतिमार्गाला अनुसरून असलेला.

चोखट, चोखटा(-डा)[हिं० चोखाह्] वि० १ सुंदर. २ शुद्ध, निर्मळ. ३ पवित्र. ❀ **चोखटेल** न० गोडें तेल (करडई, तीळ, कारळा, इ० चें तेल). ह्याच्या उलट ' कडू तेल. '

चोखटाई [म० चोखट+आई (प्रत्यय)] स्त्री० १ सुंदरपणा. २ शुद्धपणा. ३ पवित्रपणा. ❀ **चोखटाईची भाजी** स्त्री० निर्लेप म्हणून ओंवळ्यानें खावयाला हरकत नाहीं अशी भाजी.

चोखणी [म० चोख+णी (प्रत्यय)]स्त्री० शेंडी, केश, अंग,इ०स चोपडलेलें तेल निघून जावें म्हणून शिकेकाईची पूड किं० काढा लावतात तो.

चोखणी [म०'चोखणें' पासून]स्त्री० १चोखण्याची क्रिया. २ मुलांना करमणुकीसाठीं चोखावयाला देतात तो पदार्थ.

चोखणें [सं०चूष्=पिणें, चोखणें]स०क्रि० मुखाच्या किं०ओठांच्या व्यापारविशेषानें मुखांत ओढून घेणें (आंबा इ० चा रस).

चोखनळ, चोखनेळ [म० चोख; हिं० चोखाह्] वि० चोखंदळा; चिकित्सेखोर.

चोखलणें,चोखळणें, चोखाळणें [म०'चोख' पासून] स० क्रि० १ गवत, पानें, इ० काढून टाकून जमीन किं० शेत स्वच्छ करणें. २ रद्दी किं० वाळलेल्या फांद्या छाटून झाडें नीटनेटकीं करणें. ३ दांत कोरणें; काडी, इ० नीं दांत स्वच्छ करणें. ४ घासून, पुसून स्वच्छ करणें. ५ धुंडाळणें, शोधणें. ६ मुलाची टाळू तेलानें भरणें. ७ (विशिष्ट मार्ग किं०क्रम) अनुसरणें किं०अवलंबिणें.

चोखा [हिं०] वि० स्वच्छ, शुद्ध, निर्मळ, पवित्र, योग्य.

चोखामेळा पु० १ महार जातीचा पूर्वी होऊन गेलेला एक साधु. २ कोणीही महार साधुपुरुष. ३ कोणीही महार.

चोखारी [म० ' चोख ' पासून] **वि०** चोखंदळ; चिकित्सेखोर. ॐ भिकारी आणि चोखारी दरिद्र्याला चोखंदळेपणा शोभत नाहीं.

चोखाळ [म० चोख] **वि०** १ स्वच्छ; नीटनेटका. २ किल्मिषरहित.

चोखाळा [म० चोखाळणें] **पु०** १ साफसुफ किं० नीटनेटकें करण्याची क्रिया. २शोधणें, धुंडाळणें, हुडकणें (घेणें). **वि०** चोखंदळेपणा करणारा (खाण्यापिण्यांत).

चोखोट वि० वर ' चोखट ' पहा.

चोंगा पु०, चोंगी स्त्री०, चौंगा पु०हाताची रुंदी किं० त्या रुंदींत धरलेला पदार्थ.

चोंच] **सं०** चंचु] **स्त्री०** १ पक्ष्याचें तोंड, किं० त्या तोंडाचा अग्रभाग. २ शस्त्रादिकांचें टोंक, ३ पागोट्याची कोकी.

चोंचण न० १ जांत्याचा किं० तंबूचा खुंटा ह्यांच्या डोक्यावर दगड, हातोडी, इ०चे रट्टे बसून बसून त्याला येतो तो गोंड्यासारखा आकार. २ काथ्या.

चोंचर, चोंचरट न० आंबा इ० फळांतील रेषा किं० तंतु.

चोंचरा वि० बोलतांना शब्दोच्चार नीट साफ करूं शकत नाहीं असा; तोतरा; बोलतांना लागतो तो.

चोंचला, चोंचेला [**हिं०** छुंछला] **पु०** १ स्त्रीचा स्तन. २ प्रिय पति. ३ विषयी हावभाव आणि चेष्टा.

चोचा [**म०** चोचणें] **पु०** हत्यारानें वृक्ष इ० वर केलेलें क्षत.

चोचावणें अ० क्रि० सूं सूं, किं० सरसर, असा आवाज करीत जाणें (धोंडा, बाण, इ० नीं). **स० क्रि०** १ आंबा, आंवळा, मुळा, इ० ना भोकें पाडणें (त्यांत क्षार, पाक, इ० भिनण्यासाठीं). २ मुळा इ० कोशिंबिरीसाठीं विळीवर उभा फिरवून फिरवून त्याच्या बारीक चिंधोट्या करणें,–त्यांचे विळीवर आडवे धरून तुकडे करण्याकरतां.

चोज [**सं०** चोद्य=आश्चर्य] **पु०, न०** १ आश्चर्य किं० आश्चर्यकारक वस्तु. २ नखरे, कौतुक (करणें). ३ प्रेमानें आणि काळजीनें वागविण्याला लायख समजणें (करणें); उ० आई आपल्या मुलाचें भारी चोज करते.ॐ**जिवाचे चोज करणें** आपण नाजूक आहों, स्वच्छ आहों, आपणाला भरुतेंसलतें कांहीं चालत नाहीं, अशी ऐट करणें. **चोजबावळा वि०** छांदिष्ट; विलक्षण; विचित्र.

चोट [हिं०] **स्त्री०** १ तडाखा, रट्टा. २ मुठीनें मारलेला ठोसा. ३ शस्त्रादिकांनीं झालेली जखम किं० इजा. ४ व्यापारांत लागलेली बूड (लागणें). ५ दैवयोगानें झालेला अकल्पित लाभ (सांधणें, लागणें).

चोंटकें, चोंडकें न० एकतारी वाद्यविशेष.

चोड न० १ चरकांतून पिळून काढलेला ऊस. २ नारळाचें सोडण (काथ्याचें कवच).

चोंडा पु०भाताच्या रोपांची जुडी किं०झुबका.

चोंढा पु० भातशेतांतील लहानसा भाग,– बंधारे घातलेला.

चोथड पु० पदार्थ चावून त्याचा रस गिळून नंतर थुंकून टाकलेला रद्दी भाग.

चोथडी [**म०** चोथा] **स्त्री०** १ ठिगळ. २ दह्याची कवडी. ३ पदार्थ चावून रस घेऊन त्याचा थुंकून टाकलेला भाग.

चोथलणें [**म०** चोथा] **स० क्रि०** नारळाचा काथ्या, गवत, इ० नीं भांडें इ० घासणें (स्वच्छ करण्यासाठीं).

चोथवा [**म०** चवथा] **पु०** पायलीचा चवथा भाग.

चोथळणें स० क्रि० तेलें, उटणीं, इ० पदार्थाला चोपडणें. **अ० क्रि०** चोथापाणी अशा रूपाचें होणें (दही, इ०)

चोथा पु० १ भांडीं इ०घासून स्वच्छ करण्यासाठीं घेतलेलें चिरगुट, काथ्या, इ० चा गोळा. २ तोंडानें रस चुंफून किं० हातानें रस पिळून घेतल्यावर पदार्थाचा टाकून दिलेला भाग.

चोंदडणें स० क्रि० खुपसणें, जोरानें शिरकावणें.

चोंदणी [**म०** चोंदणें] **स्त्री०** बारदानांत पदार्थ ठासून भरण्याची क्रिया.

चोंदणें स० क्रि० १ ठासून भरणें; कोंबणें;

खुपसणें. २ गुडदी, बूच, इ० नीं वाट, पाट, तोंड, द्वार, इ० बंद करणें. अ० क्रि० १ अडणें; बंद होणें; बंद पडणें.

चोंद्रावळा वि० वेड्याचें सोंग घेणारा; लबाडीनें वेड्यासारखा वागणारा.

चोदलणें स० क्रि० १ पायांनीं तुडविणें. २ पाण्यांत चालून पाणी गढूळ करणें.

चोंदा [म० चोंदणें] पु० फडक्याचा बोळा,–भांड्याचें किं० कसल्याही बारदानाचें भोक बुजविण्यासाठीं घातलेला.

चोंदाट (–ड–) णें [म० चोंदणें] स० क्रि० ठासणें; खुपसणें.

चोंदी [म० चोंदणें] स्त्री० भोक बुझविण्यासाठीं खुपसलेला फडक्याचा बोळा; बूच; गुडदी (घालणें, बसविणें). ❀ **चोंदी देऊन जाणें** फसविणें.

चोप [म० चोपणें]पु० १चोपणें,धुमस, इ० नीं जमीन ठोकून टणक आणि घट्ट करण्याची क्रिया (देणें,काढणें,इ०).२नियंत्रणेंत ठेवणें किं०घालणें. ३ ताड, माड, सुरमाड, इ०च्या उभ्या चिरफळ्या. ४ कोष्ट्याच्या मागाच्या फणीची धाजू. ५ सवय, परिपाठ (लागणें). ६ ढोलकें, चौघडा,इ० वाजवावयाची काठी.

चोप, चोपट न० केळीच्या बुंध्याचें साल किं० सालपट.

चोपई स्त्री० एक सरड्यासारखा प्राणी.

चोपट न० ताड, माड,इ०ची उभी चिरफळी.

चोपट [म० चौपट] वि० तासून काटकोनांत आणलेली तुळई, खांब, इ०.

चोपट वि० तेल, इ०नीं माखलेला.

चोपटणें [म० चोपणें] स० क्रि० १ जमीन, भिंत, इ० चा पृष्ठभाग कांहीं हत्यारानें ठोकणें (तो सपाट आणि गुळगुळीत करण्यासाठीं). २ मारणें, चोप देणें. अ० क्रि० तेल इ० नीं माखलें जाणें.

चोपड [संदभाषा] वि० चवदा; तेराच्या पुढचा क्रमांक.

चोपड, चोपडण न० तूप, लोणी, तेल, इ० स्निग्ध पदार्थ,–जो खाद्य पदार्थाला लाविला जातो. ❀ **उटें खावें तुपाच्या लालचीनें** (किं० **चोपडाच्या आशेनें**) कांहीं लाभ होत असतां थोडेसें पाप केलें तर फारसा मूर्खपणा होत नाहीं; मुळींच कांहीं लाभ नसतां पाप करणें हा मूर्खपणा.

चोपड, चोपडा पु०, **चोपडण** न० १ तेल, तूप, खसखस, इ० मोवाळीचे म्हणजे अंगाला मऊपणा आणणारे पदार्थ, किं० हे पदार्थ केशांना किं० अंगाला लावण्याची क्रिया. २ दुखत असलेल्या अंगावर औषधी द्रव्यांचा करतात तो लेप.

चोपडणें स० क्रि० (तेल, तूप, इ० पदार्थ) अंगाला किं० केशांना लावणें; माखणें.

चोपडा वि० १ स्निग्ध; ओशट. २ गुळगुळीत आणि तकतकीत. ❀ **चोपडा लाख** स्त्री० चपड लाख.

चोपडी [हिं०] स्त्री० जमाखर्च लिहिणें इ० कामासाठीं शिवून तयार केलेली वही.

चोपण, चोपणी स्त्री०, **चोपणें** न० १जमीन, भिंत, इ० चे पृष्ठभाग हत्यारानें ठोकून साफ करण्याची क्रिया किं० ह्या क्रियेचें हत्यार. २ मुलाला करमणुकीसाठीं चोखावयाला देतात तो पदार्थ. ३ चोपणमातींत तेलकट वस्त्र घालण्याची क्रिया (तें स्वच्छ करण्यासाठीं). ❀ **चोपणमाती** स्त्री० एक प्रकारची मऊ माती.

चोपणें स० क्रि० १ जमीन, भिंत, इ० चा पृष्ठभाग सपाट करण्यासाठीं साधनविशेषानें तो ठोकणें. २ एकाद्याला मार किं० चोप देणें. ❀ **चोपून चापून, चापून चोपून** क्रि० वि० काळजीपूर्वक दाबून आणि चेपून; धोतर, उपरणें, रुमाल, इ० जीं ल्यावयाचीं चिरगुटें तीं अंगावर यथास्थानीं काळजीपूर्वक (धारण करणें); उ० चापून चोपून धोतर नेसून राजश्री सासुरवाडीस जाणार आहेत कीं काय ?

चोपणें अ० क्रि० रोड होणें; उ० रामभाऊ आजारानें अगदीं चोपून गेले आहेत.

चोपदार, चोबदार [फा० चुब् (काठी) + दार (धारण करणारा)] पु० वेत्रधारी; विशेष प्रकारें शृंगारलेली काठी हातांत धरून कोणा अधिकाऱ्यापुढें चालणारा शिपायी.

चोपय स्त्री० सरड्याच्या जातीचा एक प्राणी.

चोपाळा, झोपाळा पु० हेलकावे खाणारें

एक प्रकारचें चौकोनी आसन किं० बैठक;झोपाळे बहुधा पाटणीस ठोकलेल्या हलग्यांना कोंवत सोडलेले असतात.

चोंबडा, चोमडा वि० १ लुब्रा. २ दुसऱ्याच्या कामांत नाक घालणारा.⊛ **चोंब (-म-) डा चाटू** वि०१दुसऱ्याच्या कामांत लुडबुडणारा.२ दुसऱ्याचा रहस्यें ज्याच्या त्याच्या जवळ बोलणारा. ३ नीच, लाळघोट्या.

चोंबगें स० क्रि० खुंटी, बोळा, इ० नीं भोक इ० बंद करणें.

चोंबदार पु० वर ' चोपदार ' पहा.

चोंबळणें स० क्रि० तेल, इ० नीं अंग, केश, भांडें, इ० माखणें.

चोबळणें, चोंबळणें स० क्रि० खालीं ' चोंबाळणें ' पहा.

चोंबा पु० गवताच्या आच्छादनांत बांधलेला तांदुळाचा गठ्ठा; मुढा.

चोंबा, चोंभा पु० १ तोंड बंद करण्यासाठीं तोंडांत घातलेला फडक्याचा बोळा.२फुटलेल्या किं० फाटलेल्या काणिंग, पोतें, इ० बारदानांना, पात्रांना किं० भांड्यांना भोक बुजविण्यासाठीं घातलेलीं फडकें इ० ची गुडदी. ३ गवत इ० ची जुडी. ४ गवत, पानें, केश, चिंध्या, इ० खोगिरांत भरतात त्या पदार्थांचा गठ्ठा.

चोंबाळणें, चोंबाळणें स० क्रि० १ सौम्य हातानें थोपटणें किं० थापटणें (मुलाला, जनावराला). २ गोड गोड बोलून एकाद्याचा राग शमविणें. ३ गोड बोलून किं० थापा देऊन कोणेकाला फसविणें.

चोंभळणें स० क्रि० तेलें, उटणीं, इ० लावणें.

चोंभाळणें स० क्रि० वर ' चोंबाळणें ' पहा.

चोमडा वि० वर ' चोंबडा ' पहा.

चोय, चोयटी स्त्री० वर ' चुई ' ' चुइटी ' पहा.

चोर [सं०] पु० १ चोरी करतो तो. २ ज्यानें चोरी केली असा. ३ दुसऱ्याला न कळवितां कांहीं गोष्ट करतो तो किं० दुसऱ्यापासून कांहीं गोष्ट लपवून ठेवितो तो. ४ केळफुलांतील भाजीच्या उपयोगाच्या ज्या फण्या त्या फणींतील प्रत्येक दांत्याच्या म्हणजे कळीच्या भोंवतीं एक पांढरें लहानसें आवरण असतें त्याला ' चिमणी ' म्हणतात. फणींतील प्रत्येक दांत्यांत म्हणजे कळींत एक कठिण आणि पसरट माथ्याची काडी असते, जी भाजींत घेत नाहींत, तिला ' कावळा ' किं०' चोर ' म्हणतात. ५ गंजिफांच्या खेळांत ज्याच्या वरचा हुकुम पडला नाहीं असें पान. टीप—समासांत ' चोर ' शब्द आरंभीं येऊन जे समास रूढ झाले आहेत त्यांपैकीं कांहीं पुढें दिले आहेत. ⊛ **चोर अंक (किं० अंख, किं० आंख)** पु० पदार्थांची खरी किंमत दाखविणारा लहान आंकडा (जो गिऱ्हाइकाला कळवावयाचा नसतो). **चोरओटी** स्त्री० दिसण्यांत लहान पण पुष्कळ दूध देणारी गाय, म्हैस, इ० ची ओटी किं० कास. **चोर आंबा** पु० एका जातीचा आंबा. **चोरकांटा** पु० किंचित् तापाची कसर किं० भावना. **चोरकाम** न० कितीही केलें तरी दुसऱ्याच्या डोळ्यांत भरत नाहीं असें काम. **चोर कोनाडा** पु० एका मोठ्या कोनाड्यांत जो दुसरा लहान कोनाडा असतो तो. **चोरक्रांत (-ति-)** स्त्री० चोर, लुटारू इ० केलेली जी नासाडी. **चोरखण** पु० पेटी, कपाट, संदूक, इ० मध्यें केलेला असतो तो गुप्त खण किं० कप्पा. **चोरखाई** स्त्री० चोरांना मुशाफरांवर हल्ला करून लुटावयाच्या सोयीची अडचणींतील जागा. **चोरखिंड** स्त्री० मुशाफरांवर हल्ला करून त्यांना लुटण्याचा सोयीची दोन डोंगरांमधील अरुंद वाट. **चोर खिडकी** स्त्री० १ लहानशी आणि एकांतांत बसावयाच्या सोयीची खिडकी. २ घरांत चोर शिरले असतां त्यांना चुकवून बाहेर पळून जावयासाठीं केलेली असते ती खिडकी. ३ लेखांतून सुटून जावयासाठीं मुद्दाम योजलेला संदिग्ध शब्द किं० मुद्दाम केलेली संदिग्ध वाक्यरचना. **चोर खिसा** पु० अंगरखा, बंडी, इ० मध्यें ठेविलेला आणि लोकांना सहसा न दिसणारा खिसा. **चोर गल्ली** स्त्री० आडरस्ता;रहदारीची नव्हे अशी वाट. **चोर गस्त** स्त्री० कोणत्याही प्रकारचा आवाज न करतां शहरांत घातलेली गस्त; हिला ' मुकी गस्त ' असा पर्याय शब्द आहे. याच्या उलट

' राजगस्त.' **चोरगस्तीनें** क्रि० वि० गुप्तपणें; लोकांच्या लक्ष्यांत न येईल अशा रीतीनें (हिंडणें, फिरणें, येणें, जाणें, इ०). **चोरगांठ** स्त्री० लोकांना न दिसेल आणि दिसली तरी सोडतां न येईल अशी गांठ. **चोरघडी** स्त्री० कोऱ्या सणंगाच्या पोटीं गिऱ्हाइकाच्या लक्ष्यांत न येईल अशी जी लांडी घडी असते ती. केवळ घड्या मोजून सणंगाची लांबी ठरविणाऱ्या गिऱ्हाइकांना फसविण्यासाठीं दुकानदार अशी घडी घालतात. **चोर घर** न० १ घरांतील गुप्त खोली,–सरकारच्या शिपायांना तींत लपलेला मनुष्य न सापडावा म्हणून केलेली असते ती. २ पेटी, संदुक, इ० तील न दिसणारा कप्पा किं० खण. **चोरघाई** स्त्री० १चोरांचा हल्ला आला असतां बचावासाठीं पळणाऱ्या लोकांची घाई. २ कोणत्याही प्रसंगींची घाई. **चोरचाऊ (–हू–) ल** स्त्री० माणूस किं० जनावर ह्यांच्या हालचालीची गुप्तपणें काढलेली माहिती. **चोरचिर (–ल–) टा, चोरचिल(–ह्ल–) ट** पु० चोरचीर; चोर, लुटारू, इ० समुच्चयानें; उ० ह्या रस्त्याला चोरचिल्टाचें मुळींच भय नाहीं. **चोरचुंबा** पु०गुप्तपणें दिलेला किं० भरलेला लाच. **चोरजासूद** पु०गुप्त जासूद. **चोरताजवा** पु० खोटा किं० लबाडीचा तराजू. **चोरताप** पु० स्पर्शाला कळून न येणारा ताप, पण तापाचे सर्व परिणाम करणारा ताप. **चोरदार** न० घरांत गुप्तपणें शिरण्यासाठीं किं० घरांतून गुप्तपणें बाहेर पडण्यासाठीं ठेविलेलें असतें तें दार. **चोरधाड** स्त्री०, **चोरधाडा** पु० चोरांनीं केलेला हल्ला. **चोरनजर** स्त्री० १ दुसऱ्याला न कळेल असा दृष्टिनिक्षेप. २ गुप्तपणें टेहळणी करण्यासाठीं फेकलेली नजर. **चोरपाऊल** न०, **चोरपाय** पु० हळूंच आणि आवाज न करतां टाकलेलें पाऊल किं० टाकलेली पावलें समुच्चयानें. **चोरपान्हा** पु० १वासरासाठीं गाय, म्हैस, इ० नीं राखून ठेविलेलें दूध. २ फार श्रमानें पिळून काढलेलें दूध. **चोरपाळत (–थ)** स्त्री० दुसऱ्याच्या हालचालींवर किं० बोलण्याचालण्यावर ठेविलेली गुप्त नजर (कांहीं तपास लावण्यासाठीं). **चोरपेठ** स्त्री० चोरलेले पदार्थ जेथें विकावयाला येतात तो बाजार. २ खोटीं मापें आणि वजनें जेथें दुकानदार वापरतात अशी पेठ किं० असा बाजार. **चोरपोर** न० चोरटीं माणसें समुच्चयानें. **चोरांपोरीं** क्रि० वि० ज्यांना जबाबदार धरतां येत नाहीं अशा माणसांकडून किं० अशा माणसांच्या अव्यवस्थेमुळें. **चोरबातमी** स्त्री० १ गुप्तपणें काढलेली खबर. २ जिचा उगम आपणास ठाऊक नाहीं किं० तो कळविणें धोक्याचें आहे अशी खबर; चारपालथीनें मिळालेली किं० मिळविलेली खबर. **चोरभूक** स्त्री० १ पूर्णपणें न शमलेली भूक (राहणें). २ थोडेसें कांहीं तरी खाल्ल्यानें शमणारी भुकेची भावना (लागणें, वाटणें, येणें, सुटणें). **चोरमळ्या, चोरमुळ्या** क्रि० वि० चोरट्या नजरेनें, चोरटेपणानें, लोकांच्या लक्ष्यांत न येईल अशा नजरेनें किं० प्रकारानें. **चोररान** न० चोरांचा उपद्रव ज्यांत आहे असें रान किं०जंगल. **चोरलक्षण** न०जी मनुष्याची मुद्रा पाहिली असतां तो चोर असावा अशी आपली कल्पना होते ती मुद्रा. **चोरवड** स्त्री०, **चोरवा (–व–) डा, चोरावा** पु०, **चोरव(–वा–) ण, चोरवें, चोरवंड** न० चोरांनीं मांडलेला किं० चालविलेला उपद्रव, नासाडी किं० कहर (सुटणें, माजणें, उठणें, मांडणें, दाबणें, इ०). **चोरवाट** स्त्री० १ गुप्त वाट; अगदीं थोड्या लोकांस ठाऊक असलेली वाट (घर, किल्ला, देऊळ इ० तील). २ जींत फारशी रहदारी नाहीं अशी वाट किं० असा रस्ता. **चोरवाडा** पु० चोरांच्या वसतीचें ठिकाण. **चोरविद्या** स्त्री० १ गुप्त खुबी. २ फक्त थोड्या लोकांस शिकविली जाते ती कला. ३ जारणमारण इ० संबंधाची विद्या. **चोरवेळ (–ळा)** स्त्री० १ एका सूर्योदयामासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंतचा जो अवधि त्याच्या आठ विभागांपैकीं एक विशिष्ट विभाग. ह्या विभागाला ' चंचळ वेळ ' असें अन्य नांव आहे. २ ज्या वेळीं चोरांची विशेष भीति असते ती वेळ. **चोरशिवण** स्त्री०जिचे टाके बाहेर दिसत नाहींत अशी शिवण. **चोरहट्टी, चोरहाटी** स्त्री० जेथील वसति बहुतेक चोऱ्या करणाऱ्यांची आहे असा गांव किं० अशी पेठ किं० गांवाचा विभाग. **चोरहरकारा**

पु० गुप्तपणें पाठविलेला जासूद. **चोरामोरीं** **क्रि० वि०** ज्यांना जबाबदार धरतां येत नाहीं अशा माणसांच्या योगानें किं० द्वारानें किं० लुडबुडीनें किं० कारभारानें. **चोरींपोरीं क्रि० वि०** १ चोरांनीं आणि पोरांनीं (नासाडी करणें). २ बेजबाबदार अशा माणसांकडून किं० त्यांच्या हातून. टीप-' चोर ' हा शब्द उत्तरपद होऊन मराठींत अनेक उपयुक्त समास रूढ झालेले आहेत. **कलमचोर वि०** सर्व बाबी लेखांत नमूद न करणारा (कारकून किं० लेखक). **खांदचोर वि०** खांद्याचा पूर्ण नेट ओझ्याला न लावणारा (हेलकरी, बैल, किं० रेडा). **चाकरीचोर वि०** इमानानें म्हणजे सर्व शक्ति न खर्चून किं० टाळाटाळी करून काम करणारा (गडी, कारकून, इ०). **पाठचोर वि०** पाठीवर पुरतें ओझें लादून घेण्यांत कुचराई करणारा (बैल, घोडा, इ०). **पायचोर वि०** १ पथकरलेल्या कामांतून हळूंच बाहेर पडूं इच्छिणारा (माणूस). २ आपणाला जितक्या जलदीनें किं० वेगानें जातां येणें शक्य आहे तितक्या जलदीनें किं० वेगानें न चालणारा किं० न पळणारा (बैल, घोडा, इ०). **विद्याचोर वि०** १ शास्त्र, कला, हुन्नर, इ०चा कांहीं भाग शिष्याला न शिकविणारा (गुरु). २ एकादी विद्या, कला, किं० हुन्नर चोरटेपणानें शिकून घेतो तो. बळचोर, मतलबचोर, मसलतचोर, अंगचोर, कामचोर, इ०हे आणि ह्यांच्यासारखे इतर समास भाषेंत शेकडों रूढ आहेत ते आम्हीं येथें देत नाहीं. त्यांचे अर्थ सहज कळण्याजोगे आहेत. **ओळखीचा चोर जिवें (किं० जिवा) न सोडी** जो चोर आपणाला ओळखतो तो आपणावर दया करील हें शक्य नाहीं. **घरांतला चोर आणि बाहेरला शिंदळ आटपत नाहीं** घरांत सर्व ठिकाणीं वावरण्याला ज्याला हक्क आहे किं० वावरण्याला ज्याला परवानगी आहे अशा माणसाच्या चोऱ्यांना आळा घालतां येत नाहीं; घराच्या बाहेर जो व्यभिचार करतो त्याला पकडतां येत नाहीं. **चोर धरावा मोटे** बोचकें ज्यानें उचललें आहे अशा चोराला पकडलें असतां त्याला चोरी कबूल करावीच लागते. **चोराचें पाऊल चोर जाणें, चोराचीं पावलें चोराला ठाऊक** चोराच्या युक्त्या, माल लपवावयाचीं ठिकाणें, पळून जाण्याचे मार्ग इ० चोराला ठाऊक असतातच म्हणून एका चोराला पकडावयाला दुसऱ्या चोराची योजना करणें सोयीचें असतें. **चोराच्या मनांत चांदणें** ज्या कोणी कांहीं बदकर्म केलेलें असतें त्याला तें उघडकीस येईल कीं काय अशी सदैव भीति असतें. **चोरावर मोर** एका ठकाला लुबाडणारा दुसरा ठक. **वाटेचा चोर (किं० काळा चोर) देखील ही किंमत देईल** ही किंमत इतकी थोडी आहे कीं ती कोणीही देऊन हा पदार्थ विकत घेऊं शकेल.

चोरटा [सं० चोर; म० चोर] **वि०** १ चोरी करण्याच्या प्रवृत्तीचा किं० स्वभावाचा. २ गुप्त; लपलेला किं० लपविलेला; लोकांना कळूं न दिलेला. **चोरटा हुशार मेहनती दिलगीर** जो बुद्धिपुरस्सर चोरी करतो तो आपल्या बचावाची तयारी अगोदरच करून स्वस्थ बसलेला असतो; प्रामाणिक मनुष्याला मात्र आपणावर आळ येईल कीं काय अशी भीति वाटत असते.

चोरटावें न०, चोरटाई स्त्री०, चोरावें न०, चोरावा पु० चोरांचा धुमाकूळ; चोरांनीं केलेला उपद्रव किं० केलेली नासाडी.

चोरणें [सं० चुर्=चोरणें] **स० क्रि०** १ दुसऱ्याची वस्तु त्याला न कळत किं० त्याच्या परवानगीशिवाय घेणें किं० उचलून नेणें. २ एकादी गोष्ट किं० हकीगत प्रकट न होऊं देणें किं० ती दडपून टाकणें. ३ (कांहीं गोष्ट) गुप्तपणें करणें. ४ करावयाचें, म्हणावयाचें, किं० लिहावयाचें जें कांहीं त्यांतील कांहीं भाग कांहीं युक्तीनें गाळणें किं० वगळणें. **एक गोरी आणि हजार खोडया चोरी** गोरेपणा हा एक गुण नवऱ्या मुलीच्या अंगीं असला म्हणजे तिच्या अंगच्या दोषांकडे तिला पहावयाला आलेल्या लोकांचें लक्ष्य जात नाहीं. **अंग चोरणें** कुचराईनें काम करणें. **खांदा चोरणें** खांद्यानें जितकें ओझें वाहातां येईल तितकें न वाहाण्याचा प्रयत्न करणें किं० तें चुकवूं पाहाणें. **गायी म्हशींनीं पान्हा चोरणें** त्यांनीं दोहकाला पुरतें दूध न देणें. **चोरून मारून क्रि० वि०** गुप्तपणें; दुसऱ्याला न कळूं देतां.

चोरी [म० चोर+ई (प्रत्यय)] **स्त्री०** १ चोराचें कर्म; दुसऱ्याची वस्तु त्याच्या पर-

वानगीशिवाय उचलून नेणें (अपहार करण्याच्या बुद्धीनें). २ गुप्तपणें केलेलें अकर्तव्य किं० भलतेंच कृत्य. ३ जें करावयाचें किं० सांगावयाचें त्यांतील वगळलेला भाग. ४ परवानगीचा अभाव; नियंत्रणा; प्रतिबंध; उ० मी रामभाऊच्या सोबती आहें हें म्हणण्याची देखील मला चोरी आहे; उ० मेली सवत घरांत आल्यापासून मला भाकरीशीं गूळ घ्यावयाची चोरी झाली आहे ! ꣸ **चोरीचा माल** पु० दुसऱ्याचा चोरलेला माल,–जो अर्थात स्वस्त दरानें विकावयाला परवडतो. **चोरीचें चवदा हात** चोरून किं० लुटून आणलेलें कापड स्वस्त दरानें विकतां· येतें. **चोरीची बाबत** १ जीवद्दल उघडपणें बोलतां येत नाहीं अशी बाबत. २ चोरून आणलेली वस्तु. ३ ज्याचें खरें स्वरूप आपणाला कळलेलें नाहीं असा व्यवहार किं० वृत्तान्त किं० बाबत. **शेताआड चोरी** आपलें स्वताचें शेत असलें म्हणजे लोकांच्या शेतांतील चोरून आणलेला माल आपल्याच शेतांत पिकलेला आहे असें म्हणून ती चोरी छपवितां येते; हा अर्थात अप्रामाणिकपणाचा व्यवहार होय. **चोरीचकारी, चोरी चपाटी** स्त्री० चोरीबिरी; उचलेपणाचीं कृत्यें. **चोरीमारी, चोरीमोरी** स्त्री० चोरी इ० अप्रामाणिकपणाचीं कृत्यें.

चोला, चोळा पु० शिवलेल्या कपड्याचा अंगाला अगदीं लागून असतो तो भाग,–' घोळ ' ह्याच्या व्यावर्तनें.

चोव पु० १ नारळाच्या खोबऱ्याचा खवणी इ० साधनांनीं खरवडून काढलेला कीस; चव; चहूं. २ नारळाच्या खोबऱ्याचा रस पिळून घेतल्यावर जो रसरहित चोथा उरतो तो; ह्या अर्थी ' चोवा ' असाही शब्द प्रचलित आहे.

चोवा [म० चोव; वर 'चोव' पहा] वि० शुष्क; निस्तेज; नीरस.

चोवा, चोहा पु० चंदनाची उटी.

चोवीस वि० तेवीसाच्या पुढचा आणि पंचवीसाच्या मागचा क्रमांक; वीसांत चार मिळवून होते ती संख्या.

चोष्य [सं०] वि० चोखावायाचा (आंबा, औषध, इ० पदार्थ).

चोहट वि० उत्कृष्ट; नीटनेटका; सुंदर.

चोहटा, चोहोटा, चवाठा [म० चो=चार; हाट (बाजार) किं० वाट] पु० १ चार रस्ते जेथें मिळतात ती जागा; चौक. २ बाजारपेठ.

चोहींकडे, चोहोंकडे क्रि० वि० १ सर्व दिशांस. २ चारी बाजूंस.

चोळ [म० चोळणें] स्त्री० ,पु०गाडीत भरू· किं० बैलाच्या पाठीवर लादून आणलेले धान्याचे दाणे एकांवर एक चोळले गेल्यामुळें त्यांचे कांहीं कण फुटून कमी होऊन पूर्वीच्या मापांत येतो तो तुटवडा.२ पदार्थविशेष वापरून तो झिजतो आणि वजनांत कमी होतो, हा जो कमीपणा तो; तुटलेलें वजन किं० परिमाण. ३ गळूं, जखम, इ० वर वस्त्रादिकांचें घर्षण झाल्यामुळें त्या विकृतीचा होतो तो विकोप. ४ वर्दळ, रहदारी (रस्त्यावरची किं० अन्य ठिकाणची).५ शेतांतील पिकांतून गुरांढोरांची जाण्यायेण्याची वाट असल्यामुळें होणारी नासधूस; ꣸ **चोळमालीश(–स)**खालीं 'चोळणें' त पहा.

चोळटणें, चोळवटणें [म०चोळणें] अ० क्रि० १ घासलें जाणें (वस्त्रादि). २ फार वापरल्यामुळें वस्त्र, भांडें, दागिना, इ० चीं तकाकी, ताठरपणा इ० नष्ट होणें. स० क्रि० १ घासणें. २ पदार्थाची खराबी होईल अशा रीतीनें तो वापरणें किं० वागविणें.

चोळण [म० चोळणें] स्त्री० १ रहदारी; वर्दळ. २ रहदारीमुळें आसपासच्या प्रदेशास होतो तो उपद्रव.

चोळणा [हिं०] पु० आखूड म्हणजे गुडघ्यापर्यंतच उतरणारी विजार.

चोळणी [म० चोळणें] स्त्री० १ गात्रविशेष दुखत असतां त्याला तेल इ०लावून तें चोळण्याची किं० मर्दण्याची क्रिया. २ धान्याचे दाणे त्यांच्या टरफलांतून चोळून बाहेर काढणें. ꣸ **चोळणी मळणी, चोळणी मोळणी** स्त्री० धान्यें खळ्यांवर बैलांकडून तुडविणें इ० संस्कार समुच्चयानें.

चोळणें स० क्रि० गात्रविशेष हातानें दाबणें, त्याचे वरून जोरानें हात फिरविणें,इ०क्रिया करणें; रुधिराभिसरण नीट चालावें, शिरा सैल पडाव्या, म्हणून तेल इ० त्या त्या गात्राला लावून तें हातानें चेपणें इ० क्रिया करणें; उ० उद्याचें तेल कंबरेला

लाववून ती चोळवा म्हणजे तिचा ठणका कमी पडेल. २ नांदूळ इ० चा कोंडा काढून टाकण्यासाठीं ते हातांच्या तळव्यांनीं रगडून घासणें. अ० क्रि० १हळहळणें; पश्चात्तापानें युक्त होणें; उ० अभ्यास केला नाहींस म्हणून नापास झालास,आतां चोळून काय होणार ?२ घासलें जाणें. ? ꣸चोळणें मळणें चोळणें,चेपणें,इ०क्रिया करणें (गात्रविशेषावर).꣸ **चोळमालीश (–स) स्त्री०** घोड्यास खरारा करणें किं० तरटानें त्याचें अंग घासणें इ० रूप जी घोड्याची चाकरी ती. **चोळामोळा, चोळाबोळा** पु० पदार्थाची कुसकरणी.

चोळवटणें वर ' चोळटणें ' पहा.

चोळा पु० वर ' चोला ' पहा.

चोळी [सं० चोल, चोलीं] **स्त्री०** १ स्त्रिया वक्ष:स्थल झाकण्यासाठीं जें बंडीसारखें आच्छादन शिवून करतात तें.चोळी अंगांत घातल्यावर तिच्या दोन बाजूंना छातीवर गांठ मारतात; काचोळीला पाठीवर गांठ मारतात.३ अंगरख्याचा कमरेपर्यंतचा भाग; खालच्या भागाला ' घेर ' किं० 'घोळ' म्हणतात. ३ स्त्रियांना सरकारानें इनाम दिलेली जमीन. ꣸ **चोळकट न०** स्त्रियांची चोळी (तुच्छतेनें).**चोळखण पु०**एका चोळीला पुरण्याएवढा खण. **चोळखंड पु०** चोळ्यांसाठीं मागावर विणलेलें लांब वस्त्र. **चोळीचिंधी स्त्री० पु० व०** १ स्त्रियांचीं लुगडीं, चोळ्या, इ०चिरगुटें समुच्चयानें.२कोणतींहि चिरगुटें.**चोळीचिरगुट न०** १ स्त्रियांचीं लुगडीं, चोळ्या इ० ल्यावयाचीं वस्त्रें. २ ल्यावयाचीं सर्व वस्त्रें. **चोळी बांगडी स्त्री०** १ स्त्रियांचीं ल्यावयाचीं वस्त्रें, दागिने, इ०समुच्चयानें. २ स्त्रियांचा प्रसाधनविधि (करणें). [विधि.

चोळें [**सं०**चौल]**न०**मुलांची शेंडी राखण्याचा

चौ [**सं०** चतुर्;**म०**' चार ' चा संक्षेप] **वि०** चार.꣸**चौवर अढी घालून बसणें,चौचा अंक घालून बसणें** स्वस्थपणें आणि आरामांत आसनमांडी घालून बसणें.**चौकट**[**म०**चौ=चार;कड,कडा] **स्त्री०**१काटकानांत अग्रांशीं खिळविलेलीं किं०सांधलेलीं चार लाकडें समुच्चयानें;उ०दाराची,खिडकीची तसबिरीची चौकट. २ अशा चार लाकडांच्या मधील प्रदेश. ३ मोट ज्या चार लाकडांच्या रचनाविशेषानें लोंबत असते किं० वर ओढली जाते तो रचनाविशेष. ४ मारका, जखीण, तळखेंबा, आणि समंध, ह्या चार भुतांची टोळी; उ० त्याला चार चौकटींचें मरण आलें.५ चार दुष्ट लोकांची टोळी. ꣸**चौकटीचें मरण न०** मारका,जखीण,तळखेंबा, आणि समंध, ह्या चार भुतांनीं ग्रासल्यामुळें आलेलें मरण. **चौकडा** [**म०** चौ=चार] **पु०** १ चार वस्तूंचा संच. २ नथेंतील चार मोत्यांचा संच; नथेचे अन्य भाग तुरा, जोडीचीं मोतीं, हिरा, लालड्या, पाच, इ० असतात. ३ चार कुड्यांचा जो समुदाय तो. ४ कुणबी लोक कानांत घालतात तीं सोन्याचीं चार कडीं,–प्रत्येक कानांत दोन. ५ घोड्याची एक प्रकारची चाल. **चौकडी** [**म०** चौ=चार] **स्त्री०** १ कोणत्याही चार एकजातीय वस्तूंचा संच. २ एका जुटीचीं चार माणसें. ३ लुगडें, दोरवा, इ० वस्त्रांवरील चौकोनी आकृतीची वीण. ४ हरिणाची उडी. ५ चार युगें जीं कृत, त्रेता, द्वापार, आणि कलि, त्यांचा कालावधि समुच्चयानें; अशा चवदा चौकड्यांचें राज्य रावणानें भोगलें; बहात्तर चौकड्यांचें इंद्राचें स्वर्गीय राज्य; हाच कालावधि पृथ्वीवरील मनूच्या वैभवाचा. ꣸**चौकडी गुंग होणें** अक्कल किं०मति भ्रान्त होणें;अक्कल न चालणें. **चौकोन** (–नी), **चौकोण** (–णी) **वि०** चार आहेत कोन किं० कोपरे ज्याला असा (आकार, लाकूड, धोंडा, इ०). **चौकोनी चिरा पु०** १ सर्व बाजूंनीं पाथरवटानें घडविलेला दगड. २ कोणत्याही कामीं योजतां येईल असा मनुष्य; हरकामी माणूस. ३ सर्व माणसांत सारखाच रंगेलपणानें आणि मोकळ्या दिलानें वागणारा मनुष्य. **चौखणी वि०**१ ज्याचा जावता म्ह० पुढची बाजू चार खणांची आहे असें (घर, इ०). २ चार मजली घर. **चौखुंट जहागीर स्त्री०** मागें 'चार' मध्यें पहा. **चौखुंटीमार पु०** १ गुन्हेगाराला जमीनीवर पालथा निजवून त्याचे हात आणि पाय चार बाजूंस चार खुंट्यांना बांधून त्याला दिलेला मार. प्राचीनकाळीं हा शिक्षेचा एक प्रकार होता. २ श्रीमंतांकडून पैसे उकळण्यासाठीं चोरांनीं किं० दरवडेखोरांनीं त्यांना असा दिलेला मार. **चौखुंदा वि०** १ चौकोनी (कागद, कापड, शेत, इ०). २ रुंद,

अवळपघळ (पहिलवानाची छाती, रस्ता, घोंडा, इ०). **चौगर्द क्रि० वि०** १ चारी बाजूंनीं. २ सर्व बाजूंनीं. **चौगस्त न०** चालू वर्षाच्या मागें दोन वर्षे सोडून तिसरें वर्ष; इ०स० १९२८ सालीं बोलणें चाललें असतां १९२५ हें चौगस्त. **चौगस्तां क्रि० वि०** चालू सालाच्या मागें दोन वर्षे सोडून तिसऱ्या वर्षी. **चौखूर क्रि० वि०** एकदम चारी पाय उचलून(घोडा इ०नीं उडी मारणें). **चौखूर दूध काढणें** गायीं म्हशींच्या चारी अचोळांचें दूध काढणें. **चौघडा पु०** देव, राजा, इ०च्या द्वारीं प्रत्यहीं दोन किं०तीन वेळां काळू,नगारे,नौबती, वाजंत्री, कर्णा, इ० वाद्यें वाजविलीं जातात तीं समुच्चयानें. **एकाद्याचा चौघडा वाजणें** त्याची बदनामी होणें. **चौघडा पु०, चौघड्याची अवटी स्त्री०** सोन्याच्या किं० चांदीच्या पत्र्याला आकार-विशेष द्यावयाचें सोनार लोकांचें एक साधन. **चौघडी स्त्री०** वस्त्राची चार पदरी घडी. **चौचाकी पांढर स्त्री०** १ सर्व गांवकरी समुच्चयानें,-एकाद्या गोष्टीचा विचार करण्यासाठीं जमलेले किं० गोळा झालेले. २देशमुख, देशपांड्या, पाटील, आणि कुलकरणी, हे चार गांवकामगार समुच्चयानें. ३ सृष्टीची किं० जगाची रहाटी; सदैव फिरत राहाणारा सूर्य, कुंभाराचें चाक, तेल्याचा घाणा,आणि गाडीचें चाक,ह्या समाजाच्या सुस्थितीला आवश्यक असणाऱ्या चार वस्तु समुच्चयानें. ४ जो नेता भेटेल त्याच्या तंत्रानें वागणारे लोक समुच्चयानें;ज्यांच्या विचाराला स्थिरपणा नाहीं असे लोक;पुढे,मागें, उजवीकडे, आणि डावीकडे वळणारे लोक;अस्थिर बुद्धीचे;खेडेगांवचे लोक असे असतात ह्या समजावरून हा वाक्प्रचार उत्पन्न झाला आहे. ५ गांवाच्या शासनपद्धतीचीं मुख्य चार अंगें; (१) सरकार; (२)पाटील,कुलकरणी, देशपांड्या, देशमुख;(३)मिरासदार आणि शेतकरी; (४)बलुतेदार. **चौचाल वि०** १ लहरी. २ सर्व गोष्टींकडे सारखें लक्ष्य पुरवूं शकणारा. ३सर्व प्रकारच्या व्यवहारांची माहिती असलेला. **चौजारें न०** चार चार दिवसांनीं येतो तो ताप. **चौटकें न०**चार टांकांचें परिमाण; शेराचा सोळावा भाग. **चौतर्फा, चौतर्फी वि०** चार अधिकाऱ्यांच्या अमलाखालचा (गांव, इ०). **चौतर्फा क्रि० वि०**१चारीं बाजूंनीं.२सर्व बाजूंनीं. **चौतार, चौतारी वि०** चार तंतु एकत्र वळून विणलेला (पीतांबर इ०). **चौताल** ध्रुवपदादिकांस चार जे टाळाचे ठोके लागतात ते समुच्चयानें. **वि०** तद्विशिष्ट(ध्रुवपद इ०). **चौताली वि०** १ चार मजल्यांचें (घर इ०).२ ध्रुवपदादिकांस चार जे टाळाचे ठोके लागतात त्यांनीं विशिष्ट (ध्रुवपद इ०). **चौतीस वि०** तेहेतिसाच्या पुढचा आणि पसतिसाच्या मागचा क्रमांक. **चौतुकी, चौतूक वि०** चार आहेत तुकडे ज्याचे असें (ध्रुवपद इ०). **चौदीवारी** [**फा०** दीवार=भित] **स्त्री०** चार बाजूंस चार भिंतींनीं गराडलेलें अंगण किं०पटांगण. **चौधारी वि०**चार आहेत धारा ज्याला असा(निवडुंग इ०). **चौपट स्त्री०** १ तीन फाशांनीं खेळतात तो सोंगट्याचा खेळ. २ सोंगट्या इ० खेळावयाचा पट.३कांहीं परिमाण चार वेळां घेऊन होतें परिमाण. **चौपदरी वि०** १ चार पदरांची (दोरी इ०). २ चार पदर होतील अशा प्रकारें घडी घातलेलें (लुगडें,धोतर, इ०). **स्त्री०** माधुकऱ्याचें माधुकरी मागावयाचें चौकोनी फडकें. **चौपाखी वि०**चार आहेत पाखीं ज्याला असें घर. **चौपायी** [**म०** चौ=चार; पाय] **क्रि० वि०** १ चार पायांनीं किं० चार पायांनिशीं. २ सर्व बाबतींत. **चौपायीं उगवणें** १ (घोडा) सर्व चांगल्या लक्षणांनीं उत्तम ठरणें. २ (लाक्षणिक) सर्व दुर्गुणांनीं(कोणी मनुष्य) युक्त आहे असें ठरणें. **चौपायीं सुटणें** (किं० **निघणें**) घोडा भर धाव चालूं लागणें. **चौफुला पु०** लवंगा, वेलदोडे,इ० विड्याचीं द्रव्यें ठेवण्याचें पात्रविशेष. **चौफेर क्रि० वि०** चारी बाजूंनीं. **चौफेर काढणें स० क्रि०** (घोडा) भरधाव सोडणें. **चौसोपी** [**म०** चौ+सोपा] **वि०** चार आहेत सोपे ज्याला असें (घर). **चौकळशा** [**म०** चौ (चार) + कळशी (घागर) +प्रत्यय] **पु०** हिंदूंची एकजाति, किं० त्या जातीचा कोणीही इसम.

चौक [**हिं०**] **पु०** १ चौकोनी पटांगण किं० क्षेत्र. २ चौसोपी घरांत चारी बाजूंनीं सोपे बांधलेले असून मध्यें जी रिकामी असते जागा ती. ३ घोड्याचा चालण्याचा एक प्रकार. ४ लावणी म्हणून जें गीत असतें त्याचें कडवें. ५ फाशावरील

चार ही संख्या दाखविणारीं चिन्हें, किं० चाराचें दान.६लग्नादि समारंभामध्यें पाटावर कांहीं आच्छादन घालून त्यावर तांदुळाचा किं० गव्हाचा चौकोन करतात तो. ७ देवळाच्या चार खांबांमध्यें जी चौकोनी जागा असते ती. ८ शहरांत जेथें चार रस्ते मिळतात ती जागा; उ० बुधवार चौक, मोती चौक इ०. ९ माकडहाडाजवळचा मानवी शरीराचा प्रदेश. १० पशूचें ढुंगण. ॐ**सातव्या चौकांत बसणें** घराच्या अगदीं पिछाडीच्या भागीं बसणें. **चौकचाकर** सोंगट्यांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. **चौकनहाण न०** नवरदेवाच्या आईचें विशेष समारंभपूर्वक स्नान. **चौकपासोडा पु०** वर ' चौक ' चा सहावा अर्थ पहा.

चौकणें [**म०** चौ=चार] **अ० क्रि०** घोडा इ०नीं चारी पाय एकदम उचलून उड्या मारीत जाणें; याला ' चौंक टाकीत जाणें ' असाही शब्द आहे.

चौकशी [**हिं०**] **स्त्री०** तपास, शोध. ॐ**एकाद्याची चौकशी ठेवणें** त्याच्या हालचाली, त्याचीं कृत्यें, इ०कांकडे लक्ष्य पुरवून त्याच्यावर देखरेख करणें.

चौकस [**हिं०**] **वि०** शोधक; जिज्ञासु; सर्व प्रकारची माहिती मिळविण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा. ॐ**चौकसदार वि०** १ धूर्त; सूक्ष्मावलोकी. २ कांहीं माहिती मिळवून आणावयाला पाठविलेला माणूस. ३ देखरेख करावयासाठीं नेमिलेला इसम; मुकादम. **चौकसनीस पु०** मुकादम; देखरेख करण्याच्या कामावर नेमिलेला इसम.

चौकसणें [**हिं०** ' चौकस ' पासून] **स० क्रि०** १ कांहीं वस्तूच्या संबंधानें तपास करणें किं०तिची परीक्षा करणें. २कांहीं वस्तूची परीक्षा करून तिची किमत किं० योग्यता ठरविणें.

चौकळ, चौकाळ वि० विपुल;पुरून उरण्याइतका. **स्त्री०** पदार्थविशेषाची समृद्धि किं० वैपुल्य.

चौका [**हिं०; म०** चौक] **पु०** १ हिंदू परदेशी लोक स्वयंपाकासाठीं झाडून आणि शिंपडून सारवून करतात ती चौकोनीं जागा; ह्या जागेंत कोणी परजातीचा इसम गेल्यास स्वयंपाक विटाळतो. २ कोणत्याही कामासाठीं तयार केलेली चौकोनी जागा. ३ प्रवासांत स्वयंपाकासाठीं कोणत्याही जातीच्या इसमानें तयार केलेली जागा. ॐ**चौकाबासन न०** प्रवासांत मुक्कामाच्या ठिकाणीं स्वयंपाक करण्यासाठीं चौका तयार करणें, दगडांची चूल मांडणें, इ०कामें समुच्चयानें (**क्रि०** करणें). **आठ पुरभय्ये आणि नऊ चौके** पुरभय्ये लोक फार सोंवळेपणानें स्वयंपाक करतात. आमचें ' म्हणींविषयीं चार शब्द ' पान ६६ पहा.

चौकी [**हिं०**] **स्त्री०** १ शहराच्या विशिष्ट ठिकाणीं चोर, भामटे,संशयित माणसें, इ० कांवर नजर ठेवण्यासाठीं,मारामारी न होऊं देण्यासाठीं, सरकारानें नेमिलेले शिपायी समुच्चयानें किं०अशा शिपायांसाठीं बांधलेलें घर. २ अशा शिपायांचें कर्तव्य किं० कार्यक्षेत्र किं०त्यांनीं केलेला पाहारा. ३ देवांच्या मूर्ति ठेवण्यासाठीं चौरंगासारखी करतात ती बैठक. ४ वीणा इ० वाद्यांच्या तारा जीवर ठेवून ताणल्या जातांत ती घोडी किं० बैठक. ५चौरंग. ६घडवंची.७चार ध्रुवपदांचा संच. ८ तोंडांतील पुढचे चार दांत,—दोन खालचे आणि दोन वरचे.ॐ**चौकीचे दांत पु०अ०व०** १मुलाला अगदीं प्रथम येतात ते चार दांत,—दोन खालचे आणि दोन वरचे.२कोणत्याही वयाच्या माणसाचे हे चार दांत;ह्यांना ' चौकी ' असाही शब्द आहे. **चौकीदार पु०** चौकीवरील शिपायी; वर चौकी अर्थ १ पहा. **चौकीदारी स्त्री०** चौकीदाराचें कर्तव्य किं० हुद्दा. **चौकीपाहरा पु० ए० व०** १ चौकीवरील शिपायांनीं केलेला पाहारा किं० केलेला बंदोबस्त. २ पाहाऱ्यासाठीं नेमलेले शिपायी समुच्चयानें.

चौकीं [**म०** चौ=चार] **क्रि० वि०** कोणताही विशिष्ट अंक चार वेळां घेतला असतां म्हणजे त्या अंकाची चौपट केली असतां (होणारा गुणाकार); उ० आठ चौकीं बत्तीस. टीप,— ' चौकी ' बद्दल ' चोक ' असा शब्द अधिक रूढ आहे.

चौगुला, चौघुला, चौघला पु० गांवच्या पाटलाचे हुकूम अमलांत आणणारा एक गांवकामगार.ॐ**चौगु(–घु–,–घ–)लकी स्त्री०**चौगुल्याचा अधिकार, दर्जा,हुद्दा, किं० वतन.

चौघे [**म०** चौ=चार] **पु० अ० व०** १चार

माणसें; चारी माणसें. २ कांहीं माणसें. ३ समाज किं० समाजांतील लोक; उ० चौघांच्या विचारानें काय करणें तें करीत जावें. ॐ **चौघांची वाट ती आपण धरावी** सर्व लोक करतील तसें आपण करावें; समाजाच्या उलट वागूं नये. **चौघांवर तान** (किं०**ताण**)**करणें** १ समाजाचा किं० जातवाल्यांचा निकाल अमान्य करणें. २ इतरांपेक्षां वरचढ ठरणें.

चौणा, चवणा पु० एकाद्या वस्तूची लागलेली खोडी किं० चटक.

चौत, चौथ [म० चवथा] स्त्री० १ चवथी तिथि; चतुर्थी ही तिथि. २ कोणत्याही वस्तूचा एक चतुर्थांश. ३ उत्पन्नाचा चवथा भाग. ॐ **चौथभरणी** स्त्री० भाद्रपद वद्यांतील ज्या तिथीला भरणी नक्षत्रांत चंद्र असतो ती किं० त्या दिवशीं पितरांसाठीं केलेलें श्राद्ध.

चौत (–ता–) ळणें अ० क्रि० १ अनावरपणें रडत सुटणें (मूल). ४ रागानें बेफाम होणें.

चौथरा पु० घरासाठीं किं० पुतळा उभारण्यासाठीं केलेला चौरस ओटा.

चौथल स्त्री० उत्पन्नाचा चवथा भाग.

चौथा [सं० चतुर्थ] वि० पहिला, दुसरा, इ० श्रेणींतील तिसऱ्याच्या पुढचा आणि पांचव्याचा मागचा.

चौदा [सं० चतुर्दश] वि० एक, दोन, तीन, इ० क्रमांकांतील तेराच्या पुढचा आणि पंधराच्या मागचा. ॐ **चौदा इंद्र झाले तरी इंद्राणी एकच** सभोंवतीं अनेक प्रकारचे फेरफार होत असतां जी एकच वस्तु टिकून राहिलेली असेल तिचें वर्णन करतांना हें वाक्य योजतात. **चौदा रत्नें** न० अ० व० लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक, सुरा, धन्वंतरि, चंद्र, कामधेनु, ऐरावत, अप्सरा, उच्चैःश्रवा, हालाहल, शार्ङ्गधनु, शंख, आणि अमृत. **चौदावें रत्न** न० मार, ठोक. **चौदा विद्या** स्त्री० अ० व० चार वेद, वेदांगें, पुराणें, मीमांसा, न्यायशास्त्र, आणि धर्मशास्त्र. **चौदा भुवनें** न० अ० व० भूरादि सप्तलोक आणि सप्त पाताळें.

चौधरी पु० एक गांवकामगार.

चौपन्न वि० त्रेपन्नाच्या पुढचा क्रमांक.

चौमखणें स० क्रि० मनुष्याचे दोन्ही हात मागें वळवून पाठीशीं बांधणें.

चौरंग [म० चौ=चार] पु० ज्याला चार पाय किं० खूर आहेत अशी बैठक. ॐ**एकाद्याच्या हातापायांचा चौरंग होणें** तो आजारांमुळें अशक्त आणि चलनवलन करण्यास असमर्थ होणें. **एकाद्याचा चौरंग करणें** त्याचे हात आणि पाय बांधणें (चोर इ० ना पळून जातां येऊं नये म्हणून त्यांना अशा रीतीनें बांधतात).

चौरपंचक न० चार अशुभ मुहूर्तांपैकीं एक; चौरपंचक, अग्निपंचक, मृत्युपंचक, राजपंचक, आणि हानिपंचक, हे पांच अशुभ मुहूर्त ज्योतिषांत सांगितले आहेत. चौरपंचक ह्या मुहूर्तावर प्रवासास निघाल्यास वाटेंत चोरांनीं लुटण्याचें भय असतें.

चौरशी स्त्री० सुताराचें एक हत्यार.

चौर्य [सं०] न० चोरी.

चौऱ्याण्णव वि० त्र्याण्णवाच्या पुढचा क्रमांक.

चौऱ्याऐंशी, चौऱ्यांयशी वि० त्र्यांयशींच्या पुढचा आणि पंचाऐंशीच्या मागचा क्रमांक. ॐ**चौऱ्याऐंशी आसनें** न० अ० व० योग्यांचीं जीं चौऱ्याऐंशीं वेगळीं वेगळीं आसनें तीं. **चौऱ्याऐंशीचा फेरा** (किं० **गरका**) पु० १ चौऱ्याऐंशी योनींमध्यें घ्यावा लागतो जो जन्म तो. २ अत्यंत गुंतागुंतीची किं० पंचाइतीची स्थिति.

चौल [सं०] न० मुलाची शेंडी ठेवण्याचा विधि किं० संस्कार.

चौली, चवली स्त्री० दोन आणे किंमतीचें चलनी नाणें.

चौवेचा(–ता–)ळ, चौवेचा(ता–)ळीस [म० चौ+चाळीस] वि० त्रेचाळीसाच्या पुढचा क्रमांक.

चौसष्ट [म० चौ+साठ] वि० त्रेसष्टाच्या पुढचा क्रमांक. ॐ**चौसष्ट कला** स्त्री० अ० व० गीत, वाद्य, नृत्य, नाट्य, आलेख्य, इ० ज्या चौसष्ट कला त्या.

चौसष्टी [म० चौ+साठ+ई] स्त्री० १ चौसष्ट एकजातीय पदार्थांचा संच. २ सोंगट्यांच्या खेळांत एका रंगाच्या चार सोंगट्या मेल्या असतां होतो तो डाव. ॐ **चौसष्टी पिंपळी** स्त्री० चौसष्ट प्रहर म्हणजे एकशें बाहत्तर तास खलून औषधार्थ तयार करतात ती पिंपळी.

चौसार पु० सोंगट्यांचा खेळ.

चौसारणी चौंसरणी, स्त्री० चवथी खेप, किं० चौथ्या खेपेस केलेलें कांहीं कृत्य.

चौसारणें, चौसरणें स० क्रि० चवथ्या खेपेचें (कांहीं कृत्य) करणें.

च्यवणें [सं० च्यु=गळणें, पडणें] अ० क्रि० १ स्वस्थानापासून किं० विशिष्ट सरणीपासून पतन पावणें किं० सरकणें किं० भ्रष्ट होणें. २ गळणें, पाझरणें.

च्यवन [सं० च्यु=गळणें, पडणें] न० १ स्थानभ्रष्ट होणें. २ विशिष्ट सरणीपासून दूर सरणें. ३ गळती, पाझर.

च्याच्या स्त्री० १ दुखापतीची किंचाळी. २ पराभवाचा उद्गार. ३ पिरपीर;रोदनाचा आकांत.

च्यार, चार [सं० चतुर्] वि० एक, दोन, तीन, ह्यांच्या पुढचा क्रमांक. मागें ' चार 'पहा.

च्यांवम्यांव, च्याऊम्याऊ स्त्री० १ मुलांचा एक खेळ. २ घाबरगुंडी. ३ कचर; भीतीनें खाल्लेली माघार; उ० काल हें काम करावयाला तूं कबूल होतास, आज अशी कां च्यांवम्यांव करतोस ? (किं० चालवितोस ?)

च्युत [सं०] वि० पडलेला, गळालेला; उ० पदच्युत, अधिकारच्युत, इ०.

च्युति [सं०] स्त्री० १ पतन, स्खलन. २ नाश.

छ

छ हें मराठी व्यंजनमालेंतील सातवें व्यंजन आहे.

छ उ० **वा० अ०** दुसऱ्याच्या कांहीं विधानाचा तिरस्कार करावयाचा असतां हा शब्द योजतात; छेः !; उ० तो तुझ्या उपयोगीं पडेल असें तुला वाटतें काय ? छ ! तो कापल्या करंगळीवर मुतावयाचा नाहीं !

छ पु० पत्रें इ०मध्यें महिन्याची तिथि सांगावयाची असतां तिथीच्या मागें ' छ ' घालतात. छ हा चंद्र याचेबद्दल संक्षेप.

छ [हिं० छे; सं० षष्; म० सहा] वि० सहा (फक्त समासांत). हा शब्द पूर्वपदीं येऊन जे सामासिक शब्द होतात ते खालीं यथास्थानीं पहा.

छकड, छक्कड [हिं०] स्त्री० १ चपराक (मारणें). २ दुर्दैवाचा घाला; नुकसान; व्यापारांत बसलेली ठोकर किं० आलेली बूड (बसणें, येणें, लागणें). ३ दुकानदारानें वजन किं० माप खोटें योजून केलेली (लबाडी देणें); उ० वाण्यानें मला वजनांत पावशेराची छकड दिली.४यावयाच्या पैशासाठीं आलेला तगादा (बसणें); उ० सावकाराची छकड बसली मी तेव्हां एक म्हैस विकून त्याचे पैसे देऊन टाकले. **छकडभेद पु०** आपला मतलब साधण्यासाठीं केलेले डावपेच किं० युक्त्या.

छकडा पु०, छकडी स्त्री० [सं० शकट] पु० १ गाडी. २ लहान गाडी. ३ एका बैलाची गाडी. ४ सामानसुमान वाहून न्यावयाची गाडी.

छकडी [सं० षष्] स्त्री० १ सहा वस्तूंचा संच किं० समुदाय (कागद, फळें, रुपये, इ०चा). २ तिफाशीं खेळामध्यें तीन फासे मिळून सहा पगड्यांचें दान. **छकडीचें माप न०** पांच पांच वस्तूंचे गट करून त्यांचा दर ठरवून नंतर प्रत्येक गटावर एक एक वस्तु फुकट देणें हा जो विक्रीचा प्रकार तो; छकडीच्या मापानें शंभर आंबे पांच रुपायांस घेतल्यास एकशे वीस आंबे मिळतात.

छकडें, छबुकडें न०लहान मूल(प्रेमाचा शब्द).

छकणें [सं० ' चकित 'पासून] अ० क्रि० १ चकित होणें. २ चकित होऊन फसणें.३बुद्धीला भ्रांति पडून फसणें किं० फसविलें जाणें.

छकणें स० क्रि० कोणेकाच्या नांवावर उधार किं० जांगड म्हणून लिहिलेली वस्तु तिची किंमत मिळाली असतां किं० ती वस्तु परत केली गेली असतां खोडून टाकणें.

छकल,शकल न०,छकली स्त्री०[सं०शकल=तुकडा] १ पदार्थाचा भाग किं० तुकडा; उ० मारुतीपुढें हा नारळ फोड, एक छकल देवापुढें ठेव आणि दुसरें घरीं घेऊन ये. २ मोठा ग्रंथ वागवावयाला गैरसोयीचा असतो म्हणून त्याचे विभाग पाडून जे बांधलेले असतात ते प्रत्येक;

उ० तुला पाहिजे आहे ती माहिती ज्ञानकोशाच्या पांचव्या शकलांत सापडेल.

छकाविणें [म० ' छकणें 'चें प्रयोजक] **स० क्रि०** फसविणें; ठकाविणें; एकाद्याच्या डोळ्यांत धूळ टाकणें.

छक वि० आश्चर्यचकित; उ० त्याचें मागणें ऐकून मी छक झालों.

छक्का [**सं०** षष्; **हिं०** छक्का] **पु०** १ तिफाशी खेळांत तीन फासे मिळून सहांचें दान. २ सहा वस्तूंचा संच किं० गट किं० समुदाय. ३ पत्त्यांच्या खेळांत सहा ठिपक्यांचीं पानें; पांच ठिपक्यांच्या पानांना 'पंजे' म्हणतात. एका जातीचें पान नाहींसें करून त्याच्या जागीं दुसऱ्या जातीचें पान उत्पन्न करणें हा एक हातचलाखीचा प्रकार आहे त्याला ' छक्केपंजे ' ह्मणतात. यावरून ' छक्केपंजे ' याचा अर्थ नजरबंदी, फसवणूक, लबाडी, युक्त्या, कपटप्रयोग; (**क्रि०** करणें, ओळखणें; जाणणें, चालूं न देणें, इ०); उ० त्याला इतके दिवस आह्मी साळसूद समजत होतों पण आलीकडे तो छक्केपंजे करूं लागला आहे. ४ गायन, वादन, इ० तील कळाकुसरीच्या नोकी; उ० प्राचीन गाण्यापेक्षां आलीकडच्या गाण्यांत छक्केपंजे फार असतात. ५ गद्यपद्यादि लेखनशैलींतील कृत्रिम शोभेचे प्रकार.

छचोर, छछोर वि० हलकट, चटोर, वात्रट.

छट [**सं०** शठ] **वि०** १ लुच्चा; लबाड; ज्याच्या भाषणादि व्यवहारात छक्केपंजे म्ह० लबाडीचे प्रकार असतात असा. २ कृपण, चिक्कू.

छटका पु० १ पदार्थाचा उडालेला किं० उडविलेला कळपा किं० तुकडा. २ गोंडा असलेला चाबूक. ३ फुलें काडीला बांधून करतात तो गोटा किं० गुच्छ.

छटकारा पु० रेघोतळी नांवाच्या हत्यारानें दागिन्यावर जी बारीक रेघ सोनारलोक काढतात ती.

छटा [**हिं०**] **स्त्री०** १ भाषण, वर्तन, विचार सरणी, ०मध्यें प्रत्येक माणसाचा जो कांहीं विशेष असतो, ज्यावरून तो इतरांपेक्षां वेगळा म्हणून ठरवितां येतो, तो. २ रूप, रुचि, स्पर्श, इ० जो विशेष गुण प्रत्येक पदार्थांत असतो त्यावरून त्या पदार्थाचा बोध करून देणारें कांहीं चिन्ह किं० लक्षण; पदार्थाचा द्योतक गुण,– ज्यावरून तो पदार्थ अन्य पदार्थांत मिश्रित झालेला असल्यास हुडकून काढतां येतो; उ० ह्या औषधांत तुपाची थोडीशी छटा मारते. ३ संसर्गानें प्राप्त झालेला कांहीं गुण किं० धर्म किं० विशेष. ४ आटोका, मर्यादा, पल्ला.

छटांक [**म०** छ (सहा); **सं०** षष्; टांक] **पु०** शेराचा सोळावा भाग (वजनी किं० मापी). ❀ **छटांकी स्त्री०** शेराच्या सोळाव्या भागाचें माप किं० वजन.

छटेला वि० १ अमली पदार्थाच्या सेवनानें झिंगलेला. २ छाकटा; विषयासक्त. ह्या अर्थी ' छटेल ' असेंही रूप आहे.

छट्टा [**हिं०**] **पु०** पल्ला, टप्पा; उ० तो गांव येथून पांच मैलांच्या छट्ट्यावर आहे.बाणाचा छट्टा =बाणाचा पल्ला किं० टप्पा.

छडणूक, छडणी [**म०** छडणें] **स्त्री०** पूर्णपणें केलेला तपास; पदार्थाची बारकाईनें केलेली तपासणी; उलटे सुलटे प्रश्न विचारून किं० पदार्थ आंतून बाहेरून पाहून केलेली परीक्षा. २ दिलेला उपद्रव; गांजणूक; सतावणूक.

छडणें [**हिं०**] **स० क्रि०** १ पीडा देणें; उपद्रव करणें. २ बारकाईनें मनुष्य किं० पदार्थ ह्यांचा तपास करणें.३ तंतुवाद्यावर कांहीं राग वाजविणें.

छडा [**हिं०**] **पु०** बारकाईचा तपास, शोध, किं० परीक्षा (काढणें, लावणें). २ माग, पत्ता (लावणें, लागणें). ३ वज्र्याळ, किल्ली,किं० कांहीं दागिना गळूं नये किं० पडूं नये म्हणून त्याला बांधलेली दोरी, सांखळी, इ०,–जी दुसऱ्या टोकानें आपल्या अंगाला किं० कपड्याला अडकाविलेली असते.

छडी [**हिं०**] **स्त्री०** १ काठी; वत किं० झाडाची बारीक फांदी किं० लाकडाची काठी जी मारावयाला किं० टेकावयाला किं० केवळ शोभेसाठीं घेतात ती.२मोठ्या दर्जाच्या अधिकाऱ्याच्या पुढें धारण केली जाते ती विशेष प्रकारें शोभविलेली काठी. ❀ **छडी लागे छमछम विद्या येई घम घम** विद्यार्थ्याला मार दिला तर तो विद्या करतो. **छडी कांहीं लागेना विद्या कांहीं येईना**

छडी न मारिली असतां विद्या येणें शक्य नाहीं.
छडीदार पु० बडया अधिकाऱ्याच्या पुढें विशेष प्रकारें शृंगारलेली काठी धरून चालतो तो शिपायी. |वि० पट्टे पट्टे ज्यावर आहेत असें (वस्त्र).
छडीपट्टा पु० दांडपट्टयासारखा एक तालमींतील व्यायामाचा प्रकार. **छडीबरदार** पु०१बडया अधिकाऱ्यापुढें शृंगारलेली काठी धरून चालणारा. २ द्वारपाल.

छणछण, छणछणां क्रि० वि० छण् छण् असा आवाज करून किं० छणाछण असा आवाज होईल अशा रीतीनें (रुपये इ० मोजणें).

छणणें अ० क्रि० छणछण असा आवाज करणें किं० अशा आवाजानें युक्त होणें.

छत् उ० वा० अ०छेः ! असें नव्हे !

छत [सं० छत्र] न० १ मंडप किं० घर यांत आंतल्या वरच्या बाजूस ऊन्ह, केरकचरा, इ०पासून निवारण होण्यासाठीं पसरतात तें वस्त्र; चांदणी; चांदवा.२ तत्सदृश जें लाकडाच्या पातळ फळ्या ठोकून करतात तें. ३ गायन, पुराण, इ० मध्यें परमावधीचें कौशल्य दाखविणें आणि त्या त्या प्रसंगीं कमालीचा रंग आणणें;उ० अगोदर पुंडलीक बोवांनीं कांहीं गायन केलें परंतु चांगलासा रंग भरला नव्हता, मग हमीदखानानें दोन धुवपदांत छत भरून दिलें. ॐ **छत भरणें** पराकाष्टेची बहार उडवून देणें.

छतार [इं०] स्त्री० एक सहातारी वाद्यविशेष.

छतावणें [म० छत] स० क्रि० छत लावून सुशोभित करणें (मंडप, महाल, इ०).

छत्तिशी [म० छत्तीस] स्त्री० १ छत्तीस तोळे, शेर, मण, इ० ची रास, गट, समुदाय, किं० संघ.२छत्तीस द्रव्यें एकत्र करून बनविलेलें औषध.ॐ **दोन माणसांत छतिशी असणें** त्यांचा बेबनाव असणें. त्रेसष्ठी म्ह० दोन माणसांत पूर्ण ऐकमत्य, एकोपा, किं० सख्य. छत्तीस हा आंकडा ३६ असा काढतात; एकमेकांच्या उलट दिशांस तोंडें करून बसलेल्या माणसाप्रमाणें. त्रेसष्ट हा आकडा ६३ असा काढतात; यावरून हे दोन्ही वाक्प्रचार उत्पन्न झाले आहेत.

छत्तीस [म० छ+तीस;सं०षष्=सहा;त्रिंशत =तीस] वि० तीस आणि सहा यांच्या बेरजेइतकी संख्या.

छत्र [सं०] न० १ पाऊस, ऊन्ह, इ० च्या निवारणार्थ वाटोळें वस्त्र काडयांच्या कांहीं रचनाविशेषावर ताणून त्याला दांडा हातांत धरावयासाठीं लाविलेला असतो असा पदार्थ; छत्री. २ राजा इ० च्या डोक्यावर असाच पदार्थ उंच धरला जातो तो. ३ ज्याची आपणावर कृपा, लोभ, अनुकंपा, देखरेख, इ० आहे अशा माणसाचा आश्रय; उ० मातापितरांचें छत्र माझ्या डोक्यावर होतें तोंपर्यंत मी स्वच्छंदानें वागत होतों पण आतां संसार माझ्यावर पडला. ॐ **मेघांचें छत्र** न० आकाशांत मेघ जमून होतो तो काळोख. **छत्रचामर** [सं०] न० सर्व राजत्वाचीं उपकरणें. **छत्रपति** पु० सर्वभौम राजा; सम्राट्. **छत्रबंध** पु० चित्रालंकाराचा एक प्रकार. यांत छत्राच्या आकारानें अक्षरें कांहीं विशिष्ट सरणीनें लिहावयाचीं असतात. **छत्रसिंहासन** न० राजत्वाचीं उपकरणें;छत्र आणि सिंहासन ह्यांची जोडी.

छत्राक [सं०] न० अळंबें.

छत्री [सं०छत्र] स्त्री० १ उष्णता, पाऊस, इ०पासून निवारण होण्यासाठीं डोक्यावर धरतात तो कागद, कापड,इ० चा बनविलेला पदार्थविशेष. २ जेथें सन्याशी पुरलेला असेल किं० जेथें कोणी कीर्तिमान किं० पराक्रमी किं० देशकार्य करणारा पुरुष यांचें दहन झालेलें असलें तेथें जी समाधि, देऊळ, इ० बांधतात तें; उ० शिंद्याची छत्री वानवडीस आहे; उ० लोकमान्य टिळक यांची छत्री मुंबईस चौपाटीवर आहे.

छत्री [सं० छत्र+इन् (प्रत्यय)] वि० डोक्यावर मानाचें छत्र धारण करण्याचा ज्याला अधिकार आहे असा(राजा, मांडलिक राजा, इ०).

छंद [स०] पु० १ एकाद्या वस्तूचा किं० कृत्याचा लादलेला नाद.२ वाईट सवय (लागणें). ३ एकाद्या वस्तूची अनिवार इच्छा. ४ आपल्या मनाचा कल; लहर. ५ यजमानाची किं० धन्याची इच्छा,–जिला अनुसरून नोकराला किं० आश्रिताला वागावें लागतें. ६ वेडे वेडे चाळे किं० कृत्यें. ७ मनगटांत किं० पायांत घालतात तें सोन्याचें किं० चांदीचें कांहीं नक्षीचें वलय. ॐ **एकाद्या**

माणसाच्या छंदास लागणें त्याच्या सहवासांत राहून त्याच्या तंत्रानें वागणें. **एकाद्या वस्तूचा छंद घेणें** ती आग्रहानें मागणें; तिच्याबद्दल हट्ट घेऊन बसणें. **छंदफंद, छंदविच्छंद** पु० अ० व० लहरी; वेडे वेडे चाळे किं० मूर्खपणाचीं कृत्यें; वाईट सवयी. **छंदखोर, छंदवाईक** वि० लहरी; नादिष्ट. **छंदीफंदी** वि० १ वाईट सवयी ज्याला लागल्या आहेत असा. २ दुराचारी लफंगा; छचोर.

छंद [सं० छंदस्] न० १ वेद. २ मंत्र. ३ पद्य; लघु, गुरु, इ० मात्रांनीं नियंत्रित आणि अक्षरसंख्येनें नियंत्रित अशी रचना; पद; वृत्त; ※ **छंदः-शास्त्र** न० पद्यरचनेचे नियम सांगणारें शास्त्र. **छंदोबद्ध** वि० पद्यरूप रचनेंत असलेला. **छंदोभंग** पु० वृत्ताच्या लक्षणाचें उल्लंघन.

छदाम [इं० छ=सहा; दाम=एक नाणें] पु० १ पैशाच्या चवथ्या भागाच्या किंमतीचें एक नाणें. २ (अकरणरूपीं प्रयोगांत) अंगदीं लहान नाणें देखील; उ० मी तुला छदाम देणार नाहीं; उ० मी तुझा छदाम लागत नाहीं.

छंदिष्ट [सं० छंद+म० प्रत्यय] वि० लहरी; नादीं; लोकांचें न ऐकतां आपल्याच इच्छेप्रमाणें वागणारा.

छद्म [सं०] न० १ वेश, सोंग. २ कपट; प्रतारणा. ३ सबब. ४ उणेपणा; रहस्यांत ठेवावयाची गोष्ट; उ० चार मंडळींत कोणाचें छद्म काढूं नये. ५ व्याजस्तुति; खोटी स्तुति. ६ रहस्य; गूढ अभिप्राय किं० अर्थ. ※ **छद्मी** वि० १ कपटी; कावेबाजीचा; प्रतारणात्मक. २ झोंबणारें (भाषण). ३ दुसऱ्याचा उणेपणा प्रकट करणारें (भाषण).

छपणें [हिं०] अ० क्रि० लपणें; दृष्टोत्पत्तीस न येणें; गुप्त राहणें.

छपविणें [म० ' छपणें ' चें प्रयोजक] स० क्रि० लपविणें; झाकून ठेवणें; लोकांच्या दृष्टोत्पत्तीस न येईल असें करणें.

छपेली स्त्री० १ घराचा चुनेगची केलेला माथा. २ चुनेगची केलेली वाट. ३ चौसोपी वाड्यापुढें सायवानासाठीं करतात ती चुनेगची.

छप्पन, छप्पन्न [सं० षष् + म० पन्नास; सं० पंचाशत्] वि० पन्नासांत सहा मिळवून होणारी संख्या. ※ **छप्पन्नी, छप्पन्या** वि० लुच्च्या; आंतल्या गांठीचा; कावेबाज; ठक; बारा बंदरचें पाणी प्यालेला. **छप्पन्नदिवाळ्या** वि० ज्यानें अनेक वेळां दिवाळीं काढून लोकांना बुडविलें आहे असा (व्यापारी).

छप्पर [हिं०] न० १ विशेष प्रकारें कांबट्या बांधून त्यांवर गवत पसरून करतात तें आच्छादन (घरावर किं० ज्या पदार्थाला पाऊस, उन्ह, इ० चा उपद्रव न व्हावा त्याचेवर). २ घराच्या माथ्यावर कौलें, गवत, इ० घालून करतात तें आच्छादन. ३ पडवी, सोपा, इ० लहानशी बांधून काढलेली जागा. ४ गरीबाऊ घर. ५ पलंगावर उंच चार खांबांवर जें वस्त्र पसरलेलें असतें तें. ※ **छप्परपलंग** पु० ज्या पलंगावर आच्छादन घालण्याच्या सोयीची रचना केलेली आहे असा पलंग; ह्या आच्छादनास ' मच्छरदाणी ' म्हणतात. **छप्परबंद** पु० छप्परें बांधून जो उपजीविका करतो तो. **छप्परी, छप्परबंदी** वि० ज्याचेवर गवताचें आच्छादन आहे असें (घर, पडवी, सोपा, इ०).

छप्पा [हिं०] पु० १ छाप, ठसा (मारणें, वठविणें). २ अचानक घातलेला हल्ला (घालणें). ३ गंधाचा टिळा (लावणें). ※ **छप्पाछप्पी** स्त्री० कापाकापी; कत्तल; उ० पहिल्यानें गोळागोळी झाली मग छप्पाछप्पी सुरू झाली. **छप्पा वळणें** नासाडी किं० दुर्दशा होणें; उ० गेल्या सालच्या पटकीनें हजार माणसांचा छप्पा वळला.

छब, छबी, सबी [हिं० छब्; सं० छवि] स्त्री० १ आकृति; रूपरेषा; घडण. २ बांधणी. ३ तसबीर. ४ ठाकठिकी; नीटनेटकेपणा; सौंदर्य. ५ तऱ्हा; प्रकार. ६ कित्येक लोकांच्या बोलण्याचालण्यांत जी विशेष माधुरी असते ती. ※ **छबदार** वि० झोकबाज; अकडबाज; नीटनेटका; प्रेक्षकाच्या मनावर अनुकूल परिणाम घडविणारा.

छबकडा, छबुकडा वि० लहान आणि गोंडस (प्रेमाचा शब्द मुलास लावतात). स्त्री० छब (--बु--) कडी.

छबडी स्त्री० आंबूच्या पाती विणून केलेलें शिपतर किं० पसरट आकाराचें कांहींही बारदान.

छबडें न० मूल (प्रेमानें).

छबना, छबन्या [म० छब; हिं० छब्] वि० १ नीटस; गोंडस; मोहक. २ भपकेदार.

छबिना [फा० छबीनाह्] पु० १ सैन्याचा तळ, किल्ला, इ० भोंवतीं असतो तो स्वारांचा पहारा. २ सैन्याच्या आघाडीस आणि पिछाडीस असतात ते घोडेस्वार. ३ राजा, देवांच्या मूर्तींची मिरवणूक, पालखी, इ०च्या पुढें मागें असतात ते घोडेस्वार किं० पादचारी शिपायी समुच्चयानें. ४ लडवय्ये लोकांचें गलबत,–जें व्यापारी गलबताच्या जवळून किं० मागून चालतें तें.

छबिला, छबेला वि० गोंडस; मोहक.

छबुकडा वर ' छबकडा ' पहा.

छब्बा पु० रुपाया (विनोदांत); उ० आज भटजीबोवांना दक्षिणा एक छब्बा मिळाल्या-कारणानें ते खुषींत आहेत.

छमकणें अ० क्रि० १ छम् छम् असा आवाज करणें (रुपाया इ० नीं). २ ठमकत ठमकत चालणें.

छमकावणें [म० ' छमकणें ' चें प्रयोजक] स० क्रि० छम्छम् आवाज करून रुपये इ० रूप द्रव्य खर्चणें; उदारपणानें खर्चणें.

छमछम, छमछमां, छमांछम क्रि०वि० छम छम ध्वनि होईल अशा प्रकारें (छडी मारणें, रुपये मोजणें, इ०); उ० छडी लागे छम छम विद्या येई घम घम!

छमाछमी स्त्री० १ नर्तकाचें नर्तन (कारण नाचतांना पायांतलि घुंगरें छमछम वाजतात). २ आनंदांत, रंगेलपणांत, किं० बागडण्यांत काल घालविणें.

छर्दि [सं०] स्त्री० ओकारी; वांति.

छर्रा [हिं०] पु० १ बंदुक, तोफ, इ० मध्यें भरून शत्रूवर जोरानें उडवावयासाठीं ज्या जोंधळ्या एवढ्या गोळ्या केलेल्या असतात त्या प्रत्येक. २ तोफेमध्यें नाल, खिळे, पैसे, इ० पदार्थ भरून दारूच्या जोरानें शत्रूवर उडविले जातात ते समुच्चयानें किं० प्रत्येक. ॐ **छर्रे उडविणें** जोरदार भाषण अस्खलितपणें करणें.

छल [सं०] पु०, न० १ कपट; लबाडी, ढोंग, मिष, निमित्त. पुढें ' छळ ' पहा.

छलक वि० छळणारा; गांजणारा.

छलना स्त्री० गांजणूक.

छल्ला [हिं०] पु० सोन्याचें वळें; करंगळींत घालतात ती पैलूदार अंगठी; सल्ला.

छवि [सं०] स्त्री० १ रंग, वर्ण. २ कांति, शोभा. ३ सौंदर्य.

छळ [सं० छल=लबाडी] पु० १ गांजणें, उपद्रविणें. २ शरीराला क्लेश भोगविणें. ॐ **छळीं छळणें** एकाद्याला अतिशय सताविणें किं० गांजणें.

छळणें [सं० छल=लबाडी] स० क्रि० १ सतावणें, उपद्राविणें; गांजणें. २ देहकष्ट भोगविणें; यातना भोगविणें. अ० क्रि० १ यातना भोगणें; कामाखालीं बेजार होणें. २ भयग्रस्त होणें; भयानें गर्भगळीत होणें. ॐ **ह्यानें मला सळों कां (कीं) पळों केलें आहे** ह्यानें मला इतकें सताविलें आहे कीं त्याच्या सतावणुकीनें मी मरून जाऊं कीं दूर पळून जाऊं असें मला झालें आहे. **एकाद्याला सळों कां (कीं) पळों असें होणें** तो चिंता, दुःख, उपद्रव, इ० कारणांमुळें जर्जर झालेला असणें; जीव द्यावा कीं पळून जावें असें त्याला वाटत असणें. टीप– दोन्ही वाक्प्रचारांत ' छळों ' बद्दल ' सळों ' हें रूप आहे. **छळवाद** पु० पराकाष्ठेचा उपद्रव किं० जाचणूक.

छाकटा [हिं०] वि० १ दारूबाज. २ दारू पिऊन किं० अफू खाऊन झिंगलेला. २ वात्रटपणाचे ढंग करणारा.

छाकणें अ० क्रि० अमली पदार्थांच्या सेवनानें झिंगणें.

छांछू न० १ मंत्रतंत्रादिकांचें अवडंबर किं० देखावा (करणें). २ प्रयत्न, खटपट, इ० चा आविर्भाव. ३ पोकळ बाटाघाट. ४ आपण जागरूक आहों हें लोकांस कळावें म्हणून केलेलें कांहीं चिन्ह, सूचना, खांकरणें, इ०.

छाट [हिं०] पु० १ कापून काढलेला तुकडा. २ कापण्याची क्रिया. ३ गाळसाळ; शिलक राहिलेला रद्दी किं० टाकाऊ भाग. ४ निवड; अनेक पदार्थांतून आपणास इष्ट तो भाग काढून घेणें. ॐ **छाटछूट** पु० १ कापणें; कापून किं० तोडून किं० निवडून बाजूस काढणें किं० असा काढलेला भाग. २ कमी करणें (परिमाण, खर्च, रकमें, विस्तार).

छाटणी [म० ' छाटणें ' पासून] स्त्री० १ कमी किं० तोकडें करणें किं० करण्याचा व्यापार. २ कमी केलेला भाग.

छाटणें [हिं० छांटना] **स० क्रि०** १ तोडून किं० कापून पदार्थ कमी किं० लहान किं० तोकडा करणें. २ निवडणें; पदार्थांच्या प्रती ठरविणें किं० वर्गवारी करणें. ३ वस्त्र भट्टींत न घालतां साध्या क्रियेनें त्याचा मळ काढून टाकणें. ४ साफ कापून टाकणें; उ० चोराचा हात छाटणें, शत्रूचें डोकें छाटणें, कोयत्यानें केळ छाटणें, कातरीनें वस्त्राच्या आंचळ्या छाटणें, इ०.५ काटकसर करून खर्च इ० कमी करणें. ६ शिंपडणें. ७ (पोहणारानें पाण्यांत श्वास) निरोधून धरणें. ८ (साखरेची मळी काढून साखर) स्वच्छ करणें.॰ **गप्पा छाटणें** गप्पा मारणें. **छाटाछाट स्त्री०** अनेक वेळां किं० अनेक ठिकाणीं कापून किं० तोडून किं० कातरून कमी करणें.

छाटा [**म०** छाटणें] **पु०** १ थेंब, शिंतोडा. २ शिडकाव.

छाटी [**सं०** शाटि] **स्त्री०**१ सन्याशाचें वस्त्र. २ नाक पुसावयाचा वस्त्राचा लहानसा तुकडा.

छाताड [**म०** छाती] **न०** १रुंद आणि भरदार छाती (पहिलवानाची). २ छाती (तुच्छतेनें).

छाती स्त्री० ऊर; वक्षःस्थळ. २ एकादी धाडसाची कृति करतांना न कचरण्याचा धर्म; हिंमत; उत्साह; धाडस. ॰ **छातीचा कोट करणें** येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याचा निश्चय करणें, किं० अंगीं अवसान आणणें.**छातीचा व्यापार पु०**१ज्या व्यापारांत लवकर माल खपला नाहीं आणि लवकर पैसे हातीं आले नाहींत तरी चालतें असा व्यापार. २ धोक्याचा व्यापार; प्रसंगविशेषीं ज्यांत तोटा येण्याचा संभव आहे असा व्यापार. **छाती काढून चालणें, छाती लपणें, एकाद्याची छाती दबणें (बसणें, फाटणें,** किं० **उलटणें**),**छाती दाटणें, छाती फोडणें** (किं० **फोडून घेणें**),**एकाद्याची छाती फोडणें, छातीला हात लावून, छातीवर हात ठेवून,छातीवर घेणें,एकाद्याच्या छातीवर धोंडा** (किं० **धोंड**) **ठेवणें,एकाद्याच्या छातीवर बसणें, छाती फांड** ह्या वाक्प्रचारांत 'छाती' बद्दल ' ऊर ' घालून तोच अर्थ होतो.म्हणून'ऊर' शब्दांत हे वाक्प्रचार पहा. **छातीठोकपणें क्रि० वि०** हिंमतीनें. **छातीठाव पु०** छातीला लागण्याइतकी खोली किं० उंची.

छात्र [**सं०**] **पु०** विद्यार्थी; शिष्य.

छांदस [**सं०**] **वि०** १ केवळ वेदांतच आढळणारा (शब्द, प्रयोग. इ०). २ वेद पढणारा (विद्यार्थी). ३ छंदोबद्ध (रचना).**पु०** वेदपारंगत ब्राम्हण. ॰ **छांदस, छादसवृत्ति, छांदिष्ट वि०** १ तऱ्हेवाईक; लोकाचाराशीं न जुळणारें वर्तन किं० भाषण किं० पेहेराव करणारा.२लहरी; नादी.

छान [**हिं०**] **स्त्री०** पदार्थांचा ग्राह्य आणि त्याज्य, चांगला आणि वाईट, उंची आणि हलका भाग यांचें पृथकरण; पदार्थाची पूर्ण तपासणी किं० चौकशी; छाननी.

छान [**अ०** षान्] **स्त्री०** १ थाटमाट, ऐट; ऐटदार पोशाख, मांडणी, किं० रचना; डोळ्यांत भरेसा देखावा. २ स्वारस्य; मनोहरपणा; लज्जत. ३ उत्कृष्ट किं०नमुनेदार वस्तु. ॰ **छानीचा वि०** सुंदर; बहारीचा;उत्कृष्ट. **छान उतरणें**(किं०**उठणें**) बहारीचा होणें; ऐटीनें केला जाणें; उठावदार होणें किं० ठरणें किं० उतरणें. **छान मारणें** भपकेदार किं० डोळ्यांत भरण्याजोगें कांहीं काम करणें; बहार करून सोडणें. **छानछुकी स्त्री०** १ भपकेदारपणा; थाट; छकडबाजी. २ छाकटेगिरी; नखरेगिरी. **छानछूक, छानछोक, छानछुकी वि०** ऐटदार (पुरुष किं० स्त्री). **छानदार वि०** सुंदर; ऐटदार. **छानमोड स्त्री०**(एकाद्याचा) नक्षा उतरणें किं० (त्याची) ऐट जिरविणें.

छाननें [हिं० छान्ना] **स० क्रि०** १ वस्त्रांतून गाळणें किं० चाळणें.२ खरी वस्तुस्थिति काय काय आहे याचा तपास करणें; चौकसणें; तपासणें. ३ पदार्थांतील चांगल्या आणि वाईट भागांचें पृथक्करण करणें. ४ निवडणें; निवडून घेणें.

छाप [**हिं०**] **पु०** १ रुपाया, कागद, इ०कांवर उठविलेली कांहीं आकृति. २ अशी आकृति उठविण्याचें साधन किं० ठसा. **स्त्री०** १ मृदंग, इ० कांवर केलेला तळहाताचा प्रहार. २ पदार्थांच्या किं० माणसाच्या श्रेष्ठत्वामुळें किं० उत्कृष्टपणामुळें लोकांच्या मनावर झालेला सुपरिणाम किं० चांगला ग्रह किं० पडलेलें वजन (बसणें, पडणें). ३पोहोतांना पाण्यांत केलेला हाताचा प्रकार (**क्रि०** टाकणें). ४ कोणतेंही काम करण्यांत प्रत्येकाची

विशेष प्रकारची जी लकब किंवा हातवटी किंवा रीति किंवासफाई असते ती. ꠰ **छापेखालीं क्रि० वि०** आटोक्यांत; नियंत्रणेंत; आज्ञेत (असणें). **छापखाना पु०** छापण्याचा कारखाना; रुपये, कागद, कापडें इ० कांवर अक्षरें, आकृति, इ० उठविण्याची मोठ्या प्रमाणावर चाललेली संस्था.

छाप स्त्री० घोड्याच्या जनीनाखालीं घालावयाचा लोकरीचा कपडा; घामोळें.

छापणी [म० छापणें] **स्त्री०** छापण्याची क्रिया; छापण्याचा प्रकार.' छापणें ' पहा.

छापणें [हिं० छापना] **स० क्रि०** वस्त्र, कागद, कातडें, इ० कांवर साधनविशेषानें अक्षरें, आकृति, चित्रें, इ० वठविणें.

छापा [हिं०] **पु०** १ कांहीं साधनानें उमटविलेली आकृति किंवा तें साधन. २हल्ला (घालणें). ꠰ **छापारी पु०** वस्त्रांवर रंगीत आकृति उठविण्याचा धंदा करणारा. **छापेकरी पु०** १ खुणेकरतां वस्त्रादिकांवर रंग इ०चा छाप ठोकावयासाठीं नेमिलेला इसम. २ छापा घालणारा; हल्ला करणारा.

छापी [म० छापणें] **वि०** १ छापलेलें. २ ज्यावर छाप वठविलेले आहेत असा. ३ ज्यावर कांहीं विशेष प्रकारची निशाणी वठविलेली आहे असा.

छापी [म० छाप] **स्त्री०** १ उत्कृष्टपणामुळें दुसऱ्याच्या मनावर झालेला अनुकूल ग्रह किंवा पडलेलें वजन. २ कौशल्य; सफाई. २ नाक पुसणें, घाम टिपणें, इ०च्या उपयोगाचें लहानसें फडकें. ३चिलमीच्या खालच्या भोकांतून तंबाखूचे कण न येतां फक्त धूर यावा म्हणून जें ओलें फडकें गुंडाळतात तें.

छापील, छापींव [म० छापणें] **वि०** छापलेलें; छापून काढलेलें.

छापो पु० मुलांचा एक खेळ.

छाया [सं०] **स्त्री०** १ प्रकाशाच्या किंवा उन्हाच्या किरणांना प्रतिबंध झाल्यामुळें उत्पन्न होतो तो देखावा; सावली. २ पदार्थविशेष प्रकाशांत किंवा उन्हांत धरला असतां त्या पदार्थाची आकृति जी जमीनीवर, भिंतीवर, किंवा अन्य कांहीं पृष्ठभागावर पडते ती. ३ आच्छादन; निवारण; आश्रय; संरक्षण.४ कृपाछत्र. ५ चित्राचा काळसर भाग. ६ द्योतक चिन्ह; उ० याचे डोळे पिवळे दिसत आहेत ही पंडुरोगाची छाया होय. ७ पदार्थविशेषाच्या स्वरूपाची अंधुक कल्पना; उ० हा श्लोक मला समजला नाहीं पण यांत राजनीतीची छाया दिसते. ८ सारखेपणा; साम्य; सादृश्य; उ० गोविंदपंताच्या तोंडवळ्यांत सदोबाच्या तोंडवळ्याची छाया दिसते त्यावरून हा त्याचा भाऊ असावा असें मी तर्किलें. ९ देखावा; उ० झाडांवर एक पाऊस पडतांच त्यांची छाया पालटली. १० मंडपादिकांचें केलेलें आच्छादन. ११ बाळभाषेंतील वाक्याचें संस्कृत भाषेत केलेलें भाषांतर. १२ रंगीत पदार्थावर प्रकाश पडला असतां त्या रंगाची लकेर जी शेजारच्या पदार्थावर पडते ती. १३ संसर्गजन्य गुण; उ० बाळ्या अलीकडे खोटें बोलूं लागला आहे त्याच्यावर गोंद्याची छाया पडली खास! ꠰ **पावसानें** (किं० **मेघांनीं** किं०**आभाळानें**) **छाया धरणें** मेघांनीं आकाश भरून येऊन काळोख पडणें. **छायाद्वितीय वि०** एकटा. **छायापथ पु०** आकाशगंगा. **छायायंत्र न०** शंकुयंत्र. **छायापुरुष पु०** उन्हांत किंवा चांदण्यांत उभें राहून आपल्या छायेकडे एकसारखें पाहून मग एकदम सूर्य किंवा चंद्र यांजकडे पाहिलें म्हणजे जो पुरुष दिसतो तो; ह्या पुरुषाच्या देखाव्यावरून आपल्या मरणाचा काळ सूचित होतो अशी समजूत आहे. **छायाविखार पु०** सर्पादिकांची सावली निजलेल्या मनुष्यावर पडली असतां त्याला जी विषाची बाधा होते ती. **छायारोटी पु०** रोटीची म्हणजे भाकरीची छाया पाण्यावर पाडून तें पाणी पिणारा (भाकरी वाचविण्यासाठीं);चिक्कू माणूस. धुवारोटी म्हणजे केवळ भाकरी पाण्यांत बुचकळून काढून ती भाकरी वाचवून नुसतें तें पाणी पिणारा; चिक्कू माणूस. धुवारोटी हा छायारोटी पेक्षां कमी दर्जाचा चिक्कू

छायानट,छायानाट पु०गायनांतलि एक राग.

छायाछबी (–बे–) ला वि० झोकदार; अकडबाज; नखरे करणारा.

छावड (–ड) **न०, छावडा पु०** [**सं०** शाव] मूल (प्रेमाचा शब्द).

छावणी (–नी) [**हिं०**] **स्त्री०** १ कांहीं दिवस राहावयासाठीं लष्करी लोक तात्पुरतीं छपरें घालून

किं० तंबू ठोकून जी जागा तयार करतात ती. २ गृहादिकांवर कौलें, गवत इ० घालून ऊन्ह,पाऊस, इ० च्या निवारणार्थ करतात तें आच्छादन. ३ दार, खिडकी,इ०कांवर भिंत चढवावयाची असतां खालीं आधारासाठीं घालतात ती फळी किं० त्या फळ्या.

छावा [सं० शाव; हिं०छावा] पु० १ हत्तीचें पिलूं. २ कोणत्याही प्राण्याचा बच्चा. ३ मूल (लाडिकपणाचा शब्द).

छि, छिः उ० वा० अ० छट् ! छः !

छिक्का [सं०] स्त्री० शिंक(करणें).

छिचोर, छिचोरी, छिछोर, इ० मागें 'छचोर' इ० पहा.

छिछि उ० वा० अ० छेः ! छत् !

छिटाव [हिं० छींट] पु० १डाग.२शितोडा. ३ शिडकाव. ४ मोती, इ० वरचा डाग.

छिटी [स० छीट] वि० चिटाचा बनविलेला.

छिडकणें,छिटकणें [हिं०] स० क्रि०(रंगाचें पाणी) वस्त्रादिकांवर शिंपडणें.

छिड (-ट-) काव [हिं०] पु० शिंपडण्याची क्रिया.

छिणीक, छिनीक, शिणीक स्त्री० एकदम उद्भवलेली तीव्र वेदना (सांधेदुखीमुळें किं० अन्य कारणांमुळें).

छिथू [स० छीः थु] स्त्री० फजीती; अप्रतिष्ठा.

छिंद [सं० छिद्=तोडणें] स्त्री०पदार्थ वाकडातिकडा तोडणें किं० कापणें किं० अशा रीतीनें त्याची झालेली नासाडी.

छिंदणें [सं० छिद्=तोडणें] स० क्रि० १ तोडणें. २ तोडून छिन्नभिन्न करणें.

छिद्र [सं०] न० १ भोक; खळगा. २ दोष, चूक. ३ व्यंग, उणेपणा, कमीपणा. ४ पळून किं० सुटून किं० निसटून जाण्याची सोय किं० साधन. ॐ**एकाद्याचें छिद्र शोधणें** त्याचा उणेपणा कशांत आहे हें पाहाणें. **छिद्रांत निघणें** नीचवृत्ति स्वीकारणें.**छिद्रान्वेषण** न० दुसऱ्याचे दोष काढणें. **छिद्रान्वेषी, छिद्रदर्शी** वि० दुसऱ्याचे केवळ दोष काढण्याचा स्वभाव ज्याचा असा (मनुष्य).

छिनाल [हिं०] वि० परस्त्रीशीं किं० परपुरुषाशीं व्यभिचार करणारा (पुरुष) किं० करणारी (स्त्री). ॐ**छिनालपुरा** पु० देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांच्या वसतीचा गांवाचा भाग.

छिनाला [हिं०] पु० परपुरुष किं० परस्त्री यांच्याशीं स्त्रीनें किं० पुरुषानें केलेला व्यभिचार.

छिनावणें [हिं० छीनना] स० क्रि० लुबाडणें,लुटणें.

छिन्न [सं०] वि० तुटलेला; मोडलेला; कापलेला. ॐ**छिन्नभिन्न** वि० अव्यवस्थितपणें तोडलेला किं० कापलेला.

छिपटी स्त्री० १ झाडाची बारीक आणि लवचीक फांदी. २ चेपून चपटा केलेला पदार्थ.

छिलटा, छिलपा [हिं० छिलका] पु० १ साल, त्वचा. २ पदार्थाचा तास किं० तासून काढलेला भाग.

छिलणें [हिं०छीलना]स०क्रि० तासणें,सोलणें.

छिलवा [म० छिलणें] पु० देठें खुडून टाकलेल्या फुलांचा गजरा. ह्याला 'छिलवा गजरा' असेंही म्हणतात.

छिली स्त्री०, **छिलें** न० दाराच्या दुहेरी चौकटींना जोडणारीं खालच्या बाजूचीं जीं दोन लाकडें तीं प्रत्येक. अशा वरच्या लाकडांना'घोडा' किं० ' मेंधला ' म्हणतात.

छी उ० वा० अ० छेः ! छत् !

छींट [हिं०] न० नानाप्रकारच्या रंगित छापांनीं सुशोभित असें कापड.

छीट, शीट स्त्री० चिमणी, कावळा, राघू; इ० पक्ष्यांची विष्ठा.

छुक, शुक, छुत् उ० वा० अ० मांजराला हाकलून देतांना काढतात तो उद्गार.

छु छु उ० वा० अ० कुत्र्याला एकाद्या पदार्थाकडे किं० माणसाकडे धावत जावयाला लावावयाचा शब्द.

छुरिका [सं०] स्त्री० १ सुरी. २ वांझोटी गाय.ॐ**छुरिकाबंध** पु० १ ब्राह्मण, क्षत्रिय,आणि वैश्य, ह्यांना जसा मौंजीबंधनाचा संस्कार तसा शूद्रांना कमरेला सुरी किं० कोयता बांधण्याचा संस्कार; हा संस्कार हल्लीं रद्द पडला आहे. २ सुरीच्या आकारानें आणि कांहीं नियंत्रानुसार

वाक्यांतील अक्षरें जुळवावयाचा एक चित्रकाव्याचा प्रकार.

छू उ० वा० अ० कुत्र्याला एकाद्या माणसावर किं० प्राण्यावर हल्ला करावयाला लावणें असतां हा उद्गार काढला जातो. ※छू करणें एकाद्या माणसाला दुसऱ्या एकाद्या माणसाविरुद्ध उठाविणें.

छूट [सं० छटा=कांति] स्त्री० हिरा, माणीक, इ०चें तेज.

छे, छेः उ० वा० अ० तसें नव्हे ! तें नव्हे !

छेक [सं०] वि० चतुर. ※ छेकापन्हुति स्त्री०इतराला आपल्या कांहीं कृत्याची शंका आली असतां तें कृत्य छपवून तिचा धूर्तपणानें निषेध केला असतां 'छेकापन्हुति' हा अलंकार होतो; उ० विधान,–'तो शब्द करीत करीत माझ्यापायीं जडला 'प्रश्न 'कोण ? तुझा प्रियकर काय ?' उत्तर 'नव्हे नव्हे ! नूपुर,' छेकानुप्रास पु० दोन किं० अधिक व्यंजनें त्याच क्रमानें आणि दोनच वेळां आलीं असतां छेकानुप्रास होतो; उ० हें रासिककर्णतर्णकशत इ०; पतिधैर्यद्विरदकटकटाक्ष इ० छेकोक्ति स्त्री० अर्थान्तरगर्भित लोकोक्ति.

छेकणें मागें 'छकणें' पहा.

छेटा, छेडणें, छेडा मागें 'छटा' 'छडणें, 'छडा' पहा.

छेडणें 'छडणें' पहा.

छेद [सं०] पु० १ कापणें, तोडणें. २ भाग, तुकडा. ३ नाश, भंग. ४ निरसन, निवृत्ति; उ० संशयच्छेद. ५ (गणित) भाजक; उ० $\frac{३}{४}$ यांत ४ हा छेद होय. ※छेद पाडून लिहिणें लेखांतील प्रत्येक दोन शब्दांत अंतरें सोडून लिहिणें.

छेदक [सं०] वि० तोडणारा; कापणारा. पु० खस्थ गोलांचा नकाशा,–त्यांच्या गति, स्थिति इ० दाखविण्यासाठीं काढलेला.

छेदणें [सं० छिद्=तोडणें] स० क्रि० १ तोडणें, कापणें. २ मोतीं, हिरे, इ० ना वेजीं पाडणें. ३ एका रेषेनें किं० रस्त्यानें दुसऱ्या रेषेस किं० रस्त्यास कापणें. ४ बंद करणें किं० बंद पाडणें. ५ रद्द करणें.

छेदन [सं०] न० कापण्याची क्रिया.

छेलछबिला[हिं०]वि० रंगेल;छाकटा,नखरेबाज. ह्या अर्थानें 'छाल्छबिला'असाही शब्द आहे.

छेला वि० रंगेल; छाकटा.

छेळणें न० बारीक टोकाची लोखंडाची सळई किं० कांब.

छेळणें स० क्रि० बारीक टोकाच्या लोखंडी सळईनें मारणें.

छोटा [हिं०] वि० लहान; तोकडा; धाकटा. ※ छोटामोठा वि० मोठा आणि लहान; सगळे. छोटेखानी वि० लहानसर; लहान असून सुंदर;लहान असून सोयीचा (पदार्थ, घर, इ०).

ज.

ज मराठी वर्णमालेंतील आठवें व्यंजन.

ज [म० 'जेवणें' चें पहिलें अक्षर] पु० जेवण; जेवणाचें काम (विनोदांत). जचें न० असाही शब्द याच अर्थानें योजला जातो.

ज [सं० जन्=उत्पन्न होणें याचें उपपद तत्पुरुषांतील रूप] वि०उत्पन्न झालेला; जन्मलेला; उ० पंकज=चिखलांत उत्पन्न झालेलें (कमळ).

जई क्रि० वि० जेव्हां (कवितेंत). कई= केव्हां; तई=तेव्हां.

जई, जै स्त्री० भिंतींचा माथा आणि छप्पर यांच्या मधला अवकाश (जेथें बारीकसारीक वस्तु ठेवतां येतात); वळचण.

जकात [अ०] स्त्री० आयात आणि निर्गत मालांवर सरकारास द्यावा लागतो तो कर. ※ जकातदार पु० जकाती वसूल करणारा कारकून. जकातनाकें न० १ जेथें जकाती वसूल केल्या जातात तें ठिकाण. २ दाराच्या चौकटीचा ठेंगणा माथा (म्ह० वरचें लाकूड); येथें प्रत्येकाचें डोकें आपटतें यावरून विनोदानें. जकात्या पु० १ जकाती वसूल करण्याच्या कामावर सरकारनें नेमलेला अधिकारी. २ एक पक्षी,–जो त्याच्या तावडींत सापडलेल्या प्रत्येक पक्ष्याचें एक एक पीस उपटून घेतो.

जकिरा, जकेरा [अ० जखीराह्] पु० जुनें रद्दी सामानसुमान; अडगळ; अव्यवस्थितपणें रास करून ठेविलेले पदार्थ. ❀ **जकीरखाना पु०** अडगळीची खोली.

जखड, जखळ वि० म्हातारा आणि अशक्त.

जखडणें अ० क्रि० थंडीनें किं० यातनेनें गात्रें अखडणें.

जखडणें स० क्रि० १ घट्ट बांधणें. २ घट्ट बांधून अडकावून ठेवणें. ३ पदार्थ, माणूस, जनावर, इ० ना घट्ट बांधून त्यांचें हलणें, चलनवलन, सरकणें, इ० बंद पाडणें. ❀ **जखडबंदी स्त्री०** १ बांधण्याची क्रिया (करणें). २ जखडून बांधलें गेल्याची स्थिति. ३ प्रतिबंध; नियंत्रणा. ४ गुंडाळण्याची क्रिया. ५गठ्ठा बांधणें.

जखडीन पुढें ' जखीण ' पहा.

जखम [फा० जख्म्] **स्त्री०** १ शस्त्रादिकांनीं केलेलें क्षत. २ व्यापारांत बसलेली ठोकर किं० आलेली बूड किं० तूट. ३ प्रिय माणसाच्या मरणादिकांनीं किं० अपमान झाल्यामुळें अंतःकरणाला झालेले क्लेश. ❀ **जखमपट्टी स्त्री०** जखम बरी व्हावी म्हणून तिच्यावर लावितात ती तेल, मलम, इ० ची पट्टी. **जखमाना (–णा) पु०** लडाईंत जखम लागून जाया झालेल्या शिपायाला चरितार्थासाठीं देतात तें वेतन किं० द्रव्य किं० जमीन इ०. **जखमी वि०** ज्याला जखम झाली आहे असा.

जखाई स्त्री० अशिक्षितांची एक देवी. ❀ **जखाई जुखाई स्त्री०** अशिक्षितांच्या सर्व देवता सामान्येंकरून; जुखाई ही अशिक्षितांची एक देवता आहे.

जखात वर ' जकात ' पहा.

जखिरा, जखेरा वर ' जकिरा,' ' जकेरा ' पहा.

जखीण, जंखीण, जखीन, स्त्री० १ बाळंतपणांत मेलेल्या किं० पाण्यांत पडून मेलेल्या स्त्रीचें पिशाच. २ सुवासिनी स्त्री मेल्यावर ती पिशाचरूपांत असलेली. ३ कोणीही भांडकुदळ, कजाग, किं० द्वाड स्त्री.

जखख, जखखल, जखखड वि० फार म्हातारा आणि अशक्त (माणूस). ह्या शब्दापुढें 'म्हातारा' हा शब्द जोडून तोच अर्थ जोरदार केला जातो.

जग [सं० जगत्] **न०** १ स्थावर जंगम, चराचर, सजीव निर्जीव सृष्टि एकत्वाच्या दृष्टीनें. २ विश्व. ३ समाज; लोक. ४ मानवी व्यवहाराचा पसारा. ❀ **जगदंबा स्त्री०** दुर्गा. **जगदात्मा पु०** ईश्वर. **जगच्चक्षु न०, जगद्दीप पु०** सूर्य. **जगन्निवास पु०** परमेश्वर; विष्णु. **जगत्शेट, जगत्शेटीचा नातू पु०** १ अत्यंत श्रीमंत मनुष्य. २ (विपरीत लक्षणेनें) अत्यन्त दारिद्री माणूस **जगज्जनक पु०** विश्व निर्माण करणारा; ईश्वर.**जगडंबर न०** मोठा किं०भपकेदार देखावा किं०पसारा (घालणें, मांडणें, माजविणें). **जगजीवन, जगज्जीवन पु०** १ परमेश्वर. २ जगाचा प्राण किं० आधार म्ह० ईश्वर.३जगाचें जें प्राणधारण किं० तत्साधन जें अन्नोदकादि तें. **जगड्वा (–व्या–) ळ, जगडवा (–व्या–) ळ वि०** प्रचंड;अवाढव्य. **जगत्त्रय न०** स्वर्गलोक, मृत्युलोक,आणि पाताळ लोक समुच्चयानें. **जगप्रसिद्ध, जगत्प्रसिद्ध वि०** जगांत जाहीर असलेला; सर्वांस ठाऊक असलेला. **जगद्गुरु पु०** श्रीशंकराचार्यांची पदवी. **जगजेठी पु०** ईश्वर. **आपण भलें तर जग भलें** आपण लोकांशीं चांगलेपणानें वागलों तर लोकही आपणाशीं चागलेपणानें वागतील. **आपण मेलों कीं जग बुडालें** १ आपण मेल्यावर जगाशीं आपला संबंध तुटतो.२आपल्या मागें जगाचें काय होईल किं० लोक आपणाला काय म्हणतील याची परवा करूं नये. **जगामुलखानें सोडलेला वि०** सर्व लोकांनीं सोडलेला (माणूस) किं० त्याज्य समजलेला (पदार्थ). **वस्त्रा आड जग (किं० जन) नागवें** मनुष्य सभ्यपणानें बोलत असला किं० गोड गोड बोलत असला तरी त्याच्या पोटांत कपट हें असावयाचें; मनुष्याच्या गोड भाषणाला आपण फसतां कामा नये, २ मनुष्य कितीही सद्वर्तनी दिसला तरी त्याच्या अंगीं कांहीं तरी पापाचा अंश असावयाचाच !

जंग [फा०] **पु०**१लोहादि धातूचा पदार्थ फार दिवस वापरण्यांत नसला तर त्याच्यावर जामतो किं० उत्पन्न होतो तो मलविशेष; कीट. २ शिकलेल्या विद्येला किं० कलेला अनभ्यासानें जी मालिनता येते ती किं० तिचा पडतो विसर; उ० आज

आठ वर्षांत मी त्रिसुपर्णाची आवृत्ति केली नाही म्हणून त्याचेवर जंग चढला आहे. ꙳जंग देणें खालच्या ' जंग ' शब्दांत पहा.

जंग [फा०] पु० युद्ध, लढाई. ꙳**जंगबहादुर** बड्या माणसाला दिलेली ही एक पदवी आहे. **एकाद्याला जंगजंग पछाडणें** १ त्याच्यापासून एकादी वस्तु मिळविण्यासाठीं अतोनात प्रयत्न करणें किंवा खटपट करणें. २ त्यानें आपला मनोरथ पुरवावा म्हणून त्याची पिच्छा धरून बसणें. या वाक्प्रचारांत' जंग जंग ' हें क्रि० वि० असून त्याचा अर्थ फार किं० अतोनात असा आहे. **एकाद्या माणसानें** (किं० **पदार्थानें**) **जंग देणें** त्यानें टिकाव धरून असणें किं० राहाणें; उ० हा धोतरजोडा आज आठ महिने मी रात्रंदिवस गुधडतों आहे तरी त्यानें मला जंग दिला (म्ह०तो न फाटतां टिकून राहिला आहे).

जंगजोड, जंगजूट पु० १ सर्व अंगांनीं किं० भागांनीं परिपूर्ण असण्याची स्थिति; सर्व भागांची व्यवस्थितपणाची मांडणी;सर्व भाग असावे तसे किं० असावे तितके असण्याची स्थिति; उ०आमचें पंधरा माणसांचें कुटुंब आज दहा वर्षें जंगजोड(किं०जंगजूट)राहिलें आहे (म्ह० आमच्या कुटुंबांत कोणी विधवा झाल्या नाहींत,कोणी विधुर झाले नाहींत, कोणी आईपोरकीं किं० बापपोरकीं मुलें झालीं नाहींत,इ०).२ योग्य पदार्थांची योग्य प्रकारें जुळणी किं०संयोग.:३ साधनसामग्रीची पारिपूर्णता. ४ बैल, घोडा, इ० ची नांगर, गाडी, इ० शीं जुळणी (घालणें, करणें).

जंगट, झंगट, झेंगट न० कासें ह्या धातूची तबकडी,–जिच्यावर दिवसाचे तास दाखविण्यासाठीं काठीचे रट्टे मारतात; ही देवापुढें वाजविली जाते; कांहीं प्रकारचे भिकारी झेंगट वाजवून भिक्षा मागतात.

जंगड, जंगडी स्त्री० १ जीवश्चकंठश्च मैत्री; गट्टी; दाट मित्रत्व. २ एकमेकांच्या सहवासांत सदैव असणाऱ्या दोन माणसांची किं० दोन प्राण्यांची जोडी. ३ निकट साहचर्य.

जगणें अ० क्रि० नाश न पावतां किं० न मरतां टिकून राहणें (माणूस किं० पदार्थ); उ० गदाधरशास्त्र्यांची आई शंभर वर्षे जगली; उ० आजूबाजूचीं तीन चार घरें जळून गेलीं पण आमचें घर जगलें; उ० ह्या इन्फ्ल्युएंझांतून आपण जगलों तर मकरसंक्रान्तीचे बेत करूं.

जंगणें, गंजणें अ० क्रि० १ लोहादि धातूंचे पदार्थ फार दिवस वापरण्यांत नसल्यामुळें त्यांनीं मलविशेषानें युक्त होणें किं० त्यांच्या पृष्ठभागावर तो मलविशेष उत्पन्न होणें. २ अभ्यास किं० परिपाठ नसल्याकारणानें विद्या, शास्त्र, कला, इ० विसरणें.

जगत् [सं०] न० विश्व; जग; दुनिया. ꙳**जगन्नाथ** पु० जगाचा नाथ; विष्णु. **आपला हात जगन्नाथ** आपली इच्छा तृप्त करून घेण्याची पूर्ण परवानगी असल्यावर कोण कमी करील ? **जगन्नाथी** स्त्री० जगन्नाथनामक शहरासंबंधाचा किं० त्या शहरांत झालेला किं० केलेला पदार्थ. २ कापसाचें पांढरें वस्त्रविशेष. ३ पाणी प्यावयाच्या उपयोगाचें एक पात्रविशेष. **जगभांड** वि० सर्व लोकांशीं भांडणारा; भांडखोर स्वभावाचा.

जगता [म० जगणें] वि० १ जिवंतपणाचा. २ जिवंत राहिलेला. ꙳**जगता पंथ** पु० आजारांतून उठलेपणाची स्थिति; जिवंत राहाण्याच्या आशेचा उद्भव; टिकून राहण्याचा संभव (लागणें, लावणें); उ० त्या वैद्याच्या मात्रेमुळेंच मी जगत्या पंथाला लागलों; उ० मला हजार रुपये कर्जाऊ देऊन माझें मोडकळीस आलेलें दुकान तुम्ही जगत्या पंथास लावण्याचें पुण्य पदरांत पाडून घ्या.

जगती [सं०] स्त्री० १ पृथ्वी. २ लोक. ३ वृत्तविशेष. ꙳**जगतीतल** पु०, न०१ पृथ्वीचा पृष्ठभाग.२ सर्व पृथ्वीवरील लोक.

जगनाड स्त्री० भांडखोर आणि शिवराळ स्त्री.

जंगम [सं०] वि० १ हालणारा.२ सजीव. पु० हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा इसम. ꙳**स्थावर जंगम** वि० स्थिर (झाडें, पर्वत इ०) आणि हालणारे (मनुष्य, सिंह इ०). **जंगम जिंदगी** (किं० **माल**) स्त्री० भांडींकुंडीं, वस्त्रपात्र, इ० मालमत्ता. याच्या उलट 'स्थावर जिंदगी' म्ह० घर, शेत, विहीर, इ०. **जंगम ढवळें** न० लग्न वगैरे प्रसंगीं एकाद्या ठिकाणीं जी आचारभ्रष्टता होते ती. **जंगमपट्टा** पु० १ जंगमाचा गुरु

शिष्यांच्या कपाळावर जो भस्माचा पट्टा ओढतो तो. २ कित्येक स्त्रिया कपाळावर जो लांबलचक कुंकवाचा पट्टा लावतात तो (निंदेनें). **जंगम विष न०** सर्पादिकांचें विष. याच्या उलट ' स्थावर विष ' म्हणजे वनस्पतींपासून किं० खाणींतून काढलेलें विष. **जंगमशेटाई स्त्री०** आपणच आपल्याकडे ओढून घेतलेली प्रतिष्ठा किं० मोठेपणा; उ० येथें तुझी जंगमशेटाई कोणी चालूं देणार नाहीं.

जगरें, झगरें न० १ पेटविलेला गोवऱ्यांचा किं० कोळशांचा ढीग. २ आगटी; पेटविलेलीं लाकडें, गवत, इ०चीं रास.

जंगल [फा०] पु० १ पात्रांदिकांवर उत्पन्न झालेला गंज. २ तांब्याच्या भाड्यांवरील विषारी कळंक. ३ एक रांधा,—ज्याचा हिरवा रंग होतो.

जंगल [सं०] न० १ अरण्य. २ ओसाड प्रदेश. ❀ **जंगलगर्क वि०**निरुपयोगी झाडें, वेली, इ०नीं व्यापलेला (प्रदेश). **जंगलट वि०** गांवढळ चालीरीतींचा (माणूस).

जंगल वि० वार्द्धक्यानें जीर्ण झालेला (मनुष्य किं० प्राणी).

जगल स्त्री० नांगराचा फाळ.

जंगला स्त्री० १ एक रागिणी. २ एक रांधा,—ज्यांतून हिरवा रंग काढला जातो. **पु०** कळंक, गंज.

जंगली [म० जंगल+ई (प्रत्यय)] वि० १ झाडांझुडपांनीं व्यापिलेला (प्रदेश). २ रानवट किं० गांवढळ चालीरीतींचा (मनुष्य). ३ जंगलांत होणारा, असणारा, किं० राहणारा (माणूस, जनावर, झाड, इ०). ४ साग, फणस, शिसू, इ० शिवाय इमारतीच्या उपयोगाचें (लाकूड).❀**जंगली जट वि०** रानवट; असभ्य. **जंगली हिरडा पु०** एक प्रकारचा हिरडा किं० त्याचें झाड. याचें फळ कोंवळें काढून वाळविलें असतां त्याला ' बालहरीतकी ' किं० ' बाळहिरडी ' म्हणतात.

जगवणूक [म० जगविणें] स्त्री० जगविण्याची, वाचविण्याची, जोपासण्याची, किं० राखून ठेवण्याची क्रिया.

जगविणें [म० ' जगणें 'चें प्रयोजक] स० क्रि० १ जिवंत ठेवणें किं० जिवंत राखणें; (झाड इ०) मरूं न देणें. २ शाबूत ठेवणें; नष्ट न होऊं देणें. ३ वांचविणें.

जंगाल [फा०] पु० १ कलंक, गंज. २ धातूच्या पात्रावरील विषारी मल.

जगावणें [हिं० जगाना] स० क्रि० पुढें येण्याऱ्या अनिष्ट प्रकारासंबंधानें इशारा किं० सूचना देऊन ठेवणें.

जंगी स्त्री० किल्ला, घर, गलबत, इ० च्या भिंतींत किं०बाजूंत जीं भोकें,आंतून बाहेरच्या शत्रूवर गोळ्या मारण्यासाठीं ठेविलेलीं असतात तीं प्रत्येक.

जंगी, जंगडी, जंगड स्त्री० दाट मैत्री; निकट साहचर्य.

जंगी [फा० जंग्=युद्ध] १ युद्धासंबंधाचा; युद्धांत उपयोगीं पडणारा. २ फार मोठा; अवाढव्य. ❀ **जंगी ताबूत पु०** मोहरमांत दोन ढाला आणि अनेक तरवारी ह्यांनीं शोभविलेला डोला (कागदाची घरासारखी रचना). **जंगी सामान न०** लढाईच्या कामीं उपयोगी अशी दारूगोळा इ० सामग्री. **जंगी जहाज न०** लढाऊ गलबत. **जंगी भोंवरा पु०** फिरतांना गुं गुं गुं असा आवाज करीत फिरणारा भोंवरा.

जंगेल [म० जंग्] वि० जुनेपणामुळें किं० फार दिवस वापरण्यांत नसल्यामुळें गंजलेला (कांहीं पदार्थ,—भांडें, शस्त्र, इ०).

जघन [सं०] न० १ ढुंगण. २ मांडी. ३ कंबर. ४ पिछाडी. ❀ **जघनचपला स्त्री०** १ नर्तकी स्त्री. २ जारिणी; व्यभिचारिणी.

जघन्य [सं०] वि० १ अगदीं पाठीमागचा. २ निकृष्ट. ३ अधम. ४ सर्वविश्रुत (वाईट गोष्ट). **पु०** १ हलक्या जातीचा इसम. २ शूद्र. **न०** १ सर्व लोकांत ठाऊक झालेली कांहीं वाईट गोष्ट किं० कांहीं अनीतीचें कृत्य. २गुप्त असावी अशी जी गोष्ट तिचा बोभाटा. ❀ **जघन्यांत येणें** गुप्त गोष्ट जी गुप्तच राहावी अशी असते तिचा बोभाटा होणें; अनीतीच्या कृत्याचा बोभाटा होणें. **जघन्यवृत्ति स्त्री०** अनीतिचीं कृत्यें किं० तीं करण्याकडे कल.

जंघा [सं०] स्त्री० १ पोटरी. २ मांडी. ३ तंगडी. ❀ **जंघात्राण न०**लढतांना मांडीवर घाल-

तात तें आच्छादन(शत्रूच्या शस्त्रास्त्राच्या प्रहारापासून मांडीचा बचाव होण्यासाठीं).

जंवाळ [सं० जंवाल] **वि०** चपळ; जलद चालणारा (घोडा, माणूस, इ०).**पु०** १जासूद. २ हरिण.

जंजाळ पु०,न०२ प्रपंचाच्या खटरकी,|चिंता, त्रास, किं० पीडा. २ उपद्रव करणारी कांहीं वस्तु किं० माणूस; शुष्ककाष्ठ. ॐ**जंजाळ तोडणें** कांहीं कार्यार्थ पराकाष्ठेची मेहनत करणें किं०कष्ट सोसणें. **एकाद्याचा जंजाळ पछाडणें** त्याला कांहीं कामासाठीं आग्रह करणें किं० उपद्रव देणें किं०सतावणें. **एकाद्या वस्तुचा जंजाळ पछाडणें** त्या वस्तूबद्दल पराकाष्टेचा खटपट करणें.

जंजिरा [फा० जजीराह्=बेट] **पु०** १ बेटांत बांधलेला किल्ला. २ समुद्रानें तीन बाजूंनीं वेष्टिलेला किल्ला. ३ समुद्राच्या सन्निधीचा किल्ला. ह्या तीन्ही प्रकारच्या किल्ल्यांना'दुर्ग' असें म्हणतात.

जंजिरी [खालीं ' जंजीर ' पहा] **स्त्री०** १ सांखळी.२जिला लोंबणाऱ्या वजनानें घड्याळ चालतें ती सांखळी. ३ किल्ल्याच्या किं० गलबताच्या भिंतींना ठेविलेलीं भोकें,-ज्यांतून बंदुकीच्या गोळ्या बाहेर शत्रूवर सोडल्या जातात तीं भोकें प्रत्येक.

जंजीर [फा० जंजीर्] **स्त्री०** १ सांखळी. २ जिला लोंबत असलेल्या वजनानें घड्याळ चालतें ती सांखळी. ॐ**जंजीरबंद वि०** १ मजबूत; भक्कम, बळकट (घर, इ०). २ अगदीं चोख, खरा (हिशेब, इ०).

जजू , झझ्झू [सं० यजुस्] **पु०** यजुर्वेदी देशस्थ (निंदेचा शब्द).

जट [सं० जटा] **स्त्री०** डोक्यावरचे जे लांब केश ते एकमेकांस चिकटून त्यांचा दोरींसारखा झालेला आकार. **पु०** कांहीं एक कार्य करण्यासाठीं एकत्रित झालेल्या लोकांची जुळणी, मिलाफ, किं० जूट.

जटणें [म० जट=मिलाफ] **अ० क्रि०** कांहीं एक कार्य करण्यासाठीं अनेक लोकांनीं ऐकमत्यानें जुळणें.

जटा [सं०] **स्त्री०** १ चिकटलेले केश(माणसांचे). २ न विंचरल्यामुळें गुंतलेले केश (बैराग्यांचे); तपस्व्याचे केश. ३ वड,पिंपळ, इ०च्या लोंबतात त्या पारंब्या. ॐ **जटागौर स्त्री०** एक औषधी वनस्पति. हिचीं पानें पूजेंत गौरीला वाहतात. **जटाजूट पु०** १ जटांचा शिखराकार बांधलेला समूह. २ शंकराच्या डोक्यावरील केश,–ज्याला ' कपर्द ' असें म्हणतात. **जटाधारी पु०** गोसावी, बैरागी (जे डोक्यावरचे केश विंचरीत नाहींत म्हणून त्यांच्या जटा झालेल्या असतात). **जटापाठ पु०** वेदाच्या ऋचा म्हणण्याची एक विशिष्ट पद्धति; उ० ' गुरूंना वंदावें ' हे शब्द ह्या पद्धतीनें पुढीलप्रमाणें म्हटले जातील;गुरूंना वंदावें वंदावें गुरूंना गुरूंना वंदावें. **जटापाठी पु०** जटापाठाच्या पद्धतीनें वेद म्हणणारा ब्राम्हण. **जटामांसी स्त्री०** एक औषधी वनस्पति. **जटाळया वि०**जटा धारण करणारा.

जटिल [सं०]**वि०**१ जटा धारण करणारा. २ गुंतागुंतीचा. ३ दाट, निबिड (अरण्य).**पु०** १ तपस्वी. २ ब्रम्हचारी.

जटिली [सं०] **वि०** जटिल लोकांसंबंधाचा. **पु०** गोसावी इ० कांचा रसायन करण्याचा एक विशिष्ट प्रकार किं० त्या प्रकारानें सिद्ध केलेलें रसायन.

जठर [सं०] **पु०,** न० १ उदर, पोट. २ पदार्थांचा आंतील भाग. ३ गर्भाशय.ॐ**जठराग्नि, जठरानल पु०** पोटांतील अन्न पचविणारा अग्नि. **जठरामय पु०**जलोदर.**जठरज्वाला स्त्री०** पोटशूळ.

जड [सं०] **वि०** १ तराजूंत घालून वजन केल्यानें पदार्थांचा जो धर्मविशेष समजतो त्या धर्मानें युक्त.२ बुद्धीनें कमी असा(मनुष्य इ०प्राणी). ३ काम करण्यांत सुस्त; ज्याला कांहीं काम करावयाला इतरांपेक्षां अधिक वेळ लागतो असा; मंथ. ४ पचवावयास कठिण (खाद्य पदार्थ). ५ गुंतागुंतीचें; जिकीरीचें; भानगडीचें; दुष्कर (काम, कारभार, इ०). ६ महत्त्वाचें; जबाबदारीचें (काम). ७ वरच्या दर्जाचा; असामान्य. ८ वजनदार, मोठ्या अधिकाराचा. ९ मूल्यवान्; भारी किमतीचा.१० समजावयाला किं० आकलन करावयाला कठिण (कांहीं विद्या, शास्त्र, इ०). ११ दुस्साध्य किं० कष्टसाध्य (रोग). १२ थंड स्वभावाचा; ज्याच्या अंगीं चलाखपणा किं० तरतरी कमी असा (मनुष्य); मदड. १३ अचेतन

(वृक्ष, धोंडा, इ०). १४ संयुक्त (व्यंजन). १४ टणक,–पातळ आणि वायुरूप नव्हे असा (दगड, लोखंड इ०). ❀ **केलें नाहीं तोंवर जड** अगोदर कोणतेंही काम आपणाला कठिण वाटतें पण तें करावयाला हातीं घेतलें म्हणजे त्यांतील खुब्या आपणाला कळूं लागून तें सोपें वाटूं लागतें. **जड धरणें** महत्त्वाचा किंवा संमान्य समजणें. **जड सांगणें** उत्तरोत्तर कठिण असा वाटूं लागणें (एकादा रोग, करावयाला घेतलेलें काम, इ०). **जड जाणें** परिणामीं दुःखकारक होणें; पश्चात्तापाला कारण होणें. **एकाद्याचें आसन जड होणें** त्याला गर्व होणें. **जडअवघड न०** एकाद्या कामांतील पंचाइती, पेच, अडचणी, इ० समुच्चयानें. २ अडचणीचा प्रसंग. **जडपारडें, जडबुडाचें माणूस न०** श्रीमंत किंवा वजनदार माणूस. **जडभरत पु०** सुस्त आणि आळशी मनुष्य. आमचे 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०, लेखांक ११३१' पहा. **जडबोका पु०** अवाढव्य, लठ्ठ, फोफशा (माणूस, प्राणी, किंवा पदार्थ). **जडभारी न०** संकट; पेचाची स्थिति. **वि०** कठिण, दुःसाध्य, जिकीरीचें (काम). **जडजूग** [**म०** जड=कठिण; जूग=युग=जूं] **न०** १ काम, कारभार, इ०ची जोखीम किंवा जबाबदारी. २ जोखमीचें काम. **वि०** अतिशय कठिण किंवा बिकट.

जड [**म०** जडणें] **स्त्री०** संपत्ति; मालमत्ता; उ० गदाधरभटाची जड लाख रुपयांची आहे.

जड [**फा०** जर्=सोनें] **न०** सोनें; हा शब्द फक्त पुढील समासांत येतो. ❀ **जडजवाहीर न०** सोनें, रुपें, हिरे, माणकें इ०, किंवा इ० चे बनविलेले पदार्थ समुच्चयानें; एकाद्या माणसाच्या मालकीचे सर्व मूल्यवान पदार्थ समुच्चयानें.

जडकावणें [**म०**जड] **अ०** अधिक जोरदार किंवा भयंकर होणें (रोग, पाऊस, वारा, इ०); उ० दोन दिवस अपथ्य होतांच ताप जडकावला.

जडण [**म०** जडणें] १ जोडणें, सांधणें. २ जोडण्याची किंवा सांधण्याची क्रिया किंवा तऱ्हा. ३ कोंदणांत बसविण्याची क्रिया किंवा तऱ्हा. ४ सांधणी, सांधेजोड. ५ जडण्याची मजुरी.

जडणावळ स्त्री० वर ' जडण ' पहा.

जडणी वर ' जडण ' पहा.

जडणें स० क्रि० १ (दोन पदार्थ) एकाशीं एक सांधणें, चिटकावणें, किंवा संयुक्त करणें. २ (हिरा, माणिक, इ०) कोंदणांत बसविणें. **अ० क्रि०** १ पक्केपणीं बसणें किंवा चिकटणें. २ एकादी सवय, व्यसन, खोडी, परिपाठ, इ० अंगीं निविष्ट होणें.

जडप [**म०** जडणें] **न०** १ जोडण्याची क्रिया; सांधेजोड. २ कोंदणांत बसविण्याची क्रिया. ३ विचारांची, हकीगतींची, किंवा दृष्टोत्पत्तीस आलेल्या गोष्टींची एकवाक्यता, संवाद, जुगणी; किंवा मिलाफ.

जडपाळिंज न० भाताची पूर्णपणें न पोसलेली कणसें समुच्चयानें किंवा अशा कणसांतून काढलेले तांदूळ.

जडब, जडप[**अ०**जर्ब्]**वि०** १ कठिण; जोखमीचें; जिकीरीचें. २ दुःसाध्य (आजार, संकट, पेच). ३ भारी (किंमत).

जडाई स्त्री० वर ' जडण ' पहा.

जडाव [**म०** जडणें] **पु०** १ कोंदणांत बसविणें (हिरे, मोतीं, इ०). २ रचना, घटना. ३ पक्केपणीं बसल्याची किंवा स्थापित झाल्याची स्थिति.

जडावणें [**म०** जड] **अ० क्रि०** १ जड, कठिण, दुःसाध्य, किंवा जोरदार होणें (वारा, पाऊस, रोग, पंचाईत, इ०). २ गर्विष्ठ किंवा मदांध होणें (एकदम हातीं आलेल्या संपत्तीनें किंवा अधिकारानें).

जडी [**हिं०**] **स्त्री०** १ वृक्षादींचें मूळ. २ औषधोपयोगी मूळ (वृक्ष, वेली, इ०चें). ❀ **एकाद्याची जडी रुतणें** कांहीं एका अधिकाराच्या जागीं तो भक्कमपणें बसणें; उ० ह्या दरबारांत माझी जडी रुतली तर मी तुझें हें काम करीन. **जुडीबुटी** [**हिं०**] **स्त्री०** १ औषधी काष्ठें, मुळें, पाळें, इ० समुच्चयानें. २ अडचणीच्या प्रसंगीं उपयोगी पडावें म्हणून बाजूला काढून ठेविलेले बारीक सारिक दागिने किंवा द्रव्य.

जडींव [**म०** जडणें] **वि०** १ दोन किंवा अधिक पदार्थ किंवा भाग एकत्र जुळवून किंवा सांधून बनविलेला पदार्थ; उ० ही सहाण जडींव आहे ती जपून वापर. २ कोंदणांत हिरे, मोतीं, इ० बसवून केलेला (दागिना). ३ अनेक पदार्थांच्या सांधणीनें, संयोगानें, किंवा जुळणीनें, बनविलेला (पदार्थ).

४ अंगचा नसलेला आणि मागून लाविलेला, जोडलेला, किं० चिकटावलेला (पदार्थ); उ० हा पागोट्याचा पदर जडॉव आहे.

जड्या [**म०** जडणें] **वि०** १ जडाव काम करणारा (सोनार).२मूळचा एकाद्या ठिकाणचा नसून बाहेरून येऊन स्थायिक झालेला; उ० हा उपाध्या या गांवचा नव्हे,तो जड्या आहे.

जण [**सं०** जन]**पु०**माणूस; मानव जातीची एक व्यक्ति; उ० एक जण (म्ह० एक माणूस); उ० आम्हांपैकी पांच जण(ह्म०पांच माणसें). **स्त्री०** जणी; **न०** जणें.'जण' याचा उपयोग पुढीलप्रमाणें होतो; दोघे जण, तिघे जण,चौघे जण, पांच जण, सहा जण,इ०.ꕥ**जणचाल स्त्री०**समाजांत रूढ असलेला शिरस्ता, चाल, किं० धारा. **जणवाढ स्त्री०** शेतकऱ्यांनीं सावकारापासून घेतलेल्या धान्यावर जितकी वाढ सावकार घेण्याचें ठरवितील तितकी वाढ; उ० जनवाढ जी बसेल (किं० ठरेल) ती मी तुम्हाला द्यावयाला कबूल आहे.

जणूं,जणों उ०वा०अ०असें वाटतें,दिसतें,किं० संभवतें कीं;उ०झाडावरून फुलें पडत आहेत, जणों भूमातेची पूजा चालली आहे !

जंत [**सं०** जंतु=प्राणी] **पु०** १ कोणीही प्राणी. २ पोटांत जे वीतभर लांब आणि सुतळीइतके जाडी प्राणी उद्भवतात ते प्रत्येक. वावडिंगांच्या काढ्यानें हे जंत नाहींसे होतात. ꕥ **जंतवाताळें न०** जंतांच्या उपद्रवामुळें पोटांला येतो तो फुगवटा.

जत, जथ [**म०** जथणें=जुळणें] **स्त्री०** १ एकोपा, मिलाफ. २कांहीं माणसांचा कांहीं कामानिमित्त झालेला एकोपा, किं० उभारलेली संस्था. खालीं ' जतीमती ' पहा.

जतकारणी, जतकारणें पुढें ' जतावणी, ' ' जतावणें ' पहा.

जतन, जतनाई [**सं०** यत्न] **स्त्री०**१निगा; एकाद्या पदार्थाबद्दल काळजी घेऊन तो जपून किं० सुरक्षित ठेवणें; काळजीपूर्वक रक्षण; संगोपन. २ रक्षणासाठीं ठेविलेला, घेतलेला, किं०दिलेला पदार्थ किं० मनुष्य; ज्याला जपावयाचें तो. ' जतन ' शब्द ह्याच अर्थीं नपुंसकलिंगीहि आहे. ꕥ **जतन ठेवणें** सुरक्षित ठेवणें; काळजीनें ठेवणें.

जतनामा पु० वंशावळ; वंशवृक्ष.

जतावणें [**म०** ' जतन ' पासून]**स० क्रि०** काळजीपूर्वक रक्षिणें किं० जोपासणें; सुरक्षित आणि शाबूत ठेवणें.

जंतर न०, जंत्री स्त्री० [सं० यंत्र] १ सोनारलोकांची तार काढाययाची पट्टी; चढत्या क्रमानें मोठीं होत गेलेलीं भोकें जिला पाडलेलीं असतात अशी लोखंडाची पट्टी, जींतून सोनार लोक सोन्याची किं० चांदीची सळई ओढून हाव्या त्या जाडीची तार तयार करूं शकतात. २ कोणतेंही चमत्कारिक किं० आश्चर्यजनक यंत्र किं० युक्ति. ३ उत्कृष्ट धारेचें हत्यार, तरवार, इ०. ꕥ **जंतरपट्टी,जंतरपाटी स्त्री०** वर' जंतर ' चा अर्थ १पहा. **जंतर मंतर पु० न०** मंत्रतंत्रादि अवडंबर (करणें, माजविणें).

जतावणी [**म०** जताविणें] **स्त्री०** ताकीद; इशारा; सूचना.

जताविणें [**हिं०** जताना] **स० क्रि०** १ कांहीं काम किं० गोष्ट एकाद्याला बजावून सांगणें; त्यानें तें काम किं० गोष्ट विसरूं नये म्हणून त्याला खरावून खरावून सांगणें. २ कोणेकानें कांहीं गोष्ट करावी किं० कांहीं गोष्ट करूं नये अशी त्याला सक्त ताकीद देणें.

जती [**सं०** यति] **पु०** १ जैनांचा धर्मगुरु. २ जैन भिक्षेकरी. ३ जैनधर्मी सन्याशी. ꕥ **जत्या म्हणणें** १ (जैनांच्या जतीचें) धर्मग्रंथाचें पठन.२ गप्पा मारणें; चर्पटपंजरी चालविणें; बडबड चालविणें; ह्या अर्थीं ' जत्या हाणणें किं० मारणें ' असाही वाक्प्रचार आहे.

जतीमती, जथीमथी [**स०** जथणें+मथणें] **स्त्री०** १कांहीं विशिष्ट कार्यासाठीं स्थापिलेली संस्था किं० मंडळी; जूट. २ एका विशिष्ट संस्थेतील प्रत्येक इसमावर असलेली जबाबदारी,-स्वतासंबंधाची आणि बाकीच्या संबंधाची. ' एकजती एकमती ' ह्याच अर्थानें वापरतात.

जंतु [सं०] पु० १ कोणताही प्राणी. २ कोणीही इसम. २ कृमि; कीट.

जंत्र [**सं०** यंत्र] **न०** १ सोनारलोकांचें सोन्याची किं० चांदीची हाव्या त्या जाडीची तार काढावयाची पोलादी पट्टी. वर ' जंतर ' पहा. २

कोणत्याही कामाचें कोणतेंही खुबीदार यंत्र. ❀ **एकाद्याला जंत्रांतून ओढणें** त्याला कडक शिस्तींत ठेवणें किं०धरणें;त्याला पूर्णपणें शिस्तीप्रमाणें किं० नियमाप्रमाणें वागावयाला भाग पाडणें.**जमाखर्च** (किं० **हकीगत** किं० **हिशेब**) **जंत्रांतून ओढणें** तो बारकाईनें तपासणें; त्याची शहानिशा करणें. **जंत्रांतून ओढलेला वि०** आजार इ० मुळें अत्यंत रोड झालेला.**जंत्रीं ओतलेला** सुंदर आणि नीटस बांध्याचा; प्रमाणबद्ध अवयवांचा आणि चेहेऱ्याचा (माणूस, वासरूं, इ०). **कोणेकाला जंत्रींत धरणें** त्याच्यावर सख्त नजर ठेवून आणि देखरेख करून त्याला कांहीं काम करावयाला लावणें; त्याला खेळूं न देणें. **जंत्रपट्टी, जंत्राची पट्टी स्त्री०** वर ' जंत्र ' चा अर्थ १ पहा.

जंत्रमंत्र पु० न० वर ' जंतर मंतर ' पहा.

जत्रा [**सं०** यात्रा] **स्त्री०** एकाद्या गांवीं प्रसंगविशेषीं किं० वर्षांतील कांहीं विशिष्ट दिवशीं कांहीं विशिष्ट उद्देशानें जो बाजार भरतो तो; उ० मुंबईस कोजागरी पौर्णिमेला गवालिया टॅंकवर जत्रा भरते; उ० पुण्यास नवरात्रांत चतुःशृंगीची जत्रा भरते; उ० आवास येथे नागपंचमीला नागोबाची जत्रा भरते.' यात्रा 'आणि' जत्रा ' यांच्यातील भेदासाठीं आमचें " मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० " हें पुस्तक लेखांक १३६४ पहा. ❀ **जत्रेकरी पु०** जत्रेला गेलेला इसम.

जंत्री [**सं०**यंत्र] **स्त्री०** १ कांहीं विशिष्ट सरणीनें केलेली पदार्थांची,कायद्याच्या कलमांची,किं० ऐतिहासिक वृत्तांची मांडणी किं० रचना.२ अगदीं त्रोटक हकीगत. ३ क्रमवार यादी. ५ ग्रंथांत कोणचा विषय कोणच्या पानांत किं० लेखांकांत आहे याचें टांचण.६कांहीं हिशेब करण्याचा अडाखा किं० युक्ति किं० बसविलेली रीति. ७ सोनारलोकांची तार काढावयाची पट्टी; वर 'जंतर'पहा.

जथणें [**सं०** यूथ=जमाव, कळप] **स०क्रि०** कार्यविशेषाची साधनसामग्री जुळविणें किं० जमविणें; जरूर त्या पदार्थांची जुळणी करणें;पूर्व तयारी करणें; मांडामांड किं० व्यवस्थित जुळणी करणें; **अ० क्रि०** यथास्थितपणें होणें; नीट जुळणें; योग्य मार्गास लागणें. ❀ **जथाजथ स्त्री०** १ जमविणें. २ पूर्व तयारी करणें. ३ व्यवस्थित मांडणी.४संघटणा.

जथपत(–थ)**स्त्री०**पूर्व तयारी; जुळवाजुळव. मांडामांड.

जथविणें [**म०** ' जथणें ' चें प्रयोजक]**स० क्रि०** १ जमविणें; जुळविणें. २ घडवून आणणें.

जथा [**म०** जथणें] **पु०** १ समुदाय; टोळी. २ कांहीं विशिष्ट नियमांनीं संघटित झालेली मंडळी; जूट. ३ कुटुंब. ४ जात. ५ एकाद्या कुटुंबांतील सर्व माणसांत बोलणें, चालणें, चेहेरेपट्टी, स्वभाव, इ० बाबतींत जें साद्दश्य असतें तें. ❀ **जथाजथ स्त्री०** वर 'जथणें' मध्यें पहा. **जथावळ स्त्री०** १ सगळें कुटुंब.२ नात्यानें जुळलेलीं सर्व माणसें समुचयानें किं०अशा माणसांत किं०कुटुंबांत आढळणारा सर्वसाधारण गुण, धर्म, किं० ढब.

जदीद [**अ०**] **वि०** १ नवथर नेमिलेला शिपायी, अधिकारी, किं० कामगार. २ नुकताच झालेला किं० प्रचारांत आलेला.

जधीं क्रि०वि० ज्या दिवशीं किं०समयीं;जेव्हां.

जन [**सं०**] **पु०** १ प्राणी. २ मनुष्य. ३ एक व्यक्ति. ४ लोक; समाज; चारचौघे; ह्या अर्थी नपुंसकलिंगी सुद्धां.५ समूह; उ० श्वजन म्ह० कुत्रे किं० कुत्र्यांची टोळी. ६ राष्ट्र; लोकसमुदाय. ❀ **जनातित वि०** अलौकिक; लोकोत्तर. **जनाधिप पु०** राजा. **जनान्त पु०** १ एकान्त. २ यम. **जनान्तिक वि०** (नाटकांत) इतर पात्रांस ऐकूं न जाईल असें शेजाऱ्याशीं बोलणें. **जनपद पु०** १ समाज. २ लोक. ३ राष्ट्र, देश. ४ खेडेंपाडें. **जनमर्यादा स्त्री०, जनव्यवहार पु०** चाल, रीति. **जनरव, जनवाद पु०,जनश्रुति स्त्री०** १लोकवार्ता. २ टपका. **जनलोक पु०**१ सप्त लोकांतील पांचवा. २ सर्व लोकसमाज. **जनकथा स्त्री०**लोकांत निराधार असून प्रचलित अशी कांहीं गोष्ट किं०बाबत; उ० मांजर ही वाघाची मावशी, हत्तीच्या कानांत मुंगी गेली असतां हत्ती मरतो, इ० समज.**जनरंजन न ०**१ प्रजेला संतुष्ट ठेवणें हें जें राजाचें कर्तव्य तें. २ लोकांत आपली प्रतिष्ठा वाढावी म्हणून खटपट. **जनरूढि स्त्री०** समाजांत चालूं असलेली सरणी. **जनलज्जा स्त्री०** लोक आपणाला काय म्हणतील याचा विचार; लोक आपणाला नांवें ठेवितील कीं काय अशी कचर.**जनवदंती,जनवाणी स्त्री०** समाजांत बहुत लोक जें बोलतात तें.**जनवाक्य जना-**

र्दन, जनीं जनार्दन लोक जें बोलतात तें ईश्वराचें वाक्य होय. जनस्थान न० १दण्डकारण्याचा एक भागविशेष. २ हल्लींचें नाशीक शहर. जनापवाद १ समाजांत एकाद्या माणसाबद्दल प्रचलित निंदा किं० गैरसमज. २ लोकांचा एकाद्या गोष्टीबद्दल प्रतिकूल ग्रह किं० आक्षेप किं०मत. आपण भला तर जग (किं० जग)भले मागें ' जग 'मध्यें पहा. जनाचें तोंडीं लागतां पुरवत नाहीं लोक एकदा असें बोलतात आणि एकदा तसें बोलतात; लोक दोन्ही बाजूंनीं दोष देतात म्हणून त्यांना खूष करण्याचा प्रयत्न निष्फळ होतो. जनांत एक मनांत एक आंतल्या गांठीच्या मनुष्याचें हें वर्णन आहे. आपलें खरें मत प्रकट न करणें. जनीं जनार्दन बहुत लोक जें बोलत असतील तें ईश्वराचें वचन म्हणून चालवयाला हरकत नाहीं; बहुजनसमाजाचें मत खरें असतें. ऐकावें जनाचें करावें मनाचें लोकांचा विचार घ्यावा परंतु आपल्या स्वताच्याच मताप्रमाणें जें काय करणें असेल तें करावें. जन त्रिविध १ लोकांच्या मताला स्थिरपणा नसतो. २ आपण कांहीं केलें तरी निंदणारे लोक आढळतात.

जनक [सं०] वि० उत्पादक; उत्पन्न करणारा; उ० दुःखजनक, आश्चर्यजनक,इ०.पु० बाप,पिता.

जनता [सं०] स्त्री० १ लोकसमुदाय. २ प्रजाजन; रयत.

जनन [सं०] न० १ जन्म; उत्पत्ति. २प्रादुर्भाव. ꣸जननाशौच न० मुलाचा जन्म झाल्यानें कुटुंबांत येतो तो विटाळ; सुवेर; सोवेर; सोहेर. मृताशौच म्ह० कुटुंबांतील कोणी माणूस मेल्यानें येतो तो विटाळ.

जननी [सं०] स्त्री० माता, आई.

जनाजा वि० ज्याच्या मानेवर केशांचे चार भोंवरे आहेत असा (घोडा).

जनानखाना [फा० जनानाह्] पु० राजाच्या किं० कोणा बड्या माणसाच्या स्त्रियांची घरांतील जागा; अंतःपुर.

जनानी [फा० जनानाह्] वि० १ स्त्रियांचें. २ स्त्रियांना योग्य असें. ३ स्त्रियांत आढळणारें. ४ स्त्रियांनाच शोभेल असें. ५ नामर्दपणाचें.

जनार्दन [सं०] पु० श्रीविष्णु. ꣸ जनीं जनार्दन मागें 'जन'मध्यें पहा. जनार्दनी ऊद पु० पिवळसर आणि उंची दर्जाचा ऊद.

जनावर [फा० जान्वर्] न०पशु. २ प्राणी.

जानि [सं०] स्त्री० १ जन्म; उत्पत्ति. २ आई.

जनित [सं०] वि० १ उत्पन्न झालेलें. २ उत्पन्न केलेलें. समासांत उत्तरपदीं हा शब्द पुष्कळ वेळां येतो; उ० क्रोधजनित म्ह० क्रोधानें उत्पन्न केलेला किं० क्रोधापासून उत्पन्न झालेला.

जनिता [सं० जनितृ] वि० उत्पादक. पु० बाप, पिता. स्त्री० जनित्री म्ह०आई, माता,जननी.

जनी स्त्री० एका विशिष्ट जातीचें विड्याचें पान. हें काळसर आणि तिखट असतें.

जनेदारखाना पु० मागें ' जनानखाना ' पहा.

जनोबाभट्टी वि० जनोबाभट्ट ह्या नांवाच्या इसमानें रूढ केलेलें (मोडी लेखनाचें वळण).

जन्म [सं० जन्मन्] संस्कृतांत न०,मराठींत पु०, न० १ उत्पत्ति; प्रादुर्भाव; अस्तित्वांत येणें. २ आयुष्याच्या मर्यादेचा अवधि; आयुष्य; उ० त्याचा सारा जन्म दारिद्र्यांत गेला; उ०मी जन्मांत खोटें बोललें नाहीं. ꣸ जन्मान्तर न० १ अन्य जन्म; दुसरा जन्म; मागला किं० पुढला जन्म; उ० मी जन्मांतराचें पातक भोगित आहें; उ० जन्मांतरीं तूं माझे उसने घेतलेले पैसे फेडिशील. जन्माष्टमी स्त्री० गोकुळ अष्टमी हा दिवस; श्रावण वद्यांतील अष्टमी ही तिथि. जन्मपत्रिका स्त्री०जन्माच्या समयीं ग्रहादिकांची खगोलांत कशी स्थिति होती हें दाखविणारें कोष्टक. जन्मभाषा स्त्री० जन्मानंतर अगदीं प्रथम जी भाषा मूल बोलूं लागतें ती भाषा; स्वभाषा. जन्मकाल पु० १ मुलाचा जन्म ज्या समयीं झाला तो समय,–तिथि, वार, मास,पक्ष, ग्रहांचे अस्तोदय, इ० नीं उपलक्षित जो समय तो. २ ह्या समयाचें कागदावर केलेलें टिप्पण. ३ सबंध आयुष्य किं० आयुष्याचा अवधि. जो गुण बाळा तो जन्मकाळा लहानपणीं मुलाचे जे गुण दिसतात तेच बहुधा त्याच्या सर्व आयुष्यभर त्याच्या आचरणांत दृष्टीस पडतात.चांगल्या गुणांसंबंधानें बोलतांना। तसेंच वाईट गुणासंबंधानें बोलतांना ही म्हण योजतात. जन्मकरंटा वि० जन्म झाल्यापासून दुर्दैवी किं० नादान असा. जन्मकुंडली स्त्री० ज्या लग्नीं

जन्म झालेला असेल त्या लग्नाचें ग्रह पाहाण्यासाठीं जें बारा घरांचें कोष्टक करतात तें किं० त्या कोष्टकांत दाखविलेली ग्रहांची स्थिति. **जन्मखोड स्त्री०** १जन्मापासून अंगीं असलेला उणेपणा.२ जन्मापासून म्हणजे अगदीं लहानपणापासून जडलेली वाईट सवय किं० लकब. **जन्मगांठ स्त्री०** १ संबंध आयुष्यभर टिकून राहाणारा संबंध (नवरा-बायको इ० चा). **जन्मजूग स्त्री०** संबंध जन्मभर टिकणारी किं० पुरणारी वस्तु (कांहीं दागिना, सगंग, इ०). **जन्मदिवस, वाढदिवस, जन्मदिन पु०** ज्या महिन्याच्या ज्या तिथीस एकाद्याचा जन्म झालेला असेल त्या महिन्याची ती तिथि. ही तिथि प्रतिवर्षी मुलाचे आईबाप पक्वान्नानें साजरी करतात;उ० माझा वाढदिवस आश्विन वद्य चतुर्दशीस होतो. **जन्मनाम न०** जन्मनक्षत्राच्या संबंधानें अवकहडाचक्रावरून जें नाम ठेवितात तें. **जन्मनक्षत्र न०** ज्या दिवसनक्षत्रावर ज्याचा जन्म झाला तें दिवसनक्षत्र. **जन्मप्रभृति क्रि०वि०** जन्मापासून. **जन्मभूमि स्त्री०** जेथें ज्या मनुष्याचा जन्म झाला तें स्थल,देश,घर,इ०. **जन्ममरण न०** जन्मास यावें,मरावें,पुन्हा दुसऱ्या जन्मास यावें,पुन्हा मरावें, ही राहाटी. **जन्ममास पु०** ज्या महिन्यांत ज्याचा जन्म झाला तो त्याचा जन्ममास. **जन्मयोग पु०** शुभाशुभफलसूचक जो जन्मकालीन ग्रहांचा योग तो. **जन्मराशि पु०** एकाद्याच्या जन्माचे समयीं ज्या राशीस चंद्र असतो तो त्याचा जन्मराशी. **जन्मलग्न न०** जन्माच्या समयींचें लग्न (ज्योतिषांत). **जन्मसावित्री स्त्री०** १ पति जिवंत असतां जी मेली ती स्त्री; जिला वैधव्य प्राप्त झालें नाहीं अशी स्त्री; उ० बाई, तूं जन्मसावित्री हो असा मी तुला आशीर्वाद देतें. २ (विनोदांत) फार दिवस न धुतलेली धाबळी,— ही सोंवळ्यांत वापरतां येते. **जन्मसोंवळा वि०** १ ज्याला विटाळ झाला तरी नेसणारा तो मनावर घेत नाहीं असा (मुकटा, इ०). २ ज्याला विटाळ झाला तरी जो तिकडे दुर्लक्ष्य करतो असा (माणूस). **जन्मस्वभाव पु०** जन्मापासूनचा मनुष्याचा जो स्वभाव तो. **एकाद्याचा कांहीं प्रकारें जन्म जाणें** त्यानें त्या प्रकारें साऱ्या आयुष्यभर वागत असणें; उ० उनाडक्या करण्यांत विसूचा सारा जन्म गेला (किं० जात आहे) **तिनें कन्येला (किं०पुत्राला) जन्म दिला** ती कन्येला (किं० पुत्राला)प्रसवली. **जन्माचा खोटा** जन्मापासून जो खोटेपणा करीत आला आहे असा. **जन्माचा रोग** १ जन्मल्यापासून एकाद्याला पीडित असलेला रोग. २ मरणापर्यंत बरा न होणारा रोग. **जन्माचा रोगी** १ जन्मापासून जो रोगग्रस्त तो. २ ज्याचा रोग तो मरेपर्यंत राहाणारा आहे असा. **जन्माचा सोबती पु०** मेरपर्यंत टिकून राहील असा (नवरा, बायको, व्यसन, रोग, इ०). **जन्माची भाकरी स्त्री०** जन्मभर पुरण्याइतकें चरितार्थाचें भरपूर साधन (शेत, वतन, नोकरी, इ०). **जन्माचें सार्थक न०** जन्मास आल्याचें चीज किं० साफल्य (करणें, होणें). **एकाद्याच्या जन्माचा पाटावरवंटा घेणें** त्याला जन्मभर पोसण्याची हमी घेणें किं० जबाबदारी वाहाणें. **जन्माचे कर्मीं, जन्माचे कर्मां क्रि०वि०** १कधींतरी;उ० तूं जन्माचे कर्मीं मल्लखांबावर उडी मारली आहेस काय?२साऱ्या जन्मांत; एकदाच किं०अगदीं थोडे वेळां उ०त्यानें अन्माचे कर्मां मुलाची मुंज केली. **एकाद्याला जन्मास घालणें** त्याला जन्म देणें;त्याला प्रसवणें;त्याला उत्पन्न करणें; उ० जन्मास घाली तो भाकरी देई. **जन्मास घालणारास रडणें** १ आपणाला जन्म देणारास शिव्या देणें. २ आपल्या प्राक्तनाविरुद्ध असंतोष व्यक्त करणें. **जन्मास येणें** १ जन्मणें. २ उत्पन्न होणें. **एकाद्याचा नवा जन्म होणें** तो भयंकर आजारांतून निभावणें किं० बचावणें. **जन्मखुंट पु०** १ खोखोच्या खेळांत ठाम बसलेला इसम. २ पक्केपणीं एकाद्या ठिकाणीं बसलेला मनुष्य किं० कांहीं पदार्थ. **जन्मचुडेल स्त्री०** द्वाड आणि कजाग स्त्री. **जन्मजन्मीं, जन्मजन्मांतरीं** १ ह्या आणि अन्य जन्मीं. २ कधींही (अकरणरूपी प्रयोग); उ० मी जन्मजन्मीं खोटें बोललों नाहीं किं० बोलणार नाहीं. **जन्मतः क्रि० वि०** जन्मापासून. **जन्मस्थान न०** १ जन्मभूमी. २ माता; आई. **जन्मस्थानीं लघुशंका करणें** १ मातेशीं व्यभिचार करणें. २ उपकार करणाऱ्याशीं बेइमान होणें. **जन्मारभ्य, जन्मादारभ्य क्रि० वि०** जन्मापासून.

जन्मणें [सं० जन्मन्; म० जन्म] **स०क्रि०** उत्पन्न करणें; प्रसवणें; ०ला जन्म देणें. **अ० क्रि०** उत्पन्न होणें; जन्म पावणें; जन्मास येणें.

जन्य [सं०] **वि०** १ उत्पन्न केलेलें. २ वराण्यासंबंधाचें.३ ०पासून उत्पन्न झालेला; उ०विरहजन्य, शोकजन्य, इ०.**न०** १ उत्पत्ति. २ लढाई.

जप [सं०] **पु०** १ ईश्वरनाम, मंत्र, इ०चें मनामध्यें अनेकवार जें उच्चारण तें. २ स्तोत्रादिकांची मनामध्यें एकवार आवृत्ति. ॐ **जपजाप्य न०** जप, इ० जें पुण्यकर्म तें. **एकाद्या कृत्याचा (किं० गोष्टीचा) जप घेणें** (किं० **धरणें**) त्याचेबद्दल किं०तिचेबद्दल वारंवार वारंवार बोलत असणें. **जपमाळ स्त्री०** जपाच्या आवृत्तीचा संख्या मोजण्यासाठीं जी मण्यांची माळ हातांत घेऊन एक आवृत्ति झाली म्हणजे एक मणि ओढावयाचा ती माळ. **एकाद्या गोष्टीची जपमाळ घेणें** १ तिचेबद्दल वारंवार बोलणें. २ ती एकसारखी मनांत घोळणें.

जपणी, जपणूक, जपण [म० जपणें]**स्त्री०** एकाद्या माणसावर किं० कांहीं चालत असलेल्या कामावर लक्ष्य किं० नजर ठेवणें किं० पाळथ राखणें (**क्रि०** करणें).ॐ**जपणीस बसणें** (किं० **लागणें**) पाळथ ठेवणें.

जपणें [सं० जप्=तोंडांतल्या तोंडांत म्हणणें] **अ० क्रि०** १ विशिष्ट सरणींत किं० क्रमांत चूक न व्हावी म्हणून सावध असणें किं० सावधगिरी बाळगणें. **स० क्रि०** ०बद्दल काळजी घेऊन असणें. ०बद्दल काळजी घेणें; ०वर नजर ठेवणें. २ कांहीं गोष्टीचें वारंवार उच्चारण किं० निवेदन करणें. ३ मंत्र, स्तोत्र,इ०चा पाठ म्हणणें.

जपतप,जबतब क्रि० वि० कसेंबसें; कसेंतरी.

जंपती [सं०] **न० अ० व०** पति आणि [पत्नी(जोडीनें).

जपा [सं०] **स्त्री०** जास्वंदीचें झाड.

जपी [सं० जप] **वि०**जो निरंतर जप करीत असतो तो.

जप्त [अ० जबूत्] **वि०** सरकारनें ज्याची मालकी, ताबा, किं० वहिवाट, आपणाकडे घेतली आहे असा (पदार्थ,–शेत, वतन, इ०).

जप्ती [अ० जबूती] **स्त्री०** प्रजाजनाचें शेत, इ० सरकारनें आपल्या वहिवाटीखालीं घेणें, किं० आपल्या ताब्यांत किं० देखरेखीखालीं घेणें किं० घेण्याची सरणी किं०घेण्याचा प्रकार.ॐ **जप्तीदार,जप्तीवाला पु०**सरकारच्या हुकमावरून जप्ती करतो किं० करावयाला जातो तो अधिकारी.

जंब ' खालीं जंभ ' पहा.

जबडा [हि० जभ्डा] **पु०** १ मुखाचा एक खालचा आणि एक वरचा असे जे दोन भाग ज्यांच्या दाबानें खाद्य पदार्थाचें चर्वण होतें ते दोन प्रत्येक किं०त्या दोहोंची जोडी.२तोंड.ॐ**एकाद्याचा जबडा रंगविणें** त्याच्या थोबाडींत मारणें.

जबतब [हिं०] **क्रि० वि०** कसें तरी, कोणच्या तरी रीतीनें; कसेंबसें.

जंबया, जंबिया, जंब्या [अं० जंब्=बाजू] **पु०** कट्यारीसारखें एक शस्त्र.

जबर, जबरा [अ० जब्र्=जोर] **वि०** १ जोरदार; शक्तिमान. २ भयंकर (जखम, दंड, मार, इ०). ३ विद्या, द्रव्य, बळ, अधिकार, इ० गुणांनीं जो श्रेष्ट किं० अधिक तो.४ कठिण, अवघड (काम, कारभार). ५ मोठा, अव्याढव्य. ६ महागाईचा, आपणाला न झेपण्याजोगा (दर, भाव, किंमत, इ०).७ लांबलचक (अंतर, मजल). ॐ **जबरजंग** [अ०जब्र्=जोर; **फा०** जंग्=लढाई] **वि०** लढाऊ; शूर; लढवय्या पेशाचा. **जबरदस्त** [**फा०** दस्त्=हात] **वि०** १ जोरदार; आवेशयुक्त. २ अन्यायी; जुलमी (कारभार, शासनपद्धति). ३ वरच्या दर्जाचा; याच्या उलट ' जेरदस्त. ' ४ वर ' जबर ' पहा. **जबरदस्ती स्त्री०** १ शक्तीचा किं० अधिकाराचा जोर. २ दुसऱ्याच्या इच्छेविरूद्ध त्याच्यावर घातलेला जोर किं० लादलेलें काम. ३ जुलूम; सक्ती. ४ दुसऱ्यावर लादलेली आपली इच्छा किं० हुकूम.

जबर पु० गंजिफाच्या खेळांत खेळणाऱ्याच्या डाव्या बाजूचा खेळगडी.

जबरी [अ० जब्र्=जोर] **स्त्री०** जोर; सक्ती; दुसऱ्याची इच्छा नसतां त्याला आपली इच्छा किं० आज्ञा मान्य करावयास लावणें.

जंबा [अ० जम्ब्=बाजू] **पु०** कट्यारीसारखें एक शस्त्र.

जबानी [हिं०, **फा०** जबान्=भाषा, शब्द]

स्त्री० वादी, प्रतिवादी, साक्षीदार, इ०कांपासून न्यायाधीशानें विचारून मिळविलेली हकीगत.

जवाब [फा० जवाब्=उत्तर] पु० १ उत्तर. २ हुंडीबरोबरचें तपशीलाचें पत्र. ***जवाबनीस** पु० अर्ज इ०ना जवाब देणारा सरकारी अधिकारी. **जवाबनिशी** स्त्री० जवाबनिसाचें कर्तव्य किंo अधिकार.

जवाबी [फा० जवाब्=उत्तर] वि० १ प्रश्नाचें उत्तर देण्यांत तत्पर; तावडतोब उत्तर देण्यांत पटाईत. २ टोले वडविणारें (घड्याळ). ३ तोलास तोल देणारा, बरोबरी करणारा, प्रतिकृति करणारा (पदार्थाचा दुसरा भाग,—आकार, नक्षी, इ०च्या बाबतींत); संवादक; समतोल.

जंबाळ [सं० जंबाल] पु० चिखल.

जंबिया, जंब्या [अ० जम्ब्=बाजू] पु० कट्यारीसारखें एक शस्त्रविशेष.

जंबीर [सं०] पु० १ ईडलिंबू . २ महाळुंग.

जंबु[सं०]स्त्री० जांबूळ. ***जंबुद्वीप** न०पृथ्वी.

जंबुरा [फा० जन् बुराह्] पु० लहान तोफ.

जंबुर्दी [फा० जम्मर्रुदी] वि०हिरव्या रंगाची एक विशिष्ट छटा असलेला (कपडा, सखलाद).

जंबुक, जंबूक [सं०] कोल्हा.

जंबू पु० खिस्ती नांवाची गुजराथी जात किं० त्या जातीचा इसम.

जबून [फा०] वि० वाईट (कोणत्याही बाबतींत).

जबे [अ० जबअ] वि० ठार मारलेला; कापलेला.***जबे करणें** युद्धांत किं०अन्य प्रसंगीं ठार मारणें (माणूस किं० पशु).

जबेतराश(—स) [फा० जबान्=भाषा,जीभ, शब्द; तराषीदन्=कापणें] वि० उत्तर किं० जबाब देण्यांत तत्पर किं० तल्लख. * **जबेतराशी** स्त्री० १ जबाब किं० उत्तर देण्यांत तल्लखपणा. २ मुद्देसूद भाषण; जोरदार वक्तृत्व.

जबेफरास [फा० जबान्=भाषा;+फराशी] वि० वक्तृत्वाचा गुण (अंगीं असलेला). * **जबेफराशी** स्त्री० वक्तृत्वाचा गुण.

जंबोरा पु० सोनार, लोहार, इ०कारागिरांचे एक हत्यार,—पदार्थ पकडणें, पिळवटणें, तोडणें, इ० उपयोगाचें. हें हत्यार लहान असल्यास त्याला ' अंबूर ' म्हणतात.

जब्बर जब्बरदस्त इ० मागें ' जबर, "जबरदस्त,' इ० पहा.

जंब्या [अ० जम्ब्=बाजू] पु० कट्यारी सारखें एक हत्यार.

जंभ, जंब [सं० दम्भ=ढोंग, गर्व] पु० १ ढोंग. २ गर्व. ३ दुसऱ्याचें कांहीं काम करणें आपल्या हातीं असतां त्याला विनाकारण शंभर सबबी सांगण्याकडे, त्याला अनेक हेलपाटे देण्याकडे, त्याला आपलीं आर्जवें करावयाला लावण्याकडे जी मनाची निंद्य प्रवृत्ति असते ती; ह्या अर्थी बहुधा अनेकवचनीं प्रयोग होतो; उ० सद्या, तुला भारी जंभ चढले आहेत रे ! उ० नाऱ्या, कशाला इतके जंभ करतोस रे ! उ० गोंप्या, मी तुझे जंभ चालूं देणार नाहीं !

जम [म० जमणें; हिं० जम्ना] पु० १ अनेक वस्तूंचा कार्यविशेष घडवून आणण्याच्या बाबतींत असावा लागतो तो मिलाफ, संयोग, किं० जुळणी; अनेक भागांची किं० अवयवांची परस्परांशीं अनुरूपता; एकवाक्यता. २ जमाव, जुळणी, एकी. ३ दोन किं० अधिक पदार्थांच्या संयोगानें उत्पन्न होणारा कांहीं विशेष गुण,—रूप, रुचि, माधुर्य, सोयिस्करपणा इ०; उ० ताकभात आणि अंबाडीची भाजी यांचा जम चांगलासा जमत नाहीं (किं० बसत नाहीं किं० पडत नाहीं); उ० बाजरीची ऊन्ह ऊन्ह भाकरी आणि कांद्याचें पिठलें यांचा जम असा जमतो कीं यंव रे यंव ! ***जमजूट** खालीं ' जमणें ' मध्यें पहा.

जमखाना [फा० जमअ खानाह्] पु० सतरंजी; मोठी सतरंजी.

जमणें [हिं० जम्ना] अ० क्रि० १ एकत्र होणें; एके ठिकाणीं येणें, जुळणें, उपस्थित असणें, किं० होणें. २ घट्ट होणें; गोठणें; उ० नवीन व्यालेल्या म्हशीचें दूध चुलीवर ठेवतांच जमतें (किं० जमून येतें).३ व्यायामानें (शरीर, गात्रें) घट्ट, टणक, मजबूत, किं० संघटित होणें; उ० हें औषध घे म्हणजे तुझें शरीर चांगलें जमेल. ४ कांहीं काम किं० व्यवहार सोयीच्या मार्गानें किं० सरणीनें चालूं लागणें (किं० होऊं लागणें).

५ इष्टपरिणामकारक होणें किं० होण्याच्या पंथास लागणें; उ० मी द्वारकेच्या लग्नासाठीं आज चार महिने हिंडतों आहें पण अझून जमत नाहीं. ६ व्यवस्थित किं० सोयीच्या स्थितींत येणें; उ०माझा संसार कांहीं केल्या जमत नाहीं. ७साधनसामग्रीची सोयीस्कर जुळणी होणें; सुपरिणामकारक मिलाफ किं० संयोग होणें.८मिसळणें;एकजीव होणें.९उठावदार होणें; एकाद्या कार्याला रंग भरणें; उ० प्रेमळ श्रोते असले म्हणजे कथा (किं० पुराण) चांगली जमते. ※ **जमजूट**[म० जमणें+जुटणें] **स्त्री०**१ जुळणी; संघटितपणाची स्थिति. २ सर्वांगीं परिपूर्णता.३सर्व प्रकारच्या साधनसामग्रीचा मिलाफ. ४ संयोग, मिलाफ.

जमदग्नि [**सं०**] **पु०** १ पुराणप्रसिद्ध एक ऋषिविशेष. २ अति तापट माणूस.

जमदड, जमदाड स्त्री०, जमदाडा (–ढा) पु० [म० यम+दाढ] मोठी आणि रुंद तरवार.

जमदाडा (–ढा)वि० लठ्ठ; अगडबंब; धटिंगण.

जमन, जमनबिलावर पु० बिलावर नामक रागाचा एक प्रकार (संगीतांत).

जमनीक [**स०** जवनिका] **स्त्री०** वधूवरांच्या मध्यें धरतात तें वस्त्र; अंतरपाट; अंतरपट.

जमनीस [**फा०** जमाअनवीस्] **पु०**१ प्रांतांतील सरकारी जमा जमते तिजवरील अधिकारी. २ सरकारी जुने तंबू आणि नादुरुस्त सामान ज्याच्या ताब्यांत दिलेलें असतें तो अधिकारी.

जमविणें [**म०** ‘ जमणें ’ चें प्रयोजक] **स० क्रि०** १ गोळा करणें; एकत्रित करणें; मिश्रित करणें. २ इष्टकार्यार्थ साधनसामग्रीची जुळवाजुळव करणें. ३ पक्कें म्हणून ठरविणें; निश्चित करणें; उ० हें लग्न तुम्ही इतक्यांत जमवूं नका. ※**जमवाजमव स्त्री०** इष्ट कार्यार्थ जरूर असे पदार्थ किं० माणसें एकत्रित करणें.

जमा [**अ०** जमाअ] **स्त्री०** १ मिळकत;आय; उत्पन्न. २ शेतकऱ्यांकडून सरकारानें घेतलेला सारा. ३ (लाक्षणिक) गणना; मोजदाद; हिशेबांत किं० विचारांत घेतलें जाण्याची योग्यता किं० पात्रता; महत्त्व; उ० आमची थोरांतही जमा नाहीं आणि पोरांतही जमा नाहीं; उ० आम्ही काय जमेंत ना खर्चांत (म्ह० आमचें कोणाला महत्त्व नाहीं). **वि०** गोळा झालेला; एकत्रित झालेला. ※ **जमाखर्च पु० ए० व०** १ लोकांकडून आलेले पैसे आणि खर्च झालेले पैसे ह्यांच्या नोंदी करणें.२आय आणि व्यय. ※ **जमाखर्चीं न पडे ताळा पंतीं कागद केला काळा** व्यर्थ खटपट, निष्फळ खटाटोप किं० यातायात किं०कष्ट,सोसणें.**जमाखर्च बरोबर होणें** पडलेली भर आणि आलेली तूट,खर्च,किं०हानि हीं समसमान असणें. **जमाबंदी स्त्री०** १ गांव, खेडें, परगणा, इ० संबंधाची पहाणी करून सरकाराला द्यावयाची साऱ्याची रकम ठरविणें किं० ही ठरलेली रकम. २ फौज, पैसा, इ० जमविण्याचें काम किं० असा जमलेला पैसा किं० जमलेले शिपायी. **जमावसूल** [**अ०**] **पु०** जमा झालेली सरकारी वसुलाची रकम.

जमात [**अ०** जमाअत्] **स्त्री०** जमाव; संघटित मंडळी; एकाद्या जातीचे किं० संस्थेचें लोक समुच्चयानें. ※**जमात ती करामत** संघटित प्रयत्न केला असतां आश्चर्यकारक फळ प्राप्त होतें. **जमातदार पु०** सैन्याच्या तुकडीचा नायक किं० मुख्य. **जमातदारी** जमातदाराचें कर्तव्य किं० हुद्दा.

जमादार [**फा०** जमाअदार] **पु०**१ सैन्याच्या तुकडीचा मुख्य.२शिपायी, हरकारे,इ०चा मुख्य.

जमादिलाखर [**अ०**] **पु०** मुसलमानी वर्षाचा सहावा महिना.

जमादिला(–लो–)वल [**अ०**] **पु०** मुसलमानी वर्षाचा पांचवा महिना.

जमाना [**फा०** जमानाह्] **पु०** १ काळ, युग (जगाचा). २ विशिष्ट कालावधि.

जमालगोटा [**हिं०**] **पु०** सागरगोट्यासारखें एक फलविशेष,–ह्याचा उपयोग कोठा साफ करण्याकडे होतो.

जमाव [**हिं०**] **पु०** समुदाय; एकत्रित झालेलीं माणसें, जनावरें, किं० पदार्थ, यांचा समुदाय. ※**जमाव पडणें** पक्केपणीं बसणें; बद्धमूल होणें; स्थिर होणें (कांहीं अधिकारावर किं० कांहीं व्यापारांत किं० उद्योगांत).

जमाविणें [**हिं०** जमाना] **स० क्रि०** १ एकत्रित करणें; गोळा करणें. २ फौज गोळा करणें.

जमिदार पु० जमीनीवर ज्याचा हकटक असतो

असा देशमुख, देशपांड्या, इ० वतनदार.

जमीन [फा०] **स्त्री०** १ नद्या, समुद्र, इ० जलमय प्रदेश वर्ज करून बाकीचा जो पृथ्वीचा भाग तो. २ पृथ्वीचा पृष्ठभाग,—खडक इ० वर्ज करून. ३ चापून चोपून सपाट केलेली घरांतील किंवा अंगणांतील भूमि. ४ वस्त्राचा कांठ, पदर, इ० वर्ज करून बाकीचा जो भाग तो. ५ कोणत्याही पदार्थाचा पृष्ठभाग (टेबलाचा, चित्राचा). ६ शेतकी, बागायत, इ०च्या उपयोगाचा प्रदेश. ꣸ **जमीनउत्पन्न न०** १ सरकारांत भरावा लागतो तो जमीनीचा सारा. २ जमीनींत पिकविलेल्या धान्यादिकांचें उत्पन्न. **जमीनजुमला पु०** १ कोणेकाचीं शेतें, मळे, घरेंदारें, इ०जिंदगी. २ एकाद्या गांवांतील लोकांची घरेंदारें, शेतें, इ० समुच्चयानें. **जमीनदार पु०** देशमुख, देशपांड्या, पाटील,कुलकर्णी, इ० अधिकारी व्यक्तिशः. त्यांना 'जमिदार' किं० 'जमेदार' असेंही म्हणतात. **जमीनदारी स्त्री०** १ जमीनदारांचे हक्क, कर्तव्यें, अधिकार, इ० समुच्चयानें. २ डावपेच, लबाड्या. **जमीनदोस्त** [फा० जमीन्+दोस्त (मित्र)] **वि०** १ विध्वस्त केलेलें (घर इ०). २ कुस्तींत जमीनीला ज्याची पाठ लागली असा (गडी); पराभूत. **जमीननीस, जमीननवीस पु०** जमीनींच्या उत्पन्नांची पाहाणी करून धारा ठरवितो तो सरकारी अधिकारी. **जमीनबाब स्त्री०** जमीनीचा सारा. **जमीनझाडा पु०**गांवाच्या जमीनाच्या विस्ताराचा चतुःसीमापूर्वक लिहिलेल्या वर्णनाचा कागद. **जमीनशिरस्ता पु०** शेतें, मळे, इ०ना उपयोगी कोणच्या जमीनी, पडीत कोणच्या जमीनी, इ०ची पाहाणी करून सरकारांत मालकानें भरावयाच्या साऱ्याचा केलेला ठराव. **जमीनसांड,भुईसांड वि०**जमीन सुटे इतकें उचललें गेलेलें (ओझें). **क्रि० वि०** जमीनीला अगदीं थोडा स्पर्श होईल अशा रीतीनें (ओझें उचलून किं० लोटून नेणें). **जमीनीला त्याचा पाय लागत नाहीं** तो (घोडा, माणूस) जलद चालणारा किं० पळणारा आहे. **जमीनीस पाठ (किं० अंग) लागणें (किं० लागलेलें असणें), जमीनीवर पडणें** विपन्न स्थितांत असणें (दारिद्र्यानें किं० आजारानें). **जमीनीस पाय लागणें** आजारांतून उठणें. **जमीनीस मिळणें** १ विध्वस्त होणें किं० केला जाणें (घर इ०). २ हीनदीन स्थितीस येणें. **जमीन आस्मान एक होणें** १ फार गर्विष्ठ होणें.२जोराचा पाऊस पडून झाडें,घरें, इ०स्पष्टपणें दिसेनातशीं होणें. ३ढगांची दाट अंधेरी येणें. **जमीन उकरणें** १ तीव्र दुःखानें किं०भांबावल्यामुळें जमीनीवर नखांनीं रेघोट्या ओढीत बसणें. २ घोड्यानें ठाणेबंदीपणाला कंटाळून जमीनीवर खूर बडवीत राहाणें. **जमीन धरणें** आजारामुळें आंथरुणावर एकसारखें पडून राहाण्याच्या स्थितींत असणें. **जमीन सोडणें** १ आजारांतून उठणें. २ हीन स्थिति नाहींशी होऊन उत्कर्षाच्या मार्गास लागणें.

जय [**सं०**] **पु०** १ युद्धांत, वादांत, किं० कुस्तींत स्थापित केलेला वरचष्मा किं० वरचढपणा; विजय. २ इंद्रियांवर घातलेली नियंत्रणा. ३ कामक्रोधादि मनोविकारांवर घातलेला आटोका; मनोनिग्रह. ४ हातीं घेतलेल्या कामाची सिद्धि किं० तज्जन्य यश. ५ जयजयकार. ६ विष्णूचा द्वारपाळ. ७ युधिष्ठिर. ८ अर्जुन. ९ भारतादि पवित्र ग्रंथ. **उ० वा० अ०** तुझा जय असो ! तूं विजयी हो ! तुझें यश थोर होय ! उ० जय पांडुरंगा ! जय विष्णो ! जय भवानी ! ꣸ **जयगोपाळ उ० वा० अ०** गुजराथी ब्राह्मणेतर एकमेकांस भेटले असतां किं० एकमेकांचा निरोप घेतांना हा शब्द उच्चारतात. **जयघोष पु०** विजयप्राप्तीबद्दल किं० कांहीं आनंदाची गोष्ट घडली असतां करतात तो वाद्यादिकांचा ध्वनि किं० आनंदाच्या आरोळ्या. **एकाद्याचा जयजयकार करणें** १ त्याची स्तुतिस्तोत्रें गाणें. २ त्याचें अभिनंदन करणें. ३ त्याची काळजीपूर्वक निगा राखणें;त्याची बरदास्त ठेवणें. **जयजयवंती स्त्री०** (संगीतांत) एक रागिणी. **जयढाक** [**सं०** जयढक्का] **पु०** जय सुचविण्यासाठीं म्हणजे जाहीर करण्यासाठीं वाजवितात तो नगारा. **जयदुंदुभि पु०** जय जाहीर करण्यासाठीं वाजवितात तो नगारा. **जयपत्र न०** वाद, कुस्ती, इ०मध्यें पराजित झालेला इसम पराजयाची कबूली ज्यावर जेत्याला लिहून देतो तें पत्र. **जयपाळ पु०** १ एक झाड. २ त्याचें फळ.

जयप्रस्थान न० मोहिमीवर जावयाला निघालेला राजा, योद्धा, इ०चें स्थानापासून प्रयाण. **जय-मंगळ वि०** कांहीं एका विशिष्ट शुभलक्षणानें युक्त असा (घोडा). **जयश्रीराम, जयसीताराम उ० वा० अ०** १वैरागी हा शब्द उच्चारून भिक्षा मागतात. २ वैराग्यांशीं बोलतांना हा उद्गार काढला जातो. **जयावह वि०**जय देणारें;इष्ट कार्यांत सिद्धि देणारें.**जयी वि०**ज्यानें जय मिळविला आहे असा. **कोणेकानें कोणेकाचा जय करणें** त्याणें त्याचा पराजय करणें.**जयास जाणें** सिद्धीस जाणें; जयावह होणें.

जर [सं० ज्वर] पु० १ शरीराची उष्णता वाढविणारी एक विकृति; ताप.२रोग,–शाप देतांना अशिक्षित लोक या शब्दाचा प्रयोग करतात;उ०मेल्या, तुझ्या हातांपायांवरून जर जाओ (किं०जाईल). ३ असामर्थ्य, कमजोरी,धाड (होणें, भरणें, अकरणरूपी प्रयोग); उ० ह्या धोतरजोड्याला वर्षभर टिकावयाला काय जर भरला आहे ? उ० तुला चाकरी करावयाला काय जर भरला आहे ? उ० ह्या साडीला अजून सहा महिने जर नाहीं. ॐ **जर बांधणें** कांहीं तोडगा करून ताप न येईल असें करणें. **जरकरी वि०** ज्याला ताप येत आहे असा. टीप,–जर आणि त्याचे सर्व वाक्प्रचार अशिक्षितांतच रूढ आहेत.

जर [फा० जर्=सोनें] पु०, स्त्री०१ रेशमाच्या तंतूभोंवतीं सोन्याची किं० रुप्याची तार गुंडाळून करतात तो तंतु; कलाबतु. २ असे तंतु मागावर घालून विणलेलें वस्त्र. ॐ **जरकडी स्त्री०** कलाबतूच्या कारखान्यांतलिं एक साधनविशेष. **जरतार [फा० जर्=सोनें; म०तार=धातूचे तंतु] स्त्री०, न०** जर; कलाबतू.ॐ **जरतारी वि०** कलाबतूचा केलेला किं० विणलेला. **जरयान न०** सोन्यारुप्याचे दागिने इ०. खालीं 'जरियान 'पहा. **जरी [फा० जरीन्] वि०** कलाबतूचा बनविलेला. **स्त्री०** सोन्यांचे किं०चांदीचे तंतु. **जरीकांठी वि०**ज्याला जरीचे कांठ आहेत असा(मंदील,रुमाल, इ०).**जरीपटका पु०** १ पेशव्यांच्या अधिकाराचें निशाण. २ कोणा सरदाराला कांहीं अधिकारावर नेमलें असतां त्याला कमरेवर बांधावयाला पेशवे देत जो जरीचा शेला त्याला ' जरीपटका ' असें म्हणत.**जरीपटका रुपाया,जरीपटक्याचा रुपाया पु०** जरीपटक्याची निशाणी ज्यावर ठोकिली आहे असें पूर्वीं प्रचलित असलेलें एक नाणें. **जरीपदरी वि०**जरीचा पदर ज्याला आहे असें (उपरणें इ०). **जरदोज [फा०] पु०** कलाबतूचें काम करणारा. **जरदोजी स्त्री०** जरदोजाचें काम,कौशल्य, किं० धंदा.**जरबाब,जरबाफ्त [फा० जर् बाफ्त्] वि०** कलाबतूचें काम ज्यावर केलें आहे असा. **जरी बादली वि०**जरीच्या काड्या ज्यांत विणल्या आहेत असें (वस्त्र). **जरीबाब वि०**मागें ' जरबाब ' पहा.**जरीबुटी स्त्री०** १ जुनी जर किं० कलाबतू. २ जर जाळून काढलेली चांदी. ३ अडचणीच्या प्रसंगीं उपयोगी पडावें म्हणून बाजूस काढून ठेविलेले दागिने, सोनेंनाणें, इ०.**जरजरीयान[फा०] न०** सोनेंनाणें,सोन्यारुप्याचे दागिने,जरीचीं वस्त्रें, इ० समुच्चयानें.

जर उ०अ०अमुक गोष्ट झाल्यास, किं० अमुक शर्त पाळली गेल्यास (संकेतार्थक);उ०जर पाऊस पडला तर पिकें येतील. टीप,–१ 'जर' हा शब्द वगळला तरी हरकत नसते; २ 'जर' या पुढें कां, करितां, हे शब्द घालून तोच अर्थ होतो.

जरगुड न० १ आंब्याच्या कोयीला जे हजारो तंतु असतात ते समुच्चयानें. २ पिंपळाच्या पारंब्या समुच्चयानें. ३ काथ्या. ॐ **जरगुडी वि०** तंतुमय (आंब्याची कोय, लाकूड, इ०).

जरठ [सं०] वि० १ वृद्ध; म्हातारा. २जीर्ण. ३ परिपक्व; निबर.

जरंड [सं०] वि० म्हातारा.

जरडा[सं०जरा=म्हातारपण]पु०१म्हातारपण. २रोग.फक्त पुढील वाक्प्रचारांत 'जरडा' योजण्यांत येतो. **जरडा भरणें** ज्वरानें किं० रोगानें पीडित होणें. ' जर ' मध्यें अर्थ ३ पहा.

जरंडी, जरडी [सं० जरंड=वृद्ध] स्त्री० म्हातारी सवाशीण.

जरत्कारु [सं० जरत्=क्षीण; कारु=करणारा; तपानें शरीर क्षीण करणारा] पु० १ भृगुकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि; याच्या पत्नीचेंहीं नांव 'जरत्कारु ' असेंच होतें. २कोणीही रोड, किडकिडीत, किं० ज्याच्या शरीराचीं हाडें बाहेर दिसत आहेत असा इसम. ३ सदा आजारी असणारा इसम.

जरद खालीं ' जर्द ' पहा.

जरदा, जर्दा [**फा०** जर्द=पिवळा] **पु०** तंबाखूचीं पानें चुरून त्या भुग्याला तंबाखूच्या काड्यांच्या काढ्याचीं पुटें देऊन त्यांत वेलदोडे, जायपत्री इ० मसाला घालून जो तोंडांत विड्यानंतर चघळावयासाठीं करतात तो पदार्थ.

जरब [**अ०**] **स्त्री०** १ कोणेकाबद्दल लोकांस वाटत असतें तें भय; दरारा. २ दुसऱ्यानें वचकावें असा जो कोणेकाचे अंगीं असतो तो गुण किं० तें तेज. ३ धमकी (देणें, भरणें,दाखविणें). ४ दहशत (खाणें, वाटणें). ※**जरब खाणें** भयग्रस्त होणें. **कोणेकाची जरब पिणें** त्याचा दरारा वाटेनासा होणें.

जरब [**अ०** जर्ब] **वि०** विवक्षित प्रमाणापेक्षां अधिक; आपल्या आटोक्याच्या बाहेरचा; उ० त्या मापापेक्षां हें माप जरब आहे; उ० ह्या लुगड्याची किंमत तेरा रुपये आहे ती वाजवी आहे पण मला जरब आहे. २ जोखमीचें (काम). ३ कष्टावह (काम, नोकरी). ※ **जरबी वि०** भयावह; भयंकर; दरारा वाटविणारा (माणूस, हत्यार, जनावर).

जरबणें [**म०** ' जरब ' पासून] **अ० क्रि०** (भयानें) दबकणें किं० कचरणें.

जरंबा [**म०** जर (ताप)+आंबा] **पु०** अत्यन्त आंबट अशी आंब्याची एक जात.

जरा [**सं०**] **स्त्री०** १ वृद्धपणा; वार्द्धक्य. २ म्हातारपण आणि तज्जन्य अशक्तपणा. ※**जराभीरू पु०** मदन. **जरासुत पु०** जरासंध.

जरा [**अ०** जराह्] **क्रि० वि०** किंचित्, थोडक्या प्रमाणांत. **वि०** थोडासा. ※ **जरासा वि०** थोडासा.

जराक, जराकसा [**अ०** ' जराह् ' पासून] **क्रि० वि०** किंचित्; अत्यल्प प्रमाणांत.

जराबाजरा, जराबादरा पु० किरकोळ सामान; सटरफटर पदार्थ; विविध वस्तूंचा समुदाय. **क्रि० वि०** यत्किंचित्; थोडेंदेखील; उ० तूं ठराव केला आहेस त्यांत जराबाजरा अंतर पडल्यास मी तुला कोतवालाकडे नेईन.

जरायु [**सं०**] **न०** १ चर्ममय गर्भवेष्टन; गर्भाशय. २ सापाची कात. ※**जरायुज पु०** गर्भाशयोत्पन्न प्राणी (मनुष्य, गाय, बैल, इ०). जरायुज (मनुष्य, बैल, इ०), अंडज(पक्षी इ०), स्वेदज (कृमि, कीट), उद्भिज्ज (झाडें), हे सृष्ट पदार्थांचे चार मोठे वर्ग होत.

जरारी [**अ०** जरीदाह्] **वि०** १ एकटा; एकाकी;सडेसोट. २बायकापोरें ज्याला नाहींत असा.

जरी [**सं०** यदि] **उ० अ०** १ तसें असतांही; तसें असूनही; अमुक घडलें असूनही; यद्यपि. २ (कवितेंत)जर.※**जरीपण उ० अ०** जरी; यद्यपि. याला जाब देणारें अव्यय ' तरी पण. '

जरीब [**अ०**] **पु०** जमीनीच्या क्षेत्रफळाचें एक माप. **अ० व०** जमीनीची मोजणी किं० मापणी.※**जरीब खरडा पु०**जमीनीच्या मापणीचा आराखडा.

जरीसरी [**म०** जर (ज्वर)+मरक (मरणें)] **स्त्री०** १ कोणताही संसर्गजन्य रोग. २ पटकी. ३ संसर्गजन्य रोग आणणारी देवता; हिचा क्रोध शमविला असतां संसर्गजन्य रोगानें पछाडलेला इसम बरा होतो अशी अडाण्यांची समजूत आहे.

जरूर [**अ०**] **वि०** १ आवश्यक; अनिवार्य; टाळतां येण्याजोगें नव्हे असें. २ कठिण; असंभवनीय; अशक्य; उ० ह्या दुखण्यांतून त्याचें वांचणें जरूर दिसतें. **क्रि० वि०** अगत्या; कांहीं झालें तरी;न टाळतां;न चुकतां; न चुकवितां.**स्त्री०**गरज; अपेक्षा; इच्छा. ※**जरूरी स्त्री०** गरज;आवश्यकता.

जरणें [**सं०** ज्वर; **म०** जर] **अ० क्रि०** तापानें पीडित होणें.

जर्जर [**सं०**] **वि०** १ जीर्ण. २ वृद्ध. ३ तुकडे झालेला; जुनेपणामुळें फाटलेला किं० भोकें पडलेला.४ व्याकुळ, पीडित. ५ अगदीं दमलेला;त्रासलेला; कंटाळलेला.

जर्द [**फा०** जर्द=पिवळा] **वि०** पिवळा. हा शब्द पिवळ्या रंगाचा गडदपणा दाखविण्यासाठीं ' पिवळा ' याच्यापुढें योजतात;उ० पिवळा जर्द. तांबडा, काळा, हिरवा, ह्या शब्दांच्या पुढेंही 'जर्द' हा शब्द गडदपणा दाखविण्यासाठीं कधीं कधीं योजतात.

जल [**सं०**] **न०** पाणी; उदक. ※ **जलांजलि पु०**मृतांना विधिपूर्वक देतात तें उदक.**जलात्यय पु०** शरदृतु. **जलाधिप पु०** वरुण. **जलागम**

पु० पावसाळा. **जलाशय, जलाश्रय** **पु०** १ तळें. २ पाण्याचा डोहो. ३ बगळा पक्षी. **जलेन्धन** **पु०** वडवानल. **जलोच्छवास** **पु०** तुंबलेलें पाणी वाहून जाण्यासाठीं केलेली वाट. **जलोदर** **पु०** ज पोटांत होणारा एक रोग. **जलौका** [**सं०** जल+ओकस्=स्थान] **स्त्री०** जळू. **जलकुक्कुट** **पु०** पाणकोंबडा. **जलक्रिया** **स्त्री०** तर्पण. **जलचर** **पु०** जलांत राहाणारा प्राणी. **जलताडन, जललेखन** **न०** निरर्थक उद्योग; निष्फळ प्रयत्न. **जलद, जलधर** **पु०** मेघ. **जलदागम** **पु०** वर्षाऋतु. **जलधि, जलनिधि** **पु०** १ समुद्र. २ संख्याविशेष. **जलप्रदान** **न०** तर्पण. **जलप्रपात** **पु०** धबधबा. **जलयंत्र** **न०** १ रहाट. २ कारंजें. **जलरुह** **न०** कमळ. **जलशायी** **पु०** विष्णु. **जलशोष** **पु०** अवर्षण. **जलतरंग** **पु०** १ पाण्याची लाट. २ एक वाद्य. **जलसत्र, जळछत्र** **न०** प्रवाशांना जेथें फुकट पाणी दिलें जातें तें ठिकाण. **जलप्रलय** **पु०** १ पाण्याचा प्रचण्ड पूर किंवा लोट. २ जगाच्या अन्तीं जो पाण्यानें व्हावयाचा नाश तो. ३ जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें आहे असा जमीनीचा प्रदेश. **जलनाडी** **स्त्री०** पृथ्वीचे पोटांतील पाण्याचे झरे. **जळप्राय** **वि०** जेथें जागोजाग पाणी आहे असा (देश). **जलमय** **वि०** १ पुष्कळ पाणी ज्यांत आहे असा (देश). २ पाण्यानें आच्छादलेला किंवा पाण्यांत बुडून गेलेला (प्रदेश); ३ इ० पाणी गोठून होतो तो (पदार्थ. गार, बर्फ, इ०) **जलयंत्र** **न०** १ कारंजें. २ पिचकारी. **जलयात्रा** **स्त्री०** पाण्यांतून केलेला प्रवास. **जलयान** **न०** पाण्यांतून चालणारें कांहींही वाहन (होडी, आगबोट, गलबत). **जलवास** **पु०** तप करणाऱ्या माणसाचें पाण्यांत बसणें. **जलशोष** **पु०** १ पावसाचा अभाव; पाऊस पडावा तेव्हां न पडणें. २ पाण्याची असह्य तहान. **जलसमाधि** संस्कृतांत **पु०**, मराठींत **स्त्री०** १ पाण्यांत उडी घेऊन जीव देणें (प्रयाग येथें). २ संन्यासी लोकांचें पाण्यांत जीव देणें. **जलाधिवासन** **न०** देवाच्या मूर्तींची देऊळ, इ० मध्यें यथाविधि स्थापना करावयाच्या आधल्या दिवशीं ती पाण्यांत बुडवून ठेवितात तो विधि.

जलद [**फा०** जल्द्] **वि०** १ वेगवान्; वेगानें जाणारा किंवा चालणारा. २ ताबडतोब गुण देणारें (औषध) किंवा पेटणारें (द्रव्य, लाकूड, दारू, इ०). **क्रि० वि०** वेगानें; त्वरेनें. ※ **जलदकलम** **स्त्री०** झपाझप किंवा वेगानें लिहिणें किंवा लिहिण्याचा गुण. **जलदकलमी** **वि०** झपाझप थोडक्या वेळांत पुष्कळ लिहूं शकतो असा (कारकून इ०).

जलदी [**फा०** जल्दी] **स्त्री०** त्वरा; वेग; घाई. **क्रि० वि०** वेगानें; त्वरेनें.

जलाल, जलेल [**अ०** जल्लाल्] **वि०** १ तापट, रागीट (स्वभाव, प्रकृति). २ कडक, तिखट, आग करणारें (औषध, मिरची, इ०). ३ तीव्र किंवा रसरशीत (पेटलेला अग्नि, ऊन्ह, इ०). ४ तीव्र, दुःसह (तिडीक). ५ तीक्ष्ण (शस्त्र). ※ **जलाली** **स्त्री०** १ जलाल असण्याचा गुण किंवा धर्म. २ स्वभावाचा जलालपणा.

जलुका, जलाका [**सं०**] **स्त्री०** जळू (नासकें रक्त शरीरांतून काढावयाचें असतां ह्या प्राण्याचा उपयोग केला जातो).

जलूप (–स) [**अ०** जलूस्] **पु०** १ राज्यारोहण. २ वजन, वशीला. ※ **जलूषसन** **न०** राज्यारोहणाचा सन.

जलेल, जलेली [**अ०** जलाल्] **स्त्री०** जुलूम; जुलमी शासनपद्धति.

जलौका [**सं०** जल(पाणी)+ओकस्(स्थान)] **स्त्री०** जळू. वर ' जलुका ' पहा.

जल्प **पु०**, **जल्पना** **स्त्री०** [**सं०**] बटबट; बढाई.

जल्पणें [**सं०** जल्प्=बटबट करणें.] बटबट करणें; वढाया मारणें.

जल्हद मागें ' जलद ' पहा.

जंव **क्रि० वि०** जों पर्यंत; जेव्हां.

जव [**सं०** यव] **पु०** १ सातू या नांवाचें धान्य. २ हाताच्या आंगठ्याच्या दोन पेरांमध्यें असतें तें जवाच्या आकाराचें चिन्ह. ३ जवांच्या रुंदीइतकें परिमाण. ※ **जवाआगळा** **वि०** किंचित् अधिक; कांकणभऱ्यानें ज्यास्ती; उ० तूं कुबेर तर मी जवा आगळा कुबेर ! **जवापाडें** **वि०** जवा. इतकें म्ह० अल्पस्वल्प. **जवखार** [**सं०** यवक्षार] **पु०** औषधोपयोगी एक क्षार.

जव [**सं०**] **पु०** १ वेग, घाई. ※ **जवानिल** **पु०** झंझ्यावात; वावटळ.

जवकणें [म० जवा=सांधा] **स० क्रि०** १ बांधणें; जुळाविणें; संयुक्त करणें. २ गोळा करणें. ३ जनावराला खुंट्याशीं दोरी, सांखळी, इ० नें बांधणें.

जंवजाळ, जंवजार पु० मागें 'जंजाळ' पहा.

जवजे [अ० जवूजाह्] **स्त्री०** अमक्याची बायको हा अर्थ दाखविण्यासाठीं नवऱ्याच्या नांवामागें हा शब्द योजतात; उ० सक्वारवाई जवजे तुकोवा म्ह०तुकोबाची बायको सक्वारवाई.

जंवट न० टोळी, समुदाय, मंडळी.

जवट [**सं०** युग्म] **न०** जोडपें; जुळें.

जंवरा [**सं०** यमराज] **पु०** १ यम. २ स्मशानांतील भूत. ꙮ **म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं पण जंवरा** (किं० **काळ**) **सोकावतो** दुष्टाची कृति कितीही अल्प हानि करणारी असली तरी तिकडे दुर्लक्ष्य करणें योग्य नाहीं; कारण तेणेंकरून तो दुष्ट आणखी हानि करावयाला सरसावतो. पुढील प्रयोगांत 'जंवरा' याचा अर्थ मूर्ख, ''आंवटशोकी,' किं० 'मायेचा पूत' असा होतो; उ० येवढ्या कडक उन्हांत कोण जंवरा हा डोंगर चढावयाला निघेल ? उ० तुझें लक्ष करून द्यावयाला कोण जंवरा खोळंबून बसला आहे ?

जवन [**सं०**] **वि०** वेगवान्. **पु०** १ वेगवान् घोडा.२ घोडा (सामान्यतः). **न०** वेग.

जवनिका, जवनी [**सं०**] **स्त्री०** पडदा; कनात.

जवशी, जवस स्त्री० एक धान्यविशेष.

जवळ पु० हिंदू ब्राह्मणाची एक जाति. त्यांना 'खोत' असेंही म्हणतात.

जवळ न० १आकाशांत जमतें तें मेघांचें पटल किं० त्यामुळें पडते अंधेरी. २ वादळ (विशेषत: समुद्रांत होतें तें).ꙮ **जवळी वि०** १ वादळाचा (हवा). २ वादळाचा तडाखा सोसावयाला समर्थ (गलबत).

जवळ श० यो० अ० १ ०च्या सांनिध्यास; ०च्या शेजारीं.२०च्या नंतर लवकरच; ०पुढें लवकरच; थोडक्याच वेळांत किं० वेळानें. ३ ०च्या सदृश. 'जवळ' हा शब्द शब्दाच्या सामान्यरूपापुढें योजल्यास तो शब्दयोगी अव्ययाचें काम करतो आणि षष्ठ्यन्त शब्दापुढें योजल्यास तो क्रियाविशेषणाचें काम करतो. वाक्यांत थोडक्याशा फरकानें 'जवळ' हा शब्द एका कोटींतून दुसऱ्या कोटींत जाऊं शकतो आणि त्याचा अर्थ वस्तुतः एकच असतो. 'जवळ 'ह्या शब्दाचे कांहीं वाक्प्रचार खालीं देतों. **त्याच्या जवळ पुष्कळ पैसा आहे** त्याच्या संग्रहीं.**माझ्याजवळ एक स्वयंपाकी बाई आहे** माझ्या घरांत स्वयंपाक करण्यासाठीं पगार देऊन ठेविलेली बाई आहे. **त्याच्याजवळ माया हा शब्द नाहीं** तो कठोर अंतःकरणांचा माणूस आहे. **त्याच्याजवळ दुजा भाव नाहीं** त्याच्या मनांत आपपर ही भावना नाहीं;तो सर्वांस समान लेखतो. **जवळ करणें** १ संग्रहाला किं०आश्रयाला ठेवून घेणें (कोणी माणूस, नोकर, हीन आणि विपन्न माणूस). २ गांठणें; विशिष्ट ठिकाणीं जाऊन पोचणें; उ०पाऊस भरून आला आहे,पुढचा गांव जवळ केला पाहिजे. **जवळ नातें** अगदीं जवळचा आप्तसंबंध. **जवळपास क्रि० वि०** येथून फार दूर नव्हे अशा ठिकाणीं; आलीकडे पलीकडे; पुढें मागें.**जवळसर, जवळसार क्रि०वि०**जवळच.

जवळीक[**म०**जवळ]**स्त्री०**१जवळचा संबंध किं० त्या संबंधानें उत्पन्न झालेला प्रेमभाव.२आपलेपणाची भावना; प्रेमभाव; सख्य; मित्रत्व.३सहवास, घसट. ꙮ**नात्याची जवळीक तशी आदराची कंवळीक** (किं० **कोंवळीक**) १ ज्या प्रमाणांत नातें जवळचें त्या प्रमाणांत अंतःकरणांत प्रेमभाव असतो.२ जवळच्या नात्यानें उत्पन्न होतें तसें प्रेम आदरानें उत्पन्न होतें.

जवळील, जवळचा [म० जवळ] **वि०** काळानें किं० स्थलानें किं० प्रेमानें जवळ असलेला.

जवळून [म० जवळ+ऊन (प्रत्यय)] **क्रि० वि०** शेजारून;पासून;मुळें; ०च्या कर्तृत्वानें; विशिष्ट अंतरावरून.

जवा [म० जव, **सं०** यव] **पु०** स्त्रियांचें हातांत घालावयाचें एक भूषणविशेष किं० त्याचे जे अवयव ते प्रत्येक(हे अवयव जव किं०यव ह्या धान्याच्या आकाराचे असतात).

जवा [**सं०** यु=जोडणें] **पु०** १ दोन पदार्थ एकाशीं एक जोडावयाचे असतां त्यांचा करतात तो सांधा; सांधेजोड; पदार्थविशेषाच्या सर्व भागांची

कळाशीदार जुळणी (बसणें, घालणें); उ० ह्या पाटाच्या दोन फळ्यांचा जवा कळाशीनें बसविला आहे म्हणून तो एकसंधी दिसतो. २ मैत्री; निकट संबंध; सहवास; उ० एक साधु आणि आणि एक लफंगा यांचा जवा कसा बसेल ? ३ दोन किं० अधिक पदार्थांचा किं० माणसांचा अविसंवादी संबंध, मेळ, किं० जुळणी; उ०हें कूट लावावयाला मी दोन तास खटपट केली पण जवा बसला नाहीं. ❀ **जवाची माळ स्त्री०** जवाच्या आकाराचे सोन्याचे मणि गुंफून कलेली माळ (गळ्यांत घालण्याच्या उपयोगाची).

जवाद [अ० जियादाह्] वि० अधिक; जास्ती; वरचढ.

जवादी स्त्री०, जवादें न०एका विशिष्ट प्राण्यापासून मिळतें तें सुगंधी द्रव्य; कस्तूरी. ❀**जवादी मांजर न०** ज्याचे पासून कस्तूरी मिळते तो प्राणी (तो मांजरासारखा दिसतो). **जवादी पेर न०** लेखण्या करावयाचा एका विशिष्ट जातीचा बोरू; हा काळा असतो.

जवान [फा० जवान्] पु० १ तरुण पुरुष. २ पुरुष. ३ भक्कम माणूस.४वृद्धावस्था ज्याची सुरू झालेली नाहीं असा पुरुष. ५ ऐन उमेदींतील पुरुष. ❀ **जवानकट्टा,जवानपठ्ठा वि०** ऐन तारुण्याच्या भरांत किं० ऐन उमेदींत असलेला(पुरुष). **जवान जमान वि०**तरुण आणि उमेदींत असलेला.**जवानमर्द वि०** तल्लख आणि जोरदार; पराक्रमाचीं कामें करण्याला समर्थ असा; हिंमतदार.

जवानी [फा०] स्त्री० तारुण्य; तारुण्याचा जोर किं० धमकदारी. ❀ **जवानी दिवानी स्त्री०**तारुण्याची धमकदारी.

जवाब, जवाबी इ० मागें 'जबाब,' 'जबाबी' इ० पहा.

जवार न०, स्त्री०, जवारी स्त्री० [अ० जवार्=शेजार, सांनिध्य] मोठ्या शहरालगतचीं खेडींपाडीं; उ० हा धोतरजोडा पेठचा आहे कीं जवारचा आहे ? ❀ **जवारचा,जवारी वि०**मोठ्या शहराच्या आसपासच्या प्रदेशांत उत्पन्न झालेला.

जवार, जवारी [हिं०] स्त्री० ज्वारी हें धान्य; जोंधळा.

जवार [अ० जवाहर्] न० १ हिरे, माणकें, मोतीं, इ० चे दागिने समुच्चयानें. २ जडितें काम किं० तें करण्याचा धंदा.

जंवाली, जुंवाली [म० जूं] स्त्री० जुंवाला बैल जुंपतांना त्याचा गळा जुवाशीं जोडणारा पट्टा.

जवासा पु० जवादि मांजराचें वृषण.

जवाशी (–सी) **स्त्री०** एक वनस्पति.

जवाहि (–ह–) र [अ० जवाहर्] **न०** १ हिरा, पांच, माणिक, मोती, व्यक्तिशः किं० समुच्चयानें किं० त्यांचा बनविलेला दागिना किं० कोणताही पदार्थ. २ एक प्रकारची उंची दर्जाची तरवार. ❀ **जवाहिरी, जवाहरी पु०** मोतीं, हिरे, इ० जडविण्याचें काम करणारा कारागीर. **वि०** जडिताच्या कामासंबंधाचा; जडिताचा (दागिना किं० कांहीं पदार्थ).**जवाहि (–ह–) र खाना पु०** राजेरजवाडे किं० कोणी श्रीमंत मनुष्य यांचे जडिताचे दागिने किं० पदार्थ ठेवण्याची खोली.

जवी [सं० जव=वेग, त्वरा] **वि०** वेगवान्; त्वरित चालणारा.

जव्हर इ० मागें ' जवाहिर ' इ० पहा.

जंव्हार, जंव्हारी, जंवाली 'जंवार,' 'जंवाली' पहा.

जसा [सं० यादृश] **वि०** ज्या प्रकारचा किं० जातीचा. **क्रि० वि०** (लिंग वचनांनीं फिरणारें) १ ज्या प्रकारें किं०ज्या रीतीनें. २ अगदीं, पूर्णपणें.ह्या शब्दाचे उपयोग अर्थाच्या अनेक बारीक बारीक छटा दाखविण्याच्या कामीं कसे होतात हें पुढील वाक्प्रचारांवरून कळेल. **जशाचा तसा क्रि० वि०**कांहीं पालट,किं० फरक, किं०सुधारणा न होतां किं०न करतां;इष्ट कार्य न करतां.**जशास तसा** बरोबरी करणारा; तोलास तोल देणारा; उ०जशास तसा भेटे तेव्हां मनींचा संशय फिटे. **जसातसा** १ अगदीं सामान्य प्रतीचा;पूर्णपणें मनाजोगा नसलेला. २ मोठ्या प्रयासानें; उ० चोर पाठीस लागला होता; मी जसा कसा त्याच्या तावडींतून निसटलों. **जसें तसें करून क्रि० वि०** मोठ्या कष्टानें किं० प्रयासानें. **जसला वि०** ज्या प्रकारचा. **जसला तसला वि०** अगदीं सामान्य प्रतीचा; पूर्णपणें मनाजोगा नव्हे असा.

जस्त [हिं] **न०**कथील आणि शिसें ह्यांच्या

मिश्रणाचा धातु. ꙮ **जस्तफूल, जस्ताचें फूल** **न०** जस्ताची लाही.

जहत् [**सं०**] **वि०**सोडणारा (पुढील शब्दांत मात्र याचा उपयोग होतो). **जहल्लक्षणा स्त्री०** ज्या लक्षणेमध्यें वाच्यार्थाचा त्याग करावा लागतो ती लक्षणा; उ० ' गोदावरीवर सच्चिदानंद स्वामीचा मठ आहे,' ह्या वाक्यांत 'गोदावरी 'ह्या शब्दाचा अर्थ गोदावरी नदी किं०त्या नदीचा प्रवाह असा नसून त्या नदीचा कांठ असा घ्यावा लागतो. ह्या प्रकारच्या लक्षणेला ' जहत्स्वार्था लक्षणा ' असेंही म्हणतात. मागें ' अजहल्लक्षणा ' पहा.

जहन, जहान [**फा०**जहान्=जग] **न०** १ जग; दुनिया. २ मानव जाति. ३ मोठा जमाव किं० समुदाय. पुढें ' जहान ' पहा.

जहर [**फा०**] **व०** विष. हा शब्द ' कडू ' शब्दाच्या अर्थाची तीव्रता दाखविण्यासाठीं योजतात; उ०कडूजहर. ꙮ **जहरी वि०**विषारी पदार्थ, (प्राणी, वनस्पति). **जहरी खोबरें न०** जहरी नारळाचें खोबरें. **जहरी नारळ पु०** नारळाची एक जात,–हा नारळ मोठा असून त्याचें खोबरें कडू असतें. **जहरी मोहरा, जहर मोहरा** [**फा०**]**पु०** काळसर हिरव्या रंगाचा एक प्रकारचा दगड,-याचा उपयोग सापाचें विष उतरविण्याकडे केला जातो.

जहागिरदार,जहागिरी,जहागीर पुढें' जाहगीरदार ' **इ०** पहा.

जहाज [**फा०**] **न०** १ तारूं; गलबत. २ कोणताहि लठ्ठ किं० अवाढव्य पदार्थ (माणूस, खटारा, सतरंजी, पासोडी, धोतरजोडा, इ०).

जहाजम, जाजम न० जमीनीवर आंथरावयाचें वस्त्रविशेष; ह्याचेवर रंगाचीं चित्रें इ० लाकडी ठशांनीं छापलेलीं असतात.

जहान [**फा०**] **न०** १ जग, दुनिया. २ मानवजाति. ३ मोठा समुदाय. ꙮ **जहानपन्हा** [**फा०** जहान्=जग; पनाह्=रक्षक] **पु०** वड्या सरदाराला पत्रादिकांत दिलेली पदवी. ꙮ **जहांबाज (–द**) [**फा०** जहान् बाज्] **वि०** १ पक्का, अट्टल, वस्ताद. २ भांडखोर, द्वाड.

जहाल [**हिं०**] **वि०** उग्र; जलाल; तिखट; तापट. ꙮ **एकाद्यावर जहाल जाणें** त्याच्यावर संतप्त होणें; त्याच्यावर क्रुद्ध होणें; त्याच्यावर तोंड सोडणें.

जहाली [**म०** जहाल+ई (प्रत्यय)] **स्त्री०** उग्रपणा; कडकपणा; कठोरपणा (स्वभाव,मिरची, औषध, इ० चा).

जहालीम पुढें ' जालीम ' पहा.

जळ [**म०** जळणें] **स्त्री०** १ धातु, लोणी, मेण, इ० पदार्थ तापविले असतां त्यांचा जो अंश जळून जातो तो. २ चुलीवर भांडें ठेविलें असतां त्याच्या बुडाला जी मशेरी(म्ह०काळा थर) जमते ती. ३ रागाचा झणकारा; क्रोधाची लहर. ४ उद्दामपणाचा आवेश; रग; मस्ती. ꙮ **जळकट वि०** मर्यादेपलीकडे भाजलेलें किं० शिजविलेलें.

जळ [**सं०** जल] **न०** पाणी. मागें ' जल ' पहा.

जळ स्त्री० तक्तपोशीच्या दोन फळ्या जेथें मिळतात तेथें बसविलेली पट्टी.

जळकट [**म०** जळणें] **वि०**अर्धवट जळलेला. **पु०** १ अंगाचा दाह. २ खरजेला सुटलेली अनिवार्य कंड (येणें, सुटणें, होणें). ३ पित्तादि विकृतीमुळें घशांत जो ताप होतो तो किं०होते ती आग. ४ बुस्सा,चिरड (येणें).

जळकें [**म०** जळणें] **न०** १ भातावर पडतो तो एक रोगविशेष. २ जळकट.

जळगणें [**म** ' जळणें ' चें एक रूप] **अ० क्रि०** भात, नागली, इ०च्या रोपानें सूर्यतापामुळें करपणें; उ० चार दिवस तापी पडतांच आवण जळगलें.

जळजळ [**म०** जळजळणें] **स्त्री०** १पित्तादि विकृतीनें किं० तिखट पदार्थ खाल्ल्यानें घशांत होते ती आग किं० हातापायांच्या तळव्यांची होते ती आग. २ राजा किं० त्याचा कोणी अधिकारी यांनीं रयतेवर चालविलेली अन्यायी, जुल्मी, आणि पक्षपाती शासनपद्धति. ३ (एकाद्या माणसाचा वाटत असलेला) मत्सर (वाटणें, सुटणें). ४ कोणत्याही मनोविकाराची तीव्रता किं० उत्कटपणाची स्थिति.

जळजळणें [**म०** जळणें] **अ० क्रि०** पित्तादिकारणामुळें (घसा, पोट, घशांत, पोटांत) आग

पडणें किं० होणें. ॐ **एकाद्या माणसावर जळजळणें** त्याच्यावर चरफडणें.

जळजळाट [म० जळजळणें] **पु०** १ तीव्र आग किं० दाह (घशांत, तोंडांत, पोटांत, डोळ्यांत). २ अन्याय, जुलूम (राजानें चालविलेला). ३ स्वभावाचा कडकपणा किं० तापटपणा.

जळजळीत [म० जळजळणें] **वि०** अतिशय उष्ण (अन्न, पाणी, इ०).

जळण [म० जळणें] **न०** १ (जाळावयाचें) सर्पण. २ टाकाऊ मनुष्य; कुचकामाचा इसम.

जळणें [**सं०** ज्वल्=जळणें, पेटणें]**अ०क्रि०** १ दग्ध होणें. २ (अग्नि) पेटणें किं० प्रज्वलित होणें. ३ (दिवा) पेटलेल्या स्थितींत असणें. ४ तीव्र थंडी किं० सूर्याचें उन्ह ह्यांच्या योगानें (वृक्ष, लता, इ० नीं) करपणें किं० वठणें. ५ क्रोध, मत्सर, इ० नीं पीडित होणें किं० आक्रान्त होणें. ६ गंजिफांच्या डावांत एकादी गंजीफ फुकट जाणें (उतरावयाच्या समयीं ती न उतरल्यामुळें). ॐ**एकाद्याच्या अंगीं मस्ती जळत असणें** त्याचा उद्दामपणा अतिरेकाला पोचलेला असणें. **न जळणें, जळतां न जळणें** (एकाद्याच्या संग्रहीं धान्य पैसा, इ०) विपुल असणें. **जळो तुझें सोंवळें** धिक्कार असो तुझ्या सोंवळ्याला! **जळो तुझें वर्णन!** पुरे कर तुझें वर्णन !

जळत, जळता [म० जळणें] **वि०** जळत असलेला. ॐ **जळता पाय जाळणारा पु०** अत्यन्त हट्टी किं० दुराग्रही. **जळत खांब खांद्यावर घेणें** ज्याचे मुळें हटकून हानि व्हावयाची असें लोकाचें कांहीं काम पथकरणें किं० असें लोकाचें भांडण भांडायाला सरसावणें. **जळत घर न०** जो व्यवहार हानिकारक आहे असें आपणास स्पष्ट दिसतें आहे तो पथकरणें; उ० जळत घर भाड्यानें आणि जुने जोंधळे काढ्यानें कोण घेणार ? **जळत्या घराचा पोळता (किं० पळता) वांसा ओढून घ्यावा** मोठी हानि होणें अनिवार्य असतां ती अल्प स्वल्प अंशानें जरी कमी करतां आली तरी करावयाचा प्रयत्न करावा.

जळत्या [म० जाळणें] **वि०** १ घरें, गवताच्या गंजी, इ० जाळणारा. २ दुसऱ्याची बेअब्रू किं० नालस्ती करणारा.

जळप [म०जळणें] **पु०** १ तीव्र किं० कडक उष्णता (उन्हाची, अग्नीची, हवेची). २ क्रोध इ० मनोविकारांची तीव्रता किं० आवेग. ३ दिवसास ज्या गोष्टीचा विचार डोक्यांत घोळत असतो ती स्वप्नांत दिसणें, किं०तिचा देखावा (**क्रि०**पडणें). ४ सोनें इ० धातु अग्नींत घातला असतां त्याचा जळून जातो तो अंश.

जळपणें [म० ' जळणें ' चें एक रूप] **अ० क्रि०** चरफडणें, रागानें बडबडणें.

जळफळ [म० जळणें] **स्त्री०** चरफडणें; क्रोधाचा उद्रेक; रागाची धुमसणी.

जळफळणें [म० जळणें] **अ० क्रि०** १ क्रोधानें बेफाम होणें; रागानें चरफडणें. २ ज्वरामुळें शरीर फार तापणें.

जलबंब न० पाण्याचें वैपुल्य; पाण्याचा पूर किं० लोट. **वि०** पाण्यानें तुडुंब भरलेलें (नदीचें पात्र, इ०).

जळमट [म० जळणें] **म०** १ कोळिष्टकांवर धूर, केरकचरा, इ० बसून त्यांचे दोऱ्यांसारखे लोंबत असतात ते तंतु. २ दळलेलें पीठ फार दिवस ठेविल्यानें त्यांत उत्पन्न होतात ते कृमिजन्य तंतु किं० दोरे. ३ नाकांतून किं० घशांतून जो अस्वच्छ चिकट पदार्थ बाहेर पडतो आणि ज्याची तार जोरानें तोडावी लागते असा कफ, शेंबूड, इ०.

जळाऊ [म० जळणें] **वि०** जाळावयाचा किं० जाळावयाच्या योग्यतेचा किं० उपयोगाचा; उ० जळाऊ लाकडाची वखार.

जळीत [म० जळणें] **न०** १ धातु वितळविले असतां त्यांचा जो अंश जळून जातो तो (जाणें). २ घर इ० पदार्थ जळून गेल्यावर त्यांचे जे जळके तुकडे इ० राहातात ते समुच्चयानें किं० ते जळून थंड झालेले विध्वस्त भाग समुच्चयानें. ३ अन्यायानें किं०जुलमानें सरकार जो पैसा रयतेपासून घेतें तो. ४ गैरवाजवी दंड. ५ शेताची जमीन भाजावयासाठीं पसरावयाच्या काटक्याकुटक्या, शेणी, इ० समुच्चयानें. ॐ **जळीत जाळणें** अन्यायानें एकाद्याला गांजणें, छळणें, किं० सतावणें. **जळीत खत न०** १ ज्या खतांत नमूद केलेलें कर्ज परत मिळण्याची आशा नाहीं तें खत. २ ज्या खतांत लिहिलेले कर्जाचे पैसे परत आपणाला

मिळालें आहेत तें खत. **जळीत बाकी** **स्त्री०** रयतेकडून सरकारांत भरला जाणारा जो सारा त्याचा जो अंश भरला जाईल अशी आशा नाहीं तो.

जळू, जलूका [**सं०** जलाका, जलालुका, जलिका, जलुका, जलूका] **स्त्री०** शरीरांतील नासकें रक्त काढून टाकण्यासाठीं जो प्राणी शरीराला लावितात तो. शरीराला कांहीं आघात झाला असतां तेथें रक्त जमून जो गट्टू बनतो त्याला 'जळू' असें म्हणतात. [पुष्पवल्ली.

जाई [**सं०** जाति] **स्त्री०** एक सुवासिक

जाउपें इ० ' जावपें ' इ० पहा.

जाऊ **स्त्री०** नवऱ्याच्या भावाची बायको. ‌ॐ **एकाद्याला जाऊ भाऊ नसणें** त्याला नियंत्रणा घालणारें किं० रागें भरणारें कोणी माणूस नसणें.

जाखाई जोखाई, जखाई जुखाई [**सं०** 'यक्ष' पासून] **स्त्री० अ० व०** आशिक्षितांच्या देवताविशेष.

जांग, जांघ [**सं०** जंघा] **स्त्री०** गुडघ्याच्या वरचा मांडीचा आंतला भाग.

जाग [**म०** जागणें; **सं०** जागृति] **स्त्री०** १ जागेपणाची स्थिति. २ निद्रा समाप्त होऊन किं० अन्य कारणानें निद्रेचा भंग होऊन येते ती जागृति; उ० मला पहाटेस साडे पांच वाजतां जाग आली. ३ घरांत मनुष्यांचा वावर; रानांत प्राण्यांचा वावर; मांजर, कुत्रा, इ० चा घरांत किं० शेजारीं वावर, किं० हिंडणें फिरणें; उ० त्या रानांत वाघाची जाग होती तोंपर्यंत गुराखी तिकडे चरावयाला गुरें नेत नसत; उ० घरांत मांजराची जाग असली म्हणजे उंदरांचा उपद्रव कमी असतो; उ० घरांत कुत्र्याची जाग असलीं म्हणजे चोर यावयाला भितात. ह्या अर्थीं ' जागमाग ' **स्त्री०** हाही शब्द रूढ आहे. ४ आकस्मिक रीतीनें मेलेल्या माणसाच्या मरणाचें कारण, त्याच्या तृप्त न झालेल्या इच्छा, त्याचें द्रव्य पुरून ठेवण्याचें स्थल, इ० गोष्टी जाणून घेण्यासाठीं त्या मृताचे आप्त, इष्टमित्र, इ० जो विधि करून त्या मृताचें भूत त्याच्या पुत्राच्या किं० दुसऱ्या कोणाच्या तरी अंगीं आणवितात आणि त्याला प्रश्न विचारून उत्तरें काढून घेतात तो विधि. हा विधि शूद्रादिकांत रूढ आहे. ‌ॐ **जागसूध** **वि०** १ ज्याला लवकर जागें करतां येतें असा. २ दक्ष; तत्पर. ३ जी लवकर खंडित होते अशी (झोप).

जांगट **न०** कांशाची तबकडी,–जीवर तास वडवितात किं० जी देवापुढें वाजावितात ती. जंगट, झंगट, झेंगट, हीं ह्या शब्दांचीं अन्य रूपें.

जांगड [**हिं०**] **वि०** १ खपेल तो माल खपवूं आणि त्याची किंमत देऊं आणि न खपेल तो माल परत करूं, अशा बोलीनें विकावयासाठीं घेतलेला किं० ठेविलेला (माल). २ आमच्या माणसांस पसंत पडल्यास ठेवून घेऊन त्याची किंमत देऊं आणि पसंत न पडल्यास परत करूं अशा बोलीनें विकत आणलेला (माल). **स्त्री०** जनावरांची दावण किं० मालिका. २ गुरूच्या हवालीं विद्यार्थ्याला करणें (बांधणें, घालणें). ३ अशा प्रकारचा गुरुशिष्यांचा करून दिलेला संयोग.

जागणें [**सं०** जागृ=जागें राहाणें किं० जागें होणें] **अ० क्रि०** १ जागें होणें किं० जागें राहाणें; जागृत होणें. २ सावध असणें किं० राहाणें. ३ पाहारा करणें. ४ विद्या, कला, शास्त्र, इ० न विसरलेल्या स्थितींत असणें; उ० तुझी कौमुदी अजून जागत आहे काय ? ‌ॐ **कर्तव्याला, इमानाला,** किं० **सत्त्वाला जागणें** त्यांत चुकी न होऊं देणें; तें ढळूं न देणें; तें राखणें. **वचनाला जागणें** दिलेलें वचन लक्ष्यांत ठेवून तदनुरूप वर्तन करणें; वचन पाळणें. **जागेल त्याची वांठ, निजेल त्याचा टोणगा** वस्तूची निगा राखील त्याच्या संग्रहीं ती वस्तु असणें किं० देणें श्रेयस्कर असतें ; निगा न राखणाराच्या संग्रहीं टाकाऊ किं० कमी किंमतीची वस्तु दिल्यास किं० असल्यास चालेल. **सारी रात्र जागली आणि शेंगावांगीं रांधलीं** व्यर्थ कष्ट किं० निष्फळ खटपट करणाराची टवाळकी ह्या संप्रदायानें केली जाते.

जागता [**म०** जागणें] **वि०** १ सावध; कर्तव्यतत्पर. २ न विसरलेला (मंत्र, कला, शास्त्र, विद्या, इ०). ३ प्रसंगीं उपयोगीं पडण्याच्या स्थितींत असलेला. ४ आपलें श्रेष्ठत्व, सामर्थ्य, किं० प्रखरत्व लोकांस दाखविणारा (देव, मंत्र, तोडगा, इ०). ५ समाजांतील लोकांच्या स्मरणांत असलेला (वृत्तान्त). ‌ॐ **जागती ज्योत** **स्त्री०** तत्काळ उप-

योगास येणारी किं० फळ देणारी देवता किं० विद्या, मंत्र, औषध, इ०. **जागती झोप** (किं० **निद्रा**) **स्त्री०** फारशी गाढ नव्हे अशी झोप.

जागर पु०, जागरण न० [**सं०** जागृ= जागें होणें किं० असणें] १ जागेपणाची स्थिति किं० अवस्था; उ० पोरांच्या पत्ते कुटण्यामुळें मला रात्रीस चारी प्रहर जागर घडला (किं० जागरण घडलें). २ कांहीं एका देवतेच्या उद्देशेंकरून विवक्षित काळपर्यंत जागण्याचा विधि;उ० नवरात्रामध्यें देवापुढें कथा करून मध्यरात्रपर्यंत जागण्याचा आमच्या कुटुंबांत पुरातन काळापासून चालत असलेला परिपाठ आहे. ३ पोवती पौर्णिमेची रात्र; श्रावण महिन्याच्या पौर्णिमेची रात्र. पुढें ' पोवतें ' पहा.

जागरा [**म०** जागणें] **वि०** १ ज्याला निद्रा थोडी असा. २ सावध, हुशार. ३ रात्रीं लवकर न निजणारें (मूल).

जागरूक [**सं**] **वि०** १ सावध, दक्ष. २ जागा. ३ न विसरलेला (मंत्र, कला, इ०). वर ' जागता ' पहा.

जागल [**म०** जागणें] **स्त्री०** १ जागेपणाची स्थिति; उ० मला काल रात्रीं दोन तास जागल घडली. २ जागून पाहारा करणाऱ्याला दिलेली मजूरी.

जांगल स्त्री० १ सांधेजोडणी. २ पशूंची मालिका किं० दावण. ३ गुरु आणि शिष्य यांचा करून दिलेला संयोग.

जांगला, जांगळा [**म०** जंगल] पु० यूरोपी मनुष्य (तिरस्काराचा शब्द).

जागल्या [**म०** जागणें] **पु०** घर इ० च्या संरक्षणार्थ ठेविलेला किं० नेमिलेला महार, रामोशी, इ०.

जागविणें [**म०** ' जागणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ जागें ठेवणें; निजूं न देणें. २ व्रत, नेम, इ० मध्यें खंड न पडूं देणें. ३ (आबरू किं० नांव किं० कीर्ति) कलंकित न होऊं देणें. ॐ **गौर जागविणें** व्रत म्हणून गौरीपुढें जागत बसणें किं०झोप न घेतां वेळ घालविणें **दिवस जागविणें** त्या विशिष्ट दिवसाचें व्रत पाळणें.कि०कर्तव्य करणें. **नेम**(किं०**नियम**) **जागविणें** आपण आपणाला लावून घेतलेला नियम पाळणें. **सती जागविणें** सती गेलेल्या स्त्रीची चिता पूर्णपणें दग्ध होईपर्यंत तेथें जागत बसणें (कोल्हें, कुतरें, इ० चा उपद्रव न होऊं देण्यासाठीं).

जांगळी (–**ळी**) [**सं०** जांगल=रानटी] **पु०** १ धनगर. २ गुराखी.

जागा [**म०** जागणें] **वि०** १ न निजलेला; ज्याला झोप लागली नाहीं असा. २ जागरूक; सावध; दक्ष. ३ स्वस्थानावर परत आलेली (वृत्ति).

जागा [**हिं०** जगहाह्] **स्त्री०** १ स्थान; स्थल. २ अवकाश; पोकळी; कांहीं एक पदार्थ शिरकावावयास किं० ठेवावयास किं० भरावयास पुरेशी वाव. ३ पदार्थविशेष ठेवावयाला, मांडावयाला, रचावयाला, किं० उभारावयाला विशेष सोयीचें स्थळ. ४ कांहीं अधिकार किं० हुद्दा. ५ घर, घराणें; उ० मुलगी देणें ती चांगली जागा पाहून द्यावी. ६ कांहीं द्रव्य इ० नियमानें मिळत राहाण्याचें साधन; उ० ती असामी चालत होती तों आमची सालिना पांचशे रुपायांची जागा होती. ७ निमित्त; पुरेसें कारण; उ० मजवर चरफडावयाला तुला जागा नाहीं; उ० मला दोष द्यावयाला लोकांना जागा नाहीं. ८ संधी, फुरसत; उ० धनी गांवाला गेला म्हणजे नोकरांना खेळावयाला जागा मिळते. ९ आधार; कांहीं विधान करावयाला प्रमाण. १० प्रसंगीं उपयोगी पडेल असें द्रव्य, सोनें, इ०.ॐ **जागीं क्रि० वि०** बदलीं; स्थानीं; ऐवजीं. **दोन जागा करणें** (किं०**होणें**) विभागणें. **जागच्या जागीं क्रि० वि०** १ जेथल्या तेथें; स्थलांतर करावयाला फुरसत न देतां किं० न मिळतां. २ उगीचच्या उगीच; कांहीं कारण नसतां. **जागाजुगा, जागापागा स्त्री०** जागा, जागेच्या सोयी, इ०. **ते आम्हाला वडिलांचें जागीं आहेत** ते वडिलांप्रमाणें पूज्य किं०मानार्ह आहेत; ते आमचा वडिलांप्रमाणें परामर्ष घेतात. **आपले जागीं क्रि० वि०** आपल्या मतें; आपल्या ठिकाणीं; आपणच; उ० आम्ही आपले जागीं विद्वान म्हणवितों पण लोक म्हणतील तेव्हां खरें ! उ० ते आपल्या जागीं श्रमिंत म्हणवितात !

जागाईत [**म०** जागणें] **वि०** पहारा करणारा.

जागिरदार इ० पुढें 'जाहागीरदार ' इ० पहा.

जांगुलिक [**सं०**] **पु०** विषावर औषध देणारा किं० उपाय करणारा.

जागृत [**सं०**] **वि०** १ जागा; न झोपलेला. २ दक्ष.

जागृति [**सं०**] **स्त्री०** जागेपणाची स्थिति.

जांघ [**सं०** जंघा] **स्त्री०** १ पोटरी. २मांडी. ❀ **जांधभोंवरी स्त्री०** मांडीवर असलेलें केशांचें वर्तुळ,– हें घोड्याचें एक अशुभ लक्षण मानलें गेलें आहे.

जाच [**म०** जाचणें] **पु०** १ गांजणूक, छळ. २ उपद्रवाचा किं० पीडेचा उगम; उ० हा माझ्यामागें जाच लावूं नका.

जाचक [**म०** जाचणें]**वि०** १ उपद्रव,त्रास, किं० पीडा देणारें. २ अपायकारक. ३ परिणामीं दुःखदायक.

जाचण, जाचणी, जाचणूक [**म०** जाचणें] **स्त्री०** त्रास, छळ, पीडा, उपद्रव.

जाचणें स० क्रि० छळणें; गांजणें; पीडणें. **अ० क्रि०** पीडादायक होणें; परिणामीं दुःखजनक होणें; नडणें.

जाचंद, जाचोंद्रा वि० दुखरा आणि पिचापिचीत (डोळा), किं० अशा डोळ्यांचा (माणूस किं० जनावर).

जाचंद, जाचंदा, जाचोंद्रा [**म०** जाचणें] **वि०** उपद्रवकारक; पीडादायक.

जाजती [**म०** जियादाह्] **वि०** अधिक; ज्यास्ती.

जाजम, जाजीम [**हिं०**] **न०** चीट,खारवें, इ०स आस्तर लावून बसावयासाठीं करतात तें वस्त्र. ❀ **जाजमी चीट न०** जाजमाच्या उपयोगाचें चीट.

जाजा येये [**म०** जाणें+येणें] **स्त्री०**१ वारंवार जाणें आणि येणें. २ व्यर्थ झालेल्या किं० फुकट गेलेल्या खेपा किं० येरझारा समुच्चयानें.

जाजावणें अ० क्रि० १ एकाद्यावर चरफडणें किं० रागावणें; एकाद्यावर रागानें तोंड टाकणें. २ अपघातानें जाया होणें किं० मरणें (मनुष्य किं० जनावर).

जाज्वल्य [**सं०**ज्वल्=जळणें याचेंपासून मराठी रूप] **वि०** १ प्रखर आहे तेज, सामर्थ्य, किं० वीर्य ज्याचें असें (औषध, माला, मंत्र, देवता, अग्नीचा किं० सूर्याचा ताप). २ तापट स्वभावाचा (मनुष्य). **जाज्वल्यमान वि०**प्रखर, तेजस्वी, झळझळीत(अग्नि, सूर्याचें ऊन्ह, इ०).

जाट [**हिं०**] **पु०** रजपूत लोकांची एक जाति किं० त्या जातीचा इसम.

जाठर [**सं०**] **वि०** १ जठरासंबंधाचा. २ जठरांतील. **पु०** जठराग्नि.

जाड वि० १ लठ्ठ, दांडगा, मोठा, स्थूल. २ घट्ट, दाट. ३ खरबडीत सुताचें (वस्त्र). ❀ **जाडगेला, जाडसर वि०** बराचसा लठ्ठ (मनुष्य, प्राणी, पदार्थ).

जाडवीं न० अ० व०वधूवरांच्या किं० न्हाणवलीच्या पावलांवर काढतात त्या कुंकुमाच्या आकृति (काढणें).

जाडा, जाडगा वि० १ लठ्ठ; स्थूल;नेहमीच्या आकारापेक्षां मोठा. २ अत्यन्त वरच्या दर्जाचा,– विद्वत्ता किं० कसब किं० कौशल्य इ० बाबतींत. ❀ **जाडाधोंडगा, जाडाभरडा वि०** लठ्ठ आणि ओबडधोबड. **जाडाभरडा वि०** १खरखरीत; जाड सुताचा विणलेला. २ फार बारीक न दळलेलें (पीठ); फार बारीक न ठेचलेली किं० न वाटलेली (चटणी इ०).

जाडी वि० मागें ' जाड ' **वि०**पहा. **स्त्री०** १ १ जाडपणा; लठ्ठपणा. २ एक प्रकारचें दुहेरी चौकटीच्या रूपाचें जूं.

जाडेला वि० ' जाडगेला ' पहा.

जाड्य [**सं०**] **न०** १ स्तब्धता, निश्चलपणा. २ बुद्धीचा मंदपणा. ३ जठराग्नीचा मंदपणा. ४ जेवण फार झाल्यामुळें येते ती सुस्ती किं० वाटते ती अस्वस्थता.

जाण [**म०** जाणणें; **सं०** ज्ञा] **वि०** १ ज्ञाता; तज्ञ; दर्दी; उ० मनुष्य कितीही जाण झाला तरी त्याला ईश्वराच्या स्वरूपाचा पार लागत नाहीं. २ अनुकंपाशील; दयाळू. उ० मुक्याचा जाण कोण आहे ? ३ विचारी (माणूस). ४ कृतज्ञ. **स्त्री०**

१ जाणीव. २ कृतज्ञता.৪ **दुसऱ्यांनीं आपणावर केलेल्या उपकाराची जाण जाणणें** त्याबद्दल कृतज्ञ असणें. **विपन्नाचा जाण कोण होणार?** संकटांत पडलेल्याची दया कोणाला येणार? **ही म्हैस जाण आहे** तिला ज्या प्रमाणांत खाऊं घालावें त्या प्रमाणांत ती दूध देते.

जाणणें [**सं०** ज्ञा] **स० क्रि०** १ आपल्या ज्ञानाला (कांहीं पदार्थ इ०) गोचर करणें; पदार्थ त्याच्या स्वरूपानें ओळखणें; खरें खोटें, बरें वाईट, इ०तील फरक आकलणें; (कांहीं वस्तु) आपल्या बुद्धीचा किं० ज्ञानाचा विषय करणें. २ पूर्णपणें ओळखणें किं० ओळखून असणें. ३ दुसऱ्यानें आपणावर केलेल्या उपकाराबद्दल कृतज्ञ असणें. ४ दयार्द्र बुद्धीनें पाहाणें;उ० मला संपत्ति मिळाली तर मी गरीबांना जाणीन. ৪ **ही म्हैस जाणते** तिला जसें खावयाला घालावें तसें ती दूध देतें. **न जाणों** कोणास ठाऊक ? कदाचित्; उ० मी ह्या फोनोग्राफला कधीं हात लावीत नाहीं; न जाणों तो बिघडेल. **जाणत क्रि० वि०** जाणून बुजून. **जाणत मूर्ख वि०** जो मुद्दाम मूर्खासारखा वागतो तो. **जाणून बुझून, जाणून सवरून क्रि० वि०** मुद्दाम; बुद्धिपुरस्सर; परिणाम जाणत असतां.

जाणता [**म०** जाणणें] **वि०** १ जाणणारा. २ अभिज्ञ; दर्दी; गुण ओळखणारा; मर्मज्ञ. ३ पिशाचादिकांच्या उपद्रवाचें निरसन करूं शकतो तो. ४ प्रौढ वयाचा (वर, वधू). ५ संसाराची जबाबदारी ओळखणारा. ६ दुसऱ्याच्या उपदेशांवांचून किं० सूचनांवाचून कांहीं काम करूं शकेल अशा वयाचा. ৪ **जाणती कळा स्त्री०** प्रौढ वयानें आलेला सारासार विचार किं० सदसद्विचार (येणें). २ चर्मचक्षूला न दिसणाऱ्या वस्तु पाहाण्याची ताकद. ३ भूतबाधेचें निरसन करावयाचा मंत्रविशेष.

जाणवणें [**म०** जाणणें] **अ० क्रि०** १ ज्ञात होणें. २ सत्परिणामकारक होणें. ३ असत्परिणामकारक होणें; उ० परवाचें जागरण मला जाणवलें.

जाणाविणें [**म०** ' जाणणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ सांगणें, कळविणें,०चें ज्ञान करून देणें.

जाणसळ, जाणसाळ [**म०** जाणणें] **वि०** १ जाणता. २ कांहीं कामांत वाकबगार. ३ कांहीं काम करून करून वहिवाटलेला किं० घटलेला.

जाणस (–सा–) ळणें [**म०** जाणणें] **अ० क्रि०** कांहीं काम वारंवार करून त्या कामांत वहिवाटलेला किं० घटलेला होणें किं० असणें. **स० क्रि०** पारखणें.

जाणाई स्त्री० अशिक्षितांची एक देवता. ৪ **जाणाई जोखाई स्त्री०** अशिक्षितांच्या देवता समुच्चयानें.

जाणिजे [**म०** जाणणें] **सं० क्रि०** १ जाणलें जावें; आपणास विदित व्हावें(पत्रांत किं० काव्यांत योजावयाचा शब्द). २ जाणलें जातें (कवितेंत).

जाणीव [**म०** जाणणें] **स्त्री०** १ जाणण्याची शक्ति. २ ज्ञान; माहिती; ओळख. ३ बुद्धि. ४ कृतज्ञताबुद्धि. ५ भावना.

जाणूं, जणूं [**म०** जाणणें] **क्रि० वि० उ० अ०**जणों काय; असें दिसतें किंवा वाटतें कीं.

जाणें [**सं०** या=जाणें] **अ० क्रि०** १ एका स्थळापासून दुसऱ्या स्थळाकडे गमन करणें. २ शिरणें; प्रविष्ट होणें. ३ हरवणें; नष्ट होणें. ४ चोरादिकांच्या योगानें नाहींसें होणें. ५ बंद पडणें; उ०राम्याच्या संगतीनें त्याचें अध्ययन गेलें. ६(काळ) अतिक्रान्त होणें; उ० हां हां म्हणतां वर्ष गेलें; उ० माझें अर्ध्याहून अधिक आयुष्य गेलें. ७ वजा केलें जाणें; उ० दहांतून तीन गेले म्हणजे सात उरतात. ८ पुरणें; उपयोगीं पडणें; कामाला येणें; उ० मला एक धोतरजोडा वर्षभर जातो; उ० पल्लाभर तांदूळ आम्हाला तीन महिने जातात. ९ विवक्षित परिपाठांत किं० क्रमांत चूक पडणें; उ० रोज माला ध्यावयाची असतां मजकडून एक दिवस जातांच रोगानें बळ केलें. १०विशिष्ट समयीं कांहीं गोष्ट करावयाची ती करण्याचें भान न राहाणें; उ० त्याला हें उदाहरण विचारून घेणार होतों तें गेलें.११बिघडणें; न्यूनानें युक्त असणें किं० होणें; उ० ती मुलगी सुंदर आहे पण कानांनीं(किं०बहिरेपणामुळें) गेली; उ० तो जाडा विद्वान् आहे पण गर्वानें गेला. १२ इंद्रियविशेषानें त्याच्या त्याच्या विषयाकडे वळणें किं० आकृष्ट होणें; उ० माझें मन त्याच्या विपत्तीकडे जातें; उ० माझे कान त्या

सारंगीवाल्याच्या सुराकडे गेले. १टीप–क्रियापदाचें ईत प्रत्ययान्त रूप करून त्याचेपुढें 'जाणें' योजलें असतां ती क्रिया नियमानें करण्याचा परिपाठ ठेवणें असा होतो; उ०अमरकोशाची रोज उजळणी करीत जा; उ०निजतांना ह्या खिडक्या बंद करीत जा. २क्रमानें किं० धीरें धीरें कांहीं गोष्ट करणें;उ० व्यापारांत सर्व भांडवल एकदम घालूं नको;व्यापार वाढेल तसतसें भांडवलघालीत जा. २टीप– क्रियापदाला 'ऊन' हा प्रत्यय लागून पुढें 'जाणें' आल्यास पूर्णपणें, अगदीं, असा अर्थ होतो; उ० काढ्याखालीं फार लाकडें घालूं नको, नाहींतर तो आटून जाईल; उ० गेल्या महिन्यांत आमच्या घरीं पाहुणे पुष्कळ आले, त्यामुळें ह्या वरणांतील सगळें तूप संपून गेलें. ३ टीप– सकर्मक क्रियापदाच्या भूतकाळाच्या रूपापुढें 'जाणें' योजिलें असतां कर्माणि प्रयोग होतो; उ० सगळें घर बांधलें गेलें; उ० माझें सर्वस्व लुटलें गेलें; उ० तुला वर्गांतून बाहेर काढून लाविलें जाईल. ꙮ **एकाद्याचे डोळे जाणें** तो अंध होणें. **एकाद्याचे कान जाणें** तो बहिरा होणें. **एकाद्याचें पोट जाणें** त्याला रेच होणें. **जिवानिशीं जाणें** मरणें. **फाशीं जाणें** फासावर चढविलें जाण्याच्या शिक्षेनें मरणें. **एकाद्याचें शरीर जाणें** तो कृश होणें; तो रोडावणें. **माझें(किं० तुझें इ०)काय जातें ?** माझें (किं०तुझें इ०) काय नुकसान व्हावयाचें आहे ?

जाणों उ० अ० जणों काय. ꙮ **जाणोंपरी** क्रि० वि० पाहाण्यांत; आठवणींत; स्मरणांत; माहितींत; उ० माझे जाणोंपरी ही गोष्ट घडली नाहीं; उ० माझ्या जाणोंपरी त्याच्या घरीं लक्ष्मी पाणी भरीत होती. **जाणोंपरीचे अगोदर** क्रि० वि० जाणपणाची स्थिति प्राप्त व्हावयाच्या आधीं; उ० माझे जाणोंपरींच्या अगोदर बुधवारचा वाडा जळाला.

जात [सं० जाति] स्त्री० १ कांहीं विशिष्ट गुणधर्म ज्यांच्यांत समान आहेत किं० असतात अशा वस्तूंचा किं० प्राण्यांचा वर्ग; उ०वांगें आणि टोमाटो हीं एका जातीचीं झाडें आहेत. २ पुरातन काळापासून तेच आचार पाळीत आलेले, तेच धर्मग्रंथ आणि देव पूज्य मानीत आलेले, एकमेकांतच रोटीबेटी इ० व्यवहार करीत आलेले जे लोक ते आणि त्यांची संतति समुच्चयानें. ३ भाषणादिकांची विशिष्ट रीति किं० ढब किं० प्रकार. ४ लवलेश (अकरण रूपीं); उ० याच्या अंगीं सारासार विचाराची जात नाहीं. ५ मनुष्याच्या जन्मजात गुणांचा समुच्चय. ६ आपण स्वता ही व्यक्ति ; उ० यानें सगळा पैसा जातीनें मिळविलेला आहे (म्ह० स्वता); उ० तो जातीनें मला आमंत्रण करावयाला आला होता (म्ह०तो स्वता). ꙮ**कांहीं गोष्ट आपल्या जातीवर करणें** स्वताच्या हिमतीवर म्ह० दुसऱ्याच्या मदतीशिवाय करणें. **जातीनें** क्रि० वि० स्वता. **जातीवर जाणें** मूळ स्वभावानुरूप वर्तन करणें. **जात कळते पण मत कळत नाहीं** जात लपविणें शक्य नाहीं; आपलें मत गुप्त ठेवणें शक्य आहे; एकाद्याच्या मनांतील खरा विचार जाणणें कठिण गोष्ट असते. **जातिनूशीं, जातीनिशीं** क्रि० वि०स्वता; अंगें. **जातकुळी** (–ळ) स्त्री० मुलगी लग्नाच्या उद्देशानें पसंत करावयाची असतां तिची जात, नातलग,सोयरीकीचे संबंध,इ० गोष्टी समुच्चयानें. **जातखूद,जातखत (–द)** क्रि० वि० जातीनें; स्वता. **जातगंगा, जातजमात** स्त्री० सर्व जातवाले समुच्चयानें. **जातगोत** न० नातलग आणि जातीचे लोक समुच्चयानें; उ० त्याला प्रायश्चित दिलें तेव्हां तेथें त्याची सगळी जातगोत जमली होती. **जातनिसबत** क्रि० वि० स्वता; जातीनें. **जातपात** स्त्री० जात, सोयरेधायरे, आचार, इ० समुच्चयानें; उ० त्याची जातपात आह्माला समजल्याशिवाय त्याला आम्ही पंक्तीस घेणार नाहीं! **जातपूत** स्त्री० जात, कुटुंब, नातलग, इ० समुच्चयानें. **जातभाऊ** पु०त्याच जातीचा; एकाच जातीचा. **जातमुखतार** वि० अनियंत्रित; ज्याच्यावर कोणाची नियंत्रणा नाहीं असा. **जातमुचलका, जातकतबा** पु० स्वता किं० जातीनें लिहून दिलेलें खत किं० केलेला करार. **जातलग** वि० उंची जातीचा, दर्जाचा किं० अवलादीचा (माणूस, जनावर, फळ, इ०). **जातवार** क्रि० वि० १ जात, वर्ग, इ० विचारांत घेऊन. २ जातीप्रमाणें. **जातसरंजाम** पु० लष्करी नोकरीबद्दल एकाद्या माणसाला करून दिलेली नेमणूक.

जात [**सं०**] **वि०** उत्पन्न झालेला;जन्मलेला; उ० जन्मजात ह्म०जन्मापासून असलेला किं०उत्पन्न झालेला; जलजात म्ह० पाण्यापासून किं० पाण्यांत उत्पन्न झालेला इ०. ॐ **जातकर्म न०** मूल जन्मल्यावर करावयाचा संस्कारविशेष. **जातव्यवहार पु०** ज्यानें केलेल्या कृत्याबद्दल त्याला कायद्याच्या दृष्टीनें जबाबदार धरतां येतें अशा वयाचा मुलगा म्हणजे पंधरा वर्षांपेक्षा अधिक वयाचा मुलगा.

जांत न० गाडी किं० नांगर ओढणें इ० कामें करावयाला बैल शिकवून तयार करण्यासाठीं जो खुंटा पुरतात तो; ह्या खुंट्याभोंवतीं बैलाला वाटोळें फिरावयाला लाविलें जातें.

जातक [**सं०**] **पु०**१ बालक. २ भिक्षु. **न०** १ जन्मकाळच्या ग्रहांच्या स्थितींवरून कोणेकाच्या आयुष्यांत घडणाऱ्या शुभाशुभ गोष्टींचें वर्णन करणारा ज्योतिष शास्त्राचा भाग.२ दोन माणसांच्या स्वभावांची जी अनुरूपता तिच्यावरून होणारी मैत्री,स्नेह, साहचर्य, इ०; उ० त्याचें आणि माझें जातक जमत नाहीं.

जांतण [**सं०** यंत्र; **म०** जांतें] **न०** लहान जातें.

जांतणी [**सं०** यंत्र; **म०** जांतें] **स्त्री०** मोठें नसें जातें.

जांतली [वर ' जांतण ' पहा] **स्त्री०** लहा-

जातवेद [**सं०**] **पु०** अग्नि.

जाति [**सं०** जाति] **स्त्री०** १ जन्म. २जन्मकाळ. ३ कुळ. ४ ' जात ' चा अर्थ २ पहा. ५ जाईचें फूल. ॐ **जातिफळ न०** जायफळ. **जातिपत्री स्त्री०** जायपत्री. **जातिब्राह्मण पु०** केवळ जन्मानें ब्राह्मण (ब्राम्हणाचे आचार न पाळणारा). **जातिवाचक नाम न०** (व्याकरणांत) सामान्यनाम. वि० पूर्व जन्माचें स्मरण असलेला. **जातिहीन वि०** नीच जातीचा. **जातिबंधु पु०** त्याच जातीचा इसम. **जातिभ्रंश पु०** जातींतून बाहेर काढून टाकलें जाणें. **जातिभ्रष्ट वि०** कांहीं पातकामुळें किं० जातीला अनुचित अशा कांहीं कृत्यामुळें जातीच्या लोकांनीं ज्याला बाहेर टाकलें आहे असा;बहिष्कृत. **जातिमर्यादा स्त्री०** एकाद्या विशिष्ट जातींत पाळल्या जातात त्या नियंत्रणा समुच्चयानें. **जातिवंत वि०** उत्तम जातीचा किं० अवलादीचा (मनुष्य, पशु, फळ, इ०). **ज्यात्या** [**सं०** ' जाति ' च्या तृतीयेचें ए० व०] **क्रि० वि०** १ स्वभावतः. २ जातीनें; स्वतः. **जातीचें लेकरूं न०** लुचा, बदमाष. **जातीपुती** ' जात ' मध्यें ' जातपूत ' पहा. **जाती तशी पुती, खाण तशी माती** ज्या कुटुंबांत कोणी इसम जन्मला असेल त्या कुटुंबांत आढळणारे गुण त्यांच्या अंगीं असावयाचे; आणि ज्या खाणींतील माती असेल त्या खाणीचें धर्म त्या मातींत असावयाचे.

जांतें [**सं०** यंत्र] **न०** धान्यादींचें दळून पीठ करावयाचें साधनविशेष; जांत्याला दगड इ० च्या दोन तळ्या असून त्यांच्यामध्यें धान्यादि चिरडलें जातें. ॐ **जांत्यावर बसलें म्हणजे गीत आठवतें (किं० गाणें सुचतें)** कांहीं काम करूं लागलें म्हणजे त्या कामाच्या खुब्या, त्याचीं अंगें, उपांगें, इ० समजूं लागतात आणि तें काम सुकर होतें. **जातें उकट्या पु०** जांत्याला टांकी देणारा.

जात्य न० काटकोण त्रिकोण. ह्याला 'जात्यत्रिभुज ' असेंही म्हणतात.

जाथू वि० १ कांहीं कामावर कांहीं कालमर्यादेनें बांधलेला, ठरविलेला, किं० नेमिलेला (मनुष्य). २ कांहीं नियमांनीं नियंत्रित (नोकरी, करार, इ०).३फार दिवसांची,किं० पुष्कळ दिवसांपासून रूढ असलेली (चाल, रीत, आचार, इ०).

जादा [अ० जियादाह्] **वि०**अधिक;ज्यास्ती; फालतू.

जादु [**फा०**] **स्त्री०** १ चेटूक; इंद्रजाल. २ लोकांना ठाऊक नसलेली कांहीं युक्ति किं० कला किं० खुबी (कांहीं काम करण्याची). ॐ **जादुखोर,जादुग(–गा–,–गी–)र पु०**जादू करणारा. **जादुटोणा पु०** १ जादूगाराची कृत्यें; चेटुक. २ भताटकीची विद्या.

जान [**फा०**] **स्त्री०** प्राण, जीव. ॐ **जानजवान, जानबमान वि०** तरणाताठा; ऐन उमेदींत असलेला (माणूस). **जानदार वि०** जिवंत स्थितींत असलेला (आजारी माणूस). **जानपछान स्त्री०** ओळखदेख.

जानवसा, जानिवसा [**सं०** जनवास] **पु०** लग्नाला किं० लग्नापुरतें घेतलेलें घर; परगांवाहून आलेल्या वधूच्या किं० वराच्या पक्षाकडच्या मंडळीस कांहीं काळ राहावयासाठीं ठरविलेली जागा, घर, इ० (देणें, घेणें, करणें). ह्या जागेला किं० घराला ' जानवसघर, ' किं० ' जानवसें घर ' असेंही अन्य शब्द आहेत.

जानवळ (–ळें) न० कुळवाचा किं० दिंडाचा खुंटा (शेतकींतील एक पारिभाषिक शब्द).

जानवें [**सं०** यज्ञोपवीत; **अ०** जिन्नार]**न०** १ ब्राह्मणाच्या गळ्यांत उपनयन संस्कार झाल्याचें चिन्ह म्हणून धारण केलेलें सूत्र असतें तें. २ लसण्या नांवाचा जो अंगठी इ०त बसवावयाचा खडा त्याचेवरील पांढऱ्या रंगाची रेषा. ॐ **जानवें तोडावयास उठणें** किं० **जानव्यास हात घालणें** रागानें बेफाम होऊन अद्वातद्वा बोलूं लागणें आणि माझें अमुक विधान खोटें ठरलें तर मीं हें जानवें तोडीन अशी प्रतिज्ञा करणें. **जानवें उक्तें करणें** किं० **जानवें मोकळें करणें** कोणी आपल्या गोत्रांतील मनुष्य मेलें असतां त्याचें यथाकथंचित् क्रियाकर्म करून आपण शुद्ध होणें. **जानव्याचा धनी पु०** ब्राह्मण, क्षत्रिय, आणि वैश्य, ह्या तीन वर्णांचा कोणीही पुरुष. **जानव्याला वस्त्रा बांधणें** माझा पराजय झाला तर मी ह्या वस्त्र्यानें जानवें कापावयाला सिद्ध आहें अशी प्रतिज्ञा करून वादाला किं० कुस्तीला सरसावणें. **जानवें धोतर टाकणें** (किं० **फाडणें**) १ निरर्गलपणाचें वर्तन करणें. २ रागानें तोंड सोडणें. **जानव्याची लाज धरणें** ब्राम्हणत्वाला कलंक न लागेल असें वर्तन करणें; ब्राम्हणाला योग्य जें कांहीं तेंच करणें. **जानव्याधोतरांची गांठ घालणें** रागानें बेफाम होणें. **एकाद्याच्या जानव्याधोतरांची गांठ घालणें** त्याचें जानवें तोडण्याची त्याला धमकी घालणें. **जानव्याला जानवें मिळणें** १ दोन सजातीय माणसांची गट्टी होणें. २ एका ब्राम्हणानें दुसऱ्या ब्राम्हणाचा पक्ष किं० कैवार घेऊन बोलूं लागणें.

जानि [**सं०**] **पु०** (समासांत)०चा पति; उ० सीताजानि म्ह० सीतेचा पति म्हणजे राम.

जानी स्त्री० गाय, पाडी, किं० मानव जातीय मुलगी,–जी खंडोबाला किं० दुसऱ्या कोणा देवाला अर्पण करून तिच्यावरचा आपला ताबा किं० स्वामित्व सोडून देण्यांत आलें आहे. अशा मुलीस ' मुरळी ' म्हणतात.

जानु [**सं०**] **न०** गुडघा. ॐ **जानुफलक, जानुमंडल न०**गुडघ्याची वाटी. **जानुदघ्न वि०**उंच गुडघ्याइतकें खोल(पाणी, खड्डा, इ०); गुडघ्याइतका (ओटा इ०). **जानुजंघपोटरी** गुडघा, मांडी, आणि पोटरी हे तीन अवयव(लावणींतील शब्द). **जानुवर्त पु०** घोड्याच्या गुडघ्यावरील केशांचें वलय (हें अशुभ चिन्ह समजलें जातें).

जान्हवी [**सं०** जान्हवी] **स्त्री०** गंगा नदी. जह्नु हा सोमवंशी राजा होता. गंगेनें त्याचा यज्ञ वाहविल्यामुळें त्यानें तिला पिऊन टाकिलें आणि नंतर कानाच्या वाटेनें सोडून दिलें, म्हणून तिला ' जान्हवी ' हें नांव प्राप्त झालें.

जान्हवी [**म०** जानवें] **स्त्री०** श्राद्धाच्या प्रसंगीं शूद्र जें रेशमाचें सूत्र गळ्यांत घालतात तें.

जाप [**फा०** जवाब] **पु०**१ उत्तर, जबाब. २ उच्चारलेला कोणताही शब्द किं० केलेलें विधान. ३ देवसकीचें प्रसंगीं ' देवा, अमुक कर ' असें जें देवाला आग्रहाचें मागणें करतात तें.

जापणें, जांपणें [**सं०** जल्प=बडबडणें]**स० क्रि०** सांगणें, निवेदिणें. ३ केलेला अपराध कबूल करणें. ४पुन्हा असें भलतें कृत करणार नाहीं अशी प्रतिज्ञा करणें.

जापविणें [**म०** ' जापणें ' चें प्रयोजक]**स० क्रि०** पुन्हा अशी वाईट गोष्ट करणार नाहीं असें एकाद्याकडून वदविणें.

जापारणें अ० क्रि० उलट उत्तर देणें; प्रत्युत्तर करणें (उद्धटपणानें).

जाफरणें, डाफरणें अ० क्रि० एकाद्यावर ताशेरा झाडणें किं० तोंड सोडणें; उ० तूं उगीचच माझ्यावर डाफरतो आहेस (किं० जाफरतो आहेस).

जाफरा [**अ०** जफ़रान्] **पु०**केशर. ॐ**जाफरमाना वि०** केशरी रंगाचा.

जाफराबादी वि० जाफराबाद ह्या शहरची (गाय, म्हैस).

जाफा [अ० अजाफाह्] **वि**०अधिक;फालतू. **क्रि० वि**० अधिक प्रमाणांत.

जांब [**सं**० जंबु=जांभूळ] **पु**० १ एक फलवृक्षविशेष; जांभूळ. २ पेरू. ३ काजूचें झाड. ४ इमारतीच्या उपयोगाला ज्याचें लाकूड येतें असा एक वृक्षविशेष.

जांब [फा० जाम्] **पु**० पाणी प्यावयाचें एका विशिष्ट आकाराचें पात्र.

जाब[**फा**०जवाब्]**पु**०१उत्तर.२हुंडीच्या तपशिलाचें पत्र.३बोलणें;विधान. ४ बोलण्याचें कौशल्य. **जाबसाल** [**फा**० जवाब्=उत्तर; **अ**० सव्वाल् =प्रश्न] पु० १ संभाषण; प्रश्नोत्तररूप संभाषण २ बोलणें. **जाबसाली वि**० उत्तरें देण्यांत तल्लख; प्रश्नाचें उत्तर तावडतोब देण्यांत पटाईत.**जाबसाली कागद पु**० **अ**० **व**० व्यापारी व्यवहारसंबंधांत आलेलीं पत्रें आणि त्यांना पाठविलेलीं उत्तरें समुच्चयानें.

जाबडणें [**हिं**० जाभडा] अ० **क्रि**० वटवट करणें; बरळणें; मूर्खासारखें बोलणें.

जाबडा [**हिं**० जभ्‌डा] **पु**० जबडा. मागें ' जबडा ' पहा.

जाबणें [**सं**० जल्प्=बडबडणें] **अ**० **क्रि**० १ झोपेंत किं० तापाच्या गुंगींत बडबडणें. २मूर्खासारखें बोलणें.

जाबता [**अ**० जाब्ताह्] **पु**० १ नियम; शिरस्ता; कायदा; परिपाठ. २ परवाना; अधिकारपत्र. ३ एकाद्याच्या संरक्षणार्थ किं० वैभवार्थ त्याच्या बरोबर दिलेले शिपायी. ४ जमीनीचा मोजून मापून घेतलेला किं० ठरवून आखून घेतलेला भाग. ५ अंमल, देखरेख, पहारा. ६ सरंजामाच्या तपशिलाचा कागद. ७ मालाची यादी. ८ मालाची मागणी. ९ घराच्या दर्शनी बाजूचें परिमाण; उ० माझ्या घराचा जाबता पांच खणांचा आहे.

जांबळा, जांभळा [**म**० जांबूळ, जांभूळ; **सं**० जंबु] **वि**० जांभळाच्या रंगाचा.

जांभळी स्त्री० जांभळाचें झाड.

जांबा, जांबेथर, चांबोत्रा पु० जांभळ्या किं० तांबड्या रंगाचा दगड,–ज्याला असंख्य भोकें असतात आणि जो ढिसूळ असतो.

जाबाड, जाबाडें न० मागें ' जबडा ' पहा.

जांबुवंत [**सं**० जांबवान्] **पु**० १ ब्रह्मदेवाच्या जांभईपासून उत्पन्न झालेला एक वानर. यानें युद्धसमयीं रामाला फार साहाय्य केलें. २ कोणीही वयोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध पुरुष. ३ वेळेवर हजामत न करविल्याकारणानें ज्याच्या तोंडावरचे केश लांब वाढले आहेत तो माणूस.

जांबूळ,जांभूळ [**सं**० जंबुल, जंबूल] **स्त्री**० जांभळाचें झाड. **न**० त्याचें फळ.

जांबेथर, जांबोत्रा वर' जांबा ' पहा.

जांभ, जांब वर ' जांब ' पहा.

जांभई, जांभळी [**सं**० जृंभिका] **स्त्री**० निद्रेमुळें, आळसामुळें, किं० थकव्यामुळें, तोंड उघडून दीर्घ श्वास सोडणें(येणें, देणें). ꣸ **सहा महिन्यांची जांभई,कुंभकर्णाची जांभई स्त्री**०१ दीर्घसूत्रीपणामुळें फार दिवस रेंगाळत पडलेलें काम.२ काम लांबणीवर पडणें.

जांभळा, जांभूळ मागें ' जांभळा, ' जांबूळ' पहा.

जांभा, जांभी मागें ' जांबा, 'पहा.

जाभाड, जांभाड, जांभाडें [**हिं**० जभ्‌डा] **न**० तोंडाचे जे खालचा आणि वरचा असे दोन भाग,–ज्यांच्या दाबांत खाद्य पदार्थ चिरडिला जातो,–त्या दोहोंची जोडी, किं० ते व्यक्तिशः किं० विशेषतः खालचा भाग.

जांभेथर मागें ' जांबेथर ' पहा.

जाम [**फा**० जाम्] **पु**० १ आकारविशेषाचें पाणी प्यावयाचें पात्र. २ जांब.

जामगी [**फा**०] **स्त्री**० १ बंदूक, तोफ, इ० तील दारू पेटविण्यासाठीं कान्याला लावितात ती सुताची दोरी.२फटाकड्याला लाविलेली असते ती दारू भरलेली वात. ꣸ **जामगी लावणें** १ दोन माणसांत तंटा लावून देणें. २ छळणें, पीडिणें. **जामग्यानीं भाजणें** सतावणें; छळणें.

जामण (–भ)[**सं**० वामन]**वि**० ठेंगणा; ठेंगू.

जामदानी [**फा**०] **स्त्री**० १ ज्यांत वेलबुट्टी विणली आहे असें एक प्रकारचें वस्त्र.२ कातड्यानें मढविलेली बांबूची पेटी, टोपली,इ०कांहीं बारदान.

जामदार [**फा**० जामाह् दार्] **पु**०१ दागिने, सोन्याचांदीचीं पात्रें, पैसा, **इ**० चा बंदोबस्त ठेव-

णारा अधिकारी (राजाचा, किं० कोणा बड्या माणसाचा). २ मूल्यवान् सणगें ज्याच्या ताब्यांत दिलेलीं असतात तो अधिकारी. ꙮ **जामदारखाना** पु० १ सरकारी तिजोरी. २ मूल्यवान् वस्त्रें, दागिने, पैसा, इ० सुरक्षितपणें ठेवण्याची खोली. **जामदारी** स्त्री० जामदाराचें कर्तव्य किं० हुद्दा.

जामा [फा० जामाह्] पु० मुसलमान घालतात तो आकारविशेषाचा पायघोळ अंगरखा. ꙮ **जामानिमा** [फा० जामाह्+नीमाह्] १ पोशाख. २ पोशाखाचीं वस्त्रें अंगावर धारण करणें (करणें).

जामीन [अ० जामन्] पु० १ सावकारापासून जो कोणी कर्ज घेतो तो तें कर्ज फेडील किं० फेडण्याला समर्थ आहे असा सावकाराला विश्वास पटवितो तो; हमी घेणारा. २ दुसऱ्या कोणी केलेल्या अमुक व्यवहाराच्या शर्ती पूर्णपणें पाळल्या जातील अशी हमी घेतो तो इसम. ३ अमुक कृतीचा अमुक परिणाम घडेल अशी खात्री देणारा किं० अशी जबाबदारी वाहणारा इसम; उ० हें औषध तुझी घ्या, गुणाबद्दल मी जामीन (किं० गुण न आल्यास मी जामीन). ४ घर, मांडव, इ० च्या रचनेंतील जो खांब अशक्त झालेला असेल तो न काढतां त्याच्या शेजारीं त्याला बळकटी येण्यासाठीं जो दुसरा खांब उभा करतात तो. ५ पतंग, वावडी, इ०ना हिसका द्यावयाचा दोरा. ६ सोंगट्यांच्या खेळांत पक्क्या रंगाची सोंगटी अडकून पाडावयाजोगी कच्चा रंगाची सोंगटी प्रतिपक्ष्यानें मारावयाजोगी असते ती. ७ रात्रीं दुधाला घालतात तें विरजण (दूध नासू न देणारा पदार्थ). ꙮ **जामीन रहा आणि गांठचें वहा** जामीन राहिल्यानें आपलें नुकसान होते. **जामीनकत(-द-)बा** [अ० जामन्+कताबाह्] पु० जामीन राहिल्याबद्दलची कागद. **जामीनकी** स्त्री० जामीन राहाणारावरची जबाबदारी; हमी (देणें, घालणें, लिहिणें). **जामीनगत, जामीनगिरी** स्त्री० जामीन राहाणारावरची जबाबदारी. **जामीनदार** वि० जो जामीन राहिला तो. **जामीन सांखळी** स्त्री० १ सरकारचा सारा योग्य वेळीं भरला जाईल अशाबद्दल गांवांतील एका कुटुंबानें दुसऱ्या एका कुटुंबाची हमी घेणें, दुसऱ्यानें तिसऱ्याची, अशा रीतीनें सर्व गांवच्या साऱ्याबद्दल सरकारनें ठरवून घेतलेली हमी. २ नाटक, काव्य, इ०तील वेगळ्या वेगळ्या भागांची परस्परांशी जुळणी किं० सांधेजोड.

जामूण (-न), **जामण** (-न [सं० वामन=खुजा] वि० ठेंगू; ठेंगणा.

जायगड्या उ० वा० अ० छट् ! तसें नव्हे ! हुडुत् !

जायजण, जायजणा, जायजाणा, जायवळ [म० जाणें + जण (एक व्यक्ति)] वि० १ लग्न इ० प्रसंगीं चार दिवस शोभेसाठीं किं० उपयोगासाठीं दुसऱ्याकडून मागून आणलेला (दागिना, वस्त्र, पात्र, इ०); हा मागून आणलेला पदार्थ आपल्या मालकीचा नसल्याकारणानें तो जिकडच्या तिकडे परत जावयाचा असतो. २ कन्यारूप संतति (जी नवऱ्याच्याकडे जावयाची असतें). ३ वेदान्ती लोक देहादिविषयाला 'जायजण ' हा शब्द लावितात.

जायपत्री [सं० जाति=जायफळ; पत्र=कवच] स्त्री० जायफळाच्या भोंवतीं जीं तीन कवचें किं० वेष्टनें असतात त्यांतील मधलें.

जायेंप, जावपें न० गायीचें किं० म्हशीचें अपत्य.

जायफळ [सं० जातिफळ] न० औषधापयोगी एक सुवासिक फळ.

जाया [अ० जाइअ] वि० नाश पावलेला; दुखावलेला; निरुपयोगी झालेला. ꙮ **जाया देणें** अंदण म्हणून गाय, बैल, शेत, दागिना, घर, इ० पदार्थ देणें (कारण ह्या पदार्थांला आपण कायमचे मुकतों). **जाया होणें** कांहीं मोडतोड, जखम इ० झाल्यामुळें निरुपयोगी होणें (पदार्थ, गात्र, इ०). **जायबंदा** (-दी), **जायांबदा** (- दी) वि० नादुरुस्त किं० निरुपयोगी झालेला; दुखावलेला.

जायमान [सं० जन्=उत्पन्न होणें] वि० उत्पन्न होत असलेला; केला जात असलेला.

जायलेणें [म० जाणें, जायचें+लेणें(दागिना)] न० प्रसंगापुरतें मागून आणलेला दागिना इ० (जो मालकाकडे परत जावयाचा असतो).

जायां, जायास [म० जाणें] क्रि० वि० उसना म्हणून; प्रसंगा पुरताच (आणलेला पदार्थ).

जाया [सं०] स्त्री० पत्नी; भार्या. ꙮ **जायापती** पु० अ० व० नवराबायको; पतिपत्नी.

जायाचा [म० जाणें] वि० उसना म्हणून विशिष्ट प्रसंगापुरता मागून आणलेला (पदार्थ,– सणंग, दागिना, इ०). ꙮ **जायाचें लेणें लाजिरवाणें** लोकांच्या जिनसांनीं केलेला थाटमाट व्यर्थ होय. **जायाचा दागिना** पु०, **जायाची वस्तू** स्त्री० कन्यारूप अपत्य (जें पतीच्या घरीं जावयाचें असतें).

जायिजणा मागें ' जायजणा ' पहा.

जाये [म० जाणें + येणें] स्त्री० १ निरर्थक हेलपाटे; रिकामी यातायात. २ कांहीं कार्यासाठीं वारंवार जाणें येणें इ० रूप कष्ट (करणें).

जार [सं०] पु० विवाहित स्त्रीच्या अनुग्रहास पात्र झालेला परपुरुष. ꙮ **जारकर्म** वि० व्यभिचार. **जारज** वि० जारकर्मापासून जन्मलेला.

जारट [म० जारटणें; सं० जरठ] वि० १ टणक झालेला. २ योग्य वयाच्या अगोदर निबर झालेला (मुलगा) किं० निबर झालेली (मुलगी). ३ पूर्ण वाढ कुंठित झाली आहे असें (झाड, फळ, इ०).

जारटणें, चारसणें, जारठणें [सं० जरठ] अ० क्रि० १ अति उष्णता इ० कारणांनीं (फळें) टणक होणें किं० सुरकुतणें. २ (गळूं) टणक होणें किं० दाठरणें. ३ आजारामुळें किं० खावयाची अवाळ झाल्यामुळें रोडावणें किं० त्वचा सुरकतणें. ꙮ **जारटलेलें वागें** न० वयानें मोठा असून शरीरानें ठेंगणा असा (माणूस).

जारण [सं०] न० १ जादूटोणा; शत्रु इ० कांना वेड लागावें किं० रोग व्हावा म्हणून केलेला मंत्रप्रयोग. २ (**वैद्यक**) धातूचें भस्म करणें. ꙮ **जारणमारणउच्चाटन** न० शत्रूला वेड लागावें, त्याचा नाश व्हावा, किं० त्याची कांहीं हानि व्हावी म्हणून केलेला मंत्रप्रयोग.

जारस [सं० जातरस] वि० शेतांत लाविलेलें भात पिकलें असतां त्याचा दाणा पुरतेपणीं न वाढूं देतां कापतात तें (भात) किं० त्या तशा भाताचा काढलेला (तांदूळ).

जारसणें वर ' जारटणें ' पहा.

जारिणी, जारीण [सं० जारिणी] स्त्री० जारकर्म करणारी स्त्री.

जारी [फा०] स्त्री० १ सध्यां चालू असलेला अंमल किं० चालू असलेली शासनपद्धति किं० राज्य किं० शिरस्ता. २ गांवच्या सरकारी वसूलाचा बाजूस काढून ठेविलेला भाग; ह्या सदराखालीं देशमुखी आणि चौथ अमल येतात. ꙮ **जारी अमल** [फा० जारी अम्ल] पु० वर ' जारी ' पहा.

जारी [अ०] वि० सध्यां चालू किं० रूढ असलेला (सरंजाम, वर्षासन, चाकरी, इनाम, इ०). ꙮ **जारींत असणें** रूढ किं० चालू असणें. **जारींत आणणें** रूढ करणें; प्रचारांत आणणें; प्रचलित करणें.

जारी [अ०] स्त्री० वर्चस्व, अधिकार, वैभव, ० चा काळ किं० अवधि.

जाल [सं०] न० १ जाळें. २ जाळीदार वस्त्र, दागिना, इ०. ३ खिडकी, गवाक्ष, झरोका. ४ समूह (केशजाल इ०). ५ गुंतागुंत.

जालंदर, जालिंदर पु० गोसाव्यांचा एक पंथ.

जालीम [अ०] वि० १ कडक, तीव्र (औषध). २ जुलमी (शासनपद्धति). ३ तापट, उग्र (स्वभाव, माणूस).

जांवई [सं० जामातृ] पु० १ कन्येचा पति. २ एकाद्याच्या घरीं पाहुणा ह्या नात्यानें जाऊन यजमानाच्या सर्व सोयी आपणाला प्राप्त करून घेऊं पाहातो असा (संकोचरहित) माणूस. ꙮ **जांवई (किं० वर) न्हाला आणि वाफा शिंपला** एकदम दोन कार्यें घडून आलीं; (जांवयाची अंघोळ होऊन तें पाणी भाजीपाल्याच्या रोपांना मिळतें). **जांवयाच्या पंक्तीचें जेवण आणि लेकांच्या बरोबर अध्ययन मिळावयाला दैव पाहिजे** पक्वान्नांचें जेवण आणि काळजीपूर्वक दिलें जाणारें शिक्षण मिळणें दुर्लभ गोष्ट होय. **जांवई आग्रह** पु० खाद्यें आणि पेयें अधिक घेण्याविषयीं एकाद्या पाहुण्याला केलेला आग्रह. **जांवई जेवण** न० चोखंदळेपणाचें जेवण. **जांवई डौल** पु० १ मिजासखोरी; ऐट. २ ' जांवई ' शब्दाचा अर्थ २ प्रमाणें वागण्याची तऱ्हा. **जांवई पोशाख** पु० एकाद्या विशिष्ट प्रसंगाला न शोभण्याइतका डौलदार किं० अक्कडबाज पोशाख. **जांवई शोध** पु० मूळचा लेख शुद्ध असतां आपल्या अडाणीपणानें तो अशुद्ध समजून त्यांत केलेली सुधारणा,

जी अर्थात् चुकीची आणि मूर्खपणाची होते. **जांवईण स्त्री०** जांवयाची बहीण. **जांवयाचा बेटा पु०** १ जांवयाचा मुलगा. २ दूरचा नातलग,–ज्याचेवर आपला हक्क नसतो आणि जो आपल्या उपयोगीं पडेलच अशी खात्री नसते. **जांवयाची पंगत स्त्री०** जांवई ज्या पंक्तीस जेवणास बसविला असतो ती,–ज्या पंक्तींत साजुक तूप, चमचमीत खाद्यें पेयें इ० वाढलीं जातात.

जावक [हिं० जाना] **वि०** जावयाचा, बाहेर पाठवावयाचा (पत्रें, हुकूम, इ०). आवक म्ह० यावयाचा किं० बाहेरून आलेला.

जांवडीं न० अ० व० मागें 'जाडवीं' पहा.

जावत्, जावत्काळ क्रि० वि० पुढें 'यावत्' 'यावत्काळ' पहा.

जावपें न० गाय किं० म्हैस यांचें वासरूं. ꕥ **जावपेकरीण स्त्री०** जी आपल्या वत्साला पाजिते अशी गाय किं० म्हैस. **जावपेंशुद्ध वि०** सुंदर आपत्यें विते अशी(गाय किं० म्हैस).

जावरदा [**म०** जाणें] **पु०** बाहेर जाणारा किं० पाठवावयाचा माल. याच्या उलट'आवरदा'.

जावळ [**म०**जात (जन्माच्या वेळचें)+वाल (केश)]**न०** १मुलाच्या डोक्यावरचे जन्मापासूनचे केश. २ हे केश प्रथम कापण्याचा विधि.

जावळा [**सं०** यमल=जुळें] **वि०** एका मातेचीं एकाच वेळीं झालेलीं जीं मुलें त्यांपैकीं एक. **जावळा रावळा** ह्या मुलांची जोडी; हीं दोन मुलें. अशा मुलांना ' आवळीं जावळीं मुलें ' असेंही म्हणतात.

जावळ्या [**म०** ' जाऊ ' चें लघुत्व दर्शक रूप जावळी] **स्त्री० अ० व०** अनेक जावा (नवऱ्याच्या भावांच्या बायका). **जावळी भावळी** [**म०**जाऊ+भाऊजी] **वि०**अनेक भाऊ एकत्रपणांत असल्यामुळें एकाचेंच तंत्रानें चालत नाहीं तो (प्रपंच किं० व्यवहार). **जावळीहळद स्त्री०** लठ्ठ, पिवळी, आणि मऊ अशा हळदीची जात.

जावळें [**सं०**यमल=जुळें मूल] **न०** जुळें मूल.

जावा [**म०** जाणें] **पु०** जाणें; याच्या उलट ' येवा. ' ꕥ **येवा व्हावा, जावा न व्हावा, येवा बरा जावा वाईट** पैसा, प्रिय नातलग, इ० घरांत आल्यानें आनंद होतो आणि गेल्यानें दुःख होतें. **जावा येवा** [**म०** जाणें+येणें] **पु०** १ जाणें आणि येणें. येरझारा. २ व्यर्थ हेलपाटे. ३ जाण्या-येण्यानें उत्पन्न झालेला घरोबा; दळणवळण.

जांवाई इ० मागें ' जांवई ' इत्यादि पहा.

जावू, जाऊ स्त्री०पतीच्या भावाची बायको.

जासूद [**अ०** जासूस] **पु०** कासीद; हलकारा; पत्रें, निरोप, इ० पोचविणारा. ꕥ**जासुदी स्त्री०** जासुदाचें काम किं० पेशा किं० त्याला दिलेलें वेतन. **जासुदी जोडा पु०** जाडी, ओबडधोबड,आणि बेघाट जोडा (पायांत घालण्याचा). **जासूदगिरी स्त्री०** जासुदाचा धंदा किं० कर्तव्य. **जासूदजोडी स्त्री०** एकाच कामावर जोडीनें पाठविलेले दोन जासूद.

जास्त, ज्यास्ती [**अ०** जियादाह]**वि०**अधिक.

जास्ती [**अ०** जियादाह] **स्त्री०** जुलूम, जोर.

जास्वंद, जास्वन, जास्वंदी स्त्री० एक पुष्पवृक्ष.

जाहगीर, जाहागिरी [**फा०** जागीर] **स्त्री०** फौजेच्या खर्चासाठीं, इतमामासाठीं, किं० इनाम धर्मादाय म्हणून सरकारनें कोणा इसमास दिलेला मुलूख किं० गांव. ꕥ**जाहागीरदार पु०** ज्याला सरकारनें जहागीर दिली आहे तो.

जाहंबाज(–द), जहांबाज(--द) [**फा०**]. १ पक्का; वस्ताद. २ अट्टल. ३ भांडखोर. ४ कुशल किं० निष्णात (गाणारा, लिहिणारा, खेळणारा, इ०).

जाहली [**हिं०** जहाल] **स्त्री०** उग्रपणा; तिखटपणा; प्रखरपणा.

जाहिरात[**अ०**] **स्त्री०** प्रसिद्धिपत्रक. जाहीरनामा; सर्व लोकांस कांहीं गोष्ट कळावी म्हणून दवंडी पिटवून किं० वर्तमानपत्रादिकांच्या द्वारें कळविणें किं०अशा रीतीनें कळविलेली गोष्ट. खालीं ' जाहीर ' पहा.

जाहीर [**अ०** जाहिर] **वि०** सर्वांस कळलेलें किं० कळविलेलें; सर्वांस ठाऊक असलेलें; सर्वविश्रुत. ꕥ **जाहीरनामा पु०** प्रसिद्धिपत्रक; कांहीं गोष्ट सर्व जनतेस: कळावी म्हणून प्रसिद्ध केलेला मजकूर किं० तो मजकूर ज्यावर लिहिला किं० छापला आहे तो कागद.

जाळ [**सं०** जाल] **स्त्री०** झाडाझुडपांच्या

समुदायांची गुंतागुंत किं० अशा गुंतागुंतींतील रिकामी किं० मोकळी जागा.

जाळ [सं० ज्वाला] **पु०** १ अग्नीची ज्वाळा. २ ज्वराची रखरख. ३ संतापाची किं० रागाची लहर किं० उद्भव किं० आवेग. ꠸ **तापजाळ पु०** ताप, तापत्रीप. **जाळावांचून कढ नाहीं मायेवांचून रड नाहीं** चुलीत जाळ असल्याशिवाय वर ठेविलेल्या भांड्यांतील पाणी इ०ना कढ येणें शक्य नाहीं, त्याप्रमाणें अंत:करणांत खरी माया असल्याशिवाय रडें येणें शक्य नाहीं. **डोळ्यांना किं० हातापायांना जाळ उठणें** ते संतप्त होणें, त्यांची आग होणें.

जाळगा [**म०** जाळ] **वि०** हट्टी, दुराग्रही (मूल, माणूस).

जाळण स्त्री० न० सर्पणाचीं लाकडें, काटक्या-कुटक्या इ० समुच्चयानें.

जाळणूक, जाळणी [**म०** जाळणें] **स्त्री०** छळ; सतावणी.

जाळणें [**सं०** ज्वल्] **स० क्रि०** १ दग्ध करणें; भस्मसात् करणें. २ छळणें, गांजणें, सतावणें, उपद्रविणें; उ० तो आपल्या बायकोस दिवसभर जाळतो. ३ टाकाऊ समजणें; त्याज्य म्हणून फेकून देणें. ꠸**पाणी जाळणें** नवीन प्राप्त झालेल्या वैभवामुळें बेफामपणें वागणें, किं० उन्मत्तपणाचें वर्तन करणें. **वेळीं उत्तरें देतां आलीं नाहींत तर तुझा अभ्यास काय जाळावयाचा आहे ?** म्ह० त्याचा काय उपयोग ? **पोट जाळणें** अनेक खटपटी करून, कष्ट सोसून, लोकांचीं हीनपणा आणणारीं कामें करून, लोकांचीं दुरुत्तरें सोसून, पोट भरणें; उ० पोट जाळावयासाठीं मीं ही नोकरी पथकरली आहे. **जाळपोळ स्त्री०** १ शत्रु किं० दरवडेखोर इ०नीं लोकांचीं घरेंदारें इ० जाळून केलेली नासाडी; उ० पेंढाऱ्यांनीं त्या मुलखांत भारी जाळपोळ करून खूप पैसा नेला. २ शेतकीसाठीं जमीन भाजणें आणि त्याच्या अंगभूत इतर कामें समुच्चयानें. 'जाळभाज,' 'जाळपोळी' हे ह्याच अर्थाचे शब्द आहेत. **जाळपुळी स्त्री०** एक प्रकारची पुळी अंगावर उठते ती. **जाळवात पु०** हातापायांची आग होणें, त्यांना भेगा पडणें, इ०रूप जी विकृति ती. **जाळ्या, जाळ्या पु०** गुळाच्या कारखान्यांत उसाचा रस ज्या काहिलींत कढावयाला ठेविलेला असतो तिच्याखालीं सर्पण घालावयाला बसलेला इसम. **जाळाऊ वि०** जाळावयाचा; जाळावयाच्या लायकीचा. 'जळाऊ' हाही याच अर्थाचा शब्द आहे.

जाळी [**सं०** जाल] **स्त्री०** १ झाडांझुडपांची गुंतागुंत. २ गुंतलेलीं झाडेंझुडपें. ३ मखर इ०च्या शोभेसाठीं कागद इ० कातरून करतात तो नक्षीदार पदार्थ. ४ भोंवरा फिरवावयाची दोरी. ꠸**जाळीदार वि०** १ ज्यास जाळ्या लाविल्या आहेत असें (मखर, इ०). २ जाळ्यासारखें किं० जाळ्या असलेलें (कापड इ०).

जाळें [**सं०** जाल] **न०** १ मासे धरावयासाठीं कोळी लोक करतात किं० गोंवऱ्या वगैरे ठेवण्यासाठीं किं० दुसरीकडे वाहून नेण्यासाठीं सुतळी, दोरी, इ०ची मध्यें घरें राहातील अशाप्रकारें केलेली गुंफणी किं० वीण. २ घरांमध्यें कोळी ह्या नांवाचे जे क्षुद्र जंतु त्यांनीं आपल्या अंगांतून काढलेल्या तंतूंची माशा इ० पकडावयासाठीं केलेली रचना. ३ फुलांची कांहीं विशिष्ट प्रकारची गुंफणी किं० रचना. ४ (लक्षणेनें) अति जीर्ण झालेलें आणि भोकें पडलेलें वस्त्र. ५ अत्यंत विरळ विणीचें वस्त्र,—जें नेसलें असतां किं० अंगावर घेतलें असतां अंग दिसतें. ६ चाळणीचा भोकें पाडलेला तळ. ७ कोळ्याचें तंतुमय घर. ८ तांबटाची भट्टी. ९ कोष्ट्याचें एक साधनविशेष.

जिकडचा(—ला), जिकडील [**म०** जिकडे] **वि०** ज्या बाजूचा, दिशेचा, किं० जागेचा.

जिकडून [**म०** जिकडे] **क्रि० वि०** ज्या दिशेहून किं० स्थळाहून; ज्या उगमापासून. ꠸**जिकडून तिकडून क्रि० वि०** सर्व बाजूंकडून.

जिकडे [**म०** जो+कडे] **क्रि० वि०** ज्या दिशेकडे किं० स्थानाकडे. ꠸ **जिकडे तिकडे क्रि० वि०** सर्व दिशांकडे; साऱ्या बाजूंनीं; सर्वत्र.

जिंकणाभानी, जिंकणूक स्त्री० कवड्या इ० खेळांत जिंकलें असतां कवड्या इ० द्यावयाच्या संकेतानें जो खेळण्याचा प्रकार तो.

जिंकणें [**सं०** जि] **स० क्रि०** १ युद्धांत, वादांत, इ० त (प्रतिपक्षाला) पराजित करणें. २

जिंकून मिळविणें. ३ खालच्या पाहिरीस लोटणें; उ० तुझ्या मुखानें चंद्रकांति जिंकली. ४ आटो-क्यांत किं० नियंत्रणेंत ठेवणें; उ० ज्याणें काम-क्रोधादि षड्रिपु जिंकले तो सुखी. ॐ **एकाद्याची ऊब जिंकणें** त्याचा दरारा, भीति, भीड इ० वाटावयाच्या स्थितींतून बाहेर पडणें म्ह० ती वाटेनाशी होणें. **अ० क्रि०** जबाबदारींतून मोकळें होणें किं० पार पडणें; उ० हें एवढें मुलीचें लग्न तडीस गेलें म्हणजे जिंकलें.

जिकीर [अ० जिक्र्=बोलणें, वाटाघाट करणें] **स्त्री०** १ कटकट, घासाघीस, ओढाताण (करणें, लावणें). २ चिकित्सेखोरपणा; चोखंदळेपणा. ३ चरफड (आजाऱ्याची). ४ मेटाकुटीस येण्याची स्थिति; नाइलाजाची स्थिति; अत्यंत त्रास झाल्याची स्थिति. ॐ **जिकीरीस येणें** फार त्रासून जाणें.

जिक्क [अ० दक्] **वि०** अगदीं त्रस्त; कंटा-ळून गेलेला; उ० इतके दिवस मी थाटांत संसार केला पण आतां बायको मेल्यापासून मी जिक्क होऊन गेलों आहें.

जिगाजिग स्त्री० १ कटकट, त्रास. २ परिश्रम, खटपट. **वि०** जर्जर; त्रासलेला.

जिगरें न० भाताची एक जात.

जिगीषा [**सं०**] **स्त्री०**१ जिंकण्याची इच्छा.२ स्पर्धा. ३ महत्त्वाकांक्षा.

जिगीषु [**सं०**] **वि०** १ जिंकण्याची इच्छा करणारा. २ उत्कर्ष मिळवूं पाहाणारा.

जिजी स्त्री० १ वडील बहीण. २ कोणीही मानाई स्त्री.

जिणणें स० क्रि० जिंकणें.

जिणें [**सं०** जीव्] **अ० क्रि०** जीवंत राहाणें. जगणें. **न०** जिवंतपणाची स्थिति; आयुष्य; जन्म; जीवित; उ० धिक् त्याचें जिणें कीं जो मायभूमीस स्मरत नाहीं !

जित [**सं०**] **वि०** जिंकलेला; पराभविलेला; आटोक्यांत ठेविलेला; नियंत्रित केलेला; उ० जित-काम, म्ह० जिंकला आहे काम ज्याणें; कामजित म्ह० कामविकारानें पछाडलेला.

जित [**सं०** जित] **स्त्री०** १ जिंकून घेणें. २ जें जिंकून घेतलें तें. ३ जिंकलें गेल्याची स्थिति.

जित [**म०** जिवंत] **वि०** १ जिवंत. २ मूर्ति-मंत. उ० जित भूत, समंध, अवदसा, इ०. ह्या दोन्ही अर्थी ' जिवंत ' असाही शब्द योजण्यांत येतो. ॐ **जितकोळसा पु०** रखरखीत निखारा. २ उग्र आणि तापट माणूस;

जितका वि० ज्या प्रमाणाचा किं०परिमाणाचा किं० मापाचा; उ० तुला जितके रुपये पाहिजे आहेत तितके मी तुला देईन. ॐ **जितक्यास तितका वि०** अगदीं बेताचा.

जितखोर [**अ०** जिद्=तंटा] **वि०** १ तंटे-खोर; जिकीर करणारा; भांडखोर. २ हट्टी, दुराग्रही.

जिंतणें, जितणें वर ' जिंकणें ' पहा.

जितपत वि० जितका. **क्रि० वि०** ज्या प्रमाणांत.

जितराब खालीं ' जित्राब ' पहा.

जितवणी [**म०** जिवंत पाणी] **न०** १ वाहातें पाणी; झरा. २ जीवनोपाय; चरितार्थाचें साधन.

जिता [**म०** जिवंत] **वि०**१ज्याचें ठायीं प्राण आहे असा; जिवंत; उ०जित्याची खोड मेल्यावांचून जात नाहीं.२सतत वाहाणारा (झरा). ३ जिवंत झऱ्याचें(पाणी).४ प्रज्वलित होण्याजोगा(अग्नि). ५ भस्म न केलेला म्हणजे न मारलेला (धातु,–ताम्रादि). ६ प्रचलित किं० रूढ असलेली (वहि-वाट, शास्त्र, कला, इ०). ७ जागरूक (प्रमाण इ०). ८ पुरेतेपणीं न वाळूं देतां कापलेलें (भात, गवत,इ०). ॐ **जित्या रोटी मेल्या माती** मनुष्य जिवंत आहे तोपर्यंत त्याला खाऊं घालणें आणि मेल्यावर त्याचा विधिपूर्वक अंत्यसंस्कार करणें (आपलें कर्तव्य आहे).**जिती भाषा स्त्री०** हल्लीं प्रचलित अशी भाषा; उ० मराठी ही जिती भाषा आहे; संस्कृत ही मृत भाषा आहे. **जित्या पंथास लागणें** कांहीं भयंकर आजारांतून बरें होऊन उठणें. **जिता कीं मेला वि०** अगदीं गप्प; अगदीं चाप.**एकाद्याला जिता की मेला करणें** त्याला खूप चोप देणें. **जिता कोळसा पु०**१ प्रज्वलित लाकडें मातींत पुरून ठेवून केलेला कोळसा, जळत्या लाक-डावर पाणी ओतून केलेला कोळसा 'मेलेला कोळसा.' २जळत कोळसा जो शरीरावर रोगाचा इलाज म्हणून चेपला जातो. ३ ताबडतोब पेटणारा कोळसा,–एरंड

इ० झाडांच्या लाकडाचा. **जिता जागता** वि० १ पूर्ण सावध. २ पूर्ण जागरूक किं० दक्ष. ३ धडधडीत जिवंत; जिवंतपणाचे सर्व व्यापार करावयाला समर्थ; उ० जित्या जागत्याची उपासमार करणें पाप होय. **जिता जीव** पु० १ जिवंत माणूस किं० प्राणी; उ० जिता जीव मारणें हें खाटीकच करूं जाणें. **जिता पिशाच**, (किं० **समंध**) पु० अति उग्र किं० द्वाड माणूस (लक्षणेनें). **जिती अवदसा** स्त्री० अति उग्र किं० द्वाड किं० भयंकर स्त्री.

जिताड [म० जिता] स्त्री० शेतांतील आजूबाजूंचीं रोपें किं० ताटें जळून गेलीं असतां मध्यें जो टापू टिकून राहतो तो.

जिताडा (-रा) [म० जिता] पु० उन्हाळ्या दिवसांत पाण्याच्या आश्रयाला उगवतें तें गवत.

जितासु [म० जिता] वि० वाहतें (पाणी, ओढा, इ०).

जित्रब [म० जित (जिवंत) +राब] न० १ शेतांतील उभें पीक किं० बागेंत तयार होऊन फळास आलेलीं झाडें,—केळी, कलिंगडी, चिभडी, पानवेली, इ० समुच्चयानें. २ प्रत्यक्ष किं० अप्रत्यक्ष रीत्या शेतकामाच्या उपयोगाचीं जनावरें,—गायी, बैल, घोडा, इ० समुच्चयानें. ꕥ **कांद्याचें कोरड्यास, मानभावाची बायको, आणि गाढवाचें जित्रब ह्यांत श्रम नाहींत** हीं तीन्हीं बिनखर्चाचीं पण उपयोगी पडणारीं असतात. **जिनजित्रब** न० १ शेतांतील उभें पीक. २ मळे, बागा, इ० तील फळास आलेलीं झाडें समुच्चयानें.

जिथचा, जिथला, जिथून, जिथें तिथें इ० जेथचा, जेथला, जेथून, जेथें तेथें, इ०.

जिंद [अ० जिन्] पु० १ मेलेल्या मुसलमानाचें भूत. २ दुष्ट मनुष्य.

जिंदगी [फा०] स्त्री० १ जिवंतपणाची स्थिति. २ चरितार्थाचीं साधनें समुच्चयानें. ३ मालमत्ता. ४ घोडे, गायी, म्हशी, इ० आपल्या मालकीचे प्राणी समुच्चयानें.

जिद्द [अ०] स्त्री० हट्ट; दुराग्रह; आडदांडपणा; आडमुठेपणा. ꕥ **जिद्दखोर, जिद्दी** वि० हट्टी; हेकट; आडमुठा.

जिन [सं०] पु० १ जैन किं० बौद्ध यांचा ईश्वर. २ त्रिकालज्ञ साधु. ꕥ **जिनेश्वर** [सं०] पु० श्रावक किं० जैन लोकांचा साधु.

जिनगर [फा०] पु० खोगिरें, बाहुल्या, मातीचीं चित्रें, इ० करणारा कारागीर.

जिनगानी, जिनगी [फा०] स्त्री० १ प्राण धारण करून असण्याची स्थिति. २ आयुष्य; आयुष्याची मर्यादा. ३ जीवित; जीवितक्रम; उ० थुः तुझ्या जिनगानीवर !

जिनपैरा पु० शेतकी कामासाठीं शेजारच्या शेतकऱ्याकडून उसना घेतलेला गडी. पैरा म्ह० मजूर,—दिवसाच्या मजूरीवर ठरविलेला.

जिनशी [फा० जिन्स्] वि० व्यापारी माल वाहाणारें (गलबत, तारूं, इ०).

जिना [फा० जीनाह] पु० खालीं उतरावयासाठीं किं० वर चढावयासाठीं केलेल्या पाहिऱ्यांची परंपरा; सोपान; दादर.

जिन्नस [अ० जिन्स्] स्त्री० १ कोणतीही वस्तु; पदार्थ. २ क्रयविक्रयाचा पदार्थ; व्यापारी माल. ꕥ **जिन्नसखाना** पु० तेल, तूप, साखर, इ० पदार्थ सुरक्षित ठेवण्याची खोली; कोठी. **जिन्नसपाल्लल** पु० १ हरएक प्रकारचा माल. २ हरएक प्रकारचे संसारोपयोगी पदार्थ. **जिन्नसभाव** पु० पदार्थाचा बाजारांतील दर. **जिन्नसवार** वि० १ सुंदर, चमत्कारिक तऱ्हेचें (वस्त्र, पात्र, दागिना, इ०); उ० तुम्हाला बाजारांत एकादें जिन्नसवार चीट आढळलें तर माझ्या नातीच्या परकरासाठीं विकत आणा. २ अनेक रंगांचा, जातींचा, किं० तऱ्हांचा; उ० सारीं एकाच जातीचीं फुलें आणूं नको, जिनसवार आण. ३ नामनिर्देश करून तपशिलासह केलेली (यादी किं० लेख). **जिनसाना, जिन्नस जिनसाना** वि० १ सुंदर. २ वरच्या दर्जाचा; उंची. **जिन्नसी** वि० १ वाहातुकीचें (गलबत, इ०). २ ज्यांत माल भरलेला आहे असें (गलबत इ०).

जिबूड, जिभूड, चिबूड स्त्री० कालिंगडाच्या जातीचें एक फळझाड. न० त्या झाडाचें फळ.

जिभई [सं० जिव्हा; म० जीभ] स्त्री० कोष्टयाच्या मागाचा एक भागविशेष.

जिभली [सं० जिव्हा; म० जीभ] स्त्री० १ (लहान मुलाची) जीभ. २ जीभ (तुच्छतेनें किं० प्रेमानें); उ० ही बातमी मी सांगणार नव्हतों पण आमच्या मुलाची जिभली नाचली किं० वाहवली (म्ह० तो बोलून गेला!) ३ साप, राघू, इ० ची जीभ. ४

प्राण्याच्या जिभेखालच्या दोन जाडी शिरा. ५ विहिरींच्या भिंतींवर उगवणारी एक वनस्पति.

जिभळी [म०जीभ;सं०जिव्हा]**स्त्री**०जीभ खरवडून साफ करण्याचें साधन. **जिभळ्या स्त्री०अ०व**०मुखाच्या कोपऱ्यांकडचे भाग.

जिभाळी, जिभोळी [म० जीभ] **स्त्री**० नखाखालचा नाजूक भाग.

जिभी [**म**० जीभ]**स्त्री**० जीभ खरवडून साफ करण्याचें साधन.

जिम्मा [अ० जिमाह्=पथकर] **पु**० १ आपल्या ताब्यांत किं० रक्षणांत घेणें; उ० हे दागिने तुम्ही आपल्या जिम्मेंत घ्या.२ पथकर; उ० रामभाऊकडून पैसे वसूल करण्याचा जिम्मा तुम्ही घेतां काय ? ꣸ **जिम्मा पारख** (–क) [अ० जिमाह्=पथकर; फारग्=मुक्त] **वि**०जबाबदारीतून मोकळा झालेला; ज्यानें जबाबदारी निस्तरली आहे असा. **जिम्मेदार पु**० हमी घेणारा; जबाबदारी घेणारा; जामीन राहिलेला.

जिरगा पु० साळींत एक जात आहे ती.

जिरणी स्त्री० एक झुडूप.

जिरणी [**म**० जिरणें] **स्त्री**० १ मुरणें;प्रविष्ट होणें; निविष्ट होणें. २ नष्ट होणें. **टीप**– या शब्दाचा बहुधा प्रथमाविभक्तींत प्रयोग होत नाहीं. ꣸**गोविंदाचा ताप जिरणीस पडला** ह्म० त्याच्या तापाला उतारदशा लागली किं०तो शमत चालला आहे. **मला तंबाखू जिरणीस पडला** तो माझ्या अंगवळणी पडला म्ह० मला तो खाऊन उचकी किं० ओकारी येत नाहीं.**जिरणीस पडणें**. १ अपायकारक न होणें. २ मानवणें. ३पचूं लागणें.

जिरणें [**सं**०जॄ=जीर्ण होणें, नाश पावणें, पचणें] **अ० क्रि**० १ मुरणें; उ० पाणी जमीनींत जिरलें. २खाल्लेल्या अन्नाची पोटांत विल्हेवाट होणें. ३शमणें;शांत होणें;उ०माझ्यावर लाच खाल्ल्याचें किटाळ आलें आहे तें जिरल्यावर मी मुलीच्या लग्नाचा विचार करीन.४ वाढीकडून कुंठित होणें; अपेक्षिलेली वाढ न होणें. ५ नष्ट होणें; प्रतिकारामुळें किं० अडथळ्यामुळें कांहीं कार्य किं० परिणाम बंद पडणें. ६ पचनीं पडणें.७अपायकारक परिणाम न घडविणें.८फाजती पावणें.꣸**गर्भ जिरणें** गर्भाची वाढ कुंठित होणें.**गळूं जिरणें** तें न पिकतां,न फुटतां किं० न निचरतां, वरें होणें. **ताप जिरणें** घाम न येतां ताप शमणें. **अभिमान जिरणें** तो अस्थानीं आहे असें कळून आल्यावरून तो लोपणें.**हरामाचा माल जिरत नाहीं**१तो सुखावह होत नाहीं; तो अपायकारक होतो. २ तो उघडकीस येतो. **तुझी ही लबाडी जिरणार नाहीं** तीं उघडकीस येईल आणि तूं शिक्षेला पात्र होशील. **त्या पेटींत आतां हा हातरुमाल देखील जिरणार नाहीं** तो तींत मावणार नाहीं. **इतकें एरंडेल घेतलें पण तें जिरलें** त्यानें रेच झाला नाहीं. **हे भाड्याचे दहा रुपये बाजूस ठेव, नाहींतर ते संसारांत जिरतील** ते खर्च केले जातील.**टीप**—'जिरणें'ह्या क्रियापदाचा कर्ता रग, मस्ती, इ० अध्याहृत ठेवून भावकर्तरि प्रयोगांत तें आलकिडे घालण्यांत येऊं लागलें आहे. वर अर्थ ८ह्या धोरणावर आम्ही दिला आहे; उ०आतां कशी जिरली ! उ० आतां रामा जिरेल !

जिरमाणी [**म**० जिरणें] **स्त्री**० १ जिरलें जाण्याची स्थिति; जिरून जाणें. २ परिणामरहित होणें. ꣸ **जिरमाणीस पडणें, जिरमाणीं पडणें** १ सुपरिणाम घडविणारें होणें; मानवणें. २ दुष्परिणाम न घडविणारें होणें. [करणारें औषध.

जिरवण[म०जिराविणें]**न**० पचनक्रिया उद्दीपित

जिरवणी [**म**० जिरविणें] **स्त्री**० १ खाल्लेलें अन्न जिरावें म्हणून जें पेय घेतात तें. २ खाल्लेला पैसा उघडकीस न यावा म्हणून केलेल्या युक्त्या किं० सांगितलेल्या सबबी समुच्चयानें. ꣸ **जिरवणीचा पाऊस पु**० ज्याचें पाणी जमीनींतच मुरतें किं० ज्याचें पाणी वाहून जाण्याइतकें पुष्कळ नसतें, असा पाऊस. याच्या उलट ' वाहवणीचा पाऊस. '

जिरविणें [म०'जिरणें'चें प्रयोजक]**स**०**क्रि**०१ आंत शोषिलें जाईल किं०समाविष्ट होईल असें करणें. २कांहीं अडचण किं०अपाय न होईल अशा रीतीनें (एकादा पदार्थ) खाणें, (बारदानांत कांहीं वस्तु) भरणें, (लांच) घेणें, किं०(लबाडी)पचविणें, इ०.

जिरवेल स्त्री० भाताची एक जात.

जिराईत,जिरायत [**अ**० जिराअत] **न**० १ शेतकीची जमीन. बागाईत ह्म० बागेची

जमीन. २ पावसाच्या पाण्यावर होणारें पीक. ● **जिराइती, जिरायती वि०** पावसाच्या पाण्यावर होणारें (पीक) किं० ह्या पिकासंबंधाची (पहाणी, मोजणी, वसूली, इ०). **जिराइ (–य–) तखाना, जिरात(–द–)खाना पु०** धान्याचें काठोर.

जिरीं, ' जिरें ' पहा.

जिरें [**सं०**जीर]**न०**मसाल्यांत घालावयाच्या उपयोगाचें एक बीजविशेष. ● **जिरेंमिरें, जिरूंमिरूं न०** मसाल्यांत घालतात जे जिरे, मिरे, इ० पदार्थ ते समुच्चयानें. **जिरेपाक पु०** जिरें इ०अनेक पदार्थ एकत्र करून त्यांचा वैद्यलोक करतात तो पाक. **जिरेंसाळ स्त्री०** तांदुळाची एक जात; हिचा दाणा बारीक असतो.

जिरेळ, जिरेळी स्त्री० एक प्रकारची केळ. **जिरेळें न०** ह्या केळीचें फळ.

जिलकाद [**अ०** जीअल्क् अदाह्] **पु०** मुसलमानी सालाचा अकरावा महिना.

जिलबी, जिलिबी [**हिं०**] **स्त्री०** एक वेटोळेदार पक्वान्न.हें ख्याचें असून तुपांत तळून पाकांत बुडविलेलें असतें.

जिलीब [**अ०**] **स्त्री०** राजा, सरदार, किं० कोणी वडा आदमी चालत असतां त्याच्या बरोबर जे शिपाई, प्यादे, स्वार, इ० चालत असतात ते समुच्चयानें. ● **जिलीबदार पु०**जिलीब ह्या घोळक्यांपैकीं एक व्यक्ति.

जिल्हई, जिल्ह, जिल्हे, झिलई [**अ०**जिला] **स्त्री०** चकाकी; तकाकी; तजेला, उजळा. ●**जिल्हेग(–गा–)र पु०**पदार्थांना उजळा देतो तो कारागीर. **जिल्हेदार वि०** चकचकीत; ज्याला झिलई केलेली आहे असें.

जिल्हा [**अ०** जिल्अ] **पू०** १ देशाच्या राजकीय विभागांपैकीं कांहीं मर्यादांनीं विशिष्ट असा एक भाग. मुंबई इलाख्यांत जिल्हे आहेत, प्रत्येक जिल्हांत तालुके आहेत, प्रत्येक तालुक्यांत गावें आहेत. २ लिहावयाच्या बंदाचे उभे चार रकाने होतील अशा रीतीनें घड्या घातल्या असतां उजवीकडची किं०डावीकडची अर्धी बाजू; ह्या प्रत्येक बाजूंत दोन दोन रकाने येतात. ३ संगोतींतील मिश्र राग. ● **जिल्हेस क्रि० वि०** वर अर्थ २ मध्यें सांगितल्याप्रकारें बंदाचे दोन जिल्हे होतात; त्यांपैकीं कौल म्हणजे कांहीं विशिष्ट करार करणारा आणि करून घेणारा ह्या दोघांच्या सह्या उजव्या जिल्ह्यांत (जिल्हेस)असतात, आणि साक्षीदारांच्या सह्या डाव्या जिल्ह्यांत (जिल्हेस) असतात. ' जिल्हा-ह्याचें ' स ' प्रत्ययान्त रूप ' जिल्हेस 'असें होतें. **जिल्हेबीत न०, जिल्हेबीत रेघ स्त्री०** उजवीकडच्या किं० डावीकडच्या दोन रकान्यांतून (म्ह० प्रत्येक जिल्ह्यांतून) काढलेली आडवी रेघ (कारकुनांचा शब्द).

जिल्हें न० मासे धरण्याचें लहान जाळें.

जिल्हेज [**अ०** जियल्हज्] **पु०** मुसलमानी वर्षाचा बारावा महिना.

जिवट, जिवस [**म०**जीव] **वि०** १ कष्ट सोसण्यास समर्थ; कष्टाळू; विघ्नें आलीं तरी कार्य तडीस नेणारा (मनुष्य, पशु); प्रतिकूल परिस्थितींतही न खचणारा (मनुष्य), किं० न मरणारें (झाड). ४ भक्कम, मजबूत, पुष्कळ वापर पडल्यानें न मोडणारा, न फुटणारा, न झिजणारा (पदार्थ). ५फायदेशीर (व्यापार).

जिवडा [**म०** जीव; **सं०** जीव] **पु०** १ कोणताही सरपटणारा प्राणी (साप, कृमि, इ०). २ प्रियकर माणूस किं० पशु (प्रेमाचा शब्द).

जिवणी, जेवणी [**म०** जेवणें] **स्त्री०** मनुष्याचें मुख.

जिवंत [**सं०** जीवत्=जिवंत] **वि०** १ ज्याच्यांत जीव आहे असा (मनुष्य, पशु,झाड).२ ज्याच्यांत दाहकशक्ति आहे असा(अग्नि, निखारा); न विझलेला; झगझगीत.३वाढण्याची ज्यांत ताकद आहे असें (झाड); उ० हें झाड मेलेंसें तुम्हाला वाटतें पण तें जिवंत आहे हो, पावसाळ्यांत त्याला पानें येतील. ● **जिवंत कळा स्त्री०** जिवंतपणाची टवटवी; उ० तो आज सहा महिने आजारी आहे, त्याच्या तोंडावर बिलकूल जिवंत कळा नाहीं. **जिवंत कोळसा पु०** १ धगधगीत निखारा.२ पेटलेलीं लाकडें जमीनींत पुरून केलेला कोळसा. **जिवंत नरकवास पु०** १ अत्यंत दुःखमय स्थिति. २ अत्यंत घाणेरडें घर किं० तशा

घरांत वसति. **जिवंत पिशाच, जिवंत समंध** पु०अत्यन्त त्रासदायक आणि उपद्रवी माणूस.**जिवंत अवदसा** स्त्री० भारी उपद्रवी आणि त्रास्य मुलगी किं०स्त्री.**जिवंत भेट** स्त्री०आसन्नमरण अशा माणसाची भेट. **जिवंत समाध** (–धि)स्त्री० व्याधिग्रस्त माणूस जिवाला कंटाळून जिवंतपणीं स्वताला पुरून घेऊन ओढून घेतो तें मरण. **जिवंत हत्यार** न० तरवार किं० भाला,–जें हत्यार नेम न चुकतां मारणें शक्य असतें.याच्या उलट'मेलेलें हत्यार'म्हणजे बंदूक. **टीप**–'जिवंत' हा शब्द संस्कृतांत 'जीवत्' असा आहे. त्याचे पुढील सामासिक शब्द आहेत. **जीवत्पति, जीवद्भर्तृका** स्त्री० जिचा पति जिवंत आहे अशी स्त्री. **जीवत्पितृक** वि० १ ज्याचा बाप जिवंत आहे असा. २ ज्याचीं मातापितरें जिवंत आहेत असा. **जीवन्मातृक** वि० ज्याची आई जिवंत आहे असा.

जिवती [सं० जीवन्ती] स्त्री०एक देवता,–जिची प्रतिमा मुलांच्या गळ्यांत बांधतात.

जिवलग [म० जीव+लागणें] वि० अत्यंत प्रिय किं० आवडता (मित्र).

जिवविणें [म० ' जीव ' पासून] स०क्रि० जिवंत करणें.

जिवस [म० जीव] वि० चिवट; ज्यांत वीर्य, शक्ति, किं० वाढण्याची ताकद आहे असें (झाड, वेली, इ०).

जिवसा [म० जीव+सा (सारखा)] वि० प्रिय; आवडता.**✱तांदुळ जिवसे आणि पाहुणा जिवसा** पंचाइतीची स्थिति; आवडत्या पाहुण्याला चमचमीत खायें आणि पेयें खाऊं घालावीं असें वाटतें आणि तांदूळ इ० पदार्थ खर्च होतील म्हणून कचरत असावें,ही पंचाइतीची स्थिति होय.**पाहुणा जिवसा आणि तांदूळ जिवसे** पाहुण्यांचा सत्कार करणें आणि बेगमीचे पदार्थ राखून ठेवणें ह्या दोन्ही गोष्टी साधणें काठिण आहे.

जिवाचा [म० जीव; सं० जीव]वि०जिवासंबंधाचा. **टीप**– ' जीव ' चे सर्व सामासिक शब्द आणि वाकप्रचार ' जीव ' मध्यें पहा.

जिवाणूं, जिवाणें [म० जीव; सं० जीव] न० सापाच्या जातीचे सर्व सरपटणारे प्राणी.

जिव्हा [सं० जिह्वा=जीभ] स्त्री० बोलण्याच्या आणि चर्वणाच्या उपयोगाचा तोंडांतील लवचीक आणि मांसल अवयवविशेष; जीभ. **✱ जिव्हाग्र** न० जिभेचें टोक. **जिव्हादोष** पु० भाषणांत किं० शब्दोच्चारांत झालेली चूक (मुद्दाम केलेली नाहीं अशी).**जिव्हामूलीय** वि० जिभेच्या मूळांतून ज्याचा उच्चार होतो असा (वर्ण,–क, इ०); ह्याला 'कंठ्य' असेंही म्हणतात. **जिव्हारूढ** वि० हावें तेव्हा बोलून किं० म्हणून दाखवितां येईल असें म्ह० अगदीं पाठ असलेलें. **जिव्हा (किं० जीभ) वाकडी पडणें** १ अर्धांगवायूनें जीभ लटकी पडणें किं० न हालेशी होणें. २ न बोलावयाची गोष्ट गैरसावधपणें बोलून जाणें. **जिव्हा (किं० जीभ) विटाळणें** १ शिव्या देऊन किं० खोटें बोलून जीभ अपवित्र करणें.२ नालायक मनुष्यासाठीं रदबदली करणें किं० त्याची शिफारस करणें. **जिव्हा (किं० जीभ) हातीं धरणें** १ शिव्या देत सुटणें. २ खाण्याचे चोचले करणें. ३ आधाशासारखें खाणें. **जिव्हेला(किं०जिभेला) आढावेढा असणें** भाषणाची नियंत्रणा असणें; बोलावयाला हरकत असणें; उ० हें० काय तुम्ही भलभलतें बोलतां ? जिव्हेला (किं०जिभेला) कांहीं तरी आढावेढा असूं द्या(किं० आढावेढा घाला). **जिव्हा (किं० जीभ)चावलीशी करून बोलणें** संकोचवृत्तीनें बोलणें; नियंत्रितपणें बोलणें. **जिव्हा (किं० जीभ) जड होणें** शब्दोच्चार करावयाला जीभ असमर्थ होणें (करवंदें, जांभळें, विडा,इ० खाल्ल्यामुळें).**जिव्हा (किं० जीभ)जड असणें** १ स्पष्ट उच्चार करण्यास जीभ असमर्थ असणें. २ लवकर पाठ करावयाला असमर्थ असणें;उ०त्याची जिव्हा(किं०जीभ) जड आहे म्ह० त्याला लवकर पाठ होत नाहीं. **जिव्हा (किं० जीभ) झडणें** जीभ गळून पडणें; उ० मी खोटें बोलत असेन तर माझी जीभ झडो. **जिव्हा (किं० जीभ) नरकांत घालणें** १ खोटें बोलणें. २ बोललेली गोष्ट नाकबूल जाणें. ३ दिलेलें वचन न पुरविणें. **जिव्हा (किं० जीभ) पाघळणें** १ अनियंत्रितपणें बोलणें किं० बोलत सुटणें; स्वच्छंदानें बोलणें. २ गुप्त ठेवावयाची गोष्ट बोलणें (चुकीनें). **जिव्हा (किं० जीभ) मोकळी सोडणें** १ मन मानेल तें खाणें. २ स्वच्छंदानें किं० अनियंत्रितपणें बोलणें. **जिव्हा (किं०जीभ) वळ-**

वळणें १ बोलावयाला उत्सुक होणें किं० असणें. २ बोलावयाला तयार होणें; बोलण्याला (जीभ) समर्थ झालेली असणें; उ० ह्या मुलाची जिव्हा (किं० जीभ) वळवळूं लागली आहे; तें लवकर बोलूं लागेल असा रंग दिसतो. **एकाद्याची जिव्हा (किं० जीभ) सोकावणें** (किं० **लालचावणें**) तो खावयाला चटावलेला असणें; तो खाण्याला उत्सुक असणें; उ० रोज रोज पेढे खावयाला तुझी जिव्हा (किं० जीभ) सोकावली (किं० लालचावली) आहे. **जिव्हेचे (किं० जिभेचे) कुटाणे कुटणें** मुखांतून वक्तृत्वपूर्ण भाषण निघणें. **जिव्हेला (किं० जिभेला) चिमटा घेणें** एकादी रुचकर वस्तु खाण्यापासून किं०एकादी गोष्ट बोलणें जरूर असतां ती गोष्ट बोलण्यापासून निवृत्त होणें. **एकाद्याच्या जिव्हेला (किं० जिभेला) आडवा वेढा नसणें** तो मन मानेल तसें बोलणारा असणें (म्ह० स्थल, काल, इ०चा विचार न करतां). **जिव्हेचा (किं० जिभेचा) लोळा होणें** १ अत्यन्त उष्ण किं० तिखट किं० गार पदार्थ तोंडांत घातल्यामुळें जीभ हालविण्याची शक्ति एकदम नाहींशी होणें. २ अर्धांग वायूमुळें जीभ हालविण्याची शक्ति नाहींशी होणें. **जिव्हेला (किं० जिभेला) टाका देऊन एकादें खाद्य दुसऱ्यासाठीं राखून ठेवणें** आपली खाण्याची इच्छा आवरून धरून दुसऱ्याला ती खावयासाठीं राखून ठेवणें. **एकाद्याच्या जिव्हेला (किं० जिभेला) हाड नसणें** तो हावें तें अनियंत्रितपणें बोलणारा असणें; खोटें बोलावयाला त्याला तिळमात्र कचर वाटत नसणें. **एकाद्याची जिव्हा (किं० जीभ) लांब होणें** मन मानेल तसें, खोटेंनाटें, पाजीपणाचें, किं० मूर्खासारखें बोलण्याकडे त्याची प्रवृत्ति होणें. **जिव्हा (किं० जीभ) लांब करून बोलणें** स्थल, काळ, इ०मनांत न आणतां बोलणें.

जिव्हार [म० जीव] **न०** १ मर्म; रहस्य. २ काळीज, अंतःकरण. ३ अत्यन्त नाजूक भाग. ❀**जिव्हारीं क्रि०वि०**अत्यन्त नाजूक भागीं;मर्मीं.

जिव्हाळा [**सं०** जीव+आलय] **पु०** १ पदार्थविशेषाचा दर्जा, मूल्य, महत्त्व, इ० हीं ज्या गोष्टींवरून ठरवावयाचीं त्या गोष्टी समुच्चयानें; उ० ह्या विहिरीचा जिव्हाळा लहान म्हणून पाणी थोडें (म्ह० पाण्याचे झरे लहान आणि थोडे); उ० आमच्या संपत्तीचा जिव्हाळा बंद झाला,आतां पुढें संसार रेटणें कठिण होईल. २ ताकद,सामर्थ्य, शक्ति. ३ मनाची कांहीं विषय ग्रहण करण्याची शक्ति; उ० ह्या मुलाचा जिव्हाळा पाहून त्याला अभ्यास नेमून देत जा. ४ पदार्थाचें खरें स्वरूप. ५ एकाद्या पदार्थाबद्दल किं० माणसाबद्दल वाटतें तें प्रेम किं० काळजी किं० आपलेपणाची भावना; उ० ह्या कामाचा त्याला जिव्हाळा नाहीं; उ० दुखणेकऱ्याच्या शुश्रूषेला जिव्हाळ्याचें माणूस पाहिजे लागतें. ६ वीणा, इ०च्या तारा व घोडी यांच्यामध्यें जो कापूस किं० दोरा घालतात तो,—जो इकडे किं० तिकडे सरकविल्यानें स्वर उंच किं०नीच करतां येतो.७ शरीराचा अत्यंत नाजूक भाग;मर्मस्थान.८पदार्थविशेष सुस्थितींत राहण्याची त्याच्या अंगाची ताकद.९प्रेरकशक्ति.❀ **जिव्हाळीं लागणें** मर्मभेदक होणें; मर्मस्थानापर्यंत जाऊन पोंचणें; उ० तुझा शब्द माझ्या जिव्हाळीं लागला. **जिव्हाळ्याचा वि०** कैवार घेणारा; वाली.

जिष्णु [**सं०**] **वि०** १ जिंकणारा. २ जयशील. **पु०** १ इंद्र. २ विष्णु. ३ अर्जुन.

जिज्ञासा [**सं०**] **स्त्री०** १ जाणण्याची इच्छा. २ तपास, शोध. [२ मुमुक्षु.

जिज्ञासु [**सं०**] **वि०** १ जाणूं इच्छिणारा.

जी पु० पुरुषांच्या नांवांपुढें योजावयाचा प्रत्यय; उ० खंडूजी,उ० विठोजी. **उ० वा० अ०** कोणी हाक मारिली असतां तिचा स्वीकार केला असें सुचविणारा हा शब्द आहे; ओ. **टीप**—ह्या शब्दाचा ह्या अर्थी उपयोग वरच्या दर्जाचे लोक करीत नाहींत.❀**एकाद्यापुढें जी जी करणें** त्याची खुशामत करणें; त्याची हांजी हांजी करणें.

जी सर्वनाम 'जो' ह्याचें स्त्रीलिंगी एकवचनाचें रूप.

जीक, जिक वि० १ अगदीं दमून गेलेला. २ अगदीं कंटाळलेला किं० त्रासलेला.

जीत [**सं०** 'जित' पासून] **स्त्री०** १ जय. २ जिंकलेपणाची स्थिति. ३ कांहीं खेळांत पणाला लाविलेली किं० जिंकून घेतलेली वस्तु. ❀**हाराजित स्त्री० ए० व०** कांहीं कामांतील जयापजय, लाभालाभ, यश किं० अपयश.

जीत वि० मागें ' जिता ' पहा. ॐ **जीत सती** स्त्री० अत्यन्त पातिनिष्ठ स्त्री.

जीन [फा०] न० खोगीर, पलाण. ॐ **जीन-खोड** न० जीनाला बसविलेला खुंटा,—बसणाराला टेका घ्यावयासाठीं. **जिनगर** पु० खोगिरें, जिनें, लगाम, इ० बनविणाराची जाति किं० त्या जातीचा कोणीही इसम. **जिनगरी बाहुली** स्त्री० चिंध्यांची बाहुली.

जीभ [सं० जिह्वा] स्त्री० १ तोंडांतील अवयवविशेष; तो मांसल असून त्याला हाड नसतें. रसास्वाद घेणें, बोलणें, खावयाचा पदार्थ तोंडांत इकडून तिकडे लोटणें, इ० कामीं त्या अवयवाचा उपयोग होतो. २ नंदीबैलाच्या पाठीवर जिव्हेच्या आकारासारखें चर्म वाढतें तें. ३ जिभेच्या आकाराचा कोणताही पदार्थ. ॐ **उचलली जीभ आणि लावली टाळयाला** विचार न करतां बोलणें. **जीभ चावलीशी करून बोलणें** कचरत कचरत बोलणें; संकोचानें बोलणें. **त्याच्या जिभेला हाड नाहीं** तो हावें तें बोलतो; खोटें, असभ्यपणाचें, किं० वात्रटपणाचें, भाषण करणारा तो आहे. **जिभा काढणें** एकादा पदार्थ खावयासाठीं तो आशाळभुताप्रमाणें मागणें; उ० पेढ्यासाठीं अशा जिभा कां काढतोस ? कधीं पेढा खाल्ला होतास कीं नव्हतास ? **टीप**—एका मनुष्यास एकच जीभ असते परंतु रूढीनें अनेकवचनी रूप योजण्यांत येतें. **टीप**—जीभ ह्या शब्दाचे वाक्प्रचार 'जिव्हा' ह्या शब्दाच्यासारखे आहेत. मागें 'जिव्हा ' पहा. **जीभशिंदळ** वि० शिवराळ. [इंद्र.

जीमूत [सं०] पु० मेघ. ॐ **जीमूतवाहन** पु०

जीर पु० कोंवळें केळें.

जीर [फा०] स्त्री० लहान सांखळी.

जीर्ण [सं०] वि० १ फाटलेलें. २ जुनें, प्राचीन. ३ फार वापरल्यामुळें किं० घर्षण झाल्यामुळें अशक्त; नादुरुस्त, कमकुवत, खिळखिळें झालेलें. ४ फार दिवसांच्या आजारामुळें क्षीण आणि जर्जर झालेला (माणूस किं० पशु). ५ पचलेलें (अन्न). ६ अंगांत मुरलेला (ज्वर). ॐ **जीर्णज्वर** पु० बहुत दिवसांचा आणि हाडीं खिळलेला बारीक ज्वर. **जीर्णोद्धार** पु० १ मोडकळीस आलेलें जें देवालय इ० त्याची दागदुजी. २ जुनी झालेली देवाची मूर्ति काढून तिच्या जागीं नवी बसविण्याचा विधि.

जीव [सं०] पु० १ प्राण. २ जीवात्मा. ३ लिंगशरीर. ४ जीवित, आयुष्य. ५ प्राणी. ६ (ज्योतिष) पुष्य. ७ बृहस्पति. ८ चरितार्थाचें साधन. ९ पदार्थमात्राचे ठायीं उपयोगी पडण्याचें किं० टिकून राहाण्याचें जें सामर्थ्य असतें तें; वीर्य; उ० ह्या लुगड्यांत आतां कांहीं जीव राहिला नाहीं; उ० तुझ्या मदतींत कांहीं जीव नाहीं. १० पदार्थविशेषाची मूल्यवत्ता, फलदायकता, महत्त्व, किफायतशीरपणा, किं० मोहकता; उ० कापडाच्या व्यापारांत आतां जीव राहिला नाहीं. ११ तथ्यांश, खरेपणा; साधारता; उ० रामानें सांगितलेल्या बातमींत कांहीं जीव दिसत नाहीं. १२ मनाचा कल; प्रवृत्ति; उ० एक जीव म्हणतो तीं मुलगी पथकरावी; एक जीव म्हणतो न पथकरावी. ॐ **जीवांतक** पु० पारधी. **जीवात्मा** पु० देहाभिमानी आत्मा. **जीवलोक** पु० मृत्युलोक. **एकाद्याचा अर्धा जीव करणें** त्याला छळणें, सतावणें, किं० उपद्रावणें. **अर्धा जीव होणें** कष्टानें किं० भीतीनें आक्रान्त किं० जर्जर होणें; घाबरणें; भिणें. **एक जीव जाणें एक जीव येणें** अगदीं मरणासन्न स्थितींत असणें; आतां प्राण जातो कीं घटकेनें जातो अशा अवस्थेला पोंचलेलें असणें. **एकजीव होणें** (किं० **होऊन जाणें**) पूर्णपणें मिश्रित होणें; एकांत एक मिळून जाणें. **जीव आटणें** १ कामानें जर्जर होणें; दमून जाणें. २ काळजीनें झुरणीस लागणें. **एकाद्याचा जीव एकाद्या वस्तूवर टांगलेला** (किं० **अडकलेला**) **असणें** त्या वस्तूकडे त्याचें मन गेलेलें असणें; त्या वस्तूवर त्याचें मन बसलेलें असणें. **जीव टांगणीला लागणें** कांहीं गोष्ट अद्यापि घडली नाहीं म्हणून चिंताग्रस्त होणें; क्रि० वि० २ चिंताग्रस्त **जीव अधांतरीं उडणें** १ संभ्रान्त होणें. होणें. **जीव कालवणें** कासावीस होणें. **जीव कोरडा होणें** (किं० **पडणें**) दमणें; अशक्त होणें; कमजोर होणें; झिजणीस लागणें; व्याकुळ होणें (आजारानें, भुकेनें, श्रमानें, इ० नीं). **जीव सुकणें** म्लान किं० अशक्त किं० व्याकुळ होणें. **जीव खरडून** क्रि० वि० जोरानें; सर्व शक्ति खर्चून. **जीव खाऊन काम करणें** १ सर्व शक्ति खर्चून. २ फार दक्षतेनें. **एकाद्याचा जा**

घेणें (किं० खाणें) त्याला सतावणें किं० छळणें. जीव खालीं पडणें स्वस्थता पावणें; निश्चित होणें. जीव गोळा होणें भीतिग्रस्त होणें; कासावीस होणें; अस्वस्थ होणें; कष्टानें जर्जर होणें. जीव घेऊन पळणें प्राण वाचविण्यासाठीं पळत सुटणें; कांहीं संकट टाळण्यासाठीं पळत सुटणें. जीव जाळणें (किं० मारणें) कांहीं इच्छा किं०मनोविकार नियंत्रित करणें किं० आवरून धरणें. जीव टाकणें १ प्राण सोडणें, मरणें. २ निराश होणें. खचणें. २ अति उत्कंठेनें इच्छिणें; उ० पेढ्यासाठीं असा जीव टाकूं नको. जीव टाकून क्रि० वि० अति जोरानें; मोठ्या आवेशानें; फार कष्टानें किं० श्रमानें.जीव टाकून पळणें स्वताच्या बचावासाठीं पळत सुटणें. जीव ठिकाणीं नसणें चिंताग्रस्त होणें; अस्वस्थ असणें. जीव तोडून एकादें काम करणें मेहनतीनें, काळजीनें,किं०कुचराई न करतां तें करणें. जीव थाऱ्यावर नसणें चिंताग्रस्त होणें किं०अस्वस्थ असणें.जीव थोडथोडा होणें जिवाला काळजी, भीति,किं० अस्वस्थता वाटणें.जीव देणें आत्महत्या करणें. जीव धरणें वाढूं लागणें (झाड). जीव धरून उत्साहानें,मेहनतीनें. जीव पाखडणें रागानें तडफडणें;निराशेनें चरफडणें. ज्याचा जीव त्याला प्यारा १प्रत्येक मनुष्याला त्याचे प्राण आवडते असतात .२ प्रत्येक मनुष्य आपल्या जिवाची काळजी घेणारच.एकाद्या वस्तूवर जीव बसणें ती फार आवडणें;ती फार आवडूं लागणें. एकाद्याचा जीव भांड्यांत पडणें तो स्वस्थ किं०शांत होणें; त्याची काळजी दूर होणें; (बाजारांतून विकत आणलेला पदार्थ बारदानांत घातला गेला किं० पडला म्हणजे मुलें इ० तो उडवितील कीं काय ही काळजी दूर होते). जीव मुठींत धरून गत्यन्तर नाहीं म्हणून नावडती गोष्ट करावयाला सिद्ध होऊन; मनाचा धडा करून; मन घट्ट करून.जीव मोठा करणें १धैर्य धरणें,हिंमत बाळगणें.२औदार्य दाखवावयाला सिद्ध होणें.जीव राखून काम करणें कुचरपणानें तें करणें.जीव वर,धरणें उत्कंठेनें इच्छिणें; उ० थालिपिठासाठीं त्या पोरीनें जीव वर धरला होता.जीव कीं प्राण अत्यन्त मूल्यवान्;अति प्रिय. एकाद्याला जीव कीं प्राण करणें त्याला फार फार जपणें;त्याची अतिशय काळजी घेणें किं०निगा राखणें. एकाद्याच्या जिवांत जीव घालणें १ त्याला उत्तेजन देणें. २ त्याचें सांत्वन करणें. जिवाचें रान करणें फार कष्ट सोसणें. जिवांत जीव येणें निश्चित होणें;पुन्हा धैर्य धरणें;समाधान पावणें. जिवानिशीं क्रि० वि० १ जिवासकट म्ह० जीव जाईल अशा प्रकारें; उ० चार रुपड्यांच्या वाळ्यांसाठीं चोरांनीं त्या पोरीला जिवानिशीं ठार मारलें ! २ जीव न गमावून घेतां; उ० वाघाच्या तावडींतून मी जिवानिशीं पळून आलों. जिवानिशीं जाणें मरणें; उ० शेळी जाते जिवानिशीं आणि खाणार म्हणतो वातट ! जिवापलीकडे प्राणांहून अधिक किमतीचा; अति प्रिय.जिवावर स्वताच्या धमकीवर किं० हिमतीवर किं० बुद्धिसामर्थ्यावर; दुसऱ्याच्या मदतीवर न अवलंबतां. एकाद्याच्या जिवावर उठणें त्याचा जीव घ्यावयाला सिद्ध होणें. एकाद्याच्या जिवावर पोट भरणें त्याच्या पदरचें खाऊन राहाणें.एकाद्याच्या जिवावर उड्या मारणें त्याचा आश्रय, मदत, किं० पैसा मिळाला आहे किं० मिळणार आहे,ह्या भरंवशावर आनंद पावणें किं० बढाई मारणें किं० लांब लांब बाता झोकणें किं० चैन करणें. जिवावर उदार जीव जाण्याचा प्रसंग आला तरी न कचरणारा; जिवाची पर्वा न करणारा. जिवावरचा वि० ज्यांत जिवाला धोका आहे असा(प्रसंग,आजार,इ०).जिवावरचें आधण उतरणें एकाद्या कठिण प्रसंगांतून बचावणें किं० निभावणें. एकाद्याच्या जिवावर बेतणें तो जीव जाण्याच्या प्रसंगांत सांपडणें. जिवाला करवत लागणें अतिशय चिंता लागणें; मोठ्या विंवचनेंत पडणें. जिवास जीव देणें आपल्या मित्राचा जीव जात असला तर आपला जीव द्यावयाला सिद्ध होणें; मित्रावरचें संकट आपणावर ओढून घेणें. जिवास मुकणें मरणें; मृत्यु पावणें. जिवाशीं (किं० जीवीं) धरणें (किं० बांधणें) प्रिय मानणें; चहाणें; मूल्यवान् समजणें. जीवीं (किं० जिवीं) लागणें १ आवडीचा असणें; प्रिय वाटणें. २ मर्मभेदक वाटणें. जिवें वाचणें एकादें संकट टळून जिवंत राहाणें; जीव जाण्याचा प्रसंग आला असतां जीव न जातां बचावणें. जिवाचे चार चार करणें

चैन, विलास, इ०नीं स्वताला सुखी करण्याची खटपट करणें. **जिवांत जीव आहे तोंपर्यंत** सर्व आयुष्यभर; आमरण; जन्मभर. **जिवांत जीव येणें** कांहीं विवंचनेंतून मुक्त होणें; कांहीं काळजीचें निवारण होणें; स्वस्थ होणें. **जिवाचा धडा करणें** १ निरुपाय म्हणून एखादी दुःखाची स्थिति भोगावयाला सिद्ध होणें. २ साहसाचा प्रयत्न करावयाला तयार होणें. **कांहीं गोष्ट जिवाच्या गांठीं बांधणें** १ ती मनांत नीट ठसवून किं० बिंबवून घेणें. २ ती पक्की ध्यानांत धरून ठेवणें. **जिवाला खाणें** मनाला बोचत राहाणें; पश्चात्तापजनक होणें. **एखाद्याच्या जिवाचा घोट घेणें** त्याला सतावणें. **जिवाची ग्वाही** (किं० **पाखी**) **देणें** खात्रीपूर्वक सांगणें. **जिवाची हुल्लड करणें** नेटाचा प्रयत्न करणें. **जिवाचा** वि० प्रिय. **जिवाचा कलिजा(–दा), जिवाचा गडी** (**मित्र, वस्तु,ताईत,**इ०) वि०आपणाला अत्यन्त प्रिय माणूस.**जिवाचा सोबती** पु०१आपण मरेपर्यंत आपणासंगें राहाणारें (माणूस,–नवरा, मित्र,किं० व्यसन,रोग, इ०).२अत्यंत प्रिय मित्र.**जिवाजीपंत** पु० जीव, प्राण (विनोदांत). **जिवापाड** [म० जीव+पाड (किंमत)] क्रि० वि० सर्व जीव, शक्ति, किं० ताकद वेचून; नेटानें. **जिवाभ्यास** [म० जीव+अभ्यास] क्रि० वि० सर्व जीव लावून; मनापासून; उ० जिवाभ्यास श्रम करावे तेव्हांच यश येतें. **जिवाविशेष** वि० सोसण्याच्या शक्तीच्या पलीकडे केलेले (कष्ट, इ०). क्रि०वि० सोसण्याच्या मर्यादेपेक्षां अधिक प्रमाणांत. **जिवासांड** [म० जीव+सांडणें] वि० जीवित धोक्यांत घालणारें;जिवाला अपायकारक (आजार, कष्ट, इ०). **एखाद्याच्या जिवावर लाल होणें** (किं० **असणें**) तो आपणाला प्रिय म्हणून प्रिय होणें. **जिवापरता** वि० १ शरीराला सहन करावयाला कठिण (कष्ट, आजार, काळजी, इ०). २ अत्यंत प्रिय. **जिवाभावानें** क्रि० वि० प्रेमानें. **जिवावरचा लाग** पु० ज्यांत जिवाला धोका पोंचण्याचा संभव आहे असें काम, प्रवास, पत्करलेली नोकरी, इ०.

जीवन [सं०] न० १ जगणें. २ जिवंत करणें. ३ प्राण. ४ प्राणी. ५ निर्वाहाचें किं०चरितार्थाचें साधन. ६ अन्न. ॐ**जीवनकळा** स्त्री० जिवंतपणाचें तेज.

जीवित [सं०] न० १ प्राण. २ जगणें. ३ धंदा. ॐ **जीवितेश** पु० १ पति. २ यम.**जीवितसंशय** पु० प्राणसंकट; जिवाला धोका.

जीवी [सं० जीविन्] वि० समासाच्या शेवटीं याचा उपयोग होतो; उ० नौकाजीवी म्ह० नौका चालवून चरितार्थ करणारा; मांसजीवी म्ह० मांस खाऊन राहाणारा; इ०.

जुई [सं० यूथिका, यूथी] स्त्री० एक मधुर वासाची पुष्पवल्ली.

जुकड, जुखड [सं० युग] न० जूं, जोकड.

जुग [सं० युग] न० १ जूं. २ युग.

जुगणी स्त्री० १ छातीवर ल्यावयाचें रत्नखचित पदक. २ दोन वस्तूंचा संयोग किं० जुळणी.

जुगणें [सं० युज=जोडणें] अ० क्रि० १ दोन किं० अधिक पदार्थ एकाशीं एक संयुक्त होणें किं० जुळणें. २ (दोन माणसांचे विचार) मिळते असणें. ३ परस्परांशीं अविरुद्ध किं० अविसंवादी असणें;एकरूप होणें किं०असणें. २(अनेक सोंगट्या) एका घरांत येणें. ४ दोन माणसांतील बेबनाव नाहींसा होऊन त्यांच्यांत सख्य होणें.

जुगत [सं० युक्ति] स्त्री० हिकमत, युक्ति, शकल.

जुगदान न० १ कागद इ० ठेवण्याची पिशवी. ह्याच अर्थी ' जुजदान ' असाही शब्द आहे. २ सोंगट्यांचें जूग चालावयाच्या उपयोगी किं०जुगायाचे उपयोगी जो फाशावर डाव असतो तो.

जुगल,जुगुल [म० जुगणें] स्त्री० १संयोग; मिलाफ; एकरूपता; एकवाक्यता; अविरोधीपणाची स्थिति; परस्परांची अनुरूपता. २ गायनवादनांत केलेली साथ. ३ अनेक माणसांनीं एकत्र बसून ठरविलेली किं० केलेली युक्ति किं० खलबत.

जुगविणें [म० ' जुगणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ जोडणें; संयुक्त करणें.२ परस्परांशीं अविरोधी किं० अविसंवादी किं० अनुरूप करणें.

जुंगा वि० निपुण; निष्णात; हुशार.

जुंगाड न० १ झाडें झुडपें,वेली, इ०ची गुंतागुंत किं० जाळी. २ मोठ्या विस्ताराचा वृक्ष. ३

फार मोठा प्राणी किं०पदार्थ (मनुष्य, गाय, बैल, साप, हत्ती, इ०).

जुगार स्त्री० [पोर्तुगीज्] **स्त्री०, न०** पैसे लावून खेळणें; अमुक डाव पडला असतां अमुक द्रव्य इ० द्यावें किं० घ्यावें अशा शर्तीवर खेळतात तो खेळ; उ० घोडजुगार इ०. ॐ **जुगारी स्त्री०** वर ' जुगार ' पहा. **जुगारी (-र्‍या) वि०** जुगाराच्या व्यसनाला आसक्त असा (मनुष्य).

जुगुत [**सं०** युक्ति] **स्त्री०** १ युक्ति; शक्कल. २ खुबीदार रचना. ३ आदा आणि खर्च यांची तोंडमिळवणी; उ०शंभर रुपयांत कशीतरी संसार खर्चाची जुगत करतों.

जुगुप्सा [**सं०**] **स्त्री०** १ निंदा. २ वीट, किळस.

जुगुप्सित [**सं०**] **वि०** निंदित; निंद्य.

जुगुल वर ' जुगल ' पहा.

जुंज, जुंझ, झुंज[**सं०**]**स्त्री०**युद्धांत किं०कुस्तींत किं० मारामारींत दोन माणसांचें जुळणें; मारामारी; लढत.

जुंजणें, जुजणें, झुंजणें [**म०** जुंज] **अ० क्रि०** मारामारी, लढत, किं० कुस्ती,यासाठीं दोन माणसांनीं एकमेकांशीं जुळणें.

जुजता [**म०** जुजणें] **वि०** दोन विरुद्ध दिशांहून येऊन परस्परांस मिळणारे किं० भेटणारे (पदार्थ, पाणी, माणसें, रस्ते, इ०).

जुजदान न० कागद, सोंवळ्याची चिरगुटें, इ० ठेवण्यासाठीं केलेली पिशवी.

जुजरशी (-सी), जुजरुशी (-सी) स्त्री० १ पदार्थ, प्राणी, मनुष्य इ० ची घेतलेली काळजी किं० राखलेली निगा (ठेवणें, राखणें, करणें, पाहणें). २ काम करण्याची तत्परता किं०दक्षता.

जुंजार, जुंझार, झुंजार [**म०** जुंज, झुंज] **वि०** युद्धांत किं० कुस्तींत पटाईत. **न०** लढाई; कुस्ती; लढत; मारामारी.

जुटणें [**म०** जूट; **सं०** यूथ] **अ० क्रि०** १ संयुक्त होणें. २ एके ठिकाणीं जमणें किं० गोळा होणें. ३ परस्परांशीं ऐकमत्यानें किं० अविरोधानें मिळणें.

जुटी [**म०** जुटणें] **स्त्री०** १ जूट; ऐक्य. २ टोळी.

जुट्टा [**म०** जुटणें] **पु०** दहा कौलांचा गठ्ठा; दहा कौलें समुच्चयानें.

जुडगा पु०, जुडगें न०, जुडका पु०, जुडकें नं० अनेक पदार्थांचा गठ्ठा किं० गठ किं०समुदाय.

जुडणी [**म०** जुडणें]**स्त्री०**जोडण्याची क्रिया; जोडणें; संयोग; सांधणी.

जुडणें [**सं०** युज्=संयुक्त करणें] **अ० क्रि०** १ जुळणें; एके ठिकाणीं येणें किं० संयुक्त होणें; गोळा होणें; जमणें. २ परस्परांशीं मिळतें असणें किं० अविरोधी असणें; एकरूप असणें; अविसंवादी असणें. **स० क्रि०** एकत्र करणें किं० आणणें; जुळविणें; संयुक्त करणें.

जुडा पु०, जुडी स्त्री० [**म०** जुडणें] अनेक पदार्थांचा संयोग, जुळणी, किं० बांधणी; एकाशीं एक करून जुळविलेले, बांधलेले किं० जोडलेले अनेक पदार्थ.

जुडाई स्त्री० वर ' जुडा, ' ' जुडी ' पहा.

जुडी स्त्री० सरकारी नोकरांना कामाबद्दल किं० नोकरीबद्दल बक्षीस दिलेली इनाम जमीन, किं० अशा जमीनीवरील सारा.

जुतरी, जुत्री, झुतरी, झुत्री स्त्री० ओढा किं० नाला (वाहाता किं० कोरडा).

जुती [**हिं०**] **स्त्री०** वाहाण (एक किं० दोन); वाहाण; वहाणा. ॐ**जुती पैजार स्त्री०** १खेटरा-खेटरी; भांडणार्‍या दोन माणसांनीं एकमेकांना जोड्यांनीं मारणें. २ भांडण; मारामारी (करणें, होणें, चालणें).

जुतें न० १ वाहाणांची जोडी; वहाणा. २ एक वाहाण.

जुत्पाति [**सं०** युद्ध+पति] **पु०** लढण्यांत किं० कुस्तींत पटाईत; मोठा योद्धा; लढवय्या.

जुदा[**फा०**]**वि०** भिन्न; निराळा;अलग;वेगळा.

जुनवट [**म०** जुना] **वि०** जुना; जुन्यासारखा.

जुनवत(-न) [**म०** जुना] **स्त्री०** १ विड्याचीं म्ह० नागवेलीचीं जुनीं पानें म्ह० मागल्या ऋतूं-तील पानें. नव्या पानांना 'नवत' किं० 'नवतीचीं पानें' म्हणतात. २ कोणत्याही झाडाचीं मागच्या ऋतूंतील पानें. **वि०** जुनें (झाड, रोप).

जुना [**सं०** जीर्ण] **वि०** १ बहुत दिवसांचा; मागल्या पिढीचा; प्राचीन काळचा. २ फार

दिवस वहिवाटींत किं० वापरण्यांत असलेला (पदार्थ). ३ अनुभविक; गतकाळची ज्याला माहिती आहे असा (मनुष्य). ॐजुना खोड पु०, जुनें खोड न० १ फार म्हातारा मनुष्य,—बरोबरीचीं माणसें मरून गेलीं असतां जो अद्यापि जिवंत आहे असा मनुष्य. २ बरोबरचीं इतर माणसें नोकरी सोडून गेलीं असतां जो अद्यापि नोकरीवर आहे असा मनुष्य. **जुनापाना** वि० वापरून जुनें किं० जीर्ण झालेलें (वस्त्र, भांडें, घर, इ०). **जुनापापी** पु० धूर्त आणि चाणाक्ष वृद्ध माणूस. **जुनापुराणा** वि० १ वापरून जुनें झालेलें (वस्त्र, पात्र, घर, इ०). २ फार दिवस एकाद्या ठिकाणीं काम केलेला किं० वहिवाटलेला. ३ अनुभविक म्हातारा.

जुनावणें [म० ' जुना 'पासून] अ० क्रि० १ जुना होणें; मागें पडणें; वहिवाटींतून जाणें. २ समाजांत पक्केपणीं निविष्ट होणें (चाल,रूढि). ३ परिपक्क होणें. ४ उतारकळेस लागणें.

जुनेर, जुनेरें [म० जुना] न० जुनें वस्त्र (विशेषतः लुगडें).

जुन्नर [म० पुणें जिल्ह्यांतलि एक शहर] न० पुणें जिल्ह्यांतील एक शहर. ॐ**जुन्नरी कागद** पु० जुन्नर येथें पूर्वी हातानें घोटून केला जात असे तो कागद. ॐ**जुन्नरी हरहुन्नरी** जुन्नरचा मनुष्य कांहींही कामांत पटाईत असतो. **जुन्नर हरहुन्नर** पु० हिकमत; युक्ति; खुबी; लटपटी खटपटी; उ० जुन्नर हरहुन्नर करून मी पोट भरतों !

जुंपण [म० जुंपणें] स्त्री० १ जुंपण्याची क्रिया. २ बैल इ० जनावर गाडी इ०स जुंपलें गेल्याची स्थिति. ३ दुसऱ्या जनावरासह एका आउताला जुंपलें जाण्याला एकाद्या जनावराची अनुरूपता किं० सोयिस्करपणा; उ० ह्या बैलाचीं आणि त्या बैलाची जुंपण ठीक होईल. ४ गाडीची धुरी आणि जूं यांना एकत्र बांधणारी दोरी. ५ तीन किं० चार पदरांची दोरी. ६ विणावयासाठीं मागावर घातलेले तंतु ताठ राहावे म्हणून ज्या दोन कांठ्यांवर ते बांधलेले असतात त्यांपैकीं एक काठी; दुसरीला ' गुलडा ' म्हणतात.

जुंपणी [म० जुंपणें] स्त्री० १ जुंपण्याची क्रिया. २ नांगर, गाडी, इ०ची धुरी आणि जूं एकत्र बांधावयाची दोरी. ३ बैलाचा गळा जुवाला जोडावयाचा पट्टा किं० दोरी. ४ कोष्ट्याच्या मागांतील एक अवयव. ' जुंपण 'चा अर्थ ६ पहा.

जुंपणें स० क्रि० १ नांगर, गाडी, इ०स बैल, घोडा, इ० जोडणें. २ एकाद्या माणसाला एकाद्या कामीं दृढसंबद्ध करणें; उ० पत्रावळी लावण्याच्या कामावर मला जुंपून गजानन निघून गेला ! अ० क्रि० दोन माणसें एकत्र होऊन वाद, लढाई, किं०मारामारी सुरू होणें; उ० संभाषण चालतां चालतां त्यांची लढाई जुंपली.

जुंपणें [म० जुंपणें] न० १ जुंवाशीं बैल, घोडा, इ०चा गळा जोडावयाचा पट्टा किं० दोरी. २ कोष्ट्याच्या मागाचा एक अवयवविशेष. वर ' जुंपण ' अर्थ ६ पहा.

जुंबाड, जुंबाडें, जुंबडें, जुंभाड न०, **जुंबाडा, जुंबडा** पु० १ स्त्रियांचे किं० पुरुषांचे डोक्यावरचे केश जुळवून त्यांना गांठ मारून त्यांचा होतो तो आकार. २ काठ्या, छड्या, बोरु, भाले इ०चीं बांधलेली मोळी, जुडी, इ०. ३ कोणत्याही पदार्थाचा गठ्ठा. ४ झाडाझुडपांची जाळी किं० गुंतागुंत. ५ जुंबाड म्ह० माणसांचा घोळका किं० थवा; उ० तें घर जळत होतें तेव्हां तो देखावा पहावयाला माणसांचीं जुंबाडें धावत होतीं.

जुमला [अ० जुम्लाह्] पु० १ बट्टेबेरीज; रक्कम; रोकड. २ सवाशे घोडेस्वारांची पलटण. ॐ**जुमलेदार** पु० जुमल्याचा जमाखर्च ठेवणारा अधिकारी; हिशेबी अधिकारी. **जमीनजुमला** पु० शेतभात; वतनवाडी.

जुमान पु०, न०, **जूम** पु०, स्त्री०, **जुमास, जुमस** पु०, स्त्री० [फा० जुन्बष्=गति; गुमान्=मत, बुद्धि] १ वचक, दरारा, दहशत. २ कमी होणें; ओसर; उतार; खळ; पड; थांबणूक; पिछेहाट. ३ उसंत; फुरसत; संधी. १, २, आणि ३ ह्या अर्थीं नेहमीं अकरणरूपी प्रयोग होतो; क्रियापद खाणें किं० पावणें; उ० पाऊस जूम खात नाहीं म्ह० थांबत नाहीं; उ० हें दुखणें जूम खात नाहीं म्ह० हटत

नाहीं म्ह० त्याला उतार पडत नाहीं; उ० हा पाऊस पेरणीस जुम खाऊं देत नाहीं (म्ह० संधी मिळूं देत नाहीं);उ०हा सावकार मला जुमान खाऊं देत नाहीं; उ० हा ताप मला जुमान खाऊं देत नाहीं; उ० तूं डोळे वटारलेस म्हणून मी गुमान खाईन असें तुला वाटतें काय ? (गुमान खाणें म्ह० वचकणें).

जुमानणें [फा०जुन्बष्=गति;म०जमान] **स० क्रि०** महत्त्वाचा किं०वंद्य किं०पूज्य समजून दबकणें, कचरणें, भिणें, किं० हटणें; उ० जो परमेश्वराला जुमानीत नाहीं तो माणसाला जुमानील काय ?

जुयटें [म० जूं] **न०** खाडींतील किं० नदींतील बेट.

जुरत [अ० जुरात्] **स्त्री०** धिटाइ; छाती; मर्दुमकी; प्रायः अकरणरूपी प्रयोग; उ० त्याची काय जुरत झाली आहे वाघाच्या अंगावर चाल करून जावयाची ? ꣸ **जुरतदार, जुरती, जुरा वि०** धीट; हिंमतदार.

जुरबगार [अ० जूरुल् फिकार्=तीक्ष्ण, बोचणारी; अलीच्या तरवारीचें हें विशेषण] **वि०** तीक्ष्णधारेची (तरवार); मोहरमच्या मुसलमानी उत्सवांत डोल्यापुढें चालविली जाते ती(तरवार).

जुर्राबावरा वि०अक्कडबाज, कुरेंबाज (शिपायी इ०).

जुलाब [**फा०**] **पु०** १ जुलाब करणारें औषध. २ ह्या औषधानें झालेला जुलाब किं०ढाळ.

जुलूप, झुलूप [**फा०** जुल्फ्]**न०** १ डोकींवरील केशांचा झुबका (मुलांच्या डोक्यावर किं० कानशिलांवर राखतात तो). २ केशांचा झुबका.

जुलूम [अ० जुल्म्] **पु०**१ जोर;जबरदस्ती; सक्ती.२राजानें रयतेवर चालविलेला अन्याय किं० कहर. ३ अतिशयपणा; अतिरेक; उ० पावसानें आज जुलूम केला आहे;उ० ह्या पोरानें रडण्याचा जुलूम केला.꣸**जुलमाचा रामराम पु०**निरुपायानें किं०नाखुशीनें पथकरलेली गोष्ट;दुसऱ्याच्या भीतीनें केलेली गोष्ट; केवळ बलात्कारामुळें करावें लागलेलें कांहीं काम.**जुलमानें क्रि०वि०**अत्यन्त नाखुशीनें; उ० मी मोठ्या जुलमानें एरंडेल प्यालों. **जुलमी क्रि० वि०** १ दुसऱ्याच्या सक्तीमुळें. २ नाइलाज म्हणून. ३ भारी कष्टानें. **जुलमी वि०** अन्यायी, पक्षपाती, करडा (अमल्दार). **जुलूमपातशाही स्त्री०** १ पराकाष्टेच्या जुलमाची शासनपद्धति(राजाची किं०त्याच्या अधिकाऱ्याची). २ करडा अमल. ३ दुसऱ्यावर लादलेली आपली इच्छा; दुसऱ्यावर चालविलेली सक्ती. **जुलूमबाजार पु०** ठराविक दिवसाहून अन्य दिवशीं राजानें किं० कोणा बड्या माणसानें भरावयाला लाविलेला बाजार.

जुलूष,जुलूष सन्न मागें ' जलू, ' ' जलूषसन्न ' पहा.

जुंव [**म०** जूं] **न०**गाडी, नांगर, इ० चें जूं (बैलाच्या मानेवर ठेविला जातो तो दांडा).

जुवळ [**सं०** युगल] **न०** एका गर्भाशयांत एकावेळीं उत्पन्न झालेलीं जीं दोन मुलें तीं जोडीनें किं० तीं प्रत्येक.

जुंवळा [**म०** जुंवळ] **वि०** १ एका गर्भाशयापासून होणारीं जीं दोन मुलें त्यांपैकीं एक. २एका देठावर होणाऱ्या दोन फळांपैकीं एक.

जुंवळी [**म०** जुंवळ] **स्त्री०** दोन सजातीय वस्तूंची जोडी.

जुवा [सं० यु=जोडणें] **पु०** सांधा; संधि.

जुंवा पु० नदींतील किं० खाडींतील बेट.

जुवा [हिं०] **पु०** जुगार. ꣸ **जुवेबाज पु०** जुगाराचें व्यसन असलेला. **जुवेबाजी स्त्री०** जुगारीचें व्यसन.

जुंवाड, जुंवाडी [**म०** जूं] **स्त्री०** १लहानसें जूं. २ नांगर ओढावयासाठीं बैलांच्या जुंपलेल्या ज्या जोड्या त्यांतील आघाडीची जोडी.

जुवारी [हिं०] **स्त्री०** जोंधळा हें धान्य.

जुंवाली [**म०** जूं] **स्त्री०** बैलाचा गळा जुंवाशीं जोडावयाचा पट्टा.

जुवें न० नदींतील किं० खाडींतील बेट.

जुळणी [**म०** जुळणें] **स्त्री०** १ जुळण्याची क्रिया. २ मेळ; परस्परांचा अविरोध; संवादाची स्थिति.

जुळणें [**सं०** युगल] **अ० क्रि०** एकत्र होणें; एकास दुसरा भेटणें; मिळणें. **स० क्रि०** कांहीं

एका विशिष्ट क्रमानें पदार्थ मांडणें, ठेवणें, किं० एकत्र आगणें.

जुळा [सं० युगल] पु० १ एकावेळीं जन्मलेलीं जीं दोन मुलें त्यांपैकीं एक. २ एका देठावर आलेल्या दोन फळांपैकीं एक; उ० जुळा आंबा, जुळें केळें, इ०.

जुळी [म० जुळणें] स्त्री० १ अनेक सजातिय पदार्थांचा केलेला किं० जुळविलेला राशि किं० गठ्ठा किं० जुडगा. २ दोन बांगड्या जोडीनें. ३ कोणत्याही सजातीय वस्तूंची जोडी. ४ समई, लावणदिवा, पणती, इ०च्या वातेऱ्यांत घातलेल्या दोन वातींची जोडी.

जुळें [सं० युगल] न० १ आवळींजांवळीं दोन मुलें. २ अशा दोन मुलांपैकीं एक. ३ आंबा, केळें, इ०फळांची एका देठावर आलेली जोडी.

जूं [सं० युग] न० १ नांगर, गाडी, इ० ओढणाऱ्या बैलांच्या मानेवर ठेविलेला असतो तो दांडा. २ कोणत्याही कामाची जबाबदारी.

जूं न० नदींतील किं० खाडींतील बेट.

जूग [सं० युग्म] न० १ दोन तीन सजातीय पदार्थ किं० समानशील माणसें यांची जुळणी किं० मिळणी किं० एकत्र स्थिति. २ सोंगट्याच्या खेळांत एका घरांत बसलेल्या सोंगट्या समुच्चयानें. ३ टोळी; जूट; कांहीं विशिष्ट उद्देशानें एकत्र जमलेलीं माणसें समुच्चयानें. ४ युग, कृत, त्रेता, द्वापार, आणि कलि, अशीं जीं चार युगें तीं प्रत्येक,—विशेषतः कलियुग.

जूट [सं० यूथ] स्त्री० १ एकोपा; ऐकमत्य; मिलाफ. २ संस्था; कांहीं विशिष्ट कार्यासाठीं जुळलेलीं माणसें समुच्चयानें. मागें ' जंगजूट, ' ' जंगजोड ' पहा.

जून [म० जुना] वि० १ ज्याचा कोवळेंपणा नष्ट झाला आहे असें; निबर किं० परिपक्व झालेलें (फळ); २ निढावलेला, अनुभविक (चांगल्या कामांत किं० वाईट कर्मांत).

जूस मागें ' जुमान ' पहा.

जूळ [सं० युगल] न० मागें ' जुळें ' पहा.

जूळ [म० जुळणें] स्त्री० दोन बैल, रेडे, इ०ची एका जुंवाशीं केलेली जुळणी किं० जुंपणी (क्रि० घालणें).

जृंभण न०, **जृंभा** स्त्री० [सं० जृंभ=जांभई देणें] १ जांभई किं० जांभई देणें. २ उघडणें, विचकणें, वासणें.

जृंभणें [सं० जृंभ=जांभई देणें] अ० क्रि० निद्रा, आलस्य, इ० कारणांनीं तोंड उघडून दीर्घ श्वास सोडणें.

जे उभयान्वयी अ० कीं; असा कीं; उ० त्या पत्रांत मजकूर असा जे (किं० ऐसा जे). [सं० ' जय 'चा अपभ्रंश] अरे ! अहो ! उ० जे देवा ! जे खाविंद !

जे सर्वनाम 'जो' याचें पुल्लिंगाचें अ० व०; **जें** न०; **जी** स्त्री०; याचेपुढें 'कां' हा शब्द शोभेसाठीं कधींकधीं घालतात; उ० जेकां लंका वसली नवति पैं.

जेगा पु० पुरुषाचें एक शिरोभूषण.

जेंगट न० मागें ' जंगट ' पहा.

जेजाल [हिं०] स्त्री० लांब नळीची फिरकीची तोफ. ही मोठ्या बंदुकीसारखी असून तिला लाकडाचे दोन पाय असतात. ꙮजेजालबरदार पु० ही तोफ उडविण्याच्या कामावरचा शिपायी. [एक रागिणी.

जेजावंती, जेजेवंती, जय जयवंती स्त्री०

जेंजाळ पु० ' जंजाळ ' पहा.

जेजे स्त्री० कष्ट, त्रास, यातायात (करणें, देणें, पडणें, सोसणें).

जेजेवंती स्त्री० एक पुष्पवल्ली.

जेठणें स० क्रि०आवळून घट्ट बांधणें. ꙮ**जेठून बांधणें, जेठून धरणें** घट्ट बांधणें; घट्ट धरणें.

जेठवड, जेठोडी [सं० ज्येष्ठ] पु० ज्येष्ठाचा महिना. ꙮ **जेठोडी** वि० ज्येष्ठाच्या महिन्यांतील (पाऊस).

जेठा पु० जमीनीवर ढुंगण टेकून गुडघे जवळ करून आणि पाठ आणि गुडघे यांच्याभोंवतीं उपरणें इ० बांधून जें आरामाचें संस्थान करतात तें (जेठा मारणें). ꙮ**जेठा मारून बसणें** उद्योगधंदा न करतां रिकामपणांत काळ घालविणें.

जेठी पु० वस्त्र रंगवावयासाठीं करतात तो कुसुंब्याचा रंग.

जेठी [सं० ज्येष्ट] पु० मल्ल; कुस्त्या खेळण्याचा धंदा करणारा. ꙮ **जगजेठी** पु० परमेश्वर.

जेठोडी न० ज्येष्ठाच्या महिन्यांत पडणारा पाऊस.

जेतव्य [सं०] **वि**० जिंकावयाचा; जिंकावयास योग्य.

जेता [सं० जेतृ] **पु**० जिंकणारा; जयशाली.

जेतुला वि० जितका, जेवढा (कवितेंत).

जेतत्व [सं०] **न**० जिंकण्याचा गुण, सामर्थ्य, किं० ताकद; जिंकण्याचें श्रेय.

जेथ [म० जेथें] **क्रि**० **वि**० जेथें; ज्या स्थळीं. ꙮ**जेथचा, जेथला, जेथील वि**० ज्या ठिकाणचा. **जेथवर, जेथपावेतों, जेथवरी क्रि**० **वि**० १ ज्या ठिकाणापर्यंत. २ ज्या अवधीपर्यंत. **जेथून, जेथोन क्रि**० **वि**० ज्या स्थळापासून किं० समयापासून.

जेथें क्रि० **वि**० ज्या स्थळीं. ꙮ**जेथें तो खातो तेथें हगतो** तो कृतघ्न आहे. **जेथें कोठें क्रि**० **वि**० ज्या कोणत्याही ठिकाणीं; उ० रामभाऊ जेथें कोठें तुला दिसेल तेथून त्याला धरून आण. **जेथें तेथें क्रि**० **वि**० सर्व ठिकाणीं.

जेधवां क्रि० **वि**० जेव्हा; ज्या काळीं; ज्या समयीं (कवितेंत).

जेन न० मेंढा, बकरा, इ०चे केशांस खळ लावून ते केश चेपून करतात तें वस्त्र; बुरणूस. ꙮ**जेनाच्या पदरास गांठ देऊं पाहाणें** कांहीं अशक्य किं० बिकट गोष्ट करावयाला सरसावणें. **जेनबुद्धि स्त्री**० अगदीं कमी प्रतीची बुद्धि; मठ्ठपणा. **वि**० मठ्ठ डोक्याचा माणूस.

जेपाळ [सं० जेपाल] **पु**० एक औषधी वनस्पति; हिचीं बी रेच करण्याच्या कामीं योजतात. ꙮ**जेपाळाची मात्रा आणि वैकुंठाची यात्रा** जालीम इलाजाचा भयंकर परिणाम होतो.

जेमतेम, जेमत्येम [हिं० जयून तयून] **क्रि**० **वि**० मोठ्या कष्टानें किं० प्रयासानें; कसें तरी; उ० एक रुपायाचें तूप आम्हाला जेमतेम दोन दिवस पुरतें.

जेय [सं०] **वि**० जिंकावयाचा; जिंकावयास योग्य; जिंकतां येईल असा.

जेर [फा० जेर्=खालीं] **वि**० १ खालचा; खालच्या दर्जाचा किं० योग्यतेचा. २ जर्जर, बेजार, त्रस्त, पीडित (होणें); उ० तो पडशानें (खोकल्यानें, इ०) भारी जेर झाला आहे. ꙮ**जेरीस येणें** त्रस्त होणें, पीडित होणें. **जेरकडी स्त्री**० लगामाची कडी. **जेर जबर, जेर जबरी स्त्री**० डाव्या अंगाचा जबर आणि उजव्या अंगाचा जेर अशा संकेतानें जो गंजिफांचा डाव खेळतात तो. **जेरजबरी स्त्री**० जुलूम. **जेरदस्त वि**० १ खालच्या प्रतीचा किं० दर्जाचा किं० योग्यतेचा. २ गंजिफांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. **जेरदस्ती स्त्री**० १ अनाथपणाची स्थिति; विपन्न दशा. २ गंजिफांच्या खेळांत जेरदस्तासंबंधीं जी तलफ ती.

जेरबंद पु० घोड्याला तोंड वर करता येऊं नये म्हणून बांधलेला पट्टा किं० दोरी; घोड्याच्या सरोसरांत ओवून पुढच्या दोन पायांच्या मधून तंगास बांधतात तो पट्टा किं० ती दोरी. **जें न निघे संबंधीं तें निघे जेरबंदीं** सौम्य उपायांनीं जें काम होत नाहीं तें जेरबंद मारून करून घ्यावें लागतें. **घोडा जेरबंदीं आणि मनुष्य संबंधीं ओळखावा** जेरबंद आवळतांना घोड्याचें सामर्थ्य कळून येतें आणि सहवास घडला असतां मनुष्याचा स्वभाव कळून येतो. **एखाद्यावर जेरबंद उडविणें (किं० ओढणें)** त्याला जेरबंदानें मारणें.

जेवढा वि० जितका; जितका मोठा; जितका पुष्कळ; ज्या परिमाणाचा. ꙮ**जेवढा तेवढा वि**० प्रत्येक; उ० येथें जेवढा पहावा तेवढा खादीच्या पोशाखांत दिसतो.

जेवण [सं० जेमन] **न**० खाद्य पदार्थ समुच्चयानें किं० ते खाण्याची क्रिया; भोजन (जेवण करणें). ꙮ **जेवणखाण, जेवणें खाणें न**० जेवणें आणि त्यानंतरच्या गोष्टी समुच्चयानें; जेवणबिवण; उ० माझें जेवणखाण आटोपावयाला आणखी एक तास लागेल. **जेवणवत न**० जेवावयाच्या उपयोगी जें केळ इ० चें पान तें; उ० आपल्या केळीची एक मोठी डांग आण म्हणजे त्यांत पांच जेवणवतें होतील (किं० पडतील). **जेवणवार पु**० ज्या दिवशीं भोजनाला निषेध सांगितला नाहीं तो दिवस. **जेवणावळ स्त्री**० १ मेजवानी. २ जेवणाबद्दलचा खर्च. ३ खाणावळ; पैसे घेऊन जेवावयाला घालावयाचें घर.

जेवणी [म० जेवणें] **स्त्री**० १ शरीराचें

मुखरूपी जें द्वार तें; मुख. २ मुखाचें उजव्या टोकापासून डाव्या टोकापर्यंतचें अंतर; जिवणी;उ० रामभाऊची जेवणी (किं० जिवणी) कितीतरी मोठी आहे हो ! ह्या कानापासून त्या कानापर्यंत ! ३ धान्य मळणाऱ्या मजुरांना मजूरी म्हणून जें धान्य द्यावें लागतें तें.

जेवणें [**सं०** जेमन] **अ० क्रि०** १ भात, वरण, भाजी, भाकरी, इ० खाद्यें, आणि कढी, आंबटवरण, इ० पेये, यांचें ठराविक वेळीं शरीरपोषणार्थ सेवन करणें. **२** कृतकर्माचें फळ उपभोगणें किं० अनुभविणें. **टीप—**ह्या क्रियापदाचा भूतकाळीं कर्तरिप्रयोग होतो; उ० मी भात जेवलों. ॐ **जेवता गण पु०** केवळ जेवावयाच्या कामाचा जो मनुष्य तो;. उ० केशव हा केवळ जेवता गण आहे, तो काडीमात्र कामाला येत नाहीं. **जेवीन तर तुपाशीं, नाहींतर उपाशी; नेसेन तर शालू नाहीं तर नागवी** (**राहीन**) मला माझ्या मनाजोगी वस्तु द्या,तशी देणार नसलां तर मला मुळींच कांहींच नको! हट्टी मनुष्याचें हें वर्णन आहे.**रांधावें तसें जेवावें करावें तसें भरावें** आपण जें कांहीं चांगलें किं० वाईट कृत्य करू त्याचें चांगलें किं० वाईट फळ भोगावयास आपण तयार असलें पाहिजे; कृतकर्माचें फळ टाळणें शक्य नाहीं. **जेवता ठाव टाकून उठणें** अर्ध्या जेवणांतून उठणें (विटाळ झाल्यामुळें किं० कांहीं जरूरीचा प्रसंग उद्भवल्यामुळें). **मुलाला जेवूं घालणें** मुलाला भरविणें (त्याला आपल्या हातानें जेवतां येत नाहीं म्हणून). **एकाद्याला जेवूं घालणें** एकाद्या अनाथाला आपल्या पदरचें अन्न देऊन पोसणें; त्याचा सांभाळ करणें. **जेवून सेवा गोड** जेवण झाल्यावर कांहीं काम करावयाला उत्साह वाटतो. **दोहींकडून जेवणें** वादी आणि प्रतिवादी अशा दोन्ही पक्षांकडून पैसे घेणें; एका पक्षाकडून राजरोस आणि दुसऱ्या पक्षाकडून चोरट्या रीतीनें पैसे घेऊन एक पक्ष आहे त्याहून कमी बळकट भासवून आणि दुसरा पक्ष फारसा अशक्त नाहीं असें न्यायधीशाला भासवून दोन्ही पक्षांचे थोडथोडें हित करणें. उलट सुलट पक्षाचे वकील एकान्तांत बसून दोन्ही बाजूंचे मुद्दे कसे मांडावे, कसे लंगडे पाडावे, इ० गोष्टी ठरवितात. **दुसऱ्याच्या तोंडानें जेवणें** कोणी समर्थ बोलेल किं० सुचवील त्याप्रमाणें बोलणें (समर्थाला दुखविण्याचें धैर्य नसल्यामुळें किं० त्याच्या पासून कांहीं स्वार्थ साधण्यासाठीं लाळघोटे लोक असें करतात).**एकाद्याच्या बारशास जेवणें** त्याच्यापेक्षां वयानें किं० अनुभवानें किं० अकलेनें वरचढ असणें. मूल जन्मल्यावर बाराव्या दिवशीं इष्टमित्रांना बोलावून जें भोजन करतात त्याला'बारसें' म्हणतात. ह्याच अर्थी ' मीं तुझ्या बारशाच्या घुगऱ्या खाल्ल्या आहेत ' ह्या संप्रदायाचा उपयोग केला जातो. घुगऱ्या म्ह० हरभऱ्याची उसळ,—जी बारशास करावी लागते.

जेवणें [**सं०** जेमन] **न०** देऊळ इ० स्थळीं कांहीं प्रसंगानें किं० विधीनें केलेलें भोजन.

जेवा [**म०** जेवण] **पु०** १ जेवण; भोजन; उ० आजचा जेवा तर बाहेर पडला, उद्याची बात उद्या ! २ सरकारी शिपायी सरकारी कामानिमित्त आला असतां त्याला जो शिधा किं० जेवण देतात तें. ३ कोणाही माणसाला भोजनार्थ दिलेला तांदूळ पीठ, इ०चा शिधा.

जेंवीं [**सं०** यथा] **क्रि० वि०** ज्याप्रमाणें; ज्या रीतीनें. ॐ **जेंवीं तेंवीं वि०** जसें असेल तसें; कसें आहे आणि काय आहे ह्याचा विचार न करतां जें भोगास आलें असेल तें; उ० सुनेनें सासूचें जेंवी तेंवी सोसावें. **क्रि० वि०** १ कोणत्याही प्रकारें. २ मोठ्या कष्टानें किं० प्रयासानें. ३ कसेंबसें.

जेव्या [**म०** जेवणें] **पु०** दुसऱ्याच्या घरचीं [जेवणें उकळणारा.

जेंव्हां क्रि० वि० १ ज्या काळीं; ज्या समयीं. २ ज्या अर्थी. ॐ **जेंव्हां कधीं क्रि०वि०**केंव्हाही; कोणत्याही काळीं किं० समयीं; उ० जेंव्हा कधीं तो तुम्हांला भेटेल तेव्हां त्याला मजकडे पाठवून द्या. **जेव्हां तेंव्हा क्रि० वि०** वारंवार; सर्वदा; सर्व वेळां; नेहमीं. **जेव्हां केव्हां क्रि०वि०** १कोणत्याही काळीं किं० समयीं.२ ज्या ज्या वेळीं किं०समयीं.

जेष्ट, जेष्ठमध, जेष्ठवड इ० ' ज्येष्ठ, '' जेष्ठमध, '' ज्येष्ठवड ' इ०पहा.

जेह स्त्री० मागें ' जई ' पहा.

जेहपटी, जेहेपटी स्त्री० वेणी, अंबाडा, इ०

तून सुटून मोकळी पडलेली केशांची बट; झिपटी; झिपरी.

जैं, जै क्रि० वि० जेंव्हां, ज्या काळीं. उ०अ० जर, ज्या पक्षीं, ज्या अर्थी.

जै स्त्री० मागें ' जई ' पहा.

जैत्र [सं०] वि० जिंकणारा; जयशील. न० १ विजय. २ श्रेष्ठत्व.

जैन [सं०] पु० १ जिनधर्मी. २ बुद्धधर्मी.

जैनचैन, जैनशैन, जैनमैन मागें ' जईन चईन ' पहा.

जैपाळ पु० मागें ' जेपाळ ' पहा.

जयत वि० सर्व साधनसामग्रीनें पूर्ण; सर्व शस्त्रास्त्रांनीं युक्त; अगदीं तयार किं०सिद्ध; परिपूर्ण.

जैसा वि० जसा (कवितेंत).

जो [सं० यः] पु० पुल्लिंगी संबंधीं सर्वनाम.

जों क्रि० वि० १ ज्या काळापर्यंत किं० समयापर्यंत. २ ज्या अवधींत; ज्या काळीं.

जोकड, जोखड [सं० युग; म० जूं] न० १ जूं. २ उसाच्या चरकाच्या नवरा नांवाच्या लाकडाला काटकोनांत बसविलेला दांडा,–जो बैल किं० माणूस वाटोळ्या गतीनें चालून रेटतो किं० ओढतो.

जोख [म० जोखणें] न० १ मापणें, मोजणें, किं० वजन करणें ही क्रिया, किं० ह्या क्रियेनें निधालेली मोजदाद किं० ही क्रिया करण्याचा धोंडा, इ०. २ माप, परिमाण, लांबी रुंदी, इ०; उ० पायाचें जोख घेतल्यावांचून जोडे कसे करूं ?

जोखणें स० क्रि० १ तराजूंच्या एका पारड्यांत जोखें घालून दुसऱ्या पारड्यांत कांहीं पदार्थ घालून त्याचें वजन ठरविणें. २ पदार्थाचें स्वरूप जाणून घेणें किं० त्याच्या गुणधर्मादिकांचें ज्ञान करून घेणें; उ० तुझें कर्तृत्व त्याणें जोखलें आहे. अ० क्रि० लाभप्राप्ति होणें; फायदा होणें; उ० हा कज्जा भांडून तुला काय जोखतें ? म्ह० तुझा काय फायदा होणार ? ॐ**जोखमाप** न० वजनाचें परिमाण; ज्याच्या तुलनेनें पदार्थविशेषाचें वजन तराजूच्या साधनानें ठरविण्यांत येतें तो धोंडा, इ०.

जोखमी [फा० जोखम; म० जोखीम] वि० ज्यांत जोखीम किं० धोका आहे असें (काम, कारभार, प्रसंग).

जोखी [म० जोख] वि० वजनी; वजनानें ठरलेलें.

जोखी स्त्री० सणकाडी.

जोखीण स्त्री० जळवा लावण्याचा धंदा करणारी स्त्री.

जोखीम, जोखम [हिं० जोखम्] स्त्री० १ धोका, भय, संकट. २ धोक्याचें किं० धाडसाचें काम. ३ धोक्यांत घातलेली किं० पणास लाविलेली वस्तु. ४ कांहीं व्यवहारांत आलेली बूड किं० तूट. ५ माणसाला धोक्यांत घालणारा पदार्थ किं० व्यवहार.

जोग [सं० योग] पु० संसारत्याग करून आणि इंद्रियदमन करून स्वीकारलेली स्थिति; वैराग्य. ॐ**जोग भरणें** १ मुरळीची टोपली खाद्य पदार्थांनीं भरणें. २ मुरळी होणें.

जोगडा [म० जोगी]पु० जोगी (तुच्छतेनें). ॐ**जोगड्याचें भात** न० एका विशिष्ट जातीचें भात.

जोगता, जोगा [सं० योग्य] वि० बेताचा; अनुरूप; योग्य; लायख.

जोगतिणी, जोगतीण स्त्री० जोगव्याची भिक्षा मागणारी स्त्री. पुढें ' जोगवा ' पहा.

जोगम्मा [म० जोगी+का० अम्मा] पु० जिच्या डोकीचे केश न विंचरलेले असून विसकटलेले आहेत अशी मुलगी.

जोगलणें [म० योग=जुळणी किं० टेका] स० क्रि० अशक्त किं० आजारी माणसाला चालतांना हाताचा टेका देऊन संभाळणें.

जोगली स्त्री० मार्ताचा लहान परळ.

जोगवण, जोगवणी, जोगवणूक जोगावण, जोगावणी, जोगावणूक स्त्री० १ २ आहे जी सामग्री तिच्यावर सध्याची नड भागविणें किं० सध्यापुरतें काम भागविणें; निर्वाह. २ कामांत टंगळमंगळ; चुकारपणा; रेटारेटी. ३ पदार्थाची काळजीपूर्वक निगा राखणें.

जोगवणें, जोगावणें अ० क्रि० १ कांहीं काम करण्यांत टंगळमंगळ करणें किं० उगाच कालक्षेप करणें. २ साधारणपणें चालणें किं० भागणें; उ० वर्षाला हजार रुपये मिळाले म्हणजे आमचा संसार कसा तरी जोगावतो. ३ पोटभर

खावयाला भिकून उदरपूर्ति होणें; उ० रानांत गवत झाल्यापासून गायी जोगवून घरीं येतात. ४ परिपुष्ट होणें(झाड, प्राणी). ५ पुरें पडणें; पुरेसा असणें; उ० तांदूळ उद्याला जोगवेल.

जोगवा [म० जोगाई; सं० योगेश्वरी] पु०देवीचे भक्त भिक्षा मागतात तीं. ॐ**देगे बाई जोगवा म्हटल्यानें कोणी देत नाहीं** भीत भीत मागणी केल्यास कोणी कांहीं देत नाहीं; दंडुक्याचा उपयोग केल्याशिवाय आपली मागणी कोणी पुरवीत नाहीं; दुष्टाशीं सौम्य इलाजाचा कांहीं उपयोग होत नाहीं. **जोगवेकर पु०** जोगवा मागणारा भिक्षेकरी. **स्त्री०**जोगवेकरीण.

जोगाविणें, जोगाविणें स०क्रि० १ काळजीपूर्वक जतन करणें किं० राखणें (जनावर, इ०). २ साधारणपणें म्हणजे फारशी काळजी न घेतां वागविणें (जनावर इ०).

जोगी [सं० योगी] **पु०** १ गोसावी; बैरागी; योगी. २ एका जातीचा साप. ३ एक रागिणी. ॐ**जोगी असावरी स्त्री०** एक रागिणी.

जोगीण [म० योगी] **स्त्री०** १ योगी स्त्री. २ जोग्याची बायको. ३ नाचणी नांवाच्या धान्याची एक जाति.

जोगें न० एक प्रकारचें भात.

जोगेटा पु० १ जोगी नांवाचा साप (तुच्छतेनें). २ जोगी किं० योगी (तुच्छतेनें).

जोग्या पु० कुस्तींतील एक पेच (क्रि०भरणें).

जोजार पु० १ कुटुंब; कुटुंबाची संस्था. २ आश्रित, नोकरचाकर, इ० समुच्चयानें; परिवार; लवाजमा. ३ प्रपंचाची किं० कांहीं कारभाराची असह्य जबाबदारी; व्याप. ॐ**ज्याचा भार त्याला जोजार** ज्याच्यावर प्रत्यक्ष जबाबदारी असते त्यालाच तिचें दुःख कळून येतें; इतरांना त्याची कांहीं जाणीव नसते.

जोजारणें, जोजावणें [म० जोजार] **अ० क्रि०** कुटुंब इ०च्या जबाबदारीनें भारावलेलें असणें.

जोजारी [म० जोजार] **वि०** कुटूंब इ०ची जबाबदारी ज्याचे शिरावर आहे असा.

जोजो अव्यय मुलाला निजवितांना आया उच्चारतात तो शब्द. **स्त्री०** लहान मुलांची निद्रा (करणें). ॐ **जो जो करणें** १ मुलाला गाणें गाऊन निजविणें. २ निजणें (मुलासंबंधानें).

जोट, जोठ पु० जाड सुताचें कापसाचें वस्त्र.

जोटी, जोठी, जोटीव, जोठाव [म० जोट, जोठ] **वि०** जोट किं० जोठ नांवाच्या वस्त्राचा केलेला.

जोठ पु० खांबाचा माथा आणि तुळई यांच्या मध्यें घातलेला जो लांकडाचा तुकडा:तो.

जोड [म० जोडणें] **पु०** १ जे एकाच जातीचे दोन पदार्थ एकदम घ्यावयाचें किं० वापरावयाचे असतात त्यांचें युग्म; उ० बाकींचा जोड; उ० पाटल्यांचा जोड; उ० समयांचा जोड, इ०. २ एकाद्या कार्यांत लागणाऱ्या सर्व पदार्थांचा समुच्चय किं० संच. ३ पुरवणीदाखल लाविलेला तुकडा. ४ तंतुवाद्यांत मध्यमच्या दोन तारा. ५ संचित द्रव्य इ०. **स्त्री०** १ लाभ, फायदा; उ० तुम्ही उगाच भांडतां,त्यात जोड काय ?२ संयोग, जुळणी, सांधा; उ० ह्या बैलाची त्या बैलाशीं जोड घाला. ३ संग्रहास ठेविलेली किं० मिळविलेली मूल्यवान वस्तु; उ० विद्येसारखी जोड नाहीं; उ० मी आपल्या पायांची जोड केली आहे म्ह० मी आपली कृपा संपादिलेली आहे; उ० जन्मास येऊन ईश्वरचरणाची जोड करावी.४अनुरूपता; संवादाची स्थिति. ५ सलोखा; मैत्री. **वि०** दोन किं० अधिक पदार्थांच्या जुळणीनें किं० संयोगानें झालेलें; संयुक्त; उ० जोडकेळें, जोडाक्षर, इ०. ॐ **जोडगहूं न०** गव्हाची एक जात; खपल्यागहूं. **जोडगिरी वि०** १ लाकडाला लाकूड, किं० दगडाला दगड जोडून केलेला पदार्थ (खांब, तुळई, गाडीचा आंस, इ०); उ० ह्या गाडीचा आंस जोडगिरी आहे, गाडींत फारसें ओझें भरूं नको; उ०आम्ही आपल्या घरावर जोडगिरी कौलें घातलीं आहेत (म्ह०एकावर एक दोन थर घातले आहेत). २ पदार्थाला बळकटी येण्यासाठीं त्याच्या सारखाच जो दुसरापदार्थ जवळ घातलेला, ठेविलेला, किं० जोडलेला असतो तो. **जोडगिरी स्त्री०** गवई, हरिदास, इ०च्या मागें जो मदत करणारा माणूस असतो तो,—री ओढणें इ० कामांसाठीं. **जोडगोळी** एका बंदुकींत एकदम दोन गोळ्या घालतात त्या. **जोडनाल पु०** तालीमखान्यांतील एक साधन. **जोडफळ न०** जुळें फळ. **जोडफळाचा सांधा पु०**

१ चांगलें वाईट, सुखदुःख, पापपुण्य,इ० विरोधी गुणांचें साहचर्य.२ दाट मैत्री;जीवश्चकंठश्च दोस्ती.

जोडबंद पु० एका बंदांत पुरता लिहिला गेला नाहीं असा मजकूर लिहावयासाठीं त्या बंदाला खालीं चिकटवतात तो बंद.

जोडका [म० जोडणें=संपादन करणें] वि० संपादन करणारा; कुटुंबांतील जो माणूस पैसे मिळवितो तो. ॐ **जोडका पूत, जोडका राम** [म० पूत=पुत्र, मुलगा] पु० १ पैसा मिळविणारा कुटुंबांतील पुत्र. २ सरकारांत चाहाड्या सांगून चरितार्थ चालवितो तो.

जोडणी [म० जोडणें] स्त्री० १ दोन पदार्थ जोडणें किं० ते जोडण्याची क्रिया. २ दोन पदार्थांचा सांधा.

जोडणें [सं० जुड्=सांधणें, जोडणें] स० क्रि० १ एका पदार्थाच्या शेजारीं दुसरा पदार्थ ठेवणें, मांडणें, चिकटावणें, किं० सांधणें. २ पदार्थांचे विस्कळित झालेले अवयव पुन्हा शिस्तवार जुळविणें. ३ पुरवणी म्हणून एका पदार्थाला दुसरा पदार्थ लावणें किं० चिकटावणें. ४ दोन पदार्थांची तुलना करावयासाठीं ते दोन्ही शेजारीं ठेवणें किं० मांडणें. ५ (बैल, घोडा, इ० जनावर) गाडीला किं० नांगराला जुंपणें. ६ एकाद्या विशिष्ट कामावर किं० नोकरीवर (कोणेकाला) स्थापित करणें.७संपादणें;उ० पुण्य जोडणें, पाप जोडणें,कीर्ति जोडणें, इ०. ८ घडवून आणणें. अ० क्रि० प्राप्त होणें; मिळणें; पदरांत पडणें. [पहा.

जोडता [म० जोडणें] वि० मागें 'जोडका'

जोडता राम, जोडता रावजी मागें 'जोडका पूत' पहा.

जोडप [म० जोडणें]न० १ जोडण्याची क्रिया. २ जें जोडलें तें.

जोडपें [म० जोडणें] न० १ पतिपत्नी. २ नवरामुलगा आणि नवरीमुलगी. ३ मुलगा आणि मुलगी अशीं आवळीं जावळीं मुलें.

जोडवें न० हाताच्या किं० पायाच्या बोटांत घालावयाचें सोन्याचें किं० चांदीचें एक भूषणविशेष.

जोडा [म० जोडणें] पु० १ चालतांना पायांत घालावयाला चर्माचा बनविलेला पदार्थ; कांहीं विशिष्ट आकाराचें पादत्राण.२ दोन जोडीनें वापरावयाच्या किं० ल्यावयाच्या वस्तु (धोतर आणि उपरणें, एक नेसावयाचें आणि एक अंगावर घ्यावयाचें अशीं दोन धोतरें,इ०). ३नवरा मुलगा आणि नवरी मुलगी हें युग्म किं० जोडपें. ४ दोन पायांत घालावयाचे जे जोडे त्यांपैकीं एकएक व्यक्तिशः. टीप—जोडा शब्द एकवचनांत दोन्ही पायांतील दोन्ही पादत्राणांना लावतात किं० एकाएकाला व्यक्तिशः लावतात. ५ पांच जानवीं समुच्चयानें. ६ बरोबरीची किं० सारखी वस्तु; उ० त्याच्या फजीतीस जोडा नाहीं (म्ह० पारावार नाहीं). ॐ **कोणाचा जोडा (किं० पायपोस) कोणाच्या पायांत नसणें** अंदाधुंदीची स्थिति असणें. **जोडे फाडणें** कांहीं एका कामासाठीं अनेक हेलपाटे घालणें किं० एकसारखें हिंडत असणें किं०अनेक ठिकाणीं जाणें;उ०आज सहा महिने मी जोडे फाडतों आहे पण मुलीला स्थळ मिळत नाहीं. उ० मी तलाठीच्या नोकरीसाठीं आज दोन महिने जोडे फाडतों आहे.

जोडी स्त्री० १ सजातीय अशा दोन वस्तु; युग्म. २ मुख्य कारागीर आणि त्याचा मदतनीस अशीं दोन माणसें. ३ गवई आणि त्याची री ओढणारा; हरिदास आणि त्याच्या मागचा पदांची सुरवात करून देणारा. ४ दोन माणसांचा किं० पदार्थांचा अनुरूप संयोग. ५ एकदम पेलावयाचे दोन मुद्गल. ६ धन; लाभ; संग्रह. ७ आपल्या मतें मूल्यवान अशी वस्तू. ८ जुडी; इनाम जमीन. मागें ' जुडी ' पहा. ॐ **जोडीचा** वि० अनुरूप.

जोडें [म० जोडणें] न० १ नवरानवरी ह्यांचें जोडपें. २ दोन नारळ. ३ बोटांत शोभेसाठीं घालतात तें जोडवें. मागें ' जोडवें ' पहा.

जोत [सं० युति] न० नांगर ओढणारे जे दोन बैल किं० रेडे ते किं० ते आणि त्यांनीं ओढावयाचा नांगर. ॐ **पुढील जोत तसें मागील जोत** नेत्याची हिंमत असेल त्या प्रमाणांत अनुयायांची हिंमत असते.

जोत, ज्योत [सं० ज्योतिस्=तेज, प्रकाश] स्त्री० १ दिव्याची ज्वाळा. २ रत्नाचें तेज. ३ तकाकी, तजेला. ४ शस्त्राचें पाणी. ५ अवसान,

वीर्य, हिंमत, जोर, सत्त्वसपणा. ६ मोठ्या दर्जाचा माणूस. ७ अवसानाचा किं० हिंमतदार माणूस. ८ तेजस्वी किं० प्रखर देवस्थान किं० देव.

जोतिबा पु०, **जोतिलिंग** न०[सं० ज्योतिर्लिंग; म० जोती+बा (बहुमानार्थक प्रत्यय)] शंकराचें स्थान. [ज्याची भिंत.

जोतें न० १ गृहादिकांचा चौथरा. २ कठ-

जोतें [सं० योक्त्र=जुंपणी, कासरा] न० १ बैलाचा गळा जोकडाशीं बांधावयाचा पट्टा किं० दोरी.

जो तो [म० जो+तो] **पु०** प्रत्येक माणूस. **जी ती** स्त्री० प्रत्येक स्त्री. **जें तें** न० प्रत्येक वस्तु. ꙮ **ज्याला त्याला** प्रत्येकाला. **ज्यांत त्यांत** प्रत्येक कामांत, प्रकरणांत, कारभारांत, किं० गोष्टींत. **ज्यानें त्यानें** प्रत्येकानें. **जो उठला तो** प्रत्येक माणूस. **जो पाहवा तो** जो जो माणूस दृष्टीस पडतो तो तो. **ज्याचा तो** १ एक एकटा. २ प्रत्येक माणूस. ३ विशिष्ट माणूस. ४ दुसऱ्याच्या मदतीवर अवलंबून न राहणारा. **ज्याला त्याला** प्रत्येकाला; सर्वांना; ज्याला योग्य किं० जरूर असेल त्याला; स्वतः-संबंधानें जरूर तो किं० जरूर तितका. **ज्याचें नांव तें** १ अगदीं; बिलकूल; मुळींच; (अकरणरूपी प्रयोग); उ० मी त्या मारवाड्याचीं परोपरीनें आर्जवें केलीं पण तो ज्याचें नांव तें वळेना. २ अत्यन्त उत्कृष्ठ किं० उत्कृष्ट रीतीनें; उ० माझें चित्र असें साधलें आहे कीं ज्याचें नांव तें ! **टीप**—वरील सर्व वाक्प्रचार लिंगवचनभेदानें योजतां येतात.

जोत्या [म० जोत] पु० नांगराचें जोत धरणारा किं० नांगर चालविणारा.

जोंधळा पु० एक धान्यविशेष. जोंधळ्याच्या अनेक जाति आहेत. [अंगाचा.

जोधा [सं० योध] वि० धष्टपुष्ट; मजबूत

जोप, जोपें न० गाय किं० म्हैस ह्यांचें वासरूं.

जोपणें स० क्रि० खाऊं पिऊं घालून पोसणें, रक्षिणें, किं० संभाळणें.

जोंपर्यंत, जोंपावेतों क्रि० वि० १ ज्या कालापर्यंत किं० समयापर्यंत. २ जितक्या अवधींत.

जोपारणें, जापारणें अ० क्रि० उलट उत्तर देणें; उर्मटपणें बोलणें. स० क्रि० त्याज्य करणें किं० ठरविणें.

जोपावणें, जोपासणें स० क्रि० काळजीपूर्वक रक्षिणें, किं० संभाळणें, किं० वागविणें (मनुष्य, प्राणी, वस्तु, इ०ना).

जोपाशीर (–ल), **जोपा, जोपासना, जोपासणी** स्त्री० काळजीपूर्वक केलेलें रक्षण (मनुष्य, पशु, पदार्थ, इ० चें).

जोंबडा पु० १ गवताचा झुबका. २ गवत इ० ची कशीबशी बांधलेली जुडी; गुंडी. ३ अशी गवताची जुडी शेताला किं० फळझाडाला सरकारच्या हुकुमानें बांधलेली असते ती,—शेताचें पीक किं० आंबा इ० चें फळ तोडण्याला सरकारची मनाई आहे हें जाहीर करण्यासाठीं; उ० ह्या आंब्याच्या झाडाला जोंबडा बांधलेला आहे, त्याचीं फळें तोडूं नका रे पोरांनो !

जोबन [सं० यौवन] पु० तारुण्य.

जोंबाड न० पुढें ' झोंबट ' पहा.

जोंबाळणी, जोमाळणी [म० जोंबाळणें] स्त्री० १ काळजीपूर्वक रक्षिणें; खर्च न करतां राखून ठेवणें. २ प्रेमानें (मनुष्य, प्राणी, इ०स) वागविणें. ३ मूल, प्राणी, इ० चे अतिशय लाड करणें.

जोंबाळणें, जोमाळणें स० क्रि० १ जतन करून ठेवणें; काळजीपूर्वक रक्षिणें. २(मनुष्य किं० पशु यांना) प्रेमानें वागविणें. ३ फार फार लाड करणें (मूल, पशु, इ० चे). ४ (पदार्थ) फार फार हाताळणें.

जोबेदंड वि० मजबूत; जोरदार; धटमूट.

जोम [सं० यौवन] पु०, न० १ शारीरिक बळ. २ आटोपशीर आणि मजबूत बांधा. ३ जोर, ताकद. ४ अनेक माणसांचा एकवटलेला प्रयत्न. ꙮ **जोमदार** वि० जोरदार; ज्याचे अंगीं जोम आहे असा.

जोर [फा०] पु० १ बळ, शक्ति, सामर्थ्य. २ टिकून राहण्याची ताकद; चिवटपणा. ३ वारा, पाऊस, इ० चा सोसाटा. ४ राजानें रयतेवर चालविलेला जुलूम. ५ कांहीं काम शेवटास नेण्याचें मनुष्याचें किं० पशूंचें अवसान. ६ भर; वाढण्याकडे प्रवृत्ति किं० कल (ताप, गळूं, इ० चा). ७ तालमींतील व्यायामाचा एक प्रकार

(सूर्याला घालतात त्या नमस्कारासारखा);(क्रि० काढणें). ८ समुद्राची भरती (दर्यावर्दी लोकांचा शब्द). ९ वाहकाच्या खांद्यावर, डोक्यावर, मनगटावर, किं० मानेवर, पडतो तो पदार्थाचा भार. १० नेटाचा प्रयत्न; सर्व शक्ति खर्चून लाविलेला नेट. ११ अमावास्या आणि पौर्णिमा ह्या दोन तिथींस समुद्राला येते ती भरती. ꣸ **जोरास येणें** अयोग्य प्रकारें किं० भलत्याच कामीं हेका चालविणें; उ० तें कूळ जोरास आलें आहे, फिर्याद केल्याशिवाय त्याच्याकडून पैसे वसूल होणार नाहींत. **जोराचा** वि० जोरदार. **जोरकस** वि० १ शारीरिक बळ वाढविण्यासाठीं जोर काढणें म्हणून जो तालीमबाजीचा प्रकार आहे तो करणारा (मनुष्य) किं० त्या प्रकारामुळें बळकट झालेलें (शरीर). २ बळकट,मजबूत स्नायूंचा (मनुष्य). ३ मजबूत, बळकट. **जोरगत** स्त्री० समुद्राचें उधान. **जोरजबरी** स्त्री० १ अन्याय; जुलूम.२ सक्तीचा उपाय किं० इलाज. **जोरतलब (–प)** स्त्री० १ सक्तीचें बोलावणें; (सरकारनें केलेलें).२आग्रहाचें किं० सक्तीचें बोलावणें; उ० माझ्या मर्जीस आलें तर मी येईन, तुझ्या जोरतलबीस मी दाद देणारा मनुष्य नाहीं. ३ कोणापासून द्रव्य मिळविण्यासाठीं त्याच्यावर (चोर, दरवडेखोर, इ० नीं) केलेला सक्तीचा उपाय. **जोरतलबी (–पी)** वि० सक्तीचा. स्त्री० दुसऱ्यावर केलेली सक्ती;दुसऱ्यावर आपली इच्छा लादणें. **जोरतलबी टीप, जोरतलबी सर** स्त्री० पत्त्यांच्या डावांतील एक पारिभाषिक शब्द. **जोरदार,जोरवान्** वि० जोराचा,आवेशाचा. **जोरबळ** न० पाशवी शक्ति; अन्यायी आणि जुलमी इलाज.

जोरा [फा० जोर] पु० १ अधिकाराचें सामर्थ्य.२ दुसऱ्याला लाविलेला नेट(त्याच्या मर्जीविरुद्ध त्याला कांहीं काम करावयाला भाग पाडण्यासाठीं).

जोरावणें [म० ' जोर ' पासून] अ०क्रि० जोरानें वाढणें; जोरदार होणें (माणूस, वारा, पाऊस, रोग, इ०).

जोरावर [फा०] वि० १ जोरदार;आवेशी. २ अन्यायी, जुलमी.

जोरावरी [फा०] स्त्री० जोर; सक्ती; जुलूम; जबरदस्ती.

जोरावा[फा० ' जोरावर ' पासून] पु० १ जोर. २जुलूम. ३ पाठबळ.

जोरी स्त्री० जोंधळा हें धान्य.

जोरी [म० जोर; फा० जोर] वि० जोरांत बसलेलें (मोहोरें,–बुद्धिबळांच्या डावांत).

जोल स्त्री० अनुरूपता; सारखेपणा. ꣸ **जोलीचा** वि० अनुरूप.

जोव स्त्री० वीज, विद्युत्.

जोवणी स्त्री०जोकडाची खुंटी;जोकडाच्या दोन्ही शेवटांस ज्या दोन खुंट्या असतात त्या प्रत्येक.

जोवणें [म०जोव] अ० क्रि० १ (वीज) चमकणें. २ (माशा, चिरटें, इ०) गोळा होणें. ३ पचपचीत किं० नीरस होणें (फळांनीं).

जोंवर, जोंवरी क्रि० वि० ज्या काळापर्यंत; जोंपर्यंत.

जोवाल [म० जोवणें] स्त्री० जमीन भाजण्यासाठीं झाडाझुडांच्या फांद्या तोडणें इ० कामांसाठीं जमलेले शेतकरी समुच्चयानें.

जोशी [सं० ज्योतिष=ज्योतिषी] पु० १ ज्योतिषशास्त्रज्ञ. २ ज्योतिषपणाची वृत्ति आहे ज्याची तो. ३ सहदेवी मताचे मुहूर्त जाणणारी शूद्रांतलि एक जात. ४ कुक्कुडकुंभा नांवाचा पक्षी.

जोसकी स्त्री०, **जोसपणा** पु०, **जोसपण** न० जोशाची वृत्ति; जोशाचा धंदा.

जोसगंड पु० जोशी (तुच्छतेनें).

जोहरी, जोहारी, जोहोरी [अ० जवाहर्] पु० १ हिरे, माणकें, मोतीं, इ० विकणारा व्यापारी. २ जुने जरीचे कपडे जाळून त्यांतून चांदी काढणारा कारागीर. ३ आरशा, फण्या, गंगावनें, चरकीचीं भांडीं, इ० जिन्नस दारोदार फिरून विकणारा.

जोहार, जोहर [अ० जवाहर्] न० १ सोन्याचांदीचे दागिने समुच्चयानें. २ जवाहिऱ्याचा धंदा.

जोहार [सं०जय हर !] पु० महार, चांभार, इ० लोक करतात तो नमस्कार. २ राजाला संबोधावयाचें असतां हा शब्द योजतात.

जौं क्रि० वि० जोंपर्यंत.

जौळ न० १ आकाशांत गोळा झालेलें मेघपटल. २ वादळ; सोसाट्याचा वारा. ꣸**जौळी**

हवा स्त्री० १वादळाची हवा. २वादळ सुचविणारी हवा. जौळी वि० वादळांत टिकाव धरूं शकेल अशा दृष्टीनें बांधलेलें(गलबत इ०).

ज्या [सं०] स्त्री० १ धनुष्याची दोरी. २ पृथ्वी. ३ वर्तुळाच्या परिघाचे कोणतेही दोन बिंदु सांधणारी रेषा. ॐ ज्याफल न० 'ज्या' ह्या शब्दाच्या अर्थ ३ मधील रेषेची मोजणी. ज्यामिति स्त्री० भूमापन किं० तत्संबंधीं शास्त्र.

ज्येष्ठ [सं०] पु० १ हिंदू वर्षाचा तिसरा महिना. २ वडील भाऊ. वि० १ सर्वांत वडील. २ श्रेष्ठ. ज्येष्ठा स्त्री० १ सत्तावीस नक्षत्रांतील अठरावें. २ वडील बहीण. ३ मधलें बोट. ४ दुर्दैव, अलक्ष्मी. ५ गंगा नदी. ॐ ज्येष्ठांबु न० १ तांदुळाचें धुवण. २ पेज. ज्येष्ठामलक पु० कडू लिंब. ज्येष्ठाश्रम पु० गृहस्थाश्रम. ज्येष्ठ तात पु० बापाचा वडील भाऊ. ज्येष्ठ भार्या स्त्री० मोठ्या भावाची बायको. ज्येष्ठवर्ण पु० ब्राह्मण. ज्येष्ठाकनिष्ठा स्त्री० अ० व० लक्ष्मी आणि तिची बहीण अवदशा ह्या दोघी. ज्येष्ठाकनिष्ठाव्रत न० भाद्रपद शुक्लपक्षांत ह्या दोन बहिणींच्या प्रसादनार्थ करतात तें व्रतविशेष. ज्येष्ठागौर (--री) स्त्री० भाद्रपद महिन्यांत ज्येष्ठा नक्षत्रावर पूजितात तो पार्वती देवीचा एक अवतार. ज्येष्ठासन न० कनिष्ठ कन्येच्या विवाहाच्या समयीं ज्येष्ठ कन्येच्या भर्त्यास जें शेलापागोटें इ० देतात तें. ज्येष्ठवड [सं० ज्येष्ठ+म० वड] स्त्री० ज्येष्ठ मास. ज्येष्ठी स्त्री० ज्येष्ठ महिन्यांतील पौर्णिमा.

ज्येष्ठमध पु० स्त्री० एक औषधी मुळी.

ज्योति [सं० ज्योतिस्=तेज] स्त्री० १ तेज, प्रकाश. २ दिव्याची ज्वाळा.

ज्योति [सं०ज्योतिस्=तेज] स्त्री० १ तेज, प्रकाश. २ दिव्याची ज्वाळा. ३ वीज. ४ ब्रह्म. ५ डोळा हें इंद्रिय.ॐज्योतिश्चक्र न० मेष, वृषभ, इ० बारा राशि समुच्चयानें. ज्योतिर्ज्ञ पु० ज्योतिषी. ज्योतिष्मान वि० तेजस्वी. पु० सूर्य. ज्योतिष्मती स्त्री०रात्र.ज्योतिष्टोम पु०सोमयाग. ज्योतिर्लिंग न० काशीविश्वेश्वर इ० जीं शिवाचीं बारा लिंगें प्रसिद्ध आहेत तीं प्रत्येक. हीं बार येणेंप्रमाणें; १ सोरठ येथील सोमनाथ; २ उज्जनी येथलि महाकाल; ३ बदरी येथलि केदार; ४ काशी येथील विश्वेश्वर; ५ महेश्वर येथील ओंकारेश्वर; ६ त्रिंबक येथील त्र्यंबकेश्वर; ७ वेरूळ येथलि धृष्णेश्वर; अवंढें येथील नागनाथेश्वर; ९ परळी येथलि वैजनाथ; १० भीमाकाठीं भीमाशंकर; ११ श्रीशैल येथलि मल्लिकार्जुन; १२ सेतुबंध येथलि रामेश्वर. ज्योतिःशास्त्र. न० खगोलांतील जे तेजोगोल त्यांच्या गति इ० संबंधाचें शास्त्र.

ज्योतिष [सं०] वि० ज्योतिषासंबंधाचा. पु० ज्योतिषी. न० ज्योतिःशास्त्र. ॐ ज्योतिषी पु० १ ज्योतिःशास्त्र जाणणारा. २ लग्न, मुंज, इ० विधींचे मुहूर्त काढणारा, ग्रहण सांगणरा,इ०.

ज्वर [सं०] पु० १ ताप म्हणून जी शरीराची विकृति ती. २ संताप; दुःख;त्रास. ॐज्वर पांचवा, ज्वर पाचावा पु० १ ज्वरांतून पूर्णपणें बरें व्हावयाच्या अगोदर कामकाज करूं लागल्यामुळें उलटलेला ताप. २ दृष्टिबाधा होऊन उलटलेला ताप. ज्वरसृष्टि स्त्री० तापाच्या गुंगींत दिसणारा देखावा. ज्वरांकुश पु० तापावरचें एक औषध. ज्वरांश पु० १ बारीक ज्वर. २ तापाची कसर. ज्वरविपाक पु० परमावधीला पोचलेला अंगांतील ताप; तापाचा पूर्ण भर. ज्वरातिसार पु० हगवण किं० आमांश यांची विकृति असतां अंगांत भरतो तो ताप.

ज्वरित [सं०] वि० तापानें पीडिलेला.

ज्वलन [सं०]न० जळण्याची क्रिया.पु०अग्नि.

ज्वल्प, जळप पु० १ रागाची उसळी; राग; आवेश. २ दुर्गंधी. ३ दरारा; दहशत.

ज्वार, ज्वारी स्त्री० जोंधळा हें धान्य.

ज्वाला [सं०] स्त्री० १ जाळ. २ अग्नीचा झोत. ॐ ज्वालामुखी स्त्री० ज्याच्या तोंडांतून ज्वाला निघतात असा पर्वत. ज्वालामाली पु० अग्नि. ज्वालापटल न० १ आगीचा डोम. २ अग्निज्वाळांचा झोत. ३ वणवा.

झ

झ मराठी व्यंजनमालेंतील हें नववें व्यंजन आहे. ह्या व्यंजनाचे मराठींत दोन प्रकारचे उच्चार आहेत; तालव्य (झिंगणें, झिंजोटी), आणि दंत-तालव्य (झटका, झुणका). छापण्यांत आणि लिहिण्यांत हे दोन प्रकार सारखेच दाखविले जातात.

झक [**हिं०** झक्=माशी] **स्त्री०** माशी ह्या शब्दाचा उपयोग नेहेमीं 'मारणें' ह्या शब्दाच्या कर्मत्वानें होतो, इतर रीतीनें होत नाहीं.' झक मारणें' ह्या अर्थाचें ' झकणें ' हें क्रियापद फक्त ' झकत, ' 'झकत' ह्या रूपांनीं योजलें जातें. झक मारणें म्ह० १ माशी मारणें म्ह० क्षुल्लक पराक्रम करणें. २ हिडिस्स किं० अप्रिय गोष्ट करणें. पुढें 'झक मारणें' ह्याचा भलतींच गोष्ट करणें, कांहीं निंद्य गोष्ट करणें असा अर्थ झाला. **क्ष्मी तुला रामाचें रहस्य सांगितलें, झक मारली** ! मी तुला तें रहस्य सांगितलें ही मोठी चूक केली. **झक मारीत, झकत, झक्त क्रि० वि०** अलबत ! निःसंशय ! स्वताची इच्छा नसतांही; किं० सक्तीनें; उ० गडी जात काहीं म्हणजे काय ! झक मारीत जाईल; उ० (१) रामानें बाळोबा माळ्याच्या आंब्याच्या झाडावर धोंडे मारले म्हणूच मी मारले (२) रामानें झक मारली, तूं धोंडे मारावयाचे नव्हते. येथें रामानें झक मारली म्ह० त्यानें कांहीं भलतीच गोष्ट केली तर करूं दे, त्याच्या प्रमाणें तूं तसें करणें योग्य नव्हतें; उ० त्याचें नाक धरलें म्हणजे तो झकत तोंड उघडील म्ह० नाईलाज होऊन.

झककन्, झककर, झकदिशीं, झकदिनीं क्रि० वि० चमकून; तेज पाडून.

झकझक स्त्री० चकाकी; चमक.

झकझकणें अ० क्रि० लखलखणें; चमकणें.

झकझकाट पु० लखलखीतपणा.

झकझकीत वि० लखलखीत; तेजस्वी; चकचकीत.

झकटणें अ० क्रि० खरडणें.

झक (–ग–) डणें अ० क्रि० १ भांडणें. २ मारामारी करणें. ३ घासणें.

झकणें अ० क्रि० १ चकित होणें. २ फसणें; चकणें. ३ चुकणें.

झकमक स्त्री० १ चकमक. २ भांडण.

झकवणूक स्त्री० फसवणूक.

झकाविणें स० क्रि० १ फसविणें. २ मोहित करणें.

झकाकणें अ० क्रि० झळकणें; चमकणें.

झकाकी स्त्री० चमक; तेज.

झकाकीत वि० चकचकीत.

झकाझोक पु० ऐट; थाटमाट; अक्कडबाजी.

झंकार [**सं०**] **पु०** खणखण किं० छणछण असा आवाज.

झक वि० १ चकचकीत. २ उठावदार. **क्रि० वि०** भपक्यानें; डोळ्यांत भरेल अशा रीतीनें.

झक्कड [**हिं०**] **वि०** हट्टी; हेकेखोर.

झकू पु० विटीदांडूच्या खेळांत एकाद्यावर लागूं झालेला डाव.

झंगट, झेंगट न० १ ज्या काशाच्या तबकडीवर लाकडाच्या दांडक्यानें तास बडवितात ती. २ कित्येक भिकारी भीक मागतांना अशींच जी तबकडी बडवितात ती.

झगटणें स० क्रि० १ स्पर्शिणें; घासणें; उ० त्या रंगविलेल्या कपाटाला झगटूं नको (किं० झगटून बसूं नको). २ पकडणें; धरणें. ३ आदळणें; आपटणें. **अ० क्रि०** १ चिकटणें. २ भांडणें.

झंगड स्त्री० १ तासाचे टोले जिच्यावर लाकडाच्या दांडक्यानें बडविले जातात ती कासें ह्या धातूची वाटोळी तबकडी. २ वाद्य,—काशाच्या तबकडीच्या रूपाचें. ३ वाद्यांचा गजर. ४ कलकलाट. ५ वैपुल्य (भोजनांत खाद्यें पेयें इ० चें). ६ गायन, वादन, नाच, वगैरेंतील रंग. **क्रि० वि०** मोठा खणखणाट करून.

झगडणें अ० क्रि० १ भांडणें. २ मारामारी करणें.

झगडा पु०, झगड स्त्री० १ भांडण, कलह. २ निकालासाठीं सरकारांत मांडलेला कज्जा किं० खटला.

झगमग स्त्री० चकाकी; तेज.

झगरें न० १ पेटविलेल्या गोवऱ्या किं० रस-

रशीत निखारे इ० ची रास, (कांहीं पदार्थ भाजण्यासाठीं किं० शेकण्यासाठीं).२ विस्तव.

झग (–ब–)लें न० लहान मुलांचा चोण असलेला एक प्रकारचा अंगरखा.

झगा पु० कांहीं आकारविशेषाचा पायघोळ डगला.

झगार न० १ मेघांचें आकाशांत गोळा झालेलें पटल. २ ह्या पटलामुळें पडलेली अंधेरी (क्रि० येणें, निघणें, उठणें). ३ पावसाची सर (पडणें, येणें).

झंझा [सं०] स्त्री० १ वादळ. २ जोराचा पाऊस. ꙮ **झंझावात, झंझानिल** पु० पर्जन्ययुक्त वादळ.

झट न० १ उपद्रवकारक वस्तु, माणूस, किं० काम; शुष्ककाष्ठ. २ रट्टा, तडाखा (लागणें). ꙮ **झटझोंबट** न० तंटेबखेडे; भांडणतंटे.

झटकणें स० क्रि० १ झाडणें. २ केरसुणी इ०चे तडाखे मारणें (पदार्थावरची धूळ उडवून लावण्यासाठीं). ३ धोतर, सतरंजी, इ० ना जोराचे हासडे देणें (धूळ उडवून लावण्यासाठीं).

झटकन, झटकर, झटदिनीं, झटदिशीं क्रि० वि० वेगानें, त्वरेनें, झपाट्यानें.

झटका, झटकारा पु० १ रट्टा, तडाखा. २ जोरानें ओढणें, फिरविणें,आपटणें, किं० मारणें. ३ अकस्मात् उठलेली तीव्र वेदना; तिडीक. ४ वाऱ्याची जोरदार झुळुक. ५ रागाची लहर. ६ अंगांत भुताचा संचार. ७ नाचणें, पोहणें, इ० क्रियांत हात किं० पाय टाकण्याची सफाई. ८ व्यापारांत ठोकर किं० हानि. ꙮ **झटक्यापटक्यांत** क्रि० वि० अत्यल्प कालांत; हां हां म्हणतां.

झटकारणें स० क्रि० १ (पदार्थाला)जोराचा तडाखा देणें. २ झिडकारणें; धिक्कारणें.

झटकाविणें ' झटकणें ' पहा.

झटझट, झटझटां क्रि० वि० १ वेगानें. २ वेळ न गमावतां किं० न रेंगाळतां(कांहीं काम करणें).

झटणें अ० क्रि० १ सर्व शक्ति खर्चून नेटानें प्रयत्न करणें. २ एकाद्या माणसाच्या अंगाशीं भिडणें, चिकटणें, किं० बिलगणें.

झटपट क्रि० वि० त्वरेनें; लगबगीनें.

झटपट,झटापट स्त्री० १ भांडण; कलह. २ मारामारी, लहानशी लढाई.३ चपळाई,त्वरा,किं० घाई (कांहीं काम करण्यांत).

झटापटी स्त्री० १ भांडण, कलह, मारामारी. २ आवेशाचा वाद (उडणें, झडणें, इ०).

झटाळ, झटयाळ, झटाळी वि० १ नानाप्रकारच्या वेडगळ युक्त्या, कल्पना, किं० हिकमती काढण्यांत पटाईत; भरकट्या. २ कावेबाज. ३ कर्जबाजारीपणामुळें पेचांत पडलेला.

झटाळ न० १ उपद्रवकारक माणूस किं०काम. २ पेच; संकटाची स्थिति.

झटेपटे, झटेपट्टे पु० अ० व० व्यर्थ यातायात; रिकामा त्रास.

झटेल, झटेली,झटेल्या वि०मूर्खपणाच्या किं० वात्रटपणाच्या गोष्टी करण्यांत पटाईत किं० निमग्न.

झड स्त्री० १ फार वेळ टिकलेली पावसाची सर (लागणें).२जोराच्या पावसाचे उडणारे तुषार.३पावसाचे तुषार घरांत येऊं नयेत म्हणून खिडकी किं० दार यांचेपुढें पानें,गवत,इ०ची करतात ती छावणी किं०छप्पर.ह्या अर्थी'झडी'असाही शब्द आहे.४एकाद्या ठिकाणीं गोळा झालेल्या पांखरांची,किं०गुरांढोरांची, किं०माणसांची गर्दी किं०दाटी;उ०गांवांत एकच विहिर असल्यामुळें सकाळीं त्या विहिरीवर बायकांची मोठी झड पडते. ५ एकादी आवडीची किं० मूल्यवान वस्तु मिळावी म्हणून तिच्यावर घातलेली उडी (घालणें, करणें, पडणें, लागणें); उ० नको अवमानूं विठ्ठला तुका म्हणे झड घाला. ६ डोक्यावरचे केश, झाडांचीं पानें किं० फुलें, आंब्याचा मोहोर, इ० चें एकसारखें गळणें (लागणें). ७ क्षयादि कारणानें उत्तरोत्तर रोडावत जाणें (लागणें); उ० रामभाऊच्या अंगास झड लागली आहे. ८ एकामागून एक अशा एकाच जातीच्या अनेक गोष्टी घडणें; परंपरा (लागणें, पडणें); उ० हल्लीं ह्या गांवांत घरफोड्या चोऱ्यांची झड लागली आहे.

झडकणें स० क्रि० १ वस्त्राला जोराचा हिसका किं०हांसडा देणें,–धूळ,माशा,मुंग्या,किं०पाणी,इ० उडवून लावण्यासाठीं; उ०हें उपरणें झटकून आण; उ० तुझा मंदील झाडून झटकून बासनांत बांधून ठेव. २ एकाद्या पदार्थावरची धूळ इ० उडवून

लावण्यासाठीं त्याचेवर वस्त्र किं० केरसुणी यांचा फटकारा मारणें; उ० ही पेटी केरसुणीनें झडकली पाहिजे.

झडकणें अ० क्रि० झपाट्यानें निघून जाणें.

झडकन, झडकर, झडदिशीं, झडदिनीं क्रि० वि० झपाट्यानें, वेगानें, घाईनें.

झडका [म० झडणें] वि० १ रोडावलेला. २ क्षीण झालेला. ३ झडलेला.

झडकारणें, झडकाविणें स० क्रि० तुच्छ करून दूर लोटणें; नापसंत ठरविणें.

झडणी, झडणूक स्त्री० रोडावणें; क्षीण होणें.

झडणें अ० क्रि० १ गळून पडणें (वृक्षाचीं पानें, डोकीचे केश, इ०). २ अंगानें रोड किं० किडाकिडीत होणें. ३ निस्तेज किं० फिक्कें होणें. ४(चौघडा,झांज,इ०वाद्यें) वाजणें. ५(वाद,भांडण, इ०) सुरू होणें. ६ नोकरचाकर, शिपायीप्यादे, इ०चीं वेतनें वेळच्यावेळीं दिलीं जाणें. ' चांदरांत झडणें' म्ह० माहन्यांत नोकरांच्या कामांचे दिवस मोजून त्यांचा पगार देऊन टाकणें. ७ (बंदूक इ०-चा) बार होणें.

झडती [म० झडणें] स्त्री० १ बारकाईनें केलेला तपास; धुंडाळणें (घेणें); उ० त्या जकातीच्या नाक्यावर सरकारी अमलदार वाटसरूंच्या सामानाची झडती घेतात. २ सर्व पदार्थ यथास्थित आहेत किं० नाहींत, एकाद्या विशिष्ट जागीं कोणते पदार्थ किती आहेत, इ०ची माहिती मिळविणें, किं० इ०चा तपास करणें. ३ क्रयविक्रयादि होऊन, खर्च वेच इ० होऊन, किं० तपास,परीक्षा इ० होऊन, कामाची समाप्ति.

झडप स्त्री० १ पक्षी, पोरें, इ०कांनीं पदार्थविशेष मिळविण्यासाठीं त्याच्यावर केलेला हल्ला, किं० मारलेली उडी, किं० घेतलेली धाव. २ एकाद्या विशिष्ट स्थानाकडे वेगानें घेतलेली धाव. ३ दरवाजे, खिडक्या, इ० बंद करण्यासाठीं जीं झांकणें असतात तीं प्रत्येक. ४ पर्जन्यनिवारणार्थ खिडक्या, दारें,इ०च्या वर किं० पुढें ज्या छावण्या केलेल्या असतात त्या प्रत्येक.

झडपड स्त्री० तडफड; जोराची हालचाल.

झडपण [म० झडपणें] न० १ पंखा इ० वारा घेण्याचें किं० घालण्याचें साधन. २ झाकण.

झडपण न०, **झडपणा** स्त्री० १ भूतबाधेचा एकाद्या माणसाचे ठायीं संचार. २ अंगांत एकदम पुष्कळ भरलेला ताप किं० एकदम विकोपास गेलेला कोणताही आजार.

झडपणी [म० झडपणें] स्त्री० १ वारा घालणें. २ वारा घालण्याचें कोणतेंही साधन,-पंखा इ०. ३ भूत, पिशाच, सटवी, इ० चा अंगांत झालेला संचार. ४ताप किं० कोणताही रोग यांचा अंगांत एकदम जोरावलेला उद्भव.

झडपणें न० पंखा इ०वारा घालण्याचें साधन.

झडपणें स० क्रि० १ पदार्थावर वाऱ्याचा झोत चालविणें किं० त्याला वारा घालणें (धान्यांतील केर उडवून लावण्यासाठीं, किं० अग्नि उद्दीप्त करण्यासाठीं).२भूत, पिशाच, इ०नीं एकाद्याच्या अंगांत संचार करणें. अ० क्रि० १ पर्जन्यादिकांनीं खळणें किं० थांबणें. २ पक्ष्यादिकांनीं पदार्थविशेषावर उडी मारणें किं० वेगानें उतरणें.

झडपा पु० १ काऱ्या, बांबूच्या काड्या, इ०-चें केलेलें दार. २ पेटी इ०चें झांकण. ३ बांबू इ०चा केलेला पंखा.

झडाका पु० १ जोराचा रट्टा किं० तडाका.२ जोराची क्रिया किं० हालचाल. ३ जोर, आवेग.

झडाडणें अ० क्रि० १ जोराचा हल्ला करणें. २ एकाद्या ठिकाणीं वेगानें जाणें. ३ झडझड असा आवाज करणें.

झडा (-रा-)तावा स्त्री० अ० व० जोराचा प्रयत्न; नेट (देणें).

झडी [म० झड] स्त्री० १ पावसाची संतत धार किं० वृष्टि. २ झाडाचीं पानें,शरीराचें मांस, किं० अंगांतील शक्ति गळण्याची किं० पडण्याची किं० ओसरण्याची क्रिया. ३ मनुष्य, प्राणी, इ० चें कांहीं रोगामुळें रोडावत जाणें (लागणें). ४ पर्जन्याचा उपद्रव होऊं नये म्हणून तट्ट्या, चट्ट्या, झापा, इ०नीं बांधलेली तात्पुरती भिंत किं० केलेलें आच्छादन.

झणका पु० १ रागाचा आवेग; कोणत्याही मनोविकाराचा जोरदार उद्भव. २ विंचू, गांधीलमाशी, इ० च्या दंशाची एकदम उठलेली वेदना किं० आग.

झणकार (-रा) पु० १ खणखण असा

आवाज. २ झपाटा. ३ वेग. ४ क्रोधादि मनोविकारांचा जोरदार उद्रेक (येणें).

झणकी स्त्री० १फडफडावण्याची क्रिया.२विंचू इ०च्या नांगीची तीव्र आग. ३ तिखट किं० कडत पदार्थ तोंडांत घातला असतां एकदम होते ती तीव्र आग (मारणें, उठणें, निवणें).

झणझणणें अ० क्रि० १ खणखण, झणझण, असा आवाज कांहीं धातूच्या पदार्थानें करणें.२तीव्र वेदनेची लहर उठणें. ३ तिखट किं० उष्ण पदार्थ लागल्यानें तोंड, डोळे, त्वचा इ० चीं आग होणें. ४ अपमानकारक शब्द, शिवी, पराजय, इ० मनाला बोचणें किं० झोंबणें.

झणझणीत वि० १ मसालेदारपणामुळें रुचकर, (पिठलें, भाजी, इ०). २ खूप तिखट. ३त्वचेची आग करणारें (औषध).४इ०सख्त (ताकीद, हुकूम, कानउघाडणी).

झणत्कार पु० झणझण असा आवाज (वाळे, तोरड्या, कंकण, धागऱ्या, इ० चा).

झणाटा पु० १ टणत्कार. २ दंशानें उत्पन्न झालेली आग किं०तिडीक. ३कांहीं मनोविकाराचा उद्रेक. ४ उष्ण वाऱ्याचा झोत. ५ सपाटा,तडाका. ६ जोर; आवेश.

झणाणणें अ० क्रि० १ मोठा आवाज करणें. २ झोंबणें (मिरची, औषध, इ०).

झणाणां क्रि० वि० खणखण असा आवाज करून किं० करीत.

झणीं, झणें क्रि० वि० १ वेगानें, त्वरेनें. २ न जाणों, कदाचित्.

झपाझप, झपांझप क्रि० वि०१ वेगानें; झपाट्यानें. २ उसंत न खातां; न थांबतां.

झपका पु० झुबका (फुलें इ० चा).

झंपा पु० १ एका तालाचें नांव. २ एक वाद्य.

झपाटणें स० क्रि० २ जोरानें,आवेशानें,किं० झपाट्यानें(कांहीं काम)करणें किं०संपविणें.२(कांहीं खाद्य) खाऊन टाकणें. ३ भूत, पिशाच, इ०नीं एकाद्याला पछाडणें.

झपाटा पु० १ जोराचा तडाखा. २ जोराची कांहीं क्रिया. ३ वेग, आवेश. ४ जोर, आवेग. ५ तीव्रता. ४ भूत, पिशाच, इ०नीं एकाद्याची केलेली पछाडणूक.

झपापां क्रि० वि० १ झपांझप; वेगानें,त्वरेनें. २ न थांबतां.

झपेट [हिं०] स्त्री० १ झाप, उडी. २ भूत पिशाच, इ०चा एकाद्याच्या अंगांत संचार.

झबलें न० १ लहान मुलाचें अंगडें. २ लहान मुलांचा झालरी इ० नीं सुशोभित केलेला कांहीं आकारविशेषाचा पायघोळ अंगरखा.

झबा,झुबा पु० कांहीं आकारविशेषाचा अंगरखा.

झमकणें अ० क्रि० चमकणें; लखलखणें.

झमझम, झमांझमां क्रि० वि० झमझम असा आवाज करून किं० असा आवाज होईल अशा रीतीनें.

झरकणें अ० क्रि० वेगानें पळून जाणें; झपाट्यानें पळ काढणें.

झरका पु० (भाषण, चलनवलन, इ० चा) वेग, आवेश, त्वरा, जोर (करणें, लावणें, मांडणें).

झरझर क्रि० वि० त्वरेनें; वेळ न गमावतां; झपाट्यानें.

झरझरीत ,झिरझिरीत वि०१ज्याच्या विणीचे तंतु अति विरल आहेत असें (वस्त्र). २ फार वापरल्यामुळें ज्याला भोकें पडलीं आहेत आणि जें निर्जीव झालें आहे असें (वस्त्र).

झरणें अ० क्रि० १ बारदानाला बारीक छिद्र असल्याकारणानें त्यांत ठेविलेला पदार्थ थेंबाथेंबांनीं बाहेर पडणें; पाझरणें; उ०हीं कासंडी फुटकी आहे तींतून पाणी झरेल. २ अशा फुटक्या बारदानांतील पातळ पदार्थ बाहेर टाकणें; उ० हें पीप झरतें, ह्यांत तेल ठेऊं नका. ३ घर्षणानें कमी होणें; उ० हें चंदनाचें खोड सहा महिन्यांत झरेल. ४ (रोगानें शरीर) रोडावणें; (बेताल खर्चामुळें संपत्ति) ऱ्हास पावणें; (वार्धक्यानें स्मृति) कमजोर होणें.

झरम न० एक प्रकारचा मासा.

झरवणी [म० झरा+पाणी] न० १झऱ्याचें पाणी. २बारदानांतून पातळ पदार्थ थेंबें थेंबें गळणें.

झरस स्त्री० एक पालेभाजी,–कडवी आणि गोडी अशा हिच्या दोन जाति आहेत.

झरा [सं० झर, झरा,झरी] पु०१पृथ्वीच्या पोटांतून बाहेर पडणारा पाण्याचा प्रवाह; उ० आमच्या विहिरीला मनगटाएवढे तीन झरे

आहेत. २ पैशाचा किं० वैभवाचा उगम; उ० बाळकाका मेल्यापासून आमच्या संपत्तीचा (किं० वैभवाचा) झरा आटल्यासारखा झाला आहे.

झराका पु० तळखपणा; आवेग; (लावणें, करणें, इ०). वर ' झरका ' पहा.

झराझर (–रां), झरारां क्रि० वि० जलद, वेगानें.

झरातावा स्त्री० अ० व० जोराचा किं० नेटाचा प्रयत्न(क्रि० देणें).मागें 'झडातावा' पहा.

झरी [सं०] स्त्री० १ पाण्याचा झरा. २ पाण्याचें टांकें.

झरी [म० झरणें] स्त्री० १ क्षय (आजारानें शक्तीचा, बेताल खर्चानें संपत्तीचा) (क्रि० लागणें). २ पाणी प्यावयाचें किं० संध्यावंदनाच्या उपयोगाचें तोटी असलेलें पात्रविशेष. ३ पाणी गार करण्याचें उंच गळ्याचें पात्रविशेष; सुरई.

झरोका, झरोखा, झरूका (–खा) पु० घरांत किं० खोलींत वारा किं० उजेड यावयासाठीं भिंतींत किं० छपरांत ठेविलेलें भोक; लहानशी खिडकी किं० गवाक्ष.

झलाळ, झल्लाळ स्त्री० १ तेज; लखाखी; चकाकी. २ तेजाचे किरण.

झल्लर स्त्री० झालर, किनार.

झल्लरी स्त्री० झांज; टाळ.

झळ, झळई [सं० झला=उन्हाची झळई] स्त्री० उष्ण हवेचा झोत; (खाणें, लागणें, बाधणें).

झळक स्त्री० १तकाकी,चकाकी.२प्रकाशकिरण.

॰झळक फळक वि० १ चकचकीत. २ ऐटदार, झोंकबाज.

झळकणें अ० क्रि० चकाकणें; चमकणें; तकतकणें.

झळझळ (–ळी) स्त्री० चकाकी; तेज.

झळझळणें अ० क्रि० चकचकणें.

झळझळाट पु० अनेक दिव्यांचा लखलखाट; सर्व बाजूंस पसरलेला प्रकाश.

झळझळीत वि० १ चकचकीत, तेजस्वी. २ संशयरहित, स्पष्ट असलेलें (वेड, लबाडी, खोटेपणा, इ०). ३ अगदीं, मुळींच (अकरणरूपी प्रयोगांत);उ०आज घरांत झळझळीत तांदूळ नाहीं.

झळणें अ० क्रि० (मद्य) उन्हांत तापणें.

झळणें अ० क्रि० भांड्याला डाग लाविला जाऊन तें सांधलें जाणें.

झळंबणें स० क्रि० १ खरडणें, घासणें. २ (भूत, पिशाच, इ०नें) बाधा करणें. ३ व्यथित करणें; पीडिणें; झोंबणें. ४ उन्हांत(मद्य)तापविणें.

झळंबणें अ० क्रि० १ (माडाच्या जीर्ण झावळ्या किं० केळीचीं जीर्ण पानें झाडाला) लोंबत राहाणें. २ (झुबक्यांच्या रूपानें झाडावर फळें) लोंबत राहाणें. ३ (पाण्यांत सूर्यकिरणांनीं) हेलकावे खाणें. ४ भूत, पिशाच, इ०नीं पछाडलें जाणें.

झळम [म० झळमणें] वि० जीर्ण झाल्यामुळें वृक्षाला लोंबत राहिलेली (शाखा).

झळमणें वर ' झळंबणें ' पहा.

झळमळणें, झळंबळणें अ० क्रि० (हंड्या, झुंबरें, इ०चे लोलक) चमकणें; (पाण्यावर सूर्यकिरणें) चकचकणें.

झळवट वि० उन्हांत तापलेलें किं० तापविलेलें(पाणी).

झळवणी [म० झळ+पाणी] न० उन्हांत तापलेलें किं० तापविलेलें पाणी.

झळाळणें अ० क्रि० चमकणें; चकचकणें.

झळाळ(–ळी) स्त्री० चकाकी; प्रकाश.

झा, झ्यां उ० वा० अ० घोड्याला जलद चालावयाची इशारत ह्या शब्दानें केली जाते. ॰**झा करणें** पळून जाणें.

झाऊ वि० १ विरळ विणीचें (वस्त्र); झिरझिरीत, विरविरीत (वस्त्र). २ हलकें, तकलादी (दागिना, पात्र). ३ भिकार; टाकाऊ; कुचकामाचा.

झाक [म० झाकणें] स्त्री० १ पोटांत फार वेळ अन्न न गेल्यामुळें, किं० पित्तामुळें, किं० भूतबाधा झाल्यामुळें, डोळ्यांवर येते किं० पडते ती झापड; डोळे मिटत असण्याची स्थिति. २ भोंवळ, चक्कर. ३ सुस्ती, गुंगी (येणें). ४ ढगांची अंधेरी; उ० पावसाची मघापासून झांक पडली आहे पण अझून एक थेंबहीं पडला नाहीं.

झाक [म० झकझकणें] स्त्री० १ चकाकी. २ (सोन्याचा किं० रुप्याचा) मुलामा. ३ (पावसाची) सर. ४ (पक्ष्यांचा) थवा किं० धाड. ५

(पक्ष्यानें घातलेली) झडप. ६ (उन्हाची) तिरीप. ७ (उष्ण वाऱ्याची) झुळक (लागणें, येणें). ८ ऐट, झोकबाजी.

झाकण [म० झाकणें] न० १ आच्छादन (पेटी, बारदान, इ०चें). २ झापड.

झाकणां [म० झाकणें] क्रि० वि० आच्छादन घालून.

झाकणी [म० झाकणें] स्त्री० १ पदार्थावर आच्छादनार्थ घालावयाची धातूची तबकडी. २ झाकण्याची क्रिया; झाकणें. ३ डोळ्यांवर पडते किं० येते ती झापड.

झाकणें स० क्रि० १ आच्छादणें. २ (कांहीं गोष्ट)लपविणें किं० उघडकीस न येईल असें करणें. ३ आपल्या मित्राच्या किं० आप्ताच्या) कांहीं लाजिरवाण्या कृत्यावर पांघरूण घालणें. ॐ **खातीचे गाल आणि न्हातीचे बाल झाकत नाहींत** १ वेळच्यावेळीं न्हाणाऱ्या स्त्रीचे केश स्वच्छ आणि चकचकीत दिसतात, आणि पोटभर खाद्यें खाणाऱ्या स्त्रीचें गाल धष्टपुष्ट दिसतात. २ कांहीं चांगली किं० वाईट गोष्ट गुप्तपणें केली तरी ती परिणामावरून उघडकीस येतेच. **झाकली मूठ सव्वा-लाखाची** १ आपलें ज्ञान, संपत्ति, इ०बद्दल आपण मुळींच बोललों नाहीं तर तें आपलें ज्ञान आणि ती आपली संपत्ति इ० हीं आहेत त्यांच्यापेक्षां अधिक अशीं लोकांना वाटतील. आपण बढाई मारूं लागल्यास तीं खरोखरीं आहेत त्यांहून कमी आहेत असें लोकांना वाटेल किं० असा ग्रह लोक मुद्दाम करून घेतील म्हणून आपण होऊन आपली संपत्ति, विद्या, इ० संबंधानें कांहीं बोलूं नये हा शहाणपणा. २ आपल्या एकाद्या लाजिरवाण्या गोष्टीचा बभ्रा होऊं देऊं नये; ती दाबून टाकणें हें बरें. **झाकलेलें माणीक न०** जो बाहेरून मूर्ख, बेअकली, किं० अडाणी असा वाटतो परंतु जो खरोखरीं विद्वान्, शाहाणा, आणि सुशिक्षित आहे असा माणूस. **झाकल्या मुठीं क्रि० वि०** गुप्तपणें; बोभाटा न करतां; बभ्रा न होऊं देतां.

झाकर न० झाडाझुडपांची निबिड जाळी. २ जेथें पानें दाट आहेत असा झाडाचा भाग. ३ पानांसकट तोडलेली झाडाची फांदी.

झाकरणें अ० क्रि० उगवलेल्या दाट पानांनीं झाडाची फांदी युक्त होणें; उ० ह्या वेलाच्या झाडाची ही एकच फांदी झाकरली आहे.

झाकळणें, झाकाळणें [म० झाकणें] **स० क्रि०** १ आच्छादणें; लपविणें. २ (एकाद्याचा) नक्षा उतरणें किं० त्याला फजीत करणें.

झाकुळणें, झाकोळणें स० क्रि० झाकणें, आच्छादणें. **अ० क्रि०** १ चकित होणें. २(डोळे) झाकणें.

झांगड स्त्री० एके काळीं वाजणाऱ्या अनेक वाद्यांचा मिश्र आवाज. ॐ **झांगडाझिंगा पु०** १ भांडण; तंटेबखेडे.

झांज स्त्री० १ उन्हामुळें किं० पित्तामुळें डोळ्यावर येते ती अंधेरी. २ मूर्च्छा, चक्कर.

झांज [हिं० झांझाह] **स्त्री०** कासें नांवाच्या धातूचें वाद्यविशेष. ॐ**झांज झडणें** १(कांहीं काम) चालू असणें. २झांज वाजत असणें. ३दोन माणसांची मारामारी किं० भांडण होणें. **एकाद्याची झांज झाडणें** त्याची खरडपट्टी काढणें; त्याच्यावर ताशेरा झाडणें.

झांजड, झांजर न०, स्त्री०, झांजर मांजर स्त्री०, झांजड झांजड न० पहाट; अंगावरची लव दिसण्याइतका पहाटेचा प्रकाश (होणें, पडणें); उ० झांजड झांजड झालें कीं हें औषध घेऊन पुन्हां एक झोप घ्या !

झांज (-झ-)रणें स० क्रि० १ खरडणें (माल किं० त्वचा निघण्याइतकें). २ एकाद्याला फसविणें; एकाद्याला टोपी घालणें. ॐ **झांजर-माडाचे गरे खाणें** कोणेकानें झाडावरून पडून अंग खरचटल्यानें आणि ठेचल्यानें व्यथित होणें.

झांजरता [म० झांजरणें] **वि०** १ अस्पष्ट, अंधक. २ किंचित् चिकटून किं० खरडून.

झांजरी [म० झांज] **स्त्री०** लहानशी झांज. झांज म्ह० कासें ह्या धातूचें वाद्यविशेष.

झांजू पु० एक प्रकारचें गीत.

झाझा उ० वा० अ० घोड्याला जलद चालावयाची इशारत ह्या शब्दानें केली जाते.

झाझू स्त्री० कलह; बोलाचाली.

झाड न० १ वृक्ष. २ (लाक्षणिक) पिशाचसंचार ज्याच्या अंगांत झाला आहे असें माणूस,

किं० अशा माणसाचें शरीर. ३ दारूकाम उडवावयासाठीं झाडाच्या आकाराची जी कामट्या, काठया, इ० चीं रचना केलेली असते ती. ** **झाडझाडोरा** पु०, **झाडझुडपी** स्त्री०, पु० लहान झाडें आणि मोठीं झाडें ह्यांची गुंतागुंत किं० ह्यांचें बेट. **झाडपाल्याचें औषध** न० झाडाचें औषध. खनिज किं० रासायनिक नव्हे असें औषध.**कोण्या झाडाचा पाला** पु० क्षुद्र माणूस. **तूं फिरलास झाडोंझाड मी फिरलों पानोंपान** तुझ्यापेक्षां मला अधिक अक्कल आणि अनुभव आहे; तुझ्या मानानें माझें निरीक्षण अधिक बारकाईचें आहे. **झाड उभें करणें** (लाक्षणिक) उत्कृष्ट तऱ्हेचें कांहीं काम वठविणें; (गायन, वादन, कथा, उपपादनाच्या विषयाचें निरूपण, व्याख्यान, इ०). **झाडांचे राऊत दिसणें** (किं० **करणें**) भीतीनें इतकें आक्रान्त होणें कीं, साधीं झाडें सुद्धां सशस्त्र शिपायी आहेत असें वाटणें; उ० तूं उगीच झाडांचे राऊत करूं नको; उ० मी तेव्हां इतका घाबरलों कीं मला झाडांचे राऊत दिसूं लागले. **सुक्या झाडास बाक लावणें** (मेलेलें किं० वाळलेलें झाड वाकणें शक्य नाहीं ह्यावरून) व्यर्थ प्रयत्न करणें; वृद्धास किं० हेकट आणि हट्टी माणसास बोध करणें. **झाडखंड** न० झाडांझुडपांचा समुदाय, जाळी, किं० बेट. **झाडखंडा** वि० वर ' झाड उभें करणें ' ह्या वाक्प्रचारांत जें रूपक आधारास घेतलेलें आहे तेंच येथें घ्यावयाचें आहे. (शब्दशः) ज्याचीं पानें, फुलें, फळें, इ० खंडिलेलीं आहेत असें (झाड). अकुशलपणाचें, अर्धवट, ओबडधोबड असें (काम,-गायन, वादन, कीर्तन, भाषण, इ०). **झाडखंडी** वि० झाडांझुडपांनीं व्यापलेला(प्रदेश); जंगली. **झाडखंडी** स्त्री० झाडेंझुडपें. **झाडगळ** वि० झाडांझुडपांनीं व्यापलेला (प्रदेश).**झाडझडुला** पु०झाडें झुडपें समुच्चयानें. **झाडझाडोरा** पु०ःझाडेंविडें.

झाडण, झाडणी[म० झाडणें] स्त्री० केरसुणी.

झाडणी [म० झाडणें] स्त्री० १ केरसुणी. २ केरसुणीनें झाडण्याची क्रिया. ३ एकाद्याची काढलेली खरडपट्टी किं० भोसडपट्टी. ४ भूतबाधेचें निरसन. ५ विष उतरविणें.

झाडणें स०क्रि० १ केरसुणी इ०नीं (पदार्थावरचा केरकचरा) उडवून लावणें किं० नाहींसा करणें; उ० जमीन, टेबल, पेटी, इ० झाडणें; उ० केरकचरा झाडून ही खोली स्वच्छ केली पाहिजे. ३ ओलें वस्त्र इ०तील जलांश उडवून लावण्यासाठीं किं०त्याच्या सुरकुत्या मोडण्यासाठीं त्याला हासडे देणें. ४ कोणेकाला कठोर शब्दांनीं रागें भरणें. ५ हाकलून देणें. ६ (अवशिष्ट राहिलेली पैशाची रक्कम) देऊन टाकणें; (उरलेलें काम) संपवून टाकणें. ७(बंदूक) उडविणें.८(अंगांत संचरणाऱ्या भुताला) हाकलून देणें.अ०क्रि०बंदुकींतून बार निघाल्यावर तिनें ती उडविणाऱ्याला धक्का किं०हिसका देणें. **एकाद्यावर तंगड्या झाडणें** १ त्याशीं निमकहरामी करणें;त्याशीं कृतघ्न होणें.२त्याला व्यर्थ दोष देणें.**झाडून** क्रि०वि० पूर्णपणें; सर्वथैव; अगदीं.

झाडपट्टी, झाडंपट्टी स्त्री० १ सरकारदेण्याची बाकी पूज्य करणें. २ एकाद्याची खरडपट्टी काढणें.

झाडपिढ्या पु० देऊळ झाडणारा नोकर.

झाडबाकी स्त्री० पदार्थ देऊन किं० खर्चून संपविणें.

झाडवण [म० झाडणें] न०, स्त्री० १ केर काढणें. २ केरसुणी.

झाडा पु० १ पूर्ण तपास. २ हिशेबाची निःशेषता. ३ जुलाब, रेच. ** **झाडाझडका** पु० १ जकातीच्या नाक्यावर करतात ती सामानासुमानाची तपासणी. २ शौच, मुखमार्जन, इ० पंच धावनाच्या क्रिया समुच्चयानें. **झाडाझडती** स्त्री० जकातीच्या नाक्यावर मुशाफरांच्या सामानाची तपासणी.

झाडी स्त्री० झाडें, झुडपें, इ०ची गुंतागुंत.

झाडू [म० झाडणें] पु० १ केरसुणी. २ रस्ते झाडणारा. ३ भंगी.

झाडोरा [म० झाड] पु० झाडांची गर्दी; दाट झाडी.

झाड्या [म० झाडणें] पु० १ भंगी, हलालखोर. २ उचल्या चोर.

झाडया [म० झाड] पु० भूत, पिशाच, इ० ज्याच्या अंगांत संचरलें आहे असा मनुष्य.

झांप पु० १ झाडाच्या तोडलेल्या फांद्यांची मोळी. २ मोडून काढलेली झाडाची फांदी. ३ नारळीची (म्ह० माडाची) झावळी किं० फांदी,

किं० अशा फांदीची विणलेली चटई. ४ विशिष्ट जागेंत गुरांढोरांनीं येऊं नये म्हणून करतात तें वेढें किं० अडकण. ५ खिडकी, दार, इ०ची एका अंगची फळी. ६ गवती छपराचें घर किं० झोपडी.

झांप [म० झांपणें] **स्त्री०** पित्तादि विकृती-मुळें, किं० भूत, पिशाच, इ०च्या उपद्रवामुळें डोळ्यांची मिटले राहाण्याकडे जो प्रवृत्ति होते ती; झांपड (पडणें, येणें).

झाप, झांप स्त्री० १ मनुष्य पोहोतांना किं० साप सरपटतांना पुढचें अंग वर उचलतो ती क्रिया. २ पक्ष्यादिकांचा एकाद्या पदार्थावर हल्ला; झडप. ३ चोरांनीं मुशाफरावर केलेला हल्ला.

झापड, झांपड [म० झांपणें] **स्त्री०** १ पित्तादि कारणांमुळें डोळ्यांची मिटलेले राहाण्याकडे होते ती प्रवृत्ति. २ झोपेची निरंगळी. ३ आकाशांत मेघ गोळा झाल्यामुळें पृथ्वीतळावर पडते ती अंधेरी. ४ तोंडावर घातलेलें आच्छादन.

झांपडी [म० झांपणें] **स्त्री०** १ चालणाऱ्या किं० वाटोळे फिरणाऱ्या घोड्याच्या किं० बैलाच्या डोळ्यांवर घालतात तें आच्छादन. २ झापड.

झांपण, झापण [म० झांपणें] **स्त्री०** १ पित्तादि विकृतीमुळें, किं० भूत, पिशाच, इ० च्या संचारामुळें डोळ्यांचा मिटून राहाण्याकडे होते ती प्रवृत्ति. २ झोपेची निरंगळी. **न०** झाकण (पेटी, इ०चें).

झांपणी [म० झापणें] **स्त्री०** १ झाकण. २ चालणाऱ्या किं० वाटोळें फिरणाऱ्या जनावराच्या डोळ्यांवर घालतात तें आच्छादन.

झांपणें स० क्रि० १ आच्छादणें. २ झाकण घालून बंद करणें.

झांपा पु० गवत, कामट्या, माडाच्या फांद्या, इ०चें केलेलें दार.

झांपाळ, झांपळ [म० झाप] **वि०** १ दाट फांद्या असलेलें (झाड). २ दाट आहे छाया ज्याची असें (झाड). **न०** १ झाडाच्या फांद्यांचा निबिडपणा. २ ढगांची अंधेरी (येणें).

झांपाळणें झांपळणें, अ० क्रि० १ दाट दाट पानांनीं (झाड) युक्त होणें. २ मेघांनीं (आकाश) आच्छादित होणें.

झांबड वि० अति मोठा; अवाढव्य; अगडबंब; बेडौल आणि मोठा. **स्त्री०** १ हिसकावून घेणें; लुटून घेणें. ३ मेघांची अंधेरी.

झांबडणें, झांबाडणें स० क्रि० हिसकावून घेणें; लुटणें.

झांबडणें अ० क्रि० १ आळसावणें, सुस्तावणें. २ आजारानें म्लान होणें.

झांबऱ्या, झामऱ्या वि० १ विसराळू. २ अजागळ; गैबती.

झाबली स्त्री० पकडलेले मासे ठेवावयाचें कोळयांचें जाळें.

झाबा, झाबु पु० तेल ठेवण्याचें कातड्याचें बारदान.

झाबू, झावू, झाऊ वि० १ अशक्त; मोडकें तोडकें; टाकाऊ. २ कुच कामाचें.

झामरा वि० केसाळ (कुत्रा, इ०).

झार वि० खणखणीत (आवाज,–कंठाचा किं० वाद्याचा).

झार स्त्री० तांदूळ दळून त्याचें पीठ केलें असतां त्यांतील अत्यन्त बारीक कण.

झारगें न० १ जाळें. २ आंबे इ० फळें तोडावयाची आंकडेदार काठी,–जिला तोडलेले आंबे साठविण्यासाठीं टोकाला जाळें बांधलेलें असतें.

झारणें स० क्रि० पीठ, तांदूळ, इ०तील त्याज्य अंश आणि ग्राह्य अंश सूप इ० साधनांनीं पृथक् करणें.

झारबा पु० १ काहिलींत कढत असलेल्या उसाच्या रसाची मळी काढण्याची टोपली. २ तेलांतलि गाळ काढण्याची चाळण.

झारा पु० १ स्वयंपाकघरांतील एक आउत,–याच एक टोक पसरट, सपाट, वाटोळें, आणि साच्छिद्र असतें; कढईतून तळलेलीं भजीं काढणें इ० कामीं ह्याचा उपयोग होतो. २ वीणा इ०च्या तारांखालीं कापूस, लोकर, इ०ची दशी घालतात ती. ३ अशी दशी घातल्यानें जो आवाज निघतो तो. ४ कंठांतून असा आवाज निघतो तो.

झारी [हिं०] **स्त्री०** १ पाणी पिण्याचें तोटी असलेलें पात्रविशेष. २ झाडांना पाणी घालावयाचें जस्ताचें पात्र,–याला लांब तोटी असून तिच्या टोकाला असलेल्या पसरट अशा सच्छिद्र तोंडांतून पाण्याच्या धारा बाहेर पडतात.

झारें न० कढत असलेल्या उसाच्या रसांतील केर-कचरा, मळी, इ० काढून टाकण्याचें टोपलें, चाळण, इ०.

झारेकरी, झाऱ्या, झारा [म० झारणें] **पु०** १ सोनाराच्या शेगडींतील राख विकत घेऊन तींतून सोन्याचे आणि चांदीचे कण हुडकून काढून ते विकून त्यांवर चरितार्थ करणारा. १ रस्ते झाडून केरांत पडलेले कोळसे, धलप्या, आंब्याचा कोयी, इ० पदार्थ गोळा करून ते विकून चरितार्थ करणारा माणूस. ३ घरांतील पदार्थ सदा धुंडाळीत असतो असा (मुलगा). **स्त्री०** झारेकरीण.

झाल स्त्री० १ बांबूचें चौकोनी, उथळ, आणि सपाट असें शिपतर. ह्या शिपतरांत कणकेचे दिवे, फळें, इ० पदार्थ ठेविलेले असून लग्नांत त्याची पूजा करतात आणि कांहीं विधीनंतर तें नवऱ्यामुलाच्या आईला देतात. २ सुरमाडाच्या फळांचे लोंबते घोस समुच्चयानें. ३ बैलाच्या शिंगांना शोभेसाठीं बांधतात ते गोंडे प्रत्येक. ४ मूल आईच्या अंगावर किं० हातांत घालतें किं० घेतें ती उडी (टाकणें). ६ वेंदुलांच्या खेळांत मर्यादेच्या बाहेर बेंदूल पडणें (खाणें).

झालणा पु० मासे धरावयाचें हातानें पाण्यांत फेकावयाचें जाळें.

झालर [हिं०] **स्त्री०** १ मंडप, छत, झगा, इ० ना लावलेला चुणि घातलेला कापडाचा पट्टा,-जो कडांना लोंबत सोडलेला असतो तो. २ उसाच्या रसाचा गूळ करण्याच्या कारखान्यांत मांदण किं० नांद यांचे वर घालतात तें चिव्याचें झांकण किं० उसाचा रस गाळून घ्यावयाची चिव्याची चाळण. ३ लग्नांमध्यें साड्यांच्या दिवशीं दिवे, रंगाचा तांब्या, बाळकृष्णाची मूर्ति, इ० ज्या शिपतरांत ठेवून तें शिपतर मानकऱ्यांच्या डोक्यावर ठेवितात तें.

झावळ वि० १ अजागळ; विसराळू.

झावळी स्त्री० माड, पोफळी, इ० झाडाची फांदी (चटईच्या रूपांत विणलेली किं० न विणलेली).

झावाड न० खडकावर आपटून फुटणाऱ्या लाटा प्रत्येक (उठणें, उसळणें, पडणें).

झावू वि० अशक्त, कमजोर, लेचापेचा.

झासा पु० धमकी; धाक; दपटशहा (करणें, म्हणणें).

झाळणी [म० झाळणें] **स्त्री०** धातूचें पात्र झाळण्याची क्रिया.

झाळणें स० क्रि० धातूच्या पात्राला अग्निसंयोगानें डाग लावणें,-पात्राचे दोन भाग जोडण्यासाठीं किं० भोक बुजविण्यासाठीं.

झिकझिक, झिगझिग, जिगजिग स्त्री० १ रडगाणें; पिरपीर. २ पावसाची बुरबुर.

झिंकणें, झिकणें स० क्रि० वरून पडणारा पदार्थ जमिनीपर्यंत येऊं न देतां तो वरच्यावर हातांत घेणें किं० झेलणें.

झिकविणें स० क्रि० फसविणें.

झिकवण(-णी) स्त्री० फसविण्याची क्रिया.

झिगझिग वर ' झिकझिक ' पहा.

झिंगट न० लहान किं० क्षुद्र झिंगा नांवाचा [प्राणी.

झिंगट वि० मद्य, अफू, इ० अमली पदार्थांच्या सेवनानें शुद्धबुद्ध ज्याची गळाली आहे असा.

झिंगणें अ० क्रि० १ अमली पदार्थांच्या सेवनानें शुद्धिहीन होणें. २ अमली पदार्थांच्या सेवनानें अमल चढून हेलकावे खात चालणें.

झिंगरडूं न० एक उडणारा क्षुद्र कीट.

झिंगरूं न० लहान झिंगा,-एक क्षुद्र प्राणी.

झिंगा, झिंग्या [म० झिंगणें] **वि०** १ अमली पदार्थांचें नित्यशः सेवन करणारा. २ ज्याच्यावर अमली पदार्थांच्या सेवनानें निशा चढली आहे असा.

झिंगा [हिं०] **पु०** १ एक क्षुद्र प्राणिविशेष. २ रागाची लहर (येणें).

झिंगी स्त्री० १ अमली पदार्थांच्या सेवनानें आलेला कैफ. २ अमली पदार्थ.

झिंगी, झिंजी, झिटी, झिंझोटी स्त्री० डोक्यावरून तोंडावर लोंबत असलेली केशांची बट,-वेणींतून किं० आंबाड्यांतून सुटलेली.

झिजणावळ [म० झिजणें] **स्त्री०** घर्षणानें निघून जातो तो पदार्थाचा किं० दागिन्याचा अंश.

झिजणी [म० झिजणें] **स्त्री०** १ दागिना, पात्र, इ० ना घर्षण झाल्यामुळें त्यांचे नष्ट होतात

ते कण समुच्चयानें; झिजण्यांची क्रिया. २ आजार इ० कारणांनीं रोडावत जाण्याची क्रिया.

झिजणें [**हिं०**] **अ० क्रि०** १ घर्षणानें पदार्थ कमी होणें; दागिना, पात्र, इ० काना फार वापर पडल्यामुळें त्यांचे कांहीं कण नष्ट होणें. २ रोग, काळजी, इ० कारणांनीं शरीर रोडावणें. ३ कष्टामुळें कृश होणें.

झिजाविणें [**म०** ' झिजणें ' चें प्रयोजक] **स०क्रि०**१घासणें.२घासून कमी करणें.३कष्ट करून (स्वतास) कृश करून घेणें.ꕥ**आपणास झिजवावें तेव्हां दुसऱ्यास रिझवावें** आपण इमानानें दुसऱ्याची सेवा केली तर तो दुसरा खूष होईल.

झिंजाडणें स० क्रि० झिडकारणें; तुच्छ मानून दूर सारणें किं० अव्हेरणें.

झिंजार (–ड–) णें अ० क्रि १ उडविलेली बंदूक किं० तोफ, किं० मारलेली काठी, यांचा प्रत्याघात होणें म्ह० यांनीं मागें जोराचा रेट देणें.इ०.२अशा प्रत्याघातानें हात इ०व्यथित होणें.

झिंजारा (–डा) [**म०** झिंजारणें, झिंजाडणें] **पु०** उडविलेल्या बंदुकीचा किं० तोफेचा मागें बसतो तो धक्का. २अशा धक्क्यानें हात इ०ला येणाऱ्या झिणझिण्या.

झिंजो(–झो–)टी स्त्री०१एक रागिणी. २ वेणी किं० अंबाडा यांतून सुटून लोंबत असलेली केशांची बट.

झिट (–ड–) कारणें, झिटकावणें स० क्रि० धिक्कारून दूर सारणें; नापसंत ठरवून टाकून देणें.

झिटिमिटी क्रि० वि० थेंबाथेंबांनीं; कणाकणांनीं; हळू हळू; संथपणें.

झिडकणें, झिडकारणें, झिडकाविणें स० क्रि० १ नापसंत म्हणून दूर सारणें.२ तुच्छ करून फेकून देणें.

झिणझिणणें अ० क्रि० झणाणणें; एकदम झालेल्या तीव्र वेदनेनें व्यथित होणें.

झिणा वि० वापरल्यामुळें झिजलेला (दागिना, भांडें,चंदनाचें खोड इ०).

झिण्या स्त्री० अ० व० पूर्णपणें न पोसलेले धान्याचे दाणे.

झिपटी स्त्री० केशांची मोकळी सुटलेली आणि लोंबत असलेली बट.

झिपरी स्त्री० १ केशांची सुटलेली बट. २ स्वताच्या देहाची जिला ऊर्जा नाहीं अशी स्त्री.

झिंबड स्त्री० १ जोराचा पाऊस. २ भोजनांत खाद्यपेयांची समृद्धि.२ नाना प्रकारच्या खेळांतील पराकाष्ठेची मौज. ३ माणसें, कामें, इ० ची गर्दी-दाटी, किं० पुष्कळपणा. ४ गायन, वादन, इ० प्रसंगीं उडतो तो रंग.

झिमझिम वि० लहान लहान थेंबांनीं आणि आवाज न करतां पडणारा (पाऊस).

झिमोटा पु० कपाळाला आठ्या घालणें; डोळे वटारणें, नाक मुरडणें (मारणें, घालणें) रागाचें किं० नापसंतीचें हें लक्षण.

झिम्मा पु० मुलींचा एक खेळ.

झिरकणी स्त्री० १पुष्कळ दिवसांच्या आजारानें क्षीण होणें. २प्रिय माणसाच्या वियोगानें झुरणें.

झिरकणें अ० क्रि० १ आजारानें रोडावणें. २ प्रिय माणसाच्या वियोगानें झुरणें.

झिरंग पु० कढीलिंबाचें झाड.

झिरझिरा, झिरझिरीत वि० १ विरळ आहे वीण ज्याची असें (कापड). २ फार वापरून जीर्ण झालेलें आणि भोकें पडलेलें (वस्त्र).

झिरणें अ० क्रि० क्षीण होत जाणें (आजारामुळे, चिंतेमुळ, कष्टामुळें).

झिरपणें अ० क्रि० थेंबाथेंबांनीं गळणें किं० पाझरणें.

झिरपा [**म०** झिरपणें] **पु०** १ ओघळ. २ गळती. ३ ओहोळ.

झिरमळी, झिरमिळी स्त्री०१दागिन्याचा लोंबत असलेला मोती, हिरा, इ० भाग; लोलक. २ पागोट्याच्या पदराचे लोंबत असलेल्या जरीचे तंतु (या अर्थीं प्रयोग अनेक वचनीं). ३ हंडी, झुंबर,इ०चे लोंबत असलेले काचेचे लोलक प्रत्येक.

झिरें न० झाडाची तोडलेली फांदी.

झिलई, झिलाइ, झिली, झिल्हई, झिल्हाई [**हिं०** झील] **स्त्री०** १ चकाकी; तजेला. २ उजळा.ꕥ **झिलईची माती स्त्री०** एक प्रकारची माती,–जिणें भांडें घासलें असतां चकचकीत होतें.

झिलगा पु० मुलगा.

झिलाण [**हिं०** झील=झरा] **न०** १ पाणथळ जागा. २ जींत पाण्याचे पुष्कळ झरे आहेत

असी जमीन. ३ जमिनीची आर्द्रता. ४ दलदल.

झिलट वि० १ फार वापरल्यानें जीर्ण झालेलें (वस्त्र). २ अशक्त; कमजोर. ३ कुचकामाचा. टाकाऊ; भिकार.

झिल्ली [**सं०**] **स्त्री०** रात्रीस ओरडणारा एक क्षुद्र प्राणी; राळ.

झिळमिळी, झिरमिळी स्त्री० १ नथ इ० ना शोभेसाठीं लोंबते सोडलेले जें मोती इ० तें. २ बिलोरी झाडास जे लोंबते मणि लावितात ते प्रत्येक. ३ गवती छपराच्या खालीं लोंबत असतात त्या काड्या प्रत्येक. ४ केरकचरा इ०नीं आच्छादित जीं लोंबत असलेलीं कोलिष्टकें तीं प्रत्येक.

झीज [**म०** झिजणे] **स्त्री०** १ झिजण्याची क्रिया. २ पदार्थाचा झिजून गेलेला भाग. ३ व्यापारांत किं० व्यवहारांत आलेली बूड (खाणें, बसणें, येणें).

झींट, झीट न०, झीण स्त्री०, झीड न० १ अगदीं जीर्ण झालेलें झाड. २ ज्याचा केवळ बुंधा शिल्लक राहिलेला आहे असें झाड. ३ झाडाच्या इतर फांद्या जीर्ण होऊन गळून पडल्यावर जी एकादी दुसरी फांदी शिल्लक राहिलेली असते ती. ४ (लाक्षणिक) अगदीं जीर्ण झालेला म्हातारा माणूस. ५ पटकी इ० साथीमध्यें कुटुंबांतील इतर माणसें मरून गेलीं असतां एकच पुरुष जो जिवंत राहिलेला असेल तो. ६ अत्यंत अशक्त झालेलें माणूस; उ० हें मूल वाळून झींट झालें. ७ जमीन भाजावयासाठीं झाडाच्या तोडलेल्या फांद्या, काटक्या कुटक्या, इ० चा भारा (ह्या अर्थीं ‘ झींट ’ ‘ झीट ’ हे शब्द अधिक प्रचलित आहेत). ८ चंदनाचें खोड, गंधाचा रवा, हळकुंड, सुंठ, इ० उगाळून उगाळून शिल्लक राहिलेला तुकडा; ह्या अर्थीं ‘झीण’ हा एकच शब्द योजला जातो.

झीट स्त्री० १ भोंवळ, चक्कर (येणें). २ पंचाइतींची स्थिति; पेच; अडचण.

झील [**हिं०**] **स्त्री०** १ गायन, वादन, इ० कामांतील सफाई. २ कंप (गायनांतील). **पु०** छोकरा, मुलगा. **न०** झाडावरचे आंबे तोडावयाची आंकडी असलेली कांठी, – जिच्या टोकाला आंबे धरण्यासाठीं जाळें लोंबत असतें. **पु०** १ ओढा; झरा. २ जमीनींची आर्द्रता. **स्त्री०** १ संबळ नांवाच्या वाद्याचा एक भाग. दुसऱ्या भागाला ‘ बंब ’ असें म्हणतात. २ तेज (रत्नादिकांचें). **पु०** १ एका झाडापासून नवीन केलेलें किं० झालेलें दुसरें झाड; उ० हा आंबा त्या आंब्याचा झील आहे. २ कुटुंबांतील इतर माणसें मरून गेल्याकारणानें एकटा शिल्लक राहिलेला मुलगा. ३ (कुटुंबविशेषांतील) पुत्र, – वंशवृद्धि करण्याच्या दृष्टीनें. ꣸ **एकाद्याची झील उडणें** (किं० **उतरणें,** किं० **बिघडणें**) त्यानें वैभव किं० कीर्ति किं० उत्साह इ०च्या बाजूनें खालावणें. **एकाद्याची झील ओढणें, एकाद्याला झील देणें** तो गात असतां त्याची री ओढणें. **एकाद्याची झील चढणें** तो वैभव किं० उत्कर्ष पावणें. **झील चढविणें** १ चकचकीत करणें. २ वैभवास चढविणें. ३ साफ तासणें.

झुई स्त्री० नदींतील किं० खाडींतील बेट. जुवां, जुवें, जूं. हे ह्याच अर्थाचे अन्य शब्द आहेत.

झुकणें [**हिं०**] **अ० क्रि०** १ इमारतीचा किं० मांडवाचा खांब, भिंत, इ०नीं लंबरेषेपासून सरकणें किं० च्युत होणें; कलणें. २ पदार्थानें स्वस्थानापासून च्युत होणें. ३ वाकणें. ४ एकाद्याची दृष्टि चुकवून पळून जाणें. ५ रोग, चिंता, इ० कारणांनीं कृश होणें. ६ योग्य मार्ग सोडून भलत्याच मार्गाला लागणें किं० चुकीचा मार्ग धरणें. ꣸ **झुकत झुकत चालणें** चालतांना एकदा उजवीकडे आणि एकदा डावीकडे कलत कलत चालणें; डुलत चालणें.

झुकविणें [**म०** ‘ झुकणें ’ चें प्रयोजक] **स० क्रि०** १ कलविणें; वाकविणें; वळविणें. २ एकाद्याला टाळा देऊन पळून जाणें. ३ थापबाजीनें कोणेकाला फसाविणें. ४ खुशामतीनें कोणेकाला अनुकूल करून घेणें.

झुकाटणें, झुकांडणें [**म०** ‘झुकणें ’ पासून] **स० क्रि०** कोणेकाची नजर चुकवून पळून जाणें.

झुकाटा पु०, झुकाटी, झुकांडी, झुकाटणी स्त्री० [**म०** झुकणें, झुकविणें] १ कोणाकाची नजर चुकवून हळूंच पळून जाणें. २ निसटून जाण्याची क्रिया.

झुकापुरी [म० झुकणें, झुकविणें] **स्त्री०** कोणेकाला फसवून त्याची नजर चुकवून पळून जाणें. ꣸ **कोणेकाला झुकापुरी देणें** त्याची नजर चुकवून पळून जाणें.

झुंग स्त्री० टोळी; थवा; लोकांचा घोळका.

झुगझुगणें अ० क्रि० १ चमकणें. २ चंचलपणें किं० अस्थिरपणानें हेलकावे खाणें (आसन्नमरण अशा माणसाचे प्राण, किं० ज्याचे तेल संपलें आहे अशा दिव्याची ज्योत, इ० नीं).

झुगर न० झुंबर (दिवे लावण्याचें).

झुगर, झुगार न० १ जुनें आणि जर्ण झालेलें वस्त्र. २ लग्नकार्यांत पाटील, देशमुख इ०. ना देतात तो मानाचा पोशाख; ह्या अर्थी ' झुगार ' हें अधिक प्रचलित रूप आहे. ३ कोणतांही कुचकामाचा टाकाऊ पदार्थ,(माणूस, चिरगूट, इ०).

झुगर, झुगार वि० फार वापरल्यामुळें जर्ण झालेलें (वस्त्र, इ०).

झुगारणें स० क्रि० दूर फेकून देणें; दूर उडविणें.

झुगारणें [म०झुगारणें] **न०** रोड आणि अशक्त प्राणी; दुर्बल माणूस, जनावर, इ०.

झुगारा [म० झुगारणें] **पु०** कोणेकाची दृष्टि चुकवून काढलेला पळ (क्रि० देणें).

झुंज [सं० युद्ध] **न०** १ लढाई; मारामारी (दोन बैल, दोन माणसें, इ० ची). २ भांडण, बोलाचाली.

झुंजणें, झुजणें अ० क्रि० कोणेकानें कोणेकाशीं लढणें किं० मारामारी करणें.

झुंजरूक मुंजरूक, जुंजूमुंजू, झुंजुकमुंजुक न० १ प्रभातकाळ. २ पहाटेचा प्रकाश.

झुंजविणें [म० ' झुंजणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** भांडावयास लावणें; दोन पक्षांत बेबनाव उत्पन्न करून त्यांना भांडावयास लावणें. ꣸ **कण्या (किं० दाणे) टाकून कोंबडे झुंजविणें** आपले पैसे खर्च झाल्याची परवा न करतां दोन माणसांना भांडावयास लावणें (आपल्या गमतीखातर).

झुंजाट, झुजाट [म० झुंजणें] **वि०** १ जोरदार (वारा, इ०). **क्रि०** सुटणें. २ रणशूर. **क्रि० वि०** जोरानें, आवेशानें (वारा वाहणें पळणें, इ०). **न०** वादळ, जोराचा वारा(येणें).

झुंजार [म० झुंजणें] **वि०**रणशूर;लढवय्या. **स्त्री०** लढाई, मारामारी. (क्रि०लागणें होणें). ꣸ **झुंजारराव पु०** योद्धा, लढवय्या,रणशूर.

झुंझुरका (–की) **क्रि० वि०** मोठ्या पहाटेस.

झुंझणें, झुंझार इ० ' झुंजणें, ' ' झुंजार, ' इ० पहा.

झुटकणें अ० क्रि० कोणेकाची नजर चुकवून पळून जाणें.

झुटका पु० १ वाऱ्याचें किं० धुराचें तोंडांत एके वेळीं ओढून घेतलेलें परिमाण; झुरका. (चिलीम, गुडगुडी इ०तून;) **क्रि०** घेणें. २ पाणी दूध, चहा, इ० चा घोट (घेणें). ३ चुट्टा,विडी. ४ लहानसें गाणें; गमतीची गोष्ट; विनोदाचें वचन; सुभाषित. ५ आहाणा; उखाणा; कोडें. ६ थोडा वेळ घेतलेली झोंप.

झुटामुटा क्रि० वि० १ वेंब्राथेंबानें. २ थोड्या थोड्या प्रमाणांत.

झुटा, झुटी खानक [हिं०] **स्त्री०** १ उष्टावलेलें ताट,–ज्यांतून दुसऱ्या माणसाला कांहीं खातां येत नाहीं. २ कायमची म्हणून दिलेली इनाम जमीन.

झुंड [हिं०] **स्त्री०** टोळी; थवा; एके ठिकाणीं गोळा झालेलीं माणसें किं० जनावरें समुच्चयानें.

झुडतर [म० झडणें] **वि०** रोडावलेलें (माणूस, जनावर, झाड).

झुडप, झुडूप न० लहान झाड.

झुडपी [म० झुडूप] **स्त्री०**१ झाडांची जाळी.२

झुंडाई [म० झुंड, झोंड] **स्त्री०** झोंडपणा; दांडगाई.

झुंडी, झुंड स्त्री० टोळी, थवा.

झुणका पु० हरभऱ्याच्या डाळीचें एक तोंडीं लावणें; ह्याला पिठलें, आळण, इ० अन्य नांवें आहेत.

झुणा पु० मुलींचा परकर.

झुणा, झुण्णा पु० मुलींचा एक खेळ.

झुतरी, झुत्री स्त्री० लहानसा पाट, ओढा, किं० नाला (वाहाता किं० कोरडा).

झुबकळी, झुबकवाळी, झुबकेवाळी, झुबबाळी, झुबी स्त्री०, झुबा पु०, झुबें न० स्त्रियांचें एक कर्णभूषण.

झुंबड स्त्री० पदार्थविशेष मिळविण्यासाठीं आलेल्यांची गर्दी किं० दाटी (घालणें, पडणें).

झुंबर पु०, न० अनेक दिवे लावावयाच्या सोयीचें कांचेचें एक प्रकारचें लोंबतें झाड.

झुबा [हिं०] पु० १ पायघोळ अंगला. २ झुबकवाळी.

झुमकणें अ० क्रि० ठमकत ठमकत चालणें.

झुमका [हिं०] पु० घोस, गुच्छ (फुलांचा, मोत्यांच्या, हिऱ्यांचा). ॐ **झुमकेदार वि०** ज्याला मोतीं, हिरे, पाच, इ० चे घोस लोंबत आहेत असें (कर्णभूषण इ०).

झुमझुम, झुमझुमां क्रि० वि० झुमझुम असा आवाज होईल अशा रीतीनें घागऱ्या इ० वाजणें.

झुरकणें [म० झुरका] स० क्रि० (तपकीर) नाकांत ओढून घेणें; (विडी, गुडगुडी, इ० चा धूर) तोंडांत ओढून घेणें. **अ० क्रि०** एकाद्याची नजर चुकवून पळून जाणें.

झुरका पु० १ गुडगुडी, विडी, चिलीम इ०तून एका खेपेस घेतलेला धूर. २ एका वेळेस नाकांत ओढून घेतलेली तपकीर.

झुरझुरीत वि० विरळ विणीचें, झिरझिरीत [(वस्त्र).

झुरट वि० रोडावलेला, खुरटलेला, वाळलेला (माणूस, प्राणी, झाड).

झुरण न० कुटलेल्या तांदुळांचा चुरा किं० [कोंडा.

झुरणी [म० झुरणें] स्त्री० १ क्षय; रोडावण्याची क्रिया. २ थेंबें थेंबें गळणें किं० पाझरणें. ॐ **एकादा झुरणीस पडणें, एकाद्याला झुरणी लागणें** १ तो दिवसेंदिवस शरीरानें क्षीण होणें. २ दुःखामुळें दिवसें दिवस अधिक अधिक जर्जर किं० निरानन्द होत जाणें.

झुरणें अ० क्रि० १ पाझरणें, गळणें (वारदानांतून पाणी, दूध, इ०). २ एकाद्याची नजर चुकवून पळून जाणें. ३ जुन्या घराच्या भिंतींचे ढपळे, विटा, इ० एकसारख्या गळून पडणें. ४ जुन्या गवती छपराच्या काड्या एकसारख्या गळत असणें. ५ मनांत चेपून ठेविलेल्या दुःखानें दिवसें दिवस क्षीण होत जाणें. ॐ **झुरतुडला वि०** १ झुरणीला लागून रोडावलेला किं० क्षीण झालेला. २ अशक्त; मोडका तुटका; अत्यन्त जीर्ण.

झुरपणी, झुरपणें मागें ' झिरपणी, ' ' झिरपणें ' पहा.

झुरमुरणें अ० क्रि० १ रोगानें किं० चिंतेनें सुकणें, क्षीण होणें, किं० रोडावणें. २ प्रियजनाच्या मरणानें किं० वियोगानें दुःखित असणें.

झुरळ, झुरळें न० १ एक लहानसा पंख असलेला प्राणी. २ दिव्याच्या ज्योतीवर झडप घालणारा एक क्षुद्र कीट. ॐ **समुद्राला झुरळाची गरज लागते** मनुष्य कितीही मोठ्या दर्जाचा किं० श्रीमंत किं० समर्थ असला तरी त्याचें हलक्या आणि क्षुद्र माणसावांचून नडतें.

झुरळी स्त्री० १ अंगाच्या त्वचेला पडलेली सुरकुती किं० वळी. २ फळाच्या पृष्ठभागावर पडलेली सुरकुती. ३ वळी, दुमड.

झुरळूक क्रि० वि० अंधुक, अस्पष्ट (दिसणें). **स्त्री०** अंधुक किं० अस्पष्ट देखावा.

झुराबावरा वि० १ दांडगेश्वर; बोलण्याचालण्यांत मर्यादा उल्लंघणारा. २ छाकटा; नखरेबाज.

झुरी स्त्री० लहानसा ओहोळ किं० नाला.

झुरुका ' झुरका ' पहा.

झुरुंझुरूं क्रि० वि० थेंबा थेंबांनीं (पाणी वाहणें किं० पाझरणें).

झुरुंमुरूं क्रि० वि० १ अशक्तपणें; कमजोरपणानें. २ संथपणें. ३ निर्जीव स्थितींत. ४ बेताबेतानें. ५ केवळ प्राण धरून किं० जीव धरून.

झुलक स्त्री० वाऱ्याचा मंद प्रवाह; झुळूक.

झुलकणें अ० क्रि० वाऱ्यांत मंदपणें हेलकावे खाणें (वस्त्रानें). **स० क्रि०** (वस्त्रादिकांना) हेलकावे देणें.

झुलकवणी, झुलकावणी [म० झुलकाविणें] स्त्री० कांहीं बात झोकून कोणेकाला फसविणें.

झुलकविणें, झुलकाविणें [म० ' झुलणें ' चें प्रयोजक] स० क्रि० बाता झोकून किं० देऊन कोणेकाला फसविणें किं० थांबवून धरणें किं० लांबणीवर ढकलणें.

झुलणा पु० झोपाळा.

झुलणें अ० क्रि० १ कलणें; हेलकावे खाणें; डुलणें. २ इकडे तिकडे निरुद्योगीपणांत हिंडणें. ३ झोके खाणें किं० घेणें.

झुलवा पु० परजातीच्या स्त्रीशीं किं० विधवेशीं कीं० दुसऱ्याच्या रांडेच्या मुलीशीं लग्नाच्या विधीचें अनुकरण करून पत्नी म्हणून तिला स्वीकारणें.

झुलाविणें, झुलाविणें [म० ' झुलणें ' चें प्रयोजक] **स०** क्रि० थापबाजीनें कोणेकाला फसविणें किं० तो आपल्या नादीं लागेल असें करणें किं० तो आपल्या कच्छपीं लागेल असें वर्तन करणें.

झुला [हिं०] **पु** ० तात्पुरता केलेला दोऱ्यांच्या झोपाळा.

झुलावा पु० झोपाळा.

झुलूप [**फा**० जुल्फ] **न**० लहान मुलांच्या डोक्यावर कानापाशीं राखतात तो केशांचा झुबका.

झुळका पु० तोंडांत घेतलेला पाण्याचा घोट.

झुळझुळ (–ळां) क्रि० वि० १ मंदपणें आणि फारसा आवाज न करतां (पाणी वाहणें). २ अंधकपणें किं० अस्पष्टपणें (दूरचा पदार्थ दिसणें).

झुळझुळीत वि० स्वच्छ धुवून वाळविलेलें वस्त्र, अंगांत घालावयाचा कपडा, इ०.

झुळणा पु० दोऱ्यांचा झोपाळा.

झुळवणी [म० झुळझुळ+पाणी] न० संथपणें आणि फारसा आवाज न करतां वाहाणारें पाणी.

झुळूक स्त्री० १ मंद वाऱ्याचा एका समयीं आलेला प्रवाह. २ अस्पष्ट आणि अंधक देखावा. ३ पाहिलेला पदार्थाचें क्षणमात्र घडलेलें दर्शन किं० देखावा. ॐ **झुळुक वाहणें** अनुकूल परिस्थितीच्या योगानें एकदम पुष्कळ लाभ होणें.

झू पु० कुत्र्याला हल्ला करावयाला लावावयाच्या वेळीं उच्चारावयाचा हा शब्द.

झूज, झूझ, झूंज न० लढत; मारामारी.

झूट [हिं०] स्त्री० १ खोटें भाषण. २ निराधार विधान. ३ लबाडी. **वि**० खोटें, निराधार,

भोंक,–ज्यांतून शेतांतील पाणी बाहेर वाहून जातें. २ अशा भोंकांतून वाहाणारें पाणी. न० तांदूळ सडणें चाललें असतां उडतात ते बारीक कण किं० उथळतें तें पीठ.

झूल स्त्री० घोडा, हत्ती, इ०च्या पाठीवर आच्छादनार्थ किं० शोभार्थ घालतात तें वस्त्र.

झेंगट न० १ धातूची तबकडी,–जी कांहीं जातींचे भिकारी भीक मागतांना वडावितात. २ धातूची तबकडी,–जीवर दिवसाचे तास वडाविले जातात. ३ पाठीस लागलेलें कांहीं लचांड; त्रासदायक काम किं० माणूस. ४ पंचाइतीची किं० पेचाची स्थिति. ५ चरितार्थासाठीं कोणी माणूस करतो त्या खटपटी लटपटी, युक्त्या, इ० समुच्चयानें.

झेंगटका [म० झेंगट] वि० नानाप्रकारच्या लटपटी खटपटी करणारा; कुत्र्याचे पाय मांजरावर आणि मांजराचे पाय कुत्र्यावर घालणारा.

झेंजटणें अ० क्रि० खणखण आवाज करणें.

झेजरणें, झेझरणें स० क्रि० १ घांसणें; खरडून टाकणें. २ दांडगाईनें पदार्थांचा उपयोग करून तो नासणें किं० मोडणें किं० बिघडविणें. ३ पडसें किं० खोकला यांनीं जर्जर होणें. ह्या अर्थी ' झेंझटणें, ' ' झेंझडणें ' असेही शब्द आहेत. ॐ **एकाद्याचें नाक झेजरणें** पडशामुळें एकसारखें नाक वाहात असून तें पुसण्यानें तें हुळहुळें होणें.

झेंडा [हिं०] पु० राजवाड्यावर किं० देवळावर वैभवार्थ उभारलेलें वस्त्र,–जें स्तंभाच्या अग्रावर फडकत असतें तें; ध्वज; निशाण. २ फुलांचे घोस जिच्या अग्रांला लाविलेले असतात अशी उंच काठी,–जी मिरवणुकींत एक मनुष्य हातांत धरून पुढें चालत असतो. ॐ **झेंडा लावणें** मोठा पराक्रम करणें (स्तुतींत किं० टवाळकींत); उ० आम्ही तर हरलों, आतां आपण काय झेंडा लावतां तो पाहूं ! **झेंडा नाचाविणें** (किं० **मिरविणें**) ऐट किं० दिमाख करणें.

झेंडू पु० एक फुलझाड.

झेंडोली (–ळी) स्त्री० गवताची चुडी,–जी प्रकाशासाठीं पेटवितात.

झेप स्त्री० १ एका बाजूस खाल्लेला झोकांडा (देणें, खाणें, घेणें). २ पक्षी ... ती झडप. ३ पोहो-

णारा आपल्या शरीराला पुढें जाण्यासाठीं देतो तो हिसका किं० नेट (घालणें, मारणें, टाकणें). ४ (झोपाळा, पाळणा, घड्याळ्याचा लंबक, इ० च्या) आंदोलनांत एका बाजूकडची गति (घालणें, देणें, घेणें).

झेपटी स्त्री० केशांची मोकळी सुटलेली बट.

झेपणें झेपाविणें स० क्रि० १कांहीं एक कार्य पथकरून शेवटास नेणें किं० पार पाडणें. २ पेलणें उ० एवढें ओझें मी झेपीन. **अ० क्रि०** १ एकाद्याला कांहीं कार्य करावयाला सामर्थ्य असणें; उ० हें काम मला झेपणार नाहीं. २ शेवटास जाणें; उ० बरी मसलत झेपली (किं० झेपावली).

झेपसा [**म०** झेप] **पु०** १ झोपाळ्यावर आंदोलन करतां यावें किं०सुरू करतां यावें यासाठीं समोरच्या भिंतीला जी दोरी हातानें खेचावयासाठीं अडकाविलेली असते ती.२झोपाळा इ०वर घेतलेला झोका; आंदोलन (देणें, घेणें). ३ मातीचें किं० राखेचें डिखूळ किं० खंड.

झेपावणें अ० क्रि० १ पुढें उडी मारणें. २ झडप घालणें; उ० गरुड सापावर झेपावला.

झेपुटा [**म०** झेपणें] **पु०** पाळणा, झोपाळा, इ०ना झोके द्यावयाची दोरी.

झेंबणें, झेंमणें अ० क्रि० १ कोमजणें; सुकणें; वाळणें. २ डुलकी खाणें; पेंगणें.

झेलगें [**म०** झेलणें] **न०** आंबे इ० तोडावयाची लांब काठी,–जिच्या अग्राला आंकडा आणि पाडविलेले आंबे धरावयासाठीं जाळें असतें.

झेलणें स० क्रि० १ पडत असलेला किं० कांहीं अंतरावरून येत असलेला पदार्थ (चेंडू, फळ, इ०) जमीनीला लागवयाच्या अगोदर वरच्यावर धरणें किं० पकडणें. २ गाण्याचे शब्द किं० चाल एकदा दोनदां ऐकून लक्ष्यांत ठेवणें किं० उचलणें किं० पकडणें. ३ एकाद्याची बोलण्याची, चालण्याची, किं० हसण्याची,लकब किं० विशिष्ट तऱ्हा लक्ष्यांत धरून तिचें अनुकरण करणें. ४ कोणेकाची मसलत, सूचना, बोध, इ० चा स्वीकार करणें. ५ लढाई, वाद, इ० चें आव्हान स्वीकारणें. ꣸ **एकाद्याची थुंकी झेलणें** स्वकार्य साधण्यासाठीं कोणा समर्थाच्या मूर्खपणाच्या विधानांचें समर्थन करणें किं० त्या विधानाला टेका देणें किं० त्या समर्थाचें ओंगळ हुकूम अमलांत आणण.

झेला पु० १ फुलें गुंफून केलेला गुच्छ. २ आंब्याच्या झाडाचे आंबे तोडून खालीं ज्या टांगलेल्या जाळ्यावर टाकतात तें जाळें. ३ बागेंतील वांगीं, भेंड्या, इ० झाडांवर पाणी शिंपडण्याची पसरट टोपली.

झोक पु० १ कल एका दिशेस कलणें किं० वळणें;चालतांना तोल चुकण्यवाची क्रिया(जाणें). २ एकदा मनुष्य कोणीकडे जात आहे या संबंधानें आपण तर्क किं० अदमास करून ठरविलेली दिशा; गंतव्यस्थान,–आपण तर्कानें ठरविलेलें; उ० त्याचा झोक पर्वताकडे जावयाचा दिसतो. ३ कांहीं गोष्ट करण्याची प्रवृत्ति किं० कल. ४ बोलण्याचालण्याची तऱ्हा किं० ढब. ५ ऐट, थाटमाट , नखरेबाजी. ६ वाऱ्याचा किं० धुराचा सोसाटा. ꣸ **झोकदार वि०** ऐटदार; नखरेदार; भपक्याचा. **झोकपट्टी स्त्री०** थापबाजी. **झोकचिट्टी (–ठ्ठी) स्त्री०** १ कोणेकाला कोणेकानें कोणेकावर दिलेलें लबाडीचें पत्र,–ज्या पत्रानें कार्य होणें शक्य नसतें तें; लबाडीची चिट्टी. २ तुझें काम मी अमुक वेळेला करून तयार ठेवीन असें एकाद्याला सांगून तें काम न करतां त्याला दिलेला व्यर्थ हेलपाटा (**क्रि०** देणें).

झोकणें अ० क्रि० १ कलणें; एका दिशेकडे वळणें. २ भलत्याच दिशेकडे वळणें. ३ चालतांना हेलकावे खाणें; **स० क्रि०** १ जोरानें फेकणें. २ पोटांत फेकणें; म्ह० मोठमोठें घोट किं० घास घेऊन पिणें किं० खाणें उ० दारू झोकणें, इ०. ३ कांहीं जोखमीचें किं० जिकिरीचें काम पार पाडणें. ꣸ **झोकली बातमी स्त्री०** उडत उडत आलेली खबर. **बातमी झोकणें** कांहीं निराधार खबर सांगणें.

झोका [**म०** झोकणें] **पु०**१पाळणा,झोपाळा इ०चा एक हेलकावा(घेणें, खाणें,देणें);उ०मुलाला पाळण्यांत घालून झोका देणें. २ लबाड व्यापारी गिऱ्हाइकाला फसविण्यासाठीं तराजूला देतात तो हिसका. ३ रिकामा हेलपाटा; विनाकारण करावी लागलेली मजल; उ० आपण ह्या पाऊलवाटेनें

जाऊं म्हणजे आपला तीन मैलांचा झोका वाचेल. ४ व्यापारांत ठोकर (क्रि० बसणें). ५ लबाडी; फसवणूक (क्रि० देणें). ꕥ ꕥ **झोकाझोक स्त्री०** १ फेकाफेकी. २ कोणेकाला कांहीं कामासाठीं व्यर्थ हेलपाटे घालावयाला लावणें. ३ कामाची एकमेकांवर कोलांकोली; ह्यानें त्याच्यावर तें काम लोटावें आणि त्यानें ह्याच्यावर असा प्रकार. **झोका ठोका पु०** यदृच्छेनें घडून आलेली कांहीं गोष्ट (अनुकूल किं० प्रतिकूल). **झोकाठोक्यांत येणें** केवळ यदृच्छेनें किं० दैवगतीनें (कांहीं गोष्ट)घडणें.

झोकांडी स्त्री०, झोकांडा पु०, झोकांडें न० १ एका बाजूला तोल किं० कल जाणें. २ अमली पदार्थांच्या सेवनानें अंमल चढून चालतांना जातो तो झोक. ३ उपोषणामुळें किं० अशक्तपणामुळें चालतांना जातो तो झोक. ४ एकाद्याला फसवून त्याची नजर चुकवून पळून जाणें.

झोजा, झोझा वि० लठ्ठ; दोंदील; पोटाळ. ꕥ **झोजामल्हारी पु०** १ लठ्ठ किं० अगडबंब असा माणूस. २ ज्यानें नेसलेलें धोतर किं० अंगांत घातलेले कपडे अव्यवस्थित आहेत असा मनुष्य.

झोट, झोटी स्त्री० १लहान मुलांच्या डोक्यावर कपाळाला लागून जें केशांचें झुलूप शेंडीच्या अगोदर राखतात तें. २ मोकळी सुटलेली केशांची बट.

झोट पु० १ व्यवहारांत जो निर्लज्जपणानें वागतो तो. २ सावकाराचा पैशाबद्दल तगादा आला असतां जो हात पाय आपटून त्यालाच निर्लज्जपणानें शिव्या देत सुटतो तो. ३ कोणीही दांडगेश्वर. ꕥ **झोटधरणी स्त्री०** १ एकमेकांच्या शेंड्या हासडून केलेली मारामारी; केशाकेशी. २ कलह, भांडण, मारामारी. ३ निर्लज्ज कुळाकडून पैसे वसूल करण्याची खटपट किं० यातायात. ४ कोणा समर्थाकडून आपलें कांहीं काम करून घेण्यासाठीं भोगावे लागणारे कष्ट. **झोटाई स्त्री०** १ झोटपणा; झोटाची वागण्याची तऱ्हा. २ दांडगाईचें आणि निर्लज्जपणाचें वर्तन.

झोटिंग पु० १ मृत मुसलमानाचें भूत.२ज्याला बायको मुलें आणि घरदार नाहीं आणि जो एकाद्याला फसवून केव्हां पळून जाईल याचा नेम नाहीं असा मनुष्य. ३ लोकांना फसविण्यांत पटाईत असा माणूस. ꕥ **झोटिंग पादशाही स्त्री०** १अव्यवस्थितपणाचा कारभार किं०कारकीर्द; बेबंदशाही; अंदाधुंदी. २ पराकाष्टेचा गोंधळ.

झोड [**म०** झोडणें] **स्त्री०** १ खरपूस मार (एकाद्याला दिलेला).२ धान्याच्या पेंड्या, कणसें, इ० झोडपण्याची क्रिया. ३ जोराची क्रिया. ४ अतिशयपणा. ५ जोर(पावसाचा). ꕥ **पावसानें झोड लाविली आहे** पाऊस एकसारखा आणि जोरानें पडत आहे. **अभ्यासावर झोड देणें** न गमतां अभ्यास करीत राहणें. **त्यानें मघापासून चिवड्यावर (किं० अन्य खाद्यावर) झोड लाविली आहे** तो तें खाद्य एकसारखें खात सुटला आहे. **गाण्याची, लिहिण्याची, किं० भटकण्याची झोड लावणें** तें एकसारखें करीत राहणें. **झोडकाम न०** ज्यांत कौशल्य किं०नाजूकपणा यांची फारशी जरूरी नाहीं आणि जें केवळ शरीरबलानें किं० धोपट मार्गानें करावयाचें असें काम. **झोडकाम्या पु०** केवळ धोपटमार्गानें काम करणारा माणूस; ज्याच्या कामांत नाजूकपणा नाहीं असा मनुष्य.

झोंड पु० १ अरेराव; पुंड. २ लोकांचे पदार्थ दांडगाईनें लाटूं किं० बळकावूं पाहणारा.

झोडगा [**म०** झोडणें] **वि०** १ झोडणारा; मारकट. २ निर्लज्ज. ३ हट्टी, हेकेखोर.

झोडगी [**म०** झोडणें]**स्त्री०**धान्याचीं कणसें झोडपून त्यांतून दाणे काढण्याची क्रिया.

झोडगें [**म०** झोडणें] **न०** कोडगी, निर्लज्ज, किं० हट्टी स्त्री.

झोडझपाट खालीं ' झोडणें ' मध्यें पहा.

झोडणी [**म०** झोडणें] **स्त्री०** १ कणसें झोडपून त्यांतून दाणे काढण्याची क्रिया. २ अभ्यास न केल्याबद्दल किं० गैरशिस्त वर्तनाबद्दल विद्यार्थ्याला मारणें.३गैरवर्तनाबद्दल कोणालाही चोप देणें.

झोडणें स० क्रि० १ मारणें; बडविणें. २ कणसांतून दाणे काढावयासाठीं त्यांच्यावर काठ्यांचा प्रहार करणें. ३ खाद्य पदार्थ खूप खाणें; भोग्य वस्तु खूप भोगणें.४ दांडग्या हातानें (कांहीं काम) करून टाकणें किं० संपविणें. ꕥ

झोडझपाट पु०, झोडझपेट स्त्री० १ दांडगाईचें कांहीं कृत्य. २ बदमाषगिरी.

झोडपणें स० क्रि० मारणें, बडविणें.

झोत पु० १ अग्नीची मोठी आणि उंच ज्वाळा. २ वरून पडणाऱ्या पाण्याचा मोठा प्रवाह. ३ पिचकारींतून उडविलेली जोराची संतत धार.

झोप [सं० स्वाप] स्त्री० निद्रा (येणें, लागणें, घेणें). ☙ **झोपीं जाणें** निद्रावश होणें; (कोणेकाला) झोप लागणें. **झोपेला(किं० निजेला) धोंडा आणि भुकेला कोंडा** साधेपणाची राहाणी.

झोपडी स्त्री०, झोपडें न० गरीबाऊ घर.

झोपण न० वाटोळें फिरणाऱ्या बैलाच्या डोळ्यांवर घालावयाचें झांकण.

झोपा पु० १ झोपाळा. २ हेलकावा. ३ नांगरलेल्या जमीनींत धान्य पेरल्यानंतर जमीन सारखी करण्यासाठीं झाडांच्या टाहाळ्यांची जुडी करून फिरावितात ती. ४ दाराचें काम करणारी गवताची किं० कामट्यांची ताटी; झोपाटा. ☙ **बैल गेला झोपा केला** नुकसान होऊन गेल्यानंतर बंदोबस्ताची तजवीज काय कामाची ?

झोपाटा पु० वर ' झोपा ' अर्थ ४ पहा.

झोपाळा पु० हेलकावे खाण्यासाठीं दोऱ्यांची किं० लाकडांची रचना; चोपाळा; चौपाळा.

झोपाळू, झोप्या , झोपाळ (–ळ्या) [म० झोप] वि० १ फार फार झोप घेणारा. २ झोपेनें आक्रांत झालेला.

झोंबट, झोंबाट, झोंबडें न० १ पाठीस लागलेलें उपद्रवी माणूस किं० काम; शुक्काष्ट. २ कलह, भांडण. ३ भांडणारीं माणसें (किं० मांजरें, कुत्रीं इ०) समुच्चयानें.

झोंडणें स० क्रि० १ धान्य काढावयासाठीं (कणसें) बडविणें किं० झोडपणें. २ धुण्यासाठीं (चिरगुटें) हापटणें किं० लाकडानें बडविणें. ३ ' झोंबाडणें ' पहा.

झोंबणें अ० क्रि० १ क्षार किं० तिखट पदार्थ त्वचेला वेदनाकर होणें. २ चिकटणें. ३ सर्प, माशी, मुंगळा, इ०नीं दंश करणें. ४ अंतःकरणाला पीडाकर होणें. ५ दांडगाईनें (कांहीं पदार्थ किं० माणूस) पकडणें; उ० दूर हो, मला असा झोंबूं नको. ६ वृक्षावर (फळें किं०फुलें) दाट येणें.

झोंबरा [म० झोंबणें] वि० झोंबून त्रास, उपद्रव, किं० वेदना (देणारा पदार्थ किं० माणूस). वर ' झोंबणें ' पहा.

झोंबा पु० तेलाचें वारदान.

झोंबाडणें स० १ दांडगाईनें हिसकावून घेणें. २ लुटणें; लुबाडणें.

झोंबाडा [म० झोंबाडणें] पु० १ हिरावून किं० दांडगाईनें कांहीं पदार्थ घेण्याची क्रिया. (घालणें, करणें, मारणें). २ चोर; लुटारू; दरोडेखोर.

झोंबी [म० झोंबणें] स्त्री० १ कुस्ती; झुंज; लढाई; लढत. २ बिलगणें; चिकटणें.

झोऱ्या पु० सुताडा; जाड सुताचें बिछायतीच्या उपयोगाचें वस्त्र.

झोल, झोळ पु० १ अंगरखा, लहंगा, परकर, इ०चा घेर. २ नीटनेटकेपणानें आणि चापून चोपून न पेहरलेल्या कपड्यांना येतो तो बेडौल फुगवटा. ३ दोन बाजूंस दोन आधारांवर ताणून बांधलेल्या दोरीला, तारेला, किं० वस्त्राला स्वतांच्याच वजनानें मध्याशीं येतो तो सईलपणा किं० अशा सईलपणानें खालीं लोंबणारा भाग. ४ झटक्यानें केलेलें गमन. ☙ **झोलकांडा पु०** गेलेला तोल; झोकांडा (जाणें).

झोलर, झोलार [म० झोल] वि० फुगवट्यानें बेडौल असें (पेहेरलेलें वस्त्र).

झोला [म० झोलणें] पु० १ झोपाळा; हिंदोला. २ पेहेरलेल्या वस्त्राचा फुगलेला भाग. ३ टाळाटाळ; चुकवाचुकव. ४ सोगा,–पेहेरलेल्या वस्त्राचा.

झोलकंबणें, झोलंबणें अ० क्रि० लोंबरा किं० लोंबकळत असणें.

झोळकं (–कुं–) बा, झोळखं (–खुं–) बा पु० १ लोंबत राहाणें किं० असणें (खाणें, घेणें). २ झोपाळा.

झोळण स्त्री० १ पेहेरलेल्या वस्त्राचा बेडौल फुगवटा. २ सुरकुती; दुमड.

झोळणा पु० चारपांच कप्पे असलेली एका विशिष्ट रचनेची पिशवी.

झोळी स्त्री० १ चौकोनी वस्त्राच्या दोन दोन

कोपऱ्यांना गांठी देऊन पदार्थ ठेवण्याला तात्पुरती करतात ती पिशवी. २ मधुकरी मागणें इ०साठीं करतात ती वर सांगितल्या प्रकारची पिशवी. ❀ **झोळी घेणें** (किं० **सावरणें**) भीक मागूं लागणें. **झोळीकोपरगांवचा सुभा पु०** भिक्षा मागण्याचा धंदा. **झोळीबंद पु०** भीक मागण्याचा धंदा करणारा माणूस.

झ्या, झ्याझ्या अव्यय घोड्याला जलद चालण्याची इशारत ह्या शब्दानें केली जाते. ❀ **झ्या म्हणणें, झ्या करणें** एकाद्याची नजर चुकवून पळून जाणें.

झ्याऊ मागें 'झाऊ' पहा.

ञ

ञ संस्कृत व्यंजनमालेंतील हें दहावें व्यंजन समजलें जातें. ह्या अक्षराला स्वतंत्र अवस्थिति नाहीं. तें च, छ, ज, आणि झ, ह्या चार अक्षरांच्या मागचा अनुस्वार दाखविण्यासाठीं पुढच्या अक्षराशीं जोडून लिहिलें जातें. संस्कृतांतून मराठींत घेतलेल्या शब्दांतील अनुस्वार दाखवितांना कधीं कधीं 'ञ' हें अक्षर योजलें जातें; उ० पञ्चम, वाञ्छा, पञ्जर, झञ्जावात, इ०.

ट

ट मराठी व्यंजनमालेंतील हें अकरावें व्यंजन आहे. हें तालव्य वर्गांतील पहिलें व्यंजन.

ट पु० वर्णमालेंतील अक्षरें व्यक्तिशः किं० समुच्चयानें. ह्याचा उपयोग फक्त पुढील वाक्प्रचारांत होतो. **टफ करणें, टफ करीत वाचणें** म्ह० अडखळत वाचणें.

टक स्त्री० १ एकाग्र दृष्टि; उ० टक लावणें; उ० टक लावून पाहाणें. २ कपाळास लागतो तो ठणका (लागणें); उ०आज सकाळपासून माझ्या कपाळाला टक लागली आहे. ३ सतत चाललेली कोणतीही क्रिया; ४ भाषण,रोदन,गायन,पाऊस, पाठ करणें, इ० चें सतत चालू असणें. ५ आश्चर्य इ० भावनांनीं झालेली निश्चलपणाची स्थिति.

टंक [**सं०**] **पु० न०** १दगड इ० फोडावयाचें एक पोलादी हत्यार; छिनी; टांकी. २ डोंगराचें शिखर. ३ चार मासे परिमाण किं० हें परिमाण मोजावयाचें वजन. **न०** टांकणखार. ❀ **टंकशाला स्त्री०** धातूंचीं नाणीं पाडावयाचा कारखाना; टांकसाळ. खालीं 'टंकशाळा' पहा.

टंक क्रि० वि० अगदीं बरोबर किं० तंतोतंत प्रमाणांत;मापांत किं० वजनांत अगदीं बरोबर;उ० आळंदीच्या मापानें दाणे आणले ते पुण्याच्या मापानें टंक भरले (किं० उतरले).

टकटकां क्रि० वि० न खळतां (पाहाणें, बोलणें, निंदिणें, रडणें); **क्रि०** लावणें, लागणें. **स्त्री०** टकळी, वटवट.

टकटक, टकटकां क्रि० वि० १ एकसारखें (पाहणें, दृष्टि लावणें, बघणें). २ फार शिणका मारून (कपाळ, डोकें, इ० दुखत असणें).

टकटकणें अ० क्रि० १ तजेलेदार किं० टवटवीत दिसणें (मुख, पानें, फुलें, इ०).२ (डोकें, कपाळ, इ०) दुखत असणें.

टकटकी स्त्री० तजेला; टवटवीतपणा.

टकटकीत वि० तजेलेदार; टवटवीत.

टंकण [**सं०**] **न०** टांकणखार.

टकणें अ० क्रि० टक लावून किं० एकाग्र दृष्टीनें पाहाणें.

टकमक स्त्री० १ एक वनस्पतिविशेष. २एकाग्र दृष्टीनें बघत किं० पहात राहण्याची क्रिया. **क्रि० वि०** एकाग्र दृष्टीनें (बघणें).

टकमकीत वि०तजेलेदार,टवटवीत(तोंड,फूल).

टकली स्त्री०, टकलें न० १ डोकें; टाळकें; बोडकें. २ उंचवट्याची जमीन.

टकल्या [**म०** टकल] **वि०** ज्याच्या डोक्यावर कांहीं ठिकाणीं केश नाहींत असा.

टंकशाळा [**सं०**] **स्त्री०** धातूंचीं नाणीं पाडावयाचा कारखाना; टांकसाळ. ❀ **टंकसाळचा फुटका वि०** १ जन्मापासून कांहीं व्यंग असलेला (माणूस). २ मूळापासूनच सदोष (कांहीं वस्तु

किं० माणूस किं० प्राणी) ३ आरंभापासूनच चुकलेली दिशा किं०सरणी ज्यानें धरली आहे असा.

टंकसाळ्या वि० १ टांकसाळींत काम करणारा (सोनार); याच्या उलट 'अगसाळ्या.' २ टांकसाळींत कोणत्याही कामावरचा नोकर.

टकळा, टुकळा पु० १ एकाद्या वस्तूची उत्कट इच्छा. २ प्रिय वस्तु किं० माणूस आपल्या जवळ नसल्यानें तिच्या किं० त्याच्या बद्दल लागते ती हुरहुर किं० विवंचना किं० ध्यास.

टकळी स्त्री० १ एकसारखें बोलणें. २ कोणताही सतत किं० बराच वेळ चालू असलेला ध्वनि. ३ प्रिय वस्तूच्या किं० माणसाच्या वियोगानें वाटत असलेली काळजी (धरणें, वेणें).

टका, टका [हिं०] पु० १ सोळा पैसे समुच्चयानें;सोळा पैसे इतकी रकम.२(कित्येक प्रांतांत) चार पैसे. ३ पैसा (सामान्यतः). ४ रुपया (व्याजाच्या संबंधानें); उ० शेकडा पांच टके.५ एकशेवीस विघे इतकें क्षेत्रफळ. ॐ **कोठें रे जातोस टक्या, सखा तोडायाला** पैशाचा व्यवहार ज्याच्याशीं आपण करतों त्याच्याशीं बहुधा भांडण होण्याचा संभव असतो. **घरटका, लगीनटका, तोरणटका पु०** प्रत्येक घरावर, किं० लग्नाच्या प्रसंगावर, किं० तोरणावर, बसविलेली पट्टी किं० वर्गणी. **टके करणें** पदार्थविशेष विकून किं० दुसऱ्याला वापरावयास देऊन पैसे मिळविणें. **टकेशेर वि०** १ पैशाला शेरभर म्ह० अत्यंत स्वस्त. २ कुचकिंमतीचा. **टकाशेर भाजा टकाशेर खाजा, टकाशेर आटा टकाशेर खाजा** उंची निंची सर्व पदार्थांची सारखीच किंमत किं०योग्यता (समजणें हा मूर्खपणा होय). **टकबंदी स्त्री०** एका टक्याला अमुक सारा भरावा असा ठराव. टका म्ह० एकशेवीस विघे इतकें शेताचें क्षेत्रफळ. **वि०** १ शिवरायी पैशांच्या रूपांत मोजलेली, गणलेली, किं० ठरविलेली रकम.२ टके (एकशेवीस विघे क्षेत्रफळ म्ह० टका) मोजून आकारलेला (सारा).

टकाकां क्रि० वि० टक लावून किं० निश्चल दृष्टीनें (पाहणें). [त्कार.

टंकार[सं०] पु० धनुष्याच्या दोरीचा टण-

टकारी, टंकारी [सं० टंक] पु० दगडाचीं जातीं करणें किं० जात्यांना टांकी लावणें इ०कामें करणाऱ्यांची जात किं० त्या जातीचा कोणीही इसम.

टके टोणपे, टके टोणपे पु० अ० व० जगांतील किं० व्यवहारांतील संताप आणणाऱ्या किं० त्रासदायक गोष्टी समुच्चयानें (खाणें, भोगणें, सोसणें, इ०).

टकोचें, टकुचें न० १ बाळंतिणी घालतात ती टोपी. २ लहान मुलाची टोपी. ३ मुंडासें (कुणब्यांचें पागोटें किं० रुमाल).

टंकोटंक क्रि० वि० वजनांत किं० मापांत अगदीं बरोबर किं० तंतोतंत. वर ' टंक ' पहा.

टकोर, टकोरा वि० मोठ्या आकाराचा (बदाम, खारीक, इ०). ' टपोर,' ' टपोरा ' हेही ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

टकोर पु० सतत चाललेला ध्वनि किं० क्रिया. वर ' टक ' पहा; उ० पावसानें आज टकोर लाविला आहे.

टकोरा पु० १ रट्टा; तडाका (मारणें). २ सतत चाललेला आवाज किं० ध्वनि.

टकोरा स्त्री०, टकोरें, टकुरें, टकुलें, टकोलें न० डोकें, टाळकें, बोडकें (तुच्छतेनें).

टक्कर [हिं०] स्त्री० १ एका पदार्थावर दुसऱ्या पदार्थाचा आघात. २ मेषादिकांच्या युद्धांत डोक्यावर डोकें आपटण्याची क्रिया. ३ युद्ध, वाद, कुस्ती, इ० मध्यें प्रतिपक्ष्याशीं केलेला सामना.

टक्कल न० १ अशक्तपणामुळें किं० अन्य कारणामुळें डोक्यावर जो केशरहित भाग होतो तो. २ जेथें धान्य उगवलें नाहीं असा शेताचा भाग किं० टापू. ३ तोंड (तुच्छतेनें). ॐ **उरीं केश आणि माथां टक्कल** जेथें जें असणें योग्य किं०शोभादायक होतें तें भलत्याच ठिकाणीं असल्यास विरूपता उत्पन्न होते.

टंगचाई स्त्री० पदार्थाचा तुटवडा; टंचाई; तंगचाई.

टंगळमंगळ स्त्री० १ चुकारतट्टूपणा; हयगय; बेपर्वाई. २ काम करण्यांत आळसटलेपणा.

टग्या पु० १ शिसें आंत भरून जड केलेली कवडी (कवड्यांच्या खेळांत). २ दांडगेश्वर आणि

अगडबंब माणूस. ३ संकटाला न कचरणारा म्होरक्या.

टच न० १ कांहीं कामाला ठरविलेला समय; योग्य समय;उ०तुम्ही श्रावणमासीं यावें असें तुम्हाला टच सांगितलें होतें तें तुम्हांकडून चुकलें, यांत आमचा कांहीं दोष नाहीं. २ पूर्ण वाढीचा समय.

टच [इं० टच्] पु०, स्त्री० सोन्याचा कस.

टचकन, टचकर, टचदिनीं, टचदिशीं क्रि० वि० १ टच टच असा आवाज करून (एक पदार्थ दुसऱ्यावर आदळणें). २ मोठमोठ्या थेंबांनीं (डोळ्यांतून अश्रु गळणें).

टचकरा, टचकारा, तजकरा [अ०तद्‌कराह] खाल्लेला पैसा;लबाडीनें मारलेला किं०लाटलेला पैसा.

टचका पु० १ लाकडाचें मुलांचें एक खेळणें. २ टोचणी, टोचा. ३ टच असा आवाज ज्याचा होतो असा प्रहार. ३ एकदम सुरू झालेला प्रवाह (रक्त, पू, अश्रु, इ० चा).

टचटचणें अ० क्रि० (गळूं इ० नीं) ठणकणें किं० शिणका मारणें; ठुसठुसणें.

टचटचीत वि० १ पूर्णपणें भरलेला, फुगलेला, वाढलेला, किं० पोसलेला. २ मऊ न होतां टणक राहिलेला (भात इ०). **क्रि० वि०** औदार्यानें (पैसे खर्चणें).

टंचाई स्त्री० पदार्थांचा तुटवडा; महागाई; दुर्मिळता.

टटोरी स्त्री०१धान्याचीं कणसें पोसूं लागण्याची दशा; किं० पोसूं लागलेलीं कणसें उ० टटोरीस शेतें आलीं होतीं पण पाऊस जातांच त्यांच्या टटोऱ्या आवळल्या. २ घसा,गळा (तुच्छतेनें).

टणक वि० १ कठिण; कडक; मऊ नव्हे असा. २ रोगाद्युपद्रवरहित. ३ मजबूत. **पु०**श्रमातिशयामुळें येते ती ग्लानि; थकवा; उ० तो आज आठ कोश चालला आहे म्हणून त्याला टणक आला आहे. या अर्थी ' **टण**कारा, ' ' टणकभाग ' असेंही शब्द आहेत.

टणकणें, टणकारणें अ० क्रि० श्रमातिशयानें थकून जाणें किं० म्लान किं० ग्लान होणें.

टणका वि० बळकट, मजबूत. **पु०** १ रट्टा, तडाका.२विंचवाच्या नांगीचा दंश· किं० फटकारा. ह्या दोन्ही अर्थीं ' टणकारा' असाही शब्द आहे.

टणत्कार पु० धनुष्याच्या दोरीचा ध्वनि.

टणू पु०, न० कपाळाला तडाका बसल्यानें तेथें होतो तो फुगवटा; टेंगूळ.

टप पु० १ मोठी गोटी (मुलांच्या खेळण्याची). २ गाडीचें किं० तंबूचें आच्छादन.

टपकणें अ० क्रि० थेंबाथेंबांनीं गळणें·

टपकळ वि० मोठें आणि स्पष्ट दिसेल असें (अक्षर, चिन्ह, इ०).

टपका पु० १ पडणारा मोठा थेंब. ३ साथीमध्यें माणसें मरण्याचा क्रम.३ दुसऱ्याला लाविलेला दोष; ठपका; दोषारोप.

टपणी [म० टपणें] स्त्री० वाट पहात बसण्याची क्रिया. २ एकाद्या गोष्टीचें दक्षतेनें केलेलें अवलोकन.

टपणें अ० क्रि० १ एकाद्या गोष्टीचें घडणें केंव्हां होतें हेंलक्ष्यपूर्वक किं० उत्कंठेनें पहात बसणें. २ पाळथीवर असणें.

टपांटप, टपटप, टपापां क्रि० वि० टपटप असा आवाज होईल अशा रीतीनें (पाणी गळणें, रक्त वाहाणें, अश्रु पडणें, इ०).

टपाल [हिं०] न० एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणीं पत्रें इ० नेऊन पोंचविणें किं० तेथून तीं आणणें इ० संबंधाचीं कामें करण्यासंबंधाची योजना किं० व्यवस्था. २ अशा रीतीनें नेलेलीं किं० आणलेलीं पत्रें इ० समुच्चयानें. ३ एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणापर्यंत गेलेली, किं० आलेली, किं० पोंचलेली बातमी किं० खबर.

टपूर पु० धष्टपुष्ट मेंढा.

टपूर, टपोर (-रा) वि० मोठ्या आकाराचा (बदाम इ० फळ, प्राणी, इ०).

टपोरा पु० काठी, सोटा, इ० नें मारलेला रट्टा किं० तडाखा (मारणें, लागणें).

टप्पल न०व्रणादिकांची खपली. **॰खर्चाखालीं एकाद्याचें टप्पल उडणें** फार खर्च करावा लागल्यामुळें किं० फार खर्च झाल्यामुळें तो जर्जर होणें किं० त्रासून जाणें किं० जिकीरीस येणें.

टप्पा [हिं०] पु० १ हिंदुस्तानी गाण्यांतील एक रचनाविशेष किं० एक तऱ्हा. २ फेंकलेला बाण, दगड, इ० च्या गमनाचा पल्ला किं० अवधि. ३ अंतर (प्रवासांत); उ० तो गांव येथून दहा

कोशांच्या टप्यावर आहे. ४ मुक्कामाचें ठिकाण; प्रवासांत विश्रांतीची जागा. ५ एकाद्या मनुष्याच्या बोलण्याचा रोख; त्याचें ध्येय किं० त्यांचें पर्यवसान. ३ आकलनशक्तीची पोंच. ७ शिवण्याचा एक प्रकार. ७ मोठें शहर आणि त्याच्या लगतचीं लहान लहान खेडीं समुच्चयानें. ८ प्रवासांत ताज्या दमाचा घोडा इ० जनावर घेण्याची जागा. ꣸ **कांहीं गोष्ट टप्यांत येणें** ती आटोक्यांत येणें; ती साध्य होईल असा रंग दिसणें. **टप्पा खाणें** भाषणांत, वाचनांत, किं० गाण्यांत, कांहीं वेळ विश्रांति घेणें.

टप्पाल वर 'टपाल' पहा.

टबकणें अ० क्रि० थेंबा थेंबांनीं गळणें (पाणी, रक्त, इ०); टपकणें. [टपोरा.

टबुका, टबूक वि० मोठ्या आकाराचा; लठ्ठ;

टबोणा वि० मोठ्या आकाराचा (फळ, पदार्थ, माणूस, इ०).

टमकी स्त्री० एक लहान आकाराचें चर्मवाद्यविशेष; टिमकी.

टमटम स्त्री० १ आवाज; गलबला. २ वाद्यांचा ध्वनि. ३ बोभाटा. ꣸ **टमटम नगरी** स्त्री० १ प्रसिद्धि; बोभाटा. २ जेथें अनेक ठिकाणांहून बातम्या येतात किं० अनेक ठिकाणच्या बातम्या कुटल्या जातात किं० बातम्या उठविल्या जातात असें ठिकाण. **टमटम राज्य** न० १ अव्यवस्थितपणाची किं० अंदाधुंदीची शासनपद्धति. २ जेथें किं० ज्यांत अंदाधुंदीची शासनपद्धति चालू आहे असें घर, देश, कुटुंब, संस्था, इ०.

टर स्त्री० एखाद्याची उडविलेली किं० उडालेली फजीती; बोऱ्या; बचेरी. ꣸ **एकाद्याची टर उडविणें** त्याची फजिती किं० उपहास करणें.

टरकणें अ० क्रि० १ टर असा आवाज करून फाटणें. २ भिणें, घाबरणें; उ० तो टरकला; उ० त्याची टरकली (भावकर्तरि प्रयोग, 'त्याची जिरली' ह्याप्रमाणें).

टरकमोहबत स्त्री० लबाडीची किं० खोटी दया, मेहेरबानी, किं० आस्था (आपलें कार्य साधण्यासाठीं दाखविलेली).

टरकहाणी स्त्री० १ लांबलचक किं० कंटाळवाणी हकीगत किं० गोष्ट. २ तीच तीच गोष्ट लोकांना कंटाळा येईल इतका वेळ सांगत बसणें.

टरकाकडी स्त्री० काकडीची एक जात.

टरकाविणें स० क्रि० टर असा आवाज करून (वस्त्र, कागद, इ०) फाडणें.

टरघाणी स्त्री० मुलांचा एक खेळ; एका खांबावर एक खिळ्यावर फिरणारें आडवें लाकूड बसविलेलें असून त्याच्या दोन टोकांना दोऱ्या लोंबत असतात त्यांना लोंबकळून मुलें त्या खांबाभोंवतीं गरगर फिरतात; गति जोरदार होण्यासाठीं मुलें मधून मधून जमिनीला पाय रेटतात.

टरफल, टरपल न० फळें, शेंगा, इ० चें कवच किं० बाहेरची त्वचा; साल.

टरफुस स्त्री०, **टरभोंवरा** पु० १ एकाद्याला कंटाळा येईल इतके वेळीं तीच तीच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगणें. २ एकाद्या वस्तूबद्दल एकसारखी पिरपीर (लावणें, चालविणें, मांडणें, करणें).

टरबूज न० कलिंगड.

टरळी स्त्री० चर, खळी.

टरारणें अ० क्रि० १ उत्तेजित होणें. २ अतिशय फुगणें. ३ गर्वानें उन्मत्त होणें. ४ निशा करून झिंगणें. ५ भिणें; घाबरणें.

टरूं न० घर्षणानें उत्पन्न झालेला घट्टा; जेथील त्वचा अति टणक झालेली आहे असा शरीराचा भाग (पडणें).

टल्लू वि० ठेंगणा आणि लठ्ठ.

टवका, टवरा पु० (पदार्थाचा) उडालेला किं० निघालेला तुकडा.

टवटवणें अ० क्रि० (चेहेरा, फूल, झाड, इ०) तजेलेदार होणें किं० दिसणें. [तजेला.

टवटवी स्त्री० (फुलें, चेहेरा, झाड, इ० चा)

टवटवीत वि० तजेलेदार, प्रफुल्लित (फुलें, चेहेरा, इ०). [भरणें).

टवणी क्रि० वि० कांठोकांठ (पात्रादि

टवरकी, टवरचाल स्त्री०, **टवरचाळा** पु० उपयुक्त कामधंदा किं० कर्तव्य न करतां भटकत राहाणें.

टवरा पु० (पदार्थाचा) उडालेला किं० उडविलेला तुकडा. 'टवका' पहा.

टवरी वि० कर्तव्य न करतां भटकत राहाणारा (मुलगा, माणूस).

टवळी स्त्री० १ थल्पी. २ नारळाचें वेलें किं० पात्र. ३ नारळाच्या बुडाकडील निवालेली करंटी. ४ डोक्याचा पुढचा भाग. ५ मुलीला रागें भरतांना हा शब्द बायका वापरतात. ❀ **टवळी अमावास्या** (किं० **आंवस**), **दिव्याची अमावास्या** (किं० **आंवस**) **स्त्री०** आषाढ महिन्यांतील अमावास्या. ह्या दिवशीं घरांतील समया, दिवल्या, लामणदिवे, इ० घासून त्यांची पूजा केली जाते.

टवळें न० पळीचें परडें; समयींत जेथें तेल भरलें जातें तो अवयव; कर्ण्याचें तोंड (कर्णा हें तोंडानें वारा घालून वाजवावयाचें एक वाद्य आहे); डबी, करंडा, डबा, इ० चें वरचें अर्धूक किं० झांकण.

टवाळ, टवळ्या, टवाळखोर, टवाळीखोर वि० वात्रट; कर्तव्य न करतां उनाडक्या करणारा.

टवाळकी, टवाळी, टवाळगिरी स्त्री० १ वात्रटपणा. २ दुसऱ्याचा केलेला उपहास.

टहाळ पु०, न०, टहाळा पु०, टहाळी स्त्री० वृक्षाची पानांसकट फांदी.

टहाळ, टहाळा पु०, टहाळें न० १ हरभऱ्याचें झाड. २ लाख किं० वाटाणा ह्यांचें झाड.

टहाळी स्त्री० वृक्षाची लहानशी पानांसकट फांदी.

टळका, तळका पु० बांबूची लहानशी हातरी; लहान आकाराचा तट्टया.

टळटळीत वि० स्पष्ट, ठसठशीत. **क्रि० वि०** अगदीं, ऐन, (दुपार, संध्याकाळ, इ०).

टळणें अ० क्रि० १ चुकणें; न घडणें; उ० गेल्या पंचवीस वर्षांत माझें प्रातःस्नान कधीं टळलें नाहीं. २ (काळ, समय, अवधि, मर्यादा) अतिक्रान्त होणें; उ० दोन प्रहर टळले म्हणजे आपण ही घाटी चढूं लागूं. ३ केलेल्या प्रतिज्ञेपासून च्युत होणें; उ० तूं वचनाला एकदा टळलास, आतां तुजवर मी कसा भरंवसा ठेवावा ?

टळोटळो न० रखरख, तीव्र ताप (उन्हाचा). **क्रि० वि०** १ ऐन, भर (दुपार). २ जोरानें, प्रखरपणें (अग्नि पेटणें, सूर्य प्रकाशणें, इ०).

टाऊक न० १ अकल्पित किं० अनपेक्षित लाभ. २ कांहीं मोठा लाभ.

टांक [**सं०** टंक] **पु०** १ एक वजनी परिमाण,—हें भिन्न ठिकाणीं भिन्न आहे. २ लिहावयाच्या लेखणीचें टोक किं० ह्याच उपयोगाचा पोलादी पदार्थविशेष. ३ ठसा मारून केलेली देवाची प्रतिमा,—जी देवांत पूजिली जाते. ४ लेखणी लिहितांना शाईत बुडविली असतां तिच्या अग्राला येते तितकी शाई. ५ भोजनाच्या प्रसंगीं ज्याला जरूर आमंत्रण केलें पाहिजे असें मनुष्य. ६ रुपाया हें नाणें. **क्रि० वि०** ('कोरडा' याच्या पुढें) अगदीं; पूर्णपणें; उ० ती विहीर कोरडी टांक झाली आहे. ❀ **टांक गुंतणें** लेखानें किं० पत्रानें गुंतलेलें असणें किं० बांधलेलें असणें (कोणी मनुष्य). **टांक मारणें** नमूद करून ठेवणें. **टांकानें गळा कापणें** लेखानें एकाद्याचें नुकसान करणें. **टांका आगळें लिहावें घासा उणें जेवावें** आपलें मत स्पष्टपणें कळविण्यासाठीं थोडेंसें अधिक लिहावें लागलें लिहावें तरी लिहावें पण भोजनांत भुकेपेक्षां थोडेंसें कमी खावें. ही म्हण थोड्याशा भिन्न रूपानेंही योजली जाते.

टांक स्त्री० बरोबरी; उ० हा आठ रुपायांचा धोतरजोडा आहे पण तो बारा रुपायांच्या धोतरजोड्याची टांक टाकतो.

टांकण स्त्री० घोड्याची एक चाल. हिला ' टांकण चाल ' असेंही म्हणतात. **वि०** वरील चालींत चालणारा घोडा.

टांकणखार [**सं०** टंकण+क्षार] **पु०** एक क्षारविशेष.

टाकणी स्त्री० पखवाजाच्या वाजत्या पुड्याचा कांठाजवळचा प्रदेश.

टाकणें [**सं०** त्यज्=सोडणें] **स० क्रि०** १ फेकून देणें; उ० हा केरकचरा नेऊन रस्त्यांत टाक. २ परित्यागणें, सोडणें, सोडून देणें. ३ दुसऱ्यावर सोपविणें; दुसऱ्याकडे सोपविणें. ४ पसरणें (सतरंजी इ०); उ० अंगणांत चटई टाक, तेथें आपण गप्पा मारीत बसूं. ५ वर्ज किं० निषिद्ध करणें किं० समजणें; उ० मी काशीला जाऊन आल्यापासून वांगीं टाकलीं (म्ह० वांगीं खाणें बर्ज्य केलें.) ६ लोटणें; कोलणें (दुसऱ्यावर किं० दुसऱ्याकडे); उ० पूजा करणें राम्या गोंद्यावर टाकतो आणि गोंद्या राम्यावर टाकतो. ७ (पैज) मारणें किं० लावणें. ८ शेतांत (धान्य) पेरणें. ९ (धान्याच्या ताटानें कणीस) उत्पन्न करणें. ❀

मुलानें थान टाकणें तें आईच्या अंगावर पिईनासें होणें; त्याला आईचें दूध आवडेनासें होऊन त्यानें आईचें थान चोखण्याचें सोडून देणें. **टाकणें टाकणें** कांहीं गोष्ट उपचार म्हणून करणें; एकादी गोष्ट औपचारिक म्हणून करणें; एकादी गोष्ट न केली तर चार लोकांत बरें दिसणार नाहीं एवढ्याच भावनेनें ती करणें; (म्ह० मनापासून नव्हे); उ० विश्वंभर शास्त्री मुळीं देखील आपल्या ओळखीचे नाहींत; ह्या प्रसंगीं त्यांना जेवावयाला बोलावण्याचें कांहीं कारण नाहीं, परंतु ते ह्याच वाड्यांत बिऱ्हाडानें राहतात म्हणून टाकणें टाकलें पाहिजे इतकेंच. **टीप**–ह्या वाक्प्रचारांत एक " टाकणें " नाम आहे आणि दुसरें क्रियापद आहे. **एकाद्याशीं टाक टाकणें** आपला दर्जा हलका आहे हें मनांत न आणतां त्याच्याशीं बरोबरी करूं पाहाणें. **एकाद्याला टाकून बोलणें** त्याला अपमानकारक शब्द बोलणें. **टाकला डाव पडणें** इच्छिलेला डाव पडणें (खेळांत). **टाकला येणें, टाकून येणें** (पाहुणा) हटकून येणें; निःसंशय येणें; उ० कोठून नाहीं तेथून पटवर्धनांच्या घरीं टाकला पाहुणा आहेच (किं० येतोच). **डोंगरावर टाकला पाऊस असावयाचाच** म्हणजे हटकून किं० निश्चयानें. **टाकलें काम, (कारभार, रोजगार, इ०)** स्वतः प्रयत्न न करतां आपल्याकडे आलेलें किं० आपल्या अंगावर पडलेलें काम, (कारभार, रोजगार, इ०). **टाकलें अन्न, (जेवण, चहा, इ०)** हटकून मिळावयाचेंच असें; उ० गोविंदरावांच्या घरीं गेलें कीं टाकला चहा मिळावयाचाच ! **टाकली किंमत** आपणाला फायदेशीर अशी आपण न मागतां दुसऱ्यानें देऊं केलेली किंमत. **टाकली गांठ पडणें (किं० भेट होणें)** हटकून किं० न चुकतां गांठ पडणें (किं० भेट होणें). **टीप**–वरील आणी अशाच इतर वाक्प्रचारांत ' टाकला ' ह्याचा 'निश्चित, निःसंशय' असा अर्थ होतो. **टीप**–'ऊन' प्रत्ययान्त धातूच्या पुढें ' टाकणें ' हें क्रियापद योजलें असतां त्या धातूच्या अर्थाची क्रिया पूर्णपणें संपविणें असा अर्थ होतो; उ० त्याचें पैसे देऊन टाक, हें पत्र लिहून टाक, इ०.

टाकणें न० कोरडा आदर करणें; केवळ उपचार म्हणून केलेली कांहीं गोष्ट; उ० मी कोठें जेवावयास जात नाहीं हें त्याला ठाऊक आहे पण तो उगाच टाकणें टाकावयाला आला होता. वर ' टाकणें ' मध्यें ' टाकणें टाकणें ' पहा.

टांकणें [सं० टंक] स० क्रि० (जांतें, वरवंटा, इ० ना) टांकी देणें.

टाकभाडें [म० टाकणें+भाडें] न० एकादी वस्तू एका ठिकाणाहून वाहून नेऊन दुसरीकडे टाकण्याबद्दलचें भाडें; भाडोत्री कामाबद्दलची बक्षिशी; उ० आपला पोशिंदा जो बाबूजी नाईक त्यावर मोरोपंत कवीनें तीन चार अगदीं साधारण आर्या केवळ टाकभाड्याप्रमाणें रचिल्या असें एका पंडिताचें म्हणणें आहे.

टाकमटिका, टाकमटिकला, टाकमाटिका, टाकमटीक पु० नटणें, पोशाख, इ० कामें किं० इ० कामांतील नखरेबाजी, थाटमाट, किं० नीट नेटकेपणा.

टांकसाळ [सं० टंकशाला] स्त्री० सरकारच्या हुकमानें जेथें रुपये, पैसे, इ० नाणीं पाडलीं जातात तो कारखाना. ‡ **टांकसाळ थर पु०** झिजलेलें नाणें,–जें परत टांकसाळींत पाठवून आटवून नवें करण्याच्या लायकीचें आहे असें.

टांकळणें, टांकुळणें अ० क्रि० फार वाचल्यानें किं० जागरण झाल्यामुळें डोळे ताठणें किं० खुपूं लागणें.

टाकळा पुं० एक पालेभाजी. **टाकळी स्त्री०** टाकळ्याची एक जात.

टाकळें न० एक प्रकारचें भात.

टाका, टांका पु० १ वस्त्र, पानें, इ० किं० त्यांचे कांहीं भाग एकाशीं एक जोडण्यासाठीं, दोरा, चोय, इ० कांनीं घालतात तो बंध. २ शरीराचा सांधा. ३ पाठीचा मणका. ‡ **एकाद्याचे टांके ढिले करणें** १ त्याला फार कष्ट करावयास लावून अत्यंत जर्जर करणें. २ त्याचा नक्षा उतरणें.

टाकाऊ [म० टाकणें] वि० टाकून किं० फेकून देण्याच्या लायकीचा; कुचकामाचा.

टाकारी, टंकारी पु० हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा इसम. ꙮ **टाकारी थिंजारी** गरीब, हीनदीन किं० दुर्दैवी माणूस.

टाकी, टांकी स्त्री० १ पाण्याचा सांठा. २ हौद. ३ पाथरवटाचें एक हत्यार. ४ जातें, वरवंटा, इ० दगडाचे पदार्थ झिजले असतां ते पुन्हां खरखरीत करण्याची क्रिया (देणें). ꙮ **एकाद्याची टांकी लागणें** (किं० **लागू होणें**) त्यानें आरंभिलेल्या किं० हातीं घेतलेल्या कामांत त्याला यश मिळण्याच्या मार्गाला तो लागणें. **टांकीचें तोंड, टांकी दिलेलें तोंड** न० ज्याचेवर देवीचे हिडिरस वण आहेत असें तोंड.

टाकुलें, टाकोलें न० डोकें, टाळकें, बोडकें.

टांकुलणें वर ' टांकळणें ' पहा.

टांकें, टाकें न० १ पाण्याचा सांठा. २ हौद. ३ डोंगरांतून पाझरणारें पाणी साठावण्यासाठीं बांधून काढलेला हौद.

टांकोटांक [म० टांक] क्रि० वि० १ पाठोंपाठ. २ अगदीं पूर्णपणें; अगदीं तंतोतंत मापानें. ३ कमी न होतां किं० अधिक न होतां. ४ मुळींच वेळ न गमावतां (जाणें किं० होणें); त्याच पावलीं.

टांग, टांगडी [सं० टंका=तंगडी] स्त्री० १ कमरेपासून पायाच्या घोट्यापर्यंतचा मानवी देहाचा अवयव. २ चालतांना दोन पावलांमधील अंतर. ३ चालतांना टाकलेलें पाऊल. ꙮ **एकाद्याची टांग बांधणें** त्याचें कांहीं वर्म समजल्यामुळें त्याच्यावर सरशी मिळविणें किं० त्याच्यावर वर्चस्व मिळविणें किं० त्याला आपल्या नियंत्रणेंत आणणें.

टांगणें स० क्रि० लोंबत सोडणें (झोपाळा, पाळणा, इ०). ꙮ **एकाद्याचा गळा गानादिसमयीं टांगणें** त्याच्या गळ्याचा स्वर विवक्षितावधीपर्यंत मोठ्या श्रमानें पोंचणें. **एकाद्या वस्तूवर एकाद्याचा जीव टांगलेला असणें** तिकडे त्याचें अंतःकरण ओढलेलें असणें.

टांगरें [म० टांगणें] न० लांकडाची मोळी इ० आवळावयाची असतां त्या दोरीच्या वेढ्याला पूर्णपणें पीळ भरतां यावा म्हणून जी कांठी घालतात ती किं० ह्या काठीनें पक्की बांधलेली गांठ.

टांगळ [म० टांग] वि० १ लांब टांगांचा (मनुष्य). २ लाथा मारण्याची जिला खोडी आहे अशी (गाय, म्हैस, इ०).

टांगा, तांगा [म० टांग] पु० गांवांतल्या गांवांत चालणारी एक प्रकारची गाडी. पुण्याच्या टांग्याला एक घोडा जोडलेला असून त्यांत तीन उतारू बसतात.

टांगें न० डोकें, बोडकें.

टाच, टांच स्त्री० १ पायाची खोट. २ जप्ती; हुकुमनाम्याची बजावणी. ꙮ **उंच टाच करून वागणें, टाचेला माती** (किं० **मळ**) **न लागूं देणें** आपल्या पवित्रपणाचें स्तोम माजविणें; आपण साधुवृत्तीचे आहों असा डौल करणें. **टाचेचें काळीज** न० १ बायकोचा भाऊ. २ प्रिय पत्नी. ३ अत्यन्त जिव्हाळ्याचा मनुष्य किं० पदार्थ.

टांचण, टाचण [म० टाचणें] न० करून ठेविलेली नोंद; टिपण.

टांचणी, टाचणी [म० टाचणें] स्त्री० दोन किं० अधिक कागद इ० एकत्र जुळवून ठेवण्याचा बारीक तारेचा डोकें असलेला तुकडा (सुमारें एक इंच किं० अर्धा इंच लांबीचा).

टाचणें, टांचणें स० क्रि० १ दोन पदार्थ किं० पदार्थाचे दोन भाग सूत्र इ०नें जोडणें; टाका देऊन संबद्ध करणें. २ नोंदून किं० लिहून ठेवणें.

टांचर, टांचरूं न० १ टांच; पायाची खोट. २ पायाच्या खोटेला झालेलें गळूं.

टांचलणें [म० टांच] स० क्रि० घोड्यानें जलद चालावें म्हणून त्याला टांचेचे रट्टे मारणें. २ कोणेकाला कांहीं मागणी पुरविण्याबद्दल तगादा करणें.

टाचा, टांचा वि० तोकडा; आखूड; घेरांत किं० उंचींत कमी; (अंगांत घालावयाचा कांहीं कपडा इ०).

टाचा, टांचा पु० वस्त्र, पर्ण, इ० जोडण्यासाठीं दोरा, चोय, इ० नें केलेलें बंधन (मारणें, देणें).

टाचाळणें स० क्रि० सुरी इ०नीं न कापतां हातानेंच (केळीचें पान) फाडणें.

टाटोळा पु० १ केळीच्या पानाच्या दोन अर्धुकांच्या मधील दांडा. २ जोंधळ्याचें किं० बाजरीचें ताट.

टाटया पु० लहान टोणगा.

टाणाटोणा पु० मंत्रतंत्रादि इलाज. **टाणेटोणे** पु० अ० व० उपयुक्त माहिती; अनेक विषयांचें थोडेंथोडें ज्ञान किं० माहिती.

टाणें न० शेतें पिकण्याचा समय.

टाप, टांप स्त्री० १ घोड्याच्या मागच्या किं० पुढच्या पायाचा प्रहार (मारणें, लागणें). २ आई जवळ नसते तेव्हां मूल घेतें ती खंती (करणें,घेणें). ३ एक वनस्पतिविशेष. ४ लेखामध्यें खुणेसाठीं करतात तें रेषादिरूप चिन्ह. ꙮ **एकाद्याच्या टापेखालीं** त्याच्या तंत्रानें किं०त्याच्या नियंत्रणेनें.

टापटीप स्त्री० व्यवस्थितपणा; नीटनेटकेपणा; ठाकठीक.

टापटीप, टापास टीप क्रि० वि० अगदीं आजमासावरहुकूम; कमी न पडतां किं० ज्यास्ती न भरतां; उ० ह्या मेजवानीसाठीं आम्ही चार पायलींच्या जिलब्या केल्या होत्या त्या टापासटीप भरल्या (किं० झाल्या).

टापटेप [स० टेप=उंचवटा] पु० अ० व० जमीनीवरचे उंचवटे; उ० ह्या पटांगणांत दहा हजार पानें मांडावयाचीं आहेत; येथील सारे टापटेप काढून जमीन सपाट करा.

टापर स्त्री० १ घोड्याच्या खुराचा तडाखा (लागणें, बसणें). २ हाताच्या बोटांच्या पेरांनीं दुसऱ्याच्या डोक्यावर केलेला प्रहार (मारणें). ३ डोक्याला वारा लागूं नये म्हणून बांधलेलें फडकें (घालणें, घेणें, बांधणें).

टापर स्त्री०,न०, **टापरण** न०, **टापरा** पु० १ रट्टा, तडाखा. २ दोषारोप; टोमणा.

टांपरण न० डोक्याला वारा लागूं नये म्हणून बांधतात तें फडकें (घालणें, घेणें, बांधणें).

टापरणें, डाफरणें अ० क्रि० १ एकाद्यावर चरफडणें किं० तोंड टाकणें. २ घोड्यानें (खुरांनीं जमीन) उकरणें.

टापरणें स० क्रि० १ डोक्यावर रट्टे मारून (मेख, खुंटी, खिळा, इ०) जमीनींत किं०भिंतींत खुपसणें. २ एकाद्याला एकाद्या कामावर सक्तीनें बसविणें; एकाद्याला एकाद्या कामाला जुंपणें;उ० या मुलानें चार अक्षरें शिकावीं म्हणून त्याला शाळेंत टापरला आहे. अ० क्रि० (एकाद्यावर) चरफडणें. २ (कोणेकाला) टोमणे मारणें.

टापरणें न० उपकाराचें ओझें.

टापरणें न० मेख, खुंटा, इ० ठोकावयाचा मोगर किं० हातोडा.

टापरा पु० लाकडाचा खुंटा (तंबूच्या दोऱ्या बांधावयाचा किं० अन्य कामाचा).

टापशी, टापरी स्त्री० १ डोक्याला बांधलेलें फडकें (बांधणें). २ कांबळें इ० च्या एका बाजूला चुण्या करून त्या दोरीनें बांधून पर्जन्यनिवारणार्थ करतात तें डोकीवर घ्यावयाचें आच्छादन (बांधणें). ३ डोक्यानें दिलेला रट्टा; मुसंडी.

टापसणें, टापुसणें अ० क्रि० रोगानें शरीर किं० एकादा अवयव लठ्ठ होणें किं० फुगणें.

टापसा पु० फुगवटा; सूज; फुगा.

टापास टीप क्रि०वि० पाहिजे त्याहून अधिक नव्हे किं० कमी नव्हे अशा प्रकारें; बेतास बात. मागें ' टाप टीप ' पहा.

टापू, टापूं [हिं०] पु० १ बेट. २ विशिष्ट मर्यादांनीं नियंत्रित प्रदेश. ३ झाडाचें कोंवळें अग्र. ३ हरभऱ्याचा घाटा. ४ हरभरा, तूर, वाटाणा, इ० चें रोप किं०कोंवळें झाड. ५बाजरी, जोंधळा, इ० चें ताट.

टाफ स्त्री० घोड्याच्या पुढच्या किं० मागच्या पायाचा प्रहार किं० रट्टा (मारणें, लागणें). ꙮ **एकाद्याच्या टाफेखालीं** त्याच्या नियंत्रणेंत; त्याच्या तंत्रानें.

टाफरणें अ० क्रि० १ एकाद्यावर चरफडणें किं० तोंड टाकणें. २ (घोड्यानें) पायाच्या प्रहारानें जमीन उकरणें.

टामटूम स्त्री० १ मृदंग, नगारा, इ० वाद्यांचा ध्वनि. २ नीटनेटकेपणा; ठाकठिकी. ३ भपकेदारपणा; थाटमाट.

टायिट्ट पु०, स्त्री० वांग्याच्या वर्गांतील एक झाड.

टार [सं० टार = अश्व] पु० घोडा. न० घोडकूल; घोडा (तुच्छतेनें). पु०, न० वात्रट

किं० खोडकर पोर. ❀ टार, नार, गार, सार घोडा, नारी, हिरा, आणि द्यूत, ह्या चार वस्तु एका वर्गांतील होत. (१) माणसाच्या आसक्तीवर किं० आवडीवर त्या टाकाऊ किं० मूल्यवान होतात. (२) त्यांना चिकटून राहाणें किं० त्या संभाळणें सारखेंच जोखमीचें किं०खर्चाचें असतें.

टारगा वि० १ ठेंगणा; ठेंगू; खुजट. २ तोकडा (कपडा). ३ वात्रट, खोडकर (पोर).

टारलें न०वांबूच्या पातींचा गरीबाऊ पाळणा,—मुलें निजविण्याच्या उपयोगाचा.

टाराटुरी स्त्री० १ पोकळ धमकी. २ निष्फळ प्रयत्न. ३ पिरपीर, टुरटूर (असंतुष्टपणाची).

टाल [नंदभाषेंत] वि० पन्नास.

टालमटोला [हिं०] पु० १ एकाद्याचें करावयाला घेतलेलें काम आज उद्यां असें लांबणीवर ढकलणें; टाळाटाळ; टोलवाटोलवी. २ खोटीं वचनें देऊन कोणेकाला झुलवीत ठेवणें.

टाली [हिं०] स्त्री० आधेली; आर्धा रुपाया; आठ आणे.

टाव पु० पुढें ' टाहो ' पहा.

टास, टांस [म० टासणें] वि० घट्ट; टणक; कठिण.

टाहो पु० १ लहान मुलाची रडण्याची लहर; (क्रि० फोडणें); उ० आई दूर जातांच मुलानें टाहो फोडला. २ एकादी वस्तु आपणांस मिळावी म्हणून तिच्याबद्दल एकसारखी केलेली मागणी (क्रि० घेणें). ३ मोर इ० प्राण्यांचा आवाज किं० ओरडणें; केकाटणें (फोडणें). ४ जन्मास आलेल्या मुलाचें पहिलें रोदन (फोडणें). ५ जमीनीच्या आंतून बाहेर पडतो तो जलाचा अंश (फुटणें).

टाळ [सं० ताल] पु० १ कासें ह्या धातूचें एक वाद्य. हें काठीनें बडवावयाचें असतें. २ गायनांतील कालपरिच्छेद. ३ झाडांच्या फांद्या आणि काटक्याकुटक्या;टहाळ. ❀ **टाळकुट्या, टाळघाशा** पु० १ टाळ वाजविणारा (तिरस्कारानें). २ भजनी माणूस (तिरस्कारानें). २ पायाशीं पाय आपटीत चालणारा घोडा. **टाळघोळ** पु० टाळ आणि इतर वाद्यें यांचा मिश्र ध्वनि. **टाळबद्ध** वि० तालासुरांत बसविलेलें पद, गाणें, इ०. **टाळसूर** पु० ए० व० ताल आणि सूर; उ० हा टाळसुरांत गातो; उ० ह्याच्या गाण्यांत टाळसूर जातो. **धान्यादिकांचा टाळ वाजणें** त्यांचा तुटवटा पडणें. **घोड्यानें टाळ वांजवीत चालणें** ह्मनें पायाशीं पाय आपटीत चालणें.

टाळ वि० मध्याशीं ज्याच्यावर करगोट्यासारखी रेषा आहे असें (मोतीं).

टाळकें न० डोकें (तिरस्कारानें); बोडकें; उ० ह्या उदाहरणाची रीति मी सांगितली ती आतां तरी तुझ्या टाळक्यांत शिरली काय ?

टाळणें [म० ' टळणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ एकादी अप्रिय जागा, वस्तु, किं० मनुष्य, ह्यांची गांठ न पडावी किं० ह्यांच्याशीं संपर्क न व्हावा म्हणून त्यांना दूर सारणें किं० आपणच दूर सरणें; चुकविणें; उ० मी गणू ओकाला नेहेमीं टाळतों;याला दूरून पाहतांच मी बोळांत शिरतों; उ०मी सासुरवाडीस जाणें टाळतो तेथें माझा मान रहात नाहीं;उ०मी परान्न होतां होईल तो टाळतों. २ आपणावर जें अरिष्ट किं० संकट गुदरण्याचा रंग दिसत असेल तें न गुदरेल अशी व्यवस्था करणें. ३ खोट्या सबबी सांगून लांबणीवर ढकलणें. (कांहीं प्रसंग, भेट, माणूस, देणें, इ०). ❀**टाळून टाकणें** अप्रिय किं० न आवडणारा पदार्थ. माणूस, प्राणी, विकून किं० कोणाला देऊन किं० अन्य रीतीनें तो आपणापासून दूर करणें. **टाळाटाळ (–ळी)** स्त्री० चुकवाचुकव; अनेक वेळां एकादा प्रसंग किं० एकादा माणूस दूर सारणें किं० जवळ न येऊं देणें.

टाळा [म० टाळणें] पु० १ टाळण्याची क्रिया; चुकविणें. २ आशाभंग; अपेक्षाभंग; उ० काल पावसानें टाळा दिला (म्ह० पाऊस पडला नाहीं). ३ नियमभंग; शिस्तीचा भंग; उ०भटजीबोवा,काल तुम्ही पूजेला कां टाळा दिला?उ०राम्या काल संध्येला टाळा दिलास ह्याबद्दल तुला मार दिला पाहिजे. ४ जें गुदरण्याचा रंग दिसत आहे. असें अरिष्ट न गुदरूं देणें. ५ थापबाजीनें कांहीं प्रसंग लांबणीवर ढकलणें.

टाळा [म० ' टाहाळा ' चें तोकडें रूप] पु० पानांसहित फांदी.

टाळा [**सं०** ताल=चावी,खीळ] **पु०** कुलूप, ‡ **टाळाचावी स्त्री०** १ कुलूप आणि किल्ली. २ किल्लीनें कुलूप बंद करणें.

टाळा [**सं०** तालु=मुखांतील घुमटाच्या आकाराचा वरचा भाग] **पु०** मुखांतील घुमटाच्या आकाराचा वरचा भाग. ‡ **टाळ्याला जीभ चिकटणें** भीतीनें सभा इ० प्रसंगीं बोलावयाला असमर्थ होणें किं० जिव्हेनें आपले कर्तव्य करूं न शकणें.

टाळी [**सं०** ताल=टाळी; तळहात] **स्त्री०** १ तळहातावर तळहात मारून होतो तो आवाज. २ गायनवादनादि प्रसंगीं ताल धरण्यासाठीं तळहातावर तळहात आपटण्याची क्रिया. ३ सौदा ठरला अशी कबूली (देणें). ‡ **एका हातानें टाळी वाजत नाहीं** १ भांडणाऱ्या दोन्ही पक्षांकडे थोडा थोडा तरी दोष असतोच. २ जो दुसऱ्याला दोष देऊन त्याच्याशीं भांडत असतो त्याच्याकडे कांहीं तरी दोष असतोच. **ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी** जो आपणाला पोसतो त्याची स्तुति करीत असावें. **टाळीस टाळी देणें** समर्थाची झलि ओढणें; समर्थाच्या मूर्ख विधानाला होकार देणें. **टाळी वाजणें** लग्न, मुंज, इ० विधि यथाशास्त्र पार पडणें. **ब्रम्हटाळी स्त्री०** एकाग्र चित्तानें ब्रम्हाचें ध्यान (लागणें). **टाळीपटकी स्त्री०** सौदा ठरला हें दाखविण्यासाठीं एकाच्या हातावर दुसरा मनुष्य हात मारतो ती क्रिया (करणें).

टाळी, टाहळी स्त्री० झाडाची पानासकट फांदी.

टाळी [**म०** अटाली; **सं०** अट्टालिका] **स्त्री०** चुनेगच्ची जमीन.

टाळीपटकी स्त्री० मागें ' टाळी ' मध्यें पहा.

टाळू [**सं०** तालू] **स्त्री०**१ डोक्याचा कपाळालगतचा भाग. २ ह्या भागावर राखलेलें झुलूप (मुलांचें). ३ तोंडाच्या आंतील वरचा घुमटाकार भाग. ४ जमिनीवर पाऊस पडून जो घट्ट आणि टणक चिखल होतो तो किं० त्या चिखलाचा थर (धरणें). ‡ **एकाद्याच्या टाळूवर** (किं० **डोक्यावर**, किं० **ताळूवर**) **मिरे वांटणें** १ त्याच्यावर करडा अमल चालविणें. २ त्याच्या डोक्यावर विनाकारण दोष लादणें. **टाळूस** (किं० **टाळवेस**) **टिपरूं न लागूं देणें** दुसऱ्यानें आपणावर लादलेला दोष गलागला बोलून उडवून लावण्याचा प्रयत्न करणें. **टाळूचा दांत पु०** अत्यंत जिव्हाळ्याचें आणि आवडतें माणूस; अत्यन्त प्रिय पदार्थ; (साप आपल्या तोंडांतील वरच्या विषारी दांताला फार जपतो यावरून).

टाळें न० १कोयंड्यात काढाघालावयाचें कुलूप. ह्याच्या उलट 'अंगचें कुलूप'. २ झालेल्या गटारांतील गाळ उपसून काढण्यासाठीं मध्यें मध्यें जीं त्या गटाराला भोकें पाडतात तीं (टाळा घेणें, टाळू घेणें). ३ जोड्याचा तळ. ४ तोंडांतील वरचा घुमटाकार भाग. **टीप–टाळीं न० अ० व०**मुखाचे दोन्ही जबडे,–खालचा आणि वरचा. **टाळीं बसणें** किं० **मिटणें** १ कांहीं विकृतीमुळें जबडा उकलण्याची शक्ति नाहींशी होणें. २ (लाक्षणिक) पुढें बोलणें बंद होणें;निरुत्तर होणें. ‡ **टाळी येणें** घोड्यानें मागें मागें हटण्याचा क्रम चालविणें. **टाळीं आत्मा लावून बसणें** १ समाधि लावून बसणें. २ रुसून निश्चल बसणें.

टाळें न० मधमाशांचें पोंवळें.

टिकणें अ० क्रि० १ न मरतां,नाश न पावता न हटतां, माघार न खातां,शाबूत राहणें; उ० हा धोतरजोडा आठ महिने टिकला; उ० काशीकर पंडित पुणेकर शास्त्र्याशीं वादांत टिकला नाहीं. २ (हरिण इ०नें) उडी मारणें.

टिकामिरवणा [**म०** टिका (कपाळावरील गंधाचें चिन्ह)+मिरविणें] **वि०** जो केवळ बाहेरून भपकेदार दिसतो पण आंतून निःसत्त्व,पोकळ, किं० अशक्त असतो असा पदार्थ किं० माणूस).

टिकल स्त्री० उडी (मारणें, घेणें).

टिकला [**सं०** तिलक] **पु०** १ कपाळावर करतात तें गंधाचें चिन्ह. २ एकाद्या जातींतील किं० संस्थेंतील महत्त्वाचा माणूस.

टिकली [**म०** टिकला] **स्त्री०** १ लहान टिकला. २ कोणतीही वर्तुळाकार अशी अगदीं लहान वस्तु किं० आकृति (कुंकवाची, काचेची, इ० ची). ‡ **टिकली मिकली स्त्री०** स्त्रियांचा प्रसाधनविधि,–केश विंचरणें, वेणी [किं० आंबाडा

घालणें, काजळ घालणें, कुंकूं लावणें, इ० रूप.

टिकाविणें [म० ' टिकणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ बिघडूं, नासूं, मोडूं, फाटूं, तुटूं न देतां (एखादा पदार्थ) शाबूत ठेवणें किं० राखून ठेवणें; एखादा मित्र इ० राखणें. २ विकत घेतलेल्या पदार्थाची किंमत जेव्हांच्या तेव्हां देऊन टाकणें. ३ खरोखरीं किं० प्रत्यक्ष किं० शंका न राहील अशा रीतीनें कोणेकाला रुपये देणें.

टिकशी स्त्री० फांदीचें अग्र,–ज्याला कोंवळी पानें आहेत असें.

टिका [सं० तिलक] **पु०** १ गंध इ० चें वाटोळें चिन्ह शोभेसाठीं कपाळ इ० वर केलेलें. २ घोडा, बैल, गाय, इ०च्या कपाळावरील पांढरा वर्तुळाकार ठिपका किं० डाग; उ०टिका घोडा,टिका बैल, इ०. ॐ **एखाद्याचा टिका लागणें** तो प्रसिद्धि पावणें; तो प्रसिद्ध होणें. **एखाद्याच्या कपाळीं टिका लागणें** त्याची बदनामी होणें. **टिक्याचा धनी पु०** १ नांवाचा धनी, स्वामी, व्यवस्थापक, किं०मालक,परंतु ज्याच्या अंगांत कांहीं कर्तबगारी इ० गुण नाहींत असा माणूस. २ जो स्वस्थ बसून राहतो आणि ज्याचीं कामें इतर माणसें करीत असतात असा माणूस.

टिकाऊ [म० टिकणें] **वि०** टिकूं शकेल असा; लवकर न फाटणारा, न मोडणारा, किं० न झिजणारा.

टिकाव, पिकाव पु० जमीन खणण्याचें एक हत्यार.

टिकाव, टिकावा [म० टिकणें] **पु०** १ टिकून राहण्याची क्रिया. २ टिकून राहण्याचें सामर्थ्य किं० शक्यता. ३ एखाद्या विशिष्ट स्थितींत किंवा परिस्थितींत राहाणें, राहाण्याची शक्यता, किं०ताकद. ॐ **हा धोतरजोडा फार तर आणखी एक महिना टिकाव धरील** म्ह० तो उपयोगास येईल. **हा बैल दहा कोश टिकाव धरणार नाहीं** इतकी मजल त्याला झेपणार नाहीं. **रामभाऊच्या घरीं माझा टिकाव लागणार नाहीं** मला तेथें सुखानें किं० सोयीनें राहाणें कठिण जाईल. **संध्याकाळपर्यंत एवढ्या खिचडीवर त्याला टिकाव धरवणार नाहीं** तोंपर्यंत तो भुकेनें व्याकूळ होईल.

टिकी स्त्री० निर्वाहाचें कांहीं साधन,–नोकरी, समर्थाचा आश्रय, इ०; (लागणें, सांपडणें, मिळणें).

टिकी स्त्री० झाडाच्या फांदीचें कोंवळ्या पानांसकट अग्र किं० टिकशी.

टिकोजी, टिकोबा पु० १ बडा माणूस (उपहासांत); उ० हे आले टिकोजी, हे काय दिवे लावतात तें पाहूं ! २ कुटुंबांतील शिल्लक राहिलेला एकटा माणूस (थट्टेंत). ३ केवळ मानपानाचा अधिकारी.

टिकोर (– रा) वि० नेहमीपेक्षां मोठ्या आकाराचा (पदार्थ,–बदाम, बेदाणा, इ०).

टिकोर, टिकोरें न० सुंदर आणि मोठ्या वर्णाचा घोडा.

टिकोरा,टिकोरा वि०१ खूप लांब आणि जाडी (काठी सोडगा,इ०).२खूप मोठा,विस्तीर्ण,लांबरुंद; जोरदार (शेत, पाऊस, वाडा, वाटी, चढण, इ०) **पु०** काठी, सोटा, इ० चा रट्टा (मारणें).

टिकोरें न० मनगटाइतका जाडी आणि दोन तीन हात लांब असा लाकडाचा तुकडा.

टिकल स्त्री० मूल इ० नीं एक सारखी चालयिलेली पिरपीर, रडगाणें, इ० (लावणें, मांडणें, करणें, चालविणें).

टिका, टिकोजी, इ० वर ' टिका, ' ' टिकोजी, ' पहा.

टिंगणें अ० क्रि० लंगडत लंगडत चालणें.

टिंच स्त्री० १ हाताचा आंगठा आणि करंगळी ताणून होते तितकी लांबी; सुमारें आठ इंचांचें परिमाण. २ मडकें इ० वर त्यांची मजबुती आजमावण्यासाठीं बोटांनीं करतात तो प्रहार (मारणें).

टिचकणें [म० टिचकी] **सं० क्रि०** हाताच्या बोटांच्या पेरांनीं ठोकणें (मडकें, माणसाचें डोकें, इ०).

टिचका वि० १ तोकडा (अंगरखा, बंडी, इ०); अतिशय लहान घेराचें (पागोटें, मुंडासें, टोपी, इ०).

टिचकी स्त्री० १ हाताच्या बोटाच्या पेरांनीं केलेला प्रहार (मारणें). २ हाताचा अंगठा आणि मधलें किं० पुढचें बोट यांचा संयोग करून

झटकन वियोग केला असतां होणारा आवाज; चिटकी (वाजविणें). ३ फार जेवण झाल्यामुळें पोटाचा होतो तो नगारा किं० होतें तें डेरकें.

टिचकुली स्त्री० फार जेवल्यामुळें फुगलेलें पोट.

टिचणें, टिंचणें स० क्रि० १ हाताचा अंगठा आणि पुढचें किं० मधलें बोट यांचा संयोग करून नंतर वेगानें त्यांचा वियोग करणें. २ एकाद्या पदार्थावर बोट मारणें.

टिचणें स० क्रि० १ एका गोटीवर (दुसरी गोटी) नेम धरून अंतरावरून मारणें. २ (पैसे) देणें किं० भरणें (वैतागांत, रागांत).**अ० क्रि०** टिच असा आवाज करून फुटणें किं० पिचणें.

टिचर, टिचरें न० १ डोक्यांत किं० अन्यत्र झालेलें क्षत. २ डोक्याला होतो तो खवडा.

टिचा पु० १ बदनामी; वद लौकिक (उडणें, पडणें, होणें, करणें) २ मुलाच्या कपाळाला लावतात तो काळजाचा ठिपका; तीट (लावणें). ꣸ **एकाद्याचा टिचा होणें** (किं० उडणें, करणें) **एकाद्याच्या नांवाचा टिचा होणें** (उडणें,करणें) त्याचा बोभ्या होणें (किं० उडणें किं० करणें).

टिचें, टिंचें न० १ अंगांत एकदम उठते ती तिडकि किं० शिणकि (भरणें,उतरणें, इ०). २ डोक्याच्या त्वचेवर होतें तें क्षत,–खवडा, इ०. ३ तीव्र वेदना करणारें शरीरावर कोठेंही झालेलें गळूं.

टिटवी, टिटवरी, टिट्टिवरी[**सं०**टिट्टिभ] **स्त्री०** १एक लहान आकाराचा पक्षी.२खांबाच्या माथ्यावर आणि तुळईच्या खालीं घालतात ती रचना,– मध्यांनीं काटकोनांत एकाला एक जोडलेले लाकडाचे दोन ठोकळे(खांबाची उंची वाढविण्यासाठीं). ꣸ **टिटवी देखील समुद्र आटविते** क्षुद्र माणूस देखील प्रसंगविशेषीं मोठा पराक्रम करूं शकतो.

टिणगिण्या स्त्री० अ० व० वात्रटपणाचे चाळे किं०उनाडक्या (मारणें).

टिपकणें अ० क्रि० थेंबांथेंबांनीं गळणें.

टिपका, ठिपका पु० १ थेंब. २ डाग, वण. ३ लहानसा टिकला (गंध, काजळ, इ० चा). ४एकसारखें गळत राहिलेलें पाणी इ०,–ओल्या वस्त्रांतून, घराच्या छपरांतून, जखमेंतून इ०. ५ एका मागून एक असे मारलेले रट्टे. ꣸ **धपका सोसतो पण टिपका सोसत नाहीं** कोणी आपणाला रागें भरलें तर तें सहन करवतें पण कुचकें बोलणें सहन करवत नाहीं.

टिपगिरी,टिपगारी स्त्री० भिंतींच्या विटा किं० दगड ह्यांच्या सांध्यांत चुना भरणें; दरजा भरणें.

टिपण न० १ टांचण; यादी; स्मरणार्थ केलेली नोंद. २ मुलाच्या जन्माच्या समयीं असलेले जे ग्रह त्यांच्या स्थानांचा निर्देश ज्यांत केलेला असतो असा कागद; जन्मपत्रिका.३उडी(मारणें). ४ कार्यविशेष करावयाला ठरविलेला समय;उ०तुम्ही सांगाल त्या टिपणास मी हजर होईन. ५ तिरंदाजींत घेतलेलें किं०ठरविलेलें लक्ष्य; वेध्य. ६ऐन वेळ किं० समय. ꣸ **टिपणास येणें** कांहीं काम आपल्या हातून पार पडेल असा रंग दिसणें. [नोंद.

टिपणी [म० टिपणें] **स्त्री०** टांचण; यादी;

टिपणें [म०टिप] **अ० क्रि०** थेंबाथेंबांनीं गळणें.

टिपणें स० क्रि० सुई, दोरा, इ० साधनांनीं कांहीं विशेष प्रकारें टाके मारून वस्त्रादि शिवणें.

टिपणें स० क्रि० १ कांहीं बाबी स्मरणार्थ कागद इ०वर लिहून किं० नमूद करून ठेवणें. २ भलत्याच ठिकाणीं पडलेले किं० सांडलेलें अत्तर, तूप, तेल, इ०चे थेंब वस्त्रादिकांनीं पुसून काढणें किं० त्याचा पुन्हा मिळेल तितका अंश मिळविणें. ३ जमीनीवर इतस्ततः पडलेले धान्यादिकांचें दाणे एक एक वेचून घेणें. ४एक एक याप्रमाणें (माणसें) मारीत जाणें,(ढेकूण)पकडीत जाणें,(फांदींचीं) पानें तोडीत जाणें,किं० खेळांत(मोहोरीं)मारीत जाणें.५ पैजेमध्यें ठरविलेलें झाड, धोंडा,इ०ना स्पर्श करणें. ६ यादी करतांना एका एका वस्तूचें परिगणन करणें,–रेघ ओढून, खडे मांडून,किं० अन्य प्रकारें. ७ भिंत इ० चुना इ०नीं माखणें किं० सारविणें.

टिपनिशी स्त्री० टिपनिसाचें कर्तव्य.

टिपरी स्त्री० १ अर्धा शेराचें माप. २ नगारा इ० बडविण्याची काठी. ३ गुन्हेगाराला गुन्हा कबूल करावयाला लावण्यासाठीं त्याच्या बोटाला दोरीचा वळसा घालून तो वळसा घट्ट करावयासाठीं ज्या काठीनें तो पिळतात ती. ४ अंगाला अति तंग बसणारी बंडी, अंगरखा, बांगडी, जोडवें, इ०. ५ कष्टाच्या कामानंतर येतो तो शीण किं० थकवा. ꣸ **टिपरघाई स्त्री०** काम करण्यांत पराकाष्ठेची घाई किं० लगबग.

टिपरी [**सं०** त्रिपुरी] **स्त्री०** त्रिपुरी पौर्णिमा म्ह० कार्तिक महिन्याची पौर्णिमा. ꣸ **टिपरी**

पुनव, टिपरी पूर्णिमा स्त्री० कार्तिक महिन्यांतील पौर्णिमा. टिपूरखेळ पु०, टिपरबाई, टिपरघाळी स्त्री० टिपऱ्या वडवून करतात तो नाच किं०धरतात तो फेर. टिपरखेळा पु०ह्या फेरांत नाचणारा.

टिपरूं, टिपरें न० नगारा, ढोलकें, इ० वाजविण्याची काठी.

टिपळण [म० टिपणें] स्त्री० थेंबांथेंबांनीं पाणी भरून काढण्याची विहीरीची किं० हौदाची स्थिति,–त्यांत पाणी अगदीं थोडें असल्याकरणानें होते ती.

टिपुसणें [म० टिपूस]अ० क्रि० थेंबांथेंबांनीं पाणी गळत राहणें,–ओल्या वस्त्रांतून, इ०.

टिपूं न० पाण्याचा किं० अश्रूचा थेंब.

टिपेर क्रि०वि० झकझकीतपणें(चंद्र प्रकाशणें).

टिपर [सं० त्रिपुर] पु० देवळाच्या पुढें दिवे ठेवण्याठीं दहा पंधरा हात उंचीची जी दगड इ० ची रचना केलेली असते ती.

टिपूस पु०, न० १ यत्किंचित् सुद्धा (नकारार्थी प्रयोग); उ० आमच्या विहिरींत टिपूससुद्धा पाणी नाहीं. २वस्त्रादिकांवर अग्नीची ठिणगी पडल्यानें जळून होतें तें लहानसें भोक.

टिप्पण न० १ मागें ' टिपण ' पहा.

टिप्पणी स्त्री० ग्रंथांतील कठिण भागांवर खूण करून त्यांचा अर्थ समासावर लिहिलेला असतो तो.

टिंब न० अक्षराच्या डोक्यावर करतात तो बिंदु,–अनुस्वार दाखविण्यासाठीं. [रणें.

टिबकणें अ०क्रि०थेंबांथेंबांनीं गळणें किं०पाझ-

टिबका, ठिपका पु०१थेंब.२शाई इ०चा डाग.

टिबा पु० थेंब.

टिंबी स्त्री० लहानसें मडकें.

टिभा पु० नागवेलींवर पडतो तो रोग.

टिमकी स्त्री०एक चर्मवाद्यविशेष,–हें नगाऱ्यासारखेंच पण फार लहान असतें.ꕥकांहीं गोष्टीची टिमकी देणें ती प्रसिद्ध किं०जाहीर करणें. एकाद्याची टिमकी वाजणें त्याचा बदलौकिक होणें. नगाऱ्याची घाई तेथें टिमकीचें काई ? (किं० तेथें टिमकी तुझें काय ?) अतिशय मोठ्या कामांत लोक निमग्न झाले असतां क्षुल्लक कामाकडे कोण लक्ष्य देणार ? कोणी नाहीं.

टिंया पु०लहान आकाराच्या पोपटाची जात.

टिऱ्या स्त्री० अ० व० दोन्ही कुले; ढुंगण. ꕥ टिऱ्या बडविणें १ आनंदानें नाचूं लागणें. २ प्रतिपक्ष्याची फजिती झाली म्हणून आनंदणें.

टिऱ्या वि० लहान आकाराचा; खुजट.

टिल्लू वि० खुजट; लहान आणि ठेंगणा.

टिवल्या बावल्या, टिवळ्या बावळ्या स्त्री० अ० व० १ छाकटेगिरीचीं कृत्यें. २ टवाळकीचीं कृत्यें,–दुसऱ्याला वेडावणें इ० रूप. [चकदी.

टिवळी स्त्री०नारळाच्या करवंटीची लहानशी

टिवाटीव स्त्री० १ टिटवी नांवाचा पक्षी. २ उंच आणि रोडका माणूस(लक्षणेनें).

टिळक [सं० तिलक] १ कपाळावर लावतात तो गंध इ० चा टिपका किं० टिळा. २ एकाद्या कुटुंबाचा किं० संस्थेचा जबाबदार माणूस.

टिळका [म० टिळक] पु० मोठा थेंब.

टिळा [सं० तिलक] पु० १ गंध, गोपीचंदन ,इ० द्रव्यांनीं कपाळ, छाती, इ०वर केलेलें चिन्ह. २ असें चिन्ह करण्याचा ठसा. ꕥ टिळा टोपी करणें १ आपल्या विशिष्ट पंथाचीं किं० संप्रदायाचीं चिन्हें, वस्त्रें, इ० नीं युक्त होणें. २ (पुरुषानें) अकडबाज पोशाख करून सजणें. टिळा वेशीस लावणें सर्व गांवकऱ्यांना आमंत्रिणें. टिळ्या विड्याच्या मानाचा अधिकारी पु० लग्न इ० मध्यें प्रथम मानाचें आमंत्रण ज्याला करावयाचें तो पाटील. टिळेपट्टे पु० अ० व० छानछुकी; नखरेबाजी. टिळेपट्टे नायकाचे घरांत हाल बायकोचे नवऱ्यानें चैनबाजींत बाहेर काळ काढावयाचा आणि त्याच्या बायकोनें घरांत कष्ट करीत असावयाचें; (निर्लज्ज आणि कठोर अंतःकरणाचा नवरा स्वतःचैनी करतो पण बायकोला धड खावयाला आणि ल्यावयाला देत नाहीं). टिळ्याचा धनी पु० एकाद्या टोळीचा किं० संस्थेचा जबाबदार माणूस.

टीक स्त्री० १ नथ इ० भूषणावर शोभेसाठीं मोत्यांची चौकडी, हिरा, इ० लावितात ती. २ टिका म्हणून जो स्त्रिया गळ्यांत दागिना घालतात त्याचे जे वेगळे वेगळे अवयव ते प्रत्येक. ३ कुंकवावर स्त्रिया जी काचेची टिकली चिकटवितात ती.

टीका [सं०] स्त्री० १ ग्रंथांतील कठिण शब्दादिकांचें स्पष्टीकरण. २ दुसऱ्याच्या वर्तनाची

केलेली निंदा किं० स्तुति. ३ कुटाळक्या. ◈ **टीकाकार पु०** दुसऱ्याच्या ग्रंथांतील कठिण शब्दादिकांवर स्पष्टीकरण करतो तो.

टीच स्त्री० अंगठा आणि पुढचें बोट ताणून होतें तें लांबीचें परिमाण. अंगठा आणि करंगळी ताणून होतें त्या परिमाणाला ' वीत ' म्हणतात.

टीच स्त्री० लहान मुलांच्या कपाळावर लावितात ती काजळाची तीट.

टीप स्त्री० १ घरें, जनावरें, शेतें, इ० च्या मोजदादीचें परिमाण किं०गणती.२शिवण्याचा एक प्रकार (घालणें, भरणें). ३ खालच्या खर्ज स्वराच्या दुपटीचें किं० त्याचेपेक्षां अधिक जें स्वरमान तें; उ० त्याचा आवाज टिपेस पोचत नाहीं. ४मोडक्या देवळाचा जीर्णोद्धार करण्यासाठीं किं० गांवकीच्या अन्य कार्यासाठीं प्रत्येक घरावर किं० माणसावर जी वर्गणी बसवितात ती किं० ह्या संबंधाची केलेली यादी.५गंजिफांच्या डावांत तलफ इ०डाव दुसऱ्याकडून आला असतां एका पानानें घ्यावा तो दोन पानांनीं घेतात असा जो खेळण्याचा प्रकार तो.६सोडतीची चिठ्ठी. ७दागिन्याचें वजन, कस, इ० संबंधाचें वर्णन जीवर नोंदलें आहे अशी चिठ्ठी. **न०** नेत्रांतून गळणारा अश्रुबिंदु. ◈**टिपेस उतरणें** टीप केली गेली असेल त्याप्रमाणें पदार्थ आहे असें आढळून येणें किं० ठरणें. **टीपकर, टीपनीस पु०** १ गांवांतील घरें, झाडें, इ० चें परिगणन करून त्यांचेवर कर बसविणारा सरकारी अधिकारी.२सैन्याची भरती करण्याच्या कामावरचा सरकारी अधिकारी. ३ जकाती वसूल करणारा सरकारी अधिकारी.**टीपनिशी स्त्री०** टीपनिसाचें कर्तव्य,अधिकार,किं०हुद्दा.**टीप—टिपनीस, टिपनिशी** हे शब्दही टीपनीस, टीपनिशी, ह्याच अर्थी रूढ आहेत. **टीपदोरा पु०** शिवण्यांतील एक प्रकार; याच्या उलट ' धावदोरा ' किं० 'धावता दोरा.'

टीर स्त्री० ढुंगण. मागें ' टिऱ्या ' पहा.

टीव स्त्री० एक पक्षिविशेष.

टुई स्त्री० १ गोसावी नामक पक्ष्याचें ओरडणें. २ (लाक्षणिक) त्याच त्याच गोष्टीबद्दल एकसारखें बोलत बसणें किं० मागणी करीत बसणें (लावणें). ३ तगादा (देणें, लावणें).

टुकटुक, टुकटुकां क्रि० वि० १ उत्सुकतेच्या दृष्टीनें (पाहाणें); आशाळभुताप्रमाणें(पाहणें). २ अंधुक प्रकाशानें (दिवा जळत असणें). ३ मिळेल तेंव्हां खावयाचें,न मिळेल तेंव्हां उपाशी राहावयाचें, अशा स्थितींत (जगणें). ४ अशक्तपणामुळें बोलतां येत नसल्यामुळें एकाद्या वस्तूकडे पहात (राहणें). ५ एकाग्र दृष्टीनें किं० टक लावून (पाहणें).◈**टुकटुक माकड न०** कांहीं खाद्य किं० भोग्य वस्तु आपणाला मिळाली असली आणि दुसऱ्याला मिळाली नसली म्हणजे मुलें त्या दुसऱ्याला खिजावतात ती क्रिया (करणें). ' टुकटुकावल्या ' हा ह्याच अर्थाचा शब्द आहे.

टुकटुकावणें स० क्रि० एकाद्याला टुकटुक माकड करून खिजावणें.वर ' टुकटुक माकड' पहा.

टुकटुकी स्त्री० टवटवी, तजेला (चेहेऱ्याचा).

टुकटुकीत वि० तजेलेदार; टवटवीत.

टुकणी स्त्री० कोष्ट्याच्या मागाच्या फणीचे दांते करण्यासाठीं ज्या फळीला खोबण्या पाडलेल्या असतात आणि त्यांतून वांबूच्या चोया ओढून काढतात ती फळी.

टुकणें [म० टूक] अ० क्रि० आशाळभुताप्रमाणें किं० उत्सुकतेनें एकाद्या पदार्थाकडे दृष्टि लावून बसणें.

टुकळा [म० टूक] पु० १ कांहीं खाद्य किं० भोग्य पदार्थ ज्या वेळीं आपणास मिळावयाचा ती वेळ टळली असतां तिच्याबद्दल वाटते ती अस्वस्थता. २ कांहीं वस्तु हरवली असतां किं० प्रेमाचें माणूस दूर गेलें असतां मनाला वाटतें ती हुरहूर किं० अस्वस्थता (धरणें, लागणें, घेणें, करणें).

टुकुमुकु क्रि० वि० वर ' टुकटुक ' पहा.

टुंग, टुंगर, टुंगळ, टुंगूर, टुंबर न० उंचवटा, टेंगूळ, फुगा, गांठ (शरीरावरील, झाडावरील, किं० जमिनीच्या पृष्ठभागावरील).

टुचकुली, टुचकोली स्त्री० १ खिजावणी. २ वेडावणी. ३ चिमटा (घेणें).

टुपणें स० क्रि० १ (सुई किं० दाभण) शिरकावणें.२ (जमीनींत धान्य किं०बीज) घालणें.

टुपणें अ० क्रि० शिरणें, प्रवेशणें, घुसणें.

टुपसा पु० पुढें ' टोपसा ' पहा.

टुंबर, टुंबरूक न० टेंगूळ, उंचवटा.

टुमटाम, टुमठाम स्त्री० थाटमाट; भपका.

टुमटुमीत वि० १ खाद्यें खाऊन नगाऱ्या-

सारखें फुगलेलें (पोट); खूप जेवण झाल्यामुळें डेऱ्यासारखें फुगलेलें (पोट).२खाऊन पिऊन सुखी.

टुमणी स्त्री०एकाद्याला केलेला तगादा(लावणें).

टुया पु० लहान जातीचा राघू.

टुरटुर स्त्री० १ मुलानें चालविलेली पिरपीर. २ एकाद्या गोष्टीबद्दल लाविलेली तगादा.

टुरटुर स्त्री० भपका; झोकाची किंवा थाटमाटाची राहाणी; उ० त्यानें दोन दिवस टुरटुर केली आतां तोंड वासून उताणा पडला.

टुरमा वि० १ ठेंगणा, खुजट. २ देवी इ०मुळें वाढ खुंटलेला हात, पाय, इ०.

टुरुटुरू स्त्री० बेडकांचें ओरडणें.

टुल्लू वि० ठेंगणा; खुजट.

टूक स्त्री० १ एकादी वस्तु किं० पदार्थ करण्याची खुबी, युक्ति, किं० कसब (साधणें, सापडणें).२ कांहीं कृति करण्याची परिपाठानें साध्य झालेली सफाई. ३ मनुष्य, जनावर, इ०आपणाला लाभदायक होण्यासाठीं त्याची राखलेली निगा, किं० घेतलेली काळजी, किं० संभाळलेलें तंत्र; पदार्थाच्या सुस्थितीसंबंधाच्या तजविजी समुच्चयानें ४ एकाग्र दृष्टि. ꕥ **टुकीवर क्रि**० **वि**० व्यवस्थितपणें. २ योग्य समय न टळूं देतां. **टुकीनें क्रि**० **वि**० १ नियमितपणें. २ योग्य समयीं. **एकाद्याची टूक संभाळणें** त्याला ज्या वेळीं जें पाहिजे तें त्या वेळीं त्याला देणें किं० पुरविणें; त्याचें तंत्र संभाळणें. **टूक चुकणें** ज्या वेळीं जें योग्य तें त्या वेळीं न होणें किं० न घडणें.

टूम स्त्री० १ झोकदारपणा; भपका.२ संस्कारविशेषानें पदार्थास येते ती शोभा. ३पदार्थमात्राचे ठायीं नैसर्गिक जो मोहकपणाचा अंश असतो तो. ४नवीन पद्धति,चाल,तऱ्हा, किं० खुबी. ५ नवीन बनविलेला; कांहीं चमत्कारिक पदार्थ; चूष. ꕥ **टूमदार वि**० लहान असून सुंदर किं० अक्कडबाज.

टेक [**म**० टेकणें] **स्त्री**० १ सहन करण्याची ताकद; पुढें काम चालूं ठेवण्याचें सामर्थ्य(निघणें, धरणें, धरवणें, देणें); उ० माझ्यानें आणखी तीन दिवससुद्धां टेक धरवणार नाहीं; उ० थोडा वेळ टेक धर. २ दृढ निश्चय; धीर; उ० कोणतेंही काम टेकीनें केल्यास फळ प्राप्त होतें. ३ शिकस्त; परमावधि; उ० दहा जिलब्या खाईन असें तो म्हणत होता पण सात खातांच टेक झाली. ꕥ **टेकदार वि**० ज्याच्यानें धीर धरवेल असा. **टेकीचा वि**० दृढनिश्चयी. **टेकीस टेक उतरणें** चढाओढींत सारखें ठरणें;बरोबरी होणें किं०करणें.

टेक पु० **न**० जमीनीवरचा उंचवटा.

टेकड,टेकडें न०जमीनीवरचा उंचवटा;टेकडी.

टेकडी स्त्री० लहानसा डोंगर.

टेकण [**म**० टेकणें] **न**० १ आधार. २ पदार्थविशेष एका बाजूस वळूं नये किं० सरकूं नये म्हणून त्याला देतात तो आधार.

टेकणें अ० **क्रि**०१ अवलंबून राहणें. २ आधारविशेषाच्या आश्रयानें असणें किं० राहणें. ३ एकाद्या माणसावर किं०पदार्थावर किं० घडण्याचा संभव असलेल्या गोष्टीवर भरंवसा ठेवून राहणें किं० असणें. ४ कांहीं गोष्ट लवकरच होईल किं० घडेल असा रंग किं० संभव दिसणें. ५ अगदीं जवळ आलेलें असणें. ६ कांहीं विशिष्ट स्थिति किं० दशा यांच्या अगदीं जवळ येऊन पोंचलेलें असणें. **टीप**—वरील तीन्ही अर्थी 'टेकावणें'असाही शब्द आहे.

टेकाड, टेकूड न० १ जमीनीचा उंचवटा. २ डोंगर (तुच्छतेनें).३ कोणत्याही पदार्थाची रास; उ० भाताचें टेकाड. ꕥ **छातीचें टेकाड न**० १ प्रशस्त छाती. २ आजारानें जिच्या बरगड्या वर दिसत आहेत अशी छाती. **कपाळाचें टेकाड न**० भव्य आणि बुद्धिमत्तेचें व्यंजक कपाळ. **पोटाचें टेकाड न**०१ आजारामुळें जें नगाऱ्यासारखें फुगलें आहे असें पोट. २ फार जेवल्यामुळें डेऱ्यासारखें झालेलें पोट.

टेकू [**म**० टेकणें] **पु**० १ आधार.२आश्रय, पाठिंबा. ३ (लाक्षणिक) ज्यावर भरंवसा ठेवून वसतां येईल असा माणूस. ४ ज्याच्या विषयीं आशा बाळगतां येईल किं०ज्यावर अवलंबून राहतां येईल असा मनुष्य किं० अशी कांहीं गोष्ट. ५ ज्यावर तरफ टेकतात तो आधार.

टेंगळ, टेंगूळ न० १ जमीचीचा उंचवटा. २ झाडाच्या खोडावर किं० फांदीवर होते ती गांठ. ३ कपाळ इ०वर आघात झाल्यानें तेथें एकदम रक्त जमून होतो तो उंचवटा.

टेटावणें अ० **क्रि**० १पक्ष्यानें टें टें असा ध्वनि करणें. २ टें टें असा आवाज करून मुलानें रडणें.

टेटाविणें स० **क्रि**० केळीचें पान सुरी, विळी,

इ०नीं न कापतां हातानेंच फाडणें.

टेटाविणें स० क्रि०नापसंत म्हणून फेकून देणें.

टेटे क्रि० वि० साळुंकी, टिटवी, इ०नीं टेटे असा आवाज करून (ओरडणें).

टेणपणें स० क्रि० काठीनें मारणें.

टेणपा पु० सोटा, काठी, वडगा.

टेणा पु० लठ्ठ किं० जाडी वात (दिव्याची).

टेणा, टेण्या पु० १ रक्त पिऊन लठ्ठ झालेला ढेकूण. २ लठ्ठ ऊ, ढेकूण, पिसू, इ० कीट.

टेणें न० उडी (मारणें, घेणें).

टेप पु० न० १ जमीनीवरचा उंचवटा. २ डोक्यानें मारलेला ठोसा; मुसंडी ३ शिक्षेची मुदत; उ० जन्मटेप काळें पाणी; ह्या अर्थी ' ठेप ' असाही शब्द आहे. ४ खणलेल्या जमीनीचें डिखूळ. ५ टिकाव, कुदल, इ० चा रट्टा (मारणें). ॐ **टेपटाप पु० अ० व०** जमीनीवरचे उंचवटे, खळगे, इ०.

टेपण, टेपणें न० खांबाची उंची वाढविण्यासाठीं त्याच्या खालीं किं० वर घातलेलें लाकूड.

टेपण, टेपर, टेपरें, टेपरण न० तुमच्या चुकीमुळें किं० हयगयीमुळें अमुक कार्य बिघडलें असा एकाद्याला दोष देणें (मारणें, देणें, ठेवणें, इ०). २ दुसऱ्यावर कांहीं दोष लादण्याला निमित्त किं० सबब.

टेपर न०जमीनीवरचा उंचवटा. [दूर लोटणें.

टेपरणें, टापरणें स० क्रि० बाजूस सारणें;

टेपरणें अ० क्रि० (बायकांच्या भाषेंत) गरोदर होणें. [सोटा, सोडगा.

टेपरणें न० १ लाकडाचा हातोडा; मोगर. २

टेपरा पु० जमीनीचा उंचवटा; टेकाड.

टेपरा पु० दोषारोप (मारणें). वर 'टेपर 'पहा.

टेपलणें स० क्रि० १ बाजूस सारणें. २ एक वस्तु दुसऱ्या वस्तूवर आपटणें. ३ टोमणा मारणें. **अ० क्रि०** एक पदार्थ दुसऱ्यावर जोरानें पडणें.

टेपलणें न० सोटा, सोडगें, दांडकें. [उंचवटा.

टेंब, टेंभा पु०, टेंभ स्त्री० जमीनीवरचा

टेंबरू, टेंबरें, टेमरूं, टेमरें न०टेंबुरणीचें फळ.

टेंबळी स्त्री० फणसाचें डेख. ॐ**टेंबळी काढून हसणें** निर्लज्जपणानें हसणें.

टेंबा, टेंभा पु० १ प्रकाशासाठीं काठीच्या टोकाला चिंध्या बांधून त्यांवर तेल घालून पेटवितात ती काठी. २ जमीनीवरील उंचवटा किं० टेकाड. ३ जमीनीवरील उंचवट्याचें शिखर. ४ आधार, आश्रय. ५ गोंधळाचें प्रसंगीं प्रकाशासाठीं जी दिवटी केलेली असते ती. ॐ **टेंबा (किं० टेंभा) पाजळणें** अंगीं कांहीं योग्यता नसतां डौल करणें. **आपला टेंबा (किं० टेंभा) मिरविणें (किं० चालविणें)** एकाद्यावर आपलें वर्चस्व स्थापित करणें. **टेंबा (किं० टेंभा) मिरविणें** ऐट करणें; डौल करणें; कांहीं क्षुद्र पराक्रमाबद्दल बढाया मारणें. [एक वृक्ष.

टेंबुरणी, टेंभुरणी [सं० तिंदुक] स्त्री०

टेंबूस, डेंबूस, ढेंबूस न०१ झाडाच्या खोडावर किं० प्राण्याच्या अंगावर विशोभित दिसणारा गोळा वाढतो तो. २ जमीनीवरचा उंचवटा.

टेर स्त्री० आकंठ जेवण जेवून होते ती तृप्ति.

टेर , टर स्त्री० एकाद्याचा केलेला उपहास. ॐ **एकाद्याची टेर उडविणें** त्याची फजीती करणें.

टेरू, टेरकी स्त्री० नांगराच्या मागच्या टोकाची खीळ किं० खुंटी.

टेल्लू वि० १ खुजट. २ लठ्ठ आणि ठेंगणा.

टेव पु० १ कांहीं वाईट खोडी किं० लकब. २ एकाद्या गोष्टीबद्दल घेतलेला नाद किं०छंद. ॐ **टेवे, टेव, टेवरेव पु० अ० व०** सोदेगिरीचे ढंग (करणें). **टेवखोर वि०** छाकटा; नखरेबाज.

टेवण न० संकेतसमय किं० संकेतस्थान.

टेवा पु० जमीनींत किं० भिंतींत पडलेलें किं० पाडलेलें भोक.

टेहर पु० एका वेळची माणसाच्या गुवाची रास. २ एका वेळच्या हगलेल्या शेणाची किं० लिदींची रास. [(करणें).

टेहलणी, टेहली स्त्री० फेरी; फेऱ्या करणें.

टेहलणें, टेहेलणें स० क्रि० घोड्याला इकडून तिकडे आणि तिकडून इकडे चालविणें. **अ०क्रि०** इकडून तिकडे तिकडून इकडे अशा फेऱ्या करणें (पाहरेकरी, गस्तवाला, इ० नीं). ॐ **टेहलता पाहारा पु०** इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फेऱ्या करीत करीत केलेला पाहारा. उलट ' बैठा पाहरा ' म्ह० एके ठिकाण बसून केलेला पाहारा.

टेहळणी, टेहेळणी, टेहळी[म० टेहळणें] स्त्री० बारकाईनें एकाद्या माणसावर किं०त्याच्या हालचालींवर किं०घडत असलेल्या गोष्टीवर ठेविलेली नजर.

टेहेळणें, टेहळणें स० क्रि० १ एकाद्या माणसावर किं० त्याच्या हालचालीवर बारकाईची नजर ठेवून पाहाणें. २ बारकाईच्या नजरेनें अवलोकिणें. **अ० क्रि०** कोणेकाला बारकाईच्या नजरेनें दिसणें किं० उमगणें; उ० हें किरटें अक्षर मला चांगलेसें टेहळत नाहीं.

टेहेळया, टेहळया [म०टेहेळणें] **पु०** बारकाईच्या नजरेनें पाहून शोध करणारा किं० कांहीं माहिती काढणारा किं०अशा कामावर नियुक्त केलेला मनुष्य.

टोक न० कोणत्याही वस्तूचें अग्र किं० शेवटचा भाग. **स्त्री०** पक्ष्याची चोंच.

टोकण न० अग्र, शेवट.

टोकणें अ० क्रि० १ एकाग्र नजरेनें पाहात राहाणें. २ आशाळभूतपणाच्या नजरेनें पाहाणें. ३पुढें डोकें करून पाहाणें;डोकावणें;उ० खिडकींतून डोकावून पहा; उ०देवीबाहेर टोकतात.'टोकावणें' असेंही ह्या सर्व अर्थीं क्रियापद आहे.

टोकर पु० १ कातड्याच्या बुधल्याचें अधुक किं० अर्धा बुधला. २ कातड्याची टोपली. ३चामड्यानें मढविलेली टोपली.

टोकर पु० लांब आणि जाडी बांबू. ॐ **विंचू व्याला आणि टोकर झाला** सुखोपभोग परिणामीं फोल ठरतो.

टोकरा पु० १बांबू इ०च्या कामट्यांची केलेली लहानशी होडी,–जी कातड्यानें मढविलेली असून उतारू इ० नदीच्या पैलतीरास नेण्याच्या उपयोगाला लाविली जाते. झाडाचें मोठें खोड पोखरून ह्याच कामीं योजलें जातें त्यालाही ' टोकरा ' म्हणतात. २ कातड्यानें मढविलेला हारा.

टोकरी, टोकवी स्त्री० १ कातड्यानें मढविलेली टोपली.२बांबूची केलेली एक प्रकारची घंटा,–जी भटक्या गुरांच्या गळ्यांत बांधतात. ३ नाठाळ गुराच्या गळ्यांत बांधतात तें लाकूड.

टोकरी स्त्री०१ निमुळता जबडा,–साप, पाली, इ०चा असतो तो.२ पक्ष्याची निमुळती चोंच. ३ सर्पादिकांच्या जिभेचें अग्र.

टोकरी, टोकारी वि० एका जातीचा जाडा कागद,–जो बांबूपासून केला जातो अशी लोकांची समजूत असे. 'टोकर'म्ह० जाडी आणि लांब बांबू.

टोकळा पु०१एकाद्या माणसाबद्दल किं०वस्तूबद्दल घेतलेला ध्यास(धरणें,घेणें,करणें,लागणें).२रोजच्या स्वयंपाकासाठीं रोजच्या रोज द्यावयाचा शिधा किं० ह्या शिध्याचें परिमाण किं० हा असा शिधा देण्याचा किं०घेण्याचा परिपाठ. ३ बैलांना इशारत देण्यासाठीं हाकणारे लोक तोंडांत जीभ विशेष प्रकारें वळवून काढतात तो शब्द.

टोका पु० १ धान्याची नासाडी करणारा एक क्षुद्र कीट. २ मोठा द्रोण, (तूप,कढी,इ० साठीं).

टोकावणी [**म०** टोकावणें] **स्त्री०** १ पुढें डोकें करून पाहणें. २ डोकावून पाहणें.

टोकावणें, डोकावणें अ० क्रि० १ पुढें डोकें करून पाहणें.२दुसऱ्याच्या कारभारांचें किं०हालचालींचें अवलोकन करणें.

टोकावली स्त्री० टुकटुक माकड.

टोंग वि० १ दांडगा, उद्धट. २हट्टी, हेकेखोर.

टोंगळ वि०१ लठ्ठ, जाडी (काठी, सोटा). २ रिकामे डौल करणारा.३ हट्टी; उद्धत. ह्या दोन अर्थीं'टोंगदार,'असाही शब्द आहे.

टोंगाई स्त्री० हेकेखोरपणा; उद्धटपणा.

टोंच, टोंच स्त्री० १ पक्ष्याची चोंच. २ कांहीं अणकोचीदार पदार्थानें केलेला वेध किं०केलेलें क्षत.

टोंचणी स्त्री० १ टोंचण्याची क्रिया. २ केलेला तगादा. ३ मनाला लागलेली हूरहूर; पश्चात्ताप.४ पाकांत घालण्यासाठीं आंवळे इ० ना क्षतें पाडावयाचें एक साधन.५ जाचणी.

टोंचणें स० क्रि०१सुई,दाभण, किं०कोणताही तीक्ष्ण अग्राचा पदार्थ दुसऱ्या पदार्थांत शिरकावणें किं० त्यावर जोरानें टेकणें किं० त्या पदार्थानें त्या दुसऱ्या पदार्थास भोक पाडणें. २ गांजणें; सतावणें. ३ बोचणें. ४ कोणेकाला कांहीं एका गोष्टीचें वारंवार स्मरण करून देणें,–त्यानें ती विसरूं नये म्हणून. ५ ओरखडणें. **अ० क्रि०** तीक्ष्ण अग्राचा पदार्थ दुसऱ्या पदार्थांत शिरणें किं०जोरानें लागणें. ॐ **सोनारानें कान टोंचलेला पथकरला जातो** जबरदस्ताचा हुकुम निमूटपणें पाळला जातो.

टोंचळणें स० क्रि० तीक्ष्ण अग्राच्या पदार्थानें कांहीं पदार्थ ओरखडणें किं०त्याला भोक पाडणें.

टोंचा [म०टोंचणें] **पु०** १तीक्ष्ण अग्राचा पदार्थ दुसऱ्या पदार्थावर जोरानें मारून किं०दाबून पाडलेलें भोक किं०केलेलें क्षत किं०ओरखडा.२सपाट पृष्ठभागावर केलेला खळगा. ३पदार्थावर आघात करून त्याचा काढलेलातुकडा किं०अंश किं० खंड;टवका.

टोंचा, टोंच्या [**म०** टोंचणें] **पु०** कागद, कातडें, इ० ना भोक पाडावयाचें पोलादी हत्यार.

टोटकें न० लाकडाचा लठ्ठ ओंडका.

टोटरा, तोटरा पु० कोरडा पदार्थ खातांना

तो घशाखालीं उतरत नाहीं अशी स्थिति (बसणें).

टोणकणें, टोणकाविणें **स० क्रि०** टोणक्यानें मारणें, कुटणें, किं० चोपणें. [डाचा ओंडा.

टोणका पु०, टोणकें, टोणकूळ न० लाक-

टोणगट न० टोणगा किं० रेडा (तुच्छतेनें).

टोणगा पु० १ रेडा. २ (लक्षणेनें) अभ्यास न करणारा किं० उनाड पोरगा. ❀**टोणग्याच्या कानीं किनरी** अरसिकाला कांहीं रंगेलपणाची किं०गमतीची गोष्ट सांगणें. [अल्लड पोरगी.

टोणगी स्त्री० १ रेडी. २ (लक्षणेनें)मूर्ख किं०

टोणपणें स०क्रि०टोणप्यानें कुटणें, किं०मारणें.

टोणपा, टोणा पु०, टोणपें न० लठ्ठ आणि आखूड काठी. ❀ **शहाण्यास मार शब्दाचा आणि मूर्खास टोणप्याचा** समंजस माणसाला थोडीशी इशारत दिल्यानें तो सुधारतो; हेकट आणि हट्टी माणसाला चोप दिल्यावांचून तो सुधारत नाहीं.❀ **टोणपनाथ, टोणपेश्वर, टोणपशुद्ध पु०**अत्यन्त मूर्ख माणूस.

टोणपा पु० १ लाकडाचा ओंडका. २ (लक्षणेनें) अगदीं मूर्ख आणि अडाणी माणूस.

टोणा, टोण्या पु० १ रक्त पिऊन लठ्ठ झोलला ढेकूण. २ प्रतिपक्ष्यास कदली न पडावी म्हणून गोंगाट करतांना हा शब्द उच्चारतात.

टोणाटाणा पु०, टोणाटाणी स्त्री० मंत्रतंत्रादि इलाज. मागें ' टाणाटोणा ' पहा.

टोणी स्त्री० ओंडका; सर्पणाच्या उपयोगाच्या लाकडाच्या गांठी प्रत्येक.

टोणें न० १ कांहीं विशिष्ट परिमाण ज्यांत भरतां येईल असें भांडें किं० बारदान; उ० हें पात्र मणाचें टोणें आहे. २ मिळकतीची जागा; पैसे मिळण्याचें ठिकाण किं० हुद्दा; उ० मिळकतीचें एक टोणें होतें तें ह्या महिन्यापासून हातचें गेलें.

टोप पु० १ स्वयंपाकांत वरण शिजवावयाचें एक पात्रविशेष. २ ताक ठेवण्याचें पात्रविशेष. ३ नाटकांतील स्त्रीवेष धारण करणारा पुरुष डोक्यावर धारण करतो ती केशरचना. ४ नाटकांत राजाचा वेष धारण करणारा पुरुष मुकुट म्ह० जो तत्सदृश पदार्थ डोक्यावर धारण करतो तो. ❀ **टोपपदरी वि०** ज्याचा कांठ जमीनीपेक्षां अधिक रुंद आहे असें (लुगडें).**टोपकर,टोपडा पु०** टोपी माणूस.

टोपडें, टोपरें [**म०** टोपी] **न०** १ बाळंतिणी किं० मुलें यांची घालावयाची टोपी. २टोपी (तुच्छतेनें).

टोपण न० १ भोक पाडावयाचें सुताराचें एक हत्यार. २ शिवावयाचे वेळीं बोटाला सुई बोचूं नये म्हणून बोटाच्या अग्राला जी धातूची टोपी घालतात ती; अंगुस्तान. ३ झाकण, आच्छादन (करंडा इ० चें). ४ नगारा, नौबत, इ० चा सांगाडा,–ज्यावर कातडें ताणून बसविलेलें असतें. ❀ **टोपण नांव न०** कोणेकाचें कागदोंपत्रीं नमूद करावयाचें जें नांव त्याहून जें भिन्न नांव व्यवहारांत योजलें जातें तें.

टोपणें,टोपसणें स०क्रि०१टोपण ह्या हत्यारानें भोक पाडणें. २ खुपसणें, बोचणें, शिरकावणें. ३ (असोल्या नारळ इ०चें) कवच काढणें; फाडून किं० ओरबाडून काढणें. ४ कोणेकाला चोप देणें.

टोपणें न० भोक पाडावयाचें सुताराचें हत्यार.

टोपला पु०, टोपली स्त्री०, टोपलें न०धान्य साठविणें,भाजी ठेवणें, पीठ भरणें, इ०च्या उपयोगाचें पसरट तोंडाचें वांबूचें किं० धातूचें पात्र.

टोपशी स्त्री० १ सूज. २ डोक्याची कातडी. ३ खिळ्याचा माथा. ❀ **एकाद्याची टोपशी उडविणें** त्याला रागें भरणें; त्याची खरडपट्टी काढणें. [ताइताचें झाकण.

टोपसण न० १ लहानशा डबीचें झाकण. २

टोपसणें, टापसणें अ० क्रि० फुगणें; फुगून मोठें होणें (आकारानें).

टोपसणें स० क्रि० मागें ' टोपणें ' पहा.

टोपसल, टोपसाल [**म०** टोपणें (ओरबाडून काढणें+साल (त्वचा)] **न०** दांडगाईनें किं० ओरबाडून काढलेलें साल,त्वचा,किं०कातडें. ❀**एकाद्याचें टोपसल काढणें** १ त्याची खरडपट्टी काढणें. २ त्याला पारिपत्य करणें. ३ त्याला चोप देणें. **एकाद्याचें टोपसल निघणें** १ त्याची मोठी हानि होणें.२त्याचा जिवाविशेष खर्च होणें.३त्याची खरडपट्टी काढली जाणें; त्याची भोसडपट्टी निघणें.

टोपसा पु० १ शैत्यादिनिवारणार्थ डोकें आणि कान यांचे भोंवतीं गुंडाळलेलें किं० लपेटलेलें वस्त्र (बांधणें). २ फुगवटी, सूज (येणें, चढणें,उतरणें).३खिळ्याचा माथा. ❀**एकाद्याचा टोपसा उडविणें** त्याची भोसडपट्टी काढणें.

टोपा पु०एक प्रकारचें इरलें.

टोपी स्त्री० १ डोक्यावर धारण करतात तें ओकारविशेषाचें आच्छादन. २ पर्जन्यनिवारणार्थ सखलाद इ०चें डोक्यावरून आणि अंगाभोंवताल्न घेतात तें पायघोळ आच्छादन.३ डगल्याला शिवलेलें डोक्यावर कारणपरत्वें घ्यावयाचें आच्छादन. ꙮ **एकाद्याला टोपी** (किं०**गणेशटोपी**) **घालणें** त्याला भुलथापा देऊन किं० कांहीं लटपटी करून किं० दुटप्पी भाषणें करून फसविणें; उ० त्याणें गोविंदरावाला लाकडाच्या व्यवहारांत हजार रुपयांना (किं० रुपयांची) टोपी घातली.

टोपें न० मोठा द्रोण,–तूप, आमटी, इ०घ्यावयासाठीं.

टोमका पु०रामोशी,जागल्ये, इ०गांवकामगार.

टोमणा पु०, टोमणें न० १ विटीदांडूच्या खेळांत विटीवर मारलेला रट्टा. २ छद्मी भाषण; निभर्त्सनेचा शब्द. ३ एकाद्याच्या कांहीं चुकीबद्दल त्याला दर्शविलेली आपली नापसंती.

टोमणी स्त्री० ' टुमणी ' पहा. [माप.

टोमणें न०सुमारें पांच शेरांचें तेल मोजावयाचें

टोमणें स० क्रि० (कांहीं काम) दुसऱ्याच्या अंगावर लोटणें किं० दुसऱ्यावर कोलणें.

टोलविणें,टोलाविणें स० क्रि० १ कोणेकाला आज उद्या अशा थापा मारून लांबणीवर ढकलणें. २ लांबणीवर टाकणें. ३ आपल्या अंगावर पडलेलें काम उडवून देणें.४(कोणेकाला) टोमणा मारणें.

टोला पु० १ रट्टा;तडाखा.२विटेचा,कौलाचा, किं० दगडाचा तुकडा.३झोंबरें भाषण (मारणें). ꙮ **टोलाटोला पु०, टोलवाटोलव स्त्री०** १ कोणेकाला लांबणीवर ढकलणें.२ आपल्यावरचें काम उडवून देण्याचा प्रयत्न. ३ टंगळमंगळ (कांहीं काम करण्यांत). **टोलाठोसरा पु०** रट्टा;तडाखा. २ निर्भर्त्सेचें भाषण (देणें, मारणें).

टोलार त्रि० १ किड्यांनीं पोखरून पोकळ केलेला (धान्याचा दाणा किं०लाकडाचा तुकडा).२ मेलेला आणि शुष्क झालेला (विंचू किं० ढेकूण). ३पूर्णपणें न पोसलेले धान्याचे दाणे, कणसें, शेंगा, इ०). ४ सुकलेला, वाळलेला, रोडावलेला, सुरकुतलेला (मनुष्य, प्राणी, इ०), ꙮ **विंचू त्याला टोलार झाला** १ कांहीं जिवाविशेष खर्च केल्यामुळें कंगाल झालेल्या माणसाचें हें वर्णन आहे. २ मोठी खटपट आणि भिकार फलनिष्पत्ति ज्याची अशा कार्याचें वर्णन करतांना ह्या संप्रदायाचा उपयोग केला जातो.

टोलावणी [**म०** टोलाविणें] **स्त्री०** १ लांबणीवर ढकलणें.२ कांहीं काम अंगाबाहेर लोटणें.

टोलाविणें स० क्रि० १ लांबणीवर ढकलणें.२ थापा मारून किं० खोट्या सबबी सांगून कोणेकाला दूर सारणें किं० खेपा घालावयाला लावणें. ३ टोला मारून उडवून देणें किं० दूर लोटणें. ४ कोणेकाला शब्दांनीं टोमणा मारणें. [भाग.

टोली स्त्री० अर्धी दमडी किं०पैशाचा आठवा

टोलेजंग [**म०** टोला+**फा०** जंग] **वि०** खूप मजबूत आणि मोठा किं०विस्तीर्ण (घर,बंगला,इ०).

टोव पु० १ खांब पुरण्यासाठीं किं० झाडाचें रोप लावण्यासाठीं केलेला किं० खणलेला खळगा. २ लहानशी खळगी (पदार्थाच्या पृष्ठभागावर झालेली किं० केलेली). ३ शेताच्या मर्यादेची खूण म्हणून दगडांत किं०खडकावर कोरलेली निशाणी. ४ खल (कुटण्याचा).

टोवणी स्त्री०(पावटा इ०चे दाणे) जमीनीत भोंक करून रुजण्यासाठीं त्यांत घालणें किं०रोवणें.

टोवणें न० पांच शेराचें तेलाचें माप. ꙮ **एकाद्याचें टोवणें भरणें** त्याच्या इच्छा तृप्त होणें; त्याच्या कामना सफळ होऊन तो तृप्त होणें.

टोविणें स० क्रि० जमीनींत खळगे करून (बीजें) रुजत घालणें. २ खरवडणें; ओरखडणें. ३ वेधणें; ०ला भोंक पाडणें; बोचणें.

टोहो पु० ' टोव ' पहा.

टोळ पु०एक पंखांचा क्षुद्र प्राणी. ꙮ**टोळधाड, टोळक्रांति स्त्री०** टोळांचा शेतांच्या पिकांवर हल्ला आणि त्यांनीं केलेली नासाडी. **टोळखाद, टोळखाज स्त्री०** टोळांनीं केलेली नासाडी.

टोळपणें अ० क्रि०१ दबणें; ओसरणें.२ मरणें.

टोळी स्त्री० १ माणसांचा किं० जनावरांचा समुदाय किं० थवा. २ टोळांचा थवा.

टौका मागें ' टवका ' पहा.

टौकारणें अ० क्रि० डोळे वटारणें (पाहतांना). ꙮ **टौकारून पाहणें** डोळे वटारून कांहीं पदार्थ इ० अवलोकिणें.

टौकी स्त्री० १ डोक्याचा टाळू हा भाग. २ तोडून किं० कापून काढलेला तुकडा.

टौर वि० चटोर; वात्रट.

ट्यांहां क्रि० वि०ट्यांहा ट्यांहा असा आवाज करून (लहान मुलानें) रडणें.

ठ

ठ मराठी व्यंजनमालेंतील हें बारावें व्यंजन.

ठक [हिं०] पु० लुचा माणूस; फसव्या. ॐ **ठकास महाठक** एका लुचास फसविणारा दुसरा अधिक चतुर लुचा. **ठकणूक** स्त्री० फसविले जाणें; फसवणूक. **ठकबाज** वि० लुच्चा; कपटी.

ठक न० १ दृष्टीची एकाग्रता (कवितेंत). २ आश्चर्याची स्तब्धता (कवितेंत).

ठकठकणें अ० क्रि० ठकठक असा आवाज [करणें.

ठकठकें न० शेतावरून पक्ष्यांना भिववून उडवून लावण्यासाठीं लाकडावर लाकूड आपटून आवाज व्हावा अशासाठीं केलेली रचना; खटखटें.

ठकडा [म० ठक] पु० लुचा माणूस; सोदा.

ठकणें [हिं०] अ० क्रि० १ फसणें; फसविलें जाणें. २ इच्छिलेली वस्तु न मिळाल्यामुळें खट्टू किं० निराश होणें. स० क्रि० कोणा मनुष्यावर अचानक हल्ला करणें, त्याला नागविणें, किं० ठार मारणें.

ठकवरा [हिं० ठग] वि० लुचा; लबाड; [कपटी.

ठकविणें [म० ठकणें] स० क्रि० १ फसविणें. २ लुबाडणें; नागविणें.

ठकारू [हिं० ठग] वि० १ लुच्चा, सोदा. २ ज्यांत फसगत होण्याचा संभव आहे किं० फसविलें जाण्याचा संभव आहे असा व्यवहार, इ०.

ठगाई [हिं० ठग+म० प्रत्यय] स्त्री० फसवेगिरी; लुच्चेगिरी.

ठट्टा [हिं०] स्त्री० दुसऱ्यास चीड किं० राग येईल असें वर्तन किं० भाषण; टवाळकी. ' ठट्टामस्क(-स्ख-)री, ''ठट्टेबाजी',हे शब्द ह्याच अर्थाचे आहेत. ह्या सर्व शब्दांत 'थट्टा' हा अधिक प्रचलित आहे.

ठणक क्रि० वि० अगदीं, पूर्णपणें, सर्वैथैव. ' कोरडा ठणक. ' ' सुकाठणक ' ह्याच शब्दांत ' ठणक ' शब्द अंतर्भूत होतो.

ठणकणें अ० क्रि० शिणका किं० तिडका होत असून दुखणें (गळूं, क्षत, डोकें, इ०).

ठणका [म० ठणकणें] पु० १ मधून मधून शिणका होत असून जें शारीरिक दुःख तें. २ थंडी, वारा, इ०चा झोंबरेपणा. ३ घुस्सा; रागाची लहर (येणें). ४ थंडी, वारा, इ० नीं झालेली व्यथा.

ठणकाविणें स० क्रि० १ भांडें, नाणें, इ०ची परीक्षा करण्यासाठीं त्यांच्यावर कांहीं पदार्थ आपटून त्यांचा ध्वनि उत्पन्न करणें. २ विंचू इ० नीं दंश करणें. ३ एकाद्याची खरडपट्टी किं० भोसडपट्टी काढणें किं० त्याला रागें भरणें. ४ घाईघाईनें (कांहीं काम) करून संपविणें. ५ जोरानें सोडणें, चालविणें, हाकणें (घोडा, गाडी बैल, इ०).

ठणठण, ठणठणां क्रि० वि० ठणठण असा अवाज होईल अशा रीतीनें (घंटा वाजविणें इ०). ॐ **ठणठणपाल, ठणठणपाळ मदन गोपाळ** पु० बुद्धिहीन, द्रव्यहीन, किं० कर्तृत्वहीन माणूस.

ठणठणणें अ० क्रि० ठणठण असा आवाज (भांडें इ० नीं) करणें.

ठणठणाट पु० १ ठणठण असा अनेकवार ध्वनि. २ पदार्थाचा बारदानांत पूर्ण अभाव. ॐ **विहिरींत पाण्याच्या ठणठणाट झाला आहे** किं० **विहिरींत पाण्याच्या नांवानें ठणठणाट झाला आहे** विहिरींत एक थेंबसुद्धां पाणी नाहीं.

ठणठणीत क्रि० वि० पूर्णपणें; अगदीं. ॐ **कोरडा ठणठणीत** वि० अगदीं कोरडा.

ठणाणणें अ० क्रि० ठणठण असा आवाज (भांडें इ०नीं) करणें.

ठपका [हिं०] पु० १ दोष; कलंक; कलिमा; (देणें, ठेवणें, आणणें, लागणें). २ पाण्याचा थेंब.

ठपकारणें, ठबकारणें [म० ठपका] १ कोणेकाच्या कांहीं चुकीच्या कृत्याबद्दल त्याला आठवण देणें किं० त्याला त्याबद्दल टोमणा मारणें. २ व्यापारांत पैसे लाटणें किं० पैसे मारणें. ३ कोणेकाला सक्त ताकीद देणें.

ठपकाविणें [म० ठपका]स० क्रि० कोणेकावर कांहीं आरोप ठेवणें; कोणेकाला दोष देणें.

ठमक ठाणवी, ठमक ठाणवई स्त्री० गुटगुटीत आणि तजेलेदार स्त्री.

ठमकणें [हिं० ठमकना] अ० क्रि० विलासयुक्त गतीनें चालणें; ठमकत ठमकत चालणें; नखरेबाजीनें चालणें.

ठमका [हिं०] पुं० १ झोंकदार चालणें; ऐटबाज चालण्याची तऱ्हा. २ टांचेवर गर्रदिशीं वळून रागानें किं० ऐटीनें निघून जाणें. ॐ **ठमकी चाल** स्त्री० घोड्याची एक प्रकारची चालण्याची तऱ्हा.

ठरणूक [म० ठरणें] स्त्री० १ जें कांहीं ठरलें तें; ठराव. २ स्थिरपणा.

ठरणें [हिं०] अ० क्रि० १ स्थिरपणानें एके ठिकाणीं राहाणें किं० असणें.२ निकालांत निघणें. ३ पक्कें होणें. ४ टिकून राहाणें. ५ गाय किं०घोडी ह्यांचें गर्भयुक्त होणें.

ठरवणी, ठरवणूक, ठरावणी [म० ठरविणें] स्त्री० ठरविण्याची किं० निश्चित किं० पक्कें करण्याची क्रिया.

ठरविणें [म० 'ठरणें'चें प्रयोजक] स०क्रि० १ निश्चित करणें; पक्कें करणें. २ कांहीं नियम किं० शिस्त घालणें किं० योजणें. ३ नेमणें. ४ नियमबद्ध करणें.

ठराव [म० ठरविणें] पु० १ जें ठरविलें किं० पक्कें केलें तें. २ योजलेला किं० घालून दिलेला नियम. ३ शिस्त; सरणी. ४ वादग्रस्त विषयाचा निर्णय. ५ विशिष्ट स्थानीं निवास किं० वास्तव्य. ॐ **ठरावपत्र न०** १ निकाल किं० निर्णय ज्यावर नमूद केला आहे तो कागद. २ कोणेकाला घालून दिलेले नियम किं० लावून दिलेली शिस्त हीं ज्यावर लिहिलीं आहेत तो कागद. **ठरावबंद पु०** मामलतदार इ०सरकारी कामगारांना कामावर रूजू व्हावयाच्या अगोदर त्यांना अमुक शिस्त अमुक बाबतींत पाळावी अशा संबंधाच्या सूचनांचा कागद देतात तो.

ठराविणें [म० ठराव] स० क्रि० १ पक्कें किं० निश्चित करणें. २ न हालेंसें करणें.

ठरोती, ठरवती [म० ठरविणें] स्त्री०ठराव, निर्णय, निकाल.

ठवला पु० जांत्याच्या खालच्या तळीच्या मध्यांत पक्की बसविलेली लोखंडाची किं० लाकडाची खीळ,–जिच्या भोंवतीं वरची तळी फिरते ती.

ठवस पु०, न० ठरलेला संकेत.

ठस वि० १ स्पष्ट, स्वच्छ दिसेसा किं०कळेसा; ठळठळीत. २ घट्ट किं० ठाशीव विणीचें (वस्त्र). ३ झणझणीत पण रुचकर (कांहीं मसालेदार खाद्य किं० पेय पदार्थ).

ठसक स्त्री० १ पायांतील जोडवीं इ० चा चालतांना होतो तो ध्वनि. २ बोलणें, चालणें, नाचणें, इ० कामीं जोरदारपणा किं० सफाई किं० नखरेबाजी. क्रि० वि० [illegible] [पें). ॐ **ठसकदार वि०** १ [illegible]ठी किं०पैशाचा आठवा [illegible] फा० जंग] वि० खूप [illegible]णारें (जोडवें). २ [illegible] (घर, बंगला, इ०).

ठसका, ठस[illegible] [illegible]ं किं० झा[illegible] पोटांत भलत्या [illegible] [illegible]ल्यानें बसतो तो हिसका [illegible] मोहरी, मिरची, इ० चा झोंबरेपणा अ[illegible] [illegible]ानें जी कासाविशी उत्पन्न होते ती (लागणें). ३ ठस असा आवाज उत्पन्न करणारा रट्टा किं० तडाखा (लागणें, बसणें). ४ बोलण्याची किं० चालण्याची ऐट; कोणत्याही हालचालीचा आवेश किं० जोरदारपणा. ५ भाषणांत दुसऱ्याला मारलेला टोमणा (मारणें, देणें). ॐ **ठसक्याचा वि०** जोरदार; आवेशयुक्त. २ नखरेबाजीचा.

ठसठशीत वि० १ घसमर म्ह० किरटा नव्हे असा (दागिना,भांडें,इ०). २ उठावदार (चेहेरा); धष्टपुष्ट (शरीर). ३ जोरदार, आवेशयुक्त (भाषण). ४ पूर्णपणें पोसलेलें (केळें इ० फळ). ५ रटारून सुजल्यामुळें मधून मधून शिणका मारणारें (गळूं). ६ मसाला इ० यथायोग्य प्रमाणांत पडल्यामुळें रुचकर झालेला (खाद्य किं० पेय पदार्थ).

ठसठस स्त्री० गळवाला लागलेला ठणका.

ठसठसणें अ० क्रि० वेदनाकर होणें (गळूं इ०).

ठसठोंबरा [म० ठस (आवाज)+ठोंबरा (रट्टा)] पु० १ भाषणांत कोणेकाला मारलेला टोमणा (देणें). २ पाहुण्याला अपमानकारक रीतीनें वागविणें; त्याचा यथायोग्य सत्कार किं० पाहुणचार न करणें. ॐ **एकाद्याला ठसठोंबरा वाटाण्याची अक्षत देणें** (किं० **लावणें**)त्याला स्पष्टपणें आणि भीडभाड न धरतां नकारात्मक उत्तर देणें किं० त्याची विनंति अमान्य करणें.

ठसणें अ० क्रि० १ खोल शिरून आंत निविष्ट होणें; आंत प्रवेश करून तेथें दृढपणें राहाणें; उ० माझ्या सूचना तुझ्या चित्तांत ठसल्या काय ? २ रुपाया, पैसा, इ० नाण्यावर आकृतिविशेष उमटणें.

ठसदार [**म०** ठस्] **वि०** ठस असा आवाज करणारें (चालतांना पायांतील जोडवें इ०).

ठसा [**हिं०**] **पु०** १ अक्षरादि चिन्ह कागद इ० वर उमटविण्याचें साधन; छाप. २ अशा प्रकारें उमटविलेली आकृति. ३ ओतकामासाठीं माती इ० ची रचना करितात ती. ४ हातोडी इ०चा पदार्थविशेषावर मारलेला रट्टा.५(लाक्षणिक) उपदेशाचा, किं० पाहिलेलें किं० ऐकिलेलें जें कांहीं त्याचा, मनावर होतो तो परिणाम.

ठळक वि० १ स्पष्टपणें दिसेसा. २ मनांत भरणारा. ३ ठसठशीत; किरटा किं० बारीक नव्हे असा(दागिना इ०). ४ प्रसिद्ध असा; कोन्याकोपऱ्यांतील नव्हे असा; सर्व लोकांस ठाऊक असलेला (कोणी माणूस).

ठाऊक वि० माहीत; ज्ञात.

ठाकठिकी स्त्री० १ नीटनेटकेपणा, योग्य योग्य स्थळीं त्या त्या पदार्थाचें असणें, ठेवणें, मांडणें, इ०; योग्य मांडणी किं० रचना.२दुरस्ती; डागडुजी.

ठाकठीक वि० व्यवस्थित; योग्य; यथास्थित.

ठाकठोक स्त्री० हातोडा इ० वारंवार ठोकणें किं० ह्या अशा ठोकण्याचा ध्वनि.

ठाकणें अ० क्रि० १ राहाणें. २ स्थिर होणें. स्तब्ध होणें. ३ आंत प्रवेशून तेथें स्थिर होणें. ꙮ **उभा ठाकणें, उभें ठाकणें** १ उभें राहाणें. २ पुढें न जातां जागच्या जागीं थांबून राहाणें.

ठाकसठिकस वि० यथायोग्य; नीटनेटका; व्यवस्थित.

ठाका पु० १ रट्टा; तडाखा. २ जोराचें द्वंद्वयुद्ध किं०चढाओढ. ३ओरडा आरडा;गलबला;कलकलाट;मोठा ध्वनि;गर्जना. ४ कोणतीही सातत्तिक क्रिया किं०ही क्रिया करण्याचा परिपाठ (वाचणें, घोकणें, तालीम करणें, इ० क्रिया); **क्रि०** लावणें.

ठाकाठोका पु० जोशानें सांगितलेलें भविष्य (येणें, उतरणें, पटणें, प्रत्ययास येणें).

ठाकी स्त्री० १ कांहीं विशिष्ट गोष्ट करण्याची तऱ्हा किं०पद्धति. २परिपाठ. ३पखवाज.वाजविण्याचा एक प्रकार. ४ वशांतून खाकरल्यासारखा आवाज काढून कोणेकाला दिलेली इशारत किं० सूचना (देणें, वाजविणें). ꙮ **एकाद्याची ठाकी आणणें** त्याचें अनुकरण करणें (बोलणें, चालणें, वागणें, इ० बाबतींत).

ठाकुरकी, ठाकुरी इ० खालीं ' ठाकूर ' मध्यें पहा.

ठाकून ठोकून, ठुकून ठिकून [**म०** ठोकणें] **क्रि० वि०** युक्ति प्रयुक्तीनें; अनेक युक्त्या किं० हिकमती करून; उ०मी अल्प प्राप्तिवर आज पांच वर्षें ठाकून ठोकून संसार चालविला (किं० संभाळला किं० राखला) आतां माझ्या मुलाला नोकरी लागल्यामुळें माझी अडचण सरली.

ठाकूर [**सं०** ठक्कुर=१ मूर्ति. २ संमानाची एक पदवी] **पु०** १ हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा इसम,–हे लोक जंगलांत राहातात.२रजपूत, भिल्ल,इ० तील पुढारी किं० कोणीही संमान्य पुरुष. ३ ईश्वर किं० ईश्वराची मूर्ति. ४ शूद्रांच्या कांहीं जातींचा उपाध्या. ꙮ **ठाकुरजी पु०** वैरागी लोक देवाला ठाकूर म्हणतात तो वैराग्यांचा देव. **ठाकुरद्वार न०, ठाकुरदारा पु०** देऊळ (वैरागी लोकांचा शब्द). **ठाकुरदास मांडून बसणें** पवित्रपणाचें किं०सोंवळेपणाचें स्तोम किं० अवडंबर माजविणें. **ठाकुरकी, ठाकुरी स्त्री०**आबरू,लौकिक, प्रतिष्ठा; उ० तो आपली ठाकुरकी संभाळून (किं० राखून) आहे.

ठांगळ वि० लाथा मारमारी (गाय, म्हैस, इ०).

ठांगाळणें स० क्रि० नापसंत म्हणून दूर सारणें.

ठांठुरणें अ० क्रि० थंडीच्या योगानें हातपाय आकुंचित होणें.

ठांठू, ठाठू न० १ बंदुका, वाद्यें, इ० चे (एकसारखे निघत असलेले ध्वनि).२मंत्रतंत्रादिकांचें माजविलेलें अवडंबर.

ठाडा वि० उभा (कवितेंत). ꙮ **ठाडेसरी वि०** कफल्लक; खंक; अकिंचन.

ठाण [**सं०** स्थान]**न०** १ घोडे इ०ची पागा. २ बाण मारण्याच्या वेळचें शरीराचें संस्थान. ३

इमारतीची जागा. ४ घरांतील विशिष्ट उपयोगाच्या विशिष्ट खोल्यांची मांडणी. ५ स्थान, जागा. ६ बैठक, आसन. ७ एकाच ताण्याबाण्याचें एकाच रंगाचें आणि एकाच खेपेस मागावर विणलेलें सलग वस्त्र. ह्या अर्थी ' थान ' असाही शब्द रूढ आहे. ☸ **ठाणबंद, ठाणेबंद वि०** फिरावयास किं० कामासाठीं बाहेर न काढलेला आणि ठाण्यावरच बांधून ठेविलेला (घोडा, बैल, इ०). **ठाणमाण न०** १ शरीराचा बांधा. २ विशिष्ट कामासाठीं घेतलेलें किं० मांडलेलें शरीराचें संस्थान.

ठाणक [**म०** ठाण; **सं०** स्थान] **न०** १ खंडोबा इ० देवांचीं स्थानें किं० देवळें प्रत्येक. २ देवस्थान (सामान्यतः).

ठाणगा पु० १ गडकऱ्याच्या हाताखालचा एक अमलदार. २ एकाद्या ठाण्यांतील वसूल करणारा अमलदार.

ठाणवई, ठाणवी स्त्री० १ हात दीड हात उंचीचा खांब,– त्याला खालीं बैठक असून वर दिवा ठेवण्यासाठीं फळी असते. हा खांब सोयीप्रमाणें इकडे तिकडे ठेवितां येतो. २ (लाक्षणिक) ठेंगणी आणि लठ्ठ मुलगी किं० स्त्री.

ठाणें [**सं०** स्थान] **न०** १ तालुक्याचें मुख्य ठिकाण किं० गांव. २ सरकारी राज्यव्यवस्थेचीं ठिकाणें प्रत्येक, किं० तेथील कामगार समुच्चयानें. ३ घोड्याचा तबेला. ४ एकाद्या विशिष्ट घरीं आलेल्या पाहुण्यानें तेथें फार दिवस केलेला मुक्काम; उ० आमच्या घरीं तो पंधरा दिवस ठाणें देऊन बसला आहे, जातां जात नाहीं. **एकाद्या ठिकाणीं ठाणें घालणें** तेथें वास्तव्य करणें किं० राहाणें. **ठाणेदार पु०** एकाद्या विशिष्ट ठाण्यावरील मुख्य कामगार.

ठाणेसरी वि० अगदीं आकिंचन. वर 'ठाडा' मध्यें 'ठाडेसरी' पहा.

ठाम [**हिं०**] **वि०** १ कायम; स्थिर; दृढनिविष्ट; पक्का बसलेला किं० जडलेला किं० खिळलेला. २ कमीजास्ती न व्हावयाचें (माप, वजन, किंमत, मोजदात, इ०); उ० तेथील मापानें तूप आणलें तें येथील मापानें ठाम भरलें. ३ पक्कें बनलेलें (मत, सिद्धांत, ठराव, इ०).

ठामणें, ठावकें न० तेल, तूप, इ० चें बारदान. ☸ **घी (किं० तूप) गेलें पण ठामणें तर गेलें नाहीं** नश्वर किं० अल्पमूल्य किंमतीच्या वस्तूचा नाश झाला पण शाश्वत किं० बहुमूल्य वस्तूची हानि झाली नाहीं (हें भाग्य होय). **घी (किं० तूप) गेलें आणि ठामणेंही गेलें** सर्वथैव किं० सर्व प्रकारें हानि झाली.

ठाय [**सं०** स्थान] **पु०** १ स्थान. २ ठिकाण. ३ भोजनाच्या किं० फराळाच्या वेळीं बसावयास मांडलेले पाट किं० सतरंजी किं० चटई. ४ भोजनाचे किं० फराळाचे पदार्थ ज्यांत वाढावयाचे तें ताट, पत्रावळ, केळीचें पान, इ०. ५ ध्रुवपद सावकाश म्हणण्याचा किं० पखवाज सावकाश वाजविण्याचा एक प्रकार. ६ व्यालेल्या गायीपासून किं० म्हशीपासून मिळणारे दोन पदार्थ व्यक्तिशः,– पेंजें (वासरूं), जावपें (दूध). मागें 'जावपें' पहा. पुढें 'पेंजें' पहा. ७ गुरेंढोरें, भांडींकुंडीं, इ० एकजातीय पदार्थ मोजतांना ' ठाय ' चा अर्थ व्यक्ति किं० नग असा होतो आणि तो शब्द संख्या विशेषणापुढें योजतात; उ० गायी दोन ठाय (किं० तीन ठाय, किं० चार ठाय, इ०). ☸ **ठायीं घालणें** १ विशिष्ट स्थानीं ठेवणें, घालणें, किं० स्थापणें. २ मनावर घेणें; हिशेबांत घेणें. **ठायीं ठायीं क्रि०वि०** जागोजाग; मधून मधून. **ठायीं पडणें** १ उघडकीस येणें; आढळणें. २ मानवणें; गुणकारी होणें; फलद्रूप होणें. **ठायचूक वि०** १ भलत्याच ठिकाणीं ठेविलेला. २ हरवलेला; न सांपडणारा. ३ अमुक पदार्थ कोठें ठेविला हें ज्याला आठवत नाहीं असा. ४ आपण भलत्याच ठिकाणीं किं० परिस्थितींत आहों अशा भावनेनें अस्वस्थ जो तो. **ठायठिकाण न०, ठावठिकाणा पु०** कोणा माणसासंबंधाची किं० पदार्थासंबंधाची तपशीलवार माहिती,– त्याचें राहाण्याचें किं० असण्याचें ठिकाण, इ०. **ठायदुगण (–न), ठायदुगूण (–न) स्त्री०** ध्रुवपद सावकाश म्हणण्याचा किं० मृदंगादि वाद्य सावकाश वाजविण्याचा जो काळ तितक्याच काळांत तें ध्रुवपद दोनदां म्हणणें किं० तें वाद्य दोनदां वाजविणें हा जो प्रकार तो. **ठायपालट पु०** वास्तव्याचें ठिकाण पालटणें किं० बदलणें; थारापालट; उ० आजारी माणसाला ठायपालट झाल्यानें कधीं कधीं बरें वाटू

लागतें. ठायबसल्यां क्रि०वि० घरदार किं० गांव इ० न सोडतां (करावयाचा धंदा, रोजगार, काम, इ०).

ठार क्रि०वि० अगदीं; पूर्णपणें; सर्वथैव; शंका न राहील अशा प्रकारें; मरणें, बुडणें, नाश पावणें, मारणें, बुडविणें, विध्वंसिणें, खाणें, निजणें, इ० क्रियांचें पूर्णत्व दाखविण्यांस 'ठार' चा उपयोग केला जातो; उ० तो चिंचेच्या व्यापारांत ठार बुडाला; उ० चोरांनीं त्या मुषाफराला ठार मारलें; उ० त्यानें पंचवीस लाडू ठार केले; उ० तें घर जळून ठार झालें; उ० पावसानें शेतें ठार बुडविलीं.

ठाव [म० ठाय] पु० १ (विहीर, भांडें, बारदान, गुहा, इ० चा) तळ किं० शेवट किं० अगदीं पलीकडची हद्द. २ परमावधि. ३ अंतः-करण (गूढ विचारांचें स्थान ह्या दृष्टीनें). ४ पत्ता; तपास; शोध. ५ मोकळी जागा; कार्यविशेषाला पुरेसा प्रदेश. ❀ **एकाद्याला दे माय धरणि ठाव असें होणें** तो जीविताला कंटाळलेला असणें; तो अत्यन्त दुःखी झालेला असून त्याला जीव नकोसा होणें; लज्जेनें अत्यन्त आक्रांत झालेलें असणें. शब्दशः अर्थ ' हे पृथ्वी आई, मला तूं आपल्या पोटांत राहावयाला किं० लपावयाला जागा दे. ' **विहिरीचा ठाव (किं० तळ) आणणें** पोहोणारानें विहिरीच्या तळापर्यंत जाऊन तेथून मूठभर माती आणणें (आपण तळापर्यंत गेलों ह्याचा पुरावा म्हणून). **खडा टाकून ठाव पाहाणें** १ पाण्याची खोली खडा टाकून आज-मावणें. २ कांहीं खुबीदार प्रश्न विचारून एकाद्याचा आशय काढून घेणें. **ठाव लागणें** पत्ता किं० तपास लागणें; उघडकीस येणें; कळून येणें. **एका-द्याच्या मनानें ठाव सोडणें** त्याचा धीर सुटणें; तो खचणें.

ठावका, ठावा, ठाउका वि० माहीत ; माहीत असलेला.

ठावका पु०, **ठावकें, ठावळें** न० १ पान, पत्रावळ. २ तेल, तूप, इ० चें बारदान.

ठावर पु० बरें होत आलेलें पण पुन्हां वाढूं लागलेलें गळूं.

ठास वि० १ घट्ट चेपल्यामुळें किं० धुमसल्या-मुळें खूप टणक (जमीन); ठासून पदार्थ आंत भरल्यामुळें टणक (पोतें, भांडें, इ०). २ अत्यंत उंच किं० कर्कश (स्वर, आवाज, किं० तशा स्वराचा मृदंग, कंठ, इ०). ३ स्पष्ट, सडेतोड (भाषण). ४ पूर्ण विचारानें ठरलेला किं० निश्चित झालेला (बेत, योजना, इ०). ५ विश्वस-नीय (खबर).

ठासणी [म० ठासणें] स्त्री० १ खूप चेपून चेपून भरण्याची क्रिया. २ बेरजेनें वट्ट आंकडा काढणें.

ठासणें स० क्रि० १ चेपून चेपून भरणें (कांहीं पदार्थ कांहीं बारदानांत). २ मिळविणें; बेरीज करून वट्ट आंकडा काढणें. ❀ **दारू ठासणें** खूप दारू पिणें. **टीप–** ' दारू ' हा शब्द गाळला तरी चालतो.

ठासा [म० ठासणें] पु० मागावर आडवीं सुतें फणीनें ठासण्याची क्रिया; एक धोट्याची फेरी मागावर झाल्यावर नवें भरलेलें सूत चेपून बसविण्यासाठीं कोष्टी आपणाकडे फणी ओढून घेतो ती क्रिया (देणें, बसणें, करणें, येणें, होणें).

ठिकडा [म० ठीक] वि० सुंदर, मोहक, मनोहर (मूल, माणूस, जनावर, पदार्थ, इ०).

ठिकडें [म० ठीक] न० १ बोटांतील आंगठी-वर कोंदणांत बसविलेला हिरा इ० चा खडा. २ सुंदर, मोहक, चित्ताकर्षक मूल, माणूस, पदार्थ, इ०.

ठिकणाती [म० ठिकाण] पु० ज्यांना बलुतें किं० बलुतेदार म्हणतात ते गांवकामगार प्रत्येक.

ठिकणें अ० क्रि० १ उडणें, उडी मारणें (घोडा, हरिण, इ० नीं). २ झोकदार गतीनें चालणें (नख-रेबाज स्त्रीनें).

ठिकर पुढें ' ठिक्कर ' पहा.

ठिकरी स्त्री० १ दगडाची चीप किं० खापरी ह्यांवर लोणी, जिरें, इ० पदार्थ घालून कढी इ० मध्यें बुडवितात किं० त्यावर कढी इ० ओततात ती. २ वरील कृतीनें कढी इ० स लागतो तो वास. ३ फुटकें तुटकें जें भांडें किं० मडकें तें. ४ पत्रा-वळ करावयासाठीं आणलेलें लहान पान (तुच्छ-तेनें). ❀ **एकाद्याची ठिकरी तापणें** तो भुकेनें व्याकुळ झालेला असणें; त्याला फार भूक लाग-लेली असणें. **एकाद्या पदार्थाच्या ठिकऱ्या होणें**

(किं० **ठिकऱ्या ठिकऱ्या होणें**) तो फुटून त्याचे तुकडे तुकडे होणें. **हात, पाय, ओठ,** इ० **च्या ठिकऱ्या होणें** थंडीमुळें त्यांना भेगा पडणें.

ठिकला [म० ठीक] **क्रि० वि०** अगदीं बरोबर; अगदीं नेमाप्रमाणें; कमी जास्ती किं० खालीं वर किं० मागें पुढें न होतां; उ० गोळी ठिकली आंब्याला लागली; उ० एथून जो धोंडा मारला तो ठिकला कोनाड्यांत घुसला. **टीप**– ‘ ठिकला ’ हें **क्रि० वि०** लिंगवचनांप्रमाणें फिरणारें आहे.

ठिकला [म० ठीक=ठिपका] **वि०** ठिपकेदार (कवडी, शंख, इ०).

ठिकस ठाकस [म० ठीक] **वि०** नीटनेटका; व्यवस्थित; ज्याच्या अंगावर काळजीपूर्वक कपडे पेहेरलेले आहेत असा (माणूस); ज्यांतील सामान सुमान व्यवस्थितपणें मांडलेलें किं० ठेविलेलें आहे असें (घर इ०). मागें ‘ठाकस ठिकस’ पहा.

ठिकाठोक [म० ठीक] **वि०** १ अगदीं बरोबर किं० यथास्थित. २ चतुर; हुशार; तल्लख.

ठिकाण न०, ठिकाणा पु० [म० ठाण; **सं०** स्थान] १ एकाद्या वस्तूचें किं० माणसाचें स्थान किं०जागा;आधार (आधेयाच्या संबंधांत).२पत्ता, शोध (लागणें, लावणें); उ० ईश्वराच्या गुणांचें ठिकाण लागत नाहीं. ३ पदार्थविशेषाच्या गुणरूपादिकांचें पूर्ण ज्ञान. ४ भाषणवर्तनादि संबंधाची एकरूपता किं० सरणीची एकवाक्यता. अमुक वेळीं अमुक गोष्ट अमुक तऱ्हेनें व्हावी किं० केली जावी असा जो नियम किं०संकेत किं०ठराव त्याला अनुसरून ती गोष्ट होण्याचें किं० केली जाण्याचें कांहीं चिन्ह किं० लक्षण किं० उपक्रम; उ० तुह्मी साडे दहा वाजतां कसे बाहेर पडणार ? अझून स्वयंपाकाला ठिकाण नाहीं. **टीप**— ह्या अर्थी अकरणरूपीं प्रयोग होतो. ५ तंतोतंत किं० अगदीं बरोबर मोजदाद, (विस्ताराची); उ० मराठी भाषेंत किती शब्द आहेत याचा आम्हांला ठिकाणा लागत नाहीं. ६ एकाद्या बातमीचा आधार किं० उगम. ७ उत्पत्तिस्थान; उ०खरबूज हें रोगाचें ठिकाण; उ०सद्गुरु ज्ञानाचें ठिकाण होय. ॐ **ठिकाणदार वि०** एकाद्या विशिष्ट ठिकाणचा कायमचा राहणारा. याच्या उलट ‘ उपरी. ’

ठिकी स्त्री० १ गवत, इमारती लांकडें, इ० ची रास. २ धान्यानें भरलेलें कणगीसारखें गोणतटाचें बारदान. ३ झाडाच्या खोडाची करवतीनें कापलेली मोठी गंडरी.

ठिकें न० १ शरीर, फळ, इ० वर दिडिस्स दिसणारे डाग प्रत्येक. २ शेतजमीनीचा एक खंड किं० तुकडा.

ठिकोलें, ठिगोलें न० १ लहान पत्रावळ. २ जमीनीचा लहानसा तुकडा. ३ शेतजमीनींतील मर्यादांनी विशिष्ट लहानसा प्रदेश.

ठिकर वि० काळा; ‘काळा’ ह्याचा अर्थ जोरकरण्यासाठीं ‘ठिकर’ शब्द पुढें जोडतात; उ० त्याणें त्या खरेदींत पैसे खाल्ले असें मी सांगतांच त्याचा चेहेरा काळा ठिकर पडला.

ठिंगणा, ठिंगू, ठिंग्या वि०अंगानें जाडी असून उंचीनें लहान असा (माणूस, पशु, इ०).

ठिगळ न०, ठिगळी स्त्री०कागद, कातडें, चिरगूट इ०फाटून त्यांना भोंक पडलेलें असतें तें बुजविण्यासाठीं त्या भोकांवर चिकटावतात किं०शिवतात तो त्याच किं०अन्य द्रव्याचा तुकडा. ॐ **आकाश फाटलें त्याला ठिगळ कोण देणार ?** १ मोठ्याची मोठी हानि झाली असेल तिची भरपाई लहान मनुष्य करूं शकत नाहीं किं० लहान साधनानें किं० उपायानें होऊं शकत नाहीं. २ दैव उलटलें आणि माणसें मरून किं० घर इ०जळून हानि झाली तिची भरपाई होऊं शकत नाहीं.

ठिगळणें [म० ठिगळ] **स० क्रि०** १ फाटलेल्या वस्त्रादिकांचें भोंक त्याच किं० अन्य जातीच्या वस्त्रादिकांचे तुकडे तेथें शिवून किं० चिकटावून बुझविणें. २ बंदुकीची गोळी किं० बाण ह्यांनीं शरीर इ० कांचा वेध करून त्यांना भोंक पाडणें. ३ किडे, कसर, इ० कांनीं वस्त्रादि खाऊन त्यांना जागोंजाग भोंकें पाडणें. **अ० क्रि०** नासूं लागलेल्या फळाच्या किं० पानाच्या त्वचेवर भिन्न रंगाचे ठिपके, चट्टे, किं० डाग उत्पन्न होणें.

ठिंगळी स्त्री० अग्नीची ठिणगी. [पत्रावळ.

ठिंगळें, ठिंगाळें, ठिंकोळें न० अगदीं लहान

ठिणकणें अ० क्रि० लहान लहान हुंदके काढीत काढीत फार वेळ रडत राहणें (मुलानें).२ गळूं, जखम, डोकें, इ०नीं शिणका मारून दुखणें.

ठिणगी स्त्री० अग्नीचा कण. ॐ **एकाद्यानें ठिणग्या गाळणें** त्यानें अत्यन्त रागावलेलें असणें; तो बेफाम रागावलेला असणें.

ठिपकणें, ठिबकणें अ० क्रि० १ थेंबांथेंबांनीं गळत असणें (पाणी, रक्त, इ०). २ पाणी इ०थेंबांथेंबांनीं बाहेर पडत राहील अशा स्थितींत (भाडें इ०) असणें;उ०हें भांडें ठिबकतें किं० ह्या भांड्यांतील पाणी ठिबकतें.

ठिबका, ठिपका पु० १ पाणी, रक्त, तूप, तेल, इ० चा जमीन इ० वर पडलेला थेंब. २ गंध इ० चें कपाळ इ० वर केलेलें अगदीं बारीक चिन्ह. ३ फलादिकांचा डागळलेला लहानसा भाग.

ठिया पु० १ खांब कमी उंचीचा असल्यास त्याची उंची वाढविण्यासाठीं त्याच्याखालीं दगड, लाकूड, इ० चा ठोकळा बसवितात तो. २ गृहादि रचना करावयासाठीं ठरविलेली जागा. ३ घराचे मजले भिन्न दाखविण्यासाठीं भिंतींच्या रचाईंत विटांचा वेगळ्या मांडणीचा जो थर घालतात तो. ४ डोंगराच्या चढणीवर जे लहानसे सपाट प्रदेश मधून मधून असतात ते प्रत्येक.

ठिल,ठिल्लू, ठिल्लया वि० ठेंगणा; अंगानें लठ्ठ असून उंचीनें कमी असा.

ठिल्या पु० १ लहान मडकें. २ दह्याचें गाडगें.

ठिसरी स्त्री० १ कोणेकाची त्याच्या पाठीमागें (म्ह०परोक्ष)किं०समक्ष केलेली निंदा.अनेक वचनीं प्रयोग.२ओठ,हात,पाय, इ०ना थंडीनें किं० जाळवातानें पडलेल्या भेगा प्रत्येक.३ठिसूळ किं०भेगाळलेली भाकरी .ॐ **एकाद्याच्या ठिकऱ्या करणें** (किं०**उडविणें**)त्याच्या परोक्ष किं० अपरोक्ष त्याची फजीति करणें किं० त्याचा बोऱ्या उडविणें.

ठिसूळ, ढिसूळ वि० अशक्त म्हणून भारानें किं० आघातानें कट्कन् फुटणारा, मोडणारा किं० फाटणारा(पदार्थ,–भाकरी,कांचपात्र, मडकें, इ०).

ठी स्त्री० १ एकादी वस्तु बनविण्याची किं० सिद्ध करण्याची जी रीति ती, किं० त्या रीतीचा क्रम; उ० ह्या रसायणाची ठी मला माहीत नाहीं.२ म्हणणें, वाचणें, घोकणें, इ० ची क्रिया जेथपर्यंत चालून कांहीं कारणानें तींत व्यत्यय आलेला असेल तें ठिकाण. ३ कांहीं कामासाठीं ठरविलेला समय किं० स्थळ. ४ कांहीं काम करण्याची सरणी किं० पद्धति. ॐ **ठीस ठी पडणें** मेळ जमणें.

ठीक न० १ अंगठी इ० कांत बसवितात तो हिरा, पाच,माणिक, इ०.२ डाग, ठिपका.

ठीक वि० बरोबर, योग्य; असावें तसें. ॐ **ठीकठाक वि०** यथायोग्य; योग्य प्रकारें केलेलें किं० झालेलें. **ठीकताळ पु०** मेळ; जुळणी.

ठुकरणें स० क्रि० काठीनें पदार्थविशेषावर हलके हातानें आघात करून तो चिरडणें किं० ठेचणें.

ठुंठण न० तुटलेल्या किं० तोडलेल्या हाताचा किं० पायाचा किं० बोटाचा किं० झाडाचा अवशेष जो शरीराला किं० झाडाला चिकटून राहिलेला असतो तो. त्याला ' थोटुक ' असाही अन्य शब्द आहे. हाताचें थोटुक, पायाचें थोटुक, झाडाचें थोटुक,असेंहि म्हणतात.

ठुठा स्त्री० उडविल्या जात असलेल्या अनेक बंदुकांचा किं० भांडत असलेल्या माणसांचा मिश्र ध्वनि. [(येणें).

ठुणका पु० रागाचा झणकारा किं० फणकारा

ठुणगा, ठुणका वि० लठ्ठ आणि ठेंगणा.

ठुंबरी, ठुमरी स्त्री० शृंगारिक गाण्याचा एक प्रकार. [पहा.

ठुमकणें, ठुमका मागें ' ठमकणें, ' 'ठमका'

ठुला, ठुल्ला वि० १ लठ्ठ आणि ठेंगणा . २ वयाच्या मानानें असावा तितका उंच आणि लठ्ठ नाहीं असा; खुजट.

ठुली, थुली स्त्री० जाडें भरडें दळलेलें गव्हाचें पीठ किं० त्या पिठाचें केलेलें खाद्य.

ठुशी स्त्री० १ स्त्रियांचें एक कंठभूषण किं० जे तुकडे पटवून तें भूषण करतात ते प्रत्येक.ह्यांच अर्थी ' ठुशा ' असा **अ० व०** शब्दही रूढ आहे. २ चोळीच्या बगलेंत जो तिकोनी तुकडा शिवलेला असतो तो. ३ गव्हाचें झोडपून काढलेलें कणीस,–ज्यांत थोडसे दाणे राहिलेले आहेत असें. ४ मुठीनें मारलेला ठोसा; गुद्दा. ५ खडक फोडावयासाठीं उडविलेला लहानसा सुरुंग.

ठुसकर वि० अल्प श्रमानें फुटणारा, तुटणारा

मोडणारा किं० फाटणारा(कांहीं पदार्थ); ठिसूळ; ठिसूळ.

ठुसका वि० लठ्ठ आणि ठेंगणा.

ठुसका, ठुसकारा पु० मागें ' ठसका,' 'ठसकारा ' पहा.

ठुसठुसणें अ० क्रि० ठणकत असणें(गळूं इ०).

ठुसा पु० उसाचा किं० जोंधळ्याच्या ताटाचा सोललेला तुकडा; गंडेरी.

ठुं न० दुसऱ्याला दिलेला दोष (ठेवणें).

ठेऊ [म० ठेवणें] वि० पदार्थ राखून ठेवण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा; मितव्ययी.

ठेका पु० ख्याल, ठुंबरी, इ० म्हणते वेळीं पखवाजाच्या वाजवितात त्या गती. २जोरानें किं० आवेशानें चालविलेलें कांहीं काम(वेदपठण,अभ्यास, खेळणें इ०).अभ्यासाचा,पठनाचा,खेळण्याचा इ०चा ठेका लावणें असा प्रयोग होतो.३पाऊस जोरानें आणि न थांबतां पडत राहणें; उ० पावसाचा सकाळपासून ठेका लागला आहे. ❀ **आपला ठेका चालविणें** १ आपल्या लहरीप्रमाणें दुसऱ्याला वागावयाला भाग पाडणें. २ आपलें मत दुसऱ्यावर लादणें. **ठेका लावून देणें** आपली वडेजावी मिरविणें.

ठेकेठोक वि० मागें ' ठेंगेठोक ' पहा,

ठेंगडा पु० नर गाढव. **ठेंगडी स्त्री०** गाढवी.

ठेंगणा वि० योग्य किं० इष्ट उंची ज्याची नाहीं असा. ❀ **ठेंगणा ठसका, ठेंगणा रेंगणा वि०**१ठेंगणा पण विशोभित दिसण्याइतका ठेंगणा नव्हे असा. २ मध्यम उंचीचा असून मोहक.

ठेंगमत, ठेंगेमत न० १ ज्याला शास्त्राधार नाहीं असें मत; पाखंड मत; उ० आज एकादशी आहे असें तुम्ही पंचांगारून सांगतां कां ठेंगमतानें सांगतां ? २ हट्ट; हेका. ३ टोपणनांव; एऱ्हवींच्या व्यवहारांत मनुष्य ज्या नांवानें ओळखला जातो तें; ह्याच्या उलट कागदोपत्री चालतें तें नांव. ❀ **ठेंगमताचें नांव न०** वर अर्थ ३ पहा.

ठेंगळणें, ठेंगाळणें अ० क्रि० चालतांना दगड इ० स पाय लागणें; ठेचळणें; ठेच खाणें.

ठेंगा पु० १ सोटा; वडगा. २ खांबाची उंची वाढविण्यासाठीं खालीं घातलेला दगडाचा किं० लाकडाचा ठोकळा. ३ तोरा, उर्मटपणा (मिरविणें, माजविणें). ४ बंड. ५ पाखंड मत(धार्मिक बाबतींत).

ठेंगा, ठेंग्या वि० १ ठेंगणा; खुजट. २ रानवट वर्तनाचा मनुष्य; आडदांड. ❀ **ठेंगाठेंगी स्त्री०** खोट्या सबबी सांगून लांबणीवर ढकलणें.

ठेंगारणें, ठेंगाळणें स० क्रि० १ फसविणें. २ कोणेकाला तुच्छतेनें वागाविणें.

ठेंगू वि० १ ठेंगणा आणि गोंडस.❀**ठेंगुमामा पु०** ठेंगणा माणूस (थट्टेंत).

ठेंगेठोक वि० हुशार, तल्लख, चलाख.

ठेंगेमत न० मागें ' ठेंगमत ' पहा.

ठेंगोजी पु० ठेंगणा माणूस (उपहासांत).

ठेंग्या [म० ठेंगा] वि० १ बंडखोर. २ शास्त्राविरुद्ध मत प्रतिपादणारा. ३ ठेंगा.

ठेच स्त्री० १ चालतांना पायाच्या बोटांना दगड इ० लागून जो प्रतिबंध होतो तो; ठोकर (लागणें). २ हानि, नुकसान (व्यापारादिकांत). ३ वाचन, अध्ययन,इ० मध्यें दुर्बोध स्थळ आल्याकारणानें होते ती थांबणूक. ❀ **एकाद्या व्यवहारांत ठेच लागणें** त्यांत हानि होणें; त्यांत अडल घडणें.

ठेचणें स० क्रि० १ वर दाब घालून चिरडणें. २ थोडथोडें कुटणें. ३ वर दाब घालून पदार्थ बारदानांत भरणें.

ठेचळणें अ० क्रि० ठेच खाणें (चालतांना पायाला दगड इ० लागून). **स० क्रि०** पदार्थ विशेषावर रट्टे मारून तो अर्धवट फोडणें.

ठेचा [म० ठेचणें] पु० कोथिंबीर, मिरच्या, इ० पदार्थ अर्धवट ठेचून करतात तें तोंडीलावणें.

ठेटमत न० वर ' ठेंगमत ' पहा.

ठेटा, थेटा वि० तोकडा; असावा तितका लांब किं० रुंद किं० उंच नाहीं असा.

ठेठे स्त्री० १ कोरड्या खोकल्याचा आवाज. २ बोभाटा (चोरी, दिवाळें, इ० चा).

ठेणा पु०, ठेणी स्त्री०, ठेणें न० अग्नीची ठिणगी.

ठेणें [सं० स्था] अ० क्रि० उभें राहाणें. ह्या शब्दाचें भूतकाळचें किं० भूतकाळच्या विशेषणाचें रूपच कवितेंत येतें; ठेला म्ह० उभा राहिला किं० राहिलेला, थांबला किं० थांबलेला.

ठेप स्त्री० १ प्रतिबंध आल्यामुळें गति बंद पडणें; थांबणूक (खाणें, बसणें). २ मर्यादा; परमावधि; उ० भरतीच्या पाण्याची ठेप इतकीच. ३ मजल; उ० माझें घराचें काम ह्या ठेपेस येऊन पोंचलें आहे. ४ संकेतसमय. ५ ठरविलेला कालावधि; मुदत. ६ पंचाइतीचे प्रकरणीं वादी आणि प्रतिवादी यांच्याकडून लिहून घेतात ती अट.

ठेपणें अ० क्रि० १ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाच्या शेजारीं असणें किं० येणें; भिडणें. २ कांहीं आधारविशेषावर टेकणें. ३ कांहीं कामाची फलप्राप्ति किं० प्रवासाचें अंतिम स्थान जवळ येणें. ४ कांहीं कार्य अमुक समयीं करावयाचें असें ठरलेलें असणें.

ठेपराई स्त्री० व्यवस्थितपणा; शिस्तवार मांडणी.

ठेपलणें अ० क्रि० गति कुंठित झाल्याकारणानें थांबणें. स० क्रि० कोणेकास आशा दाखवून अंतीं निराश करणें.

ठेपाविणें [म० ' ठेपणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ थांबविणें; गतीला प्रतिबंध करून आडवून धरणें. २ पदार्थविशेष दुसऱ्या पदार्थाला टेकून ठेवणें. ३ कांहीं कार्याचा समय मुकरर करून ठेवणें.

ठेपसा पु० १ मातीचें ढिखूळ. २ मातीची रास. ३ गोंरीचें जळून रक्षारूप झालेलें खांड. ४ दगडाचा किं० लाकडाचा ठोकळा खांबाच्या खालीं घातलेला असतो तो. ५ असाच खांबाच्या माथ्यावरचा लाकडाचा तुकडा.

ठेंबा पु० १ लाकडाची गंडेरी; गोलटा. २ आधारार्थ दिलेला खांब. ३ आधार, आश्रय.

ठेंबूस, ढेंबूस न० झाडावरील, अंगावरील, किं० जमीनीवरील टेंगूळ किं० उंचवटा.

ठेंबें न० संकेतसमय किं० संकेतस्थल.

ठेल पु०, स्त्री० १ पदार्थादिकांची विपुलता किं० समृद्धि. २ दाटी, गर्दी. ३ कोंझटपणा. ४ दुगाण्याच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द; ठेल मुंगा; ढुंगणानें दुसऱ्याच्या ढुंगणावर मारलेला रट्टा. वि० विपूल; खूप; उ० पाऊस ठेल पडला.

ठेलणें स० क्रि० रेटणें; दूर सारणें.

ठेला पु० गोणता; पोतें.

ठेली स्त्री० रुपये इ० ठेवावयाच्या थैली.

ठेव [म० ठेवणें] स्त्री० १ गुप्तपणें घरांत किं० जमीनींत पुरून ठेविलेलें द्रव्य किं० सोन्याचांदीचे पदार्थ. २ दुसऱ्याच्या जवळ रक्षणार्थ किं० कर्जास तारण म्हणून ठेविलेली वस्तु. ३ बोलण्या चालण्याची किं० हसण्याची कोणेकाची तऱ्हा.

ठेवण [म० ठेवणें] न० मुक्कामाची जागा; प्रवासांत केलेला मुक्काम; पेणें. स्त्री० १ विहिरीच्या भिंती ज्या खडकावर रचिलेल्या असतात तो. २ बांधून काढिलेल्या विहिरीच्या रचाईंतील वेगळे वेगळे जे थर ते प्रत्येक. ३ कांहीं कार्य ज्या गोष्टीवर अवलंबून असतो ती.

ठेवण, ठेवणी [म० ठेवणें] स्त्री० १ शरीराच्या गात्रांची किं० नाक, डोळे, कपाळ, तोंड, हनुवटी इ० जे मुखाचे भाग त्यांची ढब किं० छब. २ घरांतील माजघर, ओटी, इ० ची मांडणी.

ठेवणें [सं० स्था, स्थापय्] स० क्रि० १ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थावर स्थापित किं० संनिविष्ट करणें; उ० चौरंगावर घंटा ठेव. २ कांहीं काम कांहीं वेळ बंद करणें. ३ कांहीं काम करण्यासाठीं कोणेकास नियुक्त करणें. ४ जतन करणें; कांहीं विशिष्ट कामासाठीं किं० उपयोगासाठीं कांहीं वस्तु बाजूला काढणें किं० खर्च न करतां राखणें. ५ रक्षणार्थ कांहीं पदार्थ दुसऱ्यापाशीं देणें. ६ उरूं किं० राहूं देणें; उ० पेंढाऱ्यांनीं घरांत एक भांडें ठेविलें नाहीं. टीप,— 'ऊन' प्रत्ययान्त धातूच्या रूपापुढें ' ठेवणें ' हें क्रियापद आल्यास त्या धात्वर्थाची क्रिया समाप्तीच्या स्थितीस पोंचविलेली असणें असा अर्थ होतो.

❀**ठेवरेव** स्त्री० १ पदार्थ सुस्थळीं ठेवण्यासंबंधाचीं कामें समुच्चयानें; ठेवणें व्रिवणें. २ सांठा; संचय. ३ व्यवस्था; टापटीप. **ठेवा, ठेवारेवा** पु०, **ठेवी** स्त्री० [म० ठेवणें] १ जें ठेविलेलें आहे तें. २ संचय; सांठा. ३ गुप्तपणें ठेविलेलें द्रव्य इ०. ४ व्यवस्थितपणाची मांडणी.

ठो पु० डोक्यानें डोक्याला हलकेंच मारलेला रट्टा (देणें). मुलांना खेळवितांना आया हा शब्द योजतात.

ठोक [म० ठोकणें] पु० मारलेला रट्टा. ❀ **मुलाला ठोक देणें** शिक्षा म्हणून त्याला मारणें.

ठोक वि० १ मजबूत; घट्ट (दागिना, पात्र, इ०). २ ज्ञान, विद्वता, पैसा, इ० नीं संपन्न. ❀ **ठोक रकम** स्त्री० आणे, पै सोडून रुपयाचा आंकडा.

ठोकजोशी पु० अडाण्यांना भाकितें सांगणारा

शूद्र जातीचा जोशी. हे लोक सहदेव मताचे आडाखे किं०ठोके शिकून भाकितें सांगतात. **ठोकताळा पु०** आजमास. **ठोकविक्री स्त्री०** मोठ्या प्रमाणांत केलेली विक्री. याच्या उलट ' किरकोळ विक्री. '

ठोकडा पु०, ठोकड न० बैलाच्या गळ्यांत बांधतात ती लोखंडाची किं० पितळेची घंटा.

ठोकण [म० ठोकणें]न०·१ ज्याच्यापासून नियमित काळीं आणि नियमित प्रमाणांत फायदा मिळतो किं० उत्पन्न होतें असा व्यवसाय, धंदा, किं० शेत, इ० तें, किं०तो फायदा किं० तें उत्पन्न.

ठोकणी [म० ठोकणें] **स्त्री०** १ ठोकण्याची क्रिया. २ भिंतीचा गिलावा ठोकण्याचें गवंड्यांचें तीन धारांचें आउत.

ठोकणें स० क्रि० १ मारणें, बडविणें. २ थोपटणें. **टीप**;—पुढील वाक्प्रचारांत ' ठोकणें ' ह्याचा अर्थ आवेशानें, नेटानें, किं० उत्साहानें कांहीं काम करणें, सुरू करणें, किं०संपाविणे असा होतो. फिर्याद ठोकणें, अर्ज ठोकणें, दंड ठोकणें, धूम ठोकणें इ०. ॐ **ठोकता पीर पु०** १ उद्धट मनुष्य, दांडगेश्वर. २ मारामारीला सदा तयार असा मनुष्य; मारता पीर. **ठोकाठोक क्रि० वि०** अगदीं तंतोतंत रीतीनें.

ठोकळ स्त्री० १ चालतांना लागलेली ठेच (लागणें). २ व्यापारांत आलेली बूड(बसणें).

ठोकळ वि० १ ठळक; स्पष्ट. २मुख्य. ३ सरासरीचा. ४ घाऊक.

ठोकळा पु० १ लाकडाचा ओंडका. २ ज्याच्या सर्व बाजू सारख्या तासून काढलेल्या आहेत असा लाकडाचा तुकडा. ३ शाईची दऊत, वाळूदाणी, लेखण्या, इ०ठेवण्यासाठीं कोरून केलेला लाकडाचा तुकडा. ४सहाण जागेवरून हालूं नये म्हणून कोरून केलेला लाकडाचा तुकडा.

ठोका [म० ठोकणें] **पु०**१ लाकूड, हातोडा, इ०नीं कांहीं पदार्थावर केलेला अघात किं० ह्या अघाताचें त्या पदार्थावर उमटलेलें चिन्ह; उ० ह्या तपेलीवरचे ठोके झिजत चालले. २ शास्त्रादिकांच्या आधारें सांगितलेल्या गोष्टींचा आलेला प्रत्यय किं० अनुभव. ३ भाकिताची प्रतीति.

ठोंग पु० १ भांडखोर; सदा मारामारीला तयार किं० उत्सुक जो मनुष्य तो. २ अंगीं कांहीं विद्वत्ता नसून प्रौढी मिरवितो तो. ॐ **ठोंगमत न०** १ शास्त्रविरुद्ध मत. २ लोकांची नालस्ती करणारी उठविलेली बातमी. **ठोंगाई स्त्री०** आडदांडपणा.

ठोंगळ पु० १ लाकडाचा ओंडा. २ लठ्ठ किं० आगडबंब मूल किं० माणूस. ३ रास, ढीग. ४ तोडलेल्या झाडाचा जमीनींत राहिलेला खुंट.

ठोटा वि० १ ज्याचा बाहु किं०बाहूचा कांहीं भाग कापलेला किं०तुटलेला आहे असा. २ ज्याच्या शाखा तोडून काढल्या आहेत असें (झाड).

ठोठण न० अग्र तुटून राहिलेला बुडखा (झाडाच्या फांदीचा, हाताचा, किं०तरवारीचा).

ठोठावणें स० क्रि० १ ठो ठो असा आवाज निघेल अशा रीतीनें एकाद्या पयार्थावर हात, काठी, इ० मारणें. २ कोणेकाला टोमणा मारणें.

ठोंब पु० १ झाडाचें शाखारहित खोड. २ अडाणी किं०आडदांड माणूस. ३बायकापोरें ज्याला नाहींत असा माणूस. ४पानें, फुलें, इ०चा झुबका. ५ मुलाची प्रथम राखतात ती शेंडी. [भरणें

ठोंबरणें स० क्रि० बारदानांत पदार्थ ठासून

ठोंबरा पु० १ गुद्दा; मुठीचा रट्टा; ठोसा. २ कुचकें भाषण; टोमणा; एकाद्याचें मर्मोद्धाटन. ३ जोंधळ्याच्या कण्यांचा भात.

ठोंबा पु०१सोडगें. २मूर्ख माणूस. [माणूस.

ठोंड्या, ठोम्या पु० मूर्ख आणि अशिक्षित

ठोमणा पु० १ रट्टा, गुद्दा. २ कोणेकाचें वर्म काढून त्याला लाजविण्यासाठीं केलेलें भाषण; कोणेकाच्या वर्माचें उच्चारण (मारणें, देणें). ॐ**ठोमणाठोसरा पु०** १ रट्टा. २ कोणेकाचें मर्मोद्धाटन करून त्याला लाजविणें. **ठोमणेठोसरे खाल्लेला वि०** जगाचे कटु अनुभव ज्याला आलेले आहेत असा.

ठोल्या पु० १ ज्याला बायकोमुलें, नातलग, इ० कोणी नाहींत असा (पैसा उसना द्यावयाला अपात्र अशा दृष्टीनें). २अडाणी; अशिक्षित.

ठोसर वि०१जाडी, मजबूत, ठसठशीत(दागिना, पात्र, वस्त्र, इ०). २ज्याला स्पष्ट दिसत नाहीं असा (माणूस किं० डोळा). ३दांडगाईची किं०धडाडीची किं०धिटाईची (कांहीं योजना किं० हिकमत किं० बोलण्याची सरणी). ॐ **ठोसरनजर स्त्री०** तपशील किं०बारीक सारीक मुद्दे न पाहतां केलेलें अवलोकन.

ठोसरा, ठोसला, ठोसा पु० १ हाताची मूठ वळून मारलेला रट्टा; गुद्दा. २ कोणेकाचें वर्म काढून त्याला लाजविणें किं० निंदिणें (मारणें). ॐ **ठोसराई स्त्री०** बढाई.

ड

ड मराठी व्यंजनमालेंतील हें तेरावें व्यंजन आहे.

ड पु०, स्त्री० गुराखी पोरें घसा दाबून काढतात तो विशेष प्रकारचा ध्वनि (घालणें).

डई स्त्री० १नेटाचा प्रयत्न (देणें).२फार दिवस आपल्या घरीं पाहुण्याचें किं०कांहीं विनंति करावयाला आलेल्या माणसाचें लोचटपणाचें राहणें; क्रि० देणें.

उ०तो आज पंधरा दिवस येथें डई देऊन बसला आहे.

डऊ पु० पोखरून काढलेला नारळ; वेलें (बारदान ह्या दृष्टीनें).

डकडकणें अ० क्रि० सांधे अशक्त असल्याकारणानें किं० पदार्थ नीट बसविलेला नसल्याकारणानें हालणें; उ० हा खांब (किं० चौरंग, इ०)डकडकत आहे; उ०ही भिंत डकडकते आहे.

डकडकीत वि० पुढें ' डगडगीत ' पहा.

डकणें अ० क्रि० चिकटणें; चिकटून राहाणें.

डकला पु०१ नदीच्या वाळवंटांत स्वच्छ पाणी भरून घेण्यासाठीं केलेला खळगा.२पाण्याचें डबकें.

डकली स्त्री० आंब्याच्या कोयीचें अर्धुक,–दिव्यांत तेल घालण्यासाठीं चमच्यासारखें योजतात तें.

डकवण [म० डकविणें] न० कागद, वस्त्र, इ० चिकटविण्यासाठीं योजतात तो डीक,खळ,इ०.

डंका [सं० ढक्का] पु० १ चौघडा वाजविणें संपल्यावर शेवटीं जी थोरली नौबत वाजवितात ती. २ कोणेकाच्या बदकर्माची प्रसिद्धि; बोभाटा(वाजणें);उ०त्याच्या नांवाचा डंका वाजला आहे. ३ संबळ म्हणून जें वाजत्रींतील चर्मवाद्य तें वाजविण्याची एक काठी; दुसरीला ' आकडा ' म्हणतात. ॐ **एकाद्या गोष्टीचा डंका देणें** (किं० **वाजविणें**) तिचा बोभाटा करणें.

डकाईत वि० १ हुशार; तल्लख; चलाख. २ दरवडेखोर. ३ लुच्चा; सोदा.

डकार पु० ढेंकर.

डंकी, डंखी स्त्री० १ कुस्तींतील एक पेच (मारणें, देणें). २ मल्लखांबावरील एक विशेष प्रकारची उडी (मारणें).

डंकील, डंखील, डांकील वि० डाक लाविलेलें (भांडें, दागिना, इ०).

डंख [सं० दंश] पु० १ सर्पादिकांनीं केलेला दंश (करणें, मारणें). २ कोणेकाविषयीं मनांत धरलेला रोष किं० द्वेष (बाळगणें, राखणें, ठेवणें).

डंख, डंग पु० १ चुना कुटण्याची लाट. २ भडभुंज्याची पोहे कुटण्याची मध्यावर फिरणारी तुळई.

डंखणें स० क्रि० सर्पादिकांनीं दंश करणें.

डंखी [म० डंख; सं० दंश] वि० १ मनांत वैर बाळगणारा. २ हेवेखोर; मत्सरी.

डंखी स्त्री० कुस्तींतील एक पेच. वर ' डंकी ' पहा.

डंखीण [सं० डाकिनी=स्त्री पिशाच] स्त्री० १ ठाकूर जातीची स्त्री. २ अति क्रूर किं० भांडखोर स्त्री. ३ थेरडी, बुढ्ढी.

डंखील, डंखेल [सं० दंश] वि० पक्ष्यांनीं चोंची मारलेलें (फळ); किड्यांनीं पोखरलेले (धान्यादिकांचे दाणे); उंदीर इ० नीं अर्धवट खाल्लेलें (खोबरें इ०).

डंग पु० भडभुंजाचें पोहे कुटण्याचें आऊत. मागें ' डंख ' पहा. ह्या अर्थी ' दंग ' असाही शब्द आहे.

डंग न० १डोंगराळ प्रदेशांतील जंगलाचा भाग. २सह्याद्रीच्या पायथ्या लगतचा पूर्वेकडील प्रदेश,–नाशीकच्या आसपासचा.साताऱ्याच्या आसपासचा जो असाच प्रदेश आहे त्याला' मावळ ' म्हणतात.

डग [म० डगणें] पु० १ खांब, भिंत, मोठा धोंडा, इ० चें हालणें किं०डळमळणें(खाणें). २ धोका; बिघडण्याचा किं० पडण्याचा संभव; व्यापारांत किं० व्यवहारांत फसगत होण्याची शक्यता. **स्त्री०** १ एकाद्या व्यवहारांत नुकसान होईल कीं काय अशी शंका. २ कचर (खाणें). ३ कांठ, मर्यादा, कड. ४ चालतांना दोन पावलांमधील अंतर. ॐ **ह्या रुपायास डग नाहीं** व्यवहारांत तो चालेल किं० नाहीं अशी शंका बाळगण्याचें कारण नाहीं; तो चालेलच.

डगडग, डगडगां क्रि० वि० १ धारा गळूं

लागतील इतक्या प्रमाणांत (घाम येणें). २ डगडग असा आवाज होईल अशा रीतीनें (हालणें).

डगडगणें भावकर्तरि क्रि० ऊष्म्यानें किं० घामानें अस्वस्थ होणें; उ० मला चुलीशीं बसतांच डगमगूं लागतें.

डगडगणें अ० क्रि० १ खांब इ० पक्का बसला नसल्या कारणानें तो हालणें. २ भीतीनें कांपणें. ३घामानें शरीर थबथबीत झालेलें असणें.

डगडगीत वि० १ हालणारा; कांपणारा. २ घामानें भिजलेला (कपडा, शरीर). ३ पैशानें संपन्न; सुस्थितींत असलेला; उ० रामभाऊ खाऊन पिऊन डगडगीत आहे.

डगडुवाल न० घरांतील सामानसुमान किं० चीजवस्त.

डंगण न० सह्याद्रीच्या लगतचा पूर्वेकडील [प्रदेश.

डगणें अ० क्रि० १ हालणें; कांपणें; डळमळणें. २ तुळई, घराचा पाया, भिंत, इ० खचणें. ३ कचरणें; माघार खाणें; भीतीनें पिछेहाटी करणें; घाबरणें. ४ चिकटणें.

डगमग स्त्री० अस्थिरपणा; चंचलपणा.

डगमगणें अ० क्रि० १ हालणें; कांपणें. २ भीतीनें माघार खाणें. ३ कचरणें. ४ ढासळणें.

डगर स्त्री० १ टेंकडी किं० डोंगर किं० नदीकांठ यांच्या उतरणीचा प्रदेश. २ ढीग; रास. ३ टेकडी. ४ पर्वतादिकांचा लहानसा कडा. ५ बोलतांना किं० गातांना स्वर उंच चढविणें (घेणें). ॐ **दोन्ही डगरींवर हात ठेवणें** दोन धोरणें एकाच वेळीं अवलंबिणें; दोन ध्येयें एकाच वेळीं दृष्टीपुढें ठेवणें.

डंगरणें न० जाडी किं० लठ्ठ काठी; सोडगा.

डगरा, डवरा पु० १ नदीच्या कांठच्या कोरड्या वाळवंटांत पाण्यासाठीं खणलेला खळगा. २ ज्यांतून स्वच्छ पाणी मिळतें असा कोठलाही खळगा.

डगलें न०, डगला पु० [**हिं०**] एक प्रकारचा अंगरखा.

डगळ, डघळ वि० १ सईल, पोकळ (अंगांतील कपडा, भिंतींतील खुंटी, बाटलीचें बूच,इ०). २ दगडाची भिंत,–जींतील दगडांत चिखल भरलेला नाहीं अशी.३ आकारानें फार मोठा (धोंडा, फळ, इ०). ४ ढळढळीत (अक्षर, आकृति, इ०). ५ सढळ हाताचा; खर्चिक; उदार.

डगळणें अ० क्रि० १ आंबा, फणस, इ० कुजल्यामुळें आंतील रस गळणें. २ कोसळून पडणें (भिंत, घर, बंधारा, इ०). ३ अशक्त होत जाणें; क्षीण होणें. ४ पानें, फुलें, इ० नीं समृद्ध होणें (वृक्ष).

डगळणें, डघळणें स० क्रि० ओबडधोबड रीतीनें घडविणें (धोंडा). ह्याच्या उलट 'माठणें.

डगळा, डघळा पु० कोंवळ्या पानांनीं युक्त अशी झाडाची फांदी.

डगळींव [**म०** डगळणें] **वि०** १ ओबडधोबड घडविलेला (धोंडा) किं० अशा धोंड्यांची रचलेली(भिंत). २ ओबडधोबड रीतीनें बांधलेलें (घर, इ०).

डगागणें अ० क्रि० १ उकाड्यानें घामेजणें. २ लटपटणें; खिळखिळीत झाल्यामुळें हालत असणें. ३ खचणें (भिंत इ०). ४ ऱ्हास पावणें; अपकृष्ट होणें.

डंगाण न० सह्याद्रीच्या पायथ्या लगतचा पूर्वेकडील प्रदेश (नाशीकच्या आसपासचा). साताऱ्याच्या आसपासच्या अशाच प्रदेशाला ' मावळ ' म्हणतात.

डंगाळ, डंघाळ, ढांगळ वि० लांबटांग्या; चालतांना ज्याचीं पावलें लांब लांब अंतरावर पडतात असा म्ह० टाकलेल्या दोन पावलांत अंतर पुष्कळ ज्याचें असा (माणूस).

डंगाळा वि० उंच (माणूस, पदार्थ).

डंगी स्त्री० १ एक प्रकारची होडी. २ कावड (गवळी लोक दुधाच्या चरव्या ठेवून खांद्यावरून वाहून नेतात ती).

डगूर पु० जोतास जुंपलेले जे दोन बैल त्यांपैकीं डाव्या बाजूचा. उजव्या बाजूच्या बैलाला ' हियो ' असा शब्द आहे.

डगूळ न० लहान फणस हें फळ.

डघळ,डघळा, डंघाळ मागें डगळ, ''डघळ,' पहा.

डघळींव, डघळणें मागें ' डगळींव, ' ' डगळणें ' पहा.

डचक स्त्री०, डचका पु० १ अनपेक्षित किं० अकल्पित गोष्ट ऐकून किं० पाहून मनाला किं० शरीराला बसतो तो धक्का (बसणें). २ आगामी संकट मनांत येतांच मनाला वाटते ती भीति किं० त्या भीतीचा झटका (येणें, वाटणें). ३ पोटांतून खाल्लेलें किं०प्यालेलें जें कांहीं तें उमळून येणें.

डचकणें अ० क्रि० अनपेक्षित किं० अकल्पित अशी कांहीं गोष्ट ऐकिल्यानें किं०पाहिल्यानें शरीर कंपित होणें.

डचकला पु० चरावयाला कुरणांत सोडलेल्या घोड्याला चालतां यावें पण पळून जातां येऊं नये म्हणून त्याच्या पुढच्या पायांना बांधतात ती दोरी किं० त्या दोरीनें पुढचे पाय बांधण्याची क्रिया.

डचकळी स्त्री० घशांत उमळून आलेली करपट ढेकर.

डचडचणें अ० क्रि० किं० भावकर्तरि क्रि० घशांत जळजळ होणें; करपट ढेकरा येणें; उ०मला डचडचतें; उ० मी भजीं फार खाल्लीं त्यामुळें माझा घसा डचडचत आहे.

डचडचणें अ० क्रि० हालत असणें (वार्धक्यानें किं० अशक्तपणानें शरीर किं० पक्का न बसविल्याकारणानें खांब इ०).

डचमळणें अ० क्रि० १ भांड्यांतील पाणी, ताक, दूध, इ०भांडें हलल्यामुळें हलणें किं० हलून बाहेर पडणें. २ खाल्लेल्या पदार्थांची योग्य व्यवस्था पोटांत न लागल्याकारणानें तो घशाशीं ढेकरांच्या रूपानें येणें.

डपकण, डबकण न० पर्जन्याचें पाणी किं० सांडपाणी जींत सांचलें आहे अशी खळगी.

डप (-ब-)की स्त्री०, डप (-ब-)कें न० १ तेल, तूप, इ० ठेवण्याच्या उपयोगाचा लहानसा बुधला (चर्मपात्र). २ पर्जन्याचें पाणी किं० सांडपाणी ज्यांत सांचलें आहे असा खळगा.

डफ पु० १ एक चर्मवाद्य,-मुलें शिमग्यांत वाजवितात तें. २ लावण्या म्हणणारे लोक वाजवितात तें चर्मवाद्य. ॐ **डफगाण पु०** डफ वाजवून भगवद्यश गाणारा. **डफगाणें न०** डफ वाजवून ईश्वरस्तुतिपर म्हणतात तें गाणें. **डफघाईस येणें** (किं० **डबघाईस येणें, डबघणीस येणें**) उतरत्या कळेस लागणें; वैभव, सामर्थ्य, इ०चा अंत व्हावयाची वेळ येऊन ठेपणें;उ० बाळकाकांची प्रकृति आलीकडे फार डबघाईला आली आहे (म्ह० फार बिघडली आहे); उ० हें घर डबघाईला आलें आहे, केव्हां ढांसळेल ह्याचा नेम नाहीं. **टीप**,- डफावर गाणें म्हटलें जात असतां तें समाप्त व्हावयाच्या वेळीं डफ फार घाई घाईनें वाजवितात; यावरून ' डफघई ' म्हणजे समाप्तीचा समय; या शब्दाचीं अन्यरूपें 'डबघाई,' 'डफघई'.

डफडी, डफरी [म० डफ] स्त्री० लहान डफ.

डफडें, डफरें [स० डफ] न० डफ(तुच्छतेनें). ॐ**एकादी गोष्ट डफऱ्यावर पडणें** तिचा बोभाटा होणें; तिची प्रासिद्धि होणें (वाईट अर्थी).**डफड्या, डफ्या पु०** डफ वाजविणारा.

डंब [सं० दंभ] न० १ ढोंग. २ रिकामा खटाटोप.

डंब, डंबक, डबक क्रि० वि० कांठोकांठ (भांडें भरणें).

डबक, डबकण, डबकें, डबखल न०, डबका, डबगा पु०, डबकी स्त्री० १ पाणी ज्यांत सांचलें आहे असा खळगा. २ लहान तळें.

डबकी स्त्री०, डबकें न० तेल, तूप, इ० ठेवण्याचें कातड्याचें बारदान.

डबडबणें अ० क्रि० १ ताशा, डफ, इ० चर्मवाद्यांचें चर्म सैल पडल्यामुळें त्यांतून बदबदीत आवाज निघणें.२डोळे अश्रूंनीं किं०भांडें कांठोंकांठ जलादिकांनीं भरलेलें असणें; उ० रात्रींच्या पर्जन्यानें सकाळपर्यंत विहीर डबडबली. ३ घामानें शरीर निथळत असणें.

डबडबीत वि० कांठोंकांठ भरलेलें (भांडें, विहीर, हौद,इ०).

डबडी स्त्री०, डबडें न० तेल, तूप, इ० चें चर्ममय बारदान.

डंबर [सं० डंबर] पु० १ समूह. २ अवडंबर. **न०** समूह; समुदाय; उ० मेघडंबर म्ह० मेघांचें पटल.

डबरा, डबुरा [हिं०] पु० १ नदीच्या वाळ-

वंटांत स्वच्छ पाण्यासाठीं खणलेला खळगा. २ पाण्याचें डबकें किं० खळगा. ३ घरांतील दररोजचा केरकचरा टाकावयाचा खळगा. ४ गुऱ्हाळांत उसाचा रस ज्यांत धरला जातो तें भांडें ठेवावयाचा खळगा. ५ अजीर्णानें पोटाला येतो तो फुगवटा (धरणें).

डबा [हिं०] पु० १ लाकूड, धातु, कातडें, इ० ची लहानशी पेटी. २ मुलांच्या पोटांत होतो तो एक रोग.

डबर न० न घडविलेले दगड,–घराच्या पायांत किं०जमीनीच्या भरणींत घालतात ते समुच्चयानें.

डबाड न० १ ज्यांत पाणी सांचलें आहे असा जमीनीवरचा खळगा. २ नदीच्या कोरड्या वाळवंटांत स्वच्छ पाण्यासाठीं खणलेला खळगा.

डबावणें अ० क्रि० (कचें किं० फुटलेलें मडकें) बदबद वाजणें.

डंबारणें अ० क्रि० १ फुगून टगक किं० टडस होणें (पोट). २ आकाशांत मेघांचें गोळा होणें. ३ बरें होत आलेलें गळूं पुन्हां वाढूं लागणें.

डंबारा, डमारा पु० १ पोटाचा फुगवटा; उ० माझ्या पोटांत (किं०पोटानें) डंबारा धरला आहे. २ आकाशांत जमलेल्या मेघांचें पटल (धरणें). ३ रागानें आंतल्याआंत धुमसणें (धरणें). ४ बरें होत आलेलें गळूं पुन्हां वाढूं लागणें.

डबी स्त्री० १ लहान डबा. २ देवळाचा जामदारखाना , पेटी, इ०.

डबीर, दबीर पु० राजाचा कारकून,–जो जरूरीच्या प्रसंगीं राजाच्या वतीनें आपणच पत्रांवर सह्या करतो तो.

डबुरा पु० वर ' डबरा ' पहा.

डबुलकें(–गें), डबोलें न०,डब्बा पु० १ अडचणीच्या प्रसंगासाठीं बाजूस काढून ठेविलेलें द्रव्य. २ दुसऱ्या कोणीं पुरून ठेविलेलें आणि आपल्या हातीं लागलेलें बिनवारशी द्रव्य. ३ अनपेक्षित किं० अकल्पित लाभ (लागणें, सापडणें, मिळणें).

डब्बा न० वर ' डबा ' पहा. ❀**डब्बादवाली स्त्री०** काडतुसें ठेवण्याची शिपायाची पेटी.

डंभ [सं० दंभ] पु० १ ढोंग, कपट, फसवेगिरी. २ गर्व, ताठा. ३ पाप.

डभरा पु० १ भिंत, जमीन, वस्त्र, भांडें, इ० तील भोंक किं० भगदाड. २ रस्त्यांतील खळगा,–ज्यांत पाणी सांचलें आहे असा.

डंभारणें अ० क्रि० पिशवी, पोट, इ० फुगणें किं० फुगून लठ्ठ होणें. वर ' डंबारणें ' पहा.

डमडम स्त्री० भांडण; भांडणाचा कलकलाट.

डमरु [सं०] पु० वाळूच्या घड्याळाच्या आकाराचें एक चर्मवाद्य. ❀ **डमरुयंत्र न०** वैद्य लोकांचें अर्क काढण्याचें यंत्र.

डम्म क्रि०वि० पूर्णपणें आणि त्रास होण्याइतकें (फुगलेलें पोट); उ० माझें पोट आज डम्म फुगलें आहे.

डम्म [सं० दंभ] न० १ ऐट; गर्व; जंभ. २ बोभाटा.

डर [सं० दर] पु० भीति; कचर. ❀ **कर नाहीं त्याला डर नाहीं** ज्यानें अपराध केला नाहीं त्याला भिण्याचें कांहीं कारण नाहीं.

डरकण न०, डरकणी स्त्री०,डरका पु०वाघ, बैल, इ० चें ओरडणें (मारणें, फोडणें, इ०).

डरकणें अ० क्रि० १ वाघ, बैल, इ०नीं ओरडणें. २ बेडूक इ०नीं ओरडणें. ३ रागावलेल्या मनुष्यानें आरडणें आणि ओरडणें.

डरकावणी [म० डरकावणें] स्त्री० कोणेकाला मोठ्यानें ओरडून घातलेली धमकी.

डरकावणें [म० डरकणें]स० क्रि० मोठ्यानें ओरडून कोणेकाला भीति घालणें किं०तंभी भरणें किं० रागें भरणें.

डरकाळी, डरकी [म० डरकणें] स्त्री० वाघ, बैल, इ० ची गर्जना (फोडणें, मारणें).

डरंगळ स्त्री० आमांश किं० हगवण ह्यांमुळें गुदद्वारानें वाहातो तो पातळ मळ (लागणें); किं० ती विकृति; उ० कालपासून माझ्या लेंकराला डरंगळ लागली आहे, त्याला थोडीशी अफू देऊं कां ?

डरंगळणें अ० क्रि० आमांशादि विकृतीमुळें कोणेकाच्या गुदद्वारें पातळ मळ गळत असणें.

डरणें [सं० दर, हिं० डरना] अ० क्रि० १ भययुक्त होणें; भिणें. २ कचरणें; मागें हटणें.

डरवणी, डरविणें पुढें' डरावणी , ' ' डराविणें' पहा.

डरसा पु० एकसारखें पचांपचां थुंकत राहणें (रागावलेलें मांजर, कुतरें, मनुष्य, इ० नीं).

डरा न० नर माकड.

डरांव डरांव क्रि० वि० बेडकांनीं कर्कश आवाजानें (ओरडणें).

डरावणी स्त्री० १ बेडकांचें ओरडणें (फोडणें). २ कोणेकाच्या अंगावर मोठमोठ्यानें ओरडून त्याला घातलेली धमकी किं० त्याच्यावर टाकलेलें तोंड.

डरावणें स० क्रि० कोणेकाला भीति घालणें किं० भीति घालून माघार खावयास लावणें.

डल्ला [हिं०] पु० १ गोटा, गोळा. २ कीटकांच्या उपद्रवानें पिठाचा किं० तांदुळाचा होतो तो गोटा किं० वळते ती ढेप.३पुरून ठेविलेलें द्रव्य. ५ आयता मिळालेला कांहीं खाद्य पदार्थ (साधणें, सांपडणें). ꙮ **डल्ला देणें** (किं० **मारणें**) एकाद्याच्या द्रव्यावर हात मारणें; दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार करणें.

डल्ली स्त्री० घोड्याच्या खोगिराखालीं घालतात तो बुरणुसाचा तुकडा; घामोळें.

डव पु० १ सोलींव नारळाची शेंडी काढून टाकून त्या ठिकाणीं भोंक पाडून आणि त्यांतून खोबरें खरवडून काढून करतात तें पात्र. २ नारळाच्या करवंटीला लाकडाची मूठ बसवून जी पळी करतात ती.

डवक, डौक, डौख स्त्री० १ हाताचीं बोटें ताणून कांहीं पदार्थ घ्यावयासाठीं करतात तो खळगा; पसा. २ ह्या पशांत मावेल इतकें कोणत्याही पदार्थाचें परिमाण; उ० मला डवकभर पीठ घाल.

डंवकणें, डौकणें अ० क्रि० कोणेकाकडे डोळे वटारून पाहाणें.

डवगा पु० जाडी बांबूची एक जात.

डंवचणी [म० डंवचणें] स्त्री० डंवचण्याची क्रिया. खालीं ' डंवचणें ' पहा.

डंवचणें स० क्रि० १ टोचणें, ०ला भोंक पाडणें (गळूं इ० ना).२ (व्यवस्थित पदार्थ) अव्यवस्थित करणें. ३ उपद्रविणें. ४ शांत होत आलेल्या माणसाला कांहीं वर्म काढून खिजणें. ५ तूप, दहीं, इ० पदार्थ बारदानांतून निष्काळजीपणानें काढून घेऊन तो ढवळणें. ६ पक्ष्यादिकांनीं फलादिकांवर चोंची भारणें.७कोणेकाला चीड आणणारें भाषण करून त्याला कोपयिणें किं० चेतविणें. ८ (वैर) उद्दीपित करणें. ९ कोणेकाला कांहीं इशारत करून सावध करणें किं० जागृत करणें.

डवडव, डवडवां क्रि० वि० धारा लागण्या· इतका (घाम येणें किं० घाम सुटणें).

डवडवणें अ० क्रि० १ धारा गळण्या इतकें घामेजणें; उ० हा घोडा घामानें डवडवतो आहे; उ० मी घामानें डवडवलों आहे. २ पानें, फुलें, यांनीं वृक्ष संपन्न झालेला असणें; वृक्षावर पानें आणि फुलें ह्यांची समृद्धि असणें; उ० ही मोगरी फुलांनीं डवडवली आहे; उ० ह्या शेवंतीवर फुलें डवडवलीं आहेत. ३ मेघपटलानें सूर्य आच्छादित होऊन काळोख पडणें; उ० आभाळ मेघांनीं डवडवलें आहे; उ० आज सकाळपासून डवडवलें आहे (भावकर्तरि प्रयोग).

डवणा (–ना) पु० नारळाच्या करवंटीला किं०आंब्याच्या कोयीला दांडा बसवून केलेली पळी.

डवरणें अ० क्रि० १ मेघांनीं (आकाश) व्याप्त होणें. २ (पाऊस) पडण्याचा रंग दिसणें; उ० आज सकाळ पासून आभाळ डवरलें आहे; उ० पाऊस किती डवरला आहे तरी ! ३ कणसें, पानें, फुलें, मोहोर, इ०नीं धान्याचीं ताटें, झाडें, वेली, इ० समृद्ध होणें. ४ दागिन्यांनीं सुशोभित झालेलें असणें; उ० ती नवरी मुलगी वस्त्रालंकारांनीं डवरलेली आम्ही पाहिली. ५ (पोट) वाढणें किं० फुगणें. ६ सूक्ष्म दृष्टीनें निरेखिणें. ७ चोरट्या नजरेनें पाहाणें (चोर, हेर इ० नीं).

डवरणें स० क्रि०(डोक्यावरून ओझें) उतरणें.

डवरणें न० हमालांना ओझीं उतरण्यासाठीं रस्त्याच्या कडेला बांधलेला असतो तो ओटा किं० चार खांबावर बसविलेली असते ती फळी; ह्या अर्थी 'दरवणें ' असाही शब्द आहे.

डवरा पु०१पाण्याचें टांकें.२ नदीच्या कोरड्या वाळवंटांत स्वच्छ पाण्यासाठीं खणलेला खळगा. ३शेताचें धान्य झोडपणें झाल्यावर आणि तें मापावयाच्या अगोदर शेतकरी लोक मांसाची मेजवानी

करतात ती (करणें).'डहुरा,' 'डाहोरा' अशीं ह्या अर्थी अन्य रूपेंही आहेत.

डवरा वि० १ आकाशांत दाट गोळा झालेले (ढग). २ फुगून डब्ब झालेलें (पोट). ३ रटाटून फुगलेलें (गळूं इ०).

डवरा, डऊर, डौर, डहूर [**सं०** डमरु]**पु०** वाळूच्या घड्याळासारखें एक चर्मवाद्य. ※ **डवरा (—ऱ्या,—री) गोसावी पु०** गोंधळ घालून पोट भरणाऱ्या गोसाव्यांची जात किं० त्या जातीचा इसम. हे गोसावी भैरोबाचे म्हणजे जोतिबाचे भक्त असतात.

डवला पु० नारळाच्या करवंटीला लाकडाची मूठ बसवून केलेली पळी; ओळक.

डवला [**म०** डौल] **पु०** प्रतिष्ठितपणाचा आव (मिरविणें).

डवली स्त्री० नारळाची करवंटी किं० आंब्याची कोय ह्यांना लाकडाचा दांडा बसवून केलेली पळी.

डव्हळणें पुढें ' ढवळणें ' पहा.

डंश [**सं०** दंश] **पु०** १ साप, विंचू, गांधील माशी, इ० नीं केलेला दंश किं० मारलेली नांगी (करणें, मारणें). २ मनांत गुप्त ठेविलेला आकस किं० द्वेष (राखणें, ठेवणें, धरणें).

डसकर, डसका, डसरा [**म०** डसणें; **सं०** दंश] **वि०** चावण्याची खोडी असलेला (घोडा, कुत्रा, इ०)

डसणें [**सं०** दंश] **स० क्रि०** १ दुसऱ्या पदार्थाला किं० प्राण्याला चावणें किं० दंश करणें. २ कांहीं पदार्थाला बिलगून किं० चिकटून राहाणें.

डसाडुकर, डसाडोकर स्त्री० शिमग्याच्या उत्सवांत स्त्रीचें हिडिस्स घेतात तें सोंग.

डसाण, ढसाण क्रि० वि० अत्यन्त (आंबट). हा शब्द ' आंबट ' च्या पुढें येतो; उ० हें ताक (किं० दहीं) आंबटढसाण आहे.

डह् पु० गुराख्यांचीं मुलें खेळतांना घसा दाबून काढतात तो आवाज (घालणें).

डहुरा पु० १ नदीच्या कोरड्या वाळवंटांत स्वच्छ पाण्यासाठीं खणतात तो खळगा. २ पाण्याची टांकी. ३ पिकें काढून घेतल्यानंतर शेत-करी करतात ती मेजवानी. मागें 'डवरा' पहा.

डहू पु० नारळांतील खोबरें खरवडून काढून टाकून त्याचें केलेलें पात्र.

डहूर [**सं०** डमरु] **पु०** वाळूच्या घड्याळा-सारखें एक चर्मवाद्य, किं० त्या आकाराची कांहीं वस्तु. (पाणी).

डहूळ वि०० ढवळल्यामुळें चिखलट झालेलें

डळमळणें अ० क्रि० १ आधारावर नीट न बसल्यामुळें (पदार्थ) हालत असणें. २ (निश्चित गोष्ट)अनिश्चित होणें; (संभवनीय गोष्ट) असंभवनीय होणें; (अपेक्षित फळ) प्राप्त न होणें; उ० त्याची मामलत डळमळली. ३(चिंतिलेली योजना) त्याज्य होणें किं० ठरणें.

डाई पु०, स्त्री० १ खेळांत मिळविलेलें किं० स्थापिलेलें वर्चस्व; जिंकलेला डाव. २ फाशांनीं पडलेलें दान. ३ खेळांत फासे टाकण्याची पाळी (एका पक्षाकडे आलेली). ४ द्वेष; आकस. ※ **डाईक वि०** पोटांत दंश धरणारा; खुनशी.

डाऊ पु० १ लग्नाच्या समारंभांत वधूनें किं० वरानें लपविलेली सुपारी,—जी वरानें किं० वधूनें शोधून काढावयाची असते. २ एक प्रकारचा तांबडा रंग.

डाक,डांख[**हिं०**]**पु०** १मखर इ०स शोभार्थ लावतात जे कथील इ०चे चकचकीत तुकडे ते प्रत्येक. २हिरा इ० अंगठींत बसवितांना त्याच्या खालीं घाल-तात तो चांदीचा पत्रा,—हिरा इ०चें तेज उठून दिस-ण्यासाठीं. ३काचेखालीं असाच जो चांदीचा तुकडा बसवितात तो, —खऱ्या हिऱ्याचा देखावा दिसावा म्हणून. ४ धातूच्या भांड्याचे भाग एकास एक जोडण्यासाठीं सांध्याचे जागीं पितळ इ०आणि कांहीं क्षार ह्यांचा रांधा लावितात तो;कस्तर.※**डाकपती, डांखपट्टी स्त्री०** सुवर्णादिकांचे अलंकार सांधावया-साठीं डाकाचा केलेला असतो तो पत्रा.**डाकलग, डांखलग, डांखील वि०** १ ज्याचे वेगवेगळे भाग डाग लावून सांधलेले आहेत असें (पात्र, दागिना, इ०). २ दुसऱ्या जातीशीं संबंध झाल्यामुळें किं० कांहीं बदकर्मांमुळें ज्यांची बेआबरू झाली आहे असा (माणूस, कुटुंब, इ०). ३ शरीराला कांहीं रोग होऊन तो पुरता बरा न झाल्यामुळें अधू झालेला (मनुष्य, गात्र, इ०).

डाक [**हिं०**] **स्त्री०** १ पत्रादिकांची नेआण करण्यासाठीं जी व्यवस्था केलेली असते ती. २ अशा व्यवस्थेनें आलेलें किं० पाठवावयाचें पत्र इ०. ३ खापराच्या आकारविशेषाच्या भांड्यावर कातडें ताणून बसवून करतात तें चर्मवाद्य; गोंधळ इ० प्रसंगीं हें वाजवितात. ४ मृत मनुष्याचें भूत कोणेकाच्या अंगांत आणण्याचा शूद्रादिकांत रूढ आहे असा एक विधि. **डाकचौकी स्त्री०** पत्रादिकांची नेआण करणारीं माणसें, घोडीं, इ० ज्या ठिकाणीं बदलण्यांत येतात तें ठिकाण.

डाकोंडाक [**म०** डाक] **क्रि० वि०** मार्गामध्यें न थांबतां (निरोप किं० पत्रें पोचविणें किं० आणणें).

डाकणें स० क्रि० डाक किं० कस्तर लावून (धातूच्या भांड्याचे भाग) साधणें किं० चिकटावणें किं० जोडणें.

डाकणें अ० क्रि० डाग पडून विशोभित होणें (अंगाची त्वचा, फोड, इ०).

डाकवचा (--**ता**) **पु०** खालीं ' डाकोचा ' पहा.

डाका [**हिं०** डंका] **पु०** १ मोठा नगारा. २मनुष्य मेल्यावर त्याच्या बाराव्या दिवशीं त्याचा आत्मा बोलाविण्याचा शूद्रांतील विधि (घालणें).

डाकिनी, डांकीण, डाकिणी, डांखीण [**सं०** डाकिनी] **स्त्री०** स्त्रीपिशाच. मागें ' डंखीण ' पहा.

डाकील [**म०** डाक] **वि०** डाक किं० कस्तर लावून सांधलेलें (भांडें, दागिना, इ०). ꣸ **डाकील भांडें न०** ज्याची आब्रू खराब झाली आहे किं० खराब ठरली आहे असें (माणूस).

डाकुता, डाकोता, डाकोचा, डांकुलता [**हिं०** डकूतिया] **पु०**भाकितें,उपासाचे दिवस,इ० सांगणाऱ्या शूद्रांची जात किं०त्या जातीचा इसम.

डांकू पु० १ एक वेल. २ एक मत्स्य.

डांख, डांखपट्टी, डांखलग, डांखील वर 'डाक'पु० मध्यें पहा.

डांखळणें अ० क्रि० १ आम्रादि वृक्षांनीं पूर्वपणें गळून पडण्याच्या दशेस येणें. २ कुजल्यामुळें डागांनीं युक्त होणें (फळांनीं). ३ (वृक्षानें) जीर्ण होऊं लागणें. ४ डाक लागलेल्या स्थितींत असणें (भांडें, दागिना, इ० नीं). ५ हिणकस धातूनें मिश्र झालेलें असणें (सोनें, चांदी,इ० नीं).

डाखळणें अ० क्रि० आंबा, काजू, इ० चा चीक घशाला लागल्या कारणानें घशानें रिवरिवत असणें.

डाखळणें [**म०** डांख] **स० क्रि०** १ डाक लावून सांधणें. २ हिणकस धातूचा डाग लागलेला असणें(सोनें इ० ना).

डाखळ, डाखळा वि० चिकाळ किं० चिकानें लडबडलेला (आंबा, काजू, इ०).

डाखीण [**सं०** दाक्ष=दक्षिण दिशा] **स्त्री०** दक्षिण दिशेकडील वारा.

डाग, डागिना पु०१(पदार्थांच्या परिगणनांत) एक वस्तु; एक नग; एक जिन्नस.२शेताची मर्यादा दाखविणारें झाड, धोंडा,इ०.

डाग [**फा०**] **पु०** १ शाई, तेल, इ० चा वस्त्रादिकांवर पडलेला ठिपका. २ (आब्रूला लागलेला) कलंक.३ तापविलेल्या लोखंडानें शरीराची त्वचा भाजण्याची क्रिया (देणें). ꣸**एकाद्याच्या कपाळीं डाग लागणें** त्याची बदनामी होणें.

डांग स्त्री० १ केळीचें सबंध पान. २ एक प्रकारचें गवत. ३ कोष्ट्याची फणी भरावयाच्या उपयोगाचा आधार.४ पानवेलीचा मळ्यांतील चार वाफ्यांचा एक चौक.

डांग [**हिं०** डाग्=डोंगराचें शिखर] **पु०, न०** १ सह्याद्रीच्या रांगेच्या पूर्वेकडचा बलाठीचा पट्टा,–नाशीकच्या आसपासचा. साताऱ्याच्या आसपासच्या अशा पट्ट्याला ' मावळ ' म्हणतात.

डांग स्त्री० १ चालणाऱ्याच्या दोन पावलांमधील अंतर. २चालणाऱ्यानें पहिल्या पावलानंतर टाकलेलें दुसरें पाऊल. ह्या दोन्ही अर्थी 'टांग' असाही शब्द आहे.

डांग, डाग पु०, स्त्री० डोंगराचा चढणीचा प्रदेश. **स्त्री०** वृक्षांनीं व्यापिलेला दरींतील प्रदेश.

डांग वि० दांडगा, उद्धट.

डागडुजी (–**गी**) [**फा०** दागदूजी] **स्त्री०** बांधकामांत कोठें मोडतोड,फूटतूट,इ० झालेली असते तिची दुरुस्ती.

डागडूग (–क) स्त्री० १ वर ' डागडुजी ' पहा. २ कांहीं गोष्ट करावी किं० न करावी अशा बाबतींत जी मनाची स्थिति ती; साशंक वृत्ति; कचर (करणें); उ० रामभाऊंच्या भेटीला जावें कीं न जावें म्हणून माझा जीव डागडूग करतो आहे.

डांगण न० वर ' डांग ' **पु०, न०** पहा.

डागणी [**म०** डागणें] **स्त्री०** लाल तापविलेल्या लोखंडानें त्वचा भाजण्याची क्रिया.

डागणें [**म०** डाग] **स० क्रि०** १लाल तापविलेल्या लोखंडानें (शरीराची त्वचा किं० पदार्थाचा पृष्ठभाग) भाजणें. २ बंदूक, तोफ, इ०तून लक्ष्यावर गोळा फेकणें किं० तो गोळा लक्ष्यावर पोंचेल अशा प्रकारें बंदूक, तोफ, इ० स्थापणें. ३ कोणेकाच्या मर्मास झोंबेल असें भाषण करणें. ४ कोणेकाची बदनामी करणें.

डांगर न०उडीद इ०च्या पिठांत मीठ, तिखट, इ० घालून तोंडीलावणें करतात तें. **स्त्री०** काळ्या भोपळ्याची वेल. **न०** काळा भोपळा.

डांगशी स्त्री० झाडाची लहान फांदी.

डांगळ पु० सांबर हा पशु.

डागळणें [**म०** डाग] **अ० क्रि०** १ सडण्याची क्रिया सुरू झाल्यामुळें फळाच्या त्वचेवर डाग उत्पन्न होणें. २ आजारामुळें फिक्के पडणें. ३ अग्निसंयोग अधिक झाल्यामुळें पोळी, भाकरी, इ० वर जळल्याचे डाग उत्पन्न होणें.

डांगळी स्त्री० १ झाडाची लहान फांदी. २ हातांत धरण्याची वाकड्या मुठीची कांठी.

डांगाण न० ' डांग ' **स्त्री०**मध्यें अर्थ २ पहा.

डागिणा (–ना) पु० १ अंगावर ल्यावयाचें सोनें, चांदी, मोती, इ० चें भूषण. २ गणावयाच्या पदार्थांतील एक एक वस्तु; नग.

डांगी पु० जकातीच्या नाक्यावरील वतनदार अधिकारी,–याच्याकडे बहुधा बैल मोजण्याचें काम असतें.

डागील, डागेल [**म०** डाग] **वि०** १ डागळलेला; ज्यावर डाग पडले आहेत असा; नासलेला. २ लाल तापविलेल्या लोखंडानें भाजलेली (त्वचा, पदार्थाचा पृष्ठभाग, किं० पदार्थ).

डांगोर पु० एक प्रकारचें वाद्य.

डांगोरा पु० कांहीं गोष्ट जाहीर करण्यासाठीं रस्त्यांत कांहीं वाद्यादिकांचा आवाज करून ती सांगणें(पिटणें,वाजविणें).॰ **डांगोरी**, किं०**डांगोरी एकादशी स्त्री०** ज्येष्ठ महिन्याच्या कृष्ण पक्षांतील एकादशी.**टीप**–श्रीविष्णूच्या प्रसादनार्थ ही एकादशी लोकांनीं पाळावी म्हणून डांगोरा पिटविण्यांत येत असे.

डागोळ (–ळी) स्त्री० खाऱ्या पाण्यांतील एक मत्स्यविशेष.

डांग्या पु०पतक्याच्या हाताखालचा जकातीच्या कामाकडचा कारकून.

डांग्या [**म०** डांग] वांबूच्या मुळाचा आकडीदार खंड. **वि०** जोराचा (खोकला); हा बरा होण्यासाठीं वांबूच्या मुळाचा आंकडीदार खंड योजण्याची वहिवाट आहे.

डांच, डांस [**सं०** दंश] **पु०** १ दंश; चावा. २ दंश झालेला त्वचेचा भाग. ३ एक क्षुद्र कीट.

डांचणें [**सं०** दंश] **अ० क्रि** १ तेलकट किं० तिखट पदार्थ फार खाल्ल्यानें किं०पित्तादि विकृतीमुळें घशांत जी भाजल्यासारखी व्यथा होते त्या व्यथेनें (घसा) पीडित होणें किं० (तो पदार्थ) घशाला व्यथाकर होणें; उ० दुपारची आमटी माझ्या घशाशीं अझून डाचते आहे; उ० दुपारीं मी फार भजीं खालीं त्यामुळें माझा घसा डाचत आहे.२आपण केलेली कांहीं भलती गोष्ट किं०दुसऱ्यानें आपली केलेली कांहीं हानि किं० बोललेलें कटु भाषण यांनीं मनाला पीडा देणें; उ० त्यानें मला चोर म्हटलें तो शब्द मला डाचत आहे. 'डाचणें'चा भावकर्तरि प्रयोगही होतो; उ०माझ्या घशाशीं अझून डाचतें आहे.

डाचर वि० १ खूप लठ्ठ; अवाढव्य(प्राणी). २ फार वाढून उपद्रवकारक झालेलें (गवत,रान).

डाचाड, डांचाळ वि० अति विस्तृत किं० विशाल (घर, पटांगण, इ०). याच्या उलट 'आटोपशीर'.

डाजणें अ० क्रि० १ ऊष्म्यानें व्यथित होणें.२ वर 'डाचणें' पहा.

डाझणें, डाझळणें अ० क्रि० १ झाडावरून फळ पडून आपटल्यामुळें तें नंतर कांहीं भागीं पिकणें किं० मऊ होणें आणि कांहीं भागीं अपक्व

आणि टणक राहाणें किं०होणें. २ गड्डू किं०उठाणू चोळवटलें गेल्या कारणानें तें न पिकतां टणक होऊन राहाणें.

डांडोरा पु० १ केळीचा स्तंब किं०बुंधा.२ढोलकें इ० वाद्य वाजवून सर्व लोकांना कांहीं गोष्टीची माहिती करून देणें (पिटणें). ह्या दुसऱ्या अर्थी 'डांगोरा,' 'डांडोरा,''ढांढोरा,'असेंही पर्यायशब्द आहेत.

डाफरणें अ० क्रि० १ मनुष्य, कुत्रा, वाघ, इ० चवताळून ओरडणें. २ चरफडून कोणेकाला रागें भरणें. 'डांभरणें,' 'डांभारणें' हेंही ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

डांबणें खालीं 'डांभणें' पहा.

डांबर [म० डाभा] न० १ पायांत रुतलेला कांटा (रागांत किं० वेदनेच्या आवेगांत). २ लाकूड कुजूं किं० सडूं नये किं० किड्यांनीं पोखरूं नये म्हणून किं० लोखंड गंजूं नये म्हणून त्यांना फासतात तो काळा पातळ पदार्थ; हा वृक्षाविशेषाच्या चिकापासून करतात आणि त्याला भारी दुर्गंधी येते.

डांबरट वि० निर्लज्ज; वात्रट; निगरघट्ट.

डांबरणें, डामरणें, डांबारणें, डांभारणें अ० क्रि० १ वातादि विकृतीनें (पोट)जड आणि टणक होणें. २ (गड्डू) फुगून टणक होणें. ३ मेघानें भूतलावर अंधेरी पाडणें; उ० आज सकाळपासून ढग डांबरले आहेत.

डांबारा पु० खालीं 'डांभारा' पहा.

डांभणें स० १गाय,म्हैस,इ०ना खुंट्याशीं किं० झाडाशीं घट्ट बांधून ठेवणें. २ गाय, म्हैस, इ०ना बांधण्यासाठीं जमीनींत (खुंटा) पुरणें. ३ एकाद्या माणसाला एकाद्या कामीं जुंपणें, किं० आडकावून ठेवणें; उ० मी राम्याला अमरकोशाचे पांच श्लोक पाठ करावयाला डांभून बसविलें आहे. ४ बंदूक किं० तोफ यांचा गोळा शत्रूवर किं० विशिष्ट लक्ष्यावर जाऊन पडेल अशा प्रकारें ती स्थापिणें. ह्या सर्व अर्थीं 'डांबणें' असेंही क्रियापद आहे. ॐ **वाघ डांभणें** त्याणें मारून अर्धवट खालेलें जनावर तो पुन्हा तें खावयास आला असतां त्याला बंदुकीची गोळी लागेल अशी व्यवस्था करून ठेवणें.

डांभा पु० १ पशु ज्याला बांधतात तो खुंटा. २ कुंपण किं० वई करण्यासाठीं पुरतात ते सोटे प्रत्येक. ३ जून झालेला माठाचा देठ. ४ निबर झालेली शेवग्याची शेंग. ५ दुबळेक्याची काठी. ६ शाखारहित झालेल्या झाडाचा बुंधा. ७ चांगला पिकलेला शेताचा भाग. ह्या अर्थी 'डांभा डचका' हाही शब्द आहे.

डांभारणें [म० डांभा] स० क्रि० १(गाय, म्हैस, इ०ना)खुंट्याला बांधणें किं०जखडून बांधणें. २ तापलेलें कौल इ० कांहीं पेय पदार्थांत घालून विझविणें (त्या पेयांत कांहीं विशेष गुण यावयासाठीं).

डांभारा,डांबारा पु० १ गड्डू, पोट, इ० फुगून त्यांचे ठायीं उत्पन्न झालेला टणकपणा, सूज, किं० फुगवटा,(धरणें).२ आकाशांत (मेघांचा) जमाव.

डांभीक [स० दांभिक] वि० १ कपटी; ढोंगी.२गर्विष्ठ.

डामडौल, डामाडौल पु० १ कोणेकाचा नोकर चाकर, घोडीं, बैल, इ० जो सरंजाम असतो तो. २थाटमाट;सुंदर दिमाखयाजोगें वस्त्रालंकारादिकांचे अंगावर यथास्थानीं धारण.

डामर न० वर 'डांबर' पहा.

डामरणा, डामगा पु० भाताची एक जात.

डामरणें अ० क्रि० वर 'डांबरणें ''डांभारणें' पहा.

डामाडूक, डामडूक, डामाडूळ स्त्री० १ मोठा कलकलाट किं० आरडा ओरडा.२बंड; दंगा. ३ अंदाधुंदीची स्थिति. **वि०** अव्यवस्थित.

डामारणें, डामारा वर 'डांभारणें,''डांभारा' पहा.

डाल स्त्री,न०बांबूची पसरट पाटी;जींत मोठ्या मोठ्या चौकोनी खिडक्या आहेत असा बांबूंच्या पट्ट्यांचा मोठ्या हारा,—नारळ,गवत,इ०भरण्याच्या उपयोगाचा.**पु०** अंगारखा इ०च्या कडांना शिवतात तो संजाप.

डालगें न० मोठी टोपली.

डालणें स० क्रि० १ टोपली पालथी घालून अन्नादि झाकणें. २ कोणेकाला दटावून चूप बसावयास लावणें. ३ रास किं० ढीग करणें. ४ फेकून देणें; टाकून देणें.

डालन, डालान न० १ उसाचा रस काढा-

वयाच्या चरकाच्या नवरानवरींचे माथे ज्या फळींत फिरतात ती. न०, स्त्री० मांदण किं० नांद ह्यांच्यावर झांकण घालावयाचें मोठें शिपतर. न०, स्त्री० मोठी डाल म्हणजे बांबूचा हारा,–भूस इ० भरावयाचा. न० मोठी दुरडी (बांबूची घट्ट विणीची पाटी). न० शेतकरी लोकांनीं जरूरीच्या वेळीं कामासाठीं एकमेकांना बैल,माणसें,इ० देण्याची चाल.

डाली स्त्री० १ कोणेकावर सरशी मिळविण्यासाठीं केलेला सामना (बांधणें); उ० गरीबानें समर्थाशीं डाली बांधणें हा मूर्खपणा होय. २ पत्रावळीच्या पानांची बांधून करतात ती तांटी. ३ खांद्यावर आडवी काठी ठेवून तिच्या दोन टोकांना दोऱ्यांच्या शिकाळ्यांत घालून वाहून न्यावयाच्या ज्या दोन पाट्या त्या प्रत्येक. ४ पसरट पाटी किं० शिपतर. ॐ **डालीबंद पु०** प्रतिस्पर्धी.

डालें न० १ बैल, घोडें, इ० च्या पाठीवर दोन बाजूस ज्या दोन टोपल्या माती, गोंवऱ्या, इ० वाहून न्यावयासाठीं घातलेल्या असतात त्यांची जोडी; ही रचना माकणीच्या रचनेसारखी असते. २ शेतकरी लोकांची एकमेकांना बैल, माणसें, इ० जरूरीच्या वेळीं देण्याची पद्धति.

डाव पुं० १सोंगट्या, बुद्धिबळें, इ० जे खेळ ते प्रत्येक (खेळणें). २ खेळांत फांसे, कवड्या, इ० टाकणें किं० टाकून पडतें तें दान. ३ क्रमानें किं० खेळाच्या शर्तीप्रमाणें खेळण्याची आलेली पाळी. ४ कोणत्याही कामाला योग्य समय. ५ सद्दीचा जोर; वैभवाचा काळ. ६ गंजिफा, पत्ते, इ० खेळांत एका पक्षाकडे गेलेलीं पानें समुच्चयानें. ७ खेळांत कवड्या किं०फासे टाकावयाला जमीनीवर जें क्षेत्र आखून घेतलेलें असतें तें; उ० तुझी कवडी डावाबाहेर गेली. ८ दुसऱ्याविषयीं मनांत गुप्तपणें धरून ठेविलेलें वैर; उ० दुर्दैवा, तूं डाव साधलास. ९ कांहीं कार्य होण्याला किं० करावयाला अनुकूल अशी परिस्थिति; उ० रामभाऊ माझ्या डावांत येईल तेव्हां मी आजचें उट्ट काढून घेईन. १० कांहीं हेतु साध्य करण्यासाठीं केलेली किं० योजून ठेविलेली युक्ति. ११ कवड्या इ० नीं खेळतांना आंखून घेतलेला पट. स्त्री०नारळाच्या करवंटीला मूठ बसवून केलेली पळी किं० केलेलें ओघराळें. पु० १ एक प्रकारची होडी. २ लाल तापलेल्या लोखंडानें दिलेला डाग. ॐ **फासा पडेल तो डाव, राजा बोलेल तो न्याव (म्ह० न्याय)** फासे टाकून आपणांला पडलेलें दान आपल्या इच्छेच्या किं० सोयीच्या उलट असलें तरी तें पत्करावें लागतें, तसेंच राजानें दिलेला निकाल सत्याच्या किं० प्रजाहिताच्या उलट असला तरी तो नाइलाज म्हणून पत्करावा लागतो. **पात्रांत (किं० हांडींत) असलें तर डावेंत येईल** मूळांतच कांहीं नसलें तर प्रयत्नानें तरी तें कसें साध्य होणार ? ज्याला स्मरणशक्ति नाहीं त्याला घोकून कसें पाठ होणार ? **डाव असतां हात भाजून घेऊं नये** सुरक्षित आणि सरळ मार्गानें काम होत असतां धोक्याचा किं० वांकडा मार्ग अवलंबू नये. **डाव गेला तरी क्रि० वि०** १ किमानपक्षीं; निदान. २ प्रतिकूळ परिस्थिति असतांनाही. **एकाद्यावर डाव लागूं होणें** तो हरणें; किं० पराभूत होणें. **एकाद्याच्या डावीं पेटणें** त्याच्यावर क्रुद्ध होणें. **डावपेच पु०अ० न०** १ कुस्तींतलि प्रतिपक्ष्यांना पाडण्याच्या युक्त्या.२कोणतेंही कार्य घडवून आणण्यासाठीं योजलेल्या युक्त्या किं० हिकमती.

डांव पु० मेलेल्या शूद्राचें उग्र पिशाच.

डावकें पु० गुप्तपणें राखून ठेविलेला धनसंचय.

डावखुरा, डावखोरा [म० डावा] **वि०** १ ज्याचा डावा हात उजव्या हातापेक्षां अधिक कुशल आहे असा(मनुष्य).२ घोटाळयाचा (हिशेब, व्यवहार, जमाखर्च).

डावघाव पु० १ सोयीचा समय किं० परिस्थिति. २ युक्त्या; व्यूह. मागें ' घावडाव ' पहा.

डावरणें स० क्रि० १ कोणेकाला धमकी भरणें; त्याला दरडावणें. २ कोणेकाला झिडकारणें.

डावरा वि० १ ज्याच्या उजव्या हातापेक्षां डाव्या हातांत अधिक शक्ति किं० कौशल्य आहे असा. २ ज्या गोमहिष्यादि पशूंचीं दोन्ही शिंगें सारख्या वळणाचीं किं० बांकाचीं नाहींत असा (पशु) किं० असें विरूप (शिंग).

डावलणें,डावळणें [**म०** डावा] **स० क्रि०** १ धिक्कारपूर्वक परित्यागणें किं० दूर लोटणें. २

प्रवासांत एकादें गांव डाव्या बाजूस राहील अशा रीतीनें प्रवास करणें. ३ कांहीं काम दुसऱ्यावर लोटणें किं० कोलणें. ४ अनुकूल परिस्थितीचा फायदा न करून घेतां ती व्यर्थ दवडणें.

डावली [**म०** डाव=पळी] **स्त्री०** मांजराचा पुढच्या पायाचा पंजा.

डावा वि० पूर्वेकडे तोंड केलें असतां उत्तरेकडचा(डोळा, कान, हात, इ०); उजवा याच्या विपरीत. ❀ **उजवी घालणें** उजवी बाजू देवाकडे राहील अशा रीतीनें त्याच्या भोंवतीं प्रदक्षिणा करणें. **देवानें डावी देणें** देवाला प्रश्न विचारणाऱ्यानें ' हे देवा, डाव्या बाजूकडचें फूल इ० पाडवून अमुक सुचीव ' असें सांगितलें असतें त्याला अनुसरून देवानें डावीकडचें फूल इ० पाडविणें. त्याच सरणीनें ' उजवी देणें ' चा अर्थ घ्यावा. **डावी उजवी देणें (सांगणें** कि०**बोलणें)** कोणेकाची विनंति अमान्य करणें. **त्या गृहस्थानें तुम्हांला डावी दिली कीं उजवी दिली** ? त्यानें तुमची विनंति मान्य केली कीं अमान्य केली ?**डावें उजवें न०** लबाडी; भामटेगिरी.

डावू मागें ' डाऊ ' पहा.

डांस [**सं०** दंश] **पु०** १ एक प्रकारचा उडणारा क्षुद्र प्राणी; हा चावला असतां आग होते आणि तेथें गांध उठते. २या प्राण्यानें केलेला दंश, किं० ही दंशाची जागा.

डांस (-सा-) ळणें [**सं०** दंश] **स०क्रि०** कृमिकाटांनी चावणें किं०कुरतडणें.

डाह [**सं०** दाह] **पु०** आग (रागानें मनाची किं०अग्नि, ऊन्ह,इ०नीं शरीराची).

डाहण न० घाण पाणी.

डाहणी स्त्री० डाग द्यावयाची लोखंडाची सळई; पदार्थाचा पृष्ठभाग भाजावयाची लोखंडाची सळई.

डाहण्या वि० १ अत्यंत आंबट (फळ, ताक, इ०). २ ठिपकेदार (साप, चित्ता, इ०).

डाहळ पु० झाडाच्या तोडलेल्या काटक्या कुटक्या.

डाहळा पु० १ हरभऱ्याचें झाड. २ वाटाणा, लांख, इ० चें झाड. ३ झाडाची पर्णयुक्त फांदी.

डाहळी स्त्री० झाडाची सपर्ण फांदी. ❀ **धरायाला नाहीं डाहाळी आणि बसायाला नाहीं सावली अशी स्थिति** १ जिला बाप नाहीं अशा विधवेची दशा. २ अत्यंत विपन्न स्थिति.

डाहूळ न० पाण्याचें डबकें.

डाहो [**सं०** दाह] **पु०** अंगाची होते ती आग (रागानें, तिखट खाल्ल्यानें, ऊन्ह्यानें).

डाहोरा पु०नदीच्या कोरडया वाळवंटांत स्वच्छ पाण्यासाठीं खणलेला खळगा.

डाळ [**सं०** दालि] **स्त्री०** हरभरा, पावटा, इ० द्विदळ धान्याच्या एका दाण्यांतील जीं दोन अर्धुकें असतात तीं प्रत्येक. २ पापड, फेण्या, इ० एकावर एक ठेविल्यानें होते ती रास. ❀ **एकाद्याची डाळ शिजूं न देणें** त्याला हवें आहे तें त्याला न मिळूं देणें;त्याला थारा किं०आश्रय न देणें.

डाळणें स० क्रि० १ (पदार्थ) रास करून ठेवणें. २ ताट, टोपली, इ० नीं (पदार्थ विशेष) झांकणें. ३ जुळविणें, जोडणें, सांधणें; उ० सतरा तुकडे एके ठिकाणीं डाळावे तेव्हां अंगरखा होतो. ४ कोणेकाला स्थळविशेषीं आडकावून ठेवणें; उ० त्या द्वाड पोराला शाळेंत डाळला पाहिजे.

डाळप [**म०** डाळणें] **न०** राशीच्या रूपानें जें ठेविलें तें.

डाळा पु० रास; चळथ; ढीग. ❀ **एकाद्या कार्याचा डाळा डाळणें** त्याची साधन सामुग्री गोळा करून तें सिद्ध करण्याच्या अवस्थेस किं० सुरूं करण्याच्या स्थितीस आणून ठेवणें.

डाळिंब [**सं०** दाडिम, दालिम, दाडिंब] **स्त्री०** एक फळझाड. **न०** त्याचें फळ. ❀ **डाळिंबी वि०** १ डाळिंबाच्या रंगाचें (चीट इ०). **२** डाळिंबाच्या दाण्यांसारखे ठिपके ज्यावर आहेत असें (वस्त्र).

डाळिंबी [**सं०** दालि=डाळ] **स्त्री०** १द्विदळ धान्याच्या दाण्याचें एक अर्धुक. २मसूर, तूर, इ० डाळींचा दाणा. ३ वालाच्या बिरड्या काढतात त्या प्रत्येकीं. ४ मुलें अंगावर जोरानें बोट घासून तांबडा ठिपका उत्पन्न करतात तो (करणें, दाखविणें).

डाळी स्त्री० १ बांबूच्या पातींची चटई;तट्ट्या; बोऱ्या. २ शिंदी, माड, इ० च्या पातींची चटई.

२ वांबूच्या पातींचा पसरट चौकोनी टोपला किं० हारा.

डाळें न० १ वांबूच्या पातींचा पसरट आणि मोठ्या मोठ्या चौकटी असलेला हारा. २ हरभरा इ० द्विदळ धान्य भाजून त्यांचीं सालें काढून टाकून ज्या डाळिंच्या करतात त्या मसुच्चयानें.

डिंक पु० कागद किं० वस्त्र इ० ना कागद किं० वस्त्र इ० चिकटावण्यासाठीं जो पदार्थ घेतात तो; बाभूळ इ० झाडांच्या खोडावर धरतो तो चीक; गोंद. ❀ **डिंकट वि०** चिकट. **डिंकदाणी स्त्री०** तयार डिंक ठेवावयाचें वारदान. **डिंकवडा पु०** डिंक, खारका, खसखस, इ० एकत्र कुटून त्यांचें करतात तें मिश्रण,–हें बाळंतिणींना पौष्टिक खाद्य म्हणून देतात. **डिंकाळ, डिंकेरा वि०** ज्याला चीक फार असा (फणस, आंबा, इ०).

डिंकशी, टिंकशी स्त्री० झाडाच्या फांदीचें कोंवळें अग्र; कोंवळ्या पानांनीं युक्त असें फांदीचें टोंक.

डिंका (–के–)माली, डिंका (–के–) माली स्त्री० बुंद, एकबोकी, इ० झाडांच्या वर्गांतील एक झाड किं० त्याचा चीक. हा चीक उग्र वासाचा असतो.

डिखळ, डिखूळ न०, डिखळी, डिखोळी स्त्री० १ मातीचा ओबड धोबड खंड. २ भाताचा लध्या; एकमेकांस चिटकटलेल्या शितांचा गोळा.३ कोणत्याही पदार्थाचा ओबड धोबड खंड. ४ आंबरस, दहीं, इ०चा इतर भागांपेक्षां अधिक घट्ट असलेला भाग.

डिंग पु०धान्यादिकांची रास.

डिगडिग अव्यय लहान मुलांना चालावयाला शिकवितात तेंव्हा हा शब्द उच्चारून त्यांना पावलें टाकावयाला उत्तेजन देतात.

डिंगर, डिंगरू पु०, न० मूल; लेंकरूं.

डिंगरी स्त्री० मुळ्याच्या झाडाची शेंग.

डिंगवडा, डिंगोडा वर ' डीक ' मध्यें 'डिकवडा ' पहा.

डिगशी स्त्री० फांदीचें कोंवळ्या पानांसकट जें अग्र असतें तें. वर' डिकशी ' पहा.

डिंगोरा पु०, डिंगोरी स्त्री० धान्यादिकांचा लहानसा राशि.वर ' डिंग ' पहा.

डिचकें न० नीट शिजल्यामुळें चोथापाणी अशा रूपाचा भात, भाजी, इ०पदार्थ.

डिचकोळी स्त्री० मुलाचें पोट (ठणक किं० पातळ ह्या शब्दांच्या पुढें).

डिचडिचीत वि०नीट न शिजल्यामुळें चोथापाणी झालेला भात, भाजी,इ०.

डिचणें अ० क्रि० न मानवणें(खाद्य);अहितपरिणामकारक होणें(औषध, खाद्य, इ०).

डिचा पु० एक पक्षी.

डिफल न० मातीचा ओबडधोबड खंड.

डिफला पु० मातींचीं डिखळें फोडावयाचा लाकडाचा हातोडा किं० लाकडाचा तुकडा.

डिंब [सं० डिंब, डिंभ=बालक]पु०मुलगा; पुत्र;लेंकरूं.

डिम [सं०] पु० संस्कृत साहित्यांत नाटकाचे जे दहा प्रकार सांगितले आहेत त्यांपैकीं एक.

डियो उ० वाचक अ०ओहो ! भले !

डिरंगी, डिंगरी स्त्री०मुळयाची शेंग.

डिरा, डिऱ्हा पु० फांदीचा कोंवळा अंकुर (फुटणें, निघणें,येणें).

डिरी स्त्री० १ फांदीचा किं० पानाचा अंकुर. २ मुळ्याची शेंग.

डिऱ्या पु० रोगानें किं० फार जेवल्यामुळें फुगलेलें पोट.

डिवडिवीत वि०दिसण्यांत मोठें पण सत्त्वहीन असें (झाड).

डिवली अ० क्रि०१ अपायकारक किं०अहितकारक होणें (कांहीं खाद्य, औषध, इ०). २ झोंबणें (कोणी केलेला अपमान इ०).

डिळडिळीत वि०पूर्णपणें पोसलेलें आणि चकचकणारें (द्राक्ष,गहूं, इ०).

डींक पु०१ झाडाच्या खोडाचा चीक.२चिकट पदार्थ.❀**डिंकास तेल** जशास तसें!उत्तम जुळणी!

डीर पु० १पानाचा अंकुर. २अति कोंवळें पान.

डुकर पु०स्त्री०एक ओंगळ आणि चतुष्पाद पशु. ❀ **डुकरमुसळी, डुकर मुसं (–सां–)डी स्त्री०** १ डुकरानें मारलेला डोक्याचा रट्टा (मारणें). २ असाच आवेशाचा मारलेला तडाखा किं०कोणेकावर केलेला हल्ला. **डुकरमुंडी स्त्री०** किल्ल्याच्या

भिंती किं० दरवाजे फोडावयासाठीं प्राचीन काळीं जी हेलकावे खाणारी लठ्ठ आणि लांब तुळई त्यांच्यावर आदळीत असत ती (चालविणें).

डुकळी स्त्री० १ पेंगत असलेल्या माणसाच्या डोक्याचा जातो तो तोल (खाणें).२अल्पकालिक झोप.

डुंख, डुंखण (–न) न० शाखापर्णादि छेदून काढल्यामुळें मुंढा झालेला वृक्ष.

डुंखणें स० क्रि० पानें छाटून (झाड किं० फांदी) पर्णरहित करणें.

डुंग पु० १ टेकडी; टेंकाड.२डोंगराचा सुळका. ३ धान्यादिकांची रास.

डुगडुग (– गी) स्त्री० १ कांहीं इष्टकार्य यथासांग पार पडेल किं० नाहीं अशी शंका, काळजी,किं० भीति. २आतुरतेची इच्छा.

डुंगा पु० वर ' डुंग ' पहा.

डुंगी स्त्री० वर ' डुंग ' पहा.

डुचका वि० १उरफाट्या बाहुल्यांच्या(मनुष्य, डोळा). २ बारीक डोळ्यांचा (मनुष्य) किं० बारीक (डोळा).

डुचमळणें मागें ' डचमळणें ' पहा.

डुडुळ पु०, न० घुबड (कवितेंत).

डुबक स्त्री० घोडा, गाय,म्हैस,इ०च्या पुढच्या दोन पायांस बांधतात ती दोरी किं० दोरीनें केलेलें बंधन (त्यांनीं पळून जाऊं नये म्हणून).

डुबकणें अ० क्रि० पाण्यांतल्या पाण्यांत उड्या मारीत किं०खेळत राहाणें.

डुबकणें स० क्रि० पुढचे दोन पाय बांधून (गाय, म्हैस, इ० ना) पळून जातां न येईल असें करणें. मागें ' डुबक ' पहा.

डुबकवणी न०भांडीं,इ०घासल्यामुळेंकिं०विसळ-ल्यामुळें किं० वस्त्रें धुतल्यामुळें गढूळ झालेलें पाणी.

डुबकविणें स० क्रि० १ खरकटीं भांडीं इ० पाण्यांत घासून (पाणी) गढूळ करणें.२ हात,पाय, भांडें, इ० पाण्यांत हापटणें.

डुबकळणें स०क्रि०पाण्यांत बुडाविणें.**अ०क्रि०** १पाण्यांत पडून हालत राहाणें. २ पाण्यांत डुंबणें.

डुबकळी स्त्री० पाण्यांत मारलेली बुडी.

डुबघाईस क्रि० वि०मागें'डबघाईस येणें' पहा.

डुबडुबीत क्रि० वि० कांठोंकांठ (भांडें, विहीर, हौद, इ० भरणें). **वि०** कांठोंकांठ भर-लेलें (भांडें, इ०).

डुबणें अ० क्रि० १ बुडणें; पाण्यांत खोल जाणें. २ व्यापारांत नुकसान पावणें.

डुंबणें, डुंभणें अ० क्रि० १ पाण्यांत आडवें तिडवें हातपाय आपटून खेळत राहाणें. २ एकाद्या विषयाच्या अभ्यासांत अनेक वर्षें घालविणें; उ०मी व्याकरणशास्त्रांत आज बारा वर्षें डुंबत आहें.

डुबरा वि०१फुगीर किं०फुगलेलें(पोट).२ज्याचें पोट फुगीर किं० फुगलेलें आहे असा (मनुष्य).

डुबला पु० हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा इसम.

डुबी स्त्री० पाण्यांत मारलेली उडी (मारणें).

डुबूक क्रि० वि० कांठोंकांठ (भरणें).

डुबें न०बागेंतील झाडांना पाणी पोंचावें म्हणून बारीक बारीक पाट करण्याचें एक आऊत.

डुमडुम (–मां)क्रि० वि० डुमडुम आवाज होईल अशा रीतीनें (ढोलकें, डफ, नगारा, इ० वाजविणें).

डुमडुमें न० डफ (मुलांच्या भाषेंत).

डुमणा वि० १ लठ्ठ आणि ठेंगणा. २ खुजट; खुरटलेला.

डुरकणें इ० मागें ' डरकणें ' इ० पहा.

डुरडुर स्त्री० बेडकाचें ओरडणें.

डुरडुरणें अ० क्रि० १ (बेडूक) ओरडणें. २ (घोणस इ०) फुसफुसणें. ३ कोणेकावर रागा-रागानें ओरडणें.

डुरडुरा पु० घोणस ह्या सर्पजातींतील एक पोटजात.

डुरमा वि० १ फुगीर पोटाचा (माणूस); ढेरपोट्या. २ खुजट; खुरटलेला (वृक्ष, मनुष्य). ३ लठ्ठ आणि बेडौल (गात्र).

डुरा पु० १ पाण्याचें डबकें. २ पाण्यासाठीं नदीच्या वाळवंटांत किं० अन्यत्र खणलेला खळगा.

डुऱ्या पु० वर ' डिऱ्या ' पहा.

डुलकणें अ० क्रि० झोंपेमुळें डुलक्या खाणें.

डुलकी स्त्री० १ झोंपेमुळें शरीराचा घसरतो तो तोल (खाणें, देणें, घेणें). २ अल्पकाळ घेत-लेली किं० आलेली झोंप (घेणें, येणें).

डुलणें [**स०** दुल=झोके देणें, उडविणें]**अ० क्रि०** १ बसल्या जागींच ह्या कुशीवरून त्या कुशीवर हेलकावे खाणें. २ चालतांना ह्या खांद्या-कडून त्या खांद्याकडे आणि त्या खांद्याकडून ह्या खांद्याकडे हेलकावे खात खात चालणें. ३ गृहादि-कांचा खांब इ० न पडतां हालत असणें. ४ तारण म्हणून ठेविलेला पदार्थ गहाण सोडविण्याची ऋण-कोला ऐपत नसल्याकारणानें धनकोच्या मालकीचा होणें. ५ कोणेकाला उसने म्हणून दिलेले पैसे परत मिळण्याची शक्यता किं० संभव न राहणें.

डुळकणें अ० क्रि० १ (लहान मुलानें) ओकणें. २ (लहान मुलानें) हगणें.

डुळकवणी न० १ पोटांत गेलेलें पाणी, दूध, इ० (वांतीच्यारूपानें तोंडांतून बाहेर पडलेलें). २ ज्यांत गवळ्यानें फार पाणी घातलें आहे असें दूध.

डुळका [**म०** डोळा] **वि०**१बारीक डोळ्यांचा (माणूस). २ बारीक (डोळा).

डुळकी स्त्री० १ लहान मुलाला पाजलेला (घोट);त्याच्या तोंडांतून बाहेर पडलेला दुधाचा घोट (येणें). २ लहान मुलाला झालेली वांति.

डुळं पु०, न० कणिंग, पाटी, टोपली, इ०ना पडलेलें भोंक.

डू पु०,स्त्री०, डुब पु० वैपुल्य,समृद्धि,चंगळ (होणें, माजणें).

डूब पु० १ वस्त्रादिकांना रंग देण्यासाठीं त्या रंगाच्या पाण्यांत तीं बुचकळून काढणें किं०अशा रीतीनें त्यांना दिलेला रंग. २ वैपुल्य, समृद्धि, (जरूर त्या पदार्थाची).

डूल पु० मुलांचें एक कर्णभूषण.

डेंकी स्त्री० १ गलबत किनाऱ्यावर ओढूत आणून ठेविलें असतां तें इकडे तिकडे कलूं नये म्हणून त्याला आधारार्थ देतात तीं लांकडें प्रत्येक. २ झाड, गाडी, भिंत, इ० ना असेच देतात ते आधार प्रत्येक. सर्व अर्थी क्रियापद देणें.

डेख न० १ पान,फूल,फळ,इ० ज्या अवयवानें झाडाला किं० फांदीला संबद्ध झालेलें असतें तो अवयव; वृंत; देंठ. २ कांहीं विशिष्ट विषय चर्चे-साठीं ज्या विधानावरून आला तें; भाषणाचा उगम. ॐ **डेख लावणें** १एका पदार्थाचा दुसऱ्या पदार्थाशीं संबंध जोडून देणें.२ माग किं० तपास लावणें.३ एकाद्या कार्याचा उगम शोधून काढणें.

डेखा पु०, डेखण न० छाटलेल्या झाडाचा किं० रोपाचा अवशिष्ट भाग; वरील अग्रें तोडून काढल्यामुळें भुंडें दिसूं लागलेलें झाड,–तुळस, झेंडू, इ०.

डेग [**फा०**] **स्त्री०** मोठा हांडा (पाणी सांठविणें इ० च्या उपयोगाचा).

डेंग स्त्री० केळीचें सबंध पान; डांग.

डेंगणें अ० क्रि० १ थकून जाणें. २ आजारानें अशक्त किं० शक्तिहीन होणें.

डेंगणें न० पुरुषाचा प्रजोत्पादक अवयव.

डेंगाळणें अ० क्रि० निरुत्साहानें कांहीं काम करणें; धीमेंधीमें आणि नाखुशीनें कांहीं काम करणें.

डेंगी स्त्री० गलबत, भिंत, झाड, इ० ना दिलेला टेका किं० आधार. वर ' डेंकी ' पहा.

डेचा पु० १ झाड, रोप, धान्याचें ताट,इ०चें अग्र, टोंक, किं० माथा; फांदीचें टोंक. २ कार्य-विशेषाचा उगम किं० ऐन समय; कांहीं कामाचा ऐन रंगांत येण्याचा समय (धरणें, साधणें); उ० हा दरवडा कोतवालानें ऐन डेच्यावर धरला; उ० सरबत्तीच्या डेच्यावर स्वारांनीं उडी घालून सर-बत्तीचा डेचा धरला.

डेंठ, डेठ पु० पान, फूल, फळ, इ० ज्या अव-यवानें झाडास चिकटलेलें असतें तो अवयव; डेख.

डेंडळ इ० पुढें ' ढेंढळ ' इ० पहा.

डेंडारी स्त्री० १ओकारी. २घशांत बोटें घालून मुद्दाम काढलेली ओकारी.

डेंडाळें न० आंतडें (अंगांतून बाहेर पडलेलें किं० पाडलेलें).

डेंबरणें अ० क्रि० फुगणें (पोट).

डेंबरा, डेमरा वि० १ फुगलेलें (गात्र, पोट).

डेरका पु०, डेरकी स्त्री०, डेरकें न० मातीचा डेरा. २ (लक्षणेनें) फुगीर पोट.

डेरा पु० १ मातीचा हांडा. २ (लक्षणेनें) फुगलेलें पोट. ३ देवळाचा माथा किं० शिखर. ४ नगाऱ्याचा सांगाडा (ज्यावर कातडें ताणून बस-विलेलें असतें). ५ दलदलीचें स्थळ.

डेरा [**हिं०**]**पु०** १ एक प्रकारचा तंबू(देणें).

२ अल्प काळा पुरतें करून घेतलेलें वासस्थान. ⊛ **एकाद्याच्या घरीं डेरा देणें** तेथें पाहुणा म्हणून कांहीं काळ राहावयाला जाणें किं० राहाणें.

डेरी स्त्री० मातीचा लहान घडा.

डेली स्त्री० नकाशगाराचें एक हत्यार.

डेवगा, डवगा पु० लांब आणि जाडी बांबू.

डेवण न० उतरण; उतार.

डेवण, डेवणें न० ऐन समय; संकेताचा समय; संकेताचें स्थळ.

डेवणें स० क्रि० १ (ओझें) उतरणें. २ उतरणीवरून खालीं जाणें किं० येणें.

डेवणें अ० क्रि० फार जेवण झाल्यामुळें अस्वस्थ होणें किं० निर्जीव होऊन पडणें; सुस्त किं० जड होणें.

डेवणें स० क्रि० निर्भर्त्सणें; निंदिणें.

डेवरणें स० क्रि० (ओझें) उतरणें. २(टेंकडी) उतरणें.

डेळकी, डेळी स्त्री०, डेळकें न० १ दुवेळक्याची कांटी किं० अशा कांठीनें वृक्षादिकांस दिलेला टेका. २ कांठीचें दुवेळकें. ३ कोणेकाला दिलेला आश्रय.

डोई स्त्री० १ डोकें. २ एक व्यक्ति; एक माणूस; उ० येथें दर डोईस एक पैसा पट्टी धावी लागते. ३ पिढी; उ० ह्या गांवांत माझ्या पांच डोया झाल्या. ⊛ **डोईखरड्या, डोईताशा पु०** अकुशल न्हावी. **डोईचा पु०** (विधवेचें वपन अनुलक्षित असतां) न्हावी. **डोईजड वि०** १आपल्याहून कमी दर्जाचा पण ज्याचें वचन आपणांस पाळावें लागतें किं० ज्याच्या चुका आपणांस क्षमाव्या लागतात असा (मनुष्य); वरिष्ठाकडे वशीला किं० संधान असलेला आपल्या हाताखालचा (कारकून इ०). २ दुर्वह किं० दुष्कर (कार्य,—जें करणें प्राप्त आहे). ३ न झेंपण्याजोगें (काम). **डोईफोड्या वि०** लोकांना त्रास देऊन आणि आपणही त्रास सोसून जो आपली मागणी पुरवून घेतो तो. **डोईफोड वि०** डोक्याला त्रास देणारें(काम). **स्त्री०** १ अत्यंत त्रासदायक असें मूर्खाला शिकविण्याचें काम. २ अशा कामाचे कष्ट. **डोईथडक स्त्री०**डोक्यानें मारलेला रट्टा किं०दिलेला धडाका. **डोई धरल्या बोडका हातीं धरल्या रोडका** ज्याच्यापासून कोणत्याही उपायांनीं कांहींही मिळणें शक्य नाहीं असा मनुष्य. **देव कराया डोन होया (किं० डुया) किडवळ कराया तीन डोया (किं० डुया)** एकाद्या राजाच्या मनांत प्रजाजनाला उत्कर्षाच्या स्थितीस चढवावें असें आलें तर तो तें दोन पिढ्यांत (म्ह० साठ वर्षांत) करूं शकतो, आणि प्रजाजनाला अपकर्षाच्या स्थितींत लोटावें असें आलें तर तो तें तीन पिढ्यांत म्ह० नव्वद वर्षांत करूं शकतो. चांगला राजा साठ वर्षांत आपल्या प्रजेला वैभवसंपन्न करूं शकतो आणि वाईट राजा नव्वद वर्षांत त्यांना हीन, दीन, अनाथ, आणि दुवळे करूं शकतो. **टीप**, 'डोकें' ह्याचे जे वाक्प्रचार ते सर्व 'डोई' हा शब्द घालून त्याच अर्थानें अशिक्षित लोक वापरतात. पुढें 'डोकें' मधील वाक्प्रचार पहा.

डोकरा [हिं०] वि० बुड्ढा, थेरडा.

डोकरी, डोकरीण [म० डोकरा] स्त्री० बुढ्ढी; थेरडी; हडळ.

डोकला पु० १ पाण्यासाठीं नदीच्या कोरड्या वाळवंटांत किं०अन्यत्र खणलेला खळगा. २पाण्याचें टाकें; झरा.

डोकसें न०, डोकशी स्त्री० डोकें.

डोका, डोकला पु०, डोकली स्त्री० तंगडी, तंगड (तुच्छतेनें).

डोकावणें [म० डोकें] अ० क्रि० डोकें पुढें करून पाहाणें. २(वाढणारा किं०उगवणारा पदार्थ, कळी, पान, इ०) थोड्थोडा दिसूं लागणें. ३ कांहीं इष्ट साधण्यासाठीं विशिष्ट स्थळाकडे वारंवार येरझारा करणें. ⊛ **डोकावून पाहाणें** पुढें डोकें करून पाहाणें.

डोकी स्त्री०, डोकूल, डोकें न० १प्राण्याच्या शरीराचा मस्तक हा भाग. २ कोणत्याही पदार्थाचा माथा किं० अग्रभाग. ⊛ **डोकें कीं फोकें** खालीं 'डोचकें' मध्यें पहा.

डोकें न० १ मस्तक; शिर. २ एक व्यक्ति; उ० धारापुरीचीं लेणीं पहावयाला दर डोक्याला चार आणे फी द्यावी लागते. ३ पिढी; उ० ह्या गांवांत माझ्यासकट आमच्या पांच डोया झाल्या; डोई= पिढी. ४ बुद्धि; मति; सारासार विचार करण्याची शक्ति; लक्ष्य; मेंदू; उ० माझें डोकें गणितांत

चालत नाहीं; उ० मारुतरावाचें डोकें बिघडलें आहे; उ० तुझ्या गहूल डोक्यांत ह्या श्लोकाचा अर्थ कसा शिरेल ? ५ कोणत्याही वस्तूचा अग्र-भाग किं० शिरोभाग किं० टोंक. ७ **डोकें उच-लणें** नांवालौकिकास चढणें. **डोकें उठणें** १ डोकें दुखूं लागणें. २ त्रास किं० उपद्रव होणें. **डोकें काढणें** उदयास चढण्याच्या मार्गाला लागणें. **एकाद्याचें डोकें खाजविणें** त्याला उपद्रव किं०त्रास देणें.(**आपलें डोकें**) **खाजविणें** विचार साफ करा-वयासाठीं डोकें चोळणें.२विसरलेली गोष्ट आठवावी म्हणून डोकें चोळणें. **एकाद्यावर डोकें टेकणें** त्याच्यावर अवलंबून राहणें; त्याच्या आश्रयाची किं० मदतीची अपेक्षा किं० इच्छा बाळगून असणें. **डोकें टेकणें** १ हार खाल्ली असें म्हणणें किं० कबूल करणें. २ कांहीं काम निराशेनें सोडून देणें. ३ अशक्त होणें; खचणें; आजारी पडणें. **एकाद्याच्या घरीं डोकें देणें** (किं० **डोकें देऊन बसणें**) तेथें लोचटपणा आणि चिकटपणा करीत बसणें; निर्ल-ज्यपणानें तेथें पुरवा झोडींत राहाणें. **एकाद्याचें डोकें फिरणें** १ तो वेडा होणें; त्याला वेड लागणें. २ तो रागानें बेकाम होणें.**डोकें मारणें**१ शिरच्छेद करणें. २ नुकसान करणें. **डोकें हालविणें** १ संमति दर्शविण्यासाठीं किं० अनुमोदन देण्यासाठीं मान हालविणें.२वेडाच्या लहरींत किं०अंगांत भूतसं-चार झाल्यामुळें डोकें इकडून तिकडे आणि तिक-डून इकडे जोराचे हासडे देऊन बळविणें.**एकाद्याच्या डोक्याचे केस नाहींसे करणें**, किं० **त्याच्या डोक्यावर केस राहूं न देणें** त्याला शिव्या देणें; त्याची फजिती करणें; त्याला निर्भर्त्सणें; त्याला रागें भरणें; त्याची हजामत करणें. **डोक्यावरचें खांद्यावर येणें** चिंता किं० काळजी नाहींशी होणें किं० कमी होणें. **डोक्यानें चालणें** गर्वानें किं० ताठ्यानें वागणें.**डोक्यानें चालत येणें** नम्रपणानें येणें; आपल्या आपण येणें; कोणाच्या विनंती-वांचून किं० आग्रहावांचून येणें. **एकाद्याच्या डोक्यावर खापर** (किं० **हंडी**) **फोडणें** त्याच्या माथीं विनाकारण दोष लादणें किं० त्याच्यावर उगाच टेपर ठेवणें. **एकाद्याच्या डोक्यावर खापर**(किं०**हंडी फुटणें**)तो विनाकारण दोषास पात्र होणें. **एकादें काम डोक्यावर घेणें** १ तें पतकरणें; त्याची जबाबदारी घेणें. २ शाळा, वर्ग, घर, इ० **डोक्यावर घेणें** म्ह०त्यांत अव्यवस्था, गोंधळ,धिंगामस्ती करणें किं०चालविणें.**एकाद्याच्या डोक्यावर चढणें** त्याला न जुमानणें; त्याला शिरजोर होणें. **डोक्यावर सूर्य येणें** मध्यान्ह होणें. **डोक्यावर पदर येणें** वैधव्य येणें. **एकाद्याच्या डोक्यावर बसणें** १ त्याला न जुमानणें; त्याला न वचकणें.२ आपली लायकी नसतां त्याच्यावर जाणें किं० पुढें सरणें. **एकाद्याला डोक्यावर बसविणें** १ त्याला बाजवीपेक्षां अधिक मान देणें; त्याचें फाजील गौरव करणें. २त्याला भक्तिभावानें भजणें. **एकाद्याच्या डोक्यावर मिरे वाटणें** विनाकारण त्याला दोष देणें;किं०त्यालाशिव्या देणें; किं०त्याच्या-वर ठपका ठेवणें.**कांहीं गोष्ट एकाद्याच्या डोक्या-वर शेकणें** तिचा वाईट परिणाम त्याला भोगावा लागणें; तिच्यामुळें त्याचें नुकसान होणें. **डोक्या-वर हात घेऊन येणें** रिकाम्या हातानें येणें; इष्ट वस्तु न मिळवितां तसेंच परत येणें. **एकाद्याच्या डोक्यावर हात ठेवणें** १ त्याला आशीर्वाद देणें. २ त्याला फसविणें. **एकाद्याच्या डोक्यावरून हात फिरविणें** त्याला फसविणें. **डोक्यावरून पाणी जाणें** १ परमावधि किं० शिकस्त होणें. २ असह्य नुकसानी किं० संकट आल्यानें अगदीं लाचार होणें किं० निस्त्राण होणें. **डोक्याला पाणी लावून ठेवणें** शिक्षा भोगावयाला तयार होऊन राहाणें. **डोक्यांत राख घालणें** (किं० **घालून घेणें**) संतापणें; चरफडणें. **डोई** (किं० **डोकें**) **करविणें** न्हाव्याकडून हजामत करवून घेणें. **डोकें देणें** (किं०**मारणें**) १ मदत करणें. २ नेटानें कांहीं काम आरंभिणें किं० चालविणें. **एकाद्याच्या डोक्याचा चेंडू करणें** त्याच्यावर चरफडणें; त्याला शिव्या देणें. **आपल्या डोक्याचा चेंडू करून घेणें** लोकांच्या शिव्या निमूटपणें ऐकून घेणें. **एकाद्याच्या डोक्याचें उखळ करणें** त्याच्यावर तोंड सोडणें; त्याला शिव्या देणें. **आपल्या डोक्याचें उखळ करणें** निमूटपणें लोकांच्या शिव्या खाणें. **डोक्याच्या वाटेनें कर्ज देणें** न चरफडतां किं० आढेवेढे न घेतां कर्ज फेडणें किं० देऊन टाकणें. **डोक्याच्या**

वाटेनें क्रि० वि० नम्रपणानें (देणें किं० घेणें). डोक्यावर विळाविणें अन्यायानें दोष देणें. डोकें खाजवायला सुद्धां वेळ नसणें मुळींच वेळ किं० फुरसत नसणें. डोकें खाजवावयाला फारसा वेळ लागत नाहीं आणि फारसे श्रमही पडत नाहींत परंतु खर्चावयाला तितका वेळही नसणें आणि तितके श्रमही करण्याला सवड नसणें.

डोंगर पु० १ निसर्गनिर्मित दगडांचा मोठा उंचवटा. २ कोणत्याही पदार्थांचा उंच राशि किं० ढीग. ३ (लाक्षणिक) अतिशय कठिण काम; उ० कामाचा डोंगर. ४ (लाक्षणिक) कोणत्याही बाबतींत अतिशयपणा किं०आतिरेक; उ०दुःखाचा डोंगर.५काजळ ज्या पदार्थावर धरावयाचें त्याच्या-वर जो काजळाचा शिखराकार थर होतो तो,– हा पुत्रजन्म सुचवितो; कड्याच्या आकाराचा थर असल्यास तो कन्याजन्म सुचवितो. आसन्न-प्रसव स्त्रीला पुत्र होईल किं० कन्या होईल हें ठर-विण्याचा हा बायकी आडाखा आहे. ६ डोंगरी जमीन शेतासाठीं तयार केल्यावर जें पहिलें नाच-णीचें पीक येतें तें. ७ ज्या पिकाला फारसें पाणी लागत नाहीं अशा पिकाचा डोंगरावरचा प्रदेश. ꣸**डोंगर कठडा, डोंगरकिनारा, डोंगरकांठ पु०, डोंगरकठाड (–डी) स्त्री०** डोंगर, टेंकड्या आणि त्यांचा लगतचा प्रदेश समुच्चयानें. **डोंगर-कणगर, डोंगरकंगर पु०** डोंगर, टेकड्या, उंच-वटे, इ०समुचयानें. **डोंगरदळें न०** झाडें झुडपें तोडून शेतासाठीं तयार केलेला डोंगरावरील प्रदेश. **डोंगरसरी स्त्री०** डोंगरांची किं० टेक-ड्यांची रांग. **डोंगराला दुखणें आणि शिपींत औषध** जेथें फार मोठें प्रमाण जरूर आहे तेथें त्याचा अत्यल्प पुरवठा (हा हास्यास्पद प्रकार होय). **दुरून डोंगर साजरे पण जवळ जातां कांटेकुटे** एकाद्या विशिष्ट पदार्थाचा किं० माण-साचा आपणांला अनुभव आला नाहीं किं० सह-वास झाला नाहीं तोंपर्यंत तो चांगला असें आपलें मत असतें; त्याचा अनुभव किं० सहवास घडला म्हणजे त्याच्यांतील दोष कळून येतात आणि आपलें मत बदलतें. **डोंगर खणून उंदीर काढणें** मोठा खटाटोप करून फलनिष्पत्ति अत्यल्प. **डोंगरचे आंवळें आणि सागरचें मीठ** अत्यन्त भिन्न स्वभावाच्या किं०भिन्न परिस्थितींतील लोकांचा संयोगही सुखकर होऊं शकतो. **काडीआड डोंगर** मोठ्या मनुष्याला आपले अपराध, अनाचार आणि पातकें, हीं क्षुल्लक किं० हाताखालच्या मनुष्यावर लोटून आपला बचाव करून घेतां येतो. **डोंगरावरून उडी टाकणें** (उपहासांत) फार मोठा पराक्रम करणें;उ०आतां काय तुम्ही डोंगराव-रून उडी टाकतां तें पाहूं. **डोंगरीं दिवा लावणें** घरें-दारें सोडून सर्व गांवकऱ्यांनीं डोंगरावर रहावयास जाणें,–दरवडेखोरांच्या उपद्रवामुळें किं० भूत पिशाचादिकांच्या भीतीनें. **करंगळी सुजली म्हणून डोंगरा एवढी होईल काय** ? प्रत्येक पदार्थाच्या वाढीला मर्यादा ही असतेच. **इकडचा डोंगर तिकडे करणे** प्रचंड किं० फार मोठें असें कांहीं काम करणें.

डोंगरी [म० डोंगर] स्त्री०लहानशी टेंकडी. **वि०** डोंगरासंबंधाचा; डोंगर प्रदेशांत उत्पन्न झालेला किं० तेथून आलेला. ꣸**डोंगरीमिरी स्त्री०** एक प्रकारचे काळे मिरे.

डोंगशी स्त्री० खाऱ्या पाण्यांतील एक [मत्स्यविशेष.

डेंगळा पु०एक प्रकारची मोठी मुंगी; मुंगळा.

डोंगा पु० लहान नाव किं० होडी.

डोचकी स्त्री०,डोचकें न० [म० डोकें] डोकें; मस्तक. ꣸ **डोचकें की बोचकें** माझा माल मला परत तरी द्या नाहीं तर माझें डोकें तरी तोडा,–निकरावर आलेल्या माणसाचा उद्गार.

डोण न०, स्त्री०,डोणी स्त्री० १ पाणी इ० भरून ठेवण्यासाठीं दगड मध्यें पोखरून करतात तें पात्र. २ झाडाचा बुंधा, सुरमाडाचा खंड, इ० कोरून मीठ इ०साठविण्याठीं करतात तें बारदान. **स्त्री०** शेतांतील नको तें पाणी उपसून काढून टाकण्यासाठीं योजतात तें पात्र.

डोणगें [म० डोण] न० झाडाचा बुंधा कोरून केलेलें बारदान.

डोणा [म० डोण] पु० भोजनांत तूप,कढी, इ० घ्यावयाचा पानाचा द्रोण.

डोणी [म० डोण] स्त्री० १ एक प्रकारची होडी. २ तुपाचा द्रोण.

डोंफा पु० पायाचा गुडघा.

डोब पु०, डुबी स्त्री० [म० डुबणें] जला-

दिकांत पदार्थ बुडण्याची किं०बुडविण्याची क्रिया.

डोंब [हिं०] **पु०** १ श्मशानांत काम करणाऱ्यांची जात किं०त्या जातीचा इसम. २अग्नीच्या ज्वाळांची झोत; उ० आगीचा डोंब. ३ तिखट खाऊन होते ती आग. **स्त्री०** सांडपाणी सांचविण्याचा खड्डा. ॐ **तिखट डोंब वि०**अत्यन्त तिखट (खाद्य किं० पेय). **डोंबआळी स्त्री०** मोठ्या आळी नांवाच्या कृमींची जात.

डोंबकावळा [सं० द्रोणकाक] **पु०** १ एक प्रकारचा कावळा. २ एक व्यक्ति संकटांत सांपडली असतां तिच्या मदतीला धावून येतात ते तज्जातीय प्रत्येक.

डोंबड (–र) स्त्री०, न० म्हैस (तुच्छतेनें). ॐ **म्हशीचें डोंबड (–र)** म्ह०म्हैस (तुच्छतेनें).

डोंबणें [हिं० डोंबणें] **स० क्रि०** पाण्यांत किं० रंगाच्या पाण्यांत (वस्त्रादि) बुचकळणें.

डोंबरा पु० भोंक, भगदाड, खिंडार (भिंत, जमीन, वस्त्र, पात्र, इ० तील).

डोंबल, डोंबलें [म० डोंबें] **न०** डोकें (तुच्छतेनें);उ०तुला काय समजतें डोंबल?उ०आतां तरी माझें म्हणणें तुझ्या डोंबल्यांत शिरलें काय ?

डोंबा [हिं०] **पु०** १ पाण्यांत मारलेली बुडी. २ पाण्यांत किं० रंगांत बुडण्याची किं० बुडविण्याची क्रिया (देणें).

डोंबारी, डोंभारी पु० हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा इसम.उड्या मारणें, दोरीवरून चालणें, इ० खेळ दाखवून हे लोक पोट भरतात.

डोंबाळा पु०, डोंबाळी स्त्री० [म० डोंब; हिं० डोम्]अग्नीच्या ज्वाळांचा झोत.

डोंबी स्त्री० १ पदार्थविशेष मिळविण्यासाठीं त्याच्यांवर अनेकांनीं एकदम घातलेली झडप किं० धाड. २ भीक मागावयांला आलेल्यांची गर्दी किं० दाटी. ३ लोचटपणाची मागणी. ॐ **डोंब्या पु०** लोचटपणानें मागणी करणारा.

डोंबें न० पूर्णपणें झाडावर न पोसतां बाल्यावस्थेंतच जो झाडावरून गळून पडतो तो नारळ.

डोभण न० पाण्याचें डबकें.

डोभरा पु० मागें ' डोंबरा ' पहा.

डोंभारी पु० मागें ' डोंबारी 'पहा.

डोम, डोमआळी, डोमकावळा मागें'डोंब,' ' डोंबआळी, ' ' डोंबकावळा ' पहा.

डोमला पु०, न० १ दोरीचा वेढा किं०वळसा घट्ट करावयासाठीं घातलेलें लाकूड. २ गाडीचा साटा आणि जूं यांना जोडून बांधलेलें लाकूड.

डोमळ, डोमलें न० डोकें,दोडकें (तुच्छतेनें).

डोमाळें न० गाडी हांकणारा ज्या दांड्यावर बसतो तो,–जुंवाशीं गाडी जोडणारें लाकूड.

डोयली स्त्री०समई इ०त तेल घालावयाची पळी,–करवंटी, आंब्याची कोय,इ०चीं केलेली असते ती.

डोर वि० खणखणीत आवाजाचा (कंठ,वाद्य).

डोरली स्त्री० वांग्याच्या जातींचें एक झाड. **डोरलें न०** त्या झाडाचें फळ. ॐ **डोरलें वांगें न०** (लक्षणेनें) खुजट (प्राणी). **डोरली रिंगणी स्त्री०** एक औषधी वनस्पति.

डोरलें न० १ डोरलीचें फळ. २ ह्या फळाच्या आकाराचा एक दागिना. ३ दुसऱ्याच्या माथीं मारलेला दोष किं० ठेविलेला ठपका (काढणें, लावणें).

डोरा पु० मागें ' डवरा ' ' डहुरा ' पहा.

डोल [अ० दलू] **पु०** १ चर्म, काष्ठ, इ०चें पात्र,–पाणी उपसावयाच्या उपयोगाचें; पोहरा. २ गलबताचें शीड बांधावयाचा खांब. ३ देवाची मूर्ति बसवावयाचा झोंपाळा,–लाकडाचा किं० पितळेचा. ४ चालतांना किं० बसलेलें असतां ह्या कुशीवरून त्या कुशीवर कलणें (देणें). ॐ **डोलकाठी स्त्री०, डोलखांब पु०** गलबताच्या मध्यभागीं शीड बांधावयासाठीं जो खांब उभा केलेला असतो तो.

डोलची [हिं०] **स्त्री०** भिस्ती लोकांचा कातड्याचा पोहोरा.ॐ **डोलची बेग पु०** पखालवाला; भिस्ती.

डोलणें [सं० दुल्=१ उडविणें. २ झोके देणें] **अ० क्रि०** १ झोके खात खात चालणें. २ (बसलेल्या माणसाचें) ह्या कुशीवरून त्या कुशीवर आणि त्या कुशीवरून ह्या कुशीवर झोंके खाणें.

डोलविणें[म० ' डोलणें ' चें प्रयोजक]**स० क्रि०** १ मुलाला मांडीवर घेऊन त्याला पुढून मागें आणि मागून पुढें वळविणें किं०कलविणें. २ संमति दर्शविण्यासाठीं (मान किं० डोकें) एका कुशीवर कलविणें किं० वळविणें.

डोला [सं०दोला] पु० मोहरमाच्या सणांत मुसलमान लोक कागदाची उंच घरासारखी रचना करतात ती.

डोली [सं० दोला, दोली] **स्त्री०** माणसांनीं खांद्यावरून वाहून न्यावयाचें लोंबतें वाहन (आजाऱ्यासाठीं किं० विहिणीसाठीं). ❀ **डोलकर पु०** डोली वाहाणारा मनुष्य.

डोल्हारा, डोलारा [म० डोली] **पु०** १ देवाच्या मूर्तींचा लहानसा झोंपाळा (लांकडाचा किं० धातूचा केलेला). २ मासे पकडावयासाठीं पाण्यांत खांब पुरून कोळी लोक त्यांना बांधतात तें जाळें.

डोसकी स्त्री०, डोसकें न०डोकें (तुच्छतेनें).

डोह, डोहो पु० १ तळें, नदी,इ० तलि पाणी जेथें अतिशय खोल असतें ती जागा. २ 'काळा' ह्या शब्दापुढें ' डोह ' किं० ' डोहो ' हा शब्द काळेपणाची गहनता दाखविण्यासाठीं योजतात; उ० त्या नाल्यांतील पाणी काळें डोह (किं०डोहो) आहे.❀**डोहाच्या जागीं डोहो पडतील** नदी इ०त पाणी तुडुंब भरलेलें असतां पात्रांतील खोल खड्डे आणि उथळ खड्डे जरी भिन्न दिसत नसले तरी पाणी आटल्यावर कोणचे खड्डे खोल आहेत आणि कोणचे उथळ आहेत हें दिसून येतें. त्याप्रमाणें समर्थांच्या वशील्यामुळें जरी गुन्हा प्रकट झाला नाहीं तरी तो समर्थ दूर होतांच गुन्हेगार उघडा पडतो आणि त्याचें समाजाकडून पारिपत्य होतेंच. **डोहांत पडणें** संकटांत, पंचाइतींत, किं० पेंचांत अडकणें किं० सापडणें.

डोहळ, डोहोण, न० ज्या खळग्यांत पाणी सांचलें आहे असा खळगा,—रस्त्यांतील किं० अन्यत्र असलेला.

डोहणा, डोहोणा, पु० चालत असलेल्या कामांत येतें किं० आणलें जातें तें विघ्न किं०आडथळा (येणें, घालणें); उ० तूं येथून जा,माझ्या कामांत डोहणे आणीत बसूं नको.

डोहर, डोहार, ढोर पु० हिंदूंतील एक हलकी जात किं० त्या जातीचा इसम.

डोहरा पु० मागें ' डदरा, ' ' डहुरा ' पहा.

डोह (–हो–)ळणें स० क्रि० पाणी, आमटी, वासुंदी, दहीं, इ० चे परिमाणु इकडचे तिकडे आणि तिकडचे इकडे किं० खालचे वर आणि वरचे खालीं करणें.

डोहळा, डोहाळा [सं०दोहद] पु० १गरोदर स्त्रीची इच्छा किं० ती इच्छा ज्या पदार्थावर जाते तो. हा शब्द बहुधा अनेकवचनीं योजला जातो. २ कोणाचीही कोणत्याही वस्तूसंबंधाची उत्कट इच्छा किं० भलतीच इच्छा (लागणें, पुरविणें). ❀ **एखाद्या स्त्रीला डोहाळे लागणें** गर्भवती असल्या कारणानें तिला वांत्या होणें, मळमळणें, किं० घेऱ्या येणें. **पोराचें चिन्ह डोहाळ्यांवरून समजतें** गर्भवती स्त्रीचें मन ज्या पदार्थावर जाईल त्याच्यावरून ती प्रसवेल तें मूल कोणच्या गुणांचें होईल हें कळून येतें. **एखाद्याला भिकेचे डोहाळे आठवणें** ज्या कृत्यामुळें पुढें खास भीक मागावी लागणार तीं करण्याकडे त्याची प्रवृत्ति होणें. **डोहाळ(–ळे–) जेवण न०** प्रथम गरोदर झालेल्या स्त्रीसंबंधाचा उत्सव करण्याचा विधि; ह्याप्रसंगीं त्या स्त्रीला आणि इतर सुवासिनी स्त्रियांना भोजनार्थ आमंत्रिलें जातें. **डोहाळतुली स्त्री०** जिला प्रथमच डोहाळे लागले आहेत अशी स्त्री.

डोहार, ढोर, पु० कांतडीं कमावणें आणि कातड्याच्या जिनसा बनविणें ह्यांवर उपजीविका करणारी हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा इसम. [इ० पहा.

डोहो, डोहोण इ० मागें ' डोह, ' ' डोहण '

डोळ पु० १डाळ करण्यासाठी द्विदळ धान्याचा जो भरड काढतात तो. २ चांगल्या डाळीमध्यें जे टरफलासकट दाणे राहिलेले असतात ते प्रत्येक. **न०** मनांत आलेली शंका किं० उत्पन्न झालेला किंतू (पडणें, येणें). **स्त्री०** मासे धरावयासाठीं समुद्रांत पुरलेल्या मेढ्यांस किं० खांबास बांधलेलें असतें तें जाळें.

डोलकर, डोळकर मागें 'डोली ' मध्यें पहा.

डोळस [म० डोळा] **वि०** १ डोळ्यांनीं पहावयाला समर्थ (याच्या उलट आंधळा). २ ज्याची नजर भारी तीक्ष्ण किं० उग्र आहे असा. ३ शहाणा, चाणाक्ष, हुशार.

डोळा पु० १ पदार्थाच्या रूपाचें ज्ञान ज्याणें आपणांस होतें तें इंद्रिय; नेत्र; नयन. २ दृष्टि; नजर; उ० सर्व प्रेक्षकांचे डोळे त्याच्या मुखाकडे वळले. ३ छिद्र; लहान भोक; उ० सुईचा डोळा; उ० दाभणाचा डोळा. ४ मोराच्या पिसाऱ्यांतील प्रत्येक पिसाच्या टोंकाकडे असतें तें डोळ्याच्या आकाराचें वर्तुळ; चंद्रक. ५ डोळयाच्या आकाराची आकृति,–शिताफळ, रामफळ, इ०च्या सालावरील उंचवटे किं० खवले असतात ते प्रत्येक. ६ अंकुर फुटण्याची जागा; उ० उंसाचा डोळा; उ० बटाट्याचा डोळा. ७ पायाच्या घोट्याजवळ जे दोन खळगे असतात ते प्रत्येक. ८ गुडघ्याच्या वाटीजवळ जे दोन खळगे असतात ते प्रत्येक. ९ (लाक्षणिक) माहिती सांगणारा; हकीकत कळविणारा; ज्ञानाचा उगम; उ० हेर हे राजाचे डोळे होत. १० माशाच्या अंगावरील खवला. ११ शास्त्र,–जें मनुष्याला योग्य अयोग्य, ग्राह्य अग्राह्य, इ० सांगतें आणि बुद्धीचा विकास करतें. १२धान्य मोजावयाचें एक परिमाण; हें भिन्न भिन्न प्रांतांत भिन्न भिन्न असतें. ❀ **पांढरीचा डोळा** पु० गांवचा महार. **डोळेढापणें** १ घाण्याभोंवतीं वाटोळें फिरणाऱ्या बैलांच्या डोळ्यांना घालतात तीं झांकणें,–त्यांना घेरी येऊं नये म्हणून. २ गाडी ओढणाऱ्या घोड्याच्या डोळ्यांना अशींच झांकणें बांधतात तीं. **डोळस** वि०ज्याला डोळे आहेत असा; ज्याची दृष्टी स्वच्छ आहे असा. २ ज्याला सूक्ष्म भेद कळतात असा; ज्याला बारीक सारीक गुणदोष सुद्धा कळतात असा; सुक्ष्मावलोकी. **चार डोळे होणें** एकमेकांस मदत करावयायाला दोन माणसें जुळणें. **एकाद्याचा डोळा ओळखणें** त्याचा आशय किं० अभिप्राय जाणणें किं० समजणें किं० ताडणें. **एकाद्याचा डोळा चुकविणें** १ त्यांच्या दृष्टीस न पडणें. २ त्याला न दिसूं देणें. **एकाद्यानें डोळयांत प्राण ठेवणें** मरावयाच्या आधी अमुक गोष्ट मला दिसावी अशी उत्कट इच्छा आसन्नमरण अशा मनुष्यानें करणें. **डोळाभर झोप** स्त्री० बरोबरशी झोप. **एकाद्यावर डोळे वटारणें**(किं० **उगारणें**)उग्र किं०कठोर दृष्टीनें त्याच्याकडे पाहाणें. **डोळा काणा असावा पण, मुलुख काणा असूं नये** शारीरिक व्यंग असलें तरी हरकत नाहीं पण आपण चालविलेल्या राज्यांत किं० संस्थेंत किं० कुटुंबांत अंधाधुंदीचा व्यवहार असूं नये. मागें ' काणा ' शब्द पहा. **डोळे उघडणें** (उघडणें सकर्मक) आपली स्थिति कर्तव्य, हिताहित, इ०कडे लक्ष्य देणें. (उघडणें अकर्मक) खरी स्थिति दिसूं लागणें किं० कळून येणें. **एकाद्याचा डोळा उघडेनासा होणें** किं० **एकाद्याचा डोळा उघडत नाहीं असा होणें** तो गर्वानें किं० श्रीमंतीच्या मदानें युक्त होणें; त्याला मगरूरी येणें. **पावसाचा डोळा उघडणें** पाऊस खळणें; सतत पडत असलेला पाऊस कांहीं काळ बंद पडणें. **एकाद्याचे डोळे उरफाटणें**(किं० **फिरणें**) अधिकाराच्या किं० श्रीमंतीच्या मदानें किं० वरिष्ठाची मर्जी त्याच्यावर असल्याकारणानें तो उन्मत्त होऊन जाणें. **डोळेगांगचीं कवाडें लागणें** अंधळें होणें. **एकाद्याचे डोळे चढणें** अमली पदार्थाच्या सेवनानें किं० उन्मदानें तो उग्र दिसणें. **डोळे चढवून बोलणें** रागानें किं० मगरूरीनें किं० उर्मटपणानें बोलणें. **डोळे जळणें** मत्सरामुळें दुसऱ्याचें बरें न पाहवणें. **एकाद्याचे डोळे जाणें** तो अंध होणें. **डोळे झाकणें** १ दुर्लक्ष्य करणें; उ० मुलाच्या वर्तनाकडे तुम्ही आज डोळे झांकले तर पुढें पस्तावाल. २ एकाद्या वस्तूकडे काणाडोळा करणें; ती पाहिलेली असून न पाहिली अशा रीतीनें वर्तणें. ३ मरणें. **एकाद्याचे डोळे ताठणें** तो गर्विष्ठ होणें; तो मदान्ध होणें. **डोळे तांबारणें** उग्र नजरेनें पाहाणें. **डोळे थंड होणें** (किं० **निवणें**) एकादी प्रिय वस्तु पाहून समाधान पावणें; इच्छिलेली वस्तु मिळाल्यानें आनंदित होणें. **डोळे निवळणें** १ डोळ्यांचा कांहीं रोग बरा झाल्यानंतर डोळे स्वच्छ किं० साफ होणें. २ ताळ्यावर येणें (वेड, नाद, व्यसन, इ० सुटून). **डोळे पठारास जाणें** आजार, उपास, अशक्तपणा, इ० कारणांनीं डोळे खोल जाणें. **एकाद्यानें डोळे पांढरे करणें** १ भीतीनें किं० घाबरल्यामुळें त्याचे डोळे पांढरे होणें; फार घाबरून जाणें, किं० गर्भगळित होणें. २ मरणाच्या द्वारीं येऊन पोचणें. **एकाद्याचें डोळे पांढरे करणें** त्याचे डोळे पांढरे होत तोंपर्यंत त्याला मारणें किं० शिक्षा करणें. **एकाद्याचे डोळे पांढरें होणें** अतिशय भीतीनें किं०

तीव्र शारीरिक यातनांमुळें किं० एकादें मोठें संकट प्राप्त झाल्यामुळें त्याच्या डोळ्यांचा वर्ण पांढरा होणें. **एकाद्याचे डोळे पाताळांत जाणें** अशक्तपणामुळें किंवा आजारामुळें त्याचे डोळे खोल जाणें. **एकाद्याचे डोळे पाहून वागणें** (किं० **चालणें**) त्याच्या मनाचा कल लक्ष्यांत घेऊन वर्तन करणें. **डोळे पिंजारणें** (किं० **पिंदरणें** किं० **फाडणें**) एकाद्या मनुष्याकडे डोळे वटारून पाहाणें किं०त्याच्याकडे उग्र नजर करणें. **एकाद्याचे डोळे पुसणें** त्याचें सांत्वन करणें. **एकाद्याचे डोळे फाटणें** १ त्याच्या मनांत मोठी आशा उत्पन्न होणें. २ तो आश्चर्यचकित होणें. **डोळे फाडणें** १ डोळे वटारणें. २ अंतकाळीं डोळे उघडे आणि निश्चल ठेवणें. **एकाद्याचे डोळे फिरणें** १ त्याला घेरी येणें. २ द्रव्यानें किं० अधिकारानें त्याच्या अंगीं मगरूरी येणें.३अंतकाळीं डोळे वटारले जाऊन ते निश्चल होणें.**डोळे फिरविणें** १ डोळे वटारणें. २ अंतकाल जवळ आल्यामुळें डोळे उघडून ते निश्चल करणें. ३ रागानें डोळे उग्र करणें. ४ नापसंतीची नजर करणें. **एकाद्याचे डोळे फुटणें** १ त्याला अंधता येणें. २ दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून तो मत्सरानें व्याकुळ होणें. **एकाद्याचे डोळे बांधणें** त्याच्या डोळ्यांवर फडकें गुंडाळून त्याला कांहीं न दिसेल असें करणें (अंधळ्या कोशिंबिरीच्या खेळांत). **डोळे भरून पाहाणें** तृप्ति होईपर्यंत एकादी सुंदर किं० प्रिय किं० आवडती वस्तु पाहाणें. **डोळे मुरडणें** वाकडी नजर करून पाहाणें. **डोळे मोडणें** १ डोळ्यानें कांहीं तरी खूण करणें. २ गर्वाची किं० मगरूरीची नजर करणें. ३ विलासी नजरेनें पाहाणें. **डोळे येणें** १ अंधता जाऊन पुन्हा दृष्टि प्राप्त होणें. २ डोळ्यांना रोगविशेष होणें. **डोळा लवणें** डोळ्याच्या पापणीचें स्फुरण होणें. **डोळ्यांच्या खाचा होणें** किं० **डोळयांचें खोबरें होणें** किं० **डोळयांची भिंत होणें** डोळ्यांची अवलोकनांची शक्ति अगदीं नष्ट होणें. **डोळयांचें पारणें फिटणें** उत्कंठेनें अपेक्षिलेली किं० इच्छिलेली वस्तु एकदाची पहावयास मिळणें. **एकादी वस्तु डोळयांत खुपणें** (किं० **सलणें**) ती पाहून मत्सर, द्वेष, वैर, इ० भावना उदीप्त होणें किं० उसळणें. **डोळयांत जहर उतरणें** दुसऱ्याचें वैभव पाहून मत्सरग्रस्त होणें. **डोळयांत तेल घालून क्रि० वि०** काळजीनें किं० खबरदारीनें. **डोळयांत तेल घालून जागणें** (किं० **रात्र काढण**) आजारी मनुष्याची काळजी घेण्यासाठीं झोप न घेतां बसून राहाणें. **एकाद्याच्या डोळयांत धूळ** (किं० **माती**) **घालणें** (किं० **फेकणें**) त्याला फसविणें. **एकाद्याच्या डोळयांत पाणी नसणें** त्याला बिलकूल लाज न वाटणें.**एकाद्याच्या डोळ्यांत पाणी असणें** त्याला लाज वाटणें. **डोळयांत बोट घातलें** (किं० **खुपसलें**) **तरी दिसणार नाहीं इतका अंधेर** निबिड काळोख. **डोळयांत भरणें** फार फार आवडणें. २ महत्त्वाचा वाटणें. **डोळयांत माती पडणें** मत्सर वाटणें. **एकाद्याच्या डोळयांत न मावणें** (किं० **न समावणें**) त्याला पाहातांक्षणीं गर्भगळित न होणें; त्याला न भिणें.**डोळयांत वात घालून बसणें** जागत बसणें. **डोळयांत शरम नसणें** निर्लज्ज असणें.**डोळयांनीं उजाडणें** सारी रात्र जागून काढणें किं० घालविणें. **दुसऱ्याच्या डोळयांतलें कुसळ दिसतें पण स्वताच्या डोळयांतलें मुसळ दिसत नाहीं** दुसऱ्याची क्षुल्लकही चूक आपणाला झटकन् दिसते पण आपला दोष मोठा असला तरी दिसत नाहीं. **डोळे मारणें** डोळ्यांच्या खुणांनीं आपला अभिप्राय दुसऱ्याला गुप्त रीतीनें कळविणें. **डोळयांनीं रात्र** (किं० **उजाडणें**) एकसारखें जागत बसून रात्र (किं० दिवस) घालविणें. **उघडया डोळयांनीं क्रि० वि०** जाणून बुझून; फसगतीनें नव्हे. **एकाद्याच्या डोळयावर धूर येणें** तो अधिकारानें किं० संपत्तीनें फुगून जाणें किं० उन्मत्त होणें. **डोळयावर येणें** १ डोळ्यांत सलणें; असह्य होणें. २ उघडकीस येणें. **एकाद्याच्या डोळयांशीं डोळा मिळविणें** त्याच्याकडे उद्धटपणानें टक लावून पाहात राहाणें. **डोळयाशीं डोळा लागणें** थोडीशीं झोंप येणें. **डोळा लागणें** थोडीशी झोप लागणें किं० येणें. **दोहो डोळयांची सुरवत राखणें** एकाद्याकडे पाहावयाला भिणें किं० कचरणें. **दोन डोळयांची भीड** माणूस समोर उभें आहे तोंपर्यंत त्याच्याविषयीं भीति, आदर, किं० प्रेम वाटणें आणि तें माणूस तेथून दुसरीकडे गेलें कीं त्याचें

स्मरणही नाहीं असें होणें; वरपांगीं भीति, आदर, किं० प्रेम. रुप्याचे डोळे होणे अंतकाळ आल्यामुळें डोळे पांढरे किं० निस्तेज होणें; मरणोन्मुख होणें. **डोळे ताणून पाहाणें** तीक्ष्ण नजरेनें किं० टवकारून पाहाणें. **डोळ्यापुढें काजवे येणें** भोंवळ येण्याची भावना होणें. **डोळ्यांवर कातडें ओढणें** एखाद्या गोष्टीकडे दुर्लक्ष्य करणें;ती पाहिली न पाहिली असें दाखविलें;ती मनावर न घेणें. **बाबाचा डोळा** रुपाया हें नाणें.भिक्षुक मंडळींच्या सांकेतिक भाषेंत बाबाचा डोळा किं०राम म्ह०रुपाया; सीताबाई म्ह० अधेली. चकारी म्ह० चवली; पकारी म्ह० पावली. तत्त्वमसि म्ह० द्रव्यलाभ. **डोळ्यांत केर आणि कानांत फुंकर** एके ठिकाणीं चुकी किं० न्यून आणि दुसऱ्या ठिकाणीं दुरस्ती किं० तजवीज करणें (हें हास्यास्पद होय). **डोळा न फुटे आणि काडी न मोडे अशा रीतीनें** १ कोणत्याही पक्षास वाईट न वाटेल किं० राग न येईल अशा रीतीनें; समतोल मनानें; न्यायबुद्धीनें; सौम्य उपयांनीं. २ काळजीपूर्वक; नाजूक हातानें. **डोळे पापी** सारें पाप किं० सारा खोडसाळपणा काय तो डोळ्यांचा असतो. आपल्याला न कळतां पुष्कळ भलभलत्या गोष्टी होत असतात त्या आपणाला चालतात आणि खपतात परंतु एखादी क्षुल्लक गोष्टही जर आपल्या डोळ्यांदेखत घडली तर ती आपणास खपत नाहीं. **डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच** (किं० **इतक्यांत**)अगदीं थोड्या अवधींत. डोळ्याचें पातें एक वेळ लवविण्यास जितका वेळ लागेल तितक्या वेळांत म्हणजे अत्यल्प काळांत. **कान आणि डोळे यांच्यांत चार बोटाचें अंतर** पाहिलेली आणि ऐकिलेली गोष्ट यांच्यांत केव्हां केव्हां अंतर असतें; ऐकिलेली गोष्ट पुढें खोटी ठरण्याचा संभव असतो पण पाहिलेली गोष्ट सर्वथैव खरीच असते. **दुसऱ्याच्या डोळ्यांत मुसळ किंवा बोट शिरतें** दुसऱ्याच्या दोषांवर टीका करावयाला मनुष्य एका पायावर तयार असतो. **डोळे उजेडीं क्रि० वि०** १ दिवसाचा उजेड आहे तोंपर्यंत. २ स्पष्टपणें; कांहीं लपवून न ठेवतां. **डोळेझाक, डोळेझाकी स्त्री०** न पाहिलें असा बाहाणा करणें. **डोळेफोड स्त्री०** १ बारकाईची तपासणी. २ त्रासदायक पाहणें. ३ बारीक अक्षरांचें पुस्तक वाचण्याचे कष्ट. **वि०** १ डोळ्यांना त्रासदायक. २ स्पष्ट आणि ठळक (अक्षर,चित्र). **डोळेभेट स्त्री०** १ ओझरतें अवलोकन. २ मरणापूर्वीची भेट. **डोळेमोड स्त्री०**डोळ्यानें केलेली खूण किं० इशारत. **डोळ्याचा मद पु०** डोळे गुंजेसारखे लाल होणें. **डोळ्यांतलें काजळ चोरणारा** अट्टल चोर.

डौ पु० मागें ' डव ' पहा.

डौक, डौख स्त्री० धान्यादिकांत हात खुपसून घेतलेलें धान्यादि. [वैर (धरणें, राखणें).

डौंक [सं० दंश] पु० आकस; द्वेष; गुप्त

डौंकणें अ० क्रि० १ डोळे वटारून पाहणें. २ कामुक नजरेनें घोड्यानें घोडीकडे पाहाणें. इघोड्यानें दुसरा घोडा घोडीकडे पहात असतां त्याच्याकडे क्रोधानें पाहाणें. [चणें ' पहा.

डौचणी, डौचणें मागें ' डवचणी, ' ' डव-

डौर [सं० डमरू] पु० वाळूच्या घड्याळासारखें एक चर्मवाद्य. २ मोठ्या गलबतांवर नांगर ओढून घ्यावयाचा राहाट. ३ जोत्याचे दोन चिरे एकमेकांपासून सुटूं नयेत म्हणून जी लोखंडाची पट्टी त्या दोहोंना खिळविण्यासाठीं बसवितात ती. ४ दोन लांकडांना एकाशीं एक खिळवावयासाठीं ठोकलेली पट्टी.

डौरणें अ० क्रि० अंगावर दागिने खूप घालून नटणें. [पहा.

डौरा, डौहुरा मागें ' डवरा, ' ' डहुरा '

डौरी, डौर पु० डौर नांवाचें वाद्य वाजावणारा. ॐ**डौरी जोशी, डौऱ्या जोशी पु०** वर 'डाकोचा' पहा.

डौल [हिं०] पु०१वस्तूचा आकारविशेष.२ चालणें, बोलणें, हसणें इ० बाबतींतील कोणेकाची विशिष्ट तऱ्हा किं० लकब. ३ थाटमाट. ४ देखावा. ५ प्रतिष्ठा. ॐ **डौलदार वि०** दिसण्यांत सुंदर किं० सुबक. **डौलामिया पु०** नखरेबाज पुरुष, नटवा माणूस. **डौली वि०** १ छाकटा; थाटमाट करणारा. २ गर्विष्ट.

डौल न० १ मध्यें मध्यें कांहीं विशिष्ट शब्द आकडे, नांवें, इ० घालण्यासाठीं ज्यांत जागा रिकाम्या सोडिल्या आहेत असा लिहिलेला कागद; हुकुम,इ० लेखांत अशा रिकाम्या सोडलेल्या जागा प्रत्येक. ॐ **डौलपत्रक** मध्यें मध्यें नांवें, आंकडे, इ० भरावयासाठीं रिकाम्या जागा सोडून तयार केलेला जमाबंदी इ० चा खरडा.

ढ

ढ मराठी व्यंजनमालेंतील हें चवदावें व्यंजन आहे.

ढ वि० १ अक्षरशत्रु. २ अगदीं अडाणी; व्यवहारचातुर्य ज्यास बिलकूल नाहीं असा.

ढई स्त्री० १ जोराचा प्रयत्न; नेटाची खटपट. २ काम चालविण्याच्या बाबतींत चिकाटी. ३पाहुण्याचें एकाद्याला घरीं फार दिवस किं०चिकटपणाचें वास्तव्य (देणें, देऊन बसणें.)

ढक पु० १ घराचा किं० नदीच्या कांठाचा किं० टेंकडीचा कोसळून पडलेला भाग. २ ढग; मेघ.

ढंक वि० अवाढव्य; अति मोठा, उंच, किं० विशाल (घर, माणूस, झाड).

ढकल [म० ढकलणें] स्त्री० १ निष्काळजीपणाचें करणें; उडाणटप्पूपणा. २ करावयाचें काम लांबणीवर लोटणें. ❀ **ढकलगुजर,ढकलगुजारी, ढकलगुजर (–रा–) ण, स्त्री०, ढकलगुजारा पु०**कसेंबसे दिवस घालविणें; अडचणींत कशी तरी कालक्रमणा करणें. **ढकलचंद, ढकलाप्पा, ढकलनंद,ढकलनंदन, ढकल्या वि०** ढकलपट्टी करणारा; काम चांगलें होत आहे किंवा वाईट होत आहे याचा विचार न करतां काम रेटणारा. **ढकलपट्टी स्त्री०**ढकला ढकली करण्याचा प्रवृत्ति.

ढकलणें स० क्रि० १ दूर किं० बाजूला सारणें किं० लोटणें. २ कसेंबसें (कांहीं काम) रेटून संपविणें; (काम) उडवून देणें. ३ अडचणींतून कसे तरी (दिवस) घालविणें; (काल) कंठिणें. ४ ह्यानें त्याच्यावर व त्यानें ह्याच्यावर (कांहीं काम) कोलणें.

ढकली स्त्री० १ उतरणीवरून गाडी चालतांना बैलांच्या पायांना चाकें लागूं नयेत म्हणून जें लाकूड चाकांपुढें बांधतात तें. २ गाडीची गति बंद करण्यासाठीं जें लांकूड बांधतात तें.

ढकशी स्त्री० समुद्राचें पाणी ज्याच्यावर येऊन आपटतें तो निसर्गजन्य किं० मनुष्यकृत धक्का.

ढकां, ढक्का, धक्का पु० १ जोराचा आघात; जोरानें आलेला किं० लागलेला किं० दिलेला नेट किं० केलेला आघात किं० लावलेला जोर. २ दुर्दैवाचा हल्ला. ३ व्यापारांत बसलेली ठोकर (बसणें). ३ इजा, अपाय, हानि; उ०मुद्दलाला धक्का न लागेल असा व्यापार कर.

ढकार [म० ढक] पु० न० १ मोठा ढग; काळोखी पाडणारा ढग किं० मेघ. २ (नंदभाषेंत) एक हजार ही संख्या.

ढंकाळ वि० १प्रमाणापेक्षां अधिक उंच (माणूस, जनावर, पदार्थ). २ लांबटांग्या. ❀ **ढंकाल पार्वती स्त्री०** विशोभितः दिसण्या इतकी उंच अशी स्त्री.

ढकी, ढक्की, धकी, धक्की स्त्री०, ढकां, ढक्का, धक्का पु० १ जोराचा आणि आकस्मिक नेट किं० रेट (येणें, लागणें, बसणें, लावणें,देणें). २ व्यापारांत किं० व्यवहारांत आलेली किं० बसलेली ठोकर किं० झालेली हानि.

ढक्का [सं०] स्त्री० मोठा नगारा: नौबत.

ढग पु० मेघ.❀**ढगाळ वि०**मेघांनीं आच्छादित (आकाश).

ढंग [हिं०] पु० व्यसन; अयोग्य नाद; भलताच वर्तनाचा प्रकार. ❀ **आपल्या ढंगावर येणें** आपलें खरें आणि हिडिस रूप प्रकट करणें. **ढंग करणें, ढंग ढंग करणें** भलभलते नाद करणें. **ढंग धोत्र न०, ढंगधत्तूरा पु०** १ वेडे वेडे चाळे किं० चाळे. २ फसवेगिरी. **ढंगधोत्रेकरी पु०** १ जादुगार. २ झाडपाल्याचीं औषधें देणारा.

ढंगी, ढंग्या वि० १ वेडेवेडे चाळे करणारा. २ वात्रट,खोडकर.

ढंगड्या स्त्री० अ० व० भलभलत्या गोष्टी किं० चाळे (करणें, लावणें, मांडणें).

ढगढग, ढगढगां क्रि० वि० हालत हालत; झोंके खात खात; डुलत डुलत.

ढगढग स्त्री०बोभाटा; कोणेकाच्या वदकर्माची वाच्यता. ❀ **एकाद्याची ढगढग होणें**(किं० **वाजणें**) त्याचें बदकर्म चव्हाट्यावर येणें किं० जाहीर होणें.

ढगळ वि० १ मोठ्या आकाराचा.२ जिच्यावर मातींचीं ढिखळें फार आहेत अशी (नांगरलेली जमीन). ३ खचींक; सढळ हाताचा (चांगल्या अर्थानें); उधळ्या (वाईट अर्थानें).

ढगळ स्त्री० १ गुदद्वारें कांहीं आजारामुळें पडतो तो पातळ मळ किं० तो आजार. २ नासलेला भोपळा, कोहोळा, इ०मध्यें जो पातळ चोथा होतो तो. ३एक वृक्षविशेप.

ढंगळ वि० १ लांबटांग्या. २ प्रमाणापेक्षां अधिक उंच.

ढंगळणें अ० क्रि० १ गुदद्वारें पातळ मळ पडण्याच्या विकृतीनें जर्जर होणें. २ कोहळा, भोपळा, इ० नासून त्यांत चोथा पाणी होणें.

ढगळा पु० पर्णयुक्त लहान फांदी; टाहाळा.

ढगाड, ढगार [म० ढग] **न०** मोठा आणि काळा ढग.

ढंढेरा वि० ढेरपोट्या; ज्याचें पोट फार सुटलें आहे असा.

ढणढण, ढणांढणां क्रि० वि० मोठा प्रकाश पाडून (दिवा जळत असणें, चुलीत लांकडें पेटलेलीं असणें).

ढणढणणें अ० क्रि० १ खणखणणें. २ मोठा प्रकाश पाडून (दिवा) तेवत असणें किं० चुलीत (लाकडें)पेटत असणें.

ढणढणीत वि० प्रखर प्रकाश पाडणारा तेवत असलेला (दिवा).

ढणढण्णा पु० ज्याला अगदीं कांहीं विद्या नाहीं असा माणूस.

ढप, ढब स्त्री० १ कोणेकाची चालण्याची, बोलण्याची, हसण्याची विशेष तऱ्हा किं० लकब. २ पदार्थविशेषाची घडण किं० आकार. ३ ऐट; झोंक; वैभव; नूर. ꙮ **ढब (–प–)दार वि०**अल्प किंमतीचा असून दिसण्यांत सुंदर (दागिना, मोती, पात्र इ०).

ढपवाई, ढबवाई स्त्री० मागें ' डफ ' मध्यें पहा.

ढपला, ढपळा पु० लांकूड, भिंत, गुळाची ढेप, इ० चा पडलेला किं० पाडलेला मोठा खंड. अशा लहान खंडाला ' ढपली, ' ' ढपळी ' असें म्हणतात.

ढपळ, ढप्पळ न०, ढपळवणी स्त्री०बेतापेक्षां अधिक पाणी ज्यांत घातलें गेलें आहे असें ताक, आमटी, कढी, वरण, इ०. ꙮ **ढपळशाई (–ही) स्त्री०** बेतालपणानें खर्च करून राहाण्याची किं० वागण्याची सरणी; फाजील खर्च करण्याची प्रवृत्ति किं० तऱ्हा.

ढपळा पु०, ढपळी स्त्री० वर ' ढपला, ' ' ढपळा ' पहा.

ढब स्त्री० मागें ' ढप ' पहा.

ढबक न०, ढबका पु० फळ, गुळाची ढेप, इ० चा मोठा खंड (पडलेला किं० पाडलेला).

ढबुला वि० गोटीदार; ठेंगणाठुसका; गुटगुटीत.

ढबू, ढब्बू, ढबूक पु० दोन पैसे किंमतीचें तांब्याचें नाणें. ꙮ **देखण्यांत ढब्बू चालण्यांत शिवराई** १ शक्तिहीन लठ्ठ माणूस; दिसण्यांत सुंदर आणि हुशार परंतु बुद्धिहीन आणि कर्तृत्वशून्य माणूस. २ दिसण्यांत ठसठशीत पण लेचापेचा (पदार्थ,–पलंग, कपाट, पेटी, इ०).

ढमकें, ढमढमें न० ढमढम आवाज करणारें डफ इ० वाद्य.

ढमाई स्त्री० लठ्ठ आणि ठेंगणी मुलगी.

ढमाल, ढमाल्या वि० लठ्ठ आणि ठेंगणा (माणूस); ढेरपोट्या. ' ढमाली ' हें स्त्रीलिंगी रूप.

ढलपा पु०, ढलपी स्त्री०, ढलपट न० भिंतीचा गिलावा, लाकूड, गुळाची ढेप, इ० चा पडलेला किं० काढलेला खंड. ꙮ **आठ हात लाकूड आणि नऊ हात ढलपी** फाजील अतिशयोक्तीचा प्रकार निंदावयाचा हा वाक्प्रचार आहे.

ढवऊ न० पदार्थाचें अर्धुक.

ढवढव स्त्री० १ अव्यवस्था. २ बोभाटा. 'ढवढववाडा ' **पु०** असाही ह्या अर्थी शब्द आहे.

ढवढवणें अ० क्रि० १ आरंभिलेलें कार्य फसणें; योजलेला बेत ढांसळणें. २ बुडणें, नष्ट होणें, गमावणें; उ० त्याची मामलत ढवढवली.

ढंवढाळ न० १ नाना प्रकारच्या खटपटी लटपटी समुच्चयानें; हरएक प्रकारचा खटाटोप किं० व्याप. २ संसाराचा व्याप; प्रपंचाचें खटलें. ꙮ **ढंवढाळ्या वि०** खटपटी लटपटी करणारा; उलाढाली करणारा.

ढवळणा पु०, ढवळणें न० [म० ढवळणें] लाह्या करण्यासाठीं जोंधळे, बाजरी, इ० धान्यें

पात्रांत घालून तीं ढवळण्यासाठीं जो लांकडाचा घेतात तो दांडा,—ह्याच्या एका टोकाला चिंध्या बांधून तें टोक मऊ आणि चेंडूसारखें वाटोळें केलेलें असतें; घाटणा.

ढवळणें स० क्रि० १ पदार्थाचे कण किंवा परमाणु हालवून इकडचे तिकडे आणि तिकडचे इकडे, खालचे वर आणि वरचे खालीं करणें; हालविणें. २ व्यवस्थित पदार्थ अव्यवस्थित करणें. ३ कामाचा विचका करणें. **अ० क्रि० किं०भाव-कर्तरि** आजारानें पोटांत अस्वस्थता उत्पन्न होणें; प्रेमादि मनोविकारानें अंतःकरण आक्रान्त होणें; उ० माझ्या पोटांत ढवळतें. ॐ **ढवळाढवळ स्त्री०** अव्यवस्था; गोंधळ; गल्लद.

ढवळा [म० ढवळणें] **पु०** घोटाळा; अव्य-वस्था; नासाडी (कामाची, बेताची).

ढवळा [सं० धवल] **पु०** पांढऱ्या रंगाचा. ॐ **ढवळ्या शेजारीं पोवळा बांधला वाण नाहीं पण गुण लागला** चांगल्या माणसाच्या सहवा-साला वाईट माणूस राहिला असतां चांगल्याचे चांगले गुण वाइटास न लागतां चांगल्याच्या अंगीं जो एकादा वाईट गुण असेल तेवढा मात्र तो मनुष्य चटकन् उचलतो. वाण म्ह० उत्तम जाति. गुण म्ह० दुर्गुण.

ढवळी स्त्री० एक वनस्पतिविशेष.

ढवा पु० १ नपुंसक; षंढ. २ कलावंतिणीचा सांजिंदा. ॐ **मिणमिणीत दिवा, कृपणाचा केवा, गाजराचा मेवा, आणि हिजड्याचा ढवा, हे चार निरुपयोगी** प्रकाश अत्यल्प देणारा दिवा, चिक्कू माणसाचा पैसा, गाजराचें पक्वान्न, आणि षंढाची सोबत, ह्या चार गोष्टी असून नसून सारख्याच.

ढवाळ इ० ' टवाळ ' इ० पहा.

ढसळ, ढसाळ, ढसर, ढस्सर वि० खर्चीक; उदार; सढळ हाताचा. ॐ **हाताचा ढसळ** औदार्यानें खर्च करणारा.

ढसढस, ढसांढसां, ढसांढस, ढसासां क्रि० वि० आवेशानें,जोरानें (रडणें किंवा पिणें).

ढसळणें, ढसाळणें पुढें ' ढासळणें ' पहा.

ढसासणें स० क्रि० बारदानांत पदार्थ चेपून भरणें. ॐ **ढसासून भरणें** बारदानांत पदार्थ चेपून चेपून कोंबणें. **अ० क्रि०** मोठमोठे घोट घेऊन पिणें.

ढळ [म० ढळणें] **पु०** १ स्थानापासून च्युत होण्याची किंवा सरकण्याची क्रिया. २ भ्रंश; च्युति. ३ चुकी; दोष; आपल्या कामांत केलेली चुकी; उ० माझ्या कामांत कधीं ढळ पडावयाचा नाहीं.

ढळढळ (–ळां) क्रि० वि० १ जोरानें किंवा ओकसा बुकशीं (रडणें). २ झळझळीत प्रकाश पडेल अशा रीतीनें (दिवा तेवणें, अग्नि पेटणें).

ढळढळीत वि० १ खूप प्रकाश पाडणारा (तेवत असलेला दिवा). २ स्पष्ट दिसणारें (अक्षर, आकृति, चित्र). ३ ज्याबद्दल संशय राहावयाला जागा नाहीं असा (पुरावा,अपराध).

ढळणें अ० क्रि० १ स्थानापासून भ्रष्ट होणें; सरकणें. २ कर्तव्यापासून दूर सरणें. ३ ढासळणें (प्रकृति). ४ मार खाणें; कचरणें. ५ लक्ष्याला न लागणें (बाण, धोंडा). ६ देवादिकांवर वारलीं जाणें (चवरी, पंखा, मोरचेल, इ०). ७ कलणें, वाकडा होणें. ८ (नियम,कायदा, विधि, इ०) मागें पडणें किंवा न पाळला जाणें.

ढळता [म० ढळणें] **वि०** गिऱ्हाईकाचा फायदा होईल अशा रीतीनें कललेला (कांटा, तराजू, इ०).

ढळपा पु०, ढलपी स्त्री० लाकूड, दगड, भिंतीचा गिलावा, इ०चा उडालेला किंवा उडवि-लेला खंड किंवा कळपा.

ढळाढळ (–ळां) क्रि० वि० मोठमोठे अश्रु-बिंदु टाकून (रडणें).

ढळेपंज [हिं०] **वि०**फार म्हातारा(घोडा).

ढांक न०, ढांकळ स्त्री० १ जुनाट वृक्ष. २ २ ज्याचीं पानें झडून गेलीं आहेत असें झाड.

ढांक न० वई,कुंपण,इ० साठीं पुरलेले झाडाचे सोट प्रत्येक.

ढांक वि० अवाढव्य, अगडबंब (झाड, घर, मनुष्य,प्राणी).

ढांकण, ढांकणी, ढांकणें मागें ' झांकण, ' ' झाकणी, ' ' झांकणें ' पहा.

ढांकळ, ढांकूळ वि० १ जुनाट (वृक्ष). २ शाखापर्णरहित (वृक्ष). ३ लांबटांग्या; ह्या अर्थी

' ढांगळ ' असाही शब्द आहे.

ढांकें न० लठ्ठ आणि मजबूत काष्ठखंड. मागें ' ढांक ' पहा.

ढांग [**हिं०**] **स्त्री०** १ एका पावलानंतर टाकलेलें दुसरें पाऊल. २. टाकलेल्या दोन पावलांमधील अंतर. ३ उभे राहिलेल्या माणसाच्या दोन मांड्यांतील अंतर; उ० त्यानें चोराला ढांगेत आवळिलें. ४ तंगडी, तंगड.

ढांगर न० वृक्ष, वेली, इ० ना आधारार्थ दिलेला खांब किं० लाकडाचा सोट .

ढांगळ, ढांगाळ वि० १ लांब लांब पावलें टाकून चालणारा;लांबटांग्या. २ अवाढव्य;प्रमाणापेक्षां मोठा असल्यामुळें विशोभित (माणूस,पदार्थ).

ढांगळणें स० क्रि० कोणेकास तुच्छतेनें वागविणें किं० त्याला हिडिसफिडिस करणें.

ढांचिंद्रं, ढांचिंदुचें न० कोणी विचारलेल्या प्रश्नाला दिलेलें विसंगत किं० धरसोडीचें उत्तर. **क्रि० वि०** विसंगतपणें (बोलणें, उत्तर देणें).

ढांडळ, ढांडाळ, धांढळ वि० १ लठ्ठ आणि उंच असें (जोंधळ्याचें ताट). २ अतिशय उंच आणि विशोभित दिसणारा (कांहीं पदार्थ).

ढाढी [**हिं०**] **पु०** मुसलमान गाणारांची एक जात.

ढांढोरा, ढांडोरा, ढांगोरा [**हिं०**] **पु०** ढोलकें इ० वाद्य वाजवून कांहीं गोष्टी सर्व लोकांस जाहीर करण्याची क्रिया (पिटणें).

ढांढुळणें [**सं०** ढुंड्=तपासणें, शोधणें] **स० क्रि०** (पाहिजे आहे ती वस्तु) इकडे तिकडे शोधणें किं० हुडकणें;(पाहिजे आहे ती वस्तु जेथें असण्याचा संभव आहे ती जागा) शोधणें किं० काळजीपूर्वक तपासणें; उ० जरीकांठीं खणासाठीं मी सगळी पेटी ढांढुळली; उ०त्या पेटींत मी जरीकांठीं खण ढांढुळला.

ढाण न० १ घरात पाणी सांडून होतो तो चिखल. २ फळें, शरीर, इ० वरचा डाग. **क्रि० वि०** अत्यंत, फार; उ० आंबटढाण. **टीप,**—हा शब्द विशेषणाच्या पुढें येतो. **वि०** ओलें (वस्त्र,सर्पण, इ०).

ढाणक पु० महार, मांग,इ० हलक्या जातीचा इसम. ॐ **ढाणकास देणें** (किं० **टाकणें**) त्याज्य किं० अप्रिय म्हणून टाकणें,परित्यागणें,किं० फेकून देणें. **ढाणकास जाणें** १ मसणांत जाणें (वेतागांत). २ नाश पावणें.

ढाणकस वि० लठ्ठ, दणगट, मजबूत,धिप्पाड.

ढाणें न० फळें, शरीर, इ०वरील डाग किं० चट्टा.

ढाण्या वि० १ अत्यन्त आंबट (आंबा, ताक). २ ठिपकेदार (चित्ता, वाघ, सर्प). ॐ **ढाण्या वाघ पु०** चित्ता.

ढांपण न०, ढांपणी स्त्री० [**म०** ढांपणें] १ झांकण, आच्छादन. २ घाण्याभोंवतीं फिरणाऱ्या बैलांच्या डोळ्यांस घालतात तीं झांकणें.

ढांपणी [**म०** ढापणें] **स्त्री०** १ झाकणें किं० झांकण्याची क्रिया. २ झांकण. ३ लपाविणें किं० लपवण्याची क्रिया.

ढांपणें [**हिं०**] **स० क्रि०** १झांकणें,आच्छादणें. २ लपविणें. ३ कांहीं गोष्ट दडपून टाकणें किं० जाहीर न होऊं देणें.

ढांपणें न०, ढांपा पु० [**हिं०** ढापना] झांकण, आच्छादन.

ढापा पु० मोठें पसरट कौल (भिंतीच्या माथ्यावर घालावयाचें).

ढाल [**सं०** ढाल] **स्त्री०** १ शस्त्रापासून बचाव व्हावा म्हणून चर्मादिकांची वाटोळी तबकडीपुढें धरतात ती. २ सैन्य कूच करीत असतां पुढें जें उंच निशाण चालवितात तें. ३ किल्ल्यांवर जें उंच फडकत असतें तें निशाण. ४ गळ्याचें पुढें आलेलें दिसतें तें हाड.५ (लाक्षणिक)गांवाची किं० संस्थेची आवरू राखणारा कोणी माणूस;ज्याच्यावर भिस्त ठेवितां येईल असा माणूस;वाली. **न०** स्त्रीचें धिटाईचें किं० मर्दुमकीचें कांहीं कृत्य . ॐ **ढाल देणें** १ संग्रामाला सिद्ध होऊन राहणें. २ संग्रामाला कोणेकाला आव्हान करणें. **कोणेकाला उलटी ढाल देणें** (किं०**दाखाविणें**), **ढाल उलटणें** (किं०**फिरावणें**)१त्याच्याविरुद्धउठणें.२त्याच्याशीं कृतघ्न होणें. **ढालगज** [**म०** ढाल+गज=हत्ती)] **वि०**उद्धट,निर्लज्ज,लुब्रा,अचरट. **ढालगज भवानी स्त्री०** वेडेवेडे चाळे करणारी स्त्री; अजागळ स्त्री. **टीप,**—प्राचीनकाळीं शत्रूच्या किल्ल्याचें दरवाजे किं० भिंती फोडण्याच्या कामीं डोक्यांना ढाली

बांधलेल्या हत्तींना त्यांचेंवर डोक्याचे रट्टे मारायाला योजीत असत यावरून 'ढालगज' हा शब्द उत्पन्न झाला. आमचे मराठी भाषेचें "वाक्प्रचार,म्हणी, इ० " लेखांक ११३३ पहा. **ढालकरी पु०**१कोणा-सरदाराची ढाल (ध्वज) वाहाणारा शिपायी. २ कुटुंबाची किं० संस्थेची जबाबदारी वाहाणारा मनुष्य. **ढालाईत पु०** १ बड्या माणसाच्या स्वारींत ढाल वाहाणारा हुजऱ्या. २ सैन्याचा ध्वज वांहाणारा. **ढाल्या वि०** १ ढाल वाहाणारा. २ नाना प्रकारच्या उलाढाली करणारा.

ढास, ढांस स्त्री०कोरड्या खोकल्याची उसळी (माणसें, जनावरें, यांना लागते ती; **क्रि०** लागणें). ॐ **ढासरा वि०**ढास ज्याला लागली आहे असें (माणूस, जनावर).

ढास किं० नापीक (जमीन, शेत).

ढांस पु० सर्पादींनीं केलेला दंश किं० घेतलेला चावा किं० त्या दंशाची किं० चाव्याची जागा.

ढांसण न० १ आधार; आश्रय. २ आश्रय देणारा. ३ ऐन समय; आणीबाणीची वेळ. ४कांहीं कार्यार्थ ठरविलेलें स्थळ.

ढांसणी, ढासणी [म०ढासणें] **स्त्री०**कोरड्या खोकल्याची लहर किं० उमळी (लागणें,राहणें).

ढांसणें, ढासणें अ० क्रि० १ खोकणें. २ गर्जना करणें.

ढासण्या स्त्री० अ०व०गाडीचे वेगवेगळे भाग बांधावयाच्या दोऱ्या.

ढासरा पु० १ धक्का; जोराचा तडाखा. २ अप्रिय किं० अशुभ गोष्टींचा मनाला बसलेला धक्का किं० दहशत किं० वाटलेली खंती (धरणें, घेणें, बाळगणें, काढणें); उ० पोरानें आईचा ढासरा धरला.

ढासळणें अ० क्रि० १ नीट रचून ठेविलेला पदार्थ कोसळून पडणें. २ चांगली प्रकृति कायमची बिघडणें; उ० मला आमांश झाला तेव्हांपासून माझी प्रकृति ढासळली. **स० क्रि०**(नीट रचिलेला पदार्थ) विस्कळित करून पाडणें.

ढाळ [**म०** ढाळणें] **पु०** १ पोटांतील मळ पातळ होऊन गुदद्वारें जोरानें बाहेर पडतो तो. २ तसा मळ पडावा म्हणून जें औषध घेतात तें. ३ नोकर इ० कांची केलेली हकालपट्टी; त्यांना कामावरून काढून टाकणें; उ० मी आपल्या परटास ढाळ दिला. ४ मौक्तिकावरील जो तेजोविशेष तो. ५ उतरण; उतरतेपणा; कल. ६ दागिना, पात्र, इ० चा घाट. ७ पारिपाठ. ॐ **नोकराला ढाळ देणें** त्याला कामावरून काढून टाकणें. **एकाद्याच्या ढाळाखालीं पडणें** (किं० **ढाळीं पडणें**) त्याच्या सोयीचा किं० मनाजोगा होणें. **ढाळ पडणें** (किं० **लागणें**) कांहीं शिस्त अंगवळणीं पडणें. **ढाळ उखाळे पु०** हगणें आणि ओकणें ह्या एकदम झालेल्या विकृति (होणें, चालणें).

ढाळक न० रेच करणारें औषध.

ढाळणी [**म०** ढाळणें] **स्त्री०** १ नांगरलेल्या शेताचा पृष्ठभाग सारखा करणें. २ पंखा, चवरी, इ० कोणेकाच्या डोक्यावर वारणें किं० हलविणें.

ढाळणें [**म०** ' ढळणें 'चे प्रयोजक] **स० क्रि०** १ (पंखा, चवरी इ०) देव किं० राजा किं० कोणी बडा माणूस यांच्या डोक्यावर हालविणें किं० फिरविणें. २ (अश्रु) डोळ्यांतून बाहेर गाळणें; उ० त्याचें मरण ऐकून सर्वांनीं अश्रु ढाळले; उ० माझ्या आईसाठीं मी पुष्कळ वर्षें अश्रु ढाळले. ३ नांगरलेल्या शेतांतील डिखळें फोडून तें साफ करणें. ४ मोत्यानें आपलें तेज पसरणें. **अ० क्रि०** १ पातळ मळ गुदद्वारें जोरानें विसृष्ट करणें; उ० तें मूल सकाळपासून आतांपर्यंत नऊ वेळां ढाळलें. २ डोळ्यांतून पाणी गळणें; उ० माझे डोळे आलीकडे फार ढाळूं लागले आहेत.

ढाळा पु० १ झाडाची तोडलेली पर्णयुक्त शाखा. २ हरभरा, वाटाणा, लांक, इ० चें रोप.

ढाळी स्त्री० झाडांची फांदी. ॐ **धरायाला नाहीं ढाळी** (किं० **डाहळी**)**आणि बसायला नाहीं सावली** माणें ' डाहाळी ' मध्यें पहा.

ढाळू [**हिं०**] **वि०** बहुतेक भिंतीसारखी (चढण); अति कठिण (चढण).

ढाळ्या पु० कळीला पुरवणी दाखल जोडलेलें छप्पर.

ढाळ्या पु० दवंडी पिटण्याचें काम करतो तो.

ढिकळी, ढिकुळी [**म०**ढाग] **स्त्री०**१ भाताचा

शितें एकमेकांना चिकटून झालेला गोळा. २ नास-लेल्या दह्याचा गट्टा. ३ जमीनीवर गोठलेल्या रक्ताचा गोळा.

ढिगर, ढिगार, डिगारा [म० ढीग] **पु०** माती, गवत, लाकडें, इ० चा ढीग, किं० रास.

ढिंगी स्त्री० टेकण, आधार (देणें, लावणें).

ढिपळ, ढिपूळ न० माती, शेण, इ०चा गोळा किं० गोटा.

ढिम, ढिम्म स्त्री० १ स्तब्ध(बसणें, राहणें); उ० कोणी कांहीं (किं० कितीही) बोला, हा आपला ढिम्म बसतो. २ यत्किंचित सुद्धां परिणाम घडून झालेली हालचालीची प्रवृत्ति (अकरणरूपी प्रयोग); उ० मी त्याला इतकें रागें भरलें पण त्याला ढिम्म झालें नाहीं (किं० त्याणें ढिम खाल्ली नाहीं).

ढिमा पु० १ नदीच्या प्रवाहांतील कोरडें स्थळ (बेटासारखें). २ टेकाड, जमीनीचा उंचवटा.

ढिमा वि० ज्याच्या हालचाली अति संथपणाच्या असतात असा; धिमा. [भाग.

ढिमोरा पु० पशूच्या शेपटीकडचा कण्याचा

ढिरा, डिरा पु० १ झाडाची कोंवळी फांदी. २ फांदीचें कोंवळें टोक. ३ फांदीचा अंकुर. ४ गवताची पेंडी बरावर चढलेल्या शाकारणाऱ्याच्या हातांत द्यावयाची आंकडेदार कांठी.

ढिरी [म० ढिरा] **स्त्री०** १ कोंवळी फांदी. २ पानांचा किं० फांदीचा अंकुर. ३ बाल्यावस्थेंतील फुलांचा अंकुर.

ढिलता, ढिला [हिं० ढीला] **वि०** १ सैल, अघळपघळ (कपडा इ०). २ कर्तव्याकडे फारसें लक्ष्य न देणारा. ३ ज्यांत विशेष चौकशी किं० त्वरा नाहीं असा (कारभार). ॐ **ढिला कुमाईत पु०** १ अशक्त घोडें; घोडकूल. २ गांडू, भितरा. **ढिला माल पु०** १ कर्तृत्वशून्य माणूस; पुचाट; गांडू. २ भिकार पदार्थ. **ढिली दोरी स्त्री०** सौम्य प्रकारची नियंत्रणा; करडा नव्हे असा अमल (देणें, सोडणें). **कांसोट्याचा ढिला वि०** निःशंकपणें जारकर्म करण्यास प्रवृत्त होणारा. **कमरेचा ढिला वि०** नपुंसक; षंढ.

ढिलाविणें [म० ढिला] **स० क्रि०** सईल करणें.

ढिल्या वि० १ ज्याचें शरीर अति पोकळ, सैल, किं० थिलथिलीत असा. २ जो आपलीं कामें अति संथपणें किं० फारशी काळजी न वाहतां चालवितो असा.

ढिल्ली [हिं०] **स्त्री०** १ करावयाच्या कामांत अक्षम्य दिरंगाई (करणें, पाडणें). २ कामांत चालढकल; काम कसें बसें करण्याकडे प्रवृत्ति किं० करण्याची तऱ्हा. ३ कोणेकाला कांहीं बाबतींत दिलेली सवलत.

ढिवर, ढीवर [**सं०** धीवर] **पु०** मासे पकडणाऱ्या कोळ्यांची जात किं० त्या जातीचा इसम.

ढिसळ, ढिसाळ वि० १ औदार्यानें पैसे खर्च करण्याकडे प्रवृत्ति ज्याची असा; सढळ हाताचा; खर्चीक. २ आकारानें मोठा पण लेचापेचा किं० अशक्त.

ढिसळ, ढिसाळ, ढिसर, ढिसूळ वि० १ मऊ हिराचें लांकूड; लवकर मोडणारा किं० फुटणारा. २ आकारानें मोठा पण अशक्त (माणूस, पशु).

ढिसळणें, ढांसळणें, अ० क्रि० नीट रचून ठेविलेला पदार्थ घसरून पडणें (विहिर, घर, इ०).

ढिसा पु० सुंदर पिसाऱ्याचा एक पक्षी,—हा मासे खातो.

ढीग पु० १ रास (धान्यादिकांची). २ पदार्थविशेषाचें मोठें प्रमाण, रेलचेल, वैपुल्य, इ०. **वि०** पुष्कळ, मनमुराद, विपुल. ॐ **ढीग करणें** मोठा प्रयत्न करणें. **ढीग घालणें (पाडणें, लावणें)**. शतकृत्य करणें (उपहासांत किं० वैतागांत).

ढील वि० १ सैल. २ बेफिकीर; गाफील.

ढील [**हिं०**] **स्त्री०** १ सईलपणा. २ कामांत कुचरपणा (होणें, असणें). ३ कामांत दिरंगाई (करणें, लावणें, मांडणें). ॐ **कोणेकाला ढील देणें** त्याला त्याच्या तंत्राप्रमाणें किं० सोयीप्रमाणें वागावयाला मोकळीक देणें. **कामाला ढील पडणें** तें कसेंबसें केलें जाणें; तें घाईघाईनें संपविलें जाणें.

ढील [**हिं०**] **न०** १ ढेरपोट. २ (उपहासांत) अवाढव्य, फार मोठा (पदार्थ, माणूस); उ० हें केवढें तरी ढील हो !

ढीवर वर ' ढिवर ' पहा.

डुंकून [म० डुंकणें] क्रि० वि० डोकें पुढें करून, आदरबुद्धीनें (अकरणरूपी प्रयोग); उ० त्यांणीं आहेर आणला त्याच्याकडे गोदूबाईनें डुंकून सुद्धां पाहिलें नाहीं.

डुंग,डुंगण,डुंगाड न०दोन कुल्ले जोडीनें; कंबर आणि मांड्या यांच्यामधला शरीराचा भाग.॰**डुंगणाचें सोडून डोकीस गुंडाळणें** लाज सोडून वागणें. **तोंडाच्या बाता डुंगाड खाय लाता** निर्लज्जपणें बढाई मारणें; आपली फजीती झाली तरी लोकांची मी फजीती केली असें म्हणणें. **डुंगणावर आपटणें** १ आपल्या कांहीं चुकीमुळें नुकसान पावणें किं० ठोकर खाणें. २ कोणेकाकडून फसविलें जाणें. **कोणेकाचें डुंगणास हात पोंचणें** वडील माणसांचा दाब किं० नियंत्रणा झुगारून देऊन त्यानें स्वच्छंदानें वागणें. **डुंगणमोडें इरलें न०** जें इरलें डोक्यावर घेणारा मनुष्य ओणवला असतां तें डुंगणावर वळून मांड्याच्या मागची बाजू पावसापासून राखितें तें. **डुंगणमोडें न०** एक प्रकारची मुंगी.

डुंडाळणें, डुंढाळणें मागें ' ढांढुळणें पहा.

डुड्डाचार्य, डुड्डाचार्यं [**कानडी** दोड्ड आचार्य मोठा गुरु, श्रेष्ठ गुरु] **पु०** नसतां मोठेपणा आपणाकडे ओढून घेऊन प्रौढी मिरविणारा माणूस; शेखोजी मिरे (उपहासांत). ' ढड्ढाचार्य ' हें 'डोड्डआचार्य,'ह्या शब्दाचें अन्य रूप आहे;त्याचा अर्थ अगदीं अविद्य किं० निरक्षर.

डुबा पु० लहानशी टेंकडी;जमिनीचा उंचवटा.

डुमकें, डुमडुम, डुमडुमें न० मुलांचा वाजवावयाचा डफ.

डुमणी स्त्री० १ दूध पितांना मातेच्या कांसेस वासरूं डोक्यानें जो धडाका देतें तो. २ वासरानें शिंगें फुटावयाच्या अगोदर डोक्यानें मारलेला रट्टा.

डुशी, डुश्शी स्त्री० १ दिलेला धक्का. २ डोक्यानें मारलेला रट्टा.

डुस, डुस्स क्रि० वि० काळेपणाचा गडदपणा दाखविण्यासाठीं ' काळा 'च्या पुढें योजावयाचा हा शब्द आहे; उ० तुझा हालवा काळा डुस्स झाला आहे.

डुसकणी स्त्री० डोक्यानें किं०कोपरानें मारलेला रट्टा.

डुसकणें स० क्रि० १ खुपसणें. २ डोक्यानें किं० कोपरानें तडाखा मारणें.

डुसकी [म० डुसकणें] **स्त्री०** १ डोक्यानें किं० कोपरानें मारलेला किं० दिलेला रट्टा. २ वासरानें दूध पितांना मातेच्या कांसेस दिलेला किं० मारलेला तडाखा.

डुसणें स० क्रि० खुपसणें; घुसविणें. **अ० क्रि०** डोकें पुढें करून घुसणें.

डुसा, डुस्सा पु०मुठीचा रट्टा; गुद्दा(मारणें).

डुशी, डुसी [**म०** डसणें] **स्त्री०** डोक्यानें किं० कोपरानें मारलेला रट्टा.

डुस्स वर ' डुस ' पहा.

ढेक स्त्री० १ बैलाची गर्जना; डुरकणी.२ओरडा आरडा (फोडणें). ३ कोणेकावर ओरडून केलेला गहजब.

ढेकणी, ढेंकणी स्त्री० १ ढेकूण बसावयासाठीं असंख्य भोकें पाडलेला लाकडाचा तुकडा,–गादी इ० च्या शेजारीं ठेवतात तो. हा तुकडा जमिनीवर ठोकून त्यांतून पडलेले ढेकूण मारून टाकले जातात. २ ढेकणाची आई.

ढेकणी, ढेंकणी स्त्री० कोष्टयाच्या मागाचा एक अवयवविशेष.

ढेकणें, ढेंकणें अ० क्रि० कोणेकाच्या अंगावर ओरडणें किं० त्याला रागें भरणें.

ढेकर, ढेंकर, ढेंकूर स्त्री० उदरांतून तोंडावाटें बाहेर पडतो तो वायु. ॰**कोणेकाचा पैसा खाऊन ढेकर देणें** तो अप्रामाणिकपणानें खाऊन पचविणें किं० जिरविणें.

ढेंकळ, ढेकळ, ढेंकूळ, ढेकूळ न० मातीचा खंड; शेणाचा खंड. ॰**ढेकळाप्रमाणें विरणें** (किं० **विरघळणें**) फजीती उडाल्यामुळें लज्जित होणें किं० शरमणें.

ढेकळी, ढेकुळी, ढिकळी स्त्री० १ भाताचीं शितें एकमेकांना चिकटून झालेला लध्धा किं० गोळा. २ कोणत्याही पदार्थाचे कण एकाला एक चिकटून झालेला गोळा.

ढेंकी [हिं०] **स्त्री०** चुना कुटण्याचें किं० पोहे करण्याचें एक साधन. एक तुळई मध्यबिंदूवर फिरणारी असून तिचें एक टोंक खालीं दाबून एकदम दाब सोडला असतां दुसरें टोंक चुना,पोहे, इ०वर आदळतें.

ढकूण, ढेंकूण पु० १ अंगांतील रक्त शोपून घेऊन उपद्रव करणारा एक क्षुद्र कीट. २ (लक्षणेनें) आपणांला ज्याचा सहज नाश करतां येईल किं० ज्याला सहज पराभवितां येईल असा मनुष्य. ॐ **ढेकणास ढेंकूण खात नाहीं** क्षुद्र कोटींतील प्राणी सुद्धां एकामेकांशीं गुण्या गोविंदानें वागतात (मग माणसांनींही तसें कां वागूं नये ?). **कोणे-काला ढेंकणासारखा चिरडणें** अत्यल्प प्रयत्नानें त्याचा नाश करणें किं० त्याचा ताठा जिरविणें.

ढेकें न०, ढेका पु० तेल्याच्या घाण्याचा एक अवयवविशेष.

ढेंग [हिं०] स्त्री०, न० १ चालतांना टाकलेलें पाऊल. २ उभें राहिलेल्या मनु-ष्याच्या दोन मांड्यांतील अंतर. ३ तंगडी, तंगड.

ढेंगमत, ढेंगमत न० शास्त्राला किं० रूढीला विरोधी असें मत.

ढेंगळणें [म० ढेंग] स० क्रि० १ पदार्थाच्या वरून पाऊल टाकून तो ओलांडणें. २ विचारांत किं० अवलोकनांत न घेणें. ३ बिघडविणें. ४ झिडकारणें.

ढेंगा पु० ढुंगण.

ढेंगाळ, ढेंगळ [म० ढेंग] वि० लांबटांग्या; दूरदूर पावलें टाकून चालणारा. २ विशोभित दिसण्याइतका उंच.

ढेंगोंजी, ढेंगू पु० १ महारांचा गुरु. २ दुसऱ्याच्या कामांत नसते दोष काढून शेखी मिरविणारा इसम. '**ढेंगोमेंगो**,' 'ढेंगूमेंगू,' हे ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

ढेंडळ, ढेंडळणें, ढेंडाळणें, ढेंडाळळी इ० पुढें 'ढेंढळ,' इ० पहा.

ढेंढळ, ढेंढळी स्त्री० आमांश किं० हगवण यामुळें गुदद्वारें पातळ मळ वारंवार पडणें.

ढेंढळणें, ढेंढाळणें अ० क्रि० पातळ मळ गुदद्वारें बाहेर विसृष्ट करणें; उ० तें लेंकरूं सकाळपासून एकसारखें ढेंढळत आहे. ॐ **ढेंढळपट्टी स्त्री०** जोराचें पातळ मळाचें गुदद्वारें विसर्जन.

ढेण्या पु० रक्त पिऊन लठ्ठ झालेला ढेकूण.

ढेप, ढेंप न० १ मातीचें मोठें ढिखूळ. २ विव-क्षित जमीनीचें क्षेत्र किं० विस्तार; उ० ह्या गांवचें शंभर बिघे ढेंप आहे. ३ उसाचा रस कढवून जमी-नींतील खळग्यांत ओतून करतात तो घट्ट पदार्थ; उ० ही गुळाची ढेप पांच शेरांची आहे. ४ भाताचीं शितें एकाला चिकटून होतो तो गोळा. ५ कोण-त्याही पदार्थाचे कण, थर, किं० काप, एकाला एक चिकटून होतो तो गोळा. ६ नासलेल्या दुधाचा चोथा. ७ तेल्याच्या घाण्यांत घालून तेल काढून घेतल्यानंतर भुईमूग, करडई, इ० चा चोथा जो राहातो तो; पेंड; हा गुरांना पौष्टिक असतो. ॐ **ढेपझाडा पु०** गांवांतील शेतकीच्या जमिनीच्या तपशिलाचें पत्रक. **ढेप पाहाणी स्त्री०** शेतजमिनीची पाहाणी. **ढेप फोडणें न०** नांगर-लेल्या शेतजमिनींतील ढिखळें फोडावयाचें लाकूड.

ढेपण, ढेप स्त्री० कडब्याच्या पेंड्यांची रास, —जिच्या माथ्यावर मातीचें लिंपण केलेलें असतें.

ढेपणें [म० ढेप] स० क्रि० रास करून रचून ठेवणें. २ पोटांत अन्न कोंबणें,—अधाशा-प्रमाणें. ३ मुलाला जुलमानें (भात इ०) खाऊं घालणें.

ढेपणें [म० ढेप] अ० क्रि० १ कागद, पत्रावळी, पुस्तकाचीं पानें, इ० एकास एक चिक-टून त्याचा जाड थर होणें. २ कढत उसाचा रस टणक होऊन त्याला आकारविशेष प्राप्त होणें. ३ स्थानविशेषीं किं० कार्यविशेषीं दृढ संबद्ध होणें किं० होऊन राहाणें. ४ कर्तव्य विसरून कोठें तरी जाऊन बसणें; उ० रामभाऊ साखर आणा-वयाला म्हणून गेला तो अजून परत आला नाहीं, कोठें ढेपला कोण जाणे ?

ढेंपशी स्त्री०, ढेंपसा पु० [म० ढेंप] गोंवरींचें जळलेलें आणि जसेंचें तसेंच असलेलें खांड,—पाणी ओतून विझविलेलें खांड काळें होतें, न विझविलेलें खांड पांढरें असतें.

ढेंपळ, ढेंपुळ न०, ढेंपळा पु०, ढेपळी स्त्री० मातीचा गोळा; ढिखूळ.

ढेंपाळी स्त्री०, ढेपाळें न० जमिनींत पातें-ल्याच्या आकाराचा केलेला खळगा,—ज्यांत कढ-विलेला उसाचा रस घट्ट होण्यासाठीं ओततात.

ढेपूस [म० ढेप] न० १ जीर्ण घराच्या भिंतीं ढांसळून पडलेला भाग. २ नदीचा कोसळून पडलेला धक्का,

ढेपूळ न० फणसाचें अर्धुक.

ढेपेचा [म०ढेप] वि०पेंड खाऊन माजलेला.ॐ ढेपेचें गुरूं न० लांच खाऊन श्रीमंत होऊन माजलेला माणूस.

ढेंबरा, ढेबरा वि० १ लठ्ठ आणि फुगीर (नाक). २ असें नाक असलेला (मनुष्य). ३ फुगलेलें (पोट).४अशा पोटाचा (मनुष्य).ॐ ढेंबरी ढेमाई,ढेमाई स्त्री०लठ्ठ पोटाची कुरूप स्त्री.

ढेंबरें, ढेमरें न० १ मीठ, तिखट, इ० पदार्थ पिठांत घालून तें तव्यावर थापून आणि भोंवतालीं तेल सोडून करतात तें खाद्य. २ लठ्ठ किं० फताडें नाक.

ढेंबूस न० अंगावर,झाडावर, किं० जमीनीवर उत्पन्न होतो तो विशोभित गोळा (येणें, वाढणें).

ढेमणी स्त्री० रट्टा मारण्याची क्रिया; ठोसा.

ढेमा, ढिमा पु० १नदीच्या पात्रांतील कोरडी पडलेली जागा,–बेटासारखी दिसणारी. २ ढेंबूस. वर 'ढेंबूस' पहा.

ढेर पु० डोळ्यांतील गू किं० चिकट पदार्थ. स्त्री० १ फुगलेलें किं० लठ्ठ पोट. २ नेहेमीपेक्षां मोठ्या आकाराचें कोणतेंही फळ. पु०, स्त्री० कोणत्याही पदार्थाची रास किं० ढीग.

ढेरणें [म० ढेर] अ० क्रि० गुवानें (डोळा) लडबडलेला असणें.

ढेरी [म० ढेर] स्त्री० १ लठ्ठ पोट. २ रास; ढीग. ॐ ढेऱ्या वि० १ लठ्ठ पोटाचा (माणूस).२ फुगीर (पदार्थ).

ढेल स्त्री० नाण्यावरची झिजलेली किं०अस्पष्ट उमटलेली आकृति किं० अक्षरें.

ढेल न०, स्त्री० १ लठ्ठ पोट. २ (विशिष्ट पदार्थांची) रेलचेल किं० समृद्धि.

ढेलच (–ज), ढेलेज [सं० देहली] स्त्री० १ कमानदार दरवाजा. २ दाराचा उंबरा. ३ घराच्या आवाराच्या भिंतीला लागून असलेला सोपा.

ढेला पु०नदीच्या पात्रांतील कोरडा भाग,-बेटासारखा असलेला.

ढेली [म० ढेल] वि० ज्याच्या आकृति किं० अक्षरें हीं झिजलेलीं किं० अस्पष्ट उठलेलीं आहेत असें (नाणें) किं०त्या तशा (आकृति किं०अक्षरें).

ढेंसण,ढेंसें न०पाय आणि कंबर यांचा सांधा.

ढेसणें स० क्रि० ठासून भरणें. अ० क्रि० दाटी करून राहाणें किं० जमा होणें.

ढेंसा पु० झाडाची डिरी. [दुबेळकें.

ढेळकें न० १ दुबेळक्याची काठी. २ काठीचें हे मागें 'ढई' पहा. [पुरुष किं० स्त्री.

ढोंक न० १ जीर्ण झाड. २जर्णि किं० म्हातारा

ढोंक, ढोंकें न० १ तेल्याच्या घाण्याचा एक अवयव. २ उसाच्या चरकाच्या नवरानवरी ज्यांत फिरतात ती फळी. [आउत.

ढोंकण न० जांभा दगड फोडावयाचें एक

ढोकळा पु० १ हरभऱ्यांच्या डाळीच्या पिठाचें एक खाद्यविशेष. २ दोन पैसे किंमतीचें एक नाणें. ३ (नंदभाषेंत) पैसा हें नाणें.

ढोकून, ढोंकून क्रि० वि० डोकावून किं० ओझरत्या नजरेनें सुद्धां (न पाहाणें); उ० माझ्या विहिणीनें मला खण द्यावयाला आणलेला होता त्याचेकडे मी ढोंकून सुद्धां पाहिलें नाहीं.

ढोंग, ढोंग सोंग न० १ पवित्रपणाचा किं० प्रामाणिकपणाचा बाहाणा. २ नानाप्रकारचे फसवेगिरीचे प्रकार समुच्चयानें. ॐ ढोंग धत्तुरा पु० फसवेगिरी; लफंगेगिरी; उ० त्याणें ह्या शहरांत फार ढोंगधत्तुरा माजविला आहे. ढोंगी,ढोंगी सोंगी वि० लुच्चा, सोदा.

ढोंग, ढोंगण इ० 'ढुंग,' 'ढुंगण,' इ०पहा.

ढोंगमत न० मागें 'ठोंगमत' पहा.

ढोंगा पु० ढुंगण.

ढोंगारा वि० नेसलेलें लुगडें, धोतर, इ० कंबरेचें सोडलेलें पण अद्यापि न धुतलेलें; नेसून पारोसें झालेलें (वस्त्र).

ढोंचणें स० क्रि० पुढें 'ढोसणें' पहा.

ढोढोवाढा पु० बोभाटा (कोणेकाच्या दिवाळ्याचा, दरवड्याच्या,शिंदळकीचा).

ढोण न० १ सर्पगाचा अति मोठा आणि वाकडातिकडा खंड. २ मोठा आणि अगडबंब आणि कुरूप माणूस. ॐ ढोणकूर, ढोणेप,ढोणें, न०, डोणा पु०१ जाळावयाच्या लाकडाचा ओबड-धोबड मोठा ओंडा.

ढोणा,ढोण्या [म० ढोणा=ओंडा] १·अवाढव्य मोठा; अगडबंब. २ पोरकट चाळे करणारा मोठ्या वयाचा माणूस.ॐ ढोणगी मोट स्त्री०दोन बैलांनीं ओढावयाची मोट. ढोणग्या आसूड पु० नांगर चालविणाऱ्याच्या हातांतील लांब लचक चाबूक.

ढोणंशीर स्त्री० पायाची टांच आणि तंगडी यांच्या मधील जाडी शीर. [धरण्याचें भांडें.

ढोणगें न० उसाच्या चरकांतून निघालेला रस

ढोणस न० १ झाडाच्या खोडाचा खंड; करवतीनें कापून काढलेला खोडाचा खंड. २ (लक्षणेनें) अजगर. ३ झाडांतील भगदाड किं० ढोली. ❀**ढोणसकड** न० अगडबंब आणि सुस्त माणूस.

ढोपर, ढ.पर न०, पु० १ गुडघा. २ कोपर. ३ बोट मिटलें असतां दोन पेराच्या मधला सांधा जो उंच दिसतो तो. ❀ **ढोपर खली** स्त्री० गुडघ्यानें दिलेला रद्दा. **ढोपरखुंटी** स्त्री० अशक्तपणामुळें ढोपरें टेंकून चालण्याची स्थिति. क्रि० वि० ढोपरें टेंकून (चालणें). **ढोपरखुंटीं बसणें** गुडघे टेंकून जमीनीवर बसणें. **ढोपरखुंटीस येणें** म्हातारपणामुळें गुडघे लटपटत चालण्याच्या दशेस येणें; उ० रामचंद्रपंत आतां अगदीं ढोपरखुंटीस आले आहेत. **ढोपरगोट्या** स्त्री० अ० व० बैदुलांच्या खेळांतील एक प्रकार. **ढोपराची वाटी** स्त्री० गुडघ्यावर जें वाटोळें हाड असतें तें. **ढोपरी** स्त्री० गुडघ्याला होतो तो एक रोगविशेष.

ढोपरणें [स० ढोपर] स० क्रि० बोटाच्या ढोपरानें आगलीकडे बैदूल सारणें.

ढोपा पु० गडवा.

ढोबळ, ढोबळा वि० १ स्पष्ट. २ स्पष्टपणें दिसणारा किं० कळून येणारा. ३ फार मोठी (चुकी). ४ फार अवजड शरीराचा किं० अगडबंब (माणूस).

ढोबळा पु० १ भिंत, भांडें, वस्त्र, इ० त पडलेलें मोठें भोक किं० भगदाड किं० खिंडार. २ गवती छपर काढून त्यांतील गवताचा केलेला भारा.

ढोमण न० कुळा: ढुंगण.

ढोमणें न० खाद्य पदार्थाची चिवडाचिवड.

ढोर न० गाय, बैल, म्हैस, आणि रेडा हे पशु प्रत्येक. ❀ **ढोर कोळी** पु० मोठ्या आकाराचा कोळी. **ढोर गुंज** स्त्री० मोठ्या आकाराची गुंज किं० त्या गुंजेचें झाड. **ढोर गुरूं** न० गाय, बैल, म्हैस, आणि रेडा हे पशु प्रत्येक. **ढोरवी** वि० गाय, बैल, म्हैस, आणि रेडा यांच्या कातड्याचा किं० शिंगांचा किं० हाडांचा बनविलेला (पदार्थ).

ढोर पु० कातडीं कमावणाऱ्या हिंदूंची जात किं० त्या जातीचा कोणीही इसम.

ढोरगा पु० गिधाड ह्या नांवाचा पक्षी.

ढोरजा पु० कोष्ट्यांच्या मागाच्या लाटेचों दोन कुसवें ज्या दोन उभ्या पुरलेल्या खुंट्यांत फिरतात ते प्रत्येक.

ढोल [हिं०] पु० १ मोठ्या आकाराचें ढोलकें. २ मोठें पोट (थट्टेंत). स्त्री० झाडांत, खडकांत, किं० जमीनींत पडलेलें मोठें भोंक किं० भगदाड किं० पोकळी. ❀ **ढोलखांब** पु० शेतांतून पक्ष्यांना उडवून लावण्यासाठीं ढोल किं० सूप ज्या खांबाला बांधतात तो खांब. **ढोलमांजर** न० कांडेचोर किं० ऊद हा प्राणी. **वाजत ढोलानें** क्रि० वि० जाहीर रीतीनें; थाटांत; ऐटींत; दिमाखानें.

ढोलक पु०, **ढोलकी** स्त्री०, **ढोलकें** न० लहान ढोल; पडघम. ❀ **ढोलकें फोडणें** गुप्त गोष्ट जाहीर करणें. **एकाद्याचें ढोलकें वाजणें** त्याच्या बदकर्माचा बोभाटा होणें. **पदार्थाचें ढोलकें वाजणें** जेवणारानें मागितलेला पदार्थ वाढणाराच्या भांड्यांत संपलेला असणें. [पहा.

ढोलगुंज स्त्री० वर ' ढोर ' मध्यें 'ढोरगुंज'

ढोला [म० ढोल] पु० १ व्यापारांत आलेली बुड किं० बसलेली ठोकर (बसणें). २ दुसऱ्याच्या पैशाचा फसवेगिरीनें किं० लबाडीनें केलेला अपहार (देणें).

ढोलार [म० ढोल] न० १ जीर्ण आणि पोकळ वृक्ष. २ लठ्ठ पोट; ढोंद. ३. ढोंदील माणूस.

ढोली [म० ढोल] स्त्री० वृक्ष, डोंगर, इ० तील पोकळी.

ढोल्या [म० ढोल] वि० ढेरपोट्या; ढोंदील.

ढोसकणी, ढोसणी स्त्री० खुपसण्याची किं० भोसकण्याची क्रिया.

ढोसण स्त्री० सोसाट्याचा वारा.

ढोसणें स० क्रि० मोठे मोठे घोट घेऊन पिणें. ❀**दारू ढोसणें** फार दारू पिणें. **एकाद्याला ढोसढोसून जाळणें** त्याला सतावणें.

ढोसरा पु० १ रद्दा; तडाखा (मारणें, देणें). २ भाषणांत कोणेकाला दिलेला किं० मारलेला टोमणा.

ढोसला पु० जाडी बांगडी.

ढोसा, ढोंसा [म० ढोसणें] पु० १ रद्दा, तडाखा. २ जोराचा वारा; सोसाट्याचा वारा.

ढौढव मागें ' ढवढव ' पहा.

ण

ण संस्कृत आणि मराठी व्यंजनमालेंतील हें पंचरावें व्यंजन आहे. ह्या अक्षरानें सुरू झालेले शब्द संस्कृतांत नाहींत तसे मराठींतही नाहींत; परंतु हें अक्षर शब्दाच्या मध्यें किं० अंतीं येऊं शकतें; उ० गुणाकार, गुण इ०. तें संस्कृतांत ट, ठ, ड, आणि ढ या व्यंजनांच्या मागचा अनुस्वार दाखविण्यासाठीं पुढच्या अक्षराच्या आरंभीं लिहितात. हे असले शब्द मराठींत घेतले असतां ते संस्कृत सरणीनें कधीं कधीं लिहिलेले जातात; उ० गण्डकी किं० गंडकी.

त

त हें मराठी व्यंजनमालेंतील सोळावें अक्षर आहे. हें दन्त्य वर्गांतील पहिलें व्यंजन आहे.

तइनात इ०पुढें ‘ तैनात ’ इ० पहा.

तईं क्रि० वि० १ तेव्हां; त्या काळीं; त्या समयीं. २ तेथें, त्या स्थळीं. हा शब्द फक्त कवितेंत योजला जातो.

तऊर, तंवर [अ० तहूर] **पु०** १ गर्व, अभिमान, ताठा, दिमाख; उ० काशिनाथपंताला आपल्या अधिकाराचा (किंवा संपत्तीचा, किं० विद्येचा, किं० शक्तीचा) भारी तऊर चढला आहे. २ रागाचा झणकारा; क्रोधाची लहर. ३ धिटाई, मर्दुमकी. ॐ **तउरी, तवरी वि०** १ गर्विष्ठ. २ हिंमतदार; कर्तबगार; आवेशी. ३ शीघ्रकोपी.

तकट न० १ धातु ऐरणीवर ठोकून त्याचा केलेला पातळ पत्रा. २ लहान मुलगा किं० मुलगी यांच्या करगोट्यांत पिंपळाच्या किं० वडाच्या पानाच्या आकाराची जी सोन्याची किं० चांदीची तबकडी घातलेली असते ती.

तकट, तकटून क्रि० वि० १ सैलपणा न राहील अशा रीतीनें (बांधणें); घट्ट किं० आवळून (बांधणें). २ पोटांत रिकामी जागा न राहील अशा रीतीनें (खाणें, पिणें).

तकटणें स० क्रि० १ घट्ट किं० खूप आवळून बांधणें. २ (कांहीं खाद्य) आकंठ खाणें. ॐ **तकटून बांधणें स० क्रि०** घट्ट बांधणें. **तकटून खाणें स० क्रि०** आकंठ खाणें. **तकटबंदी, तगटबंदी, तकडबंदी, स्त्री०, तगटबंद पु०** १ कुंपण, वई, कठडा, इ०नीं घर, शेत, इ० बंदिस्त करणें किं० वेढणें. २ वेढणें, गराडणें. ३ ०ला नेट लावणें किं० तगादा करणें. ४ घट्ट आणि आवळून बांधण्याची क्रिया.

तकटें न० १ तकट. ‘ तकट ’ वर पहा. २ दार, खिडकी, कुंपणाची वाट, इ० बंद करावयासाठीं बांधलेली झापा, कामट्या, इ० ची ताटी.

तकडी स्त्री० चरक्यावर काढलेल्या सुताच्या चोवीस चिवट्यांचा समुदाय किं० चोवीस चिवटीं समुच्चयानें. हें सूत पासोड्या इ०शिवण्याच्या कामीं वापरलें जातें.

तकतक, तकतकी स्त्री० चकाकी.

तकतक, तकतकां क्रि० वि० प्रकाश पाडून.

तकतकणें अ० क्रि० चकचकणें; झळकणें; प्रकाश-किरणांनीं युक्त असणें.

तकरार, तकराद [अ० तकरार] **स्त्री०** १ वाद किं० भांडण करणाऱ्या लोकांनीं एकमेकांचीं विधानें खोडून काढण्यासाठीं पुढें आणलेले मुद्दे किं० प्रमाणें प्रत्येक; हरकत. २ गुन्हेगारानें आपणाविरुद्ध झालेली फिर्याद खोटी आहे किं० आकसानें केलेली आहे असें म्हणणें; आरोप नाकबूल करणें. ३ हरकत घेणें. ४ हेकेखोरपणाचें बोलणें. ५ कोणेकाच्या उलट जें बोलणें तें. ६ स्पर्धा, चढाओढ. ॐ **तकरार अर्जी स्त्री०** खालच्या कोर्टाचा निकाल बरोबर झाला नाहीं अशी वरच्या कोर्टाकडे मांडलेली फिर्याद. **तकरारी, तकरारखोर, तकराऱ्या वि०** नेहेमीं हरकती आणणें किं० तकरारी करणें असा ज्याचा स्वभाव तो.

तकराळ [अ० तकरार] **स्त्री०** १ वस्तुस्थितीचा विपर्यास करून सांगितलेली हकीगत. २ दुसऱ्याचा नाश किं० हानि करण्यासाठीं रचिलेली गोष्ट किं० हकीगत. ३ दुसऱ्यावर घेतलेला आळ; तोहमत.

तक़रीर [अ० तक़्रबर] **पु०** १ दुसऱ्यावर

घातलेला आळ; खोटा आरोप; तोहमत (आणणें, येणें). २ स्वपक्षाचें निवेदन किं० समर्थन. ३ खोट्या सबबी समुच्चयानें. ❀ **तकरीरनामा पु०** एखाद्या खटल्याच्या बाबतींचें तपशीलवार पत्रक.

तकलादी [अ० तक्लीद] **वि०** १ सर्व कौशल्य आणि चातुर्य न वेचतां बनविलेला (कांहीं पदार्थ,–घर, पेटी, दागिना, इ०). २ दिसण्यांत भपकेदार पण असण्यांत अशक्त किं० लेचापेचा (पदार्थ,–घर, दागिना, इ०).

तकलु (–लो–) बी [**अ०** तकल्लुफ्=बनावट, खोटा] **वि०** १ वर ‘ तकलादी ’ पहा. २ बनावट; खोटा; अशक्त; निर्जीव.

तकवा [अ तक्रुई] **पु०** १ तो तो व्यवहार करावयाला जें सामर्थ्य लागतें तें. २ कांहीं काम करतांना टिकाव धरणारी शक्ति.

तकावियत कौल, तकवेत कौल पु०, तकवेत चिट्टी स्त्री० [अ० तक्वीत + हिं० चिठी] सरकारांतून जमीन इ०चा कौल द्यावयाचा असतां तो द्यावयाला अवकाश नसल्यास तात्पुरता जो कागद करून दिला जातो तो.

तकशी (–सी–) म, तक्षीम [**अ०** तकसीन्] **स्त्री०** १ द्रव्य, वतन, इ० तील कोणेकाचा हिस्सा. २ नियमविशेषांनीं बांधलेली मंडळी, संस्था, किं० जूट. ❀ **तकशी(–सी–)मदार, तक्षीमदार पु०**तकशिमींत ज्याचा हिस्सा आहे तो. **तकशी (–सी–) मदारी, तक्षीमदारी, स्त्री०** तक्षीमदाराचा हक्क किं०त्या हक्कानें त्याला जें मिळावयाचें तें द्रव्य इ०.

तकशीर, तकसीर [अ० तक्सीर] **स्त्री०** अपराध; योग्य सरणीचें उल्लंघन; वर्तनांत चुकी. ❀ **तकशी (–सी–) रवार वि०** चुकीचा; चुकलेला.

तकस पु० दुःख, इजा, व्यथा (शारीरिक किं० मानसिक).

तकाकणें अ० क्रि० चकचकणें.

तकाकी स्त्री० १ चकाकी. २ उजळा.

तकिआ पु० खालीं ‘ तक्या ’ पहा.

तकूब [**अ०** तवक्कुफ] **वि०** आतांपर्यंत चालत असलेलें पण आतां कांहीं काळ बंद ठेविलेलें (काम);अल्प अवधीपुरतें बंद ठेविलेलें(काम);**क्रि०** करणें, ठेवणें, होणें.**न०**सारा इ० वसूल करणाऱ्या शिपायानें कोणा माणसास कांहीं दिवस तगादा करूं नये अशी चिट्ठी त्या माणसास सरकार देतें ती. ❀ **तकूबी, तकुबी स्त्री०**कांहीं काम कांहीं अवधीपुरतें बंद ठेवण्याची क्रिया. **तकुबचिट्टी स्त्री०** १ वर ‘ तकूब ’ न०पहा. २ अल्प काळ वेदना बंद करणारें औषध.

तकट क्रि० वि० क्षणांत, तावडतोब, वेळ न गमावतां (जाणें, येणें).

तक्कू स्त्री० आंब्याच्या फोडी उखळांत घालून आणि ठेचून त्या ठेच्यांत तिखट, मीठ,इ०घालून जें तोंडीलावणें करतात तें.

तक्त, तख्त [**फा०** तख्त] **न०** सिंहासन. ❀ **तक्ताधिकारी, तक्ताधिपति पु०** सध्यां सिंहासनावर असलेला राजा.

तक्ता [**फा०** तख्ताह्] **पु०** १ लाकडाचे सोट करवतीनें उभे चिरून करतात त्या फळ्या प्रत्येक. २ गुलाब, मोगरी, इ० फुलझाडें, बागेंत ज्या विशिष्ट प्रदेशीं लाविलेलीं आहेत तो प्रदेश; उ० कण्हेरीचा तक्ता, गुलछबूचा तक्ता इ०. ३ फुलझाडांचें बेट किं०वाफा. ४शालीइ०चा गठ्ठा. ५ आर्धा कागद किं० कागदाचें अर्धूक. ६घड्या घालून किं० रेघा आखून रकाने पाडून कांहीं माहिती ज्यांत भरलेली असते तो कागद किं० तें पत्रक. ७ कागद, वस्त्र, इ० चे सारख्या लांबीरुंदीचे किं० सारख्या आकाराचे तुकडे करावयाचे असतां जो नमुन्याचा कागद अगोदर करतात तो. ह्या कागदाला **तक्ती स्त्री०**, आणि **तक्तीपत्र न०** असेही पर्यायशब्द आहेत. **तक्ती स्त्री०** एका नमुन्याचे जे कातरलेले कागदांचे तुकडे त्यांची चवड. **तक्तपोशी, तख्तपोशी स्त्री०** लाकडाचे तक्ते कळाशीदार रीतीनें एकाशीं एक जुळवून करतात ती जमीन किं० पाटणी किं०पटई. **वि०**तक्तपोशी ज्यांत केलेली आहे असें (घर).

तक्तरांवा [**फा०**तख्ताह् (लाकडाचा तक्ता) +रवान (फिरणें)] **पु०** नाचणाऱ्या स्त्रियांना गाडीवर तक्ते घालून लग्न इ० च्या मिरवणूकींत नाचावयासाठीं जी रचना करतात ती.

तक्या [**फा०** तकियाह्] **पु०** १ पिशवी, खोळ, इ० मध्यें कापूस, काथ्या, इ० भरून बहु-

तेक चौकोनी आकाराचा भिंत इ० शीं टेकून बसावयासाठीं करतात तो पदार्थ. असा पदार्थ लांब आणि वाटोळा असल्यास त्याला 'लोड' म्हणतात. २ फकीराचें निवासस्थान किं० रहावयाची जागा. ३ अंगणांत, ओटीवर, किं० पडवींत जो ओटा आरामांत टेकून बसावयासाठीं केलेला असतो तो.

तक्र [सं०] **न०** दह्यांत पाणी घालून घुसळून करतात तो पातळ पदार्थ; ताक. ꙮ **तक्रमंडूर पु०** ताकाच्या अनुपानानें घ्यावयाचा जो मंडूर तो. मंडूर हें एक औषध आहे. **तक्र-कौंडिन्यन्याय पु०** सामान्य नियमाला विशेष विधानानें अपवाद सांगणें हा प्रकार. ब्राह्मणांना दहीं वाढा, पण कौंडिन्य ब्राम्हण आहे तरी त्याला ताक वाढा असें सांगणें.

तखलादी इ० मागें 'तकलादी,' इ० पहा.

तखली [म० 'कथील'चें परिवृत्त रूप] **स्त्री०** कथील ह्या धातूचें पात्र. **वि०** कथील ह्या धातूचें बनविलेलें किं० घडविलेलें. ꙮ**तखलें दुःख न०, तखल्या रोग पु०, तखली व्याध स्त्री०** १ फिरंगी रोग; उपदंश नामक रोगाचा एक भयंकर प्रकार. २ अतिद्वाड आणि उपद्रवी माणूस.

तखलें [म० 'कथील'चें परिवृत्त रूप] **न०** कथील ह्या धातूचें पात्र, तपेली, इ०.

तखील न० मागें 'कथील' पहा.

तंखा पु० पुढें 'तनखा' पहा.

तंग [**फा०** तंग] **वि०** १ अंगाशीं घट्ट बसणारा (अंगरखा, बंडी, चोळी, इ०). २ अडचणीचा, अरुंद. ३ हडसून घट्ट बसलेला किं० बसविलेला. **पु०** घोड्याचें खोगीर आवळावयाचा चर्मादिकांचा पट्टा. ꙮ **तंगतोबरा पु० ए० व०** घोड्याला लागणाऱ्या सर्व जिनसा समुच्चयानें. **तंगदार वि०** अंगाशीं घट्ट बसणारा (अंगरखा, बंडी, चोळी, इ०); तक्या, लोड, गिरदी, इ० ना घट्ट बसणारा (आभ्रा, खोळ, इ०). **तंगचाई, तंगशाई, तंगची, टंचाई स्त्री०** कार्यविशेषांला जरूर जी साधनसामग्री तिच्यांत कमीपणा; जरूर त्या पदार्थांचा तुटवडा; संसार चालवावयाला जरूर जितकें द्रव्य त्यांत कमीपणा किं० ह्या कमीपणामुळें होते ती ओढ किं० अडचण. **खाण्यापिण्याची तंगचाई आणि नमो-नारायणाची ढसर** घरांत आठरा विसवे दारिद्र्य पण चार लोकांत मिजासखोरीचें वर्तन किं० डौल. **तंगबार वि०** स्वारीसाठीं खोगीर पाठीवर आवळून तयार केलेला (घोडा). **पु०** असा स्वारीसाठीं सिद्ध केलेला घोडा.

तग पु० मोठी तराजू.

तग, तगाव [**म०** तगणें] **पु०** १ कांहीं काम कांहीं काळ चालू ठेवण्याची माणसाच्या अंगची हिंमत किं० ताकद; टिकाव (निघणें, धरणें). २ कांहीं उपयोगाला कांहीं काळ येण्याचें पदार्थाच्या अंगचें सामर्थ्य किं० मजबुती; उ० ती झोंपडी ह्या पावसाळ्यांत तग धरील असें मला दाटत नाहीं.

तगट न० १ धातूची पातळ तबकडी; तकट. २ शेताचीं पिकें, आंब्याच्या झाडांचे आंबे, इ०ची पाहाणी.

तगटणें, तगटबंदी, तगटून इ० मागें 'तकटणें,' 'तकटबंदी,' 'तकटून' इ० पहा.

तगटणें स० क्रि० शेतांचीं पिकें, आंब्यांना लागलेले आंबे, इ० ची पाहाणी करणें.

तंगड न०, तंगडी स्त्री० कंबरेपासून पावलांपर्यंत जे शरीराचे दोन अवयव ते प्रत्येक. ह्या शब्दाबद्दल बहुधा 'पाय' हाच शब्द योजला जातो.

तंगडणें, तंगटणें पुढें 'तांगडणें' पहा.

तंगणें [**म०** तंग=घट्ट; **फा०** तंग] **अ० क्रि०** शक्तीनें, पैशानें, किं० हिंमतीनें कमी होणें; खचणें; क्षीण होणें; थकणें.

तगणें अ० क्रि० टिकून राहाणें.

तंगतंगीत वि० घट्ट; अतितंग, घटसुट.

तगदमा [अ० तकद्दम] **पु०** १ अधिकाराचा दरारा. २ अंदाज; अजमास. ३ भरमसाट तर्क. **वि०** अद्यापि अपुरें; अद्यापि निकालांत न काढलेलें. **क्रि० वि०** तावडतोब; झटक्यासरशी. ꙮ **तगदम पट्टी स्त्री०** १ भरमसाट आजमास. २ अनुमानधबका.

तगमग स्त्री० १ तापानें अंगाची लाही होऊन केलेली धडपड. २ चिंता, विवंचना.

तगमगणें अ० क्रि० शारीरिक किं० मानसिक व्यथेनें धडपडणें किं० अस्वस्थ होणें.

तगर स्त्री० एक फुलझाड. **न०** तिचें फूल.

तगवणा [म० तगणें] **वि०** १ टिकाऊ. २ प्रसंगविशेषीं थाटमाट करतांना मात्र वापरावयाचें (चिरगूट, पितांबर, किनखाबी अंगरखा, जरीकांठी चोळी, इत्यादि).

तगवणी, तगवणूक [म० तगविणें] **स्त्री०** टिकाविणें; पदार्थ पुष्कळ दिवस कामाला येईल अशा रीतीनें तो वापरणें.

तगविणें [म० ' तगणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** टिकविणें, (पदार्थ) पुष्कळ दिवस कामाला येईल अशा रीतीनें तो वापरणें; न मरूं देणें; फुटूं, तुटूं, फाटूं, किं० मोडूं न देणें.

तगवणें [म० तगणें] **न०** सणावाराच्याच दिवशीं वापरावयाचा पदार्थ,—पीतांबर, इ० कांहीं मूल्यवान वस्त्र, पात्र, दागिना, इ०.

तंगशाई स्त्री० मागें ' तंग ' मध्यें पहा.

तगाई [अ० तकावी] **स्त्री०** १ मुलुकाचे रावणुकीसाठीं पर्जन्याच्या पूर्वीं कुळास देतात तो पैसा. २ सरकारी तिजोरींतून शेतकऱ्याला दिलेली कर्जाऊ रकम.

तंगाडणें पुढें ' तांगडणें ' पहा.

तगादणें अ० क्रि० जगाला किं० कामकाजाला कंटाळणें किं० कंटाळून बेजार होणें.

तगादा [अ० तकाजा] **पु०** १ मागणीचा लकडा किं० उपद्रव. २ कोणाकडून आपलें कांहीं काम करून घेणें असतां त्याला तें कर असा चालविलेला आग्रह किं० लाविलेला नेट (लावणें, लागणें).

तगारी [म०] **स्त्री०** चिनी मातीचें पात्रविशेष.

तगाव [म० तगणें] **पु०** टिकाव; टिकून राहाणें; निभाव.

तागिरी, तगेरी [फा० तगीरी] **स्त्री०** कामावरून किं० अधिकारावरून कोणेकाला काढून टाकणें किं० बडतर्फ करणें; हाकालपट्टी (देणें).

॥ **कोणेकाला तगिरीचें वस्त्र देणें** त्याला कामावरून काढून टाकणें. **तगीरी बहाली, तगेरी बहाली स्त्री०** सरकारी कामगारांना काढून टाकणें, पुन्हां नेमणें, किं० नवे नेमणें, इत्यादिरूप जें काम तें.

तंगी [फा०] **स्त्री०** १ घट्टपणा; अडसरपणा. २ संसारांत भासते ती पैसा, इ० बाबतींतील अडचण. ३ घोड्याची झूल, तुरबी, गाशा, इ० बांधावयाचे पट्टे किं० बंद प्रत्येक.

तगीर [अ०] **वि०** कामावरून काढून टाकलेला (नोकर).

तग्रवग्र वि० रागानें चवताळलेला किं० बेकाम झालेला.

तज स्त्री० दालचिनी.

तजकरनवीस [अ० तज्करात्+फा०नवीस] **पु०** सरकारी पैसा कोणी नोकर खातो आहे कीं काय हें टेहळावयासाठीं सरकारनें नेमलेला अधिकारी. ॥ **तजकर नवीशी स्त्री०** तजकरनवीसाचा हुद्दा किं० अधिकार किं० कर्तव्य.

तजकरा [अ० तज्कराह्] **पु०** सरकारी कामगारानें खाल्लेला पैसा (काढणें).

तजला, तजिला, तजिल्ला, तजेला पु० तजिली, तजिल्ली, तजेली [अ०तजल्ली] **स्त्री०** चकाकी; तकतकी; तेज; टवटवी. ॥ **तजलादार इ० वि०** टवटवीत; चकचकीत.

तजवीज [अ०] **स्त्री०** १ चौकशी, शोध, तपास. २ युक्ति; हिकमत; उपाय; इलाज; खुबी. ३ सदसद्विवेक बुद्धि. ४ निकाल; निर्णय.

तजावजा [अ०] **क्रि० वि०** १ घोंटाळ्याच्या स्थितींत; इतस्ततः; चोहों दिशांकडे. २ घाबरलेल्या स्थितींत; उ० पेंढारी दहा कोसांवर आले आहेत ही बातमी येतांच गांवकरी तजावजा झाले.

तजावत, तजावूज, तजाउजू, तजावुजू, स्त्री०, न०, तजावत तफावत स्त्री० [अ०] ठरविलेल्या क्रमांत, सरणींत किं० नियमांत केलेलें किं० झालेलें उल्लंघन (काढणें, निघणें, करणें, होणें); उ० तुम्हीं सांगाल त्या अनुपानांत मजकडून यत्किंचित् तजावत होणार नाहीं.

तट [सं०] **पु०** १ कडा, उतरण. २ समुद्र, नदी, इ० चा कांठ किं० समीपस्थ प्रदेश. ३ गांव, किल्ला, इ० च्या सभोंवतालची भिंत. ४ एकाद्या जातींत पडलेले दोन किं० अधिक पक्ष, किं० अशा पक्षांतील भेदाचीं कारणें समुच्चयानें. ५ खेळांतील जे दोन पक्ष ते प्रत्येक. ६ विशिष्ट कार्यार्थ मिळलेल्या लोकांचा संघ; जूट; टोळी. ७ खोळंबा;

थांबणूक; अडचण (निषेध विवक्षित असतां); उ० तूं आला नाहींत तर माझा तट नाहीं. ❀ **तटस्थ** वि० तिऱ्हाईत; उदासीन; कोणत्याही पक्षाकडे ज्याचा कल किं० ओढा नाहीं असा. **तटास लागणें** १ अटीस पडणें किं० पेटणें. २ तंट्याचा किं० मतभेदाचा विषय होणें. **तटबंदी** स्त्री० किल्ला, शहर, इ० च्या संरक्षणार्थ बांधलेली भिंत.

तटकन्, तटकर, तटकिनीं, तटदिशीं क्रि० वि० १ घट्ट किं० मजबूत रीतीनें. २ झटपट; वेळ न गमावतां.

तटका वि० ताजें, टवटवीत (फूल, फळ, भाजी, इ०).

तटका पु० संबंध; सहवास; (पुढील प्रयोगांत मात्र). **तटका तोडणें** १ मागें पुढें न पाहतां किं० भीड मुरवत न धरतां साफ आणि स्पष्टपणें आपलें मत सांगून टाकणें. २ निकालांत काढणें. **तटका तुटणें** निकालांत निघणें.

तटकारणें स० क्रि० कोणेकाला सख्त ताकीद देणें; बजावणें.

तटकी स्त्री०, **तटकें** न० काटक्यां कुटक्या, झापा, पानें इ० चीं ताटी (खिडकी, दार, इ० बंद करण्यासाठीं केलेली).

तटणें अ० क्रि० कांहीं गोष्ट होईपर्यंत खोळंबून बसणें किं० आडून राहाणें.

तटतट, तटतटां क्रि० वि० १ तटतट असा आवाज करून (तोडणें). २ संकोच न बाळगतां किं० जोरानें किं० आवेशानें (संबंध तोडणें).

तटतटणें अ० क्रि० १ तटतट किं० तडतड असा आवाज करणें. २ कांठोंकांठ भरणें (रुपायांनीं पिशवी, पक्वान्नानें पोट इ०).

तटतटीत वि० १ अंगाशीं तंग बसणारा (अंगरखा, बंडी, इ०). २ पूर्णपणें ठासून भरलेलें (पोट, पिशवी, इ०).

तटस्थ [सं० तट+स्था] वि० १ कोणत्याही पक्षाकडे न कललेला; उदासीन. २ नदी, समुद्र, इ० च्या कांठालगत राहाणारा. ३ अगदीं कांहीं हालचाल न करतां किं० कांहीं न बोलतां स्तब्ध असलेला. ४ कांहीं गोष्टीची वाट पाहात बसलेला. ❀ **तटस्थ मुद्रा** स्त्री० कांहीं विचार करीत बसलेल्या माणसाची होते ती मुद्रा. वर ' तट 'मध्यें ' तटस्थ ' पहा.

तंटा [हिं०] पु० १ वाद; कलह; भांडण. २ मतभेद; विचारांची तफावत. ३ सावकाराचा आलेला तगादा. ४ अडचणीची स्थिति किं०प्रसंग. ❀ **तंटाबखेडा** पु० ए० व० भांडण; मतभेद. **तंटेखोर, तंटेबाज** वि० १ भांडखोर. २ जिकीर करणारा; हुज्जत घालणारा.

तटाक [सं०] पु०,न०१तळें; सरोवर. २ नदी, सरोवर, इ० चा कांठ.

तटाटणें अ० क्रि० फार ताणलें जाणें (पोट, पिशवी).

तटाणी [म० ' तट्टू ' चें स्त्रीलिंग] स्त्री० आकारानें लहान घोडी.

तटोरी स्त्री० १ रटाटून पोसलेलें आणि भरलेलें धान्याचें कणीस. २ घसा.

तट्ट क्रि० वि० रटाटून (पोट, पिशवी, इ० फुगणें,—वायूनें किं० आंत भरलेल्या अन्नादि पदार्थांनें); उ० मीं एकवीस जिलब्या खाल्ल्या त्यामुळें माझें पोट तट्ट फुगलें आहे; उ० हें पोतें भुसानें तट्ट भर.

तट्टू पु० न० १ लहान चणीचा घोडा. २ विशेषणापुढें हा शब्द त्या गुणाच्या परमावधीनें युक्त प्राणी अशा अर्थानें योजतात; उ० चुकार तट्टू म्ह० अत्यंत चुकवाचुकव करणारा प्राणी; **अडेल तट्टू** म्ह० भलत्याच प्रसंगीं अडून बसणारा. **भाद्रव्यांत भट्टू आणि आश्विनांत तट्टू पुष्ट होतात** महालय श्राद्धाचीं पक्वानें भाद्रपद महिन्यांत खाऊन भिक्षुक लठ्ठ होतात; आश्विन महिन्यांत हिरवें गवत खाऊन घोडीं लठ्ठ होतात. **तट्टूटार** न० १ भिकार घोडा. २लहान घोडा किं० शिंगरूं.टार म्ह०घोडा. मागें 'टार' पहा.

तट्ट्या पु० बांबूच्या पाती विणून केलेली चटई,—जमीनीवर आंथरावयासाठीं, गाडीवर घालावयासाठीं किं० आडोशाला उभी करण्यासाठीं केलेली.

तड [सं०] स्त्री० १ नदी, समुद्र, इ० चा कांठ किं० किनारा किं० बाजू. २कामाचा शेवट; समाप्ति; उ० हें काम लवकर तडीला लावलें

पाहिजे. ३ तगादा, नेट; उ० सावकारानें त्या रुपयांबद्दल मोठी तड लाविली आहे; उ० माझी एवढी तड ढळली तर मी येईन. ४ दोन अगदीं परस्परांविरुद्ध पक्षांपैकीं कोणचा तरी एक; उ० तूं ही तरी तड धरतोस किंवा ती, तुला मधला पक्ष ठाऊकच नाहीं. ※ **तडीस जाणें** हातीं घेतलेलें कांहीं काम समाप्त होणें. **तड घेणें** १समाप्त करणें. २निकालास लावणें.**एकादी गोष्ट तडीस लागणें** तिच्यामुळें भांडण सुरू होणें. **तडीचा पोहोणारा** १ कोणत्याही व्यवहारांत कोणतीही धाडसाची बाबत अंगावर न घेणारा. २ हातीं घेतलेलें काम नेटानें शेवटास लावण्याचें ज्याच्या अंगीं सामर्थ्य नाहीं असा.

तडक क्रि० वि० १ जोरानें, आवेशानें; उ० हें काम तडक चाललें. २ बिन हरकत; उ० अकबरी मोहोर तडक चालते. ३पूर्णपणें, भरपूर; उ० तो गांव येथून तडक बारा कोस आहे. ४ सरळ मार्गानें; थेट; उ० ही सडक तडक पुण्यास जाते. ५ वेळ न गमावतां; उ० तूं ऊठ आणि तडक चालू लाग. **स्त्री०** नेटाचा प्रयत्न; कांहीं कामाला लाविलेला जोर; उ० हूं, तडक मार आणि उचल हा धोंडा. ※ **तडकबोंब स्त्री०** तीव्र वेदनेची उसळी.

तडकणी स्त्री० बैल इ० जनावराच्या पाठीवर वाहावयाच्या गोणीला असते ती दोरी.

तडकणें अ० क्रि० १ पदार्थविशेषाला भेगा पडणें; भेगाळणें; उ० ह्या जमीनीला दोन तीन सारवणें घाला नाहींतर ती तडकेल. २ फुटणें किं० पिचणें (पण भाग वियुक्त न होतां संलग्न स्थितींतच असणें); उ० ही चिमणी तडकली, हा पेला तडकला, ही बांगडी तडकली. ३ कांहीं हानि झाल्यामुळें किं० कांहीं भयाचें कारण उपस्थित झाल्यामुळें अंतःकरण व्यथित होणें.

तडकफडक वि० १ त्वरित; वेळ न गमावतां केलेलें. २ स्पष्ट, असंदिग्ध. ३ भीडभाड न धरतां केलेलें (भाषण). ४ आवेशाचें किं० उत्साहाचें. **क्रि०वि०**तावडतोब; सबुरी न करतां; जलदीनें; उ० तो तडकफडक मेला म्ह० खितपत न पडतां. ह्या अर्थी ' तडकाफडकीं ' असाही शब्द आहे. ※**तडकाफडकी स्त्री०** घाई, त्वरा, जलदी.

तडकसार वि० तल्लख; चपळ.

तडकसावित्री स्त्री० तल्लख आणि चपळ मुलगी.

तडका क्रि० वि० तल्लखपणें.

तडका पु० १ थंडीचा कहर; तीव्र थंडी. २ तल्लखपणा. ३ तडाका. ※ **तडका तोडणें** पैशाबद्दल नेट किं० तगादा लावणें.

तडकाविणें स० क्रि० १ कोणेकाला रट्टा मारणें. २ कोणेकाला तंबी भरणें; कोणेकाला रागें भरणें. ३ आवेशानें (भाषण) करणें.

तडगी स्त्री० लहानसा मातीचा घडा.

तडज स्त्री०, पु० प्रपंचाचें खटलें.

तडजोड, तोडजोड [म० तोडणें + जोडणें] **स्त्री०** १ भांडणाऱ्या दोन पक्षांपैकीं प्रत्येकानें आपआपली मागणी थोडीशी कमी करून केलेला सलोखा. २ काटकसर.

तंडणें अ० क्रि० १ भांडणें; कज्जा करणें. २ खोटा पक्ष धरून वाद करणें.

तडणें अ० क्रि० १ उष्णतेच्या योगानें पदार्थ भेगाळणें. २ मडकें फार तापल्यामुळें त्याचे कळपे किं० पापुद्रे गळणें.

तडतडणें अ० क्रि० १ वेणी, आंबाडा, इ० तील केश फार ताणले गेल्यामुळें ते मुळांत दुखत असणें. २ चरफडून बोलणें. ३ फोडणींतील मोहोऱ्यांनीं तडतड असा आवाज करणें. ४ थंडीच्या योगानें ओंठ, गाल, इ० ना भेगा पडून त्या दुखत असणें.

तडफड स्त्री०, तडफडा पु० १ धडपड (करणें). २ कोणेकाच्या अंगावर ओरडणें किं० चरफडणें ही क्रिया.

तडफडणें अ० क्रि० १ ऊन्ह, भूक, ज्वर, इ० असह्य झाल्यानें हातपाय आपटणें, चरफडणें, इ० क्रियांनीं कोणेकानें युक्त होणें. २ प्रियजनाचा वियोग असह्य होऊन (जीव, आत्मा) व्यथित होणें. ३ कोणेकावर चरफडणें.

तडवा क्रि० वि० अत्यन्त. हें अव्यय नेहेमीं विशेषणाच्या पुढें येतें; उ० हें वांगें जून तडवा आहे; उ० तो गोविंदपंत म्हातारा तडवा झाला आहे; उ० ही मेथीची भाजी निबर तडवा झाली आहे.

तडस क्रि० वि० पूर्णपणें (भरणें, फुगणें);

उ० हें पोतें आतां अगदीं तडस भरलें, त्यांत ही लुगड्याची धडी आतां मावणार नाहीं; उ० माझें पोट तडस भरलें आतां मला एक चमचाभर देखील श्रीखंड जाणार नाहीं.

तडस पु० कांबळ्याची पर्जन्यनिवारणार्थ डोक्यावर घेतात त्या खोळींच्या घड्या कांट्यानें किं० चोयीनें खिळवितात तो कांटा किं० ती चोय (भरणें, घालणें). **पु० अ० व०** पोट अतिशय भरल्यामुळें किं० नळांत पाणी शिरल्यामुळें जी टोंचल्यासारखी वेदना होते ती (भरणें, लागणें); उ० उभ्यानें (किं० उपाशी पोटीं) तो पाणी प्याला म्हणून त्याला तडस भरले (किं०लागले) **स्त्री०** पोट फार भरल्यामुळें. पोटाला होते ती व्यथा किं० वाटते ती अस्वस्थता; उ० तीन जिलब्या अधिक खाल्ल्यामुळें माझ्या पोटाला तडस लागली आहे.

तडसणी स्त्री० गोणीच्या दोन्ही बाजूंच्या ज्या दोऱ्या त्या प्रत्येक.

तडसळी स्त्री० तळलेले वडे कढईतून काढावयाची टोंकदार सळई किं० कांठी.

तडा पु० १ चीर, भेग, फट; उ० ह्या मडक्याला (किं० कांचपात्राला किं० आरशाला) तडा गेला आहे. २ लांकूड इ० फोडीत असतां त्याच्या उडतात धलप्या किं० तुकडे ते प्रत्येक (जाणें, उडणें, निघणें).

तंडा, तांडा पु० १ गुरें, मुंग्या, इ० चा कळप किं० रांग. २ टोळी; समुदाय; उ० लमाणी बैलांचा तांडा.

तडाका, तडाखा पु० १ रट्टा, ठुस्सा. २ जोराचा किं० संतत प्रवाह; वर्षाव. ३ कोणतीही जोराची आणि एकसारखी चाललेली क्रिया. ४ जोराची आणि एकसारखी चाललेली क्रिया. ४ अतिथंडी, पाऊस, ऊन्ह, इ० चा अतिरेक किं० अतिशयपणा.

तडाग, तडाक [सं०] **पु०, न०** तळें, [सरोवर.

तडाडणें अ० क्रि० १ तडतड असा आवाज करणें. २ फुटणें; मोडणें.३ भेगाळणें.

तडावणें [**म०** तड=शेवट, कांठ] **अ० क्रि०** १ (कांहीं कार्य) शेवटास जाणें; ध्येयास जाऊन पोचणें. २ मडकें इ० ना भेग पडणें किं० चीर जाणें.

तडित् [**सं०**] **स्त्री०** वीज. ॐ **तडित्वान् पुं०** मेघ. **तडिल्लता स्त्री०** नागमोडी वीज.

तडीतापडी पु० भिक्षा मागून पोट भरणारा गोसावी, बैरागी, किं० तपस्वी.

तंडुल पु० तांदूळ. ॐ **तंडुलाम्बु न०** भाताची पेज.

तडेणें मागें ' तडगें ' पहा.

तंडेल [**म०** तंडणें] **वि०** भांडखोर. ॐ **तंडेली स्त्री०** १ भांडखोरपणा. २ दंडुकेगिरी.

तड्या [**म०** तड=कांठ] **वि०**१ किनाऱ्यावरून वाहात येणारा (वारा). २ ओठ, गाल, त्वचा, इ० ना भेगा पाडणारा (वारा).

तण [**सं०** तृण] **न०** १ गवत. २ भाताचें गवत; भातेण. ॐ **तणघर न०** गवती छपराचें घर. **तणपोशा वि०** बारीक बारीक गवत उत्पन्न करणारा (पाऊस). **तणमोड स्त्री०** पडीत जमीन लागवडीस आणावयाची असतां तिच्यावरील गवत इ० उपटून ती साफ करण्याची क्रिया. **तणमोडीचें उत्पन्न न०**पडीत जमीनीवर काढलेलें पहिलें पीक. **तणलोणी न०** चरणीस ठेविलेल्या गाय, म्हैस, इ०च्या दुधापासून काढलेलें लोणी.गोठ्यांत पासलेल्या जनावरांच्या दुधाच्या लोण्याला 'कणलोणी' म्हणतात. **तणवर पु०**जमीन भाजतांना काटक्याकुटक्या इ० च्या वर पसरतात तें गवत, पानें, इ०. **तणवरणें स० क्रि०** १ जमीन भाजावयासाठीं गवत इ० तिजवर पसरणें. **तणवी वि०** गवती छपर असलेलें (घर).

तणणें [**सं०** तन्=ताणणें] **स० क्रि०** १ तंग किं० घट्ट करणें; आवळणें; ताणणें.२(रेशिम, सूत, इ०) ताणून मांडणें.

तणणें अ० क्रि० कज्जे करीत बसणें.

तणतणणें अ० क्रि० १ कोपेकावर चरफडणें. २ फुटण्याइतकें घट्ट भरलें जाणें किं० आवळलें जाणें किं० ताणलें जाणें किं० चेपलें जाणें. ३ (चेंडू इ०) टणां टणां उड्या मारीत जाणें (उतरणीवरून किं० पाय़ऱ्यांवरून).

तणवरणें अ० क्रि० पोट, पिशवी, इ०रटाटून भरलेली असणें.

तणस [**म०** तण; **सं०** तृण] **न०** १ दाट वाढलेलें गवत, झाडें झुडपें, इ० समुच्चयानें. २

खळ्यावर इतस्ततः पडलेला धान्याच्या ताटांचा पाचोळा किं० केरकचरा. ३ हलक्या दर्जाचें गवत,–जें गुरांना फारसें पुष्टिकर नसतें.

तणसरणें अ० क्रि० यथेच्छ खाणें पिणें मिळाल्यानें (शरीर किं० माणूस किं० जनावर) पुष्ट होणें.

तणावा पु० कंठाचा किं० वाद्याचा सूर लावण्याची क्रिया.

तणावा [म० तणणें] पु० १ ताण, ओढ (देणें, लावणें). २ ताणण्याची क्रिया. ३ दोरी इ० ताणल्यामुळें येतो तो घट्टपणा. ४ तंबू न हालतां ताठ राहावा म्हणून त्याच्या दोऱ्या ज्या खुंटे इ० ना ताणून बांधलेल्या असतात त्या प्रत्येक. ५ उभा पुरलेला तारेचा, विजेचा, किं० टेलिफोनचा खांब ज्या दिशेस कलण्याचा संभव असतो त्याच्या उलट दिशेस त्याला ओढ द्यावी म्हणून जी दोरी इ० बांधलेली असते ती. ६ कोळ्याच्या घराचे मुख्य तंतु,–ज्यांनीं तें घर स्थिर वस्तूला चिकटाविलेलें असतें. ७ कोणत्याहीं उपयोगासाठीं ताणून बांधलेली दोरी, तार, इ०. ८ ज्याच्या आधारावर कोणेकाचा प्रपंच इ० चालतो तो मनुष्य; उ० आजपर्यंत रामभाऊंच्या आश्रयावर माझा प्रपंच चालला, आतां तो तणावा तुटला. ❀ **तणावे तुटणें** गाणें, बोलणें, इ० क्रिया करतांना कंठाला विशेष कष्ट देऊन उच्चार करणें. **एकाद्याचे तणावे तुटणें** तो आधाररहित किं० आश्रयरहित होणें.

तत् [सं०] ' तद् ' चें कठोर व्यंजनापूर्वीचें रूप. (समासांत) तो, ती तें, ते, त्या, तीं; उ० तत्क्षणीं म्ह० त्याचक्षणीं, तत्सदृश म्ह० त्या सारखा; तत्काळ म्ह० तावडतोब; एकदम; तत्कृत म्ह० त्यानें केलेलें इ० खालीं 'तद' पहा.

तंत [सं० तंतु] स्त्री० सतार, वीणा, इ० वाद्यांच्या तारा प्रत्येक. ❀ **तंतीं प्राण उरणें** (किं० **लागणें**) १ अगदीं मरणोन्मुख स्थितींत असणें. २ अत्यंत जीर्ण झालेला असणें (कपडा, वस्तु, इ०).

तंत [सं० तंतु] वि० सर्व बाबतींत अगदीं सारखा किं० बरोबर; कांहीं विशिष्ट पदार्थ मांप, वजन, इ० शीं पूर्णपणें संवादी किं० जुळणारा; (क्रि० भरणें, उतरणें); उ० ही ढेप तंत पांच मण भरली; उ० आतां तंत बारा वाजले. ❀ **तंतोतंत** [सं० तंतु; तंतु आणि तंतु] वि० विशिष्ट माप, वजन, इ० शीं अगदीं बरोबर. ' तंतवितंत ' हा शब्द ह्याच अर्थानें योजला जातो.

तंतरणें [सं० तंत्र=करणें, आचरणें] स० क्रि० १ थापा मारून कोणेकाला फसविणें. २ स्त्रीसंभाग करणें.

तंतारा, तताराक, तंतार [सं० तंतु] वि० (तारेसारखा) बारीक, किडकिडीत, किं० रोड.

तताळ वि० व्रात्य; खोडकर.

तंतु [सं०] पु० १ सूत, दोरा, धागा. २ सतार इ० ची ताणलेली किं० ताणावयाची तार. ३ वेलीचे जे अवयव कांहीं आधाराला वेटोळी घालून वर चढतात ते प्रत्येक. ४ एकाद्या कुटुंबांतील एकच जो अवशिष्ट पुरुष राहिलेला असतो तो,–जो तें कुटुंब संतति उत्पन्न करून टिकवूं शकेल. ५ माग, पत्ता, शोध, तपास, इ० लावण्याला साधनभूत अशी कांहीं गोष्ट किं० वस्तु. ६ संतति; मुलेंबाळें. ❀ **तंतुपटन्याय** पु० तंतूंवांचून पट (म्ह० वस्त्र) होणें शक्य नाहीं किं० तंतु हेंच कांहीं विशिष्ट प्रकारें एकांत एक गुंतविले म्हणजे त्यांनाच पट ही संज्ञा प्राप्त होते; पट हीं कांहीं वेगळी वस्तु नाहीं असें प्रतिपादन करण्याची सरणी. **तंतुमेह** पु० लघवीमध्यें धातूची तार जाण्याची विकृति. **तंतुवाद्य, तंतवाद्य, तंटीवाद्य** न० तारांच्या हादरण्यानें ज्यांतून सूर निघतात असें वाद्य; उ० सारंगी, वीणा, सतार, इ०. **तंतुवाय** पु० १ कोष्टी. २ कोळी (किडा).

तंतू [सं० तंतु=नक्र, सुसर] पु० यमुना, नर्मदा, इ० नद्यांमध्यें एक प्राणी आहे तो. त्याचे अवयव लांब तंतूंच्या रूपाचे असतात आणि ते पोहोणाऱ्याच्या पायांत आडकतात.

तंतोतंत [सं० तंतु; तंतु–न्–तंतु; तंतु आणि तंतु] वि० सर्व बाबतींत मिळता किं० मिलाफदार; पूर्णपणें सारखा. क्रि० वि० पूर्णपणें सारखा होईल अशा प्रकारें. वर 'तंत' मध्यें 'तंतोतंत' पहा.

तत्ता त्रि० हलकट, बेवकूब (माणूस).

तत्तावंथा पु० फसवेगिरी; भुलथापा देऊन

कोणेकाला फसविण्याची क्रिया.

तत्तामाल [**सं०** तत्त्व+**म०** माल; **फा०** माल] **पु०** १ नगद माल. २ पदार्थाचा उत्कृष्ट अंश; राशींतील उत्तम नग किं० भाग.

तत्पदार्थ [**सं०** तत् (तो)+पदार्थ] **पु०** परमात्मा.

तत्पर [**सं०** तत् परं यस्य] **वि०** १ एकाद्या विशिष्ट व्यवसायांत निमग्न. २ कांहीं कार्य करण्याला उत्सुक.

तत्पुरुष [**सं०**] **पु०** ज्या समासाच्या दोन पदांपैकीं पहिल्या पदानें दुसऱ्या पदाचें वर्णन करावयाचें असतें तो समास; प्रथमपदाला विग्रहांत विभक्ति लावावयाची असल्यास तो एक प्रकार आणि नसल्यास तो दुसरा प्रकार. उ० यमदंड=यमाचा दंड; तांबडमाती=तांबडी माती.

तंत्र [**सं०**] **न०** १ धागा, तंतु, तांत. २ कोणा वड्या माणसाचा लवाजमा किं०परिवार. ३ दुसऱ्या माणसाचें धोरण,–जें आपणांस संभाळावें लागतें; उ० तुझ्या तंत्रानें चालणारा तो मनुष्य नाहीं. ४ वर्तनाची सरणी; उ० तुमचें तंत्र निराळें आमचें तंत्र निराळें. ५ दोन कार्यें एकसमयावच्छेदेंकरून घडवून आणणारी कांहीं गोष्ट. ६ अनेक प्रश्नांना लागू पडणारें एकच उत्तर; उ० पानें कां सडलीं ? घोडा कां बुझला ? भाकरी कां करपली ? ह्या तीन्ही प्रश्नांचें ' न फिरविल्यामुळें,' हें एकच उत्तर समाधान करूं शकतें.७ दोन भिन्न भिन्न कामें परस्परांना अडथळा न होतां करणें किं० करण्याची सरणी; उ०काशीस गेलों तेथें यात्रा आणि उद्योग हीं दोन्हीं मी तंत्रानें केलीं. ८ धार्मिक कृत्यांत तोंडानें म्हणावयाचा जो भाग त्याच्या व्यतिरिक्त हातानें करावयाच्या ज्या क्रिया त्या समुच्चयानें. ९ मंत्रशास्त्रांतील एक भागविशेष. १० युगादिपासून ज्या ग्रंथांत ग्रहसाधन केलेलें आहे तो ग्रंथ. ११ जारणमारणाच्या क्रिया समुच्चयानें.

तत्रत्य [**सं०**] **वि०** तेथील; तेथला.

तत्रशीं [**सं०** तत्र=तेथें] **क्रि० वि०** जवळपास; शेजारीं; संनिधीला; उ० त्या हलकटास तंत्रशीं उभा करूं नको. **तत्रशी स्त्री०** पत्ता, सुगावा. ❀ **तत्रशी लागूं न देणें** आपल्या कामाचा किं० विचारांचा कोणाला मागमूस न लागू देणें.

तत्रापि, तत्राप [**सं०** तत्र+अपि] **क्रि० वि०** तरीहीं; तरी देखील.

तंत्री [**सं०**] **स्त्री०** १ लोहादि धातूंची तार. २ दोरी, दावें. ३ वीणा इ० ची तार. ४ रक्तवाहिनी. ५ वीणा. **वि०** १ विणून तयार केलेलें (वस्त्रादि). २ तंत्रें करणारा म्ह० लटपटी खटपटी करणारा (लुच्चा माणूस).

तत्रैव [**सं०**] **क्रि० वि०** तेथेंच; त्याच ठिकाणीं.

तत्त्व [**सं०**] **न०**१ पदार्थविशेषांतील सारभूत अंश; पदार्थाचा महत्त्वाचा भाग; उ० दुधामध्यें लोणी हें तत्त्व आहे. २ पदार्थविशेषाचें वास्तविक स्वरूप; वस्तुस्थिति. ३ सत्य; खरें स्वरूप. ४ कांहीं गोष्टीपासून घ्यावयाचा बोध. ५ तात्पर्य, मूलतत्त्व. ६ ब्रम्ह, परमात्मा. ७ पृथिव्यादि पंचमहाभूतें, पंचविषय, दशेंद्रियें, मन, अहंकार, महतत्त्व, माया आणि ईश्वर, हीं प्रत्येक. ❀ **तत्त्वाभियोग पु०** महत्त्वाचा आरोप. **तत्त्वज्ञ, तत्त्वज्ञानी वि०** वेदांती. **तत्त्वज्ञान न०** १ यथार्थ ज्ञान. २ ब्रम्हज्ञान. **तत्त्वन्यास पु०** पूजेमध्यें देहावयवांवर मंत्रांनीं न्यास करणें. **तत्त्वसंख्यान न०** सांख्यमत. **तत्त्वतः, तत्त्वता क्रि० वि०** खरें पाहिलें असतां; वस्तुतः; खरोखरीं.

तथा [**सं०**] **क्रि० वि०** १ तसें; त्याप्रमाणें. उ० **यथा राजा तथा प्रजा** राजा अनीतिमान असला तर प्रजाजनही तसेच असतात. २ आणखी असें कीं. ३ त्या अर्थीं. ४ ठीक, बरें आहे, होय; तसें असो; चिंता नाहीं. **स्त्री०** १ शंका, संशय; उ० तें कार्य सिद्धीस जाईल ह्यांत कांहीं तथा नाहीं. २ बळकटी, मजबुती; टिकून राहण्याची ताकद; उ० त्या धोतरांत आतां कांहीं तथा राहिली नाहीं (म्ह० तें लवकरच फाटेल). ❀ **तथागत वि०** तशा स्थितींतला; तसला. **तथागत पु०** बुद्ध साधु. **तथापि क्रि० वि०** तरीसुद्धां. **तथैव क्रि० वि०** त्याचप्रमाणें. **तथात्व न०**, **तथाभाव पु०** १ वस्तुस्थिति. २ तशी स्थिति. **तथास्तु उ० वा० अ०** १ ठीक आहे; बरें आहे.

२ तसें असो; तसें होओ. **तथातथा क्रि०वि०**त्या रीतीनें; त्या प्रकारें.

तथ्य [**सं०**] **वि०** खरें, यथार्थ. **न०** सत्य गोष्ट.

तद् [**सं०**] **सर्वनाम** तो, ती, तें, इ०. मराठींत हा शब्द फक्त समासांत आरंभीं येतो आणि पुढें कठोर व्यंजन आल्यास त्याचें 'तत्' असें रूप होतें. मागें 'तत्' पहा. तदनुगुण म्ह० त्याशीं समान, त्याला अनुरूप. तदनुरूप म्ह० त्याला मिळता; त्याप्रमाणें; त्याशीं समान. तदनुसार म्ह० त्याशीं जुळणारा; त्याप्रमाणें. तदाकार म्ह० त्याच आकाराचा; त्याशीं पूर्णपणें मिळून गेलेला. तदुपरि, तदुत्तर, तदनंतर म्ह० त्यानंतर. तद्रूप म्ह० त्याच रूपाचा. तद्वत् म्ह० १ त्या सारखा. २त्याच प्रमाणें. तल्लीन म्ह० त्यांत निमग्न किं० गढलेला. तदन्त म्ह० पूर्णपणें; अगदीं; सर्वथैव; (बुडणें, मरणें, जाणें, जेवणें). तद्देशीय म्ह० त्याच देशाचा. तदारभ्य म्ह० तव्हांपासून; त्याशीं किं० तेथें सुरुवात करून.

तदीय [**सं०**] **वि०** त्याचा; त्याच्या संबंधाचा.

तंद्रा [**सं०**] **स्त्री०** १ झोपेची गुंगी. २ आळस. ३ थकवा. ꕥ **तंद्रालु, तंद्रित वि०** १ थकलेला. २ आळशी; सुस्त.

तंद्रि, तंद्री, तंद्रिका [**सं०**] **स्त्री०** १ गुंगी. २ थकवा. ३ आळस. ४ एकाद्या विषयाच्या मननांत किं०चिंतनांत झालेली एकाग्रता किं०झालेला लय (लागणें); उ० कोणीकडे तुझी तंद्री लागली आहे ? माझ्या प्रश्नाला तूं उत्तर कां नाहीं देत ?

तध्दीं क्रि० वि० तेव्हां; त्या काळीं.

तन [**सं०** तनु] **स्त्री० न०** १ शरीर, देह. २पदार्थ, शरीर, इ०संबंधानें घ्यावयाची काळजी किं० राखावयाची निगा; टूक (संभाळणें). ꕥ **तनमन न० ए० व०** एकाद्या विषयाकडे लावलेली सर्व शक्ति,—मनाची आणि शरीराची. **तनमनधन न० ए० व०** आपलें सर्व सामर्थ्य; उ० तूं अभ्यासाकडे तनमनधन लाविल्याशिवाय तूं पास होणार नाहींस.

तन, तण [**सं०** तृण] **न०** गवत.

तनई, तनय स्त्री० उभारलेला तंबू, राहुटी, इ० हालूं नये म्हणून त्याला ज्या दोऱ्या बांधून खुंटे इ० ना बांधलेल्या असतात त्या प्रत्येक.

तनखा [**फा०** तन्‌खवाह] **पु०** १ सरकारी तिजोरीवर दिलेला हवाला किं० तींतून जें मिळावें म्हणून ठरविण्यांत आलें आहे तें. २ आदिलशाही राजांनीं ठरविलेला सारा. ३ गांवच्या शेतसाऱ्याचें पत्रक. ४ कांहीं पदार्थावर जो कोणेकाचा स्वामित्वादि संबंध असतो तो. ५ व्यवहारादि जो कोणेकाचा कोणेकाशीं संबंध असतो तो; उ० रामभाऊशीं तूं तनखा तोड (किं० तोडून टाक) म्हणजे तुझें आयुष्य सुखांत जाईल.

तनतनणें अ० **क्रि०** कोणेकावर रागावणें किं० चरफडणें; तणतणणें.

तनन, तननं न० १ ध्वनि यथाशास्त्र करण्याची क्रिया. २ एकादें गाणें पुटपुटणें किं०तोंडांतल्या तोंडांत आपल्याशींच म्हणणें. ꕥ **आधीं अननं मग तननं** आधीं जेवूं आणि मग गाऊं. पोटांत गार झाल्यावर मौजेच्या गोष्टी. ह्याच अर्थाची अरबी म्हण, अव्वल तआम् बादहू कलाम्.

तनमणी स्त्री स्त्रियांचें एक कंठभूषण.

तनय [**सं०**] **पु०** पुत्र; मुलगा. **तनया** [**सं०**] **स्त्री०** मुलगी; कन्या.

तनयी स्त्री० राहुटी इ० ची दोरी. २ परटांची कपडे वाळत घालावयाची दोरी. ३ कोणत्याही कामासाठीं ताणलेली दोरी. ४ निशाणाची काठी इ० न डळमळावी म्हणून ताणून बांधलेली दोरी. ५ ज्यावर आपण भिस्त ठेवूं शकूं असा माणूस; आपला आश्रयदाता. ꕥ **एकाद्याची तनाई तुटणें** १ त्याचा आश्रयदाता नाहींसा होणें. **तनया तुटणें** १ कंठ साफ करण्यासाठीं गवयानें कंठांतून वेंडवाकडे आवाज उत्पन्न करण्याची क्रिया चालणें किं० चालूं असणें; उ० इतक्यांत कशाला दिवाणखान्यांत जातां ? अजून गाणें सुरू झालें नाहीं, बोवांच्या सध्या तनया तुटत आहेत. २ अकुशल गवई गात असणें.

तनवी [**सं०** तनु=शरीर] **स्त्री०** चेहे-

ऱ्याची टवटवी; नीरोगीपणाचें तेज; आजारांतून उठल्यावर शरीरास येतो तो तजेला.

तनस न० मागें ' तणस ' पहा.

तन (-ण-) स (-सु-) डी स्त्री० १ गवताची काडी. २ (लक्षणेनें) क्षुल्लक पदार्थ; बिनकिंमतीची किं० टाकाऊ वस्तु. ❀ **मी तुला एक तनसडी देणार नाहीं** मी तुला कांहीं देखील देणार नाहीं. **मला तुझी तनसडीही नको** तुजपासून मला कांहींही नको; मी तुझें कांहींही घेणार नाहीं.

तनाई, तनाय, तनाव [अ० तनाब्] **स्त्री०** तंबूची दोरी.

तनाखोरी [**फा०**] **स्त्री०** १ दुसऱ्याचा पैसा लाटणें किं० मारणें. २ दुसऱ्याची ठेव खाऊन पचविण्याची क्रिया.

तनाना पु० गाणें (करणें, चालणें).

तनावा पु० मागें ' तणावा ' पहा.

तनु [**सं०**] **वि०** ० कृश, क्षीण. २ नाजूक. ३ लहान. ४ तलम (वस्त्र). ५ अल्प; क्षुल्लक. **स्त्री०** १ शरीर. २ शरीर सुस्थितींत राहाण्यासाठीं त्याची घ्यावयाची काळजी किं० पाळावयाची टक्की (तनूवर असणें किं० राहाणें); उ० मीं पंचाहत्तर वर्षांचा म्हातारा आहें पण मला गेल्या चार वर्षांत बिलकुल आजार आला नाहीं, याचें कारण मी तनूवर राहातों. ❀ **तन्वंगी स्त्री०** सुकुमार स्त्री. **तनुज पु०** पुत्र; मुलगा. **तनुजा स्त्री०** कन्या. **तनुत्र, तनुत्राण न०** चिलखत. **तनु राखणें** (किं० **संभाळणें**), **तनुप्रमाणें वागणें** शरीराच्या आरोग्याला बाध येईल असें कांहीं न करणें.

तन्मय [**सं०**] **वि०** १ त्यांत निमग्न किं० एकाग्र झालेला. २ तद्रूप.

तन्मयता [**सं०**] **स्त्री०** एकाद्या गोष्टींत किं० विचारांत अगदीं गर्क होऊन जाणें.

तन्मात्र [**सं०**] **न०** पृथ्वी, जल, इ०चें अति सूक्ष्म रूप.

तप [**सं०** तपस्] **न०** १ शरीरशुध्यर्थ किं० देवताप्रसादासिध्यर्थ जें उपोषणादिरूप आचरण तें. २ तपश्चर्या. ३ सप्त स्वर्गलोकांपैकीं सहावा. ४ क्षत्रिय इ० वर्णांचें विशिष्ट कर्तव्य. ५ बारा वर्षांचा अवधि; उ० मी दोन तपें वेदान्त पढतों आहें. ६ चिंतन. ७ सद्गुण. ८ ब्राम्हण. ❀ **तपोधन, तपोनिधि पु०** तपस्वी; यति. **तपोबल, तपःसामर्थ्य न०** तपाच्या योगानें अंगीं येणारें सामर्थ्य. **तपीं बसणें** १ पुण्यार्जनार्थ कांहीं व्रत, नियम, इ० पाळीत किं० आचरीत राहाणें. २ मामलत इ० अधिकारावरून भ्रष्ट होऊन रिकामें बसणें. **करून करून तपीं बसणें** कांहीं भलभलतीं पापें करून नंतर साधुवृत्तीचा अवलंब करणें. **तप तपणें** तप करणें; तपश्चर्या करणें. **तपोलोक** [**सं०**] **पु०** सप्तस्वर्गांपैकीं सहावा. वर ' तप ' अर्थ ३ पहा. **तपोवन न०** तपश्चर्या करावयाचें वन.

तपकडी स्त्री० पुढें ' तबकडी ' पहा.

तपकणें अ० क्रि० पाणी, रक्त, इ० थेंबाथेंबांनीं गळणें; टपकणें.

तपकीर, तपकील, तपखिल स्त्री० तंबाखु खलून नाकांत ओढावयासाठीं जें वस्त्रगाळ चूर्ण करतात तें. ❀ **तपकिरी वि०** तपकिरीच्या रंगाचें (वस्त्र, इ०).

तपकिऱ्या (-ल्या) पु० १ तपकीर विकणारा. २ तपकिरीचें व्यसन ज्याला फार आहे असा.

तपगणें अ० क्रि० ठासून भरलें जाणें.

तपणें [**सं०** तप्] **अ० क्रि०** १ चकचकणें; प्रकाशणें. २ उठून दिसणें; देदीप्यमान असणें. (तप) करणें. ❀ **कोणेकावर तपणें** त्याच्यावर क्रुद्ध होणें.

तपन [**सं०**] **न०** १ चमकणें. २ प्रकाशाचा झळझळाट. ३ सूर्याच्या उन्हाची प्रखरता (पडणें, होणें). ४ तापविणें. ५ पीडिणें. **वि०** ताप देणारा. **पु०** १ सूर्य. २ उन्हाळा. ३ सूर्यकांत मणि. ❀ **तपनमणि पु०** सूर्यकान्त. **तपनात्मज पु०** यम.

तपनीय, तपनीयक [**सं०**] **न०** १ अग्नींत तापवून शुद्ध केलेलें सोनें. २ सोनें.

तपली स्त्री०, तपलें न० पुढें ' तपेली, ' ' तपेलें ' पहा.

तपशिला पु० स्त्रियांचें ल्यावयाचें एक वस्त्रविशेष.

तपशील, तपसील [अ० तफ्सील्] पु० १ एकाद्या वस्तूच्या किं० वृत्तान्ताच्या ज्या ज्या वेगवेगळ्या बाबी त्या समुच्चयानें; एकाद्या वर्णनांतील जे मुद्दे ते समुच्चयानें. २ सर्व मुद्दे किं० अंगें सांगून केलेलें वर्णन किं० सांगितली हकीगत. ३ लांबलचक वर्णन. ४ खोटी सबब (लावणें). ✿ **तपशीलवार, तपसीलवार** वि० सर्व तपशिलासह.

तपस्या [सं०] स्त्री० तपश्चर्या.

तपस्वी [सं० तपस्विन्] पु० तपश्चर्या करणारा.

तपळ, तपीळ वि० १ तापट स्वभावाचा. २ कामांत तल्लख किं० चटपटीत.

तपास [अ० तफ्इस्] पु० शोध; चौकशी.

तपासणी [म० तपासणें] स्त्री० १ शोध; चौकशी. २ बारकाईनें केलेलें अवलोकन किं० निरीक्षण.

तपासणें [म० तपास] स० क्रि० १ परीक्षणें; निरीक्षणें. २ शोधणें; धुंडाळणें.

तपी [म० तप; सं० तपस्] वि० तपश्चर्येंत निमग्न; तपस्वी.

तंपीठ, तंबीट न० तांदुळाच्या पिठाचें करतात तें एक खाद्यविशेष.

तपिळ [म० तप] वि० १ रागीट; ज्याला लवकर राग येतो असा. २ कामांत तल्लख.

तपेली स्त्री० ताम्रादि धातूंचें एक आकारविशेषाचें भांडें.

तपेलें न० मोठ्या आकाराची तपेली. ✿ **एकाद्याचें तपेलें बुडणें** १ त्याचें नुकसान होणें. २ त्याचें चरितार्थाचें साधन नाहींसें होणें. बहुधा निषेधार्थी ह्या वाक्प्रचाराचा प्रयोग होतो; उ० तूं आला नाहींस तर माझें काय तपेलें बुडणार आहे ?

तप्त [सं०] वि० तापलेला (सूर्याचें ऊन्ह, अग्नि, ज्वर, कांहीं मनोविकार, इ० नीं). ✿ **तप्तकांचन** न० अग्नींत घालून स्वच्छ केलेलें सोनें **तप्तदिव्य** न० तेल तापवून त्यांत टाकलेला पदार्थ हातानें उचलून बाहेर काढण्याचा विधि. 'मी बोलतों आहें तें खरें आहे,' आणि खरें नसल्यास माझा हात भाजेल' असें म्हणून कोणी मनुष्य त्या तेलांतून तो पदार्थ बाहेर काढतो. हा जो विधि त्याला 'तप्तदिव्य करणें', असें म्हणतात **तप्तमुद्रा** स्त्री० तापवून लाल केलेल्या तांबें ह्या धातूच्या मुद्रांनीं वैष्णव लोक आपल्या अंगावर भाजून घेतात तीं चिन्हें किं० तीं चिन्हें उमटविणाऱ्या त्या मुद्रा.

तप्पा [हिं०] पु० एक मोठा गांव आणि त्याच्या लगतचीं दहा. पंधरा बारकीं खेडीं मिळून जो प्रदेश त्या मोठ्या गांवाच्या नांवाखालीं मोडतो तो.

तफसील, तफसीलवार मागें ' तपशील, ' ' तपशीलवार ' पहा.

तफावत [अ०] स्त्री० १ भेद, फरक, अंतर. २ दोन वस्तूंत परस्परांशीं जी विसंगति असते ती. ३ कर्तव्यापासून भ्रंश; आपल्या कामांत चुकी किं० हयगय किं० गाफीलपणा. ४ वस्तुस्थितीशीं विसंगतपणा किं० न जुळतेपणा. ✿ **तफावतनीस, तफावतनिशी** मागें ' तजकरनीस, ' ' तजकरनिशी ' पहा.

तंबक स्त्री० विहीरीच्या सभोंवार बांधलेला ओटा.

तबक [अ०] न० १ पूजेचें साहित्य किं० पानसुपारी वेलदोडे इ० ज्यांत ठेवतात तें वाटोळें आणि उथळ असें कोणत्याही धातूचें पात्र. २ जमीनीवरील सपाट माथ्याचा मोठ्या विस्ताराचा उंचवटा. ३ पर्वतादिकांच्या वेढ्यामध्यें सापडलेली जमीन,—जी पूजादि साहित्याच्या तबकासारखी दिसते. ४ सभामंडप इ० सायवानाचा प्रदेश वर्ज करून मध्यभागाचा जो प्रदेश किं० त्या खालचें जें स्थल तें.

तबकडी [म० तबक] स्त्री० १ लहान आकाराचें तबक. २ वाटोळा आणि पातळ पत्रा. ३ पालखीतील बसावयाची जागा. ४ जिन्याच्या पायऱ्या जेथून वर सुरू होतात तो प्रदेश; जिन्याच्या पायऱ्या संपल्यावर जी सपाटी असते ती; जिन्याच्या पायऱ्यांची एक परंपरा संपून दुसरी सुरू व्हावयाच्या जागीं जी सपाटी राखलेली असते ती.

तबकणें अ० क्रि० थेंबाथेंबांनीं गळणें.

तबंचा [हिं०] पु० पिस्तूल.

तबदील [अ०] वि० १ बदललेलें. २

दुरुस्त केलेलें. स्त्री०, न० १ दुरुस्ती. २ फेरबदल. न्यायाच्या कचेरीतील हा पारिभाषिक शब्द आहे.

तंबर वि० मद्यानें किं० गर्वानें उन्मत्त.

तबरूक [अ०] पु० मोहरमांतील ताबुताच्या किं० कोणा पीराच्या नांवानें प्रसाद म्हणून कोणा बड्या अधिकाऱ्याला दिलेली खिरापत किं० अन्य देणगी.

तबल [अ० तब्ल्] पु० १ ढोलकें. २ लहान कुऱ्हाड.

तबल, तब्बल क्रि० वि० विवक्षित परिमाणानें मोजलें असतां थोडेंसें अधिक भरेल पण कमी भरणार नाहीं खास असें; उ० तब्बल एक तोळा, तब्बल दोन कोश, तब्बल पांच पायल्या, इ०.

तबलक [अ०] स्त्री० अनेक कागद नीट एकत्र जुळवून त्यांना बांधतात तें सूत, किं० अशा बांधलेल्या कागदांचें जुडगें. [फा०] स्त्री० लहानसा डफ किं० ढोलकें.

तबला [अ० तब्लाह्] पु० पखवाजांत एक भेद आहे; याची पडगीं दोन असतात, वाद्या आणि धूम किं० धुमस. ꙮ **तबलजी** पु० १ तबला वाजवितो तो. २ तबला वाजवावयाला शिकवितो तो.

तंबाकू (–खू) पु०, स्त्री० वांगें, बटाटा, टोमाटो, इ० च्या वर्गांतील एक वनस्पति. हिच्या पानांचा चुरा जर्दा म्हणून तोंडांत धरतात; हिच्या पानांचें पीठ नाकांत भरतात; हिच्या पानांचा भुगा चिलमींत घालून तिचा धूर तोंडांत ओढून घेतात.

तबीयत, तब्बेत [अ०] स्त्री० १ मनुष्यादिकांची प्रकृति (आरोग्याविषयीं बोलतांना). २ स्वभाव. ३ मनाची लहर. ꙮ **तबीयती** वि० लहरी, छांदिष्ट.

तंबी, तंभी [अ० तंबियाह्] स्त्री० १धमकावणी; दटावणी. २ (कोणेकाला दिलेला) मार, ठोक. ꙮ **तंबीमार** पु० जबर शिक्षा.

तबीब [अ०] पु० मुसलमान वैद्य किं० शस्त्रवैद्य.

तंबुरा [अ०] पु० चार तारा असलेलें एक वाद्य. **तंबुरी** स्त्री० लहान तंबुरा. **तंबुरची** (–जी) पु० तंबुरा वाजविणारा किं० शिकविणारा.

तंबू [हिं०] पु० मधोमध उभ्या केलेल्या खांबाच्या आधारावर कापडाचें छप्पर आणि भिंती असलेलें तात्पुरत्या राहण्यासाठीं केलेलें घर. हें घर बरेंच मोठें असल्यास त्याला ' डेरा ' म्हणतात. ꙮ **तंबू ताणून निजणें** संसारादिकांची काळजी न करतां किं० काळजी सोडून स्वस्थ असणें किं० राहाणें. **तंबू ठोकणें** (किं० **देणें** किं० **मारणें**). तंबू उभारणें. **तंबू पाडणें** उभारलेला तंबू उपटणें.

तंबूर [अ०] पु० एक चर्मवाद्य.

तबेत इ० ' तबियत ' इ० पहा.

तबेल पु० १एक चर्मवाद्य. २कुऱ्हाड. ꙮ **एकाद्या गोष्टीचे तबेल वाजणें** तिचा बोभाटा होणें (वाईट अर्थी).

तबेला [अ० तवेलाह्] पु० १ घोड्यांची पागा. २ रथ ठेवण्याची जागा. ३ उभे केलेल्या घोड्यांची रांग.

तंबोरा, तंबोरी मागें 'तंबुरा,' 'तंबुरी ' पहा.

तबल, तब्बर मागें ' तबल ' पहा.

तब्यत, तब्यती मागें ' तबियत, ' ' तबियती ' पहा.

तम [सं० तमस्] न० १ काळोख, अंधेर. २ मोह. ३ मूर्च्छा. ४ निद्रा. ५ अज्ञान. ६ दुःख. ७ पाप, पातक. ८ सत्त्व, रज, आणि तम, ह्या तीन गुणांपैकीं तिसरा; तमोगुण.

तम [सं०] गुणाचा अतिशायितपणा किं० उत्कृष्टपणा दाखविणारा हा प्रत्यय आहे; उ० दुष्टतम म्ह० अति दुष्ट; उ० पवित्रतम म्ह० अत्यन्त पवित्र.

तमंचा [हिं०] पु० पिस्तूल.

तमणें, तमतमणें अ० क्रि० १ गर्वानें वल्गना करणें. २ बडबडणें.

तमतमाशा पु० बडबड; दर्पोक्ति; डाफरणें.

तमसुक, तमस्सुक पु० पुढें ' तमासूक ' पहा.

तपस्वी [सं० तपस्+प्रत्यय] वि० १ तापट, रागीट. २ अज्ञानरूप. ३ तमोरूप.

तमा, तम्मा [अ० तमअ=इच्छा] **स्त्री०** महत्त्व, परवा, किंमत (अकरणरूपी प्रयोग); उ० मला तुझी काय तमा आहे ?

तमाकू, तमाखू मागें 'तंबाकु' पहा.

तमाखोरी मागें 'तनाखोरी' पहा.

तमाम [अ०] **वि०** सर्व, दरोबस्त; उ० तमाम लोकांस कळविण्यात येतें कीं येथें कोणी लघवी केल्यास कानूप्रमाणें त्याला शिक्षा केली जाईल. **क्रि० वि०** अपवाद न करतां; सर्वथैव; मागें पुढें न पाहतां; उ० तो सर्वांचीं डोकीं तमाम कापीत गेला.

तमामी [अ०] **स्त्री०** १ सर्वांगांनीं पूर्णपणाची स्थिति; पूर्णता. २ खाऊन किं० वापरून संपलेपणाची स्थिति. ३ ज्यांत उभें सूत जरीचें आणि आडवें रेशमाचें असतें असें वस्त्र.

तमाल [सं०] **पु०** ज्याचीं पानें मसाल्यांत घातली जातात असा एक वृक्ष. ※ **तमालपत्र न०** ह्या झाडाचें पान.

तमाशा [फा०] **पु०** १ सोंगें घेणें, बाहुलीं नाचविणें, दाव्यावर चालणें, इ० अनेक प्रकारचे करमणुकीचे प्रकार ज्या खेळांत दाखविले जातात तो. २ हलक्या दर्जाच्या लोकांच्या करमणुकीचें शृंगाररसभरित नाटक. ३ लोकाचार, रूढि, शास्त्र, इ० ची मर्यादा उल्लंघन करून केलेलें वर्तन. ४ कांहीं चमत्कारिक, अद्भुत, आणि अकल्पित गोष्ट. ※ **तमासगीर पु०** १ तमाशा दाखवितो तो. २ तमाशा पाहणारा. ३ चमत्कारिक वस्तु पाहाण्याचा ज्याला नाद आहे असा.

तमासुक [अ० तमस्सुक] **पु०** आपण कोणेकाला लिहून दिलेला करार.

तयनात इ० पुढें 'तैनात' इ० पहा.

तयार [फा०] **क्रि०** १ कांहीं काम करावयाला ज्या ज्या गोष्टींची जरूरी असते त्या त्या गोष्टींनीं सिद्ध किं० युक्त. २ एकदम कामाला लावतां येईल किं० योजतां येईल असा. ३ कांहीं गोष्ट करावयाला जो सिद्ध आहे किं० सज्ज आहे असा.

तयारी [फा०] **स्त्री०** १ सिद्धता; सज्जता. २ राहुटीला खांबांचे टेकावे देऊन उंच दार करतात तें. ※ **तयारीच्या मेखा स्त्री० अ० व०** तंबू उभा करावयाचा असतां अगदीं प्रथम ज्या सहा खुंट्या किं० मेखा जरूर असतात त्या.

तर [सं० तर, तरि, किं० तरी] **स्त्री०** १ उतारूंना खाडी इ० तून या कांठाकडून त्या कांठाकडे वाहून नेणारी होडी; खाडी, समुद्र, नदी इ० वर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणाकडे उतारू, सामान, इ० ची नेआण करणारी होडी, गलबत, इ०. २ खाडी किं० जमीनींत शिरलेला समुद्राचा फाटा. ※ **तरीपार करणें** समुद्रावरून होडी इ० नीं पलीकडे नेणें किं० पोंचविणें.

तर [सं०] हा तद्धित प्रत्यय संस्कृत विशेषणें किं० नामें यांना लागून अधिक हा अर्थ दाखवितो; उ० जवन म्ह० जलद, जवनतर म्ह० अधिक जलद; श्रेष्ठतर, इ०.

तर [सं० तर्हि] **अ०** १ 'जर' या उभयान्वयी अन्वयाला जाब देणारें हें अव्यय आहे. त्याचा अर्थ तसें असल्यास, तसें झाल्यास, त्या अर्थी, असा असतो; उ० जर पाऊस पडला तर सुभिक्ष होईल. **टीप,**—जर हा शब्द वाक्यांत न योजला तरी चालतो; उ० तूं मला पैसे उसने ह्या वेळीं दिलेस तर मी तुझे उपकार जन्मजन्मीं विसरणार नाहीं. 'तर' हा शब्द पुष्कळ वेळां केवळ शोभेसाठीं वाक्यांत योजलेला असतो; उ० मी तर अगदीं गरीब आहें, तुम्हांला कसे पैसे उसने देऊं? उ० तूं तर मला सोबत करावयाला ये, मग रामा येओ किं० न येओ. २ संदिग्धता दाखविण्यासाठीं 'तर'चा उपयोग होतो; उ० मी आलों तर येईन म्ह० माझें येणें अनिश्चित आहे. **टीप,**—तर हा शब्द नामाप्रमाणें योजला असता त्याचा अर्थ अडचण, विघ्न, हरकत, असा होतो; उ० मी जेवावयाला तुमच्या घरीं येईन पण मध्यें एक तर आहे म्ह० कांहीं कारणामुळें मला कदाचित् येतां येणार नाहीं. मार्गांतील खाडी असा 'तर'चा अर्थ घेतला तरी हाच अर्थ निघण्याजोगा आहे.

तरक पु० स्त्री० १ जेथें फार ओझें किं० वापर पडावयाचा आहे किं० जेथें तोल संभाळावयाची आवश्यकता आहे तेथें बसविलेला खांब किं० तुळई. २ झाड इ० ना दिलेला टेका.

तरकट [सं० तर्क] **न०** १ दुसऱ्यावर कांहीं दोषारोप करण्यासाठीं किं० त्याचें नुकसान कर-

ण्यासाठीं रचिलेली खोटी हकीगत किं० गोष्ट. २ चात्रटपणाचें भाषण.

तरकटणें अ० क्रि० कांहीं तरी छांदिष्ट-पणाच्या कल्पनेच्या पाठीस लागणें; भरकटणें.

तरकणें [सं०तर्क] स० क्रि० तर्कानें जाणणें; उ० तुकोबाचे लाल डोळे पाहातांच मी तरकलों कीं स्वारीनें दारू ठाशिली आहे.

तरकश (-स) [फा० तरकश्] पु०, स्त्री० १ बाणांचा भाता. २ कोणतेंही हत्यार ठेवावयाची पिशवी इ०.

तरकाकडी स्त्री० एक प्रकारची काकडी; टर-काकडी.

तरकारी [हिं०] स्त्री० पालेभाजी.

तरकूट न० तांदूळ, पोहे, इ०चे ठायीं भाताचे नख्याचा जो चरचरीत अंश असतो तो.

तरंग [सं०] पु० १ पाण्याची लाट. २ पाण्याचा बुडबुडा. ३ (लाक्षणिक) मनांत अनि-यंत्रितपणें उद्भवणारे विचार प्रत्येक. ४ पाण्या-वरचा तवंग. ५ डोळयांची दृष्टि गढूळ किं० अस्पष्ट करणारा साका. ६ पाण्यावर तेल पडल्यानें जीं अनेक रंगांचीं वर्तुळें किं० देखावे दिसतात ते प्रत्येक किं० समुच्चयानें. ७ ग्रामदेवतेच्या देवळांत त्या त्या देवतेच्या चिन्हांनीं चिन्हित जे रंगविलेले खांब उभे ठेविलेले असतात ते प्रत्येक. ८ पदार्था-वर धरतो तो मळाचा पापुद्रा. ꙮ **जलतरंग** पु० एक वाद्यविशेष.

तरंगण स्त्री० हातपाय ताणून किं० लांबरुंद मांडी घालून बसण्याचें संस्थान (मारून बसणें).

तरंगणें [सं० ‘ तरंग ’ पासून] अ० क्रि० १ पाण्यांत न बुडतां किं० पाण्याच्या तळास न जातां केवळ पाण्याच्या पृष्ठभागावर राहाणें; उ० लांकूड पाण्यांत तरंगतें. २ बोलतांना मुद्दा सुटून वाहवत जाणें. ३ आधार न मिळाल्यामुळें किं० आधार सुटल्यामुळें अनिश्चित किं० अस्थिर स्थितींत असणें. ४ वाद, खटला, इ० निकाल न लागलेल्या स्थितींत असणें. ५ पक्का निश्चय झालेल्या स्थितींत (मन) नसणें; (मन) संदिग्ध स्थितींत असणें. ६ खोळंबून राहाणें (कोणेकासाठीं किं० कांहीं गोष्टीसाठीं). ७ (बुद्धि)कुंठित होणें. ८(आरंभि-लेलें काम) शेवटास न जातां कुचंबत राहाणें.

तरंज [सं० ‘तरंग’ पासून] स्त्री० पाणी, डोळा, इ० वर धरतो तो साका किं० मळाचा थर.

तरजमा, तरजुमा [अ० तर्जमाह्] पु० १ कांहीं मजकूर एका भाषेंतून दुसऱ्या भाषेंत सांग-ण्याची क्रिया किं० असा सांगितलेला मजकूर. २ कांहीं मजकुरांतून अनावश्यक भाग गाळून आव-श्यक भाग ठेवण्याची क्रिया किं० असा ठेविलेला भाग; सारांश. ꙮ **तरजुमान** पु० १ भाषान्तराच्या कामावर सरकारनें नेमलेला अधिकारी. २ एकमे-कांच्या भाषा ज्यांना समजत नाहींत अशा दोन माणसांत संभाषण चालण्याच्या कामीं जो मदत करतो तो,—ह्याचें म्हणणें त्याला आणि त्याचें ह्याला सांगून.

तरट न० गोणपाट. ꙮ **तरटी** वि० तरटाचें केलेलें. स्त्री० तरटाचें पोतें; ह्या अर्थी **तरटें** न० असाही शब्द आहे.

तरटी स्त्री० बैलाच्या पाठीवर लादलेला बुधला किं० गठ्ठा वेष्टावयाचें तरट.

तरटें न० १ गोणपाटाचें पट्टें. २डोक्यावर केशा-भावानें पडतें तें टक्कल. ३ बोडकें, टाळकें.

तरड, तरडक, तरढें, तरडें, तरढक न० **तरडा** पु० १ अगोदर ओलवून नंतर दळलेल्या गव्हाचा कोंडा. २ बोलणारानें लांबलचक आणि कंटाळवाणी सांगितलेली हकीगत किं०गोष्ट(लावणें, लागणें, मांडणें). ꙮ **तरटीं लागणें** (किं० **पेटणें**) क्रोधानें बेफाम होणें.

तरंडक [सं०] न० होडी.

तरडा वि० शुष्क (भाजीपाला). ꙮ **जून जून तरडा** वि०अतिशय जून(भाजीपाला,मिरचीं, तोंडलें इ०). **तरडा म्हातारा** वि० अतिशय म्हातारा; म्हातारा जख्ख.

तरण [सं०] न० १ पाण्यावर तरण्याची क्रिया. २ जें तरतें तें (लांकूड, फळी, इ०). ३ होडी, तराफा. ꙮ **तरणोपाय** पु० संकट, पेंच, अडचण, इ० तून बाहेर पडण्याचा इलाज किं० युक्ति.

तरण न०डाळ पुष्कळ पाण्यांत शिजवून काढ-लेलें पाणी,—ह्या पाण्याला तिखट, मीठ, इ०लावून त्याचें भुरकावयासाठीं पेय करतात. ꙮ **नवरा रडतो तरणास आणि वऱ्हाडी रडतात वरणास**

किं० जांवई रडे अळणास आणि व्याही रडे कळणास जेथें महत्त्वाच्या माणसाची बरदास्त ठेविली जात नाहीं तेथें इतरेजनांनीं आपली बरदास्त ठेविली जात नाहीं म्हणून रुसणें हास्यास्पद होय.

तरणा [सं० तरुण] वि० १ तरुण; प्रौढ दशेस अद्यापि न पोचलेला (मुलगा). २ पुष्य नक्षत्र किं० ह्या नक्षत्रांत पडलेला पाऊस. टीप,– पुनर्वसु नक्षत्राला 'म्हातारा' हा शब्द आहे. 'तरणा' आणि 'म्हातारा' हे शब्द ह्या अर्थानें शेतकरी लोकांत प्रचलित आहेत. ॐ **तरणा ताठा** वि० ऐन उमेदीच्या वयांतील माणूस. **तरणा बांड** पु० भक्कम तरुण माणूस. **म्हाताऱ्यानें केलें नांव तरण्यानें वाहविलें गांव** कर्तबगार बापाचा मुलगा कधीं कधीं नादान निघतो.

तरणि [सं०] पु० सूर्य. स्त्री० होडी, नाव. ॐ **तरणिपेटक** पु० घमत (नावेंत जमलेलें पाणी) काढून टाकण्याचें पात्र.

तरणी [सं०] स्त्री० जलमार्गानें जावयाचें कांहींही साधन,–होडी, नाव, गलबत,इ०.

तरणूक [म० 'तरणें' पासून] स्त्री० अडचणींतून बाहेर पडण्याचा इलाज.मागें 'तरण'मध्यें 'तरणोपाय' पहा.

तरणें [सं० तॄ=तरून जाणें] अ० क्रि० १ पाण्यांत न बुडतां (लांकूड इ०) पाण्याच्या पृष्ठभागावर राहाणें. २ (लाक्षणिक) प्रापंचिक संकटांतून निभावणें. ३ (लाक्षणिक)व्यवहारांत बूड न लागतां द्रव्यादि शाबूत राहाणें.

तरतम [सं०] न० दोन वस्तूंतील सरस नीरस हा भेद किं०असा भेद मनांत घेऊन त्यांचा ठरविलेला दर्जा (पाहणें, ठरविणें, राखणें). ॐ **तरतमभाव** पु० दोन वस्तूंत ठरविलेला उंची निंची असा भेद.

तरतर, तरतरां क्रि० वि० चपळाईनें (पळून जाणें, धावणें, इ०). ॐ **राऊत असे खरमरा तर तेजी चाले तरतरां** काम करून घेणारा माणूस हुशार असला तर काम करणारा मनुष्य झपाट्यानें आणि तत्परतेनें काम करतो.

तरतरणें अ० क्रि० १ भिजल्या कारणानें फुगणें,–हरभरे, माती, चुना, इ०. २ झाडांना पाणी मिळून तीं तजेलेदार दिसणें. ३ (तळावयाचे वडे, इ०)फुगणें. ४उल्हास पावणें, अत्यानंदानें प्रसन्न होणें. ५ संपत्ति एकदम हातीं आल्यानें उन्मत्त होणें.

तरतरा पु० पैलू पाडलेला हिरा.

तरतरी स्त्री० १ चलाखी; चपलता; काम करण्यांत उत्साह. २ नवा जोम.

तरतरीत वि० १ ताठ उभा (मनुष्य). २ सरळ (मनुष्याचें नाक, झाड,इ०).३ कांहीं काम करण्यांत उत्साहयुक्त. ४ चपळ. ६ स्वच्छ (बुद्धि).

तरता [म० तरणें] वि० १ तरणारा. २ बिनधोक्याचा आणि किफायतशीर (धंदा, भांडवल, व्यवहार, इ०). ॐ **तरता पंथ** पु० संकटांतून किं०आजारांतून निभावण्याचा किं०बरें होण्याचा संभव जांत आहे अशी स्थिति. **तरत्या पंथास लागणें** १आजारांतून उठण्याचीं चिन्हें व्यक्त करणें (आजाऱ्यानें). २ संकटांतून निभावण्याचीं चिन्हें दिसणें. **तरतें बुडतें पाहाणें** व्यापार,व्यवहार,इ० मध्यें नफा नुकसान होण्याच्या गोष्टी विचारांत घेणें. **तरती खाडी** स्त्री० जी सर्व दिवसभर आणि सर्व वेळीं होडीनें ओलांडतां येते अशी खाडी. **तरतें कूळ** न० ज्याला उसना दिलेला पैसा बुडण्याची भीति नाहीं असा मनुष्य. **तरतें बंदर** पु० १ ज्यांत पाणी नेहेमीं भरपूर असून होड्या, गलबतें, इ०पाण्यावर तरंगू शकतात असें बंदर. २ किनाऱ्यापर्यंत होड्या किं० गलबतें जाऊं शकतील असें बंदर.

तरतीब [अ० तर्तीब्=व्यवस्थित मांडणी] न० १ तजवीज. २ व्यवस्था.

तरदूद, तरदूद [अ० तरदद्] स्त्री० १ सिद्ध होणें. २ कांहीं कार्याच्या सिद्धतेसाठीं जरूर त्या पदार्थांची जुळवाजुळव. ३ माणसाची किं० जनावराची किं० पदार्थांची निगा राखणें ह्या संबंधाचीं सर्व कामें समुच्चयानें (करणें, राखणें, ठेवणें, पाहाणें).

तरफ [अ० तर्फ्] स्त्री० १ बाजू, दिशा; उ० वानवडीची उजवी तरफ. २ जड पदार्थ हालवावयासाठीं किं० पुढें ढकलावयासाठीं त्याच्या खालीं पहार इ० खुपसतात ती.३अनेक गांवांचा गठ. असे अनेक गठ मिळून एक परगणा होतो. ॐ **एकाद्याची तरफ घेणें** त्याचा कैवार किं०

पक्ष घेणें किं० उचलणें. **एकाद्याच्या तर्फेनें क्रि० वि०** १ त्याची बाजू घेऊन; त्याचा कैवार घेऊन. २ त्याचा प्रतिनिधि ह्या नात्यानें. **हा दागिना तुमच्या तरफेस असूं द्या** तो तुमच्या हवालीं असूं द्या; तो तुम्ही जपून ठेवा. **तरफदार वि०** १ एकाद्या विशिष्ट बाजूचा किं० पक्षाचा; एकाद्याचा कैवारी किं० पक्षपाती. २ ' तरफ ' हा जो देशाचा भाग त्यावरचा सरकारी अधिकारी. **तरफबंदी स्त्री०** जमाबंदीची एक पद्धति. हींत एका गांवच्या जमीनींचे मोठे मोठे विभाग पाडून एक एक विभाग एकेका संबंध घराण्याकडे दिलेला असतो.

तरफड [म० तरफडणें] **स्त्री०** १ चरफड; असंतुष्टपणानें होतो तो मनस्ताप. २ धडपड.

तरफडणें अ० क्रि० १ चरफडणें. २ धडपडणें.

तरफडाट [म० तरफडणें] **पु०** वर 'तरफड' पहा.

तरबुज [**फा०**] **पु० न०** कलिंगड हें फळ.

तरबेज (–त,–द) [**अ०** तर्बियत्] १ (कांहीं काम करण्यांत) पटाईत किं० कुशल. २ विशिष्ट विद्या, शास्त्र, कला, इ०त निष्णात किं० प्रवीण.

तरम पु०जमीनीची वर्गवारी ठरविणारा अधिकारी. ॐ **तरमबंदी स्त्री०** जमीनीची वर्गवारी करण्याचें काम.

तरमळ, तरमळणें पुढें ' तळमळ, ' ' तळमळणें ' पहा.

तरमुंडी स्त्री० गर्दीतून वाट मिळविण्यासाठीं डोकें पुढें करून दिलेला धक्का (देणें).

तरल [**सं०**] **वि०** १ हालणारें; कांपणारें; चंचल (पान, फूल, दृष्टि, इ०). २ चंचल(मन, बुद्धि, विचार).

तरवटणें अ० क्रि० १ झोंपेनें किं० सुस्तीनें (डोळे) जड होणें. २ दारू प्याल्यानें धुंद होणें.

तरवटा पु० भाजीच्या उपयोगाचें एक झाड. ह्याला टाकळा, टहाटळ, टाहकळा, अशीं अन्य नांवें आहेत.

तरवड पु० एक झाड. ॐ **बिगारींचें घोडें त्याला तरवडीचा फोक** दुसऱ्याची जिन्नस कोणी प्रेमानें आणि काळजीनें वापरीत नाहीं आणि वागवीत नाहीं. मागें 'घोडें' मध्यें हीच म्हण पहा.

तरवडी वि० तरवडाचा रंग ज्याला दिला आहे असें (कातडें).

तरवणी [**म०** तरण+पाणी] **स्त्री०** शिजविलेले तांदूळ, डाळ, इ० चें पाणी,–जें आजाऱ्याला देतात.

तरवरणें [**सं०** त्वर्=घाई करणें] **अ०क्रि०** मनाजोगें कांहीं घडल्यानें फार आनंदणें.

तरवा पु० रोप तयार करावयासाठीं भाजतात जी जमीन ती किं०तींत तयार केलेलें साळी इ०चें रोप.

तरवार [**सं०** तरवारि] **स्त्री०**युद्धादि प्रसंगीं शत्रूवर चालवावयाचें शस्त्रविशेष; समशेर. ॐ **तरवार गाजविणें** (किं० **करणें** किं० **मारणें**) १ युद्धांत शूरपणाची प्रशंसा होईल असें कांहीं कृत्य करणें. २ प्रशंसेला पात्र असें कोणतेंही मोठें कृत्य करणें. **कोणेकाला तरवारीचे धारेवर धरणें** (किं० **वागविणें**) त्याला कडक शिस्त लावून देऊन तदनुरूप वागावयाला लावणें. **तरवारबंद वि०** १ तरवार घेऊन लढण्यास तयार असलेला. २ भांडणें किं० मारामाऱ्या करावयाला अत्यन्त उत्सुक. **तरवार बहाद(–दु–) र वि०** १ समरांगणांत ज्यानें मोठे पराक्रम केले आहेत असा. २ भांडखोर किं० तापट स्वभावाचा. ३पोकळ बढाया मारणारा(उपहासांत). ३कोणत्याही विशिष्ट कामांत ज्यानें कीर्ति संपादिली आहे असा.

तरस [**सं०** तरक्ष, तरक्षु] **पु०, न०** एक वाघासारखा वन्य पशु. ॐ **तरसगांड्या वि०** भितरा, पुचाट.

तरसणें [**म०**=त्रास; **सं०** त्रास] **अ० क्रि०** १ अग्नि. सूर्य, ज्वर, इ०च्या योगानें (भूमि, शरीर, इ०) संतप्त होणें. २ थकून जाणें; शिणणें; बेजार होणें. ३ वैतागणें.

तरसा पु० खटारा गाडीच्या रचनेंतील एक अवयव. पुढें ' तारसा' पहा.

तरसाळें न० उथळ आणि पसरट आकाराचें पात्रविशेष.

तरळ वि० शाई उडणें, सर्द हवा, इ० कारणांनीं विस्वर झालेला (मृदंग); बदबदीत (आवाज).

तरळ स्त्री० अजीर्णादि विकृतींमुळें वारंवार रेच व्हावे आणि वांत्या व्हाव्या अशी जी विकृति ती; हिला 'तरळ मोडशी' असेंही म्हणतात.

तरळ पु०, तरळकी स्त्री० पुढें ' तराळ, ' ' तराळकी ' पहा. ※ **तरळमोडशी स्त्री०** जोराचा रेच किं० तसे रेच होण्याची विकृति.

तरळणें [**सं०** तरल=चंचल] **अ० क्रि०** १ (डोळे, बुद्धि, विचार, इ०) चंचल किं० अस्थिर होणें. २ तरळ हा जो अजीर्णाचा प्रकार त्यानें रुग्ण होणें.

तराजू [**फा०**] **स्त्री०** पदार्थांचें वजन करावयाचें साधनविशेष; तागडी.

तराठणें अ० क्रि० १ अतिशय ताणलें जाणें. २ आंत दूध फार झाल्यामुळें स्त्रीचा स्तन रटाटून फुगणें.

तराठा पु० १ बढाईच्या गोष्टी; वल्गना. २ कोणेकाला दिलेली तंबी. ३ आडदांडपणाचें भाषण.

तराडा वि० जीर्ण आणि रसरहित (भाजीपाला इ०). मागें ' तरडा ' पहा.

तरांडा पु० सरळ असून फार लांब असें वृक्षाचें सपल्लव कांड.

तरांडें [**सं०** तरंड] **न०** गलबत.

तराणा [**फा०** तरानाह्] **पु०** एक प्रकारचें गाणें; गायनांतील एक चीज.

तराफा पु० मोठा ताफा; तक्त्यांशीं तक्ते बांधून पाण्य वर तरणारी जी रचना करतात ती.

तरारणें अ० क्रि० फुगून मोठें होणें; फुगणें. मागें ' तरतरणें ' पहा.

तरारां क्रि० वि० फार वेगानें (धावणें, पळून जाणें, इ०).

तरासणें [**फा०** तराषीदन्=कापणें] **स० क्रि०** खेळतांना पत्ते, गंजिफा, इ० काटणें.

तराळ पु० प्रवाशांना वाट दाखविणें, त्यांची मुक्कामाच्या ठिकाणीं सोय जुळवून देणें, इ० कामें करणारा हलक्या जातीचा इसम.

तराळणें [**सं०** तरल=चंचल] **अ० क्रि०** (डोळे) तारवटणें.

तराळी स्त्री० झोडपावयाच्या धान्याच्या पेंढ्यांतील दाणे इकडे तिकडे उडूं नयेत म्हणून खळ्याच्या सभोंवर गवताच्या पेंढ्या घालून करतात तें कुंपण.

तरी [**सं०** तरि, तरी] **स्त्री०** १ नौका. २ खाडी हा जलमार्ग,—जो होडीनें ओलांडावा लागतो. ३ पाणी धरणारी जमीन. हिला ' तरी जमीन ' असेंही म्हणतात. ४ भातशेतीच्या उपयोगाची जमीन.

तरी उ० अ० १ तसें असून सुद्धां. २ (कवितेंत) तर. २ निदान पक्षीं; कमीत कमी अंशानें; उ० शंभर नाहीं तरी पंच्चाण्णव रुपये तरी माझ्या पेटींत सांपडतील. ※ **तरी पण उ० अ०** ' तर ' चे अर्थ १ व २.

तरी न० कचकच; कंकर.

तरु [**सं०**] **पु०** १ झाड; वृक्ष. ※ **तरुषंड पु०** वृक्षसमूह.

तरुण [**सं०**] **वि०** १ बाल्यावस्था संपून प्रौढावस्था ज्यास आली आहे असा; तरणा; जवान. २ कोंवळा, नवीन. ३ ताजा.

तरुणी [**सं०**] **वि०** तरुण (स्त्री); सोळा ते तीस वर्षांपर्यंतची (स्त्री).

तरोटा पु० मागें ' तरवटा ' पहा. टाकळा, टहाटळ, टाइटळ, टाकळा.

तरोड पु० तरवड नांवाचें झाड.

तर्क [**सं**] **पु०** १ कल्पना; अटकळ. २ अनुमान. ३ संशय. ४ न्यायशास्त्र. ५ हेतु; कारण. ६ अध्याहार. ७ उत्प्रेक्षा. ※ **तर्कविद्या स्त्री०, तर्कशास्त्र न०** न्यायशास्त्र. **तर्कगम्य वि०** जें तर्कानेंच जाणतां येतें तें. **तर्कबाज** [**सं०** तर्क+**फा०** बाज्] **वि०** तर्क करण्यांत चतुर किं० पटाईत. **तर्की वि०** १ तर्क करण्यांत चतुर; धूर्त. २ तर्कटी. **तर्की पु०** तर्कशास्त्र जाणणारा पंडित.

तर्जन [**सं०**] **न०** १ भिवविणें, दटावणें. २ लाजविणें.

तर्जनी [**सं०**] **स्त्री०** अंगठ्याजवळचें बोट.

तर्ण, तर्णक [**सं०**] **पु०** वासरूं; खोंड.

तर्पण [**सं०**] **न०** तृप्त करणें. २ तृप्ति, समाधान. ३ देव, पितर, इ० ना जलदान. ४ पितृयज्ञ. ५ (वैद्यक) डोळ्यांत अंजन घालणें. ※ **तर्पण्या वि०** चिकू, कंजूष.

तर्पिणें [**सं०** तृप्=संतुष्ट होणें] **स० क्रि०** (कोणेकाला) तृप्त करणें किं० संतुष्ट करणें.

तऱ्या [**म०** तर; **सं०** तरी] **पु०** होडीवर उतारू, सामान, इ० घालून पैलतीरास नेणारा माणूस

तर्र क्रि० वि० १ रटाटून (फोड फुगणें). २ दारू पिऊन (कैफांत येणें). ३ आनंदानें (उन्मत्त होणें) .

तर्षित [सं०] वि० ज्याला तहान लागली आहे असा; तान्हेला.

तऱ्हा [अ० तर्ह्] स्त्री० १ प्रकार, नमुना; पदार्थाच्या रचनेची किं० घटनेची ढब. २ समाजांत रूढ असलेली चाल किं० रीति. ❀ **कोणेकानें तऱ्हा तऱ्हा करणें** (किं० **तरतऱ्हा करणें**) त्याणें वात्रटपणाचे किं० छांदिष्टपणाचे प्रकार करणें. **कोणेकाच्या तरतऱ्हा करणें** (किं०**तऱ्हातऱ्हा करणें**) त्याला अनेक प्रकारें छळणें, गांजणें, किं० सतावणें. **एकाद्या गोष्टीच्या तऱ्हेस भरणें** (किं० **तऱ्हीं भरणें** किं० **तऱ्हेस पेटणें**) तिचा नाद घेऊन तिच्या पाठीस लागणें. **तऱ्हेस जाणें** चमत्कारिक किं० छांदिष्ट वर्तन करणें. **तऱ्हे देणें** (किं० **तऱ्हेस देणें**) कोणेकाला कांहीं भलती गोष्ट करावयाला भर देणें.**तऱ्हेवाईक** वि० १ विलक्षण, छांदिष्ट. २ क्वचित् आढळणाऱ्या नमुन्याचें.

तऱ्हाटणें, तऱ्हाठणें अ० क्रि० फार फार ताणलें जाणें.

तऱ्हाटा (–ठा), तराठा पु० अरेरावीपणाचें भाषण किं० वर्तन.

तऱ्हाण न० भलत्याच ठिकाणीं रक्त, पाणी, ताक,शेण, मूत्र, इ० सांडून होते ती घाण किं० चिखल.

तऱ्हावणें अ० क्रि० तरंगणें.

तल [सं०] पु०, न० १ पदार्थाचें बूड; तळ. २ पदार्थाचा पृष्टभाग. ३ हाताचा किं० पायाचा तळवा.❀**तलातल** न०१सप्त पातालांपैकीं चवथें. २ द्वंद्वयुद्धाचा एक प्रकार,–मल्लांनीं तळहातांनीं तळहातांवर प्रहार करणें. **तलपर्यंत** पु० १ पृष्ठभाग. २ विस्तार.

तलख, तल्लख [फा० तल्ख] वि० १ कांहीं काम करण्यांत जो आवेशी किं० त्वरावान् आहे असा. २ झोंबणारा, अमल आणणारा(कांहीं पदार्थ,–मिरची, तंबाकू, इ०). ३ दुसऱ्याच्या भाषणाचा रोख, खुबी, धोरण, इ० झटदिशीं ज्याच्या लक्ष्यांत येतात असा. ❀ **तलखी, तलखाई** स्त्री० तल्लखपणाचा गुण. वर ' तल्लख ' पहा.

तलखली [म० तलख; फा० तल्ख्] स्त्री० १ ज्वरानें किं० पश्चात्तापानें किं० कोणी आपला अपमान केल्यामुळें अंगाची किं० मनाची होते ती आग किं०तरफड.२कोणतेंही काम करण्याची उत्सुकता.३ आवेश. ४ अस्वस्थता,तळमळ.

तलपणें अ० क्रि० कांहीं पदार्थ हस्तगत व्हावा म्हणून संधी साधण्यासाठीं त्याच्या भोंवतीं घिरट्या घालीत हिंडणें. पुढें ' तळपणें ' पहा.

तलफ [अ० तल्फ्] स्त्री० गंजिफांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. गंजिफांच्या खेळांत आपल्या हातचें वजीर इ० पान हुकूम व्हावें म्हणून दुसऱ्याच्या हातांतील राजा इ० हुकूम पान खालीं पाडवावयासाठीं आपलें जें पान टाकतात तें.

तलफ, तलब [अ० तल्फ्] स्त्री०१तंबाखू, तपकीर, इ० उन्मादक पदार्थांची आपणाला सवय लागलेली असतां त्या त्या पदार्थाच्या सेवनाची वेळ आली म्हणजे त्याची जी उत्कट इच्छा आपणास होते ती. २ तंबाखू, तपकीर, दारू, इ० ची जी सवय ती.

तलफ न० दोन पानांचें जें दार त्याचें एक एक पान. ❀ **एकतलफी** वि० एक पानाचें (दार). **दुतलफी** वि० दोन पानांचें (दार).

तलब [अ० तल्ब्] स्त्री० १ पगार; वेतन; मजूरी. २ एकाद्या पदार्थाबद्दल होते ती उत्कट इच्छा. ३ वाईट सवय; व्यसन; खोडी. ४ ऋणकोला पैशाबद्दल केलेला तगादा किं० केलेली मागणी. ५ असा तगादा किं० मागणी करावयाला आलेल्या शिपायाला द्यावें लागतें तें द्रव्यादि. ६ सरकारकडून कोणेकाला आलेलें बोलावणें. ७ कोणाकडूनही आलेलें आग्रहाचें आमंत्रण. ❀ **तलबाना** [फा० तल्बानाह्] पु० पैशाबद्दल तगादा करावयाला आलेल्या माणसाला द्यावा लागतो तो पैसा किं० शिधा. २ पगार;मुषाहिरा. **तलबी** वि० तंबाखू इ० चें ज्याला फारच जोरदार व्यसन आहे असा.

तलम वि० १ नाजूक (सूत, कापड, इ०).

२ नाजूक (प्रकृति). ❀ **तलमाई** स्त्री० नाजूकपणा.

तलवार इ० मागें ' तरवार ' इ० पहा.

तलाठदार, तलाठी पु०पुढें ' तळाठदार, ' ' तळाठी ' पहा.

तलातल मागें ' तल ' मध्यें पहा.

तलाव [हिं० तालाव्] पु० तळें.

तलावा [हिं० तहूलिया] पु० १ पाय मोकळे करण्यासाठीं किं० हवा खाण्यासाठीं हिंडणें. २ आसमंतात प्रदेशांतील बातमी काढण्यासाठीं हिंडणें. ३ बातमी काढण्यासाठीं हिंडणारे सरकारचे शिपायी समुच्चयानें.

तलाश, तलास [फा० तलाश्] पु० शोध, तपास. ❀ **तलाशी, तलासी** स्त्री० जकाती वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यानें मुसाफरांच्या सामानासुमानाचा केलेला तपास (घेणें). वि० हरवलेला पदार्थ किं० माणूस शोधून काढण्याच्या कामावर नियुक्त केलेला (इसम).

तल्प [सं०] न० १ बिछाना. २ पत्नी. ❀ **गुरुतल्पग** वि० गुरूच्या पत्नीशीं व्यभिचार करणारा.

तल्लाश, तल्लास वर ' तलाश, ' 'तलास ' [पहा.

तल्लीन [सं० तत्(त्यांत)+लीन(निमग्न)] वि० कांहीं वाचण्यांत, विचारांत, लिहिण्यांत, किं० अन्य कांहीं कामांत निमग्न किं० एकाग्रचित्त झालेला.

तव [सं०] **सर्वनाम** तुझा (कवितेंत).

तव स्त्री०, पु० डोळा, पाणी, इ०ना अस्वच्छ करणारा साका.२ पातळ कवच किं० पापुदरा.

तंव क्रि० वि० १ त्यावेळीं. २ तोंपर्यंत. ३ (कवितेंत) पादपूरणार्थ हा शब्द योजतात.

तव, तंव, तवा स्त्री० भोंवळ, घेरी (येणें).

तवई स्त्री० एक प्रकारचें मातीचें भांडें.

तवई [हिं० तवयी] स्त्री०संकटाचा प्रसंग; अंगावर कोसळलेलें कांहीं दुःख. ❀ **तवईपेक्षां अवई कठिण** संकट येणार आहे ह्या विचारानें मनुष्य फार घाबरतो; प्रत्यक्ष संकट आलें असतां तो न घाबरतां प्रसंगाला तोंड देण्यास सिद्ध होतो.

तवक पु० (कवितेंत) क्रोध; रागाची लहर.

तवकल [अ०] स्त्री०; न० १ ईश्वर करील तें करो अशी ईश्वरावर भिस्त ठेवून समाधानीपणानें राहण्याची प्रवृत्ति. २ भावी स्थितीसंबंधानें उदासीनपणाची वृत्ति. ३ जें कार्य सिद्धीस गेल्यास मोठा फायदा आहे पण फसल्यास समूळ नाश होण्याचा संभव आहे असें कार्य हिंमतीनें अंगावर घेणें. तवकल करणें म्ह० असें कार्य अंगावर घेणें.

तवका [अ० तवकअ] पु० उत्साह;शक्ति; जोर.

तवखील [सं० त्वक्क्षीरी, त्वक्सारा=वंशलोचन] न० १ वंशलोचन. २ गहूं, तांदूळ, बाजरी, इ०चें सत्त्व.

तवंग पु० १ पाण्यावर तेल, इ० चा थेंब पडल्यानें ज्या नाना प्रकारच्या रंगांच्या लकेरी दिसतात त्या समुच्चयानें .२ पाण्यावर जमतो तो मळाचा थर. ३ डोळ्याची दृष्टि गढूळ करणारा जो कांहीं विकृतीमुळें पापुदरा उत्पन्न होतो तो. ❀ **तवंगट** वि० ज्यावर तवंग आहे असा (डोळा, पाणी, इ०).

तवणा पु० चरकांत घालून रस काढावयासाठीं उसाची जीं कांडकीं केलेलीं असतात त्यांची रास. ❀ **तवणेकरी** पु० अशीं कांडकीं करून त्यांची रास करणारा गुऱ्हाळांतील इसम.

तवतवणें अ० क्रि० अनेक कामें एकदम अंगावर पडल्यानें चरफडणें ।किं० कातवरणें.

तवताक, तवताख, तवताग वि० १ अगदीं अनुरूप; यथायोग्य; जसा हावा तसा. २ तयार; सिद्ध.

तवर [अ० तहूवर्] पु० १ मगरूरपणा. २ उत्साह, हिंमत (धरणें, बाळगणें). मागें 'तऊर' पहा. ❀ **तवरी** वि० १ क्षुल्लक कारणावरून बेफाम रागावणारा. २ कुरेंबाज.

तवर स्त्री० भोंवळ; घेरी (येणें).

तवर, तंवर पु० अंकुर; कोंवळी फांदी.

तवली स्त्री० धातूचें किं० मत्तिकेचें कांहीं विशिष्ट आकाराचें पात्र.

तवशी, तवशीण स्त्री० तवसें म्हणून काकडीच्या वर्गातील फळ व त्याचें झाड.

तवसाड (–ळ) स्त्री० एक प्रकारचें भात.

तवसें न० तवशीचें फळ.❀**आठ हात तवसें**

आणि नऊ हात वी मूर्खपणाची अतिशयोक्ति. **तवसें न०, तवसोळी स्त्री०** तवसें ह्या फळाच्या किसांत तांदुळाचें पीठ घालून करतात तें खाद्यविशेष.

तवा पु० १ भाकरी, पोळी, इ० भाजावयाचें लोखंड, माती, इ० द्रव्यांचें किंचित् खोलगट पात्र. २कांठ आणि पदर वर्ज करून बाकीचा जो शेला, शालजोडी, इ०चा भाग तो.३एक सारखा सपाट आणि विस्तीर्ण कातळ किं० खडक. ६ जीवर वृक्ष, खळगे, किं०उंचवटे नाहींत अशी जमीन;सपाट भूप्रदेश. ॐ **तवातोबरा पु०** प्रवासांत जरूर जें सामानसुमान तें.

तवा स्त्री० भोंवळ, घेरी (येणें).

तवाई [**फा०** तावान्] **स्त्री०** १ दंड, भूर्दंड, नुकसान (भरणें, पडणें, येणें).वर 'तवई'पहा.

तवाका, तवांका [**अ०**तवक्कअ] **पु०**ताकद, सामर्थ्य.

तवाजू [**अ०** तवाजअ] **स्त्री०** १ माणूस, जनावर, पदार्थ, इ०ची घेतलेली काळजी किं० केलेली जोपासना. २ सभ्यपणाचें वर्तन (दुसऱ्याशीं केलेलें).

तवानणें [**फा०** तवाना] **अ० क्रि०** १ आजारांतून उठून पूर्व स्थितीवर येणें. २ तालमीचे व्यवसाय करून अंगानें कुव्वतदार होणें.

तवाना [**फा०** तवाना] **वि०** १ आजारांतुन उठून बरा झालेला किं० पूर्व स्थितीवर आलेला. २ नव्या दमाचा.ॐ **ताजातवाना वि०** १ सुदृढ प्रकृतीचा. २ ज्याचा शीण नाहींसा होऊन जो पुन्हा काम करावयाला तयार झाला आहे असा.खालीं'ताजा'पहा. **तवानी, तवानी तलफ स्त्री०**गंजिफांच्या खेळांतील पारिभाषिक शब्दविशेष.

तवार क्रि० वि० तिकडच्या बाजूस. अवार म्ह० इकडच्या बाजूस.

तवी स्त्री० आकारविशेषाचें धातूचें किं० मातीचें पात्र. मागें ' तवली ' पहा.

तवेश (–ष) [सं० त्वेष] **पु०** रागाचा झणकारा. ॐ **तवेशी (–षी) वि०** रागीट; तापट स्वभावाचा.

तशरीफ (–ब) इ० खालीं ' तसरीफ ' इ० पहा.

तशांत [**म०** ' तसें ' ची सप्तमी] **क्रि० वि०** १ तसें असतां. २ आणि शिवाय.

तशेला [**म०** तशा] **वि०** त्या प्रकारचा;त्या जातीचा.

तष्ट, तष्टित [**सं०**] **वि०** १ तासलेला. २ (गणितांत) संक्षेप देऊन लहान केलेला अपूर्णांक.

तष्ट न० १ पाठीस लागलेलें कांहीं लचांड; शुष्ककाष्ट. २ पंचाईतीची स्थिति; पेंच.

तसदिया पु०,स्त्री०,तसदी स्त्री० त्रास, कष्ट.

तसनस, तसनाश, तसनास [**अ०** तहस् नहस्] **पु०, स्त्री०**१पदार्थ हरवून, मोडून, झिजून, तुटून, किं० फाटून त्याचा होतो तो **नाश. २** सत्यानाश; विध्वंस.

तसबी [**अ०** तस्बीह्] **स्त्री०** जपाची माळ इ० ची माळ.

तसबीर,तसवीर [**अ०** तस्वीर]**स्त्री०**कोणा माणसाच्या चेहेऱ्याचें किं० शरीरबांध्याचें चित्र.

तसर स्त्री० १ एक क्षुद्र कीट. २ एक प्रकारचें जाडें भरडें रेशीम किं० रेशमी वस्त्र.ॐ **तसराऊ, तसराव न०** जाडें भरडें रेशमी वस्त्र,–नेसण्याच्या उपयोगाचें.

तसर न० शेतासंबंधीं जें सरकारास देणें तें. ऐन जिन्नस द्यावा असा मूळचा ठराव असतां रयतेला तसें देणें कठिण पडतें म्हणून त्या साऱ्याच्या धान्यादिकांचा हलका ठरविला असतो तो दर. ॐ **तसर कोंबडा पु०** सरकारी अधिकारी सरकारी कामासाठीं एकाद्या गांवीं गेलेला असतां त्याच्या सरबराईसाठीं गांवकरी देत असत तो कोंबडा. **तसर भोपळा पु०** तशाच कामीं दिलेला भोपळा.

तसराळें न० पसरट आकाराचें एक प्रकारचें भांडें.

तसरी स्त्री० वांगीं, मिरच्या, इ०च्या वाफ्यांस पाणी देतां यावें म्हणून झाडांच्या दोन रांगांच्या दरम्यान जी लांबट खळी खणलेली असते ती.

तसरीफ (–ब) [**अ०** तश्रीफ्] **स्त्री०** १गवई, तमासगीर, पहिलवान् , गांवकामगार, इ० च्या कांहीं अपूर्व कौशल्यानें किं० कर्तबगारीनें खूष होऊन राजा किं० कोणी बडा माणूस त्यांना

ईतो तो मानाचा पोशाख इ०; किं० हा पोशाख इ० देण्याचा समारंभ. २ असा पोशाख न देतां त्याच्या ऐवजीं दिलेलें वतन. ꕥ **तसरीफ(–ब–) ल्याख** [अ० तश्रीफ् लायक] **वि०** १ वर सांगितल्या प्रकारें धावयाला योग्य असा (पदार्थ). २ अहेराऊ (वस्त्र).

तसलमात [अ० तस्लीमात] **स्त्री०** १दुसऱ्याचें सैन्य, वस्तु, पैसा, इ० चा उपयोग करणें, त्यांच्यावर देखरेख करणें, त्यांच्या सुस्थितीबद्दल काळजी घेणें, इ० कोणेकावर सोपविलेलीं कामें समुच्चयानें. २ वंदन, नमस्कार, संमान. ह्या दुसऱ्या अर्थीं ' **तसली (–लि–) मात** ' हें रूप विशेष प्रचलित आहे.

तसला [म० तसा] **वि०** त्या प्रकारचा; त्या जातीचा. [पहा.

तसवीर [अ०] **स्त्री०** मागें ' तसवीर '

तसा [सं० तादृश] **वि०** त्या प्रकारचा; त्या जातीचा. **क्रि० वि०** १ त्या प्रकारें. २ त्या दिशेनें. ३ त्या धोरणानें. ४ त्यानंतर लागलाच. ह्या **क्रि० वि०** च्या अर्थीं ' तसा ' हा शब्द लिंगवचनांनीं फिरतो; उ० मी जसा जेवलों तसा आलों म्ह० जेवल्याबरोबर म्ह० दुसरें कांहीं न करतां; उ० वाघाला मी पाहिलें तसा भ्यालों म्ह० पहातांक्षणीं.

तसू पु०, तसूं न० गज हें जें लांबीचें परिमाण त्याचा चोवीसावा भाग.

तसेर, तसर न० धान्याच्या रूपानें जें सरकारचें देणें त्याचा कांहीं भाग जो पैशाच्या रूपानें देण्याचें ठरविण्यांत आलेलें असतें तो भाग.

तस्कर [सं०] **पु०** चोर, लुटारू. ꕥ **तस्करी विद्या स्त्री०** १ चोरी करण्याचें शास्त्र. २ चोरी करण्याच्या कामीं कौशल्य. **मस्करी करतां तस्करी होते** थट्टेनें म्हणून कोणाचा कांहीं पदार्थ आपण आपल्याजवळ गुपचूप घेऊन ठेविला आणि ही गोष्ट मालकाच्या लक्ष्यांत आली नाहीं तर तो पदार्थ लाटण्याची बुद्धि आपणास होते आणि तो पदार्थ ज्याचा त्याला देण्याची बुद्धि नाहींशी होते.

तस्करनिशी, तस्करनीस, तस्करा मागें ' तजकरनिशी, ' ' तजकरनीस, ' ' तजकरा ' इ० पहा. ' तस्करपंत ' हा शब्द ' तजकरनीस ' ह्याला विनोदांत लावला जातो.

तस्त [फा० तस्त, तश्त] **न०** १ थुंकणें, हातपाय धुणें, इ० कामीं योजावयाचें कांहीं आकारविशेषाचें पात्र. २ समर्थाचा लाळघोट्या,–जो त्याला खूश करण्यासाठीं त्याची थुंकी आ करून आपल्या तोंडांत घेतो.

तस्मा [फा० तस्माह] **पु०** १ कातड्याची वादी किं० पट्टा. २ समईच्या खालीं ठेवावयाची कातड्याची वाटोळी तबकडी (बैठकीवर तेलाचे डाग पडूं नयेत म्हणून).

तस्मात् [सं० ' तद् ' चें पंचमी विभक्तीचें रूप] **क्रि० वि०** १ त्या कारणामुळें; त्या अर्थीं. २ त्या प्रमाणांवरून.

तह [फा० तहाह्] **पु०** १ दोन युध्यमान पक्षांचा विरोध संपून पुढें प्रत्येकानें अमुक अमुक शर्ती पाळाव्या असा जो संकेत ठरतो तो. २ दुसऱ्याच्या विचाराला किं० सूचनेला दिलेली किं० दर्शविलेली संमति. ३ गादी, उशी, इ० ची खोळ जीर्ण होऊन जागोजाग फाटूं लागली असतां तिच्यावर जी दुसरी नवी खोळ घालतात ती. ४ गादी, उशी, लोड, तक्या, इ० चा आभ्रा. ꕥ **तहनामा पु०** तहाच्या अटींचा कागद.

तहकीक [अ०] **वि०** जिच्याबद्दल संशय किं० संदिग्धता नाहीं अशी (गोष्ट, हकीगत, इ०).

तहकुबी इ० मागें ' तकुबी ' इ० पहा.

तहगिरी, तहगीर मागें ' तागिरी,' 'तगीर,' पहा.

तहद [फा० ताहद] **क्रि० वि०** विशिष्ट देशापर्यंत किं० समयापर्यंत; उ० येथून तहद पुणें पाऊस चांगला पडला.

तहनाल [फा० तहन् आल] **न०** तरवार, जंबिया, इ० च्या म्यानाच्या अग्रास जें धातूचें टोपण बसविलेलें असतें तें.

तहरीर [अ०] **स्त्री०** कारकुनांच्या पगारासाठीं देशपांड्या इ० च्या हवालीं केलेली गांवकीच्या उत्पन्नांतील रक्कम.

तहवील, तहवेल[अ०] **स्त्री०**खाजगी, पीलखाना, उष्ट्रखाना, इ० च्या खर्चाचें सदर.

तहशी (–सी–) ल [अ०] **स्त्री०, न०**

१ रयतेनें सरकारास द्यावयाचा पैसा किं० तो वसूल करण्याचें काम, किं० झालेला वसूल. २ कोणापासून किती पैसा घ्यावयाचा यासंबंधाचें पत्रक,–जें कुलकर्ण्याचे दफ्तरीं असतें. ❀ **तहशी (–सी–)लदार पु०** तहशिलाच्या (म्ह० वसुलाच्या) कामावर पाठविलेला अधिकारी. **तहशी (–सी–) लदारी स्त्री०** तहशील्दाराचा हुद्दा किं० अधिकार.

तहा, तहां [हिं० तहां=तेथें] **क्रि० वि०** (शब्दशः) त्या ठिकाणीं. हा शब्द फक्त पुढील दोन प्रकारें योजतात. १ राजा, सुभेदार, कमाविसदार, इ० नीं आपले नोकर जे मामलेदार, पाटील,गांवकरी, शिपायी,इ० त्यांना कोणेक गोष्टीं-विषयीं लेखी हुकूम करावयाचा असतां त्यांच्या नांवामागें तहा किं० तहां हा शब्द घालतात; उ० तहां नारोजी पाटील मौजे भिवंडी. २ गांवकामगार, वाणी,धंदेवाले लोक,इ०च्या धंद्यांच्या शब्दांमागें हा शब्द योजतात; उ० तहा पाटील, तहा चौधुला, तहा तेली, तहा वाणी, इ०.

तहादार [**फा०** तहदार] **वि०** १ ज्याची घडी अद्यापि उघडलेली किं० मोडलेली नाही असें (लुगडें, मंदील, परटाकडून धुऊन आलेला अंगरखा, इ०). २ अगदीं ताजा; कोरा करकरीत.

तहान स्त्री० कारिवण्याच्या पानांचा ठेचा किं० दुधाची घडी जी लहान मुलाच्या डोक्यावर थंडाईसाठीं ठेवतात ती.

तहान स्त्री० पाणी पिण्याची इच्छा;तृष्णा. ❀ **तहान लाडू भूकलाडू पु० अ० व०** कांहीं वेळ भूकेची व्यथा शमविण्यासाठीं खावयाचे फराळाचे पदार्थ. **तहानमोड स्त्री०** १ पूर्णपणें तहान शमावयाच्या पूर्वीं माणसास किं० जनावरास दूर ओढणें,–त्याला कांहीं काम देऊन किं० कांहीं कामीं त्याला योजून.२ थोडेंसें पाणी पिऊन तहान थोडा वेळ शमविणें. ३ तहान पूर्णपणें शमविणें. **तहान लागली म्हणजे विहीर खणणें हा मूर्खपणा आहे** आयत्या वेळीं जरूरीची वस्तु शोधीत बसणें हा मूर्खपणा होय. कांहीं संकट गुदरावयाच्या आधीं त्याचा उपाय चिंतून ठेवणें हा खरा शाहाणपणा होय. **तहानेला वि०** ज्याला तहान लागली आहे असा.

तहांहयात (–द) [**फा०** ताहईनूह्यात] **क्रि० वि०** मनुष्य जिवंत आहे तोंपर्यंत (चालणारी नेमणूक, उत्पन्न, कांहीं वस्तूचा भोगवटा , इ०).

तळ [**सं०** तल] **पु०** १ बूड. २ पदार्थाची खालची बाजू. ३ हाताचा किं० पायाचा तळवा. ४ सैन्याच्या मुक्कामाची जागा; सैन्य जेथें उतरलें आहे किं० उतरावयाचें आहे ती जागा. ५ सैन्याचें एकाद्या ठिकाणीं कांहीं काळ वास्तव्य. ६ घर ज्या प्रदेशावर बांधलें आहे तो. ७ मांडव ज्या स्थळीं उभारला आहे तें स्थळ. ८ घराचा अगदीं खालचा मजला. ९ सामानासुमानाच्या किं० प्रवाशांच्या गाड्या, घोडीं, इ० ज्या स्थळीं कांहीं काळ मुक्काम करतात तें. १० झाडाच्या बुंध्याला लागून असलेला जमीनीचा प्रदेश. ११ पदार्थविशेषाची जेथें रास करून ठेविली आहे ती जागा; उ० सगळेच आंबे नेऊं नका, तळावर कांहीं राहूं द्या. १२ कांहीं विशिष्ट गांवें, खेडीं, आणि तत्संबंधीं शेतें, बागा, मळे, इ०नीं व्यापिलेला भूप्रदेश; उ० ह्या तळाची प्रदक्षिणा पांच कोशांची आहे. १३ जोड्याला बळकटीसाठीं खालीं लाविलेला कातड्याचा तुकडा. १४ जोड्याच्या खालचा भाग,—ज्यावर पाऊल टेकतें तो किं० जो जमीनीला स्पर्श करतो तो. १५ कुंभाराच्या चाकाचा मध्यभाग. ❀ **तळ करणें** मुक्काम करून राहाणें. **तळ घालून बसणें** १ एकाद्या विशिष्ट स्थळीं कायमचें वास्तव्य करण्याच्या इराद्यानें राहाणें. २ दुसऱ्याचा पैसा लाटून स्वस्थ आणि निर्धास्तपणें बसणें. **तळ झाडणें** सर्व सामग्री किं० बेगमी खाऊन फस्त करणें. **एकाद्याचा तळ थांबणें** तो कायम म्हणून एकाद्या ठिकाणीं राहाणें. **तळ मारणें** दुसऱ्याचा पैसा लाटणें. **पदार्थाचा तळ लागणें** (किं० **पडणें**) बारदानांत तो पदार्थ शिल्लक नसणें किं० तो पदार्थ बहुतेक संपलेला असणें. **तळावर बसणें** (किं० **राहाणें**)१ विपन्न दशेस येणें. २ समाइकीच्या वाटणींत व्हावयाचा जो लाभ त्याला मुकणें. **कोणेकाला तळावर बसविणें** त्याच्या वाट्याला यावयाचा भाग त्याला न देणें. **तळचें मडकें हाणणें** (किं० **फोडणें**) मडक्यांच्या उतरंडींतील अगदीं खालचें मडकें फोडणें (म्हणजे समूळ उच्छेद किं० सर्वांचा

विध्वंस करणें). **तळची आग** (किं०**तळपायाची आग**) **मस्तकास जाणें** रागानें नखशिखान्त संतप्त होणें. **तळकोंकण न०** सह्याद्रि आणि अरबी समुद्र ह्यांच्या दरम्यानचा भूप्रदेश. **तळखंड न०** १ दळावयाच्या जांत्याची खालची तळी. २ भिंतीचा खालचा भाग,–जमीनीला लागून असलेला. ३ जांत्याची वरची तळी,–हिला 'वरचें तळखंड' शब्द लाविला असतां खालच्या तळीला 'खालचें तळखंड' म्हणतात. ४ फणसाचें बाहेरचें कांटेरी कवच आणि गऱ्यांचा भाग यांच्या दरम्याचा भाग. **तळखडा पु०** घराच्या खांबाची खालची उथळी. **तळखंबा पु०**मृत शूद्राचें भूत,–ज्याची पूजा मृत मनुष्य जेथें शेवटीं निजलेला असेल तेथें करावी लागते. **तळघर न०** १ घराचा अगदीं खालचा मजला. २ जमीनीच्या पोटांत केलेलें घर,–जेथें मूल्यवान सामान, वेगमीचें धान्य, इ० असतें, किं० प्रसंगविशेषीं मनुष्य लपून राहातो. **तळझाडा पु०** १ घर, खोली, इ० अगदीं रिकामीं करणें. २ पूर्ण तपास. ३ वाढलेलीं सर्व खाद्यें खाऊन ताट साफ करणें. ४ घरांतील सर्व वेगमीचे जिन्नस संपून गेलेले असणें. ५ कार्यविशेषासाठीं जागा अगदीं स्वच्छ आणि साफ करणें. ६ सैन्याचा तळ उठल्यावर ती जागा धुंडाळणें (कांहीं उरलेलें सामान मिळविण्यासाठीं).**तळपाय पु०** पायाचा तळवा. **तळवा पु०** हाताचा किं० पायाचा तळ. **तळहात, तळात, तळाथ पु०** हाताचा तळ किं० तळवा.**तळहाताचा फोड पु०** काळजीनें जपावयाचा पदार्थ किं० माणूस; प्रेमाचा माणूस किं०पदार्थ.**घराचा तळमजला पु०** घराचा खालचा मजला.**तळहाताचा मळ** किं० **हाताचा मळ पु०** अत्यल्प श्रमानें होणारें कोणतेंही काम.

तळकट न०, तळकटी स्त्री० माडाच्या झावळीचें उभें चिरलेलें अर्धुक.

तळकट [म० तळणें] वि० तळलेलें. **न०** जें तळलेलें आहे असें खाद्य (भजें, वडा, इ०).

तळकट,तळकर न०, तळकटी स्त्री० १चटई. २ चटईचा तुकडा (निजणें, बसणें, इ०च्या उपयोगाचा).

तळका [म० तळणें] वि० तळून काढलेला (पदार्थ,–भजें, वडा,इ०).

तळका [म० तळ] पु० १ चटई (बसणें निजणें, इ० च्या उपयोगाची). २ बिनघडीची पोळी; चपाती; फुलका. ३ त्वचा भाजून आलेला फोड. ४ जोड्याचा फाडून काढलेला तळाचा तुकडा. ५ शेताचा इतर भागांपेक्षां वेगळा भाग, तेथील कापणी केल्यामुळें झालेला, किं० तेथेंच पेरणी केल्यामुळें झालेला. ६ आंब्याच्या गराचा कोयीला लागून सालासकट चिरलेला भाग.

तळकें [म० तळ] न० बारदानांत भरून जमीनीवर राहिलेलें धान्य,–जें महाराला हक्क म्हणून देतात तें.

तळण [म० तळणें] न० १ तळण्याची क्रिया. २ तळण्याचें साधन,–कढई इ०. ३ तळून केलेलें खाद्य,–भजें, वडा, पापड, सांडगा, इ०.

तळणें स० क्रि० तेल, तूप, इ० कढई इ० मध्यें घालून (कांहीं खाद्य)अग्निसंयोगानें पक्व करणें.

तळतळ [म० तळणें] स्त्री० १ संताप. २ पश्चात्ताप. ३ प्रजेनें राजाला दिलेला शाप.

तळतळाट [म० तळणें] पुं० १ रयतेनें जुलमी राजाला किं० त्याच्या नोकराला दिलेला शाप. २ क्रोधाचा अतिशय. ३ तीव्र पश्चात्ताप.

तळतळाविणें स० क्रि० अतोनात गांजणें किं० सतावणें.

तळता [म० तळणें] वि० जो तळतो तो.

तळप [म० तळणें] न० तळून काढलेलें खाद्य,–भजें,वडा,इ०.

तळप पु० स्त्रियांचें एक कर्णभूषण.

तळपट [म० तळणें] न० १ सत्यानाश. २ संपलेपणाची स्थिति; फन्ना.

तळपणें अ० क्रि० १ उन्हानें होरपळून जाणें. २ चमकणें,झगझगणें, प्रकाशणें.३पदार्थाभोंवतीं तो चोरण्याच्या उद्देशानें घिरट्या घालीत असणें. ४ (दिवा) तेवत असणें.

तळमळ स्त्री० १ शारीरिक किं० मानसिक दुःख किं० व्यथा. २ उत्कट इच्छा. ३ पश्चात्ताप.

तळमळणें अ० क्रि० १ शारीरिक किं० मानसिक दुःखानें व्यथित होणें. २ उत्कट इच्छेनें व्याकुळ होणें.

तळवें [म० तळ] न० धान्याच्या पेंड्या रचून ठेवावयासाठीं केलेला दगडाचा ओटा.

तळसणें स० क्रि० पानें तोडून फांदी साफ करणें.

तळाटी (–ठी), तळाठदार पु० गांवच्या वसूलाचा हिशोब ठेवणारा पगारी कारकून.

तळाव पु० तळें.

तळावणें अ० क्रि० उन्हांत फार चालल्यामुळें किं० अनवाणी चालल्यामुळें (डोळे) व्यथित होणें.

तळासणें स० क्रि० पूर्णपणें (कांहीं काम) करणें. पुढील प्रयोग रूढ आहेत; तळासून कांपणें, तासणें,झाडणें, उपटणें,पुसणें,इ०.

तळी [**नंद्भाषा**] **वि०** पंधरा ही संख्या.

तळी [**म०** तळ] **स्त्री०** १ जांतें, घिरट, इ० चे जे दोन वाटोळे अवयव असतात ते प्रत्येक. २ घिरटांत दळून किं० भरडून जें काढलें तें धरावयाचें बारदान इ०. ३ पानें, सुपाऱ्या, हळद, कुंकू,इ०पदार्थ खंडोबाचे भक्त ज्या ताटांत भरतात तें ताट. खंडोबाचें नांव घेऊन ह्या ताटाला अनेकांनीं हात लावून तें उचलणें ह्या विधीला 'तळी भरणें' किं० 'तळी उचलणें' म्हणतात. ४ भांग भाजून तींत साखर घालून करतात ती भुकंणी. ५ शारदीय नवरात्रांत नवऱ्यामुलाकडून नवऱ्यामुलीकडे साडी, चोळी, हळद, कुंकू, इ० ची देणगी पाठविण्यांत येते ती (नेणें, येणें,पाठविणें). ६ विहिरीचें बांधकाम ठरावें म्हणून भिंतीच्या खालीं जी लाकडाची चौकट घालतात ती. ७ एकाद्या गांवच्या लोकांनीं दुसऱ्या गांवच्या गांवकऱ्यांची कांहीं नुकसानी केलेली असल्यास हे दुसऱ्या गांवचे गांवकरी पहिल्या गांवच्या लोकांची नुकसानी करण्यासाठीं त्यांच्यावर हल्ला करतात तो किं० ह्या हल्लयांत केलेली जाळपोळ,मोडतोड, इ०. ८ विहिरीजवळ चिखल होऊं नये म्हणून केलेली फरसबंदी किं०चुनेगची जमीन. ९ देवाच्या नांवानें नैमित्तिक कांहीं द्रव्य मागावयासाठीं गुरव इ० अंगारा, फुलें, इ० ज्या ताटांत घालून आणतो तें ताट. ❀ **एकाद्या कार्याची तळी भरणें** तें कार्य करावयाची सामग्री जुळवून तें कार्य करावयाला लोकांनीं सिद्ध होणें(वर अर्थ३पहा).**एकाद्या कार्याची तळी उचलणें** तें कार्य पथकरून सर्वांनीं एकदिलानें पार पाडणें (वर अर्थ ३ पहा). **एकाद्याची तळी उचलणें** अनेक युक्त्या करून त्याला त्याच्या कामावरून च्युत करणें किं०त्याला पदभ्रष्ट करणें.**कोणेकाची तळी**(किं०**कोणेकाचा तळीराम**)**गार होणें** लाटलेल्या किं० मारलेल्या पैशाच्या जोरावर शांत, तृप्त, किं० सुखी होणें. **कोणेकानें आपली तळी** (किं० **आपला तळीराम**) **गार करणें** १ दुसऱ्याच्या लाटलेल्या वस्तूच्या जोरावर संपन्न होऊन सुखांत राहाणें. २ उपभोग्य वस्तूचा उपभोग मनमुरादपणें घेऊन किं० इष्ट ती वस्तु पदरांत पाडून घेऊन शांत होऊन बसणें (चांगल्या किं० वाईट अर्थानें). **तळीगार पु०** (वर अर्थ ६ पहा) तळीमध्यें भाग घेणारा.

तळी [**म०** तळें] **स्त्री०** लहानसें तळें.

तळें [**सं०** तल्ल=तळें, टांकें] **न०** सरोवर, तलाव. ❀ **तळें राखी तो पाणी चाखी** कांहीं उपभोग्य वस्तु ज्याच्या हवालीं आपण केलेली असेल तो तिचा उपभोग घेणारच.

तक्षक [**सं०**] **पु०** १ सुतार. २ देवांचा शिल्पकार. ३ पाताळांतील सर्पांची एक जात. ४ (लाक्षणिक) मनांत गुप्तपणें वैर राखून हानि करणारा शत्रु.

तक्षण [**सं०**] **न०**१ तासणें. २ सुतारकाम.

तक्षीम [तक्सीम्] **स्त्री०** द्रव्य, वतन, इ० चे विभाग प्रत्येक. ❀ **तक्षीमदार पु०** तक्षिमेंतें ज्याचा विभाग आहे तो. मागें ' तकशीम ' इ० पहा.

ता हा प्रत्यय संस्कृत नामें आणि विशेषणें ह्यांना लागून स्थिति, गुण, इ० अर्थ दाखवितो; उ० मनुष्यता म्ह० मनुष्यपणा किं० मनुष्याची स्थिति; उ० दृढता म्ह० दृढपणा, इ०.

ताइतळें, तायतळें [**म०** ताईत +**सं०**आवली =पंक्ति] **न०** अनेक लहान ताईत पटवून केलेलें स्त्रियांचें एक कंठभूषण.

ताई स्त्री० १ वडील वहिणि. २ कोणीही संमान्य स्त्री. ३ स्त्रियांच्या नांवांपुढें लावावयाचा संमानदर्शक शब्द; उ० गंगूताई,अंबूताई, इ०.

ताईत पु० १ मुलांच्या गळ्यांत किं० हातांत घालावयायाचें एक भूषण; हें भूषण ईडापीडा टळण्यासाठीं किं० केवळ शोभेसाठीं धारण केलें जातें. २ मुसलमानाचें प्रेत पुरलेलें असतें त्या जागेवर

ओटा बांधून त्याचेवर जी लांबोडी वाटोळी रचना केलेली असते ती. ꙮ **एकाद्याच्या जिवाचा ताईत असणें** त्याला अत्यन्त प्रिय असणें.

ताऊज[अ० तअवीज]**स्त्री०** मृदंगाकार ताईत.

ताक [**सं०** तक्र] **न०** दह्यांत पाणी घालून घुसळून त्याचें लोणी काढून घेतल्यावर जें आंबट पांढुरकें पातळ पाणी राहतें तें. ꙮ **ताककण्या स्त्री० अ० व०**अगदीं गरीबाऊ जेवण. **येरे माझ्या मागल्या ताककण्या चांगल्या** उपदेश,विनवण्या, इ०कडे लक्ष्य न देतां **आ**पलेंच हेकट मत किं०वर्तन धरून बसतो अशा माणसाचा उपहास करतांना हें वाक्य उद्गारतात.**जिचे घरीं ताक तिचें वरतें गेलें नाक** ज्याच्या हातीं उपकार करण्याचें अल्पस्वल्प साधन आहे त्याला जंभ चढतात आणि तो लोकांना आपलीं आर्जवें करावयाला लावतो.**ताकाला जावयाचें मग भांडें(किं०गाडगें)कां लपवावें** ? भीक मागून मागावयाचीं आणि लाज बाळगावयाची हें कां करावें? **ताकास तूर न लागूं देणें** आपल्या विचारांचा किं० प्रयत्नांचा सुगावा किं० मागमूस कोणाला न लागूं देणें. आंतल्या गांठीच्या माणसाचें हें वर्णन आहे. **ताकतई, ताकतय स्त्री०** ताकाला फोडणी देऊन करतात तें कालवण. **ताकपाणी न०** १ दूध विरजणें, दहीं घुसळणें, लोणी काढणें,ताक करणें, इ० कर्तव्यें समुच्चयानें (करणें); उ० ताकपाणी करण्यांत माझी अर्धी सकाळ खर्च होतें. २ गरीबाऊ भोजन. ३ अल्प उपहार. **ताकपिठ्या वि०**पिठांत ताक घालून केलेलें जें खाद्य त्याच्या दर्जाचा म्ह० अगदीं सामान्य प्रतीचा; उ० गोविंदबोवा हा ताकपिठ्या हरदास (किं० पुराणिक किं० वक्ता) आहे. **ताकमेढ स्त्री०** घुसळखांबा. **ताकवणी न०** फारच पातळ असें ताक. **ताकापुरतें रामायण न०** आपलें काम साधण्यापुरतें आर्जव किं० लाडीगोडी (लावणें). **ताकट न०,स्त्री०,ताकड स्त्री०** लोण्याचे कण ज्यांत आहेत असें ताक.

ताकडा, तांकडा, ताखडा [**अ०** ताक्] **वि०** बारीक सारीक कामें करण्याचें कामीं योजावयाला लायक (मुलगा, माणूस); तल्लख; चपल; चुटचुटीत.

ताकत, ताकद [**अ०** ताकत्] **स्त्री०** कांहीं कार्यविशेषाला जरूर असें जें शरीर, बुद्धि, पैसा, इ० बाबतींत बळ तें.

ताका पु० मागावर विणलेलें आणि न फाडतां घडी केलेलें वस्त्र.

ताका पु० शेतावर पडतो तो एक रोग,–ज्याच्या योगानें धान्य काळें पडतें.

ताकाबारी स्त्री० किरकोळ सामान ठेवण्यासाठीं खिडकीवर केलेली फळी.

ताकीद (–त) [**फा०** ताकीद्]**स्त्री०**अमुक गोष्ट करावी, अमुक न करावी, इ० संबंधानें वरिष्ट किं० वडील माणूस आपल्या हाताखालच्या माणसास किं० लहान माणसास करतो ती आज्ञा किं०लावून देतो ती शिस्त किं० सरणी; बजावणूक. ꙮ **ताकीददार पु०** १ वरिष्ठाकडून कांहीं बाबतीसंबंधानें सूचना आणून हाताखालच्या माणसास कळवितो तो शिपायी. २ शेतें, घरेंदारें, गुरेंढोरें, इ० ना सैन्याचें बाजारबुणगे इ० पासून त्रास न व्हावा म्हणून नेमिलेला अंमल्दार; रखवालदार.

ताकोला वि० विवक्षित स्थितीला किं० दशेला किं० पूर्णत्वाला जो अद्यापि सर्वथैव येऊन पोचला नाहीं पण बराच जवळ आला आहे असा (माणूस, घोडा, इ०). नामें आणि विशेषणें यांच्या मागें हा शब्द योजला जातो; उ० ताकोला घोडा म्ह० घोड्याचें काम बरेंच अंशानें करूं शकणारें शिंगरूं. ताकोला बाप्या म्ह० बहुतेक अंशानें प्रौढ झालेला मुलगा; ताकोला बरा म्ह० आजारांतून उठून साधारणपणें पूर्वीच्या प्रकृतीस आलेला.

ताखडा, तांखडा [**अ०** ताक्] **वि०**चलाख, तल्लख, चुणचुणीत (मुलगा, मुलगी, नोकर,इ०).

ताग पु० अंबाडीसारखें एक झाड,–ज्याच्या बुंध्याच्या सालीचे तंतु काढून ते विणून गोणपाट इ० करतात.

तांगडणी [**म०** तांगडणें [**स्त्री०** तांगडण्याची क्रिया. खालीं ' तांगडणें ' पहा.

तांगडणें [**म०** तंगडी, तांगडी] **स० क्रि०** १ मनुष्य, पशु, इ० ना घट्ट बांधणें. २ कोणेकाला कांहीं कामीं सक्तीनें योजणें. ३ कोणेकाचें काम बंद पाडून त्याला आपल्या कामीं योजणें. ४

माणूस, पशु, पदार्थ, इ० चा कठोरपणें किं० बेपर्वाईनें उपयोग करून घेणें. ५ फाटकी टोपली, चिरगुटें, इ० विणून, शिवून, किं० ठिगळें मारून साधारणपणें उपयोगाला येतील अशीं दुरुस्त करणें. ६ अनेकांनीं अनेक दिशांस कोणेकाला आपल्याकडे खेचणें किं० ओढणें; उ० दोहों घरचा पाहुणा त्याला दोहोंकडे दोन तांगडतात. अ० क्रि० पायपिटी करणें; उ० मी सकाळपासून ज्येष्ठमधाच्या शिन्यासाठीं सारा गांव तांगडलों; उ० हा गडी आज सर्व दिवसभर उन्हांत (किं० पावसांत) तांगडतो आहे.

तांगडी स्त्री० तंगडी; कमरेपासून पावलापर्यंतचे शरीराचे जे दोन अवयव ते प्रत्येक (तुच्छतेनें).

तागडी स्त्री० तराजू.

तागलवाट स्त्री० जो आपणांस आवडत नाहीं तो पदार्थ कि० माणूस आपणांपासून दूर करणें (विकून, दुसऱ्यांच्या हवालीं करून, किं० अन्य तऱ्हेनें).

तागा पु० मागावर विणलेलें आणि न फाडतां घडी केलेलें वस्त्र.

तागाई (-य-) **त** [फा० तागायत्] **श० यो० अ०** विवक्षित काळपर्यंत; उ० आजतागायत.

तागादणें अ० क्रि० कांहीं कामांत किं० व्यवहारांत त्रस्त होणें किं० जिकीरीस येणें किं० जर्जर होणें.

तागादा, तगादा [फा० तकाजा] **पु०** पैशाबद्दल कोणेकाला नेट लावणें; कोणेकाला पैशाबद्दल लाविलेला लकडा (लावणें, करणें, येणें).

तांज [फा०] **स्त्री०** गंजिफांच्या खेळांतील एक रंग. **स्त्री०,पु०** १ बांबू इ० ची लांब कांठी,-जी झाडावरील फुलें, फळें, इ० पाडावयाचें कामीं योजतात ती. २उथळ पाण्यांतून होडी जमीनीच्या नेटावर पुढें ढकलण्याचे कामीं जी लांब कांठी योजतात ती (मारणें). ३ बांबूची एक जात,-जिला ' माण ' म्हणतात.**ःतांजकरी पु०** ताज मारून पाण्यांतून होडी चालवितो तो.

ताज [फा० ताज्=मुकुट] **पु०** एकाद्या संस्थेचा किं० टोळीचा मुख्य माणूस.

ताजक [हिं०] **न०** कोणा माणसाचें वर्षफळ, मासफळ, इ० त्यांच्या पत्रिकेवरून आगाऊ जाणण्याचें शास्त्र.

ताजवा पु० १ सुवर्ण, मोतीं, इ०वजन करावयाची तराजू किं० कांटा. २ गुण्याला गुणकानें गुणून येतो तो गुणाकार· बरोबर· आहे कीं चूक आहे हें कांहीं विशिष्ट गणितक्रियानें ठरविण्यासाठीं करतात ती फुली (×); (क्रि० करणें, चुकणें).

ताजा [अ० तअजियाह्] **पु०** १ मोहोरमांत मुसलमान म्हणतात तें शोकगीत. २ डोला, ताबूत.

ताजा [फा० ताजाह्] **वि०** १ नवा; शिळा नव्हे तो; टवटवीत. २नव्या दमाचा(पशु,माणूस). ३ चपळ, तल्लख (मनुष्य, पशु).**ःताजा तवाना** (-न) **वि०** १ नव्या दमाचा. २ शीण जाऊन पुन्हां कामाला योजतां येईल असा. **ताजा कलम पु०** १ नवीन लेख; पुरवणीचा किं० भरतीचा लेख. २ पत्र लिहून समाप्त केल्यावर नवा सुचलेला मजकूर लिहितात तो. **ताज्या घोड्यावरच्या गोमाशा स्त्री० अ० व०** लाळघोटे; हांजी हांजी करणारे लोक. **ताजातवाना वि०** १ धष्टपुष्ट आणि कामाला लावतां येईल असा. २ कामानंतर विसावा घेऊन पुन्हां काम करावयाला सिद्ध असलेला.**ताजें कुल न०** ज्याचें जवळ चार पैसे आहेत आणि समाजांत ज्याची पत आहे तो. **ताजारोजगार पु०**फायदेशीर धंदा किं०व्यवसाय किं०हुद्दा. **ताजी रोटी स्त्री०** १ श्रीमंताचा आश्रय,-जो मिळाला असतां रोज चमचमीत भोजन आणि सुखाचें राहाणें मिळून प्रसंगविशेषीं पैसे मिळूं शकतात किं० पैसे लाटावयाला मिळण्याच्या संधी येतात. २ आपलें नुकतेंच लग्न होऊन आपणाला मिळालेली पत्नी.

ताजी [फा०] **पु०** अरबी घोडा.

ताजीम [अ० तअजीम्] **स्त्री०** १ संमानपूर्वक कोणेकाचें करावयाचें जें स्वागत तें.२कोणाच्या संमानार्थ आपल्या जागेवरून उठणें; अभ्युत्थान (देणें, घेणें). **ः ताजीमतवाजू स्त्री०** कोणेकाचा केलेला सत्कार; आदरसत्कार.

ताजुब [अ० तअजब्] **वि०** आश्चर्यकारक.

स्त्री० आश्चर्यकारक किं० अद्‌भुत वस्तु; अजब चीज.

तांट न० १ जोंधळा, बाजरी, बोरू, इ०च्या झाडांचा बुंधा किं० कांड. २ सुमारें पांच रुपये किंमतीचें एक सोन्याचें नाणें. ३ ज्या पुतळीला फांसा लाविलेला नाहीं अशी पुतळी.

तांट न० १ भोजनादिकांच्या उपयोगाचें एक प्रकारचें उथळ पात्र. अशा लहान पात्राला 'ताटली' म्हणतात. २ गोणपाट. ३ फांसा न लाविलेली पुतळी; हिला 'पुतळीचें ताट' असेंही म्हणतात. ꕥ **ताटाखालचें मांजर न०** पूर्णपणें आज्ञांकित माणूस. **ताटांत सांडलें काय आणि वाटींत सांडलें काय एकच** जेथें दोन माणसांचें हिताहित एकच असतें तेथें कोणाही एकाचा फायदा झाला तरी तो ओघानें दुसऱ्याचाही होतो. **ताटाबरोबर कांठ पु०** मुख्य किं० मोठा ऐवज जुगारींत किं० दुसऱ्या मूर्ख धंद्यांत नष्ट झाल्यावर थोडासा शिल्लक राहिलेला ऐवज तसल्याच धंद्यांत घालविणें इ० रूप मूर्ख व्यवसाय; ताट गेलें म्हणजे कांठ गेलाच पाहिजे अशा धोरणावर वर्तन. **सोन्याचें ताट पण त्याला कुडाचा आधार लागतो** मनुष्य कितीही समर्थ किं० श्रीमंत असला तरी त्याला लहान किं० गरीब माणसाची गरज लागते किं० जरूरी असते.

ताट स्त्री० शेर, सावर, इ०च्या जिवंत झाडांचें कुंपण किं० वई.

ताटंक [सं०] न० तानवडें ह्या नांवाचें स्त्रियांचें एक कर्णभूषण.

ताटकळणें [म० ताठ] अ० क्रि० १ शरीर किं० कोणतेंही गात्र हालचालीशिवाय एकाच संस्थानांत फार वेळ ठेविलें गेल्याकारणानें तें ताठ होणें किं० दुखूं लागणें. २ कोणेकाची फार वेळ वाट पाहावी लागल्यामुळें त्रास पावणें किं० खोळंबून बसावें लागणें. ३ फार वेळ जागरण केल्यामुळें किं० वाचन केल्यामुळें डोळे खुपूं लागणें किं० दुखूं लागणें.

ताटकळा पु०, ताटकळ (–ळी) स्त्री० १ गात्रविशेष एकाच संस्थानांत फार वेळ ठेविल्या कारणानें त्याला येतो तो ताठपणा किं० त्यामुळें होतो तो त्रास. २ डोळ्यांना जागरणामुळें येतो तो ताठपणा (बसणें, येणें, भरणें). ꕥ **ताटकळ्या देत बसणें** कोणेकासाठीं तिष्ठत बसणें.

ताटका, ताडका [सं०] स्त्री० १ रावणाची बहीण. २ कजाग आणि त्रासदायक स्त्री.

ताटली [म० ताट] स्त्री० लहान ताट. वर 'ताट' पहा.

ताटवा पु० गुलाब, गुलछबू, इ० झाडांची रांग किं० कांहीं विशेष प्रकारची रचना.

ताटी स्त्री० १ अनेक कामट्यांची चौकट करून त्यांवर गवत, पानें, इ० बांधून कूड, दार, इ० करतात तें. २ मखराच्या भिंती प्रत्येक. ३ मृत मनुष्य श्मशानाकडे वाहून न्यावयासाठीं चिव्यांची लांबोडी चौकोनी रचना करतात ती. ४ पळस इ० च्या पानांचा लांबोडा भारा,–दुसरीकडे वाहून न्यावयासाठीं बांधलेला. ꕥ **शेरताटी स्त्री०** शेराचीं झाडें लावून केलेलें कुंपण. **कोणेकानें ताटी कापणें** १ आपल्या सोबत्यांच्या मंडळीतून हळूंच पळून जाणें. २ एकाद्या संस्थेशीं असलेला आपला संबंध तोडून टाकणें.

ताटूक न० अति जीर्ण झालेलें गोणपाट.

तांटूक [म० तांट] न० १ जोंधळा, बाजरी, इ० चें ताट. २ कोणत्याही झाडाचा नाजूक देंठ. ३ धलपी. ४ बारीक आणि आखूड काठी; काटुक.

ताटोळा, तांटोळा पु०, तांटुळ न० १ जोंधळा, बाजरी, इ० चा बुंधा. २ केळीच्या पानाच्या दोन अर्धुकांना जोडणारा जाडी दांडा.

ताट्या पु० लहान वयाचा टोणगा.

ताट्या पु० भोजनभाऊ.

ताठ वि० १ ज्यांत लवचीकपणा कमी अशी दोरी, झाडाची फांदी, इ०. २ (लाक्षणिक) जो आपला हेका सोडावयाला नाखूष असतो असा (माणूस किं० स्वभाव). ३ न हालतां सरळ उभा असा (खांब, मनुष्याचें उभेंपणाचें संस्थान). ४ अंगाशीं घट्ट किं० तंग बसणारी (बंडी, चोळी, इ०). ५ फार ताणलेली (दोरी इ०). ६ मजबूत बांध्याचा किं० रचनेचा. ७ पूर्णपणें भरलेलें किं० पोसलेलें (धान्याचें ताट, कणीस, इ०). ८ मापानें भरपूर; उ० तो गांव येथून ताठ तीन कोश आहे.

ताठ पु० १ टणकपणा. २ न वळण्याचा गुण. ३ शरीर किं० एकादें गात्र फार वेळ न हालविल्यानें त्याला येतो तो टणकपणा (भरणें). ४ तराजू शास्त्रशुद्ध नसल्यानें वजनांत होते ती चूक; उ० ह्या ताजव्याला इतका ताठ आहे कीं एक गुंज इकडे टाकली तर तो बरोबर वजन दाखवील. ५ गर्विष्ठपणा.

ताठकळणें इ० वर ' ताटकळणें ' इ० पहा.

ताठणें [म० ताठ] अ० क्रि० १ ताठ होणें; न वळेसा होणें. २ गर्वानें उन्मत्त होणें; गर्विष्ठ होणें.

ताठर, ताठम [म० ताठ] वि० १ टणक. २ मऊ नव्हे तो. ३ न वळणारा. ४ फार ताणलेला. ५ मजबूत बांध्याचा. ६ घटमूठ. ७ पूर्णपणें किं० खच्चून भरलेलें (पोतें) किं० बांधलेला (गठ्ठा). ८ मापानें किंचित् अधिक पण मुळींच कमी नव्हे असा.

ताठरणें [म० ताठ] अ० क्रि० ताठ किं० टणक किं० न वळेसा होणें; वाकवितां न येण्याजोगा होणें.

ताठा [म० ताठ] पु० १ टणकपणा. २ गर्व, अभिमान, तोरा. ꙮ **नाकीं नाहीं कांटा आणि कोरड्याच ताठा** गर्व किं० डौल करण्याची योग्यता किं० साधनें नसतां केलेला गर्व किं० डौल हास्यास्पद होतो. कांटा म्ह० नथ (ह्या म्हणींत).

ताड [सं० ताल] पु० ताडाचें झाड. याच्यापासून ताडी नामक मादक पेय काढतात. ꙮ **ताडगोळा** पु० ताडाचें फळ. **ताडभर उंच** किं० **ताडमाड उंच** वि० योग्य परिणामाहून अधिक उंच (माणूस). **ताडमाड** क्रि० वि० अतिशय (नखरे करणें, ऐट दाखविणें). **ताडपत्र** न० ताडाच्या झाडाचें पान. **ताडफळ** न० ताडाचें फळ; ताडगोळा. **ताडाचा बुंधा** पु० लठ्ठ अगडबंब माणूस. **ताडपत्री** स्त्री० १ एक प्रकारचें लुगडें. हें रेशमी असून त्याच्यावर पांढऱ्या आणि तांबड्या इ० रंगाच्या चौकटी असतात. २ वरच्या सारख्या विणीचा शेला. **ताडमाड** पु० एक वृक्षविशेष.

ताड्या [म० ताड] पु० ताडाच्या झाडतून अमली पेय काढतो तो.

ताड स्त्री० नाचणीचा किं० इतर धान्याचा कोंडा किं० भुसा.

ताडक न० ताडाची फांदी किं० झावळी.

ताडकन, ताडकर, ताडदिनीं, ताडदिशीं, क्रि० वि० ताड् असा आवाज करून (चपराक किं० चाबूक मारणें किं० कांहीं पदार्थ मोडणें, तोडणें, इ०).

ताडणें [सं० तड्, ताड्=मारणें] स० क्रि० १ मारणें. २ पारिपत्य करणें. ३ तुलना करून पाहाणें; उ० पुण्याच्या मापाशीं हें माप मीं ताडलें तें पसाभऱ्यानें कमी आहे असें मला आढळून आलें. ४ तर्कानें जाणणें; उ० त्याचा चेहेरा आनंदित पाहातांच मी ताडलें कीं त्याची परीक्षा पास झाली.

ताडन [सं०] न० मारण्याची किं० पारिपत्य करण्याची क्रिया.

ताडबाजी [म० ताडणें] स्त्री० १ तर्क. २ भरमसाट तर्क.

तांडव [सं०] न० १ नाच. २ बेताल नृत्य. ३ शंकराचें नृत्य. ४ बेतालपणाची अतिशयोक्ति. ५ एकाद्या क्षुल्लक गोष्टीचा बोभाटा किं० गरगशा (वाईट अर्थानें). ६ श्लोक, वाक्य, इ० च्या अर्थाचें विस्तारानें केलेलें विवरण (चांगल्या अर्थानें). उ० ह्या गीतेच्या मूळ श्लोकावर ज्ञानेश्वरानें बहुत तांडव केले आहे. ꙮ **तांडवप्रिय** पु० शंकर. **अकांड तांडव** न० अकांड म्ह० भलत्याच वेळीं केलेलें आणि तांडव म्ह० शंकराचें नृत्य. हें शंकराचें नृत्य श्मशानभूमींत आणि पिशाच मंडळींत चालतें. यावरून अकांडतांडव म्ह० वेळ अवेळ मनांत न आणतां जें वेड्यासारखें किं० मूर्खासारखें केलेलें कृत्य तें किं० रागाच्या भरांत दुसऱ्यावर झाडलेला ताशेरा (क्रि० करणें).

ताडा [म० ताडणें=तुलनेनें किं० तर्कानें जाणणें] पु० १ तर्क. २ तुलना. ३ तर्कानें किं० तुलनेनें जें ठरलें तें. ४ पदार्थाचा खऱ्याशीं मेळ (मिळणें, पडणें) . ४ बरोबरीची किं० समान योग्यतेची वस्तु (लागणें).

तांडा पु० एका पाठीमागून एक अशा प्रकारें चाललेलीं गुरें, माणसें, मुंग्या, इ० चा समूह, कळप, किं० रांग.

ताडातुडीं क्रि० वि० तडकाफडकीं (भरणें).

ताडामोडा (–डी) स्त्री० आई आणि तान्हें मूल, पति आणि पत्नी, मित्र आणि मित्र, यांचा केलेला किं० झालेला जुलमाचा वियोग.

ताडातोडा पु० १ जादूटोणा; टाणाटोणा. २ गाण्याचें एकाददुसरें कडवें; उ० मला गाणें येत नाहीं, उगीच ताडातोडा येतो. ३ इतर महत्त्वाच्या धान्यांत पेरलेलीं कमी महत्त्वाचीं धान्यें; इरजड; इरवाड.

ताडाफांटा पु०१ पदार्थ खर्चून संपवून टाकणें. २ पदार्थांची उधळपट्टी.

ताडातोड [म०तोडणें] पु० घरांतील भांडीं-कुंडीं, दागिने, सामानसुमान, इ० विकून त्यांचे पैसे करणें; उ० वडिलांच्या वेळची वरतवानी होती तिचा ताडामोडा करून आजपर्यंत कसे तरी दिवस लोटले.

ताडी [म० ताड] स्त्री० ताडाच्या झाडापासून काढतात तें अमली पेय. वर 'ताड' पहा.

तांडी स्त्री० १ कापडवाल्याच्या दुकानांत गिऱ्हाइकाला कपडे दिसावे म्हणून ते ज्या दोरीवर घातलेले असतात ती. २ विकाऊ कापडांची रास किं० चवड.

तांडेल पु १ गलबतांच्या मालक किं० नायक. २ लष्करांतील खलाशांवरचा नायक. २ बैलांच्या पाठीवर माल लादून नेणाऱ्या लमाणांचा नायक. ॐ **तुम तांडेल हम तांडेल तो घमत कोण सांडेल** ? मागें 'गमत' पहा.

ताण [म० ताणणें; सं० तन्]पु० १ दोरी, वस्त्र, इ०दोन बाजूंनीं ओढल्याकारणानें त्यांच्या ठायीं येतों तो ताठपणा (देणें, बसणें, भरणें). २ रागाचा झणकारा (येणें). ३ पाऊस पडणें जरूर आहे अशा वेळीं पाऊस न पडणें (देणें). **पु०, न०** १ एकसारखें कांहीं काम करीत राहाण्याची क्रिया. २ एकसारखें काम करण्यानें येतो तो शीण किं० होतो तो गळाठा. ३ कांहीं जिवाविशेष काम करावें लागल्यामुळें होतो तो त्रास. ४ जरूर अशा वस्तूच्या अभावामुळें किं० कमताईमुळें होते ती अडचण किं० पंचाइतीची स्थिति (बसणें). **न०** कांहीं कार्य करावयाला अनुकूल अशी परिस्थिति; उ० भरतीच्या ताणावर आपण महागिरी हाकारूं. ॐ **एकाद्यावर ताण तोडणें** त्यांच्यावर ताशेरा झाडणें. **ताण देणें** १ ओढून धरणें. २ लांवणीवर ढकलणें. ३ विलंब करणें. **ताणें ताणें क्रि० वि०** आवेशानें, जोरानें (जाणें, उठणें, मारणें, उडणें).**ताण देणें** लंघन करणें.

ताणणी [म० ताणणें] स्त्री० ताणण्याची क्रिया. खालीं 'ताणणें' पहा.

ताणणें [सं० तन्] स० क्रि० १ ओढणें. २ ओढून लांब करणें. ३ ओढून ताठ करणें. ४ कोणेकाला आशा लावून लांवणीवर ढकलणें. ५ बैल, घोडा, माणूस, इ०ना योग्य परिमाणापेक्षां अधिक काम करावयाला लावणें. **अ० क्रि०** १ माघार खाणें किं० घेणें. २ मागें राहाणें. ३ रेंगाळणें. ॐ **ताणून निजणें** किं० हातपाय **ताणून निजणें** कांहीं काळजी किं० विवंचना न करतां आरामांत पडून राहणें.

ताणा [म० ताणणें] पु० १ जें ताणलें तें. २ताणलेली दोरी किं०सूत.३वस्त्र विणतांना आडवे तंतू जे धोट्यानें भरतात ते प्रत्येक किं०समुच्चयानें. ४गाय, म्हैस,इ०ची मातृपरंपरा.५झाड,काठी,इ० वर चढणारी वेली. ६ वेलाचे जे तंतु काठी, झाड, इ० ना वेटोळीं घालतात ते प्रत्येक. ७ कोळ्याच्या घराचे तंतु प्रत्येक. ॐ **ताणापाजणी स्त्री०** १ विणावयाच्या वस्त्राच्या ताण्यांना कडकपणा यावयासाठीं त्यांना खळ इ० लावणें. २ त्रासदायक काम. **जिवाची ताणापाजणी स्त्री०**अनेक जोखमीचीं कामें एकदम अंगावर पडल्यानुळें मनाला होतो तो त्रास.

ताणाताण [म० ताणणें] स्त्री० १ बहुतांचें देणें डोक्यावर असल्याकारणानें खर्चाची होते ती ओढ. २ अनेक कामें एकदम करण्याचा प्रसंग आल्यानें होते ती धांदल.

ताणारी [म० ताणणें] स्त्री० विणावयाच्या वस्त्राचें उभें तंतु इ० ताणें ताणावयाचें कोष्ट्याचें एक आऊत.

तांत [सं० तंतु] स्त्री० वृक्षादिकांचा, किं० लोहादि धातूंचा,किं० मेषादिकांच्या आंतड्याचा,

तंतु. ७ **तांतीं प्राण उरणें** आतां प्राण जातो कीं० घटकेनें जातो अशा स्थितींत असणें. **तांतीं सुतीं धरणें** बैल, घोडा, इ० ना नियंत्रणेंत आणून कामाला लायक करणें.

तात [**सं०**] **पु०** १ बाप, पिता. २ कोणीही वयोवृद्ध पुरुष.

तातकथय्या पु० १ नृत्य चालत असतां होतो तो आवाज. २ नृत्यगायनादि उत्सव. ३ धावणें, उड्या मारणें, इ० मुलांचे खेळण्याचे प्रकार समुच्चयानें.

तातड, तातडी स्त्री० १ कांहीं काम लवकर लवकर करून संपवावें अशी जी मनाला होते ती घाई किं० अशी घाई झाल्यामुळें केलेली लगबग. २ कांहीं काम दुसऱ्यानें लवकर आटोपावें म्हणून त्याच्या मागें लाविलेला नेट. ३ शौचास जावें अशी लागते ती घाई. ७ **तातडीनें क्रि० वि०** घाईनें; लगबगीनें; शक्य तितक्या लवकर कांहीं काम संपवावें ह्या इच्छेनें.

तातडणें अ० क्रि० १ घाई लागलेल्या स्थितींत असणें. २ पैसा इ० पदार्थांसाठीं (माणूस) नडलेलें किं० खोळंबलेलें असणें. ७ **तातडसार वि०** जो सदा घाईत असतो तो; लगबग्या. **तातडीं क्रि० वि०** धाईघाईनें; लगबगीनें.

तातपुरता खालीं ' तात्पुरता ' पहा.

तातरा पु० गलथा इ० च्या खालची पट्टी.

तातवणें, तातावणें अ० क्रि० १ त्रस्त किं० जर्जर झालेलें असणें. २ कातवरणें.

तांतू [**सं०** तंतु] **पु०** १ धागा, दोरा, तंतु. २ मुळासकट उपटलेलें सोळा पेरांहून कमी नसलेलें दूर्वा हें गवत; ह्या गवताचें वेटोळें करून लग्न झाल्यावर पहिलीं पांच वर्षें मुली नवरात्रांत अष्टमीच्या दिवशीं पूजितात, ह्याला ' तांतु ' म्हणतात. मुलीच्या सोळा विती लांबीचा रेशमाचा सोळा गांठी दिलेला दोरा असाच पूजितात त्यालाही ' तांतू ' म्हणतात.

तातोबा पु० वयोवृद्ध पुरुषासंबंधानें योजावयाचा हा संमानाचा शब्द आहे.

तात्काळ [**सं०** तत् (तो) + काल] **क्रि० वि०** १ त्याच वेळीं. २ ताबडतोब. ७ **तात्कालिक वि०** त्याच वेळचा; जेव्हांच्या तेव्हांचा.

तात्पर्य [**सं०**] **न०** १ लेख, भाषण, गोष्ट, हकीगत, इ० तील सारभूत अंश; सारांश. २ अभिप्राय, धोरण.

तात्पुरचा [**सं०** ' तत्पूर्वक ' चा अपभ्रंश] **क्रि० वि०** जाणून बुझून; बुद्धिपुरस्सर; मुद्दाम; उ० मी जें नको करूं म्हणतों तें तो तात्पुरचा करतो; उ० मी तात्पुरचा तुमच्याकडे आलों होतों (म्ह० त्याच हेतूनें). **टीप,**–लिंगवचनांप्रमाणें फिरणारें हें क्रियाविशेषण आहे.

तात्पुरता [**सं०** तत् (तो) + **म०** पुरता (पुरणारा)] **वि०** ती वेळ निभावून नेणारा; तेवढीच अडचण भागविणारा; कामचलाऊ; उ० माझ्या घोड्याचा जेरबंद वाटेंत तुटला म्हणून मी चिंध्या वळून तात्पुरता जेरबंद करून येथपर्यंत आलों.

तात्या [**सं०** तात] **पु०** १ वयानें वडील अशा पुरुषासंबंधानें योजावयाचा हा शब्द आहे. २ कोणा पुरुष व्यक्तीचें 'तात्या' हें नांव ठेविलें जातें.

तांत्रिक [**सं०**] **वि०** १ तंत्रशास्त्रासंबंधाचा. २ जारणमारणादि कर्मासंबंधाचा. ३ उपासनामार्ग प्रतिपादक जीं तंत्रें त्यांत उक्त असा (पूजाविधि, मंत्र, इ०) किं० त्यांत उक्त जो मार्ग त्यानें जाणारा. ४ जीं अंगें वगळतां येत नाहींत तींच केवळ घेऊन बाकीचीं गौण अंगें सोडून देऊन केलेलें किं० आचरलेलें; उ० सध्यां माझी पैशाची अडचण आहे म्हणून मी तांत्रिक खर्च करतों आहें. ५ संक्षिप्त रूपाचा. **पु०** १ तंत्रशास्त्रवेत्ता. २ तंत्रानुयायी.

तात्त्विक [**सं०**] **वि०** १ तत्त्वाला किं० सत्याला धरून असलेलें. २ वास्तविक; खरें. **पु०** तत्त्व जाणणारा.

तांथ, तांथू वर ' तांत, ' ' तांतू ' पहा.

ताथय्या पु० मुलांची दांडगाई किं० धिंगामस्ती.

ताथवड, ताथोड, ताथोट, ताथा [**फा०** ताजाह्] **वि०** १ ताजा; शिळा नव्हे तो. २ नवीन. ३ ताज्या दमाचा (मनुष्य, पशु).

तांदळा, तादळा [**म०** तांदूळ] **पु०** १ देवाची ओबडधोबड घडविलेली मूर्ति. २ शेंदूर फांसलेला धोंडा (देव म्हणून पूजितात तो). ३ बेघाट, बेडौल (पदार्थ).

तांदळा [**म०** तांदूळ] **वि०** तांदुळाच्या

आकाराचा(सोन्याचा मणि, पोत,इ०). ⊛ **तांदळी पोत** स्त्री० तांदुळाच्या आकाराच्या सोन्याच्या मण्यांचें स्त्रिया गळ्यांत घालतात तें भूषण.

तादात्म्य [सं०] न० १ एकरूपता; एकत्व. २ दोन माणसांच्या विचारांचें किं० स्वभावांचें सादृश्य.

तांदुळजा (-चा) पु० एक शाकभाजी.

तांदूळ [सं० तंडुल] पु० १ हरीक, राळा, कांग, सावा, वरी, वरटी, इ० चे दाणे (टरफलांतून काढलेले). २ टरफलविरहित जो भाताचा दाणा तो. ३ सोन्याचा मणि. ⊛ **तांदुळगोटा** पु० ए० व० १ तादूळ, जोंधळे, इ० खावयाचीं धान्यें समुच्चयानें. २ तांदुळाचा दाणा.

तादृश [सं०] १ त्याच्यासारखा. २ म्हणण्याजोगा; विशेष; फारसा चांगला (अकरणरूपी); उ० ह्या शास्त्र्याच्या शिकविण्याचा मला तादृश उपयोग झाला नाहीं; उ० मी विकत घेतला तो घोडा तादृश नाहीं; उ० मला नोकरी मिळाली पण तादृश नाहीं.

ताद्रूप्य [सं०] न० त्याच रूपाचा असण्याचा धर्म; एकरूपता; एकात्मता; एकत्व.

ताधरावणें स० क्रि० कोणेकाला काहीं कामाबद्दल घाई करणें किं० नेट लावणें.

तान [सं०] स्त्री० १ सूर; रागाचा आलाफ. २ एका दमांत किं० एका नेटांत केलेली काहीं क्रिया; काहीं क्रिया सुरू करून न खळतां ती संपविणें; उ० गाण्याची (किं० शिव्यांची, मारण्याची, किं० बोलण्याची) तान घेणें किं० झाडणें. ⊛ **तानमान** [म० तान (सूर) + मान (माप)] न० १ कोणत्याही कार्याला अनुकूल अशी जी परिस्थिति ती; संधि; उ० कोणताही व्यवहार करावयाचा तरी तानमान पाहून करावा. २ दोन वस्तूंचा अनुरूप संयोग, मिलाफ, किं० जुळणी. **तान देणें** गवयाचा सूर लांबविणें. **तानकर्म** न०, **तानबाजी** स्त्री० १ गायनाला सुरवात करावयाच्या पूर्वीं कंठ साफ करणें, सूर काढणें, इ० कार्यें गवई करतात तीं समुच्चयानें. २ गाण्याची एकादी ओळ पुटपुटणें.

तान [सं० तृष्णा, तण्हा, तहान] स्त्री० १ पाणी पिण्याची इच्छा; तहान. २ कोणत्याही वस्तूसंबंधानें वाटते ती उत्कट इच्छा. ३ मुलांना एक उष्णताजन्य रोग होतो तो,-जेणें करून शोष लागतो. ⊛ **तान घालणें** (किं० धरणें) तान ह्या नांवाचा रोग जो मुलांना होतो त्यावर अंगाला पानें इ० बांधून उपाय करणें. **तानभूक** [म० तहान + भूक] स्त्री० ए० व० १ तहान, भूक, इ० देहाच्या गरजा. २ कोणतीही उत्कट इच्छा; उ० आपलें दर्शन होतांच माझी तानभूक मोडली. **तानमोड** [म० तहान + मोडणें] स्त्री० तान शमवीत असलेल्या माणसाला किं० पशूला पुरतेंपणीं पाणी न पिऊं देणें. **तानलाडू** [म० तहान + लाडू] पु० प्रवासांत अविश्रांतिच्या जागीं उपाहारासाठीं घेतलेलें खाद्य (दशम्या, चिवडा) इ०, समुच्चयानें. 'तानलाडू भूकलाडू' ह्याचाही वरील प्रमाणेंच अर्थ आहे.

तान, ताना, तान्हा [सं० कृष्ण, कण्हा, कान्हा, तान्हा, ताना] पु० आईच्या अंगावर दूध पिणारें मूल. ⊛ **तानगाभणें** [म० तान (अंगावर पिणारें मूल) + गाभणें (गर्भवती होणें)] अ० क्रि० एकें वासरूं अंगावर दूध पिण्याइतकें लहान असतां (गाय, म्हैस) गर्भवती होणें. **तानगाभी** [वर 'तानगाभणें पहा'] वि० १ पहिलें वासरूं (किं० मूल) आईच्या अंगावरचें दूध पिण्याइतकें लहान असतां पुन्हा गरोदर होणारी (गाय, म्हैस, किं० स्त्री). २ सहा सहा महिन्यानीं गरोदर होणारी (स्त्री).

तान स्त्री० एक औषधी वल्ली.

तान वि० मजबूत म्ह० वापर सोसावयाला समर्थ असें (वस्त्र). (**नंदभापेंत**) भारी किमतीचें. याच्या उलट खोंच म्ह० हलक्या किंमतीचें; स्वस्तें.

तानतान, तालताल क्रि० वि० रागारागानें आवेशानें, त्वेषानें (बोलणें, मारणें, उडणें).

तानवट न० कोष्ट्याचें एक आऊत,-कुकड्याचें, सूत गुंडाळावयासाठीं जीत उभ्या खुंट्या बसविलेल्या असतात अशी चौकोनी रचना.

तानवड, तानवीड, तानवडें न० स्त्रियांचें एक कर्णभूषण.

तानवड स्त्री० बारीक फुलांचें एक झाड. न० त्याचें फूल.

तानाशा पु० चैनींत, सुखविलासांत, किं० रंगेलपणानें राहणारा माणूस; रंगेल गडी.

तान्ह [म० तहान; सं० तृष्णा] **स्त्री०** तहान, तृष्णा. १ पाणी पिण्याची इच्छा.

तान्हा [तान ,ताना, तान्हा, पहा.] **वि०** १ आपल्या अपत्याला दूध पाजणारी (स्त्री, गाय, म्हैस). २ मातेच्या अंगावर दूध पिणारें(मूल, वासरूं).॰ **तान्ही ओल स्त्री०**पावसाळ्यांतील पहिल्या पावसांनीं जमीनीला येते ती आर्द्रता. **तान्हें पारडें न० ए० व०** एक आईच्या अंगावर दूध पिणारें मूल आणि दुसरीं त्याच्याहून मोठीं मुलें समुच्चयानें. **तान्हवट** [म० तान्हा] **वि०** १ मातेच्या अंगावर दूध पिण्याच्या वयाचें (वासरूं, मूल). २ जिचें वासरूं अद्यापि मातेचें दूध पितें अशी (गाय, किं० म्हैस). ३ समुदायांतील उत्कृष्ट (भाग किं० अंश). **तान्हुला वि०** आईच्या अंगावर दूध पिण्याच्या वयाचें मूल.

तान्हावणें [म० तान, तहान] **अ० क्रि०** तहान लागलेल्या स्थितींत असणें; तहान लागलेली असणें; तृषाकुल झालेलें असणें.

तान्हाळू, तानाळू, तान्हेला [म० तान, तहान] **वि०** ज्याला तहान लागली आहे असा.

तान्हेणें अ० क्रि० पाणी प्यावें अशा इच्छेनें युक्त होणें; तान्हावणें.

तान्हेला [म० तान्हेणें] **वि०** ज्याला तहान लागली आहे असा.

ताप [सं०] **पु०** १ ज्वर. २ सूर्य, अग्नि, इ० ची उष्णता. ३ तप्तता; तापलेपणाची स्थिति. ४ विशिष्ट समयीं उद्दीप्त झालेला कोणताही मनोविकार. ४ कामकाजानें किं० खळजनांच्या दुष्टपणानें उत्पन्न झालेला त्रास किं० उपद्रव. ५ अस्वस्थता. ६ मनोविकाराचा क्षोभ. ७ राजा, उंदीर, ढेंकूण, सावकार, धनी, इ० नीं दिलेली पीडा किं० मांडलेला छळ किं० उपद्रव. ८ पावसाळ्याच्या अगोदर किं० नंतर पडतें तें प्रखर ऊन्ह. ॰ **तापकरी वि०** ज्याला ताप आला आहे असा. **तापट (–ड) वि०** १ ज्याला लवकर किं० क्षुल्लक कारणानें राग येतो असा. २ तल्लख, हुशार, चपळ. ३ हिंमतदार, (घोडा, बैल, इ०). **तापडाई, तापटाई स्त्री०** १ स्वभावाचा तापटपणा; तल्लखपणा. २ हिंमत. **तापतोबरा पु०**हातपाय आपटणें, ओरडणें, इ० रूप रागाचें आविष्करण (करणें, लावणें, मांडणें). **तापत्रय न०** १ आधिभौतिक, आदिदैविक,आणि आध्यात्मिक अशा कष्टांचा समुच्चय. २ दारिद्र्याची स्थिति; दारिद्र्याचे सर्व प्रकारचे कष्ट समुच्चयानें. **तापिष्ठ वि०** रागीट, तापट. **तापाटी स्त्री०** प्रखर ऊन्ह किं० उन्हाची प्रखरता.

तापटणें न० १ नांगर हाकणारा माणूस वापरतो तो आखूड चाबूक. **चाव्हऱ्या आसूड पु०** नांगर हाकणाऱ्याच्या हातांतील लांब चाबूक. २ चाव्हऱ्या चाबकाचा लाकडी दांडा.

तापणें [सं० तप्] **अ० क्रि०** १ सूर्याचें ऊन्ह, अग्नि,इ० च्या योगानें गरम होणें किं०कढत होणें किं० उष्ण होणें. २ ज्वरानें पीडित होणें; ज्वरानें अंगाची उष्णता वाढलेली असणें. ३ रागावणें. ४ क्षुब्ध होणें.

तापता, ताफता [फा०] **पु०** एक प्रकारचें रेशमी वस्त्र.

तापन [सं०] **वि०** १ सूर्यासंबंधाचा. २ उपद्रवकारक. **पु०** १ सूर्य. २ उन्हाळा. ३ सूर्यकांत मणि. ४ मदनाच्या पांच बाणांपैकीं एक. **न०** १ पीडिणें, सतावणें, उपद्रविणें. २ नरकविशेष. ३ सोनें.

तापाविणें [म० ‘ तापणें ’ चें प्रयोजक] **स० क्रि०** १ तप्त करणें; ०ला उष्णता किं० आंच देणें. २ कोणेकाला रागास चढविणें.

तापस [सं०] **वि०** तपासंबंधीं.**पु०** तपस्वी. ॰ **तापसतरु पु०** हिंगणबेट.

तापा पुढें ‘ ताफा ’ पहा.

ताफा, तापा [अ० तायफाह्] **पु०** १कांहीं कार्याला जरूर जीं माणसें आणि पदार्थ त्यांचा संच किं०मिलाफ किं० समुदाय. २ वाद्यें, साजिंदे, आणि कलावंतीण मिळून जो समुदाय तो.३ सूर, सनई, संबळ, इ० वाजंत्रांसहित वाजंत्र्यांचा जो समुदाय तो.४पाण्यांतून काष्ठें न्यावयाचीं असतां तीं एकत्र बांधून करतात तो रचनाविशेष. ५ नद्यादिकांतून माणसें किं० कांहीं सामान न्यावयाचें असतां ताजेला चार भोपळे, घागरी, इ० बांधून तरंग-

णारें साधन करतात तें. ६ चिमण्यांचा समुदाय किं० थवा. ❀ **ताफा बसणें** कुटुंबांतील कर्ता किं० मिळविता पुरुष मेल्यामुळें त्या कुटुंबाला हीन किं० विपन्न दशा प्राप्त होणें.

तांब [सं० ताम्र=तांबडा] स्त्री० १ लोखंडावर जो तांबडा मळ चढतो तो; लोखंडाचा गंज. २ सूर्योदयीं किं० सूर्यास्तीं आकाशाला येतो तो तांबडेपणा. ३ गहूं, शाळू, इ० च्या शेतांवर पडतो तो रोगविशेष. ४ गुरांच्या अंगावर अगदीं सूक्ष्म जे तांबडे कृमि पडतात ते प्रत्येक. ५ कणकेंत टरफलाचा अंश येतो तो. ६ कांहीं शास्त्र किं० विद्या किं० कला ह्यांचा फार दिवस उपयोग न केल्या कारणानें त्यांचे ठायीं जें मालिन्य उत्पन्न होतें तें (विस्मृति,मंदपणा,सफाईचा अभाव, इ० च्या रूपाचा). ❀ **कोणेकाची तांब झाडणें** त्याची भोसडपट्टी करणें; त्याला रागें भरणें. **कोणेकाची तांब झडणें** त्याची भोसडपट्टी काढली जाणें किं० निघणें.

तांबट, तांबटकर [सं० ताम्र=तांबें] पु० तांबें ह्या धातूचीं पात्रें करणाराची जात किं० त्या जातीचा कोणीही इसम.

तांबट स्त्री०, न० छपरें करण्याच्या उपयोगाचें तांबडें खरखरीत गवत. [माती.

तांबड [सं० ताम्र=तांबडा] स्त्री० तांबडी

ताबडतोब क्रि० वि० तत्काळ; त्याच क्षणीं; वेळ न गमावतां.

तांबडा [सं० ताम्र=तांबडा] वि० लाल, रक्तवर्ण. ❀ **तांबडमाती** स्त्री० तांबडी माती. **तांबडसर** वि० किंचित् तांबडा. **तांबडसांज** स्त्री० सूर्यास्तानंतरचा वेळ,–रात्रीच्या पूर्वीचा. **तांबडा आंबा** पु० रातांबा; कोकम हें फळ. **तांबडा बोर** वि० एका विशिष्ट रंगाचा (घोडा). **तांबडा बोळ** पु० बोळाची एक जात; रक्त्या बोळ. **तांबडा भोपळा** पु० भाजीचें एक फळविशेष; दुसऱ्या जातीच्या भोपळ्याला ' पांढरा भोपळा ' किं० ' दुध्या भोपळा ' किं० ' दुध्या' म्हणतात. **तांबडा लाल** वि० गडद तांबडा. **तांबडी भाजी** स्त्री०मांस (विनोदांत).

तांबणें [म० तांब] अ० क्रि० गंजानें युक्त होणें(धातूचा पदार्थ).

ताबतवारा मागें ' तापतोबारा ' पहा.

तांबनेल [म० तांब] वि० गंज चढलेलें (धातूचें भांडें).

तांबर स्त्री० लाव्हा पक्ष्याची मादी.

तांबरणें, तांबारणें [म० तांब; सं० ताम्र] अ० क्रि० १ तांबडा होणें (डोळा,ढग,आकाश). २ तांबेनें किं० गंजानें (धातूचें भांडें) मलिन होणें. ३ रोगानें (धान्य) निःसत्त्व होणें.

तांबरा [म० तांब] पु० १ गहूं, जोंधळा, शाळू, इ० वर तांबडेपणाचा रोग पडतो तो. २ लोखंडाचा गंज. ३ तांबें किं० पितळ ह्या धातूंचा गंज.

तांबली स्त्री०, **तांबलें** न०[म०तांबें]संसारोपयोगीं एक आकारविशेषाचें भांडें.

तांबवशी स्त्री० एक प्रकारचा खाऱ्या पाण्यांतील मासा.

तांबसाळ स्त्री० भाताची एक जात.

तांबळ न० तांबड्या जमीनीचा प्रदेश.

ताबा[अ०ताबअ=नियंत्रणा]पु० १ कबजा. २ अमल,अधिकार. ❀ **ताबेगहाण** न० ऋणकोनें तारण म्हणून धनकोच्या हवालीं केलेला पदार्थ. **ताबेदार** वि० जो दुसऱ्याच्या नियंत्रणेंत आहे किं० त्याचा नोकर आहे तो. **ताबेदारी** स्त्री० दुसऱ्याची आपणावर असलेली नियंत्रणा; दुसऱ्याच्या इच्छेप्रमाणें वागलें पाहिजे अशी जी स्थिति ती.

तांबारा पु० वर ' तांबरा ' पहा.

ताबींत [अ० ताबअ=नियंत्रणा] क्रि० वि० एकाद्याच्या ताब्यांत (असणें, जाणें,होणें).

ताबूत (–द) [अ०] पु० मोहोरमांत मुसलमान लोक कामट्यांच्या घराला नक्षीचे कागद चिकटावून करतात ती रचना; डोला. हे ताबूद हसन आणि हुसेन ह्यांच्या कबरा मानल्या जातात.

तांबूल [सं०] पु० पानवेलीच्या पानाला चुना लावून त्यांत सुपारी, कात,इ० द्रव्यें घालून मुखशुद्ध्यर्थ खातात तो विडा. ❀ **तांबुलवल्ली** स्त्री० पानवेली. **तांबुलकरंक** पु० पानदान.

तांबूल न० वर ' तांबली, ' ' तांबलें ' पहा.

तांबूलश्रावणी स्त्री० गांवांतील देवस्की कर-

णारा महाजन किं० त्याचा गुमास्ता याला नवीन विवाह झालेल्या माणसाकडून ग्रामदेवतेच्या नांवानें जी देणगी दिली जाते ती.

तांबूस [म० तांबडा; सं०ताम्र] **वि०** किंचित तांबडा.

तांबें [सं० ताम्र] **न०** एक तांबड्या रंगाचा [धातु.

तांबेजणें **अ० क्रि०** धातूचें पात्र गंजानें मलिन होणें.

तांबेट न० घराचें छपर करण्याकडे बहुधा ज्याचा उपयोग केला जातो असें तांबूस रंगाचें गवत. त्याला ' कोळंब ' असेंही म्हणतात.

तांबेरा वि० ज्यांवर तांब चढली आहे असें; गंजलेलें; (भांडें).

तांबेरा [म० तांब] **पु०** १ धान्याच्या शेतांवर पडतो तो एक रोग. २ तांब, गंज.

तांबेरी [म० तांबें] **वि०** १ तांबें ह्या धातूचा केलेला (पदार्थ). २ तांब्याच्या पत्र्यानें आच्छादलेला किं० मढविलेला.

तांबेसांज [वर, ' तांब ' अर्थ २ पहा.] **स्त्री०** १ सायंकाळचा आकाशाचा तांबूस देखावा किं० हा देखावा दिसतो ती वेळ,– जी सूर्यास्ताच्या पाठोपाठ येते. २ प्रात:काळचा जो आकाश तांबडें करणारा काळ तो.

तांबोटी [म० तांबें; **सं०** ताम्र] **स्त्री०** १अखंड भांडें करावयासाठीं तांबें ह्या धातूचा जाड पत्रा घेतात तो. २ न्हाव्याची वपनाच्या वेळीं पाणी ध्यावयाची वाटी. ३ तेल्याच्या घाण्यांतील तेल उपसून काढावयाचें एक साधन.

तांबोरा [म० तांब]**पु०** १ लोखंड, तांबें, इ० धातूंचा गंज. २ गहूं, जोंधळा, शाळू, इ०वर पडतो तो एक रोग.

तांबोळी [सं० तांबूल] **पु०** विड्याचीं पानें विकतो तो.

तांबोळी स्त्री० एक कंदविशेष.

तांब्या [सं० ताम्र] **पु०** एका विशिष्ट आकाराचें तांबें ह्या धातूचें पात्र; भोजनाचे वेळीं ह्यांत पाणी भरलेलें असून पेला, पंचपात्री, इ० त त्यांतून पाणी लागेल तसतसें ओतून घेऊन जेवणारा पितो. पितळेचें किं० चांदीचें ह्याच उपयोगाचें जें पात्र त्यालाही ' तांब्या ' म्हणतात.

तांभण, तांभणी, तामण, इ० पुढें 'ताम्हण' ' ताम्हणी, ' इ० पहा.

ताम, तामरा वर ' तांब, ' ' तांबरा ' पहा.

तामनदस्त, तावनदस्त पु० गंजिफा वाटते. वेळीं वाटणारानें कांहीं चुकी केली असतां त्याचे पासून दंडादाखल घेतात तीं पानें समुच्चयानें.

तामस [सं०] **वि०** १ अंधकारमय.२निद्रा, आलस्य, प्रमाद, साहसिकता, इ० गुण ज्याचे ठायीं फार आहेत असा (मनुष्य). २ हे गुण ज्या आहारानें मनुष्याचे ठायीं उत्पन्न होतात असा (आहार). ३ अज्ञानी. ४ दुष्ट. ५ रागीट, तापट प्रकृतीचा. **टीप,**–वरील सर्व अर्थी ' तामसी, ' 'तामसिक' हेही शब्द मराठींत योजले जातात .ꕥ **तामसगुणी वि०** निद्रा, आलस्य, प्रमाद, साहसिकता, क्रोध, इ० गुण ज्याचे ठायीं मोठ्या प्रमाणांत आहेत असा (मनुष्य) किं० असे गुण उत्पन्न करणारा (आहार). **तामसी उपचार पु०** रोगविशेष बरा करण्यासाठीं कधीं कधीं धाडसाचा इलाज करतात तो.

ताम्र [सं०] **वि०** तांबडा. **न०** तांबें हा धातु. ꕥ **ताम्रकर्णी स्त्री०** दक्षिणदिशेचा पालक जो गज वामन त्याची पत्नी. **ताम्रचूड पु०** १ कोंबडा. २ मोर. **ताम्रसार पु०** रक्तचंदन. **ताम्रधातु पु०** गेरू; काव. **ताम्रपट्ट, ताम्रपत्र, ताम्रशासन न०** राजानें ब्राह्मणादिकांस भूम्यादि दान केलें असतां त्या संबंधाचा लेख ज्या तांब्याच्या पत्र्यावर कोरून दिला जात असे तो पत्रा. ' ताम्रपट्ट ' ह्याचें ' ताम्रपट' हें मराठी रूप आहे. **ताम्रभस्म न०** १ औषधासाठीं वैद्यलोक वनस्पति इ० साधनांनीं तांबें ह्या धातूचें करतात तें भस्म. २ पुरणपोळी (थट्टेनें).

ताम्हन (–ण) न० संध्येचें पाणी सांडावयासाठीं जें पसरट आणि उथळ पात्र घेतात तें. **ताम्हणी स्त्री०** लहान ताम्हण.

तायतळें, तायताळें,तायती मागें 'ताइतळें,' ' ताइती ' पहा.

तार [फा०] **स्त्री०** १ धातु, रेशीम, मेषादींचें आंतडें, इ०चा तंतु. २ कणीक, काकवी, इ०जे चिकट पदार्थ त्यांचा तंतूच्या रूपाचा आकार. ५ भांग, मद्य, अफू, इ०अमली पदार्थांच्या सेवनानें

एकदम हातीं आली असतां अंगांत येते ती धुंदी किं० येतो तो उन्मत्तपणा किं० वेडे वेडे चाळे करण्याकडे होते.ती प्रवृत्ति. ५ कांहीं गोष्ट करण्याकडे चित्ताची झालेली एकाग्रता. ६ कांहीं गहन विचारांत मनाची होते ती तल्लीनता(लागणें). ७ संभाषणाचा ओघ; विचाराचा सुसंगतपणा. ८ कोणत्याही क्रियेची सततची परंपरा. ९ तारायंत्रानें पाठविलेली बातमी. ꣸ **एकाद्याची तार ओळखणें** (किं० **जाणणें**) त्याच्या मनाचा कल किं० इच्छा ओळखणें किं० तर्किणें.**एकाद्याची तार राखणें**(किं० **संभाळणें**) त्याची मर्जी पाहून तदनुरूप वागणें. **एकाद्यावर तारा तोडणें** त्याच्यावर शिव्यागाळींचा वर्षाव करणें. **एकाद्याचा गळा तार असणें** त्याचा आवाज स्वच्छ, खणखणीत, आणि गोड असणें. **तारकस** [**फा०** तार्+कर्षादन् (ओढणें)] **पु०** धातूची तार काढणारा कारागीर. **तारकशी स्त्री०** १ तारकसाचा धंदा किं० कौशल्य. २ (लाक्षणिक) छळणूक, गांजणूक (लावणें,मांडणें,करणें).**एकाद्याला तारकशी धरणें** त्याच्यावर करडा अंमल चालविणे; त्याच्याकडून क्रूरपणें काम करून घेणें. **तारकशी वि०** ज्याच्याभोंवतीं तारेचें किं० सुतळीचें जाळें घट्ट विणलें आहे असें (भांडें, बारदान, बाहुली, इ०).

तारक [**सं०**] **वि०** तारणारा; संकटांतून किं० अडचणींतून सोडविणारा. मारक म्ह० संकटांत लोटणारा.

तारकटणें [**म०** तार अर्थ ६] **अ० क्रि०** १ जड किं० सुस्त होणें (डोळे, शरीर).

तारका [**सं०**] **स्त्री०** १ डोळ्यांतील बाहुली. २ नक्षत्र; तारा. ३ उल्का. ४ द्वाड,खोडकर, किं० व्रात्य मुलगी.

तारकाबारका, तारखाबारखा,तारकापारका वि० १ भांबावलेला; गोंधळलेला;आश्चर्यचकित; उ० खेडेगांवचा माणूस शहरांत आला म्हणजे तारकाबारका होतो.२संतापलेला;क्रुद्ध.३धूर्त; सावध; तल्लख.

तारकी पारखी [**म०** तर्क; **सं०** तर्क; **म०** पारख; **सं०**परीक्षा] **वि०** १ धूर्त; चौकस; सूक्ष्मावलोकी; सावध; जागरूक.

तारकेवारी, तारकीवारकी स्त्री० १ दुसऱ्याला दाबून आणि दटावून त्याच्यावर अंमल चालविणें किं० गाजविणें.२ दुसऱ्याशीं उद्दामपणाची वर्तणूक.

तारंगण न० १ लहान मुलांची चरफड, हातपाय आपटणें,इ० समुच्चयानें.२ कोणेकावर शिव्यागाळींचा वर्षाव; चरफडाट.दोन्ही अर्थी **क्रि०**करणें, लावणें, मांडणें. ३ तारांगण.

तारटणें, तारठणें पुढें ' तारवटणें ' पहा.

तारण [**सं०**] **न०** १ तारण्याची क्रिया; तारणें; रक्षिणें. २ अडचणींतून किं० संकटांतून मुक्त करणें. ३जो कोणी दुसऱ्याबद्दल जामिन राहतो तो त्या दुसऱ्याचें नुकसान आपणाला भोवूं नये म्हणून त्याच्याकडून आपल्या कबज्यांत घेतो तें द्रव्य किं०घेतो तो कांहीं पदार्थ .४कर्जाऊ दिलेल्या रकमेपेक्षां गहाण म्हणून ठेवून घेतलेल्या वस्तूच्या किंमतीचा जो अधिकपणा तो.

तारणें [**सं०** तॄ=ओलांडणें] **स० क्रि०** (कोणेकाला) संकटांतून किं० अडचणींतून सोडविणें; बचावणें.

तारतखाना, तारदखाना [**फा०** तहारत् खानाह्] **पु०** शौचकूप; शेतखाना.

तारतम्य [**सं०**] **न०** १ एक पदार्थ दुसऱ्यापेक्षां किती अंशानें खालच्या किं० वरच्या दर्जाचा आहे हें ठरविणें; दोन वस्तूंतील उंचनिचीपणा; फरक; तफावत. २ सारासार विचार; विवेकबुद्धि. ३ प्रसंगानुसार वर्तन करण्याची शक्ति. ꣸ **तारतम्यभाव पु०** तारतम्य.

तारतळया स्त्री० अ० व० कंटाळा येण्याइतका वेळ वाट पहात बसणें (देणें, देत बसणें).

तारता [**म०** तारणें] **पु०** तारणारा; संकटांतून किं० अडचणींतून सोडविणारा.꣸ **मारत्यापेक्षां तारता अधिक** (किं० **श्रेष्ठ**) मारणाऱ्याचे पेक्षां तारणाऱ्याचा दर्जा किं०योग्यता अधिक असते.

तारंतार [**म०** तार आणि तार] **क्रि० वि०** सर्वथैव, पूर्णपणें, अगदीं तंतोतंत (भरणें, उतरणें, जमणें, मिळणें, पडताळा येणें, इ०).

तारतीम, तारतम [**सं०** तारतम्य] **न०** पाहुण्याचा आदरसत्कार किं० आदरातिथ्य; पाहुणचार (करणें, पाहाणें).

तारदानी [म० तार + फा० दान्] **स्त्री०** वीणा इ० च्या दांडीला तारा ओवून घ्यावयासाठीं जी सच्छिद्र हस्तीदंती पट्टी मारलेली असते ती.

तारफेणी स्त्री० सपीटाच्या तारा काढून त्यांचें जें पक्वान्न केलेलें असतें तें.

तारंबळ, तारांबळ [खालीं टीप पहा] **स्त्री०** अनेक कार्ये एके समयीं करण्याचा प्रसंग आल्यामुळें किं० थोडक्या पैशांत मोठा प्रपंच चालविण्याची जबाबदारी अंगावर पडल्या कारणानें प्राप्त होते ती व्यग्रता किं० अस्वस्थता; त्रेधा; धांदल. २ पैशाच्या टंचाईमुळें प्रपंचांत होते ती अडचण. **टीप,**—लग्न, मुंज, इ० विधींमध्यें शुभमुहूर्त न चुकावा म्हणून उपाध्ये फार जपत असतात, आणि मंत्रतंत्रादि वेळच्यावेळीं आटोपण्यासाठीं धाई करीत असतात. ह्या धाईचा कळस ' तारावलं चंद्रबलं तदेव ' इ० शब्द म्हणतांना होतो. ह्यावरून एकाद्याची ' तारांबळ उडणें ' म्हणजे त्याची धांदल होणें असा अर्थ झाला. तारांबळ ह्याचें अपभ्रष्ट रूप ' तारंबळ ' असें आहे.

तारली स्त्री० खाऱ्या पाण्यांतील एक पांढऱ्या वर्णाचा मासा.

तारवट [म० तारूं] **वि०** तारवांत किं० गलबतांत वाहून आणलेला (नारळ इ० व्यापारी माल). ह्या अर्थानें ' तारवटी ' असाही शब्द आहे.

तारवट [म० तार] **वि०** अंमली पदार्थांच्या सेवनामुळें धुंद झालेले (डोळे) किं० चांचरा झालेला (स्वर).

तारवटणें [म० तार] **अ० क्रि०** अमली पदार्थांच्या सेवनानें किं० नेहमीचीं झोपेची वेळ टळल्यामुळें किं० पित्तादिविकृतीमुळें सुस्त किं० मंद होणें.

तारसा पु०खटारा गाडीची तबकडी लांबोड्या चौकटीच्या रूपाची असते. ह्या चौकटीचीं जीं दोन लांबीचीं म्ह०उभीं लांकडें त्यांना' घोडे 'किं०' धोडी ' किं०' धोडकीं ' म्हणतात. अशा प्रत्येक लांकडाला ' घोडा ' किं० ' घोडें ' किं० ' घोडकें ' म्हणणात. चौकटीचीं आडवीं जीं कडेचीं जीं दोन लांकडें त्यांपैकीं प्रत्येकाला ' करळी ' म्हणतात. करळ्यांना समांतर आणि घोड्यांशीं काटकोनांत मधलीं जीं दोन किं० तीन लांकडें त्यांपैकीं प्रत्येकाला ' तारसा ' असें म्हणतात.

तारळ पु० खाऱ्या पाण्यांतील एक मत्स्य. वर ' तारली ' पहा.

तारा [सं० तारा] **स्त्री० पु०** १ आकाशांत जे असंख्य बारके बारके तेजोगोल दिसतात ते प्रत्येक. २ डोळ्यांतील बाहुली. ३ बृहस्पतीची पत्नी. ४ वालि नामक वानराची पत्नी. ५ आकाशांत सर्रदिशीं इकडून तिकडे सरकणारा तारा. ह्या सरकण्याला ' तारापात ' पु० किं० ' तारा तुटणें ' असें म्हणतात. ६ बाण, नळा, इ० आतिषबाजीच्या पदार्थांत गंधकाची गोळी, इ० घातलें असतां नक्षत्राकार जो अग्निगोलक उडतो तो. ७ (लाक्षणिक) उत्कृष्ट कारकून किं० कोणीही कारागीर. ८ (लाक्षणिक) सुंदर पुरुष. ९ नदी किं० खाडी यांतील पाणी ओसरल्यामुळें होतो तो पायमार्ग. **स्त्री०** जन्मनक्षत्रापासून इष्टकालींचें दिननक्षत्र नवांनीं भागून बाकी उरते ती. ꠰꠰ **तारे तुटणें** १ आकाशांत तारे इकडून तिकडे सर्रदिशीं सरकणें. २ (लाक्षणिक) उत्कृष्ट सुरांत गाणें (स्तुतींत); गर्दभगायन करणें (निंदेंत). ३ मूर्खासारखें बोलणें. **ताराधिप पु०**चंद्र. **तारामृग पु०**मृगनक्षत्र. **ताराबल (—ळ) न०**ग्रहनक्षत्रादिकांचें विवक्षित कार्याला आनुकूल्य. **तारामंडल न०** नक्षत्रमंडल. **तारामैत्रक न०**सहज किं० आकस्मिक प्रेम. **तारांगण न०**१आकाश; गगन. २वेधशाला. ३ सैन्यांतील शिपायी इ० ची पांगापांग किं० विस्कळितपणा किं० दाणादाण. ह्या अर्थी 'तारातीर' **स्त्री०** असाही शब्द आहे, (उडणें, होणें). ४ घराच्या वरच्या मजल्याच्या खिडकीच्या पुढें आलेला सज्जा. ५ सावकारांचे तगादे एकसारखे येत असल्याकारणानें किं० अनेक जोखमींची कामें एकदम करण्याचा प्रसंग आल्यामुळें किं० पैशाच्या अडचणीमुळें होते ती त्रेधा. ह्या अर्थी ' तारातीर ' **स्त्री०** असाही शब्द आहे. ६ हरवलेल्या किं० वाट चुकलेल्या मुलाची होते ती घाबरगुंडी.

तारित [सं०] **वि०** १ संकटांतून पार पाडलेला. २ नदीपार नेलेला.

तारीख [अ० तारीग्] **स्त्री०** इंग्रजी आणि मुसलमानी महिन्यांतील जे दिवस ते प्रत्येक; उ० आज आक्टोबर महिन्याची वीसावी तारीख आहे. ॐ**तारीखवार क्रि० वि०** तारखांच्या क्रमानें. **तारीखदान न०** एकापुढें एक अशा तारखांचे पत्ते ज्यांत भरले आहेत अशी पेटी इ०.

तारीफ [अ० तअरीफ] **स्त्री०** स्तुति; प्रशंसा. ॐ**तारीफदार वि०** स्तुतीला पात्र; प्रशंसनीय.

तारुण्य [**सं०**] **न०** तरुणपणा; ऐन उमेदीचें वय; जवानी.

तारूं [**सं०** तॄ= तरणें] **न०** नौका; गलबत; जहाज. ॐ **तारूं तराडें न०** गलबतबिलबत; समुद्रावरून माणसें, माल, ह्यांची ने आण करण्याचें कोणतेंही साधन. ॐ **भटाला तारूं आणि गाबत्याला गुरूं** भलत्याच माणसानें भलताच धंदा करणें हा मूर्खपणा आहे किंवा केल्यास नुकसान होतें. गाबती ह्म० मासे धरण्याचा धंदा करणारा. **गाबत्यास गुरूं आणि गुराख्याला तारूं** ही ह्याच अर्थाची म्हण आहे. मागें ' गाबती ' पहा. **तारवांत बेडा पु०** फार मोठ्या प्रमाणांत कोणी चालविलेल्या व्यापारादिकांत दुसऱ्या कोणाचा जो अत्यल्प प्रमाणांत नफ्याचा किं०नुकसानीचा भाग असतो तो. बेडा म्ह०झाडावर पक्क झाल्यावर उतरलेल्या पोफळाची सुपारी. पूर्ण भरलेल्या गलबताच्या भरताडांत एक बेडा किं० सुपारी हें अत्यल्प प्रमाण होय.

तारें [**म०** तारा] **न०** १ हुशार आणि तल्लख मूल किं० माणूस. २ (विपरीत लक्षणेनें) म्हातारपणामुळें ज्याच्या बुद्धीला चळ भरला आहे असा मनुष्य किं० असा चळ. ३ (विपरीत लक्षणेनें) मूर्ख माणूस; वेडपा. ४ गलबताला ज्याच्या पासून धोका पोंचण्याचा संभव आहे असा वारा; वादळी किं० जोळी हवा. ॐ**आधींच तारें आणि त्यांत शिरलें वारें** जो मूळचाच द्वाड त्याला उत्तेजक परिस्थिति मिळाल्यास तो परमावधीचा द्वाडपणा करणारच. **तारेंवारें न०** १ (गलबताला अनुकूल किं० प्रतिकुल ह्या दृष्टीनें)वारा किं० वाऱ्याचा प्रवाह. २ छाकटेगिरीचे चाळे; नखरे; उ० तारेंवारें दोन दिवसांचें. ३ गर्व; ताठा; मगरूरी; उ० नोकरीचें (किं० संपत्तीचें किं० अधिकाराचें) तारेंवारें त्याला चढलें आहे (किं० आलें आहे). ४ अमली पदार्थाच्या सेवनानें अंगांत आलेली उमेद, अवसान, किं० हिंमत.

तारोतार क्रि० वि० १ कांठोकांठ (भरणें). २ खंड न पडतां; न खळतां; उ० त्यानें तारोतार दोन महिने खेपा घातल्या.

तारोळा पु० १ चालू असलेल्या कार्यांत येतो तो अडथळा, होतो तो खोळंबा, किं० पडतो तो खंड. २ घोंटाळ्याची स्थिति; अव्यवस्था; गोंधळ. ३ जरूर त्या पदार्थाच्या कमताईमुळें होते ती अडचण. ४ दुर्दशा; कष्टमय स्थिति.

तार्किक [**सं०**] **पु०** १ नैयायिक. २ तत्त्ववेत्ता. **वि०** तर्कानें जाणलेला किं० ठरविलेला.

तार्किक्य,तार्किक [सं० तार्किक] **न०** १ तर्क करण्यांत पटाईतपणा. २ बुद्धिमत्ता. ३ धूर्तपणा.

तार्‍या [**म०** तारणें] **पु०**होडीनें किं० गलबतानें वाहून नेणारा.

तार्‍या [**म०** तार] **वि०** १ अमली पदार्थाच्या सेवनाचें व्यसन असलेला. २ भरकट्या.

ताल [**हिं०** ताल=तळें] **न०** १ तळें. २ सांडलेल्या रक्ताचें, दुधाचें, किं० तेलाचें थारळें.

ताल [**सं०**] **पु०** १ गायनांतील जे परिच्छेद ते प्रत्येक,–ज्याचा अभिव्यंजक तळहात इ० चा ध्वनि असतो (**क्रि०** धरणें). २ गायनोपयोगी काशें धातूचें वाद्यविशेष. ३ हातावर हात किं० दंडावर हात मारण्याची क्रिया. ४ घराचा मजला. ५ ताडाचें झाड. ॐ **तालांक पु०** १ बलराम. २ करवत. ३ सर्व सुचिन्हांनीं युक्त असा मनुष्य. **तालवृंत, तालवृंतक न०** पंखा. **ताल ताल क्रि० वि०** १ उंच उंच; लंबेलंबे (बाता झोंकणें). २ बढाईखोरपणें बोलणें; मूर्खपणाच्या वल्गना करणें. ३असंबद्धपणें (बोलणें). **ताल ताल उडणें** (किं० **बोलणें**) १ असंबद्धपणें बोलत सुटणें; विषयाला सोडून बोलणें). २ टाळाटाळीचीं उत्तरें देणें. **तालतोड्या वि०** बढाईखोर; लंब्या लंब्या बाता झोंकणारा. **तालबद्ध वि०** तालाला अनुसरून असलेलं किं० ताल चुकूं न देणारें गाणें, ख्याल, पद, इ०. **तालतंत्र** ' ताळतंत्र ' पहा. **तालशुद्ध, ताळसूद वि०** यथाशास्त्र ताल

आहेत ज्याचे असें (गाणें). **तालसुरीं** क्रि० वि० शास्त्रशुद्ध रीतीनें (गाणें इ०). **ताल तोडणें** मूर्खासारखें बरळत सुटणें; अद्वातद्वा भाषण करणें.

ताल स्त्री० १ नद्यादिकांचा बांधून काढलेला धक्का. २ शेतांतील किं० रस्त्यावरील पाणी वाहून जाण्यासाठीं जो लांबट आणि तिरकस बांध केलेला असतो तो.

तालवर, तालवार [फा० ताल् आवर्=सुदैवी, संपन्न] पु० अ० व० संमानपूर्वक कोणेकाला वागविणें किं० त्याची यथोचित तैनात संभाळणें (करणें, ठेवणें, राखणें). ❀ **एखाद्याचें तालवार करणें** (किं० **राखणें** किं० **ठेवणें**) त्याचा यथोचित मान राखणें; त्याला संमानपूर्वक वागविणें.

तालव्य [सं०] वि० तालुस्थानीं किं०तालुस्थानापासून उत्पन्न होणारा (वर्ण किं० उच्चार); उ० इ, ई, च, छ, ज, झ, ञ, आणि श, हे तालव्य वर्ण होत. चमचा, जो, झाड, ह्यांतील च, ज, आणि झ, हीं अक्षरें दंततालव्य होत.

ताला, टाळा [सं० ताल=कुलूप] पु० कुलूप.

तालामाला पु० अनरूपता; संबद्धपणा; योग्य जुळणी किं० सांगड; मेळ; सोय; (पाहाणें, जाणणें, समजणें, येणें).

ताली [सं० ताली=चावी, खीळ] स्त्री० १ कुलूप लावावयाची किं० उघडावयाची किल्ली. २ कोणत्याही यंत्राची किल्ली.

तालीक (–ख) [अ० तअलीक्] स्त्री० सरकारी कागदाची नक्कल किं० प्रत (काढणें, उतरणें, घेणें, करणें).

तालीम [अ० तअलीम्] स्त्री० १गुरूपासून किं०वस्तादापासून घेतलेलें शिक्षण (गायन, वादन, नर्तन, व्यायामाचीं कामें, इ० मध्यें) क्रि० देणें, घेणें. २ घोड्याला चाली शिकविणें, पोपटाला बोलावयाला शिकविणें (देणें). २ तालीमखाना. ❀ **तालीमखाना** पु० कुस्ती, मल्लखांबावरच्या उड्या, जोर, जोडी, बैठका, इ० जे शरीर मजबूत करण्याचे व्यवसाय त्यांच्या सोयीचें गृह.

तालीमखाना पु० १ एक औषधी वनस्पति. २ तिचें बीज.

तालीवंत, तालीवार [अ० तालअ; सं० वत्; म० वंत; फा० वर्] वि० १ सुदैवी. २ संपन्न; वैभवशाली.

तालीसपत्र न० एक औषधी पदार्थ.

तालु, ताळू [सं०] न० मुखांत वरच्या भागीं जो अवयव असतो जेथें जिव्हा संयुक्त होऊन तालव्य वर्ण उत्पन्न होतात तो. स्त्री० १ टाळू; ताळू. २ मुखांतील घुमटाकार भाग. ३ डोक्याचा कपाळालगतचा भाग. ४ ह्या जागेवर मुलांच्या केशांचा राखतात तो झुबका किं० तें झुलूप. ❀ **ताळू भरणें** लहान मुलाच्या डोक्यावर तेल जिरविणें.

तालुका (–खा) [अ० तअल्लुकाह्] पु० एका मोठ्या शहराभोंवतालचीं लहान मोठीं गांवें ह्यांचा राजकीय व्यहारार्थ जो गट केलेला असतो तो. २ (हल्लीं) जिल्ह्याचे विभाग प्रत्येक; उ० पुणें जिल्ह्यांत नऊ तालुके आणि दोन पेटे आहेत.

ताले [अ० तालअ] पु० अ० व० १ वैभव, समृद्धि, संपत्ति, इ०च्या उपभोगाचे प्रकार; थाटमाट; डौल. २ नशीब, दैव, किं० प्रारब्ध यांचे खेळ किं० चमत्कार; उ० संपत्ति मिळणें हे दैवाचे (किं० नशीबाचे किं० प्रारब्धाचे) ताले आहेत; उ० असे त्याच्या दैवाचे ताले कीं कुत्र्यांवर नौबत चाले (म्ह० त्याचा उत्कर्ष परमावधीस पोंचला आहे). ❀ **तालेवंत, तालेवार** वि० वैभवशाली; श्रीमंत. **तालेवारी** स्त्री श्रीमंती; उत्कर्ष.

ताव [सं० ताप] पु० १ सुवर्णादि धातु अग्निसंयोगानें लाल करण्याची क्रिया. २ अशा प्रकारच्या अग्निसंयोगानें तापविलेले सुवर्णादि धातु निवल्यावर त्यांचा जो वर्ण दिसतो तो. ३ सबंध कागद (लिहावयाच्या उपयोगाचा). ४ काचेचें तावदान. ❀ **कोणेकाला ताव देणें** त्याला रागें भरून किं० त्याचे दोष दाखवून त्याला नरम करणें. **एकाद्या खाद्यावर ताव देणें**(किं०**मारणें**)तें यथेच्छ खाणें; तें आकंठ खाणें. **व्यापारांत ताव देणें** (किं० **मारणें**) खूप नफा मिळविणें. **कांहीं काम करण्याला ताव येणें** तें

करण्याची उत्सुकता होणें; तें करण्याची सुरसुरी येणें.

ताव [सं० ताप] **स्त्री०** पर्जन्य काळांत पडतें तें मंद ऊन्ह.

तावडणें अ० क्रि० कष्टाचें काम एकसारखें करीत राहाणें (आपल्या खुषीनें किं० दुसऱ्याच्या सक्तीनें). **स० क्रि०** कोणेकाला कष्टाच्या कामांत फार वेळ गुंतवून ठेवणें.

तावड स्त्री० अधीनता, पकड; कवजा. **टीप,**– हा शब्द फक्त पुढील प्रयोगांत येतो. **कोणी मनुष्य कोणेकाच्या तावडींत येणें** (किं० **सापडणें**) तो त्याच्या आटोक्यांत येणें; तो त्याची आज्ञा निमूटपणें ऐकेल अशा पेचांत अडकणें. **तावडींतून क्रि० वि०** कचाट्यांतून (सुटणें, निसटणें).

तावण [म० ताव] **स्त्री०** फार वेळ किं० पुष्कळ मजल धावण्यानें होतात ते कष्ट (' पडणें, देणें); उ० आज ह्या घोड्याला दहा मैलांची तावण पडली (किं० मीं दिली).

तावण [फा०तावान्] **स्त्री०** बेकायदा केलेलें कोणेकाचें नुकसान, किं० कोणेकाला अन्यायानें भरावयाला लावलेला दंड (बसणें, भरणें).

तावणें [म०तप्=तापाविणें] **स० क्रि०** १ लाल होईपर्यंत सुवर्णादि धातु, मडकें, वीट, इ० तापविणें. २ दूध, पाणी, इ० तापविणें किं०त्यांना आंच देणें. **अ० क्रि०** लाल होईपर्यंत तापणें. **भा० क० क्रि०** उष्मा होत असणें; उ० आज किती तावत आहे हो ! ❀ **तावणें सुलाखणें** सोन्याचा कस ठरवावयाचा असतां तें लाल तापवून त्याचा वर्ण पाहतात (तावणें) आणि तें आंत कोणच्या कसाचें आहे हें त्या सोन्याच्या तुकड्याला खळगा पाडून पाहतात (सुलाखणें); ह्या दोन कसोट्या सोन्याला लावणें ह्या कृतीला ' तावणें आणि सुलाखणें 'असें म्हणतात. **तावलेला सुलाखलेला वि०** पूर्णपणें पारखलेला; अतिशय तीव्र कसोटीला उतरलेला. **तावून सुलाखून घेणें** पूर्णपणें तपासून घेणें.

तावणें अ० क्रि० १तापत किं०तळमत असणें; उ० आज सूर्य (किं० ऊन्ह) भारी तावत आहे. २ क्रुद्ध होणें, संतापणें, रागावणें; उ०तूं उगीचच्या उगीच माझ्यावर कां तावतोस ?

तावत् [सं०] **वि०** १ तितकें. २ तेवढें. **श० यो० अ०** तोंपर्यंत. ' तावत् ' हा शब्द मराठींत पुढील समासांत मात्र येतो. **तावत्काल तावत्कालपर्यंत, तावत्पर्यंत क्रि० वि०** तोंपर्यंत; त्या समयापर्यंत. **तावन्मात्र वि०** अगदीं तितकेंच; जितकें पाहिजे आहे तितकेंच;जितकें जरूर तितकेंच; उ० हल्लीं आमच्या घरांत म्हणण्यासारखें दूभतें नाहीं, तावन्मात्र आहे.

तावता क्रि० वि० तरी देखील.

तावदान [फा० ताब्दान्] **न०** १ कांचेचा तक्ता, पत्रा, किं० तकट,–खिडक्या, दारें, कपाटें, इ०ना बसविण्याच्या उपयोगासाठीं. २अशा कांचा बसविलेली खिडकी किं० दार.

तावनदस्त [फा० तावान् दस्त्]**पु०**गंजिफा वाटतें वेळीं वाटणाऱ्यानें कांहीं चुकी केली असल्यास त्याच्यापासून जीं गुन्हेगारीचीं पानें घेतात तीं समुच्चयानें.

तावाण स्त्री० वर ' तावण ' पहा.

ताशा [अ० तासाह्] **पु०** एक चर्मवाद्यविशेष. ❀ **ताशेकरी पु०** ताशा वाजविणारा.

ताशील, ताशीलदार मागें ' तहशील,'तहशिलदार ' पहा.

ताशेरा, तासेरा, ताशिरा [म० ताशा; **अ०** तासाह्] **पु०** १ताशावरची झोड; ताशावर एका वेळेची वादनाची क्रिया (झाडणें झडणें). २ वाकस ह्या नांवाच्या हत्यारानें लांकूड तासणें किं० लाकड तासून काढलेल्या धलप्या समुच्चयानें. ३ (लाक्षणिक) बंदुकांची एक फेर (झाडणें, झडणें). ४ (लाक्षणिक) कोणेकावर शिव्यांचा वर्षाव; कोणेकाची खरडपट्टी (०वर ताशेरा झाडणें).

तास [अ०] **पु०** आडीच घटकांचा किं० साठ मिनिटांचा कालावधि. २ काशें ह्या धातूचें वाद्यविशेष,–जें तास भरला म्हणजे वाजविलें जातें. ❀ **तासजी पु०** तास वाजविणारा इसम.

तास [म० तासणें] **पु०** १ वाकसानें किं० दुसऱ्या कांहीं हत्यारानें लांकूड इ० तासण्याची

क्रिया किं० तासून काढलेला भाग. २ खडकाचा तोडून काढलेला भाग.

तास [म० तासणें] न० १ नांगरानें शेतांत पाडलेला चर. २ उन्हाळ्यांत नदीचें किं०ओढ्याचें पाणी आटून जे अनेक बारके बारके प्रवाह होतांत ते प्रत्येक.३नदी, ओढा, इ०च्या दोन कांठांच्या आंतील प्रदेश. म्ह०पात्र ४शेत नांगरण्याची क्रिया; उ० राजापुर प्रांतीं सात तासे घालावीं तेव्हां ऊस पेरावा.❀**ताशीं लागणें** १योग्य मार्ग मार्गांत असणें; योग्य सरणी अनुसरली जात असणें. २ कोणत्याही कामीं बरीच प्रगति झालेली असणें; उ० आमच्या गोविंदाला घरीं मास्तर ठेविल्यापासून त्याचे अभ्यास ताशीं लागलें.

तास [सं० चाष] पु० एक पक्षिविशेष.

तासणी[म०तासणें]स्त्री० १तासण्याची क्रिया. २ सुताराचें लाकूड तासण्याचें एक आउत. ६ कोणिकाची काढलेली भोसडपट्टी किं० खरडपट्टी.

तासणें [सं० तक्ष्=तासणें,कापणें]स०क्रि० १हत्यारानें पदार्थाचे नकोत ते भाग छेदून काढणें; हत्यारानें पदार्थाला आकारविशेष आणणें. २कांहीं काम कसें बसें करून संपविणें. ३ न्हाव्यानें हजामत करणें. ४ कोणिकाची खरडपट्टी काढणें. ५ भाज्यांकाला भाजकांकानें भागून बाकी काढणें. ❀ **तासून निजणें, तासून बसणें** बिनघोर मनानें स्वस्थ निजणें किं० बसणें.

तासीर, ताशीर [अ० तासीर्=परिणाम] स्त्री० १ स्वभाव; मनाची वृत्ति; उ० त्याची तासीर किती कठिण हो!२ कांहीं काम करण्याची कोणेकाची रीति किं० सरणी. ३ बंदुकीची एक फेर (झाडणें, झडणें). ४ कोणेकाची काढलेली भोसडपट्टी; ताशेरा (झाडणें,झडणें).

तासींव, तांशींव [तासणें] वि० तासून केलेलें.

तासोपंत [म० तासणें] पु० जिचें वपन झालें आहे अशी विधवा.

ताहां, ताहान, ताहांहयात इ० ' तहां, ' ' तहान, ' ' तहांहयात, ' इ० पहा.

तांहा पु० मुलाचें रडणें. याचा उपयोग फक्त पुढीलप्रमाणें होतो. हें मूल ताहीं भरलें आहे म्ह० रडत सुटलें आहे.

ताळ [म० ताल] पु० १ गायनांतील कालपरिच्छेद (धरणें). २ हातावर हात किं०दंडावर हात ठोकणें. ३ एक प्रकारचें वाद्य,–जें काठीनें वाजवावयाचें असतें. ४ घराचा मजला. ५ आंकड्यांचा, हिशेबाचा, किं० हकीकतीचा मेळ किं० मिळतेपणा किं० एकवाक्यता. ५ भाषणाचा सुसंबद्धपणा. ६ वर्तनाच्या सरणीची एकरूपता. ७ शिष्टाचाराला अनुसरून अशी वर्तनाची किं० भाषणाची सरणी. ❀ **सातव्या ताळीं बसणें** घराच्या अगदीं वरच्या मजल्यावर बसणें,–प्रत्यक्ष कौलांच्या छपराखालीं. **ताळतंत्र पु०, ताळतंत, ताळातंत्र न०** लोकव्यवहाराला धरून जी वर्तनाची किं० भाषणाची रीति ती; उ० तूं ताळतंत्र धरून बोल; उ० तो ताळतंत्र सोडून बोलतो किं० वागतो.

ताळा [म० ताळ] पु० १ दोघांचे हिशेब, दोघांनीं सांगितलेल्या हकीगती, यांचा जुळतेपणा किं० एकवाक्यता (येणें, पाहाणें, पडणें,मिळणें). २ पूर्वी केलेल्या भाकिताचा प्रत्यय येणें; तें पूर्वी केलेलें भाकीत नंतर घडून आलेल्या गोष्टीनंतर ठरणें (येणें, मिळणें).❀**ताळा पाहाणें** वस्तूचा, हकीगतीचा, किं० हिशेबाचा खरेपणा आजमावणें, **ताळयावर (किं० ताळयास) येणें** पूर्वींची गैरशिस्त वर्तनाची रीति सोडून योग्य सरणीनें वागं लागणें. **ताळा तोळा पु०** जुळतेपणा; मिळणी; सुसंबद्धपणा. **ताळेबंद पु०** खतावणी, रोजकीर्द, इ० वरून कांहीं मुदतीच्या जमांचा आणि खर्चांचा तयार केलेला खरडा.

ति [सं० त्रि] वि० तीन. हा शब्द समासांत पूर्वपदीं मात्र येतो; उ०तिमजली घर,तिकोन. ' ति ' पूर्वपदीं येऊन जे शब्द होतात ते खालीं यथास्थानीं पहा.

तिकटी [सं० त्रि+काष्ठ] स्त्री० लाकडाची तिवई किं० तिपायी.

तिकटें [सं० त्रि+काष्ठ] न० १ लाकडांचा त्रिकोण. २ पळस, बेल, इ० झाडांचें त्रिदलात्मक पान,–म्हणजे एका देठास आलेलीं तीन पानें समुच्चयानें; त्रिदळ. ३ तीन पानें चोयीनें टाचून केलेली पत्रावळ; ठिकोळें. ४ एक शेतकामाचें आउत; तिफण. ५ तीन कांबट्यांपैकीं दोन दोन

कामठ्यांचीं दोन दोन टोकें एकत्र बांधून करतात तो त्रिकोण,–प्रेतदहनार्थ घरून श्मशानांत नेतात त्या अग्नीचें मडकें ठेवण्यासाठीं किं० विहिरींतून कांहीं भांडें इ० वर शेंदून घेण्यासाठीं.

तिकडे [म० तो, ती, तें + कड] **क्रि० वि०** त्या बाजूस; त्या दिशेस. ॐ **तिकडचा** (–ला) **वि०** त्या बाजूचा. **तिकडून क्रि० वि०** त्या दिशेकडून. **टीप,**–' तिकडे ' हा शब्द **क्रि० वि०** असून जनानी भाषेंत त्याचा अर्थ ' माझे यजमान' '' माझ्या यजमानांनीं' 'माझ्या यजमानांकडून ' ' माझ्या यजमानांना ' असा होतो; उ० तिकडे आल्यावर म्ह० माझे पतिराज आल्यावर; हें लुगडें तिकडे दाखवा म्ह० माझ्या पतिराजांना दाखवा; तिकडची परवानगी म्ह० माझ्या पतींची, इ०.

तिकतिकणें अ० क्रि० तकतकणें; लकलकणें; चकचकणें.

तिकळा, तिकळी, तिकळें पुढें तिखुळा ' इ० पहा.

तिकांडें न०, तिकांडया पु० युरोपी ज्योतिषी ज्याला ओरायन (Orion) म्हणतात आणि कै. दामोदर गणेश केळकर यांच्या 'आकाशाचे देखावे' ह्या पुस्तकांत ज्याला 'भरत' असें नांव दिलें आहे त्या तारकापुंजांतील ध, ङ, आणि च ह्या तीन ताऱ्यांची पंक्ति. ह्या पंक्तीला आपण 'शंकराचा बाण' म्हणतों.

तिकोनी [**सं०** त्रिकोण] **वि०** तीन कोन किं० कोपरे आहेत ज्याला असा.

तिकल स्त्री० गंजिफाचीं तीन पानें अनुक्रमानें लागलेलीं जीं एका खेळाडूकडे आलीं आहेत तीं समुच्चयानें.

तिक्का पु० तीन चिन्हें आहेत ज्यावर असें गंजिफेचें पान.

तिक्त [**सं०**] **वि०** १ कडू. २ सुवासिक. **पु०** किराईत. **न०** पित्त. ॐ **तिक्तफळ** निवळी. **तिक्तगंधा स्त्री०** मोहोरी. **तिक्ततंडुला स्त्री०** पिंपळी.

तिखट [**सं०** तिक्त] **वि०** १ मिरचीच्या रुचीचा. २ तीव्र, तीक्ष्ण, झोंबरें. ३ आग करणारें. ४ अणकोचीदार. ५ फार धार आहे ज्याला असें (हत्यार). ६ स्वस्व व्यापार करण्यांत तल्लख असें इंद्रिय,–बुद्धि, कान, डोळा, इ०. **न०** १ मिरच्या कुटून करतात तें चूर्ण. २ मिरच्या, कोथिंबीर, इ०, द्रव्यें कुटून करतात तें तोंडीलावणें. ॐ **तिखट तिखट जाळ** (किं० **आग**) अत्यन्त तिखट. **खाद्य पदार्थांत तिखटमीठ घालणें** त्यांत तिखट, मीठ, इ० रुचि आणणारीं द्रव्यें घालणें. **तिखटमीठ लावून कांहीं गोष्ट** (किं० **हकीगत**) **सांगणें** ती मनोरंजक व्हावी म्हणून किं० लोकांना ती महत्त्वाची वाटावी म्हणून पदरचा मजकूर घालून सांगणें; ती अतिशयोक्तीनें सांगणें; ती फुगवून सांगणें. **पुढें तिखट आणि मागें पोचट** अगोदर शूरपणाच्या बढाया मारणें आणि प्रत्यक्ष लढाई जुंपली म्हणजे माघार खाणें अशा वृत्तीचा माणूस म्हणजे भितरा; गेहेशूर. **कानामागून आलें शिंगट तें झालें अति तिखट** गुडघ्याएवढ्या टारगट पोरानें वयोवृद्ध माणसाला बोध करूं जाणें ह्या वात्रटपणाची निंदा ह्या वाक्यानें केली जाते. **टीप,**–वासरूं जन्मतांच त्याला कान असतात आणि शिंगें मागून येतात आणि शिंगें ढुसाणी देण्याकडे योजलीं जातात. ह्या निसर्गाच्या नियमावरून हा वाक्प्रचार उत्पन्न झाला आहे. **तिखटाई स्त्री०** १ तिखटपणा, झोंबरेपणा. २ उग्रपणा; प्रखरपणा. **तिखटा मिठाभात पु०** आधल्या दिवसाचा भात तिखटमीठ घालून पुन्हां शिजविलेला.

तिखटावणें, तिखावणें [**म०** तिखट] **अ० क्रि०** तिखट किं० उष्ण पदार्थ तोंडांत चर्वणासाठीं घातल्यामुळें जीभ आणि गाल व्यथित होणें किं० त्यांची आग होणें.

तिखणी [**म०** ति + खण] **वि०** तीन खण जाडत्याचें (घर). **स्त्री०** १ तीन खण विस्ताराची खोली. २ गृहाचे तीन खण समुच्चयानें.

तिखरणें, तिखारणें [**सं०** तीक्ष्ण] **स० क्रि०** तरवार, सुरी, चाकू, इ० दगड, चाक, इ० वर घासून तीक्ष्ण करणें किं० त्यांना धार देणें किं० लावणें.

तिखळा, तिखळी, तिखळें पुढें ' तिखुळा ' इ० पहा.

तिखार वि० तिखट,झोंबणारा;आग करणारा.

तिखार, तिखें न० पोलाद.

तिखावणें अ० क्रि० मागें ' तिखटावणें ' पहा.

तिखुळा, तिखळा पु० तीन मुलांच्या पाठीवर झालेला मुलगा. **तिखुळी, तिखळी** स्त्री० तीन मुलग्यांच्या पाठीवर झालेली मुलगी. **तिखुळें, तिखळें** न० तीन मुलग्यांच्या पाठीवर झालेली मुलगी किं० तीन मुलांच्या पाठीवर झालेला मुलगा.

तिखें न० १ पोलाद. २ (लाक्षणिक) गर्व, ताठा, मगरूरी. ꕥ **त्याचे अंगीं तीन मण तिखें जळतें आहे** तो भारी मगरूर, हट्टी, किं० गर्विष्ट आहे.

तिंग वि० तीन (गांवढळ उपयोग).

तिगश्त [म० ति (तीन) + फा० गुजश्ताह् (गेलेला)] न० गेल्याच्या मागलें वर्ष. वि० तीन माणसें गंजिफा खेळत असतां तिघांचेंही कांहीं हुकूम उतरले अशा स्थितीस आलेला (डाव). ꕥ **तिगस्तां** क्रि० वि० गेल्या वर्षाच्या मागल्या वर्षीं; उ० आपण १९२८ सालीं बोलत असतां ' तिगस्तां ' म्हणजे १८२६ ह्या सालीं.

तिघई वि० तीन आहेत गस्तें ज्यास असें (घर); जावत्याला समांतर अशीं तीन आहेत पुडकीं ज्याला असें (घर).

तिघड [म० तीन + घड] पु० एका देठाला लागलेलीं तीन फळें समुच्चयानें; देठाला चिकटलेल्या तीन फळांचा घड.

तिघड [म० ति (तीन) + घडा (घट)] वि० जिला क्रमानें तीन लोटे बांधून मध्यें एक खापेकडांची जुळी वगळलेली असते अशी (पाण्याच्या रहाटाची माळ); उ० तूं तिघड माळ बांध. क्रि० वि० वरीलप्रमाणें लोटे बांधून (माळ करणें); उ० तिघड लोटे बांध.

तिघड [म० ति (तीन) + घडी] वि० एकावर एक तीन पदर ज्याचे आले आहेत असा (कागद, वस्त्र, इ०).

तिघस्त न० गंजिफांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

तिघे [म० तीन] पु० अ० व० तीन माणसें; तीन पुरुष. **तिघी** स्त्री० तीन स्त्रिया. वि० तीन (पुरुष). **तिघी** वि० तीन (स्त्रिया). ' तिघे ' ह्या विशेषणापुढें ' अण ' हा शब्द घालून तीन पुरुष असा अर्थ होतो, आणि ' जणी ' हा शब्द घालून तीन स्त्रिया असा अर्थ होतो.

तिजवर [म० तिजा + वर] पु० तिसरें लग्न करावयाला निघालेला पुरुष. विजवर म्ह० दुसरें लग्न करावयाला निघालेला पुरुष.

तिजा [म० तीज; सं० तृतीय] वि० तिसरा.

तिजा पु० डोले म्ह० ताबूत पाण्यांत बुडविल्यावर तिसऱ्या दिवशीं मुसलमान लोक करतात ती मेजवानी.

तिजाई [म० तीज] स्त्री० तिसरा भाग किं० अंश.

तिजाईत [म० तीज] वि० तीन वेळां व्यालेली (गाय, म्हैस, इ०).

तिजांतरा, तिजांत्रा, तिजारा [म० तीन + अंतर] वि० दोन दिवस मध्यें जाऊन येतो तो (ज्वर).

तिजारें [म० तीज] न० दर तिसऱ्या दिवशीं येणारें (हिंव).

तिजोर [म० तीन + फा० जोर] पु० एका पगावर तीन मोहोरीं इ० चा जोर (बुद्धिबळांच्या खेळांत). वि० कांहीं एका कार्याविषयीं तिहेरी (साधन).

तिटकन (-ण) न०, **तिटकारा** पु० तिरस्कार; तीव्र नापसंती किं० अप्रीति.

तिटकरणी, तिटकारणी स्त्री० पदार्थ किं० माणूस ह्यांना दाखविलेली किं० ह्यांच्या संबंधाची अप्रीति किं० नापसंती किं० वीट.

तिटक (-का-) रणें स० क्रि० तिरस्कारणें; पदार्थ किं० माणूस यांना नापसंतीच्या भावनेनें पाहाणें; नापसंत समजणें.

तिटकारी वि० खंत घेणारें (मन); चोखंदळें (मन, जिव्हा); चोखंदळी (जीभ, तोंड).

तिटकें न० एक लहान आकाराचा पक्षिविशेष.

तिटवी, टिटवी स्त्री० एक पक्षिविशेष. मागें ' टिटवी ' पहा.

तिटाळी [म० तीन+टाळा] वि० तीन मजल्याचें (घर). स्त्री० घर, वृक्ष, टेंकडी, इ० चा माथा.

तिठणें स० क्रि० १ दोरी, सूत, इ० आढीनें युक्त करणें म्ह० त्यांना आढी घालणें. २ दोरी, सूत, इ० दुमडणें म्ह० त्यांना वळसा घालणें. अ० क्रि० मूल, अशक्त किं० आजारी माणूस, यांचे पाय वांकडे पडणें किं० फाकटणें.

तिठणें स० क्रि० गळूं किं० दुखरी जागा यांचेवर फुलीच्या आकाराचा डाग देणें (भाजून).

तिठा [म० तीन+ठाय] **पु०** तीन रस्ते जेथें मिळतात ती जागा.

तिठा वि० लांडा, तोकडा, आखूड.

तिडक, तिडकी, तिडीकि स्त्री० गात्रविशेषास एकसारखी लागते ती कळ.

तिडकणें [म० तिडीक] **अ० क्रि०** १ गात्र विशेष ठणकणें. २ असंतुष्टपणानें चरफडत बसणें.

तिडका वि० पेटत असतां ज्यांतून ठिणग्या फडफड आवाज करून उडतात असा (कोळसा, लाकूड, इ०). २ तिरकटलेली (बाज); जिचे कोणतेही तीन कोपरे जमीनीवर टेकले असतां चवथा उठतो अशी (बाज). ३ कुरत्या स्वभावाचा; कुचका; हेकट.

तिडकी स्त्री० ठिणगी; शस्त्रावर शस्त्र, किं० उखळावर मुसळ, आपटून उडते ते ठिणगी.

तिडणूक [म० तिडणें] **स्त्री०** १ अधिकाराच्या जोरावर कोणेकावर केलेला खोटा दोषारोप. २कारणाशिवाय कोणेकावर झाडलेला ताशेरा.

तिडणें स० क्रि० १ छळणें; पीडिणें; सतावणें. २ कोणेकावर ताशेरा झाडणें; कोणेकाला दम भरणें. ३ कोणेकाला वारंवार बोलून किं० रागें भरून सतावणें किं० छळणें.

तिडणें अ० क्रि० १ बाज, पलंग, इ० तिरकटणें. २ शरीराचें गात्र भलत्याच प्रकारें सांधा वळून वांकडें होणें. ३ गळूं इ०ना ठणका लागल्या कारणानें शरीराच्या हालचाली सफाईनें न करतां येण्याच्या स्थितींत पडणें; उ०माझ्या मांडीला गळूं झालें आहे त्यामुळें मी भारी तिडलों आहें. ४ सावकारांचे तगादे वारंवार येत असल्या कारणानें पीडिलें जाणें किं० जर्जर होणें. ५ थंडी, वारा, आकुंचित जागा, इ० मुळें कामें न करतां येण्याइतकें जर्जर होणें. ६ एकाच संस्थानांत फार वेळ राहिल्या कारणानें शरीर किं० गात्र दुखत असणें.

तिडतिड स्त्री० १ असंतुष्टपणा, राग, इ०कारणांमुळें येतो किं० उत्पन्न होतो तो अस्वस्थपणा. २ चरफड.

तिडतिडणें अ० क्रि० १ तिडतिड असा आवाज करून ठिणग्या उत्पन्न करून (कोळसा, लाकूड, इ० नीं) जळणें. २ कोणेकावर रागानें ताशेरा झाडणें. ३ असंतुष्टपणा पिरपिरणें.

तिडतिडा वि० १ तिरकटलेला (पलंग, बाज, खुर्ची, इ०). २ तिरसट. ३ पिरपीर लावणारा; एकसारखा चरफडणारा (स्वभाव, मनुष्य).

तिडा [हिं० तीढा] **वि०** १ तिरकटलेला (पलंग, बाज, इ०). २ स्वस्थानापासून ढळलेला; भलत्याच आकारांत आलेला. ३ किंचित् वाकडा (लांकूड, काठी, इ०). **पु०** १ दोरा, दोरी, इ० चीं गुंतागुंत. २ सूत, दोरी, इ० ना पडते ती आढी; मेंढा, किं० पिंपळी. ३ एकमेकांविषयीं दोन मित्रांच्या मनांत कांहीं कारणानें उत्पन्न होतो तो विषमभाव किं० उत्पन्न होतें तें वैमनस्य. ४ कामाच्या सुरळीतपणांत येतें तें विघ्न किं०होतो तो अडथळा.

तिडी स्त्री० वर ' तिडा ' पहा (सर्व अर्थी).

तिडीक स्त्री० १ अकस्मात् उठलेली कळ किं० वेदना. २ कार्यविशेष करण्याची आस्था; कामाची कळकळ; काम करण्याची उत्सुकता. ॐ **पायाची (किं०तळपायाची) तिडीक (किं० आग) मस्तकास जाणें** नखशिखान्त रागानें लाल होणें; क्रोधानें बेफाम होणें. **को॰डया अंगीं तिडका आणि बोडक्या डोई लिखा** १ रुसावयाला किं० चरफडण्याला कांहीं योग्य कारण नसतां रुसणें किं० चरफडणें ह्यासंप्रदायानें निंदिलें जातें. **एका तिडकीनें क्रि० वि०** एका दमांत; मध्यें न खळतां नेटानें (कांहीं काम करणें). **तिडका खाणें (किं० सोसणें)** कांहीं काम करण्यांत उत्साह बाळगणें. **तिडका देत बसणें** कष्ट सोशीत बसणें. **तिडकि**

देऊन क्रि० वि० नेटानें; आस्थेनें; हिमतीनें. तिडीक देऊन कांहीं काम करणें तें काम संपवीनच संपवीन अशा निश्चयानें तें करणें. आसन्न-प्रसव स्त्रीनें तिडीक देणें मूल गर्भाशयांतून बाहेर पडेल असा गर्भाशयाला नेट लावणें. दे एक तिडीक आणि हो घराची धनीण मुलाला तूं जन्म दिल्यास तुझें धनीनपणाचें वैभव टिकून राहील, नाहीं तर तुझा पति पुत्रासाठीं दुसरी पत्नी करील आणि ती पुत्र प्रसवली तर तिच्याकडे सारें वैभव जाईल.

तिडोळी वि० तीन डोळे असलेला (नारळ). स्त्री० तीन छिद्रांची करवंटी. पु० तीन डोळ्यांचा नारळ. [' तिडी ' पहा.

तिढणें, तिढा, तिढी मागें 'तिडणें' 'तिडा,'

तिडका वि० त्या मापाचा किं० परिमाणाचा.

तितकासा क्रि० वि० म्हणण्या इतका; फारसा (अकरणरूपी); उ० माझा व्यापार तितकासा चांगला चालत नाहीं.

तितपत वि० त्या मापाचा किं० परिमाणाचा; त्याच्या इतका.

तितंबा [हिं०] पु० कारस्थान; बंडाची मसलत; दुसऱ्याच्या नाशासाठीं रचिलेला व्यूह किं० चक्रान्त (मांडणें, माजविणें).

तितर [सं० तित्तिर] पु० ' कवडा ' ह्या नांवाचा पक्षी.

तिताल [म० ति (तीन)+सं०ताल] पु० १ अनुक्रमानें तीन ठोके वाजून मध्यें एका ठोक्याचें अवसान राहातें असा जो गाण्याचा ताल तो. २ अशा सरणीचें जें गाणें तें. वि० मनस्वी उच्छृंखल आणि द्वाड असें (पोर). ‡ तिताल उडणें (किं० जाणें किं० लावणें) अरेरावीपणाचें वर्तन करणें.

तितालीं [वर ' तिताल ' पहा] वि० तिताल सरणीचें (गाणें). वर ' तिताल ' पहा.

तितालीं [म० ति (तीन+ताल (मजला)] वि० तीन मजल्यांचें (घर, इ०).

तितिक्षा [सं०] स्त्री० सोशिकपणा; सहनशीलता; क्षमा करण्याची प्रवृत्ति.

तितिक्षु [सं०] वि० १ सोशिक. २शांत; क्षमाशील.

तितुर पु० भांडें, वस्त्र, इ० ना पडलेलें बारीक छिद्र किं० भोक.

तितूर पु० टोळासारखा एक क्षुद्र प्राणी असतो तो,—त्याला चार चित्रविचित्र आणि नाजूक पंख असतात.

तित्तिर [सं०] पु० कवडा ह्या नांवाचा एक पक्षी. [इ० पहा.

तिथें, तिथचा, इ० पुढें ' तेथें, ' ' तेथचा '

तिथि [सं०] स्त्री० एका दर्शान्तापासून दुसऱ्या दर्शान्तापर्यंत जें सूर्यचंद्राचें द्वादशराश्यात्मक अंतर पडतें त्यामध्यें बारा बारा अंश पडावयाला जे कालविभाग लागतात ते प्रत्येक;एक चांद्र दिवस. ‡ तितिपर्व न०, तिथिपर्वणी स्त्री० चांगला किं० शुभ दिवस किं० समय. तिथिपाल न० १ अमुक तिथीस अमुक करूं नये असा जो धर्मशास्त्रांत सर्व तिथींसंबंधानें नियम सांगितला आहे तो, किं० तो अनुसरणें. २ तिथिप्रयुक्त जे उपोषणादिक धर्मशास्त्रांत सांगितलेलें आहे त्याचा नियम ती तिथि आहे तों पर्यंत राखावा सगळा दिवस राखूं नये, असा जो प्रकार तो. तिथिमतीस, तिथिमिथीस क्रि० वि० धर्मकर्मास ज्या विशेष तिथि सांगितल्या आहेत त्या तिथींच्या दिवशीं; उ० ह्या देवालयांत नित्य पुराण होत नाहीं, तिथिमतीस होतें. तिथिमास पु० ए० व० लग्न, मुंज, इ० विधींना योग्य किं० शुभावह जो दिवस, मास, इ० तो (पाहणें, ठरविणें, धरणें, इ०). तिथिवारूर पु० द्वादशीचा आद्यचरण. तिथिवृद्धि स्त्री० दोन दिवस सूर्योदयीं एकच तिथि असणें. तिथिक्षय पु० जी तिथि सुरूं होऊन संपेपर्यंत एकदाही सूर्योदय होत नाहीं ती तिथि.

तिदाणें [म० ति (तीन)+दाणे (मणि)] न० स्त्रियांचें एक कंठभूषण.

तिधारी [म० ति (तीन)+धारा किं० धारीं (कडा किं० रेषा)] वि० १ तीन आहेत धारा ज्याला असा (निवडुंग). २ तीन आहेत रेघा ज्याच्या कांठाला असा (धोतरजोडा इ०).

तिनसांज, तिनसिंज स्त्री० सूर्यास्ताचा समय. ‡ तिनसांजा, तिनिसांजा, तिन्हिसांजा स्त्री० अ० व० सूर्यास्ताचा समय.

तिनसांजां, तिनिसांजां क्रि० वि० सूर्या-स्ताच्या समयीं.

तिनीताल, तिन्हीत.ळ पु० अ० व० स्वर्ग, मृत्यु, आणि पाताळ, हे तीन लोक. ⚘ **तिनीताळीं क्रि० वि०** कोठेंही (अकरणरूपी प्रयोग).

तिनीत्रिकाळ [**म०** तीन **सं०** ति (तीन) +काळ] **क्रि० वि०** १ सकाळीं, दुपारीं, आणि संध्याकाळीं; सर्व वेळीं.

तिपट, तिप्पट [**म०** तीन+पट] **वि०** त्रिगुणित; तीन पटींच्या परिणामाचा; उ०पांचाची तिप्पट पंधरा.

तिपाठी [**म०** ति (तीन)+पाठ] **वि०** एक श्लोक किं० वाक्य तीन वेळां वाचून किं० ऐकून पाठ म्हणूं शकतो तो.

तिपायी [**म०** ति (तीन) + पाय] **वि०** तीन आहेत खूर किं० पाय ज्याला असा. **स्त्री०** तिवई.

तिपिकी [**म०** ति (तीन) +पीक] **वि०** एका वर्षांत तीन पिकें देणारी (जमीन, शेत).

तिप्पट मागें ' तिपट ' पहा.

तिफण, तिपग, तिफन, तिफणी स्त्री०, तिफणें न० शेतकीचें एक आऊत; तीन फण्यांची पाभर.

तिफसली वि० एका वर्षांत तीन पिकें देणारी (जमीन).

तिफाशी [**म०** ति (तीन) +फासा] **वि०** १ तीन फाशांनीं खेळतात तो(सोंगट्याचा डाव). २ तीन आहेत फासे ज्याला असा.

तिंब वि० १ पूर्णपणें भिजलेला. २ थेंबांथेंबांनीं ज्यांतून पाणी गळत आहे असा.

तिबक स्त्री० दांडूनें विटी उडवून ती खालीं पडावयाच्या अगोदर तिला दांडूनें तीन टोले मारून होतो तो डाव.

तिंबणें स० क्रि० १ साध्या पाण्यांत किं० रंगाच्या पाण्यांत किं० दुसऱ्या कोणत्याही पातळ द्रव्यांत पदार्थविशेष पूर्णपणें भिजविणें. २ धुवावयाचीं चिरगुटें पाण्यांत पूर्णपणें हालवून हालवून भिजविणें. ३ कणीक भिजवून ती मुठीनें चेपून मऊ करणें. ४ (पीठ) आंबविणें. ५ दहीं, दूध, वडे, इ०) बोडणांत कुस्करणें. ⚘ **कोणेकाची कणीक तिंबणें** त्याला रट्टे चढाविणें; त्याला गुध्दे लगावणें.

तिंबणें अ० क्रि० १ पूर्णपणें भिजणें. २(कणीक) मळलेली असणें. ३ (शिजलेला भात) फार वेळ राहिल्यानें आंबूस होणें. ४ (माणूस, पशु) आजार, अपुरें खाणें, इ० मुळें रोडावणें.

तिंवणें, तिमणें न० १ प्रसूत झालेल्या स्त्रीच्या माहेराकडून तिच्या सासऱ्याकडे तांदूळ डाळ, गूळ, तूप, इ० ची देणगी पाठविली जाते ती. २ हे पदार्थ रांधून इष्ट मित्रांनीं जें जेवण घालतात तें.

तिंबसणें अ० क्रि० पोटभर खाणें पिणें न मिळाल्याकारणानें किं० काळजीनें रोड होणें.

तिमण न० ' तेल 'ह्या शब्दापुढें घालावयाचा हा शब्द आहे. तेल तिमण म्ह० तेलवील; उ०पावसाळा आला, दाणादुणा, तेलतिमण इ० बेगमीचे जिन्नस साठवून ठेविले पाहिजेत.

तिमाणें न० १ ओबडधोबड रीतीनें बांधलेलें घर, झोपडी, मांडव, इ० रचना. ३ बुजगांवणें.

तिमिंगल [**सं०**] **पु०** एक फार मोठा मत्स्य.

तिमिर [**सं०**] **न०** काळोख; अंधेर. **वि०** अंधकारमय. **पु०, न०** डोळ्यांतील काचबिंदु.

तिर्रं उ० वा० अ० शेळ्या, मेंढ्या, इत्यादींनीं जलद चालावें म्हणून हा शब्द उच्चारला जातो.

तिरकट [**म०** तिरवा] **वि०** १ तिरवा (डोळा). २ एक मोठा आणि एक लहान अशा डोळ्यांपैकीं कोणताही एक (डोळा). ३ वरील प्रकारच्या डोळ्याचा (मनुष्य).

तिरकत, तिरकट पु० तीन डोलकाठ्यांचें गलबत; **तिरकती (–टी) वि०** तीन डोलकाठ्यांचें (गलबत).

तिरकमठा पु० बाण आणि धनुष्य यांची जोडी.

तिरकसशेट पु० तिरव्या डोळ्यांचें मनुष्य (विनोदांत).

तिरकस [**सं०**] तिर्यच्] **वि०** वाकडा, सरळ रेषेंत नसलेला; काटकोनांत नसलेला.

तिरका [सं० तिर्यच्] **वि०** १ तिरकस, (वर ' तिरकस ' पहा). २ तिरवा, तिरळा (डोळा), किं० तिरव्या डोळ्याचा (मनुष्य).

तिरकाठी [सं० त्रि+काठी, काष्ट] **वि०** तीन डोलकाठ्यांचें (गलबत).

तिरकीं, तिरकें [सं० त्रि] **क्रि० वि०** तिपटीनें; उ० एकीतिरकीं तीन.

तिरकूट [सं० त्रि (तीन)+कुट्ट (कुटणें)] **न०** मोहोऱ्या, मेथ्या, हळद, इ० द्रव्यें कुटून लोणचें इ०साठीं करतात तें चूर्ण.

तिरकूट [सं० त्रिकूट] **न०**१तीन माणसांची जूट. २ आपलेकडील मुलगी कोणेकाच्या घरीं यावी, त्याच्याकडील मुलगी तिसऱ्याकडे देववावी आणि त्या तिसऱ्याकडची मुलगी आपल्या घरीं करावी, असा जो सोयरिकीच्या प्रकार तो.

तिरगी (–घी–) मिरगी(–घी) स्त्री० एक-मेकांची मर्यादा न राखतां केलेला किं० चाल-विलेला कलह किं० भांडण. ॐ **तिरकी (–घी–) मिरघी (–वी) वर येणें** असभ्यपणानें किं० अरे तुरे करून भांडणें; एकेरीवर येऊन भांडणें.

तिरगळ पु० पानवेलींची लागवड आणि मशागत करून चरितार्थ चालविणारी ब्राम्हणांची जात किं०त्या जातीचा इसम.

तिरटीम स्त्री० छळणूक; गांजणूक.

तिरडा, तेरडा पु० चित्रविचित्र रंगांचीं फुलें ज्याला येतात असें एक झुडूप. **तिरडें, तेरडें न०** त्या झुडपाचें फूल. ॐ**तेरड्याचा रंग तीन दिवस** १ वैभव अशाश्वत असतें. २ खोटी बढाई मारणा-राची लवकरच फजीती होते.

तिरडाफांक [सं० त्रेधा (तीन प्रकारें)+म० फांकणें] **स्त्री०** १ सैन्य इ० चीं फांकाफांक किं० दाणादाण (होणें). २ कारभार इ०ची अव्य-वस्था; गोंधळ. ३ गांजणूक; छळणूक;दे माय धरणि ठाय अशी कोणेकाची झालेली स्थिति; उ० त्या द्वाडपोरानें आपल्या आईची तिरडाफांक केली.

तिरडी (–ढी) स्त्री० मृत मनुष्याला श्मशा-नाकडे वाहून न्यावयाची ताटी. ॐ **कोणेकाची तिरडी उचलणें** त्याच्या विरुद्ध कट करून त्याला त्याच्या अधिकारावरून काढून टाकणें किं०त्याला स्थानभ्रष्ट करणें. **तिरडी करणें** तुच्छता दाखवून दूर सारणें किं० फेंकून देणें. **एकाद्याची तिरडी काढणें** १ त्याचें मरण इच्छिणें. २ त्याचा नाश किं० घातपात इच्छिणें किं० करावयाचा प्रयत्न करणें.

तिरडें न० १ शिगेपर्यंत भरलेली गोवऱ्यांची पाटी किं०हारा.२अशा पाटींत भरलेल्या गोवऱ्यांचा ढीग. ३ भातांचीं रोपें लावतांना शेतकरी ज्या फळीवर ढुंगण टेकतो ती.

तिरडोळी [सं० त्रि+म०डोळा] **स्त्री०** १ १ नारळाचे तीन डोळे समुच्चयानें. २ भिकारी,– जो करवंटींत भिक्षा घेतो.

तिरणें [सं० तॄ=तरणें; हिं० तीरना] **अ० क्रि०** १ पोहणें. २ तरंगणें. ३ तरणें. **स० क्रि०** तरंगत सोडणें.

तिरतळ्या स्त्री अ० व० कोणेकाची किंवा काहीं गोष्ट घडण्याची वाट पहात बसणें. ॐ **तिर-तळ्या देणें** (किं० **देत बसणें**) कंटाळा येई-पर्यंत वाट पहात बसणें.

तिरतिरा, तिरतिऱ्या वि० १ अधीर. २चंचल मनाचा; अस्थिर.

तिरंदाज [फा० तीर् (बाण)+अंदाज् (फेंकणारा); अंदाख्तन्=फेकणें] **पु०** तीर मारणारा; धनुर्धर.ॐ **तिरंदाजी स्त्री०** तीर मार-ण्याची क्रिया, कला, किं० कौशल्य.

तिरधल, तिरधेल स्त्री० शेताच्या उपन्नाचा तिसरा भाग शेताच्या मालकाला देण्याची पद्धति किं० असा दिलेला भाग. ॐ **तिरधली, तिरधेली पु०** अशा शेताच्या उत्पन्नाचा तिसरा भाग माल-काला द्यावयाच्या शर्तीनें शेत करावयाला घेतो तो.

तिरपगडा पु०,तिरपगडें न० दुफांशी खेळांत एका फांशावर एक आणि दुसऱ्यावर तीन पगडे असा जो डाव पडतो तो किं०असें जें दान पडतें तें.

तिरपणें न०, तिरपणी स्त्री० [म० तिरपणें] वस्त्राचा शेवट आंत दुमडून घेऊन शिवण्याचा प्रकार; तुरपणी.

तिरपणें स०क्रि० वस्त्राचा शेवट आंत दुमडून घेऊन शिवणें; तुरपणें.

तिरपणें, तिरपावणें [म० तिरपा] **अ० क्रि०** १ मान, हात, पाय, बोट, इ० ना काहीं आघात झाल्यामुळें वाकडें होणें किं०वाकडें पडणें.

२ बाज, पलंग, इ० ना भलत्याच दिशेनें ओढ पडल्या कारणानें त्यांनीं वाकडें होणें.

तिरपतकाना (–न्हा) **वि०** तिरवा (डोळा) किं० तिरव्या डोळ्यांचा (मनुष्य).

तिरपतकानी (–न्ही) **स्त्री०** बैंदुलांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द; तिसरा तडाखा.

तिरपा वि० वाकडा; काटकोनांत किं० सरळ रेषेंत नसलेला.

तिरपिट, तिरपीट [**सं०** त्रि+पथ म्ह० तीन वाटा] **स्त्री०** त्रेधा; धांदल; गोंधळ; बावचळले-पणाची स्थिति. **टीप**,–अजाण माणसाच्या पुढें तीन वाटा आल्या असतां कोणच्या वाटेनें जावें ह्यासंबंधानें तो चुचकळ्यांत पडतो; यावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे (**क्रि०** उडणें). ' तिरपीट ' च्या पुढें ' धांदल ' हा शब्द अर्थ जोरदार करण्यासाठीं कधीं कधीं जोडला जातो.

तिरपेल न० एक औषधी तेल.

तिरफळ स्त्री० एक वृक्षविशेष; चिरफळ. **न०** त्याचें फळ.

तिरबाग (–क–) डा [**सं०** तिर्यच्+वक्र] **वि०** १ वाकडा तिकडा (सांधा, जोड, इ०). २ ज्याचे अवयव वाकडे झाले आहेत असा (पदार्थ,–बाज, टेबल, शिवलेला कपडा, इ०).

तिरंबी, तिरमी पुढें 'तुरंबी,' 'तुरमी,' पहा.

तिरमणें न० अ० न० सामर्थ्य, अवसान; उ० बरें, काय चिंता आहे ? तुझीं तिरमणें लवकरच मी पाहीन !

तिरमल्ली (–ल्ल्या) **पु०** कर्णाटकांतील शूद्रांची एक जात, किं० ह्या जातीचा इसम. ह्या जातीचे लोक नंदीबैल बरोबर घेऊन भिक्षा मागत हिंडतात.

तिरमिरी, तिरीमिरी स्त्री० १ वेदनेची तीव्र लहर. २ मूर्च्छा.

तिरमिरणें अ० क्रि० तिरमिरीनें युक्त होणें. वर ' तिरमिरी ' पहा.

तिरमी स्त्री० १ तीव्र वेदनेची लहर. २मूर्च्छा.

तिरवट वि० किंचित् तिरवा (डोळा) किं० तिरव्या डोळ्याचा (मनुष्य).

तिरवा [**सं०** तिर्यच्] **वि०**ज्याला डोळ्याच्या कोपऱ्यांत बुबळ आणल्याशिवाय दिसत नाहीं असा (डोळा) किं० अशा डोळ्याचा (माणूस).

तिरशिंगराव [**म०** तीन शिंगाचें सांबर] **पु०** तिरसट स्वभावाचा किं०थोडक्याशा कारणाव-रून चिरडीस जाणारा मनुष्य; तुसडा माणूस.

तिरशिंगी, तिरसंगी [**सं०** त्रि+संध्या] **स्त्री०** ज्याचीं फुलें एका दिवसांत तीन वेळां फुल-तात असें एक फुलझाड.

तिरसट वि० तुसडा; जो सरळ रीतीनें आणि सभ्यपणानें न बोलतां नेहमीं चिडल्याप्रमाणें बोलतो तो.

तिरसा मागें ' तिरवा ' पहा.

तिरस्कार [**सं०**] **पु०** १ अनादर, तुच्छता. २ निंदा. ३ लपविण्याची क्रिया.

तिरस्कारणें [**म०** तिरस्कार] **स० क्रि०** १ तुच्छ करणें किं० तुच्छ मानणें. २ दूर सारणें. ३ झांकणें; लपविणें.

तिरस्कारी [**म०** तिरस्कार] **वि०** १ चोखं-दळा; चिळसखोर. २ दीर्घद्वेषी; खुनशी.

तिरस्कृत [**सं०**] **वि०** १ ज्याचा तिरस्कार केला गेला आहे असा. २लपविलेला. ३ दूर सारलेला.

तिरस्थळी, त्रिस्थळी [**सं०** त्रि (तीन) स्थळ (जागा)] **स्त्री०** १ काशी, प्रयाग, आणि गया, ह्या तीन ठिकाणीं जाऊन केलेली यात्रा. २ एका कामासाठीं अनेक ठिकाणीं जावें लागल्यामुळें होणारे कष्ट किं० यातायात. ३ हर-हमेश जरूर लागणारे पदार्थ अनेक ठिकाणांहून आणावे किं० गोळा करावे लागण्याचे श्रम. ४ मनाची भांबावलेपणाची स्थिति. ५ अस्थिरपणा. ६ कामाकाजाची, जिनसापानसांची, किं०सामाना-सुमानाची अद्यापि नीट मांडणी व्हावयाच्या अगो-दरची स्थिति; उ० मी काल येथें येऊन पोंचला पण अजून माझी तिरस्थळी (किं० त्रिस्थळी) आहे.

तिरळणें अ० क्रि० फुटणें; फाटणें; भेगाळणें.

तिरळा वि० १ तिरवा (डोळा). २ तिरव्या डोळ्याचा (मनुष्य). ꙮ **तिरळा तांदळा वि०** विटीदांडूच्या खेळांत दोन्ही बाजूंकडे खेळणारा. तिसरा गडी.

तिराईत [**फा०** तीर=बाण] **वि०** तीर मारण्यांत पटाईत; कुशल (तिरंदाज).

तिरिंग पु० एक झुडूप,–याचीं पानें गुरें खातात.

तिरी स्त्री०, **तिरूक** पु० [सं० त्रि= तीन] तिसऱ्या घरीं सोंगटी बसावयाजोगा जो फाशांचा डाव पडतो तो.

तिरीप, तिरीम [सं० तिर्यच=तिरकस, वांकडा] स्त्री० १ सकाळीं किं० संध्याकाळीं सूर्याचे किरण तिरकस येतात ते समुच्चयानें किं० त्या किरणांची उष्णता (घेणें, घेत बसणें). २ दोन ढगांमधून येणारे सूर्याचे किरण समुच्चयानें. ३ खिडकींतून किं० दारांतून किं० छपरांतून येणारें ऊन्ह. ४ बारीक फटींतून किं० भोंकांतून येणारें ऊन्ह; कवडसा.

तिरीम न० १ दृष्टीची मंदता.२बुद्धीची मंदता.

तिरीम स्त्री० वर ' तिरीप ' पहा.

तिरुका पु० आण्याचा चवथा भाग; पैसा.

तिरोधान [सं०] न० १ अदृश्य होणें;लपणें. २ आच्छादन; झांकण. [झाकलेला.

तिरोहित [सं०] वि० लपलेला; अदृश्य;

तिर्यक् [सं० तिर्यक्, तिर्यच=उलटें, तोंड फिरवून] वि० तिरकस, वाकडा. क्रि० वि० तिरकस किं० वाकड्या रीतीनें किं० मांडणीनें. पु०, न० मनुष्येतर प्राणी. ॐ **तिर्यग्जाति** स्त्री० मनुष्येतर प्राण्याची जाति. **तिर्यग्योनि** स्त्री० १ मनुष्येतर प्राण्यांची जाति.२ सर्व मनुष्येतर प्राणी समुच्चयानें. [पहा.

तिहूड, तिहूडफांक मागें ' तिरडाफांक '

तिहळा तांदळा मागें ' तिरळा ' मध्यें पहा.

तिऱ्हाईत [म० त्रयस्थ] वि० घडत असलेल्या गोष्टींशीं ज्याचा कांहीं संबंध नाहीं असा. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक ले० १३३७ पहा. ॐ **तिऱ्हाइती** वि० १ मध्यस्थानें सांगितलेला (निर्णय). २ मध्यस्थासंबंधाचा. **तिऱ्हाइती** स्त्री० १ मध्यस्थी, मध्यस्थाचा दर्जा किं० अधिकार.

तिल [सं०] पु० १ तीळ. २ अत्यल्प किं० सूक्ष्म अंश (आलंकारिक रीत्या). ॐ **तिलतुल्य, तिलप्राय** वि० अगदीं लहान; अगदीं थोडा. **तिलोदक** न०,**तिलांजलि** पु० पितृतर्पणाचें तिलमिश्रित पाणी. **तिलतंडुलक** न० आलिंगन;मिठी. **एकाद्या वस्तूला (किं० व्यसनाला) तिलांजलि देणें** ती वस्तु (किं० तें व्यसन) अजीबात सोडून देणें. **एकाद्याच्या नांवानें तिलांजलि द्यावयाला उठणें** (किं० **तिलांजलि घेऊन उभें राहाणें**) १ त्याच्या मरणाची वाट पाहात बसणें. २ त्याचा नाश करावयाला टपून बसणें. **एकाद्या वस्तूच्या नांवाची** (किं० **नांवावर**) **तिलांजलि देणें** (किं० **सोडणें**), **एकाद्या वस्तूला तिलांजलि देणें** (किं० **सोडणें**) १ ती वस्तु सोडून टाकणें. २ त्या वस्तूचा लोभ किं० इच्छा अजीबात सोडणें. ३ त्या वस्तूवरचा आपला हक्क सोडून देणें.

तिलक [सं०] पु० १ टिळा. २ (लक्षणेनें) श्रेष्ठ (मनुष्य, वस्तु). ३ अंगाच्या त्वचेवरचा जन्मजात बारिक काळा डाग किं० ठिपका.

तिलवली पु० लिंगाइतांमध्यें चिलवंत, पंचम, तिलवली, आणि कुलुंग,असे चार पंथ आहेत त्यांपैकीं तिलवली ह्या पंथाचा इसम. मागें ' चिलत ' पहा.

तिल्ला पु० तिसरा खेळगडी. **दुला** किं० **दुल्ला** पु० दुसरा खेळगडी. **मिरी** पु० पहिला खेळगडी.

तिल्लाणा [फा० तरानाह] पु० एक प्रकारचें गाणें; गायनांतील एक चीज. मागें ' तराणा ' पहा.

तिल्हड, तिल्हडफांक मागें ' तिरडाफांक ' पहा.

तिवई [म० ति (तीन)+पाय] स्त्री० तीन खुरांचा आधारविशेष,–नैवेद्याचें ताट, अभिषेकपात्र, पाण्याचा हांडा, इ० साठीं.

तिवट न० मुंडासें; अशिक्षित लोक पागोटें इ० ना ' तिवट ' म्हणतात.

तिवठा, तिठा [म० ति (तीन)+ठाय (जागा)] पु० तीन रस्ते जेथें मिळतात ती जागा.

तिवठा पु० १ मळणीच्या खळ्यावर ज्या खांबाभोंवतीं बैल फिरतात तो. २ धान्यांतील भुसा उडवून लावण्यासाठीं जो तीन खांबांचा रचनाविशेष केलेला असतो तो.

तिवडा, तिंवडा पु० १ खळ्यावर मळणीसाठीं उभा पुरलेला असतो तो खांब. २ धान्यांतील कोंडा किं० भुसा उडवून लावण्यासाठीं तीन खांब पुरून जी रचना केलेली असते ती. ३ संगीतांतील एक कालपरिमाणविशेष.

तिवण [सं० त्रिपर्ण] **स्त्री**० १ तीन अवयव मिळून जें वनस्पतिशास्त्रदृष्ट्या एक पान तें; उ० बेलाचें पान, पळसाचें पान, इ०. २ कागद, वस्त्र, इ० ची तिहेरी घडी. दुहेरी घडीला ' दुघडी ' म्हणतात; चौहेरी घडीला ' चौघडी ' म्हणतात

तिवणता [म० तिवण] **वि**० कागद, वस्त्र, इ० चीं तिहेरी (घडी).

तिवंधा पु० अनेक गांवांच्या हद्दी जेथें मिळतात तें ठिकाण.

तिवर, तिवारी पु० एक झुडूप.

तिवल पु० दीड आणा किं० सहा पैसे.

तिवस पु० एक वृक्षविशेष.

तिवा पु० गुरांचा एक रोगविशेष.

तिवाटा [म० तीन वाट] **पु**० १ तीन रस्ते जेथें मिळतात ती जागा. २ तिवडा. वर ' तिवडा ' अर्थ १ आणि २ पहा.

तिवारी पु० गौड ब्राम्हणांची एक जाति किं० त्या जातीचा इसम.

तिवाशा पु०, **तिवाशी** (**–सी**) **स्त्री**० निजतांना किं० बसावयाच्या वेळीं गात्रविशेष टेकावयासाठीं जो मऊ गिर्दी, उशी, इ० च्या रूपांचा पदार्थ केलेला असतो तो.

तिवांशी [**म**० तीन वांसे + (प्रत्यय)] **वि**० तीन वांशांचें केलेलें (घर). **टीप**,–भिकार आणि गरीबाऊ घराचे वर्णन करतांना ' तिवांशी ' हा शब्द योजतात.

तिवाळ स्त्री० कोष्ट्याच्या मागावर एकापुढें एक असे विणलेले तीन पंचें (फाडून तीन तुकडे करावयाच्या अगोदर). * **तिवाळा पंचा पु**० तिवाळ फाडून केलेल्या तीन पंचांपैकीं एक. **चवाळ, चवाळा पंचा** ह्यांचा अर्थ ह्याच सरणीनें करावयाचा.

तिवेळा, तिवेळां, तिवेळीं [**म**० ति(तीन) +वेळ] **क्रि० वि**० तीन वेळां; सकाळीं, दुपारीं, आणि संध्याकाळीं.

तिव्वा [म० तीन] **पु**० ज्याच्यावर तीन चिन्हें आहेत असा पत्ता ति० गंजिफ.

तिव्वा न० गुरांना होतो तो एक रोग.

तिव्हडा, तिव्हा [म० तीन] **पु**० तीन पायांची उंच घडवंची,–धान्यांतील भुसा उडवून लावणें इ० कामासाठीं योजतात ती.

तिशी [**म**० तीस] **स्त्री**० तीस वर्षांचें वय. **चाळिशी स्त्री**० चाळीस वर्षांचें वय. पन्नाशी, साठी, विशी, शब्दांचा अर्थ ह्याच सरणीनें होतो. * **विशीं विद्या तिशीं धन** १ मनुष्य किती विद्वान होईल हें त्याच्या विसाव्या वर्षीं आजमावतां येतें आणि तो किती श्रीमंत होईल हें त्याच्या तिसाव्या वर्षीं आजमावतां येतें. २ वीस वर्षांच्या आलीकडे पलीकडे मनुष्य विद्या करण्याच्या मार्गाला लागणें शक्य असतें आणि तीस वर्षांच्या आलीकडे पलीकडे मनुष्य श्रीमंत होण्याच्या मार्गाला लागणें शक्य असतें.

तिशी [**म**० तीस] **स्त्री**० एकजातीय तीस पदार्थांचा संच किं० समुदाय.

तिशीं [**म**० तीस] **क्रि० वि**० १ तीस घटिकांचें जें दिनमान त्याचे ठायीं. २ दिवसाच्या तिसाव्या घटकेस. ३ तीस वर्षांचा जो कालावधि त्यांत.

तिष्ठणें [**सं**० स्था, तिष्ठ=उभें राहणें, थांबणें] **अ० क्रि**० खोळंबून बसणें, राहाणें, किं० असणें (कांहीं गोष्ट घडण्याच्या अक्षेपेनें); उ० मी तुझ्यासाठीं फार वेळ तिष्ठत बसलों आहे.

तिसकूट स्त्री० १ आपआपसांतील गैरसमज किं० वैमनस्य किं० बेबनाव. २ मूर्च्छा किं० घेरी (येणें). ३ झाडाचें किं० फांदीचें कोंवळें अग्र किं० टोक.

तिसकुड वि० तिरसट (मनुष्य किं० स्वभाव).

तिसड [म० तीन+सडणें] **स्त्री**० १ तांदूळ तीन वेळां सडण्याची (म्ह० कांडण्याची) क्रिया. २ बारीक चौकशी.

तिसड, तिसडा, तिसडी [**म**० तीन+सडणें] **वि**० तीन वेळां कांडलेला (तांदूळ).

तिसड स्त्री० कोणत्याही कामाची तिसरणी म्ह० तीन वेळां करणें.

तिसमारखान पु० [तिसमारखान] **पु**० १ तिसमारखान ह्या नांवाचा पूर्वीं एक शूर पुरुष

होऊन गेला तो. २ (विपरीत लक्षणेनें) अंगीं मुळींच शौर्य नसतां शौर्याच्या बढाया मारणारा माणूस.

तिसरा वि० पहिला, दुसरा, तिसरा, चवथा, इ० क्रमिकांतील दुसरा ह्याच्या पुढचा. ॐ **तिसरा पाय पु०**अति उत्सुकता (बहुधा कुचेष्टित ह्याचा उपयोग होतो). **तिसरें सवन** किं० **तृतीय सवन न०**मोठ्या मोठ्यानें बोलणें किं०रडणें.**टीप,**– संगीतशास्त्रांत मंद्र, मध्य, आणि तार, अशीं तीन सवनें म्ह० स्वरांचे प्रकार आहेत. मंद्र,मध्य,आणि तार, हीं चढत्या क्रमानें उंच होत गेलेल्या स्वरांचीं सप्तकें आहेत. ह्यावरून ' तिसऱ्या सवनावर येणें (किं० जाणें) ' किं० 'तिसरें सवन काढणें' म्ह० मोठमोठ्यानें बोलणें किं० रडणें असा व्यवहारांत अर्थ झाला. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक, लेखांक ११५६ पहा. **ह्याचें एक तिसरेंच, ह्याचा तिसराच पंथ** ह्याचें मत किं० वागण्याची किं० काम करण्याचा तऱ्हा अगदींच वेगळी (निंदेंत).

तिसराव, तिसरावा पु० तिसरा हिस्सा किं० भाग.

तिसळ पु०, स्त्री० एक कांटेरी झाड.

तिसारणें, तिसरणें स० क्रि० १ कांहीं गोष्ट तीन वेळां करणें. २ कांहीं गोष्ट तिसऱ्यांदा करणें. **अ० क्रि०** १ (कोंबडा) तीन वेळां आरवणें. २ (कोंबडा) तिसऱ्यांदा आरवणें.

तिसाला क्रि० वि० एकापुढें एक तीन वर्षें.

तिस्सां [**अ०**] **वि०** नऊ. **तिस्सैन** [**अ०**] **वि०** नव्वद. **टीप,**–हे दोन्ही शब्द अरबी साल सांगतांना योजले जातात.

तिहाळ स्त्री० मागावर सलग विणलेले तीन पंचे (फाडून तीन पंचे करावयाच्या अगोदरचा तागा).

तिहिरी, तिहेरा (–री) [**म०**ति,ती, तीन] **वि०** १ तीन पदरी (दोरी, वस्त्र). २ तिप्पट.

तिहोत्रा [**म०** तीन+उत्तर] **पु०** दर महा दर शेंकडा तीन रुपये व्याज.

तिळई [**सं०** तिल; **म०** तीळ]**स्त्री०**तिळाची एक जात.

तिळकूट इ० पुढें ' तीळ ' मध्यें पहा.

तिळतिळीत वि० चकचकीत, तकतकीत.

तिळवण स्त्री० पुढें ' तीळ ' मध्यें पहा.

तिळी स्त्री० पांढऱ्या रंगाच्या बारीक तिळाची जात.

तिळेल [**म०** तीळ+तेल]**न०** तिळाचें तेल.

ती तृतीय पुरुषवाचक दूरचा पदार्थ दाखविणारें हें स्त्रीलिंगी सर्वनाम आहे.

तीख [**सं०** तीक्ष्ण] **वि०** १ तीक्ष्ण. २ तिखट.

तीज [**सं०** तृतीया] **स्त्री०** शुक्लपक्षांतील किं० कृष्णपक्षांतील तृतीया ही तिथि; उ० अखेतीज (अक्षय तृतीया), वहाणितीज (भाऊबिजेच्या नंतरची तिथि).

तीट स्त्री० १शोभेसाठीं किं० दृष्टिबाधा होऊं नये म्हणून लहान मुलांच्या कपाळावर तेलांत खललेल्या काजळाचा लावितात तो ठिपका. २ दुमड, वळसा.

तीड स्त्री० १ भेग, फट. २ तिरबागडेपणा; वाकडेपणा; अक्रुसलेपणाची स्थिति. ३ दोरी, सूत, इ०ची गुंतागुंत. ४ दोरी, सूत इ० ला पडते ती आढी किं० पिंपळी. ५ मित्रामित्रांच्या मनांत एकमेकांविषयीं उत्पन्न होते ती विमनस्कता किं० बेबनाव.६ कांहीं कामांत येतें तें विघ्न किं० होतो तो खोळंबा (येणें, पडणें). ७ हिशोबांत किं० जमाखर्चांत झालेली चूक.

तीथ [**सं०** ' तिथि 'चें मराठी अपभ्रष्ट रूप] **स्त्री०** तिथि. वर ' तिथि ' पहा.

तीन [**सं०** त्रि] **वि०** एक, दोन, इ० क्रमांकांतील तिसरा अंक. ॐ **कोणेकाला तीन तीन करणें** त्याला रागें भरणें. **तिहींत नसणें आणि तेरांतही नसणें** अत्यन्त अप्रसिद्ध असणें; कोन्याकोपऱ्यांतला असणें (कोणी माणूस). **तीन ठिकाणीं वाकडा वि०** १ मान, कंबर आणि पाय, अशा तीन ठिकाणीं वाकडा म्ह० अत्यन्त कुरूप. २ तिरसट; तुसडा. **तीन काने (–न्हे) पु० अ० व०** तीन फाशांनीं खेळतात त्या सोंगट्यांच्या डावांत तिहींचें दान. **तीन ताळ पु० अ० व०** स्वर्ग, मृत्यु, आणि पाताळ, हें तीन लोक. **तीन ताळ उडणें** किं० **तीन ताळ गोष्टी**

सांगणें १ टाळाटाळीचीं उत्तरें देणें. २ भरकट-ल्यासारखें बोलणें; विसंगतपणें बोलणें. ३ उद्धट-पणानें बोलणें. **तीन तुकडी वि०** अशक्त (दोरी,सूत,नवार,इ०). **तीन तुकडी चोळी, तीन तुकड्यांची चोळी स्त्री०** अखंड चोळी. यांच्या व्यावर्तकत्वें नऊ तुकड्यांची चोळी. **तीन तेरा, किं० तीन तेरा आठ अठरा वि०** दाही दिशांस पांगलेले किं० उधळून लाविलेले (पराभविलेल्या सैन्यांतील शिपायी). **तीन तेरा गोष्टी सांगणें** १ अद्वातद्वा बोलणें; भरमसाटपणें बोलणें; असंबद्ध रीतीनें बोलणें. २ रिकाम्या बढाया मारणें. ३ मूर्खपणाच्या वल्गना करणें. **तीन तेरा नऊ बारा** खोट्या सबबी, धरसोडीचीं उत्तरें (लावणें, करणें, मांडणें, इ०). **तीन दिवसांचा भाऊ पु०** १ जो मेला असतां त्याचें सुतक तीन दिवस पाळावें लागतें असा नातलग. २ दूरचा नातलग. **तीनमाही, तिमाही वि०** १ तीन महि-न्यांचा. २ दर तीन तीन महिन्यांनीं करावयाचा, व्हावयाचा, यावयाचा, किं० पाठवावयाचा. **तीन वार पु० अ० व०** तीन आठवडे ही मुदत; एकवीस दिवस. **तीन हिस्से पु० अ०व०** १ पाऊण भाग. २ बहुतेक सर्व पदार्थ.

तीर [फा०] पु० १ बाण (धनुष्यानें फेंकावयाचा). २ भेग, फट, चीर. ३ खांब, तुळई, इ० स्वस्थानापासून ढळूं नये म्हणून जो तिरकस आधार देतात तो. ४ कांहीं जड पदार्थ उचलावयासाठीं त्याच्या खालीं जो दांडा इ० घालतात तो. ५ दार, झडप, इ० ओथंबूं नये म्हणून जें त्याला तिरकस लांकूड बसवितात तें. ६ टेकण, आधार. ❀ **तीरक(-का-) मठा पु०, तीरकमान(-ण)पु०** बाण आणि धनुष्य ही जोडी. **तीरमार पु०** धनुष्यानें बाण फेकणें किं० फेकून ठार मारणें. **तीरासारखा वि०** सरळ (रस्ता). **क्रि० वि०** १ सरळ रेषेंत किं० रेषेनें. २ वेगानें; त्वरेनें; फुकट वेळ न गमावतां; तिडकीसरशीं.

तीर [सं०] पु० १ बाण. २ किनारा, कडा, कांठ.

तीर्थ [सं०] न० १ ज्यांच्या उदकानें स्नानादि-कर्मे केलें असतां विशेष पुण्य लागतें आणि पापक्षय होतो अशा भागीरथी, गोदावरी, इ० पुराणप्रसिद्ध नद्या त्या किं० समुद्र तें प्रत्येक. २ शाळिग्राम इ० देवांचें स्नानोदक. ३ ब्राह्मण, संन्यासी, गुरु, इ० चें पादोदक. ४ पवित्र स्थान. ५ तीर्थस्थानापासून आणलेलें जल. ६ पवित्र स्थानीं जाऊन केलेला धर्मविधि (करणें, होणें, घडणें). ७ आपला गुरु. ❀ **तीर्थीं गेल्या-वांचून मुंडन होत नाहीं** कष्ट अनुभवाचे रट्टे खाल्ल्याशिवाय मनुष्य सुधारत नाहीं. **तीर्थकाक पु०** लोभी माणूस. **तीर्थकुंडी, तीर्थगंडी, तीर्थगिंडी, तीर्थपात्री स्त्री०** तीर्थोदक ठेवण्याचें आकारवि-शेषाचें भांडें. **तीर्थपंक्ति, तीर्थावलि स्त्री०** १ तीर्थांचा अनुक्रम. २ तीर्थांची यादी,- जी पूजेच्या वेळीं भाविक लोक म्हणतात. **तीर्थपंथ पु०** गोसाव्यांचा एक पंथ. **तीर्थपाद पु०** १ विष्णु. २ आपला धर्मगुरु. ३ आपला पिता. **तीर्थप्रसाद पु०** १ साधु, गुरु, इ० कोणी देवदर्शनार्थ किं० कथादि श्रवणार्थ आला असतां त्याला तीर्थ, अंगारा, देवावरील निर्माल्य, इ० रूप जो प्रसाद देतात तो. २ साधूच्या दर्श-नाला कोणी मनुष्य गेलें असतां साधु त्या मनुष्याला फुलें, फळें, इ० जें तो देतो तें. **तीर्थयात्रा स्त्री०** तीर्थाप्रत धर्मकृत्य म्हणून जें जाणें तें. **तीर्थराज पु०** १ समुद्र. २ प्रयाग हें क्षेत्र. **तीर्थरूप** १ आपला बाप किं० आई यांच्या नांवामागें पत्रांत लावावयाचा शब्द; उ० तीर्थ-रूप आण्णा; तीर्थरूप गंगूताई. २ आपला पिता; उ० आमचे तीर्थरूप मेल्याला आज पंचावन्न वर्षें झालीं. **तीर्थवटी, तीर्थोटी स्त्री०** तीर्थ म्ह० पवित्र जल ठेवावयाचें पात्र. **तीर्थवासी, तीर्थवासू पु०** तीर्थाचे ठिकाणीं राहाणारा साधु पुरुष किं० कोणीही सामान्य माणूस. **तीर्थविधि पु०** तीर्थाचे ठिकाणीं गेलें असतां क्षौर, श्राद्ध, देवब्राह्मण, इ० रूप जीं कर्मे करतात तीं समुच्चयानें. **तीर्थ-स्वरूप वि०** वयोवृद्ध अशा पुरुषाच्या किं० स्त्रीच्या नांवामागें पत्रांत घालावयाचा शब्द. मागें ' तीर्थरूप ' पहा. **तीर्थाटन न०** एक सारखें तीर्थें हिंडणें; अनेक तीर्थयात्रा करीत सतत फिरणें. **तीर्थोदक न०** १ तीर्थाचें जल. २ देवावर अभिषेक केलेलें जल. **तीर्थोपवास पु०** तीर्थाचे ठिकाणीं गेलें असतां जो उपवास करतात तो

तीर्थोपाध्याय, तीर्थोपाध्या पु० तीर्थाचे ठिकाणीं आपण गेलों असतां जो ब्राह्मण आपण आपलीं धर्मकृत्यें चालविण्यासाठीं योजितों तो.

तीव्र [**सं०**] **वि०** १ जोरदार. २ उष्ण. ३ तिखट. ४ दुःसह. ५ भयंकर. ❀ **तीव्रोष्ण वि०** अत्यन्त कढत.

तीस [**सं०** त्रिंशत] **वि०** पंधराच्या दुप्पट [ही संख्या.

तीसमारका पु० कोणीही पोकळ पराक्रमाच्या गोष्टी सांगणारा; पराक्रमाच्या बढाया मारणारा. मागें 'तिसमारखान' पहा.

तीळ [**सं०** तिल] **पु०** १ ज्या झाडाच्या बीजांतून तेल काढलें जातें तें बीजविशेष. २ शरीराच्या त्वचेवर जो बारीक काळा ठिपका असतो तो. **टीप,**–' तीळ ' हा शब्द समासांत गेला असतां त्याचें 'तिळ' असें रूप होतें. ❀ **तिळकूट न०** हळद, तिखट, तीळ, इ० द्रव्यें कुटून त्यांचें जें तोंडीलावणें करतात तें. **तीळतीळ क्रि० वि०** अत्यल्प प्रमाणांत. **तिळातिळानें क्रि० वि०** अगदीं थोड्या प्रमाणांत म्ह० लक्ष्यांत न येईल अशा क्रमानें किं० वेगानें (वाढणें, रोड किं० अशक्त होणें, कमी किं० आखूड होणें); उ० मकरसंक्रान्तीनंतर दिवस तिळातिळानें वाढतो; उ० कर्कसंक्रान्तीनंतर दिवस तिळातिळानें आखूड होत जातो. **तीळ खाऊन व्रत मोडणें** अगदीं क्षुल्लक लाभासाठीं आपली आब्रू, कीर्ति, प्रतिष्ठा, इ० गमावून घेणें. **टीप,**– तीळ हा पदार्थ उपवासाच्या दिवशीं निषिद्ध आहे. **अंगाचा तिळपापड होणें** अतिशय संतप्त किं० क्रुद्ध होणें. **तिळकोंद स्त्री०** तीळ भाजून किं० तळून नंतर कुटून त्यांत गूळ किं० साखर इ० द्रव्यें घालून केलेलें खाद्यविशेष. **तिळगूळ पु० ए० व०** मकरसंक्रान्तीचे दिवशीं ब्राह्मण, देव, इष्टमिष्ट, इ० कांना देतात तें कुटलेल्या तिळांत गूळ घालून केलेलें मिश्रण. हें मिश्रण मित्र एकमेकांना देतांना 'तिळगूळ घ्या आणि गोड बोला ' असें म्हणतात. **तिलपुष्प, तिळपुष्प न०** १ तिळाच्या झाडाचें फूल. २ डोळ्यांत पडतें तें फूल. **तिळप्राय, तिळभर, तिळतुल्य वि०, क्रि० वि०** अगदीं थोडासुद्धां; अगदीं थोड्या प्रमाणांत सुद्धां. **तिळवडी स्त्री०** तीळ कुटून त्यांत कढविलेला गूळ घालून वड्या करतात त्या प्रत्येक. **तीळसंक्रांत स्त्री०** गांवचे पाटील आणि कुलकरणी ह्यांना मकरसंक्रान्तीच्या दिवशीं तिळगुळ इ० ची देणगी देतात ती. **तिळवण स्त्री०** तीळ, गूळ, लुगडें, खण, धोतरजोडे, तांदूळ, डाळ, इ० पदार्थ जे लग्नानंतरच्या पहिल्या मकरसंक्रान्तीच्या दिवशीं नवऱ्याकडून पत्नीच्या माहेरीं किं० पत्नीकडून नवऱ्याच्या घरीं पाठविले जातात ते समुच्चयानें किं० ते पाठविण्याचा समारंभ, किं० ते घेऊन जाण्याची मिरवूक. **तिळागुणी न०** स्त्रीपुरुष, सेव्यसेवक, इ० चा परस्परांवर जो प्रीतिभाव किं० स्नेहभाव तो(येणें, असणें, होणें). **कोणी माणूस कोणा माणसास तिळागुणी येणें** त्याचा आणि त्याचा प्रीतिभाव होई असें आनुकूल्य होणें. **तिळीं थेंब पडणें** अत्यन्त संतप्त किं० क्रुद्ध होणें. **तिळीं येणें** स्वाधीन किं० अनुकूल होणें. **त्याच्या तोंडांत तीळ भिजत नाहीं** त्याला कांहीं गोष्ट गुप्त ठेवितां येत नाहीं; तो ती फटदिशीं बोलून जातो. **तिळवा, तिळवालाडू पु०** तिळांचा लाडू. **तिळी स्त्री०** पांढऱ्या तिळाची एक जात. **कोणी माणूस कोणेकास तिळीं असणें** त्याणें त्याला धारजिणें असणें. **शेजीची केली आस आणि तिळतिळ तुटे मांस** आपली शेजारीणबाई अडचणीच्या प्रसंगीं आपल्या उपयोगाला येईल अशा आशेनें तिच्याशीं घरोबा वाढविला तर त्या घरोब्याचा उपयोग व्हावयाचा तो बाजूलाच राहून त्याच्यापासून आपणाला बहुधा उपद्रव मात्र होतो. **त्याचे माझे तीळ तुटले** त्याचा माझ्याशीं किं० माझा त्याच्याशीं आतां कोणत्याही प्रकारचा संबंध राहिला नाहीं.

तीक्ष्ण[**सं०**]**वि०**१झोंबरा. २ उष्ण. ३ बारीक टोकाचा. ४ तल्लख धारेचा (तरवार इ०). ५ जोरदार; आवेशयुक्त. ६ कडक. ❀ **तीक्ष्णांशु पु०** सूर्य. **तीक्ष्णायस न०** पोलाद. **तीक्ष्णतंडुला** पिंपळी. **तीक्ष्णदंष्ट्र पु०** वाघ. **तीक्ष्णसार पु०** लोखंड. **तीक्ष्णदंड पु०** कडक अमलदार किं० अधिकारी. **तीक्ष्णाई स्त्री०** तीक्ष्णपणाचा गुण.

तुई स्त्री० जरीचा दाल; जरीची पट्टी,– जी चोळीच्या बाह्या, पाठ, इ० ना शोभेसाठीं लावितात.

तुक(-क-)ड मोड्या, तुक(-क-)ड बावृ खालीं ' तुकडा ' मध्यें पहा.

तुकडा [हिं०] पु० १ पदार्थमात्राचा खंड; पदार्थाचा तोडून, मोडून, फाडून, किं० चिरून, काढलेला किं० निघालेला भाग. २ (लाक्षणिक) भाकरी; भाकरी विकरी; गरीबाऊ जेवण. ꙮ **तुक(-क-)डमोड्या, तुक(-क-)डबावृ पु०** १ जो संसाराची काळजी कांहीं करीत नाहीं किं० कांहींही काम करीत नाहीं आणि जो केवळ जेवावयाच्याच उपयोगाचा असा मनुष्य. २ दुसऱ्याच्या घरीं पुष्कळ दिवस संकोच न बाळगतां निर्लज्जपणानें पाहुणा म्हणून राहातो तो. **एकाद्याच्या घरीं तुकडा मोडीत पडणें** त्याच्या घरीं निःसंकोच वृत्तीनें आणि निर्लज्जपणानें जेवीत असणें. **भाकरीचा तुकडा, भाकरतुकडा पु०** गरीबाऊ जेवण. **तुकडा तोडून देणें.** १ भीड, मुरवत, न धरतां स्पष्टपणें नकारात्मक उत्तर देणें. **कोणेकाला तुकडा देणें** त्याला वाटा देणें; त्याला वाटेकरी करणें. **हातापायांचे तुकडे पडणें** अति कष्टाच्या कामानें हातपाय दुखूं लागणें. ह्याच सरणीनें कमरेचे किं० पाठीचे तुकडे पडणें, इ० वाक्प्रचारांचा अर्थ जाणावा. **एकाद्या पदार्थाचे तुकडे पडणें** त्याची मागणी फार असणें; त्याच्यावर लोकांच्या उड्या पडत असणें; त्याबद्दल सर्वांचे प्रयत्न सुरू असणें. **कांहीं कामाचे तुकडे तुकडे पडणें** तें झपाट्यानें केलें जाऊन संपविलें जाणें. **तुकड्या वि०** लोकांच्या जेवणाच्या किं० फराळाच्या ऐन वेळीं त्यांच्या घरीं जाणें,-आपणाला कांहीं खावयाला दिलें जाईल अशा इच्छेनें. **नऊ तुकड्यांची चोळी स्त्री०** नऊ तुकडे एकत्र शिवून केलेली चोळी; हिच्या उलट ' अखंड चोळी. '

तुकडी [म० तुकडा] स्त्री० सैन्य किं० कोणताही मोठा जमाव किं० देश ह्यांचा एकत्वानें व्यवहार करणें गैरसोयीचें असतें म्हणून त्यांचे जे लहान लहान विभाग करतात किं० पाडतात ते प्रत्येक; उ० नूतन मराठी विद्यालयांत इंग्रेजी सातव्या इयत्तेच्या बारा तुकड्या आहेत.

तुकणें स० क्रि० १ तराजूंत घालून पदार्थाचें वजन ठरविणें. २ कोणत्याही साधनानें एका पदार्थाच्या मानानें दुसरा पदार्थ किती कमी किं० अधिक महत्त्वाचा किं० योग्यतेचा किं० दर्जाचा आहे हें ठरविणें. ३ एका पदार्थाची दुसऱ्या पदार्थाशीं बरोबरी करणें. ४ एक पदार्थ दुसऱ्याच्या दर्जाचा किं० योग्यतेचा आहे असें म्हणणें किं० ठरविणें.

तुकणें, तुकविणें, तुकाविणें स० क्रि० (मान, माथा, डोकें, मस्तक, इ०) ह्या खांद्यावरून त्या खांद्यावर डोलविणें,-संमति दर्शविण्यासाठीं.

तुकतुकी स्त्री० चकाकी; तजेला.

तुकतुकीत वि० चकचकीत; तजेलदार.

तुकमा [फा० तुक्माह्] पु० गुंडीचें बिरडें.

तुकाई [म० तुकणें] स्त्री० १ तोलण्याची किं० जोखण्याची क्रिया किं० त्या क्रियेबद्दल दिलेली मजूरी किं० त्या क्रियेनें ठरलेलें वजन.

तुकमराई, तुकुंबराई [फा० तुख्मे रीहान्] स्त्री० तुळशीचीं किं० सबजाचीं बीजें प्रत्येक. हीं उपासाला खातात.

तुक्कल, तुकल स्त्री० कनकावळ्यासारखी एक वावडी; एका विशिष्ट आकाराचा मुलें उडवितात तो पतंग.

तुक्का, तुका [फा० तुकाह्] पु० १ बोथट बाण; ज्याला अणकोचीदार टोंक किं० अग्र नाहीं असा तीर. २ दुसऱ्याला मारलेला सौम्य टोमणा. ३ आरोप, ठपका; उ० त्या चोरीचा तुक्का रामभाऊ मजवर ठेवून गेला. ४ कोणेकानें आपली विनंति मान्य केली तर उत्तम, मान्य न केली तर फारसें बिघडत नाहीं, अशा बुद्धीनें त्याला केलेली विनंति; क्रि० टाकणें. ꙮ **लागला तर तीर नाहीं तर तुक्का** आपला प्रयत्न सिद्धीस गेला तर मीं तीर (बाण) मारला असें म्हणावयाचें, आणि सिद्धीस न गेला तर मीं मारतांनाच तुक्का मारला असें म्हणावयाचें, अशा धोरणाचें वर्तन (चांगल्या किं० वाईट अर्थानें).

तुंग [सं०] वि० १ उंच. २ लांब. ३ मुख्य. ४ आवेशाचें (भाषण, वर्तन). ꙮ **तुंगभद्र पु०** मत्त हत्ती.

तुंग पु० १ टोळी; समुदाय. २ नदीचें धरण किं० धक्का. ३ पाण्याचा उच्छवास. ४ विशिष्ट आकाराचें पात्र. ५ पखवाज ठेवावयाची खोळ किं० पिशवी.

तुंगार पु० शिवोपासकांचा एक पंथ किं० त्या पंथाचा कोणी इसम.

तुच्छ [**सं०**] **वि०** १ तिरस्कारास पात्र. २ हिशेबांत न घेण्याइतका लहान किं० थोडा. ॐ **कोणेकाला तुच्छ करणें** (किं० **लेखणें** किं० **मानणें**) त्याचा धिक्कार करणें; त्याला तिरस्कारणें.

तुझा ' तूं ' ह्याची षष्ठी पुल्लिंगी एकवचनी.

तुटक [**म०** तुटणें] **वि०** १ जो एकसारखा नाहीं, म्हणजे ज्यांत मध्यें मध्यें खंड आहेत, असा (रस्ता, भाषण, ग्रंथ, इ०); मधून मधून ज्यांत रिकाम्या जागा आहेत असा. २ असंबद्ध (भाषण); पूर्वापर संबंध ज्याचा नीटसा जुळत नाहीं असें (भाषण). ३ विस्कळित झालेला (व्यापार, व्यवहार, सावकारी, इ०). ४ दुसऱ्याचें मन जेणेंकरून तुटतें, म्हणजे आपणावरून उडतें, असें (भाषण किं० स्वभाव). ५ असें भाषण करण्याचा स्वभाव ज्याचा असा (माणूस); तुसडा (माणूस). ६ मातेचें स्तनपान ज्याचें नुकतेंच सुटलें आहे असें (मूल). ६ एकमेकांना लागून किं० चिकटून नसलेलीं (शेतें इ०). ॐ **तुटक थेंब, तुटक पाऊस पु०** १ मधून मधून किं० थांबत थांबत पडणारा पाऊस. २ पावसाची मंदशी सर. **तुटक मजकूर पु०** ज्याचे भाग आणि विभाग पाडलेले आहेत असा ग्रंथ, लेख, भाषण, इ०.

तुटका [**म०** तुटणें] **वि०** १ तुटलेला; खंडित. २मध्यें मध्यें रिकाम्या जागा किं० खिंडी असलेला. ३असंबद्ध; संलग्न नसलेला. ४ ज्याचा पूर्वापर संबंध जुळत नाहीं असा (ग्रंथ, हकीगत, इ०). ॐ **ओंठ तुटका वि०** ज्याचा ओंठ तुटला आहे असा. ह्याच सरणीनें हाततुटका, पायतुटका, नाकतुटका इ० समासांचे अर्थ जाणावे.

तुटकाळ [**म०** तुटणें] **वि०** वर ' तुटका ' पहा.

तुटणें [**सं०** त्रुट्=तुटणें, तोडणें] **अ० क्रि०** १ शस्त्रादिकांचा प्रहार झाल्यामुळें किं० फार ताण बसल्यामुळें पदार्थाचे दोन खंड किं० तुकडे होणें. २ आजार, अपुरें खाणें, विवंचना, इ० कारणांनीं (शरीर) कृश होणें. ३ म्हातारपणामुळें किं० काळजीमुळें (आहार) कमी होणें. ४ पदार्थाचें वजन किं० परिमाण भरावें तितकें न भरतां त्यांत कमताई दिसून येणें. ५ कमी होणें, बंद होणें, बंद पडणें; उ० ओला चारा बंद होतांच गायीचें दूध तुटलें. ६ एकादी संस्था, मंडळी, किं० जूट विस्कळित होणें, म्हणजे त्यांतील माणसांची पांगापांग होणें. ७ (रस्ता, मजल, किं० अंतर) आक्रमिलें जाणें. ८ (भांडण, कज्जा, वाद, इ०) निकालास लागणें म्ह० संपणें किं० त्याचा अंत होणें. **टीप,**— ह्या क्रियापदाचे कांहीं वाक्यप्रचार मात्र खालीं देतों. ॐ **तारा तुटणें** आकाशांत तारा सर्रदिशी इकडून तिकडे सरकणें. **एकाद्या खाद्यावर तुटून पडणें** आधाशाप्रमाणें तें खात सुटणें. **एकाद्या माणसावर तुटून पडणें** त्याच्यावर हल्ला करणें (वादांत किं० मारामारींत). **एकाद्या कामावर तुटून पडणें** त्याच्याकडे तनमनधन लावून तें नेटानें, हिंमतीनें, आणि उत्साहानें करणें. **एकाद्याला एकादें घर तुटणें** तें त्याला वर्ज होणें; तेथें त्याचें जाणें बंद पडणें. **मूल तुटणें** मुलाचें स्तनपान सुटणें किं०बंद होणें. **एकाद्याचें मीठ तुटणें** त्याचीं चरितार्थाचीं साधनें नाहींशीं होणें किं० बंद पडणें. **नखानें तुटे त्याला कुऱ्हाड कशाला** ? क्षुल्लक साधनानें किं० अल्प शक्तीनें जें काम होण्याजोगें आहे तें करावयाला मोठें साधन किं० पुष्कळ शक्ति कोणी योजीत नाहीं. **फुटलें मोतीं तुटलें मन सांधूं न शके विधाता** फुटलेलें मोतीं पूर्वी प्रमाणें करणें अशक्य आहे; तसेंच एकाद्याविषयीं कोणेकाचें मन कलुषित झालेलें असल्यास तें पूर्वीसारखें स्वच्छ आणि साफ करणें अशक्य आहे. **एकाद्याचा जीव तुटणें** काळजीनें किं० उत्कंठेनें तो व्याकुळ होणें. **एकाद्या माणसासाठीं एकाद्याचा जीव तुटणें** त्याच्या सुखस्थितीसंबंधानें त्याला फार फार काळजी लागलेली असणें. **तुटंपुजा** [**म०** तुटकी (थोडी)+पुंजी (सामग्री)] **वि०** १ थोड्या भांडवलावर चालविलेला (व्यापार, व्यवहार). २ थोडका, अत्यल्प. **तुटपाणी न०** ऊस, वांगीं, इ० जित्रबास त्यांचा जीव जगे इतकेंच जें पाणी देतात तें.

तुटरा [**म०** तुटणें] **वि०** १ ढिसूळ; ज्याचे आपल्या आपण तुकडे पडतात असा. २ तुटलेला. ३ अत्यल्प निमित्तावरून भांडावयाला उठणारा.

तुटवडा पु० खालीं ' तुटार ' पहा.

तुटसाल [**म०** तुटणें] **वि०** भांडखोर; ज्याचें कोणाशीं पटत नाहीं असा.

तुटार [**म०** तुटणें] **वि०** तुटलेला; मोडका; छिन्न विच्छिन्न.

तुटार, तुटारा, तुटाड, तुटाडा, तुटवडा (–ळा), तुटोडा (–ळा) [**म०** तुटणें] **पु०** १ योग्य परिमाणापेक्षां कमताई. २ तोटा, हानि, नुकसान (पडणें, येणें, होणें).

तुटारी [**म०** तुटणें] **स्त्री०** अशक्तपणा (म्हातारपण, फार दिवसांचा आजार, इ० मुळें आलेला).

तुटावणें [**म०** तुटणें] **अ० क्रि०** १ कोणे-कावर रागानें हल्ला करणें (मारामारींत, किं० भांडणांत). २ (एकाद्या खाद्यावर) तुटून पडणें. ३ (तमाशा, खेळ, इ०) पाहावयाला घाईघा-ईनें पुढें सरसावणें किं० गर्दीत घुसणें. ४ (पाऊस) कोसळणें किं०एकदम जोरानें पडूं लागणें. 'आभाळ तुटावणें ' ह्याचाही हाच अर्थ आहे.

तुटी, तुट्टी [**म०** तुटणें] **स्त्री०** १ तुटण्याची क्रिया. २ खिंड, खिंडार. ३ न्यूनता, कमीपणा. ४ मैत्री तोडण्याची क्रिया (मुलांच्या भाषेंत).

तुटीर [**म०** तुटणें] **वि०** ढिसूळ, कमजोर. वर ' तुटरा ' पहा.

तुंड [**सं०**] **न०** १ तोंड. २ चोंच.

तुडगुडें न० मुलांचा खुळखुळा.

तुडतुडणें अ० क्रि० १ फुटणें; भेगळणें. २ भाजलें जात असलेलें धान्य तुडतुड आवाजानें युक्त होणें. ३ तिरसटपणें बोलणें. ४ तोंडांतल्या तोंडांत अस्पष्टपणें बोलणें.

तुडतुडा पु० १ एक जंगली झाड. २ एक क्षुद्र [जंतु.

तुडतुडी वि० १ तुडतुड आवाज करणारे धान्याचे दाणे (भाजतांना किं० चावतांना). २ ज्याचीं शितें टचटचीत आहेत असा (भात). ३ टणक.

तुडतुड्या वि० १ तिरसट (स्वभाव). २ तिरसट स्वभावाचा (मनुष्य).

तुडविणें स० क्रि० पायांखालीं पदार्थाचा चेंदामेंदा करणें.

तुडस, तुटसाल वि० १ तुसड्या स्वभावाचा; तिरसट. २ भांडखोर.

तुडुकतुडुक क्रि० वि० थैथै (नाचणें). ❀ **वाढिलाचें बुढूख आणि नाचे तुडुकबुडुक** १थोड्या अवधिपुरता आपल्याकडे आलेला अधिकार गाजविणें (उपहासांत). २ आपलें थोडेंसें वय ज्यास्ती आहे येवढ्या जोरावर लहानांवर करडा अमल चालविणें (उपहासांत).

तुडुंब, तुडूम, न० घोड्याच्या पाठीवर घात-लेली नौबत.

तुडुंब, तुडुम, तुडुंबंब क्रि० वि० कांठोंकांठ (भांड्यांत पाणी, पोटांत अन्न, इ०).

तुणणें स० क्रि० फाटलेल्या वस्त्रांत सुतें भरून तें पूर्वीप्रमाणें दिसेल असें करणें; (वस्त्र) रफू करणें. ❀ **तुणणावळ, तुणवाई, तुणाई स्त्री०** १ वस्त्र रफू करण्याबद्दलची मजूरी. २ वस्त्र रफू कर-ण्याच्या कामांतील कसब.

तुणतुणें (–नें) न० १ एक पक्षी. २ गोंधळी, शाहीर, इ० कांचें एकतारी पितळेचें वाद्यविशेष. ❀ **मोर नाचे म्हणून तुणतुणें नाचे** मोठ्याचें अनुकरण लहानानें केलें असतां तें त्याला साधत नाहीं आणि तो उपहासास पात्र होतो. ह्याच अर्थाची दुसरी म्हण,–मोर नाचे म्हणून लांडोर नाचे. **एकाद्या गोष्टीचें (किं० गोष्टीबद्दल) तुणतुणें लावणें** तिचा ध्यास घेणें; तिच्याबद्दल एकसारखें बोलत राहाणें; तिच्याबद्दल कोणेकाजवळ मागणी करीत राहाणें. **तुणतुण्या पु०** १ तुणतुणें हें वाद्य वाजविण्याचा धंदा करणारा. २ समर्थाची री ओढणारा त्याचा बगलबच्चा.

तुताती स्त्री० नांगर हाकणाऱ्याच्या चाब-काची वादी.

तुतारी स्त्री० फुंकून वाजवावयाचें एक वाद्य-विशेष. ❀ **तुतारजी पु०** हें वाद्य वाजविण्याचा धंदा करणारा किं० तें वाजवावयाचें कसब शिकविणारा.

तुतिया [**हिं०** थूथिया] **पु०** मोरचूद.

तुतिया [**अ०** तूतियाह्] **स्त्री०** खोटा आरोप; आळ; तोहमत.

तुती [**अ०** तूत्] **स्त्री०** एक झाड. **तुतें न०** त्याचें फळ.

तुत्या पु० सोनार लोकांचें एक आउत.

तुंद [**सं०**] **न०** १ पोट. २ लठ्ठ पोट. **वि०**

१ फार जेवण झाल्यामुळें लठ्ठ झालेलें (पोट). २ रोज यथेच्छ खाणें पिणें मिळत असल्या कारणानें आणि कांहीं काळजीकांटा नसल्या कारणानें लठ्ठ किं० गुबगुबीत झालेला (मनुष्य किं० पशु). ३ संपत्ति किं० अधिकार यांच्या योगें गर्विष्ठ किं० उन्मत्त झालेला. ४ अमली पदार्थांच्या सेवनानें कैफांत आलेला. ❀ **पोट तुंद भरणें** आकंठ जेवण झालेलें असणें. **तुंदिल** वि० लठ्ठ पोटाचा; पोट सुटलेला; ढेरपोट्या.

तुपट, तुपगट, तुपटाण, तुपसाण, तुपष्टाण, तुपाळ पुढें ' तूप ' मध्यें पहा.

तुफान [अ० तूफान्] **न०** १ समुद्राचा क्षोभ. २ वायूचा क्षोभ. ३ (लाक्षणिक) कोणेकावर केलेला खोटा आरोप. ४ नासाडी, विध्वंस. **वि०** जोरानें वाहाणारा किं० सोसाट्याचा (वारा); क्षुब्ध झालेला (समुद्र); मस्तीला आलेला (घोडा). **तुफानखोर, तुफानी वि०** दुसऱ्यावर अपराध लागू करण्याकडे प्रवृत्ति ज्याची असा.

तुंब न० १ बैलराहाटाचें दांत्यांचें चाक. २ चाकाचा तुंबा (म्ह० मध्य भागाचा अवयव,—जो आंसांभोंवतीं फिरतो).३ तुंबारा. ४ नदीचा प्रवाह आडविण्यासाठीं घातलेली भिंत किं० बंधारा. ❀ **तुंबजोड पु०, तुंबजोडी स्त्री०** बैलराहाटाचीं दांत्यांचीं दोन चाकें.

तुबक स्त्री० तोड्यानें पेटवावयाची बंदूक.

तुंबडी स्त्री० १ शरीरांतील फाजील किं० नासकें रक्त काढावयाचें एक साधन; एका टोकाला बारीक अशा नळीच्या रूपाचें हें साधन असतें. २ गोसावी, बैरागी, इ० चें भिक्षा मागावयाचें भोपळ्याचें किं०लांकडाचें पात्र.३एक तंतुवाद्यविशेष, ज्याला एक भोपळा असतो. ❀ **स्वताची तुंबडी भरणें** आपणाला पाहिजे असेल तितकें पदरांत पाडून घेणें. **एकाद्याला तुंबडी लावणें** १ त्याची पिच्छा पुरविणें. २ त्याच्यापासून एकसारखें द्रव्य किं० कांहीं पदार्थ मागून घेणें. **तुंबडीबावा पु०** गोसावी.**तुंबणें,तुंबळणें अ०क्रि०** १नदीच्या किं० पाटाच्या पाण्याच्या किं० गटारांतील मैल्याच्या गतीला कांहीं अडथळा आल्यामुळें तें पाणी किं० तो मैला सांचून राहाणें. २ कोणत्याही प्रकारचीं कामें वेळच्यावेळीं न केलीं गेल्या कारणानें तीं जमत किं० सांचत जाणें.

तुंबळ [सं०तुमुल] **वि०** जोराचें, किं० आवेशाचें (युद्ध, लढाई, वादविवाद, इ०).

तुंबा पु० १ पांढरा कडू भोपळा. २ ह्या भोपळ्याचें केलेलें पात्र किं० बारदान. ३ हत्याराचा मूठ हा भाग. ४ कुऱ्हाड, कुदळ, सुताराची वाकस, इ० चा माथा किं० जाडी भाग,—धारेच्या दुसऱ्या टोंकाकडचा. ५ चाकाच्या मध्यभागचा अवयव; तुंब. ६ तुंबारा. ७ दुधानी नांवाचें झाड. ८ तुमान.

तुंबारा, तुंबाडा [म०तुंबणें] **पु०**१पाण्याचा प्रवाह आडवून पाणी सांठविण्यासाठीं प्रवाहांत जी भिंत घालतात ती. २ कोणतेंही सांचलेलें काम.३ पाण्याची गति प्रतिबद्ध झाल्याकारणानें सांचलेलें पाणी.४भांड्याचें किं० कोणत्याही बारदानाचें भोंक बुजविण्यासाठीं त्या भोंकांत घातलेला फडक्याचा चोंभा, ठोकलेली खुंटी, इ०. ५ शरीरांत एके ठिकाणीं सांचलेलें रक्त किं० अशा सांचलेल्या रक्ताला वाट मिळाली असतां जो प्रवाह सुरू होतो तो. [वेल.

तुंबिनी [सं० तुंबी] **स्त्री०** कडू भोपळ्याची

तुंबी [सं० तुंबी] **स्त्री०** १ कडू भोपळा. २ ह्या भोपळ्याचें केलेलें पात्र. [पहा.

तुंबुरा, तुंबुरजी मागें ' तंबुरा, ' ' तंबुरजी '

तुमान [फा० तुंबान्] **स्त्री०** मैल विजार.

तुमारा पु०झाडाला एकदम फुटूं लागलेले अंकुर समुच्चयानें; धुमारा.

तुमल [सं० तुमुल] **वि०** १ गोंगाट किं० गलबला यानें युक्त. २ जोरदार. ३ घोटाळलेला **न०** आवेशाची लढाई किं० मारामारी.

तुमुल [सं०तुमुल]**वि०** जोरदार, आवेशयुक्त (लढाई, मारामारी).

तुर [सं० तूर्य] **न०** एक वाद्यविशेष

तुरई [हिं० तुरई] **स्त्री०** १ भोपळ्याच्या वर्गांतील एक झाड. २ दोन्हीकडे टोकें असलेला खिळा; सुरसा.

तुरकी स्त्री०घोड्याची एक चाल.हिला 'तुरकी चाल ' असेंही म्हणतात. [बंदीखाना.

तुरंग [पोर्तुगीझ टॅंक] **पु०** कारागृह;

तुरग, तुरंग, तुरंगम [**सं०**] **पु०** घोडा. **तुरगी, तुरंगी स्त्री०** घोडी.

तुरंज [**फा०**] **म०** महाळुंग.

तुरट [**सं०** तुवर, तूवर] **वि०** तुरटी किं० फटकी यांच्या चवीचा.

तुरटी [**सं०** तुवर, तूवर] **स्त्री०** फटकी हा पदार्थ. ❀ **तुरटाई स्त्री०** तुरटीची चव.

तुरतुर फुरफुर न०, तुरतुरी स्त्री० थोडा वेळ गरीबानें केलेला मोठा भपका(करणें,लावणें,मांडणें).

तुरपणें स० क्रि० वस्त्राचा कांठ किं० कड आंत वळवून वेऊन शिवणें. **तुरपणी स्त्री०** तुरपण्याची क्रिया.

तुरंबणें स० क्रि० ज्या कोणाला कांहीं पदार्थाची गरज असेल त्याला त्याच्याबद्दल तिष्ठत ठेवणें, किं० खोळंबून धरणें. **अ० क्रि०** पदार्थविशेष जो आपणाला पाहिजे आहे त्याचेसाठीं तिष्ठत बसणें किं० खोळंबून बसणें.

तुरंबणें अ० क्रि० १ गहूं, बाजरी, इ० चीं ताटें कणसें धरण्याच्या स्थितीस येणें. २ चरफडणें.

तुरबत [**अ०**] **स्त्री०** पुरलेल्या मुसलमानाच्या थडग्यावरचा लांबोडा रचनाविशेष.

तुरंबी स्त्री० १ तुळस, आंबा, पाच, सबजा, इ० ची मंजरी किं०डिकशी.२ कोंवळी फांदी किं० फांदीचा कोंवळा मोड.

तुरतुरणें अ० क्रि० १ चरफडणें, पिरपिरणें. २ (झाडें इ०) टवटवीत दिसणें. ३ (झाडें इ०) नवीन पल्लवांनीं युक्त होणें. ४ वृक्षाला धुमारे फुटणें. [फांदी.

तुरमणा पु० कोंवळ्या पल्लवांनीं युक्त अशी

तुरसणें न० पान, फूल, किं० फळ,यांचें आवरण,–जें बहुधा हिरव्या रंगाचें असतें.

तुरमा पु० वृक्षाला नव्या पानांचे फुटतात ते कोंब किं० अंकुर प्रत्येक; कोंवळें पान.

तुरमी स्त्री० तुळस, सबजा, आंबा, इ० ची मंजरी. वर ‘ तुरंबी ’ पहा.

तुरमुंडी स्त्री० डोक्यानें मारलेली मुसंडी किं० ढुसाणी (देणें). मागें ‘तरमुंडी’ पहा.

तुरये, तुररे पु०अ०व० वेलींचे ताणे,–ज्यांनीं कांठी, दोरी, इ० ना वळसे घालून वेली वर चढतात.

तुरवटें न० खडकाळ जमीनींवरील साफसूफ करून लागवडीस आणलेला प्रदेश.

तुरवें न० एक प्रकारचें भात.

तुरळ, तुरळक, तुरळत क्रि० वि० १ मधून मधून; विरळपणें; कोठें कोठें. २ ठाशीव रीतीनें वस्त्रादि न विणतां. ३ मध्यें मध्यें कांहीं काळ जाऊन (झोप येणें, पाठ करणें,इ०).

तुरळणें [**म०** तुरळ] **स० क्रि०** १ कांहीं पदार्थांची ठाशीव रचना किं० मांडणी मोडून ती विरळ करणें. २ (वस्त्रादि) सईलसर रीतीनें विणणें.

तुरा [**अ०** तुराह] **पु०** १ पागोटें, टोपी, मुंडासें, इ० वर लावण्यासाठीं किं० खोवण्यासाठीं मोतीं, फुलें, इ० चा जो रचनाविशेष करतात तो. **टीप**,–तुऱ्यांचे अनेक प्रकार आहेत; कळीचा तुरा, फकडीचा तुरा, चक्रीचा तुरा, दुलडी तुरा, बुरजी तुरा, इ० इ० इ०. २ राजगिरा, मका, ऊस, इ० स जो गुच्छविशेष येतो तो. ३ मंजरी, मोहोर. ४ एक प्रकारची लावणी, जींत मनुष्य देवाला स्त्री कल्पून तिला आळवितो. पुरुषाचीं आर्जवें स्त्री करीत आहे अशा मजकुराची जी लावणी तिला ‘ कलगी लावणी ’ म्हणतात. मागें ‘ कलगी ’ पहा. ❀ **तुरा लावणें** १ कांहीं अलौकिक किं० मोठ्या पराक्रमाचें किं० देशहिताचें कृत्य करून कीर्ति संपादणें किं० वैभवास चढणें. २ वादांत सरशी मिळविणें किं० वरचढ ठरणें. **तुरा लावून फिरणें** १ खोटें दिवाळें काढून, किं० एकाद्या संस्थेंत किं० कांहीं कारभारांत पैसे खाऊन तुरुंगांत जाऊन बाहेर आल्यावर निर्लज्यपणानें समाजांत वावरणें. २ कायद्याच्या पेंचांत आपण न आडकूं अशा प्रकारें कांहीं गुन्हा करून कोणी मनुष्यानें निर्लज्यपणानें समाजांत हिंडणें.

तुराठी, तुरकटी (–ठी) [**म०**तूर+काठी] **स्त्री०** तूर नांवाच्या झाडाचें खोड किं० बुंधा.

तुरांबा, तुरा आंबा पु० आंब्याच्या मोहोराला अगदीं पहिल्यानें धरतो तो आंबा.

तुरीयें न० तांदुळाची एक जात. [धोटा.

तुरी [**सं०** तुरि, तुरी] **स्त्री०** कोष्ट्याचा

तुरीय,तुर्य[**सं०**]**वि०**चवथा. ❀**तुरीयावस्था,**

तुर्यावस्था, **स्त्री०** ब्रह्माशीं तादात्म्य झाल्याची स्थिति; जागृति, स्वप्न, आणि सुषुप्ति, ह्या तीन अवस्थांहून वेगळी अशी जी स्थिति ती. **तुरीय यंत्र न०** वृत्तचतुर्थांशरूप काष्ठादिकांचें साधन,–दिवस किती आला इ० जाणण्याच्या उपयोगाचें.

तुरुंग [**फोर्च्युगीझ** टाँक्] **पु०** कैदखाना.

तुरुंब क्रि०वि०कांठोंकांठ (भांडें इ० त पाणी इ० भरणें).

तुरुत [**सं०** त्वरित] **क्रि० वि०**१ जेव्हांच्या तेव्हां; तावडतोब. २ ह्या वेळीं; आतां. **॰तुरुत दान महापुण्य** जें द्यावयाचें तें योग्य वेळीं दिल्यास घेणाराला उपयोग होतो आणि देणाराला पुण्य लागतें.

तुरुतुरु क्रि० वि० १ पाऊल विशेष अंतरावर न पडतां जलद किंवा त्वरेनें (चालणें). २ हलक्या स्वरांत पण भरांभरां (बोलणें). **टीप,**– ह्या दोन्ही अर्थी तुरुतुरुकन् (–कर,–दिशीं) हे शब्दही योजले जातात.

तुरूप स्त्री० मागें ' तिरीप ' पहा.

तुरेवाला [**म०** तुरा] **वि०** तुऱ्याच्या संप्रदायाचा शाहीर. मागें ' तुरा ' पहा.

तुऱ्यें न० तांदुळाची एक जात.

तुऱ्हाटी [**म०** तूर+कांठी] **स्त्री०** तुर ह्या झाडाचा बुंधा. मागें ' तुराठी ' पहा.

तुलक [**सं०** तुल] **पु०,न०** कापूस.

तुलई [**सं०** तुल=कापूस] **स्त्री०** पिशवींत विरळ विरळ कापसाचा थर घालून मधून मधून शिवून पांघरावयाला करतात तें आच्छादन;दुलई.

तुलना, तुळणा [**सं०** तुलना] **स्त्री०** १ दोन वस्तूंपैकीं एक वस्तु कोणच्या गुणानें कमी आहे किंवा अधिक आहे हें ठरविण्याची क्रिया. २ दोन पदार्थांत साम्य; बरोबरी; उ० कोल्ह्यास वाघाची तुलना यावयाची नाहीं.

तुलसी, तुळशी [**सं०**] **स्त्री०** तुळस ह्या नांवाचें झाड,–जें सर्व हिंदू पूज्य मानतात. **॰तुलसीपत्र, तुळशीपत्र न०** १तुळस ह्या झाडाचें पान. २ दक्षिणा देणारा मनुष्य दक्षिणेला विनयानें ' तुळशीपत्र ' म्हणतो; उ० भटजीबोवा, माझ्या ऐपतीप्रमाणें मी तुम्हांला हें तुळशीपत्र देत आहें, ह्यांत संतोष माना. **एकाद्या पदार्थावर तुळशीपत्र ठेवणें** तो दान करणें; तिच्यावरचें स्वामित्व सोडून देणें; उ० तूं रामभाऊला दिलेल्या पंचवीस रुपयांवर तुळशीपत्र ठेव (म्ह० ते परत मिळण्याची आशा सोडून दे). **तुलसीवृंदावन, तुळशीवृंदावन न०** तुळस हें झाड ज्या रचनाविशेषांत लावितात तो रचनाविशेष. हीं वृंदावनें दगडाविटांचीं किंवा पितळेचीं किंवा चांदीचीं असतात. **तुलसीविवाह पु०,तुळशीचें लग्न न०**कार्तिक शुद्ध द्वादशीस विष्णूची मूर्ति आणि तुळस ह्यांचा लावितात तो विवाह,म्ह०तें लग्न. **तुळशींत भांग स्त्री०**चांगल्या कुटुंबांत जन्मास आलेला बदमाष पोरगा. **भांगेंत तुळस स्त्री०** बदमाष कुटुंबांत जन्मास आलेला सद्गुणी मुलगा.**तुळशीच्या मुळांत कांदा लावावा लागतो** चांगल्या परिणामासाठीं कधीं कधीं वाकडा उपाय योजावा लागतो.तुळस ह्या शब्दाचे इतर समास ' तुळशीकाष्ठ, ' ' तुळशीमंजरी ' हे सहज समजण्याजोगे आहेत.

तुला, तुळा [**सं०**] **स्त्री०** १ वजन; वजन करण्याची क्रिया. २ माप; मापण्याची क्रिया. ३ मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तुला, वृश्चिक, धनु, मकर,कुंभ,आणि मीन, ह्या सूर्याचें आकाशांतील संचरण दाखविणाऱ्या ज्या बारा राशि त्यांतील सातवी रास. ४ सादृश्य, साम्य, बरोबरी. ५ तागडी, तराजू. ६ आपल्या पापाचें निरसन व्हावें म्हणून आपल्या शरीराचें वजन करून आपल्या भारंभार सोनें, रुपें,साखर, इ० पदार्थ ब्राह्मणांस विभागून देणें हा विधि किंवा ह्या विधीनें जें दिलें तें (करणें, देणें). **॰तुलादान न०** वर ' तुला 'अर्थ ६ पहा. **तुळा पुरुष पु०** 'तुला' अर्थ ६ प्रमाणें ठरलेलें जें पुरुषाच्या भारंभार द्यावयाचें सोनें, चांदी, मीठ, इ० तें. **टीप**–तुलादान किं०तुलापुरुष हें महादानांपैकीं एक आहे. **तुलाकोश पु०** ज्यानें कांहीं गुन्हा केला असेल अशी शंका आली असेल त्याला रोज तोलून तो कमी कमी भरत जाईल तर तो निरपराधी असें ठरविण्याचें दिव्य.

तुलित [**सं**] **वि०**१ जें तोललें तें. २ दुसऱ्या पदार्थाशीं ताडून पाहिलेला किंवा बरोबरीचा म्हणून ठरविलेला (पदार्थ).

तुल्य [**सं०**] **वि०** १ सारखा, बरोबरीचा. २ योग्य, अनुरूप. ३ तोच; अनन्य; अभिन्न. ꙮ **तुल्यपान न०** सहपान. **तुल्ययोगिता स्त्री०** (**साहित्य**) समगुण अशा पदार्थांचें एकत्र वर्णन; अनेक प्रस्तुत पदार्थांचा साधारण धर्म (मग तो क्रियारूप असो किं० गुणरूप असो) एकच वेळ सांगितलेला असतो तेथें ' तुल्ययोगिता ' हा अलंकार होतो; तसेंच जेथें अनेक अप्रस्तुत पदार्थांचा साधारण धर्म (मग तो क्रियारूप असो किं० गुणरूप असो) एकच वेळ सांगितलेला असतो तेथें होतो त्या अलंकारालाही ' तुल्ययोगिता ' म्हणतात. विशेष खुलासा आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण 'ह्या पुस्तकांत पहा.

तुवरी [**सं०** तुवरी=तूर] **स्त्री०** तूर हें [धान्य.

तुशा वि० ढिसूळ किं० फुसफुशीत असा (खडक).

तुशी वि० शालजोडी, खेस, इ० ह्यांच्या रंगांचा तांबूस पिवळा असा एक प्रकार आहे त्या रंगाचा (वस्त्रादि पदार्थ).

तुष, तुस [**सं०**] **पु०** कोंडा, भूस. ꙮ **तुषानल, तुषाग्नि पु०** अपराध्याला भुसांत घालून जाळणें ही शिक्षा.

तुषार [**सं०**] **वि०** थंड, गार. **पु०** १ दंव. २ बर्फ. ३ जलकण. ꙮ **तुषाराद्रि पु०** हिमालय हा पर्वत. **तुषारकिरण पु०** चंद्र.

तुष्ट [**सं०**] **वि०** तृप्त; संतुष्ट. ꙮ **तुष्टपुष्ट वि०** आनंदित; अत्यंत संतोष पावलेला. **तुष्टीभूत वि०** संतुष्ट झालेला.

तुष्टणें [**म०** ' तुष्ट '.पासून] **अ० क्रि०** संतुष्ट होणें; तोषणें.

तुष्टि [**सं**] **स्त्री०** संतुष्टपणा; तृप्तता; समा- [धानीपणाची वृत्ति.

तुसडा वि० १ तिरसट; विचारलेल्या प्रश्नाला रागानें थोडक्या शब्दांनीं उत्तर देण्याचा स्वभाव ज्याचा असा. २ लोकांशीं प्रेमानें न वागणारा.

तुसळ [**सं०** तुष] **स्त्री०** कोंडा, भुसा किं० ज्यांतील कोंडा अद्यापि वेगळा करावयाचा आहे असे (सडलेले तांदूळ).

तुसार [**सं०** तुष] **न०** खरीपाच्या किंचित् अगोदरचें पीक,–मूग, उडीद, इ०. ' तुसार धान्य ' **न०** ह्याच अर्थानें रूढ आहे.

तुसार, तुसारा [**सं०** तुषार] **पु०** पावसाची बुरबुर.

तुळई स्त्री० १ लांब आणि तासून चौरस केलेलें लाकूड. २ घराच्या खांबांच्या दोन रांगांपैकीं एका रांगेच्या एका खांबावर आणि दुसऱ्या रांगेच्या एका खांबावर घातलेलें चौरस लाकूड; बहाल.

तुळई, तूळ [**सं०** तुला] **स्त्री०** एक प्रकारची तराजू,–जिला एकच पारडें असून वजन दाखविणारा लोलक दांडीवर सरकावावयाचा असतो.

तुळणा, तुळणी मागें ' तुलना ' पहा.

तुळणें [**सं०** तुल्] **स० क्रि०** १ जोखणें. २ मापणें. ३ दोन पदार्थांत न्यूनाधिक्य ठरविणें. ४ बरोबरीचा समजणें. **अ० क्रि०** सारखा किं० एका दर्जाचा ठरणें; बरोबरीचा असणें.

तुळतुळीत वि० चकचकीत; तजेलदार.

तुळंबा, तुळांबा पु० १ केळीचा जो खांब तो. २ (लक्षणेनें) तत्सदृश जी लठ्ठ मांडी ती किं० जो लठ्ठ दंड तो; ह्या अर्थीं 'हाताचा तुळंबा' 'पायाचा तुळंबा, '' दंडाचा तुळंबा ' हेही शब्द रूढ आहेत.

तुळव पु० **खटारा** गाडीचा एक अवयव- [विशेष.

तुळवट [**म०** तुळई] **न०, पु०** १ मोठी तुळई,–तासून चौरस केलेली किं० न केलेली. २ (थट्टेंत) लठ्ठ आणि उंच माणूस,–पुरुष किं० स्त्री. ३ (लक्षणेनें) कठिण आणि जिकीरीचें काम.

तुळवा पु० ब्राह्मणांची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

तुळशीपत्र इ० मागें ' तुलसी ' मध्यें पहा.

तुळस स्त्री० मागें ' तुलसी ' मध्यें पहा.

तुळाधार क्रि० वि० अगदीं तंतोतंत किं० सर्वथैव बरोबर.

तुळांबा, तोळंबा, तुळंबा पु० १ घर, मांडव, इ०चा खांब. २ खांबाची उथळी,–ज्या उखळींत खांबाचें कुसूं बसविलेलें असतें. ३ अवाडव्य शरीर, गाल, किं० झाडाचा बुंधा. ४ गोंडस किं० गुटगुटीत शरीर. ५ गवंड्याचा ओळंबा.

तुळी स्त्री० मागें ' तुळई ' पहा.

तूं सर्वनाम तीन्ही लिंगीं एकवचनी द्वितीय

पुरुषवाचक सर्वनाम. ※ **तूंमी करणें** सभ्य माणसाशीं उद्धटपणें बोलणें. **तूंमीवर येणें** भांडणापर्यंत मजल येणें; एकेरीवर येऊन बोलणें. **केलें तुका झालें माका, तूंस करायाला गेलें तर मस कसें आलें?** तुझें वाईट करावयाला मी गेलों (किं० गेलें)पण माझेंच वाईट झालें; तुझें नुकसान करावयासाठीं रचलेल्या पेचांत मीच सांपडलों. **हूं तर भांडीं घास तूं** हें वाईट काम करणें बरोबर नाहीं असें माझें मत आहे; तें करावें असा तुझा हट्टच असला तर तें तूंच करीनास परता ?

तूक, तुकल स्त्री०एक प्रकारचा कागदी पतंग.

तूक न० निष्काचा षोडशांश;आडीच माष. २ तोलून ठरलें तें वजन. ३ श्लोकाचा एक चरण; ध्रुपद किं० पालुपद.※**तुकीं तुकणें** एका पदार्थाची दुसऱ्या पदार्थाशीं तुलना करणें किं० त्यांच्यांत तारतम्य ठरविणें.

तूट [म० तुटणें] **स्त्री०** १ विवक्षित किं० अपेक्षित किं० आजमासलेल्या परिमाणांत जी न्यूनता येते किं० कमताई होते ती; उ० खंडीस दोन मण तूट आली. २ सतत चाललेल्या सरणींत किं० क्रियेंत होतो तो खंड; उ० आज चार आठवडे सारखा पाऊस पडत आहे, एक दिवसही तूट पडली नाहीं.३पति आणि पत्नी,गाय आणि वासरूं, आई आणि मूल,मित्र आणि मित्र, यांचा परस्परांपासून जो वियोग तो;उ०गाथीची आणि वत्साची तूट पाडूं नये. ४ व्यापार, व्यवहार, इ० त बसलेली ठोकर किं० झालेली हानि. ५ मैत्री,सरकत, इ० संबंधांत कांहीं कारणानें होतो तो विच्छेद. ※ **तूट ओल स्त्री०, न०** शेत जमीनींत असावी त्याहून कमी आर्द्रता किं० जलांश. **तूटपाऊस** १ सतत न पडलेला पाऊस.२ मधून मधून पडणारा पाऊस. ३ सर्वत्र पडला नाहीं किं० पडत नाहीं असा पाऊस. **तूटपाणी न०** झाडें किं० जनावरें यांना अपुरतेंपणानें दिलेलें पाणी. **तूटपुंजी स्त्री०** व्यापारांत घातलेलें अपुरतें भांडवल. **वि०** अपुरत्या भांडवलावर चालविलेला (व्यापार किं० व्यवहार). **तूटपुंजीवाला, तूटपुंजा पु०** अपुरत्या किं० अगदीं थोड्या भांडवलावर व्यापार किं० सावकारी करणारा. **तूटमिती, तूटमुदत स्त्री०** व्याजाच्या हिशेबाचा एक प्रकार,–यांत वेळोवेळीं वसूल झालेली रकम मूळचें मुद्दल व व्याज यांच्या रकमेंतून वजा करून बाकीची रकम पुढच्या काळासाठीं मुद्दल म्हणून समजण्यांत येते.

तूण, तूणीर [सं० तूण, तूणीर] **पु०** बाणांचा भाता; बाण ठेवावयाची पिशवी.

तूत [अ० तूत्] **स्त्री०** तुतीचें झाड. **न०** त्याचें फळ.

तूप न० १ लोणी कढवून त्याचें करतात तें रूपान्तर. २ तत्सदृश जो नारळाचा रस, मांस, इ० कांपासून काढतात तो पदार्थ. ※ **रात्रीं (किं० आवशीं) खाई तूप आणि सकाळीं पाही रूप** कारण घडल्याबरोबर कार्य किं० परिणाम अपेक्षिणें हा अधीरपणा किं० ही उतावळी हास्यास्पद होय. **जेवीन तर तुपाशीं नाहीं तर उपाशीं** मागें ' जेवणें ' शब्दांत पहा. **तुपाचे आशेनें उष्टें खावें** कांहीं मोठा लाभ होत असल्यास लहानसें अकृत्य करणें क्षम्य होतें. **तुपाचा शिंतोडा, तुपाचा थेंब पु०, तुपाचें नख न०** तुपाचें अत्यल्प प्रमाण; अगदीं थोडें तूप. **तूप केळें न०** पेंढरें नांवाचें एक फळ. **तूप खिचडी स्त्री०** १ पुष्कळ तूप जींत घातलेलें आहे अशी खिचडी. २ कवड्या इ० च्या खेळामध्यें दुसऱ्याची कवडी इ० मारली असतां आणखी एकवार आपण खेळावें अशा संकेताला अनुसरून जो खेळ तो. **तूपतसर न०** सरकारी कामगार सरकारी कामासाठीं एखाद्या गांवीं गेला असतां त्याला शिरस्त्याप्रमाणें गांवकऱ्यांनीं द्यावयाची जी तुपाची रसद ती. **तूपशिस्त स्त्री०** तुपाच्या रूपानें गांवकऱ्यांपासून घेतलेला सारा. **टीप**.–' तूप ' हा शब्द कांहीं समासांत गेला असतां त्याचें ' तुप ' असें रूप होतें. **तुपट, तुपगट वि०** १ तुपाची घाण ज्याला येत आहे असें (भांडें, चिरगूट, इ०). २ तुपाच्या रुचीचा. ३ ज्यांत तूप फार आहे असा (खाद्य पदार्थ). ४ तुपाच्या वासाचा. **तुपटाण, तुपसाण, तुपष्टाण स्त्री०** तुपाची घाण. **तुपाळ वि०** जिच्या दुधांत लोण्याचा आणि पुढें तुपाचा अंश फार अशी (गाय, म्हैस, इ०). **तुपकढणी स्त्री०** लोणी कढवावयाचें मृत्तिकापात्रविशेष.

तूर [सं० तुरी] **स्त्री०** कोष्ट्याचा धोटा.

तूर [सं० तुवर, तूवर] **स्त्री०** १ एक द्विदळ धान्याविशेष, किं० त्याचें झाड. २ दोन्हींकडे अण-कोची असलेला खिळा; सुरसा. ❀ **तुरकाठी स्त्री०** तूर झाडाचा बुंधा. **तुरीची काठी तुरीवर झाडावी** १ जागच्या जागीं मिळणाऱ्या साधनां-नींच आपला हेतु साधावा किं० आपलें कार्य करून घ्यावें. २ एकादा देश जिंकावयाचा असतां त्याच देशांतील माणूस हाताशीं धरावा, कारण असा मनुष्यच इमानानें देशद्रोह करूं शकतो. ३ एकादी संस्था बुडवावयाची असतां त्या संस्थेंती-लच दिसण्यांत सभ्य असा समासद हाताशीं धरावा. (**एकाद्याच्या**) **हातावर तुरी देणें** (किं० **तुरी देऊन पळून जाणें**) त्याला फसवूनं त्याची नजर चुकवून पळून जाणें.

तूर्त [सं० त्वरित] **क्रि० वि०** सध्यां; ह्या वेळीं; ह्या प्रसंगीं; ' तूर्तातूर्त, ' ' तूर्तचे तूर्त ' आणि ' तुरुत ' ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

तूर्य [सं०] **पु०, न०** तुतारी नांवाचें वाद्य.

तूष्णीम् [सं०] **क्रि० वि०** मुकाट्यानें; स्तब्धपणें; न बोलतां. **न०** पदार्थाचें अत्यल्प प्रमाण; अगदीं थोडा पदार्थ; उ०आज आमच्या घरांत तुपाचें तूष्णीं आहे; उ० मेहेंदळ्यांच्या घरीं तुपाच्या नांवानें बहुतेक तूष्णीमचें असतें (भिक्षुकांच्या भाषेंतील हा अर्थ आहे).

तूस [सं० तुष] **पु०, न०** कोंडा; भूस; भुसकट; तांदूळ, नाचणी, वरी, इ० धान्यांच्या दाण्यांच्या वरचें कवच किं० टरफल,—जें टाकून द्यावयाचें असतें. ❀ **तूस कांढून हाताला फोड** ज्या क्रियेपासून कांहीं लभ्यांश नाहीं अशी क्रिया करणें (हा मूर्खपणा होय).

तूळ [सं० तुळा] **स्त्री०** १ मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ, आणि मीन, या ज्या बारा राशि, त्यांतील सातवी. २ एक प्रकारची तराजू,—जिला एकच परडें असून वजन दाखविणारा लोलक दांडीवर सरकावावयाचा असतो.३ रुपाया हें नाणें.

तूळ [अ०] **पु०, न०** (जमीनमापणींत) क्षेत्राची लांबी.

तृण [सं०] **न०** गवत. ❀ **तृणतुल्य, तृण-प्राय वि०** गवताच्या योग्यतेचा; टाकाऊ; भिकार; बिन किंमतीचा; तुच्छ. **दांतीं तृण धरून क्रि० वि०** गर्व, अभिमान, किं० मिजास सोडून नम्रपणानें (कोणेकाला शरण येणें). **तृणधान्य न०** १ नाचणी, वरी, सावा, राज-गिरा, देवभात, वरटी, इ० धान्यें व्यक्तिशः. २ वरीलसारखीं बीजें ज्यांना येतात अशीं जंगली झाडें व्यक्तिशः. ३ न पेरतां उगवणारें धान्य (देवभात, इ०). **तृणग्राही, तृणमणि** [सं० तृणग्राहिन्; **तृण+मणि**] **पु०** तृणाला आकर्षि-णारा मणि; नीलमणि. **तृणशत्रु पु०** अकुशल न्हावी; गवतकाप्या (न्हावी). **तृणाचा शेक पु०** क्षणभंगुर सुख.

तृतीय [सं०]**वि०**तिसरा. ❀**तृतीयनेत्र पु०** शंकराचा तिसरा डोळा.**तृतीय नेत्र उघडणें** अति-शय संतापणें. **तृतीय पंथ पु०** भलतीच सरणी; सामान्य जनांच्यापेक्षां वेगळीच रीति; वागण्याची विचित्र किं०विलक्षण तऱ्हा;'ह्याचें कांहीं तिसरेंच,' 'ह्याचें आपलें तिसरेंच," ह्याचें तिसरेंच एक 'ह्या वाक्प्रचारांचा हाच अर्थ आहे. **तृतीय सवन** मागें ' तिसरा ' ह्या शब्दांत ' तिसरें सवन ' पहा.

तृतीया [सं०] **स्त्री०** १ तिसरी. २ शुक्ल पक्षांतील किं० कृष्ण पक्षांतील तिसरी तिथि. ३ (व्याकरणांत) तिसरी विभक्ति. ❀ **तृतीया प्रकृति स्त्री०** तमोगुणयुक्तता.

तृप्त [सं०] **वि०** संतुष्ट; जें पाहिजे आहे तें ज्याला मिळालें आहे असा; तृप्ति पावलेला.

तृप्ति [सं०] **स्त्री०** जें इच्छिलें तें मिळणें; जितकें इच्छिलें असेल तितकें मिळणें; सतुष्टता.

तृषा, तृष्णा [सं०] **स्त्री०** १ पाणी पिण्याची इच्छा. २ कोणत्याही वस्तूची उत्कट इच्छा. ३ लोभ. ❀ **तृषाकुल, तृषाक्रान्त, तृषा-न्वित, तृषातुर वि०** तान्हेला.

तृषित [सं०]तान्हेला.

तेख [अ० तेघ्] **पु०** रागाचा झटका; क्रोधाची लहर. ❀ **तेखी वि०** रागीट; आवेशी; तापट.

तेगा [फा० तेग्] **पु०**एक प्रकारची बाक-दार आखूड तरवार.

तेगार पु० १ जमीनजुमला, शेतभात, घर, गुरें, माणसें, इ० चा कोणेकाचा पसारा; मालमत्ता. २ बैलाची मूठ इ० सरंजाम. ३ ऐट, दिमाख (मिरावेणें, करणें, इ०).

तेज [**सं०** तेजस्] **न०** १ अग्नि. २ उष्णता. ३ तजेला; चकाकी. ४ सौंदर्य, शोभा. ५ पृथ्वी, आप्, तेज, वायु, आणि आकाश, हीं जीं पांच महाभूतें त्यांपैकीं तिसरें. ६ जोर, उत्साह. ७ शौर्य, प्रताप. ८ स्वाभिमान. ९ सत्त्व, अर्क. १० बळ, कुव्वत. ११ वीर्य, शुक्र. १२ तेजस्वी पदार्थ. १३ पित्त. १४ तिखटपणा. १५ परब्रम्ह. ꙮ **तेजःपुंज पु०** तेजाचा राशि; मूर्तिमंत तेज. वि० कांतिमान्. **तेजोभंग पु०** अपमान. **तेजस्वी वि०** १ कांतिमान्. २ बाणेदार. **कोणेकावर कोणेकाचें तेज पडणें** त्याचेवर त्याचा वरचष्मा स्थापित होणें; त्याचेहून तो श्रेष्ठ ठरणें.

तेजक, तेजबळ न० एक औषधी वनस्पति.

तेजगी [**फा०** ताजाह्गी] **स्त्री०** १ ताजेपणा. २ तजेला; चकाकी.

तेजाळ [**सं०** तेजस्] **वि०** तेजस्वी; भव्य.

तेजित [**सं०**] **वि०** १ धार दिलेलें (शस्त्र). २ घासून चकचकीत केलेलें.

तेजी [**सं०** तेजस्] **स्त्री०** भरभराट, चलती. ह्याच्या उलट **'मंदी'**. ꙮ**तेजीमंदी स्त्री० ए० व०** १ व्यापारांत किंमतीचा चढ उतार. २ एकाद्या पदार्थाचा खप कमी अधिक होणें.

तेजी [**फा०**ताजी] **पु०** अरबी घोडा. ꙮ**हिमायतीचा गाढव तेजीस लाथ मारतो** वशील्यानें उच्च पदावर बसलेला मूर्ख, नादान, आणि बेअकली असा माणूस अनुभवशीर, हुशार, आणि शाहण्या माणसावर आपला अमल गाजवितो किं० शाहाण्या माणसाचा अपमान करूं शकतो.

तेटू स्त्री० एक औषधी झाड.

तेड पु० १ वांकडेपणा. २ गुंतागुंत. ३ मित्रांमित्रांचा बेबनाव. ४ थांबणूक; गति कुंठित होणें. ५ हिशेब, जमाखर्च इ० न जमणें किं० न जुळणें.

तेडा, तेढा [**हिं०** तेढा] **वि०** वाकडा. ꙮ **तेडाबांका वि०** १ वाकडा; वाकडा तिकडा. २ हिरवट. ३ तिरसट; तुसडा. **तेढा गुणाकार पु०** (गणितांत) संक्षिप्त गुणाकार,—यांत विशिष्ट स्थळापर्यंत गुणाकार बरोबर येईल अशी योजना असते. **तेढा भागाकार पु०** (गणितांत) यांत विशिष्ट स्थळापर्यंत भागाकार बरोबर येईल अशी योजना केलेली असते.

तेतीस, तेहेत्तीस [**म०** ते (तीन) + तीस] **वि०** तीसांत तीन मिळवून होते त्या संख्येइतका.

तेथचा, तेथला, तेथील [**म०** तेथें] **वि०** त्या ठिकाणचा.

तेथें [**सं०**तत्र] **क्रि० वि०** त्या ठिकाणीं. ꙮ **तेथवरी, तेथवर, तेथपर्यंत क्रि० वि०** १ त्या स्थलापर्यंत. २ त्या समयापर्यंत.

तेधवां क्रि० वि० त्या वेळीं (कवितेंत).

तेर स्त्री० शेताची तिसरी नांगरणी.

तेरडा पु० एक फुलझाड,—हें ठेंगणें असून याच्या फुलांचे रंग चित्रविचित्र असतात, आणि ते रंग दिवसा दिवसानें पालटतात. ꙮ **तेरड्याचा रंग तीन दिवस** अंगांत खरी धमक नसतां नुसता देखावा किं० भपका किं० खटाटोप केला तर तो फार वेळ टिकत नाहीं.

तेरवां क्रि० वि० १ चालू दिवसाच्या मागें दोन दिवस टाकून तिसऱ्या दिवशीं. २ चालू दिवसाच्या नंतर दोन दिवस टाकून तिसऱ्या दिवशीं.

तेरस [**सं०** 'त्रयोदशी' चा अपभ्रंश] **स्त्री०** त्रयोदशी ही तिथि; उ० धन तेरस.

तेरसा, तिरसा वि० तिरवा (डोळा) किं० तिरव्या डोळ्याचा (मनुष्य).

तेरा [**सं०** त्रयोदश] **वि०** दहांत तीन मिळवून होते त्या संख्येइतका. ꙮ **तेराबारा पु० अ० व०** भांडण; वाद; तंटा; उ० हल्लीं त्याचें माझे तेरा बारा चालले आहेत. **तेरावा पु०, तेरावें न०** मृत मनुष्याच्या मरणाच्या दिवसापासून तेराव्या दिवशीं करावयाचें धर्मकृत्य.

तेरीख स्त्री० मागें 'तारीख' पहा.

तेरीज स्त्री०, न० १ ज्यांची बेरीज करावयाची आहे अशा एका जातीच्या रकमा प्रत्येक. २ अशा रकमांची बेरीज. ३ अशा बेरजांची वट्ट बेरीज. ४ अनेक जातींच्या रकमांची बेरीज किं० हें बेरजांचें पत्रक.

तेरीमेरी [**हिं०**तेरी मेरी=तुझी माझी] **स्त्री०** भांडण; बोलाचाली; कज्जा; हमरीतुमरी (करणें). ꙮ **तेरीमेरीवर येणें** एकेरीवर येऊन कज्जा करणें.

तेरें न०, तेरी स्त्री०न लावतां उगवतें तें अळू.

तेल [**सं०** तैल] **न०** तीळ, खोबरें, भुईमूग, चंदन, इ० कांपासून जो पातळ स्निग्ध द्रव काढतात तो. ॐ **तेलकट, तेलगट वि०** १ तेलानें लिप्त (जो पदार्थ तो). २ तेलाचा वास ज्याला येत आहे असा. **तेलकटाण** [तेलकट+घाण] **स्त्री०** तेलकट पदार्थाची घाण; तेलानें लिप्त पदार्थाची घाण. **तेलकटी स्त्री०** तेल, धूळ. इ० पदार्थांचा थर जो एकाद्या पदार्थावर बसून टणक होतो तो. **तेलट वि०** १ ज्यांतून तेल निघतें असा (पदार्थ,– खोबरें इ०). २ तेलानें लिप्त. **तेलतिमण न०** तेलवील; तेल, गूळ, तांदूळ, इ०संसारोपयोगी पदार्थ समुच्चयानें. मागें ' तिमण ' पहा. **तेलघडी स्त्री०** क्षतादिकांवर ठेवितात ती तेलाची घडी. **तेलची स्त्री०** तेलांत किं० तुपांत तळलेली पुरणाची पोळी. **तेलवात स्त्री० ए० व०** समई, लामणदिवा, पणती, इ० घासून, पुसून त्यांत वातींच्या जुळ्या, तेल, इ० घालून जी तयारी किं० सिद्धता ती; उ० संध्याकाळ होत आली, गोदीला तेलवात करावयाला सांग. **तेलस, तेलसर वि०** सजातीय इतर पदार्थांपेक्षां ज्यांत तेलाचा अंश अधिक आहे असा; उ० त्या तिळांपेक्षां हे तीळ अधिक तेलस आहेत. **तेलघाणा पु०** १ तेल काढावयाचा घाणा. २ शूद्रादिकांचे विवाहांत गणपतिपूजनापासून सावधानविधि समाप्त होईपर्यंत ब्राह्मणानें करावयाचें जें अनुष्ठान तें. **तेलतवा पु०**पदार्थ तळावयासाठीं पितळीसारखें पात्र करतात तें. **तेलफळ, तेलवण न०, तेलसाडी स्त्री०** लग्नाचे पूर्वी नवऱ्या मुलाकडून नवऱ्या मुलीकडे तेल, साडी, नारळ, इ०पदार्थांची देणगी नेण्याचा विधि किं० समारंभ. **तेलदिवाळी स्त्री०**दिवाळीसाठीं तेली लोकांनीं गांवकऱ्यांना तेलाच्या रूपानें द्यावयाची वर्गणी. **तेलधार स्त्री०** पाटील इ० गांवकामगारांना तेल्यांनीं तेलाच्या रूपानें द्यावयाची भेट. **तेलशिपा पु०** माशांपासून काढतात तें तेल,–होड्यांना फासतात तें. **तेलबोळ पु०** बाळंतिणीच्या उपयोगाचे जे औषधी पदार्थ ते समुच्चयानें. **पोराचें पोर गेलें (किं० पोरापरी पोर गेलें) आणि तेलबोळाचें मागणें आलें** ज्याच्या प्राप्तीसाठीं इतक्या पदार्थांची सिद्धता करण्याचे श्रम सोसले त्याची प्राप्ति झाली नाहीं तीं नाहींच आणि उलट त्या पदार्थांच्या किंमती मात्र देण्याचा प्रसंग आला. **तेलमिठाखालीं, तेलमिठावारीं क्रि० वि०** जे पदार्थ अत्यन्त क्षुल्लक आणि अल्प किंमतींचे त्यांची जुळवाजुळवी किं० सिद्धता करण्यांत (इतके पुष्कळ पैसे खर्च झाले). अशा सारख्या प्रसंगीं योजावयाचे अन्य वाक्प्रचार ' हिंगातुपाखालीं,' ' हिंगातुपावारीं.' **कोणेकाचें तेल काढणें** (किं० **तेलवण काढणें**) त्याला चोप देणें. **कोणी स्त्रीनें तेल घेणें** १ तिणें गरतपणा सोडून भावीण होणें. २ राजरोसपणें एकाद्या स्त्रीनें गरतपणा सोडून रांडेचा धंदा करूं लागणें. **एकाद्या पदार्थाला** (किं० **माणसाला**) **तेल लागणें** तो दुर्मिळ होणें; तो क्वचित प्रसंगीं मिळणें, दिसणें, सापडणें, किं० भेटणें.

तेलंग, तैलंग पु० तैलंगणांतील कोणीही इसम. ॐ **तेलंगभट, तैलंगभट पु०** १ आगंतुक. २पदार्थविशेष लोचटपणानें मागणारा मनुष्य.

तेली [**सं०** तैल; **म०** तेल] **पु०** भुईमूग, तीळ, खोबरें, इ० घाण्यांत घालून तेल काढणाराची जात किं० त्या जातीचा कोणी इसम. ॐ **तेली तांबोळी पु० अ० व०** १ हलके धंदे करणारे लोक. २ अशिक्षित लोक (लाक्षणिक). **तेलीण स्त्री०** १ तेल्याची पत्नी. २ तेल्याचा धंदा करणारी स्त्री. **तेलिणीवर रुसला आणि अंधेरांत बसला** तेलिणीशीं असहकारिता करणाराला अंधेरांत बसण्याचा प्रसंग येतो. **सगळी साळ्याची, अर्धी माळ्याची, धनीण तेल्याची आणि ऋणकरीण बामणाची** (म्ह० ब्राह्मणाची) साळ्याची बायको साळ्याला सर्व कामीं मदत करते, माळ्याची बायको माळ्याला अर्ध्या कामांत मदत करते, तेली घाण्याभोंवतीं सर्व दिवस चालून तेल काढतो तें त्याची बायको शेटाणीच्या मानाच्या आसनावर बसून विकते, आणि ब्राह्मणाची बायको त्याच्या कोणत्याही व्यवसायांत त्याला मदत न करतां त्याच्यापासून हकानें दागिने मागून घेणारी असते.

तेल्या [**म०** तेल]**वि०** सजातीय पदार्थांच्या ज्या रंगांत चकाकी असते असा (रंग); उ० तेल्या रंगाचा तांदूळ इ०. ॐ **तेल्याबोर वि०** तांबूस तपकिरी रंगाचा (घोडा). **तेल्याकुमाईत वि०** तांबूस तपकिरी असून काळसर असा (घोडा).

तेल्या टांकणखार पु० टांकणखाराची एक जात; याला 'चौकीचा टांकणखार' असेंही म्हणतात.

तेव पु० साखर इ०चा उष्णानें होतो तो पाझर किं०होते ती चिकी. [(साखर,मीठ,इ०).

तेवट [म० तेव] **वि०** अग्निसंयोगानें द्रवणारी

तेवढा वि० तितक्या मापाचा, वजनाचा, परिमाणाचा, किं०किमतीचा. याचा जाबदार 'जेवढा.'

तेवणें [**सं०** तिज्] **अ० क्रि०** १ (दिवा इ० नीं) प्रकाशत असणें; उ० सारी रात्र दिवा तेवत ठेवूं नको. २ उष्णतेनें किं० जलांशानें वितळणें किं० विरघळणें (साखर, गूळ, इ०).

तेवसू [**नंद्भाषेत**] **वि०** नऊ.

तेंवी, तेवीं क्रि०वि० त्याप्रमाणें, तसें (कवितेंत).

तेवीस [**म०** ते (तीन)+वीस] **वि०** क्रमांकांतील बावीसाच्या पुढचा.

तेव्हढा वि० वर 'तेवढा' पहा.

तेंव्हा, तेव्हां क्रि० वि० १ त्या काळीं; त्या समयीं. २ त्या अर्थी; त्या पक्षीं.

तेष [अ० तेष्] **पु०** रागाची लहर.

तेषी [अ० तेष्; **म०** तेष] **वि०** रागीट; तापट; कोपिष्ट.

तेह, तेहट, तेहणें, तेहेणें वर 'तेव,' 'तेवट,' 'तेवणें,' पहा.

तेहतीस, तेहेतीस, तेहेत्तीस, ततीस, तेत्तीस [**म०** ते (तीन)+तीस; **सं०**त्रयस्त्रिंशत्] **वि०** तीस ह्या संख्येंत तीन ही संख्या मिळवून होते त्या संख्येइतका. [(कवितेंत).

तैं, तईं क्रि० वि० त्या काळीं; त्या समयीं.

तैख, तैखी वर 'तेख,' 'तेखी' पहा.

तैजस [**सं०**] **वि०** १ तेजस्वी; तेजोमय. २ चकचकीत. ३ रागीट. ४ राजस. **पु०** स्वप्नावस्थेंतील जीव.

तैतिल [**सं०**] **न०** चवथें करण (ज्योतिषांत).

तैनात [**अ०** तअइनात] **स्त्री०** १ लष्करी हुकमत. २ कांहीं कामाबद्दल ठरविलेला पगार किं० तनखा. ३कोणेकाकडे कांहीं कामाचा किं०पदार्थांचा किं०खात्याचा सोपविलेला अधिकार, व्यवस्था, वहिवाट, किं० ताबा. ४ पदार्थविशेषाच्या रक्षणाची जबाबदारी किं० काळजी. ❀ **तैनाती वि०** १ पगार किं० कांहीं नेमणूक ठरवून ठेविलेला नोकर, आश्रित, किं० अमलदार. २ सैन्याच्या तुकडीचा ताबा किं० अमल ज्याच्याकडे सोपविण्यांत आला आहे असा (अधिकारी). ३ चरितार्थासाठीं ज्याला एकादा गांव इ० नेमस्त करण्यांत आलेला आहे असा (मनुष्य). **तैनात जाबता पु०** अनेक तैनाती लोकांच्या तैनातींच्या ठरावांचीं वेगळीं वेगळीं कलमें ज्यांत लिहिलीं आहेत असा कागद.

तैनाल, तहनाल न० तरवारीच्या म्यानाच्या खालच्या बाजूचें अडकण.

तैयार इ० मागें 'तयार' इ० पहा.

तैल [**सं०**] **न०** तेल; करडई, भुईमूग, खोबरें, इ०तील स्निग्ध अंश. ❀**तैलकिट्ट न०** पेंड. **तैलबुद्धि स्त्री०** एकाद्या विषयाचा अल्प भाग गृहीत झाला असतां त्या सर्व विषयाचें तत्काळ आकलन करण्याचा गुण ज्यांत आहे अशी बुद्धि. **पु०** अशा बुद्धीचा मनुष्य. **तैलाभ्यंग पु०** स्नानापूर्वी तेल अंगाला चोपडणें.

तैवजखर्च [**अ०**] **पु०** पाहुण्यांना पानसुपारी देण्यासंबंधाचा खर्च.

तैष [**अ०**] **पु०** रागाचा उमाळा. **तैषी वि०** रागीट; तापट.

तैसा वि० (कवितेंत) त्या प्रकारचा; त्या जातीचा. **क्रि० वि०** त्या प्रकारें; त्या रीतीनें (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें हें **क्रि० वि०** आहे).

तो तृ० पु० वा० पुल्लिंगी एकवचनी सर्वनाम.

तों, तंव क्रि० वि० त्या काळीं.

तोई स्त्री० तोय; कलाबतू; जरीच्या दालासारखा एक अरुंद पदार्थ,—जो चोळीच्या बाह्यांस शोभेसाठीं लावितात.

तोकडा [**सं०** स्तोक, थोडका, थोडा] **वि०** लांडा; असावा तितका लांब किं० सैल नाहीं असा.

तोख, तोक [**अ०**] **पु०** कुत्रा, इ० च्या गळ्यांतील पट्टा. [आनंद.

तोख [**सं०** तोष] **पु०** १ समाधान. २

तोंगल न० १ भाताचा लोंगर म्ह० फुलांचा समुदाय. २ दागिन्यांत जो लोंबता अवयव असतो तो; लोलक. ❀ **तोंगलबाळी स्त्री०** भोकरबाळी,—स्त्रियांचें एक कर्णभूषण. [पहा.

तोटका, तोटकेकरी पुढें 'तोडगा,' 'तोडगेकरी'

तोटरा, तोठरा पु० अति शुष्क, रूक्ष, किं० तुरट पदार्थ खातांना तो घशाखालीं उतरण्याला होतो तो प्रतिबंध; उ० ह्या डाळ्याचा माझ्या घशांत (किं० घशाला) तोटरा बसला.

तोटा [हिं०] पु० १ नुकसान; बूड; ठोकर (व्यापारादिकांत). २ तूट; विवक्षित परिमाणांत कमीपणा. ३ कागदाच्या नळींत दारू ठेचून भरून आतिषबाजीचा जो पदार्थ करतात तो. ❀ **तोटारोटा पु०** व्यापारादिकांत येतो तो तोटा, बूड, हानि, इ०समुच्चयानें. **तोटयाची बाब स्त्री०** ज्यांत नुकसान होणारच असा व्यवहार.

तोटी स्त्री० १ नळी. २ नळ. ३ चिळकांडी.

तोठरा पु० भाताची परिपक्व दशा; उ० भात तोठऱ्यास आलें.

तोड [म० तोडणें] स्त्री० १ जंगलांतील किं० अन्य ठिकाणचीं झाडे तोडण्याची किं० झाडांची खच्ची करण्याची क्रिया. २ दोन भांडत असलेल्या पक्षांपैकीं प्रत्येकाची कांहीं थोडी मागणी तोडून म्ह० कमी करून त्या दोहों पक्षांना सलोख्याच्या स्थितीस आणण्याची क्रिया, युक्ति, किं० योजना (काढणें, पाडणें); उ०तो पंचवीस मागत आहे, तुम्ही वीस देत आहां, आतां साडे बावीसांवर तोड पाडा. ३ अडचणींतून किं० पेचांतून सुटण्याची कांहीं युक्ति (पाडणें). ४ वरचढपणा; चढाई; उ० ह्या यंत्रावर कोणी तोड करूं शकेल असें मला वाटत नाहीं. ५ अर्धेल्याकडून शेताच्या उत्पन्नाचा खोताला मिळावयाचा जो भाग त्याची खोतानें ठरविलेली जी अभावणी तिचा तपशील. मागें 'अभावणी' आणि 'अर्धेली' पहा. ६ लाकूड इ० चे दोन खंड करावयाचे असतां त्यांचेवर कुऱ्हाड इ० नीं जो छेद करतात तो. ७ ज्याचें एक तोंड किं० दर्शनी भाग चौरस केला आहे असा दगड. ८ नमुना; ठसा; बरोबरीची किं० सदृश अशी वस्तु; उ० हा बैल त्या बैलाची तोड आहे. ९ पदार्थाचा तोडून काढलेला किं० निघालेला भाग. ❀ **तोडीवर येणें** विरोधाचें कारण सोडून टाकून ऐकमत्यास येणें; सलोख्याची योजना मान्य करणें. **तोडीस तोड (देणें, करणें)** बरोबरीचा (ठरणें); जशास तसा (होणें).

तोंड [सं०तुंड] न० १शरीराच्या उपयोगासाठीं अन्नादि द्रव्यें ग्रहण करणारें इंद्रिय. २ शब्दोच्चार करणारें इंद्रिय. ३ चेहेरा; उ० त्याचें तोंड उतरलेलें दिसत आहे, तो नापास झाला असावा. ४ कोणत्याही वस्तूचा पुढचा भाग किं० दर्शन; उ० ह्या घराचें तोंड पूर्वेस आहे. ५ छिद्र; भोक; वाट; वाव; बाहेर पडण्याचा मार्ग; उ० ह्या फोडाला सुईनें तोंड पाड; उ० खिंडीच्या तोंडांतच वाघ बसला होता; उ० ज्वालामुखीचें तोंड. ६ एकादें महत्त्वाचें स्थान,—जें आपण कबज्यांत घेतलें असतां सर्व देश आपल्या कबज्यांत येतो किं० कबज्यांत ठेवितां येतो. ७ एकाद्या शास्त्रांत, विषयांत, किं० कलेंत प्रवेश,—जो झाला असतां पुढें तें शास्त्र, विषय, किं०कला हीं सुसाध्य होतात; उ० व्याकरण हें भाषेचें तोंड होय. ८ वारा इ० ची दिशा. **टीप,**—'तोंड' ह्या शब्दाचे इतर लाक्षणिक अर्थ पुढें वाक्प्रचारांवरून कळून येतील. **कोणत्या तोंडानें ?** येथें तोंड म्ह० धैर्य किं० उजागरी; उ० पुंडरीकानें एका व्यवहारांत मला फसविलें; आतां दुसरा व्यवहार करा असें तो मला कोणच्या तोंडानें म्हणावयाला येईल ? (म्ह० म्हणावयाला त्याला कसें धैर्य होईल ?). **तोंड आटोपणें (किं० आवरणें)** भाषण बंद करणें; बोलण्याला आळा घालणें; जपून बोलणें; उ० तोंड आटोप, जास्त बोललास तर मार खाशील. **तोंड आंबट करणें** असंतोषाची किं० निराशेची मुद्रा धारण करणें. **तोंड आहे कीं तोबरा आहे ?** १ किती खातोस? २किती बोलतोस ? **तोंड उतरणें** तें निस्तेज होणें; तें फिकें पडणें; (लज्जेनें, निराशेनें, आजारानें, उपवासानें, किं० अन्य कारणानें). **तोंड उष्टें करणें** अल्पमात्र आहार करणें. **तोंड करणें, किं० तोंड करून बोलणें** निर्लज्जपणें बोललें; उद्धटपणें बोलणें. **तोंड करून बोलणें** निर्लज्जपणानें किं० आपला दर्जा विसरून बोलणें. **एकाद्याच्या तोंडाला काळोखी आणणें (किं० लावणें)** त्याच्या अपकीर्तीला कारण होणें. **तोंड काळें करणें** निघून जाणें; पळून जाणें (कांहीं निंद्य कर्म करून). **टीप,**—ह्या वाक्प्रचारांतील 'तोंड' हा शब्द वगळला तरी चालतो. **तोंड घालणें** १ मध्यें

बोलणें; उ० ज्यांत त्यांत तोंड घालावयाची तुझी खोडी फार वाईट आहे. २ गाय, शेळी, इ० नीं धान्यादिकांच्या राशींत तें खावयासाठीं मुसंडी खुपसणें. **मध्यें तोंड घालणें** दोन माणसांचें बोलणें चाललें असतां आणि त्यांच्या बोलण्याच्या विषयाशीं आपला कांहीं संबंध नसतां त्यांच्याबरोबर बोलणें. उ० आम्ही आपले घरगुती गोष्टी बोलत आहों, तूं कशाला मध्यें तोंड घालतोस ? **तोंडसुख घेणें** कोणकाला यथेच्छ शिव्या देणें; त्याची खरडपट्टी काढणें; त्याची भोसडपट्टी काढणें. **तोंड चुकविणें** १ आपल्या हातून कांहीं अपराध घडला असतां कोणी आपणास रागें भरेल ह्या भीतीनें त्याच्यापासून दूर असणें किं० त्याच्या नजरेस न पडणें. २ आपण एकाद्याच्या नजरेस पडलों असतां तो आपणास कांहीं कामबीम सांगेल आणि तें आपणास करावें लागेल अशा चुकारतट्टूपणानें त्याच्या नजरेस न पडणें. **एकाद्यावर तोंड टाकणें** १ त्याच्यावर शिव्यांचा वर्षाव करणें; त्याला अद्वातद्वा बोलणें. २ (घोडा इ० नीं)त्याला चावावयासाठीं तोंड पुढें करणें. **कोणेकाचें तोंड दाबणें** (किं०**बांधणें**) त्याला लाच वगैरे भरून तो रहस्य फोडणार नाहीं किं० आपल्यातर्फे बोलेल अशी तजवीज करणें; आपलीं वर्मेंकर्मैं त्यानें प्रकट करूं नयेत म्हणून त्याला पैसे इ० देऊन त्याला गप्प करणें. **तोंड दिसणें** तोंडानें केलेली निंदा लोकांना एकू जाणें (पण ज्याची निंदा केली त्याचें वर्तन सुधारण्याची आशा नसणें किं० त्याचें गैर वर्तन लोकांच्या नजरेस न येणें);उ० मी तुला रागें भरलों म्हणजे तोंड मात्र दिसेल आणि तूं आपला आहेस तसाच राहणार; उ० बोलणाराचें तोंड दिसतें करणाराची कृति मात्र कोणाला दिसत नाहीं. **तोंड देणें** १ पारा इ० कोणेकाला देऊन त्याच्या तोंडाची आंतली त्वचा सुजवून लाळेच्या रूपानें शरीरांतून रोग नाहींसा करणें. २सैन्याच्या अग्रभागीं राहून शत्रूवर हल्ला करणें. ३ प्रतिपक्षी होऊन राहाणें; लढावयाला सिद्ध होणें; उ० मराठ्यांच्या सैन्याला तोंड देण्याची औरंगजेबाची छाती होईना. **तोंड धरणें** १ अन्नसेवन करण्याची तोंडाची शक्ति आजार इ०कारणांनीं नाहींशी होणें; उ० पांडोबाचें तोंड धरलें आहे, त्याला चमच्या चमच्यानें दूध पाजावें लागतें (' धरणें ' अकर्मक). २ कोणेकाची बोलण्याची शक्ति नाहींशी करणें (' धरणें ' सकर्मक). ३ कोणेकाला आपल्या कबज्यांत किं० तावडींत आणणें ('धरणें ' सकर्मक). **तोंड दाबून (किं० धरून) बुक्क्यांचा मार** एकाद्याला विनाकारण बडविणें आणि पुन्हा त्याला कागाळी किं० तकरार करण्याचा मार्गही खुला न ठेवणें; कोणेकाला अन्यायानें वागविणें आणि तो अन्याय तो चव्हाट्यावर आणूं लागला असतां त्याला निर्लज्जपणाणें शिक्षा करणें. **तोंड धुवून या** ही तुमची विनंती मी कदापि मान्य करणार नाहीं.**टीप**,—पुणें शहरीं ' नाकझरीवरून तोंड धुवून या ' असें म्हणण्याचाही प्रचार **आहे. तोंड निपटणें** आजारामुळें किं० उपवासामुळें किं० खाण्यापिण्याची आबाळ झाल्यामुळें गाल खोल जाणें. **टीप**,—येथें ' निपटणें ' अकर्मक.**तोंड पडणें** १ सुरवात होणें; उ० लढाईस तोंड पडलें. २ छिद्र पडणें; उ० ह्या गळवाला तूं डिवचूं नको, त्याला आपल्या आपण तोंड पडेल तेव्हां पडूं दे. **तोंड मातीसारखें (किं०शेणासारखें)होणें** तोंडाची चव नाहींशी होणें. **तोंड विचकणें(किं०पसरणें)** हीनपणानें किं०केविलवाण्या स्वरानें याचना करणें. **एकाद्याचें तोंड पाघळणें** गुह्य गोष्ट त्यानें बोलून जाणें; त्याणें कांहीं रहस्य मूर्खपणानें बोलून जाणें. **एकाद्याचें तोंड पाहाणें** १ त्याच्या आश्रयाची किं० मदतीची अपेक्षा करून असणें; उ० आम्हीं पडलों गरीब म्हणून आम्हाला वारंवार सावकारांचीं तोंडें पाहण्याची पाळी येते. २ त्याचें भाषण नुसतें ऐकणें पण त्याणें सांगितलेलें काम करावयास किं० केलेला बोध अनुसरावयास प्रवृत्त न होतां स्वस्थ बसून राहणें. **आपलें तोंड पाहाणें** आपल्या शक्तीचा अजमास पाहाणें;उ०तूं असें करीन म्हणतोस पण अगोदर आपलें तोंड पहा.**एकाद्याच्या तोंडाकडें पाहाणें(किं० बघणें)** आपल्या अंगीं जो गुण नाहीं तो गुण ज्याच्या अंगीं आहे त्याच्याकडे मत्सरानें किं० विषादानें बघत राहाणें. **एकाद्याचें तोंड फिरणें** १ त्याच्या तोंडाची चव नाहींशी होणें; त्याला अन्नद्वेष होणें. २ त्याच्या तोंडांतून शिव्यांचा वर्षाव होऊं लागणें; उ० जगोबा रागा-

वला म्हणजे कोणावर त्याचें तोंड फिरेल ह्याचा नेम नाहीं. **तोंड फिरविणें** १ शिव्यांचा वर्षाव करीत सुटणें. २ तोंडाची चव नाहींशी करणें. ३ (वितळत असलेल्या धातूनें) रंगाचा फरक दाखविणें. **तोंड फुटणें** १ थंडीच्या योगानें तोंडाची बाहेरची त्वचा खरखरीत होणें किं० भेगाळणें. २ फजीती उडणें; पत नाहींशी होणें; नाचक्की होणें. **तोंड बंदावर राखणें** खाण्याला किं० बोलण्याला आळा घालणें. **तोंड बाहेर काढणें** १ राजरोसपणें समाजांत हिंडणें (कांहीं बदकर्म केल्यानंतर). २ फिरावयासाठीं किं० कामकाजासाठीं घराच्या बाहेर पडणें. **तोंड भरून बोलणें** कोणाची भीड, मुरवत, किं० संकोच न बाळगतां बोलणें किं० आपलें मत सांगणें. **तोंड भरून साखर घालणें** एकाद्यानें उत्तम प्रकारें कांहीं कामगिरी केली असतां बक्षिसादाखल तो खाईल तितकी साखर त्याला खाऊं घालणें. **तोंड माजणें** १ पक्वान्नें किं० चमचमीत खाद्य खावयाची चटक लागणें. २ शिव्या देण्याची खोडी लागणें. **तोंड येणें** तोंडाच्या आंतल्या त्वचेवर कांहीं विकृतीमुळें फोड येऊन ती हुळहुळी होणें. **तोंड रंगविणें** १ एकाद्याच्या थोबाडींत मारून त्याचें तोंड लालभडक करून सोडणें. २ विडा खाऊन ओठ तांबडे लाल करून घेणें. **एकाद्या गोष्टीला तोंड लागणें** तिची सुरवात होणें. **तोंड वाईट करणें** निराशेची मुद्रा धारण करणें. **तोंड वाईट होणें** १ तोंडावर निराशेची मुद्रा येणें. २ तोंडाची चव नाहींशी होणें. **तोंड वाजविणें** बोलत सुटणें; गलागला बोलणें; निरुपयोगी बोलणें; बोलण्याची मेहेनत करणें. **तोंड वासणें** १ निराशेनें किं० दुःखानें तोंड उघडणें आणि तें उघडें ठेवणें. २ याचना करण्यासाठीं तोंड उघडणें. **तोंड वासून पडणें** १ शक्तीच्या क्षीणतेमुळें आ पसरून पडणें. २ सामर्थ्य, उत्साह, तेज, इ० नष्ट झाल्यामुळें लाचार होऊन आ पसरून पडणें. **तोंड हातावर धरणें** शिव्या देत सुटणें. **एकाद्यावर तोंड सोडणें** (किं० **तोंड मोकळें सोडणें**) त्याच्यावर शिव्यांचा वर्षाव करणें; त्याला शिव्या देणें; त्याला अद्वातद्वा बोलणें. **तोंड वेडावणें** एकाद्याला वेडावण्यासाठीं त्याच्यापुढें तोंडें वाकडीं करणें. **तोंड संभाळून बोलणें** जपून बोलणें; भलतेसलते शब्द आपणाकडून न उच्चारले जातील अशी काळजी घेणें. **एकाद्याचें तोंड सुटणें** चराचरा, फडाफडा, किं० अद्वातद्वा बोलण्याची त्याला प्रवृत्ति होणें. **तोंड सोडणें** १ आधाशासारखें खात सुटणें. २ अद्वातद्वा बोलत सुटणें. **टीप**,—' तोंड मोकळें सोडणें ' असाही वाक्प्रचार ह्या दोन्ही अर्थी योजला जातो. **तोंड हातीं धरणें** १ अद्वातद्वा बोलणें. २ आधाशासारखें खाणें. **तोंडचा** (किं० **तोंडींचा**) **घास देणें** वेळ पडल्यास आपण उपाशीं राहून आपलें अन्न त्याला देण्यास सिद्ध असणें म्ह० त्याला अत्यन्त प्रेमानें किं० मायाळूपणानें वागविणें. **एकाद्याच्या तोंडचा घास काढणें** (किं० **हिसकावून घेणें**) त्याच्या चरितार्थाचीं साधनें नाहींशीं करणें. **तोंडचें पाणी पळणें** किं० **तोंडावरचें पाणी पळणें** (किं० **उडणें**) तो भयभीत होणें; तो घाबरून जाणें. **तोंडाचा तोफखाना सुटणें** अद्वातद्वा बोलण्याची क्रिया चालणें; शिव्यांचा वर्षाव सुरू होणें. **तोंडाचा पट्टा सुटणें** (किं० **चालणें**) चरांचरां बोलणें सुरू होणें; शिव्यांचा वर्षाव सुरू होणें. **तोंडाचा पट्टा सोडणें** (किं० **चालविणें**) शिव्यांचा भडिमार सुरू करणें. **तोंडाचा फटकळ** वडील किं० प्रतिष्ठित माणसाची भीड न धरतां किं० त्याची आदबी न राखतां जो बोलतो तो. **तोंडाची गोष्ट नाहीं** नुसतें बोलून असलीं कामें होत नसतात; अमुक गोष्ट मी करीन असें नुसतें म्हटल्यानें ती गोष्ट हातांनीं केली जाते असें नव्हे; उ० वाघ मारणें ही तोंडाची गोष्ट नव्हे. **तोंडाची वाफ दवडणें** निरर्थक, निरुपयोगी, किं० निष्फळ असें भाषण करणें; जें बोलून फायदा नाहीं किं० जें कोणी खरें समजणार नाहीं असें भाषण करणें; उ० तुझ्या उपदेशाप्रमाणें जनार्दन कधींही वागावयाचा नाहीं, मग उगीच तोंडाची वाफ कां दवडतोस? **टीप**,—ह्या वाक्प्रचारांत 'दवडणें' बद्दल ' खरचणें, ' ' गमावणें, ' ' फुकट घालविणें ' व एतदर्थक दुसरींही क्रियापदें वापरलीं येतात. **तोंडांत खाणें** चपराक सोसावी लागणें. **तोंडांत देणें** (किं० **भडकावणें**) चपराक लगावणें; थोबाडींत मारणें. **टीप**,—येथें ' चपराक ' हें कर्म अध्याहृत ठेवलें किं० न ठेविलें तरी

चालतें. **तोंडांत मारून घेणें** नुकसानी सोसून बोध मिळविणें; फजीती झाल्यावर शहाणपण शिकणें; आपल्या हातून चुकी झाली किं० आपण मूर्खपणा केला असें कबूल करणें. **त्याच्या तोंडांत तिळभर रहात नाहीं** तो गुप्त गोष्ट पोटांत ठेवूं शकत नाहीं; गुप्त गोष्ट त्याच्या तोंडांत राहात नाहीं. **त्याच्या तोंडांत तीळ भिजत नाहीं** गुप्त गोष्ट त्याच्यानें गुप्त ठेववत नाहीं; गुप्त गोष्ट तो फटदिशीं बोलून जातो. **तोंडांत तोंड घालणें** मैत्री, प्रेम, दोस्ती, इ० च्या भावानें कोणेकाशीं वागणें. **तोंडांत बोट घालणें** (किं० **घालून राहणें**) आश्चर्यानें चकित होऊन स्तब्ध होणें. **तोंडांत माती पडणें** १ उपास काढावे लागणें. २ मरणें. **तोंडानें पाप भरणें** लोकांचीं पातकें उच्चारणें;लोकांचे दोष तोंडानें बोलून दाखविणें. **तोंडापरीस जबडा थोर** धन्यापेक्षां चाकराचा दिमाख जास्ती. **तोंडापुढें** अगदीं जिव्हाग्रीं. **तोंडापुरता गोड** तोंडावर गोड. **एकाद्याच्या तोंडाला पानें पुसणें** त्याला फसविणें; त्यानें अपेक्षिलेला लाभ त्याला न देणें किं० न मिळूं देणें. **त्याच्या तोंडाला फाटा फुटला** तो मन मानेल तें बोलूं लागला. **तोंडावर** १ डोळ्यादेखत; पाहातां पाहातां; भीड, मुरवत, किं० संकोच न बाळगतां; न कचरतां; निर्लज्जपणानें; धीटाईनें. २ पूर्णपणें पाठ; मुखोद्गत; उ० बारा ज्योतिर्लिंगांचीं नांवें अगदीं माझ्या तोंडावर आहेत. **तोंडाशीं तोंड देणें** बरोबरीच्या नात्यानें बोलणें किं० वागणें किं० व्यवहार करणें. **एकाद्याच्या तोंडावर थुंकणें** त्याची निर्भर्त्सना करणें; त्याची छीथू करणें. **एकाद्याच्या तोंडावरून हात फिरविणें** त्याला फसविणें. **तोंडास तोंड देणें, तोंडाशीं तोंड देणें** आपला हलका दर्जा विसरून जाऊन एकाद्याशीं बरोबरीच्या नात्यानें बोलणें; शेफरटपणानें त्याच्याशीं बोलणें. **एकाद्याच्या तोंडाला काजळी लावणें**, किं० **तोंडाला काळोखी आणणें** (किं० **लावणें**) त्याची बेअाबरू करणें; त्याची नाचक्की करणें; त्याची नापत करणें. **तोंडाला कुत्रें बांधणें** ताळतंत्र सोडून बोलणें; अद्वातद्वा बोलणें; शिव्या देत सुटणें. **त्याच्या तोंडावरचा जार अझून वाळला नाहीं** तो अद्यापि लहान आहे; तो बाल्यदशेंत आहे; त्याला अनुभव नाहीं. **टीप**,–मूल जन्मल्यावर त्याच्या ओठावर आणि तोंडावर जो चिकट आणि बुळबुळीत साका असतो त्याला ' जार ' म्हणतात. **तोंडास खीळ घालणें** १ बोलणें बंद करणें. २ खाणें बंद करणें. **तोंडास येईल तें बोलणें** आपलें बोलणें योग्य आहे किंवा अयोग्य आहे, शाहाण्यासारखें आहे किंवा मूर्खासारखें आहे, याचा विचार न करतां बोलणें. **तोंडास बसणें** किं० **तोंडीं बसणें**, किं० **तोंडाला लागणें** स्पष्ट, बिनचूक, आणि भरभर म्हणतां येणें. **एकाद्याच्या तोंडास लागणें** (किं० **तोंडीं लागणें**) त्याच्या बरोबर हुज्जत करावयाला किं० वादविवाद करावयाला सिद्ध होणें; आपली बाजू योग्य आहे अशी त्याची खात्री करून द्यावयाला सरसावणें. **तोंडासारखें बोलणें** खुशामतीपणानें बोलणें; स्तुति करण्याकरतां बोलणें. **तोंडीं तृण धरणें** किं० **दांतीं तृण धरणें** शरण आलों असें कबूल करणें; मी आपला आज्ञांकित सेवक आहें असें म्हणणें. **तोंडीं देणें** दुसऱ्यांच्या वतीनें कांहीं मागणी किं० विनंती करावयाला वरिष्ठाच्या पुढें त्यांच्यापैकीं एकाला पुढें करणें. **तोंडीं येणें** अगदीं परिपक्व स्थितीस येणें किं० येऊन उपभोगाला योग्य होणें. **तोंडीं लागणें** १ रोकठोक जबाब देणें; उ० तो माझ्या तोंडीं लागला (इ० तो मला रोख ठोक जबाब देऊं लागला किं० तो माझ्याशीं उद्धटपणें बोलूं लागला). २ युद्धाच्या किं० मारामारीच्या आघाडीस असणें; उ० तूं त्या मारामारीच्या तोंडीं लागूं नको, दूर उभा राहून पहा (म्ह० फार पुढें जाऊं नको). ३ आवडूं लागणें; उ० त्याच्या तोंडीं आंबेमोहोराचा भात लागला; त्याला आतां कमोद आवडणार नाहीं. **तोंडीं लावणें** १ विसारादाखल पैसे देणें. २ रुचि पालटविणें; उ० आज तोंडीं लावावयाला भाजी बिजी कांहीं केली नाहीं काय ? **तोंडें सांगितली किंमत** दुकानदारानें सांगितलेली किंमत; ह्याच्या उलट गिऱ्हाइकानें ओढाताण करून उतरविलेली किंमत. **एकाद्याच्या पुढें तोंडें वाकडीं करणें** त्याला वेडावणें

किं० टिवल्या बावल्या दाखविणें. **लहान तोंडीं मोठा घास घेणें** आपला दर्जा न ओळखतां एकादी गोष्ट करणें; आपल्याच्यानें होण्याजोगें नाहीं असें काम करावयास सिद्ध होणें; आपणास न शोभेल अशी गोष्ट बोलणें किं० करणें; आपणाहून श्रेष्ठ अशा माणसाला उपदेश करूं लागणें. **एकाद्याच्या तोंडाला हात लावणें** त्याचें मूर्खपणाचें भाषण बंद करणें. **तुझ्या तोंडांत साखर पडो** आनंददायक खबर सांगितल्याबद्दल तुझें तोंड गोड होओ! शाबास! **त्याच्या तोंडावरची माशी उठत नाहीं** तो बावळट आहे. **तोंडवशीं पडणें** १ जमीनीवर तोंड घासेल अशा रीतीनें पडणें. २ (लाक्षणिक) एकाद्या गोष्टीच्या भरंवशावर कांहीं कृत्य करावयाला उद्युक्त होणें आणि तो भरंवसा अस्थानीं आहे असें आढळून आल्यावर फसगत होऊन फजीतीं पावणें. **टीप,**—वरील दोन्ही अर्थी 'तोंडवशीं पाडणें' असा प्रयोजक भेदही होऊं शकतो. **कोणेकाला ताफेच्या तोंडीं देणें** एकाद्या कामाचे दुष्परिणाम आपणाला बाधक होऊं नयेत म्हणून ते दुष्परिणाम सोसावयाला दुसऱ्यास पुढें सारणें किं० त्याला फसवून पुढें लोटणें. **तोंड नाहीं तोबरा पोट नाहीं नगारा** तो इतका खादाड आहे कीं तो तोबऱ्याप्रमाणें तोंडांत घास भरतो; त्याचा आहार इतका मोठा आहे कीं त्याचें खाणें झाल्यावर त्याचें पोट नगाऱ्याइतकें मोठें होतें. **तोंडओळख स्त्री०** नुसतें एकमेकांनीं एकमेकांना पाहून जी ओळख ती. **तोंडकडी स्त्री०** १ दोन तुळ्यांवर आणि भिंतीच्या बाहेर जें लांकूड असतें, ज्यावर छपराचे वांसे टेकतात तें लाकूड. २ गुरांचें दावें ज्या कडीला बांधतात ती. ३ सरी इ० दागिन्यांची कडेची कडी,—जींत फासा घालावयाचा असतो. ४ जमाखर्चाच्या चोपडींत जमा आणि खर्च यांचा मेळ. **तोंडघडण स्त्री०** चेहेऱ्याची रूपरेषा. **तोंडचाटऱ्या पु०** समर्थाच्या मूर्ख विचारांची तारीफ करणारा. **तोंड देखणा, तोंड देखला वि०** खुशामती (बोलणें, संमति). **तोंडपाटिलकी स्त्री०** १ गलागला बोलणें. २ आपण कांहीं न करतां दुसऱ्याला हुकूम सोडीत असणें. **तोंडपाठ वि०** पुस्तक न पाहातां म्हणून दाखवितां येण्याइतकें उत्तम पाठ असलेलें. **तोंडपिटी स्त्री०** १ मूर्खाला शिकविण्यानें तोंडाला झालेले श्रम. २ वडील माणसानें आपणाला केलेला हुकूम अमलांत न आणतां तो हुकूम योग्य आहे किं० अयोग्य आहे याची वाटाघाट करणें. **तोंडबाग स्त्री०** चेहेऱ्याची घडण. **तोंडचा हिशेब पु०** कागदावर त्रिराशिकें न मांडतां कांहीं आडाख्यांच्या योगानें हिशेब करणें. **तोंडमिळवणी स्त्री०** १ जमा आणि खर्च यांचा मेळ. २ आपल्याजवळ असलेल्या सामग्रींत कार्यविशेष उरकणें. **तोंडसुख न०** १ अमर्याद भाषण. २ कोणेकाला पोटभर शिव्या देणें (त्यानें केलेल्या अपकाराचें पारिपत्य करण्याची ताकद आपल्या अंगा नसल्या कारणानें); क्रि० घेणें. **तोंडाळ वि०** भांडखोर; शिवराळ.

तोडणें [म० 'तुटणें'चें प्रयोजक] **स० क्रि०** १ हत्यारानें किं० अन्य साधनानें किं० केवळ अंगच्या शक्तीनें वस्तूवर तडाखा मारून किं० ताण घालून तिचे दोन खंड करणें. २ अंगावर मुलाला पाजणें बंद करणें. ३ (भांडण) मिटविणें. ❀ **मूल तोडणें** आईनें मुलाला अंगावरचें दूध प्यावयाला उराशीं न धरतां त्याला गायीचें वगैरे दूध घालूं लागणें. **एकाद्याची मैत्री तोडणें** त्याच्याशीं असलेला मित्रत्वाचा संबंध सोडून देणें. **एकाद्या माणसाला तोडणें** त्याच्याशीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवण्याचें सोडून देणें. **एकाद्याचें अन्न तोडणें** त्याला सोसणार नाहीं म्हणून किं० त्याला शिक्षा म्हणून त्याला कमी खावयाला देणें. **एकाद्याचें मीठ तोडणें** त्याच्या चरितार्थाचें साधन दुष्टपणानें नाहींसें करणें. **मानमरातब, सरंजाम, इ० तोडणें** त्यांना फाटा देणें किं० तें कमी करणें. **भांडण तोडणें** उभय पक्षांची समजूत घालून त्यांच्यांत पुन्हा सलोख्याचा संबंध उत्पन्न करणें; त्यांचें वैमनस्य नाहींसें करणें. **ढेकूण, डांस, इ०नीं कोणेकाला तोडून खाणें** त्यांनीं त्याला असंख्य ठिकाणीं दंश करून सतावणें. **कोणेकाला तोडतोडून खाणें** त्याला एकसारखे टोमणे मारणें. **कोणेकाला कांहीं उत्पन्न किं० वस्तु तोडून देणें** अगदीं स्वतंत्रपणें तें वहिवाटण्याजोगें करून देणें. **एकादें घर तोडणें** त्या घरांतील माणसांशीं

कोणत्याही प्रकारचा संबंध न ठेवणें किं० त्यांना आपणाशीं संबंध न ठेवूं देणें.

तोडमोड स्त्री० १ जरूरीच्या वेळीं दागिने, भांडीं कुंडीं, इ०सामान विकून पैसे करणें. २विरुद्ध पक्षांतील प्रत्येकाचें कांहीं कांहीं मागणें कमी करून त्यांच्यांत घडवून आणलेलें ऐकमत्य किं० सलोखा. ३ शेताचा धान्याच्या रूपानें द्यावयाचा ठरविलेला सारा. ४ संसारांतील मोडकें तोडकें रद्दी सामान. **तोडीमोडी स्त्री० अ० व०** कांहीं कामांतील किं० कलेंतील गुण किं० खुब्या.

तोडर पु० पायांतील एक भूषणविशेष. ꙮ **तोडरीं घालणें** कबज्यांत आणणें. **कोणेकाला तोडरीं बांधणें** त्याचेवर अधिकार किं० स्वामित्व गाजविणें.

तोंडली स्त्री० ज्याच्या फळांची भाजी करतात असें एक फळझाड. **न०** त्याचें फळ.

तोडा पु० १ हजार रुपये भरलेली पिशवी. २ हजार रुपये ही रकम.३ बंदुकीची वात.४ सुतळी, दोरी, इ० चा लहानसा तुकडा. ५ मणगटांत किं० पायाच्या घोटयावर घालावयाचें भूषण.६झाडाचीं एका खेपेचीं तोडलेली पानें, फळें, इ० समुच्चयानें. ७ घराच्या किं० विहिरीच्या भिंतीत रिकामी सोडलेली जागा.

तोतया पु० १ लबाडी, फसवणूक. २ आपण अमुक मनुष्य असें खोटें सांगून एकादें स्थान किं० अधिकार किं० फायदा मिळवूं पाहणारा.

तोतरा, तोतळा वि० जिव्हादोषामुळें बोलतांना अडखळतो तो किं० लागतो तो.

तोता [फा०] पु० राघू, पोपट.

तोती स्त्री० अंगाला तेल लावून केलेली अंघोळ (मुलांच्या भाषेत).

तोदा [फा० तोदाह्] पु० ज्यावर बाण किं० बंदुकीचा गोळी मारावयाची तें लक्ष्य.

तोंदेल [सं० तंदिल] वि०ढेरपोटया.

तोफ [हिं० तोप्] स्त्री० खूप मोठी बंदुक. ꙮ **तोफखाना पु०** १ तोफा, बंदुका, इ० ठेवण्याची जागा. २ तोफा समुच्चयानें. ३ (लाक्षणिक) कोणेकावर चालविलेला शिव्यांचा वर्षाव (सोडणें, सुटणें, चालविणें, इ०).

तोफा [अ० तह्फाह] वि० सुंदर, उत्तम. **उ० वा०अ०**ओहो ! बहूत उत्तम ! बहार झाली !

तोबण, तोबत स्त्री० अपराध केलेला नसतां खोटा आरोप कोणेकावर येतो तो.

तोबरा [हिं०] पु० १ घोड्याला दाणा ज्या पिशवींत देतात ती. २ टपालवाल्याची पत्रें वाहून न्यावयाची पिशवी. ३ खाद्यविशेषाचा तोंडांत भरलेला मोठा घास.

तोबा पु० मारावयासाठीं दोरीसारखें वळलेलें धोतर, उपरणें इ०.ꙮ**तोबा उडणें** कहर होणें. **तोबा तोबा उ० वा० अ०** अरेरे ! हाय हाय !

तोमर [सं०] पु०, न० एक शस्त्रविशेष,–हें घुसळण्याच्या रवीसारखें असतें. [पु०मेघ.

तोय [सं०] न० पाणी; उदक. ꙮ **तोयद**

तोय, तोई स्त्री० कलाबतूची विणलेली पट्टी.

तोर [सं० तुवर] न० आंब्याची कैरी. **पु०** आंब्याचा मोहोर.

तोर , तूर स्त्री० धान्यविशेष.

तोरंजन [फा० तुरंज्] न० नारिंगासारखें लिंबाच्या जातीचें एक फळ.

तोरड पु० पुरुषाचें एक पादभूषण. ꙮ **तोरडीं घालणें** जिंकणें; कबजांत आणणें. ‘ तोडर’पहा.

तोरडी स्त्री० स्त्रियांचें एक चरणभूषण.

तोरण [सं०] पु० न० १ शोभेची कमान. २बाहेरचें दार; वेस.३स्नानगृहांतील ओटा.४मोठा तराजू टांगण्याचें तिकटें. ५ उत्सवाच्या दिवशीं घर, सभामंडप, इ० मध्यें आंब्याचे टाहाळे, फुलांचे घोस, इ०दोरींत ओवून बांधतात त्या माळा प्रत्येक. ६ देवाच्या मूर्तीवर किं० होळीवर नारळाच्या किं०खोबऱ्याच्या वाटयांच्या बांधतात त्या माळा प्रत्येक. ७ तराजूचा कांटा ज्या दुवेळक्यांत फिरतो तें.८एक फळ. **स्त्री०**त्याचें झाड.ꙮ**तोरणटका पु०** लग्न, मुंज, इ० प्रसंगीं घातलेल्या मांडवावर बसाविलेला कर. **तोरणवेस स्त्री०**लग्न, मुंज, इ०प्रसंगीं घराच्या दाराशीं केळींचे खांब पुरून त्यांचेवर उभारतात ती कमान.

तोरणें न० राहाटाच्या कनेकडाच्या पुढलें टोंक ज्यावर ठेविलेलें असतें, ज्याच्या खालून बैल फिरतो, तें लाकूड.

तोरप न० आवणी न करतां भाताचें पीक काढतां यावें म्हणून भाजून तयार केलेली जमीन किं० अशा जमीनींतील काढलेलें भाताचें पीक.

तोरमली स्त्री० हलक्या दर्जाचा हिरा.

तोरा [हिं० तोराह] पु० १ ऐट. २ संपत्ति, सौंदर्य, अधिकार, इ० मुळें अंगीं आलेला किं० वर्तनांत दिसणारा गर्व. ॐ **तोरदार** वि० १ ऐटखोर. २ संपत्ति, अधिकार, इ० मुळें उन्मत्त.

तोरें न० कांहीं वनस्पति पाण्यांत उगवलेल्या असल्यामुळें त्या पाण्यांत स्नान करण्यानें किं० तें पाणी पिण्यानें अंगावर उठते ती खरूज.

तोल [सं० तुल्=तोलणें] १ तोलणें, जोखणें, किं० ह्या क्रियेनें ठरलेलें वजन. २ कल; झोक. ३ योग्य वजनानें भरेल तितका पदार्थ देऊन वर जें आणखी कांहीं त्या पदार्थाचें परिमाण गिऱ्हाइकाला देतात तें. ४ दोन पदार्थांचा समतोलपणा किं० बरोबरी किं० अनुरूपता. न० वजनाचा धोंडा किं० लोखंड इ० चा तुकडा. ॐ **तोल देणें** १ क्षमिणें; दुसऱ्याचा अपकार सोसणें. २ दुसऱ्याच्या मताला मान देऊन आपला हेका सोडून त्याच्या इच्छेनुरूप वर्तणें. **तोल लावून चालणें** नखरे करणें; ऐटीनें चालणें. **तोल संभाळणें** आपला झोक न जाईल आणि आपण न पडूं अशी काळजी घेणें. **कोणेकाच्या तोलास तोल देणें** त्याच्या शौर्य, धैर्य, औदार्य, विद्वत्ता, संपत्ति, इ० बाबतींत त्याच्याशीं बरोबरी होईल, ठरेल, किं० दिसेल अशा प्रकारें वर्तणें; उ० आमच्या तोलास तोल देणारा व्याही आम्हाला पाहिजे आहे. **तोलदार** वि० १ वजनदार; प्रतिष्ठित; सभ्य. २ प्रसंग ज्याच्याशीं येईल त्याच्याशीं टक्कर देण्याच्या हिमतीचा, किं० मावार न खाणारा. **तोलदारी** स्त्री० १ कोणेकाशीं बरोबरीच्या नात्यानें वागण्याची हिंमत किं० सामर्थ्य. २ वजनदारपणा; प्रतिष्ठितपणा. **तोलदारीचा हेवा आणि सनकाडीचा दिवा** प्रतिष्ठित माणसाची बरोबरी करण्याची अंगीं धमक नसतां प्रतिष्ठित माणसाच्या प्रतिष्ठितपणाचा मत्सर करणें हा मूर्खपणा होय. **तोलाचा** वि० बरोबरीचा; सारख्या हिमतीचा, दर्जाचा, किं० किंमतीचा; उ० हें मोतीं त्याच्या तोलाचें खास नाहीं.

तोलणें [सं० तुल्] स० क्रि० १ जोखणें; पदार्थविशेषाचें वजन ठरविणें. २ बुद्धीनें पदार्थविशेषाची किंमत, योग्यता, महत्त्व, इ० ठरविणें. ३ एक पदार्थ दुसऱ्या एका पदार्थाच्या बरोबरीचा ठरविणें. ४ (कांहीं काम पत्करून तें) तडीस लावणें. अ० क्रि० १ कलणें, झुकणें; उ० हा खांब पूर्वेकडे तोलला आहे. २ विशिष्ट पदार्थाकडे, मार्गाकडे, किं० सरणीकडे मन आकृष्ट होणें; उ० माझें मन सासवडाकडे तोलतें. ३ झेपणें; उ० भटाला न्यायाधीशाचें काम तोलणार नाहीं.

तोलन [सं०] न० १ वजन करणें. २ उचलणें. ३ दोन पदार्थांत तुलना करणें, किं० तुलना करण्याची क्रिया, किं० ह्या क्रियेनें ठरविलें तें.

तोलींव [म० तोलणें] वि० १ तोललेलें. २ तोलून घेतलेलें किं० ठरविलेलें किं० सिद्ध केलेलें. ३ माफक; परिमित; योग्य प्रमाणाचा.

तोंवर, तोंवरी क्रि० वि० १ तोंपर्यंत; त्या काळापर्यंत. २ तेथपावेतों; त्या स्थळापर्यंत. **टीप**,— 'जोंवर,' 'जोंवरी,' यांचे हे शब्द जाबदार आहेत.

तोंवर पु० ज्यांत अद्यापि आंबटपणा आला नाहीं असा कोंवळा आंबा; कैरी.

तोंवरी, तोवरी स्त्री० १ जिचीं पानें अद्यापि विकसित झालीं नाहींत अशी कोंवळी फांदी; डिकशी (फुटणें, येणें). २ खाऱ्या पाण्यांतील एक मत्स्यविशेष.

तोशीस [अ० तुपूवीष्] स्त्री० १ राजा, चोर, सावकार, इ० चा उपद्रव. २ आपल्यामुळें दुसऱ्याची होते ती गैरसोय किं० दुसऱ्याला लागते ती धस किं० होतो तो उपद्रव किं० पडतात ते कष्ट; (लावणें, लागणें, देणें).

तोशेखाना [फा० तोषाह्+खानाह्] पु० सरकारी खजीना.

तोष [सं०] पु० १ आनंद. २ समाधान, [तृप्ति, तुष्टि.

तोषक [सं०] वि० १ आनंददायक. २ समाधानकारक.

तोषण [सं०] वि० तुष्ट करणारा. न० तुष्ट [होणें.

तोषणें [सं० तुष्=आनंदित होणें] अ० क्रि० संतुष्ट किं० आनंदित होणें.

तोसदान [फा०] न० बंदुकीच्या गोळ्या, दारू, इ० ठेवण्याची पिशवी. २ लवंगा, सुपारी,

सुंठ, इ० पदार्थ ठेवण्याची पिशवी. ❀ **एकाद्याचें तोसदान वाढणें** १ त्याची देवपूजा, जप, इ० प्रस्थ वाढणें. २ तो वैभवास चढणें; त्याची प्रसिद्धि होणें. ३ तो लठ्ठ आणि थिलथिलीत होणें. **टीप,**– ह्या तिन्ही अर्थीं उपहासांत प्रयोग होतो.

तोहमत [अ० तुहमत्] **स्त्री०** १ कोणेकावर ठेविलेला किं० घातलेला खोटा आरोप; आळ; बालंट. २ व्यापारांत बसलेली ठोकर किं० झालेलें नुकसान. ३ दुर्दैवाचा घाला. ४ कांहीं घडलेली दुःखकारक गोष्ट.

तोळंबा [म० तुळा=तुम्ई] **पु०** १ खांब जीवर बसवितात ती उथळी. २ कांहींही लांबलचक आणि जाडी वस्तु. ३ खांबाचें कुसूं बसवावयाचें उथळीचें भोक. ४ लठ्ठ आणि धिप्पाड बाहु किं० मांडी किं० तंगडी. ५ गुटगुटीत किं० गोंडस शरीर. ६ गवंड्याचा ओळंबा.

तोळा [सं० तोल; तोल=तोळा, सोळा मासे] **पु०** बारा मासे हें वजन. ❀**तोळामासा पु० ए० व०** क्षणोक्षणीं तोळ्याचा मासा आणि माशाचा तोळा होण्याची स्थिति म्ह० अत्यंत नाजूक स्थिति (आजाऱ्याची). **वि०** अत्यंत नाजूक (स्थिति, प्रकृति); केव्हां आजारांत चढ होईल किं० उतार होईल हें सांगतां येत नाहीं अशी (स्थिति, प्रकृति). **तोळामासा पाहाणें** क्षुल्लक गोष्टींत लक्ष्य घालणें आणि कोठें खर्च अधिक होत आहे हें पाहाणें.

तौकल, तौकीर (–ल), तौखीर (–ल) मागें 'तवकल,' 'तवकीर' पहा.

तौतुक क्रि० वि० आतांच; नुकताच.

तौरी, तवरी वि० रागीट, तापट, चिरडखोर.

तौल्य [सं० तोल=तराजू] **न०** बरोबरी; सारखेपणा; अनुरूपता.

तौस, तौसें मागें, 'तवशी,' 'तवसें' पहा.

त्यक्त [सं०] **वि०** सोडलेला, टाकलेला. ❀ **त्यक्तजीवित वि०** १ जिवावर उदार. २ जिवाची आशा ज्याणें सोडली आहे असा.

त्यजनीय, त्याज्य [सं०] **वि०** सोडून टाकण्याच्या लायकीचा; त्याग करण्यास योग्य.

त्यजिणें [सं० त्यज्=सोडणें] **स० क्रि०** सोडून टाकणें; टाकणें; फेकून देणें.

त्याग [सं०] **पु०** १ सोडणें; सोडण्याची क्रिया. २ दान; पैसा इ० धर्म करणें. ३ विषयत्याग. ४ औदार्य. ५ गोंधळी, भराडी, डौरकरू, इ० ची बिदागी किं० बक्षिशी. ❀ **त्यागभोग पु०** स्वतः भोगणें आणि दुसऱ्यास भोगावयास देणें. **त्यागाभोगापुरता वि०** स्वतः भोगून दुसऱ्याला दान करण्याइतका (पैसा, संपत्ति, धान्य, इ०). **त्यागपत्र न०** सोडचिठ्ठी.

त्यागणें [सं० त्याग; म०'त्याग'पासून] **स० क्रि०** सोडून टाकणें; वर्ज करणें.

त्यागी [सं० त्यागिन्] **वि०** १ सर्वसंग ज्याणें परित्यागिले आहेत असा; संन्यासी. २ दाता.

त्याज्य [सं०] **वि०** सोडण्यास योग्य; वर्ज्य करण्यालायक.

त्रपा [सं०] **स्त्री०** १ लाज, लज्जा. २ भिडस्तपणा. ३ विनय.

त्रय [सं०] **न०** तीन वस्तूंचा समुदाय.

त्रयी[सं०]**स्त्री०** १ ऋग्वेद, यजुर्वेद, आणि सामवेद, हे तीन वेद समुच्चयानें. २ तीन वस्तूंचा संच किं० समुदाय. ३ कर्मकांड. ४ (**राजनीति**) स्वच्छिद्रगोपन, परच्छिद्रान्वेषण, आणि मंत्रगोपन, हीं तीन कृत्यें समुच्चयानें. ५ पतिपुत्रवती स्त्री. ६ बाप, आजा, आणि पणजा, हे तीन पुरुष समुच्चयानें. ७ आई, आजी, आणि पणजी, ह्या तीन स्त्रिया समुच्चयानें. ❀ **कोणेकाची त्रयी उद्धरणें** त्याला आईबापांवरून शिव्या देणें. **त्रयीमध्यें उगवलेला वि०** चोर, चहाड, आणि शिंदळ जो तो. **त्रयीतनु पु०** १ सूर्य. २ शिव. **त्रयीमुख पु०** ब्राम्हण.

त्रयोदश [सं०] **वि०** १ तेरावा. २ तेरा.

त्रयोदशी स्त्री० महिन्याची प्रत्येक पक्षांतील तेरावी तिथि; उ० धनत्रयोदशी.

त्रस [सं०] **न०** १ प्राणिमात्र. २ लिंगशरीर. ❀ **त्रसरेणु पु०** १ जाळींतून येणाऱ्या उन्हांत दिसणारे रजःकण प्रत्येक. २(लाक्षणिक) पदार्थाचें अत्यल्प परिमाण.

त्रस्त [सं०] **वि०** १ भ्यालेला. २ घाबरलेला. ३ त्रास पावलेला. ४ उद्विग्न.

त्रहाटणें स० क्रि० नगारा इ० कांहीं वाद्य वाजविणें. **अ० क्रि०** (नगारा इ० वाद्य) वाजणें किं० वाजविलें जाणें.

त्रागा पु० १ संतापाच्या लहरींत आपणाला कांहीं दुखापत करून घेणें किं० कांहीं हानि पथ-

करावयाला तयार होणें (करणें). २ दुसऱ्याची कांहीं हानि व्हावी किं० दुसऱ्यावर कांहीं टपका यावा म्हणून स्वताची कांहीं हानि मुद्दाम करून घेणें (करणें). ❀ **त्रागा करणें** आपला हक्क नसतां फुकटच्या फाकट दुसऱ्याकडून पैसे उकळण्यासाठीं स्वताला कांहीं दुखापत करून घेणें.

त्राण [सं०] **न०** १ रक्षण. २ आश्रय. ३ चिलखत. ४ शक्ति, ताकद, सामर्थ्य (शरीर, पैसा, इ० संबंधांत). ५ नेटाचा प्रयत्न (करणें). ६ वापर सोसावयाची ताकद; उ० ह्या धोतरांत कांहीं त्राण राहिलें नाहीं. ❀ **तनुत्राण न०** शरीराचें शत्रूच्या हत्यारापासून रक्षण करणारें कवच. याचप्रमाणें ' जंघात्राण, ' ' पादत्राण ' (पायतण=वाहाणा), ' करत्राण ' इ० चे अर्थ जाणावे.

त्राता [सं० त्रातृ=रक्षण करणारा] **पु०** भय, संकट, इ० पासून रक्षण करणारा.

त्रास [सं० त्रास=भीति] **पु०** १ दुसऱ्याला दिलेला उपद्रव. २ वीट, किळस, अप्रीति. ❀ **त्रास त्रास करणें** जुलमी आणि अन्यायी अधिकाऱ्याविरुद्ध चरफडणें. **त्रास त्रास देणें** अति गांजणें किं० सतावणें.

त्रासणें [म० ' त्रास ' पासून] **अ० क्रि०** कंटाळणें, जर्जर होणें. ❀ **त्रासभूत वि०** उपद्रवकारक झालेला.

त्रासविणें [म० ' त्रासणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** कोणेकाला सतावणें, किं० छळणें.

त्रासिक, त्रासीक[म० त्रास+प्रत्यय]**वि०** १ चिरडखोर; सदा चरफडणारा. २ एकलकोंडा.

त्राहटणें, त्राहाटणें स० क्रि० (नगारा इ० वाद्य) वाजविणें. **अ० क्रि०** (वाद्य)वाजणें.

त्राहि [सं०' त्रै' चें आज्ञार्थी एकवचनी रूप= रक्षण कर] **उ० वा० अ०** माझें रक्षण कर ! मला सोडीव ! ❀ **कोणेकाला त्राहि भगवन् करणें** त्याला अतिशय छळणें, गांजणें, किं० सतावणें. ' त्राहि ' चीं अपभ्रष्ट रूपें ' त्राहे, ' ' त्राय, ' ' त्राह्य. '

त्रि [सं०] **वि०** तीन हीं संख्या. ❀ **त्र्यक्ष पु०** शंकर. **त्रिपथगा स्त्री०** गंगानदी,—जी स्वर्ग, मृत्यु, आणि पाताळ, ह्या तिन्ही लोकीं वाहते. **त्र्यंबक पु०** शंकर. **त्रिकटु न०** सुंठ, मिरीं, आणि पिंपळी समुच्चयानें. **त्रिकर्मी, त्रिकर्मा पु०** ब्राम्हणेतर द्विज. **त्रिकाय पु०** गौतमबुद्ध. **त्रिकोण पु०** १ तीन रेषांची आणि तीन कोनांची आकृति. २ स्त्रीगुह्यांग. **त्रिगण, त्रिवर्ग पु०** धर्म, अर्थ, आणि काम समुचयानें. **त्रिगुण वि०** तिप्पट. **त्रिजगत् न०** स्वर्ग, मृत्यु, आणि पाताळ हे तीन लोक समुचयानें. **त्रिज्या स्त्री०** वर्तुळाच्या मध्यापासून परिघापर्यंत काढलेली रेषा. **त्रितय-न०** कोणत्याही तीन वस्तु समुच्चयानें. **त्रिदंड पु०** १ संन्यास वृत्ति. २ वाणी, मन, आणि शरीर, यांचा निग्रह. **त्रिदंडी पु०**संन्यासी. **त्रिदश पु०** देव. **त्रिदशालय पु०** स्वर्गलोक. **त्रिदिव पु०, न०**१स्वर्ग. २ आकाश. **त्रिदोष न०** वात, पित्त, आणि कफ, या तिहींचा एके काळीं झालेला क्षोभ. **त्रिधा क्रि० वि०** तीन प्रकारांनीं. **त्रिनेत्र, त्रिनयन पु०** शंकर. **त्रिपदा स्त्री०** गायत्री मंत्र. **त्रिपुंड् न०** भस्म इ० चे कपाळावरील तीन पट्ट्यांचें चिन्ह. **त्रिपुर पु०** असुरविशेष. **त्रिपुर न०** त्रिपुरासुराचीं सोनें, चांदी, आणि लोखंड, ह्या तीन धातूंचीं तीन नगरें समुच्चयानें. **त्रिपुरांतक पु०** शंकर. **त्रिपुरुष न०** तीन पिढ्या समुच्चयानें. **त्रिफळा पु०** हिरडा, बेहेडा, आणि आंवळकाठी ह्या तीहींचा समुच्चय. **त्रिमूर्ति वि०** ब्रह्मा, विष्णू, आणि महेश ह्या स्वरूपाचा. **त्रियामा स्त्री०** रात्र. **त्रिलिंग वि०** (व्याकरणांत) विशेषण. **त्रिलोकी स्त्री०** स्वर्ग, मृत्यु, आणि पाताल, हे तीन लोक समुच्चयानें. **त्रिवर्ग पु०** १ धर्म, अर्थ, आणि काम, समुच्चयानें. २ सत्त्व, रज, आणि तम, हे तीन गुण समुच्चयानें. **त्रिवार क्रि० वि०** तीन वेळां. **त्रिविक्रम पु०** वामनावतार; विष्णु. **त्रिविष्टप न०** स्वर्ग. **त्रिवेणी स्त्री०** प्रयाग. **त्रिशूल न०** शंकराचें आयुध. **त्रिशिरा पु०** कुबेर. **त्रिसुपर्ण न०** भोजनापूर्वी म्हणण्याचा मंत्रविशेष. **त्रिस्थळी स्त्री०** काशी, प्रयाग, आणि गया, हीं तीन स्थळें समुच्चयानें. **त्रिस्थळी यात्रा स्त्री०** १ काशी, प्रयाग, आणि

गया, ह्या तीन ठिकाणीं जाऊन केलेली यात्रा. २ एका माणसाला एकाच कामासाठीं तीन ठिकाणीं जाण्याचे कष्ट. मागें 'तिरस्थळी' पहा. **त्रिक** [सं०] **वि०** तिप्पट; ह्या अर्थी 'त्रीक' असाही शब्द आहे. **न०** १ माकडहाड. २ तीन रस्ते जेथें मिळतात तें ठिकाण. **त्रिकांड्या पु०, तिकांडें न०** [**सं०** त्रि (तीन) + कांड (बाण)] 'भरत' ह्या नांवाच्या तारकापुंज्यांतील तीन ताऱ्यांची पंक्ति. मागें 'तिकांडें' पहा. ***त्रिकांड्या बभ्रू पु०** भीमाचा नातू,–याच्या भात्यांत तीनच बाण होते. २ मोठा योद्धा. **त्रिकाल, त्रिकाळ पु०** भूत, वर्तमान, आणि भविष्य, हे तीन काळ. **क्रि० वि०** सकाळीं, दुपारीं, आणि संध्याकाळीं; उ० तूं त्रिकाळ खेळलास तर पास कसा होशील? 'तीन्ही त्रिकाळ' ह्याच अर्थानें योजतात. **टीप,**– हा शब्द पूर्वपदीं येऊन होतात ते समास सहज समजण्याजोगे आहेत. त्रिकालज्ञ म्ह० भूत, वर्तमान, आणि भविष्य काळच्या गोष्टी ज्याला समजतात असा. त्रिकाल–पूजा,–स्नान,–नैवेद्य,–संध्या, स्नायी, इ० इ०इ०. **त्रिकाळीं क्रि० वि०** दुपार टळून फार वेळ गेल्यावर; उ० तिकाळीं तुम्ही भोजन केल्यामुळें तुमची प्रकृति बिघडली. **त्रिकूट** १ तीन शिखरांचा पर्वतविशेष. २ तीन माणसें समुच्चयानें. **त्रिघात पु०** संख्येचा किं० परिमाणाचा घन. **त्रिदळ न०** वनस्पतिशास्त्रदृष्ट्या तीन तुकड्यांचें एक पान. **त्रिरात्रांतला वि०** ज्याचें सुतक तीन दिवस पाळावें लागतें असा (नातलग). **त्रिराशिक, त्रैराशिक न०** आद्यांक (प्रमाण), मध्यांक (फळ), अंत्यांक (इच्छांक), अशीं तीन पदें दिलीं असतां चवथें पद काढण्याची अंकगणितांतील रीति; मागें 'इच्छा' शब्दांत 'इच्छाफल,' 'इच्छांक' पहा. प्रमाणांत असलेल्या चार पदांपैकीं पहिलीं तीन पदें दिलीं असतां त्यावरून चवथें पद काढावयाच्या रीतीस 'त्रैराशिक' असें म्हणतात. **त्रिवली स्त्री० अ० व०** ज्याचें पोट सुटलेलें आहे अशा माणसाच्या पोटाला पडतात त्या तीन वळ्या किं० वळकट्या. **त्रिवाचा स्त्री०** तीन वेळां उच्चारलेली प्रतिज्ञा किं० वचन. **त्रिवार क्रि० वि०** तीन वेळीं.

त्रिविध वि० तीन प्रकारचा. **त्रिविध ताप पु०** आधिभौतिक, आध्यात्मिक, आणि आधिदैविक, असा तीन प्रकारचा ताप, त्रास, किं० दुःख. **त्रिविध नायिका स्त्री० अ० व०** मुग्धा, मध्या, आणि प्रौढा, अशा तीन प्रकारच्या स्त्रिया. **त्रिविध परीक्षा स्त्री०** (वैद्यकांत) दर्शन, स्पर्शन, आणि प्रश्न, अशा तीन प्रकारें केलेली रोग्याची परीक्षा. **त्रिविध प्रारब्ध न०** अनिच्छा प्रारब्ध, स्वेच्छाप्रारब्ध, आणि परेच्छा प्रारब्ध, अशीं तीन प्रकारचीं प्रारब्धें जीं मनुष्याच्या भोगाला येतात तीं समुच्चयानें. **त्रिविध मंगल न०** आशीर्वादरूप, (गुरुजनाचा किं० देवाचा आशीर्वाद घेणें), वस्तुनिर्देशात्मक (पुण्यवान् पुरुषाचें किं० पुण्यकृत्याचें चिंतन), आणि नमस्कारात्मक, (देव, गुरु, यांना नमन करणें) अशा तीन गोष्टी,– ज्या कांहीं मंगलकृत्य करावयाच्या अगोदर कराव्या लागतात. **त्रिवेणीचा वि०** सोनें, चांदी, आणि तांबें, अशा तीन धातूंच्या मिश्रणाचा बनविलेला (सल्ला, अंगठी, वाळा, इ०). **त्रिशती स्त्री०** १ तीन शेकडे समुच्चयानें. २ तीनशें ब्राह्मणांना जेवूं घालण्याचा विधि. **त्रिशुद्ध वि०** तीन वेळां तपासून बरोबर म्हणून ठरविलेला (लेख). **त्रिशुद्धि स्त्री०** तीन प्रकारचीं शुद्धता; तीन प्रकारांनीं केलेला शुद्धतेचा संस्कार.

त्रिवट पु० गायनांतील एक रागविशेष.

त्रुटि, त्रुटी [**सं०**] **स्त्री०** १ अठरा निमेषांचा काळ. २ अणु, लेश. ३ फोडणें, तोडणें, नाश. ५ संशय. ६ लहान एलची.

त्रुटित [**सं०**] **वि०** १ तुटलेला, फुटलेला. २ ज्याचे मधले मधले भाग गळाले आहेत असा (लेख, ग्रंथ, इ०). ३ तुटक (भाषण इ०).

त्रेचाळीस [**सं०** त्रि+चत्वारिंशत्] **वि०** चाळीसांत तीन मिळवून होतें त्या संख्येइतका.

त्रेता [**सं०**] **स्त्री०** १ अग्निहोत्र्याचे तीन पवित्र अग्नि,–दक्षिण, गार्हपत्य, आणि आहवनीय. २ चार युगांपैकीं दुसरें. हीं युगें कृत, त्रेता, द्वापार, आणि कलि. ३ फाशाचा एक डाव.

त्रेधा [**सं०**] **क्रि० वि०** १ तीन प्रकारांनीं. २ तीन ठिकाणीं. **स्त्री०** १ तीन कामांकडे मन खेचलें गेल्याची स्थिति; धांदल. २ घाबरगुंडी.

त्रेपन्न [सं० त्रि+पंचाशत्] वि० पन्नासांत तीन मिळवून होतें त्या संख्येइतका. ॐत्रेपन्न टिकल्यांचा; त्रेपन्नी वि० १ अत्यन्त वात्रट किं० लफंगा (माणूस). २ रंडापुत्र.

त्रेसष्ट [सं० त्रि+षष्टि] वि० साठांत तीन मिळवून होतें त्या संख्येइतका. ॐत्रेसष्टी स्त्री० पतिपत्नी, मित्रमित्र, सेव्यसेवक इ०चा पूर्ण सलोखा.

त्रैकालिक [सं० त्रि+काल] वि० भूत, वर्तमान, आणि भविष्य, या तीन्ही काळा संबंधाचा.

त्रैगुण्य [सं०] न० सत्त्व, रज, आणि तम, ह्या तीन गुणांचा समुच्चय किं० हे तीन समुच्चयानें.

त्रैराशिक मागें ' त्रि ' मध्यें पहा.

त्रैलोक्य [सं०] न० स्वर्ग, मृत्यु, आणि पाताळ, ह्या तीन लोकांचा समुच्चय. ॐ त्रैलोक्य चिंतामणि पु० एक रसायनविशेष.

त्रैवर्गिक [सं०] वि० धर्म, अर्थ, आणि काम साधूं पाहणारा.

त्रैवार्षिक [सं०] वि० १ तीन वर्षें पुरेसें. २ तीन तीन वर्षांनीं व्हावयाचा किं० करावयाचा; तीन वर्षांच्या संबंधाचा.

त्र्याण्णव [सं० त्रि+नवति] वि० नव्वदांत तीन मिळवून होतें त्या संख्येइतका.

त्र्याऐंशी, त्र्यांयशीं, त्र्यायशीं [सं० त्रि+अशीति] वि० ऐंशींत तीन मिळवून होतें त्या संख्येइतका.

त्र्याहात्तर वि० सत्तरांत तीन मिळवून होतें त्या संख्येइतका.

त्र्याहिक [सं० त्रि+अहन् (दिवस)] वि० मध्यें दोन दिवस आड करून येतो तो ज्वर. ॐ त्र्याहिक, त्र्याहिक ज्वर पु० दर चवथ्या दिवशीं येणारा ताप.

त्व नामें किं० विशेषण यांचेपासून भाववाचक नामें घडविणारा हा प्रत्यय आहे. उ० दीर्घत्व, लघुत्व, अश्वत्व, इ०.

त्वक् [सं० त्वच्] स्त्री० १ त्वचा. २ कातडें. ३ फळें, झाडाच्या फांद्या, इ०ची साल. ४ स्पर्शेंद्रिय. ॐ त्वगिंद्रिय न० थंड, कढत, इ० चें ज्ञान ज्या इंद्रियाच्या योगानें होतें तें इंद्रिय. त्वक्क्षीरी, त्वक्सारा स्त्री० वंशलोचन. त्वग्व्रण पु० शरीराच्या कातडीला झालेली विकृति. याच्या व्यावर्तकत्वें ' मांस व्रण, ' ' अस्थि व्रण. ' त्वग्रोग पु० त्वचेला झालेला रोग.

त्वचा [सं०] स्त्री० १ शरीराची कातडी. २ फळ, झाडाचा बुंधा, इ०ची साल. ३ सापाची कात.

[तुझें घर.

त्वत् (समासांत पूर्वपद) तुझा; उ० त्वद्गृह=

त्वदीय [सं०] वि० तुझा.

त्वम् [सं०] सर्वनाम तूं. ॐ त्वंपदार्थ पु० जीवात्मा; उ० त्वंपदार्थ तो जीवात्मा, तत्पदार्थ तो परमात्मा.

त्वंपुरा [सं० त्वम् (तूं)+पुरा (पूर्वी)] पु० शंखध्वनि; बोंब. टीप,—त्वंपुरा सागरोत्पन्नः इ० (तूं पूर्वी सागरापासून उत्पन्न झालेला इ०) ह्या शंखाच्या वर्णनांतील पहिले दोन शब्द घेऊन घडविलेला ' त्वंपुरा ' हा शब्द आहे. आमचे ' मराठी शब्दांचें उद्घाटन ' पान ५७ पहा.

त्वरणें [सं० त्व] अ० क्रि० घाईनें जाणें. स० क्रि० (कोणेकाला) घाई करणें.

त्वरा [सं०] स्त्री० १ घाई, वेग. २ उत्सुकता. ॐ त्वरेवर येणें तडखपणें (कांहीं काम) करूं लागणें; (काम) झपाटणें.

त्वरित [सं०] वि० १ शीघ्र; घाईचा. २ घाई घाईनें केलेला. क्रि० वि० घाईघाईनें.

त्वष्ट [सं० त्वक्ष्=सोलणें; त्वष्ट=सोललेला, तासलेला] वि० सोललेला; तासलेला. पु०, न० कोणेकाला कांहीं कामाबद्दल केलेली घाई; उ० माझ्या मागें हा मांडव उभारण्याबद्दल तुझें त्वष्ट कां म्हणून ? क्रि० लावणें, करणें, लागणें, होणें, देणें.

त्वष्टा [सं० त्वष्टृ] पु० १ सुतार. २ विश्वकर्मा. ३ ब्रह्मदेव. ॐ त्वष्टाकासार पु० हिंदूंच्या कासार जातींतील एक उपजाति किं० त्या उपजातीचा कोणीही इसम.

त्वाच [सं०] वि० १ स्पर्शजन्य. २ स्पर्शानें कळणारा किं० समजणारा. ॐत्वाच प्रत्यक्ष न० स्पर्शेंद्रियानें होणारें ज्ञान. [छळिक.

त्वाष्ट [सं० त्वाष्ट्र=वृत्रासुर] वि० उपद्रवी;

त्वाष्ट्र [सं०] वि० विश्वकर्म्याच्या संबंधाचें. पु० वृत्रासुर.

त्वेष [सं०] पु० १ संताप, रागाची लहर. २ ईर्षा किं० ईर्षेचा उद्रेक. ३ आवेश, स्फुरण. ४ अवसान. मागें ' तैष ' पहा.

त्वेषी [म० त्वेष; सं० त्वेष] वि० १ रागानें जळफळणारा. २ उत्साहाचें स्फुरण ज्याला चढलें आहे असा. ६ रागीट, तापट, मागें ' तैषी ' पहा.

थ

थ हें मराठी वर्णमालेंतील सतरावें व्यंजन.

थकणें अ० क्रि० १ बुद्धि, मन, शरीर, किंवा एकादें गात्र, आपलें काम करावयाला असमर्थ होणें, (आजारानें, किंवा फाजील मेहेनत पडल्यामुळें, किंवा म्हातारपणामुळें). २ दमणें, श्रमणें, भागणें. ३ मति, बुद्धि, इ० कुंठित होणें. ४ व्यापार, व्यवहार, इ० कमी होणें किंवा अजीबात बंद पडणें. ५ व्यापार, व्यवहार, सावकारी, इ० चालवावयाला किंवा पूर्वीप्रमाणें चालवावयाला असमर्थ होणें. ६ म्हातारपणामुळें अगदीं अशक्त होणें. ७ मरणें. ८ (पैसा, कर्ज, इ०) वसूल होण्याची आशा नष्ट होणें; (पैसा, कर्ज, बाकी) बुडणें.☸ **थकणें भागणें** १ अतिशय दमणें किंवा श्रान्त होणें.२ कामाला नालायक होणें. **थकलें कूळ** न० ज्याला कर्ज फेडण्याची ताकद राहिली नाहीं असें कूळ;ज्याला द्यावयाचा पैसा देण्याची ऐपत नाहीं असा माणूस,–ऋणको इ०.

थकित, थाकित, थक्कीत वि० १ आश्चर्यचकित. २ गोंधळलेला; ज्याची मति गुंग झाली आहे असा. खालीं ' थक्क ' पहा.

थक्क वि० आश्चर्यचकित.

थट पु०, स्त्री० १ माणसें, गुरें, इ० ची दाटी किंवा गर्दी किंवा घोळका; जमाव. २ ठाशींव रचना किंवा मांडणी.

थटकारणें [म० ' थट ' पासून] स० क्रि० १ ठाशींव रचनेंत घालणें. २ व्यवस्थित रूपांत मांडणें; नीटनेटक्या रीतीनें (पदार्थ) ठेवणें किंवा (कपडे, दागिने) पेहेरणें किंवा धारण करणें. ३ (कांहीं काम) झपाट्यानें, सफाईनें, किंवा हिमतीनें संपविणें. **अ०क्रि०** नखऱ्यांत चालणें; थाटमाट करून चालणें किंवा वागणें; ऐट करणें.

थटणें अ० क्रि० सजणें; दागिने, कपडे, इ० ऐटींत धारण करणें.

थट्टा, ठठ्ठा [हिं०] स्त्री० १ दुसऱ्यास राग किंवा चीड येईल असें वर्तन किंवा भाषण; टवाळकी (करणें, मांडणें). २ कौतुकाची विनोदार्थ केलेली चेष्टा. ३ अवहेलना. ४ अगदीं क्षुल्लक किंवा हलकें काम (नकारात्मक प्रयोग). उ० वयाच्या सत्तराव्या वर्षी घोड्यावर बसून एका दमांत वीस मैलांची मजल मारणें हीं कांहीं थट्टा नव्हे. ☸**थट्टेवारीं नेणें** तुच्छ मानणें; विचारांत न घेणें; हशावारीं घालविणें; महत्त्वाचा बोध, सूचना, ताकीद, इ० आपण न अनुसरल्यामुळें कोणी आपणास रागें भरूं लागलें असतां निर्लज्जपणानें हसणें आणि बोध, सूचना, ताकीद, इ०हीं न अनुसरल्यानें फारसें बिघडत नाहीं असें दर्शाविणें. **थट्टेबाज, ठट्टेखोर, ठट्टेबाज** वि० थट्टा करण्याचा स्वभाव ज्याचा असा. **थट्टामस्करी, थट्टेबाजी** स्त्री० थट्टाविट्टा; विनोदाच्या गप्पागोष्टी. मागें ' ठठ्ठा ' पहा.

थट्टी स्त्री० राजा, सरदार, संस्थानिक, इ०च्या गायी, म्हशी, इ० दुधादुभत्याचीं जनावरें समुच्चयानें किंवा अशा जनावरांचें खातें किंवा गोठा. **टीप,**–थट्टी हा पूर्वीच्या काळच्या अठरा कारखान्यांपैकीं एक असे. ☸ **कोठी, थट्टी, आणि पागा, ह्या पोट भरायाच्या जागा** ह्या तीन गोष्टींची देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्याला खूप लाट मारतां येतो किंवा आपली तुंबडी यथेच्छ भरून घेतां येते.

थड, थडी [सं० तट] स्त्री० १ कड, कांठ, किनारा. २ दुसरी बाजू. ३ परमावधीचा पल्ला. ४ कामाचा शेवट; पर्यवसान. ५ नदीच्या दोन्ही कांठांच्या शेजारचा प्रदेश; उ० भीमथड, गंगाथड, इ०.☸ **थडीस लावणें** (किंवा **लागणें, जाणें, नेणें,** इ०) शेवटास लावणें (किंवा लागणें, जाणें, नेणें, इ०). **ही थड ना ती थड** १ निराश्रितपणाची स्थिति. २ निकालास न लागलेपणाची स्थिति.

थंड [हिं०] वि० १ उष्ण ह्याच्या उलट गुणाचा; गार. २ जें सेविलें असतां अंगांत उष्ण ह्या गुणाच्या उलट परिणाम घडवितें असें (अन्न, औषध, इ०). ३ सुस्त, धिमा (मनुष्य, स्वभाव, इ०). ४ शांतता जेथें नांदत आहे असा (देश, गांव, इ०). ५ शमलेला, दबलेला, प्रादुर्भूत न झालेला (ताप, कामक्रोधादि कांहीं मनोविकार, इ०). ६ थांबलेलें (काम, कारखाना, छापखाना, इ०). ७ राहावयाला सुखकर (घर); भूत, पिशाच, इ० च्या उपद्रवानें

रहित. ८ षंढ, नपुंसक. ९ कोणत्याही मनोविकाराचा उमाळा थांबून शांत झालेला (मनुष्य, मूल, इ०). ❀ **ताबूत थंड झाले** ताबुतांचें विसर्जन झालें. **यंदा सर्वत्र थंड आहे** यंदा कोठें रोगराई, चोऱ्या, दरवडे, दंगेधोपे, इ०चा उपद्रव नाहीं. **रानडयांच्या घरीं अद्यापि थंड आहे, तुम्हीं इतक्यांत जाऊं नका** त्यांच्या घरचा स्वयंपाक अजून व्हावयाचा आहे, पाट, पानें, रांगोळ्या, इ० तयारी व्हावयाची आहे, तुम्हीं आतां गेल्यास तुम्हाला दोन तास खोळंबावें लागेल. **डोळे थंड होणें** इष्ट गोष्ट घडलेली पाहून आनंदित होणें. **दंगा, महामारी, इ० थंड होणें** म्ह० शमणें. **त्याचे हातपाय थंड झाले** (किं० **पडले**) तो मेला. **थंडगार वि०** अति थंड. **थंड वेळ स्त्री० १** संध्याकाळची किं० सकाळची वेळ. २ मनोवृत्ति शांत आहे अशी वेळ.

थडक स्त्री० डोक्यानें किं० दंडानें दिलेला रट्टा; धक्का.

थंडक [हिं०] न० अंगांत शीतलता उत्पन्न करणारें औषध.

थडकणें अ० क्रि० १ गतिमान् पदार्थाच्या गतीला प्रतिबंध करणारा जो धोंडा, भिंत, इ० पदार्थ त्याचेवर त्या गतिमान् पदार्थानें आदळणें किं० आपटणें. २ एकदम थांबविला जाणें. ३ अकस्मात् किं० एकदम येऊन पोचणें (माणूस, पत्र, इ०). ४ येऊन पोचणें. ५ येणें, उपस्थित होणें, घडणें. ६ हुंडी येऊन दाखल होणें.

थडका पु० रट्टा; तडाखा.

थडगें न० शव पुरल्या जागीं किं० जाळल्या जागीं केलेला रचनाविशेष.

थडथडणें अ० क्रि० थंडी, भीति, इ० कारणांनीं (दांत, शरीर, इ०) कंपित होणें किं० (हात इ०) एकमेकांवर आपटून त्यांनीं आवाज करणें.

थंडा वि० मागें ' थंड ' पहा. **थंडा फराळ पु०** केवळ पाणी पिणें.

थंडाई [म० थंड+आई (प्रत्यय)] **स्त्री० १** थंडपणा. २ सुस्तपणा. ३ शीतलता उत्पन्न करणारें औषध, पेय, इ०. ४ सौम्यपणा. ५ कुसुंबा.

थंडावणें [म० थंड] **अ० क्रि० १** थंड होणें; हवेंतील गारठ्यानें किं० थंडीनें व्यथित होणें. २ मनोविकार शांत होणें. ३ इच्छा, यत्न, काम, इ० मंदपणें चालणें किं० अजीबात नष्ट होणें किं० थांबणें. ४ जलांशानें मऊ किं० बिलबिलीत किं० मिसमिशीत होणें (तंबाखू, पापड, कपडा, कागद, इ०). ५ रडत असलेलें मूल उगी राहणें.

थंडावा [म० थंड] **पु० १** थंडपणा. २ थंडपणाची स्थिति. ३ आग, रखरख, वेदना, शोक, इ० शमल्यानें वाटतो तो आराम.

थंडी [म० थंड+ई (प्रत्यय)] **स्त्री० १** पाणी, हवा, इ० च्या ठायीं शरीरास असह्य जो गुणविशेष असतो तो. २ औषधविशेषाच्या सेवनानें शरीरांतील आग शमून येते ती शांतता. ३ शरीरांतील कडकी किं० रखरख शमविण्याचा जो औषधविशेषांतील गुण तो. ❀ **अंगांत थंडी भरणें** हवेंतील थंडीनें किं० हिंवतापानें अंगाला थंडी वाजणें. **थंडी वाजणें** अंगांतील उष्णतेचा अभाव किं० हवेंतील शीतता शरीरास असह्य होणें. **थंडीचा ताठा पु०** कडक थंडी. **थंडीचें पिल्लूं** थोडीशी थंडी; फार तीव्र नव्हे अशी थंडी; अल्पकाळ टिकणारी थंडी. **थंडीवाऱ्याचा क्रि० वि०** हवेंत थंडी आहे आणि वारा वाहत आहे अशा वेळीं.

थडीचा, थळीचा वि० निकोर मातापितराचें (अपत्य,—गाय, म्हैस, इ०).

थडें न० मागें ' थडगें ' पहा.

थंडोसा [म० थंड] **पु०** हवेंतील प्रखर उष्णता शमल्यावर वाटतो तो आराम.

थंतरमंतर [सं० तंत्र+मंत्र] **न० १** जादूटोण्याचा इलाज; टाणाटोणा. २ घर, झोंपडी, इ० चीं तात्पुरती डागडुजी. ३ कोणेकाचा राग घालविण्यासाठीं चार समजुतीच्या गोष्टी सांगणें किं० त्याला दादा बाबा करणें.

थत्त, थत्त उ० वा० अ० छुट् ! हुडुत ! तिरस्कार किं० तुच्छता दाखविणारा हा उद्गार आहे.

थना [सं० स्तन] **पु०** स्त्रीचा स्तन.

थपकील स्त्री० थप असा आवाज करून एकदम जमीनीवर आसनमांडी घालून बसणें (मारणें, मारून बसणें); फतकल (घालणें, मारून बसणें).

थपडाक, थप्पड स्त्री० चापटी, चपराक. ꙮ **थप्पडखाऊ, थप्पडवाईक वि०** १सदोदित थपडा खाण्याच्या योग्यतेचा, (म्ह० कर्तत्वशून्य माणूस.) २ समर्थाची लाळ घोटणारा.

थपाटी स्त्री० चापटी; चपराक.

थपी क्रि० वि० लांबीची बाजू जमीनीला टेकेल अशा रीतीनें (पदार्थ ठेवणें किं० बसविणें). याच्या उलट ' कुडती ' म्ह० रुंदीची बाजू टेकेल अशा रीतीनें; उ० जोत्याची पहिली रांग थपी लावावी आणि दुसरी कुडती लावावी.

थप्पा, थापा पु० लकारी लोकांच लाखेच्या कड्या, बांगड्या, इ० पदार्थ करण्याचें एक आउत.

थबकट (–ड,–डा) वि० चपटा; बसक्या बाटाचा. ꙮ **थबकट (–ड,–डा) बसणें** एकदम आसनमांडी घालून बसणें.

थबकड स्त्री० थप्पड, रट्टा, चपराक.

थबकण स्त्री० एकदम आसनमांडी घालणें (मारणें, घेणें).

थबकणें अ० क्रि० थांबणें; गति बंद करून स्तब्ध होणें; बोलणें एकदम थांबविणें; हालचाल एकदम बंद करणें.

थबकविणें स० क्रि० थांबविणें; आडविणें.

थबडाक, थबराक स्त्री० थप्पड; चपराक.

थबथबणें अ० क्रि० १ पाणी इ० नीं पूर्णपणें भरलेलें असणें. २ थेंब गळण्याइतकें भिजलेलें असणें.

थबथबीत वि० थेंब गळण्याइतकें भिजलेलें.

थमणें [सं० स्तम्भ्] अ० क्रि० थांबणें.

थमन [सं० स्तंभन] न० शारीरिक किं० मानासिक दुःखाचें शमन किं० शमन करणारें औषध, इलाज, साधन, उपाय, इ०.

थयकार, थयथय्या, थयथय्याट, थय्या पु० १ नाचणें, उड्या मारणें, खिदळणें, हसणें, गाणें, इ० रंगेलपणाचे प्रकार समुच्चयानें. २ चित्तविनोदार्थ करविलेली वेश्यादिनृत्यरूप जी क्रीडा ती. ३ शारीरिक किं० मानसिक दुःख असह्य झाल्यामुळें जमीनीवर गडबडा लोळणें, किंचाळणें, इ० रूप जो व्यापार तो; उ०हा विंचू तुला चावला असता तर त्यानें तुला थयथय्या करावयाला लाविलें असतें. ꙮ **थैय्या घेणें** १ हातांपायांत किं० कमरेला बांधलेलें घुंगरें इ० खणखणावीत नाचणें. २ (लाक्षणिक) नेटाचा प्रयत्न करणें; सर्व शक्ति वेचून कांहीं काम चालविणें. ३ अधीरपणानें किं० आनंदानें नाचणें.

थयथय्या, थयथय क्रि० वि० आनंदानें, दुःखानें, किं० अधीरपणानें (नाचणें, वागडणें).

थयमान न० रागानें, वेदनेनें ,किं० अधीरपणानें नाचणें, लोळणें,किं० ओरडणें.

थर [सं० स्तर] पु० १ भिंत इ०ची रचना करावयाची असतां दगड, विटा, इ०ची जी एक एक पंक्ति करीत जातात ती;अशा एकावर एक पंक्ति रचून भिंत इ०इष्ट तितक्या उंचाची बांधली जाते.२शेण,माती,चुना, रंग,इ०चे पदार्थविशेषावर जे लेप करण्यांत येतात ते प्रत्येक. ३आंबे इ० फळें पिकवावयाचीं असतां तीं जमीनीवर पसरलेल्या गवतावर नीट एक एक अशीं ठेवतात, मग ह्या फळांवर पुन्हां गवत पसरतात,पुन्हा त्यावर फळें ठेवितात, पुन्हा त्यांवर गवत पसरतात; ह्या रचनेंतील फळांचा किं०गवताचा जो एक एक संनिवेश (म्ह० मांडणी) तो. ४ भूगर्भांत एकावर एक जे दगडी कोळसा, वाळू, चिकणमाती, इ० चे संनिवेश असतात ते प्रत्येक; पदर; उ० ꙮ (एकादी गोष्ट) **असुक थरास येणें** (किं० **जाणें**) ती त्या पल्ल्यास किं०पर्यवसानास पोंचणें. **पुणेंथर** (किं० **मुंबईथर**,किं० **सातारा थर** इ०) पुणें (किं० मुंबई, किं० सातारा इ०) ठिकाणचा, प्रकारचा, जातीचा, वर्गाचा, किं०तऱ्हेचा. **ब्राम्हणथर**, (किं० **कुणबीथर** इ०) **वि०** ब्राम्हणांना (किं० कुणब्यांना) शोभेल असा किं० त्यांच्यांत रूढ किं० प्रचलित असा (कपडा, सणंग,चाल,इ०).**काळेथर वि०**काळोत्री दगडाच्या जातीचा. याच सरणीनें जांबेथर, कुपेथर, इ०. मागें ' कुपा, ' ' जांबा ' हे शब्द पहा. **लग्नीनथर वि०** लग्नाच्या सदरांतला किं० संबंधाचा (कपडा, खर्च, इ०).

थरकणें अ० क्रि० कंपित होणें, कांपणें. ꙮ **थरकांप पु०** भीतीनें किं० थंडीनें कंपित होणें. **थरकांप वि०, क्रि० वि०** अंग कंपित होईल अशा रीतीनें;उ०मीं थरकांप भ्यालों(किं०झालों).

थरणी [म० थर] **स्त्री०** शेत इ० च्या बांधासाठीं घातलेल्या दगड इ० च्या भिंतीवर घातलेला मातीचा थर.

थरथरणें अ० क्रि० हालणें, कांपणें, डळमळणें.

थरथरी स्त्री० रोमांचसहित कंप.

थरपील न०, थरपा पु० ताड, माड, इ०च्या झावळीचा बुडखा.

थरभरें न० आंबोशी नांवाचें झुडूप. याच्या पानांची चटणी करितात.

थरारणें अ० क्रि० कंपित होणें.

थरारी स्त्री० कंप; कंपितपणाची स्थिति.

थरू पु०, थरूं न० [सं० त्सरु] कोयता इ०ची मूठ.

थल [सं० स्थल] **स्त्री०** शेताच्या उत्पन्नाचा हिस्सा किं० वाटा.ꣳ **थलकरी पु०**शेताचा किं० जमीनीचा मालक. याच्या उलट ' उपरी. ' **थलझाडा पु०** एकाद्या गांवाच्या लोकांच्या मालकीच्या शेतांचें पत्रक.

थलथलीत वि० १ फार पिकल्यामुळें किं० अतिशय भिजल्यामुळें ज्यांत कांहीं टणकपणा राहिला नाहीं असा(पदार्थ,–फळ,गळूं,पीठ,चिखल, इ०). २ लठ्ठ असून फुसफुशीत (शरीर). **टीप,**– ह्या दोन्हीं अर्थीं 'थिलथिलीत'असाही शब्द आहे.

थवा पु० एके ठिकाणीं जमलेल्या एकजातीय प्राण्यांचा समुदाय; टोळी; जमाव.

थवीक स्त्री० १ कौशल्य; खुबी. २ चातुर्य.

थळ [सं० स्थल] **न०** १ ऊस, मिरची, पोफळी, इ० चें शेत, मळा, किं० बाग. २ पिशाचाचें निवासस्थान. ३ व्यक्तिविशेषाचें किं० पदार्थविशेषाचें उत्पत्तिस्थान किं० निवासस्थान. ४ अर्धेल्याकडून खोताला दिला जावयाचा शेताच्या उत्पन्नाचा हिस्सा. ५ एका मालकाचीं शेतें, मळे, बागा, इ० समुच्चयानें. ६ शेतासंबंधाचे तंटे तोडावयाला नेमलेला मनुष्य (नेमणें, घेणें, देणें,मागणें,इ०).ꣳ**थळझाडा,थळवार झाडा पु०, थळवार पत्रक न०**गांवच्या जमीनींचें नोंदणीपत्रक. **थळभरीत न०** १ एकादे स्थळीं माल विकत घेऊन तो वाहून परत नेण्यासाठीं गाड्या इ० वर लादणें. २ खरेदीच्या स्थळींची जकात; निर्गत मालावरील जकात. **थळमोड स्त्री०** १ स्थळविशेषीं माल विकणें. २ आयात मालावरील जकात. ३ सैन्य इ० नीं एकाद्या ठिकाणचा मुक्काम उठविणें. **थळवडी, थळवाडी स्त्री०** धान्यें झोडपावयाची गांवकऱ्यांची जागा. **थळवाईक** उसाच्या मळ्यांचा मालक.**थळवार क्रि० वि०** शेतकऱ्यांच्या शेतांच्या क्रमानें (केलेलें वसूलपत्रक).**कुळवार क्रि० वि०** कुळांच्या क्रमानें (केलेलें वसूलपत्रक). **थळाचा वि०** उत्तम निपजीचा (घोडा, गाय, म्हैस,इ०).

थळणें स० क्रि० १ पत्रा, तबकडी, इ० वर कोरून, ठोकून किं० विंधून (कांहीं आकृति) उठविणें. २(पत्रा, तबकडी, इ० अशा रीतीनें) आकृतिविशेषानें युक्त किं० अंकित करणें.

थळी स्त्री० ' थळ ' पहा.

थळींव [म० थळणें] **वि०** १ ज्यावर कांहीं आकृति थळविण्यांत आली आहे असा (पत्रा, तबकडी). २ थळण्यानें उठविलेली (आकृति).

था [हिं०] **स्त्री०** बूड; तळ.

थाक स्त्री० १ गोंधळलेला; व्यग्र; चकित. २ गायनवादनांत पडलेला खंड(तुटणें). **पु०** १तळ, बूड. २ थकवा. ३ थांग. खालीं ' थांग ' पहा.

थाकणें अ० क्रि० दमणें; भागणें.

थाकी स्त्री० एकाद्या माणसाची बोलण्याची, हसण्याची, किं० चालण्याची पद्धति किं० शैली. ꣳ **एकाद्याची थाकी उतरणें** त्याच्या बोलण्याचालण्याची शैली इ० चें अनुकरण करणें.

थांग [सं० स्थान] **पु०** १ पत्ता.२हरवलेल्या किं० जरूर अशा माणसाचा किं० वस्तूचा नक्की पत्ता किं० ठिकाणा. ३ खोली, गहनता, विस्तार (एकाद्याच्या विद्वत्तेचा, विचारांचा, व्यूहाचा, संपत्तीचा); **क्रि०** लागणें, लावणें. ꣳ **थांगदोरा, थांगादोरा, थांगपत्ता, थांगापत्ता पु०** पत्ता (सर्व अर्थीं).**थांगपूस पु०,स्त्री०** एकाद्या वस्तूच्या किं०माणसाच्या ठिकाणाचा शोध किं०तपास किं० चौकशी; सुगावा (लावणें,लागणें).

थांगारणें [म० थांग] **स० क्रि०** १ व्यवस्थित रीतीनें (पदार्थविशेष) ठेवणें.२ यथास्थानीं (पदार्थ विशेष) ठेवणें. ३ (मोडका, फाटका, किं० खिळखिळा पदार्थ) दुरुस्त करणें. ४ (पदार्थविशेष) कोणेकाच्या हवालीं करणें किं० स्वाधीन करणें किं० रक्षणार्थ ठेवणें.

थाट [हिं० ठाठाह्] **पु०** १ दागिने, कपडे,

इ० शरीरावर नीटनेटकेपणानें धारण करून केलेला भपका, ऐट, किं० शोभा. २ व्यवस्थितपणाच्या मांडणीनें किं० रचनेनें पदार्थविशेषास येते ती शोभा. ३ डामडौल. ४ वैभवाचा देखावा. ५ छपराच्या कामट्या कांहीं विशिष्ट प्रकारें एकमेकींशीं बांधून केलेली रचना; छपराचा सांगाडा. ह्या थाटावर गवत, पानें, इ० बांधून तो झोपडीवर चढविण्यांत येतो. ६ टोळी, ताफा, संच. ॐ **थाटमाट, थाटमांड पु०** १ भपकेदार मांडणी किं० रचना. २ भपका; कृत्रिम मांडणीनें आणलेली शोभा. **थाटबंद पु०** छपराचा सांगाडा.

थाट वि० १ घट्ट विणीचा (कपडा);ठाशीव विणीचें (वस्त्र). २ घट्ट पिळाची (दोरी). ३ मजबूत बांध्याचा(प्राणी).४धोपटमार्गी(माणूस).

थाटणें [**म०** थाट] **स० क्रि०** १ व्यवस्थित रीतीनें मांडणें किं० जथणें. २ योग्य ठिकाणीं पदार्थ ठेवून भपका करणें. ३ प्रथम करावी लागते ती जुळवाजुळव करून (संसार, दुकान, धंदा, इ०)सुरू करणें; उ० त्याला नोकरी लागतांच त्याणें आपला संसार थाटला. ४ जुळविणें, रचणें(बेत,मसलत,युक्ति, कांहीं कार्य, इ०).

थाटली स्त्री० १ धातूचें ताट. २ कोणत्याही पदार्थाचें केलेलें पसरट पात्र;ताटली.मागें'ताट'पहा.

थाटा पु० कारवीची जून जाडी काठी.

थाटी स्त्री० १ एक प्रकारचें धातूचें उथळ भांडें; ताटली. २ दाटी; थवा;टोळी. [केलेली वडी.

थाण,थान न० विणलेल्या वस्त्राची न फाडतां

थातूं मातूं, थातुर मातुर [**सं०** तंत्र मंत्र] **न०** १ टाणाटोणा. २ कामचलाऊ डागडुजी.

थान [**हिं०** ठान्] **न०** रेशमाचें किं० सुताचें विणलेलें (अखंड) वस्त्र.

थान [**सं०** स्थान] **न०** १ पदार्थविशेषाची जागा. २ गात्रांचें संस्थान;ठाण.ॐ **थानमान पु०** १ सत्कार; कोणाला दाखविलेली आदरातिथ्याची वागणूक. २ थाटमाट.

थान [**सं०** स्तन] **न०** १ स्त्रीचे छातीवरील जे दोन मांसपिंड ते प्रत्येक,—ज्यांतील दूध तान्हें मूल पितें. २ गाय, म्हैस, शेळी, इ० चें आंचोळ. ॐ **थान गुंतणें** कांहीं आजारामुळें स्त्रीच्या स्तनांतून दूध येण्याचें बंद पडणें. **थान देणें** मूल पाजावयाला उराशीं धरणें. **थान विसरणें** मातेचें दूध चोखून घेणें ही क्रिया (मूल, वासरूं) करावयाला असमर्थ असणें किं० ही क्रिया त्याला करतां न येणें. **थानकरीण स्त्री०** मुलास आपल्या अंगावर पाजणारी दायी. **थानतुटा, थानतुटक वि०** १ मातेच्या थानापासून तुटलेलें किं० तोडलेलें (मूल). २ स्तनपानासाठीं दायीच्या हवालीं केलेलें (मूल). **थानमोड स्त्री०** मातेच्या स्तनाचें पान बंद करणें; दायीच्या अंगावर मुलाला पाजणें. **थानवा पु०** तान्हें मूल; मातेच्या किं० दायीच्या अंगावर दूध पिणारें किं० दूध पिण्याच्या वयाचें मूल. **थानसीथनी वि०** स्तनाच्या जागीं स्तनासारखा कांहीं अवयव असलेला (घोडा). **टीप,**—घोडा हा खरा नर मानला जातो.

थाप स्त्री० १ चापटी. २ तळहाताचा प्रहार. ३ सर्व बोटें ताणून किं० लांब करून केलेला तळहाताचा प्रहार. ४ मृदंगादि वाद्यावर हाताचा प्रहार. ५ लाटांचा खडकावर किं० गलबतावर जो प्रहार किं० तडाखा तो. ६ समुद्राचें पाणी जमीनीवर येऊं नये म्हणून घालतात ती भिंत; धक्का; बंधारा.७ कोणेकाला फसविण्यासाठीं किं० गमतीखातर सांगितलेली खोटी खबर(देणें,मारणें,झोकणें). ८ दुसऱ्यावर आपल्या अंगच्या वरचढ गुणामुळें स्थापित होतें तें वर्चस्व. ९ गाणाऱ्याच्या किं० वाद्याच्या सुराशीं धरलेला ताल,—जो हाताच्या थापटीनें दाखविला जातो. १० पोहोतांना पाण्यावर हातानें मारलेला तडाखा. ११ मृत्तिकापात्राची घडण किं० तऱ्हा. १२ कांहीं कामासाठीं कुटून, भिजवून, आणि मळून तयार केलेली माती. ॐ ॐ**थापझिरा, थापझरा,थापविहिरा पु०**हाताच्या बोटांनीं नदीच्या वाळवंटांतील वाळू उकरून काढून स्वच्छ पाणी त्यांत झिरपून येऊन साठण्यासाठीं केलेला खळगा.

थापट, थापड [**म०** थापटणें, थापडणें] **स्त्री०** हातानें मारलेला तडाखा.ॐ**थापट उगारणें** थापट मारण्यासाठीं हात ताणणें किं० लांब करणें. **थापडवाईक, थाबडवाईक, थाबाडवाईक** [**म०** थापड] **वि०** १ सदा थापट्या खाण्याच्या लायकीचा म्ह०अजागळ. २ समर्थाचा बगलबच्चा.

थापटणें,थापडणें स०क्रि० १ पदार्थविशेषावर

हाताचा प्रहार करणें; कोणत्याही साधनानें कोणत्याही पदार्थावर प्रहार करणें. २ मुलाला निजवावयाचें असतां त्याच्या अंगावर सौम्यपणें तळहात मारणें; थोपटणें. ३ रागावलेल्या माणसास सौम्य शब्द बोलून शांत करणें. ४ बैल, घोडा, इ० वर खोगीर, कंठाळ, लगाम, इ० चढवून त्याला कामाला किं० प्रवासाला सज्ज करणें.

थापटणें, थापडणें न० ओल्या मडक्यांना दृढ करण्यासाठीं किं० आकारविशेष देण्यासाठीं त्यांच्यावर प्रहार करावयाचें एक आउत; हें सपाट फळीच्या रूपाचें असतें.

थापटी, थापडी [म० थापट, थापड] **स्त्री०** १ हाताचा रट्टा किं० तडाखा; चपराक. २ जमीनीवर शेण हातानें थापटून केलेली गोवरी. ३ पंतोजीची मुलांना शिक्षा म्हणून मारावयाची छडी. ४ गिलावा किं० सनल्याचा थर दृढ करण्यासाठीं आपटावयाचें लाकडी आणि तीन धारांचें एक आउत. ५ पदार्थाला सरकारच्या हुकमानें बांधलेली पट्टी किं० तुकडा,—त्या पदार्थाला कोणी हात लावूं नये हें सुचविण्यासाठीं.

थापटींव, थापडींव [म० थापटणें, थापडणें] **वि०** थापटून केलेला (पदार्थ,—गोंवरी, भाकरी, रोठ, इ०).

थापड, थापडणें, थापडींव मागें 'थापट,' 'थापटणें,' 'थापटींव' पहा.

थापडी स्त्री० तळहाताचा प्रहार; चपराक; रट्टा.

थापणें स० क्रि० १ चिखल, शेण, इ० चा गोळा भिंत, जमीन, इ० कांवर चिकटून बसेल अशा रीतीनें तो त्यांचेवर जोरानें मारणें. २ पीठ, कणीक, शेण, इ० चा ओला गोळा हाताच्या प्रहारानें बडवून त्याला भाकरी, पोळी, गोवरी, इ० चें रूप देणें. **टीप**,—ह्या दोन्ही अर्थीं 'थापणें' याचें कर्म शेण, पीठ, इ० होऊं शकतें तसें बनलेला पदार्थही कर्म होऊं शकतें; उ० शेण थापणें, गोवरी थापणें, पीठ थापणें, भाकरी थापणें, इ०. ३ कोणेकाला प्रेमानें सौम्यपणें थापट्या मारणें.

थापलणें स० क्रि० १ अवजारांवर चालत असलेलें गलबत इ० वल्ह्याचे कांहीं हात मारून विशिष्ट दिशेस वळविणें. २ गलबताची नाळ वल्ह्यानें विवक्षित दिशेस वळविणें.

थापा पु० १ मातीचीं ढिकळें फोडावयाचें एक आउत. २ शेण, माती, इ० चा गोळा, भिंत, जमीन, इ० वर जोरानें मारला असतां त्याला येतो तो आकारविशेष. ३ असा मारलेला गोळा. ४ लाखेच्या बांगड्या बनविण्याचें लकारी लोकांचें एक आउत. ४ सर्पणासाठीं थापलेल्या शेणाची चरच्या आकाराची वडी; गोवरी; शेणी. ५ डोंगरांच्या माथ्यावरील किं० कुशीवरील सपाट प्रदेश. ॐ**माणसें, जनावरें, इ०चा थापा वळणें** त्या सर्वांनीं एकदम आजारी पडणें किं० मरणें. **थापाथापी स्त्री०** खोट्या नाट्या गोष्टी किं० गोष्टी सांगणें.

थापी [म० थापणें] **स्त्री०** १ गवंड्याचें करणी हें हत्यार. २ गिलावा दृढ करण्यासाठीं त्याचेवर ठोकावयाचें गवंड्याचें एक आउत. ॐ**थापी कौल न०** हातानें चिखल विशेष प्रकारें थापटून केलेलें कौल; 'नळयाचें कौल' हें दुसऱ्या प्रकारचें कौल. **थापीचें माप न०** धान्य मोजण्याची एक रीति,—मापांत धान्य शिगेपर्यंत भरून आणि ओंजळींत पडणारे दाणे ह्यांसहित जें धान्याचें माप तें.

थाबडें न० बारदान; यांचा प्रयोग फक्त पुढील प्रमाणें होतो. **आपलें थाबडें भरणें** (किं० **भरून घेणें**) दुसऱ्याचा पैसा इ० जितका लाटतां येईल तितका लाटून स्वस्थ होणें किं० गबर होणें.

थाबणें वर 'थापणें' पहा.

थांबणें, थामणें [सं० स्तंभ्=थांबणें] **अ० क्रि०** १ (सुरू केलेली किं० झालेली क्रिया) बंद पडणें किं० बंद होणें. २ सुरू केलेल्या कामापासून विरत होणें. ३ स्तब्ध होणें; चालतांना उभें राहाणें; बोलतांना किं० गातांना खळणें. ४ मुक्कामाला राहाणें.

थांबविणें [म० 'थांबणें' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ थांबावयाला लावणें. २ बंद पाडणें. ३ स्तब्ध करणें. ४ (कोणेकाचें बोलणें, चालणें, इ० व्यापार) आडविणें.

थाया [म० ठाय=स्थान, जागा] **पु०** १ पाणी, दूध, रक्त, तेल, इ० चें थारळें. २ असंतुष्टपणानें किं० वेदनेनें किं० दुःखानें हातपाय आपटणें, जमीनीवर गडबडा लोळणें, इ० रूप व्यापार (घेणें, घेऊन बसणें, करणें, मांडणें). ह्या दुसऱ्या अर्थीं 'थैय्या' हाही शब्द रूढ आहे.

थार पु० १ विश्रांतीची किं० निवाऱ्याची किं० वास्तव्याची जागा. २ माणूस, पदार्थ, इ० ना टेकावयाची, अल्प काल वास्तव्य करावयाची, किं० रहावयाची जागा. ३ भाषणवर्तनादिकांत मेळ किं० संबद्धता; ताळतंत्र. (बहुधा निषेधार्थी प्रयोग); उ० त्याच्या बोलण्या करण्यांत कांहीं थार नाहीं. ४ कर्जाऊ दिलेल्या रकमेस तारण; व्यापारांत घातलेल्या भांडवलाच्या तोलाची गंगाजळी; उ० तुला मी कशाच्या थारावर कर्ज देऊं ? ५ पत, साखी; प्रमाण; भरंवशाला आधार. ॰ **थारीं बसणें**(किं० **पडणें**) कायमच्या स्थानी येणें; यथास्थानीं बसणें किं० राहाणें; स्वस्थान पावणें. **एकाद्याचें मडकें थारीं बसणें** तो विपद्घोर स्थितींत असणें.

थार क्रि० वि० (कवितेंत) पूर्णपणें; सर्वथैव.

थारणें अ० क्रि० स्थिर होणें; स्थिरपणें राहाणें; टिकून राहाणें; पक्केपणीं माणूस किं० पदार्थ एकाद्या ठिकाणीं राहाणें किं० पक्का होणें.

थारळें, थारोळें न० १ राहाटाच्या जवळची कुंडी किं० हौद. २ जमीनीवर सांडलेलें किं० गळलेलें रक्त, दूध, पाणी, इ० चा रवरबाट. ३ दूध तापविण्यासाठीं जमीनींत केलेला खळगा. ४ गुऱ्हाळांत काहिलीखालची राख सांचावयाचा खड्डा.

थारा पु० १ आश्रयस्थान; सुरक्षित असें वास्तव्याचें ठिकाण. २ शत्रूला टाळावयाला योग्य असें स्थान. ॰ **थाराथार** स्त्री० माणसांची किं० पदार्थांची व्यवस्थितपणाची मांडणी, रचना, किं० विल्हेवाट. **थारापालट, थारपालट** पु० नेहमींचें निवासस्थान सोडून मनाला हुशारी वाटण्यासाठीं कांहीं दिवस दुसरीकडे राहणें (करणें, होणें).

थारावणें अ० क्रि० स्थिर होणें; स्थिरपणानें एकाद्या ठिकाणीं राहाणें किं० कायम होणें.

थारोळें न० वर ' थारळें ' पहा.

थाली[**सं०**स्थाली]**स्त्री** ०उथळ आणि रुंद असें एक पात्रविशेष; थाळा; परात. ॰ **थाली ठावकें न० ए० व०** संसाराला लागणारीं भांडीं समुच्चयानें. **थालीपीठ न०** भाजणीच्या जाडी थापट्या,—तव्याला तेल लावून त्या भाजून काढतात त्या प्रत्येक.

थावर पु० तेल तापवावयाचें मूठ किं० दांडा असलेलें भांडें; पळा.

थावरणें [**सं०** 'स्थावर' पासून]**अ० क्रि०** १ आजारांतून, विवंचनेंतून, किं० संकटांतून बचावून किं० निभावून पूर्वस्थितीवर येऊन शांत होणें किं० आराम पावणें. २ एकाद्या ठिकाणीं बाहेरून येऊन कायमपणें राहूं लागणें. **स० क्रि०** १ कोणेकाला स्थिर करणें. २ स्वतःला किं० दुसऱ्याला आश्वासन देऊन किं० सांत्वन करून स्वस्थ करणें. ३ कोणेकाला कांहीं काळ ठेवून घेणें किं० थांबवून धरणें.

थाळ स्त्री० १ जाळावयासाठीं किं० पेटवावयासाठीं केलेली गोवऱ्या, शेणी, करतण, इ० ची रास,— पाणी तापविण्याच्या किं० स्वयंपाकाच्या उद्देशानें. २ उपवासामुळें किं० ज्वर, गोवर, इ० मुळें पोटांत उठते ती आग. ३ जड ओझें वाहून नेण्यानें कंबर, पाठ, मान, इ० ची होते ती आग (उठणें, होणें, येणें). ४ विस्तवाजवळ बसल्यानें होते ती अंगाची आग. ५ विस्तवाची किं० उन्हाची धग. ६ एकाच संस्थानांत फार वेळ राहिल्यानें शरीराची किं० गात्रविशेषाची होते ती जळजळ; उ० माझ्या अंगाला हे पांच बंद लिहून थाळ आली. ७ दूध तापविण्यासाठीं केलेला खळगा. ८ मोठी किं० ओबडधोबड चूल; चुला; चुलाणा. ९ पाणी, दूध, रक्त, तेल, इ० पातळ पदार्थ जमीनीवर सांडल्यानें होते ती राड किं० चिखल; उ० येथें पोरानें मुतून थाळ केली आहे. [अर्थ पहा.

थाळण स्त्री० वर ' थाळ ' चे पाहिले पांच

थाळणें स० क्रि मागें ' थळणे ' पहा.

थाळरें न० मागें ' थारळें, ' ' थारोळें ' पहा.

थाळा [**सं०** स्थाल, स्थाली] **पु०** १ धातूचें वाटोळें आणि उथळ पात्र. २ अशाच पात्रांत दागिने घालून वधूला देतात ती देणगी. ॰ **थाळा तांब्या पु० ए० व०** संसाराच्या उपयोगाचीं भांडीकुंडीं समुच्चयानें. **थाळावाटी स्त्री० ए० व०** १ निसतान (वाजणें). २ समूळ नाश किं० विध्वंस (होणें, वाजणें). **एकाद्या पदार्थाचा, पैशाचा, किं० बेगमीचा, थाळा वाजणें** तो अगदीं संपणें. **पिकाचा (किं० धान्याचा किं० शेताचा) थाळा बसणें** तें उत्तम प्रकारें पोसून तयार होणें.

थाळी स्त्री० १ दूध तापवावयाचा खळगा. २ लहान आकाराचा थाळा. म्ह० धातूचें वाटोळें उथळ भांडें. ॰ **एकाद्या गोष्टीचा थाळा पिटणें** ती सर्वांस जाहीर करणें. **थाळी ठावकें**

न० ए० व० संसाराचीं भांडींकुंडीं समुच्चयानें.

थिकडें, थिराळ, थिराळणें, थिराळी, थिंगळी मागें 'ठि' मध्यें पहा. [ह्याच्या उलट.

थिगळ नि०संथ;मंदड;सुस्त.चलाख किं०तल्लख

थिजणें अ० क्रि० १ थंडीनें गोठणें किं० घट्ट होणें (पाणी, तूप, खोबरेल, इ०). २ अंतकाळीं (डोळे) पांढरे आणि निस्तेज होणें. ३ आश्चर्य, विस्मय, इ० भावनांनीं स्तब्ध होणें. ४ नष्टोत्साह होणें; निराश होणें.

थिजविणें स० क्रि० १ घट्ट करणें, गोठविणें. २ कोणेकाला गलितोत्साह करणें; खचविणें.

थिटा वि० १लांडा,तोकडा,आखूड. २ मापांत किं० परिमाणांत कमी किं० उणा; अपुरता.

थिणगी, थिनगी स्त्री० (विस्तवाची)ठिणगी.

थिपकणें, थिपका, इ० मागें 'ठिपकणें,' 'ठिपका' इ० पहा.

थिपडी स्त्री० थंडाईसाठीं डोक्यावर तेल थापटून किं०चोळून लावणें(घालणें). [गळणें.

थिबणें अ० क्रि० पाणी,रक्त, इ० बिंदुरूपानें

थिर, थिराथिर उ० वा० अ० शेळ्या, मेंढ्या, इ० हाकणारे लोक त्यांना घाईनें चालावयाची इशारत ह्या शब्दानें करतात. [चालणें.

थिरकणें अ० क्रि० ऐटीनें किं० दिमाखानें

थिरबिटी स्त्री० ज्यांत फार पाणी पडलें आहे अशी माती, शेण, पीठ, इ०.

थिरावणें [सं० स्थिर; म० 'स्थिर' पासून] **अ० क्रि०** स्थिर होणें. **स० क्रि०** स्थिर करणें.

थिरेंथिरें क्रि० वि० धीरेंधीरें; संथपणानें.

थिल्लट वि० १ सुस्त, मंद. २ दिरंगाईनें चालविलेलें किं० चाललेलें (काम). २ विरविरीत; झिरझिरीत विणीचें (वस्त्र). ३ छछोर, हलकट, असभ्य. [पहा.

थिल्लटाई स्त्री०थिल्लटपणाचा गुण.वर 'थिल्लट'

थिल्लर न० १ पाण्याचें डबकें. २ (लाक्षणिक) मंद अशी बुद्धि. ३ मंदबुद्धीचा मनुष्य. ४ हलक्या दर्जाचा मनुष्य.

थीर [सं० स्थिर] **वि०** शमलेला, शांत झालेला (वारा, मनोविकार, समुद्र, साथीचा रोग, तंटा, इ०). ※ **थीरथावर वि०** यथास्थित; ज्याची नीटनेटकी मांडणी करण्यांत आली आहे असा (संसार, कारभार, इ०). **स्त्री०** १ क्षुब्ध मनोविकार शांत झाल्यानंतर येते ती स्थिति. २अव्यवस्थितपणा मोडून नंतर आलेला नीटनेटकेपणा.

थींव न० ठरविलेली जागा; संकेतस्थान.

थुकणें, थुंकणें स० क्रि० १ तोंडांतून(फाजील पाणी) बाहेर टाकणें;(खाकरा, बेडका, इ०)तोंडांतून बाहेर टाकणें. २ (न आवडणारा पदार्थ किं० चुकीनें तोंडांत गेलेला पदार्थ) मुखांतून बाहेर टाकणें. ※ **एकाद्याच्या तोंडावर थुंकणें** त्याच्या कांहीं निंद्य कृत्याबद्दल त्याची निर्भर्त्सना करणें.

थुका, थुंका पु०, थुकी, थुंकी स्त्री० तोंडांतून बाहेर टाकलेली फाजील लाळ. ※ **एकाद्याची थुंकी झेलणें**(किं०**चाटणें**)त्याची खुशामत करणें; त्याचीं निंद्य आणि ओंगळ कामें करणें. **थुंकला थुका चाटणें** १ आपण लोकांना दिलेल्या शिक्षा स्वतालाच लागू करून घेण्याच्या पेचांत सांपडणें. २ आपण केलेल्या प्रतिज्ञा निस्तरतां न आल्याकारणानें त्या परत घेणें किं०असामर्थ्य कबूल करणें.३आपण लोकांची केलेले निंदा अस्थानीं होती असें कबूल करणें. **एकाद्याचा थुंका न ओलांडणें** त्याची नीचपणानें खुशामत करणें; त्याचीं स्वाभिमान सोडून हलकीं कामें करणें. **थुंकी घालून काम करणें** तल्लखपणानें कांहीं काम करणें.(आपण थुंकलेली थुंकी वाळावयाच्या अगोदर). **थुंकापाव न०**पिकदाणी.**थुंकीचाट्या वि०**स्वाभिमान सोडून समर्थांचीं नीच आणि हलकीं कामें करणारा.

थुक्याचें काजळ न० क्षणभंगुर वस्तु.

थुली, ठुली स्त्री० गव्हाचा सांजा.

थू उ० वा० अ० छिः !

थूक स्त्री० न० थुंकी, थुंका.

थेट [**हिं०** थेठ] **वि०** अस्सल, निर्मळ, शुद्ध; उ० हें सगळं थेट पुण्याचें आहे. **क्रि० वि०** १ अगदीं; सर्वथैव; पूर्णपणें; तंतोतंत; सरळ; उ० हा रस्ता थेट पुण्याला जातो; उ० रामाचा तोंडवळा थेट गोविंदाच्या तोंडवळ्यासारखा आहे. २ तावडतोब; वेळ न गमवतां; लगेच.※**थेटखरेदी स्त्री०** पदार्थ बनविला जातो त्याच ठिकाणीं केलेली खरेदी. **थेटलष्कर पु०** तंबू ठोकणारा.

थेटा, थेंटा वि०आखूड,तोकडा,अपुरता,लांडा.

थेटें न० पडसें; नाक वाहण्याची विकृति.

"थेटें पडसें' हा शब्द ह्याच अर्थी योजण्यांत येतो.

थेंब, थेंबका, थेंबटा, थेंबडा, थेमडा, थेमका, थेमटा पु० पाणी, रक्त, तेल, तूप, इ० चा बिंदु किं० ठिपका. ॐ **थेंबें थेंबें तळें साचे** एक एक थेंब जमून जमून इतका मोठा पाण्याचा संचय होतो कीं त्याला ' तळें ' हें नांव प्राप्त होतें; त्या प्रमाणें पैपैनें पैसे वांचविले तरी कालांतरानें मोठी रक्कम शिल्लकीस पडते.

थेंबुटा, थेंबोटा पु० पाण्याचा थेंब.

थेर पु० १ हिंदूंची एक जाति किं०त्या जातीचा इसम (माकडाचे खेळ दाखविणें इ० धंदे करून हे लोक पोट भरतात). २ स्त्रीवेष धारण करून नाचणारा पोऱ्या. ३ वेडे वेडे चाळे; पोरकट किं० छछोरी कृत्यें. ४ छांदिष्ट, विचित्र, किं० तऱ्हेवाईक माणूस. ॐ **थेर भोरपी पु०** दोरीवर चालणें, कोल्हाट्या उड्या मारणें, माकडाचे खेळ दाखविणें, इ० वर पोट भरणारे लोक. **थेर थेर करणें** १ छांदिष्टपणाचीं कृत्यें करणें. २ नाजूकपणाचे चाळे करणें. ३ नाजूकपणाची पेट करणें.

थेर, थेरडा [सं० स्थविर] वि० म्हातारा (तुच्छतेंत).

थेरीण स्त्री० स्त्रीवेष घेऊन नाचणारा पोऱ्या.

थेंरू [सं० त्सरु; म० थरूं] न० कोयता, कुऱ्हाड, खुरपें, इ०चा मूठ किं० दांडा.

थैक उ० वा० अ० गुरें हाकून नेतांना किं० हाकलून लावतांना हा शब्द योजतात. ॐ **थैक करतां ब्रम्हहत्या (होते)** अगदीं सहजपणें केलेल्या कृत्याचा कधीं कधीं फार भयंकर परिणाम होतो.

थैकार इ० मागें ' थयकार ' इ० पहा.

थैमान मागें ' थयमान ' पहा.

थैला [हिं०] पु० १ मोठी पिशवी; पोतें. २ कापूस, काथ्या, इ० भरून गादी, लोड, तक्क्या, इ० करावयाची खोळ किं० पिशवी.

थैली [हिं०] स्त्री० पिशवी.

थोक पु० एक प्रमाण आहे, त्या प्रमाणानें रेशमाचे तंतु काठीस गुंडाळले म्हणजे एक कळी होते; अशा चार कळ्या मिळून एक थोक होतो.

थोक इ० मागें ' ठोक ' इ० पहा.

थोकणें स० क्रि० थांबविणें; (कोणेकाची) गति बंद करणें. **अ० क्रि०** स्तब्ध होणें; बंद होणें.

थोकताळा पु० आजमास, अंदाज (घेणें, पाहाणें).

थोंट, थोंटण न० बुडखा; हात, पाय, झाडाची फांदी, इ०चें टोक तुटून बुडखा शरीराला किं० झाडाला चिकटलेला राहातो तो.

थोट, थोंट, थोंठ वि० १ लुच्चा, लबाड. २ लबाड आणि उद्धट. ३ कुभांडखोर.

थोटा, थोंटा, थोटका वि० ज्याचें टोक किं० अग्र तुटलें आहे किं० तोडलें आहे असा (बाहु, पाय, बोट, फांदी, इ०). ॐ **थोटा पिंपळ पु०** ज्याला बायको, मुलें, इ० परिवार नाहीं तो.

थोटाई, थोंटाई, थोंठाई, स्त्री० १ नीचपणा; हलकटपणा. २ लुच्चेगिरी, लफंगेगिरी. ३ उद्धटपणा.

थोटूक, थोठूक न० शेंडा किं० अग्र तुटून राहातो तो बुडखा.

थोडका [सं० स्तोक; म० थोडा] वि० अल्प; फारसा विपुल नव्हे असा. ॐ **थोडक्यांत क्रि०वि०** १ संक्षेपानें. २ लवकरच.

थोडकावणें [म० थोडका होणें] अ० क्रि० कमी होणें; उणा होणें उ० विहिरीचें पाणी इतक्यांतच थोडकावलें; उ० त्याचा व्यापार, धंदा, थोडकावला.

थोडकाविणें [म० ' थोडकावणें ' चें प्रयोजक) स० क्रि० कमी किं० अल्प करणें.

थोडा [सं० स्तोक] वि० कमी; उणा; विपुल नव्हे असा; लहान प्रमाणाचा किं० परिमाणाचा. ॐ **जीव थोडा थोडा होणें** जिवाला काळजी, भीति, किं० अस्वस्थता वाटणें. **थोडा थोडका वि०** जरासा कमी किं० थोडा. **थोडाबहुत क्रि०वि०** कमी ज्यास्ती प्रमाणांत; किंचित्; अगदींच नाहीं असा नव्हे आणि पुष्कळ असाही नव्हे.

थोतरी, थोदरी, थोबाडी स्त्री०, थोबाड न० तोंडाची एक बाजू; गाल; गालफड. **टीप,**—हे शब्द तुच्छता किं० कुरूपता दर्शवितांना किं० बोलणारा रागावलेला असतां योजले जातात; उ० त्याचें थोबाड सुजलें आहे; उ० तुझ्या थोतरींत ऐशी एक लगावीन कीं याद रखेशी !

थोतांड, थोथांड न० १ लोकांना फसवावयासाठीं किं० लोकांची आबरू खराब करण्यासाठीं रचिलेली गोष्ट किं० माजविलेलें अवडंबर. २ कोणेकाविरुद्ध समाजांत रूढ केलेली खोटी बातमी. ३ कोणेकाच्या नाशासाठीं रचिलेला व्यूह किं०

चकान्त. ० थोतांडमत न० शास्त्राशीं विसंगत किं० विरुद्ध मत(माजविणें,उठविणें,इ०). थोतांडी (– ड्या) वि० थोतांड करण्याची हौस किं० प्रवृत्ति ज्याला आहे असा.

थोथरी थर ' थोतरी 'पहा.

थोप स्त्री० १ थांबणूक (होडी इ०ची). २ किनारा, खडक, बांध, इ०वर लाटांचा मारा. ३ असा लाटांचा मारा आडविण्यासाठीं किंवा कम-जोर करण्यासाठीं बांधलेला धक्का, भिंत, इ०. ३ मुक्काम किं० मुक्कामाची जागा; उ० हा डोंगर चढतांना तीन थोपी कराव्या (किं० व्याव्या) लागतात. ४ नदी इ०च्या प्रवाहाला अडथळा,– नैसर्गिक किं० मनुष्यकृत. ५ कांहीं कार्यांत संभा-ळावयाची अंतिम मर्यादा; उ०त्याच्या शंभर रुप-यांची मी थोप संभाळली (म्ह० शंभराहून अधिक खर्च इ० मी होऊं दिला नाहीं). ५ आबरू, लौकिक,प्रतिष्ठा, पत (संभाळणें).

थोपटणें स० क्रि० १ मुलाला किं० आजा-याला आराम वाटावा म्हणून त्याच्या अंगावर सौम्य हातानें थापट्या मारणें. २ कोणेकाला गोड शब्द बोलून शांत करणेंकिं० अनुकूल करून घेणें.

थोपणें अ० क्रि०थांबणें; गति बंद करून स्तब्ध होणें. स० क्रि० १ (कोणेकाला) थांबविणें. २ (कोणेकाला) पूर्व स्थितींत राहावयाला भाग पाडणें; (कांहीं काम) आहे त्या स्थितींतच राहूं देणें म्ह० त्याची प्रगति बंद करणें किं० बंद पाडणें. ३ कोणेकाला टेका देणें किं० सावरून धरणें. ४ आश्रय देणें. ५(पालखी, मेणा, ओझें इ०) थांब-विणें म्ह० जमीनीवर टेकणें आणि वाहकांनीं विश्रांति घेणें. ० थोपून धरणें (राखणें, ठेवणें) नाश, विस्कळितपणा, इ० पासून (धंदा, संस्था, व्यापार इ०) बचावणें किं० कांहीं काळ पूर्वस्थितींत राहातील असें करणें.

थोपविणें स० क्रि० १ थांबविणें. २ सावरून धरणें. ३ पूर्वस्थितींत राहील असें करणें.

थोंब पु० न० झुबका (गवत, रोपें, इ०चा).

थोबाड न०, थोबाडी स्त्री० ' थोतरी 'पहा.

थोबाडणें [म० थोबाड] स० क्रि० (कोणेकाच्या) गालावर चपराक मारणें.

थोमाळणें स० क्रि० शांत करणें; सांत्विणें.

थोय स्त्री० विटी दांडू इ० च्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. खेळाच्या नियमाचें कोणा खेळणाराकडून उल्लंघन झालें असतां खेळणारानें ' थोय ' हा शब्द उच्चारला तर त्याचा डाव बुडत नाहीं. हा ' थोय ' शब्द त्याणें उच्चारावयाच्या आधीं प्रतिपक्षानें ती चुकी जाहीर केली तर त्या प्रतिपक्ष्याकडे डाव येतो (क्रि० घालणें,पडणें).

थोर [सं० स्थविर] वि० १ मोठा.(वयानें, ज्ञानानें, विद्वत्तेनें, कुलीनपणानें, अधिकारानें, संपत्तीनें, इ० नें). २ वडील; वृद्ध; धाकटा नव्हे तो. ३ आकारानें किं० परिमाणानें मोठा .क्रि० वि० फार, अतिशय, मोठ्या प्रमाणांत. अतोनात. ० दिवा थोर करणें तो मालविणें. थोरा घरचा, थोरल्या घराचा पु० महार; परवारी. थोर मोठा वि० १ प्रतिष्ठित; वरच्या दर्जाचा. २ कुलीन घराण्यांतील.

थोरला [म० थोर] वि० १ मोठा; अधिक मोठा. २ अवाढव्य. ० थोरला कुंवर पु० पुन-र्वसु हें नक्षत्र; म्हातारा (शेतकऱ्याच्या भाषेत). तरणा पु० पुष्य नक्षत्र. मागें ' तरणा ' पहा. थोरली पत्री स्त्री० जायपत्री,–एक सुगंधी साल. थोरली पहाट स्त्री० सूर्योदयाच्या अगोदरचा प्रहरभर अवधि. थोरलें घर न० १तुरुंग; कारागृह; विनभाड्याचें घर. २ कुंटणवाडा. ३ दारूचा गुत्ता किं० पिठ्ठा.

थोरवकी, थोरकी, थोराई, थोरीव [म० थोर] स्त्री० थोरपणा, मोठेपणा, वडीलपणा, वयोवृद्धता, श्रेष्ठपणा, प्रतिष्ठितपणा. ' थोर 'पहा.

थोरवट [म० थोर] वि० १ मोठा; आकारानें मोठा. २ मोठया कुळांतील. ३ भव्य. ४प्रतिष्ठित.

थोरवी, थोरी, थोरवाई [म० थोर] स्त्री० १ मोठेपणा. २ प्रतिष्ठितपणा. ३ वैभव; श्रेष्ठता-गुण. ४ मोठा दर्जा.

थोराड [म०थोर] वि० १मोठ्या आकाराचा, घडणीचा, बांध्याचा, किं० रचनेचा. २ वयाच्या मानानें मोठ्या आकाराचा (मुलगा, मुलगी, जनावर, इ०).

थोरावणें [म० थोर] अ० क्रि० १ (वयानें, आकारानें, प्रतिष्ठितपणानें, गुणानें ,किं० दर्जानें) मोठें होणें. २ वरच्या दर्जाचा मानला जाणें.

द

द मराठी व्यंजनमालेंतील आठरावें व्यंजन.

द, दकार [म०'दंडवत' चें पहिलें अक्षर.]**पु०** शूद्राकडून ब्राह्मणाला यावयाच्या पत्रांत हा शब्द आरंभीं येतो. त्याचा अर्थ दंडवत म्ह० नमस्कार. ब्राह्मणाकडून शूद्राला जावयाच्या पत्रांत ' आ ' हें अक्षर आरंभीं घातलें जातें. त्याचा अर्थ आशीर्वाद.

द [सं० 'दा' (देणें) चें उपपद तत्पुरुषांतील रूप] **वि०** देणारा; उ० धनद म्ह० कुबेर, जलद म्ह० मेघ, इ०.

दउडणें, दउंडी, दऊड, दऊत, पुढें ' दौ ' मध्यें पहा.

दखल [अ० दखल् किं० दाखल्] **वि०** १ आलेला; येऊन पोंचलेला. २ वहींत किं० चोपडींत नोंदलेला किं० लिहिलेला. ३ ज्ञात, ठाऊक असलेला. ४ शिकलेलें किं० अभ्यस्त (शास्त्र, कला, इ०).****दखलगिरी स्त्री०**१ज्ञान,माहिती,अभ्यास, इ०).***दखलगिरी स्त्री०**१ज्ञान,माहिती,अभ्यास, निष्णातपणा (शास्त्र,कला, इ०त).२ कामगारांवर देखरेख (राखणें, ठेवणें). ३ अहवालपत्रक (सादर करणें, देणें). **दखल देणें** बातमी देणें. **दखलबाद स्त्री०** १ ज्ञान, परिचय, माहिती (दफतरी भाषेंत). २ कच्ची नोंद (करणें). **दखलबाद वि०** १ ज्ञात, ठाऊक, माहीत (दफतरी भाषेंत). २ सध्यापुरता समाविष्ट केलेला किं०नोंदलेला.

दंग [हिं०] **वि०** १ आश्चर्यचकित;विस्मित. २ कांहीं मनोरंजक कामांत गढलेला किं० निमग्न झालेला. ३ कांहीं नादांत किं० व्यसनांत आनंदलेला (निंदेंत).

दंग पु० १ कागद करण्यासाठीं जुनें तरट, सण, चिरगुट, इ० कुटावयाचें यंत्रविशेष. २ पोहे, चुना, इ० कुटावयाचें यंत्रविशेष. मागें ' डंख, ' ' डंग ' पहा.

दगड पु० १ धोंडा; पाषाण; फत्तर. २ कांहीं नाहीं इतकें प्रमाण; शून्य; उ० त्याला काय कळतें दगड ? उ० तुला दगड समजतें. ३ मूर्ख, बेअकली माणूस. ***चोहोंकडे दगड टाकून पाहाणें** सर्व दिशांनीं उपाय किं० खटपटी करणें. **दगड टाकून ठाव पाहाणें**१पाण्यांत दगड टाकून पाण्याच्या खोलीचा आजमास करणें. २ एकाद्याला कांहीं खुबीदार प्रश्न विचारून किं० त्याच्या पुढें कांहीं विधान करून त्याच्या मनांतील विचारांची अटकल करणें. **टीप,**–ह्या दुसऱ्या अर्थी ' खडा टाकून ठाव पाहाणें ' असाही वाक्प्रचार आहे. **दगडाखालीं हात सापडलेला (किं० गुंतलेला) असणें** अति नाजूक परिस्थितींत किं० पेचांत अडकलेलें असणें,–ज्यांतून खुबीनें आणि हिकमतीनें सुटका करून घेतली पाहिजे; म्हणजे जेथें दांडगाई करणें मूर्खपणाचें होईल. **दगडाशीं भांडणें** १ समर्थाशीं असमर्थानें झगडा करावयास प्रवृत्त होणें. २ आपणाला न होण्याजोगें जोखमीचें काम करावयाला प्रवृत्त होणें. **दगडाला पाझर** (किं० **पान्हा**) **आणणें** निर्दय मनुष्याच्या पोटांत दया उत्पन्न करणें; अगदींच असंभवनीय गोष्ट करणें. **दगडाला पाझर (किं० पान्हा) फुटणें** निर्दय मनुष्याच्या अंतःकरणांत दया उत्पन्न होणें, (ही अशक्य गोष्ट होणें).**दगडाची साल काढणें, दगडाचा दोर काढणें** दुष्कर, किं० अद्भुत, किं० अशक्य गोष्ट करणें. **दगडाचा दोर होत नाहीं** भलत्याच वस्तूपासून एकादी विशिष्ट वस्तु निष्पन्न करण्याची आशा बाळगणें व्यर्थ आहे. **दगडाचें नांव धोंडा आणि धोंड्याचें नांव दगड** ही गोष्ट स्पष्ट आहे ! तिच्याबद्दल वाटाघाट करण्याचें कारण नाहीं ! दगड म्हणा किं० धोंडा म्हणा एकच ! **दगडांचें पेंव घालतां खळखळ काढतां खळखळ** १ निरुपयोगी वस्तूसाठीं त्रास करून घेणें हा मूर्खपणा होय. २ मूर्खाशीं मैत्री करणें किं०भांडण करणें ह्या दोहोंपासून सारखाच उपद्रव होतो. ३ वाईट गोष्ट करतांना त्रास होतो आणि परिणामींही त्रास होतो. **दगडापेक्षां वीट मऊ** दोन्ही गोष्टी वाईटच, पण त्यांतल्या त्यांत पाह्यऱ्या लावावयाच्या तर तिच्यापेक्षा ही बरी; त्यांतल्या त्यांत हें बरें किं० हा पंथ चांगला. **दगडावरची रेघ**,किं०**काळ्या दगडावरची** (किं० **(चिऱ्यावरची) रेघ** न फिरणारे शब्द; जें खोटें व्हावयाचें नाहीं असें भाकीत. **टीप,**–दगडावर कोरलेलीं अक्षरें फार दिवस टिकून राहतात. **दग**

डाशीं गांठ पडणें कठोर किं० निर्दय माणसाशीं प्रसंग येणें. **दगडाशीं भांडणें** १समर्थाशीं प्रसंग येणें. २कठिण किं० जोखमीचें काम करण्याचें वांकांडी बसणें. **दगडघाशा** वि० अकुशल न्हावी किं० कोणीही कारागीर. **दगडघाशी** स्त्री० कोणतेंही कष्टमय किं० जिकीरीचें काम. **दगडपोळ** स्त्री० न० दगडाची दरड,–एकावर एक दगड ठेवून चिखल न घालतां रचलेली भिंत. **दगडफूल** न० दगड, लाकूड, इ०वर उगवते ती पांढुरकी वनस्पति,–हिचा औषधाकडे उपयोग केला जातो. **दगडफोड** स्त्री० कोणतेंही कठिण आणि जिकीरीचें काम. **दगडसर** स्त्री० जोराची पावसाची सर. **दगड (–डा–) ळ** वि० ज्यांत दगड फार अशी (जमीन, शेत). **दगडाची छाती** स्त्री० १ धाडसी पुरुष. २ धाडस, साहस. ३ मनाचा खंबीरपणा. **दगडी** स्त्री० १ दगडाचें आकारविशेषाचें पात्र. २ स्त्रीच्या स्तनांत कांहीं विकृतीनें उत्पन्न होतें ती गांठ. **दगडी चौथ** स्त्री० भाद्रपद महिन्याच्या शुक्लपक्षांतील चतुर्थी ही तिथि. **दगडी सुपारी** स्त्री० सुपारीची एक जात; ही टणक असते.

दगदग स्त्री० मेहनत, कष्ट (काढणें, सोसणें, होणें, इ०).

दगदगणें अ० क्रि० कांहीं जिकीरीच्या कामामुळें बेजार होऊन जाणें.

दगदगा [फा०] पु० दुसरा मनुष्य आपणाला वचकेल किं० भिईल असा जो आपल्या अंगचा गुणविशेष तो; दरारा.

दगदावा, दंगदावा पु० १ कोणेका पदार्थावर कोणेकाचा जो स्वामित्वसंबंध तो. **टीप,**–बहुधा निषेधांत याचा प्रयोग होतो; उ० ह्या भिंतीवर कोणाचा आतां दंगदावा राहिला नाहीं. २ द्वेषबुद्धि; वैरभाव.

दंगल [हिं०] पु० १ गाणें, बजावणें, इ० चा मुसलमान लोक करतात तो समारंभ. २धांगडधिंगा, अव्यवस्था (माजविणें). ३ गोंधळ, दंगा.

दगल [अ०] स्त्री० लबाडी; विश्वासघात. ॐ **दगलबाज** वि० लबाड, विश्वासघातकी.

दगा [फा०] पु० १ लबाडी, विश्वासघात. २ धोका, संकट, भयाचें कारण. ३फसवणूक.४ कोणेकाच्या मनांत कोणेकाविषयीं येते ती लबाडी, कपट, विश्वासघात, इ० ची शंका; उ० मजविषयीं तुमच्या मनांत विनाकारण दगा गेला. ५ शत्रूनें कोणेकावर जारणमारणादि कांहीं कृत्य केल्यानें ओढवतें तें संकट,–आजार किं० मरण; उ० कोणी तरी दगा केला म्हणून गोविंदबा आज सहा महिने मरत पडला आहे. **टीप,**–ह्या सर्व अर्थी ' दगाफटका ' हाही शब्द रूढ आहे. ॐ **दगेमात** स्त्री० कुशलपणाचा विश्वासघात.

दंगा [हिं०] पु० परचक्र, राजाच्या जुलमानें उत्पन्न झालेला प्रजाजनाच्या मनांतील असंतोष, दरवडेखोर, इ० कारणांमुळें देशांत उत्पन्न होते ती धावाधाव, पळापळ, भीति, इ०. ॐ **दंगाधोपा** पु० प्रजाजनामध्यें धांदल उडवून देणारें कारण; दरोडेखोर, जुलमी अधिकारी, इ०चा उपद्रव. **दंगेखोर** वि० दंगा करणारा.

दगागणें अ० क्रि० १ जिकीरीच्या कामामुळें, विवंचनेमुळें, किं० आजारानें जर्जर होऊन जाणें. २ खचणें, माघार खाणें.

दगावणें [फा० दगा] अ० क्रि० १ कोणेकाच्या लबाडीला किं० विश्वासघाताला बळी पडणें. २ हरवणें, नष्ट होणें; मरणें उ० ओढ्याला गेल्या श्रावणांत पूर आला होता त्यांत आमचा एक बैल दगावला; उ० गेल्या सालच्या पटकींत आमच्या घरचीं तीन माणसें दगावलीं.

दग्ध [सं०]वि० १जळलेला. २ज्याचा सत्यानास झाला आहे असा. ३पीडित. ४अशुभ; उ०दग्धयोग. ६ विटाळलेला; निरुपयोगी झालेला; उ०त्याची जिव्हा परान्नानें दग्ध झाली आहे, त्याचा मंत्र फलद्रूप कसा होणार ? ॐ **दग्धतिथि** स्त्री० कांहीं कार्याला अशुभ अशी जी तिथि ती. **दग्धबीजन्याय** पु० कारणांतील कार्योत्पादक गुण नाहींसा झाला म्हणजे कार्य घडून येत नाहीं. **दग्धयोग** पु० (ज्योतिष) अशुभ योग; उ० बुधवारीं तृतीया आली असतां दग्धयोग होतो. **दग्धपटन्याय** पु० जळून गेलेलें वस्त्र निरुपयोगी होणें ही सरणी. **दग्धहस्त** [सं० दग्ध (जळाला आहे) हस्त (हात)ज्याचा असा] वि० १ दुर्दैवी; कमनशीबाचा. २नुकसान-

कारक, बिनकिफायतशीर (धंदा, उद्योग). ३ अपशकुनी, (काळ, दर, देश, इ०). टीप,—ह्या सर्व अर्थी 'दग्धस्त' असें अपभ्रष्ट रूपही योजण्यांत येतें. **दग्धहस्ती वि०** १ज्याच्या हाताखालीं राहिलेला शिष्य, नोकर, इ०चें कल्याण होत नाहीं असा माणूस. २ ज्याचे हातून अन्न, द्रव्य, इ० कांना पुरवठा येत नाहीं असा माणूस. ३ ज्यांत राहिल्यानें कोणाचेंही बरें होत नाहीं असा (देश, गांव, राज्य, इ०). टीप,—ह्या सर्व अर्थी'दग्धस्त' असेंही रूप योजतें जातें. **दग्धहस्ती स्त्री०** दुर्दैवाचा घाला.

दचक [म० दचकणें] **स्त्री०**अनपेक्षित किं० अकल्पित अशी कांहीं गोष्ट एकदम घडली किं० दृष्टीस पडली असतां मनाला किं० शरीराला एकदम बसतो तो धक्का. **क्रि०** बसणें. **टीप**,—'डचक' असेंही ह्याचें अन्य रूप रूढ आहे.

दचकणें अ० क्रि० भयानें किं० कांहीं अनपेक्षित किं० अकल्पित गोष्ट पाहिल्यानें किं० ऐकल्यानें कंपित होणें किं० शरीराला हिसका बसणें.

दचकला पु० १कुरणांत चरावयाला सोडलेल्या घोडा, गाय, बैल, इ० चे दोन पाय बांधावयाची दोरी. २ दुःख, आश्चर्य, इ० भावनांनीं मनाला बसतो तो धक्का.

दचकळी स्त्री० लहान ढेकर.

दचका, डचका पु० वर ' दचक ' पहा.

दटावणी स्त्री० दटावण्याचा व्यापार खालीं ' दटावणें ' पहा.

दटावणें स० क्रि० १ कोणेकाला दहशत किं० भीति घालणें. २ कोणेकानें अमुक अमुक गोष्ट करण्यापासून निवृत्त व्हावें म्हणून त्याच्या अंगावर ओरडणें किं० ओरडून तशी त्याला इशारत देणें.

दट्ट्या, दट्टा पु० १ बाटली, बुधला, दौत, इ० मध्यें ठेविलेला पदार्थ बाहेर सांडूं नये म्हणून त्यांच्या तोंडाला जो फडक्याचा बोळा, बूच, गुडदी, इ० बसवितात ती. २ कठोर भाषणाचा (घालणें).
कोणेकावर केलेला प्रहार. **क्रि०** देणें. ३ दहशत

दंड [**सं०**] **पु०** १ काठी, सोटा. २ सरकारनें गुन्हेगाराला केलेली शिक्षा,—कैद, हद्दपारी फटके, इ०. ३ पैशाच्या रूपानें गुन्हेगाराला सरकारनें केलेली शिक्षा. ४ यति, ब्रम्हचारी,इ०-च्या हातांतील काठी. ५ साम, दान, भेद, आणि दंड, हे जे शत्रूला जिंकण्याचे चार उपाय, त्यांपैकीं चवथा म्ह० शत्रूवर हल्ला करणें. ६ खांद्यापासून कोपरापर्यंत जो बाहूचा भाग तो. ७ शेत,मळा, इ० मध्यें वेगळे वेगळे भाग करावयासाठीं मातीचा जो लांबलचक उंचवटा करतात तो. ८ मोट, इ० च्या प्रवाहाचें वाहात येणारें पाणी सखल प्रदेशांतून पुढें न्यावयाचें असतां जो लांबलचक उंचवटा करतात तो. ९ धोतर, लुगडें, इ० जुन्या चिरगुटाचे दोन खंड जोडावयासाठीं जी विशेषप्रकारची शिवण घालतात ती. १० रताळीं, ऊस, इ० लावावयासाठीं मातीचा लांबट उंचवटा किं० सखल पट्टा करतात तो. ११ निमोळता आणि क्रमानें उतरता जो पर्वताचा भाग तो. १२ शेत इ० ची लांबी मोजावयाचें एक प्रमाण. १३ कालावधिविशेष.१४ पर्वतावर चढावयाचा मार्ग,—जो दोन्ही बाजूंस सखल असतो तो. १५ तालमींतील व्यायामाचा एक प्रकार. १६ कोणतेंही कठिण असें काम (काढणें, पेलणें). १७ पर्वताचा फाटा किं० शाखा. १८ सैन्याचा रचनाविशेष. १९ उभें राहण्याचें संस्थान. २० दांडगा मनुष्य; दांडगेश्वर; धटिंगण. ॐ **दंडथडक स्त्री०** दंडाच्या बाहेरच्या बाजूनें दिलेला धक्का. **दंडकाक पु०** डोमकावळा. **दंडग्रहण न०** संन्यास. **दंडधर पु०** १ राजा. २ यम. ३ सेनापति. ४ कुंभार. ५ कोणीही अमलदार. **दंडनीति स्त्री०** १ राजनीति. २ न्याय देणें. **दंडपाणि पु०** १ यम. २ चोपदार. **दंडप्रणाम पु०** साष्टांग नमस्कार; दंडवत् प्रणाम. **दंडयात्रा स्त्री०** १ वरात इ० कोणतीही जंगी मिरवणूक. २ दिग्विजयार्थ मोहीम. **दंडव्यूह पु०** सैन्यरचनाविशेष. **दंड थोपटणें, दंडाला माती लावणें** कुस्तीला किं० मारामारीला सज्ज होऊन उभें राहणें. **दंडाला दंड लावून क्रि० वि०** बरोबरीच्या नात्यानें;सहकार्य. **दंडपूपिकान्यायानें, दंडापूपन्यायायानें क्रि० वि०** औघानेंच; उ० उंदीर काठीवर चढला ही गोष्ट जर खरी आहे तर त्या काठीला लोंबत असलेले अनरसे त्याणेंच खाल्ले असले पाहिजेत ही

गोष्ट दंडापूपन्यायानें सिद्ध होतेच. **दंडफुगडी** स्त्री० एकमेकांचें दंड धरून मुली खेळतात तो फुगडी ह्या नांवाचा एक खेळ. **दंडकुरई, दंडफरोई, दंडपुरोई** [सं० दंडपुरस्सर] स्त्री० दंड; मालाची जप्ती; अन्यायी जप्ती किं० दंड कि० कर. क्रि० घेणें, देणें, भरणें. **दंडस्नान** न० नद्यादिकांच्या पाण्यांत अंग न चोळतां केवळ सर्वांग भिजवून काढून केलेलें स्नान. **दंडपारुष्य** न० काठी इ० नीं कोणेकास मारून होतो तो गुन्हा किं० अपराध. **दंडायमान** [सं० दंड] वि० कंटाळा येण्याइतका लांबलचक (पदार्थ कांहीं रस्ता, कालावधि, इ०). ॐ **अखंड दंडायमान** वि० लांबलचक (हातपाय ताणून निजलेला मनुष्य, रस्ता, इ०). **दंडासन** न० हातपाय ताणून बिनघोर मनानें पडणें, निजणें, इ०. करण्याच्या इराद्यानें.

दंड वि० हट्टी; आडमुठा; आडदांड.

दंडक [सं०] पु० १ काठी. २ ध्वजस्तंभ. ३ चाल; रीति; परिपाठ; शिरस्ता; संप्रदाय. ४ लांबलचक आणि कंटाळवाणा आणि रूक्ष रस्ता. ५ एक वृत्तविशेष. ह्या वृत्ताचे अनेक प्रकार आहेत; विशेष प्रचलित जो प्रकार त्यांत प्रत्येक चरणांत तीस अक्षरें असून त्यांत आरंभीं दोन नगण असून पुढें सहा रगण असतात. ॐ **दंडकारण्य** न० नर्मदा आणि गोदावरी ह्यांच्या चिमट्यांतील प्रदेशापासून थेट खालीं दक्षिणेस जें अरण्य फार प्राचीनकाळीं पसरलेलें होतें तें. दंड या नांवाचा एक सूर्यवंशी राजा होता त्याच्या दुराचरणामुळें त्याचें राज्य विध्वस्त होऊन तेथें हें अरण्य वाढलें अशी कथा आहे.

दडकणें स० क्रि० १ चेपणें; पदार्थावर कांहीं जड वस्तु ठेऊन तो दाबणें. २ बारदानांत (कांहीं पदार्थ) ठासून ठासून भरणें.

दडकणें न० पदार्थ दाबण्यासाठीं त्याच्यावर ठेविलेला पदार्थ.

दडकुली [म० दडणें] स्त्री० १ मुलांचा लपंडाव हा खेळ. २ मुकाट्यानें पळून जाऊन कोठें तरी लपून बसणें (देणें, मारणें); दडी देऊन बसणें.

दडण [म० दडणें] न०, स्त्री० १ लपावयाला सोयीची अशी जागा. २ पर्वतादिकाच्या आश्रयानें मनुष्यादिकांस दडून बसण्याच्या सोयीची गुहा. इ० जागा.

दडणी स्त्री० दगड, लाकूड, हस्तिदंत, इ० वर खोदकाम करणाराचें एक आउत.

दडणें अ० क्रि० लपणें; लपून बसणें; अदृश्य होणें. स० क्रि० १ दागिना इ० वर (ठसा ठोकून) कांहीं आकृति बठावणें. २ चेपणें, दाबणें.

दंडणें [सं० दंड्=मारणें] स० क्रि० १ अपराध्याला शिक्षा करणें. २ द्रव्यरूपानें शिक्षा करणें. ३ (मनोविकार) नियंत्रित करणें; वासना मारणें.

दडदड (–डां) क्रि० वि० चालतांना किं० धावतांना पावलांचा दड्दड् असा आवाज होईल अशा रीतीनें (धावणें, पळणें, चालणें).

दडदडीत वि० घट्ट विणीचें (वस्त्र); मजबूत घडणीचा किं० रचनेचा (पदार्थ); जाड; टणक.

दंडन न०, **दंडना** स्त्री० [सं०] शिक्षा करणें.

दडपण [म० दडपणें] न० १ पदार्थ चेपण्यासाठीं त्याच्यावर ठेविलेला पदार्थ. २ मनावर किं० स्वैर वर्तनावर नियंत्रणा; धाक; वचक; भीति; उ० सुनेला दडपण सासू. ३ कांहीं कार्य करण्याची जी जबाबदारी तिचें मनाला वाटतें तें ओझें.

दडपणें स० क्रि० १ चेपणें; दाबणें. २ बंड, असंतोष, उच्छृंखल वृत्ति, स्वैराचार, इ० ला आळा घालणें. ३ कांहीं गोष्ट प्रकट न होऊन देणें; दाबून टाकणें. ॐ **दडपून** क्रि० वि० १ चेपून. २ जोरानें. ३ सर्व शक्ति खर्चून. ४ पूर्णपणें.

दडपा [म० दडपणें] पु० १ पदार्थावर ठेविलेलें दडपण किं०जड वस्तु. २ प्रवासी लोक मुक्कामाच्या ठिकाणीं निजतेसमयीं आपल्या सामानासुमानाची आवराआवर करून ठेवितात ती. ३ ज्वरादि प्रसंगीं अंगांतून घाम निघावा म्हणून जें जड पांघरूण अंगावर घेतात तें. ४ पदार्थ कसेबसें रचून त्यांची करतात ती रास.

दडप्या [म० दडपणें] **स्त्री० अ० व०** स्वाति नक्षत्र किं० त्या नक्षत्रावर पडणारा पाऊस (शेत-कऱ्यांच्या भाषेंत). **टीप**,–ह्या पावसानें धान्याचीं ताटें दडपलीं जातात.

दडाविणें [म० ' दडणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ लपविणें; छपाविणें. २ गुप्त ठेवणें; प्रकट न होऊं देणें.

दडस वि० घट्ट; ठाशीव विणीचें किं० रच-नेचें; टणक; घटमुट.

दडा पु० १ गुद्दी; बूच. २ नाक, कान, इ० चोंदणें (बसणें). ३ भरंवसा; आश्वासन. ४लपून बसणें; पळून जाणें (देणें, मारणें). ५ पाळथ राखण्यासाठीं किं० हल्ला करण्यासाठीं लपून बस-लेले लोक समुच्चयानें किं० अशा माणसांची लपा-वयाची जागा.

दंडाईत [म०दंड] **वि०** दांडगा; आडदांड.

दडादां, दडदडां क्रि० वि०(त्वरेनें चालतांना) पावलांचा दड्दड् असा आवाज करून (चालणें, धावणें).

दंडारणा पु० लांबलचक सोटा, काठी, इ०. **वि०** १ लांबलचक (पदार्थ). २ मजबूत, घटमुट (मनुष्य, प्राणी इ०).

दंडारा (–ळा) **वि०** मोठमोठ्या आणि ओबड धोबड शिवणी (दंड) घालून शिवलेलें चिरगुट. वर ' दंड ' पहा.

दंडावणें [म० दंड] **अ० क्रि०** थंडीमुळें किं० जबर देहकष्टामुळें ताठणें (शरीर किं०गात्र).

दंडित [सं० दंड] **वि०** ज्याला शिक्षा कर-ण्यांत आली आहे असा.

दंडिता [सं० दंडयितृ=शिक्षा करणारा]**पु०** शासन करणारा.

दंडिया, दंड्या[हिं०] **पु०** १ सुमारें बारा ते पंधरा हात लांबीचें लुगडें. २ बाजार पेठेंत व्यवस्था राखणारा अमलदार.

दडी [म० दडणें] **स्त्री०** लपणें; लपून बसणें (देणें, मारणें).

दंडी स्त्री० एक तंतुवाद्यविशेष. ॐ **दंडीगाण पु०** दंडी हें वाद्य वाजवून भिक्षा मागणारा.

दंडुका पु०, स्त्री० कोपरापासून पुढचा बाहूचा भाग.

दंडुका, दंडोका पु०, दंडूक, दांडूक न० सोटा, सोडगा. ॐ **दंडुक्या वि०** १ मारकट. २ जबरदस्त शासनपद्धति चालविणारा. **दंडुकेशाही स्त्री०** मारहाण करून आणि अन्याय करून केवळ सैन्याच्या जोरावर रयतेला कबज्यांत ठेवण्याची राज्यपद्धति.

दंडेरा वर ' दंडारा ' पहा.

दंडेल, दंडेली वि० दांडगा; शरीरसामर्थ्या-वर आपली अन्यायी मागणी दुसऱ्यावर लादणारा.

दंडेली स्त्री० शरीरसामर्थ्याच्या जोरावर आपली अन्याय्य इच्छा लोकांना मान्य करा-वयास लावणें.

दंड्य [सं०] **वि०** शिक्षा करण्यास योग्य; दंडाला पात्र.

दणकट, दणगट वि० घट्ट, टणक, मजबूत.

दणकणें अ०क्रि० १ जगजाहीर होणें; लोकांत प्रसिद्ध होणें.२(लग्न,मुंज,इ०कार्य)थाटांत केलें जाणें.

दणका पु० १ रट्टा, तडाखा. २ गडबड, दंगा. ३ जोराचें किं० नेटाचें कांहीं काम. ४ जोर, आवेश. ५ वाद्यादिकांचा खणखणाट. ॐ **दणकाहलका पु०** १ अनेक वाद्यांचा खणखणाट. २ गडबड, दंगा, गोंधळ.

दणकारणें, दणगारणें स० क्रि० १ (कोणे-काला) रागें भरणें किं० त्याची खरडपट्टी काढणें. २ (कोणेकाला) टोमणा मारणें.

दणकाविणें [म० दणका] **स० क्रि०** १ (कोणेकाला गुद्दे, रट्टे) मारणें. २ (लग्न, मुंज, इ० कांहीं कार्य) थाटांत करणें किं० उत्साहानें करणें.३ (कोणेकाची) खरपटपट्टी किं० भोसड-पट्टी काढणें.

दणकें, दणगें न० वर ' दणका ' पहा.

दणगट वि० १ मजबूत, घट्ट, ठाशीव (वस्त्र, कागद, इ०). २ जोरदार, हिंमतदार (माणूस).

दणगारणें वर ' दणकारणें ' पहा.

दणदण, दणदणां क्रि० वि० दण्दण् असा आवाज करून किं० असा आवाज होईल अशा रीतीनें.

दणदणणें अ० क्रि० १ (तोफ इ० नें) दण् दण् असा आवाज करणें. २ कोणेकावर ओरडणें

क्रि० चरफडणें. ३ हदरणें, हलणें. ४ (वाद्यादिकांनीं) वाजणें. ५ (चुलीतील लांकडें, दिवा, इ०) जोरानें पेटणें किं० जळणें.

दणाणणें अ० क्रि० १ दण्‌दण् असा आवाज करणें. २ (लग्न, मुंज, इ० कार्य) थाटांत केलें जाणें. ३ प्रसिद्ध किं० जगजाहीर होणें. ४ भयभीत होणें; गडबडणें.

दणावणें अ० क्रि० १ खचणें, दबणें (कांहीं भारानें). २ नम्र होणें.

दंत [सं०] पु० १ मनुष्य, जनावर, इ० चा दांत. २ हत्तीचा दांत. ३ डोंगराचा सुळका; पर्वताचें शिखर. ४ बाणाचें टोक. ꙮ **दंतच्छद पु०** ओठ. **दंतधाव पु०, दंतधावन न०** १ दांत घासणें. २ दांतवण. **दंतमूलीय, दंत्य वि०** दांतांपासून उच्चारला जाणारा (वर्ण,–त, थ, द, ध, न, ल, स, हीं व्यंजनें). **दंतकथा, दंतगोष्ट स्त्री०** तोंडोंतोंडीं चालत आलेली गोष्ट किं० हकीगत. **दंतवैद्य पु०** दांतांचे रोग बरे करणारा वैद्य; नवे कृत्रिम दांत बसविणारा वैद्य. **दंतपंक्ति स्त्री०** दांतांची ओळ; कवळी. **दंतस्थान न०** त, थ, द, ध, न, ल, आणि स, हे वर्ण मुखाच्या ज्या स्थानापासून उच्चारले जातात तें स्थान. **दंतौष्ठ्य वि०** दांत आणि ओठ ह्या स्थानांतून उच्चारला जाणारा (वर्ण म्ह० 'व' हें अक्षर). **दंततालव्य वि०** दांत आणि टाळा ह्या स्थानांतून उच्चारला जाणारा (वर्ण,–चमचा, जोपासना, झाड, यांतील च, ज, आणि झ, हे वर्ण). **दंतप्रक्षालन न०** दांत घासणें; दांत घासण्याची क्रिया. **दंतहर्ष पु०** १ दांत आंबणें. २ दांतांना ऊन पाणी किं० थंड पाणी असह्य होतें तो विकार; दांतांना मीठ, साखर, इ० पदार्थ असह्य होण्याची स्थिति. **दंतक्षत वि०** दांतांनीं चावलेला. **न०** ओठाचें चुंबन दांतांनीं घेतल्यानें चुंबिताच्या ओठावर होतात तें व्रण प्रत्येक. **दंताळ, दंताळा, दंताळ्या वि०** ज्याचे दांत वाकडे म्हणून ओठाच्या बाहेर आलेले आहेत असा (मनुष्य). **दंताळ, दंताळें न०** १ शेतांतील माती सारखी करण्याचें एक आउत. २बी पेरल्यानंतर वर माती सारखी पसरण्याचें एक लांब दांत्यांचें आउत. **दंती पु०** हत्ती. **वि०** दांतें ज्याला आहेत असा (प्राणी,–हत्ती; किं० पदार्थ,–फणी).

दत्त [सं०] वि० १ दिलेलें; नजर केलेलें; बक्षीस दिलेलें(करणें, होणें). २ (ईश्वरानें दिलेलें म्ह०) दैवगतीनें प्राप्त झालेलें. **पु०** १ दत्तक. २ दत्तात्रेय. ३ अकस्मात आलेला माणूस (जो आल्यानें आपणास त्रास वाटतो किं० आनंद होतो). **न०** १ देवानें किं० दैवानें जें भोगास दिलें तें म्ह० दैवगति किं० नशीब. २ अकस्मात घडलेली(प्रिय किं० अप्रिय) गोष्ट. ३ दत्तात्रेयाची फेरी किं० स्वारी म्ह० सदा भटकणारा माणूस. ४ अकल्पित म्हणजे ध्यानीं मनीं नसतां घडलेली सुखकारक किं० सोयीची गोष्ट किं० अनायासानें मिळालेली वस्तु; उ० मीं रामभाऊंची आठवण काढली तोंच दत्त म्हणून रामभाऊ दारांत उभे ! ꙮ **दत्तात्रेय [सं० दत्त+आत्रेय (अत्रि ऋषीचा पुत्र)] पु०** ब्रह्मा, विष्णु, आणि महेश, ह्या तीन देवांच्या अंशांनीं झालेला पुत्र. **दत्तात्रेयाची फेरी (किं० स्वारी) स्त्री०** सदा भटकणारा माणूस,–जो अमुक वेळीं अमुक ठिकाणीं सांपडेल असें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. **दत्त म्हणून उभा** अकल्पित आलेली अनिष्ठ दैवगति किं० अनपेक्षित अडथळा; उ० ज्या दत्ताला मी भीत होतों तेंच माझ्यापुढें उभें राहिलें; उ० जो जोडीदार इसम मला नको होता तोच दत्त म्हणून माझ्यापुढें उभा राहिला; उ० हिंदुस्थानांत दोन चार वर्षांनीं यमस्वरूपी दुष्काळ दत्त म्हणून उभा आहेच ! **टीप,**–दत्त हा प्रातःकाळीं स्नानासाठीं काशीस जातो, मध्यान्हकाळीं कोल्हापुरास जातो आणि रात्रीच्या विश्रांतीसाठीं सह्याद्रीला जातो; ह्यावरून सदा भटकणारा किं० अकल्पित येणारा असे 'दत्त' याचे अर्थ झाले. विशेष खुलासा आमचें 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०' हें पुस्तक ले० ११६५ पहा. **दत्त अवधूत पु०** दत्तात्रेय. **वि०** उघडा नागडा. **दत्तजयंती स्त्री०** मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा,–दत्तात्रेयाचा जन्मदिवस. **दत्तपत्र न०** दत्तक दिल्यासंबंधाचा कागद. **दत्तविधान न०** दत्तक देण्याचा आणि घेण्याचा विधि. **दत्तात्मा पु०** ज्याला आई बाप नाहींत असा मुलगा जो आईबापांचीं कर्तव्यें करण्यास खुषी असतील त्यांच्या स्वाधीन होतो तो.

दंद [सं० द्वंद्व] न० बेबनाव, वैर (करणें, मांडणें, इ०).

ददा [म० 'देणें' चें 'द' हें आद्याक्षर] **पु०** देणें. ॐ **ददाची विद्या, ददाची बाराखडी स्त्री०** देणें किं० देण्याची क्रिया किं० देण्याची प्रवृत्ति; औदार्य; (निषेधार्थी प्रयोग); उ० त्याला ददाची विद्या येत नाहीं (म्ह० तो कोणाला कांहींही कधींही देत नाहीं). मागें ' घघा ' पहा.

ददात, दधात, ददाती स्त्री० १ (अन्नवस्त्रादि, जे उपयोगाचे पदार्थ त्यांची) उणीव किं० अपुरेपणा किं० जरूर त्याहून कमी परिणाम (पडणें, प्राप्त होणें, भोगणें, असणें, नसणें, इ०); उ० त्याला अन्नवस्त्राची ददात नाहीं. २ कामाचे कष्ट किं० जिकीर किं० त्रास; उ० त्या कामाची (किं०कामासाठीं) मी भारी ददात केली पण उपयोग झाला नाहीं.

दंदावा [सं० द्वंद्व] **पु०** द्वेष, आकस, वैर (धरणें, करणें, इ०).

दंदास पु० त्रास, कंटाळा, उपद्रव (येणें, आणणें, होणें).

दंदी [सं० द्वंद्व] **वि०** आकसखोर; मत्सरी. ॐ **दंदीदुष्मन पु० अ० व०** आपले शत्रु किं० अहितचिंतक. **दंदेदरफडे पु० अ० व०** बढाई; स्वताच्या पराक्रमांच्या लंब्या लंब्या बाता(झोकणें).

दद्रु [सं०] **पु०** त्वग्रोग,–इसब, गजकर्ण, नायटा,इ०.

दधि [सं०] **न०** दहीं (दुधांत ताक, इ० विरजण घातल्यानें दुधाचें होतें तें रूपान्तर.ॐ**दधिसार पु०, न०, दधिस्नेह पु०** ताजें लोणी. **दधिकाला पु०** गोपाळकाला; दहिकाला. **दधिकुल्या स्त्री० अ० व०** दह्याचे पाट; दह्याचे पाट जींत वाहात आहेत अशी मेजवानी म्ह० पंचपक्वान्नी जेवण; श्रीमंती थाटाचें जेवण. **दध्योदन न०** दहीं आणि शिजविलेला भात ह्यांचे मिश्रण; दहिभात. **दधिवामन पु०** शाळिग्रामाच्या मूर्तीत एक भेद.

दनका, दनकावणें, इ० ' दणका, ' ' दणकारणें ' इ० पहा.

दनगट वि० मजबूत; घट्टमुट्ट; वापर सोसावयाला समर्थ (वस्त्र, भांडें, इ०).

दन्ना वि० प्रचंड, अवाढव्य, जगडव्याळ, खूप मोठ्या प्रमाणांत असलेला, (पाऊस, बाजार, लढाई, भांडण, वारा, गर्जना, इ०).

दपकाविणें, दबकाविणें,दबाविणें स०क्रि० (कोणेकाला) भीति घालणें किं० रागें भरणें; कोणी मनुष्य कांहीं अयोग्य गोष्ट करीत असला तर त्याला डोळे वटारून किं० रागें भरून किं० त्याच्या अंगावर ओरडून ती गोष्ट करण्यापासून त्याला निवृत्त करणें.

दंपटागिरी, दपटनिशी [म० दपटणें] **स्त्री०** लोकाची वस्तु उपटणें किं० लाटणें.

दपटणें स० क्रि० १ कोंबणें, ठासणें, ठासून भरणें. २(घोडा, माणूस,इ० नां) चालविणें किं० काम करावयास सक्तीनें लावणें. ३ (कोणेकाला) रागें भरणें किं० त्याची खरडपट्टी काढणें. ४(दुसऱ्याचा पदार्थ) लाटणें किं० बळकावणें. ५ (स्त्री) भोगणें. ॐ**दपटून जेवणें** आकंठ जेवणें.

दपटशाहा, दपटशाहा, दपटशा [म० दपटणें=रागें भरणें] **पु०** १ धमकावणी (देणें). तंभी (भरणें); धाक (घालणें). २ कामाची घाई किं० नेट (लागणें, लावणें, बसणें). ॐ **घोड्याचा (किं० माणसाचा) दपटशा काढणें** त्याच्याकडून शक्य तितकें पुष्कळ काम करवून घेणें.

दपट्या [म० दपटणें] **वि०** १ खूप खाणारा; आधाशी; सोसासोसानें खाणारा. २ लोकांची वस्तु लाटणारा. ३ विधिनिषेध न बाळगतां कांहीं काम रेटून नेणारा. ४ न बुझणारा; न आडणारा.

दपणें अ० क्रि० १ दबणें; मागें हटणें; माघार खाणें. २ लपून बसणें.

दंपती [सं० दंपती=पतिपत्नी] **पु०, न०** नवरा आणि बायको हीं दोघें. ' दंपत्य ' **न०** हें रूप मराठींत योजलें जातें.**दंपतीपूजन न०**उमामहेश्वरप्रत्यिर्थ किं०लक्ष्मीनारायणप्रीत्यर्थ वस्त्रालंकाराद्युपचारांनीं ब्राम्हणदंपतीचें पूजन करतात तें. **दंपतीभोजन न०** देवताप्रीत्यर्थ किं० व्रतसांगतासिद्ध्यर्थ ब्राम्हणदंपतीस घालतात तें भोजन.

दपाटा [म० दपटणें] **पु०** खरडपट्टी; भोसडपट्टी.

दपतर इ० पुढें ' दफ्तर ' इ० पहा.

दफ्तातें [हिं०] न० ज्या कागदामध्यें दस्तऐवजों कागद नोंदलेले म्ह० बार केलेलें असतात तो कागद.

दफाते स्त्री० बंदाच्या पहिल्या रकान्याच्या मध्यापासून तिसऱ्या रकान्यापर्यंत काढलेली रेघ (कारकुनी भाषेंतील शब्द).

दफेदार [फा० दफ़अदार] पु० १स्वारांच्या रिसाल्यावरील एक अधिकारी. २ फरासखाना इ० कडे लागणाऱ्या बैलांचा पुरवठा करणारा एक अधिकारी. ३ पट्टेवाल्या शिपायांचा नाईक.

दफेरफे[अ०दफ़अरफ़अ] स्त्री० १ कर्जाची फेड. २कोणत्याही कामाची विल्हेवाट किं०निरवानिरव. वि० निकालांत काढलेलें; शेवटास लाविलेलें.

दफ्तर [अ०] न० १ नोंदणीचा कागद किं० वही. २ अशा कागदांचें जुडगें. ३ असे कागद जेथें ठेविलेले असतात ती जागा. ४ लेखनसामग्रीसहित लिखितपत्रें इ० चा समुदाय. ५ शाळेंतील मुलाचें पाटी, लेखण्या, पुस्तकें, इ०सामानसुमान किं०तें बांधावयाचें फडकें. ❀ **दफ्तरखाना** पु० महत्त्वाचे कामाकाजाचे कागद सुरक्षितपणें ठेवण्याची जागा. **दफ्तरणी** स्त्री० १ महत्वाचे कागद एकत्र बांधावयाची दोरी किं० फडकें. २ दोरीनें किं० फडक्यांत बांधलेल्या कागदाचें जुडगें किं० गठ्ठा. **दफ्तरदार, दफ्तरनीस** [फा०] पु० दफ्तरखान्यावरील अधिकारी. **दफ्तरबंद** पु० दफ्तरखान्यांत पट्टेवाल्याचें काम करणारा अधिकारी.

दबकणें अ० क्रि० १ भाराखालीं दाबलें किं० चेपलें जाणें. २ कचरणें; वचकणें. ३भयादि कारणानें स्तब्ध किं० कुंठित होणें.४ दबा धरून लपून बसणें.

दबका पु० १ सखल जागा; तळवट जागा. २ अन्नानें पोटांत वाटतें तें जाड्य (बसणें). ३ धक्का, रट्टा, धपाटा.

दबकावणी [म० दबकाविणें] स्त्री० धमकी; भीति घालणें; दपटशा.

दबकाविणें स० क्रि० धाक दपटशा घालून कोणेकाला कांहीं कामापासून निवृत्त करणें.

दबकें न० सोनार, तांबट,इ० चें एक आउत.

दबडका, दबडगा, दबडघा, धबडका, धबडका,धबडका,धबडघा पु० १ज्यामध्यें मुळींच विसावा घेतां येतां येत नाहीं अशा कामाचा नेट किं० असें काम किं० अशा कामाचे कष्ट. २येणारे जाणारे पाहुणे इ० ची गर्दी किं० अशा गर्दीमुळें होतो तो उपद्रव.३कोणेकाची काढलेली खरडपट्टी.

दबडा पु०, **दबडें** न० तेल, तूप, इ०चें कातड्याचें बारदान; बुधली.

दबणें [हिं० दबना] अ० क्रि० १ भाराखालीं चेपगें जाणें.२समर्थाच्यापुढें भयानें वचकणें; कचरणें. ३ (रोगाची साथ, बंड, इ०) वाढीस न लागतां कमजोर होणें किं० निःशेष होणें. ४ लपून बसणें. ५ मावार खाणें.

दबदबा [अ० दब्दबाह्] पु० १ कोणेकाच्या अंगच्या विद्वत्ता, शौर्य, करडा स्वभाव, इ० गुणांमुळें दुसऱ्याला वाटतो तो वचक किं० दरारा (बसणें, वाटणें). २ भय; दबलेपणाची स्थिति. ३ इभ्रत किं०इभ्रतदारी.

दबदबीत वि० १ मऊ; बिलबिलीत. २ ज्यांत गुबारा धरला आहे असें (पोट) ३ मनमुराद जेवण झाल्यामुळें आराम किं० स्वस्थता पावलेलें (पोट). ४ पाण्यानें मऊ होऊन बी पेरण्याच्या लायकीची (जमीन). ५ कातडें मऊ पडल्यामुळें बद झालेला (नगारा, ढोलकें, इ० किं० त्याचा आवाज).

दबाविणें [म० ' दबणें ' चें प्रयोजक]स० क्रि० १ चेपणें; दाबणें; ठासणें. २ (कोणेकाला) धमकावणें किं० धमकी भरणें.

दबा [म० दबणें]पु० १ लपून बसणें(धरणें, धरून बसणें). २ लपावयाची जागा.

दबाबा पु० वर ' दबदबा ' पहा.

दबाव [हिं०] पु० १ धाक; दपटशा. २ धमकी भरणें. ३ वचक; भीति.४ नियंत्रितपणाची भावना. ५ आपल्या इभ्रतीनें दुसऱ्याच्या मनावर होतो तो परिणाम; आदरयुक्त भीति. ६ तुळईचें भिंतीच्या बाहेर आलेलें टोक. ७ गटार, खड्डा, इ०कावर घातलेली छावणी किं० आच्छादन.

दबावणी स्त्री० वर ' दबदबा ' पहा.

दबाविणें स० क्रि० कोणेकाला रागें भरून किं० त्याच्यावर डोळे वटारून त्याला नियंत्रणेंत ठेवणें किं० त्याला आपलें म्हणणें ऐकावयास भाग पाडणें. [पैकीं एक.

दबीर [फा०] पु० राजाच्या अष्ट प्रधानां-

दबेल [म०दबणें] वि० १ धमकावणीनें आज्ञेंत राहाणारा; बुझरा; भिडस्त. २ एकाद्याचा आज्ञांकित किं० नम्र सेवक किं० त्याचे हुकूम नम्रपणें किं० निमूटपणें अमलांत आणणारा; उ० सदोबा हा फडणिसाचा दबेल आहे.

दब्ब वि० फार भरल्यामुळें अस्वस्थता वाटविणारें (पोट); उ० माझें पोट दब्ब झालें आहे. न० पोटाची अशी अस्वस्थता; उ० माझ्या पोटांत दब्ब झालें आहे.

दंभ [सं०] पु० १ ढोंग. २ फसवणूक. ३ खोटा भपका (सोवळेपणाचा,विद्वत्तेचा, किं०करामतीचा). क्रि० माजविणें.

दभाशी (-सी) पु० उंट हाकणारा.

दम [फा०] पु० १ श्वास. २ जोराचा श्वासोच्छ्वास. ३एक श्वास घेण्यास लागणारा काळ. ४प्राण. ५ कष्टाचें काम कांहीं काळ केल्याकारणानें चालतो तो जोराचा श्वासोच्छ्वास(लागणें). ६स्वताच्या कर्तृत्वाविषयीं अभिमान(मग तो खरा असो किं० खोटा असो); उ० काशाला अक्कल नाहीं कवडीची आणि दम मात्र मोठा. ७ धमकदारी; कर्तृत्वशक्ति; अवसान; ताकद;उ० आतां पांच पाय़ऱ्या चढण्याचा दम माझ्या अंगांत नाहीं; उ० त्याचा काय दम लागला आहे हें ओझें उचलावयाला ? ८ वीर्य, गुणावहता; उ० हा काढा फार शिळा झाला आहे, त्याच्यांत आतां कांहीं दम राहिला नाहीं. ९ओलावा; आर्द्रता;उ०ह्या नव्या केलेल्या जमीनीला अझून थोडासा दम मारीत आहे. १०श्वास निरोधून धरण्याचें सामर्थ्य;उ०तुझा दम मोठा म्हणून तूं इतका वेळ पाण्यांत बुडून राहतोस. ११ सुरूं केलेली क्रिया शेवटास नेण्याची हिंमत; उ०मी एका दमांत आऱ्यावाऱ्याची घाटी चढूं शकतों. १२ सतार इ०चा भोपळा इ०मध्यें कोंडून राहिलेली हवा. १३ चुलीवर शिजत असलेल्या पदार्थांतून निघणारी वाफ. ꣸ **दम मारणें** १ चिलीम, गुरगुडी, इ०चा एक लांबलचक झुरका घेणें. २ आपल्या करामतीची शिकस्त करणें;उ० पुन्हा एकदा दम मार म्हणजे तो धोंडा सरकेल. ३ खाद्यावर किं० परद्रव्यावर ताव मारणें. **कोणेकाला दम भरणें** त्याला तंभी देणें; त्याला भेडसावणें किं० सख्त ताकीद देणें किं० दहशत घालणें. **एकाद्याचा दम कोंडणें** त्याचा श्वासोच्छ्वास साफ न चालणें. **दम खाणें** १ विसावा घेणें. २ धीर धरणें, उतावळी न करणें. **दम घेणें** हातीं असलेलें काम कांहीं काळ बंद ठेवून विसावा घेणें. **दम छाटणें** १ कांहीं काळ श्वासोच्छ्वास बंद ठेवणें. २ धीर धरणें; उतावळेपणा न करणें. ३ श्वासोच्छ्वास बिनकष्टानें चालणें. **इतक्यांतच दम सोडूं नको**(किं०**दम टाकूं नको**) इतक्यांतच धीर सोडूं नको. **कोणेकाला दम देणें** १ त्याला उत्तेजन देणें. २ त्याला तंभी भरणें. **एकाद्याचा दम पाहाणें** त्याचें अवसान किं० हिंमत जोखणें. **दम लागणें** कष्टाच्या कामामुळें श्वासोच्छ्वास जोरानें चालूं लागून अस्वस्थ होणें. **दम सुटणें** धीर खचणें. **दमावर धरणें**, **दमाणें घेणें** विनाकारण घाई न करतां स्वस्थपणानें कांहीं काम करणें. **एका दमानें** किं० **एका दमांत** क्रि० वि० मध्यें विश्रांति न घेतां; तिडकीसरशीं. **दमछाट** पु० श्वास कोंडून धरण्याची शक्ति. **दमछाट गोळा** पु० स्फोटक द्रव्यें भरलेला गोळा. **दमछाट तोफ** स्त्री० दमछाट गोळे उडविण्याचें यंत्रविशेष. **दमछाट माणूस** पु० जो फार वेळ श्वासोच्छ्वास बंद करूं शकतो असा माणूस.

दमट, **दमकट**, **दमकल** वि० १ किंचित् ओलें(वस्त्र); २जिला पाण्याचा दम मारीत आहे अशी (जमीन).

दमदार वि० १ जींत बहुत काळ ओलावा टिकून राहतो अशी (जमीन). २ ताजें, ओलें (लाकूड). ३ ज्याला आच फार असा (कोळसा, लाकूड, इ०). ४ सत्त्वस, सकस (धान्य). ५ नेटदार; उत्साही; धीराचा; दीर्घोद्योगी; निश्चयी (माणूस). ६ पैशानें गबर; द्रव्याची ऊब असलेला. ७ वापर फार पडून सुद्धां किं० म्हातारपण आलें असतां सुद्धां टिकून कामाला योग्य असा(पदार्थ,माणूस). ८ दणगट; मजबूत. **दमसर** वि०ओला;आर्द्रतायुक्त;किंचित् ओला. **दमसूट** क्रि० वि०प्रात:काळीं;प्रभातसमयीं. **दमेकरी** पु० ज्याला दम्याची विकृति किं० रोग आहे असा मनुष्य; श्वासरोगानें जर्जर झालेला.

दम [सं०] पु० १ नियमन; नियंत्रणा. २ इंद्रियनिग्रह. ३ शिक्षा, दंड.

दमटणें [म० ' दम ' पासून] अ० क्रि० ओला होणें; आर्द्र होणें.

दमडी [सं० द्रम्म= १ एक वजन. २ चार आणे किमतीचें एक नाणें] स्त्री० एका पैशाचा चवथा भाग. ❀**दमडपूत** पु० पैशाचा लोभी असा माणूस. **दमडीकरतां सौदा मोडणारा** क्षुल्लक कारणावरून मोठ्या लाभाची वस्तु गमावून घेणारा (मूर्ख माणूस). **तो चमडी देईल पण दमडी देणार नाहीं** तो शारीरिक कष्ट किं० इजा सोशील पण पैसा सोडणार नाहीं (लोभी मनुष्य). **दमडीवर चमडी करणें** (किं० **काढणें**, किं० **मिळविणें**) अत्यल्प भांडवलावर मोठा नफा मिळविणें.

दमणें [म० ' दम 'पासून] अ० क्रि० १ श्रमणें, थकणें, भागणें. २ ओलसर होणें; आर्द्र होणें. ३ भाराखालीं दबणें किं० चेपला जाणें; उ० तणवी घरापेक्षां नळ्याच्या कौलांचें घर लवकर दमतें. ४ वहुतवार शेत केल्यामुळें तें निकस होणें किं० पिकेनासें होणें. ५ फार वापर किं० कष्ट पडल्यामुळें झिजणें किं० निकामी होणें.

दमणें [सं० दम्=नियंत्रिणें] अ० क्रि० १ नियंत्रणेंत किं० आटोक्यांत किं० कबज्यांत येणें किं० आणलें जाणें. २ माणसाळणें.

दमदमा [अ० दम्‌दमाह्] पु० १ मोठा नगारा. २ तोफखाना.

दमदमाट पु० १ तोफांची किं० नगाऱ्याची गर्जना किं० वाद्यांचा गजर. २ मधुर सुवास; परिमल.

दमदमीत वि० १ उग्र आणि इतस्ततः पसरलेला किं० पसरणारा (वास). २ पुष्कळ वेळ भूक ज्याच्या-योगानें धरते असें (खाद्य); जें खाल्लें असतां फार वेळ भुकेची बाधा होत नाहीं किं० भूक लागत नाहीं असें (खाद्य). ३ ययेच्छ खाऊन तृप्त झालेलें (पोट).

दमन [सं०] न० १ संयमन; नियंत्रणा; आटोक्यांत ठेवणें. २ कोणेकाची रग जिरविणें. ३ जिंकणें. वि० जिंकणारा.

दमन [फा० दामन्=सोगा, पदर] न० १ गाडीचा वरचा भाग. २ दमान. खालीं ' दमान ' पहा.

दमनक [सं०] पु० दवणा –एक सुवासिक [वनस्पति.

दमनीय, दम्य [सं०] वि० १ शिकण्याच्या वयाचा, लहान, (मनुष्य, प्राणी). २ आटो-क्यांत किं० नियंत्रणेंत ठेवण्याजोगा किं० ठेविला पाहिजे असा असा. **दम्य** पु० पाडा, गोऱ्हा.

दमविणें [म० ' दमणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ कोणेकाला जिवाविशेष काम करावयाला लावून थकवा आणणें. २ (मनोविकार) नियं-त्रित करणें किं० आटोक्यांत ठेवणें.

दमा पु० १ श्वासरोग. २ धावणें, जड ओझें उचलणें, इ० मुळें लागतो तो दम किं० जोराजो-रानें चालतो तो श्वासोच्छ्वास.

दमान [फा० दामन्] न० १ शिडाच्या काठीचा अग्रभाग. २ ज्या बाजूस जो अग्रभाग आहे ती बाजू; वाऱ्यासमोरची बाजू. २ शिडाचा दोर.

दमामा [फा० दमामाह्] पु० मोठा नगारा.

दमामा [फा० दमानक्] पु० १ किल्ला इ० वर तोफ लागूं करण्यासाठीं पाषाणादिकांची ओट्यासारखी करतात ती रचना. २ एक प्रका-रची तोफ.

दया [सं०] स्त्री० कृपा; अनुकंपा; मेहेर-बानी. ❀ **दयार्द्र** वि० दयेनें ज्याचें अंतःकरण द्रवतें असा. **दयाळू, दयावंत, दयामय, दयावान** वि० मृदु अंतःकरणाचा; कोमल मनाचा. **दया उधार, खता रोकडी** मागें ' खता ' मध्यें पहा. **दयामाया** स्त्री० ए० व० दया, अनुकंपा (बहुधा निषेधीं प्रयोग). **दयाहीन, दयाशून्य** वि० निर्दय. **दयाळ** वि० कोमल अंतःकरणाचा; अनुकंपाशील.

दयित [सं०] वि० आवडता, प्रिय. पु० १ पति. २ प्रियकर.

दयिता वि० आवडती, प्रिय असलेली. स्त्री० १ पत्नी. २ प्रियकरी.

दर [सं०] पु०, न० १ गुहा, खिंड. २ शंख. ३ भीति. ❀ **दरवर** पु० पांचजन्य.

दर पु० समुदायांतील किं० मोठ्या परिमाणांतील एका एका पदार्थाची किं० एका एका अल्प परि-

माणाची किंमत,—जी त्या सर्व पदार्थांना किं० त्या सर्व परिमाणाला लागू करावयाची असते; भाव; निरख; उ० हल्लीं लोण्याचा दर रुपयास दहा छटाक आहे; उ० तांदुळाचा दर पल्ल्याला पस्तीस रुपये आहे. ॐ **एकाद्या पदार्थाला दर येणें** १ त्याची किंमत चढणें. २ तो दुर्मिळ होणें. **दरठरोती** स्त्री० १ दर ठरविणें; दराचा ठराव. २ जमीनसाऱ्याची फेरतपासणी. **दरदाम** पु० विकत घ्यावयाच्या किं० घेतलेल्या पदार्थाचा घाऊक किं० किरकोळीचा दर, किंमत, इ० चौकशी; उ० दोन चार दुकानीं लोणी पाहून आणि दरदामाची चौकशी करून पांच रुपयांचें लोणी विकत आण.

दर [सं० दरण=फोडणें, मोडणें] **पु०** १ खड्डा. २ पदार्थविशेष शिरकावण्यासाठीं किं० खुपसावयासाठीं किं० घालवयासाठीं केलेलें भोक; उ० ह्या खांबाला दर खणून घे; खुंटीसाठीं भिंतींत दर कर. **टीप,**—' दरा ' हा पुल्लिंगी शब्द वरील दोन्ही अर्थीं योजला जातो. ॐ **दराची माती दरास पुरत नाहीं** पदार्थाच्या मांडणींत किं० कामाच्या सरणींत अत्यल्प जरी फेरफार केला तरी तो पदार्थ पूर्वीच्या जागीं सोईनें राहूं शकत नाहीं किं० तें काम पूर्वीप्रमाणें सुरळीत चालूं शकत नाहीं. **वाकड्या मेढीला वाकडा दरा** सोयीची गोष्ट न ऐकणाऱ्या माणसाशीं व्यवहार करतांना त्याला अडचणीच्या मार्गांत लोटावें म्हणजे तो वटणीस येतो.

दर[**फा**०]**वि**०प्रत्येक; उ०दर मणांस दोन रुपये प्रमाणें सात मणांस चवदा रुपये पडतील; उ० तुम्हाला दर साल दर शेकडा पांच रुपये व्याज पडेल; उ० दर माणूस, दर झाड, इ०. **दरमहा, दरमाहा, दरमा** [**फा०** दरमाह्= प्रत्येक महिन्यास] **क्रि० वि०** दर महिन्याला. **पु०** महिन्याला मिळणारा पगार किं० वेतन. **दरसदे** [**फा**० दरसद्] **क्रि० वि०** प्रत्येक शेकड्याला; उ० दरमहा दरसदे आठ आणे प्रमाणें व्याजाचा दर मीं दिला.

दरक, दर्क [**अ**०] **पु**० (१) कारभारी, मुख्यत्यार किं० दिवाण, (२) मुजुमदार, (३) फडणीस, (४) सबनीस, (५) कारखाननीस, (६) चिटणीस, (७) जामदार, (८) पोतनीस, हे जे मुख्य आठ पिढीजादे अधिकारी किं०इतर गौण अधिकारी ते किं०त्यांचे जे हुद्दे किं० अधिकार ते प्रत्येक. ॐ **दरकदार, दर्कदार, पु०, दरकी असामी, दर्की असामी स्त्री०** वरील आठ मुख्य आणि इतर जे गौण अधिकारी ते प्रत्येक; दरक (किं० दर्क) आहे ज्याला तो. **दरकपट्टी, दर्कपट्टी स्त्री०** दरकदारावर बसविलेला कर,—जो उत्पन्नाच्या कांहीं विशिष्ट अंशाइतका असे;म्हणजे दर दहा वर्षांनीं घ्यावयाचा एका वर्षाच्या उत्पन्नाइतका सरकारी कर. **दरकुटें न०** दरक अथवा दरकदार (निंदेंत).

दरकार [**फा**०] **स्त्री०** जरूरी; परवा.

दरखास्त [**फा**०] **स्त्री०** फिर्याद; विनंतीचा अर्ज.

दरखोती स्त्री० १ कांहीं शर्तींवर करावयाचें काम. २ भुईमूग, बटाटा, इ०ची पूर्ण वाढ व्हावयाच्या अगोदरचा ठरविलेला किंमतीचा आंकडा.

दरगा [**फा**० दर्गाह्] **पु**०मुसलमान लोकांचें प्रार्थनास्थळ.

दरगुदर पु० काणा डोळा; क्षमा.

दरज,दर्ज पु० खूप मोठा रंधा.

दरज , दर्ज [**फा**०] **स्त्री०** विटा, दगड, तक्ते, इ० च्या रचाईतील फटी किं० चिरा. ॐ **दरजागिरी स्त्री०** १ विटा किं० दगड यांच्या रचाईतील फटी किं० सांधे यांत चुना इ० भरणें; टिपगिरी; (करणें); दरजा भरणें. ' दरदागिरी ' अशाही रूपानें हा शब्द ह्या अर्थीं रूढ आहे. २ कागदावर लिहिलेल्या मजकुरांत कांहीं भर घालावयाची असल्यास दोन ओळींच्या मधील जागेंत लिहितात ते शब्द किं० तसे शब्द लिहिणें.

दरजा, दर्जा [**अ**० दरजाह्] **पु**० १ हुद्दा, अधिकार. २ योग्यता, पाहिरी. ३ पदार्थविशेषाचें स्थान.

दरजी, दर्जी [**फा**०] **पु**० कपडे शिवणारा; [शिंपी.

दरंड स्त्री० १ नदीचा कांठ, पर्वत, इ० स्थळीं तुटलेली जी भूमि असते ती. २ दगडांच्या फटींत चिखल न भरतां रचलेली भिंत;गडगा.**दरवट वि०** उंच सखल आणि खड्डे, खाचा, उंचवटे, इ०जींत आहेत अशी (जमीन).

दरडाई [म० ' दरडावणें ' पासून] स्त्री० कोणेकाच्या अंगावर ओरडणें किं० ओरडून त्याला धमकी घालणें.

दरडावणें, दरडाविणें स० क्रि० (कोणेकाच्या अंगावर) ओरडणें किं० त्याला धमकी देणें किं० धाक घालणें.

दरद, दर्द [फा०] पु० स्त्री० १रोग. २रोग साधारण बरा झाल्यावर त्याचा शिल्लक राहिलेला अंश. ३ काळजी, परवा, घोर(कांहीं कामाबद्दलचा मनाला लागलेला). ४ भाषण, विधान, लेख, इ० तील मर्म किं० खुबी किं० सारभूत अंश. ❀ **बिनदर्द** वि० ज्याला दुसऱ्याच्या कामाची यत्किंचित् परवा नाहीं असा; दुसऱ्याचें नुकसान झालें किं० काम बिघडलें तर ज्याला बिलकुल हळहळ वाटत नाहीं असा. **दर्दी** वि० मर्मज्ञ. **दरदवत** वि० दुसऱ्याची काळजी बाळगणारा; दुसऱ्याविषयीं परवा बाळगणारा. **गरजवंत तो दरदवंत** ज्या कोणाला आपलें कांहीं काम लोकांकडून करवून घ्यावयाचें असतें तो निदान त्या वेळेपुरती तरी लोकांबद्दल आस्था दाखविणारच.

दरदर, दरदरां, दरदरून क्रि० वि० १जोरानें किं० चळांचळां (घाम येण). २ (भिजलेली जमीन, आंबलेला पदार्थ) फार फार किं० जोराजोरानें (फुगणें किं० फुगून वर येणें).

दरदरणें अ० क्रि० १(जोरानें आलेल्या घामानें) शरीर व्याप्त होणें. २ (आधल्या दिवशीं भिजवून ठेविलेलें पीठ किं० आंबलेलें पीठ) फुगून वर येणें. ३ (द्रव इ० पदार्थ) फेस इ०च्या रूपानें वर येणें. ४ (फोड, गळूं इ०) एकदम मोठें होणें.

दरदरा पु० १ दुसऱ्याविषयीं आपणाला वाटते ती भीति किं० वाटतो तो वचक; दरारा. २ भीतीचें कारण; उ० त्या वाटेनें खुशाल जा, कांहीं दरदरा नाहीं.

…ें अ० क्रि० १ आरडा ओरडा करणें;
…णें. २ बोभाटा करणें.

…०] पु०, न० १ राजाची किं०
…थें केलीं जातात ती जागा. २
…च्या किं० अर्जदारांच्या गांठी
…णें). ३प्रजाजनावर आपल्या
…ग म्हणून राजानें केलेला थाटमाट किं० भपका. ४ दरबारांत जाणारे येणारे किं० काम करणारे लोक समुच्चयानें. ❀ **दरबार खर्च** पु० सरकारांतून आपलें कांहीं काम करवून किं० लवकर करवून घ्यावयाचें असतां शिपायी, इ०कांना द्यावा लागतो तो लाच. **दरबारचीं कुत्रीं** न० अ०व० आपलें कांहीं काम सरकारांतून करवून घ्यावयाचें असतां शिपायी, पट्टेवाले, कारकून, इ० जे लाचासाठीं आपल्या कामांत विघ्नें आणतात किं० दिरंगाई चालवितात ते लोक. **दरबार तोंड** न० आपल्या कामासाठीं ज्यांना लाच देऊन संतुष्ट करावें लागतें अशा लोकांची लाच मिळविण्याची इच्छा, हाव, किं० प्रवृत्ति (भरणें, संभाळणें, दाबणें). **दरबार महशूर** वि० १ सर्व लोकांस विदित. २ दरबारचा माहीतगार. **दरबारी** वि० १ राजदरबाराला साजेसा. २ थाटमाटाचा; भपकेदार. ३ पोकळ, खोट्या प्रेमाची, किं० खोट्या आस्थेची (भाषणशैली). **दरबारी कानडा** पु० (संगीतांत) कानडा ह्या रागाचा एक प्रकार. **दरबारी जोडा** पु० फाटका किं० ठिगळें असलेला जोडा,–जो चोरीस गेला असतां मालकाचें फारसें नुकसान होत नाहीं.

दरवडा, दरोडा पु० १ अनेक चोरांनीं जुटीनें केलेला हल्ला (पडणें, घालणें, येणें, परतविणें). २ अनेक चोरांची हल्ला करणारी टोळी. ह्या टोळींतील एका एका चोराला, 'दरवडेकरी,' किं० 'दरवडेखोर' म्हणतात.

दरवळ पु० हिंग, फोडणी, फूल, इ० चा वास किं० उग्र वास किं० घमघमाट.

दरवळणें अ० क्रि० वास, सुवास, दुर्गंधी, इ० आसमंतांत पसरणें.

दरवाजा [फा० दर्वाजाह्] पु० १ वाडा, हवेली, इ० चें पुढचें दार. २ मोठें दार. ३दिंडीचें दार.

दरवान [फा० दर्वान्] पु० दारावरचा [पाहारेकरी.

दरवेशी [फा० दर्वेष्] पु० १ मुसलमान भिकारी. २ अस्वलें, माकडें, इ० चे खेळ दाखवून चरितार्थ करणारा.

दरसाविणें [म० दर्शविणें] स० क्रि० गुप्तपणें इशारत करून दुसऱ्याला (आपलें मनोगत) कळविणें.

दरा [सं० दर=गुहा, खिंड] **पु०, स्त्री०** १ पर्वतांतील खोरें. २ गुहा. ३ (लाक्षणिक) पोट. ❀ **जेथें भरे दरा तोच गांव बरा** जेथें आपला चरितार्थ चालूं शकेल त्याच गांवीं राहाणें इष्ट. **दराखोरा पु०** डोंगरांतील अडचणीची जागा. **दऱ्याखोऱ्यांत, दरींखोरीं क्रि० वि०** अडचणींत, विपन्न दशेंत, किं० संकटांत (पडणें, पाडणें, घालणें).

दराठा पु० १ अरेरावीची किं० मगरूरीची भाषणपद्धति (लावणें, मांडणें). २ कोणेकाची खरडपट्टी.

दराडणें अ० क्रि० कोणेकाच्या अंगावर ओरडणें किं० त्याला रागें भरणें किं० त्याची भोसडपट्टी काढणें.

दरारणें, दराडणें अ० क्रि० जोरानें दरदरणें. मागें ' दरदरणें ' पहा.

दरारा पु० १ कोणेकाची काढलेली खरडपट्टी. २ कोणेकाचा अधिकार, इभ्रत, करडा स्वभाव, इ० मुळें दुसऱ्याला वाटते ती भीति, किं० वाटतो तो वचक (बसणें, बसविणें, दाखविणें).

दरारां, दरारून क्रि० वि० मागें ' दरदरां ' ' दरदरून ' पहा.

दरिद्र [**सं०**]**वि०**निर्धन. **न०दारिद्र्य, दारिद्र न०**अन्नवस्त्रादि जे आवश्यक पदार्थ त्यांची कमतरता किं० ह्या कमतरतेमुळें भोगावी लागते ती अडचण किं० सोसावे लागतात ते कष्ट समुच्चयानें; गरीबी; विपन्नावस्था. ❀ **दरिद्रावस्था, दारिद्र्यावस्था स्त्री०** गरीबी; विपन्न दशा. **दरिद्री वि०** १ गरीब; अन्नवस्त्र ज्याला पुरेसें मिळत नाहीं असा. २ क्षुद्र; कृपण. ३ ज्याचा आत्मा अनुदार आहे असा (मनुष्य). ४ पैसा जवळ असून त्याचा उपभोग घेण्याकडे ज्याची प्रवृत्ति नाहीं असा. ५ टाकाऊ; अगदीं भिकार (पदार्थ). **दरिद्र दामोदर पु०** गरीब माणूस (विनोदांत). **दरिद्रनाम संवत्सरे** [**सं०** दरिद्र ह्या नांवाच्या वर्षी] **पु०** गरीब माणूस. **न०** गरीबी; दारिद्र्य. **दरिद्री हाड, भिकार हाड न०** १ हीन कुळांतील मनुष्य किं० जनावर. २ अनुदार आत्मा आहे ज्याचा असा माणूस.

दरिया इ० पुढें ' दर्या ' इ० पहा.

दरी [**सं०** दरि,दरी] **स्त्री०** लहान दरा;खोरें. ❀ **दरकुट, दरकुटा स्त्री०, दरकुट न०** दरखोरें. **दरेमार पु०**दरींत लोटून ठार मारणें.

दरीं, दरीन [**फा०** दर् (आंत)+ईन् (ह्या)] **क्रि० वि०** ह्यांत, ह्या प्रकरणांत, ह्या बाबतींत (दरबारी भाषेंत किं० सरकारी कागदपत्रीं). ❀ **दरीं अय्याम** [**फा०** दर्+ईन्+अय्याम् (ह्या काळीं)] **क्रि० वि०** ह्या काळीं; ह्या समयीं; ह्या प्रसंगीं.

दरेटी स्त्री० जांत्याच्या तळ्यांचा दगड किं० फरसबंदीचा दगड ह्यांवर बसविलेला कर.

दरोगा [**फा०** दारोगाह्] **पु०** १ एकाद्या कचेरीवर किं० सरकारी अमलदारांवर देखरेख करणारा. २ सरकारनें नेमलेल्या अधिकाऱ्यांवर देखरेख. ३ शेताच्या उत्पन्नावर सरकारसारा ठरविण्यांत यावयाच्या अगोदर तें उत्पन्न मालकानें काढून घेऊं नये म्हणून खबरदारी घेण्यासाठीं सरकारनें नेमिलेला इसम. **टीप,**–वरील १ आणि २ ह्या अर्थी ' दरोगेकरी ' असाही शब्द योजला जातो. ❀ **दरोगेगिरी स्त्री०** दरोग्याचा हुद्दा, अधिकार, किं० कार्यक्षेत्र.

दरोडा इ० मागें ' दरवडा ' इ० पहा.

दरोबस्त [**फा०**] **क्रि० वि०**एकही अपवाद न होतां. २ सर्व, एकही शिल्लक न राहतां,एकूण एक, झाडून.

दरोळ, दरोळणें मागें ' दरवळ, ' 'दरवळणें' [पहा.

दर्क इ० मागें ' दरक ' इ० पहा.

दर्ज पु० मोठा रंधा. मागें 'दरज' पहा.

दर्ज [**फा०**] **स्त्री०** फट, भेग, चीर. मागें ' दरज ' पहा.

दर्जा [**अ०** दर्जाह्] **पु०** हुद्दा, अधिकार. मागें ' दरजा ' पहा.

दर्जी [**फा०**] **पु०** कपडे शिवणारा; शिंपी.

दर्दुर [**सं०**] **पु०** बेडूक.

दर्प [**सं०**] **पु०** १ गर्व, ताठा. २ उत्साह. ३ उग्र आणि तीव्र वास किं० गंध,–हिंग, लसूण, सबजा, इ० चा. ४ आपल्या अंगच्या कांहीं विशेष गुणामुळें लोकांच्या मनावर बसतो तो दरारा किं० वचक, किं० वाटते ती भीति. ❀ **दर्पटाण स्त्री०** वर ' दर्प ' अर्थ ३ पहा.

दर्पण [**सं०**] **पु०** आरसा.꙳ **आंधळ्याला दर्पण काय होय** ? ज्या माणसाला ज्या वस्तूचा उपयोग नाहीं किंवा उपयोग करतां येत नाहीं त्याला ती वस्तु देणें हा वेडेपणा होय.

दर्भ [**सं०**] **पु०** १ एक प्रकारचें गवत,–हें धर्मकृत्यांत उपयोगिलें जातें. २ (लाक्षणिक) होरपळून गेलेलें पीक. ꙳ **दर्भ्या पु०** १ उत्तरक्रिया म्ह० और्ध्वदेहिक कर्म सांगणारा ब्राह्मण; कारटा. २ अपशकुनी.३नाशकारक किं० उपद्रवी माणूस. ४ अनुदार अंत:करण आहे ज्याचें असा मनुष्य. **कोणकानें दर्भ घेऊन उभें असणें** त्याणें कोणेकाचें वाईट इच्छीत असणें किं० त्याचें वाईट करण्याची खटपट करीत असणें.

दरम्यान, दरमियान [**फा०**दरमियान्]**पु०** १ जामीन राहिलेला मनुष्य. २ मध्यस्थ. **क्रि०वि०** १ लुब्रेपणानें किं० लुडबुडेपणानें (म्ह० योग्य माणसाला किं० अधिकाऱ्याला न विचारतां किं० त्याची संमति न घेतां); उ०मला विचारल्यावांचून दरम्यान तो दागिना तूं गहाण कां टाकलांस ? २ह्या अवधींत; मध्यंतरीं;तोंपर्यंत.**श०यो० अ०** दोन वस्तूंच्या मध्यें किं० मधोमध.

दर्या पु०, स्त्री०, दर्याव पु० [**फा०**] १ समुद्र. २ नदी. ३ पाण्याचा मोठा संचय (सरोवर इ०). **टीप**,–शेवटचे दोन अर्थ फारशींत आहेत; मराठींत क्वचित येतात. ꙳**दर्यावर्दी पु०** १ समुद्रावर सफर करणारा. २ खलाशी; खलाशाचा धंदा कराणारा. **दर्यागर्क वि०** १ समुद्रांत बुडलेला किं० बुडून मेलेला. २ समुद्राच्या पाण्यानें वाहून गेलेला(गांव,शेत). **दर्यामें खसखस स्त्री०** अत्यन्त मोठ्या परिमाणांत अत्यन्त क्षुद्र परिमाण; अत्यल्प प्रमाण.

दर्याफत,दर्याफती, दर्यास, दर्यासी [**फा०**-दर्याफ्त्] **स्त्री०** १ विचार, मनन. २ साधक बाधक प्रमाणें विचारांत घेणें. ३ चौकशी.

दर्श [**सं०**] **पु०** १ अमावास्या. २ प्रतिपदेची इष्टि.

दर्शक [**सं०**] **वि०** १ दाखविणारा; उ० मार्गदर्शक. २ प्रमाण, पुरावा. ꙳ **दर्शक सर्वनाम न०** जवळपणा किं० दूरपणा दाखविणारें सर्वनाम; उ० तो, ती,तें,ते,त्या, तीं, हीं दूरपणा दाखविणारीं सर्वनामें. हा, ही, हें, हे, ह्या, हीं, हीं जवळपणा दाखविणारीं सर्वनामें;हीं दोन्हीं प्रकारचीं सर्वनामें वस्तुत: विशेषणेंच होत.

दर्शन [**सं०**] **न०** १ पाहणें; भेटणें.२ दृष्टि. ३ डोळा. ४ दृष्टीचा टप्पा किं० पल्ला. ५ आरसा. ६ चेहरा, रूप. ७ दाखविणें; भेटविणें; हजर करणें. ८ देव, राजा, इ० ची भेट. ९ प्रदर्शन. १० पाहून केलेली परीक्षा(वैद्यकांत). ११ स्वप्न. १२ तत्त्वज्ञानाचा पंथ; शास्त्र. १३ अध्यात्मज्ञान. ꙳**दर्शनपथ पु०**नजरेचा टप्पा.**दर्शन न०** सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा, आणि वेदान्त, ह्या सहा तत्त्वज्ञानाच्या सरणींपैकीं कोणतीही. **दर्शनपट्टी, दर्शनीपट्टी स्त्री०** दरवाजा किं० खिडकी यांचेवर बसविलेली लाकडाची नक्षीदार पट्टी. **दर्शनानुशासन शास्त्र न०** प्रकाशासंबंधाचें शास्त्र. **दर्शनप्रतिभू पु०** अमुक वेळीं अमुक मनुष्य अमुक ठिकाणीं हजर राहील अशी सरकारची खात्री करून देतो तो. **दर्शनसंतुष्ट वि०** भोग्य पदार्थाचा उपभोग न घेतां त्या पदार्थाच्या केवळ दर्शनानें संतुष्ट होण्याचा स्वभाव ज्याचा असा; ' दर्शनसंतोष ' सुद्धां ह्या अर्थी योजला जातो. **दर्शनसंतोष(–षी) वि०** आंत कांहीं गुण नसतां केवळ बाह्य रूप ज्याचें मोहक आहे असा (माणूस, पदार्थ). **दर्शनी वि०** १ केवळ पाहाण्यांतच चांगला. २गृहादिकांचा पुढचा भाग,–जो एकदम लोकांच्या दृष्टीस पडतो. **दर्शनी अंग न०** पदार्थाची पुढची किं० शोभिवंत बाजू. **दर्शनी हुंडी स्त्री०** जी हुंडी पाहिल्याबरोबर पैसे दिले पाहिजेत अशी हुंडी.**सणंगाची दर्शनी घडी स्त्री०**घडी घातलेल्या वस्त्राची बाहेरची किं०शोभिवंत बाजू. **दर्शनी दरवाजा पु०** घराचा पुढचा दरवाजा.

दर्शनीय [**सं०**] **वि०**१ पाहावयाला चांगला किं० सुंदर; देखणा. २ ज्याला भेटणें योग्य आहे असा (मनुष्य).

दर्शाविणें, दर्साविणें [**सं०**'दृश्'(पाहाणें) पासून] **स० क्रि०** अप्रत्यक्ष रीतीनें, म्ह० स्पष्ट शब्दांनीं न सांगतां, आपला अभिप्राय लोकांस कळविणें किं० सुचविणें.

दर्शित [सं०] वि० दाखविलेला; दाखवून दिलेला; सुचविलेला.

दर्शी [सं० दर्शिन्=पाहणारा] वि० १ (समासांत) दाखविणारा. २(समासात) पाहाणारा; उ०दूरदर्शी, सुक्ष्मदर्शी, छिद्रदर्शी, इ०.

दल [सं०] न० १ पान (झाड, इ० चें). २ तुकडा, खंड, अंश. ३ अर्धा भाग. ४ पातें (तरवार इ० चें). ५ ढीग, रास. ६ सैन्य. ॐ **दलभार** पु० मोठें सैन्य; सैन्याचा विस्तार; सैन्य. **दलशिंगार** पु० सैन्याचा जिनगर. **दलदपट** वि० भक्कम, मजबूत (घर, मनुष्य, प्राणी, खांब, तुळई, इ०).

दलदल (–ली)[हिं०] स्त्री० १ ज्या जमीनीत खोलपर्यंत चिखल आहे, जीवरून जाणारी गाडी, मनुष्य, इ०आंत रुतून बसतात, अशी जमीन. २ चिखलटपणा. ३ हालणें, कांपणें, थरथरणें. ॐ **दलदलीत** वि० १ चिखलट (जमीन). २ थिलथिलित (अंग किं० गात्र).

दलन [सं०] न० १ फोडणें. २ फुटणें. ३ चिरडणें, चूर्ण करणें.

दलबादल [हिं०] न० १मोठें प्रचण्ड सैन्य. २ दाट मेघपटल. वि० प्रचण्ड; अवाढव्य; उ०दलबादल फौज (किं०कारखाना, कारभार, इ०). ॐ **दलबादल डेरा** पु० बड्या कामगारासाठीं उभारलेला तंबू.

दलभंजन न० घोड्याचें एक अशुभ लक्षण,– चौकावरील म्ह० ढुंगणावरील उलटे केश. पु० १ दुर्दैवी माणूस. २अपशकुनी माणूस. ३ व्रात्य किं० खोडकर मुलगा किं० माणूस. **दळभद्री** वि० धिकारलक्षणी, दुर्दैवी, कपाळकरंटा.

दलान [फा०] न० दिवाणखाना.

दलामालकी [फा० दलाल् + मालक्+म० ई (प्रत्यय)] स्त्री० १ फाजीलपणाची लुडबुड; आपलें कर्तव्य न करतां दुसऱ्याच्या कारभारांत नाक घालणें. २ रिकामटवळे धंदे, उद्योग, किं० खटपटी. टीप,–ह्या दोन्ही अर्थी ' दलामालक्या ' असा अ० व० प्रयोग बहुधा होतो. क्रि० करणें.

दलाल [अ०] पु० आडत्या, मध्यस्थ(व्यापारांत). ॐ **दलाली** स्त्री० १ दलालाचा धंदा किं०त्याच्या खटपटीबद्दल त्याला द्यावयाची बक्षिशी. २ दुसऱ्याचें कांहीं काम करतांना लबाडीनें मारलेला पैसा. **दलालाच्या अंगावर घोडे पडत नाहींत** १मालकानें किं०मुख्यानें कांहीं चुकी केली तर ती त्यालाच भोगावी लागते, त्याच्या कारकुनाला किं० नोकराला ती भोगावी लागत नाहीं. २ चुकी मालकाची असो किं० नोकराची असो, परिणाम मालकालाच सोसावे लागतात. [चूर्णित.

दलित [सं०]वि०फोडलेलें, कुटलेलें, चिरडलेलें,

दल्हें न० पुढें ' दळें ' पहा.

दंव न० १ हवेंतील जलांश; दहिंवर. २ जमीनींतून पाण्याची वाफ बाहेर पडते आणि दगड, झाडांचीं पानें, इ०वर पाण्याच्या बिंदूंच्या रूपानें बसते ती.

दव [सं०] पु० १ अरण्य. २ वणवा. ॐ **दवाग्नि** पु० वणवा.

दवड, दौड [हि० दौड्ना; म०दवडणें]स्त्री० अतित्वरेनें चालणें; धावणें.

दवडणें [हिं०दौड्ना, दौडाना] अ० क्रि० धावणें. स० क्रि० १ पळावयास लावणें. २ पाठविणें. ३ त्वरेनें पाठविणें. ४ घालवून लावणें; हाकलून देणें. ५ नाहींसा करणें. ६ उधळून टाकणें; ७ फुकट घालविणें. ८ (संधीचा) उपयोग करून न घेणें. ९ गमावून घेणें. ॐ **तोंडावाटें काढावें आणि देशांतरास दवडावें** आपला विचार किं० बेत आपण बोलून गेलों कीं तो सर्व लोकांस कळतोच. **हातचें दवडा आणि पळत्याचे पाठीस लागा** अशाश्वत किं० अनिश्चित लाभाच्या आशेनें शाश्वत आणि निश्चित जें आपल्याजवळ आहे तें टाकून देणें (हा मूर्खपणा होय). **हातीं कवडी विद्या दवडी** खेळण्याचें व्यसन ज्याला लागलें त्याला विद्या होणें शक्य नाहीं.

दवंडाळ [म० ' दवंडी ' पासून] वि० चकाट्या पिटणें, शेजाऱ्यांच्या वर्तनाची टवाळकी करणें, इकडच्या खबरा तिकडे सांगणें, इ० खोड्या असलेला.

दवंडी [हिं०] स्त्री० १ सरकारच्या हुकमानें कांहीं खबर किं० कायदा किं० नियम सर्व लोकांस कळवितांना जें ढोलकें किं० थाळा महार बडवितात तो (पिटणें). २ अशा प्रकारें जें

लोकांत जाहीर केलें तें. २ प्रसिद्धि, बोभाटा.

दवणशीर स्त्री० पायाचा घोटा आणि तंगडी यांना जोडणारी जाडी शीर.

दवणा [**सं०** दमन, दमनक] **पु०** १ एक सुगंधी वनस्पति. २ प्रतिवर्षी चैत्रमासीं दवण्यानें करतात जी कुलदेवतादिकांची पूजा ती किं० ह्या पूजेचा समारंभ; उ० आज आमच्या घरीं दवणा आहे, आपण भोजनास यावें. ❀ **दवणीपुनव, दवणी पूर्णिमा स्त्री०** चैत्रमासाची पौर्णिमा,– ह्या दिवशीं दवण्याचीं पानें देवांना मुद्दाम वाहातात. **दवणशेवती स्त्री०** शेवतीची एक जात. **दवणशेवतें न०** ह्या शेवतीचें फूल.

दवणा पु०, दवणें न० काडू किं० गांडवळ किं० गांडूळ ह्या नांवाचा सुतळीसारखा एक क्षुद्र प्राणी. ❀**कोठें दवणें आणि कोठें शेषाहि ?** ह्या दोन प्राण्यांची तुलना मूर्खपणाची होय. **दवण्याची शेषाशीं स्पर्धा** असमर्थानें समर्थाशीं वैर किं०स्पर्धा करणें (हा मूर्खपणा होय).

दवदव स्त्री० कष्ट, उपद्रव, त्रास, खटपट (काढणें, करणें, पुरवणें).

दवना पु० वर ‘ दवणा ’ पहा.

दवरणें स० क्रि० डोकें,खांदा, पाठ, इ०वरचें ओझें उतरणें (कांहीं काळ विश्रांति घेण्यासाठीं).

दवरणें न० डोक्यावरचें किं०खांद्यावरचें किं० पाठीवरचें ओझें विश्रांतीसाठीं प्रवाशानें कांहीं वेळ उतरून ठेवण्यासाठीं रस्त्याच्या कडेला केलेला असतो तो ओटा किं० चार खांबांवर ठोकलेली असते ती फळी.

दवलत इ० खालीं ‘ दौलत ’ इ० पहा.

दवा [**अ०**] **पु०** औषध. ❀**दवाखाना पु०** जेथें रोगाची परीक्षा करून रोग्यांना फुकट किं० विकत औषधें दिलीं जातात ती जागा; औषधालय.

दंवारणें [**म०** दंव] **अ० क्रि०** दंवानें व्याप्त होणें किं० दमट होणें.

दंवारा [**म०**दंव] **पु०**केवळ दंवाच्या ओलाव्यानें पिकतो तो सावा.

दवासन न० घोड्याच्या गळ्यांतील दोहोंकडे बांधावयाची दोरी.

दश [**सं०** दशन्] **वि०** दहा.❀**दशार्ह पु०** १ कृष्ण. २.बौद्ध. ३ जैन. **दशानन, दशग्रीव, दशकंठ, दशमुख, दशमौळी** ,इ० **पु०** रामायणांत वर्णिलेला लंकेचा राजा. **दशरथ पु०** अयोध्येचा राजा; राम, लक्ष्मण, भरत, आणि शत्रुघ्न, याचा पिता.**दशहरा स्त्री०** १ गंगा. २ ज्येष्ठ शुद्ध दशमी किं० त्या दिवशीं करतात तो गंगेचा उत्सव. ३ आश्विन शुद्ध दशमीस करतात तो दुर्गेचा उत्सव. **दशग्रंथ पु० अ० व०** संहिता,ब्राम्हण, आरण्यक, शिक्षा, कल्प, व्याकरण, निघंटू, निरुक्त, छंद, आणि ज्योतिष, हे दहा ग्रंथ. **दशग्रंथी ब्राह्मण पु०** वरील दहा ग्रंथ पढलेला ब्राह्मण. **दशदिशा स्त्री० अ० व०** पूर्व, आग्नेय, दक्षिण, नैऋत्य, पश्चिम, वायव्य, उत्तर, ईशान्य, खालची दिशा, आणि वरची दिशा, अशा दहा दिशा. **दशदिशीं क्रि० वि०** वर सांगितलेल्या दहा दिशांत किं० दिशांकडे, ह्म० सर्व दिशांस. **दशमूळ न० ए० व०** बाळंतिणींना देतात तो दहा मूळांचा काढा. **दशावतार पु० अ० व०** मत्स्य, कूर्म, वराह, नारसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्ध, कलंकी, हे विष्णूनें धारण केलेले दहा अवतार. **दशावतारी पु०** वरील दहा अवतार नाटकरूपानें दाखवितो तो. **दशावतारी गंजिफा स्त्री०अ०व०** वरील दहा अवतारांच्या चित्रांच्या खेळावयाच्या गंजिफा; यांच्या व्यावर्तकत्वें ‘ चंगकांचनी गंजिफा’. **दशांक पु०**१ दहाचा अंक. २ नागाच्या फण्यावरील दहाच्या अंकासारखें चिन्ह. **दशांग पु०** चंदनादि दहा सुगंधी पदार्थांच्या चूर्णाच्या गोळ्या ज्या धूपार्थ देवापुढें जळतात त्या प्रत्येक. **दशाह पु०** १ सुतकाचे दहा दिवस. २ दहा दिवसांचा अवधि. **दशांश अपूर्णांक पु०** ज्या संख्यांना १०,१००,१०००,इ० दहाचे घात छेद असून ते दशांश चिन्हापुढच्या स्थलांनीं दर्शविले जातात त्यांना दशांश अपूर्णांक म्हणतात.**दशांश चिन्ह न०** दशांश अपूर्णांकाचे अंक सुरू होतांना देतात तें चिन्ह. **दशाश्व पु०** चंद्र.

दशक [**सं०**] **न०** दहा वस्तूंचा समुदाय.

दंशक [**सं०**] **वि०** चावणारा, दंशणारा.

दशन [**सं०**] **पु०** दांत.

दंशन [**सं०**] **न०** १ चावणें. २ दंश.

दशम [**सं०**] **वि०** दहावा. ❀ **जामाता दशमो ग्रहः** जांवई हा दहावा ग्रह ह्म० उपद्रवी

माणून. **दशमी स्त्री०** दहावी तिथि. **दशमी दशा स्त्री०** म्हातारपण. **दशमद्वार न०** ब्रह्मरंध्र.

दशमी स्त्री०१ दुधांत किं० मूळा, गाजर, इ० च्या रसांत पीठ मळून केलेली भाकरी. २ पीठ भाजून पाण्यांत मळून केलेली भाकरी.

दशा [सं०] स्त्री० १ स्थिति, अवस्था. २ वयोवस्था,–बाल्य, तारुण्य,वार्द्धक्य. ३ सुखदुःख-दायक ग्रहांची स्थिति. ४ आजार, दारिद्र्य,संकट, इ० नीं जर्जर झाल्याची स्थिति.

दशा [सं०] स्त्री० अ० व० वस्त्राची न विणलेली रुंदीकडचीं सूतें; आंचळी.**ए० व०**दशी. ❀ **कांबळ्याची दशी आणि पासोड्या ऐंशी** लोकरीच्या पातळ वस्त्राला जी ऊब आहे ती सुताच्या खूप जाडी वस्त्रालाही नसते. **सदैवाची दशी आणि नरदेवाचा पालव (लागावा)** भाग्यवंताचा थोडा तरी सहवास किं० स्नेह आपणाला घडावा आणि श्रीमंताशीं नात्याचा संबंध असावा म्हणजे आपली इहलोकचीं यात्रा सुखावह होते.**दशी वाहणें** किं०**सुतानें चंद्रास ओवाळणें** शुद्ध द्वितीयेला वस्त्राचें सूत काढून तें चंद्राला अर्पण करणें (असें केल्यानें आपणाला वस्त्रांची समृद्धि भोगावयला सांपडते अशी समजूत आहे).

दंश [सं०] पु० १ चावा, डंख. २ डांस,–चावणारा एक क्षुद्र प्राणी. ३ ग्रंथांतील कठिण किं० दुर्बोध भाग. ४ भाषणांतील गूढाभिप्राय किं० मर्म; उ० त्याच्या बोलण्याचा दंश माझ्या लक्ष्यांत आला नाहीं.५वैर किं०शत्रुत्व,–मनांत गुप्त ठेविलेलें (धरणें).❀**दंशी [सं०दंश]वि०**मनांत द्वेष बाळगणारा; दांत धरणारा;आकसखोर.

दस [सं० दशन्] वि० दहा. ❀ **दसवंदन, दसन्हाणें, दसन्हाण, दसनाण न०** लग्ना-नंतर दहाव्या दिवशीं वधूवरांस तेलें,उटणीं,इ०लावून घालतात तें स्नान. **दसपिंड,दशपिंड पु० अ०व०** मृत मनुष्याच्या नांवानें मरणाच्या दिवसापासून दहा दिवस जे पिंड देतात ते किं० दहाव्या दिवशीं एकदम सगळे पिंड देतात ते.**दसप्यादा पु०** तीन फाशांच्या खेळांत दोन फाशांवर प्रत्येकीं पांच आणि एका फाशावर एक असें पडतें तें दान. **दसरात पंचरात स्त्री०** एक प्रकारचें दिव्य, यांत फिर्याद दिल्यानंतर दहा पांच दिवसांत फिर्यादीचीं मुलें किं० गुरें ढोरें मेलीं तर त्याची फिर्याद खोटी, आणि न मेलीं तर खरी समजून चौकशी करण्यांत येत असे. **दस गेले पांच राहिले** बहुतेक आयुष्य गेलें, आतां अल्प भाग जावयाचा राहिला आहे; वृद्ध मनुष्याचा किं० वृद्ध मनुष्यासंबंधाचा वैतागाचा हा उद्गार आहे.

दसक [सं० दशक] न० १ दहा वस्तूंचा संच किं० समुदाय. २ (गणितांत) हातचे म्हणून घेतात ते. ३ वर्चस्व, वरचष्मा (बसणें, होणें). ❀ **एकाद्याचा एकाद्यावर दसक बसणें** त्याचें त्याच्यावर वर्चस्व किं० श्रेष्ठपणा स्थापित होणें.

दसकत, दस्तखत[फा०] स्त्री०,न०१हस्ताक्षर. २ सही; निशाणी.

दसडी [म० दशी] स्त्री० वस्त्राची दशी (तुच्छतेनें किं० वैतागानें); उ० चोरांनीं घरांत एक दसडी राहूं दिली नाहीं.

दसरा [सं० दशहरा=दुर्गा किं० तिच्या प्रीत्यर्थ उत्सव **] पु०** आश्विन शुद्ध दशमी; ह्या दशमीला ' विजया दशमी ' असें दुसरें नांव आहे. ❀ **दसऱ्यांतून जगेल तो दिवाळी पाहील** १ दसऱ्याची शाश्वती नाहीं, मग दिवाळीच्या गोष्टी कशाला ? (वैतागाचा उद्गार). २ पुढच्या गोष्टीची वाटाघाट किं० येत पुढें. **दसरापट्टी स्त्री०** १ शेतसाऱ्याचा दसऱ्याच्या दिवशीं देतात तो हप्ता. २ देवस्थानाच्या उत्पन्नापैकीं दसऱ्याच्या उत्सवासाठीं जो भाग खर्चण्यांत येतो तो. **दसरा बकरा पु०** १दसऱ्याच्या दिवशीं ज्याचा बळी दिला जातो तो बकरा. २ पाटलाला दसऱ्याची भेट म्हणून दिलेला बकरा.

दसाडें न० १ जाडें भरडें वस्त्र. २ तेल्याच्या घाण्यांतील तेल पुसून घ्यावयाचा फडक्याचा बोळा.

दसोडी [म० दशी] स्त्री० १ दशी,–तुच्छतेनें. २ क्षुद्र किं० अल्प किंमतीची वस्तु (लक्षणेनें). [पहा.

दस्कत, दस्खत न०, स्त्री० खालीं' दस्तखत'

दस्त [फा०] पु०, न० १ शेतसारा. २ गंजिफांचीं चार चार पानें समुच्चयानें किं० खेळावयाकरतां घेतलेलीं पानें समुच्चयानें. ३ सत्ता, अधिकार, ताबा. ४ मिंधेगिरी. ५ हात. ❀ **दस्त**

करणें हस्तगत करून घेणें; पकडणें. **दस्तऐवज** [**फा०** दस्तावीज्] **पु०** लेख, हातानें लिहून दिलेला कागद,–जो लिहून देणाऱ्याला बंधनकारक असतो. **दस्तखत स्त्री०, न० १** सही, निशाणी. २ हस्ताक्षर. **दस्त रुमाल पु०** हातरुमाल.

दस्तक [**फा०**] **न०** अधिकाऱ्यांनीं मार्गांत आडवूं नये म्हणून जो परवाना सरकारांतून कोणे-काला दिलेला असतो तो.

दस्ता [**फा०** दस्ताह्] **पु०** १ चोवीस काग-दांचा समुदाय. २ बंदुकीची नळी ज्या लाकडांत बसविलेली असते तें लाकूड. ३ सैन्याचा भाग-विशेष. ४ गंजिफांच्या खेळांतील एकाच्या वांट्यास आलेलीं पानें समुच्चयानें. ५ कुटावयाचा बत्ता.

दस्ताना [**फा०** दस्तानाह्] **पु०** १ लढतांना कोंपरापासून बोटांपर्यंत जें लोखंडाचें कवच बाहू-वर घातलेलें असतें तें; एक प्रकारचा लोखंडी हात-मोजा. २ (गणितांत) हातचे दहा.

दस्तावणें [**फा०** दस्त] **स० क्रि०** लुबा-डणें, बळकावणें.

दस्ती [**म०** दस्त्] **वि०** ज्यावर दस्त (कर, सारा) बसविलेला किं० बसवावयाचा आहे असा.

दस्ती [**फा०** दस्त्] **स्त्री०** १ चाल, पद्धति. २ झोक, नखरा, ऐट. ३ विशेष प्रकारची चाल, ठेवण, किं० शिरस्ता. ४ कुस्तीच्या प्रारंभींची सलामी(करणें).

दस्तुरी [**हिं०**] **स्त्री०** १ दुकानदाराकडे गिऱ्हाईक आणून देणें, व्यापाऱ्याचा सौदा जुगवून देणें, इ० कामांबद्दल दिलेलें पारितोषिक. २ कोणे-काचें सामानसुमान किं० चीजवस्त.

दस्तूर [**अ०**] **पु०** फारशी लोकांतील धर्म-शास्त्रज्ञ. **पु०, न०** कागद लिहिणाराची निशाणी किं० सही. **पु०** १ चाल, रीति, वहिवाट, शिरस्ता. २ सारा, पट्टी. ३ कायदा; नियम. ❀ **दस्तूर अमल** [**अ०**] **पु०** १ सरकारी कायदा. २ कायद्याला धरून असलेली शासनपद्धति. **दस्तर अमल कीं अमल दस्तूर** कायद्याला धरून कीं लहरीला अनुसरून (वर्तनपद्धति). **दस्तूरखुद वि०** आपण स्वतां लिहिलेला; याच्या उलट कारकुना-कडून लिहविलेला.

दहक [**म०** दहा] **पु०** १ शेकडा दहा हा दर. २ दहावा हिस्सा. ३ लुटारू, दरोडेखोर, इ०-नीं बसविलेली पट्टी. ४ गंजिफांच्या खेळांतील दहिल्या.

दहन [**सं०**] **वि०** १ जाळणारा. २ विनाशक. **पु०** अग्नि. **न०** १ जळण्याची किं० जाळण्याची क्रिया. २ स्मशानांत प्रेत जाळणें. ❀ **दहनसारथि पु०** वायु.

दहम् [**सं०** 'दशम'चा अपभ्रंश] **पु०** (गणितांत) संख्येच्या मांडणींत उजवीकडून दुसरें स्थान.

दहलू, दहल्या [**म०** दहा] **पु०** पत्त्यांच्या खेळांतील दहा ठिपक्यांचें पान.

दहशत [**फा०**] **स्त्री०** धाक, धास्ती, भीति.

दहा [**सं०** दश] **वि०** पांचाच्या दुप्पट. ❀ **दहा घरचे दहा** १ बेजबाबदार माणसें. २ भिन्न भिन्न मतांचीं माणसें,–ज्यांचें ऐकमत्य होणें शक्य नाहीं. **दहावा वि०** पहिला, दुसरा, इ० श्रेणींतील नवव्याच्या पुढचा आणि अकराव्याच्या मागचा. **दहावा ग्रह पु०** उपद्रवी आणि खोडकर माणूस; व्रात्य पोरगा. **दहांचा हात पु० ए० व०** १ संघटित प्रयत्न. २ जुटीनें केलेलें कृत्य. ३ जूट, एकोपा. ❀ **दहांचा हात दुष्मनावर पडूं नये** ज्याच्या विरुद्ध अनेक माणसें जुळून प्रयत्न करीत असतात त्याची स्थिति अति शोचनीय असते; आपल्या वैऱ्यालाही अशी स्थिति प्राप्त होऊं नये !

दहाट वि० १ तलख, चपळ, उत्साही. २ तापट, रागीट.

दहिवड पु० एक लहान झुडूप.

दहिंवर न० दंव, हिम.

दहिंवरणें अ० क्रि० दवाच्या बिंदूंनीं व्याप्त [होणें.

दहीं [**सं०** दधि] **न०** विरजलेलें दूध. ❀ **दहीं खाऊं कीं मही खाऊं असें कोणेकाला होणें** हें करूं कीं तें करूं असें त्याला होणें; त्याचें मन कर्तव्यमूढ किं० संदिग्ध होणें. आमचें 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०' हें पुस्तक लेखांक ३२८ पहा. **दहीं मही करणें** कचरणें; साशंक होणें; कर्तव्यमूढ होणें. **दहीकाला पु०** गोपाळ-काला. मागें 'दधिकाला' पहा. उत्सवाच्या अखे-रच्या दिवशीं मातीच्या हंडींत दहीं आणि जोंध-ळ्याच्या लाह्या घालून ती हंडी टांगतात, मग ती

फोडून त्यांतला हातीं लागेल तो भाग प्रसाद म्हणून प्रत्येक माणूस घेऊन खातो; ह्या विधीस ' दहींकाला ' म्हणतात.

दळ [**सं०** दल] **न०** १ तुकडा; खंड. २ अंश. ३ अर्धा भाग. ४ तरवार इ० चें म्यान किं० पातें. ५ फूल, झाड, इ० चें पान किं० पाकळी. ६ ढीग. ७ सैन्य. ८ कागद, पान, हिरा, इ० ची जाडी. ९ फळाचा आठी इ० त्याज्यांश टाकून उरतो तो ग्राह्यांश; गर; गीर. १० ओव्याचें चूर्ण. ॐ **दळभार पु०** सैन्य किं० सैन्याचा विस्तार. **दळखुंट पु०** कोष्ट्याच्या मागाचा बैलीच्या पुढचा खुंटा. **दळदार वि०** ज्यांत ग्राह्यांश, जाडीपणा, मगज किं० गीर फार आहे असें (फळ, साल, बी, कागद, कातडें, इ०).

दळण [**म०** दळणें; **सं०** दलन; दल=फोडणें, चिरडणें, मिसळणें] **न०** १ जात्यांत धान्य इ० घालून तें दळण्याची क्रिया. २ जें दळून काढलें तें. ३ दळून काढलेल्या धान्याचें परिमाण. ॐ **दळणकांडण न० ए० व०** दळणें, कांडणें, इ० घरगुती किं० संसाराचीं मोलानें केलेलीं किं० स्वतां केलेलीं कामें समुच्चयानें. **दळणावळ स्त्री०** दळण्याबद्दलची मजूरी. **दळणवळण न० ए० व०** १ घरोब्याचा संबंध किं० परिचय. २ व्यापार, व्यवहार, इ० बाबतींत संबंध.

दळणें [**सं०** दल्=चिरडणें] **स० क्रि०** १ धान्यादि पदार्थ जात्यांत घालून त्यांचें पीठ करणें. २ भात घिरटांत घालून टरफलें काढून टाकणें. ॐ **दळील तो भरील** ज्यानें कांहीं पसारा मांडला असेल तो आवरण्याची किं० निस्तरण्याची जबाबदारी त्याच्यावरच असते. **दळप न०** १ दळण्याची क्रिया. २ दळावयाला घेतलेलें धान्यादि. ३ दळण्याबद्दलची मजूरी. **दळाई स्त्री०** दळण्याबद्दलची मजूरी. **दळाकांडा पु० ए० व०** दळणे, कांडणें, इ० घरगुती कामें. **दळाकांडा करावा आणि शिनळांचीं पोटें भरावीं** आपण कष्ट करावे आणि कृतघ्नांना पोसावें (हें मोठें दुर्दैव होय; हा वैतागाचा उद्गार आहे). **दळूंबाई दळूं न०** १ सावकाश किं० आळसांत चाललेलें काम. २ वाईट बदसूर गाणें किं० वाजविणें. **वि०** भिकार, अकुशल (हरिदास, गवई, पुराणिक, वक्ता, इ०).

दळया, दळिया पु० गव्हाचा रवा, तूप, साखर, इ० चें मिश्रण किं० ह्या मिश्रणाचे लाडू.

दळवटणें [**म०** दळणें; **सं०** दल्=तुडविणें, चिरडणें] **स० क्रि०** १ पायांनीं तुडवून किं० हातांनीं कुसकरून किं० चोळवटून खराब करणें (शेत, जमीन, पदार्थ, इ०). २ दांडगाईनें किं० निष्काळजीपणानें (प्राणी, पदार्थ, इ०) उपयोगांत आणून बिघडविणें किं० नासणें. ३ उपयोग करून करून पदार्थ सोयींचा करणें. ४ परिपाठांत आणणें. ५ जमविणें, गोळा करणें. **अ० क्रि०** १ परिपाठाचा किं० राबत्याचा किं० संवयीचा होणें. २ परिचित होणें. ३ एकत्र जमणें किं० गोळा होणें. ४ कांहीं कामासाठीं कांहीं माणसांनीं संघटित होणें.

दळवट [**म०** दळवटणें] **स्त्री०** रहदारी.

दळवटा [**म०** दळवटणें] **पु०** १ रहदारी; जाण्या येण्याची वर्दळ. २ दळणवळण; व्यापार, व्यवहार, इ० मध्यें संबंध.

दळवाडें न० जमाव, गर्दी, थवा.

दळशिंगार पु० मागें ' दलशिंगार ' पहा.

दळा पु० १ डोंगरी भूमींत नाचणी इ० लावण्यासाठीं किं० शाकभाजी करण्यासाठीं वेणून सारखें केलेलें स्थळ. २ शेतामध्यें उंदीर इ० नीं भक्षिल्यामुळें किं० नासाडी केल्यामुळें लहान लहान रिकाम्या जागा पडतात त्या प्रत्येक. ३ बागेमध्यें वेगळ्या वेगळ्या भाजीपाल्यांसाठीं बांध घालून वेगळे वेगळे केलेले जे पट्टे किं० वाफे ते प्रत्येक.

दळिया वर ' दळया ' पहा.

दळें, दळहें न० १ वर 'दळखुंट' पहा. २ वर ' दळा ' पहिला अर्थ पहा.

दळ्या [**म०** दळणें] **वि०** १ दळून पीठ करण्याच्या योग्यतेचा (एक प्रकारचा जाडी तांदूळ). २बायकी कामें (दळण, कांडण, इ०) करणारा किं० करण्याकडे प्रवृत्ति ज्याची असा (पुरुष). ४ थालिपिठ्या (हरिदास, पुराणिक, वक्ता, इ०).

दळ्या वि० वर ' दळया ' पहा.

दळ्या वर 'दळा' पहा.

दक्ष [**सं०**] **वि०** १ ज्याची बुद्धि निरंतर सावधान असते असा; जागरूक. २ अंगावर पडलेल्या किं० करावयाच्या कामांत तत्पर. ३ प्रामा-

णिक. ४ उजवा (हात, पाय, दिशा, बाजू,इ०). पु० १ पार्वतीचा बाप दक्ष प्रजापति. ꠸ **दक्षसुता, दक्षकन्या** स्त्री० १ दक्षाची मुलगी पार्वती. २ अदिति.

दक्षिण [सं०] वि० १ शहाणा, हुशार. २ दक्षिणदिशेचा; दक्षिणेकडचा. ३ उजवा,–डावा याच्या व्यावर्तकत्वें.४ प्रामाणिक; सरळ; बाळबोध. ५ योग्य, अनुरूप.६अनुकूल, वश. ७ शिष्टाचार-संपन्न; सभ्य. पु० १ उजवा हात. २ (साहित्य) अनेक स्त्रियांवर समान प्रेम करणारा नायक. ३ दक्षिणाग्नि. ४ दक्षिण देश. **दक्षिण** स्त्री० दक्षिणेकडचा वारा (खलाशांचा आणि शेतकऱ्यांचा शब्द). ꠸ **दक्षिणाग्नि** पु० अग्निहोत्र्याचा दक्षिणेकडचा अग्नि. **दक्षिणाचल** पु० मलय पर्वत. **दक्षिणायन** न० कर्कसंक्रांतीपासून मकरसंक्रान्तीपर्यंतचा सूर्यादींच्या संचरणाचा काळ.**दक्षिणारण्य** न० दंडकारण्य.**दक्षिणावर्त** पु० उजवीकडे वळलेला शंख. वि० ज्याचें वळण प्रदक्षिणाकार आहे असा (शंख किं० शरीरावरील केशांचा भोंवरा). **दक्षिणपश्चिमा** स्त्री० नैऋत्य दिशा. **दक्षिण बाधणें** (पोफळी इ० वृक्षांस) दक्षिणायनांतील उन्हानें करपाविणें. **दक्षिण सुटणें** (किं० **वाहणें**) दक्षिणेकडील वारा वाहूं लागणें. **दक्षिणेचा दिवा** पु० कुलकलंक असा पोरगा,– दक्षिणेकडे वात जळत असलेला दिवा अशुभ आणतो अशा समजुतीवरून. **दक्षिणगोल** पु० राशिचक्रांतील तुला राशीपासून मीन राशीपर्यंतच्या ज्या सहा राशि त्या समुच्चयानें. **दक्षिणोत्तर** वि० ज्याची लांबी दक्षिणेकडून उत्तरेकडे आहे असें(घर, शेत,इ०). **दक्षिणाचार** पु० शाक्तांचा एक संप्रदाय. याच्या उलट ' वामाचार. ' **दक्षिणापथ** पु० दक्षिणदेश; दख्खन. **दक्षिण दरवाजा** पु० १ पापांबद्दल शासन करणारा जो यम त्याच्या राज्याचा दरवाजा. २ (लाक्षणिक) तुरुंग, कैदखाना. **दक्षिणद्वार** न० १ घराचें दक्षिणेकडचें दार. २ यमाच्या राज्याचें दार. **दक्षिणपालवी** स्त्री० दक्षिण वारा किं०दक्षिणेकडचें ऊन्ह हीं जिला बाधक होतात अशी जमीन,शेत, इ०.याच्या उलट ' उत्तर पालवी. ' **दक्षिणमुख, दक्षिणाभिमुख** वि० दक्षिणेकडे तोंड असलेला. क्रि० वि० दक्षिणेकडे तोंड करून.

दक्षिणा [सं०] स्त्री० १ कांहीं धार्मिक विधींच्या सांगतासिद्ध्यर्थ किं० केवळ परमेश्वर-प्रीत्यर्थ ब्राम्हण, सुवासिनी, कुमारी, इ०ना देतात तें द्रव्य. २ यज्ञपत्नी. ३ दक्षिण दिशा. ४ दुधाळ गाय. ५ कर्मसमाप्ति. ꠸ **दक्षिणापथ** पु० दक्षिण देश; दख्खन.

दा,दां आवृत्ति दाखविणारा प्रत्यय.हा संख्यावाचकें, किती, बहुत, अनेक,इ०शब्दांपुढें लाविला जातो; उ० पांचदां म्ह० पांच वेळां; बहुतदां, अनेकदां, कितीदां, तिसऱ्यांदा, इ०.

दाइमी [अ० दाईम्] वि० कायमपणा,शाश्वतपणा. स्त्री० कायमची देणगी.

दाई, दायी [सं० धात्री] स्त्री० १उपमाता.२ प्रसूतिसमयीं बाळंतिणीची सुटका करणारी स्त्री.

दाइज [सं० दायाद=वारस] पु० १ वडिलोपार्जित धनादिकांचे जे हिस्सेदार किं० वांटेकरी ते प्रत्येक. २ एक गोत्रज असून सुतक आणि सोयेर धरण्याइतके जवळचे नातलग. ३ (लाक्षणिक) कोणीही हितशत्रु. ꠸ **दाईज गोत्रज** वि० एकगोत्रोत्पन्न जो नातलग तो.

दाईम [अ० दाईम्] वि० सातातिक; कायमचें; सतत चालणारें.꠸**दाइमी** स्त्री०१ कायमची देणगी. २ टिकाऊपणा.

दाऊदखानी [हिं०] वि० १ एका विशेष प्रकारचा (गहूं). २ एका विशेष प्रकारची (माळ,सांखळी).

दाकवचा (–ता), **दाखवता, दोकोतां** (–चा)पु० गवळीण आई आणि ब्राम्हण बाप यांचें अपत्य,–हे लोक भविष्यकथन करून,किं०तिथिनक्षत्रादि सांगून, उपजीविका करतात.

दाखल [अ०] वि० १ येऊन पोंचलेला. २ चोपडींत नोंदलेला. ३ ज्ञात; ठाऊक असलेला. श० यो० अ० प्रमाणें; उ०आमचा हा पिढीजादा नोकर आम्हाला पुत्रादाखल आहे; उ० हें काम मीं केल्यादाखल आहे;उ०ती नोकरी मी भिळाल्यादाखल समजतों.

दाखला [म० दाखविणें] पु० १ आपण केलेले कांहीं विधान दुसऱ्याला स्पष्टपणें समजावें यासाठीं केलेलें विधान किं० दिलेलें उदाहरण किं० सांगितलेली समान गोष्ट; दृष्टांत; उ० भीष्म रणां-

गणीं पडतांच सर्वांचेही आवांके पळांत नाहींसे झाले, मजबूत बैलाची साथ नसली तर कोंवळा बैल तोंड वासून खचतो. २ प्रतीति; अनुभव; विधानाचा खरेपणा पटवून देणारी कांहीं गोष्ट; उ०त्या जोशाच्या भाकिताचा मला दाखला आला. ३ पुरावा; कांहीं विधान करावयाला आधारभूत अशी कांहीं गोष्ट; उ०ह्या वाटेनें वाघ गेला ह्याचा दाखला हीं त्याचीं पावलें येथें उमटलेलीं आहेत. ४अमुक मनुष्य जें विधान करीत आहे तें खरें आहे अशा मजकुराचें कोणी सभ्य माणसानें त्याला दिलेलें पत्र किं० चिठ्ठी. ५ कोणा मनुष्याच्या लायकीबद्दल किं० गुणांबद्दल दुसरा कोणी त्याला देतो ती चिठ्ठी किं० पत्र;भलावणपत्रक;शिफारस-पत्र. ॐ **दाखला घेणें** अनुकरण करण्याजोगी गोष्ट म्हणून ती स्वीकारणें; उ० मुंगीपासून उद्योग-शीलतेचा दाखला घ्यावा. **दाखला पटणें** कोणी केलेलें भाकीत खरें झालें असें आढळून येणें.**दाख-ल्यास उतरणें** खरें ठरणें. **दाखला येणें** प्रती-तीस येणें. **दाखला मुकाबला** पुरावा; समर्थक अशी कांहीं गोष्ट. **दाखलेचिठ्ठी** स्त्री०, **दाखले-पत्र** न० १ भलावणपत्रक. २ रामोशी किं० महार यांना दिलेलें शिफारसपत्र. **दाखलेवाईक** वि० ज्याच्या खरेपणाचा अनुभव आलेला आहे असा; उ० हा ब्राह्मण दाखलेवाईक प्रश्न सांगतो.

दाखवणूक [म० दाखविणें] स्त्री०१ नमुना; मासला (दाखविणें). २ प्रदर्शन, मंदिर, देऊळ, खेळ, इ० दाखविणाराला द्यावयाची मजूरी किं० बक्षिशी. ३ खोटा अविर्भाव किं० देखावा;कोणाला फसविण्यासाठीं दाखविलेलें वर्तन; ढोंग.

दाखवा [म० दाखविणें] पु० दृष्टीस पडणें ही क्रिया; आपलें ओझरतें रूप दाखविणें;उ०त्यानें घरांत येऊन दाखवा मात्र दाखविला आणि नंतर तो लगेच निघून गेला.

दाखविणें [सं० दृश्, दृश्यते, ' दिसणें'चें प्रयोजक] स० क्रि० १ कांहीं वस्तु कोणेकाला दिसेल असें करणें; कांहीं पदार्थ कोणेकाच्या दृष्टीस पडेल असें करणें; कांहीं पदार्थ कोणेकाच्या चर्म-चक्षूचा विषय होईल असें करणें. २ कांहीं गोष्ट कोणेकाच्या प्रतीतींस किं० अनुभवास आणून देणें. ३ (कांहीं गोष्ट) प्रमाणें किं० पुरावे ह्यांच्या जोरा-वर सिद्ध करणें. ४ खेळ, नाटक, तमाशा, इ० प्रेक्षकांच्या पुढें करणें.

दाग, दागदुजी, दागिना,इ० मागें 'डाग,' 'डागडुजी, ' 'डागिना,' इ० पहा.

दागन (–ण) [म० डागणें] न०, स्त्री० जनावरें किं० माणसें यांच्या शरीराची त्वचा रोगादिनिवारणार्थ विशिष्ट स्थळीं भाजावयाचा लाल तापविलेला लोखंडाचा तुकडा.

दाजी पु०बहुमानपूर्वक कोणेकाशीं किं०कोणे-काविषयीं बोलतांना हा शब्द योजतात किं० त्याच्या नांवापुढेंही योजतात; उ० दाजी (किं० गोविंददाजी) आले होते; उ० दाजी,इकडे या.

दाट वि० घन; घट्ट; निबिड; उ० ह्या जंग-लांत दाट झाडें आहेत; उ० ह्या गायीचें दूध दाट असतें. **टीप**,–'दाट ' ह्या शब्दाचे अर्थ पुढील शब्दसंहतींवरून कळून येतील. दाट मैत्री,ओळख, सहवास, इ० म्ह० जीवश्च कंठश्च, विशेष घरो-ब्याचा, निकट, इ०; दाट अंधेर, काळोख,इ०म्ह० पदार्थ स्पष्टपणें न दिसण्याइतका; दाट झाडें इ०म्ह० अगदीं शेजारीं शेजारीं उगवलेलीं; दाट बातमी, वंदता, इ० म्ह० पुष्कळ लोकांत पसरलेली,पुष्कळ लोक जी सांगतात अशी; दाट विणीचें वस्त्र म्ह० ज्याचे ताण्याचे आणि बाण्याचे तंतु अगदीं ठासून भरलेले आहेत असें.ॐ**दाटधमक,दाटधमकट** वि० भक्कम,मजबूत(शरीर,गात्र,खांब,तुळई,इ०).**दाट-बळें** क्रि० वि० मुद्दाम; जाणून बुजून; दाटून. **दाटपातळ** वि० कांहीं भागीं दाट आणि कांहीं भागीं पातळ; उ० पेरा दाटपातळ उगवला आहे.

दाटण [म० दाट] स्त्री० १ गर्दी, दाटी. २ द्रवरूप पदार्थाचा घट्टपणा.

दाटणी [म० दाट] स्त्री० १गर्दी,खेचाखेची. २ प्रवाही पदार्थाचा घट्टपणा. ३ माणसें इ० ची स्थलविशेषीं झालेली गर्दी. ३ गठ्ठा इ० बांधाव-याची दोरी. ॐ **दाटणी वाटणी** स्त्री० गर्दी, दाटी, खेचाखेच. **दाटणीं वाटणीं** किं० **दाटणी वाटणीनें** क्रि० वि० गर्दीनें, खेचाखेच करून. **वरण दाटणीं आणि बायको आटणीं** चिवळ तोंडाच्या भांड्यांत वरण शिजविलें तर तें चांगलें शिजतें आणि पुष्कळ माणसांच्या कुटुंबांत बायको असली किं० कामामध्यें सदैव गढलेली असली

म्हणजे ती सुग्रण होते, किंवा तिला चांगली शिस्त लागते. टीप,–१ ह्या म्हणींत ' आटणी 'शब्दाचा अर्थ नियंत्रणा, वचक, धाक, असा घेतला तरी चालेल. २ ह्या म्हणींत ' बायको ' बद्दल ' लेक ' (मुलगी) असाही पाठ रूढ आहे.

दाटणें [म० दाट] अ० क्रि० १ घट्ट होणें. २ (लहान भांड्यांत शिजविलेल्या भाताचीं शितें) टणक होणें किं० टणक राहाणें. ३ (शिवलेला कपडा)अंगाला तंग किं० अडस होणें. ४ (माणसें, जनावरें, इ० नीं) जवळ जवळ किं० खेचाखेच करून बसणें किं०असणें किं०राहाणें.५भोकांत किं० भांडें इ०च्या तोंडांत(बूच,गुडदी,खुंटी,इ० न हालवितां येईल अशा प्रकारें बसणें किं० शिरणें. ६ सर्वत्र पसरणें,–घरांत धूर,सुगंध,दुर्गंध,इ०.७शोक, राग, प्रेम,इ०मनोविकारांनीं हृदय आक्रांत होणें आणि तेणें करून कंठ चोंदणें म्हणजे शब्दोच्चार स्पष्ट न होणें.☸**दाटून** [म०दाटणें] **क्रि० वि०** १मुद्दाम; जाणून बुजून; बुद्धिपूर्वक; बुद्ध्या. २कारण नसतां; उ० दाटून माझ्याशीं कां कज्जा करतोस ?

दाटा [म० दाट] **पु०** १ बूच; गुडदी. २ भोक बंद करावयासाठीं बसविलेली खुंटी.

दाटी [म० दाट]**स्त्री०** १ गर्दी; भीड; खेचाखेच. २ जीवश्चकंठश्च मैत्री. ३ अंधेराचा निबिडपणा. ४ बंडी, टोपी, विजार, इ०चा तंगपणा. ५ वदंता,अफवा, इ० चा सर्वतोमुखीं प्रसार.☸**दाटीवाटीनें, दाटीवाढीनें, दाटीघाटीनें, दाटोवाडीनें क्रि० वि०** दाटीनें होणारी अडचण सोसून किं० पथकरून; उ० दाटीवाटीनें कशीतरी आजची रात्र येथें निजून काढली पाहिजे.

दाठरणें [म० दृढ होणें] **अ० क्रि०** (गळूं) न पिकतां घट्ट किं० टणक होणें;(लहान भांड्यांत शिजविलेला भात) टणक शितांचा होणें;(आंबा)न पिकतां टणक होणे किं० राहणें.

दाड पुढें ' दाढ ' द्वितीय आणि तृतीय अर्थ पहा.

दांड [सं० दंड] **वि०**दांडगा;उद्धट;आडदांड.

दांड [सं० दंड] **पु०** १ वेळूची लांब काठी. २ पट्टा खेळावयास शिकणारे लोक घेतात ती काठी. ३ धोतर, लुगडें, इ० चे दोन तुकडे एकत्र शिवतांना घालतात ती शिवण,–ही शिवण दिसण्यांत सुतळीसारखी असते. ४ शेताच्या मर्यादेवर घालतात तो उंच बांध. ५ डोंगराच्या बाजूवरची धार.६सखल प्रदेशांतून पाण्याचा प्रवाह न्यावयाचा असतां जी लांबलचक उंचवट्याची मातीची भिंत रचलेली असते ती.७शेतांतून केलेली किं०पडलेली रहदारीची वाट. ८ जमीनीचा लांबलचक आणि ओसाड पट्टा. ९ अंगांत लचक भरल्यामुळें किं० थंडीमुळें येतो तो ताठपणा (भरणें);उ० बसून बसून माझ्या पाठीला दांड भरला. १० मळ्यांतील किं० बागेंतील दळा किं० वाफा. ११ शिक्षा म्हणून राजानें केलेला दंड; ह्याअर्थीं न० सुद्धां; **क्रि०** मारणें. ☸**एकाद्या माणसाचा (किं० जनावराचा) दांड काढणें** त्याच्याकडून खूप काम करवून घेणें. **दांडपट्टा पु०** मर्दुमकीचा एक खेळ,–यांत एका हातांत एक लांब आणि जाडी काठी आणि दुसऱ्या हातांत पट्टा असून हा खेळ खेळावयाचा असतो. **दांडपाळें न०** लाकडाचाच दांडा जिला बसविलेला आहे अशी लाकडाची वाटी,–स्वयंपाकांतलि पळीसारखी. **दांडपेंडोळा पु०, दांडपेंडोळें न०** १ देश, प्रांत, शेतें, इ० च्या हद्दी जेथें एकमेकींना भिडलेल्या असतात तो प्रदेश किं० तशी भीड. २ लग्न, मर्कत वगैरे व्यवहार, इ० बाबतींत दोन पक्षांची अनुरूपता (मिळणें,पुरणें, लागणें). **दांडमेड पु०** विशिष्ट भूप्रदेशाची सीमा किं० मर्यादा. **दांडळ स्त्री०** लांबलचक घर, पागा, तबेला, गोठा, इ०.

दांडकणें, दांडगणें [म० दांडकें]**स० क्रि०** (कोणेकाला) दांडक्यानें (म्ह० काठीनें) मारणें.

दांडका पु०, दांडकें, दांडगें न० [म०दांड] १ काठी, सोटा. २ दंडगोलाच्या रूपाचा लाकडाचा तुकडा.

दांडगा [म० दांड] **वि०** १ प्रचंड, अवाढव्य. २ उद्धट, उर्मट. ३ हट्टी, हेकेखोर, हेकट.४ मजबूत, भक्कम. ५ धीट,साहसी. ६ मुबलक,विपुल (पीक, पाण्याचा झरा, पावसाची सर, वाऱ्याचा झोत, इ०). ☸**दांडगाई स्त्री०, दांडगावा पु०, दांडगावें, दांडकपण, दांडगपण न०** १ दांडगेपणाचें वर्तन; असभ्य वागणूक. २ हेकटपणा. **दांडगा उतार पु०** उंच माणसाला म्ह० लांबटांग्याला ओलांडतां येईल असा

खाडी, ओढा, इ० ओलांडण्याचा मार्ग. दांडक (–ग–)मत [म० दांडगें+मत]न० हटवादीपणा ;हेकटपणा. दांडगाधिंग वि०उद्धट; मस्ताळ. दांडगेला वि० बराचसा दांडगा म्ह० बराचसा उद्धट, मजबूत, मोठा, लठ्ठ, किं० जाडी.

दांडणें [म० दंडणें] स० क्रि० (कोणेकाला) शिक्षा करणें किं० काठीनें मारणें.

दांडदपट [म० द्वाड+दपटणें]स्त्री०अरेरावी वर्तन किं० भाषण.

दांडळणें [म० दांढा] अ० क्रि० जोंधळा, बाजरी, इ० चें ताट पोसून लठ्ठ होणें.

दांडा [सं० दंड] पु० १ तीन चार हात लांबीचा बांबू, लाकूड, इ०. २ कुदळ, कुऱ्हाड, वाकस, इ० च्या लोखंडाच्या भागांच्या भोकांत बसविलेला असतो तो हात दीड हात लांबीचा लाकडाचा तुकडा. ३ पळी, चमचा, झारा, उलथणें, इ०चा हातांत धरावयाचा लांब आणि बारीक अवयव असतो तो. ४ आबदागीर, पंखा, इ० कोणत्याही पदार्थाचा हातांत धरावयाचा अवयव. ५ मोट इ० चें पाणी बाग इ० मध्यें नेण्यासाठीं सखल प्रदेशांत जो बांध घातलेला असतो आणि ज्यांत पाण्यासाठीं चर केलेला असतो तो. ६ मनुष्य, घोडा, बैल, इ० च्या पाठीचा कणा. ७ समुद्रादिकांत तारूं आडकण्याजोगा जो खडक, किं०रेती, इ०चा लांबट भिंतीसारखा उंचवटा असतो तो. ८ डोंगराची अरुंद आणि चिंचोळी शाखा. ९ समुद्रांत लांबपर्यंत घुसलेला जमीनीचा पट्टा. १० मनुष्याच्या नाकाचा कपाळापासून तों अग्रापर्यंतचा उंचवटा. ११ केळीच्या पानाच्या दोन अर्धुकांना जोडणारा पन्हळासारखा अवयव. १२ माघ महिन्याच्या पौर्णिमेस पुढें होळी व्हावयाची त्या जागीं पुरतात तो एरंड. ❀ (आपणावर उपकार करणाऱ्याच्या घराचे)दांडे वांसे मोजणें आपणावर उपकार करणाऱ्याच्या घराची बारीक सारीक माहिती मिळवून ठेवणें, योग्य संधी मिळाल्यास तें घर मी बांधलेलें आहे, त्याची पूर्ण माहिती मला आहे असें सिद्ध करून देण्याची तयारी पूर्वीपासून करून ठेवीत असणें; हें कृतघ्न माणसाच्या वर्तनाचं वर्णन आहे. ह्याच अर्थाचा दुसरा संप्रदाय ' खाल्या घरचे वांसे मोजणें. ' ❀ दांडाईत वि० दांडगा; उद्धट; उर्मट. दांडापेंडा, दांडापेंडोळा पु० पदार्थविशेष किं० मनुष्यविशेष यांची पूर्ण माहिती किं०त्यांच्यांशीं परिचय. दांडेकरी पु०महार, –सोंवळें नेससेला ब्राम्हण 'दांडेकरी' ह्या शब्दानें महाराचा निर्देश करतो. दांडेपंडित पु०ज्याणें शास्त्राध्ययन कांहीं केलेलें नाहीं पण जो उत्कृष्ट वक्ता आहे आणि वेळ पडल्यास मारामारी करावयालाही जो सिद्ध असतो तो. दांडेपाळ स्त्री० १ लाकडाची वाटी,– जिला हातांत धरावयाला लाकडाचा दांडा असतो. २पाणी ज्यांतून वाहतें त्या दांड्याच्या ज्या उंच कडा त्या प्रत्येक. दांडेबोर स्त्री० एक प्रकारचें बोरीचें झाड. न० त्या झाडाचें फळ. दांडेसाळ [म० दांडा; सं० दंड; म० साळ; सं० शाला] स्त्री० लांबच लांब घर, पागा, गोठा, तबेला, इ०. दांडेस्वार पु० आजारांतून नुकतांच उठलेला पण ज्याला काठी घेऊन चालावें लागतें असा. दांडेविंड न० नदीकांठीं मासे पकडावयाचें जाळें; ह्या जाळ्याचीं दोन टोकें दोन दांड्यांना बांधलेलीं असतात. अशा जाळ्याला ' दांडेभुसा ' असाही शब्द कांहीं प्रान्तांत रूढ आहे. दांडेपान्हवण न० १ काठ्या मारून हट्टी गाय, म्हैस, इ० ना दूध द्यावयास भाग पाडणें. २ काठीनें चोप देऊन कोणेकाला आपलें म्हणणें कबूल करावयास भाग पाडणें.

दांडारा [म० दांडा] पु०१प्राण्याच्या पाठीचा कणा. २ केळ, माड, इ०च्या पानाच्या दोन अर्धुकांच्या मधला त्यांना जोडणारा अवयव. ३नाकाचा दांडा.

दांडारणें, दांडावणें अ० क्रि० श्रमातिशयामुळें किं० थंडीमुळें शरीर किं० गात्रविशेष ताठ होणें.

दांडाविणें [म० दांडा] स०क्रि० कोणेकालीं काठीनें मारणें.

दांडाळवत [म० दांडा+पत्र (पात)]न० केळीचें पान,–ज्याचें अग्र (आगोतली किं० मोनई) छाटलेलें आहे असें पान किं०अशा पानाचं खंड प्रत्येक.

दांडी [म० दांडा; सं० दंड] स्त्री०१लुगडीं,

धोतरें, इ० धुतलेलीं वस्त्रें वाळत घालण्यासाठीं घरांत पाटणीच्या खालीं जे बांबू ठोकलेले असतात ते प्रत्येक. २ पालखीचा मध्यें कमानच्या रूपानें वाकविलेला आणि टोकाकडे सरळ असा जो वांसा असतो तो. ३ नांगर, गाडी, इ०चा लांब, लाकडाचा खंड,–ज्याच्या एका टोकाला जूं बांधलेलें असतें. ४ घोड्याच्या शेपटीचा बुंधा. ५ धुतलेलीं वस्त्रें वाळत घालावयाची परटाची दोरी,–जी दोन बाजूंच्या दोन उंच खांबांच्या टोकांना ताणून बांधलेली असते. ६ तराजूंचीं दोन पारडीं जिच्या दोन टोकांना लोंबत सोडलेलीं असतात ती धातु, लाकूड, इ०ची काठी. ७छत्रपती शिवाजी महाराजांच्या टांकसाळींत ठोकलेल्या नाण्यावरच्या दोन रेषा. ८ समुद्रांत घुसलेला जमीनीचा अरुंद पट्टा; उ० कुलाब्याची दांडी. ९ छत्री, पंखा, मच्छरझाडणी, इ० चा हातांत धरावयाचा भाग. १०वीणा, सतार, इ० चा अरुंद भाग,–म्हणजे भोपळा इ० च्या विरहित. ११ समुद्राची लांबच लांब आणि उंच अशी लाट. ❀ **दांडीपुनव, दांडीपौर्णिमा, दांडेपुनव, दांडेपौर्णिमा** स्त्री० माघ महिन्यांतील पौर्णिमा,–ह्या दिवशीं पुढें होळी पेटवावयाची त्या जागीं एरंडाचा सोट पुरतात.

दांडू [सं० दंड] पु० विटीदांडूच्या खेळांत विटी उडविण्याची काठी.

दांडूक [सं० दंड] न० १लाकडाचा लांबट आणि लहान तुकडा. २हातांत धरावयाची आखूड काठी.

दांडोरा [हिं० ढंढोरा] पु० १ सर्व लोकांस सरकारी हुकूमानें महार इ०नीं कळविलेली खबर; दवंडी (पिटणें). २ सर्व लोकांत कोणी अधिकप्रसंगीं माणसानें प्रसृत केलेली खबर (पिटणें).

दांडोली स्त्री० वर ' दांडोरा ' अर्थ १ पहा.

दांडोळ, दांडोळी [म० दांडा] स्त्री० १ पंक्ति; ओळ. २ लांबलचक घर; रुंदी कमी असून लांब असें घर. ह्या अर्थीं ' दांढळ ' असेंही रूप रूढ आहे.

दांडोळा [म० दांडा] पु० झाडाच्या पानाचीं दोन अर्धुकें जोडणारी जाडी शीर.

दाढ [सं० दाढा=मोठा दांत] स्त्री० १ मुखाचा खालचा भाग आणि वरचा भाग जेथें मिळतात तेथें जे चार खुरांचे जाडी दांत असतात ते प्रत्येक; चावण्याच्या क्रियेला जरूर असे जे मुखांत मागच्या दोन्ही बाजूंस दांत असतात ते प्रत्येक. २ जबडा. ❀ **कोणेकाची दाढ बांधणें** १ कांहीं मत्रतंत्र करून त्याची खाण्याची शक्ति नाहींशी करणें. २ त्याणें आपलें वर्मकर्म किं० रहस्य जाहीर करूं नये म्हणून त्याला लांच देऊन गप्प करणें. **कोणेकाच्या दाढेंत सांपडणें** त्याच्या कवज्यांत किं० नियंत्रणेंत जाणें किं० अडकणें; त्याच्या तावडींत जाणें किं० सांपडणें. **दाढ देखील न माखणें** अत्यल्प खाद्य मिळविणें. **दाढभर** क्रि० वि० तृप्ति होण्याइतक्या प्रमाणांत; उ० यंदा मला दाढभर ऊस खावयाला मिळाला नाहीं. **दाढसांक(–ख–)ळ** स्त्री० १ दाढेचा एक रोगविशेष. २ घोड्याच्या तोंडाच्या कोंपऱ्याजवळ उगवलेली केशपंक्ति. ही अशुभ समजली जाते. **दाढेंरू** न० दाढेजवळ हिरडीवर होतें तें गळूं. **दाढ्या** पु० दाढेला होतो तो एक रोगविशेष.

दाढ स्त्री० १ भाताचें रोप करावयासाठीं जमीन भाजतात ती. २ अशा जमीनीवर पसरलेल्या गवत, काटक्या, इ० चा थर. ३ अशा भाजलेल्या जमीनींत तयार होतें तें भाताचें रोप.

दाढरणें [सं० दृढ] अ० क्रि० फळ, गळूं, इ० न पिकतां टणक होणें.

दाढा वि० धीट; पराक्रमी.

दाढी [सं० दाढिका] स्त्री० तोंडावर किं० विशेषतः हनुवटीवर उगवतात ते केश. ❀ **घडी घडी लांब दाढी करणें** (किं० **मांडणें**) हरघडीला रागावणें किं० चरफडणें; सदा पिरपिरत असणें. **दाढी करविणें** न्हाव्याकडून तोंडावरील केश तासविणें. **एकाद्याची दाढी छोटी करणें** किं० **एकाद्याची दाढी धरणें** त्याची विनवणी करणें. काकुळतीनें त्याची प्रार्थना करणें. **एकाद्याची दाढी धरून टाचा** (किं० **पाय**) **तुडविणें** त्याला खुशामत करून फसविणें; मैत्रीचा आविर्भाव करून त्याचा घात करणें. **दाढी पाहून वाढणें** एकाद्याच्या बाह्य रूपाकडे किं० पोशाखाकडे पाहून त्याचें मानपान किं० आदरातिथ्य करणें. **दाढीस वेगळें आणि मिशांस (किं० डोकीस) वेगळें (तेल) कोण देणार ?**

कुटुंबांतील प्रत्येक माणसाला वेगळा वेगळा प्रसाद (खिरापत, इ०) कसा देतां येईल ? किं० कोण देत बसेल ? कोणी नाहीं. **शेजाऱ्याची दाढी जळत आहे, मी माझा दिवा लावून घेतों** दुसऱ्याच्या हानीबद्दल बिनदर्द असा माणूस त्याच्या हानीपासून स्वताचा फायदा करून घेऊं पाहातो. **एकाद्याची दाढी हालविणें** त्याला धमकी देऊन कांहीं काम करावयास सांगणें. **दाढीचा गधडा, दाढीवाला बोकड पु०** लांब दाढीचा माणूस (तिरस्कारांत). **दाढीडोई करविणें** न्हाव्याकडून हाजामत करवून घेणें.

दाढेल न० वडे तळणें झाल्यावर कढईंत उरलेलें असतें तें तेल.

दाण [फा० दान् हा प्रत्यय आहे, आधेय ह्या अर्थी. दाप्तन्=ठेवणें] **स्त्री०** (खादाडाचें) पोट.

दाणा [सं० धान्य] **पु०** १ धान्य इ० तील एक एक व्यक्ति. २ मोती, मणि, इ० ची एक एक व्यक्ति. ३ जाडी साखर; दाणा साखर. ४ कागद, कातडें, इ० वरील बारीक बारीक जे उंचवटे ते प्रत्येक. ५ बरफी, मोरंबा, मोरआंवळा, इ०च्या पाकांत कांहीं काळानें होतात जे साखरेचे जाडी जाडी कण ते प्रत्येक. ६ लोणी उत्तम प्रकारें कढवून तें न डिवचतां कांहीं काळ ठेविलें असतां त्यांत तुपाचे होतात जे जाडी जाडी कण ते प्रत्येक. ७ शिताफळ, अननस, इ० फळांच्या सालींवर असतात जे उंचवटे किं०खवले ते प्रत्येक. ८ वस्त्रादिकांचा एक एक स्वतंत्र तुकडा. ९ (आंबे इ० फळें गणतांना) एक एक आंबा इ०. १० उत्तम माणूस,घोडा, बैल, इ०. ११ किरमीजी रंगाचा एक खडा. **दाणागोटा पु०ए०व०**गहूं,बाजरी,जोंधळा, इ० बेगमीचे पदार्थ समुच्चयानें. **दाणापाणी न०** ए० व० १ चरितार्थाचीं साधनें समुच्चयानें. २ घोडा, गाय, बैल, इ०ना गवत घालणें, पाणी दाखविणें, इ० कामें समुच्चयानें; उ० आमचा गडी गांवीं गेल्यापासून घोड्याचें दाणापाणी मलाच करावें (किं० पाहावें) लागतें. **दाणालाख स्त्री०** बोर, पिंपळ, इ० झाडांचा डिंक. **दाणेकरी पुं०** पागेला कोठींतून धान्य देणारा अमलदार. **दाणेदार वि०** १ लठ्ठ दाण्यांनीं ठासून भरलेलें (कणीस). २ मोहोरीदार (कागद, कमावलेलें कातडें, इ०). **दाणेकरी पु०** १ धान्य विकणारा. २धान्य ज्याच्या संग्रहीं पुष्कळ आहे तो.

दाणा [फा० दाना=शहाणा; दनिष्तन्=जाणणें] वि० १ शाहाणा; शाहाणासुरता. २ धूर्त. ३ तल्लख. ४ पाणीदार (मनुष्य, कुतरा, इ०).

दाणादाण स्त्री० भयाचें कांहीं कारण अकस्मात् उत्पन्न झाल्याकारणानें एकत्र जमलेल्या माणसांची होते ती पांगापांग किं० माणसांचें इतस्ततः पळत सुटणें; वाताहत.

दाणावणें [म० दाणा] **अ० क्रि०** घोड्याला फार दाणा खावयाला दिला गेल्याकारणानें त्या घोड्यानें आजारी होणें.

दांत [सं० दंत] **पु०** १ मुखामध्यें तोडणें, चावणें, इ० क्रियांच्या उपयोगाचे अस्थिविशेष असतात ते प्रत्येक. २ चक्र, फणी, करवत, नांगर, इ० चे जे दांते ते प्रत्येक. ३ डंगाचें टोक. **त्याचा माझ्यावर दांत आहे** १ त्याचा माझ्यावर रोष आहे; त्याच्या मनांत मजविषयीं वैरबुद्धि आहे. २ तो माझा द्वेष करतो. **दांत उठणें** दांतांनीं धरलेल्या पदार्थावर दांतांच्या खळग्या पडणें. **दांत काढणें** किं० **दांत दाखविणें** आपले दांत दुसऱ्याच्या पुढें विचकणें. **दांत खाऊन** किं० **दांत ओठ खाऊन क्रि० वि०** १ रागारागानें. २ नेटानें सर्व शक्ति खर्चून. **दांत खाणें** किं० **दांत चावणें** (झोपेंत,रागांत वगैरे)दांतांवर दांत घासणें.**एकाद्याचे दांत त्याच्याच घशांत घालणें** किं० **ज्याचे दांत त्याच्याच घशांत घालणें** त्याची लबाडी उघडकीस आणून त्याच्या पदरांत माप घालून त्याची फजीती करणें. **दांत झिजणें** निष्फळ उपदेश करून तोंडाला मेहेनत होणें; केलेली विनंती फुकट गल्यामुळें तोंडाला व्यर्थ श्रम होणें; शिकविलेला विषय मूर्ख विद्यार्थ्याला न समजल्यामुळें तोंडाचे श्रम फुकट जाणें. **एकाद्यावर दांत धरणें** त्याच्याविषयीं मनांत शत्रुत्व बाळगणें. **एकाद्याचे दांत पाडणें** त्याची लबाडी उघडकीस आणून त्याची फजीती करणें. **एकाद्याचे दांत पडणें** त्याची लबाडी उघडकीस आल्यानें त्याची फजीती होणें. **दांत पाजविणें** एकादी वस्तु (विशेषतः खाण्याची) मिळण्याजोगी नसतां तिच्याबद्दल उत्कंठित होणें. आमचें

' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' ह्या पुस्तकांत हा वाक्प्रचार पहा. **तुझे दांत पाडून हातावर देईन असें म्हणणें** तुझा कंबख्ती किं० पारिपत्य करीन अशी त्याला धमकी देणें. **दांत वठणें** उच्चारलेला शाप फलद्रूप होणें. **दांत वासणें** केलेले श्रम फुकट गेल्यामुळें खिन्न होऊन बसणें. **दांत वासून पडणें** १ मेहेनत फुकट गेल्यामुळें खिन्न होऊन बसणें. २ आजारानें अशक्त होऊन बिछान्याला खिळून जाणें. **एकाद्याच्या पुढें दांत विचकणें** १ त्याला वेडावणें.२नादान मनुष्याजवळ याचना करणें. **दांत ओठ खाणें** रागानें दातांवर दांत घासणें; रागामुळें आपल्याच दांतांनीं आपलेच ओठ चावणें. **एकाद्याच्या दांतांचें विष बाधणें** १त्याचा शाप फलद्रूप होणें.२ त्याणें केलेलें अनिष्ट भाकीत खरें ठरणें. **दांतांच्या कण्या करणें** एकसारखा उपदेश करीत राहणें (उपदेश फुकट गेला म्हणजे वैतागांत हा वाक्प्रचार योजण्यांत येतो). **त्याच्या दांतांच्या घुगऱ्या झाल्या आहेत** १ त्याचे दांत हालूं लागले आहेत किं० अगदीं खिळखिळे झाले आहेत. २ उपदेश,विनवणी, इ० करून त्याणें आपल्या दांतांस फार शीण दिला आहे. **त्याच्या दांतांवर मांस नाहीं** १ तो अगदीं दरिद्री आहे. २ तो अगदीं असमर्थ किं० दुर्बल आहे. **दांतीं येणें** किं० **दांतांवर येणें** एकाद्या व्यापारांत किं०व्यवहारांत अपयश किं० नुकसानी होणें. **दांतांस दांत लावून बसणें (किं० निजणें किं० असणें)** उपाशीं पोटीं बसणें (किं० निजणें किं० असणें). **दांतांओठांवर जेवणें** चोखंदळेपणानें जेवणें. **दातीं तृण धरणें** नम्रपणा स्वीकारणें. **दांतीं बळ धरणें** अतोनात मेहनत करणें; एकाद्या कामीं आपली सर्व शक्ति वेचणें. **दांतीं येणें** १ रागावणें. २ अडचणींत किं० पेचांत सापडणें किं० अडकणें. **सोन्यानें दांत किसणें** श्रीमंत असणें; श्रीमंतीचा उपभोग घेत असणें. **हसतां हसतां एकाद्याचें दांत पाडणें** त्याच्यावर राग न दाखवितां किं० न चरफडतां त्याची फजीती उडविणें किं० त्याचा पराभव करणें. **आपलेच दांत आणि आपलेच ओठ** १ ज्याला दोष द्यावयाचा तो आपलाच मनुष्य असल्याकारणानें दोष अंशत: तरी आपल्या वांट्याला येतो (ही पंचाइतीची स्थिति होय). २ भांडणारीं दोन्ही माणसें आपणाला प्रिय आहेत, अमुक एकाची बाजू लंगडी आहे असा आपण निर्णय दिला तरी दुसऱ्या पक्षाची आपणावर अप्रीति होणार (ही पंचाइतीची स्थिति होय). ३ ज्याला आपण दोष देणार तो आपला मित्र असल्याकारणानें त्याची बदनामी करणें हें योग्य नव्हे (ही पंचाइतीची स्थिति होय). **त्याचे खायाचे दांत वेगळे आणि दाखवायाचे दांत वेगळे आहेत** तो बोलतो एक विचार आणि त्याच्या मनांत असतो दुसराच विचार; तो लबाड किं०लुच्चा आहे. **दांत आहेत तर चणे(किं०हरभरे) नाहींत आणि चणे(किं०हरभरे)आहेत तर दांत नाहींत** कांहीं काम करावयाला जरूर अशा ज्या दोन गोष्टी त्या दोन्ही एकदम विद्यमान नसल्यास कार्य होऊं शकत नाहीं; त्यांतील एक असून दुसरी नसणें हें दुर्दैव होय. **दांतांचें विष न०** उच्चारलेला शाप (फळास येणें किं० बाधणें). **एकाद्याचे दांत किरकिटीस येणें** तो भारी पंचाइतीच्या स्थितींत किं० विपन्न दशेंत असणें. **दांताकिरकिटी करून क्रि० वि०** मोठ्या श्रमानें किं० कष्टानें. **दांत कोरून पोट भरत नाहीं** क्षुद्र बाबतींत बारीक सारीक काटकसर करून मोठा खर्च भागवितां येत नाहीं. **दांत खाऊन (किं० चावून) अवलक्षण करणें** ज्याच्या अपराधाबद्दल पारिपत्य करण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य नाहीं त्याच्यावर राग दाखविण्यानें आपण लोकांच्या उपहासाला पात्र होतों. **लोण्याला दांत फुटणें** भल्या माणसाच्या अंगीं कांहीं कारणानें ताठा येणें. **दातीं तण (किं० कडऱ्याळ) धरणें** नम्रपणा स्वीकारणें. वर ' दांतीं तृण धरणें ' पहा. **दांतइळा, दांतविळा पु०** करवतीसारखे दांते असलेला इळा (किं० विळा). **दांतकढी स्त्री०**जबडा न उघडतां येईल अशी स्थिति(असणें). **एकाद्याची दातकस (किं० बत्तीशी) बाधणें (किं० लागणें)** त्यानें केलेलें अशुभ भाकीत प्रत्ययास येणें किं० खरें ठरणें. **दांतीं पदर धरून कोणेकाकडे जाणें** तो आपला मानभंग करणार असें आपणास पक्केपणीं ठाऊक असतां त्याच्याकडे कांहीं याचना करावयास जाणें. **आकाशाची (किं० आकाशाची) कुऱ्हाड कोल्ह्याच्या**

दांतांवर भल्याच माणसाचें पारिपत्य.मार्गे'कुऱ्हाड' पहा. **दांतकसई, दांतकसाई पु०** जो नेहमीं अशुभ भाकितें करतो आणि ज्याचीं अशुभ भाकितें खरीं ठरतात असा माणूस. **दांतकसळ (–ळी), दांतकिसाळ (–ळी) स्त्री०** सदा शिव्या देणें, अशुभ भाकितें करणें, इ० करण्याकडे मनाचा कल. **दांतकोरणें न०** दांतांच्या फटींत अडकलेला सुपारी इ०चा कण काढावयाची धातूची अणकुचीदार काडी. **दांतखिळी, दांतखीळ [म० दांत+खिळणें] स्त्री०** १संनिपातादि दोषांमुळें वरचे आणि खालचे दांत एकमेकांस घट्ट चिकटून राहणें (बसणें). २ (लाक्षणिक) कोणी मनुष्यानें विचारलेल्या प्रश्नाला उत्तर न देतां हिरवटपणानें गप्प बसून राहणें (बसणें). ३(वादादिकांत कोणेकाचा पराभव झाल्यामुळें त्याणें) गप्प बसणें. **दांतकेणें न०** नित्यशःखावयाचें कोणेकाचें भक्ष्य किंवा अन्न तें; जो ज्याचा नित्यशः भक्षावयाचा पदार्थ तें त्याचें दांतकेणें. **दांतकिरकिटी स्त्री०** हताशपणाची स्थिति;कार्यविशेष करावयाला द्रव्यादि जी साधनसामग्री तिच्या अभावामुळें किंवा अपुरतेपणामुळें हात टेकावयाची स्थिति. दांत किरकिटीस येणें म्ह० तशा स्थितीस पावणें. **दांतचिना, दारशिणा पु०** एक प्रकारचें दंतमंजन. **दांतराखिंड स्त्री०** दंतपंक्तींतील एक किं०दोन दांत पडल्यानें होते ती खिंड. **दांतरा वि०**ज्याचे पुढचे दांत ओठाच्या बाहेर येतात असा. **दांतरा पु०**कोयता, चाकू,इ०च्या धारेवरची खिंड. **दांतरा स्त्री०** १ म्हाताऱ्या माणसाच्या तोंडांत कधीं कधीं नवा दांत उगवतो तो; लहान मुलाला येतो तो नवा दांत (उगवणें, फुटणें). २ मध्यें मध्यें दाणे ज्यांत भरलें नाहींत असें धान्याचें कणीस. **दांताड न०, दांताडी स्त्री०** दांत(तुच्छतेनें). **दांताळ वि०** ओठाच्या पुढें ज्याचे दांत आले आहेत असा. **दांताळ, दांताळें न०** शेतकरी, बागवान, इ० चें एक आउत. **दांताळी स्त्री०** १ तोंडांतील सर्व दांत समुच्चयानें.२भांड्याच्या गळ्याला बांधलेली शिंकाळीं. **दांताळपुरी ओस पडणें** तोंडांतील सर्व दांत पडून गेले आहेत अशी स्थिति होणें.**दांतुरडी स्त्री०** दांत (तुच्छतेनें).**दांतळें न०**शेतकऱ्याचें एक आउत.

दान्त [सं०] वि० १ नियंत्रणेंत आणलेला.२ ज्याचे मनोविकार शांत झाले आहेत असा.

दांतळणें [म० दांत] स० क्रि० (हत्याराच्या धारेला) दांते किं० खिंडी पाडणें.

दांतळी स्त्री० भांड्याच्या गळ्याला बांधलेली शिंकाळी.

दांता [म० दांत] पु० १ फणी, करवत, रहाटाचें तुंब, इ० ना दांतांसारखे असतात ते अवयव प्रत्येक. २ फुलांत जो अतिशय लोचट आणि चिवट अवयव असतो तो. ३ ज्यांत गीर अगदीं थोडा आहे असें केळें. ४ लावणीच्या शेतांतील चिखल सारखा करण्याचें दांत्यांनीं युक्त असें लाकडाचें आउत. ५ लाकूड इ० ची धलपी किं० धसकट.

दाता [सं० दातृ] पु० १ देणारा; जो देतो तो. २ उदार. ꣸ **दातृत्व न०** औदार्य.

दातार [सं० दातृ; म० दाता] वि० उदार.

दांतावणें [म० दांत]अ० क्रि० कोणेकावर दांत ओठ खाऊन चरफडणें. ꣸ **दांतांतून बोलणें अ० क्रि०** कोणेकावर दांत ओठ खाऊन आणि चरफडून बोलणें.

दांताळणें [म० दांत] स० क्रि० १दांतांनीं उष्टें करणें. २ दांतांनीं कुरतुडणें. ३ (लाक्षणिक) कांहीं गुप्त गोष्ट बोलून जाहीर करणें.

दांतूर पु० उंबराच्या वर्गांतील एक वृक्ष.

दांत्या पु० एका जातीची तांबूस मुंगी.

दांत्या पु० वर ' दांता ' पहा.

दांत्रा वि० दांताळ. **पु०** करवत, फणी, इ० चा दांता.

दाथर पु० १ ज्या भांड्यांत मोदक, दिंडें, इ० खाद्य पदार्थ उकडावयासाठीं ठेविलेले असतात त्यांतील पाणी त्या पदार्थांना न लागतां पाण्याची वाफ मात्र लागावी म्हणून पाण्यांत जो गवत, पानें, इ० चा उंच थर करतात तो. २ विटा, दगड, इ० च्या भिंतींच्या माथ्यावर घालतात तो चिखल, चुना, इ० चा थर. ३ इसब, नायटा, इ० नें विकृत झालेली त्वचा किं० ती विकृति. ४ ' दाथेरा ' **पु०** ह्याच अर्थी शब्द आहे. खालीं ' **दाद** ' [स०दर] **स्त्री०** पहा.

दाद [फा०] स्त्री० १ वरिष्ठ अधिकाऱ्याकडे कांहीं तक्रार करावयासाठीं मिळविलेला प्रवेश (लावणें, लागणें). २ अशा प्रकारें केलेल्या तक्रारीनें मिळालेला न्याय किं० झालेलें संकटादिकांचें निवारण (लागणें). ३ न्याय. ४ कोणेकाच्या संकटाचें निवारण. ॐ **कोणेकाला दाद न देणें** १ त्याला हार न जाणें; त्याचें वर्चस्व कबूल न करणें; उ० काशींकर शास्त्र्याला रामशास्त्र्यांनीं दाद दिली नाहीं. २ त्याचा जोर किं० पगडा आपणावर चालूं न देणें; उ० माझा नायटा ह्या मलमाला दाद देत नाहीं. ३ त्याच्या संकटाचें निवारण न करणें; त्याची विनंति मान्य न करणें; उ० कोतवालानें मला दाद दिली नाहीं. **ह्या अमलांत दाद ना फिर्याद** ह्या अमलांत तक्रार करण्याला द्वार नाहीं आणि तक्रार कशीबशी केली तरी आपणाला न्याय मिळेल अशी आशा नाहीं.

दाद [सं० दद्रु] स्त्री० इसब, गजकर्ण, नायटा, इ० त्वचेचे विकार प्रत्येक. वर ' दाथर ' अर्थ ३ पहा.

दादड [सं० दद्रु] न० १ गजकर्ण, नायटा, इ० त्वचेचा विकार. २ भातशेतांत उगवते अशी एक वनस्पति. ३ भातांतील जाडें पाळेंज. ४ पूर्णपणें न पोसलेलें भाताचें कणिस.

दादडणें [म० दाद; सं० दद्रु] अ० क्रि० दाद नांवाच्या त्वग्रोगानें विकृत होणें.

दादर पु० १ जिना किं० जिन्याचा मार्ग बंद करावयाचें दार. हें जिन्यावर आडवें पाडावयाचें असतें. २ लहानसा लाकडी पूल. ३ लाकडी जिना. ४ इकडून काढून तिकडे लावतां येईल असा जिना. ५ नदी इ०चा प्रवाह बंद न होतां नदीवर इकडून तिकडे जावयासाठीं रचिलेली दगडाची किं० लाकडाची फटी असलेली भिंत.

दादर [सं० दद्रु] पु० १ नायटा, गजकर्ण, इ० त्वग्रोग. २ घामानें शरीरावर उठतो तो दाट पुरळ.

दादरा पु० १ पात्रांतील पदार्थ झाकलेला राहावा म्हणून त्याच्या तोंडावर फडकें, पानें, इ० चें आच्छादन बांधतात तें. २ धूर बाहेर जावा आणि प्रकाश किं० वारा आंत यावा म्हणून घराच्या छपरांत ठेवितात ती खिडकी किं० तें गवाक्ष. ३ शैत्यादि कारणानें कानाला बसतो तो दट्टया,— ज्यामुळें ऐकूं येईनासें होतें (बसणें).

दादरी स्त्री० दादर किं० लहान दादर. वर ' दादर ' (जिना ह्या अर्थाचा) पहा.

दादला, दादल्या, दादुला पु० पति, नवरा, (अशिक्षितांत रूढ शब्द). ॐ **दादल्यापेक्षां बायको मोठी मुसळ घेऊन लागे पाठीं** नवरा अशक्त किं० खुजट असल्यास त्याची बायको त्याच्यावर अमल चालविते. **दादलाबायकें (–बाइकें,–बायलें)** न० ए० व० पतिपत्नींची जोडी. **दादलोजी** पु० माझे (किं० तुझे) पतिराज.

दादा पु० १ वडील भाऊ. २ कोणाही माणसाला किं० माणसासंबंधानें संमानपूर्वक योजावयाचा शब्द. ३ व्यावहारिक नांवापुढेंही हा शब्द योजला जातो; उ० गोपाळभट्टदादा इ०. ॐ **कोणेकाला दादाबावा करणें** (किं० **दादापुता करणें**) त्याची खुशामत करून त्याला अनुकूल किं० वश करून घेणें.

दादा उ० वा० अ० बैलानें जलद चालावें म्हणून हा उद्गार काढला जातो.

दादी स्त्री० १ वयोवृद्ध स्त्रीस किं० स्त्रीसंबंधानें योजावयाचा हा शब्द आहे. २ स्त्रीचें व्यावहारिक नांव ' दादी ' असेंही ठेवितात.

दादू पु० ह्या नांवाचा एक साधु होऊन गेला. ॐ **दादूपंथी** पु० दादू ह्या साधूनें शिकविलेला जो ईश्वरप्राप्तीचा मार्ग त्या मार्गानें चालणारा.

दान [सं०] न० १ देणें, अर्पण करणें. २ देणगी; नजराणा; जें कांहीं बक्षीस दिलें तें. ३ ईश्वरप्रीत्यर्थ ब्राह्मणादिकांस देतात तें सुवर्णादि. ४ औदार्य. ५ शत्रूला जिंकण्यासाठीं त्याच्या हितशत्रूला दिलेला लांच; साम, दान, भेद, आणि दंड, हे जे शत्रूला जिंकण्याचे चार प्रकार त्यांतील दुसरा. ६ माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळांतून स्रवणारा पदार्थ. ७ खेळतांना फासे टाकले असतां दुड्डी, पवबारा, इ० जो डाव पडतो तो. ॐ **दानधर्म** पु० ए० व० ईश्वरप्रीत्यर्थ किं० दुसऱ्याच्या विपत्तीच्या निवारणार्थ ब्राह्मणादिकांस जेवूं घालणें, वस्त्रें, द्रव्य, इ० देणें. **दानपति** पु० १

अतिशय श्रीमंत मनुष्य. २ कृष्णाचा मित्र अक्रूर. **दानपत्र** न० भूमि इ० कांहीं वस्तु कोणेकाला बक्षीस दिल्याचा कागद. **दानपात्र** न० ज्याला आपण कांहीं दान द्यावयाला योग्य असा ब्राह्मणादि. **दानशूर, दानशौंड, दानशील** पु० अत्यन्त उदार माणूस. **दानवीर** पु० १ अत्यन्त उदार माणूस. २ दानधर्म करण्याविषयीं जी उत्कट भावना ती. आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्याच्या उपोद्घातांत २३ ते २७ हे लेखांक पहा. **दानाध्यक्ष** पु० श्रीमंतांच्या धर्मादायाच्या खात्यावरचा मुख्य अधिकारी. **दानप्रतिभू** पु० उसना दिलेला पैसा, कांहीं पदार्थ, इ० बद्दल जो जामीन राहातो तो.

दानत [अ० दियानत] स्त्री० १ औदार्य. २ शील, सद्वर्तन. ३ मनाचा पवित्रपणा. ❀ **जशी दानत तसें फळ** बक्षीस दिलेल्या वस्तूच्या किंमतीवर पुण्य अवलंबून नसतें तर ज्या बुद्धीनें ती बक्षीस दिलेली असेल त्या बुद्धीच्या पवित्रपणावर पुण्य अवलंबून असतें.

दानव [सं०] पु० दैत्य जातींतील एक भेद.

दानवा पु०, **दानवें** न०, **दानवार** पु० गांडूळ, गांडवळ, काडू, इ० दुसरीं नांवें ज्याला आहेत असा एक घाणींत राहणारा सुतळीसारखा लांब प्राणी.

दानाकेश [फा० दानाह् केष्] पु० जें अंगावर धारण केलें असतां शरीरास उब येते असें सकेश चर्म.

दानीय [सं०] वि० १ द्यावयाला योग्य अशी वस्तु. २ ग्रहण करावयाला योग्य असा (माणूस).

दाप, दापणें खालीं 'दाब,' 'दाबणें' पहा.

दांपत्य [सं०] ब० १ विवाह. २ विवाहसंबंध. ३ पतिपत्नींचें जोडपें.

दाब [म० दाबणें] पु० पदार्थ चेपण्यासाठीं किं० थोडक्या जागेंत ठासून भरण्यासाठीं त्याच्यावर ठेविलेली जड वस्तु; दडपण; चेपण. ३ कोणामाणसाच्या वर्तनभाषणादिकांवर घातलेली नियंत्रणा; उ० मुलें दाबांत ठेविलीं पाहिजेत. ४ अधिकार, विद्वत्ता, इ० अंगच्या श्रेष्ठ गुणांमुळें दुसऱ्यावर बसतो तो वचक किं० दुसऱ्याला वाटतो तो दरारा किं० वाटते ती भीति. ५ आपल्या स्वैर मनोविकारांवर घातलेली नियंत्रणा. ६ अंगावर घेतलेला पोत बांधावयाची किं० अंडवृद्धीचा उपद्रव असल्यास अंड चेपावयाची जी सोनें, चांदी, इ०ची पट्टी ती. ७ गंजिफांच्या खेळांत दुसऱ्याचो तलफ दाबण्याचा एक प्रकार. ८ छत्री, पेटी, खिडकी, इ० चें छप्पर, झाकण, फळी, इ० उघडावयाची किं० मिटवावयाची जी धातूची कळ केलेली असते ती. ह्या अर्थी 'दाबखीळ,' 'दाबेखीळ' हाही शब्द रूढ आहे. स्त्री० स्त्रिया, देवांच्या मूर्ति, इ० च्या कंबरेंत घालावयाची सुवर्णादि धातूंची मेखळा म्ह० कंबरपट्टा. स्त्री० ' ❀ **दाबखीळ, दाबेखीळ** स्त्री० १ वर 'दाब' अर्थ ८ पहा. २ गाडीची आख आणि आखरी ह्यांना जुळवून ठेवण्याच्या ज्या दोन खुंट्या असतात त्या प्रत्येक.

दांबडणें, दामटणें स० क्रि० (माणूस किं० जनावर यांना) सक्तीनें कामास लावणें.

दाबण [म० दाबणें] न० पदार्थ चेपण्यासाठीं त्याच्यावर ठेविलेला जड पदार्थ.

दाबणी [म० दाबणें] स्त्री० दाबण्याची क्रिया(सर्व अर्थी).खालीं 'दाबणें' पहा.

दाबणें [हिं० दाबना] स० क्रि० १ चेपणें; पदार्थविशेष पूर्वीपेक्षां थोडक्या जागेंत राहील असें करणें. २ कोणेकाला शब्दांनीं किं० नेत्रादिसंकेतानें नियंत्रणेंत ठेवणें,—त्याणें कांहीं गोष्ट करूं नये किं० बोलूं नये म्हणून. ३ जोरदार झालेला कांहीं मनोविकार प्रकट न होऊं देणें; हसणें, रडणें, इ० क्रिया प्रकट न होऊं देतां मनांतल्या मनांत निरोधून ठेवणें. ४ कांहीं हकीगत किं० हकीगतीचा कांहीं भाग न सांगणें म्ह० तो गुप्त ठेवणें. ५ आपल्या हातीं आलेला दुसऱ्याचा पैसा, दागिना, इ० मारणें म्ह० त्याचा अपहार करणें किं० तो गिळंकृत करणें. ६ गंजिफांच्या खेळांत दुसऱ्याच्या तलफेवर दाब घालणें. ❀ **एकाद्या वस्तूला दाबा देणें** १ ती लपवून ठेवणें. २ ती गिळंकृत करणें. ३ तिचा सुगावा न लागूं देणें. **दाबदडप**[म० दाबणें + दडपणें]स्त्री० ए० व० कोणेकाला घातलेली नियंत्रणा किं० दहशत किं० भीति; धमकावणी; कोणेकावर शब्दा-

दिकांनीं घातलेलें दडपण. **दाबदुबी, दाबोदुबी, दाबदूब** स्त्री० १ स्वैर वर्तनभाषणादिकांवर घातलेली नियंत्रणा. २ एकाची तल्लफ दुसऱ्यानें दाबावी अशा संकेतानें गंजिफा खेळण्याचा प्रकार. **दाबादाबी** स्त्री० १ चेपण्याची किं० ठासण्याची क्रिया. २ जमीन इ० धुमसणें किं० चेपणें ही क्रिया. ३ लपवून ठेवणें; प्रकट न होऊं देणें; उघडकीस न येऊं देणें. ४ दुसऱ्याच्या द्रव्यादिकांचा अपहार. ५ मनोविकारांवर घातलेली नियंत्रणा.

दाबाडणें [म० दाबणें] स० क्रि० १ चेपणें; दडपणें. २ पदार्थाचा उपभोग न घेतां तो बाजूस किं० लपवून किं० राखून ठेवणें. ३ कांहीं गोष्ट किं० इंगीत प्रकट न होऊं देणें. ४ दुसऱ्याची वस्तु लाटणें, मारणें, किं० चोरणें.

दाबाडी पटणी स्त्री० तांदुळाची एक जात.

दाबेखीळ स्त्री० वर ' दाब ' मध्यें पहा.

दाभ स्त्री० लहान लहान घंटा किं० घुंगुरें यांची माळ (स्त्रियांची कमरेंत घालावयाची).

दाभ [सं० दर्भ] पु० एक प्रकारचें गवत. मागें ' दर्भ ' पहा.

दाभडी पटणी स्त्री० पटणीची एक जात. पटणी ही तांदुळाची एक जात आहे.

दाभण पु०, न० फार जाडी वस्त्र (गोणताट इ०)शिवण्याची जाडी आणि लांब सुई. दाभणाच्या नेढ्यांत सुतळी घालून शिवतात. ❀ **दाभणकांठी** वि० १ दाभणासारखी अरुंद म्ह० बारीक धारी ज्याला आहे असें (उपरणें, धोतरजोडा, इ०). २ म्हातारपणीं शेंडी, केश, इ०च्या प्रसाधनविधीचा कंटाळा आला म्हणजे दाभणाइतक्या जाडीच्या राखलेल्या (मिशा).

दाभनळें न० गोंड्यांची माळ,– बैलाच्या गळ्यांत हौसेनें घालतात ती.

दाभाखिळा, दाभेखिळी वर ' दाब ' मध्यें ' दाबखीळ ' पहा.

दाभाड [हिं० जभडा] न० १ मागें ' जाभाड ' पहा. २ कुसवाच्या खालीं घालतात ती पट्टी,– तें झिजूं नये म्हणून.

दांभिक [सं०] वि० १ अंगीं नाहीं त्या गुणाचा दखावा करणारा; ढोंगी; लबाड. २ गर्विष्ठ. न० अंगीं नाहीं त्या गुणाचा देखावा; ढोंग; बतावणी.

दाम [हिं०] पु० १ पैसा; धन. २ पदार्थाची किंमत. ३ एका आण्याचा तिसावा भाग. ४ एका आण्याचा साठावा भाग. ❀ **दाम करी काम सर्व** गोष्टी पैशानें साध्य होतात. ' बिबी करी सलाम ' (स्त्री आपणास अनुकूल असते किं० होते) ही जोड कधीं कधीं ह्या म्हणीस दिली जाते. **अंगें करील तें काम पदरीं असेल तो दाम** जें काम आपण स्वतः करूं शकूं तेंच चांगलें होतें; नशीबीं असेल तितकाच पैसा आपणास मिळतो. प्रत्यक्ष आपल्या हातांत असेल तोच पैसा आपल्या उपयोगाला येतो; लोकांकडून यावयाच्या पैशावर भिस्त ठेवणें योग्य नाहीं असाही ह्या म्हणीच्या उत्तरार्धाचा अर्थ केला जातो. **दामचुंबक, दामजोड, दामजोड्या** पु० कृपण; चिकू. **दामजड** वि० भारी किंमतीचें; मूल्यवान. **दामदुक (–का–) ळ** [म० दाम+दुष्काळ] पु० धान्यादिकांची स्वताई असून द्रव्याचा अभाव किं० कमताई. **दामदुप्पट** स्त्री०, **दामदुसा** पु० कर्जाऊ दिलेले पैसे व्याजानें दुप्पट होऊन झालेली रकम. **दामदुप्पट कण तिप्पट** दुप्पट दर, भाव, किं० किंमत दिली पण आला जो धान्यादि पदार्थ त्यांत फुटके दाणे किं० मोडके तुटके भाग पुष्कळ आहेत; म्ह० पुष्कळ पैसे खर्चून पदरांत पडला भिकार माल. मागें ' कण ' पहा. **दामाजीपंत, दामोदरपंत** पु० पैसा (थट्टेंत). **दामाशाई** स्त्री० दिवाळें ज्याचें निघालें आहे त्याचा जो पैसा जमा होईल तो त्याच्या धनकोंच्या रकमांच्या प्रमाणांत वाटून देण्याची क्रिया; बुडत्या कुळाच्या सावकारांना त्यांच्या त्यांच्या कर्जाच्या प्रमाणांत मिळतो तो या कुळाचा गोळा झालेला पैसा.

दाम [अ० दाम्=चिरकाल टिको !] वि० चिरायु, शाश्वत. ❀ **दामदौलत** स्त्री० श्रीमंती, वैभव, उत्कर्ष.

दाम [सं० दामन्=दोरी, माळ] न० १ दोरी. २ माळ. ❀ **दामोदर** पु० दाम आहे उदरावर ज्याच्या तो; विष्णु; कृष्ण.

दामगा पु० भाताची एक जात.

दामट [म० दम] वि० ओलसर; भिजलेला.
आगें ' दमट ' पहा.

दामट स्त्री० १ आकाश मेघाच्छादित असून
बारीक बारीक पाऊस पडत असतो अशी दिवसाची
स्थिति. २ अंधेरीं, झापड(पडणें).

दामटणें स०क्रि० १ अश्वादिकांस त्वरेनें चालविणें.
२ मनुष्य, जनावर, इ० कांकडून फार फार काम कर-
वून घेणें. ३ कोणेकावर चरफडणें किं० त्याला रागें
भरणें किं० त्याची खरडपट्टी कारणें. ४ पदार्थाचा,
माणसाचा, किं० जनावराचा भलत्याच रीतीनें
उपयोग करणें किं० त्यांना भलत्याच कामीं योजणें.

दामटा [म० दामटणें] पु० १ थापटून चपटा
आणि वाटोळा केलेला पदार्थ (भाकरी, गोवरी,
पैसा, इ०).२ गाय, बैल, इ० च्या गळ्याखालीं
लोंबत असतें तें कातडें; सास्ना; पोळी.

दामटी [म० ' दामटा ' चें लघुत्वदर्शक रूप]
स्त्री० १ लहानशी भाकरी. २ लहानशी गोवरी.
३ चेपटला पैसा, रुपाया, इ० नाणें. ‡एकाद्याची
दामटी वळणें १ आजार इ० मुळें तो रोड होणें.
२ कामामुळें तो निर्वीर्य होणें; कामानें त्याची कम-
बख्ती होणें.

दामटीव [म० दामटणें] वि० १ वेगानें
चालविलेला (घोडा, बैल, इ०). २ मुद्दाम पाठ-
विलेला (जासूद, इ०).

दामण स० क्रि० १ दाबणें, चेपणें. २ठासून
भरणें. ३ (जनावर) खुंट्याशीं बांधणें. ४ कांहीं
कामांत (मनुष्याला) सक्तीनें गुंतविणें.

दामुखा, दामोखा पु० बाभळीच्या शेंगांतील
बीजें प्रत्येक.

दाय [सं०] वि० देणारा. पु० १ देणें. २
देणगी, दान. ३ वडिलोपार्जित मिळकतीचा वाटा
किं० हिस्सा. ४ हिस्सा (सामान्यतः). ५ भिक्षा-
बळ. ६ वधूवरांस देणगी. ‡ दायाद पु० १ वडि-
लोपार्जित द्रव्यादींचा वाटेकरी किं० हिस्सेदार.
२ नातलग (सामान्यत्वें). ३ वंशज.
दायभाग, दायविभाग पु० दायरूप द्रव्याची
वाटणी.

दायजी, दाईज पु० वर ' दायाद ' पहा.

दायक, दायी [सं०] वि० (संस्कृत समा-
सांत) देणारा; उ० सुखदायक, सुखदायी,
कल्याणदायक, कल्याणदायी, इ०.

दायतें [सं० दा=देणें पासून] न० १ देव, भूत,
पिशाच, इ०ना दरवर्षी द्यावयाचें जें खाद्यपेय किं०
वस्त्रादि तें. २ नोकरचाकर, भिकारी, इ०ना दरवर्षी
द्यावयाची खैरात.

दायरा [अ० दाइराइ] पु० १एक चर्मवाद्य.
२ मुसलमान लोकांची प्रेतें पुरण्याची जागा.

दार [सं० द्वार] न० १ दरवाजा; फाटक. २
कोणत्याही शास्त्र, कला, इ० विषयांत प्रवेश सुलभ
करून देण्याचें साधन. ३ कांहीं कार्य साधावयाचें
असतां अवलंबावयाचा मार्ग किं० आपणाबद्दल भीड
किं० वजन खर्चीऊ असा माणूस. ४मर्यादित जागेंत
जावयाची किं० तींतून बाहेर पडावयाचीं वाट. ५
दाराच्या पुढचा किं० शेजारचा प्रदेश; उ० आम्हीं
दारीं तुळशी लाविल्या आहेत. ‡दारीं जाणें(किं०
बसणें किं० लागणें) परसाकडे जाणें (बायकांत
रूड). दारकस [म० दार+कूस]स्त्री० दाराच्या
चौकटीच्या चार लाकडांपैकीं उभीं जीं दोन लाकडें
तीं प्रत्येक; बाही. दारकुसूं न० दाराचें खालचें
आणि वरचें अशीं जीं दोन कुसवें तीं प्रत्येक.
दारकसा स्त्री० अ०व० दारकसांवर भाद्रपदांत काढ-
तात पार्वतीदेवीप्रीत्यर्थ ज्या आकृति त्या. दारकोंड
पु० कुळाकडून आपलें द्रव्य यावें म्हणून त्याच्या
घरांतील मनुष्य बाहेर न पडेल आणि बाहेरचें मनुष्य
आंत न जाईल असा दाराचा जो निरोध तो. दार
धरणें लग्नामध्यें नवरा जाऊं लागला म्हणजे त्याच्या
बहिणीनें दारांत 'तुला मुलगी होईल ती माझ्या मुलास
दे' असें मागणें मागून घेणें किं०तो शिष्टाचार करणें.
ह्या विधीला ' दारधरणी ' असाही शब्द रूढ आहे.
दार ढवळणें न० नवरानवरींचें जोडपें घरांत
शिरत असतां त्यांना थांबवून म्हणतात तें गाणें.
दारफळणी स्त्री० १ घराचें दार बंद होणें,—
घरांत नांदावयाला कोणी माणूस जिवंत न
राहिल्या कारणानें किं०सर्व माणसें परागंदा झाल्या
कारणानें; उ० मागच्या पटकींत कितीएकांच्या
दारफळण्या झाल्या. २ कुटुंबाचा पूर्ण विध्वंस. ३
दिवाळें. दारभाजी स्त्री० माठ नांवाची भाजी.
दारवटा (–ठा), दारवंटा (–ठा), दारिं-
वठा पु० १ दाराजवळचा प्रदेश. २ उंबरा

दारशीक न० दरवाज्याच्या चौकटीच्या माथ्यावर पदार्थ ठेवण्यासाठीं जी फळी बसविलेली असते ती. **दारशीग** स्त्री० दाराच्या चौकटीची जी बाही म्हणजे दारकस तिला दिवा ठेवण्यासाठीं जो खिळा ठोकतात तो. **दारचा** वि० १ घराच्या दाराजवळ लाविलेला (आंबा, भाजी, फुलझाडें, इ०). २ आपल्या दारांत किं० दाराशीं बसणारा (कुत्रा), ये म्हणतांच येणारा (माणूस), इ०.

दार [फा० दाश्तन् (ठेवणें) पासून 'दार,' हा प्रत्यय] वि० १ धारण करणारा, ठेवणारा, बाळगणारा; उ० चोबदार, भालदार, जोरदार, अमलदार, इ०. २ ऐपतदार; 'नादार' च्या व्यावर्तकत्वें.

दारचिना (–णा) [सं० दन्तशाण] पु० एक दंतमंजनविशेष. 'दारशणा,' 'दारशिना (–णा),' 'दांतचिना,' हेही ह्याच अर्थाचें शब्द आहेत.

दारणा पु० डोकीची त्वचा शुष्क होऊन खवले निघतात तो रोग.

दारहळद [सं० दारुहरिद्रा] स्त्री० एक औषधी काष्टविशेष.

दारा [सं० दार पु० नित्यं अ० व०=पत्नी] स्त्री० पत्नी; भार्या; लग्नाची बायको. ❀ **दारपरिग्रह** पु०, **दारक्रिया** स्त्री० विवाह. **दारेषणा** [सं० दार=पत्नी; ईषणा=इच्छा, प्रेम] स्त्री० पत्नी मिळावी अशी इच्छा. २ स्वपत्नीवरचें प्रेम.

दारिद्र्य [सं०] न० गरीबी; अन्नवस्त्राची कोणेकाला पीडादायक होते ती उणांव किं० कमतरता.

दारुण [सं०] वि० १ कठिण. २ कठोर, दुस्सह. ३ तीव्र. ४ निर्दय. ५ भयंकर. ६ (साहित्य) भयानक रस. ७ मृग, पुष्य, ज्येष्ठा, आणि मूळ, हीं दारुण नक्षत्रें.

दारुणा पु० डोक्याला होतो तो एक प्रकारचा त्वग्रोग.

दारू [फा०] स्त्री० १ औषध. २ प्यावयाचा एक अमली पदार्थ. ३ गंधक इ० द्रव्यें एकत्र करून केलेलें अग्निसंयोगानें उडवावयाचें चूर्णविशेष. ,–जें बंदुक, फटाकडा, सुरुंग, इ० मध्यें ठासतात. ❀ **दारू ठासणें** १ मोठमोठ्या घोटांनीं दारू पिणें. २ खूप दारू पिणें. 'दारू ढोसणें' असाही ह्याच अर्थी प्रयोग आहे. **दारू पिकाविणें** प्यावयाची दारू तयार करणें. **दारूकलाली** स्त्री० प्यावयाची दारू किं० ह्या दारूवरचा कर. **दारूकाम** न० उडवावयाच्या दारूचे पदार्थ,–फटाकडे, नळे, चंद्रज्योति, इ०. **दारूखाना** पु० १ दारू जेथें पैसे देऊन प्यावयाला मिळते तें ठिकाण किं० ही दारू जेथें केली जाते तें ठिकाण. २ उडवावयाची दारू बनविली जाते किं० साठविली जाते तें ठिकाण. **दारूगोळा** पु० ए० व० उडवावयाची दारू, तोफा, बंदुका, इ० समुच्चयानें. **दारूबाज, दारूखोर** वि० दारू पिण्याचें ज्याला व्यसन आहे असा.

दारें [म० 'दार' चें लघुत्वदर्शक रूप] न० १ कुंपणाची पंक्ति मध्यें मोडली असतां पडते ती खिंड. २ पाण्याचा पाट मध्यें फुटल्यामुळें पडते ती खिंड. ३ भट्टीला ठेविलेलें असतें तें लहानसें दार,–ज्यांतून सर्पण आंत ढकलतात. ४ दरवाज्याची दिंडी. ५ शेतखान्यांतील पाटी भंगी ज्यांतून ओढून घेतो तें दार. ६ कोणत्याही बारदानाला ठेविलेलें भोक,–आंतील पदार्थ बाहेर काढून घेण्यासाठीं. ❀ **दारेकरी, दारोळ्या** पु० पाटाचें पाणी वाफ्यांत सोडणारा किं० बंद करणारा बागवानाचा नोकर.

दारोगा, दारोका [फा० दारोगाह] पु० एकाद्या कचेरीचा किं० संस्थेचा व्यवस्थापक किं० देखरेख करणारा.

दारोटा (–ठा) मागें 'दारवटा (–ठा)' पहा.

दार्ढ्य [सं०] न० दृढपणा. पुढें 'दृढ' पहा.

दार्ष्टान्तिक [सं०] वि० १ ज्याला दृष्टान्त द्यावयाचा आहे असा (पदार्थ). २ दृष्टान्त देऊन स्पष्ट किं० विशद केलेला. ३ दृष्टान्त द्यावयाला उपयोगी पडेल असें (वचन, वाक्य, इ०). ४ दृष्टान्ताला लक्ष्य जो उपमेयरूप अर्थ तो.

दाल पु० बोट दीडबोट रुंदीचें विणलेलें वस्त्र: कांठ; किनरी. [रुंद पट्टा.

दाल [फा० दवाल] स्त्री० कातड्याचा

दालचिनी स्त्री० एका वृक्षविशेषाची साल,–ही कुटून मसाल्यांत घालतात.

दालद न० समुद्र किं० खाडी यांतील मासे धरण्याचा धंदा किं० व्यवसाय. ❀ **दालदी पु०** मासे धरणारांची एक जात,–हे मुसलमान असतात. **भटाला तारवें आणि दालद्याला गोरवें** मागें ' तारूं ' शब्दांत ही म्हण पहा. तसेंच मागें 'गावती' शब्द पहा. **वि०**दालद्यासंबंधाचा. **दालदी वि०** मासे पकडण्याच्या कामीं योजलें जातें तें (होडकें, मचवा,इ०).

दालन, दालान [**फा०** दालान्] **न०** मोठ्या दिवाणखान्याचा किं०खोलीचा पडदा,भिंत, इ०नीं वेगळा केलेला भाग.

दाली स्त्री० १ तरवार अंगावर अडकावण्याचा पट्टा;तरवार कमरेशीं लटकविण्याचा चामड्याचा पट्टा. २ शिपायाचें एक चिन्ह. ❀ **कोणेकाशीं दाली बांधणें** त्याला जिंकण्याला अभिमानानें सज्ज होणें. **दालीबंद वि०** तरवार दालीनें लटकावून सज्ज झालेला (शिपायी).

दालें न० संबळ हें जें वाजंत्र्याचें चर्मवाद्य त्याचें एक अर्धुक.

दाल्ला, दादला पु० नवरा.

दाव [**सं०**] **पु०** १ अरण्य. २ वणवा. ❀ **दावाग्नि,दावानल पु०** वणवा.

दांव [**सं०** दामन्] **न०**एका देखास लागलेले दोन फणस (दुदांव) किं० तीन फणस (तिदांव).

दांवण, दांवन [**सं०** दामनी] **स्त्री०** १ गायी, बैल, इ० बांधावयाचीं अनेक दांवीं ज्याला जागोजाग बांधलीं आहेत असा दोर; हा दोन टोकांना दोन खुंट्यांशीं बांधलेला असतो. २ अशा दोराला बांधलेलीं गुरें समुच्चयानें. ३ पकडलेल्या चोरांची अशीच बांधलेली पंक्ति. ४ माणसें, जनावरें इ०ची रांग.

दावणें [**म०** दाखविणें] **स० क्रि०** (कवितेंत) दाखविणें.

दावनमलगी स्त्री० दवणशेवती हें झाड.

दावल स्त्री० ढोंग; खोटा देखावा किं० आविर्भाव.

दांवली [**म०**'दांवें' चें लघुत्वदर्शक रूप] **स्त्री०** [लहान दांवें.

दावा [**अ०**] **पु०** १ द्वेष; वैर; विरोध. २ पदार्थावर आपलें असतें तें स्वत्व; हक्क; उ० हा बाग मी तुला बक्षीस दिला, त्याच्यावर माझा आतां दावा नाहीं. ३ दुसऱ्याच्या पदार्थावर आपला हक्क सांगणें. ४ फिर्याद; तकरार. ❀ **दावादरफडा पु० ए० व०** १ धमकी घालणें. २ चरफडाट (करणें). **दावेकरी, दावेखोर, दावेदार पु०** १ शत्रु. २ आपलें अकल्याण करावयाला टपलेला. ३ आपला प्रतिपक्षी. ४ हक्कदार. **दावेदारी स्त्री०** शत्रुत्व; आकस; विरोध. **वि०** आकसखोर; विरोधी. **दावेदुष्मन, दावेदुस्मान पु०** १ शत्रु. २ आपला द्वेष्टा. **एकाद्यावर दावा उगविणें** (किं० **घेणें**)त्याचा सूड घेणें. **एकाद्यावर दावा सांगणें** (किं० **गाणें**) त्याला धमकी, दहशत, किं० भीति घालणें. **दावा तोडणें** दोघा माणसांतील विरोधाचें कारण नाहींसें करून त्यांच्यांत सलोखा करणें. **एकाद्याचा दावा धरणें** त्याच्याशीं शत्रुत्व करणें; त्याच्यावर दांत धरणें; त्याचा द्वेष करणें. **दावा साधणें** १ सूड उगवून घेणें. २ फिर्याद जिंकणें.

दावाग्नि वर ' दाव ' मध्यें पहा.

दांवाळूं न० एक प्रकारचें अळूं,–हें पांढरें असतें.

दांवें न० झाडावरचा कोंवळा फणस.

दांवें न० अळवाची मुळी.

दांवें [**सं०** दामन्] **न०** गायी, म्हशी, इ० बांधावयासाठीं बिरड्यांनीं युक्त जी दोरी केलेली असते ती; ही दोरी दावणीस किं० खुंट्यांस अडकाविलेली असते. ❀ **दांवेफणस पु०** एक प्रकारचा फणस,–हा झाडाला जमीनच्या पोटांत धरतो. **दांव्यास दांवें देणें** कोणेकाची गाय, किं० म्हैस व्याल्यास एक वासरूं देण्याच्या शर्तीनें ती गाय किं० म्हैस, आपल्या घरीं आणून तिला खाऊं पिऊं घालून तिचें दूध, तूप, इ० चा उपभोग घेणें.

दाशा पु० १ अरुंद भिंतीच्या पोटांत भिंतीला मजबुती किं० बळकटी येण्यासाठीं जे लाकडाचे आडवे दांडे भिंतींत रचाईच्या वेळीं घातलेले असतात ते प्रत्येक. २ भिंतीच्या वर छपराच्या वांशांना आधारभूत जो आडवा वांसा तो टेकावयासाठीं

सिताच्या गर्भा ज उभं खांब ठेविलेले असतात ते प्रत्येक.

दाष्टार्थिक [सं० दुष्ट] वि० दुष्ट; आकसखोर. ⊛ दाष्टास देव धारजिणा दुष्ट माणसाच्या दुष्टपणाच्या कृत्यांना देव यश देतो (वैतागाचा उद्गार).

दास [सं०] पु० १ गुलाम. २ चाकर. ३ धीवर. ४ शूद्रांच्या नांवापुढे योजावयाचा बहुमानाचा शब्द; उ० गोपालदास. ५ आत्मज्ञानी. ⊛ **दासानुदास** पु० १ कोणाच्याही दासाचा दास. २ वक्ता आपणास कोणा समर्थाचा दासानुदास म्हणवून घेतो; उ० मी आपला दासानुदास आहें, मी आपल्या उलट कसा जाईन ?

दासी [सं०] स्त्री० १ नोकर स्त्री. २ वेश्या. ⊛ **दासीपुत्र** पु० रांडलेक (शिवी).

दास्त [फा० निगाह (काळजी) + दाश्तन् (ठेवणें) पासून तोकडें रूप] स्त्री० काळजीपूर्वक वागवणूक (पदार्थाची किं० माणसाची) क्रि० राखणें, ठेवणें.

दास्तान [फा०] न० १ धान्यादिकांचा संग्रह किं० साठा करण्याची क्रिया. २ साठविलेलें धान्यादि. ३ धान्यादि साठवावयाची जागा; कोठार. ४ गलबतांत माल भरावयाची जागा. ५ पदार्थ किं० माणूस किं० जनावर यांची निगा किं० काळजी. क्रि० लावणें, ठेवणें, संभाळणें. ⊛ **दास्तानदार** पु० १ साठविलेल्या पदार्थांची उंदीर, घुशी, इ०नीं खराबी न करावी म्हणून नेमिलेला अमलदार. २ ज्याच्या संग्रहीं विपुल धान्यादि बेगमीचे पदार्थ आहेत तो.

दास्य [सं] न० १ दासाची स्थिति; दासपणा. २ ताबेदारी; परवशता.

दाखी पु० १ बहुरूप्यांचा एक प्रकार किं० वर्ग. २ नीच, हलकट, पाजी (माणूस).

दाह [सं०] पु० १ जळण्याची किं० जळण्याची क्रिया; जळणें; जाळणें. २ मनाला रागानें होतो तो ताप. ३ ज्वरानें, सूर्याच्या प्रखरतेमुळें, किं० हवेच्या उष्म्यानें अंगाला होतो तो त्रास. ४ आग. टीप,–' दाह ' ह्या शब्दाचीं अपभ्रष्ट रूपें 'दाहा' ' डाहा, ' हीं ह्याच अर्थी योजिलीं जातात. ⊛ **दाहजाळ** पु० सूर्याच्या उन्हाची प्रखरता किं० उन्हाचा झटका.

दाहक [सं०] वि० जाळणारा. पु० अग्नि, विस्तव.

दाहट वि० १ धीट, साहसी. २ तल्लख; चलाख. ⊛ **अतिसोंवळा तो ओंवळया खाय दाहट बायको निघून जाय** सोंवळेंपणा फार फार करणारा मनुष्य प्रसंगांत सांपडला असतां ओवळ्यानें खातो आणि फाजील नापट बायकोला घर सोडून जाण्याचा प्रसंग येतो. ही म्हण अन्य अर्थानेंही योजण्यांत येते.

[जाळणें.

दाहणें [सं० दह् = जळणें, जाळणें] स० क्रि०

दाहन [सं० दह् = जळणें, जाळणें] न० जाळणें.

दाहा, दाहावा मागें ' दहा, ' ' दहावा ' पहा.
दाहाट मागें ' दहाट ' पहा.

दाहिजा [म० दहा] पु० दहा मनुष्यांचा (विशेषतः दहा शिपायांचा) समुदाय किं० टोळी. २ कुळारग गांवांत कुळांचे स्वत्तांतील नव्हे असें जें ठिकाण खोताखालीं असतें तें.

दाहीं [म० दहा] क्रि० वि० दहा ह्या संख्येनें गुणून किं० गुणलें असतां; उ० आठ दाहीं ऐंशी.

दाहोत्तरा, दाहोतरा, दाहोत्रा [म० दहा + उत्तर] पु० १ प्रतिमासीं किं० प्रतिवर्षी शंभर रुपयांस दहा रुपये व्याज असा जो संकेत किं० ठराव तो. २ शंभर पदार्थ (केळीं, नारळ, आंबे, इ०) विकत घेतले असतां दहा अधिक देण्याचा संकेत किं० ठराव.

दाह्य [सं०] वि० जाळण्याजोगा; जाळावयाला लायक.

दाळ, डाळ [सं० दल] स्त्री० १ हरभरा, पावटा, इ० द्विदळ धान्यांच्या एका एका दाण्यांतील जीं दोन अर्धुकें असतात तीं प्रत्येक. २ अशीं अर्धुकें समुच्चयानें. टीप,–ह्या दोन्ही अर्थी 'डाळ' हा शब्द अधिक रूढ आहे. मागें ' डाळ ' पहा. ⊛ **एकाद्याची डाळ गळणें** (किं० **विकणें**, किं० **शिजणें**) याच्या युक्त्या, कपटें, लबाड्या, किं० डावपेंच, फलद्रूप होणें. **दाळ नासणें, दाळ व्यर्थ खाऊन गमाविणें** १ आळशी होणें. २ आशाभंजक होणें. **आपल्या पोळीवर दाळ ओढणें** आपलपोटेपणा करणें. **दाळकण** पु० दाळीचा तुकडा किं०

खेट. दाळगोटा पु० भरडून केलेल्या डाळींत राहिलेला सबंध म्ह० न फुटलेला दाणा. **दाळपिठिया** वि० गरीब; अतिशय सौम्य स्वभावाचा (मनुष्य). **दाळपीठ** न० गरिबाऊ भोजन किं० चरितार्थ. **दाळभाजी** स्त्री० डाळ घालून केलेली भाजी. **दाळभोपळा** पु० डाळ घालून केलेली भोपळ्याची भाजी. **दाळवांगें** न० डाळ घालून केलेली वांग्याची भाजी. **दाळरोटी** स्त्री० ए० व० साधें गरीबाऊ जेवण. **दाळरोटी सब बात खोटी** जीवितांत महत्त्वाची वस्तु जेवण, इतर वस्तु कमी महत्त्वाच्या होत. [पहा.

दाळिंब, दाळिंबी मागें ' डाळिंब ' 'डाळिंबी'

दाळी, दाळें मागें ' डाळी, ' ' डाळें ' पहा.

दाक्षिणात्य [सं०] वि० १ दक्षिणेकडचा. २ नर्मदेच्या दक्षिणेकडचा. पु० दक्षिणी माणूस.

दाक्षिण्य [सं०] न० १ कृपा, मेहेरबानी. २ अनुकूल वर्तन. ३ एकाद्याची मर्जी संभाळणें. ४ कौशल्य.

दिक् [सं० दिश् (दिशा) चें कठोर व्यंजनापूर्वीचें रूप] स्त्री० दिशा. ॐ **दिक्चक्र** न० १ जग. २ क्षितिज. **दिक्पति** पु० सूर्य, शुक्र, मंगळ, राहु, शनि, चंद्र, बुध, आणि गुरु, हे जे दिशांचे स्वामी ते प्रत्येक. **दिक्पाल** [सं०] पु० इंद्र, अग्नि, यम, नैऋत, वरुण, वायु, कुबेर, ईश, हे प्रत्येक. मागें ' अष्टदिक्पाल ' पहा.

दिक [सं०] पु० हत्तीचा छावा.

दिक [अ०] वि० १ दमलेला. २ थकलेला. ३ खंती पावलेला.

दिकत [अ० दिकत] स्त्री० १ शंका, संशय. २ अनिष्टाची शंका. ३ कचर; साशंक वृत्ति; मनाची चलबिचल. ४ हरकत; अडथळा. ॐ **दिकतखोर** वि० १ साशंक वृत्तीचा (मांणूस). २ किळसुडा. ३ निंदक; दोषैक दृष्टि. ४ वाईटाचा सदा शंका घेणारा. ५ जें बाजारांत चालेल किं० नाहीं अशी शंका ज्याचे संबधानें येते असें(नाणें). **दिकती** वि० १ सदा साशंक. २ हुज्जतखोर. ३ चोखंदळा. ४ अनिष्टाची सदा भीति ज्याला वाटते असा (माणूस).

दिकर [सं०] पु० तरुण मुलगा. **दिकरी** [सं०] स्त्री० लहान मुलगी.

दिग् [सं० ' दिश् ' (दिशा) चें स्वर आणि मृदु व्यंजनें यांच्या पूर्वीचें रूप] स्त्री० दिशा. ॐ **दिगंत** पु० १ दिशेच्या टोकावरचा प्रदेश. २ क्षितिज. ३ खूप दूरचा प्रदेश. **दिगंबर** वि० नग्न; नागवा. पु० १ जैन भिक्षुविशेष. २ शंकर. **दिगंबरी** स्त्री० दुर्गा देवी. **दिगीश, दिगीश्वर** पु० दिशांचे जे अधिपति ते प्रत्येक. **दिग्गज** पु० १ ऐरावत, पुंडरीक, वामन, कुमुद, अंजन, पुष्पदंत, सार्वभौम, आणि सुप्रतीक, हे जे अनुक्रमें पूर्व, आग्नेयी, दक्षिण, नैर्ऋती, पश्चिम, वायव्य, उत्तर, आणि ईशान्य, ह्या आठ दिशांचे रक्षक गज ते प्रत्येक. २ मोठा आणि धिप्पाड माणूस. ३ जाडा विद्वान्. **दिग्जय, दिग्विजय** पु० सर्व दिशांचे देश जिंकणें. **दिग्विजय** पु० मोठा पराक्रम (विनोदांत किं० उपहासात). **दिग्विजयी** पु० १ ज्याणें अनेक देश जिंकिले आहेत असा राजा. २ ज्याणें अनेक पंडितांना वादांत जिंकिलें आहे असा पंडित. ३ (विपरीत लक्षणेनें) निर्लज्ज माणूस. **दिङ्मंडल** न० १ आकाशाचा विस्तार. २ सर्व दिशा.

दिग्भ्रम पु० दिशाभूल.

दिगर [फा० दीगर्=दुसरा, अन्य] वि० १ दुसरा. २ बाहेरचा. ३ स्वसत्ताक, स्वतंत्र; उ० दहा गांव दिगर आहेत; पांच खालसा आहेत. ॐ **दिगरनंबर** पु० एकाद्या खात्यांतील किं० कचेरींतील विविध विषयांचें दफतर. **दिगरमझमून** [फा० दिगर+अ० मझमून] क्रि० वि० शिवाय; आणखी असें कीं.

दिठी [सं० दृष्टि] स्त्री० दृष्टि; नजर; एकाद्या पदार्थाकडे टक लावून पाहाण्याची क्रिया.

दिंड न० १ कोण्या कापडाचें लांबट बांधलेलें जें ओझें तें किं० जो गठ्ठा तो. २ नागपंचमीच्या दिवशीं आंत पुरण घालून उकडून काढतात तें गाठोड्याच्या आकाराचें पक्वान्नविशेष. ३ लग्नाच्या समारंभांत नवऱ्याकडील वऱ्हाड्यांस पाठवणीचे समयीं पांच वस्त्रें एकत्र करून देतात तीं समुच्चयानें. ४ पाभर, कुळव, कोळपें, इ० आउतांचा आडवा दांडा. ५ लांकडाचा ओंडा. ६ मोठ्या दरवाज्याला असते तें लहानसें दार; दिंडी.

दिडका, दिडता [म० दीड=एक आणि अर्धा] वि० १ अर्ध्यानें अधिक (माप, वजन, विस्तार,

इ०).उ०राजापूरी शेरापेक्षां संगमेश्वरी शेर दिडका आहे. २ दीड पदरी घडी ज्याची केली आहे असें (वस्त्र). ३ दोन अवयवांनीं जें वस्त्रादि पूर्ण होतें त्यांतील एक अवयव ज्यांत अर्धा आहे असें (वस्त्रादि); उ० नारायणगांवीं पासोड्या दिडक्या दिसतात.

दिडकी [म० दीड] **स्त्री०** १ दीड दुगाणीचें नाणें. २ पैसा हें नाणें. **दिडकी स्त्री०, दिडकें न०** एकपासून शंभरापर्यंत जे क्रमांक त्यांच्या दीड-पटींची पंक्ति (जी लहान मुलांकडून पाठ करवून घेतात) ती; उ० एक दीडें दीड, बे दीडें तीन, तीन दीडें साडेचार, इ० जी पंक्ति ती.

दिंडा पु० एक जंगली झाड.

दिंडी स्त्री० १ मोठ्या दरवाज्याच्या एका पानांत जें एक लहानसें दार केलेलें असतें तें. २ एक तंतुवाद्यविशेष. ३ वस्त्राच्या तुकड्यावर काढलेलें मारुति इ०चें चित्र मिरवणुकींत लांब काठीच्या टोकाला लावून नेतात तें किं० तशा वस्त्रानें सजविलेली काठी. ४कोणत्याही देवाची किं०थोर पुरुषाची किं०कांहीं प्रसंगविशेषीं काढलेली मिरवणूक. ५ उत्सवादिकांत देवाचा काढतात तो छबिना. ॐ **दिंडीगाण पु०** दिंडी हें वाद्य वाजवून भिक्षा मागणारा. **दिंडीपताका स्त्री० अ० व०** देवाच्या मूर्तीची मिरवणूक काढतांना निघालेले पताका घेतलेले आणि वाद्यें वाजवीत चाललेले लोक.

दिढी [म० दीढ] **स्त्री०** पदार्थाची दीडपट; अर्धासहित कोणत्याही पदार्थाचें परिमाण. ॐ **दिढीकाढी, दिडीवाढी स्त्री०** शेतकऱ्यास पेरावयासाठीं किं० इतरांस संसारादिकांसाठीं एकपट धान्य देऊन पुढें सराईस दीडपट (किं० सव्वापट) धान्य परत घ्यावें असा जो व्यवहाराचा प्रकार तो; ' वाढीदिडी ' हाही शब्द ह्याच अर्थीं योजतात.

दिढें, दिडें [म० दीड] **क्रि० वि०**दीडपटीनें, उ० दहा दीडें पंधरा.

डिढोतरा, दिढोत्रा [म० दीढ+**सं०** उत्तर (वर, अधिक)] **पु०** दरमहा दरशेकडा दीड रुपाया हा व्याजाचा दर.

दिति [**सं०**] **स्त्री०**दैत्यमाता; दैत्यांची आई. **अदिति स्त्री०** देवमाता. **आदितेय पु०** देव.

दिदारू [**फा०** दीदारू=सुंदर] **वि०** केवळ दिसण्यांत सुंदर; भपकेदार (वस्त्र, माणूस, जनावर, पदार्थ).

दिदृक्षा [**सं०**] **स्त्री०** पाहण्याची इच्छा.

दिन [**सं०**] **पु०** १ दिवस. २ अहोरात्र. ॐ **दिनान्त पु०** सायंकाळ. **दिनान्तक पु०** अंधकार. **दिनार्ध पु०** दुपार, मध्यान्ह. **दिनपति, दिनकर, दिनमणि पु०** सूर्य. **दिनचर्या स्त्री०** १ रोजचा कार्यक्रम. २ भोजनादि ज्या नित्य क्रमांतील बाबती त्या समुच्चयानें; उ० ह्या नोकरींत पैसा शिलकीस पडणार नाहीं; बरासरी दिनचर्या मात्र भागेल(किं० चालेल).२ कचेरींतील रोज केलेल्या कामांच्या नोंदीचें पुस्तक. **दिननिर्वाह पु०** गरीबाऊ गुजराण किं० चरितार्थ. **दिनमान न०** १ सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत तीस घटिका हें कालमान. २ कांहीं एका गोष्टीविषयीं कालाची अनुकूलता किं० प्रतिकूलता; उ० केवळ नोकरी करून चार पैसे शिलक पडतील असें दिनमान राहिलें नाहीं. **दिनवृद्धि स्त्री०** ज्या तिथीच्या अवधींत दोन सूर्योदय होतात ती तिथि. **दिनशुद्धि स्त्री०** समयाचा शुभपणा; कोणतेंही कार्य करावयाला कालाचें अनुकूल्य किं० औचित्य. **दिनक्षय** १ **पु०** सूर्योदयानंतर लागलेल्या तिथीनें दुसऱ्या दिवसाच्या सूर्योदयाचें पूर्वीच संपणें हा तिथीचा ऱ्हास. २ सायंकाळ. **दिनावधि पु०** १ दिवसाची कालमर्यादा. २ (मराठींत) दिरंगाई; आजचें काम उद्यांवर,परवावर,असें लोटीत गेल्यानें होणारा उशीर; उ० माझें काम दिनावधींवर लोटूं नको, तें तावडतोब झालें पाहिजे.

दिपणें, दिपावणें [**सं०** दीप्=प्रकाशणें, पेटणें] **अ० क्रि०** १ पदार्थाचें तेज असह्य झाल्यामुळें (डोळे) आपलें पाहाण्याचें कर्तव्य करावयाला असमर्थ होणें; उ० विजेच्या दिव्यानें माझे डोळे दिपतात (किं० दिपावतात). २ वीज चमकल्यावर किं० चंद्रज्योत इ० विझल्यावर दिव्याचा प्रकाश असूनसुद्धां डोळ्यांना कांहीं काळ अंधता येणें. ३ कांहीं अद्भुत किं० अपूर्व देखावा पाहून चकित होणें.

दिपत, दिपवत [**सं०** दीप (दिवा)+(वर्ति) वात] **स्त्री०** १ देवापुढें पणती, निरांजन.

इ० मध्यें कापसाची वात तुपांत जळत ठेवितात ती. २ देवापुढें जी सांजवात करतांत ती (लावणें). ॐ **दिपत** (किं० **दिपवत**) **धरणें** देवापुढें तुपांत कापसाची वात जळत ठेवण्याचें व्रत धरणें.

दिपवा [**सं०** दीप्=प्रकाशणें; **म०** दिपणें] **पु०** सर्व दिवसभर मेघांची अंधेरी असतां मधून मधून जो सूर्यप्रकाश कांहीं वेळ दिसतो तो.

दिपवाळी, दिपावळी, दिवाळी [**सं०** दीप (दिवा)+आवली(पंक्ति)] **स्त्री०** १ नरकचतुर्दशी-पासून चार दिवस दीपोत्साहपूर्वक सण करतात तो. हे चार दिवस पुढें दिल्याप्रमाणें असतात. आश्विन कृष्ण चतुर्दशी (नरक चतुर्दशी), आश्विन कृष्ण अमावास्या (लक्ष्मीपूजन), कार्तिक शुद्ध प्रतिपदा (बलिप्रतिपदा), कार्तिक शुद्ध द्वितीया (यमद्वितीया किं० भाऊबीज). २ मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा,—ज्या दिवशीं बैल शृंगारतात आणि सण करतात ती. ॐ **दिपवाळीचा पाडवा पु०** कार्तिक शुद्ध प्रतिपदा. **दिपवाळीचें ओवाळणें न०** खोताच्या मानासाठीं दिपवाळीच्या सणांत खोताच्या पुढें प्रथम लावितात तो दिवा.

दिपावणें मागें ' दिपणें ' पहा.

दिपुष्ट, दिपोष्ट [**सं०** दीप (दिवा) + उच्छिष्ट (खाऊन उरलेलें)] **न०** दिवा मालविल्यावर पणती इ० त जें तेल राहिलेलें असतें तें. ' दिपुष्टेल ' म्हणजे असें शिल्लक राहिलेलें तेल. ॐ **दिपुष्टाण, दिपोष्टाण स्त्री०** मालविलेल्या दिव्याची घाण.

दिमक [**हिं०** दीमक्] **पु०** एक प्रकारची पांढरी मुंगी.

दिमत इ० पुढें ' दिम्मत ' इ० पहा.

दिमाख [**अ०** दिमाग्] **पु०** तोरा; ऐट; नखरेबाजी. ॐ **दिमाखलंवडी आणि कानांत कवडी** ऐट फार आणि ऐट करावयाला भिकार वस्तु (हा हास्यास्पद प्रकार होय). **दिमाखदार वि०** ऐटदार, भपकेदार, शोभिवंत.

दिम्मत, दिमत [**अ०**] **स्त्री०** दुसऱ्याच्या पदार्थावर त्याच्या संमत्तीनें चालविलेला ताबा, अधिकार, स्वामित्व, किं० अधिकार; दुसऱ्याच्या पदार्थाची आपणाकडे आलेली संरक्षणाची जबाबदारी किं० काळजी; उ० हा दागिना तुमच्या दिमतीस असूं द्या; उ० तुमच्या दिमतीच्या स्वारांची हजीरी घेणें आहे. ॐ **दिम्मतदार, दिमतदार पु०** आपल्या हवालीं असलेल्या दुसऱ्याच्या वस्तूची निगा राखणारा किं० काळजी घेणारा किं० वहिवाट करणारा; ज्याच्या दिमतीस कांहीं पदार्थ आहे तो त्या पदार्थाचा दिम्मतदार. **दिम्मतवार वि०** दुसऱ्याच्या दिमतीस असलेला. **क्रि० वि०** ज्या माणसांच्या हवालीं किं० देखरेखीखालीं कांहीं पदार्थ किं० माणसें ठेविलेलीं आहेत त्यांच्या नांवांचा उल्लेख करून (केलेली यादी). **दिम्मती, दिमती, वि०** दुसऱ्याच्या हवालीं किं० देखरेखीखालीं असलेला.

दिरंग, दिरिंग [**फा०**] **पु०** विलंब, उशीर, लांबणीवर ढकलणें. ॐ **दिरंगाई, दिरिंगाई स्त्री०** कांहीं काम एकसारखें लांबणीवर टाकीत जाणें किं० टाकीत जाण्याची प्रवृत्ति; विलंब; उशीर.

दिरगदारी [**फा०** गिरफ्ताहद्दारी] **स्त्री०** पंचाईतीची, पेचाची, किं० अडचणीची स्थिति. मागें ' गिरिबदारी ' पहा.

दिल [**फा०** दिल्] **पु०, न०** अंतःकरण. ॐ **दिलखुष** (**–श**) **वि०** आनंददायक; संतोषकारक; अंतःकरण संतुष्ट किं० आनंदित करणारें (गायन, वादन, भाषण, इ०). **दिलखुशी** (**–षी**) **स्त्री०** १ आनंदितपणाची स्थिति; संतुष्टपणा; मनाची चिंतारहित वृत्ति. २ स्वेच्छा; स्वयंप्रेरणेनें कांहीं काम करण्याची मोकळीक. **दिलगीर वि०** मनाप्रमाणें कांहीं गोष्ट न घडल्याकारणें हिरमुष्टा किं० खिन्न किं० दुःखी झालेला. **दिलगिरी स्त्री०** खिन्नता; विषाद. **दिलदस** (**–फ्त–**)**र न०** अंतःकरणरूपी चोपडी,—जींत घडलेली गोष्ट नोंदलेली असते, म्हणजे स्मृति. **दिलदार वि०** १ उदार अंतःकरणाचा; ज्याचें मन मोठें आहे असा; क्षुल्लक गोष्टीकडे लक्ष्य न देणारा. २ संकटसमयीं ज्याचें धैर्य, उत्साह, किं० नेट खचत नाहीं असा. **दिलदारी स्त्री०** दिलदार असण्याचा गुण; दिलदारपणा. **दिलताजा वि०** सदैव प्रीतिकरीत राहाणारा (दफ्तरी भाषत). **दिलादिलासा पु०** उत्तेजन;

टेका देणें; कोणेकाला दिलेलें आश्वासन (देणें). **दिलपाक** वि० पवित्र अंतःकरणाचा; साधा, निष्कपट. **दिलभर** [फा० दिल्बर] पु० प्रेमी; प्रेमपात्र; यार; जार. **दिलभरंवसा, दिलभरोंसा** पु० कोणेकाला दिलेलें आश्वासन किं० धीर किं० टेका. २ कांहीं काम आपणाला रेटतां येईल अशी स्वताची खातरी किं० असा वाटतो तो भरंवसा. **दिलभरी** स्त्री० उत्तेजन; भरंवसा. **एकाद्याची दिलभरी करणें** त्याला उत्तेजन देणें. **एकाद्याची दिलभरी होणें** तो उत्तेजन पावणें; तो उत्साहयुक्त होणें. **दिल फाकणें** (किं० **फाकटणें**) संभ्रान्त किं० अस्वस्थ होणें; कर्तव्यमूढ होणें. **दिलहवाल,हवालदिल** वि० अस्वस्थ आहे मन ज्याचें असा;चिंताग्रस्त.**दिलहवाली,हवालदिली** स्त्री० मनाची अस्वस्थता किं० चिंताग्रस्तपणाची स्थिति. **दिलावरी, दिलदिलावरी** स्त्री० धाडस; स्वताच्या कर्तबगारीची खात्री; धमकदारी.

दिलासा [हिं०] पु० १ भरंवसा; खात्री; उत्तेजन. २ इरादा; मनोगत.

दिल्ली स्त्री० उत्तर हिंदुस्थानांतील एक मोठें शहर. कौरव पांडवांच्या काळचें हेंच हास्तिनापुर असें विद्वानांचें मत आहे. ❀ **दिल्लीकर,दिल्लीवाला, दिल्लीचा सोदा** पु० अट्टल भामटा;विलंदर. **दिल्ली तो बहुत दुर है** अद्यापि व्हावयाचें काम झालेल्या कामाच्या मानानें पुष्कळच अधिक आहे; झालें तें अगदीं थोडें झालें; गांठावयाचा पल्ला फार मोठा आहे. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक लेखांक १६३५ पहा.

दिवई [म० दिवा] स्त्री० आषाढ महिन्याची अमावास्या; ह्या दिवशीं लामणदिवे, समया, इ० दिवे घासून स्वच्छ करून त्यांची पूजा करतात आणि कणकेच्या पणत्यांत वातीं पेटवून लावतात;मग ते कणकेचे दिवे प्रसाद म्हणून खातात. ह्या दिवसाला 'दिव्यांची आंवस ' असेंही म्हणतात.

दिवई स्त्री० ज्याला लहान लहान नारळ येतात असा माड.

दिवटा [म० दिवा] पु० १ बारीक काटकीला चिंधी किं० कापूस गुंडाळून तेलांत भिजवून प्रकाशार्थ पेटवितात ती. २ (लाक्षणिक) कुळाला कलंक लावणारा मुलगा; अशा मुलीस ' दिवटी ' म्हणतात. ❀ **चंद्रम् दिवटे विरम् थाळे** मागें ' चंद्र ' मध्यें पहा.

दिवटी स्त्री० १ बहुत वस्त्रें गुंडाळून मोठो दंडाकार प्रकाशार्थ जी वात करतात ती. २ ह्या वातीस जी धातूची मूठ असते ती. ३ नारळाच्या करवंटीचा केलेला हिलाल. ❀ **दिवटी जोहार, दिवटी सलाम** पु० दिवे लागणीच्या समयीं राजा इ० कांना त्यांचे नोकर चाकर करतात तें वंदन. **दिवट्या** पु० १ दिवटी धरणारा माणूस. २ कुलकलंक असा पोरगा. **दिवट्या वाघ** पु० चित्ता; बिबळ्या वाघ. **दिवठण, दिवठाण** [म० दिवा + स्थान] न० १ घरांतील मोठा किं० मुख्य दिवा ठेवण्याची जागा. २ घरांतील नित्य दिवा लावण्याची जागा. [नसते.

दिवड न० एक जलचर सर्प; याला विष

दिवली, दिवळी [म० दिवा] स्त्री० १ लामणदिवा, ठाणवई, इ० जो दिवा लावण्याचा लहानसा आधार तो. २ तेल, तूप, इ० पदार्थ खोल वारदानांतून बाहेर काढावयासाठीं टोकाशी परडें असलेला लोखंड इ० चा दांडा. ३ पणती.

दिवस [सं०] पु० १ सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचा काळ. २ एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंतचा काळ. ३ मृतासंबंधाचें और्ध्वदेहिक (ह्या अर्थी अ० व०; क्रि० करणें). ४ सूर्य किं० सूर्याचें ऊन्ह; उ० दिवस धारेवर गेला तेव्हां मी निघालों. ५ (लक्षणेनें) पीडा, उपद्रव; उ० जेथें जावें तेथें डोईवर दिवस आहेच. ❀ **अझून पहिला दिवस आहे** (किं० **प्रथम** किं० **पूर्व दिवस आहे**) अद्यापि कांहीं सुधारणा नाहीं; पहिली स्थितीच कायम आहे. **चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे** १ सासूच्या वैभवाचे दिवस असतां ती सुनेवर अधिकार गाजविते, पुढें सून मोठी होऊन कर्ती सवर्ती झाली म्हणजे घरांत सुनेचा अधिकार चालतो आणि सासूचें महत्त्व कमी होतें. २ वैभवाची स्थिति सदोदित कायम रहात नाहीं. **दिवस काढणें** (किं० **ढकलणें, लोटणें**) अडचणीच्या किं० पंचाइतीच्या स्थितींत कालक्रमणा करणें; कसाबसा काळ घालविणें. **दिवस घेऊन येणें** (किं० **जाणें**) दिवस मावळावयाच्या अगोदर येणें (किं०

जाणें). **दिवस जातो पण बोल (किं० शब्द) रहातो** कोणी आपणाला शिवी दिली असली किं० आपणाला अपमानकारक शब्द बोलला असला तर त्याचें स्मरण आपणाला सदैव डवचीत असतें. **दिवस झाडावर येणें** सूर्य उगवून बराच वेळ झालेला असणें. **दिवस दारीं आला** सूर्य नुकतांच उगवला आहे. **दिवस फिरणें** वैभवाचे दिवस संपणें. **दिवस मागें पाहतात** आपत्काळ आला आहे. **दिवसाउजेडीं, दिवसासकट, दिवसापूर्वी** क्रि० वि० सूर्य मावळावयाच्या अगोदर. **दिवसानें डोकें काढणें** सूर्य नुकताच उगवलेला असणें. **दिवसा बरोबर** क्रि० वि० १ सूर्योदयीं. २ सूर्यास्तीं. **दिवसां मशाल लावणें** (किं० **पाजळणें**) अनीतीच्या कृत्यांत निर्लज्जपणानें काल घालविणें. **दिवसावर नजर देणें, दिवसासारखा होणें** हल्लींची परिस्थिति मनांत आणून वागणें; एकादी गोष्ट करणें आपणाला आवडत नसली तरी हल्लीं ती करणें जरूर आहे इकडे लक्ष्य देऊन ती करावयाला सिद्ध होणें. **दुसऱ्या दिवसावर नेणें** (किं० **ढकलणें**) १ लांबणीवर सारणें; दिरंगाईवर लोटणें. २ आज करणें सोयीचें नाहीं म्हणून तें पुढें करण्याचें ठरविणें. **नवा दिवस उगवणें** कांहीं कठिण आजारांतून किं० संकटांतून बचावून किं० निभावून पार पडणें. **मागला प्रहर दिवस राहतां** तिसऱ्या प्रहरीं; दिवस मावळावयाला एक प्रहर अवकाश असतां. **वर्षाएवढा दिवस** पु० वासंत संपातापासून तों ग्रीष्म भरापर्यंतचे दिवस प्रत्येक. **दिवसगत** स्त्री० विवक्षित काळ टळून गेलेला अवधि; विलंब; उशीर; दिरंगाई. **दिवसगुजारा** पु०, **दिवस गुजराण** स्त्री० १ विपत्तीचे दिवस कसेबसे काढणें (करणें). २ गरीबाऊ रीतीचें जेवण जेवून दिवस घालविणें (करणें). **दिवसबळ** न० दिवसाच्या प्रकाशाची अनुकूलता; उ० बारीक अक्षर वाचणें किं० चित्र काढणें हें दिवसबळाशिवाय चांगलें होणें शक्य नाहीं. **दिवसभऱ्या** पु० मन लावून काम न करणारा; दिवस मावळेल केव्हां आणि मी मजुरी घेऊन घरीं जाईन केव्हां अशा बुद्धीनें काम करणारा मजूर. **दिवसमजूरी** स्त्री० महिनाभर किं० वर्षभर इ० मुदत न ठरवितां फक्त एका एका दिवसाची मुदत ठरवून कांहीं काम करणें किं० नोकरी करणें हा प्रकार; उ० मी एकाकडे चाकर रहात नाहीं, दिवसमजुरीनें पोट भरतों. **दिवसां** क्रि० वि० १ दिवसाच्या प्रकाशांत. २ दिवसाच्या अवधींत. **दिवसांढवळ्यां** क्रि० वि० दिवसांच्या प्रकाशांत (निर्लज्जपणानें कांहीं निषिद्ध गोष्ट करणें). **टीप**,– दिवसाचा ढवळा (ध्व० पांढरा) प्रकाश असतां. **दिवसा दरवडा** पु० १ राज्यकर्त्यानें निर्लज्यपणें केलेला अन्याय किं० उकळलेले पैसे किं० लुबाडलेली जमीन इ०. २ आपल्या परिचयाच्या किं० घरोब्याच्या माणसानें आपली संमति किं० परवानगी नसतां आपला कांहीं पदार्थ उचलून नेणें. **दिवसां दिवाळी** स्त्री० दिवाळींत जशी खाद्यें, पेयें, दिवाबत्ती, वस्त्रें, प्रावरणें, नाचतमाशे, इ० मध्यें खर्च केला जातो तसा नित्य खर्च करण्याचा प्रकार; उधळपट्टी; उ० तूं अशी दिवसां दिवाळी केलीस तर पुढें तुला भीक मागावी लागेल. **दिवसानुदिवस, दिवसानदिवस, दिवसेंदिवस, दिवसोंदिवस** क्रि० वि० दिवस जातील त्या क्रमानें; उत्तरोत्तर; उ० गोविंदपंत दिवसानादिवस थकत चालला आहे; उ० दिवसानुदिवस तो जास्ती जास्ती दारू पिऊं लागला आहे. **दिवसाभऱ्याचा** क्रि० वि० [लिंगवचनांप्रमाणें फिरणारें अव्यय] १ संबंध दिवसभर; सगळा दिवसभर; उ० मी दिवसाभऱ्याचा श्रमलेला आणि उपोषित आहे. २ संबंध दिवसासाठीं; उ० मला दिवसास फावत नाहीं म्हणून दिवसाभऱ्याचा संध्याकाळीं जेवतो. **दिवसाभऱ्याचा** वि० १ संबंध दिवसाला पुरण्याइतकें; उ० अजून दिवसभऱ्याचें काम उरलें आहे. २ संबंध दिवसासाठीं; उ० मी सकाळींच दिवसभऱ्याचें जेवण जेवून कामाला बाहेर पडतो. **दिवसावडा** पु० दिवसाची मजूरी; दिवसभर काम केल्याबद्दलची मजूरी; उ० माझे तुमच्याकडे चार दिवसांचे शिल्लक आहेत. **दिवसेश्वर, दिवसकर** पु० सूर्य. **दिवसमुख** न० पहाट; प्रभातकाळ. **दिवसविगम** पु० सायंकाळ.

दिवसें [म० दिवा + असें] न० तांदुळाच्या पिठाचें एक खाद्यविशेष.

दिवळ न० एक प्रकारचा निर्विष सर्प.

दिवा [सं० दीप] पु० १ तेल, तूप, इ० मध्यें वात भिजवून प्रकाशार्थ पेटवितात ती; कांहीं

पात्रविशेषांत पेटविलेली वात किं० त्या वातीचा प्रकाश किं० ती वात ज्या पात्रविशेषांत ठेवतात तें पात्रविशेष. हीं दिव्याचीं पात्रें अनेक प्रकारचीं असतात,—लामण दिवा, रोवणदिवा, समई,पणती, इ०.२दिव्याच्या अवसेस किं०विवाहादिकांत करतात ते पिठाचे दिवे प्रत्येक. ३ वैशाख महिन्यांतील अश्विनी, भरणी, कृत्तिका, रोहिणी, आणि मृगशीर्ष, ह्या पांच नक्षत्रांनीं युक्त दिवस. ꣸एकाद्या **गांवांत (किं० देशांत) दिवा लागत नाहीं** तो उजाड झाला आहे; तो निर्जन झाला आहे. **कोणे-कानें दिवा (किं० दिवे) लावणें** तो दुष्कृत्यानें सर्व लोकांस ठाऊक झालेला असणें; त्याचा बद-लौकिक झालेला असणें. **दिवा सरसा करणें** वातीचा काळी झाडून वातेऱ्यांत वात पुढें सारून वात चांगली जळूं लागून प्रकाश अधिक देऊं लागेल अशी करणें. **दिव्यानें दिवस काढणें (किं० उजाडणें)** सर्व रात्रभर दिवा जळत ठेवून जागत असणें,—आजाऱ्याच्या शुश्रूषेंत किं० खेळण्यांत. **दिव्यानें रात्र (किं० दिवस) काढणें (किं० लोटणें)** अत्यन्त आजारीपणाच्या स्थितींत असणें. **दिव्या वातीनें शोधणें** दिवसाच्या प्रकाशानेंही जेथें न दिसेल अशा जागेंत हरवलेला कांहीं पदार्थ दिव्यानें शोधणें. **दिव्याला निरोप देणें**, किं० **दिव्याला पदर देणें**, किं० **दिव्याला फूल देणें** दिवा मालविणें.टीप,—तोंडानें फुंकर घालून दिवा मालवणें हें निषिद्ध मानलेलें आहे म्हणून वस्त्राच्या सोग्याचा वारा घालून दिवा मालविण्याची चाल आपणांत आहे किं० असे. आमचें ' अर्थालंकारांचें निरू-पण ' ह्यांतील परिशिष्ट घ च्या शेवटची टीप पहा. **दिवा (–वे–)लावू (–लाव्या) पु०** बदमाष माणूस; बदकर्मांनीं प्रसिद्धि पावलेला माणूस. **दिवे ओवाळा(–ळ्या) पु०** निर्लज्ज आणि बद-कर्मी माणूस. **दिवे पु० अ० व०, दिवेपंचक न०** वैशाख महिन्यांतील अश्विन्यादि जीं पांच नक्षत्रें तीं. **दिवेलागण, दिवेलावण, दिवेलावणी, दिवेलागणी स्त्री०** संध्याकाळीं गृहादिकांत दिवे लावणें किं० दिवे लावण्याची क्रिया किं० दिवे लावण्याचा समय. **दिवेलावणी स्त्री०** १ ओसाड प्रदेशांत मानवी वसति स्थापणें किं० स्थापण्याचें काम; शहर, देश, इ० वसविणें. २ भुतेंखेतें, चोर, दरवडेखोर, इ० च्या भयानें पळून जाऊन दुसरीकडे राहिलेल्या लोकांना परत बोलावून त्यांना पूर्वीच्या स्थळीं राहावयास लावणें. **दिवेलावणीचा कौल पु०** ओसाड प्रदेश लागवडीस आणून तेथें घरेंदारें करून राह-णारांना कांहीं वर्षे सरकारसारा माफ केला जाईल अशा आश्वासनाची दिलेली सनद. **दिवे लावणें न०** दिवा लावावयाचा जो तो पणती (मातीची किं० लोखंड, तांबें, इ० धातूंची). **दिवे सलामी स्त्री०** दिवे लावल्यावर बारगीर, मानकरी, इ० नीं राजा इ० कांस सलाम, नमस्कार, इ० करणें किं० करण्याचा विधि किं० समारंभ. **दिवेसळई स्त्री०** दिवा पेटविण्याची अग्राला गंधक इ० पदार्थ लावून केलेली काडी; आगकाडी.

दिवा [सं०] **क्रि० वि०** दिवसास; दिव-साच्या अवधींत. ꣸ **दिवान्ध, दिवाभीत पु०** घुबड. **दिवाकर पु०** सूर्य. **दिवाकीर्ति पु०** १ चांडाळ. २ न्हावी. **दिवातन वि०** दिवसाचें; दिवसा व्हावयाचें; दिवसासंबंधाचें. **दिवानिश, दिवारात्रि क्रि० वि०** रात्रंदिवस.

दिवाण, दिवाणजी [**फा०** दीवान्] **पु०** १ मुख्य मंत्री. २ सरकारसारा वसूल करण्याचा कामावरचा अधिकारी. ꣸ **दिवाण न०, दिवाणखाना पु०** [**फा०** दीवान्+खानाह्] १ राजाचा दरबार भरा-वयाची जागा. २ कोणाही माणसाच्या घरांत चारचौघांच्या भेटी घेण्याची जागा. ३ दिवाण म्ह० सरकारला कोणत्याही बाबतीसंबंधानें जें देणें तें.४दिवाण म्ह०सरकारांत निकालासाठीं किं० विचारासाठीं पाठविलेलें प्रकरण; उ०खोतीचें वतन बहुत दिवस दिवाणांत आहे. **दिवाणाचें तेल पदरांत घेणें** आपल्या वरिष्ठाकडून आलेली दगदगी आपली कितीही गैरसोय होत असली तरी पथकरावी (म्ह० आव्हेरूं नये). **दिवाण असामी स्त्री०** १ कोणीही सरकारी अधिकारी. २ सर-कारचा कोणत्याही खात्याकडचा नोकर. ३ सर-कारनें करून दिलेलें वर्षासन इ०. **दिवाणगिरी स्त्री०** दिवाणाचा हुद्दा, अधिकार, किं० कार्यक्षेत्र. **दिवाणचावडी स्त्री०** सरकारचें न्यायखातें;

दिवाणदरबार पु०, न० १ राजाची किं० कोणा बड्या अधिकाऱ्याची लोकांच्या भेटी घेण्याची किं० खटल्यांचे निकाल करण्याची जागा. २ राजानें किं० त्याच्या अधिकाऱ्यानें कांहीं बाबतीचा चौकशी करून दिलेला निकाल; उ० ह्या गोष्टीचा दिवाणदरबार कधीच झालेला आहे. **दिवाणदस्त** पु०, न०, **दिवाणधारा**, **दिवाणसारा** पु० कोणत्याही प्रकारचें सरकारला द्यावयाचें द्रव्य इ०. **दिवाणमुख्यम** पु० मुख्य दिवाणाच्या हाताखालचा अधिकारी. **दिवाणी** [फा० दीवानी] वि० मुलकी (खातें, खटला, दावा, इ०). उलट 'फौजदारी.' **दिवाणी अदालत** स्त्री० देणेंघेणें, हक्क, इ० बाबतींत चौकशी करण्याचें सरकारी खातें. **दिवाणी झांप** पु० अ० व० सरकारनें साऱ्यादाखल घेतलेल्या ताडमाडांच्या फांद्या.

दिवातें न० शेतावर किं० इतरत्र काम करावयास जाणारे गडी तेथेंच खावयासाठीं जें जेवण बरोबर घेऊन जातात तें.

दिवान्ध [सं० दिवा (दिवसास)+अंध (आंधळा)] पु० १ दिवसां ज्याला दिसत नाहीं तो मनुष्य किं० कोणताही प्राणी. २ घुबड. मागें ' दिवा ' मध्यें पहा.

दिवान इ० मागें ' दिवाण ' इ० पहा.

दिवाना [फा० दीवानाह्] वि० १ वेडा. २ मूर्ख, अचरट. ❀ **देख दिवाने आपना सौदा** अरे मूर्खा, तुझें काम तूं कर, दुसऱ्याच्या कामांत लुडबुडूं नको.

दिवार (–ल) [फा० दीवार्] स्त्री० भिंत. ❀ **दिवालगिरी** स्त्री० दिवा, वालशीट, इ० साठीं भिंतींत ठोकलेला खिळा, आंकडा, फळी, इ०.

दिवाळखोर इ० पुढें ' दिवाळें ' मध्यें पहा.

दिवाळसण पुढें ' दिवाळी ' मध्यें पहा.

दिवाळी [सं० दीप; म० दिवा; सं० आवलि=पंक्ति] स्त्री० १ आश्विन कृष्ण चतुर्दशी (नरक चतुर्दशी), आश्विन अमावास्या (लक्ष्मीपूजन), कार्तिक शुद्ध प्रतिपदा (बलिप्रतिपदा), आणि कार्तिक शुद्ध द्वितीया (यमद्वितीया किं० भाऊबीज) ह्या चार दिवसांचा हिंदू लोकांचा सण. २ मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा हा दिवस. हिला 'थोरली किं० देवांची किं० गुरांची दिवाळी ' अशीं अन्य नांवें आहेत. ३ भक्ष्यभोज्यादि पदार्थांची समृद्धि किं० विपुलता किं० अशा समृद्धीचा किं० विपुलतेचा उपभोग किं० ह्या उपभोगांत घालविलेला काळ; उ० त्याचें घरीं आज जिलब्यांची दिवाळी झाली; उ० त्याच्या घरीं रोज दिवाळी आहे. ❀ **दिवाळीचा दिवा** पु० दिवाळी हा सण. वर ' दिवाळी ' अर्थ १ पहा. **दिवाळीचें साल** न० व्यापारी लोकांचें वर्ष; हें दिवाळीला सुरू होतें; ह्या सालच्या आरंभाला व्यापारी लोक नव्या चोपड्यांवर हिशेब इ० लिहूं लागतात. मृग-साल, पाडव्याचें साल, हीं इतर प्रकारचीं सालें किं० वर्षें. **असेल त्या दिवशीं दिवाळी, नसेल त्या दिवशी शिमगा** पैसा जवळ असतां पुढचा विचार न करतां उधळपट्टी करणें आणि नसेल त्या दिवशीं चरफडत बसणें किं० बोंब मारीत बसणें (हा मूर्खपणा होय). **दसऱ्यांतून जगल्यास दिवाळीचें बेत करूं** १ पुढच्या गोष्टीचे बेत पुढें करतां येतील. २ दसऱ्यापर्यंत आपण जगल्यास पुढचे बेत पुढें करतां येतील. ३ दसऱ्याची शाश्वती नाहीं, मग दिवाळीचे बेत कशाला करावयाचे ? **दिवाळसण** पु० १ दिवाळी हा सण. २ आपल्या मुलीच्या लग्नानंतरच्या पहिल्या बलिप्रतिपदेच्या दिवशीं आपल्या जांवयाला जेवावयाला बोलावून त्याला पागोटें, कंठी, सल्ले, इ० देण्याचा विधि किं० समारंभ.

दिवाळें, दिवाळूं [सं० दीप; म० दिवा] न० व्यवहार किं० व्यापार बुडाल्यामुळें कर्जदारांचीं कर्जें न फेडतां येण्याची स्थिति जी दुकानदार, सावकार, कारखानदार, इ० ना प्राप्त होते ती. त्याचें दिवाळें निघालें किं० वाजलें, त्याणें दिवाळें काढलें, असे ह्या शब्दाचे प्रयोग होतात. ❀ **एकाद्या खाद्यपेयाचें दिवाळें वाजणें** जेवावयाला किं० फराळाला बसलेल्या माणसांनीं मागितलेला पदार्थ शिल्लक न राहिलेला असणें.

दिवाळी स्त्री० भाद्रपद आणि आश्विन, ह्या महिन्यांत उगवतें तें भोपळ्याच्या जातीचें एक झाड; त्याला 'कडू दोडकी' असेंही म्हणतात. **दिवाळें** न० दिवाळी ह्या झाडाचें फूल किं० फळ.

दिवी [म० दिवा] **स्त्री०** एक प्रकारचा दिवा,–हा लाकडाच्या आधारावर ठेविलेला असतो किं० उभ्या लोखंडी सळईच्या टोकाला असतो.

दिवें न० एक कंदविशेष; हा काळा आणि कडू असतो.

दिव्य [सं०] **वि०** १ स्वर्गीय; स्वर्गस्थ. देवांना साजेसा किं० उचित असा. २ अत्यन्त उत्कृष्ट; सुंदर. ३ लोकोत्तर. **न०** १ कांहीं विधानाच्या समर्थनार्थ केलेलें जें कांहीं अलौकिक किं० अचाट कृत्य तें; उ० सीतेनें आपल्या पावित्र्याची रामास खात्री पटविण्याकरतां अग्निप्रवेशाचें दिव्य केलें. २ कांहीं हेतुसिध्यर्थ करावयाचें तें असाधारण आत्मत्यागाचें कृत्य तें,–ज्यायोगें आपलें सर्वस्व कसास लागून आपणांस निभावून जावयाचें असतें; उ० हिंदुस्थानला स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ प्रचंड स्वार्थत्याग केला पाहिजे; या दिव्यांतून पार पडण्याची धमकदारी असेल तरच त्याची आशा. ३ भयंकर संकट; पेचाची किं० पंचाइतीची स्थिति; उ० परमेश्वरा, बापाचा जीव वांचवावा तर पावित्र्य जातें, पावित्र्य संभाळावें तर पित्याचा जीव जाणार ! या दिव्यांतून मला पार पाडण्यास तुझ्यावांचून कोण आहे ? **दिव्य उतरणें, दिव्यास उतरणें, दिव्यांतून उतरणें** मोठ्या संकटांतून यशस्वी रीतीनें पार पडणें. **दिव्य लागणें** दिव्यांतून न उतरणें. **दिव्यचक्षु पु०, दिव्यदृष्टि स्त्री०** चर्मचक्षूंनां न दिसणाऱ्या गोष्टींही दिसाव्या अशी दृष्टि; उ० व्यासांनीं संजयाला दिव्यदृष्टि दिल्यामुळें कुरुक्षेत्रावरील संग्रामाचें वर्णन त्यास धृतराष्ट्राजवळ करतां आलें. **वि०** दिव्यदृष्टि असलेला. **दिव्यदेह पु०** १ स्वर्गीय वपु; जरा, घर्म, दुर्गंधि, इ०नीं रहित आणि तेजस्वी, सुंदर, देवतुल्य असें शरीर. २ अत्यंन्त सुंदर, सुदृढ, सशक्त, सतेज असा देह. **दिव्यदेही वि०** दिव्यदेह असलेला. **दिव्यपादुका स्त्री० अ० व०** १ देवाच्या पादुका. २ देवानें दिलेल्या अलौकिक शक्ति असलेल्या पादुका. **दिव्यप्रकाश पु०** आत्म्याचें ज्ञान. **दिव्यबाण पु०** दिव्यशक्ति असलेला बाण,–जो लक्ष्य वेधून पुन्हां भात्यांत येऊन बसतो. **दिव्यरूप न०** १ स्वर्गीय लावण्यानें युक्त असें स्वरूप. २ देवांना योग्य असें स्वरूप. **दिव्यशक्ति स्त्री०** देवांना साजेशी किं० लोकोत्तर शक्ति. **दिव्यस्थान न०** स्वर्ग; इंद्रादि देवांचें वास्तव्यस्थान. **दिव्यज्ञान न०** तिन्ही लोकांचें व तिन्ही कालांचें ज्ञान. **दिव्यज्ञानी वि०** त्रिलोकज्ञ व त्रिकालज्ञ. **दिव्यांगना स्त्री०** १ स्वर्गस्थ देवता. २ अप्सरा. **दिव्योदक न०** पाऊस. **दिव्यौषधि स्त्री०** दिव्यशक्ति असणारी वनस्पति; लोकोत्तर प्रभाव असलेली वनस्पति. **दिव्यकळा स्त्री०** गळग्रंथि, गळचुट्या.

दिशा [सं०] **स्त्री०** १ विशिष्ट स्थलाच्या किं० बिंदूच्या अपेक्षेनें पदार्थविशेषाची स्थिति किं० गमनमार्ग. २ पूर्व, पश्चिम, इ० सापेक्ष स्थितीच्या दर्शक ज्या बाजू त्या प्रत्येक; उ० पुण्याच्या उत्तरेस मुंबई आहे. मुख्य दिशा चार आहेत; (१) पूर्व, (२) पश्चिम, (३) दक्षिण, आणि (४) उत्तर. उपदिशा चार आहेत; (१) आग्नेयी, (२) नैऋत्य, (३) वायव्य, आणि (४) ईशान्य; वरची दिशा आणि खालची दिशा ह्या दोन मिळून एकंदर दहा दिशा. २ विशिष्ट स्थानाप्रत जाण्याचा मार्ग. ३ कोणच्या पद्धतीनें विशिष्ट ध्येय गांठतां येईल तो मार्ग. ४ कोणच्या सरणीनें कांहीं विशिष्ट गोष्ट किं० कृति करावयाची ह्या संबंधाची सूचना किं० निर्देश. ५ कोणत्याही विषयांत सुलभ रीतीनें प्रवेश करण्यासंबंधाची सूचना. ६ विशिष्ट पदार्थांकडे किं० विषयाकडे पहावयाची सरणी; दृष्टिकोन. ७ सरणी, पद्धती, (सामान्यतः). ८ दहा ही संख्या (चार दिशा, चार उपदिशा, खालची आणि वरची, अशा एकंदर दहा दिशा होतात यावरून). ❀ **दिशेस (किं० बहिर्दिशेस) जाणें** मलविसर्जनार्थ घराच्या बाहेर (म्ह० परसांत किं० रानांत) जाणें. **कोणेकाला चारी दिशा मोकळ्या होणें** १ त्याला वाटेल तिकडे जाण्याला मोकळीक प्राप्त होणें. २ त्याच्या स्वैराचाराला आळा घालणारें कोणी माणूस शिल्लक न राहाणें. **दिशाभूल स्त्री०** १ खऱ्या दिशेसंबंधानें चूक किं० भ्रांति. २ योग्य किं० खऱ्या दिशेसंबंधानें अज्ञान. ३ योग्य धोरणाविषयीं अज्ञान; भलत्याच मार्गाकडे प्रवृत्ति किं० कल. ४ अपरिचित

ठिकाणां गेलें असतां पूर्व कोणती, पश्चिम कोणती, हें झटदिशीं लक्ष्यांत न येणें. क्रि० होणें, करणें. **दिशा दाखविणे** १ विशिष्ट ध्येय गांठण्याचा मार्ग दाखवून देणें. २ कांहीं कृति करावयाची युक्ती सांगणें. **दिशा फाकणें** (किं० **फुलणें** किं० **पालटणें**) सूर्योदयानें, किं० चंद्रोदय किं०सूर्यो-दय होऊन, किं० तारे दिसूं लागून सर्व दिशा प्रकाशयुक्त होणें **दिशा भारणें** (किं० **बांधणें**) १ आपण जें कपट करतों तें कोणीकडूनही दुस-ऱ्यास न दिसेल अशी मंत्रसामर्थ्यानें तजवीज करणें. २ विशिष्ट प्रदेशांतील लोकांत कांहीं मंत्रसामर्थ्याच्या योगानें कांहीं रोग पसरणें किं० त्यांना कांहीं संकटांत लोटणें. **दिशाप्रकाश** पु० सूर्य किं०चंद्र उदयास आल्यामुळें दिशा प्रका-शमय होणें.

दिशीं क्रि० वि० प्रकारें, अमुक आवाज होईल अशा रीतीनें, इ० अर्थ दाखविणारा हा प्रत्यय आहे; उ० झटदिशीं, फटदिशीं, काडदिशीं. ह्याच अर्थाचे इतर प्रत्यय ' कन्, ' ' कर, ' दिनीं, ' इ०.

दिशींच [**म०** दिवस, दीस, दिस] **क्रि० वि०** १ दिवसाचा प्रकाश आहे त्या अवधांत; दिवस बुडावयाच्या अगोदर. २ योग्य वेळीं; संधी न जाऊं देतां; उ०यंदां पावसाचें अळमटळम दिसतें, दिशींच बेगमीविषयीं जपलें पाहिजे.

दिसगत, दिवसगति [**म०** दिवस + गति] **स्त्री०** उशीर; विलंब; दिरंगाई; आजचें काम उद्या-वर, परवावर, असें ढकलणें; उ० माझें काम दिसगती-वर लोटूं नका.

दिसणें [**सं०** दृश्=पाहणें; दृश्यते=पाहिलें जातें] **अ० क्रि०** १ चर्मचक्षूंचा विषय होणें; दृष्टि-गोचर होणें; नेत्र ह्या इंद्रियाला कळणें किं० समजणें; उ० मला अरुंधतीचा तारा दिसत नाहीं. २ मनश्च-क्षूला गोचर होणें; बुद्धीला कळणें; बुद्धीनें जाणणें. ३ तर्कानें जाणणें; अनुमानानें ग्रहण करणें. ४ आविर्भूत होणें. ५ वाटणें. ६ अमुक गोष्ट घडेल असा रंग किं० संभव असणें; उ० आज पाऊस पडेलसें दिसत नाहीं; उ० तो येईल असें दिसत नाहीं. ※ **दिसून येणें** १ आढळून येणें. २ निर्णीत होणें.

दिसाघडीं [**म०** दिवस, दिस, दीस+घडी] **क्रि० वि०** सूर्यास्ताच्या अगोदर; दिवस मावळा-वयाच्या पूर्वी.

दीगर [**फा०** दीग =अन्य, दुसरा, परकी] **वि०** १ दुसरा, अन्य. २ परकी. मागें ' दिगर ' पहा.

दीठ [**सं०** दृष्टि] **स्त्री०** १ दृष्टि. २ बुद्धीची आकलनशक्ति (कवितेंत).

दीड, दीढ वि० अर्ध्यासहित एक; उ० दीड रुपाया म्हणजे सोळा आणे आणि आठ आणे, म्ह० चोवीस आणे ही रकम; उ० दीड तोळा म्ह० बारा मासे आणि सहा मासे मिळून एकंदर अठरा मासे इतकें वजन. ※ **दीड कानाचा वि०** थोडासा बहिरा. **दीड डोळयांचा वि०** ज्याला चांगलेंसें दिसत नाहीं असा. **दीड पायाचा वि०** ज्याचा एक पाय आखूड आहे असा. **दीड हाताचा वि०** ज्याचा एक हात असावा तितका लांब असून दुसरा हात दैवी इ० मुळें आखूड झालेला आहे असा. **दीड चतुर, दीड शहाणा वि०** आपणाला इतर लोकांपेक्षां दीडपट अक्कल आहे असें समजणारा पण ज्याला खरोखरी मुळींच अक्कल नाहीं असा; मूर्ख; बेअकली. **दीड दमडीचा वि०** ज्याची किंमत दीड दमडी म्ह० अत्यल्प आहे असा; कुचकिमतीचा; भिकार; नादान. **दीड दमडीचा शिपायी पु०** भितरा म्हणून लढण्याच्या उपयो-गाचा नव्हे असा शिपायी. **दीड दांडी स्त्री०** खोटी तराजू; जिच्या दांडीची एक बाजू दुसरी पेक्षां आखूड आहे अशी तराजू. **दीडमणि स्त्री०** दीड मणाचें वजन.

दीन [**सं०**] **वि०** १ निर्धन. २ अनाथ; द्रव्यादिक देऊन ज्याला मदत करणें योग्य आहे असा. ३ विपन्न; दुःखी. ४ हताश; केविलवाणा. ५ नम्रपणाचा किं० दया उत्पन्न करणारा (स्वर, मुद्रा, इ०). ※ **दीनदयाळ वि०** दीनावर दया कर-ण्याची ज्याला प्रवृत्ति आहे असा (परमेश्वर, साधु, इ०). **दीननाथ वि०** दीनाला साहाय्य कर-ण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा. **दीनबंधु पु०** दीनावर बंधुप्रमाणे प्रेम करणारा. **दीनवदन, दीनमुख न०** दैन्य प्रकट करणारें तोंड. **वि०** ज्याच्या मुखावरून त्याची विपन्नावस्था प्रकट होते असा.

दीनवत्सल, दीनानुबंधी, दीनाभिमानी वि० दीनावर दया करण्याचा स्वभाव ज्याचा असा. **दीनवाणा** वि० केविलवाणा; दया उत्पन्न करणारा. **दीनोद्धार** पु० विपन्न माणसाला वरच्या दर्जास पोंचाविणें; विपन्नांची विपत्ति दूर करणें.

दीन [अ० दीन्=धर्म] पु० १ धर्म. २ महंमदानें स्थापिलेला धर्म. ❀ **दीन ! दीन !!** उ० वा० धर्म ! धर्म ! धर्माच्या रक्षणार्थ उठा किं० लढा ! महंमदाच्या धर्माचा विजय असो ! **दीनदुनिया खातरींत नसणें** धर्म आणि लौकिक यांना धिक्कारणे किं० यांची परवा न करणें.

दीप [सं० दीप=दिवा] पु० १ दिवा. २ दिव्याचा आधार; ठाणवई इ०. ❀ **दीपान्विता** स्त्री० अमावास्या. **दीपाराधन** न० आरती. **दीपाली, दीपावली** स्त्री० १ दिव्यांची पंक्ति. २ दिव्यांनीं केलेली रोषनाई. ३ दिवाळी हा सण. **दीपोत्सव** पु०दिवाळीचा सण.मागें' दिवाळी'पहा. **दीपकलिका** स्त्री०दिव्याची ज्योत.**दीपकिट्ट** न० काजळ.**दीपमाला** स्त्री०दिपमाळ.**दीपकल्याण** पु० गायनांतील एक राग. **दीपचंदी** स्त्री० होरीसारखी गायनांतील एक चीज; होळींत म्हणावयाचें एक गाणें. **दीपदर्शन** न० १ सायंकाळीं दिवा लावल्यावर नमस्कारपूर्वक घेतात तें दिव्याचें दर्शन. २ दिवेलावणीचा समय. **दिपाचा कवडा** पु० १ अत्यंत अशक्त माणूस. २ गृहकृत्यादि व्यवहारांत जो केवळ नांवाचा मात्र धनी तो.कवडा=प्रतिबिंब. मागें ' कवडा 'पहा.

दीपक [सं०] वि० १ पेटविणारा. २ उत्तेजक. ३ (**वैद्यकांत**) क्षुधा उत्पन्न करणारें (औषध इ०). पु० १ दिवा. २ लहानसा दिवा. ३ प्रकाश.४ मदन. ५ कांदा. ६ (**संगीतांत**) एक रागविशेष. ७ (**साहित्य**) प्रकृत आणि अप्रकृत अशा दोन्ही प्रकारच्या वस्तूंचा साधारण धर्म (गुणरूप किं० क्रियारूप) एकच वेळां एकाच वाक्यांत सांगितलेला असतो तेथें होतो जो अलंकार त्याला ' दीपक ' ह्मणतात. तसेंच एकच विभक्त्यन्त नाम अनेक क्रियापदांशीं कोणत्या तरी कारकसंबंधानें जुळलेलें असतें तेव्हां जो अलंकार होतो त्यालाही ' दीपक ' म्हणतात विशेष खुलासा आणि उदाहरणें आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

दीपन [सं०] न० १ पेटविणें. २ चेतविणें. ३ पचन वाढविणें.

दीपिका [सं०] स्त्री० १ दिवा ठेवण्याचा आधार,–ठाणवई इ०. २ लहान दिवा.३टीकाग्रंथ. ४टीका.

दीप्त [सं०] वि० १ जळणारें. २ जळलेलें. ३ तेजस्वी. ४ प्रखर, उग्र. ५ स्पष्ट, ठळक, असंदिग्ध. ❀ **दीप्तांशु** पु० सूर्य. **दीप्तोपल** पु० सूर्यकांत मणि.

दीप्ति [सं०] स्त्री० १ तेज, प्रकाश. २ सौंदर्य. ❀ **दीप्तिमान्** वि० १ तेजस्वी; प्रकाशयुक्त. २ भव्य.

दीर [सं० देवर] पु० नवऱ्याचा भाऊ.

दीर्घ [सं०] वि० १ लांब (स्थळ, काळ, इ० संबंधांत).२ गुरु(स्वर);द्विमात्राक (स्वर). ३ विस्तृत; विस्तीर्ण. ❀ **दीर्घायु** वि० १पुष्कळ दिवस जगणारा. २ पुष्कळ आहे आयुष्य ज्याचें तो; उ० तूं दीर्घायु हो ! पु० मार्कंडेय. **दीर्घदर्शी** वि० १ दूरदर्शी.२ भूतभविष्यज्ञ.**दीर्घनिद्रा** स्त्री०मरण. **दीर्घसूत्र, दीर्घसूत्री** वि० काम करण्यांत बिलंबी; चेंगट.**दीर्घचतुरस्र** वि० रुंदी पेक्षा ज्याची लांबी अधिक आहे आणि ज्याचे चारी कोपरे काटकोन आहेत असें (क्षेत्र,घर, इ०).**दीर्घच्छंदी** वि० एकच नाद फार दिवस धरून बसणारा; नादिष्ट; छांदिष्ट. **दीर्घद्वेषी** वि० मनांत फार दिवस द्वेष बाळगणारा. **दीर्घप्रयत्न** पु० अनेक अडचणी किं० विघ्नें किं० संकटें आलीं तरी आपलें ध्येय न सोडणें. **दीर्घवर्तुळ** न०लांबोडें वर्तुळ;ज्याला दोन केन्द्रें आहेत असें वर्तुळ. **दीर्घशंका** स्त्री० मलविसर्जन.लघुशंका म्ह० लघवी किं० मूत्रविसर्जन.

दीर्घिका [सं०] स्त्री० १ मोठें तळें. २ पाहिऱ्यांची विहीर.

दीर्ण [सं०] वि० फाटलेलें; फाटकें.

दीक्षा [सं०] स्त्री० १ यज्ञनिमित्त नियम स्वीकारणें; अंगीकृत जें व्रतादि तें समाप्त होईपर्यंत तत्संबंधाचे नियम पाळणें. २ कांहीं आचरणाची किं० वर्तनाची जी सरणी तिचा स्वीकार; उ०

आलीकडे याणें चांगली दीक्षा धरली आहे. ३ (लाक्षणिक) लावून घेतलेलें व्यसन किं०खोडी; उ० त्याणें तंबाखूची दीक्षा लावून घेतली.४एकाद्या मोठ्या कार्याचा आरंभ (घेणें). ५ गुप्त पंथांत प्रवेश (देणें,घेणें).

दीक्षित [**सं०**] **वि०** १ दीक्षा घेतलेला. २ व्रतस्थ. ३कांहीं कार्यार्थ सज्ज किं० सिद्ध झालेला. ४ अभिषिक्त. ५ सोमयाग ज्याणें केला आहे असा. **पु०** यज्ञांतील यजमान.

दु [**म०** ' दोन 'चें तोकडें रूप] **क्रि० वि०** दोन (शब्दारंभीं); उ० दुपार, दुसडी, दुहेरी, दुकडी, दुधारी, दुकसबी, इ०. असे कांहीं शब्द स्वतंत्रपणें यथास्थानीं आम्ही खालीं दिले आहेत तें पहा.

दुई, दुही स्त्री० बेबनाव; वांकडें येणें; उ० त्याची माझी दुई पडल्यापासून मी त्याच्या घरीं जाणें वर्ज केलें आहे.

दुकटा [**म०** ' एकटा ' याच्या सरणीनें] **वि०** जोडीदार; सोबती; दुसरा माणूस; उ० तुला एकट्यालाच हें काम केलें पाहिजे, दुकटा तुला कोण मिळणार ? उ० हें काम एकट्या दुकट्याला होण्याजोगें नाहीं, पुष्कळ माणसें मदतीला पाहिजेत. **टीप**,–' एकटा ' याचें जोरदार रूप करावयासाठीं ' दुकटा ' ची जोड त्याला दिली जाते असेंही म्हणतां येईल.

दुकडी [**म०** दु (दोन)+कडी]**वि०** दोन कड्या असलेलें (भांडें इ०).

दुकलमी [**म०** दु (दोन)+कलम (लेखणी)] **वि०** १ दोन लेखण्यांनीं लिहिलेलं (पत्र इ०). २ दोन माणसांनीं लिहिलेलें (पत्र इ०).

दुकसबी [**म०** दु+कसबी] **वि०** ज्याला दोन कसबें, धंदे,–इ० वर पोट भरतां येतें असा.

दुकाठी [**म०** दु+काठी] **वि०** दोन डोलकाठ्या असलेलें (गलबत).

दुकांड [**म०** दु (दोन म्ह० लांब)+कांड] **स्त्री०** सर्पणाचा लांबट ओंडा.

दुकान [**फा०**] **न०, स्त्री०** १ विकावयाचे पदार्थ विकावयासाठीं जेथें दुकानदार मांडून ते विकतो तें घर. २ लोहार, सुतार, इ० कारागीर जेथें आपल्या कसबांचे पदार्थ विकावयासाठीं घडवितात ती जागा, किं० त्या त्या कसबाला जरूर अशीं हत्यारें समुच्चयानें. ३ विक्रीचे पदार्थ समुच्चयानें. ४ कोणत्याही कामाचीं साधनें, उपकरणें, इ० समुच्चयानें. ꣸ **दुकानदार पु०** दुकान मांडून पदार्थ विकून चरितार्थ चालवितो तो. **दुकानदारी स्त्री०** दुकानदाराचा धंदा किं० कसब. **दुकानदारी फैलावणें** लबाड्यांचें जाळें पसरणें (लोकांना आकर्षिण्यासाठीं, मोहांत पाडण्यासाठीं, किं० फसविण्यासाठीं). गोसावी, भोंदू, रांडा, जुगारी लोक असले धंदे करतात. **दुकान घालणें** १ दुकान स्थापणें,–दुकानदारीचा धंदा करून चरितार्थ चालविण्यासाठीं. २ राजरोसपणें रांडेचा धंदा सुरू करणें (कोणा स्त्रीनें). **एकाद्याचें दुकान वाढणें** त्याच्या गिऱ्हाइकांची संख्या वाढणें; त्याच्या दुकानाची भरभराट होऊं लागणें.

दुकाना [**म०** दु+काना किं० कान] **वि०** १ उचलावयाला दोन कड्या असलेलें (भांडें). २ दोन आहेत दारू पेटविण्याचीं भोकें जिला अशी (बंदुक).

दुकार पु० दोन आण्याचें नाणें (भिक्षुकांच्या सांकेतिक भाषेंत). मागें ' चकार ' पहा.

दुकाळ [**सं०** दुष्काळ] **पु०** १ पर्जन्याच्या अभावामुळें किं० कमताईमुळें धान्यादि पदार्थ भरपूर न पिकल्यामुळें खाद्यपेयांची होते ती टंचाई किं० अशा टंचाईचा काळ. २ कोणत्याही पदार्थाचें जरूरीपेक्षां पुष्कळच कमी प्रमाण. ꣸ **कोरडा दुष्काळ पु०** अवर्षणानें होतो तो दुष्काळ. **ओला दुष्काळ पु०** अतिवृष्टीमुळें धान्यादींचा नाश होऊन बहुजन समाजाला होते ती अडचण. **दुकाळीं माळी सुकाळीं साळी** सुबत्तेच्या दिवसांत साळ्यानें विणलेलीं सणंगें खपतात आणि साळ्याला खूप पैसे मिळतात; दुष्काळांत माळ्याच्या धंद्याला तेजी येते म्हणजे त्यानें पिकविलेल्या फळें,भाज्या,इ०नां मागणी फार येतें म्हणजे माळ्याचें महत्त्व वाढतें.

दुकाळणें [**म०** ' दुकाळ ' पासून] **अ० क्रि०** दुर्मिळ किं० महाग होणें.

दुकी स्त्री० उशीरां शाळेंत आलेल्या मुलाला

ज्या दोन छड्या शिक्षा म्हणून मारल्या जातात त्या (मुलांचा शब्द).

दुकूल [सं० दुकूल किं० दुगूल] **न०** १ तलम कापड. २ रेशमी वस्त्र.

दुकल स्त्री० १ गंजिफांच्या खेळांत बंद ठेवून उतरावयाजोगा जो हुकूम तो. २ एक प्रकारचा कागदाचा पतंग.

दुक्का पु० दोन चिन्हें ज्यावर असतात असें जें गंजिफांतील पान तें.

दुक्खारा , दुख्खारा [सं० दुःख] **वि०** उपदंश ह्या रोगानें पीडलेला.

दुःख [**सं०**] **न०** १ मनाला किं० शरीराला पीडादायक किं० जाचक अशी कोणतीही गोष्ट. २उपदंश हा रोग. ३ संकटाची किं० विवंचनेची कांहीं बाबद. ४ त्रासदायक अशी कोणतीही गोष्ट. ॐ**दुःख पाहून डाग द्यावा** जेथें खरोखरी पीडा असेल तेथेंच इलाज करावा; दुःखाचें जें कारण किं० बीज त्याचेवरच उपाय करावा. **दुःखावर डाग देणें** (किं० **फासण्या घालणें** किं० **टाकणें**) आधींच पीडित झालेल्या मनुष्याला झोंबरे शब्द बोलून विनाकारण अधिक पीडा देणें. **दुःख वेशीस बांधावें** आपलें संकट आपण बोलून दाखविलें म्हणजे प्रकट केलें तरच लोक उपाय सांगू शकतील. **दुःखें पापें क्रि० वि०** मोठ्या कष्टानें; भारी त्रास सोसून (कांहीं काम करणें किं० पथकरणें). **दुःख मानणें** अंतःकरणाला लावून घेणें; विषाद मानणें. **दुःखदाटणी स्त्री०** शारीरिक किं० मानसिक दुःखें एकामागून एक किं० एकदम कोणेकावर कोसळणें किं० अशा दुःखांची परंपरा. **दुःखाचा प्राणी पु०** ज्याच्यावर एकसारखे दुर्दैवाचे घाले येत आहेत असा मनुष्य; ज्याला सुखाचें वारें कधींच लागलेलें नाहीं असा. याच्या व्यावर्तकत्वें 'ऐश्वर्याचा प्राणी.' **दुःखाचा दाटेली** (किं० **विभागी**) **वि०** मित्राच्या दुःखानें दुःख पावणारा.

दुखंड [**म०** दु (दोन)+खंड (तुकडा)] **वि०** दोन भागांत कापलेला, तोडलेला, तुटलेला, फाडलेला, किं० फाटलेला (होणें, करणें).

दुखणाईत, दुखणारू वि० आजारी; दुखणेकरी.

दुःखणें [**सं०** दुःख] **न०** १ आजार. २ बरेच दिवसांचा आजार. ॐ **देणें दुखणें हीं कोणाला आवडत नाहींत** लोकांचा आपण उसना घेतलेला पैसा फेडणें हें प्रत्येकाच्या जिवावर येतें.तसेंच आजारी पडण्याला कोणीही मनुष्य खुषी नसतो. **दुखणें घेणें** १आजारी असल्याचें ढोंग करणें. २ कांहीं गोष्टीबद्दल दुःख करीत बसणें. **दुखण्याचें अंग असणें** आजाराचा थोडासा अवशेष राहिलेला असणें; आजार पूर्णपणें बरा झालेला नसणें. **दुखणेकरी वि०** आजारी पडलेला. **दुखणेंबाहणें न०** १ दुखणेंबिखणें. २ मनुष्याच्या नित्य क्रमांत व्यत्यय आणणारी कोणतीही गोष्ट,–आजार इ०.

दुखरण [**म०** दुःख; **सं०** दुःख] **स्त्री०** कोणत्याही प्रकारचें शारीरिक किं० मानसिक दुःख.

दुखरा [**म०** दुखणें] **वि०** १ दुखत किं० ठणकत असलेला (पाय, हात, इ०). २ नाजूक स्थितींत असलेलें (मन किं० गात्र).

दुखरूं [**म०** ' दुःख ' चें लघुत्वदर्शक रूप] **न०** १ लहानसें दुःखणें,–मोठा आजार अर्थात वायु, क्षय, इ० यांच्या उलट; उ० ठेंच, गळू, इ०. २लहानसें पण लवकर बरें न होणारें दुःखणें.

दुखवटा [**सं०** दुःख+वाटा] **पु०** १दुःखाची स्थिति; दुःखाचा भोग. २ मृत मनुष्याच्या नातलगांस सहानुभूति दाखविण्यासाठीं त्यांच्या भेटीस जाण्याचा विधि; सांत्वनार्थ दिलेली भेट; उ०रामभाऊंचा जांवई मेला म्हणून रामभाऊंच्या दुखवट्याच्या भेटीस मी काल जाऊन आलों. ३ मृत मनुष्याच्या पुत्रादिकांस सुतक संपल्यावर पागोटें इ०चा नजराणा देतात तो; उ० हें पागोटें मला गोविंदपंतांकडून दुखवट्याचें म्हणून आलेलें होतें. ॐ**सुखवट्यास सारे येतात सुखवट्यास कोणी येत नाहींत** वैभवाच्या स्थितींत वैभवाचा वाटा घ्यावयास पुष्कळ लोक आपल्याकडे येतात; विपत्तिसमयीं विपत्तीचा वाटा घ्यावयाला कोणी येत नाहींत.

दुखविणें [**स०** दुःख] **स०क्रि०** १शस्त्र, काठी, मर्मभेदक भाषण, वाईट आचरण, इ०च्या योगानें

कोणेंकाचें शरीर किं० मन व्यथित किं० पीडित करणें. २झाडाचें खोड किं०साल कुऱ्हाड इ०शस्त्रांनीं थोडथोडी टोचणें; जमीन सपाट करावयासाठीं ती चोपतां यावी म्हणून कुदळ, पहार, इ० साधनांनीं तिचा पृष्ठभाग खोदणें किं० उकरणें. ३ आंवळे, आंबे, इ० फळें मोरआवळा, मोरआंबा, इ० करण्यासाठीं टोचणीनें चोचावणें.

दुखावणें [म० दुःख] अ० क्रि० १ इजा पावणें (शरीर, गात्र, इ०; कांटा, चाकू, इ०नीं).

दुखांदा [म० दु (दोन) + खांदा(शाखा)] पु० वृक्षाला जेथें दोन फांद्या फुटल्या आहेत ती जागा किं० त्या दोन फांद्यांच्या मधील बेचकें किं० कोन.

दुखापत [म० दुःख] स्त्री० इजा; शरीराला ठेच लागणें, कांटा बोचणें, इ० मुळें होते ती जखम किं० त्या जखमेनें होते ती वेदना.

दुखांबी [म० दु (दोन) + खांब] वि० दोन खांबांच्या आधारावर उभारलेलें किं० रचलेलें (घर, तंबू, इ०).

दुखारणें [म० दुःख] अ० क्रि० दुःखयुक्त किं० खेदयुक्त होणें; दुःखित होणें.

दुखाळू [म० दुःख] वि० १ जो सदा आजारी असतो असा. २ उपदंश हा रोग ज्याला झाला आहे असा.

दुखीबाही स्त्री० वर ' दुखणें बाहणें ' पहा.

दुखोटा पु० वर ' दुखवटा ' पहा.

दुख्खारा, दुख्खेरा [म० दुःख] वि० उपदंश ह्या रोगानें पीडित.

दुगन [म० दु (दोन) + गान] स्त्री० ध्रुपदादि गाणें निम्मे काळांत म्हणणें; तितक्याच अवधींत ध्रुपदादि दोन वेळां म्हणणें.

दुगस्तां [म० दु (दोन) + गपताह् साल (गेलेलें वर्ष)] क्रि० वि० गेल्या वर्षी; गुदस्तां.

दुगाणी स्त्री० १ एक तांब्याचें नाणें. २ लाथ; तंगडी. ※ **एकाद्यावर दुगाण्या झाडणें** त्याच्यावर व्यर्थ टपका ठेवून किं० कृतघ्नपणानें त्याला दोष देणें किं० त्याची निंदा करणें.

दुगुन स्त्री० वर ' दुगन ' पहा.

दुग्ध [सं०] न० १ मातेच्या स्तनांत जो पांढरा रस अपत्याच्या पोषणार्थ उत्पन्न होतो तो; दूध. २ रुई, वड, उंबर, इ० झाडांचा जो पांढरा चीक तो.

दुग्धा [सं० द्विधा=दोन प्रकारांनीं] पु०, स्त्री० संदिग्धपणाची स्थिति; अनिश्चितपणा; शंका; संशय; (क्रि० ठेवणें, सांगणें, असणें, वाटणें, दिसणें).

दुघई [म० दु (दोन) + घई (गस्ता)] वि० दोन आहेत गस्ते ज्याला असें (घर). तिघई, चौघई, यांचे अर्थ ह्याच सरणीनें जाणावे.

दुघड [म०दु (दोन)+घड (घट,घागर)] स्त्री० १ पाण्याच्या राहाटाच्या माळेस दोन दोन लोटे बांधून मध्यें एका एका लोट्याची जागा वगळावी असा लोटे बांधण्याचा प्रकार. २ आंबे, फणस, इ० फळें एका डेखाला दोन लागून होते ती जोडी.

दुघड [म० दु (दोन) + घड (घडविणें)] वि० अनेक वेळां ज्याला शिकवावें लागतें असा (विद्यार्थी). ※**दुघड ओनाम्या** वि० १कितीही अभ्यास करूनही ज्याला अक्षर येत नाहीं असा. २ मूर्ख, अडाणी.

दुघडी [म० दु(दोन) + घडी (पदर)] वि० १ दुहेरी केलेलें (वस्त्र, कागद, कातडें, इ०). २ वस्त्रादि दोन वेळां दुमडून केलेली (घडी किं० रचना).

दुचमळ स्त्री० भांड्यांतील पाणी, दूध, इ०-चें हलणें; डुचमळ.

दुचमळणें अ० क्रि० भांड्यांतील पाणी, दूध, इ० हलणें. स० क्रि० भांडें हालवून आंतील दूध, पाणी, इ० हालविणें. टीप,—ह्या दोन्ही अर्थी डुचमळणें, डचमळणें, हे शब्द अधिक प्रचलित आहेत.

दुचष्मी, दुचश्मी, दुचस्मी [म०दु (दोन)+फा० चष्माह् (डोळा)] वि० दोन्ही डोळे दिसतील अशा प्रकारें काढलेलें (माणसाचें चित्र).

दुचाला [म० दु (दोन) + चाला (हालचाल)] पु० संदिग्धपणाची स्थिति: हें करूं कीं तें करूं अशी मनाची स्थिति; पंचाइतीची किं० पेचाची स्थिति.

दुजा वि० १ दुसरा. २ परकी; आत्मीय नव्हे

तो; उ० मला तुम्ही दुजा समजूं नका. ॐ दुजाभाव पु० परकीपणाची भावना; उ० तुजविषयीं माझ्या मनांत दुजाभाव मुळींच नाहीं. दुजाईत [म० दुजा (दुसरा)+ईत (वेत)] वि० दोन वेळां व्यालेली (गाय, म्हैस, इ०). दुजांतरा वि० [म० दुजा (दोन)+अंतर] वि० दोन दिवसांआड येणारा (ज्वर).

दुजोडी [म० दु+जोड] स्त्री० दोहोंकडील दोहों तुळयांचीं टोकें एका खांबावर टेकतील अशा प्रकारें मधोमध खांब देऊन दोन सोप्यांचा केलेला एक सोपा.

दुजोर, दुजोरा [म० दु (दोन)+जोर (नेट)] पु० (बुद्धिबळांच्या खेळांत) एका प्याला दोन प्यांचें असतें तें संरक्षण.

दुटप्पी [म० दु (दोन)+टप्पा (धोरण)] वि० दोहोंकडे ज्याचा कल आहे असें; दोन धोरणें, दोन उद्देश, किं०दोन ध्येयें ज्यापासून काढतां येतील असें (भाषण) किं० अशाप्रकारें बोलणारा (माणूस) किं०अशा प्रकारचा लिहिलेला (लेख). ॐ दुटप्पी सांगणें संक्षेपानें सांगणें (म्हणजे दोनच वेळां थांबून किं० विसावा घेऊन).

दुटपी, दुटप्पी [म० दु (दोन)+टप (माथा)] वि० ज्याला दोन छपरें म्हणजे छोत्र्यावरील चांदण्या आहेत असा (तंबू इ०).

दुटें न०१लांबी मोजण्याची गवंड्यांची कांठी.२ घर इ० बांधावयाचें असतां जमीनीवर भिंती इ० च्या पायांच्या रेषा राख इ०च्या पट्ट्यांनीं दाखविलेल्या असतात त्या समुच्चयानें; इमारतीचा जमीनीवर दाखविलेला आराखडा. ३ भाषण, वर्तन, इ० ची कोणी कोणास घालून दिलेली शिस्त; उ० ह्या दुट्याप्रमाणें तूं वागलास तर त्यांत तुझें कल्याण आहे.४ बैल इ०च्या पाठींवर सामान लादून वाहून न्यावयाच्या गोणपाटाच्या पिशव्या,-ज्या दोऱ्यांनीं हव्या तितक्या मोठ्या किं० लहान करतां येतात. ५घोड्याच्या जिनावर बांधावयाची एक प्रकारची पिशवी. ६ मध्यें दुमडून दोन पानें ज्यांचीं केलीं आहेत असा कागद.

दुट्टा पु० १ वर ' दुटें ' अर्थ ६ पहा. २ कोष्टयाच्या मागावर विणावयाला घातलेलें दुहेरी सूत.

दुठरूं न० पूर्ण न पिकलेलें गहूं फुटलें किं० फोडलें असतां पुन्हा उपटतें तें.

दुंड न०१ पर्णरहित झाडाची फांदी. २ अगडबंब मनुष्य किं० जनावर.

दुडकारीं क्रि० वि० दुक्कारीं;गंजिफांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

दुडकी वि० १ अश्वादिकांच्या चालण्याचा जो एक प्रकार तद्विशिष्ठ. २ मृदंगाचा धूम वाजविण्याचा जो प्रकार तद्विशिष्ट.

दुडता वि० दुहेरी केलेलें (वस्त्रादि).

दुडदुड, दुडदुडू,दुडदुडां क्रि० वि० जवळ जवळ पावलें टाकून आवाज करून (धावणें).

दुंडा पु०, दुंडी स्त्री० १ पोळ्या, भाकऱ्या, विटा, कडब्याच्या पेंढ्या, इ०ची जोडी. २ पुस्तकांचीं मध्यें दुणून न कापतां संलग्न दोन पत्रें राखिलीं असतात तीं.

दुंडा वि० १ सुईंत ओवून दुहेरी केलेला दोरा. २ दोन पानें होतील अशा रीतीनें मध्यें दुमडलेला (कागद, वस्त्र, इ०).

· दुडाण न० घोड्याची एक प्रकारची चाल.

दुडाळ [सं० द्वि+दल; म० दु+डाळ] न० ज्या धान्याचीं दोन अर्धुकें होतात असें धान्य,-पावटा, हरभरा, इ०. याच्या व्यावर्तकत्वें गहूं, तांदूळ, जोंधळा, इ०.

दुड्ड, दुड्डु [कानडी] पु० १ पैसा. २ पैशाचा चतुर्थांश. ३ द्रव्य; संपत्ति. पु०अ० व० संपत्ति; पैसा; उ० त्याचेपाशीं दुड्डु फार आहेत.

दुड्ड्या पु० १ मातीचा डेरा. २ (लाक्षणिक) मोठें फुगीर पोट; पोटाचा डेरा.

दुड्डाचार्य, दुड्डाचारी [कानडी दोड्डु=मोठा; आचार्य=गुरु] पु० १ सामान्य आचार्यांच्या वरचा आचार्य. २ (विपरीत लक्षणेनें) नसता मोठेपणा आपणाकडे ओढून घेऊन प्रौढी मिरविणारा माणूस; उ० हे आले मोठे दुड्डाचार्य, ते काय दिवे लावितात तें पाहूं !

दुड्डारी क्रि० वि० दुड्डीनें जावयाजोग्या पर्गी-

दुड्डी स्त्री० १ दुफाशी खेळांत एक डाव

पडतो तो. २ दोन पैसे, दोन रुपये,—अशी जोडी; उ० त्याणें दुट्टी दुट्टी दक्षिणा दिली.

दुणकाम [म०दुणणें (दुप्पट करणें) + काम] न० एकदा केलेलें काम चांगलें न झाल्या कारणानें तें मोडून पुन्हां केलेलें काम; दुवार करावें लागलेलें काम. ॐ **दुणकाम्या पु०** ज्याचें काम कधींच चांगलें होत नाहीं म्हणून दुवार करावें लागतें असा कोणीही अडाणी माणूस.

दुणणें [म० दुणा] स० क्रि० १ दोरी, वस्त्र, कागद, इ० मध्यें दुमडून दोन पदरी करणें. २ दोहोंनीं गुणणें; उ० तेवीस दुणले असतां शेचाळीस होतात. ३ एका खळग्यांत लाविलेल्या मिरच्या, वांगीं, इ० चीं दोन दोन रोपें वाढूं लागलीं असतां अडचण न व्हावी म्हणून मध्यें माती घालून दोहोंकडे दोन करणें. ४ एकवार नांगरलेली जमीन पुन्हा नांगरणें; उभ्या नांगरणीवरून आडवी नांगरणी करणें.

दुणता [म० दुणा] वि० दुहेरी केलेला.

दुणा वि० दुहेरी;दुसऱ्यांदा केलेलें(तेंच काम).

दुणा विं० ... **आळशास दुणें काम,कृपणास दुप्पट खर्च** ॐ आळसानें किं० चुकारतट्टूपणानें केलेलें काम करणारास तें पुन्हा करावें लागतें, आणि कोणत्याही वस्तूवर चिक्कूरपणानें खर्च केल्यास ती वस्तु व्हावी तशी होत नाहीं म्हणून पुन्हा तितका खर्च करून ती पुन्हा करावी लागते.

दुणारणें, दुणावणें अ० क्रि० १ दुप्पट होणें. २ दुप्पट जोरदार होणें(रोग,रागाची लहर, वारा, पाऊस, इ०). स० क्रि० १ पुन्हा करणें. २ पुन्हा नांगरणें. ३ दुहेरी करणें. ४दुप्पट करणें. ४(वर्तमान इ०) दृढ करणें किं० पुरावे देऊन त्यांचें समर्थन करणें किं० तीं खरीं म्हणून सिद्ध करणें.

दुणी [म० दुणा] स्त्री० दुप्पट परिमाण; उ० वाढीनें धान्य दिलें होतें त्याची दुणी झाली.

दुणीं, दुणें [म० दुणा] क्रि० वि० दुप्पट केलीं असतां; दोहोंनीं गुणलें असतां; उ० आठ्ठावीस दुणें (किं० दुणीं) छप्पन्न.

दुतर्फा [म० दु; फा० दो+तर्फ (बाजू)] क्रि० वि० १ दोन राजे,दोन अधिकारी, इ० कडे (असणें). २ दोन कडांना किं० बाजूंना धरून, व्यापून, किं० स्पर्शून; उ० नदी दुतर्फा भरून चालली आहे. ३ दोहों बाजूंनीं; दोहों पक्षांना सारखेंच लागू पडेल अशा रीतीनें (बोलणें, पुरावा पुढें आणणें, इ०).

दुताडा [सं ' दूत ' पासून लघुत्वदर्शक किं० तिरस्कारदर्शक] पु० तगादा करावयाला किं० धरणें धरून बसावयाला राजा किं० कोणी अमलदार यांच्याकडून आलेला त्रासदायक,क्रूर,आणि निर्लज्ज माणूस.

दुतार,दुतारी, दुतू [म० दु (दोन)+तार (तंतु)] वि० रेशमाचे दोन तंतु एकत्र वळून त्या तंतूंनीं विणलेलें वस्त्र.

दुतुकडा [म० दु + तुकडा] वि० दोन तुकडे एकत्र शिवून किं० जोडून केलेला (पदार्थ).

दुतोंडी, दुतोंड्या [म० दु+तोंड] वि० १ ज्याला दोन तोंडें आहेत असा (साप किं० कृमि इ०). २ दोहों बाजूंनीं बोलणारा. ३ज्याच्या दोन बाजू घडविलेल्या आहेत असा (चिरा,धोंडा,इ०).

दुथडीं [म० दु+थड] क्रि० वि० १ दोन्ही किनारे किं० कांठ यांना स्पर्शून(नदी,नाला,इ०चें वाहणें). २ दोहों बाजूंस; उ० ह्या नदीच्या दुथडीं ऊस लाविला आहे.

दुदांडी [म० दु+दांडी] वि० १ दोन दांड्यांचें चिन्ह ज्यावर आहे असा (पैसा). २ दोन बाजूंस धरावयाचे दोन दांडे ज्याला आहेत असें (पात्र इ०).

दुदावणें स०क्रि०आरडाओरडा करून (चोर, चिमण्या, गुरें, इ०) पळवून लावणें.

दुदिया, दुधिया पु० एक अमली पेयविशेष.

दुंदुभि [सं०] पु० स्त्री० १ नगारा. २ दुतोंडें.

दुधखुळा [म० दूध+खुळा] वि० १ प्रौढ वयांतही पोरकटपणा करणारा. २ मूर्ख,अजागळ.

दुधगा [म० दूध] पु० कोवळें दूध प्याल्यामुळें गाय, म्हैस, इ०च्या वासरांस होतो तो एक रोगविशेष.

दुधड वि० १ दुटप्पी (भाषण). २ अस्पष्ट. ३ फसवेगिरीचें (वर्तन, भाषण, इ०). क्रि०वि० दोन खंड होतील अशा रीतीनें (तोडणें, कापणें, इ०).

दुधणी, दुधाणी स्त्री० एक वनस्पति

हिचा चीक पांढरा असतो.हिला 'कुंभा,' 'तुंबा,' ' शेतवड, 'इ० दुसरीं नांवें आहेत.

दुधणी, दुधाणी [म० दूध] **स्त्री०** दूध तापवावयाचें भांडें.

दुधपाक, दुधपेढा इ० ' दूध ' मध्यें पहा.

दुधवणी [म० दूध+पाणी] न० ज्यांत फार पाणी घातलें गेलें आहे असें दूध.

दुधवणी स्त्री०, दुधावणें न० १ दूध तापवावयाचें भांडें. २ दूध तापत ठेवण्याचा जमीनींत केलेला खळगा.

दुधाणी स्त्री० चालकवाऊ नांवाच्या आजारांत पायाच्या घोट्यावर बांधतात ती पांढरी गारगोटी.

दुधू [म० दूध] **पु०, न०** मातेचा स्तन किं० मातेच्या स्तनांतील दूध.

दुध्या पु० पांढरा भोपळा.

दुनया, दुनिया [फा०]**स्त्री०** १ पृथ्वी. २ मानवजाति. ३ जग. ※ **धनावांचून दुनिया पंगू** १ पैसा नसल्यास सर्वांचें अडतें किं० नडतें. २ जवळ पैसा नसल्यास पृथ्वीवरील भोग्य पदार्थ आपणास नसल्याप्रमाणेंच. **दुनिया झुकती है झुकानेवाला चाहिये** नादीं लागणारे किं० फसणारे मूर्ख किं० अजागळ लोक जगांत पुष्कळ आहेत, त्यांना नादीं लावणारा किं० फसविणारा मनुष्य मात्र पाहिजे. **दुनिया दुरंगी आहे** कांहीं केलें तरी लोक दोष देतातच; लोक दोहोंकडून निंदितात.

दुपक [म० दु+सं० पक्ष] **वि०** १ दोन दिवस एकच तिथि इ०पडल्याकारणानें त्या तिथी इ० चें विहित कर्म आज करावें किं० उद्या करावें असें जिच्या संबंधानें द्विधा मत होतें ती तिथि इ०; वादाला विषय झालेली (तिथि इ०).२जिच्या संबंधानें दोन मतें आहेत अशी (आचारसरणी).

दुपकी स्त्री० चरावयास सोडलेल्या गाय,म्हैस, घोडा, इ०नीं पळून जाऊं नये म्हणून त्यांच्या दोन पायांना बांधतात ती दोरी.

दुपट, दुप्पट [म० दु (दोन)+पट]**वि०** द्विगुणित; ज्याच्या परिमाणाइतकी वाढ झाली आहे असें.**स्त्री०**दुप्पटपणा; पूर्वीच्या परिमाणाइतकी झालेली वाढ. ※ **दुपटी स्त्री०** पहिल्या परिमाणाइतकी वाढ. [दुहेरी वस्त्र.

दुपटा, दुपट्टा पु०, दुपटें न० पांघरावयाचें

दुपती, दुभती [सं०दुग्ध+वत्+ई(प्रत्यय)] **स्त्री०** नित्य दूध देणारी (गाय, म्हैस); भाकड न झालेली. ※ **दुभती गाय** (किं०**दुभती धेनु**) **स्त्री०** ज्याच्यापासून नित्य थोडाबहुत कोणत्या तरी प्रकारें लाभ होत असतो असा यजमान.

दुपतें, दुभतें [सं० दुग्ध; दुह्=दूध काढणें; म० दूध] न० १ दूध देणारें घरीं बाळगलेले प्राणी गाय, म्हैस, इ०. २ अशा प्राण्यांपासून मिळतें तें दूध. ३ अशा घरच्या दुधाला विरजण लावणें,ताक करणें, इ० कामें समुच्चयानें; उ० तुमच्या घरीं दुभतें कोण करतो ? ४ (लाक्षणिक) ज्याच्या संबंधानें एकसारखी काळजी वहावी लागते किं०कष्ट सोसावे लागतात असें (काम, मूल,गडी, आजारी माणूस, इ०).

दुपदरी [म० दु (दोन)+पदर+ई(प्रत्यय)] **वि०** १ दोन शेवटांस जरीचे किं० रेशमाचे पदर ज्याला घातले आहेत असें(पागोटें, लुगडें, इ०). २ द्विगुणित किं० दुहेरी केलेलें (वस्त्र,दोरी, इ०).

दुपरतणी स्त्री०, दुपरतणें न० [म० दु+परतणी] एक वार शमलेल्या दुखण्याचा अपथ्यादि कारणामुळें जो पुनरुद्भव होतो तो. **दुपरतणें अ० क्रि०**शमलेल्या दुखण्यानें पुन्हा उद्भवणें.

दुपाटा, दुपेटा वर ' दुपटा ' पहा.

दुपाठी [म० दु+पाठ] **वि०** दोन वेळां वाचून किं० ऐकून ज्याला श्लोक, वाक्य, इ० पाठ होतें असा.

दुपानी [म० दु+पान] **वि०** दोनच पानें ज्याला आलीं आहेत असा (झाडाचा अंकुर). **स्त्री०** गंजिफांच्या खेळांत शेवटीं जीं दोन पानें खोटीं राहिलीं तीं.

दुपाय [म० दु+पाय] **वि०** दोन पायांचा. ※ **दुपायी वि०**दोन पायांचा. **दुपायीं येणें अ० क्रि०** १ (घोड्यानें) दोन पायांवर मागें हटणें. २ भांडावयाला सज्ज होणें.

दुपार [म० दु (दोन)+पार (प्रहर)] **स्त्री०**१मध्यान्हसमय. २ दिवसाचे दोन प्रहर उलटून गेले आहेत असा समय. **दुपारां, दुपारीं क्रि० वि०** मध्यान्हाच्या समयीं. ※ **भरल्या दुपारीं**

क्रि० वि० ऐन दुपारीं. **दुपार उरकणें** दुपारचीं भोजनादि कृत्यें संपविणें. **दुपारची चिंता** स्त्री० १ दुपारीं कोठें आणि कसें जेवण मिळेल ही काळजी. २ अत्यन्त हीन दशा. **दुपारची सोय** स्त्री० दुपारच्या जेवणाची तजवीज. **दुपारची भ्रांत** स्त्री० दुपारीं जेवावयाला कसें मिळेल अशी सदोदित वाटत असलेली चिंता. **त्याला दुपारची भ्रांत आहे** तो अत्यन्त हीनदीन आणि विपन्न स्थितींत आहे. **दुपारची मात्रा** स्त्री० दुपारचें जेवण. **दुपारची सावली** स्त्री० क्षणभंगुर वैभव. **दुपारी** स्त्री० एक फुलझाड. **दुपारें** न० त्या झाडाचें फूल. **दुपारीं तिपारीं** क्रि० वि० १ दुपारच्या आलीकडे किंवा पलीकडे; मध्यान्हाच्या सुमारास. २ भलत्याच वेळीं.

दुपेटा पु० दरबार, सभा, इ० स्थळीं जावयाचें असतां किंवा कांहीं समारंभास जावयाचें असतां अंगावर धारण करावयाचें वस्त्रविशेष.

दुफसली वि० एका वर्षांत दोन पिकें जिच्यापासून काढतां येतात अशी (जमीन, शेत, इ०).

दुफळी [म० दु+फळी] स्त्री० एकाचा विषयांवर कांहीं माणसांचें एक मत आणि कांहीं माणसांचें भिन्न मत पडल्याकारणानें होतात ते दोन तट किंवा पक्ष; विरोध; बेबनाव (पडणें, होणें).

दुफाड [म० दु+फाडणें] स्त्री० एका पदार्थाचे दोन खंड करण्याची क्रिया. वि० ज्याचे दोन खंड केले आहेत असा.

दुफाशी [म० दु+फासा] वि० १ दोन फासे टाकून खेळावयाचा सोंगट्यांचा खेळ. २ दोन फासे किंवा आंकडे ज्याला आहेत असा (दागिना, इ०).

दुबक स्त्री० १ चरावयाला सोडलेल्या घोडा इ० चे दोन पाय बांधणें (त्यानें पळून जाऊं नये म्हणून); उ० ह्या गायीला दुबक घालून कुरणांत सोडली पाहिजे. २ विटीदांडूच्या खेळांत विटीवर दुसऱ्यानें टोला मारण्याची क्रिया.

दुबकणें स० क्रि० १ चरावयास सोडलेल्या घोडा इ० नीं पळून जाऊं नये म्हणून त्यांचे दोन पाय दोरीनें बांधणें. २ रट्टे मारणें.

दुबका पु०, **दुबकी** स्त्री० मूठ मिटून मारलेला रट्टा; बुक्की; बुक्का; बुकांदा.

दुबकी स्त्री० चरावयास सोडलेल्या जनावरानें पळून जाऊं नये म्हणून त्याचे दोन पाय ज्या दोरीनें बांधतात ती.

दुबंदी स्त्री० १ दोन बंद पडावयाजोगा कागद. २ घोड्याच्या पुढच्या दोन पायांसच नाल मारणें.

दुबळा [सं० दुर्बल] वि० १ विद्या, द्रव्य, शक्ति, वशीला, इ० ची अनुकूलता ज्याला नाहीं असा. २ किडकिडीत. ॐ **दुबळवाडा** पु०, **दुबळवाडी** स्त्री० अनाथपणाची किंवा हीनदीनपणाची स्थिति (पडणें, होणें). **दुबळ्या देवाची दिपमाळ** स्त्री० हाडका, रोडका, किंवा किडकिडीत माणूस.

दुबळें [सं० दुर्बल] न० विपन्न स्थिति.

दुबार, दुबारा [सं० द्विवार; हिं० दोबार] क्रि० वि० दोन वेळां.

दुबार वि० दुप्पट; पुन्हा तितकेंच.

दुबारी [म० दु, दोन; बार, बहर] वि० १ एका वर्षांत दोन वेळां ज्याला फळें किंवा फुलें येतात असें (झाड इ०). २ दोन वेळां उडणारा फटाकडा इ०. ३ दोनदां उडवितां किंवा झाडतां येईल अशी बंदूक. ४ दोन पट्टीं जोडून केलेला जो भारी किंमतीचा दुपेटा तो.

दुबाळकें, दुबेळकें न० वृक्षाला जेथें दोन फांद्या फुटल्या आहेत तेथें होतो तो कोन.

दुबेरजी [म० दु, दोन+बेरीज+ई] वि० कांहीं कारणानें रकमांचे दुबार खर्च करावे लागतात आणि पक्क्या हिशेबांत त्या जमाखर्चाचा दुबारपणा घालवून एक बेरजीच्या रीतीनेंच तो पक्का हिशेब आकारतात असा जो लिहिण्याचा प्रकार तो किंवा तद्विशिष्ट कागद इ० तो.

दुबोल्या [म० दु+बोलणें] वि० १ अस्थिर विचारांचा माणूस; ज्याचें मन सदा हेलकावे खात असतें असा. २ स्वताच्या फायद्यासाठीं एक पक्ष सोडून दुसऱ्या पक्षास मिळणारा.

दुभणें [सं० दुह्] अ० क्रि० १ गाय, म्हैस, इ० नीं दोहिलें असतां दुग्धस्राव करणें किंवा दूध देणें. २ क्षतानें पुवाचा स्राव करणें. ३ ताड, माड, इ० नीं रसस्राव करणें. ४ कांहीं कारभार, व्यापार, इ० तून द्रव्यरूप फलनिष्पत्ति

होणें. ॐ **व्याही पाहुणा आला तरी रेडा दुभत नाहीं** कशीही नड किं० जरूरी असली तरी अशक्य गोष्ट कधीही घडूं शकत नाहीं.

दुभणें [सं० दुह्] **स० क्रि०** गाय, म्हैस, इ० दोहणें म्हणजे त्यांचें दूध काढणें.

दुभता, दुभतें मागें ' दुपता, ' 'दुपतें' पहा.

दुभरंवसा, दुभरोसा [म० दु+भरंवसा] पु० १ मनाची साशंक वृत्ति; शंकितपणाची स्थिति; संदिग्धता. २ पदार्थ, माणसाचें वर्तन, कारभार, इ० च्या खऱ्या स्वरूपासंबंधाचा अनिश्चितपणा.

दुभाग [म०दु+भाग] **वि०**१दोन भागांत विभागलेला. २ ज्याचे दोन भाग झाले आहेत असा.

दुभांग [म० दु+भंग] **वि०** मध्यें कांहीं अडथळा किं० व्यवधान आल्यामुळें ज्याचे दोन भाग किं० अवयव दोन बाजूंस सरले आहेत असा; उ० मध्यें खडक आल्यामुळें ह्या नदीचा प्रवाह दुभांग झाला आहे.

दुभागणें [म० दु+भाग] **अ० क्रि०** दोन भागांत विभागलें जाणें. **स० क्रि०** दोन भागांत विभागणें.

दुभांगणें [म०दु+भांग] **अ०क्रि०**मध्यें कांहीं व्यवच्छेद आल्यामुळें दोन तुकड्यांचें रूप पावणें. **स० क्रि०** एका पदार्थांत कांहीं अन्य पदार्थ घालून (त्याचे दोन भाग)दोन बाजूस सारणें किं०ढकलणें; (पदार्थ) पिंजणें.

दुभाव पु० मागें ' दुजाभाव ' पहा.

दुभाषी, दुभाष्या [म० दु+सं०भाषा;म० भाषा] **वि०** १ दोन भाषा जाणणारा. २ एकमेकांच्या भाषा न जाणणाऱ्या दोन मनुष्यांत संभाषण चालण्यासाठीं ह्याचे विचार त्याला आणि त्याचे विचार ह्याला समजावून देणारा जो दोन भाषा जाणणारा मध्यस्थ तो.

दुभास [म० दु+भासणें] **पु०** वस्तूच्या खऱ्या स्वरूपासंबंधानें अज्ञान; गैरसमज.

दुभाळकें,दुभेळकें,दुभाळणें न० १झाडाच्या खोडाला जेथें दोन फांद्या फुटलेल्या आहेत तेथें झालेला कोन. २ पिंजलेल्या काठीच्या मधील फट.

दुभ्भीराजा पु० १ बैदुलांच्या खेळांत दोन ह्या संख्येचा वाचक शब्द. २ दुसरा तडाखा.

दुमची [फा०] **स्त्री०** १ घोड्याच्या शेपटीच्या खालून घातलेला आणि खोगिराला बांधलेला पट्टा किं० दोरी; लेंडी. २ घोड्याच्या मागच्या तंगडीचा प्रहार (मारणें, झाडणें). ॐ **कोणेकाची दुमची उचलणें** त्याला स्थानभ्रष्ट करणें. **कोणेकाची दुमची पुरविणें** त्याचा पिच्छा पुरविणें. **दुमच्या झाडणें** घोड्यानें किं० गाढवानें लाथा मारणें.

दुमजला, दुमजली [म०दु+मजला] **वि०** दोन मजल्यांचें (घर, गलबत, इ०).

दुमटणी, दुमडणी [म० दुमटणें, दुमडणें] **स्त्री०** दोरी, वस्त्र, कागद, इ०ला मध्यें घडी घालून दुहेरी करणें किं० दुहेरी करण्याची क्रिया.

दुमट (–ड–) णें, दुमतणें, दुमताविणें स० क्रि० वस्त्रादिकांना मध्यें दुमडणें किं० त्यांना मध्यें घडी घालणें; दुणणें.

दुमड [म० दुमडणें] **स्त्री०** कागद, वस्त्र, दोरी, इ० मध्यें वळविल्यानें त्यांना पडते ती संधिरेषा किं० मोड. २ अशा रीतीनें कागद, दोरी, वस्त्र, इ० मध्यें वळविल्यानें होतात जे दोन भाग ते प्रत्येक.

दुमण न० १ भात झोडतेसमयीं कवळे बांधावयास घेतात ती दोरी. २ गवताची वळून केलेली दोरी. २ अशा दोरीनें बांधलेला गठ्ठा;मुठा.

दुमणी, दुमन [फा० दुम्=शेपटी] **स्त्री०** १ घोड्याच्या मागच्या दोन पायांपैकीं प्रत्येक. २ ह्या मागच्या पायांचा प्रहार (झाडणें, लागणें, उचलणें). ३ घोड्याचें ढुंगण.

दुमता वि० दुमडलेला; घडी घातलेला.

दुमदार [फा० दुम्=शेपटी; दाश्तन्=ठेवणें पासून दार] **वि०** १ शेपूट असलेला. २ सुंदर शेपटीचा. ॐ **कोणेकाची दुमदारी राखणें** (किं० **ठेवणें**) त्याला मदत करणें; त्याला पाठबळ देणें.

दुमदुम क्रि० वि० दुम्दुम् असा आवाज होईल अशा रीतीनें (नगारा इ० वाजणें किं० वाजविणें).

दुमदुमणें अ० क्रि० १ दुम्दुम् अशा आवा-

जानें (नगारा इ०) युक्त होणें. २ सर्व लोकांस जाहीर होणें. ३ सर्व लोकांस विदित होणें किं० सर्वत्र पसरलेली असणें (कांहीं बातमी, कोणेकाची कीर्ति, इ०). ३ (वास) सर्वत्र पसरलेला असणें किं० पसरणें. ४ (मद, मत्सर, क्रोध, इ० मनोविकारांचा क्षोभ) हृदयांत होत असणें.

दुमदुमीत वि० १ फुगलेलें, तडस्स भरलेलें (पोट). २ उत्तम प्रकारें पोसला गेल्यामुळें लठ्ठ झालेला (बैल, घोडा, इ० जनावर). ३ पैसा ज्याच्या जवळ पुष्कळ आहे असा (मनुष्य). ४ दाट वास पसरणारा (फणस, आंबा, फूल, इ०).

दुमनी स्त्री० वर ' दुमणी ' पहा.

दुमात्राकानाकौ [म० दु(दोन)+मात्रा+ काना=कौ हें अक्षर]न०, स्त्री० ' कौ ' हें अक्षर लिहितांना ' क 'ला दोन मात्रा आणि एक काना अशीं चिन्हें करावीं लागतात.यावरून ' दुमात्राकानाकौ ' याचा अर्थ खांद्यावरून वहावयाची पडशी वाहणारा माणूस असा झाला (थट्टेनें).

दुमारा पु०, **दुमारें** न० [म० दु (दोहोंकडून) + मारा, मारणें]१दोन दिशांकडून सैन्यादिकांवर तोफा, बंदुका, इ०चा मारा किं० हल्ला. २ वादादिकांत दोहोंपैकीं कोणतीही गोष्ट कबूल केली तरी पंचाईत व्हावी अशी अडचणीची स्थिति किं० पंचाईत; पेच; इकडे आड आणि तिकडे विहीर अशी स्थिति.

दुमारी [म० दु+मारणें] वि० दोन वेळां किं० दोन प्रकारें मारा किं०हल्ला करणारें (हत्यार, माडूसारखें); दुबारी (बंदूक).

दुमाला [फा० दुम्बालाह्] पु०१ पदार्थाचा पृष्ठभाग. २ पदार्थाची पिछाडी. ३मदत; साहाय्य. ४ पाठीच्या बाजूनें किं० पिछाडीकडून केलेलें संरक्षण; उ० माझ्या दुमाल्याबर कोणी असेल तर मी किल्ला सर करीन. ५जबाबदारी शिरावर घेऊन केलेलें माणसाचें किं० वस्तूचें संरक्षण.ꕥ **दुमाला देणें** मदत करणें. **कोणेकाचा दुमाला राखणें (ठेवणें, उचलणें, संभाळणें, पुरवणें**) त्याला मदत करणें;त्याच्या संरक्षणाची जबाबदारी वाहाणें **कोणेकाचा दुमाला धरणें**(किं० **धरून असणें**) त्याच्यावर भिस्त ठेवून असणें; त्याच्या मदतीची अपेक्षा बाळगून असणें. **कोणेकाचा दुमाला सोडणें** त्याचा आश्रय सोडणें; त्याच्या मदतीवर अवलंबून न राहणें. **कोणेकाच्या दुमाल्यावर असणें** १ त्याला मदत करावयाला त्याच्या पाठीशीं असणें किं०राहणें.२त्याला उत्तेजन द्यावयाला त्याच्या मागें असणें. **कोणेकाच्या दुमाल्यावर** क्रि० वि० त्याचा पाठलाग करावयासाठीं त्याच्या मागोमाग (पाठिवेणें). **दुमाल्यास लावणें** १ जोडून घेणें. २ हवाली करणें; स्वाधीन करणें.

दुमाला [फा०दुम्बालाह्] वि० १ हल्लींच्या मालकानें सोडल्यावर किं० हल्लींच्या मालकाच्या मागून सरकारजमा होणारा (गांव, जमीन,इ०). २ दोन मालकांच्या किं० अधिकाऱ्यांच्या अमलाखालीं असलेला (गांव, जमीन, इ०); उ० पुणें तालुक्यांत दुमाले गांव पंचवीस आणि खालसा गांव पाउणशें आहेत. ३ ज्याचें बूच म्ह० पिछाडी लांब आहे असा (चिरा, घडविलेला दगड, इ०). ꕥ **दुमालेगांव, दुमालगांव** पु०, न० १ दोन मालकांच्या अमलाखालीं किं० वहिवाटीखालीं असलेला गांव. २ पुढें सरकारजमा होणारा गांव. ३ खालसा गांव. **दुमालअमल** पु० दोघांच्याकडे सोपविलेली वहिवाट किं० अमल. **दुमालझाडा** पु० दुमाल्या गांवाचें पत्रक किं० यादी **दुमालदार** पु०१दुमालगांवाची वहिवाट करणारें जे दोघे असामी त्यांपैकीं प्रत्येक. २ लांब टोकाचा चिरा किं० घडविलेला धोंडा. ३ ज्याचा लवाजमा फार आहे असा(माणूस, अधिकारी, इ०). **दुमालेपत्र, दुमालपत्र** न० हुंडीच्या बरोबरचें पत्र.

दुमाळी [म० दु+माळ, माळा] वि० पाकळ्यांचीं दोन वर्तुळें असलेलें (फूल); दुहेरी (फूल).

दुमोट, दुमोटली स्त्री०, **दुमोटलें** न० ज्याचें एक अर्धुक पाठीवर आणि एक अर्धुक छातीवर टेकेल असें खांद्यावरून वाहून न्यावयाचें दोन पुडांचें पोतें; पडशी.

दुमोळी [म० दु+मौलि (माथा)] वि० दुपाखी (सोपा).

दुयम, दुय्यम [फा०] वि० १ दुसरा. २ हाताखालचा (अधिकारी).

दुर् [सं०] क्रि० वि० हा शब्द उपसर्गरूप

असून त्याचे निंदा, निषेध, दुःख, कष्ट, काठिन्य, इ० अनेक अर्थ आहेत; उ० दुःसाध्य म्ह० साधावयाला कठिण; दुष्कर म्ह० करावयाला कष्टकारक; दुर्भेद्य म्ह० फोडावयाला किं० प्रवेश करावयाला कठिण; इ०. स्वरारंभीं आणि मृदु व्यंजनारंभीं ह्या शब्दाचें 'दुर्' असें रूप होतें; उ० दुराराध्य, दुर्गम इ०. कठोर व्यंजनांपूर्वीं 'दुष्,' 'दुश्,' 'दुस्' अशीं रूपें होतात; उ० दुश्चर, दुस्संग, दुष्परिणाम, इ०.

दुरकानी [म० दु+रकना+ई] **वि०** कागदाच उभे चार रकाने पाडले असतां मधल्या दोन रकान्यांतून ओढलेली (रेघ).

दुरकी [म० दु] **क्रि० वि०** दुप्पटीनें; उ० एकी दुर्की दोन.

दुरकी स्त्री० गंजिफांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

दुरकी स्त्री० घोड्याची एक प्रकारची चाल.

दुरंगी स्त्री० १ तिफाशी खेळांत एक डाव होतो तो. २ दोन अंगांस दोन प्रकारचा रंग असलेलें (वस्त्रादि).

दुरगुसला, दुरगुस पु० दांडगाईचे चाळे; धिंगामस्ती (घालणें).

दुरडी स्त्री० १ तांदूळ धुणें इ० कामीं योजावयाचें बांबूच्या तारांचें पात्रविशेष. २ फुलें गोळा करणें इ० कामीं योजावयाची लहानशी टोपली.

दुरडी स्त्री० १ फाशांच्या खेळांत दोहोंचें दान. २ दोन रुपये, दोन पैसे, इ० रूप कोणेकाला दिलेलें दान.

दुरंत [सं० दुर्+अंत] **वि०** १ ज्याचा अंत म्ह० शेवट लागत नाहीं असा. २ ज्याचा परिणाम कठिण किं० दुःखकारक आहे असा.

दुरतिक्रम [सं० दुर्+अतिक्रम] **वि०** १ उल्लंघावयास कठिण अशी (आज्ञा, उपदेश, इ०). २ ओलांडावयाला कठिण किं० अशक्य (नदी इ०).

दुरत्यय [सं० दुर्+अत्यय (उल्लंघणें)] **वि०** १ अनिवार्य; न टाळतां येईल असा. २ न उल्लंघितां येईल असा. ३ वश न करतां येईल असा; कबजांत न आणतां येईल असा.

दुरदुरी स्त्री० चिळकांडी.

दुरंदेश [फा० दूर् अंदेशाह्] **वि०** दूरदर्शी; जागरूक; सावध.

दुरंदेशा [फा० दूरंदेशाह्] **पु०** दूरदर्शीपणा; सावधगिरी.

दुरधा वि० पुरतें न पिकलेलें (फळ).

दुरबीन, दुरभीण [फा० दुर्बीन्] **स्त्री०** दूरचा पदार्थ पाहावयाचें यंत्रविशेष.

दुरभीराजा पु० (बैंदुलांच्या खेळांत) दुसरा रट्टा.

दुरवा [सं० दूर्वा] **स्त्री० अ० व०** एक तृणविशेष. हे देवांना वाहतात; 'हरळी' हें ह्या तृणाचें अन्य नांव. एकवचन 'दुरव.'

दुरशी, दुरसी [म० दूर+अशी] **स्त्री० ए० व०** रजस्वला; विटाळशी.

दुरस्त, दुरुस्त, दुरूस्त वि० १ नीटनेटका; डागडुजी केलेला. २ वापरावयाच्या स्थितींत असलेला.

दुरस्तां क्रि० वि० रस्त्याच्या दोन्ही बाजूंस.

दुरा वि० १ दुणलेला; घडी पाडलेला. २ दुप्पट केलेला किं० झालेला.

दुराई, दुराही, द्वाही [हिं० दूहाही] **स्त्री०** आपल्या मतें न करावें असें कोणी कांहीं कर्म करूं लागला असतां त्याला प्रतिबंध करावयासाठीं जी राजादिकांची शपथ घालतात ती; उ० हें करूं नको अशी सरकारची दुराही आहे. ॐ **दुराई बांधून टाकणें** एकादा पदार्थ, घर, इ० चा कोणी उपयोग किं० उपभोग करूं नये असें लोकांस कळविण्यासाठीं त्याचेवर कांहीं खूण किं० निशाणी करणें. **दुराई मोडणें** सरकारी मनाईचें उल्लंघन करणें.

दुराग्रह [सं०] **पु०** भलत्याच कामीं हट्ट; हटवादीपणा; हेकटपणा.

दुराचरण [सं०] **न०** गैरशिस्त किं० अनीतीचें वर्तन.

दुरात्मा [सं०] **त्रि०** दुष्ट आहे अंतःकरण [ज्याचें असा.

दुरांदुरचा [म० दूर] **वि०** दूर देशाहून फार दिवसांनीं आलेला.

दुराधर्ष [सं०] **वि०** १ दुर्धर्ष. २ अजिंक्य. ३ जवळ जाण्यास कठिण. ४ भयंकर; भिवविणारा.

दुराप [सं०] **वि०** मिळण्यास किं० मिळविण्यास कठिण किं० अशक्य.

दुरापस्त, दुरापास्त [सं० दूर+अपास्त; दूर टाकलेलें किं० सारलेलें] वि० १ करावयास कठिण; दुष्कर. २ अशक्य.

दुरावणें [सं० दूर; म० दूर] अ० क्रि० दूर होणें; दूर सरणें; दूर जाणें.

दुराशा [सं०] स्त्री० १ जी सफल होण्याची शक्यता किं० संभव नाहीं अशी आशा किं० इच्छा. २ भलतीच इच्छा किं० आशा.

दुरासद [सं०] वि० मिळविण्यास किं० गांठण्यास अशक्य किं० कठिण.

दुराही स्त्री० वर ' दुराई ' पहा.

दुरित [सं०] न० १ संकट. २ पाप.

दुरील [म० दूर; सं० दूर] वि० दूरचा; दूरस्थित.

दुरुक्त [सं०] न० १ भलतेंच भाषण; अपशब्द; शिवीचा शब्द. २ कठोर भाषण. वि० निंदिलेला.

दुरुक्ति [सं०] स्त्री० १ निंदा. २ अपशब्द. ३ कठोर भाषण. ४ गालिप्रदान.

दुरुत्तर [सं०] न० १ असभ्यपणाचें उत्तर; अपमानकारक जबाब. २ प्रश्नाला लागू न पडणारें उत्तर.

दुरुद्धर [सं०] वि०ज्याचें निराकरण करणें कठिण किं० अशक्य आहे असा (दोष, विधान, इ०).

दुरू, दुरव [सं० दूर्वा] स्त्री० एक प्रकारचें [गवत.

दुरूक पु०दोन पगें चालून तिसऱ्या पगीं सोंगटी बसावयाजोगा जो डाव तो किं० जें दान तें.

दुरूग [सं० दुर्ग] न० मातीची किं० लाकडाची किल्ल्यासारखी रचना,–चैत्रमासीं गौरी बसावयासाठीं करतात ती.

दुरूस्त मागें ' दुरुस्त ' पहा.

दुरूह [सं०] वि० तर्कानें जाणावयास कठिण किं० अशक्य.

दुरोखशह, दुरूकशह पु० (बुद्धिबळांच्या खेळांत) १ घोडा इ० मोहोऱ्यांचा वजीर इ० मोहोऱ्यांवर उडी पडावयाजोगा जो राजास शह येतो तो. २ दोहोंकडून आलेला किं० येण्याचा संभव असलेला हल्ला.

दुरोखी [म० दु+रोख] वि० १ दुटप्पी.२ ज्यावर दोहोंबाजूंनीं रंगाचे छाप उठविलेले आहेत असें (वस्त्र).

दुर्ग [सं०] पु०, न० १ अडणीचा मार्ग. २ संकट. ३ किल्ला.

दुर्गंधी [सं०] स्त्री० घाण.

दुर्गम [सं०] वि० १ जाण्यास कठिण. २ दुर्बोध. न० अवघड ठिकाण,–डोंगर इ०.

दुर्गा [सं०] स्त्री० शंकराची भार्या. ॐ

दुर्गाष्टमी स्त्री० शुक्लपक्षांतील अष्टमी ही तिथि.

दुर्गुण [सं०] पु० वाईट गुण. **दुर्गुणी** वि० वाईट गुणांचा; दुराचरणी.

दुर्घट [सं०] वि० १ करावयास कठिण. २ व्हावयास कठिण.

दुर्घाण [सं० दुर् (वाईट)+म० घाण] स्त्री० वाईट वास; दुर्गंधी.

दुर्जन [सं०] पु० दुष्ट माणूस; खल जन. २ कपटी, दुष्ट. [किं० अशक्य.

दुर्जय [सं०] वि० जिंकण्यास कठिण

दुर्जर [सं०] वि० १ पचण्यास किं० पचविण्यास कठिण. २ सदा तरुण.

दुर्दर्श [सं०] वि०१ न दिसेसा. २ ज्याच्याकडे पाहावत नाहीं असा; दिपविणारा. ३ कुरूप.

दुर्दशा [सं०] स्त्री० वाईट स्थिति; मातेरें; विचका;विपन्नावस्था.

दुर्दिन [सं०] न० १ मेघांनीं आकाश व्याप्त झालें आहे असा दिवस. २ वृष्टि.

दुर्दैव [सं०] न० कमनशीब.

दुर्धर [सं०] वि० १ दुर्निवार. २ असह्य. ३ करावयाला कठिण. ४ जोखमीचा.

दुर्धर्ष [सं०] वि० १ अजिंक्य. २ जावयास कठिण; दुर्गम. ३ गर्विष्ट. ५ ज्याच्या समोर जाणें कठिण किं० अशक्य आहे असा.

दुर्नाम [सं०] स० बदनामी; बदलौकिक; अपकीर्ति.

दुर्निमित्त [सं०] न० १ कोणेकावर घातलेला खोटा आळ किं० आरोप. २ अपशकुन.

दुर्निवार [सं०] वि० १ निवारण्यास किं० टाळण्यास कठिण. २ अजिंक्य. ३ कबज्यांत आणावयास कठिण.

दुर्बल, दुर्बळ [सं० दुर्बल] वि० १अशक्त. २ निरुत्साही; म्लान. ३ गरीब, विपन्न.

दुर्बुद्धि [सं०] वि० १ मूर्ख.२ दुष्ट बुद्धीचा. **स्त्री**० दुष्ट बुद्धि; वाईटाकडे कल; भलतीच गोष्ट करण्याकडे प्रवृत्ति.

दुर्बोध [सं०] वि० १समजण्यास किं० आकलन करण्यास कठिण; ज्याचा अर्थ कळत नाहीं किं० नीटसा कळत नाहीं असें (वाक्य). २ अगाध.

दुर्भग [सं०] वि० १ दुर्दैवी. २ कुरूप.

दुर्भाग्य [सं०] न० दुर्दैव.

दुर्भिक्ष [सं०]न०१अन्नवस्त्रांच्या कमताईचा काळ; महागाई. २ कोणत्याही पदार्थाचा तुटवडा.

दुर्भेद्य [सं०] वि० फोडावयास किं०प्रवेश करावयास कठिण.

दुर्मति [सं०] स्त्री० १दुष्टपणा; कपट.२भलतीच गोष्ट करण्याकडे प्रवृत्ति. वि० दुष्ट; कपटी.

दुर्मद [सं०] वि० १ उन्मत्त. २ उग्र. ३ हेकट.

दुर्मना [सं०दुर्मनस्] वि०१उदास;अस्वस्थ. २ असंतुष्ट; खट्टू झालेला; निराश.

दुर्मरण [सं०] न० १ अपघातानें आलेलें मरण. २ हाल आपेष्टा होऊन आलेलें मरण.

दुर्मिळ [सं० दुर्+म०मिळणें] वि०१मिळावयास किं० मिळवावयास कठिण. २ क्वचित् आढळणारें. ३ महाग.

दुर्मुख [सं०] वि० १ कुरूप. २ फटकळ तोंडाचा. ३ निंदक. ४ अपशकुनी आहे दर्शन ज्याचें असा.

दुर्मुखणें [म० ‘ दुर्मुख ’ पासून] अ० क्रि० असंतुष्ट किं० खिन्न होणें; हिरमुष्टें होणें.

दुर्मुखला [म० दुर्मुखणें] वि० १ निराश किं० हिरमुष्टा झालेला. २ रुसून बसलेला.

दुर्मेधा [सं० दुर्मेधस्] वि० १ मूर्ख. २ मंदबुद्धीचा. **स्त्री**० भलतीच गोष्ट करण्याकडे प्रवृत्ति.

दुर्योग [सं०] पु० १ दुष्कृति. २ अपशकुनी योग.

दुर्लभ [सं०] वि० १ मिळावयास किं० मिळवावयास कठिण. २ क्वचित् आढळणारा किं० सापडणारा.

दुर्लक्ष, दुर्लक्ष्य [सं०] वि० १ पहावयास कठिण.२ दिपविणारें. ३ जाणण्यास किं०आकलन करावयास कठिण. न० अनवधानता; दुसरीकडे लक्ष्य जाणें; प्रकृत विषयाकडे लक्ष्य न जाणें.

दुर्लक्षण [सं०] न० १ अपशकुन. २ वाईट खोडी. ३ वाइटाकडे प्रवृत्ति; भलत्याच गोष्टीकडे कल. ❀ **दुर्लक्षणी** वि० १ अपशकुनी. २ वाइटाकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा.

दुर्लौकिक [सं०] न० बदलौकिक; बदनामी; दुष्कीर्ति.

दुर्वचन [सं०] न० १ शिवी. २ मर्मभेदक भाषण. ३ अपशकुनी भाषण. ४ खोटें वचन.

दुर्वा पुढें ‘ दूर्वा ’ पहा.

दुर्वार [सं०] वि० निवारण्यास कठिण; अनिवार्य; टाळतां न येण्याजोगें.

दुर्वासना [सं०] स्त्री० १ वाइटाकडे कल किं० प्रवृत्ति. २ भलत्याच गोष्टीची इच्छा.

दुर्विदग्ध [सं०] वि० १ मूर्ख. २ गर्विष्ठ. ३ उन्मत्त.

दुर्वृत्त [सं०] वि० १ वाईट किं० निंद्य आचरणाचा.२ व्यसनी. ३ वाईट स्वभावाचा.

दुर्व्यसन [सं०] न० अयोग्य गोष्टींचा नाद; कांहीं वाईट खोड.

दुर्व्रात्य [सं०] वि० अत्यन्त दुष्ट; अतिशय खोडकर किं० उपद्रवी; द्वाड.

दुऱ्हाई स्त्री० मागें ‘ दुराही ’ पहा.

दुऱ्हाटी स्त्री० लांब पल्ल्याची बंदूक.

दुर्हृद, दुर्हृदय [सं०] वि० १ दुष्ट बुद्धीचा; कपटी. २ कठोर अंत:करणाचा.

दुर्ज्ञेय [सं०] वि० जाणण्यास किं०आकलन करावयास कठिण किं० अशक्य; गूढ; गहन.

दुलई, दुलाई स्त्री० आंत कापूस भरून पांघरावयासाठीं वस्त्राची खोळ किं० पिशवी करतात ती; रजई; लेपडी; सुजनी.

दुलंगी [म० दु, दोन+अलंग] वि० १ वारंवार पक्ष, बाजू, किं० मतें बदलणारा. २ तंटे उपस्थित करण्याकडे प्रवृत्ति ज्याची आहे असा. ❀ **दुलंगी रेघ** (किं० **ओळ**) स्त्री० हिशेब किं० जमाखर्च पुरा झाला असें दाखवावयासाठीं काढलेली रेघ (मारणें, करणें, ओढणें).

दुलंगा स्त्री० घोड्याच्या जिनावर किं० खोगिरावर सामान भरावयासाठीं घातलेली पिशवी किं० पडशी. ॐ **दुलंगी पेच** पु० कुस्तींतील एक पेच.

दुलंड वि० दोन्ही पक्षांशीं विश्वासघात करणारा.

दुलंडी पु० एका गांवांत राहून दुसऱ्या गांवांत शेतकी करणारा किं० शेतसारा भरणारा.

दुलदुलीत वि० लठ्ठ किं० गुबगुबीत.

दुला, दुल्हा [अ० दुल्हा=नवरा मुलगा] पु० १ मोहोरमाच्या सणांत ताबुतापुढें नाचणारे लोक हा शब्द उच्चारतात. यझीद याणें हुसेनला त्याच्या लग्नाच्या अगोदरच्या रात्रीं ठार मारलें यावरून दुला किं० दुल्हा हा शब्द नवरा मुलगा याचा वाचक म्हणून उच्चारला जातो. २ कोणीही दांडगा आणि उद्धट माणूस. ३ (गोट्यांच्या खेळांत) दुसऱ्यानें खेळणारा,–' मिरी ' च्या व्यावर्तकत्वें.

दुलाई स्त्री० २ जई, लेप, लेपडी. वर 'दुलई' पहा.

दुलाची, दुलीची [म० दु (दोन)+लाता (लाथा)] स्त्री० घोडा, गाढव, इ० नीं मागल्या पायानें मारलेली लाथ. ह्या शब्दाचा प्रयोग स्त्री० अ० व० होतो; उ० दुलीच्या किं० दुलाच्या झाडणें. ' दुलच्या ' हाही शब्द ह्याच अर्थाचा आहे.

दुलाब स्त्री० भिंतीच्या पोटांत ठेविलेलें फडताळ.

दुलाबा, दुलाबी, दुलाब्या वि० इकडच्या गोष्टी तिकडे आणि तिकडच्या गोष्टी इकडे सांगून दोन माणसांत कलागती लावून देण्याचा स्वभाव ज्याचा असा; कळलाव्या; आगलाव्या.

दुल्लड स्त्री० स्त्रियांचें एक कंठभूषणविशेष.

दुवक्तां, दुवख्तां [फा० दो (दोन)+अ० वक्त (वेळ)] क्रि० वि० दोन वेळां; दोन खेपा.

दुवल [म० दु+वेळ] पु० रुपयाचा सोळावा भाग; दोन दुवाले पैसे.

दुवली [म० दुवल] स्त्री० एक आणा किमतीचें चांदीचें नाणें.

दुवळ [म० दु+वळणें] वि० दोन पदरी (दोरी); दोन पेडी(वेणी).

दुवा [अ० दु आ] पु० १ कोणी आपलें बरें केलें असतां देवाजवळ त्याचें अभिष्ट चिंतिणें. २ ईश्वरापाशीं काहीं प्रार्थना करणें. ॐ **कोणेकाला दुवा देणें** त्याचे उपकार स्मरणें.

दुवा [म० दोन] पु० तोडा, सांखळी, इ० चा एक एक अवयव पृथक्पणें.

दुवारणें [म० दु (दोन)+वार] स० क्रि० पुनरावृत्ति करणें; (तीच गोष्ट) पुन्हां करणें. पुढें ' दुसारणें ' पहा.

दुवारा [म० दु+वार] वि० दुसऱ्यांदा सडलेलें (तांदूळ इ०).

दुवारें [म० दु+वार] न० एक वेळ कांडलेल्या साळी पाखडून स्वच्छ तांदूळ होण्यासाठीं ते दुसऱ्यांदा कांडण्याची क्रिया.

दुवासन न० घोड्याच्या पुढच्या दोन पायांच्या बांधावयाच्या दोऱ्या प्रत्येक.

दुवाळ स्त्री० मागावर एकापुढें एक असे विणलेले दोन पंचे जोडीनें (फाडावयाच्या अगोदर).

दुवाळणें स० क्रि० १ (एकदा सांगितलेली हकीगत दुसऱ्या खेपेस सांगतांना ती थोडीशी) बदलून सांगणें.

दुवेत [म० दुर् (वाईट)+वेत (विणें)] न० १ गर्भिणीचे पूर्ण महिने भरावयाच्या अगोदर झालेलें गर्भपतन. २ वात्रट किं० द्वाड पोरगा. ॐ **शंभर सुवेतें पुरवतील पण एक दुवेत पुरवत नाहीं** सुरळीतपणें शंभर वेळां बाळंत होण्याचे कष्ट पुरवतील पण एका खेपेचें नासावणें पुरवत नाहीं.

दुवेत [म० दु+(दोन)+वेत (विणें)] न० गाय, म्हैस, इ०चें दुसऱ्या खेपेचें विणें किं० ह्या विण्यापासून झालेलें अपत्य म्ह० वासरूं. ॐ **दुवेत, दुवेती** वि० दोन वेळां व्यालेली (गाय, म्हैस, इ०).

दुवेतणें [म० दुर् (वाईट)+वेत(विणें)] अ० क्रि० गर्भिणीनें नासावणें.

दुवेळां, दुवेळीं [म० दु+वेळ] क्रि० वि० १ दोन वेळां. २ दोन्ही वेळां.

दुव्वा [म० दु, दोन] पु० १ पत्ते, गंजिफा, इ० तील दोन ठिपक्यांचें पान. २ फाशांचें एक दान. ३ अगस्त्याच्या फुलांतील २ ह्या आंकड्याच्या आकाराचा कोंडोसारखा बारीक असा एक अवयव.

दुःशक [सं० दुर्+शक् (समर्थ होणें)] वि० करावयास कठिण किं० अशक्य.

दुःशकुन [सं० दुर्+शकुन] पु० अपशकुन.

दुशमन, दुश्मन, दुष्मन, दुषमन [फा०] पु० वैरी; शत्रु. ❀ **दुशमनकी, दुशमनगिरी, दुश्मनी** स्त्री० शत्रुत्व; वैर. **दुशमन दावा** पु० शत्रुत्व; वैर. **दहांचा हात दुश्मनावर पडूं नये** मागें ' दहा ' मध्यें पहा. **दुश्मन असावा पण जागा असावा** शत्रु असला तरी तो पुरवेल,-पण जर तो समंजस असला तर.

दुशाख [म० दु+शाखा] स्त्री० टोकाला पेटलेल्या वातीसाठीं आंकडे असलेली काठी,-प्रकाशासाठीं.

दुशाला [हिं० दुशालाह्] पु० शालजोडी.

दुशिकडे, दुशीकडे क्रि० वि० दोहोंकडे; दोहो-बाजूंस; दोहो अंगांनीं.

दुशिलावा (-व्या) वि० कलागती लावणारा; आगलाव्या.

दुश्चित्त [सं० दुर्+चित्त] वि० दुःखी; विमनस्क; अस्वस्थ आहे अंत:करण ज्याचें असा.

दुश्चिन्ह [सं० दुर्+चिन्ह] न० १ अपशकुन. २ वाईट लक्षण. [शाप.

दुःशाप [सं० दुर्+शाप] पु० भयंकर

दुःशासन [सं० दुर्+शासन (नियंत्रणा)] वि० नियंत्रणेंत आणण्यास किं० ठेवण्यास कठिण; न वागवितां येईल असा.

दुःशील [सं० दुर् (वाईट)+शील (स्वभाव)] वि० वाईट स्वभावाचा; दुष्ट अंत:करणाचा.

दुष्कर [सं०] वि० करावयास कठिण.

दुष्कर्म [सं०] न० १ भलतेंच कृत्य. २ पाप.

दुष्काळ [सं० दुष्काल] पु० १ आपत्तीचा काळ. २ अतिवृष्टि, अनावृष्टि, टोळधाड, इ० कारणांमुळें धान्यादींची होते ती महर्घता. ❀ **दुष्काळांत** (किं० **दुकळांत**) **तेरावा महिना** पदार्थांची आधींच दुर्मिळता असून पुढची आशा करावयालाही कांहीं आधार नाहीं अशी स्थिति (भारी कष्टकारक होय).

दुष्कीर्ति [सं०] स्त्री० अपकीर्ति; बदलौकिक.

दुष्कृत [सं०] न० १ वाईट कृत्य. २ पाप.

दुष्ट [सं०] वि० १ लोकांचें वाईट इच्छिणारा; लोकांचें वाईट करण्याकडे प्रवृत्ति ज्याची आहे असा. २ दूषित; नासलेला; बिघडलेला. ३ खोडसाळ; व्रात्य. पु० शत्रु, वैरी. ❀ **दुष्टप्रतिग्रह** पु० जें घेऊं नये तें घेणें; ज्याचेपासून दान घेऊं नये त्याचेपासून दान घेणें; पापी कृत्यांकडे योजावयासाठीं घेतलेलें दान. **दुष्टाई** स्त्री० **दुष्टावा** पु० दुष्टपणा. **दुष्टस्वप्न** [सं०] न० (संस्कृतांत पु०) १ वाईट सुचविणारें स्वप्न. २ अनिष्टाची शंका,-मनाला डवचणारी. **दुष्टोत्तर** न० १ अपमानकारक उत्तर. २ प्रस्तुत विषयाला लागू न पडणारें उत्तर.

दुष्प्राप, दुष्प्राप्य[सं०] वि० न मिळण्याजोगें; जें साध्य होण्याची शक्यता किं० संभव नाहीं असें.

दुसग, दुसगाई [सं० दुःसंग] स्त्री० मत्सरादिकारणांमुळें उत्पन्न होतो तो विरोध किं० बेबनाव; कुटुंब, संस्था, इ० मध्यें मतभिन्नतेमुळें दोन तट किं० पक्ष उत्पन्न होणें; किं० असें झालेले दोन तट किं० पक्ष; किं० असे तट किं० पक्ष पडल्याची स्थिति. ❀ **दुसगीचा पाहुणा उपाशी मेला** ज्या घरांत पतिपत्नी एकमतानें चालणारीं नसताव तेथें पाहुणा पत्नीच्या वर्गाचा असल्यास पति त्याला वाईट रीतीनें वागवितो, आणि पाहुणा पतीच्या वर्गाचा असला तर स्त्री त्याची बरदास्त यथास्थित ठेवीत नाहीं (अशी पाहुण्याला पंचाइतीची स्थिति प्राप्त होते).

दुसड, दुसडा, दुसडी [म० दु+सडणें] वि० १ दोन वेळां कांडलेला (तांदूळ इ०). २ दोनदां नांगरून एका वर्षांत काढलेलीं (दोन पिकें). स्त्री० तांदुळाची दुसऱ्यांदा केलेली सड किं० कंडन.

दुसडो [म० दु (दोन)+सड (थान)] वि० दोनच आहेत आंचोळ जिला अशी (गाय, म्हैस, इ०).

दुसरणें पुढें ' दुसारणें ' पहा.

दुसरा वि० १ पहिला याच्या पुढचा आणि तिसरा याच्या मागचा क्रमांक. २ अन्य; भिन्न. ३ परकी. क्रि० वि० (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) शिवाय; आणखी असें कीं; उ० आला तो आला आणि दुसरा मला शिव्या देऊन गेला. ❀ **दुसऱ्यानें, दुसऱ्यांदा,** क्रि० वि० १ दुसऱ्या खेपेस किं० पाळीस. २ पुन्हां.

दुसवास [सं० दुर्+सहवास] पु० १ मत्सर; दुष्टावा. २ वाईट संगति.

दुःसह, दुःसहीं [सं०दुःसह] वि०१ सोसावयास कठिण; असह्य. २ मर्मभेदक.

दुसांजां [म० दु+सांज; सं० संध्या] क्रि० वि० दुपारीं आणि संध्याकाळीं अशा दोन्ही वेळीं (भोजन इ०).

दुःसाध्य [सं०] वि० १ मिळण्यास किं० मिळविण्यास कठिण (पदार्थ इ०). २ बरा न होणारा (रोग इ०). ३ जिंकतां न येईसा (शत्रु इ०).

दुसारणें [म० दु+सारणें (करणें)] स० क्रि० तीच क्रिया पुन्हां करणें,–शेत नांगरणें, पुस्तक वाचणें, पत्र लिहिणें, इ०.

दुसाला(–ली) [म० दु+फा० साल्] वि० दोन वर्षांचा (वसूल, उत्पन्न, (वर्ष) हिशेब, इ०).

दुसोटा पु० एक पीक काढून घेतल्यावर त्याच शेतांत हरभरा इ० लावतात तो.

दुस्तर [सं०] वि० १ ओलांडावयास कठिण (नदी, समुद्र, इ०). २ अजिंक्य (शत्रु इ०).

दुस्ता पु० १ वस्त्राच्या विणीमध्यें सुतें इकडे तिकडे सरल्यामुळें जीं भोकें किं० फटी पडतात त्या प्रत्येक, किं०विरळ वीण होते ती.२जीर्ण झालेल्या वस्त्रांत अशाच खिंडी उत्पन्न होतात त्या प्रत्येक.

दुहणें, दोहणें [सं० दुह्]स० क्रि० गायी, म्हशी, इ० चें दूध काढणें.टीप,–गाय, म्हैस,इ०वर कर्तृत्व येऊं शकतें; उ० मी किं० दूध यावर म्हैस दोहिली, मी दूध दोहिलें.

दुहस(–ज–)बी वि० १ दोन डोळे, दोन कान, इ० दिसतील अशा प्रकारें काढलेलें (चित्र). २ जें एका रूपांत थोडासा फेरफार करून दुसऱ्या रूपें दाखवितां येईल असें (चित्र, आकृति, आंकडा, इ०). ३ जें दोन्हींकडे लागूं करून दाखवितां येईल असें (वाक्य, इ०); उ० भाकरी कां करपली ? घोडा कां बुझला ? पानें कां सडलीं ? ह्या तीन्ही प्रश्नांचें ' न फिरविल्यामुळें ' हें उत्तर दुहसबी आहे. ४ दोन कामीं योजतां येईल असा (घोडा, माणूस, किं० कांहीं पदार्थ).

दुहार स्त्री० १ दुसऱ्या खेपेस केलेली तीच क्रिया,–नांगरणें, वाचणें, पढविणें, इ०. २ दोन ठिकाणचें (वास्तव्य, शेतकाम, इ०).

दुहांशी [फा० दो, दू+हाशीयाह्=किनारी] वि० दोनच बाजूंस कांठ असलेली (शाल इ०). याच सरणीनें ' चौहांशी '.

दुहाळ स्त्री० मागावर एकदम विणलेले दोन पंचे जोडीनें.

दुहिता [सं० दुहितृ=दूध काढणारी; दुह्] स्त्री० आपली कन्या किं० मुलगी.

दुहिंरी, दुहेरा, दुहेरी [म०दु]वि० १दुणलेलें (वस्त्र, कागद, इ०). २ पुन्हां केलेले तेंच (काम). ३ दुप्पट (खर्च,श्रम,त्रास, इ०).॰**दुहेरी इष्टराशि** पु०, स्त्री०, **दुहेरी इष्टराशिक** न० ज्यांत अज्ञात संख्या दोन किं० दोन वेळां घ्याव्या लागतात असें इष्टराशिक. **दुहेरी फासोळींचा, दुहेरी हाडाचा** वि० लठ्ठ (माणूस, जनावर).

दुही,दुई स्त्री० १ दोन माणसांत होतो तो बेबनाव.२ एका सत्येंत पडतात ते दोनपक्ष किं०तट.

दुहोतरा पु० दरमहा दरशेकडा दोन रुपये हा व्याजाचा दर.

दूक स्त्री० जोडी (दोन विटा, पेंढ्या, कौले, इ० ची).

दूड स्त्री० १ स्त्रियांचें एक कंठभूषणविशेष. २ पाणी दूरून वाहून आणावयाच्या एका माणसानें दोन भरून आणलेल्या घागरींची जोडी. ३ भाताच्या शेतांत उगवतें तें एक प्रकारचें तृण.

दूण स्त्री० १ वस्त्र, कागद, दोरी, इ० दुणल्यानें मध्यें जी मोड पडते ती. २ शेत पुन्हां नांगरण्याची क्रिया. ३ परिमाणाची दुप्पट.

दूत [सं०] पु० १ कांहीं बातमी किं० पत्र पोचविणें किं० घेऊन येणें, निरोप सांगणें, इ० कामीं नेमिलेला मनुष्य. २ एका राजाकडून कांहीं सूचना दुसऱ्या राजाकडे पोचविणारा इसम.

दूतिका, दूती [सं०] स्त्री० १ निरोप नेणारी किं० आणणारी स्त्री. २ आपुकमाषुकांचे निरोप एकमेकांना कळविणारी किं० त्यांच्या गांठी घालून देणारी स्त्री; कुंटीण.

दूध [सं० दुग्ध] न० १ अपत्यपोषणार्थ

मातेच्या स्तनांत उत्पन्न होतो तो पांढरा द्रव. २ वृक्षविशेषांचा चीक (उंबर, शेर, इ० चा). ३ नारळाच्या चवूचा रस. ४ धान्याच्या कणसांतील कोवळ्या दाण्यांतून निघतो तो पांढरा रस. ५ (लक्षणेनें) साधा माणूस किं० अजागळ माणूस. ॐ **दुधाचें वि०** अंगावर पिणारें किं० पिण्याच्या वयाचें (मूल). **दुधाचा जोर पु०** निकोप किं० नीरोगी आईच्या अंगावरच्या दुधांत जी शक्ति असते आणि जी तान्ह्याला प्राप्त होते ती. **दुधाचे दांत पु० अ० व०** मुलाला अगदीं प्रथम येतात ते दांत (येणें, फुटणें, निघणें, इ०). **दुधाधारी** [**सं०** दुग्धाहारी] **वि०** जो केवळ दूध हेंच अन्न खातो असा. **दुधानें धुतलेला वि०** निष्पाप; निष्कलंक. **दुधा भोपळा पु०** पांढरा भोपळा. **दुधाळ वि०** १ पुष्कळ दूध देणारी (गाय, म्हैस, इ०). २ दूध देते ती (भाकड नव्हे ती गाय इ०). **दुधिया पु०** एक अमली पेय. **दुधीण स्त्री०** दुध्या भोपळ्याचें झाड. **दुधपाक पु०** दूध आटवून केलेली खीर. **दुधवणी न०** ज्यांत फार पाणी घातलें गेलें आहे असें दूध. **दुधाची तहान ताकावर भागविणें** खरोखरीं आपणास पाहिजे आहे ती वस्तु किं० तितकी वस्तु मिळण्याजोगी नसल्यास तिच्यासारखी किं० तिच्याहून कमी दर्जाच्या वस्तूवर किं० त्या वस्तूच्या कमी प्रमाणावर संतुष्ट होणें (हा शहाणपणा होय). **दुधाला तुटणें** कमी दूध (गाय, म्हैस, इ० नीं) देऊं लागणें. **दुधाला फुटणें** (गाय, म्हैस, इ० नीं) ज्यास्ती दूध देऊं लागणें. **दुधाचा थेंब पु०** थोडेंसें दूध. **तुझा ओठ पिळला तर दुध निघेल, किं० अझून तुझ्या ओठावर दूध दिसतें आहे** तूं अद्यापि पोरवयाचा आहेस; तुला जगाचा अनुभव नाहीं; तूं अझून अप्रौढ वयाचा आहेस. **दुधकरीण स्त्री०** मातेला दूध नसल्यामुळें मुलाला आपल्या अंगावर पाजणारी दायी. **दूधखुळा, दुधखुळा वि०** १ साधा. २ अजागळ. **दूधदुभतें न०** १ दूध देणारे पशु,—गाय, म्हैस, इ० समुच्चयानें. २ संसारांत जरूर असें दूध, ताक, इ० समुच्चयानें. **दुधपितें न०** मातेच्या अंगावर अझून दूध पीत असलेलें मूल; तान्हें मूल.

दूम [**फा०** दूयम्=दुसरा] **वि०** खालच्या दर्जाचा. अव्वल म्ह० पहिल्या दर्जाचा; सीम्, शीम्=तिसऱ्या दर्जाचा.

दूम [**फा०** दुम्=शेपूट] **पु०** शेपटी. ॐ **कोणेकाचा दूम निघणें, (किं० दूम बाहेर पडणें)** त्याला अतोनात कष्ट होणें; तो जर्जर होणें. **कोणेकाचा दूम पुरविणें** त्याच्या पिच्छेस लागणें; त्याची पिच्छा पुरविणें.

दूर [**सं०**] **वि०** १ लांबचा (स्थल किं० काळ ह्या संबंधांत किं० प्रेम, नातें, इ० बाबतींत). २ असंभवनीय; बहुतांशीं अशक्य. ॐ **नोकर (किं० माणूस) दूर करणें** १ त्याला कामावरून किं० नोकरीवरून काढून टाकणें. २ त्याच्याशीं संबंध तोडणें किं० सोडणें. **कोणेकाला दूर धरणें (किं० दूर पाहाणें)** पूर्वीप्रमाणें त्याच्यावर प्रेम न करणें. **दूरदर्शी वि०** १ पुढच्या गोष्टी तर्कानें किं० विचारानें जाणून योग्य आचरण करणारा. २ दिव्यदृष्टि ज्याला आहे असा. **दूरदृष्टि स्त्री०** पुढचें जाणणें. **वि०** पुढचें जाणणारा; धोरणी. **दूरवर क्रि० वि०** १ सर्व गोष्टी विचारांत घेऊन किं० मनांत आणून. २ लांब अंतरावर; लांबपर्यंत. **कोणेकाचें संकट दूर करणें** तें निवारणें; त्यांतून त्याला मदत करून सोडविणें. **दूरवर विचार करून क्रि० वि०** पुढें काय काय गोष्टी होण्याचा संभव आहे हें मनांत घेऊन.

दूर्वा [**सं०**] **स्त्री० अ०व०** देवाला वाहतात तें एक प्रकारचें गवत किं० हरळी. **ए० व०** दुरब. ॐ **दूर्वाष्टमी स्त्री०** भाद्रपद शुद्ध अष्टमी ही तिथि.

दूल पु० मुलांचें एक कर्णभूषण; डूल.

दूषक [**सं०**] **वि०** १ दोष देणारा. २ निंदक. ३ लांच्छनास्पद; बट्टा लावणारें; लाजिरवाणें. ४ अपवित्र करणारें.

दूषण [**सं०**] **वि०** १ निंदिण्याची क्रिया; निंदा. २ दोष; अपराध. ३ आक्षेप. ४ स्त्रीवर बलात्कार करण्याची क्रिया; स्त्रीला भ्रष्ट करणें. ६ खराब करणें; बिघडविणें. ६ वचनभंग; करार मोडणें.

दूषणीय, दूष्य [**सं०**] **वि०** निंद्य; दोष [देण्यालायक.

दूषणें [**सं०** दुष्=बिघडविणें] **स० क्रि०** १ निंदिणें. २ अपवित्र करणें. ३ कलंकित करणें. ०ला बट्टा लावणें. ४ (स्त्रीला) भ्रष्ट करणें.

५ (प्रतिपक्षाचें विधान) सदोष आहे असें सिद्ध करणें.

दूषित [**सं०**]**वि०**१निंदिलेला.२विटाळलेला. ३ अपवित्र किं० मलिन झालेला किं० केलेला. ४ कलंक लागला आहे ज्याला असा. ५, दोषयुक्त झालेला. ६ भ्रष्ट झालेली (स्त्री).

दृक् [**सं०** ' दृश् ' चें कठोर व्यंजनापूर्वींचें रूप] **स्त्री०** १ डोळा. २ दृष्टि. ३ ज्ञान. ४ बुद्धि. ※ **दृक्तुल्य वि०** प्रत्यक्षाशीं जमणारें. ' दृश ' चें मृदु व्यंजनापूर्वीं आणि स्वरांपूर्वी ' दृग ' असें रूप होतें. त्याचे समास पुढीलप्रमाणें. दृग्गोचर, दृग्विषय **वि०** दृश्य; डोळ्यांना दिसणारें. **पु०** दृष्टीचा टप्पा किं० पल्ला. **दृग्गोल पु०** डोळ्याचें बुबूळ; डोळा.

दृढाड [**सं०** दृढ+**म०** हाड]**वि०** अवाढव्य, प्रचंड, अगडबंब.

दृढ [**सं०**] **वि०** १ पक्का; निश्चल; स्थिर. २ चिवट, कठिण; टणक. ३ चिकाटीचा; नेटदार; उ० दृढप्रयत्न. ४ (**गणित**) दुसऱ्या कोणत्याही संख्येनें भाग न जाणारी (संख्या). ※ **दृढमुष्टि वि०** ज्याच्या मुठींतून पैसा लवकर सुटत नाहीं असा म्ह० चिक्कू; कृपण. **दृढसंधि वि०** १ घट्ट विणीचें (वस्त्र). २ घट्ट रचनेचें,मजबूत बांध्याचें (घर,शरीर,इ०). **दृढभाजक पु० (गणितांत)** दोन किं० अधिक संख्यांना निःशेष भागणारा जो सर्वांत मोठा भाजक त्याला महत्तम साधारण-विभाजक किं० दृढभाजक म्हणतात.

दृढावणें [**सं०** दृढ; म० दृढ] **अ० क्रि०** दृढ होणें; पक्कें होणें; टणक होणें.

दृप्त [**सं०**] **वि०** १गर्विष्ठ.२बलिष्ठ.३ उन्मत्त.

दृश्य [**सं०**] **वि०** दिसण्याजोगा. **न०** चित्र; देखावा.

दृश्यमान [**सं०**] **वि०** दिसणारा; दृग्गोचर; दृष्टिपथांत आलेला.

दृष्ट [**सं०**] **वि०** १ पाहिलेला. २ आढळून आलेला. ३ शास्त्रोक्त.४ अनुभाविलेलें. **न०**पाहाणें; अनुभव. ※ **दृष्टान्त पु०** १ उदाहरण; दाखला. २ भूतभविष्य गोष्टींचें सूचक असें स्वप्न. ३ (**साहित्य**)प्रस्तुत विषयाचें वर्णन एका वाक्यांत केलेलें असतें आणि त्या वर्णनाचा बोध स्पष्टतर करण्यासाठीं दुसऱ्या एका वाक्यांत केवळ उदाहरण किं० दाखला ह्या नात्यानें अप्रस्तुत अशा विषयाचें वर्णन केलेलें असतें तेंव्हा दृष्टांत हा अलंकार होतो. पहिल्या वाक्यांत प्रकृत विषयाचा जो धर्म सांगितलेला असतो त्या धर्मासारखा म्ह० त्याला जाब देणारा धर्म दुसऱ्या वाक्यांत अप्रस्तुत विषयाचा सांगितलेला असतो. ' दृष्टांत ' ह्या अलंकाराचे प्रकार, उदाहरणें, विशेष खुलासा, इ० आमच्या ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. **दृष्टकूट न०** उखाणा; कोडें. **दृष्टादृष्ट स्त्री०** एकमेकांनीं एकमेकांस पाहाणें; नजरानजर. **दृष्टदोष पु०** १ खरोखरीं आपल्या हातून घडला तो दोष किं० घडलें तें पातक. **अदृष्टदोष पु०**१ पूर्वजन्मींचा दोष किं० पाप. २ आपल्या आचरणांतील लोकांना दिसणारें पातक किं० गैरशिस्त प्रकार. **अदृष्टदोष पु०** हृदयांत चिंतिलेलें पातक. **दृष्टार्थवाद पु०**इंद्रियगोचर जें कांहीं तेंच खरें असें मत. **दृष्टोत्पत्तीस येण**१अवलोकनांत येणें;आढळून येणें. **दृष्ट काढणें (किं० उतरणें** किं० **ओवाळून टाकणें)** मीठ, मोहोऱ्या, इ० हातांत येऊन तीं मुलावरून ओवाळून नंतर तीं चुलींत टाकणें (मुलावर पडलेल्या दृष्टीच्या बाधेचें निरसन व्हावें म्हणून). **दृष्टभेट स्त्री०**१आसन्नमरण अशा मनुष्याला त्याचे दूरचे इष्टमित्र येऊन त्याच्या जिवंतपणीं भेटणें; अशा दोघांची केवळ दृष्टींची भेट. २नुसती नजरानजर.

दृष्ट [**सं०** ' दृष्टि ' चा अपभ्रंश] **स्त्री०** कोणकानें कोणेकाकडे केवळ दृष्टि वळविण्यानें उत्पन्न होते ती बाधा, पीडा, किं० हानि(लागणें, पडणें, बाधणें, काढणें, उतरणें). ※ **दृष्टमणि पु०** मुलाला दृष्ट लागूं नये म्हणून जे मणि त्याच्या हातांत किं० मनगटांत बांधतात ते प्रत्येक.

दृष्टळणें, दृष्टवणें दृष्टाळणें [**सं०** दृष्टि; **म०** दृष्ट] **अ० क्रि०** कोणेकाच्या दृष्टीनें बाधा,पीडा, किं० उपद्रव पावणें.

दृष्टावा [**सं०** दृष्ट] **पु०**१ स्वप्नांत देव येऊन भेटणें. २ अनुभव. ३ प्रत्यक्ष दर्शन.

दृष्टाळा [**सं०** दृष्टि; **म०** दृष्ट] **वि०** ज्याची दृष्टि लोकांचें नुकसान करणारी आहे असा(मनुष्य).

दृष्टि [**सं०**] **स्त्री०** १ पाहाण्याचें इंद्रिय. २

पाहाणें. ३ डोळा. ४ पाहाण्याची ताकद. ५ अवलोकनाचा टप्पा किं० पल्ला. ६ पदार्थविशेषाचें लक्ष्यपूर्वक अवलोकन. ७ विचारांत घेण्याची इच्छा. ८ सदसद्विवेक बुद्धि. ९ बुद्धि. १० शास्त्र किं० शास्त्राच्या धोरणानें कांहीं विषयाचें अवलोकन, निरीक्षण, किं० विवेचन. ११ पाषाणादिकांच्या मूर्तीस चांदी इ० धातूंचीं नेत्रें लावतात तीं. १२ दुष्ट माणसाच्या केवळ नजरेनें उत्पन्न होणारी बाधा (पडणें, बाधणें). ❀ **दृष्टीस पडणें** (किं० **दृष्टीं पडणें**) आढळणें; सापडणें; दिसणें. **दृष्टि** (किं० **दृष्ट**) **काढणें** (किं० **उतरणें**) कोणेकाची दृष्टि कोणेकावर पडून जी बाधा होते तिचें निरसन करणें,–मीठ, मोहोऱ्या, इ० ओंवाळून. **कोणेकाची दृष्टि चुकविणें** त्याच्या नजरेस पडणें टाळणें. **दृष्टि मरणें** तोच पदार्थ अनेक वेळां पाहिल्यानें त्या पदार्थाच्या ठायीं असलेला अद्भुतपणा, हिडिस्सपणा, आश्चर्यहेतु, इ०चें कांहीं वाटेनासें होणें. **दृष्टि चोरणें** कोणेकाच्या नजरेस न पडणें. **कोणेकाची दृष्टि ओळखणें** त्याच्या चेहेऱ्यावरून त्याचें मनोगत जाणणें. **दृष्टि घालणें** डोळ्यानें कोणेकाला कांहीं इशारत करणें. **दृष्टि चढणें** उन्मत्त किं० गर्विष्ट होणें. **दृष्टि चुकणें** करावयाची गोष्ट आयत्या वेळीं लक्ष्यांत न येणें किं० न सुचणें. **दृष्टि निवळणें** १ बिघडलेले डोळे विश्रांति जाऊन पुन्हा पूर्वीसारखे स्वच्छ होणें. २ उन्माद, गर्व, ताठा. इ० नाहींसा होणें. **दृष्टीचा पापी, दृष्टीचा खोटा** दुसऱ्याचें चांगलें ज्याला पाहावत नाहीं असा; मत्सरी. **दृष्टीची मुरवत राखणें** दुसऱ्याला जें आवडणार नाहीं तें त्याच्या देखत न करणें. **त्याच्या माझ्या चार दृष्टि झाल्या** त्याची आणि माझी गांठ पडून विचारविनिमय झाला; त्याचें आणि माझें खलबत झालें. **दृष्टी आड सृष्टि** मागें 'आड' **क्रि० वि०** मध्यें पहा **दृष्टीचें पारणें फिटणें** जें पाहावें अशी अत्यन्त उत्कट इच्छा असते तें पाहावयाला मिळाल्याकारणानें समाधान पावणें. **त्या दृष्टीनें क्रि० वि०** १ त्या धोरणानें. २ त्या उद्देशानें. ३ त्या बाजूनें. **कांहीं वस्तु दृष्टोत्पत्तीस पाडणें** ती दिसेल असें करणें. **दृष्टिकोन पु०** १ पदार्थविशेष आपण ज्या दिशेकडून पाहात आहों ती त्या पदार्थाची दिशा. २ एकाद्या पदार्थाचा जो गुण, धर्म, उपयोग, इ० आपण विचारांत घेत आहों तो गुण, धर्म, उपयोग, इ०नीं आपल्या विचाराला लागणारी सरणी. **दृष्टिपथ पु०** अवलोकनाचा पल्ला; नजरेचा टप्पा. **दृष्टिविकार पु०** दुष्ट मनुष्याच्या दृष्टीनें होते ती बाधा. **दृष्टीचा अमल पु०** १ अवलोकनाची मर्यादा. २ नजरेंत किं० पाहण्यांत आलेल्या काळाचा अवधि. ३ चांगल्या दृष्टीनेंच कांहीं गोष्ट चांगली करण्याचें सामर्थ्य. **दृष्ट्या क्रि० वि०** दृष्टीनें. **दोषदृष्ट्या क्रि० वि०** दोष काढण्याच्या बुद्धीनें. **गुणदृष्ट्या क्रि० वि०** गुण काढण्याच्या किं० दाखविण्याच्या बुद्धीनें किं० उद्देशानें. **विहंगदृष्टि, विहंगमदृष्टि स्त्री०** विषयाच्या तपशिलांत न शिरतां त्याच्या स्थूल भागांचेंच अवलोकन. **विहंगदृष्टीनें** किं० **विहंगमदृष्टीनें क्रि० वि०** तपशिलांत न शिरतां केवळ स्थूल गोष्टीच विचारांत घेऊन (केलेलें परीक्षण, अवलोकन, इ०).

देऊं पासरी [**म०** देण्याच्या वेळची+पांच शेरांचें वजन किं० माप] **स्त्री०** गिऱ्हाइकाला माल विकतेसमयीं तो माल मोजावयाची पासरी (कमी परिमाणाची). **वि०** दुसऱ्याला योग्य असेल त्याहून कमी देणारा; चिकू. **घेऊं पासरी स्त्री०** माल विकत घेतांना दुकानदार योजतो ती खोटी पासरी (अधिक परिमाणाची). **वि०** दुसऱ्याचा पदार्थ लाटण्यांत कुशल किं० तरबेज.

देऊळ [**स०** देव+कुल] **न०** देवालय; देवाची मूर्ति जेथें संस्कारपूर्वक स्थापिली आहे तें घर किं० ती जागा. ❀ **देऊळवाडा पु०** देवळाच्या आसमंतात भागीं गुरव, पुजारी, इ०नीं वसविलेली वाडी किं० वसाहत. **देऊळ घांट स्त्री०** १ देवळांत देवापुढें टांगलेली घांट. २ वटवट्या; एकसारखा आणि मोठ्या आवाजानें सदा बोलत असतो तो.

देकार [**म०** देणें] **पु०** १ देणें. २ लग्न, मुंज, इ० समारंभांत दक्षिणा इ० रूपानें होणारा दानधर्म (देणें, करणें, होणें).

देख [**म०** देखणें=पाहाणें] **पु०** देखावा; अवलोकन. ❀ **देख दाखविणें** कांहीं गोष्टीचा आविर्भाव करणें. **देखदुखी, देखदुख्या वि०** दुसऱ्याचें चांगलें पाहून ज्याला दुःख होतें असा; मत्सरी. **देखभट्टी स्त्री०** कांहीं कला किं० कौशल्य केवळ पाहून

शिकण्याचा प्रकार. **ऐकभट्टी** **स्त्री०** कांहीं कला किं० कौशल्य केवळ ऐकीव माहितीवरून शिकण्याचा प्रकार. **देखभट्टीचें ज्ञान** कांहीं विशिष्ट कृति केवळ पाहून तिच्या संबंधानें प्राप्त झालेली माहिती. **देखरेख** **स्त्री०** कांहीं काम यथास्थित होत आहे किंवा नाहीं हें पाहाणें किं० याच्या संबंधानें काळजी वाहाणें.

देखचा, देगचा पु०, देचकें न० स्वयंपाकांत ज्याचा उपयोग केला जातो असें एक धातूचें पात्रविशेष.

देखणा [**म०** देखणें] **पु०** दृष्टि मोहविणारा किं० ओढून घेणारा; सुंदर.

देखणाऊ [**म०** देखणें] **वि०** केवळ दिसण्यांत सुंदर पण भिकार किं० नादान.

देखणें [**सं०**दृश=पाहाणें]**स०क्रि०**१पाहाणें; अवलोकिणें; निरेखणें. २ शोधणें; कांहीं पदार्थासाठीं स्थलविशेष धुंडाळणें. ꕥ **देखूं शकणें** पाहूं शकणें; शांत मनानें पाहाणें. ह्या वाक्प्रचाराचा उपयोग अकरणरूपी होतो; हा वाक्प्रचार मत्सर, दुष्टपणा, इ० दाखवितो; उ० रामभाऊंच्या दोन बायकांपैकीं एकीशीं तो कांहीं बोलला तर दुसरी तें देखूं शकत नाहीं. **टीप**,–ह्या वाक्प्रचाराचा अर्थ जोरदार करण्यासाठीं ' दोहीं डोळ्यांनीं ' ह्या शब्दांची जोड ' देखूं ' च्या मागें दिली जाते. **देखादेखी, देखोवेखी, देखोवखी, देखोदेखी, देखोदेखों वाखी** **स्त्री०** १ स्पर्धा. २ अनुकरण. **क्रि० वि०** १ स्पर्धेनें. २ पाहातां पाहातां.

देखत, देखतां [**म०** देखणें] **क्रि० वि०** १ (कोणेकाच्या) समक्ष; उ० रामभाऊंनीं माझ्यादेखत त्या चोराच्या थोबाडींत लगावली. २(कोणेकाच्या) हयातींत; उ० माझ्यादेखत माझ्या मुलाला नोकरी लागली हें फार चांगलें झालें. ꕥ **देखत सोदा** (किं० **लुच्चा, लबाड,** इ०) धडधडीत किं० सर्व लोकांस ठाऊक असा सोदा, इ०. **देखतचिठ्ठी, देखतपत्र, देखतहुकूम क्रि० वि०** चिठ्ठी (किं० पत्र किं० हुकूम) पाहातांच किं० पाहिल्याक्षणींच. **देखतचोर** **पु०** मालक जवळ किं० शेजारीं असतां चोरी करणारा चोर; अट्टल किं० वस्ताद चोर. **देखत भूल (–भुली)** **स्त्री०** नजरबंदी; दृष्टीला भ्रम पडून झालेली फसणूक (गारोड्याच्या कौशल्यानें होते ती).

देखवा,देखावा [**म०** देखणें] **पु०**१आपल्या स्वताच्या रूपाचें किं० आपल्या अंगच्या विद्यादि गुणांचें केवळ ईषन्मात्र प्रकाशन किं० प्रकटीकरण; उ० पावसानें देखवा मात्र दाखविला पण तेवढ्यानें काय होणार ? २ केवळ दृष्टीस पडणें ही क्रिया; उ० तुकोबा येथें येऊन नुसता देखवा दाखवून गेला; त्याणें तिकडची कांहीं खबर सांगितली नाहीं. **टीप**,–ह्या दोन्ही अर्थीं ' देखवा ' किं० ' देखावा ' यांच्या पुढें ' दाखविणें ' हें क्रियापद येतें. ३ खोटा आविर्भाव (करणें); उ० तिला प्रेमाचा देखावा करतां येतो. ४ निसर्गाचें, काढलेल्या चित्राचें, गौरीपुढें मांडलेल्या पदार्थादिकांचें एका दृष्टिनिक्षेपांत दिसणारें रूप (दिसणें, दाखविणें, करणें, मांडणें, इ०). **टीप**,–ह्या शेवटच्या दोन्ही अर्थीं ' देखावा ' हा शब्द अधिक प्रचलित आहे.

देखाऊ, दिखाऊ [**म०** देखणें, दिसणें]**वि०** दिसण्यांत भपकेदार पण खरोखरीं भिकार किं० नादान.

देखी [**म०** देखणें] **स्त्री०** दृष्टिपात; अवलोकन. ꕥ **कोणेकाच्या देखीचा वि०** त्याचें अनुकरण करणारा; त्याचा कित्ता उचलणारा.**देखींचें न०** देवी हा आजार (येणें). देवींनीं ग्रस्त माणसास पाहिल्यानें देवी येतात अशी समजूत आहे.

देखील क्रि० वि० सुद्धां; उ० राजा देखील त्या साधूच्या पायां पडला; उ० तो काशीहून आला पण मला भेटला देखील नाहीं. **टीप**,– 'देखील,' चीं अपभ्रष्ट रूपें ' दिखीत ' ' देखीत, ' ' दिखीद, ' ' देखून ' हीं होत. ꕥ **देखीलबावती क्रि० वि०** सर्व बाबतींसहवर्तमान; उ० यंदा शेतास देखीलबाबती पांच मण धान्य पडतें.

देखींव [**म०** देखणें] **वि०** प्रत्यक्ष पाहिलेली (गोष्ट, वृत्तान्त, इ०). याच्या व्यावर्तकत्वें ' ऐकीव ' म्ह० केवळ ऐकिलेली (खबर, इ०).

देग [**फा०**] **स्त्री०**धातूचें पात्रविशेष.

देगचा,देखचा पु०,देचकें न० स्वयंपाकांतील एक धातूचें भांडें.

देघे [**म०** देणें+घेणें] **स्त्री०** देणें आणि

घेणें; उसनें देणें आणि उसनें घेणें ह्या रूपाचा व्यवहार.

देज [म० देणें] न० वरपक्षानें वधूपक्षाला दिलेला पैसा.

देटपुळी स्त्री० काळपुळी.

देठ, देट पु० १ पान, फूल, फळ, इ० फांदीला ज्या अवयवानें चिकटलेलीं असतात तो अवयव. २ अंगीं सामर्थ्य उत्पन्न करणारा कांहीं गुण किं० आश्रय किं० आधार; उ० त्यानें घोडे घेतले, पालखी घेतली हें सर्व पैशाच्या देठीं (किं० त्याला दिवाणगिरी मिळाली तिच्या देठीं). ॐ **देठ कळवळणें** (किं० **पिळणें**), **देठाला पीळ पडणें, देठाला माया येणें** आपल्या प्रेमाच्या माणसाच्या सुखानें सुख पावणें आणि दुःखानें दुःख पावणें **कोणेकाला कोणेकाच्या देठीं ठेवणें** त्याला त्याच्या आश्रयास ठेवणें; त्याच्यावर त्याच्या सुस्थितीची जबाबदारी घालणें. **कांहीं काम, कारभार, व्यापार, इ० देठीं लागणें** तें सुरळीतपणें चालूं लागणें. **देठीं लावणें** १ आधार किं० उगम शोधून काढणें. २ योग्य सरणीस लावणें. **देठचा तुटलेला** वि० १ नवशिका. २ उपटसुंभ. **देठसुटा** वि० गळून किं० तुटून पड-ण्याच्या स्थितींत असलेलें (फळ, फूल).

देंडारी स्त्री० ए० व०, **देंडाऱ्या** स्त्री० अ० व० १ हगणें आणि ओकणें (देणें). २ लाटलेला पैसा परत देण्याच्या प्रसंगांत सांपडणें (देणें). **टीप**,–ह्या दोन्ही अर्थीं ' देंडाऱ्या ' असा अ० व० प्रयोग होतो.

देणगी [म० देणें] स्त्री० १ जें बक्षीस दिलें तें. २ पारितोषिक; बक्षिशी; नजराणा.

देणावळ [म० देणें] स्त्री० मजुरी (कांहीं कामाबद्दल). ॐ **जशी देणावळ तशी धुणा-वळ** कपडे धुण्याबद्दल अधिक मजूरी दिली तर परीट अधिक काळजीनें कपडे धुवील.

देणी [म० देणें] स्त्री० (गंजिफांच्या खेळांत) द्यावयाच्या गंजिफांचा तलफ.

देणें [सं० दा] स० क्रि० १ वस्तूवरचें आपलें स्वामित्व दुसऱ्याच्या स्वाधीन करणें; उ० माझ्या सासऱ्यानें मला दिवाळसणाला सहेजोडी दिली. २ कांहीं वस्तु कांहीं उद्देशानें कांहीं काळ दुसऱ्याच्या हवालीं करणें; उ० आज मी परटाला चवदा कपडे दिले ते मी वहींत मांडून ठेविले. ३ अर्पिणें; बहाल करणें; उ० बादशहानें त्याला ' राजा ' हा किताब दिला. ४ कांहीं इंद्रिय कांहीं विषयाकडे लावणें; उ० लक्ष्य देणें, कान देणें, चित्त देणें, इ०. ५ विद्या, कला, कसब, युक्ति, इ० जी आपणास विदित आहे ती दुस-ऱ्यास शिकविणें किं० पढविणें. **टीप**,–' देणें ' या क्रिया-पदाचे अर्थ पुढील वाक्प्रचारांवरून स्पष्ट होतील. **मला सारा लिहूं देत नाहीं** वाऱ्या-मुळें मला लिहितां येत नाहीं. **कोणेकाला शिवी देणें** त्याला गालिःदान करणें. **कोणेकाला आशी-र्वाद देणें** त्याला त्याचें अभिष्ट मिळो किं० त्याचें कल्याण होओ अशी आपली इच्छा प्रकट करणें. **कोणेकाला शाप देणें** त्याचें अमुक वाईट हो-ओ अशी आपली इच्छा प्रकटिणें. **आज्ञा देणें** १ हुकूम करणें. २ जावयाला संमति दर्शविणें. **निरोप देणें** जावयाला संमति किं० परवानगी दर्शविणें. **एकाद्या कामाकडे चित्त देणें** तें लक्ष्यपूर्वक करणें किं० चालविणें. **कान देणें** लक्ष्यपूर्वक ऐकणें. **कष्ट देणें** कष्टविणें; उपद्रविणें; सतावणें. **वाट देणें** वाट मोकळी सोडणें. **झाडांना पाणी देणें** त्यांचेवर पाणी शिंपडणें किं० पाटाचें पाणी त्यांचेकडे वाहूं लागेल असें करणें. **कोणेकाला लढाई देणें** त्याच्याशीं लढणें. **हें भाषांतर मला करून दे** कृपा करून मजसाठीं हें भाषांतर कर. **खांदा देणें** खांद्याचा नेट लावणें; खांद्यानें भार सोसणें. **हें व्यसन सोडून दे** सोडच सोड. **देणें नास्ति घेणें नास्ति (देणन् नास्ती घेणन् नास्ती)** कृति कांहींच नाहीं; शुष्क बेत, वाटाघाटी, वल्गना, किं० बढाया. **देतां घेतां** क्रि० वि० प्रत्यक्ष खरेदी किं० विक्री करण्याच्या प्रसंगीं. **देणेंघेणें** [म० देणें+घेणें] न० पैसे उसने देणें, उसने घेणें, इ० रूप पैशाचा व्यवहार.

देता [म० देणें] वि० देण्याकडे कल अस-लेला. ॐ **देताघेता** पु० नेहेमीं ठराविक प्रकारें देण्याघेण्याचा व्यवहार करणारा. **देतांघेतां खळ-खळ** स्त्री० प्रपंचाच्या बाबतींचा खटाटोप. **देतावणा (–ना)** [म० देणें] वि० देण्या-कडे कल असलेला; याच्या उलट ' घेतावणा. '

देदीप्यमान [सं०] वि० तेजस्वी. **दैदीप्यमान** हें अपभ्रष्ट रूप.

देपोघेपो [म० देणें+घेणें] स्त्री० देण्याघेण्याच्या खटपटी किं० उपद्रव; व्यवहाराचा त्रासदायकपणा किं० कष्ट.

देय [सं०] वि० देण्याजोगें; जें द्यावयाचें तें; द्यावयाला पाहिजे तें. [लावणें).

देर [हिं०] स्त्री० उशीर, विलंब (लागणें,

देव [सं०] पु० १ स्वर्गस्थ जे इंद्र, बृहस्पति, इ० ते प्रत्येक. २ ईश्वर; परमेश्वर. ३ पूजा करावयासाठीं काष्ठपाषाणादिकांच्या घडविलेल्या मूर्ति प्रत्येक. ४ पर्जन्याची देवता. ५ (नाटकग्रंथांत) राजा. ६ कोणीही संमान्य पुरुष. ७ अंगांत येतें किं० संचरतें तें भूत. ‌‌ॐ **देवऋण, देवर्ण** न० यज्ञयागादि कृत्यें देवांच्या प्रीत्यर्थ करावयाची तीं समुच्चयानें (फेडणें). **मानला तर देव नाहीं तर धोंडा** पदार्थाकडे किं० माणसाकडे आपण पूज्यतेच्या भावनेनें पाहिलें तर त्याचा आपणास उपयोग होईल किं० त्यांच्यापासून आपणाला लाभ होईल; तुच्छतेच्या भावनेनें पाहिलें तर त्याचा आपणास कांहींही उपयोग होणार नाहीं किं० त्यांच्यापासून आपणाला कांहींच लाभ होणार नाहीं. **कोणेकाला देवदेव करणें** त्याची फार फार आर्जवें किं० प्रार्थना करणें. **देव होऊं लागणें** गर्विष्ठ किं० उन्मत्त होऊं लागणें. **देवाचें नांव आणि आपला गांव** दुसऱ्याची वस्तु आपली म्हणून वापरणें. **देवाचें नांव घेणें** कार्याला आरंभ करणें (कोणतेंही काम करतांना देवाचा आशीर्वाद मागण्याच्या चालीवरून). **देवानें डावा देणें** देवानें आपली इच्छा अमान्य करणें. **देवानें उजवा देणें** देवानें आपली कामना पुरविण्याचें आश्वासन देणें. **देवानें भरलें धरणें** देवानें किं० अंगांत संचरलेल्या भुतानें आपण त्याला विचारल्या प्रश्नाला कांहींच उत्तर न देणें; त्यानें आपली इच्छा सफल होईल किं० निष्फल होईल हें कांहींच न दर्शविणें. **देवावर हवाला** (किं० भिस्त) **ठेवणें** देव काय करील तें करो असें म्हणून शांत राहाणें. **देवावरचीं तुळशीफुलें उचलणें** तीं उचलून शपथ वाहाणें. **देवावरचें फूल** (किं० बेल)**काढणें** फूल (किं०बेल)काढून शपथ घेणें. **देवास करणें, देवाला करणें** कांहीं अद्भुत किं० आश्चर्यकारक गोष्ट घडली म्हणजे हा उद्गार काढला जातो; देवानें मनांत आणलें तर तो काय करू शकणार नाहीं ? तो सर्व कांहीं करूं शकेल. **देवास पेचणें** आपल्या शत्रूचा सत्यानाश कर म्हणून देवाला गाऱ्हाणें घालणें. **देवासारखा बसणें** खोड्या न करतां अगदीं स्वस्थ बसणें (मुलासंबंधानें). **न देवाय न धर्माय** देवाच्या कार्याला नव्हे आणि धर्माच्याही कार्याला नव्हे ! व्यर्थ किं० अनाठायीं खर्च केला गेला. **देव कराया दोन डुया, किडवळ कराया तीन डुया** एकाद्या राजाच्या मनांत प्रजाजनांला उत्कर्षाच्या स्थितीस चढवावें असें आलें तर तें तो दोन पिढ्यांत म्ह० साठ वर्षांत करूं शकतो आणि प्रजाजनांला अपकर्षाच्या स्थितीत लोटावें असें आलें तर तो तें तीन पिढ्यांत म्ह० नव्वद वर्षांत करूं शकतो. डोई किं० डुई म्ह० पिढी. किडवळ म्ह० हीन, दीन, दुबळे, परावलंबी, तुच्छ, असे प्राणी. **देव देव्हाऱ्यांत नसणें** १ जो मालक तो स्थानावर नसणें; ठिकाणावर देखरेख करणारा नसणें. २ मन (म्ह० शरीराचा चालक किं० प्रेरक) स्वस्थ नसणें; मन फिकीरींत असणें. **देव पावला** देवानें मनोरथ पुरविला; जें पाहिजे होतें तें घडून आलें; मनाजोगी गोष्ट घडून आली. **कोणेकाला देवाज्ञा होणें** तो मरणें; शब्दशः,—याला देवाकडून बोलावणें येणें. **देव तुमचें भले करो** ! देव तुमचें कल्याण करो ! **टीप,**—बोलतांना शब्द किं० मजकूर सुचला नाहीं म्हणजे तो सुचेंतोंपर्यंत हें वाक्य वेळ भरून काढण्यासाठीं रेंगाळत रेंगाळत उच्चारण्याचा परिपाठ आहे. **देवमाणूस** पु० १ देवतुल्य माणूस. २ ज्याच्या ठायीं लबाडी नाहीं असा माणूस; सरळ आणि साधा माणूस. ३ उपकारशील माणूस. ४ आपल्या ऐन अडचणीच्या समयीं ओळखपाळख नसतां जो आपण होऊन आपल्या मदतीला येतो तो. **देवकळा** स्त्री० देवाला योग्य तो मान; देवाचा मोठेपणा; देवत्वाचें वैभव. **टांकीचे घाव सोसल्यावांचून देवकळा येत नाहीं** अपरंपार कष्ट सोसावे तेव्हांच वैभवाची स्थिति प्राप्त होते. **देवकार्य** न० धर्मकृत्य; कुलधर्मानुसार जीं कुलदेवतांची पूजा इ० अनुष्ठान तें. **देवखोली** स्त्री०,

देवघर न० घरामध्यें ज्या खोलींत कुटुंबाच्या पूजावयाच्या देवांच्या मूर्ति ठेविलेल्या असतात ती खोली किं० ती जागा. **देवगण पु०** जन्मनक्षत्रावरून पाहाण्याचा पुरुष किं० स्त्री यांचा घटितोपयोगी एक गुण आहे तो. मनुष्यगण आणि राक्षसगण असे आणखी दोन आहेत. **देवगत, देवगति, दैवगति स्त्री०** १ जगाची रहाटी. २ अमुक गोष्ट कां घडली किं० कशी घडली हें जिच्या संबंधानें सांगतां येत नाहीं ती गोष्ट किं० तिचें घडणें. ३ यदृच्छा. **देवगाय स्त्री०**मखमली किडा. **देवऋषि, देवरुषी पु०** बायाबापड्या किं० अडाणी माणसें यांना बाता झोंकून नादीं लावून पैसे उकळणारा साधुत्वाचा आविर्भाव करणारा लुच्चा माणूस. **देवनागरी स्त्री०** बालबोध लिपि; हें पुस्तक ज्या लिपींत छापिलें आहे ती. **देवदत्त पु०** कोणीतरी मनुष्य,–ज्याचें नांव सांगण्याची जरूरी नाहीं; एक मनुष्य–मग तो कोणी कां असेना; कोणीतरी मनुष्य,–ज्याचें कांहीं महत्त्व नाहीं; कोणीतरी; फलाणा; उ० देवदत्ताचा खून करणाराला फांसावर चढविलें म्हणून देवदत्त कांहीं जिवंत होत नाहीं. येथें ' देवदत्ताचा खून ' म्ह० कोणाही माणसाचा खून असा अर्थ. याच प्रमाणें योजावयाचे अन्य शब्द, ' गोमा गणेश पितळीदरवाजा, ' 'गोमाजी कापशे,' 'गोमाजी तिमाजी, ' इ० हे आहेत. **देवदत्त पु०** पांच उपप्राणांपैकीं एक. **देवदारु पु०** एक वृक्षविशेष. **देवदेव पु०** देवांचें पूजन, प्रदक्षिणा, नामस्मरण, स्तोत्रपाठ, इ० अनुष्ठान. **देवदेव्हारे पु० अ० व०** १ कांहीं संकटाच्या निवारणार्थ देवाला नाना प्रकारें आळविणें (करणें). २ देवपूजादिकांचें अवडंबर(माजविणें). **देवद्वार न०**स्नान,संध्या, इ० पुण्यकर्मोचित आणि देवाच्या सांनिध्याला असलेलें स्थळ;उ०देवद्वारीं थट्टामस्करी करणें योग्य नाहीं. **देवनदी स्त्री०** भागीरथी. **देवपुरी स्त्री०** ज्या घरीं कोणाही माणसाला येण्याजाण्याला प्रतिबंध नसतो असें घर. **देवप्रतिष्ठा स्त्री०** देवालयांत नव्या देवाच्या मूर्तीची स्थापना. **देवब्राम्हण पु० ए०व०** तीर्थाच्या स्थानीं गेलें असतां देवास नैवेद्य, आणि ब्राह्मण आणि सुवासिनी यांस भोजन घालण आणि दक्षिणा देणें,हा जो विधि तो(करणें).

देवभक्ति स्त्री० पिशाचाच्या उपद्रवाच्या निवारणासाठीं अंगारा लावणें इत्यादि रूप जें करणें तें. **देवभक्ति माजविणें** भाविकपणाचें अवडंबर करणें किं० ढोंग वाढविणें. **देवभक्त्या पु०** अंगारा लावून रोग बरे करण्याचें ढोंग माजविता तो. **दैवभात न०** मनुष्यानें न पेरतां तळें इ० चे स्थळीं उगवतें तें भात. **देवभोळा वि०** निरंतर देवाची नामस्मरणादि रूपानें सेवा करणारा आणि देवाची म्हणून सांगितलेलीं कांहींही कृत्यें खरीं मानणारा सात्त्विक मनुष्य. **देवयोनि वि०**इंद्रादि देवाचें आश्रयें करून राहाणारे विद्याधर, गंधर्व, किन्नर, इ० ज्या जाति त्यांपैकीं कोणीही (व्यक्ति). **देवाला जाणें** देवळांत देवाच्या दर्शनार्थ जाणें.

देवक [सं० ' देव ' पासून] **न०**लग्न,मुंज, इ० कार्यांत देवतादिकांची स्थापना; देवकप्रतिष्ठा; देवदेवक; (बसविणें, ठेवणें,उठविणें). ꣸ **देवकोत्थापन न०** देवकाचें उत्थापन.

देवजी, देवजीधसाडा पु० १ माकडाच्या खेळांत नरमाकडाला ' देवजीधसाडा ' ही पदवी दिली जाते.२कोणीही कुरूप किं० दांडगा माणूस.

देवड स्त्री० एकामागून एक अशा तगादा करावयाला पाठविलेल्या अनेक माणसांची मालिका, (चालविणें, बसविणें, लागणें, बसणें, लावणें); उ० पाठोपाठ दहा माणसें तुम्हीं मला बोलवावयाला पाठविलीं, अशी देवड तुम्ही कशाकरतां लावली ? ꣸ **देवडचाल स्त्री०** घोड्याची एक प्रकारची चालण्याची पद्धति. **देवडमार पु०** बंदुका तोफा, इ० चा एकसारखा कडकडाट.

देवडाकाटी [नंदभाषेंत] **वि०** तीस.

देवडी (–ढी) [सं० देहली] **स्त्री०** मोठ्या वाड्याच्या दरवाज्याच्या आंतल्या दोन बाजूंस किं० बाहेरच्या दोन बाजूंस उंच जोतीं करून बसावयाजोग्या जागा केलेल्या असतात त्या.

देवत [सं० दैवत] **न०** १ देव; आपली ज्यावर विशेष भक्ति आहे असा देव. २आपणाला अत्यन्त प्रिय वस्तु, माणूस, पशु, इ०. ꣸ **देवतवार पु०** आपल्या कुलदेवतेस दमनारोपण, पवित्रारोपण, इ० करण्याचा वार्षिक दिवस.

देवता [सं०] **स्त्री०** १ देव. २ यच्चयावत्पदार्थांचे अभिमानी जे ईश्वरांश ते प्रत्येक

उ० वनदेवता, जळदेवता, वृक्षदेवता, इ०. ॐ **देवतार्चन** न० १देवाच्या मूर्तींची पूजा. २ह्या पूजेला लागणारें सहाण, खोड, इ० सामग्री. **देवतावाहन** न० १देवाच्या मूर्तींचे ठायीं देवाची प्रतिष्ठापना. २मंगल कार्याच्या आरंभीं देवांना करतात तें आमंत्रण. **देवताळा** वि० देवाची पूजाअर्चा इ० चें फाजिल अवडंबर माजविणारा. **देवताळें** न० देव- पूजेचें माजविलेलें फाजिल अवडंबर. **देवतोत्थापन** न० मंगल कार्याच्या समाप्तीनंतर देवांचें विसर्जन. **देवरुखा** पु० ब्राह्मणांची एक जाति. **देव- रुखी** स्त्री० देवाल्यादि स्थळीं देवमूर्त्यादि ठेवण्या- करतां मोठा सुशोभित जो कोनाडा राखिलेला असतो तो. **देवलंड** वि० देवाप्रीत्यर्थ जें कांहीं कर्म करावयाचें तें जो करीत नाहीं तो. **देवलोक** पु० स्वर्ग. **देवसकी** [सं० देव+आसक्ति] स्त्री० १ देवाची भक्ति. २ प्रतिग्रामीं ग्रामदैवतसंबंधीं वार्षिक उत्सवादिरूप जो विधि करतात तो. **देवांना प्रिय** [सं० देवांना आवडता] पु० १ मूर्ख किं० अजागळ माणूस. २ देवाच्या भज- नांत निमग्न असा साधु पुरुष. **देवापुढचा देव** पु० १ शंकराच्या पुढचा देव म्ह० नंदीबैल. २ ठोंब्या; बैलोबा.

देवळी स्त्री० घराच्या भिंतींत वस्तु ठेवण्या- साठीं जी रिकामी जागा बांधून काढलेली असते ती; कोनाडा. पु० भाविणीच्या पोटीं जन्मलेला मुलगा.

देवाणघेवाण [म० देणें+घेणें] न० १ पैसे उसने देणें आणि घेणें इ० रूप व्यवहार. २ उप- काराची किं० अपकाराची फेड.

देवातपत्र न० भलावण पत्र.

देवारणें न० १ अर्धा कोस हें अंतर. २रस्त्याचें अंतर किं० लांबी दाखविण्यासाठीं अर्ध्या अर्ध्या कोशांच्या अंतरावर खुणेसाठीं जी दगडांची रास केलेली असते ती. ३डोक्यावरची ओझीं विश्रांतीसाठीं उतरतां येण्याच्या सोयीची रस्त्याच्या कडेवर केलेली रचना.

देवी [सं०] स्त्री० १ देवाची स्त्री; देवस्त्री. २ दुर्गा. ३ सरस्वती. ४ सावित्री. ५ पट्टराणी. ६ अंगणांत विश्रांतीसाठीं बांधलेला ओटा. ७ विस्फोट रोग (येणें, काढविणें, कानपणें, सुकणें). टीप,— ह्या अर्थी प्रयोग अ० व० होतो. ॐ **देवी जाग- विणें** देवीच्या प्रसादनार्थ केलेल्या व्रताच्या अंग- त्वानें देवीपुढें जागत बसणें. **देवी देवळांत पण नायटे मुलखांत** खल जनाच्या दुष्ट कृत्यांचा प्रसार दूरवर आणि खोलवर होतो. **देवींचा थाट** पु० अंगावर आलेल्या देवी लठ्ठ लठ्ठ फुगणें.

देव्हारा [सं० देव+अगार] पु० १ नित्य पूजावयाच्या देवांच्या मूर्ति ठेवण्यासाठीं काष्ठा- दिकांची घुमट असलेली जी लहानशा घरासारखी रचना केलेली असते ती. २ देवपूजेचें माजविलेलें अवडंबर. ह्या अर्थी ' देव्हारा माजविणें ' किं० 'देव्हारें माजविणें' असे प्रयोग होतात. ॐ **कोणे- काचा देव्हारा फैलावणें** (किं० **माजणें** किं० **वाढणें**) (नादान मनुष्य) वैभवास चढणें. **देव्हारा माजविणें** (किं० **वाढविणें** किं० **मांडणें**) १ देवपूजादिकांचें अवडंबर करणें. २ भूतपिशा- चादिकांवर आपला अमल चालतो असे सांगणें. **कोणकाच्या देवाऱ्यांत देव नाहींसे होणें** तो अत्यन्त घाबरून जाणे किं० आश्चर्यचकित होऊन जाणें. **कोणेकाला देव्हाऱ्यांत बसविणें** (किं० **मांडणें**), **कोणेकाचा देव्हारा** (किं० **कोणेकाचे देव्हारे**) **माजविणें** त्याला नसतें महत्त्व देणें; त्याची फाजील महती गाणें; त्याचें फाजील गौरव करणें.

देव्हारें [म० 'देव्हारा' चें लघुत्वदर्शक रूप] न० १ धार्मिकपणाचें अवडंबर (मांडणें, माजविणें). २ कोणी मनुष्य, प्राणी, किं० वस्तु, यांच्या संबंधानें आपल्याला वाटत असलेला फाजील आदर, महत्त्व, प्रेम, किं० पूज्यभाव; (असणें, बाळगणें, धरणें); उ० आपल्या नव्या बायकोचें गोंदोबाला मोठें देव्हारें आहे; उ० तूं ह्या मांजराचें देव्हारें बाळगूं नको (किं० माजवूं नको किं० धरूं नको). ३ एकाद्या दैवतेचें जागृत किं० जागतें स्थान; किं० त्या स्थानीं त्या देवतेचा संचार; उ० जेजुरीस जागृत देव्हारें आहे; उ० त्याच्या अंगीं देव्हारें आहे.

देश [सं०] पु० १ भूतलाचा विशिष्ट दृष्टीनें केलेला, पाडलेला, किं० मानलेला, भाग किं० विभाग. २पदार्थविशेषाचें किं० मनुष्यादि प्राणिविशे- षाचें निवासाचें स्थान. ३ कांहीं कार्याला सोयीची

अशी जागा. ४ पदार्थांचा खालचा, वरचा, किं० बाजूचा भाग; पदार्थाची बाजू किं० अंग. ५ पूर्वेस बालेघाट, दक्षिणेस कर्नाटक, पश्चिमेस सह्याद्रि, उत्तरेस गंगा, ह्यांच्या मधील हिंदुस्तानचा भाग. ६ राजकीय व्यवहारासाठीं पाडलेले जे भूभाग त्यांपैकीं सर्वांत मोठा भूभाग; याच्या खालोखाल जे भूभाग ते प्रांत, सुभा, परगणा, तालुका, जिल्हा, महाल, कसबा, पेटा, पुठा, मौजा, सम्मत, तरफ, हे होत. हे भाग भिन्न राज्यांत भिन्न नांवांनीं आणि भिन्न अनुक्रमानें गणण्यांत येतात. ७ विशिष्ट परिस्थितींत, संस्कृतींत, आचारपद्धतींत, किं० भाषादिबंधनांत, राहाणाच्या लोकांच्या निवासाचा प्रदेश; उ० महाराष्ट्र देश, गुजराथ देश, कर्णाटक देश, इ०. ꙮ **आपला देश घेणें** (किं० **देश घेणें**) १ आपल्या कामाबाहेर लक्ष्य न घालणें. २ निघून जाणें; काळें करणें. मागें 'कावळा' शब्दांत 'पांढरें कावळे' पहा. **देशाचा पाटा वरवंटा करणें** तो उद्ध्वस्त करणें. **देशीं जाणें** व्यापार, नोकरी, इ०चें ठिकाण सोडून परत आपल्या मुलखांत जाणें (कायमचें म्हणून किं० कांहीं काल). **देशकुलकरण न०** देशकुलकरण्याचा अधिकार किं० त्याचें कार्यक्षेत्र. **देसकुलकर्णी पु०** महालाचा वतनदार अधिकारी,—महालांतील खोत आणि कुलकर्णी ह्यांच्या जमाबंदींच्या पत्रकांवरून एकंदर महालाचें पत्रक तयार करणें हें ह्याचें काम असे. **देशठक पु०** मगळ्या देशास ठकविण्याचें ज्याच्या अंगीं चातुर्य आहे असा माणूस; अट्टल सोदा. **देशत्याग पु०** आपला देश सोडून परदेशांत किं० परप्रान्तात रहावयास जाणें. **देशधडीस** (किं० **देशोधडीस**) **लागणें** स्वताच्या देशांत किं० गांवांत राहणें अशक्य झाल्यामुळें परदेशांत विपन्न स्थितींत हिंडत राहणें किं० कोठें तरी राहून कसेंबसे दिवस घालविणें (लागणें, लावणें). **देशधर्म पु०** विशिष्ट देशांतील किं० प्रदेशांतील चालीरीति, रीतरिवाज, आचार, पोशाख, इ०चा समुच्चय. **देशपांड्या पु०** महालाचा एक वतनदार अधिकारी. त्याचा दर्जा देशमुखाच्या खालचा असे. देशपांड्याला 'देशकुलकरणी' असेंही म्हणत. **देशमुख पु०** १ परगण्याचा (किं० महालाचा) मुख्य वतनदार अधिकारी. २ (विनोदांत) काकंता नांवाचें सोनाराचें एक आउत. ३ हलगा हें धान्य (थट्टेंत). ४ कतल किं० ओतलें त्यांतून पाणी काढावयाचें मडकें. **देशमुखी स्त्री०** १ देशमुखाचा हुद्दा, अधिकार, किं० कार्यक्षेत्र. २ धान्यावर शेकडा तीन आणि विक्रीवर शेकडा सात असा कर. **देशलेखक पु०** देशकुलकरणी आणि देशपांड्या हे अधिकारी. **देशावर पु०**, **देशावरी स्त्री०** १ एका गांवाहून दुसऱ्या गांवीं, दुसऱ्या गांवाहून तिसऱ्या गांवीं पुराणिक, हरिदास, वैदिक, इ०चें आपल्या धंद्यावर पैसे मिळवीत हिंडणें. २ अशा रीतीनें हिंडून मिळालेलें द्रव्य. ३ परदेशची व्यापारी पेठ. ४ विकावयासाठीं आणलेला परठिकाणचा माल. ५ परदेशच्या व्यापारी मालाचे भाव किं० दर. ꙮ **देशावरास** (किं० **देशावरीं**) **जाणें** परदेशांत हिंडणें किं० प्रवास करणें. **देशावरकरी पु०** परदेशीं हिंडून आपल्या विद्येवर पैसे मिळवावयासाठीं जाणारा ब्राह्मण.

देशी [**म०** देश; **सं०** देश] **वि०** १ घाटावरचा जो प्रदेश तत्संबंधीं. २ त्याच देशचा; त्याच देशांत उत्पन्न झालेला; उ० देशी माल वापरणें हें पुण्य होय; परदेशी माल वापरणें हें पाप होय.

देशीय [**सं०** देश] **वि०** विवक्षित देशासंबंधाचा; उ० तद्देशीय, एतद्देशीय, पुण्यदेशीय, इ०.

देशिक [**सं०**] **वि०** स्थानिक. **पु०** १ उपदेशक. २ गुरु. ३ नायक. ४ वाटाड्या. ५ प्रवासी.

देस [**सं०** देश] **पु०** १ देश. २ एक राग (संगीतांत). ꙮ **देसधूळ स्त्री०** पैसा, घरदार, शेतवाडी, गुरेंढोरें, इ०च्या नाशामुळें प्राप्त झालेली विपन्नावस्था.

देसक [**सं०** देश] **पु०** वतनदार अधिकारी; देशमुख. ꙮ **देसकत न०**, **देसकी स्त्री०** देसकाचा अधिकार किं० कार्यक्षेत्र.

देसवट, देसाळ, देसोळी वि० घाटावरील (माणसें, वस्तु, पशु, इ०). **देसवटा पु०** १ देशोदेशीं हिंडणें. २ स्थान, जागा.

देसाई (–**य**) **पु०** परगण्याचा मुख्य वतनदार अधिकारी; देशमुख.

देसुरी वि० सह्याद्रीच्या पूर्वेकडील प्रांतांतील,—मनुष्य, पशु, बोलण्याची ढब, शब्द, इ०.

देह [**सं०**] **पु०** शरीर. ꙮ **देहान्तर न०**

अन्य जन्म. **देहात्मवाद** पु० शरीर हाच आत्मा असें मत; चार्वाकमत. **देहावरण** न० चिलखत. **देहेश्वर** पु० जीवात्मा. **देहगत** वि० मूर्तिमंत. **देहत्याग** पु० मरणाची इच्छा करून देहाचा नाश करून घेणें. **देहदण्ड** पु० देहशोषणार्थ तीर्थयात्रा, प्रायश्चित्त, इ० चा अवलंब किं० तेणें-करून देहास केलेलें दंडन. **देहधर्म** पु० आहार, निद्रा, इ० जे देहाचे व्यापार ते व्यक्तिशः किं० समुच्चयानें. **देहधर्माचें करणें** मलविसर्जन करणें. **देहधारी** वि० देह धारण केला आहे ज्याणें असा; मूर्तिमंत. **देहधारण** न० राहाणें; जगणें. **देहपात** पु० मेल्यामुळें जें देहाचें पतन तें. **देहबद्ध** वि० मूर्तिमंत. **देहंभरि** वि० पोटभरू. **देहभृत्,देहवत्** पु० १ प्राणी. २ जीवात्मा. **देहयात्रा** स्त्री० १ मरण. २ भोजन. **देहभान** न० १ कर्तव्य, अकर्तव्य, इ० चा विवेक करणारी बुद्धि; उ० तूं देहभानावर आहेस काय ? उ० ह्याला राग आला म्हणजे ह्याचें देहभान नष्ट होतें. २ शुद्धि; बेशुद्धीचा निरास; उ० ती स्त्री अझून देहभानावर चागलीशी आली नाहीं. **देही** वि० मूर्तिमंत. पु० १ मनुष्य. २ कोणीही प्राणी. **देह उगाळणें** नोकरी, शुश्रूषा , इ० मध्यें देहकष्ट सोसणें किं० शरीर झिजविणें. **देहं कारणीं लावणें** सत्कार्यांत देहकष्ट सोसणें. **मी तुझ्या कारणीं आजपर्यंत हा देह लाविला** मीं इतके दिवस तुझ्यासाठीं कष्ट सोशिले. **देह टाकणें** (किं० **ठेवणें** किं० **सोडणें**) मरणें. **देही असून विदेही** लोकांना संसारांत मग्न असा दिसतो पण खरोखरीं जो संसारांत अगदीं अनासक्त तो. **विदेही** वि० सांसारिक बंधनांपासून अलिप्त. **देहत्रय** न० स्थूलदेह, लिंगदेह, आणि कारणदेह, हे तीन समुच्चयानें. **देहद्वय** न० स्थूलदेह आणि लिंगदेह (किं०सूक्ष्मदेह) ही जोडी. **देहावर असणें** १ शुद्धीवर असणें. २ आपण काय करीत आहों किं० जें करीत आहों तें योग्य आहे किं०अयोग्य आहे हें जाणत असणें किं० हें जाणून वागत असणें. **कोणेक देहावर नसणें** प्रकृत विषयाकडे त्याचें लक्ष्य नसणें. **देहावर येणें** १ शुद्धीवर येणें. २ निंद्य वर्तनक्रम सोडून पुन्हां सद्वर्तनाचा क्रम किं० सरणी स्वीकारणें. **देहशुद्धि** स्त्री० १ स्नान. २ प्रायश्चित्तविधि. **देहान्त प्रायश्चित्त** न० ज्या प्रायश्चित्तविधींत शेवटीं मरण प्राप्त होतें असें प्रायश्चित्त. **देहान्तशिक्षा** स्त्री० ठार मारण्याची शिक्षा.

देह [फा०] पु० गांव ' देहहाय, ' ' देहेहाय, ' ' देहाय ' हीं ' देह ' ह्यांचीं अ० व० रूपें.हे शब्द दफ्तरीं भाषेंत येत असत.॥ **देहेवार** क्रि० वि० प्रत्येक देहाचा म्ह० गांवाचा निर्देश करून.

देहली [सं०]स्त्री० उंबरठा;उंबरा.॥ **देहलीदीप** पु० उंबऱ्यावर ठेविलेला दिवा,-जो उंबऱ्याच्या दोहों बाजूंस प्रकाश पाडतो. **देहलीदीपन्याय** पु० एका गोष्टीनें दोन कामें साधणें.

देहुडा वि० १ वाकडा.२ एक पाऊल जमीनीवर साफ टेकून दुसऱ्या पायाचा चवडा त्या पावलावर टेकला असतां हा वाकडा झालेला दुसरा (पाय). मुरली वाजविणारी कृष्णाची मूर्ति अशा संस्थानांत असते.

देहुडी स्त्री० मागें ' देवडी ' पहा.

दैत्य [सं०] पु० दितिपुत्र (देवांचे प्रतिपक्षी). ॥**दैत्यारि** पु० १ देव. २ विष्णु. **दैत्यगुरु** पु० शुक्राचार्य. **दैत्ययुग** न० मनुष्याचीं चार युगें.

दैन, दैनंदिन, दैनिक [सं०] वि० रोजचें. **दैनिक** न० रोज छापलें जाणारें (वर्तमानपत्र). ॥ **दैनिकी** स्त्री० रोजमुरा.

दैना [सं० दैन्य] स्त्री० १ दुर्दशा; विपन्न स्थिति. २ जरूर अशा अन्नवस्त्रादिकांची कोणेकाला जाचक होते ती उणीव किं० कमतरता.

दैन्य [सं०] न० १ गरीबी. २ विपत्ति; हाल; अपेष्टा. ३ हीनदीनपणाची कोणेकाची होते ती स्थिति.

दैर्घ्य [सं०] न० दीर्घपणा; लांबी,लांबटपणा.

दैव [सं०] न० १ प्राण्यांस सुखदुःखादि होण्याविषयीं नियामक जो प्राचीनकर्मानुसार ईश्वरी संकल्प तो. २ अमुक गोष्ट अमुक प्रकारें घडली ती तशी घडण्याचें कारण आपणास समजत नसलें म्हणजे तें कारण ज्या कल्पित शक्तीवर आरोपिलें जातें ती शक्ति. ३ प्रारब्ध; नशीब. ४ एका जातीच्या लोकांचा समुदाय किं० एका जातीचे लोक समुच्चयानें. ॥ **एकाद्याचें दैव उघडणें** (किं० **उपटणें** किं० **खुलणें**) तो वैभ

दाम चढूं लागणें. **दैव काढणें** (किं० **दैवास चढणें**) वैभवशाली होणें. **दैवानें उपट खाणें** अनुकूल परिस्थिति उत्पन्न होणें. **दैवानें ओढ घेणें** (किं० **दैव ओढवणें**) कांहीं अनिष्ट भोग प्राप्त होणें. **दैवानें धाव घेणें** (किं० **करणें**) कांहीं सुखभोग किं० दुःखभोग प्राप्त होणें. **दैवास येणें** १ सुख प्राप्त होणें; वैभवकाळ प्राप्त होणें. २ पूर्व कर्मानुसार कांहीं गोष्ट घडणें. **दैवास रडणें** आपल्यावर आलेल्या अनिष्टाबद्दल चरफडणें. **धड कांट्यावर घालून दैवास रडणें** आपण जाणून बुजून कांहीं वाईट गोष्ट करणें आणि तिचें वाईट फळ आलें म्हणजे दैवाला शिव्या देणें (हा मूर्खपणा होय). **दैवांतून उतरणें** दुःस्थिति पावणें. **दैवानें उचल करणें, दैवानें यारी देणें, दैवानें हात देणें** दैव अनुकूल होणें. **दैवानें माघार खाणें, दैवानें मागें घेणें** (किं० **पाहणें, सरणें**, किं० **हटणें**) दैव एकदम प्रतिकूल होणें. **दैवावर हवाला देणें** दैव काय करील तें करो असें म्हणून येईल त्या भोगास सिद्ध होऊन राहणें. **दैवोपहत** वि० दुर्दैवी (माणूस). **दैवज्ञ** पु० ज्योतिषी. **दैवतः** क्रि० वि० प्रारब्धानें. **दैवपर** वि० दैववादी. **दैवयोग** पु० १ आकस्मिक योग. २ संभव. **दैवलेखक** पु० ज्योतिषी. **दैववाणी** स्त्री० १ आकाशवाणी. २ संस्कृत भाषा. **दैवगति** (–त) पूर्वकर्मानुसार भोगाचें फल किं० परिणति. **दैवदशा** स्त्री० दैव; नशीब. **दैवप्रश्न** पु० १ ज्योतिष. २ शुभाशुभसूचक आकाशवाणी. **दैवयोगानें, दैवयोगें करून** क्रि० वि० १ यदृच्छेनें. २ दैवांत होतें त्याप्रमाणें. **दैवरेषा** स्त्री० दैवाचें लिखित,– जें प्रत्येक माणसाच्या कपाळावर लिहिलेलें असतें तें. **दैववशात्** क्रि० वि० दैवानुसारें. **दैववाद** पु० आपणाला प्राप्त होतें जें इष्ट किं० अनिष्ट तें आपल्या पूर्वकर्मानेंच प्राप्त होतें असें मत. याच्या उलट ' यत्नवाद ' किं० ' प्रयत्नवाद. ' **दैववान** वि० सुदैवी. **दैवाचा खेळ** पु० दैवानुसार घडलेली गोष्ट (चांगली किं० वाईट). **दैवाचा पुतळा** पु० वैभवशाली मनुष्य. **दैवाचा भोपळा** पु० दुर्दैवी माणूस. **दैवाची कहाणी** स्त्री० कोणा माणसाची दुर्दैवाची किं० विपत्तीची हकीगत. **दैवाचे लाळे** पु० अ० व० कोणेकाच्या दैवानें त्याला प्राप्त झालेले सुखदुःखादिकांचे भोग. **दैवाधीन** वि० आपल्या इच्छेवर किं० प्रयत्नावर अवलंबून नसलेलें. **दैनिक** वि० ईश्वरानें मनुष्यावर धाडलेलें संकट (रोग, टोळधाड, इ०). **दैविक** न० नशीब; दैव. **दैवी सृष्टि** स्त्री० ब्रह्मदेवानें केलेली सृष्टि. याच्या उलट ' विश्वामित्रानें केलेली सृष्टि. '

दैवत [सं०] न० १ देव. २ अत्यन्त प्रिय वस्तु.

दैवर [म० दहिवर] न० हवेंतील जलांश,– पदार्थांच्या पृष्ठभागावर जलबिंदूंच्या रूपानें बसलेला.

दैवरणें [म० दहिवर, दैवर] अ० क्रि० दहिवराच्या बिंदूंनीं व्याप्त होणें किं० भिजणें.

दैवी [सं०] स्त्री० आजारावर केलेले धार्मिक उपाय मंत्र, अंगारा, इ०. ॐ **दैवी संपत्ति** स्त्री० श्रीमद्भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायांत सांगितलेले जे अभय, शुद्ध सात्त्विक वृत्ति, ज्ञानयोगव्यवस्थिति, इ० गुण त्यांचा समुच्चय.

दैशिक [सं०] वि० १ स्थानिक. २ राष्ट्रीय. पु० १ उपदेशक. २ मार्गदर्शक.

दैष्टिक [सं०] वि० दैवलिखित. पु० दैववादी.

दैहिक [सं०] वि० देहासंबंधाचें. पु० जीवात्मा.

दोकडा पु० १ तांब्याचें एक नाणें,–अर्धा पैसा इतक्या किमतीचें; दुगाणी. २ (मोत्यांच्या व्यवहारांत) एका चवाचा शंभरावा भाग. ३ (व्याजाच्या आकारणींत) कच्चयाचा शंभरावा भाग.

दोगला वि० मिश्रधर्मांचा किं० जातीचा.

दोग्धा [सं० दोग्धृ] पु० १ दूध काढणारा. २ गायीचें वासरूं. ३ वेतन घेऊन काव्य करणारा. ४ स्वार्थास्तव झटणारा. ॐ **दोग्ध्री** स्त्री० १ दुभती गाय. २ दाई.

दोघे [म० दोन] वि० दोन पुरुष; दोन प्राणी. स्त्री० दोघी. दोन स्त्रिया; दोन स्त्री प्राणी.

दोड [कानडी: दोड्ड=मोठा] वि० द्वाड; खोडकर; व्रात्य.

दोडका पु० १ साळींतील एक जाति. २ एक भाजीच्या उपयोगाचें फळ.

दोडकी स्त्री० दोडक्याची वेल. हिच्या फळाला ' दोडका ' म्हणतात.

दोडा पु० १ रुई किं० मांदार या झाडांचें फळ. २ कोंवळा पेरू किं० कोंवळें बोर. ३ कापशीचें फळ किं० बोंड.

दोड्डाचार्य पु० मागें ' दुड्डाचार्य ' पहा.

दोण, दोणी, डोणी [सं० द्रोण] स्त्री० १ दगड कोरून किं० दगड आणि चुना यांची रचाई करून जें पात्र करतात तें,--गुरांना पाणी पाजण्याच्या सोयीचें.२पोट (उपहासांत). क्रि०भरणें, ठासणें, इ०.ह्या अर्थी 'दोणा' हाही शब्द आहे.

दोणगें [म० दोण] न० लांकडाचें पाणी इ० साठविण्याचें पात्र.

दोतकी, दोतूक वि० अस्ताई आणि अंतरा आहे पण आभोग नाहीं ज्याला असें (ध्रुपद).

दोंद [सं० तुंद=पोट] न० सुटलेलें पोट; काळजीकांटा ज्याला कांहीं नाहीं आणि ज्याला यथेच्छ खावयाला आणि प्यावयाला मिळतें त्याचें सुटलेलें किं० भिलथिलीत झालेलें पोट. ֍ **आईजीचे दोंदावर बाईजी उदार** किं० **सासूच्या जिवावर जांवई उदार** दुसऱ्याच्या पैशाच्या जोरावर कोणीही मनुष्य औदार्य दाखवूं शकतो. **एकाद्याचें दोंद वाढणें** (निंदेंत) त्याचे प्रस्थ वाढणें; त्याला मिजास येणें. **एकाद्याचें दोंदावर दोंद येणें** त्याचेवर पैशाचा पूर लोटत असणें. **दोंदीलमामा दोंदाळ, दोंदी, दोंदील, दोंद्या,** पु० (थट्टेंत) ढेरपोट्या.

दोन [सं० द्वि; फा० दो] वि० एकांत एक मिळवून होतो तितका. **टीप,**–या शब्दाला किं० याच्या पुढील नामांना विभक्तीप्रत्यय लागतांना दोहों, दोघां,अशीं ह्यांचीं रूपें होतात. ֍ **दोनतोंड्या, दोनबारी, दोनदोल्या, दोनमाऱ्या, दुतोंड्या** पु० जो एकदा एक बोलतो आणि नंतर त्याच्या उलट बोलतो तो. **कोणेकाचे दोन हाताचे चार हात होणें** १ त्याचें लग्न होणें. २ त्याला दुसऱ्याची मदत मिळणें. **दोन दिवस** पु०अ०व० थोडे दिवस; अल्पकाळ. **दोन दिवस सासूचे दोन दिवस सुनेचे** मागें ' दिवस ' शब्दांत' चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे,' ही म्हण पहा. **दोन दिवसांचा** अल्पकाल टिकणारा; टिकाऊ नव्हे असा; सद्योदितचा नव्हे तो. **दोन प्रहर** पु० अ० व० मध्यान्ह समय. **दोन्हीसांज** क्रि० वि० सकाळीं आणि संध्याकाळीं अशा दोन्ही वेळीं. **दोहो जिवांचा निवाडा** पु० बाल आणि बाळंतीण ह्या दोघांची सुस्थिति किं० खुशाली. **दोहों जिवांची** स्त्री०, किं० **दोन्ही जिवांचें माणूस** न० १ मुलासहित प्रसूत स्त्री. २ गरोदर स्त्री. **दोहो टक्यानें धड** वि०मजबूत;धडधाकट;कणखर (माणूस).**दोहोत्रा** पु०दरमहा दरशेकडा दोन रुपये हा व्याजाचा दर.**दोहो दरडीवर हात देणारा** पु० १ स्वार्थ साधण्यासाठीं वेळ पडल्यास मतें किं० पक्ष बदलणारा. २ एकदम दोन आधारांवर अवलंबून असणारा. ३ अनिश्चित विचारांचा माणूस. ४ धरसोड करणारा माणूस. **दोहो बापांचा** वि० व्यभिचारिणीचा मुलगा.**दोहो मांडवांचा वऱ्हाडी** पु० १ ह्याच्या त्या प्रसंगांत किं० पक्षांत पुढाकार घेणारा (निंदेंत किं० स्तुतींत). २ नवरा मुलगा आणि नवरी मुलगी ह्या दोहों बाजूंकडून जो लग्नांत पुढाकार घेऊं शकतो किं० दोन्ही पक्षाशीं स्नेहादिसंबंधानें जो जुळलेला आहे तो. **दोहोंघरचा पाहुणा उपाशी** दोन अधारांवर अवलंबून राहाणारा मनुष्य फशीं पडतो; दोन्ही पक्षांशीं सलोखा ठेवणाऱ्या माणसावर एकाही पक्षाचा भरंवसा नसतो आणि अंतीं त्याची फसगत होते.

दोभ [सं० दोध=दूध काढणें; वांसरूं] पु० गाय, म्हैस, इ०चें आंचोळ.

दोमदोम उ० वा० अ० पीराच्या नांवानें भिक्षा मागतांना मुसलमान फकीर उच्चारतात तो शब्द.֍**दोमदोम करीत फिरणें**(किं० **हिंडणें**) भीक मागत जाणें किं० हिंडणें.

दोर [सं० दोर; दोरक] पु० १ सुंभ, अंबाडी,इ० ची साल, घायपात, इ०चे तंतु एकत्र वळून करतात तें चऱ्हाट. २ गव्यामध्यें किं०नासलेल्या दहीं, दूध, इ०मध्यें जी तार उत्पन्न होते ती. ֍ **दोरखंड** [म० १ जाडी दोरी. २ दोरीचा तुकडा. ३केळीच्या कालाचे तंतु. **दोरखंडें** न० अ० व० गलबताचे दोर.

दोरक [सं०] पु० १ शिवण्याच्या उपयोगाचा धागा किं० तंतु. २ दोरी.

दोरकस [म० दोर] पु० १ जाडी दोरी

वरात. २अनेक दोऱ्या वळून केलेलें जाडी चऱ्हाट. ३ दोराचें वेटोळें.

दोरडें [म० दोर] न० जाडी दोर.

दोरणी [म० दोर] स्त्री० दोरी; दोर.

दोरवा पु० १ एक प्रकारचें वस्त्र. २ खडक, शिळा, इ० मध्यें असतो तो दोरा म्ह० दोन भागांचा संधि.

दोरा [सं० दोर] १ शिवणें इ० च्या उपयोगाचें सूत. २ दगडाच्या एकत्र चिकटलेल्या दोन भागांची संधिरेषा. ३ विहिरींत पाणी आणणारे झरे प्रत्येक; उ० ह्या विहिरीला तळ्याचे दोरे आहेत. ४ तांदुळाचा दाणा, मोतीं, दगड, इ० चे दोन खंड होण्याचा संभव दिसतो तेंथील रेषा. ५ संबंध; अनुबंध; नातें; अनेक कुटुंबांत नात्याला नातें जुळून जो लांबचा संबंध असतो तो. ६ वशीला लावण्याचें साधन किं० द्वार; उ० दरबारांत आमचा कांहीं दोरा होता म्हणून जातांच पाय शिरकला. ७ वृषणाच्या मध्यावरून शिश्नाच्या अग्रापर्यंत जी सूत्राकार रेषा दिसते ती. ८ नारू इ० चा तंतु. ९ शरीरावर कीड चरत चालली असतां तिचा जो मार्ग रंगाच्या भिन्नत्वामुळें लक्षित होतो तो. १० स्त्रियांचें एक करभूषण. ❀ **दोराळ** वि० ज्यांत रेषा किं० तंतु फार आहेत असा. **सुई मागें दोरा**, किं० **जिकडे सुई तिकडे दोरा** १ सहकार्य करणाऱ्या दोन माणसांपैकीं जिकडे एक तिकडे दुसरा जाणारच. २ पत्नीच्या पाठीमागें पति असावयाचाच.

दोरावणें [म० दोरा] अ० क्रि० १ तंतु, रेषा, उभे हीर, इ० नीं व्यापलेला किं० भरलेला असणें (दगड, लाकूड, इ०). २ आंबलेल्या पदार्थाला तार सुटलेली असणें; उ० ही मटक्यांची उसळ दोरावली आहे, ती आंबोणांत घाल. ३ (पोट, तिखट, इ०) जाळ्यांनीं व्याप्त होणें.

दोरी [म० दोर] स्त्री० १ वळलेलें अनेक पदरी सूत. २ कापूस इ०चे लांब तंतु एकत्र वळून केलेला दोर. ३ जमीनमापणीचें एक परिमाण,– वीस काठ्या. ४ एक खाऱ्या पाण्यांतील मत्स्य. ❀ **दोरी सैल (किं० ढिली) करणें (किं० सोडणें)** १ मोकळें सोडणें. २ स्वच्छंदानें वागूं देणें. ३ नियंत्रणा काढून टाकणें. **दोरीसूत** क्रि० वि० अगदीं सरळ रेषेत; मध्यें वळणें न घेतां; उ० हा रस्ता येथून दोरीसूत चिंचवडास जातो. न० निमूटपणें सांगितलें तें करणारा.

दोर्दण्ड [सं० दोस्=हात+दण्ड=काठी] पु० लांब काठीसारखा हात; मजबूत आणि लठ्ठ बाहु.

दोला [सं०मध्यें स्त्री०]मराठींत पु० १झोपाळा २पाळणा. ३ नागपंचमीच्या सणांत झाडाच्या फांदीला दोऱ्या लोंबत सोडून झोका घावयाला करतात तें साधन. ❀ **दोलायंत्र** न० तेलें ■ काढण्याचें वैद्य लोकांचें साधनविशेष.

दोलायमान [सं०] वि० १ झोके खात असलेला; हेलकावत असलेला. २ हें करूं कीं तें करूं अशा संदिग्ध स्थितींत असलेलें (मन, चित्त).

दोष [सं०] पु० १ असावें तसें नसणें; न्यून; कमीपणा; असावें त्याहून अधिक किं०कमी. २व्यंग. ३ चूक; अपराध; गुन्हा. ४ (वैद्यकांत) कफ, वात, पित्त, हे शरीरांत असावे त्या प्रमाणांत नसणें; म्ह०त्यांचा बिघाड. ५ (**साहित्य**) उद्दिष्ट अर्थाच्या प्रतीतीस ज्याच्या योगानें बाध किं० कमीपणा येतो त्याला दोष म्हणतात. हे दोष अनेक प्रकारचे असतात; शब्ददोष, अर्थदोष; रसदोष. ❀ **दोषैकदृष्टि** स्त्री०केवळ दोष काढण्याकडे जी प्रवृत्ति ती. वि० केवळ दोषच काढण्याकडे प्रवृत्ति ज्याची असा (स्वभाव, मनुष्य). **कोणाला दोष देणें** त्याच्यावर कांहीं टपका ठेवणें. **दोष काढणें** कमीपणा दाखवून देणें. **दोषानुवाद** पु० दुसऱ्याच्या दोषांचें प्रकटीकरण किं० उच्चारण. **दोषारोप** पु० दुसऱ्यावर दोष लादणें किं० ठेवणें.

दोषणें [सं० दुष=निंदणें, स्त्री भ्रष्ट करणें] सं० क्रि० १ निंदिणें. २ (स्त्री) भ्रष्ट करणें.

दोषा [सं०] स्त्री० १ रात्र. २ बाहु. क्रि० वि० रात्रा. ❀ **दोषाकर** पु० चंद्र.

दोषी [सं० दोष; म० दोष] वि० १ ज्यानें दोष केला आहे असा. २ ज्याच्याकडे दोष येत आहे असा. ३ पापी. ४ गुन्हेगार; अपराधी.

दोस्त [फा०] पु० १ सोबती; जोडीदार. २ मित्र. २ आपुकमापुक परस्परांचे. ❀ **दोस्त**

क

ला

दार पु० जोडीदार; सोबती. दोस्तदारी, दोस्ताई स्त्री० मैत्री; संघटन; सलगी. दोस्ती स्त्री० १ मैत्री. २ एकत्रितपणा; साहचर्य; सहवास. ३ आपुकमापुक ह्या रूपाची मैत्री.

दोह [सं०] पु० १ दूध काढणें. २ काढलेलें दूध. ३ दोहनाचें पात्र.

दोह पु०, दोहन न० [सं०] दूध काढणें.

दोहणें [सं० दुह्] स० क्रि० १ (गाय, म्हैस, इ० चें) दूध काढणें; उ० गाय दोहून मी वासराला पाजायाला सोडली. २ गाय, म्हैस, इ० चें (दूध) काढणें; उ० मी कपिलेचें आज तीन शेर दूध दोहिलें. टीप,—'दोहणें' ह्या क्रियेचें कर्म गाय, म्हैस, इ० होतात किं० दूध हेंही होतें.

दोहद[सं०]पु०,न०१गरोदरपणांत स्त्रीस होते ती कांहीं विशिष्ट पदार्थ खाण्यापिण्याची इच्छा; डोहाळा.२ उत्कट इच्छा.३गर्भारपण ४गर्भारपणाचें लक्षण. ꙮ दोहदलक्षण १न०गर्भधारण.२अवस्थांतर होण्याचें चिन्ह. दोहदवती स्त्री०गर्भिणी स्त्री.

दोहन [सं०] न० दूध काढणें.

दोहरा, दोहोरा [हिं० दुहा] पु० हिंदुस्थानी भाषेंतील दोन ओळींचें एक मात्रावृत्तविशेष. मराठांत ' दोहा ' असेंही रूप प्रचलित आहे. मोरोपंतांनीं ह्या वृत्तांत दोन रामायणें आहेत.

दौड [हिं०] स्त्री० १ धावण्याची क्रिया; धावणें (मारणें). २ शिपायांचें कूच करणें. ꙮ दौडचाल स्त्री० घोड्याची एक जलदीची चाल.

दौडणें [हिं० दौड़ना] अ० क्रि० धावणें. ꙮ दौडादौडी स्त्री० धावाधाव; पळापळी; उ० पेंढाऱ्यांची टोळी येत आहे अशी अवई येतांच गांवकऱ्यांची दौडादौडी सुरू झाली.

दौंडी, दौणशीर, इ० मागें ' दवंडी, ' दवणशीर, ' इ० पहा.

दौत [अ० दवात्] स्त्री० लिहितांना शाई ज्या लहानशा पात्रांत ठेवतात तें पात्र. टीप,—'दऊत' ' दवत, ' हीं ह्या शब्दाचीं अन्य रूपें.ꙮदौतीचा पाणा घालणें लिहिण्याचें काम संपलेलें असून दौतींतच लेखणी उभी घालून ठेवणें (तेल्याच्या घाण्यांतील मुसळाप्रमाणें). दौतपूजा स्त्री० १ व्यापारी लोक महाकाळीची पूजा दौत ह्या रूपांत दिवाळीच्या सणांत करतात ती.२ भाडेकऱ्याकडून अत्यल्प भाड्याचा ठराव करून घेतलेलें भाडें.

दौत्य [सं०] न० १ निरोप. २ दूताचें काम. ३ शिष्टाई.

दौरात्म्य [सं०] न० १ दुष्टपणा. २ अपकार करण्याकडे प्रवृत्ति.

दौर्बल्य [सं०] न० दुर्बलपणा.

दौर्भाग्य [सं०] न० दुर्भाग्य; दुर्दैव.

दौर्मनस्य [सं०] न० १ खेद; विषाद.२दुष्टपणा. ३ शत्रुत्व; वैर. ४ दोन माणसांत कांहीं कारणानें एकमेकांविषयीं उत्पन्न होतो ती अढी किं० अप्रीति किं० साशंक वृत्ति.

दौर्मंत्र्य [सं०] न० वाईट सल्ला मसलत; उ० दौर्मंत्र्यानें राजा राज्याला मुकतो.

दौर्लभ्य [सं०] न० दुर्मिळता.

दौलत [अ०] स्त्री० १ संपत्ति. २ वैभव. ३कोणेकानें कांहीं मूल्यवान् म्हणून गणिलेली वस्तु (बहुधा निंदेंत प्रयोग). ꙮ दौलतीचा खांब पु० ज्याच्या भाग्यानें कुटुंबांतील माणसांस किं० आश्रितांस सुखविलास भोगावयास सांपडतात असा पुरुष; कुटुंबांतील मुख्य मिळविता माणूस. राजाच्या मंत्र्यांना ' दौलतीचे खांब ' (अरबी 'अर्‌काने दौलत') असें म्हणण्याचा परिपाठ असे. दौलतज्यादा[अ० दौलत (संपत्ति)+जियादाह् (अधिक)]स्त्री० उत्कर्ष पावणारी संपत्ति किं० बडेजाव.' उ० वा० अ० राजेसाहेबांची भरभराट होवो ! राजाच्या दरबारीं भालदार हा उद्गार काढतात. त्याची दौलतज्यादा झाली तो वैभवास किं० मानमान्यतेस चढला; दरबार इ० कांत तो प्रतिष्ठा पावला.

दौलतदार, दौलतवान वि० १ श्रीमंत. २ वैभवशाली.

दौहित्र [सं०] पु० दुहितेचा म्ह० आपल्या मुलीचा मुलगा. ꙮ दौहित्रप्रतिपदा स्त्री० आश्विन महिन्याची शुक्लपक्षांतील प्रतिपदा. ज्याचा बाप जिवंत आहे आणि ज्याच्या आईचा बाप मेलेला आहे,त्याणें त्या आज्याचें करावयाचें श्राद्ध. ह्या श्राद्धाला ' दौहित्रश्राद्ध ' असें म्हणतात.

द्युति [सं] स्त्री० १ तेज, प्रकाश.२ किरण. ३ सौंदर्य. ४ वैभव, उत्कर्ष.

द्यूत [सं०] न० जुगार. ⊛ **द्यूतकार** पु० जुगाऱ्या. **द्यूतपूर्णिमा** स्त्री० कोजागिरी पौर्णिमा; आश्विन महिन्याची पौर्णिमा. **द्यूतसभा** स्त्री० जुगारी लोकांचा अड्डा.

द्योतक [सं०] वि० १ प्रकाशक. २ सूचविणारा; दाखविणारा; सिद्ध करणारा; बोधक. ३ तेजस्वी. न० पुरावा; उ० तुझी परीक्षा उतरली नाहीं हें कशाचें द्योतक आहे ?

द्योतणें [सं० द्युत=प्रकाशणें] अ० क्रि० प्रकाशणें; चमकणें; झळकणें.

द्योतन [सं०] न० १ प्रकाशणें. २ उजेड. ३ आरास करणें. पु० १ दिवा. २कठिण विषयाचें स्पष्टीकरण.

द्योतित [सं०] वि० १ प्रकाशित. २ स्पष्ट केलेला (ग्रंथ, वाक्य, इ०).

द्रढिमा [सं० द्रढिमन्=दृढपणा] पु० १ दृढपणा; टणकपणा. २ जडपणा. ३ समर्थन.

द्रम्म [सं०] पु० १ एक वजन. २ चार आणे किंमतीचें एक प्राचीन काळचें नाणें.

द्रव [सं०] वि० १ ओला. २ पातळ. ३ मऊ. पु० १ पाझरणें. २ पळ; माघार; पलायन. ३ वितळणें. ४ पातळ पदार्थ. ५ पदार्थाच्या अंगचा रस. ६ दयेनें अंत:करणांत होते ती कालवाकालव; दुसऱ्याची दयार्द्र स्थिति पाहून अंत:करणांत उत्पन्न होतो तो कळवळा; उ० महामारीनें त्या अंधळ्याची बायको आणि दोन मुलगे मेलेले पाहून माझ्या अंत:करणाला द्रव आला.

द्रवणें [सं० द्रु=पाझरणें] अ० क्रि० १ पाझरणें; द्रवरूपानें बाहेर पडणें. २ वितळणें. ३ परदु:खानें अंत:करण कळवळणें.

द्रविड [सं०] पु० १ एक देश. २ त्या देशचा इसम. ३ ब्राम्हणांतील एक भेद. ⊛**द्रविडो लुडबुडास्यहम्** [सं० मी द्रविड लुडबुडत आहें] पदार्थाला किं० माणसाला कायमचा आधार किं० आश्रय न मिळाल्याकारणानें त्याची इकडून तिकडे आणि तिकडून इकडे होते ती उचलबांगडी; मधल्यामध्यें हेलपाटे.आमचें मराठी'भाषेचे वाक्प्रचार, म्हणी,इ० ' हें पुस्तक ले० १७२६ पहा.

द्रव्य [सं०] न० १ वस्तु, पदार्थ. २ मूलतत्त्व; पृथ्वी, जल, तेज, वायु, आकाश, काळ, दिशा, आत्मा, आणि मन, हीं नऊ प्रत्येक. ३ योग्य वस्तु; असावी तशी वस्तु. ४ संपत्ति,– रत्नें, पशु, जमीन, वस्त्र, दासदासी, आणि सोनें. ५ औषधांत घालावयाचे पदार्थ प्रत्येक; औषधाचा घटक पदार्थ प्रत्येक. ६ कोणत्याही बनवावयाच्या वस्तूंत, कार्यांत, किं० क्रियेंत, जरूर जे पदार्थ ते प्रत्येक. ७ (व्याकरण आणि साहित्य) ज्या वस्तु किं० व्यक्ति एकएकच आहेत, किं० एकएकच आहेत असें मानण्यांत येतें,त्या वस्तु प्रत्येक; ज्या वस्तूंचे वर्ग बांधतां येत नाहींत त्या वस्तु प्रत्येक; उ० शिवाजीमहाराज, लंका, देव, सूर्य, इ०.ह्याच्या उलट सामान्य नाम (व्याकरणकारांचा शब्द). ⊛ **द्रव्यवान्** वि० श्रीमंत. **द्रव्यदृष्टि** स्त्री० केवळ द्रव्याकडे असलेली दृष्टि. वि० जो केवळ द्रव्यावरच दृष्टि ठेवतो असा (मनुष्य). **द्रव्यवाचक** वि० वैयाकरणांनीं आणि आलंकारिकांनीं चार प्रकारचे शब्द मानिले आहेत.जातिवाचक (घोडा, गाय, कागद, इ०), गुणवाचक (सुंदर, वात्रट, इ०), क्रियावाचक (बोलतो, मारतो, इ०),द्रव्यवाचक किं०संज्ञावाचक (रामदास, वाराणशी, हिमालय, इ०);ह्या चार प्रकारांस सामान्यनामें, विशेषणें, क्रियापदें, आणि विशेषनामें,हीं इतर नांवें आहेत. **द्रव्येषणा** स्त्री० १ द्रव्य मिळविण्याची इच्छा. २ द्रव्यलोभ. **द्रव्येण सर्वे वशाः** द्रव्य दिल्यानें सर्व लोक आपणांस वश करून घेतां येतात.

द्रष्टव्य [सं०] वि० १ सुंदर, देखणा. २ विचारांत घ्यावयाचा किं० घेण्याच्या योग्यतेचा ३ पाहावयाला योग्य.

द्रष्टा [सं० दृष्ट्] पु० १ पाहाणारा. २ न्यायाधीश.

द्राख स्त्री० खालीं ' द्राक्ष ' पहा.

द्रांबें, द्राभें न०,**द्रांबा**,**द्राभा** पु० भाताची पेज, पालेभाज्यांचें पाणी,–ज्यांना तिखट, मीठ, इ० लावून रुचिकर केलें आहे तें.

द्रावक [सं०] वि० १ द्रवविणारा. २ चित्ताकर्षक. ३ अंत:करणाला दयेच्या भावनेनें द्रव आणणारा; उ० हृदयद्रावक हकीगत.

द्राविड [**सं०**] **वि०** द्रविड देशाचा. **पु०** द्रविड, कर्णाट, गुर्जर, महाराष्ट्र, आणि तैलंग ब्राम्हण. ॐ **द्राविडी वि०** द्रविडांत रूढ. **द्राविडी प्राणायाम पु०** एकाद्या साध्या गोष्टीसाठीं विनाकारण केलेला किं० करावा लागणारा खटाटोप. **टीप**,–प्राणायाम करतेवेळीं उजव्या हातानें समोरून नाक न धरतां द्रविड लोक डोक्यामागून उजवा हात नेऊन त्याचीं बोटें वळवून नाक धरून प्राणायाम करतात, त्याला ' द्राविडी प्राणायाम ' म्हणतात. त्यावरून व्यवहारांत वरील अर्थ रूढ झाला.

द्राष्ट, दाष्ट वि० कठोर भाषण करून किं० क्रूरपणें दुसऱ्यांना वागवून त्यांना पीडा देणारा.

द्राक्ष [**सं०** द्राक्ष, द्राक्षा] **न०** एक मधुर फळ.**द्राक्षा**,**द्राक्षी स्त्री०**ह्या फळाची वेली.'द्राख' हें मराठी अपभ्रष्ट रूप. ॐ **द्राक्षापाक पु०** १ द्राक्षांची परिपक्व दशा. २ द्राक्षांचा कांहीं वैद्यकी क्रियेनें केलेला रांधा किं० पाक. ३ श्लोक किं० वाक्य वाचतांच किं० ऐकतांच त्याचा अर्थ समजावा किं० अंतःकरणास प्रतीत व्हावा हा जो त्याचा गुण तो किं० ह्या गुणानें विशिष्ट श्लोक इ०. **द्राक्षापाकात्मक वि०** अति स्पष्ट, उघडी, आणि मधुर (क्लेश न देणारी)काव्यादिरचना. **द्राक्षारस**, **द्राक्षासव पु०** द्राक्षाचा एक रांधा किं० दारू.

द्राक्षी [**सं०** द्राक्षा] **स्त्री०** द्राक्षाची वेली.

द्रुत [**सं०**] **वि०** १ शीघ्र. २ गळलेला. ३ भिजलेला. ४ विळतलेला. ५ पळालेला. **क्रि० वि०** लवकर, झपाट्यानें, वेगानें.

द्रुम [**सं०**] **पु०** वृक्ष.

द्रुष्ट [**सं०** दुष्ट] **वि०** दुसऱ्याचें वाईट करणारा किं० वाईट चिंतिणारा.

द्रोण [**सं०**] **पु०** १ कढी, ताक, तूप, इ०पातळ पदार्थ भोजनाचे वेळीं ठेवण्यासाठीं केळ, पळस, इ० च्या पानांना चोया टोचून करतात तें पात्रविशेष किं० तदाकार करतात तें धातूचें भांडें. २ लाकूड, दगड, इ० कोरून पाणी साठविणें, स्नान करणें,इ०साठीं करतात तो हौद किं० बारदान. ॐ **द्रोणवत वि०** द्रोण करण्याला योग्य असें (पान). **द्रोणकाक पु०** डोमकावळा. **हाताचा द्रोण होणें** कांहीं विकृतीमुळें हाताचे स्नायु ताठर होऊन बोटें उघडणें किं० मिटणें ह्या क्रिया करावयाला हात असमर्थ होणें. **हातापायांचे द्रोण होणें** कांहीं विकृतीमुळें हातपाय आखडलेल्या स्थितींत राहणें.

द्रोणी, डोणी [**सं०** द्रोणि, द्रोणी] **स्त्री०** १ कोठिंबा. २ पाणी इ० साठविण्याचें दगड, लाकूड, धातु, इ०चें बारदान.

द्रोह [**सं०**] **पु०** १ दुष्टावा; द्वेष. २ मत्सर. ३ नुकसान. ४ विश्वासघात. ५ बंड. ॐ **द्रोहचिंतन न०** दुसऱ्याचें वाईट कसें करतां येईल या संबंधाचे विचार करणें. **देशद्रोह पु०** स्वताच्या वैयक्तिक फायद्यासाठीं किं० स्वताच्या वैयक्तिक शत्रूच्या नाशासाठीं किं० केवळ गमतीखातर स्वदेशाच्या शत्रूच्या मदतीनें स्वदेशाचें नुकसान करणें. **देशद्रोही पु०** देशद्रोहाचें नीचतम पातक करणारा अधमाधम मनुष्य.

द्वंद्व [**सं०**] **न०**१दोन पदार्थ; **द्रोन** पदार्थांची जोडी. २ जोडपें; पतिपत्नींची जोडी. ३सुखदुःख, प्रेमद्वेष, इ० विरुद्धधर्मी पदार्थांची जोडी. ४ वाद, भांडण, कलह. ५ कुस्ती; द्वंद्वयुद्ध. ६ दोन किं० अधिक शब्दांचा संयोग होऊन मधल्या 'आणि'ह्या अव्ययाचा लोप होऊन त्यांचा एक शब्द होतो त्याला ' द्वंद्व 'म्हणतात; उ० आईबाप, विटीदांडू; बापलेक, रामलक्ष्मण, इ०. जेव्हां द्वंद्व समासांतील दोन शब्दांनीं दाखविलेल्या दोन वस्तु आणि तज्जातीय इतर वस्तु ह्यांचेंही ग्रहण करावयाचें असतें तेव्हां समाहार द्वंद्व हा समास होतो;उ०भाजीपाला इ०.**द्वंद्वयुद्ध न०** कुस्ती; दोन माणसांची झटापट. **द्वंद्वचर पु०** चक्रवाक पक्षी. **द्वंद्वशः क्रि० वि०** जोडीजोडीनें; दोन दोन ह्या प्रकारें. **द्वंद्वी वि०** १ परस्परविरोधी. २ भांडखोर. **द्वंद्वभिन्न न०** पतिपत्नीवियोग. **द्वंद्वदोषोत्थ पु०** वातपित्तादि द्वंद्वापासून झालेला शीतज्वर, रक्तपित्त, इ० रोग.

द्वय [**सं०**] **न०** दोन पदार्थांची जोडी; दोन पदार्थ जोडीनें; युग्म; उ० खड्गद्वय म्ह० दोन तरवारी. ॐ **द्वयवादी वि०** १ अप्रामाणिक. २ द्वैतवादी.

द्वाड [**कानडी** दोड्डु=मोठा] **वि०** खोडकर व्रात्य; उपद्रवी.

द्वादश [सं०] वि० १ बारा. २ बारावा. ❀ **द्वादश पुत्र पु० अ० व०** संपत्तीला वारस असे बारा प्रकारचे पुत्र धर्मशास्त्रांत सांगितले आहेत. औरस, क्षेत्रज, दत्त, कृत्रिम, गूढोत्पन्न, अपविद्ध, कानीन, सहोढ, क्रीत, पौनर्भव, स्वयंदत्त, आणि शौद्र. **कोणाचा कोणेकाशीं बारावा बृहस्पति असणें** किं० **कोणी कोणाच्या द्वादश स्थानीं असणें** त्याचें त्याच्याशीं वैर असणें; त्याचें त्याच्याशीं पटत नसणें. **टीप**,– जन्मराशीपासून बाराव्या राशींत बृहस्पति म्ह० गुरु असल्यास तो त्या माणसास फार दुःख देणारा असतो असें फलज्योतिषांत सांगितलेलें आहे. **द्वादशी स्त्री०** महिन्याच्या शुक्लपक्षांतील किं० कृष्णपक्षांतील बारावी तिथि.

द्वापर [सं०] **पु०, न०** कृत, त्रेता, द्वापर, आणि कलि, अशीं जीं चार युगें त्यांपैकीं तिसरें युग. **टीप**,–' द्वापार ' हें मराठींतील अपभ्रष्ट रूप.

द्वामुष्य [**सं०** द्वामुष्यायण किं० द्व्यामुष्यायण म्ह० जन्म देणाऱ्या बापाचा वारस असून दत्तक घेणाऱ्या बापाचा मुलगा. 'द्वामुष्य ' हें संस्कृताचें मराठींतील अपभ्रष्ट रूप] **पु०** १ जन्म देणाऱ्या बापाच्या संपत्तीचा वारस राहून जो मुंजीनंतर दुसऱ्या माणसाचा दत्तक पुत्र झाला आहे तो. २ व्यभिचारापासून जन्मलेला पुत्र. ३ संदिग्ध भाषण; संशयित गोष्ट; अस्पष्ट विधान; न उलगडतां येईल असें कोणेकाचें वर्तन. **वि०** संदिग्ध; संशयित; दुटप्पी. **क्रि० वि०** अस्पष्टपणें; संदिग्ध रीतीनें.

द्वामौंश, द्वामांश [सं० ' द्वामुष्यायण ' चा अपभ्रंश. वर ' द्वामुष्य ' ची व्युत्पत्ति पहा] **पु०** संशय; दुटप्पीपणा; संदिग्ध स्थिति. **क्रि० वि०** संदिग्ध रीतीनें; अस्पष्टपणें; खुलासा न करतां किं० न होतां.

द्वार [**सं०** द्वार] **न०** १ घरांत किं० कोणत्याही मर्यादित जागेंत शिरावयाची किं० तींतून बाहेर पडावयाची वाट. २ घराची किं० मर्यादित जागेची वाट बंद करावयाचें साधन; दार; दरवाजा. ३ कांहीं एका पदार्थाच्या ठायीं दुसऱ्या पदार्थाचा प्रवेश व्हावयास छिद्रादि रूप जो मार्ग तो. ४ मर्यादित जागेंत असलेल्या किं० कोंडलेल्या किं० अडकून राहिलेल्या पदार्थाला बाहेर पडावयाला मिळालेली वाट. ५ एकाद्या मंडळांत किं० संस्थेंत किं० कचेरींत आपला प्रवेश करून देणारा मनुष्य. ६ कोणत्याही शास्त्रांत किं० विषयांत प्रवेश सुलभ करून देणारा लहानसा ग्रंथ किं० कांहीं आडाखा किं० हिकमत. ७ शरीराचीं जीं मुखादि नऊ द्वारें तीं प्रत्येक; (एक तोंड, दोन कान, दोन डोळे, दोन नाकपुड्या, आणि दोन गुह्येंद्रियें). ८ कांहीं भाषण, वर्तन, इ० कांना औचित्यरूप जो अवकाश किं० संधि तो; उ० मला ही नोकरी रामभाऊंनीं मिळवून दिल्यापासून मला रड गावयाला आतां द्वार राहिलें नाहीं. ९ कांहीं कार्य घडवून आणण्याच्या कामीं साधनभूत जें कांहीं तें; उ० ज्ञानच विषयांचें ग्रहण करतां, इंद्रियें हीं ज्ञानाचीं द्वारें आहेत. ❀ **द्वारदेवता स्त्री०** १ देवालय इ० च्या दारात जयविजय, कीर्तिमुख, इ० ज्या अधिकृत देवता असतात त्या प्रत्येक. २ थोर माणसांच्यापाशीं अधिकृत जे द्वारपाल, मुत्सद्दी, इ० असतात ते प्रत्येक. **द्वारवती, द्वारावती स्त्री०** द्वारका ह्या नावाचें पुण्यक्षेत्र. **द्वारपाल पु०** श्रीमंतांच्या घराच्या दारावर जो पहारेकरी असतो तो. **द्वारपूजा स्त्री०** १ देवालयाच्या ज्या द्वाराधिदेवता असतात त्यांचें पूजन. २ कोणा समर्थास कांहीं विनंती करावयासाठीं जावयाचें असतां त्याचे पट्टेवाले, कारकून, बगलबच्चे, इ० कांस जें द्रव्यादि द्यावें लागतें तें. **द्वारशाखा स्त्री०** दाराचें किं० दरवाज्याचें एक पान, म्हणजे उजवीकडची किं० डावीकडची फळी. **द्वारा** [सं० ' द्वार ' (दार) च्या तृतीयेचें **ए० व०**] **क्रि० वि०** द्वारानें; मार्गानें; साधनानें; मार्फतीनें; मुळें.

द्वारावती [सं०] **स्त्री०** १ द्वारका नांवाचें पुण्यक्षेत्र. २ द्वारकेंतील पांढरी माती.

द्वाली [**फा०** दुवाल] **स्त्री०** कातड्याचा पट्टा. ❀ **द्वालीबंद पु०** पट्टेवाला शिपायी.

द्वाही [हिं० दूहायी] **स्त्री०** राजाच्या नांवाचा मनाई हुकूम (फिरविणें). मागें ' दुराही ' पहा. ❀ **द्वाहीदुऱ्हाही स्त्री०** परस्परांनीं परस्परांस घातलेली जी राजाची शपथ ती.

द्वि [**सं०**] **वि०** दोन. ❀ **द्व्यामुष्यायण पु०** मुंजीनंतर दिलेला दत्तक. मागें ' द्वामुष्य

पहा. द्व्याहिक पु० तिजाऱ्या ताप. **द्विगु** पु० पूर्वपद संख्यावाचक असून पुढच्या शब्दाशीं बहुधा समाहारार्थी समास होतो तो द्विगु समास; उ० पंचपाळें, पंचारती, बारभाई, इ०. **द्विगुण** वि० १ दुप्पट. २ दुवडी. **द्विघात** पु० एका संख्येला त्याच संख्येनें गुणून येतो गुणाकार; वर्ग; उ० ' पांचचा द्विघात किं० वर्ग पंचवीस. **द्विगुणाकृत** न० दोनदां नांगरलेलें शेत. **द्विज, द्विजन्मा** पु० १ ब्राम्हण, क्षत्रिय, आणि वैश्य, ह्या जातींतील कोणीही इसम. २ अंडज प्राणी (पक्षी, सर्प, इ०). ३ दांत (मुखांतील). ४ संस्कार झालेला ब्राम्हण. ५ ब्रम्हचारी. **द्विजराज** पु० १ चंद्र. २ गरुड. ३ अनंत (नाग). **द्विजातीय** पु० खेचर हा चतुष्पाद प्राणी. **द्विजिव्ह** वि० १ कपटी. २ चहाडखोर. पु० १ एकदा एक मत आणि दुसऱ्यांदा दुसरें मत प्रतिपादणारा किं० दुसरा पक्ष अवलंबिणारा. २ सर्प. **द्वितय** न० जोडी. **द्वित्व** न० १ युग्म. २ दोन. ३ द्वैत. ४ एकच अक्षर, शब्द, किं० वाक्य, ह्यांचें दोन वेळां उच्चारण किं० प्रयोग; उ० घरोंघर, देशोदेशीं, तो बोलबोलबोलतो. **द्वित्त** वि० एका व्यंजनास तेंच व्यंजन जुळून होतें तें जोडाक्षर; उ० ' हक्क ' ह्यांतील दुसरें अक्षर द्वित्त आहे. **द्विदल** पु० दोन डाळिंब्यांचें धान्य,–वाटाणा, हरभरा, पावटा, इ०. **द्विदशाक्षरमंत्र** पु०, **द्विदशाक्षरविद्या** स्त्री० ' ओं नमोभगवते वासुदेवाय ' हा मंत्र. **द्विधा** क्रि० वि० १ दोन भागांत (फोडलेलें, केलेलें, इ०). २ दोन प्रकारांनीं. ३ दोहींकडे कलणारें किं० वळणारें (मन). **द्विप** पु० हत्ती. **द्विपक्व** वि० दोन वेळां भाजलें, शिजलें, किं० शिजविलें आहे असें; उ० उकडीचा मोदक, पोहे, इ०, हीं द्विपक्व खाद्यें होत. **द्विपथ** पु० दोन रस्ते; दिठा. **द्विपद, द्विपाद** वि० दोन पायांचा (मनुष्यादि). पु० १ मनुष्य. २ पक्षी. **द्विभुज** पु० कोन. कोपरा. **द्विबिंदु** पु० विसर्ग. **द्विस्वभाव** वि० मिथुन, कन्या, धन, आणि मीन, ह्या चार राशींसंबंधाचा. **द्विशफ** वि० ज्याच्या पायाचा खूर दोन अर्धुकांच्या रूपाचा आहे असा (प्राणी,–गाय, म्हैस, बकरी, इ०). घोडा, गाढव, इ० हे प्राणी एकशफ. **द्विमात्र** वि० गुरुस्वर. **द्विरद** पु० हत्ती. **द्विरेफ** पु० भ्रमर. **द्विविध** वि० दोन प्रकारचा. **द्विहृदया** वि० गर्भिणी (स्त्री). **द्विवचन** न० (संस्कृत व्याकरणांत) दोन हा अर्थ दाखविणारें शब्दाचें रूप; उ० फलं, फले, फलानि, ह्या श्रेणींतील दुसऱ्या शब्दाचें रूप.

द्वितीय [सं०] वि० दुसरा. पु० मित्र, सहाय, जोडीदार. ꣸ **द्वितीया** स्त्री० १ शुक्लपक्षांतील किं० कृष्णपक्षांतील दुसरी तिथि. २ (व्याकरणांत) दुसरी विभक्ति; उ० मी आंबा खातों. **यमद्वितीया** स्त्री० कार्तिक शुक्लद्वितीया,–ह्या दिवशीं बहिणी आपल्या भावांना जेवावयाला बोलावून त्यांना ओवाळतात. ह्या दिवसाला 'भाऊबीज' असें व्यावहारिक नांव आहे. **द्वितीयाश्रम** पु० गृहस्थाश्रम. **द्वितीय संबंध** पु० पुरुषाचें दुसरें लग्न. **द्वितीय सवन** न० स्वराचा दुसरा प्रकार,–मंद्र याच्यावरचा आणि तार याच्या खालचा. मंद्र, मध्य, आणि तार, हीं चढत्या क्रमानें उंच होत गेलेल्या स्वरांचीं सप्तकें आहेत. मागें ' तिसरा ' मध्यें ' तिसरें सवन ' किं० ' तृतीय सवन ' पहा. **अद्वितीय** वि० उत्कृष्ट; उत्तमोत्तम.

द्विस् [सं०] अव्यय दोनदां. हा शब्द संस्कृतांतून मराठींत आलेल्या सामासिक शब्दांत येतो. ꣸ **द्विरुक्ति** स्त्री० १ दोन वेळां उच्चारण किं० कथन; पुन्हा तेंच सांगणें किं० बोलणें. २ जरूरी नसतां पुन्हा तेंच सांगणें. **द्विरुक्त** वि० १ पुन्हा सांगितलेलें. २ जरूरी नसतां पुन्हा सांगितलेलें. **द्विरागमन** न० विवाहानंतर वधूचा पतिगृहीं दुसऱ्यांदा खेपेस जाण्याचा विधि. **द्विरावृत्ति** स्त्री० कोणत्याही क्रियेचें दुसऱ्यांदा करणें; तीच क्रिया पुन्हा करणें. **द्विर्द्वादशक** न० (पत्रिकासंमेलनांत) वधूवरांच्या राशींतील कांहीं विशिष्ट अंतर.

द्वीप [सं०] न० (संस्कृतांत पु०, न०) १ सर्व बाजूंनीं पाण्यानें वेष्टिलेला भूप्रदेश; बेट; उ० सिंहलद्वीप. २ पृथ्वीचा भाग(जंबू, प्लक्ष, शाल्मलि, कुश, क्रौंच, शाक, आणि पुष्कर, हे सात प्रत्येक). ꣸ **द्वीपकल्प** न० तीन बाजूंनीं पाण्यानें वेष्टिलेला भूप्रदेश.

द्वीपी [सं० द्वीपिन्] पु० १ वाघ. २ चित्ता.

द्वेधा [सं०] क्रि० वि० १ दोन प्रकारांनीं. २दोन भागांत.

द्वेष [सं०] पु० १ वैर. २ वीट; उ० अन्नद्वेष म्ह० अन्न खाण्याकडे मन न जाणें. ३ परस्परांशीं संयोग, सहवास, किं० हितावह जुळणी होण्याच्या बाबतींत दोन पदार्थांची जी प्रतिकूलता किं० अननुरूपता ती; उ० कणकेचा आणि काकडीचा द्वेष आहे; उ० ताकभाताचा मज्याशीं द्वेष आहे. ❀ **कोणेकाचा द्वेष करणें** त्याच्याविषयीं मनांत अप्रीति किं० मत्सर करणें. **द्वेष उगविणें** सूड उगविणें; उट्टें काढणें. **मनांत द्वेष वागविणें** कोणेकाविषयींचा वैरभाव मनांत जागता ठेवणें; त्याच्याबद्दल मनांत धुमसत राहाणें.

द्वेषक, द्वेष्टा [सं०] वि० १ द्वेष करणारा. २ दुसऱ्याचें अहित चिंतिणारा.३ मत्सरी.

द्वेषणें [सं० द्विष्] स० क्रि० १ ०चा द्वेष करणें. २ ०बद्दल मनांत अप्रीति किं० किळस किं० खेतीं बाळगणें.

द्वेषी [सं० द्वेषिन्=शत्रु] पु० शत्रु; अहितचिंतक.

द्वेष्य [सं०] वि० १ द्वेषार्ह. २ अप्रिय, न आवडणारें. पु० शत्रु; वैरी.

द्वैगुणिक [सं०] पु०शेंभर टक्के व्याज घेणारा; दामदुप्पट व्याज घेणारा.

द्वैत [सं०] न० १जोडी; युग्म. २ भेदभाव. ३ जीव आणि ईश्वर(किं० परमात्मा)हे निरनिराळे आहेत असें मत. ❀ **द्वैतवाद** पु० जीव आणि परमात्मा हे वस्तुतः भिन्न आहेत असें जें मत तें. **द्वैतवादी, द्वैती** पु० द्वैतमताचा अभिमानी जो माध्वादिक तो. **द्वैतवन** न० एक अरण्यविशेष. **द्वैतभाव** पु० १ शत्रुत्व; परस्परविरोध. २ संयोगाची अननुरूपता. ३ एकाचें जें हित तें दुसऱ्याचें अहित अशी स्थिति. ४ वर 'द्वैतवाद' पहा.

द्वैध [सं०] वि० दुहेरी; [illegible] प्रकारचा. न० १ द्वैत; भेदभाव. २ विरोध. ३ संशय. ४ वैर, दुही.

द्वैविध्य [सं०] न० द्विविधपणा.

द्व्यर्थ,द्व्यर्थक [सं०] वि० १दोन अर्थांचा; दोन अर्थ ज्याचे होतात असा (शब्द, वाक्य इ०). २ दोन कामीं उपयोगी पडणारा (माणूस, पदार्थ). ❀ **द्व्यर्थी** वि० १ ज्याचे अर्थ दोन प्रकारांनीं करतां येईल असें (वाक्य, वचन, आंक, इ०). २ संदिग्ध; दुटप्पी. ३ दोन उपयोगांना येईल असा. ४ दोन उद्देश सफल करील असा.

द्व्यामुष्यायण [सं०] पु० व्रतबंधनोत्तर परगोत्रीं जो दत्तक दिला तो. मागें 'द्व्यामुष्य' पहा. वि० संदिग्ध, संशयास्पद. क्रि० वि० संदिग्धपणें; अस्पष्ट रीतीनें.

द्व्याह्निक [सं०] पु० तिजारीचा ताप. मागें 'द्वि' मध्यें पहा. वि० १ दोन दिवसांचा. २ क्षणभंगुर; अशाश्वत; उ० द्व्याह्निक सुखविलासांत तूं गढून राहिलास तर जन्माचें मातेरें करून घेशील.

द्वैवार्षिक [सं०] वि० १दोन वर्षांनीं व्हावयाचा किं० करावयाचा. २ दोन दोन वर्षांनीं [illegible]णारा.

